THE BOOK WAS DRENCHED

TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY
OU_176574
UNIVERSAL
LIBRARY

महाराष्ट्र शब्दकोश

विभाग सहावा

म – वृ

कोशमंडळांतील व बाहेरील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केलेला.

प्रकाशक—महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणें; तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर यशवंत रामकृष्ण दाते, ४८१ शनिवार, पुणें २.

मुद्रक—यशवंत रामकृष्ण दाते, महाराष्ट्र कोशमंडळाचा शारदा प्रेस, ४८१ शनिवार, पुणें २.

किंमत १० रुपये

इ. सन १९३८] पुणें [शा. शक १८५९

संपादकमंडळ

श्री. यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए. एलएल्. बी. (मुंबई)

श्री. चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.

श्री. आबा चांदोरकर.

श्री. चिंतामण शंकर दातार.

प्रमुख शाखा–साहाय्यक संस्था

विदर्भसाहित्यसंघ (वऱ्हाडी बोली); गोमंतकसाहित्यसेवकमंडळ (गोमंतकी);
वाङ्मयचर्चामंडळ (कर्नाटकी. बेळगांव); शारदोपासकमंडळ (कोंकणी.
मालवण); महाराष्ट्र शब्दकोशमंडळ (कुडाळी. पेडणें); पुणें;
भाषाशास्त्रमंडळ (व्युत्पत्ति); शारदाश्रम (महानुभावी.
यवतमाळ); हेटकरी भंडारीमंडळ (दादर);
साहित्यसेवामंडळ (कऱ्हाड); इ. इ.

संपादकीय निवेदन

इंद्रादयोपि यस्यान्तं न ययुः शब्दवारिधेः ।
प्रक्रियां तस्य कृत्स्नस्य क्षमो वक्तु नरः कथम् ॥

महाराष्ट्र शब्दकोशाचा हा सहावा विभाग आमच्या आश्रयदात्यांच्या हातीं देतांना आम्हांस फार आनंद होत आहे. पूर्वसंकल्पित पांच विभागांत सर्व मराठी शब्दांचें संकलन करणें अशक्य झाल्यानें व कोशासारख्या सर्वसंग्राहक स्वरूपाच्या संदर्भग्रंथांत काटकसर करणें अनिष्ट असल्यामुळें शब्दकोशाचे दोन विभाग अधिक करावे लागले. यामुळें पूर्वीच्या अपेक्षेपेक्षां खर्चहि वाढला. या वाढत्या खर्चाकरितां पूर्वीप्रमाणेंच पांचव्या विभागाचा स्वीकार करतांना सहाव्या विभागाकरितां आगाऊ पांच रुपये द्यावे अशी विनंति आम्हीं आमच्या भागीदार ग्राहकांस केली व ती बहुतांशीं सर्व ग्राहकांनीं आनंदानें मान्य केली. याबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. बाकीचे ग्राहकहि हा विभाग स्वीकारतांना त्यांचें मूल्य देतील अशी आमची खात्री आहे. तथापि ग्राहकसंख्येपेक्षां कांहीं ग्रंथ अधिक काढणें जरूर असल्यामुळें त्यांत कांहीं रक्कम गुंतून राहिली व आतांपर्यंतच्या अशा प्रकारच्या खंडशः प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांची ग्राहकसंख्या अल्प कां होईना तथापि कांहीं प्रमाणांत घटत जाते असा जो अनुभव आहे तो याहि ग्रंथाच्या बाबतींत आल्यामुळें या विभागाच्या छपाईच्या कामीं फार दिरंगाई झाली. तथापि आमच्या कांहीं मित्रांच्या साहाय्यामुळें आम्हांस हा विभाग आज तडीस नेतां आला. याबद्दल आम्ही त्यांचे फार अभारी आहों. आमच्या साहाय्यकांचे नामनिर्देशपूर्वक आभार संपूर्ण ग्रंथाच्या अखेरीस आम्हांस मानावयाचेच आहेत, तेव्हां आम्ही सध्यां त्यांचा नामनिर्देश करीत नाहीं.

या विभागांत **वृ** अक्षरापर्यंतचे शब्द आले आहेत. यापुढील सातव्या विभागांत पुढील **ज्ञ** पर्यंतच्या अक्षरांतील सर्व शब्द येऊन हें कार्य पूर्ण होईल.

सध्याच्या आर्थिक मंदीमुळें नवीन ग्राहक मिळणें फार कठिण झालें आहे. तथापि त्यांतूनहि आमचे प्रयत्न चालू आहेत व महाराष्ट्रांतील मराठी भाषेच्या अभिमानी अशा आमच्या ग्राहकांच्या व जनतेच्या सहानुभूतीनें हें कार्य शेवटास जाईल असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे. तरी सर्व महाराष्ट्रीय जनता आम्हांवर आजवर दाखविलेला लोभ कायम ठेवून हे कार्य आमच्या हातून पूर्ण करून घेवो व या वाङ्मययज्ञाच्या अवभृत स्नानाचा दिवस लवकर उदय पावो अशी त्या जगन्नियंत्याजवळ प्रार्थना करून हें निवेदन पुरें करतों.

यशवंत रामकृष्ण दाते

प्रस्तावना



मराठी भाषेचें व्याकरण व शब्दसिद्धि



यद्यपि बहुनाधीषे पठ पुत्र तथापि व्याकरणम् ।

विषयप्रवेशः—भाषा प्रथम उत्पन्न कशी होते व त्यानंतर तिची अनेक अंगांनीं वाढ कशी होते, तिच्या स्वरूपांत कालांतरामुळें व स्थलांतरामुळें फरक कसकसे पडत जातात, असे फरक पडत असले तरी तिच्या विशिष्ट रूपास स्थिरता प्राप्त होण्याची क्रिया कसकशी चालत असते, विशेषतः भाषा लिखित स्वरूपांत आल्यानंतर तिला स्थैर्य प्राप्त होऊन शिष्ट भाषा म्हणून तिच्यांतीलच एका प्रकारास अधिक मान्यता प्राप्त होऊन त्या शिष्ट स्वरूपाचें महत्त्व वाढत जाऊन इतर प्रकारांस गौणत्व कसें प्राप्त होतें व अशा रीतीनें लिखित, ग्रांथिक अथवा शिष्ट भाषेचें रूप अधिकाधिक निश्चित व कमी बदलणारें कसें होतें, वगैरे गोष्टी आपण दुसऱ्या विभागाच्या प्रस्तावनेंत अवलोकन केल्या आहेत. अशा तऱ्हेनें भाषेचें एक शिष्ट स्वरूप निश्चित व मान्यता पावलेलें बनून स्थिर झाल्यावर त्या स्वरूपासंबंधीं कांहीं निश्चित नियम बांधतां येतात. असे जे भाषेच्या निश्चित स्वरूपासंबंधीं शिष्टसंमत नियम त्यांसच आपण व्याकरण म्हणतों.

व्याकरणाचें स्वरूपः—वेदकालीं किंवा तदुत्तरकालीं जेव्हां तत्कालीन भाषेस स्थैर्य प्राप्त होण्याची वेळ आली तेव्हांच त्या भाषेचें व्याकरण तयार करण्याची जरूरी वाटूं लागली व भाषेस कांहीं तरी नियम पाहिजेत अशी जाणीव उत्पन्न झाली. हीच गोष्ट आपणांस पुढील आख्यायिकेंत आढळून येते. 'वाग्वै पराच्यव्याकृतावदत्ते देवा इंद्रमनुब्रुवन्निमां नो वाचं व्याकुर्विति । तामिन्द्रो मध्यतोऽवक्रम्य व्याकरोत्तस्मादियं व्याकृता वागुद्यते ।'—तैसं. (वाणी प्रथम अव्याकृत स्थितींत होती तेव्हां देव इन्द्राकडे गेले आणि म्हणाले आमच्या वाणीस व्याकृत कर तेव्हां इन्द्रानें तिचें व्याकरण केलें.) यावरून कोणत्याहि भाषेचें व्याकरण होण्यापूर्वी ती भाषा दीर्घ कालपर्यंत प्रचारांत असते व तिला हळूं हळूं नियमबद्ध स्वरूप प्राप्त होऊन तिचें व्याकरण बनतें. प्रत्येक भाषेंत अनेक बोली प्रचलित असतात. बारा कोसांवर भाषा बदलते असें आपण म्हणतों म्हणजे एकच भाषेचें भिन्नभिन्न स्वरूप आपणांस तिच्या एकंदर क्षेत्राच्या निरनिराळ्या भागांत आढळतें. परंतु सर्वांस गम्य व सर्वांस साधारण असें एक भाषेचें विशेषतः लिखित भाषेचें स्वरूप शिष्टसंमत असतें व या शिष्टसंमत भाषेचेंच प्रथम व्याकरण तयार होतें. व्याकरणकाराचेंहि मुख्य काम भाषेंतील कोणते प्रकार व रूपें शिष्टसंमत आहेत हें सांगण्याचें असतें परंतु असें एकदां सांगून तें ग्रंथगत होऊन सर्वमान्य झालें म्हणजे त्यास नियमांचें स्वरूप प्राप्त होतें व या नियमांस सुसंगत असेल तें शुद्ध व विसंगत असेल तें अशुद्ध असें मानण्याची प्रथा पडते. त्यामुळें यानंतर होणारें लेखन या नियमांस शक्य तों अनुसरूनच होत गेल्यामुळें या नियमांचें सामर्थ्य वाढत जातें व तें अधिकाधिक व्यापक बनून सर्व भाषेचें क्षेत्र आक्रमण करतें आणि सर्व भाषेस नियंत्रित करून एकरूपांत आणण्याचें कार्य करतें. अशा तऱ्हेनें ज्या विशिष्ट भाषेचें व्याकरण प्रथम सर्वमान्य होऊन सर्व क्षेत्र आक्रमण करितें त्या भाषेस विशेष महत्त्व येऊन इतर बोली अगर त्या भाषेचे स्थानिक प्रकार गौणत्व पावून हळूहळूं लोप पावतात. संस्कृत भाषेमध्यें पाणिनीपूर्व व पाणिनीकालीन किंवा तदुत्तर अनेक व्याकरणकार झाले व त्यामुळें पाणिनी-कालीन किंवा तदुत्तरकालीं कांहीं महत्त्वाच्या ग्रंथांतूनहि अपाणिनीय प्रयोग आपणास आढळतात, त्यांस कांहीं अलीकडील लोक व्याकरणदृष्ट्या अशुद्ध म्हणतील पण ते तसे नसून तत्कालीन रूढ प्रयोगच होत. पण जसजसें

पाणिनीय व्याकरणास महत्त्व प्राप्त होऊन इतर व्याकरणें मागें पडलीं व पाणिनीय व्याकरणास अनुसरणारे प्रयोग तेवढेच शुद्ध असें मानलें जाऊं लागलें तसतसे इतर प्रयोग अशुद्ध मानण्याकडे प्रवृत्ति होऊन, भाषा पाणिनीय व्याकरणानें बद्ध झाली व तिला स्थिर व अविकृत असें स्वरूप प्राप्त झालें पण तिची स्वाभाविक वाढ खुंटली व म्हणून संस्कृत भाषेस मृतभाषा म्हणून कांहीं लोक संबोधूं लागले. वास्तविक तिचा प्रचार कमी झाला असें नव्हे तर ती नियमांनीं निबद्ध झाल्यामुळें तिची वाढ खुंटली एवढेंच; असो.

मराठीचीं प्राचीन व्याकरणें :—सामान्यतः देशी भाषा पृथक्‌पणें अशा सातव्या शतकांत आस्तित्वांत आल्या असाव्या असें आपण चवथ्या विभागाच्या प्रस्तावनेंत पाहिलेंच आहे. त्यानंतर या भाषांची वाढ होऊन त्यांत महत्त्वाची अशी ग्रंथरचना होऊं लागण्यास दोनतीन शतकांचा तरी अवधि त्या कालच्या प्रगतीच्या गतीच्या मानानें लागला असावा; व बाराव्या-तेराव्या शतकांत अमृतानुभव, ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ निर्माण करण्याची पात्रता ज्या भाषेमध्यें आली त्या भाषेस यापूर्वीच दोनतीन शतकें तरी शिष्टसंमत व प्रौढ असें स्वरूप प्राप्त झालें असलें पाहिजें हें निर्विवाद आहे व असें स्वरूप प्राप्त झाल्याबरोबर हें स्वरूप निश्चित करण्यासाठीं तत्कालीन ग्रंथकारांस व पंडितांस त्या भाषेच्या व्याकरणाची आवश्कता भासली असली पाहिजे; त्याप्रमाणें त्यांनीं प्रयत्नहि केले असले पाहिजेत. परंतु ज्याप्रमाणें या कालांतील वाङ्मय आपणांस अज्ञात आहे त्याप्रमाणें त्या कालांतील व्याकरणाचे प्रयत्नहि आपणांस अज्ञात आहेत, तथापि योग्य संशोधन झाल्यास मराठी व्याकरणाच्या उगमांतील निरनिराळ्या पायऱ्या आपणांस अवगत झाल्याशिवाय रहाणार नाहींत असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

महानुभावी व्याकरणें:—ज्ञानेश्वरकालीन अथवा तत्पूर्वकालीन मराठी वाङ्मयाचा एक भाग आपणांस महानुभावी वाङ्मय म्हणून परिचित आहे. या पंथामध्यें गद्य व पद्य दोन्ही प्रकारची ग्रंथरचना झालेली आपणांस आढळून येते. या ग्रंथकारांसहि व्याकरणाचें महत्त्व ठाऊक असून त्यांनींहि आपल्या भाषेचें व्याकरण करण्याचे प्रयत्न केल्याचें आपणांस दिसून येतें. प्रसिद्ध महानुभाव ग्रंथकार भास्करभट्ट अथवा कवीश्वर व्यास यांचें महाराष्ट्र भाषाभाष्य अथवा सुभाष्य अशा कांहीं तरी नांवाचें एक मराठी भाषेचें व्याकरण होतें अशा तऱ्हेचा उल्लेख त्यांच्या वाङ्मयांत आढळतो. यावरून त्यांस भाषाघोष असेंहि म्हणत. आनेराज व्यास यांनींहि लक्षण रत्नाकर या नांवाचा एक व्याकरण प्रबंध रचल्याचा उल्लेख आहे. त्यानंतर पंडित भीष्माचार्य यांनीं नामविभक्ति व पंचवार्तिक असे व्याकरण संबंधी ग्रंथ लिहिल्याचें आढळतें. महानुभावी व्याकरणकारांसंबंधीं खालील पद्यामध्यें उल्लेख आढळतात.

'माहींभट्टीं व्याकर्णावरी । संस्कृत भाषा मंजरी । रचितें जहालें केशवसूरी । परमार्थ हेतु ॥ १ ॥ मूळ व्याकरणाचे नि आधारें । सुभाषानिबंधु बोलिला कविश्वरें । जो छपन्न भाषेसी होऊन उरें । महाराष्ट्रीये ॥ २ ॥ भाषा प्रबोध, भाषा प्रदीपिका । गौड महाराष्ट्री पीठिका । अष्टौ व्याकरणाचा अवाका । उमचविला ॥ ३ ॥ श्री भास्करें गोपाळा आज्ञापिलें । तें लक्षण रत्नाकर बोलिलें । मग पंचवार्तिक निरौपिते जहालें । भीष्ममुनि ॥ ४ ॥ लिंगत्रय विवंचना । दृष्टांतोपपत्ति न्याय प्रमाणा । उपपत्ति अनुपपत्ती शङ्कार्ण । दामोदरु प्रणितु ॥ ५ ॥ ऐसे भाषा निबंध महात्म मार्गीचे प्रसिद्ध । लिङ्गत्रय पदार्थभेद । कवीश्वरकृत ॥ ६ ॥'

आतां महानुभावीय वृद्धान्वयांत असें म्हटलें आहे कीं, तघलखांच्या स्वारींत महानुभावी धर्मग्रंथांचा नाश झाला व कवीश्वर वंशवर्णनांत 'विशेषासहित देह त्यजीयेलें । हीरोनियां नेलें । पुस्तकांतें' असा उल्लेख आहे. यावरून एका काळीं महानुभावी ग्रंथांचा नाश झाला होता ही गोष्ट स्पष्ट आहे. अशा तऱ्हेनें एकदां एखाद्या आपत्तीमध्यें मूळ ग्रंथांचा नाश झाला म्हणजे पुनरुज्जीवनाच्या वेळीं जुने ग्रंथ म्हणून अनेक नवीनच ग्रंथ प्रसृत होण्याची भीति असते, ही गोष्ट चिनी वाङ्मयावर जेव्हां ख्रि. पू. तिसऱ्या शतकांत एका बादशहानें होळी करण्याचा प्रसंग आणला व त्यानंतर जें ग्रंथपुनरुज्जीवन झालें त्यांत असे अनेक बनावट ग्रंथ तयार करण्यांत आले, यावरून स्पष्ट होते; असो.

सध्यां जो पंचवार्तिक या नांवाचा महानुभावी व्याकरण ग्रंथ आहे त्यावरून आपणांस एवढें तरी निश्चित माहीत होतें कीं, महानुभावी ग्रंथकारांनीं व्याकरण-शास्त्रावर विचार केला होता. तो कितपत प्रगत होता हें आपण पंचवार्तिकावरून पाहूं.

पंचवार्तिक—यांत १ सूत्रलक्षण, २ सूत्रप्रकृतिलक्षण, ३ सूत्रकारकलक्षण, ४ सूत्रव्याख्यानलक्षण व ५ सूत्रस्वरूपलक्षण अशीं पांच प्रकरणें आहेत.

१ सूत्रलक्षणांत (अ) वचन (आ) वाक्य (इ) प्रकरण व (ई) महावाक्य असे सूत्रांचे चार भेद सांगून तीन पदांचें सूत्र तें वचन, सहा वचनांचें सूत्र तें वाक्य, बारा वाक्यांचें सूत्र तें प्रकरण व बारा प्रकरणांचें सूत्र तें महावाक्य अशीं यांचीं लक्षणें दिलीं आहेत.

(अ) पुन्हां वचनांचे एकपदी, द्विपदी व त्रिपदी असे भेद सांगितले आहेत. नंतर पदें, सलिंग, अलिंग व क्रिया या तीन प्रकारच्या असतात असें सांगून सलिंगांचें पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग असे भेद वर्णिले आहेत. तसेंच सलिंग पदांस एकवचन, द्विवचन व बहुवचन अशीं तीन वचनें असतात असें सोदाहरण नमूद केलें आहे. पण द्विवचन व बहुवचन एकत्रच केलीं आहेत. सलिंग पदांची पुन्हां नाम व सर्वनाम अशी विभागणी करून त्यांचे पुन्हां केवळ व संयुक्त असे दोन वर्ग कल्पिले आहेत. नंतर केवळ पदें कृदन्त किंवा तद्धित प्रत्ययें करून सिद्ध होतात असें सांगितलें आहे व त्यांचीं उदाहरणें दिलीं आहेत. संयुक्त पदें समासानें होतात असें म्हटलें आहे. समासांमध्यें अव्ययीभाव, तत्पुरुष, बहुव्रीहि व द्वंद्व समासांचे प्रकार वर्णन करून तत्पुरुषाचे विभक्तितत्पुरुष, कर्मधारय व द्विगु असे भेद दाखविले आहेत. यानंतर संधिप्रकरण दिलें आहे. यानंतर सिद्धनामें कांहीं विशेषणें व कांहीं विशेष्यें असतात व सर्वनामें केवळ विशेषणेंच असतात असें सांगितलें आहे. अव्ययाबद्दल 'अलिंगें तियेंचि अन्वयें' म्हणून उदाहरणें दिलीं आहेत. क्रियांचे सलिंगा व अलिंगा असे भेद करून, भूत, भविष्य, वर्तमान हे काळभेदहि सांगितले आहेत. तसेंच क्रियेचीं तीन वचनें व तीन पुरुष असें सांगून सकर्मक व अकर्मक भेदहि दाखविले आहेत. यानंतर कर्तरि, कर्मणि व भावे प्रयोग वर्णिले आहेत.

(आ) वाक्यविचारांत वाक्यांचे चार पदांपासून अठरा पदांपर्यंत असे १५ भेद करून त्यांचीं उदाहरणें दिलीं आहेत. वाक्यांचे पुन्हां केवळवाक्य व संयुक्तवाक्य असे भेद केले आहेत.

(इ) प्रकरणविचारांत तीन वाक्यांपासून बारा वाक्यांपर्यंत प्रकरणाचे दहा भेद कल्पिले आहेत.

(ई) महावाक्यांचे पुन्हां तीन प्रकरणांपासून बारा प्रकरणांपर्यंत दहा भेद केले आहेत.

२ सूत्रप्रकृतिलक्षणांत सूत्राची दशधा प्रकृति पुढील श्लोकांत वर्णन करून त्यांची फोड केली आहे 'संज्ञा च परिभाषाच विधिर्नियम एव च। अतिदेशोऽपवादश्च विभाषा च निपातनम्॥ १॥ प्रतिषेधोऽधिकारश्च सूत्रंतद्दशधाविदुः।

३ सूत्रकारक लक्षणांत प्रथमेपासून सप्तमीपर्यंत सात विभक्ति सांगितल्या आहेत व त्यांचे अर्थहि दिले आहेत. 'संबोधनी प्रथमा विभक्ति वर्ते' असें सांगितलें आहे. प्रथमा विभक्तीचे कर्ता, कर्म व संबोधन; द्वितीयेचे कर्म, अत्यंत संयोग व प्रतिशब्द; तृतीयेचे कर्ता, साधन, सहार्थक व विनार्थक; चतुर्थीचे संप्रदान व प्रयोजन; पंचमीचा अपादान; षष्ठीचे संबंध व शब्दयोग आणि सप्तमीचा अधिकरण असे अर्थ दिले आहेत. नंतर विभक्तींचे प्रत्यय दिले आहेत.

४ सूत्रव्याख्यान लक्षणांत पदच्छेद, पदार्थोक्ति, विग्रह, वाक्ययोजना, आक्षेप व समाधान या सहा प्रकारांनीं सूत्राचा अर्थ प्रकाशित होतो म्हणून त्यास सूत्रव्याख्यान म्हणतात, असें सांगून या सहा अंगांची फोड केली आहे.

५ यानंतर पांचवे वार्तिक सूत्रस्वरूपलक्षण यामध्यें सूत्राचीं पुढील बत्तीस लक्षणें सांगून त्यांचें विवरण केलें आहे. १ प्रतिज्ञा, २ प्रमाण, ३ दृष्टान्त, ४ उपपत्ति, ५ व्याप्ति, ६ विषयप्रदान, ७ विशेष प्रबोधक, ८ उत्सर्ग, ९ अपवाद, १० निषेध, ११ न्याय, १२ विरोधपरिहार, १३ काकु, १४ कक्षा, १५ भावार्थ, १६ प्रकरण, १७ अस्तित्व १८ निर्देश, १९ निर्णयो, २० पक्ष, २१ प्रभेद, २२ आशंका, २३ आक्षेप, २४ कार्य, २५ लक्षण, २६ स्वरूप, २७ कारण, २८ हेतु, २९ संबंध, ३० प्रतीति, ३१ विशेषण ३२ प्रतिष्ठा.

महानुभावी व्याकरणग्रंथ कोणी अथवा केव्हां रचले याबद्दल जरी वादविवाद चालू असले तरी महानुभावी ग्रंथकारांनीं मराठी भाषेच्या व्याकरणाचा विचार केला होता व त्यावर आपली कांहीं रचना केली होती हें निःसंशय. वरील पंचवार्तिकांवरून त्यांनीं आपलें व्याकरण संस्कृत व्याकरणास अनुसरूनच रचलेलें दिसतें. मराठी ही संस्कृत-

संभव भाषा अमून तीवर इतर भाषांचा त्या वेळीं फारसा संस्कार झाला नसल्यामुळें तीच पद्धति अनुसरणें साहजिक होतें. वरील व्याकरणांत आपणांस नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद व अव्यय या शब्दांच्या जाती पाडलेल्या आढळतात. तसेंच एकवचन व बहुवचन, तिन्ही लिंगें व सात विभक्ति यांचा विचार केलेला आढळतो. तसेंच कृदन्त व तद्धित शब्दांचाहि विचार आढळतो. तसेंच संधिविचार व समासविचारहि केलेला आढळतो. क्रियापदाच्या वाचतींत तीन काळ व तीन प्रयोग, सकर्मक-अकर्मकादि भेद दाखविलेले आढळतात. पुढील वार्तिकांत वाक्यांचे प्रकार व वाक्यांचे पृथक्करणाचाहि विचार आढळतो.

महानुभावी व्याकरणानंतरचीं व्याकरणें:—महानुभावी ग्रंथकारानंतर तत्कालीन भाषेच्या व्याकरणाचा प्रयत्न केलेला आपणांस कोठें उपलब्ध होत नाहीं. ज्ञानेश्वरी ग्रंथाची भाषा बरीच जुनी असून ज्ञानेश्वरकालीन भाषेंत व एकनाथकालीन भाषेंत फरक पडला होता हें आपणांस एकनाथानें ज्ञानेश्वरीची प्रति शुद्ध केली (म्हणजे तत्कालीन रूढ भाषेंत लिहिली) या ज्ञानेश्वरीतील उल्लेखावरून दिसून येतें. राजवाडे यांनीं संपादन केलेल्या ज्ञानेश्वरीची भाषा सांप्रदायिक ज्ञानेश्वरीहून जुनी असून त्या भाषेचें त्यांनीं व्याकरणहि लिहिलें आहे. परंतु ज्ञानेश्वरकालापासून इंग्रजी अंमलापर्यंतच्या कालांत रूढ असलेल्या भाषेचें व्याकरण इतक्या दीर्घकालांत कोणी केलेलें आढळत नाहीं. मध्यंतरींच्या निरनिराळ्या कालखंडांत प्रचलित असलेल्या मराठी भाषेच्या निरनिराळ्या अवस्थांचीं व्याकरणें रचण्याचें कार्य अद्याप व्हावयाचें आहे.

इंग्रजी अंमलांतील व्याकरणांची उत्पत्ति:—यानंतर मराठी भाषेच्या व्याकरणाची आवश्यकता विशेषतः जे पाश्चात्य लोक हिंदुस्थानांत येऊन स्थायिक होऊन राहिले व आपल्या राज्याचा व धर्माचा प्रसार करण्याचें कार्य करू लागले त्यांस भासली. विशेषतः धर्मप्रसाराच्या कामीं येथील सामान्य जनतेशीं संबंध येऊं लागल्यामुळें त्यांच्या भाषेचें ज्ञान या परदेशीय धर्मोपदेशकांस आवश्यक झालें व तें मिळविण्याकरितां त्यांस येथील देश्य भाषांच्या व्याकरणाची जरूरी भासूं लागली. हींच गोष्ट थोरल्या शास्त्रीबोवांनीं आपल्या व्याकरणावरील निबंधांत पुढें दिल्याप्रमाणें उल्लेखिली आहे. "ज्याची जी जन्मभाषा नव्हे त्यास ती येण्यास व्याकरणाचा जसा उपयोग होतो तसा तो ज्याची ती जन्मभाषा आहे त्यास पडत नाहीं. मराठी लोकांस संस्कृत व इंग्रजी वगैरे भाषा येण्यास त्या भाषांच्या व्याकरणाचें ज्ञान जसें आवश्यक आहे तसें त्यांस मराठी भाषा येण्यास तिच्या व्याकरणाचें ज्ञान आवश्यक आहे असें म्हणतां येत नाहीं." अर्थात् आज या मताचा कोणी विद्वान् स्वीकार करणार नाहीं. येथील देश्य भाषांचें ज्ञान पाश्चात्यांनीं आपणांस येत असणाऱ्या पाश्चात्य भाषांशीं तुलनात्मक रीतीनें मिळविण्याचा प्रयत्न केल्यामुळें त्यांनीं जीं देशी भाषांचीं व्याकरणें रचलीं, तीं पाश्चात्य भाषांच्या व्याकरणाच्या वळणावर गेलीं हें स्वाभाविकच होय.

हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणारे पहिले मिशनरी पोर्तुगीज होत. त्यांनीं गोमंतक प्रांत जिंकल्यावर तेथील धर्म व भाषा नष्ट करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला व धर्मप्रसाराकरितां म्हणून प्रथम देशी भाषांचा अभ्यास केला. त्या वेळीं गोमंतकांत जरी कोंकणी हीच मराठीची बोली प्रचलित होती तरी तेथील कानडी राजसत्तेमुळें लिपी कानडी वापरण्यांत येत असे. त्यामुळें तत्कालीन पाद्री मिशनऱ्यांनीं गोमंतकी कोंकणी भाषेसच कानडी समजून त्या नांवानेंच तिचें व्याकरण तयार केलें. असें व्याकरण प्रथम फादर स्टीव्हन्स यानें इ. स. १६४० त रायतूर येथें छापलें. त्याचें नांव 'कानडी भाषेचें व्याकरण' (Arte da Zingoa Canarim) असें आहे. याखेरीज गोमंतकी बोली मराठीचीं अनेक व्याकरणें तयार झाल्याचे उल्लेख आढळतात; परंतु तीं हस्तलिखिताच्या रूपांतच असून छापलीं गेल्याचें दिसत नाहीं. १९ व्या, विसाव्या शतकांत अलीकडे कांहीं कोंकणी भाषेचीं व्याकरणें छापलीं गेलीं आहेत; पण तीं व्याकरणाच्या इतिहासाच्या दृष्टीनें महत्त्वाचीं नाहींत.

अशा तऱ्हेचें मराठी भाषेचें व्याकरण करण्याचे प्रयत्न वसईकडील पोर्तुगीजांनींहि केले असावेत. असें एक व्याकरण रोम येथें इ. स. १७७८ सालीं छापलेलें आढळतें; त्यांचें नांव 'ग्रामाटिका मरास्टा' (Grammatica Marasta a mais vulgar que se practica nos reinos de Nizamaxa e Idalaxa Rom. 1778). त्याची दुसरी आवृत्ति लिस्बन येथें १८२५ त प्रसिद्ध झाल्याचा उल्लेख आढळतो; असेंच एक व्याकरण 'उत्तरेकडील कोंकणी बोलीचें व्याकरण—' Grammatica da Lingua Concani no dialecto

do Norte Composta no secalo XVII por Rum missionaris Portuguez c agroa pela primeria vez dala a estampa (por Joachim Helisdoro da cunha Rivara.) या नांवाचें सतराव्या शतकांत लिहिलेलें १८५८ सालीं नवें गोवें येथें कुञ्जरिव्हारनें छापून प्रसिद्ध केलेलें आढळतें. याच सुमारास १८५४ मध्यें फिलिप नेरी पिअर्स यांनीं मुंबईत एक Grammatica Maratha Explicada em Lingua Portuguza या नांवांचें व्याकरण प्रसिद्ध केलें व १८७५ मध्यें सूर्याजी आनंदराव देशपांडे यांनीं एक मराठी व्याकरण लिहिलें आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं श्रीरामपूर येथें डच मिशनऱ्यांनीं देशी भाषांचे कोश व व्याकरणें रचण्याचें कार्य चालविलें होतें; त्यांपैकीं डॉ. विल्यम केरी यानें इ. स. १८०५ सालीं पंडित वैद्यनाथ शास्त्री यांच्या साहाय्यानें मराठी भाषेचें व्याकरण इंग्रजींत लिहिलेलें प्रसिद्ध आहे. (Grammer of the Mahratta Language, with Dialogues of familiar subjects. Carey William). यापुढें इ. स. १८२६ सालीं महमद इब्राहिम मक्का (नाखवा ?) यानें केलेलें व व्हॉन्स केनेडी यानें सुधारलेलें एक व्याकरण, प्रसिद्ध झाल्याचा दाखला आढळतो. यानंतर इंग्रजांनीं मराठी व्याकरणासंबंधीं केलेले प्रयत्न, म्हणजे जे. बॅलंटाइनचें एडिंबरा येथें छापलेलें व्याकरण (Mahratta Grammar Edinburgh 1839), रे. जे. स्टीव्हन्सन यांचें मुंबईस १८४३ सालीं छापलेलें (The principles of Mahratta Grammar Bombay 1843), तसेंच १८४८ सालीं मुंबईस निघालेलें एक व्याकरण (Marathee Grammar Bombay 1848), ई. बर्जेस यांचें मराठी भाषेचें व्याकरण (Grammar of the Marathi Language Bombay 1854.) व एच्. एस्. के. बेलायर्स व असखेडकर यांचें १८६८ सालीं प्रसिद्ध झालेलें मराठी भाषेचें व्याकरण, हे होत.

अमेरिकन मिशनचें व्याकरण :—वरील सर्व व्याकरणें युरोपीय लोकांकरितां प्रायः लिहिलीं असल्यामुळें इंग्रजी भाषेंत आहेत. परंतु १८४८ सालीं प्रसिद्ध झालेलें व्याकरण अहमदनगर येथील अमेरिकन मिशननें तयार केलेलें असून अमेरिकन मिशन प्रेस मुंबईमध्यें छापलें आहे पण तें सर्व मराठींत आहे. या व्याकरणांतील विशेष म्हणजे शब्दांच्या जाती, नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, उपसर्ग, उभयान्वित व केवळप्रयोग अशा सात केल्या आहेत. विशेषणामध्यें नाम, विशेषण व क्रियाविशेषण असा भेद केला आहे. शब्दयोगी अव्ययास उपसर्ग संज्ञा दिली आहे. सामान्य रूपास कार्यरूप असें म्हटलें आहे. नामांचे फक्त सामान्य व विशेष असे दोनच भेद केले आहेत. विभक्ति फक्त प्रथमा, कर्म विभक्ति व संबोधन विभक्ति अशा तीन कल्पिल्या आहेत. सामान्यरूप होण्याच्या प्रकारावरून नामांचे वर्ग केले आहेत. सर्वनामांचे पुरुष, दर्शक, परस्परसंबंधी, प्रश्नार्थक व सामान्य असे भेद केले आहेत. विशेषणांचे गुण व संख्या असे दोन भेद केले आहेत. विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्ययें सर्व उपसर्ग या सदरांत घातलीं आहेत व त्यांची एक यादी दिली आहे. यांची संख्या ९४ असून त्यांत आसपास, तागाईत, रूबरू, समक्षा-समक्ष, हुजूर, चा, ची, चें, तें, णें यांचाहि समावेश केला आहे. क्रियापदांचे सकर्मक, अकर्मक व कर्मणी असे भेद केले आहेत. तसेंच आणखी नियमित, अनियमित, साह्यकारक, प्रयोजक, अपूर्ण व भावी असेहि भेद केले आहेत. क्रियापदांस पुरुष, वचन, लिंग, काळ व रूपभेद असतात असें सांगितलें आहे व रूपभेदाचे निश्चयार्थ, संकेतार्थ, धर्मार्थ, शक्यार्थ, संशयार्थ, आज्ञार्थ आणि सामान्यार्थ असे प्रकार वर्णिले आहेत. यांत विध्यर्थाबद्दल धर्मार्थ शब्द वापरला आहे, स्वार्थाबद्दल सामान्यार्थ वापरला आहे. काळामध्यें वर्तमानाचे सामान्य, अपूर्ण व रीति; भूतकाळाचे अपूर्ण, पूर्ण, सामान्य, भूतभूत, रीतिभूत; व भविष्य काळाचे वर्तमान व भूतभविष्य असे भेद दाखविले आहेत. यानंतर निरनिराळ्या क्रियापदांचीं रूपें दिलीं आहेत. क्रियाविशेषणांचे भेदांचा नेम नाहीं असें सांगून संख्या, क्रम, स्थळ, काळ, परिणाम, रीति, संशय, निश्चय, निषेध, परस्परसंबंध इतक्या प्रकारचीं उदाहरणें दिलीं आहेत. उभयान्विताचे योजक व भेदक असे दोन प्रकार केले आहेत. नंतर वाक्यरचनेसंबंधीं कांहीं नियम दिले आहेत व कांहीं वाक्यांचें व्याकरण चालवून दाखविलें आहे. याप्रमाणें या व्याकरणाचें सामान्य स्वरूप आहे.

इंग्रजी अंमलांतील मराठी व्याकरणाची वाढः— अव्वल इंग्रजींत शिक्षणसंस्था स्थापन झाल्या, त्यांत मराठी व्याकरण प्रायः तोंडीं शिकवीत, व्याकरणाचीं कांहीं लेखी टिपणें असत तीं विद्यार्थी उतरून घेत व ग्रंथावरून व्याकरण लावलें जाई. पण व्याकरणाचीं छापलेलीं पुस्तकें नव्हतीं.

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं १८६५।६६ सालीं व्याकरणावर निबंध लिहिले त्यांत त्यांनीं तत्पूर्वी छापलेल्या चार व्याकरणांचा कालानुक्रमानें उल्लेख केला आहे. त्यांतः—

" **पहिलें**ः—जांबेकर यांचें बाल-व्याकरण. हा ग्रंथ फारच लहान आहे व त्यांत मूळ विषयाचें दिक्प्रदर्शन-सुद्धा पुरें नाहीं " असा उल्लेख आहे.

" **दुसरें**ः—व्याकरण गंगाधरशास्त्री फडके यांचें. हें व्याकरण पहिल्यापेक्षां मोठें असून त्यांत विषयसंग्रहही पुष्कळ आहे व त्या विषयाचें विवरणही बरेंच केलें आहे. तरी ह्या ग्रंथांत कांहीं विषय सोडले आहेत व ज्यांचें उपपादन केलें आहे त्यांचें तें उपपादन कितीएक अंशीं न्यून आहे व किती एक ठिकाणीं दूषणग्रस्तही आहे." फडके यांचें हें व्याकरण प्रश्नोत्तर आहे. तें १८३६ त प्रथम छापलें व तें दादोबांच्याही अवलोकनांत आलें होतें असें त्यांच्या व्याकरणाच्या प्रस्तावनेवरून दिसतें.

तिसरेंः—दादोबा यांचें व्याकरण. दादोबांनीं प्रथम प्रश्नोत्तररूपानेंच आपलें व्याकरण लिहिलें होतें; पण दुसरीं दोन व्याकरणें प्रश्नोत्तर आहेत असें पाहून त्यांनीं आपल्या पुस्तकाचें मूळचें स्वरूप बदलून सारें पुस्तक पुनः साध्या विवेचनाचे स्वरूपांत अगदीं थोड्या अवकाशांत लिहिलें (प्रस्तावना पहा). अर्थात् छापलेल्या व्याकरणांत कालानुक्रमानें दादोबांचें व्याकरण हें तिसरें होय. दादोबांच्या व्याकरणाची पहिली आवृत्ति १८३६ त कृष्णाजी गणपत यांच्या शिळाछापावर छापिली असून तींत १९२ पृष्ठें होतीं. हें तत्पूर्वीच्या व्याकरणापेक्षां फारच श्रेष्ठ प्रतीचें होतें. दुसरी आवृत्ति १८५० त छापतांना ती सुधारून पुष्कळच वाढविली. इतकी कीं, दादोबा त्यासंबंधानें म्हणतात, " त्या ग्रंथाची विस्तारानें नवीन रचना करावी लागली." अशी सुधारणा इतर व्याकरणांत झाली नाहीं, यामुळें तीं मागें पडलीं व पुढें पुष्कळ वर्षें दादोबांचें व्याकरण हेंच प्रमाणभूत होऊन राहिलें, ही गोष्ट यथाक्रमच झाली.

चवथेंः—रा. गंगाधर रामचंद्र टिळक यांचें लघुव्याकरण. हा ग्रंथ वर सांगितलेल्या दोन ग्रंथांचा (फडके व दादोबा) व विशेषतः दादोकृत व्याकरणाचा केवळ थोडाफार संक्षेप आहे. यांत वर सांगितलेल्या ग्रंथांचे गुण नसतां त्यांतील कितीएक दोष मात्र आहेत. शाळेंतील मुलांस जुन्या चालीप्रमाणें व्याकरणांतील कांहीं ढोबळ ढोबळ गोष्टी सांगण्यास टिपणादाखल हा ग्रंथ उपयोगीं पडला तरी मराठी व्याकरणरूप विषयाचें विशेष व्यक्तीकरण होण्यास हा ग्रंथ अगदीं योग्य नाहीं, असें कृष्णशास्त्री चिपळूणकर म्हणतात.

कृष्णशास्त्री चिपळूणकर हे ट्रे. कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाल्यावर त्यांचें मराठी व्याकरणाकडे विशेष लक्ष वेधलें. दादोबांचे व्याकरणांत त्यांस अनेक उणीवा व दोषस्थळें दिसलीं, तेव्हां त्यांचें दिग्दर्शन करून आपल्या मताचें सविस्तर उपपादन करण्यासाठीं त्यांनीं शालापत्रक या मासिकांतून १८६५ त 'मराठी व्याकरणावर निबंध' लिहिण्यास सुरवात करून एकंदर २५ निबंध लिहिले. त्यांत वर्णोपासून वाक्यरचनेपर्यंत व्याकरणाच्या बहुतेक अंगांचा परामर्श घेतला. या निबंधांतील मतांवर कित्येकांनीं काढलेल्या मार्मिक शंका आणि त्यांवर शास्त्रीबोवांनीं दिलेलीं सविस्तर व समर्पक उत्तरें शालापत्रकांत प्रसिद्ध झालीं. हे निबंध, या पत्रव्यवहारासह स्वतंत्र पुस्तकरूपानें रा. भि. जोशी यांनीं (आपले ३ निबंध जोडून) १८९३ त प्रसिद्ध केले. यामुळें ते आज कोणासही उपलब्ध होण्याजोगे आहेत.

चिपळूणकरांचे हे निबंध शालापत्रकांत सुरू असतां किंबहुना त्याच्याही जरा आधींपासून दुसरे एक विद्वान् गृहस्थ मराठी व्याकरणाची स्वतंत्रपणें रचना करीत होते. ते म्हणजे कृष्णशास्त्री गोडबोले हे होत. हे त्या वेळच्या जाड्या विद्वानांपैकीं एक होते. संकृत आणि मराठी या भाषांप्रमाणेंच सिंधी भाषेचाही त्यांनीं सूक्ष्म अभ्यास केला होता व तदनुषंगानें फारसी व अरबी भाषांचेंहि ज्ञान संपादिलें होतें. यांनीं व्याकरणाखेरीज मराठी ग्रहलाघव, ज्योतिःशास्त्र, बीजगणित, सिंधी अंकगणित, सिंधी भाषेचें निरूपण (इं.), सिंधी भाषेचें आणखी निरूपण (इं.), भूमितीचें भाषांतर, बालसंगोपन, वेदांचें पुरातनत्व (इं.) इत्यादि ग्रंथ केले आहेत. त्यावरून त्यांची सर्वगामी सूक्ष्म बुद्धि आणि दृढ व्यासंग हे गुण प्रतीत होतात. अशा विद्वान् गृहस्थांकडून झालेलें 'मराठी भाषेचें नवीन व्याकरण'ही त्यांच्या योग्यतेस साजेसेंच निपजलें. हें १८६७ त छापलें.

सन १८६३ त दक्षिणा प्रैझ कमिटीनें मराठी व्याकरणाचे ग्रंथासंबंधानें एक जाहिरात दिली. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे या वेळीं या कमिटीचे सेक्रेटरी होते. त्यांच्याच सहीनें ही जाहिरात ऑक्टोबर १८६३ च्या शालापत्रकांत

प्रसिद्ध झाली आहे. हींत मराठी व्याकरण कसें असावें याचें सामान्य दिग्दर्शन सुंदर रीतीनें केलें आहे. तें अर्थातच चिपळूणकर यांनींच केलें असून त्यांत मराठी व्याकरण कसें असावें यासंबंधाचे त्यांचे विचार प्रतीत झाले आहेत. या जाहिरातीस अनुसरून गोडबोले यांनीं आपल्या व्याकरणाची रचना केली. ही जाहिरात पुढीलप्रमाणें होती:—

"**जाहिरात-मराठी व्याकरणाविषयीं:**—मराठी व्याकरणावर उत्तम प्रतीचा ग्रंथ कोणीं तयार केल्यास दक्षिणा प्रैझ कमिटी त्या ग्रंथकर्त्यास उत्कृष्ट प्रतीचें बक्षीस देण्यास सिद्ध आहे. हा ग्रंथ मराठी भाषेंत असावा व त्यांतील विषयप्रतिपादन करण्याची शैली युरोपियन अर्वाचीन व्याकरणासारखी असावी. म्हणजे ग्रंथकर्त्यानें एकदोन उदाहरणांवरून एकादा व्यापक नियम कल्पून त्यावरून इतर उदाहरणांची उपपत्ति करावयास लागूं नये. तर जीं वास्तविक उदाहरणें असतील त्यांवरून नियम बांधावे. तसेंच भाषा कसकशी बदलत गेली याच धोरणानें ग्रंथकारानें शब्दसिद्धीचे व वाक्यरचनेचे नियम बांधून त्यांचें निरूपण करतांना मूळच्या संस्कृत भाषेंतून प्राकृत भाषा, जिला बालभाषा म्हणतात तिच्या रीं व जुन्या मराठी भाषेच्या (ज्ञानेश्वरीच्या वगैरे भाषेच्या) द्वारें हल्लींची मराठी भाषा कशी निपजली हें संभवेल व शोभेल तितकें दाखवावें. तसेंच हल्लींच्या मराठींत फारसी व अरबी शब्द मिसळले आहेत त्यांचेंही प्रकृतिप्रत्ययरूपानें विवेचन या ग्रंथांत बरेंच असावें. त्याप्रमाणेंच जुन्या मराठी कवींच्या ग्रंथांतील शब्दांची व शब्दरचनेची उपपत्ति होईल असे नियम या ग्रंथांत असावे. या ग्रंथांतील सिद्धांत एकदेशी नसतां होतील तितके व्यापक असावे. ज्याचा ग्रंथ उत्तम होईल त्यास प्रथम ५०० रुपये दक्षिणा प्रैझ कमिटी देईल व त्या ग्रंथाच्या विक्रीच्या पैशांतून आणखी ५०० रुपये त्यास मिळतील. याप्रमाणें एकंदर एक हजार रुपये ग्रंथकर्त्यास मिळतील.

(सही) **कृष्णशास्त्री चिपळूणकर,**
सेक्रेटरी, "निसबत दक्षिणा प्रैझ कमिटी."

चांगलें मराठी व्याकरण कसें असलें पाहिजे याविषयीं चिपळूणकरांची कल्पना वरील जाहिरातीवरून व्यक्त होते. त्यांनीं दादोबांच्या ग्रंथाकडे याच दृष्टीनें पाहिलें आहे आणि याच दृष्टीनें आपल्या निबंधांत अनेक मुद्द्यांचें मोठ्या मार्मिकपणें सविस्तर उपपादन केलें आहे. यामुळें विद्यमान मराठी व्याकरणग्रंथांत त्यांच्या या निबंधाची योग्यता असामान्य आहे. त्यांचे लेखणींतून उर्वरित विषयांचेंही असेंच विवेचन झालें असतें तर या निबंधांस पूर्णत्व येऊन मोठा लाभ झाला असता. त्यांनीं व्याकरणाचा जो इतका खोल विचार केला आहे त्यावरून मराठीचें स्वतंत्र व्याकरण स्वतःच लिहिण्याचा विचारही त्यांचे मनांत असावा असें अनुमान होतें व त्यांचे हातून असें व्याकरण तयार झालें असतें तर महाराष्ट्र-भाषेस तो एक बहुमोल अलंकारच मिळाला असता यांत शंका नाहीं. तथापि त्यांच्या या २५ निबंधांत ऐतिहासिक दृष्टीनें व्याकरण विषयाचें सोपपत्तिक व व्यापक विवेचन करण्याची जी पद्धति दाखवून दिली आहे ती पुढील ग्रंथकर्त्यांस मार्गदर्शक झाली आहे यांत शंका नाहीं.

वर उध्दृत केलेल्या जाहिरातीस अनुसरून म्हणजे एक प्रकारें कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्याच मार्गदर्शित्वानें कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं आपल्या व्याकरणाची रचना केली आणि त्यांचा तो हस्तलेखही छापण्यापूर्वी चिपळूणकरांनीं पाहिलेला होता. गोडबोले यांचें हें व्याकरण दक्षिणा प्रैझ कमिटीच्या पसंतीस उतरून त्यांस यथायोग्य बक्षीसही मिळालें.

यानंतर दादोबांना आपल्या व्याकरणाची नवी आवृत्ति तयार करतांना या दोन ग्रंथांतील मतांचा विचार करणें अवश्यच होतें व तसा तो त्यांनीं केल्यामुळेंच त्यांस सातव्या आवृत्तींत बरीच सुधारणा करूनही आपल्या मताच्या विवेचनार्थ व पुष्टयर्थ एक स्वतंत्र ग्रंथ लिहावयाची आवश्यकता भासली. "मोठ्या महाराष्ट्र व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीची पूरणिका" असें या ग्रंथाचें नामाभिधान असून तो १८८१ त प्रसिद्ध झाला आहे. याचीं २१५ पृष्ठें आहेत.

येथवर केलेल्या विवेचनावरून असें दिसून येईल कीं सन १८३६ त दादोबांनीं व्याकरण छापल्यापासून सन १८८१ मध्यें पूरणिका रचिली तेथपर्यंतचा ४५ वर्षांचा काल हा व्याकरणरचनेच्या दृष्टीनें इंग्रजी अंमलांतील पहिला कालखंड धरावयास हरकत नाहीं. या कालखंडांत कोणा व्याकरणकारानें कोणती भर घातली हें पहावयाचें तर चार ग्रंथ विचारांत घेतले पाहिजेत.

१ दादोबांचे व्याकरणाची १८५१ त छापलेली दुसरी आवृत्ति.
२ कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत मराठी व्याकरणावरील निबंध.
३ कृष्णशास्त्री गोडबोलेकृत मराठी भाषेचें नवीन व्याकरण.
४ दादोकृत व्याकरणाची सातवी आवृत्ति, तिचे पूरणिकेसह.

मराठी भाषेचे स्थलपरत्वें अनेक प्रकार नमूद करून आपण कोणत्या प्रकारच्या भाषेचें व्याकरण लिहिणार याविषयीं दादोबा म्हणतात, " महाराष्ट्र देशाचा मध्यभाग जो पुणें-प्रांत त्यांत जी भाषा राजकीय आणि विद्वान् लोक बोलतात तिचें अनुसरण या व्याकरणांत केलें आहे."

दादोबांचें व्याकरण:—दादोबांनीं आपल्या व्याकरणासाठीं भाषेची स्थलकालमर्यादा कोणती ठरविली होती हें पाहिल्यानंतर त्यांनीं आपल्या दृष्टीपुढें व्याकरणाचा कोणता आदर्श ठेविला होता असा आणखी एक प्रश्न उपस्थित होतो. त्यांना संस्कृत येत नव्हतें, इंग्रजी व्याकरण येत होतें आणि त्याच व्याकरणाचें अंधानुकरण त्यांनीं केलें असून त्यामुळें त्यांचें व्याकरण सदोष झालें आहे, असा आक्षेप क्वचित् काढण्यांत येतो. त्यांच्या व्याकरणाच्या पहिल्या आवृत्तीसंबंधानें असा आक्षेप घेण्यास कदाचित् कांहीं जागा असली तरी दुसऱ्या आवृत्तीसंबंधानें तसें म्हणतां येईल असें दिसत नाहीं. पहिल्या आवृत्तीच्या वेळीं त्यांचें वय विशीच्या आंत असल्यानें त्यावेळीं त्यांचे विचार तितके परिपक्व झाले नसणें शक्य आहे. परंतु त्यानंतर त्यांनीं संस्कृत व्याकरणाचें चांगलें अध्ययन करून लघुकौमुदीचें मराठींत सविस्तर विवरणासह भाषांतरहि बेरचसें केलें होतें. आणि मराठी भाषेचें सर्वांगपूर्ण व्याकरण तयार करण्याचें ध्येय सतत दृष्टीपुढें ठेवून दहाबारा वर्षें सूक्ष्म अवलोकन व परिशीलन चालविलें होतें. त्याचेंच फळ म्हणजे त्यांच्या व्याकरणाची द्वितीयावृत्ति होय. या आवृत्तीवरून पाहतां त्यांनीं संस्कृत व्याकरण किंवा इंग्रजी व्याकरण असा कोणताहि एकच एक आदर्श पुढें ठेविल्याचें दिसून येत नाहीं. तर त्या काळीं जी मराठी भाषा शिष्ट-जनांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत रूढ होती तीस लागूं होईल असें तिचें स्वतंत्रपणें व्याकरण रचावयाचें हेंच त्यांचें उद्दिष्ट असून त्याप्रमाणें त्यांनीं भाषेंतील रूपविशेषांचें परिगणन करून त्यांस नियमांत गोंवण्यासाठीं परिश्रमांची शिकस्त केल्याचें दिसून येतें. मराठी भाषा ही संस्कृताशीं विशेष संबद्ध असल्यामुळें संस्कृत व्याकरणांतील पुष्कळशी परिभाषा मराठी व्याकरणास उपयोगीं पडण्याजोगी आहे व तिचा शक्य तितका स्वीकार दादोबांनींहि केलाच आहे. स्वर, व्यंजन, नाम, सर्वनाम, विशेषण, विशेष्य, क्रियापद, धातु, काळ इत्यादि संज्ञा, लिंगांचीं व विभक्तींचीं नांवें, वर्णांचीं स्थानें, संधि-नियम, विभक्तींची संख्या, समासांचीं नांवें व लक्षणें, कर्ता, कर्म, करण, इत्यादि कारकार्थ वगैरे बहुतेक सारी परिभाषा त्यांनीं संस्कृत व्याकरणावरूनच घेतली आहे. तथापि त्यांनीं इंग्रजी व्याकरणांतील पद्धति-ही बरीच उचलेलली आहे. शब्दांच्या ८ जाति करणें, नामांचे सामान्य, विशेष व भाववाचक असे प्रकार करणें, सर्वनामांचे पुरुषवाचक, दर्शक, संबंधी, प्रश्नार्थक व सामान्य असे ५ प्रकार कल्पिणें, क्रियापदाला रूप, भेद वगैरे मानणें यांसारख्या पुष्कळ गोष्टी त्यांनीं इंग्रजी व्याकरणांतून घेतल्या आहेत हें स्पष्ट आहे. याप्रमाणें त्यांनीं इंग्रजी व संस्कृत व्याकरणांतील पद्धतींचा अवलंब केला असला तरी त्यांचें अंधानुकरण केलेलें नाहीं. मराठी भाषेचा स्वतंत्रपणें अभ्यास करून तीस उपयुक्त होतील तेवढ्याच गोष्टी व त्याही मराठीस साजतील अशा बेतानें त्यांत फरक करून त्यांनीं घेतल्या आहेत व यांत अयुक्त असें कांहीं नाहीं. त्यांच्याशीं इतर वैय्याकरणांचा मतभेद होणें साहजिक आहे. त्यांनीं स्वीकारलेल्या कित्येक गोष्टी व त्यांनीं केलेल्या कित्येक व्यवस्था इतरांस मान्य होणें न होणें हा भाग अगदीं वेगळा आहे. त्यांच्या कित्येक गोष्टी आज विद्वानांस न पटल्या व त्यांत कांहीं फरक करावासा त्यांस वाटला तरी तेवढ्या-वरून त्यांनीं इंग्रजी व्याकरणाचें अंधानुकरण केलें असा दोषारोप करणें युक्त होणार नाहीं असें आम्हांस वाटतें.

त्यांनीं वर्णविचार, शब्दविचार व वाक्यविचार असे व्याकरणाचे मुख्य ३ विभाग पाडले आहेत. वर्ण-विचारांत वर्णांचें परिगणन, स्वर-व्यंजनें असे भेद, जोडाक्षरांची बनावट, वर्णांचीं स्थानें व तदनुसार वर्णांचें वर्गीकरण, आणि स्वरसंधीचे व व्यंजनसंधीचे नियम इतका विषय घेतला आहे. शब्दविचारांत शब्दांच्या ८ जाति, नामाचे सामान्य, विशेष व भाववाचक असे ३ प्रकार, तीन लिंगें व त्यांशिवाय सामान्य लिंग, लिंग ओळखण्याचे नियम, दोन वचनें, एकच वचन असणारे शब्द, संबोधनासह आठ विभक्ति, सामान्य रूपांचे प्रकार, उपांत्यास होणारे विकार,

सर्वनामांचे पुरुषवाचक, संबंधी, दर्शक, प्रश्नार्थक व सामान्य असे ५ प्रकार, विशेषणांचे गुणविशेषण व संख्याविशेषण असे २ प्रकार आणि संख्याविशेषणांत संख्यापूरक, क्रमवाचक, आवृत्तिवाचक व संख्यावाचक असे पोटप्रकार, क्रियापदांचे सकर्मक, अकर्मक, उभयविध असे भेद; भावकर्तृक, सहाय, प्रयोजक व शक्य क्रियापदें; क्रियापदांचे रूप, भेद, प्रयोग, अर्थ व काळ; संयुक्त क्रियापदांचे संयुक्त काळ; धातुसाधित शब्द; अस, नस, हो, दे हे धातु चालवून दाखविणें; कर्तरि, कर्मणि, भावि, भावकर्तरि व कर्मकर्तरि प्रयोग आणि सिद्ध व गौण क्रियापदें; क्रियाविशेषण अव्ययांमध्यें शुद्ध अव्ययें, धातुसाधित क्रियाविशेषणें आणि मूळचीं गुणविशेषणें असणारीं क्रियाविशेषणें याशिवाय क्रि० वि० अव्ययांचे स्थलवाचक, कालवाचक, संख्यावाचक, क्रमवाचक, निश्चयवाचक व अनुकरणवाचक, असे प्रकार; उभयान्वयी अव्ययांचे समुच्चयवाचक, पक्षांतर बोधक, न्यूनत्वबोधक, कारणबोधक व संकेतबोधक असे ५ प्रकार; शब्दयोगी अव्ययांमध्यें शुद्ध शब्दयोगी अव्यय हा एक प्रकार आणि केवलप्रयोगी अव्ययांत धिक्कार, दुःख, तिरस्कार, हर्ष, धन्यता, आर्जव व आश्चर्य दर्शविणारीं अव्ययें; साधित शब्दांमध्यें निरनिराळे प्रत्यय लागून होणारे नाना प्रकारचे धातुसाधित व शब्दसाधित शब्द; समासांचे ८ प्रकार; द्वंद्वांमध्यें समाहार द्वंद्व; कारकांमध्यें प्रत्येक विभक्तीचे संभवणारे अनेक अर्थ; षष्ठीच्या संबंधाचे 'अंगांगीभाव' वगैरे प्रकार; वाक्य-विचारांत वाक्यरचनेचे मुख्य ३० नियम, लेखन-पद्धति, विरामचिन्हें आणि वाचनपद्धति, आणि नमुन्यादाखल ग्रंथावरून व्याकरण चालवून दाखविणें. इतके विषय दांदोबांच्या व्याकरणांत समाविष्ट झाले आहेत.

गोडबोले व्याकरण :—गोडबोले यांच्या व्याकरणांत प्रथम जगांतील भाषांचे तुराणी, शमी व आर्य असे ३ वर्ग सांगितले असून अनेक आर्य भाषांत कसें साम्य आहे तें लॅटिन, संस्कृत, ग्रीक, फारशी, इंग्रजी, मराठी आणि जर्मन भाषेंतील अनेक शब्दांवरून दाखविलें आहे. चिपळूणकरांच्या मताप्रमाणेंच यांत व्याकरणाचे शब्दविचार व वाक्यविचार असे २ भाग केले आहेत. वर्णांचें वर्गीकरण संस्कृत व्याकरणास अनुसरून केलें आहे. पण ख्, घ् इत्यादि महाप्राण वर्ण क्, ग् इत्यादि अल्पप्राण वर्णांत हकार मिळून झाले असल्यामुळें ते वास्तविक संयुक्तवर्ण आहेत आणि लिपींतील तीं तीं अक्षरेंही क्+ह्=ख अशीं संयोगानेंच बनलीं आहेत असें प्रतिपादिलें आहे.

स्वरसंधि, व्यंजनसंधि व विसर्गसंधि यांचे नियम संस्कृत व्याकरणास अनुसरून सविस्तर दिले असून त्यांचे तेथील अपवादही दिले आहेत! मराठी व्याकरणाचे दृष्टीनें हा संधिविचार अधिक पाल्हाळाचा झाला, असेंही वाटणें शक्य आहे.

यांचें **सर्वनामांचें विवेचन** अगदीं अभिनवच आहे. ते सर्वनामांस शब्दांच्या मुख्य वर्गांत गणीत नाहींत किंवा चिपळूणकरांच्या मताप्रमाणें नामांचा पोटवर्गही मानीत नाहींत. त्यांचीं सर्वनामें नामात्मक, विशेषणात्मक, आणि क्रियाविशेषणात्मक अशीं ३ प्रकारचीं आहेत! प्रातिपदिकाऐवजीं येणारें तें सर्वनाम असा त्यांचा अर्थ आहे आणि प्रातिपादिकें पदार्थबोधक (नामें), गुणबोधक (विशेषण), आणि क्रियाबोधक अशीं तीन प्रकारचीं असल्यामुळें त्यांच्या ऐवजीं येणारीं सर्वनामेंही (त्यांच्या कल्पनेप्रमाणें) सहजच उपर्युक्त तीन प्रकारचीं झालीं. मी, तूं, हा, जो, इ. शब्द स्वतंत्रपणें (पुढें नाम न घालतां) योजलीं जातील तेव्हां तीं नामात्मक सर्वनामें. त्यापुढें नामांची योजना असेल तर तीं विशेषणात्मक सर्वनामें. यांचे पुरुषवाचक, दर्शक, संबंधी, प्रश्नार्थक व अनिश्चित संख्यार्थक असे पांच प्रकार केले आहेत. 'म्यां भिकाऱ्यानें' यांत म्यां हें 'पुरुषवाचक विशेषणात्मक सर्वनाम.' जो पदार्थ यांत, जो हें 'संबंधी विशेषणात्मक सर्वनाम.' आणि रामा स्वतः गेला यांत स्वतः हें 'पुरुषवाचक क्रियाविशेषणात्मक सर्वनाम.' तेथें, तेथून, एथवर, तोंपर्यंत, तेवीं, तेव्हां, कदा, तद्वत्, इ. शेंकडों क्रियाविशेषणात्मक सर्वनामेंच! यांचे पुनः दर्शक, संबंधी, प्रश्नार्थक इत्यादि पोटवर्ग व त्यांचे पुनः स्थलवाचक वगैरे प्रतिपोटवर्ग सांगितले आहेत. केवलप्रयोगी अव्यय हें एकटें सबंध वाक्याचें काम करतें, तें वाक्याचा भाग होऊं शकत नाहीं, म्हणून गोडबोले या शब्दास 'व्याकरणांत अनवश्यक' म्हणतात आणि वर्गीकरणांतून गाळतात. त्यांचीं सर्वनामेंही स्वतंत्र न राहतां नामें, विशेषणें व क्रिया-विशेषणें यांचे पोटांत विभागलीं जातात. म्हणून त्यांचे शब्दांचे वर्ग ६ होतात. १ नाम, २ विशेषण, ३ क्रिया-विशेषण, ४ क्रियापद, ५ शब्दयोगी अव्यय व ६ उभयान्वयी अव्यय.

नामांचे विशेष, सामान्य व भाववाचक असे ३ वर्ग केले आहेत. कळप, लष्कर वगैरे समूहार्थक नामें सामान्य नामांत आणि सोनें, लांकूड इ. द्रव्यवाचक नामें भाववाचक नामांत समाविष्ट होतील असें त्यांचें म्हणणें आहे.

विशेषणांचे गुणवाचक व संख्यावाचक असे दोन भेद केले आहेत. संख्या हाही एक गुणच असल्यामुळें वास्तविक गुणविशेषणांतच संख्यादर्शकांचाही समावेश होतो. परंतु दोहोंस कांहीं कार्यें भिन्न होतात म्हणून दोन वर्ग मानणें बरें, असें कारण सांगितलें आहे. संस्कृत विशेषणांचीं तरतमभावानें होणारीं रूपें सविस्तर दिलीं आहेत. कर्तृ-करीयस्-करिष्ठ; वृद्ध-वर्षीयस्-वर्षिष्ठ; वसुमत्-वसीयस्-वसिष्ठ इ० रूपांची माहिती मराठी व्याकरणांत तितकीशी आवश्यक वाटत नाहीं.

षष्ठी विभक्ति मानिलेली नाहीं. रामाचा इ. रूपें विशेषणेंच मानिलीं आहेत. हिंदुस्थानी, गुजराथी व सिंधी या भाषांत हीं रूपें विशेष्यनिघ्न म्हणजे विशेषणेंच आहेत असें सोदाहरण दाखविलें आहे.

संस्कृत नामांच्या लिंगांसंबधाचे व पुल्लिंगी नामांवरून स्त्रीलिंगी नामें बनविण्यासंबंधाचे नियम संस्कृत व्याकरणानुसार सविस्तर दिले आहेत. त्यांत कशेरु, मस्तु, रुज्, पामन्, मघवन्-मघोनी, ब्रह्मन्-ब्रह्माणी, उपाध्यायी, उपाध्यायानी, आचार्यानी इ. मराठींत प्रायः न येणारे संस्कृत शब्द पुष्कळ आले आहेत.

चिपळूणकरांच्या मताप्रमाणेंच जो तो यांतील ओ हा प्रथमैकवचनाचा प्रत्यय, व वास्तविक हे मूळ आकारान्त शब्द असें प्रतिपादिलें आहे. संस्कृतांतील आकारान्त किंवा ईकारान्त नामांवरून मराठींत अकारान्त स्त्रीलिंगी नामें कशीं आलीं आहेत हें सुमारें पाऊणशें नामांचे मूळ संस्कृत शब्द देऊन दाखविलें आहे.

विभक्ति, प्रत्ययांवरून मानिल्या आहेत. द्वितीया व षष्ठी गाळली आहे. त हा सप्तमीचा प्रत्यय न धरतां तेथें आंत हें शब्दयोगी अव्यय धरलें आहे आणि मराठींत सप्तमी विभक्तीचीं रूपें सर्व शब्दांचीं होत नसल्यामुळें मराठींत सार्वत्रिक अशा वास्तविक प्रथमा, तृतीया, चतुर्थी, व पंचमी आणि संबोधन अशा पांचच विभक्ति मानिल्या आहेत.

जंद, लिथुयानी, स्लेव्होनी, लॅटिन, ग्रीक, तुतोनी, आणि सध्यांची इंग्लिश या भाषांत कोणकोणत्या विभक्तींचीं रूपें आहेत व कोणत्या विभक्ती नाहींत ही माहिती दिली आहे.

संस्कृतावरून विभक्तिप्रत्ययांची उपपत्ति पुढीलप्रमाणें दिली आहे

सं	म	सं	म	सं	म	सं	म	सं	म
न—	नें;	भिः—	हीं;	स्य—	स;	नाम्—	ना;	अन्ते—	तें;

स्मिन्-ई पंचमीचा हून हा प्रत्यय प्राकृतांतील पंचमीचा एकवचनी हि व अनेकवचनी हिंतो प्रत्यय आहे त्यांवरून आला आहे. ला, शीं या प्रत्ययांची उपपत्ति दिलेली नाहीं.

क्रियापदाची व्याख्या चिपळूणकरांप्रमाणेंच "ज्या शब्दानें क्रियेचें ज्ञान कालासंबंधानें होतें तो शब्द" अशी केली आहे. कांहीं धातुसाधितांवरून कालसंबंध कळतो; पण विधान होत नाहीं, म्हणजे वाक्य पुरें होत नाहीं, म्हणून ते क्रियापदें नव्हत, अशी टीप दिली आहे. पुढें दामले यांनीं या टीपेंतील अटीचा मूळ व्याख्येंत समावेश करून क्रियापदाचे व्याख्येस पूर्णत्व आणिलें आहे. तथापि ह्या अटीची आवश्यकता मूळ गोडबोले यांस प्रतीत झाली असल्यामुळें क्रियापदाचे व्याख्येस पूर्णता आणण्याचें मुख्य श्रेय त्यांसच दिलें पाहिजे.

दादोबांनीं प्रयोगाचें नांव भावी (भावसंबंधी) असें विशेषणरूप योजिलें होतें. चिपळूणकरांनीं भाव हा मराठी शब्द धरून त्याच्या सप्तमीचें रूप भावीं असें योजिलें होतें. पण गोडबोले यांनीं मूळ संस्कृताप्रमाणें भावे (संस्कृतसप्तमी) असें नांव योजिलें व तेंच आज प्रायः रूढ आहे.

दादोबांप्रमाणेंच संयुक्त क्रियापदें मानिलीं आहेत; पण सहाय धातु दादोबांनीं १६ सांगितले होते. त्यांतील दे, बस, पाह, ठेव, टाक, घे आणि नलगे इतके कमी करून सहाय धातूंची संख्या नियमित केली आहे. गोडबोल्यांचे मतानें अस, नस, हो, ये, पाहिजे, नये, नको, जा आणि लाग एवढ्या ९ च धातूंच्या योगें संयुक्त क्रियापदें होतात.

संस्कृत आख्यात व कृत् प्रत्ययांवरून मराठींतील क्रियापदांचे सर्व काळचे प्रत्यय कसकसे आले हें सोपपत्तिक सोदाहरण दाखविलें आहे; आणि साधित शब्दांचें प्रकरण बरेंच पूर्णत्वास नेलें आहे. पूर्व वैय्याकरणांनीं संस्कृतांतील आणि मराठींतील साधित शब्दांचीच बनावट दिली होती; अरबी व फारसी भाषेंतून मराठींत आलेले शब्द

कसकसे साधलेले आहेत, हें बहुतेक कांहींच सांगितलें नव्हतें. पण गोडबोले यांनीं तें विस्तारपूर्वक सांगितले आहेत; आणि तेणेंकरून मराठी व्याकरणांत ही मोठीच नवीन भर टाकिली आहे. दामले यांनीं आपल्या शास्त्रीय व्याकरणांतील हें प्रकरण बहुतांशीं गोडबोले यांच्या व्याकरणाच्याच आधारें लिहिलेलें आहे आणि या विषयांत गोडबोले यांच्यापुढें मजल कोणत्याहि व्याकरणानें अजून केलेली नाहीं. मराठींत पुष्कळ द्राविडी शब्दहि आहेत, परंतु त्यांचें विवेचन अवश्य असूनहि गोडबोले यांनीं (वेळाच्या अभावीं) केलेलें नाहीं.

गोडबोले यांनीं वाक्यविचारांतहि पुष्कळ नवीन भर घातली आहे. दादोबांनीं उद्देश्य व विधेय यांपलीकडे वाक्यविभागाचा अर्थदृष्टीनें संबंध कांहींच विवेचिला नव्हता. चिपळूणकरांनीं प्रयोगरचनेच्या दृष्टीनेंच काय तें वाक्यविचाराचें विवेचन केलें आहे. गोडबोले यांनीं वाक्यांचे शुद्ध व संयुक्त हे प्रकार, संयुक्तांत उभयप्रधान आणि गौणप्रधान (मिश्र) वाक्यें, गौणवाक्यांचें नामदर्शक, विशेषणदर्शक, क्रियाविशेषणदर्शक, असे तीन प्रकार आणि संक्षिप्त वाक्यें किंवा वाक्यांश इत्यादिकांचें विवेचन केलें आहे. सारांश हा वाक्यविचाराचा भाग गोडबोले यांनीं मराठी व्याकरणास नवीनच जोडला असें म्हणावयास हरकत नाहीं. हा भाग यांच्या व्याकरणाच्या १८६७ त प्रसिद्ध झालेल्या पहिल्या आवृत्तींत नव्हता. तो (आणि छंदोविचार हा भागहि) त्यांनीं १८७४ त छापलेल्या द्वितीयावृत्तींत घातला. वाक्यविचाराचा व्याकरणाशीं तादृश संबंध नाहीं असें पुष्कळ विद्वानांचें मत होतें; पण तें यांस पटलें नाहीं. यासंबंधानें ते लिहितात, "कितीएक म्हणतात कीं, वाक्यविचार मराठींत परकीय आहे आणि तो तिच्या व्याकरणांत आणूं लागल्यास इंग्रजी व्याकरणांतील वाक्यविचाराचा उतारा आणि अनुकरण होईल; परंतु लेखनांत आलेल्या इंग्रजी वगैरे भाषांप्रमाणेंच मराठी भाषेसही स्वरूपसिद्ध वाक्यनिर्बंध आहेत असें बहुत सबळ प्रमाणांनीं दाखवितां येईल. प्रस्तुत विषयाचे उपपादनांत विशेषावरून सामान्याचें अनुमान करण्याची रीति योजिली आहे. मराठी भाषेतील प्रयोग आणि संप्रदाय ताडून पाहिल्यानें येणारीं सामान्य अनुमानें किंवा नियम प्रथम देऊन उदाहरणांनीं आणि प्राचीन कवींच्या लेखांनीं त्यांचें स्पष्टीकरण केलें आहे." याप्रमाणें यांनीं व्याकरणास वाक्यविचाराची जोड दिली आहे, तथापि वाक्यपृथक्करणाचें विस्तृत विवेचन त्यांनीं केलेलें नाहीं. तें काम पुढें लवकरच आगरकर यांनीं वाक्यमीमांसा हें पुस्तक लिहून केलें.

वाक्यविचार आणि पद्यविचार यांप्रमाणें गोडबोले यांनीं प्राकृत भाषेचें संक्षिप्त व्याकरण आणि संस्कृत-प्राकृत-मराठी शब्दांचा कोश म्हणजेच शब्दव्युत्पत्ति हेही नवीन भाग पुरवणीरूपानें आपल्या व्याकरणास जोडून त्याच्या उपयुक्ततेंत आणखी भर घातली आहे.

अशा प्रकारें, ऐतिहासिक दृष्टि, शास्त्रीय मांडणी, अनेक भाषांच्या तुलनेनें विवेचन, प्रत्ययादिकांची संस्कृत व प्राकृत भाषेच्या द्वारें उपपत्ति, यवनी शब्दसाधनिकेचा विचार, वाक्यविचार, पद्यविचार (छंदःशास्त्र), पद्यांत येणाऱ्या रूपांचा विशेष विचार, प्राकृत भाषेचें व्याकरण आणि शब्दव्युत्पत्ति इत्यादि अनेक अंगांची जोड गोडबोले यांनीं आपल्या व्याकरणास दिली असून मराठी व्याकरणविषयक ग्रंथांत बहुमोल भर घातली आहे यांत शंका नाहीं.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें मत :—विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं व्याकरण विषयावर साक्षात् असें विशेष कांहीं लिहिलेलें नाहीं. तथापि त्यांनीं १८७४ त निबंधमाला सुरू केल्यावर पहिल्याच वर्षीं 'लेखनशुद्धि' हा जो निबंध लिहिला आहे त्यांत व्याकरणाचा खरा अधिकार काय याविषयीं मोठें मार्मिक विवेचन केलें आहे. "मराठी भाषेमध्यें भाषेतील रूढ शब्द व रूढ प्रयोग बळेंच फिरविण्याचा आज बरींच वर्षें उद्योग चालू आहे," असा प्रस्ताव करून वर्णशुद्धि, वाक्यशुद्धि व शब्दशुद्धि यासंबंधानें अनेक उदाहरणें देऊन मोठें समर्पक विवेचन केलें आहे. आणि या निबंधाचे शेवटीं "या अंकांत एकंदर आपणांकडून आम्हीं काय सिद्ध केलें तें थोडक्यांत सांगतों," असें म्हणून त्यांतील सार पुढीलप्रमाणें दिलें आहे. "भाषेचें म्हणजे पडून गेलेल्या रूढीचें सामर्थ्य केवढें आहे व त्यापुढें व्याकरण किती पंगु, हें दाखवून तीस अटकाव करूं जाणें हें किती वेडेपणाचें काम आहे तें दर्शविलें. त्यावरून असें समजावयाचें कीं, जेथें रूढीचा आणि व्याकरणाचा विरोध पडतो तेथें "शास्त्राद्रूढिर्बलीयसी" याच वचनास प्रायः अनुसरणें उत्तम. तसेंच वर्ण, शब्द किंवा वाक्य हीं कशीं लिहावीं असा जेथें म्हणून संदेह पडेल तेथें फारकरून केवळ उच्चारावरच प्रमाण धरून चालावें. हा नियम अत्यंत सयुक्तिक, साधा आणि सोपा असून यामुळें लेखी भाषेंत चोहोंकडे एकदम मेळ बसून जाईल हें उघड आहे."

दादोबांची तक्रार:—दादोबांस मात्र भाषेनें व्याकरणाचे नियमांस सोडून स्वैरसंचार करावा हें इष्ट वाटत नव्हतें असें पूरणिकेतील त्यांच्या पुढील उद्गारांवरून वाटतें. दादोबा म्हणतात, "जनाच्या रूढीपुढें आणि लोकांच्या विचित्र शब्दप्रयोगापुढें, बापुड्या वैय्याकरणांचें कांहींच चालत नाहीं. त्यांनीं निमूटपणें त्यांचे ते प्रयोग ऐकत असावे; आणि जरी ते धडधडीत त्यांच्या व्याकरणाच्या नियमांस विरुद्ध असले, तरी तीं उदाहरणें मानून अपवादकांचीं कोष्टकें वाढवीत जावीं, हेंच त्यांचें काम. पहा, कित्येक धातु धडधडीत अकर्मक असतां लोक भूतकाळीं त्यांस कर्में लावून सकर्मक करितात; आणि पुनः त्यांच्या लिंगवचनांचा आक्षेप न धरितां मूळचा कर्तरि प्रयोग तसाच कायम ठेवितात; आता त्यांचीं तोंडें कोणी धरावीं. उदाह. मी गंगा न्हालों, मी आंघूळ केलों, ती दहींभात जेवली, ते वाट चुकले, तूं वैभव पावलास, तूं दूध प्यालास इ. अशीं नित्यशः लोकांच्या तोंडांतून वाक्यें ऐकण्यांत येतात." दादोबांनीं आपल्या व्याकरणाच्या प्रस्तावनेंतहि म्हटलें आहे कीं, 'सांप्रत जी महाराष्ट्र भाषा लिहिण्यांत अव्यवस्था आढळते ती मोडून ग्रहण केलेले जे नियम त्यांस अनुसरून, ही भाषा नीट सारखी व्यवस्थेवर आणण्याविषयीं ते (लोक) उद्युक्त होत गेले, म्हणजे माझ्या इतक्या श्रमांचें साफल्य झालें, असें मी मानीन."

निबंधमालाकारांची टीका:—निबंधमालेंतील 'भाषापद्धति' या निबंधांत व्याकरणाचा साक्षात् संबंध येत नाहीं, तथापि 'व्याकरण म्हणजे भाषेचें शास्त्र' यांतील शास्त्र शब्दाचा व्यापक अर्थ घेतल्यास त्यांत भाषापद्धतीचाहि समावेश होऊं शकेल. उत्तम भाषापद्धतीचें शुद्धत्व, प्रौढत्व आणि सुबोधत्व हे जे मुख्य तीन गुण त्यांतील पहिला गुण शुद्धत्व हा तर व्याकरणावरच बहुतांशीं अवलंबून आहे. तें असो; पण येथें या निबंधाचा उल्लेख करण्याचें दुसरेंहि एक कारण आहे; तें असें कीं, या निबंधांत विशिष्ट भाषेचा नमुना म्हणून दादोक्त महाराष्ट्र भाषेचे व्याकरणाच्या प्रस्तावनेंतील उतारा दिला आहे आणि त्यांतील 'गालवशौनकशाकटायनादि जे प्रातिशाख्यादि वेदव्याकरण भाष्यकार', 'विद्वज्जनचित्तचकोरास चंद्रीभूत होऊन' इत्यादि प्रकारच्या भाषारचनेस अनुसरून पुढील मत प्रदर्शित केलें आहे.

"या उताऱ्यांत वरील ग्रंथकर्त्याची नेहमींची तऱ्हा पूर्णपणें लक्षांत येते. ती सर्वांस माहीतच आहे कीं, संस्कृतांतले मोठमोठाले शब्द व लांब लांब समास घालून देण्याची हौस होय. .....तिजवर (वरील भाषारचनेवर) दोष एवढाच येतो कीं, ती असावी त्यापेक्षां दुर्बोध झालेली असून ग्रंथकारानें आपलें पांडित्य मिरविण्याच्या उद्देशानें तिची योजना केली आहे असा वाचकांचा समज होतो."

वरीलसारख्या टीकेमुळें, निबंधमालाकारांचें मन आपणाविषयीं कलुषित आहे अशी दादोबांची समजूत झाली होती. पण इतरत्र मालाकारांनीं दादोबांस पाणिनीची व त्यांच्या व्याकरणास महाभाष्याची उपमा दिली आहे. त्या प्रकारच्या उल्लेखावरून मालाकारांची दृष्टि निवळत चालली असें दादोबांस वाटून त्यांनीं समाधान व्यक्त केलें आहे. दादोबा म्हणतात, "अलीकडील नव्या तरुण विद्वान गृहस्थांमध्यें मोठे रसिक व मर्मज्ञ व ज्यांच्या महाराष्ट्र लेखणीस हात धरणारा असा मला फारच विरळा दिसतो, असे जे निबंधमालाकार त्यांची आम्हांविषयींची आजपर्यंतची जी थोडी वक्रदृष्टि होती तीहि आतां सरळ प्रेमयुक्त अशी त्यांची कृपादृष्टि होत चालली आहे, हेंहि आतां त्यांच्या लेखावरून आमच्या अनुभवास आणून देत आहेत."

लोकहितवादी व व्याकरण:—व्याकरणाच्या अनुपयुक्ततेविषयीं लोकहितवादींनीं पुढील उद्गार काढिले आहेत. "व्याकरणाचें पंधरा वर्षें अध्ययन केलें, त्यापासून अमुक उपयोग होतो असें मला दाखवून द्यावें, म्हणजे मी वास्तविक म्हणेन. परंतु मीं शोध केला आहे, त्यावरून मला तर वाटतें कीं, मनुष्यास लांकडें तोडावयाचें कसब शिकविलें तर बरें, परंतु हें व्याकरण नको. यांत कांहींच अर्थ नाहीं. केवळ मूर्ख होण्याची विद्या आहे." निबंधमालाकारांनीं या उद्गारांचा खरपूस समाचार घेतला आहे.

मराठी भाषेचें मध्यम व्याकरण:—हें व्याकरण दादोक्त मोठ्या व्याकरणाहून लहान आणि लघु व्याकरणाहून मोठें असल्यामुळें याचें नामाभिधान मध्यम व्याकरण असें करण्यांत आलें. मराठी शाळांतून सहाव्या इयत्तेपर्यंत हायस्कुलांतून मॅट्रिक्युलेशन व स्कूल फायनल परीक्षापर्यंत आणि ट्रेनिंग कॉलेजांत पहिल्या वर्षाचे परीक्षेपर्यंत उपयोगी पडावें अशा बेतानें हें आहे. या कामीं दादोक्त लघुव्याकरण अपुरें पडे व मोठें व्याकरण अधिक मोठें वाटे म्हणून मध्यम मानानें हें व्याकरण डायरेक्टरसाहेबांच्या हुकूमावरून तयार करण्यांत आलें, रावजी सदाशिवशास्त्री

गोडबोले यांनीं नारायण पांडुरंगशास्त्री साठे व नारायण धोंडदेव जोशी यांच्या साहाय्यानें १८८५ ते ८७ या काळांत हें व्याकरण तयार केलें, तें पुढें १८९७ त (म्हणजे रावजीशास्त्री यांचे मृत्यूनंतर ६ वर्षांनीं) छापलें. प्रस्तुत पुस्तकांतील विशेष गोष्टी थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगतां येतील:—

(१) शब्दांच्या ८ जाति मानिल्या आहेत पण 'क्रियाविशेषण अव्यय' या संज्ञेऐवजीं 'विशेषणात्मक अव्यय' अशी संज्ञा योजिली आहे. दादोबांनीं क्रि. वि. अ. ही संज्ञा योजिली. या संज्ञेवर दोन प्रकारें आक्षेप येतात. एक तर या संज्ञेनें दर्शविले जाणारे शब्द सर्वदां क्रियेशींच अन्वित असतात असे नाहीं. तर ते कधीं कधीं विशेषणांशीं दुसऱ्या क्रि. वि. अव्ययांशीं व क्वचित् नामांशींही अन्वित असतात; यामुळें त्यांस क्रि. वि. म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. ही अडचण लक्षांत घेऊन प्रस्तुत पुस्तकांत क्रि. वि. अ. या संज्ञेऐवजीं 'विशेषणात्मक अव्यय' अशी संज्ञा योजिली आहे व तेणेंकरून ही अडचण दूर होते. परंतु क्रि. वि. अ. या संज्ञेवर दुसराहि एक आक्षेप निघतो तो असा कीं, ही संज्ञा सर्वथा स्वतंत्र दिसत नाहीं. 'विशेषण' ही जी सव्ययांतील एका वर्गाची संज्ञा ती सामान्य अर्थानें या संज्ञेच्या पोटांत समाविष्ट झाली आहे, यामुळें विशेषण या एका शब्दाचा एकदां पारिभाषिक अर्थ व एकदां सामान्य अर्थ घ्यावा लागतो व तेणेंकरून सशास्त्रतेस बाध येतो. प्रस्तुत पुस्तकांत योजिलेल्या " विशेषणात्मक अव्यय " या संज्ञेनेंहि वरील आक्षेपाचें निरसन होत नाहींच. तथापि क्रि. वि. अव्यय संज्ञेपेक्षां ही विशेषणात्मक अ. ही संज्ञा अधिक प्रशस्त होय यांत शंका नाहीं. तथापि ही नवी संज्ञा रूढ न होतां जुनी दादोक्त क्रि. वि. अ. हीच संज्ञा आजवर कायम राहिली आहे व इतकी रूढ झालेली ही संज्ञा यापुढें बदलली जाणें दुरापास्तच आहे.

(२) सर्वनामांचे पुरुषवाचक आणि दर्शक असे मुख्य दोन प्रकार केले आहेत. नामांऐवजीं योजलें जाईल तेव्हां तें पुरुषवाचक आणि विशेषणासारखें योजिलें जाईल तेव्हां तें दर्शक सर्वनाम. अशा प्रकारें प्रत्येक सर्वनाम स्थलपरत्वें दोन्ही प्रकारचें संभवतें. उदा० मी येईन; तूं जा; कोणी म्हणतात कीं इ., काय पाहिजे, यांत मी, तूं, कोणी व काय हीं पुरुषवाचक सर्वनामें आणि मी ब्राम्हण नित्य स्नान करितों; तूं शिपाई तरवार गाजवितोस; कोणी मनुष्य येऊन गेला. यांत मी, तूं कोणी, हीं दर्शक सर्वनामें. पुरुषवाचक किंवा दर्शक सर्वनामांचे पुनः संबंधी प्रश्नार्थक व सामान्य हे पोट प्रकार होतील. अ त ज क हीं अनेक सर्वनामांचीं मूळरूपें होत. अ पासून हा अमुक, अमका, असा, असला, असलाला, इतका, एवढा इ० सर्वनामें बनलीं आहेत इ० विवेचन केलें आहे आणि किती; कैक; एक, परस्पर, उभयतां, स्वतः इ० पुष्कळ शब्दांची सर्वनामांत गणना केली आहे.

(३) शब्दयोगी अव्ययांचे 'सामान्यरूप करणारीं' व 'सामान्यरूप न करणारीं' असे दोन वर्ग केले असून या दुसऱ्या वर्गांत पुढील पांच पोटवर्ग केले आहेत. (१) संग्रहबोधक–तरी, देखील, पण, ही, सुद्धां इ० (२) निश्चयबोधक—च, तर, म्हणून इ० (३) कैवल्यबोधक -केवळ, च, ची, पण, बरीक, फक्त, मात्र इ० (४) प्रश्नार्थक—का, कीं, ना. इ० (५) पादपूरक—पैं, नी इ०

(४) विशेषणात्मक अव्ययांचे कालबोधक, स्थळबोधक व प्रकारबोधक असे तीन वर्ग केले असून प्रकारबोधकाचे पोटांत गुणबोधक, निश्चयबोधक, संशयबोधक, प्रश्नबोधक, अहेतुबोधक, हेतुबोधक, अनुकरणबोधक निषेधबोधक, तारतम्यबोधक, तुलनाबोधक इ० पोटवर्ग केले आहेत.

(५) विध्यर्थ आणि संकेतार्थ असे दोनच अर्थ मानिले आहेत. 'तुम्ही काम करा' आणि 'तुम्हीं काम करावें' हें दोन्ही विध्यर्थच; अर्थात् क्रियापदाचे रूपावरून अर्थ मानिले नसून ते त्या रूपांतून दर्शित होणाऱ्या आज्ञा, उपदेश इ० अर्थावरूनच मानिले आहेत. संकेतार्थहि क्रियापदाचे रूपावरून मानिला नाहीं. अर्थावरूनच मानला आहे. तो गेला तर काम होईल, मी देणार असलों तर इ० तो आला नाहीं म्हणून मी जात नाहीं; यांत गेला, देणार असलों व आला नाहीं या क्रियापदांचे संकेतार्थ मानिले आहेत.

(६) संयुक्त क्रियापदें मानिलीं असून सहाय धातूंचे पुढील चार प्रकार केले आहेत. कालांतर बोधक—असं. निषेध बोधक—नस, नको, नये. प्रयोगांतर बोधक—जा; हो. विशेषार्थक—आण, इच्छ, काढ, घे, चल, चाल, चूक, जा, टाक, ठेव, दे, पड, पाह, पाहिजे, बस, ये, राह, लाग, शक, सूट, सोड इ० संयुक्त क्रियापदांतर्गत धातुसाधितें कोणते प्रत्यय लागून झालेलीं असतात व तीं तीं कोणत्या सहाय धातूंशीं संयुक्त होतात हें सविस्तर दिलें

आहे. आणि 'फेकून, देत आहे' यासारखीं तीन अवयवांची व 'देऊन टाकीत चालला आहे' 'फेकून द्यावें लागत आहे' 'करूं देतां यावें लागेल' इत्यादि चार अवयवांचीं हीं संयुक्त क्रियापदें दिलीं आहेत.

(७) अनेक चमत्कारिक वाक्यांचे प्रयोग ठरविले आहेत. उदा०-(अ) रामा जाण्याचें (किंवा जावयाचें) पत्करतो-सकर्मक कर्तरि. येथें जाण्याचें (जावयाचें) याची योजना जाणें या प्रथमांताऐवजीं आहे असें समजावें. (आ) माझें जाण्याचें (जावयाचें) ठरलें—अकर्मक कर्तरि येथें जाण्याचें याची योजना प्रथमान्ताऐवजीं आहे. (इ) पाणी तापायला पाहिजे. तापायला हें प्रथमान्ताऐवजीं आलें. पाणी हा तापणें याचा कर्ता व तापायला (तापणें) हा पाहिजे याचा कर्ता-अकर्मक कर्तरि प्रयोग. (ई) त्याला मारतां उपयोगी नाहीं. मारतां=मारणें मारतां हा कर्ता नाहीं हें क्रियापद. (उ) त्याला बोलून व्यर्थ आहे. बोलून=बोलणें. बोलून हा कर्ता आहे, क्रि. अकर्मक कर्तरि प्रयोग. (ऊ) बाजीरावास पुणें इंग्रजांस द्यावें लागलें. बाजीरावास हा कर्ता, पुणें हें कर्म, द्यावें लागलें क्रि. कर्मणि प्रयोग. (ए) त्यानें देण्याचें नाकारलें. देण्याचें=देणें हें कर्म. (ऐ) मला आंबा पाहिजे. मला हा कर्ता, आंबा हें कर्म, कर्मणि. (ओ) मला आंबा नको. मला हा कर्ता, आंबा हें कर्म, कर्मणि. (अं) मला आंबा हवा. मला हा कर्ता, आंबा हें कर्म, कर्मणि.

(८) समासांचे शब्दार्थप्राधान्यावरून मुख्य ४ प्रकार केले आहेत.

(९) शब्दांचें वर्गीकरण देखील सिद्ध-साधित; सव्यय-अव्यय; योगिक-रूढ-योगरूढ-योगिकरूढ असें त्रिविध केलें असून साधितांत प्राकृतिक-सामाजिक असे पोटवर्ग केले आहेत; यावरून या वर्गीकरणांतहि शास्त्रीयतेची चुणूक दिसते.

(१०) प्राकृतिक साधित शब्द साधण्याचे नानाप्रकार सविस्तर दिले आहेत. प्रथम नामें, विशेषणें, धातु व अव्ययें यांचे प्रत्येकीं नामसाधित, विशेषणसाधितें, धातुसाधित व अव्ययसाधित असे चार चार प्रकार सांगितले आहेत व सोळा प्रकारांचे पुन्हा पुष्कळसे पोटप्रकार देऊन प्रत्येक पोटप्रकार कोणत्या प्रत्ययांनीं होतो ते प्रत्यय सोदाहरण दिले आहेत. उदाहरणार्थ, नामसाधित नामांचें स्वार्थदर्शक, कुत्सितत्वदर्शक इ० २२ प्रकार कल्पिले असून या सर्वांत मिळून ८६ प्रत्यय दिले आहेत! सारांश, हा प्राकृतिक साधित शब्दांचा भाग सूक्ष्म वर्गीकरण करून विशेष विस्तारानें दिला आहे.

(११) सर्व व्याख्या शक्य तितक्या व्यापक व शास्त्रदृष्ट्या शुध्द बनविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच प्रमाणें वा व्याकरणांत संधिनियम जसे शुद्ध स्वरूपांत दिले आहेत तसे ते इतर मराठी व्याकरणांत (दामले यांचे शास्त्रीय व्याकरणांत देखील) क्वचितच आढळतील.

(१२) वाक्यपृथक्करण, व्युत्पत्ति, छंदःशास्त्र, अलंकार इत्यादि भाग या व्याकरणांत नाहींत; आणि या व्याकरणाचें प्रयोजन पाहतां हे भाग नाहींत हें युक्तच होय असें दिसून येईल.

भिडेकृत मराठी भाषेचें व्याकरण:—मध्यम व्याकरणानंतर लवकरच त्याच्या खालोखाल असें हें पुस्तक धुळें ट्रेनिंग स्कूलचे हेडमास्तर बा. वि. भिडे यांनीं लिहिलें. यांत कांहीं नवे विचार असून वादग्रस्त मुद्दयांचा निर्णय ऊहापोह करून केला आहे हा यांतील विशेष आहे. या व्याकरण्यांत पुढील गोष्टी दिसून येतात:—

(१) राजानें ज्यांना इ. स्थलीं जा व ज्या यांतील आ या स्वराचा उच्चार कंठ्य नसून तालुकंठ्य आहे. येथें अधोरेखित 'आ'काराचा उच्चार पुढील इंग्रजी शब्दांतील a च्या उच्चारासारखा म्हणजेच तालुकंठ्य आहे आणि येथील 'य'कार हें य् व्यंजन नसून ती केवळ तालुकंठ्य उच्चारची खूण आहे. धंद्यानें than, जिन्यांत gant, मुलग्यास gas, प्याले pallid, नफ्यानें fan, हिऱ्यानें Ran, करित्ये, देशपांड्ये यांतही य् हें व्यंजन नसून तें एकाराच्या तालुकंठ्य तालव्य उच्चारचें दर्शकचिन्ह आहे. (२) नामांचें सामान्य व विशेष असे दोनच प्रकार केले आहेत. सोनें, कळप, सौंदर्य, दया हीं सामान्यनामेंच असें कारणें देऊन ठरविलें आहे. (३) द्वितीया, षष्ठीसुद्धां ८ विभक्ति मानल्या आहेत. द्वितीया ही सप्रत्यय अप्रत्यय अशी दुहेरी मानिली आहे. कर्मणि प्रयोगाव्यतिरिक्त कर्म असतां ती द्वितीया; मग प्रत्यय असो नसो, ज्ञानम् ही जशी संस्कृतांत प्रथमा व द्वितीया होते किंवा ज्ञानाभ्याम् ही जशी तृ० च० पंचमी होते तशी मराठींत ज्ञान ही प्रथमा

द्वितीया व ज्ञानास ही द्वि० चतुर्थी होण्यास हरकत नाहीं असें प्रतिपादिलें आहे. (४) काठीनें, घरीं, भरून हीं वाक्यांत अर्थदृष्ट्या क्रियाविशेषणें असतांही त्यांस आपण विभक्ति म्हणतों. तर घराचा इत्यादि अर्थदृष्ट्या विशेषणें होत असलीं तरी षष्ठी विभक्ति म्हणावयास काय चिंता आहे असें विवेचिलें आहे. (५) गळ्यांत म्हणजे गळ्याच्या आंत नव्हे. असेंच हातांत, पायांत, डोक्यांत यांचा अर्थही आंत या अव्ययाचे योजनेनें येत नाहीं म्हणून त हा सप्तमीचा प्रत्यय होय असा कोटिक्रम केला आहे. (६) गंगा, रमा यांचीं संबोधनरूपें मूळ शब्दांसारखीं किंवा एकारान्त दिलीं आहेत. येकारान्त केलीं नाहींत. येथें भाषेचा बदलता स्वभाव विचारांत घेतला आहे. (७) सकर्मक धातु म्हणजे 'ज्या धातूनें दर्शित क्रियेचा अर्थ पूर्ण होण्यास दुसऱ्या शब्दाची अपेक्षा असते ते धातु' अशी केली आहे. येथें अपेक्षा असलेले शब्द कोणत्या प्रकारचे,इत्यादि सांगण्याची आवश्यकता असल्यामुळें ही व्याख्या जरी अपूर्ण असली तरी ती बरीच सूचक आहे यांत शंका नाहीं. दामले यांस कर्माचें लक्षण बनवितांना या सूचक व्याख्येचा उपयोग झाला असावा असें वाटतें. (८) पुष्कळ प्रयोग चमत्कारिक केले आहेत. उदा० गोविंदाच्यानें ओझें उचलतें–अकर्मक कर्तरि. गोविंदाच्यानें (गोविंदाचें बळ) हें करण. गोविंदाला ओझें उचलतें. गोविंदाला–हेत्वर्थी च० गोविंदाला बसतां येतें. बसणें हा कर्ता बसतां येतें क्रियापद. (गंगू गाणें गातें याप्रमाणें बसणें बसतां येतें) मला जावें लागतें-जाणें हा कर्ता, जावें लागतें क्रियापद. मला कामें करावीं लागतात. कामें हा कर्ता, करावीं लागतात क्रियापद, अकर्मक कर्तरि प्रयोग. गोविंदानें गेलें पाहिजे. गोविंदानें हा कर्ता, भावे प्रयोग. गोविंदाला गेलें पाहिजे, जाणें हा कर्ता, गेलें पाहिजे क्रि० अक. कर्तरि. रामानें कामें केलीं पाहिजेत–कर्मणिप्रयोग रामाला कामें केलीं पाहिजेत कामें हा कर्ता केलीं पाहिजेत क्रि. अकर्मककर्तरि प्रयोग. ही प्रयोग करण्याची पद्धति मान्य होण्याजोगी नसली तरी ग्रंथकारानें स्वतंत्र बुद्धीनें विचार केल्याची द्योतक आहे. सारांश, ह्या लहानशा व्याकरणांतही कित्येक नवीन विचार आले असून ते पुढील व्याकरणकारांनीं पाहण्याजोगे आहेत.

नवलकर यांचें "स्टूडंट्स मराठी ग्रामर"— मराठी न कळणाऱ्या लोकांस इंग्रजीच्या द्वारा मराठी शिकण्यास उपयोगीं पडावें म्हणून हें व्याकरण तयार करण्यांत आलें आहे. मराठींत शब्दांतील वर्णोच्चार कसकसे होतात, लिंग, वचन, विभक्ति इ० विकारांच्या योगानें शब्दांत बदल कसकसे होतात, इत्यादिकासंबंधानें ह्या व्याकरणांत सविस्तर माहिती दिली आहे. ती परकीयांस मराठी शिकतांना फार उपयोगी पडण्याजोगी आहे. यांनीं शब्दांच्या जाती अर्थावरून ठरविल्या आहेत. उभयान्वयी अव्ययांस वाक्ययोगी म्हटलें आहे. नामांमध्यें समुदायवाचक हा भेद कल्पिला आहे. विभक्ति, कर्तृ, कर्म अशा अर्थानें मानाव्यात असें सुचविलें आहे. चतुर्थीस दानी विभक्ति असें नांव सुचविलें आहे. तथापि निव्वळ मराठी व्याकरणाच्या दृष्टीनें या पुस्तकाकडे पाहतां, याच्या योगानें मराठीच्या व्याकरणांत कांहीं विशेष भर पडली आहे असें आढळत नाहीं. नाहीं म्हणावयास कित्येक शब्दांची व्युत्पत्ति संस्कृत व प्राकृत भाषांच्या द्वारें कसकशी संभवते तें दाखविलें आहे व मधून मधून अनेक भाषांच्या स्वभावासंबंधानें कांहीं तुलनात्मक माहिती इंग्रजी पुस्तकांतून उद्धृत केलेली आहे. या पुस्तकाची दुसरी आवृत्ति १८८० त निघाली. तिसरी आवृत्ति १८९४ त छापलेली आहे. खेर यांनींहि असेंच एक व्याकरण १८७५ त लिहिलें आहे.

जोशांचें प्रौढबोध व्याकरण :—मध्यंतरीं इ. स. १८८८ साली श्री. रा. भि. जोशी यांनीं आपलें 'प्रौढबोध' व्याकरण लिहिलें. यांनीं चिपळूणकरांच्या बऱ्याच सूचना स्वीकारून त्या प्रत्यक्ष अमलांत आणण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु वाक्यपृथक्करणाचा भाग इंग्रजी व्याकरणाच्या वळणावर नेऊन एकंदर व्याकरणांत बरीच ढवळाढवळ केली त्यामुळें व्याकरणविषयक विचारामध्यें मुळींच प्रगति झाली नाहीं असें तज्ज्ञांचें मत आहे.

गुंजीकरांचें सुबोध व्याकरण :—या व्याकरणावर श्री. रा. भि. गुंजीकर यांनीं विविधज्ञानविस्तारांत विस्तृत टीका केली आहे. त्यानंतर त्यांनीं स्वतः 'सुबोध व्याकरण' लिहिलें. त्यांत द्वितीया व चतुर्थी भिन्न विभक्ती मानल्या असून त्यांचे प्रत्ययहि स्वतंत्र दिले आहेत. कर्तरि, कर्मणि व भावे प्रयोग या ऐवजीं कर्त्याचें, कर्माचें व क्रियापदाचें प्राधान्य अशा संज्ञा योजित्या आहेत. त्यांनीं आख्यात शब्दाचीहि योजना केली आहे. तसेंच पुरुषांस संस्कृतप्रमाणें उत्तम, मध्यम या संज्ञा वापरून तृतीय पुरुषांस अन्य संज्ञा वापरली आहे.

इतर व्याकरणकार :—या कालांत व्याकरणावर बरीच चर्चा चालू असून तींत चिपळूणकर पितापुत्रांप्रमाणेंच हातवळणे, आचार्य, वैद्य, पाध्ये, थत्ते, परांजपे, प्रो. ना. दा. घनहंही वगैरे अनेक विद्वानांनीं भाग घेतला

होता. प्रो. आगरकरांचा वाक्यमीमांसा हा ग्रंथहि बराच महत्त्वाचा असून एका नवीन अंगाची त्यामुळें व्याकरणांत भर पडली.

दामले यांचें शास्त्रीय मराठी व्याकरण:—दादोबा व कृष्णशास्त्री गोडबोले यांच्यानंतर मराठी व्याकरणांत महत्त्वाच्या सुधारणा सुचविणारा व विचारास विशेष चालना देणारा ग्रंथ म्हणजे श्री. मो. के. दामले यांचें 'शास्त्रीय मराठी व्याकरण' हा होय. हा १९११ त प्रसिद्ध झाला. या सुमारें एक हजार पृष्ठांच्या ग्रंथांत व्याकरणविषयक प्रश्नांचा विवेचक ऊहापोह केला असून मागील ग्रंथकारांच्या भागांचें चिकित्सक दृष्टीनें निरीक्षण करून व त्यांतील दोष दाखवून स्वतःच्या मतांचें मंडन केलें आहे. यांनीं आपल्या व्याकरणांत अनुस्वार, विसर्गास स्वरादि ही संज्ञा सुचविली आहे. शब्दांचे विकारी व अविकारी हे भेद सविभक्तिक व अविभक्तिक यांच्याऐवजीं कल्पिले आहेत; व विकारी शब्दांचे नाम, सर्वनाम, विशेषण व धातु अथवा क्रिया असे भेद करून अविकारी अथवा अव्ययांचे भेद रूढच ठेवले आहेत. नामांचे धर्मवाचक (भाववाचक) व धर्मिवाचक असे भेद करून धर्मिवाचकांत सामान्य व विशेष असे भेद केले आहेत. सर्वनामांचे पुरुषवाचक, आत्मवाचक, दर्शक, संबंधी, प्रश्नार्थक व अनिश्चित असे सहा भेद केले आहेत. व एकंदर सर्वनामें फक्त नऊ मानिलीं आहेत; तीं—मी, तूं, आपण, स्वतः, तो, हा, जो, कोण व काय. विशेषणांचे सार्वनामिक, गुण व संख्या असे तीन भेद केले आहेत. धातूंचे सकर्मक व अकर्मक असे भेद केले आहेत. तसेंच सिद्ध व साधित असे भेद केले आहेत. क्रियाविशेषणांचे रूपावरून सिद्ध, साधित व स्थानिक असे भेद करून अर्थमूलक म्हणून स्थल, काल, संख्या (परिमाण), व रीतिवाचक असे वर्ग कल्पिले आहेत. शब्दयोगी अव्ययांच्या वर्गीकरणाची विशेष आवश्यकता नाहीं असे सांगितलें, पण एक सोईकरितां दिलें आहे. या प्रकरणांत सामान्यरूपाबद्दल विस्तृत ऊहापोह केला आहे. उभयान्वयी अव्ययाचे प्रधानवाक्यसूचक व गौणवाक्यसूचक असे भेद केले आहेत; व त्यांचे पुन्हां पोटभेद केले आहेत. केवल प्रयोगी अव्ययांनीं सूचित होणाऱ्या निरनिराळ्या वृत्ति दाखविल्या आहेत.

नामाच्या अन्त्यावरून व प्रत्ययावरून लिंगनिर्बंध करण्याचे नियम केले आहेत. सामान्य लिंग मानण्याची गरज नाहीं असें दाखविलें आहे. नामांचें अनेकवचन करतांना होणारे विकार दाखविले आहेत. विभक्ति किती मानाव्या यासंबंधी विस्तृत उहापोह करून द्वितीया गाळून सात विभक्ति मानल्या आहेत व त्यांचे प्रत्यय देऊन ते लावतांना होणारे विकार दाखविले आहेत व नंतर विभक्तिकार्य करणारीं अव्ययें दिलीं आहेत. नंतर सर्वनामें व विकरणें दाखविलीं आहेत. क्रियापदांच्या प्रत्ययांस आख्यात प्रत्यय अशी संज्ञा वापरली आहे व त्यांची संख्या सांगितली आहे व त्यांस प्रथम ताख्यात (वर्तमान काल), द्वितीय ताख्यात (संकेतार्थ), लाख्यात (भूतकाळ), वाख्यात (विध्यर्थ), ई—आख्यात (रीतिभूतकाळ), ऊ—आख्यात (आज्ञार्थ), ईलाख्यात (भविष्यकाळ) अशा संज्ञा वापरल्या आहेत. नंतर या आख्यातांचे प्रत्यय देऊन ते कसे लागतात याचें विवेचन केलें आहे. तसेंच कर्तरि, कर्मणि व भावे या संज्ञांचें स्पष्टीकरण केलें आहे. नंतर व्युत्पत्ति प्रकरणांत साधित शब्द कसे बनतात तें दाखविलें आहे. नंतर वाक्यविचार या भागांत वाक्यरचनेमध्यें विभक्त्यर्थ, आख्यातार्थ, संयुक्त क्रियापद, प्रयोग, कर्ता, कर्म व क्रियापद हे विषय विवेचिले आहेत. व वाक्यपृथक्करणामध्यें वाक्यांच्या निरनिराळ्या जातींचा व अवयवांचा विचार केला आहे.

राजवाडे यांचीं पुस्तकें :—दामले यांच्या शास्त्रीय व्याकरणावर टीकात्मक म्हणून रा. वि. का. राजवाडे यांनीं सुबन्त व तिगन्त विचार म्हणून दोन उत्कृष्ट निबंध लिहिले आहेत. रा. राजवाडे यांची दृष्टि भाषेचा ऐतिहासिक दृष्टीनें अभ्यास करावयाची होती व तशी दृष्टि अद्यापपर्यंत रा. गोडबोले यांशिवाय कोणत्याच व्याकरणकारांनी वापरली नसल्यामुळें आतांपर्यंत झालेलीं मराठी भाषेचीं व्याकरणें मराठीच्या प्रकृतीच्या दृष्टीनें अपूरींच पडतात. मध्यंतरीं रा. ना. वि. आपटे यांनीं एक विचारप्रवर्तक असें व्याकरण लिहिलें आहे. यानंतर मराठी भाषेंत अनेक शालेपयोगी व्याकरणें झालीं परंतु ऐतिहासिक अथवा शास्त्रीय दृष्टीनें सखोल विचार करणारें व्याकरण अद्यापि तयार झालें नाहीं.

शालेपयोगी व्याकरणें:—दामले याच्या शास्त्रीय मराठी व्याकरणानंतर जरी सोपपत्तिक व शास्त्रीय दृष्टीनें विचार करणारा चांगला व्याकरण ग्रंथ तयार झाला नाहीं, तरी मराठी व्याकरणासंबंधीं जे मतभेद व घोटाळे वारंवार मजरेस येत ते काढून टाकून शाळेमध्यें शिकविण्याच्या दृष्टीनें व्याकरणास निश्चित स्वरूप यावें याकरितां सरकारी

शिक्षणखात्याकडून एक समिति नेमण्यांत आली होती. या समितीनें एक प्रश्न-पत्रिका काढून अनेक विद्वानांचीं व व्याकरणकारांचीं मतें मागवून आपले निर्णय प्रसिद्ध केले. व त्या निर्णयांस अनुसरून सांप्रत शालोपयोगी मराठी व्याकरणावरील पुस्तकें अनेक शिक्षकांकडून तयार करण्यांत येत आहेत.

तथापि या निर्णयांनीं अनेक विद्वान् लोकांचें समाधान झालें नाहीं; व मराठी व्याकरणाचा पाया अधिक शास्त्रशुद्ध तत्त्वांवर घातला जाऊन मराठी भाषेच्या प्रकृतीस अनुसरून तिचें व्याकरण लिहिलें जावें अशा तऱ्हेचा प्रयत्न करणें आवश्यक होतें. या उद्देशास धरून कोल्हापूर येथें १९३२ च्या डिसेंबरमध्यें भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनामध्यें एक समिति नेमण्यांत आली. या समितीचे कार्यवाह रा. य. रा. दाते हे होते. या समितीनें अनेक विद्वानांकडून सूचना मागवून त्यांस अनुसरून एक प्रश्न-पत्रिका तयार केली व त्या प्रश्न-पत्रिकेवर अनेक विद्वानांचीं मतें मागविणें व अनेक विद्वानांशीं प्रत्यक्ष चर्चा करणें हीं कार्यें दोनतीन वर्षें करून आपले कांहीं प्राथमिक निर्णय बडोदें येथील, साहित्य संमेलनापुढें मांडले व त्यानंतर त्यावर अधिक चर्चा करून इंदूर येथील साहित्य संमेलनापुढें आपले निर्णय मांडले. या समितीचे निर्णय पुढें दिले आहेत.

व्याकरण समितीचे निर्णय

रचनापद्धतिः – मराठी व्याकरणाची रचनापद्धति तिचा विशिष्ट स्वभाव लक्षांत घेऊन करणें अवश्य असल्यानें ती कोणत्याच भाषेच्या व्याकरणाला पूर्णीशानें अनुसरून होणार नाहीं. परंतु मराठी भाषेची परंपरा ही संस्कृत, प्राकृत अपभ्रंशादि भाषास विशेष अनुसरून असल्यानें त्या भाषांच्या व्याकरणाचा मुख्य आधार घेऊन मराठीच्या व्याकरणाची रचना करावी; तसेंच परभाषांतील ज्या गोष्टींचें अनुकरण मराठीनें केलेलें आहे, त्या गोष्टी अनिष्ट नसतील तर त्यांचा समावेशहि 'मराठी व्याकरणा'त करण्यास हरकत नाहीं.

वर्णविचारः—स्वरांची संख्या–यामध्यें निर्विवाद स्वर म्हणजे अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ आहेत. बाकी राहिलेल्यांचा विचार करूं. दीर्घ ऌ हा स्वर मराठींत नाहीं आणि संस्कृतातहि नाहीं. म्हणून तो गाळावा. ह्रस्व ऋ मराठींत आहेच. ह्रस्व ऌ संस्कृतात आहे. मराठींत तो फक्त तत्सम शब्दांत येतो कीं तद्भव शब्दांत येतो येवढाच प्रश्न; परंतु तो कोणत्याहि शब्दांत आला तरी त्याचें अस्तित्व आहेच. दीर्घ ॠ मराठींत येत नसल्यामुळें तो गाळण्याचा प्रश्न उत्पन्न होतो. परंतु संकृतातील वर्णांपैकीं ॠ विना बाकी सर्व वर्ण मराठींत आलेले असल्यामुळें व मराठीमधील संधि-विचार प्रायः संस्कृतप्रमाणें असल्यामुळें पितृ + ऋण अशासारख्या संस्कृत उदाहरणात त्याची आवश्यकता उत्पन्न होते. म्हणून दीर्घ 'ॠ' मराठींतून गाळूं नये असे आम्हास वाटतें. अं, अः—अनुस्वार आणि विसर्ग याना 'अ' स्वर जोडून अं, अः हे झालेले आहेत. यांना जरी स्वराच्या संख्येंत दाखल केलेलें असलें तरी त्याना अनुस्वार आणि विसर्ग अशीं नावें आहेत. अर्थात् उपयोगाच्या दृष्टीनें वाद नसून त्यांना स्वराच्या यादींत घालावें कीं नाहीं व स्वरामध्यें घालावयाचे नसल्यास कोठें घालावें हाच मुख्यतः वादाचा प्रश्न आहे. अनुस्वार आणि विसर्ग हे स्वर नाहींत. कारण (१) त्याचा उच्चार स्वतंत्रपणें करतां येत नाहीं; (२) स्वर व्यंजनाला जोडून आले म्हणजे अक्षर तयार होतें, पण अनुस्वार आणि विसर्ग हे व्यंजनाला जोडून आले तरी अक्षर बनत नाहीं. अनुस्वार आणि विसर्ग हीं व्यंजनेंहि नाहींत. कारण (१) व्यंजनाला स्वर जोडून अक्षर बनलें तरी वाचतांना आपण प्रथम व्यंजनाचा उच्चार करतों. परंतु अनुस्वाराचा उच्चार स्वरानंतर होतो. (२) जोडाक्षरामध्यें दोन व्यंजनें यावीं लागतात. पण अनुस्वार वा विसर्ग दोन व्यंजनांपैकीं एका ठिकाणीं येऊन चालत नाहीं. आतां अनुस्वार किंवा विसर्ग पुढें आला असतां त्यामुळें जोडाक्षराप्रमाणें वृत्तामध्यें मागील स्वरास गुरुत्व येतें हें खरें; तथापि तेवढ्यावरून अनुस्वार व विसर्ग याचें व्यंजनत्व सिद्ध होत नाहीं. म्हणून त्यांचा समावेश स्वर किंवा व्यंजनें यांमध्यें न करता त्यांचा स्वतंत्र वर्ग करावा.

एतावता अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ए, ऐ ओ, औ, हे स्वर आणि ं अनुस्वार व ः विसर्ग हे 'अयोगवाह' समजावे. अयोगवाहींचें स्थान स्वरानंतर व व्यंजनांपूर्वी म्हणजे सध्याचें आहे तेथेच ठेवणें युक्त आहे.

व्यंजनांची संख्या :—व्यंजनांच्या संख्येंत क्ष, त्र, ज्ञ, श्र, हीं चार वादग्रस्त होत. ण्, न्, म्, यांचा उपयोग


स्वतंत्रपणें शब्दांत होतो; तसा ङ्, ञ्, याचा होत नाहीं. परंतु त्यांचा उपयोग संस्कृत तत्सम शब्दांत होतो. उदा०— वाङ्मय, पराङ्मुख. ञ् अनुनासिकाचा उच्चार मराठींत करण्याची प्रायः रूढी नाहीं. परंतु कांचन, तंजावर, जंजाळ अशा शब्दांतून तो स्पष्टपणें दिसतो. म्हणून ङ्, ञ्, यांना व्यंजनांच्या संख्येंतून गाळण्याची आवश्यकता वाटत नाहीं. क्ष्, ज्ञ्, यांची गणना सध्यां व्यंजनांमध्यें होत असली तरी तीं जोड व्यंजनें असल्यानें तीं व्यंजनांच्या संख्येंतून गाळावीं.

अंतःस्थांचाक्रम य्, र्, ल्, व् असा असावा किंवा य्, व्, र्, ल् असा असावा ? इ, उ, ऋ, ऌ यास होणारे आदेश अनुक्रमें य्, व्, र्, ल् असे आहेत. उलट य्, व्, र्, ल्, यांचें संप्रसारण इ, उ, ऋ, ऌ असें होतें. या दृष्टीनें य्, व्, र्, ल् असा क्रम रूढ करणें सकृद्दर्शनीं आवश्क वाटतें. उलट य्, व्,र्, ल् असा अंतःस्थांचा क्रम बदलण्याऐवजीं सध्यां असलेला स्वरांचा क्रम इ, ऋ, ऌ, उ. असा बदलण्यानेंहि उपरिनिर्दिष्ट अडचण दूर होईल हें खरें. पण त्यायोगें पुष्कळ ठिकाणीं फेरफार करावा लागेल. म्हणून अंतःस्थांचा क्रम बदलावयाचा तर तो य्, व्, र्, ल् असा बदलणें इष्ट होईल. परंतु वर्णमालेंत अंतःस्थांचा असलेला क्रम स्थानभेदानें ठरलेला दिसतो. व्यंजनापुरता विचार केल्यास क वर्ग कंठ्य, च वर्ग तालव्य, ट वर्ग मूर्धन्य, त वर्ग दंत्य, प वर्ग ओष्ठ्य, असा स्थानक्रम आहे. याच क्रमानुसार य्, र्, ल्, व् हा अंतःस्थांचा क्रम लावलेला आहे. य् तालव्य, र् मूर्धन्य, ल् दंत्य आणि व् दंत्यौष्ठ्य अशीं स्थानें असल्यानें क्रम एका तत्त्वानें केलेला दिसतो. पुढचा क्रम पाहिल्यासहि श् तालव्य, ष मूर्धन्य, स् दंत्य बरोबरच आहे. ळ् मराठी म्हणून शेवटीं देणें युक्त ह् चा संबंध स् शीं अधिक म्हणून तो स् नंतर असावा.


कंठ्य, तालव्य, मूर्धन्य, दंत्य, ओष्ठ्य हा स्थानक्रम बरोबर नसून वास्तविक क वर्ग, ट वर्ग, च वर्ग, त वर्ग आणि प वर्ग अशी व्यवस्था पाहिजे असा एक प्रश्न आहे. या दृष्टीनें स्वरांचा क्रम अ, आ, ऋ, ॠ, इ, ई, ऌ, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ, व व्यंजनांचा क्रम क, ट, च, त, प असे वर्ग र्, य्, ल्, व्, ह्, ष्, श्, स्, ळ् असा लागतो. यांमध्यें ह् चें स्थान प वर्गानंतर किंवा सध्यांप्रमाणें स् पुढें येण्यासहि प्रत्यवाय नाहीं.

क्रम बदलल्यास तो कसा लागेल हें पाहिलें, तरी क वर्गानंतर च वर्गास स्थान कां दिलें गेलें याचाहि विचार करणें अवश्य आहे. द्राविडी भाषांतून ट वर्ग मागाहून घेतला गेला असें मानलें तरी त्याला च वर्गानंतरचें स्थान कां दिलें गेलें असा प्रश्न उत्पन्न होतो. मुखांतील स्थानांचा क्रम कोणता हाहि वादग्रस्त प्रश्न आहे. जिभेचें टोंक आंतून बाहेर ज्या क्रमानें लागतें त्या क्रमानें कंठ, तालु, मूर्धा...इत्यादि क्रम आहे असें कांहींचें म्हणणें आहे. उच्चाराच्या वेळीं जेथून वायु निघतो तें त्याचें स्थान या दृष्टीनें विद्यमान क्रम बरोबर आहे असें कांहींचें म्हणणें आहे. परंतु प्रातिशाख्यामध्यें कंठ्य, मूर्धन्य, तालु, दंत्य, ओष्ठ्य असा क्रम नमूद असून 'ळ्' इत्यादींचा उच्चार स्पष्ट केल्यास तो क्रम बरोबर दिसतो. तथापि सध्यांच्या क्रमामध्यें बदल करण्यापासून व्यवहारदृष्ट्या फायद्यापेक्षां अडचणी अधिक उत्पन्न होण्याचा संभव असल्यानें आज वर्णांच्या क्रमांत बदल करावा असें आम्हांला वाटत नाहीं.

शब्दांचें वर्गीकरण



नामाचें वर्गीकरण



रूपसिद्धीच्या दृष्टीनें नामांचे पोटप्रकार पाडतां येत नाहींत. परंतु रूपसिद्धीच्या दृष्टीनें नामांच्या पोटप्रकारांची आवश्यकता नसली तरी भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीनें त्यांची आवश्यकता आहे असें आम्हांस वाटत. वर्गीकरण करतांना ' रूपसिद्धि व अर्थ हें एकच भेदक तत्त्व लावणें इष्ट आहे ' हें लक्षांत घेऊन शक्य तितकें शास्त्रशुद्ध वर्गीकरण करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

सर्वनामें :—सर्व प्रकारच्या नामांकरितां ज्या शब्दांचा उपयोग करतां येतो व ज्यास वाक्यांत त्या नामांचा अर्थ प्राप्त होतो त्या शब्दांस सर्वनामें म्हणावें अशासारखी सर्वनामाची व्याख्या स्वीकारावी. सर्वनामांनीं प्रथम, द्वितीय व तृतीय यांपैकीं कोणता तरी पुरुष दर्शविला जातो. त्यांपैकीं मी आम्ही (कधीं कधीं आपण, स्वतः) यांनीं प्रथम पुरुष, तूं तुम्ही (कधीं कधीं आपण, स्वतः) यांनीं द्वितीय पुरुष आणि बाकी सगळीं सर्वनामें (व नामें) यांनीं तृतीय पुरुष दर्शविला जातो.

पुरुष हें भेदक तत्त्व मानून सर्वनामांचे प्रकार करावयाचे तर (१) प्रथम पुरुषवाचक सर्वनामें ,(२) द्वितीय पुरुषवाचक सर्वनामें व (३) तृतीय पुरुषवाचक सर्वनामें असे प्रकार करावे लागतील, अर्थाच्या दृष्टीनें अधिक प्रकार करावयाचे तर ते तृतीय पुरुषवाचकांचे होतील; ते म्हणजे दर्शक, संबंधी, प्रश्नार्थक व सामान्य हे होत.

मी, तूं, तो, हा, जो, कोण, कोणी, काय, आपण, स्वतः हीं सर्वनामे होत. वाक्यदर्शक ' असें ' शब्दाचा उपयोग सर्वनाम म्हणून होतो.

सर्वनामांचे प्रकार :—प्रथम पुरुषवाचक–मी–आम्ही, आपण, स्वतः (कधीं कधीं). द्वितीय पुरुषवाचक–तूं–तुम्ही. तृतीय पुरुषवाचक–आपण, स्वतः (कधीं कधीं) दर्शक–तो, ती, तें,–ते, त्या, तीं; हा, ही, हें-हे, ह्या,हीं; असें. संबंधी –जो, जी, जें–जे, ज्या, जीं. प्रश्नार्थक–कोण, काय. सामान्य–कोण, कोणी, काय, आपण, स्वतः. सार्वनामिक विशेषणवाद–मराठीची प्रवृत्तिच अशी आहे कीं, आधिक्य दाखविण्यासाठीं एका शब्दाचा दोनदां उच्चार करतात. त्याचप्रमाणें निर्देश स्पष्ट होण्यासाठीं नामापाठीमागें नाम किंवा सर्वनाम घालण्याची रूढी आहे. तसेंच नामामागें नाम घातलें असतां मागल्या नामाची जात नामाऐवजीं विशेषण सांगण्याची रूढी नाहीं. ' अकबर बादशहा ' असें म्हटलें असतां अकबर व बादशहा या दोन शब्दांपैकीं एकाची जात विशेषण व एकाची जात नाम असें कांहीं सांगितलें जात नाहीं. ' राजा घरीं नव्हता ' आणि ' रामा तेथें नव्हता ' यांपैकीं पहिल्या वाक्यांत ' घरीं ' ही अधिकरणार्थी सप्तमी असें सांगतात; ' तेथें ' प्रमाणें स्थलवाचक क्रियाविशेषण म्हणून सांगितलें जात नाहीं. याच न्यायानें नामामागें सर्वनाम दिसलें (उदा०—हा मनुष्य) तर त्या सर्वनामाला विशेषण म्हणण्याची आवश्यकता आहे असें आम्हांला वाटत नाहीं.

विशेषण:—पदार्थाचा गुण किंवा संख्या दाखविणारा जो शब्द त्याला विशेषण म्हणावें. विशेषणांचे प्रकार दोन–(१) गुणविशेषणें व (२) संख्याविशेषणें. ' विधि विशेषणें ' हा स्थानभेदानें होणारा प्रकार अवश्य तर सांगावा.

परंतु त्याचा समावेश वरील प्रकारांतच होतो. विशेषणें हीं नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, अव्यय या सर्वांचे गुण दर्शविण्यासाठीं येतात; म्हणजे विशेषणाचें विशेष्य हें सर्व जातींत असूं शकतें. अर्थात् त्या दृष्टीनें विशेषणाचे अनेक प्रकार होतील. परंतु तितके करण्याची आवश्यकता दिसत नाहीं.

संयुक्त क्रियापदें:—धातूनें बोधित क्रियेचें विधान क्रियेचे काल, प्रयोग इत्यादि व्याकरणदृष्ट्या करतांना सांगण्यासाठीं प्रयोजिला जाणारा धातु सहाय-धातु होय; व या दोन्हीं धातूंनीं बनलेलें क्रियापद तें संयुक्त क्रियापद होय. संयुक्त काळ मानावे.

विभक्ति विचार:—ज्याच्या प्रातिपदिकाचा पदशब्द होतो त्या प्रत्ययाला (व प्रत्यययुक्त शब्दालाहि) विभक्ति म्हणतात. अर्थात् रूपावरून विभक्त्या मानाव्या. प्रथमा, तृतीया, पंचमी, सप्तमी, संबोधन या विभक्त्यांच्या रूपांबद्दल वाद नाहीं. ज्याअर्थी विभक्ति ठरविण्यासाठीं प्रातिपदिकांचें वाक्यगत रूप पहावयाचें किंवा विभक्ति म्हणजे प्रत्यय त्याअर्थी द्वितीया व चतुर्थी या दोन विभक्त्यांचीं रूपें सारखीं असल्यामुळें त्यांपैकीं एक विभक्ति गाळणें अवश्य आहे. एक विभक्ति गाळणाऱ्या वैय्याकरणांनीं द्वितीया गाळलेली आहे. गाळली तर चतुर्थी गाळावी असें कांहींनीं म्हटलेलें आहे. गाळली तर चतुर्थी गाळावी हें अधिक इष्ट दिसतें. परंतु गाळणाऱ्या वैय्याकरणांनीं द्वितीया गाळलेली असल्यानें एक विभक्ति गाळावयाची झाल्यास द्वितीया गाळणें युक्त होईल. परंतु ही सूचना मान्य होण्यासारखी नसेल तर निदान अप्रत्यय द्वितीया गाळून (कारण रूपावरून विभक्ति विचार केल्यावर अप्रत्यय द्वितीयेचीं रूपें प्रथमेचीं होत हें स्पष्ट आहे.) सध्यांप्रमाणें द्वितीया व चतुर्थी मानाव्या. 'रामा आंबा खातो' अशासारख्या वाक्यांत आंबा शब्दाची विभक्ति प्रथमा असून तिचा अर्थ कर्म आहे असें म्हणावें. षष्ठीच्या प्रत्ययाचीं रूपे लिंगवचनाप्रमाणें बदलतात; परंतु तेवढ्यावरून षष्ठ्यंत रूपें विभक्तिरूपें नव्हेत असें म्हणतां येत नाहीं. कारण षष्ठीचे प्रत्यय लागण्यापूर्वी सविभक्तिकांचें सामान्यरूप होतें. त्याचप्रमाणें कधीं कधीं षष्ठीचा संबंध क्रियापदाशींहि असतो.

आख्यात व्यवस्था:—नामादिकांना होणारा विकार म्हणजे विभक्ति, त्याचप्रमाणें धातूंना क्रियापद होण्याकरितां होणारा विकार म्हणजे आख्यात होय. प्रायः समानार्थक विभक्तिरूपांचे गट करून त्यांना प्रथमादि क्रमवाचक अर्थहीन नांवें दिलीं, त्याचप्रमाणें आख्यात रूपांचे समानार्थक गट करून त्यांना विभक्तिप्रमाणें नांवें देणें युक्त दिसतें. अर्थ विचारांत घेऊन ज्याप्रमाणें कारकार्थांची योजना केलेली आहे त्याप्रमाणेंच काळ व अर्थ सांगण्याची योजना आख्यातांच्या बाबतींत करावी असें म्हणणारा एक पक्ष आहे. तात्त्विक दृष्ट्या ही विचारसरणी कोणालाहि मान्य होण्यासारखी आहे. प्रायः लाख्यातांचा रूपें भूतकाळ दर्शवितात, ताख्यातांचीं रूपें वर्तमानकाळ दर्शवितात, व्याख्यातांचीं रूपें विध्यर्थ दर्शवितात.....वगैरे. म्हणून लाख्यातांला भूतकाळ, ताख्यातांला वर्तमानकाळ, व्याख्यातांला विध्यर्थ.....अशीं नांवें दिलीं जातात. यामुळें कधीं कधीं रूपावरून मानला जाणारा काळ व प्रत्यक्ष काळ यांमध्यें फरक आढळतो. ही अडचण दूर होण्यासाठीं प्रत्यक्ष असणारा काळ सांगावा, आणि रूपासाठीं अवश्य तर कोणता प्रत्यय लागलेला आहे, तें सांगावें. विभक्तीप्रमाणें आख्यात प्रत्ययांना क्रमवाचक नांवें देऊन व्यवस्था करण्यानें विभक्तीपेक्षांहि अधिक वादग्रस्त प्रश्न उत्पन्न होणारे असल्यानें तशी व्यवस्था करणें सोईचें होणार नाहीं असें आम्हांस वाटतें.

वाक्य पृथक्करण:—मराठी भाषा ही विभक्तिप्रचुर असल्यामुळें वाक्याचा अर्थबोध होण्यास अडचण पडत नाहीं हें खरें असलें तरी वाक्यांतील प्रत्येक शब्दाचें व्याकरण करणें आणि वाक्य पृथक्करण हीं एकमेकांस पूरक आहेत. म्हणून वाक्य-पृथक्करण हा भाग मराठींत ठेवण्यास हरकत नाहीं.

प्रयोग:—वाक्यांतील क्रियापदाचें त्याच्या कर्त्याशीं किंवा भावाशीं पुरुष, लिंग, वचन या बाबतींत जें साधर्म्य त्याला प्रयोग म्हणतात. प्रकार ३–(१) कर्तरी, (२) कर्मणि, (३) भावे.

वादग्रस्त प्रयोग निर्णय:—त्यानें कथा श्रवण केली—त्यानें कर्ता, कथा कर्म, केली क्रियापद; कर्मणि प्रयोग. मी स्नान केलें.—कर्तरि. वैद्यानें रोग्याला बरा केला.—कर्मणि. त्याचें लिहून झालें.—लिहिणें हा अध्याहृत कर्ता, लिहून झालें क्रियापद; कर्तरि. मला गांवीं जाणें आहे.—जाणें कर्ता; कर्तरि. मला स्वप्न पडलें.—स्वप्न कर्ता, पडलें क्रियापद; कर्तरि.

सभा:—नारायण गोविंद चाफेकर, यशवंत रामकृष्ण दाते, वासुदेव कृष्ण भावे, गोविंद पांडुरंग पावशे, दिनकर धोंडो परांजपे, कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, राजाराम दामोदर देसाई.

या निर्णयास वरील निर्णय देणाऱ्यांपैकीं रा. गो पां. पावशे यांनीं आपली भिन्न मतपत्रिका जोडली असून तींत " पाणिनीची व्या० रचना पद्धति कोणत्या तात्त्विक पायावर उभारली आहे व त्याचा मराठी व्या० रचनेशीं कसकसा संबंध जुळतो, या गोष्टींचा विचार जसा आजपर्यंतच्या वय्याकरणांनीं केला नाहीं, तसाच तो प्रस्तुत सभासदांनीहि केला नसावा. म्हणून त्यांना व इतर वाचकांना त्यांनी ओळख करून देणें क्रमप्राप्त आहे;" असें म्हणून ती रचनापद्धति त्यांनीं थोडक्यांत दिली आहे.

सन १९३६ ची व्याकरण परिषद:— त्यानंतर दादोबा पांडुरंग यांच्या व्याकरणशताब्दीच्या निमित्तानें १९३६ सालीं पुणें येथें एक व्याकरण परिषद भरविण्यांत आली होती. त्या परिषदेनें विशेषतः मराठी भाषेच्या व्याकरणाची रचना कशी असावी व शब्दांचें वर्गीकरण कसें करावें या दोन प्रश्नांची चर्चा केली. अशीच चर्चा सर्व प्रश्नांची व्हावी असा तिचा उद्देश होता, पण त्यानंतर अद्यापि तसा प्रसंग पुन्हां आला नाहीं. असो.

आजचें व्याकरण कसें असावें ?:— मराठी भाषा ही संस्कृत भाषेपासून महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश यांच्या द्वारें प्रस्तुत रूपांत परिणत झालेली असून तिच्यावर सान्निध्यामुळें कानडी, तेलगी वगैरे द्राविड भाषांचा व राजकीय वर्चस्वामुळें अरबी व फारशी भाषा यांचा व नंतर इंग्रजी भाषेचा बराच परिणाम झाला असल्यामुळें सांप्रत च्या मराठी भाषेचें व्याकरण करावयाचें तें तिच्या जरी प्राकृतिक स्वरूपावर आधारलेलें असलें तरी सांप्रतच्या रूढ पद्धतीस अनुसरून स्वतंत्र रीतीनें तयार होणें अवश्य आहे. व जे नवे नवे प्रकार सांप्रत भाषेंत व व्याकरणांत रूढ होत आहेत त्यांचाहि अंगीकार या व्याकरणानें केला पाहिजे हें निर्विवाद होय. आतांपर्यंत जी मराठी व्याकरणांची रचना विशेषतः इंग्रजी अमदानीपासून झाली ती ऐतिहासिक दृष्टीचा मुळींच अवलंब न करतां केवळ कांहीं तरी सांचां पुढें ठेवून त्यास धरून अनुकरणात्मक पद्धतीनें झाली. परंतु सांप्रत कोणत्याहि विषयाची मांडणी करावयाची म्हणजे ती त्या विषयाची वाढ ऐतिहासिक दृष्टीनें कसकशी होत गेली हें निरनिराळ्या पायऱ्या दाखवून केली म्हणजे ती त्या विषयाच्या मूळ प्रकृतीचा जो इतर आनुषंगिक कारणांस अनुलक्षून विकास होतो त्यास अनुसरून होते व अशाच पद्धतीनें आज प्रत्येक शास्त्राचा व विषयाचा अभ्यास करण्याची प्रथा पडत चालली आहे व ती अत्यंत इष्ट आहे. मराठी व्याकरणांत ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब फक्त श्री. वि. का. राजवाडे यांनींच केलेला आढळतो. त्यांनींच ज्ञानेश्वरीचें व्याकरण आणि सुबंत व तिंगत विचार लिहिले पण त्याच पद्धतीनें मराठीच्या संपूर्ण व्याकरणाचें विवेचन केलें नाहीं व तसा प्रयत्न आजपर्यंत इतरहि कोणी केला नसल्यामुळें मराठी भाषेचें शास्त्रशुद्ध व पद्धतशीर व्याकरण अद्यापि तयार व्हावयाचें आहे असें म्हटलें पाहिजे. असो.

मराठीची शब्दसंपत्ति :—आतांपर्यंत मराठी भाषेच्या रचनेच्या दृष्टीनें व्याकरणाचा विचार केला; त्यानंतर मराठी भाषेचें जें महत्त्वाचें दुसरें अंग म्हणजे त्या भाषेंतील शब्दसंपत्ति, तीसंबंधीं विचार करूं. मराठी भाषा ही संस्कृत संभव असल्यामुळें मराठी भाषेंत कांहीं शब्द जसेच्या तसेच संस्कृत भाषेंतून आले आहेत, यांस तत्सम असें म्हणतात यानंतर संस्कृत भाषेमधून ज्या निरनिराळ्या प्राकृत भाषा निघाल्या त्यांपैकीं महाराष्ट्रीय प्राकृत भाषेचाच मराठीला जरी मूळ आधार असला तरी पाली, मागधी, वगैरे प्राकृत भाषांचाहि परिणाम मराठीवर कांहीं बाबतींत झाला आहे ही गोष्ट चवथ्या विभागाच्या प्रस्तावनेंत आपण पाहिलीच आहे. तेव्हां अशा तऱ्हेनें संस्कृत भाषेपासून अपभ्रंश पावून मराठींत अनेक शब्द आले आहेत, त्यांस तद्भव असें म्हणतात. याखेरीज जी या प्रदेशांतील मूळची भाषा होती तिचेहि कांहीं शब्द त्या भाषेंत टिकून राहिले असून त्यांची व्युत्पत्ति कोणत्याच संस्कृत शब्दापासून संभवत नाहीं, त्यांस देश्य असें म्हणतात. याखेरीज मराठीमध्यें अरबी व फारसी शब्द व अरबी व फारसी भाषांच्या धर्तीवर बनलेलेहि कांहीं शब्द आहेत व आज तर इंग्रजी भाषेमधून कांहीं शब्द जसेच्या तसेच अगर रूपांतर पावून मराठींत येत आहेत व मध्यंतरी पोर्तुगीज व फ्रेंच इत्यादि भाषांतूनहि कांहीं आले आहेत; तरी यापुढें संस्कृत, अरबी व फारसी या भाषांमधून मराठींत शब्द कसे सिद्ध होत गेले ते थोडक्यांत पाहूं व त्याचप्रमाणें मराठींतहि याच क्रियांनीं एका शब्दापासून दुसरे शब्द बनविण्याची क्रिया कस कशी होत असते त्याचेंहि दिग्दर्शन करण्यांत येईल. कारण, मूळ कोशांत जरी बरेच साधित शब्द दिले

असले तरी सर्व साधित शब्द देणें शक्य नाहीं. याकरितां असे साधित शब्द बनण्याची पद्धति व त्यांची कांहीं उदाहरणें येथें दिलीं म्हणजे त्यांवरून अशा प्रकारच्या साधित शब्दांचा अर्थ कळणें सुलभ होईल.

साधित शब्द:—संस्कृत भाषेंत जे उपसर्ग आहेत ते निरनिराळ्या धातूंस लागून त्यांपासून अनेक साधित शब्द निरनिराळ्या अर्थाचे तयार होतात. अशा कांहीं शब्दांचीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. **अति**—फार, **फारच,** अधिक, प्रमाणापलीकडे–अतिक्रम, अतिरेक, अत्युक्ति, अतिशय इ. **अधि**—वर्चस्व, योग्यतेनें किंवा मानानें वर अधिकार, अधिपति इ. **अनु**—मागें, बराबर, जवळ, सारखें, साहचर्य, सादृश्य–अनुभव, अनुज, अनुरूप इ. **अप**—कमी, योग्यतेनें खालीं, न्यूनत्व–अपगत, अपशकुन, अपकर्ष इ. **अपि**—(क्वचित् पि) सांन्निध्य, जवळ, वर–अपिधान, पिधान, अपिनद्ध इ. **अभि**—पुढें, समीप, सर्वत्र, चोहोंकडे;–अभिज्ञ, अभिरुचि, अभिमान इ. **अव**—न्यूनत्व, **पासून,** खालीं, अप्रतिष्ठा–अवनत, अवकृपा, अवतार इ. **आ**—पर्यंत, कडे, थोडा, हलका;–आज्ञा, आकार, आनंद, आदर, आयुध इ. [कितीएक धातूंच्या मागें 'आ' लागल्यानें त्यांचा अर्थ मूळ अर्थाच्या उलट होतो. उदा० गमन–जाणें. आगमन–येणें. दान–देणें. आदान–घेणें.] **उत्** किंवा **उद्**—वर, उंच, बाहेर;–उत्कर्ष, उत्तेजन, उत्प्रेक्षा, उत्तान. **उप**—संन्निध; योग्यतेनें खालीं, कडेस; उपनेत्र, उपक्रम, उपकार इ. **दुस्, दुर्**—कठीण, दुष्ट, निंद्य, वाईट;–दुर्गुण, दुराचार, दुःख इ. **नि**—अत्यंत, रहित, आंत, मध्यें;–निधन, निबंध, नियोग. **निस्, निर्**–अभाव, बाहेर, शिवाय, उलट;–निराकार, निष्कारण, निर्बंध, निष्कृति इ. **परा**—विपरीत, मागें, उलट–पराजय, पराभव इ. **परि**—सभोंवती–परिकर, परिसर, परिचर्या. **प्र**—पुढें, बाहेर, दूर, अधिक, वर्चस्व–प्रभात, प्रताप, प्रदेश, प्रकार इ. **प्रति**—पुनः, मागें, उलट, बदल–प्रतिबिंब, प्रतिशब्द, प्रत्यक्ष, प्रतिवादी. **वि**—वेगळा, विशेष, अधिक, गेलेला–विरक्त, वियोग, विराम. **सम्**—चांगलें, एकत्र, बरोबर–संगम, संभव, संबंध, संसार इ. **सु**—चांगलें, सोपें, पुष्कळ–सुकर, सुप्रभात, सुख इ. कधीं कधीं दोन दोन तीन तीन उपसर्गहि एका शब्दांत दृष्टीस पडतात. उदा०—अत्युत्कृष्ट, अध्याक्षेप, व्यवधान, सुसंगति, प्रत्यपवाद, संप्रदान, व्याकरण इ.

या उपसर्गाशिवाय दुसरीं कित्येक अव्ययें व विशेषणें शब्दांच्यापूर्वीं येऊन साधित शब्द बनतात. उपसर्गाप्रमाणें हीं केव्हांहि निरर्थक नसतात. यांना अनेक भिन्न अर्थहि नसतात. त्यांची अर्थासह यादी पुढें दिली आहे.

अ—(शब्दाचें आद्याक्षर स्वर असल्यास अ बहुल 'अन्' येतो) अभाव, निषेध;–अनक्ष, अकम, अधर्म, **अनादर,** अनर्थ, अनपत्य. **अद्**—आश्चर्यदर्शक;–अद्भुत. **अधस्**—खालीं, खालच्या भागीं;–अधःपात, अधोमुख इ. **अंतर्**—आंत, मध्यें;–अंतर्द्वार, अंतपुर, अंतःकरण इ. **अमा**—जवळ, बरोबर, संन्निध;–अमावास्या, अमात्य इ. **अलम्**—शोभा (हें कृ धातूत्पन्न शब्दांपूर्वी लागतें)–अलंकार, अलंकरण इ. **आविर् स्**–उघड, दृश्य;—आविर्भूत, आविर्भाव, आविष्करण इ. **आशु**—लवकर, वेगानें,–आशुग (वायु, बाण); आशुव्रीहि (लवकर पिकणारें भात–हळवें भात). **इति**—असें, ह्या प्रकारें, शेवट;–इत्यर्थ, इतिहास (इति–ह–आस असें असें झालें) इतिवृत्त,इत्यादि इ. **इत्थम्**—ह्या प्रमाणें;–इत्थंभूत. **ईषत्**—किंचित्, थोडें,–ईषद्धौर. **उच्चैः**—उंच, मोठ्यानें;–उच्चैःश्रवा, उच्चैर्घोष इ. **उरि, उरी, ऊरी**–विस्तार, अंगीकार–उरीकृत (स्वीकारलेला). **कु, का**—वाईट, दुष्ट, हलकें, थोडें–कुकर्म, कुवासना, कुपुरुष, कु (का) पथ इ. **चिरम्** (र)–दीर्घकालपर्यंत—चिरकाल, चिरंजीवि इ. **दिवा**—दिवसास–दिवाकर, दिवाभीत इ. **धिक्**—निंदाव्यंजक–धिक्कार, धिक्कृत इ. **नाना**—निरनिराळे, बहुत;–नानारूप, नानाविध. **न**—निषेधदर्शक;–नक्षत्र, नास्तिक इ. **पश्चात्**—नंतर, मागें;–पश्चात्ताप, पश्चाद्द्वार इ. **पुनः**—फिरून–पुनर्भव, पुनर्विवाह. **पुरस्**—पुढें, पूर्वी;–पुरस्कर्ता, पुरोगामी, पुरश्चरण इ. **पुरा**—मागें, पूर्वी–पुरावृत्त, पुरातन इ. **पृथक्**—वेगळे, दूरदूर, बहुत;–पृथक्करण, पृथग्विध, पृथग्जन इ. **प्राक्**—पूर्वी, पूर्व;–प्राक्कर्म, प्राक्तन इ. **प्रातर**—सकाळीं;–प्रातःकाल, प्रातःसंध्या. **प्रादुर्**—उघड, दृश्य;–प्रादुर्भाव, प्रादुर्बुद्धि. **बहिर्** (स्) बाहेर, बाहेरल्या बाजूस–बहिर्द्वार, बहिष्कार इ. **शम्**—सुख, भाग्योदय; –शंकर, शंभु, शंपाक इ. **स**—सह, युक्त, प्रमाणें—सजीव, सफल, सजाति. **सह**—युक्त, बरोबर;–सहज, सहवास, सहगमन इ. **सायं**—संध्याकाळीं–सायंकाल, सायंसंध्या इ. **स्वयम्**—स्वतां, आपण;—स्वयंभू, स्वयंवर, स्वयंपाक इ. **स्वर्**—आकाश, परलोक;–स्वर्णदी, स्वर्वेश्या इ.

कृ आणि भू या धातूंचे पाठीमागें असेच कांहीं शब्दविशेषेंकरून नामें व विशेषणें बहुधा ईकारांत अव्ययात्मक

होऊन येतात. उदा० समीकरण, वर्गीकरण, स्वीकार, स्पष्टीकरण, पुत्रीकृत, दूरीकरण, भस्मीभूत, कारणीभूत, बाष्पीभवन इ.

पुढें दिलेले शद्ध उपसर्गामुळेंच साधलेले आहेत पण ते मराठी आहेत. **अ**--न;-अजाणता, असमंजस, अपुरे, अनोळखी (अन्+ओळखी). **अड, आड**--लहान, थोडे;असाधारण, अपुरें-आडगांव, आडवाट्या, अडगळी. **अर्द**—अर्धें (सं. अर्धपासून) अदमण, अदशेर (अच्छेर), अदमुरें (अर्धें मुरलेले दही). **अव**--हीन, कमी;-अवजड, अवकळ, अवघड, अवताण. **दु**-दूषित, दुष्ट, वाईट;-दुवेत, दुकळ. **ना**—अभाव, अपुरें;-नाइलाज. **नि**—रहित, अधिक;-निकोप, निकामी, निजोरी, निधड्या, निनांवी. **निर्**--निस्-रहित-निर्फळ, निर्धास्त, निष्काळजी. **पड**—दुसरा, गौण;-पडजीभ, पडसाद. पडचाकर, पडताळा. **पण**--प्र, प्रकर्ष-पणजा, पणतोंड, पणतु. **फट**—फार, उघड, स्पष्ट;-फटफजिती, फटलंडी, फटकळ. **भर**—पुरा, मुख्य-भरदिवसा, भररात्रीं, भरधांव.

कृदन्तें व तद्धितें:—याशिवाय संस्कृत भाषेंत धातूंस निरनिराळे प्रत्यय लागून कृदन्तें व तद्धितें बनतात व मराठी भाषेंत तीं तशींच वापरलीं जातात. त्यांचीं कांहीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. **प्रत्ययघटित कृदन्तें अ** -चुर्,—चोर, सृप्-सर्प, कृ-कर, बुध्-बुध. **अक**--कृ-कारक, नी-नायक, बाध्-बाधक. **अन**—नंद्-नंदन, मद्-मदन, रम्-रमण, **आना**—विद्-वेदना, रच्-रचना. **अनीय**—दृश्-दर्शनीय, कम्-कमनीय. **आ**—इष्-इच्छा, कथ्-कथा. **अस्**—सृ-सरस्, तम्-तमस्, वच्-वचस्. **आलु**--स्पृह-स्पृहयालु, शी-शीयालु. **इ**—हृ-हरी, भृ-भरि. **इन्**--युज्-योगी, दुष्-दोषी, द्रुह्-द्रोही. **इस्**--सृप्-सर्पिस्, अर्च्-अर्चिस्. **इष्णु**--सह्-सहिष्णु, जी-जयिष्णु. **उ**—भिक्ष्-भिक्षु, इच्छ्-इच्छु. **उक**—भिक्ष्-भिक्षुक, भू-भावुक. **उर्**--भास्-भासुर, भंज्-भंगुर. **उस्**—चक्ष्-चक्षुस्, यज्-यजुस्. **ऊक**—दश्-दंदशूक, जागृ-जागरूक. **त**—कृ-कृत, मृ-मृत. **ता**—दा-दाता, नी-नेता. **तव्य**—कृ-कर्तव्य, भू-भवितव्य. **ति**--कृ-कृति, भू—भूति, गम्—गति. **त्र**--नी—नेत्र, पा—पात्र. **त्रिम**—कृ--कृत्रिम **न**--यत्—यत्न. स्वप्-स्वप्न. **मन्**—दा—दामन्(दावें), छद्-छद्म, नम्-नाम. **य**--रम्-रम्य, गम्-गम्य. **या**—विद्-विद्या, चर्-चर्या. **र**—नम्-नम्र, हिंस्--हिंस्र. **रु**--दा—दारु, मि—भेरु. **वर**—भास्—भास्वर, स्था—स्थावर.

प्रत्ययघटित तद्धितें--अ-भृगु-भार्गव, यदु-यादव; चक्षुः-चाक्षुष, विष्णु-वैष्णव, शुचि-शौच, मुनि-मान, लघु-लाघव. **अक**—मीमासा-मीमांसक, न्याय-नैयायिक. **आट**—**आल**-वाचाट, वाचाल. **आमह**—पितामह, मातामह. **इ**-- दाशरथि, कार्ष्णि. **इक**—वार्षिक, मासिक, लौकिक. **इत**—पुष्पित, फलित, दुःखित. **इन**—घनी, अर्थी, पक्षी **इन**--फलिन, मलिन. **इम**—अग्रिम, अंतिम. **इमा**--गरिमा, लघिमा, महिमा. **इय**—यज्ञिय, राष्ट्रीय **इल**—तुंडिल, पंकिल. **ईन**--कुलीन, शालीन, नवीन. **ईमस**--मलीमस. **ईय**--त्वदीय, मदीय. **उल**—मातुल, **एय**—कौंतेय, वैनतेय. **क**—पुत्रक, बालक. **कट**—निकट, उत्कट, प्रकट. **कल्प**—द्वीपकल्प **चित्**—क्वचित्, किंचित्, कदाचित्. **ठ**—कर्मठ, जरठ. **तन**--सनातन, चिरंतन. **तस्**—स्वरतः, वर्णतः, कालतः. **त्य**—अत्रत्य, तत्रत्य. **ता**—गुरुता, कविता, समता. **त्व**—गुरुत्व, ब्राह्मणत्व. **धेय**—नामधेय, भागधेय. **म**--मध्यम, अधम. **मय**—काष्ठमय, मांसमय. **मत्**--श्रीमत्, गुरुत्मत्, धीमत्. **मिन्**--स्वामी, वाग्मी. **य**--जाड्य,वाणिज्य, स्वास्थ्य, शांडिल्य, वायव्य. **र**—मधुर, मुखर, पाण्डुर. **ल**—वत्सल, पांसुल. **लु**—श्रद्धालु, कृपालु, दयालु **व**—केशव, राजीव. **वत**—**वान**-धनवान् विद्यावान्. **वल**—कृषीवल, शिखावल. **विन्**--मायावी, तेजस्वी. **श्य**--पितृव्य, भ्रातृव्य. **शः**—क्रमशः, कणशः.

सामासिक शब्द सिद्धीः—खालीं दिलेले शब्द आरंभी किंवा शेवटीं येऊन कांहीं सामासिक शब्द मराठींत होतात. त्यांचीं उदाहरणे पुढें दिलीं आहेत.

अंकित—युक्त,विशिष्ट, चिन्हित-मुद्रांकित, स्नेहांकित, नामांकित इ. **अतीत**—पलीकडे गेलेला-मर्यादातीत, मायातीत, गुणातीत, इ. **अधीन**—ताब्यांत गेलेला, दास-पराधीन, व्यसनाधीन, विषयाधीन, इ. **अध्यक्ष**—सूत्रधार, व्यवस्थापक-वादाध्यक्ष, शालाध्यक्ष, कोशाध्यक्ष, इ. **अनुरूप**--योग्य, पाहिजे तसा-गुणानुरूप, योग्यतानुरूप, मर्जी-नुरूप, इ. **अपह**—नाशक, दूर करणारा-शोकापह, दुःखापह, सुखापह, इ. **अनुसार**—प्रमाणें, धरून-कर्मानुसार, वेळेनुसार, वेळेनसार इ. **अंतर**—अन्य, दुसरा-भाषांतर, वनांतर, रूपांतर, देशांतर, इ. **अन्वित**—युक्त असलेला-गुणान्वित, पुत्रान्वित, इ. **अर्थी**—(अर्थिन्) इच्छा धरणारा, मागणारा-विद्यार्थी, पुत्रार्थी, अन्नार्थी इ. **अर्ह**—योग्य

लायक, शोभणारें-पूजाई, गुणाई, दोषाई. **अवरोध**--प्रतिबंध, अडचण-प्राणावरोध, मानावरोध, मलावरोध, इ. **आकीर्ण**--व्याप्त, भरलेलें-जलाकीर्ण, मेघाकीर्ण, जनाकीर्ण इ. **आकुल**--व्याप्त, पीडित-चिंताकुल, शोकाकुल इ. **आक्रांत**--आच्छादित, व्याप्त-चिंताक्रांत, शोकाक्रांत, पादाक्रांत इ. **आचार**--विधि, धर्म-कुलाचार, पापाचार, शिष्टाचार इ. **आढ्य**--परिपूर्ण, समर्थ,निपुण, पराक्रमी-गुणाढ्य, बलाढ्य इ. **आतुर**--क्षुब्ध,व्याप्त, उतावळा;-चिंतातुर, भयातुर, विद्यातुर इ. **आपन्न**--विशिष्ट, युक्त, पीडित-दुःखापन्न, दोषापन्न, विद्यापन्न इ. **आरूढ**--चढलेला-पदारूढ, अधिकारारूढ इ. **आर्त**--पीडित, भरलेला-क्षुधार्त, शोकार्त इ. **आवह**--प्राप्त करून देणारें-हितावह, सुखावह, दुःखावह इ. **आविष्ट**--व्याप्त, भरलेला-क्रोधाविष्ट, शोकाविष्ट इ. **आशय**--सांठा, संग्रह, पात्र, स्थान-पुण्याशय, पापाशय, महाशय इ. **आरोप**--लावणें, चिकटविणें, लागू करणें-दोषारोप, गुणारोप इ. **आस्पद**--स्थान, आगर-शोकास्पद, संशयास्पद, लज्जास्पद इ. **उन्मुख**--कडे तोंड केलेला, तत्पर, तयार-मरणोन्मुख, दुःखोन्मुख. **उत्तर**--मोठा, श्रेष्ठ-लोकोत्तर. **कर**--करणारा,-दिनकर, प्रभाकर, दिवाकर. **करी**--स्वामी, धनी-भाडेकरी, कामकरी, ओझेकरी. **कामुक**--इच्छा करणारा,-मोक्षकामुक. विद्याकामुक. **कार**--करणारा, बनवणारा-चर्मकार, ग्रंथकार, सुवर्णकार. **गम्य**--जाण्यास योग्य, प्राप्त होणारा, वश्य-विचारगम्य, मनोगम्य. **गोचर**--गम्य, कळणारा,-दृग्गोचर, इंद्रियगोचर. **ग्रस्त**--पीडलेला, व्यापलेला-चिंताग्रस्त, भयग्रस्त, वादग्रस्त. **घ्न**--नाशक-शत्रुघ्न, कृतघ्न. **चर**--फिरणारे, चालणारे-जलचर, खेचर, भूचर. **चिंतक**--विचार करणारा-लाभचिंतक, हितचिंतक. **च्युत**--पडलेला, खालीं आलेला-धर्मच्युत, स्वर्गच्युत. **ज**--जन्मलेला, उत्पन्न झालेला-स्वेदज, अंडज, पूर्वज. **जात**--उत्पन्न झालेला, जन्मलेला-धनजात, क्रोधजात. **जात**--समुदाय-वस्तुजात. **जीवी**--राहणारा, उपजीवन करणारा-मांसजीवी, चिरंजीव. **दर्शी**--पाहणारा-गुणदर्शी, दूरदर्शी. **धर, धारक**--घेणारा, जवळ असणारा-चक्रधर, गदाधर. **नाशक**--नाहींसें करणारा-कफनाशक, पापनाशक. **निष्ठ**--तत्पर, निमग्न-कर्मनिष्ठ, स्वार्थनिष्ठ. **पर, परायण**--रत, निमग्न, लुब्ध-ज्ञानपर, भक्तिपर, ईश्वरपरायण, भक्तिपरायण. **बाह्य**--सोडून, उलट, विरुद्ध, बाहेर-धर्मबाह्य, रीतिबाह्य **बुद्धि**--मन, आवड-दुर्बुद्धि, विषयबुद्धि. **भ्रंश**--पतन, दूषण-बुद्धिभ्रंश, मतिभ्रंश. **भूत**--झालेला, स्थितीला गेलेला-विषयभूत, भस्मीभूत, सारभूत, प्रमाणभूत. **मय**--भरलेला, व्याप्त-सुवर्णमय-मयी (स्त्री.) पाषाणमय, वाङ्मय. **मात्र**-केवळ, सरासरी, पर्यंत-क्षणमात्र, अणुमात्र (मराठी-पळमात्र, तिळमात्र). **रूप**--प्रतिमा, स्वरूपाचें, मूर्तिमंत-तीर्थरूप तेजोरूप, रुद्ररूप. **श**--क्रमानें, एकेक-अक्षरशः, शब्दशः, क्रमशः. **शाली**--मंडित, युक्त-गुणशाली, भाग्यशाली, वैभवशाली. **शील**-कल असलेला, ओढा असलेला-सहनशील, दानशील, धर्मशील, भक्तिशील. **शून्य**-रहित, वाचून, अभावज्ञानशून्य, अक्कलशून्य, तर्कशून्य. **शूर**--उदार, धाडसी, सढळ,-दानशूर, कर्मशूर, आरंभशूर. **साध्य**--होण्यास योग्य, हातीं लागणारें, कष्टसाध्य, द्रव्यसाध्य. **स्थ**-राहणारा, असणारा,-मार्गस्थ, देशस्थ, कोंकणस्थ. **हत**--ठार केलेला मारलेला, तडाका दिलेला-दैवहत. **हर, हर्ता, हारक, हारी**,--नेणारा, नाहींसें करणारा,-पापहर, विघ्नहर. मनोहर, पापहर्ता, विषहारक, मनोहारी. **हीन**--अभाव, नसणें-द्रव्यहीन, बुद्धिहीन, श्रद्धाहीन. **ज्ञ**--जाणणारा, पाहणारा-मनोज्ञ, सूज्ञ, अज्ञ, दैवज्ञ. **दार**--स्वामित्व, अंगीं असणें-छानदार, अणीदार, खुबीदार. **पट्टी**--आवेश, जोर, निंदा, दोष-धूळपट्टी, हजामपट्टी, खरडपट्टी. **वार**--क्रमानें, एकेक, निरनिराळ्या-गांववार, तालुकेवार, असामीवार. **सर**--थोडें, कांहींसें-पिंवळसर, काळसर, आटोपसर. **शीर, सीर**--अनुसरून,बरोबर-वक्तशीर, कायदेशीर अनुभवशीर.

मराठी कृदन्तें अथवा साधुसाधितें :--आतांपर्यंत मराठींत जे संस्कृतमधून तत्सम शब्द आले आहेत त्यापैकीं प्रत्ययघटित व इतर साधित शब्द दिले आहेत. याखेरीज तद्भव अथवा देश्य असेहि साधित शब्द अनेक बनत असतात, त्यांचीं उदाहरणें कांहीं पुढें दिलीं आहेत.

अ--मेळ, फेर, खोट, फूट, तूट, लूट, उतार, बिघाड, मोड, तोड, भरड (पीठ), मोड (विळी), गाळ. **आ**--घसरा, पुकारा, झगडा, ठेवा, भरडा, ठेंचा, चावा, हिसका, झरा, ओढा, लंगडा, नाचा, सुका, धुवा, चारा, तोटा, मेळा, रगाडा, पसारा, उकाडा. **आई**--खोदाई, चराई, चढाई, बढाई उतराई. **आऊ**--टाकाऊ, लढाऊ, दिखाऊ. **आट**--फलफलाट, गडगडाट, सुळसुळाट. **आड**--म्याड, खादाड. **आडा-डी**-नासाडा-डी चुराडा. **आडी-डू**--खिलाडी, खेळाडू. **आंडी**--झुकांडी, चिळकांडी. **आणा**--फुटाणा, घाटाणा. **आणूं**--जिवाणूं, उठाणूं. **आफ**--मिलाफ. **आर**--चुकार, लुटार. **आरा**--बंधारा, फुगारा, **आरी**--पुजारी, ओतारी, रंगारी, ओकारी

आव--चढाव, रिघाव, पाडाव, शिडकाव, जमाव, जडाव, वटाव, सराव. **आवट**—बनावट. **आवा**—काढावा, वाढावा, देखावा, मेळावा, पुरावा, तगावा. **आळ**--ओढाळ, भाडाळ, खाजाळ. **आळा**--चोखाळा. **आळी**--डरकाळी. **आळू**--लाजाळू, झोंपाळू, सोसाळू. **आळें**--ओगराळें, तसराळें. **आं**--खदखदां, गदगदां गडबडां. **ई**--बुडी, उडी, बोली, थुंकी खर्ची, थापी, चुरपी, राखी, चुगी, मोडी, लेखी, उघाडी, उतारी. **ईक**--खर्चीक, त्राशीक, सोशीक, सडीक, पढीक, तिडीक. **ईन**--लखलखीत, चकचकीत, विसकळीत, पडीत, बुडीत, भरीत, वाळीत. **ईर**—फुगीर, फुटीर. **ईल**--सडील, रंगील, ओढील, आंबील. **ईव**--सोलींव, कोरींव, घोटींव, जाणीव. **ईस**--कासावीस. **ऊ**—मारू, लागू, चालू, खाऊ, पोटभरू, गळेकापू. **ऊत**--समजूत. **ऊं**—हसूं, करूं, बोलूं, रडूं, गळूं, उबाळूं. **ऊन**—करून, देऊन, घेऊन, बसून, शिकून, खाऊन, फिरून, रगडून, म्हणून, वांचून, करून, हांतरूण, पांघरूण. **एँ**—हसें, रडें, कुडबुडें, डोळेढांपें, वळें, (अद)मुरें, (लोण)कढें; (पळी)वाढें, (हात)खुरपें. **एरा**—बोचेरा, दांतेरा. **एल**--चढेल, रंगेल, अडेल. **ओका**—अटोका. **ओती**—ठरोती. **ओसा**--आडोसा, पडोसा. **ओशी**—कसोशी, पडोशी. **ओळा**--चाखोळा. **अंता**--वदंता. **अंती**—वदंती. **क**—वेंचक, तुटक, ढाळक, रेचक, अटक, तडक. **कट**—फळकट, कुजकट. **कटी**--वळकटी, वळकटी. **कत**--भिळकत. **कर**—विणकर, बसकर, रुचकर, खेळकर. **कळ**—मोडकळ, पडकळ. **का**—मारका, बोलका, फुटका, मोडका, सुटका, फाळका. **कार**--देकार, होकार, नकार. **की**—डुलकी, उनाडकी. **कूर**—फटकूर. **खोर**—भांडखोर, चिडखोर. **गत**—फसगत, धडगत. **गा**—भांडगा कोडगा, माडगा **घस्त**—ओढघस्त. **चीक**—लबचीक. **ट**—घामट, भिजट, कुजट. **टा**—कपटा, चोरटा, **ठा**—पुरवठा. **ड**—घसरड, निसरड, **डा**--घसरडा, निसरडा, उकिरडा, वांकडा. **डी**--फुगडी. **ण**—तारण, पोषण, दळण नेसण, झाडण, वाढण, लवण, कोंदण. **णा**—रमणा, पाळणा, भरणा, उगाणा, देखणा, पोसणा. **णाईत**—दुखणाईत, रुग्णाईत. **णाऊ**—शिकणाऊ. **णार**—खाणार, देणार. **णारा**—लिहिणारा, करणारा, **णावळ**—देणावळ, धुणावळ, खाणावळ. **णी**--करणी, पाहणी, पेरणी, देणी, रोखणी, चाळणी, न्हाणी. **णूक**—गांजणूक, करमणूक. **णें**—बोलणें, करणें, कोरणें, चोखणें, उलथणें, बोलावणें. **त**—जात, घेत, उगवत, मावळत, चुकतमाकत, विराजीत. **ता**—देता, घेता, बोलता, कर्ता, निसटता, ओझरता. **तां**—जातां, येतां,उठतां, बसतां, **तांनां**—करतांना, देतांना. **ती**—गणती फिरती, खणती, गळती, पावती. **तें**—दुभतें, भरतें. **त्रा**—भित्रा. **नें**—उलथनें. **प**—कांडप, रांधप. **पी**—दळपी, वाढपी. **पट्टी**—खरडपट्टी, तासडपट्टी. **पुटा**—पळपुटा. **पें**—जोडपें. **मट**—जळमट. **बू**—खाबू. **या**—(आग)लाग्या, (वाघ) मार्‍या, उभ्याउभ्या. **र**—ठोकर, फुंकर. **रड**—हगरड, मुतरड. **रा**--चावरा, नाचरा, खाजरा. **ला**—केलेला, दिलेला, पिकलेला, राहिलेला. **ला**- खोकला, खवला. **लें**—घाटलें, गांठलें. **ल्या**—जागल्या, उठल्या, बसल्या. **व**—देवघेव. **वट**—धुवट. **वटा**—भागवटा, भोगवटा, **वटी**—फुगवटी. **वड**—लागवड, **वण**—आंबवण, दांतवण. **वय्या** गवय्या, बजवय्या. **वळ**—गुतवळ. **वत**--सुखवत, मुगवत. **वळी**—पत्रावळी, उखिरवळी. **वा**—यावा, चावा, बोलवा, रुसवा, ठेवा. **वा**--करावा, द्यावा, घ्यावा. **शहा-शा**--दपटशहा. **शी**—मोडशी. **स**—अडस, दडस. **सर**—आटपसर, आवळसर. **सा**—वळसा. **सुरा**—निजसुरा. **स्त**—नेमस्त, निद्रिस्त. **ळ**--भोंवळ, ठोकळ.

निवळ मराठी तद्धितें:—**अ**—दूण-दुणणें, थोबाड-थोबाडणें, फूल-फुलणें, गद्रूळ-गदुळणें, सुरकुतणें, गळाठणें. **अट**—पिसाटणें, चिकटणें. **अड**—चिरमडणें. **अब**—पान्हवणें, ओलवणें. **अळ**—चिघळणें. **आ**—ताठा, चिकटा, दुजोरा, अभ्रा, सावकारा, दांता, वाळा, करमरा, मुगा, तान्हा, खुळा, शेंबडा, लहाना, स्वस्ता, सामोरा, चुला, पानगा, चिमटा, तुंबा. **आं**—मघां, मागां, उद्यां. **आई**—शीतळाई, धिटाई, पेशवाई, मोगलाई. **आईत-आयत**—बागाईत, जिराईत, कबुलायत. **आऊ**—कर्जाऊ, घराऊ, कुणबाऊ. **आट**—खालाट, वलाट, पेंचाट, चोंदाटणें. **आटा-टी**—हाकाटा. **आंटा**--खरांटा, सरांटा, फरांटा. **आंटी**—वेलांटी, गोलांटी. **आठी**—तुराठी. **आड**—उंचाड, थोराड, गुंताड, रेताड, पाठाड, दांताड, तरकाड. **आडा**—सुताडा, गुंताडा, पवाडा. **आडी**—**आड्या-वाटाडी-ड्या**, नावाडी-ड्या, **आंडी**--मुसंडी, मुसकांडी. **आडें**—धुराडें, खुराडें, कोयाडें. **आण**—उचटाण, पिकटाण, **मोंगलाण, हबशाण. आणा**—फकाणा, गपाणा. **आणी**—दुधाणी. **आणें**—बियाणें. **आर**—कुंभार, सोनार, लोहार, चांभार. **आरा**—पिसारा, पेटारा, भपकारा, वाफारा. **आरी**—पानारी, फुलारी. **आरें**—सालारें. **आव**—

दुखावणें, वेडावणें, डोकावणें. **आवा**—कुणबावा. **आविष्ट**—कोपाविष्ट, लोभाविष्ट. **आस**—भगास, भकास. **आसें**—मुंडासें. **आळ**—चिकाळ, दुधाळ, बंबाळ. **आळा**—जिव्हाळा लव्हाळा, डोंबाळा. **आळी**—कागाळी, आरोळी. **आळू**—दयाळू, मायाळू, कृपाळू, कष्टाळू, निद्राळू. **आळें**—खणाळें, खुटाळें, दिवाळें, विटाळें. **ई**—मापी, सुती, हौशी, माघी, पुशी. **ईक**—सोयरीक, मोकळीक, आगळीक. **ईट**—रागीट. **ईण**—बाळंतीण, सवाशीण, सासुरवाशीण **ईल**—दोंदील, अंडील, वरकशील, शेवटील. **ईळ**—गोडीळ, तपीळ. **इष्ट**—चविष्ट, नादिष्ट, नेमिष्ट, पापिष्ट, छांदिष्ट. **उकली**—धनुकली, अंडुकली; चांदुकली. **उडा**—खरजुडा. **उरडा**—भटुरडा, नखुरडा. **उरी**—देसुरी. **उला-ली-लें**-बारुळा-ळी-लें, सोल्लुला-ली लें. **उ**—दांडू, भोंकू, बंभू, लंबू. **ऊक**—काटूक, किडूक, चिंधूक, हाडूक, भेतूक. **ऊण**—एकूण. **ऊत**—धडूत, बहूत. **ऊन**—इकडून, पासून, येथून, तेथून, आंतून. **ऊरा-ऊरगा-डा**—भटूरा, भटूरगा, भटूरडा. **ऊल**—कणगूल, परडूल, पडगूल, करंडूल. **ऊस**—आंबूस, तांबूस, टिपूस, बापूस. **ऊळ**—पांगूळ, पिठूळ, वातूळ. **ऊं**—टिपूं, रेडकूं, मांजरूं, बकरूं, शेरडूं, करडूं. **ए**—कडे, वाटे. **एं**—बाळेंतें, मेंगें. **एज**—भकेजणें, रागेजणें. **एटा**—कोशेटा. **एण**—भातेण. **एता**—ओलेता. **एर-एरें**—जुनेर, जुनेरें, फणेरें. **एरा**—पातेरा, घाणेरा. **एल**—तिळेल, मोगरेल, खोचरेल, उंडेल. **एला**—उंचेला काळेला, कोडगेला, जाडगेला. **एली**—खांदेली, भागेली, दंडेली. **ओका**—चिंचोका. **ओटी**—चिंधोटी, धांदोटी, रेघोटी फासोटी. **ओडा**—लांबोडा, हातोडा. **ओती**—धडोती, धडूत, धडोत. **ओत्रा**—एकोत्रा, दुहोत्रा, दिढोत्रा. **ओपा**—शिळोपा, एकोपा, सुखोपा, हातोपा. **ओबा**—घरोबा, गणोबा, मोरोबा, आजोबा. **ओर**—टपोर, पिठोरा, पिठोरी. **ओशी**—अंबोशी. **ओसा**—हातोसा, आडोसा. **ओळ**—आजोळ, पंजोळ. **ओळा**—आठोळा, सातोळा, **ओळी**—फांसोळी, मासोळी, चिरटोळी. **ओळें**—पिंडोळें, भिंडोळें, भेडोळें. **अंड**—भावंड, नातवंड, नातोंड, नातुंड. **अंडी**—पोतंडी, मुसंडी, **अंत**—बाळंत, जिवंत. **क**—धडक, थडक. **कट**—धुरकट, भुसकट, तेलकट, मेणकट. **कड**—वरकड. **कडी**—छकडी. **कन**—झटकन, कटकन, चटकन, पटकन. **कर**—खोडकर, खेळकर, साळकर, कामकर. **करी**—देणेकरी, घेणेकरी, रीणकरी, कामकरी, गांवकरी. **करू**—यात्रेकरूं होतकरू. **कली**—धनुकली. **कळ**—पचकळ, फटकळ. **का**—थेंबका, चुळका, मणका, पुंजका खुळका. **कार**—पुढाकार, नकार, डकार, हुकार. **कारा**—हुकारा, होकारा. **की**—खोतकी, गांवकी, शेतकी. **कुची**—अणकुची. **कुला**—चिमकुला, सोनकुला. **कुली**—फुसकुली, अंडकुली, चांदकुली. **कुळा, कोळा**—काटकुळा, काटकोळा. **कूट**—हिरकूट, **कूल**—घरकूल, मडकूल. **कूर**—ढोणकूर. **कें**—बिंडकें, पुडकें, नाळकें, ओंडकें, होडकें. **को**—धनको, रिणको. **कोळ**—काठकोळ, किरकोळ. **क्या**—पाणक्या. **खा**—नवखा, बुडखा. **खुरा, खोरा**—डावखुरा, डावखोरा. **खोर**—कागाळीखोर, भांडखोर, चाहाडखोर. **गट**—खोलगट, चारगट. **गत**—कलागत, कामगत, दिवसगत, ओशाळगत. **गळ**—वेडगळ. **गा**—सोटगा, जुडगा, वाडगा, खळगा, मुलगा. **गिरी**—शिपायगिरी, वैद्यगिरी, लुचेगिरी. **गी**—पोटगी. **गूत, द**—नाळगूत, **गें**—झारगें, वाडगें. **गेला**—रोडगेला, दांडगेला, वेडगेला, जाडगेला. **चट**—गुळचट, मेणचट, पाणचट. **चा**—एकदांचा, केव्हांचा, आजचा, कालचा, आतांचा. **चार**—पाहुणचार, मेहुणचार. **चें**—लोणचें. **जा**—दुजा, तिजा. **जी**—रामजी, विठोजी, रघोजी, मालोजी. **ट**—अरबट, रेंवट, मातट, आघट, खारट, तिखट. **टळ**—वावटळ. **टा**—रोपटा, बाहुटा, चोरटा, पोरटा, गोरटा. **टी**—आगटी, शेकटी, शेपटी, भुगटी, थापटी. **ठण**—गोठण, पायठण, गांवठण. **ठा**—गावठा, उंबरठा, गारठा. **ठी**—गांवठी. **ड**—रातड, जखखड. **डा**—जरडा, गधडा, बापुडा, विंचडा. **डी**—पोतडी, चिंधडी, डफडी, पानडी, वावडी. **डें**—अंगडें, कुंचडें, सुपडें, रुपडें. **ढळ**—गांवढळ. **ढा, ढें**—गांवढा, गावढें. **ण**—ढुंगण, कुंपण, गोफण, पोखरण. **णा**—(गुणितार्थी) दुणा. **णी**—चांदणी, नथणी, दुधाणी. **णें**—चांदणें. **ता**—गोणता, कोणता, जोगता, भलता. **तें**—रायतें, ओलेतें. **थळ**—पाणथळ, नवथळ. **था**—चवथा. **दर**—एकेदर. **दा**—पाचुंदा. **दां**—एकदां, पांचदां, अनेकदां, पुष्कळदां. **दाड**—भगदाड. **दार**—नोकरदार, छानदार, खुबीदार, अंमलदार. **प**—कोळपणें, झोडपणें. **पट**—सालपट, लोळपट. **पण, पणा**—मनुष्यपण, देवपणा, थोरपण, लहानपण. **पट्टी**—धुळपट्टी, हजामपट्टी, तासडपट्टी, झोडपट्टी. **पें**—जावपें. **प्रा**—कांठप्रा, खुंटाप्रा. **पा**—हातपा, टोणपा, वेडपा, वजपा. **फट-ड**—कानफट-ड, गालफट-ड. **बा**—कोठिंबा, पाठिंबा. **मट**—घसमटणें, चुरमटणें. **मंत**—श्रीमंत, बुद्धिमंत. **या**—टकल्या, ओनाम्या, मस्क-या, पिरपिऱ्या. **र**—सासुर माहेर. **रा**—शिवरा, लातरा, दांतरा, डावरा. **राव**—अरेराव, तिरशिंगराव, हुजारराव. **री**—रुपेरी, सोनेरी, कणेरी,

पायरी, पोटरी. रूं—मेंढरूं, शिंगरूं, म्हसरूं, रांडरूं, लेंकरूं. रूड—मिसरूड, म्हसरूड. रें—टोपरें, डफरें, डबरें. ल—तांबूल, डोंबल. लग—नातलग, जिवलग, डांकलग. लट—अंगलट. ला—मागला, पुढला, आंतला, बाहेरला, मधला. ली—टिकली, डावली, ताटली, दिवली, शिंपली. लें—झबलें, तांबलें, पिठलें. लंड—अधलंड, मधलंड, धर्मलंड. व—सटवणें, सठवणें. वट—मसणवट, धुळवट, मळवट. वटा—मुखवटा, दुखवटा, उंचवटा. वटी—राजवटी हातवटी. वंट—वाळवंट, सुरवंट. वंटा—वरवंटा. वठा—अंगवठा, दारवठा. वडा—म्हारवडा, रांडवडा, आठवडा, वंड—नातवंड, पणतवंड, भावंड. वण—दांतवण, हगवण. वणी—गुळवणी, चिंचवणी, उन्हवणी, हातवणी. वंत—भगवंत, गरजवंत, धनवंत, बलवंत. वर—आजवर, कालवर, जोंवर, येथवर, तेथवर. वरा—फुलवरा किंवा फुलोरा. वला—कानवला, गव्हला. वली, उली—मावली किंवा माउली. वळ—शितवळ, उष्टावळ, गयावळ, प्रयागवळ, वळा—अंगवळा, तोंडवळा, एकवळा. वा—गारवा, ओलावा, थंडावा, गोडवा. वाईक—नातेवाईक, तऱ्हेवाईक. मासलेवाईक. वाणा—गोजिरवाणा, लाजिरवाणा, वाईटवाणा. वान—गाडीवान, बागवान. वार—चेतवार, एकवार, दोन वार. वाला—गाडीवाला, कंठीवाला, भाजीवाला. वी—ठाणवी, थोरवी. वीस—वाढवीस, वें—जोडवें. शा—बहुशा, अनेकशा. शीर—अनुभवशीर, कायदेशीर, वक्तशीर. शां, शी, शीं, शें—आतांशीं, विटाळशी, गर्भारशी. स—डोळस, रूपस, गोंडस, हाडस. सट—भोळसट. सर—मऊसर, गोडसर, आंचटसर, जाडसर. सरा—दुसरा, तिसरा. सा—धडसा, भलतासा, इवलासा, कवडसा. सें—बाळसें, बोंडसें. हेरी—दुहेरी, तिहेरी, चव्हेरी, पांचफेरी. ळ—गांठळ, हातळ, प्रेमळ, दयाळ, कृपाळ. ळा—कपळा, माथाळा, अंधळा, पांगळा. ळी—मासळी, फासळी, कांठळी, गुठळी.

सामासिक शब्द—याखेरीज मराठींत दोन शब्द एकत्र येऊन त्यांचा समास झाला असतां केव्हां केव्हां त्यांचा अर्थ मूळ शब्दांपेक्षां व्यापक अगर भिन्न होतो. संस्कृत भाषेंतील अनेक सामासिक शब्द मराठींत जसेच्या तसेच घेतले जातात व कांहीं समास मराठीमध्यें स्वतंत्रपणें होतात. यासंबंधीं माहिती कोणत्याहि व्याकरणांतील समास प्रकरणामध्यें आढळेल, तथापि त्यांच्या दिग्दर्शनाकरितां कांहीं उदाहरणें पुढें विवेचन गाळून दिलीं आहेत.

अव्ययी भाव—यथाशक्ति, प्रतिक्षण, दरदिवस, प्रत्यक्ष, समक्ष, बिनधोक, हरघडी, जागोजाग, दारोदार, घरानघर इ.

तत्पुरुष—तोंडपाठ, कपाळकरंटा, पांचपट, देशगत, काकबलि, गायरान, गर्भगळित, जन्मखोड, धर्मवेड, आंबराई, तोंडसुख, घरकलह, तोंडीलावणें, ग्रंथकार, गृहस्थ, पांथस्थ, घातुक, रेचक, बोटचेपे, पळीवाढें, मळेकरी, गळेकापू, अजाण, अपुरा, अवगुण.

कर्मधारय—काळमांजर, शेंडेनक्षत्र, दालचिनी, उपजतवेडा, गडीमाणूस, निराशा, पंचवटी, पंचारती, त्रिदळ, पांचशेरी.

मध्यमपदलोपी—साखरभात, कांदेपोहे, साखरलिंबू, घोडनवरी, घागरगड, उंबरघाट.

द्वंद्व—बहीणभाऊ, सुखदुःखें, दहीभात, दौतलेखणी, दारूगोळा, काजळकुंकू, रांडमुंड, शेतमळा, इडापिडा, चट्टीपट्टी, घोडाबिडा, भलतासलता, लुंगासुगा, पोरसोर.

बहुव्रीहि—कृतकृत्य, दशमुख, निर्धन, शूलपाणी, मानधन, काळतोंड्या, वीरपुरुष, अल्पमोली, पायाशुद्ध, चंद्रमुखी, शिवशब्द, यशोधन, गायमुख्या, अनाथ, दुतोंडें, निधारी, उपदेश, सजोड, सढळ, केशाकेशी, लठ्ठालठ्ठी, निर्लेप, विरूप.

विशेष समास—खेपेगणिक, भारंभार, अपरंपार, हातोहात, रातोरात, दिवसाढवळ्या, डोळढापे, गळपट्टी, गलेलठ्ठ, गळेकापू, डोकेफोड, साळवाडा, चोळखण, बाळदाणी, मिरपूड, सोनचांफा, वरोपचार, मनकामना, कोंडमारा, सोडमुंज, सांडपाणी, आपसुख, पोटदुखी, भावजय, मरतमढें, आंबटढाण, कडूजहर, काळाढोण, लालभडक, सडेतोड.

अभ्यस्तशब्द—यांचे पूर्णाभ्यस्त, अंशाभ्यस्त व अनुकरणवाचक असे तीन प्रकार असून त्यांचीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. **पूर्णाभ्यस्त**—घरघर, गांवगांव, हालहाल, काळेकाळे, गोरेगोरे, गोडगोड, थोडाथोडा, वेगवेगळा,

नेऊंनेऊं, करूंकरूं, गेलागेला, जाजा, हंसतहंसत, उडतउडत बोलतांबोलतां रडूनरडून, मारामार, धांवाधांव, हळूहळू, वरवर, पुन्हापुन्हा, छीछी, गोडचगोड, लालचलाल, उगीचच्याउगींच, पुढचेपुढें, मागचेमागें. **अंशाभ्यस्त**—लाडीगोडी, आगतस्वागत, उलटसुलट, असातसा, समजणेंउमजणें, बोलणेंचालणें, कधींमधीं, शेजारीपाजारी, दाणादुणा, जाडजूड, अर्धांमुर्धा, जळफळणें, धुसमुसणें, दगडचिगड, आंबटचिंबट, गेलाबिला, पिळूनबिळून, लुंगासुंगा, चट्टामट्टा, टकमक, करणेंसवरणें, पुसतपास, केरकचरा. **अनुकरणवाचक**—किरकिर, खटपट, लटपट, हळहळ, कलकलाट, चकचकाट, गरगरीत, चमचमीत, गडगडणें, धडधडणें, कडाडणें, चकाकणें, मरारणें, घमघम, चरचर, खदखद.

अनिर्बंध साधितशब्द—वर उल्लेखिल्यखेरीज कांहीं अनियमित साधित शब्द आढळतात. उदाः—अगडबंड, आकडेंतिकडें, ओक्साबोक्सी, अननंतनन, लटपटपंची, रक्तचंचाळ, साळकायगोळकाय, लठ्ठभारती, ढकलपंचविशी.

फार्शी-अरबी प्रत्ययः—फार्शी अरबी शब्द आपल्या मराठींत बरेच आले आहेत. त्या भाषांतहि प्रत्यय लागून कांहीं शब्द बनविले जातात. हे प्रत्यय आपणांस समजणें अगत्याचें आहे असें वाटल्यावरून त्यांचीं कांहीं उदाहरणें पुढें दिलीं आहेतः—**आः**—गर्मा; पन्हा । पहना । पहन् = रुन्दी. **आईः**—फार्शींत रोशनाई हा एकच शब्द आई प्रत्यय लागून झालेला दिसतो, मराठींत पुढील उदाहरणें आहेत, अमिराई (प्रभाकर १३९) कादीमाई (राजवाडे ८।११९); गनिमाई (खरे ६।२७९६); जबराई (परशराम १३९); जलदाई; दिरङ्गाई यांतील आई हा प्रत्यय निष्कारण आहे; दुनियाई (राजवाडे ५।२०) दुरुस्ताई (जोरा ५); नरमाई (जोरा ६); नाजुकाई; बारकाई, सराफाई; सुस्ताई इत्यादि. **ईः**—एकी; कार्कुनी; खुची; दानाई; दुही; सवुरी वगैरे. **कीः**—हा प्रत्यय गर्चिचें रूपान्तर असावें, गन्दकी । गन्दगी = घाण; जामीनकी; दर्म्यानकी (खरे १०।५२९६); मुजावरकी (राजवाडे १५।२६); खाजकी (राजवाडे १२।१९२); शहाजादकी । शाहझादगी (ऐटी ५१) हा प्रत्यय मराठींत चांङ्गलाचं रूढ झाला आहे. **गिरीः**—[फार्शी गर हा कर्तृवाचक प्रत्यय आहे; याला ई लागून गरी हा संयुक्त प्रत्यय सिद्ध होतो. खझान्चीगरी, गुमास्तगरी, मुत्सद्दीगिरी, बख्शीगरी व सिपाहगरी अशा कांहीं थोड्या शब्दांत पदवीदर्शक अगर कार्यदर्शक म्हणून गरी या प्रत्ययाचा स्वतन्त्र उपयोग आढळतो, गीर या धातूला ई लागून घेणें या अर्थाचा गिरी फक्त कबज़गिरी, खबर्गिरी, दस्तगिरी, व मुलूखगिरी या चार शब्दांत दिसतो] गुमास्तेगिरी, शिपायगिरी, मुत्सद्दीगिरी. **गीः**—हा प्रत्यय मुळांत अकारान्त शब्दासच लागतो, जसें बन्द बन्दगी, इतर उदाहरणें अजुर्दगी असुदगी, खफगी गिर्वीदगी, खानगी, बिदागी. **आत्**—कित्येक अरबी भाववाचक नामांच्या अन्ती अत् येतो, अरबींतील ईयत् हा प्रत्यय कैफियत, खसलीयत, जाहलीयत, मालकीयत, वाकफीयत, वाहदीयत, वगैरे ५-६ शब्दांत आढळतो, पुढील शब्द त लागून झालेले आहेत. खलीपत, नायबत, वजीरत, हेजिबत, वगैरे. **अल्पत्वदर्शक नामें**—इचा (बगिचा-बाघ्), क (जम्बूरक; बदक-बत्) व-चा (गालीचा) हे प्रत्यय लागून होतात. **स्थानदर्शक नामें**—पुढील प्रत्यय लागून सिद्ध होतात. **आबादः**—अहमदाबाद, हैदराबाद, वगैरे. **खाना** (फा०खाना=गृह) अदखाना, अजायबखाना, घुसलखाना, दारूखाना वगैरे. **गाह, गाः**—इद्गा, कम्बर्गा=सेनामध्य, किब्लेगाह=वन्दनस्थान, खाब्गा =निद्रागृह, जागा, दर्गा, पागा, वगैरे. **दानः**—अङ्गुस्तान, कलम्दान, जुज्दान, चिराग्दान, तावदान, शामदान वगैरे. **दाणीः**—(हें दान्चेंच रूपान्तर आहे) अत्तरदाणी, पिकदाणी, चहादाणी वगैरे. **स्तानः**—कबरस्तान, तुर्कस्तान, हिंदुस्तान, वगैरे.

नामसाधित कर्तृवाचक शब्द पुढील प्रत्यय लागून होतात—**ची**—खजानची, तबल्ची, तास्ची, नगारची, नशेकची, मर्फाची, मशाल्ची. **जी**—खजान्जी, दिवाणजी, मशाल्जी, भियाजी. **गर**—कारीगर, जादूगर, जीनगर, बाजीगर, सौदागर. **गार**—कमान्गार, कलईगार, कारीगार, किमयागार, खिद्मत्गार, गुन्हेगार, जादूगार, नकास्गार, मदतगार, माहितीगार, शिकल्गार. **बान**—पास्बान, मेहेर्बान. **वान**—बाग्वान, दर्वान, सार्वान.

विशेषणें व नामें सिद्ध करण्याचे इतर प्रत्यय—**ई**—अमली, अस्मानी, कबजी, कलमी, जबाबी, हौसी, वगैरे. **ई**—[फार्शी, द्रव्यदर्शक ईनपासून] आयनी, चर्मी, चौबी, जरी, पश्मी, बिरंजी, रंगी, सङ्गी, **ईन**—रङ्गीन, सङ्गीन. **आना**—जख्माना, जनाना, तल्याना, दिवाणा, मर्दाना, माहाना, मेहनताना, मोताना,

ईना--छबीना, जख्मीना, रोजीना, सालीना. **मन्द**--अकल्मन्द, आर्जूमन्द, एहसान्मन्द, कसल्मन्द, दौलामन्द, नियाज्मन्द, फिकीरमन्द, बहरामन्द, रजामन्द. **वजा**--काडीवजा. **वन्त; वन्द**--खुदावन्त, गरज़वन्त, दरंदवन्त, फिकीरवन्द, रजावन्त. **वार**--आसामीवार, इस्मनवेशीवार, उमेद्वार, कलमवार, कैदूवार, खुलासेवार, तालेवार, बखतवार, बयान्वार, बाबत्वार, शिस्तवार. **शाई**--[फा. शाही = राज्य] काफर-शाही, शिवशाही, नोकरशाही, लोकशाही, शिन्देशाही, बाबाशाही. **शीर**--अदब्शीर, आराम्शीर, कायदेशीर, दाखलेशीर, नफेशीर, फाकेशीर, मस्लतशीर, मोहीमशीर, वक्तशीर, हङ्गामशीर हवाशीर, वरीलपैकीं कांहीं विशेषणें क्रियाविशेषणासारखीं उपयोगिलीं जातात.

धातूस इश लागून--[मराठींत उपान्त्य इ दीर्घ होते अगर ए होते अगर तिचा अ होऊन कित्येकदां ती गळते; व अन्त्य श चा विकल्पें करून स होतो,] अज्मास, अज्माईश, अफ्जायश, आरास, कशीश, कोशीस, खाईश, नवाजीस, नालीस, निगारीश, पर्वरीश, पुर्शीस, पैमास, फर्मास, बक्शीस, बारीश, मालीस, रञ्जीस रवेश, साजीश. याच तऱ्हेनें पैदास व बालाईश हे दोन शब्द पैदा व बाला या दोन विशेषणांपासून सिद्ध झालेले आहेत. वरील नामांस निरर्थक ई लागून कसोशी, बक्षिसी इत्यादि रूपें प्रचारांत आलेलीं आहेत. **धातूस**--आ लागून-अन्देशा **धातूस**--आकू लागून--खुराक, पोशाख. धातूचाच क्रियावाचक नामासारखा उपयोग--अङ्गेज, अन्दाज, गुजर, गुजार, जोसताब, दर्गुजर, फरेब, शिताब, साज वगैरे. क्रियापदाचाच नामासारखा उपयोगः-आमदन, कर्दन--बस्तन वगरे. क्रियापदांतील अन्त्य अन् काढून उरलेल्या भूतकाळ रूपाचाच नामासारखा उपयोगः-आमद गुजास्त, निशस्त, फरोख्त, फिरस्ताद, बर्खास्त, पैवस्त, रक्त, शिकस्त. भूतकाल रूपास--आ--अ (ह्) लागून होणाऱ्या भूतकालवाचक अव्ययाचाच नामासारखा उपयोग--गुमास्ता, नविश्ता, बस्ता, सुर्दा, शिकस्ता, दोन भिन्न क्रियापदांच्या भूतकालीन-रूपांच्या द्वन्द्व समासानें--आमद्रफ्त, खरेदीफरोक्ती, सुदामत. एकाच क्रियापदाच्या धातूस व भूतकालीनरूपास उनें जोडून अगर त्याशिवाय-गुफ्तगो, बन्दोबस्त.

धातुसाधित कर्तृवाचक शब्द पुढीलप्रमाणें होतात. (अ) **धातूस**--इन्दा (अन्दा) लागून--निशिन्दा, नविसन्दा,परिन्दा,पोशिन्दा, फामिन्दा,बाजिन्दा, शर्मिन्दा, साजिन्दा.**धातूस**--आ लागून--दाना, तवाना. **धातूस**--ना हा उपसर्ग लागून नातवान, नादान, नादार. **भूतकालीनरूपास**--ना उपसर्ग लागून-ना-बूद (आ) नामास पुढील धातू लागून--**अन्दाज** (=फेंक)--गोलन्दाज, जालन्दाज, तिरन्दाज, बर्कन्दाज, व त्याच धर्तीवर घरन्दाज, कारन्दाज, सरन्दाज. **आवर** (=आण)--जोरावर, दिलावर. **आवीज़** (=घर)--दस्तेवज. **कन्द**--(=खोद)--मोहर-कन्द. **कस** (=ओढ)--अर्कस, तार्कस, बार्कस, त्याच धर्तीवर गान्जेकस जोरकस. **कून**--(=कर)--कार्कून. **खाह** (=इच्छ)--खातर्खाह, खैर्खाह, दिलखा, तन्खा, दौलत्खाह. **खोर** (=खा)--कज्जेखोर, चुगलखोर, जिद्दखोर, तक्रारखोर. **गीर** (=धर)--अब्दागीर, अस्मानगीर, जहांगीर, दस्तगीर, दामन्गीर, दिल्गीर, आणि त्याच धर्तीवर तमासगीर, दुवागीर. **गुजार** (=ठेव)--गई गुजार, गिले-गुजार, गोश्गुजार, नजर्गुजार, माल-गुजार, शुक्र-गुजार. **गो** (=बोल)--कानुगो, रास्तगो, गरज़गो, सक्तगो. **तरास** (=काप) जबा-तरास, कलम्तरास, सङ्ग-तरास, सुम्ब-तरास. **तलब** (=माग)--ज्यादा-तलब, मरामत-तलब, रजा-तलब. **दान** (=जाण)--कददान. **दार** (=लेव, धारण कर)--अजूर्दार; कबिलेदार, छान्दार, तऱ्हेदार, दम्दार. **दोज** (=शिव)--चर्मदोज, जमीन्दोज, हबादोज. **नवाज** (=पाळ, बाजीव)--गरीब-नवाज, चङ्ग-नवाज, तासे-नवाज. **नवीस-नीस** (=लिही)--अख्बार-नवीस, नक्ल्-नवीस, चिटणीस, वाक्नीस. **निगार** (=लिही) वकायेनिगार. **नशीन** (=बैस)--किल्लेनशीन, जन्नत्नशीन, तख्त-नशीन, पडदे-नशीन, मस्नद्शीन, बेहेस्तनशीन; त्याचधर्तीवर खातर्नशीन, गादीनशीन. **नुमा**--(=दाखव)--किल्लेनुमा, खुशनुमा, फलक्नुमा. **पर्दाज** (=कर)--कार्पर्दाज. **पर्वर** (=पाळ)--गरीब-पर्वर. **परस्त** (=भज)--बुत्परस्त, हक-परस्त. **पाश** (=शिम्पड)--गुलाब-पाश. **पजीर** (=स्वीकार)--सुरतपिजीर. **पैवन्द** (=जोड)--अबद-पैवन्द. **पोस** (=आच्छादन कर, परिधान कर)--कुल्हापोश, खान्पोश, गर्दपोस, पलङ्गपोस, पायपोस, शिलेपोस. **फराज** (=उच्चव)--सर्फराज. **फरोश** (=वीक)-- बुत्फरोश, मेवेफरोश. **बन्द** (=बान्ध) नालबन्द, पगडबन्द. **बर्दार** (=उचल)--खास-बर्दार, चौरी-बर्दार, निशाण-बर्दार, बंदूक-बर्दार, हुके-बर्दार, हुक्कू-बर्दार. **बर** (=हरण कर, ने)--दिल्बर, पैगम्बर. **बाज** (=खेळ)--आतश्बाज़, कत्तलबाज़, कायदेबाज़, कुर्रेबाज़,

जहाँबाज़, दगल्बाज़, दगेबाज़, दारूबाज़, नजर्बाज़, निशानफेबाज़, मन्सुबेबाज़. वगैरे **बीन** (= पहा)—तमास्बीन, दुर्बीण, बारीकबीन. **बोस** (= चुम्ब)— कदम्बोस. **माल** (= चोळ)—गोश्माल, दस्तमाल, रुमाल, पायमाल. **याब** (= मिळव)—काम्याब, बार्याब. **रुबा** (= हरण कर)—क्रेरुबा, दिलरुबा. **रुबू** (= झाड)—जारूब (झाडू.) **रेज** (= ओत)—रङ्गरेज. **शिकन** (= फोड)—बुत्शिकन.

नामास पुढील पूर्वगामी शब्दयोगी अव्ययें लागून विशेषणें सिद्ध होतात. जेर—(खालीं) जेर्दस्त; जेर्जस्त, जेर्बार. **ब**—(बा-दार या अर्थी):—ब-अब्रु, ब-जमियत वगैरे. **बाः**—बा-जमियत, बा-वक्र, बा-वकूफ **बरः**—बर्जोर, बर्पा, बर्तर्फ, बर्बाद वगैरे. **बेः**—(निः या अर्थी) बे-इतल्ला, बे-इनाम, बे-कायदा, बे-कार, बे-कुसूर. बे-कैद, बे-खबर, बे-गुमान, बे-चिराग, बे जा, बे-जाब, बे-तक्शीर, बे-ताब, बे-तालूक, बे-दखल, बे-दम, बे-दर्द बे-दाजा, बे-निहायत, बे-पर्वा, बे-पाया, बे-काम, बे-फिकिर, बे-बन्द, बे-बाक, बे-मालून, बे-मब्लग वगैरे. **लाः**—(अरबीना):—लाइलाज, ला-चार, लाजबाब, लावलद. पुढील विशेषणें लागून तत्पुरुष समासाचीं विशेषणें होतात. **जमा**—खजाने-जमा, पोते-जमा, सरकार-जमा. **तरीक**—(दाखल) तोफातरीक, नज्राणातरीक, सलाहतरीक **दाखल**—कैद-दाखल, खजाने-दाखल, खेमे-दाखल, डेरे-दाखल, हवेली-दाखल, **पूर**—पुर् (पूर्ण):—अकलपूर, खजानेपूर, पैकेपूर. **बन्द**—कलम्बन्द, किल्लेबन्द, जीन-बन्द, दप्तरबन्द वगैरे. **वजा**—(= रितीची, तुल्य):—काडीवजा. **लायक**—इज्जतलायक, खात्रीलायक, तारीफलायक, तोफालायक.

सामासिक नामेंः—पुढीलप्रमाणें सिद्ध होतात. द्विरुक्तीनें होणाऱ्या समाहार द्वन्द्वांचीं उदाहरणेंः—अबरचबर, अलाबला, अवाई-तवाई, अमन-चमन, बाकी-साकी, बारीक-सारीक. ज्या समासांत दुसरें पद हें पहिल्या पदाचें अनेक वचनाचें रूप असतें अशा इतरेतर द्वन्द्वाचीं उदाहरणेंः—अमीर-उमराव, कान-काननात, खत-खतूत, खबर-अख्बार, गरीब-गुरीब, गरीब-गुरबा.

समानार्थक दोन शब्दांचा समास केल्याचीं उदाहरणें अगणित आहेत त्यांचे तीन वर्ग पडतात. ज्यांत दोन्हीं पदें फार्शी किंवा अरबी आहेत. अक्कल-हुशारी, आलम-दुनिया, कर्ज-वाम, ज्यांत दुसरें पद मराठी आहे—अक्कल-बुद्धी अम्मल-बजावणी, इमान-प्रमाण, कज्जा-कटकट, कागद-पत्र, कौल-बोल, खबर-बात, खर्च-वेंच, खेश-सोयरे, चीज-वस्त दारू-फुलसरा, बाजार-हाट, मामूल-वहिवाट, मेवा-मिठाई, रङ्ग-ढङ्ग वगैरे. ज्यांत पहिलें पद मराठी आहे—कावा-दावा, चूक-गलत, जीव-जान, दङ्गा-मस्ती, दाब-रुबाब, दाम-दिरम, थट्टा-मस्करी, धन-दौलत, घर-बन्द, न्याय-दाद, न्याय-मन्सुबी, नांव-किताबती, पीळ-पेच, बळ-जोरी, मान-मरातब रीत-रिवाज वगैरे. मूळ फार्शीत उ या उभयान्वयी अव्ययानें जोडले गेलेल्या शब्दांतून ते मराठींत येतांना मधील अव्यय गळतें; व या समासाचा अर्थ अधिक व्यापक असतो. अहाली-मवाली, आब-हवा, आमदरफ्त, कार्भार, खरेदी-फरोक्ती, छान-छोक, जफ्त-रफ्त,:जाब्साल, नान्-कुराण, रद्-बदल वगैरे. याच धर्तीवर मराठींत पुढील सामासिक शब्द बनविले गेलेले आहेतः—अत्तर-गुलाब अलङ्ग-नौबत, अस्मानी-सुल्तानी, उजू-तवाजू गरिबी-हरिफी, गोर-कफन, जमा-खर्च, तवा-तोबा, तोक-जञ्जीर, रङ्ग-बहार, वगैरे. नामांची द्विरुक्ती होऊन मध्यें आ येऊन झालेले समास सम्शेरा-सम्शेर, पैगामा-पैगामी वगैरे.

गैर, ना, ब बे हे उपसर्ग, लागून नञतत्पुरुष सामासिक नामें सिद्ध होतात.— गैर-अब्रू, गैर्-इतबार, गैर्-किफायत, गैर-नफा, गैर-फायदा, गैर्-मर्जी, गैर्-मेहेनत, गैर्-मेहेर्बानी, गैर्-मोसम, गैर्-रहा, गैर्-राबता, गैर्-वाका, गैर्-हङ्गाम, गैर्-हजिरी, गैर्-दुर्मत; ना-इत्यफाक, ना-इलाज, ना-उमेद, ना-कुवत, ना-तवानगी, ना-दौलत्खाई, ना-मर्दुमी, ना-माफकत, ना-मेहेर्बानी, ना-रजावन्ती; बे-अक्कल, बे-अब्रू, बे-आब, बे-इज्जत, बे-इतबार, बे-इलाज, बे-कानू बे-किलाफ, बे-खातरी, बे-जाबता, बे-तर्तूद, बे-दस्तूर, बे-दाद, बे-दावा, बे-दुवा, बे-निगा, बे-बर्कता, बे-बाकी, बे-बुनियाद, बे-मुन्सफी, बे-मोहर, बे-वक्त, बे-शिरस्ता, बे-शिस्त, बे-हङ्गाम, बे-हिम्मत, बे-हिशेब, बे-दुर्मत.

पेन्, नव, नेक, बद हीं विशेषणें, लागून समास सिद्ध होतात—पेन्-खर्च, पेन्-नमा, पेन्-ज्वानी. पेन्-हङ्गाम इत्यादि. नव्-कीर्द, नव्-खरीद, नव्-जवान, नव्-निघादास्त. नेक्-नजर, नेक्-नियत, नेक्-सल्ला बद्-अमल, बद्-नक्श, बद्-नजर, बद्-नाम, बद्-नियत, बद्-फैल, बद्-मामला, बद्-रस्ता, बद्-रहा, बद्-वक्र बद्-सलूक.

या प्रमाणें थोडक्यांत मराठी भाषेच्या व्याकरण रचनेचा इतिहास देऊन मराठी भाषेंत जे अनेक साधित शब्द तयार होऊन शब्दांची भर सारखी पडत आहे त्या क्रियेचें स्वरूप थोडक्यांत सोदाहरण दिग्दर्शित केलें आहे. या प्रमाणें सामान्यतः मराठी भाषेचें जागतिक भाषांत स्थान कोणतें आहे तिचा प्रसार कोणत्या प्रदेशांत आहे तिची उत्पत्ति व वाढ कसकशी होत गेली व तिची घटना कोणत्या प्रकारची आहे हें आतांपर्यंतच्या प्रस्तावनांत नमूद केलें आहे.

या विभागाची प्रस्तावना तयार करीत असतां रा. यशवंत गणेश फफे यांनीं केलेल्या मराठी व्याकरणासंबंधींच्या कांहीं टिपणांचा उपयोग करण्यांत आला आहे. तसेंच खालील ग्रंथांचाहि बराच आधार घेतलेला आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

1 Linguistic Survey of India by G. A. Grierson Vol. VII. 2 मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरण प्रबंधकार—मो. स. मोने. ३ मराठी व्याकरणावरील निबंध—कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर, ४ मराठी व्याकरणाची कुलकथा—रा. अ. का. प्रियोळकर, ५ अर्वाचीन मराठी साहित्य—रा. नेने व इतर, ६ शास्त्रीय मराठी व्याकरण—कै. मोरो केशव दामले. ७ मराठी भाषेची घटना व मराठी शब्दसिद्धी—कै. रा. भि. जोशी ८ फारशी—मराठी कोश—प्रो. मा. श्यं. पटवर्धन. महाराष्ट्र साहित्य पत्रिका—महाराष्ट्र साहित्य परिषद. व प्रस्तावनेंत उल्लेखिलेलीं व्याकरणें इ. इ.

यशवंत रामकृष्ण दाते.

॥ श्री ॥

महाराष्ट्र शब्दकोश

विभाग सहावा

म

म—व्यंजनमालेंतील पंचविसावें व्यंजन. या अक्षराच्या मुख्य चार अवस्था दाखवितां येतात. पहिली अशोकाच्या गिरनार लेखामध्यें, दुसरी महाक्षत्रप शोडासच्या वेळच्या (ख्रिस्तपूर्व १ ल्या शतकाचा सुमार) मथुरा येथील जैन लेखांत, तिसरी समुद्रगुप्ताच्या अलाहाबादच्या स्तंभावर (इसवी सन चवथें शतक), व चवथी राजा यशोधर्मन्‌च्या वेळच्या मंदसोर लेखांत (इ. स. ५३२).

माार—(संक्षेप) मजकूर.

मअ—क्रिवि. सह. [अर.]

मअदन—स्त्री. खाण. [फा.]

मअनी—पु. अर्थ. [अर.]

मअसूम—वि. निरपराधी. [अर.]

मइदा, मइदान, मइदालकडी, मइना, मईद, मईल, मईलखोर—मैदा इ० पहा.

मऊ—वि. १ कोमल; मृदु; शिथिल (अवयवाचा). २ गुळगुळीत; खरखरीत, खडबडीत नव्हे असें. ३ (ल.) सौम्य; शांत; नम्र; रागीट नसलेला; कठोर नसलेला (माणूस, भाषण) [सं. मृदु; प्रा. मउ] **म्ह०** मऊ सांपडलें म्हणून कोंपरानें खणूं नये. =एखाद्याच्या चांगुलपणाचा फार फायदा घेऊं नये. **०पायांचा**–वि. (स्त्रियांचे पाय मऊ असतात त्यावरून ल.) नपुंसक. **०रेशीम-सूत**–वि. १ रेशमासारखा किंवा सुतासारखा मऊ; अतिशय मऊ. २ (ल.) अतिशय गरीब, दीन; नरम. **०सर**–वि. किंचित् मऊ; साधारण मृदु.

मऊ—पु. (व.) वाणी या जातीच्या ज्वारीचा (जोंधळ्याचा हुरडा).

मऊज—स्त्री. मौज पहा.

मकई—स्त्री. (ना. बडोदें) मका. [हिं. गु.] **०भुट्टा**–पु. मक्याचें कणीस. 'या दिवशीं, भाज्या व मकईभुट्टे श्री. खाशा बाया व मानकरी मंडळी...याजकडे पाठविण्यांत येत असतात.' –ऐरा १२५.

मकडी—स्त्री. माकडीण. (पुढील एका म्हणींतच या शब्दाचा उपयोग केला जातो). [सं. मर्कटी प्रा. मक्कडी] **म्ह०** लकडीवांचून मकडी वळत नाहीं (वठणीस येत नाहीं) =मूर्ख मनुष्य मारावांचून वठणीवर येत नाहीं.

मकण—न. मक्याचा कडबा; मकाण पहा.

मकण—न. (राजा.) मजल; टप्पा. मकाण पहा. 'अजून पांच मकणें राहिलीं आहेत.'

मकतल-ळ—न. (नारायणपेठेजवळील एका गांवाचें नांव. या ठिकाणीं जाडेभरडें व हलक्या दर्जाचें कापड त्यार होतें. यावरून) जाडयाभरडया व विटणाऱ्या कापडाचा आंगरखा, बंडी इ० –वि. जाडेभरडें आणि विटकें (कापड). याच्या उलट अणखर.

मक(ख)तूल—पु. रेशमाची कंकरी, कांकरी; लड; पीळ घातलेलें किंवा वळीव रेशीम. [अर. मख्‌लूत=मिश्र, गुंतीचें ?]

मकबरा—पु. कबर; समाधिस्थळ. [अर. मक्‌बर]

मकर—न. १ कुटिलपणा; फसवणूक; ढोंग. 'त्यांच्या हरामजाद्या व मकर सर्व नबाब बहादूर यांचे ध्यानांत' –रा १९.५९. २ कपट; फितुरी; दगा. ३ लबाडी: क्लृप्ती. [अर. मक्र] **०फरेब**–पु. लुच्चेगिरी; फितुरी; कुटिलपणा. 'इंग्रज मक्करफरेब बहुत जाणतात.' –पया ४७६. **मकर-री**–वि. १ कपटी; दांभिक; कुटिल. 'कुमशेलवाले आले ते कावूची; बहुतां प्रकारें बजिदी करितील, लालूच दाखवितील, जात मकरी!' –रा १९.६०. २ धूर्त; युक्तिबाज.

मकर—पु. १ मगर; नक्र; सुसर. मकराचें चिन्ह (चित्र) मदनाच्या ध्वजावर असतें असें मानलेलें आहे व म्हणून त्यास मीनकेतन, मकरध्वज म्हणतात. 'बळानें काढूं ये मणि मकरदाढेंत दडला।' –वामन, स्फुट श्लोक (नवनीत पु. १३३). २ मगरासारखा एक काल्पनिक प्राणी. ३ (ज्यो.) बारा राशींपैकीं दहावी

रास. ४ (नृत्य.) दोन्ही हातांचीं बोटें सरळ पसरून आंगठा ऊर्ध्व करणें व उजवा हात डाव्या हाताच्या पाठीवर ठेवणें व हात अधोमुख करणें [सं.] **०कुंडल**-न. मकरमाशाच्या आकाराचा पुरुषांच्या कानांतील अलंकार; मकराच्या आकारांचें कुंडल. 'मकर कुंडलें तळपती श्रवणीं।' -तुगा १. **०तुंड-तोंड**-न. मगराच्या तोंडासारखा केलेला रथाचा अग्रभाग, रथाची दांडी. 'मिळौनि मकरतोंडां मकरतोंडें। सरथियांचा तोंडीं सुनि खांडें।' -शिशु १०४७. -ज्ञा ११.२९३. **०ध्वज**-पु. १ मदन; कामदेव. 'ज्याचे जानूवरी मकरध्वजा। जोडली बरव।' -ज्ञा ११.६०१. २ असंभोगजन्मा मारुतीपुत्र. **०रास**-स्त्री. दहावी रास; या राशींत पूर्वाषाढा नक्षत्राचा शेवटचा चरण, उत्तराषाढा व श्रवण या दोन नक्षत्रांचा समावेश होतो. **०रेषा-वृत्त**-स्त्री न. विषुववृत्तापासून दक्षिणेस २३॥ अंशांवर असणारें वृत्त. याच्यापलीकडे दक्षिणेस सूर्याची गति नाहीं. उत्तरेकडे २३॥ अंशावर असणाऱ्या वृत्तास कर्कवृत्त म्हणतात. **०संक्रमण-संक्रांत-ति**-नस्त्री. १ सूर्याचें धनराशीहून मकरराशीस जाणें. २ (विशेषतः संक्रांत.) एक सण; उत्तरायणाचा आरंभ. या दिवशीं अयनश्राद्ध, तिलपात्रदान, एकमेकांस तिळगूळ वाटणें इत्यादि करितात. **मकरालय**-पु. समुद्र. 'मकरालय लंघाया मत्ता मशका कसा उडालास।' -मोद्रोण १.२२. [मकर+आलय] **मकरी**-स्त्री. मगराची मादी. 'म्हणोनि माझी वैखरी। मौनाचेंही मौन करी। हे पाणियावरी मकरी। रेखिली पां।' -अमृ १०.१७.

मकरंद—पु १ फुलांतील मध; पुष्परस. 'लतेतळीं, रुंद निरुंद कालवे। गळोनि तेथें मकरंद कालवे।' -र ८. २ सुवास. 'जैसी कमळकळिका जालेपणें। हृदयींचिया मकरंदातें राखों नेणें।' -ज्ञा १०.१२७. ३ भिजविलेल्या रव्याच्या गोळ्या तुपांत तळून नंतर साखरेच्या पाकांत बुडवून करतात तें एक पक्वान्न. [सं]

मकराणी—स्त्री. मकान प्रांतांतील रहिवाशी. एका जातीचें नांव व त्या जातीचा मनुष्य. 'अहमदखां, मकराणी समजून इंदूर छावणींतून बडे साहेबांचे हुकुमानें काढून दिला.' -विक्षिप्त ३.२३०.

मकसुद, मक(ख)सूद—पु. अभिप्राय; हेतु. मक्सुद पहा. -पेद २१.३२.

मकळी—स्त्री. ज्वारीवरील रोग; सजगुऱ्यावरील रोग; तिळाच्या झाडावरील किडा; हा ढेकूण खातो.

मका—पु. एक तृणधान्य; मकई पहा. याचा मुख्य उपयोग चारा व अन्न म्हणून होतो. दाण्याच्या रंगावरून याच्या पांढरा, तांबडा, पिंवळा, काळा, इ० जाती आहेत. हें धान्य पौष्टिक, थंड व धातुळ आहे. **मकाण**-न. मक्याचा कडबा; मक्याचीं कणसें कापून घेतल्यावर राहिलेलीं ताटें. [मका+तृण] **मकाणा**-पु. १ मक्याचा दाणा. २ (मकाणे) मक्याच्या लाह्या. ३ कमलबीज; हें मक्यासारखें असतें यावरून यासहि म्हणतात. याच्या लाह्या करितात. ४ मक्यावर होणारा काजळी नांवाचा रोग; भेरड. [मका+दाणा] **मक्याण** न. १ मक्याची उसळ; २ मक्याचा कडबा; मक्याचीं ताटें.

मकाण-न—न. १ राहण्याची जागा; घर; ठिकाण. २ मुक्कामाची जागा; वाटेंत थांबण्याचें ठिकाण; पल्ला; टप्पा ३ व्याप; पोंच; विस्तार (मन, सामर्थ्य इ० चा.); (भाषणाचा) ओघ. [अर. मकान्] **मकाणांत येणें**-(एखादी गोष्ट) टप्प्यांत येणें.

मकातीब—न. पत्रें. 'हमेशा मकातीब पाठवून दोस्ती-येकजहती दीन-ब-दीन ज्यादा होय.' -रा १०.३१२. [अर. मकातीब्. मक्तूबचें अव.]

मकार—पु. प्रणवाची किंवा ओंकाराची तिसरी मात्रा. 'अकार उकार मकार। तिन्ही मिळून ओंकार।' 'वरी मकारांत सोपान। तें सांडोनियां गहन। काखेसुनियां गगन। भरले ब्रह्मीं।' -ज्ञा १२.५६. **०पंचक**-न. 'म'नें सुरू होणारे पांच शब्दः-मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा, मैथुन. ह्या पांच गोष्टींना शाक्त लोकांत विशेष मान्यता देतात. 'मकारपंचकं येणें करून पापाचा नाश होतो कीं।'

मकारिम—स्त्री. स्पृहणीय कृत्य; उदारता. [अर.]

मकुडयाचा खिळा—पु. पसरट माथ्याचा खिळा.

मकूदाणा—पु (अशिष्ट) योनिलिंग **मकोडा**-वि. (बायकांत व बदफैली लोकांत रूढ) फाकडू; मारू [? हिं. मकोडा=मुंगळा]

मक्कलशूळ—पु. बाळंतिणीच्या हृदयांत, मस्तकांत व बस्तींत होणारा शूळ. हा वाताच्या प्रकोपानें रक्ताचा अवरोध झाला म्हणजे उत्पन्न होतो. -योर २.६४०.

मक्को—पु. मुंजफळ. -मुंव्या ११०.

मक्त(क्त)सर—पु. हक्कदार किंवा कामदार नव्हत अशा जुन्या वतनदारांचीं पदवी. 'विलेस राजश्री शिवाजीपंत कार्कून मख्तसर आहेत.'-रा ८.१६४. -वाडमा ४४. [फा.मुख्तसर?]

मक्ता-खता—पु. १ विशिष्ट अटींवर काम करण्याचा किंवा कांहीं पुरविण्याचा हक्क व जबाबदारी; उक्तें काम. २ ठेका; बोली; कंत्राट; इजारा; हमी. (क्रि० घेणें) 'आम्ही तुम्हांस सुशिक्षित करूं असा आम्हीं कांहीं मक्ता घेतलेला नाहीं.' ३ खंड; उत्पन्नाचा ठराविक अंश; जमीनीच्या मालकी हक्काबद्दल मालकास द्यावयाचा मोबदला-धान्य अगर नक्त रक्कम. [अर.

मक्तअ] **मक्तेकरी-दार-वाला**-पु. १ ठेकेदार; कंत्राटदार. २ मक्ता घेणारा शेतकरी; खंडकरी. **०गुत्ता**-पु. १ ठराविक रकमेपेक्षां जास्त न देण्याच्या करारानें घेतलेलें शेत. २ असा कायम धाऱ्याचा करार. **मक्तेदारी**-स्त्री. इजारा; इजाऱ्याची पद्धत. **मक्त्याची मामलत**-स्त्री. मक्त्यानें दिलेली जिल्ह्याची मामलत, राज्याधिकार. याच्या उलट कच्ची मामलत.

मक्ता—क्रिवि. (राजा.) पुरेसें; जितक्यास तितकें.

मक्तूब—वि. उपर्युक्त; संबोधित; मजकूर. 'सरकार मक्तूबाचे कार्पेर्दाजाच्या दरखास्ती प्रमाणें अमलांत येईल.' -पेश. ५७ [अर. मक्तूब्]

मक्बूल—वि. मान्य; मंजूर; सन्मानित. [अर.]

मक्मूर—वि. निशेमुळें तर्र झालेला; निशेबाज. [अर. मख्मूर]

मक्रबी—वि. १ पाश्चात्य. २ उत्तर आफ्रिकेंतील. [अर. मघ्रबी]

मक्रमत—स्त्री. कृपा. [अर.]

मक्सी—पु. घोड्याचा रंग. -अश्वप १.२८.

मक्सूद—पु. हेतु; मतलब. 'तुझा काय मक्सूद (?) तो सांगणें. -रा १५.३७. [अर. मक्सुद्]

मख—पु. यज्ञ. हा शब्द समासांत पूर्वपदीं व उत्तरपदींहि येतो. पूर्वपदीं-मख-मंडप-भूमि-रक्षण-विघ्न-सामग्री, इ० उत्तरपदीं-हयमख, शतमख इ० 'जे राजधर्म सुरतरुसख मखसे सुखद उत्सवद नार्की।' -मोसभा १.१५. [सं.]

मख—पु. मगज; गीर, गाभा; मोख पहा. [मोख]

मख—वि. आंतल्या गांठीचा. मख्ख पहा.

मखण—न. लोणी; माखण पहा. 'यानें चोरून खावें मखण अनुभवें हें मला पूर्ण ठावें।' -अकक. २ विसुदाम ७३.

मखदूर—पु. मगदूर पहा.

मखम(मा)ल, मखमुल, मख्मल—स्त्री. १ एक प्रकारचें अतिशय मृदु वस्त्र. २ एक फुलझाड. -न. त्याचें फूल. [फा. मख्मल्] **मखम(ख्म)ली-माली**-वि. मखमलीचा; मखमलीसारखा. 'सोनेरि पलंगावर गाद्या मख्मली पसरल्या चादरा त्यावर त्या मलमली।' -प्रला २२९. **०किडा**-पु. एक तांबडा, सपक्ष व अनेक पाय असलेला पावसाळी किडा; देवगाय; गोसाई. हा मृगारंभीं दिसतो.

मखर—न. १ कागदाच्या जाळ्या, उंची वस्त्रें इ० सभोंवतीं लावून देवाच्या मूर्ति, सन्माननीय पुरुष इ० साठीं प्रसंगविशेषीं करतात ती सुशोभित जागा. 'त्या निंदी श्रीकृष्णा कीर्ति श्री-शांति-मूर्तिच्या मखरा।' -मोसभा २.३६. २ प्रथम ऋतु प्राप्त झाला असतां न्हाणवलीस जींत बसवितात ती जाळीची ताटी; अशा ताट्या लावून केलेली जागा. ३ (व.) पोळथाच्या दिवशीं बैलाच्या कपाळावर बांधावायाचें लाकडी, कागदी बाशिंग. **मखऱ्या**-पु (व.) ज्याच्या डोक्यावर मखर बांधतात तो बैल.

मखलाशी-सी, मख्ल(ख्ला)शी—स्त्री. १ हिशेब, कागदपत्र इ० मंजूर करणें; तो बरोबर आहे असा, मान्यतेचा, पसंतीचा शेरा; (सामा.) मान्यता; मंजूरी. २ सनद, नेमणूक, इनाम, दस्तरेवज इ० मंजूर झाल्याबद्दलचा सरकारचा शिक्का, निशाणी, सही. 'यांचे यादींत मखलासी जाहली असे.' -वाडबुबा ८४. ३ एकाखालीं एक रकमा मांडून केलेली गोळाबेरीज; तेरीज. ४ वादाचा निकाल; निर्णय. ५ फार देणें, घेणें असतां सरकार इ० पासून थोड्या द्रव्यानें करून घेतलेली तोड. 'याची मखलशी करून खरा होईल त्याचे स्वाधीन करावी.' -वाडबाबा २.७१. ६ (ल.) साफसुफी; सारवासारव; वरवरची बोळवण. ७ (ल.) टीका; मल्लीनाथी; भाष्य. [अर. मुखल्लस्=शुद्ध, विनचूक] **०करणें**-सुधारणा करणें; नीटनेटकें स्वरूप देणें. 'जें मनांत होतें तें एकदम बाहेर पडलें. आतां किती जरी कळाकुसरी आणखी मखलाशी केली तरी मी फसायची नाहीं.' -जग हें असें आहे.

मखा-ख्खा—पु (व.) गोट्या खेळण्यासाठीं जमिनींत केलेला खळगा; गल.

मखी-ख्खी—स्त्री. १ बंदुकीच्या टोंकाला नेम धरण्यास उपयोगी असतें तें चिन्ह; माशी. २ खोंच; मर्म; गर्भितार्थ; आशय (भाषण, कविता इ० चा.) ३ युक्ति; रीत; खुबी; मर्म (एखाद्या कृतीचें, कोड्याचें) [सं. मक्षिका. प्रा. मक्खिआ; हिं. मख्खी] **०उतरणें**-हुबेहूब, विनचूक अनुकरण, नक्कल करणें.

मख्ख—वि. आपले विचार कोणाला न कळूं देणारा; आंतल्या गांठीचा. [मेख ?]

मख्खम—वि. १ मजबूत; बळकट; भक्कम (इमारत, पदार्थ). २ मोठें; अवाढव्य; अवजड (ओझें इ०). खंमाल पहा.

मख्खीचूस—वि. (ना.) अत्यंत कंजुष; कवडीचुंबक. [हिं. मक्खी=माशी+चूसना=चोखणें]

मख्दू(द्दू)म—पु धनी; मालक. 'सत्यापा मख्दूम सल्गरेकर याची स्त्री.' -ख ७.३७२१. [अर. मख्दूम्]

मख्फी—वि. गुप्त. कुपिया पहा. [अर.]

मख्मूल—वि. टवटवीत; तजेल; तर्र. 'मख्मूल फूल गुलगुलित ऐन रंगात।' -प्रला २३८. [अर. मख्मूर]

मग—पु. मीडियांतील एक जात; प्राचीन पारशी धर्मांतील पुरोहितवर्ग. सूर्योपासक लोक. -झाको. (म) ५.

मग—क्रिवि. १ त्यावर; नंतर; पुढें. २ लवकरच; अंमळशानें; थोड्या वेळांत. ३ असें आहे त्याअर्थी. 'पाऊस तर पुष्कळ पडला मग पिकें कां नाहीं आलीं ?' ४ पुष्कळदां पादपूरक म्हणून योजितात. 'जाईन मग तुझें काय जातें.' [वेप्रा. मगा–ग=पश्चात् ; म. मागें]

मगतून, मगत्यान—क्रिवि. (कों. कु.) मागाहून; नंतर. –लोक २.८०. **मगन, मगनशानि**–क्रिवि. (खा. व.) नंतर; थोड्या वेळनें.

मगज—पु. १ गीर; गाभा; रसाळ पदार्थ. 'मग पाहतां दिसें सगळें । परि मगज हारपे ।' –कथा ७.६.५३. २ शेंगेच्या आंतील दाणा, गर इ० मऊ पदार्थ. ३ भाकरींतील मऊ भाग. ४ हाडांतील मृदु अंश. ५ बोज; प्रतिष्ठा; महत्त्व. 'आपला मगज राखणें । कांहीं तरी ।' –दा ११.१०.२३. ६ डोक्यांतील मेंदु. ७ सार; तथ्य. [फा. मग्झ; तुल. सं. मज्जा]

मगजी—स्त्री. १ कड; कांठ. २ शोभेची, नक्षीची किनार, कांठ; फीत; झालर. [फा. मग्झी] ०**दार**–वि. सुशोभित कांठ, किनार असलेलें (वस्त्र).

मगण—न. (महानु.) महिमा; गहनता. 'चांग मगण वाढिनलें । शांतीचें पैं ।' –भ.ए ४३. [सं. महार्घ; म. महाग]

मगदुमी, मगदुमीसाखर—स्त्री. पिठी साखरेचा एक प्रकार. 'चिनी साखर पांढरी, मगदुमी तैसीच नाबद्दरी ।'–कचेसुच ८.

मगदूर, मग्दूर—पु. १ शक्ति; सामर्थ्य; ताकद; जोर. –दिमरा १.१६. २ योग्यता; किंमत. 'पूर्वी बंदरावर मालाच्या मगदुराप्रमाणें गलबतावर जकात पडे.' –कोरकि १४. [अर. मक्दूर]

मगन—वि. १ (प्र.) मग्न. कांहींएक विचारांत गुंतलेला, गुंग झालेला; चूर; दंग. 'तेथेंच जाले मगन हो ।' बयाबाई रामदासी प्र. ९२, पद ८. २ संतुष्ट; आनंदित; खूष. [सं. मग्न] ०**मस्त, मगरमस्त**–वि. १ (ल.) धुंद झालेला; गर्विष्ठ; उन्मत्त; मगरूर झालेला. २ अतिशय मस्त; बेफाम झालेला. मगरमस्त पहा. 'कोतल नर कोतवाल वारण मगनमस्त किल करित ।'–ऐपो २००.

मगम—वि. (व) १ पोटभर; पुरेसें. 'मगम पोट भरलें म्हणजे खाण्यावर वासना होत नाहीं.' २ संतुष्ट. 'वरणभात मिळाला कीं मनुष्य मगम राहतो.'

मगमगीत—वि. सुवासानें युक्त; घमघमीत पहा. 'मधुररसें रसाळें । अति निर्मळें मगमगीतें ।' –एभा १८.९०.

मगर—पुस्त्री. सुसर; नक्र; एक जलचर प्राणी. [सं. मकर; प्रा. मगर] ०**गांड**–वि. माजलेला; मस्त. ०**मस्त**–वि. १ अत्यंत गर्विष्ठ; उन्मत्त (माणूस). २ धष्टपुष्ट; मस्त; न दमणारें (जनावर). ३ झिंगलेला. मगनमस्त पहा. ०**मिठी**–स्त्री. १ मगराची मिठी. यावरून २ (ल.) अतिशय घट्ट, न सुटणारी मिठी, पकड, छाप. 'अज्ञानाच्या मगरमिठीहून अधिक जाचक अशी गोष्ट नसेल.' –नि. ३ एखाद्या लांबलचक व कंटाळवाण्या भाषणानें एखाद्यास गुंतविणें, हालूं न देणें. ०**मुशी**–स्त्री. मुशी नांवाच्या समुद्रांतील माशाची एक जात. **मगरेजाळ**–न. (गो.) कोळ्याचें जाळें. [मगर+जाळें]

मगर—उअ. परंतु; पण. 'करार होणें राहिला, मगर बोलण्यांत शपथपूर्वक आलें आहे.' –रा ५.६. [फा. मगर्]

मगरी—स्त्री. १ छपराचें आढें; पाटेस (क्रि० बांधणें) २ वाफ्यांतील रोपांची रांग, ओळ. ३ भितीची मुंढेरी, वरवंडी. ४ बागेंत वाफ्यांना पाणी देण्यासाठीं बांधलेला उंच पाट. ५ (कु.) मिरचीचें रोप लावण्यासाठीं केलेला वंधारा, वरवंडी. [हिं. मग्री]

मगरूर—वि. गर्विष्ठ; चढेल; उन्मत्त; प्रतिष्ठित. [अर. मघ्रूर] **मगरुरी, मगरुरी**–स्त्री. गर्व; चढेलपणा; उन्मत्तपणा; घमेंड, 'शेवटीं दादासाहेबांस द्यावें, साष्टी द्यावी हें कांहीं त्यांच्या मनांत नाहीं व गोष्टीही मगरूरीच्या... ' –पया १०. [अर. मघ्रूरी]

मंगल—न. १ भाग्य; सुदैव; कल्याण. २ लग्न, मुंज, इ० शुभकार्य. ३ शुभकार्य, ग्रंथ पठण इ०च्या आरंभीं म्हणतात ते ईश्वरस्तुतिपर श्लोक; मंगलाचरण पहा. आरंभींचें–मध्यचें- शेवटचें मंगल असे याचे तीन भाग कधीं कधीं करण्यांत येतात. –पु. मंगळ नांवाचा एक ग्रह. –वि. शुभ; सुलक्षणी; कल्याणकारक. [सं.] ०**कार्य**–न. लग्न, मुंज इ० शुभ विधि. ०**जननी**–स्त्री. (काव्य) पृथ्वी, मंगल ग्रहाची माता. [सं.] ०**दायक**–वि. शुभदायक. [सं.] ०**निधि**–पु. कल्याणाचा ठेवा, सांठा. ०**भवानी**–स्त्री. (निंदा, उपहास याअर्थी) अचरट, मूर्ख स्त्री. ०**वाद्य**–न. मुंज, लग्न यांसारख्या शुभप्रसंगीं वाजविण्याचें वाद्य. (वाजंत्री, इ०) ०**वार**–पु. मंगळवार; भौमवार. ०**सूत्र**–न. मंगळसूत्र पहा. ०**स्नान**–न. अंगाला तेलें, उटणें लावून उष्णोदकानें केलेलें स्नान; अभ्यंगस्नान; न्हाणें. **मंगलागौरी**–स्त्री. देवी; पार्वती. **मंगलागौरीव्रत**–न. लग्नानंतर मुलींनीं पांच वर्षे श्रावण महिन्यांतील प्रत्येक मंगळवारीं करावयाचें मंगळागौरी पूजेचें व्रत. **मंगलाचरण**–न. १ ग्रंथ, कथा, पुराण इ०च्या आरंभीं केलेली ईश्वराची स्तुति २ कुलदेवतेचें नामस्मरण. ३ कोणत्याहि कार्याचा आरंभ, सुरवात. (क्रि० करणें). **मंगलाष्टक**–न. लग्न, मुंज इ० कार्यांच्या वेळीं म्हणावयाचीं आशीर्वादार्थी शुभदायक पद्यें, प्रत्येक. [मंगल+अष्टक] ०**घट्ट करणें**–मंगलाष्टकें म्हणावयास शिकणें. ०**गात बसणें**–रडत, चरफडत बसणें. **मंगलाक्षता**–

स्त्रीअव. मंगलप्रसंगीं आशीर्वाद देतांना ब्राह्मण इ०नीं मस्तकावर टाकलेले कुंकुमयुक्त तांदूळ; मंत्राक्षता. [मंगल+अक्षत]

मगस—पु. (प्र.) मगज पहा.

मंगळ—पु. सूर्यमालेंतील एक ग्रह; भूमिपुत्र. हा तांबूस वर्णाचा असून पृथ्वीच्या अगदीं जवळ आहे. फलज्योतिषांत हा क्रूर ग्रह मानिला जातो. [सं.] **०उखा**–स्त्री. सुखप्रकाश. –मनको. **०जननी**–स्त्री. पृथ्वी. **०भगिनी**–स्त्री. १ सीता, द्रौपदी या पृथ्वीपासुन जन्मल्या म्हणून यांच्याबद्दल योजितात. ' मंगळभगिनीच्या वरप्रसन्नें। ' –दावि ४४२. २ (लग्न सोहळ्यांतील) करवली. **०माठ्या**–वि. मूर्ख; मट्ट; अडाणी (शिवी). [मंगळ+माठ] **०वार**–पु. भौमवार. **मंगळाई देवी**–स्त्री. एक क्षुद्र देवता. ' मंगळाई देवी म्हणे श्रीगुरु वरिष्ठा। ' –सप्र ५.१३. **मंगळी**–वि. (बे.) सोंगाडी (स्त्री).

मंगळ—न. मंगलकारक गाणें; मंगलाचरण. ' अहिवा मंगळ गाती। ' –वसा ४९. –नपु. (व.) मंगलाष्टक. –नवि. मंगल पहा. [सं. मंगल] (वाप्र.) **०गात बसणें**–रडत, दुःख करीत बसणें. **०मातणें-माजणें**–१ अव्यवस्थितपणें कसें तरी केलें जाणें (लग्न). २ (मंगलकार्यांत) सोंवळें ओवळें इ०चा विचार न राहणें. सामाशब्द– **०आरती, मंगळारती**–स्त्री. १ देवपूजेच्या समाप्तीच्या पूर्वी तबकांत नीरांजनें ठेवून तोंडानें आरती म्हणत देवाला ओवाळणें. २ आरतीचें तबक. ' मग उजळोनि मंगळारती। वोवाळिला रुक्मिणीपती। ' **०कूळ**–पु कल्याण करणारा. –मनको. **०तुरें**–न. मंगलवाद्य पहा. [मंगल+तूर्य] **०दायक**–न. लग्न, विवाह इ०कार्य. ' लटिकें करिती मंगळदायकें। लटिकींच एकें एकां व्याही। ' –तुगा २५. **०धाम**–न. (काव्य) १ चांगल्या वस्तूंनीं भरलेलें गृह. २ (ल.) देव; साधुपुरुष इ० **निधि**–पु. कल्याणाचा ठेवा, खाण. **०भारणी**–स्त्री. परस्परांनीं परस्परांच्या पायांत पाय घालून ते चेपण्याचा प्रकार. **०मूर्ति**–पु. गणपति. **०सूत्र**–न. लग्नांत वर वधूच्या गळ्यामध्यें दोऱ्यांत मणि ओविलेलें जें सौभाग्यचिन्ह बांधतो तें. (कु.) मंगळसूत. **०सरी**–स्त्री. मंगळसूत्र. ' कीं अलंकार घातले संपूर्ण। परी मंगळसरीविण व्यर्थची। ' –भवि ६.४४. **मंगळागौर-री**–मंगलागौरी इ० पहा.

मंगळणें—उक्रि. १ चकविणें; ठकविणें; भोंदणें; फसविणें. २ (ल.) चळविणें; गोड बोलून इष्ट हेतु साध्य करून घेणें; वश करणें. ३ (अश्लील) भोगणें; हेपलणें. तंतरणें पहा. **मंगळीचा**–पु. (एक शिवी) अवैवाहिक संबंधापासुन झालेला इसम; अनौरस; कट्ट.

मगां, मगाशीं—(प्र.) मघां, मघाशीं पहा.

मंगी—वि. (नंदभाषा, व्यापाऱ्यांत रूढ) आठ संख्या. ' सुतपेटीचा भाव मंगी आहे. '

मंगी-गू—स्त्री. मांजरीला लाडिकपणें संबोधितात. **मंगोबें**–न. (बालभाषा) मांजर.

मंगूस, मंगूसवेल—(प्र.) मुंगूस; मुंगूसवेल पहा.

मगे-ग्ये—क्रिवि. (राजा. कु.) नंतर; मग. [मग]

मगे—क्रिवि. (कु.) म्हणजे. [म्हणजे-म्हंजे-म्हंगे-मगे]

मंगेरा, मंग्यारो—पु. (कु. गो,) पाचोळा; केरकचरा इ० एकत्र करण्याचें लांकडी पावडें.

मगोळ—स्त्री. (सुतारी धंदा) कानशीचा एक प्रकार.

मग्न—स्त्री. (शाप. रसा.) चांदीसारखा पांढरा व फार तेजस्वी असा एक धातु. याचे पुष्कळ संयुक्त पदार्थ बनतात मग्नक्षार हें एक चांगलें रेचक आहे. (इं.) मॅग्नेशियम्.

मग्न—वि. १ पाणी इ० मध्यें बुडालेला. ' अयोध्यापुरीं वाजती शंख भेरी। नभीं देव ते मग्न चिंता समुद्रीं। ' –मुरामायण अयोध्या ७. २ (ल.) एखाद्या कामांत तल्लीन, दंग, चूर झालेला. [सं.]

मग्रब, मग्रबाई—पुस्त्री. सूर्यास्त. ' मगरबाचे समई नवाब येकामुदौलाचे घरास गेले. ' –रा ७.१४६. [अर. मघ्रब=पश्चिम]

मघई—स्त्री. बनारस येथें मिळणाऱ्या विड्याच्या पानांची एक जात. हीं पानें सुवासिक व उत्कृष्ट चवदार असतात. –वि. मगधदेशाचें; मागधी. [सं. मगध; प्रा. मगह]

मघमघणें—अक्रि. घमघमणें; गोड, खमंग वास येणें; सुवास दरवळणें. ' ऐसें कमळ अति सुंदर। षड्विकार तेचि केसर। वैराग्य कर्णिका सधर। मघमघी थोर सुवासें। ' –एभा २७.२३२. –मुआदि १०.९९. **मघमघ, मघमघीत**–वि. घमघमीत. ' मघमघ बहु अन्नें सेवितां भक्ष्य धाले। ' –माधव, रामायण बालकांड ६०. ' मघमघीत सुपरिमळें। सफळफळें रुक्मिणी। ' –एरुस्व १५.२५. [घमघम चा वर्णव्यत्यास; प्रा. मघमघ=फैलावणें; तुल०का. मग=वास]

मघवा—पु. इंद्र. [सं.]

मघा—स्त्रीअव. सत्तावीस नक्षत्रांपैकीं दहावें नक्षत्र (अनेकवचनी प्रयोग). [सं.]

मघां, मघाशीं-सीं—क्रिवि. नुकताच; थोड्या वेळापूर्वी. ' तो मघांच आला तूं मात्र आतां आलास. '

मंच—स्त्री. खेळ; सामना. ' मॅच झाली त्या सुमाराला कांहीं कांहीं दिवस जरी उघाडी होती ... ' –सुदे ७९ [इं.]

मंचक, मंच—पु. १ पलंग; माचा; कोच; बाज. २ शेतांत पाखरें राखण्यासाठीं केलेला माळा; माचा; उंच केलेली जागा. ३ सिंहासनविशेष. [सं.] **मंचकारोहण**–न. १ राज्याभिषेकाचा एक प्रकार. हा सिंहासनारोहणापेक्षां कमी दर्जाचा आहे.

'राजारामानें दोनदां मंचकारोहण केलें.' (एकदां शिवाजीच्या मृत्यूनंतर व एकदां संभाजीच्या वधानंतर). २ बाळंतिणीस बाळंत झाल्यावर प्रथमच बाजेवर निजविण्याच्या विधीसहि म्हणतात.

मचकट—वि. कांहींसें मचूळ; मचूळ पहा.

मचकमचक—क्रिवि. पदार्थ खातांना होणारा मचमच असा आवाज करून. [ध्व.]

मचकूर—पुवि. (विरू.) मजकूर पहा.

मचणें—अक्रि. (क्र.) १ माजणें; बोकळणें; अनियंत्रितपणें चालणें (दांडगाई, धिंगामस्ती, खिदळणें इ०). 'काय वेड्यांचा बाजार मचला.' फुगणें; वाढणें. 'कलम ज्यारीचे घटाव मचले।' –ऐपो २१४. ३ (ना.) भांडाभांडीला सुरवात होणें; एकेरीवर येणें. [हिं. मचना] **मचविणें**–उक्रि. (निदार्थी.) उपस्थित करणें, चेतविणें, माजविणें, करणें (भांडण; लुच्चेगिरी; दंगाधोपा इ०). [मचणें]

मचपत्री—स्त्री. (बे.) शेवंतीप्रमाणें आकार व वाढ असलेली एक औषधी वनस्पति. हिचा रस जनावराच्या पोटदुखीवर उपयोगी आहे. [सं. मंचपत्री]

मचमच—स्त्री. १ खातांना होणारा तोंडाचा आवाज. २ (ल.) व्यर्थ, निरर्थक केलेली बडबड. [ध्व.] **म्ह०** खाणें थोडे मचमच फार. **मचमच-मचां**–क्रिवि. खातांना, चुंबन घेतांना इ० वेळीं होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज करून.

मचमचीत—वि. १ पचपचीत; बेचव; पाणचट. २ (ल.) निःसत्त्व; निर्जीव; नीरस. [ध्व.]

मचवा—पु एक प्रकारचें लहान गलबत; बलावापेक्षां मोठी होडी. 'बेलापूर येथील बातमीचा मचवा जाया झाला आहे.' –समारो ३.२२०. [पोर्तु. मांचुआ]

मॅचा—पु (बे) आटयापाटयांचा खेळ.

मचांग—पु (व.) शिकार किंवा गवंडीकाम इ० साठीं घातलेला मांचा; माळा. मंच पहा.

मचाड—वि. (ना.) गचाळ; शिळपट.

मंची-जी—स्त्री माती, विटा इ० इकडून तिकडे वाहून नेण्याचें कुंभाराचें साधन; कोळंबें. [सं. मंच]

मचूळ—वि. १ पूर्णपणें खारट नाहीं आणि गोड नाहीं असें (पाणी). २ बेचव; नीरस; पाणचट (पाणी, फळ इ०).

मच्चा—वि. मधचा–ला; मध्यें असलेला. [मध्यचा] **मच्च्यामध्यें, मच्चेंमध्यें**–क्रिवि. १ ज्याचा विचार घेणें किंवा ज्यास कळविणें जरूर आहे त्यास न कळत (जाणें, देणें, करणें). 'मला न सांगतां न विचारतां त्यास कारभार मच्च्यामध्यें सांगितला.' २ भलत्यावर, तिऱ्हाइतावर विनाकारण परिणाम होईल अशा रीतीनें. 'ते दोघे भांडले आणि सोडवावयास जो गेला त्यानें मच्च्यामध्यें शिव्या खाल्ल्या.'

मच्छ—पु. १ (प्र.) मत्स्य; मासा; एक जलचर प्राणी. २ (ल.) पाण्याच्या जोराच्या गतीस विरोध करून पाण्याचा जोर कमी करणारा जो भित, पूल इ०च्या रचनेंतील कुऱ्हाडीच्या ठोंकाच्या आकाराचा भाग बांधतात तो. [सं. मत्स्य] **मच्छ-यंत्र**–पुन. खलाशाचें दिशा दाखविणारें यंत्र; होकायंत्र. [सं.] **मच्छिंद्री**–पु. जोंधळ्याची एक हलकी जात. याचें कणीस वांकडें असून दांडा वांकडा असतो. दाण्याचें भोंड लाल असतें. –कृषि २६६. **मच्छीगोता**–पु. (मल्लविद्या) कुस्तींतील एक डाव. जोडीदाराच्या–चड्डीस लंगोटा खोंवतात त्या ठिकाणीं–धरून जोडीदारास थोडा मागें हिसका देऊन आपण जोडीदाराच्या मागें बसून आपल्या दुसऱ्या हातानें त्याचा पाय घोटयाजवळ धरून त्याला आपल्या पुढें चीत पाडणें. **मच्छीमार**–पु. मासे मारणारा कोळी; धीवर; (माळवी) मछलेटा. 'तिचें पाणी बहुत चांगलें असतां, कोळी मच्छीमार खाजणांतील येऊन विहिरींत पाय धुतात.' –समारो ३.२१२. **मच्छीमारी बोट**–स्त्री. मासे मारण्यासाठीं असलेलें लहान गलबत. मत्स्य पहा,

मच्छर—नपु. डांस; एक सपाद क्षुद्र प्राणी. [सं. मशक, मत्सरा; हिं.] **०दाणी-नी**–स्त्री. निजल्यावर डांस, ढेकूण इ०चा उपद्रव निवारण्यासाठीं केलेली बारीक जाळीदार कापडाची खोली.

मछरु—पु. (काव्य) मत्सर; द्वेष. 'नको रे मना मछरु दंभभारु।' –राम ६. [सं. मत्सर; प्रा. मच्छर]

मज—सना. १ मला; मजला. 'त्याचें मज मृषा गमे हनन।' –मोकर्ण ६.४. २ माझ्या. 'मजवर आपले अनंत उपकार आहेत.' [सं. अहं] **म्ह०** (व.) मज पहा फूल वाहा, घर पाहा इगून जा. =स्वतःपुरताच स्वच्छपणा. **मजपें**–माझ्याकडे. 'मजपें दुजें आलें तें देव जाणे वो।' –तुगा १४१.

मंज—न. (बे.) दंव; दंहिवर; धुकें. [का. मंजु]

मजकूर, मज्कूर—पु १ लेखी माहिती; हकीकत; पत्रांतील वर्तमान. २ तोंडी सांगितलेली बातमी, माहिती; बोलणें. ३ हकीकत; गोष्ट. 'त्यानें केवळ कच्चा मजकूर सांगितला.' ४ उल्लेख; निवेदन; आढळ. (क्रि० निघणें; येणें; चालणें). ५ किंमत; पाड; हिशेब. 'इराणीचा मजकूर किती? मारून धुडकावून देऊं!' –पाब ३२. ७ युक्ति; उपाय; तजवीज. 'याचा मजकूर काय करावा?' –भाब ४. ६ विचार; मसलत; बेत. 'नबाब शाइस्ताखान याची रवानगी करावी असा मज्कूर करून...' –सभासद २६. –वि. १ पूर्वी सांगितलेला; उपरिनिर्दिष्ट (कागदपत्रांत उपयोग). 'मौजे मजकूरचा पाटील गेला.' २ (चुकीनें) चालू; सध्याचा; वर्तमान. जसें:–सालमजकूर; माहेमजकूर. [अर. मझ्कूर्] **०करणें**–भाषण करणें; बोलणें. 'तुम्ही काय मजकूर

केला।' –ऐपो ४१. **मजकुरी**–वि. ज्यांत कांहीं मजकूर, हकीकत, माहिती आहे असा (कागद, भाषण इ०).

मजगतीं—क्रिवि. (गो.) मध्यंतरीं; दरम्यान [सं. मध्य; प्रा. मज्झ] **मजवेलो**–वि. (राजा. कुण.) मधला; मधचा. –मसाप २ १०५.

मजत—स्त्री. (राजा. कुण.) मदत पहा. 'चडेवांबी चार दी येवन मजत करती.' –मसाप २.४.११०.

मंजन—न. १ दांत, हिरडया इ० घांसण्याच्या उपयोगाचें कोणतेंहि चूर्ण, औषध. २ पदार्थ घासून स्वच्छ करण्याचें कोणतेंहि साधन. [सं.]

मजबूत-वृ—वि. १ बळकट; भक्कम; दृढ; टिकाऊ; भरीव. २ (ल.) कायम; निश्चित; दृढ; खंबीर (भाषण, वचन). [अर. मझ्बूत्] **मज्बूतमिजाज**–वि. स्थितप्रज्ञ. 'आंसाहेब दूरंदेश व मजबूत-मिजाज' –पया ४६५. **मजबुती, मज्बुती-दी**–स्त्री. १ बळकटी; भक्कमपणा; दृढता; पक्केपणा (इमारत इ०चा) 'जागां जागां गडकोट यांसि ताकीद करून मजबुदी करविली.' –सभासद ३२. २ बंदोबस्त. 'मोदी यास हस्तगत करून इकडे मज्बुतीनें पाठवून द्यावा' –दिमरा १.३००. ३ (ल.) कायमपणा; निश्चितपणा; (भाषण, वचन इ०चा) [फा. मझ्बूती]

मजबूर, मज्बूर—वि. १ लाचार; निराश्रित. २ जुलुमास बळी पडलेला. [अर. मज्बूर्]

मजमू—स्त्री. १ वसुली. २ वसुलीचें काम; मजमूदारी. 'येथील मजमू जगन्नाथ नारायण यांजकडे आहे.' –समारो ३.६. [अर. मज्मूअ] **०दार**–पु वसुलीअधिकारी; मुख्य हिशेब-तपासनीस. सर्व महत्त्वाच्या कागदपत्रांवर मंजूर म्हणून हा मोर्तबसुद करीत असे. मुजुमदार. [फा. मज्मूआदार्] **०दारी**–स्त्री. वसुलीचें काम; मजमू.

मजमून, मज्मून—पु १ पत्रांतील मजकूर; वृत्तांत. 'तेरावे व दहावे दफेतील जो मज्मून त्याचा मत्लब या फर्दैत आला.' –रा ७ ३. २ विषय; आशय; सारांश; मजकूर पहा. [अर. मझ्मून]

मजयाला—वि. (कु) मधला; मधचा. [सं. मध्य; प्रा. मज्झ]

मजरा-रें—पुन. १ शेतीच्या सोयीसाठीं शेताच्याजवळ व गांवापासून जरा लांब राहिलेल्या शेतकऱ्यांची दहापंधरा झोपडयांची वसाहत; वाडी, गांवचा परिकर. '... प्रांत कर्नाळा पैकीं तालुके नेरळाकडील खेरीज घरवण करून देहे व मजरे व खारी. ...' –समारो १.१६६. [अर. माज्री]

मजरा—वि. कमी; वजा. मुजरा पहा. 'तेणेंप्रमाणें मजरा पडेल म्हणोन सनद.' –वाडबाबा २.१५८. [मुज्रा]

मंज(जि)री—स्त्री. अनेक फुलें ज्यास एकापुढें एक लागलीं आहेत असा तुळस, सबजा इ०चा दांडा; मोहोर; तुरा; केसर. 'कापुरकेळीचां पदरीं। दिसति तुळसिचेया मंजिरी।' –भाए ३३. [सं. मंजरी]

मंज(जि)री—स्त्री. लहान टाळ. नृत्याच्या वेळीं ताल धरण्याकडे हिचा उपयोग करतात. 'सुरताल पखवाज खंजिरींत मंजरींत बासरीं।' –राला ३१. [सं. मंजीर]

मजल—स्त्री. १ एका दिवसांत साधारणपणें आक्रमिला जाणारा रस्ता; पल्ला; टप्पा. (क्रि० छाटणें; आटपणें; मारणें; उरकणें; गांठणें; ठोकणें; करणें). २ एका दमांत, एकदम, न थांबतां केलेला प्रवासाचा भाग. 'आम्ही प्रहरास चार कोस मजल आटपिली.' ३ प्रवासाचा शेवट, शेवटचा भाग. 'मी संध्याकाळीं मजलेस जाऊन ठेपेन' ४ उतरण्याची व विसाव्याची जागा. 'मजलीस येतांच गंजीफा खेळत बसले.' –ख ११.५९८०. ५ एखाद्या कामांतील टप्पा; भाग; कोणत्याहि कामाचा पार पडलेला भाग, पल्ला. ६ शेवट; अंत (काम इ०चा). 'तें कार्य इतक्या मजलेस आलें आहे परंतु मजलेस पोहोंचेल तेव्हां खरें.' [अर. मन्झिल्] **०दरमजल**–क्रिवि. मजल करीत करीत (मध्यें न थांबतां); कूचदरकूच. 'तुम्ही मजल दरमजल जाल वीं रहात रहात जाल?'

मज(जा)लस, मजालीस—स्त्री. १ दरबार; राजसभा. 'दाद फिर्याद मजालसींत ऐकून घेऊन' –मराचियोशा ३३. २ सदरेची जागा; बैठकीची जागा; दिवाणखाना. 'महोत्सहामध्यें आपण बसते जागीं नृत्य गायनादि न करवितां बाहेरल्या बाहेर मजलसींत करवावें.'–मराआ ११. ३ थोर, विद्वान्, सन्माननीय लोकांची सभा. ४ (सामा.) बैटक; सभा. 'जाउलीच्या मैदानीं बैसले शिपाई मजलशीं।' –ऐपो ६७. [अर. मज्लिस्]

मजला—पु. १ इमारतीचा ताल, माळा, माडी. २ (वस्त्राचा कांठ, लाकूड, दगड इ० वरच्या) नक्षीकामाचा निरनिराळा भाग. ३ नौकाफलक; गलबताचें पृष्ठ. ४ थर; पापुद्रा; पडदा. [अर. मन्झिला] **मजली**–वि. १ मजला असलेलें (घर, जहाज). २ एकावर एक किनारी असलेलें (वस्त्र). 'एक-दु-तिमजली पैठणी.' **सातव्या मजल्यावर बसणें**- १ इमारतीच्या सर्वांत उंच भागांत असणें. २ (ल.) उच्च पदावर स्थित होणें.

मजा—स्त्री. १ रुचि; चव; स्वाद; खुमारी. २ गंमत; मौज; करमणूक. [फा. मझा] **०दार, मजेदार**–वि. १ रुचकर; स्वादिष्ट; लज्जतदार; चवदार. २ गमतीचा; मौजेचा; ३ सुरेख; उत्कृष्ट; अप्रतिम; श्रेष्ठ. [फा मझा+दार्] **०दारी, मजेदारी**–स्त्री. १ स्वादिष्टपणा; रुचकरपणा. २ गोडी; आवड; सुखकारिता. मनोरंजकता (गाणें, खेळ, नाच इ०ची). ३ मोहकता; सुंदरपणा;

सुरेखपणा. (पदार्थांचा). ४ प्रिय; कोमल भाषण, कृति; गोडी-गुलाबीचें बोलणें. **मजेदारीचा शब्द**–पु. लाडीगोडीचें भाषण; गुलगुल गोष्टी.

मंजा—पु. स्त्रीचीं आर्जवें पुरुष करीत आहे अशा मजकुराची लावणी; कलगी; याच्या उलट पंजा. **०उतरणें**–१ एखाद्याच्या तोंडावरून हात खालीं आणून दाखणें; हात ओवाळणें.

मजाख—स्त्री. थट्टा; मस्करी; चेष्टा; विनोद. [अर. गुज.]

मजारला—वि. (कों.) मधला; मधचा. [मध्य]

मजाल—स्त्री. सामर्थ्य; ताकद; विशाद; शक्ति. [अर. मजाल्]

मंजिष्ठ—नपु. एक प्रकारचा औषधी वेल, वनस्पति. याच्या मुळयांपासून तांबडा रंग करतात. [सं. मंजिष्ठा; हिं.] **०मेह**–पु. १ तांबडी लघवी होण्याचा विकार. २ असली तांबडी लघवी; प्रमेह पहा. [सं.]

मॅजिस्ट्रेट—पु. फौजदारी खटले चालविणारा न्यायाधीश व मुलकी खात्यांतील अधिकारी; मामलेदार [इं.]

मंजी—स्त्री. (कों. नाविक) (प्र.) मंची; गलबताचा एक प्रकार.

मंजी—उश. (माण.) म्हणजे.

म(मं)जीट–ठ, मजीत–द्—वि. १ मळकट; जुना; खराब झालेला. ' सनगें मजीद एकूण चौपटा. ' –वाडसमा १.१४८. २ फिकट; मंद; निस्तेज; विटलेला (रंग, रंगीत वस्त्र इ०); ३ (ल.) चांगली उपस्थित नाहीं अशी, विसरलेली आहे अशी (विद्या, कला, इ०). –पु. (सराफी) जुना, मळकट मोती; [अर. मजीद्]

मजील—स्त्री. मजल पहा.

मंजु—वि. १ सुंदर; सुरेख; मोहक; रमणीय. २ मंजुळ; कोमल; मधुर (आवाज). [सं.]

मजुमु, मजुमदार–री—मजमू, मुजुमदार, मुजुमदारी पहा.

मजुरा—पु. मुजरा पहा. [अर. मुज्रा] **०करणें–देणें**–(मूळ, मुख्य रकमेंत) वजा घालणें; सुट देणें. ' त्याप्रमाणें शिबंदीचा खर्च सरकारांतून मजुरा दिला जाईल. ' –थोमारो १.८. **०जकात**–स्त्री. आयात मालावरील घेतलेल्या जकातीपैकीं तोच माल बाहेर देशीं पाठविल्यावर परत मिळणारा भाग. **०दास्त**–स्त्री. शेतवाडीसंबंधीं जें सरकारला द्रव्य द्यावयाचें त्या द्रव्यांतून सरकारला प्रत्यक्ष दिलेल्या धान्य, गवत इ० मालाच्या किंमतीची वजा केलेली रक्कम.

मंजुल–ळ, मंजूळ, मंजुळघाणा—वि. १ कानास गोड लागणारा; मधुर, (आवाज, ध्वनि). २ सौम्य; झुळझुळ वाहणारा; मंद (वारा). [सं. मंजुल]

मंजु(जू)षा—स्त्री. पेटी. [सं.]

मजूर—पु. दिवसास अमुक पैसे देऊं अशा करारानें कामाला लाविलेला इसम; गडी; कावाडकष्ट करणारा; कुली; मोलारी. [फा. मझ्दूर] **म्ह०** दिवस बुडे मजूर उडे. **०कर–करी–दार–वाला, मजूर्दार**–पु. मजूर; भाडोत्री माणूस. ' तोंपर्यंत केवळ मजूर्दाराप्रमाणें करूं नये. ' –ख ८६३. **मजु(जू)री**–स्त्री. १ मजुरास त्याच्या कामाबद्दल दिलेला पैसा; रोजमुरा; वेतन. २ मोलानें केलेली अंगमेहनत; मजुराचें काम. [फा. मझ्दूरी]

मंजूर—वि. १ कबूल; पसंत; मान्य; इष्ट. ' टीपूचा आमचा स्नेह आहे परंतु राज्य पंतप्रधान यांचा स्नेह आम्हांस अधिक मंजूर. ' –ख ८.४११६. २ कायम करणें; मान्य करणें (खालच्या कोर्टांचा निकाल इ०). ३ परवानगी. ४ पाहिलेलें. [अर. मन्जूर]

मंजुरी–स्त्री. स्वीकृती; कबुली; मान्यता.

मजोरी—वि. (प्र.) माजोरी; उन्मत्त; गर्विष्ठ. ' मजोरी ढंग ना सोडी. ' –राला ७३.

मज्जन—न. १ बुडणें; बुडी मारणें; बुडविणें. २ स्नान. ' जों मज्जनें करिति त्या यमुनेंत नारी. ' –वामन कात्यायनी व्रत ३२. [सं.]

मज्जा—स्त्री. १ हाडांतील मऊ पदार्थ; अस्थिसार. ' आंतली मज्जा काढी. अस्थिगत. ' –ज्ञा ६.२१८. २ चरबी; मेद. ' अस्तींचा पुंजा. गुंडाळिला मज्जा. ' –भाए ७६१. ३ मेंदु; मगज. ' भय चिंता रोगांनीं ग्रासिलें काळीज मज्जांला. ' –ऐपो ३९७. ४ झाडांतील पोषक रस; गीर; सत्त्व. [सं.] **०गत**–वि. मांसांत, हाडांतील धातूंत भिनलेला (रोग). **०तंतु**–पु. मेंदु, पृष्ठवंशरज्जु इ०स जोडलेल्या दोरांपैकीं प्रत्येक; (इं.) नर्व्ह. **०मेह**–पु. १ लघवींतून शरीरांतील सत्त्व निघून जाण्याचा विकार. २ अशा तऱ्हेची लघवी; प्रमेह पहा. **०स्थान**–न. मस्तुलुंग; मेंदू. –बालरोगचिकित्सा ७४.

मज्जाव—पु. (जाण्यायेण्याला) प्रतिबंध; मनाई; बंदी; आडकाठी. [हिं. मत्+जाव=जाऊं नको]

मज्या—न. खेळण्याची गोटी; बैदूल.

मज्हला, मझेला—पु. १ संकट; पेंच. २ बखेडा; घोळ. ' पागेकडील कारभाराचा येक महिना कम-कसर मोठा मझेला पडला होता. ' –रा ७.६९. २ हगामा; गडबड; धुमाकूळ; गर्दी. ' मज्हला तमाशाचाच दिसतो. ' –रा ६.५९३ [फा. मज्हला]

मझारिआन्—पु. शेतकरी. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

मटकणें, मटकाविणें—सक्रि. १ झडप घालून पकडणें. एकदम धरणें (धावणारा माणूस, चेंडू, वस्तु इ०). २ एकदम खाऊन टाकणें; मटामट खाणें. ३ हुशारीनें चटकन पटकाविणें (पैसा, नफा इ०). ४ एकदम घट्ट मिटणें (तोंड, डोळे). [ध्व.मट!]

मट-कन-कर-दिनीं-दिशीं, मटक्कदिशीं-क्रिवि. १ चटकन; पटकन; झटकन; चुटकीसरशीं. 'ती त्या उंचवटयावर मटक्कदिशीं बसली;' -कोरकि ४५७. २ स्तब्धपणें; मुकाटयानें; तोंड न उघडतां; गुपचुप. (क्रि० बसणें; असणें; राहणें; होणें). [ध्व.]

मटकमटक-क्रिवि. अधाशीपणानें खाताना तोंडाच्या, ओठाच्या होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज करून. **मटगोळा**-पु. एका दमात खाल्लेला कांहीं खाद्य पदार्थ. 'मुलानें भाताचा मटगोळा करून टाकला.' **मटमट-मटां**-क्रिवि भराभर अधाशीपणानें खाणें, मुक घेणें, एकदम उठणें किंवा बसणें, एकदम कांहींएक वस्तु पकडणें इ० च्या होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज करून. (क्रि० खाणें; जेवणें; देणें; उठणें; धरणें; झेलणें). 'देउनि मिटक्या मटमट घटघट त्या स्वाहितासुदका पी।'-मोकर्ण ४५.१४. **मटमटावणें**-सक्रि मटकावितें; मटवन खाऊन टाकणें; अधाशीपणानें भराभर खाणें. **मटमुट-मटां**-क्रिवि. माटमुट; धागधूग; घसघस; धडधड होऊन. 'माझा जीव मटमुट करतो.' **मटाट-टां, मटामट-मुटां**-क्रिवि (मटमटचा अतिशय) मटमट असा जोराचा आवाज करून. 'मुके मटामट अगणित घेत।' -आई.

मटकणें—सक्रि (व) मुरडणें.

मटका—पु. कंबर. (क्रि० बसणें; जिरणें,). 'त्या कामांत त्याचा मटकाच बसला.'

मटका—पु. मटकींतला एक भेद.

मटकी—स्त्री एक कडधान्य; मठ. [सं. मटक]

मटकेंच—क्रिवि. (ना. व.) थोडया वेळापूर्वी; नुकताच; आतांच.

मटगा—वि. आंखूड; तोकडा; लांडा. [का. मट्ट=आंखूडपणा]

मटन—न. बकरा इ० चें मांस; सागोती. [इं.]

मंटप—पु. (गो.) मंडप पहा. 'मंटपसभेसी दाटी पूर्णे।' -दावि ३३.

मटवालकी—स्त्री. (बे.) गवंडी, सुतार यांचें एक हत्यार; गुण्या; काटकोन्या. [का. मट्ट=गुण्या]

मटा—वि. (क. कुण.) मोठा; बडा 'मटा लागून गेलायस कीं नाहीं?' [मोठा]

मटा(ठा)र—पु. एक प्रकारचें कडधान्य; पांढरा वाटाणा. [हिं. मटर]

मटाळू—न. (व.) एक प्रकारचा वेल व त्याचें फळ. हें उपासाला भाजून खातात.

मट्ट—क्रिवि. स्तब्ध; कांहीं एक न बोलतां; मुकाटयानें (क्रि० बसणें; असणें; राहणें; होणें.) -वि. १ जागच्याजागीं एकदम थांबणारा; बसणारा (बुजलेला घोडा, जनावर इ०). २ नेटानें धरणें देऊन बसणारा (मनुष्य). ३ मंद; आळशी; मठ्ठ. [सं. मठः दे. प्रा. मट्ठ=मंद] **०माथा होणें**-(क.) नाहींसें होणें; गप्प, गार होणें.

मट्टा—पु. (तंजा.) झाडाची साल; वल्कल. [ता मेट्टे]

मट्टी—स्त्री. माती. [सं. मृत्तिका.प्रा.मट्टी] **मट्टी पलिद करणें**-(ना.) शरीराची नासाडी करणें; सर्व नाश करणें.

मट्टयास येणें—फार चालण्यानें, श्रम केल्यानें थकणें; जेरीस येणें; मेटाकुटीस येणें. [मेटें]

मठ—पु (संगीत.) कर्नाटक संगीत पद्धतींतील एक ताल. त्याचे मात्रा प्रकार पांच आहेत ते असे:-८ १०,१२,१६,२०.

मठ—पु एक प्रकारचें कडधान्य: मटकी पहा.

मठ—पु. शिकारीकरितां बसण्यासाठीं खणलेला खळगा. -मनोहर मासिक मे १९३६.

मठ—पु १ पाठशाळा; धार्मिक शिक्षणसंस्था. २ आश्रम, गुहा. ३ यती, गोसावी ब्रह्मचारी इ०चें राहण्याचें स्थान. 'गंधर्व मोडोनिया मठीं। आलीस का।' -कथा २.१२.७१ ४ लहान देऊळ. ५ स्थान; जागा. 'ना ते साटवण मठ। ब्रह्मविद्येचे' -ऋ २७. [सं.] **०भिक्षा**-स्त्री (भिक्षा मागण्यासाठीं बाहेर न जातां) मठात मिळालेली भिक्षा. **मठाधिकार**-पु. गोसावी, बैरागी, संन्यासी इ० चा विवक्षित काळापर्यंत मठात राहण्याचा हक्क. [मठ+धिकार] **मठाधिकारी, मठाधिपति. मठाधीश, मठपति**-पु मठांत राहण्याचा हक्क असलेला गोसावी,यति,बैरागी इ० **मठारा**-पु. ढोंगी साधू. 'सांडा सांडा रे मठारे। एकी गांठी सवें धुरें।' -तुगा ३२५५. **मठिका, मठी**-स्त्री. १ लहान मठ. २ (विनयानें उल्लेख करतांना) लहान घर. ३ (व) चावडी.

मठ-ठ्ठ—वि. १ मंद; सुस्त; संथ (बैल, टोणगा इ०). २ बुद्धिहीन; जडबुद्धि. [सं. मृष्ट=गुळगुळीत धुतलेला; दे.प्रा. मट्ठ]

मठा-ठ्ठा—पु १ लोणी न काढतां ढवळून पातळ केलेलें दहीं. 'पन्हें फुटाचें मठ्ठा मिठा।' -अमृत ३५. २ घट ताक.

मठाटी-डी—स्त्री. (व) बैलाच्या डोक्यावरील सुताच्या दोरीचा साज. [सं मस्त(क); प्रा. मत्थ+ताटी] **०झाडणें**-(व.) खरडपट्टी काढणें. **०हालविणें**-(व.) कान धरून हालविणें.

मठा(ठ)रणें, मठाळणें—सक्रि. (घडकाम) १ नव्या भांड्याला ठोके मारणें; सफाई, झिलई करणें. २ गोंजारणें;चुचकारणें. ३ मन वळविणें; अनुकूल करणें. -अक्रि. १ (जखम) बरी होत येणें, भरत येणें. [सं. मृष्ट; प्रा. मट्ठ?] **मठार**-१ (जरतारीची) तार चपटी करण्याचें हत्यार. **मठारणी, मठारणें**-स्त्रीन. सोनार, तांबट इ० चा साखळया इ० साफ करण्याचा, सफाई देण्याचा, पोंचे काढण्याचा एक हातोडा.

मठारणें—अक्रि. १ (व.) सुस्त होणें; मंद होणें. 'अलीकडे पोरगा फारच मठारला आहे.' [मट्ट] २ माजणें; गर्विष्ठ, उन्मत्त होणें. 'जो गर्वाहंकारें वाढे। दंभे मठारुनी चढे।' –ज्ञाप्र २३०. [देप्रा. मडदर=गर्व]

मठ, मठ्या, मठ्ठ्या—वि.क्रिवि. मट्ट पहा.

मड-डें—न. १ (कों.) प्रेत; मुडदा; मढें. 'चितेवरी शोभल मड।' –दावि १४७. २ उपद्रवी, त्रासदायक माणूस; पीडा; लचांड. ३ (गो.) देवादिकांचा अंगांत होणारा संचार; अवसर; घुमारा; किंवा असा संचार झालेला माणूस. [सं. मृत; प्रा. मड; का. मंडि=मरणें]

मंड—पु. १ आजाऱ्याला देण्यासाठीं भाताच्या लाह्या शिजविलेलें पाणी. २ भाताची पेज (औषधी). ३ कोणत्याहि पदार्थाचें सत्त्व, सार, तवंग, निवळी, साय. ४ मद्य. [सं.]

मंड—वि (बे.) १ हट्टी; काम न ऐकणारा. 'काय मंड मुलगा आहस तूवा!' २ बोथट; मंद धारेची (सुरी, चाकू,इ०). [सं. मंदः का मट्ट]

मंडई—स्त्री. भाजीपाल्याची जेथें मोठ्या प्रमाणावर खरेदी विक्री होते असें शहरांतील ठिकाण; भाजीपाल्याचा बाजार. [हिं. मंडी]

मंडक—पु. गव्हाच्या पिठापासून केलेलें एक पक्वान्न; मांडा पहा. [सं.]

मडकी-कें—स्त्रीन. पाणी भरण्याचें मातीचें भांडें; डेरा; माठ. [वै. सं. मणिक; देप्रा. मडक्क] **मडकूल**–न लहान मडकें; गाडगें. **मडकींभांडीं–हंडरीं**–न.अव. स्वयंपाकाचीं भांडीं-कुंडीं (समुच्चयानें). **मडक्यांतली वरू–वरव**–स्त्री. १ मडक्यांतलें शिलकी धान्य. २ (ल.) अल्पस्वल्प संग्रह. वरव पहा. 'कोंकणातलें पीक मडक्यांतली वरव.'

मडखुळ—स्त्री. (कु.) मळणीचें गवत वरखालीं करण्याची काठी. [? का. मडिके=शेतकीचें एक औत]

मडगा-गें, मडघा—पुन. १ नरडें; गळ्याचा पुढचा भाग.–शर. २ अंमल; सत्ता. 'आज तो रानटी व जुनाट मडघा मोडून दयाळु इंग्रजांचा सुधारणेचा...' –खेया २८. ३ स्थान; घर. 'भेदाभेदाचा मडघा मोडिला'। –दा ५.९.३९ [मट–ढ]

मडगें—न. (व.) एक धान्य.

मडचणें—क्रि. (बे.) घडी घालणें; दुमडणें [का. मडचु]

मंडण—न. (कु.) मनुष्यांचा समुदाय; मंडळी. [सं. मड्–मंड]

मंडन-ण—न. १ शोभा; थाटमाट; सुशोभितपणा. २ अलंकार; भूषण; दागिना. 'सकळा भूषणां भूषण। ते मंडण तिन्हीं लोकीं।' –एरुस्व ३.४६. 'राम योग्यांचें मंडन।' –भूपाळी. ३ सजविणें; शोभविणें; थाटमाट करणें. ४ (वादविवादांत मुद्यांचें) समर्थन; सिद्ध करणें; स्थापन. याच्या उलट खंडन. ५ उत्सवप्रसंग; समारंभ. ६ मेघमंडल; मेघांचें आकाशांत गोळा झालेलें पटल. (क्रि० घालणें). [सं. मंडन]

मंडप—पु. १ लग्न, मुंज इ. प्रसंगीं घरापुढें खांब पुरून उन इ० पासून निवारण होण्यासाठीं वस्त्रादींनीं आच्छादिलेली जागा; मांडव. २ वेल इ० स चढावयासाठीं केलेला कामटया इ०चा मांडव; लताकुंज. ३ सभामंडप; देवळांतील श्रोते, भाविक लोक इ० ना बसावयासाठीं गाभाऱ्यापुढें असलेली जागा. ४ (ल.) मेघांचें आकाशांत गोळा झालेलें पटल; मेघपटल. 'पावसानें मंडप घातला' ५ धाबें; माळवद. 'मढ मंडप चौबारी। देखे धर्मसाळां। –ऋ २०. [सं.] **०ताणणें**–मंडप घालणें–उभारणें. 'आसन घालुनि प्राणायामें। चित्त चतुष्टय मंडप तापूं।' –मध्व ५२१. **०घ(घु)सणी**–स्त्री. (गर्दीत अंगाला अंग घासलें जातें यावरून) मंडपांत होणारी अतिशय गर्दी; खेंचाखेंच. 'तों मंडपघसणी होतसे देख। मार्ग न दिसे जावया।' –ह ३४.९२. –वेसीस्व ३.६९. **०देवता**–स्त्री. लग्न इ० प्रसंगीं घातलेल्या मंडपाची प्रत्येक खांबाच्या ठिकाणीं पूजिली जाणारी अधिष्ठात्री देवता. **०शोभा**–स्त्री १ हंडया, झुंबरें, सुंदर वस्त्रें इ०नीं केलेली विवाहादिप्रसगीच्या मंडपाची शोभा. २ थोर, विद्वान् लोकांच्या आगमनानें मंडपास आलेली शोभा; मांडवशोभा. **०प्रतिष्ठा**–स्त्री. मंडपदेवतेची यथाविधि केलेली स्थापना. **मंडपी**–स्त्री. १ देवाच्या मूर्तीवर टांगलेला कामटयांचा फुलवरा. २ लहान मंडप. **मंडपोद्वासन**–न. लग्न इ०प्रसंगीं घातलेल्या मंडपांत आवाहन करून स्थापिलेली जी देवता तिचें त्या प्रसंगाच्या समाप्तीस केलेलें विसर्जन; मंडपदेवतोत्थापन. [सं. मंडप+उद्वासन]

मडम, मडुम—स्त्री. १ युरोपियन स्त्री. २ (उप.) सुधारलेली, फॅशनेबल स्त्री. ३ पत्नी; राणीसाहेब. 'आपली एल्एल्. बीची परीक्षा पास होते आहे तों आपल्या मडमसाहेब वयांत येऊन मुंबईस ठेवल्याच!' –मोर. ४ [इं. मॅडम]

मडमडणें—अक्रि. (ताप, दुखणें इ०चीं पूर्वचिन्हें म्हणून) अंग मोडून येणें; कसकसणें (अंग).

मंडल-ळ—न. १ वर्तुळ; वलय; घेर; परिघ; चक्र. २ चंद्र, सूर्य इ०चें बिंब. 'पै मंडळ आणि चंद्रमा। दोनी नव्हती सुवर्मा।' –ज्ञा १४.४०५. ३ प्रांत; क्षेत्र; वीस किंवा चाळीस योजना–पर्यंतचा आसमंतांतील प्रदेश; भोंवतालचा प्रांत. ४ बारा चक्रवर्ती राजांनीं ज्या प्रांतावर राज्य केलें तो प्रांत, राष्ट्र. ५ (यावरून) प्रांत; देश; राज्य. जसें–कुरुमंडल. ६ समुदाय; समूह; सभा; समाज; टोळी. ७ वर्तुळाकार ठिपके असलेलें कोड.

८ देवतेची स्थापना करण्यासाठीं काढलेली एक गूढ वर्तुळाकार आकृति. व्रतोद्यापनप्रसंगीं देवतांची स्थापना करण्यासाठीं विशिष्ट रंगानें रंगविलेलीं सर्वतोभद्र, लिंगतोभद्र इ०मडळें प्रत्येकीं. ९ एक निरुपद्रवी सर्प. १० देवास नैवेद्य दाखवितांना पात्राखालीं पाण्याची (चौकोनी, वर्तुळाकार, त्रिकोणी इ०) काढलेली आकृति. ११ सैन्याची वर्तुळाकार रचना. १२ चुन्याच्या घाणीची वर्तुळाकार चाकोरी. १३ बेचाळीस दिवसांचा काल. 'त्यासि एक मंडळ सांग । पठणें करूनि कार्यसिद्धी ।' –व्यं ९४. १४ (समासांत) शरीराचा तो तो भाग. जसें- मस्तक–कुच–कर्ण–मंडल. 'तेभां नाभिमंडळा आगाधा । समवेत ब्रह्में पेलिलें दोंदा ।' –ऋ ९०. १५ (कु.) समुद्राच्या तळाशीं असलेले खडक. १६ राजमंडल. [सं. मंडल] ०**फिरणें**–वर्तुळाकार, गोल फिरणें. **मंडळाबर धरणें**–मंडलाकार, बाटोळें फिरविणें (घोडा इ.स.). ०**गति (बाहु)**–पु. (नृत्य.) बाहू वर्तुळाकार फिरविणें. ०**देवता**–स्त्री.अव. १ एखाद्या व्रताच्या आरभीं सर्वतोभद्र, लिंगतोभद्र इत्यादि मंडलांवर पूजिल्या जाणाऱ्या देवता. २ (ल.) राजाच्या बरोबरचे सरदार, प्रधान. ३ राजसभा; दरबार. ४ कोणत्याहि सरदाराचा,थोरमाणसाचा लवाजमा. ०**वत्**–क्रिवि. वर्तुळाप्रमाणें; वाटोळा; चक्राकार. ०**वत**–न. अनेक पानें चोयांनीं टोंचून जेवणासाठीं केलेलें जेवणाचें पान; पत्रावळ. [मंडळ+पत्र] ०**स्वस्तिक(करण)**–न. (नृत्य) ऐंद्र स्थानांत उभें राहणें व हातांचें स्वस्तिक करणें व आपल्या समोर बसलेल्या मनुष्याला अभिमुख दिसतील असे तळहात वर ठेवणें. **मंडली-ळी**–स्त्री. १ मनुष्यांचा जमाव,समुदाय, संघ. २ (कायदा) एकमेकांशीं भागीदारी असणाऱ्या माणसांचा समुदाय, मंडळ. (इं) फर्म. ३ स्पर्श केल्याबरोबर वेटोळें करून बसणारा अनेक पायांचा एक किडा,वाणी. ४ (ख्रि.) सार्वत्रिक मंडळी; पिता, पुत्र व पवित्र आत्मा असा जो सनातन एकच देव त्याजवर भाव ठेवून स्वतःस ख्रिस्ती म्हणविणाऱ्या पृथ्वीवरील सर्व लोकांचा संघ. (इं) एक्लेशिया. 'आणखी मी तुला सांगतों कीं, तूं पेत्र (खडक) आणि या खडकावर मीं आपली मंडळी रचीन.' –मत्त १६.१८. ४ (ख्रि.) स्थानिक मंडळी; ईश्वरोपासना, शुद्धाचरण व ख्रिस्ताच्या राज्याचा विस्तार हे हेतू पुढें ठेवून विधिपूर्वक स्थापित झालेला व सार्वजनिक उपासनेसाठीं नियमितपणें एकत्र जमत असलेला ख्रिस्ती लोकांचा संघ. (इं.) कॉंग्रिगेशन. ५ (गहूं, बाजरी, भात इ०) पिकाच्या पेंढ्यांची वर्तुळाकार गंजी. ६ पति किंवा पत्नी परस्परांविषयीं बोलतांना योजितात. **मंडली ळी)क**–पु. १ मंडळ, थवा, पथक इ० चा नायक. २ मांडलिक. 'उखरडा धाधाविलें । मंडळीकु निघालें ।' –शिशु ५०४. **मंडलेश्वर**–पु. १ सार्वभौम राजा. २ मांडलिक राजा. [मंडल+ईश्वर]

मंडली—पु. रत्नाच्या दलालाचें एक प्राचीन नांव.

मड(ढ)वळ—पु. (कु. बे.) परीट; धोबी. **म्ह**० (गो.) मडवळाचें मढें भायेर काढल्याबगर कळाना=धोब्याचे स्वतःचे कपडे कोणते हें तो मेल्यावर कळावयाचें (खरी स्थिति शेवटीं कळते). [का. मडिव]

मंडवळी—स्त्री. (विरू.) मुंडावळी पहा.

मंडवारी—पु. (परदेशी तेली) लग्नसमारंभांत मांडवांत मधला खांब मेहुणा पुरतो व त्याबद्दल मानाचा म्हणून जो सवा आणा त्याला मिळतो तो. –बदलापूर २७१. ०**साण्या**–पु. तेल्यांत जातीचे पंच येऊन त्यांनीं विवाहमंडप स्थापणें. –बदलापूर २७.

मडवी—पु. कोळ्यांतील गांवदेवीचा पुजारी. –बदलापूर २५४.

मंडवीबाळ्या—स्त्री. बाळ्यांचा एक प्रकार. –अफला ५५. [मंडप+माळी]

मंडाई—स्त्री. मंडई पहा. [हिं.]

मंडाई, मंडावण—स्त्रीन. सावकारापासून पैसा कर्जाऊ घेतला असतां त्याच्या संतोषार्थ ठरलेल्या व्याजापेक्षां अधिक दिलेलें द्रव्य; मनोती.

मंडाण–न—न. १ आकाशांतील मेघांचें पटल; मेघाच्छादन. (क्रि० घालणें). 'पावसानें मंडाण घातलें आहे.' २ (ल.) शोभा; अलंकार; दागिना. 'घराचें मंडान वायकोच.' [सं. मंडन]

मंडावळ-ळी—स्त्री. (विरू.) मुंडावळी पहा.

मंडा(डो)ळी—स्त्री. मंडली (किडा) पहा.

मडिग—पु. कानडी अस्पृश्यांची एक जात; मांग. [का]

मंडित—वि १ सुशोभित; अलंकृत. 'मग काढिली पत्रिका। कुंकुम मंडित सुरेखा।' –एरुस्व ३.५२. २ (ल.) भूषित; शोभिवंत; सौंदर्ययुक्त केलेला. 'शांति क्षमा दया विशेष। तेणें मंडित सत्पुरुष।' [सं.]

मंडी—स्त्री. (बे.) वाफा; आळें. [का.]

मंडी—स्त्री. (तेजा) दगडाचें पसरट तोंडाचें भांडें; दगडी.

मंडूक—पु. बेडूक. [सं.] ०**प्लुतिन्याय**–पु. बेडकाप्रमाणें उड्या मारीत मारीत–मधलाभाग गाळून–भराभर केलेलें काम. **मंडूकानुवृत्ति**–स्त्री. टाळाटाळी; वगळणें; गाळणें. **मंडूकासन**–न. प्रथम मांडी घालून बसणें. नंतर दोन्ही पायांचे तळवे उताणे करून मांड्या ढोपरासह रुंद करून उताणे तळव्यावर कुल्हे टेकणें. नंतर दोन्ही हात ढोपरावर टेकणें. –संयोग. ३३७.

मंडूकी—स्त्री. घोड्याच्या खुराचा शेवटचा भाग. –अश्वप. १.६४. **मंडूकता**–स्त्री. घोड्याच्या पायाचा एक रोग. –अश्वप २.३८.

मंडुर—पु. १ लोखंडाचें कीट, जंग. २ त्यापासून केलेलें औषध; एक रसायण. [सं.]

मडें-ढें—न. प्रेत; मुडदा; शव. 'देह पडतां म्हणती मडें।' –दा १३.६.२३. [सं. मृत; प्रा. मड; का. मडि=मरणें] **०पाताळावप**–(गो.) ठार मारणें. **मड्याच्या ताळ्याचें-ताळूवरचें लोणी खाणारा**–पु. (ल.) अतिशय नीच व लोभी-मनुष्य. **मड्यावर पाय देऊन जाणें-करणें**–मरणोन्मुख मनुष्याकडेहि दुर्लक्ष्य करून (कांहीं जरुरीच्या कामानिमित्त) दुसरीकडे निघून जाणें. **मेलें मडें आगीला भीत नाहीं**–कोडग्या व निगरगट्ट माणसाबद्दल योजितात. **म्हण** १ केश उपटल्यानें काय मडें हलकें होतें? २ (गो.) मडें गेलें मसणा, त्याची ना वासना. ३ (व.) मड्यास शृंगार नाहीं रयतेला उपकार नाहीं. **०कळा**–स्त्री. १ मरणसमयीं तोंडावर येणारा फिकटपणा, पांडुरता. २ (ल.) केलेल्या गुन्ह्याच्या भीतीमुळें चेहऱ्यावर दिसणारा निस्तेजपणा. **०पंचक**–न. वैशाख महिन्यातील धनिष्ठा नक्षत्रापासून पाच नक्षत्राचा काल (धनिष्ठापंचक). या अवधींत मृत्यु फार होतात. **०पेंड**–न. मड्याची जकात. –अस्पृ ३८.

मंडादरी—स्त्री. (अप.) मंदोदरी पहा.

मंडोसरी—स्त्री. (व) फोडणीचें वरण; आमटी. [मंदसोर]

मंडोळ—पु. (कु.) अंड्यातील पिवळा बलक.

मंडोळी—स्त्री (विरू.) मुंडावळ पहा.

मडौरा—पु. (महानु) घागरघुमा नावाचें मातीच्या घड्याचें डमरूसारखें वाद्य. 'मडौराचां बघाळी। योगिनीचक्राचां गोंदळीं।' –शिशु ४४६. [सं. मृद्=माती+डौर=डमरू]

मड्डा—वि (व. ना) अतिशय आबट (दहीं इ०). 'भाव जबर आणि दहीं मड्डा.'

मड्डुक—न मडके. 'दृष्टांत दे शुकहि मड्डुकभाजनाचे। तैसेच नेत्र अति दारुण दुर्जनाचे।' –वामन, हरिविलास २५९.

मढ—पु कळी; अंकुर. 'तो तृतीय-नयनाचा मढु। फुटला जैसा।' –ज्ञा ११.३०४.

मढ—पु १ मठ पहा. –पाटणचा शिलालेख शक ११२८ २ कोठडी. 'मग आघवींचि सर्दी। धानाच्या आतुल्या मर्दी।' –ज्ञा १८.७४२. [स. मठ प्रा. मढ; हिं. पं. मढी] **मढगा**–पु. मठ; आश्रम; घर. मडघा पहा. [मठिका]

मढण, मढविणें—क्रि. सोनें, चांदी, वस्त्र, कातडें इ०नीं एखाद्या पदार्थाच्या आंतल्या किंवा बाहेरच्या बाजूस थर, आच्छादन देणें; लपेटणें; आच्छादणें, आस्तर घालणें; मुलामा देणें. 'स्तंभ मढिले दिव्य सुवर्णें।' –मुआदि ४१.८. –ज्ञा १७.२५१. 'सुवर्णशिगी देऊ मढऊन।' –नव १७ १३५. [हि.] **मढणावळ, मढवाई**–स्त्री. मढविण्याची मजुरी, किंमत. **मढवणी, मढवणूक**–स्त्री. मुलामा देण्याची, मढविण्याची क्रिया. **मढींव**–वि. मढविलेलें; मुलामा दिलेले.

मढी—स्त्री. १ साधु, बैरागी इ०ची लहानशी झोपडी; मठी; लहान मठ. 'गांवाबाहेर आंत कोसावर गोसाव्याची मढी।' –पला ८२. २ डोंगर इ० च्या पायथ्याशीं पाण्यासाठीं खणलेली खळी; झरा; टांकें. [मठी]

मढू—वि. (अशिष्ट) मधुर; गोड (फळझाड, फळें). जसें–मढू-चिंच-बोर-लिंब. 'कडू खातां मढूं आलें मी गर्भीण झालें तधीं।' –पला १०२. [सं. मधु]

मण—पु. १ एक वजनी किंवा मापी परिमाण; हें निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळें असतें. मापी मण बारोली किंवा सोळोली (१२, १६ पायल्यांचा) व वजनी ४० शेरांचा साधारणपणें असतो. २ मणानें मापलेलें–मोजलेलें धान्य, पदार्थ. ३ जमिनीचें सहा बिघ्याचें एक परिमाण. [सं. मान; अर. मन्] **०खाण**–पु. सुमारें एक मण. **मणका**–पु. १ एक मणाचें माप किंवा वजन. २ एक मणाच्या मापाचें भांडें, पाटी इ०; एक मण वजनाचा दगड इ० **मणकी**–स्त्री. एक मणाचें धातूचें किंवा दगडाचें वजन.

मणका—पु. १ मोठा मणि. 'मणका येक त्यांनीं बांधिला पायासीं।' –रामदासी. २ गळ्याच्या पुढील भागावरील उंचवटा; कंठमणि; घांटी. ३ माकडहाड; गुदास्थि ४ पृष्ठवंश-रज्जूंतील दुव्यासारखा भाग प्रत्येकी ५ गळ्यात बांधावयाचा मंत्रसिद्ध ताईत, तोडगा. ६ घोडयाच्या गळ्यांत बांधतात तो मणि. ७ कप्पी; खोबणीचें चाक; (इं.) पुली. ८ छत्रीच्या ज्या भागांत काड्या बसवितात तो चक्राकार अवयव. [मणि] **०ढिला करणें**–१ बेदम मारणें. २ अतिशय कष्ट करणें.

मण(न)गट—न. १ हाताचा पंजा आणि कोपर यांमधील भाग; (सामा.) मणिबंध; पंज्याचा सांधा. २ पाऊल व पायाची नळी यांच्यामधील सांध्याचें हाड; घोटा; पायाचा डोळा; गोफा. ३ घोडयाच्या पायाचा सांधा. ४ (ल.) उपाय; मार्ग; योग्यता (शक्ति, पैसा, विद्या इ०ची). [सं. मणि+कट] **म्हण** ज्याच्या मणगटास जोर तो बळी. **०घेणें**–बोंबा मारणें; बोंबलणें. **०धरणें**–एखाद्यास कांहीं अपराधांत पकडणें; आरोप ठेवणें. **मणगटांत-मणगटास जोर असणें**–द्रव्य, अधिकार, योग्यता, शारीरिक शक्ति इ० बाबतींत समर्थ असणें. **मणगटावर केस येणें**–हातांतील जोर नाहींसा होणें; एखादें काम करावयाला असमर्थ असणें **मणगटावर गोणी पडणें**–येणें–(ल) एखादें कष्टाचें किंवा जबाबदारीचें काम लादलें जाणें. **मणगटावर तेल-तेल चुना घालणें-ओतणें**–बोंबा मारणें; बोंबलत सुटणें (कांहीं एक विशेषेंकरून अज्ञ). **मणगटावर**

तेल घातलें पाहिजे–मूर्ख, अडाणी मनुष्यास उद्देशून योजितात. **मणगटासारखें मणगट पाहून कन्या द्यावी, मणगटासारखें मणगट पहावें**–शरीर, पैसा, परिस्थिति इ० बाबतींत कन्येशीं जुळणारा वर पहावा. **मणगटाशीं मणगट घासणें**–एखाद्याशीं बरोबरी, स्पर्धा करणें. **मणगटी**–स्त्री. लहान मुलांच्या मणगटांत घालण्याचा मण्यांचा एक अलंकार.

मणगणें—क्रि. (कों.) चण्याची डाळ व तांदुळाचें पीठ यांत गूळ घालून कालवून तें एकत्र शिजविणें.

मणा—पु. (प्रा.) (विरू.) मणी (मदन मध्यें पहा).

मणि–णी—पु. १ हिरा; माणिक; रत्न; माळेंत ओंवण्याचा गोलक, गोळी. 'मकरकुंडलें तळपती श्रवणीं। कंठीं कौस्तुभमणि विराजित।' –तुगा १. दगड, लाकूड इ० कातून, घडून तयार करतात ती गोलवस्तु. २ शिश्नाची बोंडी. ३ योनिलिंग; दाणा. ४ (ल.) कोणत्याहि गुणानें श्रेष्ठ, ललामभूत मनुष्य. ५ ज्याच्या भोंकातून दोरी ओंवून एखादी जड वस्तु वर उचलतात, खेंचतात किंवा भारा, ओझें इत्यादि आवळतात ती लाकडाची कप्पी; (इं.) पुली. ६ निकणांतून पाखडून निघालेले पोंचट दाणे मदन पहा. ७ सापाच्या किंवा हत्तीच्या डोक्यांतील एक रत्न. 'क्रोधें चवताळतो ज्यापरी जातिवत जो फणी। त्याचा कोणी हरितां मणी।' –विक ३२. ८ पुरुषाचें रेत. ९ लोखंडाच्या पट्ट्यास भोंक पाडण्याकरितां त्याच्याखालीं ठेवतात तो छिद्रयुक्त ठोकळा. [सं. मणि] **म्ह०** सुतासाठीं मणि फोडणें–अत्यंत अल्प लाभासाठी फार मोठी हानि करून घेणें. **एका माळेचे मणी**–(जपाच्या माळेंतील मणी सारखेच असावे लागतात यावरून ल.) एकसारखे वाईट, दुर्वर्तनी. **०कंठ**–पु पक्षिविशेष; ताम; चाष. **०कर्णिका**–स्त्री. १ काशी येथील एक तीर्थ. २ एक विशिष्ट आकाराची पाणी पिण्याची लोटी, तपेली [सं.] **०कार**–पु जवाहिरी; जव्हेरी; मण्यार. [सं.] **०घोळणा**–स्त्री. मणी तयार करण्याचें सोनाराचें एक उपकरण. **०ज**–वि. अंडयापासून उत्पन्न झालेला (पक्षी इ०); अंडज. 'परि आधीं तंव स्वेदज। जारज उद्भिज मणिज।' –ज्ञा १५.१४८ [सं.] **०नीभ**–वि सर्व शरीराचा रंग गौरवर्ण व फक्त टाळूच्या ठिकाणीं तांबडा असा (घोडा) –अश्वप १ २२. **०पु(पू)र**–न. (योग) नाभिस्थानाजवळील एक चक्र. या ठिकाणीं डं पासून फं पर्यंत अक्षरें असून, मोक्षदायी म्हणून या चक्राचें चिंतन करतात. 'नाभिस्थानीं मणिपुर कमळ।' –विउ १.५०. 'मणिपूरीं झुंजे। राहोनियां।' –ज्ञा ६.२१५. **०बंध**–पु. १ मणगट. २ एक वृत्त. याच्या चरणांत नऊ अक्षरें व भ, म, स हे गण असतात. उदा० 'द्रव्य मिळावें याकरितां। कां हलक्यांना आर्जवितां। काय नव्हे हो तो धनवान्। ईश रमेचा जो भगवान्।' [सं.] **०भूमिकाकर्म**–न. ६४ कलापैकीं एक कला; त्रिकोण, चतुष्कोन इ० आकृतींत जमिनीवर मण्यांची रचना करणें. [सं.] **०भूषण**–न. रत्नांचा अलंकार. 'अष्टादशपुराणें। तींचि मणिभूषणें।' –ज्ञा १.५. [सं.] **०मंगळसूत्र**–न. १ मुहूर्तमणि व मंगळसूत्र. २ स्त्रियांचा मणि व मंगळसूत्र एकत्र ओवलेला एक अलंकार. **मणखुरा**–पु. सोनाराची मणि इ०करण्याची ऐरण. [मणि+खुरा] **मणदोरा**–पु १ गाडीवरचें ओझें बांधावयाची दोरी व ज्याच्या भोंकातून दोरी ओवून खेचतात तो मणी, ठोकळा समुच्चयानें. २ नदी ओलांडणारी नाव इकडेतिकडे वाहवत जाऊं नये म्हणून नदीच्या दोन्ही काठांवर पुरलेल्या दोन खांबांना बांधलेली दोरी व तिच्यावरून सरकणारा लाकडी मणी, ठोकळा. ३ पिशवी, बटवा इ०चें तोंड उघडावयाची किंवा बंद करावावयाची दोरी; धांवता दोरा; ओढदोरा. ४ लोंबत सोडलेला पडदा ज्या दोरीवरून सरकविला जातो ती दोरी. ५ स्त्रिया कंबरेला बांधतात तो अभिमंत्रित दोरा. ६ वस्त्राच्या शेवटीं किंवा ताग्याच्या शेवटीं जे आडवे जाड धागे ठासलेले असतात ते समुच्चयानें. [मणि+दोरा] **मणेर, मण्यार**–पु. एक विषारी सापाची जात. **मणेरी, मण्यार**–पु. १ एक जात किंवा तींतील व्यक्ति. हे लोक बांगडया, मणी, कांकणें तयार करतात व विकतात. २ स्टेशनरी सामान विकणारा दुकानदार. ३ जवाहिऱ्या; सराफ. **मणेरी, मण्यारी**–वि. १ मण्यार लोकांसंबंधीं. २ स्टेशनरी सामानासंबंधीं. –मुंव्या ११.

मणिक—न. मडकें; डेरा. 'पावुनिहि अमरमणि कीं कारासदनात शिखिशिखां जसि मणिकीं।' –मोकृष्ण २.२०. [वै. सं.]

मण्यारी—पु. (कों.) एक प्रकारचा मासा.

मत्—सना. (समासांत) माझें. उदा० मद्गृह; मत्सदृश. [सं.]

मत—न. १ अभिप्राय; मनांतील विचार; निश्चय; कल्पना; भावना; बुद्धि. २ विशिष्ट विचारसरणी. ३ पंथ; मार्ग; पक्ष (धर्म, तत्त्वज्ञान यांतील). ४ पाखंड; पाखंडमंडळ. 'जेणें मतें उच्छेदुनि समस्त। शुद्ध मार्ग वाढविला।' ५ म्हणणें; सांगणें. 'चालों न देचि मत, करि मन तैशाचेंहि वश्य पाप तिचें।' –मोमंभा ३. ५२. ६ संमति; मान्यता; अनुमति. ७ निवडीची नोंदणी, हक्क. (इं.) व्होट. 'पुरुषांना मतांचा कैवार तर बायकाना मुलाबाळांचा कैवार.' –नारुकु ३.६४. –वि. मान्य; कबूल असलेलें. 'कार्यें दोन्हींहि दासामरतरुसि मतें तें कळे उद्धवा।' –मोकृष्ण ७१. २. [सं.] **०देणें**–१ एखाद्या वादग्रस्त प्रश्नाच्या निर्णयार्थ सभासदानें अनुकूल किंवा प्रतिकूल अभिप्राय देणें. २ निवडणुकींत आपली निवड नोंदणें (इं.) व्होट टाकणें. **मतणें**–अक्रि. मतें, विचार इत्यादि बाबतींत जुळणें; एकमत होणें. 'दोन आसामीची एक जोडी करून मतून येतां कीं नाहीं?' –सुकौ ७९. **०दार**–

वि. मत देण्याचा हक्क असलेला. **०पत्रिका**-स्त्री. १ साक्षीभूत, आधारभूत लेख; प्रमाण. 'पुराणें इयेविषीं । मतपत्रिका ।' -ज्ञा १३.६६. २ जीवर मत नोंदतात तो कागद. (इं.) व्होटिंग पेपर. **०प्रदर्शक**-वि. केवळ मतांचें दिग्दर्शन करणारा. 'अमुक सभा मतप्रदर्शक स्वरूपाची आहे.' -के १.२३५ **०मतांतर**-न मतभिन्नता; भिन्न भिन्न मतें. **०वाद**-पु. आग्रह. 'एकाचा मतवाद निश्चितीं । करितां श्रुतिवाक्य व्युत्पत्ती ।' -एभा २६.१८४. **०वादी**-वि. स्वतःच्या मतांविषयीं दुराग्रही. **०स्वातंत्र्य**-न. स्वतःचा अभिप्राय देण्याचें व त्या प्रमाणें वागण्याचें स्वातंत्र्य. 'शिक्षकांच्या मतस्वातंत्र्याचा प्रश्न निघालेला होता.' -केले १.२०३. **मताधिकार**-पु मत देण्याचा अधिकार. **मता(त्ता)भिमान**-पु. स्वतःच्या मताचा अभिमान. **मता(त्ता)भिमानी**-वि. स्वतःच्या मताचा अभिमान बाळगणारा; मतवादी.

मंत—नामांचीं विशेषणें करण्याकरितां युक्त ह्या अर्थी त्यांस जोडलेला अनुबंध जसें-बुद्धिमंत; शक्तिमंत. मान पहा. [सं. मत्]

मतकापड—न. (विरू.) मातकापड पहा.

मतंग, मतंगज—पु. हत्ती. [सं.]

मतपिसें—न. (कों.) मुद्दाम पांघरलेलें वेड.

मतमान—पु (कु.) मान.

मंतरणें—उक्रि. १ अभिमंत्रित करणें; मंत्र घालणें; भारणें; मंत्रानें युक्त करणें (अक्षता, इ०). २ (ल.) एखाद्याला कांहीं सांगून, गोड बोलून वश करून घेणें. [मंत्र]

मतलई, मत्लई—स्त्री. (नाविक) जमिनीवरून समुद्राकडे वाहणारा वारा; पूर्व किंवा ईशान्य दिशेकडून वाहणारा वारा. [अर. मत्लअ=उगवत]

मतलब—पु. १ हेतु; उद्देश; इच्छा. 'मुन्शी बोलावून पत्र लिहावयाचा मतलब सांगितला.' -रा ५.१७९. २ आशय; सारांश; तात्पर्य (लेख, पत्र इ०चा). ३ मसलत; बेत. [अर. मत्लब्] **मताल(ली)ब**, मतलबचें-अव. 'जे मतालब, स्वामींचे असतील ते सर्व होऊन येतील.' -रा ८.२०३. 'ऐवज देऊन सर्व मतालीबचा बंदोबस्त करून घ्यावा.' -दिमरा २.११. **मतलबदार, मतलबी**-१ स्वार्थी; स्वार्थसाधु. २ कपटी; लुच्चा. **मतलबी यार**-पु. हितचिंतक मित्र.

मतवाला—वि. (लावणी) इष्कबाज; ख्याली; विलासी; रंगेल. 'गळी पडून म्हणे रडरडून नार मतवाली । मी येतें अहो सुभेदार बसा तरी खालीं ।' -प्रला १९४. [सं. मद; मत्त]

मंतव्य—वि. मनन करण्यास, चिंतण्यास योग्य. 'तेणेंचि कळे मनासि मंतव्य ।' -एभा ३.६४०. -न. मनन; मनोव्यापार; विचार. 'मनासीं मंतव्य बुद्धीसीं बोधव्य ।' 'प्रस्तुत पुस्तकांत दयानंदाचें चरित्र व मंतव्य हें मुख्यतः सांगावयाचें असल्यामुळें ...' -स सं २.१२८. [सं.] **मंता**-वि. मनन करणारा. 'मन, मंता, आणि मनन । याचें समूळ भान उच्छेदी ।' -एभा १४.१२८.

मति—स्त्री. १ बुद्धि; जाणण्याची शक्ति. 'कशी हीन झाली तुझी मति ।' -ऐपो १४६. २ मन; अंतःकरण. ३ विचार; हेतु. बुद्धि पहा. [सं.] **०चालणें**-आकलन होणें. 'आपली बरीच मति चालते.' -विवि ८.३.४७. **०प्रकाश**-वि. ज्ञानवान; बुद्धिवान. 'विनायका अभयदाता । मतिप्रकाश करीं मज ।' -गुच १.११. **०भ्रम-विभ्रम**-पु. चूक; चुकीचा समज; बुद्धिभ्रंश. 'तियें मूर्ख मतिभ्रमें । मी कर्ता म्हणे ।' -ज्ञा ३.१७८. **०मंद**-वि. बुद्धीनें कमी; जड बुद्धीचा; मठ्ठ. [सं] **०मान्-वंत**-वि. बुद्धिमान्; शहाणा; धूर्त. 'तंव एकीं मतिवंतीं । या बोलाचिया खंतीं ।' -ज्ञा १३.४०.

मती, मतीत, मट्टी—स्त्री. (विणकाम) जिभई; कापड विणींत असतां तें आकसूं नये म्हणून त्याच्या दोन्ही काठास ताण देण्याची पट्टी. हिच्या दोन्ही टोकास अणकुचीदार व सुईसारखे बारीक खिळे असून ते कापडांत गुंतवितात.

मंतु—पु. अपराध; गुन्हा; अन्याय. 'तुझ्या जिरविलें बहु प्रगतमंतु पोटेंपण ।' -केका १८ [मन्-मंतु]

मतेरी-ली—स्त्री. (नाविक) बोमाचें शीड बांधण्याचा दोर. हा मोठ्या डोलकाठीस बांधतात आणि तिसरें शीड उभारल्यावर नाळीस बांधतात.

मतेलांड—न. (कु.) लचांड; ब्याद; कटकट.

मतोळा—पु. गोंधळ; घोटाळा; नुकसान. 'नव्हे मतोळयाचा वाण नीच नवा नारायण ।' -तुगा ३३०७. [मत]

मत्कुण—पु. ढेकूण. [सं.]

मत्छ—पु. मासा; (प्र.) मत्स्य. 'मत्छ आठविता पाळी ।' -दावि ४८१. [मत्स्य अप.]

मत्त—पु. (संगीत) एका तालाचें नांव. त्यांत अठरा मात्रा व नऊ विभाग असतात.

मत्त—न. (बिरू.) मत पहा.

मत्त—वि. १ झिंगलेला; धुंद झालेला. २ माजलेला; उन्मत्त; गर्विष्ठ (मद्य, द्रव्य, कीर्ति इ० मुळें). 'स्वधर्मरूप क्रतु । नानुष्ठी जो मत्तु ।' -ज्ञा ३.१३९. ३ वेडापिसा. [सं.] **०मयूरी**-स्त्री. एक समवृत्त. ह्याच्या प्रत्येक चरणांत तेरा अक्षरें व म, त,य,स,ग हे गण असतात. उदा० माता भ्राता तूं भयनाशा सखया जी । गेले स्नाना विप्र तयां अभ्र न भाजी । आतां देती शाप सहासी वनिं कृष्णा । हाका मारी मत्तमयूरीपरि कृष्णा ।' [सं] **०मयूरी-वीणा**-पु. (संगीत) सारमंडल पहा. **०मुद्रा**-वि. उन्मत्त

दिसणारा. 'महाहटी विशाळ । एक पिसाळ मत्तमुद्रा ।' –एभा १४.२०७.

मत्तर—पु. जमीन मोजण्याचें एक परिमाण. 'त्या मल्हारें आपल्या शेतापैकीं सहा मत्तर जमीन दुर्गा देवतेच्या रंगांगभोगासाठीं दिली.' –केसरी १०.७.३६.

मतल्लि (करण)—न. (नृत्य) पाय वाटोळे फिरवून पुन्हां जवळ आणणें व हात उद्वेष्टित करून अपविद्ध करणें.

मत्ता—स्त्री. द्रव्य; संपत्ति; मिळकत; जिंदगी. [अर. मताअ] **म्ह**० काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता (बरोबर होत नाहीं)

मंत्र—पु. १ गूढशक्तियुक्त वाक्य किंवा अक्षरें. (क्रि० घालणें; मारणें; टाकणें; फुंकणें) मंत्राचा उपयोग मारण, मोहन, वशीकरण, स्तंभन, उच्चाटन, आकर्षण ह्याकरितां करतात. 'जे शस्त्रविद्यापारंगत। मंत्रावतार मूर्तें।' –ज्ञा १.१०९. २ देवतास्तुतिपर पवित्र वचन. उदा० 'ओं विष्णवे नमः' ३ वेदभागविशेष; वेदसंहिता. ४ मसलत; गुप्त सल्ला, उपदेश; विचार. (क्रि० सांगणें; देणें). 'धर्म म्हणे सिद्धि भजे यन्मंत्रा जेवि वासवा रंभा।' –मोसभा १.५३. ५ युक्ति; क्लृप्ति. 'रसु होआवा अतिमात्रु। हा घेतासि कविमंत्रु।' –ज्ञा १३.६३५. ६ गुप्त गोष्ट; गुह्य. 'झांकुनि मंत्र पृथेनें अति दुःसह दुःख मज दिल्हें बा हें।' –मोशांति १.८. [सं.] ०**बोधास-गुणास-प्रत्ययास-प्रतीतीस-कळूं-येणें**–मंत्र परिणामकारक होणें, अनुभवास येणें. **मंत्रणें**–क्रि. (विरू.) मंतरणें पहा. ०**अक्षता मंत्राक्षतता**–स्त्री अव. १ मंत्रानें संस्कारलेले तांदूळ. २ (ल.) आशीर्वाद. 'त्यास व्यासवाल्मिकादि देति मंत्र अक्षता।' –मध्व १९. ३ (वि ल.) शिव्यांचा भडिमार. (क्रि० देणें; मारणें) ०**कौटाल**–न. चेटुकविद्या 'सभामोहन भुरटीं चेटकें। साबर मंत्रकौटालें अनेकें। –दा ५.२.२. ०**चळ**–पु १ मंत्रप्रयोगांत चूक होऊन लागणारें वेड. 'मंत्रचळ नाना खेद। नामनिष्ठे नासती।' –दा ४.३.१२. २ (ल.) वेड लागल्यासारखी, बावचळल्यासारखी होणारी स्थिति. (क्रि० लागणें) ०**चळथा**–वि. १ मंत्रप्रयोगांत चूक झाल्यामुळें ज्यास वेड लागलें आहे असा. २ लहरी; बेफाम. ३ भ्रमिष्ट; बावचळलेला; तीच तीच गोष्ट पुन्हां पुन्हां करणारा. ०**जागर**–पु अनेक ब्राह्मणांनीं एकमेकासमोर बसून एका पक्षानें एक वाक्य म्हटल्यावर त्या पुढील वाक्य दुसऱ्या पक्षानें म्हणावें असें वेदमंत्र म्हणणें; वेदघोष करणें. ०**तंत्र**–पु.अव. १ जादू–टोणे; तोडगे; जपजाप्य; छांछूं इ०. २ युक्तया प्रयुक्तया; डावपेच. (क्रि० लटपटणें; डगमगणें; डळमळणें; कोसळणें; ढासळणें; ढरणें). ०**पुष्प**–पु देवाची संध्याकाळची आरती वगैरे झाल्यावर विशिष्ट वेदमंत्र मोठमोठ्यानें म्हणून देवास फुलें वगैरे वाहणें. ०**पुष्पांजलि**–स्त्री. १ पूजेनंतर ओंजळींत फुलें घेऊन समंत्रक देवास वाहणें; मंत्रपुष्प. २ (ल.) शिव्यांचा वर्षाव, लाखोली, भडिमार. (क्रि० करणें; वाहणें; अर्पिणें). ०**प्रयोग**–पु. १ मंत्राचा प्रत्यक्ष अनुभव पाहणें. २ जादूटोणा करणें; मंत्र घालणें. ०**मुख**–पु आपल्या उपयोगापुरतेच ज्यास मंत्र येतात असा ब्राह्मण. ०**वादी**–वि. मंत्र व त्यांचा उपयोग जाणणारा; मंत्री; मांत्रिक. ०**विद्या**–स्त्री. १ वेदविद्या. 'मंत्रविद्येसि माहेर । ब्राह्मण जे।' –ज्ञा ९.४७५. २ जादूटोणा करण्याची कला. ०**शक्ति**–स्त्री १ युद्धाच्या तीन शक्तींपैकीं दुसरी. बाकीच्या दोन–प्रभुशक्ति व उत्साहशक्ति. २ मंत्राचें सामर्थ्य, प्रभाव. ०**शास्त्र**–न. विवक्षित देवतेपुढें कोणते मंत्र म्हणावयाचे हें शिकविणारें शास्त्र; मंत्र विद्या. ०**षडक्षरी**–स्त्री. 'रामकृष्णहरी' हीं अक्षरें. 'होऊनी सावध उघडीले नेत्र । आठवला मंत्र षडक्षरी ।' –ब ७७. ०**साधन**–न. मंत्रशास्त्रांत सांगितलेले विधि व नियम पाळून मंत्राचा उपयोग करण्याची शक्ति मिळविणें. ०**सिद्धि**–स्त्री. मानवी सामर्थ्याच्या आटोक्याबाहेर असलेल्या आठ शक्तींपैकीं एक. ०**स्नान**–न. प्रत्यक्ष स्नान न करतां कांहीं मंत्र म्हणून जो स्नानाचा गौण प्रकार म्हणून विधि करतात तो. ०**ज्ञ**–वि. मंत्र जाणणारा; मांत्रिक. 'देखा मंत्रज्ञु बरळु जाय।' –ज्ञा १.१९०. **मंत्राग्नि**–पु. उत्तरक्रियेचे मंत्र म्हणून प्रेताचें केलेलें दहन; सशास्त्र दहन. याच्या उलट भडाग्नि. [मंत्र+अग्नि] **मंत्रित**–वि. मंतरलेलें. **मंत्री**–पु १ प्रधान; अमात्य; राजाचा सल्लागार. २ (सामा.) सल्ला देणारा; उपदेश करणारा. ३ राजाच्या अष्टप्रधानांपैकीं एक; न्यायाधीश. ४ मंत्र जाणणारा व त्याचा उपयोग करणारा; मांत्रिक. **मंत्रोपचार**–पु. मंत्रप्रयोगाचे विशिष्ट विधि, नियम. [मंत्र+उपचार] **मंत्रोपदेश**–पु १ मंत्र देणें (गुरूनें शिष्यास). 'मातेच्या दर्जाला जेव्हां चढावें तेव्हां मंत्रोपदेश देणाऱ्या गुरूची पायरी बायकांना प्राप्त होते.' –मेनका ६८. २ सल्लामसलत; उपदेश. [मंत्र+उपदेश] **मंत्रोपासना**–स्त्री. मंत्र साध्य करून घेण्याचे नियम पाळणें. (क्रि० देणें). [मंत्र+उपासना]

मत्लूब—अ. जरूर; अवश्य. 'सामान जंगी सर्कारांत मत्लूब जाल्यास बेपारी...यांजपासोन बिला महसूल खरेदी करण्याची पातशाहनगी असावी.' –रा ७.९४. [अर. मत्लूब्]

मत्सर—पु. डांस; मच्छर पहा. [सं. मत्सरा] ०**दानी**–स्त्री. (प्र) मच्छरदाणी पहा.

मत्सर–पु. दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणें; द्वेष; हेवा; स्पर्धा. यास्ककालीं याचा अर्थ लोभ असा होता. [सं.] **मत्सरी**–वि. द्वेष, हेवा करणारा; द्वेष्टा. [सं.]

मत्स्य—पु. १ मासा; मच्छ; एक जलचर प्राणी. २ एकमेकांना छेदणाऱ्या दोन वर्तुळांत समान असा भाग. ३ मनुष्याच्या तळहातावर किंवा तळपायावर रेषांची बनलेली विशिष्ट आकृति. हें चांगल्या नशिबाचें लक्षण समजतात. ४ तीळ (मनुष्य इ०च्या शरीरावरील). ५ विष्णूचा पहिला अवतार. [सं.] **०घ्न**-पु मासे मारणारा; धीवर. 'तो मत्स्य मत्स्यघ्न विदारी । तंव लोह निघे त्याचे उदरीं ।' –एभा १ ३८४. **०जयंती**–स्त्री. विष्णूनें ज्या दिवशीं मत्स्यावतार धारण केला तो दिवस: चैत्र शुद्ध प्रतिपदा. [सं.] **०देश**-पु. कानपूर, मिरजापूर इ० प्रदेश –अश्वप १.३४. **०पुराण**–न. अठरा पुराणांपैकीं एक. **०यंत्र**-न. १ मच्छयंत्र पहा. २ मासा बसविलेलें, फिरतें वेधण्याकरितां केलेलें यंत्र. **मत्स्यावतार**–पु. विष्णूच्या दहा अवतारांपैकीं पहिला [मत्स्य+अवतार] **मत्स्यासन**–न. पद्मासन घालून नंतर तसेंच पाठीवर उतार्णे निजणें व हाताचा कवा घालून डाव्या हातानें उजव्या हाताचें बावखड व उजव्या हातानें डाव्या हाताचें बावखड धरणें आणि दोन्ही हाताच्या तिढ्यावर डोकें टेवणें. –संयोग ३१८. **मत्स्याहारी**–वि. मासे खाणारा. याच्या उलट शाकाहारी. [सं. मत्स्य+आहारी] **मत्स्यी**–स्त्री. (काव्य) माशाची मादी. [सं.] **मत्स्यी(त्स्य)द्रनाथ**–पु. नवनाथांपैकीं एक. नवनाथ पहा. 'निरालंबदेशीं अनूपम्य राजा । नमस्कार मत्स्यींद्रनाथासि माझा ।' –अकक २.२०२. **मत्स्येंद्रासन**–न योगशास्त्रांतील एक आसन. **मत्स्योदरी**–स्त्री. काशी येथील भैरवाच्या देवळापर्यंत आलेला गंगा नदीचा पूर. [मत्स्य+उदर]

मथक—न. मुख्य ठाणें, ठिकाणा. 'माल्टा (वेलेटा) बंदर भूमध्य समुद्रांतील अत्यंत महत्त्वाचें नौकाखात्याचें आणि वैमानिक खात्याचें मथक आहे' –किर्लोस्कर मासिक, जून १९३६. (इं.) हेडक्वार्टर्स. [सं. मस्तिष्क; मस्तक]

मथणें—अक्रि संगनमत करणें; एकत्र होणें. 'ते दोघे मथले आणि घर फोडलें.' [मत]

म(मं)थणें—उक्रि. १ घुसळणें; मंथन करणें. 'ना तरी शब्दब्रह्माब्धि । मथिलेया व्यासबुद्धि ।' –ज्ञा १.५१. २ वादविवाद, चर्चा, वाटाघाट करणें. ३ छाननी, संशोधन, परीक्षण करणें. ४ एखाद्या गोष्टीविषयीं (मनांत) विचार, मनन, चिंतन करणें. ५ अनुकूल करून घेणें; वळविणें. ६ (काव्य) ठार मारणें. 'श्वेतहयें अंबष्ठ श्रुतायुनामा रणांगणीं मथिला।' –मोकर्ण ३.२५. ७ पराभव करणें. 'तव बळ मथितो त्यातें मारुनि साधीं रणीं निज स्वार्था।' –मोकर्ण १२.३. ८ घासणें: मंथन करणें. 'जैसें काष्ठें काष्ठ मथिजे । तेथ वन्हि एक उपजे ।' –ज्ञा १.२४३. [सं मंथन] **मंथणी-नी**–स्त्री. १ रवी; घुसळणी. २ मंथण्याची, घुमळण्याची क्रिया ३ सोनारांचें मणि तयार करण्याचें हत्यार. **मथणी-नी**–स्त्री. ताक करण्याचा डेरा; माथणी.

मं(म)थन—न. १ दहीं इ० घुसळण्याची क्रिया. 'कुंकुमादि चर्चुनि मंथनालागीं आरंभिती।' –घनश्यामाची भूपाळी पृ २१. २ अग्निहोत्र्यानें अरणी नांवाच्या लाकडावरील खळगींत लांकडाचा शकु सामत्याप्रमाणें फिरवून अग्नि उत्पन्न करण्याची क्रिया. ३ (ल.) वादविवाद; चर्चा; वाटाघाट; ऊहापोह. 'अध्यात्मविद्या भेदाभेद। मथन जेथें।' –दा १ ८ ५. ४ वध; जखमी करणें. 'तेव्हां कवील कोणी भलता त्वद्वीर मन्मथन राजा।' –मोभीष्म १.८७. [सं.] **०सार**–पु (काव्य) चंद्र (हा समुद्रमंथनापासून निघाला म्हणून). 'किं मथनसाराचें बीज। धर्म म्हणति प्रळयबीज।' **०साराचें बीज**–न १ कार्हीं अशक्य किंवा अविद्यमान वस्तु. २ लोणी; नवनीत. **मंथरी**–स्त्री घुसळतांना रवीभोंवतीं गुंडाळलेली दोरी. **मंथान मंथा**–पु. १ मंथन करण्याचा दंड; रवी. २ (अरणीवर) घासून अग्नि उत्पन्न करण्याचें लांकूड 'आणिकीं हृदयारणीं मंथा। विवेकु केला।' –ज्ञा ४ १३०. **मथित**–न १ वादविवाद; चर्चा; वाटाघाट २ लोणी 'हें शब्दब्रह्माचें मथितें। श्रीव्यासप्रज्ञनिधि हातें।' –ज्ञा १५.५७१ ३ तत्त्व; साराश 'तेंचि आनंदें बोलतु । भक्तीचें मथितु वासुदेवाप्रती।' –एभा ५ ४८८. –वि. १ घुसळलेलें; मंथन केलेलें (दहीं इ०). २ (ल.) चर्चिलेला; वाटाघाट केलेला (विषय) **मथितार्थ**–पु. वादाचा निष्कर्ष; तात्पर्य; सारांश; रहस्य. 'तेथ उद्धवासि श्रीअनंत।' ज्ञानमथितार्थ सांगत।' –एभा १५.१० **मथितोष्ण, मंथोष्ण**–वि. नुकतेंच घुसळल्यानें गरम झालेलें (ताक).

मथव(वि)णें—उक्रि. वश करणें; वळविणें. 'रघोजीनें शिंयास मथवून भोपाळ काबीज करावयाचें ठरविलें।' –विवि ८.७.१३९. [मथणें]

मथ(था)ळा—पु. १ हुंडी देणारा हुंडीवर श्रीकाराच्या खालीं करतो ती सही. २ डोकें; माथा. ३ लेखाच्या माथ्यावर लिहिलें असतें तें लेखाचें नांव; शिरोनाम; (इं.) हेडिंग 'अर्थसूचक प्रश्नाच्या मथळ्याखालीं जो एक निबंध लिहिला आहे...' –केले १.१४८. ४ समईच्या खालची बैठक, बूड. [माथा]

मंथा—पु. (कुंभारी) १ मडक्यांना झिलई देण्यासाठीं कुंभार ज्याचा उपयोग करतात तो कांचेचा मणि. २ (खा.) अशा मण्यांची माळ. या माळेनें मातीचें भांडें तेल लावून घांसतात. [सं. मंथ]

मथाटी—स्त्री. (व.) बैलांच्या शिंगाभोंवतीं बांधलेली दुहेरी जाड दोरी. [माथा]

मथित—स्त्री. (विणकाम) कापडास ताण देण्याचें एक उपकरण; मती, मतीत पहा.

मथुरी—स्त्री. एक लहान वृक्ष.

मद—पु. १ धुंदी; कैफ; मत्तपणा (दारू, धन, विद्या, कुलिनता इ०मुळें आलेला). (समासांत उत्तरपदीं) धन-विद्या-स्वरूप-तारुण्य-मद. २ उत्कट कामेच्छा; कामवासना. ३ माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळांतून निघणारा चिकट द्रव्याचा स्राव. 'प्रवृत्तिकर्णाच्या चाळीं। उठिला मदगंधानिळीं।' –ज्ञा १७.६ ४ पुष्परस; फलरस. ५ गर्व; ताठा; अभिमान; अहंरावी. 'संपत्तिमदु सांडिजे। कुरवंडी करुनी।' –ज्ञा ९.३८१. ६ वेड; उन्माद. ७ आसव; मद्य; दारू. ८ रंगेलपणा; चेष्टा; ख्याल; विलास (तारुण्यांतील). 'देती बळें चावुनि दाम दांतें। सोसुं किती ह्या प्रमदामदातें।' [सं.] **०कारी**–वि. कैफ उत्पन्न करणारें; कैफी. **०गज**–पु. उन्मत्त हत्ती. **०त्रय**–पु. विद्या, धन व कुल (किंवा तारुण्य, धन व सत्ता) या तिहींचा मद. 'अहंकारचिया चळिया। वरि मदत्रयाचिया उकळिया।' –ज्ञा ७.७५. **०भुस्र**–पु. (ल.) मदोन्मत्त हत्ती. 'जैसा सिंहाचिया हांका। युगांतु होय मदमुखा।' –ज्ञा १.२१५. **०विव्हल-ळ**–वि. कामविकारानें विव्हल, वेडा झालेला. **मदणें**–अक्रि. मत्त होणें; माजणें; झिंगणें. 'गति किती किति नाचति हांसति ते निजती रडती मदले।' –गंगाधर, रस. कल्लोल २०. **मदात्यय**–पु. १ मदामुळें झालेला अतिशयित विकार. २ गर्व, ताठा इ०चा नाश. **मदात्यय-वायु**–पु. उन्माद; उन्मादवायु. **मदांध**–वि. (द्रव्य, विद्या इ०च्या) गर्वानें ज्याचा विचार नष्ट झाला आहे असा; उन्मत्त. [सं. मद+अंध] **मदिणी**–स्त्री. हत्तीण. –शर. **मदोत्कट**–वि. गंडस्थळांतून मदस्राव होत असलेला (हत्ती). [सं. मद+उत्कट] **मदोन्मत्त**–वि. (श्रीमंती, विद्या, कुल इ०नीं) माजलेला; उन्मत्त, धुंद झालेला. [सं. मद+उन्मत्त]

मद—पु. (बे.) कचऱ्यासहित भात. मळलेलें पण स्वच्छ न केलेलें भात; मदन. [सं. मृद्–मर्द्]

मंद—पु.शनि हा ग्रह.–वि. १ ज्यास फारसा वेग, चलाखी नाहीं असा; संथ; धिमा. २ (ल.) मूर्ख; मट्ट; निर्बुद्ध. 'रजरागी महा मंद। जाण प्रसिद्ध उद्धवा।' –एभा १३.२४०. ३ जड; आळशी; सुस्त. ४ अस्पष्ट; किंचित् अंध (दृष्टि). ५ अंधुक; प्रभाहीन; निस्तेज (प्रकाश). 'जेवीं सूर्योदयापुढें चांदू। होय मंदू निजतेजें।' –एभा १३.४७०. ६ सौम्य; गालांतल्या गालांत केलेलें (हास्य). 'वदन मिरवे मंदहसितें।' ७ हलु लु वाहणारी; सौम्य (वाऱ्याची झुळुक). ८ नक्षत्रांच्या अंधमंदादि प्रकारांपैकीं एक वर्ग. यांत मृग, आश्लेषा, हस्त, अनुराधा, उत्तराषाढा, शततारका व अश्विनी हीं नक्षत्रें येतात. हें नक्षत्र असतांना हरविलेली वस्तु लवकर सांपडत नाहीं. ९ बारीक; हलका (आवाज, ध्वनि). १० सामर्थ्यहीन; असमर्थ; कमजोर. 'त्याचे उपदेशीं ब्रह्मा मंदू। माझेनिही बोध न करवे।' –एभा १३.१५८. [सं.] **०पडणें**–१ संथपणानें, सुस्ताईनें चालणें (काम, धंदा). 'हल्लीं तुमचे कामाचें मंद पडलें आहे.' –शाको. २ कमजोर होणें (सांध, आजार). **०केंद्र**–न. (ज्यो.) मंदोच्च पहा. [सं.] **०गति-गामी**–वि. ज्यास फारसा वेग नाहीं असा; कमी वेगाचा. [सं.] **०फल**–न. (ज्यो.) मध्यम ग्रहाला ज्या फलाचा संस्कार केला असतां मंदस्पष्ट ग्रह होतो असें गणितागत अंशात्मक फल. –माधवचंद्रोबा कोश. [सं.] **०बुद्धि-मति**–वि. जड बुद्धीचा; मट्ट. [सं.] **०भाग्य**–वि. कमनशिबी; दुर्दैवी. **०मधुर**–वि. १ गोड; आल्हाददायक (फळ, वास, आवाज, वाद्य, काव्य इ०). २ सौम्य; मोहक; रम्य (वारा, हास्य, गाणें, बोलणें). **०रूप**–न. १ सूक्ष्मरूप. –मनको. 'जो हा ठाववेना-ही मंदरूपें। उवायिलेपणें हारपे।' –अमृ १.३५. २ स्थिरपणा; अचलपणा. **०वाणी**–स्त्री. भाषणांत सावकाशी; ओघ, किंवा आकर्षकता नसणें; वक्तृत्वाचा अभाव. 'माझी अतिमंदवाणी। तयाची महिमा काय वाणी।' –वि. सावकाश, छाप न पडण्यासारखें बोलणारा; बोलण्यांत अकुशल. [सं.] **०वात**–पु. सौम्य, झुलु झुलु वाहणारा वारा; वाऱ्याची झुळूक. 'गंगातटीं सेविती मंदवातें।' [सं.] **०वार-वासर**–पु. शनिवार [सं.] **०वाहकता**–स्त्री. (शाप.) पदार्थांतून उष्णता लवकर जात नाहीं असा पदार्थांचा गुणधर्म. (इं.) बॅड कंडक्शन. **०विसर्जक**–वि. (शाप.) जो लवकर उष्णता बाहेर टाकीत नाहीं असा (पदार्थ). (इं.) बॅड रेडिएटर. **०वीर्य**–वि. सौम्य गुणाचें, प्रभावाचें (औषध इ०). **०वेळ-वेळा**–स्त्री. (ज्यो.) ज्या समयीं आरंभिलेलें कार्य लवकर तडीस जात नाहीं तो समय; प्रतिकूळ वेळ. (कि० लागणें). **०शोषक**–वि. (शाप.) जो उष्णता लवकर शोषित नाहीं असा (पदार्थ). (इं.) बॅड अॅब्सॉर्बर. **०सुगंध**–वि. सौम्य व सुवासिक (वारा, वाऱ्याची झुळुक). **०स्मित-हास्य**–न. गालांतल्या गालांत हसणें. 'मंदस्मित वदनीं मिरवे।' –वि. गालांतल्या गालांत हंसणारा; हंसतमुख. **०स्मित-वदन**–न. हास्यमुख; प्रसन्नमुख. **मंदणें**–अक्रि. १ कमी, मंद होणें; 'मती मंदली पातकांचें नि गुणें।' –राक १ पृ. १५. २ थांबणें. 'मी वंदीन पदारविंद म्हणुनी जातां पथीं मंदली।' –आ शबरी ४. ३ मंद होणें; थकणें. 'मयितां मंदले देव दैत्य।' –मुआदि ४.११२. **मंदवा**–पु. (प्रां.) मंदाई पहा. **मंदा**–पु. मंदी, मंदाई पहा. –वि. १ स्वस्त. २ चलती, मोसम, हंगाम नसलेला. **मंदाई**–स्त्री. १ सुस्तपणा; धीमेपणा; स्वस्थपणा; ढिलाई (काम, धंदा, इ० मध्यें) २ कमजोरपणा (सांध, रोग इ०चा). ३ स्वस्ताई; उतार (भाव इ० मध्यें) **मंदाग**–स्त्री. सौम्य अग्नि. [मंद+आग] **मंदागीं**–क्रिवि. १ सौम्य अग्नीवर (शिजविणें, भाजणें.) 'ती भाजी मंदागीं शिजूं दे.' २ सौम्य; बारीक ज्योतीनें (दिवा जळणें). **मंदाग्नि**–पु. (ल.) मंद जठराग्नि; पचनशक्ति

कमजोर असणें. –वि. ज्याचा जठराग्नि प्रदीप्त नाहीं असा (मनुष्य). **मंदावणें**–अक्रि. (शब्दशः व ल.) मंद होणें; कमी होणें; रेंगाळणें; आळसावणें. 'मग सुखानुभूतीचीं चेपीं देपीं। मंदावों लागती।' –ज्ञा १६.१२. **मंदाविणें**–सक्रि. सौम्य, मंद, कमी करणें. **मंदावा**–पु (शब्दशः व ल.) मंदपणा; सुस्तपणा; आळस. **मंदाळणी**–वि. ज्यांत मीठ कमी घातलें आहे असा (पदार्थ.)[मंद+अलवण–अळणी] **मंदी**–स्त्री. मंदाई पहा. **मंदोच्च**–नपु. ग्रहाच्या कक्षेतील सूर्यापासून अति दूरचा बिंदु; सूर्योच्च. याच्या उलट शीघ्रोच्च. [सं. मंद+उच्च] **मंदोष्ण**–वि. साधारण उष्ण; कोंबट. [सं. मंद+उष्ण]

मदगडी–ढी—स्त्री. बहादरखानीपेक्षां हलका मध्यम प्रतीचा दौलताबादी कागद. मधघडी पहा.

मदगर्भ–र्भी—पुस्त्री. मधगर्भ पहा.

मद(दा)ड, मद्दड, मंदट–र—वि. मंदबुद्धि; सुस्त; जड; मठ्ठ.

मदत–द्—स्त्री. साहाय्य. –वि. साहाय्य करणारा; जोडीदार; मदतनीस; पाठिंबा देणारा. 'मी तुला मदत आहें. भिऊं नको.' [अर. मदद्] **०इमदाद**–स्त्री. साहाय्य; निकडीची मदत. 'जूद–तर खर्चाची मदत–इमदाद पोक्ता ऐवज देऊन रवाना करून पाठवावें.'। –पया ३.८७. [अर. इम्दाद्=मदत] **०खर्च**–पु. खर्ची; मदत करण्याबद्दल दिलेला पैका. 'आणि मुलाजमत जालिया मदतखर्चेही उमदा देतील.'। –रा ८.२१२. **०गार–नीस**–वि. १ उपकारकर्ता; मदत, आश्रय देणारा. २ सहाय्यक; जोडीदार; दुय्यम (कारकून, लेखक इ०). [फा. मदद्गार] **०गारी–निशी**–स्त्री. सहाय्य करणें; मदत करणें. 'नाईक यांस गुप्तरूपें तुम्ही मदतगारी करून.....' –रा २२.२३. [फा. मदद्गारी] **०माश**–स्त्री. निर्वाहासाठीं दिलेली मदत. 'मदतमाश म्हणजे निर्वाहाकरितां' –वाड–सनदा ८३. [अर. मआश्=जीवन] **मदती**–वि. मदत करणारा; मदतगार. 'मसलतीस मदती असणें.' –रा १५.३६३.

मदत–द्—स्त्री. एक प्रकारचा ओढण्याचा कैफी पदार्थ (अफू, विडयाचीं पानें इ० पासून केलेला). [सं. मद हिं. मद]

मदंती—स्त्री. (संगीत) अठराव्या श्रुतीचें नांव. [सं.]

मदन—न. कणसें एकदां तुडवून काढलेलें गोंडासहित धान्य; दाणे व भूस यांचें मिश्रण. याला पहिलें मदन असेंहि म्हणतात. दुसऱ्यांदा तुडवून निघालेल्या धान्यास दुसरें किंवा आकणाचें मदन म्हणतात व तिसऱ्यांदा कणसें तुडवून निघालेल्या धान्यास तिसरें किंवा निकणाचें मदन म्हणतात. परंतु कांहीं प्रांतांत वेगवेगळ्या तुडवणीवरून धान्याचे रास, आकण, निकण, व मणी किंवा रास, कांडें, मातेरें, फंजट किंवा वरळें असेहि प्रकार करतात. हे शब्द (त्यांच्या अनुक्रमाप्रमाणें) पहा. [सं. मर्दन; प्रा. मद्दन] **म्ह०** पहिली रास, दुसरें आकण, तिसरें निकण, चौथा मणी त्यास बलुता धणी.

मदन—पु. १ कामदेव. २ काम; संभोगाविषयींची इच्छा; विषयविकार. [सं.] (**मुखावरून, तोंडावरून, स्वरूपावरून**) **०ओंवाळून टाकणें–ओवाळणें**–एखाद्या मनुष्याचें सौंदर्य मदनापेक्षांहि अधिक आहे असें दाखविण्यासाठीं योजितात. **०कामेश्वर**–पु. एक कामोद्दीपक रासायनिक औषध. **०तात**–पु कृष्ण. 'मदनतात मनमोहन मुरली वाजवी कुंजवनीं।' **०फळ**–न. गेळफळ. **०बाण**–पु. १ मदनाचे बाण, आयुधें. हे पांच आहेत; (अ) (फुलें) अरविंद, अशोक, चूत, नवमल्लिका व नीलोत्पल. (आ) (विकार) उन्मादन, तापन, शोषण, स्तंभन, व संमोहन. 'बाधि मदन बाण घे प्राणदान दे दावि हरी वदना।' –केप ७४. २ एक फुलझाड; जाईची एक जात. 'तिनें एक मदनबाणाचें पुष्प खोंविलें।' –चंद्र ५४१. **०मस्त**–वि. कामविकारानें बेफाम, उन्मत्त झालेला. **०मूर्ति**–स्त्री. १ कामदेव. २ सुंदर, सुस्वरूप मनुष्य; मदनाचा पुतळा. **मदनाचा पुतळा**–पु. अत्यंत सुंदर मनुष्य. 'पाहीन ना आतां कसला मदनाचा पुतळा हिला नवरा मिळतो तो!' –पकोघे. **मदनाची छडी**–स्त्री. अत्यंत सुंदर स्त्री. 'तूं कशी सुरेख मदनाची छडी आहेस.' –मृ ९. **मदनांतक, मदनारी**–पु. शिव; शंकर. 'अशेषांही रुद्रांमाझारीं। शंकर जो मदनारी।' –ज्ञा १०.२२५. [सं. मदन+अंतक, अरि]

मदनजर—न लक्ष्य; ध्यान 'याजकरितां मस्लहतीस मदनजर राखून...' –पया ४६९. [फा. मद्द–इ–नझर =कृपावलोकन, उत्तेजन]

मदनाई(य)क—पु. माळेंतील मधला मणि, हिरा. 'मदनाईक बदामी.' –वाडमा १.१५९. [सं. मध्यनायक]

मदनी—स्त्री. एक झाड; गेळ. मदनफल पहा.

मंदर, मंदराचल—पु. देवदानवांनीं ज्यानें समुद्रमंथन केलें तो पर्वत. 'देवा मंदराचेनि अंगलगें। ठायीं ठायीं श्वापदांचीं दागें।' –ज्ञा ११.२५७. [सं.]

मदलस—स्त्री. (प्र.) मजलस पहा. **मदलसी**–स्त्री. सभा. –मब ६७.

मदलस–सा—पु. मांडव, छत इ०चा मध्यभाग; चांदणी 'हिरियांच्या मदलसा झळकती।' –रावि ३६.५६. 'निळयाच्या मदलसा जडित। वरी मुक्तांचे राजहंस खेळत।' –ह २.२२. [सं. मध्य+लस्=विलसणें? मसलंद पहा.]

मदवी—स्त्री. उंची रेशमी वस्त्र; (सामा.) वस्त्र. 'आतां अविद्येचिया गांवीं। मोहाची वेढूनि मदवी।' –ज्ञा १८.६९०.

'मदवीयेची वरी चोळी। बिरडें काढिलें मुक्ताफळीं।' –कथा ४. ८.४६. [?]

मंदा—स्त्री. (संगीत) तिसऱ्या श्रुतीचें नांव.

मंदा—पु. घोड्याच्या लगामाचा प्रकार. –अश्वप १.१८५.

मंदाकिनी—स्त्री. १ आकाशगंगा; आकाशांतील चांदण्यांचा शुभ्र पट्टा. 'नीळ गगनावरी सुंदर। मंदाकिनीवोघ दिसे शुभ्र।' २ भागीरथी नदी. [सं.]

मंदाक्रांता—स्त्री. एक वृत्त. याच्या चरणांत सतरा अक्षरें व म, भ, न, त, त, ग, ग हे गण असतात. उदा० 'हाहा देवी हृदय फुटतें देह माझा गळाला। वाटे शून्य त्रिभुवन मला, अंतरात्मा जळाला।' [सं.]

मदार—स्त्रीपु. १ उंटाच्या पाठीवर असणारा उंच भाग; वशिंड. २ भिस्त; दृष्टि; लक्ष्य. 'अक्षरावर मदार नाहीं अर्थावर आहे.' ३ मुसलमानाचें थडगें. 'तुका म्हणे बावी। मोडूनि मदार बांधावी।' –तुगा ६२२. ४ मुख्य आधार; केंद्र; सत्ता. 'पादशाही मदार आपलें हातास आला असतां...' –इमं ९८. ५ आंस; भार. 'इब्राहीम आदीलशानें पादशाही कारभाराचा मदार महाराजाचे सिरीं टाकिला.' –इम ९७. ६ इतबार. 'त्या फौजेंत अवघा मदार तुमचाच आहे.' –पया १४९. ७ ठराव. 'तेव्हां मदार झाला कीं अक्षय तृतियेस निरोप द्यावा.' –ख ५. २५९३. [अर. मदार्]

मंदार—पु. १ पांढऱ्या रुईचें झाड; मांदार. २ एक कल्पवृक्ष. ३ एक पुष्पवृक्ष. [सं.] **०माला**—स्त्री. एक वृत्त; अश्वधाटी. याच्या चरणांत सवीस अक्षरें व त, त, त, त, त, त, त, ग हे आठ गण असतात. उदा० 'वाचाळ मी नीट पाचारितों धीट याचा नयो वीट साचा हरी।' [सं]

मदारुलमहाम—पु. १ राजसत्तेचा मुख्य केंद्र, आंस. २ मुख्य प्रधान; कारभारी. ३ नाना फडणविसांचा किताब. [अर. मदारुल्महाम्म्]

मदारी—पु. जादूगार; बहुरूपी; डोंबारी; गारुडी; नजरबंदीचे खेळ करणारा. ज्याच्यावर सर्व खेळ अवलंबून आहे असा. [मदार हिं.]

मदालसा—स्त्री. मस्त स्त्री.

मदिर—पु. घोड्याच्या खुराचा खालील भाग. –अश्वप. १.६४.

मंदि(दी)र—न. १ गृह; घर. (समासांत) राज–देव–हृदय-मंदिर. २ देवालय; देऊळ. (समासांत) शिव–विष्णु–दत्त–मंदिर. [सं.]

मदिरा—स्त्री. दारू; मद्य. [सं.]

मदीय—वि. माझा. [सं.]

मंदील—पु.न. जरीची काडी, कांठ असलेलें पागोटें, फेटा इ० [अर. मिन्दील्]

मंदोदरी—स्त्री. १ बेडकी. २ रावणाच्या बायकोचें नांव. [सं. मंद+उदरी]

मंदोरा—पु. (प्र.) मणदोरा पहा.

मंदोसरी—स्त्री. (माण.) फोडणीचें वरण; ढकू. मंडोसरी पहा.

मंदोसा—पु. दाराच्या दोन चौकटींनां काटकोनांत सांधणारा चौरस तुकडा.

मद—पु. (सराफी) (हिऱ्याच्या खाणींतील) कठिण रेतीचा गठ्ठा.

मद्दड—वि. मट्ठ; जड; मंदबुद्धि. मंदड पहा. 'झुलु किंवा हॉटेन्टॉट लोकांसारखे बुद्धीनें ते खास मद्दड नाहींत.' –सासं २. ३५१. [का. मद्दु=मूर्खपणा]

मद्य—न. मदिरा; दारू. [सं.] **०पा–पी**–वि. दारू पिणारा; दारुड्या, 'मद्यपाआंगीचें वस्त्र। कां लेपाहातींचें शस्त्र।' –ज्ञा १३.५३२. **०पान**–न. दारू पिणें. **०पाननिषेध**–पु. दारू पिण्याबद्दल निषेध; दारू न पिण्याबद्दलची चळवळ 'सरकारनें द्रव्यशोषणाकडे नजर वेऊन मद्यपाननिषेधाचे पाय तोडावे. ...' –के १.२५९. **०मंड**–पु. सातूच्या दारूवरील फेसाळ साय; सुरामंड; कारोत्तर. **०सार**–न. (शाप.) अल्कोहल.

मंद्र—पु. नाभिस्थानचा गंभीर नाद. एक स्वर, ध्वनि. [सं.] **०नाद**–पु. (संगीत) हृदयांतून निघणारा नाद. ह्या नादाचा उपयोग जवळच्याशीं बोलतांना करतात. **०सप्तक**–न. (संगीत.) मंद्रनादयुक्त सात स्वरांचा समुदाय. **०स्वर**–पु. (संगीत) रागालाप सुरू असतां तो मंद्रसप्तकांतील अमुक स्वरापर्यंत जावा अशी मर्यादा दाखविणारा त्या सप्तकांतील स्वर.

मद्रा—पु. कापडाची एक जात; अलवण. –मुंज्या १२३.

मद्राशी–सी—वि. मद्रास प्रांतासंबंधीं. **०चप्पल**–स्त्री. चप्पल (वाहाणां)ची एक जात.

मध—स्त्रीपु. १ मधमाशा गोळा करतात तो गोड रस, दाट द्रव. २ फुलांतील रस; मकरंद. ३ फणसांतील गोड द्रव; गऱ्यांतील पाणी. गऱ्यांचीं साठें वाळवून एकत्र रचून ठेविलीं असतां त्यांतून जो द्रव निघतो तो. [सं. मधु] **मधाचें बोट लावून ठेवणें–लावणें–दाखविणें**–(ल.) लालूच, आशा दाखविणें. **०पिंपळी**–स्त्री. मध आणि पिंपळी यांची एक औषधी कृती. **०पुळी, मधरा**–(प्र.) मधुपुळी, मधुरा पहा. **०पोळें**–न. मधमाशा जेथें मध सांठवितात तें पोर. **०माशी**–स्त्री. मध गोळा करणारी माशी. **०शर्करा**–स्त्री. फळें, मध इ० गोड पदार्थांत सांपडणारी साखर; फलशर्करा. (इं.) ग्ल्युकोज. **०युक्त**–न. मध आणि पाणी

यांचें मिश्रण. [मध+पाणी] ०वर्ले–न. तांदुळाच्या पिठाचें गोड थिरडें. –गृशि ३५३. **मधाळ**–वि. मधानें किंवा गोड रसानें युक्त (फणस, खजूर इ०). [मध+आळ प्रत्यय]

मध—वि. मध्य याचा अप. समासांत पूर्वपदीं योजितात **०कांडें–पेरें**–न. उसाचा मध्यभाग. **०गर्भ–र्भी**–पुस्त्री. मधला भाग; आंतील भाग; अंतर्भूत प्रदेश. **०घडी**–वि. फार उंची नव्हे फार हलकाहि नव्हे असा दौलताबादी (कागद). उत्तम प्रतीच्या कागदाला बहादूरखानी असें म्हणत. मदगडी पहा. **०घर**–न. घराचें मधलें दालन; माजघर. **०चा**–वि. मधला; मध्यभागचा; मध्यें असलेला. [मध्य] **मधचेमधीं, मधच्यामध्यें**–क्रिवि. मच्च्यामधें पहा. **०भाग**–पु. मधला भाग; (प्र.) मध्यभाग पहा. **०लंड**–वि. १ मध्यमप्रतीचा; अगदीं चांगलाहि नाहीं किंवा अगदीं वाईटहि नाहीं असा. २ धड इकडे नाहीं किंवा तिकडे नाहीं असा; अधांतरीं असलेला. **०ला**–वि. मध्यावरचा; मधचा. **मधल्यामधें**–क्रिवि. १ उगीच; विनाकारण. २ अधिकार नसतां लुडबूड करून. मच्च्यामध्यें पहा. **मधल्या वाटेस येणें**–इष्ट वस्तु न मिळविता येणें. **०लाटी–ठी**–स्त्री. वलाटी व खालाटी यांच्या मधला प्रदेश; देश व कोंकण यांच्या मधला प्रदेश. [मधला+ठाय] **मधवा, मधवेला, मधिवला**–वि. सर्वांत वडील व सर्वांत लहान यांच्या मधला (भाऊ, बहीण). **मधास**–क्रिवि. (अशिष्ट) मध्यें; मध्यभागीं. (व.) मधात; (खा.) मधार, मझार. **मधीं**–क्रिवि. मध्यें; आंत. [मध्य] **मधील**–वि. मधला; आंतला; मध्यावरचा. **मधून**–क्रिवि. १ मध्यापासून; आंतून. २ हून पहा. **मधून विस्तव न जाणें**–क्रिवि. दोघांमध्यें वैमनस्य असणें. **मधें**–क्रिवि. मध्यें पहा. **मधोमध**–क्रिवि. मध्यभागीं: अगदीं मध्यावर.

मधु—न. १ मध. ' मधुविषीं मधुमक्षिका । लोभिणी जैसी । ' –ज्ञा १३.५०२. २ फुलांतील रस; पुष्परस. ३ मोहाच्या फुलांपासून काढलेली दारू. (सामा.) मद्य. –पु. १ चैत्र महिना. २ वसंत ऋतु. –वि. (अक्षरशः व ल.) गोड; मधुर. ' साधो हळु हळु मृदु मधु हित मित बोलोनि चित्त वळवावें । '–मोवन ४.३६. [सं.] **०कर**–पु. भ्रमर; भुंगा. ' मधुकर वनवन फिरत करी गुंजारवाला । ' [सं.] **०करी**–स्त्री. १ भ्रमरी. ' मधुरसादोशें । मधुकरी जवें जैसें । ' –ज्ञा १३.७८६. २ शिजविलेल्या अन्नाची भिक्षा; माधुकरी पहा. ' मधुकरी संन्याशासी । स्वधर्मासी अतिविहित । ' –एभा १८.२३९. –पु अशी भिक्षा मागणारा ब्राह्मण. **०कुल्या**–स्त्रीअव. १ (शब्दशः) मधाचे पाट. २ (घृतकुल्या इ० शब्दाप्रमाणें उपयोग) पक्वान्नांची रेलचेल; जेवणाची रंगळ [सं.] **०क्रिया**–स्त्री. मधुकरी पहा. ' आतां अमृता म्हणिजे मधुक्रिया । शुचिभूत सोंवळें होऊनियां । आणिजे अन्न मेळऊनियां । '–स्वादि ५.५.१५. **०चंद्र**–पु. विवाह झाल्यानंतरचा पहिला महिना; आनंदमास. (इं.) हनीमून. ' चाललंय आपल्या मधुचंद्राला. ' –सुदर्शन पृ ७१. **०प**–पु. १ भ्रमर; भुंगा. ' मधुपास जसा पद्माप्रति आणि बळेंकरूनि तो वास । '–मोसभा १.५६. २ मद्यपी; दारुड्या. [सं.] **०पर्क**–पु १ (विवाहांत) नवरामुलगा वधूच्या घरीं आल्यावर कन्येचा पिता दहीं, मध इ० समर्पण करून त्याची वस्त्रादिकांनीं पूजा करतो तो विधि. ' वर वरिष्ठ कृष्णदेवो । मनी धरूनी हाचि भावो । मधुपर्क विधी पहावो । पूजा विधान करीतसे । ' –एरुस्व ६.५. २ यजमानानें ऋत्विजांचें करावयाचें आदरातिथ्य. ३ शिष्ट, साधु इ०चा आदरातिथ्यविधि. [सं.] **०पुळी**–स्त्री. पाठीवर होणारी असाध्य पुळी; काळपुळी **०प्रमेह**–पु मधुमेहाचा एक प्रकार. [सं.] **०मक्षिका–माशी**–स्त्री. मधमाशी. **०मक्षिकान्याय–व्रत**–पु. कोणत्याहि ठिकाणीं जेवढें चांगलें असेल तेवढें घेणें; संकलन; संग्रह. **०मादसारंग**–पु. (संगीत) एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, कोमल निषाद, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति औडुव–औडुव. वादी ऋषभ. संवादी पंचम. गानसमय मध्यान्ह. **०माधवी**–स्त्री. (संगीत) एक राग-प्रकार; रागिणी. **०मालती**–स्त्री एक फुलझाड. **०मेह**–पु. १ लघवींतून शरीरांतील साखर जाते असा मूत्ररोग. २ अशी रोगदूषित लघवी. [सं.] **०यष्टि–यष्टिका**–स्त्री. १ ऊस २ ज्येष्टमध. [सं.] **०रस**–पु फुलांतील मध.

मधुर—पु १ षड्रसांतील एक रस. २ मद्य. ' दैत्यासी मधुर । घालितसे । '–कालिका १२.१८. –वि. गोड; मोहक; रम्य; चित्ताकर्षक (शब्दशः व ल.) **०ता**–स्त्री. गोडी. ' कां बचनागाची जैसी । मधुरता पहिली । ' –ज्ञा १८ ७९६. **०वर्ण**–पु. कानाला गोड लागणारीं अक्षरें, वर्ण. उदा० ड्, ञ् ण, न, म्. **मधुराई**–स्त्री. गोडपणा; मधुरपणा (शब्दशः व ल.). **मधुराम्ल**–वि. आंबटगोड (फळ इ०). [सं. मधुर+अम्ल] **मधुरिमा–पु** स्त्री. माधुर्य; गोडी. ' सुस्त्रीला दहिंवरामुळें प्राप्त होणारी मोहक मधुरिमा विनोदानें येणें शक्य नाहीं '–साहित्यसेवकांस अनावृत पत्रें ६. **मधुरोष्ण**–वि. किंचित् उष्ण; कोंबट. [मधुर+उष्ण]

मधुरती—क्रिवि. (व.) १ मध्यस्थी. ' मोठे मोठे लोक मधुरती पडले ' २ (व) काकळूत, अजीजी, विनवणी करून.

मधुरा—पु ज्यांत गळण्याच्या आसपास बारीक पुळ्या येतात असा ताप या तापांत वायु झाला असतां त्यास वेडामधुरा म्हणतात.

मधुवा—स्त्री (महानु.) मधमाशी; मोंहोळमाशी. ' सींधु पतंगु मधुकरू । गजु मधुवा कृष्णसारू । ' –भाए २६७.

मध्य—पु. १ मधला भाग; केंद्र. २ कंबर; कटिप्रदेश. ' पहावया कृष्णमध्यरचना । चित्रींचीं लेपें जाहलीं जाणा । ' –एरुस्व १.३३. ३ गर्भ; गाभा. –वि. १ मध्यभागचा; मधला. २ मध्यम.

[सं.] ०कटिबंध–पु. समशीतोष्ण कटिबंध. ०केंद्र–(ज्यो.) दीर्घवर्तुळांतील दोन विशिष्ट बिंदूंपैकीं प्रत्येक. (इं.) फोकस. ०गृह–न. घराचा मधला भाग; माजघर. ०त्वचा–स्त्री. शरीरावरील बाह्यत्वचेच्या खालची त्वचा. ०दंती–वि. चार दांत उगवले आहेत असा (घोडा). –मसाप २.५४. ०देश–पु. १ कोंकण व देश यांच्यामधील कोल्हापूर, पुणें, नाशीक इ० प्रदेश; गोदावरी व कृष्णा आणि सह्याद्रि व बालाघाट यांच्यामधील प्रदेश. २ डांग किंवा मावळ आणि देश यांच्या मधील प्रदेश. ४ कोणत्याहि देशाचा मधला प्रदेश. ५ हिंदुस्थानचा कुरुक्षेत्र, प्रयाग, हिमालय आणि विंध्य यांच्या मधला प्रदेश. ६ क्रांतिवृत्त आणि उष्णकटिबंध यांच्या मधला प्रदेश. ०नाडी–स्त्री. (फलज्यो.) नक्षत्रांच्या तीन वर्गांपैकीं दुसरा; नाडी पहा. ०नाद–पु. (संगीत) कंठांतून निघणारा नाद. साहजिक बोलण्यांत ह्याचा उपयोग करतात. मंद्रनादाच्या दुप्पट मध्यनाद असतो. ०पटल–न. १ छाती व पोट यांमधील पडदा. २ यंत्राच्या आंतील आवरण. (इं.) डायाफ्राम. ०पद–न. (गणित) त्रैराशिकांतील मधली रकम. ०पदें–नअव. मध्यमपदें. (इं.) मीन्स. ०परिमाण–न. मधलें मान; अणु व अनंततत्व यांमधील परिमाण. –वि. असल्या परिमाणाचा (प्रत्येक जड पदार्थ). ०पाती–वि. मध्येंच पाडणारें, सोडणारें. 'माझा भक्तिमार्ग केवळ । ज्ञान तें विकळ मध्यपाती।' –एभा ११.१५२९. ०प्रमाण–न. (गणित) मध्यम–मध्यपद. (इं.) मीन. ०बिंदु–पु. (गणित) वर्तुळांतील ज्या बिंदूपासून परिघापर्यंत काढलेल्या सर्व सरळ रेषा समान असतात तो बिंदु; वर्तुलमध्य. ०भाग–पु. मधला भाग; मध्य. ०मिश्रगणित–न. मध्यप्रमाणदर्शक मिश्रगणित; एका जातीच्या अनेक पदार्थांच्या मिश्रणाचा दर काढण्याचें गणित; सरासरी. याच्या उलट व्युत्क्रममिश्रगणित. मिश्रगणित पहा. ०रात्र–पुस्त्री. रात्रीचा मध्य; भररात्रीचा समय. ०रेषा–स्त्री. (ज्यो.) विषुववृत्त (पृथ्वी किंवा इतर खगोलाचें). हें वृत्त ध्रुवांपासून सारख्या अंतरावर असतें. ०लग्न–न. (ज्यो.) आकाशांतील डोक्यावरचा बिंदु; खस्वस्तिक. ०लंड–वि. मधलंड पहा. ०लय–पु. (संगीत) तालामधील द्रुतलयीच्या दुप्पटीचा काल ०लोक–पु. स्वर्ग आणि पाताळ यांच्यामधील लोक; मृत्युलोक; पृथ्वी. ०वर्ती–वि. १ मधोमध असणारा; मधला. २ मध्यस्थ; दोघांमधील व्यवहार ज्याच्या विद्यमानें होतो तो. ३ मध्यस्थीचा; मध्यस्थविषयक. ४ मुख्य; सर्वश्रेष्ठ; सार्वभौम. (इं.) सेंट्रल, 'गंगाजळी (रिझर्व) बँक ही एक मध्यवर्ती बँकच होय.' –के २५.२ ३६. ०वर्तीसरकार–न. मुख्य, सार्वभौम सरकार. उदा० हिंदुस्थान करकार. प्रांतिक सरकार याचें मांडलिक असतें. ०व्रती–व्रता, मध्याव्रती–वि. (अप.) मध्यवर्ती अर्थ २ पहा. ०सप्तक–न. (संगीत) मध्यनादयुक्त सात स्वरांचा समुदाय. ०स्थ–वि. १ मध्यभागीं असणारा; मध्यवर्ती. 'तो मध्यस्थु गा गिरिवरां । मेरु जैसा।' –ज्ञा १५.१०२. २ तिऱ्हाईतपणानें निर्णय करणारा; पंचाचें काम करणारा; लवाद. ०स्थकी–स्थगिरी, मध्य(ध्या)व्रती, मध्यस्थी–स्त्री. १ मध्यस्थाचें काम; तिऱ्हाईतपणानें निर्णय करणें; पंचाईती; तिऱ्हाइती. मध्यंतरीं–क्रिवि. १ मधल्या काळांत, अवकाशांत; २ मधल्या स्थलीं. ३ मधल्या प्रतींत. मध्यंदिन–पु. यजुर्वेदाच्या वाजसनेयी शाखेचा ब्राह्मण.(प्र.) माध्यंदिन. मध्यांक–पु. त्रैराशिकांतील दुसरें किंवा मधलें पद. [मध्य+अंक] मध्याकर्षप्रेरणा–स्त्री. पदार्थास एका बिंदूभोंवतीं फिरविणारी प्रेरणा. –यंमु २१९. (इं.) सेंट्रिपीटल. मध्यांगस्नान–न. मोठ्याशा पातेल्यांत किंवा लोखंडाच्या पिपांत नाभीपासून गुडघ्यापर्यंत अंगाचा भाग पाण्यांत बुडवून बाकीचा भाग कोरडा ठेवून केलेलें स्नान. –आगर ३.७. [मध्य+अंग+स्नान] मध्यान्ह–पु.न. १ दिवसाचा मध्य; दुपार. 'तारुण्याचा मध्यान्हीं। न चलेचि विवेक वाहाणी। –ऋ ९. मध्यान्हरेखा–स्त्री. याम्योत्तर वृत्त. मध्यान्ह–काल–समय–पु. १ दुपारची वेळ; दोनप्रहराचा काळ. २ (ल.) जेवण (दुपारचें) ३ निर्वाह; उपजीविका. म्ह० अंतकाळापेक्षां मध्याह्नकाळ कठीण. मध्यान्ह काळाचें कठीण–पोटास मिळावयाचें कठीण; अत्यंत गरिबीची स्थिति. ०रात्र, मध्यानरात–त्र–स्त्री. रात्रीचा बारा वाजण्याचा समय; ऐनरात्र. मध्यान्हाचें–न. दुपारचें जेवण. (क्रि० करणें; गांठणें; उरकणें). मध्यान्ही–स्त्री. एक फुलझाड आणि त्याचें फूल. मध्योत्सारिणी–वि. पदार्थास मध्यापासून दूर नेणारी; केंद्रत्यागी (प्रेरणा); (इं.) सेंट्रिफ्यूगल.

मध्यम—पु. १ (संगीत) सात स्वरांपैकीं चौथ्या स्वराचें नांव; म. स्वरसप्तक पहा. २ रजोगुण. 'तेव्हां गुणचि गुणातें आटी। तमातें धोटी मध्यमू।' –एभा १०.३५०. –वि. १ मधला. २ साधारण; सामान्य; मधल्या प्रतीचा. [सं.] ०ग्राम–पु. (संगीत) सप्त स्वरांतील तीन अवधींपैकीं एक अवधि. त्यांतील सहा स्वर षड्जग्रामाप्रमाणें असत. परंतु पंचम स्वराचा ध्वनि षड्जग्रामांतील पंचमस्वराच्या ध्वनींपेक्षां एक श्रुतीनें कमी असे. हा ग्राम प्रचारांत असतां (१५ व्या शतकापर्यंत) पंचमस्वर अचल नव्हता. पंचमस्वर अचल झाला तेव्हां मध्यमग्राम प्रचारांतून गेला. ०पदलोपी समास–पु. दोन शब्दांच्या मधल्या पदाचा ज्यांत लोप होतो असा समास. जसें–साकरभात, लांकूडकाम. ०वयस्क–वि. मध्यम वयाचा (सुमारें चाळिशीचा). मध्यमा–स्त्री. १ मधलें बोट. २ नुकतीच वयांत आलेली मुलगी. ३ परा, पश्यंती मध्यमा व वैखरी हे जे वाणीचे चार भेद त्यांतील (कंठस्थानस्थित मननात्मक) तिसरा भेद. 'जया तुझिया उद्देशासाठीं।

पश्यंती मध्यमा पोटीं।' –ज्ञा १६.२०. ४ सुषुम्ना नाडी. 'हृदयकमळीं केला थारा। मध्यमाद्वारा चालिले।' –एभा १२.६. ५ एक छंद. याचे चार चरण असून प्रत्येक चरणांत तीन अक्षरें असतात. [सं.] ०**वती**–स्त्री (संगीत) एका तालाचें नांव. यांत नऊ मात्रा व चार विभाग असतात.

मध्यें—क्रिवि. १ मध्यभागीं. २ आंत; गर्भांत. ३ मध्यंतरीं; मधल्या वेळांत. 'मी नसतां मध्येंच मामलेदार ह्यांनीं केलें.' ४ ठायीं; अंगीं; मधें. [मध्य] ०**तोंड घालणें**–चाललेल्या संभाषणांत ज्याचा संबंध नाहीं अशा माणसानें मध्येंच बोलूं लागणें. ०**मध्यें**–क्रिवि. मधून मधून; मध्यंतरीं; कांहीं वेळानें.

मध्रा—पु. (प्र.) मधुरा पहा.

मध्रा—स्त्री.अव. (एव. मधर–रूढ नाहीं) भाजलेल्या जागेवर तुंबडी लाविल्यानें तेथें उत्पन्न होतात ते फोड. [मधुरा]

मध्व—पु. १ द्वैतमताचा प्रस्थापक आचार्य. २ यानें काढलेला वैष्णवांतील एक संप्रदाय; त्यांतील व्यक्ति. ०**गुळ**–न. (गो.) पांढऱ्या रंगाचें वाटोळें वांगें. (ही पवित्र वांग्याची जात मध्वाचार्यांनीं उत्पन्न केली अशी समजूत आहे). –गोमांतकाचा इतिहास ९. ०**मत**–न. १ मध्वाचार्यांनी पुरस्कारिलेलें मत. २ हें मत मानणारा पंथ; मध्वसंप्रदाय.

मन—न. १ चित्त; चित्शक्ति; बुद्धि, विचार, तर्क, स्मृति इ० चें अधिष्ठान; अंतःकरणचतुष्टय आणि अंतःकरण पंचक पहा. २ अंतःकरण; हृदय; भाव, रस, विकार इ० चें अधिष्ठान; सुखदुःखादिकांचें ज्ञान करून देणारें इंद्रिय. ३ सदसद्विवेकबुद्धि; बरें-वाईट समजण्याची शक्ति;अंतर्याम. 'ज्याचें मन त्यास ग्वाही देतें.' ४ जाणीव; आत्मबोध; भान; सावधपणा; शुद्धि. ५ संकल्पविकल्पात्मक अंतःकरणवृत्ति; इच्छा; निश्चयशक्ति. 'संकल्प विकल्प तेंचि मन।' –दा १७.८.६. ६ आवड; अंतःकरणाची ओढ, प्रवृत्ति; खुषी; मर्जी. ७ माया ८ प्रेम; लक्ष. [सं.] 'तुजवरिमन ईचें यापरी कां इयेला।'–र ४२. ९ ध्यान. **म्ह०** १ मनीं वसें तें स्वप्नीं दिसे. २ मन राजा, मन प्रजा. ३ मनांत एक, जनांत एक. ४ मनांत मांडे, पदरांत धोंडे. ५ मनीं नाहीं भाव, देवा मला पाव. ६ मनीं वसे तें स्वप्नीं दिसे. ७ मान जना, अपमान मना. ८ मन जाणे पापा माय जाणे मुलाचे बापा. ९ मनास मानेल तो सौदा. (वाप्र.) ०**उठणें–उडणें**–आवडेनासा होणें; कंटाळा, तिटकारा, वीट येणें. 'ह्या सखलादी अंगरख्यावरून अलीकडे माझें मन उडालें आहे.' ०**कांपणें**–दुःख होणें; भीति वाटणें. 'व्यूढोरस्कादिक नव मेले, मन कांपतें कथायाला।' –मोभीष्म ९.६२. ०**खचणें–कचरणें**–हिंमत सुटणें; हातपाय गळाठणें. ०**खाणें**–आपण केलेल्या वाईट कृत्याबद्दल स्वतःलाच वाईट वाटणें; टोंचणी लागणें; पश्चात्ताप होणें. ०**गडबडणें**–भीतीनें भरणें; गांगरणें; घाबरणें. 'गडबडतें मन वेडें, माणुस मीं मीं म्हणोनि बडबडतें।' –मोशल्य ४.४९. ०**घालणें–देणें–लावणें**–मन एकाग्र करणें; लक्ष लावणें. ०**जाणें**–इच्छा होणें. ०**तुटणें**–मनांत कंटाळा, अप्रीति उत्पन्न होणें; मन पराङ्मुख होणें. **म्ह०** तुटलें मन आणि फुटलें मोतीं सांधत नाहीं. ०**थोड्यासाठीं निसरडें करणें**–क्षुल्लक फायद्यासाठीं निश्चयापासून पराङ्मुख होणें. ०**दुग्ध्यांत पडणें**–संशयांत पडणें; गोंधळणें. 'आतां माझें मन दुग्ध्यांत पडलें.' –बाळ २.१९५. ०**धरणें**–१ एखाद्याच्या मनाप्रमाणें वागणें. २ हांजी हांजी करणें. 'आदर देखोनि मन धरी। कीर्तीविण स्तुती करी।' –दा २. १०.२५. ०**पाहणें**–मनाची परीक्षा करणें; (एखाद्याच्या) मनाचा कल अजमावणें; एखद्याचे विचार त्याचें भाषण, वागणूक इ० वरून ठरविणें. ०**बसणें–लागणें**–(कांहीं गोष्ट करावयास) अनुकूल होणें; अतिशय आवडणें; आसक्त होणें; प्रिय वाटूं लागणें. 'नको कचा मज टाकुनि जाऊं, तुजवरि मन हें बसलें रे।' ०**मनाविणें**–मन वळविणें; मर्जी संपादणें; अनुकूल करून घेणें. ०**मानेल तसें करणें**–इच्छेस येईल तसें करणें; स्वैर वर्तन करणें; स्वच्छंदानें वागणें. ०**मारणें**–इच्छा मारणें; इच्छा दाबून ठेवणें. ०**मिळणें**–उभयतांच्या आवडीनिवडी सारख्या असणें. 'स्त्रीपुरुषांचीं मनें मिळालीं नाहींत तर त्यांचा संसार सुखावह होऊं शकत नाहीं.' ०**मुंडणें**–इच्छा नाहींशी करणें. 'आधीं मन मुंडा व्यर्थ मुंडितां मुंडा।'–मृ ६५. ०**मोठें करणें**–उदारपणा दाखविणें; थोरपणानें वागणें. ०**मोडणें**–एखाद्याची आशा विफल करणें; एखाद्याच्या इच्छेविरुद्ध वागणें; दुःख देणें. 'जयाचेनि शब्दें मन मोडे। तो एक पढतमूर्ख।'–दा २.१०.६. ०**विटणें**–कंटाळा, वीट येणें. 'बहुवीरक्षय घडला, तेणें बहुजीवितासि मन विटलें।' –मोभीष्म ११.७४. **मनांत आणणें**–संकल्प, निश्चय करणें; मनावर घेणें. **मनांत(मनीं)कढविणें**–मनांतल्या मनांत रागानें चूर करणें. जळफळावयास लावणें. 'निजतेजें भानुला मनीं कढवी।' –मोविराट ३.१२०. **मनांत(मनीं)कालवणें**–अंतःकरणांत अतिशय कष्टी होणें; अतिशय दुःख होणें. 'बहुत दुःख मनीं जरि कालवे। भिउनि ह्यास तयास न बोलवे।' **मनांत गांठ ठेवणें**–मनांत वैरभाव, द्वेषबुद्धि, सूड घेण्याची इच्छा जागृत ठेवणें; अढी धरणें. **मनांत गांठ बांधणें–घालणें**–नीट ध्यानांत धरून ठेवणें; मनात गोष्ट पक्की ठेवणें. **मनांत चरचरणें**–मनास काळजी, भीति वाटणें; दुःख होणें. **मनांत ठेवणें**–एखादी गोष्ट गुप्त राखणें; वाच्यता न करणें. **मनांत नवमण जळणें**–मनांतल्या मनांत संतापणें; मनांत द्वेष, सूड घेण्याची इच्छा जागृत ठेवणें. **मनांत भरणें**–पसंत पडणें; आवडणें. **मनांत(मनीं)मांडे खाणें**–व्यर्थ मनोरथ करणें; मनोराज्य करणें. **मनांत(मनीं) म्हणणें**–स्वगत बोलणें; स्वतःशीं पुटपुटणें. **मनांतल्या मनांत**

जळणें–आंतल्या आंत जळफळणें;रागानें धुमसत राहणें. **मनांतून उतरणें**–आवडेनासा होणें; कंटाळा, वीट येणें. **मनानें करणें**–(कोणाची सल्ला न घेतां) स्वतःच्या विचारानें करणें. **मनानें घेणें**–मनाचा ग्रह होणें; मत बनणें. **मनाला द्रव येणें**–मनांत दया, प्रेम इ० कोमल भावना उत्पन्न होणें. **मनाला लावून घेणें**–अतिशय दुःख वाटणें. 'कल्पनेला सुचतील त्या गोष्टी मनाला लावून घेत बसलं म्हणजे खाल्लेलं अन्न सुद्धां अंगीं लागायचं नाहीं.'–एक ४३. **मनावर घेणें–धरणें**–एखादी गोष्ट पत्करणें; तींत मन घालणें; सिद्धीस नेण्यास झटणें. 'झटता तुझा सखा तरि होतें हित, परि न हा मनावरि घे।'–मोभीष्म ३.३. **मनावर लिहून ठेवणें**–कायमची आठवण ठेवणें; स्मृतिपटलावर कोरून ठेवणें. **मनास(मनां)आणणें**–१ लक्ष देणें; मानून घेणें. 'आम्ही वेडें बगडें गातों मनाशीं आणा।'–ऐपो १४२. २ समजून घेणें. 'म्हणे पैल ते कोण ललना। कां तप करिते आणीं मना।'–ह २६.२९ ३ मनावर घेणें; महत्त्वाचें मानणें; 'मी रागाच्या वेळीं बोललों तें मनास आणूं नका.' **मनास येणें–वाटणें**–आवडणें; पसंत पडणें. 'वारूबाई ! पाहिलीस कां भावजय ? येते का मनास ?'–पकोघे. **मनीं ठेवणें**–गुप्त ठेवणें. 'चाल पुरा, हें मनींच ठेवून।'–मोविराट ६.५२. **मनीं जाण होणें**–ओळखणें; जाणणें. **मनीं धरणें–बागविणें**–लक्ष्यांत असूं देणें. 'ह्यालागीं तुम्हाशीं बोधिलें। मनीं धराल म्हणोनिया।' **मनींमानसीं–मनोमानसीं–मनोमनीं नसणें**–(एखादी गोष्ट)अगदीं मनांत देखील आलेली नसणें; स्वप्नींहि नसणें. **मनोमन(य)साक्ष**–१ मन मनाची साक्ष देतें. ज्यांना परस्परांविषयीं तिटकारा किंवा प्रेम वाटतें अशा मनुष्यास उद्देशून योजतात; एखाद्या गोष्टीबद्दल एकमेकांचे विचार एकमेकांना अंतर्मनानें कळतात या अर्थी. २ मन स्वतःसाक्षी आहे; स्वतःच्या मनांतील अभिप्राय, उद्देश, भाव इच्छा इ० स्वतःस माहीत असतात. साधित शब्द.– **मनाचा**–वि. मनासंबंधी; अंतःकरणाचा. **मनाची आशा–ओढ–धांव**–स्त्री. मनाचा कल, रोंख. सामाशब्द– **०उथळा**–वि. मोकळ्या मनाचा, साधा; छक्केपंजे न जाणणारा. **०ओळख**–स्त्री. एखाद्याच्या मनाची परीक्षा; स्वभावाविषयीं बनविलेलें मत. 'कोणाशीं वाईट बोलूं नये. कां ? तर मन ओळख होते.' **०कपटी**–वि. दुष्ट अंतःकरणाचा; लबाड. **मनःकल्पित**–वि. कल्पनेनें, तर्कानें केलेलें; काल्पनिक. **मनकवडा**–पु. दुसऱ्याचें मन वेधून घेण्याची शक्ति. 'मन माझें मोहिलेंस नकळे आहे तुझ्यापशीं मनकवडा।'–प्रला १६१. –वि. दुसऱ्याच्या मनांतील विचार ओळखणारा. **०कामना**–स्त्री. अंतःकरणांतील इच्छा. [मन+कामना] **०कुजका**–वि. हलक्या मनाचा; दुष्ट; विश्वासघातकी. **मनःकृत**–वि. मनानें केलेलें; मानसिक. **०कोवळा**–वि. प्रेमळ; शुद्ध अंतःकरणाचा. **मनखोडी**–स्त्री. मनोविकार. 'देवनाथ तुज हात जोडि मनखोडी सकळ सांडी।' –देप ६३. **मनच्या मनीं**–क्रिवि. मनांतल्या मनांत; आपलें म्हणणें काय आहे हें न सांगतां. **०गाडून**–क्रिवि. मन लावून; अंतःकरणपूर्वक; एकाग्रतेनें. **०देवता**–स्त्री. अंतःकरणांतील देवता. १ मन; अंतःकरणांतील तर्क, आशा इ० ची प्रेरक शक्ति (क्रि० लवणें; वाहणें). 'यंदा सस्ताई होईल कीं महागाई ? तुमची मनदेवता कशी लवते ?' २ सदसद्विवेकबुद्धि; न्यायबुद्धि. **०धरणी**–स्त्री. मर्जी संपादन करणें; आर्जव; खुशामत. (क्रि० करणें) **०धरणीचा**–वि. दुसऱ्याचीं आर्जवें, खुशामत करण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा; मर्जी संपादणारा. **०पाकुळका, मनाची पाकुळका, मनपिंगळा–ळी**–स्त्री. बऱ्यावाईट गोष्टी करण्याची प्रेरणा करणारी मनांतील देवता; मनोदेवता. **मनःपीडा**–स्त्री. मानसिक त्रास; दुःख, काळजी इ०. **मनःपूत**–क्रिवि. (मनाला जें पवित्र, शुद्ध वाटतें त्याप्रमाणें) मनास येईल तसें; वाटेल तसें. 'कोणी वाटेल तें भलभलतें करूं लागला म्हणजे तो मनःपूत वागतो असें आपण म्हणतों.'–गीर १२५. **म्हo** मनःपूतं समाचरेत्। **मनःपूर्वक**–क्रिवि. १ मनापासून २ जाणून बुजून; मुद्दाम. **मनःप्रिय**–वि. मनाला आनंद देणारें; समाधानकारक. **मनभाव**–पु. उत्सुकता; श्रद्धा; भक्ति; मनोभाव. 'मनभाव असल्यावांचून कार्य सिद्धीस जात नाहीं.' [सं. मनोभाव] **०भूक**–स्त्री. काल्पनिक, खोटी भूक; नेहमीच्या सरावामुळें वाटणारी भूक. **०भोळा**–वि. साधा; गरीब; निष्कपटी. **०मन**–स्त्री.(व.) मनधरणी; खुशामत; आर्जव. **०मानेसें**–क्रिवि. मनास वाटेल तसें; मनःपूत. 'वर्तति मनमानेसें सुरतपदा अपतिका स्त्रिया बटकी।'–मोसभा ६.२०. **०मान्य**–वि. स्वेच्छाचारी; स्वच्छंदी; बेताल. **०मिळाऊ**–वि. सर्वांशीं मिळून मिसळून राहणारा; गोड स्वभावाचा. **०मुक्त**–क्रिवि. यथेच्छ; अमर्यादपणें; मनमुराद; मनाची इच्छा पूर्ण होईपर्यंत. **०मुराद**–वि. १ मनोहर; आल्हादकारक; आनंददायक. २ विपुल; यथेच्छ: मनसोक्त; मनाची तृप्ति होईल इतकें (जेवणांतील पक्वान्न). [अर. मुराद=ईप्सित] **०मेळ**–वि. १ आवडतें; प्रिय; मनोहर. २ शास्त्र इ० चा फारसा विचार न करतां दोन्ही पक्षांच्या संमतीनें झालेलें (लग्न). **०मोकळा**–वि. खुल्या दिलाचा; सरळ; निष्कपट. **०मोकळें करून**–क्रिवि. खुल्या अंतःकरणानें; संकोच, भीति, लाज इ० सोडून. **०मोठा**–वि. १ उदार अंतःकरणाचा. २ उदार; सढळ; मोकळ्या हाताचा. **०मोड**–स्त्री. हिरमोड; निराशा. 'नको करूं मनमोड।'–पला २२.४. **०मोहतिर**–न. मनाचा, मनानें ठरविलेला मुहूर्त; **०मोहन**–वि. मनाला खुष करणारा; रमणीय; आवडता; प्रिय. 'मनमोहन यादवराणा। कोणी जाउनि आणा।' **०मौज**–स्त्री. १ गमतीचा विचार, कल्पना. २ लहर; नाद; छंद.

॰मौजा-करणें-स्वतःच्या (रंगेल, अनिर्बंध) इच्छा तृप्त करणें. **॰मौजी-ज्या**-वि. १ लहरी; छांदिष्ट; चंचलबुद्धि. २ मिजासखोर; दिमाखी. **॰लज्जा**-स्त्री. स्वाभाविक, नैसर्गिक लाज; मनोदेवतेची टोंचणी; भीति; शरम; शिष्टाचार; संभावितपणा. 'तुला मनलज्जा नाहीं जनलज्जा तर धर.' **॰वळख**-स्त्री. मनओळख पहा. **मनश्शांति**-स्त्री. मनाची शांतता. **मनःसंतोष**-पु मनाचें समाधान; मनास होणारा आनंद. **मनसमजावणी-समजावशी**-स्त्री. रागावलेल्या, दुःखी, सचिंत माणसाचें सांत्वन, समाधान करणें. **॰समजूत**-स्त्री. ग्रह; मत; समज; भावना. 'सर्व मनुष्यांची मनसमजूत एकसारखी असत नाहीं.' **॰समर्पण**-न. (काव्य) मन अर्पण करणें. **मनसाराम**-पु. (विनोदानें) मन. 'मनसारामाचे स्वाधीन सर्व इंद्रियें आहेत.' **॰सुटका**-स्त्री. मन एखाद्या गोष्टीपासून परावृत्त होणें. **॰सूत्र**-न. इच्छानुरूप सत्ता चालविणारें, वागणारें, मन. **॰सोक्त**-क्रिवि. यथेच्छ; स्वैर; स्वच्छंद. मनः पूत पहा. 'पशुपक्षी यांचा मनसोक्त व्यवहार आहे.' **॰सोदिष्ट**-वि. मनांत योजिलेलें, ठरविलेलें, निश्चित केलेलें. **मनस्ताप**-वि. १ दुःखदायक. २ अनुतापी; दुःखपीडित. **मनस्ताप**-पु. (मनाला होणारा त्रास) दुःख; शोक; पश्चात्ताप; हुरहुर; खिन्नता इ० **मन(नः)स्थिति**-स्त्री. १ मनाची स्थिति; मानसिक अवस्था, भावना. २ मन. 'माझी मनस्थिति चंचल आहे.' **॰हलका**-वि. दुर्बल; क्षुद्र मनाचा. **मनाकळित**-वि. मनानें आकलन केलेलें. **मनाजीपंत**-पु. (विनोदानें) मन. **मनाजोगा**-वि. जसा हवा तसा; मनासारखा. **मनापासून**-क्रिवि. खरोखरी; बेंबीच्या देठापासून; अतिशय; फार. **मनापून**-क्रिवि. खरोखरी. **मनायोग-ग्य**-वि. क्रिवि. (अप.) मनोयोग्य पहा. **मनास येईल तसें**-क्रिवि. स्वेच्छेनें; मर्जीप्रमाणें. **मनासारखा**-वि. इच्छेसारखा; आवडीचा; जसा पाहिजे तसा. **मनुबाई**-स्त्री. मन. **मनेच्छ-च्छां**-क्रिवि. मनसोक्त; यथेच्छ; मनाचें समाधान होईपर्यंत 'नदी पुलिनी गंगातिरीं। क्रीडा करिती मनेच्छां।' [मन+इच्छा] **मनेच्छा**-स्त्री. मनाची इच्छा; प्रवृत्ति,कल **मनेप्सित**-न. मनोवांछा; मनाची इच्छा.-वि. मनानें इच्छिलेलें; मनोवांछित. [मन+ईप्सित] **मनोगत**-न. मनीषा; हेतु; उद्देश; विचार; इच्छा. 'श्रीकृष्णवासातें वांछिती। जाणे श्रीपती मनोगत।'-एरुस्व १५ १३८. -वि. मनांत असलेलें; ठरविलेलें. 'कुंभाराचा मनोगत जो आकार असतो तो घटावर उत्पन्न होत असतो.' **मनोगति**-स्त्री. १ मनाची वृत्ति, क्रिया, विचार. २ मनाचा, विचाराचा प्रवेश, पोंच; मनाची धांव; आकलन. ३ इच्छेचा कल, प्रवृत्ति. 'हा आपल्या मनोगतीनें चालतो-वागतो-करतो.'-वि. मनाप्रमाणें वागणारा, चालणारा; विचाराप्रमाणें चंचल. -क्रिवि. मनाच्या गतीप्रमाणें; अतिशय, कल्पनातीत वेगानें. 'आला गेला मनोगती।'-मारुतिस्तोत्र. **मनोगम्य**-वि. मनाला जाणतां येण्यासारखें; मनानें आकलन होण्यासारखें. **मनोज**-पु. मदन; काम. 'मनोज मध्यस्थ करूं निघाला।'-सारुह २.६०. **मनोजय**-पु मनाचा जय; आत्मनिग्रह; मनोनिग्रह. 'तैसा मनोजयें प्रचारु। बुद्धींद्रियांचा।'-ज्ञा १६ १८४. **मनोजव**-वि. मनाच्या गतीनें जाणारा; फार त्वरेनें जाणारा. **मनोत्साह**-पु. मानसिक उत्साह; आनंद; आवड. 'ज्याचा जसा मनोत्साह तसें तो करितो.' **मनोदय**-पु. १ हेतु; विचार; आशय. २ इच्छा; कल; प्रवृत्ति. **मनोद्देश**-पु. मनांतील योजना, हेतु, बेत, विचार. **मनोधर्म**-पु. १ (प्रेम, द्वेष, काम, क्रोध, मत्सर इ०) अंतःकरणाची भावना, विकार. 'न निघे मनोधर्मी। अरोचक।'-ज्ञा १८.६५७. २ मनाची शक्ति (विचार, कल्पना, सदसद्विवेकबुद्धि इ०) ३ (सामा.) चित्तवृत्ति; मनोगुण. 'आहार मिळाल्या उत्तम। हरिखेजेना मनोधर्म।'-एभा १८.२३६. ४ मनाची चंचलता. 'तंव आंतु त्राय मोडे। मनोधर्माची।'-ज्ञा ६.२११. ५ हेतु; बेत; विचार -वि. मनोगतीप्रमाणें वागणारा. 'सहचरु मनोधर्मु। देवाचा जो।'-ज्ञा १७.३३. **मनोधारणा**-नस्त्री. मन राखणें; मनधरणी. **मनोनिग्रह**-पु. मनाला ताब्यांत ठेवणें; मनोजय; संयमन. **मनोनीत**-वि. मनानें पसंत केलेलें, स्वीकारिलेलें. **मनोनुकूल**-वि. एखाद्याच्या मनाप्रमाणें; मनाला पसंत पडण्यासारखें. **मनोनुभूत**-वि. मनानें अनुभविलेलें, सहन केलेलें, उपभोगिलेलें. **मनोभंग**-पु. इच्छा बेत, आशा इ० फलद्रूप न होणें; निराशा. **मनोभव**-पु. १ मदन; काम. २ कामेच्छा; विषयेच्छा. **मनोभाव**-पु. १ हेतु; विचार. २ भक्ति; श्रद्धा. ३ प्रीति. **मनोभावें, मनोभावें करून, मनोभावापासून, मनोभावानें**-क्रिवि. अंतःकरणपूर्वक. मनापासून; श्रद्धेनें. 'मनोभावें ईश्वराची सेवा करावी.' **मनोभिराम**-वि. मनाला तुष्ट करणारा; आनंददायक; मोहक; चित्ताकर्षक. 'तेव्हां तरी तारकशक्ति राम। देईल आम्हासि मनोभिराम।' **मनोमय**-वि. मनःकल्पित; काल्पनिक; अंतःकरणांतील; मानसिक. **मनोमयकोश**-पु. चैतन्याच्या पांच (अन्न-प्राण-मन-विज्ञान-आनंद) कोशांपैकीं तिसरा. पंचकोश पहा. **मनोमयसत्यवाद**-पु. एकाच वस्तूविषयीं निरनिराळ्या लोकांच्या मनांत सारख्याच कल्पना असतात असें मत; सादृश्यवाद. (इं.) कन्सेप्च्युॲलिझम्.-नीति ४०६. **मनोयोग**-पु. मन लागणें; लक्ष्य; अवधान. **मनोयोग्य**-वि. मनपसंत; समाधानकारक; संतोषकारक. **मनोरंजक**-वि. मनाला रमविणारें; करमणूक करणारें; चित्ताकर्षक. **मनोरंजन**-न. १ करमणूक; गंमत; **मौज**. २ मनास वाटणारा आनंद, उल्हास. **मनोरथ**-पु. इच्छा; बेत: हेतु; उद्देश; योजना. 'तोषूनियां वैकुंटनायक। मनोरथ पूर्ण करील।'-व्यं ५. **मनोरथ-सृष्टि**-

स्त्री. मनोराज्य; काल्पनिक सृष्टि. **मनोरम**–वि. १ मनाला रमविणारें; मोहक. २ आनंददायक; संतोषकारक; **मनोरमा**–स्त्री १ सुंदर स्त्री. २ (संकेतानें) बायको; पत्नी. **मनोराज्य**–न. भावी उत्कर्षाविषयींचे कल्पनातरंग; हवेंतील मनोरे **मनोविकार**. **मनोविकृति**–पुस्त्री. मनांत उद्भवणारे कामक्रोधादि विकार प्रत्येकीं; भावना; मनोवृत्ति. **मनोवृत्ति**–स्त्री.१ मनाची स्थिति; चित्तवृत्ति; स्वभाव. २ मनाचा व्यापार; विचार, भावना, विकार इ० 'ह्या मनोवृत्ति देवपरायण झाल्या.' **मनोवेग**–पु मनाची गति; अत्यंत जलद गति. मनोगति पहा. 'मनोवेगें तात्कालीं। पातले विश्वेश्वराजवळी।' –गुच ४१.१५७ **मनोवेद्य**–वि मनानें, अंतःकरणानें जाणतां येण्याजोगें. **मनोव्यापार**–पु. मानसिक संकल्पादि व्यवहार; विकार, विचार इ० **मनोहत**–वि. निराश; हताश. **मनोहर**–पु. व्यंकोबाचा प्रसाद (नैवेद्य) –तीप्र २५२. –वि. मोहक; आल्हादकारक; रमणीय; सुंदर. **मनोहारी**, **मनोज्ञ**–वि. चित्ताकर्षक; रमणीय; सुंदर; मोहक. **मनौनि**–क्रिवि. मनापासून; मनांतून 'तैसें मनौनि धनवरी। वियमानें आल्या अवसरी।' –ज्ञा १६.८७. **मनोरें-रा**–न.पु. मनाची इच्छा. 'कां जे लळेयाचे लळे सरती। मनोरथांचे मनोरे पुरती।' –ज्ञा ९ ३. **बरव्या मनानें**–क्रिवि. शुद्ध मनानें; चांगल्या, प्रामाणिक हेतूनें. 'सीता स्वयंवर असें बरव्या मनानें अवलक्षुनि शास्त्र अवलोकिलें.' **मोकळ्या मनानें**–क्रिवि खुल्या दिलानें; स्वतःचें मन, हेतु, भावना इ० स्पष्ट रीतीनें सांगून; मन मोकळें करून.

मनखुरा—पु. (सोनारी) एक हत्यार. मणखुरा पहा.

मनगट—न. घडकामाची चौकोनी लोखंडी कांब. खरवाई पहा.

मनग(क)ट, मनगटी—मणगट, मणगटी पहा. 'तेथ पुढां तुझे पुष्पांजुलि। खेवंगी मनकटांचा।' –भाए ४५१. **मनगटांतील माशा मरणें**–असमर्थ असणें.

मनचव—वि. (जरतारी धंदा) मध्यम.

मनजात—स्त्री. (गो.) मोनी, मुकी जात. (पाळींव जनावरांना उद्देशून कोंकणांत उपयोग.)–सह्याद्रीच्या पायथ्याशीं ३०६.

मनणें—सक्रि. १ मानणें; पटणें; आवडणें. 'जरी उतरला धराभार। हें शारंगधर न मनीच।' –एभा १.२२०. २ ध्यानांत, लक्ष्यांत घेणें. 'कां निंदेचे घाय तिखट। एकही न मनी ब्रह्मनिष्ठ।' –मुवन ४.१२६. ३ वाटणें; भासणें. –एभा ३.६१. [सं. मन्]

मनन—न. विचार करणें; चिंतन; ध्यास. 'श्रवण म्हणिजे ऐकावें। मनन म्हणिजे मनीं धरावें।' –दा १८.१०८. **०शील**–वि. मनन, चिंतन, विचार करण्याचा स्वभाव असलेला.

मनवणें—अक्रि. मान्य होणें; मानलें जाणें. 'तेथ शुद्धीचिया आशा। तो लेपु न मनवे जैसा।' –ज्ञा १७.१०८. **मनविणें**–सक्रि. जागृत करणें; उद्युक्त करणें. 'चित्ता चेतविसी मना मनविसी सर्वेंद्रिया चाळिसी।' –निमा २.२.

मनवारी—वि. मनोरशाई लोखंडाची एक जात.–मुंव्या ९३.

मनशा-सा-स्या, मनीषा—स्त्री. इच्छा; वासना; हेतु; मनीषा पहा. 'आशा मनशा तृष्णा कल्पना।' –शिली १.१२७. [मन+आशा] **मनशामोड**–स्त्री. इच्छिलेली वस्तु मिळाल्यामुळें झालेलें समाधान; ७ खंड तृप्तता.

मनशी(सी, स)ळ—नपु. एक तांबूस रंगाचा औषधी धातु. [सं. मनःशिल]

मनसब, मन्सब—पु. १ (मुसलमानी अमदानींत) घोडदळांतील एक अधिकाराची जागा २ अमुक इतक्या घोडेस्वारांचें पथक पदरीं ठेवण्याचा अधिकार. ३ या हुद्दयाच्या दिमतीसाठीं दिलेली जहागीर. [अर. मन्सब्] **०दार**–पु. मनसब धारण करणारा अधिकारी; एक लष्करी हुद्देदार. [फा. मन्सब्दार्]

मनसुत्र-त्री—(अप.) मळसूत्र-त्री पहा.

मनसुबा-भा, मनसोबा—पु. १ उद्देश; हेतु; मनोगत. २ विचार; ठराव; मसलत. 'परंतु मनसुबा कांहीं लांबणीवर पडला आहे.' –समारो १.१३९. ३ युक्ति; हिकमत. ४ अंगीकृत कार्य; मोहीम. ५ मनसुबी पहा. [अर. मन्सुबा] **मनसुबदार**–वि. युक्तिवान्; अक्कल लढविणारा; कल्पक; योजना तयार करणारा. **मन्सुबेबाज**–वि. युक्तिवान्; अक्कल लढविणारा; मुत्सद्दी. 'शिपाईगिरीची व मन्सुबेबाजपणाची शर्त करून यशास पात्र व्हावें ऐसेंच आहा.' –पया ३३३. [फा. मन्सुबा+बाझ]

मनसुबी-फी, मन्सोबी—स्त्री. १ किरकोळ दाव्यांची चौकशी; न्यायनिवाडा; निकाल 'आमची मनसुफी नारो बाबाजी यांजपाशीं पडली.' –समारो ३.१२३. २ पंचाईत; लवाद; मध्यस्थी. [अर. मन्सब्; फा. मुन्सिफी] **मनसु(सो)बदार**–पु. न्यायकोर्टातील अधिकारी; मुनसफ; न्यायाधीश.

मन(सू)सूर, मन्सूर—पु. १ राजाचें आज्ञापत्र; सनद. २ मोहोर; शिक्का. 'वरी मनसुर सद्गुरुकृपेचा। दिशेब सकळांचा पुसिला।' –भवि ४५.६२. [अर. मन्शूर्]

मनसूर—वि. १ मदत झालेला. २ यशस्वी. –आदिलशाही फर्मानें. [अर. मन्सूर्]

मनसोटी—स्त्री. (कातकरी) मसणवटी; स्मशान. 'तुम्ही तें प्रेत मनसोटीवर घेऊन जा.' –मसाप १.३.३१. [मसणवटी]

मनस्वी—वि. १ मन स्वाधीन असलेला; मन जिंकणारा; संयमी. 'मृत्यु न म्हणे हा मनस्वी।' –दा ३.९.२६. २ बेसनदशीर; स्वैर वर्तनाचा; अमर्याद. ३ स्वच्छंदी; लहरी; छांदिष्ट (काम, वागणूक, स्वभाव, मनुष्य). ४ बेदरकार; निधडया छातीचा. 'स्वातंत्र्यासारख्या गोष्टी ज्यांना मिळवायाच्या

आहेत अशा जिगीषूंनीं मनस्वी म्हणजे लोकमान्य टिळकांप्रमाणें निधडया छातीचें झालें पाहिजे.' –धर्मशास्त्रविचार (काणेकृत). ५ पुष्कळ; अतोनात; विपुल; अतिशय. उदा० मनस्वी–पाऊस–ऊन–थंडी; मनस्वी उंच–खोल–लहान इ० क्रियाविषेषणाप्रमाणेंहि योजतात जसें–मनस्वी लिहितो–वाचतो. **मनस्वार**–वि. (क्र.) मनस्वी अर्थ ५ पहा.

मना—स्त्री. १ मनाई; प्रतिबंध. 'कोणी कोठडीत जाऊं लागेल त्यास मना करणें.' –सभासद ४२. २ निषेध; हरकत. –वि. बंद केलेलें; ज्याला प्रतिबंध करण्यांत आला आहे असा; निवृत्त; निषिद्ध; जप्त. (क्रि० करणें; होणें). [अर. मन्अ] **०चिठी**–स्त्री. पूर्वीचा हुकूम रद्द केला आहे अशा अर्थाची चिठी; (तगादा ०ं) मना करण्याविषयीचें पत्र; उलट हुकमाची चिठी; लेखी मनाई. **०मोबदला**–पु. देणें, घेणें इ० संबंधाचे संबंट युक्त्या प्रयुक्त्या करून टाळणें. (क्रि० करणें; होणें) **०रोखा**–पु मनाई हुकूम **मनाई**–स्त्री. १ बंदी; निषेध; प्रतिबंध. २ कुळाला तगादा न करण्याविषयींचा सावकाराचा हुकूम. **०पत्र**–न. प्रतिबंधक हुकूम. –रा ८.१५७. **०हुकूम**–पु. (कायदा) अमुक गोष्ट करूं नये अशाबद्दलचा कोर्टाचा हुकूम, ताकीद; (इं.) इन्जंक्शन.

मनाक—क्रिवि. १ क्षणभर. २ अल्प; किंचित्. 'विसरचि न पडावा मनाक।' [सं. मनाक्] **०स्पर्शस्वर**–पु. (संगीत) विवादी स्वर पहा.

मनावणी—स्त्री. मन वळविणें; आर्जव; मनधरणी. **मनाविणें**–सक्रि. वश करणें; अनुकूल करून घेणें; मन वळविणें. **मनेरा**–पु. १ मन. २ तगादा? –शर. ? **मनेरी**–वि. मनरूपी. –शर.

मनावर—न. (मुंबई) लढाऊ जहाज; गलबत. [इं. मॅन ऑफ वॉर]

मनि–नी—पु. राग. 'म्या नेणत याचा मनिहि न धरावा' –शिगीता १.१५. [सं. मन्यु=राग]

मनी—स्त्री. (बालभाषा) मांजर. 'ती पहा मनी आली। म्यांव म्यांव वाली। येग मने खेळूं आपण।' [ध्व]

मनु—पु. १ ब्रह्मदेवाच्या एका दिवसांत जे चवदा अधिकारी होतात ते प्रत्येक. प्रत्येक कल्पांत चौदा मनु असतात. चौदा मनु, मन्वंतर पहा. 'स्वायंभू मुख्य वडील। चारी मनु।' –ज्ञा १०. ९३. २ एक ऋषि व स्मृतिकार. ३ अनुकूल काळ; हंगाम. 'धान्य कापावयाचा मनु आला.' ४ मनुष्य; मानव. ५ (सांकेतिक) चौदा या संख्येबद्दल संज्ञा. [सं.] **०पालटणें**–(ल.) परिस्थिति बदलणें; क्रांति, मन्वंतर होणें. **मन्वंतर**–न. १ दुसरा मनु, काळ. २ मनूचा शक; देवांचे ७१ पर्याय (युगें) किंवा ३०,६७,२०,००० वर्षे; प्रत्येक मन्वंतरांत नवा मनु, इंद्र व इतर देवता येतात. ३ (ल.) (एखाद्याच्या उत्कर्षाची, वैभवाची सत्तेची) अमदानी; काळ; अनुकूल काळः हंगाम. 'तुमचें मन्वंतर गेलें माझें मन्वंतर आलें म्हणून म्यां तोंडीं भडकावल्या.' ४ क्रांति. 'सर्वत्र मन्वंतर फिरून जिकडे तिकडे अस्वास्थ्य, क्षणभंगुरता आणि अशाश्वती मूर्तिमंत दिसूं लागली.' –गुजराथचा इतिहास [मनु+अंतर]

मनुका—स्त्रीअव. वाळलेलीं काळीं द्राक्षें. एकवचन. मनूक. [अर. मुनक्का]

मनुज—पु. १ मनुष्य; मानव २ मानवजाति. [सं.]

मनुरी—स्त्री. (कों) ऊद; काळें मांजर; कांडेचोर.

मनुष्य—पुन. १ मानव जातीचा इसम; माणूस; मानव. २ कर्तृत्ववान्, पराक्रमी, समर्थ माणूस, पुरुष. 'राज्यांत कोणी मनुष्य नव्हता म्हणून राज्य बुडालें.' [सं.] **मनुष्यांतून उठणें**–१ लोकरीति, शिष्टाचार इ० सोडून वागणें; स्वैरवर्तन करणें. २ सर्वस्व गेल्यामुळें अत्यंत दीन, दीन विपन्नदशेप्रत येणें. ३ मरणोन्मुख होणें; मरावयास टेकणें; रोगामुळें व्यवहारांत निरुपयोगी होणें. (याच्या उलट) **मनुष्यांत येणें**–जम बसणें धंदा, व्यवहार यांची स्थिरस्थावर होणें. **(एखाद्या) मनुष्यास; हातीं धरणें**–१ एखाद्याला मदत करणें. २ त्याला मदतनीस घेणें. सामाशब्द– **०ऋण**–न. (मनुष्याला असलेलें कर्ज) मनुष्यानें करावयाचीं कर्तव्यें (समुच्चयानें, यामध्यें देवऋण, ऋषिऋण व पितृऋण अशा तऱ्हेचीं ऋणें फेडावयाचीं असतात). **०कला–ळा**–स्त्री १ मनुष्याचें कौशल्य, चातुर्य. २ मनुष्याची लुच्चेगिरी. विशेषतः आपल्याला ईश्वरी साक्षात्कार झाला आहे, आपण ईश्वराचे अंश आहों असें पसरविलेलें थोतांड. ३ (चेहऱ्यावर दिसणारें) तेज; कांति; मनुष्यलक्षणस्वरूप. 'याचे तोंडावर मनुष्यकळा नाहीं.' **०की**–स्त्री. मनुष्यपण पहा. **०गण**–पु. १ नक्षत्रांवरून पडलेल्या तीन वर्गांपैकीं एक; पूर्वात्रय, उत्तरात्रय, रोहिणी, भरणी आणि आर्द्रा ह्या नऊ नक्षत्रांवर जन्मलेल्या मनुष्यांचा वर्ग. बाकीचे दोन देवगण आणि राक्षसगण. २ मानवजाति. **०तीर्थ** न. तीर्थ पहा. **०देव**–पु. राजा. 'साची, असा असावा निश्चयचि तुझा मनुष्यदेवाचा।' –मोकर्ण २०.२३. **०पण–पणा**–नपु. १ मनुष्यानें मनुष्यार्शी किंवा समाजांत योग्य प्रकारें वागण्याचा स्वभाव; माणुसकी; सभ्यपणें, शिष्टाचारास धरून वागण्याची पद्धत. २ भलेपणा; दयाळूपणा; विनय इ० गुण. **०बल**–न. संख्याबल; संघबल; अनेक माणसांची मदत. (इं.) मॅनपावर. 'हें काम एकट्याचें नव्हे मनुष्यबल पाहिजे' २ मनुष्यामुळें प्राप्त होणारें सामर्थ्य (सैन्य, नोकर चाकर). याच्या उलट विद्याबल; द्रव्यबल इ० **०यज्ञ**–पु. १ पंचमहायज्ञांपैकीं एक; अथितिसंतर्पण. २ नरमेध. **०लोक**–पु. इहलोक; पृथ्वी. **०वाणी**–स्त्री. मनुष्याचा आवाज;

बोलणें. ०हानि-नी-स्त्री. मनुष्याचा नाश 'मनुष्यहानीसारखी हानी नाहीं.' **मनुष्यागम्य**-वि मनुष्याला साध्य न होणारें; मानवी शक्तीच्या बाहेरचें.

मनूख, मनुक्ष—पु. (अशिष्ट कुण.) मनुष्य. 'मनुखे वेषें अवत्रला।' -उषा ८६०. 'त्ये त्या मनुक्षानें जानाया होवे होते.' -हाकांध ५९.

मॅनेजर—पु. कारभारी; व्यवस्थापक; प्रमुख. [इं.]

मनेर, मनेरी, मन्यार—न. मणेर, मणेरी, मण्यार पहा.

मनेवार—पु. बंडखोर. 'आपण हरामखोर मनेवार चंजाउरकरास गोशमाल देऊनु सोडउनु घेउनु।' -इमं ६६. [अर. मन्अ?]

मनोती—स्त्री. १ मंडाई पहा. व्याजाखेरीज दिलेला जास्त मोबदला. २ रक्कम घेतांनाच कापून घेतलेलें व्याज. [हिं. मनौति]

मनोरा—पु १ आंतून पोकळ असा उंच स्तंभ (दगड, चुना इ०चा). २ विहीर इ०च्या बाजूस बांधलेला दगडी खांब; बुरूज. ३ दीपस्तंभ; दीपमाळ. मिनार पहा. [अर. मनारा]

मनोरा—पु. (व.) बारीक तुकडा; चीप. 'कांच पडला तर मनोरे मनोरे झाले त्याचे.'

मनोळी—स्त्री. (सुतारी वे) खोदण्याचें एक हत्यार.

मन्मथ—पु. मदन; काम. 'भीमकी पहातसे सभोंवतें। तंव वीर भेदिले मन्मथें।' -एरुस्व ७.५७. [सं.]

मन्या—स्त्री. मानेची मागची शीर. [सं.] ०**स्तंभ**-पु. ज्यांत मान इकडेतिकडे वळवितां येत नाहीं असा रोग; मान धरणें.

मन्यु—पु राग; क्रोध. [सं.]

मप-म—अ. गाडी, नांगर इ० हांकणाराच्या डाव्या बाजूच्या बैलास जलद चालण्याची इशारत द्यावयाचा शब्द. याच्या उलट उजव्या हाताच्या बैलास पप अशा शब्दानें इशारत देतात.

मप, मपस—शभ. माझ्याजवळ; मजपाशीं. 'मप नाहीं हत्यार मुसळाचा घाव लागला।' -ऐपो ७१. [मजपाशीं अप.]

मपला-ली-लें-वि. (व.) माझा-झी-झें. **मपासून, मपून**-क्रिवि. (घाटी) मजपासून; माझ्यापासून.

मपितला—वि. परिमित; मोजका 'मपितलां बोली बोलिजे।' -माज्ञा ६.३५०. [सं. मा=मापणें]

मफलीस—वि. गरीब, कामकरी वर्गोतील (सडा शब्दास जोडून सरकारी कागदपत्रीं उपयोग). सडामफलीस पहा. [अर. मुफ्लिस्]

मफौरा—पु. तीन पीळ असलेला गळ्यांतील अलंकारविशेष. 'माणीकीं खचीत मुडे मफौरा।' -धवळे उत्तरार्ध ४२ [का. मुप्पुरि=तीन पीळ]

मंबरेज—पु. टांचखिळा; आर [फा. मिह्मांझ्; हिं. मम्रीझ्]

मबादा—अ. १ देव करो तसें न होवो. २ कदाचित्. 'मबादा त्याजवळोन कांहीं तफावत नजरेस आला तर आम्हास सांगावें.' -रा १.४६. [फा. म+बादा]

मम—वि. (अस्मद्‌ची षष्ठी विभक्ति). (काव्यांत उपयोग) माझा. 'मम आत्मा गमला हा।' -स्वयंवर. [सं.] ०**म्हणणें**-१ आपला म्हणणें; स्वीकारणें. २ कबूल करणें, जाणें. ३ मान्य करणें. ४ कोणी जें म्हणेल त्याला संमति देणें: दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणें (भिक्षुक यजमानाला मम म्हणण्यास सांगून आपण पुढें त्याचीं वचनें उच्चारतो यावरून). ०**कार**-पु. माझेपणा; ममत्व. 'ममकार अहंकार त्यागुनि होसील मुक्त गेहींच।' -मोशांति ३.५१. ०**त्व**-न. माझेंपणा; ममता; प्रेम. 'कीं ममत्वें वसुदेवा-। दिकां सकळां।' -ज्ञा ९.४६७.

ममता—स्त्री. १ आपलेपणाची, आत्मीयतेची भावना; माझेपणा. २ माया; प्रेम; प्रीति. ३ महत्त्वाकांक्षा; अभिमान. ४(ल.) मत्ता. [सं. ममत्व; प्रा. ममत्त; हिं.] ०**लावणें-लावून घेणें**-प्रेमळ वर्तनानें दुसऱ्याची प्रीति संपादणें. ०**ग्रह**-पु आपलेपणाची भावना. (क्रि० करणें). **ममतालु-ळू**-वि. मायाळु; दयाळु; प्रेमळ. **ममतास्पद**-न. ममत्वबुद्धि ठेवण्याला, प्रेमाला पात्र; प्रेमाचा विषय (मूल, बायको इ०). [ममता+आस्पद] **ममतेशील**-वि. मायाळु; प्रेमळ. 'कुशल ज्या त्या ममतेशील धनि।' -ऋफला ४९.

ममलकतमदार—पु. (राज्याचा आधारस्तंभ) एक किताब. 'संताजी घोरपडे यांस हिंदुराव ममलकतमदार ऐसा किताब दिल्हा.' -मराचियोरा चरित्र पृ. ३३. [फा. मम्लुकत्-मदार]

ममालिक—पु. देश; राज्य. [अर. ममालिक-मम्लुकतचें अव.]

ममुला—पु. (ब.) अतिशय जाडी भाकर; रोट; रोडगा.

मम्नुनी—स्त्री. अजिजी; मनधरणी. 'त्यांची मम्नुनी करून आपली तक्सीर माफ करून घेऊन.' -दिमरा १.७५. [अर. मम्नूनी]

मय—स्त्री. एक रानटी जनावर.

मय—अ. एक संस्कृत प्रत्यय. १ भरलेला; पूर्ण; व्याप्त. समासांत उत्तरपदीं येतो. उदा० जल-आनंद-वृक्ष-धान्य-मय. 'समुद्रांत जाऊन पाहिलें तों जलमय सर्व दिसूं लागलें.' २ एखाद्या (वस्तूचा) केलेला; बनविलेला उदा० सुवर्ण-धातु-सिकता-मय. 'सुवर्णमय प्रतिमा करावी।' [सं.]

मयंक—पु. चंद्र. 'जैसा तारांमाजी मयंक शोभायमान।' -कथा ३.३.१९. [सं. मयु=हरिण+अंक=चिन्ह] ०**पत्र**-न. चंद्राकृति निशाण, ध्वज. 'त्राहाटलीं नेणों मयंकपत्रें।' -वेसीस्व ६.७५.

मयत, मयतगहाणा, मया, मयातैन—मैयत इ० पहा.

मयदा, मयदान, मयदालकडी, मयल, मयलखोर—मैदा, मैदान मैदालकडी, मैल, मैलखोर, इ० पहा.

मयना—पु. एक पक्षी. मैना पहा.

मयना—पु (विरू.) मायना, माना पहा.

मयाल—स्त्री. (ना. व) तुळई.

मयासुर—पु एक शिल्पकार राक्षस. [सं. मय+असुर] **मयासुरी प्रकार**–पु (क.) नाटकी, खोटी, घटोत्कची गोष्ट.

मयाळ—वि. १ मवाळ; २ मायाळु. 'आर्तांसी निःहां मयाळु।' –दाव ३९४. [मवाळ]

मयाळ-ळी—स्त्री. एक प्रकारची भाजी.

मयूख—पु. १ सूर्यकिरण; प्रकाशकिरण; तेज; कांति. २ (धर्मशास्त्र) एक टीकाग्रंथ. [सं.]

मयूर—पु. १ मोर; एक सुंदर पक्षी. २ तुरा; मयूरशिखा; ३ एक वनस्पति. [सं.] **०कुंचा**–पु. मोराच्या पिसाची चवरी. 'मयूरकुंचे ढालिसी श्रीहरी।' –महिपतीकृत पांडुरंगस्तोत्र ७७. **०पत्र**–न. मोराचें पीस. 'तया मुकुटाचे तळवटीं। मुक्तमयूर पत्रांची वेटी।' –एहस्व १.६५. **०पिच्छ**–न. मोराचा पिसारा. 'मस्तकीं मुगुट आणि किरीटी। सभोंवतीं झिलमिळ्यांची दाटी। त्यावरी मयूरपिच्छांची वेटी।' –व्यं ६९. **०ललित(करण)**–न. (नृत्य.) पाय वृश्चिक करून व पाठीमागें पुष्कळ वळवून पाठीमागेंच उंच करणें, हात रेचित करणें व त्रिक वांकडें करणें. **०शिखा-शिख-शिखर**–स्त्रीन. १ एक फुलझाड. २ (ल.) करडई. **मयूरासन**–न. एक योगासन. हाताचे तळवे जमीनीवर टेवून कोंपरावर शरीराचा तोल सांभाळणें. [मयूर+आसन] **मयूरी**–स्त्री. १ मोराची मादी; लांडोर. २ एक प्रकारची अश्व गति. 'तों निघाल्या अश्वरत्नांच्या हारी। दाखविती गती नाना परी। उष्ट्री नाकुळी हंसी मयूरी।' –जै ४.२२. **मयोर**–पु. (अप.) मयूर; मोर.

मये—शअ. सह; बरोबर; 'शामजीपंत टकले मये लक्ष्मण पंत गेले होते.' –रा १.१८४. [फा. मइ.]

मर—स्त्रीन. (पीक, झाड, लाकूड, दगड, कापड इ० चा) सडलेला, मेलेला, किडलेला, नाश पावलेला भाग. २ पूर्णपणें जळून गेलेलें पीक. ३ पिकावरील कीड. 'भांगलतांना मर असेल ती काढून जाळून टाकावी.' –शेतकी-शेतकरी २.११ –न. कुंभार इ० च्या भट्टींतील पूर्णपणें जळून गेलेलें जळवण. याच्या उलट करळ. –स्त्री. मरण्याची स्थिति; मरणोन्मुख अवस्था. (क्रि० येणें; लागणें; मरीस येणें-जाणें.) [मरणें] **मरीं जाणें**–मरणाच्या पंथास लागणें. **मरीं मरणें**–जिवाकडे न पाहतां अतिशय काबाडकष्ट करणें. **मरीस येणें-जाणें**–मर येणें.

मरक—न. अपस्मार; फेपरें; घुरें. [सं.]

मरकत, मरगज—पु एक प्रकारचें रत्न; पाच. 'जैसा परिमळ जाहला मरगजा।' –ज्ञा ११.६०१. [सं. मरकत]

मरकब—पु.न. १ वाहन. २ (जकातखात्यांत) गाडवं. [अर. मरकब्]

मरक(कु)ळी—स्त्री. मर (–स्त्री.) पहा.

मरकाड—स्त्री. (व.) अवकृपा; संकट. 'आमच्यावर सगळी मरकाड खचली.'

मरकाड्या—वि. अत्यंत अशक्त माणूस; रोडका; मरतुकडा. [मरणें+काडी]

मरकेपणा—पु. (व.) ढोंगीपणा.

मरगड—स्त्री. (ना.) मरणाची सांथ; मरगळ.

मरगण-त, मरग(क)ळ—स्त्री. थकल्यामुळें येणारी अर्धमेल्यासारखी स्थिति; थकवा; ग्लानि. मर–मरकळ पहा. [मरणें+गळणें] **०घेणे-मारणें, मरगणें, मरगळीस येणें**–१ अतिशय दमल्यामुळें पडणें, अंग टाकणें ग्लानि येणें. २ दमल्याचें ढोंग करणें (हट्टी बैल, घोडा, माणूस यानीं)

मरग(क)ळ—वि. अगदीं दमल्याचा बहाणा करून बैठक मारून बसलेला (माणूस, जनावर). **मरगळणें**–अक्रि. दमून जाणें; निःत्राण होणें; शक्तिपात होणें. **मरगळा घेणें**–जागा सोडून न हालणें.

मरगी-की—स्त्री. १ महामारी; सांथीचा रोग. २ भोंवळ; चक्कर; घेरी. ३ फेपरें; अपस्मार. [सं. मरक]

मरगूत—स्त्री. १ मृत्युगति; मरणावस्था. २ दुर्दैवाची परमावधि; मृत्यु. (क्रि० येणें; भरणें; घेणें; मरगुतीस येणें) 'त्याला मरगुतीनें घेरलें तो काय वांचायचा?' ३ मरगळ पहा. [मरणें+गति]

मरचला—पु. वालाचा एक प्रकार. याच्या शेंगेचें सालपट नरम असतें. –कृषि ३३२.

मरज—पु मरकत पहा.

मरजसत्ताक्का—पु. घोडयाचा एक रोग. हा ठेंच लागल्यामुळें होतो. –अश्वप २.२९९. [अर. मरज्=रोग]

मरड—स्त्री. (गो.) १ कमी पाण्याची भातशेती. २ माळ जमीन. [का. मलर=खडे, वाळू]

मरडादहीं—न (व.) साय काढून घेतलेल्या दुधाचें दहीं.

मरडी टांकळी—स्त्री. टांकळयाची एक जात.

मरण—न. १ मृत्यु; प्राण जाणें. २ (ल.) हानि; तोटा; नुकसान. 'सोन्याचे नाण्यास कोठेंहि मरण नाहीं.' न्यूनता नाहीं असें बेधडक सांगतांना योजतात. 'उदा० या व्यापारांत शंभर रुपयास मरण नाहीं' (निंखालस मिळतील). ३ मोठा धोका;

संकट. ४ जिवावरची गोष्ट; प्राणाशीं गांठ; प्राणसंकट. 'त्या मार्गानें जाऊं नको, तेथें मोठें मरण आहे.' ५ अत्यंत अप्रिय, कंटाळवाणी गोष्ट. 'लोकाजवळ कर्ज मागणें हें मला मोठें मरण आहे.' [सं.] (वाप्र.) **०जाणणें-समजणें-कळणें-कळूं लागणें**-संकटाची जाणीव होणें. **(कोणाच्या घरीं) मरणाची वाजंत्रीं वाजणें**-कोणत्याहि संकटाला तोंड देणें; मरण्यास तयार असणें. **मरणाच्या दारीं बसणें-पंथास लागणें-टेकणें**-आसन्नमरण होणें; आतां मरतो कीं मग मरतो अशा स्थितींत असणें. **मरणादारीं कीं तोरणादारीं (जावें इ०)** शुभ-प्रसंगीं किंवा अशुभ प्रसंगीं हजर रहावें. **मरणानें जिंकलेला-जिंकला**-वि. मरावयास टेंकलेला; मरणद्वारीं असलेला. **मरणामाथां-माथेस येणें-पावणें**-मरायला लागल्या-प्रमाणें होणें; पूर्णपणें थकून जाणें. 'हा पांच कोस जमीन चालला म्हणजे मरणामाथां येतो.' **मरणाला रात्र आडवी करणें**-मरण, एखादा कठिण प्रसंग कांहीं तरी युक्ति योजून लांबणीवर ढकलणें. **मरणीं घालणें**-मरूं घालणें. 'ऐसा कळलाव्या नारद-मुनी। मरणीं घातल्या कृष्णकामिनी।' -जै ७१.१११. **मरणीं मरणें**-१ एखाद्यासाठीं मरण पतकरणें; जीव धोक्यांत घालणें. २ एखाद्याच्या सेवेस तत्पर असणें. **(आजचें) मरण उद्यावर लोटणें**-सध्याचा कठिण प्रसंग लांबणीवर टाकणें. **(आपल्या) मरणानें मरणें**-१ नैसर्गिक रीतीनें मरणें. २ (स्वतःच्या दुष्कर्माबद्दल शिक्षा म्हणून) स्वतःवर संकट ओढून घेणें. **(उद्याचें) मरण आज आणणें**-कालांतरानें गुदरणारा अनिष्ट प्रसंग आतांच ओढवून घेणें. **खितपणीचें मरण**-न. खितपत पडून राहिल्यानंतर प्राप्त होणारें मरण. 'ज्या अंगावरी केलें शयन। तेथून अंग हलवूं नेणे। खितपणीचें आलें मरण। निंदकजन बोलति।' सामाशब्द- **०कळा**-स्त्री. आजार, काळजी इ० मुळें चेहऱ्यादर येतो तो फिकटपणा; निस्तेजपणा; प्रेतकळा. **०तरण**-न. मरणें आणि जगणें; मृत्यु आणि जीवन. 'मरणतरण ईश्वराचे स्वाधीन.' **०दशा**-स्त्री. कठिण प्रसंग; जिवावरचें संकट. **०पंथ**-पु. मृत्यूचा मार्ग. (क्रि० टेंकणें; लागणें.) **०प्राय**-न. मरणा-सारखें संकट. 'कोणी मागितलेली वस्तु नाहीं म्हणावयास मला मरणप्राय होतें. -वि. मरणाइतकें दुःसह, कठिण. **०मूळ**-न. १ मरणास बोलावणें. 'मज न्यावया आला उतावीळ। तत्काळ झाला मरणमूळ।' -कथा १.६.९१. २ अत्यंत त्रासाचें, कष्टाचें काम; जिवावरची गोष्ट; जीवघेणा प्रसंग. **०सोंग-सोघ**-नपु. मरणाचें केलेलें ढोंग, बहाणा. (क्रि० घेणें; आणणें) **मरणा**-वि. (राजा.) अगदीं मरावयास टेकलेला; अत्यंत अशक्त; मरतुकडा. **मरणेच्छा**-स्त्री. मरणाची इच्छा. **मरणोन्मुख**-वि. आसन्नमरण; मरणाच्या पंथास लागलेला. **मरणें**-अक्रि. १ मरण पावणें; वारणें. २ शुष्क होणें; वाळणें; कोळपणें; कोमेजणें (झाड, रोप इ०). ३ (ल.) (दिलेलें कर्ज, व्यापारांत घातलेलें भांडवल इ०) बुडणें; नुकसान पावणें; किफायतशीर न होणें ४ (मुलांच्या खेळांतील गडी, सोंगटी इ०) निरुपयोगी, बाद होणें; खेळांतून निघणें. 'दोन गडी मेले.' ५ थंडीनें कडकून जाणें; नाश पावणें. ६ (पारा, सोनें इ० चा) गुणधर्म नाहींसा होणें; भस्मदशा पावणें. ७ संवेदनाशून्य होणें; बधिर, मद्दड होणें. 'नित्य मार खाल्ला असतां पाठीचें रक्त मरतें.' ८ आटून जाणें; नाहींसें होणें (पाणी, रक्त, रस, ओलावा इ०). ९ बरें होणें; नाहींसें होणें. (खरूज, नायटा इ०). १० (खड्यांत) सांठून रहाणें; न वहाणें (पाणी). ११ कंटाळवाणा होणें; फुकट जाणें; निरुपयोगी होणें (वेळ). १२ मोडणें; जाणें; नाहींशी होणें (तहान, भूक, वासना इ०-वेळेवर तृप्त न झाल्यामुळें). 'पाहण्याविषयीं त्याची दृष्टि मेली.' १३ उडणें; नष्ट होणें; लुप्त होणें (आशा प्रीति, इच्छा, मनोवृत्ति इ०). १४ ताजेपणा, सत्त्वांश नाहींसा होणें; बेचव होणें (पाणी इ०). १५ दुखणाईत होणें; आजारानें खितपत पडणें. 'हा तीन वर्षें मरतो आहे.' १६ पराकाष्ठेचा तोटा, नुक-सान सोसणें. 'त्या साखरेच्या व्यापारांत हा हजार रुपयाला मेला.' १७ अत्यंत कष्ट सोसणें; जिवापाड काम करणें; कामानें बेजार होणें. 'तुम्ही सारे बसतां आणि म्यां एकट्यानें मरावें हें ठीक नाहीं.' १८ अतिशय उत्सुक, उत्कंठित होणें; उतावीळ होणें. 'एवढा मरतोस कां? उद्या तुझें काम होईल.' १९ खालीं बसणें; कमी होणें (धूळ.) **(दृष्टि, नजर) मरणें**-एखादी वस्तु नित्य पाहण्यांत आल्यानें तिजविषयीं औत्सुक्य कमी होणें; उदासीनता येणें. **मरण्याजिण्यास उपयोगी (कामास) पडणें**-ऐन अडचणीच्या प्रसंगीं उपयोगी येणें. **मरतां मरतां वांचणें**-भयंकर दुखण्यांतून, प्राणसंकटांतून वांचणें. **मरतां मरतां हातपाय झाडणें**-शेवटचा जोराचा प्रयत्न करून पाहणें. **मरमरून जाणें-पडणें**-अतिशय आसक्त, उत्कं-ठित, उत्सुक होणें; वेडा होणें. **मरस मरे**-क्रिवि. अत्यंत श्रमानें; कष्टानें. **मरीं मरणें**-जिवाची पर्वा न करतां कष्ट करणें. **मरूं घालणें**-मरणार म्हणून टाकून देणें; मरणाच्या दारीं असणें, ठेवणें. 'तरींच मरूं घातला कुमर। हा तयावरी अपटावा।' **मरूं घातलेला**-वि. मरणार अशा समजुतीनें सोडून दिलेला. **मरून जिणें**-पुनर्जन्म होणें; मरतां मरतां वाचणें. 'गोविंदामृत-दृष्टिवृष्टि करितां आतां मरूनी जितों।' **मरून पडणें**-अतिशय मोठे घोस, झुबके येणें (झाडावर फळांचे) 'आबे यंदा मरून पडले आहेत.' **मरूं मरुं करणें**-लवकरच प्राण जाईल असा रंग दिसणें. **मरोमरोसें (मरेमरेसें) करणें**-सतावणें; गांजणें; अत्यंत त्रास देणें. **मेला जसा**-वि. अति शरमिंदा; लज्जित;

मेल्यासारखा. **मेल्याचा पाड जाणें-होणें**–१ हलका लेखिलें जाणें; मान्यता कमी होणें २ गोंधळणें; गर्भगलित होणें.

मरत—वि. मेलेलें; मृत. [सं. मृत] **०मडें ढें**–न अतिशय अशक्त मनुष्य; मरतुकडा. **०मढ्यासारखा**–वि. कृश; अशक्त. **०वड-वडा**–स्त्रीपु. मरणाची सांथ. (क्रि० येणें.) **०वांझ-ज**–स्त्री. १ जिचीं मुलें लहानपणींच मरतात अशी स्त्री 'वांजपण संदिसे गेलें । तों मरतवांज नांव पडिलें ।' –दा ३.३. ३९. २ (कन्हाडी) मरतांना एकहि मूल जिवंत नसलेली स्त्री. **०संभाळ**–पु. १ मरावयास टेकलेलें माणूस, पशु इ०ची शुश्रूशा. २ प्रेमपूर्वक केलेलें संगोपन; आस्था; काळजी. (क्रि० घेणें). ३ कोणत्याहि गोष्टीचा केलेला अतिरेक (जेवण, झोंपणें, बसणें, लिहिणें इ०चा); शेवटपर्यंत पिच्छा पुरविणें. (क्रि० घेणें). **मरतडणें**–अक्रि. मरावयाच्या बेतांत असणें; मरावयास टेकणें. **मरता आहार**–पु. मरणोन्मुख माणसाचें शेवटचें खाणें. **मरताक**–न. (कुण.) १ मृताची और्ध्वदेहिक क्रिया; दिवस. २ मरण; मृत्यु. ३ मृत मनुष्य; प्रेत; मुडदा. [सं. मृतक] **मरती कळा**–स्त्री. १ मरणाच्या वेळीं चेहऱ्यावर येतो तो फिकटपणा; प्रेतकळा. २ आजाऱ्यासारखा दिसणारा माणूस. **मरती भावना**–स्त्री. मरण जवळ येऊन ठेपलें आहे असें जीवरून समजतें अशी मुद्रा. **मरती रात्र**–स्त्री. ऐन रात्रीचा समय. (स्वतःचें म्हणणें खरें आहे हें ज्यांना साक्षी ठेवून दाखवावयाचें त्यापैकीं एक प्रमाण). 'मरती रात्र झाली आहे खोटें बोलत नाहीं.' काळी रात्र, भरल्या बंदाखालीं बसणें पहा. **मरतुकडा, मरतुं(तें)गडा**–वि. अगदीं अशक्त; रोडका; मरतमढें. **मरमर**–स्त्री. १ धोक्याच्या परिस्थितींत, प्राणावरच्या संकटांत अविचारानें शिरणें; फाजील धाडसी, साहसी वृत्ति (वेडपा, कैदाशीण इ०ची). (क्रि० येणें; लागणें; घेणें). २ उपहास; टवाळकी. **म्ह०** आपली हाण (हानि) आणि जगाची मरमर. ३ कुरकुर. 'पाठी बैसला दावेदार । जाली मरमर संसारीं ।' **०घेणें**–१ अत्यंत क्षीण, मरणासन्न होणें. २ मरणाची धास्ती घेणें; हाय खाणें. **मरमरा, मरवडा**–पु. १ मरमर अर्थ १ पहा २ (निंदार्थी) पराकाष्ठेचा अशक्तपणा; मरणप्राय स्थिति. 'तुला काय मरवडा आला!' **मरवड**–स्त्री. मरण, रोग इ०ची साथ (माणूस, जनावर इ०ची).

मरतबा—पु. दर्जा; पदवी; योग्यता [अर मर्तबा]

मरद, मरदगाजी, मरदमाणूस, मरदा, मरदाना, मरदाई, मरदानी—मर्द, मर्दगाजी इ० पहा.

मरदणें, मरदळणें—सक्रि. १ चोळणें; मर्दन करणें (तेलानें अंग, वाळूनें फरशा इ०). २ चेपणें; रगडणें; मर्दन करणें. ३ (आकाश ढगांनीं) आच्छादित होणें; व्यापणें. [सं. मर्दन]

मरफा—पु. एक प्रकारचें वाद्य; लहान टिमकी, नगारा. मर्फा पहा. [फा. मर्फा] **मरफेकरी**–पु. मरफा वाजविणारा.

मरमत-तलब—वि. मरामत मागणारा. दुरुस्ती पाहिजे असलेला. 'जागा मरमततलब आहे सबब दुरुस्ती करावयास माणसें लाऊन ...' –रा ७.२१९.

मरल-ळ—पुस्त्री. गोड पाण्यांत राहणारा एक उंची मासा. याची लांबी सुमारें ३ फूट असते. [सं. मरोली]

मरवा—पु. एक सुगंधी वनस्पति. [सं. मरुक; प्रा. मरुअ; हिं. मरुआ–वा]

मरशा—पु. शोकगीत (विशेषतः हसन आणि हुसेन त्यांच्या विषयीं मुसलमान लोक मोहरमांत गातात तें गीत). [अर. मर्सिय]

मरहूम—वि. मृत; माजी; कैलासवासी. [अर. मर्हूम्]

मरळ—स्त्री. मरगळ पहा.

मरळदंडी—स्त्री. (वे.) गर्भाधानाचा दुसरा दिवस. [का.]

मरळा—वि. अतिशय थकलेला; अशक्त. 'पाहतां दिसतो गोठ्यांतिल पशु बैल तसा मरळा ।' –देप ९९. [मरण–मरगळणें]

मराठ, मऱ्हाट—वि. (ल.) १ स्पष्ट. २ सोपें. –मनको. 'स्वभावें तयाचें मऱ्हाट बोलणें' –दावि ३९०. [महाराष्ट्र]

मराठा—वि. १ मराठी देश, लोक इ०संबंधीचा; महाराष्ट्रीय; दक्षिणी. २ महाराष्ट्रांतील क्षत्रिय जात (ब्राह्मण आणि कुणबी यांच्या मधली). यांना कधीं राव, मराठे असें म्हणतात. हे वेदोक्त संस्कार करतात. ३ (सामा.) कुणबी, शूद्र लोकांबद्दल योजावयाचा शब्द. ब्राह्मण–पांढरपेशे आणि अस्पृश्य यांच्या मधला वर्ग. [सं. महाराष्ट्र; प्रा. मरहट्ठ, मरट्ठ] **मराठी**–स्त्री महाराष्ट्रांतील मुख्य प्रचलित भाषा. 'मराठी असे आमुची मायबोली ।' –वि. मराठे लोकांसंबंधीचा; मराठ्यांचा. **०कावा**–पु. मराठे लोकांचा स्वाभाविक धूर्तपणा; कावेबाजपणा. **०भाषा**–स्त्री. संस्कृत–प्राकृतापासून झालेली एक भाषा; मराठी. **०मोळा, मराठमोळा**–पु. १ मराठे लोकांतील चालीरीति (समुच्चयानें); बाळबोध वळण. 'तुम्ही आपणास पवार म्हणवितां पण तुमच्या घरीं मराठमोळा दिसत नाहीं.' २ (विशेषतः) मराठ्यांतील बुरखा, पडद्याची चाल; कुलीनपणा; जुनें वळण. 'मराठमोळा तुझा । जपुन चाल लोक छिनाल म्हणतील नको नारी उडवु भुजा ।' –होला १४३. **०वैखरी**–स्त्री मराठी भाषा. 'मी बोलिलों मराठी वैखरी ।' –विपु ७.१४७. **मराठेशाही**–स्त्री. मराठ्यांचें राज्य, अमदानी. 'निपजणार कोण धनाजी । तारण्या मराठेशाही–यापुढें ।' –विक १०. **मराठेशाही पागोटें**–न. पागोट्याची एक तऱ्हा.

मराठी—स्त्री. एक औषधी वनस्पति. हिचीं फुलें पिवळीं असुन अकलकाऱ्यासारखा त्यांचा उपयोग होतो. वगु –४.१२८.

मराड—पु. पावसाळ्यांत भिजल्यामुळें निरुपयोगी झालेला घरावरचा पेंढा. –बदलापूर २६. **मराडी**–वि. केंबळी; पेंढ्यानें शाकारलेलीं (घरें). –बदलापूर २६.

मरात(ती)ब—पुस्त्री. १ (विद्या, पराक्रम इ० बद्दल) पदवी; सन्मानार्थ योजावयाचा शब्द.जसें-भट्टाचार्य; समशेरबहादर. 'राजे असा मरातीब मेळविला.' -रा ४.२३. २ दर्जा; बहुमान. 'त्यांचा मरातब दादासाहेबांनीं वाढविला.' -रा १९ ९१. ३ -अव. गोष्टी; मजकूर. 'लिहावयाचे मरातब बोलण्यांत येतील त्या प्रमाणें तुम्ही लिहावें.' -रा५.१५६.[अर. मरातिब्-मर्तबाचें अव.]

मरादबा— पु. स्नेहसंबंध; मैत्री. 'मला पत्र दोस्तीचें मरादबाचें आहे.' -रा ५.१५९. [अर. मुरावत]

मरांदा—पु. (राजा. कु) कोंब आलेल्या नारळाच्या पोटांत बनतो तो मगज.

मरामत, मरम(म्म)त—स्त्री. १ चांगल्या स्थितींत राखणें; दुरुस्त ठेवणें. २ दुरुस्ती; डागडुजी; निगा; सांभाळ, (क्रि०राखणें; करणें). 'येथें हवेलीचे मरामतेस दीडशें रुपये लागले. हवेलीची ज्या ठिकाणीं जरूर मरमत करणें होतें तेथें केली आहे.' -रा ६. ५९२. ३ नांगरणें, खत घालणें इ० (शेताच्या मशागतीतील); (कणीक) तिंबणें; घोळसावणें; (चिखल नरम करण्यासाठीं) तुडविणें; (रेशीम) कातणें; स्वच्छ करणें, (एखादे मिश्रण बनवितांना), मिसळणें, मर्दणें, वाटणें इ० अनेक कामें (समुच्चयानें). ४ (चुकीनें) करामत; खुबी; चातुर्य. 'या पुरुषाची मरामत दुसऱ्यास येणार नाहीं.' ५ (चुकीनें) मरातब. [अर. मरम्मत]

मरामर-मरी—स्त्री. मरणाची, आजाराची फार मोठी साथ. (क्रि० चालणें; लागणें; होणें). [मरणें]

मराल-ळ—पु. (काव्य) हंस पक्षी. 'आले दैवें कदाचित मराळ।'-मोकर्ण २८.१७ [सं. मराल] **मराळिका, मराळी**-स्त्री. १ (काव्य) हंसी. २ देवी; देवता. 'जयजय कासारमराळिके।' ३ सुंदर, नाजूक स्त्री.

मरिगळा-गळ—स्त्री. आकार; आकृति; मूर्ति. 'सकळ देखिलें रणमंडळ। परि न देखे दक्षमरिगळ।'-कथा ३.१४.२०५.

मरी—स्त्री. १ साथ (पटकी इ०ची); जरीमरी. २ आसन्न मरणाची स्थिति; मरणदशा. 'माझी आई मरीस आली.' [सं. मरक] **०आई**-स्त्री. अडाणी लोकांची एक देवी. मृत्युदेवता; साथीची देवता. 'मरी आईचा कोरडा वाजतो।' -भज ७४. 'मरीआई रोडगा वाहिन तुला।'

मरीच—न. काळी मिरीं. 'जीरें, शुंठी मरीचे हळदि बहुतशी हिंगही दारचीनी।' -सारुह ३.४८. [सं.]

मरीयल, मरेल—वि. (ना.) निस्त्राण, मरतकुडा (मनुष्य). [मरणें]

मरु—पु १ मारवाड देश. २ निर्जल, रेताड प्रदेश; वाळवंट. ३ एक पर्वत. [सं.] **०देश-धन्व-भूमि**-१ मारवाड. २ निर्जल, ओसाड प्रदेश. 'तृषार्ता मरुदेशीं। झळे अमृतें वोळली जैसी।' -ज्ञा १८.१६१.

मरुआ—स्त्री. एकप्रकारचें धान्य; नाचणी. -कृषि २८२.

मरुत—पु. वायु; वारा. [सं.] **०सख**-पु. अग्नि **मरुद्गण**-पु. एक देवतावर्ग. यांत ४९ देवता आहेत. 'मरुद्गणांच्या वर्गी। मरीचि म्हणे मी शार्ङ्गी।' -ज्ञा १०.२२२. [सं.]

मरूळ—वि. वालुमिश्रित; पुळणवट; रेताड (जमीन, भुई, देश, प्रांत, शेत, रान इ०). **०फडाची**-वि. दोन नद्यांच्या संगमाजवळच्या बेचक्यांतील सोंडाची (जमीन). -कृषि १६.

मरोड—स्त्री. अत्यंत आजारीपणाची स्थिति. (विरू). मरवड पहा.

मरोड, मरोडकानवला, मरोडशेंग, मरोडणी, मरोडणें—मुरुड इ० पहा.

मरोडा—पु. पोटदुखी; मुरडा. (क्रि० येणें; होणें; निघणें; उठणें; करणें). [मुरडा]

मरोडा—पु. जनावरास होणारा सांथीचा रोग; मरी; मरवडा पहा.

मर्कट—पु. माकड; तांबडया तोंडाची एक वानरजात. 'आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला।' [सं.] **०चेष्टा**-स्त्री. पोरकट चाळे, खोडया; माकडचेष्टा.

मर्कूम—वि. लिखित; लिहिलेलें. 'आं साहेबांनीं मुसफल मर्कूम केलें तें जाहीर आलें.' -पया ४८४. [अर. मर्कूम्]

मर्गज—पु. पाच; मरकत. 'सांडूनी कठिणत्वांचें डिंब। सचेतन मर्गजस्तंभ।' -एरुस्व १.२५. [सं] **मर्गजामणी**-पु मरकतमणी. 'मर्गजामणीचे घोषें।' -शिशु ४०९.

मर्गळ—वि. अडाणी. -शर. मरगळ पहा.

मर्जी—स्त्री. १ संमति; इच्छा; आवड; पसंती. 'यजमानाचे मर्जीप्रमाणें वर्तावें.' २ सुप्रसन्नता; कृपा; लोभ. 'आताशीं त्याजवर मर्जी आहे.' ३ स्वभाव; तब्यत; अंतःकरणवृत्ति 'त्या पुरुषाची मर्जी कठीण.' [अर. मर्झी] **म्ह०** मर्जी देवाची मिथ्या धाव मनाची. **०खप्पा-बारीक होणें-जात राहणें**-नाखूष असणें; आवडेनासा होणें 'श्रीमंत स्वामींची बहुतच मर्जी बारीक जाली आहे.' -रा १ २२८. **०जिंकणें**-आपलासा करून घेणें; भीड, दरारा चेपणें; भीति नाहींशी होणें; ऊब जिंकणें पहा. **मर्जीतून उतरणें-जाणें**-आवडेनासा होणें; लोभ कृपा नाहींशी होणें. **०बसणें**-लोभ जडणें. **०मोडणें**-एखाद्यास अप्रिय असें कांहीं करणें; मन मोडणें; मर्जीविरुद्ध वागणें. **०राखणें-संभाळणें**-एखाद्याची कृपा, लोभ टिकवणें; नाखूष न होईल अशा तऱ्हेनें वागणें. **०संपादणें**-कृपा, लोभ संपादणें. **मर्जीस उतरणें**-आवडणें; मनास येणें; पसंत पडणें. **०अजूर-आजू**-स्त्री.

इच्छा. –दिमरा १.२२२. ०खेरीज–क्रिवि. आज्ञेबाहेर; इच्छेबाहेर. 'आम्ही आजतागायत तुमच्या मर्जीखेरीज नाहीं.' –दिमरा २.१३४. ०माफक–क्रिवि. मर्जीप्रमाणें (करणें, होणें इ०). ०मिजाज–स्त्री. प्रकृति; तब्येत. 'नबाबाची मर्जीमिजाज विलक्षण जाली.' –रा ३.४११. ०मुबारक–स्त्री. शुभेच्छा. 'स्वामींचे मर्जी मुबारकेंत आल्यास मी विजयदुर्गाहून पुण्यास येईन.' –ऐटी १.६७. ०रक्षण–न. मर्जी, इच्छा, कृपा सांभाळणें. ०संपादन–न. कृपा, लोभ संपादन करणें.

मर्तबान—न. चिनी मातीचें भांडें; बरणी. 'तीन जोडया मर्तबानाच्या चिनीच्या, वरतीं झाकणी कुलाबेदार कुलफी मजबूत...' –रा २२.३५. [अर. मर्तबान्]

मर्त्य—पु. मनुष्य; मानव. –वि. मरणशील; मरणारा. [सं.]

मर्द—पु. १ पुरुष. 'गांजाचा अम्मल दारुवानी बायकी नव्हं, गांजा मर्द हाय मर्द' –बाय ४.२. २ शूर, पराक्रमी, हिंमतदार मनुष्य. 'पैका नामर्दाचा इज्जत व यश मर्दाचें.' –ब्रच ८८. ३ नवरा; स्त्रिया आपल्या नांवापुढें व नवऱ्याच्या नांवापूर्वी योजतात. ४ रखेली (महारीण, कैकाडीण) आपल्या यजमानाच्या (विशेषतः मुसलमान) नांवापूर्वी हा शब्द पत्रांतून योजिते. 'राणू मर्द हशमखान खडोबाले.' [वैसं. मर्य; फा. मर्द्] ०गाजी–माणूस–पु. शूर, मर्द गडी; पराक्रमी माणूस. **मर्दा, मर्दाना–नी**–वि. १ शूर; धैर्यवान. –मराआ ३६. २ (विशेषतः मर्दानी) पुरुषी. याच्या उलट जनानी. [फा. मर्दाना–नी] **मर्दाई, मर्दपणा**–स्त्रीपु. १ धैर्य; धीटपणा; शौर्य; पराक्रम; पौरुष. २ शौर्याचीं, पराक्रमाचीं कृत्यें. **मर्दाची मिशी**–स्त्री. (पुरुषत्वाचें लक्षण) प्रौढी मारतांना, दम देतांना, धाक दाखवितांना पुरुष योजतात. **मर्दानगिरी, मर्दानगी**–स्त्री. मर्दुमकी; शौर्य; पौरुष. 'हे जागा मर्दानगिरीची आहे.' –ऐस्फुले १.२१. 'परंतु टिपूची मर्दानगी व दिलेरी पाहून हे आपले चित्तांत भय मानून आहेत.' –पदमव १०८. **मर्दाना**–पुरुषांची बैठक. 'फार करून जनान्यांत असतात. येकादों–दिवसां आंत दोन तीन घटिका मर्दाना करून...कांहीं जाब–साल होतो.' –रा ७.११९. –वि. मर्दा पहा. **मर्दानी–णी**–वि. १ पुरुषास योग्य, साजेसें (वस्त्र, पोशाख इ०); याच्या उलट जनाबी. 'शिकारीसारखी मर्दानी मौज नाहीं असें पुरुष म्हणतात. –बाय ३.३.' २ पुरुषी; पुरुषांचा (आवाज इ०). ३ पुरुषी आवाजाची जरूरी असलेलें (गाणें इ०). ४ पुरुषासंबंधीं. ०खेळ–पु. अंगमेहनतीचा, पराक्रमाचा, ताकदीचा प्रयोग, खेळ. **मर्दामर्दी**–स्त्री. शौर्य; पौरुष; पराक्रम; मर्दुमी. –क्रिवि. १ धिटाईनें; शौर्यानें; मर्दपणानें. २ पुरुषी धडाडीनें; उत्साहानें. 'हशमाच्या लोकांनीं कोटासच मर्दामर्दी शिडी टेंकून चढले.' –बप ७४. 'त्यानें पैसा जवळ नसतां मर्दामर्दी लग्न केलें.' ३ अतिशय श्रमानें, कष्टानें. 'मर्दामर्दी तो चोर धरला.' ४ मोठया जुलमानें; संकटानें. 'मर्दामर्दी तो वांचला–जगला.' **मर्दी, मर्दुमी**–स्त्री. १ शौर्य; पराक्रम; साहस. 'परशुराम रामचंद्र यांणीं मोठे मर्दुमीनें लढाई दिली.' –ख ११.६१०४. २ शौर्याचें, पराक्रमाचें, साहसी कृत्य. [फा.] **मर्दुम**–पु. मनुष्य; माणूस. [फा. मर्दुम्] **मर्दुमकी**–मर्दी पहा. 'मर्दुमकी शाबासकीचा मालक.' –गोखचिशाब ६.५.

मर्दजान—वि. गुडघ्यांत दुसरें हाड राहतें असा (घोडा). असा घोडा खराब समजतात. –अश्वप १.१०४.

मर्दणें—सक्रि. १ चोळणें; चेपणें; रगडणें इ०; मर्दन करणें. २ ठार मारणें. 'तो करावया वेदोद्धार। म्यां मर्दिला शंखासुर।' –एभा २१.३७३. [सं. मर्दन.] **मर्दन**–न. १ चोळणें. २ मऊ करण्याची, चूर्ण करण्याची क्रिया; चुरडणें, कुटणें, दळणें, रगडणें इ०. ३ (काव्य) कत्तल; ठार मारणें; नाश. [सं.] **मर्दनं गुणवर्धनं**–(संस्कृत सुभाषित) १ औषधी द्रव्यें जों जों अधिक खलावीं तों तों तीं अधिक गुणकारी होतात. २ विद्यार्थ्यास छडी मारल्यानें त्याची बुद्धि अधिक तल्लख होते. **मर्दना**–स्त्री. स्नान; न्हाणें. 'भणे एथ होए मर्दना। स्वामी माझेया।'–ऋ ७४. **मर्दन्या**–पु. अंग रगडणारा. **मर्दित**–वि. १ मर्दन केलेलें; चोळलेलें; चेपलेलें. २ कुटलेलें.

मर्दल–ळ—पु. एक वाद्य; तबला. 'पणवशब्दें ढोल। आनक ते पैं मर्दळ।' –गीता १.७७२. [सं. मर्दल]

मर्दवाण—न. लिप्तपात्र; उटीचें भांडें. –राव्यको ३.१५. [फा.]

मर्फा—पु. लहान टिमकी, नगारा. ह्यावर टिपरीनें ठोका मारून ताशाच्या मेळामध्यें तालाची लय दाखविण्याकडे उपयोग करतात. 'तासे मर्फे ते अंबूर किती वाजती।' –ऐपो ११९. [फा.] **मर्फाची, मर्फेकरी**–पु. मर्फा वाजविणारा. –समारो २.३.

मर्म—न. १ गूढ शक्ति; सूक्ष्म गुणधर्म; कार्यसाधक गुण (याचें अनुमान कार्यावरून होतें). 'सर्व पदार्थांमध्यें जीं ईश्वरानें मर्में ठेविलीं आहेत तीं कोणास समजतात.' २ (शरीरादिकाचा) नाजूक भाग, अवयव; जिव्हाळी; वर्म. ३ छिद्र; उणेपणा; व्यंग. 'मर्म उघडितां, मानी पुरुष बुडाले त्रपेंत,जड तरले।' –मोआदि २४.४७. ४ रहस्य; गूढार्थ; खरा आंतला हेतु (भाषण, लेख इ० चा,); तात्पर्य. ५ मेख; मुद्दा; खोंच; रोंख. ६ कला; खुबी; गूढविद्या; युक्ति; गुरुकिल्ली (एखादें कोडें, रचना, क्रिया, धंदा इ० ची). 'अद्यापि श्लोक लावण्याचें मर्म तुला समजलें नाहीं.' 'घडयालांतलें मर्म कळत नाहीं.' ७ शत्रु; अरि; नाशक; भंजक; उलट आणि प्रतिक्रिया करणाऱ्या गुणांची वस्तु. 'केळयाचें मर्म तूप, गव्हाचें मर्म कांकडी.' [सं.] ०भेद्–पु. १ नाजूक भागावर

केलेला आघात; जिव्हाळीं झालेली जखम. २ (ल.) जिव्हाळीं लागणें, झोंबणें; ममेस्पर्श. ३ कट, युक्ति, बेत शोधून काढणें; खुबी, रहस्य हुडकणें; बिंग बाहेर काढणें; गूढपरिज्ञान. ४ एखाद्याचा उणेपणा, व्यंग, दोष इ० चा स्फोट करणें; एखाद्याच्या मनाला झोंबेल अशा गोष्टी उघड करणें. **०भेदक-भेदी, वेधक वेधी**-वि. जिव्हाळीं स्पर्श करणारा; नाजूक भागाला जखम करणारा; बिंगें उघडकीस आणणारा (अक्षरशः व ल.).**०वेत्ता**-वि. मर्म जाणणारा; मर्मज्ञ. **०स्थल-स्थान**-न. १ नाजूक भाग; जिव्हाळी. २ (ल.) दोष, उणीव असलेलें स्थान; व्यंग. **०स्पृक्**-वि. नाजुक भागावर स्पर्श करणारा, जखम करणारा; चावा घेणारा (अक्षरशः व ल.); मर्मभेदी. **०ज्ञ**-वि. १ मर्म, गूढ, खुबी जाणणारा. २ अत्यंत कुशल; निपुण; पंडित. **मर्मण**-वि. मर्मज्ञ (अप.) 'मानवा सुजाणा मर्मणा सुजाणा।' -देप ११३. **मर्मान्वेषण**-न. एखाद्याचें मर्म, उणेपणा शोधून काढणें; छिद्रान्वेषण. (अक्षरशः व ल.) **मर्मान्वेषी**-वि. मर्म, दोष, उणें शोधणारा; छिद्रान्वेषी. **मर्मी**-वि. १ गुप्त, गूढ गोष्टी जाणणारा. २ एखाद्या गोष्टींत अत्यंत निपुण; कुशल; मर्मज्ञ. ३ मर्मभेदी; भेदक; झोंबणारें; टीकात्मक (भाषण). **मर्मीक**-वि. (प्र.) मार्मिक पहा. **मर्मोद्घाटक**-वि. एखाद्याचें मर्म, दोषस्थल, कमीपणा उघडकीस आणणारा; मर्मभेदी. **मर्मोद्घाटन**-न. एखाद्याचें व्यंग, उणें, दोष उघडकीस आणणें; ममभेद.

मर्मर—पु. संगमरवरी दगड; आरसपान. [ग्री. मार्मारो (मार्मेरो=प्रकाशणें); लॅ. मार्मोर; फा. मर्मर.] **मर्मरी**-वि. संगमरवरी; आरस्पानी.

• मर्यत-ल—वि. (व.) अत्यंत अशक्त; मरतुकडा. [मरणें हिं. मरियल]

मर्म्या-वि अत्यंत रोड;मरतो आहे असा दिसणारा (माणूस, जनावर). [मरणें]

मर्यादा—स्त्री. १ सीमा; शेवट; इयत्ता; कड; हद्द (स्थल, काल, क्रिया इ०ची). २ (ल.) संप्रदाय-शास्त्रसिद्ध रूढी, बंधन, दाब; नियम; अट. 'जो विप्र आजिपासुनि मद्यप्राशन करील तो पापी। ब्रह्मघ्नासम निश्चित असि मर्यादा स्वयें कवि स्थापी।' -मोआदि ९.५३. ३ शिष्टाचार; वर्तनाचा योग्यपणा; व्यवस्थित सभ्य वागणूक; विनीतता. 'आजकालच्या मुलींना मर्यादाच कमी-मुलींच नाहीं म्हटलें तरी चालेल.' [सं.] **०मोडणें**-मर्यादा, सीमा ओलांडणें; नियमबाह्य, क्रम सोडून वर्तन करणें **०राखणें**-आदरानें, शिष्टाचाराप्रमाणें वागणें. **मर्याद**-शअ. पावेतों; पर्यंत; अखेर. जसें-आकंठमर्याद भोजन केलें; श्रावण-काल-नदी-मर्याद. **०दृष्टि**-स्त्री. नजरकैद; साधी अटक. 'रायें पाचारुनि तंत। मर्यादृष्टित ठेविलें।'-ज्ञान प्रदीप १०१७. **०वेल, मर्यादावेल**-स्त्री. समुद्रकांठची एक वेल. 'जैसी मर्यादावेल उल्लंघून। प्रवेश नकरी समुद्रजीवन।' -भवि **०शीर-ल-ल**-वि. सभ्यपणानें वागणारा; शिष्टाचार न उल्लंघिणारा; विनीत; अदबशीर.

मर्‍यान—स्त्री. (चंद्रपुरी) घरामागील लहान वाडी.

मर्वारीद्—पु. मोतीं; मौक्तिक. 'माळा,मर्वारीद.' -ऐटि १११ [फा.]

मर्सूल—वि. प्रेषित; रवाना केलेलें. [अर. मुर्सल]

महमत, मन्हामत—स्त्री. कृपादान; दान. 'जमीन मन्हामत केली असे.' -रा ८ ६८. 'बंगल्याची सनद मुबारक-जंग यास महमत जाली. -ऐटि १८. -वि. दत्त; स्वयंदत्त. -राज्य ८.४०. [अर. महमत्]

मन्हाटा, मन्हाटी, मन्हाटी मोळा— मराठा इ० पहा. 'मजविवेकु सांगावा। मन्हाटा जी।' -ज्ञा ३.१७. जेथची नांव तरि मन्हाटी। परि षड्-दर्शनातें दळवटी।' -ऋ २४.

मन्हाटें—न मराठ्यांचें राज्य; अमदानी. 'नी मी जंव वर्ते तंव मन्हाटें वर्तेल।' -नागदेवाचार्यस्मृति ९७.

मन्हाटें—वि. प्राकृत; सुगम. 'येक म्हणती मन्हाटे काये। हें तों भल्यांसि ऐकों नये।' -दा ७ १.३२.

मन्हाष्ट-ष्ट्र—(प्र.) महाराष्ट्र पहा. 'पाहिले नस्तां संस्कृती। रीग नाही मन्हाष्ट्रग्रंथीं।' -दा ५.६.३३.

मल—पु. १ घाण; केर; कचरा. २ शरीरांतील विष्ठा, मूत्र, घाम, शेंबूड, रक्त, नखें, अश्रू इ० उत्सर्ग. ३ गाळ; रेंदा. ४ गंज; कीट; तांबरा. ५ दुष्ट वासना; दुःस्वभाव; नैतिक पाप. 'स्ववत्स मल भक्षिती परि न सर्वथा बाटती।' -केका ५८ मळ पहा. [सं.] **०द्वार**-न. ज्या वाटेनें विष्ठा पडते तो शरीराचा भाग; गुद. **०पृष्ठ**-न. पुस्तकाच्या आरंभीचें कोरें पान. **०मास**-पु. अधिक महिना. 'मलमास क्रमल्या नंतर... घेऊन जाणें.' -पेद ८.३८. **०मूत्र**-न. (भीतीमुळें) विष्ठा, मूत्र यांचा उत्सर्ग होणें. (क्रि० करणें; होणें). 'व्याघ्र पाहतांच मलमूत्र झालें' **०वस्त्र**-न. केरकचऱ्यापासुन रक्षण करण्यासाठीं घातलेलें वस्त्र (देवाची मूर्ती इ०वर); गवसणी; खोळ. **०विसर्ग-विसर्जन**-पुन. पोटांतील मळाचा उत्सर्ग; झाडा. मलमूत्र पहा. (क्रि० करणें; होणें). **०शुद्धि**-स्त्री. पोटांतील मळाचा उत्सर्ग झाल्यामुळें वाटणारी आंतड्याची शुद्धता; शौच. **०स्नान, मलापकर्षस्नान**-न. केवळ शरीर स्वच्छ करण्यासाठींच केलेलें स्नान; याच्या उलट मंगलस्नान; अभ्यंगस्नान. **मलावरोध, मलावष्टंभ**-पु. शौचास साफ न होणें; बद्धकोष्ठता. **मलाशय,मलाचा कोठा**-पु. आतड्यांतील मलाची पिशवी; मलमार्ग. **मलिन**-वि. १ घाणेरडा; मळलेला; मळकट; खराब. २ आचारहीन; पातकी. 'मलिन कुटिल नीरस जडअजड पुनर्भवपणें हि कच साचा।' - मोआदि ३.६४.

' बांधी मणिभ्रमे बहु फुगला मलिन स्वभाव कपटानें । ' –मोसभा ४.५५. ४ अपवित्र; अमंगल; आत्मशुद्धतेकडे दुर्लक्ष करणारा. ५ अस्पष्ट; निस्तेज; उपस्थित नसलेली (आवृत्ति नसल्यानें विद्या इ०)

मलोत्सर्ग, मलोत्सर्जन–पुन. मलविसर्ग पहा.

मलई—स्त्री. साय; दूध इ०पदार्थावरील पापुद्रा. [हिं.]

मलई—स्त्री. १ दांडगाई; धिंगामस्ती; बखेडा; बंडावा; दंगा. (क्रि० करणें; मांडणें; माजविणें). ' कोळ्यांनीं सन तिसांत मलई करून सरकारचा मुलुख खराब केला. ' –थोमारो १.२४५. २ गोंधळ; आरडाओरड; दंगल; गडबड (जमाव, सभा इ०ची). ' दक्षिणा घेतेवेळेस मलई केवढी ! ' ३ मनुष्यांचा अव्यवस्थित जमाव, घोळका; संकर (सर्व जातींचा, सोवळें-ओवळें इ०चा); गर्दी. ' त्यास धर्माधिकारी ब्राह्मणास मिळून मलई करितात. ' –वाडसमा ३.१२०. ४ (यावरून) खाणावळ; भटारखाना इ० [मल्ल. किंवा फा. मला=जमाव] **०दार घिस्सा**–पु. (मल्लविद्या) एक डाव. जोडीदाराच्या कुल्ल्यावर चड्डींत हात घालून आपला दुसरा हात जोडीदाराच्या डोक्यावर ठेवून त्याच बाजूचा आपला पाय जोडीदाराच्या आपल्याकडील हाताच्या कोपराच्या लवणींत घालून जोडीदारास चीत करणें.

मलऊन–वि. शापित; शापार्ह; बहिष्कृत. ' जमियत शायस्ता पैदा करून सिवा मलऊनानें मुलूक काबीज केला आहे. तो दरकबज् पादशाहजीच्या आणील. ' –रा १७.१६. [अर. मल्ऊन]

मल(लि)कंबरी—वि. मलिकंबराच्या अमदानींत सुरू झालेली (मोजणी, दर, धारा, शिरस्ता, तनखा, कमाल इ०). [मलिकंबर]

मलखांब—पु अंगांत चपळता येण्यासाठीं कसरत करण्याकरितां तालमींत पुरलेला वाटोळा खांब. [सं. मल्लस्तंभ]

मलंग—पु. फकीराचा एक पंथ; दरवेशी. [हिं.]

मलगंडा—पु. (व.) अव्वल माल. [का. गंडा=वरचढ]

मलतंडी—स्त्री. जोंधळ्याचें हलकें पीक. –कृषि २६६.

मलपणें—अक्रि. (काव्य) १ डुलत चालणें; चालतांना या बाजूस एकदां आणि त्या बाजूस एकदां असें होणें (विशेषतः मूल) ' सावळ्या वाणाचें मूल। कोणाचें एथें मलपत चालें। ' २ (सामा.) इकडून तिकडे हालणें; डोलणें. ' मलपत घुसळिते गवळणी । तिचा पदर रुळतो मेदिनीं । ' ३ थलथलणें; हलणें. ' लवथवित मलपे दोंद । वेष्टित कट्ट नागबंद । ' –दा १.२.१६.

मलपी—स्त्री. (कु. हेट.) डोळ्याची पापणी.

मलबारी—वि. मलबार प्रांतासंबंधींचा. [सं. मलय, मलबार]

मलम—नपु. जखम, खरूज इ०वर चोळण्याचें स्निग्ध औषध; अंजन; लेप. [फा. मल्हम्; अर. मर्हम्] **०पट्टी**–स्त्री. जीवर मलम पसरून जखम इ०वर लावतात ती कापड, कागद, पान इ०ची पट्टी.

मलमल-ली—स्त्री. तलम, बारीक सुताचें कापड. [हिं.]

मलमा—पु. १ पडक्या घराचें दगड, विटा, चुना इ० अव्यवस्थित पडलेलें सामान. २ (ना.) विहिरींतील गाळ (दगड, माती इ०). ३ (मलमाला उपयोगी असें) वाशेरे, वासकट तूप. [मलम]

मलय—पु. १ हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील अरबी समुद्राला समांतर अशी एक पर्वताची रांग; मलबारघाट. २ ह्या पर्वताच्या लगतची किनाऱ्याची पट्टी; मलबारप्रांत. ३ मलाया द्वीपकल्प. [सं. द्रा. मल्ये=पर्वत] **मलयाग(गी)र**–पु. मलयपर्वतावरील चंदनाची एक उंची जात. ' कृष्णागर मलयागर परिमळ। देवदार वृक्ष तेथें। ' –ह २३.१००. [सं. मलय+अगरु]

मलयानिल–पु. मलयपर्वतावरील सुगंधी वारा. ' सहजें मलयानिलु मंदु सुगंधु । तया अमृताचा होय स्वादु। ' –ज्ञा ४.२२०.

मलयी–वि. मलाया द्वीपकल्पासंबंधाचा (रहिवासी, जिन्नस).

मलया—पु. एक प्रकारचा मासा.

मलयी, मलाई—स्त्री. मलई पहा.

मलसूत्र-त्री—(प्र.) मळसुत्र पहा.

मलाखीजांब—पु जांबांची एक जात. –कृषि ७२०. [मलाख ?]

मलाड—न. मावळ प्रांत.

मलिका—स्त्री. राणी. [अर.] **०मुअज्जमा**–स्त्री. थोर राणी; महाराणी.

मलिदा—पु. १ दूध, साखर, लोणी इ० पदार्थ कणकेमध्यें घालून केलेलें मुसलमान लोक पिरास देतात तें पक्वान्न. २ (ल.) तिंबलेली, मळलेली, ठेंचलेली कोणतीहि वस्तु. ३ (सामा.) खुराक; पौष्टिक अन्न. ' न्याय असा जगतीं, दिसे कीं । चाकरा मलिदा मिळे धन्याला धत्तूरा हातीं । ' [फा. मालिदा] **०करणें**–१ गुधडणें. २ तिंबणें; बडविणें; कणीक मऊ करणें.

मलियाड—पु. मलबार प्रांत. –अश्वप १.३४.

मलीक—पु. राजा. [अर. मलिक्] **०नवीस**–पु. राजचिटणीस. **०मैदान**–स्त्री. रणराजा; विजापूर येथील सुप्रसिद्ध तोफेचें नांव. (चुकीनें) मुलुखमैदान.

मलुहाकेदार—पु. (संगीत) एक राग. ह्यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य. जाति औडुव संपूर्ण. वादी मध्यम, संवादि षड्ज. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर.

मलूल-र—वि. १ क्लांत; निस्तेज; कोमेजलेला; उदास. ' मलूल होऊन शरमिंदी जाहली. ' –भाअ १८३४. २ खिन्न; शोकग्रस्त. ३ अशक्त; कमजोर; गरीब; निर्वीर्य (प्राणी, माणूस).

४ नादुरुस्त (गात्र, अवयव). ५ मऊ; नरम; निर्जीव (कातडें). [अर. मलूल]

मलेथी—स्त्री. ज्येष्ठमधाचें मूळ.

मलेरिया—पु. डांस चावून येणारा हिवताप; कर्दमोत्थित ज्वर. [इं.]

मल्फूफ—वि. गुंडाळलेलें. 'पत्र बाबासाहेबांचे पत्रांत मल्फूफ करून पाठविलें.' –रा १.१९०. [अर. मल्फूफ्]

मल्बूस—पु. कापड. –वि. पेहरलेला. 'रजाई शालनामी मल्बूस-खास इनायत जाली.' –दिमरा २.१३७. [अर.]

मल्या—पु. गोड पाण्यांत राहणारा एक मासा.

मल्ल—पु. १ पहिलवान; जेठी. २ धंदेवाईक मुष्टियुद्ध करणारा; मुष्टियोद्धा; ठोंसाठोंशीवाला. ३ (ल.) धडधाकट, धट्टाकट्टा, मजबूत, जोमदार मनुष्य. [सं.] **०क्रीडा**–स्त्री. आखाडयांतील कुस्ती, डावपेंच; मुष्टियुद्ध **०खांब**–पु मलखांब पहा. **०भू**–स्त्री. १ कुस्ती इ० खेळण्यासाठीं केलेली जागा; आखाडा. २ (ल.) युद्धक्षेत्र; रणभूमि. **०युद्ध**–न. कुस्ती; बाहुयुद्ध. 'रथाखालीं उतरून। मल्लयुद्ध आरंभिलें।'. **मल्लई**–स्त्री. गोंधळ; गोंगाट; दांडगाई. मलई पहा. **मल्ली**–वि. समर्थ. –शर.

मल्ला—पु. घोडयाच्या पायास होणारा एक रोग. –अश्वप. २.२८२.

मल्लाररा(शा)ई, मल्हारराई—वि. मल्हारराव रास्ते यांनीं पाडलेलें (नाणें, रुपया इ०); मल्हारारावरास्ते यांच्या राज्यासंबंधीं.

मल्लारि-री, मल्हारी-र—पु. शिवाचा एक अवतार; खंडोबा; खंडेराव. 'माता म्हणे मल्लारी पूर्ण। हरि तुजवरी क्षोभला।' –ह ९.१९९. [सं. मल्ल+अरि]

मल्लाह—पु. (काशी.) नावाडी. [अर.]

मल्लिका—स्त्री. १ ज्याचे पाय आणि चोंच पिंगट आहेत असा हंस. २ पांढरी जाई; मोगरा. [सं.] **मल्लिकार्जुन**–पु. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक. **मल्लिकाक्ष**–वि. ज्याच्या डोळयांतील बाहुली कांहीं पांढरी आणि कांहीं काळी अशा रेषेनें वेष्टिली आहे असा (घोडा). –अश्वप १.२१.

मल्लु-ल्लू—पु. (ना. व.) वानर; माकड.

मल्हार—पु. (संगीत.) एक राग. 'अलापितां मल्हार थेंब तळीं मेघमंडळा–हुन गळती।' –प्रला २३६.

मवकुफ—वि. तहकूब; थांबविलेलें. 'करवी तिकडील स्वारी मवकुफ।' –दावि २१३. [अर. मौकूफ्]

मवणें—सक्रि. १ लिहून ठेवणें; दाखल करणें. 'सिसे वेंचि तया मविली। वही जेवीं।' –ज्ञा १८.९१२. २ मोजणें. 'साउली वरी न मववे।' –अमृ ५.२६. [सं. मा–मापय; प्रा. मव] **मवणी**–स्त्री. १ गणना; मोजणी; माप. 'तें येक नक्षत्र प्रतिदिनीं भोगिजेतसे चंद्रें गगनीं। या चंचळपणाची मवणी। श्रेष्ठ करोतु सुखें।' –स्वादि १२.२.४०. २ धोकणी. 'ते योगपटाची मवणी। जीवीं अनियम चिंतवणी।' –ज्ञा १६.३३२. **मविता**–वि. मोजणारा. 'साउलीवरी न मववे। मवितें जैसें।' –अमृ ५.२६. **मविलें**–वि. मोजलेलें.

मवसर, मव्सर—पु. १ पैसा; धन; वित्त. २ ताकद; ऐपत; सामर्थ्य. 'कर्जे–वाम जालें तें वारायास मव्सर नाहीं.' –वाडशाछ ८३. –वि. १ लायक; समर्थ; ऐपतदार. 'त्यास हे नादार. यावयास मवसर नाहींत.' –वाडबाबा २.२४. २ प्राप्त; अनुकूल. 'तालुक्यांची तमाम ताख्त व ताराजी होऊन कोठील पैसा या दिवसांत मवसर नाहीं.' –रा ५.१४५. [अर मुवस्सल्] **०हाल**–क्रिवि. ऐपतीप्रमाणें. 'मवसर-हाल गुन्हेगारी.' –इऐ ५.४९.

मवसुफ-फ—वि. उपर्युक्त; मशारनिल्हे; वर दर्शविलेलें. 'त्यास हल्लीं नवाब मवसुफ यांजकडे यावयाचा करार केला असे.' –समारो १.३२८. [अर. मौसुफ]

मवा—पु. विशिष्ट पिकावर पडणारा एक रोग.

मवाई—स्त्री. (काव्य) मऊपणा; मृदुता. [मऊ.]

मवाखजा—पु. भांडण. 'कांहीं मवाखजा मध्यें नसावा.' –दिमरा १.४५. [अर. मुवाखझा]

मवाग—स्त्री. मंदाग्नि; सौम्य आंच. [मऊ+आग] **मवागीं टाकणें**–मंद अग्नीवर ठेवणें, धरणें. **मवागी-ग्नी**–स्त्रीपु. मंद अग्नि. 'निजबोध मवाग्नीनें सानविलीं।'–सप्र १५.७. **मवागीत**–वि. सौम्य; मंद (विस्तव, आंच). **मवागींत, मवागीं**–क्रिवि. शेक लागेल असें; मंदाग्नीवर (शिजविणें इ०); मंद ज्योतीनें; सौम्यपणें (विस्तव पेटणें, जळणें).

मवागी-री–स्त्री. १ लोणी इ० स्निग्ध पदार्थ. 'लोणकढे शुद्ध नाहीं कडूपणाची मवारी।' –सला ८१. २ तुपावरचा कणीचा पापुद्रा. 'तुपावर चांगली मवारी आली आहे.' ३ कातडें कमावण्याच्या क्रियेंत लावतात तीं दहीं, हळद इ० द्रव्यें समुच्चयानें. गोरसन पहा. [मऊ]

मवाज(जी)न—पु. मशिदीची बांग पुकारणारा; मोआजीन. [अर. मुअज्झिन्] **मवाजनी**–स्त्री. मवाजनाची वृत्ति, काम. 'शेख अबदुल समद यास खिजमत मवाजनीची मशीद मजकूरची चालवीत आहों.' –वाडसनदा २८.

मवाजने-नवीस—पु. अस्सलावरून ताडून पाहून नक्कल दप्तरीं नमूद करणारा. 'मवाजनेनवीस त्याचे दप्तरीं नक्कल विल्हे लाविली.' –रा २०.१८. [अर. मुवाझना=तुलना]

मवाजा-ज्या—पु. चर्चा; ऊहापोह. 'हजरत बरखास्त झालियावर तुम्हीं आम्हीं बसून तहनाम्याचा मवाज्या करूं.' –रा ५.७. [अ. मुवाजआ]

मवाझी—स्त्री. जुळती. आदिलशाही फर्मानें. [अ.]

मवाफी(फि)क—क्रिवि. 'प्रमाणें; माफक. 'ताकीद असे त्या मवाफीक चालविजे.' –रा १५.१६७. [अ. मुवाफिक्]

मवाली—वि. गुंड; उडाणटप्पू; पुंड. 'त्या गांवांत मवाली लोकांनीं अत्याचार केले.' –के १७.५.३०. मवाशी-सी पहा. [? सिं. मवाली=व्यसनी]

मवाली-पन्हा—वि. उच्च गुणांनीं युक्त. –रा १५.५६. [अ. मआली]

मवास—पु. १ लुटारूंच्या टोळीचा नायक; स्वतंत्र अधिपति, राजा इ०. 'परंतु जमीनदार मवास मोठमोठे आहेत.' –इमं २६१. २ लुटारू; बंडखोर; चोर. 'संपत्तिस तो मवास येउनि।' –अमृत २७. ३ अनिर्बद्ध वागणारीं, आडदांड, भटकणारीं गुरेंढोरें, बदमाष लोक इ० समुच्चयानें. ४ लुटारूंची टोळी. [अ मुआसी] **मवाशी-सी**-स्त्री. लुटारूंची राहणी, सरणी; लुटारूपणा. –पया ८३. –पु. बंडखोर; लुटारू; पुंड. मवास पहा. [अ. मुआसी]

मवाळ—वि. १ तेल इ० स्निग्ध पदार्थ लावल्यानें नरम पडलेलें. २ (ल.) आकर्षक; हळुवार; मृदु (भाषण, वागणूक, स्वभाव इ०). 'ते वेंचिती मनें मवाळें। चकोरतलगें।' –ज्ञा १.५६. ३ (सामा.) मऊ; मृदु; नरम. 'मृदु मवाळ वालुका पहा हो। दुग्धवर्ण जलप्रवाहो।' –मुआदि २२.३५. ४ समुद्रकांठची, बांध घालून खारें पाणी न येईल अशी केलेली, खार जमिनींतील मऊ असलेली (जमीन). ५ राजकारणात सरकारच्या धोरणास विशेष विरोध न करणारा; प्रागतिक. (एक पक्ष) [सं. मृदुल-मउल-मवळ-मवाळ राजवाडे ग्रंथमाला; मऊ] **मवाळ-पक्ष**-पु. सरकारजवळ नम्रपणानें न्याय, दाद मागणारा राजकारणांतील पक्ष. (इं) मॉडरेट पार्टी. याजबद्दल बनविलेला प्रतिशब्द. याच्या उलट जहाल पक्ष. **मवाळी**-स्त्री. १ तेल, लोणी इ०त्वचा मऊ करणारा पदार्थ; मवागी. २ (ल.) मऊपणा; सौम्यपणा; मार्दव; नरमाई. 'सपासंगीची मवाळी।' –मुआदि ३५.१३०. **मवाळु**-वि. मायाळु; प्रेमळ; मृदु; मवाळ 'दिनाचा दयाळु मनाचा मवाळु।' –राम ५६.

मवाळें—न. हत्तीच्या दातांना घातलेलें कडें; कट; वेढें; शेबी. 'हत्तीचे दातांस मवाळें बसवून घेणें.' –ऐरापुप्र ९ ५०१.

मवेश—पु. मायेचा स्वामी. –शर. [सं. माया; म. माव+ईश]

मवेशी—स्त्री. १ हक्काचा माल; मालमत्ता. 'आपण मवेशी नेली असेल ती देवावी.' –रा २२.३९. २ गुरें-ढोरें. [अ.] **०इस्पितळ**-न. गुरांचा दवाखाना.

मव्जुद—वि. मौजूद पहा. [फा.]

मव्हर—पु. (व) पुढारी; अग्रणी; म्होरक्या. –क्रिवि. पुढें; म्होरें. [सं. मुख] **मव्हर**-क्रिवि. (खा.) पुढें; म्होरें.

मश-स्त्री. मस पहा.

मश(स, श्य)क—पु. १ चिलट; डास; मच्छर. 'कीं राजहंसांपुढें मशका' 'लघू मश्यकाचे परी रूप केलें।' –राक ४८. २ (ल.) कःपदार्थ. 'द्वारका पाहतां वाडे कोडें...। मशक त्यापुढें सत्य लोक।' –एरुस्व ३.१४ [सं. मशक]

मशक—न. १ पाणी ठेवण्याची चर्मी पिशवी, पखाल, मसक. २ एक वाद्य. [अ. मश्क्]

मशगूल, मशगूल—वि. तत्पर; गढलेला; दंग; चूर; निमग्न. –रा २०.२८६. [अ. मश्घूल]

मशमूल—वि. प्रविष्ट केला गेलेला; सामील केलेला. –आदिलशाही फर्मानें. [अ. मश्मूल]

मश(स)रू, मश्रू—स्त्री. गर्भरेशमी कापड; गजनीचें कापड [अ. मश्रूअ]

मशारुल-अनाम, मश्रूल अनाम, मसुरुल् अनाम—पु. (लोकप्रसिद्ध लोकमान्य या अर्थी) सरकारी सनद, कागद पत्र इ० त ज्यास पत्र लिहितात त्यास योजावयाची एक सन्मानाची पदवी. जसें मश्रूल अनाम रामचंद्र देशमुख. [अ. मश्हूर=प्रसिद्ध+अनाम्=लोक.]

मशहूर, मश्हूर—वि. महशूर; प्रख्यात; प्रसिद्ध. 'दुनियाईत दोही दौलतींची एगानगत मशहूर' –रा ५.३१. [अ. मश्हूर] **मशहुरुल-मश्हूरुल हजरत**-वि. (एक मायना) राजप्रसिद्ध; राज्यमान्य.

मशाएख(य)ख, मषायक—पु. धर्मात्मा; धर्मशास्त्रज्ञ. 'अलीजाह यांनीं कोणी मशाएख पीर-जादा आहे त्याचे लेकीशीं निका लाविला.' –रा ५.१०७. [अ. मशाइख्]

मशाग(क)त—स्त्री. १ मेहनत; परिश्रम; श्रम. 'कष्टमशागत केलिया लोकांस संरंजाम करून द्यावा.' –सभासद २३. २ सेवा; चाकरी. 'तैसेंच अण्णाजीपंत यांणीं मोठी मशागत केली...यास्तव यथारीती सन्मान केला.' –चित्रगुप्त ५. ३ मजुरी; वेतन. 'माझी मशागत चुकवून दे म्हणजे मी जातों.' ४ कांबाडकष्ट करून, अत्यंत परिश्रमानें (शेत इ०) तयार करणें. 'शेत अशी मशागत केली तसें पिकतें.' ५ निगा; काळजी. [अ. मशक्कत्] **मशाग ती**-वि. १ मशागत करणारा कष्टाचीं कामें करून पोट भरणारा; मजूर. २ कष्टाळू; उद्योगी; कामसु; मेहनती.

मशारनिले-ल्हे, मशार्निले-ल्हे—वि. वर सांगितलेला; उपरिनिर्दिष्ट मजकूर. (मनुष्याच्या नांवाबद्दल, एकदां येऊन गेल्यानंतर पुन्हां आल्यावर विशेषतः सनदा, दप्तरीं पत्रें, दस्तऐवज इ० त उपयोग). 'सालगुदस्तांपासुन मशारनिलेचा अमल मोगलाकडे दिला.' -थोमारो १.१३. [अर. मशारुन्-इलैह्]

मशाल—स्त्री. काठीच्या टोंकास चिंध्या गुंडाळून केलेली दिवटी; ढिलाल. (क्रि० चेतणें; पेटणें; लावणें) [अर. मश्अल्] **०पाजळणें-दिवसां लावणें**-(ल.) प्रसिद्धि पावणें. **मशालची-जी**-पु. मशाल, दिवटी धरणारा; दिवट्या. 'मशाल्ची याची तैनात सर्कारांतून पावत आहे.' -रा ७. [अर. मश्अलूची] **म्हo** १ दस घर ज्यादा मागना पण मशालजी रखना. २ उल्लूका भाई मशालजी.

मशिंग—पु. (गो.) शेवग्याचें झाड.

मशी—स्त्री (गुज.) बाजरीवरील कीड. ही बाजरीच्या काडाचीं पानें खातें व त्यामुळें काड कमजोर होतें. -कृषि २८१. [सं. मषी ?]

मशी-षी-सी—स्त्री. १ काळी शाई. 'मग काजळा आणि मसी। न दिसे विवंचना जैसी।' -ज्ञा १७.७०. २ काजळी. 'कीर्तीच्या वदनासि लाविति मषी वाटूनियां लेप हा।' -मोकृष्ण ७४.१४. ३ चुलीवर ठेवलेल्या भांड्याच्या बुडावर जमतो तो काळा थर. ४ जळलेल्या चिरगूट, कागद इ० ची राख. [सं. मषी] **०पात्र**-न. दौत. **मसीपत्र**-न. शाईनें लिहिलेला कागद. 'मसीपत्र ते कव्हडे।' -राज्ञाअभंग.

मशीं-सीं—(काव्य) माझ्यासीं; मला; मजशीं 'मसीं आतां कृष्णा तिळभरि दुजाभाव न धरी।' -सारुह ६.१५७

मशी(सी)द—स्त्री. १ मुसलमानांचें प्रार्थनामंदिर. २ (ल.) मनुष्य-वस्तुरहित मोठें घर, वाडा इ० भयाण जागा. ३ चुन्यानें नुमती पाढरी केलेली जागा. [अर. मस्जिद्] **म्हo** (सामा.) चुकला फकीर मशिदींत शोधावा. नमाज करतां मशीद गळ्यात पडली.

मशीन—न. १ यंत्र. २ शिवण्याचें यंत्र. [इं.] **०मारणें**-मशीन चालवून कापडा शिवणें.

मशी(शे)री—स्त्री. १ मशी पहा. २ (कु.) तंबाखू जाळून तयार केलेलें दांतवण. [मशी]

मशेर—पु. एक मासा. -प्राणिमो ८१.

मश्रीफ—पु. खर्च; व्ययलेख. -रा०यको ८.९७. [अर. मशरफ]

मश्रूरदारेघ-ओळ, मशोदर रेघ-ओळ—स्त्री. मसुदर रेघ पहा.

मश्वरा—पु. सल्लामसलत; जाबसाल. '(जनरेल कोट) कांहीं मश्वरा करावयास आला आहे.' -दिमरा १.९१. [अर.]

मश्हूद—वि. व्यक्त; सिद्ध. 'मश्हूद आं के.' -ख्या ३८३. [अर. मश्हूद्]

मस—पु. शरीरावरचा लहान काळा ठिपका; तीळ; चामखीळ. [सं. माष; प्रा. मस]

मस—स्त्री. १ काजळ; चुलीवर ठेवलेल्या भांड्याच्या बुडाचा काळा थर; मशी पहा. 'कां अंधारासि मसी माखिलें।' -एभा २१.१८६. २ (ल.) डाग; कलंक. [सं. मषी] **तोंडास मस लागणें**-कांहीं एक आरोप येऊन अप्रतिष्ठा होणें; तोंड काळें होणें **मसकूट**-क्रिवि. अत्यंत, अतिशय, फार ह्या अर्थी काळा या शब्दास जोडून येणारा शब्द. जसें-काळा मसकूट.

मस—सना. (राजा.) मला. 'मस ठाव नाहीं!'

मस—क्रिवि. (व.) पुरेसा; पुष्कळ; रगड; खूप; मस्त पहा. [मस्त]

मसक—क्रिवि. (संगीत) गातां गातां किंवा वाजवितां वाजवितां एकदम जलदीनें वरील तिसऱ्या स्वरावर जाणें.

मसक—स्त्री. १ खार्केत अडकविण्याची पाण्याची कातडी पिशवी; पखाल. 'येर वेटया पोट भरी। चाम मसकाचे परी।' -तुगा २५५१. २ पोट. [फा. मश्क्] **०भिस्ती**-पु. खांद्यावरून पखाल वाहणारा भिस्ती; याच्या उलट बैलभिस्ती.

मसकणें—अकि. तुकडे तुकडे, चुरा होणें (पोळी इ०चा). (सामा.) जाणें ह्या क्रियापदाबरोबर उपयोग. जसें-मसकून जाणें.

मसकणें—(विरू.) मुसकणें, मुसकटणें पहा

मसकती—वि. मसकतचा; मसकत शहरासंबंधींचा.

मसका—पु. १ लोणी. २ मिश्रण. [फा. मस्क; हिं. मस्का]

मसंड—न. (गो.) मसणवट. मसण पहा.

मसण—न. प्रेतें जाळण्याची किंवा पुरण्याची जागा; स्मशान. 'अग्नीचा परम सण क्षणांत भासे पुरी भयंकर मसण।' -मो रामायणें १.३४३. [सं. स्मशान; प्रा मसण] **म्हo** आचरट खाणें मसणात जाणें. **०उठणें**-ज्या ठिकाणीं लढाईत भयंकर प्राणहानि झाली असेल किंवा जेथें असंख्य लोक जाळले गेले असतील अशा जागेबद्दल योजतात. **०जागविणें**-स्मशानांतील पिशाचांना उठवून त्यांनां कांहीं अद्भुत करावयास लावणें. **०माजणें**-भरमसाट, अतिशय दाट वाढणें (शेत, गवत इ०). **मसणांत गोवऱ्या-हाडें जाणें**-मरणाच्या पंथाला लागलेला असणें; वयातीत असणें. **मसणांत-मसणीं दिया लावणें**-कोणतेंहि उच्छृंखलपणाचें अशास्त्रीय, अयोग्य, निरर्थक कृत्य करणें. **मसणांत देखाल कावळ्यांचा उपद्रव**-कोणत्याहि स्थळीं-परिस्थितींत विश्रांति न मिळणें. **मसणांतून ओढून काढणें**-अनेक

उपाय करून मरणोन्मुख माणसाला बरें करणें. **मसणांतून ओढून काढलेला**–वि. कोणतेंहि काम करण्यास असमर्थ, अत्यंत अशक्त; रोड; किडकिडीत (माणूस) **०कुटी**–स्त्री (ना) स्मशानभूमि. **०खाई**–स्त्री. १ प्रेतें जाळण्याची खोलगट अशी जमीन. २ (ल.) खूप मोठें (स्मशानाप्रमाणें), भयाण ओसाड घर. **०खुंट**–पु. आईबाप, बायकामुलें इ० नसून विद्या व द्रव्य बेताचेंच असलेला अगडबंब, धष्टपुष्ट माणूस. **०फट्टें**–न. (गो.) १ स्मशानांत पिंड देण्याकरितां शिजवितात तें अन्न २ (ल.) रुचि नसलेलें जेवण. **०वट–टी–टा**–स्त्रीपु स्मशानभूमि. **मसणा**–वि. १ ज्याचें नांव आपणास माहीत नाहीं किंवा ज्याचें नांव सांगणें अप्रिय किंवा इष्ट नाहीं अशा माणसाबद्दल योजतात. फलाणा; कोणीतरी, गोमाजी. २ रागामध्यें संबोधनार्थ योजावयाचा शब्द. 'अरे मसण्या तुला शंभर वेळ सांगितलें तरी तूं तसाच.'

मसंदणें, मसंदठणें—सक्रि. (क.) जास्त कुसकरणें; चुरगळणें; दाबणें; फार हाताळणें; खराब करणें (खाद्यपदार्थ, कणीक, फुलें इ० मृदु पदार्थ).

मसन, मसनखाई, मसनखुंट—मसण, मसणखाई इ० पहा.

मसनद, मस्नद—स्त्री. गादी; सिंहासन; तख्त. 'फिरोन फत्तेच्या मस्नदीवर बसविला।'–इमं २४०. [अर. मस्नद्] **०नशी**–स्त्री. १ सिंहासनारोहण. २ राजधानी. 'अर्काट् मकाण नामी मस्नदनशीचें।'–पया ४७५. [फा. मस्नदनिशीनी] **०नशीन**–वि. गादी-तक्तनशीन; तक्तावर बसलेला, असलेला (राजा). [फा. मस्नद्निशीन्]

मसलबदार—पु. १ मुनसफ; न्यायाधीश २ पंचाईतीचा सभासद; एक पंच मनसबदार पहा [फा. मस्लबदार]

मसमी भिकण—स्त्रीअव. (गो.) भुइमुगाच्या शेंगा.

मसमू—वि. पक्का; कायम; स्थिर केलेला; ठरविलेला (शब्दशः व ल). [अर. मुसम्मम्]

मसरें—नअव. १ रेडकू. २ म्हशी व रेडे यांचा घोळका. [म्हैस]

मसर्रत–नमत— वि. आनंददायक. 'खत मसर्रत–नमत पाठविलें तें नेक वक्ती पोहोंचलें.'–पया ४६४ [अर. मसर्रत्=आनंद; फा. मसर्रत् नमत्]

मसलत, मस्लत—स्त्री. १ विचारविनिमय करणें; योजना, बेत, निश्चय करणें. २ युक्ति; बेत; कट; डाव; हिकमत. 'मोंगलाई मसलत'=कपटव्यवहार. ३ सल्ला; योग्य विचार; उपदेश (क्रि० सांगणें). ४ हुशारीनें केलेली योजना, प्रयत्न. 'हा लोकापासून मोठ्या मसलतीनें पैका ओरपतो.' ५ मोहीम; स्वारी. 'भागानगर व विजापूर दोनी मसलती तरून हस्तगत जालीं.'–मराचिसं १९. ६ अंगीकृत कार्य. 'सर्वांनीं एक जागा राहून मसलत बुड वावी हें ठीक नाहीं.'–भाब ८. ७ युद्धाची तयारी; फौजफाटा. 'करवीरकरांची मसलत म्हणजे थोडी असा समज हुजूर आहे, परंतु यांचा फैल उत्कृष्ट.'–ख ११.५७६४. –वि. योग्य; इष्ट; उचित. 'याउपर इकडे येणें मसलत नाहीं, माळव्यांत रहावें.'–ऐच १७. [अर. मस्लहत्] **०पडणें**–पंचाईत पडणें; पेचांत सांपडणें; युक्ति, इलाज केलाच पाहिजे असा प्रसंग प्राप्त होणें. 'तुम्ही करा म्हणतां पण मला मोठी मसलत पडली.' **०दार–गार**–वि. सल्लागार; मंत्री; मनसुबदार. **मसलतबाज, मसलती**–वि. १ धूर्त; चतुर; कावेबाज; धोरणी. २ मसलतदार पहा. **०शीर**–पु. सल्लागार 'निखालस तुम्हीच मस्लतशीर सोबतीस दुसरें कोणही नाहीं.'–ख ८४५. –वि. मोहिमशीर; मोहिमेवर असलेला. 'खावंद मसलतशीर असल्यास तुम्ही एक दोन सालचा अगाऊ ऐवज सरकारांत द्यावा.'–रा १.३३६.

मसलंद—स्त्री. अंबारीचा मध्यभाग (ह्यावर घुमटी असते); महाताची बसण्याची जागा आणि खवासखाना यांच्यामधील (मालकाची बसण्याची) जागा. [अर. मसनद्?]

मसा—पु. १ मांसवृद्धि; चामखीळ; मस. २ घोडयाच्या पायांस होणारा एक रोग. [सं. माष; हिं. मसा]

मसाण, मसाणखुंट—मसण, मसणखुंट इ० पहा

मसाद—स्त्री. १ जमिनीची मोजणी. २ (व.) मातीच्या भिंतीचें तीन हात उंचीचें बांधकाम. [अर. मसाहत्] **मसादी**–वि. जमिनीच्या मापणीचा (खरडा, हिशेब, बेरीज, अटकळ).

मसादा—पु. मदत; त्यासाठीं दिलेला पैसा. 'लोकांस जमियत आणावयाकरितां मसादा दिला आहे.'–रा ५ १००. [अर. मुसाअदा.]

मसाऱ्या ऊद—पु. (व.) कलिंदर; कांडेचोर; काळमांजर.

मसार—वि. विशेष खुपीक नसलेली, वालूमिश्रित (जमीन). [का. मसारे=तांबडी जमीन]

मसारगर्भ, मासरमणि—पु. एक रत्न. हें हल्लीं प्रचारांत नाहीं. याचे अंगीं एकत्र केलेलें दूध आणि पाणी निरनिराळें करण्याचा धर्म असतो. याचा रंग श्याम असतो. [सं. मसारक; हिं. मसार=पाचू, मरकत]

मसाला—पु. १ कांहीं खाद्य, पेय, औषध इ० अधिक गुणकर व रुचिकर करण्यासाठीं घालतात ते पदार्थ समुच्चयानें (भाजींत हिंग, जिरें इ०–खिरींत, लाडूंत लवंग, वेलदोडे इ० –जनावरांच्या पौष्टिक औषधांत गूळ, मैदा, भांग इ०) २ तोंडीं लावणें; खार; लोणचें; व्यंजन. ३ (सामा.) मिश्रणांतील द्रव्यें. जसें–चुन्याचा मसाला, रंगाचा मसाला. ४ सरकारनें जबानीसाठीं बोलाविलेल्या आरोपीपासून न्याय देण्यापूर्वी घेतलेला पैसा, खर्च 'त्याजवरून सरकारांतून राजश्री बाळाजी महादेव याजकडे मनसबीविशीं पत्र

दिल्हें त्यांनीं आपल्यास मसाला करून आणिले.'-थोमारो २.१५२. ५ वसुल करावयास गेलेल्या शिपायाला सरकारी चिठ्ठींत लिहिलेलें द्यावें लागतें तें द्रव्य. 'त्याजवर कोपायमान होऊन ढालाईत व दहा हजार रुपये मसाला करून पाठविले.'-भाब १०१. ६ निरनिराळ्या निमित्तानें बसविलेले दंड, दस्त. 'त्यावरून तुम्हीं लोहवाडीच्या पाटलास वीस रुपये मसाला घेतला.' -वाडबाबा २.७८. ७ सामान; सामुग्री; साहित्य. ८ (ओतकाम) डांबर आणि विटकर यांचा एकजीव करून केलेली ओतकामाची माती. [अर. मसालिह; मस्लहत्चें अव.] **मसालेदार**-वि. मसाल्यानें युक्त; मसाला घालून स्वादिष्ट केलेला (खाद्य, पेय इ० पदार्थ).

मसि(सी)हा—पु. तारणारा; ख्रिस्त.-वि. इसवी; ख्रिस्ती. 'सन १७९६ मसीहा.'-पदभव ८५. [अर. मसीह]

मसुदरेघ-ओळ—स्त्री. शुद्ध, मुसलमान किंवा स्वतःपेक्षां हलक्या दर्जाच्या लोकांस लिहिलेल्या पत्राच्या चार रकान्यांपैकीं पहिल्या तीन रकान्यांत ओढलेली रेघ. [हिं. मस्तर+म. रेघ]

मसु(सो)दा—पु. कच्चा खर्डा; पक्कें करण्यापूर्वीचें पहिलें लिखाण; आराखडा. 'मसोदेही पाटवून, तेथून ठरून खचित आज्ञा आल्यावर इनायत-नामे त्याप्रमाणें द्यावे.'-रा ५.१९५. [अर. मुस्वद]

मसुरा—पु. धान्य सांठविण्यासाठीं भिंतींत ठेविलेली पोकळ जागा.

मसुरुल् दौलत-हजरत—वि. राजमान्य. [फा.]

मसूर—स्त्री. एक प्रकारचें द्विदल धान्य. [सं.] **मसूरी मिरची**-स्त्री. मिरचीची एक जात. **मसूरिका, मसूरी, मसूऱ्या देवी**-स्त्री. देवीच्या रोगाचा एक प्रकार. त्यांत अंगावर मसुरीच्या आकाराचे फोड येतात.

मसूरघोडी—स्त्री. मुलांचा एक खेळ.-मखेपु ९१.

मसैरें—न. १ अंधार; काळोख. 'तें अज्ञान जैं समूळ तुटे। तैं भ्रांतीचें मसैरें फिटे।'-ज्ञा ५.८३. २ काजळ. [मस, मशी]

मसोटी—स्त्री. (बे.) स्मशान; मसणवट.

मस्क—पु. कस्तुरी. [फा. मुश्क्]

मस्करी—पु. संन्यासी. [सं. मस्करिन्]

मस्करी—स्त्री. थट्टा; चेष्टा; विनोद; टवाळी; कुचाळी. [अर मस्खरा=गमत्या] **मस्करीची कुस्करी-होणें**-चेष्टेचें पर्यवसान भांडणांत होणें. **मस्क-ऱ्या**-पु. विदूषक; गमत्या. [अर. मस्खरा]

मस्त—वि. मत्त पहा. १ धुंद; उन्मत्त; गर्विष्ठ. २ धष्टपुष्ट; लठ्ठ; मोठा. ३ (कृण.) विपुल: पुष्कळ; भरपूर; खूप. 'सुर समस्त इच्छावर निश्चयें। सुरस मस्त असें वदले स्वयें।'-र ४७. ४ (व.) मनाजोगा; चांगला. [फा. मस्त=तर्र] **म्ह० पडेल हस्त** तर पिकेल मस्त. **०खोर**-वि. मस्तीखोर; उन्मत्त. 'आला अफूजल मस्तखोर कपटी प्रासावयाला झणीं।'-चित्रगुप्त ११. **०जावप**--(गो.)मस्ती येणें. **०बाल**-वि.उन्मत्त;माजलेला;माजोरी; मगरूर. **मस्ता-स्त्या**-वि. १ अमली पदार्थाच्या सेवनानें तर्र झालेला; झिंगलेला. २ (ल.) उन्मत्त; उर्मट; चढेल. ३ उधळलेला; बेफाम सुटलेला (घोडा). **मस्तावणें** अक्रि. मस्त होणें; माजणें; गर्वानें फुगून जाणें; मगरूर होणें.

मस्तक—पुन. १ डोकें; शिर. २ कोणत्याहि पदार्थाचा वरचा भाग; शिरोभाग. [सं.] **म्ह०** दोन हस्तक आणि तिसरें मस्तक. **०ठेगणें, करणें**-नम्रतेनें वागणें; गर्व, ताठा, अभिमान सोडून देणें. 'करी मस्तक ठेंगणा। लागे संताचिया चरणां।'-तुगा **०डोलविणें**-मान्यता, स्वीकार, अनुमोदन, समाधान इ० दर्शविण्याकरितां मान डोलविणें. 'सोडुनि समाधि, मस्तक डोलविलें, आयकोन, देवाघें।'-मोभीष्म २.५. **०हुंगणें**-अवघ्राण; मोठ्या मनुष्यानें प्रेमाचें लक्षण म्हणून लहानाच्या डोक्याचा वास घेणें. 'हुंगुनि मस्तक हस्तें कुरवाळी तो पितामह त्वरित।'-मोशांति ७.११. **मस्तकीं मारणें**-माथीं मारणें; एखाद्यावर सोंपविणें. **०द्वार**-न. टाळू. 'नाकीं तोंडीं बैसलें मास। मस्तकद्वारें सांडी श्वास।'-दा ३.१.३६. **०पट्टी**-स्त्री. खिडकीच्या किंवा दाराच्या चौकटीची वरची पट्टी. **०विज्ञान**-न. मानसशास्त्राचा एक प्रकार. या शास्त्राच्या योगानें माणसाच्या स्वभावाचें व बौद्धिक शक्तीचें ज्ञान होतें. (इं.) फिजिऑग्नमी. **मस्तकावघ्राण**-न. आप्तेष्टांना भेटतांना प्रेमाचें चिन्ह म्हणून मस्तक हुंगणें. [मस्तक+अवघ्राण]

मस्तराळ—पुन. हजेरीपुस्तक; नांवनिशी; इममवारी. [इं. मस्टररोल अप.]

मस्ती—स्त्री. १ अंमल; कैफ; झिंगलेपणाची स्थिति (शब्दशः व ल) २ ताठा; गर्व; अभिमान; माज; गुर्मी. ३ कैफ चढून किंवा हर्षाच्या भरांत केलेल्या चेष्टा; दांडगाईचे खेळ, खोड्या. ४ हत्ती, उंट इ० च्या गंडस्थळांतून गळणारा मदाचा स्राव. उन्माद; मद; [फा.] **०येणें**-उन्मत्त होणें; अंगांत गुर्मी येणें. **०खोर**-वि. मस्त.

मस्तु—न. दह्यावरचें पाणी-योर १.१५५. [सं.]

मस्तुती—स्त्री. बराच अरुंद व लांबचलांब असा जमिनीचा पट्टा.-मसाप १.२.९. [का. मस्तुदीर=वर्तुळाकार, परिघ]

मस्तुरें—न. (व. ना.) तोंडयासारखा हातांत घालण्याचा दागिना.

मस्तुलुंग—न. मस्तकांतील मेंदू. मगज. [सं.] **०शास्त्र**-न. मस्तिष्कविज्ञानशास्त्र; मस्तकसामुद्रिक; (इं.) फ्रेनॉलॉजी.

मस्तूर—स्त्री. (कों. नाविक.) तागाची दोरी. हिचें एक टोंक (पाचर) बारीक व दुसरें जाड असतें. [मस्तूल=डोलकाठी]

मस्तूर—वि. लिहिलेला. –आदिलशाही फर्मानें. [अर.]

मस्रूर—वि. आनंदित. 'हमेशा मोहबदनामा इब्लाग करोन मस्रूर करीत जाणें.' –रा १०.१६४. [अर. मस्रूर]

मस्विदा—पु. मसुदा पहा. 'पत्राचे मस्विदे मशार्निल्हे याजपाशीं दिले.' –रा ३.३३६. [अर. मुसव्वदा]

महक, मह(हे)कार—स्त्री. (व. ना.) सुगंध; सुवास; खमंग वास.

महकमा—पु. (व.) नोकरमंडळ. 'तुमच्या महकम्यांत लोक किती?' [अर. महकमा–न्याय कचेरी]

महकूब-फ—वि. तहकूब; रहित; तात्पुरतें किंवा कायमचें बंद. 'असें ठरून लढाई महकूब झाली.' –इमं १९४. [अर. मौकूफ्] **महकुबी**–स्त्री. तात्पुरती किंवा कायमची थांबणूक; तहकुबी; बंदी. 'आज प्रतिनिधी पंत जाणार होते, परंतु तूर्त महकुबी जाली.' –ख ११.६०७४.

महज(जी)द—स्त्री. मशीद. 'महजदी बांधोन पुजारे। ठाईं ठाईं स्थापिले।' –नव २३.१७८. 'कोठें महजीद आहे तेथें त्याचें स्मरण करून बांग देतात' –वाडसनदा १५०. [फा. मस्जिद]

महजब—पु. धर्मपंथ; धर्म. 'हिंदु अगर मुसलमान होऊन इस्कील करील त्यास आपले महजबाची सौगंद असे.' –रा १५. १५६. [अर. मज्हब्]

महजर—पु. १ बादशहानें दिलेली सनद; सनदपत्र. 'गोत महजर करून घेतला होता तो माघारा घेतला असे.' –समारो १.६८. २ हुकूमनामा; करारपत्र; निकाल; निवाडापत्र. 'ग्वाही भक्ताची घालूनियां वरि। महजर करीं आहे माझ्या।' –तुगा १२२३. ३ दाव्याचे कागदपत्र, पुरावा; कैफीयत. [अर. महज्झर्]

महजूद—वि. जिवंत; विद्यमान; उपस्थित; हजर. 'आम्ही तो महजूद आहों.' –रा १.१९५. [अर. मौजूद्]

महडणें, महडवणी, महडविणें—(प्र.) मढणें इ०पहा.

महत्—वि. १ मोठा; बडा; विस्तृत. २ (ल.) थोर; वरच्या दर्जाचा; उत्कृष्ट; कोणत्याहि गुणांत श्रेष्ठ. जसें–महाबुद्धिमान्, महालबाड; महासोदा. महत् हा शब्द कर्मधारय आणि बहुव्रीहि समासांत महा असा होतो आणि तत्पुरुष समासांत तसाच राहतो. जसें-महादेव, महाबाहु व महत्पूजा; महत्सेवा. ३ अतिशय; फार; अत्यंत जसें–महाप्रचंड; महातीक्ष्ण इ० [सं.] **महतामहत्**–वि. (व.) मोठ्यांतला मोठा; सर्वांत मोठा. **महत्तत्त्व**–न. सत्त्व रज, तम या तीन गुणांची साम्यावस्था; मूळमाया; गुणसाम्य. 'सत्त्वगुणापासुन महत्तत्व उत्पन्न झालें.' –टिले ४.३६१. **महत्तमसाधारण भाजक**–पु. दिलेल्या सर्व संख्यांना पूर्ण भाग जाईल अशी सर्वांत मोठी संख्या. **महदंतर**–न. फार मोठें अंतर, तफावत; वेगळेपणा. **महदहंबुद्धि**–स्त्री. महत्तत्त्व; अहंकार-बुद्धि. 'एवं महदहंबुद्धि। मनें महाभूत समृद्धि।' –माज्ञा १५.१०५. **महदादिदेहांत**–क्रिवि. महत्तत्त्वापासुन स्थूलदेहापर्यंत. 'महदादि देहातें। इयें आशेषेंही भूतें।' –ज्ञा ९.६७. **महद्ब्रह्म**–न. मूळ ब्रह्म. 'तया महद्ब्रह्मातें व्याली। दैविकी इच्छा।' –ज्ञा ११.५११. **महद्भूत**–वि. विलक्षण; असामान्य; चमत्कारिक. **महद्वर्तुळ**–न. गोलाचें वर्तुळ; खगोलीय वृत्त. **महती**–स्त्री. मोठेपणा; महत्त्व. 'त्याचेनि माझी त्रैलोकीं ख्याती। मज महती त्याचेनी।' –एभा १४.२६९. **महतीवीणा**–स्त्री. नारदाच्या वीणेचें नांव. **महत्त्व**-न. मोठेपणा; योग्यता; लौकिक; प्रतिष्ठा; किंमत. महती पहा. 'रायाजी पाटिल महत्त्व रक्षी।' –ऐपो ३२. **०उतरणें**–योग्यता, प्रतिष्ठा कमी होणें. **०चाढविणें**–फुशारकी, बढाई मारणें. **०दर्शक**–वि. पदार्थाचें माप, लांबी, रुंदी इ० दाखविणारें (परिमाण). **०मापन**–न. गणितशास्त्राचा एक विभाग; आकारमान मोजण्याची विद्या; मापनशास्त्र. **महत्त्वाकांक्षा**–स्त्री. मोठेपणाची इच्छा, हांव; जिगीषा. 'कर्तबगार लोकांच्या वेडाला महत्त्वाकांक्षा म्हणतात.' –विधिलिखित २१. **महा**–वि. १ महत् पहा. २ थोर; बडा. 'हे एक महा आहेत.' 'तो काय एक महा आहे.' **०अर्बुद**–न. एक हजार दशकोटि ही संख्या. **०ऊर**–पु. (अप.) महापूर; अतिशय मोठा पूर. **०एकादशी**–स्त्री. आषाढशुद्ध व कार्तिक शुद्ध एकादशी. **०कंद**–पु. १ मोठ्या जातीचा कंद. २ लसुण. **०कल्प**–पु. ब्रह्मदेवाच्या शंभर वर्षांचा काल; ब्रह्मदेवाचें आयुष्य; महाप्रलय; कल्प पहा. **०काल–ळ**–पु. १ प्रलय काळचा शंकराचा अवतार. 'महाकाळ उभा चिरीन बाणीं।' २ बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक (उज्जनी येथील). **०काली**–स्त्री. १ पार्वती. २ प्रचंड तोफ; महाकाळी. –शर. **०काव्य**–न. वीररसप्रधान, मोठें, अभिजात, रामायण-महाभारताप्रमाणें काव्य; (इं.) एपिक. 'आर्ष महाकाव्यांत कोणकोणते गुण असावे याबद्दल पुढें विवेचन येईलच.' **०काश**–न. अवकाश; अफाट पोकळी. याच्या उलट घटाकाश, मठाकाश. [महा+आकाश] **०कुल-कुलीन**–वि. थोर, उच्च कुलांतील; कुलीन. **०खळें**–न. मोठें अंगण. **०गाणी–नी**–वि. गानकुशल. 'उत्तर देशींच्या महागाणी। गुर्जरिणी अतिगौरा।' –मुरंशु १२२. **०गिरी**–पु. मोठा पर्वत; हिमालय. 'किं मक्षिकाचेनि थडकें। महागिरी पडों शके।' –एकनाथ–आनंदलहरी ४२. –स्त्री. १ तीनशें खंडीपर्यंत वजन नेणारें जहाज, गलबत; मालाचें तारूं; 'सबब त्यांजकडे दोन महागिऱ्या भरून गवत व एक महागिरीभर लांकडे देविलीं असे,' –समारो ३.१६. २ मोठें तारूं;

शिबाड; बतेला. **०ग्रह-ग्राह**-पु. मोठी सुसर; मोठा मगर. 'गज करवडी महाग्राह।' –एरुस्व १०.८० –एभा २०.३५०. **०जन**–पु. १ काहीं गुण, विद्या इ० मुळें थोर, श्रेष्ठ माणूस. 'परंतु हृदयीं महाजन भयास मी मानितों।' –भक्तमयूरकेका ७५. २ व्यापारी; उदमी; सावकार. ३ गाव, कसबा इ० तील व्यापाराला नियम, शिस्त घालून देणारा, त्यावर देखरेख करणारा व कर वसुल करणारा सरकारी अधिकारी. ह्या अर्थी महाजनी असाहि शब्द आहे. ४ पंच **०जनकी**–स्त्री. महाजनाचें काम, अधिकार. **०डाळा**–पु एक मासा. –प्राणिमो ८१. **०तल**–न. सप्तपातालांपैकीं एक; नाग व असुर यांचें स्थान. **०ताप**–पु. (तंजा.) शोभेच्या दारूचा एक प्रकार; चंद्रज्योति. महताब पहा. **०तेज**–न. १ ब्रह्म २ सूर्य. 'हें अपार कैसेनि कवळावें। महातेज कवणें धवळावें.' –ज्ञा १.७४ **महात्मा**–पु. १ महानुभव पंथांतील व्यक्ति. २ मोठा धैर्यवान, पराक्रमी मनुष्य. 'तैसें महात्मा वृक्षमुळीं। असावें खांड देउळीं। –भाए ४९३. गौतमबुद्ध, गांधी यांस संबोधितात. –वि १ थोर मनाचा; उदार; महानुभाव. 'परते धर्म महात्मा, स्तविला बहु नारदादि साधूंनीं।' –मोभीष्म १ ९९. [महा+आत्मा] **०दंदी**–वि. महामत्सरी; कट्टर द्वेष्टा. 'छंदि फंदि महादंदि। रावण पाडिला तुझ्या बंदि।' –ज्ञानप्रदीप २६६. [सं. महाद्वंद्वी] **०दशा**–स्त्री. (ज्योतिष) कुंडलीतील मुख्य ग्रहाची बाधा. अंतर्दशा पहा. **०दान**–न. (मोठें दान) हत्ती इ० षोडशदानांपैकीं एक; षोडशमहादानें पहा **०देव**–पु. १ शंकर; शिव. 'महादेव म्हणावया कारण। ब्रह्मयासि. जाण या हेतू।' –एभा १३.२७९. २ (विणकाम) हातमागाच्या फणीचा वरचा अवयव, दांडा फळी. हा आणि तळचा दांडा किंवा पार्वती मिळून फणीची चौकट होते या फणीच्या चौकटीस महादेवपार्वती किंवा हात्यादांडी असेंहि म्हणतात **०देवाचें देणें**–न. कंटाळवाणें व दीर्घकाल टिकणारें काम. **०देवापुढचा**–वि. (शब्दशः) नंदी; (ल.) मूर्ख; निर्बुद्ध. **०देवी**–स्त्री. १ पार्वती; दुर्गा. २ एक प्रकारची वनस्पति. हिचें बीं महादेवाच्या पिंडीच्या आकाराप्रमाणें असतें. **०देवी सहादेवी**–स्त्री. (माण.) चैत्री पौर्णिमेस तिन्हीसांजचे वेळीं एखाद्या भितीवर जीं महादेवी सहादेवी म्हणून दोन गंधाचीं बाहुलीं काढून त्यांची पूजा करतात तीं. –मसाप ४.४.२५९. **०देव**–(माण.) सर्व जातींचे लोक. **०द्वार**–न. (मंदिराचा किंवा राजवाड्याचा) बाहेरचा किंवा मुख्य दरवाजा. 'भक्त गर्जती महाद्वारीं। त्यांसी द्यावें दर्शन।' –भुपाळी विठ्ठलाची पृ २२. **०द्वीप**–न. (मोठें बेट) खंड. 'तयाफळाचे हें महाद्वीप। पातली प्रभु।' –ज्ञा १६ ३२ **०नदी**–स्त्री. मोठी नदी; उगमापासुन शंभर योजनांवर वाहात जाणारी नदी. **०न मी**–स्त्री. १ आश्विन शुद्ध नवमी; नवरात्राचा शेवटचा दिवस. २ रामनवमी. –शाल्रीको. **०नवरात्र**–न. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासुन विजयादशमीपर्यंतचा काल. **०नस**–पु. स्वयंपाकघर. **०नक्षत्र**–न. सूर्यनक्षत्र **०नाड**–पु. महाजनासारखा एक वतनदार. 'महाजन व महानाड पेठ मजकूर यांचें नांवें सनद कीं,' –थोमारो १ ५४. [महा+नाड–डु] **०निंब**–पु. एक प्रकारचें झाड. **०निद्रा**–स्त्री. मरण; मृत्यु 'तिसरें प्रमाण महानिद्रा म्हणजे मृत्यु हें होय?' –टि ४.४८१. **महानुभाव**–पु. श्रीचक्रधरानें स्थापिलेला एक द्वैतवादी पंथ. या पंथांत श्रीकृष्णभक्ति प्रमुख आहे. [महा+अनुभाव] –वि. १ ज्यानें कामक्रोधादि विकार जिंकले आहेत असा; महात्मा. २ उदार थोर पुरुष एवं पिंडारकीं ऋषि सर्व। शापानुग्रही महानुभाव।' –एभा १ ३३६ ३ प्रशस्त अनुभवाचा; ब्रह्मानुभवी. 'ऐसें जे महानुभाव। जे दैविये प्रकृतीचें दैव।' –ज्ञा ९ १९४. ४ विद्या, बुद्धि, पराक्रम इ० गुणांनीं श्रेष्ठ मनुष्य; महाप्रतापी. **०नेटका**–वि. परिपूर्ण; पूर्णपणें; व्यवस्थित. 'यज्ञ मुनिचा राखे महानेटका।' –मोरामायणें त्रिःसप्तमंत्रमय रामायण ३. **०नैवेद्य**–पुन. पंचपक्वान्नमय अन्नाचें ताट वाढून देवाला दाखवितात तो नैवेद्य (साखर, दूध इ०चा छोटा नैवेद्य होतो). **०न्यास**–पु. पूजा करतांना शरीराच्या विवक्षित भागांना स्पर्श करून करावयाचा न्यास. याचाच दुसरा प्रकार लघुन्यास. **०पट**–पु. (महानु.) महापट; ध्वज. 'आहो जी देवा। पैलु देखिला महापटांचा मेळावा।' –शिशु १०३३. [महापट] **०प(पं)थ**–पु. १ मृत्यु; मरण; मृत्यूची वाट. 'न देशील सत्यवंत। तरी करीन हाचि महापंथ।' –वसा ६ ८. २ निर्वाणाचा मार्ग. 'लागले महापंथी तत्काळची।' –एभा ३१ २९८. **०पद**–न. ब्रह्मपद. 'कीं श्रुति हे महापदीं। पैठी जाहली।' –ज्ञा १३.३७१. **०पद्म**–पु. १ एकं, दहं, शतं ह्या श्रेणींतील तेराव्या स्थानची संख्या (एकावर बारा शून्यें इतका आकडा) २ कुबेराच्या नवनिधींपैकीं एक निधि. नवनिधी पहा. **०पातक**–न. ब्रह्महत्या, दारू पिणें, सुवर्णाची चोरी, गुरूच्या पत्नीबरोबर किंवा स्वतःच्या मातेबरोबर संभोग आणि यांपैकीं एखादें पातक करणाराशीं मैत्री, अशा पांच मोठ्या पातकांपैकीं प्रत्येक **०पातकी**–वि. १ ज्याच्या हातून महापातक घडलें आहे असा. २ अत्यंत पापी; दुराचारी. **म्ह०** अवसानघातकी महापातकी. **०पाप-पी**–महापातक-की पहा. **०पीठ**–न. विष्णुच्या चक्रानें झालेले शक्ती–पार्वतीच्या शरीराचे तुकडे ज्या ठिकाणीं पडले असें मानतात त्या अत्यंत पवित्र स्थानांपैकीं प्रत्येक. अशीं स्थानें साडेतीन आहेत. तुळजापूर, मातापूर आणि कोल्हापूर, हीं तीन व अर्धे सप्तशृंग. औट पीठ पहा. **०पुरुष**–पु. १ ईश्वर. २ साधु-पुरुष; सत्पुरुष; ब्रह्मनिष्ठ मनुष्य. 'महापुरुषाचें चित्त। जालिया वस्तुगत।' –ज्ञा १३.७८९ ३ मेलेल्या ब्राह्मणाचें पिशाच्च. **०पू(पु)जा**–स्त्री व्रतसमाप्ति इत्यादि विवक्षित प्रसंगास अनुसरून करतात ती मोठी पूजा. **०पूर**–पु. नदीस येणारा मोठा पूर, लोंढा.

'महापूरें झाडें जाती। तेथें लव्हाळे राहती।'–तुगा १०४३. **०प्रयास**–पु मोठे परिश्रम, कष्ट, प्रयत्न, खटाटोप. **०प्रलय**–पु. १ प्रत्येक ४३२०००००० वर्षांनीं होणारा सर्व जगाचा नाश. २ ब्रह्मदेवाच्या शंभर वर्षांनीं होणारा सर्व (देव, ब्राह्मण, साधू, ब्रह्मा यासह) विश्वाचा नाश. 'जो ब्रह्मयाच्या स्थूळ देहाचें मरण। तो महाप्रलय जाण।' महाकल्प पहा. **०प्रयास**–पुअव. फार मोठे कष्ट, श्रम, प्रयत्न. **०प्रसाद**–पु. १ धार्मिक किंवा देवाच्या उत्सवानंतर वाटतात तो फुलें, मिठाई, जेवण इ०रूप प्रसाद. २ देव, गुरु इ०पासून मिळालेली प्रसादाची वस्तु (कृपा, अनुग्रह म्हणून). ३ (शब्दशः व ल.) मोठी कृपा, अनुग्रह 'महःप्रसादाचेनि हारिखें। सप्रेम सुखें डुलती।' **०प्रस्थान**–न. (मोठा प्रवास) १ यथार्थ ब्रह्मज्ञानानंतर येणारा मृत्यु. २ (ल) मरण; मृत्यु **०प्राण**–पु. १ मोठ्या जोरानें व प्रयासानें केलेला उच्चार: हकारयुक्त उच्चार २ जोरानें आणि प्रयासानें उच्चारण्याचा वर्ण. जसें–ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, ध, फ भ, आणि ह अल्पप्राण आणि बाह्य प्रयत्न पहा. **०फणी**–पु. मोठा साप **०फल-ळ**–न. मोठें, उत्कृष्ट फळ: नारळ, फणस इ० **०बलि-ली**–पु, पिशाच्चादिकांस संतुष्ट करण्यासाठीं मांस, अन्न इ० चा बलि, अर्पण करावयाचा पदार्थ **०बळी**–वि. अत्यंत प्रबळ, सामर्थ्यवान्. 'महाबली प्राणदाता सकळां उठवी बळें।'–मारुतिस्तोत्र. **०बळा बुटी**–स्त्री. रुंदट पानाचें आलें. **०भाग**–वि.१अतिशय भाग्यवान् 'नित्य निष्काम अतिप्रीतीं। मज भजती महाभाग।'–एभा २४ ३३५. २ सद्गुणी: सद्वर्तनी. **०भारत**–न. व्यासप्रणीत कौरव–पांडवांच्या युद्धाचें भारतीयांचें पवित्र असें एक महाकाव्य; महापुराण **०भूत**–न. पृथ्वी, आप तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांपैकीं प्रत्येक. 'तरी होसी गा तूं परब्रह्म। जे या महाभूता विसंवतें धाम।'–ज्ञा १०.१४९. **०भेड**–वि. अत्यंत भितरा: भेकड. 'मग विराटाचेनि महाभेडें उत्तरें।'–ज्ञा ११ ४६९. **०मणि**–पु. मौल्यवान् रत्न; हिरा, माणिक इ० 'कांचोटी आणि महामणी। मेरू मशक सम नव्हे।'–ह १ ८४. **०मति-मना**–वि थोर अंतःकरणाचा; उदार मनाचा; महात्मा. **०मंत्र**–पु. निरनिराळ्या देवतांचा मुख्य मंत्र. जसें–गायत्री हा ब्राह्मणांचा महामंत्र. 'महामंत्र आत्मप्राप्तीची खाणी।' **०मंत्री**–पु. मुख्यप्रधान; मुख्य मंत्री सल्लागार. **०महोपाध्याय**–पु. मोठ्या शास्त्र्यांला देतात ती एक सन्मानाची सरकारी पदवी. **०मात्र**–पु. हत्ती हांकणारा; महात. 'मुरडावया मत्त हस्ती। महामात्र दोन्हीं हस्तीं। अंकुश हाणी तैसा श्रीपती। मर्मोद्घाटनें करीतसे।'–यथादी २ १६. **०माया**–स्त्री. १ पार्वती; दुर्गा. २ जगदुत्पादक शक्ति; सर्व संसाराला, प्रपंचाला कारणीभूत अशी देवता; आदिमाया; मूलप्रकृति ३ जहांबाज कजाग बायको. **०मार**–पु. मोठा मार, फटका. 'शुक्रबाणाचा महामारु।'–मुवन ३.३८. **०मारी**–स्त्री. १ मोठा मृत्यु. 'तेथ अचेतना झुंजारीं। न मरत्या महामारीं।'–एभा २८.२५०. २ (ल.) प्राणसंकट. 'तिचेनि योगें महामारी। पातली हे जाणिजे।'–मुवन ७ १८७. ३ पटकी या सांथीचा रोग. ४ या रोगाची अधिष्ठात्री, दुर्गादेवी. ५ जिवापाड श्रम; शिकस्तीचा प्रयत्न ६ हाणाहाणी; मारामारी: मोठें युद्ध. 'दोघे झुंजतां महामारी'–मुवन ३.३६. 'तैसी मांडिली महामारी।'–कथा २.२.६०. **०मृत्यु**–पु. मरण; मृत्यू (अपमृत्युविषयीं बोलतांना उपयोग) जसें–'अपमृत्यूचा महामृत्यु झाला.' **०मृत्युंजय**–(वैद्यक) एक औषध. **०यंत्र**–न. तोफ. **०यज्ञ-याग**–पु. मोठा यज्ञ; पंच महायज्ञांपैकीं प्रत्येक; पंचमहायज्ञ पहा. 'तरी महायागपसुखें। कर्में निफज नाहीं अचुकें।'–ज्ञा १८.१६६. **०यात्रा**–स्त्री. १ काशीयात्रा. २ (ल.) मरण; मृत्यु. 'आधीं पेशवाई संकट सगळयाना महाय त्रेला धाडीन.'–अस्तंभा १६२. महाप्रस्थान पहा. **०रथ-र्था**–पु. १ शस्त्रास्त्रात प्रवीण असून दहा हजार धनुर्धारी योद्धयाबरोबर एकटाच लढणारा योद्धा. 'महारथी श्रेष्ठु। द्रुपद वीरु।'–ज्ञा १ ९८. २ (ल) अत्यंत शूर, कर्तबगार पुरुष किंवा मोठा वक्ता. **०रस**–न. १ ब्रह्म. २ पक्वान्न. –मनो. **०राज**–पु. १ सार्वभौम राजा; सम्राट्. २ (आदरार्थी) श्रेष्ठ माणूस. ३ जैन, गुजराथी वैष्णव लोकांचा गुरु. **०रात्रि**–स्त्री. महाशिवरात्र माघ वद्य चतुर्दशी. **०राष्ट्र**–नपु मराठे लोकांचा वंश: उत्तरेस नर्मदानदी, दक्षिणेस कर्नाटक पूर्वेस तैलंगण आणि पश्चिमेस समुद्र यांनीं मर्यादित असलेला प्रदेश; मुंबई इलाख्यांतील एक विभाग. **०राष्ट्र-राष्ट्रीय**–वि. महाराष्ट्रवंशासंबंधाचे (लोक, भाषा, रिवाज इ०). **०राष्ट्र-भाषा**–स्त्री मराठी भाषा; संस्कृत–प्राकृत भाषेपासून झालेली एक देशी भाषा. **०राष्ट्री**–एक जुनी प्राकृत भाषा. **०रुख**–पु एक प्रकारचें झाड; महावृक्ष. 'कवेत लागला महारुखा। म्हणे पुढती न दिसे निका।'–मुआदि ३३.२९. **०रुद्र**–पु. १ रुद्राभिषेकाचा एक प्रकार: अकरा लघुरुद्र; लघुरुद्राच्या उलट शब्द महारुद्र. २ मारुती. 'महारुद्र आज्ञेप्रमाणें निघाला।'–राक १ १. **०रुद्रो**–पु. (गु.) बाजरीची मोठी जात हिचें काड फार उंच होतें –कृषि २७७. **०रोग**–पु १ अत्यंत दुःखदायक असा रोग. याचे आठ प्रकार आहेत–वातव्याधि, अश्मरी कृच्छ्र, मेह, उदर, भगंदर, अर्श आणि संग्रहणी. कांहींच्या मतें हे नऊ आहेत; त्यांत राजयक्ष्मा हा एक जास्त असून कृच्छ्राऐवजीं कुष्ठ व संग्रहणीच्या ऐवजीं ग्रहणी अशीं नांवें आहेत. २ रक्तपित्त: गलित कुष्ठ **महार्घ**–वि. १ महाग; दुष्प्राप्य. 'महार्घ येथें परमार्थ जाला।'–सारुह १.२१. २ मौल्यवान् [सं. महा+अर्घ] **०र्णव**–पु. मोठा समुद्र; महासागर. 'वर्नी रणीं शत्रु–जलाग्निसंकटीं। महार्णवीं पर्वत–वास दुर्घटीं।'–वामन

स्फुट श्लोक ३५. (नवनीत पृ. १३७.) –न. १ (ल.) मोठें, दीर्घकाल चाललेलें भांडण; युद्ध: लढाई. 'दोघां मांडलें महार्णव । दाविती बळ प्रौढीगौरव ।' –निगा २४. २ प्रसिद्धि; डांगोरा; जघन्यत्व. ३ लहान काम, प्रकरण, गोष्ट इ० ला मोठें रूप देऊन सांगणें; राईचा पर्वत करणें. 'एवढयाशा गोष्टीचें त्वां लागलेंच महार्णव केलेंस.' [सं. महा+अर्णव] **०लय**–पु १ आश्रयस्थान: आश्रम; धर्मशाळा. २ देऊळ. ३ परमात्मा. ४ भाद्रपद वद्यपक्षांतील पितरांप्रीत्यर्थ केलेलें श्राद्ध; पक्ष; मृतपितृकानें भाद्रपद शुद्ध पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंत दररोज करावयाचें श्राद्ध. हें रोज करणें अशक्य असल्यास १५ दिवसांतून एका उक्त दिवशीं करावें. [महा+आलय] **०लक्ष्मा**–स्त्री. १ विष्णुपत्नी. २ अश्विन शुद्ध अष्टमीस पूजावयाची एक देवता, त्या देवतेचें व्रत. ३ भगवती; कोल्हापूरची देवी. ४ (ना.) ज्येष्ठागौरी; भाद्रपद शुद्ध नवमीस पूजा करावयाच्या देवता. **०लिंग**–न. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं प्रत्येक. **०वटी, महावटी**–स्त्री. राजमार्ग. 'हे कपटाची कस(व)टी । अनृत्याची माहावटी ।' –भाए ७५५. **०वस्त्र**–न. उंची, सुंदर वस्त्र; प्रतिष्ठित वस्त्र; शालजोडी इ० **०वाक्य**–न. वेदांतातील जीवब्रह्मांचें ऐक्य दाखविणारें तत्त्वमसि आदि वाक्य हीं चार वेदांचीं चार आहेत. 'तो महावाक्याचेनि नांवें । गुरुकृपेचेनि थावें ।' –ज्ञा १८.४०४. २ गायत्री मंत्र. **०वात**–पु. (तासीं ८० मैल वेगाचा) सोसाटयाचा वारा; झंझावात; तुफान. 'महावात सुटला म्हणुनि का कंप येत भूधरा ।' –सौभद्र **०विषुव**–न मेष संपात: हरिपद **०वृत्त**–न. ज्या वृत्ताची पातळी गोलाच्या मध्य बिंदूतून जाते तें वृत्त: मोठें वर्तुळ. **०वोजा**–वि. मोठया थाटाचा: तेजस्वी. 'संतोषोनी महाराजा । सभा रचित महवोजा ।'–गुच ३४. ९७. [महा+ओजस्] **०व्याधि**–पु. महारोग: रक्तपित्त **०शब्द**–पु. बोंब; शंखध्वनि **०शय**–पु. १ थोर पुरुष; महात्मा २ मोठया माणसांस महाराज रावसाहेब याप्रमाणें संबोधावयाचा शब्द. [सं. महा+आशय; बं. मॉशे; फ्रें मुस्ये (माँसिय)] **०शिवरात्र-त्रि**–स्त्री. माघ वद्य चतुर्दशी **०शून्य**–न. जें कांहींच नाहीं असें जें शून्यास अधिष्ठानरूप ब्रह्म तें; परब्रह्म. 'आतां महाशून्याचिया डोहीं । जेथ गगनासीचि ठावो नाहीं ।' –ज्ञा ६. ३१५. **महाष्टमी**–स्त्री. अश्विन शुद्ध अष्टमी. **०सरणी**–स्त्री. स्वर्गमार्ग. 'सोउनि सुयोधनाचा शोकार्त वरो पिता महासरणी ।' –मोभीष्म ११.१५. **०सागर**–पु पृथ्वीवरील पाण्याचा सागराहून मोठा सांठा; मोठासमुद्र. उदा० हिंदी महासागर. **०सिद्धांत**–पु. एकमेवाद्वितीयं ब्रह्म हा मुख्य सिद्धांत. 'आणि महासिद्धांतापाशीं । श्रुति हातपती शब्देंसीं ।' –ज्ञा १५.४३४. **०सिद्धि**–स्त्री. अष्टमहासिद्धि पहा. 'जेथ महासिद्धींचीं भांडारें । अमृताचीं कोठारें ।' –ज्ञा ६.३२१. **०सुख**–न. ब्रह्मसुख; ब्रह्मसाक्षात्कार. 'जेथ परमानंदु केवळु । महासुखाचा ।' –ज्ञा १ १४. **०स्म(श्म)शान**–न. काशीक्षेत्र. 'सदाशिव बैसला निजासनीं । महाश्मशानीं निजवस्ती ।' –एभा २.३१. **०क्षेत्र**–न. काशीक्षेत्र. –रा ३.४७६. **महेंद्र**–पु. १ हिंदुस्थानांतील पर्वताच्या सात रांगांपैकीं एक. २ इंद्राचें नांव. 'हें महेंद्रपदही पाविजेल । परि मोह हा न फिटेल ।' –ज्ञा २.६५. [महा+इंद्र] **महेश, महेश्वर**–पु. शिव; शंकर. [महा+ईश्वर] **महेश्वरी पातळ**–न. महेश्वर नांवाच्या गांवीं (इंदूर संस्थान) तयार झालेलें वस्त्र, पातळ. 'आधींच कंबर बारिक त्यावर महेश्वरी पातळ कसलें ।' –होला ८९. **महोत्सव, महोत्साह**–पु मोठा उत्सव; आनंददायक प्रसंग. [महा+उत्सव] **महोदधि**–पु. १ महासागर; मोठा समुद्र. 'महोदधीं कां मिनले । स्रोत जैसे ।' –ज्ञा १५.३१७. २ हिंदीमहासागर [महा+उदधि] **महोदय**–पु. माघ किंवा पौष महिन्यांत सोमवारीं सूर्योदयीं अमावास्यारंभ, श्रवण नक्षत्राचा मध्य आणि व्यतिपाताचा शेवट यांचा योग; एक मोठें पर्व. [महा+उदय] **महौजा**–वि. तेजस्वी; ज्याचें तेज मोठें आहे असा; सामर्थ्यवान् 'पुरुष श्याम महौजा ओढित होता बळेंचि मजला जो ।' –मोवन १३.८८. [महा+ओज] **महान्**–वि. १ मोठा; विस्तृत; थोर. २ उशीरां पिकणारें (धान्य, पीक); गरवें ३ दोन किंवा अनेक वर्षें टिकणारें (झाड, मिरची, कापूस, पांढरी तूर इ०).

महंत—पु. १ बैरागी, गोसावी इ०च्या आखाडयाचा मुख्य नायक; (कायदा) पारमार्थिक शिक्षणसंस्थेतील आचार्य. 'महंतें महंत करावें ।' –दा ११ १०.२५ २ (सामा.) ऋषि; साधु. 'तरी महंताचिया वोडी । घरा आलियाही वोढी ।' –ज्ञा १७.३४७. ३ पंडित इ०मध्यें मुख्य मनुष्य; पुढारी; श्रेष्ठ दर्जाचा मनुष्य. ४ (हीख धर्मातील) सेवादार. –वि थोर; श्रेष्ठ [सं. महत्: हि.] **०पण, महंता**–नस्त्री. थोरपणा; मोठेपणा; योग्यता. 'तैसें आपणयांआपण । मानितां महंतपण ।' –ज्ञा १६ ३७८. **महंती**–स्त्री. १ महंताचा दर्जा, अधिकार, गुण, थोरपणा इ० २ (ल) मोठेपणा; थोरपणा; प्रौढी; थोरवी. 'लोकप्रतिष्ठा महंती । वैसावें अर्धी गर्जी रथीं ।' –एरुस्व ६ ६५.

महतकद्दम, महत्कद्दम—क्रिवि. पूर्वी. 'या वतनास हक्क लवाजिमा महतकद्दम चालला असेल त्याप्रमाणें तुम्हास करार केला असे.' –रा ८.५२. [अर. मा–तकद्दम्]

महताप–ब—स्त्री. १ चंद्रज्योत; आतषबाजीच्या जिन्नसांतील एक. २ हिलाल. 'महताबा लावून रात्रीं परस्परें गोळागोळी जाली.' –ख ८.४१३०. ३ चंद्र; चांदणें. ४ (ल.) सुंदर स्त्री. [फा. महताब्] **महतार्पा**–स्त्री. वर चांदणी घातलेला मांडव; (सामा.) मांडव. –ख १०.५४२०. [फा. महताबी]

महतारी—स्त्री. १ म्हातारी. 'इच्छी महतारी पुत्रसंतान।' –दावि २४३. २ (खा. व.) आई. [म्हातारी]

महदर, महदररेघ-ओळ—स्त्री. मसुदररेघ पहा.

महदूद—वि. निश्चित मर्यादेतील; मर्यादित (गांव इ०). 'गांवाची, जमिनीची हद्द महदूद करून दिली.' [अर. महदूद्]

महब्बतअंजाम—क्रिवि. प्रेमपूर्वक; सप्रेम. [फा.]

महंमाय—स्त्री. १ दुर्गादेवी. २ माया; असत्. महामाया पहा. [महामाया अप.]

महमुदी—स्त्री. १ एक फुलझाड. २ एक प्रकारचें सुती वस्त्र; तलम पण घट्ट विणीचें कापड. महामुदी पहा. –वाडमा १.१५७. [फा.]

महर्ग-र्घ—वि. महाग; भारी किंमतीचें; मौल्यवान्. [सं. महार्घ] **महर्ग(र्घ)ता**–स्त्री. १ महागाई. २ उणीव; कमतरता.

महर्लोक—पु. सूर्य आणि आकाशस्थ ज्योतींचें वसतिस्थान. सप्तलोक पहा. [सं.]

महर्षि—पु मोठा ऋषि, तपस्वी. 'राजर्षि, महर्षि सकळ येथें न्यूनाचि भूमिपाळसभा।' –मोसभा १ १० [सं. महा+ऋषि]

महल—पु. १ राजवाडा; प्रासाद; महाल. २ खातें –आदिल शाही फर्मानें. [फा.]

महला-ल्ला—पु. शहराचा भाग, पेठ; पुरा; मोहल्ला. [अर. महल्ला]

महशूर—वि. प्रसिद्ध; प्रख्यात; माहीत असलेला. [अर. मश्हूर]

महसरा—पु १ वेढा. २ उपद्रव. 'रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांनीं मसलत करून संस्थानास महसरा दिल्हा.' –वाडबुा ८१. [अर. महसूर्]

महसरा—पु. जमाव. - शर. [अर. महशूर्]

महसूफ—वि. उपरिनिर्दिष्ट; मजकूर. 'ज्या अर्थी खान महसूफ यांनींही खातर्जमेचें पत्र लिहिलें असें.' –ख ९.५०२२. [अर मौसूफ]

महसूल—पु. धारा; जमाबंदी; बसुल; जकात. [अर.] **महसुली**–वि. ज्यापासून वसुल यावयाचा असें (गांव, कूळ, शेत इ०).

महा—पु. महिना; मास; माहे. [अर. माह्] **महावार**–स्त्री. (व) १ महिन्याचा पगार. 'महावार शंभर रुपये' २ मासिक हप्ता. 'दारूच्या दुकानाची महावार पाठविली' –क्रिवि. महिन्याच्या महिन्यास; दरमहा; माहेवार. **महा-च-महा**–क्रिवि. दर महिन्यानें; महिन्याच्या महिन्यास [फा.]

महा—वि. (व.) मोठें.

महाकार—पु. (कर.) त्रास; दगदग

महाग—वि. १ ज्याला वाजवीपेक्षां जास्त किंमत पडते असा; ज्यास्त भावाचा, मोलाचा. २ जरूर असलेलें; मिळण्यास कठिण असलेलें. जसें–अन्नास–वस्त्रास–महाग. [सं महार्घ; प्रा. महाग्घ]**०होणें**–मिळण्यास कठिण होणें; दुष्प्राप्य होणें. **०लागणें**–त्रासदायक, नुकसानकारक होणें. **महागणें**–अक्रि. महाग होणें. **महागरा-ग्या**–वि. महाग दरानें विकणारा (वाणी). **महागाई**–स्त्री. १ बाजारांत जिन्नस नेहमींपेक्षां अधिक किंमतीनें विकला जात असण्याची स्थिति; महर्गता. २ कमतरता; उणीव. ३ महर्गतेच्या दिवसांत नोकरांना देण्याचा विशेषभत्ता. 'लहान पगाराच्या नोकरास महागाई देण्याबद्दल हुकूम सुटला आहे.' –टि १.५७९.

महाडी—स्त्री. (कुलाबा) भाताची एक जात. त्याचा दाणा तांबडा असतो. [?महाड]

महांडुळ—न. एक प्रकारचा साप. 'अज्ञानाचें जें वारुळ। त्यांत दोरीचें महांडुळ।' –अमृत ११०. मांडुळ पहा.

महात—द –पु. हत्तीला हाकणारा; माहामात्र; महावत. 'लीलेनें द्विडिभांचा न मद अवस्वापिता महात रणीं।' –मोभीष्म २.२. [सं. महामात्र; प्रा. महामत्त; हिं. महावत]

महातारचळ, महातारडा, महातारा—(प्र.) म्हातारचळ इ० पहा.

महात्याक दिवस—पु. (ना.) दिवसाचा तिसरा प्रहर. [महा+अत्यय+दिवस ?]

महादकांदा—पु. (अशिष्ट) महाबळेश्वराकडे होणारें भुईकमळ, कंदाळू.

महापा—पु. एक प्रकारचा मेणा, पालखी (स्त्रियासाठीं). [अर. मुहाफ]

महामात्र—पु. महात. 'प्रावृट् नदांत तरतां जेंवि गजा निजहिता महामात्र।' –मोभीष्म ८.१३. [सं.]

महामुदी—स्त्री. तलम पण घट्ट विणीचें कापड; मखमल. [अर. महमूदी]

महामूर—स्त्री. धान्यादिकाची विपुलता, समृद्धि, भरपूरपणा. –वि. १ पुष्कळ; विपुल; भरपूर; अतिशय. २ बंद केलेलें; लावलेलें (किल्ला इ०चें दार, दरवाजा, खिडकी). (क्रि० करणें; होणें). 'दरवाजे किल्ल्याचे रायगड याचे महामूर राखावे, खिडया मात्र उघडया असाव्यात.' –मराचिसं २. ३ पुरें झालेलें पेरणी इ० सर्व कामें केलेलें; पूर्णत्वास, पिकापावेतों आलेलें (शेत, पीक इ०). 'शेत पिकून महामूर झालें.' ४ गाढ; स्वस्थ, भरपूर (झोंप, नीज, निजणें) ५ आकंठ; भरपूर; भरगच्च (जेवणें, खाणें, भोजन). [अर. मअमुर] **महामुरी**–स्त्री. १ विपुलता;

समृद्धि. 'द्रव्याची लष्करांत महामुरी झाली.' २ (दार, खिडकी इ०ची) बंदपणाची, दरवाजा लावलेली स्थिति. ३ (शेत, पीक इ०ची) पूर्णावस्था; लागवड.

महार—पु. एक अंत्यज, अस्पृश्य जाति; अतिशूद्र: परवारी पहा. [सं. महा+अरि किंवा आर्य; महा+अर (पर्वताच्या गुहेंत राहणारा); मृत+हर=मेलेलें जनावर ओढणारा; मेर=गांवाची कडे?] **म्ह०** महाराची आई चांभार घेऊ (मला काय त्याचें). **०कचका**—पु. जोराजोराचें, आरडाओरडयाचें भांडण (महार नेहमीं भांडतात त्याप्रमाणें). **०कवडी**—स्त्री. एक जातीची कवडी. **०कावळा**—पु. डोंबकावळा. **०की**—स्त्री. १ गांवच्या महाराचें काम, हक्क, वतन, अधिकार. २ (ल.) कोणतेंहि हलकें, नीच, कष्टाचें काम. **०गजाल**—स्त्री. गडबड; गोंगाट; दंगल; आरडाओरड. **०चावडी**—स्त्री. अस्पृश्यांना गांवच्या चावडींत येऊन बसता येत नाहीं म्हणून बहुतेक खेडयांत गांवचावडीखेरीज दुसरी एक चावडी असते ती. –गांगा ५५. **०पुंज**—पु शेतकऱ्यांनीं आपल्या उत्पन्नांतील जो भाग गांवच्या महाराचा हक्क म्हणून सरकारांत भरावयाचा तो. **०पोर**—पु न. गांवांतील हलक्या जातीचे लोक. **०पोरगा**—पु. पागेमध्यें घोडयांची नोकरी करण्यासाठीं ठेवलेला महारजातीचा मनुष्य. **०भादवी**—स्त्री. भाद्रपद महिन्यांत देवीच्या यात्रेकरितां येणारा खर्च भागावा म्हणून महाराला जमिनीच्या उत्पन्नापैकीं द्यावयाचा भाग, किंवा कांहीं देणगी. **०महारकी**—स्त्री; महाराच्या इनामजमिनीवरील कर. **०व(वा)डा-वण**—पुन. १ महार लोकांची राहण्याची जागा. २ (ल.) सोंवळयाओवळ्या-संबंधानें अतिशय अव्यवस्था 'त्याचे घरीं सारा महारवाडा आहे. मी काहीं जेवावयास जात नाहीं.' **म्ह०** जेथें गांव तेथें महारवडा. **०शिलोळा-हडोळा-हडकी-रहाटी**—पुस्त्री. गांवचीं मेलेलीं गुरें टाकण्यासाठीं महाराला नेमून दिलेली जागा. **महारडा**—पु. (तिरस्कारार्थी) महार. **महारवां**—वि. महार लोकांनीं तयार केलेली (टोपली, केरसुणी, सूत इ०).

महारकी—स्त्री. चांगलें तलम कापड (धोतर जोडयाच्या उपयोगी). [सं. महार्घ?]

महाल—पु. १ तालुक्याचा पोटभाग; पेटा. देश पहा. 'साराश उभयतां महालचें अतो प्राबल्य जहालें आहे.' –पया ६१. २ ह्या पेटयाचीं कामें करावयाची जागा; कोर्ट-कचेरी. ३ यांत चालणारीं कामें. ४ खातें. 'पाकाशय, जलस्थान. फलस्थान, वसनागार आदिकरून हे नाजूक महाल ...' –मराभा १०. ५ घरांतील स्त्रियांची वसण्याउठण्याची जागा; अंत:पुर; गोषा: राणीवसा. 'श्रीच्या दर्शनास महालसहवर्तमान गेले.' –ब्रच ९४. ६ मोठा, भव्य वाडा; प्रासाद; राजवाडा; मंदिर; ७ क्रीडागृह. ८ सावकार, पेढीवाला इ०चा व्याप, विस्तार, पसारा. ९ खंडोबा, जोतिबा इ० च्या भेटीला पाल इ० गांवांहून जेजुरीकडे जावयाला निघालेली पालखी, काठी इ०ची मिरवणूक. १० राजस्त्री; बेगमांच्या नांवापुढें लावावयाचा बहुमानार्थक शब्द. उ० नूरमहाल, झिनत् महाल इ० [अर महल्ल] **०मजकुरावर-खालीं घालणें-लोटणें-टाकणें-नेणें-देणें**—कांहीं एक गोष्ट ज्यावेळीं करणें जरूर आहे त्यावेळीं न करतां लांबणीवर टाकणें, टाळणें, पुढें ढकलणें. **०मजकुरावर पडणे-येणें**—पुढें ढकलणें; उडवाउडवी करणें. **महाली उल्फा मोईन**—पु महालास येणाऱ्या सरकारी कामगारांचा सरबराई खर्च. सामाशब्द– **०करी-दार**—पु. महालासंबंधाची जमाबंदी, बंदोबस्त इ० कामें पाहणारा सरकारी अधिकारी. **०करी**—पु. रत्नागिरीकडील चांभारांतील जातपाटील. **०झडती**—स्त्री. महालाच्या जमाबंदीचें कच्चें वार्षिक पत्रक. **०दफ्तर**—न. पेशवे दफ्तराचा एक भाग यांतील कागद महालांतील असत. –इनाम ४६ **०दार**—पु. (चुकीनें) भालदार. रक्षक; पहारेकरी. **०पेटा**—पु. महालाचा पोटभाग. यावर महालकरी असतो. **०मजकूर**—पु. १ ज्याचा नुकताच उल्लेख केला आहे असा महाल; वर उल्लेखिलेला महाल, प्रदेश. २ सर्व महालाचा एकूण खर्च; देशव्यय. –राव्यको ९.१७. **०मवेशी-सा**—स्त्री. चीजवस्त; गुरें ढोरें. 'महालमवेसी मागों लागलें.' –इए ५.१००. **०शिबंदी**—स्त्री. महालांतील कामासाठीं नेमलेले शिपाई (पोलीस, वसुली नोकर).

महाल—पु. न्हावी; महाली. हा लग्नांतील सोयरीक जुळविण्याचें काम करतो म्हणून मध्यस्थ; हिंदुस्थानांत कांहीं जातींतील सोयरीक जुळविण्याचें काम न्हाव्याकडे असतें.

महाला, महालया, महाली-ल्या—पु. न्हावी.

महाव(वं)त—पु. माहुत; महात; हत्ती हांकणारा. 'गज आदळले गजांसी: महावंत महावंतांसी।' –एरुस्व ८.३९. [सं. महामात्र; प्रा. महामत्त; [हिं.]

महावळुंग-गी—(प्र.) महाळुंग-गी पहा.

महासरा—पु. वेढा; परिघ. महसरा पहा. 'कुमक करून महासरा उठविला.' –रा १०.३३१. [अर. महसूर, मुहासरा] **०देणें**—वेढणें; वेढा घालणें.

महाळ-ल—पु. १ भाद्रपद वद्यांत पितरांप्रीत्यर्थ केलेलें श्राद्ध. महालय पहा. २ भाद्रपदपक्ष; पितृपंधरवडा. [सं. महालय] **०वडा**—पु. (कुण.) पितृपक्षाच्या वेळीं करतात तो वडा. **०वस-वसा**—पु. (राजा.) भाद्रपद वद्यपक्ष. [महाळ+वासर]

महाळावाचर्जा—पु. उद्धटपणें नांवाची पृच्छा करणारास उत्तरादाखल दिलेलें कांहीं तरी नांव; गोमाजी कापशा पहा.

महाळुंग-गी—नस्त्री. एक प्रकारचें कागदी लिंबाच्या जातीचें झाड व त्याचें फळ. [सं. मातुलुंग]

महिख—पु. १ म्हैस; रेडा. २ महिषासुर. 'सुवर्णाचिया महिखा । नाशु केला ।' –ज्ञा १८.४४४. [सं. महिष]

महिना—पु. १ साधारणपणें तीस दिवसांचा काल; मास. २ मासिक वेतन, ह्या अवधीचा पगार. 'माझे सरकारांतून सहा महिने यावयाचे आहेत' [सं मास; फा. माहीना;] **महिन्याच्या कांठीं**-क्रिवि. महिना भरल्यावर; महिनाभर काम केल्यावर. 'महिन्याचे कांठीं शंभर रुपये मिळतात. '**महिनखत**–न. (ना.) दरमहिन्याला ठराविक रकम फेडण्याच्या करारानें केलेलें खत. **माहनदारीण**–स्त्री. (ना. व) मोलकरीण. **महिने-करू, महिने(न)दार**–पु. १ दर महिन्याला अमुक पगार अशा ठरावानें कामाला लाविलेला नोकर. २ आळीपाळीनें एक एक महिना काम करावें अशा वांटणीप्रमाणें त्या त्या महिन्याची ज्याची पाळी असेल ता इसम. **महिनेभरु**–पु. कामाकडे लक्ष न देतां माझा महिना भरतो कव्हा व मला पगार मिळतो कव्हां अशा बुद्धीनें काम करणारा नोकर; भाडोत्री नोकर. **महिन(न)माल, महिने(न)महाल**–वि. मासिक; महिन्याच्या बोलीनें ल विलेला, ठरविलेला (चाकर, चाकरी, पगार, रोजमुरा, खर्च, जमाबंदी, हिशेब). **महिने(न)माह**–क्रिवि. महिन्यास, प्रत्येक महिन्याला; दरमहा. 'महिनेमहा खर्चाचा ताळा.' –स्वारी-नियम ४०. **महिनेवाला**–पु. (कु.) देवळाच्या उत्पन्नातून ज्याला दर महिन्यास ठराविक धर्मादाय मिळतो तो मनुष्य.

महिमहि जाणें—अक्रि. (व) नवल, कौतुक वाटणें.

महिमा—पुस्त्री. १ मोठेपणा; थोरवी; वैभव; प्रभाव, ख्याति. 'तो शरीरीचि परी महिमा । ऐशी पावे ।' –ज्ञा ६ ४८०. २ (सामा.) मोठेपणा; थोरवी. ३ अष्टमहासिद्धींपैकीं एक; हवें तितकें मोठें होण्याचें सामर्थ्य. 'अणिमा महिमा लघिमादिशक्ति । या तिन्ही देहसिद्धींची प्राप्ती ।' –एभा १५.४३. [सं.] **महिमान**–न.(काव्य) १ मोठेपणा; थोरवी; महिमा. 'ज्यासि अग्रपूजेचा सन्मान । श्रेष्ठ देवामाजीं महिमान ।' –एभा १३.२७९. २ महत्त्व; सामर्थ्य. 'विचारितां शब्दमहिमान । शब्द स्वरूपें ज्ञानघन ।' –एभा १३.३३८.

महिमान—पु. १ पाहुणा; अतिथि; तिन्हाईत; मेहमन–मान पहा. २ फिरस्ता शेतकरी [फा. मिहमान्]

महिर(रा)प–ब—स्त्री. कमान; दवळी; मेहराप पहा. [अर. मिहराब्]

महिला—स्त्री. (काव्य) १ स्त्री: बायको. २ (विशेषत:) पत्नी 'साजे सखी अखिन्ना कृत्यभरें सुमति आमुची महिला ।' –मोसमा ४.७२. ३ माशी. [सं.]

महिष—पु. रेडा; टोणगा. 'मनोमहिषाचेनि मुंडे । दिधली बळी ।' –ज्ञा १२.५३. [सं.] **महिषी**–स्त्री. १ म्हैस. २ पट्टराणी. ३ मुख्य स्त्री 'होऊनि तया शूद्रमहिषी । होती पापिणी दुराचारी ।' –गुच ७.१६२. [सं]

मही—स्त्री. १ पृथ्वी. २ एक नदी [सं.] **०तल**–न. पाताळ. **०धर, महीध्र**–१ पर्वत. २ शेष नांवाचा सर्प. **०पाल-ळ**–पु. राजा. **०सुत**–पु १ मंगळ नांवाचा ग्रह. २ (ल) बोरू. 'महीसुत सरसाविला । सरसाऊन द्विधा केला ।' –दा १५.६.३.

महीग—न. नांगरलेली जमीन साफ करण्याचें हत्यार.

महत्तपण—न १ मोठेपणा; महत्त्व. २ अहंकार. [महान्]

महीस—स्त्री. म्हैस: महिषी. [सं. महिषी]

महुडा—पु. (काव्य) ढग; मेघ. 'मग प्रचंड तेज प्रगटलें । तेणें महुडें विराले । निःशेष शोखिलें । प्रलयोदक ।' [मेघ]

महुर—पु मोहर. 'जे सोहंभावमहुरें । मोडोनि आला ।' –ज्ञा ५ १४९.

महु(हु)र—त्रि. मधुर; गोड. 'जैसें महूर कां म्हणिजे । विषकंदातें ।' –ज्ञा ५ ११५. [सं. मधुर; प्रा. महुर] **महुरता**–स्त्री. माधुर्य; गोडी. 'कां बचनागाची जैसी । महुरता पहिली ।' –माज्ञा १८.७९६

महुरणें—अक्रि मोर्चा वळविणें; मिरविणें. [मोहर]

महुरी—स्त्री मोहरी; राई. 'आदींचि द्रव्यें चुरबुरीं । वरी परिवडिजती महुरी ।' –माज्ञा १७.१४६.

महुरें—न (महानु.) नागाचें विष. 'महुरें घाली दाढे । ऐसे केवि होय ।' –भाए ७३७.

महूंचळ—वि. (महानु) मचूळ मोहाच्या फुलाच्या वासासारखें. 'नंदनवनींचें खडुळ । मानससरोवरीचे महूंचळ ।' –शिशु ६४४. [मचूळ]

महैळी, म्हे-म्हैळी, म्हैळारु—स्त्री. (महानु.) बायको; स्त्री. 'म्हेळीयेची शिवी दे' –सिद्धांतसूत्रपाठ. [महिला]

मळ—पु. १ घाण; केरकचरा; रेंदा. २ विष्ठा. 'मज उपजतांचि मळसा त्यजिलें याहून काय अत्याग ।' –मोभीष्म १२.५६. ३ पाप; पापवासना. 'जाऊनिया मळ । वाळवंटीं नाचती ।' –तुगा ७६७. ४ कमीपणा. 'म्हणे कर्मनिष्ठां मळु । ठेविला देखों ।' –ज्ञा १८ ६२. ५ दोष. 'म्हणे तुम्ही निष्पाप निर्मळ । तंव तुमचेनि दर्शनें तत्काळ । नासती सकळ कळिमळ । ऐसे निजनिर्मळ तुम्ही सर्व ।' –एभा २.२४३. –स्त्री. (राजा.) अंगावरच्या मळाची वळी; मळी. [सं. मल] **मळई**–स्त्री. १ पावसानें किंवा नदीच्या प्रवाहानें वहात आलेली माती, पानें, कचरा इ०. २ अशा जागेवर केलेलें बागाईत ३ मासे धरण्याचें जाळें. –बदलापूर. ४ साय. (प्र.) मलई पहा. **मळकट**–न. १ पाप. 'जें त्रिविधीं मळकटां । तूं सांडिलासि सुभटा ।' –माज्ञा १५.५८१. २ मळाचें पुट; थर 'तै कळिमळांचीं मळकटें । नामोद्धाडें नासतीं ।' –एभा ४.२५३.

–वि. मळलेला; घाणेरडा; मलिन. **मळकटणें**–अक्रि. मळणें; घाणेरडें, मलिन होणें. **मळकटा**–पु मळाचा थर, लेप. 'धुऊनिया मळकटा । बुद्धीचा तेणें । ' –ज्ञा १८.१०११. **मळका**–वि. घाणेरडा; मळलेला; मलिन. **मळकी**–स्त्री. १ नदीच्या प्रवाहाबरोबर आलेला गाळ. २ गाळ साठून झालेली जमीन; मळई ३ (बे.) अशा जमिनीवर केलेली लागवड. मळई पहा. **मळको(खो)रा**–वि. मळकट रंगाचें, नवीनपणाचा तजेला कमी झाला आहे असें (नाणें) **मळघा(खा)ऊ-घाव**–वि. १ जो मळला असला तरी मळलेला दिसत नाहीं असा (रंग) २ कष्ट, आजार इ० न चरफडता सोसणारा. ३ बाहेरून सुंदर पण आतून घाणेरडा दिसणारा (मनुष्य, पदार्थ). **मळगा(घा)वणें**–सक्रि खराब, घाण करणें; मळविणें; मलिन करणें. **मळणें**–अक्रि. १ मलिन, घाण होणें २ मोहानें व्याप्त होणें. 'मळलें होतें मन. परि केलें त्वां शुद्ध, तुजकडे वळलें।' –मोकर्ण ४३ २३. **मळमास, मळयागर मळशुद्धि**–मलमास इ० पहा. **मळवणें**–सक्रि १ मळानें युक्त करणें; घाणेरडे करणें. २ (पशुभव इ०नीं तोंड) उतरविणें. 'पळवी सुयोधनातें, त्यासकट तदाश्रितानें मळवी।' –मोविराट ६ १४४. **मळाचा कोठा**–पु. मलाशय **मळी**–स्त्री. १ अंगावरच्या मळाचा वळी. २ पावसानें किंवा नदीच्या प्रवाहाबरोबर वाहून येतो तो गाळ (समा) चिखल 'आतां गंगेचें एक पाणी । परि नेलें आनानीं वाहणीं । एक मळी एक आणि । शुद्धत्व जैसें । ' –ज्ञा १७ १९६. ३ नदीकाठची बागाइती जमीन; मळई. 'काळी मळी पांढरा चोळ । परी ते केवळ वसुधाची ।' –एभा ४.२६०. ४ अशा जमिनींवर केलेली बागाइती शेती. लाग वड ५ मांखर, गूळ इ० शुद्ध करतांना निघतो तो मळ ६ कोणत्याहि पदार्थांवर येते ती मळकट साय. ७(राजा) मोठ्या शेताला बांध घालून पाडतात तें लहान खोंचे, भाग प्रत्येकी ८ (व) नदीकांठची पडीत जमीन ९ (न्हावी धंदा) डोक्यातील मळ काढण्यासाठीं कोईचें केलेलें साधन –वि. (जुन्नरी) मळकट, धुरकट रंग असलेली (मेंढी). 'ही मेंढी मळी आहे' **मळी(ळि)ण**–वि. १ मळलेला. घाणेरडा; ओंगळ; अस्वच्छ. २ (ल) पापानें युक्त; पापी; दोषी ३ तयार नसलेली; विसरलेली (विद्या, कला इ०) ४ म्लान; मरगळ. 'कुंथाच्या ढेकरें न देवेल पुष्टी । रूप दावी कष्टी मळिण वरी ।' –तुगा २८७६. [सं. मलिन]

मळक-की—स्त्री. (ना. व.) मळमळ; वांतीची भावना.

मळगा(घा)वणें—अक्रि. १ फार रहदारीमुळें झिजणें, तुडविला जाणें रुतणें; (रस्ता इ०). २ फार वापरल्यामुळें गुळगुळीत होणें; झिजणें, जीर्ण होणें (पदार्थ). ३ अंगवळणी पडणें; अनुभविक असणें; संवय, परिपाठ असणें (कला, कृति, धंदा इ० मध्यें). [मळणें]

मळगी-घी—स्त्री. (बे. कर्ना.) बाजारातील कायमची बांधलेलीं दुकानें (समुच्चयार्थी); ठाम बाजार; याच्या उलट मेणबाजार. [का. मळगिसु=ठाम असणें]

मळणें—सक्रि १ धान्य कणसांतून तुडवून, झोडपून बाहेर काढणें; तुडविणें (धान्य). २ (गुऱ्हाळघर, कों.) ऊंस चरकांत घालून रस काढणें, पिळणें. 'गूळ मळणें' =गूळ तयार करणें. ३ तिंबणें; मऊ करणें (कणीक). ४ चेपणें, रगडणें; चोळणें (हात, पाय इ०). ५ (घोड्याला) खरारा, मालीश करणें. ६ अंगास उटी, उटणें लावणें. ७ (ल) रहदारीनें वाट पाडणें; रस्ता रुळविणें; (मार्ग मळणें). 'मळलेला मार्ग सोडून आपला मुलगा किंचित बाजूला गेला. ...' –केले १.३१२. [सं मर्दन; प्रा. मलन; पं. मळना; गु. मळवुं; हिं. मलना; सिं. मल्वुं] **मळण**–न. १ (राजा.) ऊंसाचा रस गुळासाठीं कढविणें. २ गूळ घर; गूळें तयार करण्याची जागा. **मळणकर**–पु मळणी करणारा; धान्य मळणारा. [मळणी+कर] **मळणतळण**–न स्वयंपाकाचीं कामें (सर्व साधारण). कणीक तिंबणें, तळणें इ०कामें **मळणी**–स्त्री. १ कणसें झोडपून, बैलाकडून तुडवून धान्य काढणें. (क्रि० काढणें; करणें; घालणें) २ उसाचा रस काढण्याची क्रिया ३ (ल.) मळणीचा हंगाम **०घालणें**–धिंगामस्ती. धांवाधांव करणें; धुळींत खेळणें (लहान मुलांनीं) **मळणीवर येणें**–काहीं एक पदार्थ तयार झाल्यावर येणें; आयत्या वेळीं येणें. **मळावि**–वि १ मळलेलें; झोडपलेलें; तुडविलेलें (धान्य). २ तिंबलेलें; चेपलेलें; पिळलेलें इ०.

मळभ-ब—न. १ अभ्र; आभाळ; ढगांचा समुदाय. २ आकाशाची अभ्राच्छादित स्थिति. ३ (बे. कु.) आकाश. [सं. मल+अभ्र] **मळभभर**–क्रिवि. पुष्कळ; अतिशय; बेसुमार (बोलणें; खाणें) **मळभी**–स्त्री. (समुदायांतून) निराळा झालेला ढग; लहान ढग **मळबट**–स्त्री. (कु. गो.) अभ्र; मेघांचा समुदाय. **मळाब**–न (कु.) १ अभ्र; ढग २ ढगांनीं युक्त असें आकाश.

मळमळ—स्त्री. १ पित्तामुळें, कळकट पदार्थ खाण्यांत आल्यामुळें वांती होईलसें वाटणें; उमासा (क्रि० येणें). २(ल.) कांहीं संशय आल्यामुळें मनास वाटणारी अस्वस्थता; चित्ताची संशयात्मकता (क्रि० फेडणें; घालणें; फिरणें; जाणें) 'माझ्या घराचा झाडा घेऊन तुम्ही आपल्या मनाची मळमळ फेडून टाका.' [ध्व.] **मळमळणें**–अकर्तृकक्रि. वांती होईल अशा भावनेनें युक्त होणें. उमळणें; उमसणें. 'मला मळमळतें'; 'पोटांत मळमळतें. 'मळ; **मळी**–स्त्री. बीट; तिटकारा; उमासा. **मळमळीत**–वि. १ बेचव; पाणचट; योग्य प्रमाणापेक्षां कमी मालमसाला असलेला (खाद्यपदार्थ). २ पाणचट; कवकवीत (फळ) ३ बेगरूळ; सौम्य; बेडौल (मनुष्य). ४ नीरस; तडफ नसलेलें (गाणें, भाषण, वागणूक). ५

ओंगळ; तेजहीन; घाणेरडें दिसणारें; बोजड (धातूचें भांडें, शस्त्र, हत्यार). ६ ढिला; सैल; अव्यवस्थित; नीटनेटका नसलेला (पदार्थ, कामाची पद्धत). **म्ह०** मळमळीत सौभाग्यापेक्षां झळझळीत वैधव्य बरें.

मळय(यें)पांचौर—न. (महानु.) पांच सुगंधांचें वस्त्र. 'ब्रह्मसुखाचें मळयपांचौर। जि! कवणा वेचिलें।' –भाए १२५. 'सर्व सुखाचें मळयेंपांचौर। जाण माझें स्वरूप।' –भाए ६६२. [सं. मलय+पंच]

मळयो, मळ्या—पु. गोडया पाण्यांतील एक मासा; खवळी मासा.

मळ(ळि)वट—पु लग्न, मुंज इ० प्रसंगीं स्त्रियांनीं कपाळभर लाविलेलें कुंकू किंवा पुरुषांनीं तसेंच लाविलेलें गंध; गंधलेप (क्रि० भरणें; लावणें). 'तेंही केलें कृष्णार्पण। निजभाळीं मळवट।' –एरुस्व १.६२. 'ललाटीं शोभे मळिवट। मृगमदाचा।' –कथा ३. १५.३१. –न. (कुंभारी धंदा) चाकावर तयार केलेलें व थोपटण्यापूर्वीचें मडकें. –बदलापूर ६६. –वि. फार मळी सांचून तयार झालेली (पांढरी जमीन). –कृषि १५.

मळवटी—स्त्री. अंगावरच्या मळाची वळवटी; मळी. [मळ+वटणें]

मळवंड्या—पु. काळा तीळ. –कृषि ३४९.

मळवा—पु. (कु.) खडकावरचा मळ खाणारा मासा. मळयो पहा. [मळ]

मळवाचें—न (ढोराचा धंदा) गाईम्हशींचें टांगलेलें चामडें.

मळसु(सू)त्र—न. पेंच, आटे असलेला खिळयासारखा पदार्थ; फिरकीचा खिळा; (इं.) स्क्रू. **०फिरविणें-दाबणें-चापणें**–(ल) एखाद्याचा मूळ हेतु बदलून अन्य गोष्टीकडे त्यास प्रवृत्त करणें; मनाविरुद्ध गोष्ट करावयास लावणें; मन वळविणें **मळसूत्री**–वि. मळसुत्रानें बसविलेला (पदार्थ). **०प्रदक्षिणा**–स्त्री. शक्राच्या भोंवती जी विशिष्ट (दिडकी) प्रकारची घालतात ती प्रदक्षिणा; सोमसुत्री प्रदक्षिणा पहा.

मळहीर—वि. घोडयाचा एक रंग. –अश्वप १.२८.

मळा—पु १ फळफळावळ, भाजीपाला इ०ची लागवड; बागाईत. २ बागाईत पिकें करण्याची जमीन. ३ दुपिकी जमीन. ४ तिळाची एक जात. [सं. माला] **०(ळ्या)एरंड**–पुस्त्री. मळयांत लागवड केलेलें एरंडाचें झाड. याच्या उलट शेत एरंड; ह्या दोहोंस अनुक्रमें मोठा एरंड आणि बारीक एरंड असेंहि म्हणतात. **मळेकरी**–पु १ बागाईत करणारा; मळयाचा मालक; याच्या उलट शेतकरी. २ मळयाची मशागत करणारा. **मळेजमीन**–स्त्री. मळयासाठीं योग्य असलेली, बागाइती जमीन **मळेवांगी**–स्त्री. मळयात लागवड केलेलें वांग्याचें झाड. **मळेवांगें**–न. त्याचें फळ. **मळेवाफ्याची पेरणी**–स्त्री. पाऊस पडल्यानंतर केलेली पेरणी. जी जमीन पावसापूर्वी नांगरतां येत नाहीं अशा जमिनींत या प्रकारची पेरणी होते. –कृषि २२४. **मळ्यागहू**–पु. मळयांत तयार झालेला गहूं; पाटस्थळांत झालेला गहूं; ह्याच्या उलट शेतगहूं.

मळ्या—पु. तांबूस, तेलकट रंग. –वि. तांबूस, पिंगट रंगाचा; भुरा (बैल, गाय इ०).

मक्षिका—स्त्री. माशी. [सं.] **०पात**–पु अडचण; विघ्न; अपशकून; माशी शिंकणें. 'कोठें तरी मक्षिकापात झाल्यानें म्हणा सभेपुढें पुरावा वाचण्याचें काम निघालें नाहीं.' –टि ४.१२७. **प्रथमग्रासे मक्षिकापातः**–एखाद्या गोष्टीस प्रारंभ करावयाच्या वेळीं कांहीं तरी हरकत, अडचण एकदम उपस्थित होणें.

मा, मां—क्रिवि. नको; नाहीं. 'तेह वेळीं मा–भणौणि न घसरें चालतां। दुनी वेंहुडी आंगें घालितां।' –शिशु ५६२. २ नकार. 'न यावया मा जिभ लाज ना दे।' –आविश्वा २३. ३ ना; होय ना? (प्रश्नार्थक अव्यय). 'तुम्ही बकाकरवीं चांदिणें। चरऊं पहा मा।' –ज्ञा ११.१५६. ४ मग; नंतर. 'मा एक जन्म येथें दीजोका। मा काई होइल ते पाहिजे।' –चक्रधर सि. सु. 'सुर्यो रात्री पा मारील। मां आपणया उदो करील।' –अमृ ६.२१. ५ जरी; यद्यपि. 'तान्हेलया मृगतृष्णा। न भल्या सीण जे सणा। मा भेटलया कोणा। काय भेटलें।' –अमृ ७.२१०. ६ तरी पण. 'मा चंद्रासि उणें। स्फुरतें कां।' –अमृ ७.१७२. ७ तर मग. 'तेवीं हरिभक्तां देहाचा अभावा। मा काळ कणवा घालील घावो।' –एभा २.६८३. [सं.]

मा—स्त्री. १ माता; आई. २ लक्ष्मी; विष्णुपत्नी. 'भंगे अश्वत्थामा अश्वत्था मा क्वचित् सदा हरिला।'–मोविराट ५.३८. [सं. मातृ; प्रा. माइ, माउ] **०साहेब**–स्त्री. राणी; राजमाता.

मा(मां)ई—स्त्री. १ आई किंवा बहीण यांस हांक मारण्याचा शब्द; (सामा.) एखाद्या वडील बाईस लोकांनीं हांक मारण्याचा शब्द. २ (बालभाषा) मांजर. [सं. मातृका; प्रा. माइआ]

माई(इ)क—वि. १ मायिक; मायावी. २ मिथ्या; अशाश्वत. 'हें सकळही जाणभाव। माईक माया।'–दा ३.१०.४९. ३ माया करणारा. 'यापरी महीते माईक। कोणी नाहीं मजलागीं।'–नव २४ १६६. [सं. मायिक]

माई(इ)ण, माइणी-नी—स्त्री. मायणी पहा.

माईण-न—स्त्री. एक वनस्पति. हें झाड ओव्याच्या झाडासारखें असुन पानेंहि ओव्याच्या पानाप्रमाणें लहान असतात. [सं. मायिनी] **माईणमूळ**–न. वरील वनस्पतीचें मूळ. या मुळाचें लोणचें घालतात. हें औषधी आहे.

माईंदळ—क्रिवि. (अशिष्ट) पुष्कळ; भरपूर. मायंदळ पहा.

माई(य)फळ—न. माजूफल; मायफळ. [हिं.]

माउंदें—न. (महानु.) मावंदें पहा. ' माहिंभटीं माउंदें केलें '

माउ(ऊ)ली—स्त्री. (काव्य) १ मावली; आई. ' सासुरवासें शीणली । तिये भेटे जेंवि माउली । ' –ऋ ११. २ आईसारखी कोणतीहि भली स्त्री. ' त्या माउलीच्या सद्गुणांचें कीर्तन करावें तें थोडेंच. ' –विवि १०.२१८. ३ जलदेवता. [सं. मातृ] **माऊलपण-पणा**–नपु. १ आईची माया; दयाळूपणा; (सामा.) माणुसकी. [माउली+पण, पणा] **माउ(ऊ, व)शी-सी**–स्त्री. १ मावशी; आईची बहीण. २ (ल.) सापत्नमाता. ' ध्रुव पितयाचे अंकीं बैसला । तंव माउशियेनें ढकलिला । ' –कथा ७.१०.८. **माऊसबहीण**–स्त्री. मावशीची मुलगी. [मावशी+बहीण] **माऊसभाऊ**–पु. मावशीचा मुलगा. **माऊ(व)सा**–पु. मावशीचा नवरा.

माऊ—स्त्री. (व.) खाटेस ताण देण्यासाठीं पायगतच्या दोरांत पिळवटलेली लांब काठी.

माऊ—स्त्री. (कों.) जखम, क्षत बरें झाल्यावर त्या जागी राहणारी खूण; चट्टा; वण.

मांऊं—न. १ (बालभाषा) मांजर. २ (व.) आईचें थान; आमा. [ध्व.]

माऊत-द्—पु. महात; हत्ती हांकणारा. [सं **महामात्र**; म. महात]

माऊन—न. एक सारक औषध.

माकड—नपु. १ मर्कट; वानर; यांचें शेंपूट आखुड असून तोंड तांबडें असतें. माकड अगर वानर हा सस्तन वर्गांतील द्विहस्त प्राण्यामध्यें मोडतो. याच्या अनेक जाती असून त्यापैकीं कांहींचें माणसाशीं पुष्कळ सादृश्य आहे. २ कवडयांच्या खेळांत न उजवितां राहिलेला–अंगावर डाव आलेला–चवथा गडी. [सं. मर्कट; प्रा. मक्कड] **म्ह०** १ माकड मारलें आणि पाला हगलें=निरुपयोगी शिक्षेबद्दल म्हणतात. २ माकडाला काकडी (मिळणें)=थोडयाशा लाभावर संतुष्ट होणें. ३ घर सांकड आणि वायको माकड. **०चेष्टा**–स्त्री. वानरचेष्टा; द्वाड चाळे. **०टोपी**–स्त्री. कानटोपी. **०तोंड्या**–वि. माकडासारखें तोंड असलेला. **०निंबू**–न. माकडनिंबोणीचें फळ. **०निंबोणी-निंबूण**–स्त्री. नेहमीं हिरवें असणारें एक कांटेरी झाड; माकडी अर्थ ४ पहा. **०फुगडी**–स्त्री. मुलींचा एक खेळ. **०मिठी**–स्त्री. घट्ट मिठी; कवटाळणें; मगरमिठी. **०मेवा**–पु हलकीं, निःसत्व, भूक तृप्त न करणारीं फळें, अन्न, विडयाचीं पानें, भुई मुगाच्या शेंगा, ऊंस, खरबुजें, फळफळावळ इ०; विशेषतः हरभरे [माकड+मेवा] **०वस्ती**–स्त्री. वन्य, वृक्षमय, डोंगराळ प्रदेश. **०शिंगी-शेंगूळ-शिंदळ**–नस्त्री. एक वनस्पति **०शेंडा**–पु एक प्रकारचें गवत. **०हाड**–न. पाठीच्या कण्याच्या शेवटीं असलेलें गुदद्वारावरचें हाड. [सं. मर्कटास्थि] **माकडी**–स्त्री. (कों.) १ वल्हें अडकविण्याच्या खुंटीचें भोंक. २ (गो.) तुळई. ३ एक वेल व तिची शेंग; कुहरी. ४ लिंबुणीच्या जातीचें रानटी झाड. यांचीं पानें निंबुणीप्रमाणें असतात पण यास कांटे असतात. फळें बारीक सुपारी एवढीं असतात. ५ पकड. ६ (कु.) (दाराची) कडी. **माकडीचें झाड**–स्त्रीन. एक झाड. रात्रीं प्रवास करतांना डाक नेणारे जासुद व इतर लोक याच्या लांकडाचा मशालीकरितां उपयोग करतात. यांचें एक टोंक थोडेसें चेचून मग तें पेटवितात. हें फार तैलयुक्त असतें.

मा(मां)क(ख)ण—न. बैल, रेडा, घोडा इ०च्या पाठीवर पाणी आणण्यासाठीं घागरी ठेवण्याकरितां केलेली लांकडी, लोखंडी चौकट; सांगड. [का मेकणि] **माकण**–स्त्री. (मल्लविद्या) एक डाव. जोडीदाराच्या पाठीवर माकण घातल्याप्रमाणें आपले दोन गुडघे आपल्या बाजूच्या बरगडीजवळ टेकून आपलीं दोन्हीं कोपरें, एक जोडीदाराच्या बगलेंत व दुसरें त्याच्या जांघाडांत, वाकून त्याचा हात कस काढल्याप्रमाणें काढून व त्याचा पाय गुडघ्याच्या लवणींत हात घालून धरून, त्याला आपल्या मांडयावर चीत करणें. **माक(ख)ण्या**–वि. १ माकण वाहणारा (रेडा, बैल, घोडा इ०). २ पाठीवर माकण घातलेल्या जनावरास हांकणारा, नेणारा.

माकता, माकतेकरी—वि. भिकारी; याचक. [मागता अप]

माकत्यान, माकत्या(त्क्या)न्-नी-नें, मागत्यान-नी-नें—क्रिवि. पुनः, फिरून. [मागती; मागे+नें]

माकंद—पु. आम्रवृक्ष. [सं.]

माका—पु. भृंगिराज; एक औषधी वनस्पति. ही ओलसर जमिनींत बारा हि महिने होते. ही वातहारक आहे. श्राद्धामध्यें पितरांच्या पूजेस वापरतात. माक्यांत काळा माका म्हणून एक जात आहे. यास काळीं फुलें येतात. हा गुणानें जास्त आहे. [सं. मार्कव]

माकां, माज—सना. (राजा. कु.) मला. [मी] **म्ह०** (गो.) माका तुका पडना, वडे वाढूक घडाना; माका तुका पडता, वडे वाढूक घडता=मन एक असलें म्हणजे वाटतील त्या गोष्टी मनुष्यें एकमेकांसाठीं करतात.

माकुंडजावप—अक्रि. (गो.) मऊ पडणें.

माकुल—पु. (कों.) एक मासा; माशाची एक जात. **०वाणा. माकुला**–वि. (राजा.) देखणा; सुंदर; रम्य; नेटका; सुबक; चिमुकला; चिमणा (मनुष्य, वस्तु).

माकूल—पु. (कों) लष्करी लोकांच्या खांद्यावरील फितीचा आडवा पट्टा.

माकूल—वि. १ प्रौढ; सभ्य; जाणता. २ पसंत; रास्त; न्यायाचें. ३ उदार; सन्मान्य; पूज्य; योग्य. ४ शाहाणा; अक्कलवान. –पाब १८. 'याजकरितां तुम्ही राजास माकूल करून परस्परें...' –वाडबाबा १.१५५. ५ मुबलक. 'सरन्जामही माकूल दिधला जाईल.' –रा ८.२०७. [अर. मअकूल]

माकोजी—पु. मुढामाकोजी पहा.

माकोडा—पु. मुंगळा; डोंगळा. 'कीं वळघौनि झाडा। एरझारा करी माकोडा।' –ऋ ३०. 'गुळीं आवडी माकोडि यासी।' –एभा ३१.३०३. [गुज. मंकोडा]

माख—पु. (महानु.) उडीद. 'माख न साहे.' [सं. माष]

माखटणी—स्त्री. (राजा.) माखणी. **माखटणें**–सक्रि. (राजा) भाकरी इ०कांस तूप इ० चोपडणें. [सं. म्रक्षण=चोपडणें] **माखण(न), माखटण**–न. (राजा.) १ लोणी, तेल चोपडणें. (सामा.) ओशट व चोपडण्याचा पदार्थ. २ लोणी. 'दुधमाखण दधी विकनारी।' –आनवरसचन्द्रिका २९. ३ (व) तेल. 'भाकरीवर माखण पाहिजे.' ४ लेपणें; चोपडणें 'माखण झालें कुसरी।' –वेसीस्व १०.१०. ५ (कों. वऱ्हाळी) अभ्यंगस्नान **माखणी**–स्त्री. चोपडणें. **माखणें**–सक्रि. १ चोपडणें; भरणें; लेपणें (ओशट द्रव्यानें शरीर इ०). 'नावाडी घेऊनी चंदनां रसी। आंगां माखिजतु पाहे मासी।' –शिशु २८. २ चिखल इ०नीं शरीर भरणें. ३ (ना.) बैलगाडीला ओंगण लावणें. [सं. म्रक्षण; प्रा. मक्खण, माखन; गुज. माखण] **माखण्यावालपापडी**–स्त्री. वालाची एक जात; याच्या शेंगांची फक्त भाजी करतात, वाळवून दाणे काढीत नाहींत; दाणा वाटोळा असतो. –कृषि ३३४.

माखार—वि. (कु.) हाडापेरानें सुदृढ, देखणी (मुलगी).

माखी—स्त्री. (खा.) माशी. 'सरावनांत माख्या भलत्याच त्रास देतात.' [सं. मक्षिका]

माग—पु. १ ज्यावर कोष्टी कापड विणतो तें कापड विणण्याचें साधन, यंत्र. २ विणतांना पावंडा खालीं जाण्याकरितां केलेली खळी. [सं. मार्ग=चालणें; हालणें] **०दोर**–पु. वशारन आणि कापड यास ताण देण्याचा दोर (सुताचा, अंबाडीचा).

माग—पु. १ रस्ता; वाट. 'निज शिबिरापासुनि गुरुपुत्ररथाच्या धरूनि मागातें। धावे भीमक ...।' –मोऐषिक १.३४. २ पायरव; चाहूल; चिन्ह. ३ पत्ता; शोध. 'हारतलें न देखिजे। तंव मागु न सांडिजे।' –ज्ञा १८.१५०. ४ तपास; थांग; छडा; पत्ता (क्रि० लावणें; लागणें; काढणें). ५ (राजा.) मळा, बाग यांतील झाडांस पाणी देण्याकरितां केलेला मार्ग; पाट; पाणी जाण्याचा मार्ग. ६ पाटाच्या एका भागानें पाणी दिलेली झाडांची रांग. ७ –स्त्री. (कों.) मासे धरण्याचें मोठें जाळें. [सं. मार्ग; प्रा. मग्ग] (वाप्र.) **०काढणें–लावणें**–एखादा मनुष्य वोणत्या वाटेनें गेला, ह्याचा तपास त्याच्या रस्त्यावर उमटलेल्या पावलांच्या अनुरोधानें करणें; ठावठिकाणा लावणें, काढणें; पाठलाग करणें. **०लागणें–उरणें**–पत्ता, तपास लागणें; अवशेष राहणें. सामाशब्द– **०काढू–काढया**–वि. चोर इ०चा माग, पत्ता काढणारा, लावणारा. [माग+काढणें] **०मू(मो)स–मुद्दा**–पु. छडा; पत्ता; ठावठिकाणा; थांग. (क्रि० लावणें; लागणें; काढणें; निघणें; पाडणें; पडणें). [माग+मूस] **मू(मो)स–मुद्दा मोडणें**–सर्व ठावठिकाणा नाहींसा करणें; प्रत्येक मुद्द्यापत्त्यावरून बोळा फिरविणें. **०लाव्या**–वि. पत्ता काढणारा; थांग लावणारा; पाठलाग करणारा (चोर, पळपुटे इ०चा). [मागे+लागणें] **मागाडा–डया**–वि. १ वाटाडया. 'सवें मागाडा बरा।' –गीता २.२४९५. २ चोर इ०चा माग काढणारा; तपास लावणारा. 'मळयानीळु मागाडा।' –भाए ४२६ **मागारी**–पु. १ (कु.) सोबती. २ पति; नवरा: पाहुणा. ३ मूळ आलेला मनुष्य. **मागारीण**–स्त्री. (कु.) लग्न झालेली स्वतःची बायको. **मागांचवें**–क्रि (गो.) माग काढणें. **मागा(गो)वा–वें**–पुन. १ मार्ग; वाट; दीक्षा; कित्ता. 'घेती तयाचे मागावें। आचरावया।' –ज्ञा १७४१. २ अनुकरण; अनुसरणें; त्या मार्गानें जाणें. 'तैसा व्यासाचा मागोवा घेतु।' –ज्ञा १८. १७२२. **मागोसा**–पु. पत्ता; मागमूस; चाहूल. 'त्यांच्या पावलांचा मागोसा घेतघेत माणसांनीं यूरेनसचा पत्ता लावला.' –के १२.७.२०.

मांग–पु एक हिंदु जात व तींतील व्यक्ति. फाशी देण्याचें काम यांचेकडे असे; यांच्यांतील कांहीं सांकेतिक शब्द– हिडका=मारामारी. कुडतुल=पेटी. धादल, खडल=फोडणें. कुडपळ=गाडी. गांगल=चांभार. पेडणें=पळून जाणें. खुमर=दार. तवला=खुनासहित दरोडा. शेग=मालाचा वाटा. पेडम, भुरा=युरोपियन. हलक, हलवा=सोनें किंवा चोरीचा माल. दुबक, फुकणी=बंदूक. कूड, कुडच=घर. नादी, खवडी=घरफोडी. बे, बोय=दिवा. चिलड=कुलुप. खारपे, दमुल=पैसा. ऊन=चांदणें. झुकीर, मुलसी=पोलीस. ताड=दोरी. हुरकत, पेडा, हुराकडा=पळ. तोलकला=निजला निलगंटी=काठी. कडूल, कटनूल=तलवार; हत्यार. मूच, नली=चोरी. इ० –गुजा. [सं. मातंग] (**अंगांत**) **मांग शिरणें–येणें**–रागावणें; त्वेष चढणें. **०गारु(रो)डी**–पु. मांगांतील एक पोटजात. हे म्हशी विकतात व भादरतात. यांच्या टोळया गांवाबाहेर पालांत उतरतात; ढोल बाजवून नजरबंदीचा खेळ करतात. धान्य, मेंढया इ० चोरतात. **०गारूड**–न. १ मांगगारुडयाची जादुगारी; मूठ फेकणें. **मांगटा–डा**–पु. १ (निदार्थी) मांग. २ मांगाचा भाट व उपाध्याय. अस्पृ ४७. **मांगणी**–स्त्री. मांग जातीची स्त्री. **मांगणीची पत्री**–स्त्री. अमावास्या, संक्रांत किंवा महापर्व आलें असतां भीक मागत फिरणाऱ्या मांगणीच्या टोपलींत (दुःखें व व्यद्बाधा नाहींशी

करण्यांत हिचा उपयोग होतो म्हणून) टाकलेलीं द्रव्यें (धान्य, तेल, मीठ इ०). **मांगणीचें पत्तर**–न. वरील भीक मागणाऱ्या मांगणीचें तरसाळें, पोखरलेला भोपळा. **मांग हृदय–यी**–वि. निष्ठुर अंतःकरणाचा; निर्दय; पाषाणहृदय. [मांग+हृदय] **मांग(गो) ळी**–स्त्री. १ थोरल्या दिवाळीच्या दिवशीं मांग लोक मोळाचा ओढण्याकरितां दोर करून चावडीवर ठेवितात तो. २ मुंजींत मुंज्याच्या कमरेस बांधावयाची मोळाची दोरी. ' आणि स्वधर्माची मांगळी । बांधे वाचेच्या पिंपळी। ' –ज्ञा १३.६५८. [मांग+वळी] **मांगिणी**–स्त्री. एक क्षुद्र देवता. ' पूजा जोगिणी मांगिणी। ' –दावि ६३. **मांगेला**–पु गुजराथेंत मांगास म्हणतात.

मागचा, मागला, मागील—वि. १ पूर्वीचा; पूर्वकालीन. २ पाठीमागचा; पश्चात् भागीं असणाऱ्या जागचा. ३ काळानें मागून येणारा. उदा० मागचा जमाखर्च; मागची युक्ति. [मागें] **म्ह०** १ येरे माझ्या मागल्या कण्या भाकरी चांगल्या=पुष्कळ दिवस शिकविलें तरी मूळची संवय, खोडसोडीत नाहीं उद्देशून अशास म्हणतात. २ येरे माझ्या मागल्या पाप न जाई बोंबल्या. **०पाय**–पु. उतार; मागें येणें; कमी होणें (रोग, दुखणें इ०). **मागल्यापार्यी**–क्रिवि. न थांबतां परतून; लवकर.

मांगठा—पु. (ना.) हातमाग.

मागणी—स्त्री. १ लग्नासाठीं वधूपक्षाजवळ वरपक्षानें केलेलें मागणें; वाङ्निश्चय. २ याचना; मागणें. [सं. मार्ग्=शोधणें; म. मागणें] **०करणें–घालणें**–आमच्या येथें आपली मुलगी द्या असें वरपक्षानें वधूपक्षास म्हणणें. **मागणें**–न. १ कांहीं एक पदार्थ स्वतःस देण्याविषयीं विनंति करणें. २ मागावयास आलेला किंवा गेलेला मनुष्य. **०मागणें**–सक्रि. द्या म्हणणें; याचना करणें; विचारणें. [सं. मार्ग्=शोधणें; फ्रें जि. मंगार; पोर्तु जि मागिणार] **आज्ञा मागणें**–परवानगी घेणें. **मागणें,मागणेकरी, मागता, मागतेकरी**–पु. भिक्षेकरी; मागणारा; याचक. ' तें कवी दैन्य फेडीति। मागतेयाचीं।'–शिशु १५०. ' धिक्कारिति अज्ञ जसे मागतया भीक सर्वदा भणगा।' –मोआदि २२.३४. **मागरा–माग्या**–वि. पाहिली ती वस्तु मागणारा; मागण्याची, याचना करण्याची संवय असलेला. **मागोव**–वि. मागून आणलेला; उसनवार. [मागणें]

मागती, मागतेन, मागुतमागुतां, माघरेन, मागत्यान—क्रिवि. लागलीच; पुनःपुनः ' निरूपणमिष ज्ञानकथा। मागुतमागुतां सांगत।'–एभा ११.२५१.

मागती—स्त्री. माघार; माघार घेणें. ' मागोनि मागती सति घे।'–मोवन १३.७५. [मागें]

मागध—पु. १ बंदी; भाट; कवि. ' अठरा मागध करिती वर्णन। सगुण निर्गुण चरित्रें।'–स्वादि १०.१.६. २ क्षत्रिय स्त्रीस वैश्यापासून झालेला मुलगा; एक संकर जात. ' तेचि संतति प्रसिद्ध। सूत वैदेह मागध। ऐशिया नामाचें जें पद। तें जाण शुद्ध प्रतिलोमज।'–एभा २०.३१. [सं.] **०देश**–पु. गया जिल्हा. –अश्वप १.३४. **मागधी**–स्त्री. (साहित्य) एक पदरचना पद्धती; हीस रीति असें साहित्यशास्त्रांत नांव दिलें आहे. ही रीति कोमल, कठोर, मध्यम अशी तीन प्रकारची आहे; यांपैकीं एक. ' वैदर्भी तशि मागधी स्फुरु अम्हां घेवोत रीती अशा।'–कम १.२. [सं.]

मागप, मागपणें—मागस; मागसणें पहा.

मा(मां)गर—पु. (राजा. कु.) १ शेतकामाच्या हंगामांत रहावयाकरितां, शेतांत तात्पुरती बांधलेली झोपडी. २ –न. कोठार (गवत, सर्पण इ०चें). ३ (वे) प्रवासी बैलगाडयांचे बैल बांधण्याची जागा; येथें यांना जकात पडते. **०घर**–न. (राजा. कु.) मागराप्रमाणें असलेलें लांबट, उघडें घर.

मागलट, मागासणी—स्त्री. १ मागें सरणें; फिरणें; परतणें (संकट, करार इ०कापासुन). (क्रि० पडणें; टाकणें). २ (कु.) तपास; छडा; माग. ३ दिरंगाई; दिवसगत. ' मला दुखणें आलें म्हणून शेत मागलटीस पडलें. ' [मागें+लोटणें] **मागलटणें, मागसावणें**–अक्रि. (एखादें काम) मागें पडणें; योग्य वेळीं तयार न होईल इतकें सुस्ताईनें केलें जाणें किंवा लांबणीवर टाकणें. **मागलटीवर टाकणें**–(एखादें काम) दिवस गतीवर टाकणें; तें मागें पडेल इतक्या सुस्ताईनें करणें.

मागलटीस, मागासणीस येणें—फिक्का पडणें; वाईट स्थिति येणें.

मांगलबळ्या—पु. बैलगाडीस मागें टेकण लावावयाचा घट. –मसाप २.२५२. [मागें]

मांगलिक—न. मंगल, शुभ कार्य (लग्न, मुंज इ०); किंवा तत्संबंधीं मंडप इ० रचना. –वि. १ लग्न इ० मंगल कार्याच्या संबंधाचा. २ शुभ; मंगल; भाग्यसूचक. [सं. मंगल] **०स्नान**–न. मंगलकार्यांत (अभ्यंग व उष्णोदकानें) करावयाचें स्नान. [सं.] **मांगल्य**–न. १ मंगल कार्य (लग्न इ०). २ सुदैव; कल्याण. **०तंतु**–पु. मंगळसूत्र. **०वस्तु**–नअव. सुवासिनीचे अलंकार. ' मांगल्यवस्तु स्वकरें करोनि।' –दावि ४५८.

मागस—वि. १ मागसलेला; उशीराचा; याच्या उलट आगस (पीक इ०). २ उशीरांचें; योग्य काळानंतरचें (देणें). –क्रिवि. मागाहून; उशिरां. ' ते तरी बहुत युगाचे राक्षस। रामलक्ष्मण जाहले मागस।' –कथा ३.३.१४९. [मागें] **मागसणें**–अक्रि. १ विलंब लागणें; दिवसगत होणें; लांबणें. ' यंदा पाऊस मागासला म्हणून धान्यें मागसलीं.' २ मागें राहणें; मागसणींत पडणें(मनुष्य, काम).

म्ह० आगसली ती मागसली, मागाहून आली ती गरव्हार झाली **मागसलेला वर्ग**–पु. शिक्षणाच्या बाबतींत सुशिक्षितांच्या मागें असलेला वर्ग, जाति. **मागसांडणें**–सक्रि. (कों.) अंतरणें; मागें टाकणें. [मागें+सांडणें] **मागसावणें**–अक्रि. (कों.) मागस केलें जाणें; मागें, पाठीमागें टाकलें जाणें. [मागसणें] **मागां-गा**–क्रिवि. १ मागें; माघारें. 'आशीर्वाद घेऊनी द्विजा। मागा परतवी सहित प्रजा।' –मुआदि १५.४९. २ पूर्वी. 'मागा योगिये समर्थ। त्यांचाहि निज स्वार्थ।'–दा१.९.११. **मागाऊ(हू)न**–क्रिवि. नंतर. **मागाडा**–क्रिवि. मागें. –शर. **मागांत**–क्रिवि. उशीरां; उशीरानें (धान्य पिकणें, वाढणें). याच्या उलट अगांत. **मागातली**–स्त्री. (कों. राजा.) चुलीच्या मागची, चुलीच्या उंचीइतकी भितीपर्यंतची सपाट जागा. **मागिलीकडे**–क्रिवि. अंतर्मुख; प्रत्यगात्म्याकडे (वृत्ति फिरविणें). –हंको.

मागिलवट––स्त्रीपु. मागलट अर्थ २ पहा. त्या शब्दाप्रमाणें कारक विभक्तीशिवाय व मागिलवटीस, मागिलवटयास या रूपांव्यतिरिक्त हा शब्द क्वचित योजितात.

मागी––स्त्री. (राजा.) १ मागणी अर्थ १ पहा. २ शोध. –शर. ३ संबंध; संदर्भ. 'दूर टेली कथेची मागी।'–एभा ११.६९०. ४ आचरण; मार्ग. 'आमची मागी अति शुद्ध।'–एभा २९.८९. ५ संबंध; विचारसरणी. 'हें अतर्क्य तर्केना मागी।' –एभा २२.४११. ६ मार्ग; पत्ता; मागमूस. 'अतियत्नें लक्षिलीं न वचेचि मागी।'–एभा २२.४१४. ७ खूण, चिन्ह 'ऐक विरक्तीची मागी।'–एभा २२ ६४७. [सं. मार्ग; प्रा. मागणें]

मागीर––क्रिवि. (गो.) मग; नंतर.

मागील––वि. मागचा पहा. [मागें; प्रा. मग्गि] **०ओढण**–नस्त्री. मागच्या काळापासून आतांच्या काळापर्यंत चालत आलेला संप्रदाय; पूर्वापर चाल. **०दार**–न. (हेट.) घराची मागची बाजू **०पायाचा टाळ**–पु. अशक्त घोडयाचे चालतांना मागील दोन्ही पाय एकमेकांवर आपटणें; पाय अडकत चालण्याची क्रिया. **मागिल्ल्यो**–न. (कर.) (विटीदांडूचा खेळ) चिनीच्या मागच्या टोंकापासून मोजणें. **मागीव**–वि. (कों.) उशीरा येणारें, गरवें; मैंहान (धान्याचें पीक). [मागील]

मागुत-ता-ती-तें, मागुतेन, मागौता, माघुता––क्रिवि. (काव्य) १ पुन्हां; फिरून. 'पुढें मागुता राम जोडेल कैचा।' –राम २५. २ लगेच. 'पुढे मागुता शोक जीवी धरावा।' –रा ६१. ३ मागें. 'तेही सारूनि मागतीं।'–एरुस्व १.६० [मागें]

मागू(घू)न, मागाहून––क्रिवि. १ नंतर; पश्चात्: मागोमाग. २ पाठीमागच्या बाजूनें; पाठीकडून. [मागें] **म्ह०** मागून पुढून बाप नवरा. **मागून आलेलें लोण पुढें पोंचविणें**–पूर्वीपासून चालत आलेले परिपाठ पुढें चालू ठेवणें. (आटयापाटयांच्या खेळांत सर्व पाटया ओलांडून परत येऊं लागलेल्या गडयास 'तो लोण घेऊन येत आहे' असें म्हणतात त्यावरून)

मांगुली––स्त्री. लडिवाळपणानें बांसरास म्हणतात.

मागें-घें––क्रिवि. १ गतकालीं; पूर्वी: अगोदर. २ पाठीकडे; पार्श्वभागीं. 'तो माझ्या मागें उभा होता.' ३ नंतर; पश्चात्. 'माझ्या मागें मुलांचें कसें होईल याची मला काळजी वाटते.' ४ (ल.) वर अवलंबून. 'माझ्या मागें हजार कामें आहेत.' [सं. मार्ग=शोधणें] **म्ह०** १ पुढें पाठ मागें सपाट. २ मागें एक पुढें एक–पुढें एक बोलणें आणि मागें विरुद्ध बोलणें, करणें, बोलणें व कृति यांत फरक असणें. 'मागें येक पुढें येक। ऐसा कदापि नाहीं दंडक।' –दा १९ ४.१८. **०घेणें-फिरणें-सरणें-होणें-हटणें**–उलट खाणें; परावृत्त होणें; सोडून देणें. 'मी हें काम पथकरलें तें पथकरलें. आतां मी मागें घ्यावयाचा नाहीं.' **०टाकणें**–१ (पैसा इ०) शिलक ठेवणें. २ भीतिग्रस्तास पाठीशीं घालणें. 'मला द्यावें जीवदान टाकावें मागें।'–ऐपो १५९. **०पडणें**–१ खर्च न होतां शिलकेस राहणें; गांठीं पडणें (द्रव्य). 'काटकसरीनें खर्च करा म्हणजे चार पैसे मागें पडतील. २ साफ बरा होणें; निखालस जाणें (दुखणें, त्रास). 'माझी पोट-दुखी अगदीं मागें पडली.' ३ आटवणींतून जाणें. 'आमच्या बरोबर फिरावयास या, म्हणजे तुमच्या आईच्या मरणाचें दुःख मागें पडेल.' ४ रद्द होणें; मोडणें. 'हा नियम आतां मागें पडला.' ५ प्रगति कमी होणें. 'रामा महिनाभर आजारी होता म्हणून मागें पडला.' ६ फिके पडणें; महत्त्व कमी होणें. 'मिरजकरबुवांच्या कथा पुण्यास सुरू होतांच इतर सर्व हरिदास मागें पडले.' **०पाडणें**–(मिळकत, वेतन इ०कांतून) शिलकेस टाकणें; संग्रही टाकणें. **०राहणें**–पिछाडीला असणें; लोकांपुढें, प्रसिद्धीस न येणें. **०लागणें**–(एखाद्याचा) पिच्छा पुरविणें. तगादा करणें. **०पाय**–वि. पिशाच्चयोनि. 'तुका म्हणे मागें पाय। तया जाय स्थळाशीं। –तुगा ६५८. **मागें पुढें**–क्रिवि. १ आजूबाजूस. 'मागेंपुढें पाहून चाल, दांडग्यासारखा चालूं नको. २ दोन्ही दिशांकडे, गोष्टीकडे; दोन्हीपक्षी. (शब्दशः व ल.). 'मागेंपुढें पाहून काय करणें तें कर.' ३ लवकर किंवा उशिरां; आगेमागें; केव्हांना केव्हां. 'तुम्ही असें करतां परंतु मागेंपुढें जाचील.' ४ अस्ताव्यस्तपणें; व्युत्क्रमानें (पडलेल्या वस्तू; बोललेल्या, केलेल्या गोष्टी). 'हा ग्रंथ मागेंपुढें झाला आहे, नीट कर.' ५ कांकूं, टंगळमंगळ करून. 'हा मागेंपुढें करूं लागला.' ६ केव्हां तरी; कधी तरी; आणखी एखाद्या वेळेस; पुढच्या किंवा मागच्या बाजूस. **०करणें**–माघार घेऊं लागणें; कांकूं करणें. **०कोणी नसणें**–वडील माणूस किंवा संतति नसणें; आईबाप, बायकापोरें याशिवाय असणें. **०न पाहणें**–मुळींच न

कचरणें. 'मला चोर भेटले तेव्हां मी मागेंपुढें न पाहतां त्यांच्या अंगावर तुटून पडलों.' ०पाहून वागणें-दूरवरचा विचार करून, शहाणपणानें चालणें. **मागमोरा(मोहरा)**-वि. पाठमोरा. [द्वे.] **मागोमाग** क्रिवि. लागलीच; पाठोपाठ. [मागें द्वि.] **मागोती, मागौता, मागौतिआं, मागौतीं**-क्रिवि. १ पुन्हां. 'तो दैववशें मागौता। जळेंचि लाहे।'-ऋ ६२. 'मागौतिआं निग लिआ। पवनवेगें।'-शिशु ९०८. 'मागौतीं न यों सर्वथा।' -भाए ३२३. २ माघारी; परत. 'स्वयंवरा आली उर्वशी। ते मागौती पाठवीलि साधुसीं।'-शिशु २०२ [मागें]

मांगेरी—स्त्री. (कु.) गलबत. [महागिरी]

मागेला-ल्या—पु. कोंकणांतील एक जात व तींतील व्यक्ति.

मागो(घो)टा-ठा, मागोटी—पुस्त्री. घोडा, बैल इ० पशूंच्या शेपटीच्या खालून नेलेला खोगीराचा बंद, पट्टा. [मागें]

मागोदर—क्रिवि. (कर.) नंतर; शेवटीं. 'अगोदर व मागोदर मिळून दीड महिना मोडला.' [अगोदरच्या उलट]

मांगोरा—पु. (कु. बे.) गवत, झाडाचा पातेरा ओढण्याचें लांकडी दांताळें. मंगेरा पहा.

माघ-ग—पु. चैत्रादि महिन्यांतील अकरावा महिना. [सं.] **म्ह०** माघीं अळें आणि बेंदरीं फळ.(गो.)माग वांचूया,मागीर शिमगो खेळ्ंया=माघ महिन्यांतून जगल्यावर मग शिमग्यांत खेळ्ंया. (दूरच्या व हातांत नसलेल्या गोष्टी सांगणाराविषयीं ही म्हण योजतात). ०वटा-स्नान **माघोटा**- पुन. माधवा(श्रीकृष्णा)प्रीत्यर्थ पौषी पौर्णिमेपासून माघी पौर्णिमेपर्यंत सुर्योदयापूर्वी नित्य नियमानें स्नान करणें. [सं. माघ+ठान] **माघा-घी**-वि. माघ महिन्यासंबंधी. **माघोटी**-स्त्री. १ माघांत पडणारा पाऊस २ माघस्नान पहा.

माघड—स्त्री. (व. घाटी.) सरकी पेरण्याकरितां नळ्याच्या वर लावलेली एक प्रकारची लांकडी वाटी, टवळें; चाडें.

माघणी-णें—(प्र.) मागणी-णें.

माघां—क्रिवि. मागें. [प्रा.]

माघार—स्त्री. १ (शब्दशः व ल) मागें घेणें; उलट मारणें; कचरणें. २ उतरती कळा लागणें; मागें पडणें (काम, नशीब इ०). (क्रि०घेणें). ३ मागें हटणें, फिरणें; (क्रि०घेणें) ४ परत येणें. ५ उलटणें; परतणें (ताप इ०). 'ज्वरानें माघार घेतली.' [सं. मार्ग= रस्ता; मागें] **माघारणें**-अक्रि. १ मागें घेणें; फिरणें (शब्दशः व ल.). शड्कोनि देवऋषिवचनातें। माघारले सुर सकळ।' -मुआदि ४.१७९. २ उतरती कळा; ऱ्हास पावणें. ३ मागें हटणें; मुरडणें. ४ परतणें; उलटणें. इ० ५ मूळपदावर येणें (माघार घेणें या शब्दापेक्षां माघारणें हा शब्द कमी प्रचारांत आहे). -सक्रि. (काव्य) मागें सांडणें; मागें टाकणें; अतिक्रम करणें; मागें पाडणें. 'माघारोनि मनपवनातें। सत्रसदना पातला।' -मुआदि ११.५७. [माघार] **माघारपण**-न. १ नुकतेंच लग्न झालेल्या मुलीनें सासरहून माहेरीं कांहीं दिवस रहावयास परत येणें; माहेरपण. २ तिचें माहेराहून सासरीं परत येणें; (क्रि० करणें). [माघारा+पण] **माघारा(रां)रीं-रें, माघारिआ**-क्रिवि. परत; पुन्हां परत; उलट. **माघारा काढणें**-मागें घेणें. 'माघारा भीम काढला तूर्ण।' -मोस्त्री २.३४. **माघारी**-वि. १ (कों.) नुकतेंच लग्न झालेल्या मुलाच्या अथवा मुलीच्या बरोबर माहेरीं किंवा श्वशुरगृहीं जाणारें (मनुष्य). २ सासरच्या मुलीला माहेरीं आणण्याकरितां गेलेला, पाठविलेला (मनुष्य). [माघारा] **माघारीण**-स्त्री. १ (कों.) सासऱ्याहून माहेरीं किंवा माहेराहून सासरीं कांहीं दिवस रहावयास जाणारी, नुकतेंच लग्न झालेली मुलगी. २ (सामा.) तरुण पत्नी; मालकीण; गृहिणी. [माघारा]

माघावा—पु. माग. [सं. मार्ग; प्रा.]

माघील, माघील ओढण, माघून, मार्घे, मार्घेपुढें, माघोटा, माघोमाघ—मागील, मागील ओढ इ० पहा.

माघु-घू—पु. मागें; माग. [सं. मार्गे]

माघोडा—क्रिवि. मागोमाग. [प्रा.] **माघोवा**-पु. माग; पत्ता. -क्रिवि. आपले मागें; माघां; मागें. 'चरण घेती माघोवा।' सिसं १.४. [सं. मार्ग]

माघौता-ती-तें—क्रिवि. पुन्हां, परत. मागौता पहा. 'कोण्ही कोणातें भजतां। ते ही त्यातें भजे माघौता।'-रास ४. २९५. [मागुता]

माच—पु. १ फोडलेल्या अथवा लहान धोंडयांनीं भरलेला किंवा भरावयाचा गच्ची, पाया इ०कांचा मध्य, आभ्यंतर भाग. २ गच्ची इ० करतांना जमिनींत घातलेलें भरण (क्रि० भरणें; घालणें).

माच—अ. शेळी, मेंढी यांची गणती करतांना विसावरील संख्येस लावतात तो प्रत्यय. उदा० शेळी माच एकवीस मेंढी माच बावीस. विसाच्या आंतील संख्येस बुद्ध शब्द लावतात. ०**बक्करी**-स्त्री. माचांतील बकरी; वीस संख्येहून अधिक असलेली बकरी.

माच—पु. १ माचोळी; माळोंचा; माचा. २ माळा; मांडव; सोपान. 'कीं प्रासादाचेनि मीषें। आकाशा मांच बांधले जैसें।' -ऋ १६. 'नातरी संहारतेजाचिया ज्वाळा। तोडोनि माचु बांधला अंतराळां।'-ज्ञा ११.३०३. ३ (कों.) पेंढा, गवत, सर्पण इ० ठेवण्यासाठीं जमिनीवर धोंडे मांडून किंवा मेढी पुरून त्यांवर आडवींउभीं लांकडें घालून केलेला माळा. ४ आश्रय. ५ ठिकाण. ६ (व.) माकण (पाणी आणण्याची) ७ (व.) आढी (आंबे इ० पिकविण्यासाठीं घातलेली). 'आंब्याचा माच.' ९ खाट;

पलंग. [सं. मच्=धारण करणें; सं. मंच] **माचण**-स्त्री. लहान माचा.

माचकणा—पु. पाटीचा कणा. [माज+कणा]

माचंग, मोरचंग—न एक वाद्य. -वेहु ३६.

माचण—स्त्री. (नाविक) गलबताची गति बदलतांना शीड पालटण्याची क्रिया. [दे.] **०घेणें**-नागमोडीच्या मार्गानें जहाज हांकारून वाऱ्याच्या विरुद्ध दिशेनें मार्गक्रमण करणें.

माचण—स्त्री. भरणी; भर. (क्रि० भरणें). [माचणें]

माचणें-सक्रि. १ (व.) दाबून नरम करणें. 'आंबा माचला.' २ दगड इ०नीं भरणें (गच्ची, जमीन, पाया, भित, विहीर, खळगा, भोंक इ०चा मध्यभाग). 'पन्नासा चिऱ्यांनीं बांधिलें माचोनी।' -व ५००. ३ भेगा, चिलणी भरणें. या क्रियापदाचें कर्म भरलेली जागा किंवा भरण्यास लाविलेलें द्रव्य हें असतें. उदा० जमीन माचली, विहीर माचली, पाया माचला, गार माचली, खडे माचले इ०

माचयाल(वेल), माचील, माचेल—स्त्रीन. (कु.गो.) मिरवणुकीचे वेळीं नवरदेवास जींत बसवितात ती पालखी, मेणा इ० [सं. मच]

माचळ—पु. १ कोरळ वृक्ष:यांचें पान खाण्यास योग्य असतें. २ एक विशिष्ट खाण्याजोगें गवत.

मांचळी—स्त्री अडणी; तिवई (जेवण्याचें ताट ठेवण्याची) 'आसन सोरठा उर्णपटीं। पुढां माचळी चौंपुटी।' -ऋ ८०. [सं. मंच]

माचा, माचवा—पु १ काथ्यानें विणलेला एक विशिष्ट आकाराचा पलंग. 'गणिले कुशशयनोनचि कृष्णेनें हे पलंग हे माचा' -मोआदि ३४.२३. २ पलंग; मचक. 'दूत त्रासासि घेतीं म्हणुनि सुमति ते जोडिती पाय माचे।' -मोकृष्ण ७२.५३. ३ शेताच्या राखणीसाठीं चार खांबावर केलेली बसण्याची जागा; माळा. ४ माच्याचा खूर. ५ पाण्याचा पाट ओलांडून पलीकडे जाण्यासाठीं केलेली वाट. 'गांवच्या माच्यापाशीं गाडी आली.' -खरादे [सं. मंचक; प्रा. मंचओ; अप. मंचऊ] **माचाड**-स्त्री. मोटेनें पाणी वर काढण्याकरितां जिला मोटेचा नाडा (दोर) बांधतात ती मोटेच्या तोंडावरील लाकडी चौकट. **माचाळ**-न. माचा अर्थ ३ पहा. **माची**-स्त्री १ पर्वताच्या पायथ्याजवळील किंवा पायथा व शिखर यांच्या मधील सपाट जमीन: उपत्यका. २ किल्ल्याच्या तटाखालील उताराचा माग ३ माचा: खाट. ४ (व.) खुर्चीसारखे समोर खालीं पाय सोडून बसण्याचा छोटा टेकडा. ५ चार खुंटावर आडवीं उभीं लाकडें ठेवून केलेली चवकट. (उन्हांत धान्य इ०वाळत घालण्यासाठीं, पेंढा ठेवण्यासाठीं). ६ वासरें, करडें इ०कांकरितां खुंट व फळ्या पुरून (केलेलें आवार; कोंड वाडा; कोंडण. [सं. मच्=धारण करणें; मंच] **माचुं(चों-चो)डा**-पु. (कों.) (भात, नाचणी इ०कांच्या) पेंढ्यांचा बिडा; पेंढी. **माचो**-पु. (कु.) दोऱ्यांनीं विणलेला पलंग, चोपाळा. **माचो(चु)ळा**-स्त्री. १ पेटी, धान्याचें गोण इ० ठेवण्याची घडवंची. २ लहानसा माच; माळोंचा; गवत, पेंढे इ०साठीं केलेली उंच जागा.

माचिगाणें—न. दिंडी गाण्याचा एक प्रकार. 'डफगाणें माचिगाणें।' -दा १२.५ ६. [प्रा]

माचूळ—वि. बेचव. मचूळ पहा.

माचेमार—पु खेटरानें, पायपोसानें दिलेला मार [मोची+मार]

माज—पु. १ (राज) स्वयंपाकाच्या भांड्यास तें न जळावें म्हणून बाहेरून लावण्याची राख व माती. २ भांड्यास राख व माती फांसण्याची क्रिया. ३ अशी राख, माती फासलेली स्थिति, केलेला लेप [माजणें]

माज—पु. १ (कों.) एक मासा; २ (माण.) माचा.

माज—पु. (काव्य) मध्य; कंबर; मधला भाग. (शरीर, टेकडी, घर यांचा) 'सिंह देखोनि जिचा माज। मुख न दावी मनुष्यांत।' [सं. मध्य, आर्मेजि. मंझ; यूरोपियन. जि. मस्करे] **०बांधणें**-कंबर बांधणें. 'दुष्ट बाढे जो तो उपाव आधीं, दनुज रोषें बोलोनि माज बांधी।' -आमहा ६. **०सोडणें**-कंबर सोडणें 'सुदेव नामा द्विज माज सोडी।' -सारुह ५.३८. **०घर-नपु.** घराचा मध्य भाग; मध्य गृह; पडशाळेच्या आंतील मुख्य खोली. [सं मध्यगृह] **०पट पट्टा**-पु कमरपट्टा (विशेषत: बायकांचा) 'अचाट दळ अबळांचें कैसें प्रबळ माजलें। माजपट्यानें माज बांधलें।' -अमृत २३.

माज—पु. १ मैथुनेच्छा; उधान; मस्ती (गोमहिष्यादिकांस ऋतु प्राप्त झाला असतां उत्पन्न होणारी). (क्रि० येणें; करणें). २ मद; फुगा; तोरा; धुंदी; गर्व; अहंभाव ३ आधिक्य; रेलचेल; वृद्धि. 'तैसी रजतमें हारवी। जे सत्त्व माजु मिरवी।' -ज्ञा १४.१९९. ४ (औषधांतील) मादक गुण, कैफ. 'कनकाचिया फळा। आंतु माज बाहेरी मौळा।, -ज्ञा १८.६५८. ५ खळबळ. 'तरि सिंधूचेनि माजे। जळचरा भय नुपजे।' -ज्ञा १२.१६५. ६ हातमागाच्या सुतास पाजण करतेवेळीं ज्या बैलीस सूत ताणतात त्या बैलीची ताणण्याची दोरी. ७ गाण्यांतील एक राग. राग पहा. [सं. मद; प्रा. मज्ज] **०करणें**-पशूंना ठराविक मुदतीनें मैथुनेच्छा उत्पन्न होणें: माजास येणें. **माज मोडणें**-(कर्त्याची षष्ठी) माज शांत होणें; पशूना ठराविक मुदतीनें मैथुनेच्छा होण्याचें बंद होणें. २ (ल) खोड मोडणें; गुरमी जिरणें. **०मोडणें**-(कर्माची षष्ठी) खोड मोडणें; माज जिरविणें. **माजावर येणें**-फळणीस येणें. सामाशब्द- **०क**-वि. मत्त; धुंद झालेला (मद्य, औषध, मान इ०कानीं). [सं. मादक] **०गेला**-वि. सहज शेफारणारा;

मगरूर; मस्तवाल. **०मोड**-पु. (विशेषतः म्हैस, घोडी यांची) मैथुनेच्छा शमविणें. [माज+मोड] **माजरा-माजिरा**-वि. १ मादक. विशिष्ट धान्यें व वनस्पतींसंबंधीं योजतात. उदा ०माजरा हरीक, माजरा गोंवल, माजरी खडसांबळी, इ०च्या उलट. गोडा हरीक; गोडा गोंवल इ०. २ बेहोष; उन्मत्त; शेफारलेला; मगरूर. 'जो सावध घे मदिरा। तो होउनि ठाके माजिरा।' -ज्ञा १७. ११३ ३ चोखंदळया; चवचाल **माजऱ्या हरीक**-पु हरकाची मादक काळ्या टरफलाची जात. याच्या उलट गोडाहरीक. **माजरु-रू**-वि. (व.) १ मस्तवाल. २ माजलेला. **म जरें**-न. मादक असलेलें धान्य, वनस्पति खाल्ल्यानें उत्पन्न होणारा कैफ, धुंदी. -वि. कैफ उत्पन्न करणारें. **माजवण**-न. १ उन्मत्तपण. २ मादक पदार्थ. 'कां माजवण दीजे मर्कटा।' -ज्ञा ३.९. ३ अधिकता. 'चंचळपणाचें माजवण। घेतलें जेणें।' -स्वादि १.५. १८.**०वणें**-अक्रि. माजणें. **०विणें**-सक्रि. उन्माद आणणें; जास्त, अधिक करणें **माजिवटा**-पु. १ उन्माद; गुंगी. 'पातलिया मरणाचा माजिवटा।' -ज्ञा ८.२०८ २ मरण **माजिवडें**-वि मस्त.

मा(मां)जण—न १ देवाच्या मूर्तीला तेल, शेंदूर इ०लावणें लेपणें. २ असा लेप लावण्याचें द्रव्य. ३ माज; स्वयंपाकाच्या भांड्यावर फासण्याची राख व माती. [सं. मार्जन] **मा(मां)जणें**-सक्रि. १ तेल, शेंदूर इ०कांनीं देवाच्या मूर्तीस लेप लावणें. माती, राख इ०स्वयंपाकाच्या भांड्यावर फांसणें. २ फासणें; लेपडणें; माखणें. 'त्याला काय बक्षीस तर तेलशेंदराचें माजणें. -नामना ३२. **माजविणें**-सक्रि. १ (खड्, माती इ०) पाटीवर फासणें. २ शेंदूर, राख, माती इ०नीं देवाची मूर्ती, शरीर, स्वयंपाकाची भांडीं इ०) माखणें. [माजन]

माजणें—अक्रि. १ मादक पदार्थ, औषधें यांचा अंमल, चढणें; कैफ चढणें; झिंगणें; धुंद होणें. २ फुगणें; शेफारणें; चढून जाऊन तोरबाज, दांडगा, उन्मत्त होणें. 'माजो बाहुबळें न छात्र।' -मोउद्योग १३ १५. ३ मर्यादेबाहेर पुष्ट, मस्त, तुंद होणें (खुराक खीरपुरी इ०कांनीं) ४ पुष्कळ, पूर्णपणें, उफाड्यानें वाढणें; फोफावणें. (पीक). ५ मुलुखभर पसरणें; दूरवर प्रसृत होणें (वातमी, गोष्ट). 'बातमी माजली.' ६ वाढणें; वृद्धि पावणें; सर्व बाजूंनीं विस्तार होणें (धंदा, गांव, गान यांचा). 'कारखाना माजला, वस्ती माजली. झाडी माजली.' ७ अमर्याद वाढणें. फुगणें 'दरिद्र माजलें, महागाई माजली, गोंधळ माजला.' ८ संचकणें (जीभ, हात इ०). 'जिव्हा माजली हात माजला.' [सं. मद्, माद्य; प्रा. मज्ज] **म्हo** माजली महारीण फोपसाला जहार.

मां(मा)जर—न १ एक लहान ग्राम्य जनावर; बिल्ली. याचा रंग पांढरा, काळा, पिवळा, उदी, मुगी इ०, केस गळ ह तुळतुळीत, डोळे घारे व शेपूट लाब असतें. हें उंदीर मारून खातें व्यास अंधारांत फार चांगलें दिसतें. रानमांजराची जात फार क्रूर असते २ गाजराचा गाभा, सुळा. [सं. मार्जार; प्रा. मंजार] **म्हo** १ मांजराचे गळ्यांत घाट कोणी बांधावी ? =(स्वसंरक्षणार्थ युक्ति म्हणून सर्व उंदरांनीं, मांजराच्या गळ्यांत घांट बांधल्यानें तिचा आवाज होऊन मांजर आलेलें कळेल, असें ठरविलें पण घांट बांधण्यास कोणी पुढें होईना यावरून) दिसण्यांत सोपी पण करण्यास अशक्य अशी गोष्ट २ (व.) मांजरीचें दांत तिच्या पिलास खात नाहींत=आपलें मनुष्य कितीहि बोलले तरी राग येत नाहीं. ३ मांजर गेलें लुटी आणि आणल्या चार मुठी **०आडवें येणें**-(ल.) एखाद्या कामास अडथळा होणें, येणें. (मांजर आडवें आल्यानें कार्य सिद्धीस अडथळा येतो अशी समजूत आहे यावरून.) **०मारणें**-पाप करणें; (मांजरिवध हें एक पातक आहे यावरून ल.) अपराध, गुन्हा करणें. **माझ्या घरांत मांजर व्याली काय ?** -ज्यानें भेटीस यावयाचें सोडलें आहे त्यास म्हणतात. **मांजराचा मावशी**-स्त्री. चिचुंद्री (कारण मांजर ह्या प्राण्यास मारीत नाहीं. **मांजराचे पाय**-पुअव. (ल.) गिचमिड, चिडचिड अक्षर. कुत्र्याचे पाय या शब्दाशीं सामान्यतः जोडून उपयोग. **मांजराचे पाय कुत्र्यावर करणें**-एखाद्या गोष्टींत, काम'त कांहीं तरी लटपट, गडबड करणें. सामाशब्द- **०झां क-प**-संधिप्रकाश व रात्र यांच्या दरम्यानची वेळ (यावेळीं मांजरें दृष्टीस पडत नाहींत यावरून). **०डोळ्या**-वि. मांजराच्या डोळ्याप्रमाणें डोळे असलेला; घारडोळ्या. **०सुतवणी**-न. कोमट पाणी, द्रव **०वेल**-स्त्री. तांदुळाची एक जात. **मांजरी**-स्त्री. १ खांवेंत होणारी गांठ. (या गांठीवर उपाय म्हणून तीवर लोणी लावून तें मांजराकडून चाटवितात. यावरून); खाकमांजरी पहा २ घुसळखांबाच्या रवीच्या फासाच्या दोऱ्या प्रत्येकी; मांजरें. मादिरें ३ माजराना फार प्रिय असलली एक वनस्पति. ४ (कों.) किसणी; विळी. ५ (कों.) मांजराची स्त्री; भाटी. ६ (गो.) चटई (लव्हाळ्याची). **०कवळप**-(कों.) अंथरूण गुंडाळणें. **मांजरूं**-न माजर (कोणत्याही लिंगी-लडिवाळपणानें, तिरस्कारानें). **मांजरें**-न. घुसळखाबाची दोरी. **मांजऱ्या**-क्रिवि उंदऱ्यामांजऱ्या पहा.

मां(मा)ज(द)रपाट—पु. मद्रीपोलम येथील जाडयाभरडया कापडाची एक जात.

माजरी—स्त्री. गवतावगैरे उगवणारें एक तण.

माजवळ—वि. (गो) मध्यम.

माजवी—स्त्री. (राजा.) टेंकडीच्या उतरणीवर केलेला चौथरा; माची. [मध्य. माज]

माजा—पु. मायफळ. [फा. माजू]

माजा—वि. (काव्य) माझा. 'कोण निवारील शाप हा माजा।' -मोआदि २.६. [प्रा.]

मांजा-ज्या-झा—पु. १ मेण, तेल, अंड्याचा बलक आणि काचेची पूड यांचें दाट मिश्रण, खळ. २ हें मिश्रण लावलेला पतंगाचा दोर. [सं. मंड; हिं.]

माजाड—न. १ पाठीचा कणा व कंबर यांचा सांधा. २ कटिप्रदेश; माज (निंदेनें, तिरस्कारानें.) [माज=कंबर]

माजिटा—पु उत्कर्ष. -हंको. [प्रा.]

मांजिर्ठ—न. १ (मदानु.) मंजिष्ठ. 'ऐसी भीतभंगा नेहटी। सपोतें मांजिर्ठी।' -ऋ ६९. २ तांबडें वस्त्र. ' प्रणवाचिये पेठे। जाहलें शब्द ब्रह्म मांजिर्ठे।' -ज्ञा ६.१०९. [सं. मंजिष्ठ]

माजिला—वि. मधला. [सं. मध्य] **माजिवटा**-पु. १ मध्यभाग, मध्य. ' शांतीचा माजिवटा। ठाकिला जेणें।' -ज्ञा १२.१४३. २ भर. ' ऐसीया बोधाचा माजिवटा।' -ज्ञा १८. ११८७. **माजिवर्टे-डें**-क्रिवि. मध्यें; आंत.

माजिवडा-डां—वि. मध्याचा आश्रय करून राहणारा. -क्रिवि. मध्यें. ' जेथें आकाराचिया माजिवडां। येणें जाणें पडे निवाडा।' -सिसं ६.१३७.

माजी—वि. १ भूतकालीन; गत. २ रद्द; गैरचालू; अनुपस्थित. (क्रि० पडणें). ' हा नवा रुपया होतांच तो रुपया माजी पडला.' ' माजी-मामलेदार, कारकून ' [अर. माझी=गत] **०करणें-पाडणें-घालणें**-रद्द करणें.

माजी-जीं—क्रिवि. (काव्य) आंत; मध्यें; मधें. ' विपरीत ज्ञानें लीन होय। माजीं अज्ञानासी।' -विउ ३.४१. [सं. मध्य; प्रा. मध्यें, मज्झ, माज्झ; सिं. मंझु; हिं. मांझ, माझ; बं माझ] **माजीवटा**-क्रिवि. मध्यें. ' यालागी सहज भजनामाजीवटा। जाहला तो पैठा अनहंकृती।' -एभा २.४३९.

मांजी—(सांकेतिक) आठ. संख्या.

माजु—पु. १ मध्यभाग; कंबर; माज. ' अतिशयें माजु साना। होता अभिमान पंचानना।' -एभा १४.४९२. २ मस्ती; माज. [मध्य]

मांजुळणी—स्त्री. (ना.) रांजणवाडी.

माजूफळ—न. मायफळ. [सं.]

माजू(जु)म—स्त्री. साखर, बदाम, पिस्ते इ० मसाला घालून बनविलेल्या भांगेच्या वड्या. [अर मअजून्] **माजुमी**-वि. १ माजूम खाण्याची संवय असलेला. २ माजूम मिसळलेला (बर्फी इ० पदार्थ).

माजूर—वि. (अशिष्ट) माहीत. [अर. मअजूर]

माजूर-माजोरा-री—वि. चढेल; उन्मत्त; गर्विष्ठ; मस्त वाल; माजलेला. **माजुरकी, माजुरी**-स्त्री. गुरमी; मगरूरी; मिजाज. -वि. मस्तवाल; उन्मत्त; गर्विष्ठ. **माजुरमत**-न. आडदांड मत; अहंपणानें, हट्टानें धरलेला मुद्दा. (क्रि० धरणें).

माज्या—पु. मोटेच्या वरच्या बाजूचा तुकडा.

माझा—वि. स्वतःचा; माजा; मम. मी शब्दाचें षष्ठीचें रूप. [सं. अस्मत्] **म्ह०** माझी बाई गुणाची पायलीभर चुनाची= रडत असलेल्या मुलीस समजावितांना थेट्टें म्हणतात. **०मी**-क्रिवि. मी एकटा; दुसऱ्याची मदत न घेतां. **माझिये**-क्रिवि. माझ्या. ' मनीं माझिये हीत ऐसेंचि होतें।' -राक १.३७. **माझें**-वि. मी याचे षष्ठीचें नपुंसकलिंगी रूप. [सं. अस्मत; प्रा. मज्झ=माझें] **म्ह०** १ माझें मला होईना अन् पावणा दळून खाईना. २ (व) माझेंच नाक वर=हरला तरी ज्याची मुजोरी जात नाहीं अशा माणसासंबंधीं. **माझें तुझें म्हणणें**-(आचरणांत) पक्षपात करणें. ' माझें तुझें हें म्हणशील जेव्हां।' -सारुह ७.१२१. [प्रा.] **माझेंमाझें म्हणणें**-न सर्व ठिकाणीं आपलेपणा दर्शविणें; सर्व माझेंच आहे असें म्हणणें. ' माझें माझें म्हणतोसी। म्हणौनियां।' -दा ३.१० ५०. **माझ्या(मज)कडे तरी पहा**-माझी तरी दया येउंदे. ' नादा एकत्र, नको द्वेष करूं मजकडेचि बा! पाहे।' -मोउद्योग २१.११. **माझ्या बापाच्यानें, हें होणार नाहीं**-हें करण्यास मी अत्यंत असमर्थ आहे. **माझ्या वस्त**-क्रिवि. (व.) माझ्याच्यानें; माझ्याकडून.

माझारीं—शअ. १ (काव्य) आंत; मधें; मध्यें. ' पै ध्यातां आपणचि परी। ध्यानरूप वृत्तिमाझारी।' -ज्ञा १८.१०३३ २ -क्रिवि मध्यभागीं. ' दिसती उचित पदें माझारीं।' -ज्ञा १.८. [सं. मध्य]

माट—पु. (गो) अति गोड खाल्ल्यामुळें तोंडास बसलेली मिट्टी. [मिटणें]

माटकुला—वि. लहान आकाराचा; चिमुकला.

माटमु(मू)ट—स्त्री. भयामुळें उद्भवलेली चिंता. (क्रि० करणें). -क्रिवि. धागधुग होऊन; भयभीत होऊन. ' माझा जीव माटमुट करतो. ' [ध्व.]

माट्या, माट्या—पु. (व.) सोसाट्याचा वारा; वावटळ.

माटव—पु. (कु.) मांडव. [सं. मंडप]

माटवी—स्त्री. (कु.) गणपती इ०च्या मूर्तीवर फळें वगैरे बांधण्याकरिता केलेली लाकडी मंडपी; भाळी. [सं. मंडप] **०बांधणें**-(कु.) गणेशचतुर्थीला गणपतीवर लाकडी चौकटीस फळें इ० बांधणें.

मां(मा)टु(ट्ट)ळणें—अक्रि. खुंटणें; वाढ संपणें. ' नाना फळतिये वेळे। केळीची वाढी मांटुळे।' -ज्ञा १८.१०८२.

माठ—पुस्त्री. एक पालेभाजी. ही सर्वत्र व सर्वकाळीं होते. तांबडा व पांढरा असे याचे दोन प्रकार आहेत. लावल्यापासून तीन आठवड्यांत खाण्याजोगी होते. [सं. मारिश]

माठ—पु. पसरट असा मातीचा घडा; रांजण. –स्त्री. (कु.) चिकण माती असलेली जागा. [सं. मृद्+घट; मृत्तिका+घट] **०ली**–स्त्री. (कु.) मातीचें लहान भांडें.

माठ—वि. १ चापटसर; खालपट; किंचित् उतरतें (छप्पर इ०); याच्या उलट खर किंवा पाणढाळ. २ टिल्लू; खुजट (मनुष्य, पशु). ३ मंदमति; जडबुद्धि. 'विश्वाचे माठ । त्याचे कपाळीं तें नाट ।' –तुगा ३४६०. [माठणें] **०घोसाळें**–न. घोसाळ्याची एक जात. –कृषि ५९५. **माठणें**–अक्रि. १ (जखम, क्षत इ०) भरणें आणि बरें होणें. २ झिजणें; बोथटणें (धार, टोंक). ३ उग्रता कमी होणें. –सक्रि. टांकीनें सारखा व गुळगुळीत करणें; साफ करणें (गुंडे, चिरे). ४ हलके हलके ठोकून गुळगुळीत करणें (दागिने, गोठ, कडें, जोडवीं इ०). ५ (धातूच्या नव्या भांड्याचे) पोचे काढणें; साफ करणें. ६ (ल.) ठोकून नरम, वश करणें. **माठरणें**–अक्रि. १ जड, सुस्त, मट्ट होणें. २ डागळणें; सुकणें; कोमेजणें; टवटवी नाहींशी होणें (वनस्पति इ०ची). ३ भरून येणें; बरी होणें (जखम); मठारणें. –सक्रि. १ घडणें; आकार, रूप देणें. २ (ल.) आपल्या इच्छेप्रमाणें घडविणें, वळविणें. ३ मठारणें या अर्थांहि योजितात. **माठळें**–न. १ (पळी, चमचा इ०कांचें)तोंड. २ समईचें टवळें. ३ ताक करावयाच्या रवीचा माथा, बोंड. ४ लहान मुलाचें चापट व पातळ करभूषण **माठवण**–न. १ जखम भरून येण्यासाठीं लावलेलें औषध; माठणारें मलम. २ मठारणारा; माठणारा व्रण. **माठ(ठा)ळणें**–सक्रि. १ (हलकें ठोकून) नव्या भांड्याचे पोचे साफ करणें. २ भांडें घडणें, उतरणें. ३ एखादी वस्तु, भांडें यांवर हलका हात फिरविण्यानें साफ व गुळगुळीत करून त्यास आकार आणणें; हलके हाताच्या चोपानें सारखी करणें (जमीन इ०). ४ (ल.) आज्ञाधारक करणें; आपल्या इच्छेप्रमाणें वळविणें. –अक्रि. १ बरी होणें; भरणें; मठारणें (जखम). २ मंद, जड होणें (बुद्धि, मन); मट्ट होणें; जड, सुस्त, मांदा होणें (शरीर, मनुष्य). ३ वाढ खुंटणें; झकाकी, तेज, दम गमावणें (झाड, वनस्पति यांचें). **माठा–ठ्या**–वि. जड; ठोंब्या; जडबुद्धि; मंदमति. **माठी**–स्त्री. बायकांच्या हातांतील धातूची पोकळ बांगडी. **माठीव**–वि. टांकीनें सारखा व गुळगुळीत केलेला; उत्तम घडलेला (इमरतीचा दगड). **माठें**–न. (कु.) १ प्रेत जाळलेल्या जागेवरील बांधकाम (मशीद, थडगें, छत्री, वृंदावन इ०). २ दोन्ही टोकांस उघडी असलेली, पडदी नसलेली शेतांतील पडवी, सोपा इ०; दुपाखी ढेलच; पडसाळ.

माड—पु. (कु.) समईच्या चाडग्याचा खालचा भाग (चाडें पितळी व खालीं लांकडी दांडा अशा).

माड—पु. नारळाचें झाड. **म्ह० आडो माडो समुद्रासारखा वाढो** (मुलाला न्हावूं घालतांना स्त्रिया म्हणतात). =माडाप्रमाणें उंच व समुद्राप्रमाणें विस्तार पावो या अर्थी. **०उतरणें, वहाणें**–माडाची माडी काढणें व विकणें. सामाशब्द– **०पीर**–पु. ताडी पिण्याचें व्यसन असणारा; नारळसंत. [माड+फा. पीर] **०बाग**–पु. (हेट.) नारळीच्या झाडांचा बाग. **माडागूण, मांडागूळ**–ळ–नपु. (कों.) नारळी, ताड यांस येणारा शेवटचा सुयरा, कोंका, पोय. [माड+अगूळ, अग्र] **माडागोड**–पु (गो.) माडीपासून तयार केलेला गूळ.

मांड—पु. १ रचणें; व्यवस्थित टेवणें (काम, कारखाना यांकरितां–हत्यारें, उपकरणें, साहित्य इ०) २ केलेली रचना; मांडणी. (क्रि० मांडणें). ३ देखावा; व्यवस्था 'दावूनिया माड । पुरे न करीती भांड !' –तुगा ३११५. ४ विस्तार; पसारा. ५ वैभव. 'काळीं संहारीना मांड त्याचा सारा मी हरी ।' –मोरा मायणें १.२५२. ६ (गो.) दुकान. ७ (कों. राजा. कु.) पिशाचादिकांस बलि देण्याचे वेळीं भगतानें देव–देवतांची स्थापना करण्याचा विधि. (क्रि० भरणें) ८ होळीच्या सणामध्यें ग्रामदेवतेस कौल लावणें. ८ ठेवलेलेपणा; मांडलेलेपणा; स्थिरावलेली स्थिति. (मांडणें या क्रियापदासह उपयोग करतात). ९ (संगीत) एक राग. ह्यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण–संपूर्ण. वादी षड्ज, संवादी पंचम, गानसमय सायंकालिक. १० (कों.) झोडलेल्या भाताची रास [मांडणें] **०काढप**–(गो.) दुकान उघडणें. **०घालप**–(गो.) दुकान स्थापन करणें. **मांडणावळ**–स्त्री. १ मांडणें, व्यवस्थित टेवणें याबद्दल द्यावयाचें मोल, किमत. २ मांडणी; मांडणूक. **मांडणी–मांडणूक**–स्त्री. १ मांडणें; मोकळेपणीं व व्यवस्थित रीतीनें पसरणें; थाटणें; लावणें; रचणें. 'जमीनीवर प्रथम टाहाळाची मांडणी करावी मग वर गवत घालावें.' २ व्यवस्थित रचना. 'तदन्याय वृक्षपाषाणी। आणिली ज्यानें गंधर्वमांडणी ।'–नव १९.४८. ३ सांगाडा; हुसती बांधणी; बंदिस्ती (इमारतीची). **मांडणें**–सक्रि. १ मोकळेपणीं व व्यवस्थितपणें पसरणें, ठेवणें, रचणें (काम, धंदा यांकरितां–साहित्य, सामान, जरूरीच्या गोष्टी). २ स्थापन करणें; उघडणें (दुकान, व्यापार) ३ लिहिणें; वहींत दाखल करणें(खर्चाच्या बाबी, टांचण). ४ तयार केलेल्या चिखलांत रोपापाठीमागून रोप याप्रमाणें लावणें; आवटणें (नाचणी, वरी इ०चीं रोपें–आवटणी करतांना). ५ प्रतिपादणें. 'मना सर्वथा मिथ्य मांडूं नकोरे ।' –राम १९. ६ व्यापणें. 'जी भूतीं भूतळ मांडिलें ।' –ज्ञा ११.२८६. ७ पाळणें. 'देह सांडावा ना मांडावा ।' –एभा २०.१४९ ८ प्रवर्तणें; चालविणें; दाखविणें; प्रदर्शित करणें इ०. 'कज्जा मांडला, सोंगेगिरी, मांडली, फजिती मांडली.' ९ कडाक्यानें व यथेच्छ चालू करणें. 'त्यानें गालीप्रदान मांडलें–लत्ताप्रहार मांडला-ढंग

मांडले-चेष्टा मांडल्या.' -अक्रि. १ इच्छेप्रमाणें. वागण्यास संधि मिळणें; फावणें. 'अंधारी रात्र आली म्हणजे चोराचें मांडतें.' २ बनणें; तयार होणें; निघणें. 'बाजरीच्या कणसांत अझून दाणा मांडला नाहीं. ३ आरंभ होणें. 'जैसा प्रळयकाळ मांडला।'-ज्ञा १.१५८. [सं. मंड्=शोभविणें] **मांडपूस**-स्त्री मांडणें, नोंद करणें व पुसणें; लिहिणें व तपासणें. 'प्रत्येक वसुलाची लेखी पावती दप्तरांत मांडपूस होत आहे.'-के २०.५.३६. **मांडली**-स्त्री. मंडण, रचना. 'म्हणौनि निवृत्तीचि मांडली। सुनि प्रवृत्ति-तळीं।' -ज्ञा १८.७०४.

मांड—स्त्री. १ मांडीस होणारा रोग. यानें सर्व मांडी सुजून मांडीचें हाड कुजतें. २ योग्य बैठक (घोडयावरची, लिहितांना घातलेली). (क्रि० जमणें; बसणें; साधणें). ३ स्वारांच्या टोळीचा हल्ला. (क्रि० करणें). ४ घोडेस्वारांची टोळी. 'दाटती मांड मांडिला.'-ऐपो २३२. [मांडी] ०**मांडणें-जमविणें**-घोडयावर चांगलें बसतां येणें. 'जमवून मांड घोडयाला।'-संग्राम १२४. ०**गादी**-स्त्री. घोडयावर बसणाऱ्याच्या मांडया गच्च व सोईस्कर बसण्याकरितां खोगराच्या पुढील भागीं केलेली गादी. [मांडी+गादी] ०**चोळणा-चेपणें-चेपणी**-पुनस्त्री. मांडीचोळणा इ० पहा; लांडी विजार. ०**पत्र**-न. (माडीवर घेऊन दत्तविधान करितात यावरून) दत्तकपत्र; दत्तक घेण्याविषयींचा लेख, करार. [मांडी+पत्र] ०**पुत्र**-पु दत्तक घेतलेला मुलगा. [मांडी+पुत्र] ०**मोड**-स्त्री. मांडीमोड पहा. ०**वर्त**-पु. घोडयाच्या मांडीवरील भोंवरा. -अश्व १.१०१.

मांड—न. भाज्या, मीठ इ० ठेवण्याचें दांडयाचें लाकडी पडगें.

मांड—स्त्री एक शाक भाजी; माठ.

मांडकी—स्त्री. (कु) बेडकी. [सं. मंडूक]

मांडगा—पु. (कों) कळकाची एक जात; लाठीच्या उपयोगी बांबू; कळक; माणगा पहा.

मांडगें—न. (निजाम) डाळ, तांदूळ एकत्र शिजवून केलेली खिचडी २ (माण) हुलग्याच्या पिठाचें पातळसर पिठलें, कढण. हें ज्वर आलेल्या माणसास देतात. यानें घाम येतो.

मांडण—स्त्री. (कासारी धंदा) एखाद्या पत्र्यास भोंक पाडतेवेळीं तो पत्रा ज्यावर ठेवतात तें साधन. [मांडणें]

मांडलि(ळी)क—पु मंडलावर राज्य करणारा राजा; सार्वभौमाच्या ताब्यांतला राजा; सस्थानिक. याच्या उलट सार्वभौम. [सं. मंडल]

मांडव, मांडो—पु. १ (लग्न, मुंज इ० शुभकार्याकरितां घातलेला) मंडप; आच्छादिलेली जागा; शमीआना. २ द्राक्षी इ० वेल चढून फैलावण्याकरितां केलेला कमानदार रस्ता. ३ देवास अर्पण केलेला इमला. ४ (खा.) झाल; ऐरणीदान करण्याचें वंशपात्र. [सं. मंडप] **म्ह**० चुटक्यांचे मांडव=पोकळ प्रतिष्ठेचें बोलणें. 'मियासाहेबानीं चुटक्याचे मांडव यथास्थित रचून...' -नि. ०**खंडणी-खण्णी**-स्त्री. शूद्र लोकांत होणाऱ्या लग्न व इतर विशिष्ट धार्मिक प्रसंगीं जोशी, उपाध्याय यांचा दक्षिणेचा हक्क. ०**डाहाळे**-पुअव. मांडवावर पसरण्याचे, लावण्याचे वृक्षाचे डहाळे. -ऐरापु ६३. ०**देवता-प्रतिष्ठा-शोभा**-(प्र.) मंडपदेवता इ०पहा. ०**परतणी-णें**-स्त्रीन. लग्नसमाप्तीनंतर वधूपक्षानें वरपक्षास दिलेली मेजवानी, जेवणावळ. [मांडव+परतणी] ०**मेड-ढ**-स्त्री. मांडवाची पहिल्यानें पुरलेली, मुख्य मेढ; सामान्यतः मेढ. ०**मेड(ढ) रोवणें**-(ल.) मनापासून काम करावयास लागणें, आरंभिणें. **मांडवस, मांडव आवस**-स्त्री. १ फाल्गुन वद्य अमावास्या. या दिवशीं शेतकरी लोक सालदार ठेवतात. **मांडवी**-स्त्री १ देवावर टांगावयाची लांकडी जाळीदार चौकट; मंडपी; भाळी. २ (राजा.) देवळांतील मूर्ति जेथें स्थापन केलेली असते तो गाभारा. ३ लहान मांडव. 'हें कामाची मांडवी।' -ज्ञा १३.९९१. ४ बंदरांतील आयात निर्गत मालाकरितां केलेली वखार, कोठी, जकातघर. बाजार उभारण्यासाठीं जागा. -वसईची मोहीम. ५ (ना.) विड्याच्या पानांची एक जात. [मांडव]

माडवप—सक्रि. (गो.) तुडविणें.

माड वावर—न. रेणें वावर पहा.

मांडस ढोनस—न. (कु.) एक पक्वान्नविशेष.

मांडळ—स्त्री. ठोकणी, मुसळ, मोगर इ० कांड्या टोकाला घातलेली कडी, वसु, मायणी. [सं. मंडल] **मांडळी**-स्त्री.(खा.) गाडीच्या चाकाची धांव.

माडा—पु. (गो.) एक लहान माशाची जात.

माडा—पु मंदिर; प्रासाद. 'अंबिकाचिआं माडा जवळीं।' -शिशु ४४५. [माठ-मठ]

माडा—स्त्री. माता. 'माडांचीं सप्रेमळें चित्तें।' -दाव ३१९. [सं. माता; गु. माडी=आई]

माडा—स्त्री. लहान झाड; रोपडा; रोपा (उपटून दुसरीकडे लावतां येण्यासारखा). [मोड?] -वि. रब्बीच्या पिकाकरितां दमदार होण्यासाठीं तयार केलेली व खरीपाच्या पेरणीच्या वेळीं न पेरतां पड टाकलेली (जमीन); अशा जमीनींत पिकलेलें धान्य, दाणा, पीक. खाटा पहा.

मांडा—पु. गव्हाच्या पिठाचें केलेलें अतिशय पातळ पापुद्रयाचें एक पक्वान्न. [सं. मंडक; का. मंडिगे] **म्ह**० सुप्रण झाली म्हणून कांहीं हाताचे मांडे करीत नाहीं. (वाप्र.) **तोंडाचे मांडे**-पुअव. बोलमांडे; थापेबाजी. **मांडे करणारीचा शेंबूड काढला पाहिजे**-ज्याच्या कहून आपणांस काम करून

घ्यावयाचें आहे त्याची मनधरणी केली पाहिजे; त्यास खूष ठेवलें पाहिजे याअर्थी.

मांडाघळ—स्त्री. मांडणी; मांडणूक पहा.

माडी—स्त्री. (खा. अशिष्ट) आई. माडा पहा. [सं. माता-माया-माडा; सिं. अमडी; गु. माडी]

माडी, माडी पुणे(ने)घ—स्त्री. (व.) कोजागिरी; अश्विन शुद्ध पौर्णिमा.

मार्डा—स्त्री. माडाच्या पोईपासून स्रवलेला रस; मादक रस. (ताडापासून ताडी याप्रमाणें नारळापासून माडी काढतात).

माडी—स्त्री. वरचा मजला. 'माडया गोपुरें कवलारें।'

माडी—स्त्री. अळवाचें लांब मूळ; आखुड व वाटोळया मुळास मुडळी म्हणतात. मुडळी पहा. ०**अ(आ)ळू**—न. गोंवा-फोंडा प्रांतांतील वरील अळवाची जात.

मांडी—स्त्री. १ गुडघ्यापासून कमरेपर्यंतचा पायाचा भाग; जांघ. २ बसण्याचा एक प्रकार; बैठक (घोडयावरची, लिहिणाराची इ०). ३ लगामाच्या बाहेरील बाजूच्या दोन कांबी, कडया. [मंडण] (वाप्र.)(**आपली)मांडी उघडतां आपणासच लाज वाटते**-स्वतःचीं दुष्कृत्यें उघड करताना स्वतःस लाज वाटते; स्वतःचीं व्यंगें उघडकीस आणण्याचें कर्म कठीण आहे. ०**चें उसें करणें-घर मान ठेवणें**-दुसऱ्याच्या मांडीवर आपलें डोकें टेकणें; त्याच्यावर बिनदिक्कत विश्वास ठेवणें; आपली मान दुसऱ्याच्या हातांत देणें. ०**ठोकणें**-बैठक मारणें. ०**ठो(टे)कून उभें राहणें**-लढण्यास इ० सज्ज होऊन उभें राहणें. ०**ठो(टे)कून बसणें**-(गायन, लेखन इ०कांविषयीं) आपली उत्कंठा, तयारी दाखविणें. ०**देणें**-मरणोन्मुख (वडील) मनुष्याच्या मानेखालीं मांडी ठेवणें. 'वृद्ध व्याकूळ होतां मांडी द्यायासि या समीप रहा।' -मोउद्योग १२.७०. ०**पालटणें**-संततीविषयीं नवऱ्याकडून निराश झालेल्या स्त्रीनें संततिसाठीं परपुरुषगमन करणें. ०**बांधणें**-निश्चय करणें. 'अधिकें जंवजंव औषधी। सेवायाचि मांडी बांधी।' -ज्ञा १८.१५५. ०**मोडणें**-१ लेखनव्यवसायास योग्य असें दृढ आसन घालणें. २ लिहिण्यासाठीं घातलेली मांडी बदलणें; विचलित करणें. 'पंचवीस बंद ते माडी न मोडतां लिहीत असत.' -कोरकि ६४. ०**वर घेणें देणें**-एखाद्याशीं बरोबरीनें वागणें. ०**वर घेणें-बसविणें**-दत्तक घेणें. ०**वर देणें**-दत्तक देणें. ०**वर मांडी टाकून-घालून बसणें**-निरुद्योगी, स्वस्थ बसणें. **मांडीस मांडी टेकून बसणें**-१ एखाद्याशीं स्पर्धा करणें; टक्कर देणें. २ बरोबरी करणें. **मांडीखालचा**-वि. नेहमींचा बसायाचा; पूर्ण संवयीचा (घोडा). 'स्वाराच्या मांडीखालचा घोडा असावा.' सामाशब्द- ०**चेपणें, चेपणा**-नस्त्री. लग्नसमारंभांत सुनमुखाचे वेळीं वरमातेला वधूच्या आईनें द्यावयाचें लुगडें किंवा इतर वस्त्र. नवऱ्या मुलीस आपल्या माडीवर बसवितांना वरमातेनें हें लुगडें आपल्या मांडीखालीं ठेवण्याची चाल आहे त्यावरून. [मांडी=चेपणें] ०**चोळणा**-पु निवळ मांडया झांकणारा चोळणा, विजार; मांडचोळणा पहा. ०**मोड**-स्त्री. लेखनाचा दृढ व्यासंग; मेहनत, कसालत; शीण; परिश्रम. [मांडी+मोडणें]

माडु—पु. (ना. व.) स्तन; थान.

मांडुक—पु. बेडुक. [सं. मण्डूक]

मांडुकली—स्त्री. (कों.) लहानसा मांडव; हलका व जुजबी मांडव. [मांडव]

मांडुक्य—न. अथर्व वेदांतील एका शाखेचें उपनिषद्. [सं.]

मांडुल-लो—न. (कु.) एल लाकडी पात्र.

माडू-डु—पु. हरिणाच्या दोन जोडलेल्या शिंगांना पोलादी पातीं बसविलेलें हत्यार. **म्ह**० सोयऱ्यांत साडू, हत्यारात माडू, भोजनांत लाडू.

मा(मां)डू(डू)ळ—न. १ सापाची एक जात. २ दोन डोकीं किंवा दोन तोंडें असलेला एक प्राणी; दुतोंडें.

मांडें—न. मसाला घालून केलेलें हुलग्याच्या पिठाचें कालवण. माडगें.

मार्डे—न. खरीपाच्या वेळीं मोकळया ठेवलेल्या जमीनींत रबीच्या वेळीं काढलेलें पीक. माडा पहा.

मांडें—न. मांडणी; विस्तार, उत्कर्ष होणें. 'वंशावरी वंशांचें मांडें।' -ज्ञा १५.१२८.

मांडेबांध—पु प्रभाव; तेज. [प्रा.]

मांडो—पु. (गो.) किरस्ताव लोकातील एक घरगुती समारंभ.

माडोकी-ळी—स्त्री. अळूची मुडळी; मुळी.

मांडावा-बा—पु. मांडणी; विस्तार. [मांडणें]

मांडोस—स्त्री. (व.) चैत्र शुद्ध प्रतिपदा (प्र) तत्पूर्वीचा दिवस म्हणजे फाल्गुन वद्य अमावास्या. मांडअवस पहा

माडौचें—सक्रि. (गो.) तुडविणें.

माडया—पु अळवाची एक जात; अळवाची मुडळी.

माढ(ढा)ण—न. (कों.) मीठ, मसाला इ० ठेवण्याचें लांकडी पाळें; हें ताड, माड इ०च्या खोडाचें कोरून केलेलें असतें.

माढा—वि माडा पहा.

माण—स्त्री. १ (गुरांच्या) मानेस होणारा दाह; सूज; रोग. २ चिकण माती. ३ निकस, हलकी, भरभरीत माती ४ पाणी ठेवण्याचें रुंद तोंडाचें मडकें. ५ जात्याची वर्तुळाकार मढण. माईण, माइणी पहा. ६ उंसाच्या चरकाच्या तळाशीं रस सांठविण्याकरितां ठेवलेलें भांडें. 'जैसा गुळउसाचा घाणा। रसु जाये चौहेरी माणा।'

–एभा १५.१७. ७ मोठ्या जातीचा बांबू; याला ताज असें म्हणतात. ८ थर (खडकाचा, मातीचा). ९ (गुज.) जोंधळ्याचे कोवळे मोड खाल्ल्यामुळें गुरांना होणारा रोग. [मान] **माणगें**–न. १ मानेचा दाह. २ पडगें; पाळें. माढण पहा. ३ गुरांस होणारा एक रोग. **माण जमीन**–स्त्री. चिकण मातीची जमीन.

माणकी—स्त्री. (गो.) माशाची एक लहान जात.

माणकी, माणकुली—स्त्री. लहान माणीक. 'हिरकणी माणकुली।' –स्वादि ९.५.६७. [माणिक]

माणकुला—वि. (राजा.) लहान व सुंदर; लघ्वाकृति; चिमुकला. [माणिक]

माणगा, माणगारा, माणा—पु. (राजा.) लांब जातीचा चिवा; बांबू.

माणवक—न. एक समवृत्त. याच्या चरणांत अक्षरें आठ व भ, त, ल, ग हे गण असतात. [सं]

माणा—पु. १ माणगा पहा. २ एक वृक्ष.

माणिव—स्त्री. मृदुता; मऊपणा. 'ताठा सरला माणिव आली, सहज झाली लीनता।' –दत्तपदें ६८. [सं. मृदु]

माणी—स्त्री. मायणी; वसु; वर्तुलाकार मढण; काठीला खालीं बसविलेली शेंबी, कडें.

माणी(णि)क(क्य)—न. एक तांबडें रत्न; लाल नांवाचें रत्न; हें कुरुंदाचें असून हिऱ्याच्या खालोखाल कठिण असतें. यानें विद्युत जागृत होते. याच्या खाणी ब्रह्मदेशात आढळतात. कांहींचा रंग गुलाबी व काळसर अगर सफेत असतो. याच्या पोटजातीः–श्याम, तारा, लाल, माणकी, चुनी लालडी, लालडी (हीं लहान लालाचीं नावें), करिपोक, बंकाऊ, जर्दा, रोण (हीं कमी दर्जाचीं माणकें), सौगंधिक, नीलगंधि, कटकारिक, बंधुजीवी, शिखंडिक, गौरिकाख्य, इंद्रगोपी, सीमंतक, कुसुम, गोक्षुर इ० [सं. माणिक्य] **म्हo** कोळशांतलें माणिक. **माशानें माणिक गिळणें**–झालेला तोटा पुनः पूर्ण भरून येणें अशक्य असणें; दुसऱ्याच्या हातीं गेलेली वस्तु परत मिळणें अशक्य होणें याअर्थी उपयोग. सामाशब्द– **०चौक**–पु. जेथें लग्नाजम्याचे लोक रागेनें उभे राहतात, खेळ खेळतात असें मोठ्या लोकांच्या घरापुढील आवार घातलेलें मैदान. **०चौकडी**–स्त्री. (राजा.) उत्सवप्रसंगीं बायकांनीं भितीवर काढलेल्या रेखांकित आकृतींपैकीं एक. [माणीक+चौकडी] **०पेजण**–न. (व.) गव्हाच्या रव्याचा, उकडीचा एक पदार्थ; फळ. **०वात**–स्त्री. १ पुढें माणकासारखी गोळी व मागें बोटभर लांब अशी बारीक सुतासारखी केलेली कापसाची वात. २ हातानें पांच धान्यांची मिळून वळलेली, दिव्यांत घालावयाची वात. **०विद्या**–वि. (व.) फाजील नाजूक (माणूस). **माणिकुली**–स्त्री. लहान माणिक.

माणूस—पुन्नीन. १ मानव; मनुष्य; मानवी प्राणी. २ (कु.) रखेली; अंगवस्त्र. ३ मानव; मनुष्यजाति. ४ –पुस्त्री. रोजंदारीनें कामावर लावलेला मजूर; गडी. सासान्यतः श्रेष्ठ दर्जाच्या मनुष्याची कोमलता, नाजुकपणा यापासून तों रानटीपणा, रांकटपणा, दांडगेपणा इ० अवस्था दाखविण्यासाठीं माणूस, शब्दास जोडून काणूस, ठेकस व टोमस हे तीन शब्द योजितात. उदा० माणूस काणूस, माणूस ठेकस, माणूस ठोमस इ०. (समासांत) रानमाणूस, जळमाणूस, बाईलमाणूस इ० [सं. मनुष्य; आर्मेंजि. मनुस; पोर्तु.जि. मनु. मनुश] **म्हo** १ (व.) माणूस फिरलें तर फिरलें पण घराचे वासेहि फिरले=घरांतल्या मुख्य माणसाची नाराजी झाली ती झालीच. पण त्यामुळें घरांतील लहानमोठीं सर्वच माणसें विरुद्ध झालीं. २ (व.) माणसांतला, रांडया बायकांतला देशपांडया=पुरुष मंडळींत कांहींच चालत नाहीं पण बायकांत मात्र बढाई मारणारा. (वाप्र.) **माणसाकाणशीं**–मानवी प्राण्याकडून. **भरल्या माणसांतून उठविणें–काढणें–घालविणें**–समाजांतून बाहेर टाकणें. **माणसानें काय बोलावयाचें**–(बायकी) १ आतां कांहीं बोलावयाचें उरलेंच नाहीं या अर्थी उद्गार. २ आतां यापुढें शब्द करणें–काढणें व्यर्थ. **माणुसाचें काणूस होणें**–आजार, दुःख, काळजी यांमुळें मनुष्य किडकिडीत, कृश होणें; दरिद्री व दुःखी होणें. **माणूस काणूस–ओळखावें–जाणावें–पाहावें–ध्यानांत धरावें**–माणसा-माणसातील भेद लक्षांत आणावा; कोण चांगला, कोण वाईट ओळखावा. **माणस(सा)ळणें, माणसाघणें**–अक्रि. १ माणसाच्या संवयीचा होणें; क्रूरपणा टाकून गरीब होणें; (रानटी पशु). २ मनुष्य खाण्यास वखवखणें (मनुष्याच्या रक्ताची एकदां चव घेतलेला वाघ, लांडगा इ०) **माणसाचा अवतार–कांदा–लेंक**–पु. ठोंब्या, दगड मनुष्य. सामाशब्द– **०कंटाळ्या–गंधारा–गंध्या–घाण्या–घाण**–वि एकलकोंडा; मनुष्याच्या संगतीचा कंटाळा करणारा. [माणूस+कंटाळणें, गंध, घाण] **०पण–पणा**–नपु. माणुसकी पहा. **०बळ**–न. १ माणसांच्या संख्येचें बळ; संघशक्ति. 'हें काम एकट्याचें नव्हे. माणूसबळ पाहिजे' २ मनुष्यरूप शक्ति (सैन्य, नोकर इ०) विद्याबळ, द्रव्यबळ, पुण्यबळ याच्याहून भिन्न शक्ति. **०मार्‍या**–वि. १ माणसें मारणारा; मानवहत्यारा; खुनी. २ (ल.) क्रूर; निर्दय. **माणसामाणसीं**–क्रिवि. १ आपल्या नोकरा–चाकरा मार्फत. २ मनुष्यांकडून; मानवी प्राण्यांकडून. **माणुसकी**–स्त्री. १ सुधारलेल्या मनुष्याचे गुण व भावना, चाली व रीती; सभ्यता; शिष्टता; सुजनता; थोरपणा; मनुष्यांतील सात्विक गुण. 'या सात्विक गुणांच्या समुच्चयास आपण तूर्त माणुसकी असें नांव देऊं.' –गीर ९२. ३ मानवी धर्माची जाणीव; मानुषी दयाधर्म; मनुष्यपण. ४ व्यवस्थित वर्तन; नियमितपणा व मनमिळाऊपणा.

माणें—न. (गो.) गुंगी. **०पडप-लागप**–अक्रि. (गो.) गुंगी येणें.

मा(व)णें—अक्रि. राहणें; समावणें (भांडें, जागा इ० कांत–कांहीं वस्तु). 'घटाकार आकार मातींत माती। असे मातसे सर्वहि ज्यांत माती।' [सं. मा=मापणें; हिं. माना]

माण्या—पु. माणगा; लहान जातीचा बांबू.

मात—पु. (कों.) चारा. 'वरच्या रानचा शिंगनी मात।' –मसाप ४.२६४.

मात, मातु—स्त्री. १ (बुद्धिबलक्रीडा) प्रतिपक्षीयाच्या राजास मोहऱ्याच्या माऱ्यांत बिनतोड धरणें; कोंडमारा करणें. 'दावूं हात करूं मात। मारूं लाथ काळासी।' –तुगा. २ (काव्य) मोठें काम; महत्कृत्य; मर्दुमकीचें काम; चमत्कार; अद्‌भुत कृत्य. 'ऐक बाई सांगतें मात त्याची।' ३ (काव्य) काम; कार्य; बाब; खबर; गोष्ट. (क्रि० उठणें; उडणें; उठवणें, उडवणें). 'कटकीची मात सांग जासुदा घरांत।' ४ थाट; वैभव; ऐश्वर्य; चकचकाट; झकझकाट; शानदार व दिव्य देखावा; समारंभ. 'गाण्याची–जेवणाची–प्रयोजनाची–लग्नाची–मात.' ५ प्राचुर्य; वैपुल्य; स्वस्ताई, सुलभता; 'धान्याची – साखरेची – जिनसांची – मात. ६ बोलणें; भाषण. 'त्यांची नायकावी मात।' –परमा २.१६. ७ शर्थ. 'जरीपटक्यानें केली मात।' –ऐपो १८५. ८ (तंजा.) प्रतिकार; विषावर उपाय. [सं. मात्रा; अर. मात्; ते. माट=शब्द] (वाप्र.) **०करणें**–१ (बुद्धिबळक्रीडा.) प्रतिपक्षाच्या राजाला अडविणें. २ बुद्धीचें, कुशलतेचें कृत्य करून प्रतिपक्षाला जिंकणें. ३ अघटित, अप्रतिम, विचित्र, लोकोत्तर कृत्य करणें. **०खाणें**–पराजित होणें.

मातकदम—क्रिवि. फार पूर्वीपासून [अर. मातकदम=भूतकाल]

मातकर—वि. तापद; वाईट. 'विरह तुझा अत्यंत मातकर कंठिं प्राण उरले।' –केप २७. [मातणें]

मातकयान-नीं-नें—क्रिवि. माकत्यान पहा.

मातंग—पु. १ हत्ती. 'मस्त चालती पुढें मातंग।' –ऐपो २१३. २ मांग. 'मोह मातंग आमुचें कुळीं।' –एरुस्व १७.३७.

मातगा—वि. १ सहज शेफारणारा; स्वतःचा उत्कर्ष होतांच पूर्वीचीं परिचित माणसें, वस्तु इ०कांचा तिरस्कार व अनादर करणारा. २ अहमन्य; गर्विष्ठ. ३ खरमस्त; तापट (घोडा) [सं. मद्]

मातण-न—स्त्री. सामान्यतः माचण पहा. **०करणें**–(हेट. नाविक) शीड फिरविणें. **०घेणें**–माचण घेणें पहा.

मातणें—अक्रि. १ शेफारणें; गर्वानें फुगणें. 'मर्दी शत्रुचमूला शौर्यमदें बहुत मातलीला जो।' –मोभीष्म ७.५. २ चांगलें चांगलें खायला घातल्यामुळें पुंड व अडिवाळ होणें; उन्मत्त होणें. ३ जोरानें फैलावणें (वनस्पति). ४ भरून वाहूं लागणें; ओथंबणें; भरून येणें. 'ब्रह्मानंदें क्रीडती साचार। प्रेमबळें मातोनिया।' [सं. मद्] **म्ह० १ बोकड माते आणि आपल्या तोंडीं मुतें. २ (गो.) माजलेल्या हुंदराक हत्ती म्हणून जातां=उंदीर माजला तरी तो हत्ती होत नाहीं. मातलेपण**–न. मस्तपणा. 'कैसें प्रतिवदनीं मातलेपण। आवेशाचें।' –ज्ञा ११.३४१. **माताइ**–स्त्री. (महानु.) मस्ती; मताचा आग्रह; उन्मत्तपणा; वेड. 'माताइ ते वादी दिग्गजु सकळा। भूमंडळीचें।' –शिशु २५ [मत्ताई=माताई] **माताबळा-ळें**–वि. (महानु.) १ वेडा. 'काव्यें जाहलीं मातबळीं।' –शिशु ८५. २ मस्त; गुंग. 'प्रबंधें होती माताबळें। कविजनांचें।' –शिशु १५. [मत्त+आवलि]

मातब(ब्ब)र—वि. १ आदराई; अब्रूदार; सन्मान्य; योग्य. २ थोर; श्रीमान; प्रतिष्ठित. 'पुढील स्वारीस जो कोणी सरदार मातबर येईल तो बंदोबस्त करील.' –इमं २६१. ३ मोठा; मोठाघोटा; स्थूल. ४ महत्त्वाचा; मौल्यवान. 'तहनाम्यासारखे मातबर कागदपत्र अर्थ लावण्याकरितां पुढें यावयाचे होते.' –सासं २.१९३. [अर. मुअतबर्] **मातब(ब्ब)री**–स्त्री. १ मान्यता; थोरवी; श्रेष्ठता. २ पत; प्रतिष्ठा. 'जें कर्तव्य तें सलाबतीनें मातबरीनें आपली इभ्रत शहा याजवरी पडोन नक्ष होय तें करावें.' –ख १.२४०. ३ महत्त्व; किंमत. 'परार्थबुद्धीला स्वार्थाची मातब्बरी काय होय?' –टि ४.३०२.

मातम-मी—नस्त्री. १ शोक; दुःख. 'पातशहानीं दोन दिवस बहुत मातम केलें.' –दिमरा २.८४. २ दुखवटा. 'सुल्तानखान जमातदार यास मातमीचें खल्अत जाले.' –रा १.१८६. [फा. मातम्; अर. मअतम्] **०पु(शि, सी)रशी**–स्त्री. दुखवटा; दुखवटयाचीं वस्त्रें; दुखवटयासंबंधीं विचारपूस. 'हमसिरा बेगमेस एंक दुशाला पल्लेदार मातमपुर्सीचा.' –दिमरा [फा. मातम्पुर्सी]

मातल—न. १ बेत-बदली. २ उशीर. 'अमासाहेबांचें यावयास मातल जालें.' –इमं ६८. [अर मुअत्तल्]

माता—स्त्री. १ आई. समासांत मातृ असें रूप होतें उदा० मातृकुल, मातृगोत्र. २ देवाचा शक्ति, त्याची पत्नी. ३ देवी (रोग). [सं. मातृ; झें. मातर्; ग्री. मेर; लॅ. मेतर; पोर्तु.जि. बाता, मींदाई (माझी आई).] **०काढ्या**–पु. (व.) देवी-डॉक्टर. **०पितरें**–नभव. आईबाप समुच्चयानें. [सं. मातापितृ] **०मह**–पु. आईचा बाप [सं.] **०मही**–स्त्री. आईची आई. [सं.]

मातायते—वि. (महानु.) माजलेलें; मातलेलें. 'दैत्य रगडा मातायते पाउडा।' –गस्तो ८२.

माती—स्त्री. १ पृथ्वी; दगडावाचून पृथ्वीचा अंश; मृत्तिका, धूळ. २ (ल.) स्थूल शरीर. 'कीर्तनासी जाता तुझी जड झाली माती।' –तुगा २९८७. ३ (ल.) नाश; नासाडी; दुर्दशा. 'पोरानें संसाराची माती करून टाकली.' ४ अगदीं काहीं नाहीं

याअर्थीं. 'तुला काय कळतें माती ?' ५ निरुपयोगी; बिनकिमतीचा पदार्थ. ६ (ल.) मृत शरीर. ७ निसर्गानें मेलेल्या जनावराचें मांस; मढें. ८ शाड्ड (मातीचा गणपति, चित्रें इ० कां करितां). [सं. मृत्तिका, मृद्=कुस्करणें; प्रा. मत्ति(ट्टि)आ; हिं. मट्टी-माटी] **म्ह**० १ अति तेथें माती=कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक झाल्यानें नुकसान होतें. २ जित्या रोटी आणि मेल्या माती. ३ दरीची माती दरींत आटते. (वाप्र.) **०आडकरणें-घालणें-ठेवणें-टाकणें**-१ (शब्दशः व ल.) मातीखालीं ठेवणें; पुरणें; आच्छादणें; झाकणें (प्रेत, धन, ठेवा). २ विसरून जाणें; पुनःपुनः त्याच गोष्टीचा उल्लेख न करणें. **०(मातेरा)करणें**-(एखाद्या वस्तूची) नासाडी करणें; तिचा सुखावहपणा हिरावून घेणें. **०(मात)करणें**-(व.) प्रेत दहन करणें, मूठमाती देणें; पुरणें. **(अज्ञात)०कालवणें**-एखाद्याच्या उपजीविकेचें साधन नाहींसें करणें; पोटावर पाय आणणें. **०खाणें**-पराभव पावणें. **०च्या मोलानें विकणें-देणें**-हलक्या दरानें, कमी किंमतीनें विकणें. 'पैशाची फार जरूरी होती, म्हणून मला आपलें सामान मातीच्या मोलानें विकावें लागलें.' **०जड होणें**-मरणोन्मुख मनुष्याचें शरीर जड होणें. **०टाकणें-घालणें-लोटणें**-बुझविणें; (कलह, अपराध इ० कांवर) पांघरूण घालणें; विसरण्याचा प्रयत्न करणें. 'ह्या वादावर आतां माती लोटली पाहिजे.' **मातीला देणें-जाणें-येणें**-(कर.) प्रेत पुरणें; मढें पुरणें; प्रेतयात्रेला जाणें. 'मातीला गेलों होतों-काल माती दिली-मातीला चला.' **(तोंडांत) ०पडणें**-प्राप्ती बुडणें. **(मातींत) ०मिसळणें**-प्रेत पुरणें; और्ध्वदेहिक, उत्तरक्रिया करणें. **०होणें**-१ नाश होणें. 'जें अनया कारण, त्याची पळांत हो माती.' -मोआदि ३३ ६०. २ खराबी होणें. 'यालागी श्रवणाची होय माती। परमार्थप्राप्ति त्यां कैची।' -भारा बाल ११.१३०. ३ बेकार होणें. सामाशब्द-(माती शब्द समासांत पूर्वपदीं आला असतां त्याचें मात असें रूप होतें) **०कट**-वि. माती असलेला (पदार्थ) **०कण**-न. माती मिसळल्यामुळें नासलेलें धान्य. [माती+कण] **मात्कर**-पु. (व.) मातीच्या भिंती घालणारा; मातकाम करणारा. **मातकरी**-पु. (राजा.) शेतजमीन भाजण्यासाठीं पसरलेल्या राबावर माती घालण्याकरितां लावलेला मजूर; पैरगडी. [माती+करी] **०कापड**-न. १ (अग्निपुटें देण्याकरितां कुपीस्थ रसायनें इ०ची) ज्यांत भट्टी लावावयाची त्या भांड्यास मातीचा लेप दिलेल्या कापडाच्या पट्टीनें लेपटणें. २ असला लपेटा; आवरण. [माती+कापड] **०काम**-न. मातीचें काम; मडकीं घडणें, विटा घालणें, चित्रें करणें चिखलानें भिंत रचणें इ०काम. **०ख(खा)ण**-स्त्री. १ मातीची खाण. २ भाजावळीकरितां दाढीवर पसरण्यासाठीं दाढीच्या नजीकच्या जमीनींतील जी माती खणतात ती जागा. **०गाळणें**-न. चाळणीवजा चिकणमाती गाळण्याचें मडकें **मातट-ड-ळ,मातमळ**-वि. माती मिसळल्यामुळें खराब झालेला (गूळ, धान्य इ० पदार्थ); मातीमिश्रित. **०सामान**-न. मातीचीं चित्रें, भांडीं इ० जिनसा. **मातियेडें**-न. मातकाम करणारा. -शर. [प्रा.] **मातिरा**-पु. मातेरें; नाश. 'चरमतनू परमलाभ, न करिं मातिरा।' -भज ५७. **मातीचा मैराळ**-वि. जंगी व स्थूल; गलेलठ्ठ (मनुष्य). **मातीचें अत्तर**-न. उत्तम मातीपासून तयार केलेलें अत्तर. **मातीचे कुल्ले**-पुअव. खरें प्रेम नसतां प्रेमाचा आणलेला नुसता आविर्भाव; दृढ बंधन, एकोपा नसल्यामुळें संकटाच्या वेळीं उपयोगी न पडणारे नातेवाईक, संबंधीं; बळें लावलेलें नातें किंवा संबंध; उसनें प्रेम, अवसान. **म्ह**० मातीचे कुल्ले लावल्यानें लागत नाहींत. **मातीचें तेल**-न. खडकतेल; घासलेट. **मातीमीठ**-न. खारट मातीपासून तयार केलेलें मीठ. **माती वडार**-पु. वडारांतील एक पोट जात.

मातुल, मातू(तु)ळ—पु. आईचा भाऊ; मामा. 'उभय कुळीं साक्ष। तूंचि माझा मातुळपक्ष।' -तुगा ७९८. [सं.]

मातुलंगी-लिंग-लिंगी—स्त्री. महाळुंग. 'मधु काकडिआं मातुलंगी।' -दाव १३६. [सं.]

मातु(तो)श्री—स्त्री. आई; माता. [सं. मातृश्री, मातुःश्री]

मातृ—स्त्री. आई [सं.] सामाशब्द- **०कन्यापरंपरा**-स्त्री. माणसांचें नातें बापाकडून न गणतां आईकडून गणण्याची एक विशिष्ट पद्धति. [सं.] **०गमन**-न स्वमातेशीं अगम्य गमन. [सं.] **०गया**-स्त्री १ सिद्धपूर नांवाचें क्षेत्र. २ गयेस किंवा सिद्धपुरास केलेलें आईचें श्राद्ध. [सं.] **०गामी-गमनी**-वि. मातृगमन करणारा; मात्रागमनी. [सं.] **०गोत्र**-न. १ आईचें कुल, गोत्र. २ -वि. आईच्या कुलासंबंधीं. [सं.] **०घात**-पु. मातेची हत्या. [सं.] **०घातुक**-वि. मातृघात करणारा. **०द्रोह**-पु. आईशीं द्वेष. [सं.] **०द्रोही**-वि. मातेशीं द्वेष करणारा. [सं.] **०पद**-न आई, माता होणें. **०पक्ष**-पु. मातृकुल; मातृवंश. [सं.] **०पितृभक्त**-वि मातापितरांची शुश्रूषा करण्यांत तत्पर. [सं.] **०बंधु**-पु. आईकडचा भाऊ किंवा नातेवाईक [सं.] **०भूमि**-स्त्री. आपलेपणानें वागण्याचा आपला हक्क असलेली भूमि; जन्मभूमि; मायभूमि. [सं.] **०भोजन**-न मुंजीच्या दिवशीं बटूनें उपनयनांग वपनाच्यापूर्वी मातेसह भोजन करण्याचा समारंभ. यानंतर तो मातेसह एकत्र जेवत नाहीं. [सं.] **०मंडल**-न. दोन भुवया. [सं.] **०वध-हत्या**-पुस्त्री. मातृघात. [सं.] **०श्री**-स्त्री. आईस आदरार्थी म्हणतात. वडील व प्रौढ स्त्रीस योजावयाचा शब्द. बाई, ताई व इतर बाहत्या नांवाप्रमाणें मातृश्री व त्याचे अपभ्रंश मातुश्री आणि मातोश्री त्यांचा पुष्कळदां नपुंसकलिंगी अनेकवचनी प्रयोग करतात. उदा० मातोश्री आलीं आहेत. कांहीं प्रांतांत हे शब्द पुल्लिंगी

अनेकवचनीं योजतात. [सं.] **मातृ(त्रु)का**–स्त्री. १ वर्णमालेंतील एक वर्ण; अ पासुन ह पर्यंत अक्षरें. 'ओंकार मातृकांसकट। तोचि जाणावा कंबुकंठ।' –एरुस्व १.४२. २ आई अथवा दाई. ३ देवता. ह्या आठ देवता आहेत–ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, चामुंडा किंवा कौबेरी, चर्चिका. लग्न इ० मंगल कृत्यांत ह्यांचें पूजन करितात. याहून भिन्नहि मातृका सांगितल्या आहेत. व त्यांची संख्या एके ठिकाणीं सोळा व दुसरे ठिकाणीं सात अशी आहे. 'पार्थु अधिष्ठात्री तेथिची। मातृका गा।' ह्या ६.१२७. ४ मूर्च्छना; सुर; स्वर. ५ (नृत्य) दोन करणांचा समुदाय. [सं.] **०का(वर्ण)न्यास**–पु दक्षिणाचार पूजेसंबंधीं विधि; एक न्यासविधि. ह्यांत स्वरव्यंजनात्मक पन्नास वर्ण तोंडानें म्हणून शास्त्रविधीप्रमाणें कर्मकर्त्यानें किंवा उपाध्यायानें पूजावयाच्या मूर्तीच्या पन्नास अवयवांस हातानें स्पर्श करावयाचा असतो. **०का पूजन**-स्वमाता इ० त्याचप्रमाणें गौरी इ० सोळा आणि ब्राह्मी इ० सात मिळून तेवीस देवतांचें मंगल कार्योतील पूजन. गणपति, दुर्गा, वास्तोष्पति व क्षेत्रपाल यांचें पूजनहि मातृकापूजनाबरोबरच होतें. **मातृत्व**–न. मातेचा संबंध, स्थिति, स्वभाव, धर्म; आईपणा. [सं.] **मात्रागमन**–न. १ मातेशीं मैथुन. २ (ल) महापातकांपैकीं एक पातक. [सं. मातृ+गमन] **मात्रागमनी**–वि. १ मातृगमन केल्याचा दोष असलेला. २ (ल.) मादरचोद; लबाड (मनुष्य). [सं. मातृ+गमनी]

मातें—सना. (काव्य) मला; मजला. 'काय बोल गा माते।' –मोउद्यो ११.६८. [मी]

मातेर—न (कों.) पू. (जखमेंतील).

माते(त्ये)रा–रें, माते राकोतेरा—पुन. १ आंत माती, कचरा मिसळलेला पदार्थ (धान्य, साखर इ०). २ धान्य इ० कांतून वेंचून काढलेला कचरा. ३ (ल.) पूर्ण नाश. (क्रि० करणें). 'तेवीं पार्थ सैन्याचा केला मातेरा।' –जै ८८.३५ ४ खराबी; दुर्दशा; धूळधाण (वस्तु, काम, अन्न इ०कांची). (क्रि० करणें). ह्या अर्थाकरितां माती, धूळ, पीठ चुराडा, राख इ० शब्द पहा. ५ अप्रतिष्ठा. 'तुका म्हणे चोरा होय भूषण मातेरा।' –तुगा ६२४. –वि. माती, कचरा आंत मिसळलेला (दाणा, पीठ, साखर इ०). [माती]

मातोळी—स्त्री. (कु.) शेणवी ब्राह्मणांतील कांहीं घराण्यांत दर वर्षी शूद्र स्त्रीला नारळ, तेल,फुलें देऊन भोजन घालण्याचा एक कुळाचार. [माता]

मात्मसाद—पु. महात्मा; साधु. 'त्रिदंडी संन्यासी जटिल गोसावी बैरागी मात्मसाद असे पाखंडी आहेत.' –पेशवेकालीन महाराष्ट्र ४३२.

मात्र—न. १ दृश्य तात्त्विक द्रव्याचें प्राथमिक सुक्ष्म, अदृश्य चिन्ह. २ समुदाय; सगळी जात–वर्ग; साकल्य; **वस्तुजात**. 'मनुष्यमात्र पापी आहे.' –क्रिवि. १ केवळ; फक्त; नुसता; च; बरीक. उदा० काडी–क्षण–वितस्ति–मात्र. 'भात मात्र खा, भाजीपाला, तुला वर्ज्य.' २ यत्किंचित्; थोडेसें. 'या दवतींत मात्रसें पाणी घालून आण.' [सं.]

मात्र—स्त्री. अक्षरांतील मात्रा मात्रा अर्थ १ पहा.

मात्रा—स्त्री. १ एकार, ओकार दाखविण्यासाठीं अक्षराच्या डोक्यावर दिलेली तिर्कस रेघ. जसें:–क वर एक मात्रा दिल्यानें के, का वर दिल्यानें को होतो. कै व कौ हीं द्विमात्रक अक्षरें आहेत. २प्रणवाचे तीन अवयव, भाग प्रत्येकी; अकार, उकार, मकार इ० ३ ह्रस्व स्वर अथवा कोणताहि वर्ण उच्चारण्यास लागणारा काल; वर्ण. 'मात्रांचिया त्रिपुटिया।' –अमृ १.५८. ४ (छंदःशास्त्र) परिमाण; गणाक्षर; गायनांतील किंवा दुसरें कोणतेंहि स्वराचें कालमान. ५ इयत्ता; एक लहान परिमाण. 'मृदंगाचे आवाजापेक्षां विण्याचा सुर एक मात्रा अधिक आहे.' ६ रसायण (गोळीच्या, चूर्णाच्या रूपानें असलेलें). ७ (ल.) रोगघ्न औषधी पदार्थ; औषध, औषधांचें मिश्रण प्रमाण (खनिज पदार्थांचें किंवा वनस्पतीचें केलेलें). 'जेंगे विडल मात्रा घ्यावी। तेणें पथ्य संभाळावी।' ८ कालमर्यादा; चुटकी वाजविण्यास किंवा पापणीची उघडझांप होण्यास लागणारा काळ; सशक्त, निरोगी मनुष्याच्या नाडीच्या दोन ठोक्यांमधील काळ. ९ संपत्ति; जिनगी; द्रव्य; ऐवज; पैसा; माल. 'मात्रा आणावी मजपासीं। नाहीं तरि मुकाल प्राणासीं।' १० (महानु.) सामानसुमान; कपडालत्ता; वस्त्रपात्र. 'घ्या गा मात्रा प्रयानु कीजताये।' ११ भोजनसामग्री; फराळाचें साहित्य; भिक्षेची झोळी. 'तें धन तेणें मात्रेमध्यें घातलें असे।' –पंच १.२७. १२ (महानु.) आहार. 'मात्रेवर न राहे।' १३ (अध्यात्म) वासनांचा विषय, इंद्रियविषय, वृत्तिविषय. १४ हिंमत; धैर्य. 'त्यांच्यापुढें जास्त बोलण्याची कुणाची मात्रा नव्हती.' –इंप २४. [सं.] (वाप्र.) **०चालू न देणें**–विरुद्ध पक्षाचे बेत हाणून पाडणें. **०न चालणें**–इलाज न चालणें; सामर्थ्याची प्रौढी कुचकामाची ठरणें (वैद्यानें रोग्याला दिलेली मात्रा लागू पडली नाहीं म्हणजे मात्रा चालली नाहीं असें म्हणतात यावरून). **०लागू पडणें**–इलाज यशस्वी होणें **०वर असणें**–वर्चस्व असणें. सामाशब्द– **०त्रय**–न. अकार, उकार, मकार ह्या प्रणवाच्या तीन मात्रा. 'अकार उकार मकार। मात्रात्रय हें।' –विपू ४.७८. [सं.] **०पद्धति**–स्त्री. (गणित) दशांशमापन पद्धति; (इं.) मेट्रिक सिस्टीम.

मांत्रिक—वि. १ मंत्रज्ञ; जादूगार. २मंत्रापासुन उत्पन्न होणारा; मंत्रानें उत्पन्न केलेला; मंत्रासंबधीं. उदा० मांत्रिक–आंबा–भात–

झाड–रुपया–घोडा–वस्तू इ० [सं.] ०आत्मा–पु. मंत्रशक्तीनें दुसरें शरीर, प्रेत इ० कांत प्रवेश करावयास लाविलेला आत्मा, जीव. (क्रि० घालणें). ०खेळ–पु. १ मंत्राचा खेळ. २ मंत्रशक्तीनें आंबा, झाड, रुपया इ० वस्तू उत्पन्न करणें.

मात्रें—न. मातेरें पहा.

मात्सर्य—न. हेवा; दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणें. [सं.]

मात्सो—क्रिवि. थोडासा.

मार्थं—क्रिवि. (चि.) माझ्यासह.

माथण–णी—स्त्री. रुंद तोंडाचा मातीचा डेरा, घागर, रांजण (ताक घुसळण्याचा अथवा पाणी ठेवण्याचा). [सं. मंथ्=घुसळणें] **माथवीय–न.** डेऱ्यांतील पाणी. **माथुला, माथुली, माथुलें**–पुस्त्रीन. पाणी इ० भरावयाचें, डोक्यावर घेतां येण्याजोगें मडकें, डेरा. 'वेऊनियां मिठी । पडे महिया माथुलें ।' –तुगा ३५०१.

माथण करणें—क्रि. (कु.) एकाबाजूस असलेलें शीड गुंडाळून दुसऱ्या बाजूस ताणणें; माचण पहा

माथ(थु)ला(ळा)वा–पु. १ पळींचें टवळें, तोंड. २ घुसळावयाच्या रवीचा फुगीर भाग.

माथवट–वटी—नस्त्री. माथोट पहा.

माथवणें—न. चांभारांत लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं वधूकडील वऱ्हाडयांच्या डोक्याला खोबरें लावून त्याना घालण्यांत येणारें स्नान. [माथा]

माथा–थें—पुन. १ डोक्याचा अग्रभाग; टाळू २ कपाळ. 'अजायुद्ध होतें तेव्हां माथ्यासीं माथा आपटतो.' ३ डोकें, ४ घुसळावयाच्या रवीचा माथला; एखाद्या तसल्या वस्तूचें डोकें. ५ शिखर; टेंबा; शेंडा (पर्वत, झाड इ० चा). ६ लाक्षणिक अर्थी-करितां डोई पहा. **माथां**–क्रिवि (काव्य) डोक्यावर. 'धर्मप्रसाद माथां आंगीं भगवत्प्रसाद दृढ वर्म ।' –मोकर्ण ११.९. [सं. मस्तक; प्रा. माथअ; पं. मथ्था; सिं. मथो; हिं. बं. माथा; गु. माथुं] **म्ह**० १ उरीं केंस माथा टक्कल. २ पोटांत जळे माथ्यांत कळे. (वाप्र.) ०**तुकविणें**–आनंदानें मस्तक डोलविणें. 'तियांचें भाऊ वाणिता । कवींसी माथा तुकविणें ।' –शिशु ६००. **माथां मारणें**–एखाद्यावर सोंपविणें; विश्वासणें; हवालणें; लावणें; अंगावर टाकणें (काम, धंदा). **माथां वाहणें**–फुलें इ० डोक्यावर समर्पण करणें. 'वाटे इथुनीं माथां धीर गुरु म्हणोनि वाहिला काय ?।' –मोभीष्म ११.१२१. (**उजळता**) **माथा होणें**–आलेला अपवाद इ० दूर होणें. **माथीं बसणें**–एखाद्यावर लादलें जाणें. **माथ्यांत राख घालणें**–वैतागणें. **माथ्यार पदर गांड उकती**–(गो.) वरचा देखावा उत्तम राखणें पण आंत कांहींच अर्थ नसणें. **माथ्यावर चढविणें**–लडिवाळपणें वाटेल तसें वागूं देणें; डोक्यावर घेणें. **माथ्यावरचा पदर टाकणें–उतरणें–पडणें**–वेश्या बनणें (बहुतेक सभ्य स्त्री डोकीवरून पदर घेते यावरून). **माथ्या वैयलयान हुवार वचप**–(गो.) डोकीवरून पाणी जाणें; गंगेंत घोडे न्हाणें; एखाद्या कामाची मेहनतीची शिकस्त होणें याअर्थी. सामाशब्द– **माथफळी**–स्त्री. गोसावी, बैरागी लोक कुबडीवजा टेकण्यासाठीं घेतात त्या साधनाची वरील आडवी फळी. **माथाकूट**–स्त्रीन. १ (मूर्खास शिकविणें, हटवाद्याशीं वाद करणें इ०) कंटाळा आणणारा, त्रासदायक व बिनफायदेशीर धंदा, काम. २ एखाद्या गोष्टी बद्दल चीड व शीण आणणारा हट्ट धरून बसणें; एकसारखी बडबड; त्राग्याची मागणी (वाक्यांत काम, धंदा, उद्योग इ० शब्दाबरोबर योजतात). ०**फोड**–स्त्री माथेफोड. ०**रोग**–पु. गुरांचा एकरोग. –शे ६.४८. ०**शूळ**–पु. १ भयंकर डोकेदुखी. २ एक सरळ वाढणारी वनस्पति. **माथाटी**–स्त्री. माथोटी पहा. **माथें**–न. शिर; मस्तक. 'संकटांत तीच म्हणोनी उंच करी माथें ।' –विक ६. [सं. मस्तक] (वाप्र.) ०**करणें**–(कु.) (विधवांनीं) केशवपन करणें. ०**पिकवणें**–डोकें उठवणें; त्रास देणें. ०**फिरणें**–वेडा होणें; अतिशय रागावणें. 'माझें माथे फिरलें.' ०**बोडविणें**–हजामत करविणें.' सामाशब्द– **माथेकळी**–स्त्री. आंगरख्याची एक कळी, भाग. ०**फळी**–स्त्री. उंसाच्या चरकांतील नवरानवरीचे माथे जींत बसविलेले असतात ती आडवी फळी. ०**फिरू**–पु. संतापी; अविचारानें भलतेंच कृत्य करणारा; भ्रमिष्ट. ०**फोड**–स्त्री. माथाकूट पहा. –वि. कठिण व त्रासदायक; चीड व शीण आणणारें (काम). ०**सूळ**–पु. डोकेंदुखी. **माथो**–पु. (चि.) मस्तक; कपाळ; (सामा.) वरचा भाग. **माथोट, माथोटी**–नस्त्री. १ बैलाच्या शिंगाच्या मुळाशीं बांधलेली दोरी. २ अशी दोरी जेथें बांधतात तो बैलाच्या डोक्याचा भाग. ही दोरी बैलाला पकडण्याच्या उपयोगी पडते व हिला कासरा लावतात. ३ शिंगाभोंवतालचें गोंडे इ०ज्यास बांधलेले असतात तें बंधन. ४ डोंगराचा माथा. [माथा+अट] **माथ्या–थ्यो**–पु. १ रवी इ०चा माथा, बोंड. २ (चि.) रवी. **माथ्याचा**–वि. (गुज.) हेकेखोर; हट्टी.

माथान—क्रिवि. (कों. कृण.) माझ्याजवळ.

माद—पु मत्तपणा (गर्व, आनंद इ०कांचा). [सं. मद]

मादक–वि (शब्दशः व ल.) मत्त करणारा; कैफी; अमली (मद्य, औषध, संपत्ति, विद्या, शक्ति). ०**पेय**–न. मदिरा. ०**रस**–पु. कैफ आणणारा द्रव. **मादगा–गी**–वि. लवकर गर्वानें ताठणारा; सहज उद्धट व तोरेबाज होणारा; मातगा.

मांद—स्त्री. (कों.) १ मळणीच्या वेळीं खळ्यांत होणारी धान्याची रास. २ पाणी ठेवण्याचें रुंद तोंडाचें भांडें; मांदण पहा.

मांदगी—स्त्री. (बडोदें) आजार. [सं. मंद]

मांदगी—स्त्री. शीण; थकवा; सुस्ती; आजार. (क्रि० येणें; होणें). [मंद]

मांदण—नस्त्री. १ पाणी, उंसाचा रस, विस्तव इ० ठेवण्याचें रुंद तोंडाचें, सामान्यतः मातीचें भांडें. २ विस्तव ठेवण्याचें पात्र; शेगडी.

मांदणें— सक्रि. फांसणें; लेपणें; चोपडणें; माजण करणें. [सं. मर्दन]

मादनें—न. (महानु.) मर्दनयुक्त स्नान, आंघोळ. ' तै गोसावी मादनें वर्जिलें । ' –भाए १३९.

मादर—स्त्री. आई. [फा. मादर] **मादरचोद-चोंद**–वि. एक बीभत्स शिवी; मात्रागमनी, नीच या अर्थी.

मादरपाट—पु. मांजरपाट पहा. माद्रीपोल्लम येथें तयार होणाऱ्या कापडाची एक जात. [ता. मद्रपल्लम]

मादरखान, मादवान—स्त्री. मोठी व उमदी घोडी. [फा. मादवान]

मांदरी—स्त्री. शिंदीची किंवा मोळाची चटई.

मादव—स्त्री. गाय, म्हैस इ०नीं कांस आंत ओढून घेणें व विण्याचें चिन्ह दाखविण्याचें थांबणें. (क्रि० करणें). [मद=माज]

मा(मां)दवी—स्त्री. वस्त्र; मदवी पहा.

मांदस—स्त्री. (गो.) सापळा. [मांदूस=पेटी]

मां(मा)दळ-ळा—पु. १ मोठा मृदंग. ' करूनिया टिरी आपुला मांदळ । वाजविती टाळ दगडाचे । ' २ गाडीच्या चाकाचा तुंबा. [सं. मंडल] **मां(मा)दळी, मांदाळ**–स्त्री. १ डफ; डफाचें कडें. २ मंडळी; समुदाय. [मंडल] **मांदळमामा**–पु. दैवज्ञ जातींत लग्न, मुंज इ० कार्यांत करावयाचा एक समारंभ. लग्न, मुंज होण्यापूर्वी एका ढोलावर भाचा किंवा भाची यांना बसवून तें ढोल मामा वाजवितो. मामाच्या, भाच्याच्या किंवा भाचीच्या मस्तकावर एक उपरणें घालतात व त्याचाच शेवटीं मामाला अहेर करितात. सुवासिनी हातांत गाडगीं घेऊन वाजवीत मामाभाच्यांच्या भोंवतीं गाणें गात चार फेऱ्या घालतात. –बदलापूर २३२.

मांदळघारें—न. पराकाष्ठेचा शीण; शक्तिक्षीणता. (क्रि० येणें; भरणें; लागणें). [मंद]

मांदा—वि. सुस्त; जड; श्रान्त; आजारी. [सं. मंद; फा. मांदा]

मादागी—क्रिवि. (राजा.) (प्र.) मंदागीं पहा.

मांदाडा—पु. (महानु.) समूह. ' मळयानीळु मागाडा । दाखवी चुततरूचा मांदाडा । ' –भाए ४२६. [मंडल]

मांदाण—नस्त्री. (प्र.) मांदण पहा.

मांदाण्या—पु. (गुऱ्हाळघर) एकवार चरकांतून काढलेलीं पेरीं (चिपाड) पुन्हां चरकास लावणारा. –कृषि ४७३. लेंड-कवळ्या पहा.

मांदार—पु. १ एक फुलझाड; रुईमांदार; रुई व यांत फुलाच्या व झाडाच्या रंगांत फरक आहे. हीं झाडें पांढरीं, भुरकट असून रानांत आपोआप उगवतात. फूल पांढरें. याचा कोळसा दारूच्या उपयोगी आहे. चीक उकळून त्याचा रांधा (गटापर्चा) तयार होतो. २ (रुई शब्द जोडलेला किंवा न जोडलेला) वृक्षविशेष. [सं. मंदार] **०रुई**–स्त्री. पांढरा मांदार.

मांदि-याळी-ळें—स्त्रीन. मंडळ; गर्दी; समुदाय; टोळी. ' तैशी शिष्यांची मांदियाळी । ' –एभा ५.१५५. [मंडल]

मांदिरें, मांदेरी—नस्त्री. ताक घुसळण्याच्या रवीस खांबास जोडण्याची दोरी; घुसळण्याची दोरी; मांजरी पहा. ' मग वासुकीचें करोनि मांदिरें । ' –कथा २.५.९. [सं. मंथन+दोर, माथा+दोर]

मादी, मादा, मादिका—स्त्री. १ स्त्रीजाति; नराच्या उलट. २ नर–मादी या जोडीपैकीं एक अवयव. नरमादी पहा. ३ दोन अवयवांच्या, पदार्थांच्या दोन अवयवांपैकीं लहान अवयव; किंवा एकमेकींत अडकविण्याच्या दोन वस्तूंपैकीं जींत दुसरी वस्तु अडकवितात अशी वस्तु. ४ (उंसाचा चरक) तीन लाटांच्या चरकांतील बाजूच्या दोन लाटा प्रत्येकी; दोन लाटांच्या चरकांतील डावी लाट. [फा. माद] **मादीचा आंख**–पु. उंसाच्या चरकाच्या बाजूंच्या वृत्तचिती बसण्यासाठीं त्याच्या मधोमध पाडलेल्या भोकांत बसविलेले खिळे. **मादीचें चाक**–उ. बाजूच्या वृत्तचिती आणि वरची फळी यांचे दरम्यान नराच्या चाकांच्या दांत्यांत अडकावून बसविलेलें चाक.

मांदी—स्त्री. (काव्य) १ वलय; चक्र. २ (ल.) समुदाय; मंडळी; मंदियाळें; थाटी (भक्त, शिष्य, मित्र इ०कांची). ' तवं ते धांवली सेवकांची मांदी । ' –शनि ३५९. ' [सं. मंडल]

मा(मां)दुरी—पु. १ चाबुकस्वार. २ तबेला टेवणारा. ' कां मांदुरी लोकांचा घोडा । गजपतिही मानी थोडा । ' –ज्ञा १६.२२५. [प्रा.]

मांदू(दु)स·सी-सें—स्त्रीन. १ तिजोरी; संदूक; मोठी पेटी. ' पूर्वी भागवदत्त जें बहुबरें भारी घरीं मांदुसें । ' –आसी ५. २ (काव्य) सामान्यतः पेटी. ' ज्ञानरत्नाची मांदुस । ' –विपू १.६४. ३ –पु. पिंजरा. ४ (चांभारी) मांदें व एरंड्या ठेवण्याचा लाकडी ठोकळा. [सं. मंजूषा]

मांदें—न. एकत्रपणा. [मांदी]

मांदे—पुअव. (गो.) कारिंदा फळाच्या तळलेल्या चकत्या.

मांदें—न. सुसर इ० प्राण्याची चरबी. हिचा औषधाकडे उपयोग करतात (सामा.) बकरें इ०कांची चरबी. [सं. मेद]

मांदोडा(डी)-ळा—पु. १ मांडव. ' किरीटी कामधेनूचा पाडा । वरी कल्पतरूचा आहे मांदोडा । ' –ज्ञा ८.८. २ अनेक

फांयांचा समुदाय; जुंबाड. 'तरी ऊर्ध्वाहीकडे । शाखांचे मांदोडे ।' –ज्ञा १५.६०. ३ फळांचा घड. ४ समुदाय. [मंडप]

मांद्य—न. १ मंदपणा; चेंगटपणा; गतीची, क्रियेची शिथिलता. २ मंदाई; जाडय; अशक्तता; थंडपणा (शरीरप्रकृति, बुद्धि, मनोवृत्ति इ०कांचा); मतिमंदपणा; विराग; सुप्ति. ३ मांदगी; मांदेपणा; सुस्ती. ४ मंदपणा; अंधुकता; सौम्यता; मृदुता (दृष्टि, उष्णता, प्रकाश, आवाज, झुळूक यांची). (समासांत) अग्निमांद्य इ० [सं.]

मांद्री, मांदरी—स्त्री. (तंजा.) प्रकार; तऱ्हा. [सं. मात्र; ता. मादिरी]

माधव—पु. १ विष्णु. २ वैशाखमास. 'मधुमाधव वसंत युक्तु । कृष्ण म्हणे तो मी ऋतु ।' –ज्ञा १६ २२०. ३ वसंतऋतु. ४ (मधूचे वंशज, संबंधी) कृष्ण; सात्यकी. [सं.] **०लठ**-पु. एक फुलझाड व त्याचें फूल. **माधवी**–स्त्री. वसंतकाळ. 'ना तरी उधाना माधवी घडे ।' –ज्ञा १.४३. [सं माधव] **माधवी**–पु. नाटकांतील विदूषक; दशावताराच्या खेळांतील सोंगासारखें हास्यरसोत्पादक सोंग. २ –स्त्री. पांढरी व सुवासिक फुलें येणारा एक वेल; मधुमालती.

माधवगिरी—पु. (कों.) (अप.) मधुकरी.

माधवी—स्त्री. मधापासून गाळलेलें मद्य. गौडी, माधवी, पैष्टी हीं तीन प्रकारचीं मद्यें आहेत. [सं. मधु=मध]

मांधा—पु. समुदाय. 'त्वरें चालती धांवती लोक–मांधा ।' –मुरामायण अयोध्या ४४. [मांदी]

माधु(धो)करी—स्त्री. १ ब्राह्मणास भिक्षार्थ दिलेलें अन्न. २ –पु. मधुकर वृत्तीनें (भुंगा जसा फुलांतून थोडा थोडा मध आणतो त्याप्रमाणें) दारोदार भिक्षा मागून आणलेल्या अन्नावर उपजीविका करणारा; शिजल्या अन्नाची भिक्षा मागणारा. [सं. मधुकर]

माधुर्य—न. १मधुरपणा; अत्यंत गोडी. २ मंजुलता; सौंदर्य; मनोरमता इ० 'श्राव्यत्वें तरी माधुर्य । पायीं घाली ।' –ज्ञा १६ ११८. ३ मृदुता; सौम्यता; सात्विकपणा (स्वभावाचा, चालीरीतीचा). [सं. मधुर] **माधुरी**–स्त्री. १ वाचा; वाणी. 'तैसी बोली साचारी । अवतरो माझी माधुरी ।' –ज्ञा १४.३१. २ मधुर ध्वनि; गोड आवाज. 'कटी क्षुद्र घंटिका शब्द करिताती माधुरी वो ।' –तुगा २९१.

माध्यं(दि)जन—पु. यजुर्वेदाच्या वाजसनेयी शाखेचा ब्राह्मण. मध्यंदिन पहा. [सं. मध्यंदिन] **ग्रह०** (व.) माध्यंजनाची बोडखी, ऋग्वेदाची पालखी.

माध्यम—न. द्वार; साधन; (इं.) मीडिअम्. 'परीक्षेचें माध्यम मातृभाषा हीच कबूल केली आहे.' –केले १.५७. [सं. मध्यम] **माध्यमिक**–पु. आत्मा अणु नाहीं, महान् नाहीं, मध्यम परिमाणाचा आहे असें मत; या मताचे अनुयायी लोक. [सं. मध्यम]

माध्यस्थ—न. (प्र.) माध्यस्थ्य, मध्यस्थाचें काम. –वि. (वाद इ०कांत) मध्यस्थपणा करणारा. [सं.] **माध्यस्थ्य-स्थी-स्थगिरी**–नस्त्री. दोन पक्षांतील व्यवस्था, तडजोड; मध्यस्थी. [सं.]

माध्यान–न–न्ह, माध्यान्हाचें—मध्यान्ह इ० पहा. **माध्यान्ह**–स्त्री. दुपार; भर दोन प्रहर. 'माध्यान्हीं आला आदित्य ।' –एरुस्व ७.६४. [सं.] **०मारणें**–(ना.) पुष्कळा झोडणें. **माध्यान्हीं येणें**–निश्चयास येणें. **माध्यान्हकाल**–पु. दुपार. **०वृत्त**–न. खम्वस्तिक व ध्रुव यांमधून जाणारें याम्योत्तरवृत्त. [सं.] **माध्यान्हिक**–न. मध्यान्हसमयीं करावयाचें कृत्य, भोजन इ०

माध्व—पु. वैष्णव ब्राह्मणांतील एका पंथाची स्थापना करणाऱ्या मध्वाचार्यांचा अनुयायी. [सं. मध्व]

माध्वी—स्त्री. १ मोहाच्या फुलाचें मद्य. २ (सामा.) मद्य.

मान, मती, मत्—पुस्त्रीन. (विशिष्ट विद्या, कला, भूषण, वस्तु, चिन्ह इ० ज्या जवळ आहे अशा अर्थीनामाला लागून त्याचें विशेषण बनविणारा संस्कृत प्रत्यय. वान्, हा हि असाच प्रत्यय आहे). जसें–बुद्धिमा(वा)न, शक्तिमा(वा)न् इ० या प्रत्ययाचीं तिन्ही लिंगांचीं रूपें जरी वर दिलीं आहेत तरी यांना विभक्ती प्रत्यय लागून तयार झालेलीं रूपें क्वचितच आढळतात. [सं. मत्]

मान–ण—स्त्री. १ चिकण माती. २ (व.) तांबूस रंगाची टणक जमीन. ३ (वे.) कोंकण व देश यांच्या सरहद्दीतील काळे कांटे. **माणट**–न. (कों.) नापीक जमीन; पीक चांगलें होत नसून गवत फार येतें अशी जमीन. **माणटी**–वि. (कों.) भिकार; भुकिस्त (जमीन, तिजवरील पीक).

मान—स्त्री. १ ग्रीवा; गळ्याचा मागचा भाग. २ गळ्यास होणारा रोग. ३ (अशुद्ध) गळा. 'घास मानेंत अडकला.' ४(नृत्य) नृत्यांतील मानेच्या चलनवलनाचे प्रकार (सम, नत, अंचित, कुंचित, रेचित, पार्श्वोन्मुख, निवृत्त, व्यस्र व उन्नत हे ते नऊ प्रकार होत). [सं. मन्या; फ्रेंजि. मेन] (वाप्र.) **०अडकणें**–पेंचात, संकटांत सापडणें. **०कंबर एक करप**–(गो.) मान खालीं वांकवून कामास लागणें. **०कांटयावर नसणें**–(एखाद्यानें) अति गर्विष्ठ, उद्दाम किंवा मगरूर असणें. **०कापणें**–१ एखाद्याच्या उपजीविकेच्या साधनाचा नाश करणें; मुंडी मुरगाळणें. २ विश्वासघात करणें; फसविणें. ३ मोठी हानि करणें. **०खालीं घालणें**–१ डोकें खालीं घालणें; नांगी पडणें. २(ल.)अपमान सहन करण्याचा प्रसंग येणें. **०चोळणें**–(व.) कांकूं करणें. **०टाकणें–थकणें**; शक्तिहीन, निर्बल होणें. **०टोकाविणें**–मानेनें खुणा करणें. **०डोलवणें–हालविणें**–१ हुकार, पसंती, प्रशंसा करण्यासाठीं मान

हालविणें; पसंती दर्शविणें; वाहवा, कौतुक करणें. २ कबूल करण्यास भाग पाडणें. **०ताठ ठेवणें**–स्वाभिमान राखणें. **०तुकविणें**–वाहवा, कौतुक करणें. 'काय जिणें जर न घडे करणी तुकवी जियेस जग मान।' –विक ६५ **०धरणें**–सक्रि १ (ल.) ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं एखाद्यास अडचिणें. २ –अक्रि. मानेस कांहीं विकृति झाल्यामुळें ती आखडणें, इकडे तिकडे वळवितां न येणें. **०(मुंडी) मुरगाळणें**–१ (एखाद्याचा) आशाभंग करणें; नाश करणें. २ पूर्णपणें लुटणें. **०मोडणें**–१ (राखून ठेवलेला पैसा इ०) नाइलाजास्तव किंवा नाखुषीनें खर्च करणें. 'पाचशें रुपयांची मान मोडली तेव्हां लग्न झालें.' २ थोडक्या खर्चासाठीं मोठ्या नाण्याला हात लावणें. 'चार पैशांकरितां रुपयाची मान मोडावी लागली.' **०वर करणें**–१ गरिबींतून वैभवास चढणें; दिमाख दाखविणें. २ दुखण्यांतून उठणें; डोकें वर करणें. **०वर न करणें**–लज्जेनें किंवा नम्रपणानें वागणें. **०वांकडी करणें**–१ संमति अथवा रुकार दाखविण्यासाठीं डोकें एके बाजूस वळविणें. २ असंमति दर्शविणें. **०वाकविणें**–कबूल करणें; मान्यता दाखविणें; अनुसरणें. 'ह्या परिस्थितीस्च मान वांकविली पाहिजे.' **०सोडविणें**–एखाद्यास अडचणींतून, पेचांतून मुक्त करणें. **(खालच्या) मानेनें चालणें–पाहणें**–१ नम्रतेनें, विनयानें, सलज्जतेनें चालणें. २ खालीं मान घालून, लाजेनें चालणें. **मानेवर सुरी ठेवणे**–एखाद्याला धमकी देणें, भिवविणें; नाश करावयास सिद्ध होणें. **मानेस–मानगुटीस बसणें**–१ गळीं लागणें; खपाटीस बसणें. २ (भूत, पिशाच वगैरेनीं) झपाटणें; पछाडणें. ३ गळ्यांत लादणें; डोईवर ओझें पडणें; अवश्य कर्तव्य असणें (करावयाचें काम) सामाशब्द– **०खुंट–खोडा**–नपु. ओढाळ जनावराची मान व पुढचा एक पाय यांस एके ठिकाणीं बांधलेली दोरी. [मान+खूंट] **०खुरी**–स्त्री. (नेमाड) गुरांचा एक रोग; तोंडखुरी पहा. –शे ११.३२. **०गु(गो)टी**–स्त्री. (तिरस्कारार्थी) मान; बोकांडी; अपकार, निग्रह इ० दाखविण्याच्या क्रियापदाशींच फक्त जोडून योजतात. 'वाघानें मानगुटी फोडली–धरली–सोडली.' 'हा त्याचे मानगोटीस बसला.' **०पुळी**–स्त्री. (कों.) कांकर रोग. **०मोड**–स्त्री. १ मान दुखावणें. २ लिहिणें, शिवणें इ०कां करितां एकसारखी मान वांकवून करावयाचें परिश्रम, यातायात, दगदग. ३ अपमान; मानहानि; मानभंग. ४ उभी उतरण. [मान+मोडणें] **०मोडा**–पु. (गो.) माशाची एक लहान जात. **०मोडी**–स्त्री. १ अतिशय उभ्या चढणीची जागा. २ (नेमाड) गुरांचा एक रोग. –शे ११.३. ३ (व.) इन्फ्लुएन्झा रोग. १९१८ सालीं ही सांथ आली होती, त्यास मानमोडीचें साल म्हणतात. ४ –वि. अतिशय उभ्या चढाचा (रस्ता, डोंगर) **०मोडें**–न. (नुकताच संसार करूं लागणारा तरुण, गरिबींतून हेर निघालेला, दुखण्यांतून उठलेला मनुष्य, झपाटयानें पक्व दशेस येणारी वनस्पति इ० कांची) नाशक, विघातक, विध्वंसक अशी स्थिति, अवस्था. 'या वांग्या कांहीं टवटवीत दिसूं लागल्या होत्या इतक्यांत काय मानमोडें आलें तें कळेना.' –शास्त्रीको. [मान+मोडणें] **०वळा–ळी**–पुस्त्री. मानेवरील आंखूड केसांची रेषा (प्रायः अनेकवचनी प्रयोग). [मान+ओळ] **मानेचा कळस किंवा कांटा**–पु डोकें.(क्रि० ढळणें; पडणें; खालीं येणें) मानेचा कळस म्हणजे पाठीच्या कण्याचें वरचें अग्र, मणका अशी प्रायः समजूत आहे. **मानेचा कांटा ढळणें**–अक्रि. मृत्यु, मूर्च्छा इ० समयीं मानेचें अवसान नाहींसें होऊन डोकें एका बाजूस वळणें, पडणें. **मानेचा खाक्षेटा**–पु गळ्याची घांटी;कंठमणि. **मानेची पन्हळी**–स्त्री. डोक्याच्या पाठीमागच्या बाजूस मानेवर असलेली पोकळी, खळगी.

मान—पु. १ आदर; मुरवत; पूज्यबुद्धि; सत्कार; गणना. 'एथ आलेआं तुमचा मानु किती। वाढीन्निला।' –शिशु १८१. २ तोरा; दिमाख; स्वतःचा किंवा स्वतःसंबंधीं माणसें, वस्तु, देह इ०कांचा अभिमान; अहंता. 'जया पुरुषांचें कां मन। सांडोनि गेलें मोह मान।' –ज्ञा १५.२८५. ३ (औषधाचा) गुण; आराम. 'वैद्याच्या औषधानें मान वाटतो कां कांहीं?' ४ अधिकार; हक्क; इलाखा; सत्ता. 'लग्नामध्यें उपाध्यायाचा वस्त्र घेण्याचा मान आहे.' ५ कामगिरी; प्रतिष्ठा; अधिकार. 'नाहीं–होय म्हणण्याचा मान सासुबाईकडे आहे.' ६ परिमिति; परिमाण; इयत्ता; माप (पदार्थाची लांबीरुंदी, महत्त्व, संख्या याचें अथवा काल, देश, गुण याचें). 'मज अमेया मान।' –ज्ञा ९.१५९. ७ ज्याच्या योगानें एखादें परिमाण निश्चित करितात तें; वजन, लांबी, अवकाश, वेळ इ०कांचें कोणतेंहि माप. 'मास म्हणून कालाचें एक मान आहे.' ८ आधार; प्रमाण; गमक. ९ प्रमाण; तुल्यता; 'अव्हेरिलें कवणे मानें।' –ज्ञा १.९२. १० रीत; रिवाज; चाल. 'नाना क्षीरापति मान पद्धति।' –सप्र २०.३७. ११ –न. परिस्थिति 'पण तेच आंटनीनें आपल्या करुणरसभरित भाषणास प्रारंभ करतांच सगळें मान एकदम फिरून गेलें.–नि. १२ वयोमर्यादा; जगण्याची सीमा. 'हल्ली ५०किंवा६० हेंच आयुष्याचें मान झालें.' –टि ४.१४०. १३ (महानु.) वृत्तांत. 'ऐसें मान आइकौनि।' –धवळेपू २३. १४ नेम; टीप; निश्चय (काल, स्थल, कर्ता, सुमार यासंबंधीं). 'पर्जन्य केव्हां कोठें किती काय कसा पडेल ह्याचें मान कोण्हाचें हातीं लागत नाहीं.' १५ युक्तता; वाजवीपणा; औचित्य; जरूरी. 'राजा दुष्ट झाला. आतां एथें राहण्याचें मान राहिलें नाहीं.' १६ मोठेपणाची, महत्त्वाची पदवी; उंची; सुमार; मजल; पायरी. 'त्या गृहस्थाचें अलीकडे मान चढलें आहे.' १७ दर; योग्यता; उच्चता; किंमत. 'गाडयाचें, भाडयाचें, धान्याचें, गुळाचें मान चढलें–वाढलें–उतरलें–बसलें–फिरलें–

उलटलें–बदललें.' [सं. मा=मापणें] म्ह० १ मानो हि महतां धनं। २ मानें न खाई पानें पडपडल्या खाई कांदे=कादे खाण्यांत आनंद पावण्याइतक्या नीच स्थितीस आलेल्या गर्विष्ठ माणसासंबंधीं योजतात. ३ मान जना, अपमान मना (सांगावा); मान सांगावा जना; अपमान सांगावा मना. (वाप्र.) **मानावर जाणें**–क्रि. (खा.) इष्ट देवतेचा नवस फेडणें. साधितशब्द– **मानाचा**–वि. मानाचा हक्क असणारा. जसें–मानाचा धनी-पाटील–देशमुख–देशपांडया इ०. **मानकरी** पहा. **मानाचा तुकडा**–पु. क्षुद्र देणगी, पदवी. 'ते देतील तेवढाच भाकरीचा किंवा मानाचा तुकडा घेऊन...'–टि २.५४. **मानाचें पान**–न द्रव्यदृष्ट्या अल्प मोलाची परंतु जिच्या योगानें मान दिला जातो अशी कोणतीहि देणगी, सत्ता अथवा मालमत्तेची बाब. म्ह० मानाचें पान गोड. सामाशब्द– **०करी**–पु. १ (अधिकार, नातें, गुण इ०कामुळें) दरबार, सभा, लग्न, उत्सव, ग्रामसभा इ० ठिकाणीं विशिष्ट मान व नजराणा घेण्याचा हक्क असलेला मनुष्य; आदरणीय, माननीय मनुष्य. २ राजा-राणीचे आप्तेष्ट; यांस कांहीं नेमणूक असते. (गो.) मानकर. **०कीन-धनी**–पु. (व घाटी.) मानाचा मनुष्य. **०खंडना**–स्त्री. अनादर; अपमान; अवमान करणें. [सं. मान+खंडना] **०णूक**–स्त्री. १ नवस; देव, ईश्वर, पिशाच यांच्या पुढें घेतलेली शपथ. २ मानपान. [मानणें] **०धन**–न. मानरूपी धन. –वि. मान (दिमाख, ताठा) हेंच ज्याचें धन आहे असा; मानी. [मान+धन] **०नीय**–वि. पूज्य; मान्य; विश्वासार्ह; **मान** देण्यास, विश्वास टेवण्यास, मान्य करण्यास योग्य. (व.) मानधारी. **०पट्टी**–स्त्री. प्रमाण मोजण्याची पट्टी; स्केलपट्टी. **०पत्र**–न. मान्यता करणारा लेख. [सं.] **०पान**–पु १ मानकऱ्याचे हक्क; लग्न, मुंज इ० प्रसंगीं मानकऱ्यास दिलेले मान व नजराणे; आदरसत्कार. २ गांवच्या पिढीजाद अधिकाऱ्याचे हक्क. ३ एखाद्या कामाचे संबंधीं अधिकार व हक्क. [मान+पान: मान द्वि.] **०बरळे**–वि. (महानु.) गर्वानें (वाटेल तें) बरळणारे. 'तंव रतिरसिकां भणितलें। आंवो आंवो मानबरळें।'–शिशु २१८. **०भंग**–पु. १ अनादरानें, अपमानानें वागविणें. २ अपमान; परिभव; मानहानि. [सं. मान+भंग] **०मरातब**–पु. आदरसत्कार. **०मर्यादा**–स्त्री. आदर; मान्यता; भीड; मुरवत. (क्रि० टेवणें; राखणें). **०मान्यता**–स्त्री. १ (पदवी, विद्या इ० असलेल्या मनुष्याचा) वाजवी मानसन्मान, आदर उपचार करणें. 'त्या दरबारांत त्याची मानमान्यता मोठी आहे.' २ सन्मान्यपणा; मान, वंदन करण्याची पात्रता. [मान+मान्यता] **०म्हातारी**–स्त्री. प्रौढ स्त्री; वागणुकीचें व गांभीर्याचें अनुकरण करणारी लहान मुलगी; लहानगी आजीबाई. [महान्+म्हातारी] **०वती**–स्त्री. १ स्त्री. २ (नाटय) आपल्या प्रियकराकर रुसलेली कामिनी; मानिनी. –वि. मानवत म्हणून एक पेठ आहे. तेथें तयार झालेलें (पागोटें इ०). [सं.] **०वस्त्र**–न. सन्मानार्थ दिलेलें वस्त्र. 'वोपिलें पताका मानवस्त्रें।'–दावि ४७४. **०वाईक**–वि. (व.) मान देण्यास योग्य; मानकरी. **०हानि**–स्त्री. अपमान, मानभंग. [सं. मान+हानि] **मानार्ह**–वि. मान देण्यास योग्य. [सं.] **मानणें**–सक्रि. १ आज्ञा पाळणें; पूज्य समजणें. २ विश्वास ठेवणें; भरंवसा धरणें; मान्य करणें; कबूल करणें; खरें, बरोबर आहे असें धरणें. 'तूं जरी हें ऐसें मानसी। तरी खेदु कां करिसी।'–ज्ञा २.१६२. ३ गृहीत धरणें; लेखणें; भावणें; गणणें. 'विष्णु व शिव निराळा असें मानीत नाहींत.' ४ किंमत बाळगणें; मोजणें; विचारणें; महत्त्वाचें गणणें. 'ज्याचा एकदां पराजय झाला त्यास कोण्ही मानीत नाहीं.' ५ मानवणें; सुखावह होणें; आरोग्यकारक पथ्यकारक असणें (हवा, पाणी, अन्न इ०). 'येथील पाणी मला मानतें.' ६ मर्जीस येणें; आवडणें; रुचणें. 'माझे मनास जें मानील तें करीन.' ७ वाटणें; आवडणें. 'हा मन मानेल तेंच करील.' ८ नवस करणें. [सं. मन्=विचार करणें; प्रा. मण्ण; पं. मन्नणा; सिं. मनणु; गु. मानवुं; हिं. मानना] म्ह० मानला तर देव नाहींतर धोंडा= मूर्तीपूजक लोक दगडाच्या इ० मूर्तीना देवाप्रमाणें भजतात. तदितर लोक मूर्तीना कांहींच मान देत नाहींत. यावरून मान हा दुसऱ्यांनीं करावा तेव्हांच होतो. नाहीं तर तो होत नाहीं. **मानवणें**–अक्रि. १ कबूली, परवानगी, रुकार ह्याकरिता मान हालविणें; पटणें; कबूल होणें. २ संतुष्ट होणें. 'म्हणौनि मानवले सारंगपाणी'–धवळेपू ४९. ३ अनुभवास येणें. 'ऐसें एकत्वें मानवे।'–ज्ञा ९.२४७. ४ मान देणें. ५ सोसणें (हवा, पाणी). **मानवली**–स्त्री. (व.) देवीच्या नवसाची सुवासिनी. **मानविणें**–सक्रि. मन वळविणें (रुकार देण्यास, मान्य करण्यास, आवडण्यास). 'लग्न करण्याविषयीं त्याचें मन मानवा.' या अर्थी ह्या क्रियापदाचा बहुधा मन शब्दाशीं प्रयोग होतो. –अक्रि. रुचणें; आवडणें; मान्य होणें. 'आजची कथा आम्हास मानविली.' [मानणें] **मानवणी, मानवीण**–स्त्री. १ (लग्न, श्राद्ध इ०प्रसंगीं) मृत सुवासिनी स्त्रीची प्रतिनिधीभूत मानलेली सुवासिनी. 'मानवणीच्या सुवासिनी किती आहेत?'–ऐरापु ४४१. २ (व.) मृत सवतीच्या नावानें देव्हाऱ्यांत बसविलेली प्रतिमा, टाक. ३ एक क्षुद्र देवता. 'बाळा बगुळा मानविणी।'–दा ४.५.१६. [मानणें=गृहीत धरणें] **मानाविणें**–सक्रि. (काव्य) मान देणें; आदर करणें; सन्मान राखणें. 'मानावया जगा व्हावी द्रव्यमाया। नाहीं तें माझिया जिवा चाड।' **मानि(नी) जाणें**–१ पर्वा करणें. 'दुर्वार वाडवशिखेस न मानिजेलें।'–र ३९. २ मानिलें जाणें. 'मानीजेसी थोर थोरी नाहीं।'–तुगा १०८. **मानित**–वि. मान दिलेला; आदरिलेला; आज्ञा

पाळलेला; सन्मान केलेला. [सं.] **मानिनी**–स्त्री. (नाट्य) १ आपल्या प्रियकरावर रागावलेली, मानी स्त्री. मानवती पहा. 'ते साचचि धर्माची मानिनी ।' –एभा १.२०९. २ स्त्री. [सं.] **मानिया**–पु. मानी पुरुष. 'कां मानिया निस्तेजा । निकृष्टास्तव ।' –ज्ञा १६.१७५. [मान] **मानी**–वि. १ गर्विष्ठ; ताठेबाज; चढेल. २ दुराग्रही; हट्टी. 'जो मानी म्हणतो यमपुरपथहित सामपथ नका माते ।' –मोभीष्म ७.४१. ३ तेजस्वी; उदार; थोर मनाचा. [सं.] **मानीव**–वि. मानलेला. **मानेच्छु, मानेपाष्टी**–वि. मान, आदर इ० इच्छिणारा; योग्य मानाविषयीं आग्रह धरणारा; मानासाठीं हपापलेला.[सं.] **मान्य**–वि. १ आदराई; पूज्य; मानमान्यतेला, योग्यतेला योग्य. ' विद्या भोगसुकीर्तिदायक पहा ते मान्य मान्यासही ।' २ प्रशस्त; अभिमत; अनुमत; पसंत. ' शास्त्रीबुवांची ही स्पष्टोक्ति माधवरावांना मान्य झाली.' ३ तयार; कबूल; राजी. [सं.] **मान्य करणें**–कबूल करणें; न्याय्य, बरोबर, खरें मानणें. **(प्रश्न, सूचना) मान्य होणें**– प्रश्न, सूचना ह्यांस संस्थेच्या नियमांत अवश्य असलेलें बहुमत मिळणें. –सभा ७३. **मान्यपूजन**–न. मानास पात्र असलेल्यांचा सन्मान करणें. **मान्यता**–स्त्री. १ आज्ञा पाळणें. २ विश्वास ठेवणें. ३ मान; आदर; मुरवत. ' ज्यासि अग्रपूजेची मान्यता.' –एभा १०.६१३. ४ भारदस्तपणा; पत; योग्यता (मान, आदर, समाचार यांविषयींची). ५ कबुली; अनुमति; संमति. [सं.]

मान(इ)ई, मानया—पु. मनुष्य; तरुण मुलगा; पुरुष. [सं. मानव]

मानकुल—न. (महानु.) माणिक. ' परि उद्धातया रंगाचे हीर । ते मानकुलांचि आति ।' –भाए ६४५.

मानगी—स्त्री. (ना.) शीण; थकवा. मांदगी पहा.

मानगें—न. (गो.) मगर.

मानचुंग—न एक रेशमाची जात. –मुंज्या ९७.

मानत–ता—स्त्री. देवांदिकांस केलेला नवस; नवसाचा बळी. (कु.) मानतूक. ' पाटलानें पुत्राकरितां नबाबांस मानत केली होती, त्यास पुत्र झाला.' –रा ७.१३९. [अर. मआनत]

मानभाव–वीण—पुस्त्री. १ हिंदूंतील एक पंथ व त्यांपैकीं व्यक्ति. हा पंथ चक्रधरस्वामी यानें स्थापिला. हे भिक्षेवर निर्वाह करितात, काळीं किंवा भगवीं वस्त्रें नेसतात व श्रीकृष्णाची भक्ति करितात, महानुभाव पहा. ' मानभाव बाई । आम्हा भिक्षा वाडा कांहीं ।' –भज ४१. २ (ल.) मनांत कपट ठेवून बाहेरून गोड बोलणारा; लुच्चा. ' परंतु अशा निर्मल अंतःकरणाच्या पुरुषासहि चकविणारे मानभाव ह्या पृथ्वींत आहेत. –टि १.३८७. [सं. महानुभाव] **ग्रह०** करणें कसाबाचें बोलणें मानभावाचें. **मानभावाची ऊ**–स्त्री. (ऊ पकडली असतां मानभाव तिला मारीतहि नाहीं अथवा जाऊंहि देत नाहीं यावरून) दुःखदायक, अवघड स्थितींत सांपडलेला मनुष्य. **मानभावाची बायको**–स्त्री. १ भिक्षा मागून स्वतःचा निर्वाह करणारी (व ह्यामुळें आपल्या नवऱ्यास खर्चांत न आणणारी) स्त्री. २ (ल.) बिनखर्ची उपयोगी पडणारा व नफा करून देणारा मनुष्य, पशु, पदार्थ इ० **मानभावी**–वि. मानभावांच्या पंथासंबंधीं. (भाषण, आचार इ०). **मानभावी कावा–मत**–पुन. मानभावी लोकांच्या सारखा कावेबाजपणा; कपटाचे डावपेंच.

मानव—पु. १ मनुष्य; मनुष्यजाति. याच्या जातींची (योनींची) संख्या चार लक्ष मानिली आहे. तीस लक्ष योनी पशुचिया घरीं । मानवाभितरीं चार लक्ष ।' ' लक्ष चत्वारी मानवी। योनी सप्तद्वीपा भूवी । १ ।' –हंको. २ मनुष्य. –न. क्षुद्र, पामर मनुष्य. ' मनीं मानव वेर्थचिंता वाहातें ।' –राम १७. [सं.] **०लोक**–पु. मनुष्यलोक; पृथ्वी. [सं.] **०शास्त्र**–न. मनुष्याची उत्पत्ति व विकास यांचें भौतिकदृष्ट्या विवरण करणारें शास्त्र. [सं.] **मानवी**–स्त्री. १ मानुषी, स्त्री. –वि. मनुष्यानें केलेलें.

मानवळण—न. (महानु.) १ वेढा. ' उठवी मानवळणें । इंद्रियांचीं ।' –भाए १६१. २ किल्ल्यावरील पहारेकरी.

मानवेल—स्त्री. अतिशय चिवट अशा बांबूची एक जात. ही तिरकमठ्याच्या उपयोगी पडते.

मानस—स्त्री. (कु.) १ घूस पकडण्याचा लांकडी सापळा. २ (गो.) खाजणाच्या तोंडाचें लाकडी दार. यांतून भरतीचें नदीचें पाणी शेतांत घेतात. [मांदूस]

मानस—नपु. १ मन; चित्त; बुद्धीचें स्थान; बुद्धिशक्ति. २ अन्तःकरण; मनोविकारांचें स्थान. ' मानस माझें मोहिलें या देवें ।' ३ इच्छा; प्रवृत्ति. ४ हेतु; उद्देश. ५ (कायदा) ध्वनित, गर्भित मान्यता. ६ हिमालय पर्वतांतील मानससरोवर. ' न क्षोभे जेवि मानसीं हंस ।'–मोसभा १.९६. –वि. मनासंबंधीं; मनाचा. [सं.] **०पुत्र**–पु. १ शरीरापासून नसून केवळ इच्छामात्रेंकरून निर्माण केलेला पुत्र. २ (ल.) पुत्राप्रमाणें अत्यंत प्रिय मनुष्य. [सं.] **०पूजा**–स्त्री. १ गंधपुष्पादिक पदार्थ मनाचेच कल्पून भावनामय केलेली पूजा; मानसिक पूजा. ' मानसपूजा अगत्य म्हावी ।'–दा ४.५.३१ [सं.] **०शास्त्र**–न. मनाचें स्वरूप, त्याच्या प्रक्रिया इ० संबंधीं शास्त्र. [सं.] **०सरोवर**–न. हिमालयांतील एक प्रख्यात सरोवर. **०सृष्टि**–स्त्री. मनाची सृष्टि; काल्पनिक चित्रें; मनानें बनविलेल्या आणि मनांत असणाऱ्या आकृती व रूपें. [सं.] **मानसिक**–न. १ पराकाष्ठेचें अल्पत्व; निवळ कल्पना. ' मरु देशांत पाण्याचें मानसिक.' २ एखाद्या गोष्टीविषयीं होणारा संदेह. ' त्याचें येण्याचें असल्या पावसांत मानसिकच दिसतें नाहीं ' –शाको. –वि. १ मनाचा; बुद्धीचा; मनांत असणारा;

मनसंबंधीं. 'स्वप्न हा मानसिक प्रपंच होय.' २ काल्पनिक; अयुक्तिक. ३ संशयित; अनिश्चित; निवळ कल्पनीय. [सं.] ०जुलूम-पु. मनाविरुद्ध गोष्ट करण्यास भाग पाडणें. 'शारीरिक जुलमापेक्षां मानसिक जुलूम अतिशय भयंकर असतो. -टि ३.१३९.

मानसिक—न. देव, भुतें यांना केलेला नवस. (क्रि० करणें)

माना, मायना—पु. १ आशय; अर्थ; अभिप्राय; धोरण. २ पत्रांतील आरंभीं लिहिण्याचे औपचारिक संप्रदाय; जसें--वेदशास्त्रसंपन्न, श्रीमंत राजश्री, राजश्रिया विराजित इ०. ३ पत्रादिकांतील मजकूर, हकीगत. ४ योग्यता; औचित्य; वाजवीपणा; अर्थ; उपयोग. 'आतां महागाई झाली एथें राहण्याचा माना राहिला नाहीं.' ५ गोष्ट. 'चोरांनीं घाला घालून हार घेऊन गेले...हे काय माना ते मना आणून तलास करून देवणें.' -भाअ १८३४. ६ अर्थ; हकीगत. 'हे मायना आहे, तूंच चोर आहेस.' ७ संधि; वेळ. 'या प्रसंगीं गनीम कापून काढावयाचा माना आहे.' -वसईची मोहीम. [अर. माना]

मानाय—पु. १ (कु. कों.) (वयांत आलेला) चाकर; मजूर; गडी. २ अंगानें मोठा, धिप्पाड मनुष्य. [सं. मानव] **यह०** (गो.) मानायांनीं शेतां आनी बटकींनीं घरां जातात=मजुरावर विश्वास टेवन घरें जातात आणि बटकीच्या संगतींत घरें बुडतात.

मानिणें—अक्रि. धांवत येणें. -शर. [प्रा.]

मानी—स्त्री. (कों.) १ जात्याच्या वरच्या तळीच्या भोकांत बसविलेली लोखंडी वाटोळी चकती; मायणी. २ (कों.) जातें इ०कांच्या वरच्या पेढीस पाटी बसविण्यासाठीं पाडलेली खाचणी. [मान]

मानीचेरा—पु. (बे.) एक प्रकारचें गवत.

मानुख-ष-स—पु. (महानु.) मनुष्य. 'ते कळियुगीं होउनि मानुख । सुलभु जाला ।' -ऋ ४१. [सं. मनुष्य]

मानुभ(भा)व—पु. महानुभाव. -वि. मोठे सामर्थ्यवान्. 'मानुभव पुण्यरासी। तेथें पवाडती ।' -दा २०.२.१२. 'साधुसंत मानुभाव ।' -दा ६.६.४७. [सं. महानुभ(भा)व]

मानुष—पु. नर; मनुष्य. [सं.] **मानुषी**-स्त्री. नारी; मनुष्य स्त्री. [सं. मनुष्य] **मानुष-षी**-वि. मनुष्याचा; मनुष्यासंबंधीं: मानवी. **मानुष्य**-न. मनुष्यपणा; मनुष्यत्व; मनुष्याची अवस्था, स्थिति, धर्म. **मानुसवाणें**-न. मनुष्यासारखा भास होणें. 'तैसें असणें का नसणें । हें कांहिंच माणुसवाणें ।' -अमृ ४.३७. [सं. मनुष्य+वत्; मानुस+वाणे]

मानू—न. माप. 'सोडितां क्षेमालिंगनू । नारदां होतुसें जगबोळाचें मानू ।' -शिशु ६३. [मान]

माने—क्रिवि. समान; बरोबर. [मान]

माने-मुजाही (ई)—म—वि. प्रतिबंध, अडथळा करणारा. 'कोणेविशीं माने-मुजाईम न होणें' -वाडमा १.६५. [अर. मानिअ]

मानो—पु. (कु.) प्रमाण; खात्री. 'तो परत येयूतच हेचो मानो काय ?' [मान=प्रमाण]

मान्तूफ—स्त्री. (गो.) पिशाचादिकांना (कोंबडें, बकरें इ० कांचा) बळी देण्याचें कबूल करून त्यांना स्थिराविणें, शांत करणें.

मान्ना—पु. (स्त्रि.) एखाद्या लोक ४० वर्षे वनवासांत असतां, देवानें त्यांच्याकरितां आकाशांतून अद्भुत रीतीनें पाडिलेलें अन्न (हा मान्ना, शब्बाथ दिवस खेरीज करून दररोज खालीं पडत असे. त्याचा आकार धन्यासारखा असुन रंग पांढरा, व चव तेल व मध घातलेल्या पोळीसारखी होती). 'एखाएल लोकांनीं त्या अन्नाचें नांव मान्ना ठेविलें.' -निर्ग १६.३१ [हिब्रू मान हू=हें काय ?]

मान्नें—न. (कु. गो.) न्हाणीघर.

मान्या-ण्या—पु (राजा कों.) लहान जातीचा बांबू; माणगा.

माप—न. १ प्रमाणानें मोजून निश्चित करण्याचें साधन; (वजन, सांटा, लांबी, वेळ इ०) मोजण्याची, गणण्याची क्रिया. (क्रि० करणें; चालवणें; घेणें; मांडणें; लावणें.) 'आज भातांचें माप चाललें आहे.' २ गणना; गणनेनें निश्चित करणें. 'आंब्यांचें माप झालें म्हणजे खुरयाचें माप घे.' ३ (सामा) मापण्यानें निश्चित केलेलें मान, परिमाण. 'दहा खंडी माप भरलें; (सामा.) मापण्याचें साधन (वजन, सांटा, लांबी इ०चें) उदा० वजनी माप, कैली माप, धान्य माप, कापडाचें माप. इ०, मापण्याचें कोणतेंहि साधन. ४ मापलेला, परिमित भाग. 'त्या खांचरांत चार मापें आहेत.' ५ (खा.) बारा डोळे किंवा चार पायली. डोळा अर्थ १० पहा. [सं. मा=मोजणें] ०**देणें-घेणें**-मापून देणें, घेणें. ०**कुतऱ्यानें नेणें**-एखादी गोष्ट गतगोष्टींपैकीं एक होणें; एखाद्या गोष्टीची गतगोष्टींत गणना होणें. (**पदरीं**) ०**घालणें**-एखादी गोष्ट अमान्य करणारास ती अनेक प्रमाणांनीं खरी करून पटवून देणें. ०**लागणें-मापीं लागणें**-कमी कमी होणें. 'मापीं लागलें शरीर।' -दा ३.९.१. (**आपल्या**) **मापानें मोजणें**-आपल्या स्वतःच्या (प्रमाण असलेल्या) मापानें मोजणें. **माप आणि महापाप**-खोटें माप घालणें महापाप होय. सामाशब्द- ०**पट्टी**-ऐनजिनसी सारा घेतांना धान्य मापण्याबाबत शेतकऱ्यावर बसविलेला कर. ०**वरताळा-वर्ताळा**-पु. १ धान्याच्या साऱ्याच्या खंडीमागें सरकारानें हक्कानें मागितलेला वरतावळा. २ (कों.) कुळाकडून धान्य घेतांना माप घेण्यासाठीं हक्क म्हणून ठरीव खंडापेक्षा एकचौसष्टांश किंवा एकअष्टमांश जास्त घेतलेला माल, रकम.

मापटें–न. साठ्याचें माप; अर्धा शेर,एक अष्टमांश पायली; निठवें. **म्हण** (व.) आपलें तें मापटें दुसऱ्याचें तें दीड पायली. **मापणें**–सक्रि. (वजन, साठपा, लांबी, वेळ यांच्या) मापानें निश्चित करणें; मोजणें; तोल करणें; मेज घेणें. [सं. मा; झें. मा; ग्री. मेत्रिओ; लॅ० मेतिओर] **मापन**–न. मापणें; मोजणें; माप घेणें. **मापाड्या, मापारी, मापेली**–वि. १ (सरकारी कोठ्या, बाजार माल यांतील) सरकारी धान्य मापणारा. २ (सामा.) मापणारा. 'आयुष्य मोजायाला बैसला मापारी। तूं करि व्यापारीं संसाराच्या ।' **मापारकी**–स्त्री. मापाऱ्याचा धंदा. **मापारी**–स्त्री. धान्य इ० मोजण्याचें फरा नांवाचें एक मांप. **मापी**–वि. १ साठ्याच्या मापानें निश्चित केलेला. २ मापानें मोजण्यासारखें; साठ्याचें; वजनीच्या उलट. माप दाखविणाऱ्या शब्दांच्या पूर्वी हा शब्द जोडून येतो. जसें मापी खंडी–मण–शेर. **मापीव, मापित**–वि. मापलेला. ह्याच्या उलट तोलीव, मोजीव.

मा(मो)प–न. (गों.) उन्हांत वाळविलेली मोठी वीट; कच्ची वीट. –शामची आई. [मापणें]

माप, मोप–वि. रगड; पुष्कळ; उमाप. 'आज पाऊस माप पडला आहे.' [अमाप]

माप–पु लक्ष्मीपति; विष्णु [सं. मा+पति]

मापल–वि. (व.) मी आपलें; माझें. 'मापल्या पाटल्या ओय(ळ)खल्या.' [मीं आपल(लें) अप.]

मापूल, मापलें–न. (व.) बोळकें. 'मुलीकरितां मापलें आणा.' [माप]

माफ–वि. क्षमा केलेला; क्षांत; सोडलेला (अपराध, अपराधी, कर्ज, एखादें येणें). (क्रि० करणें; होणें). [अर. मुआफ्]

माफी–स्त्री. १ क्षमा; सूट. २ (माळवी) दानरूपानें दिलेली जमीन अगर पैसा. [अर. मुआफी] **०चिट्ठी**–स्त्री. जकात माफ असल्याबद्दलचा दाखला, चिठ्ठी. पत्र. [हिं.] **०जमीन**–स्त्री. साऱ्याची सूट मिळालेली जमीन. हिचे दोन प्रकार आहेत– एक अजी माफ आणि दुसरा अपूर्ण माफ. [हिं.] **०साल**–न. लागवडीस आणण्याच्या जमिनीवरील शेतसाऱ्याची सूट मिळालेलें वर्ष. 'माफीसाल गुदरल्यानंतर धारा पडेल.' [अर. मआफ+फा. साल] **माफीचा साक्षीदार**–पु. (कायदा) गुन्हा माफ करून इतर आरोपीविरुद्ध साक्षीदार केलेला आरोपी इसम.

माफक, मवाफीक–वि. १ अनुकूल; यथायोग्य. 'ताकीत असें त्या मवाफीक चालविजे.' –रा १५.१६७. २ बेताचा; मध्यम. 'माफक–मरातब नजराणा देऊन विनंती केली कीं.' –दिमरा १.७५. ३ जितक्यास तितकें; नेमस्त. 'नजरा माफक–मामूल गुजराणल्या.' –दिमरा २.९६. ४ सदृश; प्रमाणें. 'यांस जन्नेली तमामी फौजेची माफक–हुकूम–विलायत मुकर जाली आहे.' –पदमव ११५. [अर. मुआफिक्] **माफकत**–स्त्री. १ पसंति. २ सोय. –वि. १ पसंत. 'यांची अधर्माची वर्तणूक आमचे राजास माफकत पडत नाहीं.' –दिमरा १.२३६. २ माफक; योग्य. 'याकरितां मशारनिल्हेस यावयास माफगत होत नसे.' –ऐटि २.६५. [अर. मुवाफकत्]

माफ(ब)जत–स्त्री. १ दक्षता; बंदोबस्त. (क्रि० करणें). तृतीया विभक्तींत अथवा सप्तमी विभक्तींत ठेवणें,राखणें या क्रियापदांस जोडून उपयोग करतात. उदा० माबजतीनें अथवा माबजतींत ठेवणें; राखणें. '(डबीचें घडथाळ) माफजतीनें पाठवावें.' –ख ९.४४५१. २ जपणूक. 'दक्षिणावर्ते शंख आज्ञा झाल्यास माफजतीनें पाठवून देणें.' –ख ४.१८३२. ३ (जिन्नस, प्राणी इ०कांची आस्थेनें किंवा हयगयीनें होणारी) व्यवस्था; स्थिति; अवस्था. 'ह्या घोड्याची माबजत चांगली आहे; त्याची माबजत नासली.' ४ संरक्षण. 'पांचशें लोक किल्ल्याचे माफजतीस व दोन तोफा आणिक पाठविल्या.' –दिमरा २.९५. [अर. मुहाफजत्]

माफलात–स्त्री. १ कार्य; काम. २ बजावणी. 'आज्ञेप्रमाणें माफलात करून...' –दिमरा १.६७. [अर. मुफअलत्]

माफा–पु. ज्यांत बसून स्त्रिया प्रवास करितात तो मेणा. [अर. महाफ]

मामळभट-भट्ट–पु. (श्रीकृष्णाच्या बाळपणीं एक राक्षस महाबळभटाचें सोंग घेऊन, कृष्णास मारण्यासाठीं गोकुळांत आला होता त्यावरून). १ नेभळा, बिन चापचोपीचा मनुष्य (विशेषतः मुलगा); पोकळ धोतर नेसणारा, बावळट मनुष्य. २ कपटवेषी विप्र. 'तेव्हां मामळभट्ट गर्जुनि तया शास्त्रार्थ सांगे विधी।' –आमहाबळ २२. ३ (ल.) दुसऱ्याची मालमत्ता उडविण्यांत उदार असलेला मनुष्य. **म्हण** लोकाच्या गायी मामळभट दान देई. **मामळभटी-ट्टी**–स्त्री. ढोंगीपणा; बाह्यतः साधुत्वाचा डौल व मनांतून कपटी वर्तन –वि. बावळटासारखें.

माम-मू–पु. (बालभाषा) आईचा स्तन. –न. भोजन.

मामंजी–पु. मामाजी; सासरा; नवऱ्याचा बाप. [मामा]

मामर्दी-दं-दें-धें–स्त्रीन. मांवदें. 'मोठ्या थाटाचें मामर्दं केलें.' –शुक्रवारची कहाणी २७. [सं. मा वद]

मामरमुंडा-ढा–पु. हिजड्याचा नोकर. मुंडा पहा.

मामल(लीय)त, मामला–स्त्रीपु. १ सरकारी काम; सरकारी चाकरी(विशेषतः तहशीलची व अधिकाराची). २ तालुक्याच्या वसुलाचें काम. ३ हातीं घेतलेलें काम; जोखीम; महत्त्वाचें कार्य, गोष्ट. 'सोन्धेकरांचीही मामलीयत चुकवून बिदनूरकरांकडे जावें.' –पया ६९. ४ महत्त्व; वजन; योग्यता; गणना; (बिशाद, किंमत, पाड, कथा, लेख इ० शब्दांप्रमाणें योजितात.) ५ जाबसाल. [अर. मुआमलत; मुआमला] **मामलतदार, मामलेदार**–पु.

तालुक्यावर अंमल चालवून जमाबंदीचा वसूल घेणारा अधिकारी. [फा. मआमिलतदार] **०दारी**–स्त्री. मामलतदाराचे अधिकार, काम, हक इ० **मामला**–पु. १ मामलत. २ (ल.) काम; कृत्य. 'मामला कठिण दिसतो.' ३ बाब; बाजू. 'तव ते व्यापार बुडाले। मामले आंगीं सेकले।' –स्वादि २.२. १८. **म्ह**० धकाधकीचा मामला.

मामलूत—स्त्री. १ मायाळूपणानें (अपराध) माफ करणें; शिक्षा करण्याचें सामर्थ्य असून बाबापुता इ०आजेव करणें. (क्रि० करणें). २ पर्वा; मुलाजा. 'पुन्हां अपराध केलास तर मामलत करणार नाहीं.' [काकलूत द्वि.] **मामुलती**–स्त्री. १ काकलूत; विनंति. (क्रि० करणें; दाखविणें). २ दयेनें दुर्लक्ष करणें; हेळसांड करणें.

मामा—पु. १ आईचा भाऊ. २ (आदरानें) बायकोचा बाप; सासरा. 'आणिक फिरून 'संभाळ मामा' बाजीबोवाला बोलला।' –ऐपो ७०. ३ कोणीहि पुरुष मनुष्य; गांवमामा. ४ (निंदार्थी) निरक्षर व कामांत अनिपुण मनुष्य. ५ (घट्टेनें) रात्री उडया मारणारा उंदीर (रात्रीं उंदीर शब्दाचा उच्चार करणें अशुभ समजतात). ६ (अश्लील) लहान मुलाची बुल्ली. [सं. मामक; प्रा. मामा] **म्ह**० कामापुरता मामा. **०बनविणें**–खूळ लावणें. चेष्टा करणें; फसविणें. **मामाजी**–पु. (आदरानें) नवऱ्याचा बाप, सासरा यांस म्हणतात. 'देवव्रत मामाजी प्रभु यांचें राज्य भारतापसदा।' –मोउद्योग ११.५९. **मामी(मि), मामी(मि)स**–स्त्री. (कों.) १ मामाची बायको; मातुलानी. २ बायकोची आई; सासू (मामानें भाच्यास मुलगी देण्याची कोठें कोठें चाल आहे त्यावरून). 'सुन म्हणे मामीस ऐका। लोणी कृष्णें लाविलें मुखा।' –ह ६.१३०. **मामे**–वि. मातुलकुलांतील भाऊ, बहीण यांच्या नात्याचा उल्लेख करतांना मामा या शब्दाचें होणारें रूप; सामाशब्द– **०बहीण**–स्त्री. मामाची मुलगी. **०भाऊ**–पु. मामाचा मुलगा. **०सासरा**–पु. नवऱ्याचा किंवा बायकोचा मामा. **०सासू**–स्त्री. मामेसासऱ्याची बायको; नवऱ्याची किंवा बायकोची मामी.

मामीर—अ. (गो.) मग; नंतर.

मामुजी—पु. (व.) उंदीर.

मामुरी—पु. आबादी; संपन्नता. 'रयतमामुरीवर नदर देऊन...' –इमं ७५. [फा. मअमूरी] **मा(महा)मूर**–वि. संपन्न; समृद्ध; आबाद. 'मुलुक मामूर होत नाहीं.' –रा १६.४४. [अर. मअमूर]

मामूल—पु. १ वहिवाट; साधारण रीत, चाल; दस्तुर. 'नजरा माफक–मामुल गुजराणल्या.' –दिमरा २.९६. २ उमेदवार; उत्तेजित. 'मोकदमांस कौलु–बोल देऊन मामूल करून लावणी उगवणी करणें.' –रा १५.३१. –वि. रूढ; सामान्य; नेहमीचा; प्राचीन; जुना. 'तेथें मामूल वहिवाट कशी आहे याची योग्य चौकशी करून ...' –टि १.२३८. [अर. मअमूल्] **०चाल–वहिवाट**–स्त्री. पूर्वीपासून चालत आलेली पद्धत; चाल; रूढी. **मामुली**–वि. रोजच्या व्यवहारांतील; सामान्य; किरकोळ; जुजबी.

माय—स्त्री. १ आई. 'तुम्हींहि बळि बांधिला म्हणुनि आमुची माय जी.' –केका ८८. २ (कों.) सासू. [सं. मातृका; लॅ. मॅटर; इं. मदर; प्रा. माउआ; सिं. पं. हिं. माऊ(उ); ते. मम्मा; उर्दू अम्मा, मा; का. अव्वा] **म्ह**० १ माय मरो पण मावशी उरो. २ (व.) माय तशी बेटी गहूं तशी रोटी. (वाप्र.) **०मावशी नाहीं–मावशी पहात नाहीं**–विषयवासना तृप्त करण्यासाठी अगम्यगमन सुद्धा वर्ज्य न करणाऱ्या मनुष्यासंबंधीं म्हणतात. **माय विणें**–१ आई प्रसूत होणें; मातेनें विशिष्ट गुणांनीं युक्त अशा पुत्रास जन्म देणें. २ (ल.) (एखादें काम करण्याविषयीं) छाती, धाडस, हिंमत होणें. 'मला शिवी देण्याला कोणाची माय व्याली आहे तें पाहतों.' सामाशब्द– **०आंग**–न. १ शरीराचा अतिशय कोमल, नाजूक भाग. २ गुदभ्रंशांतील बाहेर आलेलें आतडें; गुदभ्रंश. ३ बाहेर आलेला गर्भाशय आणि गर्भाशयभ्रंश. ४ योनि; स्त्रियांच्या किंवा मादीच्या जननेंद्रियाच्या आंतील जननविषयक अंग, इंद्रिय. 'तिला बाळंत होतांना फार त्रास झाला व मायआंग बाहेर आलें.' [माय+अंग] **०आजा**–पु. आईचा बाप; मातामह. **०आजी**–स्त्री. आईची आई; मातामही. **०गोसावीण**–स्त्री. राजरा किंवा राजेश्वरी देवीच्या कुलधर्मांत सवाष्ण म्हणून सांगितलेली विधवा. या कुलधर्मांत एक घरचें मेहूण, एक बाहेरचें मेहूण, एक ब्राह्मण, एक सुवासिनी, एक ब्रह्मचारी आणि एक विधवा अशीं साडेसात माणसें (ब्रह्मचारी अर्धा माणूस) भोजनास बोलावतात. विधवेला मायगोसावीण म्हणतात व देवी मानून तिचें पूजन करितात. हा कुलाचार पुष्कळ ब्राह्मण कुटुंबांत आहे. **माय(ये)चा पूत**–पु १ खऱ्या आईचा पुत्र; पराक्रमी, प्रतापवान, महत्कृत्य करणारा मनुष्य. 'असे परिणाम उत्पन्न करणारा कायदा कोणत्या मायेचा पूत निर्माण करण्यास तयार आहे...' –टि ४.९२. २ निंदा, उपहास इ० कर्तव्य असतांहि याचा उपयोग करितात. [माय=आई+पूत=पुत्र] **मायचि मी, मायचि मी चूत**–उद्गा. (कों.) (अश्लील) अपशब्द; एक शिवी. 'तुझ्या मायचि मी चूत साल्या.' **०झवी**–उद्गा. (हेट.) एक शिवी; आईशीं वाईट कर्म करणारा या अर्थी. **०थळ**–न. आईचें म्हणजे जन्माचें स्थळ; जन्मभूमि. असंतुष्ट पक्षानें आपल्या गांवांत किंवा भोंवरगांवीं झालेल्या निकालावर पूर्वग्रहदूषित नसलेल्या निःक्षपाती अशा परस्थळीं फिरून चौकशी व्हावी अशी विनंति करतांना योजलेला शब्द. उदा० 'हें मी मायथळ मानितों. दुसरें थळ मला द्या.' **०देश**–पु. जन्मभूमि. **०पोट**–न. अतिशय शांततेची व सुरक्षिततेची जागा; आसरा; थारा;

लपण्याची जागा; शरणस्थान. –वि. १ आश्रय देणारा; रक्षक; पालक (देव, राजा, धनी, लोक, राज्य, देश, गांव, ठिकाणा इ०). 'जें अचिंतां अनाथांचें मायपोट।' –ज्ञा ८.१९५. २ गरीब; निरुपद्रवी (गाय, घोडा, हत्ती इ०). **०बहीण**–स्त्री. आदरानें कोणत्याहि स्त्रीविषयीं योजावयाचा शब्द; आईसारखी किंवा बहिणीसारखी मानिलेली स्त्री. 'मायबहिणी विठाबाई। लागला छंद तुझे पायीं।' [माय+बहीण] **०बहिण घेणें**–(व.) आईबहिणीवरून शिव्या देणें. **०बाप**–पुअव. आई व बाप; आईबापें. **म्हo** (व.) माय बाप हेल्या लेकरं पाहिले कोल्ह्या=आईबाप सशक्त व मुलें किडकिडीत. **०भाषा–बोली**–स्त्री. स्वतःची भाषा. **माय(उ)ली**–स्त्री. १ आईस लडिवाळपणें संबोधण्याचा शब्द. २ (सामा.) आई किंवा आदरणीय, आवडतें वडील स्त्रीमाणूस. **०मावशी**–स्त्री. १ मातेसमान किंवा प्रौढ स्त्री. २ मातृस्थानीय किंवा अनुल्लंघ्यवचन असलेली नातेवाईक स्त्री. (क्रि० ओळखणें; जाणणें; मानणें; पाहणें इ०) गोमांस व शिवस्व. हे शब्द पहा. [माय+मावशी] **०माहेर**–न. १ आईचें घर; माहेर. २ आश्रय; थारा. ३ आश्रयदान; (क्रि० करणें). **०मूर्ति**–वि. दिसण्यांत संभावित परंतु महा लुच्चा मनुष्य. **०(माये)राणी**–स्त्री. १ स्त्रिया व खालच्या जातींतील लोक यांनीं पूज्य मानलेली पिशाच देवता; एक क्षुद्र देवता. 'जाखमाता मायराणी। बाळाबगुळा मानविणी।' –दा ४.५.१६. २ जलदेवता. 'जळीच्या मेसको मायेराणी।' –दा ३.२.२७. ३ (व.) एक देवी. हिची पूजा दिवाळीत होते. 'आमच्या घरीं मायराणीचा कुलाचार आहे.' ४ (निंदेनें) करंजी नावाचें पक्वान्न. **म्हo** अडक्याची मायराणी सापिक्याचा शेंदूर. **मायराणीचे दिवे**–पुअव. आंत तेल घालून व वात लावून मायराणीस समर्पण केलेले कणकेचे लहान लहान दिवे. बायकांचा हा आषाढांतील एक कुलाचार आहे, या दिव्यासारखे कणकेचे दिवे करून बायका खातात म्हणून–मायराणीचे दिवे खाले फिरफिरून घरास येते–असें एखाद्या धीट, लचाळ व त्रासदायक स्त्रीसंबंधीं रागानें म्हणतात. **०वणी**–स्त्री. १ कुलीन स्त्री. २ गर्भार स्त्री. 'मायवर्णी धाल्या धाय। गर्भ आंवतणें न पाहे।' –तुगा २३४८. [प्रा.] **०वत्**–न. महारांस आई किंवा पालक यांच्या ठिकाणीं असलेल्या गांवच्या सर्व दुसऱ्या जाती; या जातीपैकीं एक व्यक्ति. **०वाण**–न (व.) नवऱ्या मुलाच्या आईला द्यावयाचें वाण. 'मायवाणासाठीं लुगडें द्यायला हवें.'

मायणी–नी—स्त्री. मुसळ, ठोकणें, जात्याचें पाळें, जात्याचा आंतील खुंटा इ० कांना बसविलेलें लोखंडी कडें.

मायतें—न. (कर.) दोन प्रहरचें जेवण. 'मायतें झाल्याबरोबरच मी इकडे आलों.'

मायतो—पु. (गो.) अर्धा दिवस.

मायदळ—पु. मृदंग. मांदळ पहा. [प्रा.]

मायंदळ–ळा, मायं(दा)धाल—वि. पुष्कळ; भरपूर; ढीग; मोप; मस्त. 'समागमें ते स्वार पायदळ, अती मायंदळ,' –देप (कटिबंध पृ. १७४). [(अशिष्ट) महान्+दळ]

मायना—पु. १ भावार्थ, अभिप्राय; आशय. २ पत्रांतील आरंभीं लिहिण्याचे औपचारिक संप्रदाय. माना अर्थ २ पहा. ३ दर्जा. 'आपण महाराज छत्रपती यांचे सेनापती. आणि श्रीमन्त हे पन्त प्रधान; उभयतांचा बरोबरीचा मायना.' –हब ४९. [अर. मअना]

मायना, माना—पु. (कों.) फायदा; नफा.

मायपत्री—स्त्री. खोटी, नकली जायपत्री.

मायफळ—न. एक औषधी फळ; माजूफळ. हें सुपारीपेक्षां बारीक असतें. यास कोणी तुरटें असेंहि म्हणतात. हें विशेषतः लहान मुलांच्या आजारावर फार उपयोगी पडतें. [सं. मायाफल; हिं. माजूफल]

माय(ये)णी—स्त्री. कुलीन स्त्री. 'कीं मायेवणी पापियें।' –माज्ञा १६.१४४. (पाठ). [सं. महावर्णिनी]

माया—स्त्री. १ सृष्टि निर्माण करण्यास साधनीभूत अशी ईश्वरशक्ति. 'इंद्रो मायाभिः पुरुरूप ईयते' =इंद्र आपल्या मायेनें अनेक रूपें धारण करतो' –ऋग्वे ६.४७.१८. –गीर २२१. २ सृष्टिप्रपंच; नामरूपात्मक जगत्; जग हें अमूर्त, नित्य, अद्वितीय अशा ब्रह्मतत्त्वापासून उत्पन्न झालें असतां तें द्रव्यमय व भिन्नस्थिति आहे अशी त्याच्या स्वरूपाची ऐंद्रजालिकता. पुराणांत मायेवर चेतनधर्मारोप करून तिला स्त्री व ब्रह्माची सहधर्मचारिणी आणि चुकीनें सृष्टीची रचना व विस्तार मानिलें आहे. ३ कपट; कृत्रिम गारुड; ऐंद्रजाल; मोह घालणारी ईश्वराची शक्ति. 'हे आदिपुरुषाची माया।' –ज्ञा १.२०३. ४ अवस्तूच्या ठायीं वस्तुत्वबुद्धि; मिथ्या कल्पना; अवस्तूच्या ठिकाणीं वस्तुत्वाचा भास; खोटा भ्रम. 'पैल जळ हे माया।' –ज्ञा १३.१०३०. 'तैसी हे जाण माया।' –ज्ञा २.१४०. ५ नावंशत रूप. 'म्हणून विकारी किंवा नाशवंत नामरूपासच माया ही संज्ञा देऊन...' –गीर २१७. ६ अविद्या; अज्ञान. 'तैसा विश्वस्वप्नेंसी माया। नीद सांडूनि धनंजया।' –ज्ञा १८.४०५. ७ स्नेह; प्रेम; ममता. 'तेंवि करिल काय माय मायेतें?' –मोअनुशासन ४.३५. ८ दया; करुणा; अनुकंपा. ९ भांग. [सं.] **म्हo** माया वेडी गू फेडी=काम कितीहि किळसवाणें, नीच असो, तें करण्यास माया प्रवृत्त करते. (वाप्र.) **०निवारणें**–मायेचें पटल घालविणें, दूर करणें. 'कृपादृष्टीनें पाहसी जया। तयाची माया निवारिसी।' **०सांखळणें**–अति प्रेम करणें; अपुर्वाई करणें. **मायेक गेल, सेवेक**

चुकलें–(गो.) माया करायला दुसरीकडे गेलें पण त्यामुळें कर्तव्य चुकल्यें. **मायेचें तोंड खालीं–निराळें**–माया, ममता ही वरपांगी, दिखाऊ नसून, ती प्रकट होण्यापेक्षां अप्रकट रहाण्यांतच विशेष आहे; ममता नम्र असते. **मायेंत अटकणें–घोंटाळणें–पडणें–फसणें; मायेनें गुंतणें–गोवणें–गुंडाळणें**–प्रपंचाच्या फेऱ्यांत सापडणें; प्रवृत्तिमार्ग चालविणें. **मायेन मगाळणें**–(कु.) द्रव, पाझर फुटणें. सामाशब्द–**०चक्र**–न. मायेप्रमाणें मानलेलें पांचभौतिक जग. 'जय जय मायाचक्रचालका.' [सं. माया+चक्र] **०जाल(ळ), मायापाश**–नपु. १ जग हें पांचभौतिक असून ब्रह्माहून भिन्न आहे असा विश्वास उत्पन्न करणारें, बुद्धि व इंद्रियें यांवर टाकलेलें मायेचें जाळें. २ मोह. [सं.] **०तीत**–वि. मायाशक्तीच्या पलीकडे गेलेला (सत्पुरुष, ईश्वर). [सं. माया+अतीत] **०पटल–पडळ**–न. मायेचें घुंगट, आच्छादन; जग हें वस्तुतः ब्रह्मच असतांना त्यास भिन्न सत्ता आहे असें भासविणारा मायेनें जगास दिलेला आकार व छटा. [सं. माया+पटल] **०पुर**–न. (ल.) शरीर. **०ब्रह्म**–न मायावेष्टित ब्रह्म. [सं. माया+ब्रह्म] **०भान**–न. मायेचा भ्रम, झापड. 'निरोपिलें ब्रह्मज्ञान. जेणें तुटे मायाभान.' –दा ७.१.६१. [सं.] **०ममता**–स्त्री. दया; माया; स्नेह; प्रीति. **०मय**–वि. मायारूप; मायेनें कल्पित. 'मायामय जग सारें. अवघें दोन दिवसांचें वारें.' [सं.] **०मयविकार**–पुअव. प्रापंचिक बदल; रूपांतरें; घडामोड व स्थित्यंतरें होणारा प्रपंच. 'नव्हते मायामय विकार. तेथें झाला स्फुरणगजर.' **०रूपी**–वि. १ मायिक; फसवणारें रूप, मुद्रा, आकार असलेला. २ कृत्रिम; बाहेरून सुरेख पण आंतून नीच, वाईट; आंत एक बाहेर एक अशा स्वभावाचा (मनुष्य, सचेतन पदार्थ). [सं.] **०लाघव**–न. जगत् हें ब्रह्मविस्तार नव्हे तर द्रव्यात्मक सृष्टि आहे अशी मनुष्याची वंचना करण्यांत दिसून येणारें मायेचें कौशल्य; अवस्तुच्या ठिकाणीं वस्तुत्वबुद्धि उत्पन्न करणारें मायेचें कौशल्य. [सं.] **मायालु–ळू**–वि. १ ममताळू; प्रेमळ. २ (ल.) जादुगार. [सं.] **०वंत**–वि. मायामय. **०वाद**–पु. सर्व बाह्य जग असत्, मायारूप असून या जगाच्या बुडाशीं असणारें ब्रह्मतत्त्व तेवढेंच सत् आहे असें प्रतिपादणारें मत. मायावादाचा पुरस्कार मुख्यत्वें अद्वैतमतवाद्यांनीं केलेला आहे [सं.] **०वान्–वंत**–वि. मायिक (जगत, सर्व दृश्य विषय.) [सं.] **मायावी**–वि. १ मांत्रिक; गारुडी. २ मायेचा नियंता (जगांत दिसणाऱ्या त्याच्या अद्भुत कौशल्यावरून ईश्वरास म्हणतात). ३ खोटा; वरपंगी; कपटी; लबाड (भाषण, वर्तन, मनुष्य). 'हे अविद्या तरी मायावी.' –अमृ ६.४३. [सं. माया+विन्(प्रत्यय)] **०वेष**–पु. मायिक देह. 'कीं लेउनि मायावेषीचें लेणें.' –ऋ ५. **मायाळी**–स्त्री. प्रेमळ स्त्री. 'तंव कोणी मायाळी रुदंतीसी.' –दावि ११५. **मायि(यी)क**–वि. १ ऐंद्रजालिक; मायेनें रचिलेला. २ जगत् हें वस्तुतः अमूर्त आणि ब्रह्मस्वरूप असतां तें पांचभौतिक व सृष्ट आहे असें भासवून वंचना करणारा (जग, जडसृष्टि). ३ खोटा; लटका; असत्य; पोकळ. जसें– मायिक कारभार–धंदा–सुख–दुःख–संपत्ति–दरिद्र–बोलणें–रडणें–करणें. 'आणिक नलगे मायिक पदार्थ.' –तुगा १०७०. ४ माया करणारा. 'यापरी महीतें मायिक. कोणी नसे मजलागी.' –नव २४ १६६. [सं. माया+इक (प्रत्यय)] **मायिकवृत्ति**–स्त्री. वंचितवृत्ति, स्थिति; जडाच्या ठिकाणीं भासणारें सत्यत्व, सृष्टिभिन्नता, ब्रह्म व माया यांच्या ऐक्यत्वाविषयीं भ्रम. 'मायिकवृत्तींचा झणी धरिसी संग. इंद्रियाचा पांग सांडी रया.' [स.] **मायेक**–वि मायावी, खोटें. –शर. [मायिक] **मायेचा अवतार, मायाअवतार**–पु. परमेश्वराचा मायिक अवतार (ईश्वराचे सर्व अवतार. कारण आत्मज्ञान नसलेल्या व मूढ अशा माणसास मात्र हे अवतार खरे भासतात). **मायेचा गोंधळ**–पु प्रपंच; संसार. **मायेचा पदर**–पु. प्रेमाचें बंधन बाळगणारा मनुष्य (पुत्र, भाऊ, बांधव, आई, बाप इ०). **मायेचा पदार्थ–मनुष्य–माणूस**–पु. स्नेह, प्रीति असलेला मनुष्य.

माया—स्त्री. १ पुंजी; ऐवज; मालमत्ता; पैसा; डबोलें. 'त्याच्या जवळ बरीच माया आहे.' २ वस्त्र इ० शिवतांना दोरा निसटूं नये म्हणून शिवणीच्या बाहेर सोडलेला वस्त्रादिकांचा भाग; कोरी सोडलेली जागा, समास (माचा विणतांना त्याच्या गाताचा, एका रेषेंत खिळे ठोकतांना लाकडाच्या फळीचा सोडलेला भाग इ०). 'हा बरू केवळ कांडयाबरोबर कापूं नको, थोडी माया राख.'

मायोर—न. (खि.) माहेर घर.

मार—पु. मदन. 'मानी अहंकृति शिवे असि मार-माते.' –वामन, रुक्मिणीविलास २. [सं. मृ=मरणें]

मार—पु. १ ठोक; चोप; ताडण. (क्रि० देणें). 'देते झाले वीर सुभद्राकृष्णाकुमार मारा ज्या.' –मोभीष्म ७.३८. २ बंदूक, तोफ इ० कांच्या गोळ्यांचा प्रक्षेप, हल्ला; भडिमार. 'त्याच्या गुलालाचा मार. आमच्या वेण्या झाल्या लाल.' –मसाप २.३०. ३ (ल.) हल्ला; गर्दी; कहर. 'ते तसें बोलतात, हे असें बोलतात. एकूण मला दोहोंकडून मार.' ४ प्राण हरण करणें. 'तरी मारें उर्णे काळकूट.' –ज्ञा १७.१३९. ५ निग्रह करणें. 'मनाचा हन मारु.' –ज्ञा ६.२८९. ६ विपुलता; कडेलोट; रेलचेल. 'सालमजकुरीं अंब्यांचा मार झाला आहे.' ७ एखाद्या गोष्टीचा धबडगा, भारी प्रमाण. 'त्या विहिरीवर सगळे गांवाचा आठ दिवस मार पडतांच आटली.' ८ क्रियेचा झपाटा, अतिरेक, निष्काळजीपणा दाखविणाऱ्या भाषणसंप्रदायांत प्रकर्षार्थी व पादपूरणार्थी,

योजतात. उदा० 'मार पगडी फेंकून, मार डौलानें, चालतो.' ९ न्यूनाधिक असणारें जमीनीचें माप. जसें– विठलपंती–रायरी–सुल्तानी–मार. [मारणें] (वाप्र.) ०देणें–१ जिंकणें. २ एखाद्यास चोपणें, ठोकणें. ०पडणें–मारा पडणें; हल्ला होणें. 'बहु कोस मागें सारिला मार पडली हुजरातिला।'–ऐपो २८३. ०बसणें–माराला पात्र, विषय होणें; मार मिळणें. ०मारणें–देणें–निश्चयानें व नेटानें हल्ला करणें (अभ्यास, काम इ०कांवर). **मार मार, मारे मारे करणें–फिरणें–हिंडणें–करीत फिरणें**–आपलें दुःख सांगत फिरणें. ०कूट–स्त्री. मारणें व धबकणें; बुकलणें व कुटणें. [मारणें+कुटणें] ०कूट–झोड–पीट, **माराकुटी करणें**–क्रि. बेदम ठोकणें, मारणें; पिटणें. [मारणें+कुटणें] ०खाऊ–वि. नेहमीं मार खाणारा. ०गिरी–स्त्री. १ तोफांच्या किंवा बंदुकीच्या गोळ्यांचा हल्ला; मारा; भडिमार. २ लक्ष्य वेधण्याचें कौशल्य. ३ नेमक्या ठिकाणीं गोळा इ० जाण्याजोगी किल्ला इ० कांवर केलेली सोय. 'या किल्ल्याची चहूंकडून मारगिरी साधली.' ४ माराचा प्रयोग; मारा. [मार+फा. गरी] ०झोड–स्त्री. मारणें; झोडणें; कुदलणें. [मारणें+झोडणें] ०पकड–स्त्री. लाठी खेळण्याच्या प्रकारांपैकीं स्वतःचें संरक्षण करावयाचा प्रकार.–के ३६.११.३५. ०पीट–स्त्री. सडकणें व दांडकणें; मारठोक; मारहाण. [मारणें+पिटणें] ०वण–स्त्री. (एखाद्याकडून) मारविण्याची क्रिया. 'जेथें नसे मारण। जेथें नसे मारवण।' –यथादी २.५७६. [मारवणें] ०हाण, **माराहाण**–स्त्री. हाणणें व ठोकणें; मारणें व सडकणें मार, जखम इ० **मारकट–कणा, मारका**–वि. १ (कों.) हुंदाडण्यास, लाथा झाडण्यास संवकलेला. २ मारण्याची संवय, खोड असलेला. [मारणें] **मारकी (खुं)डा**–वि. (व. ना.) मारका, अंगावर धांवून येणारा (बैल इ०). **मारका**–पु. दबडगा व ओझें; जीव घेणारा, लोळवणारा, जमिनदोस्त करणारा (विशेषतः कामाचा) दबडगा. (क्रि० लावणें; पडणें; बसणें; असणें). [मार] **मारसा**–वि. (राजा.) मारका; हुंदाडण्याची व लाथा झाडण्याची संवय असलेला.

मारई—स्त्री, मोठी शिंप. हिच्यांतील माशास मारवी म्हणतात. मारवी पहा.

मारक—पु. १ साथीचा रोग; मरी; सांथ. २ मारेकरी; यम. 'झालों धन्य त्रिजगीं, भास पळ प्राकृतांस मारकसा।' –मोभीष्म १०.१०३. –वि. १ मारणारें; नाश करणारें. २ (ल.) प्रतिकारक. भंजक; दोषापहारक (औषध इ०). 'कोवमसाल घृताचें मारक आहे.'

मारका—पु. पिशाचांचा एक प्रकार; (कु. कशेळी) सर्व भुतांचा राजा. [मारणें]

मारका–खा—पु. (ना.) भयंकर मारामारी; युद्ध, मुकाबला.

मारग—पु. १ (काव्य) रस्ता; मार्ग. 'पाहा त्या मारगें। कोण येतो आमच्या लागें।' २ (माण.) रानांत जाऊन तेथें स्वयंपाक करून देवीस नैवेद्य समर्पण करणें व या रीतीनें देवीचा नवस फेडणें. [सं. मार्ग; प्रा. मग्गो] ०मळणें–एखाद्या देवतेला जाऊन आल्यावर पुन्हां त्याच मार्गावर जाऊन स्वयंपाक करून कुलदेवतेस नैवेद्य दाखवून सवाष्ण व ब्राह्मण जेऊं घालणें.

मारगुंडया—पु. एक वनस्पति.

मारजांभळ—न. एक इमारतीच्या उपयोगी लाकडाचें झाड.

मारंडी—स्त्री. (राजा.) क्रुद्ध झालेल्या देवतेच्या रोषामुळें (खेडयांत, कुटुंबांत इ०) होणारा म्हणून साथीचा मानलेला क्लेशदायक आजार. [मारणें]

मारण—न. १ मारणें; वध; हिंसा. २ शत्रूच्या नाशार्थ योजिलेला मंत्र, जादू इ०. 'जारण मारण.' [सं.]

मारणी—स्त्री. (काव्य.) १ प्रहार; मार. २ हल्ला; चाल. 'अनेक शस्त्रांची मारणी। चुकवूं जाणे साधक।' ३ वेग. ४ (बंदूक, तोफा, रोंखून उडविण्याकरितां किल्ल्याच्या तटबंदींत राखलेलें) तिरकस उतरते भोंक. जंगी पहा. [मारणें]

मारणें—सक्रि. १ ठार करणें; जीव घेणें. व्युत्पत्तिदृष्ट्या, 'मृ' ह्या धातूस अनुसरून जरी हा अर्थ प्राथमिक आहे तथापि तो मारणें ह्या क्रियापदाच्या ऊन प्रत्ययान्त रूपाशीं टाकणें हें क्रियापद योजलें असतां, अथवा मारणें क्रियापद कांहीं विशिष्ट क्रियाविशेषणांशीं किंवा क्रियाविशेषण असलेल्या जीव ह्या शब्दाशीं योजिलें असतां मात्र होतो. उदा० मारून टाकणें; ठार मारणें; अगदीं मारणें; निःशेष मारणें=जिवानिशीं–जिवानें–जिवें–मारणें. २ ताडन करणें; ठोकणें; पिटणें; हाणणें (कोणत्याहि साधनानें). ३ जिंकणें; पराभव करणें. ४ (पारा, वंग इ० कांच्या) तीव्रतेचा नाश करणें. ५ हल्ला करणें (घर, गांव, प्रवाशी इ० कांवर). ६ लुबाडणें; अंगावर तुटून पडून (ठार मारून, ठोकून, जुल्म करून) हिरावणें; हिसकावून घेणें. 'सोनें–खजाना–हुंडी–मारली' ७ काबीज करणें; वश करणें; दमन करणें(मनोविकार, इच्छा, वासना). ८ ठोकणें (खिळे, खुंटया, मेखा). ९ लावणें; बसविणें; न हालेसा करणें (कुलपें, वांसे, बिडया, कोणतीहि वस्तु इ० जलद घट्ट बसणें असा अर्थ असतां योजतात). १० (सोनारी धंदा) कोणत्याहि. जिनसाला पैलू पाडणें किंवा विशिष्ट आकार देणें, टसा उठवणें वगैरे उदा० वटंगावर बिल्वर मारणें. ११ संभाळणें; निभावणें; निभावून नेणें; पार पाडणें. 'ही एवढी आणीबाणीची वेळ मारून न्या म्हणजे झालें.' १२ लिहिणें. 'पत्रकावर शेरा मारला पाहिजे.' १३ करणें ह्या क्रियापदाच्या विस्तृत अर्थी(जोर, जलदी, झटपट, चटपट इ० क्रिया दाखविणें असतां) उपयोग करितात. उदा० एवढें काम मारतों आणि येतों.' करणें याच्या अनेक अर्थी योजलेल्या

मारणें क्रियापदाचे कांहीं अर्थ:–उडविणें (बंदूक); लढणें (लढाई); लगावणें (तरवार, चाबूक, छडी); फेकणें; झुगारणें (अस्त्र); घालणें (घाला); आरंभणें (धांव, नृत्य, ताण, जोर, दम, यत्न); ठोकणें (तंबू); फकूदिशीं आंत टाकणें, फेकणें (तोंडांत–मिष्टान्न, घांस, बकाणा); गट्ट करणें, खाणें (पैसा, माल); चलाखीनें व हुशारीनें मिळविणें, कमावणें (धंद्यांतील नफा); उदा० त्या व्यापारांत म्यां दोनशें रुपये मारले; कर्कशपणें व मोठ्यानें उच्चारणें (आरड, हाक, आरोळी, कुकारा); झपाट्यानें, उत्सुकतेनें करणें (मौज, कौतुक, ख्याल, बाष्कळ गोष्टी); –'चल लौकर हात मार, फडशा करून टाक.' याप्रमाणें जोरानें, झटकन् केलेलें कृत्य दाखविण्याकरितां योजलेल्या 'मारणें' क्रियापदाचीं उदाहरणें असंख्य आहेत. यावरून **जोर, दम, चलाखी**, उचल ह्या अर्थांच्या द्योतक अशा घालणें, टाकणें, लावणें, पाडणें, हाणणें, ठोकणें इ० अर्थांच्या क्रियापदांच्या वर्गांतीलच मारणें हें क्रियापद असल्याचें दिसून येतें. १४–अक्रि. लागणें; परिणाम होणें. 'ह्या तळ्याची ओल त्याच्या ओटीवर मारती.' 'काय शरूांची झळक, चकाकी मारती' १५ शरीरांत एकदम उत्पन्न होणें, उठणें. (चमक, धमक, लचक, शूल, कळ, उसण इ०); 'शीर–डोई–डोसकें–मस्तक–मारतें.' [सं. मृ=मरणें; फ्रेंजि. मर; पोर्तु. जि. मारार] **म्हण०** १ मारशील (जाळशील) तर पुढें जाशील=जर तूं मला मारशील तर तूं पुढें जाशील (तुला पुढें काय होईल तें समजेल). मारण्याचा धाक घालणारास ताकीद देतांना ह्मणतात. २ मारावा हत्ती लुटावा भंडार. (वाप्र.) **छटा, छाया मारणें**–सारखेपणाची लकेर असणें. 'तुमच्या बोलण्यांत तीर्थरूपांच्या बोलण्याची छाया मारती.' **झोप मारणें, डुकल्या मारणें**–निद्राग्रस्त होणें; पेंगणें. **वास–घाण–मारणें**–(खाद्य वस्तूचा) वास, रंग, रुचि, छटा, लकेर, झांक असणें. **मजा मारणें**–चैन करणें; मौज करणें.

मार(रं)द, मारांडी—स्त्री. खारवटांत उगवणारी एक कांटेरी वनस्पति.

मारंदा—पु. नारळ, ताडाचें फळ इ०कांत येणारा आळंब्या सारखा अकालपिंड; कोंवळा मोड.

मारपाचो—पु. (गो.) चौकोनी दगड. **मारपी**–पु. (कु.) खाणींतून चिरे काढणारा मनुष्य.

मारफत-ती—स्त्री. (विशेषतः देण्याघेण्याच्या व्यवहारांत) एखाद्या मनुष्याची गुजारत; वित्तमानता; मुखत्यारी; ओळख. 'जें कांहीं द्यायाचें, द्यावयाचें असेल तें हरीपंताचे मारफतीनें घे–दे.' –क्रिवि. संबंधानें; निसबतीनें; कडून; तर्फेनें. 'मी त्याचें मारफतीनें आलों=मी त्याजकडून (त्याच्या नांवानें–वतीनें, त्याजकडून अखत्यारी घेऊन) आलों.' [अर. मुआरफत]

मारबत-द—स्त्री. १ (व.ना.) धिंड; मिरवणूक. २ पोळ्याच्या दुसऱ्या दिवशीं गांवांतील इडापिडा, रोगराई बाहेर नेऊन घालविण्या-साठीं सोंगें वगैरे काढून मिरवणूक काढतात ती; बरसातींत रोगराई उत्पन्न करणारी मारबत नांवाची देवता; हिच्या प्रीत्यर्थ वरील मिरवणूक काढतात त्यावेळीं गांवाबाहेर जाळण्यांत येणारी बांबू व कागद यांची केलेली अकाळविकाळ, प्रचंड स्त्रीरूपी प्रतिमा. **०खेंदणें**–(ना.) (एखाद्यास) हांकून लावणें; (एखाद्याची) हुर्यो उडविणें.

मारवा—पु. (संगीत) एक राग. ह्यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर असतात. जाति षाडव–षाडव. वादी ऋषभ. संवादी धैवत. गानसमय दिवसाचा चवथा प्रहर. [हिं.] **०थाट**–पु. (संगीत) एक थाट ह्याचे शुद्ध षड्ज, कोमल ऋषभ, शुद्ध गांधार, तीव्र मध्यम, शुद्ध पंचम, शुद्ध धैवत व शुद्ध निषाद असे सात स्वर असतात.

मारवाडी—पु. मारवाड देशांतील व्यापारधंदा करणारी एक जात व तींतील व्यक्ति. –वि. १ मारवाड देशासबंधीं. २ तद्देशीय (व्यापार करणारे लोक). ३ (ल.) धूर्त; शठ; कृपण; कावेबाज; व्यवहारदक्ष. [सं. मरु] **म्हण०** मारवाडी मित्र नाहीं पायखाना पवित्र नाहीं. **०पणा**–पु. कंजूषपणा;

मारवी—स्त्री. मोठ्या जातीचा शिंपमासा. याच्या शिंपेला मारई म्हणतात. मारई पहा.

मारवेल-ळ—पुस्त्री. १ प्रायः समुद्रकिनाऱ्यावर उगविणारा वेल. २ एक प्रकारचें हरळीसारखें गवत; हें गुरांना चांगलें मानवतें 'कन्हवेळु मारवेळु गोंडाळी।'–गीता २.५२८६.

मारा—पु. १ (किल्ला इ० कांवर केलेला हल्ला; तोफांच्या गोळ्यांचा वर्षाव; मार. 'किल्ल्याच्या पूर्व बाजूनेंच मारा केल्यामुळें यश आलें.' २ तोफांची रांग. ३ नेमक्या ठिकाणीं गोळा लागू होण्याजोगें संधान. 'त्या मोरच्यानें मारा चांगला साधला.' 'त्या किल्ल्यास दोन मारे आहेत. तिसरेकडून कोठून' गोळा लागू व्हावयाचा नाहीं.' ३ तोफेचा, बंदुकीचा, आटोका, पोंच; टप्पा. ४ एखाद्या साथीच्या रोगानें, महापुरानें घेतलेला बळी. 'महामारीनें त्या गांवाचे दोन मारे घेतले.' 'ही नदी प्रतिवर्षी एक मारा घेतें.' ५ भडिमार; मार; माराचा विषय होणें; मार बसणें. माझा चहूंकडून मारा होतो.' ६ (किंवा मार) चंगळ, विपुलता (बऱ्या किंवा वाईट गोष्टींची). ७ बुद्धिबळादि खेळांत एका किंवा अनेक घरांवर चालू शकणारी मोहऱ्याची मारक शक्ति. ८ वेढा; लोंढा; जोर; सपाटा. 'पंधरा खेडीं पुराच्या माऱ्यांत सापडलीं.'–के २६.७.३०. **माऱ्याचे आंत येणें**–माराच्या टप्प्यांत येणें. **माराकुटी**–स्त्री. १ मारकूट; मारपीट. २ (सोंगटयांचा खेळ) मारामारी (यांत कोणत्याहि खेळाडूनें दुसऱ्या कोणाचींहि नरद मारावयाची असते). **मारांडी**–स्त्री. (कु.) कुचंबणा. **मारामार-री**–स्त्री. १ परस्पर लढणें; मारणें; युद्ध; लढाई. २

(ल.) अतिशय श्रम. (उपजीविकेचीं साधनें इ० मिळविण्याकरितां केलेले). 'दिवसभर मारामार करावी तेव्हां कोठें दोन आणे हातीं येणार.' ३(अशिष्ट) पराकाष्ठेचा झपाटा व गडबड; गर्दी (रोजच्या कामाची). ४ पराकाष्ठेची विपुलता (पदार्थांची.) 'कामाची-गाण्याची-धावण्याची - प्रयोजनाची - मारामार.' ५ पंचाईत, अडचण. ६ (कायदा) दोन किंवा अधिक इसमांनीं सार्वजनिक जागीं केलेली झुंज. [मारणें द्वि.] **०पडणें-होणें**-पंचाईत पडणें. पंचाईत होणें; अडचण पडणें. 'गोऱ्यांना तेथें धान्य-पाणी मिळण्याची मारामार पडली.' -के १७.४.३०. **माराहाण**-स्त्री. मारहाण. **मारिजेसिल**-क्रि. मारला जाशील. **मारू**-वि. १ मारणारा. २ मोहक; नखरेबाज; चित्ताकर्षक; मनोहर (डोळे, अलंकार इ०). ३ भेदक; बोंचणारें; परुष (भाषण). ४ (गो.) लबाड. **मारून**-क्रिवि. आवेश, पूर्णपणा, विपुलता इ० दाखविणारें वाक्यालंकारभूत क्रियाविशेषण. 'मारून तेल लाव आणि बळकट चोळ.' 'आज मारून हजारों रुपये धर्म केला.' **मारून उरता न ठेवणें**-बेदम मारणें; मरेमरे तों मार देणें. 'त्याला मारून उरता ठेवला नाहीं.' **मारून पीठ-पिठार करणें**-(एखाद्यास) ठेचणें; बदडणें; बेफाम मारणें. **मारून भूस भरणें**-अगदीं बेदम मार देणें, मरेमरे तों ठोकणें. **०मारून-मारतां मोत भरणें**-मारून नरम आणणें, बेशुद्ध करणें; बेदम मारणें. **मारून येवप**-(गो.) मिरगी, झिट येणें. **मारून कुट्टून-धमकून-मुटकून**-क्रिवि. नाना प्रकारच्या युक्त्या व प्रयत्न करून; जबरदस्तीनें; जुलमानें; पुष्कळ श्रमानें; मोठ्या कष्टानें; वारंवार प्रयत्न केल्यावर. (क्रि० अळेबळे साधणें, करणें). 'एकदां मारून कुट्टून घर बांधलेसें केलें.' [मारणें+कुटणें; मारणें+मुटकणें] **मारे**-क्रिवि. (वाक्यालंकारार्थी किंवा पादपूर्णार्थिक शब्द) आवेशानें. मार अर्थ ८ पहा. 'मारे मुसळाखालीं एकेकाची टाळकीं फोडून टाकीन.' -नामना ८६. **मारेकरी**-पु. एखाद्याच्या सांगीवरून दगयानें एखाद्यास ठार मारणारा; वेतन घेऊन मनुष्यवधाचें काम करणारा. [मारणें+करी]

मारांक-पुन. (महानु.) शस्त्र; बाण. 'कंदर्पाचेया मारांका। गोसावीणि ते।' -भाए ४२१.

मारा घेणें-क्रि. फरेमरें या खेळांत आपलें फरें झाल्यावर विरुद्ध पक्षाचा खडा उचलून घेणें.

माराणु-पु. १ लक्ष्मीपति विष्णु. २ कृष्ण. ३ राम. [मा=लक्ष्मी+राणा]

मारि-री-स्त्री. मरी; महामारी. 'मारी-लक्षहि न तदिषुहुनि अधिक प्राणिजात सारील।' -मोभीष्म १०.१६. [सं. मृ=मारणें]

मारि(र)ता-वि. मारणारा. [मारणें] **म्ह०** १ मारत्याचा हात धरवेल पण बोलत्याचें तोंड धरवत नाहीं; किंवा मारत्याचे हात धरवतात, पण बोलणाराचें तोंड धरवत नाहीं. २ मारत्याच्या मागें पळत्या पुढें. **मारता पीर**-वि. १ वस्ताद; जबरदस्त. उतारा; वरकडी. 'त्याचा मारता पीर मी आहें. मजपुढें येऊं द्या.' 'हें औषध पित्ताचा मारता पीर आहे.' २ तडखपणानें मारणारा इसम. [मारणें+फा. पीर] **मारती**-स्त्री. १लढाऊ फौज. 'मारती तीस हजार।' -ऐपो २३२. २ (पत्त्यांचा खेळ) आपणांजवळ ज्या रंगाचें पान नाहीं व जी आपण हुकुमानें मारतों अशी बाजू; कटाप. **मारपेंच**-पु. डावपेंच; कावेदावे; छक्केपंजे; युक्तिप्रयुक्ति.

मारुत-पु. १ वायु; वारा; हवा. २ ज्यावेळीं प्राणवायु आंतून निघून गगनाला मिळतो त्या स्थितींतील कुंडलिनीचें नांव. 'ते वेळीं कुंडलिनी हे भाष जाये। मग मारुत ऐसें नाम होये।' -ज्ञा ६.३०१. [सं.] **मारुति-ती**-पु. १ वायुपुत्र; हनुमान्. २ क्वचित् भीमालाहि म्हणतात. 'शिकवी मारुतिला भगदत्ते हृदयांत बाण शिरकविला।' -मोभीष्म ५.४८. **मारुतीचें(ची) शेंपूट**-नस्त्री. (सीताशुद्धीसाठीं लंकेंत गेलेल्या मारुतीच्या शेंपटाला राक्षसांनीं चिंध्या बांधल्या पण तें इतकें लांबलें कीं संपेचना. यावरून (ल.) लांबत जाणारें काम; लांबट गोष्ट; पाल्हाळ. **०लांबणें**-अक्रि. अशा रीतीनें काम लांबविलें जाणें.

मारूज-पु. अर्ज. 'हुजूर मारूज पोंहचविला.' -वाडमा१. ६६. -वि. प्रविष्ट; श्रुत. 'खावंदास अर्ज मारूज करून पाहीन.' -रा ५.७३. [अर. मअरूझ] **०मी(मे)दारद**-पु.अर्ज, विनंति करतो या अर्थाचा फार्शी अर्ज, पत्रें इ०कांतील मायना. [फा. मअरूझ् मिदारद्=मी अर्ज करतों]

मारूमिती-स्त्री. एका महिन्याच्या पौर्णिमेपासुन दुसऱ्या महिन्याच्या पौर्णिमेपर्यंत महिना मोजण्याची उत्तरहिंदुस्थानांतील रीति व या पद्धतीनें केलेलें मारवाडयांचे हिशेब.

मारोंब-स्त्री. (गो.) तुमान.

मार्क-पु. गुण; परीक्षेमध्यें प्रश्नाच्या उत्तरास मिळालेले गुणांक.स्त्री. -स्त्री. चिन्ह; खूण. [इं.]

मार्कंडेय-पु. १ एक ऋषि; मार्कंडेयपुराणाचा कर्ता. २ (मार्कंडेय हा चिरंजीव आहे या समजुतीवरून ल.). अतिशय म्हातारा मनुष्य. [सं. मार्कंडेय] **मार्कंडेयाचें आयुष्य**-न. दीर्घायुष्य.

मार्ग-पु. १ रस्ता; पथ; वाट. २ पंथ; संप्रदाय. ३ (ल.) रीति; पद्धति; मोड; सरणी; धाटी, वहिवाट; चाल; परिपाठ. 'गुरुजन देती वरासि कन्या, या। मार्गासि लंघितां मी प्रभुजी होईन पात्र अन्याया।' -मोआदि ८.३४. ४ मोक्ष, स्वर्ग अथवा एखादा सुखप्रद लोक गांठण्याचा रस्ता. कर्ममार्ग, उपासनामार्ग

व ज्ञानमार्ग असे हे तीन मार्ग आहेत. कांहीं लोक यांतच सिद्धांत मार्ग, योगमार्ग व वैराग्यमार्ग यांचा समावेश करतात. ५ (संगीत) ताल देण्याची एक पद्धति. ध्रुव, चित्र, वार्तिक व दक्षिण असे हे चार मार्ग आहेत. [सं. मृग्=शोध करणें] (वाप्र.) **०धरणें**–१ निघणें; आपल्या मार्गाला लागणें. २ रस्ता रोखणें; रत्याला उपद्रव देणें; वाट मारीत बसणें. **०फुटणें**–१ रस्ता, वाट आढळणें. 'खुंटली समीराची गति । मार्ग न फुटे चालावया ।' २ एका वाटेस दुसरा फाटा फुटणें. **०मळणें**–१ मारग मळणें पहा. २ बागेंत भोजन करण्याकरितां व मौजा मारण्याकरितां जाणें; वनभोजनासाठीं सहल करणें. **मार्गावर येणें**–सुधारणें. **मार्गीं लागणें**–१ (आपल्या उद्दिष्ट प्रवासाचा) मार्ग धरणें; निघणें. २ मरणाच्या पंथांत असणें. ३ (एखादें कार्य करण्याच्या किंवा तें कसें करावें हें समजण्याच्या) पंथास लागणें. ४ आरंभिलें जाणें; सुरू होणें (काम, गोष्ट). सामाशब्द– **०क्रमण**–न. रस्ता, वाट चालणें [सं.] **०गीत**–न. (संगीत) गांधर्वगीताचा एक प्रकार. [सं.] **०घ्न**–वि. (काव्य) रस्तेलुटारू; वाटमाऱ्या. 'दुर्बळघातक मार्गघ्न ।' [सं. मार्ग+हन्] **०ताल**–पु. (संगीत) प्राचीन तालाचा प्रकार. हे प्रचारांतून नष्ट होऊन अनेक शतकें झालीं आहेत. [सं.] **०त्रय**–न. तीन मार्ग. मार्ग अर्थ ४ पहा. [सं.] **०दर्शक**–वि. वाटाड्या; रस्ता दाखविणारा. **०पालीबंधन**–न. १ दर्भ किंवा मोळ यांचा दोर वळून तो गावाबाहेर पूर्वदिशेकडे दोन झाडांस किंवा खांबांस दोहींकडे बांधून त्याखालून गावकऱ्यांनीं गांवांत प्रवेश करण्याचा विधि. २ मोळाचा दोर करून एका टोकास हीनवर्णीय व दुसऱ्या टोकास श्रेष्ठवर्णीय यांनीं धरून ताणून ओढावयाचा विधि; मांगोळी. [सं.] **०प्रतीक्षा**–स्त्री. एखाद्याची वाट पाहणें. [सं.] **०भेद**–पु. १ मार्गाची भिन्नता; रस्त्याचा पालट. २ मार्गाच्या भिन्नतेमुळें किंवा पालटामुळें होणारी चूक. ३ पद्धतीचा भेद. 'हल्लीं या बाबतींत जो कांहीं मतभेद दृष्टीस पडतो तो मार्गभेदामुळें झाला आहे.'–टि १.४९९. **०रूढी**–स्त्री. (महानु.) पंथांतील प्रचलित वर्तन. 'प्रमाणपुरुष तयांची मार्गरूढी ।' **०संगीत**–न. १ जें भरताला ब्रह्मदेवानें शिकविल्यावर त्यानें अप्सरा व गंधर्व यांच्या कडून शंकरापुढें गाविलें तें संगीत. त्याच्या नियमांत बदल व्हावयाचा नसतो. दुसरें देशी संगीत. २ प्रचारांतून नष्ट झालेलें संगीत. [सं.] **०स्थ**–वि. यात्रेकरू; प्रवासी; मुशाफर. 'मार्गस्थ देवदर्शनासी आले ।' –सप्र ८.२१. **मार्गाची**–वि. सरळ; न्यायाची. 'ही मार्गाचीच गोष्ट होती.' **मार्गाटन**–न. वाट, मार्ग, रस्ता चालणें. [सं. मार्ग+अटन] **मार्गामार्ग**–पु. सरळ मार्ग व आडमार्ग; योग्य–अयोग्य मार्ग. 'कां जे मार्गामार्ग देखावे ।'–ज्ञा ८.२३९. [सं.] **मार्गीक्रमण**–न. (ज्योतिष) नक्षत्रांच्या क्रमानें अंतरिक्षाचें पूर्वेस जाणें. [सं.] **मार्गीचलन**–न. (ज्योतिष) ग्रहांचें नक्षत्रक्रमानें पश्चिमेकडून पूर्वेकडे गमन. [सं.]

मार्गण—पु. शर; बाण. 'मग असंख्य सोडोनि मार्गण ।' –जै २०.११७. [सं. मृग्]

मार्गशिर—पु. मार्गशीर्ष महिना. [सं. मार्गशीर्ष] **मार्गशिरी–शीर्षा–शीर्षी**–वि. मार्गशीर्ष महिन्यासंबंधीं. **मार्गशीर्ष–शीर, मार्गेश्व(स)र**–पु. चैत्रादि महिन्यांतील नववा महिना.

मार्च—पु. १ इंग्रजी वर्षाचा तिसरा महिना. २ सैन्याचें कूच. [इं.]

मार्जन—न. १ सिंचन; शिंपडणें. २ दर्भाग्रानीं अथवा विशिष्ट मंत्र म्हणून उजव्या हाताच्या बोटांच्या अग्रांनीं हृदय व शीर यांवर पाणी शिंपडणें. ३ स्नानानें, धुण्यानें, पुसण्यानें, सुवासिक उटण्यानें इ० शरीर स्वच्छ करणें. ४ (सामा.) धुणें; घांसणें; स्वच्छ करणें. ५ सडा; संमार्जन. 'केशर कस्तूरीचीं मार्जनें ।' –वेसीस्व ८.८८.६ (महानु.) मुखमार्जन; तोंड धुणें. [सं. मृज्=पवित्र करणें] **मार्जनी**–स्त्री. १ केरसुणी; झाडणी; कुंचली; झाडण्याचें, पुसण्याचें कोणतेंहि साधन. २ (संगीत) तेराव्या श्रुतीचें नांव. [सं.]

मार्जा(र्ज)र—पुन. गावांतील किंवा रानांतील मांजर. 'सुगंधमृगें आणि मार्जरें ।' –दा ४.५.२८. [सं. मार्ज्=ध्वनि करणें]

मार्तंड—पु. (कवि.) १ सूर्य. 'सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा । उडी घालितो संकटीं स्वामी तैसा ।'–राम ३७. २ खंडेराव किंवा खंडोबा. 'पाहोनि मार्तंडा जेजुरवासी ।' –दावि १७६. [सं.]

मार्तु(तू)ल— पु. (कर) डिसपीस; चावी; (इं.) स्क्रूड्रायव्हर.

मार्त्तिक—वि. मातीचा; मृत्तिकामय. [सं. मृत्तिका]

मार्दव—न. १ मृदुपणा. २ सौम्यता, कोमलता; शांति. [सं.]

मार्फत—स्त्री मारफत पहा.

मार्मिक—वि. १ रहस्य, मर्म जाणणारा; अंतर्गत खुब्या, भावार्थ भेदणारा. २ भेदक; वेधक; बारीक; खोल; सूक्ष्म (तर्क, अनुमान, कल्पना). ३ भेदणारें; टोंचणारें; खोंचणारें; दंशक (भाषण). [सं.]

मार्वोत—पु. (व.) पोळयाच्या सणांतील दुसरा दिवस. मारबत पहा.

मार्सो—स्त्री. (गो.) लीख; ऊ.

माल—पु. मल्ल. 'माल मर्दूनि मालखडा ।'–एभा ३१.३४१. [सं. मल्ल] **०खडा**–पु. अर्जिक्य मल्ल. 'चाणूर मुष्टिका दीधला विडा । युद्ध करावया मालखडा ।' –कथा ४.६.३८.

मालखंड–पु. (महानु.) युद्धभूमि; कुस्तीची जागा. 'गिरी गजरगडा मालखडा प्रवेशे।'–गस्तो. 'मालखंडां जें केलें क्षात्र।' –एभा ३१.३८१. **मालगंठी**–स्त्री. (महानु.) मल्ल बांधतात त्याप्रमाणें कास बांधण्याचा प्रकार; विशिष्ट प्रकारें गांठ देऊन वस्त्र नेसण्याची पद्धत. 'तो पीतांबरू असे वेढिला। मालगंठी।' –दाव २२४. [सं. मल्ल+ग्रंथि] ०**जेठी**–पु. मल्ल. **मालातिर्णे, मालाथ(थि)र्णे**–सक्रि. १ (महानु.) मल्लविद्येनें वेढणें; मोहित करणें. 'येणें अहंकारें मालाथिल।' –ज्ञाप्र ६.३२. २ निस्तेज होणें, करणें. ३ निःशेष होणें. 'भीतरीं मालाथिलें। साभिळासे।' –कालिका २६.४०. ४ आश्रय, आंगीकार करणें. 'तैसा प्रकृति हे आसुर। एकली नोहे गोचर। जवं एकाधें शरीर। माल्हातीना।' –ज्ञा १६.२७७. [प्रा.]

माल—पु. परिणाम; शेवट. [अर. मआल्] **मालअन्देशी**–स्त्री. परिणामाचा अगोदर विचार करणें. 'मालअन्देसी.' –पेअ ६०. [अर. मआल्=परिणाम]

माल—पु. १ मत्ता; वित्त; द्रव्य; संपत्ति. २ जिन्नस; सौदा; विक्रीचा पदार्थ; जिन्नसपात्रस. ३ किंमतीची वस्तु. 'हा आठा रुपयांचा माल आहे.' ४ (कायदा) प्रत्येक जातीची जंगम जिंदगी. ५ जमाबंदी. 'मालाचें (रेव्हेन्यूचें) काम.' –निजामविजय १४.१२.३१. [अर. माल्] (वाप्र.) ०**खाणें**–(व.) मेवा, मिठाई इ० गोड पदार्थ खाणें. **माल केमाल, मालचा माल**–वाढ, सुधारणा होणाऱ्या किंवा घट, अपकार होणाऱ्या कामीं लावल्यावरहि ज्याच्यामध्यें बराबाईट असा काहींच बदल होत नाहीं असा पदार्थ (पैसा, माल इ०). ०**थरणें**–(व.) पीक चांगलें येणें; **मालावरचा नाग**–वि. १ पैशाचा उपयोग न करतां त्याचें केवळ रक्षण करणारा (कृपण मनुष्य). २ श्रमाशिवाय आयती संपत्ति ज्यास मिळालेली आहे असा (इसम). सामाशब्द– ०**अस्बाब**–पु. चीजवस्त वगैरे संपत्ति. ०**कटनी-काटणी-काटी**–स्त्री. १ शेताच्या कापणीसाठीं सरकारची परवानगी मिळण्याबद्दल दिलेली रक्कम; फी. २ पिकाची कापणी. ०**काळी**–स्त्री. (व ना.) शेतजमीनीचा सरकारसारा. 'वऱ्हाडची मालकाळी किती?' ०**खरा**–वि. पूर्ण किंमतीचा (चेंचलेलें किंवा विरूप झालेलें असलें तरी जें चांगल्या धातूचें असतें असें नाणें इ०). [माल+खरा] ०**खाना**–पु. कोठी. ०**चाटी-चाटश्या**–पु. शाळेंतील उपगुरु. [माल+चाटश्या] ०**जामिनकी**–स्त्री. मालजामिनाचा अधिकार, काम. ०**जामीन**–पु. मालाचा, पैशाचा जामीन; अमुक रक्कम अमुकवेळीं देईन अशी हमी घेणारा. –रा१६.५०. याच्या उलट हाजीर जामीन. ०**टाल**–पु. चोज वस्त; माल आणि इतर सामान. [माल द्वि] ०**दार**–वि. (व.) श्रीमंत. 'गावांत मालदार लोक आहेत.' ०**धनी**–पु मालाचा, जिन्नसाचा धनी. ०**पिसा**–वि. मालाचा नाश झाल्यानें किंवा तो नष्ट होण्याच्या भीतीनें वेड लागलेला. ०**पिसें**–न. मालाच्या नाशामुळें किंवा नाशाच्या भयामुळें लागलेलें वेड. ०**बंदी**–वि. १ ऐवजदार; किंमतवान; मोलवान. २ घणसर द्रव्याचा भक्कम (बांधणी, मांडणूक). ०**बिसात**–स्त्री. मालमत्ता. ०**मत्ता**–स्त्री. (व्यापक.) सर्व धनदौलत, जिंदगी, इष्टेट; रोकड, माल, चीजवस्त इ० सामान. [अर. माल+मताअ] ०**मवेश-शी**–स्त्री. चीजवस्त; गुरेंढोरें; मालमत्ता. [अर. मवेशी] ०**मसाला**–पु. (व्यापक,) १ मिश्रणाचीं द्रव्यें. २ इमारती इ० कामासाठीं लागणारें दगड, विटा, चुना, लाकूडफाटा इ० सामान. ३ उपयुक्त वस्तु, सामग्री. [माल+मसाला] ०**मस्त**–वि. संपत्तीनें चढलेला; धनगर्वित; धनोन्मत्त. [अर. माल्+फा. मस्त=मत्त] ०**मालिक**–पु. धनी. 'तरी मालमालिक व्हा त्याचे।' –दावि ८. ०**मालीयत**–स्त्री. मालमत्ता. 'संस्थानामध्यें मालमालीयत व स्वभाव...' –वाडबाबा १.१३४. ०**मिळ(ळ)कत**–स्त्री. माल व चीजवस्त; जंगम व स्थावर मालमत्ता. [अर.] ०**मुद्दल**–न. झालेल्या खर्चाच्या किंवा आगाऊ दिलेल्या पैशाच्या बरोबरीचा जिन्नस. उदा० माझें मालमुद्दल उभें राहिलें-आलें-हातास लागलें. –क्रिवि. १ बरोबर किंमतीला (क्रि० विकणें; विकत घेणें; करणें इ०). २ मूळ किंमतीला. ०**मोल**–वि. योग्य किंमत दिलेला; त्याच्या किंमतीला घेतलेला, विकलेला, मांडलेला. –क्रिवि. योग्य किंमत देऊन. (क्रि० विकत घेणें; विकणें; मांडणें; गहाण ठेवणें इ०). ०**मोल किंमत**–स्त्री. योग्य किंमत. ०**वाडी**–पु. (कों.) कुलवाडी; कूळ; शेतकरी. 'गावांतल्या समथा कुलवाडी मालवाडयाशीं काय हाय? जो तो कसा तरी उपाश्यानें दीस लोटतोय.'–चैत्रावळ–महाराष्ट्र शारदा, जून १९३५. ०**शिकाऱ्या**–वि. (व.) उत्तम पदार्थावर हात मारावयास सवकलेला. ०**साईर**–न. मालावरील जकात. 'कसवो कसवो कराहरा मालसाईर सुधी तुमपर राखो.' –वाडबाबा१.२१. ०**हराऊ**–वि. तोटा, नुकसान, खराबी करणारा. (प्राणी, वस्तु, काम याची). **माल(ली)क**–वि. १ धनी; स्वामी. २ अधिपति; शास्ता; अधिकारी. ३ हकदार; जो एखादें काम पाहतो किंवा ज्याचें तें काम आहे असा मनुष्य. 'माझा बाप जामीन राहिला आहे तो त्या गोष्टीचा मालक त्यास काय तें विचारा.' ४ (बायकी) पति; नवरा. ५ (कायदा) एखाद्या कंपनीचा, मंडळाचा गुमास्ता; मॅनेजिंग एजंट. ६ (पुरतु) टोळीचा नायक. ७ शेतकरी. ८ जमीनदार. [अर. मालिक; मालक] **मालकी**–स्त्री. धनीपणा; स्वामित्व. सत्ता. [मालक] **मालकीयत**–स्त्री. स्वामित्व. 'मालकीयत व खाविन्दी.'–दिमरा १.२०७. [हिं.] **माल गुजा(झा)र**–पु. १ जमीन खंडानें

देणारा, जमीनदार. २ सरकारचा वसूल जमा करून देणारा. ३ (व.) पाटील. [फा. माल्गुझार] **०गुजा(झा)री**–स्त्री. १ सरकारसारा देणें. २ मालगुजाऱ्याचा हक्क. **माल(लि)म**–पु. गलबताचा हिशेब व व्यवस्था पाहणारा अधिकारी; नाखवा. **मालत, मालयत, मालियत, मालीयत मालिस्त**–स्त्री. जिंदगी; उत्पन्न; वसूल; मालमत्ता. 'त्यांची मालयतें फारच गेली.' –ख ११.५९५५. 'माणसास न मारावें, मालत घेऊन सोडून द्यावें.' –भाकै २६. [अर. मालीयत] **माली**–वि. वसुलासंबंधीं. 'माली व मुल्की.' –वाडसमा ३.२४. [फा. माली] **माली मामला**–पु. १ (जकात) किंमतवान माल; जो विकला असतां पैसा उत्पन्न होईल. असा माल; सर्व खर्च सोसण्याजोगा माल. २ जकातीचें काम. **मालीव**–वि. (कों.) कांहीं किंमतीचा; विकला असतां कांहीं किंमत येणारा (मौल्यवान जिन्नस). [माल] **मालोमाल**–वि. किंमतीच्या योग्यतेचा; दिलेल्या पैशाइतक्या किंमतीचा. (विकत घेतलेला जिन्नस). (क्रि० विकणें इ०). [माल द्वि.]

मालकई, मालकै–स्त्री. (महानु.) गोष्ट. 'न पातां आपुलें बळ। मियां मालकै केली नवल।' –शिशु ७२६.

मालकंस–पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, कोमल गांधार, कोमल मध्यम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति औडुव-औडुव. वादी मध्यम. संवादी षड्ज. गानसमय रात्रीचा तिसरा, प्रहर. [सं. मालकोश]

मालकांगु(गो)णी–स्त्री. कांगोणीची एक जात; एक वनस्पती व तिचें बीज. [सं. कुंगुनी; हिं. मालकांगनी; गुज. मालकांगणी; कों. पिंगवी]

मालकी–स्त्री. (कों.) गलबताच्या पठाणावरील तीन-चार फळयांच्या रांगा.

मालकुडई–स्त्री. तांदुळाची एक जात.

मालखडी–स्त्री. माल नांवाच्या मातीची खडूची एक जात. हिनें लिहावयाच्या पाटया इ० घासतात. **मालणें**–माल्मातीनें पाटी इ० घासणें.

मालगण–पु. (व.) माळयांचा रहाळ. 'मालगणांत जा.'

मालगा–पु. द्राक्षाची एक जात. ह्यास सफेत विलायती असेंहि म्हणतात. याचें बीं अमेरिकेहून हिंदुस्थानांत आणविलें. –कृषि ५१३.

मालगोंडा–पु वरीची एक जात. हिचें कणीस मोठें असून तांबूस असतें. –कृषि २९२.

मालगोवा–पु. म्हैसूरकडील आंब्याची जात. –कृषि ६८१.

मालजा–स्त्री. (माळवी) व्यवस्था; दुरुस्ती. 'गोविंदराव डॉक्टरचे हातून मालजा बरोबर होत नाहीं.' –विक्षिप्त ३.१३२.

मालजादी–स्त्री. वेश्या; रांड; कसबीण; वेश्याकन्या. [फा. माल्झादा=रंडीपुत्र]

मालटी–स्त्री. (हेट. गो. कु.) एक प्रकारचें मातीचें लहान भांडें; परळ. [माती]

मालण-न–स्त्री. अतिशय सुंदर स्त्री. 'मालणी कैक प्राशिती विषाचा प्याला।' –अफला ५३. [सं. मालिनी]

मालणें–अक्रि. मालवणें; विझविला जाणें (दिवा). [सं. म्लै]

मालती–स्त्री. (कों.) गाडग्यावर (सुगडावर) ठेवण्याची मोठी मातीची पणती.

मालती–स्त्री. १ बाजरीच्या आकाराचा गव्हला; खिरींत घालण्यासाठीं गव्हाच्या सपीठाचा फुलासारखा केलेला एक पदार्थ. 'ते बोटवे सरवळे अणि मालत्यांला।' –सारुह ६.७७. २ एक सुवासिक फुलझाड. लावल्यापासून दोन-अडीच वर्षांनीं यास फुलें येतात. फुलें बारीक व जरा वाकडीं असतात. यांचा बहर उन्हाळयांत असतो. फुलांस मधुर वास येतो. ३ एक वृत्त. याच्या चरणांत अक्षरें १२ व न, ज, ज, र हे गण असतात. [सं.]

मालदा घुंगरु–पु. रेशमाची एक जात. –मुंव्या ९७.

मालदांडी–स्त्री. जोंधळयाची एक हलकी जात. याचें धाट लांबलचक असून कणीस लहान असतें.

मालदी–पु. चुर्म्याचे लाडू. –पाक ५८.

मालप(पु)वा, मालपु(पो)हा-बा–पु पीठ भिजवून तें चांगलें फुगल्यावर कढईत तूप टाकून त्यावर तें ओतून दोन्ही बाजू तांबूस रंगाच्या झाल्यावर साखरेच्या पाकांत टाकून केलेलें एक प्रकारचें मसालेदार व हलकें घिरडयासारखें पक्वान्न. [हिं.]

मालमी–स्त्री. (नाविक) मराठयांच्या आरमारावरील दिशा दाखविणारें होकायंत्र. **मालीम**–पु. १ गलबतावरील मुख्य अधिकारी; नाखवा; सुकाणू धरणारा. कप्तान. [अर. मुअल्लिम्]

मालव–पु. १ (संगीत) एक राग; यास मारवा असेंहि म्हणतात. मारवा पहा. २ माळवा प्रांत. [सं.] **०देश**–पु. माळवा प्रांत. यांत इंदूर, उज्जनी इ० शहरें येतात.

माल(ल्ह)वणें–अक्रि. १ जाणें; विझणें (दिवा). २ (ल.) संपणें; खालावणें; नाहींसें होणें (आजार, देवीच्या पुटकुळया, भरभराट इ०). [सं. म्लै] **मालव्हण**–न. फुंकर; विझविणें. **माल(ल्ह)विणें**–सक्रि. १ विझविणें; फुंकणें (दिवा). २ नाहींसा करणें (वंश, कुल).

मालवी–पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी ऋषभ, संवादी पंचम. गानसमय सायंकाळ [सं.]

मालश्री—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति औडुव-औडुव. वादी षड्ज. संवादी पंचम. गानसमय दिवसाचा चवथा प्रहर. [सं.]

माला-लू—पुस्त्री. एक प्रकारची माती. मालखडी पहा.

माला—स्त्री. १ फुलांची माळ; कुसुममालिका. २ मणी ओंवलेली दोरी; हार; स्मरणी. ३ ओळ; पंक्ति. [सं.] **०दंड**-पु. पुष्पहार. ' कंठीं रुळताति अलौकिक । माळादंड । ' -ज्ञा ११. २२०. [सं. माला+दंड]

मालिगौरा—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी ऋषभ, संवादी धैवत. गानसमय सायंकाल. [सं.]

मालिनी—स्त्री. १ स्त्रियांची एक जाति; स्त्रियांच्या पद्मिनी, चित्रिणी इ० चार स्थूल वर्गांपैकीं एक वर्ग. चतुर्विधाजाति पहा. २ एक गणवृत्त. याच्या चरणांत अक्षरें १५ आणि न, न, म, य, य हे गण असतात. [सं.] **०वसंत**-पु. एक औषधी मात्रा, रसायण. यास सुवर्णमालिनी असेंहि म्हणतात. [सं.]

मालिन्य—न. मळकेपणा; मलिनपणा; घामटपणा. [सं. मलिन]

मालिस्त—स्त्री. (डांगदेश) माळ जमीन; एक वर्ष पडीत टाकून दुसऱ्या वर्षी लागवडीस आणलेली जमीन.

मालिस्त—न. १ कुटणें; ठेचणें. २ तयार माल. ३ चंदी.

माली—स्त्री (कु.) पाच नांवाची वनस्पति.

माली, महाला-ली-ल्या—पु. न्हावी; न्हाव्याची जात. ' नखें चोखाळाया माल्या बोलाविती । ' -वसा ८.

माली(ले)तुळस—स्त्री. एक वनस्पति. रानतुळस व ही एकच.

मालीमर्दन—न. (महानु.) तैलादि द्रव्यें शरीरास लावून केलेलें मर्दन; मालीश. ' माली-मर्दनां दीधली राया मुरारी । ' -धवळेपू ६८.१. [मल्लमर्दन]

माली(लि)श-स, मालिस्त—स्त्री. १ खरारा; घोडयाची चाकरी. २ अंग रगडणें, चोळणें; चंपी.

मालुंड, मालुण—पुन. सापाची एक जात; दुतोंडें. महां डुळ, मांडूळ, पहा.

मालू(लु)म—वि. ज्ञात; माहीत; ठाऊक. ' मालूम करणें. ' -रा १५.३१. [अर. मअलूम्] **मालू(लु)म(मा)त-माती**-स्त्री. १ घडलेल्या गोष्टींतील सर्व मुद्दे, कलमें; यच्चयावत् परिस्थिति (एखाद्या कृत्याची); कच्ची हकीगत. २ माहिती. ' माझी मालुमात हि लिहिणें. ' -पेद २१.५५. माहितीचा कागद. ३ पत्रांतील मजकूर. -पया १८०. ४ (भाषण, लेख इ० काचा) खोटेपणा. ' या पत्रांत जें लिहिलें आहे ही सर्व मालुमत आहे, हा मजकूर खरा नव्हे. ' ५ मालूम केलेली, सांगितलेली सर्व हकीगत; अर्ज. -वि. खोटा; बनावट (दस्त ऐवज). ' बहुत बारकाईनें (चवकशी) करून मालुमातील असतील, निकामी तीं दूर करावीं. ' -वाडमा २.४४. **मालूम दानद, मालूम मीदानद**-स्त्री. (विशेषतः सरकारी पत्रांतील) 'कळवितों, निवेदन करतों, माहीत करतों अशा अर्थाचा शब्दसमूह. [फा. मअलूम मिदानद्]

मालें—न. दंडाच्या फेडीकरितां, तुरुंगांत पडलेल्या नातेवाइकाच्या सुटकेकरितां किंवा जप्त झालेली जमीन, वतन पुनः मिळण्याकरितां गळ्यांत नांगर अडकवून दारोदार भिक्षा मागून द्रव्य मिळवणें. (क्रि० मागणें). ' काष्ठाचा नांगर गळ्यांत । खांडश्मश्रु वाढलें बहुत । ब्राह्मण आला मालें मागत । करा साहित्य म्हणतसे । ' **०करी**-पु. मालें मागत फिरणारा मनुष्य.

मालें-लू—न. १ एक प्रकारचा मऊ दगड, खडी. मालखडी पहा. २ (माल्याचे गोळे केलेले असतात यावरून) कणीक, लोणी, खवा इ० कांचा गोळा; पुरणाची पोळी लाटावयाच्या पूर्वी आंत पुरण भरण्याकरितां टदलयाच्या आकाराचा केलेला कणकेचा गोळा; उंडा. ३ गुळाची ढेप. ४ राव; काकवी. ' अहो गूळासाखरे मालेयाचे । हे बांधे तरी एकाचि रसाचे । ' -ज्ञा १०.३३. ५ (गो.) गांधीलमाशी, मधमाशी इ०कांचें घर; पोळें.

मालोणी-नी—वि. (ना. व.) बेचव; मचूळ (पाणी).

माल्य—न. १ फूल. २ हार; माळ; पुष्पमाला. [सं.] **०ग्रथन**-न. चौसष्ट कलांपैकीं एक कला; हार गुंफण्याची, माला करण्याची कला. चौसष्ट कला पहा. [सं. माल्य+ग्रथन]

माल्हातणें—क्रि. १ अंगीकार, आश्रय करणें; जवळ करणें. माल्हाती दाढयें । आलस्याचें । ' -ज्ञा १४.१७९. २ आहारीं जाणें; प्रभाव पडणें. ' ऐसें माल्हातिजे मोहें । ' -ज्ञा १४.२५३. [सं. मल्ल्=युक्त होणें; जवळ असणें]

माव—स्त्री. १ कपट; कृत्रिमता; लबाडी. २ गारुड; गौड-बंगाल; माया. 'विश्वकर्मा येऊनि सत्वर। मावेचें रचिलें वैकुंठपुर।' ३ खोटेपणा; पोकळपणा; मायिकपणा. ' बाह्यभक्ति मावेचि करी । ' -एभा २.४९०. ४ भ्रम. ५ (गो) जखम बरी झाल्यानंतर राहणारा वण, चिन्ह. 'माव आसा'=कुऱ्हाडीचा घाव आहे. [सं.माया] **म्ह०** मावेचें मंथन धुंक्याचें काजळ. **०कर-री**-वि. मायावी; कपट करणारा. ' तैसा आतापी मावकर । ऋषीस दावी बहुआदर । ' -रावि १३.१४५. **०खोर**-वि. कपटी. ' जात फिरंग्याची मावखोर । ' -गापो ८५. **०भक्ति**-स्त्री. खोटी भक्ति. ' मावभक्ति ते नसावी किंचित । ' -दावि ३२१. **मावा**-पु. चित्ताकर्षकता; मोहिनी. -शर. [सं. माया] **मावि(वी)क मावि(वी)य, मावी**-वि. मायावी; भ्रामक; लाघवी. ' परि तो मावियांचा राऊ । ' -शिशु

३९४. **मावेचा**–वि. १ खोटा; कपटाचा; लबाडीचा. २ अवास्तव; पोकळ; ढोंगीपणाचा. ३ खोटें; ऐंद्रजालिक; मायावी. **मावेचा मृग**–पु. (मारीच राक्षसानें मृगाचें रूप धारण केलें होतें यावरून ल.) दिसण्यांत मोहक, मनोहर परंतु आंत पोकळ अशी वस्तु. **मावेचें मंथन**–न. वऱ्हाडगोष्टी; लग्नगोष्टी; चांभार फट; नसती उठाठेव.

माव—स्त्री. (गो.) कोणत्याहि फळाचा दळदार भाग. [माया]

माव-वो—पु (गो.कु.) सासरा. [मामा] **मावडां**–स्त्री. (कु.) सासुरवाड. [मामाचा वाडा (घर)]

मावडा—पु. फिकट निळा रंग. **मावडी सुरळी**–न. (विणकाम) फणीच्या एका घरांत काळा धागा व एका घरांत मावडा असें उभार व आडवण सर्व काळें, किनार कोणत्याहि प्रकारची, अशा प्रकारचें लुगडें.

मावडी—स्त्री. काइलींतील उसाचा रस ढवळण्याचा लांकडी पळा.

मावंडोळ—पु. (गो.) आग्या घणस; घोणस. [मांडळ]

मावणें—अक्रि. सांठणें (भांडयांत, जागेंत). माणें पहा. 'आनंद तीचा हृदयीं न माये।' [सं. मा=मोजणें]

मावंदें-धें—न. काशीयात्रा करून घरीं आल्यावर गंगापूजन, देवास नैवेद्य समर्पण व ब्राह्मणभोजन इ० करावयाचा विधि. समारंभ. मांउदें पहा. [सं. मा+वद]

मावरुख—पु. एक वृक्ष.

मावली—पु. (कों.) कोळिष्टकें करणारा, तंतूंचें जाळें पसरणारा कोळी.

माव(उ)ली—स्त्री. १ आई किंवा आईप्रमाणें मानिलेल्या वृद्ध बाईस आदरानें म्हणतात; गरीब, प्रेमळ, धर्मशील स्त्री; माउली पहा. 'मुखीं प्रगट होय जी करि सुखी जना मावली।' –केका ७३. २ (लडिवाळपणें) आईस म्हणतात. 'बुझावीतां माउली काय बोले। अम्ही देवासी नाहिं पूजियेले।' –ध्रुवचरित्र ११. (नवनीत पृ. ४११). ३ (–अव.) जलदेवता. [सं. मा]

मावशी-सी—स्त्री. १ आईची बहीण. २ (अश्लील) लहान मुलींचें जननेंद्रिय. ३ पूतनाराक्षसी. [सं. मातृष्वसृका; प्रा. माउसिआ; हिं. मौसी; कांहीं भाषांत मासी] **मावस**–वि मावशीकडील आपल्या नात्याचीं माणसें (बहीणभाऊ इ०). यांच्या नांवापूर्वी लावावयाचा शब्द. ०**बहीण**–स्त्री मावशीची मुलगी. ०**भाऊ**–पु. मावशीचा मुलगा. **मावसा**–पु. मावशीचा नवरा.

मांवसाळें—न. मिरवणूक (नवरदेव, मुंजा मुलगा, देव इ० कांची). (क्रि० काढणें; निघणें). [माणूस]

मावळ—न. महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील हद्दीचा व सह्याद्रीच्या पूर्वेकडचा प्रदेश. मुऱ्हापासुन आरंभ होऊन हा पूर्वेकडे चाळीस पन्नास मैलांपर्यंत पसरला आहे. [मावळणें] **चोवीस मावळें**–न.अव. जुन्नरपासुन चाकणपर्यंत घांटावरील बारा मावळें–१ शिवनेरी, २ जुन्नर, ३ भिमनेर, ४ घोडनेर, ५ भिननेर, ६ भामनेर, ७ जामनेर, ८ पिंपळनेर, ९ पारनेर, १० सिन्नर, ११ संगमनेर, १२ अकोळनेर व पुण्यापासुन शिरवळपर्यंत कोकणांतील मावळें:–१अंदर मावळ, २नाणे मावळ, ३ पवन मावळ, ४ घोटणमावळ, ५ पौडमावळ, ६ मोसे मावळ, ७ मुठे मावळ, ८ गुंजण मावळ, ९ वेळवंड मावळ, १० भोरखोरें, ११ शिवतर खोरें, १२ हिरडस मावळ इ०. [सं. म्लै] **मावळा**–पु. मावळ प्रदेशातील इसम. **मावळी**–वि. मावळ प्रांतासंबंधी; मावळांतील (वस्तु, माल).

मावळण—पु (राजा.) पश्चिमेकडील वारा.

मावळंग-गो-लिंगी—स्त्री. १ महाळुंगाचें झाड व त्याचें फळ. महाळुंगें पहा. [सं. मातुलुंग]

मावळण—स्त्री. १ आत; आत्या; बापाची बहीण. २ (कों.) मामी. [सं. मातुलानी] **मावळा**–पु. मामा; आईचा भाऊ. [सं. मातुल=मामा; प्रा. माऊओ=मावळा]

मावळणें—अक्रि. १ अस्तास जाणें (सूर्य, चंद्र, आकाशस्थ तारे). २ (ल.) ओसरणें; नाहींसा होणें; मरणें; अदृश्य होणें (देवी, खरूज, पुटकुळ्या, फोड). ३ पाकळ्या मिटणें (सायंकाळीं फुलाच्या). ४ (ल.) बुडणें; नाहींसें होणें; मालवणें. (कीर्ति, वैभव, थोरवी, जीव). [सं. म्लै] **मावळत**–क्रिवि. पश्चिमेकडे. 'तूं मावळत तोंड करून बैस.' **मावळत-ती**–स्त्री. मावळण्याची जागा; पश्चिम दिशा. **मावळती बाजू**–स्त्री. (माण.) पश्चिम. **मावळों सरणें**–क्रि. मावळावयास आणें. मावळणें. 'कां मावळों सरला दिवो।' –अमृ ७.१८९.

मावा—पु. आटवून घट्ट केलेलें दूध; खवा.

मावा—पु पिकावरील जंतु प्रत्येकी. हे संघ करून राहतात. बहुतेक पिकांवर मावा पडतो. हे पानांतील रस शोषून घेतात. –वि. पिवळसर हिरव्या रंगाचा.

माविजा—क्रिवि. ऐवजीं; बदली. 'वकलातीचे माविजा तालुका द्यावा.' –रा ५.१९५. [अर. मुआवझा=बदली भरपाई]

माश—न. चरित. [फा.]

माशि(शी)क—न. मासिक पहा.

माशावळण—न. माशांच्या थव्याची चळवळ व क्षुब्धता. मासेवळण पहा.

माशी—स्त्री. १ मक्षिका. एक घरांत आढळणारा सपक्ष जीव, कीटक. २ नेम धरण्यास उपयोगी असें बंदुकीच्या तोंडावरच

माशीसारखें चिन्ह; मासकी; मखी. [सं. मक्षिका; प्रा. मक्खिआ; पं. मक्खी; सिं. मखी; हिं. गुज. माखी; हिं. मछिआ; बं. माछी; फ्रेंजि. मॅंखी] **म्ह०** (व.) माशी पादली =माशी शिकणें याअर्थी. (वाप्र.) **माशा उडवणें**-स्वस्थ बसणें. **माशा खाणें-गिळणें**--१ मूर्ख, गोंधळलेला, बावरा झालेला दिसणें. २ गमणें; रेंगाळणें; चाचपडणें. **माशा मारणें-मारीत बसणें**-निरुद्योगी बसणें. **माशी लागणें**-१ दागिना इ०च्या वरील मुलामा, पातळ पत्रा झिजून आंतील लाख दिसूं लागणें. २ एखादें काम चालू असतां तें मध्येंच थांबणें; अडणें. 'पण कुठें माशी लागली?' -नाकु ३.७७. ३ मळमळूं लागून वांति होणें. **०शिंकणें**-(हानि किंवा अनर्थकारक गोष्ट घडून येण्यास क्षुल्लक कारण दाखविणाऱ्या माणसाच्या उपहासार्थ योजतात) हरकत येणें; अडथळा येणें (माशी शिंकणें ही गोष्ट अशक्य तेव्हां असेंच असंभवनीय कारण सांगून कार्य बंद ठेवणारास उद्देशून उपयोग). (नाका-तोंडावरची) **माशी न हालणें**-गरीब स्वभावामुळें कांहीं न बोलणें. **माशीला माशी**-(नक्कल करितांना मूळच्या लेखांत शाईवर माशी बसून डाग पडला असल्यास नकलेंतहि तसाच डाग दाखविणें यावरून ल.) हुबेहुब, बिनचुक पण अर्थ न समजतां नक्कल करणें. **माशी हागणें**-क्रि. जनावराच्या अंगांतील व्रणांवर कीड होण्याचीं चिन्हें दिसणें. **गुळावरल्या माशा किंवा साखरेवरले मुंगळे**-जोंपर्यंत गोडी (उत्कर्षाचे दिवस) आहे तोंपर्यंत मित्र म्हणविणारे लोक. **माशांचा वाघ**-पु. माशा पकडणारा कीटक, कोळी.

माशी—वि. मासा नामक वजनासंबंधीं. समासांत संख्यावाचकांसह योजतात. जसें-एकमाशी-दुमाशी-तिमाशी-चौमाशी.

माशी, माशीचें झाड—स्त्रीन. एक झुडुप. याच्या पानाचा पलिस्तर मारण्यांत उपयोग करितात. याला अतिशय लहान, माशीसारखें फूल येतें.

माशू(शू)क—स्त्री. १ प्रिय; प्यारी; रमणी. २ रंडी; रखेली. -वि. प्रिय; कमनीय; रमणीय; सुंदर. 'माशूक मऊ मुखचंद्र सुकुमार पुष्पाहून अरवा।'-प्रला २३० [अर. मअशूक] **माशुकडा**-वि. सुंदर.

माष—पु. १ उडीद. २ (जवाहिरी धंदा) पांच, आठ किंवा दहा रतींचें वजन. [सं.] **०तैल**-न. एक औषधी तेल. पिंपळमूळ, चित्रकमूळ, पिंपळी, रास्ना, कोष्ट, सुंठ, सैंधव यांचा कल्क व उडदाचा काढा ह्यांमध्यें हें तेल सिद्ध करितात. हें अर्धांगवायूचा नाश करितें.-योर १.७६७. **०पर्णी**-स्त्री. मुसाकानी. **माषान्न**-न. उडीदाचे शिजविलेले पदार्थ. मांसान्न पदा. [सं. माष+अन्न]

मास—न. अनेक माशांचा समुदाय. -स्त्री. (राजा.) माशांचा थवा. [माशी] **मासकी**-स्त्री. (राजा. वा.) १ बंदुकीच्या टोंकावर नेम मारावयासाठीं असलेलें चिन्ह, खूण. २ (बे.) माशी. **मासूक**-न. (राजा.) माशी; मक्षिका. **मासूकमारा**-वि. (राजा.) माशी मरेल इतकें अतिशय जालिम. (तंबाकू, तपकीर, भांग इ०); चेटक्या किंवा अत्यंत दुष्ट व मारक दृष्टीचा (मनुष्य).

मास—पु. मध्य; मधील भाग. **मासावरील**-वि. (गो.) होडीच्या मध्यावरील, मधील (वल्हेकरी).

मास—पु महिना. बारा महिने पहा. [सं.] (वाप्र.) **मासपक्ष लागला-लोटला-सरला**-एक महिना किंवा सहा आठवडे लागले, लोटले इ०. **मासपक्षाच्या आंत**-महिनापंधरा दिवसांच्या आंत. सामाशब्द-**०दान**-न. दर महिन्यास द्यावयाचें दान. **०नहाण-न्हाण-न्हाणें-वंदण**-न. विवाहसंस्कारास एक महिना ज्या दिवशीं पुरा होतो त्या दिवशीं वधूवरांस एकत्र स्नान घालण्याचा समारंभ; आठनहाण पहा. [सं. मास+स्नान] **०पक्ष**-पु. महिना-पंधरा दिवस. [सं. मास+पक्ष] **०वडा**-पु. (कों.) ग्रामदेवतेसंबंधीं केलें जाणारें मासकृत्य. **मासांत**-पुन. महिन्याचा अंत; चांद्रमासाचे त्रयोदशीपासून प्रतीपदेपर्यंतचे दिवस; तुटके दिवस. [सं. मास+अंत] **मासिक**-न. १ महिन्याचें वेतन. २ प्रतिमासीं निघणारें पुस्तक. ३ वर्षसमाप्तीपर्यंत, दर महिन्यास मृतमनुष्याचें करावयाचें श्राद्ध. -वि. महिन्यासंबंधीं; महिन्याचा; दर महिन्याचें. [सं.]

मां(मा)स—न. शरीरांतील सप्त धातूंपैकीं एक. [सं. मांस; फ्रेंजि. मस; पोर्तुजि. मास] (वाप्र.) **०कसणें**-चांगलें खालीं वर करून मांस भाजणें. सामशब्द-**०ओटी**-स्त्री. वाहेर दिसण्यांत मोठी पण दूध थोडें अशी गाय, म्हैस यांची ओटी, कास. **०कंड-कण-गंड**-न. (निंदार्थी) मांस; विदारलेलें, छिन्नभिन्न होऊन इकडे तिकडे पडलेलें मांस; घायांतून, जखमेंतून लोंबणारें मांस किंवा आंतड्याचा लोंबणारा भाग. नासणारें, वाईट, मुरदाड मांस. [मास+कण] **०कण**-न (कों.) शिजविण्याकरितां केलेले मांसाचे तुकडे. **०कार**-पु. (गो.) मांस विकणारा. **०कूट**-न. (गो.) मांसाचा तुकडा. **०कोथ**-पु. मांसार्बुद; चरणारा व्रण. **०भरू**-वि. दळदार; गरभरू (फळ); चांगली भरलेली (करंजी, पुरणपोळी). **०भक्षक**-वि. मांसाहारी. [सं.] **०मच्छर**-न. मांस वगैरे. **मा(मां)सल**-वि. १ मासाळ; मासानें पूर्ण असें. २ (ल.) मासभरू; पुष्ट. **मासवा**-पु. (व.) मांसाचा किंवा झाडाच्या सालीचा अनुक्रमें माणसाच्या किंवा झाडाच्या जखमेवर वाढणारा भाग. **मासव्रण**-पु. मासांतील व्रण. [सं.] **मांसाळ, मासाळ-ठा**-वि. (प्र.) मांसल; पुष्कळ मांस असलेला. 'एकें पीनावयव मांसाळें।' -ज्ञा ११.१३९. **मांसागळा**-वि. धष्टपुष्ट; मांसल. 'धष्ट पुष्ट मांसागळा।' -आमुदि २.३१. **मासार्बुद**-पु. कर्कट रोग. -राको

२६८. **मांसाहारी**–वि. मांसावर निर्वाह करणारा. **मासु(सो)रडा–डें**–पुन. (निंदार्थी) मासकंड पहा. **मासोंडणें**–अक्रि. (व) अंगावर मांस वाढणें; लठ्ठ होणें. 'म्हैस मासोंडली.' **मासोळ**–वि. (गो.) मांसयुक्त.

मासडभात––न. एक प्रकारचें भात. याचा तांदूळ तांबडा व हलक्या प्रतीचा असतो.

मासला––पु. १ नमुना; वानगी. २ डौल; आकार; घडण; घाट; तऱ्हा; फर्मा; कित्ता. 'हे दोन्ही घोतरजोडे एका मासल्याचे आहेत.' ३ रुचि; अनुभव. 'याचे गाण्याचा मासला पाहिला.' ४ उदाहरण. 'उत्तम गुणांचा हा एक मासला आहे.' [अर. मसल] **मासलेदार–वाईक**–वि १ चांगल्या जातीचा; सुरेख; डौलदार, उत्तम घाटाचा, तोडीचा; नमुनेदार; तऱ्हेदार. २ विचित्र.

मासा––पु. १ मीन; मत्स्य. सपृष्ठवंश प्राण्यांपैकीं अगदीं खालच्या जातींतील प्राणी. हा नेहमीं पाण्यामध्यें राहतो. श्वासोच्छ्वासाकरितां कल्ले असणें हें याचें मुख्य लक्षण आहे माशांचा उपयोग खाण्याकडे, तेल व औषधी द्रव्यें काढण्याकडे करितात. २ (सोनारी) माशाच्या आकाराचा सोन्याचा दागिना, पानर्डी. याच्या तोंडाजवळ वरील बाजूस एक टीक व खालच्या बाजूस एक टीक बसविलेली असुन फासा लाविलेला असतो. ३ एक मुलींचा खेळ. [सं. मत्स्य; प्रा. मच्छ; सिं. मच्छु; हिं. म(मा)छ; बं. माछ; युरोपियनजि. मचो; आर्मेनियनजि. मथसब; पोर्तु.जि. माशे] **॥ह० १** जळांत राहून माशाशीं वैर. २ माशाच्या पोरास पोहावयास शिकवावयास नको. **माशांचें जाळें**–न.-१ मासे पकडण्याचें जाळें. २ (ल.) झिरझिरीत व विरळ विणीचें कापड. **माशांचें विष**–न. विषारी मासे चावल्यानें होणारी दाह, सूज व ज्वर हीं लक्षणें. **माशानें गिळलेलें माणिक**–न. (ल.) एखाद्यानें गिळंकृत केलेली व पुनः परत न मिळणारी वस्तु; कधीं न भरून येणारी हानि. **मास(से)बाळी**–स्त्री. माशाच्या आकाराचें स्त्रियांचें एक कर्णभूषण. [मासा+बाळी] **मासळी**–स्त्री. १ विक्रीकरितां ह० मांडलेल्या किंवा राशिरूपानें असणाऱ्या माशांचा ढीग. २ लहान मासा. **मासामासा**–पु. एक मुलांचा खेळ. **मासेगाळणा–गाळणें**–वि. (विणकाम) अतिशय विरळ विणीचा (ज्यांतून मासा गळेल असा) कपडा. **मासेवळण**–न. १ बावरलेल्या माशांच्या थव्याचें एकदम मागें फिरणें. २ (जोराचा पाऊस, गढूळ पाणी इ० कारणानें होणारी) माशांची त्रेधा, व्यग्रता, धांदल. ३ (ल.) (सामा) त्रेधा होऊन लगबगीनें मागें फिरणें व पळणें; गाळण; गडबड. 'वाघ पाहतां गायींचें मासेवळण झालें.' ४ (समुदायाचा, व्यक्तीचा) मोठा क्षोभ. **मासोळी**–स्त्री. १ लहान मासा. मासळी अर्थ २ पहा २ माशाच्या आकाराचा पायाच्या बोटांत घालावयाचा स्त्रियांचा एक चांदीचा दागिना. (कु.) मासो. ३ अतिशय मांसल कांस (गाय, म्हैस यांची). **मासोळी कोथिंबिरी**–स्त्री. एक अलंकारविशेष. 'खूंटा टोप असे विशाळ झुबका मासोळि कोथिंबिरी।'–अकक २, अनंत कृत सीतास्वयंवर ४३. **मासोळीबाळी**–स्त्री. मासबाळी पहा.

मासा––पु. १ आठ गुंजांचें वजन. २ (व्यापारी, सांकेतिक) चार आणे.

मां(मा)सान्न––न. मांसान्न; उडदाचे पदार्थ. पूर्वी श्राद्धांत मांसान्न वाढीत असत परंतु पुढें याचा निषेध करून त्या ऐवजीं माष घेऊं लागले. यावरून माषान्नापासून मांसान्न हा शब्द अपभ्रंश व अर्थविपर्यय होऊन उत्पन्न झाला असावा.

मासी–सीं––सना. (महानु.) मजसी; माझ्याशीं. 'मासेंनि आंगलगें मासी। वैर चाळीति अहर्निशीं।'–ऋ ५५.

मास्तर––पु. शिक्षक; विद्यागुरु. [इं. मास्टर]

माह––पु. महिना; मास. 'यांचें देणें चालतें माहापासोन मागील गेला महिना देखील धरिलें असें.' –रा ६ १९८. [फा. माह] **०ब–माह**–क्रिवि. महिन्याच्या महिन्यास. [फा.] **०वार, माहे(ह)वारी**–नस्त्री. १ मासिक पगार, भत्ता, नेमणूक. (क्रि० बांधणें; बांधून देणें; ठरविणें); घडलेल्या गोष्टींचें त्या त्या महिन्याचें टेवलेलें टिपण. –क्रिवि. महिनेवार (पैसे देणें, हिशेब चुकता करणें इ०). **माहान**–वि. महिन्याचा. 'सबब रोजमरा एक माहान.' –वाडबाबा १.२७.

माहतानी––क्रिवि. ताब्यांत; सत्तेखालीं. [अर. मा–तहतानी]

माहदत–असारी––वि. लेहांकित. [फा. मवहत्–आसार्]

माहनमूळ––न. एक प्रकारचें लोणच्यांत घालावयाचें मूळ. माइनमूळ पहा.

माहबल–मक्सूद––स्त्री. विनंति [फा. मुहब्बालि मक्सूद]

माहबल–मराम––स्त्री. विनंति. [फा. मुहब्बलि मराम्]

माहसरा––पु. वेढा. 'माहसऱ्या अलीकडे तर्फेनच्या कसुरामुळें.' –थोमारो १.२२३. [अर .महसूर=वेष्टित]

माहा––वि. महान्; मोठें. 'कीर्तिनें माहादोष जाती।'–दा ४.२.२७. महत् पहा. [सं. महान्]

माहाग, माहागणें, माहागाई, माहागिरी, माहात, माहार, माहाल––महाग, महागणें इ० पहा.

माहात्म–त्म्य––न. १ महिमा; मोठेपणा; थोरवी; प्रभाव; तेज. 'निज–पद–विभवाचें काय माहात्म्य आहे।' –नरहरि गंगारत्नमाला (नवनीत पृ. ४२६). २ शौर्याचें, अद्भुत कृत्याचें वर्णन; दंतकथा, वीरचरित्र. ३ चैत्रादि महिन्यांत करावयाचीं पुण्यकर्में व त्यापासून मिळणारें पुण्य यांचें वर्णन ज्यांत आहे असे

बारा महिन्यांतील प्रत्येक महिन्यासंबंधीं वर्णनपर ग्रंथ. उदा० वैशाखमाहात्म्य, ज्येष्ठमाहात्म्य इ०. ४ पुराण; वर्णनपरग्रंथ. उदा० देवीमाहात्म्य; तापीमाहात्म्य. [सं.]

माहालदार—पु. न्हावी. 'हाडपे चोर माहालदार।' –दावि ६९. [महाली]

माहावाक्य—न. तत्त्वमसि हें वाक्य.(प्र.) महावाक्य पहा. 'माहावाक्य उपदेश भला।' –दा५.६.११. प्रज्ञानं ब्रह्म हें ऋग्वेदांतील, अहं ब्रह्मास्मि हें यजुर्वेदांतील, तत्त्वमसि हें सामवेदीय व अयमात्मा ब्रह्म हें अथर्ववेदीय अशीं चार महावाक्यें आहेत. [सं. महावाक्य]

माहि-ही—स्त्री. छत्र; उंच छत्री. –शर. 'माहि मेघडंबे सूर्यापानें।' –दा ४.५.२०. –पु. मत्स्य वगैरे सन्मानदर्शक चिन्ह; मकरध्वज. 'माहि मोर्तबे तगटी ढाला।' –सप्र२१.४३. **०दार**–वि. १ माशाचें चिन्ह असलेले निशाण धारण करणारा; मकरध्वजी. २ छत्रधर. [फा.] **०म(मु)रातब**–पु. १ मत्स्य व सोन्याचे दोन गोल मिळून होणारें व हत्तीवरून मिरवावयाचें बहुमानाचें चिन्ह. हा मान फक्त राजांना व मातबर सरदारांना मिळालेला असतो. २ मोगल बादशहाकडून महादजी शिंद्यांनीं पेशव्यांसाठीं आणिलेलीं सन्मानचिन्हें दोन मुखवटे व दोन अब्दागिऱ्या मिळून मिरवावयाचें एक राजचिन्ह. [फा. माही मरातिब] **माही(हि)मोर्तब**–न. अलंकार; सरंजाम. 'सरज्या तोरड माहीमोर्तब शिवाजीला।' –ऐपो २२. [फा.]

माहिती—स्त्री. परिचय;ज्ञान;दखलगिरी; माहितगारी. [अर. माहीयत्] **माहितगार**–वि. १ परिचित; माहिती असलेला. २ वाकबगार. [फा.] **माहितगा(गि)री**–स्त्री. माहिती. **माहीत**–स्त्री. परिचय; परिज्ञान (विद्या, गोष्टी, स्थळें यांचें). 'या प्रांतांतील काटक वगैरे माहीत यांस वाटेची व मुक्कामाची माहीत पुसत होते.' –ख ११.५७१२. –वि. १ ज्ञात; परिचित. २ जाणता; माहितगार. 'श्रीमन्त गैर–माहित व नानाप्रमाणें दुसरा कार्भारी कुणी माहीत नाहीं.' –ख १०.५५५०.

माहिरू—वि. कपाळावर तिकोनि पट्टा असलेला (घोडा). –अश्वप १.१०४.

माहिष—न. म्हशीपासून मिळणारी कोणतीहि वस्तु (दूध, लोणी, शेण इ०). [सं.]

माही—पुस्त्री. (बायकी) माघ महिना. –वि. माघ महिन्यांतील. [सं. माघ]

माही(हि)ना, माहाना—पु. मासिक पगार.–क्रिवि. दरमहा. [फा. माहाना; माहीना]

माहुटी, माहुटीचें पान—स्त्रीन. घराच्या छपराच्या शेवटास बसविलेली लांकडाची आडवी फळी; छप्पराच्या पागोळीच्या खालीं वाशाला मारलेली आडवी फळी.

माहुर—वि. मधुर; गोड. [मधुर]

माहुरा—पु. (ना.) सराव; संवय; राबता.

माहुरा-री—वि. माहूर देशासंबंधीं; (म्हैस इ०).

माहु(व्ह)रें—नअव. नदी इ०तील धरून आणलेले, विक्रीस मांडलेले मासे.

माहुली—स्त्री. एक झाड. याचीं पानें बरींच मोठीं असून त्यांच्या पत्रावळी करितात.

माहुळुंग-गी—(प्र.) महाळुंग, महाळुंगी पहा.

माहूत-द—पु. हत्ती हांकणारा, राखणारा; महात. [सं. महामात्र]

माहे—पु. महिना. हा शब्द फक्त कागदोपत्रीं महिन्याच्या नांवामागें जोडतात. उदा० माहे मोहरम; माहे चैत्र. [फा. माह] **०गुदस्त**–पु. गेला महिना. [फा. माह+गुदरत] **०गुदस्त-स्तां**–क्रिवि. गेल्या महिन्यांत. [फा. माहगुझश्ता] **०दरमाहे**–क्रिवि. महिन्याच्या महिन्यास; माह-ब-माह.

माहे—क्रिवि. मध्यें. 'गवतमी प्रवेशली जळमाहे।' [सं. मध्य]

माहेर, माहेरघर—न. १ लग्न झालेल्या मुलीच्या आईबापांचें घर; तिच्या सासरहून भिन्न असें आप्तस्वकीयांचें घर. २ (ल.) आसरा; विश्रांतिस्थान; सुखाच्या आश्रयाची जागा. 'साधुसंतांचें माहेर। बाप रखुमादेवीवर।' ३ उत्पत्तिस्थान; जन्मस्थान. 'ना तरी सकळ धर्मांचें माहेर।' –ज्ञा १.३१. ४ मायबाप. 'जरी माहेरें श्रीमंतें होतीं। तुम्हा ऐसीं।' –ज्ञा ९.३. [सं. मातृगृह; प्रा. माइघ(ह)र; गुज. माहीरुं] **म्हण** माहेराची पेज सर्वांगास तेज (घरच्या साध्या अन्नाची बरोबरी वशासहि येत नाहीं या अर्थी). **माहियेरें**–वि. मायेचें; माहरच. –शर. **०पण**–न. माहेरीं राहणें. **०वाट**–स्त्री. १ स्त्रियांच्या केसांचा उजवीकडे काढलेला भांग; डावीकडच्या भांगाला सासुरवाट म्हणतात. २ माहेरघर. **०वाशीण-वासी, माहेरकरीण**–स्त्री. लग्नानंतर आपल्या माहेरीं रहावयास आलेली मुलगी; माहेरीं आलेली स्त्री. **०वाशीण मुरडणें**–माहेरीं आलेली मुलगी परत सासरीं जातांना तिला मुरड घातलेली करंजी खावयास घालणें (म्हणजे ती मुलगी सासरहून माहेरीं लौकर परत येते अशी समजूत आहे). **०वास**–पु. लग्नानंतर मुलीचें माहेरीं राहणें.

माहेवणी—स्त्री. १ गरोदर स्त्री. 'माहेवणी प्रयत्नेसीं। चुकवीजे सेजे जैसी।' –ज्ञा १८.८६६. २ रजस्वला स्त्री. 'कीं माहेवणी पापियें। उघडी केली विपायें।' –ज्ञा १६.१४४. [सं. मांस; म. माह]

माहेश्वरधूप—पु. सरक्या, मोराचीं पिसें, रिंगणीचीं फळें, शिलारस, दालचिनी, जटामांसी, मांजराची विष्ठा, नखला, वेखंड,

केस, सापाची कात, हस्तिदंत, शिंग, हिंग, व मिरीं या सर्व वस्तू समभाग घेऊन त्यांची केलेली धुरी. स्कंदोन्माद, पिशाच्च, राक्षस व देवग्रह यांचे आवेश व तज्जन्य ज्वर यांचा नाश करण्यास ही धुरी उत्तम आहे. –योर १.३५८. [सं.]

माहो—पु. माघ मास. 'माहो शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार। केला अंगीकार तुका म्हणे।' –तुगा ४८६. [सं. माघ] **म्ह०** माहो आणि हिंवाचा लाहो.

माहोरा—पु. (व.) संवय; अभ्यास; माहुरा पहा.

माळ—स्त्री. १ फुलांचा हार; माला. २ फुलांतील पाकळ्यांचा घेर, दलपंक्ति. संख्यावाचकासह समासांत योजतात. उदा० एक माळ, दुमाळ, तिमाळ इ०. ३ रत्नें,मणी यांची माला;हार; स्मरणी. ४ (ल.) सर; हार; माला. ५ (सामा.) वस्तूंची परंपरा, साखळी (रहाटगाडग्यांतील लोटयांची, वस्तु हातोहात देण्याकरितां मजुरांची, मनुष्यांची, हरिदासांची, आळीपाळीनें काम चालविण्याकरितां याज्ञिकांची इ०). (क्रि० लावणें; लागणें). परंपरा. 'म्हणोनि वैष्णव कुळमाळ। वंदिली सकळ ग्रंथार्थी।' –एभा १.१३८. ६ विहीर इ०कांतील पाणी वर आणण्याकरितां खापेकडांचे दोन बाजूस वळलेली, लोटे बांधलेली रहाटगाडग्याची दोरी. ७ (ल) नवरात्रांतील. प्रत्येक दिवस (कारण नवरात्रांत प्रत्येक दिवशीं नवीन फुलांची माळ बांधावी लागते.) 'आजची कितवी माळ आहे?' ८ (विणकाम) गती देण्याकरितां रहाटाला व कांडी भरण्याच्या चाती'ला जोडणारा सुताचा पट्टा, सुतळी. ९ दोराची शिडी. 'दिल्लीचा किल्ला अपेशी, पांच सात रोजांत हल्ला करून माळा लावून हस्तगत केला.' –भाब ९१. [सं. माला] (वाप्र.) **०आंखडणें**–(कों.) रहाटगाडग्यास एक दांडकें लावून त्यावर माळ अडकवून ठेवणें (रहाट चालविण्याची आवश्यकता नसतांना माळ पाण्यांत राहून कुजूं नये म्हणून). **०गोळ्याची**–(ढोवर म्हैस खेळ) मेलेल्या (बाद झालेल्या) दोन दोन गड्यांनीं एकमेकांचा हात धरून बाकीच्यांस शिवावयास जाणें. **०घालणें**–१ लग्नांत वरल्याची खूण म्हणून वराच्या गळ्यांत वधूनें व वधूच्या गळ्यांत वरानें माळ टाकणें. 'लग्नार्थी हिंडतां भूमंडळ। त्यासीं राजकन्या घाली माळ।' २ पंढरीचा वारकरी होणें; दर शुद्ध एकादशीस पंढरीची वारी करणें (पंढरीचे वारकरी संप्रदायास अनुसरून वारी स्वीकारल्यावर गळ्यांत तुळशीच्या मण्यांची माळ घालतात. यावरून). **संसाराची-कामाची)-माळ घालणें-पडणें**–संसाराची, कामाची व्यवस्था एखाद्याच्या गळ्यांत टाकणें, पडणें. एखादें काम एखाद्याकडे सर्वथैव सोंपविलें जाणें. 'मराठी काव्याचें काम करणारा दुसरा कोणी पुरुष तयार असता, तर त्यांनीं त्याची माळ आनंदानें त्याच्या गळ्यांत घातली असती.' **०घेवन बसप**–(गो.) एकसारखी वाट पाहणें; धोसरा काढणें. **एका माळेचे मणी**–पुअव. (एका माळेंतले सगळे मणी सारखे असतात. यावरून ल.) एकासारखे एक (वाईट) लोक. सामाशब्द– **०काठी**–स्त्री. रहाटगाडग्याची माळ इकडे तिकडे सरूं नये विवक्षित जागेंतून जावी म्हणून विहिरींत आडवा बसविलेला लाकडाचा दांडा. **०खंड**–न. (कों.) १ रहाटगाडग्याच्या भोंवतालची कांहींशी मोठी माळ. २ जुन्या झालेल्या माळेंतून खापेकडे काढून टाकल्यावर तिच्या राहिलेल्या दोऱ्या; तुकडे. यांचा दोऱ्यांप्रमाणें उपयोग करितात. [माळ+खंड] **माळका**–स्त्री. १ माळ; ओळ; रांग; परंपरा (वस्तु, सजीव प्राणी यांची). (क्रि० लावणें; लागणें). २ (कुणबाळ) गप्पागोष्टी. [सं. मालिका] **माळणें**–सक्रि. १ डोक्यांत फुलें, फुलांची माळ घालणें. 'गौरकांति तारुण्यभार। माळिले सुगंधपुष्पाचे हार।' –सिसं ४७.१५८. २ माळेंत ओंवणें (फुलें); माळ गुंफणें. **माळप**–सक्रि. (गो.) डोक्यांत घालणें (फुलें). **माळाकार**–पु. माळी; माळा करणारा. 'माळाकार तरूंचें घेतो फळ पुष्प जेवि तेंवि नृपा।' –मोसभा ४.२४. [सं. मालाकार] **माळादंड**–पु. फुलाचा हार. 'कंठी रुळताति अलौकिक। माळादंड।' –ज्ञा ११.२२०. **माळिकाघटी**–स्त्री. रहाटगाडगें; घटीयंत्र. 'संसारकुपाचां पोटीं। कर्म माळिका घटी।' –ऋ ३०.

माळ—पु. १ खडकाळ किंवा नापीक असा भूमीचा उंच व विस्तृत प्रदेश; मैदान; डोंगरमाथा; सपाटी; पठार. 'गोंवऱ्या आणाया जावें माळावरी।' –रामदासी २.१३८. २ घराचे वरचा लहान मजला. याची जमीन (तक्तपोशी) कडयांच्या ऐवजी बांबूचे तुकंड आडवे बसवून त्यांची केलेली असते म्हणून हा माडीहून भिन्न आहे; माळा. –वि. ओसाड प्रदेश. [सं. माल्यम्=पठार] (वाप्र.) **माळावरचा घोंडा, माळघोंडा**–पु. १ एकदां झालेला व्यवहार परत फिरणार नाहीं अशा अर्थाचा भाषणसंप्रदाय. खरेदी करणाराच्या स्वाधीन पशु, जिन्नस इ० करतांना विकणारा इसम हा शब्द योजतो. खारीमाती पहा. २ टोणपा; मट्ट मनुष्य. **माळावरची माती**–(ल.) वाटेल त्यानें वाटेल तसा उपयोग करावा अशी वस्तु. **म्ह०** माळावरची माती कोणीहि उचलावी. सामाशब्द– **०जमीन-रान**–स्त्रीन. खडकाळ, नापीक असा उंचवट्यावरील जमिनीचा विस्तृत भाग; मैदान; सपाटी; रान. २ (जमाबदीसंबंधी) डोंगराच्या चढणीवरील भुकिस्त पण लागवडीची जमीन. [माळ+जमीन] **०ढोंक**–पु. एका जातीचा पक्षी. **०घोंडी**–स्त्री. माळावरील दगड. **०पटणी**–स्त्री. भाताची एक जात. **०भूमि-भोई**–स्त्री. डोंगराळ भाग. **०मुरू(र)ड-मुरडाण**–पुन. माळ व त्यांतील ओढ्याच्या वळणाखालील वाकडीतिकडी जमीन. 'काळीनें झोका दिल्हा पण माळ मुरड बरें पिकलें.' [माळ+मुरडणें] **०रान**–न. माळजमीन. [माळ+रान]

०वट-वद्–वि. १ माळजमीन फार असलेला (देश, प्रांत). २ माळ किंवा माळजमीन यांच्या सारखा–संबंधी (भूमि, जमीन). [माळ+वट] **०शिकारी–च्या**–वि. (हरिण, ससे, कोल्हे इ०. कांची) माळावर शिकार करणारा. **०शिकारी हरिण**–न. माळावर ज्याची शिकार करतात असें हरिण; हरणाची एक जात. [माळ+शिकारी+हरिण] **०शेण**–न. माळावरचें शेण; रानगोवरी; रानशेणी.

माळ—पु. (बागलाणी) बोगदा.

माळगी—स्त्री. (व.) कोनाडा. हा शब्द लिंगायत वाणी लोकांत वापरतात.

माळंवचा—पु. शेतांत पाखरें राखण्यासाठीं केलेला माळा. माळोंचा.

माळवान्—स्त्री. (हेट. नाविक) पश्चिम दिशा; बाहेरची बाजू. [मावळत]

माळवी, माळवाई—वि. माळवा प्रांतांतील. [सं. मालव] **माळवी गोखरू**–पु न. एक वनस्पति.

माळवें—न. बागाईती जिन्नस; मळ्यांत उत्पन्न केलेला भाजीपाला. [मळा]

माळसात—स्त्री. १ भाजीपाला विकण्याची शहरांतील जागा; मंडई. २ (बाजारांतील, शहरांतील) माळ्यांची आळी ३ माळ्यांची जात.

माळहट—पु. भाजीबाजार; मंडई. [माळी+हाट=बाजार]

माळा—पु. १ घराच्या तुळयांवर लाकडी कडया आडव्या पसरून केलेली जागा; मजला; छपराखालीं काढलेली टेंगणी, बसकट माडी. २ शेत राखणाऱ्या मनुष्यास बसण्याकरितां शेतांत केलेली उंच माचोळी; शेतांतील पांखरें हाकण्याचें ठिकाण. ३ टेहळणीची माचोळी; शिकारीकरितां झाडावर केलेली जागा. ही झाडाच्या १२–१३ हात उंचीवर खाटलें बांधून करतात. माळ्यावर कोण आहे हें जनावरास दिसूं नये म्हणून झाडाच्या डाहाळ्या तोडून त्या माळ्याच्या चौफेर व खालील बाजूस लावतात. ३ पहाड; पायाड (घर बांधावयाच्या वेळचा) [मच्] **माळवद**–न. १ घराच्या तुळवंटावर कळकाच्या कांबी आडव्या बसवून त्यांवर माती पसरून केलेली सपाट जमीन; धाबें. 'भिंती माळवदें पडती।'–दा ३.७.१४. २ पोटमाळा; छप्पर. **माळवद-दी**-वि. १ असली छावणी असलेलें (घर). २ पोटमाळा असलेलें (घर.) [माळा+वत] **माळोत्रें**–न. (कों.) माळ्यावर जाण्याचे दार. **माळोद**–न. माळवद पहा.

माळी—स्त्री. १ खाण 'उपनिषदर्थांची माळी–। मार्जी खांडिली।'–ज्ञा १८.३५. २डोंगर पठारावरील लागवडीची जमीन; पठार. ३ माळा; वरचा मजला; माळ्यावरची खोली; माडी. ४ झाडाची आडवी फांदी. 'आड फुटती माळिया।'–ज्ञा१५.१५०. **माळिवरा**–पु. माडी. 'ओवरा ओसरी माळिवरा।'–वसा १४.

माळी—पु. फुलारी; माळाकार; बागाइत्या; बागवान. २ माळी जातींतील एक व्यक्ति; खंडानें अगर अर्धलीनें शेती करणारा शेतकरी. [सं. माली] **म्ह**० माळ्याची मका आणि कोल्ह्यांचें भांडण (दोघांपैकीं एकाचाहि संबंध नसणाऱ्या मालाविषयीं दोन पक्षांचें भांडण या अर्थी योजतात). **माळगंड**–पु. (निंदार्थी) माळी. **माळव(वा)डा, माळेआळी**–पु.स्त्री. माळ्यांची वस्ती असलेला पुरा, मोहला, वाडा (गांवांतील, शहरांतील). [माळी+वाडा] **माळीण**–स्त्री. १ माळी जातीची स्त्री. २ नाकांत उद्भवणारी दुःखदायक पुटकुळी. फुलांचा वास घेतल्यानें ही जाते. **०म्हेतर**–पु. (व्यापक) माळी किंवा त्याच्या वर्गातील इतर लोक. **माळेवोळ**–स्त्री. भाजी विकणाऱ्या माळ्यांचा बाजार. 'मोतियांची गोणी माळेवोळीं नेली।'–तुगा ३०६८.

माळीक—वि. (बे.) सारखा.

माळुंग-गी—स्त्रीन. महाळुंग पहा. [सं. मातुलुंग]

माळुंड—न. (गो.) दुतोंडें; मांडूळ.

माळुंड महिना—पु. (गों.) पौष महिना.

माळूं—पु. मृदंगाच्या तोंडावरचें कातडयाचें कडें किंवा वादी.

माळोंचा—पु. १ शेतांतील पिकावरील पक्षी हांकलण्यासाठीं शेतामध्यें केलेला माळा. २ जिन्नस, धान्यांचीं पोतीं ठेवण्याकरितां खोलीच्या कोंपऱ्यांत केलेली माचोळी. ३ घराच्या वरचा मोळा. ४ (व.) टेंगणा माळा. [माळा]

माळोमाळ—क्रिवि. रानोमाळ; दशदिशा 'भयाभीत गज अश्व शूर शत्रुसैन्य माळोमाळीं।'–ऐपो २६८. [माळ]

माळोवाळीं—क्रिवि. चोहोंकडून. 'एवं माळोवाळीं उत्तरोत्तरु।'–ज्ञा १५.१९८.

माळ्या—स्त्री. राव; काकवी.

माक्षिक—न. १ एक विशिष्ट खनिज पदार्थ. याचे सुवर्ण व रौप्य माक्षिक असे दोन भेद आहेत. अशक्त माणसास शक्ति वाढण्यासाठीं हें देतात. [सं.]

माक्षिक—न. मध. –वि. मधमाशा किंवा माशांसंबंधीं. [सं. मक्षिका]

मिआ-आं—सना. मीं; म्या. प्रथमपुरुषवाचक मी या सर्वनामाचें तृतीयेच्या एकवचनाचें जुनें रूप. 'तेआं साष्टांगीं नमस्कारु केला मिआं।'–दाव ४. [मी]

मिआना—स्त्री. एक गुन्हेगाराची जात. ही चालण्यांत मोठी चपल आहे. हे लोक रात्रींतून ४० ते ६० मैल चाल करून चोरी करून उजाडण्यापर्वी घरीं येतात. –गुजा ८२.

मिख—न. मिष; सोंग; बतावणी; वेषांतर 'ना तें सांवळें आकाश पाल्हलें। लोहांचेनि मिखें।'–शिशु १०२०. [सं. मिष]

मिचकट—वि. घाणेरडें; शिडबिडीत (भांडें इ०). **मिचकटणें**–अक्रि. (भांडें, हात इ०) खराब होणें; वाईट होणें; बरबटणें; लिडबिडणें.

मिचकट—वि. काळाकभिन्न; काळा कुळकुळीत (काळा या रंगाचा अतिरेक दर्शविण्यासाठीं काळा या शब्दास जोडून योजतात). [सं. मषी; म. मस]

मिचकणें, मिचकाव(कवि)णें—सक्रि. १ (डोळे, तोंड इ०) त्वरेनें मिटणें आणि उघडणें; (डोळ्यांची) उघडझांप करणें; एखाद्याला एखादी खूण करण्याकरतां डोळे झांकून उघडणें: नेत्रसंकेत करणें. २ अतिश्रमामुळें, दुःखामुळें डोळ्यांची एकसारखी उघडझाप करणें. 'कासावीस गरुड होत। नेत्र मिचकावून मुख पसरित।'–ह ३१.११७. [सं. श्मीलनम्] **मिचकावणी**–स्त्री. डोळे मिचकावण्याची क्रिया; निमिषोन्मेषण. **मिचका**–वि. मिचमिचीत डोळ्याचा (मनुष्य); एकसारखी उघडझांप होणारा (डोळा). **मिचक्या-मिचमिच्या**–वि. डोळे मिचकावण्याची संवय असलेला; डोळे मिचकावणारा.

मिचकूट—न. (गो. खिस्ती) लोणचें.

मिचकूट, मिचकुटणें—मिचकट, मिचकटणें पहा.

मिचमिच—स्त्री. १ जलद खातांना होणारा आवाज; मिटकी; जबडयाची त्वरित उघडझाक (क्रि० करणें; वाजणें). २ डोळ्यांची उघडझाप. [ध्व.] **म्हo** खाणें थोडें आणि मिचमिच बहुत. **मिचमिच-मिचां**–क्रिवि. १ मिटक्या मारून; खातांना तोंडाचा आवाज करून. २ उघडझांकीनें; मिचकावून. (डोळे इ०). **मिचमिचीत**–वि. १ बिलबिलीत; बेचव; चांगल्या तऱ्हेनें न शिजविलेलें (अन्न). २ मिचका (डोळा); मिचक्या डोळ्याचा (माणूस).

मिजरफी, मिजराफ—स्त्री. तंतुवाद्य वाजविण्याकरितां बोटांत घालावयाची एक प्रकारची तारेची आंगठी; नखी. [फा.]

मिजागरें-री—नस्त्री. बिजागरी-रें पहा.

मिजाज-स–स्त्री. दिमाख; ताठा; ऐट; डौल; अभिमान; २ तब्येत; प्रकृति. ३ बुद्धि. 'तस्मात् याची मिजाज कायम नाहीं.'–ख ८.३९१५. [अर. मिझाज्] **म्हo** मिजाज-स बाद शहाची आणि अवलाद भडभुंजाची. (वाप्र.) **०जाणें**–इतराजी होणें. **०ठेवणें-राखणें**–तब्येत सांभाळणें. **मिजाशींत येणें-चढणें**–गर्वानें फुगणें; डौलांत असणें. सामाशब्द– **०खुशी**–स्त्री. खुशाली. **०खोर-दार, मिजाजी-शी-सी**–वि. १ मिजाशीनें वागणारा; चढेलपणानें किंवा प्रतिष्ठितपणानें वागणारा; गर्विष्ठ. २ नाजुक प्रकृतीचा; तब्यती; लहरी. ३ डामडौलाचें; थाटमाटाचें. **०मान्दगी**–स्त्री. प्रकृतीचें अस्वास्थ्य. 'राजाची व रघोत्तमराव यांचेही मिजाजमान्दगीकरितां राहिले.'–रा ५ १५७. **मिजाण**–स्त्री. १ तब्यत; प्रकृति. २ चोखंदळपणा; लहर. [फा.]

मिजात-द, मिजाती-दी—मिजाज, मिजाजी पहा.

मिजान—स्त्री. १ तुला; प्रमाण. २ (व.) एकंदर बेरीज; एकूण बेरीज. [अर. मीझान्]

मिज्रीकम, मिद्रीकांव—स्त्री. (गो.) सब्जा; एक वनस्पति.

मिटका—पु. ओठांची मिटलेली स्थिति; (डोळे, फुलें, कागद, पानें इ० ची) चिकटलेली, मिटलेली, दाबून बसलेली स्थिति; चिकटणें. (क्रि० बसणें; पडणें). २ मिठी. (क्रि० मारणें). 'कमरेस मिटका मारला.' [मिटणें] **मिटकावणें**–सक्रि. १ घट्ट बंद करणें; दाबून धरणें (डोळे इ०). २ कान टवकारणें, उभारणें. **मिटकी**–स्त्री. एकमेकांस चिकटलेले ओंठ उघडतांना होणारा आवाज; पदार्थ खातांना होणारा मिट्ट मिट्ट ऐसा आवाज. **मिटक्या मारणें**–प्रेमानें गोडी चाखणें. 'तो नित्य तृप्त भगवान् विदुरगृहीं भोजनांत दे मिटक्या।'–भोउद्योग ७.७६. २ (ल) आशा धरून बसणें; जिभल्या चाटणें **मिटमिट**–स्त्री. मिटकी; खातांना तोंडाचा होणारा आवाज. **मिटमिट-मिटां**–क्रिवि. १ मटमटां; मिटक्या मारून. २ मिचकावीत; उघडझाप करीत. **मिटमिटीत**–वि. १ नीरस; बेचव; कवकवीत (भाषण, खाद्य, काम इ०). २ क्षुल्लक; अत्यल्प; तुटपुंजें (देणगी, खर्च). **मिटमिट्या**–वि. कृपण; कवडीचुंबक. [ध्व.] **म्हo** मिटमिट्या शेंबूडचाट्या.

मिटणें—सक्रि. १ (ओंठ, हाताची मूठ, पापण्या, दाराचीं झडपें, फुलाच्या पाकळ्या इ०) बंद होणें; एकत्र होणें. २ (ल.) बंद करणें; शेवटास नेणें; संपविणें; संपणें. (भांडण, तंटा). ३ पुसून टाकणें; घालविणें. ४ –अक्रि. (रोग किंवा आजारीपणा) संपणें; नाहींसें होणें.

मिटान—वि. (व.) मेणचट; ओशट; तेलकट.

मिटुका—पु. नांगराचें रुमणें धरण्याकरितां त्यास बसविलेला लांकडी दांडा.

मिटें—न. (गो.) गोडें पाणी. [मिष्ट]

मिट्टी—स्त्री. (विटीदांडूचा खेळ) डाव्या किंवा उजव्या मुठीवरून विटी उडवून दांडूनें तिला ठोला मारण्याची क्रिया; मुंड (क्रि० मारणें). [सं. मुष्टि]

मिठ—न. (कों.) मीठ पहा. **०पाणा**–पु. मिठाणा; भाजलेले वाल इ० कडधान्यें यांची मीठ घालून शिजविलेली उसळ. **०पणी**–न. मिठाचें पाणी. –स्त्री. (राजा.) स्वयंपाकाला लागणारी मीठ ठेवण्याची परडी, पाळें. [मीठ+पाणी] **मिठागर**–न. मीठ तयार करण्याची जागा; मिठाचें शेत [मीठ+आगर] **मिठागरी**,

मिठागीर–मीठ बनविण्याचा धंदा करणारी आगरी जात; या जातींतील व्यक्ति. **मिठागरीण**–स्त्री. मिठागरी जातीची स्त्री. **मिठाणा**–पु. खारवून शिजविलेलें कडधान्य. –पु. खारी डाळ. **मिठाणें**–न. मीठ ठेवण्याचें मातीचें भांडें, परळ. **मिठाभोवो**–न. (गो.) १ मिठाचें पक्वान्न. २ (ल.) निरुपयोगी वस्तु.

मिठण, मिठाण—न. गर्दी; एकत्र जमणें; अनेक माणसांचा समुदाय; विकार गर्दी. (क्रि० घालणें; पडणें; होणें) [मिटणें]

मिठा, मिठडा—वि. गोड; मिष्ट; रुचकर; मिठास. [सं. मिष्ट; प्रा. मिट्ठ] **मिठाई**–स्त्री. खाऊ, पेढे, बर्फी इ० साखरमिश्रित गोड पदार्थ. [हिं.] **मिठा ठक**–वि. गोडगोड बोलून फसविणारा. **०बार**–पु. पहिला बार, बहर; पहिलें पीक. ह्याच्या उलट खट्टाबार **०लिंबु**–न. साखरलिंबू. **मिठांश–शु**–पु मिष्टांश; गोडी. 'हें न निवडे मिठांशु । अमृतीं जेवी ।' –अमृ ५ ७. **मिठास**–स्त्री. स्वादिष्टपणा; माधुरी; मिष्टता; गोडी. **मिठा(ट्ठा)स, मिट्ठा**–वि. गोड. **मिठाक्षर**–न गोड शब्द. **मिठी**–स्त्री. १ (गोड पदार्थ फार खाल्ल्यानें उत्पन्न झालेली) अरुचि; वीट; तिटकारा, शिसारी. (क्रि० बसणें). २ आवड; छंद; उत्कट इच्छा. [सं. मिष्ट] **०पडणें**–गोडी लागणें; ऐक्य पावणें. **मिठेभावल**–पु. (व.) गूळ व गरम मसाला घालून केलेला भात; गूळभात. [हिं.]

मिठी—स्त्री. १ दृढालिंगन; पकड. (क्रि० बसणें) २ ऐक्य; लीनता; लय. 'ते उभय बोधांची मिठी । अक्षरु पुरुषु ।' ज्ञा १५.५१४. ३ संकोच; बंदी. 'कानाची नुघडी निमटली मिठी ।' –एभा १५.१४. ४ आंठी. 'भ्रकुटीम घालून मिठी ।' –दा ३. १०१८. ५ (अव.) पाऊस; झडप; उडियावर उडया. 'यंदा आंब्यावर मिठया पडल्या.' **०देणें**–बंद होणें; मिटणें. 'चंद्रोदयीं कमळवनें । मिठी देती ।' –ज्ञा १८.७३५. **०मारणें**–आलिंगन देणें; हातांनीं एकमेकांस बळकट धरणें **०सात्रकी**–स्त्री. घोडयाची एक चाल 'मिठी सात्रकीची मर्यादा अशी आहे कीं घोडयाचे पुढले पाय सात्रक आणि मागचे दुडकीच रहावे.' –अश्वप १.१९४.

मिठया—पु. मुठया. मिटुका पहा.

मिडकणें—अक्रि. आशाळभूत होणें; धावावणें; जीव टाकणें; भुणभुण लावणें; तळतळणें. 'अन्नासाठीं मिडकलीं । झडा टाकिती ।' –दा ३.५.७. [ते.]

मिडगण, मिडोगण–णी—स्त्री. स्तुति. 'काश्मीरीं न करावी । मिडगणें जें ।' –ज्ञा १३.३१९.

मिडगणें—न. फराळ; उपहार.

मिडमिडा—वि. मिणमिणा; अंधुकपणें जळणारा (दिवा). [ध्व.]

मिडवा मिरवणें–दाखविणें—मिरवा मिरवणें पहा.

मिडी—स्त्री. (बे.) वांगी, पडवळ, दोडका, वाळुक इ० चें कोवळें फळ. [का.]

मिण(न)धा—वि. १ मिंधा पहा. 'मिणधा त्यापाशीं वेद वादु ।' –एभा १३.४६५. २ कपटी. [मिंधा]

मिणमिण—स्त्री. हलक्या किंवा खोल आवाजाचें भाषण; कुरबुर; कुरकुर. (क्रि० लावणें; करणें). [ध्व.] **मिणमिणा**–क्रिवि. मंदपणें; अंधुकपणें. **म्ह०** मिणमिण दिवा कृपणाची सेवा. **मिणमिणणें**–अक्रि. १ मंद जळणें; अंधुकपणानें जळणें. २ (ल.) हलक्या आवाजानें किंवा खोल स्वरानें, रडकें रडकें, स्तिमितपणानें बोलणें **मिणमिणा–ण्या**–वि. १ मंद; क्षीण; अंधुक; बारीक ज्योतीचा (प्रकाश). २ हळु बोलणारा, बारीक आवाजाचा. ३ सुस्त; मंद; रेंगाळणारा; मेंगलगाडया. ४ (ल.) मनात कुढणारा; आंतल्या आंत जळफळणारा. **मिणमिणीत**–वि. मंदपणें जळणारा; अंधुकपणें प्रकाशणारा.

मित—वि. १ मोजलेला; मोजका. २ (ल) मध्यम; माफक; योग्य प्रमाणांत असलेला; जितक्यास तितका; थोडका. [सं. मा= मोजणें] साभाशब्द– **०पान**–न. प्रमाणशीर दारू पिणें; मोजकें पिणें. **०भाषण**–न. स्वल्प किंवा मोजक्या शब्दांत बोलणें. **०भाषी**–वि. मोजकें बोलणारा; वायफळ बडबड न करणारा. **०व्यय**–पु. मोजका खर्च; काटकसर. **०व्ययी**–वि. काटकसरीनें खर्च करणारा. **मिताक्षरा**–स्त्री. याज्ञवल्क्य स्मृतीवर विज्ञानेश्वरानें लिहिलेली टीका. **मिताक्षरी**–स्त्री. एक सांकेतिक भाषा. हींत अ, आ या स्वरांच्या बाराखडीच्या जागीं ककाची, खच्या जागीं गची, घच्या जागीं ङची बाराखडी व च वर्गाच्या ठिकाणीं ट वर्ग, त वर्गाच्या ठिकाणीं प वर्ग व य र ल व ळ यांच्या जागीं श ष स ह क्ष या बाराखडया परस्पर व्यत्यासानें होतात. **मितला**–वि. परिमित; थोडें; अल्प, मोजकें; माफक. 'मितलां बोलीं बोलिजे । अर्थप्रमय न सोडिजे ।' –स्वादि १.५.९२.

मिति–ती—स्त्री. १ माप; परिमाण; वजनमाप; संख्या; गणती; गणना. २ परिमितपणा; माफकपणा; प्रमाण; ठराविक रकम; प्रमाणशीर गोष्ट; निश्चित संख्या. 'त्याचे पातकासी नाहीं कीं हो मिती ।' ३ तिथि; दिवस (चांद्रमासाप्रमाणें). ४ काळ; मर्यादा. 'यज्ञारंभ उद्यां, सहा दिवस या कर्मा मिती तोंवरी ।' –आय १६. ५ कर्जाऊ रकमेवरील व्याज. 'शेंकडा चार आणे आम्हास मिति पडती.' –क्रिवि. हळू. –शर. [सं.]

मित्र—पु. १ स्नेही; दोस्त; सखा. २ सूर्य. 'उठि लवकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला ।' –घनश्यामाची भूपाळी. –वि. मित्रत्वाचा; दोस्तीचा; सलोख्याचा; स्नेहाचा. (समासांत) मित्रलाभ, मित्रवत्सल, मित्रयुद्ध इ० [सं.] **०तोडणें, मैत्री**

तोडणें–स्नेह, मित्रत्व सोडणें **०तनया**–स्त्री. १ यमुना. २ सावित्री. **०त्व**–न. प्रेम; स्नेह; मैत्री. **०द्रोह**–पु मित्राशीं केलेला द्वेष; मित्राशीं बाळगलेला वैरभाव. **०पत्र, मित्रातपत्र**–न अबदागीर; सूर्यपान. 'झलकती चामरें मित्रातपत्रें।' –रावि २६.५५. [मित्र+पत्र; मित्र+आतप+त्र] **०भाव**–पु. मित्रत्व; मैत्री; सख्य. **०वार-वासर**–पु. रविवार; आदितवार **मित्राचार**–पु. स्नेह; मैत्री. 'तुम्हासि करावया मित्राचार।' –भारा-किष्किंधा २.६. [मित्र+आचार]

मिथः—क्रिवि. आपसांत; परस्पर; एकमेकांत. [सं.] **मिथणें**–अक्रि. १ एकमत करणें; संगनमत करणें. २ एकत्र मिळणें; जुळणें

मिथुन—न. १ जोडी. २ युग्म; जोडपें; स्त्री आणि पुरुष. ३ समागम; स्त्रीपुरुषांचा संग. ४ एकी. ५ बारा राशींतील तिसरी रास. हींत मृग नक्षत्राचे दोन चरण, आर्द्रा पूर्णनक्षत्र आणि पुनर्वसु नक्षत्राचे तीन चरण यांचा समावेश होतो. [सं.]

मिथ्या-थ्य—वि.क्रिवि. खोटें; असार; नश्वर; अवास्तविक –न. खोटी माया. 'मना सर्वथा मिथ्य मांडूं नकोरे।' –राम १९ [सं.] **मिथ्यात्मा**–पु. देह. **मिथ्यादृष्टि**–स्त्री. मिथ्या ज्ञान; नास्तिकता. **मिथ्यापवाद-अभिशाप-आरोप**–पु. निष्कारण देण्यांत येणारें दूषण; खोटा आरोप, आळ. **मिथ्या वग्रह, मिथ्यात्वग्रह**–पु खोटें मानणें [सं.]

मिंधा—वि. १ ओशाळा; दबेल; उपकारामुळें दाबला किंवा बांधला गेलेला. २ लज्जित; लाजलेला. ३ पूर्वीच्या बाळंतपणानंतर विटाळशी न होतां पुनः गर्भार राहून झालेलें (मूल); अशा तऱ्हेची गर्भवती (स्त्री). उदा० मिंधी गर्भार; मिंधी बाळंतीण. मिंध्या मुलांना विजेपासून भीति असते अशी समजूत आहे. उदा० 'बाण कैसा लागला सतेज। जैसी मिंध्यावरि पडे वीज।' **मिंधे राहणें-असणें**–विटाळशी न होतां गर्भार राहणें–असणें. **मिंधें होणें**–ओशाळा होणें; उपकारबद्ध होणें.

मिनणें—एकत्र होणें. मीनणें पहा.

मिन(न्न)त, मिनत, मिनतमाना, मिनतवारी, मिनत्वारी, मिनती—स्त्रीपु स्त्री. विनंति; अर्जे; मनधरणी; विनवणी; आर्जव. 'जाबतेखानानीं मिन्नत करावयास वकील पाटविला आहे.' –दिमरा १.२७. [अर. मिन्नत=कृपा, उपकार] **मिनतीनें, मिनतवारीनें, मिनतवार, मिनतीवार**–क्रिवि. काकुळतीस येऊन केलेल्या विनंतीनें; मनांत नसतां केवळ अजिजीस व भिडेस बळी पडून, मेहेरबानी म्हणून.

मिनमेख—क्रिवि. (कागदोपत्रीं) बिनशर्त; अटीशिवाय; मर्यादा न घालतां; पूर्णपणें; सर्वस्वी (हुकूमनामा, फैसला, जाब इ०).

मिनहु-हू. मिन्हु—क्रिवि. वर सांगितलेल्या महिन्याचा; त्याच महिन्याचा; चालू महिन्याचा. 'नववे जमादिलावरचीं पत्रें बेबिसावें मिन्हूस सादर झालीं' –पया २१०. [अर. मिन्हुव]

मिना—क्रिवि. वजा; हिशेब करतांना कमी केलेला. 'शंभर रुपये देणें त्यांत तेतीस मिना घातले.' [अर.]

मिना—पु. कांचेचा मुलामा; चांदीच्या दागिन्यावर बसविण्यांत येणाऱ्या हिरव्या दगडाचा पातळ रांधा. [फा. मीना] **०कार-गार, मिनेगार-मिनेकार**–पु. मिन्याचें काम करणारा. –वि. मिना केलेलें. 'पांच मण्याचा द्राक्षघडवजा सोन्याचें सुतांत बांधीव दाडी मिनेगार बाबत जवाब पोलादजंग पैकीं' –बाडसमा २.५५. [फा. मीनाकार] **०कारी, मिनेकारी, मिनेगारी**–स्त्री. मिन्याचें काम. [फा. मिनाकारी] **मिनेदार**–वि. मिन्याचें काम ज्यावर केलें आहे असा; नक्षीदार 'गोठ हातसर, जत्रे खिजमत्या मिनेदार कीं चुडे।' –प्रला ११८.

मिनि(नी)ट—न. १ तासाचा साठावा भाग; क्षण. २ टिपण; टांचण; लेख. 'केक्तावलीवर रावबहादुरांनीं जें मिनिट लिहिलें आहे त्याच्या शेवटच्या वाक्यांत गुणसर्वस्व दाखल केलें.' –नि ७९४. ३ (डिग्रीचा अंशाचा) साठावा भाग. ४ दाव्याचा, खटल्याचा निकाल. [इं.]

मिनिस्टर—पु. दिवाण. [इं.]

मिनी—स्त्री. (कों.) स्त्रीचा स्तन; मिमी.

मिन्कबल—क्रिवि. पूर्वी. [फा.]

मिन्जुमला—क्रिवि. एकंदरीनें. [फा.]

मिन्वाद–क्रिवि. यापुढें. [फा.]

मिंबर—न. व्यासपीठ. 'मशिदीच्या मिंबरचा दगड बसविण्याचा समारंभ सातारा येथें झाला.' [अर.]

मिया-यां—सना. म्यां; मीं, मिआं पहा. –क्रिवि. माझ्याकडून. 'स्वामी जें पाप प्रमादा। तंव जोडिलें मिया।' –ऋ ५३.

मिया—पु. मुसलमान गृहस्थ. [हिं.] **ग्रह०** मिया मूठभर दाढी हातभर. **०मल्लार**–पु. (संगीत) एक राग यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. अवरोहांत धैवत वर्ज्य. जाति संपूर्ण–षाडव. वादी मध्यम; संवादी षड्ज; गानसमय मध्यरात्र. **०सारंग**–पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद, हे स्वर लागतात. जाति षाडव–षाडव, वादी ऋषभ, संवादि पंचम. गानसमय मध्यान्ह.

मियाद—स्त्री मुदत. [अर. मीआद=वायद्याचें स्थळ अगर वेळ] **मियादी**–वि. मुदतीची; कांहीं शर्तीवर दिलेली.

मिरका धनगर—पु. फक्त शेळ्यामेंढ्यांचा कळप बाळगणारा धनगर. याच्या उलट खिल्लारी धनगर=गुरें–ढोरें, शेळ्यामेंढ्या बाळगणारा गुराखी.

मिरकूट—न. एक क्षुद्र जंतु; डांस; मच्छर.

मिरग—पु. (कु.) मृगनक्षत्राचे दिवस [मृग अप.] **मिरग्या**–पु. (व.) मृगनक्षत्रांत उत्पन्न होणारा सपक्ष किडा; मृगकिडा.

मिरगिटाण—स्त्री. तेल, तूप इ० स्निग्ध पदार्थ जळल्या-करपल्यामुळें सुटणारी घाण.

मिरगी, मिर्गी, मिरघी—स्त्री. १ फेपरें; अपस्मार; घुरें. २ घेरी; भोंवळ; झीट. [हिं. उरिया–मेरिआ] **०वर येणें**–क्रुद्ध होणें; रागांत येणें; संतापणें.

मिरची—स्त्री. एक झाड व त्याचें फळ. हें झाड कमरेइतकें उंच होतें. मिरची हिंदुस्थानांत सर्वत्र होते. हिच्या जाती:–लवंगी, भोपळी, बुटकी, बुगडी, भाजीची, धारवाडी, पांढरी इ०. २ एक मुलींचा खेळ. [सं. मरिच] (वाप्र.)(**अंगाला, नाकाला**) **मिरच्या लागणें–झोंबणें**–चडफडाट होणें; चरफडण **मिरबोंडी–मिरची**–स्त्री. लहान हिरवी मिरची; कोंवळी मिरची. **मिरशांग, मिरसेंग**–स्त्री. (गो. कु) मिरची; (राजा.) मिरसांग.

मिरजाई—स्त्री. गुन्हेगार जातींत स्त्रिया चोळीवरून घालतात तो आंगरखा. –गुजा ११५.

मिरजी—वि. मिरजेचा; मिरज येथील (रुपया, तंबाखू इ०).

मिरजोळी—स्त्री. एक औषधी वेली; ही वृक्षाच्या ढोलींत उगवते; हिचीं पानें मोठीं व मिरवेलीच्या पानासारखीं असून त्यांनां उग्र वास येतो. पानांचा रस नाकांत घातला असतां शिंका फार येतात.

मिरधा, मिर्धा, मिरध्या—पु. १ खेडेगांवचा एक अधिकारी; चौगुला. २ दहा शिपायांचा नाईक; भालेकऱ्यांचा नाईक; जासुदांचा नाईक; मरचोपदार. 'राजश्री प्रधान याजकडे तुलाराम मिरधे याजबरोबर पत्र पाठवून.'–शारो ८. ३ (व) गोंड लोकांतील धार्मिक कृत्यें करणारा मुख्य; धर्माधिकारी (यावरून लक्षणेनें) प्रमुख मनुष्य; पुढारी. [फा. मीर्दह्]

मिरपु(मु)टणें—उक्रि. १ वाढ खुंटणें; खुरटणें. २ थांबविले जाणें; भयोत्साह होणें; खुंटणें; रुसणें.

मिरमिटा—पु. १ शोपा आंबा. २ शोप्या आंब्याचा वास. –वि. शोपा (वास); वडीशोपेसारखा वास असलेला [मिरमिर?]

मिरमिर—स्त्री. तिखट पदार्थ खाल्ल्यानें जिभेस उत्पन्न झालेली जळजळ; चुरचुर. [ध्व.] **मिरमिरणें**–अक्रि. १ तिखट लागणें; झोंबणें; मिरमिर टणें (अकलकारा, पिंपळी, इ० पदार्थ खाल्ल्यानें) चुरचुरणें. २ मिरमिरयुक्त होणें (तोंड, जीभ इ०). **मिरमिराट**–पु मोठी मिरमिर; जळजळ. **मिरमुटणें**–अक्रि. मिरपुटणें पहा.

मिरमिरी—स्त्री. (कों.) तिरिमिरी.

मिरमीट—न. डोळ्यांत शिरून झोंबणारा लहान कीटक; चिलट. [मिरी]

मिरमुटला—पु. लहान, खोडकर मुलगा.

मिरवण–वणी, मिरवणूक—स्त्री. थाटानें पुष्कळशा जमावानें सावकाश जाणें; छबीना; दिंडी; वरात;स्वारी. (क्रि०निघणें). 'झाली संभ्रमे मिरवण।'–वेसीस्व ७.१०६. [का. मेरवणगे, मिरवणें; का. म्यरोण; द्राविडी. मेर; अरमीर, अमीर, मिहीर] **मिरवणी**–स्त्री.१ अलंकार; सुशोभित करण्याची वस्तु. 'पै जळशयना चिया अवगणिया। कां मत्स्यकूर्म इया मिरवणिया।'–ज्ञा ११. ८४. २ प्रसिद्धि. 'सिंधु आणि गंगेचि मिळणी। स्त्रीपुरुष नामाची मिरवणी।'–अमृ १.५४. **मिरवणें**–अक्रि. १ वाद्यादिसहित शहरांतून समारंभपूर्वक सावकाश जाणें; भपका दाखवीत जाणें. २ छानछोकीनें फिरणें; डौलानें जाणें. ३ (ल.) धिंड काढली जाणें. ४ शोभणें. 'तैंचि कृष्णाचें श्रीमुख। नित्य निर्दोष मिरवत।'–एरुस्व १.५४. ५ बोलणें. ६ क्रीडा करणें; खेळणें. ७ डौल दाखविणें; डौलानें फिरणें. **मिरवा मिरवणें**–डौलानें दिमाख दाखवीत हिंडणें. **मिरविणें**–सक्रि. मिरवण्यास काढणें; थाटानें फिरवीत नेणें. (**प्रतिष्ठा–डौल–तेज–विद्या–गुण–ज्ञान–शहाणपण**) **मिरविणें**–प्रतिष्ठा डौल इ०चें निरर्थक प्रदर्शन मांडणें; पोकळ देखावा दाखविणें; खोटा आविर्भाव करणें.

मिरामल्लार—पु (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र, ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण–संपूर्ण. वादी मध्यम, संवादी षड्ज, गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. वरील स्वरांशिवाय गांधार, धैवत व निषाद हे तीव्र स्वरहि लावण्याचा गायकांचा परिपाठ दृष्टीस पडतो.

मिराशी—पु. मुसलमानांतील एक अस्पृश्य जात. –के १७. ४.३६.

मिरास—स्त्रीन. १ वडिलोपार्जित वतन; दायभाग; वंशपरंपरा संपत्ति; स्थावर मालमत्ता (विशेषतः शेत जमीन इ०); वतनदारी. 'निपुत्रिकांचें मिरास तें दिवाणाचें'–रा ८४९. २ जमिनीवरील कर. [अर. मीरास] **०पुरणें**- गाठोडें पुरणें; महत्त्वाची गोष्ट एखाद्या ठिकाणीं ठेवलेली असणें. **०जमीन**–स्त्री. वतनदारीची जमीन; वडिलोपार्जित जमीन. 'जमीनसारा थकला तरी तीन वर्षांनंतर मिरासदार परागंदा झाल्याशिवाय मिरास जमीन खालसा करण्याचा सरकारला हक्क नव्हता.'–गांगा १२. **०झाडा**–पु. मिराशीची आणि मिरासदारीची कलमबंदी. **०दार, मिरास्दार, मिराशी–सी**–पु. १ मिराशीचा उपभोग घेणारा; वतनदार; थळकरी; सरकारसारा नियमानें भरून आपलें स्वामित्व कायम ठेवणारा शेतमालक. 'वडगांवीची मोकदमीस कोण्ही मिरास्दार

नाहीं ' -रा १७.३२. २ माहार; महारकीचें वंशपरंपरा वतन भोगणारा महार. मिराशीचे चार प्रकार-१ वतनदार, २ मिरासदार, ३ उपरी, ४ ओवांडकरू. [फा. मीरासीदार्] ०पट्टी-टी-स्त्री. मिरास जमिनीवरील कर; कायम लावणीचे जमिनीवरील कर. ' मिरासपट्टी तिसरे सालीं घ्यावी. ' -बाडममा ४.६७ ०पत्र-न. मिराशीच्या हक्काचा लेख.

मिरी—पु. १ पहिल्यानें खेळण्याची पाळी असलेला गडी. २ खेळतांना उताणी पडलेली कवडी. [फा मीर] ०तल्फ-पु. गंजिफांतील राजेरी देणी; राजा खालीं टाकणें, उतरणें [फा. मीर+तलफ]

मिरी—स्त्री निरी. चुणी (धोतर इ० ची).

मिरी—स्त्री. (एकवचन मिरू, मिरें) १ मिऱ्यांचा वेल. २ एका झाडाचें नांव. -न मिऱ्याचा दाणा. मिरीं तिखट असून मसाल्यांत घालतात. [सं. मरिच; हिं. मिरच; बं. मरिच; गु. मरी; का. मेणसु; ते. मरिया, मिरयन्; ता. मिलगु] म्ह० मिरीं नासलीं तरी जोंधळ्याच्या भावानें जात नाहींत. (मिरें शब्दाचें समासांत पूर्वपदीं मिर अर्से रूप होतें). **मिरकाढा**-पु मिऱ्यांचा काढा. [मिरें+काढा] **मिरकूट**-न. मिऱ्यांची पूड; मिरपूड. [मिरें+कूट] **मिरगुंड-डें**-न. चटणी; मिरपूड. ०गोंडु-न. १ मिरवेलीस आलेला मिऱ्यांचा घड; झुबका. २ मिरबोंड; मिरघाटा. -स्त्री. लहान हिरवी मिरची; कोंवळी मिरची. ०घाटा-पु. उडदाचें किंवा इतर डाळीचें पीठ लावून तळलेले मिरे. ०पूड-पूट-स्त्री. १ मिऱ्यांची पूड. २ (कु.) मिरच्यांची पूड, तिखट, म्ह० अन्नमत्रीं जेवणें आणि मिरपूड मागणें. ०बोंड-न मिरघाटा पहा. ०चणी-न मिऱ्याचा काढा. [मिरें+पाणी] ०वेल-स्त्री. मिऱ्यांची वेल. ही पानवेलीसारखी असते. या वेलीला मिऱ्याच्या फळांचे घोस येतात. यांची लागवड मलबार व कोंकण प्रांतीं होते. मिरवेलीस ज्या शेंगा येतात त्यांस गजपिप्पली म्हणतात व मूळास चवक म्हणतात. चवक पहा. या वेली ४०-४० वर्षे जगतात ०मारा-ऱ्या-वि. मिऱ्याप्रमाणें तिखट, कडक, झोंबणारा, जळजळ उत्पन्न करणारी लागट (भाषण अगर इसम.) **मिरें, मिरें**-न. मिरी पहा. (मिरें मिरूं यांचें अव.)

मिऱ्या—पु. एक कीटक. मिरमीट पहा.

मिलक—स्त्री. जिंदगी; मालमत्ता; मिळकत. [अर. मिल्क्]

मिलताऊ—वि दुसऱ्याच्या मताशीं आपलें मत सहज मिळवून घेणारा. ' प्रधान पंताचे मिलताऊ. ते कां येतील -पेद ६.६२. [मिळणें]

मिलांड—न. बीड. -शर.

मिलाप-फ—पु. स्त्री. १ ऐक्य; मिश्रण; मिळणें; जुळणें; मेळ. २ भेट; संयोग; एकत्र येणें. [हिं.] **मिलाफी-पी**-वि. सलगीचा; सोबतीचा; संगतीचा; जुळता; जुळणारा; मिळता; जमणारा.

मिलांव—न. पोलाद.

मिलाव, मिलेर—पु. (गो.) पैसे ठेवण्याकरतां भोंक असलेला मातीचा गड्डू.

मिलिंद—पु. भुंगा; भ्रमर. [सं.] **मिलिंदायमान**-वि. आसक्त; लीन. [सं.]

मिल्हा—पु. १ बगळ्याच्या जातीचा एक पक्षी. २ (ल.) साधुत्वाचें ढोंग करणारा मनुष्य

मिशन—न. १ कोणत्याहि धर्माचा अगर संप्रदायाचा प्रसार करणारी संस्था. २ धार्मिक अगर राजकीय प्रचार. [इं.] **मिशनरी**-पु. प्रचारक; पाद्री; ख्रिस्ती धर्मप्रचारक.

मिशि-शी-सि-- स्त्री. दंतमंजन; मस; राखुंडी. [बं.]

मिशी— स्त्री. १ पुरुषांच्या वरच्या ओठावर व नाकाच्या खालील जागेंत येणारे केंस. २ मांजर, वाघ, झुरळ इ०च्या तोंडावरील लांब केंस. [सं. श्मश्रु; प्रा. मुस; का. मोशि] (वाप्र.) ०उतरून देणें-एखाद्या गोष्टीची निश्चिती सांगतांना म्हणतात. ०(मिशा) खालीं होणें-उतरणें-खालावणें-मानखंडना होणें; फजिती होणें; नक्षा उतरणें. (एखाद्या पातकाच्या प्रायश्चित्तार्थ क्षौर (मिशा भादरणें) करतात त्यावरून). **मिशा किंवा मिशी भादरणें**-फजिती करणें, बेअब्रू करणें; अपमान करणें. (मिशा-मिशी)वर ताव देणें; **मिशी मिशा पाजविणें, मिशांना पीळ भरणें**-सुड घेण्याच्या विचाराचें निदर्शक म्हणून मिशांवरून हात फिरविणें; तिरस्कारानें, रागानें मिशा वळविणें. **मिशा पिळणें; मिशांस पीळ भरणें**-गर्व वाहणें, ऐट मिरविणें; धमक दाखविणें. ' च्यारि दिवस ते मिशांमि पिळितील। ' -मोउद्योग ४.९८. **मिशांना-मिशांवर तूप लावणें, मिशीवर-मिशांवर शीत ठेवणें**-श्रीमंती दाखविणें; पोकळ, बाह्यात्कारी श्रीमंतीचा आविर्भाव करणें; डामडौल करणें. **मिशावर खेळप**-(गो) एखाद्यास न भिणें. **मिशाळ-ळा**-वि. मोठ्या मिशा असलेला.

मिशी— स्त्री वेश्याव्यवसायाच्या सुरवातीस करावयाचा समारंभ. ०लावणें-(व.) वेश्याव्यवसायास आरंभ करणें; धंद्याची सुरवात; वेश्येनें प्रथमच एखाद्याशीं केलेल्या समागमाच्या वेळचा थाटाचा समारंभ.

मिश्र—पु. एक देश व त्यांतील एक ब्राह्मणांची उपजात.

मिश्र, मिश्रित-- वि. मिसळलेला; एकत्र झालेला; मिळविलेला. [सं. मिश्र=मिसळणें] ०अपूर्णांक-पु अव अपूर्णांकांचा एक प्रकार; अधिक निम्नांनें जोडलेले अपूर्णांक. ०गणित-न. सुवर्णगणित. याचे दोन भेद आहेत मध्यमिश्रगणित व व्युत्क्रममिश्र गणित. ०गति-स्त्री. (ज्योतिष) दोन किंवा अधिक

प्रेरणांच्या योगानें उत्पन्न होणारी गति. **०जाति**–स्त्री. (ताल) पहिला विभाग नियमानें सात मात्रांचा असणारा, दक्षिणेकडील एक ताल-प्रकार. **०धातु**–पु. दोन किंवा अधिक धातूंचें मिश्रण करून नवीन बनविलेला धातु उदा० पितळ. **०व्यवहार**–पु. मिश्र गणिताचे नियम **०मिश्रण**–न. १ मिसळ, भेसळ; मिश्र झालेला पदार्थ. २ बेरीज. ३ (रसा.) संयोगी नसतां मिसळून झालेला पदार्थ. **मिश्रणीय**–वि. मिश्रण करण्यास योग्य; मिसळण्यासारखें.

मिश्री—स्त्री. खडीसाखर; मिसर देशांतील साखर. 'श्री हरिनामें अमृत फिकें मग कोण मिश्री।' –अमृत १०९. [अर. मिस्री] **सफेत मिश्री**–स्त्री. एक औषधी मूळ. **सालंमिश्री**–स्त्री. एक औषधी वनस्पति.

मिष–स—न १ निमित्त; ढोंग; बतावणी; सोंग. २ फसवणूक; फसवेगिरी; लबाडी. [सं.] **मिषांतर**–न. दुसरें निमित्त; निराळी बतावणी. 'वर्षे तेथ मिषांतर। चातकु कीं।' –ज्ञा १८.१३७७. **मिषा**–वि. ढोंगी; बतावणी करणारा; खोटें कारण दाखविणारा; सबबी सांगणारा.

मिष्ट—वि. गोड; चवदार; स्वादिष्ट; रुचकर; लज्जतदार.[सं.] **०भाषणी**–वि. गोड बोलणारा; गोडबोल्या. **म्ह० मिष्ट भाषणी आणि लिंगदर्शनी. मिष्टाई**–स्त्री. १ गोडी; माधुरी. २ रुचकरपणा; स्वादिष्टता; लज्जतदारपणा. **मिष्टान्न**–न. पक्वान्न; गोडधोड; सुग्रास अन्न; रुचकर अन्न.

मिस, मिसक, मिसकट–टें—म. १ निमित्त. २ रूप; आकार. 'पै अष्टधा भिन्न ऐसें। जें दाखविलें प्रकृतिमिसें।' –ज्ञा १५.४८४. **०करा–खोर**–वि. ढोंगी; बतावणी करणारा; तोतया.

मिसकीन–ल–वि. १ गरीब; अशक्त. २ निरुपद्रवी; शांत (गाय, म्हैस). ३ (ल.) बाहेरून दिसण्यांत गरीब पण आंतून लबाड. [अर. मिस्कीन्=गरीब] **०बगला–मात्रागमनी–मादरचोद–मारवाडी**–वि. बाहेरून सौम्य, गरीब परंतु आंतून हरामखोर; मुद्रा बावळी परंतु पक्का लबाड असा (इसम).

मिसकूट—क्रिवि. काळा याचें आधिक्य दाखविणारा शब्द. उदा० काळा मिसकूट. मसकूट पहा.

मिसमिशी(सी)त—वि. मऊ; नरम (माणूस इ०); विसविशीत; चिवट; मजबूत नसलेलें; घट्ट वीण नसलेलें (वस्त्र).

मिसर—पु. ईजिप्त देश. **मिसरी–मिश्री**–वि. मिसर देशांतील (स्त्री, खडीसाखर).

मिसरूड, मिसरू—स्त्री. नुकत्याच फुटलेल्या मिशा. बारीक, नवीन मिशा; (निंदार्थी) मिशा [सं. श्मश्रु]

मिसल—स्त्री. हुकूम; व्यवस्था; दर्जाप्रमाणें कोणी कोणत्या ठिकाणीं बसावयाचें ही व्यवस्था; दर्जेबन्दी, प्रकार; अनुक्रम; समाजांतील योग्य जागा. 'निमंत्रित मंडळी दरबारास आल्यावर त्यांस दर्जाप्रमाणें मिसलवार बसविणें' –ऐरा ७. २ प्रकरण; (व.) वकिलाचें दाव्यासंबंधींचें टिपण, टांचण. 'त्या दाव्याची मिसल काढून दे पाहूं' [अर. मिसाल्] **मिसलदारी, मिसलदारी**–स्त्री. योग्यतेनुरूप व्यवस्था; दर्जेबन्दी. 'कोरबंदीनें उभे मानकरी थटून मिसलदारींत।' –प्रला २२६. **मिसलबंदी, मिसळबंदी**–स्त्री. कामाची वांटणी आणि व्यवस्था; दर्जेबंदी. **०बाजू**–स्त्री. ठराविक जागा; योग्य जागा; नियोजित स्थान. (क्रि० धरणें; संभाळणें; राखणें; टाकणें; सोडणें; सुटणें).

मिसळ–ळा—स्त्री पु. १ मिश्रण; मिसळलेली स्थिति; भेळ. २ एकत्र मिसळलेला समूह. ३ मंडळी; संघ. ४ सख्य; मैत्री. [सं. मिश्रण] **मिसळ**–वि. मिसळलेला; एकत्र झालेला. [सं. मिश्रित] **मिसळण**–स्त्री. मिसळलेली स्थिति; मिश्रपणा. –न. १ मिश्रण करण्याकरतां मिसळलेली वस्तु; मिश्रणांतील निरनिराळे पदार्थ. २ मिश्रण; भेसळ. ३ फोडणींत घालण्यासाठीं एकत्र केलेले धने, मोहऱ्या, कारळे इ० पदार्थ. **०काढणें**–कारळे, मोहऱ्या, हळद, मेथ्या, हिंग इत्यादि जिन्नस वेगवेगळे काढून ठेवणें. [मिसळणें] **मिसळणी**–स्त्री. मिसळणें; एकत्र करणें. **मिसळणें**–न. मिसळण; धने, मोहऱ्या, कारळे, मेथ्या इ० चें फोडणींत घालण्याचें मिश्रण. **मिसळणें**–अक्रि. मिश्रण होणें;एकत्र होणें.–सक्रि १ एकत्र करणें. २ (ल. काम किंवा लढाई) जोरानें करणें; त्वेषानें करणें. **मिसळपाणी**–न. कोकंबसारांत मिसळून वाढविलेलें ताक. [मिसळ+पाणी]

मिसाल—स्त्री. हुकूमनामा; आज्ञापत्र. 'तालीक लिहून घेऊन असल मिसाल परतून दीजे.' –रा १५.१३६. [अर. मिसाल्]

मिसूर, मिस्र—न. स्त्री. मिशी; (अव.) मिशा.

मिस्कीन–ल—वि. मिसकीन पहा

मिस्तरी, मिस्त्री—पु. रेषालेखनपटु; मुकादम; कुशल कारागीर (विशेषतः सुतार). [फा. मिस्तरी]

मिस्तीस—स्त्री एक मिश्र पोर्तुगीज जात.

मिस्सी—स्त्री. दंतमंजन; दांतवण; राखुंडी; हिरडा, मायफळ, लोहचूर्ण इ० चें दांताला लावण्याचें व दात काळे करण्याचें चूर्ण. [सं. मषी] **०लावणें**–१ दांतांना मिस्सी लावून वेश्येच्या धंद्याला प्रथम सुरवात करणें. हा विधि नायकिणीकडून करवितात. २ शेसविधि करणें; एखाद्या स्त्रीला वेश्येच्या धंद्याची दीक्षा देणें.

मिहिर—पु. सूर्य. 'धरिमि अरितिमिरहर मिहिरसम शूला।' निमा १.१२. [सं. मित्र]

मिळकत, मिळख(ग)त—स्त्री. प्राप्ति; नियमित मिळणारें द्रव्य. २फायदा: नफा. ३ मालमत्ता:जिंदगी.[मिळणें; अर मिल्कत्]

मिळण—न आमटी, भाजी इत्यादि मिळून येण्याकरितां त्यांस लावावयाचें पीठ. [सं. मेलन] **मिळण–णी**–नस्त्री. १

एकत्र होणें; मिलाफ; संबंध; मिश्रण; एकी. २ संगम. 'सागर-सरिता जीवन एक । परी मिळणीं भजन दिसे अधिक ।' –एभा १.९५. ३ संसर्ग; भेट; स्पर्श; संयोग; संबंध; मेळ. 'सत्संगसुर्याचे मिळणीं निर्विकल्पकमळणी । विकासे ।' –एभा २६.४३८. ४ एकरूपता. 'कृष्णमिळणीं मिळाल्या । त्याही न फिरती ।' –तुगा १२८. ४ मीलन; एकत्र जुळणें, जमणें. 'तेही तेही ठाईं मिळणी । समयो सांजवेळु कां रजनी ।' –ज्ञा १७.२९५. **मिळणीं मिळणें**–भेटणें; एकत्र येणें; संयोग–संगम होणें. **मिळणीं मिळणींत–मिळणीस असणें-चालणें-मिळणें**–एखाद्याच्या तंत्रानें चालणें, मिळून जाणें; कह्यांत, ताबेदारींत असणें. **मिळणीस मिळणें**–संगम होणें; एखाद्याशीं मिळून जाणें. **मिळणी होणें**–भेटणें. **मिळणें**–अक्रि. १ (द्रव्य, लाभ, नोकरी, पदवी इ०) प्राप्त होणें; हस्तगत होणें. २ एकत्रित होणें; मिसळणें. ३ एकरूप होणें; एकत्रित, एकजीव होणें; एकमत होणें. ४ जुळणें; अनुरूप किंवा अनुकूल होणें; बरोबरीचें होणें; एखाद्याप्रमाणें–सारखें असणें. ५ एखाद्याच्या बाजूचा होणें; एखाद्या विशिष्ट पक्षाचा, मताचा, धोरणाचा होणें. 'पार्थासी नमुनियां अजा मिळ र ।' –मोभीष्म १२.५२. ६ भेटणें; भिडणें; टेकणें; गांठ पडणें; संयुक्त होणें; समोरासमोर येणें. ७ सांपडणें; आढळणें; दृष्टोत्पत्तीस येणें; दिसणें; पाहिलें जाणें. ८ पकडींत येणें; धरूं येणें; हातांत येणें. 'हा खिळा अवघड ठिकाणीं बसला, ह्यास धरायला मिळत नाहीं.' ९ शक्य होणें; शक्य असणें. 'हें कुलप भलत्याला उघडायला मिळणार नाहीं.' १० (गो.) रतिभावनेनें अंगीकार करणें. ११ गुरफटला जाणें; अडकणें. 'मिळेना कदा कल्पनेचेन मेळीं ।' –राम ५४. १२ नफा; फायदा होणें; उत्पन्न होणें. [सं. मिल्=भेटणें] **म्ह०** मिळत नाहीं भीक तर वैद्यकी शीक. **मिळून मिसळून वागणें**–मित्रत्वाच्या, घरोब्याच्या, समतेच्या नात्यानें वागणें. **मिळता**–वि. जुळता; मिळणारा. **मिळता काळ**–पु भरभराटीचा काळ; प्राप्तीचा वेळ; मिळण्याचा काल. **मिळताऊ**–वि. १ बरोबरीच्या लोकाशीं लवकर मिसळून जाणारा; दुसऱ्यांशीं आपलें पटवून घेणारा. २ जिकणारा, मिळविणारा. **मिळताव**–पु १ प्राप्ती; मिळकत; फायदा. २ सामील होणें. **मिळती वस्त**–स्त्री. मिळतितां येण्यासारखी वस्तु; ज्याची नुकसानभरपाई करतां येईल असा माल 'पोर मिळवतीवस्त आहे. परंतु आईबाप मिळवतीवस्त नाहींत.' [मिळणें+वस्तु]

मिळमि(मां)ळ—स्त्री. (स्निग्ध पदार्थांच्या संयोगानें आलेला) बुळबुळीतपणा; मिळमिळाट –क्रिवि. (राजा.) गुळमुळ; आवाज न करतां (रडणें). **मिळमिळाट**–पु. अतिशय बुळबुळीतपणा. **मिळमिळीत**–वि. १ (कों.) बुळबुळीत व तेलकट दिसणारें, असणारें. २ बेचव; नीरस; मळमळीत (भाषण इ०).

मिळवण—न. १ आमटी इ० घट्ट होण्यासाठीं तीस लावावयाचें पीठ. मिळण पहा. २ गुरांना खावयास घालण्याचें आंबोण. ३ मिश्रण. **मिळवणी**–स्त्री. १ बेरीज; एकाच जातीच्या अनेक रकमा एके ठिकाणीं आणण्याची कृति. २ बेरीज करावयाच्या रकमा; दुसऱ्यांत मिळविलेला पदार्थ ३ अनेक संख्या एकत्र करून आलेलें फल; बेरीज; एकूण संख्या. ४ जमवणी; जुळणी; सफाईची जोडणी **मिळवणी वजाबाकी**–स्त्री. बेरीज आणि वजाबाकी.

मिळाऊ—वि. १ मिळविणारा; कमाई करणारा. २ जिकणारा. ३ जुळणारा [मिळणें] **मिळून**–क्रिवि. १ सहित; सोबतीनें; सह; एकत्र. २ एकंदरींत; एकूण. ३ जुळून.

मिळवणी—न. १ मिश्रण करतांना घातलेलें पाणी. २ पाणी घालून केलेलें मिश्रण. [मिळणें+पाणी]

मिळव(वि)णें—सक्रि. १ प्राप्त करून घेणें; संपादणें. २ मिसळणें; एकांत दुसरें घालणें; मिश्रण करणें. ३ संचय करणें; एकत्र आणणें, करणें; बेरीज करणें. ४ जुळण्यास, भेटण्यास, मिळण्यास लावणें; ताळा घेणें; जमवून पाहणें. ५ गांठणें; जिंकून घेणें; पाडाव करणें. 'लगट करुनि फौजांनीं मिळविले ।' –ऐपो २०९. ६ जिंकणें; मन वळविणें; सरशी करणें; वश करणें. ७ कृतकृत्य होणें. 'ही मागासलेली ईश्वरी विद्या चांगली नांवारूपाला आली कीं मिळविली.' –सु ११. [मिळणें] **मिळवून पाहणें**–तुलना करणें; ताळा जमविणें.

मिळी—स्त्री. (कर.) उंच गळ्याचा चंबू.

मी—सना. बोलणारा स्वतः [सं. अस्मत्] **म्ह०** मी हांसतो लोकाला शेंबूड माझ्या नाकाला. (वाप्र.) **मी म्हणणें**–जोरांत असणें; स्वतःचा प्रभाव दाखविणें. 'त्या वेळीं मी कसचा घराबाहेर पडतों. तेन्हां पाऊस मी म्हणत होता.' **मीमी म्हणणें-बोलणें**–स्वतःच्या कर्तृत्वाची बढाई मारणें; ऐट मिरविणें; गर्व वाहणें; अहंपणा दाखविणें. 'जितां बोलती सर्वही जीव मी मी ।' –राम १५. 'भिव्याशीं सामना करावयास कोणीहि पुढें जाईनात, मी मी म्हणणारे सारे पहिलवान कचरूं लागले.' **मीचें घर खालीं असणें**–गर्वाचें, मीपणाचें घर खालीं असणें. **मीतूं**–अ. द्वैतभाव; दुजाभाव; आपुलकीचा अभाव. 'नाहीं तें नांदविलें जेणें । मी तूं जगीं ।' –ज्ञा १५.२८०. **मीतूं करणें-मीतूंवर येणें**–हमरीतुमरी करणें; भांडणावर येणें. **मीपण-पणा**–नपु. १ अहंता; गर्व; मगरूरी. २ ब्रह्मापासुन मी निराळा असल्याची जाणीव; अहंपणा.

मींजुम्ला—पु. समुदाय. [फा.]

मीट—स्त्री. मिटलेली स्थिति; डोळ्यांतून पू आल्यामुळें, चिपडामुळें डोळ्यांची चिकटून राहिलेली स्थिति; झांकलेली स्थिति. [मिटणें]

मीटफळ्यो—स्त्रीअव. (गो.) आटयापाटयांचा खेळ.

मीटर—पु (पाणी, वीज, लांबी इ०) मोजण्याचें यंत्र: मापनयंत्र. [इं.]

मीटिमीटि—क्रि. (महानु) टकमकां पाहणें. 'मीटिमीटि स्वर्गीदेवा। पाताळीं पीयूषाचा ठेवा।' –ऋ ८१. [ध्व.]

मीठ—पु (ढोरांचा धंदा) एक जातीचा निवडुंगावर वाढणारा वेल. यानें चामड्यावरील केस जातात.

मीठ—न. १ लवण; क्षार. मीठ ही पांढऱ्या रंगाची खारट वस्तु असून मनुष्यमात्राम अत्यंत आवश्यक अशी आहे. बरेचसें मीठ समुद्राच्या पाण्यापासून करतात. मिठाच्या कांहीं खाणीहि आहेत. २ (क.र. आटयापाटया) लोण. (क्रि० आणणें). [सं. मिष्ट=रुचकर] (वाप्र.) **०घालणें**–१ पिठांत मीठ घालणें; चव आणणें; गोडी आणणें; पुष्कळशा मोठ्या साठयांत थोडीशी भर घालणें; पुष्कळ असून आणखी थोडीशी अपेक्षा असेल अशा ठिकाणीं जरूर ती भर घालणें. २ महत्त्व देणें; पर्वा करणें, ठेवणें; भीक घालणें. 'ते दुबळ्या भटभिक्षुकांना मीठ घालतील कीं काय!' –नि १०६८. **०मोठें खारट असणें**–कडक किंवा करडा धनी असणें; मालक मोठा कटोर असणें. **०तोडणें**–मीठ कमी करणें; खावयास कमी घालणें. 'मुलास मुलगी मोठी झाली तर तिचें मीठ तोडणें.' **०देणें**–चामडें कठीण करण्याकरितां त्यास मीठ लावणें. **(अंगास)मीठ मोहऱ्या लागणें**–रागावणें; क्रुद्ध होणें; संतप्त होणें. सामाशब्द- **०कणी**–स्त्री. लांबून घरी आल्यानंतर दृष्ट काढण्याचें मीठ; मिठानें काढलेली दृष्ट. **०बंदर**–न. मीठ उतरण्याचें बंदर. **०भाकर-भात**–स्त्रीपु. गरीबीचें जेवण (विशेषत: यजमान आपण दिलेल्या जेवणासंबंधी विनयानें असें म्हणतो). **०मसाला**–पु. मीठ व मसाल्याचे सर्व जिन्नस; पदार्थास चव आणणारे पदार्थ **०मोहऱ्या**–स्त्रीअव. दृष्ट काढण्याचें साहित्य. **०मोहऱ्या ओवाळणें**–दृष्ट काढणें. **०लोणारी**–पु. मीठ बनविण्याचा धंदा करणारी एक जात व त्या जातीचा मनुष्य. **मीठारंग**–पु मोत्याचा पिवळट गुलाबी रंग.

मीण—पु. (गो.) जार.

मीत्री—स्त्री (प्र.) मैत्री; सख्य. 'पराव्यासीं करी मीत्री।' –दा २.१.१४. [सं. मैत्रि]

मीन—पु १ मासा; मत्स्य २ मेषादि राशींपैकीं बारावी रास. या राशींत पूर्वाभाद्रपदा नक्षत्राचा एक चरण व उत्तराभाद्रपदा आणि रेवती या नक्षत्रांचा समावेश होतो. [सं. मी=मारणें] **०केतन**–पु माशाचें चित्र असलेलें निशाण ज्याचें आहे असा मदन; कामदेव. [सं.]

मी(मि)नणें—अक्रि. एकत्र होणें. 'मीनती दांदिया पासीं। राउळीचे यां।' –शिशु ५०५. २ प्राप्त होणें. मिळणें. 'कां वृक्षाची साउली। वाटे जातां मीनली।' –ज्ञा १३.५९४. ३ भेटणें; गांठ पडणें. 'तैसें संत माहेर माझें। तुम्ही मिनलिया मी लाडेजे।' –ज्ञा १५.५९७. [मिळणें]

मीना—पु. मिना पहा १ निळा रंग. २ दातावरील लुकण. ३ नीलमणी. ४ स्वर्ग. [फा.] **०बाजार**–पु वस्तूंचें प्रदर्शन.

मीमांसा—स्त्री. १ षड्दर्शनांपैकीं पांचवें दर्शन; याचे दोन भाग आहेत–पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा किंवा वेदांत. पहिल्यामध्यें कर्मकांड व दुसऱ्यांत ज्ञानकांड विवेचिलें आहे. २ चर्चापूर्वक जाणण्याची इच्छा; खोल विचार; चिकित्सा. [सं. मान्=चौकशी करणें] **मीमांसक**–पु. कर्मकांडवादी जैमिनीचे अनुयायी. **मीमांसक मार्ग**–पु. कर्मकांड. 'ह्या प्राचीन कर्मकांडास पुढें मीमांसकमार्ग असें नांव मिळालें.' –गीर २८८.

मीर—पु. (व.) रुई, कपाशी मोजण्याचा काटा.

मीर—पु. १ (गंजिफा) दशावतारी गंजिफांतील प्रत्येक बाजूचा, रंगाचा राजा. २ उमराव; अमीर; सरदार; राजा. [फा. मीर; अर. अमीर] **०अदल**–पु. न्यायाधीश. [फा. मीर–इ–अदल्] **०ज्या**–पु. (माण.) सर्व मेंढ्यांचा पुढारी. **०पीर**–पु. थोर, अनुभविक, स्वतंत्र अधिकारी; बडा मनुष्य 'सारांश फौजेंत ताळ नाहीं. सारेच मीरपीर आहेत.' –ख ५.२३८०. [फा.] **०शिकार**–शिकारीवरील अधिकारी. 'मीर शिकार पाखरें धरून आणावयास पाठविले असेत.' –ब्रप ११८. [फा. मीर–इ–शिकार]

मीर शेंग—स्त्री. मिरची.

मीलन—न. १ मिश्रण; मिसळण; एकांत एक मिसळणें. २ भेट; भेटाभेट. ३ एकत्र जमणें; एकत्र येणें; मिळणी; संबद्ध होणें. ४ एकत्र मिसळून जाणें; मिळून जाणें; ऐक्य; एकी. ५ उघडझांक. ६ खग्रास ग्रहण. [सं. मील्=मिटणें, झांकणें, मिचकावणें] **मीलनोन्मीलन**–न. उघडझांप; मिटणें आणि उघडणें. 'दैविसी दिडी पाहतां सानी। तऱ्ही मीलनोन्मीलनीं।' –ज्ञा १७.५. **मीलित**–वि. १ मिश्रित. मिसळलेला; एकत्र केलेला. २ भेटलेला. ३ एकत्र जमलेला, मिळालेला. ४ विशिष्ट बाजूस मिळवून घेतलेला; वळविलेला. [सं.]

मीस—न. मिष पहा.

मीळ—स्त्री. १ (अशिष्ट) प्राप्ती; नफा; फायदा; मिळकत. २ मिळणी. [मिळणें] **०जोड**–स्त्री. लाभ; तडजोड. 'सारांश मीळजोड स्वामींच्या आशीर्वादें होईल.' –पया १०.

मुआझिन—पु. प्रार्थनेस बोलाविणारा. [फा.]

मुकटा—पु. सोंवळ्यांत नेसावयाचें रेशमी किंवा तागी वस्त्र. [का. मुट्टु=शिवणें?]

मुकटी—स्त्री. (गो.) बंदुकीचें तोंड.

मुकण-णा—नपु. १ निःसत्व व हलका असलेला कडधान्याचा दाणा; अशा दाण्याची रास. २ (क्र) शिजविल्यानंतर किंवा भिजविल्यानंतर टणक राहिलेला दाणा. चाड; –वि. उदास; उदासीन वृत्तीचा [मुका+दाणा] **०हत्ती**–पु. १ बिन सुळयाचा हत्ती; दंतहीन हत्ती. २ (ल.) टेंगू व ढेरपोटया इसम. **मुकणी-तूर**–स्त्री किडकी तूर; रोगट दाणा असल्यामुळें नासून जिची चांगली डाळ होत नाहीं अशी तूर

मुकणें—सक्रि. गमावणें; न मिळणें; अंतरणें; हानि पावणें. 'तरि देतों शाप तुला, विजय न घडतां हितास मुकतास।' –मोभीष्म १.८९. [सं. मुच्=सोडणें]

मुकं(कुं)वणें—अक्रि. (ना.) १ गुदमरणें. २ आंबणें.

मुकदम, मुकद्दम, मुकादम, मोकदम—पु. १ पुढारी; म्होरक्या; मजुरांवर देखरेख करणारा. २ गांवपाटील; गांवक-यांचा मुख्य; वतनदार. ३ देशमुखाच्या खालच्या हुद्याचा गांवकामगार. [अर. मुकद्दम] **मुकदमी**–स्त्री. मुकादमाचे हक्क किंवा हुद्दा.

मुकद्द(द्दि)मा. मोकद्दमा—पु. १ काम; प्रकरण; बाब. २ खटला (दिवाणी किंवा फौजदारी). (ना.)मुकरदमा. 'नबाब गुरगुटे यांचा मोकदमा फैसल करून...' –ख ११९४. [अर. मुकद्दमा]

मुकद्दम—पु. (निंदार्थी) मुका मनुष्य. [मुका]

मुकद्दर—वि. नियुक्त; नियोजित; कायम केलेला; नामजाद. 'आबाजीकृष्ण या कामावर मुकद्दर असोन...' –रा ५. १९७. [अर. मुकद्दर्=ईश्वरनियोजित]

मुकरर्‍यद—वि. कायम; पक्का. 'या कामावर मुकर्‍यद राहून...' –पया ४६६. [अर. मुकर्‍यद्]

मुकरणें—न. वाचाळता; बडबड. 'जाती प्राणें प्रमाणें करिति मुकरणें पै न वेतील नाणें।' –अकक २, सुदामचरित्र ७०. [मुखर]

मुकरर, मुकर्र, मक्रर—वि. १ निश्चित; नेमलेला; ठरविलेला; २ नक्की; नियोजित. –क्रिवि. खात्रीनें; निश्चयानें; पुन्हां पुन्हां. 'मुकर ल्याहावें याची हाजत नाहीं.' –पया ४७६. [अर. मुकर्रर्]

मुकलस्त—वि. (व.) मनमानेइतका; मुबलक; वाटेल तितका. [सं. मुक्त?] **मुकलस्ती**–स्त्री. (व.) १ मुबलकता. २ मोकळीक; स्वैर वर्तन.

मुकशी—स्त्री. (राजा.) टोंक; अग्र; अखेरचा भाग; तीक्ष्ण अग्रभाग. [सं. मुख]

मुकसणी—स्त्री. (गो.) संपादणी.

मुकसी—वि. सोनेरी बुटीदार; सोनेरी बुट्टया किंवा ठिपके असलेलें. 'चिरे मुकसी.' –वाडसमा १.१९. मुकेस-सी पहा.

मुकसुचें—अक्रि. (गो.) लांच घेणें; खाणें. [मुखशुद्धि]

मुक(कु)लित—वि. १ स्पष्ट. २ संक्षिप्त. 'हे सांख्यस्थिति मुकुलित। सांगीतली तुज एथ।' –माझा २.२३. [सं. मुकलित]

मुका—पु चुंबन. (क्रि० घेणें). [ध्व मुख]

मुका—वि. १ बोलतां येत नसलेला; न बोलणारा; वाचा नसलेला. २ रागानें किंवा हिरवटपणानें बोलत नाहीं असा; स्तब्ध. ३ शांत बसलेला. ४ तोंड नसलेलें (गळूं, फोड) डोकें किंवा तोंड नसलेला (नारू). ५ न वाजणारा; अगदीं कोंवळा; आंत गर नसून पाणी भरलेला (नारळ). ६ चाड; न भिजलें जाणारें; मोड न येणारें (कडधान्य). ७ न उमललेली; न फुललेली (कळी) ८ आवाज न करतां चालणारें (रहाटगाडगें, चरक, यंत्र इ०) [सं. मूक; का मुत्तु, मुद्दु] **म्हण०** मुक्याचे मनीं मंगळवार (मंगळवारीं कोणताहि बेत करूं नये अशी समजूत आहे त्यावरून). (वाप्र.) **०सुलगा होणें**–प्रथम स्नान येणें. **०रहाणें**–(बागलाणी) गप्प बसणें. **मुकावणें**–मुकें होणें; स्तब्ध बसणें. 'मुकावल्या वेदश्रुती।' –परमा १.१८. सामाशब्द– **०गोवर**–पु. ज्यांत अंगावर पुटकुळ्या पुरळ येत नाहीं असा गोंवर. **०द्रंद**–पु. मुका दावा पहा. **०द्राक्षा**–पु गुप्त द्रेप; इक. **०नारळ**–पु. कोंवळा असल्यामुळें न वाजणारा नारळ. **०मार-मारा**–पु. १ वैरामुळें किंवा दुष्टपणानें जादूटोण्याच्या योगानें किंवा शापांनीं केलेला गुप्त नाश हानि. २ पुराव्याला कांहीं खुणा वगैरे राहाणार नाहींत असा दिलेला अंगावर मार. **०मैंद-म्हसोबा, मुकी मण्यार**–पुस्त्री. (निंदार्थी) हिरवट, तिरसट मनुष्य. **मुकी अर्जी**–स्त्री. एखाद्याची नालस्ती करण्यासाठीं बिनसहीचा किंवा खोट्या सहीनें केलेला अर्ज. **मुकी कमान**–स्त्री. चपटी कमान. **मुकी वस्तु, मुकें जनावर**–स्त्रीन. गाय म्हैस इ० जनावरें. 'मुकी वस्तु निघातें मारी।' –दा २.१.६६. **मुकें गळूं**–न. तोंड न पडलेलें गळूं. **०गाळ**–न. एक मुलींचा खेळ. **०द्रंद**–मुका दावा पहा. **०फळ-फूल-पान**–न. कोंवळें किंवा पक्व न झालेलें फळ; न उमलेलें, कळीच्या स्थितींत असलेलें फूल, पान. **०फुल**–न. एक मुलींचा खेळ. **०भिजाणे**–पुअव. भिजलेले परंतु मोड न फुटलेले दाणे (हरभरा, पावटा इ०चे) **मुकाणा**–पु. मुकणा पहा.

मुकाटयां, मुकाटयानें–नीं—क्रिवि. गपचीप; न बोलतां; स्तब्धपणें; शांतपणें.

मुकादम–मी—मुकदम–मी पहा.

मुकाब(बि)ला, मोकाबला—पु १ पडताळा; मासला. २ तुलना; शर्यत. (क्रि०करणें). ३ गांठ; लढाई; विरोध; झुंज; तोंड देणें. 'त्यांचा यांचा मुकाबला होऊन लढाई सुरू झाली।' –भाव ७९. [अर.] **मुकाबिले, मुकाबील**–क्रिवि. समोर. 'पुन्हां नबाब बहादराचे मुकाबिले उभे न रहात.' –रा १९.

मुका(क्का)म—पु. १ थोडा काल राहण्याची, उतरण्याची, तळ देण्याची जागा; आश्रयस्थान; आसरा; विश्रांति घेण्याचें ठिकाण. २ रहाणें; अवस्थान; तळ देणें; एखाद्या ठिकाणीं थोडा वेळ थांबणें. ३ वास्तव्याचें ठिकाण; वस्ती; बिऱ्हाड; राहण्याचें गांव. उदा० (पत्रांतून) मु. पुणें, मुंबई इ० ४ (ल.) कुंठितावस्था; विश्रांति; टप्पा; पायरी; मध्यंतरींचें थांबणें. [अर. मुकाम्] **मुकामात, मुक्कामात**—स्त्री. वस्ती; राहणूक. 'शहरच्या पूर्वेस चारा आहे तेथेंच मुकामात करावी.' –रा १.१५६. [अर. मुकामत्]

मुकासा, मुकासाई—पु. मोकासा, मोकाशी पहा.

मुकुट—पु. किरीट; टोप; राजाचें, देवाचें शिरोभूषण; शिरताज. [सं.] **०मणि**–पु. १ मुकुटांतील रत्न. २ (ल.) नायक; पुढारी; नेता; अग्रगण्य; अग्रेसर; मुख्य इसम **मुकुटाभिषेण** न राज्याभिषेक.

मुकुर—पु. आरसा; दर्पण. [सं.]

मुकुल—पुन. १ मोठा कळा; कळी (उमलणारी). २ कमळ. ३ घोडयाच्या कपाळावर जाईच्या कळीप्रमाणें असलेला भोंवरा. –अश्वप १.८५. [सं.] **०दृष्टि**–स्त्री. (नृत्य) पापण्या स्फुरण पावण्यास लावणें. अशा दृष्टीचा अभिनय, झोंप, स्वप्न व सुख द्रर्शित करतो. **मुकुलित**–वि. १ पूर्ण न उमललेलें (फूल); अर्धवट मिटलेले (डोळे). २ (ल.) संक्षिप्त; थोडक्यांत. **मुकुळणें**–अक्रि. बंद ठेवणें; करणें; आवरून घेणें. 'परि तो रसातिशयो मुकुळी। मग ग्रंथार्थदीपु उजळी।' –ज्ञा ५.१४२. [सं. मुकुलित]

मुकेस—पु. सोन्या-चांदीची बारीक तार; सोनेरी-रुपेरी वर्ख इ० चा चुरा. **मुकेस-सी**–वि. जरतारी; भर्जरी; सोनेरी बुट्ट्यांचें. 'तिवट चुनडी समेत बतनाव तुरा मुकेसी.' –वाडसमा १.१११९. [अर. मुकय्यस्]

मुक्कर—क्रिवि. खचित; खरोखर; निश्चयानें; न चुकतां; खास. [अर. मुकर्रर]

मुक्की—स्त्री. बुक्की; मुष्टियुद्ध. [सं. मुष्टि]

मुक्त—स्त्री. १ मुक्ति; मोक्ष. २ मृत्यु. (क्रि० पावणें). 'मुक्त पावले साहेबनाना कशा केल्या देवा तडातोडी।' –ऐपो १३२. –वि. १ मोकळा; सुटलेला; सोडून दिलेला. २ परब्रह्मांत मिळून गेलेला; मोक्षाप्रत गेलेला; प्रपंचादि बंधनापासुन सुटलेला. ३ फेंकलेलें; सोडलेलें (अस्त्र इ०). [सं. मुच्=सोडणें] **०कैवल्य**–न. ज्ञानाची ऐक्यस्थिति. 'किंबहुना ऐसैसें। मुक्तकैवल्य सुदिवसें।' –ज्ञा १६.१३. **०क्रिया**–स्त्री. वेदाच्या आधाराशिवाय केलेली गोष्ट; धर्मबाह्य वर्तन; स्वैराचार. 'मुक्तक्रिया प्रतिपादी। तो येक पंढतमुखें।' –दा २.१०.४. **०छंद**–पु. ताल खेरीज छंदाच्या इतर नियमांनीं बद्ध नसलेला छंद. **०द्वार**–न. १ जाण्यायेण्यास प्रतिबंध नसलेलें दार; हवें त्यानें जावें यावें असें ठिकाण. २ कोणासहि जेथें जेवणास प्रतिबंध नाहीं असा भोजनसमारंभ. **०मार्ग**–पु. वेदबाह्य मार्ग; स्वैर वागणुकीचा मार्ग. **०मुद्री**–स्त्री. १ सर्वत्र चालणारें नाणें; अप्रतिहत मुद्रा. २ मोत्यांची आंगठी; मोत्यांच्या आंगठीचा ठसा, शिक्का. 'आतां गीतार्थाची मुक्तमुद्री। लावी म ज्ञिये वाग्वृद्दी।' –ज्ञा १८.२७. मुक्ता+मुद्रा] **०स्वर**–पु. (संगीत) सुटा स्व पहा.

मुक्त—न. मोतीं. [सं. मुक्ता; द्रा. मुत्तु] **०लग**–पु. मोत्यांचा सर. –वि. मोतीं लाविलेला; मोत्यांनीं गुंफलेला. 'शुभ्र वस्त्र मुक्तलग कांचोळी।' –ह २३.२६. [मुक्ता+लग्न] **मुक्ता**–स्त्रीन. मोतीं. [सं.] **०गर्भ**–पु. मोत्यांतील मध्यवर्ती पदार्थ; ज्याच्या भोंवतीं मौक्तिक रसाचे थर बसुन मोती तयार होतें तो पदार्थ. **०जाल**–न. १ मोत्यांची जाळी; डोक्यांत घालण्याचा स्त्रियांचा एक दागिना; बिंदी. २ मोत्यांचा झुबका. **०फळ-ल**–न. १ मोतीं २ मोत्यासारखें सुंदर अक्षर. ३ सीताफळ. ४ (ल.) मूर्खासारखे बोललेले उद्गार; हास्यास्पद भाषण. **०फळी**–स्त्री. नाकांतील मोत्यांचा दागिना; नथ; मुगबट. नासिकीं मिरवे मुक्ताफळी।' –कथा २.११.९५.

मुक्तसर—पु. हक्कदार किंवा कामदार नव्हे अशा वतनदारांची पदवी. मक्तसर पहा.

मुक्ता—क्रिवि. तोंडीं.

मुक्ता—वि. पुष्कळ.

मुक्ताभरण—न. एक विधि,संस्कार;(प्र.) अमुक्ताभरण पहा.

मुक्ति—स्त्री. १ मोक्ष; जीव आपल्या मूळच्या परमात्म स्वरूपास पावून त्या जिवाची जन्ममरणापासून सुटका होणें. मुक्ति चार प्रकारच्या आहेत. –सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता. २ मुक्त स्थिति; मोकळीक; स्वातंत्र्य; सुटवणूक; मोकळें सोडणें. ३ (ल.) मृत्यु. 'मुक्तीनें वोढिलें काळाचें घर।' –ऐपो ३३१. [सं. मुच्=सोडणें] **०पद**–न. मुक्तीचें स्थान; विदेही स्थिति. (क्रि० मिळणें; प्राप्त होणें). **०मार्ग**–पु. मुक्ति मिळविण्याचा मार्ग; मोक्ष मिळविण्याचें साधन.

मुक्ती, मुक्तीकल—स्त्री. (बे.) ज्यामध्यें रहाटाच्या खांबण्या उभ्या बसवितात ते विहिरीजवळचे दगड प्रत्येकी. [का]

मुक्त्यार-री—मुखत्यार, मुखत्यारी इ० पहा.

मुक्बरा, मुकबा—पु समाधिमंदिर;थडगें. [अर. मुक्बरा]

मुक्र—अ. मुकर पहा. **मुक्रा**–पु. ठराविक रक्कम; सारा. 'बाकी आबाद देह मुक्रा रु. १८०.' –रा १५.९३. [अर. मुकर्ररा]

मुक्री—स्त्री. (गो.) काजूच्या खेळांतील एक विशिष्ट संज्ञा. मुक्र, कायम केलेला नियम, अट.

मुक्स, मुकस—न. (अशिष्ट) तोंड; मुख. 'पुढें यांच्या मुक्सांतून वाक्स काय निघतात...' –विक्षिप्त १.६३ [सं. मुख] **मुकसांतून वाकसं काढणें-निघणें**–बोलणें; शब्द काढणें.

मुक्सी—पु. घोड्याचा रंग; पांढऱ्यांत काळे ठिपके असलेला रंग; अशा रंगाचा घोडा चांगला समजतात –अश्व १.३१.

मुक्सूद—न. विनंति; अर्ज. मक्सुद पहा. [अर. मक्सूद]

मुख—न. १ तोंड; ओठ, दातांचीं मुळें, दांत, जीभ, टाळा, गाल व गळा या सात अंगांच्या समुदायास मुख म्हणतात.–योर २.४४८. २ पक्ष्याची चोंच. ३ चेहरा; मुद्रा; तोंडवळा. ४ (ल.) द्वार; वाट; मार्ग; एखाद्या इमारतीचें द्वार. ५ एखाद्या कामाची सुरुवात. इतर लाक्षणिक अर्थ तोंड या शब्दांत पहा. ६ साधन; करण; उपाय; हत्यार. 'ज्ञानाग्नीचेनि मुखें। जेणें जाळिलीं कर्में अशेखें।' –ज्ञा ४.१०५. ७ (सामासिक शब्दांत) अग्रभाग; मूळचा भाग; मूळवस्तु; मुख्य मनुष्य; पुढारी; अग्रेसर. ८ नदी समुद्राला मिळते तो भाग, स्थल. ९ (सोनारी धंदा) पोचे काढण्यासाठीं लोखंडी पहारेचें टोंक वळवून त्याच्या शेवटीं मुखाकृति केलेला भाग. १० गणितश्रेढीतील पहिली संख्या. ११ चतुष्कोणाच्या पायाच्या विरुद्ध बाजू. [सं.; फ्रेंजि. पोर्तु. जि. मुई] **म्ह०** (सं.) मुखमस्तीति वक्तव्यम्। (तोंड आहे म्हणून नाटेल तें बोलावें) सामाशब्द– **०कमल-चंद्र**–न.पु. (काव्य) कमलाप्रमाणें किंवा चंद्राप्रमाणें सुंदर असलेलें तोंड. **०चर्या, मुखावरची चर्या, मुखकळा**–स्त्री. तोंडावरील ओज, तेज. **०चालन**–न. (गायन) रागोचित गमक व अलंकार यांचा यथोक्त प्रयोग करून गायन करणें. **०छिद्र**–न. ज्वालामुखीचें तोंड; हें कढईसारखें असतें. **०जड**–वि. निबोल्या; कमी बोलणारा. 'बोलोंचि नेणे मुखजड। तो येक मूर्ख।' –दा २.१.४९. **०जबानी**–स्त्री. तोंडी हकीकत. **०जबानीनें**–क्रिवि. तोंडीं; तोंडानें बोलून. [सं. मुख+फा.जबान्=वाचा] **०टी**–स्त्री. मुख; तोंड. 'पाहिली ब्रह्मयाची मुखटी'। –कथा ७.११.५५. **०टोप**–पु. (काव्य) शिरस्त्राणाचा तोंडाकडील भाग. **मुखंड**–वि. मुख्य; पुढारी; प्रमुख; नायक; म्होरक्या. **मुखडा**–पु. चेहरा; तोंडावळा. 'मुखडा पाह्या उभी राहते धाउनिया।'–सला २५. [हिं.] **मुखदाक्षिण्य**–न. १ भाषणशैली; वक्तृत्व; वाक्पाटव; शब्दचातुर्य. २ मुखसंकोच; एखाद्याच्या आदरार्थ किंवा भावनाविष्काराकरितां बोलण्यास घातलेला आळा. **०दुर्बल-ळ**–वि. वेळेवर विशेष बोलतां येत नसलेला; बोलण्याचा कंटाळा असलेला; मितभाषी; बोलण्यास भित्रा. **०दूषिका**–स्त्री. अव. मुरूम; तारुण्यामुळें तोंडावर उठणाऱ्या पुटकुळ्या. **०पट्टा**–पु. १ घोड्याच्या तोंडावरील पांढरा पट्टा. २ घोडा जिन घालून बसण्याकरतां सज्ज केला असतां त्याच्या तोंडावर येणारा चामड्याचा पट्टा; म्होरकीचा भाग. **०परीक्षा**–स्त्री. (वैद्यक) तोंडात उत्पन्न होणाऱ्या चवीवरून करावयाची त्रिदोषपरीक्षा. वातदोषानें तोंड गुळमट होतें, पित्तानें तिखट किंवा कडू होतें आणि कफदोषानें आंबट, मधुर असें होतें. –योर १.२५. **०पाक**–पु तोंड उतणें; या रोगानें तोंडांत, गालफडांत, जिभेवर लहान लहान फोड येतात व ते फुटून त्यांच्या योगानें पिवळे अथवा पांढरे चट्टे पडतात. –गृहवैद्य ४१. **०पाठ**–वि. तोंडपाठ; मुखोद्गत. **०पृष्ठ**–न पुस्तकाचें पहिलें पान; पुस्तकाचें अगदीं बाहेरील पान; (याच्यावर पुस्तकाचें नांव इ० छापलेलें असतें). (इं.) कव्हर **०प्रिय**–वि. १ शरीरपोषक नसतां फक्त जिभेला गोड लागणारा (पदार्थ). २ सार्धे व पोषक असें तोंडास वीट न आणणारें; चवदार लागणारें (अन्न.) **०भंजन**–न. एखाद्याचा नक्षा उतरणें; लाजविणें; रंग जिरविणें; खोड मोडणें; घाबरविणें. [सं. भञ्ज्=मोडणें] **०माधुर्य**–न. ज्यामध्यें फार बडबड ण्याची व पुष्कळ खाण्याची इच्छा उत्पन्न होते असा एक वातविकार. **०मार्जन**–न. १ तोंड धुणें. २ (ल.) रागावलेल्या माणसाची गोड व प्रेमाच्या शब्दांनीं केलेली मनधरणी. ३ एखाद्याची त्याच्या तोंडावर खरडपट्टी काढणें; शिवीगाळ. ४ मुखमाधुर्य. **०र**–वि. १ बोलका; बडबड्या; तोंडाळ; फटकळ. २ आवाज काढणारा; सनाद; वाजणारा. ३ पुढारी; म्होरक्या. 'मुखरस्तत्रहन्यते' [सं.] **मुखरत्व**–न. बडबड; वाचाळता. **०रंग**–पु. मुखराग पहा. **०रण, मुखरीण-रणी**–वि. मुख्य; प्रमुख; पुढारी. 'हरें तोषें केलें मुखरण तुला कीं रणतरी।' –वामन, विराट ७.१६१. **०रस**–पु. १ लाळ; थुंकी. २ (ल. निंदार्थी) अनिष्ट भाषण; दुर्भाषण. (क्रि० पाघळणें; गळणें). **०रा**–पु (ना.) नथ सर्ज्याची. **०राग**–पु १ तोंडावरील तेज; तजेला; कांति. २ (नृत्य) निरनिराळ्या भावांच्या वेळीं दाखविलें जाणारें तोंडावरील तेज. हे चार प्रकारचें असतें–स्वाभाविक, प्रसभ, रक्त व श्याम. **०रोग**–पु. १ तोंडास होणारा रोग. २ चेहऱ्यासंबंधीं रोग. मुखरोग एकंदर ६७ आहेत. **म्ह०** आंब्याला आला पाड कावळ्यांला आला मुखरोग. **०रोगी**–वि. १ मुखरोगानें पछाडलेला; मुखरोग झालेला. २ (ल.) दुर्मुखलेला; खिन्नवदन; खाणें पिणें व मंडळींत बसणें नाकारणारा, नावडणारा. **०वट-वटा-वटी, मुखोटा**–पु. १ तोंडवळा; चेहरा; तोंड. 'इच्छा इच्छुनी पाहती मुखवट।' –दावि ८. २ चांदी, सोनें इ०ची देवाच्या मूर्तीवर लावण्याकरतां केलेली फक्त तोंडाचीच प्रतिमा; (व.) मुखवट. पौराणिक नाटकांतील गणपती, रावण, नारसिंह इत्यादींचीं सोंगें बनविण्याकरितां त्यांच्या चेहऱ्यांच्या कागदाचा लगदा वगैरेच्या आकृती करीत त्या. ३ बुरखा; सोंग. ४ छातीपासून वरील शरीराचा भाग. ५ कागदावर काढलेलें तोंडाचें चित्र. ६ तोंडाची ढब; चेहरेपट्टी. **०वटी**–स्त्री. तोंडांत

मावण्याइतकें प्रमाण. **०वस्त्र**–न. १ देवाची पूजा, नैवद्य वगैरे झाल्यावर देव वामकुक्षि करतात तेव्हां त्यांच्या मूर्तीच्या तोंडावर घालतात तें वस्त्र. २ तोंड पुसण्याचें वस्त्र. ३ ग्रंथ किंवा पोथी बांधून ठेवण्याचें वस्त्र. ४ मलपृष्ठ; ग्रंथाच्या बाहेरील पान; (इं) कव्हर. ५ कागदाच्या पुडक्यांतील अगदीं वरचें पान. **०वाद्य**–न. १ तोंडानें वाजविण्याचें वाद्य. २ (ल.) बोंब; शंख. **०वास–वासन**–पु. १ तोंडाला सुवास देणारा पदार्थ. (पान सुपारी इ०) २ चुकीनें मुखवस्त्राबद्दल उपयोग करतात. **०विलास**–पु. एक पक्वान्न. **०वैवर्ण्य**–न. लज्जा, भीति आश्चर्य इ० मुळें चेहऱ्याला आलेली विरूपता; चेहऱ्यातील बदल. **०व्रण**–पु. तोंडावर उठलेला व्रण; तोंडावर झालेली जखम. **०शुद्धि**–स्त्री. जेवणानंतर तोंडाचा ओशटपणा जाण्याकरितां खावयाचे सुपारी, विडा इ० पदार्थ; सुपारी इ० खाणें. **०श्री**–स्त्री. मुखचर्या; तोंडावरील तेज. **०संकोच**–पु. १ एखाद्याच्या समोर भीतीमुळें अगर आदरामुळें बोलावयास वाटणारा संकोच; दबकलेपणा. २ आदरामुळें किंवा मोठेपणामुळें येणारा लाजाळूपणा. ३ वचकामुळें आलेली शालीनता. **०सूद, मुकशूत–द**–स्त्री. (कों.) मुखशुद्धि पहा. **०सेक**–पु. चूळ भरून टाकलेलें पाणी; गुळणा. 'असें असेल तर तो अभिषेक नव्हे. मुखसेक आहे.' –भाषाच्या प्रतिभा नाटकाचा मराठी अनुवाद **०स्तंभ**–पु. १ न बोलतां स्तब्ध बसणें २ ज्यामध्यें वाचा बंद होते असा एक रोग. –वि. घुम्या; न बोलणारा. **म्ह०** खावयास अगडबंब म्हणावयास मुखस्तंभ. **मुखिया**–पु. पुढारी; म्होरक्या. **मुखरी. मुखो**–स्त्री. (राजा.) मडकें कापड इ०ला पडलेलें बारीक भोंक, छिद्र. **मुखीं**–क्रिवि. (काव्य) तोंडपाठ; तोंडी. **मुखें, मुखेंकरून**–क्रिवि. एखाद्याच्या योगानें; रूपानें; द्वारें. उदा०त्यागमुखें, अन्वयमुखें, व्यतिरेकमुखें इ० **मुखोद्गत**–वि. तोंडपाठ; तोंडी. [मुख+उद्गत]

मुखई—वि. १ मोखा बंदरांतून आलेला (माल, जिन्नस.) २ निस्तेज, दुधासारख्या पांढऱ्या रंगाचें (मोतीं) मोखाबंदरांतून आलेले किंवा तेथें सांपडलेलें (मोती). [मोखा=एक बंदर]

मुखत्यार, मुख्त्यार, मुख्तार—पु. १ राजाच्या हाताखालील अधिकारावरील अंमलदार; सर्वाधिकारी. २ वंशपरंपरेनें चालत आलेला अधिकारी; पिढीजाद अधिकारी; नियोजित मुनीम; वतनदारांनीं वतनदारीचीं कामें चालविण्याकरितां नेमलेला मनुष्य.–वि. संपूर्ण अधिकार दिलेला; नियोजित; अधिकृत (प्रतिनिधि) स्वतंत्रपणें वागण्यास मोकळीक असलेला. [अर. मुख्तार] **०नामा–पत्र**–पुन. अधिकारपत्र; ज्या लेखानें एखादा मनुष्य स्वत:च्या ऐवजीं व स्वत:च्या तर्फे काम करण्याचा दुसऱ्याला अधिकार देतो तो लेख; वकीलपत्र. [मुखत्यार+नामा; फा. मुखत्यार+सं. पत्र] **मुखत्यारी, मुख्तारी**–स्त्री. अख्त्यार; अधिकार; स्वतंत्रता; दुसऱ्यानें दिलेला अधिकार; वकीलीचा अधिकार. 'याप्रमाणें मुख्त्यारीचें अहकाम आणून दिलें. –चिरा २४. [फा. मुख्तारी]

मुखबीर—पु. हेर; गुप्तपणें बातमी काढणारा, पुरविणारा मनुष्य. 'प्रसिद्ध मुखबीर दुर्गाप्रसाद हा खबर चांगली देतो म्हणजे चुगलखोरपणा उत्तम करतो.' –विक्षिप्त ३.६५ [सं. मुखवीर हिं.]

मुखलासी—स्त्री. (कों.) मखलाशी; खुबी; हातचलाखी; युक्ति.

मुखशाळा—स्त्री. १ स्वयंपाक घर. –आडिवऱ्याची महाकाळी १०. २ (कु.) देवळांत स्त्रियांना बसण्यासाठीं केलेली विशिष्ट जागा. [मुख+शाळा]

मुखळ—न. मुसळ (उखळ शब्दाच्या जोडीस वर्णसादृश्यामुळें म्हणतात).

मुखा—पु. हातोड्याचें पसरट तोंड (याच्या उलट बाजूस पिसा म्हणतात). **मुखाची खरवाई**–स्त्री. चांदीचीं भांडीं पडवितांना उपयोगांत आणावयाची, टोकास गोल असलेली खरवई. मुख अर्थ ८ पहा.

मुखालीफ—पु. वैरी; शत्रु. 'समुद्रांतील टोपीवाले तुम्हांसीं मुखालीफ होऊन आम्हांसी स्नेह करावयास येतील.' –ऐटि२.७४. [अर. मुखालिफ्] **मुखलिफत**–स्त्री. वैर; दावा. [अर. मुखालफत]

मुखिक—पु. (महानु.) उंदीर. 'ऐसा उगवल्या खुडिती ठावो। विषय मुखिक।' –ज्ञाप्र २४३. [सं. मूषक]

मुखी—स्त्री. (ना.) नखी पहा.

मुखतसर—वि. संक्षिप्त; थोडक्यांत. [अर. मुख्तसर्]

मुख्य—वि. प्रमुख; श्रेष्ठ; प्रधान; अग्रेसर. [सं.] **०अहंकार**–पु. ज्ञानापूर्वीचा अहंकार. **०उपासना**–स्त्री. निर्गुणोपासना; जींत ध्येय, ध्याता, ध्यान ही त्रिपुटी नाहीं अशी भक्ति; ब्रह्मोपासना. **०चैतन्य**–न. सत्यचैतन्यांतील अविनाशी चैतन्य; परब्रह्म. **०देव**–पु. परब्रह्म. **०धुर**–पु सेनापति; सेनानी. 'हाती लागल्या मुख्य धुर। सहजचि सांपडला परिवार।' –ह ६.९७. [सं. धुर्=जोखड] **०ब्रह्म**–न. चौदा ब्रह्मांतील अनिर्वाच्य ब्रह्म. **०भक्त**–पु. (आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी यापैकीं नव्हे असा) ज्ञानी भक्त. **०भक्ति**–स्त्री. जीमध्यें ध्येय, धाता, ध्यान अशी त्रिपुटी नाहीं अशी निर्गुण भक्ति; अद्वैतभक्ति. **०वृत्त**–न. (ज्यो.) अनेक महावृत्तें लंबरूपानें ज्याला छेदणारीं अशीं कल्पिलेलीं असतात तें महावृत्त (छेदक वृत्तांना लंबवृत्तें म्हणतात). –क्रिवि. मुख्त्वेंकरून; प्रामुख्यानें; प्रधानत्वें; प्राधान्यें करून. **०स्वर**–पु. अ पासून ऌ पर्यंत दहा स्वर. **मुख्यात्मा**–पु. कूटस्थ ब्रह्म; प्रत्यगात्मा.

मुखण—स्त्री. (मुंबई) सुंदर स्त्री; मुख्य राणी. मुखरण पहा.

मुख्लीस—वि. प्रामाणिक. [फा.]

मुगट—वि. पेवांत पुष्कळ दिवस राहिल्यामुळें मुगासारखा उग्र व सयेणारें (धान्य).

मुगटा—पु मुकटा पहा.

मुगडा—पु (राजा.) केसांचा झुबका; जुंबडा; केरसुणीचा बुडखा.

मुगडी—स्त्री. बुगडी; कानांत घालण्याचा बायकांचा दागिना. [सं. मुकुट-मुगुट-मुगटी-मुगडी]

मुगण—न मुगाण पहा.

मुंगणा-णी—पुस्त्री (ना. व) शेवगा.

मुगत—न. मोतीं. ' मुगतांमाणीकांचे दांडे गोमेद पद्मराग माणिकें उधांती । ' –धवळेउ ५४. [सं. मुक्ता]

मुगद—पु. (बे.) भाताची एक जात.

मुगदमी, मुगदुमी, मुगदुमी साखर—स्त्री. हलक्या प्रकारची पिठी साखर. [मगदुमी]

मुगदल—पु. (प्र.) मुदगल पहा.

मुगदळ—स्त्री. मूग पेरण्यास योग्य असलेली जमीन. [मूग+दळें] –न. १ मूग भाजून त्यांचें केलेलें पीठ. २ अशा पिठाचे लाडू. [मूग+दळणें] **मुगवण-न**–न. मुगाचें भूस; मुगाचा कोंडा; मुगाचें गुळी. **मुगवा**–पु. १ बायकांचें एक प्रकारचें, मुगा एवढया चौकटी असलेलें वस्त्र; लुगडयाचा एक वाण, प्रकार. २ दुष्या भोपळा. –वि. मुगाएवढया चौकटी असलेलें (लुगडें).

मुगदाण—न. (बे.) वेसण; बैल, रेडा इ० पशूंच्या नाकांत घातलेली दोरी. [का मूग=नाक+दावगी=दावें; सं मुख+दामन्=दावें]

मुगदुरी—स्त्री (बे.) पोह्यांच्या कण्या समुच्चयानें.

मुंगफल्ली—स्त्री. (ना.) भुईमूग

मुंगरचें—क्रि. (गो.) शिरकणें; शिरणें.

मुगवत—न (कों.) १ कौलारू छपराची, खपरेलाची पानपट्टी. २ चौथऱ्याचा पाटथरा. [मुखवत्]

मुंगस, मुंगसवेल—पु. मुंगूस, मुंगूसवेल पहा.

मुंगसें—न. (व.) बैलाच्या तोंडाला बांधावयाची मुसकी. मुसकी पहा. [मुख]

मुगळ—स्त्री. भातांत उगवणाऱ्या एक प्रकारच्या गवताचें बीं.

मुगळ—पु. शाकारलेल्या छपराचें आढें.

मुंगळा-ळी—पुस्त्री. डोंगळा; मोठी मुंगी. **०लागणें**–उतावीळ होणें; चेव येणें; अतिशय घाई करणें. **साखरेवरले मुंगळे**–पुअव. गुळावरल्या माशाः जोंपर्यंत उत्कर्षाचे दिवस आहेत तोंपर्यंत मित्र म्हणविणारे लोक, स्नेही.

मुगा—पु. लुगडयांतील एक प्रकार, बाग. मुगवा पहा. **०घेवडा**–पु. एका जातीचा घेवडा. **०भोंपळा**–पु. दुष्या भोंपळा.

मुंगा—पु. १ घोडयाला होणारा एक रोग. २ घोडयाचा वरचा ओंठ, नाकाचा शेंडा; घोडयाला आवरून धरण्यासाठीं त्याचा वरचा ओठ दाबून धरणें, पिरगळणें. (क्रि० दाबणें; पिळणें; घालणें; धरणें). ' मागुती सरसावोनि घांवित्नला हरीनें रगडून मुंगा पिळला । ' –हर १४.६४. ३ मुंगा पिळण्याकरितां घेतलेली दोरी किंवा इतर साधन. ४ गर्विष्ठपणाच्या चेष्टा; रग; उद्धटपणाची वागणूक; गर्व; खुमखुमी. (क्रि० करणें; लावणें; चालवणें; जिरवणें; मोडणें). ' सहजांत जिरविती सर्व तयाचा मुंगा । ' –ऐपो ४२४. ५ चेव: उत्कट इच्छा; कांहीं एका कामासाठीं असलेली उत्सुकता. (क्रि० आणणें). ६ मुंगळा; काळी किंवा तांबडी मोठी मुंगी; डोंगळा. ७ (नाशिक) नागपंचमीच्या दिवशीं स्त्रिया फेर धरून गाणीं गातात तो प्रकार. (क्रि० घालणें). ८ बैलगाडीच्या मागील बाजूस सामान पडूं नये म्हणून दोन्ही बाखडांना मिळून बांधलेला दोरी विणून केलेला कटडा. [मुंगी]

मुंगा—पु. प्रवाल; पोंवळें. [हिं.]

मुगाण—न. जोंधळा किंवा बाजरी यांमध्यें पेरलेलें मूग किंवा अशा तऱ्हेचें दुसरें धान्य. मोघड, मोघण पहा. [मूग+दाणा]

मुगाणा—पु. १ मुकाणा; चाड; मोड न आलेला दाणा; न भिजलेला किंवा शिजलेला दाणा. २ (गो.) अर्धवट कोंब आलेलें भात. [मुकाणा]

मुगाणा—पु. (राजा). भरडलेले मूग; मुगाचा डोळ. [मुग+दाणा]

मुगारा—पु. नुकता फुटलेला कोंब. (क्रि० येणें; निघणें; फुटणें)

मुंगारा—पु. खरीपांत होणारी जोंधळयाची एक जात. –कृषि २६५.

मु(मुं)गारी—स्त्री. (सोलापुरी) खरीपाचें पीक; पावसाळी पीक. याच्या उलट हिंगारी, अगर रब्बीचें पीक. [का.]

मुगाळ—स्त्री. १ गवताचा किंवा झाडाचा कोवळा अंकुर; फूट. (क्रि० येणें; फुटणें; निघणें; होणें). २ मुलांच्या अंगावरील लव.

मुगी—स्त्री. १ मुगाची एक बारीक जात. २ लुगडें, खण इ० वरील मुगाएवढी चौकट. –वि. अशा चौकटीनीं युक्त असें (लुगडें, खण, इ० [मूग]

मुंगी—स्त्री. १ एक बारीक कीटक; पिपीलिका; गोड पदार्थ फार आवडणारा एक लहान प्राणी. ' गुरुचरणीं पार्थ जड जैसी मधुशर्करारसीं मुंगी । ' –मोकर्ण ४३.५०. मुंग्यांचे प्रकारः–काळ मुंगी, गांडमोडी, घाणेरी, ढुंगणमोडी, दांत्या,धांवरी, वळविंच(ज),

हुरण, हुळहुळी, पिसोळी. इ०. -राको ७३. २ एखादा झणझणीत पदार्थ खाल्यामुळें जिभेमध्यें होणारी खरख. ३ चेतना; चेव; एखादी गोष्ट करण्याविषयीं एकदम उत्पन्न झालेली उत्सुकता; तीव्र इच्छा. (क्रि० येणें; आणणें). ४ पुरुषांच्या ठिकाणीं उत्पन्न होणारा कामविकाराचा प्रक्षोभ. (क्रि० येणें) 'मग मुंगी येउनी लुंगी कासोटी । सोडुनि धावती तयांचे पाठी ।' -नव २५. ५८. ५ शरीरास आलेली बधिरता. (क्रि० येणें). [दे. मुअंगी] **म्ह०** १ मुंगीला मुताचा पूर. २ मुंगी होऊन साखर खावी पण हत्ती होऊन लांकडें खाऊं नयेत.(वाप्र.) **मुंग्या येणें-चढणें**- वातविकारामुळें शरीरावयव जड होऊन त्यास बधिरता येणें. रुधिराभिसरण रुद्ध झाल्यामुळें येणारी बधिरता. **मुंगीच्या पावलानें**-क्रिवि. मुंगीच्या गतीनें; अगदीं हळू हळू. **मुंगीच्या पायानें येणें आणि हत्तीच्या-घोड्याच्या पायांनीं जाणें**-सावकाश येणें आणि त्वरेनें निघून जाणें (संपत्ति, वैभव वगैरे संबंधीं योजतात).

मुगीमुग—स्त्री. स्तब्धता. [मूग=मूक]

मुगुट, मुगूट, मुगुटमणी—मुकुट, मुकुटमणी इ० पहा. **मुगुटी कांच**-स्त्री. ही गारेच्या कांचेपेक्षां कठीण असुन फुंकून तयार करतांना महाळुंगाच्या किंवा मुगुटाच्या आकाराची बनते.

मुगुतें—न. मुक्ति. -शर.

मुंगूस—न. सर्पाला मारणारें, भुरक्या रंगाचें, लांब शेंपटीचें एक केसाळ जनावर; नकुल. [प्रा. दे. मुंगुस, मुग्गस, मुग्गुस; का. मुंगुरी] **०कांदा**-पु. एक झाड; एक कंदविशेष. त्याचे मोठा व लहान असे दोन भेद आहेत. **०तोंडा-ड्या**-वि. १मुंगुसाच्या तोंडासारखें तोंड असलेला. २ रागातिकारेमुळें ज्याचा चेहरा मुंगसासारखा झाला आहे असा. ३ ज्याची हनुवटी आंत दबलेली असुन ओंठ मोठे व पुढें आलेले आहेत अशा चेहऱ्याचा. ४ लाजाळू; घाबरट. **०वेल**-स्त्री. एक वेल.

मुग्ध—वि. १ मूर्ख; मूढ; मतिमंद; भोळा; अज्ञानी. 'न उपेक्षी मीं सामान्याहि मुग्ध भक्तातें ।' -मोअनु ४.६२. २ अस्पष्ट; संदिग्ध; घोटाळ्याचें; अनिश्चित. (भाषण, काम, उद्योग). ३ सुंदर; गोजिरवाणें (मूल). ४ लहान (मूल). 'ताताला जेविं बोल मुग्धाचा ।'-मोअनु ४ ५७. [सं. मुह्=मूर्ख होणें] **मुग्धमाम्मा**-स्त्री. (निंदार्थी) लहान असुन मंदबुद्धीच्या इसमाला-विशेषतः स्त्रीला म्हणतात. [मुग्ध+का. अम्मा] **मुग्धा**-स्त्री. १ सोळा वर्षांच्या आंतील वयाची मुलगी; तारुण्यावस्था प्राप्त न झालेली मुलगी. २ तरुण व सुंदर स्त्री. ३ नायिकेच्या अवस्थेचा एक भेद.

मुग्याण—न. १ मळणी करण्यासाठीं काढलेले मुगाचे वेल. २ मुगाचें गुळीं; भूस. [मुग+तृण]

मुघोसी—स्त्री. एक प्रकारचें लढाऊ तारूं. [तु.]

मुच(चु)कुंद—पु. १ एक सूर्यवंशी राजा. यानें देवास साहाय्य केलें. त्यामुळें देवानीं त्यास पुष्कळ झोंप येण्याचा वर दिला. जो त्याची झोंपमोड करील तो भस्मसात् व्हावयाचा असाहि त्यास वर असल्यानें कृष्णानें कालयवनाला याच्या गुहेंत आणिलें व झोंप मोडविली आणि अशा युक्तीनें त्या कालयवनाचा नाश केला. २ (ल) नेहमी झोंपून राहणारा, झोंपाळू मनुष्य. ३ एक तीर्थाचें स्थल. 'ढोलपूर नजीक मुचकुंदतीर्थ म्हणून आहे.' -भाब ८९. ४ एक पुष्पवृक्ष. ह्याचीं पानें पळसाच्या पानासारखीं असुन फूल पिवळें, सुवासीक व वीतभर लांब असतें फळें गोरखचिंचेसारखीं परंतु लहान असतात. गुरांना होणाऱ्या कुंद नामक रोगावर याचा उपयोग करतात. -वगु ५.५.

मुंचणें—अक्रि. मुक्त होणें; मुकणें. 'इतुलेन मुंचसि । भवबंधासि तुं ।' -भाए ६६४. -सक्रि. १ सोडणें; टाकून देणें. 'जें आइकौनि जीवें मुंचती ।' -दाव २७९. [मुंच्=सोडणें]

मुचलका, मुचल्का, मुच्लका—पु. १ गुन्हेगार इ० पासुन सरकारनें 'मी अशा तऱ्हेनें वागेन' अशा करारांचें लिहून घेतलेलें वचनपत्र; हमीपत्र; जामीनपत्र; कबूलपत्र. २ करारनामा; कतबा; वचनपत्र. ३ पंचाइतीच्या पुढें लिहून दिलेलें करारपत्र; वादीप्रतिवादींची जबानी. [तुर्की. मुचल्का]

मुचूंक—क्रिवि. (व.) शिवाय; वांचून. 'मी तुझ्यामुचूक जाणार नाहीं' [सं मुच्=सोडणें]

मुच्छी—स्त्री. (व.) मिशी. [सं. श्मश्रू]

मुंज—स्त्री. १ उपनयनसंस्कार. २ एक प्रकारचें गवत; मोळ. ३ उपनयन संस्कारांत बटूच्या कमरेस बांधण्याकरितां जी मोळ, कुश, लव्हाळा यांची दोरी करतात ती (ही पुढें सोडमुंजींत सोडतात); मोळाचें कटिसूत्र 'ऋषि मुंज बांधीती ।' -वसा ११. [सं. मौंजी] **मुंज्या-जा**-पु. १ मुंजीला योग्य झालेला मुलगा. २ नुकतीच मुंज झालेला मुलगा; ब्रह्मचारी; लग्न न झालेला इसम. ३ एखादा मुंज झालेला मुलगा सोडमुंजीच्या पूर्वी अपघातानें मेल्यामुळें त्याचें झालेलें भूत; एक ब्रह्मचारी देवता. 'मुंज्या नृसिंह बन शंकरी ।' -दा ४.५.७. ४ (मुंज्याचें भूत पिंपळावर राहतें अशी समजूत आहे त्यावरून) पिंपळाचें झाड. **बारा पिंपळावरचा मुंज्या**-बारा शब्द पहा. **मुंजी, मुंजीबंधन**-स्त्रीन. (प्र.) मौजीबंधन; मुंज; उपनयन.

मुजत—स्त्री. (गो.) १ वायदा. २ कारकीर्द. ३ मुदत; मुदतीचा ताप; विषमज्वर. [म. मुदत; अर. मुद्दत]

मुंजनाल—पु. घोड्याचा एक रोग. -अश्वप २.३१.

मुजन्ना—पु. संदेह. [फा.]

मुजमू, मुजमूदार, मुजमूदारी—मजमू, मजमूदार इ० पहा.

मुजरत-द, मुज्रत-द—विक्रिवि. १ मुद्दाम; तदर्थ; मुद्दाम नेमलेला; खास; निश्चयपूर्वक. २ तावडतोब; त्वरेनें. 'वेदशास्त्री बापू जोशी यांजबरोबर मुजरत इंग्रज दुर्बुद्धि धरून आल्याचें सविस्तर वर्तमान लिहिलें.' –वाडसमा २.१०. [अर. मुजर्रद्]

मुजरा, मुज्रा—पु. १ वंदन; नमस्कार; रामराम; सलाम. २ धन्याची भेट झाल्याबरोर किंवा त्याची रजा घेतांना नोकरांनीं म्हणावयाचें गीत. ३ तमाशांतील समाप्तीचें गाणें, लावणी. ४ (राजा.) नेम; नेम धरणें. (क्रि० धरणें). ५ मोबदला; भत्ता. ६ वजा, कमी केलेली, काढून टाकलेली रक्कम. 'कोणी वसुल वगैरे दिल्यास तो मुजरा धरला जाणार नाहीं.' [अर. मुज्रा=रूढ] **म्ह०** (गो.) मुजऱ्याक कोण ना हुलप्याक पंचवीस=हुलपा (बिदागी) घेण्याला पुष्कळ परंतु मुजरा करावयाला कोणी नाहीं.

मुजरादास्त—स्त्री. मजुरादास्त पहा.

मुजाईक-म, मुजाहीक-म—नपु अडथळा; आडकाठी; अटकाव. 'तरी मार्गी मुजाईम न होतां सुखरूप जाऊं देणें.' –वाडबाबा २.१४५. –वि. प्रतिबंध करणारा; हरकत करणारा; अडथळा आणणारा; थांबविणारा. 'आपले वतनास मुजाईक होऊन ...' –वाडबाबा २.६४. [अर. मुझइक्-म]

मुजाका, मुजाख-खा—पुस्त्री. १ पर्वा; प्रतिष्ठा; किंमत; बिशात; महत्त्व. 'हे फौज आलियाची काय मुजाका आहे.' –मराचिसं २२. २ अडचण; हरकत. 'मुजाका नाहीं, तुम्ही यावयाचें करावें.' –रा ५.२५. [अर. मुझायका]

मुजाफत–वि. १ दुसऱ्या ठिकाणचा; परस्थ. २ अधिक. [फा.] **०खर्च**–पु. १ देणगी खर्च; सरकारनें देणग्या, बक्षिसें या बाबत केलेला खर्च. २ परस्थलव्यय; दुसऱ्या सुभ्यासाठीं अगर महालासाठीं केलेला खर्च; इजाफत जमा अर्थ २ पहा. ३ विशेष खर्च. **मुजाफती**–वि. मुजाफत खर्चासंबंधीं.

मुजामा—पु. घोडयाच्या पायाचा चर्मबंद; याला पायबंद अडकवितात. [फा. मुईजामा]

मुजा(दा)रत-द—स्त्री. १ शिष्टाचार; मानसन्मान. २ आर्जव; मनधरणी; संभावना. (क्रि० ठेवणें; राखणें). 'गंगाविष्णूची मुदारद करावी.' –ख ४.१९८४. ३ मागें राखून ठेवलेली गोष्ट. (क्रि० राखणें; करणें). –क्रिवि. चुकीनें मुजरत या अर्थी योजितात. [अर. मुदारत्]

मुजारियान—पु. शेतकरी; खेडूत. [फा. मुझारिआन; अर. मुझारिअ]

मुजावर—पु. मशिदींतील झाडलोट करणारा; सेवेकरी; मुसलमान पुजारी. [अर. मुजाविर्] **मुजावरी-घरकी**–स्त्री. मुजावराची वृत्ति; त्याचा उद्योग हुद्दा इ०.

मुजाहिमत—स्त्री. प्रतिबंध; अडथळा; हरकत. 'टिपूसुल्तान कर्नूलकरास पेशकरीचा तगादा करितील त्यास मुजाहिमत नव्हती.' –रा ७.३५. [अर. मुझाइमत्]

मुजाहीम-हीक—वि. मुजाईक-म पहा.

मुंजिका—पु. घोडयाचा एक रंग. –अश्वप २.३१.

मुंजी—वि. (जुन्नरी) पोटाखालीं पांढरा पट्टा असलेली; तांबेड काळे केस मिश्र असलेली (मेंढी).

मुजुम—पु. एक अलंकार. 'कटिसुवर्णमेखळा जडित। वरि मुजुमे पेटिया रत्नखचित।' –स्वादि १.३.३८.

मुजुमदार-री, मुजूम्दार—मजमूदार-री इ० पहा.

मुजेरी—पु. खेडूत, कुणबी; शेतकरी. 'समस्त मुजेरी प्रजा.' –रा १५.१२८. [अर. मुझारिअ]

मुंजेवार—पु. गांवचा हक्कदार फकीर. गांवांतील जनावरें हलाल करण्याचा याचा हक्क असतो. [अर. मुजावर]

मुजोर—वि. (ना.) हेकेखोर; तोंडास तोंड देणारा; वाचाळ. [फा.] **मुजोरी**–स्त्री. बडबड.

मुज्कर—वि. आठवण करून देणारा. 'श्रीमंताकडून आठ फर्दा मुज्कर होऊन आल्या.' –रा ७.१८३. [अर. मुझ्किर]

मुज्म(ज्मि)ला—क्रिवि. संक्षेपानें; संक्षिप्त; मुख्तसर. 'येकवेळ मुज्मिला फर्द आली.' –रा ७.८२. [अर. मुज्मलन्]

मुटकण-कर—क्रिवि. १ पटकन; झटकन; चुटकीसरशीं. (क्रि० धरणें; पकडणें; पडणें; शिरणें; घुसडणें; झोंप लागणें). २ अवयव आखडून; मुरगुशी मारून. (क्रि०निजणें; पडणें). [ध्व.]

मुटकणें—सक्रि. बुक्क्या मारणें; अंग दुखत असल्यास त्यावर हलु हलु मुठीनें मारणें. [सं. मुट्-मर्दन करणें; म. मूठ] **मुटकळणें**–सक्रि.१ मुटकणें; हलु हलु बुक्क्या मारून रगडणें. २ तिंबणें; मळणें; मऊ करणें (कणीक). ३ मऊ भात किंवा भिजविलेलें पीठ मुठींत दाबून, मुटकुळीं करणें. ४ कापड मोजतांना प्रत्येक हाता गणीक मुठीच्या आकाराइतकी जागा (कापड) अधिक व्यापून कापड अधिक घेणें. [मूठ+आकलन] **मुटक(कु)ळा-ळें**–पुन. मुठींत दाबून केलेला कणीक इ०चा लांबट गोळा; मुठींत मावणारा पिठाचा गोळा. (क्रि० घेणें). **मुटका-कें**–पु. १ बुक्की, चंपी करतांना, अंग रगडतांना हलु हलु मुठीनें मारणें. २ ठोसा; गुद्दा. (क्रि० मारणें; देणें). ३ मारण्यासाठीं हात वळून उगारलेली मूठ. (क्रि० उगारणें). ४ पेटका; वातविकारानें गात्रविशेष आखडणें. (क्रि० वळणें). ५ नांगर इ० धरावयाची मूठ. ६ हातपाय पोटाशीं धरून पाणी उंच उडेल अशी पाण्यांत मारलेली उडी. –न. मुटकें; मुटकळा–ळें. [सं. मुष्टि; म. मूठ; का. मुटगी] **मुटकाविणें**–सक्रि. मुटक्यानें अंग मर्दन करणें; मुटकण.

मुटमुट-मुट्ट—क्रिवि. १ घाईघाईनें पदार्थ खातांना होणाऱ्या आवाजासारखा आवाज करून; मटमटां; मचमचां. (क्रि० खाणें; जेवणें). २ माटमुट; टकमकां; न बोलतां; स्तब्धपणें; गुपचूप; निमूटपणें. (क्रि० पहाणें). ३ (ना.) केविलवाण्या दृष्टीनें; आशाळभूत नजरेनें. [ध्व.] **मुट्टट्ट**-क्रिवि. मुकाट्यानें स्तब्ध. (क्रि० होणें; बसणें; राहणें).

मुटला—पु. (बे.) साधारणतः सहा शेराची गुळाची ढेप. [मूठ]

मुट्टा—पु. इस्लाम कायद्यांतील सुनी पंथाच्या कायद्याप्रमाणें तात्पुरता लग्नसंबंध; मुदतीचें लग्न. याची मुदत १ दिवस, १ महिना १ वर्ष किंवा अनेक वर्षेंहि असूं शकते. -घका ७३.

मुट्टा—पु. (भरतकाम) पांच चिवट्यांची एक गुंडी. (कर.) दहा वळ्या किंवा रहाटाचे ५२५० फेरे होतील इतका दोरा. [मूठ?]

मुट्टा—पु. (गो.) काजू.

मुट्ठा-ठ्या—पु. १ एक बाजू वजनदार असलेला लोहाराचा घण. २ (बे.) कातडें बडबावयाचें किंवा त्यावर खिळे मारावयाचें लोखंडी हत्यार; हस्ती. [मूठ]

मु(मू)ठ, मुठवळी, मुठी, मुट्ट—स्त्री. बैलाचें खोगीर. मूठ पहा. 'चवकीदारानें वळी मुठ नेली उचलून हक्काची।'-पला ७०. [मूठ]

मुठलां-लें—न. (कु.) १ कोकंबतेल; रातांबतेल; भिरंडेलाचा गोळा; थिजल्यामुळें या तेलाचे बांधलेले गोळे. २ लहान लाडू. [मूठ]

मुठेल—न. खोबऱ्याचा कीस उन्हांत वाळवून किंवा विस्तवावर परतून तो मुठीनें दाबून पिळून काढलेलें तेल. -कृषि ७४९. [मूठ+तेल]

मुठेळ-ळी—स्त्री. केळीची एक जात. **मुठाळें, मुठेळें**-न. गोल असून कडा किंवा कोरा नसलेलें केळें; मुठेळ केळीचें केळें.

मुंड—न. १ (विटीदांडूचा खेळ) अंतर मोजतांना तीन या संख्येबद्दल संज्ञा. २ या खेळांत डाव्या हाताच्या आडव्या अगर उभ्या मुठीवर इटी ठेवून जरा उडवून तिला दिलेला टोला. ३ (तंजा.) साडेचार हाताचें मद्रासी पद्धतीचें धोतर; अशा रीतीचें धोतर गुंडाळून नेसण्याची तऱ्हा. [ते. मुड्=तीन]

मुंड—पुन. १ सारा, भाडें किंवा व्याज म्हणून दिलेलें धान्य किंवा पैसा. २ (व.) वतनदारीचे एकमेकाशीं संबंध नसलेले स्वतंत्र भाग. -वि. व्याज द्यावें लागत नाहीं अशी, बिनव्याजी (रक्कम, कर्ज). [सं. मुंड=हजामत केलेला] **०बंदी**-स्त्री. कासबंदी पद्धत पहा. **मुंडाचें शेत**-न. बिघ्यावर दर न ठरवितां ठोक अगर एकदम विकलेली जमीन.

मुंड, मुंडकी-कें—नस्त्री. १ डोकें; शिर. २ डोक्याला बांधायाचें तीन चार हात लांबीचें वस्त्र; मुंडासें; रुमाल. ३ हजामत केलेला किंवा डोक्यावर केस नसलेला मनुष्य. ४ पानें झडून गेलेलें झाड; बोडका वृक्ष. ५ न्हावी. ६ मुंडकोपनिषद्; अथर्ववेदाचें एक उपनिषद्. ७ (व.) कुल; घराणें. 'रामराव गोपाळरावांच्या मुंडांतील आहेत.' -वि. १ केंस नसलेला; बोडका. २ हजामत केलेला; मुंडित. ३ (व.) सुस्त. [सं. मुंड] **०मुंडावणें**-एखाद्या कार्याला वाहून घेणें. 'तुझे निरोप पोंचवायला मी कांहीं मुंड मुंडावून बसलों नाहीं.' **०माला-ळा**-स्त्री. मेलेल्या माणसांच्या मुंड-क्यांची, डोक्याच्या कवट्यांची माळ; रुंडमाळा; शिरांची माळ. **मुंडण-न**-न. १ हजामत; हजामपट्टी; क्षौर; चौल, उपनयन व तीर्थयात्रा इत्यादि कर्मांत करावी लागणारी हजामत. २ (ल.) खरडपट्टी; तासडपट्टी; शिव्या हासडणें. [सं.] **म्ह०** तीर्थीं गेल्यावांचून मुंडण होत नाहीं. **०पर्वणी**-स्त्री. १ हजामत करण्यास योग्य दिवस. २ (ल.) सुट्टीचा दिवस. **मुंडणें**-क्रि. १ हजामत करणें; मुंडन करणें. २ मंत्रोपदेश देणें; गुरूपदेश देणें; शिष्य बनविणें. ३ (अशिष्ट) फसवून लुबाडणें; टकवून द्रव्य काढणें. ४ संन्यास देणें; घेणें. 'नलगे हिंडणें मुंडणें तें कांहीं। साधनाची नाहीं आटाआटी।' -तुगा २५८०. [सं. मुंडन; फ्रें.जि. मुर] **म्ह०** वैद्याचें वाटलें आणि संन्याशाचें मुंडलें कोणास समजत नाहीं. **मुंडला जाणें**-लुबाडला जाणें. **मुंडंती**-स्त्री. चांगली खरडपट्टी; बोडंती; तासडपट्टी; खरमरीत कानउघाडणी. **मुंडवण**-स्त्री. १ फसवणूक; नागवणूक; मोहनी. (क्रि० पडणें; घालणें). २ (ल.) शिव्यांचा भडिमार; खरडपट्टी. **मुंड(डा)विणें**-क्रि. हजामत करणें; डोकें तासणें. **मुंडा(ढा)वळ-वळी, मंडावळ**-स्त्री. वधूवरांच्या किंवा मुंज्या मुलाच्या डोक्याला फुलें, मोतीं इ० ची तोंडाच्या दोन्ही बाजूला पदर लोंबणारी बांधतात ती माळ. २ फुलांची माळ; गजरा. [मुंड+आवली] **मुंडा(ढा)सें**-न. साध्या बांधणीचें लहान पागोटें; शिरोवस्त्र; हेंच ओबडधोबड बांधणीचें मोठे पागोटें असल्यास त्यास निंदार्थी पुल्लिंगी. मुंडासा असें रूप योजितात.) [हिं. मुंडासा; का. मुंडास] **मुंडासबंद**-वि. (व.) पागोटें बांधणारा, घालणारा. **मुंडित**-वि. हजामत केलेला; मुंडन केलेला; तासलेला. **मुंडी-ढी**-पु. (निंदार्थी) (शेंडी न ठेवतां सर्व हजामत करतात म्हणून) संन्याशी; गोसावी. -स्त्री. १ शिर; डोकें; मुंडकें. 'दुधेर योग धराया जैसी वेतात धीरतर मुंडी।' -मोभीष्म ५.४३. २ (मल्लविद्या) दोन खांदे व कमरेचे दोन खवाटे मिळून चार मुंड्या होतात त्यांपैकीं प्रत्येक भाग (यावरून). **चारी मुंड्या चीत होणें**-१ वरील अवयव जमिनीला लागतील अशी जमिनीला पाठ लागणें. २ (ल.) पूर्ण पराभव होणें. **मुंडी फिरवणें**-नापसंति, नावड दाखविणें. **मुंडी मुरगाळणें**-

पिळणें-पिरगळणें-(एखाद्याचा) सर्वतोपरी नाश करणें; त्रास देणें; छळणें; एखाद्याच्या उपजीविकेचें साधन नाहींसें करणें. **मुंडी हालविणें-डोलविणें**-विषय न समजतां समजला असें डोकें हालवून सांगणें; वरिष्ठाच्या म्हणण्यास अनुसरणें; होस हो करणें. **मुंडी-मुंड मोचन**-न. १ (अशिष्ट) चोरांनीं केलेला शिरच्छेद. २ दुर्दशा; शिव्या शाप, द्रव्य हरण इ०नीं केलेली दुर्दशा. [सं.]

मुडकर—न. (व.) लिफाफा; पत्र बंद करण्याचें लांबट पाकीट. उघड नव्हे असा मजकूर लिहून पाठविण्याचें पत्र.

मुंडकारी—स्त्री. (गो.) नारळीच्या बागेभोवतालचें कुंपण; कुंपणाची भित.

मुडकी—स्त्री (व.) कानांतील चाफ्यामध्यें घालण्याचा सोन्याचा दागिना 'कुडया ऐवजीं कुणब्याच्या लक्ष्म्या मुडक्या घालतात.'

मुंडकी—वि. (कर.) बारीक; हलकें. (सागवान). 'मुंडकी सागवान स्वस्त असतें.'

मुडगा—पु १ धान्याची मूठ. २ खराटा, झाडणी, केरसुणी यांची मूठ. ३ चोळण्याचा पुढील भाग. [मूठ]

मु(मुं)डगा, मु(मुं)डगें भात—पु. एका जातीचें भात व तांदूळ.

मुडगुशी—स्त्री. हातपाय, डोकें इ० सर्व अवयव आखडून घेऊन डोक्यावरून पांघरूण घेऊन निजणें किंवा कोठें अडचणींत, कोंपऱ्यांत पडून राहणें (कु.) मुडदूस (क्रि० मारणें). [मुंड+घुसणें]

मुडणकांठ—पु. (बागलाणी) जरी कांठाची एक जात.

मुडत—न. (नाविक) पाण्याची खोली मोजण्याचा किंवा पाण्याच्या तळाशीं गाळ, रेती अथवा खडक आहे हें पहाण्याचा शिशाचा किंवा लोखंडी लांबट गोळा; बुडीत.

मुडतर—न. दैन्य; दुःख. 'फेडिलें मुडतर। किंवा कांहीं जरजर।' -तुगा ६१२.

मुडताळणें—अक्रि. मुरडणें; मागें वळणें; वांकणें; लवणें. 'परपीडे ज्याची जिव्हा मुडताळे।' -तुगा ३६१८. [मुरडणें]

मुडद(दु)शी—स्त्री. (गो.) एक लहान जातीचा मासा.

मुडदा, मुड्दा, मुर्दा—पु. प्रेत [फा. मुर्दा=मृत; सं.मृत] **०पाडणें**-ठार मारणें. **मुडदेफरास**-पु प्रेतवाहकांची एक जात. २ अंत्यविधीला लागणारें लांकूड, गोवऱ्या इ० सामान विकणारा. [फा. मुर्दाफरोश]. **मुडदेफराशी-स्त्री**-स्त्री. मुडदेफरासाचें काम.

मुडदार—वि. १ मरून कुजत पडलेलें; शिळें (मांस, प्रेत). २ (ल.) घाणेरडें; ओंगळ; खराब; तिटकारा आणणारें; अपवित्र; हलकें; (मुसलमानी धर्मशास्त्रांत या शब्दाचा अर्थ आपोआप मेलेल्या किंवा यथाशास्त्र न कापलेल्या जनावराचें अतएव अपवित्र व खाण्यास अपात्र मांस असा आहे.) ३ (बे.) अप्रयोजक; हट्टी; मूढ. [फा. मुर्दार्] **०कातडें**-न. संवेदना, चेतना, नसलेलें, कापलें असतां न दुखणारें कातडें. **०तूप**-न. बरेचसें खपल्यानंतर शिल्लक राहिलेलें तूप. **०तेल**-बरेंच जळल्यावर दिव्यांतील शिल्लक राहिलेलें, शिळें तेल; दीपुष्टेल. **०नख**-न. मृतनख; **०मास**-न. १ क्षतांतील किंवा जखमेंतील निर्जीव, मेलेलें मांस. २ आपोआप मेलेल्या प्राण्याचें मांस. **०रक्त**-न. नाडीबहि त रक्त; गोठेलेलें रक्त.

मुडदार-शिंग-सिंग-सेंग—न. एक औषध; शिशाचें प्राणिद. [फा.]

मुडदूस—पु. लहान मुलांना होणारा एक रोग.

मुंडप, मुडप—पुन मुकुट; शिरताज; पागोटें. डोक्याचें रक्षण करणारी कोणतीहि वस्तु. 'मुडुपें जैसीं कुंभस्थळें। दिग्गजांचीं।' -ज्ञाप्र ४६०. २ गजरा; पुष्पमाला. [सं. मुंड+प] **०घसणी-नी**-स्त्री. (काव्य) पागोटयाशीं पागोटें किंवा डोक्याशीं डोकें घासण्याइतकी गर्दी; दाटी; चेंगरण्याइतकी गर्दी मंडपघसणी पहा. 'कृष्ण पहावया नरनारी। मुडपघसणी होतसे भारी।' -एरुस्व ६.१७. [सं. मुंड+घर्षण] **मुंडपी**-पु. जटाधारी.

मुडपणें—अक्रि. १ मुरडणें; पाय इ० वांकडातिकडा पडल्यानें दुखणें. 'तेवि मुडपोनि सुजला पाये।' -दावि १६.२२. २ दुमडणें; घडी घालणें. [का. मडपु] **मुडपा-पी**-पुस्त्री. घडी; दुमड.

मुंडमुंड—पु. हलकट लोक. -शर.

मुडमुशी—मुडगुशी पहा.

मुंडलावा—पु. भितीवरील मुंडेरी; वरंडी. [मुंड]

मुंडवचें—क्रि. (गो.) शस्त्राची धार बोथट करणें. [मुंडणें]

मुंडशेबाजू—स्त्री. (कु. नाविक) उलांडीच्या विरुद्ध असलेली होडीची बाजू.

मुंडळी—स्त्री. (गो.) बुबूळ.

मु(मुं)डळी—स्त्री. काळें अळूं किंवा राजाळूं याचा कांदा; गड्डा.

मुडा—पु. १ भात किंवा इतर धान्य आंत घालून बाहेरून पेंढा अगर गवत यांचें आवरण घालून सुंभानें अगर दोरीनें बांधून केलेलें गोलाकार किंवा अंडाकृति गाठोडें, कणगा. निरनिराळ्या आकारावरून याला निरनिराळीं नांवें आहेत. उदा. मुडी, मुडें, कोळें, चोबा इ०. २ वरील गड्ड्याइतक्या प्रमाणाचें धान्य. पंचवीस मण हें एका मुडयाचें परिमाण मानितात. ३ गुळाच्या ढेपीचा निघालेला तुकडा. ४ कणगा; बीजाचें साठवण; सांठा. 'तुका म्हणे बीज मुडा। जैशा चाडा पिकाच्या।' -तुगा. २७४४. ५ (माण.) गाठोडें. ६ ठराविक वजनाइतकें खोबरें.

'खोबऱ्याचा मुडा.' [मूठ; का. मुडि] **०घालून बसणें**– पोटाशीं पाय घेऊन व गुडघ्यांत मान घालून व त्या सभोंवतीं दोन्ही हातांचा वेढा देऊन बसणें; शरीराचें गाठोडें करून बसणें. **म्ह०** (गो.) मुडयांनी खाल्लें तर वेढयानीं तरी पाउक जाय. =एखाद्याकडून पुष्कळसें घेऊन खाल्लें तर थोडें तरी त्याला पोंचविलें पाहिजे.

मुडा—वि. १ तोंड किंवा गळा फुटलेलें (मडकें) २ चोंबडा (मनुष्य).

मुडां-डें—न. (कु.) आंखूड बाह्यांचें आंगडें; आंखूड हाताचा खमीस.

मुंडा-ढा—पु. हिजडयाचा सोबती;खरखर मुंडा; यामध्यमुंडा; भिक्षा मागतांना हिजडयाच्या बरोबर फिरणारा व भिक्षा घेणारा मनुष्य. २ (गो.) नायकिणीचा भाऊ. **म्ह०** हिजडयाची जोड मुंडयानें खावी.

मुंडा—पु (कों.) मातीचें भांडें; डेरा; रांजण. २ पखालीचें तोंड, भोंक. ३ (ना.) लांकडी खांब; स्तंभ. –वि. पेंढा भरलेला. [मुंड]

मुंडा, मुंडा हात—मुंढा इ० पहा.

मुडापा—पु. (कर.) (शेतकऱ्यांत रूढ) कणसें काढण्याचें काम. 'राम्यानं काल शेतांतल्या कणसांचा मुडापा केला.' [मोडणें]

मुडापाक—न. फडशा; समूळ नाश.

मुंडारणें—उक्रि. १ मागें वळणें–वळविणें; तोंड फिरवून चालूं लागणें; पलट खाणें; परत फिरणें. २ एखादा खाण्याचा पदार्थ नकोसा होणें; त्याबद्दल अरुचि उत्पन्न होणें. [मुंड]

मुंडाल—स्त्री. (ना.) वरंडी; वरवंडी; मुंडेरी; मुंडलावा

मुंडाला—पु. (ना.) तेल सांठविण्याचा रांजण, बुधला.

मुडी—स्त्री. लहान मुडा; भात किंवा इतर धान्यें पेंढयांत वेष्टून बांधलेली वाटोळी मोटळी. ही मुडी पपनस सोलल्यावर दिसावें तशी कळीदार दिसते. हींतील धान्य ६ ते १० कुडव असतें. ह्याहून ज्यास्त धान्य मावणाऱ्यास मुडा म्हणतात. मुडयाचा आकार अंडाकृति व मुडीचा चेंडूसारखा गोल असतो. मुडीहून लहान (२ ते ६ कुडवाच्या) गोलास बिवळा म्हणतात. बिवळा अर्थ ३ पहा. २ पुंजी, भांडवल. [मुडा] **०मारणें–मारून बसणें**–भयानें दबकून, हातपाय आंखडून बसणें; उकिडवें बसणें.

मुंडी—स्त्री. एक झाड.

मुडे—पु. (महानु.) डोक्यांत घालण्याचा एक मोत्याचा अलंकार. 'माणीकीं खचित मुडे–मफौरे।' –धवळ उ. ४२. [का. मुडि]

मुडों—पु. (राजा. तेली. घाणा) जांगीच्या मागच्या बाजूस वजनदार दगड स्थिर राहण्याकरितां भोंवतालीं खुंटे उभे करून ते बाहेर सरकूं, कलूं नयेत म्हणून भोवतालीं दोरीचे वेढे दिलेले असतात तो सर्व भाग. याच्या पोकळींत पांच मणांचें वजन ठेवतात. [मुडा]

मुडून—न. (व.) शेताच्या एका टोंकापासून निघून पुन्हां त्याच टिकाणीं आऊत आणणें, येणें. मुरडाण पहा. [मुरडणें]

मुडो—पु. (गो.) रानटी लोकांचें पक्वान्न.

मुंढरा—वि. आंतल्या बाजूस वळलेलीं शिंगें असणारा; लहान व आखूड शिंगांचा (बैल). [मुंढा]

मुंढवणें—सक्रि. बोथट करणें; धार बसविणें.

मुढा—पु. मुडा पहा.

मुंढा-डा–पु. १ खांद्याचा गोल भाग; खांदा. 'आनंत्या बोलला आज मुंढ्याच्या चिंध्या होती.' –ऐपो ७०. २ (सांकेतिक) मुंढा हात; पाऊग हात. ३ पखालीचें (दोन्हीकडील) तोंड. ४ हिजडयाचा सोबती; नोकर. –वि. १ डोकें, माथा, टोंक शेंडा, शेंडी, शिंगे किंवा अग्र नसलेला (प्राणी, झाड, बोट, चाकू, नारळ इ०). २ कडा, गळा, कांठ, इ० नसलेलें (भांडें). ३ निव्वळ, केवळ फक्त शंभरच असा पंचोतरी व सळी नसलेला (शेंकडा); याच्या उलट खरा (शेंकडा). ४ विरहित; साधा; ओका; दागिने नसलेला; मुंडा. ५ शिंगें मागें वळलेला; ६ छत्र नसलेलें (सिंहासन); सिंहासनाला छत्र असण्याचा अधिकार नसलेला (मांडलिक); [सं. मुंड] **०हात**–पु. कोपरापासून वळलेल्या मुठीपर्यंत लांबीचा हात (लांबी मोजण्याचें एक प्रमाण). (गो.) मुंडिहाथ, मुंडोहात. **०उलटा**–पु. (जंबिया) आपल्या हातांतील जंबियानें आपल्या जोडीदाराच्या डावीकडील खांद्यावर मारणें. **०सीधा**–पु (जंबिया) आपल्या हातांतील जंबियानें आपल्या जोडीदाराच्या उजव्या बाजूकडील खांद्यावर मारणें. **मुंढे फिरणें**– १ खांदे गोलाकार होणें; खांदे भरणें. २ गर्दीत कवडी फेकून खेळावयाच्या कवडयांच्या खेळांतील एक डाव. पारिभाषिक शब्द.

मुंढा—पु. केळीच्या पानांतील मोठें पान; डांगा.

मुढाकान—पु. (व.) दुमडलेला व विकृत झालेला कान.

मुढामाकोजी—वि. पोकळ अभिमानी; बढाईखोर; ठक. **म्ह०** मुढामाकोजी आणि नकटा टिकोजी.

मुंढारणें—मुंडारणें पहा.

मुंढारी—मुंढेरी पहा.

मुंढावळ—स्त्री. १ चमळ, पोशेरें इ० चे अंकुर किंवा कोंब. हे भक्षणीय असतात (बहुधा अव. उपयोग.) २ मुंडावळ पहा.

मुढी—स्त्री. (व) मूर्ख स्त्री. [मूढ]

मुंढी—स्त्री. मुंडी पहा. **०वसात**–स्त्री. गांवच्या पाटलाचा एक शिकारीसंबंधीं हक्क. 'मुंढीवसात व शिकार उभतांनीं वांटून घ्यावी.' –वाडशाछ १.१४९. [मुंडी]

मुंढेरी, मुंढरी, मुंढारी—स्त्री. पावसाचें पाणी भिंतींत मुरूं नये, तें निघून जावें म्हणून भितीवरील उतरता केलेला भाग; वरवंडी; वरंडी; भित बांधून झाल्यावर शेवटीं विटांचा निमुळता, पायऱ्यावजा बांधतात तो भाग. [मुंड]

मुंढोजी मुका—पु. चढेल, मिजासखोर मनुष्य (एखाद्याची मिजास जिरविण्याकरतां म्हणतात).

मुंढ्या—पु. मुसलमान हिजड्यांचा गुरु.

मुण, मुंड—पु. (गो) झाडाचा बुंधा.

मुणग्यां(गा)भात—न. (कु.) भाताची एक जात.

मुतआकीब—क्रिवि. पाठोपाठ; लागोपाठ; पाठलाग करीत. ' सर्दार जंगी सामान घेऊन मुतआकीब येत आहे. ' –रा १०.१९१. [अर. मुतआकिब्]

मुतगा—पु. भाताची एक जात.

मुतपाक, मुत्पाक, मुतबक-ख, मुतवखखाना, मुत्वख, मुद्पाकखाना—पु. स्वयंपाकघर; सैपाकघर. [अर. मुत्वख]

मुतफर्कात—क्रिवि. किरकोळ; वरकड; बाजे. ' विसाजी अनंत मुतफर्कात असामी निसबत मुभे मजकूर. ' –वाडबाबा १. ३७१. [अर मुतफर्रिकात्]

मुतफीक—क्रिवि. सामील; शरीफ. [अर मुस्तफिक]

मुतबन्ना—वि. दत्तक ' मुतबन्ना पुत्र घेतला. ' –रा २२. १०३. [अर. मुतबन्ना]

मुतमरीद—वि. बंडखोर. [अर. मुतमरिद्]

मुतलक—स्त्री. (कों.) खाऱ्या जमिनीचा एक प्रकार.

मुतलक-ख, मुत्लक-ख—क्रिवि. मुळींच; सर्वथैव ' जयाजी तर मुत्लख नामुराद आहे. ' –रा६ ६१७. [अर.मुत्लक्]

मुतवजे-वज्जे-वजेह, मुतवजा—वि. जाणारा; गमनकर्ता; वळलेला; उद्युक्त; तयार; नियुक्त (स्वारीवर). ' होळकर मातबर सर्दार...फौजसुद्धां मसलतीवर मुतवजे केले पाहिजेत ' –पया २२५. [अर. मुतज्जिह]

मुतवली—पु. १ मशिदीची देखरेख करणारा. २ खजिनदार.

मुतवातीर—क्रिवि. पुन्हां पुन्हां; वरचेवर: एकसारखें; पैदरपै. ' मुतवातीर लढाया अमलांत येतात. ' –पया ४७९. [अर. मुतवातिर्]

मुतसद्दी-सद्दी, मुत्स(त्सु)द्दी-द्दी—पु. १ कारभारी; राजकारणी; राजकार्यधुरंधर. ' सर्कारचे मुतसद्दी राजंदिवस नालिशी करितात. ' –रा २२.१०४. २ (ल.) धोरणी; धूर्त; कारस्थानी [अर. मुतसद्दी=कार्यकारी] ०**असून शिपाई**–पु. शहाणा असून वेळीं तलवारहि चालविण्यास समर्थ असा मनुष्य. ०**गिरी**–स्त्री. १ राजकारणपटुता; राजकारणचातुर्य: मुत्सद्दीपणा. २ धूर्तता: चातुर्य.

मुतसील—पु. ताबा; कबजा; अधिकार. ' जंजिरे याचे मुतसिलांत चालोन. ' –वाडमा १.२२३. –वि. सदरचा; ताब्यांतील; जोडलेला. ' तर्फेन मुतसील महालाचे वतन्दारी वगैरे इन्साफ ' –वाडमा १.२२३. [अर. मुत्तसिल्]

मुतावत—स्त्री. बजावणी; अनुनय. ' तेथून जो अहकाम पोहोंचेल त्याची मुतावत असावी. ' –पया १८. [अर. मुतावअत] **मुतावि(वी)क**–वि. प्रमाणें; सारखा; जुळता; जुळणारा; अनुसरून असलेला. [अर. मुताबिक]

मुतालीक–पु. उपमंत्री; आठ दरकदारांपैकी एक; नायब; कारभारी. [अर. मुतअल्लिक्] **मुतालका-की, मुतलकी**–पुस्त्री. मुतालिकाचें काम; मुतालिकाचा अधिकार; नायबत.

मुर्ता—स्त्री रूढी; चाल. –शर.

मुतैनरवा–वि. नेमलेलें व चालू. ' आपणास इनाम ... कार्किर्दी दर कार्किर्दी मोकाशियानी माजी मुतैनरवा अस्त (आहे). ' –रा १५.१४५. [अर. मुतअय्यिन=निश्चित+फा. रवान्=चालू]

मुद(द्)ई—वि. १ फिर्यादी; दावेदार. ' देखत देखत मुदई... '–पेद १०.८. २ बंडखोर. ३ आरोप करणारा. [अर. मुद्दई]

मुदगल—पु. व्यायामासाठीं फिरविण्यास घेतात ती लाकडी जोडी; करेला. [सं. मुद्गर]

मुदगलसिंचन—न. रेताचा व्यय.

मुदडणें—उक्रि. (तंजा.) दुमडणें; घडी घालणें; मुडपणें. [दुमडणें अप]

मुदण-णी—मुदन-नी पहा.

मुंद(ध)णें—उक्रि. भोंक बुजविणें; बंद करणें; भरून काढणें; गुडदी बसविणें.

मुद(द्)त—स्त्री. वेळ; अवधि; कालमर्यादा; कालखंड; ठरविलेला अवधि. [अर. मुद्दत्] ०**बंदी**–स्त्री. मुदत करणें, ठरविणें **मुदतीचीं हुंडी**–स्त्री. १ जिची रक्कम काहीं कालानें मिळावयाची आहे अशी हुंडी हिच्या उलट दर्शनी हुंडी. २ सरकारी तिजोरींतील जमाखर्चाचा मेळ बसण्यासाठीं सरकारनें काढलेलें तात्पुरतें कर्ज.

मुदन-नी—स्त्री. १ बिरडें; गुंडी लावण्याकरितां किंवा अडकविण्याकरितां केलेलें भोंक; काज. २ सलिता किंवा गोणी यांच्या कडेला असलेली भोंकाची किंवा बिरड्याची रांग, मालिका; गुळख्यांची ओळ. ३ फासा; अडकविण्याचें साधन; पेटी, डबी, इ० बंद करावयाचा खटका. ४ घोड्याच्या पायबंदाची चामड्याची गुळखी. ५ खिरीसाठीं तयार केलेली कणिक. गव्हले तयार करण्यासाठीं केलेली भिजविलेल्या सपीटाची वळवटी ६ असुडाच्या टोकाला असलेला फांसा; बटण्याची गुळखी किंवा फांसा.

७ आखाचें किंवा चाकाच्या कण्याचें टोंक (ज्यांत कुणी बसवितात तें). [सं. मुद्; म. मुदी] **मुदन वळणें**–(व.) कोमेजणें.

मुदपाक-ख, मुद्बक-ख, मुदबखखाना—पु. मुतपाक पहा. **मुदबख्या-खी-खण, मुद्बख्या**–पु. आचारी; सैंपाकी. 'बातमी पोहोंचविण्यासारखें याचें बातमीदारांत मुदबख्याशिवाय दुसरें कोणी नव्हतें.' –रा ६.५०९

मुदफर्क—पु. किरकोळ खात्यांत काम करणारा मनुष्य. 'गंगाजी वाईकर प्यादे दिमत मुदफर्क आनंदवल्लीकर.' –बाडसमा ४.८५. [अर.]

मुदफाळ—स्त्री. (गो.) भाताची मूद.

मुदबख्या—वि. (व.) मुखदुर्बळ; योग्य प्रसंगीं बोलणारा; कमी बोलणारा.

मुदल, मुद्दल—न. १ भांडवल; कर्जाऊ दिलेली रक्कम; मूळ रक्कम; आरंभींचा सांठा 'जे सर्वकर्मसिद्धीलागीं । इयेंचि मुद्दलें हो जगीं।' –ज्ञा १८.२८०. २ मूळचें पुण्य. 'मानूं नेणतां परवडी। मुद्दल तुटे।' –ज्ञा १७.३४७. –वि. मूळचा; मुख्य; सुरवातीचा; मूळांतील. 'मुदलां धुरां छपन्न कोडीं। जेथ सरुया नाहीं णायकवडी।' –शिशु ५४३. (समासांत) मुद्दल-भांडण-तंटा-करार-कारण-बोलणें इ० –क्रिवि. १ मुख्यत्वेंकरून; मुख्यतः. 'पाणी मुदल झाडा जाये।' –ज्ञा १७.२१८. २ मुळींच; किंमपिहि. 'वख्तशीर रक्कम मिळत आहे तोंपर्यंत त्याला सुखुख मागण्याचा मुद्दल अखत्यार नाहीं' [सं. मूलद; का. मैदलु=मुख्य; ते. मोंदलु] **मुद्दलावर येणें**–मूळ स्वभावावर येणें; एखाद्याने पुन्हां आपले मूळचे दुर्गुण दाखविणें. **म्ह०** (गो.) मुद्दल नासुन कळा तर बुडतां=मुद्दल हातांत नसतां उगीच व्याज बुडाल्यावरुन हाकाटी करणें. **मुदलांत सुरकुंडी**–स्त्री भांडवलांत तूट येणें; नफा न होतां भांडवलच खर्ची पडणें. **मुद्दलामुद्दल-मुद्दली**–क्रिवि व्याज किंवा नफ्याशिवाय; व्याज किंवा नफा न घतां; मूळच्या भांडवलाइतकेंच, त्यांत कमी जास्त न होतां. [मुदल द्वि] **मुद्दलीं**–क्रिवि. (मुदल याचें सप्तमीचें एकवचन) मुळींच; मुळांतच; किंमपिहि, किंचितहि. 'मोक्षप्राप्तीच्या मार्गाचें भगवद्गीतेंत मुदलीच विवेचन नाहीं.' –गीर ७.

मुदव—पु. (गो.) अंडयांतील पिवळा बलक.

मुंद(दा)विणें—सक्रि. बंद करणें; भरून काढणें; बुजवून टाकणें (भोंक, मार्ग, बीळ, फट इ०). मुंद(ध)णें पहा.

मुदसा—पु. एक जातीचा मासा.

मुदाई, मुदई, मुद्दईदार—वि १ हक्क सांगणारा; दावेदार; शत्रु; वादी; विरुद्ध आरोप करणारा; आरोपाचे मुद्दे सांगणारा. द(द्द)ई पहा. 'मुदई यासी हातां धरून गोतामध्यें उभे रहा.' –भाइ १८३५. २ साक्षीदार. [अर. मुद्दई] **०इल्लै**–पु. आरोपी. [अर. मुद्दआ-इल्लैह] **०गिरी**–स्त्री. हक्कसांगणी; दावेदारी.

मुदाईम—पु. खटला, वाद इ०मध्यें मुद्दे किंवा पुरावे गोळा करणारा इसम. [अर. मुद्दई]

मुदाईम—वि. १ कायमचा; टिकाऊ; सतत चालणारा. २ पुरातन; प्राचीन; फार दिवसांपूर्वीच प्रस्थापित झालेला. [अर.]

मुदाम—क्रिवि. सतत; एकसारखें 'मुदाम चौदा रोज शहरामध्यें सोदासोदी कले.' –इमं. [अर मुदाम्] **०बेगारी**–पु. अखेरपर्यंत ओझें वाहून नेण्यासाठीं लावलेला कामकरी; मध्यें न बदलतां अखेरपर्यंत काम करणारा बेगारी [अर मुदाम=सतत, निरंतरचा] **मुदामी**–वि. नेहमीचा; जुना.

मुदार(रा)त, मुजारत—स्त्री. संभावना; बर्दास्त. 'केवळ सांगण्यावरूनच मुदारत फलाण्याचा नातु म्हणोन करावयाची नाहीं.' –ख ९.४७६६. [अर. मुदारत]

मुदित—वि. हर्षभरित; आनंदित; आल्हादित; सुखी; प्रसन्न. [सं. मुद्=हर्ष होणें]

मुदी—स्त्री. १ आंगठी; मुद्रिका. २ कानांतील किंवा नाकांतील सुकलें; वळें. ३ मुद्रा; शिक्का. 'जे विश्वप्रामाण्याची मुदी। आजि तुझ्या हातीं असे सुबुद्धि।' –ज्ञा १६.४६८. [सं. मुद्रा, मुद्रिका]

मुद्ग—पु. मूग धान्य.

मुद्ग—पु. आच्छादन. [सं.]

मुद्गर-ल—पु. मुदगल पहा.

मुद्दत—स्त्री. मुदत पहा.

मुद्दा—पु. (तंजा.) मऊ, गिच्च भात; खिमट.

मुद्दा, मुदा—पु. १ कोर्टी विधान, गोष्ट इ० स्थापित करण्यास आधारभूत असलेलें प्रमाण; पुरावा. २ बाब; बाबत. ३ मतलब; तात्पर्य; हेतु; मुख्य गोष्ट. ४ ज्यावर भाषण करावयाचें किंवा लिहावयाचें तो विषयविभाग. ५ बोलण्याचा किंवा लिहिण्याचा रोख, दिशा. ६ अट; शर्त; मानगट; मंतव्य; हेतु. 'जे काय दीलचे मुदा असेल ते कबूल' –भाद्विसवृ १७९१. ७ मार्गदर्शक चिन्ह, खूण; साधन; आरोप. 'याजकडे खुनाचा मुद्दा लागला.' –वाडबाबा २.५०. [अर. मुअदा] **०पत्ता**–पु. पुरावा; साक्ष; आधार; धागा; मागमूस; धागादोरा; धागापत्ता. **मुद्दापत्त्यानिशीं**–क्रिवि. योग्य पुराव्यानें. **मुदामक्सूद**–पु. १ हेतु. २ अर्ज; विनंति. 'यांनीं कागद लेहून आपला मुदामक्सुद पाठविला जे.' –रा १७.३३ **मुद्देदार**–वि. मुद्दे असलेला; मुद्दई; वादी; फिर्यादी. **मुद्देनजर**–स्त्री. लक्ष्य. [फा. मुद्द+नझर्] **मुद्देमाफ(फी)क**–क्रिवि. इच्छेनुसार; इच्छेप्रमाणें. 'सत्वर फौजेसह वर्तमान येऊन मुलाजमत करीत त्याचे मुद्देमाफीक सर्व होऊन

जाईल.' –रा ८.२०७. **मुद्देवार**–क्रिवि. मागणीवार. 'चाकर असतां रोजमुरे न घेतां गैरशिस्त मुद्देवार जाब घालूं लागले' –होकै १३. **मुद्देसूद**–वि. मुद्यास धरून असलेलें; प्रमाणशुद्ध; संगतवार. **मुद्याचा मनुष्य**–पु (व) मुख्य मनुष्य; सूत्रधार; सूत्रचालक. **मुद्याची गोष्ट**–स्त्री. (कायदा) जीवरून कोणतीहि जबाबदारी, हक्क किंवा नालायकीबद्दल अनिवार्य अनुमान निघतें अशी गोष्ट; (इं.) फॅक्ट इन् इश्यू.

मुद्दाम—क्रिवि. बुद्धया; जाणून बुजून; हेतुपुरःसर; बळेंच; हट्टानें; खास; उघडपणें. [अर. अम्दन्]

मुद्दी—स्त्री. (बे.) रेशीम उकलण्याकरतां लागणारी, लाकडी फळीवर बसविलेली खुंटी. [का. मुद्दे=गोळा]

मुद्याळ—वि कुरळे; कुरळ (केस). [मुदी]

मुद्रण—न. छापण्याची क्रिया. [सं] **०कला**–स्त्री. दाबाच्या योगानें कागद किंवा मुद्रणयोग्य अशा इतर पृष्ठभागावर शाई किंवा इतर तैलरंग यांच्या साहाय्यानें अक्षरें अगर इतर आकृति वठविण्याची कला. –ज्ञाको (म) १६५. **०स्वातंत्र्य**–न. आपल्या मतानुरूप मजकूर छापून प्रसिद्ध करण्याचा व्यक्तीचा अधिकार. छापखान्याचा हक्क; (इं.) लिबर्टी ऑफ प्रेस. 'परिस्थिती व प्रसिद्धी यांच्या दरम्यान मुद्रणस्वातंत्र्य आहे.' –टिसु २००. **मुद्रक**–पु. १ छापणारा. २ छाप मारणारा. [सं.] **मुद्रित**–न. छापून झालेलें लिखाण; छापलेला कच्चा खर्डा; (इं.) प्रूफ. 'घाणेरडें मुद्रित शुद्ध करण्यापेक्षां फिरून सर्वच प्रत लिहून कंपोज करविलेली पुरवेल.' –केले १.२२६. –वि. १ ज्यावर ठसा किंवा शिक्का मारलेला आहे असा. २ खूण केलेला; चिन्हांकित. ३ मिटलेलें; बंद केलेलें (फूल, डोळा इ०).

मुद्रस—पु आनंदरस; आनंद; अन्नरस (?) 'मुद्रस कैचा त्याला भलत्याला भाकर मागति मुख पसरुनी।' –ऐपो ३७०. [सं. मुद्+रस=आनंद पावणें]

मुद्रा—स्त्री. १ ठसा किंवा शिक्का उठविण्याचें साधन. २ छाप, शिक्का; ठसा. ३ शिक्क्याची आंगठी; ठसा उमटविण्याची आंगठी; (सामा.) आंगठी. 'हळूच मारुती सद्गुणसमुद्रा। वर्णी मग मुद्रा मज द्यावी।' –मोसीतागीत(नवनीत पृ.२६०). ४ गोसावी लोकांचें लांकडाचें किंवा कासवाच्या पाठीचें कर्णभूषण, 'कान फाडूनिया मुद्रा ते घालिती। नाथ म्हणविती जगामाजीं।' –तुगा २८२९. ५ वैष्णव आपल्या अंगावर गोपीचंदनानें शंख, चक्र, रामनाम इ० चे उठवितात ते ठसे प्रत्येकी ६ नागें; विशेषतः रुपया. उदा० ताम्रमुद्रा=पैसा; रौप्यमुद्रा=रुपया; सुवर्णमुद्रा'=मोहर, पुतळी इ० 'ओंवाळूनी श्रीकृष्णासी। अनंत मुद्रा याचकांसी। देऊनि आभर केलें त्यासी। मागों आणिकांसी विसरले।' –एरुस्व १७.८. ७ चेहेऱ्याची ठेवण; चर्या; तोंडवळा. ८ पूजेच्या वेळीं धेनु, शंख इ० रूप करतात ती हाताच्या बोटांची रचना. ९ कर्तृत्वाच्या दृष्टीनें रूप, आकार इ० 'त्याची मुद्रा लहान आहे पण मोठ्या पुरुषाला जें होणार नाहीं तें काम आज त्यानें केलें.' १० पदार्थ ओळखतां यावा म्हणून त्याच्यावर केलेलें चिन्ह; खूण. ११ कामली नांवाच्या झाडाचें फळ; हें मुद्रेसारखें असतें. १२ योगविद्येंत अथवा धार्मिक विधींत सांगितलेली कमरेच्यावरील भागाची,हातांच्या बोटांची ठेवण किंवा विशिष्ट मुखचर्या. या मुद्रा चार आहेत.–गोचरी, अगोचरी, चाचरी, व ज्ञान. कोणी कोणी खेचरी, भूचरी, चांचरी, अगोचरी, अलक्षी किंवा अलक्ष्य मुद्रा. अशा मुद्रा मानितात. याशिवाय ध्यानमुद्रा, शांतमुद्रा,काममुद्रा, क्रोधमुद्रा इ० मुद्रांचे प्रकार आहेत. [सं.] (वाप्र.) **०देणें**–१ दीक्षा देणें (विशेषतः वैष्णव संप्रदायाची) २ वर्म सांगणें; गूढ ज्ञान सांगणें. 'ते मुद्रा श्रीगोरक्षराया। दिधली मीनीं।' –ज्ञा १८. १७५४. **०पडणें**–वळण येणें; चेहेऱ्यावर आविष्कार होणें. 'बाहेर युक्तीची मुद्रा पडे। तंव आंत सुख वाढे।' –ज्ञा ६.३५. **०लावणें**–समाप्ती सूचक शिक्का देणें; खूण करणें. 'म्हणोनि नवमींचिया अभिप्रायां। सहसा मुद्रा लावावया। विहाला मी वायां। गर्व कां करूं।' –ज्ञा १०.३२. सामाशब्द– **मुद्रांकित**–वि. शिक्का असलेला; चिन्हयुक्त. 'तुका म्हणे तैसा मी एक पतित। परि मुद्रांकित जालों तुझा।' –तुगा १३७३. **मुद्राचिरी**–स्त्री. दानपत्र; बक्षीसपत्र (सही शिक्क्याचे). 'तो द्रोण दुपदा विनवी नम्रोत्तरी। कीं मज द्यावी मुद्राचिरी। जें बोलिला होतासि वक्त्रीं। अर्धराज्याची।' –कथा ५.११.६९. **०दोष**–पु. १ प्रसन्नतेचा अभाव. २ लज्जा वगैरे सारखा विकार. 'छत्रपते, कर्तबगारीच्या आपल्या जगज्जेतृत्वापुढें धीटपणें उभे राहताना सुद्धां स्वतांच्या शून्यत्वामुळें मुद्रादोष पतकरावे लागतात.' –शिवचरणी. (पु पां. गोखलेकृत) **०धारी**–पु. १ सरकारी कागदावर शिक्के मारणारा; सरकारी शिक्का ज्याच्या जवळ असतो तो; शिक्क्यावरील अधिकारी. (ह्या वरून सामा) कोणीहि कोणताहि अधिकार, पदवी इ० चें चिन्ह धारण करणारा. 'राजश्री मुद्राधारी व लेखक किल्ले चंदनगड यांसी आज्ञा.' –बाडशाछ १.१२४. २ बाहू, कपाळ, छाती इ०वर गोपीचंदनाच्या मुद्रा ज्यानें लावल्या आहेत असा. (यावरून ल.) ३ वैष्णव. ४ मुद्रा इ० लावणारा किंवा करणारा आणि त्यायोगानें आपल्या धार्मिकतेचा गाजावाजा करणारा; दांभिक; भक्तीचा टेंभा मिरविणारा. ५ पूजा किंवा ध्यान करण्यास योग्य अशी मुद्रा किंवा आव दाखविणारा. **०हीन**–वि. १ ज्याचा चेहरा पाहून कोणाला त्याच्या विषयीं आदर किंवा दरारा वाटत नाहीं असा. २ ज्याचा चेहरा टवटवीत दिसत नाहीं असा; विद्रूप चेहऱ्याचा **मुद्रिका**–स्त्री. मुद्रा अर्थ १ ते ३ व ५, ६ पहा.

मुद्दुनियां—क्रिवि. (महानु.) संक्षेपानें; संकळौनिया. 'या कारणें बोलैन सर्वथा । मुद्दुनिया ।' –ज्ञाप्र २०९.

मुंध, मुंधा, मुंधारा, मुंधारा—बुंध-बुंधा इ० पहा.

मुंधणें, मुंधविणें, मुंधाविणें—उक्रि. ओंक बुजविणें; ओंक भरणें, भरून येणें. मुंदणें; मुंदविणें पहा.

मुधनी—स्त्री. (व.) ज्यांत दांडा बसवितात तें कुऱ्हाडीचें वाटोळें ओंक. [मुदनी]

मुधा—क्रिवि. व्यर्थ; फुकट; निरुपयोगी; वृथा. 'सोडुनि वेडा छंद मनांतिल खेद करावा मी न मुधा ।' –ममं ५१. [सं. मिथ्या, मृषा ?]

मुधादित्य—पु. (महानु.) सूर्याचें देऊळ (पैठण येथील); सूर्यदेवता. 'मुधादित्या अवस्थान ।' –चक्रधरचरित्र.

मुधाळ, मुधाठ—वि. कुरळे (केस) मुधाळ पहा.

मुनकता—स्त्री. मिळवणी; जुळणी; मेळ. 'परी उत्पन्न खर्चाची मुनकता । ठरावी पाहिजे तत्वतां ।' –पैमा १५.२६. [अर. मुनक्का]

मुनका—पु. निवाडा; फैसला. 'एक महिन्याचा करार कीं जाबसालाचा मुनका करून यावें.' –रा २२.६३. –क्रिवि. साफ; संपूर्ण. 'बहालीच्या सनदा होतील ते समयीं नजराण वगैरे जाबसाल अवल मुनका करून मग सनदा द्यावयाच्या.' –रा ७.७३ [अर. मुनक्का]

मुनमुन—स्त्री. (पुणेरी, मंडईतील) हांजीहांजी.

मुनवा—पु. केळीचा रोपा; केळवा; केळीला नवीन फुटलेला कोंब (कों.) मोनवा; मोना.

मुनशी, मुन्शी—पु. १ फारशी भाषा जाणणारा चिटणीस; फार्शी पत्रव्यवहार करणारा; पारसनीस. २ अरबी, फारशी इ० भाषांचा शिक्षक. [फा. मुन्शी] **०गिरी**–स्त्री. पारसनिशी; मुन्शीचें काम; हुद्दा, कौशल्य इ०

मुनसफ, मुन्सफ, मुनसी(सि)फ, मुनसूफ—पु. खालच्या दिवाणी कोर्टांतील न्यायाधीश; (सामा.) न्यायाधीश. –वि. न्यायी. 'इंग्रजी इन्साफी, त्यांचे येरुत्यारी हेही मुन्सफ असतील.' –ख ७.३५७०. [अर. मुन्सिफ्] **मुनसफी-सिफी-बी-मुन्सफी-सिफि**–स्त्री. १ न्यायनिवाडा; चौकशी. 'काय गैरमाकूल कार्भार होईल त्याची मुन्सिफी साहेबीं करावी.' –रा ८.१०. २ मुनसफाचा हुद्दा, काम. ३ न्यायनिवाडयाचें प्रकरण

मुना—पु. मुकाबला; नजरानजर. 'ऐन लढाईच्या मुन्यास सर्कार कामावर नीळकंठराव दिवंगत झाले.' –ख ४.१७९८. [अर. मुआयना]

मुनादि-दी—स्त्री दवंडी. 'आपले शहरांत सलुख्याची मुनादी देऊन...' –ख ७.३५६९. [अर. मनादी]

मुनाफा—पु. १ नफा; फायदा; लाभ. २ हित; कल्याण. ३ (व.) शेत विकल्यावर कुंळानें मालगुजारास द्यावयाचा पैसा. [अर. मुनाफआ, मन्फआ]

मुनासब—वि. उचित; योग्य; रास्त; बरोबर; युक्त; न्यायाचें. [अर. मुनासिब्]

मुनि, मुनी—पु. १ ऋषि; यति; तपस्वी. २ मनन करणारा. 'मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं । बोधमदामृत मुनी-। अली सेविती ।' –ज्ञा १.१६. (महानु.) मननशील; मौन्यशील. 'भणे जगीं हुनी जन्ममरणा । मुनी रिगाले जेआ शरणा ।' –ऋ १३. [सं. मुनि; सं. मन्=ज्ञान होणें; विचार करणें] **०श्राद्ध**–न. १ मुनीनें केलेलें श्राद्ध. यांत ब्राह्मणांना दक्षिणेच्या मानानें अधिक श्रम करावे लागतात. (यावरून ल.) २ फार मेहनत आणि अतिशय काळजी घेऊन सुद्धां अगदीं थोडी मिळकत होणारें काम.

मुनिखिचडी—स्त्री. केशर, लवंगा, वेलदोडे, जायफळ इ० घालून केलेली श्रीमन्ती थाटाची खिचडी.

मुनीम—पु. एखादें काम, धंदा चालविण्यास नेमलेला इसम; गुमास्ता; व्यवस्थापक; व्यापाऱ्याचा प्रतिनिधि; अडत्या. (इं.) एजंट [अर. मुनीब्] **मुनिमी**–स्त्री. मुनिमाचा हुद्दा, काम.

मुने—न. (महानु) शस्त्राचें कोचाळें; शस्त्राची अणी. 'शस्त्राच्या मुनैवर घाली ।' –आचार, टाचनीटीका ११.

मुन्कीर, मुनकीर—वि. नाकबूल करणारा; इन्कार करणारा. [अर. मुन्किर्]

मुन्हेचे लोक—पु.अव. आघाडीचे लोक; अर्थात् मातबर लोक. –पेद १०.७१.

मुफत—क्रिवि. १ फुकट; विनामूल्य. २ धर्मार्थ. [फा. मफ्त] **०चा**–वि. विनामूल्य; कांहीं किंमत न देतां घेतलेला.

मुफस्सल, मुफसल, मुफशील—वि. सविस्तर; संपूर्ण; तपशीलवार असलेला; पूर्णपणें सांगितलेला, लिहिलेला. 'कलमी केला मतालीब मुफशील जाहिरीस पोहोंचला.' –पया ३८४. [अर. मुफस्सल्]

मुफाइजा—पु. कृपापत्र; इनायतनामा. 'मुफाइजा इब्लाग केला तो उसुल जाहला.' –रा १०.१२७. [अर. मुफावझा]

मुफासला—पु. अंतर; तफावत; फरक; फेर. 'आपले फौजेसी व राजाच्या फौजेसी सोळा कोसांचा मुफासला आहे.' –दिमारा २.१६३. [अर]

मुफीद—वि. हितकर; फायदेशीर; फायद्याचें. 'ती सला दोन्ही उम्या दौलतींच्या तक्वियतेस नेक व मुफीद आहे.' –रा १०.२७८. [अर.]

मुफ्ती—पु. न्याय, फत्वा देणारा; न्यायाधीश; बडा काजी; मुसलमानांतील कायदेकानू करणारा मुख्य. [अर. मुफ्ती] **०गिरी, मुफ्तीगिरी**–स्त्री. न्यायाधिशी; ठराव करणें किंवा निकाल देणें इ० कामगिरी. –वाडमा ४.१०६. **मुफ्ती पोशाख**–पु. साधा पोशाख; विशिष्ट नव्हे असा

मुफ्सद—पु. पुण्ड; बखेडेखोर; बंडखोर. 'असा बंदोबस्त राखावा कीं कोणीहि मुफ्सद बादशाही मुलखांत बंड न करूं शके.' –रा ८.१०९. [अर. मुफ्सिद्] **मुफ्सिदी**–स्त्री. बंडखोरी. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

मुंब—पु. १ विशिष्ट घाटाचें मोठें मडकें. २ विशिष्ट प्रकारचें गलबत. मुमडा पहा.

मुंबई—स्त्री. विना. १ एक शहर. या शहराची अधिष्ठात्री देवी मुंबा ही आहे. २ (ल.) माणूस, पशु किंवा पदार्थ इ० बेपत्ता होणें. ३ सत्यानाश; पूर्णविध्वंस. ४ धपके मारणें; खरडपट्टी काढणें. ५ मनुष्याच्या चरबीपासुन मलम तयार करणें; मृतशरीराचें ईजिप्तमधील ममी प्रमाणें संरक्षण करणें. [जुन्या मुंबईतील बाटविण्याच्या व अंदाधुंदीच्या कारभारावरून हा अर्थ असावा. मिसरी 'ममी' शब्दावरूनहि कांहीं अर्थ संभवतात] [मुंबा] **(पैशाची) मुंबई करणें, (एखाद्याची) मुंबई होणें**–१ एखादा इसम बेपत्ता होणें. २ व्यापारादिकांत तो ठार बुडणें. **(एखाद्या पदार्थाची) मुंबई होणें–करणें**–त्याची नासाडी होणें–करणें. **जिवाची मुंबई करणें**–चैन करणें, मजा मारणें. (मुंबईस नवीन जाणारे लोक तेथें चैन करतात यावरून.)

मुबदला, मुबादला—मोबदला पहा.

मुंबर—न. (कु.) तारुण्यावस्थेंत तोंडावर उठणाऱ्या पुटकुळ्या; तारुण्यपीटिका; मुरूम.

मुंबर, मुभर, मुमोर, मुमूर—पु. फुफाटा; जळजळीत तापलेली राख.

मुंबरो—पु (गो.) डांसासारखी चावणारी लहान माशी.

मुबलक-ख ग, मुब्लक, मब्लग—नपु. (हिशोबांतील किंवा मिळवणीची) एकंदर रक्कम; एकूण बेरीज. –वि. विपुल; पुष्कळ; मनसुराद; अघळपघळ. 'मब्लग मत्ता पाडाव केले.' –सभासद १९. [अर. मब्लघ=मोठी रक्कम]

मुबा—स्त्री. मोकळीक; सदरपरवानगी; कायदेशीर माफी; कांहींहि करण्याची कोणीकाला असलेली बिनशर्त परवानगी; मुभा. २ बक्षीस; देणगी. 'तरी तुमची वस्तभाव सुतळीचा तोडा आदिकरून जी स्वामीनीं दिली आहे ती मुबा केली असे.' –ब्रच १२५ [अर. मुबाह्=विहित]

मुबारक—पु. संतोष; इनाम; बक्षीस. –वि शुभ; मंगलदायी शल; सुखी. [अर. मुबारक्] **०करणें**–इनाम देणें. 'शिर्के यांशीं गांव व महाल मुबारक करून त्यांची कन्या महाराजांनीं आपले पुत्रास केली.' –चित्रगुप्त ५. **०बाद–बादी, मुबरकबादी, मुबारकी**–स्त्री. अभिनंदन; खुशाली; आशिर्वाद; संतोष. 'चार घटका मुबारकीच्या नजरा जाल्या.' –ख ९. ४६२५. [फा. मुबारक् बाद=मंगलदायक असो]

मुबारत—स्त्री. परस्परसंमत घटस्फोट;पातीदारीची वाटणी. –धका ७५. [अर. मुबारात्]

मुंब्रज—मंबेरज पहा.

मुभा—मुबा पहा.

मुमडा—पु विशिष्ट तऱ्हेचें मोठें गलबत. मुंब अर्थ २ पहा.

मुमाहिद—वि. साह्यकारी. –आदिलशाही फर्मानें. [फा. अर. मुमिद=सहाय्यक]

मुमीर, मुमूर, मुमर—मुंबर पहा.

मुमुर्ली—पु. (गो.) जाड व लहान भाकरी.

मुमुर्शेलो–ल्लो—वि. (गो.) हिरमुसलेला. [मुरमुसणें]

मुमुक्षा—स्त्री मोक्षप्राप्तीची इच्छा. [सं.] **मुमुक्षु–क्ष–मुमुक्षुजन**–पु. मोक्षाची इच्छा करणारा; मुक्ति इच्छिणारा. 'बद्धचि होती मुमुक्ष...। भक्तिमार्गे।' –दा १.१.३४.

मुमू—न. (कातकरी) पाणी. –बदलापूर १२८.

मुमूर्षा—स्त्री. १ मरण्याची इच्छा. २ मरणांतिक अवस्था. मरण्याच्या वेळची स्थिति. [सं. मृ=मरणें] **मुमूर्षु–पू, मुमूर्षित**–वि. १ मरूं इच्छिणारा. २ मरणाच्या द्वारीं पोंचलेला; ज्याचें मरण जवळ येऊन ठेपलें आहे असा; आसन्नमरण; मरणोन्मुख; मरावयास टेंकलेला.

मुम्ताझ—वि. विभूषित; प्रख्यात. –आदिलशाही फर्मानें. [अर. मुम्ताझ=निवडक, प्रख्यात, थोर]

मुयदंड—पु. आटयापाटयांच्या खेळांतील सुरपाटी; सर्व पाट्या मधोमध छेदणारी पाटी. [सं. मूळदंड?] **मुयदंड्या**–पु. सुर धरणारा इसम; सुराच्या पाटीवरील इसम.

मुयधोंडा—पु. गांवाची हद्द दाखविण्यासाठीं पुरलेला दगड. [मूळ+धोंडा]

मुयर, मुय्यार—वि. (व.) १ निःसत्त्व; कमजोर. 'मुयार कडबा' २ मुर्दाड; बेहिमती; निर्बळ; नालायक; कुचकामाचा. 'या मुयार पोरट्याच्या हातून नेटानें काम काय पार पडावयाचें आहे?' [सं. मृत]

मुयाल—न. (बे. शेतींतील) १ बैल. २ साटेलोटें.

मुयेद—न. (गो.) (२८ रु. किंमतीचें) नाणें.

मुयौचें—क्रि. (गो.) (पायांना) मुंग्या येणें; शरीराचा एखादा भाग विरविरणें.

मुरकट—न. चिलट; डांस; मूरकूट.

मुरकणें—अक्रि. १ एखाद्या गोष्टीला मनांतून संमति असून तिजबद्दल लज्जेन बाहेरून नापसंति दाखविणें; मनांतून करावयाचें असतां बाह्यात्कारीं विपरीत भासवून मुरडणें. २ मुशीमध्यें सोनें इ० वळूं लागणें; वेटाळूं लागणें. ३ (मावळी) वळणें; विशिष्ट बाजूस फिरणें. 'मरळ जाऊन डाव्या हाताकडे मुरक म्हणजे तुला श्री महाकाळेश्वराचें मंदिर सांपडेल.' [मुरु =नाखुषी दाखविणें] **तोंड मुरकणें**–(एखाद्या स्त्रीनें) विनयशीलपणानें तोंड फिरविणें; मुरका मारणें.; **मुरका**–पु. नखरा; अंग मुरडणें; लाजेनें किंवा विनयशीलपणानें तोंड फिरविणें. (क्रि० मारणें)

मुरका—पु. मुरकुटासारख्या बारीक माश्यांनीं मध सांठविण्याकरितां झाडाच्या ढोलींत केलेलें लहान पोळें. मुळकुटयें पहा.

मुरकी—स्त्री. गोसावी, वैरागी, वाणी, परदेशी इ० लोकांचा कानांत घालण्याचा एक अलंकार; बाळी; डूल [का. मुरि=अंगठी, वळें]

मुरकी—स्त्री. (संगीत) तंतुवाद्यावर कोणताहि स्वर वाजवीत असतां त्याच्या मागच्या व पुढच्या स्वरांस झटका देऊन त्या तीन स्वरांपासून उत्पन्न केलेला मिश्र स्वर.

मुरकुंडी–ड—स्त्री. १ (उत्सुकता, फार हंसणें. असह्य थंडी, ताप, अशक्तपणा, भीति, आनंद इ० कारणांमुळें होणारी) शरीराची संकुचित स्थिति; गात्रवैकल्य; शरीराचें संकोचन. (क्रि० घालणें; मारणें; पडणें; वळणें). 'वाघ पाहतांच त्याची मुरकुंडी वळली ' २ भीड; दाटी; खेचाखेच. ३ झुंड; उडद्यावर उडद्या. (विशेषतः अव. उपयोग). (क्रि० पडणें) 'अनेका हिंसांची सहज मुरकुडी वरि पडे । '–सारुह ६.१६२. 'अनंत फंदीच्या लावण्यावर हजारों माणसांच्या मुरकुंड्या पडत.' ३ पाय मानेवर ठेवून बसण्याचें एक आसन; गुडघ्यांत मान घालून व हात पायांभोंवतीं वेढून बसण्याचा प्रकार. (क्रि० मारणें; घेणें; वळणें). [का. मुरि=वळणें] **०पाडणें**–क्रिकणें. 'विधि हराची मुरकुंडी । अनंग पंचकुसुमशरेंचि पाडी । '–जै १ १००. **०वळणें**–१ देहभान नाहींसें होऊन पडणें. २ भयानें भेदरून जाणें; गर्भगळित होणें. 'मुरकुंडी कंसाची वळली । शस्त्रें हातींचीं गळालीं । '–ह ३.११७. **मुरखंडी**–स्त्री. मूर्च्छा; घेरी.

मुरकू(कु)ट—न. १ डांस; चिलट; केमरें. २ (ल.) (तिरस्कारार्थी) क्षुद्र मनुष्य; कःपदार्थ **मुरकुटी माशी**–स्त्री. मध गोळा करणारी एक मुरकुटासारखी लहान माशी. **मुरकुटयें**–न. ह्या माशीचें मधाचें पोळें.

मुरक्का—पु. चित्रांचें किंवा नकाशांचें बांधलेलें पुस्तक; बांधीव चित्रपुस्तक. आल्बम; 'तस्विरांचे मुरक्के दोन चार आले.' –ऐटि ३.५९. [अर. मुरक्कअ]

मुरक्किबात—स्त्री. (संगीत) एखादा मिश्र राग कोणकोणते राग मिळून तयार झाला आहे हें स्पष्ट करून सांगणें.

मुरगळणें, मुरगाळणें—उक्रि. पिरगळणें; पिळवटणें, एकदम किंवा हिसका देऊन वळविणें; पिळवटून वांकडें करणें–होणें. [का. मुरि=वळणें] **(एखाद्याची मान-मुंडी) मुरगळणें-पिरगळणें-पिळणें**–एखाद्याचा सर्वतोपरी नाश करणें; त्यास ठार मारणें. **मुरग(गा)ळा**–पु. १ पीळ देऊन वांकडा केलेला भाग; मिरगळा; चोळामोळा. २ वक्रता; वळण; कोपरा.

मुरगी—स्त्री. कोंबडी. [फा. मुर्ग़=पक्षी]

मुरंगी—१(कु.)लाल तोंडाचा चवदार मासा. २(कु.)बारीक ऊ.

मुरगुमी—स्त्री. (सोनारी) (सरी, वाकी इ० तयार करण्याकरितां) पीळ घालून एकत्र केलेल्या दोन सुतांची जोडी.

मुरट—न. (कों.) झाडावर पडणाऱ्या रोगामुळें मुरडून वांकडें झालेलें पान, फळ इ० [मुरडणें]

मुरटणें—उक्रि. १ (पान, फळ इ०) रोगामुळें वांकडें होणें; मुरडणें; सुरकुतणें. २ एकदम वळणें; एकदम वळसा घेणें. ३ पिळवटणें; एकदम पिळणें. **मुरटा**—पु. मुरटलेलें, खुरटलेलें, फळ (विशेषतः काकडी) –वि. मुरटलेलें; खुरटलेलें; वांकडें झालेलें. **मुरटी**–स्त्री. १ (कों.) ज्याच्या योगानें पानें, फळें इ० मुरडून वांकडीं होतात असा झाडास होणारा रोग; मुरड.

मुरड—स्त्री. १ वस्त्र, कागद, भाकरी इ०चा दुमडलेला कांठ. २ रस्ता, नदी इ०चें वळण; वांक. ३ दोरी, शरीर, गात्र इ०स दिलेला वळसा. ४ पदार्थाचा घाट, आकार, ठेवण, घडण, ढब, घाटणी. ५ एखाद्या कामांतील कौशल्य. ६ मिशांना दिलेलें अक्कडबाज वळण. ७ जमीनीची वक्रता. ८ अक्षराचें वळण. ९ भाषणांस दिलेलें निराळें वळण; भाषण संपविण्याकरितां, त्याचा ओघ बदलण्याकरितां दिलेलें वळण; भाषणाच्या ओघाला दिलेली निराळी गति. १० वस्त्राचा कांठ दुमडून घालण्याची एक प्रकारची शिवण. ११ करंजी, कानवला इ०चे कांठ जोडून वळवून घालतात ती घडी, दुमड; त्यांच्या सांध्यावर करतात ती नक्षी. [का. मुरि=वाकणें, वळणें] **०कानवला–कान्होला**–पु. कांठाला मुरड घातलेला कानवला. (मुलगा, मुलगी परगांवास निघाली असतां त्यांनीं लवकर परत यावें म्हणून जातांना त्यांच्या जेवणांत मुरडकानवला देण्याची चाल असे त्यावरून). **०कानवला खाणें**–परगांवाहून लवकर परत येणें. **मुरडण–न**–स्त्री. (शेती) पिकाची एक पात काढावयाची पुरी करून दुसरी काढण्यासाठीं पुन्हां परत फिरणें. बांधाच्या एका टोंकांस जाऊन औत परत फिरणें. सामान्यतः वळण; परती. **मुरडणी**–स्त्री. मुरडण्याची, दुमडण्याची क्रिया. **मुरडणें**–उक्रि. १ मागें वळणें; फिरणें; माघारें उलटणें; परतणें. 'मग तो मुरडला ऋषेश्वर । भ्यालेपणें ।' –कथा १.१५.६२. २ मान मागें

वळवून पहाणें. 'यश रुसलें मुरडुनि तुज पहातें मुला बाहे।' –मोउद्योग ९.७६. ३ पिरगाळणें; वांकडें करणें; मागें वळविणें. 'अरिच तेंचि मुरडितों नरडें।' –मोविराट १.१०७. ४ दुमडणें; चुरगाळणें; घडया घालणें. ५ सुरकुतणें; खुरटणें; आकसणें. ६ (करंजी, कानवला इ०स) नक्षीदार मुरड घालणें; कांठ वळविणें. ७ कागदाला घडया घालून रकाने पाडणें. ८ पराजय करणें. 'न श्वसनावरि अभ्र मुरडेल।' –मोभीष्म ५.३०. [का. मुरि=वळणें; वळविणें; फिरविणें] (अंग, नाक, कान, डोळे, हात, तोंड) **मुरडणें**–अंग इ० वांकडें करून नापसंति दर्शविणें. **मुरड(मुरूड)शेंग**–स्त्री. एक औषधी शेंग (हिला मुरड किंवा पीळ असतो); असल्या शेंगेचें झाड **मुरडा**–पु. १ दुमड; पीळ; पिरगळा; वेढ. २ आमांशादि विकारानें आंतडीं पिळवटल्यासारखीं होऊन पोटांत होणारी व्यथा; पोटशूळ. ३ पानें, फुलें इ० खुरटून टाकणारा, झाडास होणारा एक रोग; मरटी. **मुरडाण-न-न** १ वांकडी-तिकडी, वळणाची जमीन. २ नांगराची खेप (शेताच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकाला जाऊन परत पहिल्या ठिकाणीं येणारी); अशा एका खेपेनें नांगरला जाणारा जमिनीचा पट्टा, भाग. **मुरडि(डी)ब**–वि. मुरडलेला; नागमोडी; पीळदार; फिरलेला; दुमडलेला; वांकडा. 'मुरडीव शुण्डादंड सरळ।' –दा १.२.१२. **मुरडी**–स्त्री. मुरडा; मुरटी; बटाटे वगैरेवर पडणारा एक रोग **मुरडु(डुं)गा**–वि. (राजा.) नखरेबाज; मरडत चालणारा, ऐटबाज चालीचा, नटूनथटून जाणारा.

मुरणें—अक्रि. १ (पाणी, दूध, तेल, तूप, रंग इ०) पातळ पदार्थ, वस्त्र, भाकरी, लांकूड, जमीन इ०मध्यें शिरून त्यांत निविष्ट होऊन राहणें; त्यांत जिरणें. २ शोषून घेतला जाणें; पाकांत घातलेल्या आंब्यांत, लोणच्याच्या फोडींत पाक किंवा क्षार भरला जाणें; किंवा जिरून सर्व भागांत पसरून असणें; पाकणें. ३ दुधाला चांगल्या तऱ्हेनें विरजण लागणें. ४ पिकणें; पूर्णत्वास येणें; पक्व होणें; (बी) पूर्ण तयार होऊन वाळणें. 'बीज दोन रोज टेविलें म्हणजे मुरेल, मग पेरायास चांगलें.' ५ परिपक्वदशेस येणें; मूळचा खडबडीतपणा, कच्चेपणा इ० जाऊन गुळगुळीतपणा येऊन (वस्तु) वापरण्यासारखी किंवा उपयोगी होणें; वस्तु नवीन असतां तिचा कोरेपणा वापरल्यानें जाऊन ती सरावाची होणें. ६ गंभीर, स्थिरमनस्क, शांत होणें; नियतवृत्ति होणें; विचारी होणें; निवळणें. ७ अभ्यासानें, संवयीनें तरबेज होणें; वाकबगार होणें; मुरब्बी होणें; पूर्ण परिचित असणें. 'हा मनुष्य ह्या कामांत मुरला आहे, ह्यासच हें काम सांगावें.' ८ (राग, इच्छा, वासना इ०) दबणें; कमी होणें; नाहींसा होणें; दडणें. ९ घाम आल्याशिवाय ताप कमी होणें; बारीक ताप अंगांत राहणें. १० (गळू, फोड, उठाणू इ०) फुटल्याशिवाय बसणें; आंतल्याआंत दबून जाणें; जिरणें. ११ (चिंतनांत) मग्न होणें; गढून जाणें. १२ एखाद्या कामीं अजमासापेक्षां जास्त (मनुष्यें पैसा, पदार्थ) लागणें; अधिक खप होणें. १३ (ल.) तृप्त होणें. [सं. मूर्व्] **मुरून बसणें**–हातपाय आंखडून आणि गुडघ्यांत डोकें घालून बसणें; मुसमुशी मारून बसणें. **मुरी मारणें**–कांहीं कालपर्यंत स्वत: लपून राहणें; दडणें, दडी मारून बसणें.

मुरता—वि. मुरटा; मुरटलेला; खुरटलेला.

मुरदं(दुं)ग—पु. पखवाज; मृदंग; नाल. [सं. मृदंग]

मुरदं(दुं)ग—पु. आटयापाटयांच्या खेळांतील सुरपाटी. [सं. मूल+दंड] **०पाटी, मुरदंड**–स्त्री. आटयापाटयांच्या खेळांतील सुरपाटी; मधली मोठी उभी रेघ: मुयदंड पहा. **मुरदं(दुं)ग्या, मुरदंड्या, मुंदुंग्या**–पु सुरपाटी धरणारा गडी; मुरदुंगपाटीवर फिरत राहून सुरपाटीच्या दोन्ही बाजूच्या विरुद्ध पक्षाच्या गडयांना मारण्याचा प्रयत्न करणारा गडी.

मुरदा, मुरदाड—पु मुडदा, मुडदार पहा.

मुरदाडणें—सक्रि. १ पिरगळणें; मुरगळणें; ओरबाडून मोडणें; तोडणें. 'त्या म्हशीनें तुळशी एका क्षणांत मुरदाडल्या.' २ (ल.) त्रास देणें; गांजणें; जुलूम करणें (या अर्थी मानाचा या शब्दांशीं जोडून या शब्दाचा विशेष उपयोग करतात). [मुरडणें]

मुरदाडणें—सक्रि. मुरदाडाप्रमाणें वागविणें; उपहास करणें; निर्भर्त्सना करणें; कमी लेखणें; हंसून तिरस्कार करणें. [मुरदाड]

मुरदाडशिंग-शेंग, मुरदारशिंग, मोदारशृंग—न. एक औषध. शिशाचें प्राणिद. [फा.]

मुरंबा, मुरब्बा, मोरंबा—पु. साखरेच्या पाकांत मुरविलेला आंबा इ० आम्रपाक, पाक. [अर. मुरब्बा]

मुरब्बी-बी—वि. १ कैवारी; आश्रयदाता; पक्ष घेऊन बोलणारा. 'तुम्ही मुरब्बी होऊन आलपेष्टण यासीं बोलावें.' –मदरु २.३१. २ पोक्त; अनुभविक; माहितगार; हितेच्छु. 'आपण आमचे मुरबी दोस्त, आमचें जेणें करून चांगलें तें इच्छिणारे.' –भाअ १८३८. ३ मुख्य अधिकारी; दिग्दर्शक; संरक्षक; पालक; वस्ताद. 'दौलतींत मुरबी अमीर कोणी राहिला नाहीं.' –पाब ८. [अर. मुरब्बी]

मुरमाड—न. मुरमाचा खडक; मऊ झालेला खडक; ठिसूळ खडक: जीर्ण कार. [मुरून] **मुरमाड-डी, मुरमाडी**–स्त्री. मुरूम असलेली जमीन; बारीक ठिसूळ खडी असलेली जमीन. (व. ना) मुरभाटी, मुरमाटी.

मुरमु(मू)र—स्त्री. कुरबूर; कुरकूर, बुरबूर; पुटपूट. [ध्व.] **मुरमुरणें**–अक्रि. १ कुरबूर लावणें, करणें; पुटपुटणें; कुरकुरणें २ कुसमुसणें; धुसफुसणें.

मुरमुरा—पु. १ चुरमुरा. २ सडलेला व भिजत घालून नंतर भाजलेला तांदूळ. चुरमुऱ्याहून हा नाजूक असतो. ३ भाजका

पोह्याचा दाणा (एवढयाच अर्थी कांहीं लोक या शब्दाचा प्रयोग करतात). [सं. मुर्मुरक] **मुरमुरीत**-वि. चुरचुरीत.

मुरमुशी—स्त्री. १ ताप येण्याच्या अगोदर किंवा येऊन गेल्यानंतर वाटणारी ग्लानि. (क्रि० येणें). २ अंगाचा संकोच करून बसणें; मुरगुशी पहा. (क्रि० मारणें) ३ अंगाचा संकोच करून पडावेंसें वाटणें. **मुरमुसणें, मुरमुसून पडणें-निजणें-बसणें-राहणें**-अक्रि. १ मुरमुशी मारून बसणें; अंग आंखडून बसणें. २ तापामुळें ग्लानि येणें; मूर्च्छित होणें. ३ मुखचर्या पालटणें; म्लान व उदासीन दिसणें; चेहरा फिकट पडलेला दिसणें.

मुरली—स्त्री. (कों.) नदीकांठचें एक प्रकारचें गवत.

मुरली, मुरळी—स्त्री. तोंडानें वाजविण्याचें एक बांबूचें, सुषिर वाद्य. अलगुजाप्रमाणेंच याची सर्व बनावट असते. हें आडवें धरून वाजवितात. [सं.]

मुरवण—न. १ विरजण; दुधाचें घट्ट दहीं होण्याकरिता जें दुधांत थोडेंसें ताक मिसळतात तें. २ (ल.) एखाद्याचा गर्व उतरण्यासारखी गोष्ट. ३ पैशाची अफरातफर केलेली लपविण्यासाठीं सांगितलेली खोटी सबब, किंवा केलेलें ढोंग. ४ अफरातफर; गिळंकृत केलेलें द्रव्य. ५ ज्यामध्यें बारीक सारीक दोष किंवा गोष्टी सहज लपवितां, जिरवितां येतात असें मोठया घडामोडींचें काम. ६ बूड आलेली, खोट आलेली रक्कम. ७ रोगट, अपरिपक्व धान्य. ८ आंब्याच्या अढींतील गवताचे थर; तंबाखू मुरण्याकरितां केलेली योजना; पिकविण्याकरितां, मुरण्याकरतां किंवा उग्रता कमी करण्यासाठीं घातलेलें द्रव्य. [मुरणें] **मुरवणें**-न. मुरवण (विशेषतः पहिल्या तीन अर्थी) पहा. **मुरविणें**-सक्रि. १ मुरत घालणें; धान्य, तंबाखू इ० पदार्थ दडपून ठेवणें. २ (ल.) जिरविणें; गिळंकृत करणें; मोठया खर्चाच्या बाबींत बारीक सारीक खर्च घुसडून लबाडीनें पैसा खाणें. ३ फसवेगिरीनें पैसा खर्चणें; खाणें.

मुरवत—स्त्री. भीड; संकोच; पर्वा; भय; आदर. (क्रि० बाळगणें; धरणें; राखणें).

मुरवन—न. १ (माण.) कणसें न आलेला कडबा. २ मुरवणा, मुराण पहा.

मुरवा—पु. (कों.) १ कोंवळया भाजीपाल्याचा समुदाय. २ मरवा.

मुरवा—पु. (व.) गुरांच्या खुराच्या मागचा नखासारखा भाग; नख्या.

मुरवा—पु. (कु.) मांसरस.

मुरसंड-डी—स्त्री. मूर्च्छा; झीट. (क्रि० येणें). [सं. मूर्च्छा]

मुरसा-स्सा—वि. रत्नजडीत. [अर. मुरस्सा]

मुरळी—स्त्री. खंडोबाला वाहिलेली स्त्री; भक्तीण; देवदासी. [सं. मैराल=मल्लारि (खंडोबा) मैराली (स्त्री.) =मुरळी; का. मरळी] **०महार**-पु. खंडोबाला वाहिलेल्या महार स्त्रीपासुन झालेला महार. -अस्पृ ३४.

मुरा, मुरामासा—पु. गोडया पाण्यांतील एका जातीचा मासा.

मुराण—न. अगदीं कोंवळेपणीं रोगानें जळलेलें शेत. (व ड म्हणजे बेरंच वाढल्यावर खुरटलेलीं जोंधळा, बाजरी इ०ची तार्टे); मुरवण, मुरवन पहा. [मुरणें]

मुराद—स्त्री. (अशिष्ट) इच्छा. -वि विपुल; पुष्कळ; इच्छेप्रमाणें; भरपूर. 'हस्तनापूरचा बंदोबस्त हातास आला म्हणजे मुराद सर्व गोष्टी व मन्सबा हासल होईल ऐसें आहे -रा ८.२०३. [अर. मुराद्] **मनमुराद**-वि. यथेच्छ; भरपूर.

मुरापा—वि. ज्याचे मागील पाय कोंबडयाच्या पायाप्रमाणें नीट असतात असा (घोडा); असा घोडा चांगला समजतात. -अश्वप १.१०३.

मुराबट्टी—स्त्री. मातेरें; घाण; नाश. 'कारटीनें आंगरख्याची अगदीं मुराबट्टी केली.'

मुरांबा—पु. मुरंबा पहा.

मुरारि-री—विना पु. मुर नांवाच्या दैत्याचा शत्रु; श्रीकृष्ण. [सं. मुर+अरि]

मुरास—पु. सह्याद्रीच्या पूर्वेकडील दऱ्याखोऱ्यांचा प्रदेश. मुरें पहा.

मुरी—स्त्री. अंगावर खवले नसलेला मासा. -बदलापूर १२३.

मुरी—स्त्री. हातपाय आंखडून व डोकें गुडघ्यांत घालून बसणें; मुरगुशी. (क्रि० घालणें; मारणें; मारून बसणें). [मुरणें]

मुरीद—पु. शिष्य; चेला; मौलवीचा चेला. गोविंदगीर मुरीद कमलनयन.' -रा १४.१३४. [अर. मुरीद्]

मुरीन—पु. (गो.) कोंब येण्यापूर्वीची नारळाची स्थिति. मुरूंज पहा.

मुरुडणें, मुरूड, मुरूडशेंग—मुरडणें, मुरड, मुरडशेंग इ० पहा.

मुरूमुरु—क्रिवि. (व.) थोडथोडें.

मुरूवत, मुरोवत, मुरोत—स्त्री. मुरवत पहा.

मुरूंज, मारांद—पु. (गो.) आंतल्या आंत वाढलेला नारळाचा कोंब. नारळाच्या आंतील पाणी संपल्यावर हा कोंब मधील सर्व जागा व्यापतो. हा खातात.

मुरूम—पु. १ घट्ट मातीचे खडे; बुरुंब; काळ्या फत्तराचें रूपांतर होऊन झालेली टणक माती किंवा खडे. मुरमाचे प्रकार-कोंडया, उडया, काळा, तांबडा, दगडी, लोखंडी इ०. २ तारुण्यांत तोंडावर उठणाऱ्या पुटकुळ्या; तारुण्यपीटिका; यांस मुरुमाची पुळी, पुटकुळी किंवा मुरुमाचा फोड असेंहि म्हणतात.

मुरेली-ळी, मुरळी—स्त्री. (कों.) विळी; भाजी इ० चिरण्याकरतां लांकडी ठोकळ्यांत किंवा पाटाला एक पातें उभें बसवून ही केलेली असते. मोरळी पहा.

मुर्गी—स्त्री. कोंबडी. मुरगी पहा. 'मुर्गीस बिस्मिल्ला तो कशास ?।' -होकै ११. [फा. मुर्ग़=पक्षी]

मुर्चा—पु. मोर्चा; तोफांचा मारा. 'राजश्री पंतप्रधान व चिरंजीव पिलाजी व मोंगल भाऊ ऐसे हिंगणघाटावरी येऊन मुर्चे लाविले आहेत.' -१९२. [अर. मूर्चा]

मुर्तोळी, मुहुर्तवळी—पु. (कों.) पाणजांवई; टोकणा. 'उष्टावणाच्या वेळीं मुर्तोळी उर्फ मुहुर्तवळी आणि वर एका पानावर जेवतात.' -मसाप ४.२५४.

मुर्दा, मुर्दाड-र, मुर्देफरास— मुडदा, मुडदार इ० पहा.

मुर्दाडी—स्त्री. मेलेल्या जनावरांचें कातडें.-ज्ञाको (क) २५९.

मुर्दुंगपाटी—स्त्री. आटापाटया. मुरदुंगपाटी पहा. 'हें क्रिकेट, टेनिस, हुतुतु, मुर्दुंगपाटया, विटिदांडू, खोखो वैरे व्यायामशील खेळांसंबधीं झालें.' -आगर ३ १६२.

मुर्मुशी जाणें—क्रि. (कर.) रागावणें.

मुर्वत—स्त्री. माणुसकी; सभ्यता; मुरवत पहा. [अर. मुरूवत] **०शारी**-वि. माणुसकीनें युक्त. [फा. मुरवत+शिआर]

मुऱ्हा, मुसकी, मुंगसें—स्त्रीन. बैल शेतांत काम करीत असताना त्यांनीं पिकास तोंड लावूं नये म्हणून त्यांच्या तोंडाला घालण्याची जाळी; म्होरकी.

मुऱ्हाळी-री—पु. १ श्रीविष्णु. [सं. मुरारी]

मुऱ्हाळी-री—पु. नवऱ्यामुलीचा भाऊ. २ नवीन लग्न झालेल्या मुलीच्या बरोबर पाठराखणें गेलेलें मनुष्य. ३ माघारी; नवरीला सासरीं अगर माहेरीं नेण्याकरतां आलेला इसम. ४ पाचारण; बोलावणें. [सं. मूळहारी, मूळारी] **०मान**-पु. वधूच्या भावाला किंवा त्याच्या जाग्यावरील दुसऱ्यास मान म्हणून द्यावयाचा अहेर, कापडचोपड इ०. **मुराळ्री**-स्त्री. पाटलाच्या घराण्यांतील सुना, लेकी, सासरी-माहेरी नेण्या-आणण्याचें काम.

मुऱ्हे—न. १ धुकें. २ सह्याद्रीच्या लगतचा प्रदेश. हा प्रदेश म्हणजे सह्याद्रीच्या माथ्यापासून पूर्व बाजूस पायथ्यापर्यंत व त्यापुढेंहि ४।५ मैल पर्यंतचा पट्टा. हा पुढें मावळांत समाविष्ट होतो. या प्रांतांत पावसाळ्यांत नेहमीं धुकें असतें. यामुळें या प्रदेशाला हें नांव पडलें. 'आतां आदिमुऱ्ह्यांचीं आदिदैवतें।' -सप्र ५.२.

मुलकण्-कन्-कर—क्रिवि. सौम्यपणानें; मंदपणें; गालांतल्या गालांत (हंसणें). [ध्व.] **मुलकणें**-अक्रि. मंदस्मित करणें.

मुलकी-खी—वि. १ स्वतःच्या मुलुखांतील; स्थानिक; परप्रांतांतील नसलेलें; देशी. २ गैर फौजदारी; वसुलासंबंधींचा; जमाबंदीबाबत; चिटनिशी नव्हे तें. [मुलूख] **०कोर्ट**-न. चालू वहिवाट, खंडवसुली वगैरे बाबतींतील दावे चालविणारें मामलेदार किंवा महालकरी यांचें कोर्ट. **०बाकी**-स्त्री. लोकांकडून कुळांकडून येण्याचा वसूल. **०लाट**-पु गव्हर्नर जनरल; व्हाईसरॉय.

मुलगा—पु. १ पुत्र; छोकरा; लेक. २ साधारणतः सोळा वर्षांखालील पुरुषव्यक्ति. ३ गुलामस्त्रीचा पुत्र [सं. मूलकः] **मुलगी**-स्त्री. १ कन्या. २ बाराचौदा वर्षांची, अविवाहित स्त्री. ३ सून (सासुसासरा सुनेस संबोधनार्थी मुली म्हणतात.) 'काळें पदार्थ दिधला होता तेणेंचि तो मुली नेला।' -मोस्त्री ३ ६९. **०उजविणें**-मुलीचें लग्न करून तिच्या ऋणांतून मुक्त होणें. **०गळ्याशीं-गळीं लागणें**-मुलगी उपवर होणें; विवाह लांबणीवर टाकतां येणें कठीण होण्याइतकी मुलगी मोठी होणें. **०सांगून येणें**-मुलीच्या बापानें किंवा नातलगानें, आमची मुलगी स्वीकारा अशी मुलास किंवा मुलाच्या तर्फे कोणा माणसास विनंति करणें. **मुलगें**-न मूल. **मुलें**-नअव. मुलगे आणि मुली. मूल आणि मुलगा हे शब्द एकमेकांबद्दल योजतात. परंतु त्यांतील फरक असाः-मूल=म्हणजे कोणतेंहि लहान मूउ. व मुलगा म्हणजे पुत्र; कोणाचा तरी लेक या अर्थी योजतात.

मुलजमत—स्त्री. (ल.) सेवेसीं हजर होणें; भेट. मुलाजमत पहा. [फा. मुलाझमत]

मुलतानी—स्त्री (संगीत)एक रागिणी, राग. ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. अरोहांत ऋषभ, धैवत वर्ज्य, जाति औडुव-संपूर्ण, वादी पंचम, संवादी षड्ज. गानसमय दिवसाचा चवथा प्रहर. -वि. मुलतान देशासंबंधीं. [मुलतान] **०कमान**-स्त्री. एक प्रकारचें धनुष्य. 'मी मुलतानी कमान कसुन कसवटी।' -सला १. **०माती**-स्त्री. एक प्रकारची चिकण माती.

मुलना, मुलाणा-ना—पु. १ मुसलमान जातीचा धर्मगुरु किंवा शास्त्रवेत्ता; मुल्ला. २ मुसलमान पंतोजी; शिक्षक. ३ बारा बलुतेदारांपैकीं एक. हा जातीनें मुसलमान असतो; गांवांतील मशिदी, पीर, यांची व्यवस्था हा पहातो आणि मुसलमान लोकांचीं धर्मकृत्यें व लग्नें याच्याच देखरेखीखालीं होतात. -ज्ञाको (म) १७९. [अर. मौलाना]

मुलाईम, मुलायम—वि. १ मृदु; मऊ; नरम; दबणारा. २ नाजूक; उत्कृष्ट; सुरेख; कोमल. [अर. मुलायिम्]

मुलाक(ख)त, मुलाकात—स्त्री. भेट; गांठ; बोलाचाली; विचारपूस; मुलाजमत. [अर. मुलाकात्]

मुलाजम(मा)त—स्त्री. १ भेट. २ सरकारी नोकरी; कर्तव्य; काम; तत्परता. ३ सलामी. ४ दिवाळें काढलेल्या

कर्जदारावर सावकारांची (त्याची कांहीं मालमत्ता आहे काय किंवा त्याला मिळण्यासारखी एखादी मिळकत आहे कीं काय अशा तऱ्हेची) सारखी असलेली नजर. [अर. मुलाझमत्=तत्परता, सेवा]

मुलाजा, मुलाइजा, मुलाहिजा—पु १ पर्वा; मान; विचार; आदर, २ क्षमा; गय. ३ दुर्लक्ष; उपेक्षा. 'मुलाइजा न करावा म्हणजे माणूस खबरदार असतें' –मराआ १६. [अर. मुलाहझा]

मुलाणा—पु. मुलना पहा.

मुलाम—वि. मुलाईम पहा. 'मुलाम नथणी जड मज झाली नाकाच्या छिद्रा।' –पला ९३.

मुलामा-म्मा—पु. धातुमार्जनम्; एका धातूच्या पदार्थावर दुसऱ्या धातूच्या रसाचा दिलेला पातळ थर; सोनें, रुपें इ० चें इतर धातूच्या वस्तूवर दिलेलें पाणी. 'मुलाम्याचें नाणें। तुका म्हणे नव्हे सोनें। –तुगा. [अर. मुलम्मअ] **मुलामगिरी**–स्त्री. मुलाम्याची कृति. –वि. मुलाम्याचा. 'सेवकास मुलामगिरी हत्यारें यांची आवड फार आहे.' –पेदसमा ५२. **मुलामी-म्मी**–वि. १ मुलामा दिलेला; सोन्याचांदीचें पाणी दिलेला. २ दिखाऊ; दिसण्यांत मात्र चांगला असा.

मुलायम, मुलार्यीम—वि. मुलाईम पहा.

मुलारत—वि. पुढील एक पाय पांढरा असलेला (घोडा). पुढील डावा पाय पांढरा असणें वाईट. परंतु उजवा पांढरा असल्यास चांगलें लक्षण मानतात. –अश्वप १.१०३.

मुलाहिजा—पु. १ तपास; चौकशी; प्रेक्षण. २ इतर अर्थाकरितां मुलाजा शब्द पहा. [अर. मुलाहझा] **मुलाहिजा का आदमी**–पु. सभ्य मनुष्य.

मुलुमुलु—क्रिवि. (बालभाषा) (व.) मोठ्या आवडीनें; गोडीनें 'तितकाच तुकडा मुलुमुलु खाल्ला.' [ध्व.]

मुलूक-ख—पु. १ प्रांत; देश; राज्य. २ स्वदेश; स्वतःचा प्रांत. [अर. मुल्क्] **०उठणें**–मुलूख ओसाड पडणें. **मुलखांत दिवा लावणें**–ओसाड प्रदेशांत वस्ती करणें; निर्जन प्रदेश वसविणें. **मुलखास जाणें, मुलखांत जाणें**–स्वदेशास किंवा आपल्या प्रांतामध्यें जाणें. सामाशब्द-**०गिरी**–स्त्री. १ देशपादाक्रमण; परदेश जिंकणें. २ सैन्याचें कूच; मोहीम; स्वारी. ३ सारा वसुलीसाठीं सरकारनें पाठविलेल्या तुकडीचा प्रवास. ४ व्यापारी, यात्रेकरू इ० चा प्रवास; देशाक्रमण; देशाटन; (सामा.) प्रवास. [फा. मुल्+गीरीं] **०दार**–पु. दौलतवंत; सरदार; जहागिरदार. **०दारी**–स्त्री. राज्यव्यवस्था. **०परखा**–वि. हद्दपार केलेला. **०मैदान, मलिक मैदान**–विना.स्त्री. १ ह्या नांवाची विजापूर येथील सुप्रसिद्ध तोफ हिच्या तोंडाचा व्यास ४ फूट ८ इंच आहे. व पोकळीचा किंवा गर्भाचा व्यास २ फूट ४ इंच आहे. २ (ल.) मोठमोठ्यानें बोलणारी, भांडखोर स्त्री; जहांबाज स्त्री; तोंडाळ बायको. [अर. मलिक-इ-मैदान=देशाचा राजा, रणराज] **०मैदान**–न. १ प्रदीर्घ सपाट भूप्रदेश; सपाट प्रांत; पटांगण. २ झाडी नसलेला भूभाग; ओसाड प्रदेश. 'रान तोडून मुलुख मैदान केलें.' [अर. मुल्क+मैदान] **मुलखाचा**–वि. अतिशय; फार; पुष्कळ. 'किति सांगूं हो गुण वाळाचे हट्टी मुलखाचा।' –मृ ६३. **मुलखानिराळा**–वि. सर्वांहून भिन्न; चमत्कारिक; कोठेंहि न आढळणारा.

मुल्कात—स्त्री. प्रांत; विलायत. 'हे कदीम मुल्कात देणें. –इमं ६६. [अर.]

मुल्की—मुलकी पहा.

मुल्कीर—वि. नाकबूल; मुन्कीर. 'तो मुल्कीर जाला कीं इतला नाहीं.' –रा १.१९९. [फा. मुर्]

मुल्जीम—वि. लाचार; हतधैर्य; दीन. 'ऐसें पष्टवार्दे पुसतां मुल्जीम होऊन आपल्या मुखें एकार केला.' –रा २०.६५. [अर. मुल्झम्]

मुल्तवी—वि. तहकूब; पुढें ढकलला गेलेला. 'हा जाबसाल मुल्तवी राहिला.' –रा ७.३५. [अर. मुल्तवी]

मुल्ला—पु. मुलाना पहा. **०गिरी**–स्त्री. मुलाण्याला मिळणारें वतन.

मुल्हन—न. (व.) पोकळ, बारीक व निःसत्व असा तुरींतील दाणा; मुकणा.

मुवाफिक—वि. योग्य; जुळता; उचित; समर्थ; जुळण्यासारखा. [फा.]

मुशकस, मुश्कस—वि. निश्चित; ठरविलेला; मुक्रर 'खंडणी मुशकस करणें म्हणौन आज्ञा.' –पेद ७.३०. [अर. मुशरुखस्]

मुश(स)्कील, मुश्कील—स्त्री. अडचण; पंचाईत; संकट; अवघड गोष्ट. 'लष्करांत फिरावयाची मोठी मुश्कील, जागांजागां चौकीपहारे वाजपूस होते.' –ऐटि ३.५०. –वि. कठिण; दुर्घट; अवघड; अडचणीचा. [अर. मुश्किल.] **मुश्किलीनें, मुष्केलीनें**–क्रिवि. अडचणीनें; संकटानें. 'पल्टणें.....बहुत मुश्किलीनें गाडर याजपासीं जाऊन पोहोंचलीं.' –दिमरा १.३८. [फा. मुश्किली]

मुशजर—न. वेलबुट्टीचें काम केलेलें रेशमी कापड. [फा. मुशज्जर]

मुशांड—न. (गो.) ढोंग. [सं. मृषा?]

मुशाफर—पु. प्रवासी; वाटसरू; फिरस्ता; सफर करणारा. [अर. मुसाफिर्] **०खाना**–पु. १ धर्मशाळा; सराई; वाटसरूंस उतरण्याची जागा. २ खाणावळ. ३ डाकबंगला. **मुशाफरी**–स्त्री. १ प्रवास; देशाटन. 'मुशाफरींत वय न्यावें, नित्य नवें

उदक व नवें स्थळ व डेरियाची सावली अनुभवावी.' –पया४३७. २ प्रवासीपण. –वि. प्रवासासंबंधींचा; प्रवाश्यासंबंधींचा; प्रवासी. [फा. मुसाफिरी]

मुशारा, मुशाहिरा—पु. १ मासिक वेतन; पगार; २ मजुरी; रोजमुरा ३ वर्षासन. 'हा गांव बद्दल मुशाहिरा, एकूण दोन्ही गांव तुम्हांकडे आहेत.' –वाडसमा ४ ८. [अर. मुशाहरा] **म्ह०** मुख पाहून मुशारा आणि घोडा पाहून खरारा. **मुशारखोर**–पु. नोकर; चाकर; पगार देऊन ठेवलेला मनुष्य. **मुशारपण**–न. मजुरी.

मुशी—स्त्री. खाऱ्या पाण्यांतील एका जातीचा मासा. हा दीड वीत लांब असतो. याच्या बारा जाती आहेत. त्यांपैकीं कांहींची नांवें–कान, डाग, डोर, झोरी, तांबस दरवड, मगर, वाट, शिरवट इ०. या माशाला गोव्याकडे मोरी म्हणतात.

मुशीर—पु. मंत्री; सल्लागार. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

मुश्क, मुष्क—पु कस्तूरी. [फा मुश्क्; सं. मुष्क=अंड] **०हीना**–पु. एक प्रकारचें अत्तर.

मुश्फक, मुश्फीक–वि. कृपाळु; मेहेरबान. [अर. मुश्फिक्]

मुश्रि(श्री)फ—पु. १ तपासनीस. २ फाजील खर्च. [अर.]

मुषकी—वि. आयाळ दूमसहित सर्व काळथा रंगाचा (घोडा) –अश्व १.३०. **०अबलख–क**–वि. कमीजास्ती काळा-पांढरा असलेला (घोडा); असल्या रंगाचा कार्यसिद्धि करणारा असतो. –अश्व १.३०. **०पंचकल्याण**–वि. दूम-आयाळसुद्धां काळा असून डोळे मनुष्यासारखे आणि चारी पाय पांढरे व कपाळावर पांढरा ठिपका असलेला (घोडा) –अश्व १.३०.

मुषादिरदार—पु (जरतारी विणकाम) शालू वगैरेवर बुट्टे वगैरे उठवितांना निरनिराळे चोळे वर-खाली करण्यासाठीं चाळयाचें वजन कमीजास्त करणारा मुलगा; (इं ड्रोबाय).

मुष्कर– पु मोठ्या अंडाचा; लट; स्थूल (मनुष्य). 'भीम ठोणप, मुष्कर । बलाढ्य जाला तरी काय ।' –यथादी १ १८३. [सं मुष्क=अंड; अंडकोष]

मुष्टि स्त्री पु १ मू . हाताची बोटें मिटलीं असतां होणारी रचना. २ मूठभर धान्य इ० पदार्थ; भरलेली मूठ. ३ शस्त्र इ०चा हातात धरावयाचा भाग. मूठ; कबजा; परज; दांडा; यरूं; मुठया. ४ बुक्की [सं.] सामासशब्द– **०का**–स्त्री. १ मुष्टि शब्द अर्थ १ ते ३ पहा २ लहान मूठ **०घात प्रहार**–पु मुठीनें मारलेला धबका; गुद्दा; बुक्की; मुठीचा तडाखा. 'तेथेंचि मर्दिला मुष्टिघातें रा आणि कंतु । इंद्रापासीं आले धावतु ।' **०प्रयोग**–पु. १ मु चा रट्टा. २ मूठ मारणें; जारणमारणांतील एक क्रिया. अभिमंत्रित उडीद, तांदूळ मूठभर दाणे इ० घेऊन ते एखाद्यावर–याचा नाश करण्याकरितां–फेंकणें. **०मैथुन**–न. मुठळथा मारणें. **०मोदक**–पु (विनोदानें) गुद्दा; ठोसा. (ठोसे देण्यासाठीं मूठ वळली म्हणजे तिचा आकार कांहींसा मोदकासारखा होतो यावरून) (क्रि० देणें). **०स्वस्तिक (संयुक्त हस्त)**–न. (नृत्य) खटकाख्य हात थोडेसे आंखडून व वांकडे करून मनगटावर ठेवणें. **मुष्टि(हस्त)**–पु. (नृत्य) हाताचीं सर्व बोटें मिटून तळहातास चिकटवून ठेवणें व त्यांवर आंगठा ठेवणें.

मुसकट–ड–ल, मुसकाड–काडी, मुसकुरी, मुसकूट–नस्त्री १ जनावराचें तोंड; जनावराचा डोक्यापासून तोंडापर्यंतचा भाग. २ (तुच्छतेनें) मनुष्याचें तोंड किंवा गाल; गालफड. [सं. मुख; का. मुसुकु] **मुस्कट घेणें**–(माण.) वस्त्रानें सर्वांग तोंडासहित झांकून घेणें. **मुसकटणें, मुसकाटणें, मुसकुटणें**–सक्रि. १ तोंडांत मारणें; मुसकाड फोडणें. २–अक्रि. (वस्त्रानें) तोंड झांकून घेणें; मुसकणें.

मुसकणें—अक्रि. वस्त्रानें तोंड झांकून घेणें; तोंड आच्छादणें. –अक्रि. रागानें किंवा तिरस्कारानें तोंड एकदम वळविणें; तिटकाऱ्यानें एकदम परत फिरणें, माघारी जाणें. [मुसकट] **मुसकाड फोडणें–फिरवणें**–तोंडांत, कानशिलांत मारणें. **०सुजविणें**–जोरानें तोंडांत मारणें; गालफड सुजविणें. **मुसकाडींत देणें**–तोंडांत; थोबाडींत मारणें; थोबाड रंगविणें. **मुस्कटांतलीं वासकटं बाहेर पाडणें**–(व.) (निंदार्थी) आपलें म्हणणें दुसऱ्याला कळविणें. 'मुसकटांतलीं वासकटं पडूं तर द्या एकदां बाहेर' **मुस्कटदाबी**–स्त्री. १ एखाद्याला बोलूं किंवा खाऊं न देण्यासाठीं त्याचें तोंड दाबणें. २ (ल) विचारस्वातंत्र्य आणि लेखन स्वातंत्र्य यांना सरकारच्या कायद्यानें झालेली बंदी; जुलूम; गांजणूक. **मुस्कटदाबीचा कायदा**–पु. अन्यायाचा किंवा दडेलीचा न्याय; लेखन-भाषणाचें स्वातंत्र्य हिरावून घेणारा कायदा.

मुसकंडी, मुसकांडी—स्त्री. मुसंडी, मुसांडी पहा.

मुसकें, मुस्कें, मुसकी—नस्त्री. १ उभें पीक असलेल्या शेतांत किंवा मळणीच्या वेळीं बैलाच्या तोंडास बांधावयाची जाळी; म्होरकी, मुन्हा पहा. २ तोंड (गुरांचें, माणसाचें). [मुख]

मुसक्या—स्त्रीअव. कैद करताना पाठीमागें वळवून बांधलेले हात. (क्रि० आंवळणें; बांधणें). (यांचें मुसकी असें एकवचनी रूप सहसा योजण्यांत येत नाहीं). [हि.]

मुसज्जर—पु. एक प्रकारचें वेलपत्ती असलेलें रेशमी वस्त्र. 'सिरसाफ मुसज्जर मंदिल बंदरि छीट जरी दुपटे भरतें।' –अक्क २. किंकरकृत शुकरंभासंवाद २८. [अर.]

मुसडा—पु. १ पाण्याचा जोराचा लोंढा; जोराचा, मोठा प्रवाह. २ (ल) गर्दीतून जोरानें घुसणें. ३ डोक्यानें मारलेला ठोसा. (क्रि० मारणें; देणें). ४ प्रतिकारास टक्कर देण्याकरितां

जमलेला समुदाय. **मुसंडी, मुसांडी-ड**-स्त्री. १ डोकें पुढें करून व शरीर वांकवून जोरानें गर्दीत शिरणें. (क्रि० मारणें; देणें; मारून घुसणें; शिरणें). २ जोरानें गर्दीत शिरण्यासाठीं डोकें पुढें घालून व शरीर किंचित वांकवून केलेली शरीराची ठेवण. ३ डोक्यानें दिलेला रट्टा. [का. मुसुंडी=चेहरा]

मुसंडा—पु. (निंदार्थी) मुसलमान.

मुसंडि—स्त्री. (कों.) पंचरसी छोटें घमेलें.

मुसनमान—पु. मुसलमान शब्दाचा अपभ्रंश.

मुसना-न्ना—पु. १ दुहेरी नक्कल. ' एक मजकुराचे दोन कागद; त्यास मुसन्ना म्हणतात. ' –पदमव १००. २ सारांश; संक्षिप्त हकीकत. [अर. मुसन्ना]

मुसंबें, मोसंबें—न. नारिंगाच्या जातीचें एक फळ; साखरलिंबू; (इं.) माल्टीज. याचा रस पाचक आहे. [मोझांबिक या बेटाच्या नांवावरून]

मुसमारणें—अक्रि. तापामुळें, थंडीमुळें गुडघे पोटाशीं घेऊन व अंगावरून पांघरूण घेऊन निजणें; मुरमुसणें.

मुसमुशी, मुसमुस—स्त्री. तारुण्याचा भर; तारुण्यानें, तालीमबाजीनें अंगांत संचरणारी रग, शक्ति; भर; ज्वानीचें तेज. **मुसमुशीत-मुसमुसलेला**-वि. भर ज्वानीचें तेज असलेला.

मुसमुस—स्त्री. १ स्फुंदन; मुळु मुळु रडणें. २ बारीक बारीक पुटपुट; गुणगुण [ध्व.] **मुसमुसणें**-अक्रि. १ तारुण्याच्या भरांत असणें; ऐन ज्वानीचा जोम असणें. २ जोरांत असणें; भरांत असणें. ' काम खवळे धनापाशीं । अहर्निशीं मुसमुसित । ' –एभा २३.२५०. ३ रागानें संतप्त होणें; क्रोधानें जळणें. ४ स्फुंदणें; मुळु मुळु रडणें ५ अर्धस्पष्ट गुणगुणणें पुटपुटणें.

मुसरें—न. खरकटें [का मुसारी]

मुसल—न. मुसळ पहा.

मुसलमान, मुसल्मान—पु. इस्लामी धर्माचा अनुयायी. [फा. मुसुल्मान्] **(एखाद्याला मा॰ न सुटकून किंवा हाणून) मुसलमान करणें**-एखाद्याला त्याची इच्छा नसतां एखाद्या कृत्याकडे वळविणें; संमति देण्यास भाग पाडणें. **मुसलमानी मुल्क, मुसल्मानी**-स्त्री. इस्लाम धर्म; इस्लाम सत्ता. ' हजरतांनीं दीनचा पक्ष सोडून मल्हाटियाचा पक्ष धरला आहे हे गोष्ट मुसल्मानीस ठीक नाहीं. ' –दिमरा. १.२६७. - वि. मुसलमानासंबंधींचा. [फा. मुसुल्मानी] **मुसल्या, मुसंड्या**-पु. (निंदेनें) मुसलमान.

मुसव्वर, मुसंवर, मुसव्वर—पु चित्रकार; चितारी. ' तेथें मालिटाकडून मुसव्वर आला होता. ' –ख ९.४७१८. [अर. मुसव्विर] **मुसव्वरी**-स्त्री. चित्रकाम. [फा. मुसव्विरी]

मुसळ—न. १ तांदूळ इ० सडण्याकरितां, गोल व लांब लांकूड घेऊन त्याच्या टोंकाला वसवी किंवा मांडळ बसवून केलेलें साधन; कांडणी. २ गदा ह्या नांवाचें युद्धोपयोगी हत्यार; सोटा. ३ उसाच्या चरकांतील नवरा किंवा नवरी. [सं. मुसल, मुस्=तोडणें; कांडणें]. (वाप्र.) **०नेसणें-पांघरणें-डोक्याला बांधणें**-(ल) निर्लज्जपणानें वागणें; सभ्यतेला सोडून वागणें; आपली अब्रू सोडून निर्लज्जपणाचे आचार करूं लागणें. **मुसळाचें धनुष्य (धनू)करणें**-अशक्य गोष्ट शक्य करणें. **मुसळानें टिऱ्या बडविणें**-हुरळणें; अतिशय हर्ष होणें; आनंद होणें. ' थोडयाशा यशानें मुसळानें टिऱ्या बडवून घेऊं नका. ' **मुसळा(स)अंकुर फुटणें**-१ शक्य कोटींतील पण अत्यन्त असंभवनीय अशी कांहीं एक गोष्ट घडून येणें. २ असाध्य आजार इ० मधून बरें होऊन पूर्वीप्रमाणें व्यवहार करूं लागणें. **मुसळास मुसळाशीं गांठ पडत नाहीं, मुसळा मुसळांची गांठ बांधतां येत नाहीं**-दोन सारख्या हेकट आणि दांडग्या माणसांत सलोखा किंवा एकी घडवितां येत नाहीं. **सगळेंच मुसळ केरांत**-अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष होणें; महत्त्वाचीच गोष्ट विसरणें. सामाशब्द- **०कंद**-पु. १ एक कंद विशेष; एक प्रकारचा कांदा. २ (ल.) धटिंगण; दांडगा. ३ टोंण्या; मूर्ख; बैलोबा. **०कांड**-स्त्री. मुसळानें तांदूळ सडण्याची क्रिया. **०कांड-कांडा-ड्या, मुसळसड्या**-वि. १ मुसळानें कांडलेला, सडलेला (तांदूळ) २ निमसडा; कमी सडीचा. [मुसळ+कांडणें, सडणें] **०झुड्या झोंड्या**-वि. मुसळानें कांडतांना न मोडणारा; कण्या न होणारा (मुसळाबरोबर झुंजणारा असा चांगला, न मोडका). याच्या विरुद्ध पिठूळ **०देवता**-स्त्री. (ल.) धोट, आडदांड स्त्री. **०धार-धार पाऊस**-स्त्री.पु फार जोराचा पाऊस; मुसळासारख्या मोठ्या धारा असलेला पाऊस. **०वादा**-पु. हगवण किंवा आमांश यांची जोराची सांथ. **०सर-सळई**-स्त्री. मुसळ करण्याला योग्य असें लांकूड. **०स्नान**-न. संकल्प, पुरुषसूक्त इ० मंत्र न म्हणतां केलेलें स्नान. २ नुसतें आंग धुणें; आंग न चोळतां अंगावर फक्त पाणी ओतून केलेली आंघोळ. **मुसळा**-पु. (कोतकाम) हंद बुडाचा एक-दीड फूट लांबीचा सुळकेदार दगड. याच्या बुडाला एक भोंक असतें;त्यांत बांबूचा दांडा घालुन भांडें वर उपसुन काढण्याकडे याचा उपयोग करतात. **मुसळी**-स्त्री. (लोखंडी काम) गोल नळ्या करण्याकरतां उपयोगांत येणारी पोलादी पहार. २ (राजा.) लहान मुसळ. **मुसळेश्वर**-पु. (ल.) धटिंगण, दांडगा, गलेलठ्ठ व आडदांड मनुष्य.

मुसळणें—अक्रि. १ फळें, कलिंगड इ० नासणें, सडणें. २ अतिशय श्रमानें थकणें; दमणें.

मुसळवादा—पु. गुरांस होणारा एक स्पर्शजन्य रोग;हगवण.

मुसळी—स्त्री. घोड्याच्या मागील पायास होणारा एक रोग. –अश्वप २.३१६.

मुसळी—स्त्री. धक्का; गर्दीतून पुढें जाण्याकरतां दिलेला जोराचा धक्का; मुसंडी. (क्रि० मारणें; देणें). [फा.]

मुसळी—स्त्री. एक औषधी वनस्पति किंवा तिचा कांदा. हीं झाडें लहान असून पावसाळ्यांत रानांत उगवतात. हिला खारकेच्या रोप्याचा पानांसारखीं परंतु अधिक पातळ व रुंद अशीं पानें असतात. कांदे किंवा मुळ्या बोटाइतक्या जाड व पांच सहा अंगुलें लांब असतात. हे कंद पौष्टिक असतात. सफेत व काळी असे मुसळीचे दोन प्रकार आहेत. [सं. मुसली] ०कंद–पु. मुसळीचा कांदा.

मुसळें कोनफळ, मुसळ्या—नपु. कोनफळाची एक जात

मुसळो—पु. (गो.) एक रोग.

मुसाडटकली—स्त्री. (गो.) १ माशीचें डोकें. २ (ल.) (गो.) अगदीं लहान अंश; अत्यल्प भाग.

मुसांडा-डी—मुसंडा-डी पहा.

मुसाफर—पु. पांथस्थ; वाटसरू. मुशाफर पहा.

मुसावणें—अक्रि. १ पूर्णपणें भरणें; भरून जाणें; भरून फुगणें; नसांतून रक्त, रस इ० पूर्णपणें भरून वाहणें. 'अहो वाढिवेला ऊस। तेथें मुसावला रस।' २ वाढणें; फुगणें. ३ मग्न होणें; साकार होणें; एकत्र होऊन जाणें. 'घृत थिजलें कीं विघुरलें। परी घृतपणा नाहीं मुकलें। तेवीं अमूर्त मूर्ती मुसावलें। परी तें संचलें परब्रह्म।' –एभा १.२४६. ४ निमग्न होणें; रमणें. ५ व्यापणें; आंत पूर्णपणें भिनणें; भरून असणें. 'कीजेल भाषा विवरण। जेथें नित्यानंद पूर्ण। मुसावला असे।' ६ मुशींमध्यें घातला जाणें; मुशींत आटून तयार होणें; मुशींत ओतून मुशीच्या आकाराची वस्तु करणें. 'गाळोनियां मीक्षसुख। तेथींचा मुसावोनि हरिख।' –एरुस्व १.५४. [मूस]

मुसावणें—अक्रि. (महानु.) मूर्च्छित होणें. 'रसभावाचेनि तुषारें। मुसावे तो।' –एभा १७४.

साहि(हे)ब—पु. स्नेही; सोबती; जोडीदार. 'वाजद–अल्लीखां दिवाण निजाम अल्लीचा फार मुसाहेब...' –रा १.१६५. (मुखतार म्हणजे अनियंत्रित सत्ताधिकारी असा चुकीचा अर्थ मराठे समजतात). [अर. मुसाहिब्]

मुस्मूम—स्त्रीपु. १ मोसम; हंगाम; ऋतु; ठराविक वेळा; फळें इ०चा बहराचा समय. २ –न. टेंकडीचें टोंक; डोंगराचें टोंक. [अर. मूसम]

मुसूम—वि. ठराविक; निश्चित; कायम; पक्का केलेला. [अर मुसंम्]

मुसे येणें—(काव्य) रूपाला येणें. 'कां नादब्रह्मचि मुसे आलें।' –ज्ञा १३.२६८. [मूस]

मुसेजर—मुसज्जर पहा.

मुस्तकबील, मुस्तक्बील, मुस्तकबाल—पु. भावी, पुढें मिळणारी रक्कम; भविष्यकाळीं मिळणारी रक्कम; भाव्यादाय. –राको. [अर. मुस्तकूबिल] **मुस्तकबल**–पु (गो.) मक्त्याच्या रकमेचा चतुर्थांश (सरकारांत टेवलेला).

मुस्तकीम-ल—वि. १ कायम; निश्चित; पूर्णपणें स्थापिलेलें. 'याचा नक्शा मुस्तकीम ठरून मग जावें.'–रा ७.१२. २ भक्कम; मजबूत; बळकट; पक्का (माणूस, पशु, यंत्र, घर इ०). 'जुन्या इमारती फार मुस्तकील असतात.' [अर. मुस्तकीम्] **मुस्तकिमी**–स्त्री. मजबुती; बळकटपणा. 'वरकड दर्वाजे बंद करून आपले मुस्तकिमींत आहेत.' –मदबा १.३९. **मुस्तमीक**–स्त्री. सुधारणा; मशागत. 'जशी तुम्ही शेताची मुस्तमीक कराल तसा तुम्हाला शेताचा कौल मिळेल.' [मुस्तकीमचा वर्णव्यत्यास]

मुस्तरीफ—पु. कलेक्टरच्या दर्जाचा अधिकारी; सुभेदार; जिल्ह्याचा अधिकारी. [फा.]

मुस्ता—स्त्री. नागरमोथा नांवाचें सुगंधी गवत. व त्याचा गड्डा. [सं.]

मुस्ता—पु (पिंजारी) कापूस पिंजतांना पिंजण्याच्या हत्याराच्या तांतीवर आपटण्याचें मुठीसारिखें साधन. याच्या दोन्ही टोंकांना जाड गोळे असतात

मुस्ताकी—स्त्री. (गो.) शिदोरी वगैरे सामान.

मुस्तायकी—स्त्री. अंगांत घालण्याचे कपडे.

मुस्तेद—वि. १ सिद्ध; तयार; सज्ज. 'जीन खोगीर बखतरादि मुस्तेद करावयाचें संपूर्ण हुन्नर अवगत करून टेवणें.'–मराआ १०. २ भक्कम; मजबूत; पक्का. 'गडाची इमारत मुस्तेद करावी.' –मराआ ३३. [अर. मुस्तइद] **मुस्तेदी**–स्त्री. १ तयारी; सिद्धता. २ मजबुती; बळकटी.

मुस्राद, मसुराद—पु. (गो.) कलमी आंब्याची एक जात.

मुस्लि(स्ली)म—पु मुसलमान. [अर. मुस्लिम्]

मुहंजोरी—स्त्री. कडक, कठोर बोलणें; उद्धट भाषा. मुजोरी पहा.

मुहळी—स्त्री. मनगटाची पट्टी.

मुहीम—मोहीम पहा.

मुहिम्मात—नअव. कामें. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

मुहुरणें—अक्रि. मोहोर येणें; प्रफुल्लित होणें. 'नीतिभाग्यें रसशृंगारू। दानधर्मी शांत विचारू। त्या पुष्पीं हा कल्पतरू। मुहूरलासे।' –कथा २.१७.१२२. [मोहोर]

मुहुर्मुहुः—क्रिवि. वारंवार; पुन्हां पुन्हां. [सं.]

मुहूर्त—पु. १ दोन घटकांचा काळ. २ (ल.) शुभ वेळा; योग्य समय; उपनयन, विवाह, गृहप्रवेश इ० कार्यास इच्छित ठरविलेली शुभ वेळ. ३ कार्याचा प्रारंभ. ४ समय; ठरलेला वेळ. ५ (ल.) क्षण; अल्प काळ. ६ पुनर्विवाह; म्होतूर; पाट; न्हावेर (म्होतूर हें अपभ्रष्ट रूप रूढ आहे). [सं.] ०**करणें**–१ चेतविणें. –हंको. २ (शुभ दिवशीं) आरंभ करणें. 'तरी क्षेत्रज्ञदशे। आत्मा मोटका पैसे। हें देह मी ऐसें। मुहूर्त करी।' –ज्ञा १४. १४५. ०**पूजन-पूजा**–नस्त्री. (लग्नादि विधींत) पत्रिकापूजन; लग्नमुहूर्त लिहिलेल्या पत्रिकेची पूजा. ०**मणि-णी**–पु वधूच्या गळ्यांत (शुभ मुहुर्तावर) बांधतात तो सर. ०**मेढ**–स्त्री. लग्नकार्याकरितां मांडव घालतांना किंवा घर बांधतांना शुभमुहूर्तावर रोविलेला पहिला स्तंभ-खांब. ०**मेढ रोवणें**–एखादें काम सुरू करणें. **साडेतीन मुहूर्त**–पुअव. वर्षप्रतिपदा, अक्षयतृतीया व विजया दशमी हे तीन उत्कृष्ट मुहूर्त व कार्तिक शुद्ध प्रतिपदा हा अर्धा म्हणजे सापवाद मुहूर्त मिळून साडेतीन मुहूर्त. कित्येक दसरा, दिवाळीचा पाडवा (कार्तिक शु० १), गुढी पाडवा. हे तीन व नागपंचमी (किंवा कांहींच्यामतें अक्षयतृतीया) अर्धा मिळून ३॥ मुहूर्त मानितात.

मुहूर्त—स्त्री. मूर्त; मूर्ति; शब्दाचा अपभ्रंश [सं. मूर्ति]

मुळकंड, मुळकुंडी, मुळखंड-डी—मूळ शब्द पहा.

मुळका—पु. १ घाई; तगादा (क्रि० करणें; लावणें) २ घाई (क्रि० सुटणें). ३ उत्सुकता लागणें.

मुळगेणें—अक्रि. (कु.) करपणें; शिजतांना खाली चांगला जाळ न लागल्यामुळें बिघडणें.

मुळमु(मू)ळ—स्त्री. १ दुसऱ्याला समजण्यास कठिण व पाल्हाळिक भाषण; अस्पष्ट बोलणें. २ झिमझिम पाऊस; पिरपिर; बारीक थेंबांचा व पुष्कळ वेळ पडणारा पाऊस. ३ भिक्षेकऱ्यानें लावलेली पिरपीर. ४ कामाची घाई, निकड.(क्रि० लावणें; लागणें). [ध्व.] **मुळमुळ-मुळां**–क्रिवि. १ हळू हळू; स्फुंदून स्फुंदून (रडणें). २ झिमझिम; पिरपिर (पाऊस पडणें). **मुळमुळणें**–अक्रि. १ गुळमुळणें; पिळपिळीत बोलणें; अस्पष्टपणें किंवा तोंडातल्या तोंडांत बोलणें. २ (पाऊस) झिमझिम पडणें. पावसाची पिरपीर सुरू असणें. ३ कण्हणें; कुंथणें. **मुळमुळीत**–वि. १ बेचव; नीरस (खाद्य, पेय). २ संदिग्ध; अनिश्चित (विधान, जबाब). ३ पुळपुळीत; परिणामरहित (भाषण).

मुळवणी—स्त्री. बोळवण. [मूळ]

मुळवशी—स्त्री. (राजा.) खेडें, बाग, शेत इ० चा सर्वांत खालचा भाग, बाजू; सखल प्रदेश. [मूळ+वास]

मुळवा—पु. एका शेतांतून दुसऱ्या शेतांत जेथून पाणी जातें ती जागा; मूस. –बदलापूर २९३. [मूळ]

मुळव्याध-व्याधि-धी—स्त्री. अर्श; गुदाला होणारा एक उष्णतेचा रोग. मुळव्याधीचे प्रकार:–रक्ती, मोडाची, लसणी, चुंबळी इ०. [सं. मूलव्याधि]

मुळस—पु. (गो.) मूळ; पायथा (डोंगराचा). [मूळ]

मुळस्ता—पु. (गो.) फिरकी; मळसूत्र.

मुळहारी, मुळारी—पु. मुऱ्हाळी पहा. **मुळाऱ्या**–पु. (शिंपी) लग्नाला वऱ्हाड आणणारा माणूस. –बदलापूर १०६.

मुळा—पु. एक प्रकारची भाजी–पाला व कांदा,मूळ.मुळ्याचा आकार गाजरासारखा परंतु रंग पांढरा असतो. मुळ्याच्या शेंगाचीहि (डिंग्रीचीहि) भाजी करतात. २ (कों.) शिंपेंत राहणारा एक जलचर प्राणी. याच्या शिंपल्यांचा चुना करतात. [सं. मूलक]

मुळिया—पु. ज्योतिषी. 'पाटक ज्योतिषी दीक्षित। भट्ट अभिहोत्री महापंडित। शुक्ल मुळिये अनंत। आले यागा।' –कथा ३.८.२१. [मूळ]

मुळी—स्त्री. लहान मूळ; पाळ; जडी; मुळाचा तुकडा; मुळखंडी; पाळखंडी. [सं. मूल] **मुळ्या पाताळीं गाडल्या जाणें**–१ फार खोलवर मुळ्या जाणें. २ (ल) (एखाद्या स्थळीं, समाजांत, स्वभावांत) पक्केपणें किंवा दृढपणें जाऊन वसणें; दृढ होणें.

मुळीं—क्रिवि. १ अगदीं; अजीबाद; बिलकूल. २ प्रथमत: सुरवातीला; मुळांत. 'मुळीं देह त्रिगुणांचा। सत्वरजतमांचा।' –दा २.५.१. [मूळ याची सप्तमी]

मुळु-ळू—वि. (नेदभाषा) पांच. 'मुळुवदनें जया कारण। उदानु नेत्र देदीप्यमान।' –भवि १८.८९.

मुळु मुळू—क्रिवि. आंतल्या आंत; हलक्या आवाजांत; बाहेर पडूं न देतां (रडणें).

मुळे—पुअव. (कों.) (मूळचे या अर्थी) मानकरी ब्राह्मण (देशस्थ, कोंकणस्थ, देवरुखे आणि कऱ्हाडे); ज्योतिषी.

मुळें—क्रिवि. कारणानें; योगानें; च्याकरितां; म्हणून.

मुळेपण—न. जोशीपणा; खेडयांतील ज्योतिषाची वृत्ति. 'ग्रामजोशी मुळेपण। त्याहून विशेष सोनार जाण।' –भवि ३४.९. [मूळ]

मुळेमाठ—पु. माठाच्या भाजीचा एक प्रकार.

मुळो—पु. (कु.) शेणवी ब्राह्मण जातीच्या कांहीं घराण्यांतील प्रतिवर्षी शूद्र पुरुषाला नारळ, तेल आणि फुलें देऊन भोजन घालण्याचा एक कुलाचार.

मुळ्या—पु १ काष्ठौषधी विकणारा मनुष्य. २ ग्रामजोशी; गांवजोशी; ज्योतिषी. ३ (राजा.) वतन, अधिकार इ०चा मूळचा भोक्ता. ४ वयोवृद्ध गृहस्थ; जुन्या पिढीचा म्हतारा. ५ मूळ नक्षत्रांवर जन्मलेला, द्वाड, खोडकर, दुष्ट, उपद्रवी मनुष्य. [मूळ]

मुक्ष—वि. मुख्य. [सं. मुख्य; प्रा.]

मुक्षद, मुक्षु(क्ष्)द—स्त्री. जेवणानंतर तोंड स्वच्छ करण्यासाठीं खाण्याचे सुपारी, लवंग इ० पदार्थ; जेवणानंतर सुपारी इ० खाणें; मुखशुद्धि. [सं. मुखशुद्धि]

मूक—वि. मुका; वाचा नसलेला. [सं.] **०गायन-गान**—न. (ल.) अशक्य गोष्ट; अविद्यमान वस्तु; खपुष्प, शशशृंग इ० प्रमाणें. **०त्व**—न. मुकेपणा. [सं. मूक]

मू(मु)ग—न. मौन; स्तब्धता; मूकत्व. ' वेद वानूनि तंवचि चांग । जंव न दिसे तुझे आंग । मग आम्हां तया मूग । एके पांती । '—ज्ञा १४.११. [सं. मूक; प्रा. मूग] **०आरोगणें-खाणें-गिळणें-गिळून बसणें**-(कोणी अपमान केला असतां किंवा आपणास उत्तर द्यावयास येत नसतां, उत्तर दिल्यास अनर्थ होईल म्हणून) न बोलतां, स्वस्थपणें, मुकाटयानें बसणें. ' आरोगुनी मुग । बैसलासे जैसा बग । '—तुगा १४६८. ' जो कोणी पुढाकार घेईल त्याला कोणी कांहीं बोललें तरी मूग गिळावे लागतात. '—पकोधे. मूग याचें प्राकृत रूप मूग हे आहे. मूग हें धान्य खाण्याचें असल्यानें मौन स्वीकारणें ह्या अर्थी मूक ह्याचें मूग हें रूप घेऊन खाणें, गिळणें इ० धातूशीं त्याचा प्रयोग केला जातो. वास्तविक मूग धान्याचा मौनाशीं संबंध नाहीं.

मूग—पु. एक द्विदल धान्य. ह्याचें झाड किंवा वेल सुमारें हातभर उंच वाढतो. आकृति, रंग, वाढ, शेंगा हीं सर्व उडदासारखीं असतात. मात्र मुगाची शेंग हिरवट असते. हिरवा, पिवळा व काळसर अशा मुगाच्या निरनिराळ्या जाती आहेत. मूग हिंदुस्थानांत सर्वत्र होतो. डाळ पिवळी असून ती पथ्यकर आहे. हिचा उपयोग खिचडी, वरण, मुगदळ इ०कडे होतो. [सं. मुद्ग; प्रा. मुग्गो]

मूठ—पु. बैलाच्या पाठीवर टाकण्याची (बुरणुसासारखी) एक गादी; बैलाचें खोगीर. ' बसला वृषभ कधीहि आपण न म्हणेचि जेवि मूठ कसा । '—मोगदा १.४९. [प्रा.] **०वळी**—स्त्री. बैलाचें खोगीर. मूठ पहा.

मूठ—स्त्री. १ मुष्टि या शब्दाचे सर्व अर्थ पहा. २ मुष्टिप्रयोग; मंत्रप्रयोग; मंत्रानें भारून मुठींत घेतलेले उडीद इ०. हे दुसऱ्याच्या नाशाकरितां फेकावयाचे असतात. (क्रि० मारणें; टाकणें). ३ मुठींत राहतील इतक्या भाताच्या रोपांची जुडी; भाताची लावणी करण्यापूर्वी रोपें उपटून त्यांची जुडी करतात ती. ४ मुठीनें पेरलेलें भात. (क्रि० पेरणें; टाकणें). ५ हत्ती, घोडा वगैरे जनावरांच्या रोजच्या अन्नांतून त्यांच्या रखवालदारास द्यावयाचा मुठीच्या परिमाणाचा (पगाराहून अधिक) भाग. ६ घोडयाच्या पायाच्या खुराला लागून असलेला सांधा (ह्या सांध्याशीं घोडयाचा पाय लहान घेराचा असल्यामुळें येथें बांधलेल्ली दोरी खालीवर होत नाहीं). ७ एक मुलींचा खेळ. —मखेपु ३३६. ८ गर्भ (हातानें चांचपून पाहीलयास गर्भाचा आकार मुठीसारखा लागतो असें म्हणतात यावरून). ' ही मूठ मुलाची किंवा मुलीची आहे. ' ९ (कों.) शेतांतील पीक कापण्याच्या वेळीं करावयाचें कुणबी लोकांचें देवकृत्य. [सं. मुष्टि; प्रा. मुट्ठि; पं. मुट्ठ; सिं. मुठि; उरि. मूठि; बं. मूठ; हि. गु. मूठ, मुट्ठि] **वाह० झांकली मूठ सवा लाखाची उघडली मूठ फुकाची=**आपण बोललों नाहीं तोंपर्यंत आपलें अज्ञान झांकून राहील, बोलल्यास तें लोकांना दिसून येईल. (वाप्र.) **०आवळणें**-दुसऱ्यास देण्याचें थांबणें; चिक्कूपणा करणें, करूं लागणें **०दाबणें-चेपणें-गार करणें-भरणें**-लांच देणें; लांचाची रक्कम मुठींत किंवा हातांत देणें. ' त्यानें पन्नास रुपयांनीं फौजदाराची मूठ दाबली तेव्हां तो सुटला. ' **०भर मास चढणें-वाढणें**-लठ्ठ होणें; गर्विष्ठ होणें; फायदा झाल्याने अत्यानंद होणें. **०मारणें**-मंत्रसामर्थ्यानें दुसऱ्याचा नाश करणें; प्राण घेणें. **मुठींत असणें**-(एखाद्याच्या) पूर्णपणें किंवा सर्वथैव ताब्यात, कह्यांत, अधिकारांत असणें. ' श्रोत्यांच्या साऱ्या मनोवृत्ति या वक्त्याच्या जशा काय मुठींत होत्या. ' —नि. **मुठी-मुठेळ्या-मुठ्या मारणें**-मुष्टिमैथुन करणें. **मुठ्या मारीत बसणें**-(व.) माशा मारीत बसणें; निरुद्योगी राहणें; आळसानें वेळ घालविणें. **एका मुठीचीं माणसें**-एकाच कायद्याखालीं किंवा हुकमतीखालीं येणारीं माणसें. **एका मुठीनें**-एकदम; एकाच हप्त्यानें, एकाच वेळीं. (रुपये देणें, घेणें, फडशा पाडणें). **झांवल्या मुठीनें**-गुप्तपणें; खरी गोष्ट बाहेर पडूं न देतां; कोणाजवळ काय आहे किंवा कोण कसा आहे तें बाहेर फुटूं देतां. सामाशब्द- **०पसा**-पु. पसामूठ पहा. **०मर्दाई**-स्त्री. १ अन्यायानें व दांडगाईनें किंवा पाशवी सामर्थ्यानें दुसऱ्याचा पैसा इ० लुबाडणें. २ दांडगाई; जुलुमजबरदस्ती. ३ चोर, भामटे इ०नीं एका जुटीनें हल्ला करून लुबाडणें. **०माती**-स्त्री. (प्रेत इ०) पुरणें; पुरण्याचा अंत्य संस्कार. (क्रि० देणें). **मुठवा**-पु. (नाविक) भुरडयाच्या थोडें मागें दोन बोडतास दोन लांकडी जाडे खुंट ठोकतात त्यापैकीं प्रत्येक. याचा उपयोग टांकणीचें शेवट अडकविण्यासाठीं घोंस नाळीस चेपणीच्या वेळीं अगर पागर बांधण्यासाठीं होतो. **मुठळी**-स्त्री. १ मूठ. २ मुठींत धरून हलविणें. **मुठा**-पु. १ पाणी भरण्याचें पखालीचें तोंड. २ (राजा.) चुलीतील विस्तव विझून जाऊं नये म्हणून तींत पुरून ठेविलेला शेणाचा गोळा. (क्रि०घालणें;पुरणें). ३ वातविकारानें किंवा भयानें पोटांत उठणारा गोळा. ४ रेशीम, सूत इ०चा गुंडा, लड. **मुठाण**-न. एकजूट; संघ; टोळी; चांडाळचौकडी. **मुठाळणें**-सक्रि. हातीं धरणें; मुठींत धरणें. ' झाला सकोप, परजाळा मुठाळुनि भुजालागि थापटिच करें । ' —आमा ४५. **मुठियो**-पु १ (गो.) तांदुळाच्या पिठाचें गूळमिश्रित पिंडाकृति एक पक्वान्न. २ (गो.) सोनाराचें एक हत्यार **मुठा-**

स्त्री. (राजा.) खोबऱ्याची गोणी; खोबरें भरलेलें पोतें. **मुठीचा खेळ**–पु. मंत्रानें भारलेलें धान्य मुठींत घेऊन तें एखाद्या पदार्थावर टाकून केलेला जादूचा खेळ. मांगगारूड पहा. **मुठा**–वि. १ रेशीम, कलाबतू इ० पुष्कळ प्रकारचे धागे एकत्र बांधून केलेला बिंडा. **मुठ्या**–पु. १ एका जातीचा खेंकडा. २ नांगराच्या रुमण्यांत बसविलेली, हातांत धरावयाची खुंटी; मूठ. [म. मूठ; का. हिडी; गुज. हडेली] **मुठ्याल**–न. (हेट.) मुठेल पहा. **मुठ्यो**–पु. (कु.) १ काथ्या ठोकण्याचें लांकूड. २ (कु.) लाह्या, उमलें इ० भाजतांना तें ढवळण्याकरितां काठीच्या टोकाला फडकीं गुंडाळून केलेलें चेंडूच्या आकाराचें साधन; घाटणा. **मुड्का**–पु. (व.) पेंढी; गड्डा. **मुडगा**–पु. १ मूटभर धान्य. २ केरसुणीची मूठ.

मूढ—वि. १ मूर्ख; अज्ञानी; मठ्ठ; मतिमंद; अडाणी. २ मूर्च्छित पडलेला. ३ गोंधळलेला; संभ्रांत झालेला ४ सूर्यप्रकाशांत असल्यामुळें डोळ्यांस न दिसणारा; ज्याचा अस्त झाला आहे असा (ग्रह). [सं. मुह्=वेडा होणें, मूर्च्छना येणें] **०गर्भ**–पु. १ मेलेला गर्भ २ जन्मतांना आडवें आलेलें मूल. **०मति**–वि. १ मंद बुद्धीचा; जड; मठ्ठ; ढ; मूर्ख. २ गोंधळलेला; भ्रमलेला.

मूत—न. १ मूत्र; लघवी; जननेंद्रियांतून शरीरांतील बाहेर येणारें खारट पाणी. [सं. मूत्र; आर्मे जि. मुरेल; यूरोपियनजि. मुतेर] **०आणणें**–१ (एखाद्यास) अत्यंत त्रास देणें; सतावणें. २ भिवविणें; भीति घालणें. **०जळप**–(गो.) एखाद्याला मोठी योग्यता येणें. **मुतमुतगावली करणें**–पुष्कळ मनधरणीच्या आणि नरमाईच्या गोष्टी करणें; अत्यंत लाघवानें दुसऱ्याचें मन वळविणें. **मूत येणें–होणें**–१ फार भयभीत होणें; अत्यंत कष्टी, त्रस्त होणें; कष्टामुळें जर्जर होणें. **मुतांत माशा(मासोळ्या) मारणें**–(ल.) आळसानें वेळ घालविणें; निरुद्योगीपणांत काळ घालविणें. **मुतानें दिवा पाजळणें–लावणें**–अत्यंत निर्दय असणें; कठोर-पणानें वागणें; जुलमी असणें. **मुतखडा**–पु. ज्यामुळें लघवीला अडथळा होतो असा एक रोग; अश्मरी. 'ज्या वेळीं वायु बस्तीमधील शुक्रमिश्रित मूत्राला अगर, कफाला शुष्क करतो त्या वेळीं, गाईचें पित्त शुष्क झाल्यामुळें जसा गोरोचनाचा खडा बनतो त्याप्रमाणेंच अनुक्रमें शुक्रजन्य पित्तजन्य आणि कफजन्य मूतखडा बनतो.' –योर २.१३७. **मुतट**–स्त्रीन. मूत्राशयाची पिशवी, आधान; द्रव पदार्थाचें आशय. (क्रि० येणें; पडणें; निघणें; फुटणें). –वि. १ मुताची घाण येणारें, मुतानें घाण झालेलें (वस्त्र, जागा इ०). २ मुतासारखी (घाण); मुतासारखा (वास). **मुतणें**–न. मासे व साप यांचें मूत्रेंद्रिय. –अक्रि. लघवी करणें; मूत्रत्याग करणें; मूत्रविसर्जन करणें. **उभ्यानें किंवा फेर घेऊन मुतणें**–१ (ल.) अत्यंत लज्जास्पद गोष्टी करणें. २ लाज सोडणें. **मुतरा, मुत्रा**–वि. १ वारंवार मुतणारा; फार मुतणारा. २ (ल.) गळका; भोंक असलेला. **मुतरी–त्री**–स्त्री. १ मुतण्याची जागा, मोरी. २ लहान झरा; लहान प्रवाह. **मुतवणी**–न. १ मूत; लघवी. २ (ल.) उबट पाणी; कोमट द्रव पदार्थ. [मूत+पाणी] **मूतसळई**–स्त्री. मूत कोंडलें असतां तें काढण्यासाठीं मूत्रेंद्रियांत घालण्याची शस्त्रवैद्याची सळई. [सं. मूत्रशलाका] **मुताची गांठोडी**–स्त्री. मूत्रावरोध झाला असतां येणारा बस्तीच्या भागांतील फुगीरपणा आणि कठिणपणा. **मुताट**–स्त्री. तबेल्यांत घोडा बांधण्याच्या जागीं त्याचें मूत निघून जाण्यासाठीं ठेवलेलें,भोंक,मार्ग.[मूत+ठाय] **मुताटणें**–न मूत्रद्वार; मूत्रमार्ग. –अक्रि. मूत्रप्रतिरोधानें पीडित होणें. [मूत+ताठणे] **मुतारी**–स्त्री. मुतरी अर्थ १ पहा. **मुती, मुतु**–स्त्री. (बालभाषा). लघवी; मुतणें. **मुतीर**–वि. वरचेवर मुतावयास जावें लागल्यामुळें त्रस्त झालेला. **मुतेर–रें**–न. ज्यावर लहान मुलें मुतलेलीं आहेत असें, मुतानें भिजलेलें, घाण झालेलें वस्त्र.

मूत्र—न. मूत; लघवी. [सं.] सामाशब्द– **मूत्रकाम्ल**–न. एक प्रकारचें अम्ल (इं.) यूरिक ॲसिड. –ज्ञको (अ) ३६७. **मूत्रकृच्छ**–न. १ थेंबथेंब लघवी होऊन वेदना होतात असा रोग; उन्हाळीं. २ मुतखडा; अश्मरी. **०कोंड**–मूत कोंडणें; मुतावयास न झाल्यामुळें मूत सांठून राहणें; मूतखडा. 'मूत्रकोंड आणी परमें । रक्तपिती रक्तपरमें । ' –दा ३.६.२९. **०खडा**–पु. मुतखडा पहा. **०ग्रंथि**–स्त्रीपु. मुतखडा; मूत्राशयांतून मूत बाहेर पडतांना प्रतिरोध होणें. **०चिकित्सा–परीक्षा**–स्त्री. मुताची परीक्षा. **०ढाळ**–पु. १ लघवीचा जुलाब होणारें औषध. २ मूत्ररेच; लघवीचे जुलाब. **०दाह**–पु. मुततांना होणारी जळजळ; मूत्रविकारानें होणारी आग. **०दोष**–पु. मूत्ररोग; मूत्रविकार. **०विरोध**–पु. मूत्रावरोध; अश्मरी; लघवी कोंडणें. **०पथज्वर**–पु. मूत्रमार्गांत सळई घातल्यामुळें येणारा ज्वर. **०पिंड**–पु. मूत्र ज्यामध्यें तयार होतें तो पिंड. (इं.) किडनी. **०पुट**–न. औषधाला दिलेलें मुताचें पूट; मुतांत औषध तयार करणें. **०पोतडें**–न. मूत्राशय; मूत्र ज्यांत सांठून राहतें तो भाग. **०मार्ग**–पु. लघवीची वाट. **०शलाका**–स्त्री मूतसळई पहा. **०शुक्र**–न. रेतमिश्रित लघवी; दुधासारखी पांढरी लघवी. **०शोधन**–न. १ लघवी साफ होणें. २ लघवी साफ होण्यासाठीं द्यावयाचें औषध. ३ (औषधाला) मुताचें पूट देणें. **मूत्राघात, मूत्रघात**–पु. १ मूत्रावरोध; मूत्रस्तंभ. २ मूत्रविकार. **मूत्राचा कोठा–पोटला**–पु. मूत्राशय. **मूत्रावरोध, मूत्रावष्टंभ, मूत्रस्तंभ**–पु. लघवीला न होणें; लघवी कोंडणें. **मूत्राशय**–पु. मूत्राचा कोठा. [मूत्र+आशय] **मूत्राष्टक**–न. गाय, शेळी, मेंढी, म्हैस घोडी, गाढव, उंट व हत्ती या आठ जनावरांच्या मूत्राला मूत्राष्टक म्हणतात. –योर २. ६७३. **मूत्रित**–वि. मुतलेला; मुतट **मूत्रोत्सर्ग**–पु. लघवी करणें; मुतणें.

मूद—स्त्री. १ ओगराळ्यांत चेपून, ठोकून पाडलेला विशिष्ट आकाराचा भाताचा गोळा. २ स्त्रियांचा वेणींत घालण्याचा एक सोन्याचा अलंकार; कलशाच्या आकाराचा एक अलंकार. ३ तंग किंवा पट्टा ज्यावरून आवळला जातो असा झुलीचा, खोगीराचा चामड्याचा किंवा कापडाचा तुकडा. ४ खोगिराच्या मध्यावरील मुदनी किंवा फांसा. (मुदनी किंवा यासारखे आणखी इतर अर्थ या शब्दाचेहि असूं शकतील). [का. मुद्द] **०ओघाळणें**-आपली अत्यंत प्रिय व्यक्ति भेटल्यावर तिजवरून भाताची मूद इ० ओंवाळून काढणें. 'मग करूनियां कुरवंडी । मूद ओवाळून सांडी ।' -कथा १.६.१९१. **मुदाळें**-न. मूद पाडण्याचें साधन; ओगराळें.

मूम(मी)र—पु. कढत, ऊन्ह राख.

मूय—स्त्री. (गो.) मुंगी.

मूय—पु. आटयापाटयांच्या खेळांतील सुराची पाटी; मुयदंड पहा.

मूर—न. (कु.) दैव; दर्हिवर; मुर्हे.

मूर—स्त्री. १ गुप्त छिद्र; न दिसणारें भोंक; शेताचा बांध इ० मधून पाणी झिरपून जाण्यासारखीं बारीक भोंकें प्रत्येक. २ सच्छिद्रता; जिरण्याची, मुरण्याची अगर शोषून घेण्याची एखाद्या पदार्थाच्या अंगची पात्रता, गुणधर्म. ३ पाझरणें; गळून जाणें; गळती. ४ गळतीमुळें होणारें नुकसान; मुरल्यामुळें, जिरल्यामुळें आलेली तूट. ५ धंद्यांतील, व्यापारांतील बूड; नुकसान; ठोकर; तूट. (क्रि० येणें). 'ह्या रोजगारांत मूर आली.' ६ (कों.) तुपाची बेरी; तेलाचा तळाला राहणारा सांका, बेरी. ७ अवकाश; जागा; समावेशशक्ति; धर. 'ह्या कणगींत खंडीभर धान्याची मूर आहे.' ८ (दगडांतील, लांकडांतील) तडा; भेग; नरमपणा; शुष्कता; सामान्यतः कोणताहि दोष. ९ भातशेतांतील एक किडा; खार. शेतांतील पाणी आटल्यावर हा किडा पिकाच्या मुळ्यांस उपद्रव देतो. १० टरफलाचा किंचित् भाग. -मुंव्या ३९. ११ झाडाच्या खोडास लागणारी कीड, हिनें खोड पोखरलें जातें.

मूर्ख—वि. अशिक्षित; अज्ञानी; मूढ; निर्बुद्ध; बेअकली. [सं.] **म्ह०** १ मूर्खाशीं बोध करितां श्रम होय वाणी=मूर्खाला उपदेश करतां करतां तोंड दुखेल परंतु त्याचेवर कांहींहि परिणाम होणार नाहीं. २ मूर्खापुढें कहाणी=निष्फळ प्रयत्न; व्यर्थ श्रम. **सामाशब्द**-**०वाद**-पु. मूर्खपणाचें भाषण, वादविवाद. **०समज-समजूत**-पु.स्त्री. मूर्खपणाची समजूत, कल्पना; (अज्ञानामुळें झालेली) चुकीची समजूत; खोटी समजूत; गैरसमज. **०समजावशी-विशी-वीस, मूर्खसमजावणी**-स्त्री. मूर्खाला समजावून सांगणें; मूर्खाला एखादी गोष्ट पटविणें.

मूर्च्छना—स्त्री. १ घेरी; बेशुद्धि; भोंवळ; मूर्च्छा. २ गायनांतील प्रत्येक दोन स्वरांमधील तीन सूक्ष्म स्वरांश. एकंदर एकवीस मूर्च्छना तीन ग्रामांच्या धोरणानें होतात. 'तानमान मूर्छना अवरोहास । प्रशंसिते ब्राह्मण ।' -स्वादि ४.५ २१. [सं.]

मूर्च्छा—स्त्री. घेरी; चक्कर; बेशुद्धि. [सं.] **०गत, मूर्च्छित**-वि. बेशुद्ध झालेला; मूर्च्छा आलेला.

मूर्त, मूर्तिमान-मंत-वंत—वि. १ रूपानें किंवा आकारानें युक्त; साकार; कांहीं तरी निश्चित आकार, आकृति असलेला. २ खरोखर; साक्षात्; नगद; प्रत्यक्ष. 'मी तुला मूर्तिमंत शंभर रुपये दिले असतां नाकबूल जातोस?' ३ देहधारी; साकार; सगुणरूपानें युक्त; प्रत्यय. 'तो नावें तरी शिशुपाळु । एऱ्हवीं मूर्तिवंत कालु ।' -शिशु १६४. [सं.]

मूर्ति-मूर्त—स्त्री. १ प्रतिमा; पुतळा; निश्चित आकारयुक्त आकृति. 'कीं विवेकाची सौभाग्यदेवता । मूर्ति झाली ।' -शिशु ३२. २ देह; शरीर. ३ मनुष्य; माणूस; व्यक्ति. 'आम्हीं चार मूर्ति आहों.' [सं.] **म्ह०** मूर्ति (व्यक्ति) तितक्या प्रकृती. =जितके लोक तितक्या प्रकारचे स्वभाव. **०धर**-वि. देहधारी. 'धर्म म्हणे मी म्हणतों मूर्तिधर बहिश्चर स्वअसु यातें ।' -मोसभा ४.६०. **०भंगी**-वि. (गो.) मूर्ति फोडणारा.

मूर्धा, मूर्धान—स्त्रीन. १ डोकें; शिर. २ (भूमिति) पाया; पायाची रेषा. [सं. मूर्धन] **मूर्धन्य**-वि. मस्तकांतून किंवा टाळ्याला जीभ लावून ज्याचा उच्चार करावा लागतो किंवा होतो असा (वर्ण); ऋ. ॠ, टवर्ग, र आणि ष हे वर्ण **०अभिषिक्त**-वि. १ राज्याभिषेक केला गेलेला; सिंहासनाधिष्ठित; पट्टाभिषिक्त. २ (ल.) मुख्य; पुढाकार घेणारा. **०अभिषेक**-पु. राज्यावर बसतांना करावयाचा अभिषेक; राज्याभिषेक. [मूर्धा+अभिषेक]

मूर्धावसिक्त—वि. ब्राह्मणापासुन क्षत्रिय स्त्रीच्या ठिकाणीं झालेला. 'अंबष्ठ आणि मूर्धावसिक्त । प्रवृत्ति आणि सारस्वत । इत्यादि नांवें जे वर्तत । ते जाण समस्त अनुलोमज ।' -एभा २०.३३. [सं.]

मूल—पुस्त्रीन. १ बालक; लहान पुत्र किंवा कन्या (वयनिरपेक्ष). २ -न. झाडाचें पाळ. ३ (ल.) उत्पत्तिस्थान; उगम; पाया; मूल कारण. अधिक अर्थासाठीं. मूळ शब्द पहा. [सं.] **मुलाचीं हाडें भाजणें**-मुलाचें लग्न करणें. -मसाप ३.३. **मुलाचे पाय पाळण्यांत दिसणें**-मोठेपणीं मुलगा कसा निघेल याचा अंदाज त्याच्या लहानपणाच्या कृत्यांवरून करणें. **मुलांची धाम**-स्त्री. उत्सुक मुलांची हुल्लड; झुंड. धाम (-स्त्री.) अर्थ २ पहा. **मुलेंबाळें, मुलेंलेकरें**-नअव. लहान-थोर सर्व मुलें. **मुलेंमाणसें**-नअव. कुटुंबांतील मुलांपासुन थोरापर्यंत सर्व माणसें. सामाशब्द-**०तत्त्व-द्रव्य**-न. रासायनिक द्रव्याचे अंतिम घटक प्रत्येक. (इं.) एलिमट.

०प्रकृति–स्त्री. मूळमाया; आदिमाया. **०मंडळी**–स्त्री. लहान माणसें; मुलें. 'तुम्ही मूलमंडळी अशी आगळीक करूं लागला म्हणजे आम्हांला बघा समाधान वाटतें.' –भा ७. **०संधि**–स्त्री. प्रत्येक अवयवाचा शेवटचा, तळचा भाग. **मुलांकुर**–पु. मोड. [मूल+अंकुर] **मुलाधार**–पु. मूळ आधार, पाया; मूळ कारण. [मूल+आधार] **मूलाज्ञान**–न. मूळमाया; त्रिपुटी. **मूलेकुठार**–ज्या सिद्धांतावर एखाद्या मुद्याची उभारणी झालेली असते तो मुद्दा खोडण्याकरतां मूळ सिद्धांतच फोल ठरविणें. **मूलक**–(कारणवाचक प्रत्यय) त्यामुळें झालेलें; मुळें.

मूलक—पु. मुळा. 'सोमवारीं मूलकाला आणि तूलकाला स्पर्श करूं नये.' [सं.]

मूलपादी—पु. एक प्राणी. याला तोंड नसतें. –प्राणिमो १५३.

मूलरूपप्राणी—पु. प्राण्याची एक क्षुद्र जात. हे प्राणी नेहमीं पाण्यांत असतात यांतील सजीवकण अल्ब्युमनाच्या म्हणजे अंडयांतील बलकाच्या घटनेचे असून त्यांस चलनवलनाची शक्ति नसते –प्राणिमो १५२.

मूल्य—न. मोल; किंमत. [सं.] **०वान्-वंत**–वि. मोठ्या किंमतीचा; महाग; किंमतवान्. [सं. मूल्यवान्] **मूल्यत्त्व**–न. (रसायन शास्त्रांतील) परमाणूंची संयोगशक्ति (इं.) व्हलन्सी. 'उज्ज हें एकमूल्यक द्रव्य असून त्याचें तें मूल्यत्व स्थिर असल्यामुळें संयोगशक्ति मोजण्याकडे त्याचा उपयोग केला जातो.' –ज्ञाको (म) १८८. **०त्व कल्पना**–मूल द्रव्यें विशिष्ट परिमाणांतच संयोग पावतात हा सिद्धांत. (इं.) थिअरी ऑफ व्हॅलन्सी. **मूल्यानुवर्ती**–वि. किंमतीवर अवलंबून असलेली; किंमतीच्या प्रमाणांत असलेली. याच्या उलट परिमाणानुवर्ती.

मूष, मूषक—पु. उंदीर. [सं. मूष्=चोरणें] **०कर्णी**–स्त्री. मुसाकर्णी पहा; उंदिरकानी एक; वनस्पती. **०वाहन**–वि. उंदीर ज्याचें वाहन आहे असा (गणपती).

मूस—स्त्री. १ सोनें, चांदी आटविण्याचें पात्र; धातूचा रस करण्याचें पात्र; आटणी. २ सांचा. ३ (यंत्र, शरीर, काम, योजना, बेत इ०ची) घडण; रूप; आकार; रचना; घाट; ठेवण; घडी; जम. 'कामाची मूस एकदां फुटली म्हणजे, जमत नाहीं.' ४ (ल.) योजना; मसलत; युक्ति. 'तुमची मूस समजली–साधली–बिघडली.' ५ (राजा. कु.) खाजणाच्या शेताच्या बांधाच्या आंतसांचणारें पाणी बाहेर जाण्यासाठीं बांधांत केलेलें दार; गोरी. ६ (गो) माशी. ७ –पु. (राजा.) माग; शोध; मार्ग; पत्ता. (क्रि० लावणें; काढणें; लागणें; निघणें–मागमूस). [सं. मूषा] (वाप्र.) **०उतरणें–ओतणें–काढणें–बनणें**–(एखाद्या सुंदर व घाटदार शरीराच्या माणसाबद्दल उपयोग.) शरीराचा आकार सुंदर असणें. 'काय हो मूस उतरली–ओतली आहे?' **०धरणें**–(व.) गांठ बसणें. येणें. 'मानेला मूस धरली.' **(गोष्टीची, बोलण्याची) ०फुटणें**–एखादी गुप्त गोष्ट फुटणें; तिचा बभ्रा होणें, लोकांत पसरणें. 'ऐसा मनसबा जालाची मूस फुटली आहे.' –पेद ६.१४९. **०मारून निजणें**–(ताप वगैरे आला असतां) मुडगुशी मारून निजणें; गुडघे पोटाशीं घेऊन व डोकें खालीं करून निजणें. **०मारग**–पु पत्ता; खूण; अवशेष; तपास; मार्ग; माग; शोध; (क्रि० लावणें; पाडणें; काढणें; लागणें; पडणें; निघणें; उमटणें; उमगणें.) 'घातला परी लाग। कीं कोठें नाहीं मूसमारग।' –नव १५ ३. [मूस+मार्ग]

मूळ—न. १ झाडाचें पाळ. मूल शब्द अर्थ २ पहा. २ मूळपुरुष; आदिपुरुष; वंशसंस्थापक. ३ आरंभ; सुरवात; उगम; उत्पत्ति. ४ ज्यावर टीका केलेली असते तो ग्रंथ. ५ मुख्य, प्रधान वस्तु, गोष्ट. ६ एकोणिसावें नक्षत्र. ७ (गणित) एखाद्या वर्ग किंवा घन संख्येची मूळ संख्या; उदा० वर्गमूळ. ८ बोलावणें; आमंत्रण; नवीन लग्न झालेल्या मुलीला नेण्याकरतां आलेला इसम; नवऱ्याला लग्नाकरितां बोलाविण्यास गेलेला इसम; एखाद्या माणसाला घेऊन येण्याकरितां गेलेला मनुष्य; माघारी. 'केला लग्नाचाही निश्चय चैद्यासि धाडिलें मूळ।' –मोकृष्ण ८३.१९. [सं. मूल] (वाप्र.) **०काढणें-खणणें-झाडणें-पुसणें-मोडणें-मारणें-निर्मूळ करणें**–सर्वस्वीं नाश करणें; पूर्णपणें बिघाड, नाश उच्छेद, विध्वंस, संहार करणें. **०चा, मुळचा**–वि. मुळांतला; प्रारंभींचा; सुरवातीचा. **०जाणें**–मुलीला सासऱ्याहून आणण्यासाठीं तिच्या माहेरच्या माणसानें जाणें; बोलावण्यास, आमंत्रण करावयास जाणें. **०धाडणें**–बोलावणें पाठविणें; घेऊन येण्याकरितां इसम पाठविणें. **मूळावर जन्मणें**–मूळ नक्षत्रावर जन्म होणें; दुसऱ्याचा नाश होईल अशा अशुभ नक्षत्रावर जन्म होणें. **मुळावर येणें–बसणें**–एखाद्याच्या नाशाला कारण होणें, असणें. (विशेषतः कुयोगावर जन्मल्यामुळें आईबापांच्या नाशास कारणीभूत झालेल्या मुलाबद्दल उपयोग करतात). **मुळाशीं हात घालणें**–तत्त्वाशीं गांठ ठेवणें; तत्त्व न सोडणें. 'बाह्योपाधीकडे लक्ष न देतां प्रत्येकानें मुळाशीं हात घातला पाहिजे.' –टि २.५९५. **मुळाहून, मुळाधरून**–मुळापासून; आरंभासून; सुरवातीपासून. सामाशब्द– **०अहंता**–स्त्री. मूलप्रकृति; मूलमाया; ब्रह्मांडीचा महाकारण देह. **०अक्षरें**–नअव. लिहिण्यास शिकवितांना प्रथम शिकवावयाचीं अक्षरें; वर्णमाला. **मूळाक्षरांचें पुस्तक**–न. वर्णमाला शिकविण्याचें पुस्तक. **मूळ आचार**–पु. उदय; वाढ; प्रगति; उत्कर्ष. (मूलाधार शब्दांचें हें अपभ्रष्ट रूप असावें) **मूळक, मूळिक,**

मुळिक–वि. पहिलें; मूळचें. 'ना तरी दीपमूळकीं । दीपशिखा अनेकीं । मीनलिया अवलोकीं । होय जैसें ।' –ज्ञा १४.५५. **मूळकरी**–पु. (व.) मुलीस, सुनेस आणण्याकरितां पाठविलेला मनुष्य. ०**कर्म**–न १ मूलभूत काम; सुरवातीचें कार्य; आद्यकर्तव्य. २ (गणित) एखाद्या संख्येचें वर्गमूळ काढणें. ०**किडा**–पु (व.) बैलाच्या शिंगांत उत्पन्न होणारा एक किडा. याच्या योगानें शिंग हलूं लागतें व गळून पडतें. ०**खंड-कंड**–न. (अशिष्ट) १ मुळी, मुळाचा तुकडा. २ (व.) झाडाची जाड मुळी. [मूळ+खंड=तुकडा] ०**गांव**–न. एखाद्या घराण्याचा अगर वंशाचा मूलपुरुष ज्या गांवीं राहत असे तो गांव; वाडवडील राहत आले तो गाव. ०**ग्रंथ**–पु १ मूळचा ग्रंथ; ज्यावर टीका लिहिली तो, आधारभूतग्रंथ. २ (ल.) आधार; पाया; मूळची हकीकत; सुरवातीचें कारण. 'मूळग्रंथ कळल्यावांचून कज्जाचा न्याय होत नाहीं.' ०**घटक**–पु. (रसा.) पदार्थाचा मूळचा घटकावयव. ०**चिठी**–स्त्री. आमंत्रण पत्रिका; कुंकुमपत्रिका. 'त्वरित मुळचिठ्या त्या सोयऱ्यांला लिहील्या.'–सारुह ३.३३. ०**डाळ**–न. मूळ, पाळ वगैर. –तुगा. ०**द्रव्य-धन**–न. भांडवल; व्यापारांत गुंतविलेला पैसा. ०**नक्षत्री**–वि. मूळ नक्षत्रावर जन्मलेला. 'येवढेवरी ढिसाळ । नित्यनैमित्तिकीं आहे फळ । परी तें त्यजिजे मूळ । नक्षत्री जैसें ।'–ज्ञा १८.१२३. ०**पत्र**–न. १ अस्सल पत्र: मूळ दस्त ऐवज. २ परवानगीचा दाखला; परवाना. 'आणि तयाचि स्थिति तमीं । जे वाढोनि निमती भोगक्षमीं । ते घेती नरकभूमी । मूळपत्र ।' –ज्ञा १४.२७४. ०**पाटी**–स्त्री. ठाकरांत विवाहप्रसंगीं मुलाचा बाप लग्नाचें सामान ज्या टोपलींतून मुलीकडे नेतो ती टोपली. –बदलापूर १४७. ०**पीठ**–न. १ मूळस्थान; देवता ज्या ठिकाणीं पहिल्यानें प्रगट झाली तें स्थान; उगमस्थान. 'ओंकार मातृकांसकट । तोचि जाणावा वेंकुवंठ । वेदाचें जें मूळपीठ । तेथून प्रकट त्रिकांडी ।' –एरुस्व १.४२. २ एखाद्याच्या पूर्वजांचें स्थान. ०**पीठिका**–स्त्री १ आदिकारण; प्रारंभ; उगम; (एखाद्या देशाची, राष्ट्राची, कामा-प्रसंगाची) सुरवातीची स्थिति. २ साद्य वृत्तांत; समूळ हकीकत; (एखाद्या कामाचे–कृतीचे–प्रसंगाचे हकीकतीचे) सर्व मुद्दे; सर्व गोष्टी. 'अनुष्ठानाची मूळपीठिका ठाऊक असल्यावांचून ते करावयास येत नाहीं.' ०**पुरुष**–पु. १ एखाद्या वंशाचा किंवा घराण्याचा संस्थापक; आद्यपूर्वज. २ कुलाध्यक्ष; टोळीचा नायक; घराण्यांतील मुख्य पुरुष. ०**प्रकाशक**–पु. (बीजगणित) एखाद्या घातसंख्येचें मूळ ज्या आंकडयानें दाखविलें जातें तो; मूळदर्शक अंक. 'घाताचा मूळ प्रकाशक दाखविण्याच्या दोन रीति आहेत:–घात संख्येच्या आरंभीं V असें चिन्ह काढून त्यांत मूळदर्शक अंक लिहितात अथवा घातसंख्येचे वर उजवे बाजूस अपूर्णांक रीतीनें मूळ–दर्शक अंक मांडतात. –छअं १५३. उदा० $3V^{2}7$, $2^{\frac{1}{3}}$ V^{4}, $4^{\frac{1}{2}}$ या वरील उदाहरणांत अनुक्रमें ३ आणि २ हे मूळ प्रकाशक होत. घात प्रकाशक पहा. ०**प्रकृति**–स्त्री. आदिमाया. प्रकृति पहा. ०**बंद-ध**–पु. वज्रासन; योगशास्त्रांतील एक बंध, आसन. योगाभ्यासी साधक योनिस्थान दाबून आणि गुदद्वार आं संकुचित करून अपानवायूची अधोगति मोडून ती उर्ध्व करितात. त्यायोगें प्राण आणि अपान यांचा संयोग करवितात. मूलस्थानाचें बंधन होतें म्हणून यास मूलबंध म्हणतात. 'त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं । सावरूनी घरी घाली घाली वेदीं गांठीं ।' –तुगा २५८. ०**बांध-बंद**–पु. (क.) शेतांत पाणी अडविण्यासाठीं घातलेला बंधारा. ०**भूत**–वि. सर्वांस कारण असलेला; आदिकारण. 'जय जय देव निष्कळ । स्फुरदमंदानंदबहळ । नित्य निरस्ताखिलमळ । मूळभूत ।' –ज्ञा १८.४. ०**माधव**–विना. द्वारकेजवळील एका क्षेत्राचें नांव. 'वचना मानवला बळिदेवो । ऐकोनि हासिन्नला देवाधिदेवो । पाणिग्रहण मूळमाधवो । मुळीचा टावो लग्नासी ।' –एरुस्व १४.३८. ०**माया**–स्त्री. आदिमाया. 'म्हणोन हें बोलणें होये। जाणीव मूळमाया।'–दा १०.१०.१५. ०**मुहूर्त**–क्रिवि. प्रथमारंभीं; सुरवातीला. ०**वस-वसा**–पु. (कों.) खेडें, शेत इ०चें खालचें टोंक किंवा बाजू; प्रथम वस्तीची जागा. ०**वैरी**–पु. हाडवैरी. 'इंद्रासुर आणि देवेंद्र। मूळवैरी झुंजती।' –मुविराट ३.१४८. ०**व्याध-धि-धी**–स्त्री. एक गुदरोग. मुळव्याध पहा. ०**शोधन** न उगम किंवा मूळ शोधणें. ०**साडा**–पु. (माण.) नवऱ्यामुलीला मूळ घाडून व तिच्या सासुला साडीचोळी देऊन तिला परत घरीं नेणें; नवरी ववसुन नेणें. ०**सूत्र**–न. सूत्ररूपानें असलेलें मूळ. 'एवं वेदांचें मूळसूत्र। सर्वाधिकारैकपवित्र।' –ज्ञा १८.१४२६. ०**स्तंभ**–पु. १ मुहूर्तमेढ; घर बांधतांना जोत्यावर प्रथम उभा केलेला खांब. २ ज्यांत विश्वाची रचना, उभारणी वर्णिली आहे असा एक ग्रंथ. ०**स्तंभारोपण**–न. मुहूर्तमेढ घालणें–पुरणें; घर बांधावयास सुरवात करणें. ०**स्वभाव**–पु. उपजत स्वभाव; जन्मसंस्कार. 'त्यांचें येळकोट. राहिना। मूळस्वभाव जाईना।' –तुगा. ०**हारी**–पु. मूळ आलेला मुन्हाळी पहा ०**क्षेत्र**–न. घर; निवासस्थान; वसतिस्थान. 'गंधर्वनगरीं क्षण एक न राहावें। तैंचि करावें मूळक्षेत्र।' –तुगा ३५३१.

मूळघणें—न. उन्मूलन; उच्चाटण. 'तैसें कथेचें इये ऐकणें। एक श्रवणासि होय पारणें। आणि संसारदुःख मूळवणें। विकृतीविर्णे।' –ज्ञा ४.२३२. –क्रि. घालविणें; मूळ उच्चाटन होणें, करणें. [मूळ]

मूळू—वि. (कर. नंदभाषा) पांच. मुळु पहा.

मृग—पु १ हरिण; काळवीट. २ सत्तावीस नक्षत्रांपैकीं पांचवें नक्षत्र. ३ मृग नक्षत्राचा पाऊस. ४ सामान्यपणें चतुष्पाद प्राणी; पशु; जनावर. [सं. मृग्=शोधणें] **म्ह**० मृगाचे आधीं पेरावें बोंबचे आधीं पळावें. सामाशब्द- **०छाल-छाला**-पु. मृगाजिन; हरिणाचें कातडें. 'शेले शाली शाला दुशाल । स्वीकारा सांडून मृगछाल ।' -नव १७ १३७. **०जल-ळ**-न. अति-उन्हानें जमीन किंवा वाळवंट सडकून तापलें म्हणजे त्या लगतच्या हवेचे थरहि तापून हलके होतात. ते वर जाऊं लागले म्हणजे हवा पाण्याच्या लाटांप्रमाणें हलूं लागते व ते थर पाण्याप्रमाणें भासतात अशा रीतीनें होणारा पाण्याचा भास. **०जल-स्नान**-न. अशक्य गोष्ट; खपुष्प. **०तृषा-तृष्णिका**-स्त्री. मृग जळ पिऊन शांत होणारी तृष्णा; अशक्य गोष्ट. **०नयना-नैना-नेत्री-लोचना**-स्त्री. हरिणाच्या डोळ्यांसारखें डोळे असलेली स्त्री; सुंदर स्त्री **०नाभि-मद**-पु कस्तुरी. 'मृगनाभीं रेखिला टिळा ।' -तुगा ४०६९. **०नीर**-न. मृगजळ. **०पति-राज-वर, मृगेंद्र**-पु (काव्य) पशूंचा राजा; सिंह. **०बहार-बार**-पु आगोटीच्या सुमारास किंवा मृगनक्षत्राचे वेळीं येणारा बार; पहिला बहर; हत्तीबार, आंबेबार पहा. **०मद**-पु. मृगनाभि पहा. **०लांच्छन, मृगांक**-पु. १ मृगाच्या आकाराचा डाग(चंद्रावरील). २(काव्य) चंद्र; मृगाची आकृति धारण करणारा. 'कृपेनें अंकीं धरिला हरिण। मृगलांछन चंद्रमा ।' -मुआदि ३४.१२. **०शावाक्षी**-स्त्री. हरिणाच्या पिलाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली, चंचल डोळ्यांची स्त्री; सुंदर डोळ्यांची स्त्री 'मृगशावाक्षी गुण निधान । उपमा नाहीं स्वरूपातें ।' -शिली १४.१४९. [मृग+शाव=पिलूं+अक्षन्=डोळा] **०शि(शी)तळाई-शि(शी)तळी**-स्त्री. मृगाच्या पावसानें हवेंत आलेला थंडावा. **०शिर-शीर्ष**-न. मृग नक्षत्र. **०शीर्षक(हस्त)**-पु (नृत्य) मूठ मिटून नेत्र आंगठा व करंगळी उभी करणें. **०साल**-न. मृगनक्षत्राच्या आरंभापासून सुरू होणारें वर्ष. या खेरीज दुसरें पाडव्याचें साल, दिवाळीचें साल व सुरसन पहा. **०सेवडी**-स्त्री. कृष्णाजिन; हरिणाचें कातडें. 'वरी चोखट मृगसेवडी । माजी धूतवस्त्राची घडी ।' -ज्ञा ६.१८२. **मृगांक**-पु. चंद्र, मृगलांछन पहा. 'उदैला आनंद मृगांकु। मोहा अंधकारीं ।'-भाए २. [मृग+अंक=चिन्ह] **मृगाचा किडा**-पु. मृगनक्षत्रांत किंवा त्या सुमारास आढळणारा एक तांबडा किडा. **मृगांबु**-न. मृगजळ. 'ब्रह्मगिरीहूनि न निघे । आणि समुद्रींही कीर न रिगे। तरी माजीं दिसे वाउगें। मृगांबु जैसें ।' -ज्ञा १५.२३८. [मृग+अम्बु=पाणी] **मृगाब्धि, मृगांभ**-न. मृगजळ. **मृगासन**-न. १ बसावयाचें हरिणाचें कातडें. २ देवडीच्या दोन बाजूंस असणाऱ्या ओटयांपैकीं प्रत्येक ओटा. ३ रांगोळीची एक आकृति. ही आठ आठ ठिपक्यांच्या आठ समांतर ओळी व बाजूनें दोनदोन ठिपके देऊन चौपट साधून काढतात. -रंगवल्लिका १.११. **मृगी**-स्त्री. हरिणी. **मृगेंद्र, मृगेश**-पु. (काव्य) सिंह. [मृग+इंद्र, ईश] **मृगया**-स्त्री. शिकार; पारध. [सं. मृग्=शोधणें]

मृड—पु. शिव; शंकर. [सं.] **मृडानी**-स्त्री पार्वती.

मृणाल—नपु. कमळाचा देठ [सं. मृण्=इजा देणें] **०सुत**-कमलतंतु. 'मृणाल सुतांचा पासवडा घातला ।' -शिशु १७७.

मृणी—(हेट.) बसण्याचा पाट.

मृण्मय—वि. मातीचें बनविलेलें. [सं. मृत्+मय]

मृत—वि. १ मेलेला; प्राण गेलेला; जीवनशक्ति नाहींशी झालेला (प्राणी, वनस्पति). २ (ल.) निष्फळ. ३ (वैद्यक) भस्म केलेला (धातु). 'मृतें लोहें होती। ते रसरूपें जिती। जळोनि इंधनें येती। वन्हिदशे।' -अमृ ३.५. [सं. मृ=मरणें] **०गोदान**-न मृत्युगोदान पहा. **०तिथी-दिन-दिवस**-स्त्रीपु. पुण्यतिथि; श्राद्धदिन. **०पत्र**-न. मृत्युपत्र पहा. **०प्राय**-वि. मेल्यासारखा; मृतवत् **०भाषा**-स्त्री. चालू नसलेली भाषा. **०लेख**-पु. १ मेलेल्या माणसाच्या हातचा लेख, लिखाण. २ मृत्युपत्र. **०वत्सा**-स्त्री. १ जिचें वांसरूं तान्हें असतांनाच मेलें अशी गाय, म्हैस. २ जिचीं वासरें मरतात अशी गाय, म्हैस. ३ जिचीं मुलें लहानपणींच अगर जन्मतांच मरतात अशी स्त्री. **०वंध्या**-स्त्री. मरतवांझ; जिचीं सर्व मुलें मरतात अशी स्त्री. **०शय्या**-स्त्री. मेलेल्या माणसाच्या नांवाने ब्राह्मणास दान दिलेली शय्या. **०संजीवनी**-स्त्री. मेलेल्यास पुन्हां जिवंत करणारा मंत्र. **०स्नान**-न. प्रेतयात्रेला जाऊन आल्यानंतर करावयाचें स्नान. **०स्नात**-वि. ज्यानें मृतस्नान केलें आहे अला. **मृताशौच**-न. सुतक. **मृतासन**-न. (योगशास्त्र) सर्व आसनविधि किंवा व्यायाम आटपल्यानंतर शरीराला विश्रांति देण्याकरतां करावयाचें (आंग लुळें करून मृतवत् पडलें असतां होणारें) आसन; गात्र-शिथिलीकरण. **मृताह**-पु. मृत्युदिन; पुण्यतिथि. [सं मृत+अहन्] **मृति**-स्त्री. मरण; मृत्यु. 'न मृति मज म्हणे हो चेतनाचेतनाहीं।' -वामन, नृसिंहदर्पण १९. **मृतक**-न. १ मृताशौच; सुतक. २ अंत्यविधि; मृताची क्रिया. ३ प्रेत. 'मृतक तें ढकलोनि धरातळी।' -वामन, नृसिंहदर्पण १७७. **मृत्यंग**-न. शरीराच्या ज्या भागावर आघात केला असतां तत्काळ मरण येतें तो भाग; मर्म. 'सांग तुझें मृत्यंग कोण । मीही सांगतों आपुलें मरण ।' -शवि २.१७४. [मृति+अंग]

मृत्तिका—स्त्री. १ माती. २ एखाद्या विवक्षित जागेची माती; कांहीं अनुष्ठानांत किंवा शांतिकर्मांत सात प्रकारच्या मृत्तिका सांगितल्या आहेत. त्याः-अश्व, गज, रथ, चतुष्पथ, गोष्ठ, वल्मीक, ह्रद अगर संगममृत्तिका. कांहीं लोक गोष्ठ, वेदिका, कितवस्थान,

ह्रद, कर्षितक्षेत्र, चतुष्पथ, स्मशानमृत्तिका या सप्तमृत्तिका मानतात. रसायनशास्त्रांत नऊ प्रकारच्या मृत्तिका सांगितल्या आहेत. [सं.] **०होणें**–माती होणें; नाश होणें; धुळीस मिळणें. **०बुद्धि**–स्त्री. मतीप्रमाणें मानणें; **दुर्मिळ मृत्तिका**–स्त्री. (रसा.) कांहीं खनिज पदार्थांत सांपडणारे प्राणिद. या प्राणिदांमध्यें सेरियम, टर्नियम व इटर्नियम ह तीन धातु असतात. **मृत्पिंड**–पु. मातीचा गोळा. [सं.] **मृदावरणशास्त्र**–न. भूगर्भशास्त्र; भूस्तरशास्त्र. [सं. मृद्+आवरण+शास्त्र] **मृद्घटवत्**–क्रिवि. मातीच्या भांड्याप्रमाणें, मडक्याप्रमाणें. 'धरणीवरि आपटिला। चूर्ण झाला मृद्घटवत।' [सं. मृद्=माती+घट+वत] **मृन्मय, मृण्मय**–वि. मातीचा बनविलेला.

मृत्यु–त्य—पु (काव्य) १ मरण; अंत. 'शोकार्णवीं नाना पडून, नित्य रडरडून पावले मृत्य।' –ऐपो ४१९. २ यम; अंतक. [सं. मृत्यु; मृ=मरणें] (वाप्र.) **०पावणें**–मरणें. **मृत्यूचा फांसा पडणें**–मरणोन्मुख होणें; मरण. 'भ्रमला सुविचक्षण परि पडले कंठांत मृत्युचे फांसे।' –मोआदि ४.८२. सामाशब्द– **०कळा**–स्त्री. मरणाच्या वेळीं तोंडावर दिसणारी कळा; मरणकळा; प्रेतकळा; मरणाच्या वेळेचा तोंडावरील फिक्कटपणा; निस्तेजपणा. **०गंडांत**–नपु. जीवावरचें संकट; मृत्युप्राय संकट; जीवावरचा प्रसंग; गंडांत शब्द पहा. **०गोदान**–न. १ (प्र.) मृतगोदान; मेलेल्या गाईचें दान. एका चिक्कू गृहस्थानें मेलेल्या गाईला नेऊन टाकण्याचा खर्च वांचावा म्हणून तिचें मरणप्राय स्थितींत एका ब्राह्मणाला दान केलें यावरून वरील संप्रदाय प्रचारांत आला. २ (ल.) मरतुकडा प्राणी; अत्यंत कृश व अशक्त असलेला मनुष्य किंवा पशु. ३ (ल) निर्वीर्य मनुष्य; पुचाट मनुष्य; पुळचट इसम, मेमलतोंड्या. **०चिन्ह**–न. मरणाचें चिन्ह; मृत्युकाल समीप आल्याची खूण; मरणकाळचें लक्षण; महत्संकटाची सूचना. (क्रि० उमटणें; दिसणें; होणें) **०पंचक**–न. (ज्योतिष) एक अशुभ योग; या योगावर जन्म झाल्यास मरणाची भीति असते. पंचक पहा. 'अगे हा रुक्मिया दुर्बुद्धि। न पाहेचि लग्नसिद्धी। मृत्युपंचकाचे संधी। लग्नसिद्धी मांडिली।' –एरुस्व १२.८. **०पत्र**–न आपल्या मरणानंतर जिंदगीची व्यवस्था कशी व्हावी यासंबंधीं लिहिलेला लेख, दस्तऐवज. **०पत्र चालविणारा**–पु मृत्युपत्राप्रमाणें जिंदगीची सर्व विल्हेवाट लावणारा. **०पंथ–मार्ग**–पु. मरणाची वाट; मानवी जीवित; मर्त्यलोक. 'मनुष्याचा जन्म हा मृत्युपंथच आहे आणि हें भूमंडल हें मृत्युपंथ नव्हे तर काय?' **०मुखीं**–क्रिवि. (मूळ शब्द मृत्युमुख) मृत्यूच्या तोंडांत; काळाच्या जबड्यांत. **०योग**–पु. (ज्योतिष) एक कुयोग रविवारीं अनुराधा, सोमवारी उत्तराषाढा, मंगळवारीं शततारका, बुधवारी अश्विनी, गुरुवारीं मृगशीर्ष, शुक्रवारीं आश्लेषा, व शनिवारीं हस्त याप्रमाणें त्या त्या वारीं तीं नक्षत्रें आलीं असतां त्या दिवशीं मृत्युयोग असतो. **०लोक**–पु. पृथ्वी; भूलोक. **०वेळ–वेळा**–स्त्री. दिवसांतील एक अशुभ काळ; काळवेळ. वेळ शब्द पहा. [सं. वेला] **०षडाष्टक**–न. (ज्योतिष) मेष–कन्या, तूळ–मीन, मिथुन–वृश्चिक, सिंह–मकर, कर्क–कुंभ, वृषभ–धन; या दोन दोन राशींतील अंतर सहा व आठ आहे. म्हणून यास षडाष्टक म्हणतात. या दोन राशींपैकीं एक वधूची व एक वराची असल्यास विवाहकार्यास हें वर्ज्य मानलें जातें. **मृत्युंजय**–पु. १ शंकर; शिव. 'तात तुझा तेजस्वी मृत्युंजयसचिव होय अजित रणीं।' –मोभीष्म ३ २९. २ (वैद्यक) एक मात्रा; औषध. बचनाग, गंधक, मिरीं, टांकणखार, पिंपळी हीं औषधें एकेक भाग व हिंगूळ दोन भाग घेऊन आल्याच्या रसांत खलून त्याच्या गोळ्या करतात. हें औषध सर्व ज्वरांचा नाश करितें. [सं. मृत्यु+जि=जिंकणें]

मृद—वि. (प्र) मृदु; मऊ. 'गगनाहून मृद पूर्ण। ब्रह्म जाणावें।' –दा ७.४.२९. [सं. मृदु]

मृदंग—पु. १ पखवाज; एक वाद्य; मुरदुंग पहा. २ (संगीत) एक यति. गायनारंभीं द्रुत, मध्यें मध्य, अंतीं द्रुत किंवा प्रारंभीं द्रुत मध्यें विलंबित व अंती मध्य अशा लयींची गती असणें. [सं.] **म्ह०** मृदंगास मार दोहोंकडून. **मृदंगी–ग्या**–पु. १ मृदंग वाजविणारा; पखवाजा–जी. २ आटयापाटयांच्या खेळांतील मुर्दुंग्या; सूरपाटी धरणारा.

मृदु, मृदुल—वि. १ मऊ; नरम; खरखरीत नसलेला. २ कोमल; नाजुक, लवचीक; नमता; शिथिलावयव. ३ (ल.) सौम्य; सोपें; सार्धे; शांत; न लागणारें; गोड, नम्र; कठोर नसलेलें (भाषण इ०). [सं.] **०काय**–पु. अपृष्ठवंश प्राणिसंघांतील मृदुकाय हा एक संघ आहे. गोगलगाय, शिंकूळ, खुबडी, कवडी, कालवे, शिंप वगैरे प्राणी या संघांत मोडतात. –ज्ञाको (म) १९०. **०वर्ण**–पु. वर्णांचा एक वर्ग; कठोर नव्हे असा वर्ण. ग, द, ज, वगैरे **मृदुली, मृदोली–ळी**–स्त्री. मऊ गिरदी. 'विचित्रु घातलीं आसनें। सुकुमार मृदुपणें। गाद्यापडगाद्या टेंकणें। वोठंगणें मृदोळिया।' –एरुस्व १५.४०.

मृदूच्च—न. (ज्योतिष) ग्रहाच्या कक्षेंतील सूर्यापासून अति दूरचा बिंदु; मंदोच्च पहा.

मृदुवल्या—स्त्री.अव. एक कोंकणी पक्वान्न; सांधणांचा एक प्रकार. –पाक ६०.

मृषा—वि. खोटें; मिथ्या; नकली. 'मृषा शीर निर्मूनियां राघवाचें। सितें दावितां हारपे रूप त्याचें।' –मुरामायणयुद्ध५०. –क्रिवि. १ खोटेपणानें; लुच्चेगिरीनें; फसवून २ निष्फळ; व्यर्थपणें; फुकट. [सं]

मे—पु. इंग्रजी वर्षाचा पांचवा महिना. [इ.]

मैं, मे—सना. (चि. राजा.) मी.

मेकड—नपु. मेकूड पहा.

मेकडा—पु. रोगट हवेनें झाडांस किंवा जनावरांना होणारा रोग. मेकाड पहा.

मेंकण(मे)कण—न. (राजा.) कानांतील मळ; कर्णमल.

मेकलणें—सक्रि. घट्ट बांधणें. मेखलणें पहा 'निद्रालस्या न मेकली।' –माझा १८.१०२७. (पाठ). [मेख]

मेकाड-डा—नपु. भाजीपाला, पिकें यावरील रोगरूप क्षुद्र जंतु; विशाखा नक्षत्राच्या पावसानें पिकांवर पडणारा रोग. हा अनुराधा नक्षत्राच्या पावसानें धुवून जातो असें म्हणतात.

मेकी—स्त्री. एक वेल [का. मेक्के] **मेकें**–न. मेकीचें फळ.

मेकू(कु)ड—नपु. नाकास चिकटलेला वाळलेला शेंबूड; नाकांतील मळाच्या खरपुड्या.

मेख—स्त्री. १ खुंटा; खुंटी. २ खोंच; रहस्य; गूढ गोष्ट 'तुकारामबोवाची मेख' ३ लोखंड इ० धातूचा खिळा. ४ अलंकारार्थ दातांत बसविलेली सोन्याची चूक. ५ (ल.) धष्टपुष्ट व बळकट मनुष्य, पशु. [फा. मेख्] **म्ह**० १ सोन्याची मेख आणि तमाशा देख. २ तुम्ही आम्ही एक कंठाळीला मेख.' (वाप्र.) **०ठेवणें**–एखादा करार, कदुलायत करतांना त्यांत विशिष्ट खोंच, अट घालणें, ठेवणें. **०बसणें**–अडवणूक, अटकाव होणें; मेखलें जाणें. **०मारणें**–१ जोरानें, पुरतेपणी थांबविणें, बंद करणें; अडकवून ठेवणें (चालू व्यापार, धंदा काम, इ०) २ प्रतिपक्ष्याचें कांहीं न चालेल अशी तजवीज करून ठेवणें, विघ्न आणणें. **०सोसणें-घेणें (हातावर)**–(वाईट कृत्यें करण्यांत किंवा त्यांजबद्दल दुःख भोगण्यांत) अतिशय धैर्य, रांकटपणा, सोशीकपणा असणें. **मेखलणें**–उक्रि. १ (घोडा, बैल इ०) मेखेस, खुंट्यास बांधणें; गुंतविणें. २ (ल.) चालतें काम थांबविणें, बंद पाडणें. [मेख] **मेखा उचटणें-उचलणें-उपटणें-खांद्यावर घालणें-देणें** ताबडतोब बिदाई करणें; काढून देणें, घालवणें; उचाटणें, निखळणें. **मेखा घेणें**–१ (आपल्या तंबूकरितां गांवच्या सुताराकडून) फुकट व जुलूम करून, मेखा घेणें. यावरून २ (ल.) बळजबरी करणें; जुलमानें घेणें, सूड घेणें; जुलमानें आपली हानि भरून काढणें. **मेखेवर बसविणें**–सरळ, नम्रपणें न वागतां वांकडी गोष्ट सांगणें. **मेख(क)चू-सू**–पु. मेख ठोकण्याची मोगरी; तंबूच्या मेखा ठोकण्याचा ठोकळा. –वाडसमा १.२३३. [हिं. मेखचू] **मेखसूं मेखस**–न. १ ओबडधोबड अशी मेख; मोठी मेख. २ मोठा व लांब लोखंडाचा खिळा. [मेख] **मेखला**–स्त्री. बैलगाडीच्या जोखडाच्या खुंट्या प्रत्येकी. **मेखाटणीस-मेखाटीस बसणें**–हट्टे धरणें, धरून बसणें; पुरता पिच्छा पुरवणें; पाठीस लागणें (तगादेदार, सरकारी अधिकारी, खमक्या मालक इ०नीं). **मेखाटणें**–सक्रि. १ मेख, खुंटी मारून बांधणें; खिळून टाकणें. २ (ल.) ठोकणें; चोपणें; तासडणें; सतावून त्रास देणें. [मेख, मेखाटी] **मेखाटी**–स्त्री. मेख; खुंटी (बहुधा मेखाट्या असा अनेकत्वनीं उपयोग करतात. [मेख] (वाप्र.) **०खांद्यादास देणें**–एकदम काढून देणें, घालविणें; वाटेला लावणें. **०घेणें**–१ वेठीस धरून काम करून घेणें. २ ठोकणें; तासडणें; भर्त्सणें; अतिशय गांजणें. **मेख्या**–वि. खमक्या; शारीरिक किंवा मानसिक प्रचंड शक्तीनें प्रतिपक्षीयास दाबून टाकणारा; प्रतिपक्षीयावर दरारा बसविणारा; वस्ताद; पुरून उरणारा; खंबीर. [मेख]

मेखला-ळा—स्त्री. १ उपनयन संस्कारांत त्रैवर्णिकांनीं कमरेला बांधावयाचें तिहेरी कटिसूत्र, दोरी. हें कटिसूत्र वर्णपरत्वें निरनिराळ्या प्रकारचें असतें. 'तेंचि मेखळा मिरवती।' –ज्ञा १.९. २ स्त्रियांचा कमरपट्टा; कटिबंध; सांध्यावर; फांशावर सिंहाचें मुख वगैरे चित्र असलेला कमरपट्टा. 'नितंब अतिदीर्घ हा नचि पुरे यया मेखला।' –कमं १.५४. 'जेवि कां मेखळेचा सिंह विराजमान।' –स्वादि ११.१.४५. [सं.] ३ तरवारीच्या मुठीस बांधलेली दोरी; सांखळी. ४ कमरेस गुंडाळावयाचें वस्त्रविशेष. 'समर्थें कंथा मेखळा देऊन स्कळासी आणिलें।' –सप्र २१.५५. **०बंधन**–न. मेखला बांधण्याचा विधि; उपनयनविधि. [सं. मेखला+बंधन] **०मुख**–वि. नेवराच्या (तंगडीच्या) पुढच्या भागाच्या उजव्या बाजूस वळलेला भोवरा असलेला (घोडा) हें अशुभ चिन्ह आहे. –मसाप २.५६. अशुभचिन्हें पहा.

मेंग—स्त्री. सापाची कात, कवच. (क्रि० टाकणें) [सं. मृतांग] **मेंगचोट, मेंगा-ग्या**–वि. १ बुळा; षंढ; निर्वीर्य; नेभळट. 'तुका म्हणे मेंग्या गाढवाचें जिणें।' –तुगा २९५५. २ (ल.) दुबळा; गयाळ; मूर्ख, गायतोंड्या; अनिश्चयी. ३ पराक्रमशून्य; निष्क्रिय. 'रामजी मेंगा माणूस आहे.' [मेंग] **मेंगटा**–वि. (कु.) अजागळ; निर्बल 'रेडा मारील म्हणून गडबडूं नका. मेंगटा आहे तो.' [मेंगा] **मेंगावणें, मेंगणें, मेंगेस येणें**–अक्रि. (राजा.) १ (सापानें) आपली कात टाकणें. २ (ल.) भिऊन माघार घेणें; कचरणें; कचणें; कचकणें. [मेंग] **मेंगें**–न. गयाळ, मूर्ख, नामर्द, मेंग्या मनुष्य. **मेंग्यामारवाडी**–पु. बाहेरून दिसण्यांत भोळवट पण आंतून कावेबाज असलेला मनुष्य. **मेंग्या साप**–पु. (ल.) खुनशी; आड गांठ्या मनुष्य.

मेंगळ-मेंगें मीठ—न. खातेरा व केरकचरा यांपासून तयार केलेलें मीठ; क्षारमृत्तिका.

मेघ—पु. १ घन; जलद. २ हिम. ३ दाट धुकें पडलें असतांना हवेपासून उत्पन्न होणारा व नंतर विस्तवावर तयार केलेला एक विशिष्ट खाण्याजोगा पदार्थ. [सं. मेघ; प्रा. मेह; गुज. हिं. मेह; सिं. मेहु] (वाप्र.) **०ओळणें**–ढग येणें; आकाश

अभ्राच्छादित होणें. 'असंभाव्य मेघ ओळला। एकाएकीं चहूंकडे।' –ह १२.४५. सामाशब्द– **०गंभीर**–वि. १ मोठा नाद करणारा; मेघगर्जनेप्रमाणें घन व पूर्ण. [सं. मेघ+गंभीर [**०गर्भ**–पु. (अनेक वचनी उपयोग) गारा; करका. [सं.] **०डंबर, मेघाडंबर**–नपु. १ मेघांचें अवडंबर; आभाळ भरून येणें; ढगाचें छत. २ (ल.) पोकळ धमकावणी; व्यर्थ वल्गना; भयंकर पण निष्फळ देखावा. **०डंबर–री**–स्त्री. १ छत; मंडपी; उंच छत्री. 'भवित वैराग्य ज्ञान। हेंचि माहीमातेंब सूर्यपान। मेघडंबर पताका।' –स्वादि ७.५.५२. २ घुमट; हत्तीवरील अंबारी. 'यापरी हवदे मेघडंबरी।' –नव १३.७५. –वि. मंडपी, छत असणारा (देव्हारा, डोला इ०). [सं.] **०तडित्**–स्त्री. (शाप.) ढगांतील वीज; (इं.) लाइटनिंग. [सं.] **०तडिद्वाहक**–पु. (पदाव) ढगांत उत्पन्न होणाऱ्या विजेपासून संरक्षण होण्याकरितां इमारतीच्या उंच भागावर धातूच्या पट्ट्या बसवून त्या जमीनींत पुरलेल्या असतात त्या प्रत्येक. [सं. मेघ+तडित्+वाहक] **०पटल**–न. ढगांचें आवरण; छत; ढगांनीं आकाश आच्छादित होणें. (क्रि० येणें; पडणें). **०मंडल**–न. १ मेघांचा समुदाय. २ मेघांचा प्रदेश; वातावरण, आकाश. [सं. मेघ+मंडल] **०मल्हार**–पु (संगित) एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति षाडव-षाडव. वादी षड्ज. संवादी पंचम. गानसमय मध्यरात्र. वर्षाऋतूंत सार्वकालिक [सं] **०मांस**–न. मेघ अर्थ २ पहा. [सं] **०माळ**–स्त्री. कागद कातरून केलेली माळ; नक्षत्रमाळ; रंगमाळ पहा. **०माळा**–स्त्री. १ ढग; मेघपंक्ति. २ मेघावर केलेला एक भविष्यसूचक ग्रंथ. ३ रहाटगाडग्यावरील गाडग्यांची माळ. **०रंजनी**–पु. (संगीत) एक राग. ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र निषाद हे स्वर लागतात जाति औडुव–औडुव. वादी मध्यम. संवादी षड्ज. गानसमय रात्रीचा चौथा प्रहर. क्वचित् ह्या रागांत तीव्र मध्यम घेण्यांत येतो. **०वितान**–न. मेघडंबरी; मेघांचा चांदवा, विस्तार. [सं.] **०श्याम**–वि. ढगासारखा काळासावळा; घनश्याम **मेघाडंबर**–न. मेघडंबर पहा. **मेघुडा**–पु प्रलयकालचा मेघ. 'मग मेघुडे विराले।' –विउ ५.४९. **मेघो(घौ)डा मेघौडें**–पुन. मेघ; ढगांचा समुदाय. 'जैसे वर्षाकाळींचे मेघौडे।' –ज्ञा ११.१९४. [प्रा.] **मेघौनि**–क्रिवि. मेघापासून. 'देखे मेघौनि सुटती धारा।' –ज्ञा ६ ८७. [मेघ+हून–ऊन]

मेच—पु. (कों.) एक प्रकारचा मासा.

मेच—पु. (कों.) एक प्रकारचा बांबू.

मेचक—न. एक उपरत्न. हें दृष्टि निर्मल करणारें, सौभाग्यदायक व वशीकरण करणारें असतें; पण हें हल्ली आढळत नाहीं. –वि. काळा. –मोमंभा १०.३१४. –शर. [सं.]

मेचका—मोजका पहा.

मेचकू—पु. (प्र.) मेखचू पहा.

मेचकें—न. (प्रां.) सांध्याच्या आंतील वळण, वाकण. बेचक–की पहा.

मे(मॅ)चट—वि. (प्र.) मेणचट पहा.

मेंचणें—उक्रि. १ मोजणें; मानणें; ऐकणें; जमेंत घेणें; जुमानणें; (निषेधार्थी प्रयोग), मानणें; खिजगणतीस धरणें 'बुद्धि मेचवेना धोंडीं।' –ज्ञा १४.२४६. 'हा त्याला मेचायाचा नाही' २ कचरणें; कचणें; भिऊन माघार घेणें. 'मरण जवळि आलें काळ कोणास मेचे।' –सारुह ४.९०. ३ आटोपणें. ४ इच्छिणें. –मनको. [मे(मो)जणें] **मेचून असणें**–भिऊन, नमून असणें. 'मी कोणाला मेचून असणार नाहीं.'

मेचला—वि. मेमत्तोंडया बोलण्यास लाजणारा, भिणारा.

मेचाड—वि. (व.) अशक्त; दुर्बळ. 'मेचाड माणूस काय करील?' [मेचट]

मेचु–चू—स्त्री. आवड; भक्ति; प्रीति. 'तैं मधुरीं रसीं वाढे। मेचु तया।' –ज्ञा १७.१२५ [का. मेच्चु=आनंद, समाधान]

मेछनी—पु. (कों.) एक प्रकारचा मासा.

मेज—न. लिहिण्यासाठीं केलेलें लांकडीं घडवंचीसारखें साधन; (इं.) टेबल. [फा. मेझ्] **०मंडळी**–स्त्री. (गो.) कार्यकारी मंडळ. **०मांडप**–(गो.) सोडावाटर इ० विकण्याचें दुकान घालणें. [मेज+मांडणें]

मेज, मेजणी, मेजदात-द-स्त—(प्र.) मोज, मोजणी इ० पहा.

मेजणें—सक्रि. अंक किंवा प्रमाण संख्येनें मोजणें. 'कथा अशि असो पहा स्वचरितें तुम्ही मेजुनी।' –केका ३९. २ (ल.) गणणें. (गो.) मेजप. [मोजणें] **मेजला, मेजीव**–(प्र.)मोजला, मोजीव पहा.

मेजबा(मा–वा)न—वि. १ मेजवानीस, भोजनास बोलावलेला (मनुष्य, पाहुणा). २ कुटुंबांतील आळशी व निरुद्योगी इसम. ३ (क्व.) मेजवानी देणारा (यजमान). ४ (मेसमन या इंग्रजी शब्दाशीं साम्य जोडून चुकीनें)खानावळवाला; खानसामा. [फा. मेझबान्–मान्] **मेजबा(मा–वा)नकी–गी**–स्त्री. १ मेजबानी देणें; जेऊं घालणें; आदरातिथ्य, सत्कार करणें. २ आदरातिथ्य; पाहुणचार. ३ स्वागतखर्च. ४ नजराणा 'पांच हजार रुपये सरकारांतून मेजवानगी पाठविली' –ख ९ ४७४३. [फा. मेजबानी] **मेजबा(मा–वा)नी**–स्त्री. १ सोयरेधायरे, संपत्तिमान लोक यांस आदरानें मिष्टान्नभोजन घालणें. २ थाटाचें जेवण; आतिथ्य; मेहमानी; ३ नजराणा. 'अदवानीवरावडील वकील

मेजवानी व वस्त्रें घेऊन आले आहेत।' –ख ६.३०९६. [फा. मेझ्बानी]

मेज(झ)र—न. (छाप.) जुळलेल्या मजकुराचें एक पृष्ठ वगैरेचें लाबीचें प्रमाण. [इं]

मेजोटी—स्त्री. (गोफ, कडदा, मणी इ०) दागिन्यांचें माप घेण्याचें सोनाराचें हत्यार. [मेजणें]

मेट—अ. आधिक्य, प्रकर्ष दाखविण्याकरितां काळोख शब्दाबरोबर योजितात. उदा० काळोख मेट=अंधार गुडुप. [? तुल. का. मेटी=उच्चता]

मेट, मेटें—न. १ जानुसंधि; गुडघ्याचा सांधा. घोडा चाल इ०नीं थकला असतां त्याच्या ढोपरासंबंधीं योजतात (सामान्यतः अनेकवचनी प्रयोग. (क्रि० मोडणें; घेणें; धरणें; दुखणें; थकणें). 'घोडयाचीं मेटें मोड.' २ चौकी; पहारा; गस्त; पाहऱ्याची जागा, ठाणें (डोंगरी किल्ल्याच्या वाटेंतील वळणावरचें, तंटबंदी गांवाच्या वेशीच्या बाहेरील बाजूस किंवा प्रांताच्या सरहद्दीपाशीं असलेलें बहुधा महारांच्या वस्तीचें). 'अहंकाराचें मेट होतें।' –एभा ५.५६१. ३ (कु.) दार धरणें; लग्नांतील एक सोहळा (वरात आल्यावर गृहप्रवेशाच्या वेळीं वराची बहीण दार आडवून धरते व या वधुवरांस जी मुलगी होईल ती आपल्या मुलास देण्याविषयीं त्यांस वचन मागते). ४ अवसान; हिंमत (क्रि० बसणें). [मिटणें] (वाप्र.) **०पडणें**–हातपाय गाळणें, गळणें. 'धांप कांप पडे मेट।' –एभा १२.५७४. **०मारणें-मारून पडणें**–(बैल इ०च्या) शरीराचा लोळागोळा होऊन पडणें. **०मारणें-मारून बसणें**–पाय दुमडून गुडघ्यावर हनुवटीस टेकून बसणें. **मेटा असणें**–(माण.) मुडा असणें. **मेटेखुंटीस, मेटाखुटी, मेटाकुटीस येणें**–१ मांडी घातलेली काढून गुडघ्यावर उभें राहणें (एखाद्यास मारण्याकरितां वादांत वरचष्मा होण्याकरितां) २ नेटानें खेंचण्याकरितां, ओढण्याकरितां गुडघे टेकून उभें राहणें. (मनुष्य, पशु यांनीं). ३ ढोपरखुंटीस येणें; म्हातारपणामुळें गुडघे खचणें. ४ हट्टास पेटणें. 'हमामा घालिती कडोकडी। मेटाखुंटी येऊनियां।' –ह १०.९५. ४ शिकस्त करून कंटाळणें; अगदीं दमणें, त्रासणें. **मेटेखुंटीस बसणें**–गुडघे टेकणें. **मेटे घालणें**–१ रडकुंडीस येणें. २ गुडघ्यांत डोकें खुपसणें ३ गुडघे जमिनीवर टेकणें. 'मेटें घालून सांवरी।' –वेसीस्व ४.९९. **०घेणें**–(मल्लविद्या) खुरमुंडी घेऊन हिसडा देणें. **०टेकणें**–१ गुडघे टेकणें. २ वार्धक्यामुळें, अशक्ततेमुळें गुडघे मोडणें; खचणें. ३ (ल.) खचणें; डगणें. **०धरणें**–संधिवातानें गुडघे आंखडणें; दुखणें. **०बसणें**– १ वार्धक्यामुळें व अशक्ततेमुळें अवसान खचणें. २ (ल.) कचरणें; कचणें; धीर खचणें. **०वळणें**–गुडघे हनुवटीला टेकून गुडघ्याभोंवती दोन्ही हातांचा विळखा घेऊन बसणें. सामा-

शब्द– **मेट(टे)करी**–पु. मेटयावरील, नाक्यावरील चौकीदार. 'मेटेकरी अष्टौदिक्पाल।' –रंयोवा ६.८७. **मे. णा**–स्त्री. १ स्नायुमय भागांत उत्पन्न होणारा वायूचा गोळा; पेटका पहा. २ मेंडका, मेंडकी पहा. **मेटा(मेटें)कुटी-खुटी-खुंटी**–स्त्री. १ ढोंपर टेंकून बसण्याची रीत; ढोंपरखुंटी. २ महत्प्रयास; निकर.

मेटचें—अक्रि. (गो.) जुळणें.

मेटण—न. (गो.) शिवणें; शिवण.

मेटाणणें—अक्रि (ना.) तेलकट घाण येणें [मेणचट+घाण]

मेटी—स्त्री. (बे.) मळणीनंतर रास खळ्यांत ओतल्यावर त्यामध्यें पुरलेला खांब. [सं. मेथि–ठि; का. मेटि]

मेटी रयत—पु. गांवचा मुख्य शेतकरी.

मेटीव—वि. ओबडधोबड; कसा तरी घडविलेला (दगड). [मेटणें (हें क्रियापद रूढ नाहीं.)]

मेठ—स्त्री. (व.) संघ; समुदाय; जूट. **०कर**–पु. (व.) मजुरांच्या मेठाचा मुख्य.

मेड—स्त्री. १ (प्र.) मेढ पहा. २ आधारस्तंभ. ३ मेख. **मेडका**–पु. मेढ; खुंट (विशेषतः दुबेळकें असलेला).

मेंड—पु. १ शेताची उंच कड, कांठ, बांध; सीमा; मर्यादा. २ (सामा.) उंच, कड; कणा; दांडा. [हिं. मेन्ड]

मेंड—स्त्री. १ तरंग; लहर. २ (तंतुवाद्य) एका स्वरावरून दुसऱ्या स्वरावर घर्षणानें जाणें; नाजूक रीतीनें उत्पन्न केलेली स्वराची वक्रता. [हिं.]

मेंड—पु (व.) मध्य.

मेंडका-की—पुस्त्री. १ शरीर कमावल्यामुळें भरदार व फुगीर झालेले हातापायांचे स्नायू; शिरा (क्रि० जमणें; निघणें; फुगणें). व्यायामानें स्नायु फुगणें २ प्रहारानें, चिमटा घेतल्यानें हाताच्या स्नायूंत दिसणारा उंचवटा, बेडकी: मांसल गांठ. (क्रि० येणें; उठणें; निघणें; काढणें). ३ पेटका; वळ (हातापायांतील) (क्रि० चढणें; उतरणें; बांधणें; ओढणें). [सं. मंडूक] **मेंडकी**–स्त्री. (व.) बेडूक; बेडकी. [सं. मंडूक] **मेंडकु(को)ळी**–स्त्री. (ना) बेडकी; बेटकुळी.

मेंडका-क्या, मेंडपाळ—वि. मेंढका–क्या; मेंढरें राखणारा; धनगर.

मेंडगू(गु)ळ—न. १ (आंबा इ० झाडावरील) बांडगूळ; झाडावर फुटलेलें दुसरें झाड. २ परोपजीवी वनस्पति किंवा प्राणी.

मेंडग्या—पु. आकाशांतील नक्षत्राकडे पाहून भविष्य सांगणारा.

मेंडजोगी—पु. १ शूद्र जातीचा. अडाणी व रानटी जोगी; दाणगट, रानवट भिक्षेकरी. २ खणपट्या, डोईफोडया इसम.

मेंडणें—न. (राजा.) निरनिराळ्या दोऱ्या एकत्र वळून एक मोठा दोर करण्याची क्रिया.

मेडभूक—स्त्री. (कु.) मरतांना लागणारी जोराची भूक; मरणकाळीं लागणारी अति उत्कट भूक.

मेंडल—स्त्री. (खा. सुतारकाम) दरवाजाच्या बाहेरील बाजूस लंगरी खिळे मारून बसविलेल्या आडव्या लांकडी पट्टया प्रत्येकी. बेणी पहा.

मेंडा—पु. मेंढा पहा. **मेंडी**–स्त्री. (गो.) बायबलचा उपदेश करणारी ख्रिस्ती बाई (बहुधा शेपर्डेस याला प्रतिशब्द).

मेंडा—स्त्री. हद्द; मर्यादा; मेंड पहा'

मेंडा—पु. पीळ देऊन मुरडलेलीं, नरम केलेलीं कडब्याचीं तारें. यांचा पेंढया बांधण्यास उपयोग करतात. (क्रि० मुरगाळणें)

मेंढ्रकमुख—वि. बेडकासारखें तोंड असलेला (घोडा) हें एक घोड्याचें अशुभ चिन्ह आहे. [सं. मंडूक+मुख]

मेंढ—स्त्री. सीमा. मेंड पहा. ' आम्ही सरोन आपल्या मुलुखाच्या मेंढयावरी जाऊन... ' –पेद २१.९६.

मे(में)ढ–ढी—स्त्री. १ (को.) वरच्या टोकास दुबेळकें असलेलें, छपरासाठीं, मांडवासाठीं जमिनींत पुरून जें उंच उभें करितात असें लांकूड. २ आंखूडखांब. ३ (कों.) गुरें बांधण्याचा खुंटा. ४ ध्रुवतारा. ५ आधारस्तंभ. ६ दोरीचा पीळ. [सं. मेठि–थि–धिः प्रा. मेंढि] **म्ह**० हातीं लागली चेड आणि घर मांडवाची मेढ. **मे(में)ढकी–कें**–स्त्रीन. लहान मेढ.

मेढंगमत, मेढजोशी, मेढदाई, मेढमत—मेढेमत, मेढेजोशी, मेढेदाई इ० पहा. **मेढंगमती, मेंढगी–ग्या**–मेढेजोशी इ० पहा.

मेंढ—पु. भाताचें रोप तयार करण्याकरितां माळावर केलेला राब. –बदलापूर २८३.

मेंढका–क्या—वि. मेंढया राखणारा; धनगर. [मेंढा]

मेंढपा–पाळ, मेंढरपाळ—पु. १ धनगर. २ (ल.) निरक्षर मनुष्य; ठोंब्या.

मेंढरी—स्त्री. मेंघला पहा.

मेंढरूं—न. मेंढें; मेंढीचें पिलूं. [मेंढा] **म्ह**० मेलें मेंढरूं आगीला भिईल काय? **मेंढरांची दावण देवास देणें**–देवाला मेंढरांची माळका एकदम बळी देणें. **मेंढमाळ**–स्त्री. मेंढयांची रांग. **मेंढरू चेंढरूं**–न. मेंढरूं व त्यासारखें दुसरें क्षुद्र जनावर. [मेंढरूं द्वि.] **मेंढवाडा**–पु १ रात्रीच्या वेळीं जेथें मेंढया कोंडून ठेवतात तें घर, जागा. २ (ल.) मेंढरांचा कळप, जमाव. **मेंढशिंगी**–स्त्री. मेंढयाच्या शिंगाच्या आकाराचीं फळें असलेली दुधाळ व कांटेरी वनस्पति; काकडशिंगी. हिचा नेत्रौषधांत उपयोग करतात. [सं. मेषशृंगी. मेंढा+शिंग]

मेंढसर—पु. सोन्याच्या तारेचें कंकण.

मेंढा—पु. १ दुबळकें असलेला खुंट; खांब; डांग. ' दाटून वैराग्याचा मेढा। ' –उषा १२५. २ खुंटांची दाट उभारणी; कुंपण; लाकडी कोट; कठडा. ३ उभ्या लाकडांचा कोट.' भृकुटीचे मेढे चढवीले। ' –अकक २. उद्धवचिद्घनकृत शुकरंभासंवाद १३. ४ पाठीराखा; पाठिंबा देणारा. ५ दोऱ्यांतील तेढ, अढी. ६ त्रिशूळ. ७ धनुष्य; धनुष्याची कांबीट ' मेढा निगुती वाहिला। ' –एरुस्व १०.२५. ' बळें मेढा वोढिला। ' –एरुस्व ९.१८. ८ ढाल. –शर. [मेढ] (वाप्र.) **०वाहणें**–प्रतिज्ञा करणें. ' वाऊनि मेढा चालिला। ' –एभा १२.१५१. ' भागैवरामाचा तो वाहियला मेढा। ' –मभा ५३. **मेढावि(व)णें**–उक्रि. एखाद्या जागेच्या भोंवती मेढी पुरून कुंपण करणें; आवार घालणें. [मेढा]

मेंढा—पु. १ एडका; मेष. २ सरळ नसलेलें, वांकलेलें टोंक (काठी, शिंग इ० चें). –वि. वाकलेली; टोंक असलेली (काठी, शिंग). [सं. मेढ्र; प्रा. मेढ; हिं. मेंढा] **०येणें**–मस्ती येणें. **०बैल**–पु. ज्याचीं शिंग मागल्या बाजूस वळलेलीं आहेत असा बैल. **मेंढी**–स्त्री. मेंढरांतील स्त्री–जात. [मेंढा] **०गरव्हार–गव्हार**–स्त्री. प्रसूतीनंतर विटाळशी न होतां गर्भिणी होणारी स्त्री. मिंधीं पहा. **मेंढें**–न. मेंढरूं (नर किंवा मादी). [मेंढा]

मेंढिगमत, मेंढिगमती, मेंढिग्या—मेंढेमत मेंढेजोशी इ० पहा.

मेंढी–ढें—स्त्रीन. मेढ, मेंढा पहा. १ लहान मेंढ. २ आडव्या फळीस, तुळईस धीर देण्यासाठीं खांबासारखा उभा केलेला दुबेळका किंवा विन दुबेळका लहान खुंट. ३ खळ्यांत मधोमध पुरलेला खांब; तिवडा. ' जेवि खळांत वृषांचा घेरा सर्वत्र मेंढिला होतो। ' –मोआश्रम ५.८८. [मेंढ] **मेंढीचें केल–ळ**–न (कों). १ मेंढीच्या वरच्या बाजूस लांकूड ठेवण्यासाठीं राखलेले सुमारें हात भर लांबीचे दोन फांटे; दुबेळकें. २ मेंढीचा शेंडा. **मेंढेकरी**–पु. आधारस्तंभ; आधार; अवष्टंभ. मेढया पहा. **मेंढेकोट**–पु. मेंढा; लकडकोट; लांकडाचें केलेलें दाट, मजबूत कुंपण [मेंढा] **मेंढेजोशी**–पु. १ जमीनींत खुंटे पुरून तिथि इ० कांची गणना करणारा जोशी. २ भविष्यकथन, शकुन पाहणें, शुभाशुभ काल सांगणें, पंचांग करणें इ० धंदे करणाऱ्यांचा एक वर्ग किंवा त्यांतील एक व्यक्ति हे शूद्र असून मेंढेमताचे अनुयायी असतात. मेंढेमत पहा. ३ (उप.) गांवचा पिढीजाद, वतनदार जोशी. ४ महारांचा धर्मगुरु. दाकोता पहा. **मेंढेदाई, मेंढेदाईक**–वि. शेजाऱ्याच्या आवारापासुन आपलें आवार भिन्न करण्यासाठीं आपल्या हद्दीवर कुंपण घालणारा शेत इ० चा मालक. [मेंढा+दाय] **मेंढेबंदी**–स्त्री. मेंढेकोट. **मेंढेमत**–न. उत्तरध्रुवाच्या ताऱ्यावरून बसविलेलें एक ज्योतिषमत. शूद्रांत हें मत प्रचलित आहे. यावरून मेंढेजोशी किंवा डौरीजोशी यांचा वर्ग निघाला. [मेंढ= ध्रुवतारा+मत] **मेंढ्या**–वि. (कुटुंब, सैन्य, मंडळी इ०कांचा) आधारस्तंभ असलेला; मेंढेकरी; पुढारी; मुख्य. २ लबाडीच्या,

ऊंचेगिरीच्या कामांत तरबेज असलेला. ३ मेढेजोशी पहा [मेढ]

मेढ्र—पु. १ मेंढा. २ शिश्न. 'गुदमेढा आंतौतीं।'—ज्ञा ६. १९५. [सं.]

मेण—न. म्यान; कोष; तरवारीचें घर. 'मेण शिकल केली. —ऐपो ४३०. [फा. मियान्] (बाप्र.) **०करणें**—१ म्यानांत तरवार घालणें; कोषित करणें. २ (ल.) झाकणें; वस्त्रादिकांनीं आच्छादित करणें. 'मेण कर आरसा, सख्यांनो, गुलाल भांगीं नका भरूं।'—प्रला १३६. **एका मेणांत दोन सुऱ्या (सामावणें-राहणें)**—१ कोणतेहि दोन मोठे राजे, विद्वान्, प्रतिष्ठित पुरुष, परस्पर विरोधी स्वभाव व बुद्धि असलेलीं माणसें, प्रतिस्पर्धी हीं भांडण न करतां शांततेनें एकत्र राहूं शकत नाहींत अशा अर्थी वापरतात 'तुकयाची प्रतिष्ठा वाढतां तेथें। त्याचे मनीं द्वेष उपजत। म्हणे एका मेणांत दोन सुऱ्या निश्चित। समावती कैशा परी।' २ एक काम दोघांकडे असल्यानें त्या कामाची होणारी दुर्दशा, अव्यवस्था या अर्थी.

मेण—न. १ मधाच्या पोळ्यांतून निघणारा चिकट, घट्ट, चरबीसारखा पदार्थ; मधूच्छिष्ट. २ जनावराच्या शरीरांतून किंवा वनस्पतीपासून काढण्यांत येणारा वरील सारखा पदार्थ; तेलाची बेरी. ३ (कु.) मासे मारण्याकरितां केलेलें विषारी औषध. —वि (ल.) मऊ व चांगला शिजलेला पदार्थ (तांदूळ डाळ, इ०) [फा. मोम्] (वाप्र.) **०काढणें**—(ल.) खूप चोपणें, झोडणें, मारणें. **०घालणें**—(कु.) मासे धरण्यासाठीं त्रिफळे, गेळफळ, निवळकांडें इ० कुटून पाण्यांत घालणें. **०स्वस्त होणें**—(मनुष्य) लठ्ठ व गुलगुलीत होणें. **०होणें**—१ नरमावून सौम्य, शांत होणें. २ शिजून मेणाप्रमाणें होणें (भात, डाळ इ०). **मेणाची चोटली कढयता**—ओढून चंद्रबळ आणणें. **मेण(णा)वणें-विणें**—१ मेण, तेलाच्या तळची बेरी, तेलांत भिजविलेली चिंध्यांची राख इ० नीं सुप, टोपलीं इ० मढविणें; त्यांस लेप देणें २(ल.) गोंडस, लठ्ठ बनणें. सामाशब्द. **०कट**—न. १ (समई, तेलातुपाचें भांडें यांस चिकटून असणारी) तेलाची घाण, मळ, चिकटा, बेरी. —वि. १ घाण तेलानें, तुपानें माखलेला; मेणचट: तेलकट; ओशट (वास). [मेण+कट] **मेणकट(कु)टणें**—अक्रि. मेणकट लागणें; घाण तेलातुपानें माखलें जाणें (भांडें). **०कापड**—न. मेण लावलेलें एक प्रकारचें कापड. **०गट, मेण-कुटला**—वि. अतिशय शिजविल्यानें मऊ व मेणासारखा झालेला (भात). [मेण] **०गट, ०कुटलें**—न. जास्त शिजविल्यानें बिघडलेला भात. **०गटी**—स्त्री. जास्त शिजविलेल्या भाताचा मऊपणा व मेणचटपणा. [मेणगट] **०गुट होणें**—अक्रि. एकजीव होणें; मिसळणें. **०गोळी**—स्त्री. १ मेणाची गोळी. २ (ल.) मऊ, नरम, सौम्य मनुष्य. **०घुणा-ण्या**—वि. सौम्य, शांत, गंभीर मुद्रेचा पण मनाचा कुढा, लबाड मनुष्य; न बोलणारा, आंतल्या गांठीचा इसम. **०चट**—वि. १ मेणगट; कण्या न पडलेलें (तूप). २ मऊ व मेणासारखा शिजलेला (भात). ३ गिच्च व पचपचीत (शिजविण्यांत बिघडलेलें अन्न). ४ मंद; ढील; गयाळ; सुस्त; निर्जीव; उत्साह, धैर्य, पाणी नसणारा. ५ कृपण; कंजूष (मेणचाटणारा). **०चोट-चोट्या**—वि. १ नपुंसक; निर्बल; नामर्द. २ जड; रेंगाळणारा; मेंग्या मारवाडी. ३ भोळसट; भोळानाथ. **०तेल**—न. (गो.) तेलांत शिजविलेलें मेण; (स्त्रिया कुंकु लावतांना हें मेणतेल कपाळास लावून त्यावर पिंजर लावतात). **०वत्ती**—स्त्री. मेणानें मढविलेली वात; मेणाचा दिवा. [फा. मोम, मूम+वत्ती] **०बाजार**—पु. दररोज दुकानासाठीं पालें द्यावयाचीं व तीं रात्रीं काढावयाचीं अशीं दुकानें असलेला बाजार; जुना बाजार. हा मुख्य रस्त्यांत नेहमीच्या दुकानाशीं समांतर ओळींत भरवितात. आयते तयार केलेले कपडे व जुनेपाने जिन्नस यांत विक्रीस मांडतात. **०बाजारी**—पु. १ मेणबाजारांतील दुकानदार, माल विकणारा. २ (ल.) पत नसलेला, बेअब्रूचा माणूस. **०बावली**—स्त्री. १ (ल.) लहान, सुबक, नेटकी व चपल स्त्री. २ गरीब, दुसऱ्याच्या तंत्रानें चालणारी नवरी, बायको. **०वला**—वि. (प्र.) मेणोला; म्रेणा पहा. **०वात**—स्त्री. मेणबत्ती पहा. **मेणा-ण्या**—वि. मेण, तेलाचा-तुपाचा गाळ, जाळलेल्या चिंध्या, शेण्यांची राख इ०कांच्या मिश्रणानें लेपलेला (हारा, टोपलें, सुप, पाटी, इ०). [मेण] **मेणाचा**—वि. १ मऊ; अशक्त; कमकुवत. २ नरम; निर्जीव. ३ अयोग्य; अक्षम. ४ धिक्कार, तिरस्कार दाखविण्याकरितां नेहमीं योजतात. उदा० तूं कोण मेणाचा मला सांगायला? **मेणाळ**—स्त्री. (जरतारी धंदा) मेण असलेली, मेणयुक्त तार. **मेणी**—स्त्री. १ तेलकट काजळ; मस; घाण. २ केसांच्या वळलेल्या जटा. ३ (ठाणें) काकडीची एक जात. —कृषि४८२. **मेणी मोडशी**—स्त्री. जुनाट, फार दिवसांची मोडशी. [मेण्या+मोडशी] **मेणें**—न. १ (कों.) जिच्या चिकानें मासे आंधळे होऊन सहज सांपडतात अशी नदी इ०च्या प्रवाहांत टाकतात ती एक वनस्पति; कांडयाहुरा. २ माशांना मारण्याकरितां, गुंगी आणण्याकरितां नदींत टाकलेला चिकचिकीत द्रव्याचा पदार्थ. **मेणे डोळे**—पुअव. डोळे आले असतां त्यांतून अतिशय पू वाहणारे, फार बरबरणारे डोळे; बरबरीत, पुवाचे डोळे; शेणे डोळे; याच्या उलट कांटे डोळे. **मेणें वावर**—न. (रब्बीच्या पेरणीकरितां) नांगरून, खत घालून, राखून ठेवलेलें वावर **मेणोला, मेणोल**—वि. मेणा पहा. **मेण्या**—वि. १ मऊ; दुबळा; नामर्द; गरीब. २ मंद; धारिष्ट नसलेला; निर्जीव. [मेण] **मेण्यामारवाडी**—पु. दिसण्यांत भोळा पण कावेबाज इसम; सौम्य मुद्रेचा पण शठ मनुष्य. **मेण्या साप**—पु. १ सापाची एक जात. २ (ल.) गुप्तपणें आकस धरून नाश करणारा मनुष्य.

मेणा—पु. झाकलेली पालखी; डोलीसारखें परंतु चारहि बाजूनीं बंद, पेटीवजा, खाद्यावर वाहून न्यावयाजोगें वाहन; पालखी पहा. [फा. मियाना] **मेणेकरी**–पु. मेणा वाहणारा इसम; भोई.

मेत(थ)कूट—न. १ तांदूळ, निरनिराळ्या डाळी, मोहऱ्या, मेथ्या इ० एकत्र दळून केलेलें पीठ व त्यांत दहीं घालून तयार केलेलें एक रुचकर तोंडीलावणें. २ (ल.) मेळ; एकी; दृढ मैत्री. 'शिंदे, बाळोबा व भाऊ यांचें मेतकूट झालें होतें.'–अस्तंभा ९६. [सं. मिथः कूटः मित्र–प्रा. मित + कूटः मेथी+कूट ?] (वाप्र.) **०जमणें–मिळणें**–स्नेह जुळणें; मन मिळणें; सख्य होणें. 'दिल्लीपति अकबराशीं रजपुतशीं चाकरी करून त्यांच्या मुलीशीं लग्नें लाविलीं इतकें मेतकूट जमविलें.'–निचं.

मेथी—स्त्री. (कों.) मेंदी.

मेथी—स्त्री. १ एक पालेभाजी. हिच्या जून झाडावर शेंगा येतात, त्यांत मेथ्या असतात. २ या भाजीचें बीज; एक उपधान्य. [सं. मेथिका; हिं. बं. गुज. मेथी] **मेथा**–पु. मेथीची एक जात. **मेथकणी**–न. मेथीच्या काढ्या घालून केलेली आमटी; ही भाकरीशीं खातात. [मेथी+पाणी] **मेथोडा**–पु. (वाळलेली इ०करितां केलेला) मेथ्यांचा लाडू. [मेथी+वडा]

मेद—स्त्री. आल्यासारखें एक मूळ. हें आठ मुख्य औषधी-द्रव्यांपैकीं एक आहे. [सं. मेदा]

मेद—पु. १ चरबी; शरीरांतील सप्त धातूंपैकीं एक. 'मेदाचे पर्वत फोडी।'–ज्ञा ६.२१८. २ स्थौल्य; पुष्टता; लठ्ठपणा. [सं.] **०वात**–पु. मेदोवात पहा. **मेदगी**–स्त्री. स्थूलता; गुबगुबीतपणा. (क्रि० येणें; चढणें; धरणें). [मेदु] **मेदस्वी**–वि. लठ्ठ; पुष्ट; स्थूल; फोफसा. [सं.] **मेदोग्रंथि**–पु. शरीरावर होणारी चरबीची गाठ; वालुक. [सं मेदस्+ग्रंथि] **मेदोधरा**–स्त्री. चरबी राहण्याचें उदरांतील स्थान. [मेदस्+धरा] **मेदोरोग, मेदोव्याधि**–पु. स्थौल्य; पुष्टता; मेदोवृद्धीमुळें जडलेला व्याधि [सं.] **मेदोवह**–न मेद वाहणारी शीर: मेदोवाहिनी. [सं.] **मेदोवात**–पु एक रोग; मेदांतील किंवा स्नायुतंतूत पसरणाऱ्या स्निग्ध विसर्जनांतील वात. [सं.] **मेदोवृद्धि**–स्त्री. अंगांत चरबीची होणारी वाढ; फोपसेपणा; लठ्ठपणा. [सं.]

मे(में)दगी—स्त्री १ नवा मिळावा केलेल्या भिंती सारविण्याकरितां बकऱ्या–मेढ्यांच्या लेंड्यांमध्यें माती–मसाला घालून, पाण्यानें भिजवून व दगडावर चांगलें मळून तयार केलेलें मिश्रण. २ अशा मिश्रणानें भित इ० सारविण्याची क्रिया. (क्रि० करणें).

मेंदगी—स्त्री. बकऱ्याच्या शेणानें भित इ० सारविण्याची क्रिया.

मेंदगी—स्त्री. थकवा; भागवटा; शीण. (क्रि० येणें). [फा. मांदगी]

मेंदट—वि. पळपळीत; मुळमुळीत; कण्या मोडलेलें (तूप, मध). मेणचट पहा.

मेद(दा)र—पु. (बे. ना.) बुरूड; बुरूड जात. [का.]

मेदिनी—स्त्री. भूमि; पृथ्वी. [सं.] **०वसन**–न. समुद्र; सागर.

मेंदी—स्त्री, एक झाड. स्त्रिया याच्या पाल्यांत कात, चुना घालून तो वाटून त्यानें हातापायांचीं बोटें व नखें रंगवितात. या झाडावरील फळांच्या घोसास इसबंद म्हणतात. मुलांची दृष्ट काढण्यास हा घेतात. मेंदीच्या फुलांचें अत्तर काढतात त्यास हीना म्हणतात. [सं. मेंधी] **मेंदा**–पु मेंदीतील नर जाति.

मेदु—पु. गोष्ट ? –शर.

मेदुर—वि. १ घट्ट व चिकट. २ गच्च; जड. 'भेसुर बेसुर! मेदुर अंबर!।'–टिक १७५. [सं. मिद्–मेद]

मेंदू—पु. १ (अस्थि, मांस यांतील) सारभूत अंश; मज्जा; अंग ठेचलें असतां त्यांतून मांसासारखा निघणारा अंश. २ मगज; ज्ञानतंतुजाल. ३ (ल.) बुद्धि; अक्कल. ४ (ल.) नासल्यामुळें मऊ व स्रवणाऱ्या स्थितीप्रत पोचलेलें फळ, मांस इ०; बागुरडा, विंचू, खेकडा इ० प्राणी चिरडल्यानें त्याचा होणारा लगदा. ५ रक्त व पू यांचें मिश्रण. (फोड, गळू, इ० तून स्रवणारें). [सं. मेद] **०निघणें–वासणें–बाहेर पडणें**–(श्रमामुळें) टेकीस येणें.

मेध—पु १ यज्ञ. (समासांत) अश्वमेध; नरमेध इ० २ आहुति; बळी; यज्ञिय पशु. [सं. मेध्=मारणें] **मेध्य**–वि. १ बळी देण्यास योजलेला, योग्य. २ (हवनीय) पवित्र; शुद्ध. 'तयाचि परी खाद्याखाद्य। न म्हणे नित्यानित्य। तोंडा आवडे तें मेध्य।'–ज्ञा १८.५६०. [स.]

मेंधला—पु. (वास्तुशास्त्र) दरवाजास मागें–पुढें दोन चौकटी असल्यास त्या एकमेकींस जोडणाऱ्या वरील बाजूच्या दोन भुजा प्रत्येकीं; मेंढरी; घोडा. खालच्या भुजांना छिली म्हणतात. छिली पहा.

मेधा—स्त्री. १ बुद्धीची तीक्ष्णता: कुशाग्र मति; तीव्र बुद्धि; धारणायुक्त बुद्धि. 'पैं स्वहिता अनुजायिनी। मेधा ते गामी इये जनीं।'–ज्ञा १०.२७९. २ (श्रद्धा या अर्थी चुकीनें उपयोग). आवड; चाड; प्रीति. 'तयां बहुत करूनि मेधा। स्वर्गी आथी।'–ज्ञा १७.७६. 'त्या मुलावर त्याची मेधा आहे. तितकी याजवर नाहीं.' [सं.] **मेधावी–विनी**–वि. बुद्धिमान्: कुशाग्र मतीचा–ची–चें. 'तो भक्तु मेधावी तपिया।'–ज्ञा१८ १५०५. [सं. मेधा]

मेधी—स्त्री. एक वनस्पति. [सं.]

मेंधी अवळी—स्त्री. एक वनस्पति.

मेना—पु. मेणा पहा. [फा. म्याना]

मेपटें—न. (क.) (कार किंवा कटक उडविण्याची वेलुची) फुंकणी; उडवणी.

मे बायदकी-के—उद्गा. झालें पाहिजे कीं. 'मे बायद के गोविन्दगीर मशार्निल्हेसी...कालवा पाणी कैसे अलाहिदा चालत होते त्याप्रमाणें चालविजे.' –रा १५.१४६. [फा. मी+बायद कि–के]

मेम-साहेब—स्त्री. मडम; बाईसाहेब. [इं० मॅडम]

मेमटमाऱ्या, मेमणचोटया—वि. (निंदार्थी अश्लील) मेणचोटया; मेण्यामारवाडी पहा.

मेमटा-टया, मेम(मु)टमाऱ्या, मेंवटा-टया—वि. गंभीर पण आकसखोर; दिसण्यांत साळसूद पण आंतून दुष्ट; धूर्त व कावेबाज. **म्हo** मेमटा घेतो चिमटा भडभडयाचा बोभाटा.

मेमण—पु. मुसलमान कोष्टी, विणकर जात. [मोमीन.]

मेम(मा)णें—अक्रि. मेंमें करीत ओरडणें. 'दोनी एडके चोर नेती। मध्यरातीं मेमात।' –एभा २६.६८. [ध्व.]

मेमुलगाढा, मेमलतोंडा-डया—वि. गयाळ; मेंगा; गायतोंडया; मूर्ख (मनुष्य). [मेमे+गाडा]

मेमे—स्त्री. (गो. बालभाषा) मासळी.

मेया-यां—सना. (महानु.) म्यां. 'तंवं मेया भणितलें।' –शिशु ११७. [मी]

मेर—स्त्री. १ (शेतवाडी, टेकडी इ० ची) कड, कांठ. २ (कों. गो.) शेताचा बांध; हद्द. ३ (हेट.) जमीन उंच-सखल असल्यामुळें शेतीचें खत व पाणी राहण्याकरितां लहान तुकडे पाडून मध्यें टाकलेला मातीचा वरंबा; बांधोळी. ३ (व.) पेरा; लागण. 'उसाची मेर यंदां लावली.' ४ समय; वेळ. 'तेंचि मरणाचिये मेरे।' –ज्ञा ८.७४. [देप्रा. मेरा=मर्यादा; का. मेर=टेकडी] **म्हo** धनी नाहीं मेरें आणि शेत भरलें बरें. **०घेणें, मेरी करणें**–(ठाणें) शेताच्या बेणणीनंतर भात निसवायच्या अगोदर बांधावरील गवत कापून काढून, टाकणें. –बदलापूर २८८. **०बांधावरचें, नजीकचें** गवत बेणणें व जागा स्वच्छ करणें. **०धार**–स्त्री. (कु.) (अव. मेरोधारों). शेताचे कुणगे (वाफे) करण्यासाठीं मिठागराप्रमाणें रचलेली चिखलाची लहान भित; मेर. **मेरुली-ल्या**–स्त्री. मेरेवर, शेताच्या कडेला पेरतात तें पावटयासारखें एक द्विदल धान्य. (गो.) मेरली. [मेर]

मेरशिंगी—स्त्री. एक लहान झाड.

मेरु—पु. १ हिमालयाच्या उत्तरेकडील तार्तरीचा डोंगरी प्रदेश म्हणून समजलेला, सप्तखंडांच्या मध्यभागीं असलेला, श्रेष्ठ मानलेला असा पर्वत; स्वर्ग, मृत्यु, पाताळ यांस आधारभूत असा सोन्याचा पर्वत. 'तो मध्यस्थु गा गिरिवरां। मेरु जैसा।' –ज्ञा ५.५०२. २ (ल.) जपाच्या माळेंतील मध्यवर्ती असलेला मोठा मणी. यांत माळेचीं दोन्ही शेवटें ओवितात. 'स्मरणीलागीं मेरू जैसा.' –अमृत १६. ३ जिच्यावर चिलीम बसविलेली असते ती गुडगुडीची नळी. ४ सांबर, हरिण यांची एक जात. [सं.] सामाशब्द–**०दंड**–पु पाठीचा कणा. 'तेणें मेरुदंड अवक्र शुद्ध।' –एभा १४.४१० [सं.] **०स्थान**–न. माळेच्या मधील मोठा मणि.

मेल—स्त्री. १ डाक; टपाल. २ डाक, टपाल नेणारी आगगाडी; डाकगाडी. 'नोकरांना मेल गाडीनें न पाठवितां .....' –(बडोदें) स्वारीनियम पृ. ५२. [इं. मेल]

मेल—पु. (संगीत) थाट शब्द पहा [सं.]

मेलं—उद्गा. (बायकी) नावड, तिरस्कार इ० चा वाचक शब्द. मेला पहा. 'मेलं, असं हो काय करतां चिमाबाई?' –मोर १४.

मेलकार—पु. शस्त्रविद्येचा शिक्षक.–शर. [फा.]

मेलन—न. १ मीलन; एकीकरण. '...लोकसत्ताक पद्धति व सार्वभौम सरकारचे अधिकार या दोहींचें योग्य मेलन करिता आलें पाहिजे' –पार्ले २७२. २ मिश्रण. [सं.]

मेला—स्त्रीपु. १ मेळा; यात्रा. मेळा पहा. [सं. मिल्; हिं. मिला] **मेलि(ली-लि)कार**–पु (महानु.) १ वसति; छावणी. 'पातले पवनवेगें जेथ मेलिकारू केला श्रीकृष्णराये।' –धवळे पू २६. २ समुदाय; जमाव. 'मेलीकारें नाचती सुभद्रेचे गार्नी।' –धवळे उ. २४. **मेलेकरी**–पु. मेळ्यांतील मनुष्य.

मेला—वि. १ मृत; मेलेला (मनुष्य); स्त्रिया आपली खोडी काढणाऱ्या, आपणांस दुखविणाऱ्या पुरुषासंबंधीं तिरस्कारार्थी हा शब्द नेहमीं वापरतात. २ मुरदाड; निकस: बेचव; शिळा; निर्जीव, नीरस इ० अर्थी अनेक नामांशीं योजतात. जसें-मेला चुना=मळणींत वापरलेला, बांधकामांत योजलेला, विरी गेलेला चुना. मेली भाकर=चाकरी किंवा मेहनत न करितां मिळालेलें अन्न. मेलें अन्न पहा. मेली माती=बांधकामांत एकदां उपयोगिलेली, रुक्ष, निःस्नेह, चिकटपणा न धरणारी माती; कुजलेली माती; क्षारपुटाची माती. मेलें अन्न=श्रम न करितां अगांतुकी करून किंवा शास्त्रविहित नसतां भिक्षा मागण्याच्या निंद्य मार्गानें मिळविलेलें अन्न. (क्रि० खाणें). मेलें कातडें=निर्जीव कातडें. मेलें काम=एखादें निरुत्साही काम; मनाला उत्तेजन किंवा व्यायाम न देणारें, नुसत्या मजुरीचें काम. मेलें तूप=योग्य तो खर्च करून किंवा उपयोग केल्यानंतर अवशेष राहिलेलें तूप. मेलें तेल=खर्च न होतां राहणारें तेल (दिव्याचें दिपुष्टेल); तळण्यांतील राहिलेलें शिळें तेल. मेलें नख=मृत, रुक्ष, अळंब्यासारखें नख. मेलें पाणी=कढविल्यानें किंवा तापविल्यानें त्यांतील वायु निघून गेला आहे असें पाणी; बेचव, निर्जीव पाणी. एकदां उपयोग केलेलें पाणी. मेलें मांस=मृत मांस, जखमेंतील अळंब्यासारखी वृद्धि. मेलें रक्त=१ मृत,

नाडिबहिर्भूत रक्त. २ पडलेलें रक्त, गोठलेलें रक्त. ३ अर्धवट चलन पावणारें, मृत रक्त (जसें, म्हताऱ्या माणसाचें). मेलें राज्य=नष्ट राज्य, सत्ता. मेलें लिहिणें=मनाला आल्हाद न देणारें लिहिण्याचें काम; नुसतें नकल करण्याचें काम. मेलें हत्या(तें)र=निकामी धार नसलेलें, गंजलेलें, वापरांत नमलेलें हत्यार; कितीहि चांगली व्यवस्था असली तरी गोळी उडण्यास चुकणारी बंदूक, तोडयाची बंदूक, तोफ इ० याच्या उलट जिवंत हत्यार; चालू हत्यार. [सं. मृत; प्रा. मइल्ल] (वाप्र.) **मेला मुर्दा उकरणें**–उखाळथा-पाखाळया काढणें; विसरलेलें भांडण, वैर उकरून काढणें. **मेल्याचा पाड चढणें-जाणें**–प्रेताच्या किंमतीचें होणें; सर्व किंमत गमावणें **मेल्या आईचें दूध प्यालेला असणें**–निर्बळ, निर्जीव, नेभळा असणें. **मेल्याच्या मागें कोणी मरत नाहीं**–दुसरा मेला म्हणून कोणी स्वतां मरत नाहीं; तोटा, नुकसान झालें असतां कोणी आपला जीव देत नाहीं. **मेल्याचें तळपट हो-** (बायकी शिवी) दुष्टांचा सर्व नाश होवो. ' कृष्णा हि म्हणे मेल्या अक्षकरांचें समूळ तळपट हो । ' –मोविराट ६.७८. (वाप्र.) **मेल्या तुझी रांड हो**–तुझी बायको रांड(विधवा)होवो. म्हणजे तूं लवकर मृत्यु पावोस. ' मेल्या ! रांड तुझी हो ऐसें शापी हळूच कु त्यातें । ' –मोवन १२.५८. **मेल्यापेक्षां मेला होणें**–अतिशय खजिल होणें. **मेल्या सारीर वडे भाजून खाणारो**–(गो.) चितेवर भाकरी भाजून खाणारा, उलटया काळजाचा मनुष्य सामाशब्द-**मेलतोंडया**–वि. मेमलतोंडया; गायतोंडया; लाजाळू मुखदुर्बळ. [मेला+तोंड] **मेलेला**–वि. १ मृत; निर्जीव. २ बुडालेलें; डुबलेलें (कर्जे). याच्या उलट जिवंत किंवा जिता. [मरणें] **मेलेली सोंगटी बसविणें-सोंगटी लागणें**–(तिफाशी सोंगटयांचा खेळ) डावांत प्रतिपक्ष्यानें मारलेली सोंगटी पुनः डावांत खेळण्यास घेणें. अशी सोंगटी लागण्यास किंवा बसविण्यास नऊव्या पुढील दान पडावें लागतें. मेलेली सोंगटी बसेपर्यंत दुसरें दान देतां येत नाहीं. **मेलेलें अन्न**–न. मेलें अन्न. ' कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, मेलेलें अन्न खाण्याची हौस हे प्रकार चोहोंकडे माजलेले आहेत. ' –के.

मेलिकार—पु. जमाव. मैल्यकार पहा. [सं. मिल्]

मेलो—पु. (गु.) शिरसावरील एक रोग. –कृषि ३५५. [गु. मेलु]

मेल्ह(ल)वन—न. (महानु) १ मालवणें. ' तरि सभावीं होईल मेल्हवनें । या लेवरासी । ' –भाए ८०. २ नाहींसें होणें; अस्त. ' जाणतां दिधल मेलवणें । या संसारासि । ' –भाए २४८. [सं. म्लै] **मेल्हवनी**–स्त्री. (महानु.) रात्र. ' तरि सभावी फिटैल मेल्हवनी । अज्ञानतमाची । ' –भाए १६६. [सं. म्लै; प्रा. मिलाणि]

मेल्हरें, मेळेरें—न. संयोग; भेट. ' तया दोहों परस्परें होय ना जेव मेळेरें । ' –अमृ २.५२. [सं. मिल्; म. मेळ]

मेवणा-णी, मेवुणचार, मेवूण—(प्र.) मेहुणा-णी इ० पहा.

मेवा—पु. १ द्राक्ष, अंजीर इ० मिष्ट फळें; फळफळावळ. ' जंगी नवे नित येती मेवे बागांत । ' –प्रला २२९. २ मिठाई, मुरांबा इ० मिष्ट पदार्थ. ' मज मिळाला तो दर्शनाख्य मेवा । ' –र ३६. [फा. मेवा] **म्ह**० बाजारचा मेवा बापलेकांनीं खावा. सामाशब्द- **मेवा(मेवे)फरोश**–वि. फळफळावळ विकणारा. ' एक्या महिन्याचे मुदतीनें मेवा न पोंहचे; मार्गोतच सडून जाईल म्हणून विलायतचे मेवे फरोशांहीं सांगितलें ' –ऐटि २.९५. [फा. मेवा+फरोश्] **०मिठाई**–स्त्री. फळफळावळ, पेढेबर्फी इ० मिठाई **मेवेजात**–पु. मेवा: फळफळावळ. ' त्यांचे समागमें मेवेजातच्या बंग्या वगैरे सरंजामही खाना करावयास तयार झाला आहे. ' –रा ५.४४. [फा. मेवजात्. मेवाचें अव.]

मेवाडी—वि. मेवाड देशांतील (मनुष्य, वस्तु इ०).

मेवाती—वि. १ मेवात प्रांतांत राहणारा (एका जातीचा मनुष्य). हे लुटारू असतात. २ लुटारू; बंडखोर. ३ पुरभय्या. [हि. मेवाती]

मेव्हणचार, मेव्हणा-णी, मेव्हूण—(प्र.) मेहुणचार, मेहुणा इ० पहा.

मेश(शी)पात्र—न. भितरा, मुखदुर्बल मनुष्य; मेमलतोंडया, गायतोंडया, भलु मनुष्य; मूर्ख, भोळानाथ, दुधखुळा. [मेष+पात्र] **मेशा-शी**- वि. गायतोंडया; मेमलतोंडया; भलु, दुर्बल व भित्रा; मेषपात्र. [मेष] **मेशी**–वि. (गो. कु.) आळशी. 'उद्योगांत सोडाच पण जेवणांत सुद्धां तो मेशीच.'

मेष—पु. १ मेंढा. २ बारा राशींतील पहिली रास. अश्विनी, भरणी व कृत्तिका नक्षत्राचा पहिला चरण यांचा या राशींत समावेश होतो. [सं. मिष्=शिपडणें; टक्कर देणें, स्पर्धा करणें; झें. मएष; फा. मेष] सामाशब्द- **०पात्र**–वि. मेशपात्र पहा. ' अंगांत कर्तृत्वशक्ति पाहिजे. नुसतीं मेषपात्र माणसें काय कामाचीं ? '[सं.] **०संपात**–पु. मेष राशींत सूर्याचा प्रवेश; ता. २१ अगर २२ मार्च या दिवशीं सूर्य विषुववृत्तावर येऊन दिवस व रात्र यांचें मान सारखें होतें, तो काळ [सं.] **मेषी**–स्त्री. मेंढी. [सं.] **मेषी-शी-सी**–वि. मेंढराच्या कातडयांचा केलेला.

मेषोन्मेष—पु. मिटणें व उघडणें; उघडझांप (डोळयांची, फुलाची). [सं. मेष+उन्मेष]

मेस—पु. मेच; एक जातीचा बांबू. याच्या पेऱ्याजवळ वांक असतो.

मेसको—स्त्री. जलदेवता; क्षुद्र देवता. 'जळीच्या मेसको मायेराणी।' –दा ३.२.२७. [सं. महिषी]

मेसाई, मेसादेवी, मेसाबाई—स्त्री. एक क्षुद्र देवता. 'ब्राह्मण म्हणविती मद्यमांस सेविती। मेसाई पूजिती वश्यकर्मी।' –ब ५३०. 'नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई।' –तुगा ७९१. [सं. महिषी]

मेसी—स्त्री. (चांभारी धंदा) मेंढराचें किंवा हरणाचें कातडें. [मेष]

मेसीरी—स्त्री. राख; मस; मशेरी; मशीरी (चूर्ण, खल). 'यैसे वाळूळउनु मेसीरी कीजे' –वैद्यक बाड ४६. [सं. मृश्–मृष्टि]

मेस्त—पु. (गो.) सुतार. [पोर्तु. मेस्तर]

मेस्तक—न. १ अंकगणितांचें पुस्तक; उदाहरणें सोडविण्याचीं कोष्टकें, हिशेबाचीं कोष्टकें लिहिलेली वही; नियमांचें व बेरजांचें पुस्तक. २ मायने बैगेरे लिहिण्यासंबंधीं व नमुन्यांचें पुस्तक; लेखनपद्धति. ३ कामाच्या नियमांचें व हुकुमांचें पुस्तक; व्यवहारचोपडी.

मेस्तर—न. गिलावा घोटण्याचें गबंडयाचें एक हत्यार.

मेस्तरी, मेस्त्री, मेस्त—पु. १ मुख्य लोहार, सुतार, गवंडी किंवा शिकलगार; इतर कामगारांवर देखरेख करणारा कामगार. २ कामकऱ्यांवर देखरेख करणारा मनुष्य. ३ बेकरीमधील पोर्तुगीज जातीचा रोटीवाला. ४ (आदरार्थी) पोर्तुगीज जातीचा चाकर; विशेषतः स्वयंपाक्या. [पोर्तु. मेस्तर; इं. मास्टर]

मेह—पु. १ मूत्रासंबंधीं रोग. हा एकवीस प्रकारचा आहे. प्रमेह पहा. 'मेह, पिन्नस विख्यात।' –गीता १३.२४९६. २ मूत्रोत्सर्ग; मुतणें. ३ मेंढा. [सं. मिह्=शिंपडणें]

मेहतर, मेहतरकी, मेहतराणी—प्र. म्हेतर इ० पहा.

मेहतर, म्हेतर—पु. १ श्रेष्ठ; नाशीक प्रांतांत भिल्लांच्या जातीच्या पाटलाला, पुण्याकडील सुताराला मेहतर म्हणतात. जातीचा मुख्य; म्होरक्या; पुढारी. –गांगा २९. २ भंगी. ३ घडा; रांजण. [फा. मिहतर] सामाशब्द– **मेहेत्रेपण-पणा**–नपु. जातीचा पुढारीपणा; एक हक्क; हक्काची बाब. 'नेवासें परगण्यांतील न्हाव्यांमधील मेहेतरपणाचा कज्जा न्हाव्यांनीं पाटीलकुळकर्णांनिशीं हुजुरास येऊन तोडून घेतला.' –पेशवेकालीन महाराष्ट्र पृ. ४८३.

मेहंदळ—वि. पुष्कळ; विपुल; मायंदळ पहा.

मेहंदी—स्त्री. एक झाड; मेंदी पहा. [सं. मेंधी]

मेहन—न. १ मूत्रोत्सर्ग करणें. २ शिश्न. 'घोडयाचें अति लंब मेहन जसें लोंबे दहा अंगुलें।' –निमा ३.७५. 'घोडा पांढरा किंवा श्यामवर्ण असून मेहन आरक्तवर्ण असल्यास तो घोडा उत्तम होय' –अश्वप १.२६. [सं.]

मेहनत-ती—स्त्री. १ कष्ट; श्रम; आयास. 'अन्तोजीनें मेहनती केली.' –ब्रच १०५. २ मजुरी; कामधंदा. ३ मजुरीचें मोल, वेतन. [अर.मिहनत्] सामाशब्द–**०मजुरी**–स्त्री. भाडयानें किंवा पैसा घेऊन शारीरिक श्रम करणें. **०मशागत**–स्त्री. १ (व्यापक.) कष्ट; श्रम; निगा; प्रयत्न. २ शेत वगैरेची नांगरणी, बेणणी, खुरपणी इ० कामें. [अर. मिहनत+मशक्कत] **मेहनताना**–पु श्रमाचा मोबदला; मजुरी; पगार. [अर.] **मेहनती-त्या, मेहनती खपती**–वि. मेहनत करण्याचा स्वभाव असलेला; श्रमी; उद्योगी; कष्टाळू; खटपटी.

मेहम(मा)न—पु. १ अतिथि; सत्कार करण्याकरितां बोलावलेला किंवा अवचित आलेला मनुष्य. २ ज्याची वंशपरंपरागत जमीन, घरदार, हक्कसंबंध इ०कांहीं नाहीं असा उपरी गांवकरी. ३(कु.) केलेल्या चाकरीकरितां किंवा कृपापात्र म्हणून सरकारनें पोसलेला अब्रूदार मनुष्य; सरकारी पेनशनर. [फा. मेहमान] **मेहम(मा)नकी**–स्त्री. मेहमानचा गुण किंवा त्याची स्थिति. **मेहमानगी**–स्त्री. मेहमानी; आदरसत्कार; मैत्री; सलूख. 'अलीयेदल शहानें चारी पादशाहासी मेहमानगी केली.' –इमं १३. **मेहमानी**–स्त्री. आतिथ्य; पाहुणचार; मेजवानी; नजराणा. 'खंड फारीक झाल्यावर थोडीबहुत त्यांची मेहमानी करून बहुमानें त्यास त्यांचे स्थळास पाठवून द्यावें.' –मराआ २२. [फा. मिहमानी]

मेह(हे)र—स्त्री. १ कृपा; दया; दयादृष्टि 'इलाहीचे हुकुमें व बडेखान यांचे मेहेर आमचे जागा होती.' –ब्रप ३०८. २ कींव. –चित्रगुप्त ३४. –पु. भर्तृदत्त विधवावेतन; घटस्फोट करतांना पतीनें पत्नीसें द्यावयाची करार केलेली रकम. [फा.मिहर्] सामाशब्द– **०नजर**–स्त्री. कृपादृष्टि; दयादृष्टि. **०बा(वा)न**–वि. १ कृपाळु; उपकारी; अनुग्रही; बहाल. २ अर्जात अधिकाऱ्याच्या नांवामागें जोडावयाचें उपपद. [फा. मेहर्बान्] **०बा(वा)नी-बा(वा)नगी**–स्त्री. कृपा; दया; अनुग्रह; उपकार; बहाली [फा. मेहेरबानगी]

मेहर—पु. सूर्य. –शर. [सं. मित्र; अवेस्ता मिथ्र; फा. मिहिर]

मेहरणें—अक्रि. बधिर होणें. **मेहरी**–स्त्री. बधिरता; जडपणा; (अंगांतील, अवयवांतील) 'माझ्या पायांस मेहरी आली.'

मेहरा(र)ब-प—स्त्री. १(भिंतींत केलेला) लहानसा कोनाडा; कोनाडा, भित, मखर इ० कांस शोभेकरितां केलेली कमान. २ मशीदींत पश्चिम दिशेस असणारी पवित्र देवळी; हिच्या शेजारीं मिंबर (व्यासपीठ) असतें. [अर. मिहराब]

मेहलनी—स्त्री. (महानु). अंधारी रात्र. 'कटाक्षाची मेहलनी पडे अंतःकरणीं।' –भाए ३४४. मेल्हवनी पहा.

मेहु-हू-हो—पु. १ पर्जन्य. २ मेघ. 'उभय विर सरोषें लागला बाणमेहो।'–मुगमायण, युद्ध ३७२. [सं. मेघ] **मेहुडा-ला-ला**–पु. (काव्य) मेघ. 'अकाळीं दिसती मेहुडे। चंडवातें क्षणार्धें मोडे।'

मेहु(हु)ण—न. भोजनादिकांस बोलविलेलें, लग्न झालेलें जोडपें; दांपत्य; नवराबायको. [सं. मिथुन; प्रा. मिहुण] **मेहुणा**–पु. १ बायकोचा भाऊ. २ बहिणीचा नवरा. ३ (व.) आतेचा किंवा मामाचा मुलगा. [देप्रा. मेहुणिआ=साला, मामाचा मुलगा] **मेहुणचार**–पु. (पाहुणा शब्दापासून पाहुणचाराप्रमाणें मेहुणा शब्दापासून साधित) १ मेहुण्याचें आदरातिथ्य. २ (ना.) थट्टेचें नातें. [मेहुणा] **मेहुणिआ**–स्त्री. मेहुणी. [वे.] **मेहुणी**–स्त्री. १ मामाची मुलगी. २ आतेची मुलगी. ३ (कों.) बायकोची बहीण. **म्ह०** राजाची राणी पाटलाची मेहुणी.

मेहेतर, मेहेतरकी, मेहेतराणी—प्र. म्हेतर इ० पहा.

मेहेता—पु. गुजराथी लिहिणारा कारकून. [सं. महत्; गुज.] **मेहेताजी**–पु शिक्षक. [गुज.]

मेंहदी, मेहेनत, मेहेराब, मेहेमान, मेहेर, मेहेरणें, मेहेरी, मेहेराप—मेहंदी इ० पहा.

मेहेरबान, मेहेर्बान, मेहरबान—वि. सुप्रसन्न; कृपावन्त; दयाळु, मेहरबान पहा. [फा. मिहरबान्] **मेहेर(र)बा(बा)नगी**–स्त्री. दया; लोभ, कृपा. मेहरबानगी पहा. 'आपणहीं हुजुरीहून मेहेरबानगीचा खिलत पाठवावा'–दिमरा १.९९. [फा.] **मेहे(ह)रबानी**–स्त्री कृपा. 'मेहेरबानी' –राज १५.१४. [फा. मिहरबानी]

मेळ—पु. १ मिलाफ; जम; संगति; संयोग. 'तैसें हेतुकारणमेळें।'–ज्ञा १८.३७०. २ पटणें. 'भलतेणेंसि मेळु।'–ज्ञा १३.३५८. ३ जमणें; मिळणें; समतोल करणें (हिशेब इ०). ४ समूह; समुदाय; मेळा. 'तेथेंहि तापसांचा मेळ।'–मुआदि २७.४५. 'कामिक मेळ भोंवे भोंवतां।'–मुविराट ३.६. ५ ताफा (गाणारांचा, वाजंत्र्यांचा). ६ संगत; योग; संबंध. 'घडली जयाचेनि मेळे।'–अमृ २.२३. 'घडे तैसाचि पात्रमेळु।'–ज्ञा १७.२८४. ७ घसट. ८ गाण्यांतील एक चाल. 'पहा स्वार होउनियां दिल्ली शहरची बारी। तुम्ही झेल तबेले गडी देखणे भारी। मेळ।'–प्रला १९१. ९ मैथुनासक्त सापाचें जोडपें. १० कळक; वेळू इ०कास जें बीज येतें तें. [सं मिल्=भेटणें]

मेळप—क्रि० (गो.) व्यभिचारानें अंगीकार करणें.

मेळवण—न. १ समूह. 'जें महामोहाचें मेळवण।'–एभा १४.३६७. २ (ना.) जनावरांस खाऊं घालावयाचें मिश्रण. (व.) गाई-म्हशीस चारावयाचा दाणा; आंबवण. मिळवण पहा. ३ (सामा.) मिश्रण. [सं. मीलन] **मेळवणी**–स्त्री. १ मिश्रण; मिळवणी. २ अतिशयोक्ति. [गुज.] **मेळविणें**–सक्रि. १ एकत्र जुळणी करणें. 'मेळविला भोयांनीं। पालखींत घालून चालविला।'–ऐपो २०. २ मिळवणें; मिसळणें. 'युक्ती मेळवितां द्रव्यांतर।'–एभा २.५८०. **मेळा**–पु. १ मनुष्यांचा समुदाय; जमाव; जमात (विशेषतः धार्मिक किंवा व्यापारी उद्देशानें विशिष्ट काळीं जमलेला); जत्रा इ०. (क्रि० भरणें; जमणें). २ संगम (नदीचा) 'पाहुं पंचगंगेचा मेळा। स्नान करूं गंगेचें।'–गंगेची भूपाळी. ३ गणपतीच्या उत्सवांत पदें म्हणणाऱ्या, टिपऱ्या खेळणाऱ्या मुला-मुलींचा संघ, समुदाय. ४ पंच; संघ. 'आमचा मेळा निवडा.' [सं. मिल=भेटणें] **मेळयास मिळणें**–पैकीं एक म्हणून जाऊन मिळणें. **मेळाप**–पु. समुदाय. तैसा सज्जनांचा मेळापीं।'–ज्ञा १८.१५२१.

मेळपकु, मेळापाक—पु. १ मिलाफ; मिश्रण. 'माजि तया मेळापकु। सिंहनादाचा।'–गीता १ ७७८. २ समेट; मनजुळणी. ३ जमवाजमव; जुळणी; समुदाय. ४ वियोगितांची पुनर्भेट. [सं. मिल्]

मेळावा—पु. (कवि.) १ जमाव; समुदाय. 'नाना रत्नांचे मेळावे। अलौकिक गुंफिले।' २ मेळ; संयोग; मिलाफ. 'तैसा मेळावा अर्जुनीं। झाला दिसे समस्तीं।'–मुआदि ८१ ३. ३ समारंभ. ४ सैन्यविभाग; सैनिकसमूह; तुकडी. 'तो मेळावा रणकाळ डंका। विदुरथाचा।'–शिशु १०३२. [सं. मिल्] **मेळि(ळी)कार**–पु. भेट. 'कृष्णें केला मेळिकार।'–एरुस्व ६.२७. **मेळु-ळू**–पु. भेट; मेळ; संयोग. 'कैसा मेळु आला गोडिये।'–अमृ १.११. **मेळे करणें**–क्रि. (कु.) एकत्र जमून गप्पा मारणें. **मेळेकरी**–पु. एखाद्या गांवचा पिढीजाद गांवकामगार. **मेळेदार**–पु. पंचायतीपैकीं एक इसम; पंच.

मेळावा—पु. (गो.) द्वेषभाव.

मेक्षण—न. यज्ञकर्मांतील एक पात्र. हें लांकडाचें असून उलथन्यासारखें असतें. [सं.]

मै—क्रिवि. सह; बरोबर. [अर. मअ] **मैजमीयत**–क्रिवि. जमातीसह. –पया ४९३. **मै-फौज**–क्रिवि. फौजेसह. –पयाव ४९४.

मैडोळें—न. (गो.) गोव्यांतील मैंडे नांवाच्या गांवीं होणारें उंची, रुचकर, महाग असें केळें. –सह्याद्री ३०८.

मैत—वि. मेलेला; मयत; मैत या शब्दाशी समास होऊन झालेले शब्द मैयत शब्दांत पहा.

मैत्र—पु. मित्र; स्नेही; दोस्त. 'मैत्राचें बोलें उणें।'–दा २.१.५५. –न. अनुराधा नक्षत्राचें नांव. –वि. स्नेहीपणाचा; **मैत्रीचा** [सं. मित्र] **मैत्रकी**–स्त्री. दोस्ती; स्नेह; मैत्री. 'पत्रिका

यदुवरें लिहिली गे। मैत्रिकी स्मरुनि ते पाहिली गे।' –मध्व १९९. **मैत्रणी, मैत्रिणी, मैत्रीण**–स्त्री. स्त्रीमित्र; दोस्तीण **मैत्रिकी, मैत्री**–स्त्री. दोस्ती; स्नेह. 'लाभाविणें मैत्री तोडूं नये.' [मित्र]

मैत्रायणी—स्त्री. कृष्णयजुर्वेदाची एक शाखा. **मैत्राणी, मैत्रायणी**–पु. ब्राह्मणांची एक जात किंवा तींतील व्यक्ती. [मैत्रायणी]

मैथिल—पु. एक ब्राह्मणाची जात किंवा तींतील व्यक्ति. –वि. मिथिला देशाचें किंवा नगरासंबंधाचें. [सं.]

मैथुन—न. १ संयोग; अंगसंग; स्त्रीपुरुषसमागम; संभोग. २ एकी; समेट; संयोग; संघ. [सं.] **०वैराग्य**–न. बेसुमार संभोग केल्यामुळें दुःखप्रद औदासिन्य व विषाद उत्पन्न होऊन स्त्रीविरक्ति उत्पन्न होणें किंवा कामवासनेचें संयमन करण्याची इच्छा होणें. [सं.]

मैंद—पु. ढेकळें फोडावयाचा कुळव; पेरलेल्या शेतांतील सरी बुजविण्यासाठीं त्यावरून फिरवावयाचें एक औत.

मैंद—पु. एका विवक्षित जातींतील व्यक्ति. हे लोक प्रवासी लोकांना वाटेंत अडवून त्यांचा खून करतात. –वि. १ बुद्धिमंद; जड; सुस्त. २ घातकी; ढोंगी; दांभिक. 'मैंद सोइरी काढिती। फांसे घालोनी प्राण घेती।' –दा ३.२. 'मैंदाचे स्वीकारिल कवण विचक्षण अमूल्य निष्क–पट।' –मोउद्योग ६.४९. [सं. मंद; महेंद्र] **०कर्म**–न. खून; दरवडा. 'गर्व सत्यभामेचा निर्दाळुन समुळिहुन करी एक चोर ज्यार चाहाड एक मैंदकर्म आचरी।' –होला २७. **मैंदाची नगरी**–स्त्री. सोदे किंवा लबाड लोकांचा कंपू. **मैंदावर्वे**–न. १ मैंद नांवाच्या लोकांचा दरवडा, अत्याचार. २ मैंदपणा; घातकीपणा. ३ भुलावणी; मोह. 'येकलें जाववेना संसार मैंदावें।' –दावि २३५.

मैंदाविणें–मैंदावणें—क्रि. मैंदपणा करणें; मैंदासारखी कृति करणें.

मैदा—पु. ओलविलेले गहूं वाळवून त्यांचें दळलेलें पीठ; सपीट; [फा. मैदा]

मैदान—न. १ उघडी, सपाट व विस्तीर्ण अशी जागा. २ अंग किंवा मधला भाग (वस्त्राचा). [अर्. मैदान्] **०बसणें**–क्रि. सृष्टिशोभेचें सुख घेण्यासाठीं मैदानांत बसणें. **घोडेमैदान**–न. मर्दुमकीची जागा; रणक्षेत्र.

मैदालकडी—स्त्री. (हिं.) एक औषधी झाड. उदबत्त्या करण्याकरितां यांचें लांकूड वापरतात.

मैदी—स्त्री. (व.) मेंदी पहा.

मैना—स्त्री. १ पोपटाची, राघूची मादी. २ साळुंकी; एक गाणारा पक्षी. या पक्ष्याच्या अनेक जाती आहेत.

मै–फर्जेन्दान—क्रिवि. लेंकरासह; वंशपरंपरा. 'इनाम मै–फर्जेन्दान मुकर असे.' –वाडसनदा ८७ [फा.]

मैफल—स्त्री. (व.) मजलस; मंडळी; सभा. 'मैफल जमली.' [अर. महफल]

मैयत—वि. १ मेलेला; माजी; इहलोक सोडून गेलेला. २ निर्बीज झालेलें; विनाशित (घराणें, कुल). ३ करपलेलें (पीक). [अर. मयत] **०अर्जी**–स्त्री. मयत इसमासंबंधींचा अर्ज. **०कयास**–पु. संशयित मृत मनुष्याच्या मरणाच्या कारणाचा तपास किंवा त्यासंबंधीं बनविलेलें मत, विचार. **०चौकशी–तपासणी**–स्त्री. मृत इसमाच्या संबंधानें केलेली विचारपूस. **०जिंदगी**–स्त्री. १ मृत इसमाची राहिलेली, त्यानें ठेवलेली मालमत्ता. २ बेवारशी, योग्य वारसदार हक्कदार, नाहीं अशी मालमत्ता. **०पंचनामा**–पु मृत इसमाच्या चौकशीचा केलेला पंचनामा. **०पाहणी**–स्त्री. जळुन गेलेल्या किंवा रोग पडून नष्ट झालेल्या पिकांची पाहणी. **०माल**–पु. मयत जिंदगी पहा. **०मोकद्दमा**–पु. मृत इसमासंबंधीं चौकशीचा, मोकद्दम. **०याद**–स्त्री. १ मयत झालेल्या लोकांची केलेली यादी, फेरिस्त. २ मृत इसमांच्या चौकशीचे निकालाचे ठेवलेले कागदपत्र. **०वारीस**–पु. बेवारशी वतन, मालमत्ता.

मैया—वि. शंभर ही संख्या. [अर्. मिअा] **मैयातैन**–वि. दोनशें (फक्त मुसलमानी वर्षासंबंधानें उपयोग). [अर. मिअतैन]

मैराप—स्त्री. महिरप पहा. 'मैरापीची सर्जा केल्या जशी दुसरी द्वारका.' –पला. [अर. मिह्राब]

मैराळभाऊ—पु. ह्या नांवाच्या इसमावरून काटक व बलवान इसमाबद्दल योजावयाचा शब्द.

मैल—पु. एक रस्त्याची, मार्गाची लांबी मोजण्याचें प्रमाण; अर्धा कोस. [इं. माइल]

मैल—पु. घाण; खळमळ; मल. 'जळती चित्त मैल सर्वथा।' –विपू १.६९. [सं. मल; सं. मल्=धारण करणें] **०खोर**–वि. मळकट रंगाचा; घाण दडवणारा; मळखाऊ (रंग) **मैला**–पु. नरक; घाण. [सं. मल्=धारण करणें] **मैलो**–पु. (कु.) मळ. [म. मैला]

मैलागर—पु. १ एक प्रकारचें चंदनाचें लांकूड; उत्कृष्ट चंदन. २ मलयगिरी पर्वताचें नांव. [सं. मैलागिरी, मलयगिरी; द्रा. मलै=पर्वत]

मैल्यकार—पु. (महानु.) संघ; जमाव. चतुरंग सैन्यासह मुक्काम. 'पातले पवनवेगें जेथे मैल्यकारू केला श्रीकृष्णराजें.' [सं. मिल्=एकत्रित होणें]

मैस, मैंस—स्त्री. काजळ; मस; शाई. 'सकळ पर्वतांची मैंस करूनि। समुद्राचिया पात्रामाजीं भरूनि। कल्पतरूंची सुंदर करूनि लेखणी। लेहूं बैसे आदिमाया।' –स्वादि ७.४.४८. [सं. मषी]

मैळ—पु. मळ. **मैळ**–वि. मलिन. **मैळणें**–स्त्री. मलिन होणें; मळणें. 'तरि तें पंधरेपण न मैळे।' –ज्ञा ८.३९. [सं. मलिन–मइल–मैल–मैळ]

मैळें—न. (महानु.) वस्त्र. 'तया अनुरागाचेया चोळे। रापे ईंद्रियांचे मैळें।' –भाए ७९६. [सं. मल्=धारण करणें]

मोआ—स्त्री. (कों.) माशाची एक जात. या जातीच्या माशांस आक्टोबर नोव्हेंबर मध्यें पकडतात.

मोआजीन—पु. मशिदीची बांग पुकारणारा मनुष्य. मवाजीन पहा. 'इमामलोक व मोआजीन लोक यांची चौकशी करणें –वाड सनदा ७९. [अर्. मुअज्झिन्]

मोईतसबी—वि. मुकरर वस्ती करणारे. 'मोईतसबी यांची चौकशी करून.' –समा ३.२०५. [फा.]

मोईं(इ)न—स्त्री. वर्षाची नेमणूक; ठराव; नियम; पगार; तैनात; कायम नेमणूक. 'इतकियावर मोईन प्रमाणें चौकीपहारा न राखेच तर परिच्छिन्न दूर करावा.' –मराआ १४. [अर. मुअय्यन्] **०जाबता**–पु. १ नेमणूक होतांना किंवा पगार निश्चित करतांना लिहून घेतलेला लेख; पगारपत्रक; नोकर लोकांचें पत्रक. २ करारांचें पत्रक; वांटणीपत्रक. **०दार**–पु. संस्थानांतून नेमणूक किंवा वेतन घेणारा इसम. मोईन पहा. **०माप**–न. १ ठराविक किंवा निश्चित मोजमाप. २–क्रिवि. खचित; करारानें; कायमपणें; ठराविकपणें; खरोखर.

मोईर—पु. (गो.) मुसलमान. [मूर?]

मोऊळ—पु. (कु.) गवताची केलेली लहान केरसुणी. [मोळ]

मोक, मोख—पु. अंकुर; मोड; कोंब; गर्भ. 'केळीचा मोक हरभऱ्यायेवढा घेऊन...त्यांत हें औषध संध्याकाळीं घालावें' –अश्वप २.१८०. [सं. मुख]

मोकट—वि. मोकळा; बेबंद; स्वच्छंद. मोकाट पहा.

मोकडी—स्त्री. एक झाड.

मोकदम—पु. मुख्य अधिकारी. मुकदम पहा. 'मोकदम (मुख्य आदमी) हा किताब पाटलाला असे' –गांगा ४५. **मोकदमा**–पु. मुकदमा पहा. **मोकद्दम-मोकद्दमी**–(प्र.) मुकद्दम, मुकद्दमी पहा.

मोकरर—वि. स्थिर; निश्चित. मुकरर पहा. [अर.]

मोकल—वि. स्वाधीन. 'आपली कुलकर्णाची गोही याल तरी सदहूं पैकीयाची सोडी मोकल करीन.' –रा १८.६६. –पु. संरक्षक; बदरका. 'आम्हास पन्नास तोपची मोकल देऊन गडावरी नेऊन...' –रा १८.६४. [अर. मुवक्कल्]

मोकलणें—क्रि. १ पाठविणें. धाडणें; प्रेषणें. 'ब्रह्मघ्ना शिष्यांची भीड धरुनि साधु शिष्य मोकलिला'–मोआदि ९.३४. 'स्वशक्ती करिता खाण्डव वन दहन। इन्द्र मोकलील मेघजीवन' –मुआदि ४९.९९. २ मोकळा सोडणें; दाब किंवा बंधन न ठेवणें. 'द्वारे मोकलुनि। जनक शृंखला तोडूनी'–पाळणेसंग्रह १०. ३ गमावणें. ४ ओक्सबोसी, मोठ्यानें (हेल काढून, ओरडून, कंठसंकोच न करितां) रडणें. [सं. मुक्त; देप्रा. मोकल; गु. मोकलवुं] **मोकळूं न देणें**–यांबावयास लावणें; जाऊं न देणें; अटकाव करणें.

मोकळ—स्त्री. १ विस्कटलेली, निर्बंध, अस्ताव्यस्त स्थिति. २ फेड (कर्जाची). ३ खुले किंवा विस्कळीत स्थितींतील भारे, गठ्ठे, इ० ४ मोकळीक; स्वतंत्रता; सोडणूक; सुटका; मुक्तता. –क्रिवि. १ मोकळेपणें; स्वैरपणें; स्वतंत्रतेनें; दाब किंवा प्रतिबंध नसतां. (क्रि० **सोडणें**; **सुटणें**; **फिरणें**; **हिंडणें**; **चरणें**) २ (खुल्या किंवा उघड्या स्थितींत–) पत्र, हिशोब, दस्तऐवज; (कायम मुक्रर किंवा निश्चित न केलेल्या स्थितींतील)–हिशोब; स्मरणार्थ टिपण. [सं. मुक्त] **०चरणी**–वि. मनास येईल त्याप्रमाणें चालण्यास स्वतंत्र. २ भटक्या; उनाडक्या करणारा; ३ अस्थिर किंवा खात्रीचा, निश्चित नसलेला (पगार, उत्पन्न इ०). **०चरणें**–क्रिवि. मोकळेपणें; अनिरुद्ध; स्वतंत्रपणें. **मोकळचिट्ठी**–स्त्री. मोकळीक देण्यासंबंधीचें पत्र; मोकळीक चिट्ठी पहा. **०लेख**–पु. खुल्या कागदावर किंवा उघड्या कागदावर लिहिणें. याच्या उलट बंदिस्त लेख. **०वट**–क्रिवि. १ खुलेपणें; (पेंढ्या जुडे किंवा भारे अगर गठ्ठे न बांधता). २ बंद न करतां; उघडें ठेवून. ३ ऐसपैस; अघळ पघळ; प्रशस्तपणें (मैदान किंवा विस्तीर्ण पटांगण) ४ स्वैरपणें; स्वतंत्रपणानें (भटकणें इ०). [मोकळा+वत्] **०वाडी-वादी**–स्त्री. १ (प्रां.) मोकळीक. २ स्थलत्याग. ३ निराश स्थिति. 'सृष्टि गेली रे गेली। देवा मोकळवादी जाहली। ऐशी एक टाळी पिटिली। सत्यलोकीं।' –ज्ञा १.१५७.

मोकळा—वि. १ स्वतंत्र; बंधमुक्त; अनियंत्रित. २ खुलें; उघडें; बंद नसलेलें (दार किंवा दरवाजा अथवा पेटी). ३ वेगवेगळे; एकत्र न झालेलें; एकत्र न गुरफटलेलें. ४ न व्यापलेलें; रिकामें. ५ (भयंकर रोगापासून, दुःखांतून) सुटका झालेला; मोकळा झालेला; मुक्त. [सं. मुक्त; प्रा. मोको; गु. मोकळु. सिं. मोकल; उरि. मुकुळा] **०चाकळा**–वि. स्वतंत्र; स्वैर; अप्रतिबद्ध; खुला; उघडा; बंद नसलेला इ० [मोकळा द्वि.] **०ढाकळा**–वि. १ उघडा; न झांकलेला; बंद नसलेला; सार्वजनिक उपयोगाकरितां खुला असलेला (तलाव, नदी, जमीन). २ ऐसपैस; अघळपघळ; लांबरुंद (झगा, घर इ०) [मोकळा द्वि.] **मोकळी**–स्त्री. १ स्वच्छंदीपणा; स्वातंत्र्य. **मोकळीक**–स्त्री. १ सुटणूक; मुक्तता; स्वतंत्र किंवा मोकळें होणें. 'तुवा दिधली मज मोकळीक बा जे' –र १३. २ सुटका; रजा इ० [मोकळा]

॰चिठ्ठी–स्त्री. १ सोडवणूकीची, सुटकेची अगर मुक्त केल्याची चिठी अगर लेखी कागद. २ जप्त केलेला माल सोडलेल्याचा लेख. **मोकळीभाजी**–स्त्री. शिजवून कोरडी केलेली, आंत पाणी नसलेली भाजी. ह्याच्या उलट असट भाजी किंवा गोळा भाजी. **मोकळें**–न. मोकळेपणा. **॰मैदान-रान**–न. १ ऐसपैस जागा. २ (ल.) पूर्ण स्वातंत्र्य; सदर परवानगी.

मोका—पु. १ संधि; प्रसंग. 'अलीकडे मोका आल्यास कैलासवासी महाराज साहेब, ह्यांची चांगली पूजाही करीत असत. –विक्षिप्त २.१६८. २ नाकें; प्रमुख ठिकाण. 'मोक्यावरची जागा.' [अर. मौकअ]

मोकाट—टु-ट्टू—वि. १ (माण.) उद्धट; द्वाड; दांडगा; स्वच्छंदी. २ (व.) मोकळा; अनर्गल. 'धीट सैराट मोकाट। चाट चावट वाजट।'–दा २.२. [सं. मुक्त]

मोकाडकी—स्त्री. एक प्रकारचें दावें. [मोकाड=मुख+अडकी=अडकणें]

मोकादम, मोकादमी—पु. मुकद्दम व मुकद्दमी. मुकादम पहा.

मोकाबला—पु. मुकाबला पहा.

मोकाम—पु. मुक्काम पहा. 'ती दिसाचे मोकाम' –ऐपो ८०.

मोकार—पु. एन खर्च.

मोकार—क्रिवि. १ मोकळेपणानें, निर्बंध नसतां. २ स्वतंत्रपणें; फाजीलपणें.

मोकारा—पु. (महानु.) मोगरसूल. 'केला परमुखाचा मोकारा। जीवपशुवा।'–ऋ ५१.

मोकाशी–सी, मोकासदार—पु. मोकासपणाचा हक्क ज्यास आहे असा इसम; संस्थानचा अगर अशा इसमाच्या मार्फतीचा वसूल जमा करणारा शेतकरी; गांव इत्यादि ज्यास इनाम आहेत किंवा चाकरीबद्दल दिले आहेत असा इसम. [मोकासा]

मोकास—पु. गांव, जमीन, इनाम देतात ती. सरकार चाकरीबद्दल मिळणारा गांव.

मोकासा—पु. १ लष्करांतील नोकरीची अट घालून त्या संबंधानें किंवा इनाम म्हणून दिलेलीं गावें, जमिनी वगैरे. २ गांवच्या वसुलामध्यें व अंमलामध्यें हिस्सा. ३ चौथाईपैकीं राजबाबती वजा करून राहिलेला भाग; चौथाईपैकीं तृतीयांश अथवा तीन आण्यांचा भाग. –इनाम ३०. ४ गांवखोती वगैरेसहि हा शब्द लावतात. ५ मुशाफरांची मालमत्ता सुरक्षित राखण्याच्या अटीवर दिलेलें इनाम. [अर. मुकासा] **मोकास**–स्त्री. वसुलापैकीं कांहीं हिस्सा मिळण्याचा हक्क. 'मौजे बहूल तालुके पाबळ येथील मोकास बाबेचा अंमल.' [अर. मुकासा+बाब]

मोकाळ—वि. मोकळा; भटक्या; स्वतंत्र; मन मानेल तिकडे हिंडणारा; उनाड. क्रिवि. मोकळेपणानें; स्वतंत्रतेनें.

मोकील—पु. (व.) (मोंगलाई) अशील. [अर मुअक्कील]

मोकूफ-ब—वि.क्रिवि. स्थगित; थांबलेलें; रहित; बंद. 'वतन चालविण मोकूफ राहिलें होतें.' –थोमारो १.६५. 'दोन दिवस मोकूब जाले आहेत.' –पेद ६.२०३. [अर. मब्कूफ]

मोख, मोंख—पु. १ धान्यादिकांच्या आंत जो बीजभूत अंश असतो तो. २ सुपारीच्या मध्यभागाचा मऊ पदार्थ; नारळांतील अंकूर; मोड किंवा बीजाचा खाण्यामध्यें येणारा भाग. **मोखर, मोखार**–वि. १ मऊ; कठिण नसलेला; सहज मोडणारा किंवा फुटणारा; ढिसूळ (दगड इ०). २ भरभराटीचें, जोमानें वाढणारें; वयाच्या मानानें बाळसेदार व सुरेख असलेलें (मूल). [मुख]

मोखंडी—वि. (व.) उत्तम. 'मोखंडी जमीन.' =गव्हाची उत्तम जमीन.

मोखणें—क्रि. (गो.) १ बिनचूक तीर मारणें. २ (गो.) झोंकून देणें.

मोखा—पु. १ दांडा; खुंटा. २ लवचीक किंवा हिरवा कोंवळा फोक (झाडाचा); कांहीं भागांत डांबा;शब्दांबद्दल उपयोग करतात.

मोख्तसर—पु. मुख्तसर पहा. वजनदार लोक. 'हेजीबा सांगात मोख्तसर दाहाजण आले होते.' –इमं १०. [अर. मुख्तसर; संक्षिप्त; निवडलेलें] **मोख्लीसान**–पु. स्नेही. [फा. मुख्लिसान]

मोग—पु. (कों.) मोड; अंकुर; कोंब. मोख पहा.

मोग—पु. (गो.) लोभ; मोह.

मोगड, मोगण—न. (सामा. मोघड, मोघण असा शब्द रूढ) पेरणी करतांना पाभरीच्या दर चौथ्या तासांत मुख्य धान्याशिवाय जें दुसरें धान्य पेरतात तें. **मोगडा, मोगणा, मोगणी**–एकाच वेळीं दोन धान्यें पेरण्यासाठीं पाभरीला जोडलेला स्वतंत्र नळा. मोघडा, मोघणा पहा. (क्रि० धरणें; चालवणें). 'आज गव्हाचा मोगडा धरावयाचा आहे.'

मोगर-रा—पु. १ टापरणें; ठोकणी; टोकणें; मेखसु. २ लहान गांठ (ओंवलेला मोती सोन्याच्या तारेंतून पडूं नये म्हणून तारेच्या टोंकाला मारलेली, बसविलेली). ३ फरसबंदी करणारांची ठोकणी, ठासणी;परटाचें कपडे बडविण्याचें साधन; लाकडी हातोडा. ४ (ल.) पायदळ. 'चालती पायांचे मोगर। पातले कौंडिण्यपुर नगर। आणीक वऱ्हाडी महावीर। चैद्यभार तेही आले।' –एरुस्व ५.२६. [सं. मुद्गर; प्रा. मोग्गरो; सिं. मुड्गिरो]

मोगर—वि. मुख्य. 'चालती मोगर चातुरंगी।' –मातृकी–स्वयंवर ९९. [सं. मुखर]

मोगरसूल, मोंगरसुल—न. धान्य, धन, इतर पदार्थांचा समूह दानधर्म म्हणून जनतेकडून लुटविण्याची क्रिया; लूट;

संक्रांतीला स्त्रिया उंसाची वगैरे लूट करतात ती; वोवसादान. 'तरि मुक्तीचे मोगरसुल देवें। कां न कीजे।' –भाए ६१९.

मोगरा—पु. एक फुलवेल; तिचें फूल; झुबकेदार फुलास बट-मोगरा म्हणतात. **मोगरें**–न. मोगऱ्याचें फूल. **मोगरेल**–न. मोगऱ्याचें तेल. **मोगरी**–स्त्री. (कों.) मोगऱ्याचें झाड.

मोगरी—स्त्री. कणसें बडविण्याचें लांकडी अवजार; लाकडी मोठा हातोडा; शेतांतील ढेकळे फोडणारें लाकडी औत. मुळ्याची विलायती शेंग; हो रंगानें तांबूस असते [सं. मुद्गर] **०मार**–पु. १ (कपडे धुतांना) मोगरीचा मार देणें; चोप देणें. २ (ल.) चांगला, खरपूस चोप, मार देणें. 'मोगरीमार बुधलेमार।' –दा ३ ७.६५.

मोगल, मोंगल—पु. मध्य आशियांतून किंवा तार्तरीहून हिंदुस्थानांत आलेली मुसलमानांची एक जात; मोंगल जातीचा मुसलमान इसम. [फा. मुघोल्] **मोगलाई**–स्त्री. १ मोगलें लोकांचें राज्य, अंमल, सत्ता. २ कोणत्याहि मुसलमान राजाची सत्ता, त्याचें राज्य. ३ (ल.) बेबंदशाही. ४ करविशेष (मोंगलांनीं बसविलेली मोंगलांचें हिरड्याची रक्कम). –थोमारो २.७०. ९. [मोगल] **०मसलत**–स्त्री. कपटडाव. 'परंतु मोंगलाई मसलत यांस उमजली नाहीं.' –भाब ४८. **मोगलाण**–न. १ मोगलांचा देश; मोगलांच्या सत्तेखालील देश. २ मोगल लोकांच्यामधील, मोगल लोकांनीं सरकारविरुद्ध केलेलें बंड, दंगा, उठावणी. [मोगल] **मोगली**–वि. १ मोगल लोकांसंबंधीचें. २ कपटी. 'ऐशियास मोगली मन्सबा, इनाम देऊन आपला मतलब साधितील.' –इमं २०१. [मोगल] **०एरंड**–पु. एक प्रकारचें एरंडाचें झाड; वईचा एरंड. **०बाजार**–पु. जोराची दंगल, आरडाओरड. (क्रि० मांडणें; माजणें; मातणें; करणें). **०बेदाणा**–पु. बेदाणा; एक औषधोपयोगी पदार्थ. [फा.] **०मिरची**–स्त्री. वांग्यासारखी मोठी मिरची; भाजीची, भोपळी मिरची.

मोगल—पु. काजूगर.

मोगळ—पु. (कर.) चौपाखीपैकीं बाजूचीं छपरें. मोळ पहा. 'छपराला मागळ ठेवले तर खर्च फार येणार नाहीं.'

मोगा—वि. (गो) सखा; जिवलग (मित्र) –चित्रा, दिवाळी अंक १९३६.

मोगा-घा—पु. (हेट.) १ रहाटगाडग्याचें मडकें; मातीचा लोटा. २ नारळाचा सुयरा, पोगी; (क्वचित) नारळांत उद्भवणाऱ्या कोंबासहि म्हणतात. **मोगारा**–पु. कोंब; कोम; अंकुर. (क्रि० येणें; फुटणें).

मोघ—वि. व्यर्थ; निष्फळ; विनाकारण; निरुपयोगी; बेकिफायतशीर. 'ज्यावर सत्कवीचीं वचनें मोघ होत नाहींत ...' –नि ८९५. [सं.]

मोघड, मोघण—स्त्रीपु. (व.) १ मुख्य धान्यामध्यें पेरलेलें दुसरें धान्य; उतवडा. २ असें धान्य पेरण्याचा नळा. मोगण पहा.

मोघडया–स्त्री. (खा.) दोन फणी पाभर; खानदेशांत गहूं, हरभरा या पाभरीतून पेरतात. **मोघणा**–पु. मुख्य धान्यांत मोगण म्हणून दुसरें धान्य पेरण्याचा नळा. मोघड किंवा मोघण ह्या अर्थी उपयोग. २ ह्या नळ्यानें किंवा मोघण्यानें पेरलेलें ताम. **मोघणी, मोंघणी**–स्त्री. १ जोंधळा, बाजरी वगैरे मध्यें तूर, हरभरा इ० ची केलेली पेरणी. ३ असें पेरणीचें काम ज्या नळ्यानें केलें जातें तो नळा. मोघणा पहा. **मोघणें**–क्रि. मोघणाच्या साधनानें शेतांत तास पाडून त्यांत बीं पेरणें. [मोघण]

मोघम, मोहगम—वि. सर्वसाधारण; अनिश्चित, अस्पष्ट रूपरेषेचें; खुलासेवार नव्हे असें (भाषण, काम, व्यवहार, खर्च); संदिग्ध. 'ऐसे मोहगम हजरत म्हणतात यांत काय समजावें?' –रा ५. १४५. [अर. मुग्हम्] **०बाब, बाबती**–स्त्री. कोणताहि खुलासा न केलेला असा कर, वर्गणी किंवा पट्टी; कोणत्या बाबीकडे खर्च करणेची हें न ठरवतां वसूल केलेली रक्कम.

मोघल—न. तंबूचें, डेऱ्याचें मागील दार. [अर.]

मोघळ—पु. (कर.) गटार; पाट. 'गाय मोघळा मोघळानं गेली.'

मोघा—मोगा पहा.

मोघारणें—न. नकसगारांचें हत्यार.

मोघें—न. जोंधळा, बाजरी किंवा गहूं ह्यांच्यामध्यें मोघण्यानें पेरलेले धान्य; मोगण पहा. (व.) असें धान्य पेरण्याचा नळा.

मोच—स्त्री. खाण्यास योग्य अशी एक भाजी.

मोच—पु. मऊ कापूस ज्यास येतो असें झाड; सावरी; शेवरी. **मोचरस**–पु. मोच नांवाच्या झाडाचा, सावरीचा चीक, डिंक; एक औषधी पदार्थ; सुपारीचें फुल. –मुंव्या १७१.

मोचक—वि. मोकळा करणारा; सोडविणारा; मुक्त करणारा; सुटका करणारा; (समासांत) भवमोचक; पापमोचक; ऋणमोचक. [सं.] **मोचणें**–(काव्य) मोकळा करणें; सोडणें; मुक्त करणें; सुटका करणें. [सं. मोचन, मुच्] **मोचन**–न. मोकळें होणें; मुक्त होणें; स्वतंत्र होणें; सुटणूक; स्वतंत्रता; मोकळीक; (सामा.) जाऊं देणें. [सं. मुच्=सोडणें]

मोचड—पु. जोडा. [प्रा.] **मोचडी**–स्त्री. नाजुक जोडा.

मोचा—पु. १ मोजा. २ जोडा; एक प्रकारचा बूट. हा अहमदनगराकडे वापरतात. 'होईन मोचे वाहणा। पायीं सकळा संतजना।' –तुगा ११४१. [हिं.] **मोचे खाणें–बसणें**–पायपोसांचा मार खाणें, बसणें **०मोची**–स्त्री. एकमेकांमधील खेटराखेटरी किंवा जोडाजोडी. **मोचे फेडणें**–क्रि. जोडे फेकणें; तुच्छ मानणें.

' गजवाजीनृयानप्राप्तता । तेणें गर्वे इंद्रमाथां मोचे फेडी । ' –एभा ५.१५२. [मोचा द्वि.]

मोची, मोचेकरी—पु. १ एक जात; चांभार. ' जीनगर सलतानगर चर्मक । डोहर भाट बुरुड रजक । दांगट मोचेकरी खाटिक । लोणारी आणि कैकाडी । ' –स्वादि ६.५.३८. २ मांग जातीतील एक पोटजात; खानदेश व सोलापूर जिल्ह्यांत ही पोटजात प्रामुख्यानें आढळते. –अस्पृ ४७–४८. [बं. मुचि; हिं. मोची; मोचा]

मोच्छाव, मोच्छाह—पु. महोत्सव; कोणताहि मोठा उत्सव. [सं. महोत्सव, महोत्साह]

मोज—न. १ मापन; परिमाण किंवा संख्या निश्चित करणें. २ मापणें; मोजणें; मापानें मोजून निश्चित करणें. ३ मापानें मोजून निश्चित केलेली संख्या. ४ (लांबी, वजन किंवा क्षेत्र यांचे) मापन किंवा माप. ५ मोजण्यासाठीं घेतलेलें कोणतेंहि परिमाण. [सं. मा=मोजणें] **०दात–दाद–दास्त**–स्त्री. संख्या मोजणें; गणना; मापन; मोजणी. [अर.] **०प**–न. संख्या मोजणें; मापणें; मोजमाप करणें; संख्या. **०पट्टी**–स्त्री. मोजण्याची पट्टी; फूटरूल. **मोजका**–वि. मोजलेला; मर्यादित किंवा इयत्ता ठरविलेला. २ माफक; साधारण. [मोजणें] **मोजजा**–पु. मोजणी. ' आंबे जाहाले असतील त्यांचा नजर मोजजा आजमासें करून ' –वाडबाबा १.२१२. **मोजणी**–स्त्री. मोजण्याची क्रिया; संख्या ठरविणें; मोजणें; मोज किंवा मोजमाप करणें. २ जमीनीचें मापन किंवा क्षेत्र मोजणें. [मोजणें] **०दार**–पु. जमीनीचें क्षेत्रफळ काढणारा, मोजणी करणारा. **मोजणें**–क्रि. १ मेजणें; मापणें; गणित करणें. २ (ल.) भिणें; पर्वा करणें; जुमानणें; अभिमान धरणें; मानणें; गणणें. ' यांच्या गुणापुढें न त्रिदशांचा आपणासि नगमोजी । ' –मोविराट ६.३८.

मोजला—वि. मोजलेला; मोजमाप केलेला; गणलेला; विवक्षित रक्कम किंवा परिमाण ठरविलेला; मयादित केलेला; मोजका. ' मोजल्या रुपयांनीं संसार होत नाहीं. ' **मोजी करणें**–क्रि. काटकसर करणें. **मोजीव मापीव**–वि. मोजलेलें व मापलेलें; निश्चित केलेलें, एकत्र जमा केलेला किंवा विस्कळीत नव्हे असा; मोजमाप किती आहे हें माहीत असलेला. [मोजणें व मापणें] **मोजोटी, मोजवटी**–स्त्री. (सोनारी) मोजपट्टी; एक प्रकारचा शिक्का. **मोज्या**–पु. मापारी.

मोजवा, मोजबेदार—पु. (प्र.) मोसबा व मोसबेदार पहा.

मोजा—पु. थंडी वगैरेपासून हातपायांचें रक्षण व्हावें म्हणून त्यांस घालण्याची विविक्षित आकाराची पिशवी. [फा. मूझा]

मोजिब, मोजीब—क्रिवि. प्रमाणें. [अर. मूजिब्, मुजिब]

मोड्या—पु. खल;चर्चा; सारांश; प्रतीसाक्ष्यमू.–राव्य ८.८१. ' हा कागद साहेबीं जतण करून ठेविला पाहिजे. याचा मोड्या होईल. ' –रा १६.४६. [अर. मुवाझअ]

मोट—स्त्री. (व.) १ मोठी पिशवी; पोतें; मोठें ओझें; गाठोडें (धान्य, शेण इ०चें गाठोडें किंवा एकत्र जखडून बांधलेल्या पुष्कळ वस्तूंचा समूह ढीग, रास). ' ना तो सुर्य मोट। बांधितां निकें । ' –अमृ ७.२७४. २ बैलांकडून किंवा रेडयांकडून विहीर वगैरेंतील पाणी वर काढण्याचें साधन. ३ पाणमोट; पोटांतील पाण्याची पिशवी. (क्रि० येणें; पडणें; फुटणें; निघणें). ४ (ल.) पशूला खालीं जमीनीवर पाडून त्याच्या पायांचे चारी खूर एकत्र बांधलेली त्याची स्थिति; भूत-पिशाच्च बाधा झाली असतां माणसाची गठडी वळवून त्यास बांधलें जाणें किंवा त्याचे हातपाय जखडले जाणें ५ शिदोरी; उपहाराच्या साहित्याचें गाठोडें. ' मग आपुलालिआ मोटां घेऔनि । सकळें एतें जालें । ' –दाव २०१. ६ दहा हजार ही संख्या. (स्त्रिया फुलांची, दुर्वांची लाखोली वाहतात त्यावेळीं लक्षाचा दहावा अंश याअर्थी योजतात.) **म्ह**० शिनळ धरावा खाटेस चोर धरावा मोटेस. **०बांधणें**–इच्छेविरुद्ध जखडून बांधणें; एखाद्यास त्याच्या इच्छेविरुद्ध एखाद्या कार्यास प्रवृत्त करणें; इच्छा नसतां धरणें. **(वाऱ्याची) ०बांधणें**–असंभाव्य गोष्ट करूं पाहणें. **०धरणें**–क्रि. मोट जुंपणें, सुरू करणें, हांकणें. सामाशब्द– **०करी**–पु. मोट हांकणारा; मोटेवर काम करणारा. **०क(कु)ळें**–न. गांठोडें; कसें तरी बांधलेलें किंवा नीट न बांधलेलें गांठोडें. मोटळा पहा. **०कुळी**–स्त्री. गांठोडी. **०उडी**–स्त्री. (पाण्यांत) उडी टाकतांना हवेंत असतांच स्वतःचे हातपाय पोटाशीं धरून व शरीराचें गाठोडें करून जी उडी मारतात ती. याच्या उलट चुबकती उडी. **मोटला–ळा–मोटली–ळी, मोटलें–ळे**–पुस्त्रीन. मोटकुळें. पुरचुंडी; गाठोडें. ' पृथुक मोटली सांपडतां प्रभु बहु हर्षाला लाहे । ' –मो सुदामचरित्र (नवनीत पृ. ३७७). **मोटवण**–न. १ मोटेंतील पाणी जेथें ओतलें जातें ती जागा. २ (कर.) मोटेचें वडप; मोटेकरितां उभारलेली जागा. **मोटस्थळ, मोटस्थळ जमीन**–नस्त्री. मोटेच्या पाण्यानें भिजणारी जमीन; विहीरीच्या पाण्याखालीं, बुडकीच्या पाण्याखालीं भिजली जाणारी जमीन. याच्या उलट पाटस्थळ. **मोटाळा–ळी–ळें**–न. (महानु.) १ गाठोडें; बंधन. ' महातारी तमाचा मोटाळा गा । ' –चरित्र. २ (महानु.) (ल.) सामान; संग्रह (रोजचें व्यवहारोपयोगी भांडीकुंडीं, खाद्यवस्तु इ०). ' मोटाळा बांधागा । ' –सूत्रपाठ. **मोटया**–वि. मोटा वाहण्याचें कसब करून उपजीवन करणारा ओझीं किंवा गठ्ठे वाहून नेणारा, हमाल. [मोट]

मोट—स्त्री. मठ; एक धान्यविशेष; मटक्या.

मोटका—वि. निपुण; निष्णात; नेटका; प्रत्यक्ष; चांगला. मोंटका देओ वागारां हातु घालीं। सवेंचि बैसे मागिलीं पांसाळी। –शिशु १०११. 'मोटका काळासीं मीतकारी।' –भाए ४५८.

मोटका—पु. फडकरी. –कृषि ४७३.

मोटका-को—वि. (गो. कु) खुजा; ठेंगू; क्षुद्र. 'मोटके दोघांचि भालेकार।' –उषा १४३१.

मोटकी—पु. गायनशास्त्रांतील एक राग. ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ; कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम; कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी मध्यम. संवादी षड्ज. गानसमय-दिवसाचा दुसरा प्रहर.

मोटकें—वि. १ थोडें. २ सूक्ष्म.

मोटगार—पु. हमाल.

मोटन—न. वोडण पहा. [सं.]

मोटवी—स्त्री. एक प्रकारची मिरची; ही आंखूड व जाड असते.

मोटवें—न. (कों.) लहान.

मोटसुती—वि. जाड धाग्याचें किंवा जाडेभरडें कापड. [मोट+सूत]

मोटा-ठा—वि. १ थोर; जाडा. २ (शब्दशः ल.) अतिशय; जास्त; फार; अधिक (चांगल्या किंवा वाईट अर्थी). 'दिसतोस तूं बरा मोटा।' –मोआदि २.२९. 'हा मोठा आळशी – अडाणी – शहाणा – चतुर–विद्वान – मूर्ख–लबाड इ०' –क्रिवि. थोर, परम इ० शब्दांप्रमाणें उपयोग). फार, अतिशय. [सं. महत्तर] **मोटाई**—स्त्री. १ मोठेपणा; थोरपणा; जाडपणा. २ (ल.) श्रेष्ठत्व. (क्रि० करणें; धरणें; लावणें; मिरवणें; दाखविणें; भोगणें; बाळगणें; वाढवणें; सांगणें). [मोटा] **मोटाड**—वि. अतिशय, अत्यंत मोठा; थोर; जाडा: जाड. [मोटा] **मोटा-धाटा**—वि. १ मोटा व जोरदार, जाड आणि धिप्पाड (मनुष्य, जनावर). २ बळकट; जाड्या अंगाचा; जाडेभरडें, बारीक, सुंदर, नाजूक नव्हे असें (कापड; धागा, वस्तु). [मोठा द्वि]

मोटार—स्त्री. तेलानें(पेट्रोलनें) चालणारी गाडी.[इं.] **मोटार-सायकल**–स्त्री. फटफटी मोटार; पेट्रोलच्या साह्यानें चालणारें सायकलसारखें दोनचाकी वाहन **मोटारहाक्या**–वि. मोटार हांकणारा इसम. 'दोन मोटारहांके यांना पकडून नेलें.' –के १७.६.३०. [इं. शॉफर, ड्रायव्हर]

मोटाळणें—क्रि. मोडणें. [सं. मोटन] **मोठा–मोटा** पहा.

मोठाई—स्त्री. (कों.) मोठेपणा मोटाई पहा. 'दासीची लाज जाईल मग काय राहील मोठाई।–पला २९.

मोठाब्बा—पु. साप. [मोठा+बाबा]

मोठाबाप—पु. (खा.) वडील चुलता. [मोठा+बाप]

मोठी—वि. थोरली. **०घोळ**–स्त्री. रस्त्याची वांकण. **०माय**–स्त्री. (व.) आजी. 'मोठी माय मेली.' **०होणें**–क्रि. (कु.) नहाण येणें. **मोठें**–वि. थोरलें; लहान नाहीं तें; स्थूल (शरीर); (ज्ञानानें, वयानें, धनानें) अधिक. **०पोट**–न. (ल.) अंतःकरणाचें औदार्य; दया, क्षमा करणें. (क्रि० असणें). **०शहाणे**–(निंदार्थी) अतिमूर्ख. 'आपण मोठे शहाणे अहात.' **मोठ्ठा जात**–वि. (व.) फार मोठा; खूप मोठी. –रणगर्जना १७.९.२८.

मोड—पु. १ पराजय; मोडलेली, फाटाफूट झालेली किंवा विस्कळित झालेली स्थिति (सैन्याची); बखेडा. २ पाणीच पाणी करणारा पाऊस; मोठा पूर. –स्त्री. १ जुनींपुराणीं, फुटकींतुटकीं हरकामी न येणारी अशी (विकून टाकण्यासारखीं धातूंचीं भांडीं किंवा दागिने वगैर.) २ भाषेची मांडणी. 'मराठी शब्दांची लिंगावचनानें रूपें कशीं कशीं होतात ह्याची एकदा मोड समजली म्हणजे चाललें.' ३ दूण; दुमड; सळ; केसांमध्यें काढलेला भांग; उभ्या पिकाच्या शेतामधून पडलेली रेषा, ओळ; अशाच तऱ्हेची पडलेली सामान्य रेषा ओळ. ४ (नदीचें, रस्त्याचें) वळण किंवा वांकण. ५ दिशा; रोख; वळण; मोडणी; सर्वसाधारण गति किंवा मार्ग. 'जशी केंसांची मोड असेल त्याप्रमाणें वस्त्रा फिरविला म्हणजे लागत नाहीं.' ६ पद्धत; रीत; वळण; प्रघात;सरणी; रोंख (भाषणाचा, निबंधाचा, कृतीचा) 'गणूची अक्षराची मोड फार चांगली आहे.' 'घोषाच्या कुंडीं। नाद चित्रांची रूपडी। प्रणवाचिया मोडी। रेखिली ऐसीं।' –ज्ञा ६.२७६. ७ हिशेब, गुणांक, मेळवणी, पोहणें, झोंपणे इ० ची जी रीति ती. ८ खुरदा किंवा लहान तांब्याणें नाणें (पैसे वगैर). 'एक रुपयाची मोड आण.' ९ –स्त्रीपु. जड होणें किंवा दुःख होणें (कामाचा भार पडल्यामुळें किंवा वाकून अगर दबून राहिल्यामुळें अवयवामधील किंवा इंद्रियामधील). आळस; मंदपणा. 'हाताला–मानेला–कमरेला–मोड येती–येतो. [सं. मुट–मुड् = मोडणें] **मोड पाडणें**–क्रि. (चांभारी धंदा) घडी पाडणें. **मोडतोड**–स्त्री. १ मोडलेलें, तुटलेलें सामान; त्याची दुरस्ती. २ एखादा व्यवहार, वस्तू वगैरे बदलून घेणें, विक्री करणें (जुने दागिने, धातूंचीं भांडीं इ०ची). ३ मिटवणें; तडजोड करणें; एकी घडवून आणणें (भांडण, कर्ज इ०संबंधीं). ४ भाग किंवा अवयव निरनिराळे, वेगवेगळे करणें व ते पुन्हां जोडणें; दुरुस्त करणें; नीट करणें. [मोडणें+तोडणें] **मोडभांग**–पु. भांग आणि जोरगत ह्यांच्या दरम्यानची समुद्राची स्थिति. भरती आणि ओहोटी ह्यांच्यामधली अवस्था (वास्तविक मोडभांग व मोडजोहार हे दोन्ही शब्द एकच व दोन्ही शब्द एकमेकांच्या ऐवजी उपयोगी येतात). **मोडमाड**–स्त्री. मोडतोड;विध्वंस; सत्यानाश. **मोडसुरा, मोडसुरी**–पु.स्त्री. ज्याचें पातें मिटवितां येतें असा सुरा किंवा सुरी; मिटणारा चाकू.

[मोडणें+सुरा] **मोडामोड**-स्त्री. (कों.) मोडतोड. **मोडक्या वळाचा सारथी**-पु. (ल.) अनाथांचा वाली; असाध्य स्थितींतल्या इसमाला मदत करणारा; दीनदुबळयांचा साह्यकारी.

मोड—पु. बीजादिकांपासून मूलभूत अंश जो उत्पन्न होतो तो; अंकुर, कोंब; मुगारा. (क्रि० येणें; फुटणें) मूळव्याध झाली असतां गुदद्वारीं होणारी मांसवृद्धि; एक प्रकारचा रोग.

मोंड—वि. (कर.) खाष्ट.

मोडक—पु १ एक जातीचा डोंगळा, मुंगळा किंवा माकोडा. २ एक उपनांव.

मोडकळ-ळी—स्त्री. दमून जाणें; थकवा; दमणूक; ग्लानि. (म्हातारपणामुळें किंवा जास्त परिश्रम केल्यामुळें आलेला)-वि. १ मोडलेला;-ह्रास पावलेला;नाश पावलेला;नादुरुस्त झालेला (उद्योग, इमारत, व्यापार इ०); नाश झालेली (स्थिति). (क्रि० येणें; होणें; घालणें; आणणें) २ अव्यवस्थित; अस्ताव्यस्त; नादुरुस्त (सरंजाम, सैन्य इ०) ३ तुकडे पडणारा, ढिसूळ, मोडणारा, पिचूळ, फुसका; चुरा होणारा (तांदूळ इ०) **मोडकळणें, मोडकळीस येणें**-क्रि थकणें; दमणें. (म्हातारपणामुळें इ०); नाश होणें; -ह्रास पावणें; नादुरुस्त होणें-असणें; बिघडून जाणें. -मोवन १२.१५९. **मोडका**-वि. मोडलेला; दुखविल्यानें अगर भंगल्यामुळें मोडल्यामुळें निरुपयोगी किंवा अधु झाला आहे असा (पदार्थ). [मोडणें] **०तोडका**-वि. मोडावयास झालेला; मोडकळीस आलेला. **०वाणी**-पु. लहान प्रमाणांत व्यापार करणारा व्यापारी; जुन्या पुराण्या मालाचा, तुटपुंज्या भांडवलावर धंदा करणारा वाणी, घेवारी; डाळपिठ्या, हिंगमिऱ्या वाणी. **मोडकी**-स्त्री. १ (सामा.) मोडलेली स्थिति; मोड; पराभव; मोडल्या बद्दलचें अपयश. २ अडथळा; प्रतिबंध; हरकत; अडचणीचें कारण. (क्रि० आणणें; ठेवणें; घालणें; येणें). ३ बिघाड (कामाचा, उद्योगाचा, मताचा). 'चार मनुष्यें काम चालविणारीं परंतु कामाची मोडकी मुख्याच्या डोकीवर येते.' ४ खंडन; मोड; वितंडा; खोटें करून दाखविणें; निरुत्तर, कुंठित करणें. (क्रि० येणें; आणणें). [मोडणें] **०कांटी-काठी**-स्त्री. १ मोडून पडलेलें कांटेरी झाड, काठी. २ (ल.) ज्या मनुष्याची सत्ता, अधिकार इ० नाहिशी झाली आहे अशा मनुष्याबद्दल उपयोग. **म्ह०** मोडकी काठी भलताच लाटी.

मोडकु(कू)ल-ळ—न. (गो.) भात मळल्यावर, तुडविल्यावर भात्याण खालींवर करण्याकरितां व निराळें काढण्याकरितां तयार केलेली, टोंकास ८-१० बोटें वाकडी असलेली काठी.

मोड जोहार—स्त्री. जोर नसलेली किंवा कमजोर भरती भांग; ऐन भर निघून गेल्यानंतरची पक्षमध्यातील भरती. [मोडणें+ जोहार (जोर शब्दापासून)]

मोडणा—स्त्री. १ शेतांतील कापणी केलेल्या धाटांचीं किंवा पिकाचीं कणसें मोडण्याची, खुडण्याची क्रिया (मळणी करण्यासाठीं); कापणी; मोडण्याची क्रिया. ' होता स्थूळ पिकाची मोडणी । होय सुक्ष्म बीजाची पुडझाडणी । ' -स्वादि १३. ५.४६. २ मार्ग; पद्धत; वागण्याची रीत; ओळ; मोड (-स्त्री.) पहा. ३ मांडणी. ४ देवाला कौल लावले म्हणजे अमकी गोष्ट करावयाची तर उजवी कळी दे, नको करूं असें म्हणावयाचें असेल तर डावी कळी (प्रसाद) दे, अशा प्रकारें कौल लावण्याची क्रिया.

मोडणें—सक्रि. १ तोडून खाली टाकणें, पाडणें; नाश करणें; बिघाड करणें, (इमारत इ०); विस्कळित करणें; भग्न करणें; नाहींसें करणें (मोडणें आणि तोडणें ह्या दोन्हीहि क्रियापदांचा हा सर्वसामान्य अर्थ आहे. तरी पण दोहोंच्या अर्थांत बराच भेद आहे. (तोडणें पहा.) तोडणें याचा अर्थ कांहीं तरी मोठें, अचानक, भयंकर कृत्य करून तीक्ष्णधारी जोरकस हत्याराचा उपयोग करून किंवा जोरानें किंवा एकदम हिसकून एखाद्या वस्तूचा नाश करणें. आणि मोडणें म्हणजे पदार्थाच्या आकारांत, स्थितींत बदल करणें. उदा० रान तोडणें आणि रान मोडणें हे दोन वाक्प्रचार घेतले तर पहिल्यांतील तोडणें याचा अर्थ रानांतील झाडें तोडून, छाटून, खांडून नाहींशी करणें व मोडणें याचा अर्थ रानांतील झाडझुडप काढून साफसफाई करणें असा अर्थ ध्वनित होतो.) जसें:-देशपद्धति मोडणें. ' त्याचें लग्न त्यानें मोडलें. ' २ तुकडे करणें; भाग किंवा अवयव वेगवेगळे करणें (यंत्राचे इ०). ३ वांकवून तुकडा करणें (कांठी, वेत, लांकूड इ०चे) खुडणें. (धान्याचीं कणसें, भुट्टे इ०). ' जादुगारानें काठी मोडलेली आम्ही पाहिली. ' ४ तोडणें; नाहींसा करणें (मंत्री, संगत, दुकानदारी, व्यवहार इ०). ५ विस्कळित होणें; विस्कट होणें; पांगापांग होणें (बाजार, मंडळी, सभा, कौन्सिल इ०ची). ' म्हैस उधळल्यामुळें सभा मोडली ' ६ खुरदा किंवा नाणें करून आणणें (मोहरा, रुपया यांचें) ' एक रुपाया मोडून नाणें, खुर्दा घेतला. 'पैसे करणें; (दागिन्याचे, धातूच्या भांड्याचें). विक्री करून पैसे घेणें (जनावरांचे, वस्तूचे). ७ भंग करणें; अडथळा करणें; बिघाड करणें (झोपेचा, शांततेचा, चालू कामाचा, उद्योगाचा इ०). ८ बिघडविणें;नाखुश करणें; अवमानणें (मन, मर्जी, इच्छा, हेतु). ' पितृसत्यपालना प्रभु कैकेयीचें न चित्त मोडून । ' -मोरामायणें १.४८४. ९ बिघाड करणें; रचना, जुळणी नाहींशी करणें; विस्कटणें (पागोटें, निऱ्या इ०). १० नाहींशी करणें; ओसाड पाडणें; (वस्ती, गांव,वसाहत). ११ खंडण करणें; पाडाव करणें (पक्ष, मत, वाद इ०चा). १२ खर्च करणें; नाश करणें; गमावणें; घालविणें; बुडविणें (वेळ, काळ, दिवस). १३ जोर हटविणें, नाहींसा करणें; शमविणें; दाबून टाकणें;

घालविणें. (तहान,भूक, काळजी,संशय, भय). १४ जिरविणें; कमी करणें; घालविणें (खोड, व्यसन, गर्व, इ०). १५ स्थिरस्थावर करणें; सांत्वन करणें; नाहींसें करणें (भांडण, झगडा, दंगा). १६ भंग करणें; अतिक्रमण करणें; उल्लंघन करणें (कायदा, हुकूम, आज्ञा, वचन,करार इ०). १७ रद्द करणें; बंद करणें; काढून टाकणें(कायदा; नियम, विधी, संस्कार, समारंभ). १८ दिवाळें काढणें;नाश करणें; मोडतोड करणें. १९ पुसून टाकणें; नाहींशी करणें; खरडून टाकणें; मागमूस दिसूं न देणें. 'गाडीची वाट फेसाटीनें मोडावी.' मोडणें हें तोडणें या क्रियापदाहून भिन्न आहेच परंतु याच अर्थासारखें भासणारें फोडणें या क्रियापदाहूनहि भिन्न आहे. फोडणें पहा. **मोडून टाकणें-काढणें**-१म्हणणें किंवा बोलणें खुंटविणें; गोंधळविणें; कुंठित करणें; निरुत्तर करणें. २ पराजित करणें; फजित करणें. 'त्याचा हा परिपाक आजि दिसतां या पंडिता मोडिलें।' -सारुह ६.६४.

मोडणें—सक्रि. उकरणें. 'जैसा न मोडिलिया विहिरा। मग आपलिया उगमीं झरा। भरोनि ठाके।' -ज्ञा १५.२६९. [सं, मुट्, मुड्=मोडणें; सं. मोटन; प्रा. मोडण; हिं. मोडन] मोडणें शब्द उत्तरपदीं येणारे कांहीं वाक्प्रचार (एखाद्याचें) मन मोडणें= त्याच्या इच्छेविरुद्ध जाणें, न ऐकणें; त्याची आज्ञा निष्फळ करणें; मर्जीच्या उलट जाणें. घर मोडणें=कुटुंबातील माणसांची पांगापांग करणें. प्रॉमिसरी नोट मोडणें=ती बाजारभावानें विकून मोबदल्याचे पैसे घेणें. दिवस मोडणें=दिवस खर्च करणें. भय मोडणें=भय घालविणें; भीति वाटेनाशी करणें. चालरीत मोडणें=चालरीत सोडणें, ती न पाळणें. मातीचें चित्र मोडणें=तें छिन्नभिन्न करणें.

मोडणें—अक्रि. १ भग्न होणें; छिन्नविच्छिन्न होणें; विस्कळित होणें. २ ऱ्हास पावणें; अपकर्ष पावणें; कमी होणें. ३ (एकादशी) निष्फळ होणें. ४ मोडून जाणें; भाराखालीं, दाबाखालीं नमणें. ५ प्रकृति खालावणें; ऱ्हास होणें. ६ ओसाड होणें; निर्जन होणें; लोकांची वस्ती नाहीशी होणें. ७ दिवाळें वाजणें; मोडतोड होणें. ८ बंद पडणें; चालूं नसणें (उद्योग, कारखाना, धंदा). ९ नांवा खालीं येणें; मध्यें अंतर्भाव होणें; जाणीव होणें; पोटांत, सदरांत येणें, अंतर्भूत होणें. 'पुणें शहरांत भांबुर्डा मोडतो' 'हिंदुस्थानांत लंका मोडते.' १० स्मृतीतून नष्ट होणें; विस्मरण पडणें (आचार, रूढी, पद्धत यांचें). ११ (अशक्तपणामुळें, अधिक श्रमामुळें) ढिले पडणें; हतबल होणें; त्राण नाहींसा होणें; कसकसणें. १२ तुटणें. **(अंग) मोडून येणें**-कसकस येणें; तापाची कसर येणें; हातपाय मोडून येतात. **मोडतें घेणें**-नाकबूल करणें; इनकार करणें; नाकारणें; माघार घेणें; मागें हटणें; पाऊल मागे घेणें. **मोडता काळ**-पु. अपकर्षाचा, मंदाईचा काळ. 'मोडत्या काळीं जो धर्म करील तो धर्मात्मा. [सं. मुट्=चूर्ण करणें: ठार करणें]

मोडती—स्त्री. १ कांहीं एक कार्य होऊं न देण्याविषयीं केलेला भाषणादि व्यापार; बंदी, मनाई; अडचण, अडथळा; अटकाव. (क्रि० घालणें). 'मी जाणार होतों परंतु त्यांनीं मोडती घातली म्हणून राहिलों.' २ मनाईची, अटकाव केल्याची, हरकत घेतलेली स्थिति. [मोडणें] **०घेणें**-थांबणें; मागें घेणें; ओढून घेणें; खेंचणें.

मोडवणें—क्रि. (प्र.) मोडावणें पहा.

मोडवांक—स्त्री. हातांत घालण्याचा स्त्रियांचा सोन्याचा, रुप्याचा एक दागिना. [मोडणें+वांक]

मोडविळी—स्त्री. भाजी इ० चिरण्याचें एक साधन; जिचें पातें उघडतां व मिटतां येतें, मोडून खालीं पाडतां येतें अशी विळी. विळी, इळी पहा.

मोडशी, मोडवशी—स्त्री. रेचक; थंडी होऊन लागलेली हगवण; अजीर्ण; अपचन. [मोडणें] **०उतरणें**-(ल.) नक्षा उतरणें. 'शिंदे यांचे फौजेस हांसत होते त्यांची मोडशी उतरली.' -भाब८१. **(एखाद्याची) ०जिरविणें**-एखाद्याची खोडकी जिरवणें; त्याला खूप चोप देणें; त्याचें पारिपत्य करणें. 'हल्लीच्या काळीं एखादा फडक्यासारखा वेडा पीर जर कांहीं गडबड करण्यास आरंभ करील तर सरकार त्याची मोडशी एका क्षणांत जिरवील.' -निबंधचंद्रिका.

मोंडळ—न. बेडकाप्रमाणें ओरडणारी, निर्विष, दुतोंडी, आखूड, जाड, रंग बांडा-तांबूस अशी सर्पाची जात. -बदलापूर ३४८. माडूळ पहा.

मोडा—पु. १ हरकत; विघ्न; अडथळा; नको म्हणणें; नकार देणें; मनाई करणें; कांहीं एक कार्य होऊं न देण्याविषयीं केलेला प्रतिबंधक व्यापार. २ अशा व्यापारानें कार्याची झालेली कुंठितावस्था; खोळंबा; हरकत केलेली, मोडता घातलेली स्थिति. 'पर्जन्यानें चार दिवस आंवजेचा मोडा केला.' ३ पाठ नसलेली खुर्ची; घोडी. ४ गुरांचा व शेतकामाचा सुटीचा दिवस. ५ (मल्लविद्या) आपल्या मानेवर जोडीदारानें हात ठेविला असतां आपल्या बाहेरच्या हातानें मानेवर ठेविलेल्या जोडीदाराच्या हाताचा पंजा धरून तो मुरगळून जोडीदारास चीत करणें. ६ घडवंची. [मोडणें] **मोडा-मोडता घालणें**-क्रि. अडथळा करणें; विघ्न आणणें; हरकत येणें. 'भोपाळावर स्वारी करण्याच्या राघोजीच्या बेतांला इंग्लिशांनीं मोडता घातला.'-विवि ८.७.१३९.· **०कुंवर**-पु. एक प्रकारचा रोग; आळस. **०खा**-पु. (कु) जेथून दोन रस्ते फुटतात तें स्थळ. **०घणी**-स्त्री. गळाठून जाणें; हतबल होणें; कमजोर होणें; अंग मोडून येणें; कसकसणें. [मोडावणें] **मोडावणें**-अक्रि. थकणें; दमणें; मोडकळीस येणें; कोसळणें-दुखणें यांमुळें ग्लानि येणें. 'मोडावला जाणो निकुंभ। उटावला वज्रनाभ। मग पाठीसि घातला सांब। मदन वीरे।' -कथा १.

१३.६३. २ वेहस्मृति नाहींशी होणें. 'राया हें बोलतां विस्मित होये। तेणेंचि मोडावला ठाये।'–ज्ञा १८.१६१३. ३ वाढ खुंटणें किंवा थांबणें. [मोडणें]

मोडावणें—अक्रि. (धान्यादिकांना) मोड येणें; अंकुर फुटणें.

मोडावळ—स्त्री. (कु.) १ मोडतोड; दुरुस्ती २ डोंगर फोडून केलेली शेतजमीन; जमीनींत डागडुजी करून तीं झाडें लावण्यासाठीं व्यवस्थित करणें; पडीक जमीन उपयोगांत आणणें. [मोडणें]

मोडिक—वि. कुत्सित. –शर.

मोडी—स्त्री. नटणें; सजणें; शृंगार. –शर.

मोडी—स्त्री. १ जलदीनें मराठी भाषा लिहिण्यासाठीं वर्ण मोडून लिहिण्याची प्रचारांत आलेली पद्धति. २ प्रकार; सरणी; पद्धत. 'त्या रजाची स्वरूपमोडी। ऐके निरवडी सांगेन।'–एभा २५.२१९. ३ मुरमाची पुटकुळी. [मोडणें] **०लिपी**–स्त्री. जलद लिहिण्याची लिपी; मोडी लिपी ही हेमाड पंडितानें उपयोगांत आणली. मोडीच्या सांप्रतच्या स्वरूपावरून ती देवनागरी(बालबोधी)चींच परंतु लिहिण्यास सोयीच्या अशा मोडणीची बनलेली असावी असें दिसतें. 'मराठी साम्राज्याच्या उदयापूर्वी तीनशें वर्षांपासुन मोडी लिपी प्रचारांत होती.' –ज्ञाको (म) २१८.

मोडी—स्त्री. (बे.) ऐंद्रजालविद्या.

मोडीव—वि. १ घडी करतां येण्याजोगा; आटोपसर आकारांत ठेवतां येण्याजोगा; ज्याचे अवयव सुटे करतां येतात आणि पुन्हां जोडतां येतात असा (पलंग, टेबल इ० वस्तु किंवा यंत्र). २ मोडतोड झाल्याकारणानें विकून टाकले पाहिजे असें; विक्री करून मोडण्याजोगें; विक्री करून किंवा बदलून घेण्याजोगें; मोडीला घालण्याजोगें (सामान, दागिने, भांडी इ०) ३ फुटकीं तुटकीं भांडीं, दागिने, इ० आटवून किंवा पुन्हां सांधून नवीन केलेलीं (भांडीं, दागिने इ०); मोडलेल्या दागिन्यांचें किंवा धातूच्या भांड्यांचें केलेलें. ४ नादुरुस्त; फुटका; मोडका (कोणताहि पदार्थ); तुकडे तुकडे झालेलें. [मोडणें] **०अडकित्ता**–पु. ज्यांचें पातें आंतील बाजूनें व बाहेरील बाजूनें मोडता किंवा वळवितां येतें असा सुपारी कातरण्याचा अडकित्ता. **०घडी**–स्त्री. घडया मोडलेली कापडाची गांठ किंवा गठ्ठा. **मोडून घेणें**–क्रि. पाडाव करणें कांबीज करणें. 'तयाचा वेहदुर्ग हा थारा। मोडूनि घेतला तो वीरा।'–ज्ञा १८.१०५२. **मोडून-मोडोनि येणें**–क्रि. झाड लवण्याइतकें, मोडण्याइतकें बहारीचें झाडास पीक, फळ येणें. 'निंब निंबोळियां मोडोनि आला। तरी तो काउळियांसीचि सुकाळु जाहला।'–ज्ञा ९.४३८.

मोडें—न. (कु.) ताप; अंगमोडून येणारा ताप. [मोडणें]

मोडया—वि. १ मोडतोड, नाश, विध्वंस किंवा नासाडी करणारा–करण्याच्या स्वभावाचा किंवा करण्याच्या प्रवृत्तीचा; अडचणी किंवा भय दाखवून, अनियमितपणें वागून योजना, प्रयत्न हाणून पाडणारा. २ अडथळा, हरकत, विघ्न आणणारा. ३ कांहीं अवयव, भाग किंवा गात्रें मोडलीं आहेत ज्यांचीं असा; (समासांत हात, पाय, बोट इ० शब्दांशी जोडून, जसें–) हातमोडया=ज्याचा हात, मोडला आहे असा (माणूस, पशु इ०)

मोढ—पु अंकुर, मुगारा. मोड पहा.

मोढा—पु. १ नदींत घुमलेला आणि पाण्यानें बहुतेक वेष्टिलेला असा जमीनीचा पट्टा. २ खोल ओढा, ओघळ किंवा ओहळ (पाणी असलेला किंवा नसलेला).

मोंढा—वि. (व) डोक्यावर मुकुट नसलेला उघडया डोक्याचा (रुपया). 'मोंढा रुपाया कोणी घेईना.'

मोत, मौत—स्त्री. (व.) १ मरण; मृत्यु. २ मोठें संकट. (क्रि० येणें). ३ स्मशानयात्रा. [सं. मृत्यु; प्रा. मत्तु; हि. पं. मौत; गुज. मोत: अर. मौत्] **कुड्याच्या मोतानें मरणें**–हाल होऊन अथवा समाजानें अवमानिलेल्या स्थितींत मरणें.

मोनड, मोथड—न खटाटोप. 'गाढव गाढवीसि धुंथड। न करी अलंकार मोथड।'–एभा १३.२२१.

मोतदार, मोतादार—पु. घोडयाला खरारा करणारा, त्याला दाणापाणी देऊन त्याचो निगा राखणारा नोकर; सईस; खासदार. [अर. मुत अहिहद्=काळजी घेणारा]

मोतरिंगणी—स्त्री रिंगणीची एक जात. [मोती+रिंगणी]

मोतसबी—स्त्री. फडणिशी; हिशेबनिशी. –थोमारो ९. १०६. मोहतसबी पहा.

मोताद—स्त्री. १ ठराविक किंवा परिमित प्रमाण किंवा परिमाण (अन्न, औषध, पैसा इ० चें); ठराविक भत्ता किंवा मिळकत. २ प्रमाण; इयत्ता; मर्यादित रक्कम. [अर. मुअताद्=ठराविक; अर. मुहताज्=दरिद्र] **मोतादि-दी, मोहोतार्जा**–स्त्री. ठरविकपणा; मर्यादितपणा; परिमितपणा.

मोताद—स्त्री. १ अगदीं तुटपुंजा पदार्थ. २ दुर्भिक्ष्य; अभाव. 'पादशाही बन्दे तुम्ही सन्निध असतां पादशाहीची ही दशा होऊन कवडीस मोहोताजी व्हावी हें अपूर्व आहे.'–दिमरा २.१२५. ३ मध्यमपणा. -मदबा २.३०. –वि. नादार; दरिद्री. प्राप्तीचा अभाव दर्शवितांना समासांत नामास जोडून योजतात. उदा० अन्नाला–वस्त्राला–खर्चाला–मोताद=अन्न, वस्त्र इ० ज्यास मिळत नाहीं असा. [अर. मुहताजी=कंगाली, गरिबी]

मोताना—पु. १ लढाईंत मरण पावलेल्यांच्या मुलाबाळांस दिलेली वेतनी –होकै १२३. २ बालपरवेष. [अर. मौत्]

मोताळा—पु गुजराथी ब्राह्मणांची एक जात किंवा त्या जातींतील एक व्यक्ति.

मोतिया—पु. १ मोगऱ्यांतील एक भेद. २ मोत्याचा रंग. **मोतीया रंग**-पु. एक प्रकारचा मोत्यासारखा रंग.

मोतिलग—वि. मोत्यें लाविलेला; मोत्यांचा हार; मोत्यांचे सर. 'तिये पदीं जे सुलीन । तेंचि जडित पदक जाण । मुक्त मोतिलग संपूर्ण । गुणेविण लेइलासे ।' –एरुस्व १.३९. **मोती-मोत-दाणा**-पु (तंजा.) हिरे व मोत्यें यांनीं जडित अशी नथ.

मोतीं—न. १ समुद्रांत शिंपीच्या पोटीं जें रत्न उत्पन्न होतें तें; मौक्तिक; मुक्ताफळ; मुक्ता; मुक्तिका. मोतीं वजन करण्यासाठीं पुढील वजनांचा उपयोग करतात.– १३॥ टक्के किंवा १६ तंडुल= १ रति. २४ रति=१ टांक. १६ बदाम=१ दोकडा. ६। दोकडे=१ टक्का; १ टाक=६२ ट्रायग्रेन. –छअं. ७१. १६ बदाम=१ दोकडा. १०० दोकडे=१ टक्का, चव. १३॥ टक्के=१ रती; २४ रती=१टांक; २६ आणे=१ रती. २४ रती=१ टाक. –मुंब्या १२०. २ वरील पदार्थासारखा कृत्रिम पदार्थ करतात तो; नकली मोतीं. ३ सोन्याच्या तारेंत मोतीं ओंवून त्याचा नाकांत घालण्यासाठीं जो दागिना करतात तो; नथ. ४ डोळ्यांतील एक विकार, विकृति. मोतीबिंदु; मोतिबिंब; पटल. (क्रि० उतरणें; पडणें). [सं. मौक्तिक; का. मुत्तु; प्रा० मोत्ता] (वाप्र.) **नाकापेक्षां मोती जड**–मोतीं हें नाकाला शोभा आणण्यासाठी असतें. मोती जड झालें तर नाक तुटण्याचा संभव असतो यावरून एखाद्या गौण वस्तूला मुख्य वस्तूपेक्षां अधिक महत्व प्राप्त होणें याअर्थी योजतात. **मोतीदाणा**-वि. मोत्याच्या दाण्यासारखा सुंदर (मनुष्य, अक्षर) 'धन्य भगवाना नेलास मोतीदाणा' –ऐपो १३८. **मोत्यांचा भांग**-पु. केसांच्या भांगांत घालावयाचा मोत्यांचा दागिना. एक तऱ्हेचा मोत्यांनीं गुंफिलेला दागिना. –तुळसीदास शाहीर यांचे पोवाडे. **मोत्यांची ओळ**–स्त्री. सुंदर वळणदार अक्षराबद्दल योजतात. **मोतशिंप-पी**–स्त्री. जींत मोतीं तयार होतो ती शिंप. **मोतिबिंदु, मोतिबिंब, मोत्याबिंदु-बिंब**–पु एक नेत्ररोग. (क्रि० उतरणें; पडणें; होणें).

मोतीचूर—पु. १ बारीक कळ्यांची बुंदी; लाडूचा एक प्रकार. २ धोतर, लुगडें इ० यास असलेला जरीचा किंवा शोभिवंत कांठ, किनार.

मोतीण—स्त्री. एक पांढऱ्या फुलांची वेल.

मोतीयाळें—न. (गो.) लहान माशांची एक जात. –मसाप ३.३.

मोतूर—पु. पाट. मोहतर–तूर पहा. 'आपल्या भावाचा... खून करून व हॅमलेटच्या आईशीं मोतूर लावून...' –गीर २९.

मोत्या—पु. १ कुत्रा. २ (ल.) लहान मुलाची बुल्ली. ३ (ल.) पिकदाणी.

मोत्याळ—स्त्री. एक प्रकारचा तांदूळ.

मोत्रा—पु. घोड्याचा एक रोग. –अश्वप २.१४०.

मोत्साव, मोत्साह—पु. महोत्सव; मोठा उत्सव; मंगल प्रसंग. [सं. महोत्सव, महोत्साह]

मोथ, मोथा—स्त्री. पु. नागरमोथा; एक सुवासिक गवत व कंद. [सं. मुस्त; प्रा. मोत्थ; हिं. पं. मोथा]

मोथळा—पु. मोदळा पहा.

मोद—पु. आनंद; आल्हाद; उल्हास. [सं. मुद्=संतोष पावणें]

मोदक– पु. एक पक्वान्नविशेष. 'तडस भरोनि येती तिडका । मोदक बहु चाग्गिले देखा । जेविता आमुचा आवांका । गलित झाला तेधवां' –ह १२.१९२. २ (ल.) मुष्टि मोदक; खापूस मार. –वि. सुखदायक; आनंददायक. [सं. मुद्=एकत्र करणें] **०विडा**–पु. एका विशिष्ट आकाराचा नागवेलीच्या पानांचा विडा; विवक्षित पद्धतीनें केलेला विडा. **मोदणें**–अक्रि. आनंदित होणें; आनंद मानणें; उल्हासित होणें. [सं. मुद्] **मोदराशि**–पु. आनंदानें भरलेला किंवा व्याप्त असा. 'सदानंद जो मोदराशि । तया भेटवी आजि दामोदराशी ।' [सं.] **मोदित**–वि. आनंदित; प्रमुदित; उल्हसित. [सं.]

मोदळा, मोधळा—पु. चिटाचें सूत उकलण्यासाठीं तें ज्या रहाटावर घालतात त्या रहाटावर खांबण्या ज्या मातीच्या गोळ्यांमध्यें उभ्या करतात, बसवितात त्या गोळ्यांपैकीं प्रत्येक. २ (सामा. मोधळा) सैल बांधलेला गवत, काटक्या इ०चा भारा; गुरांनीं खाऊन उरलेल्या कडब्याचा भारा. ३ (ल.) अगडबंब, जड, किंवा ज्याला आपलें शरीर पेलतां येत नाहीं असा माणूस, पशु, किंवा वस्तु. ४ मातीचा गोळा; ढिकला; चिखलाचा गोळा. 'कैंचा लोंवेवीण कांबळा । मातियेवीण मोदळा ।' –ज्ञा १८. ८१४. ५ गांठोडें, ओझें. 'देह नश्वरत्वें ढेंकिळा । विष्ठामूत्रांचा मोदळा ।' –एभा १०.१८९. ६ मोहाळें; धार काढण्याच्या वेळे शिवाय इतर वेळीं दूध पिऊं नये म्हणून वासराच्या तोंडावर काटे असलेलें तरट बांधतात तें. ७ मुद्गल. –अमृ ६.४९. ८ शिररहित देह. 'निरंजन तो जना वेगळा । आधार पाहतां न दिसे डोळां । अवयवहीन केवळ मोदळा । याहूनि भिन्न ।' –स्वादि ६.१.३८. [सं. मृद्+गोलक]

मोदाड—न. थोबाड.

मोदी—पु. १ मोठ्या किंवा थोर इसमाच्या पदरचा दिवाणजी किंवा कारभारी; सरकारी खाणेपिणें इ० चा सर्व सरंजाम ज्याच्या स्वाधीन असतो तो २ धान्याचा दुकानदार; सर्वसंग्रह जवळ बाळगितो असा जो वाणी त्यास म्हणतात; धान्याच्या खरेदी-विक्रीचा धंदा करणारा. [हिं. मोदी; अर. मुदाई=निधिधारक, ट्रस्टी]

मोदीखाना—पु. लष्कर, सैन्य इ० ची धान्यादि सामुग्री ठेवण्याची जागा किंवा ह्या संबंधाचें खातें; सैन्याच्या पुरवठ्याच्या वस्तू ज्यांत भरून ठेवल्या आहेत अशी इमारत. 'पदार्थ भरपूर मोदीखाना।' –ऐपो २१५.

मोधळा—मोदळा पहा.

मोधा—वि. मुग्ध; स्तब्ध. 'ज्ञान पावोनि नव्हे मोधा। स्वरूपींशुद्धा प्रबोधी।' –एभा ११.१०१६. [सं. मुग्ध्] ०**गोळा**–पु. १ गात्रांच्या क्षीणतेमुळें जो वांकला आहे आणि जो सदा जुडी करून बसतो असा परस्वाधीन झालेला रोगी किंवा म्हातारा माणूस; लंगडा, थोटा किंवा बोजड अंगाचा, मोठा, अवजड इसम; जडगोळा. [मुग्ध–मुडा+गोळा]

मोधाड—वि. जुनाट झालेला; कुजलेला; जुनाट झाल्यामुळें कमजोर झालेला.

मोधाड—न. (व.) तोंड; मुसकट. मुंडकें. 'मोधाडावर मारलें.'

मोधाडणें—अक्रि. मारणें. 'ऐसा मोधाडीन कीं याद राख.'

मोधी, मोधीखाना—मोदी, मोदीखाना पहा.

मोनई, मोनवत—स्त्री. केळीच्या पानाचा शेंडयाकडचा भाग; पानाचे जे तीन भाग करतात त्यांपैकीं शेवटचा, तिसरा भाग. आगोतली [सं. मौन; मोना=मुका]

मोनजात—स्त्री. मुकें जनावर, पशु; मुका प्राणी. [सं. मौन+म. जात]

मोनवत—(प्र.) मौनव्रत पहा.

मोनवा, मोना—पु. (कों.) १ केळीच्या खुंटाच्या किंवा ताड माड इ० च्या मध्यांतून जें नवीन (सुरळीसारखें) पान निघतें तें; सुयरा; कोंब. ह्याच अर्थी मुनवा असेंहि रूप आहे. २ केळीच्या खुंटांच्या मुळाशीं जो नवीन कोंब फुटतो तो किंवा असा कोंब तेथून काढून दुसरीकडे लाविलेला असतो तो. 'केळीचा मोना जोरांत आहे.' –वि १ मुका; न बोलणारा. २ असंतोष इ० कारणांमुळें मुद्दाम बोलत नाहीं असा; निःशब्द. ३ (कु.) बागुलबोवा. [सं. मौन] **मोनेपण**–(कों) मुकेपणा. **मोनाभक्ष्य**–न. (कु.) अंडें.

मोनें—वि. थोर.

मोप—न. (व.) १ चिखलाची, मातीची वीट; कच्ची वीट; भेंडा. २ (महानु.) पेटी; भंडार. 'उघडिलें माणिकांचें मोप।' –दाव १३७. ३ ठसा. 'सृष्टीचिये टांकसाळें। शरीराचें मोप पडिले.' –भाए २४७. [माप] **मोपाळें**–न. विटा घालण्याचा साचा; विटाळें. **मोपें**–न. मोठी कच्ची वीट.

मोप, मोपाड, मोपर, मोपार—न. (पर्वताचें, टेकडीचें पर्वताच्या रांगेचें) पुढें आलेलें टोंक किंवा शिखर; जमीनीचा चिंचोळा भाग किंवा भूशिर; तुळईचें पुढें आलेलें टोंक. किंवा इमारती लांकडाचा तुकडा.

मोप—वि. (व.) पुष्कळ; बहुत; विपुल; अमूप, ह्या शब्दांचीं अन्य रूपें– उमोप, उमाप, म्वाप अशींहि आहेत. 'गाभेवनांचें करौनि माप। मविजे परिमळाचें मोप।' –शिशु २५२. [अमूप सं. मा=मोजणें] **मोपणें**–क्रि. मोजणें. 'आयुर्दिना मृगदृशा पठियेसि मोपी।' –अकक २, विठ्ठल रसमंजरी.

मोपला, मापिला—पु. मलबारच्या मुसलमानांतील एक जात.

मोफत—वि. फुकट; विनामूल्य. [अर. माफी]

मोब—पु (बे.) रास. 'उंसाचा मोब घाला.' [का.]

मोबत, मोबद, मोहब्बत—स्त्री. १ कृपा; प्रेम; दयाळूपणा; मेहेरबानगी [अर. महब्बत्=मैत्री]

मोबदला, मोबादला, मुबादला—पु. १ एक वस्तु देऊन तीबद्दल दुसरी वस्तु घ्यावी अशा तऱ्हेचा जो व्यापार तो; अदलाबदल. 'त्या आकाराबद्दुकूम दरोबस्त अम्मल–मोबदला घ्यावा' –मराचिथोशा ५३. २ हिशोबांतील एका सदरांतून किंवा खात्यांतून दुसऱ्या सदरांत किंवा खात्यांत घालणें. ३ वसुल. –क्रिवि. एखाद्याच्या ऐवजीं किंवा बद्दल. [अर. मुबादला]

मोबलक–ख–ग—वि. पुष्कळ; विपुल. मुबलक पहा. 'त्या खालीं दोघे पादशाहांचें लस्कर मोबलग झगडीयांत पडीले.' –इमं १२.

मोबा–मोंबा—पु. मुगावर पडणारा रोग; मुगास शेंग धरण्याच्या वेळीं पाऊस जास्त पडला तर हा होतो. –कृषि १६९.

मोबार–मोबारी—न (कों.) नदी व समुद्र यांच्या संगमाजवळचें स्थान; मोठें बंदर; खाडी ओलांडण्याची जागा; खाडीचें तोंड. 'कदाचित वखारीस जागा देणें झाली तर खाडीचे मोबारी समुद्रतीरीं न द्यावी.' –मराआ २१. [अर. मअबर्]

मोम, मोम—पु. मेण. [फा. मोम] ०**जामा**–पु. मेणकापड. 'खर्च किरकोळ खाद्या व मोमजामा यांस, व हुण्डणावळ अधिक लागली.' –मदबा १.२१. ०**दील**–वि. हळुवार; मेणहृदयी. 'प्राणत्यागच केला तर नाहक दुर्निमित्य होईल यास्तव मोम्दीलही जाली.' –मदबा १.११५. ०**बत्ति**–स्त्री. मेणबत्ती. 'झाडें मोम्बत्त्यांचीं लावणें तीं पुसून लावावीं.' –पया २८६. **मोमद्या पीर**–वि. (व.) फुकटखाऊ व मिजासी.

मोमा—पु. (महानु.) मुका; चुंबन 'नमस्करीति मोमे देति।' –पूजावसर. [ध्व.]

मोमी इलै–इले, मोमिलै—वि. मशारनिल्हे. 'नरसिंगराव मोमीइले.' [अर. मूमा–इलैह्]

मोमीन—पु. मुसलमान कोष्टी; मुसलमानांतील एक जात. [अर. मूमीन=सनातनी] **मोमनाऊ, मोमनी, मोमिनी**–वि मोमीन जातीच्या विणकरी लोकांनीं तयार केलेलें, बनविलेलें.

मोमुर—पु गरम राख; फुपाटा. मुंबर पहा. 'चटणीसाठीं बांगीं उकडण्याऐवजीं आपल्या चालीप्रमाणें मोमुरांत भाजून काढलीं असतां तीं विशेष रुचिकर लागतील.'–पाश्चिमात्य पाकशास्त्र ५७९.

मोमो—पु. (गो.) स्तन.

मोयीन, मोयीनजाबता, मोयीनदार—मोईन इ० पहा.

मोर—पु न. मयूर. एक अत्यंत सुंदर पिसाऱ्याचा पक्षी. मोराच्या स्त्रीस लाडोर म्हणतात. २ (ल) मोरणी, मयुराकृति नथ; नथेचा एक प्रकार. 'नाकी तिचे अति मनोहर मोरसाजे' –सारूह ८.१३५. ३ एक मुलींचा खेळ. –मखेपु ३०४. [सं. मयूर; प्रा मोरो] **०नाचतो म्हणून लांडोरहि नाचते**–मूर्खपणाचें अनुकरण. **मोरकुंचा**–पु. मोरचेल. **मोरचल–चेल**–पुन. (काव्य) मोराच्या पिसांचा केलेला जुंबडा. हा देवाच्या मूर्तीवरून किंवा राजेलोकांवरून फिरवितात, वारितात. [हिं. मोरछल] **मोरचेला**–वि. तोंडावर देवीचे वण असलेला; देवीचे वण उमटलेल्या तोंडाचा; फोडेल तोंडाचा. [मोरचेल] **मोरपत्र, मोरपीस**–न. मोराचें पीस. 'शिरीं बांधिती मोरपत्रें विचित्रें।'–वामन, वनसुधा १.१७. **मोरविडा**–पु नागवेली पानाचा विडा. यांतील वरील पानाचा आकार मोरासारखा असतो. **मोरवीस-वीसा–विसें**–न. (महानु.) मयूरपिच्छ; मोराचें पीस; मोरपिसें; मोराच्या पिसांचा मुकुट; **मोरमुकुट** 'माथा मोरवीसा वेठी।'–दाव ७८. [सं. मयूर+पिच्छ] **मोरशिखा**–पु एक फूलझाड आणि त्याचें फूल. [मयूरशिखा] **मोरशिंग**–न. एक प्रकारची पितळेची तुतारी. **मोरशेंडा**–पु. एक फूल. **मोरा**–वि. सर्व शरीर काळें किंवा तांबडें असुन त्यावर पांढरे ठिपके असलेला (बैल, घोडा); तोंडावर चित्र विचित्र रंग असलेला 'आपला मंत्र नव्हे बरा। माझा बैल चुकला मोरा।'–तुगा ४४४०. [मोर] **मोरांगी घार**–स्त्री. घारीची एक जात. तांबूस अंग आणि वर ठिपके असलेली घार. 'किल्ल्यावरी मोरांग्यांचा उपद्रव फार ...'–पेद १८.१३. **मोराची शेंडी, मोरशेंडी** स्त्री. मोराच्या डोक्यावरील तुरा. **मोराची समई**–स्त्री. वाड्यावर झांकण असुन त्यावर मोराचें चित्र असलेली समई. **मोरा म्हातारा**–वि. वयोवृद्ध आणि शरीरावर सर्वत्र पांढरे ठिपके असलेला (इसम) **मोऱ्याची टिकली**–स्त्री. (तांबड्या रंगाच्या खोंडाच्या कपाळावर पांढऱ्या रंगाची टिकली असते त्यावरून (ल.) विद्वान अथवा शहाण्या बापाचा मुलगा मठ्ठ किंवा अडाणी असला म्हणजे त्यास म्हणतात.

मोरई—स्त्री. समुद्रांतील एक मोठा मासा. त्याची पाठ काळी असुन पोट पांढरें असतें.

मोरकी, म्होरकी—स्त्री. मोहरकी पहा.

मोरघार—स्त्री. एका पक्ष्यांचें नांव; भारद्वाज पक्षी. कावळ्याच्या आकाराचा, काळ्या रंगाचा व पिंगट, तांबूस असा पिसारा व लाल गुंजेसारखे डोळे, बारीक चोंच असलेला पक्षी.

मोरचंग—पु. चंग; मुखवाद्य; हें वाद्य दातांत धरून उजव्या हाताच्या बोटांनीं त्या तारेच्या उभ्या टोंकाशी बोटाचा आघात करून वाजवितात. 'टाळ विणे मोरचंग। वाजतात बीन मृदंग।' –प्रला २.

मोरचा, मोरवसा—पु. समुद्रांतील एका माशाचें नांव.

मोरचा, मोर्चा, मोरचा(र्चा)ल—पु १ तोफ ठेवण्यासाठीं केलेली मातीची, लांकडाची उंच रचना; धमधमा; टप्पा. २ अशा प्रकारें अनेक तोफांची केलेली मांडणी. ३ तोफांचा मारा; ४ चौकी; पहारा. ५ कोटबंदी; तटबंदी. ६ तरवार इ०वर चढतो तो जंग, कलंक. ७ आरशाचा पारा मधून मधून निघून गेल्यामुळें उघडा पडलेला आरशाचा भाग. [फा. मूर्चा, मूर्चाल्] **मोरचेबांदी–मोर्चेबंदी**–स्त्री. तटबंदी; कोटबंदीची उभारणी, रचना; त्याची ओळ, माळका. 'किल्ल्यास मोर्चेबंदी करून शहर घ्यावें.'–समारो १.१६. **मोर्चे लावणें**–तोफा डागणें. 'रघुनाथदादा यांस विषाद येऊन कुंभेरीस मोर्चे लाविले.'–भाब ३.

मोरचूत–द—पु तांबें आणि गंधक ह्यांचें पृथ्वीच्या पोटांत मिश्रण होऊन होणारा पदार्थ; एक विषारी औषधी जिन्नस. [हिं. मोरथुथिया] **मोरचुती डांख**–पु. सोनें आणि मोरचूद यांचा बसविलेला डांख.

मोरछठ—पु. तेली लोकांतील बाशिंगाचें गाठोडें नदींत टाकण्याचा समारंभ. –बदलापूर २७५.

मोरट्ट—वि. (तंजा.) घसमुसळ्या; दणकट; दांडगाई करणारा. [ता. मोरटु=खरखरीत; मोरटु=दांडखोर]

मोरणी—स्त्री. स्त्रियांचा नाकांत घालावयाचा सोन्याच्या तारेचा केलेला एक दागिना; स्त्रियांचें नाकांतील मोती म्हणून एक अलंकार. 'सोहं मोरणी, मोरणी गे साजणी। गुरुनें दिली होती गांठणी।'–भज ८९.

मोरणी—स्त्री. (कों.) विळी. [मोर]

मोरणें—क्रि. ऐकणें.

मोरंबा, मोरांबा—पु. साखरेच्या पाकांत आंब्याच्या फोडी शिजवून तयार केलेला पदार्थ. मुरंबा पहा. [अर. मुरब्बा]

मोरली–ळी—स्त्री. (कों.) विळी.

मोरव—पु चाटण. –शर. [मुरणें]

मोरवई—स्त्री. एक पसरणारा वेल.

मोरवंडी, मोरवंड—स्त्री. (व.) चुनखडीची (जमीन) –कृषि १६.

मोरवणें—सक्रि. सांत्वन करणें. 'सावध होऊनी ते मुली बैसली । गाईस मोरविली कुर्वाळोनी । ' –ब २८.

मोरवा—पु. १ पाणरहाटाच्या माळेचा मातीचा मोघा. २ (सामा.) मातीचा, धातूचा लोटा ३ घराच्या आढ्याला अथवा तिरास आधारभूत असा तुळईवर असलेला आंखूड खांब, खांबणी, कैची. ४ खांबाखालीं दिलेला तळखडा, खांबाच्या डोक्यावर दिलेला आडवा लाकडाचा ठोकळा.

मोरवें—न.(व) (शिजलेले पातळ पदार्थ) वाढण्याचें मडकें. 'कुंभाराकडून चार मोरवीं आण. '

मोरवेल—पुस्त्री. १ एक वेल. हिला येणारें फळ खाण्याच्या उपयोगी असतें. त्यास गोमटी म्हणतात. २ एक प्रकारचा फुलांचा वेल.

मोरवो—पु. (कु.) वीत दीड वीत खोल पाय जाईल इतका ज्या भातशेतांत चिखल करावा लागतो अशा शेतांत वी पेरल्यावर पाणी सुकवून परत पाणी देण्यास त्या जागेंत लहान लहान पाटांचें जाळें करतात त्यांपैकीं एक पाट. (-अव. मोरवे). [मूर]

मोरस—न. हें झुडप लहान असून जमीनीवर पसरलेलें असतें. यास बारीक भातगोट्या एवढीं पानें असून त्यांचा रंग हिरवा, तांबूस व अस्मानी असा अनेकरंगी असतो. या भाजीच्या देठावरील बारीक पानें काढून घेऊन त्यांची भाजी करतात व देठ टाकतात. ही भाजी समुद्राच्या आसपास वाढते म्हणून किंचित खारट लागते.

मोरस साखर—स्त्री. साखरेची जात; मॉरिशस बेटांत तयार झालेली साखर. [मॉरिशस]

मोरांडणें—क्रि. भरून येणें; भारावणें: गळणें. 'माझे पाय मोरांडले आहेत. '

मोरांडें—न. (महानु.) मुरलेलें हाड. 'दैत्यांचीं मोरांडीं कसकुसी. ' [मुरणें+हाड]

मोरावा, मोरावो—पु (कु.) इमारतकामांतील आढें तोलण्यासाठीं लावलेला उभा खांब; कैची; खांबोटी; खांबणी; लहानसा खांब किंवा ठेपसा; आढ्याचा धीरा.

मोरी—स्त्री. (कु.) १ एका माशाचें नांव मुंबईत या प्रकारच्या माशास मुशी असें म्हणतात. –प्राणिमो. २ पाकोळीची एक जात.

मोरी—स्त्री. १ नाहणी; स्नानगृह. सांडपाण्याकरितां बांधलेली जागा, नाली वगैरे. २ पाण्याचीं भांडीं ठेवण्यासाठीं केलेली जागा. [का. मोरवु=तळ्यांतील वाहून जाणारें अधिक पाणी; फा. मूरी] **मोरीवर जाणें**–(बायकी) लघवी करणें.

मोरुषी, मौरुषी—वि. (व.) कायमच्या हक्काची; वंशपरंपरा. 'मौरुषी हक्काची जमीन. ' [अर. मौरुशी=वंशपरंपरा]

मोरू—न. शेताच्या सांडव्याच्या ठिकाणीं असलेलें झापड, फाटक, किंवा दरवाजा [का. मोरवु]

मोर्ची—स्त्री. (कु.) मोरकी पहा.

मोर्त मारप—क्रि. (वाप्र.) (गो.) खून करणें.

मोर्तब, मोरतब—न १ संस्थानचा, सरकारचा शिक्का; राजचिन्ह. २ पत्रावर वठविलेला अनुमतिदर्शक शिक्क्याचा ठसा; छाप, चिन्ह. 'त्यानें अनेकांचे रंजन करून आपल्या प्रशंसेचे मोर्तब काळास दाखविलें ' –नि ३१. 'महालांचे बंदोबस्तास मोर्तब महालांचे चालीचे करून देणें. '–समा १७.७. [अर.मुरत्तब=तयार] **०बर्दार-बारदार**–पु. राजमुद्राधर; शिक्केमोर्तब संभाळणारा. **०सूद**–मोर्तबांत मोर्तबसुद अशीं अक्षरें कोरलेली असतात. यांचा अर्थ 'मुद्रा केली '

मोल्हांटा—पु. जनावराच्या पाठीच्या कण्याचें मानेकडचें टोंक; कांटा; दांडा. [मोहरा+कांटा]

मोल—न. १ किंमत; दर; मूल्य; द्रव्य; 'असमय मौनें तुमच्या सुज्ञपणाच्या न हानि मोलाहो ' –मोसभा ५.४६. २ बिदागी; कोणी केलेल्या कामाबद्दल त्याला दिलेली मजूरी; मजूरीचे पैसे 'मोलें घातलें रडाया। ' – तुगा.–ज्ञा १८.१६७. [सं. मूल्य=मोल] **मोल देणें**–विकणें. **मोलास तुटणें**–किंमतींत कमी होणें. 'सोन्याचें कडें घडविलें। तरी काय सोनें मोलास तुटलें ' –ह २१.२६१. **०करी, मोलारी**–पु. मजूर; कामकरी; पैसे घेऊन लोकांचीं कामें करणारा माणूस. **०करीण**–स्त्री. कुणबीण; पैसे घेऊन लोकांचीं कामें करणारी स्त्री. –गांगा १०९. **०कारू**–पु (महानु.) मोल करणारा: गिऱ्हाईक. 'कुडा होय मोलकारू ' –भाए ३८१. **०तोल**–न किंमत; मजूरी; खर्च (मोल द्रि). **०मजुरी-मजूरी**–स्त्री मजूरी घेऊन केलेलीं लोकांची कामें समुच्चयानें किंवा अशीं कामें करून मिळविलेलें द्रव्य; नोकरी; कायाकष्ट. **०वान**–वि. १ उपयुक्त; किमतीचें; महत्त्वाचें. 'इतिहासभिज्ञास तें पुस्तक फार मोलवान् होईल. ' –टिलि ४.४.१. २ गुणग्राही; किंमत करणारा. **मोला आगळा**–वि. (काव्य) योग्य किंमतीच्या बाहेर किंवा जास्त मौल्यवान्; बहुमोल; भारी किंमतीचें. 'द्रौपदीस दिधले अलंकार। मोला आगळे अपार. ' [मोल+आगळा] **मोला महागाचा**–वि. अतिशय महाग; फार किंमतीचा. [मोल+महाग] **मोलारी**–पु. सामान्यपणें मोलकरी: पुरुष मजूर **मोलारीण**–स्त्री. स्त्री मजूर: मोलकरीण; मोल मजूरीनें काम करणारी स्त्री किंवा बाई. **मोलावणें, मोलाविणें**–क्रि. १ किंमतींत वाढ होणें; किंमत काढणें. २ नुसती किंमत विचारणें; मोल–किंमत, दर लावणें, ठरविणें, करणें. 'खरेदी करण्याकरितां किंवा नुसते मोलावून अजमावण्याकरितां चाललेला जनसंमर्द. ' –हिंदु ११.२.३०.

मोलांडणें—क्रि. (व.) एका स्थितींत फार वेळ राहिल्यानें शरीरास रग लागणें. 'लिहिण्यानें पाय मोलांडून आले'

मोलीन—स्त्री. (कु.) सुतारांचें एक हत्यार.

मोव—वि. मृदु; मऊ. 'भूहून उदक मोव असे।'–दावि ६० [सं. मृदु] **मोव असा ये खणता**–(गो) मउ असेल तेथें खणणें. **मोवाण, मोंवण**–न. लोणी; मार्दव आणणारा पदार्थ. 'पहारेवाल्यास बरेच मोंवण लावलें तेव्हांच श्रीमंताचे पाय दिसले.' **मोवारी**–स्त्री. मवारी पहा. **मोवारीचें वंगण घालणें**–(ल.) ममतेनें वागविणें. 'मोवारीचें वंगण घालणारा नाहींसा झाला.' –दुर्देवी मोहरे. **मोवाळ, मोवाळी**–वि. मवाळ; मृदु. **मोवाळी**–स्त्री. लोणी. –मसाप २.४.१८५१. **मोवाळणें**–क्रि. मृदु होणें; वठणीस येणें.

मोवई—स्त्री. केळ, माड इ० च्या पोटांतून निघणारा सुयरा; कोंब; मोना.

मोवट, मोवई—स्त्री. सर्पणाच्या उपयोगी एक वृक्ष.

मोवणें—क्रि मापणें. –शर. [सं. मा]

मोवरें—न. (कु.) खाण्यायोग्य मच्छी; मासळी; हलवान; म्हावरें.

मोवला—पु. (मालवणी) काजुगर. मोगल पहा.

मोवळां—नअव. (गो.) कानांवरील केसांचीं झुलपें. **मोवळी**–(कों.) पानांची मोळी; गुंडाळी.

मोवा—पु. (व.) शेतांतील पीक, भाजीपाल्याची नासाडी करणारा एक कीटकविशेष; वेलांवर किंवा भाजीपाला व पीकावर सातींत एक प्रकारची बारीक कीड पडते ती. ही कीड फार बारीक असून ती सर्व झाड व्यापते.

मोवागी, मोवागीत, मोवारी–स्त्री. मवागी व 'मवागीत' पहा मंद मंद असा जाळ. **मोवा ज्वर**–पु. तापाची एक जात, प्रकार; यास प्रायः जीर्णज्वर म्हणतात. 'मोवाज्वर आणि संताप। या नांव आध्यात्मिक।' –दा ३ ६ ३४.

मोवार—पु. (गो.) गोंव्यांत नदीच्या लगत राहणारा शुभ्र पांढऱ्या रंगाचा एक पक्षी. सह्याद्रीच्या पायथ्याशीं ३०६.

मोवाळ—न. वासराला धारेच्या वेळेशिवाय इतर वेळीं पिता येऊं नये म्हणून त्याच्या तोंडाला घालतात तें जाळें; मुसकें. [मुख]

मोस, मोसु—पु. १ (महानु.) मार्ग; पत्ता; मूस; शोध; सुगावा; माग (क्रि० लागणें; काढणें; लागणें) 'तो मोसु श्रीचरण पंकजां जवळि दीसे।' –ऋ ६.५५१. 'जीविताचा मोसु घेऊनि कैसेनि जाता।' –भाए १२०. २ कुंपणाला लावण्यासाठीं झाडाच्या तोडलेल्या लहान लहान फांद्या.

मोसबा—पु. १ हिशोब; हिशोबपत्रक; खर्चाच्या हिशोबाचें टिपण. २ मुक्ततेची किंवा सुटका झालेली स्थिति; सुटणूक; मोकळीक. ३ पराक्रम (निंदार्थी). [अर. मुहासबा] **मोसबा फारक-ख-ग**–वि. हिशोब पुरा झालेला; ज्याचे हिशोब झाले आहेत असा. **मोसबेकरी**–पु. हिशोब तपासणारा. 'त्यास माल मजकुरी वीस पंचवीस कारकून चांगले लिहिणार मोसबेकरी.' –समा २.१९६. **मोसबेदार**–पु. फडणीस; हिशेबनीस.

मोसंबी—स्त्री. नारिंगाच्या जातीचें एक फळ. मोझांबिक मधून प्रथम आलें यावरून. [मोझांबिक] **मोसमी धाडप**–(वाप्र.) (गो.) काळथा पाण्यावर पाठविणें; (गोव्यांतील कैदी मोझांबिकला पाठवितात यावरून मोझांबिक–मोसमी).

मोसम—पुन. कांहीं गोष्टींचा योग्य, अनुरूप काळ, समय, ऋतु; सुगी; हंगाम. –कृषि ६८६. [अर. मौसिम] **मोसमी**–वि. कांहीं काळपर्यंत टिकणारा; हंगामी.

मोसवो—पु. (कु.) शेत, जमीन जाळल्यानंतरची राख.

मोस्तार—न. (कु.) महिना.

मोह—पुस्त्री. चेहरा; हजामत. –बदलापूर ३७.१०५. [मुख]

मोह-हो—पु. एक वृक्ष; याच्या फुलांपासुन दारू काढतात. [सं. मधु, मधुक; प्रा. महु; उरि. बं. महु] **मोहटेल-टेल**–न. मोहटीपासुन, मोहाच्या बियांपासुन काढलेलें तेल; मोहाळ. [मोहटी+तेल]

मोह—पु. १ मूर्च्छा; बेशुद्धि; चित्तभ्रम; भुरळ; भारणी; मोहन; भुलावण; भूल. २प्रेम; माया, दया, कींव, सहानुभूति इ० ना चेतविणाऱ्या विषयांचा क्षुब्ध लोभ; मोहन. 'द्रोणाला दुःशासन कथितां वे भीष्म हानि मोहातें।' –मोभीष्म ११.१३२. ३ सदसद्विवेकबुद्धीचा, जाणिवेचा लोप; विस्मरण; घोटाळा; मतिभ्रम; भुलवण. 'निजदोषें व्यसनातें पावुनि मोहीं निमग्न नससी कीं।' –मोकर्ण १.६. ४ अज्ञान; मूर्खपणा; आत्मज्ञानाचा अभाव असल्या मुळें जगांतील सर्व विषय, सर्व दृश्य जगत खरें आहे असा भास होऊन त्याचा उपभोग व वैषयिक सुख घेण्याकडे प्रवृत्ति होणें. ५ आवड; शोक; प्रीति; प्रेमाचें वेड; प्रेमाचा अतिरेक. 'परिभूपपुत्र मोहें केला पहिल्या परीस ही अंध।' –मोरोपंत. ६ चूक. [सं. मुह्] **मोहक**–वि. १ भुरळ पाडणारें; भ्रम उत्पन्न करणारें; गुंतविणारें; गुंगविणारें. २ आकर्षक; रमविणारें; चित्त हरण करणारें. [सं.] **०पाश**–पु मोहरूप जो पाश तो; संसाराचें जाळें; भ्रामक विषयांचें बंधन. मोहजाल पहा. **०यंत्र**–न. नळा (शोभेच्या दारूचा); फुलबाजी. 'मोहयंत्री सुमनमाला। अग्निपुष्पें भासती डोळा। फुलें म्हणती अबळा। पाहता डोळां ते राखा।'–एरुस्व १५.११८. **मोहा, मोहाचा**–वि. मोहक किंवा उत्कृष्ट गुणाचा–(एक प्रका-

रच्या नारळाबद्दल किंवा सुपारीबद्दल उपयोग). **मोहाचा नारळ नारळी-माड-सुपारी**–पुस्त्री. ज्यांची गोडी इतर नारळ, सुपारीपेक्षां अधिक असते तो नारळ, सुपारी इ०. या नारळाचें खोबरें गोड असुन तें खाल्ल्यावर चोथा रहात नाहीं; सुपारीहि गोड असते. –कृषि ७०३. **मोहाथिणें**–क्रि (काव्य) मोहनी पाडणें; भुरळ किंवा भुलवण पडणें; भुलून जाणें; मोहीत होणें. 'अवश्य म्हणोनि तीर्थेश्वरी मोहाथिली अनुवादे।' **मोहाळणें**–क्रि. मोह पावणें. **मोहित**–वि. मोह पावलेला; भुलेलेला; भुरळ पडलेला; मोहानें व्याप्त असा; लुब्ध. **मोहरात्रि**–स्त्री. श्रावण वद्य अष्टमी. (या रात्रीं कृष्णानें कंसदूतास मोह पाडला यावरून). **मोहजाल-जाळ**–न. मायेच्या योगानें संसारांत उत्पन्न होणारा मोहाचा पाश; संसाराचें, जगांतील पसाऱ्याचें जाळें; कुटुंब, इष्टमित्र, मालमत्ता व इतर भ्रामक विषय यांची भूल, भुरळ. 'तां घेतले ये मज मोहजाळीं।' –सारुह १.१९. **मोहणें**–उक्रि. भुलणें; भुलावणें; वश करून घेणें; वश होणें; मोह पडेल असें करणें; भारणें; व्यामोह उत्पन्न होणें, करणें; भुलविणें; भुलणें; चित्त भ्रमणें, भ्रमविणें. 'मन मोहिलें नंदाच्या नंदनें।' **मोहन**–वि. १ मोहविणारें; आकर्षक. २ भुलविणारें; भूल पाडणारें; भ्रामक. 'एक म्हणे कुब्जेनें लाविला चंदन। त्यांत कांहीं घातलें मोहन। तरीच भुलला जगज्जीवन। कौटिल्य पूर्ण केलें तिनें।' –ह २१.१७७. –न. १ (वैद्यक) गुंगी आणणें; भूल देणें; बेहोष पाडणें. –ज्ञा १३.९९५. २ भुरळ मूर्च्छा; भ्रम. गुंगी, निद्रा आणणारें औषध. **मोहनभूत**–न. एक प्रकारचें भूत, पिशाच. **मोहनमाळ-माला**–स्त्री. मोन्याच्या मण्यांची गळ्यांत घालावयाची एक विशिष्ट माळ. **मोहनास्त्र** न. एखाद्या इसमावर मोहनी टाकण्याचें अस्त्र; जें शत्रूवर सोडलें असतां त्याला मूर्च्छा येते असें एक अस्त्र. **मोह(हि)नी**–स्त्री. १ भूल; भुलावण; मोहन. २ मोह घालण्याचीं कृत्यें; वश करण्याचीं किंवा भूल घालण्याचीं, भुलविण्याचीं कृत्यें (क्रि० घालणें). एखाद्यास भुलविण्याकरितां उपयोगांत आणण्याचे मंत्र. ३ विष्णूनें अमृतमंथनाच्या वेळीं घेतलेलें सुंदर स्त्रीचें रूप. [सं. मुह् = बेशुद्ध होणें] **मोहिनी**–स्त्री. १ मोहन; प्रलोभन; भुलवण; भुरळणें; चित्तभ्रम; बुद्धिभ्रम; मोह करणारी. २ समुद्रमंथनप्रसंगीं भगवंतानीं जें मोहिनीचें रूप घेतलें होतें तें; भुरळ पाडणारी. 'कथा भुवन मोहिनी अशि न मोहिनी होय ती।' –केका १०३. [सं. मुह्] **मोहिरें**–न. (महानु.) मोहक वस्तु; मोहविणारें 'तो दाउनि माया वेषाचें मोहिरें। जेथ चरित्रें करी' –ऋ ४२.

मोहकम—वि. भक्कम; दृढ; बळकट; मजबूत. 'हा करार राजे याजकडूनच बहाल व मोहकम जहाला.' –पया ४०३. [अर. मुहकम]

मोहकूब-कुब—क्रिवि. (व) तहकूब; बंद. 'दिलेला परव ना मोहकूब करणें' –बडोदेअ ४.१६४. [अर.मवकुफ, मौकुफ]

मोहगम–वि. मोघम पहा.

मोहचळ—वि. १ गरम; कोंबट (पाणी, इतर द्रव पदार्थ). २ मचूळ. **मोहचूळ, मोहचळें**–वि. घोटभर; चूळभर; थोडेसे. 'तुज अभिषेक होणें जेणें जळें। ऐसें हें मोहचळें तरी वेई।' –मध्व ५८३.

मोहछाव—पु. महोत्सव. 'भक्तवत्सल भेटला। मोहछाव वाटला।' –मध्व ३०६.

मोहजवा, मोहजबेदार—पु (प्र.)मोसबा व मोसबेदार पहा.

मोहटळ—न. गुरांना चरण्याचें कुरण: सार्वजनिक गुराढोरांचें चराऊ रान; गायरान.

मोहटी—स्त्री मोहाच्या झाडाचें फळ.

मोहटी—स्त्री. १ छपराचें अग्र. २कठडा नसलेला घराचा गॅलरी वजा लहानसा भाग;ओसरीचें छप्पर. 'हाटक मंडप मोहटया रत्नदीप।' –दावि ४७४. 'खांब उथाळी मोहटया सोनें।' –अमृत ३६. **मोहटीचें पान**–न वाश्यांचीं टोकें दिसूं नयेत म्हणून छपराच्या अखेरीस मारलेली नक्षीदार फळी वगैरे; पानपट्टी.

मोहडा—पु. मोहोरा;मुख्य;म्होरक्या. 'हातींचिआं मोहडा। सिंहो करी रगडा।' –शिशु ४८६. **मोहडा चांदाचा**–पु. घोड्याच्या तोंडावरील भूषण. [मुख–मुह–मोह–मोहड]

मोहतर, मोहतूर, मोहतीर—पु १ मुहूर्त; अठ्ठेचाळीस मिनिटांचा काल, वेळ. २ (ल). योग्य काल; शुभकाल,ऋतु, क्षण. ३ शूद्र स्त्रीचें, पुरुषाचें दुसरें लग्न, विधवाविवाह; पाट पहा. (क्रि० लावणें; लागणें). [मुहूर्त]

मोहतरफा-तर्फी—पु खेड्यांतील दुकानदार व कारागीर यांच्यावरील कर; गवंडी, सुतार इ०कांस त्यांच्या कसबासंबंधीं सरकारास जो कर द्यावा लागतो तो. 'पांढरी हक्कांना मोहतरफा म्हणतात.'–गांगा. 'ढवळ्या निसबत मोहतरफा.' –समा ४ ८३[फा. मुहतरिफा] **मोहतरफी**–वि. मोहतर्फा ज्या कुळास द्यावा लागतो तीं कुळें, तो इसम.

मोहतसदी-मोहतसबी—स्त्री. वजनमापांची तपासनिशी. –थोमारो २३.६. **मोहतसीब**–पु. निषिद्ध कर्माची चौकशी आणि निवाडा करणारा; धर्मशास्त्री; पंडितराव. यांचीं कामें:– 'कज्जे तोडणें व मामलेफैसला करणें, ज्या बायकोस आईबाप वगैरे कोणी नसेल तिचा मोहतूर लावणें व मेलेल्या मनुष्याच्या मालाची धर्माप्रमाणें वांटणी करणें व चक्बन्दी व शराचे कागद ठेवीत जाणें.' –बाडसनदा ७७.७९. [अर. मुहतसिब्]

मोहतोपदर—पु. मशालजी. 'एमाजी गुंजाल मोहतोपदार.' –बाडबाबा १.१६. [फा. महताबदार्]

मोहदाद—वि. माफक.

मोहन—वि. मोवन पहा. कणीक किंवा कोणतेंहि पीठ मळ तांना त्यास मऊपणा आणण्यासाठीं त्यांत घातलेलें तूप, तेल.

मोहन—न. (व.) (प्र.) मौन. स्तब्धता; स्थिरता; शांतता; गुपचुपपणा; निःशब्दता. 'काय सेवूं नव शीत उष्ण तहान। साहो कीं मोहन धरुनी बैसों।' –तुगा १११८ [मौन]

मोहन—न. गूळ, खोबरें आणि वेलची वगैरे एकत्र करून ज्या करंज्या, मोदक इ० करतात त्यांत घालतात तें पुरण, चुकीनें तेल. मोवन, तूप. [मोवन]

मोहन जाबता—न. सरकारी सर्व धर्मदायाचा नामनिशीवार तक्ता किंवा यादी.

मोहन भोग—पु. १ (व.) तांदुळाची एक जात. २ आंब्याचा रस आटवून करतात तें एक खाद्यविशेष. ३ गव्हांचा शिरा.

मोहबत-द—स्त्री. प्रेम; कृपा; मेहेरबानी; भीड; मुरवत. 'धर्माची प्रीत नव्हे पाक मोहबत सत्ता सारखी।' –सला ३५. [अर. महब्बत्]

मोहमदी-मुदी—स्त्री. कापसाचें वस्त्र किंवा कापड; सुती कापड; उंची सुती वस्त्र. [अर. महामुदी]

मोहर, मोहोर—स्त्री. १ एक सोन्याचें नाणें. २ शिक्का. ३ आपल्या नांवाचा अक्षरांकित ठसा. ४ रुपया, पैसा, नाणें इ० वर जें चिन्ह किंवा खूण असते ती आकृति. ५ कांहीं पदार्थावर खुणेकरितां केलेलें चिन्ह. [फा. मुहर] **मोहरकन्द**–पु. मोहरेवर ठसा मारणारा; मोहरेचा शिक्का ठसा खोदणारा. [फा. खोदणें] **०बन्द**–वि. मोहर किंवा शिक्का मारून बंद केलेले. पक्कें बंद; वर मोहोर केलेलें; बन्द करून लखोटा केले गेलेलें. **मोहरी**–वि. १ सही–शिकेदार. 'मोहरी दस्तऐवज' –रा ७.३५. २ मोहोर केलेलें; सही शिक्क्यानिशीं. **मोहरंदार, मोहोरंदार**–वि. तुळतुळीत; घोटीव; गुळगुळीत; चकचकित व उजळ; उजळपाजळ; तुळतुळीत; नितळ [फा. मुहरा+दार]

मोहर, मोहोर—पु आंब्यास येणाऱ्या फुलांचा गुच्छ; मुपका; आम्रवृक्षमंजरी. [सं मुख] **मोहरणें**–अक्रि. १ केसरणें; कळ्यांचें तुरे येणें; मोहर येणें (आंब्याला व अशाच तऱ्हेच्या इतर झाडाला. २ (शेत, धान्य इ०) परिपक्व दशेस येणें; पूर्णपणें पक्व होणें. ३ (लोणी, उंसाचा रस, तूप, यांची) कढविण्याची क्रिया पूर्ण होणें. ४ (गुरें, ढोरें, मेंढरें इ० नीं) कळपाच्या पुढें चालत असणें. ५ पुढें असणें किंवा जाणें; पुढारणें; पुढें होणें; मार्गांत प्रगति करून घेणें. ६ (चंद्र) उगवण्याच्या बेतांत असणें; वर येणें; उगवणें; उदय पावणें; उदयास येणें; क्षितिजावर येणें. चंद्रोदय जवळ येऊन ठेपलेला असणें. **मोहुरणें**–क्रि. फुलणें; केसरणें–(आंबा आणि अशाच सारखीं इतर झाडें).

मोहोरवणें–क्रि. प्रफुल्लित करणें; आनंदित करणें. 'वाचिता हरिस मोहरवी हा।' –किंगवि ७. **मोहुर**–मोहरलेली स्थिति; फुललेली किंवा केसरलेली अवस्था–(आंब्याची व इतर झाडाची). [मोहर]

मोहर—स्त्री. १ अग्रभाग; पुढचा भाग; पुढची जागा. २ पुढील फौजेचें तोंड; पुढें असलेले किंवा गेलेले लोक; विनी; अघाडीची फौज; पुढील तुकडी. 'मागें दुरावला श्रीधर। पुढें गेली गाईंची मोहर।' –ह १४.२६. ३ अग्रभागीची निषाणी, खूण, चिन्ह; ध्वज. 'तंव बाणाचे वहनासमोर। तो चालिला गरुडमोहर। गरुडें करूनि जर्जर। पडिला तो।' –कथा १.७. ४ बोलणें चालणें, कांहीं काम करणें इ० ची परिपाठी. ५ गमनाची दिशा; गंतव्यस्थान (क्रि० धरणें). मार्ग; रस्ता- ज्ञा ३.१७१. ६ बाजू. 'ईश्वराची मोहर धरी' –महानु ९० ७ प्रकार. 'आणि एकसरें आहारा। कैसेनि तिनि मोहरा। जालिया तेहावीरा। रोकडे दाऊं' –ज्ञा १७.१२० [सं. मुख; प्रा. मुह] **मोहर धरणें**–अघाडीस जाणें; पुढारीपण घेणें; पुढें निघणें; अघाडीला जाणें. 'ऐसें म्हणोनी तस्कर। गांवाकडे धरिली मोहर।' **मोहरकाडा**–पु. अग्रेसर. **मोहरकाड्या, म्होरक्या, मोहरकडा-डी, मोहरपी-प्या**–वि. पुढाकार घेणारा; पुढें होणारा; (कोणत्याहि मंडळाचा, सभेचा–संघाचा) मुख्य इसम किंवा पुढारी; समारंभाचा चालक; मालक. **मोहरकी-मोहोरकी**–स्त्री. (व.) (बैलाच्या किंवा घोडयाच्या वगैरे तोंडाभोवतालून मानेवरून दुहेरी किंवा तिहेरी विळखे घेऊन बांधलेले) कातडयाचें किंवा दोरीचें बंधन, घोडयाचें तोंडास बांधलेली पट्टी; बैलाच्या तोंडास बांधलेली जाळी. **मोहरकी गांठ**–स्त्री. मोहरकी तयार करण्याची शेतकरी लोकांना अवगत असलेली गांठ. **मोहरचा-ला**–वि. १ पुढचा–ला; अघाडीचा; पुढें जाणारा (कालामध्यें, किंवा जागेवर) २ भविष्य काळाचा. [मोहर] **मोहरणें**–क्रि. मिरवणें; मोर्चा वळविणें 'नाना पुनिवेचे अंधारें। दिहा भेणें रातीं मोहरें' –अमृ ७.४०. **मोहरणें**–अक्रि. पुढें होणें; वळणें; फिरणें. १ –सक्रि. वाजविणें (पोवा, मोहरी) २ गोंजारणें. –तुगा २१३०. ३ मन आकर्षणें; मोहून टाकणें. 'गोपी स्त्रियांचें मन मोहरी हा' –नदा ५२. **मोहरप**–पुढला; वडील. 'रामचंद्र पाटील निमे मोकदम मोहरप.' **मोहरा**–पु. बुद्धिबळाच्या खेळांत राजा व प्यादा खेरीज बाकीचीं बुद्धिबळें प्रत्येक. (यावरून) २ नेता; मुख्य; पुढारी. ३ मृदंग वाजविण्याचा एक प्रकार. ४ चेहरा; मुद्रा; तोंडावळा; मुख; तोंड; चेहेरेपट्टी; मुखाची रूपरेषा. ५ देखणा; पराक्रमी किंवा साधनसंपन्न असा इसम; ज्याचा चेहरा दिसण्यांत सुंदर आणि इभ्रतदार आहे असा मनुष्य. ६ कोणीहि कोणत्याहि गुणानें उत्कृष्ट असा मनुष्य. ७ कागद, दागिना, सोनें, चांदी, इ० चें पात्र गुळगुळीत व चकचकीत करण्यासाठीं घोटावयाचा

मणि किंवा दगड; अशा घोटण्यानें आलेली चकाकी, तजेला, गुळगुळीतपणा. ८ सर्पाच्या डोक्यांतील कल्पित मणि. हा विषाला मारक आहे असें म्हणतात. –केका ८४. ९ आघाडी; अग्रभाग; पुढील भाग; पुढची किंवा अघाडीची जागा; बिनी; फौजेचा पुढचा भाग. १० कोऱ्या कागदामधील शिक्का किंवा आकृती. [मुखर] **मोहोरा इरेस पडणें**–क्रि. अभिमानीं गुंतणें; अब्रूखातर कोणतें एक कृत्य नेटानें करणें. 'असें संकट प्राप्त झालें. मोहरा इरेस पडला. आंतून कोणी सलाहास येईनात.' –भाव ३. **मोहोरा माघारी फिरविणें**–आघाडी मागें फिरविणें; तोंड फिरविणें. **मोहरा**–क्रिवि. सामोरा; आघाडी; बाजूला; पुढें; समोर; नीट. 'मग निकट दक्षिणेच्या मोहरा। आले कऱ्हाड सोलापुरा। मार्गी भेटले महावीरा । परशुरामासी।' –कथा २.२.८६. **मोहरी**–वि पुढचा; अग्रभागचा; पुढील अघाडीचा. **मोहरून**–क्रिवि. (बा.) समोरून; पुढून; पुढील; समोरील; समोरच्या जागेपासून. **मोहरें**–न. १ तोंड; चेहरा. २ राजा खेरीज करून मुख्य आठ बुद्धिबळापैकीं कोणतेंहि एक बुद्धिबळ; बुद्धिबळांतील प्यादीं व राजा याशिवायचीं बुद्धीबळें. ३ तोंडानें वाजवावयाचें एक वाद्य. 'शृंगें काहळया रणमोहरीं।' –मुआदि २३.११९. –क्रिवि. १ पुढें; च्या समोर, पुढें, अघाडीस. २ ठराविक वेळेच्या पुढील काळात किंवा दिवसांत. [फा. मुहरा; सं. मुख; प्रा. मुह; हिं. मुंह; सिं. मुहु; गु. मोहो] **रणमोहरें**–रणवाद्य. **मोहरें घालणें**–गोंजारणें. –शर. **मोहिरा**–पु. अग्रभाग. **मोहिरें**–न. सन्मुखता. 'परतले अवियेचें मोहिरें' –अमृ २.१४. मोहाडे पहा.

मोहरम—पु. १ अरबी वर्षाचा पहिला महिना. २ तावूताचा सण. [अर. मुहर्रम्]

मोहरम—पु. पराभव; धुव्वा. पराभूत; नामोहरम; [अर. महरूम्]

मोहरी—स्त्री. फोडणींत घालतात ती वाटोळया आकाराची करडया रंगाची राई; मोहरीचें झाड हातभर उंच वाढतें. मोहरीच्या महत्त्वाच्या–दोन जाती (१) शिरसु–यापासून कडवें तेल काढतात. (२) राई हो शरीर विलेपनाकरितां उपयोगांत आणतात. **मोहरी इतका जीव**–(दुखण्यामुळें) जीव मोहोरीच्या आकाराप्रमाणें किंवा राईप्रमाणें अगदी लहान होणें. **मोहरवणी**–न. तोंडी लावण्यासाठीं आंब्याच्या कैऱ्यांच्या फोडी, हिंग, मोहोऱ्या, मीठ इ० चें मिश्रण केलेलें असतें तें; लोणचें वगैरे प्रमाणें याचा उपयोग करतात. [मोहरी+पाणी] **मोहरीफेस**–(व.) मोहऱ्यांचें बारीक भुरका पाणी टाकून फेणवून साल काढून अंब्याच्या बारीक फोडी त्यांत घालून केलेलें एक प्रकारचें लोणचें.

मोहरी—स्त्री. तोडानें वाजवावयाचें एक वाद्य; पुंगी. 'टाळ मृदंग मोहरिया। पावे शृंगें घुमरिया।' –ह १०.१४०. 'जैसे मोहरी वाजतां ऐकूनि कानीं' –भवि १६. [मुख]

मोहरी—स्त्री. पाणी वाहून नेण्याकरितां केलेला लहान पाट. स्नान वगैरे कामासाठीं केलेली चुनेगच्ची मोरी. तोफेचा मणी किंवा डोळा. चुन्याच्या भट्टीचें भोंक. [मोरी]

मोहरीर–ल—पु. लेखक;देशपांडयाचा गुमास्ता; सार्वजनिक अधिकारी; देशपांडयाचा मदतनीस. [अर. मुहर्रिर] **मोहरिरी**–स्त्री मोहरीराचा उद्योग पगार किंवा वतन; मोहरीरांचें कर्तव्य, अधिकार किंवा पगार.

मोहर्क—स्त्री. (व) मोहरकी पहा. –वशाप ५२.

मोहल्ला—पु. १ व्यूह; चढाई; मोर्चा. 'फौजेचा मोहल्ला करून मोंगलाचे गोटावर चालले.' –खरे २०९६. २ शहराचा भाग; गल्ली. [अर. महल्ला]

मोहसबा, मोहसबेदार—पु. मोसबा, मोसबेदार पहा. 'मोहसबा इहलोक व परलोक विषयीं घेत जावा.' –सानेपयाव ४३७.

मोहसल्ली—पु. महसूल करणारा शिपाई; महसुलाबद्दल तगादा करणारा शिपाई. –गांगा ५८. [अर. मुहस्सिल]

मोहळ–ळें, मोहाळा, मोहळा—नपु. वासराला मातेचें दूध पिता येऊं नये म्हणून त्याच्या तोंडाला बांधलेलें मुसकें किंवा मुखबंधन. [मुख] **मोहळी**–स्त्री. घोडयाचा लगाम: मोहोरकी; मोहरकी. 'घोडिया बाणली मोहाळी। कंगणटोप रागावळी। पाखरा झळकती तेजाळी। आरसे तळीं लाविले।' **मोहाळें**–न. बैलांसाठीं (डोळयाचा भाग उघडा ठेवून) तरटाचें शोभीवन्त बनविलेले झापड किंवा झांकण; सकलादीचें आच्छादन. 'झडपीती वारुवांचे मोहाळे' –उषा १७२३. [मुख+आलि=मुहाळ]

मोहळ, मोहाळ, मोहोळ, मोहोळें—न. मधमाशींचें पोळें किंवा टाळें (पोळी व मध्याचा कांदा मिळून सर्व भाग); मधाचें पोळें. **०वर बसणें**–चरकणें; धाबरणें.

मोहळ—न. मोहाळे पहा.

मोहळें, मोहोळ—न. मधमाशांचें पोळें; मधाचें पोळें.

मोहाड—न. चेहरा; तोंड. 'दिग्गजा चिआं मोहाडा। जरि आनंदाचिआ होंति दोनि सोंडा' –शिशु ४००. [मुख]

मोहाळ—वि. व्यर्थ; निरुपयोगी. 'नातरी वांझ स्त्री मोहाळ। काय कीजे तिचा उदरगोळा। कीं अपत्यावीण किडाळ । न फिटे तयेचें।' –कथा ७ १ १२.

मोहिम, मोहीम - स्त्री. १ महत्त्वाचें कार्य; अंगीकृतकार्य. 'मोहिमेचे (कामाचे) दिवस होते, याजकरितां नबाबांकडून जाबास चार दिवस लागले.' –रा ७. –खलप १.१०५. २ कांहीं देश जिंकण्यासाठीं राजेलोक वगैरे जी स्वारी करतात ती; सैन्याची चाल; मुलुखगिरी; (सैन्याची) सफर. 'मुख्य शहर दक्षिणेवरती मोहीम झाली.'–ऐपो २३०. मराठींत फक्त लढाईच्या

कामीं मोहीम शब्द वापरतात. ३ (ल.) गोसावी लोकांची सफर; पर्यटन, फेरफटका. **०शीर**–वि. १ वारंवार स्वाऱ्या करणारा. २ मोहीमेंत गर्क; मोहीमेवर, स्वारीवर असलेला. 'हरीपंत-तात्या व होळकर वगैर सरदार मोहीमशीर आहेत.' –ख ८. ४११९. **मोहिमी**–मोहिमेसंबंधीं; मोहिमेचा. 'धोंडोपंत गोखले यांस मोहिमी वस्त्रें देऊन...' –मदरु २.४ [हिं]

मोहिरें—न. साहित्य; सामग्री.

मोहीब—पु. स्नेही; आपण; पत्रांत तुम्ही या अर्थी योजावयाचा शब्द. 'येथील खैर-सल्ला जाणून मोहिब्बी आपली खैर सल्ला हर्वक्त कलमी मर्कूम' –रा१५.२५३. –ब्रप२३४. [अर.मौहिब= देणगी] **मोहीबान-पन्हा**–पु.स्नेह्यांचा आश्रयदाता. –रा३.७१.

मोहो—पुन. मोह अपभ्रंश; मोह पहा. मधुभक्षिका मधु संचयार्थ जे पोळें करीत असतात तें. **०माशी**–स्त्री. एक प्रकारची मधमाशी. ही मोहो तयार करते.

मोहोटी, मोहोटेल, मोहोणें, मोहोतरफा, मोहोतूर, मोहोती, मोहोबद, मोहोर, मोहोरकी, मोहोरणें, मोहोळ, मोहोळें—मोहटी, मोहटेल इ० पहा.

मोहोटें—न. (व.) मोहटी पहा.

मोहोडें—न. बैलाच्या तोंडावरील दागिना. मोहाडे पहा.

मोहोतीर—पु. (व.) गंधर्व. मोहतर पहा. –वशाप ५२.१

मोहोत्साव—पु. महोत्सव पहा. 'तिथी पर्व मोहोत्साव। तेथें ज्यांचा अंतर्भाव।' –दा २.७.३१.

मोहोबत—स्त्री. प्रेम. मोहबत पहा 'भट करी बटकिशीं मोहबत।' –अफला ६९.

मोहोरें—क्रिवि. पुढें. 'तोंडें काढूनी येरी मोहोरें।' –उषा १६९९.

मोहोळ—स्त्री. अस्तनीचें मनगटाकडील तोंड अथवा विजारीचा घोटयाकडील भाग. 'नेफा मोहोळ प्रथम तयार करा.' –शिकशि २.२९. **मोहोळी**–स्त्री. तोंड. 'पाटथर दगडास मोहोळी असते.' [मुख]

मोहोळ—न. (कु.) पर्वताचें खोरें. [सं. मौलि किंवा मलय]

मोळ—पु. १ छपराची तिकोनी बाजू किंवा उतार. २ वळचणीच्या बाजूचा छपराचा पुढें आलेला भाग. ३ डोकें. 'कर्पूर कर्दळी असती सुफळ। भारे लवोनि स्पर्शती भूतळ। जैसा लवे सज्जानाचा मोळ। गुणधन वैभवें करूनी।' –जै ३.७१. –न. लहान मुलांच्या पोटरीवर होतो तो एक रोग [सं. मौलि=शिर]

मोळ—न. १ एक प्रकारच्या गवतांचें नांव; एक प्रकारचें निर्गंध गवत. ज्याच्या केरसुण्या, कुंचे करतात तें गवत: २ –पुन. पीठ वगैर गोळा करण्याचा एक प्रकारच्या राठ गवताचा कुंचा. ३ कानांतील मळ. [सं. मृदुल=मऊ]

मोळका—पु. (बे.) कोंब. [सं. मौलि]

मोळसूद—न (गो.) मळसुद; मळसुत्र पहा.

मोळा—पु. १ वळण; रीत; पद्धत; परिपाठी; वर्तनाची सरणी; चालरीत; वागणुकीची रूपरेषा. 'लहानपणीं मुलास जसा मोळा लाविला तसा लागतो.' 'त्या मुलाला मोळा नाहीं.' मराठमोळा. २ रूढ झालेली पद्धत; रूढी; प्रघात; संवय; चालरीत; पद्धति. 'जळो जळो वोंगळ हा। हा तुमचा मोळा।' –मध्व१२७. 'ऐसा विपरीत आहे मोळा। जाणा येथीचा जी गोपाळा।' –निगा २४५. [सं. मूल–मौलिक ?]

मोळा—पु. १ ठसा. मुक्तिचा मोळा उमटे।' –भाए१७०. २ खिळा; खुंटी; लोखंडी किंवा लांकडी मोठी चूक; लहान मेख. [सं. मौलि]

मोळा—न.मोहाळें पहा.वासराच्या तोंडाला घालतात तें जाळें; वासरास मातेचें दूध पितां येऊं नये म्हणून बांधलेलें मुखबंधन. **०घालणें**–वासरूं अथवा रेडकू त्याच्या मातेबरोबर रानांत चरावयास सोडतेवेळीं त्याला पितां येऊं नये म्हणून काटे लावलेली म्होरकी घालणें. **मोळांडणें**–(व.) रग लावणें. पायास मुंग्या येणें किंवा पाय दुखणें या अर्थीसुद्धा हा शब्द वापरतात. 'इतका वेळ लिहिण्यासाठीं मांडी घालून बसल्यानें पाय मोळांडले.'

मोळी—स्त्री. १ जळणाच्या लांकडांचा भारा, ओझें किंवा गठ्ठा; लांकडांचा भारा; लांकडें, उंस, गवत इ०चा जो मोठा भारा तो. 'मोळी तसि गांधारी त्या अग्नींत स्वमूर्ति टाकिल तें।' –मोसभा १.६८. २ शरीराबद्दल तुच्छतेनें हा शब्द योजतात. **मोळी उचलणें**–१ (मनुष्याला) उभें करणें; उंच करणें; उत्थापन देणें; (मनुष्याची) तळी उचलणें. २ (होळीच्या खेळामध्यें) मनुष्याची गठडी करून त्याला वर उचलणें. **मोळी बुचकळणें**–स्नान करणें (थोडया पाण्यांत). **मोळी करणें**–मनुष्याच्या देहाची गठडी करणें (हातपाय व अंग दूमडून) **मोळी टाकणें**–(वैतागांत) दमलेलें शरीर जमीनीवर टाकून पडणें; (विश्रांतीसाठीं, निजण्यासाठीं). **मोळीची बाहेरील टांग**–स्त्री. (मल्लविद्या) हातपाय मोळीसारखे बांधून पायानें पाय अडकवून मारण्याचा डाव. **मोळीकार**–पु. मोळी विकणारा; मोळीविक्या. 'मोळिकारा धांडोळितां रानें। जेवि मोळिए जोडिलें बावनें।' –क १०. **०विक्या, मोळक्या, मोळविक्या**–वि. लांकडांची मोळी विकून उदरनिर्वाह करणारा. [मौल]

मोळें—न. वासराचें मुखबंध. मोळा पहा.

मोक्ष—पु. १ मुक्ति; शरीरांतून आत्मा निघून जन्मरणाच्या फेऱ्यांत न सांपडतां कायमचा ब्रह्मामध्यें विलिन होणें; चार पुरुषार्थांपैकीं अखेरचा पुरुषार्थ. हा प्राप्त झाला असतां संसारांतून कायमची सुटका होते; दुःखाची अत्यंत निवृत्ति व परमानंदाची प्राप्ति;

ब्रह्मस्वरूपता. २ सोडविणें; (जन्मरणापासून) सुटका. ३ मृत्यु. 'रात्री ज्याचा मोक्ष झाला त्याची पोतीं उघडण्याकरितां सर्व मंडळी एकत्र झाली.' –विवि १०.५ ते ७.१२४. ४ कर्ज फेडणें. ५ मुक्त अवस्था; आध्यात्मिक पूर्णावस्था. 'यालाच वेदांतांत मोक्ष असें म्हणतात.' –गीर ४८६. [सं. मुच्–सोडणें] **०काम**–वि. मोक्षाची इच्छा असलेला. 'ऐसे मोक्षकाम सकळ।' –ज्ञा ४.१४८. **०गुरु**–पु. आत्म्याला मोक्ष, मुक्ति मिळविण्याची दिशा दाखवून देणारा गुरु (समासांत) मोक्ष-मार्ग-धर्म-प्राप्ति. **मोक्षण**–न. मोकळे होणें; स्वतंत्र होणें; सुटका. **०धर्म**–पु. पारलौकिक धर्मास मोक्ष, किंवा मोक्षधर्म म्हणतात. –गीर ६५. **०पट**–पु. एक खेळ; मुलांचा खेळ. –मखेपु २०७. **०पद**–न. मोक्षाचें स्थान, स्थिति. श्रेष्ठपद; ब्रह्मत्व. (क्रि० देणें; मिळणें). **०श्री**–स्त्री. मोक्षलक्ष्मी. **०पुरी**–स्त्री. काशी. 'मोक्षपुरी मारुती-पुढे पाषाणी।' –दावि ७१८. **०साधन**–न. मोक्ष साध्य होणें, मिळणें. [सं.]

मौ—वि. १ मऊ; नरम. २ मृदु; लवचीक; नमनशील. ३ (ल.) मऊ; सौम्य; नरम. [सं. मृदु=मऊ] **मौआळ, मौवाळ**–वि. मऊ; कोमल; मवाळ.

मौकूफ—वि. तहकूब; मुल्तवी. [अर. मव्कूफ]

मौक्तिक—न. मोतीं; समुद्रांत शिंपीच्या पोटीं सांपडतें तें. [सं. द्रा. मुत्तु] **०रस**–पु. मोत्याचें कालव पाण्यांतील चुना घेऊन तो आत्मसात् करून आपल्या शरीरांत त्याचा एक रस तयार करतें. हा चुना व प्राणिज द्रव्य या दोघांचा बनलेला असतो. तें कालव शिंपल्याच्या अंतर्भागावर या रसाचे थर देतें आपल्या शरीरांत घुसलेल्या पदार्थांवर अगर कृमीवर या रसाचे फेरे फिरवून मोती बनवितें. या रसास मौक्तिकरस म्हणतात.

मौज—स्त्री. १ मजा; गम्मत; चैन; क्रीडा; खेळ; करमणूक; आनंद देणारीं कृत्यें किंवा देखावे. २ सुख; आनंद; मनोरंजन. ३ एकदम उद्भवणारी लहर, तब्येत, विनोद, आश्चर्य; नवल. [अर. मोज] **मौज, मौजा**–वि. नाना प्रकारच्या मौजा करण्याचा ज्याचा स्वभाव तो; रंगेलपणांत काळ घालविणारा. **मौजाळा**–वि. गमती; खेळकर; मजा करणारा; खेळाडू; करमणूक करण्याचा शोक अगर आवड असलेला. **मौजी, मौज्या**–वि. मौजाळा पहा.

मौज, मोजा—स्त्री. पु. लहर; लाट; तरंग; हेलकावा; हेलावा; वीची; ऊर्मि. [अर. मौज=तरंग]

मौंज—वि. मोळ नांवाच्या गवताचें; मुंज तृणाचें. [सं.] **मौंजी**–स्त्री. मुंज नांवाचें कटिसूत्र (मुंज गवताची केलेली असते म्हणून); ब्राह्मणाचें कटिसूत्र; परंतु मुंजविधि किंवा व्रतबंध याजबद्दल सामान्यतः उपयोग; मुंज. **मौंजीबंधन**–न. उपनयन; मुंज; यज्ञोपवीत धारण करण्याचा विधि; ब्राह्मणाच्या मुलाचा व्रतबंध विधि. [सं.]

मौजा—पु. खेडेगांव (वसुल किंवा सारा ह्यासंबंधानें कसबा, महाल अशाच दुसऱ्या शब्दार्शी मुख्यत्वें उपयोग करितात); गांव; खेडें; महाल, कसबा इ० संज्ञा ज्यास नाहीं असा गांव. [अर. मौझा] **मौजे**–न. गांव; खेडें. –क्रिवि. ज्या खेडेगांवांत किंवा–ला; खेडेगांवाच्या नांवाच्या पाठीमागें हा शब्द योजून पत्रांतून लिहितात. उदा० 'मौजे गिम्हवणें; मौजे करजगांव इ०'

मौजूद—वि. विद्यमान; हजर; तयार. 'टिपू सरन्जामसुद्धां पाऊसकाळ न म्हणतां लढाईस मौजूद.' –पया २५९. [अर. मव्जूद]

मौढ्य—न. १ अज्ञान. २ मूर्खपणा; मद्दपणा; वेडसरपणा; बुद्धिमांद्य. –एभा १०.२७५. [सं. मूढ. मौढ्य]

मौत—स्त्री. मृत्यु; संकट; मरण. 'आतां राजे यांचे अगोदर आपणास मौत येईल तर बरें.' –मदरु १.७७. मोठें अरिष्ट, संकट किंवा आपदा याजबद्दल देखील उपयोग करितात. जसें– **विकत मौत**–मुद्दाम ओढून घेतलेलें संकट; मूर्खपणानें, हेकटपणानें अंगावर ओढून घेतलेलें संकट. [अर. मौत्; सं. मृत्यु]

मौन—न. गप्प किंवा स्तब्ध बसणें; न बोलणें; गुपचुप बसणें; मुकेपणा; निश्शब्दता; विवक्षित कालपर्यंत भाषण न करितां राहण्याचा जो व्यापार तो. 'नकळे हृदयीचें महिमान। जेथें उपनिषदा पडलें मौन। तेथेंही संचरले सज्जन। देहाभिमान सांडोनी।' –एरुस्व १.३७. २ अबोलपणा; स्तब्धता; अनालापिता; अनालापवृत्ति.–वि. मुका; न बोलणारा; स्तब्ध किंवा गपचूप बसणारा. [सं.] **०मुद्रा**–स्त्री. शांतपणाची, न बोलण्याची किंवा अबोलपणाची मुद्रा; अबोलपणानें राहण्याची प्रवृत्ति दर्शविणारी चेहऱ्याची ठेवण. [सं.] **०व्रत**–न. कांहीं मुदतीपर्यंत न बोलण्याचा नियम, नेम; कांहीं कालपर्यंत मौन वृत्तीनें राहण्याचें धरलेलें व्रत. (क्रि० धरणें.) [सं.] **मौनावणें**–क्रि. स्तब्ध राहणें; अबोलपणानें असणें; एखाद्यानें स्वतःची शांतवृत्ति राखणें; चुप बसणें, होणें. 'प्रेमें विकासलीं कमळें शुद्ध। गुंजारवती कृष्ण षट्पद। ऐकोनि गंधर्व जाहले स्तब्ध। सामवेद मौनावले।' –एरुस्व ३.६. 'स्वयें शेष मौनावला स्थीर पाहे।' –राम १५८. **मौनी**–वि. १ स्तब्ध; मौनव्रत घेतलेला; निश्शब्द; अबोल; अल्पभाषी; अनालापी; भाषणविरक्त. २ जगापासून पराङ्मुख होऊन ज्यानें आपले सर्व विकार (कामक्रोध इ०) जिंकले आहेत असा; वनवासी; अरण्यवासी; वानप्रस्थ; ऋषि (धार्मिक). **मौन्य**- न. १ स्तब्धता; मौन; शांतता. २ मुकेपणा; अबोलपणा; अनालापिता; अनालापवृत्ति. [सं. मौन] **मौन्य(न)पणें**–क्रिवि. स्तब्ध;

मुकटयानें. 'बस तुं मौनपणें अथवा उगा।' –वामनचरित्र १४ (नवनीत पृ. ११०).

मौर्ख्य –न. मूर्खत्व; मूढपणा; मौढ्य; मूर्खपणा; बुद्धिमांद्य; अक्कलहीनपणा. २ अज्ञान; निरक्षरता; अशिक्षितपणा. [मूर्ख]

मौर्वी—स्त्री. धनुष्याची दोरी. 'बाण वर्षला घनदाट। रुक्मिया भुलविला आली वाट। रथ लोटुनियां घडघडाट। मोर्व्या-कंठ बांधिला' –एरुस्व १२.१३५. [सं.]

मौल—स्त्री. मौली; मस्तक. [सं.] **मौळ**–न. १ शिर; डोकें. 'चमत्कारोनि महाव्याळ वारंवार डोलवी मौळ।' –मुआदि ८.२९. 'कृपेनें मौळ स्पर्शिलें हस्तें।' –मुसभा १.६२. मौली पहा. २ –पु फणस इत्यादि फळांवरील कांटे ते. ३ शिखर –ज्ञा १३.५६७. **मौलि, मौली**–स्त्री. १ शीर्ष; डोकें; शिर. २ डोक्यावरील केसांचा झुबका किंवा जुडगा. ३ –पु. मस्तक [सं.] **मौळी, मौळि**–मुकुट; मुगुट.

मौल—न कपट, इंद्रजाल. **मौलाचा बाजार**–मौला-बाजार व मिनाबाजार भरविण्याची पूर्वी चाल होती. या बाजारांत मालाची विक्री करण्यास बहुधा वेश्या किंवा स्त्रिया असत. त्या मालाची मागतील तितकीच किंमत द्यावी लागे. आणि एकदा रक्कम किंवा माल मागितल्यावर तो द्यावाच लागे असा नियम असे. हा बाजार रात्रीस भरे त्याचा दुसरा प्रकार खोट्या रकमा (वस्तु) किंवा रकमेचें रूपांतर करून बहुत किंमतीची रक्कम थोडथा किंमतीस द्यावयाची. यासच मौलाचा बाजार म्हणतात. 'तेव्हां छद्मी जयपूरवाल्यांनीं शहरांत मौलाचाचा बाजार भरविला।' –मल्हारराव चरित्र ६८.

मौलवी—पु. इस्लामधर्मशास्त्री; मुसलमानी धर्माधिकारी; मुल्ला; न्यायकोर्टांत मुसलमानी कायद्यांचा अर्थ सांगणारा; मुलाना; मुसलमानी धर्म सांगणारा. [अर. मव्लवी] **मौला**–पु प्रभू; ईश्वर; मालक; धनी [अर. मव्ला] **मौलाना**–पु. मुसलमान धर्मशास्त्रवेत्ता; शिक्षक; मौलवी; मुसलमानांचा उपाध्याय. [अर मौलाना=आमचे साहेब]

मौल्य—न. मूल्य; मोल; किंमत [सं. मूल्य]

मौवाळ—वि. (महानु.) मऊ; मोवाळ; मृदु. 'रत्नकूटांची केवाळु मौवाळ उदकाजवळीं।' –दाव १७७. **मौवाळे**–स्त्री. मृदुपणा. [सं. मृदुल]

मौसर—स्त्री. ऐपत; सामर्थ्य.

मौसुफ, मौसूफ—वि मशारनिल्हे; उपर्युक्त; मजकूर. 'नबाब मौसुफ' –रा १०.१६५. [अर. मवसूफ]

मौळला—वि. मृदुल; मऊ 'मी मदनु मौळला सापु।' –उषा १२६ [सं. मृदुल]

मौळा—पु. मोळा पहा कांटा; फळावरील कांटा. 'कनकाचिया फळा। आंतुमाज बाहेरी मौळा। तैसा सबाह्य दुबळा। शुचित्वें जो।' –ज्ञा १८.६५८.

म्यां—सना (काव्य) मीं; मी ची तृतीया. 'जगोनि बहू काय म्यां सुकृत जोडिलें दुर्बळें।' –केका ५०. 'एकें वधिजेल पांडुपुत्रा म्यां।' –मोकर्ण ७.२४ [सं. मया]

म्याऊ—उद्गा. मांजरीचा शब्द. [ध्व.]

म्यान—न. तरवार इ० चें मेण; तरवारीचें घर; कोष; असिकोष–स्त्री. सापाची कात. [फा. मियाना] **०करणें**–१ तरवार म्यानांत घालणें. २ (ल.) तोंड बंद करणें; जीभ आटोक्यांत ठेवणें; जीभ सैल न सोडणें; स्तब्ध राहणें; असणें. [फा. मियान्] **०घालणें**–त्रिफळे, गेळफळें, निवळकांडे इ० कुटून त्या नदीच्या एखाद्या डबक्यांत टाकतात. यामुळें पाणी विषारी बनतें व मासे मरतात. मेण घालणें पहा. **एका म्यानांत दोन तरवारी–सुऱ्या–राहत नाहींत**–एकाच घरांत दोन सवती सुखानें नांदत नाहींत किंवा एकाच धंद्याचीं दोन माणसें परस्परांचा मत्सर केल्याशिवाय रहात नाहींत; दोन तेजस्वी माणसें शेजारी राहूं शकत नाहींत. त्यांच्यांत तेढ येण्याचा संभव असतो. **म्याना**–पु. १ मेणा; पेटीवजा पालखी; पालखीसारखें वाहन. पालखी पहा. २ एक औषध हें इराणाहून येतें. त्यास तुरंजबीन अथवा शिरखैस्त म्हणतात. हा पदार्थ एका प्रकारच्या झाडाच्या बुंधास चोंचे मारल्याने निघतो. हें साधारण सारक आहे.

म्यानेजर—पु (इं.) एखाद्या संस्थेची, उद्योग–गृहाची, कारखान्याची, नाटकमंडळी इ०ची किंवा कांहीं कामाची व्यवस्था पाहणारा- करणारा; व्यवस्थापक. [इं.] **म्यानेजिंग कमिटी**–स्त्री. व्यवस्थापकमंडळ. 'इकडे अमक्या सधन गृहस्थांवर मंडळीस 'पार्टी' करण्याची पाळी येईल म्हणून म्यानेजिंग कमेटीचे अध्यक्ष बोटें चोखीत असतात'

म्यार—स्त्री. (कु.) खाचरा सभोंवतीचा बंधारा; मेर; शेताची सीमा दाखविणारा बंधारा. [म. मेर]

म्यालेट—पु. हातोडा; मोगरी; घण; फर्मा ठोकण्यास लागणारें साधन. हा लाकडी ठोकळा असतो. –मुद्रण १०६.

म्युनिसिपा(पॅ)लिटी—स्त्री. शहरसुधराई इ० कामें करण्यासाठीं (कांहीं कायद्यान्वयें) स्थापन करण्यांत आलेली कांहीं मंडळींची संस्था; नगरपालिका. [इं.]

म्यौ—उद्गा. १ मांजराबद्दलचा उद्गारवाचक शब्द. २ मांजरांचें ओरडणें. –स्त्री. (म्हणून) मांजर (याअर्थी) –क्रिवि. मांजराच्या ओरडण्याच्या आवाजासारखें.

म्लान—वि. १ थकलेला; गळलेला; अवसन्न; अवसादित; क्लांत; मलूल. २ कोमजलेला; फिकट; निस्तेज; सुस्त; जड; गलित;

कोमेजलेलें (पुष्प, मनुष्य किंवा एखादा पदार्थ) ३ खिन्न; विषण्ण दिसणारा [सं. म्लै=कोमेजणें] ०दृष्टि–स्त्री. डोळ्यांची चमक नष्ट करणें; दृष्टीस मंदता दाखविणें; बुबुळें खालच्या पापणीचे आंत दडविणें; हा अभिनय व्याधि, ग्लानि दर्शवितो.

म्लेच्छ, म्लेंछ, म्लेछ, म्लेंच—पु. परकीय किंवा यवन लोकांबद्दल सामान्यपणें योजावयाचा शब्द; यवन; हिंदूव्यतिरिक्त अन्यधर्मीय; मुसलमान व युरोपियन; अनार्य. [सं. म्लेच्छ्=अशुद्ध बोलणें]

म्वाल—स्त्री. (कु.) किंमत; मोल. [सं. मूल्य; म. मोल]

म्वार—स्त्री. मोहर (अप.) ' दक्षिणप्रांतीं कुतुबशाही ही पराक्रमी महान् सकलार्थें समृद्धि मंत संस्थानें तसेंच मागल एक एक सुभा लक्षलक्ष म्वारांचा. ' –मराआ ३. [मोहर अप.]

म्हइस, म्हईस—स्त्री. म्हैस पहा.

म्हटलें—(पादपूर्णार्थक–मराठी बायकी) १ लक्षांत असूं द्या. २ सिद्ध गोष्ट. (आजेव शक्तीनें व अदबीनें व केव्हां केव्हां किंचित् थेट्च्या सुरांत उपयोगांत आणलेला शब्द). ०तेव्हां–अ. केव्हांहि.

म्हण—स्त्री. १ लोकपरंपरेनें आलेलें नीतिबोधक किंवा दृष्टांतायुपयोगी लोकमान्य झालेलें सुटसुटित आणि चटकदार असें दृष्टांतभूत वाक्य; रूढवचन; म्हणणी; लोकोक्ति. ' कोणाचें वाईट करूं नये अशी वडिलांची म्हण. ' २ बोलण्याची रीत; वाक् प्रचार. ' एका म्यानांत दोन सुऱ्या अशी म्हण आहे. ' ३ बातमी; खबर; वार्ता. [म्हणणें]

म्हण—उअ. म्हणून. ' कांतेला श्रमहो झणी म्हण तरू पुष्पें स्वहस्तें हरी। '–अकक २, विद्रल, रसमंजरी १. [म्हणणें; सं. भण्=बोलणें] ०गत–स्त्री न. म्हणणें; बोलणें; भाषण. ' आम्हीं तुमची झणियागतें । जें सांगतसा तें मानूनि हितें । काया वाचा मनसा तुमतें । अनन्य भावें शरण जी। ' –स्वादि १२.४.७९. **म्हणजे**–उअ. १ त्याचा अर्थ कीं; अन्यशब्दांनीं तेंच सांगावयाचें तर; किंवा; अथवा. ' अश्व म्हणजे घोडा. ' २ त्याच्या योगानें; तेणें करून; त्याचा परिणाम असा होतो कीं; अशी स्थिति असल्यामुळें; पूर्वोत्तर क्रियांचा कार्यकारणभाव असतां कारण क्रियावाचकापुढें या अव्ययाचा योग होतो. ' पाऊस पडला म्हणजे पीक चांगलें होईल'; ' तुम्हीं बोलला म्हणजे माझें कार्य होईल. ' [म्हणणें; म. म्हणिजे=म्हटलें जातें] **म्हणणें**–क्रि. १ बोलणें; उच्चारणें; वदणें. २ पठण करणें; पाठ म्हणणें. ' म्हणेल तो चुकेल.' ३ वाचणें; अभ्यास करणें; पढणें; सर्व म्हणून टाकणें; मुखोद्गत करणें (वेद, शास्त्र इ०) ४ नांव घेणें; नांव उच्चारणें; आव्हान करणें; बोलणें; नामोच्चार करणें. [सं. भण्] **म्हणणी**–स्त्री. १ म्हणणें; पाठ म्हणणें. २ म्हणण्याची किंवा पठण करण्याची रीत अथवा मार्ग; म्हणण्याची तऱ्हा; धाटणी ३ एक किंवा एकदां म्हणावयाचा पाठ (वेद वगैरेचा). ४ म्हण; आहाणा; लोकोक्ति. म्हण पहा. ' दुसऱ्याचें जो वाईट इच्छितो त्याचें बरें होत नाहीं अशी लोकांची म्हणणी आहे. ' **म्हणण्यासारखा**–क्रिवि. विशेष; सांगण्यासारखा; उल्लेख करण्याजोगा. ' तो लांब टांग्या असून शर्यतीत म्हणण्यासारखा उल्लेख करण्याजोगा पुढें आला नाहीं. –वि. फार चांगला. विशेष. ' हरदासाची कथा कांहीं म्हणण्यासारखी नसते ' **म्हणतखेवो–खेवीं**–क्रिवि. म्हणता क्षणींच; म्हटल्या बरोबर. ' कऱ्हा म्हणतखेवो ' –पंच १.३९ **म्हणता**–वि. म्हणणारा. –एभा ७.४४३. **म्हणतां म्हणतां**–क्रिवि. फार थोडया अवधींत; बोलतांबोलतां; अगदीं अल्प काळांत. ' वारा अनुकूल असल्यामुळें म्हणतां म्हणतां आमची होडी एक मैल गेली. ' **म्हणपणें**–क्रि. म्हटले जाणें. [प्रा.] **म्हण(णि)विणें**–क्रि. १ एखाद्यास बोलावयास किंवा म्हणावयास लावणें; बोलविणें; वदविणें; उच्चारविणें; पठण करविणें किंवा करावयास लावणें अथवा भाग पाडणें. २संज्ञा देण्यास, अभिधान करावयास लावण्याम, नामोच्चारण करावयास लावणें, भाग पाडणें; म्हणवून घेणें; ' शिवाजीनें आपणास इ. स. १६७४ मध्यें राजा म्हणविलें. ' ३ कांहीं गुणांची प्रौढी मिरवणें. ' तूं आपणास धीट म्हणवितोस मग साप पाहतांच कां पळून गेलास ? [म० ' म्हणणें ' चें प्रयोजक] **म्हणासार**–क्रिवि. (गो.) म्हणेपर्यंत. **म्हणितली–लें**–क्रि. म्हटली–लें; बोलली–लें. ' कर्ता भोक्ता म्हणितलीं. ' –विपु ३.८४. ' ते वेळीं म्हणितलें रुक्मिणीसीं। ' –उषा ६४.३०. म्हणविणें पहा. **म्हणिया**–वि. आज्ञाधारक. ' म्हणिये तुम्हांते मागतील महाऋषि। ' –ज्ञा ३.९९ **म्हणियागत**–वि. आज्ञाधारक; चाकर; आज्ञेप्रमाणें वागणारा. –ज्ञा ९.२८४. **म्हणियारा–रें**–वि. १ म्हटलेलें करणारा. ' होतील सकळ। ऋद्धिसिद्धि म्हणियारीं. ' –तुगा ३२४. २ –पु. दास; चाकर; दूत. ' नाहीं वेठी जेवा सारा। जाहाती नाहीं म्हणियारा. ' –तुगा ३६०. ' अवचितें काळाचें म्हणियारे। मारीत सुटती एकसरें. ' –दा ३ ९.३९ **म्हणियें**–न. १ आज्ञा; सेवकांचें कर्तव्य; सांगितलेलें काम. ' आणी कांवो तूं दिसमीं दुश्चित्ती। म्हणिये काम नलगे तुझ्या चित्तीं। '–तुगा १११. २ काम. –माज्ञा १३.४३९. [प्रा.] **म्हणिपणें**–म्हटला जाणें. –एभा ६.१८५ **म्हणीजेलें**–म्हटलें. ' द्विजी निषधापासाव म्हणीजेलें। ' –र ४. **म्हणुं**–म्हणावा; म्हणतो जणूं काय ' चारु तापद वन्हित्व हा म्हणुं तरी. ' –मृ ७. **म्हणे**–मानतो. ' द्वीगुण काळी तुसचपेटी म्हणे वज्रमुस. ' –वैद्यकबाड ७९. [सं. मन्ये; भण्] **म्हणेरा**–तगादा. –शर.

म्हणयार—स्त्री. (कु.) मण्यार; एक जातीचें सरपटणारें विषारी जनावर. [मण्यार]

म्हणम्हणी, म्हणम्हणां—अ. म्हणून. **म्हण म्हणोनि**–म्हणून. –ज्ञा १४.४१. **म्हणिपें**–पे–अ. म्हणजे. नांवाचा–ची–चें. 'भक्ति तेथि पैं आर्ति । आणि जिज्ञासु म्हणिपे ज्ञानस्फूर्ति.' –मिमं ४.८८.

म्हणी—स्त्री. (कु.) पाट (बगावयाचा).

म्हणीजे—अ. म्हणजे. 'चित्रांगु म्हणीजे येकु' –उषा ९.९७

म्हणून, म्हणोन, म्हणवून–ऊन—क्रिवि. १ (काव्य) त्यामुळें; त्या कारणास्तव; त्यासाठीं; यावरून; तस्मात्, सबब; त्याअर्थी. 'त्यानें मला शिवी दिली म्हणून म्यां तोंडी मारलें.' पूर्वोत्तर क्रियांचा कार्य–कारणभाव असतां कारण क्रियावाचकापुढें याचा प्रयोग होतो जसें– 'नदीस पूर आला म्हणून मी अलीकडे अडकलों.' २ असें; इत्यादि; याप्रकारचें, अर्थाचें. 'मी तुझे घरीं येईन म्हणून म्हणाला. 'राजानें माझें घर लुटलें आणि माझी चौघांमध्यें अगदीं अप्रतिष्ठा केली म्हणून (असें) हा बोलतो.' ३ –वि. म्हटलें जातें तें; या नांवाचें. 'साप म्हणून एक भयंकर प्राणी आहे. ४ अर्थशून्य पादपूरक; जोर देतांना हा शब्द योजतात. उदा० कोठें म्हणून कोठे ? [म्हणणें] **०का**–म्हणा किंवा काय त्या शब्दानें जोर व्यक्त होतो जसें:–गहू म्हणून का (म्हणा; काय) **जोंधळा** म्हणून का (म्हणा; काय) जो जिन्नस पाहिजे तो आहे. कधीकधी अधिक जोर किंवा अधिक स्पष्टता दर्शविण्यासाठीं कांहीं सर्वनामें व क्रियाविशेषणें यांस 'म्हणून' हा शब्द पुढे जोडून उपयोग करितात. कोण म्हणून ? काय **म्हणून** ! कोठें म्हणून ? **०शानि**–म्हणून **०साठीं**–क्रिवि. एवढ्यासाठीं; यास्तव; म्हणून; सबब; तस्मात; अर्थात् इ० **हणोनि**–क्रिवि याकरितां. 'ध्रुवस्तवनि आवडी धरि म्हणोनि अत्यादरें.' –केका ६२. 'आधार हा मज म्हणोनि गणोनि डोले.' –र ७५. **म्हणौनि**–अ. म्हणून. 'म्हणौनी त्रिभुवनी विख्यातु.' –उषा ७१३ [सं भण्=म्हणणें]

म्हणौनु–म्हणून. 'म्हणौनु धातुसोधन.' –वेयकवाड ७८.

म्हसक—स्त्री. कांखेत घेऊन नेण्याची कातडी पाण्याची पिशवी. पखाल; धान्य परतेवेळीं धान्य ठेवण्याची मोठी हरण केव्हा अगर मेंढराच्या कातडयाची पिशवी. [मसक]

म्हसण, म्हसणखाई, म्हसणखुंट, म्हसणवटी—स्मशान. मसण पहा. [प्रा.]

म्हसा—स्त्री. (व.) चामखीळ. [मसा]

म्हाकूळ—पुन. समुद्रकफ; समुद्रफेन–फेस; सिंधुकफ; सुफेन.

म्हाग, म्हागिरी, म्हागेरी, म्हाळुंग, म्हाळू—महाग, महागिरी इ० पहा.

म्हाजूर असणें—माहिती असणें.

म्हात—पु हत्ती हांकणारा. महात पहा. [महात]

म्हातन—न (कों.) कुणबी लोकांचें देवकृत्य.

म्हातापी—स्त्री. (कु.) आतषबाजी; शोभेच्या दारूकामांतील एक प्रकार महताब पहा.

म्हातारा—वि. १ वृद्ध; वयोवृद्ध; वयस्क. 'म्हाताऱ्यानें केलें नांव.' २ पुनर्वसु नक्षत्राबद्दल शेतकरी लोक म्हणतात. तसेंच पुष्य नक्षत्राला तरणा अशी संज्ञा देतात. ३ एक प्रकारचें गवत. –बदलापूर १६१. [सं. महत्तर] **म्हाताऱ्यास पिपांत ठेविलें पाहिजे किंवा पेटींत अगर कंठाळींत घालून नेलें पाहिजे**–आपणाला सल्ला देण्यासाठीं आपणाबरोबर नेहमी वयोवृद्ध माणसें असावयास पाहिजेत. **म्हातारपणीं ढोवळा मर्णा**–(व.) म्हातारपणीं कशाला शृंगार हवा. **म्हाताऱ्याबगर काणी जायना**–(गो.) म्हातारा मनुष्य असल्याशिवाय कहाणीसारख्या टराविक गोष्टी पार पडत नाहींत. **म्हाताऱ्याच्या वायकोस तांबटाच्या रोट्या**–म्हातारीला धड खाण्यास अन्न व नेसण्यास वस्त्र मिळत नाहीं. तिला उरलेसुरलेंच खावें लागतें. **म्हाताऱ्या माणसाचें लोणचें घालून ठेवावें**–सदुपदेश पाहिजे असेल तर म्हाताऱ्या माणसाचा सल्ला घ्यावा. **म्हातारखंड**–न. म्हातारा शब्दाचें तुच्छतेचें रूप; निंदेनें म्हाताऱ्यास म्हणतात **म्हातारचळ**–पु. म्हातारपणीं बुद्धीस होणारी विकृति; म्हातारपणीं होणारा बुद्धिभ्रंश; साठी बुद्धि नाठी; पिसें; चाळे; तारे; म्हातारपणी बुद्धि बावचळणें. **म्हातारडा, म्हातारडुक**–वि. थेरडा; मूर्ख म्हातारा अशा अर्थी; तुच्छतादर्शक म्हातारा या अर्थी (स्त्री, पुरुष या दोहोंबद्दल उपयोग); म्हातारखंड. **म्हाताराकोताराा**–वि. म्हातारा (द्विरुक्तीनें); वृद्ध आणि वयस्क; म्हातारा आणि अशाचसारखा. **म्हातारी**–स्त्री. १ वृद्ध स्त्री; वृद्ध आई; जरट स्त्री. २ वोडकी; केस भादरलेली विधवा स्त्री (तरुण किंवा म्हातारी कशीहि असो इजबद्दल उपहासार्थी योजावयाचा शब्द) ३ कापसाचा हलका पुंजा किंवा हलकें पीस (हवेंत उडणारें) याजबद्दल योजावयाचा शब्द. रुईच्या फळातील तंतुसमुदाय. (वाप्र) 'मुलें खेळतांना म्हाताऱ्या उडवितात.' –मराठी ६ वें पुस्तक पृ. २४३. **म्हातारी मेलीसें होणें**–(ल.) अतिशय दुःख होणें. **म्हातारीनें कोंबडें झांकून ठेवलें म्हणून उजेडावयाचें रहात नाहीं**–कोंबडा उजेडण्याचे अगोदर आरवतो. यावरून कोंबडयाच्या आरवण्याचा आणि उजेडण्याचा कांहीं कार्यकारणभाव आहे असें मात्र नाहीं. उजाडूं नये म्हणून म्हातारीनें कोंबडे झांकून ठेविलें तरी उजाडावयाचें तें उजाडतेंच. सृष्टिक्रमाप्रमाणें गोष्टी होऊं नयेत म्हणून कितीहि प्रयत्न केला तरी त्या गोष्टी थांबावयाच्या नाहींत.

म्हान, म्हांद—न.(गो.) कणगरासारखा एक कंद. याचे तुकडे तुपांत तळून साखरेंत घोळून खातात. हे कंद औषधी असतात व ते वेलीच्या मुळाला होतात. विषावर उतारा म्हणून हा कंद खावयास देतात.

म्हापुरस—पु. (कु.) महापुरुष; उगीच एखाद्यास मोठेपणा देण्यासाठीं वापरण्याचा शब्द. [म. महापुरुष]

म्हामूर—वि. पुष्कळ; महामूर पहा.

म्हार—वि. महार. **म्हारवड-म्हारोडा**-पु. महारवाडा. **म्हारांगण**-(कों.) महाराकरितां आंगण. **म्हारचत**-(कों.) महारांनी तयार केलेल्या टोपल्या इ० जिन्नस **म्हारपोर**-वि. महारपोर. **म्हारटोपी**-स्त्री. (कु.) महाराच्या पाठीस गळ टोचून वीसपंचवीस फूट उंचीच्या खाबावर लटकावून गरगर फिरविण्याचा विधी. वगाड; आंकडे घेणें (आतां ही चाल बंद झाली आहे).

म्हारकावळा, म्हारकी म्हारवी-महार शब्दाखालीं पहा.

म्हारकाव—स्त्री. गेरूचा एक प्रकार; एक प्रकारची काव; तांबडी माती. गेरू पहा.

म्हारकांडो—पु. नेता; म्होरकाडया.

म्हारग—वि (गो.) महाग. **म्हारगाय**-(गो.) महागरा.

म्हारगा—महार.

म्हारडें—न. पावसाळ्यांत उत्पन्न होऊन पावसाळा अखेर मरणारा खेंकडा.

म्हारू—न. (गो.) टारपोला नांवाच्या वनस्पतीचा दुपडदी फुलाचा कवचीवजा भाग.

म्हाल—वि. (कु.) माडाच्या पेंडीपैकीं पूर्वीच्या पेंडीचे नारळ. [महत्] **०गडा**-पु. (कों.) मुख्य विद्यार्थी. **०तंगडी**-नायक; म्होरक्या. **०म्हातारी**-स्त्री. म्हातारी स्त्री.

म्हाला-म्हाली-म्हालो—पु (व.) न्हावी; हजाम. मशाली किंवा मशालजी; मशाल (टेंभा) धरणारा. -विवि ५९. ३.४. 'हजामतीला आठ दिवस झाले तरी म्हालो आला नाहीं.'

म्हांव, म्हाँ—न (कु) मोह पहा. मधाचें पोळें; मधमाशांनीं बांधलेलें (मधयुक्त) पोळें.

म्हांवडोळ, मावडोळ—न. (गो.) एक सर्पजात.

म्हाँवरा—न. मासळी; म्हावरें पहा.

म्हावरें -न. (कु.) मावेंदें. **म्हामनां**-(कु.) यात्रेहून आल्यावर करावयाची सांगता (संतर्पण).

म्हावरें—न (गो.) १ घबाड. २ मासा; मच्छी; मासळी. (सामुदायिकपणें किंवा सैरव्यानें) पकडून आणून विक्रीकरितां उघडे ठेविलेले मासे. **०मिळप**-(गो) घबाड मिळणें.

म्हावेलो—पु (कों.) (फळांतील) गर.

म्हासड, म्हासाड, म्हसाळ—पु. एक प्रकारचे तांदूळ; पटणी. 'म्हासाड (पटणी) घुरे अशा पिकतात.' -खेया.

म्हासरा—पु वेढा; महासरा. महसरा पहा. 'अहमदखा पठाण बंगस प्रयागास म्हासरा करून होता.' -पया १३९.

म्हाळ, म्हाळवस, म्हाळवसा, म्हाळुंग, म्हाळुंगी, म्हाळ—पु. (कों.) महालय; श्राद्ध; पक्ष. महा शब्दामध्यें पहा. [महालय]

म्हाळसा—स्त्री. १ खंडोबाची स्त्री. २ कुंकवाचा मोठा टिळा लावणारी, पुष्टपुष्ट आणि भव्यवस्थित राहणारी भांडकुदळ स्त्री. ३ पूज्य देवता (खंडोबाची बायको म्हणून) 'म्हाळसाईनें केले धांवणें, -दावि १०१. **०कांत**-पु. खंडोबा; म्हाळसेचा कांत **०देवी**-स्त्री. खंडोबाच्या बायकोचें नांव. **म्हाळोबा**-पु. खंडोबाचें किंवा खंडेरावाचें नाव. [म्हालसाकांत, म्हालसाकांत]

म्हाळुंग—न. महाळुंग पहा.

म्हाळुंड चावप—क्रि. (कों.) अळणी पदार्थ करणें. (माळुंड चावलेल्या माणसाला मीठ खारट लागत नाहीं यावरून).

म्हाळू—पु. महाळू; म्हाली; न्हावी.

म्हण—अ. (कु.) म्हण; म्हणून. 'ब्याला वाढविलें म्हण। मज सुख तुज सीण।' -तुगा १९०७. [म. म्हणून; म्हण] **म्हूनशान**-म्हणून.

म्हेतर—पु १ भंगी; झाडूवाला. २ खेडेगांवच्या वंशपरंपरागत वतनदार महाराच्या बद्दल योजावयाचा शब्द. त्यावरून सर्वसाधारणपणें चांभार व महार यांच्याबद्दल योजावयाचा शब्द. तसेंच अशा तऱ्हेच्या शब्दांना प्रत्ययवजा जोडून उपयोग. जसेः-हिरम्हेतर; चांगम्हेतर. ३ गवंडी, सुतार, लोहार, साळी, कोष्टी, तेली तांबोळी, माळी, चांभार यांच्यांतील नायकाबद्दल किंवा मुख्याबद्दल मोठेपणानें योजावयाचा शब्द. ४ पाटील, कुळकर्णी, चौघुला इ०वतनदार लोकांच्याबद्दल प्रतिष्ठितपणें योजावयाचा शब्द [सं महत्तर] **०की**-स्त्री. म्हेतराचा उद्योग किंवा कर्तव्य; ग्रामादिसंबंधी एक वतनदारी. **म्हेतराणी, म्हेत्राणी**-स्त्री. १ भंगीण किंवा झाडूवाली बाई. २ म्हेतराची स्त्री (वतनदार महार किंवा चांभार याची) चांभार जातीची स्त्री. **म्हेतऱ्या**-पु. वतनदार महाराबद्दल श्रेष्ठत्वाचा शब्द; कांहीं कारागीर लोकांतील नायकाबद्दल योजावयाचा शब्द. तसेंच जातींतील मुख्य इसमाबद्दल योजावयाचा शब्द. म्हेतर अर्थ २, ३ पहा. [म्हेतर]

म्हेर, मेहरे,—स्त्री. मातीचा बांध. मेर पहा.

म्हेळ—स्त्री. उंसाचा रस कढवितांना वर येणारी मळी (यापासून उत्तम पिण्याची दारू काढतां येते) [मलई; मळी] **०चें**-(कों) गळणें.

म्हैस—स्त्री. १ महिषी; रेडयाची मादी; म्हसरू; म्हस. २ एक प्रकारचा सहा पायांचा माशीपेक्षां मोठ्या आकाराचा व वरचा पृष्ठभाग कठीण असलेला किडा. ३ केळफुलावरील निबर, काळसर रंगाची पारी. पांढऱ्या रंगाच्या पारीस गाय म्हणतात. **म्ह०** मेल्या म्हशीला दहाशेर दूध किंवा बहु दूध. [सं. महिष प्रा. महिस] **पाण्यांत म्हैस न बाहेर मोल**-म्हैस डबक्यांत

बुडून राहिली असतां तिची किंमत ठरविणें. **म्हशीवर पाऊस पडणें**–बेकिफायतीचे प्रयत्नावद्दल किंवा निरर्थक झालेल्या हित कारक गोष्टीवद्दल योजावयाचा शब्द. **म्हशीचा प्राणनाथ**–पु. रेडा. –वि. (ल.) सुस्त; मस्त. 'तो काय नुसता म्हशीचा प्राणनाथ आहे.' **म्हशीनें पाय दिलेलें नाक**–न. नकटें किंवा बसकें नाक. **म्हैस आटणें**–दूध द्यावयाचें बंद होणें; दूध न निघणें. 'गेल्या महिन्यापासून म्हैस आटली आहे.' **म्हैस पावल्या**–वि. (व.) म्हशीसारखा जड प्रकृतीचा. **म्हैस पाहणें**–(व.) म्हशीचें दूध काढणें. **म्हैस पिळणें**–धार काढणें. 'मी म्हैस पिळून येतों.' **म्हैस हात पारखते**–(व.) म्हैस धार काढणाऱ्याचा हात ओळखते. **म्हशींचीं शिंगें म्हशीला जड होत नाहींत**–मुलें अधिक असली तरी तीं आईबापाला जड नसतात. **म्हशा**–पु. १ (व.) रेडा; हल्या; जड, दांडग्या व कुरूप रेडयावद्दल किंवा इतर पशूबद्दल तुच्छतेनें योजावयाचा शब्द. २–वि. (ल.) रेडयासारखा धष्ट पुष्ट मतिमंद; म्हशीसारखा जड प्रकृतीचा. ३ सुस्त; दांडगा आणि घाणेरडा अशा इसमाबद्दल योजावयाचा तुच्छतादर्शक शब्द; मूर्ख अचरट मनुष्य. 'कीं म्हशाचें गण्या नाम।'–नव १८.१७२. [म्हैस] **म्हशागुग्गुळ–गुगुळ**–पु. १ एक प्रकारचा गुग्गुल. २ (म्हशा किंवा म्हैस) घिप्पाड गलेठ्ठ व ठोंब्या इसमाबद्दल निर्भत्सनापूर्वक योजावयाचा शब्द. [म्हशा, म्हैस; मशी आणि गुग्गुल] **म्हशाबोळ**–पु. एक प्रकारचा बोळ; एक औषधी वनस्पती; एका झाडाच्या चिकापासून हा होतो. याचा रंग काळा असतो. हें औषध गुरांचे पोटदुखीवर चालतें. **म्हशासुर**–पु. देवीनें मारलेला एक दैत्य; म्हसोबा. [सं. महिषासुर] **म्हशी केळें, म्हशेळी, म्हशळें, म्हसकेळें**–न. एक जातीची मोठीं व जाड केळीं. **म्हशीचा खटारा म्हशींचें खोड–म्हशींचें डोंबड**–पुन. म्हशीबद्दल उपहासानें म्हणतात. **म्हशींचें मेळवण**–न. (विनोदानें) अव्यवस्थित जेवण: पात्रावर खाद्यपदार्थांची अव्यस्थित रेलचेल. **म्हस**–स्त्री. (व.) म्हैस; महिषी; म्हसरू; म्हसरूड; म्हसर ह्या शब्दाकरितां म्हैसरूं इ० शब्द पहा. [म्हैस] **म्हसर्की–म्हसक्या**–वि. म्हैस राखणारा, चारणारा. **म्हसडी, म्हसडें**–वि. म्हशीचें कातडें; महिषचर्म. [म्हैस–म्हस–म्हसडी] **म्हसर**–ढोर; लांब व सापट (म्हशीच्या पाठी प्रमाणें) ह्या अर्थी नामाशीं सामासिक शब्दांत म्हैस किंवा म्हस शब्दाचें तुच्छतादर्शक रूप; कंटाळवाणें व न संपणारे लांबलचक. जसें–म्हसरमाळ, म्हसर मैदान, म्हसररान. कधीं कधीं म्हमरभुई व म्हसरजमीन, म्हसरशेत, म्हसरवाट, म्हसररस्ता, म्हसर मजल, म्हसरकोस, म्हसरपल्ला इ. [एकवचन म्हसरू] **म्हसर**–म्हैस, टोणगे. **म्हसडया**–वि. (व.) म्हशीसारखा जड प्रकृतीचा. **म्हसासूर, म्हसोबा**–पु. एका असुराचें किंवा दैत्याचें नांव, यास देवीनें मारलें. कांहीं हलक्या जातीचे लोक त्याची पूजा करितात; एक पिशाच्च. [महिष] म्हसोबाला नाहीं बायको व सटवाईला नाहीं दारला. **म्हसोबा कोपविणें, पेचविणें**–कृष्णानदी तटाकास अक्कलखोप गांवीं म्हसोबा आहे त्याला आपल्या शत्रूचा सूड घेण्याकरितां नारळ फोडणें; देव घालणें **म्हैशा**–पु. अंगानें मोटा व कुरूप अशा रेडयाबद्दल किंवा इतर नर जातीच्या पशूबद्दल रागानें किंवा उपहासपूर्वक योजावयाचा शब्द. –वि ज्याचें शरीर पुष्ट असुन जो आळशी आहे त्यास निंदनें म्हणावयाचा शब्द. [म्हैस] **म्हैसभाद्र्या**–वि. आपल्या कामांत निपुण नसलेल्या म्हाऱ्याबद्दल उपहासानें योजावयाचा शब्द; वाईटपणें खोडाखोड करून लिहिणाऱ्या लेखकाबद्दल योजतात. **म्हैसमंगळ**–वि. मद. **म्हैसमाळ**–पु प्रवासामध्यें लवकर न संपणारा मोठा माळ किंवा ओसाड व नापीक जमीन. म्हसर पहा. **म्हैसरट, म्हैसरूड, म्हैसर**–न. म्हैस किंवा म्हैसा याजबद्दल तुच्छतादर्शक बनलेलीं रूपें. **म्हैसरूं**–न. म्हैस शब्दाचे नर किंवा मादी वगैरे भेद लक्षात न घेतां लाडिकपणानें योजावयाचा शब्द. **म्हैसवा**–पु. (महानु.) एक प्रकारचा पाषाण. 'कीं आव्हाटी म्हैसवा थर। नव्हतां दृष्टी गोचरु।'–ऋ ४८. **म्हैसवल**–स्त्री. एक औषध. **म्हैसा**–पु. टोणगा; रेडा (हा शब्द मराठींत विशेष रुळलेला नाहीं.) रांड–भांड म्हैसा बिघडे तो होय कैसा? (हिंदी म्हण) 'नको देऊं म्हैसा।'–प्रला. **म्हैसासुर**–पु. एक पिशाच्च; क्षुद्रदेवता. 'म्हैसासुर मल्लिकार्जुन।'–दावि ६३. [महिषासुर] **म्हैसिक**–वि. म्हशीचा. **म्हैसोबा–म्हसोबा**. 'मुंज्या झोटिंग करणी। म्हैसोबाची'

म्होतरफा, म्होतरफी, म्होतीर, म्होतुर—मोहतरफा, मोहतरफी इ० पहा.

म्होप(उमाप)—वि. (कों.) पुष्कळ.

म्होर—न. बाशिंग; ताडाच्या व शिंदीच्या पाती, केळीचीं सोपें वगैरे जिनसांचें केलेलें हें बाशिंग असतें. भिंगाचे व काचेचे गोळे बसविले म्हणजे हें बाशिंग मुकुटासारखे दिसतें. असल्या बाशिंगाला रुपये २५ ते ४० पर्यंत किंमत पडते. **म्होर**–क्रिवि. पुढें. 'म्होर हो.' 'म्होरं होऊन बघ कोण आलं तें. **म्होरकाढया, म्होरकी, म्होरक्या, म्होरचा, म्होरणें, म्होरपी, म्होरला, म्होरून, म्होरे, म्होरकाडी, म्होरको, म्होरकी, म्होरक्या, म्होरळा म्होरे**–मोहर काढ्या इ० शब्द पहा. (माणदेशी) पुढचा. –अ. (कु. कों.) पुढें. **म्होरो**–पु. विष उतरण्याकरितां लाविलेला दगड. मोहरा पहा.

म्होव, म्होवँ—पु. (गो.) १ मोहाचें झाड. २ मध; मधमाशींचें मोहो किंवा मोहोळ. 'म्होंव संपले.' ३ बसण्यासाठीं

कायमची जागा हुडकणाऱ्या किंवा शोधणाऱ्या मधमाशांचा थवा, घोळका. ४ गोडा. **म्होडवामुस**-(गो.) मधमाशी.

म्होवरी—स्त्री. (हेट.) मोहरी.

म्होवलो—पु. (गो.) भाजलेली काजूची बी.

म्होवाळ—न. (गो.) मधुर, फळ; मध, रस निघणारें फळ. **म्होवाळप, म्होवाळचें**-(कों.) मधुर होणें.

म्होवो, म्होवी नाल—पु. (गो.) गोडा नारळ

म्हौ-महू—पु.न. मोहोळ. मधमाशांनीं तयार केलेलें मधाचें पोळें. 'चिंचेच्या झाडाला महु लागला आहे.'

म्हानत—स्त्री. (कु.) मेहनत. [म. मेहनत]

य

य—व्यंजनमालेंतील सव्विसावें अक्षर. अक्षरविकासः-या वर्णाची पहिली व दुसरी अवस्था अशोकच्या गिरनार लेखांत आढळते. दुसऱ्या अवस्थेतील 'य' लेखणी न उचलतां काढला तर तिसऱ्या अवस्थेतील 'य' निघतो. ही अवस्था कुशानवंशी राजांच्या वेळच्या (इ. स. १ लें आणि दुसरें शतक) मथुरा येथील लेखांत 'य्यै' किंवा 'स्य' या जोडाक्षरांतून दिसून येते, शेवटची अवस्था इ. स. ५८८ मधील महानामाच्या बुद्धगया येथील लेखांत पहावी आपण आज लिहितों तसा य ११ व्या शतकांतील उज्जनीच्या लेखांत लिहिलेला आहे. -ज्ञाको (य) १. हा वर्ण गांवढळ लोकांच्या बोलींत वर्तमानकाळाच्या प्रथम व तृतीय पुरुषाच्या एकवचनाच्या रूपांना जोडलेला आढळतो. उदा० मी जातोंय; हा जातोय; मी देतोय (देतों, देत आहे). त्याचप्रमाणें एऱ्या ठिकाणींही य असा उच्चार आलेला त्यांच्या बोलींत आढळतो. उदा० यक्का, येक. यचा हि मुद्धां, अशा अर्थी शिष्ट भाषेंत उपयोग केलेला आढळतो. उदा० 'तेव्हांय मीच होतों आतांय मीच आहें.' 'अधिक महिनाय आला आहे.' -सागोप्रं ३.१.

यआं—याचें सामान्यरूप. (महानु.) यां. 'यआंसी कुळ ना ज्ञाती। रूपु ना संपत्ती।' -शिशु २१०.

यऊल—पु. (कु.) तरस.

यक—वि. एक. -आदिलशाहि फर्मानें. [फा. यक्] **यकमुखनीपणा**-पु. एकवचनीपणा. 'यकमुखनीपणाची नेकी व खुबी सर्व टोपीकरांस जाहिरीस येई तें करणें वाजीब व लाजीम आहे.' -रा १०.२८०. [फा. यक्मुखुन्]

यःकश्चन, यःकश्चित्—वि. सामान्य; क्षुद्र; वरऱ्या दर्ज्याचा नसलेला; कोणीहि; कोणीएक. [सं. यः+कः+चन, चित्]

य(ये)कीन—पु. खात्री; सत्य; निष्ठा; निश्चय; विश्वास. -क्रिवि. खचित; निश्चित; पूर्णपणें; खात्रीनें. 'आम्ही हरामखोर असें खचित यकीन जालें असल्यास आम्हांस परिछिन्न गोश्माली करावी.' -ऐस्फुले ४९. [अर. यकीन्]

यकृत्—पुन. १ पित्ताशय; (इं.) लिव्हर. २ उजव्या कुशींत असणारें पित्ताशय; यकृत् वाढलें किंवा फुगलें असतां होणारा रोग; जंडी. [सं.] **०पक्वपिंड**-पु. पृष्ठवंशीय प्राण्यांचा यकृत् आणि पक्वपिंड मिळून होणारा संयुक्त पिंड. -ज्ञाको (क) १९४.

यकृब—पु. घोडयाच्या तोंडावरील भोंवरा. हा जबडयावर असेल तर चांगला, खालीं असेल तर वाईट. -अश्वप १.१०२.

यखतियार्, यख्तियार्, यख्त्यारी—अख्त्यार इ०पहा.

यगानगत—स्त्री. ऐक्य; सख्य; मैत्री; विश्वास. 'बाळाजीराव यांनीं आम्हांस यगानगतीचे मार्गे जें सांगून पाठविलें ती दोस्ती त्यांचे पाठीमागें आम्हीं अदा केली.' -रा ५.८६. [फा. यगानगत्]

यच्चयावत्, यच्चावत—अ. सर्व; झाडून; सगळें; असणारें सर्व; एकहि न वगळतां. [सं. यत्+च+यावत्]

यजन—न. १ यज्ञ; होमहवन (स्वतः करितां व स्वतः, केलेलें; 'याजन' याच्या विरुद्ध अर्थ). २ एखाद्या हविर्द्रव्यांचें हवन. [सं. यज्=यज्ञ करणें] **यजणें**-सक्रि. होमहवन करणें; यज्ञ करणें; पूजणें. 'जे इष्टयज्ञ यजावे। तें हविर्मंत्रादि आघवें।' -ज्ञा ४. १२०. **यजिजणें**-सक्रि. पूजिलें जाणें. 'जे जैसें देव यागीं यजिजती। तैसीं तैसीं त्यां फळें देव देती।' -एभा २.६५ **यजितसांतें**-पुअव. यज्ञ करीत होत्साते; यज्ञ करणारे. 'परी तें असो येणें उचितें। ज्ञानयज्ञें यजितसातें। उपासिती मातें। ते सांगितले।' -ज्ञा ९.२६२. **यजिता, यज्वा**-वि. यज्ञ करणारा; यजनकर्ता. 'जेथ यजितयाचा कामु पुरे। यज्ञींचें विधान सरे। मागुतें जेथूनि वोसरें। क्रियाजात।' -ज्ञा ४.१५०.

यजमान—पु. १ यज्ञकर्म करणारा; स्वर्गादि फल प्राप्त व्हावें म्हणून याग करणारा; यज्ञाचा खर्च इ० चालविणारा मुख्य मनुष्य २ (ल.) धनी; मालक; कुटुंबाचा मुख्य; एखाद्या उपाध्यायाचा आश्रयदाता. ३ (बायकी भाषेंत) नवरा; पति. ४ वैश्येचा धनि; उपपति. ५ (गो.) गोमंतकांतील देवस्थानचा (गोवा हद्दीच्या बाहेरील) कुळावी. [सं. यज्=यज्ञ करणें, देवपूजा करणें] **म्ह०** यजमानाचा होतो पाहुणचार पण पाहुणा होतो थंडगार. **०कृत्य**-न. १ जोशी किंवा उपाध्यायानें यजमानाच्या घरीं करावयाचें धर्मकृत्य. २ धर्मकृत्यांबद्दल जोशाला यजमानाकडून मिळणारा पैसा. **यजमानी**-पु. (कु.) लग्नादि समारंभातील मुख्य मनुष्य. **यजमानीण-न, यजमानिनी, यजमानपत्नी**-स्त्री. यजमानाची स्त्री; मालकीण; धनीण.

यजित—वि. महाग. 'असें असतां मी अन्नाच्छादनास यजित!'

यजित, यजितजाणें, यजितपत्र, यजीत—अजित पहा. ['अजित' चेंअशिष्ट रूप] शरण. **यजितखत**–न. अजितपत्र; हरल्याबद्दलचा लेख.

यजीत(द्)खत–न. सोडचिठ्ठी. [फा. आझाद्-मुक्त]

यजुर्वेद, यजुः— पु. चार वेदांपैकीं दुसरा वेद. यांत यज्ञकांडाबद्दल विशेष माहिती आहे. [सं.] **यजुर्वेदी**–पु यजुर्वेद शाखेचा ब्राह्मण; यजुर्वेदाचें अध्ययन करणारा ब्राह्मण. **यजुःशाखी**–पु यजुर्वेदी; यजुर्वेदशाखीय. [यजुः+शाखा] **यजू**–पु. यजुर्वेदी; माध्यंदिन; यजुर्वेदशाखीय. [सं. यजुः]

यटक—न. (कों.) बैलगाडीचें जूं बांधण्याचा दोर; जोखडाला बांधलेला नाडा.

यटक—स्त्रीन. खुबी; मर्म; युक्ति.

यडकतणें—सक्रि. (माण.)त्रास होणें; अडचणींत येणें. [यटक]

यडताक—न. घोटाळा; अडचण.

यडताकणें—क्रि. हेलपाटे घालणें. [का.]

यडु—न. मस्ती; खोडसाळपणा. [का.]

यंता—वि. नियमन करणारा; दाब ठेवणारा; सूत्रधार. [सं. यन्तृ]

यति—पु. १ पद्याच्या चरणांतील थांबण्याची जागा; अक्षराचें अवसान; विसांवा; दम. 'मालिनी वृत्तांत आठव्या अक्षरावर यति येतो.' २ (संगीत) लयीचा गतिनियम. हे पांच आहेत. समा, स्रोतोगता, मृदंगा, पिपीलिका व गोपुच्छा. [सं.] **०भंग**–पु. वृत्तांत जो यति यावयाचा तो पदांतीं न येतां पदार्धावरच आल्यास होणारा दोष. उदा० 'पुढें माझा नारायण तरुण तो पुत्र तिसरा.' या ओळींत नारा या अर्धपदावरच यति येतो. या ठिकाणीं एखादें पूर्ण पद असावयास पाहिजे होतें. म्हणून हा यतिभंग दोष जाणावा. [सं. यम्]

यति-ती—पु. १ संन्यासी; मनोविकारांस ताब्यांत ठेवणारा. २ भिक्षु (जैन भिक्षु). [सं. यति. यम्=नियमन करणें]

यती—पु. १ प्रयत्न करणारा; मोक्षाकरितां प्रयत्न करणारा संन्यासी. २ यज्ञ करणारा. –हंको. [सं. यतिन्, यत्=प्रयत्नकरणें]

यत्किंचित्—क्रिवि. थोडा सुद्धां; थोड्या प्रमाणांत: थोडेसें. [सं. यत्+किम्+चित्] **०(यत्किंचित् न ठेवतां) सगळा-सारा-सर्व-समस्त-अवघा-अख्खा**–सर्व; मुळींच शिल्लक न ठेवतां.

यत्न—पु. प्रयत्न; उद्योग; खटपट; परिश्रम. [सं. यत्=मेहनत करणें] **०तः**-क्रिवि. प्रयत्नानें; खटाटोपानें; उद्योगानें **०वाद**–पु. प्रयत्नावर सुखदुःख, उत्कर्षापकर्ष इ० गोष्टी अवलंबून आहेत, दैवावर नाहींत असें मानण्याचा सिद्धांत: प्रयत्नवाद. याच्या उलट सिद्धांत दैववाद अथवा प्रारब्धवाद. **०वादी**–पु यत्नवादाचें समर्थन करणारा; प्रयत्नवाद मानणारा. **०वान्, यत्नी**–वि. खटपटी; उद्योगशील; प्रयत्न करणारा; उद्योगी. **०सिद्ध**–वि. यत्नानें साधलेला; प्रयत्नानें प्राप्त झालेला. सिद्ध पहा.

यत्र—अ. जेथें. [सं.] **०कुत्रचित्-कुत्रापि**–क्रिवि. कोठें तरी; कोणच्या तरी एखाद्या ठिकाणीं. **यत्रयत्र**–क्रिवि. जेथें जेथें; ज्याज्या ठिकाणीं.

यंत्र—न. १ साधन; हत्यार; कोणतेंहि एखादें काम सुलभतेनें, जलदीनें किंवा कमी प्रयासानें होण्यासाठीं तयार केलेलें गुंतागुंतीचें उपकरण: कळ; युक्ति २ बंदूक; तोफ; कोणतेंहि अशा रीतीचें संहारसाधन. 'नातरी संहारत्रिपुरारीचीं यंत्रें।' –ज्ञा ११.३४३. ३ रहाट; रहाटगाडगें. 'वाया यंत्रारूढ जीवसृष्टी । भ्रमतुसे ।' –ऋ १३०. ४ देवतेच्या पूजेला लागणारी एक गूढ रेखात्मक आकृति; इच्छा पूर्ण होण्यासाठीं कागदावर वात्स्यायन कामसूत्रकर्त्या ऋषीनें सांगितल्याप्रमाणें काढावयाची आकृति; एखादी गूढ आकृति. ही कागदावर काढून व ती ताइतांत घालून गळ्यांत बांधतात किंवा तिची पूजा करतात. असें केल्यानें इच्छित फल मिळतें किंवा अनिष्ट टळतें अशी समजूत आहे. उदा० स्वस्तिक कमल वगैरे यांनीं पिशाच्चबाधा होत नाहीं. 'मंत्रयंत्र कांहीं करिसी बुटबुटी । तेणें भूतसृष्टी पावशील । ' –तुगा. ५ जादू. ६ प्राणायाम. ७ कळाशी. ८ वाद्य. [सं. यन्त्र्=बांधणें, नियमांत आणणें] **एखाद्या भोंवतीं-बरोबर-शीं यंत्र किंवा यंत्रमंत्र लावणें-मांडणें-चालविणें-करणें**–एकाद्याच्या विरुद्ध व्यूह रचणें; एखाद्याच्या विरुद्ध कट रचणें; जंतरमंतर करणें. **०गोळ**–पु. तोफेचा गोळा. 'उल्हाट यंत्रांचे मार । दुर्गावरूनि होती अपार । परसैन्याचे यंत्रगोळ समग्र । दुर्गपरिघामाजी पडती । ' –ह २२. ८९. **०धारी**–पु. हत्यारबंद शिपाई. 'काय तुझें नांव पुसती यंत्रधारी । तो म्हणे बेगारी विठा कीं जी । ' –तुगा ४४३६. **०शास्त्र**–न. यंत्रासंबंधीं ज्यांत विवेचन केलेलें असतें असें शास्त्र; पदार्थाच्या स्थिरावस्थेचें व गमनावस्थेचें विवेचन करणारें शास्त्र. याचे दोन विभाग आहेत–१ स्थितिशास्त्र. २ गतिशास्त्र. (इं.) एंजिनिअरिंग. **यंत्रित**–वि. नियंत्रण केलेला; नियमित बांधलेला; ताब्यांत ठेवलेला. **यंत्री**–वि. यंत्र चालविणारा. 'देह हें ईश्वर निर्मित यंत्र आहे, यंत्री चालवील तसें तें चालेल.' –वि. यंत्राच्या सहाय्यानें बनविलेलें. **यांत्रिक**–वि. १ यंत्रासंबंधीं. २ केवळ यंत्रयोगें झालेलें.

यत्शब्द—पु. संस्कृत व्याकरणांतील एक संज्ञा. संबंध वाचक शब्द. [सं. यत्+शब्द]

यथा—अ. १ जसा–शी–सें; ज्या प्रमाणें. 'यथा राजा तथा प्रजा.' २ या शब्दाचा पुष्कळ संस्कृत शब्दांशीं समास होतो. तेथें याचा अर्थ त्या त्या प्रमाणें, त्यांचें उल्लंघन न करितां

असा प्रायः होतो व तो शब्द क्रियाविशेषण होतो. अशा तऱ्हेचे कांहीं साभासिक शब्द पुढीलप्रमाणें. [सं.] **०कथंचित्**–अ. १ कसा तरी; कांहीं झालें तरी; चांगल्यावाईट किंवा योग्य अयोग्य मार्गानें. ' त्यानें दिवसभर खपून लिहिलें तर यथाकथंचित् दोनशें ग्रंथ लिहील. ' २ यथाकदांचित्; यदाकदाचित्, कदाचित् कदाचित्; जर शक्य झालेंच तर; शेकडा एक शक्यतेनें; जगदीं पराकाष्ठेनें. ' एवढा उद्योग उभा राहणें दुर्घटच, पण यथाकथंचित् तो राहिलाच तरी त्यास सहाय्य मिळण्यासारखें नाहीं. '–नि १११. **०कथा**–क्रिवि. १ योग्य रीतीनें; जसें पाहिजे त्याप्रमाणें; म्हटल्या–सांगितल्या बरहुकूम. २ (विरू.) फार झालें तर; कदाचित्; चुकून. **०काम**–क्रिवि. इच्छेप्रमाणें; मनाजोगें. **०कामी-कामिनी**–पुल्ली वि. आपल्या इच्छेनुरूप वागणारा–री; स्वेच्छाचारी; आपल्या मनाप्रमाणें करणारा–री. **०काल-लीं-ळीं**–क्रिवि. योग्यवेळीं; नियमित कालीं; हंगाम साधून. ' पेरणी यथाकालीं झाली म्हणजे पीक चांगलें येतें. ' **०क्रम-क्रमें-क्रमानें**–क्रिवि. १ क्रमानुसार; क्रमवार; क्रमानुरूप; अनुक्रमानें, ठरलेला क्रम न सोडतां; ओळीनें. २ शिस्तींत; नियमानें, नियम किंवा रीत यांना न सोडतां. **०गम**–क्रिवि. शास्त्रानुसार; यथाशास्त्र; शास्त्रोक्त; शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें. ' ऐसें कर्मभेदें मुदलें। फळसुखही त्रिधा जालें। तें हें यथागमें केलें । गोचर तुज। ' –ज्ञा १८.८१०. [यथा+आगम] **०जात**–वि. १ जन्मल्याप्रमाणें; जसा जन्मला तसा. २ मूर्ख; खुळा; वेडपट इ० सूचित अर्थी. ३ स्वभावतः; निसर्गसिद्ध; स्वाभाविक. **०तथा**–अ. कसा तरी; कष्टानें; जेमतेम. ' संसार यथातथा चालला. ' **०तथ्य**–क्रिवि. जसें असेल तसें; खरें; खरेपणानें. **०तृप्त-तृप्ति**–क्रिवि भरपूर; मनसोक्त; पाहिजे तितकें. **यथाशक्ति-क्त्या, यथानुशक्ति-क्त्या**–क्रिवि. शक्तीप्रमाणें; सामर्थ्यानुरूप; एखाद्याच्या कर्तृत्वाप्रमाणें. [यथा+अनु+शक्ति] **०निगुती**–क्रिवि. यथार्थत्वानें; यथार्थपणें; योग्य रीतीप्रमाणें; यथायोग्य; स्पष्ट. ' ऐक बापा परीक्षिती । तूं तंव सुखाची सुखमूर्ती । भीमकी पाणिग्रहणस्थिती । यथानिगुती सांगेन । ' –एरुस्व १.९. **यथानुक्रम-मे, यथानुक्रमानें**–क्रिवि. यथाक्रम पहा. **०न्याय**–क्रिवि. न्यायास नीतीस धरून; न्याय्य रीतीनें; योग्यपणें. **०पद्धति-त**–क्रिवि. रीतसर; पद्धतीप्रमाणें; वहिवाटीला अनुसरून. [सं.] **०पूर्व**–क्रिवि. पूर्वीप्रमाणें; पहिल्यासारखें, पूर्ववत्. ' कुपथ्य होतांच दुखणें पुन्हां यथापूर्व झालें. ' [सं.] **०प्रति-त**–क्रिवि. मूळ प्रतीप्रमाणें. [सं.] **०बुद्धि-मति**–क्रिवि. आपल्या बुद्धीप्रमाणें; आपल्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणें; आपल्या ज्ञानाप्रमाणें. **यथाभिमत**–क्रिवि. इच्छेप्रमाणें; कल्पनेप्रमाणें आपल्या योजनेस अनुसरून. [यथा+अभिमत] **०मार्ग**–क्रिवि. योग्य मार्गानें; नीतिनियमांस धरून; खऱ्या मार्गानें; योग्य प्रकारें. **०यथा**–क्रिवि. १ जसजसा; जसा जसा. तथातथा शब्दाबरोबर प्रयोग. ' यथायथा चंद्रादिक ग्रह येतात तथातथा जप करावा. ' २ कसेंतरी; सरासरी; जितक्यांस तितकें; बेताबाताचें; अल्प. ' त्याचें गणितज्ञान म्हणजे यथायथाच आहे. ' **०युक्त, ०योग्य**–क्रिवि. जसें असावें तसें; योग्य तऱ्हेनें; बरोबर रीतीनें; रास्त. **०रीति-रीत**–क्रिवि. रीतीप्रमाणें; रूढीनुसार; प्रचाराप्रमाणें; वहिवाटीस अनुसरून. [सं. यथा+रीति] **०रुचि**–क्रिवि. आवडीप्रमाणें; इच्छेप्रमाणें; मनाप्रमाणें. ' दिधलें भोजन यथारुचि। ' –एरुस्व ३.२५. **यथार्थ**–क्रिवि. १ बरोबर; खरें; जसें घडलें त्याप्रमाणें; वास्तविक योग्य रीतीनें. ' किंबहुना प्रियपणें । कोणतेंही झकवूं नेणें । यथार्थ तरी खपणें । नाहीं कवणा । ' –ज्ञा १६.१२०. २ अन्वर्थ; नांवाप्रमाणें; शब्दाप्रमाणें. उदा० भूपाल, जलधि, आतपत्र. हे शब्द यथार्थ होत, कारण प्रत्येक शब्दावरून आपणास त्या शब्दवाचक वस्तूचें वर्णन किंवा माहिती कळते. [यथा+अर्थ] **यथार्थबुद्धि**–स्त्री. निःपक्षपाती बुद्धि; मनाची समता. –नि ५८३. **यथार्ह**–क्रिवि. योग्यतेप्रमाणें; शोभेसें. [यथा+अर्ह] **०लाभ**–क्रिवि. मिळकतीप्रमाणें; फायद्याप्रमाणें; उत्पन्नाप्रमाणें. **यथावकाश, यथावकाशें**–क्रिवि. सवडीप्रमाणें; फुरसतीनें. [यथा+अवकाश] **यथावत**–क्रिवि. यथायोग्य; जसें आहे तसें. 'तसें समस्तही श्रुतिजात । ठाके लाजलें ऐसें निवांत । तें मीचि करी यथावत । प्रकटोनिया । ' –ज्ञा १५.४३५. [सं. यथावत्] **यथावसर**–क्रिवि. प्रसंगानुसार; वेळ सांपडेल त्याप्रमाणें. [यथा+अवसर] **०विधि**–क्रिवि. नियमानुसार; शास्त्रांतील विधींत सांगितल्याप्रमाणें; विधींचें उल्लंघन न करितां. **०विभव**–क्रिवि. ऐपतीप्रमाणें; सामर्थ्यानुरूप; मिळकतीला धरून. **०विभागें**–क्रिवि. विभागाप्रमाणें; वांटणीप्रमाणें; हिश्शाप्रमाणें. **०वृत्त**–क्रिवि घडल्याप्रमाणें; जसें झालें तसें: खरेपणानें. **०शक्ति**–क्रिवि. आपल्या शक्तीप्रमाणें; ऐपतीनुसार; कर्तृत्वानुसार. **यथांशतः**–क्रिवि. वांटणीप्रमाणें; योग्य प्रमाणानें; निरनिराळ्या हिश्शांप्रमानें; हिशोबानें. [यथा+अंशतः] **०शास्त्र**–क्रिवि. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें; शास्त्रमर्यादा न उल्लंघितां. **०श्रुत**–क्रिवि. १ ऐकल्याप्रमाणें; ऐकलेल्या गोष्टीबरहुकूम. २ जसें शिकला त्याप्रमाणें; आपली बुद्धि न चालवितां फक्त गुरूनें पढविल्याप्रमाणें. ३ काव्याचा अर्थ लावतांना फक्त पदांचा अर्थ दिसतो त्याप्रमाणें; यौगिक अर्थानें; व्यंगार्थ लक्षांत न घेतां. ' –मभाको **०संख्य**–क्रिवि. संख्येप्रमाणें; यथानुक्रम; क्रमानें. [यथा+संख्या] **०संप्रदाय**–क्रिवि. संप्रदायानुरूप; सामान्य रीतीप्रमाणें; पद्धतीप्रमाणें. **०संभव**–क्रिवि. १ शक्यतेप्रमाणें; अंदाजाप्रमाणें. २ ऐपतीप्रमाणें,साधनानुकूलतेप्रमाणें. **०सांग**–क्रिवि. पूर्णपणें; कांहीं न्यून न ठेवतां; कोणतीहि गोष्ट

कमी न करतां; अंगोपांगासहित शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें. ' येथा-सांग रे कर्म तेंही घडेना । घडे धर्म तों पुण्य गाठीं पडेना । ' -राम १००. [यथा+स+अंग] **०सामर्थ्य**-क्रिवि. शक्तीप्रमाणें; यथा शक्ति; कर्तबगारीला साजेसें; ऐपतीप्रमाणें. **०सुख**-क्रिवि. समाधानानें; शांततेनें. **०सूत्र**-क्रिवि. सूत्राप्रमाणें; तंतोतंत त्याप्रमाणें; अगदीं बरोबर तसें. **०स्थानीं**-क्रिवि. योग्य स्थळीं; योग्य ठिकाणीं; उचित जागेवर. [यथा+स्थान] **०स्थित**-क्रिवि. १ कालानुरूप; परिस्थितीप्रमाणें. २ भरपूर; यथेच्छ; रगड; पुरेपूर; पूर्णपणें; जितकें पाहिजे असेल तितकें. ' आज भोजन यथास्थित मिळालें. ' ३ जसें होतें तसें; यथायोग्य. ' पोथी नीट यथास्थित बांधून ठेव; नाहींतर भिजेल. ' ४ पूर्वकुशलावस्था न पालटतां; पूर्वीप्रमाणें. ' आजपर्यंत इकडील वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. ' **०ज्ञान-ज्ञानें**-क्रिवि. यथामति; ज्ञानाप्रमाणें; एखाद्याच्या समजुतीप्रमाणें. [सं यथा+ज्ञान] **यथेच्छ, यथेच्छा, यथेष्ट**-क्रिवि. १ भरपूर विपुल; इच्छेला येईल तसें, तितकें; इच्छेप्रमाणें. ' यथेष्ट पुरतें जरी प्रथम दाम कां साधिती । ' -केका ८७. २ स्वैर; मन मानेल तसें; अनिर्बंधपणें; अनिर्बंध. [यथा+इच्छा; यथा+इष्ट] **यथेष्टाचार**-पु. मनसोक्त वर्तन; स्वैराचार; अनिर्बंधता; बेछुट वागणूक. [यथा+इष्ट+आचार] **यथेष्टाचारी**-वि. स्वैराचारी; मन मानेल तिकडे भटकणारा; वाटेल तसें वागणारा. **यथेप्सित**-क्रिवि. १ इच्छेप्रमाणें; इच्छिल्याप्रमाणें. २ स्वैरपणें; स्वतंत्रपणें; आपल्या कल्पनेप्रमाणें; वाटेल तसें. [यथा+ईप्सित] **यथोक्त, यथोदित**-क्रिवि. म्हटल्याप्रमाणें; बोलल्याप्रमाणें; वर्णन केल्याप्रमाणें; दाखवून दिल्याप्रमाणें; आज्ञा केल्याप्रमाणें. [यथा+उक्त, उदित] **यथोचित**-क्रिवि. योग्य दिसेल तसें; लायकीप्रमाणें; अनुरूप. [यथा+उचित] **यथोपपन्न**-क्रिवि. शक्तीप्रमाणें; ऐपतीप्रमाणें; प्राप्तीप्रमाणें. ' यथोपपन्न खर्च-दान-भोग-वर्तन-वैभव-खाणें-पिणें ' इ० [यथा+उपपन्न]

यद्-सना. जो, जी, जें; हें संस्कृतमध्यें संबंधीसर्वनाम आहे. परंतु मराठींत याचा उपयोग फक्त समासांतच आढळतो. उदा० यत्कथा=जी गोष्ट, ज्याची गोष्ट. यदंश=ज्याचा अंश. यत्कृत=ज्यानें केलेलें; यच्चित्त, यन्नाम इ० [सं.] **यदर्थ**-क्रिवि. ज्या कारणाकरितां; ज्या हेतूनें [यद्+अर्थ] **यदर्थी**-क्रिवि. हा शब्द यदर्थ याचें अनागर रूप असुन एतदर्थ ऐवजीं चुकीनें वापरला जातो; या कारणास्तव; या कारणाकरितां. **यदीय**-वि. ज्याचा; ज्यासंबंधी

यदगुदी-स्त्री. (कर.) गडबड; धांदल. (विशेषतः बायकांच्या भाषेंत रूढ).

यॅदॉच, येदोच-वि. (गो.) एवढाच. ' येदोच दिता. '

यंदा, यंदाच्या वर्षी-क्रिवि. यावर्षीं; चालू सालीं. [फा. आयंदा]

यदाकदाचित, यदि-शअ. जर करतां; जर कदाचित. [सं. यदा+कदा+चित्]

यदूळ-क्रिवि. हावेळपर्यंत; इतक्यावेळ; वाढूळ. [सं इयत्+वेला एवढा+वेळ]

यदृच्छा-स्त्री. १ योगायोग; आपोआप संभव; सहज गति; परमेश्वराची इच्छा; ईश्वरेच्छा. ' दुःख जसें प्रयत्न न करतां यदृच्छे करूनच होतें तसें सुखहि यदृच्छेकरूनच होईल. ' २ स्वच्छंदीपणा; स्वैरपणा. [सं.] **०लाभ**-पु. अनायासें किंवा आकस्मिक रीतीनें घडलेला लाभ; प्रयत्नाशिवाय झालेला फायदा. **०लाभजीवी**-वि. आपोआप मिळेल त्यावर जगणारा. **यदृच्छया**-क्रिवि. सहज; प्रयत्नाशिवाय. ' यांचेविण यथाकाळें । यदृच्छया जें जें मिळे । तें तें सेवी सकळ मंगळ । गुरुवाक्यमेळें स्वानंदें । ' -एभा ३.५००. [यदृच्छा शब्दाचें तृतीयेचें एव. रूप]

यंदो-पु (गो.) चूल कोरलेला दगड.

यद्यपि, यद्यपिचेत्-उअ. जरी. [सं. यदि+अपि] **म्ह०** ' यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाचरणीयं नादरणीयं. '=एखादी गोष्ट जरी योग्य असली तरी ती लोकरूढीच्या उलट असल्यास करूं नये व आदरूं नये.

यद्वा-क्रिवि. अथवा; अगर; किंवा. [सं. यद्+वा]

यद्वा-क्रिवि (कु.) एव्हां; ह्या सुमारास. [म. एधवा]

यनमेनसवती-(वाप्र.) एक मुलींचा खेळ. -मराठीखेळ पृ. २९२.

यःपलाय-(वाप्र.) पळून जाणें; धूम ठोकणें; पाय काढणें. (क्रि० करणें; म्हणणें) [यःपलायति सजीवति । या संस्कृत म्हणीवरून]

यबड-वि. मट्ठ; मंद; गबाळ्या. [का.]

यबाव-पु हावभाव; अजागळपणा; चाळा. (शेतकऱ्यांत रूढ). [म. हावभाव]

यब्धा-पु. स्त्रीसंग करणारा. [सं.] **म्ह०** अडाणी यब्धा योनीचा नाश.

यम-पु १ प्राण्याला त्याच्या मरणानंतर पापपुण्याचा निवाडा करून त्याप्रमाणें नरकाला किंवा स्वर्गाला पाठविणारी देवता (ही सामान्यतः पाप्यांनां शिक्षा करणारी देवता असेंच मानण्यांत येतें); कृतांत; काळ; यमधर्म. २ (ल.) कर्दनकाळ; निर्घृण मनुष्य; भयंकर दिसणारा मनुष्य. [सं.] (वाप्र.) **यमाच्या दाढेंत असणें-पडणें-सांपडणें-जाणें**-१ मृत्युमुखांत असणें-पडणें-सांपडणें. २ (ल.) मोठ्या संकटांत असणें, पडणें, सांपडणें; अतिशय हाल करणाराच्या तावडींत सांपडणें. **यमाच्या दाढेंत घालणें-टाकणें**-मृत्युमुखांत टाकणें; मोठ्या संकटांत घालणें; अति क्रूर मनुष्याच्या आहारीं टाकला जाणें.

सामाशब्द- ०**कुंड-कोंड**-पु (गो.) १ नरककुंड; पाप्यांना शासन करण्याकरितां त्यांना कोंडून ठेवण्याचें यमाचें कुंड. २ (ल.) तुरुंग; कैदखाना. [सं. यमकुंड] ०**गंड**-पु. मृत्युकाळ; मरणकाळ; गंडांतर; मृत्युयोग. 'त्याच दिनीं यमगंड समजुनी। निमग्न झाला पार्थिव पूजनीं।' -कीर्तन १.६०. ०**जाच-जाचणी**-पुस्त्री. यमानें दिलेली शिक्षा; यमानें भोगावयास लावलेलें दुःख. ०**झाडी**-स्त्री. संकट. 'सांपडलासी यमझाडी।' -नामना १९. ०**तर्पण**-न. यमाच्या नांवानें करावयाचें तर्पण. हें यमद्वितीयेला करितात. ०**तुल्य**-वि. १ यमासारखा; क्रूर; भयानक; अतिशय भयंकर. २ विरूप; तिरस्कृत; किळसवाणा. ०**दंड**-पु. पाप्यांना यमाकडून करण्यांत येणारी शिक्षा. ०**दंष्ट्रा, दाढ**-स्त्री. १ यमाचें मुख; काळमुख; मृत्युमुख. २ आश्विन महिन्याचे शेवटचे आठ व कार्तिक महिन्याचे सर्व दिवस. या अर्थी अनेकवचनीं उपयोग. या काळांत रोगराई आजार बराच असतो. यावरून रूढ. [सं. यमदंष्ट्रा] ०**दिशा**-स्त्री. दक्षिण दिशा; यमाचें वसतिस्थान ज्या दिशेकडे आहे ती दिशा. ०**दूत**-पु. १ माणसाचे प्राण हरण करून नेणारा यमाचा नोकर. २ (ल.) निष्ठुर अंतःकरणाचा नोकर, क्रूर शिपाई. ०**द्वितीया**-स्त्री. कार्तिक शुद्ध द्वितीया; भाऊबीज. ०**धर्म**-पु. यम ०**नंदन**-पु यमाचा मुलगा; धर्मराजा; युधिष्ठिर. [सं. नंदन=पुत्र; मुलगा] ०**पाश**-पु. मनुष्याचे प्राण काढून नेण्यासाठीं यम टाकतो तो पाश; मृत्यूचा फांस. मृत्यूची छाया. 'यमपाश गळ्यांशीं ज्यास लागला त्यास.' -शारदा. ०**पुरी**-स्त्री. १ यमाची राजधानी; पापी लोकांना शासन करण्याची जागा; यातनांचें आगर. २ तुरुंग. ३ यमपुरींतील यातना दाखविणारा कळसूत्री बाहुल्यांचा खेळ. [सं. यम+पुरी] **यमपुरीं-रा जाणें**-क्रि. मरणें. 'धर्मात्मजार्थ सेनाबिंदु कुरुश्रेष्ठ यमपुरा गेला।' -मोकर्ण ४.२१. **यमपुरीस पाठविणें**-१ अतिशय मारणें; बेदम चोप देणें. २ ठार मारणें. **यमपुरीचा यातना, यमपुरीचा दंड, यमपुरीचें दुःख**-मोठ्या आजाराचें दुःख; घोर शिक्षा; बेदम मार इ० ०**बाधा**-स्त्री. यमानें दिलेली शिक्षा; यमदंड; यमयातना. 'न भुले वाट न पडे छंदी। त्यास नव्हे कधीं यमबाधा।' ०**भट**-पु. (विनोदानें) यमाचे दूत. ०**यातना**-स्त्री. १ यमाकडून पापीजनास करण्यांत येणारे क्लेश. 'विषयांचें सुख येथें बहु लागे गोड। पुढें आहे अवघड यमयातना।'-नागा. २ विपरीत परिस्थितींतील भयंकर हाल; अतिदुःख; क्लेश. [सं. यम+यातना] ०**रूप-रूपी-स्वरूप-पी**-वि. काळरूपी; यमासारखा भयंकर, उग्र; मृत्युसारखा. ०**लोक**-पु. यमाचें वसतीस्थान ज्या ठिकाणीं मरणोत्तर प्राण्यांना शिक्षा केली जाते तें स्थान. ०**लोकची वाट धरणें**-१ मरणोन्मुख होणें. २ मरणें. ०**शिक्षा**-स्त्री. यमदंड; यमजाचणी. ०**सदन**-न. यमाचें घर; यमलोक; मरणोत्तर शिक्षा भोगण्याचें ठिकाण. [सं. यम+सदन] **यमसदनाला पाठविणें**-ठार मारणें. **यमाचा पाहुणा**-पु. (मरणानंतर खात्रीनें यमाच्या घरीं पाहुणा म्हणून जाणारा इसम, नरकांत जाणारा) महापापी मनुष्य. **यमाजीपंत, यमाजीभास्कर, यमाजीबाबाजी**-पु. यम; मृत्यु. **यमाजीपंताचें-यमाचें बो(बु)लावणें**-न. १ मृत्यु; मरण २ (ल.) अतिदुष्ट मनुष्याचें बोलावणें, अतिकडक मनुष्याकडून किंवा कदैनकाळाकडून आलेलें बोलावणें; अति नावडणारें परंतु विरोध करतां न येणारें-न चुकवता येणारें बोलावणें, काम.

यम—पु. १ नियमन; ताब्यांत ठेवणें; इंद्रियदमन; राग, विकार, इंद्रियें यांचें दमन; आत्मसंयमन. २ अष्टांग योगांतील पहिलें अंग. तीं आठ अंगें येणेप्रमाणें:-यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधि. यम या अंगांतील पांच प्रकार, भाग यांबद्दल सामान्यतः योजतात. ते पांच प्रकार याप्रमाणें-अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह. [सं. दे. प्रा. जम; सं. यम्=ताब्यांत ठेवणें] ०**नियम**-पुअव. १ आत्मसंयमनासाठीं करावयाचीं कृत्यें; नियोजित व ऐच्छिक व्रतें; अष्टांग योगांतील पहिलीं दोन अंगें. नियमाचे पांच अवयव याप्रमाणें:-शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान. 'यम नियय दोघे द्वारपाळ। अखंडित सावध अविकळ। अंतर्बाह्य वृत्ति करूनि निश्चळ। दोघे दोहीं बाहीं। उभे।' -स्वादि १०.२.२८. २ आत्मसंयमनाचे नियम; यमाचे नियम. ०**नियमसाधनी**-वि. इंद्रियें, राग, विकार इ० ताब्यांत ठेवणारा; आत्मसंयमी व व्रतवैकल्यें यथायोग्य करणारा; योगी. **यमणें**-सक्रि. (काव्य) नियमन करणें. 'यमु म्हणे काय यमावें। दमु म्हणे कवणातें दमावें।' -ज्ञा ९.१९९. **यमन**-न. दमन; ताब्यांत ठेवणें; निग्रह; संयमन. [सं.] **यमी**-वि. १ यमनियम किंवा यम साधणारा; संयमी; इंद्रियनिग्रही; योगी. २ ताब्यांत ठेवणारा; नियमन करणारा; आंवरून धरणारा.

यम, यमल—न. जुळेभाऊ; जोड. 'करुनी करिति रजांहीं लिंपोनि स्वस्वरूपहानि यम।'-मोसभा ३. -वि. जुळा; जावळा; जोडीपैकीं एक. [सं.]

यमक—न. एक शब्दालंकार. कवितेच्या एका चरणांत किंवा चरणार्धांत जीं अक्षरें ज्या क्रमानें संनिध असतील त्याच क्रमानें दुसऱ्या चरणांत किंवा चरणार्धांत त्यांची आवृत्ति झाली म्हणजे हा अलंकार साधतो. याचे अनेक भेद आहेत. उदा० वर्ण-पद-लिंग-प्रकृति-प्रत्यय-भाषा-पदावयव-यमक. या अलंकारांतील प्रत्येक ओळींतील अक्षरांचा अर्थ प्रायः निराळा असतो. उदा० जो धैर्यें धरसा सहस्र करसा, तेजें तमा दूरसा। जो रत्नाकरसा गभीर सुरसा भूपां यशोहारसा।'-र. [सं.]

'हरिकीर्तनासीं नर हो तुम्ही जागा' अशा चार ओळी **यमकाला यमक**–१ जशास तसें; तोडीस तोड. (क्रि० मिळवणें; साधणें; लावणें; बसवणें; मिळणें; लागणें; बसणें). २ होस हो; प्रत्येक गोष्टीला होकार देणें; अनुमति देणें; होयबा करणें.

यमघंट---पु. (ज्योतिष) एक योग. रविवारीं मघा, सोमवारीं विशाखा, मंगळवारीं आर्द्रा, बुधवारीं मूळ, गुरुवारीं कृत्तिका, शुक्रवारीं अनुराधा, शनिवारीं हस्त याप्रमाणें त्यात्या वारीं तीं तीं नक्षत्रें आलीं असतां यमघंटयोग समजावा. –ज्योतिषसार पृ २२.

यमन—न. नियमन; निग्रह; ताब्यांत ठेवणें. [सं.]

यमन---पु. (संगीत) एक राग. हा कल्याण रागाचा एक प्रकार आहे म्हणून त्याला यमनकल्याण असेंहि म्हणतात. ह्या रागांत षड्ज, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद, हे स्वर लागतात. जाति–संपूर्ण संपूर्ण, वादी गांधार, संवादी निषाद, गानसमय रात्रीचा पहिला प्रहर. **यमन(नी)बिलावल–र**–पु. (संगीत) बिलावल रागाचा एक प्रकार. ह्यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण–संपूर्ण. वादी षड्ज, संवादी पंचम. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर.

यमपुष्प—न सुरवंट; कुसरूड; घुला; केसाळ किडा. [सं.]

यमुना—स्त्री. १ गंगेला मिळणाऱ्या एका मोठ्या नदीचें नांव. २ यमाची बहीण. [सं.] **यमुनेचा खडा, यमुनी**–पुस्त्री. यमुना नदींत सांपडणारा एक प्रकारचा काळा खडा. हा अंगठींत बसवून त्यावर सोनेरी अक्षरें कोरतात

यया—सना (काव्य) यास; ह्याला (या किंवा हा याचें चतुर्थीचें रूप). 'कैं ऐसें पातां ययां एकु हीं गुणु। आथीचिना।' –शिशु ८६२.

यरकाल—न (बे.) बैल गाडीची साटी व जू यांना जोडणारा दांडा. [का. येर–उचलणें;+काल–पाय]

यरेकर—पु (कुं.) येरें घरून वसणारा.

यर्हि—क्रिवि. यदा; ज्यावेळीं. तर्हि या शब्दाशीं संबंध राखून या शब्दाचा प्रयोग होतो. अशाच अर्थाची दुसरी जोडी. यदा तदा. हे शब्द विशेषतः शास्त्री, पंडित इ० च्या वापरांत दिसून येतात. अशाच तऱ्हेचा दुसरा शब्द. **कर्हि**–केव्हां; कदा. [सं.]

यलम—स्त्री. (गो.) सोडत; लॉटरी. [अर. इलम=विद्या]

यलम्मा---स्त्री. १ रेणुका; परशुरामाची आई. २ यलम्मा देवीची जोगतीण. [का. यल्लम्मा]

यव—पु. १ एक धान्य; सातू; जव. २ हाताच्या बोटावरचें यवाच्या आकाराचें चिन्ह. ३ यवाच्या दाण्याची लांबी. हें एक लांबीचें परिमाण. सहा मोहऱ्यांच्या दाण्यांच्या लांबीबरोबर हें असतें. [सं.] **०क्षार–खार**–पु. (विरू.) सातूच्या गवताच्या राखेपासून तयार केलेला क्षार; (इं.) नायट्रेट ऑफ पोटयाश. [सं. यवक्षार] **यवोदक**–न. (श्राद्धाच्या वेळीं लागणारें) सातूमिश्रित पाणी.

यवजणें—सक्रि. (कु.) आटवण करणें; योजणें. [सं युज्]

यवन—पु. म्लेच्छ; आयोनिया देशांतील मनुष्य; आर्यवंशीय नसलेला मनुष्य; हल्लीं सामान्यतः मुसलमानास हा शब्द योजतात. [सं.] **यवनाचार्य**–पु. १ मुसलमान शास्त्री; मुसलमानांतील विद्वान् किंवा पंडित. २ रमल शास्त्र हिंदूंत फैलाविण्याकरितां मुसलमान झालेला कोणी एक ब्राह्मण. [यवन+आचार्य] **यवनानी**–स्त्री. अरबी अगर फारशी अक्षरलिपी. [सं.] **यवनी**–स्त्री. यवन स्त्री; मुसलमान स्त्री. –वि. यवनासंबंधी; यवनाचा.

यवनास—पु. अव. १ श्रम; त्रास; दगदग; कंटाळवाणें व मेहनतीचें काम. २ त्रस्त अवस्था; अतिशय त्रासिक स्थिति. [वनवास वर्णव्यत्यास]

यवस—न. गवत; तृण; चारा. 'यवस क्षत्रिय–कुळशत यत्परशुदवानळा, तयाराम।'–मोबालमंत्र रामायण १.३५. [सं.]

यश—न. १ दैवाची अनुकूलता; चांगलें नशीब; सुदैव. 'हा वीर आहे पण याला यश नाहीं म्हणून हा पराभूत होतो.' २ जय; विजय; सुपरिणाम; सुफल. 'याला बहुत वैद्यांनीं औषधें दिलीं परंतु गोसाव्याचे हातास यश आलें.' ३ आपल्या सत्कृत्यांबद्दल इतरांकडून मिळणारी वाहवा; उपकाराच्या जाणिवेचें अस्तित्व पाहून मिळणारा आनंद. 'तुम्ही याचें किती बरें करा, परंतु हा तुम्हांस यश देणार नाहीं, भांडून जाईल.' ४ कीर्ति; प्रसिद्धी, [सं. यशस्] **०बुडविणें**–नांव, कीर्ति बुडविणें. 'तों भीष्मयश हयांनीं स्वैरग होऊनियां बुडविलें हो।' –मोभीष्म ९.४. **०लाभास येणें**–श्रमाचें सार्थक होऊं लागणें; चांगला मोबदला मिळूं लागणें, मिळणें; आशा फलद्रुप होणें. (बाळगिलेला मनुष्य किंवा प्राणी, चालविलेला उद्योग अगर अभ्यास यांच्या विषयीं उपयोग). **यशाचा केश**–कीर्तीचा–मानाचा अल्पांश; अत्यल्प मान; थोडेंसें यश. (क्रि० मिळणें; सांपडणें). **०अपयश, यशापयश**–न. कीर्ति किंवा अपकीर्ति; मानापमान; स्तुति किंवा निंदा. **०वंत**–वि. विजयी; कीर्तिमान्; दैववान्. **यशस्कर**–वि. १ यश देणारें; कीर्तिकर; प्रसिद्धि करणारें. २ स्तुत्य; माननीय; आदरणीय. [सं यशस्+कृ–करणें] **यशस्मान्, यशस्वान्, यशस्वी**–वि. १ कीर्तिमान्; प्रसिद्ध; नांवलौकिक मिळविलेला; विजयी. २ सुदैवी; नशिबवान्; भाग्यवंत; भगवान; सुखी; भरभराटींत असलेला. ३ यश देणारा; ज्याच्या अस्तित्वानें किंवा सान्निध्यानें यश मिळतें अशी (वस्तु); शुभगुणी; लाभदायक. **यशोधन**–न. यश हेंच धन; कीर्तिरूपी संपत्ति. –वि. कीर्ति हेंच ज्याचें धन आहे असा (मनुष्य).

यष्टि, यष्टिका—स्त्री. काठी. [सं.] **यष्टिमधु**-पु ज्येष्ठमध.

यसवार, यस्वार—पु. (कु.) वेस्वार; मसाला (मिर्ची घातलेला). -मसाप ४.२८०.

यसा—पुअव. (निजाम सं.) कोळिष्टकें.

यहतियात—स्त्री. काळजी; बंदोबस्त. 'तुम्ही आपले बचावाची यहतियात करीत जावी.' -रा ५.९१. [अर. इहतियात्]

यहसान—न. १ उपकार; कृपा. २ सत्य. ३ निष्ठा; विश्वास; एहसान. [अर. इहसान्] **०मंद**-कृतज्ञ. [फा. इहसान् मंद]

यहु(हु)दी—पु. पालेस्टाइन प्रांतातील एका जातीचें नांव. इस्रायल. -पु. या जातीचा मनुष्य; इस्रायल.

यळकोट—न. १ सातकिल्ले; तट असलेली जागा. २ खंडोबाला ओंवाळतांना उच्चारण्याचा शब्द; खंडोबाचा जयजयकार. येळकोट पहा. [का. येळकाटि=सात किल्ले]

यऴणें, यळवणें—सक्रि. पदार्थ शिजल्यानंतर त्यांतील पाणी काढून टाकणें, पेज काढून टाकणें; भात शिजल्यावर त्यांतील पेज काढून तो मोकळा व फडफडीत करणें, वेळणें, वेळवणें पहा. **यळवणी**-स्त्री. (मराठ्यांत रूढ) कटाची आंबटी किंवा सांबारें.

यळिल—वि. निष्फळ. -शर.

यक्ष—पु. एक देवयोनि; उपदेवता; कुबेराचा सेवक (हे यक्ष कुबेराच्या खजिन्यावर किंवा बागेवर नेमलेले असतात.) [सं. यक्ष्=पूजा करणें] **०कर्दम**-नपु. सुगंधी उटी; सुवासिक उटणें; कुंकुम, अगरु, कस्तूरी, कर्पूर आणि चंदन अशा पंचद्रव्यांचें हें उटणें असतें. 'यक्षकर्दम डवरिले सरिसें।' -भाए ४४३. **०धन**-न. पुरून ठेवलेलें द्रव्य; ठेवा; सांठा; ज्याचा उपयोग न करतां ज्यांचें फक्त रक्षण करावयाचें असें धन. 'तैसेंचि कृपणाचें यक्षधन। नाहीं दान धर्मरक्षण। त्यातें तस्कर नेती मारून।' -एभा ८.१४९. **०धूप**-पु. राळ; सर्जरस. **०प**-पु कुबेर [यक्ष+प; पा=रक्षण करणें;] **०वित्त**-न. यक्षधन पहा. उपभोग न घेतां फक्त रक्षण केलेलें द्रव्य. **यक्षिणी**-स्त्री. यक्षाची स्त्री; यक्षस्त्री. या मंत्रतंत्राच्या सहायानें मनुष्यास वश होऊन अलौकिक सामर्थ्य देतात. **यक्षिणीची कांडी**-स्त्री. यक्षिणीची मंत्र सामर्थ्ययुक्त काठी; जादू, मंत्रविद्या. **यक्षिणीची कांडी फिरणें**-अकल्पित रीतीनें स्थिति पालटणें.

यक्ष्मा—पु. क्षयरोग. [सं.]

यज्ञ—पु. १ याग; होम. २ बलिदान; एखादी वस्तु देवतेस अर्पण करण्याची क्रिया; त्याग. ३ धर्मकृत्य; ईश्वरविषयक कर्म. [सं. यज्=पूजा करणें] **०कंकण**-न. यज्ञाच्या वेळीं यजमानानें हातांत बांधावयाचें कंकण. 'तें यज्ञकंकण करांबुजि राघवातें।' -लवकुशाख्यान. **०कुंड**-न. यज्ञाच्या वेळीं होमांत आहुति टाकण्यासाठीं केलेली जागा; होमकुंड; वेदी. **०दीक्षा**-स्त्री. यज्ञ करण्याचें व्रत; हें व्रत घेतांना कांहीं तरी खूण व्रत घेतल्याचा दाखला म्हणून घ्यावयाची असते. यावरून यज्ञदीक्षा म्हणजे ती खूण असाहि अर्थ होतो. उदा० यज्ञकंकण. **०नारायण**-पु. अग्निदेवता. **०पशु**-पु. यज्ञांत बळी देण्यास योग्य अगर बळी देण्याचा पशु. **०पुरुष**-पु. विष्णु; यज्ञदेवता. 'तूं यज्ञपुरुष नारायण।' -एरुस्व ३.३१. **०मुख**-पु. अग्नि. 'यज्ञमुखें काढीतसे खोडी। तो भिल्लिणीची देखोनी आवडी।' **०याग**-पु यज्ञ, होम इ०. यज्ञ वगैरे [एकाच अर्थाचे दोन्ही शब्द] **०वृक्ष**-पु. यज्ञाला ज्यांचें लांकूड उपयोगी पडतें असे वृक्ष. हे-पिंपळ, पळस, औदुंबर, रुई, शमी, खैर व आघाडा. निघंटूमध्यें वेन्हेकळ व नदीवड किंवा खुजावड यांनांहि यज्ञवृक्ष म्हटलें आहे. **०शाला**-स्त्री. यज्ञाची जागा; होमशाला. [सं.] **०सूकर**-पु वराहावतार. **यज्ञांग**-न. १ यज्ञाचा भाग. २ -पु. ज्याचे सर्व अवयव यज्ञरूप आहेत असा श्रीकृष्ण; यज्ञमूर्ति कृष्ण. 'तया नांव त्यागु। म्हणे तो यज्ञांगु। हें मानूनि सुभगु। पार्थु पुसे।' -ज्ञा १६.१३५. [यज्ञ+अंग] **यज्ञिय**-वि. यज्ञासंबंधीं; बली देण्यास योग्य. [सं.] **यज्ञेश**-पु. यज्ञांतील मुख्य देवता; यज्ञपुरुष; यज्ञफलदाता (विष्णु). [यज्ञ+ईश] **यज्ञोपवीत**-न. जानवें (हल्लीं हें सुताचें नऊ पदरी तीन फेरे असलेलें झालें. प्राचीन काळीं तें उपवीत म्हणजे विणलेलें वस्त्र होतें.) [सं. वे=विणणें]

या—उभअ. १ अगर; अथवा; किंवा. 'बातमी खरी या खोटी' -ख ९.४७९५. २ व; आणि. 'पत या तेज बुडली.' -ख १.१५०. -उद्गा. हे; अरे. 'देवाचें नांव या खुदा असें घेऊन.' -मदरु १.८३. [फा.]

या, आ—एक प्रत्यय. हा प्रत्यय सकर्मक क्रियापदांना लागला म्हणजे कर्तृत्ववाचक विशेषण तयार होतें. उदा० गोड बोलणें-गोडबोल्या; वाटमारणें-वाटमाऱ्या; प्राण घेणें-प्राणघेण्या.

याकुती—स्त्री. साखर, मसाला इ० घालून केलेलें भांगेचें मिश्रण; घोटा. [फा.]

याकूत—न. माणिक; तांबडया रंगाचें एक रत्न उत्तम याकूत हिंदुस्थान, सैबीरिया, सिलोन, इराण व ब्राझील या देशांत सांपडतात. -ज्ञाको (य) २३. [अर.]

याग—पु. १ यज्ञ; हवन; होम. २ पूजा. [सं. यज्=पूजा करणें] **यागी**-वि. यज्ञ करणारा; यजमान.

यागी—वि. संतप्त; दुःखी; रुष्ट; 'उमाबाई दाभाडी पुत्र वारले म्हणोन बहुत यागी जाहली.' -मराचिथोशा ५१. [हिं.]

याचक—पु. १ भिकारी; भीक मागणारा; २ मागण्यास आलेला मनुष्य. [सं. याच्–मागणें] **०वृत्ति**–स्त्री. भिक्षुकी; भिक्षा मागण्याचा धंदा; भिक्षा मागून पोट भरणें. [सं. वृत्–राहणें] **याचकी, याचकाई**–स्त्री. भिक्षुकी; भिकारीपणा. **याचणें** सक्रि. १ मागणें; विनंति करणें; प्रार्थना करणें. २ भिक्षा मागणें; एखाद्यापाशीं भीक मागणें; एखादी वस्तु मागणें. [सं. याच्=भीक मागणें] **याचन–ना**–नस्त्री. भिक्षा; भीक; विनंति; अर्जे; प्रार्थनापूर्वक मागणें. **याचनीय**–वि. भीक मागण्यासारखी; भिक्षा मागण्यास किंवा घालण्यास योग्य, लायक. [सं.] **यांचा, याञ्चा**–स्त्री. याचना. [सं. याञ्चा] **याचित**–वि. मागितलेलें; ज्याच्या जवळ याचना केली तो (मनुष्य.) [सं.] **याचिता**–वि. भिक्षा मागणारा; भिकारी; याचक. **याची**–पु. याचक. 'असें असतां द्विज पांचसात याची।' –र ३.

याजक, याजी—पु. यज्ञकर्ता; यज्ञकर्म चालविणारा उपाध्याय; ऋत्विज इ० [सं.] **याजन**–न. दुसऱ्याकडे यज्ञक्रिया वगैरे चालविणें; दुसऱ्याकरितां यज्ञासंबंधीं सर्व व्यवस्था पाहून तो तडीस नेणें; उपाध्याय, ऋत्विज इ० चें होमासंबंधींचें काम. [सं.] **याजी**–वि. यजनशील; यज्ञकर्ता. 'याजी होउनियां द्विजांस म्हणतो या जी धनें घ्यावया।' –र २. **याज्य**–न. यज्ञाचा विषय; ज्याकरितां यज्ञ केला जातो असा मुख्य विषय–हेतु. 'जें भजतियांसी भज्य। याज्ञिकांचें याज्य।' –ज्ञा ६.४७७. –वि. यज्ञिय.

याजुष—वि. १ यजुर्वेदासबंधीं; यजुर्वेदांतील. २ यजुर्वेदी; यजुःशाखी; यजुर्वेदांत सांगितल्या प्रमाणें विधि व कर्में करणारा. [सं. यजुस्]

यात–ती—स्त्री. ब्राह्मण इ० जात; वर्ग; भेद; वर्ण. 'कोण याती कोण वर्ण।' [सं. ज्ञाति, जाति] **याति–ती**–स्त्री. १ जात, प्रकार. 'नाना याती कुशममाळा।' –दा १.२.१९. २ ज्ञाति; जात; वर्णभेद. [सं. जाति]

यात—वि. १ गेलेला; गत. २ मिळालेला; संपादित. [सं. या=जाणें]

यात—स्त्री. मोटवण. [का. याता]

यातना—स्त्री. १ हाल; अपेष्टा; तीव्र दुःख; वेदना; त्रास कष्ट. २ यमयातना; नरकवास. [सं.]

यातायात—स्त्री. १ येरझार: जाये;खेप; हेलपाटा. २ त्रास; श्रम; कष्ट; भानगड. जाण्यायेण्याचा त्रास–श्रम–कष्ट. ३ जन्ममृत्यु; जननमरण; पुन्हांपुन्हां जन्मणें आणि मरणें. 'ते कर्मी तरी वर्तती। परी कर्मफळा नातळती। आणि यातायाती लोपती। अर्जुना तयां।' –ज्ञा २.२७८. [यात+आयात]

यातायाती—स्त्री. जातिभेद; जातीजातींतील फरक. 'साधु किंवा ब्रह्मनिष्ठ यातायाती मनांत आणीत नाहींत.' [सं. जाति, ज्ञाति–ज्ञाति]

यातु, यातुधान—पु. राक्षस, 'उभाउभारे यातुधाना। करीत उटला हेचि गर्जना।' –कीर्तन १.५१. [सं.–स्त्रीपु यातु=जादु; यातुधान=जादुगार]

यात्रा—स्त्री. १ देवतादर्शन, तीर्थस्नान इ० करतां निरनिराळ्या पुण्यक्षेत्रीं जाऊन तेथें तीर्थस्नान, देवदर्शन, क्षौर, ब्राह्मणभोजन इ० विधि करून येणें; क्षेत्रसंचार. २ यात्रेकरूंचा समुदाय–समूह. ३ जत्रा; उत्सव. 'आज त्या देवाची यात्रा आहे म्हणून सर्व दुकानें तिकडे गेलीं.' ४ (ल.) फुकट पडलेला हेलपाटा; निष्कारण प्रवास. 'ज्या कामाच्या उद्देशानें मुंबईस गेलों तें झालें नाहीं, उगीच यात्रा घडली.' ५ देशांतरास गमन; संचार; पर्यटण. ६ (ल.) मरण; मृत्यु: व्यसुता. 'यात्रासमयभ्रंशें दुर्गति ऐसा धरूं नका त्रास।' –मोभीष्म ११.१२९. [सं. या–जाणें] **यात्रकरू, यात्रस्थ, यात्रेकरी–रू, यात्रिक**–वि. यात्रा करणारा; तीर्थक्षेत्रांस जाणारा: वारकरी. [यात्रा+करणें; सं. यात्रिक] **०डब्बी**–स्त्री. यात्रेच्या ठिकाणीं किंवा देवळांतून यात्रेकऱ्यांनीं दिलेले पैसे इ० ठेवण्याची पेटी; अशा पेटींतील पैसे इ०

याथातथ्य—न. खरेपणा; सत्य; वास्तविकता (याच्या उलट अर्थी भास) [सं.]

याथार्थ्य—न. सत्यता; उचितपणा; औचित्य; खरेपणाला धरून असणें.–क्रिवि. उचितपणानें: योग्यपणानें; सत्यतेला धरून; बरोबर. [सं. यथा+अर्थ] **याथार्थिक**–वि. खरें असेल तसें; योग्य; बरोबर; रास्त; न्याय्य; सत्यता आणि खरेपणाला धरून; औचित्याला अनुसरून.

याद—स्त्री. १ स्मरण; आठवण; एखादी गोष्ट लक्षांत ठेवणें –आणणें. 'कुठवर वाट पाहुं सखे मज सांग कांहीं। घडोघडी याद होते गृहीं पतिराज नाहीं।'–प्रला १४३. २ यादी; फेरिस्त; सूची; स्मरणार्थ टिप्पण; यादी लिहिलेला कागद. ३ अर्जे; विज्ञापनापत्र. (याद ही एखाद्या विशेष दर्जाच्या मनुष्याकडून येते आणि अर्जे हा सामान्य किंवा गरीब मनुष्याकडचा असतो.) [फा. याद्] **०गारी–गिरी**–स्त्री. १ आठवण; स्मृति; स्मरण. २ आठवण राहण्याकरितां खूण; स्मारक. [फा. याद्+गार] **०दास्त**–स्त्री. सूची; रोखा; सुचीबद्ध कागद. –मराचियोरा ७३. २ गायकांना येणाऱ्या ध्रुपद, ख्याल इ० चा थोडाबहुत भरणा. [फा. याद्+दास्त्] **०बस्त–हस्त**–स्त्री. सूची; लेख. 'कितेक जिन्नस सुटींत गेला त्याची यादबस्त...'–रा १.३६. [फा. याद्+–हस्त्] **०बूद**–स्त्री. १ निश्चित यादी; ठराव; दस्तऐवज; लेख. 'आणशपत यादीबुदी व्हावयाच्या आहेत. होतील.' –ख ६. ३०९२. २ स्मरणार्थ खूण–लेख. [फा. याद्+बुद्] **यादवान**–न. जन्मकालीन तिथिवारादि ज्या कागदावर लिहिलेलें असतें तो

कागद; जन्मलग्नपत्रिका; टिपण. **यादी**–स्त्री. १ स्मरणार्थ टिपण; याद; फेरिस्त. २ संस्थानिकांनीं हुजुरास केलेला अर्ज. [याद] **०दास्त**–वि. यादी देणारा. ' यादीदास्त करारदाद कुंवर बळराम संस्थान. ' –वाडबाबा ३.६०. याद पहा. **यादीचा**–वि. धड आठवणीचा; चांगली स्मरणशक्ति असलेला.

याद—न. जलचर; मत्स्य; मासा. ' सोडीना सुव्रतें तो जसिं जलधिजलें तापलें याद शीतें । ' –मोअंबरीषाख्यान ७ (नवनीत पृ. ३६०) [सं. यादस्]

यादव—पु यदूचा वंशज; एक राष्ट्र; कृष्णाचें कुल. **यादवी**–स्त्री. आपसांतील कलह; भाऊबंदकीचीं भांडणें; गृहकलह (कृष्णावतारीं यादव दारूनें धुंद होऊन आपसांत लढले व त्यामुळें त्यांचा नाश झाला यावरून). **यादवेंद्र**–पु. कृष्ण. [यादव+इंद्र]

यादृश—वि. जसा; ज्याप्रमाणें; ज्यासारखा. [सं. यादृशः –शी–शम्]

यान—न. १ ज्यांत किंवा ज्यावर बसून जातात असें साधन; वाहन; उदा० गाडी, पालखी, जहाज, घोडा इ०. २ जाणें; गमन; प्रवास. [सं. या=जाणें]

यानी–ने—अ. त्याचा अर्थ असा कीं; म्हणजे; पुढें. [अर. यअनी]

याफ्त—क्रि. प्राप्त झाला–ली–लें. –आदिलशाही फरमानें. [फा.]

याबू—पु. लहान घोडयाची एक जात. [फा.]

याम—पु. १ प्रहर; दिवसाचा आठवा भाग. ' एक याम उरली यामिनी । तों तृषाक्रांत जाहली जननी । ' –पांप्र ११.५. २ तीन तासांचा पहारा. ३ सहनशीलता. ४ थांबणें; विश्रांति; मुक्काम. [सं.] **०त्रय**–न. दिवसाचे किंवा रात्रीचे तीन प्रहर. **०द्वय**–न. १ दिवसाचे किंवा रात्रीचे दोन प्रहर. २ विशेषतः सूर्योदयानंतरचे दोन प्रहर. **यामार्ध**–न. वारपरत्वें प्रत्येक दिवशीं अर्धा प्रहरपर्यंत असणारा वाईट मुहूर्त, कुमुहूर्त. [याम+अर्ध] **यामिनी**–स्त्री. रात्र [सं.] **यामिनीचर**–पु राक्षस; निशाचर. [यामिनी+चर्; सं. चर–फिरणें]

याम्य—वि दक्षिणेकडचा; दक्षिण दिशेचा. [सं.] **०गोल**–पु. दक्षिण गोलार्ध. **याम्योत्तर**–वि. दक्षिणोत्तर. [याम्य+उत्तर] **याम्योत्तर रेषावृत्त**–न एका ध्रुवापासून दुसऱ्या ध्रुवापर्यंत मध्यरेषेस लंबरूपानें छेदून जाणारी रेषा; मध्यान्हरेषा; रेखावृत्त. **याम्योत्तरवृत्तपात**–पु याम्योत्तर वृत्ताचा विषुववृत्ताशीं होणारा छेद. –सूर्य १२. **याम्योत्तरा**–स्त्री. एका मोठया वर्तुलाला लंब असलेलें दुसरें मोठें लंब वृत्त; मध्यान्ह रेषा.

यायी— पु. अवचित येणारा प्रसंग; अकस्मात् घडून येणारी गोष्ट; अडचणीची वेळ. [सं.] –वि. जाणारा; गमन करणारा; प्रवासी; उतारू.

यार—पु. १ मित्र; स्नेही; दोस्त; मदतनीस. २ जार; धगड; प्रेमी. ३ हत्तीबरोबर चालणारा भालाईत. [फा. यार; सं. जार द्वितीयार्थी] **यारी**–स्त्री. १ मैत्री; अत्यंत सख्यभाव; दोस्ती; निकट स्नेह. ' अधमाची यारी । रंग पतंगाचे परी । ' –तुगा ११७७. २ मदत; साह्य. (क्रि० देणें.) [फा.] **०देणें**–संकटकाळीं मदत करणें; (जरूरीचे वेळीं) उपयोगी पडणें. **०न देणें**–(जरुरीचे वेळीं) निराश करणें; मदत न करणें; हेळसांड करणें. **यारेदी, यारदी**–पु. १ वेशपांडयाचा मदतनीस वतनाची देखरेख करणारा; गुमास्ता. २ –स्त्री. त्या गुमास्त्याची वंशपरंपरेनें चालत आलेली मालमत्ता–हुद्दा–जागा इ० [फा. यारी–दिहं]

यारदा–दी—वि. १ ठेंगणा व लहान; ओझ्यापाझ्याच्या कामीं उपयोगी पडणारें; हलक्या व ठेंगण्या जातीचें (घोडें). २ हलक्या कामाला उपयोगी पडणारा; सर्वसामान्य; हलका; कमी योग्यतेचा (मनुष्य, पशु इ०) ३ लहान परंतु बळकट अशा बट जातीचीं. (तटें, घोडीं)

यारी—स्त्री. (नाविक) ओझें उचलण्याचें यंत्र. यांत मुख्यतः कप्या असतात. (इं.) क्रेन.

यार्ड—पु. तीन फूट; तीन फुटांचें माप; वार; गज. [इं.]

यावत्—अ. १ जेथपर्यंत; जोंपर्यंत. २ –वि. जितका; जेवढा. (तावत् या शब्दाच्या बरोबर उपयोग). ३ यच्चयावत; सर्व; एकहि न वळगतां; शिल्लक न ठेवतां. ' आज गांवांतील यावत् मनुष्य कथेला गेलें आहे. ' [सं.] **म्ह०** यावत्तैलं तावद्व्याख्यानम् = जोंपर्यंत दिव्यांत तेल आहे तोंपर्यंतच गोष्टी चालावयाच्या;मनुष्याजवळ द्रव्य वगैरे असतें तोंपर्यंत त्याची चैन चालते. **यावच्चंद्रदिवाकरौ**–क्रिवि. चंद्रसूर्य आहेत तोंपर्यंत; सदासर्वकाळ; अनंतकालपर्यंत; चिरकाल. [सं. यावत्+चंद्र+दिवाकर=सूर्य] **यावज्जीव**–क्रिवि. जिवंत असेपर्यंत. **०तावत्**–न. (बीजगणित) अव्यक्त संख्या आणि अंक यांमधील संबंध; अव्यक्तसंख्यादर्शक अक्षर. –क्रिवि. बेतानें; विशेष सांगण्यासारखें नसलेलें; अधिक नव्हे व तुटपुंजेहि नव्हे असें. ' आमच्या घरीं यंदा दूधदुभतें यावत्तावत् आहे. '

यावनाल—पु. जोंधळा; जोंधळयाचा दाणा ' यावनालकण देखील नाहीं '=जोंधळयाचा एक दाणा सुद्धां नाहीं, मुळीच नाहीं.[सं.]

यावनी—वि. यवनाची; यवनासंबंधी.

यावा—पु. १ उदय; प्राप्ति; आगमन. ' मग म्हणे जी श्री गुरुदेवा । जो तुम्ही दाविला निज रूपाचा यावा । ' –स्वादि

१२.२.१०३. २ प्रभाव; धैर्य; सामर्थ्य; बल. 'समई यावा चुको नये।' –दा २.२.३१. ३ ओघ; प्रवाह. 'तंववरी नदानदींचीं नांवें। तंवचि पूर्वपश्चिमेचे यावे। जंव न येती आघवे। समुद्रामाजीं।' –ज्ञा ९.४६२. ४ आवेग; आवेश; फेरा; संचार; प्रवेश; तडाखा; कचका. 'कृष्णासी म्हणे राहे साहे। माझा यावा आला पाहें।' –एरुस्व १२.८९. ५ स्वारी. 'आला कर्नाटकी यावा।' –रामदासी २.१८७. ६ महत्त्व; सामर्थ्य; श्रेष्ठता. 'मत्पुत्र इंद्रासम ज्यास यावा।' –वामन विराट ८.२९. [येणें] **यावांका**–पु (महानु.) धैर्य; पुरुषार्थ. 'ऋषीशृंगु तपाचा यावांका।' –भाए ४६०.

याहा(ही)स—सना. (चतुर्थी विभक्ति) (व.) यांना; त्यांस. [हे]

याज्ञसेनी—विना. द्रौपदी; यज्ञामध्यें उत्पन्न झालेली स्त्री. **याज्ञिक**–न. १ यज्ञयाग; सामान्यतः यज्ञसमारंभ. २ लग्न, मुंज यांतील उपाद्धिक. –पु. १ यज्ञ करणारा; अग्निहोत्री; यज्ञ करणारा पूर्वमीमांसक. 'परिजे नुसधी हिंसा। तेथ उगवैल काय अहिंसा। परीनवल बापा धिंवसा। या याज्ञिकांचा।' –ज्ञा १३.२२३. २ लग्न, मुंज इ० धर्मकृत्यें चालविण्याचें अनुष्ठान जाणणारा ब्राह्मण. [यज्ञ] **याज्ञिकी**–स्त्री. याज्ञिकांचें काम; लग्न, मुंज इ० धर्मकृत्यें चालविण्याचें काम व तत्संधीं मंत्रमंत्र वगैरे. –वि. याज्ञिकांसंबंधीं; याज्ञिकाचा. [सं.]

यिव, यीव—स्त्री. बकऱ्याच्या मानेचें मांस; मानेंतील मांसाचा तुकडा. [यिव=मान सं. ग्रीवा ?] ०**कुकडी**–स्त्री. मानेंतील आणि ढुंगणांतील मांसाचे तुकडे. (एखादा बकरा अगर मेंढा कापला असतां मेंहाराचा या दोन भागांतील मांसावर हक्क असे) [यिव=मान+कुकडी=ढुंगण, मागचा भाग; अवशिष्ट भाग]

यींदा—पु. (माण.) नांगरास हाळीस बसण्याकरितां पाडलेलें भोंक; कुऱ्हाड, कुदळ, इ०ना दांडा बसविण्याकरितां असलेलें भोंक; नेढें.

यीस्तारी—स्त्री. पत्रावळ. इस्तारी पहा. [सं. वि+स्तृ]

युक्त—वि. १ जोडलेला; मिळवलेला; मिसळलेला; जुळविलेला. २ सहित; संपन्न. (समासांत) चिंतायुक्त; शोकयुक्त; संशययुक्त; खेदयुक्त; हर्षयुक्त; कामयुक्त; जलयुक्त; शर्करायुक्त इ०. ३ तत्पर; तयार; (अभ्यासांत अगर कामधंद्यांत) गुंतलेला; गढून गेलेला; सदोदित लक्ष देत असलेला. 'पार्थहितीं मुरारि युक्त सदा।' –मोकर्ण २३.२५. ४ योगांत निमग्न झालेला; योगाभ्यासी. ५ योग्य; रास्त; बरोबर; उचित; शोभेसा; जुळणारा. [सं. युज्=जोडणें] **युक्ताथिला**–वि. आस्तिक्य भावना असलेला –हंको [युक्त+आथिला] **युक्तायुक्त**–वि. योग्य आणि अयोग्य; बरें आणि वाईट; साजेसा व न शोभणारा. [सं. युक्त+अयुक्त] **युक्ताहार**–पु. बेतार्चे अगर पचेल तेवढें खाणें; मिताहार; योग्य रीतीचें पथ्यकर आणि मित भोजन. [युक्त+आहार] **युक्ताहारी**–वि. बेतार्चे खाणारा; योग्य अन्न योग्य प्रमाणांत घेणारा.

युक्ति, युक्त—स्त्री. १ शक्कल; खुबीदार कल्पना; शोधकबुद्धि. २ कसब; खुबी; कल्पना; कौशल्य (शक्तीच्या विरुद्ध). ३ (एखाद्या यंत्रांतील) कळ; मख्खी; किल्ली; मखलाशी. ४ उचितपणा; योग्यपणा; औचित्य; विवेक; प्रमाण; नियमितपणा. 'तरि तत्सत्तेविषयीं उपमन्यो कोणती असे युक्ति।' –मोअनु ३ ३१. ५ ऐक्य; मिश्रण; मिळणी; एकत्रीकरण; एकी. ६ निष्काम कर्म करण्याची हातोटी. 'जो युक्तिपंथें पार्था। चढे मोक्षपर्वता। तो महा सुखाचा निमथा। वहिला पावे।' –ज्ञा ५.३२. [सं. युक्ति] (वाप्र.) **युक्तीच्या पोटीं**–क्रिवि. युक्तीनें; मुत्सद्देगिरीनें; कौशल्यानें. **युक्तीस येणें**–मनास पसंत पडणें; योग्य, युक्त वाटणें, दिसणें. 'बहु बोलणें तयांचें धर्माच्या येइनाचि युक्तिस तें।' –मोशांति ३.८४. **युक्तीयुक्तीनें करणें–घेणें**–त्वरा अथवा दांडगाई न करतां सोईनें करणें. सामाशब्द– ०**कौशल्य**–न. उपाययोजनेंतील कौशल्य; तोड काढण्यांतील प्रावीण्य. ०**घोष**–पु. बंधरूपी मंत्रघोष. 'तेथ संयमाग्नीचीं कुंडें। इंद्रियद्रव्याचेनि पवाडें। यजिती उदंडें। युक्तिघोषें।' –ज्ञा ८.५०. ०**त्रय**–न. (योगशास्त्र) वज्रासन, जालंदर आणि उड्डियान असे तीन बंध. –ज्ञा ४.१२७. ०**प्रयुक्ति**–स्त्री. नानाप्रकारच्या युक्त्या; बरेवाईट उपाय. [सं.] **युक्तिप्रयुक्तीनें**–क्रिवि. बऱ्यावाईट उपायांनीं; कोणत्याहि मार्गानें; कांहींहि करून; या नाहीं त्या उपायानें. ०**बाज–मान–वंत–वान**–वि. युक्त्या जाणणारा; युक्त्या लढविणारा; हुषार; सुपीक डोक्याचा; शोधक; निरनिराळे उपाय योजणारा. ०**वता**–क्रिवि. कौशल्यानें; युक्तीनें; खुबीनें; हुषारीनें; लबाडीनें. [युक्ति+वत्, वाट] ०**वाद**–पु. युक्तीनें केलेला वाद (तर्कशास्त्रास अनुसरून नव्हे पण सामान्य व्यवहारास पटेल असा) ०**सार**–वि. बरोबर; योग्य; रास्त; पटण्यासारखें; औचित्याला धरून असलेलें. **युक्त्या**–वि. कसबी; हुशार; युक्तिबाज; सुपीक डोक्याचा; चलाख; निरनिराळे बेत, मसलती, उपाय योजणारा. –क्रिवि. युक्तीनें; कौशल्यानें; लबाडीनें; हुशारीनें.

युग—न. १ कृत, त्रेता, द्वापार आणि कलि असे जे विश्वाचे कालमापक चार मोठाले विभाग त्यांपैकीं प्रत्येक. २ मोठा कालविभाग; वरील चारी कालविभाग मिळून होणारा काल; चारी युगांचा काल. ३ जोडी; दोन वस्तूः युग्म; द्वय. उदा० कर्णयुग; वस्त्रयुग इ० ४ जोखड; जूं; धुरा. –वि. चार संख्या (युगें चार मानिलीं त्यावरून) 'नाराच सहस्र युग।' –मोकर्ण ४३.७७. ०**धर्म**–पु. १ कालमाहात्म्य; त्या कालांतील लोकांची प्रवृत्ति. कलानुरूप योग्य वर्तन. ०**पत्**–क्रिवि. एकत्र; एकदम; एकाच वेळीं. 'घट

आणि घटाभाव हे एका अधिकरणीं युगपत् संभवत नाहींत.' **०माहात्म्य**–न. युगाचा मोठेपणा; युगाचें महत्त्व; युगाचें वैशिष्ट्य; काळाचा गुण, प्रभाव. **युगांत**–पु १ युगाचा शेवट. २ प्रलयकाळ; चारी युगांनंतर येणारा प्रलयकाल. 'जैसा सिंहाचिया हांका। युगांतु होय मदमुखा।' –ज्ञा २.२१५. [युग+अंत] **युगादि**–पु. युगाचा प्रारंभ, सुरुवात [युग+आदि] **युगानुयुग**–क्रिवि. कित्येक युगेपर्यंत. [युग+अनुयुग] **युगुल, युगल, युगूळ**–न (काव्य) जोडी; द्वय; दोन वस्तू. [सं. युगुल]

युगूत, युगत—स्त्री. युक्ति; खुबी. [युक्ति अप.]

युग्म—न. १ द्वय; जोडी. २ जोडपें; मिथुन; मेहुण. ३ वाक्यरचनेनें व अर्थानें एकत्र जोडल्यामुळें दोन्ही मिळून अर्थ पूर्ण होणारें श्लोकद्वय. ४ (गणित) प्रमाणांत असलेल्या दोन संख्या (यांतील पहिलीस अग्रसर व दुसरीस उपाग्रसर म्हणतात). –छअं१०४. [सं. युज्=संयोग करणें, जोडणें] **०भोजन**–न. देवतातुष्ट्यर्थ मेहुणांना, जोडप्यांना घातलेलें जेवण.

युत—वि. जोडलेला; संबद्ध; युक्त; एकत्र झालेला, असलेला; [सं. यु=जोडणें] **युति**–स्त्री. १ (ज्योतिष) चलग्रहांचें एका दक्षिणोत्तर रेषेंत जवळ जवळ येणें. २ मिलाफ; जोड; एकत्र येणें. ३ (गणित) बेरीज. [सं. यु=जोडणें]

युधिष्ठिर—पु विना. १ पांडवांतील सर्वांत मोठा; धर्म. २ (यौगिक) सामान्यतः निधडया छातीचा, युद्धांत स्थिर असणारा मनुष्य.

युद्ध, युद्धय—न.१ लढाई; रणकंदन. २ भांडण; मारामारी; झुंज; दोन व्यक्तींचा, पक्षांचा झगडा, लढा, सामना. समासांत कुक्कुटयुद्ध (कोंबडयांची झुंज); मेषयुद्ध (मेंढयांची साठमारी); गजयुद्ध; मल्लयुद्ध (मल्लांची झोंबी, कुस्ती); तलातल्युद्ध (हातांनीं केलेली मारामारी); गदायुद्ध; मुष्टियुद्ध इ० [सं. युद्ध, युध्=लढणें] (वाप्र.) **युद्धास तोंड लागणें**–युद्ध सुरू होणें. कलहास, मारामारीस, वादास वगैरे आरंभ होणें. सामाशब्द– **०कंडू**–स्त्री. लढाईची खाज; लढण्याची, भांडण्याची तीव्र, उत्कट इच्छा; मारामारीची खुमखुमी. [सं.] **०कंदन**–न. लढाईतील कत्तल; प्राणांतिक लढाई. 'युद्धकंदन मग करूं।' –रावि १५.७५. [युद्ध+कंदन;] **०करी**–पु. योद्धा; लढणारा. **युद्धकर्ज**–न. युद्धाच्या खर्चासाठीं काढलेलें कर्ज. **०फळी**–स्त्री. (काव्य) सैन्याची रांग; लढाईस उभें असलेलें सैन्य; सैन्याची मांडणी, रचना. **०मद**–पु. लढण्याचा आवेश, स्फुरण. [सं.] **०वीर**–पु. शूर पुरुष; योद्धा. [सं.] **युद्धांगण**–न. १ रणमैदान; रणभूमि. २ फड; हौदा; कुस्तीची किंवा झुंजेची जागा. [युद्ध+अंगण]

युनानी—वि. मुसलमानी वैद्यकासंबंधीं; यवनी. [फा.]

युनिव्हर्सिटी—स्त्री. विश्वविद्यालय. [इं.]

युयु, यू, यूयू—उद्गा. कुत्र्याला बोलावितांना उच्चारण्याचा शब्द. याच्या उलट म्हणजे त्याला एखाद्याच्या मागें लावण्यासाठीं किंवा भुकण्यासाठीं छू छू शब्द उच्चारतात.

युरेजन-जिअन-शिअन—वि. हिंदी स्त्री व युरोपियन पुरुष यांच्या संबंधापासून झालेला (मनुष्य). [इं.]

युवक—पु. तरुण. **युवकसंघ**–पु तरुणांचा संघ; तरुणांची संस्था. (इं.) यूथलीग.

युवति-ती—स्त्री. तरुण स्त्री; सोळा ते तीस वर्षांपर्यंत वयाची स्त्री. [सं.]

युवन—न. १ यौवन; तारुण्य. 'जो कैवल्यकुसुमाचा आमोदु। नातरि ब्रह्मविद्येचा युवनमदु।' –भाए ३७. २ स्तन. 'सदैव युवन पाजिती। दुद मरिये।' –ख्रिपु २.२.१५४. [सं. यौवन; हिं जोबन]

युवराज-जा—पु. १ गादीचा वारस; ज्येष्ठ राजपुत्र. २ राजानें राज्यकारभार चालविण्यास मदतीस घेतलेला व त्याच्या नंतर गादीवर बसणारा राजपुत्र किंवा दुसरा एखादा इसम. [सं. युवराजा] **युवराज्य**–न. गादीवर बसण्याला नियुक्त मनुष्याचें कर्तव्य किंवा जागा, हुद्दा, पदवी; युवराज हें पद. [सं. यौवराज्य]

युवा—पु. १ तरुण पुरुष; तारुण्यावस्थेंत प्रवेश करणारा मनुष्य (सोळा ते चाळीस वर्षांपर्यंतच्या पुरुषालाहि युवा म्हणतात). २ साठ संवत्सरांतील नववा संवत्सर. [सं.]

युष्मत्—सना. तूं; तुम्ही. (समासांत) युष्मद्गृह, युष्मद्देश; युष्मत्पुत्र इ० [सं.] **युष्मादिक**–सना. तुम्हीं; आपण (उपरोधिकपणानें किंवा विनोदानें उपयोग). क्रियापदाचें रूप तृतीयपुरुषाचें असतें. 'आतां शौर्याच्या गोष्टी सांगतां पण त्या दिवशीं चोर आले तेव्हां युष्मादिकच पळाले.' [सं. युष्मत्+आदि+क]

युक्षदंड—पु. (अप.) इक्षुदंड; ऊंस. [सं. इक्षुदंड]

यूका—स्त्री. ऊ. [सं.]

यूथ—पु. कळप; तांडा; समूह; समुदाय (विशेषतः पशु किंवा पक्षी यांचा). [सं.]

यूनान—विना. यवनदेश. ग्रीस देश. अयोनिया. [इं.]

यूनिट—पु. १ एक; एकांक; एकम्. २ व्यक्ति; व्यष्टि; एकबीज. ३ मूलमान; मूलपरिमाण; मापनपरिमाण. [इं.]

यूप—पु. खांब; स्तंभ; यज्ञस्तंभ. [सं.]

यू(यु)रोपियन—वि. यूरोप खंडांतील; यूरोप खंडासंबंधी; [इं.]

ये—सना. या; त्या. 'ऐशीं शरीरें नेणों किती। म्यां निर्माण केलीं ये क्षितीं।' –एभा ७.२४५.

ये—उद्गा. सलगीचें संबोधन. [सं. ए]

येइतलग—क्रिवि. येईपर्यंत. 'लेकीन...मोहिवास येइतलग त्यास...करावें.' –पेद ३.५.

येउ(ऊ)तें—वि. १ येवढें. 'ऐसें अर्जुना येउतें सर्वेश्वरें। पाहोनि बोलिलें आदरें।' –ज्ञा १०.५३. २ येवढेमें. 'तिया झाडां येउतें जयां पाहती। तें कल्पवृक्ष।' –ज्ञा ९.३७५. –क्रिवि. येथें. [सं. यावत्]

येऊनजाऊन—क्रिवि. १ प्रसंगानें; कायमचें नव्हे; मधून मधून यावें जावें अशा प्रकारें. 'मी येथें नेहमीं राहणार नाहीं, येऊन जाऊन असेन.' २ सरतशेवटीं; बाकी; शेवटचें कृत्य, उपाय साधन म्हणून. 'वरकड सारी दौलत संपली आता येऊनजाऊन वतन राहिलें.' ३ फार तर. 'तूं येऊनजाउन मारशील, आणखी काय करणार आहेस?' ४ नेहमीं; सतत. 'येऊनजाऊन हाच धंदा.' [येणें+जाणें]

येऊल—पु. (कों. गो.) १ मुंग्यांची एक जात. २ तरस.

येक—वि. १ एक; सामाशब्द व साधित शब्द एक शब्दामध्यें पहा. (समासांत). येकंदर, येकलकाजा, येकलकोट, येकलकोंडा, येकवट, येकवटणें, येकवत, येकवळा, येकसुरा, येकाड, येकांडया, येकांत्रा, येकांत्रा आड, येकांत्राड, येकामी, येकारणें, येकुणात, येकूण, येकोपा, येकोबा, येकोशास, येकोशी, येकोस इ०. २ कित्येक. 'साधूनि मारिती। येकाचीं सर्वस्वें हरितीं। येकालागीं उभारिती।' [सं. एक] सामाशब्द- **०इसा**–वि. (कों.) वीस. **येकंकार**–पु अष्टाकार. 'अवघा येकंकार करिती।'–दा ११.१.३२ **०जथ**–पु. एकत्रित जमाव. 'तीन हजार येकजथ आहे.' –पेद २०.१७६. **०जरा–ऱ्हा**–अ. बिलकुल; थोडें सुद्धां. [अर.] **०जहती**–स्त्री. स्नेह; मैत्री. 'हमेशा मकातीब पाठवून दोस्ती येकजहती दीन–ब–दीन जादा होय.' –रा १०.३१२. [फा.] **०जिनसी**–वि. एकाच प्रकारचें; अमिश्र. 'येकजिनसी स्वतंत्र।' –दा २०.२.३. **येकटका**–वि. एकटा. 'गेला हरि येकटका यास्तव घेवूनि आपणहि ये कटका।' –मोकृष्ण ५३.१५. **०ठोक**–वि. सर्व एकासारखें एक. 'राजमित्रादि येकठोक।' –दावि ३९०. **०तार**–वि एकरूप. 'येकतार रामेसी।' –दावि ७१. **०तुकें**–वि. सारखें; समान. 'ऐसें येकतुकें पांचभौतिक।' –ज्ञा ७.२५. **येकंदरें**–वि. एकाकार; एकाग्र. –शर. [प्रा.] **०दाणें**–न. एकदाणी. 'तें येक दाणें मिरवे गळांचें।' –सारुह ६.३४. **०दुमाल**–क्रिवि. एकामागें एक उभे राहून. 'घोडेस्वारांनीं येकदुमाल होऊनु।' –ममं ९. **०देसी**–वि. १ एकपक्षी; सर्वत्र लागू न होणारें. 'परि तों आहे येकदेसी। दृष्टांत न घडे वस्तुसी।' –दा २०.१०.६. २ एकमार्गी; अल्पज्ञ. 'विरक्तें येकदेसी नसावें।' –दा २.९.२९. [सं. एक+देश] **०बगी**–वि. एक प्रकारचें. 'परि तें एकबगी थोडें।' –ज्ञा ११.४०४. [एक+बग] **०बेग**–अ. एकदम; ताबडतोब. [फा.] **०मुख**–शअ. समोर. 'व्यासासि केलें येकमुख।' –एभा १.१५१. (पाठभेद) [प्रा.] **०मोहरें**–क्रिवि. १ एकत्र. २ एका बाजूस तोंडें असलेलें; सामोरें. [प्रा.] **येकल**–वि. एकटा. 'तरी आम्ही भेटविला दमयंती नळ। तेथें हंसचि होता येकल।' –कथा १.८.१०. **येकलहरा**–वि. जो चावला असतां एकाच लहरीनें मृत्यु येतो असा (सर्प) 'बलावा गारोडी भुजग डसवा येकलहरा।' –मध्व ५८१. **०वंकी**–स्त्री. तादात्म्य. –हंको. [प्रा. एक+अंक] **०वगी**–अ. एका प्रकारानें. [सं.] **०वट**–पु. एका ठिकाणीं जमणें; एकत्रता. 'सकळांचा जाहला येकवट।' –कथा९.५.८. **०वटणें**–सक्रि. गोळा करणें. 'रत्नें साधाया कारणें। मृत्तिका लागे येकवटणें।' –दा ७.३.२. **०वळा**–क्रिवि. एकत्र; एकाग्र. 'वृत्ती करणें येकवळा।' –ज्ञा १८.६३७. [एक+भोळ] **०सर**–वि. एकजात; ब्रह्म [प्रा.] **०सरणें**–सक्रि. एक मार्गी होणें; अनुसरणें. –हंको. [प्रा.] **०सरां–रा**–अ. एकदम. 'तुटे संशयाचें मूळ। येकसरां।' –दा १.१.२८. **०सरें**–क्रिवि. ताबडतोब; एकदम. **०सार**–न. एकच तत्त्व. –हंको. **०सुदी**–स्त्री. सुधेपणा; सरळपणास 'सदरहू कलमांचा लिहिल्याप्रमाणें फडशा न केल्यास तुमचें येकसुदीस चांगलें नाहीं म्हणोन –वाडदुबा ५.१६६. **येकाखडी**–स्त्री. उजळणी; ओ ना मा नंतर शिकवावयाची अ आ इ ई इ० स्वरादि अक्षरें. 'ऐसा महाक्लेशेसि त्यास शिकवी। ओनामा आणि येकाखडी।' –स्वादि ४.४.४५. **येकाग्र**–वि. एकाग्र. 'श्रोती करावें श्रवण। येकाग्र होऊनि।'–दा ३.६.१. **येकाद्यता**–स्त्री. १ एकदेशीपणा. 'तै गातयाचेनि पांगें। येकाद्यता नोहे।'–ज्ञा १८.१७३६. २ अपूर्णता. –शर. **येकांत**–पु. एकांतांत भाषण वगैरे करणें. 'परांगनेसीं येकांत।'–दा २.१.२९. **येकांतर**–वि. एका दिवसाआड. [प्रा.] **येकाधा**–वि. एखादा. 'चुकोनि येकाधा जाये।'–गीता २.२३३१. **येकायतनु**–न. एकायतन; एक अधिष्ठान; ब्रह्म. [सं.] **येकायेकी**–वि. एकटा; निःसंग. –क्रिवि. अकस्मात्. [प्रा.] **येकावळी**–स्त्री. एक पदरी मोत्यांचा हार; एकेरी हार. 'चतुर्भुज माळा रुळे येकावळी।' –तुगा ८. **येकाहारी**–वि. एकपंक्तीचा. 'आहाति जे ब्रह्माच्या येकाहारी।'–ज्ञा १७.३३४. **येकु**–वि. एक. 'भजाया जनीं पाहतां राम येकु।'–राम १३१. **येकुणा**–वि. दीड दुमता. –शर. **येकेताळीस**–वि. एकेचाळीस. 'वर्त्या येकेताळीस कमाना।' –दावि ५०४. **येकोदर**–वि. सख्खा; एकोदर. 'त्यांचे बंधु येकोदर दत्तात्रेय।' –रामदासी २. १६९. **येकोपजीवी**–वि. एकच आश्रय असलेला. 'तेथ दैवा गुणां येकोपजीवी।' –ज्ञा १६.६७. [सं. एकोपजीवी]

येकसुई—स्त्री. स्नेह. 'तर्फेन येख्लास व येकसुईची तरक्की रोज-ब-रोज ज्यादा होत असावी.' -रा १९.१०५. [फा. यक्सू]

येखंड, येंग, येंगटणें, येंगाडणें, येंघणें, येच, येचणें, येज, येंट-ठ, येंटाळणें, येंटाळा-ळी-ळें—वेखंड, वेंग इ० पहा.

येखलास, येखलासनामा, येखलासी—इखलास इ०. पहा.

येखलास, येख्लास—पु. मनाची शुद्धता; अंतःशुद्धि; स्नेह. 'मुख्य येख्लास वाढावा.' -ख ८७५. [अर. इख्लास]

येखादा—वि. एखादा; क्वचित्. 'येखादा राहिला स्वरबिंदु।' -कथा १.१.७२. [एक+अर्धा]

येंग—पु. (व.) चढ; चढाव. [येंगण=चढाव]

येगाननत—स्त्री. यगानगत पहा. ऐक्य; मैत्री. 'दोन्ही कडव दोस्ती व येगानगत रोज-ब-रोज वृद्धींत असावी.' -दिमरा १.४५. [फा.]

येंचू—पु. (कु.) विंचू.

येजमान—पु. आश्रयदाता; मालक. यजमान पहा. [सं. यजमान अप]

येजा—स्त्री. १ त्रासाचें व श्रमाचें येणें आणि जाणें; येरझार. २ पुनः पुनः येणें व जाणें. (क्रि० करणें; लावणें; मांडणें). [येणें+जाणें]

येजित, येजित जाणें, येजित पत्र—(अशिष्ट) अजित, अजित जाणें इ० पहा. **येजित खत**-न. अजित पत्र. 'त्यांचे साक्षीनें येजित खत लिहून दिल्हें.' -वाडबाबा २.९.

येटकें—न. जोत जुंपण्याचें सामान, पट्टे, कांसरे, वाला इ० यटक पहा.

येटाण, ये(ए)टाळ, येठ—न. (कों.) वेटाळ, वेठ, वेठण इ० पहा.

येड, येडका, येढवळ, येढोळ, येढोळां—एड, एडका इ० पहा.

ये(वे)ड—स्त्री. घोडयास इशारा करणें. 'तुजला मारिन मी, करिन येड।' -ऐपो १२६. **येड करणें**-घोडयास इशारा करणें, प्रेरणा करणें. **०देणें**-(व.) लगामाच्या इषा-यानें घोडयास मागें परतविणें.

येंड—न. (कों. हेट.) मासे धरण्याचें एक प्रकारचें जाळें.

येडगा—पु. (कों.) धनगराचा उपाध्याय.

येडताक—पु. विसंवाद.

येडपट—वि. वेडपट. [का. यडपट्ट]

येंडी—स्त्री. (कु.) तडीस दोघांनीं पागण्याचें जाळें. येंड पहा

येंडी—स्त्री. (व.) एरंडी. **येंडीचें तेल**-न. (व) एरंडेल.

येडीकुंटी—स्त्री. आऊत.

येडुळ बेडूळ—वि. (व.) ओबडधोबड.

येडें—न. लिंगाइतांनीं आपल्या जंगमास (गुरूस) पाठविलेलें अन्नाचें ताट.

येणगर—न. जोंधळयाची एक जात.

येणी—स्त्री. गंजिफाच्या खेळांतील राजाचा वजीर असणा-याकडून पान येण्याचा हक्क. [येणें]

येणें—न, एखाद्याकडून यावयाचा असलेला पैसा, यावयाची रक्कम, उगवावयाचें कर्ज.

येणें—अक्रि. १ आगमन करणें; आलेला असणें; दाखल असणें. २ विद्यमान झालेला असणें; प्राप्त होणें. ३ एखाद्याजवळ, कडे ओढवणें; समीप जाणें. ४ एखाद्याला माहीत असणें, एखाद्याकडून करण्याजोगें असणें; अवगत होणें; जाणणें. 'याला लिहिणें येतें पण पढणें येत नाहीं.' ५ उद्भवणें; उत्पन्न होणें (राग, लोभ, विषयवासना, दया इ०.) ६ बितणें; प्राप्त होणें. ७ उत्पन्न होणें; उद्भवणें (फुलें, फळें, पानें इ०). ८ भरणें; मिळून होणें, बराबर असणें. 'ही अंगठी तोळाभर वजन येईल.' 'तो गांव एथून चार कोस येईल.' ९ उतरणें; योग्य आकारांत, स्थितींत दिसणें. 'हें पागोटें चांगलें आलें नाहीं, आणखी बांध.' १० होणें; एखाद्या स्थितीला, अवस्थेला प्राप्त झालेला किंवा पोंचलेला असणें. 'घर अगदीं मोडकळीस आलें आहे.' ११ संभाव्य, जरूर, उपयोगी, योग्य, उचित होणें. 'ते धनी पडले त्यासीं उत्तर करतां येत नाहीं. प्रसंग पाहून बोलावयास येईल.' १२ अवलंबणें (मार्ग इ०). 'वडील वर्तत आले त्याप्रमाणें आम्ही करीत आलों.' १३ पासुन निघणें, उत्पन्न होणें, तयार होणें. (दुधापासुन लोणी इ०). १४ प्रवासादिसमयीं जाण्याकरितां निरोप घेतांना 'जाणें, ह्या अर्थी येणें ह्या शब्दाचा उपयोग करितात. कारण ह्या प्रसंगीं जाणें शब्दाचा उपयोग अशुभ मानतात. 'आतां आम्हीं येतों कृपा असो द्यावी।' 'येतों बसा, प्रसन्न प्रभु तुम्हां, हो।' -मोवन १३.२. [सं. यान=गमन करणें] **म्ह०** (दुखणें) येतें हत्तीच्या पायानें, जातें मुंगीच्या पायानें. (वाप्र) **येणें जाणें**-न. १ येणें व जाणें म्हणजे भेटीला जाणें किंवा येणें; राबता, दळण वळण. 'श्रीमंताकडे त्यांचें येणेंजाणें आहे.' २ येणें व देणें असलेला पैसा; उकळण्याचें कर्ज व फेडावयाचें कर्ज; देण्याघेण्याचा व्यवहार. 'तुम्ही जा म्हणून सांगतां पण लोकांकडे आमचें येणेंजाणें आहे त्याची काय वाट?' **येता**-वि. येणारा. 'येती यासी पुसे'-नामना २. **येताजाता**-पु. उतारू; मार्गस्थ; प्रवासी. 'मार्गावरचा आंबा हा येत्याजात्याचा.' **येतांजातां**-क्रिवि. नेहमीं; एकसारखें; सतत. 'सदा

येतां जातां बसत उठतां कार्य करतां।' 'तो येतां जातां बाय कोस शिव्या येतो.' [येणें+जाणें] **येता पाय**-पु. प्राप्तीचा किंवा अनुकूल काळ. **येतापाया**-पु. चलती; भरभराट. [येणें+पाया] **येतेकरी**-पु. १ येणारा. २ शास्त्र, कला इ० त्वरित संपादन करणारा मनुष्य. **यें द्वार**-न. येण्याचा रस्ता. 'येतें द्वार बुजवावें।' -एरुस्व १८४७. **आल्या-(वर्षास-महिन्यास-दिवसास-वारास)**-वर्षे, महिना इ० येतें तसें म्हणजे सतत, नियमितपणें.

येणेंकडून, येणेंकरून—क्रिवि. यामुळें; याकारणानें.

येणें नावें—क्रिवि. यामुळें.

येणेंप्रमाणें—क्रिवि. ह्या प्रमाणें; एणेंप्रमाणें.

येतपर्यंत, येतपावेतों—एतपर्यंत इ० पहा.

येतुकी-का—वि. इतका. 'चमू समुद्राची येतुकी।' -मुआदि ४४.६२.

येतुला—वि. इतका; एवढा. 'तरी तिहीं येतुला अवसरीं।' -ज्ञा १.८७. -क्रिवि. येथें. [प्रा.] **येतुला(ले)वरी**-क्रिवि. इतकें; येथपर्यंत. 'देवा हें येतुलेवरी। बोलावें नलगे अवधारीं।' -ज्ञा २.३०. [प्रा.]

येत्न—पु. यत्न; प्रयत्न. 'देहे रक्षणाकारणें येत्न केला।' -राम २६.

येथ—क्रिवि. येथें. 'श्रोते पुसती कोण ग्रंथ। काय बोलिलें जी येथ।'-दा १.१.१. [सं. अत्र] **येथचा, येथपर्यंत, येथपावेतों, येथवर, येथील, येथून, येथें, येथोन येधवां, येधष्ट**-एथचा, एथपर्यंत इ० पहा.

येथा—स्त्री. (व) (अप.) व्यथा; रोग. 'त्याला पोटाची येथा असल्यास मी दवाई देतों.' [सं. व्यथा]

येथें—क्रिवि. या ठिकाणीं [सं. अत्र; प्रा. एत्थ] (वाप्र.) **येथेंच घोडें पेंड खातें**-मुख्य अडचण ती येथेंच आहे; मर्मस्थान तें हेंच; छिद्र, कमीपणा, लबाडी जी आहे ती येथेंच आहे.

येदलोक—क्रिवि. (व.) इतका वेळ. [सं. यावत्काल]

येद(ध)वां—क्रिवि. एव्हां, या वेळीं. [सं. यावत्वा]

येंदाळा, येधोळ—क्रिवि. एवढावेळ; अपेक्षेपेक्षां जास्ती वेळ. **येदूळ**-क्रिवि (कु.) बऱ्याच वेळापासून. [सं. इयत् वेला; वाढूळ]

येदो—वि. (कु.) एवढा. [सं. यावत्]

येधाळा—क्रिवि. (ना.) या वेळीं. [सं. यावत् वेला]

येधोळ—क्रिवि. (व.) आतांपर्यंत. [सं. यावत् वेला]

येन—स्त्री. (व.) वीण; जननाचा मोसम; विण्याचा काळ. [वीण]

येबिन—पु. पौत्र; नातू 'आपाजी बिन भगवंतराव येबिन कृष्णाजी कदम पाटील,'-समा २.३१७. [फा.]

येम—पु. (अप.) यम. 'जया नावडे नाम त्या येम जाची।' -राम १०१. [सं. यम]

येमाई देवी—स्त्री. एक क्षुद्र देवता. 'यमाई देवी म्हणे जी गुरुछत्र छाई।' -सप्र ५.१४. [यमाई]

येयां—सना. याला. 'किती मोडा केला येयां देतां। माझेनि लोभें।' -शिशु २१२. **येयांचिआं**-सना. यांच्या. 'तेंह वेळीं ते नायका। भणें येयांचिआं कवतिकां।' -शिशु २२४.

येर-रू, येरी-रें—सना. (व्यय) दुसरा; तो एक; उल्लेख केलेला मनुष्य; अन्य; इतर. 'सीता · इणे लक्ष्मणा धाव। येरू म्हणे राक्षसी माव।' २ हा; जवळचा. पूववाक्यांत ज्याचा नामनिर्देश केला असतो त्याचा पुनः उल्लेख कर्तव्य असतां ह्या सर्वनामाचा प्रयोग करितात; तो; हा. 'तैसाचि देखे येरें। निनादें अति गहिरें।' -ज्ञा १.१४६. [सं. अपर, अवर. सं. अन्यतर-अण्णयर-यर=येरू] सामाशब्द- **०घर**-न. ब्रह्मस्वरूप. **०जावाई**-पु जावयाच्या भावास तुच्छतेनें म्हणतात. **०येर**-वि. परस्पर; एकमेक. 'काय किजत असे येरयेरीं।'-ज्ञा १.८७. **०येरां**-क्रिवि. १ एकमेकाशीं; त्यांच्यामध्यें; परस्पर. 'येरयेरां भेटी युद्धाच्या प्रसंगीं।' २ सतत; नेहमीं. **०वार्डा-ळो**-क्रिवि. (व.) लौकर; वाजवीपेक्षां अगोदर [येर+वेळ] **०वाळीं**-क्रिवि. योग्यकाळीं; सुवेळीं; लवकर; जें काम रात्रीं करण्यास त्रास पडतो तें दिवसा उरकून घेण्याबद्दल सांगावयाचें असल्यास उपयोग. 'येरवाळी गाईस चारा घाल.' **येरीकडे**-क्रिवि. दुसरीकडे; इकडे. 'राम उभे लग्नासी। येरीकडे जानकी।' -वेसीस्व १०.७४. 'येरीकडे नृपति धाडुनि राजहंसा।' -र ३०. **येरीमोहर**-वि. उलटें; शेंडा खालीं व बुडखा वर असें; भलतीकडे तोंड असलेलें. 'उपडिलें कवतिकें। झाड येरी मोहरा ठाके।' -ज्ञा १५.४१. [येर=दुसरा+मोहरा=तोंड]

येरजा(झा)र, येरधार—स्त्री. कंटाळवाणी व निष्फळ जाये; खेप; हेलपाटा. 'त्याची सरली येरजार। झाला सफळ व्यापार।' [येरे+जारे] **येरजाऱ्या**-स्त्रीअव. खेपा. 'कर्मे करितांना फलाशाहि सोडलेली असल्यामुळें स्वर्गाच्या येरजाऱ्या न घडतां...'-गी २९२.

येरंड, येरंडमूळ, येरंडी-ड, येरंडेल, यरंड्यासाप, येरमीठ, येरवां, येरवीं, येरशेर, यरव्हयीं, येलकी, येलची, येलदोडा, येलाची, येवढा, येवढाव(वे)ळ, येवींच, येवींतेवीं, येव्हां, येव्हांयेव्हां, येव्हांशीं, येळकोट, येळा—एरंड एरंडमूळ इ० पहा.

येरदेर—पु. (गो.) वारस.

येरली—स्त्री. १ (कु.) एका माशाचे नांव. २ धान्याची वर्णंग.

येरवण—स्त्री. (हेट.) बांबूची विणलेली मोठी दुरडी.

येरवां—क्रिवि. परवां, तेरवां.

येरवान—न. (कु.) लग्नांत वधूवरांकडून परस्परांस येणारा शिधा.

येर(=ह-वी)व्हीं—अ. विचाराअंतीं; नाहीं तर. 'तरीच खंडेल चिंतारोग। येर्‍हवीं अनर्थ रोकडा।' –मुवन १.८२.

येरांस—पु. (गो.) नातेवाईक मनुष्याची इस्टेट मिळणें; इतरांश; वारसा. [येर+अंश]

येरिका—स्त्री. लव्हाळा; लव्हाळ्याची एक जात. 'समुद्रलाटांचे कल्लोळ। तेणें लोहचूर्ण सकळ। प्रभासे लागूनि प्रबळ। उठिले तत्काळ येरिकारूपें।' –एभा १.३८२.

येरी-=ही—अ (ना.) एरवींच; उगांच.

येरुळ्या—स्त्रीअव (व.) चारा एवढीं एक प्रकारचीं आंबट गोड फळें.

येरें, येरं—न. (गो.) सुकाणू. **येरें भर**–न. येरें धरून बसण्याचें होडीचें टोंक. **येरें घुंवडावप**-क्रि. (गो.) मार्गास लावणें; दिशा दाखविणें; किल्ली फिरविणें. **येर्‍हि**–क्रिवि येर्‍हवीं. 'येर्‍हि नाकळसी कोण्हासी।' –सप्र ६.३५.

येर्‍ही, येर्‍हवीं—क्रिवि. (व) सहज.

येल—वेल पहा.

येल(ल्)गार—पु. एलगार पहा. मोहीम; दौड; नेटाचें कूच; चढाई; निकराचा हल्ला. [तु. इल्गार]

येल(ल्)ची—पु. वकील; प्रतिनिधि; तह ठरविणारा वकील. –पया ४५४. [तु. ईल्ची]

येलणें—अक्रि. (ना. व.) खोड्या, चेष्टा करणें; त्रास देण्याच्या हेतूनें वात्रटपणा करणें; वेडेविद्रे चाळे करणें; गमजा करणें. 'काहून येलत गा! पायजे (पाहिजे) काय कांहीं?' [वेल्हाळ?]

येलशेल—क्रिवि. १ (व.) एका टोंकापासून दुसर्‍या टोंकापर्यंत. २ शेताच्या धुर्‍यापासून दुसर्‍या धुर्‍यापर्यंत. [शेल=टोंक]

येला—पु. एक झाड; वेलदोडा, वेलची. 'येला कंकोळ पूगीफल खदिर शशी जायपत्री लवंगा।' –सारुह ३.४८. [सं. एला]

येलां—स्त्री. (व.) लाकडाच्या लांब ठोकळ्यास चार पांच उभ्या खुंट्या बसवून कपाशी पेरण्याकरितां केलेलें आऊत.

येलें—न. कच्च्या चामड्याची दोरी असलेलें नांगराच्या उपयोगाचें आऊत. हें मांग लोक करितात.

येल्या—स्त्रीअव. (खा.) वेला; वेळा. स्त्रियांचा दंडामध्यें घालण्याचा चांदीचा दागिना; स्त्रियांचें बाहुभूषण. [वेल]

येल्हे—पु (व.) त्रास; कष्ट; हाल; येलणें.पहा. 'काय येल्हे मांडले त्याचे.'

येल्हावणें—अक्रि. (व.) फाजीलपणा करणें; इत्रावणें. –वशाप ५१.४७९.

येवंच—क्रिवि. एवंच; एकूण; एकंदरींत; सारांश. [सं. एवम्+च]

येवजणें—सक्रि. (गो.) आठवण करणें, मनांत आणणें; योजणें. (अप.) [योजणें]

येवंतणें—सक्रि. (प्र.) वेवंतणें. पाठीस लागणें; चिडविणें; खनपटीस बसणें; त्रास देणें.

येवा—पु. १ येणें, आगम, आगमन, ह्या अर्थी जावा शब्दाशींच प्रयोग होतो. २ दुसर्‍याकडून येणें असलेला पैसा. 'पांचशें रुपये लोकाकडे येवा आहे.' ३ (ल.) लाभ; प्राप्ति; मिळालेला नफा. ४ शोभा; लावण्य; रूप; देखणेपणा. 'दोन तोळे सोन्यानें कसा येवा आला.' योग्यता; शोभिवंतपणा; प्रशस्तपणा. (वस्त्रें, भूषणें यांचा). 'काळ्या मनुष्याला मोत्यांचा येवा असतो.' [येणें] **म्ह**० उदंड खाल्ला मेवा तर येईना अर्धभाकरीचा येवा. सामाशब्द– **०जावा**–पु. येणेंजाणें; घरोबा; रावता; भेटीस जाणेंयेणें, दळणवळण. [येणें+जाणें] **०देवी**–स्त्री. जमा व खर्च; घेणी व देणी; व्यापार; व्यवहार. [येणें+देणें]

यें(हें)वाळें—न. (कों.) पाणसर्पाची एक जात. ही पाण्यात राहते.

येवि—क्रिवि. जंव; जों. 'एथ कां पां हा उगला। म्हणौनि कृष्णें येवि पाहिला।' –माझा ११.१५३.

येश, येशस्वी, येशवान्, येशवंत, यशापेश—यश, यशस्वी, यशवंत इ० पहा.

येशेल—न. (व.) गोडें तेल; खावयाचें तेल; अळशीचें तेल.

येस, येसकट, येसण, येळ, येळणें, येळू—वेस, वेसकट इ० पहा.

येस—स्त्री. (खा. अहिराणी) शेवाडें; गाडी जाण्या इतक्या रुंद जागेस लावावयाचा (काट्यांचा, कांबट्यांनीं बांधलेला) दरवाजा, झाप, झापा, फाटक. [वेस]

येसकर—पु. (व.) वेसकर पहा.

येसकी—स्त्री. (पुणें, शेतकी) मोठी शिवळ.

येसणा—वि. इतका; असा. 'ग्रामा येसणा विस्तारु।' –गीता २.२२७७. [सं. ईदृश] **येसणें**-वि येवढें; असें. 'येसणें पतन कुलक्षयीं।' –ज्ञा १.२६१ [सं. ईदृश]

येसपार—पु. ठावठिकाण; पत्ता.

येसर—न. १ (व. घाटी) आमटींत घालावयाचें भाजलेली डाळ, तांदूळ इ० कांचें मिश्रण. २ तिखट मसाला. वेसवार पहा.

येसवा—स्त्री. १ वेश्या. वेसवा पहा. २ (बायकी) भांडखोर, तंडणारी, तोंडाळ बाई. 'बाई येसवाच आहे.' [सं. वेश्या]

येसवार—स्त्री. (व.) मसाल्याची आमटी. [सं. वेसवार]

यसान, येहसान—न. प्रसाद; कृपा; उपकार. 'या गृहस्थावरी तुम्ही येहसान करून निरोप दिल्हा यामुळें तो उपकारी आहे.'—ख ९१६. [अर. एहसान्] **येहसान्मन्दी**—स्त्री. कृतज्ञता. —पदमव ९९.

येसाय—स्त्री. (गो.) तालीम (नाटक इ०कांची). [व्यवसाय?]

येसूर—न. काळें तिखट; तिखट मसाला. वेसवार पहा.

येळ, येळा—न. (चंद्रपुरी) वेल; सोन्याचें अगर चांदीचें कडें. येल्या पहा. [वेळणें]

येळकोट-टी—स्त्री. खंडोबाचा जयजयकार; एळकोट. 'लोक येळकोटि म्हणती लक्ष कोटीरे।'—आप १९. —पुस्त्री. नाश. 'सगळयांच्या मदतीनें नानाचा येळकोट करण्याचें सोपें आहे.'—अस्तंभा ९६. [यळकोट]

येळणी—स्त्री. वेळणी; पसरट भांडें; (चंद्रपुरी) पसरट वाटी; (व.) खापराचें परळ.

येळवाळीं—अ. वेळेवारीं; योग्य वेळेला. [वेळ+वार]

येळा—पु. वेलदोडा; एला. 'चतुर्विध परिमळा। येळा वाळा उदादि।'—एरुस्व १४.१३६. [सं. एला]

येळा—स्त्री. खांब.

येळाइतु—पु. वेळाईत पहा. कैवारी; साह्यकर्ता.

येळील—वि. १ अळणी. 'येळील केलें सर्वस्व।'—दावि ४०. २ लज्जित. 'लोक येळील केले।'—दावि ४०. **येळिलवाणें**—वि. ओशाळें. 'येळिलवाणें करूं नये। आपणासी।'—दा १४.१.५४.

यैन—क्रिवि. १ ऐन; भर; मुद्दल. 'साठ लाखाची वेरीज यैन व इजाफा मिळोन सिद्ध केली.'—रा ७.५३. २ तत्त्वतः; मुख्यतः [अर. ऐन्].

यो—क्रि. येवो. (ये चें तृतीयपुरुषी अज्ञार्थी एकवचन) 'सुरर्षि म्हणतो तुझें यशचि धन्य यो गायना।'—केका ११४.

योक—पु गिरदा; खांदेपट्टी. 'योक प्रमाणेंच कापडाच्या लांबींतून कॉलर काढावयाची असते.'—शिकशि १.६० [इं.]

योग—पु. १ जुळणी; जोड; मिलाफ; संग; संयोग; संलग्नता; लग्न. 'योग पुढें भृगुसवें तिचा घडतां'—मोआदि ३.६. २ परस्पर संबंध; ऋणानुबंध; संगत. 'तिला नहाण यावें आणि तिचा दादला मरावा असा योग होता' (समासांत) कालयोग; दैवयोग; प्रारब्धयोग इ० ३ आध्यात्मिक अथवा भाविक भक्ति अगर ध्यान, चिंतन करून होणारें ब्रह्मैक्य; ध्यानपूजा, मानसपूजा, समाधि व त्यासंबंधीं नियम व आसनें; प्राणायामादिक साधनांनीं चित्तवृत्तीचा किंवा इंद्रियांचा निरोध करणें. ४ मार्ग; साधन; आत्मसाधन या अर्थी भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग इ० 'संक्षेपानें नुसता योग अगर कर्मनिष्ठा असें म्हणतात. ५ खगोलाचे २७ भाग; ज्यावरून चंद्र सूर्याचे अक्षांश रेखांश मोजतात ते; ते योग असे—विष्कंभ; प्रीति, आयुष्मान्, सौभाग्य, शोभन, अतिगंड, सुकर्मा, धृति, शूल, गंड, वृद्धि, ध्रुव, व्याघात, हर्षण, वज्र, सिद्धि, व्यतीपात, वरीयान्, परीघ, शिव, सिद्धि, साध्य, शुभ, शुक्र, ब्रह्मा, ऐंद्र व वैधृति असे २७ योग आहेत. ज्योतिषी २८ योग मानतात. ६ संबंध; जवळ येणें. 'ग्रहांचे कालांश (वस्तुतः भोग) सूर्याच्या इतके झाले म्हणजे त्याचा सूर्याशीं योग झाला किंवा युति झाली असें म्हणतात.'—सूर्य २३. ७ उपाययोजना; वस्तूचा उपयोग, विनियोग; कार्यार्थ साधना, प्रयत्न. ८ इष्टता; योग्यता; समत्व. ९ (गणित) रकम; रास; बेरीज. १० साधन; युक्ति. 'एकच योग (साधन अगर युक्ति) आहे.'—गीर ५६. ११ मिठी. १२ कवळा. १३ कार्यकुशलता. १४ संधि. 'योग बरवा हा पुन्हां घडेना।'—दावि २४२. १५(वैद्यक) इलाज; उपाय; औषध. 'आमवायूवर एरंडेलाचा योग प्रशस्त आहे.' १६ मोठा लाभ. 'मग योग योग ऐसा सहसा उठला वळी महा शब्द।'—मोकर्ण ७.३५. १७ जारणमारण; जादूटोणा. १८ ईश्वरी संकल्प. १९ समाधिशास्त्र. २० तत्वज्ञान. २१ व्युत्पत्ति; व्युत्पत्तिमूलक अर्थ. २२ सूत्र; नियम; कायदा. २३ (ज्यो.) विशिष्ट तिथि, वार, नक्षत्र यांचें सहचर्य येणें. उदा० रविवारीं हस्त आलें असतां त्यास अमृतसिद्धि योग म्हणतात. [सं. युज्=जोडणें] सामासशब्द- **०च्युत**—पु. योगभ्रष्ट. -ज्ञा ६.४४८. **०धर्म**—पु. कर्तव्य; सद्गुण, अथवा योग्याचें विशेष कर्म; त्यांपैकीं दहा विशेष आहेत- अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्या, अपरिग्रह (हे पांच यम व) शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान (हे पांच नियम होत). दुसरी गणना अशी आहे—अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, अपैशुन, दया, अलोभ, मार्दव, लज्जा. कांहीं दम, क्षम, अचापल्य, तेज, तितिक्षा, हे यांतच गणतात. **०निद्रा**—स्त्री विश्वप्रलयानंतरची व विश्वोत्पत्तीपूर्वीची ब्रह्मदेवाची झोंप; ईश्वराची निद्रावस्था; योगमाया; सहजस्वरूपस्थिति. —ज्ञा ५.७८. **०निष्ठा**—स्त्री. योगपरायणता. —ज्ञा २.३१५. **०पट**—पु. १ श्रेष्ठ भोग. २ संन्याशदीक्षेचा एक प्रकार. संन्याशानें धारण करावयाचीं विशिष्ट वस्त्रें. ३ (ल.) संन्यास घेतल्यावर त्यासंबंधीं पाळावयाचे नियम वगैरे. 'ते योगपटाची मवणी। जीवीं अनियम चिंतवणी।'—ज्ञा १६ ३३२. **०भूमिका**—स्त्री.

योग्यार्ची विशिष्ट अवस्था, स्थिति. 'द्रष्टादृश्यांचिया प्रासीं। मध्यें उलेख विकासी। योगभूमिका ऐसी। अंगीं वाजे।' –अमृ७.१८५. **०भ्रष्ट**–वि. योगसाधनांत कांहीं प्रत्यवाय घडल्यामुळें पुनर्जन्म पावलेला. **०माया**–स्त्री. ईश्वराची जी मायारूप शक्ति ती; भ्रम; माया; माया व ब्रह्म पहा. **०मुद्रा**–स्त्री. खेचरी, भूचरी, चाचरी, अगोचरी, आलेख इ०. पांच योगमुद्रा; यांचीं स्थानें अनुक्रमे नादबिंदु, नासिका, नेत्र, कर्ण, व आकाश हीं होत. 'खेचरी भूचरी चाचरी। अगोचरी आलेख यापरी। माजी समरसली खेचरी। नादबिंदूसी।' –कथा ७.४.७३. **०राज गुग्गुल–ळ**–पु. एक प्रकारचें रसायन; मात्रा. **०रूढ**–वि. व्युत्पत्तीनें ज्यांचा प्राप्त अर्थ व रूढ अर्थ हे जुळतात असा (शब्द). जसे– भंगरखा; जलधर; पंकज; भूधर. कांहीं शब्द यौगिक, कांहीं रूढ आणि कांहीं योगरूढ असतात. **०शास्त्र**–न. चित्ताची एकाग्रता करण्याच्या साधनासंबंधींचें शास्त्र; ज्यामध्यें प्राणायामादिद्वारां अंतःकरणाच्या एकाग्रतेचा उपाय सांगितला आहे असें सहा शास्त्रांतील एक शास्त्र. **०सार**–पु. विचार. **०क्षेम**–पुन. निर्वाह; चरितार्थ; उदरपोषण. 'यांचे योगक्षेमाबद्दल मौजे वडु तर्फ पाबल पैकीं इनाम.' –शाछ १.३६. **योगक्षेम चालविणें**–एखाद्या मनुष्यास पाहिजे असेल तें मिळवून देणें; संसाराची एकंदर व्यवस्था पाहणें; उदरनिर्वाहाची तजवीज करणें. 'जे मला अनन्यभावें शरण येतात त्यांचा योगक्षेम मी चालवितों.' **योगानंद**–पु. योगाभ्यासानें होणारा आनंद; पांच आनंदांपैकीं शेवटचा. **योगाभ्यास**–पु. हटयोगादिकांचा अभ्यास, शिक्षण; योगशास्त्राचा अभ्यास; चित्तवृत्तींचा निरोध करून ध्यानादिकांचा केलेला अभ्यास. **योगायोग**–पु. १ दैवगति; अनपेक्षित अशी घडलेली कांहीं गोष्ट; बनाव. २ अनुकूल काळ आणि प्रतिकूल काळ. 'योगायोग पाहून वागावें.' **योगारूढ**–वि. योगी; योगनिष्णात. 'तोच पुरुष योगारूढ म्हणजे पूर्ण योगी झाला' –गीता ६९४. **योगासन**–न. योगाभ्यास करणाऱ्या योग्याची विशेष प्रकारच्या पद्धतीनें वसण्याची रीत. **योगिनी**–स्त्री. १ दुर्गादेवीची परिचारिका. या ६४ आहेत. २ योगाभ्यासी स्त्री; जोगीण. [सं.] **योगी**–पु. १ योगसाधन करणारा; योगमार्गास लागलेला मनुष्य. –ज्ञा ६ ३९. २ योगसाधनांचा उपयोग जादुगिरीच्या रूपानें करून लोकांस चमत्कार दाखविणारा मनुष्य. 'भारतीय वाङ्मयांत योगी याचा अर्थ बडा जादूगार असा होतो.' –ज्ञाको (य) ६५. ३ (सामा.) संन्याशी अथवा भक्त. **योगेश्वर**–पु. १ श्रेष्ठ योगी; सर्वांत श्रेष्ठ प्राणी; नांवाजलेला योगी; भक्त; संन्यासी; साधु. २ कृष्ण.

योगें—शअ. मुळें.

योग्य—वि. १ शोभेलसें; स्थानानुकूल. 'पालखी जी आहे ही श्रीमंतासं योग्य.' २ मान्य; संमत; रास्त; बरोबर. ३ अनुरूप; उचित. 'या स्त्रीस हा नवरा योग्य आहे.' ४ उत्कृष्ट; श्रेष्ठ. 'अवघ्या मंडळीत बापुजी बावांचें अक्षर योग्य आहे.' **योग्यता**–स्त्री. मोठेपणा; पात्रता.

योजक—वि. १ कल्पिं काढणारा; युक्तिवान. २ व्यवस्थापक; योजना करणारा. ३ जोडणारा; लावणारा; वियोजक; संयोजक. ४ (गणित) मिळवावयाचा; बेरीज करावयाचा (आंकडा रक्कम). ५ (चुकीनें) शोधून काढलेलें; योजलेलें. [सं. युज्=संयोग करणें] **योजकस्तत्र दुर्लभः**–एखाद्या वस्तूचा योग्य स्थळीं व योग्य प्रसंगीं उपयोग करणारा माणूस दुर्मिळ असतो. उपयोगाच्या वस्तू जगांत पुष्कळ आहेत त्यांची योजना करणारा मनुष्य मात्र मिळणें कठिण आहे.' **योजणूक**–स्त्री. योजना पहा. [योजणें] **योजणें**–क्रि. १ लावणें; नेमणें; कोणेकाला कोणेक कामीं नेमणें; किंवा स्थापिणें. 'त्याजकडे पगारदार जर चांगला कणकया योजला तर पैक्याचा उग वा होईल.' २ व्यवस्था लावणें; उरकणें; रचणें. ३ विचार करून ठरविणें; शोध लावणें; डोक्यांतून काढणें; युक्ति काढणें; साधन मिळविणें; कोणेक गोष्ट अशी अशी, या प्रकारें करावी इ० रूपें संकल्पिणें. ४ निश्चय करणें; निश्चित करणें; नेमणें; नेमस्त करणें; ठरविणें 'तुम्ही वर योजला होता त्याचें रासकूट मिळत नाहीं.' ५ देणें; ठेवणें. 'यदुच्या देहीं जेंसि योजीन।'–मोआदि ११ ६४. ६ आश्रय करणें. 'जें बुद्धियोगा योजिलें। तेचि पारंगत चाहले।'–ज्ञा २.२२७. [सं. युज्=योजना करणें] **योजना**–स्त्री. १ व्यवस्था; रचना; ठराव २ बेत; घोरण; अंदाज; कल्पना: संकल्प; युक्ति. ३ नेमणूक; लावणें; जोडणें; रुजू करणें **योजित**–वि. १ रचलेलें; ठरविलेलें; उपयोगांत आणलेलें. २ हुडकून काढिलेलें; शोधिलेलें; मनानें ठरविलेलें; संकल्पित. ३ जोडलेला; लाविलेला; नेमलेला; निश्चित; नेमस्त केलेला; जुळलेला; जुळविलेला. [सं.] **योज्य**–वि. १ योजण्यास योग्य २ (गणित) जींत कांहीं रक्कम, संख्या मिळवावयाची आहे अशी (संख्या). [सं.]

योजन—न १ रस्त्याची लांबी अगर अंतर मोजण्याचें माप; चार कोस; नऊ मैल; कित्येकांचे मतें ५ मैल. 'शक्रसभा सार्धशतक योजन दीर्घा तशीच विस्तीर्णा।'–मोसभा १.२३. २ योजना; बेत इ० [सं.]

योध—पु. योद्धा; वीर. 'हरुनि यशो–धन गो–धन योध अगणित क्षयासि नेऊन।'–मोविराट ६.५२. **योधसंराव**–पु. युद्धतयारीची सुरवातीस सूचना देण्याचा आवाज; शंख फुंकणें; लढाईत स्फुरण येण्यासाठीं ओरडण्याचा शब्द (हरहर महादेव इ०) [सं.] **योद्धा**–पु. शूर पुरुष; वीर; लढाऊ शिपाई; लढवय्या. [सं.]

योनि-नी—स्त्री. १ (स्त्रियांचें) जननेंद्रिय. २ जन्मस्थान; झरा; उगम; त्या त्या पदार्थांचें जें उत्पत्तिकारण तीं. 'मेघ हा धूमयोनि आहे.' ३ प्राण्याची जाति किंवा वर्ग; कोटी उदा० मनुष्ययोनि, व्याघ्रयोनि इ०. या योनी ८४ लक्ष आहेत असें मानलें आहेत. त्यांत २० लक्ष वृक्ष, ९ लक्ष जलचर, ११ लक्ष किडे, १०लक्ष पक्षी, ३०लक्ष पशू, ४ लक्ष मानव. ४जगाचें-निमित्त कारण जें ईश्वर, काल स्वभाव इ० त्यासहि म्हणतात. 'ईश्वर हा जगद्योनि होय.' ५होमकुंडाच्या मेखलेस पश्चिमभागीं शाळुंकेसारखी आकृति करतात ती. [सं.] ०**कंद**-पु एक रोग. [सं.] ०**चतुष्टय**-न. जीवांचे चार प्रकार, कोटि (जन्माच्या प्रकारभेदानें-जरायुज, अंडज, स्वेदज, व उद्भिज). ०**दाह**-पु स्त्रियांचे जननेंद्रियांतील असह्य उष्णता; एक रोग. [सं.] ०**द्वार**-न. मूत्रद्वार; मूत्रेंद्रिय (स्त्रियांचे). [सं.] ०**नासा**-पु. स्त्रीजननेंद्रियाचा भाग ०**पुष्प**-न. (काव्य) स्त्रीजननेंद्रियाचा भाग [सं.] ०**भ्रंश**-पु योनी बाहेर येणें. [सं.] ०**रोग**-पु स्त्री जननेंद्रियाचे विकार. हे २० प्रकारचे आहेत. ०**वात**-पु. योनीसंबंधीं वातविकार. [सं.] ०**व्रण**-पु. योनीमध्यें क्षत पडणें; योनी चुरचुरणें. [सं.] ०**शूल**-पु. योनींत दुखणें; कळा येणें. [सं.] ०**संकर**-पु उत्तम, अधम वर्णाचा मिलाफ; मिश्र संतति; जारज उत्पत्ति. ०**संबंध**-पु. विवाहद्वारा जो परस्पर संबंध होतो तो; यौनसंबंध. [सं.] ०**संवृत्ति**-स्त्री. योनीचें आकुंचन. [सं.] ०**स्फुरण**-न. योनी थरथरणें; एक रोग. [सं.] ०**स्फोट**-पु. योनी फाटणें; छिद्र पडणें. [सं.] **योन्यर्श**-पु. योनीचा विकार; जननेंद्रिय बाहेर येणें. [सं.]

योषा, योषित्, योषिता—स्त्री. १ सामान्यतः स्त्री. २ व्यभिचारी; अपतिव्रता. [सं. युष्=सेवा-चाकरी करणें]

यौक्तिक—वि. १ कृत्रिम; बौद्धिक; कसबाचें. २ सामासिक अथवा संयुक्त (शब्द अथवा प्रत्यय) जसें- 'देवभक्त, विद्वान्.' ३ योगविषयक. [सं.]

यौगपद्य—न. एककालिकता; समकालिकता; कालैक्य. [सं.]

यौगिक—वि. प्राकृतिक; प्रत्यय किंवा इतर अनेक अर्थवंत शब्द यांचा परस्पर योग होऊन अवयव शक्त्यनुरोधानें अर्थ व्हावयाजोगा सिद्ध झालेला (विशिष्ट शब्द). शब्दावयवांवरून निघणारा (अर्थ). ०**शब्द**-पु. ज्या शब्दाचा अर्थ त्याच्या अवयवांच्या अर्थाच्या जुळणीनें उत्पन्न होतो तो शब्द.

यौतक—न. स्त्रीधनाचा एक प्रकार. [सं. युज्, युति]

यौतिकमास—पु. नक्षत्रप्रदक्षिणेनंतर सुर्याची युति होण्यास चंद्राला २ दिवस ५ तास आणखी लागतात. ह्या कालास यौतिक मास किंवा चांद्रमास म्हणतात. हा मास २९ दिवस १४ तास आणि १४ मिनिटें ह्यानीं पूर्ण होतो.

यौनसंबंध—पु. योनिसंबंध पहा. [सं.]

यौवन—न तारुण्य; वयांत येणें; पूर्ण वाढ (शरीराची) [सं. युवन्-तरुण] ०**कंटक**-पु. तरुणपणीं तोंडावर येणारे फोड अगर पुटकुळ्या; तारुण्यपीटिका. [सं.] ०**पीटिका**-स्त्री. कफवातपित्त यापासून शेवरीच्या काट्यासारख्या पुटकुळ्या तारुण्यांत मनुष्याच्या तोंडावर येत असतात त्या [सं.]

यौवराज्य—न. युवराजाचें म्हणजे राज्याचा जो कायदेशीर वारस त्याचीं कर्मे, कर्तव्यें किंवा अधिकार; युवराजाचें पद किंवा अधिकार. [सं.]

र

र—मराठी व्यंजनमालेंतील सत्ताविसावें व्यंजन. अक्षरविकास-चार अवस्था. पहिली अशोकाच्या गिरनार लेखांत, दुसरी मंदसोर लेखांत (इ.स. ५३२), तिसरी कुंडेश्वर लेखांत (इ.स. ६६१), व चवथी जोधपूर-लेखांत (इ.स. ८३७). [ओझा]

र—स्त्री. रड; रडणें या अर्थी संकेतानें; रुदन; किंकाळणें; रडणें. 'करि बहु ज्यातें मानुनि पतितेजःसारपुंज राका र।' -मोअनु ३५५. **र चा पाढा वाचणें, र चें गाणें लावणें-सांगणें-मांडणें, र करणें-गाणें**-१ मोठ्यानें रडणें, ओरडणें. २ रडगाणें सांगणें; दुबळेपणा दाखविणें. ३ रखडणें; कसा तरी काळ कंठणें. ४ पोरकटपणें वागणें; रडणें भेकणें. **र र**-स्त्री. रडगाणें. र पहा. [र द्वि.] ०**करीत**-क्रिवि. जोरानें किंवा उत्साहानें नव्हे असें; रडत कढत; कष्टानें.

र—अ. रे (अप.) 'दौडी देण्याचा हुकूम झाला है र.' -नामना ८६.

रा—(संक्षेप) १ रवाना. २ राजमान्य. ०**खर**-(संक्षेप) रबिलाखर. ०**वल**-(संक्षेप) रबिलावल.

रअया-आया—स्त्री.अव. रयत. -आदिलशाही फर्मानें. [अर.]

रइ-ई—स्त्री. (व.) रवी; घुसळणी. [सं. रवि; प्रा. रइ; हिं. रई]

रईस—पु. १ सरदार; जहागीरदार. 'अव्वल घरचा बंदोबस्त नीट राखावा हें रईसास लाजम.' -पया २१. २ श्रीमंत; मोठा माणूस. 'रईस माणसें आहेत या गांवांत.' ३ (व.) राहणारा; वस्तीदार. 'कोठले रईस तुम्ही?' [अर. रईस्]

रंक—वि. १ गरीब, दीन (माणूस). राजा किंवा राव या शब्दाच्या जोडीनें येतो. -ज्ञा ५.११०. -एभा ५.४६८. 'रंक राजआज्ञेसि भ्यालें। तेचि पुढें राजा जालें।' -दा ९.१०.३१. २ दीन; लाचार; क्षुद्र 'पै रंकु एक आडलेपणें। काकुळती अंतीं

धांवा गा धांवा म्हणे।'-ज्ञा ८.१२८. [सं.] ०पण-न. दारिद्र्य -ज्ञा १८.३२३.

रंक—न. जीवत्व. 'भीतरीं नसतां रंक। लोक प्रसीध बाजविति संख।'-ऋ ९३.

रकटा—पु. दोरा; आगवळाकरितां वापरावयाचा दोऱ्याचा किंवा रेशमाचा, केळीच्या सोपाचा, गंगावनाचा तुकडा; गवताची पात चिंधी वगैरे. २ करगोटयाकरितां वळलेला दोर वगैरे.

रकटे—न. १ फाटकें घोंगडें; कांबळें. २ लकतरें; जुनें, फाटकें वस्त्र. ३ जुना शेला, धोतर, उपरणें इ०स तुच्छतेनें म्हणतात. [का. रट्टु=जाडेंभरडें कापड]

रकत, रगतओढ, रकतपिती—(प्र.) रक्त, रक्त ओढ, रक्तपिती इ० पहा.

रकबा—पु. १ (अप. रुकबा) गांवाभोंवतालची जमीन; गांव, खेडें, परगणा वगैरेची हद्द अगर प्रवेश; किल्ला वगैरेच्या सभोंवतालचें मर्यादित क्षेत्र. २ गुलाम; बंदी. [अर. रकबह=गळ्याभोंवतालची कडी, सांखळी] ०बंदी-स्त्री. गावच्या जमिनी (पडीत, वहीत, इनामी इ०) ची माहिती देणारा तक्ता, कागद; जमाबंदीचा तक्ता.

रकम, रक्कम—स्त्री. १ हिशोबाची बाब; कलम; गोष्ट; अंकराशि. २ खूण; चिन्ह; हस्ताक्षर; लेख. ३ (व) जात; प्रकार; तऱ्हा. ४ चीजवस्त; डाग; दागिना. 'चांदीच्या रकमा एकशेर आदपाव वजनाच्या...'-विक्षिप्त १.११. ५ विशिष्ट द्रव्यसंख्या; परिमित द्रव्य; ऐवज. ६ पोटगी; भत्ता; खर्ची. ७ कोणत्याहि पदार्थाचें विशिष्ट प्रमाण. ८ तह, ठराव, करार वगैरेचें कलम -पया ३२०. [अर. रक्म] **रकमेस आणणें**-मोठा ऐवज करणें; किंमतदार बनविणें; वस्तु फायदेशीर करणें. **रकमेस येणें**-१ किंमतवान होणें; मूल्यवान होणें. २ (ल.) जेर येणें. 'तो इतका उद्दाम घोडा होता पण त्या चाबुकस्वाराचे हातीं जातांच दोन दिवसांत रकमेस आला.' ३ हिशेबांत धरण्याइतकी किंमत येणें; व्यापार, देवघेव, अगर व्यवहार वगैरेची किंमत निश्चित होणें; मूल्य ठरविण्याइतकें निश्चित स्वरूप प्राप्त होणें. ०पात-स्त्री दागदागिने. 'शिरसाळकर व वालूजी हुजऱ्या हे माझे घरी जाऊन माझी रकमपात घेऊन गेले'-विक्षिप्त २.७९. ०बंद्-बार-क्रिवि. एकेक बाब घेऊन; कलमवार; अंशाअंशानें. **रकमाला**-पु. १ बाबींची, जिनसांची यादी; वस्तूंचा हिशेब. २ जमाबंदी; जमीनमहसुलाचें हिशेबपत्र; राजलेख. -राज्ञ ९.२५. **रकमी**-वि. १ ठराविक; निश्चित; कायम (जमाबंदी). २ कलमी. **रकमेरकमेचा**-वि. (ना.) तऱ्हेतऱ्हेचा.

रकाना—पु कागदास उभी घडी पाडून अगर आंखून केलेला भाग; कागदाचा उभा भाग, स्तंभ; तुर्यभाग. -राज्ञ १०.८ (इं.) कॉलम. [अर. रुक्न्=स्तंभ] **रकान्यास आणणें येणें**-१ बरीच किंमत आणणें, येणें; हिशेबांत लिहून ठेवण्याइतकी किंमत आणणें, येणें. रकमेस आणणें-येणें पहा.

रकाना-णा—पु. (व.) माज; उन्मत्तपणा. **रकान्यावर येणें**-(व.) माजणें; जोर येणें. 'रकान्यावर आला म्हणून असें बोलतो.'

रकाब, रकाबी, रकेबी—स्त्री. रिकाब-बी पहा.

रकार—पु. १ रडगाणें; रडणें; र करणें; बोंबलणें. २ ईर्षेचा अभाव व त्यामुळें येणारा ढिलेपणा. ३ अपयश; नाश; ओंफस् (काम, योजना इ०चा). (क्रि० होणें; करणें). [र (रडणें)+करणें]

रकट(कटा)ण-न—न. (विणकाम) वशारण्याच्या गांठी दिल्यावर जें दोन बोटें विणतात ते; लुगडें इत्यादि वस्त्राच्या करळयांचा भाग. [रकटा]

रक्त—न. रुधिर; जिवंत प्राण्याच्या शरीरांत सतत वाहणारा तांबडा रस; शरीरांतील एक द्रवरूप धातु. -वि. १ तांबडा; तांबूस रंगाचा; रक्तासारखा (तांबडा) लाल; लालभडक. २ रंगविलेलें. रंगीत. ३ आषक; अनुरक्त; सवय, शोक, लळा, ओढा असलेला; [सं. रंज्-रत-रक्त; फ्रेंजि. रत, पोर्तु.जि.अरत] (वाप्र.) ०आटविणें, रक्ताचें पाणी करणें-उरस्फोड करणें; फार मेहनत करणें. ०पडणें-शौऱ्याच्यावाटे रक्त जाणें. **रक्ताचें पाणी (आणि हाडाचे मणी) करणें**-अतिशय इमानानें आणि मेहनतीनें कामगिरी करणें. ०पाडणें-(मंत्र, जादूटोणा इ०नीं) बाहेर रक्त पडेल असें करणें. **रक्तावणें, रक्ताळणें**-क्रि. १ रक्तें वाहूं लागणें; रक्तस्राव होणें (जखमेंतून). २ रक्तबंबाळ होणें (शरीर, वस्त्र, वस्तु). सामाशब्द- ०ओढ-स्त्री. रक्त पडतें अशी हगवण; रक्त जाणें. ०कांचन-पु. एक डोंगरी झाड; तेंदू, तेंतु. ०गुल्म-न. मुलाच्या डोक्याचीं हाडें व त्वचा यांमध्यें कधीं कधीं रक्त सांचून गुल्म होतें तें.'-बालरोगचिकित्सा ५०. ०गोलक-पु. (शाप.) रक्ताचा थेंब, बिंदु इ० (इं.) ब्लड ग्लोब्यूल. -सेंपू २. ०चंदन-पु. एक वृक्ष; तांबडा चंदन; याच्या बाहुल्या, खेळणीं इ० करतात. [सं.] ०चंदनी-वि. रक्तचंदनाच्या संबंधीं. ०तालू-वि.घोडयाचा एक प्रकार. 'तालूचे ठिकाणीं तांबडा, दारूप्रमाणें नेत्र; मानेवरील केस आरक्तवर्ण आणि बाकी सर्व अंग तांबडें अशा घोडयास रक्ततालू म्हणतात.'-अश्वप १.२३. ०धातु-पु. तांबडा खडू; तांबडा(हर)ताल. [सं.] ०नेत्र-वि. तांबडे, लाल डोळे असलेला (घोडा); अशुभ चिन्ह होय. [सं.] ०प-१ राक्षस. २ ढेंकूण. [सं. रक्त+पा=पिणें] ०परमा-मेह-पुन. जननेंद्रियाचा रोग; कांहीं व्याधीच्या योगानें शिश्नद्वारां जो रक्तप्रवाह तिडीक लागून होतो तो; रक्तप्रमेह. 'मूत्रकोड आणि

परमें । रक्तपिती रक्तपरमें । ' –दा ३.६.२९. [सं. रक्तप्रमेह] **•पात**–पु. खून; कापाकापी; मारामारी; कत्तल; रक्त सांडणें. ' त्याच्या दाराशीं रक्तपात केल्यावांचून तो पैसा देणार नाहीं. ' [सं.] **•पिती**–स्त्री. महारोग; महाव्याधि; गलतकुष्ट रोग. [सं. रक्त+पित्त] **•पित्या**–वि. रक्तपिती भरलेला; महारोगी. **•पिस**–पुन. नाक, तोंड इ०पासून रक्तस्राव होणें. ' आम्लपित्त रक्तपित्त । ' –गीता १३.२४९७. **•प्रदर**–पु एक प्रकारचा प्रदररोग. **•प्रमेह**–पुन. रक्तपरमा–में पहा. जननेंद्रियाच्या द्वारें रक्तस्राव होणारा प्रमेह; लघवींतून रक्त जाणें. **•बंबाळ–बांबाळ**–वि. १ रक्तानें भरलेला, माखलेला; अंगातून अतिशय रक्त वाहत असलेला. २ शरीर अवयव इ०ची अशी स्थिति. ' हाताचा रक्तबंबाळ झाला. ' **•बाऊ–बाहु**–पु. एक सन्निपात ज्वर; अंगावर तापाचे तांबडे चकंदळे उठणें. **•बीज**–वि. १ ज्याच्या रक्तापासून नवीन असुर उत्पन्न होई असा (एक असुर). २ ढेंकूण ३ (ल.) डाळिंब, तांबडे दाणे असलेलें. [सं.] **•बुंद**–पु. राक्षस. [सं. रक्तबिंदु] **•बोळ**–पु एका झाडाचा औषधी तांबडा डिंक, गोंद. **•भरित** (गो.) रक्तानें भरलेला **•माँडळी**–स्त्री. (गो.) सापाची एक जात. ही चावली असतां तोंडांतून रक्त वाहतें. **•मा(मां)स**–न. रक्त व मांस; शरीरांतील महत्त्वाचा अंश. ' रक्तमांस आटलें–शोषलें–सुकलें इ०. ' **•मांस एक**–एका रक्ताची; कुळांतील; सगोत्र. **•मांस निराळे**–नात्याचा कांहीं संबंध नसणें; नातें नसणें, असगोत्र. **•मान्य**–वि. लढाईमध्यें केलेल्या कार्याबद्दल, झालेल्या जखमांबद्दल बक्षीस दिलेल्या, सारा माफ जमिनी. **•मुखराग**–पु. (नृत्य) वीर, रौद्ररस, किंवा मद्याची धुंदी दाखविण्याची तोंडावरील लाली, तेज. **•मेह**–पु. रक्तप्रमेह पहा. [सं.] **•मोक्षण**–न. शरीरांतील रोगांश बाहेर पडावा म्हणून जळवा लावून, कापून, फांसण्या टाकून किंवा शिरा तोडून जें रक्ताचें निष्कासन करितात तें. **•रंजन**–न. तांबडें करणें. **•रुधिरपेशी**–स्त्रीअव. रक्ताच्या तांबड्या पेशी. (इं) रेड कॉर्प्युस्कल्स. **•रोडा–रोहिडा–रोहुडा**–पु. एक प्रकारचें झाड, औषधी वनस्पति; रगतरोडा. पानें भोकरीच्या पानासारखीं, मिऱ्याहून मोठीं गोल व तांबड्या रंगाचीं फळें येतात. [सं. रक्तरोहितक] **•वर्ण–वर्णी**–वि. लाल; तांबड्या रंगाचें. [सं.] **•वाहिनी**–स्त्री. जीमधून रक्त वाहत असतें अशी शरीरांतील नाडी. [सं.] **•विकार**–पु. रक्तदोष; रक्तांतील बिघाड [सं.] **•विपाक**–पु. रक्तदोषानें होणारा रोग. विपाक पहा [सं.] **•वृध्दि**–स्त्री. (आजारानंतर) शरीरांत रक्त वाढणें.याच्या उलट रक्तक्षय. [सं] **•शोषण**–न. १ (आजारामुळें) रक्त कमी होणें; अंगांतील रक्त कमी करून कृश करणें. २ (ल.) लोकांकडून त्याच्या शक्तीबाहेर पैसे उकळणें; जळवा लावणें. [सं.] **•सांड**–स्त्री. (कों.) रक्तमोक्षण पहा. फासण्या टाकून रक्त काढणें. **•स्राव**–पु रक्त जाणें, वाहणें; रक्ताचा पाट. [सं.] **रक्ताचीआण**–स्त्री. एखाद्याच्या रक्ताची शपथ घेणें; निकराची शपथ. बंदाखालीं बसणें पहा. **रक्तांजनी**–वि. एकरंगी पांढरा असून डाव्या कुशीवर फक्त तांबडी टिकली असलेला (घोडा). –अश्वप १.९७. [रक्त+अंजन] **रक्तातिसार**–पु रक्ताची हगवण. –बालरोगचिकित्सा १०७. [रक्त+अतिसार] **रक्तांबर**–पु. भगवें, तांबडें वस्त्र. –वि. १ तांबडें वस्त्र परिधान केलेला. २ रक्तानें न्हालेला; जखमी झालेला. [सं. रक्त+अंबर] **रक्तांबील–ळ, रक्ताभोंवळा**–वि (काव्य) रक्तानें माखलेला; अंगांतून रक्तस्राव होत असलेला. [सं. रक्ताविल] **रक्ताभिमान**–पु समान रक्ताविषयीं अभिमान, जागृति; जातीचा जागतेपणा. ' आम्हालासुद्धां रक्ताभिमान हा आहेच. ' –टिले २.४५०. **रक्ताम्र**–पु. एक प्रकारचें झाड व त्याचें फळ. रातंबी पहा. [सं. रक्त+आम्र] **रक्तार्श**–पु. मूळव्याध; रक्ती मूळव्याध; शौचाच्या वाटेनें रक्त पडणें. [सं.] **रक्तावरोध**–पु रक्त न वाहणें; रक्ताचें अभिसरण होण्याचें थांबणें; रक्ताचा विशिष्ट जागीं संचय होणें. [रक्त+अवरोध] **रक्ताशय**–पु. शरीरांतील रक्त संचयाची जागा; हृदय. [रक्त+आशय] **रक्तासन**–न. तांबड्या दुपारीचें झाड. **रक्ताक्ष**–वि. १ तांबड्या लाल डोळ्याचा (घोडा). २ तांबडा; लाल (मोती, खडा क्ष) [सं. रक्त + अक्ष] **रक्ताक्षी**–पु साठ संवत्सरांतील अठावन्नावा संवत्सर. **रक्ता**–वि. पंधराव्या श्रुतीचें नांव. [सं.] **रक्ति**–स्त्री. अनुराग; रंग. [सं.] **रक्तिका**–वि. सातव्या श्रुतीचें नांव. [सं.] **रक्तिमा**–पु. तांबडेपणा; लालपणा; लाली. [सं.] **रक्तिया**–वि. लाल रंगाची छटा असलेला (हिरा). हा दोष अशुभ मानतात. **रक्ती–रक्त्या मूळव्याध**–स्त्री.जींत रक्त पडतें अशी मूळव्याध. **रक्त्या बोळ**–रक्तबोळ पहा. **रक्तोत्पल**–न. तांबडें कमळ. [रक्त+उत्पल]

रक्तवान—पु. १ शाई विकून निर्वाह करणारा. २ घराला शाई पुरविणें, द्रोण, पानें आणून जेवण्याला मांडणें या कामावरचा श्रीमंताच्या घरचा नोकर. –वाडबाबा १.९३. [फा.] **•वानी**–स्त्री रक्तवानाची वृत्ति. धंदा.

रकबा –पु. गांवाखालची जमीन. रकबा पहा. [अर. रक्ब]

रख—वि. (सांकेतिक) (भाजीपाला बाजार) तीन संख्या.

रखडणी—स्त्री १ रखडपट्टी; रेंगाळत चालणें, काम करणें; रेंगाळणें; रेंगत चालणें; ढुंगणानें सरकणें. **रखडणें**–क्रि. १ कष्टांत दिवस काढणें; कसें तरी चालणें; ढकलणें खितपत पडणें; एखादें कार्य धड न होतां त्यांतून आपली सुटका होणार नाहीं अशा कंटाळवाण्या स्थितीची विपत्ति भोगीत बसणें. २ भटक्या मारणें. ' पायाखालचे खडे तुडवीत रखडत फिरत असतो. '

–भा१११. ३ दुखण्यांत खितपत पडणें. ४ ढुंगणानें सरकत जाणें; खुरडणें. [ध्व. खरडणें वर्णव्यत्यास] **रखडपट्टी–पाटी**–स्त्री. (गु.) भटकणें; हिंडणें.

रखतवाणी–वानी–वाळी—(प्र.)रक्तवानी पहा. 'म्हणोनि केली रखतवानी।' –दा २०.९.१०.

रखना—पु भांडण; वाद. 'त्या अलीकडे दरम्यान रखने जहाले.' –थोमारो १.२२१. [फा. रख्ना=फट, चीर] **रखने सूरत–सुरत**–स्त्री. तंट्याची तऱ्हा; भांडणाचें कारण. दरम्यान रखनेसुरत ते तर्फेनें अमलांत आली.' –थोमागे १.६६.

रखमंडळ—न. १ राख पसरलेली जागा. २ (ल.) घाण जागा; उकिरडा. [राख+मंडळ]

रखरख—स्त्री. १ कडक ऊन; आग; भकभक; धगधग; तीव्र उष्णता. २ रोगामुळें पोटांत पडणारी आग; खाखा. ३ तीव्र क्षुधा अगर शोष. (क्रि० करणें). [अनुकारी. लखलख प्रमाणें; तुल. सं. रुक्ष] **रखरखणें**–अक्रि. १ रखरख होणें; प्रदीप्त होणें; (जळजळीत असणें) २ घसा कोरडा होणें; तीव्र क्षुधा अगर तृषा लागणें. ३ तीव्र दाह अगर आग आग होणें; तापणें. ४ रुक्ष, शुष्क होणें (जमीन, प्रदेश). **रखरखलेला निखारा**–पु. १धगधगीत विस्तव.२(ल.) जाज्वल्य माणूस, वस्तु. 'रखरखलेल्या निखाऱ्यांना कोणीच लाथाडूं शकत नाहीं.' –सवतीमत्सर २९. **रखरखाट**–पु. १ तीव्र भूक, तहान; अन्नापाण्याच्या अभावामुळें पोटांत होणारी रखरख. २ रुक्षता; शुष्कपणा; रखरखीतपणा (प्रदेश इ० चा). [रखरख चा अतिशय] **रखरखीत**–वि. १ स्निग्धांशविरहित कोरडा; भरभरीत; कठिण (खाण्याचा पदार्थ). २ कोरडा; नापीक; निर्जन; निर्वृक्ष (प्रदेश, प्रांत); थंडावा, स्निग्धपणा जेथें नाहीं असा (देश–ग्रामादि). ३ धगधगीत; अतिशय तप्त. **रखाखणें**–अक्रि. फार धगधगणें. रखरखणें पहा.

रखवालदार—पु. रक्षक; राखण करणारा; पहारेकरी; भय्या. [सं. रक्ष; प्रा. रक्ख; देप्रा. रक्खवाल; हिं. रखवाला] **रखवाली**–स्त्री. १ राखण; पहारा; संरक्षण; संभाळ.

रखा—पु. जागल्या. 'मुलकी खात्यामार्फत ठेवलेले रखे.' –(बडोदें) स्वारीनियम २६. [सं. रक्षा; प्रा. रक्खा]

रखा—स्त्री. (कों.) राख; भस्म. [सं. रक्षा; प्रा. रक्खा] **रखाडी**–स्त्री. राख. राखुंडी पहा. 'रखाडीला जा मिळूनियां वेगे।' –केक १५.

रखाद–त्—स्त्री. (व.) रद्दी. [फा. रख्त्=माल, सामान]

रखेली—स्त्री. राख; उपपत्नी; बाळगलेली स्त्री. [राखलेली, राखणें]

रख्त—पुन. १ जिंदगी; सामान; २ कापडचोपड. [फा. रख्त्=मालमत्ता] **०खाना**–१ कापडखाना. २ सरकारी कचेरी कोठी. 'अजरख्तखाने खोदायनंद खाने अलीशान' –रा २०. १२०.

रख्तवान–नी –रक्तवान–नी पहा.

रग—स्त्री. १ इंगा; नांगा. २ ईर्षा; मिजास; मस्ती; जोर; गुर्मी; ताठा; मगरूरी. 'मराठ्यांची रग जिरविल्याशिवाय ते गप्प बसावयाचे नाहींत.' (क्रि० धरणें; बाळगणें; येणें; मोडणें; जिरविणें) ३ उत्साह; जोर; सहनशक्ति. ४ तीव्रता; कडकपणा; प्रभाव; वेग; सोसाटा, 'गळवाचें रक्त काढतांच त्याची रग मोडली.' 'उन्हाची–पावसाळ्याची–वाऱ्याची रग.' ५ कळ; वेदना; दुःख; अवघडणें. (क्रि० लागणें; येणें) 'टवकारूनी दृष्टि लावूनिया रग। दावी झगमग डोळ्यापुढें।' –तुगा ४०७. ६ धमनी; नस, स्नायु; शीर; नाडी. 'मिठी मारा सळसळती साऱ्या रगा।' –प्रला १३१. ७ वेदना; पोट, हातपाय, डोकें, डोळे इ० अवयवांमध्यें सारख्या होणाऱ्या कळा. [फा. रग=धमनी] (वाप्र.) **०जिरविणें–मोडणें**–खोडकी जिरविणें; खोड मोडणें; शासन करून एखाद्याचा ताठा नाहींसा करणें. **०जिरणें–उतरणें**–मस्ती शमणें; नरम येणें. 'मदनरगा या त्वरितगती जिरुं देरे।' –प्रला १८७. (**मणगटाला**) **रग लावणें**–मनगट घट्ट पकडणें; अवळून धरणें; पिळणें; वेदना होतील अशा रीतीनें दाबणें. **कामाची रग**–कामाची आच, त्रास, घाई; जाचणूक. (क्रि० लावणें; लागणें) **सावकाराचा रग, देणेदाराची रग**–स्त्री. सावकारानीं किंवा देणेदारांनीं मागें लाविलेली टोचणी, तगादा, त्रास, दुःख; छळणूक. सामाशब्द– **रगदार**–वि. १ जोरदार; पाणीदार; मस्त; रगेल, उन्मत्त; मिजासखोर; ऐटबाज. २ जिवंत; उत्साही; ईर्षेबाज. तगडा (मनुष्य, पशु इ०). रग पहा. **रगदारी**–स्त्री. उत्साह; ईर्षा; कस; जिवंतपणा; चैतन्य. **रगमोड**–स्त्री. गर्वहरण; मानहानि; नाक खालीं होणें; मस्ती घालविणें; जाणें. **रगेल**–वि. अंगांत पुष्कळ रग असलेला. (मनुष्य; घोडा); ताठलेला; गर्विष्ठ; मस्त; गुर्मीखोर. अहंमन्य; मिजासखोर; बेगुमान; दिमाखी.

रंग—पु १ केवळ चक्षुरिंद्रियानां जाणतां येतो असा पदार्थाच्या ठिकाणीं जो पांढरेपणा, तांबडेपणा इ० वर्ण तो; एखाद्या वस्तूवर प्रकाश पडला असतां ती वस्तु ज्या रंगाची असेल त्या रंगाच्या किरणाशिवाय इतर किरण शोषले जाऊन त्या रंगाचे किरणच फक्त बाहेर टाकते. त्यास रंग म्हणतात.–ज्ञाको (र) २. २ रंगाची पूड; पदार्थाला तांबडा, काळा इ० कोणताहि वर्ण देण्याचें द्रव्य; रंगविण्याचें द्रव्य. ३ (ल.) तेज; तेजस्विता, चकाकी; भपका; गायन, कीर्तन, तमाशा, भाषण, इ० चा लोकांचीं अंतःकरणें रमण्याजोगा पडणारा शोभाविशेष; मजा; शोभा; आनंद. 'आजचे गाण्यास रंग चांगला आला.' ४ देखणेपणा; उत्कृष्टता; चांगली

स्थिति (मनुष्य, वृक्ष, बाग, शेत, इ० पदार्थांची किंवा संसार, व्यवहार इ०ची). ' नुकता संसार रंगास आला तों बायको मेली.' ५ देखावा; आकार; ढब; डौल; घाट; अंदाज; चिन्ह; परिस्थिति; प्रसंग; संधी. (क्रि० दिसणें) ' आज गरमी होती तेव्हां पाऊस पडेलसा रंग दिसतो. ' ' उन्हाचा-वाऱ्याचा-आभाळाचा-दिवसाचा-काळाचा-धारणेचा-भावाचा-पिकाचा-चाकरीचा-रंग. ' ' तूं शालजोडी मागशील तर पहा, मागण्याचा रंग आहे. ' ६ सोंगट्यांचे चार भिन्न प्रकार; गंजिफाचे निरनिराळे दहा प्रकार; पत्त्यांच्या चार बाजू प्रत्येकी. ७ गंमत; मजा; तमाशा; खेळ. ' भंगकरी रंग, अफू करी चाळा, तंबाखू बापडा भोळा. ' ८ रंगण; क्रीडास्थान (नाट्य, नृत्य इ०चें); हौदा; आखाडा; रंगभूमी; सभागृह; सभामंडप. ' असें बोलून इकडे तिकडे फिरते आणि रंगांतून पडद्यांत निघून जाते.' -कमं. २; -मोआदि २६.२१. ९ नवरा; पति (समासांत स्त्रीच्या नांवापुढें योजतात). ' सीतारंग. ' १० विचार; बेत. ' जाणत्याचे जाणावे प्रसंग । जाणत्याचे घ्यावे रंग ' -दा १८.२.१२. ११ तऱ्हा; ढोंग. ' बहु शिकला रंग चाळे । खरें खोटें इचे वेळे. -तुगा १३५९. १२ गाणें, बजावणें, नृत्य इत्यादि करमणुकीचा प्रकार. ' आजि कुमारिकेच्या महालासी । रंग होतो दिवसनिशीं । ' -शनि २४६. १३ थाटमाट ' रंग स्वर्गीचा उतरे । ' -दावि ५०४. १४ महत्त्व. ' या कारणें कांहीं रंग । राखोन जावें ' -दा १७.७.२१. १५ विवाह, शिमगा इ० प्रसंगीं एकमेकांच्या अंगावर केशर इ० चें रंगीत पाणी टाकतात तें किंवा तें टाकण्याचा समारंभ. १६ प्रेक्षकांचा किंवा श्रोत्यांचा समुदाय. १७ चुना; सफेती; उजळा. (क्रि० देणें). [सं. रञ्ज्-रंग देणें; फा. रङ्ग; हिं. रंग] (वाप्र.) **०उडणें**- १ मूळचा रंग जाणें, फिका होणें; तेज कमी होणें **०करणें**- मजा मारणें; मौज करणें. **०खेळणें**-विन्मद्दादि प्रसंगीं एकमेकांच्या अंगावर रंग उडविणें. **०चढणें**-अंमल, निशा, मद, धुंदी येणें. **०दिसणें**-एखादी गोष्ट होईलशी वाटणें, आकारास येणें; संभव असणें. ' तरी यापुढें जें एकंदर अवस्थांतर होण्याचा रंग दिसत आहे. ' -नि. **०भरणें**-१ भरास येणें; जोमांत येणें; मजा येणें. ' भलत्या प्रसंगीं भलत्या तालाची चीज सुरू केलीत तर रंग भरेल कां ? ' -नाकु ३.४६ २ रंग आणणें. ' रंग भरिती अद्भूत । ' -सप्र १०.८८. ३ तडजोड करणें. -पया १४०. **०मारणें**-बाजी मारून नेणें. ' रहस्य राखून रंग मारला । ' -ऐपो २५३. **०राखणें, रंगाची मोट बांधणें**-विजयानें, वैभवानें हुरळून न जातां सभ्य आणि सौम्य वर्तन कायम ठेवणें; आपल्या प्रतिपक्ष्यांवर वादांत किंवा कांहीं कामांत आपण सरशी मिळविली असतां आपण दिलदारीनें त्याच्याशीं वागणें; त्या सरशीच्या जोरावर त्याच्याशीं कठोरपणा न करणें; त्याला न हिणविणें; अधिक पेंचात ढकलण्याचा प्रयत्न न करणें. ' त्यानें मी चुकलों असें कबूल केलें तें बस झालें, आतां काय रंगाच्या मोटा बांधावयाच्या आहेत ? ' **०शिंपणें**-होळीचे अगर लग्नाचे वेळीं रंगाचें पाणी उडविणें, फेकणें; रंग खेळणें. **रंगाचा भंग करणें**-आनंदाचा बिरस करणें. **रंगांत येणें**-तल्लीन होणें; रंगून जाणें. **चढणें**-शोभा प्राप्त होणें; खुलून दिसणें; पूर्णतेस येणें; विकास पावणें; भरास येणें. **रंगास-रंगारूपास आणणें-येणें-चढणें**-१ फलद्रूप होणें-करणें; वैभवशाली, सुखावह, करणें; आरंभिलेलें कार्य अनुकूल संस्कारादिकांनीं चांगल्या स्थितीला आणणें, येणें. ' माझ्या प्रेमाचा मी नुमता कच्चा खरडा तयार केला आहे. तो रंगारूपास आणावयास वर्ष दीड वर्ष तरी लागेल. ' २ (तिरस्कारार्थी) एखाद्या तऱ्हेस, आकृतीस, विशिष्ट अवस्थेस पोंचणें, पोचविणें. ' हा आतां राम म्हणावयाचे रंगास आला. ' सामाशब्द- **०आखाडा**-पु. कुस्ती खेळण्याची जागा. ' धनुर्याग आरंभिला । मळें रंगआखाडा केला । ' -कथा ४.६.३७. **०काम**-न. १ रंग देण्याचें, रंगाचें काम. २ (रंगारी धंदा) धाग्यावर रंग चढवून तो पक्का बसविण्याची क्रिया; (इं.) डाइंग. **०डाव-बाजी**-पुस्त्री. गंजिफा, पत्ते खेळण्याचा एक प्रकार. **०डी, रंगडी ढंगडी-धंगडी**-स्त्री. १ ढंग; चाळा. २ फसगंमत; फसवेगिरी; खोडी; लबाडी; डावपेंच इ० (अनेक वचनी उपयोग). [रंग+ढंग] **०ढंग**-नपु. १ युक्ति; कारवाई; फंद; चाळा; लटपट; कावा. (क्रि० करणें; मांडणें; चालविणें). २ रागरंग; स्वरूप; एकंदर देखावा. ३ नाचरंग वगैरे; स्वच्छंदी आचरण. **रंगणावळ**-स्त्री. रंगविण्याबद्दलची मजुरी; रंगविण्याचा खर्च. [रंगणें] **०दार**-वि. १मनोहर रंग असणारा (पदार्थ, फूल, वस्त्र इ०) २ रंगेल गमत्या; विनोदी विषयी; चैनी; (माणूस) ३ रंगीत; रंगविलेले; रंगीबेरंगी. **०देवता**-स्त्री. गाणेंबजावणें, कथा, पुराण, प्रवचन, व्याख्यान इ०कांस जिच्या प्रसादानें रंग येतो, यश मिळतें अशी एक कल्पित देवता; खेळांत रमणीयता आणणारी देवता. २ खेळांची अधिष्ठात्री देवता. [सं.] **०द्रव्यें**-नअव. (रसा.) जीं द्रव्यें सूर्यकिरणांचा कांहीं विशिष्ट भागच फक्त आरपार जाऊं देतात अथवा परावृत्त करतात व बाकीचा भाग नष्ट करून टाकतात तीं द्रव्यें. -ज्ञको (र) ३. २ रंगविण्याच्या कामीं लागणाऱ्या वस्तु, पदार्थ. **०नाथ**-पु. कृष्ण; श्रीकृष्णाची बालमूर्ति. [सं.] **०पंचमी**-स्त्री. फाल्गुन वद्य पंचमी. या दिवशीं एकमेकांवर रंग उडवितात **०पट**-पु. रंगण्याची खोली; पात्रें रंगून तयार होण्याकरितां केलेली जागा; (इं.) ड्रेसरूम, ग्रीनरूम. [सं.] **०बहार**-पु. १ मौज. कमालीचा आनंद; सुख; आनंदाची लूट (क्रि० करणें मांडणें; होणें) ' रंगबहार एकांतीं लुटा । घर सुंदर कर पोपटा । ' -प्रला १४०. २ भव्य, आनंददायक दृश्य; थाटमाट. ३ नानाप्रकारच्या करमणुकी, खेळ,

कसरती किंवा त्या जेथें चालतात तें ठिकाण. ४ मुबलकता; पीक इ०ची आनंदप्रद रेलचेल. 'पिकांचा-धान्याचा-आंब्यांचा-लाडवांचा-जेवणांचा-रंगबहार. [रंग+बहार] **०बाजी**-स्त्री. पत्त्यांनीं खेळण्याचा एक प्रकार; पत्त्यांतील एक खेळ; रंगडाव. **०भंग**-पु. विरस; आनंदाचा नाश; मध्येंच एकदम येऊन खेळ थांबविणें, बंद करणें; खेळांतील आनंद, गोडी न वाटेल असें करणें. **०भूमि**-स्त्री. १ नाटकगृह; प्रयोग किंवा नाटक करून दाखविण्याची जागा; सभागृह; सभामंडप. २ मर्दानी खेळांचें मैदान; रणांगण. [सं.] **०मंडप**-पु. कुस्त्या वगैरे खेळण्यासाठीं घातलेला मांडव. [सं.] **०मंडपी**-स्त्री. खेळाची अथवा करमणुकीची जागा. [स.] **०महाल**-पु. विलासमंदिर; दिवाणखाना; आरसे व तजबिरी लावून सुखोपभोग घेण्यासाठीं केलेलें घरांतील दालन; श्रीमंत लोकांची आरशांनीं, रंगीबेरंगी चित्रांनीं सुशोभित केलेली विलास करण्याची खोली; (विशेषतः) निजण्याची खोली. [फा.] **०माळ**-स्त्री. लग्न वगैरे समारंभाच्या मिरवणुकीपुढची नक्षत्रमाळा; रंगीबेरंगी कागदांचीं अथवा बेगडांचीं फुलें कातरून दोऱ्यांत ओवून काठीला बांधून लग्नकार्यांत धरण्याच्या माळा. [सं. रंग+माला] **०माळा**-स्त्री. १ रांगोळीचीं चित्रें; रांगोळी. 'प्रवर्तोनि गृहकार्मीं रंगमाळा घालुं पाहती।' -भूपाळी घनश्यामाची २०. २ सिंहासन अथवा मूर्तीचें देवालय याचे भोंवतीं तिन्ही बाजूंनीं बसविलेल्या लाकडी अगर धातूच्या सोंगट्या अथवा निरनिराळ्या आकृतीचीं चिन्हें. ३ नक्षत्रपुंज; तारे. ४ नक्षत्रमाळा; (सामा.) रंगमाळ. **०मूर्ति**-स्त्री. ज्याच्यामुळें समारंभास विशेष शोभा येते असा मनुष्य अथवा मूर्ति; कृष्णाचें बालस्वरूपी लांकडी अथवा धातूचें छायाचित्र; श्रीकृष्णाची मूर्ति. [सं.] **०मोड**-स्त्री. रंगभंग; ऐन भरांत खेळ आला असतां विरस होणें; हिरमोड; उत्साहभंग; आनंदाचा नाश; खेळाचा चुथडा. **०रस**-पु. आनंद; हर्ष. 'हस्ती सेवकांसुद्धां सकळही लाल रंगरसी।' -हो २०३. **०राग**-पु रागरंग पहा. **०रूप**-न. आकार, रंग, वर्ण, चर्या, देखावा इ० (फळ, व्यापार, व्यक्ति, इ०चा); बाह्यस्वरूप. [सं.] **०रूपास आणणें**-चांगल्या स्थितीस आणणें; निरोगी करणें; ऊर्जित दशेस आणणें. **०रूपास येणें-चढणें**-चांगल्या स्थितीस किंवा पूर्णतेस येणें, पोहोचणें. **०रेज**-पु. रंगारी. [फा. रंगरेझ] **०रेजी**-स्त्री. रंग देणें; रंगविणें; सफेती [फा.] **०रोगण**-न. १ तेलिया रंग. २ सामान्यतः रंग देणें; साफसुफ करणें वगैरे क्रिया. [रंग-इ-रौघन्] **०लाल**-वि. चैनी (मनुष्य). [रंग] **०लूट**-स्त्री गंजिफाचे खेळांतील एक शब्द; गंजीफांचे डावांत सर्वांचीं पानें एक रंगाचीच पडलीं असतां तो हुकूम फुकट जातो आणि पानें सर्वांनीं लुटून घ्यावीं असा एक प्रकार आहे ती. **०लेला ऊंस**-पु. गाभ्यांत लाल पडलेला ऊंस. **०वट**-स्त्री. खेळण्याची जागा; क्रीडांगण; रंगण. 'द्राखे घोंस लांबटी। रंगवटामाजी मिरवती।' -ख्रिपु १.८.२३. **०वणी**-न. रंगाचें पाणी. [रंग+पाणी] **०वल्ली**-स्त्री. रांगोळीचें चित्र; रांगोळी पहा. [सं.] **०शाला, रंगांगण**-स्त्रीन. नाटकगृह; खेळाचें मैदान; तालीम; नर्तनशाला; जेथें नाटकांतील पात्रें रंगवितात ती जागा. [सं.] **०शिला, रंगशिळ**-स्त्री. १ दगडी पाटा. २ देवाच्या मूर्तीपुढील मोठी शिळा; पंढरपूरच्या विटोबाच्या पुढील मोठी शिळा (यावर भक्त नाचतात). 'नाचा रंगशिळेवरी। भेट देईगा मुरारी। रामचंद्राहो।' -भज ८२. [सं.] **०सभा**-स्त्री. १ खेळ अथवा करमणूक यासाठीं असलेली जागा. २ खेळाडू अगर विनोदी मंडळी. (क्रि० जमणें; भरणें; मांडणें; चालणें; उठणें; मोडणें). **०सही**-स्त्री. तिफांशी खेळांत पक्क्या रंगाच्या चारी सोंगट्या पटाच्या चारी बाजू हिंडून आपल्या पटाच्या डाव्या बाजूकडील घरांच्या ओळींत येऊन बसणें. **०स्थल**-न. रंगण; रंगभूमि पहा. 'विचक्षणा पडद्यांतून रंगस्थलांत येते.' -कसं २. **रंगाई**-स्त्री. (हिं.) रंगणावळ; रंग देण्याची मजूरी, किंमत. 'रंगाऱ्याला कपडे रंगविण्याबद्दल रंगाई द्यावी लागते.' -विक्षिप्त १.१२. [फा. रंगाई] **रंगांगण**-न. कुस्त्या, खेळ इ०करून दाखविण्यास योग्य स्थळ; रंगशाला पहा. **रंगाचळ**-न. (महानु.) रंगाचा भर; आनंद, उत्साह; भर. 'निरुपनांचा रंगाचळी। त्यागाचें आढाळ चाळी।' -भाए २३७. [रंग+अचल] **रंगाची(रंगीत) तालीम**-स्त्री.रंगभूमीवर नाटक होण्यापूर्वी खाजगी रीतीनें साल्ंकृत प्रयोग करून पाहणें. [इं.] **रंगाथिणें**-क्रि. रंगविणें; रंगविशिष्ट करणें. 'यया भूतांचेनि संगें। जीवें घेतलीं अनेक सोंगें। विपरीत वासना संगे। रंगाथिला।'-सिसं३५.२२२. **रंगामेज**-पु.१चितारी २ढोंगी; दांभिक इसम. [फा. रंगामेझ] **रंगामेजी**-स्त्री. १ आरसे, चित्रें, इ०नीं सुशोभित करणें;दिवाणखाना इ० स्थलास नानाप्रकारचे रंगांनीं, चित्रें, वेलबुट्टी काढून शोभेसाठीं चितारण्याचा केलेला संस्कार. 'भीमनाथ केदार राममंदीर रंगामेजीचें।' -प्रला ७८. २ (ल.) दांभिकता; कृत्रिमता; कुटिलता. **रंगारी**-पु. कपडे रंगविणारा; वस्त्रें रंगवून उपजीविका करणाऱ्यांची एक जात. [सं. रंज्; फा.] **रंगारीहिरडा**-पु. एक प्रकारचें हिरड्याचें झाड व त्याचें फळ (पिवळसर रंगाचें). यालाच जंगली किंवा चांभारी हिरडा म्हणतात. सुरवारी हिरडा हा दुसऱ्या जातीचा आहे. **रंगालय**-न. नाट्यशाला. [सं.] **रंगाळा**-न (राजा.) चामडें ताणून घोटण्याचें साधन (हें सुतारांच्या पटाशीसारखें पण बोथट धारेचें असतें). [रंगाळें] **रंगिन**-न. चांदीवर सोन्याचा पत्रा चढवून तयार केलेलें जरतार. **रंगिला**-वि. रंगेल; ख्यालीखुशालीचा; चैनी; विषयी; खेळाडू. [हिं.] **रंगी**-स्त्री. (बे.) जुगार; जुवा; पत्त्यांतील खेळाचा एक प्रकार. **रंगी, रंगीन, रंगील**-वि. १ रंगीत; रंगविलेलें. 'तुम्ही रंगीन फेटा पाठविला तो पावला.'

–रा३२.८९. २ रंगेल पहा. [रंग; महानु] **रंगीढंगी**–वि. रंगेल; चंगीभंगी; व्यसनी. ' मुलगा रंगीढंगी असूनहि केवळ पैसा पाहून पांचहजार हुंड्यासह त्याच्या ताब्यांत देऊन टाकली.' –हाकांघ १८२. **रंगीत**–वि. रंगी; रंगविलेलें; रंग असलेलें; रंग लाविलेला; कुसुंबा, हिंगूळ इ० रंगानीं रंगविलेला (पदार्थ, वस्त्र, काष्ठ इ०). **रंगीबेरंगी**–वि. अनेक रंगाचा. **रंगीला**–वि. रंगीन; रंगेल; गुलछौशी. **रंगेरी**–स्त्री. (गंजीफांचा खेळ) अखेरीस म्हणजे सर्व खेळाच्या शेवटीं खेळणाराची अखेरी दोघानीहि मारली, तिघांचेंहि पान एकाच रंगाचें निघालें तर त्यास रंगेरी म्हणतात. **रंगेल-ला-ली**–वि. १ आनंदी; विनोदि; खेळाडू; खेळकर; चैनी; विषयी; विलासी; ललितकलाप्रिय; गाणें, तमाशा, इ० विषयांचा उपभोग, मस्करी, या विषयावर ज्याची अधिक रुचि असा आनंदी; रसिक; इष्कबाज. **रंगविणें**–क्रि. १ रंग लावणें, देणें; रंगानें वस्त्रादिक विशिष्ट करणें; शोभिवंत करणें. २ (ल.) तोंडांत देणें; भडकाविणें; मारणें. ' त्याचें तोंडांत दोन रंगविल्या म्हणजे कबूल होईल.' **(तोंड) रंगविणें**–१ विडा खाणें. २ (ल.) थोबाडांत मारणें. [रंग; रंज्=रंग देणें]

रंगजोडवें—रणजोडव पहा.

रगटा, रगटें—पुन. रकटा; रकटें; हलकें, जीर्ण, फाटकें वस्त्र. ' पाटोळ्या संवसाटी । दिली रगटयाची गाटी । ' –तुगा १३५१. –मुरंशु ३८४. [का. रट्टु=जाडें भरडें कापड]

रंगरेड–पु. रंगारयांचा नाईक. –गुजा १७.

रगड—स्त्री. पूर्णता; भरपूरपणा; (सामा.) रगडा; चंगळ; वैपुल्य. –वि. भरपूर. मुबलक. [रगडणें; अर. रघद्=विपुलता] **पट्टी**–स्त्री. चंगळपट्टी; भरपूर पुरवठा; विपुलता. [रगडपट्टी] **रगाडी**–स्त्री. रेलचेल; चंगळ. ' मोरोपंतानीं आपल्या कवितेंत संस्कृत शब्दांची रगाडी करून दिली आहे ' –नि ७६६.

रगडणें—क्रि. १ (कांहीं पदार्थ) चेपणें; दडपणें. ' कुरुबलनलिनवनांते भीमगज निकार आठवी रगडी । ' –मोभीष्म ६. ४७. २ लाटणें; मटकावणें; बळकावणें. ' भलत्याचें पागोटें रगडलें नी चालला. ' ३ चेपणें; दाबणें; जोरानें चोळणें; मालिश करणें. ' निजउनि निज शयनावरि, शयनावरि बंधुच्या पदा रगडी । ' –मोकृष्ण ८१.२७. ४ खाणें. ' त्यानें पंचवीस लाडू रगडले. ' ५ निष्काळजीपणानें करणें. ' त्यानें भलताच प्रयोग रगडला. ' ६ घासणें; पीठ करणें; चिरडणें. ७ दटावणें. ' सांगेल कोण दुसरा भीष्महि सांगेल ज्या न रगडूनी । ' –मोउद्योग १.१९. ८ नाश करणें; मारून टाकणें. ' त्या कुरुसेनेसि वासवी रगडी । ' –मोविरा ४.८९. **रगडणी**–स्त्री. मागावर विणून झालेलें कापड गुंडाळण्याचा रूळ फिरविणारें लाकूड. [रगडणें] **रगडपट्टी**–स्त्री. दडपशाहीचें कसें तरी उरकलेलें, धसमुसळेपणाचें काम; धडपड; रगडमल्लाचें कर्म. ' नीट विचार करून अर्थ लिहीत जा. उगीच रगडपट्टी करूं नका. ' [रगडणें+पट्टी] **रगडमल्ल**–वि. १ ज्याचे अंगीं काम करण्याची युक्ति नाहीं व काम कोणत्या रीतीनें केलें असतां नीटनेटकें होईल इ० विचार न करितां केवळ अंगबळानें काम करण्याचा ज्याचा स्वभाव तो; दांडगा; रानवट; ओबडधोबड. २ ज्याचे अंगीं नाजुकपणा, सुरेखपणा नाहीं आणि सामान्य रीतीपेक्षां आकारानें जो मोठा आहे असा (दागिना, पदार्थ, पात्र, वस्त्र इ०). [रगडणें+मल्ल] **रगडमल्ली**–स्त्री. १ ओबडधोबड, बिगारी, आडदांडपणानें केलेलें काम; रगडमल्लपणा. २ धुडगूस; धांगडधिंगा, बेफामपणा. **रगडा**–पु. (कों.) १ संकुचित स्थलामध्यें अनेक मनुष्यें जमलीं असतां होणारी दाटी; चेंगराचेंगरी; गर्दी; दाटी. ' पांचशें दळण्याचा ज्याचा एकच रगडा झाला । ' –ऐपो ६९. २ रस काढावयाचा चरक. ३ कुचंबणा; अव्यवस्थित कारभार. ४ नाश. ' वागूळाचा रगडा निजशस्त्रें कीजे । ' –एभा ३.३५. ५ ढीग; मोठें ओझें; अतिशयपणा; भार; घाई वगैरे. ' आज कामाचा रगडा आहे. ' ६ (गो.) उखळांतील उभा वरवंटा; वाटण्याचा दगड. रगडो. **रगडाझगडा**–पु. रगडा पहा. [रगडा+झगडा] **रगडून**–क्रिवि. १ खूप जोरानें; पुष्कळपणीं; मनमुराद. ' तो रगडून जेवला. २ आवेशानें; घट्ट. ' त्याला चांगलें रगडून धर नाहीं तर तो पळून जाईल. ' **रगडून-बांधणें**–जोरानें बांधणें; ओढून बांधणें. **रगडून धरणें**–घट्ट, दाबून धरणें. **रगडून मारणें**–सपाटून, खूप मारणें. **रगडून जेवणें**–पोटभरून खाणें; ओकारी येईपर्यंत खाणें. **रगडून सांगणें-बोलणें**–मनमुराद बोलणें, शिव्या देणें; निर्भर्त्सना करणें; रागें भरणें. **रगड्या**–वि. आडदांड; दडप्या; गर्दीतून, अडचणींतून वाट काढणारा; कशाहि स्थितीस न डरतां मनांत असेल तें करणारा. २ विचित्र; चमत्कारिक; बेफिकीर; ओबडधोबड काम करणारा. [रगडणें]

रंगण—न. १ मंडळ; वर्तुलाकार वाट, प्रदेश; भजनासाठीं भक्तमंडळी जो फेर धरतात तें. ' वैष्णव नाचति रंगणि करिती तव सेवा । ' –भज ७७. २ खेळाची जागा; खेळाचें मैदान. ३ अंगण; प्राकार. ' पातली अंबिकेचें रंगण । केलें करचरण क्षालन । ' –एरुस्व ६ ७८. ३ भोंवरा इ० खेळाचें वर्तुळ, हद्द. ४ घोडे फिरविण्याचें मैदान ५ नाटकगृह; नर्तनगृह. ' इतक्यासहित त्वां बा यावें माझे रंगणीं नाचावें । ' ६ सभा; मंडळी (खेळासाठीं जमलेली). [सं. रंगांगण] **रंगणांत येणें**–१ प्रतिपक्ष्याशीं लढावयासाठीं पुढें सरसावणें; सामन्यास छातीठोकपणें येणें; धैर्यानें पुढें येणें. २ देखत, समोर आरोप करण्यास धजणें. ' पाठीमागें बडबडून फळ काय ? अवसान असलें तर असा रंगणांत ये. मग पाहीन. ' **०टोला**–पु. रंगणांत भोंवरा फेकणें; चिंगाटी फेकणें.

०डाव–पु. मुलांचा एक खेळ. –मखेपु १३२. **०पाणी**–न. एक खेळ. –मखेपु ५५.

रंगणें—अक्रि. १ कांहीं आनंद, करमणूक, सुखास्वाद इ०मध्यें गढून जाणें किंवा तल्लीन होणें (गाणें, ईश्वरभक्ति वगैरेत); तन्मयता पावणें. ' व्रजाचिया गोपिका स्त्रीस्वभावें । रतिप्रीतिनें रंगल्या स्वस्वभावें । ' २ वस्त्रादिक विवक्षित रंगानें विशिष्ट होणें; रंग घेणें; रंगीत होणें; विशिष्ट वर्णयुक्त होणें. ३ रंगात येणें; भर येणें. [सं. रञ्ज्]

रगत—न. रुधिर; रक्त; रक्त पहा. ' कृष्णा ताटांत तें धरी रगत । ' –मोविराट ६.९३. **०ओढ**–न. रक्तओढ पहा [रक्त] **०रोटी**–स्त्री. (रक्तांत केलेली भाकरी) १ (ल) सैन्यांतील नोकरी; जीमध्यें जीव धोक्यांत असतो अशी नोकरी. २ (ल) लढाईंत केलेल्या कामाबद्दल मिळालेलें वतन इ०. **०रोडा**–रक्तरोडा पहा.

रंगत—स्त्री. सजावट. [सं.]

रगबा—पु. गांवरान; रकबा पहा.

रंगरूट—पु. सैन्यांत नवीन भरती होणारा शिपाई. –वि. (ना.) धटिंगण; आडदांड. [इं रिक्रूट]

रगस, रघास—न. (राजा.) गुठें; दिंड; शेत नांगरल्यानंतर डिखळें फोडावयाचें आउत.

रगाटणी—स्त्री. मागाचा एक भाग; फणींतून धागे ओविल्यानंतर जिला बांधतात ती काठी. रगडणी पहा.

रगाडा-रगाडी—पुस्त्री. रगडा पहा.

रंगेरा—पु. वेलीसारखें झाडास विळखे घालणारें एक झाड.

रघटलें—न. (बे.) वेळूचा पाळणा.

रघत—न. रक्त पहा. (खा.) रंघत. [सं. रक्त] **०रोडा**–रक्तरोडा पहा.

रंघळणें—सक्रि. १ फरपटत नेणें; फरा फरा ओढणें. २ (धोतर इ०) बरेंच वापरून गुधडणें, मळविणें. ' हें धोतर दोन दिवस रंघळून नंतर परटाकडे द्या म्हणजे पांढरें शुभ्र होईल. ' –अक्रि. रेंगाळणें; मागें पडणें. रेंघाळणें पहा.

रच—पु. १ ढीग; रचना; रचाई. २ रचण्याची क्रिया. ३ रचलेली वस्तु. ४ रचून केलेला ढीग किंवा केलेली रास. [सं. रच्=रचना करणें] **रचणावळ**–स्त्री. जुळण्याची, एके जागीं ठेवण्याची मजूरी, किंमत. [रचणें+वळ] **रचणी**–स्त्री. १ रचण्याचा जो व्यापार ती. २ रचना. **रचणी, रचणूक**–स्त्री. रचना; जुळणूक; व्यवस्थित लावणी; व्यवस्था [सं. रचना] **रचणें**–उक्रि. १ मांडणें; जुळणें; व्यवस्थित रूपांत ठेवणें, उरकणें; २ पदार्थ एकावर एक ठेवणें किंवा पदार्थाच्या एका थरावर दुसरा, दुसऱ्या थरावर तिसरा, अशा प्रकारें त्यांची रास करणें; जुळणें. ३ उभें करणें; उभारणें; मांडणें. ' बाहेरी पद्मासन रचुनी । ' –ज्ञा

८.९२. ४ शब्दांची, विचारांची योग्य प्रकारें मांडणी, जुळणी करून ग्रंथ, श्लोक इ० निर्माण करणें. ५ (कादंबरी, गोष्ट, बनावट हकीगत इ०) आपल्या कल्पनेनें नवीन बनविणें. ६ (माप, योजना) ठरविणें; आंखणें. –अक्रि. तन्मय होणें. ' तूं संत स्तवनीं रचसी । तरी कथेची से न करिसी । ' –ज्ञा ५.१४१. [सं. रच्= रचना] **रचना**–स्त्री. १ मांडणी; रचण्याचा व्यापार; व्यवस्थित ठेवणें; एकावर एक किंवा एकापुढें एक ठेवणें. ' अनेक पदांची रचना केली असतां श्लोक होतो. ' २ घर, मांडव, भिंत, गवताची गंजी इ० ची उभारणी. ३ कल्पनेनें निर्माण केलेली कांहीं वस्तु, गोष्ट इ०. ४ ग्रंथ, मसलत, श्लोक इ०ची उत्तम प्रकारची जुळणी. ५ घटना; जुळणी. ' शरीराची रचना सर्व शस्त्रवैद्यांस ठाऊक असावी लागते. ' ६ हार, दागिना, यंत्र इ० चे अवयव विशिष्ट प्रकारें जुळवून त्यांची विशिष्ट प्रकारें केलेली जुळणी. ७ मांडणें, बनविणें, उभारणें, निर्मिणें, जुळविणें, घडविणें, गुंफिणें इ० क्रियांनीं झालेला किंवा अस्तित्वांत आलेला पदार्थ. ' तव रचना देखे गोमटी । राजद्वारीं ' –ऋ ५६. [सं. रच्=जुळणें] **रचनेच**–पु.(महानु.) उपद्व्याप. ' जया रचनेची भीति । सदा जनेशीं संगती । गुरुकुळीं रती । नाहीं कदा । ' –ज्ञाप्र २३५. **रचयिता**–वि. रचना करणारा [सं.] **रचलेपणा**–पु. स्थिरपणा; सुखरूपता. ' म्हणे पावो घडफडील । तरी स्वामीची निद्रा मोडैल । रचलेपणा पडैल । झोती हन ' –ज्ञा १३.२५६. **रचाई**–स्त्री. १ रचण्याची क्रिया, सरणी; तेणेंकरून सिद्ध झालेला पदार्थ. २ अशा सिद्धतेसाठीं द्यावे लागलेलें द्रव्य. ३ व्यवस्था; तजवीज; व्यवस्थित लावणी; जुळणी. ४ रचना; मांडणी; जुळणी; उभारणी. ' धर्ममंदिराची रचाई श्रद्धेच्या किंवा विश्वासाच्या पायावर झालेली आहे. ' **रचावा**–पु रचना. 'तरी हे इच्छा धरी कोण । सृष्टीरचाव्याची । ' –दा ८.२.१२. **रचित**–वि. १ रचलेला; जुळविलेला; मांडलेला; व्यवस्थित ठेवलेला, लावलेला. २ योजलेलें; बेत केलेले; जुळविलेलें; बांधलेलें (पुस्तक, कविता, फुलें वगैर); आंखणी, अंदाज केलेलें. [सं.] **रचुन, रच्चुन**–क्रिवि. भरपूर, पूर्ण या अर्थी. **रच्चक**–स्त्री. (व.) भडिमार; एकसारखा मारा. ' पत्रांची रच्चक लाविली. '

रज—पु. न. १ धुळीचा कण; धूळ. ' नकुळ रजाहीं मळवुनि सर्वांगाला वनासि गेला हो । ' –मोसभा ७.६३. २ फुलांतील परागाचा कण; ३ सोनें इ० चा एक बारीक कण. ४ मनुष्याचे जे तीन गुण (सत्त्व, रज, तम) त्यांतील दुसरा. ५ स्त्रियांचा मासिक विटाळ. ६घांसुन साफ करावयाची पूड. ' आरिसयालागीं सांचावें । अधिकें रज । ' –माज्ञा १८.१४०. [सं.] (वाप्र.) **रजाचा गज करणें**–१ राईचा डोंगर करणें; अतिशयोक्ति करणें; थोड्याचें जास्ती करणें; एकाचे दहा करणें;

अगदीं क्षुल्लक वस्तूला अतोनात महत्त्व देणें; ज्यांत कांहीं अर्थ नाहीं अशा गोष्टी फुगवून सांगणें; पराचा कावळा करणें. २ पुष्कळ काळ पोसणें व चांगला वाढीला लावणें; लहानाचें मोठें करणें. **रजःकण**-पु. धुळीचा कण, बिंदु. [रज+कण] **रजरेण**-पु. धुळीचा कण. [रज+रेणु] **रजोगुण**-पु. सत्त्व, रज, तम, या तीन गुणांपैकीं दुसरा; कामक्रोधादि मनोविकार या गुणाच्या प्राबल्यानें उत्पन्न होतात. [सं.] **रजोगुणी**-वि. ज्यामध्यें रजोगुण पुष्कळ व प्रधान आहेत तो; विकारी; विषयी; कामुक. [सं.] **रजोदर्शन**-न. ऋतुदर्शन; ऋतुप्राप्ति; न्हाण; अगदीं पहिलें विटाळशीपण. [सं.] **रजस्वला**-वि.स्त्री. विटाळशी; ऋतुमती स्त्री; ऋतुस्नात; अस्पर्श स्त्री. हिला पहिल्या दिवशी चांडाली, दुसऱ्या दिवशीं ब्रह्मघातिनी, तिसऱ्या दिवशीं रजकी समजतात. ' कृष्णा म्हणे सभेंत न न्यावें मज, मी रजस्वला आंग । ' -मोसमा५.५. [सं.] **रजी**-स्त्री. घूळ; धुराळा. [रज]

रंज—पु. दुःख; नाखुषी; खेद; त्रास. ' चेहऱ्यावर जितका आनंदहोता त्याचे दसपट रंज झाला ' -विक्षिप्त २८३. [फा. रञ्ज्] **रंज करणें**-क्रि. (माळवी) दुःख करणें; दुःखी होणें.

रजई, रजाई—स्त्री. लेप; दुलई; उबदार पांघरूण, वस्त्रांचे पोटीं कापूस घालून शिवून पांघरावयास केलेलें वस्त्र. [फा. रझाई, रजाई]

रजक—पु. धोबी; परीट. ' रजक अंत्यज अत्यंत । आतळे त्यासि अधःपात ।'-एभा ७.१९०. [सं.] **रजकी**-स्त्री. धोबीण; परटीण.

रंजक—विपु. १ रंगारी. २ चितारी. ३ उत्तेजक पदार्थ. -वि. १ रंगविणारा; २ करमणूक करणारा; आनंद देणारा; **उत्साहक.** ' तैसेचि मनासि रंजकें । श्रीकृष्णार्चीं मधुरवाक्यें । ' -रास २.४९. [सं.]

रंजक-स्त्री. १ बंदुकीच्या कान्यावर घालतात ती दारू; बार भरण्याची, ठासण्याची दारू. (क्रि० देणें; भरणें). २ बार; दारू उडणें; बार होणें. ' तोफखान्याची मात्र एक दोन वेळा रंजक झाली. ' -पेद १९.८४. ३ बाण अथवा शस्त्रास्त्रांची लढाई. ४ वखारींत अगर कोठारांत साठ्याकडे भरून जाणारी पिठाची, दारूची (सुरंगी) गाडी; दारूगोळ्याची गाडी, डबा; दारूगोळा. [फा. रञ्जक्] (वाप्र.) **०उडणें-झडणें**-क्रि. १ सुरंग अगर बार उडणें, झडणें; बंदुका, तोफा यांची फैर झडणें. २ (ल.) कज्जा किंवा भांडण एकदम किंवा जोरानें सुरू होणें. **०देणें-पाजणें-भरणें**-एखाद्यास कांहीं काम करावयास भर देणें, उठविणें, चेतविणें. **०खाणें**-दारू जळून बार न उडणें. **०पिणें**-कान्यावरची दारू मात्र जळून बार न उडणें. सामाशब्द-**०दाणी-दानी-दान**-स्त्रीन. बंदुकीच्या दारुची पिशवी अगर शिंग; कान्याची दारू ठेवण्याचा डबा. **रंजकीची दारू**-स्त्री. सुरुंगाची दारू; बंदुकीच्या कान्यावर घालण्याची दारू (ही फार उत्तम असते). **रंजकीची विडी**-स्त्री. बंदुकीचा घोडा, काटा.

रंजगंज—पु. किटण; कीट; तांबरा (धातू, लांकूड, वस्त्र, शरीर इ० वरील). [गंज द्वि.] **रंजणें गंजणें**-क्रि. किटण, कीट तांबरा जमणें, बसणें. [रंजगंज]

रजगा—स्त्री. विक्रीला नालायक अशा मोड म्हणून आलेल्या सर्व जिन्नसांची खिचडी, मिसळ, भेसळ. [रज]

रजगुडाई—स्त्री. (व.) लाडीगोडी. ' रजगुडाईनें वागलास तर काम निभेल. ' [रंजणें+गोडी]

रंजणें—उक्रि. १ एखादा विषय गोड लागल्यामुळें अंतःकरण आनंदित होऊन उद्वेगादि दुःखें विसरून त्या विषयाकडे लागून राहणें; रंगणें; मोहित होणें; (काव्य) गुंगून जाणें; एकतानता होणें; आल्हादणें; सुप्रसन्न होणें (सौंदर्य, उत्कृष्टता यांमुळें). २ मनोरंजन करणें. ' वरिवरी देह न पूजी । लोकांतें न रंजी । ' -ज्ञा १३.२०७. [सं. रञ्ज्]

रंजणें—अक्रि. दुःखी होणें; कष्टी होणें. **रंजणें गांजणें**-त्रासणें; दुःखित, पीडित होणें, असणें. ' जेकां रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले । ' -तुगा २२१५. [फा. रञ्ज्]

रजत—न. चांदी; रुपें; एक धातु. [सं.] **०वणी**-स्त्री. रुपेरी मुलामा; चांदीचा मुलामा. ' कां साडेपंधरया रजतवणी । तैशीं स्तुतीचीं बोलणीं । ' -ज्ञा १०.१५.

रंजन—न. १ करमणूक; मौज; गाणें, सुभाषित इ० विषयांमध्यें दंग असतां उद्वेगादि दुःखांचा विसर पडून अंतःकरणास होणारी सुखरूपता; आनंद; सुख. २ रंग. ३ तांबड्या चंदनाचें लांकूड, खोड. [सं. रंज्] **रंजवण**-स्त्री. करमणूक. -वि. मनाचें रंजन करणारें.

रजनी—स्त्री. आरसा घांसण्यासाठीं राखेची किंवा इतर द्रव्याची पोटळी. ' आत्मलोहांचा दर्पणीं । करावी ईश्वरध्यानाची रजनी । ' -भाए २११. [रज=कण]

रजनी—स्त्री. रात्र; निशा. ' न दिसे, न कळे स्वपर, ध्वांत परम गाढगाढवी रजनी । ' -मोभीष्म ९.६८. [सं.] **०कर**-पु चंद्र. [सं.] **०चर**-वि. रात्रीं फिरणारा (राक्षस, चोर, घुबड इ०). ' अवघे मतवादी रजनीचर । शंकर त्यावरि रघुवीर । ' [सं.] **०मुख**-न. प्रदोष; संध्याकाळ; संधिप्रकाश; संध्याप्रकाश; [सं.]

रंजनी—स्त्री. सहाव्या श्रुतीचें नांव. [सं.]

रजपज—स्त्री. सर्वसाधारणपणा; मर्यादितपणा; माफकता. [रज द्वि.] **रजपजचा, रजापजाचा**-वि. माफक; मर्यादित; हलका.

रजपूत—पु. राजपुतान्यांतील एक हिंदु जात व त्या जातींतील व्यक्ति. [सं. राजपुत्र]

रजब—पु. मुसलमानी वर्षाचा सातवा महिना. [अर. रजब्]

रजबली-ल्ली—स्त्री. रदबदली; मध्यस्थी. (क्रि० करणें). [रदबदली]

रजमें—नअव. कागदाचीं रिमें. –पेशवे. [अर. रिझ्मह्]

रजा—स्त्री. १ कांहीं एक कार्याविषयीं कोणाएकाचें अनुमत; अनुमति: सम्मति; आज्ञा; परवानगी. ' तेथून जैसी रजा सादीर होईल त्याप्रमाणें वर्तणूक केले जाईल. ' –रा ८.७. २ सुटी; चाकरास चाकरीवरून कांहीं काल किंवा पूर्णपणें दिलेली मोकळीक. ३ कोणी कोणास आपल्या जवळून इतरत्र जाण्यास जो निरोप देतात तो. ४ नियमित सरणीनें चाललेल्या कामांत विश्रांतीसाठीं, करमणुकीसाठीं किंवा अन्य उद्देशानें झालेला खंड किंवा बंद ठेवण्याचा काळ. [अर. रिझा] **०चिठी-ट्ठी-ट्टी**–स्त्री. १ अनुज्ञा; परवानगी किंवा घालवून देण्याचा हुकूम ज्या कागदावर लिहिलेला, नोंदलेला असतो असा कागद. २ गैरहजेरीबद्दल लेखी परवानगी, पास; रजेचा अर्जे. **०तलब**–स्त्री. आज्ञा; इच्छेप्रमाणें वागणें; यजमानाच्या हुकुमाप्रमाणें नोकरानें वागणें, वागण्याची कबुली किंवा वागण्यांत तत्परता. (क्रि० असणें; राहणें). ' कुसाजी ...आमचे रजेतलबेंत राहून सांगितल्याप्रमाणें वर्तणूक करून कार्य सिद्धि केली. ' –रा १०.४१८. ' त्याचे रजातलब वर्तोन... ' –रा १५.२०४. [अर. रिझा+तलब्] **रजावंद-मंद**–वि. १ कबूल. ' पुण्यांतील सावकार...निदान पावणा लाख रुपये पांवतो नजर द्यावयास रजावंद जाहले आहेत कीं मुंबईचा माल आणावयास मोकळीक द्यावी. ' –ख ५.२३९६. २ खूष; संतुष्ट. ' रयतेस राजी व रजामंद राखून... ' –रा ६.३०२. [फा. रिझामन्द] **रजावंती, रजावंदी, रजामंदी**–स्त्री. १ सम्मति; मर्जी; खुषी. ' धणी यानीं खुषी–रजावंतीनें निरोप दिला तर उत्तम आहे. ' –भाब ८. २ समजूत. ' यानीं आमची रजावंदी केली. ' –पया ३२६. ३ परवानगी; स्वतंत्रता; मोकळेपणा. ४ आपखुशी; स्वसंमती. [फा. रिझामन्दी]

रंजित—वि. अनुरंजित; आनंदित; उल्हसित; अत्यंत संतुष्ट; प्रसन्न. [सं.]

रजिस्ट(ष्ट)र—न. १ नोंदवही; नोंद. २ पोस्टाकडून पावती घेऊन जोखमीचे कागदपत्र पोस्टाच्या विशेष संरक्षणानें पाठवितात तें. [इं.] **०करणें**–नोंदणें; नोंद करणें; पोस्टाच्या विशिष्ट सुरक्षित पद्धतीनें पाठविणें.

रंजी—स्त्री. वैताग; कंटाळा; त्रास. [फा. रंजिश्] **रंजीस**–वि. उत्साह, मनोरथ, यांचा भंग झाल्यामुळें खिन्न झालेला; त्रासलेला; दुःखित; असंतुष्ट; निराश; थकलेला; दमलेला; त्रस्त. ' दर्म्यान इस्कील करून गोसावी मजकूर यांसी रंजीस करिता. ' –रा २०.१७२. [फा. रञ्जिश] **०करणें**–(व.) त्रास देणें. **०येणें**–त्रासून जाणें.

रंजूक—स्त्री. रंजक पहा.

रज्जब—पु. मुसलमानी सातवा महिना. रजब पहा.

रज्जु—स्त्री. १ दोरी; चव्हाट. २ धागा; दोरा; तंतु. ३ केसांची वेणी. ४ लगाम. [सं.]

रंझणें—क्रि. रंजणें पहा. गांजलें जाणें; कष्टी असणें; पीडित असणें; जुलुमांत असणें.

रंझळणें—अक्रि. प्रयत्न निष्फळ होण्यामुळें किंवा विलंबामुळें एखाद्या कामांत व्यत्यय येणें. रेंघळणें पहा.

रंझाड—पु. (व.) एक हिंदु जाति.

रंझाड—वि. (व.) ओंगळ; घाणेरडें. ' तिचें काम फार रंझाड आहे. '

रट—वि. रठ; रंठ पहा.

रटणें—अक्रि. १ (बेडूक इ०) ओरडणें; ओरड करणें. २ (मुलानें) एकदम किंचाळून रडणें; किंकाळी फोडणें. ३ बडबड करणें; टकळी लावणें. ४ घोकणें; घोकून पाठ करणें. [ध्व.]

र ट प करणें—थोडें थोडें वाचणें; अडखळत वाचणें (लहान मुलानें).

रटमट-रट—स्त्री. हुरहुर. –क्रिवि. भात इ० शिजतांना होणाऱ्या शब्दाचें अनुकरण होऊन; रटरटां. (क्रि० शिजणें; वाजणें; होणें करणें). [ध्व.] **रटमटणें, रटरटणें**–क्रि. १ रटरट असा आवाज होणें (तांदुळांचा शिजतांना). २ (अपचनानें अथवा जंतामुळें पोटांत) गुरगुरणें; वाजणें. **रटमट-टां, रटरट-टां**–क्रिवि. (तांदूळ इ० जिन्नस) शिजतांना होणाऱ्या पाण्याच्या आवाजाप्रमाणें; पोटांतील जंत इ०मुळें होणाऱ्या आवाजाप्रमाणें; पाणी उकळत असतां होणाऱ्या आवाजाप्रमाणें. **रटरटाट**–पु. जोराचा रटरट असा आवाज.

रटाला-ल्या, रटेल—वि. १ लठ्ठ; दांडगा (मनुष्य, भाकर, दागिना, पदार्थ); धष्टपुष्ट; अगडबंब; ओबडधोबड; जाडजूड; अवाढव्य; विचित्र; चमत्कारिक; वातूळ; स्थूल (व्यक्ति). २ राकट; रासवट; रानटी (काम, कामगार).

रट्ट, रठ—पु. १ दाटी; गर्दी; चिकार जमाव. २ जाडी ओबडधोबड भाकरी किंवा पोळी; रोठ. ३ ओबड धोबड काम; विद्रूप अगर अवाढव्य वस्तु अथवा प्राणी.

रट्टा, रट्ठा, रेटा—पु. १ टोला; तडाखा; जोराचा धक्का; धबका. (क्रि० मारणें, लगावणें, बसणें, लागणें). २ (कामाचा) नेट किंवा दडपण. (काळजीमुळें मनावर दाब. (क्रि० पडणें, बसणें). ३ मुसंडी, (लहान अरुंद मार्गानें जातांना) (क्रि० मारणें)

४ ओबडधोबड, विद्रूप वस्तु. ५ अवाढव्य, अचाट राक्षसी खच; ढिगारा (वस्तूंचा) ६ अतिशय दाब अगर चिरडून टाकण्यास समर्थ असा धक्का [ध्व.] **रट्टे-घट्टे खाणें-पडणें**-सराव होणें; टक्केटोणपे खाणें. **रट्टे-रट्टा-देणें**-हातानें मारणें; तडाखा मारणें. **रट्टावून**-क्रिवि. रेटून; भक्कम; पूर्ण. 'स्टेशन अद्याप रट्टावून कोसभर आहे.' 'मघाशीं रट्टावून जेवलों, आतां भूक नाहीं.'

रट्टा, रेटा—पु. बाहु; हात. [का. रट्टे=हात]

रठ, रंठ—वि. १ राट; कठिण; गांठ्याळ (लाकूड). २ कठिण; टणक (नारळ, फळ). ३ जाड; भरड (पीठ). ४ कठोर; कर्कश (भाषा, शब्द). ५ कठिण, नापिक (जमीन). ६ भक्कम; घटमूट (शरीर) ७ (सामा.) रटाल, रंटाल (या अर्थी). राठ पहा ८ सोशीक.

रड—स्त्री. १ एकसारखें न थांबता रडणें किंवा अशा रडण्याची क्रिया. (क्रि० घेणें, लावणें, लागणें, चालणें, खळणें, राहणें, आटोपणें). 'या मुलाला सकाळपासून रड लागली आहे.' २ तक्रार; पिरपिर. (क्रि० लावणें; चालविणें). [रडणें] सामाशब्द-**०कथा-कहाणी**-स्त्री. लांबलचक करुणास्पद कहाणी; दुःखाची गोष्ट; विपत्तीची कंटाळवाणी हकीकत; (क्रि० सांगणें; गाणें). **०गाणें**-न. करुणास्पद कहाणी, गोष्ट, तक्रार इ०; रडकथा; दुःखाची गोष्ट. **०गाल्या**-वि. सदा आपल्या दुःखाच्या रडकथा, गाऱ्हाणीं सांगणारा. [रडणें आणि गाणें] **०गाऱ्हाणें**-न. रडकथा; रडगाणें; शोकमय कथा. (क्रि० सांगणें; गाणें) **०गेला**-वि. रडकथा, रडगाणें सांगण्याची प्रवृत्ति असलेला. [रडका] **०तोंड्या**-वि. ज्याचा सर्वकाल रडण्याचा स्वभाव आहे असा; मेषपात्र; दुर्मुखलेला; नेहमीं रडगाणें कुरकुर करणारा, सांगणारा. [रडणें+तोंड] **०पंचक**-न. नेहमींचें रडगाणें अगर रडकथा, (प्रपंचांतील ओढाताण व दुःख यामुळें) (क्रि० गाणें, सांगणें, वाचणें, लावणें, मांडणें). **रडारड**-स्त्री. कोणी गेला, मेला इ०कारणानें मोठें दुःख झालें असतां कोणेकांनीं रडूं लागावें असा जो व्यापार चालतो ती; (सामा.) रडणें; शोक करणें; अनेकांनीं एकदम रडणें. [रडणें] **रडाराड, रडारोवी**-स्त्री. मोठा शोक व रडणें; छाती, ऊर बडवून रडणें; मोठा आक्रोश; आरडा ओरड. 'काय होईल माझें मांडिलें कवतुक। आदराची भूक रडारोवी।'—तुगा १५८२. [म. रडणें; हिं. रोना=रडणें] **रडुरडु, रडूरडू**-स्त्री. रडण्याची पिरपीर. —क्रिवि. नेहमीं रडत रडत; मुळमुळीत संमतीनें; दीनवाणीपणानें. (क्रि० करणें, लावणें, मांडणें). **रडू, रडें**-न. १ रडण्याची क्रिया. २ रडण्याचा आवेश. (क्रि० कोसळणें). ३ शोक, भय, दुःख, प्रेम, हर्ष इ० कारणांनीं अंतःकरण शिथिल होऊन डोळ्यांत अश्रू येणें, तोंड पसरणें कंठध्वनि निघणें इ० विकारविशेष उत्पन्न होणें; रडणें; रुदन. (क्रि० येणें). 'देखे मडें येई रडें.' [रडणें] **रडया**-वि. १ सर्वकाल रडण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा; सर्वदा रडणारा; उत्साहहीन; मंदगतीनें चालणारा; रडतराऊत; रडतोंड्या; दुर्मुखलेला. २ (ल.) चालण्यास, कामास मंद असा (बैल इ०). ३ हरसबबी (इसम). [रडणें] **रडका**-वि. १ सदा रडत असणारें (मूल); रडण्याची अगर चिरचिरण्याची सवय असलेला; नेहमीं तक्रार करणारा; गाऱ्हाणें सांगणारा. २ दुःखी; कष्टी; मंद; निराश; निरुत्साही (चेहेऱ्याचा अगर बोलणारा). ३ ज्याचे हातून कोणतेंच काम चांगलें होत नाहीं, तडीस जात नाहीं असा. ४ रडतांना होतो तसा (आवाज, चर्या). ५ ज्याचा चेहेरा, भाषण, काम इ० टवटवीत, उत्साहयुक्त किंवा प्रसन्न नाहीं असा. ६ कंटाळवाणें (भाषण इ०). [रडणें] **रडकी गोष्ट**-स्त्री. शोकमय किंवा शोकजनक गोष्ट; वाईट गोष्ट. **रडकी सूरत**-वि. सदा दुर्मुखलेला (इसम); सदा रडया; नेहमीं रडकी मुद्रा असणारा; रडकी मुद्रा धारण करणारा; रडया; दुःखी चेहेरा, मुद्रा असलेला. [रडका+अर. सूरत] **रडकुंडा-डी**-वि. रडावयाच्या बेतास आलेला; डोळे पाण्यानें भरून आले आहेत असा; निस्तेज. [रडणें आणि तोंड] **रडकुंडीस येणें**-कांहीं कामांत अति त्रासल्यामुळें किंवा दुःख सोसवेनासें झाल्यामुळें आतां रडूं लागावें अशा स्थितीस पोहोंचणें; रडण्याच्या बेतांत येणें; अति दगदगीमुळें रडण्याच्या स्थितीस येणें; रडें कोसळण्याइतका त्रास होणें. याच अर्थानें जीव रडकुंडीस येणें-रडीस येणें असेंहि म्हणतात. 'ती आजोबाजवळ गेली आणि अगदीं रडकुंडीस येऊन म्हणते कीं, लोक आतां तोंड नाहीं काढूं देत बरं कां?'—पकोघे. **रडकूळ**-स्त्री. (गो.) रडकुंडी. **रडणें**-अक्रि. १ रुदन करणें; अश्रू गाळणें. २ विषाद वाटणें; शोक करणें. ३ (ल.) अपयश येणें; ठेचाळणें; आपटणें; नष्ट होणें; बंद पडणें; अनादरानें बाजूला ढकलला जाणें. 'चार दिवस पाटीलबोवांचा आश्रय होता तोहि रडला, आतां गोंदोबाला भीकच मागितली पाहिजे.' 'बक्षिशी रडो पण पगार तर द्याल कीं नाहीं?' ४ नुकसान होणें. 'तूं नोकरी सोडलीस तर त्यांत माझें काय रडतें?' ५ (वैतागानें, निदेनें) असणें; होणें. 'दोन वर्षे मामलत रडत होती तेव्हां आमच्या मुलानें आम्हाला काय दिलें तें तुम्ही पाहिलेंतच, आतां मामलत गेली, आतां काय देणार फतऱ्या?' ६ एखादी गोष्ट घडणें, करणें, सुरू करणें या अर्थी तुच्छतेनें योजतात. 'मी सावकारी करीन म्हटलें ती रडली. आतां दुसरें कांहीं रडावें.' ७ निंदणें; निर्भर्त्सिणें. 'मी त्याला नाहीं दोष देत, मी आपल्या दैवाला रडतों.' —सक्रि. (निदेनें) चालविणें; करणें. 'दोन वर्षे तूं दुकान रडलास तेवढें बस्स झालें.' [सं. रट्; प्रा. रड] **रहः०** १ रोज मरे त्याला कोण रडे. २ (व.)

रडली तर रडली काय माणिक मोती झडतील ? (ही म्हण रडणाऱ्या मुलीला अनुसरून आहे. म्हणजे रडण्याचा एवढा धाक कशाला–या अर्थी). **रडतखडत, रडतरडत, रडत पडत, रडत कसत**–क्रिवि. मोठ्या कष्टानें; इच्छेविरुद्ध कसेबसें; रेंगाळत; आळसल्यासारखें; नाइलाजानें; बिगारीनें; मंदपणानें. **रडतगोत्र**–न. रडया वंश; रडी मंडळी अथवा जथावळ; सदोदित कुरकुरणारी अथवा रडतराऊ व्यक्ति; नेभळट, नेभळा, बिनकर्तबगारीचा, उत्साहरहित मनुष्य. ' त्याचें रडतगोत्र आहे ' (म्हणजे तो रडतराऊत आहे) **रडत घोडें, रडत राऊत, रडत राव**–नपु. लोकांच्या सक्तीनें किंवा स्वतःची इच्छा नसताना कांहीं काम करणारा; रडवा मनुष्य; उत्साह किंवा धमक नसलेला, नेहमीं वाईट अगर संकटाची सबब सांगणारा इसम. **रडता राऊत घोडयावर बसविणें**–एखाद्या कामास आंबटतोंडया अगर निरुत्साही मनुष्यास पाठविणें अगर त्यास काम सांगणें;काम करण्याचें मनांत नसणाऱ्यास बळजबरीनें कामास लावणें. ' रडतराऊत घोडयावर बसविला तर मेल्याची खबर आणितो. ' **रडत लक्षुमी–लक्ष्मी**–स्त्री. रडतपावैती; क्षणोक्षणीं कांहीं थोडेसें निमित्त होतांच रडूं लागणारी स्त्री; उत्साहरहित स्त्री. **रडता**–वि. रडणारा; रडका; रडया; रडतोंडया. ' हासती बायको आणि रडता पुरुष कामाची नाहींत. ' [रडणें] **रडतोंड**–न. दुर्मुखलेला चेहरा अगर सुरत. **रडवा**–वि. रडका; दुःखी; खिन्न; कष्टी; नेहमीं रडण्याची संवय असलेला; सदा तक्रारी करणारा; कुरकुऱ्या किंवा तशा स्वभावाचा; निराश; दुर्मुखलेला. [रडणें] **रडविणें**–सक्रि. १ रडावयास लावणें, भाग पाडणें; दुःख देऊन रडीस आणणें. २ दुःखकारक प्रसंगाच्या वर्णनानें किंवा देखाव्यानें कोणेकाला डोळ्यांतून अश्रु गाळावयास लावणें. ३ (ल.) नाश करणें; वाढ खुंटविणें; उर्जितावस्थेस येऊं न देणें. ४ त्रास देणें; चिडविणें; एखाद्याला रडावयास येईल इतकें छळणें, गांजणें, उपद्रव देणें. ' मला ह्या कामानें पांच वर्षें रडविलें. ' ५ आनंदाचा प्रसंग, पाऊस, वारा, रोग, थंडी, ऊन्ह इ०नीं शेत, रचनाविशेष इ०च्या रंगाचा भंग करणें.

रंडकी, रंडकीमुंडकी—स्त्री. विधवेसंबंधीं तिरस्कारयुक्त व करुणाजनक शब्द; विधवा; निराश्रित व दुबळ विधवा. [रंडा; रंडकी+मुंडकी]

रडखडणें—क्रि. (सामा.) रखडणें; जडपणें आणि मंदपणें हलणें चालणें.

रंडा—स्त्री. १ विधवा स्त्री; रंडकी. २ जारिणी; स्वैर स्त्री. [सं.] **रंडका**–वि. १ गरीब; निरुपयोगी. २ विधवा (स्त्री.) अगर विधुर (पुरुष). ३ (ल.) नागवा; उघडा; नंगा; कफल्लक; दरिद्री; कृपण; करुणास्पद स्थिति असलेला. ४ फायदा नसलेला; निरुपयोगी. [रंडा] **०अमल**–पु बायक्या, जनानी, नामर्द, स्त्रीबुद्धि मनुष्याचा कारभार. **रंडगोलक**–पु. गोलक नांवाचा वर्ग व त्यांतील व्यक्ति; विधवेच्या ठायीं जारापासून उत्पन्न झालेली संतति. **रंडागीत**–न. १ विधवेची कहाणी, गीत. २ विधवेच्या शोकासारखें गाणें. (ल. वाईट काव्यास म्हणतात). ' रंडागीतानि काव्यानि ' [सं.] **०पंडित**–वि. बायकांत निर्लज्जपणें बोलणारा; थापा मारणारा; बढाई मारणारा. [सं.] **रंडापति**–वि. १ ज्यानें रांड बाळगिली आहे असा. रंडीबाज; छिनाल. २ (ल.) बायक्या; बाइलबुद्धया; **०पुत्र**–पु आई विधवा झाल्यावर अगर बाप मेल्यावर जन्मास आलेला पुत्र, मुलगा. [सं.] **०प्रिय**–वि. १विधवांची आवड असलेला. २बाइलवेडा;स्त्रीचा नादी; स्त्रीलंपट; स्त्रैण. **रंडी**–स्त्री. (हिं.) १ वेश्या; नाचणारी स्त्री. २ दासी; रखेली. ३ पत्त्याचे खेळांतील राणी. [सं. रंडा] **रंडीबाज**–वि. वेश्या इ० रंडीचें ज्यास व्यसन आहे तो; बाहेरख्याली, व्यभिचारी; परस्त्रीगमनी; वेश्यागमनी. **रंडीबाजी**–स्त्री. १ वेश्यागमन; बाहेरख्यालीपण. २(क्र.) रडीऐवजीं उपयोग करतात. **रंडुला, रंडोला**–वि. १ बायक्या. २ स्त्रैण; बाइलबुद्धया. [रांड] **रंडेय**–पु. रंडीपुत्र; वेश्यापुत्र; विधवापुत्र; अनौरस मुलगा.

रडी, रंडी, रड्डी—स्त्री. १ (सामान्यतः रडी) भान जाऊन खेळांत खोटें खेळणें; खेळांत चिडणें. (क्रि० घेणें). २ वाटेल तेव्हां डोळ्यांतून पाणी, अश्रू आणणारी स्त्री. [रडणें] **रडी खाणें**–चिडणें; रडकुंडीस येणें; पराभव होणें. ' पांडुरंगे पहा खादलीसे रडी । परि नाम सेंडी धरिली आम्हीं । ' –तुगा १२१८. **रडी येणें**–ज्यावर डाव आला असेल त्या मुलीनें किंवा मुलानें माझेवर मुळींच डाव आला नाहीं असें किंवा अशा प्रकारचें खोटें सांगणें. **रडी(रंडी)खोर**–वि. चिडखोर; खेळांत खोटें बोलणारा. **र–रंडीबाल**–वि. रडण्याची संवय लागलेला, असलेला; चिरडीस जाणारा. रडी खाण्याचा किंवा रडीस येण्याचा ज्याचा स्वभाव आहे तो.

रण—पुन. १ युद्धभूमि. २ युद्ध; संग्राम; लढाई. ' श्रीराम–राक्षसांचा तो कीं हा एक होय परम रण । ' –मोभीष्म ३.५७. –न. १ तंटा; आवेशाचें भांडण; जोराजोराचा वादविवाद. २वाळूचें मैदान. ' कच्छचें रण. ' [सं.] **०कंदन–कंदळ**–न. १ निकराची लढाई; कापाकापी; परस्परांमध्यें आवेशानें होणारें पराकाष्ठेचें युद्ध. २ ज्यांत हाणामारी, अरेतुरे होते असा जो पराकाष्ठेचा कज्या, भांडण इ०; तुंबळ युद्ध; नाश. ' मुसळघायें करी चूर्ण । रणकंदन मांडिलें । ' –एरुस्व १०.६०. **०कर्कश**–वि. चिकाटीनें लढणारा. ' आम्ही प्रचंड धनुर्वांडे ।

रणकर्कश रणगाढे । ' –एरुस्व ८.१९. **०कावो**–पु. युद्धांतील डाव, पेच. ' वीरीं घेतला रणकावो । देखोनि धाविन्नला शाल्वो । ' –एरुस्व १०.६२. [रण+कावा] **०कुवळ**–वि. १ भांडखोर. २ लढ व वातुळ व्यक्तीस म्हणतात. **०खंदळ–खुदळ–खुंदळ–ळा, ०खुदल**–स्त्रीनपु. निकराची लढाई; घनचक्री; रणभूमीवरील बिनशिस्त लढाई; रणकंदन; जंगी युद्ध; दाणादाण; नाश; कत्तल. ' त्यांनीं फौजेंत रणखुंदल करून मारामारी केली. ' –भाब ६७. [सं. रण+कृंतन] **०खंद(दा)ळी**–स्त्री. युद्धपराक्रम; रणकंदन; मारामारी; गर्दी. ' यादव उठावले महाबळी । रणखंदळी करितील । ' –एरुस्व ८.५६. **०खांब**–पु. रणस्तंभ; एकमेकांवर हल्ला करून जाणाऱ्या दोन सैन्यांमध्यें पुरलेला खांब; लढाईस उत्सुक झालेल्या दोन सैन्यांमधील खुणेचा खांब. या खांबाचा सैनिकांस एकत्र जमण्यास खुणेसारखा उपयोग होत असे. ' रणखांब रोविला मुक्काम घोडेगांव । ' –ऐपो ११८. [सं. रणस्तंभ] **०गंभीर**–वि. युद्धाच्या वेळीं न डगमगणारा; धीराचा. [सं.] **०गरी**–स्त्री. आरमार. –के १.५.३६. **०गाडा**–पु. १ लढाईंत तोफा किंवा दारूगोळा वाहून नेणारा गाडा; बैल, घोडे यांनीं ओढावयाचा तोफेचा गाडा. २ ओझें वाहावयाचे उपयोगी मोठा गाडा. **०गाढा**–वि. कसून लढणारा. ' आम्ही प्रचंड धनुर्वाडे । रणकर्कश रणगाढे । ' –एरुस्व ८.१९. **०घर**–न. रण; रणभैदान; रणभूमी. ' आम्ही जातों रणघराला । ' –ऐपो ११६. **०घाई**–स्त्री. १ युद्धांतील पराकाष्ठेची गडबड; हातघाई. २ जोराचा, नेटाचा प्रयत्न. ३ घाईघाईचें काम. (क्रि० करणें, चालणें). **०घाल्या**–वि. ऐन लढाईच्या दिवशीं विश्वासघात, निराशा करणारा; दगा देणारा; हातपाय गाळणारा (घोडा, मनुष्य); ऐन वेळीं अवसान सोडणारा; अवसानघातकी. **०चत्वर–चत्वार**–न. रणांगण. [सं.] **०छतरी**–स्त्री. सैन्याच्या भोंवतीं पहारा करणाऱ्या संत्र्यास उभें राहण्याकरितां केलेली तात्पुरती लांकडी खोली. **०जोडवें**–न. पायाच्या अंगठ्यांतलें चांदीचें वळें. **०झुंझार**–पु. पराक्रमी; शूर; लढवय्या. ' किती झाले तरी स्वराज्याचे ते एक अनुभवी, कसलेले वयोवृद्ध रणझुंझार वीर आहेत. ' –स्वप ९६. **०झेंडा**–पु. ध्वज; सैन्याचें निशाण; युद्धाच्या क्षेत्रावरील निशाण, खूण. **०टाळ**–पु. युद्धांतील एक वाद्य. **०ठाण**–पु. पक्ति्रा; युद्धाकरितां उभें राहण्याची पद्धति. ' तुझे गर्वकवच छेदन करण्याकरितां रणठाण मांडून बसलों आहे. ' –पारिभौ ५३. **०ढोल**–पु. युद्धांतील नौबत; मोठें ढोलगें, मृदंग; दोन्ही बाजूनीं वाजवितां येणारें ढोलगें. **०तुंबळ**–न. तुमुल, घनघोर युद्ध; जोराची लढाई; धुमश्चक्री. –वि. अतिशयित जोराचें (भांडण, मारामारी, कज्जा इ०). [रण+तुमुल] **०तुरा**–पु. युद्धांत विजयी झाल्याचें चिन्ह म्हणून पागोटयांत, शिरोवेष्टणांत खोचण्याचा तुरा, दागिना इ०. **०तुरा–तूर्य**–पुन. रणांत वाजवावयाचें वाद्य. ' रणतुराचेनि बंबाळें । भीडींनिलीं दोनि दळें । ' –शिशु ८७६. **०तुरा लावणें**–क्रि. पराक्रमी वीराप्रमाणें डौलांत चालणें, जाणें, मिरविणें. **०धीट**–वि. युद्धांत ज्यास भय वाटत नाहीं असा. **०धीर**–वि. रणगंभीर पहा. [सं.] **०धुमाळी**–स्त्री. धुमश्चक्री; हातघाई; निकराची लढाई; युद्धांतली गडबड. **०धेंडा**–पु. लग्नांत वधुवरास खांद्यावर घेऊन नाचतात त्याप्रमाणें रणांत नाचणें. ' ऐसेनि लग्न लागलिया पुढा । रणीं नाचेल रणधेंडा । वोवाळणी बाणें प्रचंडा । परस्परें पडतील । ' –एरुस्व ४.४०. **०नवरा**–वि. १ मर्द; शूर; उत्साही (वीर). २ स्वारीवर असतां अथवा हिंडतांना ज्याला आपल्यापुढें वाद्यें वाजतगाजत ठेवण्याचा अधिकार अथवा मान आहे असा (योद्धा). ३ स्फुरण येऊन लढणारा; सेनापति; पुढारी; लढवय्या. ' अखंड रणनवरा. ' –दावि १७६. ४ बेफाम; बेहोष. **०पंडित**–पु. लढवय्या; युद्धकलेंत निष्णात; सफाईनें शस्त्र चालविणारा. [सं.] **०पिसा**–न. युद्धाचें वेड लागलेला. ' एक ते रणपिसेचि जाले । कंबर सोडुनि मोकळे । ' –गीता १.४८८. **०प्रसंग**–न. युद्ध; लढाई. ' एकदोन वेळां रणप्रसंग पाहिल्यावांचून कोणी धीट होत नाहीं. ' [सं.] **०फंदी**–पु. रणशूर; लढवय्या; युद्धाची आवड असलेला. ' जिवबादादा ते रणफंदी । ' –ऐपो २६७. **०बहिरी**–स्त्री. रणभेरी; एक मोठें कर्ण्यासारखें वाद्य. ' कर्णे किती एक रणबहिरी कर्कती । ' –ऐपो ११९. –वि. रणशूर; लढाईंत धीट असलेला. [रणभेरी=रणवाद्य] **०बावरा**–वि. १ लढाईसाठीं अथवा युद्धासाठीं बेफाम. २ (ल.) भयंकर उतावळा; अत्यंत उत्सुक. **०बोका**–वि. १ गलेलठ्ठ; गब्बू व अधाशी आणि विषयी (प्राणी). २ फार मोठा (खांब, तुळई, ओझें इ०). **०भीत**–वि. युद्धाला भिणारा; रणभीरु. [सं.] **०भूमी**–स्त्री. युद्धस्थळ; युद्धाची जागा; रणांगण. [सं.] **०भेरी**–स्त्री. रणबहिरी (–स्त्री.) पहा. ' सोनजी भापकर मानाजी पायघुडे रणांत राहिल्या रणभेरी । ' –ऐपो १३५. [सं.] **०मंडल–ळ**–न. १ एक प्रकारचा व्यूह; योद्धयांची वर्तुळाकार उभारणी. २ रणभूमी; रणमैदान; रणांगण. ' रणमंडळीं रघुवीर । ऐका कैसा शोभला । ' **०मोहरी–मोहरें**–स्त्रीन. रणवाद्य. ' राजे गिडगिडिआं रणमोहरी । ' –शिशु ५२६. **०यज्ञ**–पु. युद्धरूपी यज्ञ–होम. ' गाठी आराधाया रणयज्ञें करुनि सिद्ध कटकांतें । ' –मोभीष्म ५.१. **०यूप**–पु. दोन्ही सैन्याच्या मधोमध खुणेकरितां उभारलेला खांब; रणस्तंभ. [सं.] **०रंग**–पु. लढाईची हातघाई; घनचक्कर; युद्धाचें भीषण स्वरूप; युद्धाचा भयंकर देखावा; युद्धाच्या वेळची गडबड, गोंधळ. **०रंगधीर**–वि. रणामध्यें धीट; वीर; रणवीर; युद्धांत पराक्रम करणारा. **०वट**–पु. रणांगणातील स्थान. ' कीं हा (मुकुट) माथां असतां रणवट । न भंगे तुझा । ' –कथा २.४.१२८. **०वाद्य**–न. लढाईंतील वाद्य, शंख, दुंदुभि

इ० [सं.] **०विंदान**–न. युध्दकौशल्य. ' गदें घातली आपुली आण । रणविंदान पाहे माझें । ' –एरुस्व १०.३८. **०शिंग**–न. रणाच्या वेळीं योद्धयांना बोलावण्यासाठीं, उत्साह येण्यासाठीं वाजवितात तें शिंग. [सं. रणशृंग] **०शूर**–१पु. घोडयाच्या शुभलक्षणापैकीं गणलेला, मानिलेला एक गुण. –वि. २ युध्दांत धीट, पराक्रमी, माघार न घेणारा; वीर. [सं.] **०शौंड**–वि. युध्दकलानिपुण; विक्रमशाली. [सं.] **०संकुल**–न. हातघाईची लढाई. [सं.] **०सज्जा**–स्त्री. युध्दकाळचा पोषाख; समरशोभा. [सं.] **०सांडी**–स्त्री. पराभव. ' होईल आतां रणसांडी । ' –उषा १७४३. **०सौरा**–वि. रणशूर. ' आनंदे नाचत रणसौरे । ' –निगा ६१. **०स्तंभ**–पु. १ रणयूप पहा. २ स्मारकासाठीं उभारलेला खांब; स्मृतिस्तंभ. [सं.] **०हलकी–गी**–स्त्री. एक प्रकारचें रणवाद्य. **०क्षेत्र, रणांगण**–न. रणभूमि. [सं.] **रणालगी**–स्त्री. (बे) टिमकी. [रण+हलगी] **रणोत्साह**–पु. युध्दाची आवड; गोडी.

रणंग, रणाग, रणांग–स्त्री. फोड येतात आणि आग होते असा एक रोग; खवडे इ०.

रणदिस होणें—(माण.) बेजार होणें; थकणें; रंजीस येणें.

रणरण—स्त्री. भयंकर उन्हाचा ताप; कडक ऊन. [ध्व.] **०करणें**–अक्रि. मध्यान्हसमय, ऊन, निखारे, ज्वरविशिष्ट शरीर इ०कांनीं स्पर्शेन–दर्शनादि करण्यास अशक्य पडायाजोगी अतिसंतप्तता पावणें; भयंकर तापणें, जळणें (सूर्य, तापांतील शरीर, अग्नि, यांनीं). **रणरणणें**–अक्रि. १ जळजळणें; अत्यंत तप्त होणें (झळीनें); अतिशय उष्णता वाटणें; उकडणें. २ ऊन, निखारे, सूर्य, अग्नी इ०कांनीं अतिशय संतप्त होणें. **रणरणीत**–वि. अतिशय जळजळीत; कडक; प्रखर (सूर्य, ऊन्ह, अग्नि, दुपार इ०). **रणरणीत उन्हाळा**–पु. उन्हाळयांतील कडकडीत ऊन्ह, उष्ण झळा; (सामा.) हवेंतील प्रखरता. **रणरणीत दुपार**–स्त्री. उन्हाळयांतील ऐनदुपार; मध्यान्हसमय.

रत—न. १ संग; संयोग; सुरतभोग; मैथुन. २ करमणूक. –वि. रमलेला; रममाण झालेला; निमग्न; गुंगून गेलेला. तल्लिन; अनुरक्त. ' ज्यांचें कृष्णीं तन मन जालें रत । '–तुगा १२. (समासांत) कामरत; कर्मरत; विषयरत; स्त्रीरत; दान–धर्म–भक्ति–रत. [सं. रम्=खेळणें; क्रीडा करणें] **रतणें**–अक्रि. १ आनंदित होणें. २ आसक्त होऊन खेळणें रममाण होणें; सहजासहजीं गुंग होणें. ' चित्तवृत्ति रतली हरिपायीं । ' ३ भटकणें; बागडणें; करमणूक करून घेणें. ४ मैथुनांत आसक्त होणें; विषयसुखांत निमग्न होणें; संभोगणें. [सं. रम्, रत]

रतन—न. रत्न; मौल्यवान पदार्थ. [सं. रत्न] **०आबली**–स्त्री. (गो.) एक फुलझाड; त्याचें फुल. **०कूप–कुंड**–न. उत्तम पोसलेला, पिकलेला आणि तेजस्वी आंबा, पेरू इ० फळ. **०गुंज**–स्त्री. गुंजेचा एक प्रकार; ढोरगुंज. रत्नगुंज पहा. **०जोत**–स्त्री. १ डोळयास थंडावा आणणारें एक औषध. २ वैदूची कांडी. ३ (ल.) चणचणीत, हुषार मुलगा, वगैरे. ' तट्टू माझा रतन जोत ' –त्राटिका. [रत्न+ज्योति] **०जोध**–न. कमळबीज. –मुंव्या १३२. **०पारखी**–पु. रत्नांची परीक्षा करणारा; हिरे, मोतीं, माणिक इ०ची पारख असलेला. **०बाघ**–स्त्री. (राजा.) पाटाचें पाणी आंत घेऊन बाग शिंपण्यासाठीं केलेला खळगा, विहीर, खांच.

रतनाळ–ळूं–ळें—न. (ना. व.) रातालें. [रतन+आलू]

रतन्या—पु. (व.) शिरा घोटण्यास केलेला मोठा लाकडी सराटा.

रतल, रत्तल—पु. १ सुमारें १५ औंसांचें म्हणजे ३६ पुरती रुपयांइतकें वजन; कांहींच्या मतें १६$\frac{2}{3}$ औंस, तर कांहींच्या मतें १२ औंस; सध्यां ४० रुपये भारांचें वजन प्रमाण मानतात. २ (सामा.) अर्धा शेर; पौंड. [अर. रत्ल]

रतांजली—स्त्री. रक्तचंदन. –मुंव्या १६३.

रतालूं, रतालें—न. एक कंद; गोडा बटाटा; पांढरें व तांबेंड अशा याच्या दोन जाती आहेत. [सं. रक्तालु] **रताळी**–स्त्री. रताळयाचें झाड, वेल.

रति–ती—स्त्री. सद्दी; नशीब. (क्रि० फिरणें, अनुकूळ होणें). ' पहिल्यानें जुगारांत मला रती अनुकूळ होती. ' –बाळ २.२. ' रति फिरली, सारांश मिळाले लोक अपूज्याला '–ऐपो ३६६. [दैवाची रति याचा संक्षेप; सं. रति] **०वंत**–वि. दैववान; भाग्यशाली. ' रतिवंत महाराज पेशवे माधव विष्णु अवतार ' –ऐपो ४३९.

रति—स्त्री. १ कांहीं विषयाच्या ठायीं प्रीतिपूर्वक आसक्ति, इच्छा. ' कुकर्मी रति घडे । ' –ज्ञा ३.८२. २ मैथुन; संभोग; स्त्रीसंग. ' रतीचिया बेटा । आदळती कामाचिया लाटा । ' –ज्ञा ७.७४. ३ मदनाची, कामदेवाची स्त्री. ४ विषय; कामवासना; कामेच्छा; शृंगाररसाचा स्थायीभाव. ५ आनंद; सुख. ६ क्रीडा; विलास. [सं.] **०चळ**–पु. काम; विषयलालसा. ' नाहीं तीळ रतीचळ । तुझी कळा अचळ । ' –पला १.४. **०नाथ**–पु. मदन. [सं.] **०राय**–पु. (महानु.) मदन. ' ते रतिरायाचें माराक कासी । तरि कवण विषयविरु हातवसी । ' –भाए ४४५. **०युध्द**–न. संभोग; सुरतक्रीडा. –नि ८७५. **०रोदन**–न. प्रथम रतिप्रसंगींचें रुदन. [सं.] **०सुख**–न. संभोगजन्य सुख; कामशांति. [सं.]

रति–ती—स्त्री. १ हिरे, मोतीं इ० वजन करण्याची एक बी, गुंज. २ (ल.) वजन करण्याचें अगदीं लहान (काल्पनिक)

प्रमाण. सुमारें १॥ गुंज किंवा २। ग्रेन. ४ गहूं किंवा १६ तंदुल= १ रती, २४ रती=१ टाक, ६० किंवा ६४ रती=१ तोळा. [सं. रक्तिका=गुंज] ०रति-क्रिवि. अगदीं बारीक बारीक. ' रति रति मांसतुकडे करोनी । जळचरातें वोपीतसे ।' -नव २२.१४०.

रतीब—पु. १ उकाडा; रोजीं नियमित द्यावयाचें अन्न वगैरेचें प्रमाण; ठराविक देणें, खाणें, इ०. (क्रि० लावणें). २ रोज नियमित खर्चास घेण्याचा पदार्थ. ३ खुराक; पौष्टिक अन्न. [अर. रातिब; रातिबा]

रत्न—न. १ हिरा, माणिक, पाच इ० मूल्यवान खनिज पदार्थ; (हिरा, पाचु, माणिक, पुष्कराज, नीळ, गोमेद, लसण्या, प्रवाळ इ०). २ (ल) कोणेक जातींतील, समुदायांतील किंवा वर्गातील रत्नाप्रमाणें उत्कृष्ट व्यक्ति. उदा० पुत्ररत्न, कन्यारत्न, अश्वरत्न, ' सखाराम बापू म्हणजे एक रत्न आहेत. ' -इंप ७१. ३ (ल.) शोभा देणारा, सौंदर्य वाढविणारा, संसार, सभा इ०स ज्याच्या योगानें शोभा येते असा पदार्थ. ' संसारांत मूल हें रत्न आहे. ' ४ समुद्रमंथनापासुन उत्पन्न झालेले चंद्र, अमृत, लक्ष्मी इ० चतुर्दश पदार्थ. ५ (उप.) मूर्ख मनुष्य. ' इंदूर प्रजेचें दुर्दैव म्हणून हें रत्न या गादीला लाभलें. ' -विक्षिप्त १.१७. ०**खचित-जडित**-वि. हिरे, माणकें इ० रत्नें बसविलेलें; जडावाचें; रत्नें बसविलेला (सोन्याचा दागिना, सिंहासन इ०). [सं.] ०**गुंज**-एक झाड. यास लांब शेंगा येतात. एकएका शेंगेंत ८।१० गुंजा असतात. मुंबईकडे सोनें, रुपें तोलावयास यांचा उपयोग होतो; वाल. ०**त्रय-त्रितय**-न. जैन धर्मांतील सम्यक् दृष्टि, सम्यक्ज्ञान व सम्यक् चारित्र्य हीं तीन अमोलिक तत्त्वें. [सं.] ०**दीप**-पु. दिव्यासारखा लखलखीत प्रकाश देणारें रत्न; स्वयंप्रकाशी रत्न; अशा प्रकारचीं रत्नें पातालांत असल्याबद्दलच्या कथा आहेत. ०**पारखी**-वि रत्नाची परीक्षा करणारा; ज्यास रत्नांची पारख आहे असा. ०**वाटी**-स्त्री. हिरे इ० रत्नें बसविलेलें बशीच्या आकाराचें भांडें. [सं.] ०**सानु**-पु. मेरु पर्वत. [सं.] **रत्नाकर**-पु. १ रत्नांची खाण. २ (ल.) समुद्र (तळाशीं रत्नें असतात म्हणून). ३ रामेश्वरापासुन अलीकडील पश्चिमेच्या आंगचा जो समुद्र तो. [रत्न+आकर] **रत्नाकर-आळविणें**-पु. (समुद्र शांत करणें). काम न करतां (रडत, बोंबलत) परत येणें; अपयश घेऊन येणें. ' हा रडतोंडया खरा. जेथें कामास पाठवावा तेथून रत्नाकर आळवीत येतो. ' [सं.] **रत्नाचल**-पु. मेरु पर्वत. -ज्ञा १८.३५. [रत्न+अचल] **रत्नाभरण**-न. जडावाचें भूषण. [सं. रत्न+आभरण]

रत्नी—स्त्री. १ नाचणी धान्याची एक जात. २ माकडाच्या खेळांत माकडीला दिलेलें नांव. [सं. रत्न]

रत्न—पु. ठराव; करार. ' मुरादखानानें वाजीद अलीखानाशीं फार रत्न केला आहे. ' -रा १.१९४. [अर. रब्त्]

रथ—पु. १ राजा, देवाची मूर्ति इ०ची मिरवणूक ज्या गाडींत निघते ती गाडी. २ घोडयांनीं ओढीत न्यावयाचें राजादिकांचें वाहन; राजेशाही गाडी. ३ लढाईंतील वाहन; आंत बसुन लढण्याची गाडी. ४ रथी; रथावरील योद्धा. ' मजपासी दूत मद्रथां बाहो । ' -मोशल्य ३.६. ५ पृथ्वी. ' चळित रथ रथाचा नाथ संतुष्ट मोदें । ' -मुरा, बाल १०२. [सं.] ०**कार-कारक**-पु. १ रथ बनविणारा सुतार; गाडया तयार करणारा. २ एक जात; हिचा उद्भव माहिष्य जातीचा पुरुष व करण अगर लेखक जातीची स्त्री अशा दांपत्यापासुन आहे. ०**भार**-पु. जींत रथासारखीं वाहनें आहेत अशी युद्धसामुग्री. [सं.] ०**यात्रा**-स्त्री. जगन्नाथादि देवाच्या मूर्तीची रथांतून मिरवणूक काढण्याचा समारंभ. ०**सप्तमी**-स्त्री. माघ शुद्ध सप्तमी; या दिवशीं सूर्य रथावर आरोहण करतो अशी कथा आहे; या वेळेपासुन दिवस वाढत जातो. [सं.] **रथांग**-न. १ रथाचा भाग, चाक, जूं वगैरे. ' रथांगांचा मेळावा । जेवीं रथु म्हणिजे पांडवा । का अधोर्ध्व अवेवां । नांव देही । ' -ज्ञा १३.१५१. २ चक्र; विष्णूचें सुदर्शन. [सं रथ+अंग] **रथी**-पु. १ रथांत बसणारा; रथाचा मालक; मुख्यस्थानीं रथावर बसणारा योद्धा. २ रथांत बसुन एकटा लढणारा वीर. **रथोद्धता**-स्त्री. एक समवृत्त; ह्याच्या प्रत्येक चरणांत ११ अक्षरें आणि र, न, र, ल, ग हे गण असतात उदा० ' मोकळा करुनि कंठ तेधवा । ' -वामन भरतभाव १६. [रथ+उद्धता] **रथोत्सव-रथोत्साह**-पु. देवाची मूर्ती रथांत बसवून मिरवणूक काढण्याचा समारंभ; रथयात्रा पहा. [सं. रथ+उत्सव] **रथ्य**-पु. गाडीचा घोडा. [सं.]

रथ्या—स्त्री. राजमार्ग; हमरस्ता. [सं.] **रथ्योदक**-न. रस्त्यावर वहाणारें पाणी. ' तेथ जैसी रथ्योदकें सकळें । घेऊनि गंगा समुद्रीं मिळे । ' -ज्ञा ५ ११४. [सं. रथ्या+उदक]

रद, रदन—पु. दांत; दंत. [सं.] **रदी**-पु. हत्ती.

रद, रद्द—वि. १ काढून टाकलेलें; बातल. २ फेंकलेलें; बाजूस सारलेलें. ३ खोडलेलें; नामंजूर. ४ निरुपयोगी झालेलें; टाकाऊ. (क्रि० होणें, पडणें, असणें). ' ही चांगली पोथी मिळाल्यापासुन ती पहिली रद्द पडली. ' -स्त्री. परतवणें; फेड. [अर. रद्, रद्द] ०**कर्ज**-न. १ (हिं.) कर्जमुक्त झाल्याची स्थिति; ऋणमुक्तता. २ कर्जफेड. ' बाकी राहील ऐवज रदकर्जास लावून देतो ' -ख ८.४३२२. ०**कर्जी**-स्त्री. कर्जाची फेड. ०**जबाब**-पु. (कायदा) प्रत्युत्तर. [फा.] ०**बातल** वि (कायदा) कायद्यानें अमलांत आणताच येणार नाहीं असा करार -घका ९२. **रद्दी**-स्त्री. निरुपयोगी झालेल्या कागद इ०चा समुदाय. रद्द पहा. -वि. त्याज्य; कवडीमोल.

रदबदल-ली—स्त्री. १ मध्यस्थी; तहाची वाटाघाट; तहचर्चा. 'सोंधेकरी यांची रदबदल लागली असे.' –पया ६९. २ वकिली; शिष्टाई; तरफदारी. 'केली गोष्ट सुधरावी म्हणजे त्यांची रदबदल न चालेल असा विचार काय आहे?' –ख ५.२३५७. ३ एखाद्याला भीड घालणें; मनवळवणी. [फा. रद्द्–उ–बदल]

रंद-ध—पु. गळूं; फोड, इ०मधून निघतो तो रक्तमिश्रित पू; लस. 'त्याच्या कानांत रंद फार झाला आहे.' [सं. रद्?]

रदळ—वि. (मुंबई) घाणेरडा; गदळ. [रद्द]

रंदा, रंदागोल—पु. (प्र.) रंधा; रंधागोल पहा.

रदाळ्या-ल्या—वि. रटाळ्या पहा.

रद्दा—पु. १ माती, शेण इ०चा तुडवून तयार केलेला गारा; चिखल (इमारतीसाठीं). २ (व.) पेंड; दडपण. ३ लगदा; गरगट. [सं. रद्=फोडणें?] चुन्याचा रद्दा–चुन्यांत वाळू आणि पाणी प्रमाणांत घालून तें मिश्रण घाणींत घालून तयार केलेला चुना.

रंधन—न. १ शिजविणें; रांधणें; पाककिया. २ शिजलेले पदार्थ; स्वयंपाक. 'किं धाला बैसे पाठीं । रंधनाच्या ।' –अमृ ५.६४. **रंधप**–न. (कों.) १ शिजवून केलेला स्वयंपाक. २ शिजविलेले पदार्थ. रांधप पहा. **रंधपी**–पु. आचारी, स्वयंपाकी. रांधपी पहा.

रधवणें, रधविणें—क्रि. १ (सामा.) रुधविणें; रुधे असा करणें; रुधणें पहा. २ (व.) सतावणें; रडकुंडीस आणणें; त्रासविणें. [सं. रुध्]

रंधा—पु. १ सुतारांचें लांकूड साफ, सपाट करावयाचें एक हत्यार. याचे प्रकार–वजी, गोल्या, खोल्या, एकधडया, वांकडा. २ त्या हत्यारानें लाकूड साफ करण्याचा केलेला संस्कार. (क्रि० करणें). [फा. रन्दा] **०गोल**–पु. लांकडाची कड गोल व साफ करण्याचें हत्यार. **०गोलची**–स्त्री. कांठ, कड रंध्यानें गोल करणें; रंध्यानें केलेली गोलाकार वस्तूची साफसुफी. (क्रि० करणें). **०पट्टी**–स्त्री. गिलावा साफ करण्याची पट्टी. **रंधणें**–क्रि. लांकूड रंध्यानें साफ करणें; रंधा फिरविणें. [रंधा]

रंध्र—न. १ छिद्र; भोंक; वेज. २ भगदाड; डोंगरांतील गुहा. ३ (ल.) व्यंग; उणीव; दोष; न्यून; बिंग. ४ (ल.) नाजूक भाग; मर्म, वर्म. [सं.] **०शलाका**–स्त्री. छिद्र पाडण्याचें हत्यार. **रंध्रान्वेषण**–न. १ भोंक, छिद्र शोधून काढणें. २ न्यून पाहणें; उणीव, बिंग, मर्म शोधणें, हुडकून काढणें. [सं.] **रंध्रान्वेषी**–वि. छिद्रान्वेषी; दोष काढणारा. [सं.] **रंध्रिका**–स्त्री. एक वाद्य. 'ढोल दमामे मृदंग चंग । शंख रंध्रीका स्वरशृंग ।' –स्वादि ८.५.९५.

रनाळा—पु. (कों. कुलाबा) उन्हाळा. [रण] **रनाळी**–स्त्री. उन्हाळी.

रन्नावणें—अक्रि. (व.) १ आळसावणें; सुस्त बसणें. २ शेफारणें; माजणें. 'फार रन्नावलास तूं, तुला वाटेवर आणिलें पाहिजे.'

रप, रपका—पु. १ धपाटा; गपका; गुद्दा; चापट. २ मऊ, ओलसर पदार्थ हापटल्याचा होणारा आवाज. ३ मऊ व कठिण पदार्थांच्या संयोगानें निघणारा आवाज. [ध्व रप]

रप-कण-कन-कर-दिशीं—क्रिवि. धपाटा मारल्यानें, ओलसर, मऊ, कठिण पदार्थांशीं घांसून गेल्यानें, चिखल वगैरे पदार्थांत पाय गेल्यानें, पडल्यानें इ० प्रसंगीं होणाऱ्या झपाट्याचें व तीक्ष्ण आवाजाचें अनुकरण करून. [ध्व.]

रपाटा—पु. चपराकेचा जो मोठा प्रहार तो. रपदिशी आवाज होऊन मारलेला, गपका; गुद्दा. 'कुरुपतिस दिला भीमें उग्र गदेचा असा रपाटा कीं।' –मोगदा ३.२२. २ एखाद्या वस्तूचा आकार सामान्य आकारापेक्षां एकदम मोठा दिसल्यास योजतात. 'केवढी थोरली रपाटा भाकर हो!' ३ वेग, चलाखी, भयंकर जोर जींत आहे अशी क्रिया. ४ झपाटा पहा. **रपाटणें, रपटणें**–क्रि. १ दपटणें; रगडणें. २ एखादी गोष्ट, एखादें काम तडकाफडकी, घाईघाईनें आणि आचरटपणानें करणें; त्वरेनें करून टाकणें. उदा० हांकत रहाणें, ढकलणें, हात उगारणें, बलात्कार करणें इ०. रगडणें पहा. [रप] **रपाटखान**–वि. सामान्य प्रमाणापेक्षां, नेहमींच्या अगर योग्य आकारापेक्षां भयंकर वाढ झाली असतां योजावयाचा शब्द; गबदुलखान [रप, रपाटा] **रपाटून**–क्रिवि. सपाटून. रगडून पहा. [रपाटणें] **रपाट्या**–वि. रगड्या पहा. [रपाटणें]

रपापा, रपा(प)रप-रपरप—क्रिवि. भराभरा, एकसारखें केलेल्या आघाताच्या आवाजाचें अनुकरण करून. (क्रि० मारणें, धोपटणें).

रपटा—पु. गूळ, चिंच, चिखल वगैरेचा केलेला लिबलिबीत, पातळ लगदा.

रंपाळें—वि. (कुलाबा कों.) अवाढव्य; अगडंबंब.

रपेट—स्त्री. १ (हिं.) घोडदौड; दौड. २ व्यायाम; सहल. ३ घसरती जागा. [हिं.]

रपोट—पु. अहवाल, वृत्तांत. –पैमा. [इं रिपोर्ट]

रफडा—पु. (व.) धामधूम. **रफरफ**–स्त्री. १ अत्यंत अव्यवस्था; सांवळागोंधळ. २ नाश, चुथडा; चिंधड्या; पूर्ण विध्वंस; नासाडी (काम, धंदा, संसार इ०ची). [ध्व.]

रफल—स्त्री. (काश्मिरी) हलकी लोंकर.

रफा—पु. १ विचका; बिघाड; चिवडा. २ डिवचाडिवच; कालवणें व टाकून देणें; मातेरें; नाश; मचका. 'काय भाताचा रफा करून टाकलास हा.' ३ निराकरण. 'थोडेच दिवसांत खलश

रफाही होईल.' –रा ५.१५७. [अर. रफ्अ] **०तफा**–रफादफा पहा. **०दफा**–स्त्री. १ चिवडाचिवड; खिचडी; काला. २ अव्यवस्था, गोंधळ. ३ नासाडी. [अर. रफ्अ–द्वि.] **रफादफा, रफेदफे**–स्त्री. १ निवाडा; उरक; निकाल. 'असें जाहल्यास मागील रफेदफे करून त्यासही भेटीस बोलवावें.' –रा १.२८९. २ (कर्जाची) फेड; निवारण. 'देणेदाराची कोचवण किती आहे याची रफेदफे धनी अथवा आपण करून मला मोकळें करावें.' –होकै २०. –वि. निकालांत काढलेलें; उरकलेलें; पार पाडलेलें. [अर. रफ्अ द्वि.] **रफे-खल(लि)श**–पु. वैराचें निराकरण. 'आमची त्याची रफे-खलिश व्हावा ऐसें बेतांत आणिलें आहे.' –ऐकिप्र ४१. [फा. रफ–इ–खलिश्] **रफे-शर**–पु. वैराचें निराकरण. 'रफे-शर केला व तस्फियाचा नक्शा ठरविला.' –वाड–कैफियती १००. [अर. शर्र=वाईटपणा; रफ–इ–शर्र]

रफाकत, रफीकत—स्त्री. स्नेह; सख्य; मैत्री. 'तुम्ही इंग्रेजांची रफाकत करणें ठीक नाहीं.' –दिमारा १.१२३. 'म्हणजे आम्ही रफीकतींत राहूं.' –दिमरा १.२०७. [अर. रिफाकत्]

रफाड—न. (व. ना.) मोकळें मैदान; खुली जागा. 'गांवाच्या बाहेर रफाड आहे. तेथें शाळा बांधावयाला जागा ठीक आहे.'

रफायत, रफाहीयत—स्त्री. भरभराट. 'किफायत सरकार व रफायत राया (र आया=प्रजा) अमलांत आणोन...'–रा १५. ११३. 'आपले रयासतीची बंदोबस्ती व खल्खुलाचे रफाहीयतीवर असावें.' –वाडसमा १.३२८. [अर. रफाहत्; रफाहीयत्]

रफीअल्कदर—वि. उच्च दर्जाचा; अत्युच्च; एक पदवी. –इमं ६५. [अर. रफी उल्कद्र]

रफिक, रफीक—पु. स्नेही; मित्र; रक्षणकर्ता; सामील; दोस्त. 'हल्लीं रफीक होऊन सेवा करून दाखवूं.' –इमं २६०. [अर. रफीक]

रफू—पु.स्त्री. १ कापडाचें छिद्र विणून बुजविणें; तुणणें; वस्त्राचें छिद्रादि बुजविण्याकरितां युक्तीनें सुतें भरून संधान करण्याचा एक प्रकार. २ या क्रियेनें युक्त असा वस्त्रभाग. ३ जुन्या छपरावर नवीन गवत व पानें पसरणें. (क्रि० करणें). [अर.रफ्व; फा. रफू] **०करी, ०गार**–पु. रफू करणारा; रफूचें कसब करून उपजीविका करितो तो; तुणणारा. [फा. रफूगर]

रफूचक्कर होणें—वि. (व.) पळून जाणें.

रफूक—पु. मेहेरबानी; स्नेह. 'एके ठिकाणी रफुकाचें कलम असावें.' –पया २२१. [अर. रफक]

रफ्त—पु. १ चाल; रीत. 'राव पन्त प्रधान यांजकडील सर्दारांशीही रफ्त आश्नाईचा आहे.' –रा ५.१०१. २ व्यासंग; परिपाट. 'अलीकडे घोडयावर बसण्याचा माझा रफ्त मोडला.' ३ जाण्यायेण्याची वहिवाट. [फा. रफ्त]

रब—स्त्री. (व.) चाल; रीत. [सं. रव किंवा फा. रफ्त]

रबक—न. एक तंतुवाद्य; सारंगी. [अर. रुबाब; फ्रें इं. रेबेक]

रब-कण-कन-कर-दिर्शी—रपकण इ० पहा. **रबका**–पु. १ रपाटा; धपाटा (आवाज होईलसा). (क्रि० मारणें; देणें) २ कोणताहि अवाढव्य, अगडबंब पदार्थ.

रबखा—पु. (व.) दरारा.

रबडगा—पु. १ अनेक कामांचा दबडगा. रगाडा; रगडा. २ कामाची गर्दी; गडबड; घाई इ०.

रबडणें—अक्रि. रखडणें; फार काम, कष्ट करणें किंवा सोसणें.

रबडा—पु. चिखल; रद्दा; गारा. [ध्व. रब !] **रबडा काढणें-लावणें**–(माण) एखाद्या झाडाचें मूळ अथवा साल उगाळून गंध काढणें.

रबडी—स्त्री. (उ. हिं.) राबडी; दुधावरची मलई; कढईच्या बाजूला लागून वाळल्यावर कडईत राहिलेल्या दुधांत ती मिसळून व साखर घालून बासुंदीसारखी तयार करितात ती. (सामा.) बासुंदी; आटीव दूध. [राब; हिं.]

रबर—न. १ एक प्रकारच्या झाडाच्या चिकापासून होणारा पदार्थ, रबराच्या अंगच्या चिवटपणामुळें त्याचा पुष्कळ उपयोग होतो. शाई–पेन्सिलीनें लिहिलेलें यानें पुसतात.

रबर—न. जाड, हलक्या प्रतीचें भरड, निःसत्त्व अन्न. [भरड]

रबरब-र्बा—क्रिवि. चिखलांतून चालतांना, चिखलांत पाय रुततांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण. [ध्व. रब !] **रबरबीत**–वि. गोळा करूं गेलें असतां होऊं नये इतका पातळ झालेला (चिखल, पीठ इ०). [रब]

रब(ब्ब)ल—न. (व.) भित रचण्याचे किंवा सडकेवर घालावयाचे अनघड दगड; ओबडधोबड दगड; डबर. 'सडकेवर रबल पसरण्याचें काम चालू आहे. [इं.]

रंबाट—न. (बे.) कामाची गर्दी.

रबाब—न. एक तंतुवाद्य. लांकूड कोरून हें तयार करतात व गजानें वाजवितात. [फा.]

रबाब—पु. १ (प्र.) रुबाब; धाक; दरारा. 'रबाब पूर्ववत् जमून इंद्ररास आले.' –होकै २९. २ डौल; ऐट. [फा.रू=चेहरा+आब=तेज] **रबाब-रुबाब करणें**–(व.) धाक, दपटशा दाखविणें.

रबिता—पु. राबता पहा.

रबिलाखर—पु. अरबी वर्षाचा चौथा महिना. [अर. रबी–उल्–आखिर्]

रबिलावल, रबिलोवल—पु. अरबी वर्षाचा तिसरा महिना. [अर. रबी-उल्-अव्वल]

रबी, रब्बी, रबीधान्य—स्त्रीन. पर्जन्यकाळच्या अखेरीस पेरून वसंतऋतूंत कापावयाचें धान्याचें पीक; वैशाखी पीक. 'वैशाख फलम्' –राज्य ९.१२. याच्या उलट खरीफ. 'गारा फाल्गुन मासीं पडल्या, रब्बी बुडाली.' –रा ३.१६४. [अर. रबीई=वासंतिक]

रबीसोस—पु. ज्येष्ठमधाचा शिरा. –मुंव्या ११३.

रबुका—पु. रबका पहा.

रबूक—वि. विशाल; प्रचंड; फारच अवाढव्य (वाडा, पशु, मनुष्य, वस्तू इ०). २ अत्यंत विपुल; समृद्ध; भरपूर (माल, पाणी, पीक, आंबे इ०).

रबेत-द, रबेता-दा—पु. १ जोराचा रट्टा किंवा तडाखा; ठोसा (आवाज होईल इतक्या जोराचा) (क्रि० मारणें देणें). २ राबता; वहिवाट; प्रघात; चाल. ३ व्यासंग; संवय. [अर. रब्त , रफ्त]

रबेत-द—वि. अवाढव्य; मोठा; राक्षसी; प्रचंड.

रब्बा—पु. अफूच्या बोंडावरील रस काढून तो मडक्यांत भरून त्याची अफू करतांना तो पातळ कापडाच्या थैल्यांत घालतात. या रसाचा जो भाग थैल्याच्या बाहेरच्या अंगास येऊन चिकटतो तो. –कृपि ५०७. [अर. रुब्ब्=रस]

रंभा—स्त्री. १ कदलीवृक्ष; केळ. 'जाणिजे योगपीठीचा भैरवु। काय हा आरंभ रंभेचा गौरवु।' –ज्ञा ६.४६२. 'जैसी रंभा ताडिली। शुंडादंडें वारणें' –ह २.१३४. २ स्वर्गातील सुंदर स्त्री; एक अप्सरा; देवांगना. 'नाना रंभेचेनिही रूपें। शुकीं नुठिजेचि कंदर्पे।' –ज्ञा १६.१२७. ३ वेश्या. ४ (उप.) स्थूल, कुरूप व अव्यवस्थित वस्त्राची, पिंजारलेल्या केसांची बाई, विशेषतः मुलगी. [सं.] **०तृतीया**–स्त्री. १ मार्गशीर्ष शुद्ध तृतीया. २ या तिथीचें व्रतविशेष. **०नंदन-पुत्र**–पु. कापूर. 'अग्नीस विझवावया रंभानंदन। आवेशेंकरून लोटला।' –रावि १४.१७६. **रंभा**—पु. (चांभारी) कातडें कापण्याचें एक हत्यार. हें रापीहून वेगळें असतें. –स्त्री. गवत काढण्याचें खुरपें. **०पुतळी**–स्त्री. खुरपें.

रमजान—पु. अरबी वर्षाचा ९ वा महिना. या महिन्यांत मुसलमान लोक दिवसा उपवास (रोजा) करतात. [अर. रमझान्] **०गाई, रमजानिगाई**–स्त्री. रमजान महिन्यांत उपवास न करण्याबद्दलचा दंड; एक कर. 'मुलकाचे दस्तावर रमजानिगाई कदीम तहनाम्याप्रमाणें न घ्यावी.' –वाडमा १.२२३.

रमढोल—न. प्रचंड, अवाढव्य वस्तु. –वि. विशाळ; प्रचंड; अवाढव्य.

रमण—पु. १ उपभोक्ता; रममाण होणारा पुरुष; आवड असणारा. २ नवरा. उदा० जानकीरमण; सीतारमण. ३ जार. ४ मन्मथ. –न. १ मैथुन. २ कांहीं एक विषयाच्या ठायीं चित्ताचा रमण्याचा व्यापार; क्रीडा; विहार.' –वि. १ सुखविणारा; प्रिय. २ मोहक; सुंदर. [सं. रम्]

रमणा—पु. १ बाग; क्रीडास्थान; रम्य स्थल. २ चोहोंबाजूंनीं आवृत स्थान; दक्षिणा वांटण्याची जागा; कोंडी. 'पेशव्यांचा रमणा पर्वतीच्या पायथ्यास होता, तेथें आज रान माजलें आहे.' ३ (ल.) ब्राह्मणांना दक्षिणा वाटणें किंवा तदर्थ खर्चलेली रक्कम. ४ अनेक मंडळीनीं केलेला गोंधळ किंवा गोंगाट. (क्रि० माजविणें); गर्दी. 'रमणा बहुत तिथें मातला।' –ऐपो १४१. ५ (इमारत काम) जिन्याच्या आरंभीं किंवा शेवटी जिन्याच्या दारापुढें असलेली चौकोनी जागा. 'रमणा घट्ट बसवा.' [सं. रम्=रमणें]

रमणी—स्त्री. १ तरुण, सुंदर स्त्री. २ पत्नी; बायको. ३ (सामा.) स्त्री. [सं.]

रमणीक—वि. रम्य; आनंददायक; रमणीय (स्थल इ०) 'रमणीक याचेसरी। पट्टण आन असेना।' –मुआदि ४६.२०. [सं. रमण] **रमणीकपणा**–न. रमणीयता; रसज्ञता. 'रमणीकपणें पाहतां मन। कदा काळीं नुठावें।' –मुआदि ३५.६१. **रमणीय**–वि. रम्य; मनोहर; सुखावह; शोभिवंत (जागा, मूर्ति, काव्यार्थ इ०). **रमणीयता**–स्त्री. मनोहरत्व; सौंदर्य. [सं.] **रमणूक**–स्त्री. १ चैनीखातर फिरणें; विहार. २ मनोरंजन; करमणूक. [रमणें] **रमणें**–अक्रि. १ कांहींएक विषयाची गोडी लागल्यामुळें तेथें चित्तवृत्ति आसक्त होऊन रहाणें. 'पुष्पाचे सुगंधावर भ्रमर रमतो.' २ बागबगीचा, चांदणें इ० उपभोग्य जे विषय, तदुपभोगद्वारां विनोद करीत काळ घालविणें. ३ रेंगाळणें; गमणें. संभाषणांत किंवा खेळण्यांत वेळ घालविणें. 'लवकर जा. वाटेस रमूं नको.' ४ विलास करणें; मैथुनार्थ संगत होणें, जुळणें. [सं. रमण] **रमतरमत-गमत, रमते रमते**–क्रिवि. १ स्वस्थपणें; सुखानें; सहज; बिन त्रासानें; घाई न करितां; विशेष तसदी न घेतां (काम करणें इ०); २ बागबगीचा, चांदणें, वायु इ०कांपासुन करमणूक करीत करीत. (क्रि० जाणें; येणें; चालणें इ०). (रमते रमते हें हिंदी रूप आहे). **रमताराम**–पु. भटक्या, फिरस्ता, प्रवासी माणूस; विशेषतः तीर्थे हिंडणारा गोसावी. [रमणें राम] **रममाण-न**–वि. रमणारा; आसक्त; गुंग; तल्लीन; रंजित. **रमविणें**–क्रि. रंजन करणें; रंजविणें; करमणूक करणें; सुखविणें. [रमणें]

रमराट—पु. प्रचंड रास, ढिगारा (खरकटीं भांडीं, उष्टी पानें इ० चा). रामरगाडा पहा. [सं. राम+राष्ट्र]

रमल—न. रेतीवर किंवा कागदावर काढलेल्या रेघांवरून अथवा फांशावरून शकुन पाहण्याची विद्या. मूळ देवदूत जिब्रईलनें

प्रेषित दनियल यास बाबुवर रेषा काढून त्यावरून भविष्य वर्तविण्याची ही कला शिकविली. यावना फलज्योतिषशास्त्र. [अर. रम्ल्] **रमली**–वि. रमल जाणणारा; रमलशास्त्राप्रमाणें भविष्य सांगणारा. [रमल्]

रमा—स्त्री. १ लक्ष्मी. २ शोभा. [सं.] **०कांत-नाथ-नायक-पति-रमण-वर**–१ विष्णु. 'रमारमणीं एकांती। मीनल्या काम नुपजे चित्तीं।' –एरुस्व ७.५८. २ (उप. सांकेतिक) र० ; आरडणें (दोन्ही शब्दांत आरंभी र आहे). [सं.] **०कांत आळविणें**–(विष्णूचें ध्यान, पूजा, आराधना करणें) १ (उप.) रडणें; भेकणें. २ पोरा-प्रमाणें असहाय्यतेनें ओरडणें. ३ रमणें गमणें; रेंगाळणें. **०बंधु**–पु. चंद्र. [सं.] **रमिक**–वि. (ना.) रमणीय.

रमात करणें—क्रि. थट्टेवारी घालविणें.

रमारम, रमारमी—स्त्री. १ बेतासबेत; जमा आणि खर्च यांची बरोबरी; तोंडमिळवणी; नफा-तोटा सारखाच असणें, होणें. 'यंदाचे व्यवहारांत तोटा नाहीं, नफा नाहीं, रमारमी झाली.' २ समता; सारखेपणा=(गरीब-श्रीमंत, नफा-तोटा, बरें-वाईट इ० चा) (क्रियाविशेषणा सारखाहि उपयोग होतो.)

रमुजी, रमोजी—वि. १ विनोदी; गमती; विचित्र; चित्ता-कर्षक; हंसविणारा (वक्ता, त्याचे भाषण). [अर. रमूज] **रमूज**–स्त्री. १ खेळ; करमणूक; गंमत; मौज. 'कोण दिसेना प्राणप्रियकरे, चल रंगमहालीं रमूज करूं।'–सला ३४. २ स्वतःची करमणूक करून घेणें; खेळणें; विहरणें. ३ झालेलें मनोरंजन, करमणूक. ४ (समासांत) मनोरंजक पदार्थ, वस्तु. जसे– रमूज-बाग-रान-शेत-वाडा-गायन-नाच-तमाशा-वाणी-भाषण इ० [अर. रमूझ]

रम्य—वि. रमणीय; मनोहर; आनंददायक; सुंदर. [सं.]

रम्या—स्त्री. (संगीत) विसाव्या श्रुतीचें नांव. [सं.]

रय—पु. वेग [सं.]

रयत-रय्यत—स्त्री. १ प्रजा (राजाची). लोक; जनता. 'कौल घेऊन आज्ञा केली तर रयत उमेद धरून किर्दी करतील.' –रा ६.१४८. 'रानांत कोठें पिकें आहेत तेथें उपद्रव बहुत होतो. रयता दिल्गीर.' –ख ११.६१३. २ कूळ (शेतमालकाचें); शेतकरी; जमीन कसणारे लोक. [अर. रईयत्] **०भाग**–पु. रयतेचा, कुळाचा वांटा, मेहेनताना. **०रजावन्ती**–स्त्री. रयतेची खुशी. 'पाऊस कमी, पिकें तमाम वाळतात, त्यामध्यें रयत रजावंतीनें वसूल घेतच आहों' –ख ५.२४०९. **०वार**–क्रिवि. कूळ अगर प्रजा यांशीं प्रत्यक्ष रीतीनें; प्रत्येक कुळाशीं स्वतंत्रतः **०वारी-वारी, ०पध्दत**–स्त्री. रयतेनें जमीनीचा वंशपरंपरेनें उपभोग घ्यावा अशी व्यवस्था;प्रत्येक कुळाशीं सरकारनें साऱ्याचा स्वतंत्र ठराव करण्याची पद्धति. याच्या उलट जमीनदारी. [फा. रईयत्वारी] **रयतानी**–स्त्री. रयत; कुळें, शेतकरी, (समुच्चयानें). [रयत] **रयतावा**–पु. १ रयतानी पहा. 'त्या राज्यांतील रयतावा सुखी आहे.' २ रयत, कूळ यांची स्थिति, कामें, कर्तव्यें वगैरे. ३ जमीनीचा सारा–चावडी (कुळांवर बसविलेली). [रयत]

रयनी—स्त्री. रात्र; रजनी. –माझा १६.३६९. [सं. रजनी; प्रा. रयणी] **रयन-दिवस**–क्रिवि. रात्रेंदिवस. 'मन रयनदिवस इच्छित परधन परनारी।' –स्तोत्रमाला ३२५.

रया—स्त्री. १ किंमत; मोल; गुण; योग्यता. (मनुष्य, पदार्थ धंदा इ० चीं) (क्रि० जाणें). २ वजन; मान; पत; दर्जा. 'गवताला जी रया तीहि तुला नाहीं.' ३ कांति; शोभा; तेज. 'तेजें गुणें उत्तर ते रया रे।' –दावि ३७९.

रया, रयात, रयायत—स्त्री. १ कींव; कृपा; क्षमा;माफी. 'सबब तुम्हावर रयात करून ...' –थोमारो १.४५. –पेद २१. १४७. २ अदब. 'परंतु तुम्ही आतां शास्त्राची आज्ञा उलट करून आपले मगरूरीनें रया सोडून देऊन त्या सतीस मारितां.' –ऐटि २.३४. ३ भीड. ४ दान; देणगी. (क्रि० देणें; करणें). [अर. रिआयत्]

रया, रयाया, राया—स्त्री. प्रजा; शेतकरीवर्ग. 'किफायत सरकार व रफायत राया.' –रा १५.११३. [अर. रआया रईयत चें अनेकवचन]

रयान-नी—पु. रयत; प्रजा. 'मौजे मजकूरचें रयान व कुळकर्णी.' –समारो ३.६७.

रयाळ—पु. एक चांदीचें नाणें; स्पेन देशांतील एक नाणें. किंमत अजमासें सहा आणे. [स्पॅनिश; इं. रियल]

र र—स्त्री. रडगाणें; चिरचिर; कुरकुर. (क्रि० करणें). [रडणें चें आद्याक्षर]

रव—पु. (कु.) रोह; पालेभाजी, भात वगैरेचा अति लहान अंकुर; रोप. [सं. रुह्=रुजणें]

रव—पु. १ ध्वनि; शब्द. 'परवामलोचनेच्या ऐकों न शकेंचि या विलाप-रवा।' –मोसभा ५.३४. २ नांव; कीर्ति; स्तुति; गुणानुवाद. 'कीर्तिचा तरि जगीं रव ह्याचा।' [सं. रु=आवाज करणें] **रवळा**–पु. (व.) गडबड; कोलाहल.

रव—पुस्त्री. १ रस्ता. 'मंगळवेढयाचीं पांचसात खेडीं रवेस लागतात.' –ख ११२३. २ परिपाठ; शिरस्ता; चाल; रूढी. 'येथें एक वेळ लटकें पडलें म्हणजे मनुष्यास पुन्हां जवळ उभें राहूं देत नाहींत. येथील रव या प्रकारचा.' –रा ८.२२०. ३ रांग; ओळ. ४ वंश; परंपरा. ५ रवण पहा. **०पडणें**–वाट होणें, रहदारी चालणें. 'रव पडली पहा उंट तटें किती सौदागर देशावरले। हांका आरोळया देति भयंकर मागें चुकुन डोंगरीं शिरले।' –प्रला १२५.

' आज मोंगलाची रव पडल्यावर बैलें, ढोरें कांहीं तटें आलीं. ' –पेद १.१९.

रवका—पु. एखाद्या रवाळ पदार्थाचा जमलेला, तोडून काढलेला लहानसा डोळा; तुकडा; (गूळ, मध, तूप इ०चा). ' कलिंगड चांगलें असलें म्हणजे त्याचे रवके तोडून खावयास बरें. ' [रवा]

रवखंदळ–स्त्रीन. नाश; दाणादाण.

रंवखळ-खला-खाळा-रंवखळणें-खाळणें, रंवटळ-टळा, रंवटळणें-टाळणें—रंवदळ, रंवदळणें पहा.

रवखांब—पु. मजल्याची उंची वाढविण्यासाठीं किंवा छप्पर उंच करण्यासाठीं भिंतीवर जे खांब बसवितात ते प्रत्येक. घराच्या रवीस ज्या खांबण्या देतात त्या प्रत्येक. [रवी+खांब]

रवण—स्त्री. १ रांग; ओळ. रव पहा २ (महानु.) वावरण्यास प्रशस्त स्थळ. ' पृथ्वीएवढें रवण असे. ' ३ वेळ; प्रहर. ' रात्रीच्या रवणीं फिरत जाऊं नकोस. ' ४ गस्त. **रवणवाला**–पु. गस्तवाला; गस्त घालणारा पोलीस शिपाई.

रवणदिवली, रवणदिवा, रवणदिवी—पुस्त्री. (प्र.) रोवणदिवली इ० पहा.

रवणें—क्रि. (कु.) राहणें.

र(रं)वणें—रोवणें पहा.

रवंथ—पुन. आपलें खाद्य प्रथम अर्धवट गिळून नंतर तें सोईच्या वेळीं पुन्हां तोंडांत आणून पूर्णपणें चघळीत बसणें (गाई, म्हशी इ०ची क्रिया); चर्वण. [सं. रोमंथ] **रवंथणें**–क्रि. १ रवंथ करणें. २ एखादा पदार्थ चघळीत चघळीत पुष्कळ वेळ खात बसणें. **रंवथें**–न. अनेक प्रकारचें उष्टेमाष्टें अन्न एकत्र कालवलेलें, जें गाई–म्हशी इ०कांस खावयासाठीं ठेवलेलें असतें तें. २ आंबोणाचें भांडें. [सं. रोमंथ]

रवंथो—पु. (गो.) कोरडया खरजेंतील कीड. **०दवरप**–(गो.) रवंथा शिल्क ठेवणें; रोगाचें मूळ शिल्क ठेवणें.

रवंदणें—क्रि. तुडविणें; नाश करणें. ' रवंदी सुहृद राजा गुरु। सोंडे कवळी स्वर्ग शिखरू। ' –एभा ३.५१८. (जुनीप्रत)

रंवदळ, रवंदळ—स्त्री. रहदारी. ' शहराची रवंदळ वाढली. '

रवंदळ, रवंदळी, रंवदळ-ळी—स्त्री. तुडविलें जाणें; चुराडा; नाश; दाणादाण; (पाणी, चिखल, गवत इ०) तुडविणें; डिवचणें, कुसकरणें किंवा या क्रियेनें झालेली पदार्थाची अव्यवस्था; नासाडी किंवा दुर्दशा. (क्रि० घालणें; करणें; पडणें; होणें). ' सरोवरामाजीं कमळीं। गज करी रंवदळी । ' –एरुस्व १३.६. [रव+दलन] **रवंदळा-दाळा**–पु. दुर्दशा; नाश; तुडवातुडव. **रवंदळारवंदळ**–स्त्री. तुडवातुडव. ' शत्रूस रान मोकळें सुटून मोर्चेकरांची नुसती रवंदळारवंदळ झाली. ' –वसईची मोहीम.

रंवदळणें, रंवदाळणें–सक्रि. १ तुडविणें; पादाक्रांत करणें. २ डिवचणें; कुसकरणें. ३ ढवळणें (नासाडी होईल अशा प्रकारें); घुसळणें; हलवणें; रेंदाळणें (पाणी, चिखल). **रवरवीत**–वि. ओळीच्या ओळी असलेलें; पंक्तीच्यापंक्तीसह ' अंगीं रोमांच रवरवीत । स्वेदबिंदू डळमळीत । ' –एभा १४.३१७. [रव द्वि.]

रवंदा—पु. वाळलेला पाचोळा; मुख्यत्वेंकरून उंसाचा पाचोळा. [रव]

रवरव—पु. १ किड्यांनीं भरलेला नरक; एकवीस महा नरकांतील एक नरक. ' रवरव कुंभपाक भोगिती यातना । नये नारायणा करुणा त्यांची । ' –तुगा २४११. २ बुजबुजाट (माशा, उवा, डांस इ०चा). –क्रिवि. वळवळ करणाऱ्या किड्यांनीं बुजबुजल्या प्रमाणें; बुजबुजाट होऊन. (क्रि० किडे पडणें). [सं. रौरव] **०नरकवास**–पु. १ रवरव नरकांत वास. २ (ल) अतिशय वाईट, दुःखकारक स्थळ; प्रसंग.

रवरव, रवरवी—स्त्री. १ बधिरता (अवयवांची); मुंग्या येणें. २ कणकण; कचकच (ज्वराची); शहारे; आंग मोडून येणें. ३ पोटांत विष गेल्यानें होणारा दाह. ४ विंचू चावल्याच्या वेदना. ५ मुंग्या चावल्यानें होणारी आग; हुळहुळ. ६ अक्कलकारा, पिंपळी इ०खाल्ल्यामुळें जिभेची होणारी चुरचुर,झणझण. –क्रिवि. गर्दी करून, पुष्कळ. [ध्व.] **रवरवणें**–क्रि. शरीर किंवा शरीरावयव रवरवीनें युक्त होणें; रवरव होणें. **रवरवी**–स्त्री. १ एक प्रकारचें औषधी झाड व त्याचें फूल. हें जिभेवर ठेविलें असतां रवरव सुटते. २ रवरव पहा.

रवला—पु. (सोनारी) चार गुंजांच्यावर वजन असलेल्या सोन्याचा आटवून तयार झालेला गोळा; रवका पहा.

रवस—पु. (वे.) जोर. [रव किंवा सं. रय]

रवसड—स्त्री. (व.) विपुलता. ' आंब्याची गेल्या साली रवसड झाली तेव्हां तुम्ही आला नाहीं. '

रवसडणें—क्रि. आवेशानें चालून जाणें; रवसडून, जोरानें अंगावर चालून जाणें.

रवळणें—न. सोनाराचा एक ठसा; रवाळणें, रवाळें पहा.

रवळनाथ—पु. गोमंतकांतील एक देवता. **रवळनाथाचें कूळ**–न. १ (राजा.) ज्याचे घरीं धान्यादिकाची आटचार दिवसांची देखील बेगमी नाहीं असा दरिद्री, कंगाल माणूस. २ (गो.) बावळट मनुष्य. [रवळनाथ+कूळ] **रवळिया**–स्त्री. एक क्षुद्र दैवत. [प्रा.]

रवळा-ळी—रोवळा, रोवळी पहा.

रवा—पु. १ कण (बंदुकीची दारू, साखर वाळू इ० चा). ' दिठी वियाचा रवा । नागरु इया ठेवा । ' –अमृ ९.५. २ मध किंवा कढविलेलें तूप इ० न डिवचतां ठेवून दिलें असतां त्यांत

जे कण उत्पन्न होतात ते. ३ भरडलेलें गव्हाचें पीठ, सांजा, कणीक, तांदळाचें पीठ, इ० कांतील जाडा कणांश राहतो तो. ४ खडा; ढेप, (गुळाचा, साखरेचा). 'जे गोडी नाबदरासी। तेचि वेगळी रवेयासी।' –ऐभा ४.२६१. ५ सोन्याचांदीचा रज; सोनें आटवून बारीक असा गोल आकाराचा केलेला लहान गोळा. ६ दिव्यामध्यें तापलेल्या तेलांतून बाहेर काढावयाचा सोन्याचा किंवा धातूचा तुकडा. 'त्या सतीनें रवा काढिला.' –वाडबाबा २.६३. ७ जो उगाळतात, ज्याचें गंध कुंकू, वगैरे करतात तो तांबडा हळकुंडाचा तुकडा; विशिष्ट क्षाराचीं पुटें देऊन तांबडें केलेलें हळकुंड. ८ रहाटाच्या कणेकडास बसविलेलें आढीस जोडणारें उभें लांकूड. ९ दागिन्यावरील कंकर; पेरांच्या आवटीची मुद्रा, ठसा; सोनाराच्या पेराची आवटी नांवाच्या ठशांतील खांच (ज्यांत सोनें, चांदी, इ० चा पातळ पत्रा टोकला असतां त्यांत फुगा उत्पन्न होतो). ०काढणें–सोनें चांदी इ० चा रज किंवा तुकडा तापलेल्या तेलांतून हातानें बाहेर काढणें; एक दिव्याचा प्रकार. रवा अर्थ ६ पहा. **रवाळ**–वि. १ जाडया कणांच्या रूपांत असलेलें; दाणेदार; कणदार (तूप, मध, साखर इ०). २ खरीपेक्षां मोठा व पत्रीपेक्षां लहान (कोळसा) –स्त्रीन. सोनाराचें एक हत्यार. रवाळणें पहा.

रवा—क्रिवि. चालू; विद्यमान. 'आपणांस इनाम... कारकिर्दी–दर कारकिर्दी मोकासियानीं माजी मुतैन रवा असत.' –रा १५.१४५. [फा. रवान्] ०दार–पु. अनुमोदक. 'तुम्हीं सरकार नुकसानीचे रवादार कांहीं नाहीं.'–रा ७.५६. [फा. रवा+दार्] ०रास्त–वि. वहिवाटींतील; शिरस्त्याचें; परंपरागत व योग्य. [फा.]

रवानकी-गी—स्त्री. १ बिदागी; जातेवेळची देणगी. 'रवानकीचीं वस्त्रें.' –रा १२.१९२. २ पाठवणूक; पाठविणें; ३ पत्रोत्तर; उत्तराकरितां पत्र पाठविणें. 'श्रीमंत वसईचें मुक्कामीं असतां बहुत पत्रें आपलीं आलीं व त्यांच्या रवानग्याही बहुत जाल्या.' –रा ६.५८२. ४ मालाची निर्गत; विक्रीस जिन्नस परगांवीं, दूरदेशीं पाठविणें. ५ कांहीं एक कार्याच्या उद्देशानें देशांतरी फौज पाठविणें, दारूगोळा गलबतें इ० पाठविणें. ६ पाठवणीच्या वेळीं द्यावयाची आगाऊ खर्ची. 'लोकांस रवानगी नाहीं.' –पया ३२४. [फा.] **रवानगी चिठ्ठी**–स्त्री. परवानगी; परवाना; अनुज्ञापत्रक; पासपोर्ट. **रवाना**–पु. परवाना; पास. –वि. पाठविलेला; धाडलेला; प्रेषित; मार्गस्थ केलेला (कागद, माणूस, इ०). (क्रि० करणें; होणें). **रवानाचंद्र-मिती**–पुस्त्री. ज्या दिवशीं कागद-पत्र-रवाना होतें त्या दिवशींचा चंद्र, मिती. [फा.]

रवासुदगी—स्त्री. १ सरकारी कागद (दस्त ऐवज, हुकूम, आज्ञा इ० ची नोंद ज्यावर करतात तो); दस्त ऐवज रोखे, सनदा, पावत्या इ० चा कागद. २ पावती. 'बाकी रसद हुजूर रुा ८०० पैकीं रवासुदगी सेटी खाटक हुजूर–बाजार लस्कर रुा १००' –रा १५.१०१. ३ नक्तीचा जमाखर्च.–इनाम ४९. [फा. रवनाशुदा=पावता झालेला]

रवाळणें, रवाळें—न. सोनारांचें एक हत्यार; गड्डीच्या दरामध्यें सोन्याच्या मण्यांचीं दोन छकलें तयार करतांना सोन्याच्या तुकडयावर उभी करून वर ठोकले असतां, वरचा ठोका सोसणारी (रवीसारखी) काडी; नक्षी उठविण्याचा खिळा. [रवा]

रवि—स्त्री. (कों.) गलबतावरील चारी बाजूस वावरतां येण्याजोगा माळा.

रवि—पु. १ सूर्य. २ अर्क; रुईचें झाड. ३ उजवी श्वासनलिका; इडानाडी. [सं.] ०कांत–पु. सूर्यकांत; स्फटिक. ०ग्रावा–पु. सूर्यकांत; ज्यांत सूर्याचे किरण एका बिंदूत केंद्रीभूत होऊन विस्तव पडतो असा एक दगड. [सं. ग्रावन्=धोंडा] ०छिद्र–न. झरोका; लहान प्रकाशद्वार. 'ऐसा सुग्रीव विलपत। मी गुंतोनि पडलों विवरांत। भ्रमण करितां अकस्मात। देखिलें तेथें रविछिद्र।' –भारायुद्ध ४.१०३. ०तप्त–वि. उन्हानें तापलेला, करपलेला, पोळलेला. 'जसि बहु रवि तप्ता सावली गोड वाटे। तशि वनि पतिलाडें मानिता कोड वाटे।' [सं.] ०तनया–स्त्री. यमुना. [सं.] ०मंडल-ळ–न. सूर्यबिंब. [सं.] ०वार-वासर–पु. आदितवार. ०संक्रमण–न. १ सूर्याचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें. २ विशेषतः मकरराशींत जाणें; मकरसंक्रमण; संक्रांत. ०संक्रमणाचे तीळ–पु. (अव.) संक्रांतीच्या दिवशीं वांटावयाचा तीळगूळ, हलवा. ०सुत–पु. १ (सूर्याचा मुलगा) यम; कर्ण. 'पंथ पुरिंचा रविसुत पुरे आतां। आड करावा भवसिंधु ऐसा नव्हता।' –तुगा ४१११. २ (सांकेतिक) कर्ण(कान). 'अलि कुलवहनाचें वहन आणीत होतें।...रवि सुत महिसंगें फार दुःखार्त झाला।' –कूटश्लोक. [सं.]

रवी—स्त्री. १ दहीं घुसळण्याकरितां जें लांकडाचें यंत्र करतात तें; घुसळणें. २ घराचा मजला किंवा छप्पर उंच करावयाचें असतां भिंतीवर जे लहान खांब ठेवतात ते प्रत्येक; घराच्या तुळयांवरच इंद्रवट दिलें असतां मांडा ण ठेंगणी होते म्हणून त्या तुळयांवर असे दीड–दोन हात उंचीचे खांब देऊन माळ्याची उंची वाढवितात. ३ पखालींत वरून पाणी भरतांना तोंड (मुंढा) उघडें रहावें म्हणून त्यांत ज्या बांबूच्या कांबटया घालतात त्या प्रत्येक (रव्या असा अव. प्रयोग). [रवा] ०दोर–पु. घुसळण्याची दोरी.

रवी—स्त्री. गुऱ्हाळावरील अकरा माणसांचा समूह (१ गुळव्या, १ जाळव्या, १ पेरव्या=तुकडे करणारा, २ पालके=बैल हांकणारे, २ ऊंस चरकांत लावणारे, ४ फडकरी=ऊंस कापणें,

आणणें, पांचुदा गोळा करणें, गुऱ्हाळघरांत आणणें इ० कामें करणारे); (सामा.) गुऱ्हाळावरील कामकरी मंडळी.

रवे—पुअव. (कों.) रहाटाच्या कणेकडाचे आरे. रवा पहा. **०कड**–न. १ रहाटाच्या आंसाभोंवतीचा आरा. २ चाकाचे आरे काढण्यास योग्य असा लांकडाचा तुकडा. रवा पहा. [रवी+काष्ठ]

रवेश-स—स्त्री. चाल; रीत;पद्धत; बहिवाट;रिवाज रव पहा. ' इन्साफाची रवेश दर्किनारा ठेऊन खुंद–गर्जीवर नजर देऊन साष्टी सरकारांत देण्यविषयीं ताकीद न केली. ' –ख ७.३५७०. –रा १५.२१९. [फा. रविश] **रवेश्वार**–पु. चालीप्रमाणें; योग्य.

रवैया—पु. खालींचे तोंड भरतांना उघडें रहावें म्हणून काटयांची रचना करतात ती. रवी अर्थ ३ पहा. [रवी]

रशना—स्त्री. १ दोरी. २ लगाम. ३ कंबरपट्टा. [सं.]

रशेला—वि. रसभरीत. ' बूट गंगु हैबतीचे रशेले रिझाऊ। निवडक अक्षर अर्थी बहुत सजाऊ।'–प्रला १५३. [रसाळ; हिं. रसीला]

रश्मि—पु. प्रकाशकिरण. ' कां रश्मी हन मृगजळा–। पासुनि अर्कमंडळा। '–ज्ञा १५.५३०. २ दोरी; रज्जु. ३ लगाम. [सं.] **०कर**–पु. किरण. ' तेथूनि फांकती रश्मिकर। ' –ज्ञा १५.४०४. [रश्मि+कर] **०राज**–पु. सूर्य. ' कां उदितें रश्मिराजें। लोपिलीं चंद्रादि तेजें। ' –ज्ञा १४.४६.

रश्शी—स्त्री. दोरी; दोर. [सं. रश्मि; हि. रस्सि] **०खेंच**–स्त्रीपु. एक विलायती खेळ; दोरी खेंचण्याचा खेळ; दोरखेंच. (इं.) टग ऑफ वॉर.

रस—पु. १ चव; रुची; स्वाद; जिव्हेनें खारट, तुरट, गोड इ० जो पदार्थाचा धर्म समजतो तो. ' सुरभिदुग्धपान रस मजला समजे। ' –मोअनु २.७. २ चीक; द्रव; पान, फूल, फळ इ०तील पातळ अंश. ३ ऊंस, आंबा यांतून निघणारा द्रवपदार्थ. ४ अर्क. ५ अन्नाचें रक्त व्हावयापूर्वीचें रूपांतर; शरीरांतील ज्या अन्नापासून रक्त व घाम बनतो ती अन्नाची अवस्था. ६ धातूचें द्रवरूप; कोणत्याहि धातूचा वितळून केलेला द्रवपदार्थ; सोनें, चांदी इ०ची अग्निसंयोगानें झालेली द्रवरूप स्थिति. ७ (साहित्य) अंतःकरणाच्या वृत्तीचें कांहीं कारणानें उद्दीपन होतें आणि त्या उद्दीपित झालेल्या वृत्तीच्या अनुभवानें किंवा अवलोकनानें अनुरूप विचार प्रकट करण्याची प्रेरणा होते तिला रस म्हणतात. रस नऊ आहेत– शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र व शांत. ' तैं नवरससुधाब्धीचा । थावो लाभे। ' –ज्ञा १०.७. ८ (ल.) गोडी; आवड; राम; मनोरमता; मोहकता (प्रसंग, साहित्य, भाषण, व्यापार इ० तील.) ' वचनांत कांहीं, रस नाहि पाही। ' –लीलावती. ९ प्रीति; प्रेम; अनुराग. १० कस; योग्यता. ' ऐसियांचा कोण मानितो विश्वास। निवडे तो रस घाईं डाईं ' –तुगा ३३६२. ११ खाणींतील मीठ; खनिजक्षार: (गंधक, मोचूत इ०). १२ पारा. १३ पुरुषाचें वीर्य किंवा रेत. १४ विष. १५ उत्तेजक द्रव्य (तेल, मसाला, साखर, मीठ इ०). (संस्कृतमध्यें असे अनेक प्रतिशब्द या शब्दाला आहेत). १६ पाणी. ' तरी नुरोनि वेगळेंपण। रसीं भजिन्नलें लवण। ' –ज्ञा १७.१८. १७ दूध. ' कथा सुरभिचा रस स्वहित पुष्कळ स्वादुहि । ' –केका. १८ रसायन; औषध. ' पैं कळांतर गांठीं बांधिजे। मग पुढिलांचें काज कीजे। पूजा घेऊनि रसु दीजे। पीडितांसी ' –ज्ञा १७.२८७. १९ नारळाच्या रसांत गूळ मिळवून तयार केलेलें पातळ पेय. [सं.] सामाशब्द– **०कस**–पु. १ रसज्ञता. –शर. २ रसाचा कस; रंग; बहार; गोडी. (क्रि० जाणें; घेणें). ' भोग आतां रसकस घे बरी ही संधी सापडली । ' –प्रला १९९. [रस+कसणें] **०केळी**–स्त्री. (महानु.) रसकेलि; नवरसाची क्रीडा. ' जेही रसकेळि खेळति मनें । कळाविदांची. ' –भाए २७२. [सं. रस+केलि=क्रीडा] **०गुल्ला-गोल्ला**–पु. (व.) एक बंगाली गोड खाद्य पदार्थ; एक प्रकारची मिठाई. **०द**–पु. मेघ. [सं.] **०पूजा**–स्त्री. औषधाबद्दलची किंमत; वैद्याची फी. ' रसपूजा धरोनि पोटीं । वैद्य औषधांच्या सोडी गांठी। ' –एभा ११.१०४४. **०बाळ-बाळी-बेळी-बेळ**–स्त्री. केळ्याची एक जात (सोनकेळ्याप्रमाणें). [रस+का. बाळे=केळ; का. रसबाळे] **०भंग**–पु. १ गोडी जाणें; काव्यग्रंथ गानादिसंबंधी वाचकश्रोत्यांचा विरस. २ बेरंग; सौंदर्यनाश. ३ उत्साह, उमेद, यांवर विरजण पडणें. [सं.] **०भरित**–वि १ रसानें युक्त अगर भरलेलें; रसपूर्ण; (फळ इ०). २ (ल.) चटकदार; गोड; मनोरंजक; सुंदर (भाषण, वर्णन, इ०). [सं.] **०भरू**–वि. रसानें भरलेला (फलादि पदार्थ); रसपूर्ण; रसाळ. [रस+भरणें] **०भावना**–स्त्री. पुटें देण्याची रीत; किमयेची रीत. ' परी मात्रेचेनि मापें। दिव्यौषध जैसें घेपे। कां कश्मिलाचें कीजे रूपें। रसभावनी। ' –ज्ञा १८.७७४. **०भोजन**–न. ज्या जेवणांत आंबरस हें मुख्य पक्वान्न आहे असें जेवण. **०मय**–वि. (रसपूर्ण) जलमय. ' अद्वयानंदस्पर्शें । दिठी रसमय जाली असे । तें अश्रु नव्हती जैसें। द्रवत्वचि ' –ज्ञा १८.१६०४. **०रंग**–पु. मकरसंक्रांतीचे दिवशीं कुंकु आणि गूळ हीं दोन पात्रांत भरून ब्राह्मणांस सुवासनीस देतात तो; संक्रातीचें हळदीकुंकू. [रस आणि रंग] **०राय**–पु. (महानु) शृंगाररस. ' निर्यास गेलें । रसरायाचें। ' –भाए ९९. **०वडी**–स्त्री. तोंडीलावण्याकरितां मसाल्याच्या रसानें युक्त हरभऱ्याच्या पिठाच्या वड्या करतात त्या; पाटवडी. **०वंती**–स्त्री. १ (प्र.) रसवती; वाणी; वाचा (रसाचें अधिष्ठान मानली जाणारी); वक्तृत्व. २ गोड भाषण. ३ जीभ. ४ एक वनस्पति. **०वांगें**–न. मसालेदार रसानें युक्त असें शिजवून तयार केलेलें सगळें वांगें;

भरलेलें वांगें (भाजी). ०वान्-वि. १ रसभरित-युक्त-पूर्ण. २ चवदार; स्वादिष्ट; मिष्ट. [सं.] ०विक्रय-पु (तेल, मीठ,लोणी, साखर, दूध, तूप, इ०) रसाळ, पोषक पदार्थांची विक्री. शास्त्रांत हा दोष मानला आहे. [सं.] ०वृत्ति-स्त्री. शृंगारादिक रसभाव. (क्रि० प्रकट करणें). 'येथ विभूती प्रतिविभूती। प्रस्तुत अर्जुना सांगिजेती। ते विद्रदा रसवृत्ती। म्हणिपैल कथा।' -ज्ञा १०.४१. ०सोय-स्त्री. स्वयंपाक; पक्वान्न. 'जैसी रांधवणी रससोय निकी। करूनियां मोले विकी।'-ज्ञा २.२५४; -अमृ ५.४३. ०स्वादन-न. स्त्रियांच्या शृंगारचेष्टांचें वगैरे वर्णन ऐकण्यामध्यें असलेली श्रद्धा, गोडी. 'हावभाव कटाक्षगुण। सुरतकाम निरूपण। तेथ ज्याचें श्रद्धा श्रवण। रसस्वाद त्या नांव'-एभा ११.७०७. ०ज्ञ-वि. १ रस जाणणारा; रसिक; मर्मज्ञ. 'पुष्पाच्या मकरंदाचा रसज्ञ भ्रमरासारखा दुसरा कोणी नाहीं.' २ योग्यता जाणणारा; महत्त्व ओळखणारा. ३ रस, भावना, वृत्ति ओळखणारा. [सं.] ०ज्ञता-स्त्री रस जाणण्याचा गुण, पात्रता. ०ज्ञतावात-ज्ञानवात-स्त्रीपु. रस जाणण्याखेरीज बाकी सर्व इंद्रियांची ज्ञानशक्ति यांचा नाश करणारा वात. **रसरसणें**-अक्रि. १ रसानें पूर्ण भरून असणें. २ (अग्नि) प्रज्वलित असणें; धगधगणें;प्रखरणें. ३ तापणें; जळजळीत असणें; जळजळणें (तापांत अंग, डोळे, उष्णतेनें पाणी, तवा इ०. ४ ऐन तारुण्यांत, भर ज्वानींत असणें. ५ भर-भरांत असणें (देवी, गोवर, ज्या त्या हंगामांत उत्पन्न होणारे पदार्थ) किंवा संतापानें. 'संजयो विस्मयें मानसीं। आहा करूनी रसरसी। म्हणे कैसे पा देवेसी। द्वंद्व यया'-ज्ञा १४.४११. [रस ध्व.] **रसरसीत-शीत**-वि. १ रसाळ; रसपूर्ण. २ भर ज्वानीनें युक्त; तारुण्यानें मुसमुसलेली. ३ प्रखर; प्रज्वलित; तापून लाल झालेलें. ४ पिवळा शब्दामध्यें पहा. **रसा-रस्सा**-पु १ पुष्कळ रस असलेली भाजी; मसाला इ० घालून केलेलें पातळ तोंडीलावणें (बटाटा इ०चें). २ मांसाचें कालवण. [सं.] **रसाधिपति**-पु. वरुण. [सं.] **रसाभास**-पु. १ कृत्रिम, खोटी भावना; अनुचितपणें प्रवृत्त केलेला रस. उदा० पशुपक्ष्यादिकांचा शृंगार वर्णन करणें. हा शृंगाररसाभास झाला. २ अशा तऱ्हेचें काव्य अगर नाटक. ३ स्थायीभाव नांवाखालीं येणाऱ्या अष्टरसांपैकीं एकाचें केलेलें खोटें आविष्करण; अशा रसाचें (काव्य, नाट्य रूपानें) केलेलें दिग्दर्शन. ४ कांहीं खोट्या बतावणीनें खरी भावना दडवून ठेवणें. [सं.] **रसाल-ळ**-वि. १ रसभरित; ज्यामध्यें रस पुष्कळ आहे असा (फलादि पदार्थ) २ रसयुक्त; मधुर; गोड. 'केळीचें दळवाडें। हळू पोकळ आवडे। परि फळोनिया गाढें। रसाळ जैसें।'-ज्ञा १३.२१२. ३ चटकदार; मनोरंजक; आवडेलसें (भाषण). 'आतां टाकून बहुत शब्दजाळ। बोले रामकथा रसाळ।' ३ बरका फणस **वास दुसरें नांव**. ४ गमतीचें; विनोदी; हास्यजनक (भाषण). ५ खमंग; चांगलें; मुरलेलें; चमचमीत (पाक, लोणचें, ओला पदार्थ) ७ रसिक;रसज्ञ. 'तूं सांग तो वर तुला रुचला रसाळे।'-नल ९.१. **रसाळी** स्त्री. १ (व.) आंबरसाचें जेवण. 'अंबादासपंत खाडथाच्या येथें दरवर्षी एक रसाळी होते.' २ (कों.) उंसाच्या चरकाचें खालचें लांकूड, काटवट. **रसिक**-वि. १ मर्मज्ञ; गान, काव्य इ० रसावर विशेष प्रीति असुन त्यांतील मर्म जाणतो तो; सहृदय. २ थट्टा-मस्करी, भाषण इ० द्वारा दुसऱ्याच्या आणि आपल्या अंतःकरणप्रवृत्तीस विनोद उत्पन्न करील असा. ३ गमत्या; विनोदी. ४ भावनाप्रधान. ५ चवदार; स्वादिष्ट; मधुर. ६ (ल.) (काव्य) आल्हाददायक; सुखोत्पादक. [सं.] **रसिकत्व**-न. १ माधुर्य. २ रसिकता. -ज्ञा १८.३४७. **रसिक रसीला**-वि. रसाचा खरा खरा भोक्ता; इश्कबाज. [रसिक+हिं. रसीला=रसदार] **रसोत्पत्ति**-स्त्री. १ रसाची उत्पत्ति,निर्मिति. २ विनोद; हास्य; करमणूक. [सं.]

रस—पु. पारा; पारद धातु. ०कापूर-पु. पारायुक्त पांढरा कापूर अगर कापराचा गंधक, पारा, मीठ इ० शीं केलेला संयोग, मिश्रण; एक औषधीपदार्थ. [सं. रसकर्पूर] ०पुष्प-न. पाऱ्याचा एक संयुक्त पदार्थ. -पदार्थ १७२. [सं.] ०राज-पु. एक औषध; मौक्तिक, प्रवाळ, पारा, सोनें, चांदी, अभ्रक, कांतलोह, वंग या सर्वांचीं भस्में समभाग घेऊन त्यास गुळवेलीच्या रसाच्या आणि शतावरीच्या रसाच्या सात सात भावना दिलेलें रसायन. हें उरक्षतनाशक व कामोद्दीपक आहे. [सं.] ०रीति-स्त्री. रासायनिक पद्धत. 'जैसा रसरीति मरतां। राखिला विषें।'-ज्ञा १८.१६३. ०रूप-न. रसायन रूप. 'मृतें लोहें होती। ते रसरूपें जिती। जळोनीं इंधनें येती। वन्हिदशे।'-अमृ ३.५. [रस+रूप] ०शुद्धि-स्त्री. पारा शुद्ध करणें, मारणें. ०सिंदूर-पु. एक रासायनिक औषध; मात्रा. (पारा, गंधक व नवसागर यांपासून केलेली) [सं.] ०सिद्धी-स्त्री. १ रसायन शास्त्राचें ज्ञान. २ किमया; रासायनिक गुणांची निर्मिती करण्याची कला अवगत असणें. **रसांजन**-न. डोळ्यांत घालण्याचें एक औषध; पितळभस्म, दारुहळद, बकरीचें दूध व भांग यांचें मिश्रण आटवून केलेलें अंजन. 'नेत्रीं रसांजनाचें अंजन।' [सं. रस+अंजन] **रसायण-न**-न. १ पारद, गंधक इ०कांचा रांधा करून केलेल्या मात्रा. भस्में व इतर औषधें. 'पै रसायनें तै गोडें। जैं आरोग्य देहीं।'-ज्ञा १०.१७०. २ रसज्ञ, सिद्ध पुरुषानें तयार केलेलें अमृत. ३ रससिद्धि; धातुपरिवर्तनविद्या; किमया. ४ (रसायनक्रिया करतांना फार चपळाई लागते यावरून ल.) अत्यंत निकड; नेट (क्रि० लावणें; लागणें). ५ (कु.) रस; शिकरण. 'केळ्याचें रसायन.' [सं. रसायन] ०क्रिया-कार्य-स्त्रीन. निरनिराळ्या पदार्थांचा परस्परांवर व्यापार. ०शास्त्र-न. पृथ्वीवरील पदार्थांच्या घटनेंत होणाऱ्या

फरकांविषयीं ज्या शास्त्रांत सांगितलें आहे तें शास्त्र; यांत धातु व अधातु यांच्या संयोग-वियोगाचें विवेचन केलेलें असतें. (इं.) केमिस्ट्री. **रसायनाकर्षण, रसायनप्रीति**-नस्त्री. १ विजातीय परमाणु ज्या शक्तीनें एकत्रित होतात ती शक्ति. (इं.) केमिकल अट्रॅक्शन-ॲफिनिटी. २ दोन किंवा अधिक तत्त्वांस एकत्र करून नवीन पदार्थ उत्पन्न करणारी आणि त्या नव्या पदार्थांतल्या तत्त्वांस पुन्हां निराळें होऊं न देणारी शक्ति. **रसायनी औषध**-न. खनिज औषध. **रसीं उतरणें**-क्रि.हात, पाय इ० अवयव सुजणें; फुगणें (घोडयाचें) **रसौषध**-न. रासायनिक औषध. 'जैसें रसौषध खरें। आपुलें काज करूनि पुरें।' -ज्ञा १८.१०७९.

रसकर्णे—अक्रि. मजेंत असणें; सुखाच्या, आनंदाच्या अगर मनाजोग्या कामांत गुंग होणें, रमणें. 'त्या मुलाला कांहीं खेळणें देऊन अमळसा रसकीव व तूं जेवून ये.' [रस]

रसकस-घस—स्त्री. १ भांडण; बोलाचाली; वाद; धुसपूस. (क्रि० करणें; लावणें; मांडणें). २ कचकच; ताप चढण्यापूर्वी होणारी अवस्था. ३ रोमांच; शहारे. (क्रि० येणें; वाटणें). ४ (कु.) अप्रीति. 'लोकांच्या रसकशीमुळें केलेल्या कामांत यश नाहीं' ५ घासाघीस; जिकीर. **रसकसणें**-क्रि. १ कसकसणें, अंगावर कांटा अगर शहारे येणें; ताप येईलसें वाटणें. २ भांडणें-तंडणें; बोलाचाली होणें, करणें; हुज्जत घालणें. [रसकस] **रसकी**-स्त्री. (बे.) जखमेंतून गळणारें नासकें पांढरें पाणी; ल्स.

रसखुंटणा—पु. धातूचे गज, सळया तोडण्याची छिनी.

रसडी—स्त्री. दोरी. [अर. रसन्=दोरी तुल० सं. रशना, रश्मि]

रसद—स्त्री. १ सैन्यासाठीं सांठविलेला, पाठविलेला दाणागोटा; धान्य. २ कमाविसदारानें केलेला आपल्याकडील मुलुखाच्या वसुलाचा भरणा; मामलेदारानें एखाद्या परगण्याचा इजारा घेतला म्हणजे जी रक्कम त्यास सरकारांत आगाऊ भरावी लागते ती; गांवच्या वसुलाचा सरकारांत भरणा. 'रसद सालमजकुरी सरकारांत देऊं नये.' -थोमारो १.८. ३ स्वारीवरील सैन्याच्या खर्चास दिलेला पैसा. ४ पेढी-हुंडीवाल्यानें आपल्या गुमास्त्यास पाठविलेला पैसा. ५ सैन्यामागून जाणारा दाणावैरणीच्या जनावरांचा तांडा. ६ (व्यापक) सैन्यामागून जाणारीं माणसें व गुरेंढोरें. ७ (सामा.) दाणावैरण, दारूगोळा, सैन्य, पैसा इ० युद्धसामुग्री. 'रणमस्तखान यांशीं युद्ध देऊन रसदबंदी करून.' -संभाजीचरित्र १५. [फा. रसद्] **०भरणा**-पु. १ मामलतीसंबंधीं रसदेचा जो भरणा तो. फौजेचे बरदास्तीकरतां गांवागांवांतून पाठवितात जें धान्य, दारूगोळा इ० सामान तें. **रसदी**-वि. अंदाजी वसुलाइतक्या खजिन्यांत भरलेल्या रकमेच्या तारणावर घेतलेला (गांव, प्रांत); सरकारांत रसद देऊन घेतलेला. [रसद]

रसना—स्त्री. १ चव; आवड. २ जीभ; जिव्हा. [सं. रस्=रुचि घेणें] **रसनेंद्रिय**-न. (चव घेण्याचें इंद्रिय) जीभ; [सं.]

रसपें—न. गाढवावर नेतां येण्याइतकें ओझें (धान्य इ०चें).

रसम, रस्म—स्त्री. चाल; रीत. 'आलम दुनियास हेच रहा व रस्म' -पया ४६७. [फा. रस्म=नियम; चाल] **०रव**-स्त्री. चालरीत. 'आं साहेबही त्यांचें रस्मरव यांस खूब वाकीफ.' -पया ४७६. **०रिसायत**-स्त्री. वहिवाटीचें अवलंबन. 'वस्त्रें वगैरे रसम रिसायत केली.' -जोरा ५६. **रस्मीयात**-स्त्री. वहिवाट. 'वस्त्रें शादीचे रस्मीयातीचीं।' -रा ७.-खलप १.२. [अर. रस्मीयात]

रसमस—स्त्री. गडबड; रसकस पहा. 'रसमस अति गांवी थोर संतोष लोकां' -माधवकृत रामायण अयोध्या ८.

रसमालणें—न. (कु.) मार.

रसवस—स्त्री. (मुंबई) कटकट; त्रास; रसकस पहा. [ध्व.]

रसा—स्त्री. पृथ्वी. 'प्रसवे न यासि राधा प्रसवेल सुधाकरासि काय रसा।' -मोकर्ण नवनीत ३३३. **रसातल-ळ**-न. सप्तपाताळांपैकीं एक खालचा पाताळ. [सं.] **रसातळास-तळीं जाणें-वुडणें**-(ल.) पूर्णपणें नाश होणें (कामाचा). **रसातळास नेणें**-पूर्णपणें नाश करणें; सफा बुडविणें (धंदा, उद्योग यांत). (पोट) **रसातळास जाणें**-पोट पोकळ लागणें; क्षुधापीडित होणें.

रसाणें—न. निखारे; रसरशीत निखाऱ्यांचा समुदाय. [ध्व. रस्]

रसानगी—स्त्री. दुसऱ्याच्या मार्फत अगर चिठ्ठीनें दिलेली परवानगी. -वि. दुसऱ्याच्या मार्फत पाठविलेलें. [अर.]

रसासणें—क्रि. रसरसणें पहा.

रसीद—स्त्री. पावती; पोंच (रसद भरल्याची); माल पोंचल्याचा दाखला. 'वकील मजकूर यांणीं हुजूर अर्जदास्त रसीद करून' -रा १५.२९९. [फा. रसीद्; तुल० इं. रिसीट] **रसीदगी**-पैवस्तगी. **रसीदन**-पावणें; पोहोंचणें. 'आतां रसीदन मिसली देखतांची.' -रा १५.१५६. [फा. रसीदन]

रसुलो—स्त्री. घोडयाचा खुरासंबंधी एक रोग. यांत गुडघ्यापासून पायास खुरापर्यंत गळवें होतात. -अश्वप २.२५७.

रसूम—पु. १ जिल्ह्याधिकाऱ्याचा पगार, हक्क, वेतन इ० २ कर; फी; कमीशन [अर. रुसुम्, रस्मचें अव.]

रसूल—पु. प्रेषित; पैगम्बर. 'खुदा व रसूलखुदाची शपथ आहे.' -दिमरा १.४५. [अर. रसुल्]

रसोई—स्त्री. स्वयंपाक. [म. रसवोई; हिं रसोई]

रस्त—स्त्री. रसद पहा. 'शेहराबाहेरून रस्त येत नाहीं.' –पेद २१.४२.

रस्ता—पु. १ मार्ग; वाट. २ चाल; वहिवाट; नियम. [फा. रस्ता; तुल० सं. रथ्या; प्रा. रच्छा] (वाप्र. आणि सामाशब्द– वाट शब्दांत) **रस्तेबंदी**–स्त्री. १ सडक तयार करण्याचें काम. २ रस्ता बांधणी; रस्ता–दुरुस्ती. [फा.] **रस्तोरस्तीं**–क्रिवि. प्रत्येक रस्त्यावर; सर्व रस्त्यांतून.

रस्सा—पु. भाजी, कालवण इ० चा आटून राहिलेला रस; रसदार भाजी, कालवण.

रस्सा—पु. मोठी जाड दोरी; दोर; कासरा; दोरखंड. [हिं.] **रस्सी**–स्त्री. दोरी; काढणी. [अर. रसन्. तुल० सं. रश्मि]

रहकारू—पु. राहणें. 'जया नाहीं रहकारू।' –गीता. १२.७९८.

रहगुज(द्)री—वि. १ वाटसरू; फिरस्ता. २ गैर–वतनदार. 'दोन चार दुकानदार रहगुदरी ठेऊन...' –वाडबाबा २.२१६. [फा. राह्=रस्ता+गुझर]

रहदारी—स्त्री. १ माणसांचें जाणें येणें; मालाची ने आण; वर्दळ; जाये; राबता. 'त्याजवरी यंदा नापीक; तशांत लष्करची रहदारी.' –ख ८५०. २ जकात; पट्टी. ३ जकातमाफीचा परवाना; पासपोर्ट. 'इंग्रजास थैली पावतांच रहदारीचें दस्तक रवाना केलें. –ख ७.३७८६. [फा. राह–दारी] **०जकात**–स्त्री. रस्ता वापरण्याबद्दलची पट्टी, कर.

रहवर—पु. वेगवान घोडा. 'मित्ररथीचा जैसा रहवर। बलाढ्य सुंदर तैसेचि।' –ह २.२.३६. [फा. रहवार] **रहवाळ**–न. घोडदळ. 'त्याहून मागें रहवाळ आलें।' –सारुह ७.५४.

रहंवर—पु. पहिल्या प्रतीचा, दर्जाचा रथ; श्रेष्ठ रथ. 'कीं परवांचा सेरु जैसा। रहंवरु मिरवितसे तैसा।' –ज्ञा १.१३९. २ (सामा.) रथ. [सं. रथवर; प्रा. रहवर]

रहवाई—वि. राहणारा 'इब्रामखान गाडदी निजाम अल्ली पाशील रहवाई.' –भाब १२०. [राहणें]

रहवास—पु. १ सहवास; दळणवळण; परिचय. २ रहिवास; राहणें; वस्ती. [सं. रहिवास]

रहसाळी—स्त्री. रहस्य; दृढ मैत्री; एकमेकांशीं वागण्यांतील गोडीगुलाबी आणि प्रेमळपणा. [रहस्य]

रहःस्थान—न. गुप्त जागा; एकांत जागा; खासगी जागा. [सं.]

रहस्य—न. १ गौप्य; गुप्त गोष्ट; खासगी गोष्ट. 'वदले असेंचि नारद केशव मजसी रहस्य हें मागें।' –मोभीष्म १२.३९. २ मैत्री; स्नेह; प्रेम; परस्परांचा सख्यभाव. 'रहस्य राखून रंग मारला।' –ऐपो २५३. ३ विनोद; खेळ; गम्मत; चेष्टा; थट्टा–मस्करी; बागडणें–बोलणें. ४ मुख्य उद्देश; तात्पर्य; महत्त्वाचा मुद्दा; खोंच. 'तुम्ही बोलतां यांतील रहस्य माझे ध्यानांत आलें नाहीं.' ५ राम; गोडी; फायदा; चांगलेपणा. 'सराफीचे व्यवहारांत आतां कांहीं रहस्य राहिलें नाहीं.' **रहस्यांत येणें**–खुलणें; रंगांत येणें. **रहस्यभेद**–पु. गुप्त गोष्ट फोडणें, तिची वाच्यता करणें.

रहा—स्त्री. १ मार्ग; वाट; 'रघुनाथराव यांस सुरतेहून खुस्कीचे रहानें मुबईस रवाना केलें.' –ख ७.३५७०. २ रीत; पद्धत. 'चवघाची रहा जशी असेल तीप्रमाणें तुम्ही चाला.' ३ वागणूक; वर्तन. 'साष्टी घेतल्यावर (मुंबई करांनीं) लिहून पाठविलें कीं पूर्तेकेश घेणार म्हणून आम्ही घेतली! हे रहा कोण?' –ख ७.३५६८. [अर. राह्] **०दार**–पु. १ वाटसरू; वाहतूक करणारा. 'वाणी उदमी वगैरे रहादार यांस लुब्रन वाटा मारितात.' –वाडसमा २.१५५. २ मार्ग–रक्षक. 'मांग, रामोसी व रहादार' –भाअ १८३४. [फा. राहदर्] **०दारी**–रहदारी पहा. **०रास्त**–वि. योग्य; न्याय्य; सरळ; प्रामाणिक, बिनचूक (भाषण; वागणूक). [फा. राह्+रस्त] **०रीत**–स्त्री. चालरीत. 'सांप्रत त्यांची रहा–रीत मराठे लोकांप्रमाणेंच आहे.' –भाजुएगो २७. [राह+रीत]

रहाकळ—स्त्री.न. कावरेंबावरें होणें; राहकळ पहा.

रहाट—पु. १ पाणी ओढण्यासाठीं दोन चाकांचें एक साधन. २ यंत्राचें चाक (पाणी काढण्याच्या, सुतास पीळ देण्याच्या, दोऱ्या वळणाच्या). (सामा.) एखाद्या यंत्राचें चाक. ३ यंत्र. ४ कांड्यावर सूत भरण्याचें साधन. ५ सूत कातण्याचा चरखा. [सं. अरघट्ट; प्रा. अरहट्ट–रहट] **०गाडगें**–न. १ वर गाडग्यांची अगर पोहऱ्यांची माळ असलेलें रहाटाचें मोठें चक्र. २ (ल.) नशीबाचे नेहमीं होणारे फेरफार, चांगली किंवा वाईट परिस्थिति; ऐहिक व्यापार; खालींवर होणें; (प्रपंच, व्यवहार इ० ची). ३ एकसारखी देवघेव, व्यवहार. **०घटिका**–स्त्री. रहाटगाडगें. 'न चुके संसार स्थिति। रहाटघटिका जैसी फिरतचि राहिली।'–तुगा २४८३. **०पाळणा**–पु. यात्रेंत चार पाळणे बांधलेलें फिरतें चक्र उभारतात तें; जत्रेंतील खालींवर फिरणारा पाळणा. **०पट्ट**–स्त्री. (कों.) रहाट तयार करण्यास लागणारीं साधनें (कणा, रवे, खापेकड, लोटे, तुंबे इ०) **०पाणी**–न. (को.) रहाटाचें पाणी; रहाटगाडग्यानें काढिलेलें पाणी; याच्या उलट ओढ्या–विहिरीचें पाणी. 'या एवढे मोठे आगरास रहाटपणी किती म्हणून शिंपाल.' [रहाट+वणी=पाणी] **रहाटागर**–पु.न. रहाटानें पाणी देऊन तयार केलेलें पीक, मळा, शेत. [रहाट+आगर] **रहाटया**–वि. १ रहाट चालविण्यास नेमलेला अगर नेमण्यास लायक मनुष्य; पशु. २ दोन्ही बाजूच्या वतीनें खेळणारा खेळाडू. ३ एकदा एक तर

एकदा दुसरी बाजू घेणारा; दुटप्पी; वेळ येईल तसें वागणारा. ४ (ल.) व्यवस्थापक; प्रमुख. ५ (लग्न इ० समारंभांत) वेतन न घेतां काम करणारा. ६ ओझें वाहून शिवाय वाट दाखविणारा वाटाडया; हमाल व वाटाडया. [रहाट]

रहाटणें—क्रि. १ एखाद्या कामांत अभ्यस्त होणें; रुळणें; काम-धंदा अंगवळणीं पडणें. २ (काव्य) वागणें; वर्तणें. [रहा]

रहाटी—स्त्री. १ आंबे इ०ची निबिड राई; आंबे, बाभळी, सुरमाड इ० कांची जी निबिड राई असत्ये ती; जाळी; दाट झाडी. 'या दाट रहाटीमध्यें' २ किल्ल्याच्या पायथ्याची झाडी (जीमध्यें थोडिशी वस्ती असते अशी).

रहाटी—स्त्री. १ पायरहाट; पायानें चालविण्याचें रहाटगाडगें. २ सूत उकलण्याकरितां ज्यावर प्रथमतः सुत ताणतात ती.

रहाटी—स्त्री. १ पद्धत; रीत; शिरस्ता; पूर्वीपासून चालत आलेला प्रघात. २ (काव्य) वागणूक; वर्तणूक. [राह]

रहाड-डी—स्त्री. १ राड; चिखल. 'कोण तें रहाडीचें सुख। वरतें पाय आरतें मुख।'—तुगा २७९९. २ शिमग्यांत धुळवडीसाठीं केलेली चिखलाची खळी. ३ धुळवडींत खेळणें; धुळवड. ४ चिकचिक; राड (जमीन, रस्ता यावरील). ५ चिकचिक; रेबडी; शेणसडा (नासकें कलिंगड, पाघळलेला गूळ इ० चा). राड पहा.

रहाडण—स्त्री. (व.) खापराचा तवा; परळ. 'कुंभाराकडून रहाडण आण.'

रहाडा-डी—पु. १ रगाडा; गर्दी; गडबड (लग्न, मेजवानी इ०ची). २ (सामा.) गलका; गोंधळ; धामधूम इ० (क्रि० घालणें; पडणें; असणें) [रहाड]

रहाडी—स्त्री. एक बारीक जातीचा कळक; चिवाटी.

रहाण, रहाणें—न. १ (कों.) अंगांत दैवत आणवून बोलविणें, एखाद्याच्या अंगीं पिशाच्चाचा संचार व्हावा म्हणून देवभगत जो वाद्यांचा गजर करतात तें. (क्रि० घालणें; माजवणें). 'केले समंधाचे सायास। राहाणें घातलें बहुवस।'—दा ३.३.४४. २(ल.) एखादा मनुष्य मरूं घातला किंवा मेला असतां होणारी रडारड.

रहाण—न. (ना.) कामाचा ढीग; तुंबलेलें काम.

रहाणें—क्रि. राहणें पहा. [सं. रह्=थांबणें]

रहाणी, रहणी—स्त्री. वागणूक; वर्तणूक; वहिवाट; चाल; पद्धत. 'कथनी पठणी करूनि काय। वांचुनि रहणी वायां जाय।' —तुगा ३६३१. रहणीस लागणें-लावणें अस्स प्रयोग येतो. [फा. राह; म. रहा]

रहार—स्त्री. तुरीची एक जात. —के ४.१२.३६. [हिं. अरहर]

रहासाळी—स्त्री. (कों.) रहसांळी पहा.

रहाळ—स्त्री. १ (समासांत उपयोग) प्रांत; देश; परगणा; जिल्हा. उदा० 'पुणें रहाळ, नाशिक रहाळ, सोलापूर रहाळ इ० २ विवक्षित भाग, हद्द (प्रांताची). 'या रहाळांत अशी चाल नाहीं.' ३ वेटाळें; गांवातील वस्तीचा विशिष्ट भाग; वाडी.

रहाळ-ळी—स्त्री. पु. १ दाट परिचय; सहवास (माणूस, व्यवहार यांशीं). २ घरोबा; निकट स्नेहसंबंध. ३ (क्र.) येणारा-जाणारांची गर्दी, दाटी, वर्दळ. **रहाळणें**—क्रि. १ चांगला परिचित होणें; दाट घरोबा असणें. २ अंगवळणीं पडणें; संवय होणें. [रहाळ] **रहाळसहाळ, रहाळसाळ**—वि. १ खुल्या दिलाचा; मोकळा; मनमिळाऊ. २ (व्यापक.) मनमोकळी; दिलजमाईची; प्रेमळ (भाषा). [रहाळणें+शील] **रहाळी**—स्त्री. रहाटी पहा. **रहाळीस लागणें**—योग्य मार्गास, वाटेस लागणें.

रहित—वि. शिवाय; खेरीज; वर्जित. (समासांत उपयोग). उदा० जलरहित धनरहित; क्रोधरहित. 'विद्यारहित पुरुष शोभत नाहीं' [सं. रह्=सोडणें] **र(हि)हीत**—वि. १ (हिशेबी) बाकी; अवशिष्ट; मागच्या खर्चांत न आलेलें. उदा० रहीत-आढावा-जमाखर्च-बेरीज-रक्कम-तारीख-मिति-व्याज-शिल्लक इ० २ राहिलेलें; शिलकी; अद्याप करावयाचें असलेलें. ३ तहकूब; रद्द असलेलें. [राहणें]

रहिवाल—वि. वेगवान (घोडा); रहवर पहा.

रहिवास—पु. १ राहणें; वस्ती; मुक्काम; निवास; वास्तव्य. 'जिये उदरीं तुझा वास। तेथेंचि माझा रहिवास'—मुआदि १७.१३८. २ घर; निवास; राहण्याचें ठिकाण. 'मीचि घ्राण मीचि वास। मीचि जाण सुवास। मजवेगळा रहिवास। परिमळास असेना।'—एभा १३.३४६. **रहिवासणें**—क्रि. १ वस्ती करणें; मुक्काम करणें; राहणें. २ स्थिर होणें; चिकटणें; रमणें. 'रहिवासले मन पाहूनि स्वरूप।' **रहिवासी**—वि. वसति करून राहणारा; स्थायिक; याच्या उलट उपरी. [रहिवास] **रहिवास चाल**—स्त्री. घोड्याची एक चाल; बसणाराचें अंग हलूं न देतां घोड्यानें जाणें.

रही—स्त्री. १ रांग; ओळ; रव पहा. २ पायाची धूळ. 'वंदिल्या हृषिकेशाच्या रही।'—अफला ५९.

रहु—पु. (कों.) पेरण्यासाठीं भिजवून मोड आणिलेलें धान्य. (प्र.) रोह पहा. [सं. रुह्] **रहुपणी**—स्त्री. (राजा.) हिवाळ्यांत भातास मोड आणून तें भात पेरणें; रोपण.

रहेपट—स्त्री. (ना.) थापटी; थापड.

रहोपहो—पु रोहोपोहो पहा.

रळ—स्त्री. (सामा.) रडी; रट्टी; खेळांत चिडून वाटेल तसें खेळूं लागणें. (क्रि० खाणें; घेणें; खेळणें; जाणें) [रडणें]

रळपळ, रळफळ—स्त्री. १ गोंधळ; गैरव्यवस्था; बेशिस्तपणा; घालमेल (परिस्थिति, काम, वस्तू इ०ची). 'ऐसें कां जालें मजही न कळे। कीर्तनाचे रळेपळे जगीं।'—तुगा १२८९. २ बेचैन; दुःख; अस्वस्थता. ३ जळफळ; भांडण. ५ थट्टा; रळी पहा.

रळी—१ विनोद; थट्टा; मस्करी; कौतुक. 'तूं या विश्वाची अनादि आदी । वैससी जिये सभासदीं । तेथें सोयरीकीचिया संबंधीं । रळी बोलो ' –ज्ञा ११.५४४. २ लडिवाळपणें धरलेला आग्रह; हट्ट. (क्रि० घेणें, चालणें, पुरविंणें, चालविणें) 'आईबाप पोरांची रळी चालवितात.' ३ तंटा; भांडण. 'शालकां हे भली रळी ।' –गीता १.२१८४. ४ व्यंगोक्ति–वक्रोक्त्यादिकें-करून केलेली थट्टा. ५ विटंबना; खोडी. 'विन्मुख जो प्रालब्ध पाहती पांडव द्रौपदीची रळी ।' –होला ११०.

रक्षक—वि. १ रक्षणकर्ता; संरक्षण करणारा. २ (ल.) कृपण; चिक्कू. ३ पहारेकरी; शिपाई. **०गण**–पु. १ रक्षण करणारे हत्यारबंद शिपाई (इं.) बॉडीगार्ड–ऐरापुविवि १८४. २ पहारेकरी; रखवाल्या; राखण्या. 'तुम्ही बाहेर जाऊं लागाल तेव्हां घरास कोणी रक्षकगण ठेवा, मग जा.' [सं.] **रक्षणाईत**–पु. रखवालदार. 'तंव त्या रक्षणाइतीं हटकिलें । तुम्ही कोणाचे कोण वहिले ।' –जै ७६.१७. **रक्षणीय**–वि. रक्षावयास योग्य, जरूर, आवश्यक, पात्र. [सं.] **रक्षणें**–क्रि. सांभाळ करणें; राखणें; जपणें. **रक्षपाळ**–पु. रक्षक. 'तेथ राजे रक्षपाळ सैन्यपती । शैल्यू असें ।' –शिशु १०३७. **रक्ष रक्ष होणें**–अगदीं अगतिक दशा प्राप्त होणें; त्राहि त्राहि भगवान् अशी अवस्था येणें. **रक्षा**–स्त्री. १ राखण; जोपासना. २ सुरक्षितपणा. ३ अभिमंत्रित ताईत, गंडा, (कशाची बाधा होऊं नये म्हणून) मनगटावर बांधतात ती. ४ श्रावणी पौर्णिमेला हातांत बांधावयाची राखी. ५ लाख. ६ प्रसूत स्त्री आणि तिचें मूल यांच्या गळ्यांत इडापीडा टाळण्यासाठीं सहाव्या दिवशीं सटीची पूजा करून तिला वाहून बांधतात तो दोरा. ८ राख; रखेली; ठेवलेली स्त्री.–वि. रक्षण केलेली; रक्षित. 'प्रभुजी रक्षा तुमची दासाची मी लहानशी बटिक ।' [सं. रक्ष] **रक्षापुत्र**–पु. लेकवळा; दासीपुत्र. **रक्षाबंधन**–न. श्रावणी पौर्णिमेस हातांत राखी बांधण्याचा विधी. [सं.] **रक्षावा**–पु. रक्षण. 'जेणें जेणें मागें रिघावा । करील तैसा तैसा रक्षावा ।' –गीता १.६९४. **रक्षित**–वि. राखलेलें; सांभाळ केलेलें; संरक्षित; सुरक्षित. **रक्षोविधि**–पु राक्षस विवाह. 'रक्षोविधी करुनि ने परिणूनि मातें ।' –अक्क २ कृष्णकौतुक २७. **रक्षोहण**–न. रक्षणाच्या मंत्रांचें पठण; स्तोत्रगान. 'द्वारीं करावया रक्षण । केलें रक्षोहण मंत्रींचें ।' –जै ९२.५४. **रक्ष्य**–वि. रक्षणीय. [सं.]

रक्षस—पु. राक्षस. [सं.]

रक्षा—स्त्री राख; भस्म. 'गिरी टाकिती चंड मंडीत वृक्षा । रथांची शतें त्यातळीं होत रक्षा ।' –मुरा युद्ध ११९. [सं.]

राई—स्त्री. १ मोहरी. 'राई राईपण बीजीं ।' –ज्ञा १४. २५६. २ बारीक कण. –वि. क्षुद्र; निरुपयोगी; क्षुल्लक. 'स्वप्रकाशा प्रकाश काई । दृष्टान्त विचार अवघे राई ।' –ज्ञाप्र १०४. 'मायबापाची आण याला राई ।' –राला ४२. [सं. राजिका] (वाप्र.) **राईचा पर्वत करणें**–एखादी हकीकत, बातमी, फुगवून सांगणें; अतिशयोक्ति करणें; पराचा कावळा करणें. सामा-शब्द– **०काई**–वि. बारीक कण, तुकडे तुकडे झालेलें. **०भर**–क्रिवि. अगदीं थोडें. **०भोग**–पु. एक प्रकारचे तांदूळ. (प्र.) रायभोग पहा.

राई—स्त्री. १ बन; दाट झाडी. 'एक वृक्षाची राई होती तींत उतरलों.' –विवि ८.८.१५१. २ रांग. [सं. राजि; प्रा. राइ]

राई—स्त्री. राही; राधा. 'रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ।' –विठ्ठलाची आरती. [सं. राधिका–राही–राई; बं. राय=राजा]

राई—स्त्री. (सोनारी) तांबें. [सं. रक्त, म. रातें]

राउटी—स्त्री. रावटी; तंबूचा एक प्रकार. राहुटी पहा.

राउ(ऊ)त—पु. १ घोडेस्वार. '...भ्रमले धनुच्या परिसोनि राउत रवास ।' –मोविराट ६.२८. २ घोड्याचा खासदार. '...पसंत घोडा मोगलाई सामानासह वक्तशीर कामगिरीचे ठिकाणीं पोंचेल अशा बेतानें राउतावरोबर कारखान्यांतून रवाना करावा.' –ऐरापुप्र ४.२५८. ३ रजपूत. ४ मांगास ही संज्ञा लावतात. ५ (ढोरकाम) वादी. [सं. राजपुत्र] **०वाड**–पु. राजापेक्षां कनिष्ठ दर्जाचा पुरुष. 'रायापासौनि राऊतवाड । हें व्रीद सत्य केलें ।' –शिशु ५१८. [राजवत्] **राउताळी**–स्त्री. (महानु.) शिपाई; दळ; सैन्य. 'राउताळी अफाटे ।' –गस्तो ४४. **राउताळें**–न. (महानु.) सैन्य. 'ते देखौनि राउताळें ।' –शिशु ९६१. **राउतै**–न. १ (महानु.) राऊतपणा; स्वारी. 'जेयांवरी परब्रह्म आमोले–पणें । राउतै करी ।' –शिशु ५०७. २ घोडदौड. 'निघाला राउतै करीतु । असिवारापुढें ।' –शिशु १००२.

राउत—पु अपानवायु. 'येक राउत सोडिती ।' –दा १८. ९.१७.

राउती—स्त्री. चांदीचा डाख देतांना उपयोगांत आणावयाचें मिश्रण. –जनि (पारिभाषिक शब्दयादी) १२. [राई ४ पहा]

राउस—पु. एक मासा. –प्राणिमो ८१.

राउ(ऊ)ळ—पु. १ (महानु.) राजा. 'राउळें नेली सर्व संपत्ती ' । –भाए ७२६. २ (महानु.) श्रीकृष्ण परमात्मा; देव. 'भवमोचकें चरित्र । राउळाचीं ।'–ज्ञाप्र९५२. ३ (महानु.) गोसावी; देव; चक्रधर. 'ऐसीं परीकरें पवित्र । राउळांचीं लिळाचरित्रें ।' –ऋ २५. ४ छोटे रजपूत जातीचे जहागीरदार. ५ श्रीगुरुमहाराज; श्रेष्ठ पुरुष. 'तरी याचिलागीं तुमतें । म्यां राउळासि विनविलें होतें ।' –ज्ञा ५.५. ६ एक जात किंवा तिच्यापैकीं एक व्यक्ति. हे भैरवाचे भक्त असून कोष्टी कामाकरितां लागणारे कुंचले, फण्या

इ० तयार करितात. (नाशिक) वई तयार करणारी जात. –ज्ञानप्रकाश ९.१.३१. ७ बदरीनारायणाचा नंबुद्री ब्राह्मण जातीचा पुजारी. 'बदरीनारायणाची पूजा अद्याप आचार्यांचे लंबेरी म्हणून ब्राह्मण आहेत त्यांजकडेस आहे. त्यांस...राऊळ म्हणतात. –तीप्र ५३. ८ पहाटेस हातांत मोठा त्रिशूळ घेऊन दोहरा म्हणत भीक मागणारा भिकारी. –न. १ घर; राजवाडा. 'आला वसुदेवाचिया राउळा।' –एभा २.३९. २ देऊळ; मंदिर. 'काकडभारतीस ते वेळीं। पुजारी आले राउळांत।' –भवि २.२९. [सं. राजकुल] सामाशब्द– **०गण**–न. (महानु.) राजमंदिर. 'कांइंवो बोलणें रांउळगणांत।'–धवळे पू. ७.२. **राउळार**–न. राऊळ; राजवाडा.

राऊ—पु. १ राजा. २ (सांकेतिक) थोरले बाजीरावसाहेब पेशवे किंवा गादीवर बसलेले बहुतेक सर्व पेशवे. –पया. २९१. **राऊसाहेब**–पु. थोरले बाजीराव साहेब पेशवे; राऊ पहा.

राओ—पु (महानु.) राजा. 'जेथ सर्वज्ञ राओ निरूपिता।' –भाए ३८.

रांक—वि. फार गरीब; रंक पहा. 'नातरि दुर्भक्षी पक्कान्नें। रांकु लाहे।' –ऋ ११. [रंक]

रांक—स्त्री. (तंजा.) दिमाख; अभिमान; मगरूरी.

रांकट—वि. १ शरीरानें बळकट असून नाजुकपणा किंवा बारीक युक्ति इ० गुण अंगीं नसलेला; गलेलठ्ठ; गांवढळ; कणखर व टणक. २ घातपाताविषयीं विचार न करितां अंगधटाईनें एखाद्या कामांत पडणारा (मनुष्य, त्याचें शरीर); साहसबुद्धि; वज्रदेही. [रानट] **रांकटाई**–स्त्री. रांकटपणा; कणखरपणा; टणकपणा; मनाचें धाडस; धिटाई. [रांकट]

राकडला—वि. (व.) अधाशी. 'राकडल्यासारखें त्यानें मोठ्या दगडीभर सातूचें पीठ खाल्लें.'

रांकडु—वि. नीरस; शुष्क; वीट आणणारा. 'आनंदु होअे गोडु। फुन तोही नावेकु रांकडु।' –शिशु १३४. [राकट]

राकणा—पु. (हेट.) गुराखी. [राखणा]

रांकधनी—स्त्री. पूर्णिमेची समाधानी; पूर्णिमेच्या परमानंदकारक प्रकाशाची विपुलता, रेलचेल. 'दारूण संसारु दुःकाळीं। जेणें परमानंदाची रांकधनी केली।' –शिशु ५. [राका+धणी ?]

राकस—पु. राक्षस; भूतपिशाच. 'राकस पिठा कांडती' –मसाप १.२. [सं राक्षस] **०भुकस**–वि. (व.) रानवट; अव्यवस्थित राहणीचा. 'बाया कशातरी राकस भुकस राहतात.'

राका—स्त्री. पूर्णिमा. 'राकाशशी मदनदर्पण भाविला हे।' –नल २७. [सं.]

राकून—पु. अस्वलाकृति, कुत्र्याएवढा मोठा एक मांसाहारी प्राणी. हा उत्तरअमेरिका व उष्ण कटिबंध यांत आढळतो. –प्राणिमो ३०.

राकेल—न. घासलेट; मट्टीचें तेल. हा खनिज पदार्थ पृथ्वीच्या पोटांतील आहे. कांहीं ठिकाणीं याचे झरे आहेत. [इं. रॉक्=खडक+ऑईल=तेल]

राख—स्त्री. भस्म; जळल्यानंतर राहिलेला अवशेष; रक्षा. 'तिसरा खिजमतगार, राख मग चौघांची एकच मौत।' –ऐपो ३२४. [सं. रक्षा] (वाप्र.) **राख सावडणें–टाकणें**–प्रेत जाळल्यानंतर ती राख भरून टाकणें. सामाशब्द– **राखमंडळ**–न. (को.) राखामंडळ; राख पसरलेली जागा. रखमंडळ पहा. **०मीठ**–न. (सोनारी धंदा) मणी वगैरेस चुकून राहिलेल्या छिद्रांतून, भरलेली लाख बाहेर येऊं नये म्हणून राख व मीठ यांचें मिश्रण वाटून लावतात तें. **०रांगोळी**–स्त्री. पूर्ण निर्दळण; नाश; विध्वंस; जाळून पोळून केलेला सत्यानाश (देश, गाव, शेत, कुटुंब, काम यांचा). (क्रि० करणें; होणें) [रांक+रांगोळी] **०रांगोळी करणें**–पूर्ण विध्वंस, नाश करणें. **०वड, राखाडा–डी**–स्त्री. १ राखेची रास, ढीग. २ राख विखुरलेली जागा. ३ (को.) नुसती राख. [राख] **०वडा**–पु. राखुंडी. **राखाड–डी**–स्त्री. राख. **राखाडी**–स्त्री. १ पसरलेली किंवा एकत्र ढीग केलेली सांचलेली राख. २ (को.) (सामा.) राख; रखा. **राखामंडळ**–न. राखमंडळ पहा. **राखुंडा**–पु. राखेचा ढीग; राखेची खळी. –वि. ओठ तुटलेला (मनुष्य). राखोंडें पहा. **राखुंडी**–स्त्री. १ गोवरीच्या राखेचा ढेपसा. २ (ल.) करपून काळा झालेला भात, भाकरी इ० [राखुंडा] **राखोटी**–स्त्री. राख. **राखोंडा**–पु. राखुंडा. **राखों(खो)डा**–वि. राखेप्रमाणें रुक्ष, निकस, भरभरीत (जमीन, बुरूम, पीठ, विशिष्ट चूर्ण) [राख] **राखोंडी**–स्त्री. १ राखुंडी अर्थ १ पहा. २ (ल.) नाश. 'झाली रत्नाची राखोंडी।' –एभा११.५५४. **राखोंडें**–वि. प्र. रावखंडें; जन्मतःच ओठ तुटकें (मूल). 'मुकें बधीर राखोंडें।' –दा ३.६.४१.

राख—स्त्री. रखेली; ठेवलेली स्त्री; उपस्त्री. [सं रक्ष्=राखणें]

राखडी—स्त्री. १ स्त्रियांचा एक वेणींत घालावयाचा अलंकार; केशभूषण. 'मुद, राखडी लेणें वेणीचें। करी शृंगार।' –देवदास भामावर्णन ९९.

राखण—स्त्रीन. (को.) १ राखणें; ठेवणें; रक्षण करणें. २ रक्षक म्हणून ठेवलेला मनुष्य; रखवाली. 'राखण वायसें राहवेना।' –एभा १३.४७४. ३ रक्षकाचें, रखवालदाराचें वेतन. ४ पिशाचादि उपद्रवापासून आपलें रक्षण व्हावें म्हणून ग्रामदेवतेस प्रतिमासीं किंवा प्रतिवर्षी अर्पण केलेला नारळ,बळी. ५ भुतें, उंदीर, टोळ इ०कांच्या उपद्रवापासून मनुष्यें, प्राणी, शेतें इ०कांना मंत्र, तंत्र, मानता इ० उपायांनीं मुक्त करून सुरक्षित ठेवण्याची क्रिया; भूतादिकांचा बंदोबस्त करणें. (क्रि० लावणें; करणें; लागणें). ६ (क.) पूर्ण अभाव होऊं नये म्हणून घरांत राखून ठेवलेलें अल्प-

स्वल्प धान्यादि खाद्य पदार्थांचें परिमाण; घर म्हणून ठेवलेला पदार्थ. 'सगळे दाणे खर्चूं नका, घरांत राखण म्हणून दोन पायली तरी राखून ठेवा.' ७ (माळवाप्रांत) अतिशय कुरूपतेमुळें व अकाळविकाळपणामुळें घराचें व त्यांतील स्त्रियांचें चेटकापासून रक्षण करण्यास समर्थ म्हणून मानलेली स्त्री. –न. ब्राह्मणांत प्रसूतीनंतर तिसऱ्या दिवशीं, सुईण बाळंतिणीच्या खोलींतील एक कोनाडा सारवून, रांगोळी काढून, त्यांत वर गंधाचीं बोटें ओढलेलें व आंत पैसा, सुपारी टाकलेलें जें मडकें ठेवते तें; किंवा बाळंतिणीच्या दहा दिवसांत तिच्या जेवणाच्या वेळीं तिच्या खोलींत, निखारा व त्यावर थोडा भात टाकून ठेवलेलें मडकें. याच मडक्यांत प्रत्येक जेवणाच्या वेळीं असा निखारा व भात टाकतात. [सं. रक्षण] (वाप्र.) **०लागणें**–उपद्रव न होईल असा बंदोबस्त करणें. 'या खिस्तीचे एकदां रुपये भरले म्हणजे चार महिन्यांची राखण लागली.' सामाशब्द– **०करी–दार, राखणा, राखणाई(इ)त, राखणार**–पु. १ रखवालदार; पहारेकरी. २ गुराखी. 'जरी राखणाइत सहपरीवारी।'–विउ ९.७६. 'मालीकाचा मी तो राखणार।'–दावि ४५९. **म्ह०** राखण्यानें गुरें टाकलीं म्हणून धनी टाकील काय? **राखणावळ**–स्त्री. १ गुराख्याची मजुरी, वेतन. २ राखणें; रक्षण करणें; काळजी घेणें. [राखणें] **राखणी**–स्त्री. राखणें; संभाळणें; ठेवणें; बाळगणें इ० [राखणें] **राखणें**–सक्रि. १ रक्षणें; रक्षण करणें; रखवाली करणें; खबरदारी घेणें; अपकारापासून वांचविण्याकरितां आपल्या ताब्यांत घेणें. 'काढूनि राखे प्राणु।'–ज्ञा १६.१४३. २ ठेवणें; उरविणें; पुढच्या काळाकरितां किंवा कांहीं उद्देशानें ठेवून देणें. 'त्या रानांतील गवत यंदा राखलें आहे.' ३ खर्चेल्याशिवाय ठेवणें (सामर्थ्य, जोर). 'जोर–हात राखला.' 'टोला–घाव–मार–राखला.' ४ चोरून ठेवणें; पोटांत किंवा मनांत ठेवणें. 'तुझ्या मनांत असेल तें सारें बोल. कांहीं राखूं नको.' ५ एखाद्या पदार्थावर ओघानें एखादी क्रिया करणें प्राप्त झालें असतां ती न करितां, तो पदार्थ तसाच ठेवणें; आहे त्या स्थितींत राहूं देणें. 'कोनाडयाची जागा तेवढी राख आणि अवघी भिंत सारीव.' ६ करणें; ठेवणें; एखादा पदार्थ स्थित्यंतर न पावूं देतां ठेवणें; बनविणें व कायम करणें. 'ही भिंत फार रुंद राखली म्हणून जागा अडली.' 'हा अंगरखा त्वां आंखूड राखलास म्हणून शोभत नाहीं.' ७ स्त्रीनें पुरुषास किंवा पुरुषानें स्त्रीस उपभोगार्थ बाळगणें, ठेवणें. ८ ठेवणें; धरणें; पाळणें; हेळसांड, अवज्ञा न करणें; एका बाजूस पडूं न देणें. ९ व्यवस्थित, योग्य स्थितींत ठेवणें. १० पालन करणें; न ढळणें (वचन; आज्ञा; प्रतिज्ञा). [सं. रक्षण; रक्ष्; प्रा. रक्ख; पं. रक्खण; सिं. रखणु; हिं. रखना, राखना; गुज. राखवुं; बं. राखिवा; फ्रेंजि. रख; पोर्तुजि. अरखना=रक्षक] **म्ह०** राखील त्याचें घर, खणेल त्याचें शेत. **राखणेकरी**–पु. राखणदार; राखणकरी पहा. **राखण्या**–पु. (राजा.) गुरें राखणारा; गुराखी. **राखले**–स्त्री. हुंडी विकत घेणाराची स्थिति, पेशा, अधिकार, पत दर्शक योजावयाचा शब्द. 'त्या हुंडीमध्यें माझी राखले घातली होती.' [राखणें (गुजराथींतून आलेला शब्द)] **राखवळ**–स्त्री. (प्र.) राखणावळ; राखण्याबद्दल मजूरी, वेतन.

राखणा—पु. पानें खाणारा एक लहान किडा.

राखांदुली—स्त्री. (बायकी) दुहेरी दोरा पिवळा करून घेऊन, त्यांत दोन सोन्याचे मणी आणि हळकुंड व वेखंड यांचे तुकडे बांधून मुलाचें नांव ठेवण्याच्या वेळीं बाळंतिणीच्या गळ्यांत बांधतात तो दोरा. **राखांदुळी**–स्त्री. (कों.) बाळंतीण झाल्यापासून तिसऱ्या किंवा पांचव्या दिवशीं भूतादि बाधा निरसनार्थ बाळंतिणीच्या खोलीच्या दारासीं राखेनें भरून ठेवलेलें भांडें. **राखावळ**–स्त्री. राखणावळ; राखणाऱ्या मनुष्याची मजुरी. **राखी**–स्त्री. पिशाचापासून रक्षण व्हावें म्हणून श्रावण शुद्ध पौर्णिमेस हातांत रेशमाचा, कलाबतूचा अथवा कापसाचा दोरा बांधतात तो; रक्षासूत्र. [राखणें] **राखीपाडवा, राखीप्रतिपदा**–पुस्त्री. राखी पुनवेच्या पुढील दिवस. ब्राह्मणांच्या तीन मोठ्या भिक्षा मागण्याच्या दिवसांपैकीं हा एक आहे. बाकीचे दोन गुढी पाडवा व दिपवाळीचा पाडवा हे होत. **राखीपुनव–पू(पौ)र्णिमा**–स्त्री. श्रावण शुद्ध पौर्णिमा; या दिवशीं राखी बांधतात. **राखील**–स्त्री. (कों.) १ गुरें, शेत इ० राखण्याचें काम. (क्रि० घालणें). २ गुराख्यास गुरें राखण्याबद्दल द्यावयाचें वेतन. –वि. राखलेला; बाळगलेला (रखेली, माकड, कुत्रा, राघू, लढणारा एडका). **राखीव**–वि. राखलेला; राखून ठेवलेला. [राखणें] **राखीव खातें**–न. मध्यवर्ती सरकारानें प्रांतिक सरकाराकडे न सोंपवितां आपल्याकडेच ठेविलेलें खातें; (इं.) रिझर्व्हड डिपार्टमेंट. 'तिसरें राखीव खातें म्हणजे परराष्ट्रीय राजकारण होय.'–वस्व ६६. **राखूळ**–स्त्री. १ गुरें राखणें, वळणें. (क्रि० घालणें). २ गुरें राखण्याची मजूरी. **राखोळ–ळी**–स्त्री. १ राखूळ पहा. २ राखणावळ. **राखोळा**–वि. पाठराखणा पहा. [राखणें] **राखोळी**–स्त्री. गुरचराई; गुरें राखण्याची मजूरी. 'राखोळी द्यावया नाहीं।'–दावि ७६७. [राखणें] **राख्या**–वि. स्त्रीनें ठेविलेला (यार). [राखणें]

राखीसमुख—स्त्रीन. (अशिष्ट) राक्षसांची दिशा; दक्षिण दिशा. –क्रिवि. दक्षिणाभिमुख; दक्षिणेकडे; गंगमोहरा पहा. [सं. राक्षसमुख] **राखेसमोहरा–री**–क्रिवि. दक्षिण दिशेकडे; गंगमोहरा पहा.

राखोळा—पु ओठ तुटका.

राग—पु. १ रंग; वर्ण; छटा. २ रंगविणें; रंग देणें; रंजन. ३ लाली; आरक्तपणा. 'फुल्ल पलाशवनीची होय सखी शोणिताद्रे-

तनु रागें।' –मोकर्ण १५.६. ४ प्रीति; आवड. 'मग राग द्वेष स्वभावें।नाशतील।' –ज्ञा २.३३१. [सं. राग; रंज्]

राग—पु. १ क्रोध; संताप; कोप. २ संस्कृतांत हा शब्द क्रोध किंवा दुःख, आनंद, क्रोध, इच्छा, हेवा इ० मनोविकार सामान्यतः दर्शवितो. [सं.] **म्ह**० राग खाई आपणांस संतोष खाई दुसऱ्यास. **(एखाद्याचा) राग करणें**–ज्यावर आपला राग आहे तो दृष्टीस पडला किंवा त्याची गोष्ट निघाली कीं रागावणें; त्याचा कंटाळा करणें. (**एखाद्याला**) **०आणणें**–एखाद्यास कोपयुक्त करणें; खिजविणें. **०आणणें-धरणें-करणें-येणें**–एखाद्याविषयीं पोटांत राग धरणें. **०गिळणें**–अतिशय राग आला असतां तो प्रयत्नानें आवरून धरणें. **०नाकावर असणें**–लवकर रागास चढणें; लवकर चिडणें. **०मानणें**–एखाद्याबद्दल अढी बाळगणें; नासपंती दर्शविणें; नाखूष होणें. **०येणें, रागें भरणें**–रागावणें. **रागाच्या हातीं जाणें**–कोपवश होणें. **रागाच्या हातीं देणें**–रागाच्या हवालीं करणें; रागाच्या लहरींत सोडून देणें (काम, स्वामित्व, उद्देश) **रागानें लाल होणें**–रागानें संतापणें; अतिशय रागावणें. **रागानें हिरवापिवळा होणें**–क्रोधामुळें अंगाची कांति बदलणें; भयंकर रागावणें. **रागास येणें-भरणें-पेटणें-चढणें**–खवळून रागावणें; चेतणें; तापणें. **रागें भरून घेणें**–स्वतःवर दुसऱ्याचा राग ओढवून घेणें. (**एखाद्याला**) **रागें भरणें**–एखाद्यावर आपला राग काढणें. **रागणें**–सक्रि. रागावणें. **रागावणें**–अक्रि. कोपयुक्त, रुष्ट होणें. [राग] **रागिष्ट, रागीट**–वि. कोपिष्ट, संतापी, तामसी. [राग] **म्ह**० रागिटाची चाकरी तरवारीची धार. **रागी**–वि. १ राग, मनोविकार असणारा (तीव्र, आवेशी, आस्थेवाईक, अनुरत, शीघ्रमनोविकारी, सहृदय, रसिक इ०). २विषयी; आसक्त. ३ शोक असलेला. 'तेथ रागी प्रतिमल्लाचा।'–ज्ञा १८.४९०. [सं. राग] **रागीसांड-डी**–स्त्री. विषयत्याग. **रागीसांडी**–वि. विषयासक्त. **रागेजणें, रागेणें**–अक्रि. (काव्य राजा) १ रागावणें. 'रागेजणें सुदुर्मिळ तेंहि जिचें ज्वालसें गगनिं जावें।'–मोसभा ४.७५. २ रंगयुक्त होणें. रंगणें. 'रागेजली अरुण-कांति विराजवी ते।' –नल ९८. [राग] **रागेला**–वि. रागावलेला. 'रागेला परी सेवक चित्ता। घुसघुसी मिरवतसे।' –नव १४.१८२. [राग]

राग—पु. (संगीत) पांच स्वरांपेक्षां कमी नाहीं असा वादी-संवादी स्वर व आरोह-अवरोह यानीं शोभा आल्यानें जो जनमनरंजनास योग्य होतो असा स्वरसमुदाय. षड्जादि स्वरांची परस्पर जुळणी केल्यानें गायनास योग्य होणारा त्यांचा रचनाविशेष. हल्ली प्रचारांत सुमारें दीडशें राग मानितात त्यांचीं नांवें:– अडाणा, अभिरी, अल्हैया, अहीरभैरव, आसावरी, कानडा, काफी, कामोद, कालिंगडा, कुकुभबिलावल, केदार, कौशी, खट, खमाज, खंबायती, गारा, गुजरी तोडी, गुणकली, गौडमल्हार, गौडसारंग, १ गौरी, २ गौरी, चंद्रकांत, चांदणीकेदार, छायानट, जयजयवंती, जयंत, जयत्कल्याण, जलधरकेदार, जेताश्री, जैमिनीकानडा, जोगिया, जौनपुरी, झिंझूटी, झीलफ, टंकी, तिलककामोद, तिलंग, तोडी, त्रिवणी, दरबारीकानडा, दीपक, दुर्गा (१), दुर्गा(२), देवगांधार, देवगिरीबिलावल, देवसाख, देशकार, देस, देसगौड, देसी, धनाश्री, धानी, नट, नटबिलावल, नटमल्हार, नायकी कानडा, नारायणी, नीलांबरी, पंचडा, पटदीप, पटदीपिका, पटमंजरी (१), पटमंजरी (२), परज, पहाडी, पीलू, पूरिया; पूर्या धनाश्री, पूर्वी, प्रतापवराळी, प्रभात, बंगालभैरव, बडहंस, बरवा, बहादुरीतोडी, बहार, बागेसरी, बिंद्रावनी सारंग, बिभास (१), बिभास (२), बिलावल, बिलाखानी तोडी, बिहाग, बिहागरा, भंखार, भटियार, भीमपलासी, भूपाळी, भैरव, भैरवी, मधुमादसारंग, मलुहाकेदार, मांड, मारवा, मालकौस, मालवी, मालश्री, मालीगौरा, मियांमल्हार, मियांसारंग, मुलतानी, मिरामल्हार, मेघमल्हार, मेघरंजनी, मोटकी, यमनकल्याण, यमनीबिलावल, रागेश्वरी रामकली, रामदासीमल्हार, रेवा, लंकादहनसारंग, लच्छासाग, ललित, ललित पंचम, लाचारीतोडी, वराटी, वसंत, वसंतमुखारी, शंकरा, शहाणा, शिवभैरव, शुक्लबिलावल, शुद्ध कल्याण, शुद्ध मल्हार, शुद्ध सामंत, शुद्ध सारंग, श्याम, श्री, श्रीरंजनी, सपैर्दा बिलावल, साजगिरी, सामंत सारंग, सावनी कल्याण, सावेरी, सिंधभैरवी, सिंधुग; सुघराई, सुहा, सूरदासीमल्हार, सोरट, सोहनी, सौराष्ट्रभैरव, हमीर, हंसकंकणी, हंसध्वनि, हिजेज, हिंदोल, हुसेनी कानडा, हेम. 'श्री, रागोऽथ वसंतश्चभैरवः पंचमस्तथा। मेघरागो बृहनाटो षडेते पुरुषाः स्मृताः।' या संगीतरत्नाकर ग्रंथांतील श्लोकाप्रमाणें श्री, वसंत भैरव, पंचम, मेघ किंवा मेघमल्हार, बृहनाट किंवा नटनारायण असे सहा पुरुष राग आहेत (मोल्स्वर्थ कोशांत वरील श्लोक संगीतरत्नाकरांत असल्याबद्दल उल्लेख आहे परंतु उपलब्ध संगीतरत्नाकर ग्रंथांत हा श्लोक आढळत नाहीं). काव्यांत व पुराणांत यांवर चेतनधर्माचा आरोप केला असून प्रत्येकाला रागिणीनामक सहा (कांहींच्या मतें पांच) स्त्रीरूपें मानिलीं आहेत. सामाशब्द– **०माला-ळा, माली(ळि)का**–स्त्री. १ गीताचा एक प्रकार; स्वरांची किंवा अनेक रागभेदांची मालिका; निरनिराळ्या रागांत म्हणतां येण्यासारखें गीत. २ किल्ली दिली असतां अनेक रागांचे सुर ज्यामधून निघतात असें यंत्र; पियानोफोर्टे नामक वाद्यासहि म्हणतात. [सं. राग+माला] **०मालेचीं चित्रें**–नअध. राग गाइले जात असतां त्यांचा प्रभाव काय दिसतो हें ज्या चित्रांवरून दिसतें तीं चित्रें उदा० मेघमल्हार हा राग घेतला तर मोर हर्षभरित होऊन आपला रमणीय पिसारा उभारतो. इ०. –पेशवेकालीन महाराष्ट्र १६१. **०रंग**–पु. १ गाणें व खेळणें; खेळ, मौज व ख्यालीखुशाली.

२ लक्षणें व चिन्हें; साधारण स्वरूप, सुमार (कामांचा, गोष्टीचा). ३ संभव; पूर्वसूचना; बॅरॉमीटर स्वरूप. 'पावसाचा रागरंग पहा, तसे निघा.' [राग+रंग] **०वाचक तान**–स्त्री. (संगीत) ज्या रागामध्यें तान घ्यावयाची असेल त्या रागाच्या जीवभूत स्वरांची तान. **०संकर**–पु. गातांना एका रागांत दुसऱ्या रागांतील स्वर मिश्रित करून गाणें. [सं.] **०ज्ञान**–न. रागांचें, स्वरांचें किंवा गीतांचें ज्ञान. [सं.] **रागांग राग**–पु. (राग) शुद्ध शास्त्रीय राग. त्याच्या लक्षणांत सांगितल्याप्रमाणेंच हा गाइला पाहिजे असा कडक नियम आहे. [सं.] **रागालप्ति**–स्त्री. (प्रबंध) वर्ण, अलंकार, गमक, स्थाय, त्यांच्या साहाय्यानें रागाचें पूर्ण स्वरूप दृष्टीस पाडणें व त्यांत रागाचे आविर्भाव व तिरोभाव दाखविणें. [सं.] **रागालाप**–पु. (प्रबंध) ग्रह, अंश, न्यास, मन्द्र, तार, अपन्यास, अल्पत्व, बहुत्व, षाडवत्व, औडुवत्व, ह्या रागाच्या विशेषांचें प्रकाशन ज्यांत होतें अशी स्वररचना. [सं.] **रागिणी**–स्त्री. १ मिश्र किंवा पोट राग; मंजुल स्वर असलेला गायनांतील राग. प्रत्येक रागास रागिणी सहा अथवा पांच मानिलेल्या आहेत. पुराणांत रागिणी ही रागाची स्त्री असें मानिलें आहे. राग पहा. कांहीं ग्रंथकार रागांचें वर्गीकरण पुरुषराग, भार्याराग, पुत्ररराग, स्नुषाराग असें करितात त्यावेळीं कांहीं रागांस भार्याराग म्हणतात. तेव्हां त्यांस रागिणी म्हणून संबोधितात. वस्तुतः राग, रागिणी ह्यांमधील भेद कोणत्याहि ग्रंथकारानें स्पष्ट सांगितला नाहीं. २ विलासिनी, अनुरक्त स्त्री. [सं. राग] **रागेश्वरी**–स्त्री. एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ व पंचम वर्ज्य. अवरोहांत पंचम वर्ज्य. जाति औडुव-षाडव. वादी मध्यम, संवादी षड्ज. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर.

रांग—स्त्री. १ पंक्ति; ओळ; हार; आवली; श्रेणी. २ बरोबरी; समान दर्जा. 'लोकपाळ रांगेचे। राउत जिये पदवीचे।' ज्ञा ९.३२६. ३ (व.) गंजी, ढीग. –वसाप ८.५१.२४५. ४ दोन्ही बाजूंस असलेली उतरती कडा किंवा ओळ. उदाहरणार्थ, दोन्ही बाजूस उतार असून मध्यें उंचवटा असलेल्या बांधावरून जाणारा मार्ग; एका बाजूस डोंगर व दुसऱ्या बाजूस खोल कडा तुटलेला अशी डोंगरांतील अरुंद वाट, धक्क्याच्या लांबीचा पृष्ठभाग. [सं. राजि; इं. रँक ?]

रांगडा—पु. १ गुजराथ व मेवाड यांमधील एका देशाचें नांव व त्या देशांतील व्यक्ति. –वि. १ अडाणी; रीतभात ठाऊक नसलेला. २ रांगडा देशांतील (मनुष्य, भाषा इ०) इसम) [हिं. रान्गडा]

रांगण—न. कुंभाराच्या भट्टींतली राख.

रागणा—पु एक मासा. –प्राणिमो ८१.

रांगणी—स्त्री. (कों.) मोठी, रुंद, रेखांकित व किंचित् गोल अशी शिंप. हातावर गंधाचा लेप करून त्यावर रेघा उमटविण्याकरितां हिचा पुष्कळ उपयोग करितात.

रांगणें—अक्रि. हात व गुडघे टेकून पुढें जाणें, सरपटणें. [सं. रिंगण=अडखळणें]

रागबा(वा)गा—स्त्री. घोड्यास चाल शिकविण्यासाठीं त्यास बांधलेली दोरी. 'पुढें राखे नेहटूनि रागबागा।'–एभा २०.२१६.

रांगसारांगुस—स्त्री. (राजा.) एखादें ठिकाण नाखुषीनें सोडून जातांना त्या जागेभोंवतीं रेंगाळणें; घोटाळणें. [रांगणें]

रांगा—पु. स्थिर किंवा शांत समुद्राची पट्टी.

रागा(घा)वळी-ली—स्त्री. घोड्याच्या पाठीवर घालावयाची जाळीदार झूल. 'घोडिया बाणली मोहाळी। कंगण टोप रागावळी।'–एरुस्व ८.१५.

रागी—स्त्री. एक धान्य; नाचणा; नाचणी. [सं.]

रागोळ—न. (माण.) खळ्यांतील कणसें गोळा करण्याचें लांकडी हत्यार.

रांगोळी, रांगवळी—स्त्री. १ देवापुढें, मेजवानींत इ० प्रसंगीं चित्रें, निरनिराळ्या आकृती काढण्याकरितां तयार केलेली शिरगोळ्याची, तांदुळाची किंवा दुसऱ्या वस्तूची भुकटी; पूड. 'तिआ रांगवळीं सूतीं राणियां। चक्रवर्तीचिआं।'–शिशु ५९१. २ वरील भुकटीनें काढलेली रेघ, आकृति, चित्र वेल इ० [सं. रंज्=रंग देणें; रंगवल्ली; रंग+ओळ] (वाप्र.) **०करणें**–(ल.) सत्यनाश करणें; विध्वंस करणें; ठार मारणें. 'टेंचून करी रांगोळी।'–संग्राम ११. **०होणें**–समूळ नाश होणें. 'ऐसें साहस करितां होईल तनुची पळांत रांगोळी।'–मो विराट ४.३३. **रांगोळें**–न. बारीक भोकें पाडलेली, तांबें इ० धातूची नळी. हींत रांगोळी भरून ही जमिनीवर ओढली असतां चित्रविचित्र आकृति उमटतात. (ना.) रांगोळणें.

राघ—न. मोठें पाप; महापातक. [सं.]

राघव—पु. १ रघूच्या वंशांत जन्मलेला, विशेषतः श्रीरामचंद्र. २ एक अवाढव्य व काल्पनिक मासा. (राघव आणि तिमिंगल हे दोघे भूगोलाभोवतीं एकमेकांचा पाठलाग करीत असून जेव्हां त्यांची गांठ पडेल तेव्हां पृथ्वीची वरील बाजू खालीं व खालची वर अशी ती फिरली जाऊन ग्रस्त होईल. अशी समजूत आहे). [सं.] **०दास लाडू**–पु. रवा, साखर व खवा यांचा केलेला लाडू; यास चुरमा अथवा राधाविलास असेंहि म्हणतात. **०मासा**–पु. देवमासा. 'जळीं राघवमाशास अडविलें असंख्य झिंग्यांनीं।'–ऐपो ४०३.

रांघळणें—सक्रि. फरपटत नेणें. रंघळणें अर्थ १ पहा.

राघावळ—स्त्री. १ निळीची एक जात. २ तांबडया रंगाच्या लुगडयाची एक जात. **राघावळी**–वि. राघावळ नांवाच्या निळीसंबंधी; तिनें रंगविलेलें (वस्त्र).

राघू—पु. (विणकाम) गातडीच्या मध्यभागीं असलेली एक जाड लांकडी खुंटी. हिच्यांतून दोर इकडून तिकडे फिरतात

राघू-घो—पु. १ शुक; पोपट. २ (ल.) हदग्याच्या फुलांतील हिरवे तंतू. ३ (लावणी इ० मध्यें ल.) प्रियकर; दोस्त (वाप्र.) **०पढविणें**–पोपटास बोलावयास शिकविणें.

राघोडा—पु. कर्जाऊ घेतलेल्या रकमेवर व्याज म्हणून हंगामावर देऊं केलेलें धान्य इ० किंवा पैसा; अशा रीतीनें पैसा देण्याघेण्याची चाल; काढा. 'सावकाराचे दाहा रुपये म्यां बाजरी राघोडा कबूल करून घेतले आहेत.'

रांच—स्त्री. (गो.) सैन्यांतील सर्व शिपायांनीं एकत्र जेवण करण्याची पद्धत. –सह्याद्रीच्या पायथ्याशीं १६२. [पोर्तु.]

राज—पु. (व. ना.) गवंडी; बेलदार; चुन्याचें काम करणारा

राज, राज्य—न.(ना.) (खेळांत) एखाद्या खेळाडूवर अथवा एखाद्या पक्षावर आलेला डाव. [सं. राज्य] **०देणें**–डाव देणें. **०येणें**–खेळांत डाव येणें; हार येणें.

रांज—स्त्री. (कु.) १ झऱ्यांनीं बनलेला पाण्याचा डोह. २ (कु.) समुद्रास मिळणारा ओढयाचा भाग.

राजगिरा—पु. एक प्रकारचें तृणधान्य व त्याचें झाड. हें झाड तांबडया माठासारखें असतें. पान लांबट, पण रंग फार तांबडा नसतो. हें कंबरेइतकें वाढतें; ह्याला तांबडया मखमलीसारखीं फुलें येतात. ह्याच्या बियास राजगिरा म्हणतात. ह्याचा रंग पांढरा, क्वचित् काळाहि असतो. पाल्याची भाजी होते व बीं उपोषणास खातात. [सं. राजगिरी]

रा(रां)जण-णी—स्त्री. बकुळीच्या जातींतील एक झाड. फळ बकुळासारखेंच पण पिवळया रंगाचें असुन गोड असतें. हीं झाडें गुजराथेंत फार आढळतात. [सं. राजादन]

रांज(झ)ण—पु. मातीचें, धातूचें–पाणी सांठविण्याचें मोठें भांडें; डेरा. 'पाहुणा देखतां आंगणीं। म्हणे उदक नाहीं रांजणीं।' –कथा ५.२. [दे.] **रांज(झ)णी**–स्त्री. १ लहान रांजण. २ (कों.) रोजच्या खर्चाकरितां रोज काढलेले तांदूळ ठेवावयाचें भांडें. [रांजण]

रांज(झ)णवा(व)डी—स्त्री. डोळयाच्या पापणीला होणारा फोड; अंजिणी; आंजरली. 'नेत्रीं होती रांजणवाडिया।' –दा ३.६.४९.

राजणी—स्त्री. (ना.) विहीर खोदल्यावर ज्या जागेपासून ती वर बांधीत आणतात तो भाग; विहिरीचा बांधकामाचा तळ, पाया.

राजणें—अक्रि. (काव्य) शोभणें; प्रकाशणें. 'राजवक्त्र राजलीं।' –वेसीस्व ७.४०. [सं. राज्]

राजन्य—पु क्षत्रिय. [सं.]

राजपीण—स्त्री. (कु.) स्वयंपाकीण. [रांधपीण]

राजस—वि. १ रजोगुणप्रधान; रजोगुणसंबंधी. 'हें नेणेचि राजसें। सुखें जो गा।' –ज्ञा १३.७४२. २ रागीट; विषयी;लोभी इ०. रजोगुण व गुण पहा. [सं. रजस्] **राजसी**–वि. रजोगुण युक्त; रागीट; राजस पहा. [सं. राजस]

राजस सो—वि. १ (काव्य) सुकुमार व देखणा; सुरेख; सुंदर. 'हे राजस बाळे। किती करशील चाळे।' 'परमसकुमार राजसी।' २ शृंगारिक नायक. [राजा+सा] **राजसवाणा**–वि. राजस; सुंदर; सुकुमार आणि देखणा. **०राजसी**–वि. राजकीय थाटाचें; बादशाही; उमदा; भव्य; खासा; नामी (मनुष्य, कृत्य, वस्तु). [राजस; राजा+सा] **राजसी उपचार**–पु. रोग घालविण्याचा राजस (मृदु, सौम्य, सुखावह) उपचार.

राजा—पु १ नृप; नृपति; भूपाल; नरेंद्र; छत्रपति; लहान राज्यें व थोडक्या प्रजा असलेले संस्थानिक व सरदार यांसहि हा शब्द लागतो. २ (मंडळीचा, टोळीचा) नायक; मुख्य. ३ सजातीय पदार्थसमुच्चयांत श्रेष्ठ मानलेला तो. ४ अन्न, वस्त्र इ० पदार्थ यथास्थित असल्यामुळें ते मिळविण्याचे कष्ट किंवा काळजी ज्यास करावी लागत नाहीं असा मनुष्य. ५ गंजिफांच्या बाजूंतील मुख्य. पत्त्यांतील एक चित्राचें पान. ६ बुद्धिबळाच्या खेळांत डावांतील मुख्य मोहरा. ७ वर्षाचा शास्ता म्हणून मानलेला ग्रह; वर्षेशग्रह. ८ (ल.) वेडा; मूर्ख; स्वेच्छ वर्तन करणारा मनुष्य. ९ कसरीच्या राणीस म्हणतात. (सगासांत) राजपत्नी; राजपुत्र; राजकन्या; राजगुरु; राजपुरोहित; राजोपाध्याय; राजसभा इ० ह्याचे मराठी शब्दांशींहि समास झाले आहेत. जसें– राजपसंत; राजदरबार इ०. राजपद उत्तरपदीं येणारे नायक या अर्थाचे कांहीं सामासिक शब्द– मृगराज=मृगश्रेष्ठ; तीर्थराज=तीर्थांपैकीं मुख्य, सागर किंवा प्रयाग; तसेंच गजराज; सर्पराज; अश्वराज; द्विजराज; देवराज; कविराज; वैद्यराज; पंडितराज; स्वामिराज; गणराज; भूतराज; यक्षराज; वनराज (आपटा किंवा शमी), वृक्षराज. राजपद पूर्वपदीं असलेले कांहीं सामासिकशब्द– राजकांति; राजशोभा; राजकृपा; राजचित्त; राजमित्र; राजप्रिय; राजाश्रय; राजाश्रित; राजबुद्धि; राजसखा; राजरंग; राजमहाल; राजवटी इ०. [सं राज्=प्रकाशणें] (वाप्र.) **राजापासून रंकापर्यंत**–श्रीमंतापासुन तों गरीबापर्यंत; सर्व दर्जाच्या लोकांत. 'ब्राह्मणाला राजापासुन रंकापर्यंत मान मिळत असे.' राजा यांचें राज असें रूप होऊन झालेले कांहीं सामासशब्द– **०अंबीर**–पु १ (शृंगारिक काव्य) गंभीर स्वभावाचा,

सभ्य नायक. –वि.बादशाही; भव्य; नामी; उत्कृष्ट (मनुष्य, देश, पोषाख, बोलण्याची ढब, कोणतीहि गोष्ट). [सं. राजा+अर. अमीर] **०आवळी**–स्त्री. आवळीचा एक प्रकार. या झाडास फळें लहान येतात. हींसच हरपरेरवडी, रानआवळी असेंहि म्हणतात. **०कडी**–स्त्री. विशिष्ट प्रकारची कानांतील कडी; एक कर्णभूषण. **०कवि**–पु. दरबारी कवि. [सं.] **०काज-कारभार**–नपु. राज्यकारभार; राज्यासंबंधीं सर्व प्रकारचें काम. **०कारण**–१ राज्यासंबंधीं मसलत; खोल व गूढ मसलत, कल्पना. 'राजकारण बहुत करावें।' –दा ११.५.१९. २ गुप्त निमित्त, गूढ (एखाद्या गोष्टीचें). 'भितीस किती सारवलें, लिपिलें तरी चीर पडते यांचें राजकारण कांहीं समजत नाहीं.' ३ शासनसंस्थेसंबंधीं गोष्टी; राजनीति; (इं.) पॉलिटिक्स. 'बिझांटबाई तरुण मुलांनीं राजकारणांत पडूं नये असें सांगतात.' –केले १.१९. **०कारणी**–वि. खोल मसलत करणारा; मुत्सद्दी. **०कारभार**–पु. राज्यव्यवस्था. **०कारस्थान**–न. राजकीय मसलत, कल्पना, बेत, चतुराई; राज्याची मसलत. **०कार्य**–न. १ राजकीय कर्तव्यें, काम; राज्याचीं कामें. २ राजाचें काम. ३ राजाचें शासन, कायदा, कृत्य. [सं.] **०किंकर**–पु. राजाचा चाकर; सरकारी नोकर, शिपाई, जासुद इ० [सं.] **०किशोर**–पु. राजाचा मुलगा. [सं.] **राजकी**–पु. राजाचा नोकर. 'राजकी म्हणती आमुचें घर।'–दा १.१०.४६. –वि. राजापासून उत्पन्न होणारी; राजाच्या संबंधाची (सत्ता, जुलूम, कृत्यें). याच्या उलट देवकी. 'दुसऱ्या राज्यांत गेल्यानें राजकी उपद्रव टाळायास येईल पण देवकी उपद्रवापुढें उपाय चालत नाहीं.' [राजीक] **राजकीय**–वि. राजासंबंधीं; राजाचा; राजविषयक (व्यवहार, कारभार, मनुष्य इ०) [सं.] **०कीय कैदी**–पु. राजद्रोहामुळें तुरुंगांत कैद केलेला राजकारणी पुरुष; सरकारविरुद्ध अराजकता माजविणारा म्हणून कैद केलेला मनुष्य. **०कीय बंदी**–पु, सरकारी कैदेंत अडकलेला कैदी; राजद्रोही बंदिवान. **०कीय व्यवहार**–पु. १ राज्याचें काम. २ राजनीति. [सं.] **०कीय सभा**–स्त्री. राजकारणासंबंधीं सभा; (इं.) पोलिटिकल मीटिंग. 'क्वचित एखादा सरकारी नोकर आपल्या मुलांना राजकीय सभांना जाण्यास प्रतिबंध करतो.' –केले १.२३३. [सं.] **०कुमर-कुंवर-री-कुमारी**–स्त्री. राजाची कन्या. [प्रा.] **०कुमार-कुंवर**–पु. १ राजाचा मुलगा; राजपुत्र. २ पुनर्वसु नक्षत्र. [सं.] **०कुल**–न. राजघराणें; राजवंश. [सं.] **०केळ-ळी-ळें**–स्त्रीन. केळीची एक जात व तिचें फळ. **०क्रांत-क्रांती**–स्त्रीन. १ राज्याची उलथापालथ; राज्यव्यवस्थेंत मोठी उलाढाल, खलबळ, बदल. २ युद्ध, शत्रूचें आक्रमण इत्यादीमुळें माजलेली गडबड, गोंधळ, वगैरे नासधूस. ३ राजाचा जुलूम, अन्याय. [सं.] **०गादी**–स्त्री. राजाची गादी; सिंहासन. **०गुह्य**–न. राजाचें किंवा राज्यासंबंधीं गुपित, गुढ; गुप्त गोष्ट. **०गोंड**–स्त्री. (शहराचा, गांवचा) मोठा रस्ता. **०गोंड**–पु. गोंडांतील एक श्रेष्ठ जात. **०गोंडा**–पु. पालखीच्या दांडीला मध्यभागीं लोंबता बांधलेला, हातांत धरावयाचा गोंडा. **०घोस**–स्त्री. एक वेल. हिच्या पानांच्या काढयाचा देवी इ० आजारांत उपयोग करितात. **०घोळ**–स्त्री. घोळ नामक भाजीची एक जात. **०चिन्ह**–न. १ राजेपणाचें चिन्ह; राजाचें छत्र, चामर इ० वैभव. २ (सामुद्रिक) नशीबीं सिंहासनावर बसण्याचा योग आहे असें दाखविणारी खूण, लक्षणविशेष किंवा विशेष गोष्ट (आजानुबाहुत्व इ०) ३ राजाची मोहोर, शिक्का, किंवा सही (नांवें, पत्र इ०कांवरील). ४ (राजाच्या सह्या अस्पष्ट, वाचण्यास कठिण असतात यावरून ल.) फरपटयांचें, बिरखुडी, वाईट लपेटीचें, दुर्बोध अक्षर. [सं.] **०टिटवी**–स्त्री. पिवळसर रंगाची टिटवी. **०तिलक**–पु. १ राजांमध्यें श्रेष्ठ; सार्वभौम राजा. २ राजटिळा. ३ राज्याभिषेक. [सं. राजा+तिलक] **०तुरा**–पु. एक फुलझाड व त्याचें फूल. **०तेज**–न. राजाचें तेज, वैभव, ऐश्वर्य. [सं.] **०तख्त**–न. १ राजाचें सिंहासन. २ राजधानी. 'किल्ला रायगड राजतख्त.' –चित्रगुप्त १६७. **०त्व**–न. राजेपणा; राजाधिकार; राजपद. [सं.] **०दंड**–पु. १ राजानें केलेली शिक्षा. २ राजानें बसविलेला दंड. ३ जातिबहिष्कृत केलेल्या मनुष्यास जातींत परत घेतांना त्यानें राजास द्यावयाचा दंड. ४ राजाच्या हातांतील अधिकारदर्शक काठी. **०दंत**–पु. चौकडीचे दांत; पदार्थ तोडावयाचे दांत; पुढील दांत. [सं.] **०दरबार**–१ राजाची कचेरी; न्यायसभा. २ प्रजेचीं गाऱ्हाणीं ऐकण्याकरितां बसावयाची राजाची जागा. **०दरबारी**–वि. राज्यासंबंधी. **०दर्शन**–न. राजाचें दर्शन; राजाची भेट. 'राजदर्शन म्हणजे मोठा लाभ.' [सं.] **०दुहिता**–स्त्री. राजाची मुलगी. 'वर शिशुपाळ ऐकतां। दचकली ते राजदुहिता।' –एरुस्व २.४१. [सं.] **०दूत**–पु. राजाचा नोकर, हुजऱ्या, सेवक; जासुद. [सं.] **०द्रोह**–पु. १ सरकाराबद्दल अप्रीति; राजाविरुद्ध कट, बंड; फितुरी. २ राज्य व राजसत्ता याविरुद्ध गुन्हा. ३ (कायदा) बादशाहाविरुद्ध किंवा ब्रिटिश अमलाविरुद्ध द्वेष, तिरस्कार किंवा बेदिली बोललेल्या किंवा लिहिलेल्या शब्दांनीं किंवा खुणानीं किंवा इतर रीतीनीं उत्पन्न करणें; (इं.) सिडिशन्. **०द्वार**–न. १ न्यायाच्या कचेरीचा राजवाडा; राजदरबार. २ राजवाडयाचा दरवाजा. [सं.] **०धन**–न. राजाचा महसूल, उत्पन्न. [सं.] **०धर्म**–पु. १ राज्यकारभार चालविण्याकरितां मार्गदर्शक असा शास्त्रांत सांगितलेला कायदा, अनुशासन. २ राजास योग्य किंवा शोभणारा गुण, राजगुण. कार्योपदेशकौशल्य, प्रागल्भ्य इ०). 'जे राजधर्म सुरतरू सख मखसे सुखद उत्सवद नार्की।'–मोसभा १.१५. ३ राजाचें कर्तव्य

विशेष काम. [सं.] ०धातु–पु. कित्येक कवींनीं लोखंडास हें नांव दिलें आहे. ०धानी–नगरी–स्त्री. राजाचें राहण्याचें मुख्य शहर. [सं.] ०धान्य–न. एक धान्य; सांवा. [सं.] ०धारी–पु. एक प्रकारचा तमाशा. –कलावंतखातें (बडोदें) १३८. ०निष्ठ–स्त्री. राजाविषयीं, सरकाराविषयीं आदर दाखविणारा. ०निष्ठा–स्त्री. राजासंबंधीं, सरकारसंबंधीं आदर, पूज्यबुद्धि. ' राज्यपद्धतीतील दोष अधिकाऱ्यांच्या नजरेस आणणें हीच खरी राजनिष्ठा. ' –टिसु २१५. [सं.] ०नीति–स्त्री. १ राजव्यवहारशास्त्र. आन्वीक्षिकी किंवा तर्कविद्या, त्रयी किंवा धर्म विद्या, वार्ता किंवा अर्थविद्या व दंडनीति असे चार राजनीतीचे भेद आहेत. २ नीति; नीतिशास्त्र. [सं.] ०नील–नीळ–न नीलमणी. [सं.] पंचक–न. ज्यांत राजापासुन जुलूम किंवा नासधूस होते असा ज्योतिषीय गणितानें येणारा काल. अग्निपंचक, चौरपंचक, मृत्युपंचक, हानिपंचक इ० पहा. [सं.] ०पट्ट–पु. राजाचा शिरताज; राजाचें ललाटपट्ट. [सं.] ०पत्नी–स्त्री. राजाची स्त्री; राणी. [सं.] ०पत्र–न. राजाचें पत्र; देणगीपत्र, सनद. ' ब्राह्मण स्थापिले वृत्तिक्षेत्रीं। ते ते अक्षर्यी राजपत्रीं। ' –मुसभा ६.५६. [सं.] ०पद–न. राजाचा अधिकार, दर्जा; राजत्व. ०पद्धति–त–स्त्री. राजास योग्य अशी रीति, चाल, वहिवाट. [सं.] ०पसंत–द–वि. राजे व अमीर उमराव यांस मान्य असणारा; सर्वोत्कृष्ट; उंची; खासा; नामी. [सं. राजा+ फा. पसन्द] ०पिंडा–पु. देखणा व छबीदार मनुष्य; राजबिंडा. [सं. राजा+पिंड] ०पीठ–न. १ राजाचें आसन; राजाचें सिंहासन. २ राजधानीचें शहर. [सं.] ०पीढी–पु. (महानु.) राजपुरुष. ' स्वमदें पातले राजपीढी। ' –गस्तो ४३. [राजा+पिढी] ०पुत्र–पु. १ राजाचा मुलगा. २ क्षत्रिय. [सं.] ०पुरी–स्त्री. बादशाही शहर; राजधानी. [सं.] ०पुरुष–पु. १ सरकारी अधिकारी, नोकर. २ राजाच्या चाकरींतील कोणीहि लहानमोठा मनुष्य. [स.] ०बंदी–पु राजकैदी; राजकीय गुन्हेगार, बंदिवान. ०बनसी–वि. राजवंशाचा. हा हिंदुस्थानी शब्द मराठी लावण्यांतून नेहमीं येतो. [राजवशी; हिं. राजबनसी] ०बाबती–स्त्री. राजास द्यावयाचा वसुलाचा चौथा भाग. चौथ पहा. ०बिंडा–वि. अतिशय सुंदर व नाजुक पुरुषास म्हणतात; राजासारखा अथवा अत्यंत देखणा, सुंदर आणि तेजस्वी (मनुष्य). [राजा+पिंड] ०बिदी–स्त्री. राजमार्ग. ' इंद्रियग्रामींचा राजबिदीं। ' –ज्ञा ७.१०६. ०बीज–वि. १ राजाच्या बीजाचा, वंशाचा. २(ल.) सुस्वभावी व सुंदर मुलास म्हणतात. ०बीध–स्त्री. (शहराचा) मुख्य; मोठा रस्ता; राजविदी. ०बेत–(को.) राजदंड. [राजबेत्र] ०भाग–पु. राजाचा भाग; सरकारास द्यावयाचा कोणत्याहि उत्पन्नाचा भाग. [सं.] ०भार्या–भाजा–स्त्री. राजाची पत्नी; पट्टाभिषिक्त राणी. ' येरु बोले पाहीन पिता माझा। नको जाऊं मारील राजभाजा। ' –ध्रुवाख्यान ४ (नवनीत पृ. ४११).[सं.] ०भोग–पु. सरकारचा हक्क. [सं.] ०भ्रष्ट–वि. राज्यावरून निघालेला. ०मंडल–ळ–न. १ राजांचा समुदाय. २ राजकीय मंडल; राजभृत्य; राजपुरुष; बादशाहा भोंवतालचे अमीरउमराव इ० [सं.] ०मंत्र–पु. राजाचा बेत, उद्देश. [सं.] ०मद–पु. राज्याचा गर्व, दर्प. [सं.] ०मंदिर–न. १ सौध; राजवाडा. २ (लावणी, शृंगारविषयक काव्य इ० कांत) विलासमंदिर; रंगमहाल; अंतःपुर इ० [सं.] ०महाल–पु. राजवाडा. ०मान्य–वि. १ राजानें मान देण्यास योग्य; पूज्य; श्रेष्ठ; वरिष्ठ; २ ज्याला पत्र पाठवावयाचें असतें किंवा ज्याचा उल्लेख करावयाचा असतो त्याला सन्मानार्थ कागदोपत्रीं हें विशेषण लावतात. ३ सर्वांस पसंत पडेल असें. ' हा एक राजमान्य उपाय आहे. ' [सं.] ०मार्ग–पु. १ राजाचा हमरस्ता; सार्वजनिक रस्ता. २ (ल.) सर्व लोकांनीं मान्य व पसंत केलेली चाल, वहिवाट, रहाटी. [सं.] ०माष–पु. एक कडधान्य. [सं.] ०मुद्रा–स्त्री. १ राजाची मोहोर; तिचा शिक्का; ठसा. २ राजाच्या छापाचें नाणें. [सं.] ०मोहरा–मोहोरा–वि. १ शहाणा; शूर किंवा विद्वान् (मनुष्य); विद्या, शौर्य इ० गुणांनीं प्रसिद्ध असलेला, तेजस्वी (पुरुष). ' या राज्यांत नानाफडनवीस एक राजमोहरा होता. ' २ देखणा व छबीदार (मनुष्य); राजबिंडा. ०यश–न. राजाचें, राज्याचें यश; कीर्ति. ' राजयश वर्णितां वर्णितां भाट शिणले। ' [सं.] ०यक्ष्मा–पु. क्षयरोगाचा एक भेद; कफक्षय. [सं.] ०योग–पु. १ हठयोगाहून भिन्न असा योगाचा साधा व सोपा प्रकार; प्राणनिरोध इ० न करितां अंतःकरण एकाग्र करून भगवत्स्वरूपीं लावण्याचा उपाय. ' राजयोगतुरंगीं। आरूढला। '–ज्ञा १८.१०४७. २ राज्य मिळवून देणारा पत्रिकेंतला ग्रहयोग. ३ श्रेष्ठ, सर्वोत्कृष्ट योग; प्रापंचिक वैभव व संपत्ति हीं उपभोगीत असतांहि त्यांहून आत्म्याची भिन्नता ओळखून आत्मचिंतनाचा अभ्यास चालू ठेवणें. [सं.] ०योगी–पु. राजयोग करणारा मनुष्य; हठयोगीच्या उलट. [सं.] ०रा–स्त्री. (नेहमीं अनेकवचनी उपयोग) कुलाचाराच्या प्रसंगीं तबकांत ठेविलेल्या देवीच्या सात मूर्ती. [सं. राजेश्वरी=एक देवी] ०राज–पु. राजाधिराज; राजांचा राजा; बादशहा. [सं.] ०राजेश्वर–पु. सम्राट; बादशहा; सार्वभौमराजा. [सं.] ०राणी–स्त्री. राजाची मुख्य पत्नी; पट्टराणी. [सं.] ०रीति–स्त्री. १ राजांस योग्य अशा रीति, पद्धति, सरणी, मार्ग. २ सर्वमान्य पद्धति. [सं.] ०रु(रो)शी–स्त्री. सार्वजनिक आणि स्वतंत्र परवानगी; उघड व पूर्ण स्वतंत्रता; मुभा. 'पोरांस सुटीच्या दिवसीं खेळायास राजरूशी असती. ' [सं.राजा+फा. रूशन] ०रू(रो)स–श–ष–क्रिवि. उघडपणें; प्रसिद्धपणें; स्वतंत्रपणें; अनियंत्रितपणें; बेधडक. ' तो राजरोस इराणीच्या दुकानांत जाऊन चहा पितो '

२ दिवसाढवळ्या. [सं. राजा+फा. रूशन, रोशन्; रोश-इ-रौशन] **राजर्षि**-पु. तपश्चर्येनें ज्यानें ऋषि ही उच्च पदवी मिळविली आहे असा क्षत्रिय; तपस्वी क्षत्रिय; राजांमधील ऋषि. 'राजर्षि महर्षि सकळ येथें न्यूनाचि भूमिपाळ सभा।'-मोसभा १.१०. [सं. राजा+ऋषि] **०लक्षा** न. १ पक्षिविशेष. याचे मोठा व लहान असे दोन भेद आहेत. **०लक्षण**-न. १ राजत्वाचें सूचक एखादें स्वाभाविक चिन्ह. २ (छत्र, चामर इ०) राजचिन्हांपैकीं कोणतेंहि चिन्ह. [सं.] **०लेख**-पु. राजाचें पत्र; सनद. [सं.] **०वट-वटा-टी**-पुस्त्री. १ एखाद्या राजाचा, राज्याचा, अंमलाचा, कारकीर्दीचा काल; कारकीर्द. 'विक्रमाचे राजवटयांत सर्व लोक सुखी होते.' २ अंमलाचा, वजनाचा काल; (सामा.) चलतीचा काल. ३ सामान्य चाल, रीत, संप्रदाय, वहिवाट. 'आमचा सकाळीं जेवण्याचा राजवटा नाहीं.'-क्रिवि. राज्यांत; अमलांत; कारकीर्दीत. 'वडिलांचे राजवटा ही गोष्ट घडली नाहीं.' [राज्य+वर्ति] **०वटा**-पु. हमरस्ता; राजमार्ग. [राजा+वाट] **राजवर्खी बांगडी**-स्त्री. एक प्रकारची बांगडी. **०वंश**-पु. राजाचें कुल. [सं.] **०वंश्य**-वि. राजाच्या कुळांतील, वंशांतील. [सं.] **०वनसो**-वि. राजघराण्यांतील [सं. राजवंशी] **०वळ, राजावळी**-स्त्री. राजाचीं अक्षरें (सही); राजाचा शिक्का; राजमुद्रा. 'तुम्ही राजावळीचीं अक्षरें।'-ज्ञा १७.३२२. **०वांटा**-पु. १ मुख्य वांटा, मोठा हिस्सा. 'तो सुखदुःखाचा राजवांटा।'-ज्ञा ८.१८४. २ राजाचा भाग. **०वाडा**-पु. राजाचा वाडा; राजमंदिर; प्रासाद. **०विद्या**-स्त्री. सर्व विद्यांमध्यें श्रेष्ठ विद्या. 'या दोन्ही कारणांमुळें राजविद्या शब्दानें भक्तिमार्गच या ठिकाणीं विवक्षित आहे असें सिद्ध होतें.'-गीर ४१५. [सं.] **०विलास**-पु. राजाचीं सुखें व करमणुकी; उच्च प्रकारचीं सुखें व क्रीडा. [सं.] **०विलासी**-वि. राजासारखीं सुखें भोगणारा; राजविलास करणारा; राजविलासांचा शोकी. [सं.] **०वेत्र**-न. राजदंड. [सं.] **०वैद्य**-पु. १ वैद्यशास्त्रपारंगत असा उत्तम वैद्य. २ राजाचा वैद्य. [सं.] **०व्रत बांगडी**-स्त्री. बांगडीची एक जात. **०शक**-पु. ज्येष्ठ शुद्ध १३, आनंदनाम संवत्सर, शके १५९६. या वर्षी शिवाजी महाराजांनीं आपल्या राज्यारोहणानिमित्त सुरू केलेला शक. कोल्हापूर व इतर कांहीं संस्थानांत हा चालतो. [सं.] **०शय्या**-स्त्री. सिंहासन, राजाची शेज. [सं.] **०शासन**-न. १ राजाची आज्ञा. २ राजा अपराध्यांना जें शासन करतो तें. [सं.] **०शोभा**-स्त्री. राजाची शोभा; राजाचें तेज, कांति इ०. [सं.] **०श्रियाविराजित**-वि. १ राजाच्या तेजानें व शोभेनें विभूषित; लक्ष्मीनें राजासारखा सुशोभित असा. २ बरोबरीच्या गृहस्थास पत्र लिहावयाचें असतां त्याच्या सन्मानार्थ हा शब्द त्याच्या नांवापूर्वी विशेषणाप्रमाणें योजतात; पत्राचा मायना. [सं.] **०श्री**-पु. १ राजाची पदवी; राजाचें वैभव; राजासंबंधीं बोलतांना सन्मानार्थ योजावयाचा शब्द. 'एव्हां राजश्रीची स्वारी कचेरीस आहे.' २ सामान्य माणसास पत्र लिहितांना त्याच्या नांवापूर्वी हा शब्द आदरार्थ योजतात. ३ (विनोदार्थी) विचित्र, तऱ्हेवाईक माणूस. ४ (सामा.) गृहस्थ. 'आतां हे राजश्री भाज्या भीमास पाणि लावून।'-मोस्त्री २.२९. **०सत्ता**-स्त्री. १ राजाची सत्ता, कायदेशीर अधिकार. २ राजाची थोरवी, कदर, भारदस्ती. [सं.] **०सदन**-न. राजवाडा. [सं.] **०सभा**-स्त्री. राजाची सभा, कचेरी; राजाचा दिवाणखाना; दरबार. [सं.] **०स्थान**-न. राजाची राहण्याची जागा. **०सूय**-पुन. सार्वभौम राजानें करावयाचा यज्ञ (हा यज्ञ सार्वभौमत्वाच्या द्योतनार्थ राज्याभिषेक समयीं मांडलिक राजांसह करावयाचा असतो). अथवा राजा (सोमलता) याचें सवन, (कंडन) ज्यांत करतात तो यज्ञ. 'देवर्षि म्हणे नृप तो सम्राट् प्रभु राजसूयमखकर्ता।' -मोसभा १.४६. [सं.] **०हत्या**-स्त्री. राजाची हत्या; खून. [सं.] **०हत्यारा**-वि. राजहत्या करणारा. **०हंबीर**-पु. राजहंबीर पहा. **०हंस**-पु. १चोंच आणि पाय तांबडे व वर्ण पांढरा असा पक्षी. दूध व पाणी एकत्र केलीं असतां त्यांतून दूध तेवढें वेगळें करण्याची शक्ति याला आहे असें मानितात. 'राजहंसाचा कळप पोहताहे।'-र ९. २ (लावण्या, शृंगारिक काव्य) प्रियकर; नायक. ३ एक झाड. हीं झाडें लहान भुइसरपट असतात; पानें बारीक व जोडलेलीं; यास तांबूस रंगाचीं बारीक फुलें व बारीक शेंगा येतात. [सं.] **राजांगण-गणें**-न. १ राजाच्या, श्रीमंत लोकांच्या वाड्यापुढें रिकामी राखलेली मोकळी जागा. २ राजवाड्याच्या समोरचा चौक. ३ चौसोपी घरास मध्यें असलेलें चतुष्कोणी अंगण. 'पैस नाहीं राजांगणीं।' -दावि ५०४. [सं.] **राजागर**-न. १ राजाचा बाग. 'सुटली तरी राजागरीं मरें।'-एभा ११.५५८. २ रायभोग तांदुळाचें शेत. 'तेणें पिकती केवळ राजागर।'-एभा २७.२०२. **०धिकार**-पु. राजाचा अधिकार. [सं.] **राजाधिपति, राजाधीश**-पु. राजाधिराज. [सं.] **राजाधिराज**-पु. राजांचा राजा; सार्वभौम; अनेक मांडलिकांवरचा मुख्य राजा. [सं.] **राजानुकंपा**-स्त्री. राजाची कृपा, दया. [सं.] **राजानुग्रह**-पु. राजाची प्रसन्नता. [सं.] **०पुरी**-वि. राजापूर गांवासंबंधीं (गूळ, हळद, भाषा इ०). **राजाप्रधान सोडणें**-(बायकी) चातुर्मासांत भात व वरण हे मुख्य पदार्थ वर्ज्य करणें. **राजाभिषेक**-पु राज्यारोहणप्रसंगीं महानद्या, समुद्र इ०कांचें पाणी आणून त्यानें अमात्य, पुरोहितादिकांनीं मिळून राजावर विधिपूर्वक अभिषेक करावयाचा, राजाला गादीवर बसविण्याचा समारंभ. [सं.] **राजाम्लक-की**-पुस्त्री. रायआवळा-ळी पहा. [सं.] **राजावर्त, लाजवर्द**-पु. हलका, कमी प्रतीचा हिरा (इं.) लापिसलॅझूली. याचा मुख्य रंग निळा;

कधीं तांबूस पिवळाहि सांपडतो. [सं.] **राजावली**–स्त्री. राजांची परंपरा; राजांचें घराणें; राजवंश. [सं.] **राजावळ**–स्त्री. १ तांदुळाची एक जात. २ तांबडया रंगाच्या लुगडयाचा एक प्रकार. ३ वर्षाचा अधिपति; मंत्री इ० ग्रह दाखविणारा पचांगाच्या आरंभीचा भाग; संवत्सर फल. **राजावळी**–वि. राजानें काढलेली (ओळ). 'तऱ्ही राजावळीचीं अक्षरें।' –ज्ञा १७.३२२. **राजासन**–न. राजाचें सिंहासन; तख्त. [सं.] **राजाळूं**–न. पांढऱ्या अळवाची जात. ह्याच्या पानाचा देठ लांब व जाड आणि कांदा मोठा असतो. **राजाळें**–न. केळयाची एक जात. **राजाज्ञा**–पु. राजाच्या प्रधानांपैकीं (अष्टप्रधानांपैकीं नव्हे) एक. –स्त्री. १ राजाची आज्ञा, शासन. २ निखालस व खमखशीत हुकूम; आदेश; आज्ञा. **राजिक**–वि. राजकीय. 'राजिक दैविक उद्वेग चिन्ता।' –दा ११.३.५. **राजी**–स्त्री. गंजिफांतील शब्द; राजेरी देणी. [राजा] **राजीक**–न. १ राजाचा जुलूम; अन्याय; राजापासून उत्पन्न होणारीं संकटें व दुःखें; याच्या उलट दैविक. २ सैन्याच्या स्वाऱ्यांमुळें होणारी नासधूस; धूळधाण. ३ राजाचें काम; लढाई व तिच्यामुळें होणारी अव्यवस्था. ४ क्रांति; बंड. [राजा] **राजी बेराजी, राजीक बेराजिक**–स्त्रीन. निर्नायकी; बेबंदशाही; एक राजा गादीवरून दूर झाल्यापासून दुसरा येईपर्यंतचा मधील काळ. [राजीक] **राजेंद्र**–पु. १ राजांचा राजा; बलाढय राजा. २ राजअंबीर. [सं.] **राजेरजवाडे**–पुअव. राजे; संस्थानिक; सरदार इ०. **राजेश्री**–वि. १ राजश्री याचें अशुद्ध रूप. २ (ल.) मूर्ख माणूस. 'हे राजेश्री दुसऱ्याला तोंडघशी पाडण्याऐवजी आपणच पडले.' –के २४.६.३०. **राजेश्वरी**–स्त्री. शिवाची अथवा ईश्वराची पत्नी; देवी. [सं.] **राजेळ–ळी, राजकेळ**–स्त्री.न. केळीची एक जात व फळ. हे केळें ६ ते १२ इंच लांब व तिधारी असतें. ह्याचीं सुकेळीं करतात. **राजैश्वर्य**–न. राजाचें ऐश्वर्य, वैभव, थाटमाट. [राजा+ऐश्वर्य] **राजोट–टी, राजोटा**–स्त्रीपु. राजवट; राजवटा पहा. **राजोट्या**–पु. १ कुटुंबांतील कर्ता पुरुष; घरांतील मुख्य कारभारी. २ (ना.) लुडबुड करणारा, चोंबडा मनुष्य. **राजोपचार**–पु. १ राजत्वास योग्य असे आदर, उपचार; राजास उचित असे उपचार (छत्र धरणें, चवरी–मोरचेल वारणें इ०). २ सात्विक, सौम्य औषधयोजना, शस्त्रक्रिया इ० नाजूक प्रकृतीच्या माणसास सोसण्याजोगा औषधादि उपचार. [सं. राजा+उपचार] **राज्य**–न. १ प्रजेपासून कर घेऊन तिचें पालन करणें असा राजाचा अधिकार किंवा काम. २ राजाचा अंमल; हुकमत. ३ राजाच्या सत्तेखालचा प्रदेश. ४ राष्ट्र: कायद्यानें राहण्यासाठीं संघटित झालेले व एका विशिष्ट देशांत राहणारे लोक (हो व्याख्या वुड्रो विल्सन यांची आहे); किंवा एका ठराविक प्रदेशांत दंडशक्तीच्या सहाय्यानें न्याय व शांतता प्रस्थापित करण्यासाठीं स्थापित केलेला मनुष्यांचा समाज. ५ कोणत्याहि व्यवहारांत दुसऱ्यास न जुमानतां स्वतंत्रपणें वागण्याजोगें एखाद्याचें आधिपत्य असतें तें. त्याचे घरांत सारें बायकांचें राज्य झालें आहे.' ६ खेळांतील डाव, हार. [सं. राजन्] **०क्रांत–क्रांति**–स्त्री. राज्याधिकाऱ्यांत आणि राज्यपद्धतींत जबरदस्तीनें घडवून आणलेली उलथापालथ. [सं.] **०घटना**–स्त्री. राज्यव्यवस्थेसंबंधीं मूलभूत कायदे वगैरे. **०घटना मोडणें**–राज्यघटनेच्या कायद्यांत ज्या पद्धतीनें राज्यकारभार चालावा असें नमूद केलें आहे त्याप्रमाणें कारभार चालेनासा होणें. –के ५.१.३७. **०घटना राबविणें**–मंत्रिमंडळास जे अधिकार दिले आहेत त्यांचा उपयोग लोकहितवर्धनार्थ करावयाचाच. पण प्रत्यक्ष कायद्याच्या कलमांतील शब्दानें जो अधिकार दिला नसेल तोहि प्रत्यक्ष व्यवहाराला आवश्यक म्हणून पर्यायानें दिला गेला आहे असें म्हणून त्यांचाहि पायंडा पाडणें.' –के ५.१.३९. **०पद्धति**–स्त्री. राज्यकारभाराचा प्रकार. हिचे राजसत्ताक, प्रजासत्ताक व राजप्रजासत्ताक असे तीन प्रकार आहेत. [सं.] **०भार**–पु. राज्याचा कारभार करण्याची जबाबदारी, भार, ओझें. [सं.] **०रीति**–स्त्री. शासनपद्धति. 'ज्या राष्ट्राची राज्यरीति उत्कृष्ट आहे त्यास धनसमृद्धि अपायकारक होत नाहीं.' –नि ५३. **०लोट**–स्त्री. राज्यक्रांति; राज्य बुडणें. 'झालिया राज्यलोट।' –एभा ३०.३५९. **०व्यवहार**–पु राज्याचें काम. [सं.] **राज्यांग**–न. राज्याचीं मुख्य अंगें. हीं स्वामी, अमात्य, सुहृत्, कोश, दुर्ग, राष्ट्र व बल अशीं सात आहेत. यांतच कोणी पौरश्रेणी व पुरोहित यांचा समावेश करतात [सं.] **राज्याभिलाष**–पु. राज्याचा अभिलाष:दुसरे देश जिंकण्याची किंवा त्यांवर राज्य करण्याची महत्त्वाकांक्षा. [सं.] **राज्याभिलाषी**–वि. राज्याचा अभिलाष करणारा. [सं.] **राज्याभिषिक्त**–वि सिंहासनावर बसविलेला; ज्यास राज्याभिषेक झाला आहे असा; राजश्रीनें युक्त केलेला. [सं.] **राज्याभिषेक**–पु. राजाला गादीवर बसविण्याच्या वेळीं विधिपूर्वक करावयाचा अभिषेक; राज्याधिकाराचीं वस्त्रें देणें. [सं.] **राज्यासन**–न. सिंहासन;राजासन पहा. [सं.] **राज्योपचार**–पु. सरकारी अधिकाऱ्यांचें कृत्य. [सं.]

राजि–जी—स्त्री. रांग; ओळ; पंक्ति; समुदाय: राई; वन. 'सोशिल इतर कसी दे मदिपूंची भंग राजि रामा जी?।' –मोभीष्म ११.३६. [सं.]

राजी—वि. १ खुशी; तयार; कबूल; मान्य २स्वाधीन; अनुकूल. 'वाजीचें मन जाणतां सकळही राजी शिपाई जया।' –र २. [अर. राझी] सामाशब्द– **०खुशी–षी**–स्त्री. मर्जी; मान्यता; पूर्ण कबूली. हा शब्द विशेषत: करारनाम्यांत तृतीया व षष्ठी विभक्तींत येतो. **०नामा**–पु. १ शेवटच्या निकालाचा वादीकडून लेखी स्वीकार; बेदावापत्र. 'हर्दा वादियांचे राजीपणें राजीनामे

लेहून घेऊन.' –रा १५.४७. २ एखाद्याची आज्ञा मान्य असल्याचें लेखी कबूलीपत्र; कबुलायत. 'बेपारी मजकुराचें कापड झाडियानसी देऊन त्याचा राजीनामा पाठवून देणें.' –रा ६.६०६. ३ नोकरी सोडण्याविषयींचें पत्र. ४ (बुद्धिबळांचा खेळ) प्रतिपक्ष्याची मात कबूल करणें. [फा.राझीनामा] **०बिराजी**–स्त्री. सुखदुःख; संकट. 'राजीबिराजीचे दिवस, सर्व वस्तवानीसह कुटुंब एका किल्लेंत, तेव्हां स्थळाची मजबुदी पाहिजे.' –ख ५.२२१२. **०मतें**–क्रिवि. स्वसंतोषें. 'श्रीसत्यंदवाची स्थापना कोंडसकर खोत व भिडे यांनीं मिळून राजीमतें केली.' –आडिवऱ्याची महाकाली ४२. **०रजावंती(दी)नें**–क्रिवि. १ मान्यतेनें;कबुलीनें; राजीखुशीनें; परवानगीनें. 'उदमी यांचे राजीरजाबंदीनें करारा-प्रमाणें बटछपाई घेणें.' –वाडसमारो ३.२३४. २ (खतपत्रांत, विशेषतः अक्कलहुषारीनें ह्या शब्दासह योजना) स्वतंत्र खुशीनें आणि पूर्ण स्वातंत्र्यानें; बळजबरी न करितां दिलेल्या कबुलीनें. **राजीरजावंतीचा**–वि. स्वतंत्र खुशीचा व पूर्ण कबुलीचा (ह्याचा प्रथमाविभक्तींत प्रयोग क्वचितच आढळतो). [अर. राझी+फा. रझामन्दी] **राजू**–वि. (ना.) कबूल.

राजीव—पु. (काव्य) पति; प्रियकर.

राजीव—न. कमळ; सूर्यविकासी कमळ. 'आतां सूर्यासि जीवें। अनुसरलिया राजीवें।' –ज्ञा १६.१६३. [सं.] सामाशब्द– **०नयन-नेत्र-लोचन, राजीवाक्ष-क्षि**–वि. (काव्य) देवास उद्देशून लाक्षणिक अर्थानें कवितेंत येणारे शब्द. कमलासारखे सुंदर डोळे असलेला. [सं.] **०नयना**–स्त्री. (काव्य) सुंदर स्त्री. [सं. राजीव+नयन]

राजू—स्त्री. दोर; विशेषतः जाड व मोठा दोर. [सं. रज्जु]

रांझण, रांझणवाडी, रांझणी—रांजण, रांजणवाडी इ० पहा.

राट—पु. १ (राजा.) रहाट; पाणी ओढण्याचें चाक. २ (खा. अहिराणी) सूत कातण्याचा रहाट; चरखा. [रहाट]

राटावळ—स्त्री. (कों.) खटपट; श्रम. [रहाटणें]

राटावळी—स्त्री. वाट ? 'मार्ग पाहे घरिंची राटावळी।' –खिपु २.३६.१६.

राट्या—पु. (हेट. नाविक) शिडाची दोरी टांगून ठेवण्याची जागा.

रां(रा)ठ—वि. १ आडदांड; अडाणी; रानटी (मनुष्य). २ कणखर; चिवट; खडखडीत व कठिण (माती, पीठ इ०). ३ चरचरीत; भरभरीत (केस, कापड इ०). ४ खरबरीत (रुक्ष पदार्थामुळें होणारी जीभ). ५ कर्कश; बेसुर (आवाज). ६ कठीण व ओबडधोबड; कसातरी केलेला (जिन्नस). रठ पहा. **०गवत**–न. रानगवत.

राड—स्त्री. लुटून, पाडाव करून आणलेले लोक. 'दहा हजार राड लष्करांत आली आहे' –पेद २०.९३.

राड—स्त्री. १ शिमग्यांत खेळण्याकरितां आंत पाणी घालून ज्यांत चिखल केलेला असतो तो मोठा खळगा; होळीची खांच. २ नाचणें; क्रीडा. ३ रेबड, रेंदाड; घाण; चिखल. ४ रस्त्यावर मार्गावर पाणी पडून, पाऊस पडून झालेली ओल. ५ कचरा; वाळलेला पाला; गुऱ्हाळाच्या चुलाण्याखालीं जाळण्याकरितां घातलेला पालापाचोळा. ६ धगधगीत निखाऱ्यांनीं युक्त जी भूमि, खळी इ० ती. –वि. घाण; गढूळ; रेंदाड (पाणी इ०) [का. राडि] **राडी**–स्त्री. १ चिखल, 'तेंही बाळाचे हातवरी। चिवडिलें जैसी राडी करी।' –ज्ञा १७.१६०. २ धगधगीत निखाऱ्यांची खाई. 'आतां लेकुराचें मुख देखेन। तरी आनंदें राडी चालेन।' –दा ३.३.४१.

रांड—स्त्री. १ (निंदार्थी) विधवा. २ दासी; कलावंतीण; वेश्या. ३ (तिरस्कार, राग किंवा अनाथ स्थिति दाखवावयाची असतां) स्त्रीजात; बायको. 'तुझी रांड रंडकी झाली.' –नामना ९२. ४ (निरुद्योगीपणा, नवरा मेलेल्या स्त्रीच्या स्थिती-प्रमाणें) विघडलेली, अतिशय खलावलेली स्थिति; दुर्दशा. 'यंदा शेतें चांगलीं आलीं होतीं पण आंत पाणी शिरून अवघी रांड झाली.' ५ (निंदेनें) भित्रा, नीच, नामर्द मनुष्य; युद्धांतून पळून जाणारा सैनिक. 'म्यां न वधावें पळतां चाला मारूनि काय रांडा या।' –मोकर्ण ३५.६०. [सं. रंडा] **म्ह० रांडेच्या लग्नाला छत्तीस विघ्नें.** (वाप्र.) **रांडेचा**–वि. १ बेकायदेशीर संबंधापासून झालेला. २ (ग्राम्य.) पादपूरणार्थक किंवा उद्गारवाचक शब्द. ३ एक ग्राम्य शिवी. **रांडेचा, रांडचा मारलेला**–वि. स्त्रीवश; स्त्रीलंपट **रांडे(डि)च्यानो**–उद्गा० (बायकी) रखेली पासून झालेल्या मुलांना उद्देशून बोललेल्या शब्दावरून पुष्कळदा आश्चर्य व्यक्त करण्याकरितां पण क्वचित् निरर्थकपणें निघणारा उद्गार. **रांडेवाचून पाणी पीत नाहीं**–आपल्या बायकोला एखादा कठोर शब्द बोलल्यावांचून तो पाण्याचा थेंब सुद्धां पीत नाहीं (सतत शिव्या देणाऱ्या नवऱ्यासंबंधीं म्हणतात). **रांडेहून रांड**–वि. वुळा; अतिशय बायकऱ्या(मनुष्य). सामाशब्द– **०अंमल**–पु १ स्त्रीराज्य. २ नेभळा, अयशस्वी कारभार. **०काम**–न. १ बायकोचें काम; गृहकृत्य. २ विधवेचें काम; बाहेरील आडकाम किंवा रानांतील गवत कापणें व सर्पण गोळा करणें इ० काम. **०कार-भार**–पु. १ बायकी कारभार. २ स्त्रियांचा कारभार; स्त्रियांचीं कृत्यें. ३ (निंदेनें) भिकार, मूर्खपणाचीं कृत्यें; दुबळीं कृत्यें. **०खळी**–वि. (गो.) विधवा झालेली. **०खांड**–स्त्री. स्त्रियांस लावावयाचा रांड, बाजारबसवी, बटीक इ० अर्थांचा अभद्र शब्द, शिवी. 'मी त्याची कांहीं गोष्ट बोलिलें नसतां उगीच मेला मला

रांडखांड म्हणतो.' [रांड द्वि] **०गळा**-पु. १ टिपेचा सुर; तृतीय सवन. २ बायकी आवाज. [रांड] **०गांठ**-स्त्री. विशिष्ट आकाराची गांठ; ढिली गांठ. बाईलगांठ पहा. याच्या उलट पुरुषगांठ. **०गाणें-गाऱ्हाणें**-न. पिरपिर; बायकी कुरकूर; बायकी विनंति; रडगाणें. (क्रि० गाणें; सांगणें). **रांडगो**-पु (गो.) वेश्येचा मुलगा, किंवा विधवेस अनीतीच्या मार्गानें झालेला मुलगा. **०चाल**-स्त्री. भित्रेपणा; नामर्दपणा; बायकीपणा. **०छंद**-पु. रंडीबाजीचा नाद; रांडेचें व्यसन. **०छंदी**-वि. रंडीबाजीची संवय लागलेला; रांडगा. **०तगादा**-पु. (कुण.) (साऱ्याच्या किंवा कर्जाच्या) पैशाची (पिठ्या शिपायानें नव्हे) कुळाकडे सौम्य रीतीनें केलेली मागणी. ह्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यास आपणास मुखत्यारी आहे असें कुणबी मानतो. बडग्याच्या विनंतीशिवाय दुसऱ्या कोणत्याहि विनंतीस दाद न देण्याबद्दल हा वर्ग कित्येक पिढ्या प्रसिद्ध आहे. कुणबी पहा. **०पण**-न. १ (कों.) वैधव्य. २ नाश; नादानपणा. 'कां घेतां रांडपण ठरून भाऊ नाना।' -ऐपो ११६. **०पाटा**-पु. वैधव्य. (क्रि० भोगणें; येणें; मिळणें; प्राप्त होणें; कपाळीं येणें). [रांड+पट्ट] **०पिसा**-वि. रांडवेडा; अतिशय रांडछंदी; रंडीबाज; बाईलवेडा; स्त्रैण. **०पिसें**-न. रांडवेड; रांडेचा नाद. **०पोर**-न. १ (व्यापक) बायकामुलांसह एखाद्या ठिकाणचे सर्व रहिवासी; गांवांतल्या बायकापोरांसुद्धां सर्व लोक. 'आज कथेला झाडून रांडपोर आलें होतें.' २ एखाद्याच्या पदरीं असलेलें. बायको, मुलें इ० कुटुंब, खटलें. ३ रंडकीचें मूल. ४ दासीपुत्र; वेश्यासुत. [रांड+पोर] **रांडपोर कीं राजपोर**-रंडकीचा मुलगा किंवा राजाचा मुलगा हे दोघेहि अनियंत्रित व अशिक्षित असतात; दोघेहि बेबंद व निर्धास्त असतात. **०पोरें**-नअव. घर, गांव, देश यांतील मुख्य कर्त्या पुरुषाहून इतर बायका, मुलें इ० सर्व माणसें. **०बाज**-वि. रंडीबाज; बाहेरख्याली. [हिं.] **०बाजी**-स्त्री. बाहेरख्यालीपणा; रंडीबाजी. [हिं.] **०बायल**-स्त्री. (गो.) विधवा स्त्री. **०बेटा**-पु. रांडलेक. 'तुका म्हणे कोरान्न रांड। बेटा भांड मागेना कां।' -तुगा २९८३. **०बोडकी**-स्त्री. विधवा स्त्री. 'त्या रांडबोडकीनें लग्न जुळलन्।' -मोर ११. **०भांड**-स्त्री. (निंदार्थी) रंडकी; बाजारबसवी; बटीक. [रांड द्वि.] **०भांडण**-न. १ बायकांचें भांडण. २ (ल.) बिन फायदेशीर, निरर्थक गोष्ट. **०भाषण**-न. बायकी, नामर्द, दीनवाणें भाषण. **०मस्ती**-स्त्री. १ पतिमरणानंतर विधवेस येणारा लहरपणा व जोम. २ (ल.) नियंता नाहींसा झाल्यावरोबर एखाद्या माणसास येणारी टवटवी; चपळाई, धिटाई. **०माणूस**-न. १ (दुर्बलत्व दाखवावयाचें असतां) स्त्री; स्त्रीजाति; स्त्रीमात्र. २ (तिरस्कारार्थी) बुळा, निर्जीव, बायक्या मनुष्य; भित्रा मनुष्य. [रांड+माणूस] **०मामी**-स्त्री. (करुणेनें) विधवा स्त्री. **०मांस**-न. (निंदार्थी) पतीच्या मृत्यूनंतर विधवा स्त्रियांस एकटें राहतां आल्यामुळें व मोकळेपणा मिळाल्यामुळें कधीं कधीं येणारा लहरपणा. (क्रि० चढणें; येणें). [रांड+मांस] **०मुंड**-स्त्री. १ केशवपन केलेली, अनाथ व अनुकंप्य अशी विधवा. २ (शिवी) रांड; बोडकी; अवेशा थेरडी; विधवा. [रांड+मुंड] **०रळी**-स्त्री. विधवा किंवा विधवेसारखी; (व्यापक.) विधवा. 'रांडरळी म्हणती हा मेला बरें झालें' [रांड+रळी] **०रागोळी**-स्त्री. (व्यापक.) रंडीबाजी व बदफैली. [रांडद्वि.] **०रांडोळी**-स्त्री. १ विधवा किंवा तिच्या सारखी स्त्री. रांडरळी पहा. २ शिंदळकी. ३ बायकांशीं संगत ठेवणें; रंडीबाजी. **०रूं**-न. विधवा स्त्री. **०रोट-रोटा**-पु. आपल्या मरणानंतर बायको विधवा होईल यासाठीं लग्नाच्या वेळीं नवऱ्यानें तिच्या तर्तुदीकरितां दिलेलें वेतन; बाइलवांटा; रांडरोटयाची चाल मुख्यत्वें गुजराथेंत आहे [हिं.] **०रोटी**-स्त्री. लढाईंत पडलेल्या किंवा सरकारकामीं आलेल्या माणसाच्या बायकोस निर्वाहाकरितां दिलेली जमीन इ०. [हिं.] **०लें(ल्यों)क**-पुन. १ रंडापुत्र; विधवेचा मुलगा; एक शिवी. 'काय केलें रांडलेंका। तुला राजी नाहीं तुका।' २ (व.) मेलें या शब्दाप्रमाणें वाक्याच्या आरंभीं किंवा मध्यें निरर्थक योजतात. 'आम्हास नाहीं रांडलेक असं येत!' **०वडा**-पु. सर्व बायकामाणसें; घरांत सत्ताधारी पुरुष नसल्यामुळें होणारें स्त्रियांचें प्राधान्य. २ बाजारबसवी, रांड, बटीक इ० शब्दप्रचुर शिव्या; शिवीगाळ; गालिप्रदान. (क्रि० गाणें; गाजविणें; ऊठवणें) 'किती रांडवडे। घालूनि व्हालरे बापुडे।' -तुगा २७४६. [रांड+वाडा] **०वळा**-पु. स्त्रियांच्या कडाक्याच्या भांडणांतील शिवी; रंडकी, रांड, बटकी, बाजारबसवी इ० शिव्यांची माळका. (क्रि० गाणें; वाजवणें). [रांड+आवलि] **०वांटा**-पु. वैधव्य. **०वांटा कपाळीं येणें**-विधवा होणें. **०वाडा**-पु. कुंटणखाना; वेश्यांची आळी. **०व्यसन**-न. रांडेचा नाद, छंद. **०व्यसनी**-वि. रांडबाज. **०सांड**-स्त्री. विधवा. [रांड+सांडणें किंवा रांड द्वि.] **०सांध**-स्त्री. विधवेचा कोपरा. [रांड+संधि] **०सांधीस बसणें**-घरांत उदास होऊन बसणें (रागानें एखाद्यास म्हणतात). **रांडक**-वि. (कों.) विधवा झालेली. 'सडा मफलीस व रांडक बायको व भिकारी बैरागी हे निमदस्ती.' [रांड] **रांडका**-पु. विधुर; ज्याची बायको मेली आहे असा पुरुष. [रांड] **रांडकी**-स्त्री. विधवा. (तिरस्कार दया दाखवितांना). [रांड] **रांडगा**-वि. (राजा. तंजा.) रंडीबाज. २ -पु. (बे.) महार जातीचा बलुतेदार. याला वतन इनाम जमीन असते. याचा हक्क कर्णाटकांतील लक्ष्मीच्या जत्रेंत रेडा मारण्याचा असतो. हल्लीं ह्या शब्दास अपभ्रष्टता येऊन तो शिवीदाखल योजिला जातो. **रांडरूं**-न. (निरस्कारानें) विधवा स्त्री. [रांड] **रांडव**-वि.

१ रंडकी झालेली; विधवा.(स्त्री). २ बायकोच्या मरणानें उघडा झालेला; मृतपत्नीक; विधुर. [रांड] **रांडवणें**–अक्रि. विधवा होणें; रांडावणें पहा. [रांड] **रांडवा**–स्त्री. विधवा स्त्री. ' रांडवा केलें काजळ कुंकूं । ' –एभा ११.९६६. **रांडा पोरें**–नअव. १ कुटुंबांतील कनिष्ठ दर्जाचीं माणसें (बायका, मुलें व कुणबिणी). २ समाजांतील हलक्या दर्जाचे लोक. **०रोटा**–पु. विधवांनीं करावयाचें सामान्य आडकाम. (दळण, कांडण, मोल मजुरी इ०). **रांडाव**–वि. (गो.) विधवा. **रांडावणें**–अक्रि. १ विधवापणाच्या केविलवाण्या स्थितीस प्राप्त होणें. २ (ल.) फिसकटणें; मोडावणें; नासणें; बिघडणें; भंग पावणें (व्यापार, मसलत, काम) (विशेषत: या लाक्षणिक अर्थानेंच हा शब्द योजतात). ' त्याणीं मागें संसार चांगला थाटला होता पण धोरला भाऊ मेल्यापासुन रांडावला. ' [रांड] **रांडावा**–स्त्री. (माण.) बालविधवा; बालरांड. **रांडरांड**–स्त्री. १ रंडक्यांतली रंडकी; अतिशय अनाथ व असहाय रंडकी. २ (ल.) नामर्द, बुळा, अपात्र, नालायक, मनुष्य. ३ पराकाष्ठेचा अनाथ किंवा निराधार मनुष्य. **रांडुल**–स्त्री. (गो.) (अनीतीच्या मार्गानें) विधवेस झालेला मुलगी. **रांडूल**–स्त्री. (कों.) विधवा स्त्रीला उपहासानें म्हणतात. **रांडे**–उद्गा. एक शिवी. ' भांडे तृष्णेसीं द्विज भारातें, म्हणे यथेष्ट घे रांडे ! ' –मोअश्व ६.७५. [रांड, संबोधन] **रांडेचा**–वि. रांडलेक. –उद्गा. आश्चर्यवाचक उद्गार. ' अग रांडेचें ! पांच वर्षांचें पोर पहा किंग कशी पोथी वाचतो. ' **रांडेचा आजार**–पु. गर्मी. **रांडेच्या**–उद्गा. (प्रेमळ) एक शिवी. ' आहा रांडेच्या !... ' –केप ६२. **रांडोळी**–स्त्री. १ (करुणेनें, तिरस्कारानें) विधवा स्त्री. २ विधवेप्रमाणें वागवणूक. ३ कुचाळी, थट्टा. ' करितां गोपिकांसी रांडोळी । ' –एभा ६.३६५. ४ मारामारी; कत्तल. ' निकरा जाईल रांडोळी । ' –एरुस्व ६.९. ५ क्रीडा. ६ नाश. ' कीं भीष्मदेवें चरणातळीं । केली कामाची रांडोळी । ' –जै २४.७ [रांड] **रांड्या, रांड्या राऊजी, रांड्या राघोजी**–वि. १ रंडीबाज; रांडव्यसनी; रांडछंदी. २ बायक्या; बाइल्या; नामर्द. ३ बाईलवेडा. ४ रांडयाराघोबा, रांडयारावजी, बायकांत बसुन किंवा त्यांजबरोबर फिरून गप्पा मारण्यांत आनंद मानणारा (मनुष्य); गप्पीदास; चुलमावसा. **म्ह०** रांडया रावजी आणि बोडक्या भावजी. [रांड] **रांढरुं, रांढूं**–न. (तिरस्कारार्थी) विधवा स्त्री. रांडरू पहा. [रांड]

राड बांधणें—क्रि. (बे.) झड बांधणें; भितीस पाऊस लागूं नये म्हणून आडोसा करणें.

राडवाळि—वि. (महानु.) राजकारणदक्ष. ' प्रस्तुत नारायणें बाहाळियें । जन्म देउनि राडवाळिए । ' –ऋ ७.

राडा—पु. १ पसारा; कामाचा रगडा; कचका. (क्रि० घालणें; पडणें). २ भानगड. ' या उपर गुता राडा फार करून राहिला नाहीं. ' –पेद १.४३. ३ खोल चिखल, रेबड. ४ आकांत; रडारड (मृत्युसमयीं होणारी मनुष्यसमुदायाची)

राडिकें—न. (महानु) विनोदाचें उत्तर, भाषण, वचन. ' देशकाळें निःहां राडिकें । –शिशु ११९.

राण—न. (प्र.) रान. शब्द, व त्याचे सामासिक शब्द पहा. **राणटा**–वि. गांवढळ. ' तेथें त्या राणटा स्त्रीजाति । ' –रास ५.६४. **०वटी माळ**–स्त्री. वनमाला. **०वाट**–स्त्री. रानवाट पहा. ' धरितां राणवाट गुरुराव । ' –दावि. ३१५.

राणा—पु. एक मासा. –प्राणिमो ८१.

राणा—पु. १ (काव्य) राजा. ' मी असे उज्जनीचा राणा । नाम माझें विक्रम । ' –शनि ३६७. २ मुख्य; नायक. ' तंव बोले शिष्यांचा राणा । ' [सं. राजन्; प्रा. राण; हिं. राणा] **राणी**–स्त्री. १ राजपत्नी; राजाची स्त्री. २ (पत्त्यांचा खेळ) राणीच्या चित्राचें पान. [सं. राज्ञी; प्रा. रण्णी (?); गु. पं. सिं. बं. राणी; हिं. रानी] **राणि(णां) वसा, राणवसा**–पु राणीची किंवा राजाच्या बायकांची राहण्याची, बसण्या–उठण्याची जागा; अंतःपुर; जनानखाना. ' तंव ते येउनि राणिवशासीं । ' –ह ३१.१९७. [राणी+वास] **राणीचा जाहीरनामा**–पु. १८५७. सालच्या बंडानंतर लोक शांत व्हावे म्हणून व्हिक्टोरिया महाराणीनें काढलेला एक जाहीरनामा. **राणी माशी**–स्त्री. मधमाशी; आकारानें मोठी असुन अंडीं घालून नेहमीं पोळ्यांत राहणारी मधमाशी; (इं.) क्वीन् बी. **राणीराउत, राणीराउ(व)त्राणी**–पुस्त्री. श्रीमंत व दरिद्री हा भेद; श्रीमंती, वैभव, निर्धास्तपणा किंवा धिटाई दाखविण्याकरितां भाषणसंप्रदायांत योजलेला शब्द. ' राणी रावताणी त्याच्या घरीं पाणी भरती. ' ' हा राणीरावताणी भीत नाहीं–खातरेंत आणीत नाहीं. ' **राणी(णि)व**–स्त्री. (काव्य) १ राजाचा अधिकार; राजेपण; राजपद. ' नातरि राणीव सांडावी । ' –शिशु ४७५. २ राज्य. ' जीत असतां हे पांडव । पुत्रांसि न जिरे राणीव । ' –मुआदि ३४.१००. ३ राज्यसुख. ' मजवीण भोगा सुखें राणीव । ' –मुआदि १८.६९. ४ (महानु.) अधिकार; सामर्थ्य. ' भक्तीसी राणीव जाली । ' –भाए ४७. **राणीवी**–स्त्री. राज्य; समृद्धि. [प्रा.] **राणेपण**–न. १ मोठेपण. ' परि राणेपणें शाङ्गधरा । बोला हें तुम्हीं । ' –ज्ञा १०.३२३. २ (महानु.) राजेपणा. ' आतां देवो कांई विसरले राणेपणें । ' –भाए १४३. **राणेराऊ**–पु. राजराज; अधिराज. ' नागार्जुनाचा दातारू । राणेराऊ श्रीचक्रधरू । ' –शिशु ७. **राणो**–पु. (गो.) (राणे नांवाच्या लोकांनीं बंड केलें होतें यावरून) बंडखोर मनुष्य.

रात—पु. (कों.) रक्तिमा; तांबडेपणा; डोळ्यांची आरक्त स्थिति. [सं. रक्त] **रातं(तां)जन**–पुन. एका झाडाचें नांव.

[रक्त+अंजन] **रातड**–वि. किंचित् राता, तांबडा (तांदूळ, विशिष्ट फळें डोळे इ०), [राता] **रातडी**–स्त्री. तांबड्या जोंधळ्याची एक जात.

रात—स्त्री. १ रात्र. 'सुग्रीव म्हणे यत्नें लंकेचें भस्म जा करा रातीं।' –मोरामायणें युद्ध ५५७. २ रातकिडा. [सं. रात्रि; प्रा.राती; हिं. पं. गुज. बं. उरिया रात;सिं राति; पोर्तुजि.अराची] **म्ह०** (गो.) रातचे बोल दिसाक पोल=रात्रीचे बोल दिवसाच्या वेळीं फोल होतात. **रातच्यारात**–क्रिवि. रात्रभर. सामाशब्द– **रातकिडा**–पु. रात्रीं किर्र आवाज काढणारा एक किडा. **रातबिरात**–स्त्री. संकटाचा, धोक्याचा, अनुपपत्तीचा काल; वेळप्रसंग. 'रातबिरात आहे, चार जिन्नस घरांत बाळगून ठेवावे.' –क्रिवि. संकटकालीं; रात्रीबेरात्रीं. 'धान्य घेऊन ठेवावें, रातबिरात उपयोगी पडेल.' [हिं रात+बिरात] **रातवडा**–पु. (गो.) एका रात्रीचें काम. **रातवणी–न.** (बायकी) रात्रीं हातपाय धुण्याकरितां, शौचाकरितां किंवा पिण्याकरितां ठेवलेलें पाणी. [रात्र+वणी=पाणी] **रातवा**–पु १ रात्रीचा सर्व काल; रात्रपणा. (क्रि० पडणें; होणें). २ रात्रीचा पाऊस. 'रातवा पडूं लागला; रातव्याच्या पावसानें किंवा रातव्यानें बाजरी नासेल.' ३ बुजूं नये म्हणून घोडयाला रात्रीं बाहेर काढणें. (क्रि० देणें) [रात] **रातवा घेउन निघणें**–रात्र असतांना निघणें. (**पावसानें**) **रातवा धरला**–पावसानें रात्रीं पडण्याला सुरुवात केली. **रातसार**–क्रिवि. रात्रभर. **रातांधळा**–वि. ज्याला रात्रीं मुळींच दिसत नाहीं असा; रातांधळें प्राप्त झालेला. **रातांधळें**–न एक नेत्ररोग. ह्यामुळें सुनुष्यादिकांस रात्रीं दिसत नाहीं. **रातोरातीं**–क्रिवि. रात्रीं; मध्यरात्रीच्या वेळीं. [वात] **रातावणें**–अक्रि. (काव्य) रात्र पडणें, होणें. 'रातावलें आतां जाऊं दे बाई घरा।' [रात] **रातिवळा**–पु. (कों.) रात्रीं गुरांच्या पुढें टाकलेली वैरण किंवा ओलें गवत. **रातिया**–पु. रात्रपणा; रात्र. 'जे कांडाचेनि आंधारें। करिति रातिवा।' –शिशु ९४४. **राती**–स्त्री. १ (काव्य) रजनी; रात्र. 'आनंदकंदा प्रभात झाली उठ सरली राती।' –भूपाळी घनश्यामाची २०. २ अंधार. [सं. रात्रि] **रातीच्या रातीं**–क्रिवि (कुण) रात्रीच्या मुदतींत; रात्रीच्या रात्रीं. **राती(त्रि)दिवो**–क्रिवि. रात्रंदिवस. 'तेव राहटवी रातिदिवो।' –माज्ञा १८.५०४. [प्रा.] **रातोरात**–क्रिवि. १ रात्रीच्या रात्रीं; दिवसाची इ० वाट न पाहतां रात्रीच्या वेळीं. २ सर्व रात्र; रात्रभर. 'हें पत्र म्यां रातोरात जागून लिहिलें' ३ रात्रीच्या वेळीं, रात्र असतांना. 'एव्हां निघालास तर रातोरात पोंचशील.' **रातोरातीं**–क्रिवि. रात्रीं; मध्यरात्रीच्या वेळीं. [रात] **रात्र**–स्त्री. १ रजनी; रात्रि; सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ; पृथ्वी दैनंदिन गतीनें आपल्या आसाभोंवतीं फिरतांना तिचा सूर्यानें अप्रकाशित असलेला अर्धा भाग. २ रातकिडा; झिल्ली. [सं. रात्रि] (वाप्र.) **०ओरडणें**–झिल्लीच्या शब्दानें नादणें. **०वैऱ्याची जाणें**–अतिशय दुःखांत व हालांत रात्र जाणें. **मरती रात्र झाली**–शपथेचा एक प्रकार. बंदाखालीं बसणें पहा. सामाशब्द–**०किडा**–पु. रातकिडा; झिल्ली. **रात्रंदिवस, रात्रंदिस**–क्रिवि. रात्रीं व दिवसां; अहर्निश; अहोरात्र; सबेदा. **रात्रांध**–वि. रात्रीं ज्यास दिसत नाहीं असा; रातांधळें झालेला. [सं.] **रात्रि**–स्त्री. रात्र; रजनी. [सं.] **रात्रि(त्रि)चर**–पु. १ निशाचर; राक्षस. २ चोर. [सं.] **रात्रिदिव**–क्रिवि. (काव्य) रात्रीं व दिवसां; सर्वकाळ. 'जे रात्रिदिव तुझें हित साधाया धरूनि धनु जपती।' –मोकर्ण ३.३७. [सं.] **रात्रिवितीं**–क्रिवि. रात्रीं; भर मध्यरात्रीं [रात्रि+वितीं] **रात्रौ**–क्रिवि. रात्रीस; रात्रीच्या ठायीं. [सं.] **रात्रौणें**–अक्रि. रात्र करणें. 'ऐसेआंहीं यावें रात्रौनि सायासीं।' –शिशु १८३.

रातणें—अक्रि. १ (काव्य.) रतणें; अनुरक्त होणें; भुलणें; भाळणें. 'अभंगकडवें नामगोष्टी माझी सोय सांड। आतां रातले अनंता तुका म्हणे।' २ रमणें; रत होणें; विलास करणें. 'आपुली अंगना रातली परा।' –मुआदि ३४.९. [सं. रत]

रातनबाव, रातंबाव—स्त्री. (प्र.) रतनबाव पहा. पाटाचें पाणी घेण्याकरितां खणलेली खांच.

रातब—पु. रतीब; खुराक. [अर.]

रातंबा—पुन. १ रातंबीचें फळ; कोकंब. २ तांबडया आंब्याची जात. **रातंबेपिकणें**–(ल.) उन्हांत गेल्यामुळें गोऱ्या, नाजूक मनुष्याचे गाल रक्तवर्ण होणें. **रातंबी**–स्त्री. अमसुलाचें झाड; हें झाड कोंकण, मलबार, उत्तरकानडा या भागांत होतें. ह्याच्या फळास रातंबे किंवा कोकंब म्हणतात. फळांतील मगज खातात पाण्यांत कोळून साखर घालून सरबत करतात. बियांचें तेल खाण्यास व औषधास उपयोगी आहे. [सं. रक्तक] **रातंबें**–न. रातंबीच्या झाडाचें फळ. **रातंबेल**–न. रातंबीच्या बियांचें तेल; कोकंबतेल. [रातंबी+तेल]

रातवा-मसाला—पु. रोजचा खुराक व इतर योग्य खर्च. 'तेथील कमाविसदार यांस तुम्ही रातबामसाले विशीं कागद व जासूद जोडी देणें.' –पया २०२.

रातवणी—न. (कु) १ फार ऊन पाणी. २ लग्नांत वधूवरांना खेळण्यासाठीं केलेलें लाल पाणी. **रातव्याचा रुपया**–पु लग्नाच्या दिवशीं नवरा मुलगा नवरीच्या घरीं येतांना उपाध्यायास द्यावयाचा रुपाया.

रांता—पु तांदळांची एक जात; तांबडेतांदुळ. –वि. १ काळसर तांबडा (तांदूळ, फळें, खाण्याचे कंद.) २ तांबूस (डोळे). [सं. रक्त=तांबडा] सामाशब्द– **रातांजन**–पुन. एक झाड.

'जाई जुई रातांजन।' –ह १४.१२७. **रातांबा-बी-बें, रातांबेल**–प्र. रातंबा इ० पहा. **रातांळी**–स्त्री. (प्र.) रताळी पहा. एक वनस्पति. **रातांळूं-ळें**–न. रतांळें पहा. एंक कंद. **रातोत्पल-ठ**–न. तांबडें कमळ. 'अति सुरंग चरणतळें। उपमे कठिण रातोत्पलें।' –एरुस्व १.२१. [सं. रक्तोत्पल]

राद्धांत—पु. सिद्ध केलेलें सत्य; प्रमाणानें सिद्ध, ठरविलेली खरी गोष्ट किंवा अनुमान; सिद्धांत. [सं.]

रांधण—न. मातीचा तवा; पदार्थ भाजण्याचें खापर. [सं. रध्]

रांधण-न—न. १ शिजविणें; रांधणें; पाककिया. २ रांधण्याचें भांडें, मडकें. 'रांधण नाहीं आमुचे घरीं' –भवि ९.१७०. ३ स्वयंपाक. ४ (गो.) चूल. [सं. रध्-रंधन] **रांदायणी**–स्त्री. स्वयंपाकीण बाई. [सं. रंधन] **रांधचेकुड**–स्त्री. (कु.) स्वयंपाकघर. **रांधणी**–स्त्री. (व.) स्वयंपाकघर. **रांधणें**–सक्रि. शिजविणें; उकडणें. [सं. रंधन] **म्ह०** सारी रात्र जागली आणि शेंगावांगीं रांधलीं. **रांधें घर**–न. १ स्वयंपाक घर; रांधतेंघर. २ माजघर. **रांधतेंघर**–स्त्रीन. (ना.) स्वयंपाकघर; पाकशाला. **रांधनीपल्ल**–न. (गो.) चुलखंड. **रांध(दा)प**–न. १ शिजविणें; उकडणें. २ रांधलेले पदार्थ; स्वैंपाक. [रांधणें] **रांधपखण**–न. (हेट.) स्वैंपाकघर. **रांधपी**–पु. १ सैंपाकी; आचारी. २ (हेट. नाविक) जहाजावर जेवण तयार करणारा इसम. [रांधप] **रांधपीण**–स्त्री. (गो.) स्वयंपाकीण. [रांधप] **रांधय**–न. (गो.) एक आमटीचा प्रकार. **रांधवणा**–पु. सैंपाकी; आचारी. 'बल्लव रायाचा रांधवणा।' –मुविराट २.४४ **रांधवणी**–स्त्री. स्वयंपाक करणारी सुगरण स्त्री. 'जैसी रांधवणी रसोय निकी।' –ज्ञा २.२५४. –वि. स्वयंपाक करण्याची(चूल). 'रांधवणी चुलीपुढें।' –ज्ञा १३.५६२. **रांधवणी**–न. स्वयंपाकाचीं खरकटीं भांडीं व हात धुतलेलें पाणी. [रांधणें+पाणी] **रांधापघर**–न. (रत्नागिरी) स्वयंपाकघर. **रांधिये उणें**–वि. पुरतेपणीं किंवा मुळींच न शिजविलेलें. **रानपीण**–स्त्री. (कु.) स्वयंपाकीण. [रांधण]

राधा—स्त्री. १ कृष्णसखी; अनयाची स्त्री. २ नाचकामाकरितां स्त्रीवेष धारण करणारा पुरुष. **राधाईमावशी**–स्त्री. (जादूगार व कोल्हाटी लोकांत) नळीच्या तोंडाशीं असलेली नाचणारी बाहुली. **०नगरी-नगरी रेशीम**–न रेशमाची एक जात. **राधाष्टमी**–स्त्री. राधेचा वाढदिवस म्हणून पाळण्यांत येणारी आश्विन वद्य अष्टमी. [सं.] **राधेय**–पु. राधापुत्र कर्ण. [राधा=एक कोळणीचीं स्त्री.]

रांधा—पु १ रसायन; शिजवून केलेलें मिश्रण; पाक; काला. 'शरीर अवगुणांचा रांधा।' –तुगा ७३९. २ रसायन तयार करण्याची क्रिया, कृति. ३ शिजविणें. ४ शिजलेलें अन्न. [राधणें] **म्ह०** रांधा वाढा उष्टीं काढा.

रान—न. (जंबिया) चड्डीच्या काढणीजवळील मांडीवरचा पुढील भाग; बाँकमधील एक डाव. आपल्या हातांतील जंबियानें जोडीदाराच्या उजव्या मांडीवर चड्डीच्या काढणीजवळ मारणें. [फा.]

रान—न. १ जंगल; वन; विशेषतः जंगलांतील खुजा, ठेंगण्या झाडाझुडपांचा समुदाय. २ तळवट; माळ; रुक्ष प्रदेश; नापीक व निर्जन प्रदेश. ३ मनुष्यास उपभोग्य असा भाजी-पाला इ०कांहून भिन्न असें तण, गवत, उपद्रवी–निरुपयोगी वनस्पती इ०. 'भाजीचे वाफ्यांत कोठें कोठें रान रुजलें आहे तें उपटून टाक.' ४ शेतांत उगवणारें गवत; तन. ५ शेत. ६ झाडी; राई; बन; वृक्षवाटिका. 'बंदर किनाऱ्यास सारें नारळीचें रान.' ७ देश; प्रदेश; भाग. 'मारवाडदेश म्हणजे उंटाचें रान.'' त्या रानचे मनुष्यास हें रान मानत नाहीं.' ८ विदेश; परका मुलुख. 'परस्परें या रानांतील उमराव व रजवाडे यांस पत्रें देऊन तुमची कुमक करवितों.' –भाब १३. ९ (ल) फार मोठी वाढलेली हजामत. प्रदेश ह्या सामान्य अर्थी रान शब्दापूर्वी विशेषणात्मक शब्द जोडल्यानें त्याचा विशेष अर्थ होतो; उदा० डोंगररान; खडकरान; धोंडेरान किंवा गोटेरान; बनजररान गवतरान; माळरान इ० तसेंच काळें रान, पांढरें रान, चिक्कणरान काळथा–पांढऱ्या–चिक्कण मातीचा प्रदेश. नवें रान=पूर्वी जंगल किंवा माळ असून नुकतीच लागवडीस आणलेली जमीन [सं. अरण्य; प्रा. रण्ण] **म्ह०** (गो.) रान झालें लागीं घरां जाली पैस=म्हातारपण प्राप्त होणें, मरण जवळ येणें या अर्थी. (वाप्र.) **०उठणें**–लोक खवळणें; क्रुद्ध होणें. 'म्युनिसिपल इमारतीवर संयुक्त निशाण लावण्याचा ठराव हुजूरपक्षानें फेटाळला त्यामुळें शहरांतील रान उठलें होतें.' –के २२.७.३०. **०उठविणें-जागविणें**–पारधीकरितां धडधड आवाज करून सावजांना जागें करणें. झाडींतून पारध, सावज बाहेर हुसकणें. 'रान उठविल्याशिवाय, जागविल्याशिवाय शिकार कशी सापडेल?' **०काढणें**–१ जंगल–जमीन लागवडीस आणणें. २ झाडें झोडपून व ओरडून ओरडून शिकार उठवणें. ३ रानाचा, जंगलाचा शोध लावणें. **०खवळणें**–१ एखाद्यावर खवळणें; उठणें (रान, श्वापदें). २ अतिशय क्षुब्ध होणें, (राग, भूक, लोभ, काम इ० कानीं). 'लवकर जेवायला वाढा, आज इकडे रान फार खवळलें आहे.' **०घेणें**–१ रानांत पळून जाणें (गुरांनीं). २ (ल.) वेढंग मार्गाचा स्वीकार करणें; बारगळणें. ३ रानांत शिरणें पहा. **०बदलणें-सोडणें-पारखें होणें**–(ल.) आपलें मन किंवा उद्देश बदलणें; एखाद्यासंबंधीचा आपला विचार फिरविणें; आपला पूर्वीचा मुद्दा सोडून देणें. **०भारणें**–१ सर्व प्रदेशावर जादू पसरणें; मंत्र टाकणें. 'तमाम गारोडी रान भारतो तसा प्रकार त्यानें केला.' –भाब

२४. २ (ल.) यथास्थित पैसे चारणें. ०मानणें–त्या देशाची हवा इ० प्रकृतीस मानवणें, पसंत पडणें. ' कोंकणच्या माणसास हे रान मानवत नाहीं. ' ०हांकणें– (शिकार उटविण्याकरितां) झाडें झोडपणें व आरडाओरड करणें. **रानांत, आडरानांत पडणें**–एकटें सांपडणें; उदास होणें. **रानांत शिरणें**–(ल.) (संभाषणप्रसंगीं) सरळ मार्ग सोडून अयोग्य गोष्टी सांगत बसणें; विषयांतर करणें; बहकणें. **रानीं रिघणें**–अरण्य सेविणें. ' ब्रह्मसुकाळु लाधला ते ही । जे रानीं रिगाले । ' –ऋ १६. **रिकाम्या रानीं**–क्रिवि. बेफायदेशीर; व्यर्थ; निरर्थक; फुकट(बोलणें, चालणें). ' आतां एथें काम नाहीं काज नाहीं. रिकाम्यारानीं कशाला बसावें, रहावें, फिरावें इ०. ' रान या शब्दापुढें पक्षी, पशु व वनस्पति यांचीं नांवें जोडून रानटी किंवा न माणसाळलेला, न लागवड केलेला या अर्थी बरेच समास होतात. जसें:– रानडुक्कर; रानमांजर; रानकेळ; रानउडीद; रानतूर; रानपडवळ; रानमटकी; रानमसूर; रानमाठ;रानमूग इ०. तसेंच रानआंबा–केळी–कोंबडा–जेवण. या व यासारख्या दुसऱ्या अनेक सामासिक शब्दांत रान ह्याचा रानांत राहणारा किंवा होणारा असा अर्थ होतो; कांहीं विशिष्ट सामाशब्द– ०**आंबा**–पु. वृक्षविशेष. ०**आलें**–न. रानांत होणारें आलें. ०**आळू**–न. तेरें अळूं. हें पर्जन्यकाळीं उगवतें; याचा रंग पांढरा, हें फार थंड आहे. यांची भाजी चागली होते. ०**कट**–वि. खेडवळ; गांवढळ; रानावनांतील (मनुष्य, पशु). [रान] ०**कंद**–पु. एक कंद. ०**करी**–पु. रान्या; गवत, लाकूडफांटा इ० आणण्याकरितां रानांत फिरणारा माणूस.०**काळ्या**–वि. शिकार करण्यासाठीं रान काढण्याकरितां लावलेला (मनुष्य); पारध्याकरितां सावज कचाट्यांत आणणारा. ०**कांदळ**–न. एक वन्य वृक्ष. ०**कापशी**–स्त्री. रानांतील कापशीचें झाड; देवकापशी, देवपळ्ही-हून भिन्न व पळ्हेंशीं जुळणारी. हिचें बीं लहान व वाटोळें असून देवकापशीचें मोठें व लांबट असतें. ०**कापूस**–पु. रानकापशीचा कापूस. ०**कावळा**–पु. कावळ्याच्या जातींतील जंगली पक्षी. ०**केळ–ळी**–स्त्री. केळीची जंगली जात. हिच्या पानावर जेवतात. कांदा उकडून किंवा वाळवून त्याचें पीठ करून खातात; कवदर व ही एकच. कवदर पहा. ०**कोंबडा–डी–डें**–पुस्त्रीन. जंगली कोंबडा. ०**खरडा**–पु. जंगलखरडा पहा. ०**गट**–वि. १ खेडवळ; गांवढळ. २ वन्य; लागवडीशिवाय उगवणारा. [रान] ०**गांजा–ज्या**–पु. एक औषधी मूळ; सालवण. यांचीं पानें बेलाप्रमाणें त्रिदळ असून यास निरनिराळ्या रंगांचीं फुलें येतात. याचें मूळ सर्व प्रकारचे तापावर गुणकारी आहे. ०**गाय**–स्त्री. तार्तरी देशांतील गाय; वनगाय. ०**गोवरी**–स्त्री. जंगलांत सांपडणारें इतस्ततः पडलेलें शेण, शेणी. याच्या उलट शेण थापटून लावलेली गोवरी. ०**घेवडा**–पु. एक वेल.० **घोळ**–स्त्री. घोळ नामक भाजीचा एक प्रकार. हिचें पान रंगानें तांबूस व चरबट असतें. ०**चा राजा**–पु. भील किंवा कातकरी. ०**चिमणी**–स्त्री. १ चिमणीसारखा एक लहान पक्षी. २ जांभळीं व पांढरीं फुलें येणारें एक झाड. ०**जाई**–स्त्री. उंच वाढणारें वेलासारखें झुडुप. ०**जेवण**–न. वनभोजन; रानांत किंवा झाडाखालीं केलेलें जेवण. **रानट, रानक(ग)ट**–वि. १ रानांत राहणारा; रानटी; अज्ञानी. ' होतां तापत्रयार्ते त्वरित भववनीं रक्षितां रानटाचा । ' –केका १२२. २ आडगांवीं राहणारा; शहर, कचेरी, दरबार इ० ठिकाणीं न जाणारा; अडाणी (मनुष्य). ३ जींत भात, गहूं इ०न येतां गवत फार उगवतें अशी जमीन.०**टाकळी**–स्त्री. टाकळीची एक जात. **रानटी–ठी**–वि. १ रानासंबंधीं; आपोआप उगवणारा. २ गांवढळ; खेडवळ; रीतभात नसलेला. [रान] ०**टोणगा**–पु. जंगली टोणगा; रेडा. ०**टोळ**–पु. टोळाची एक जात. ०**डुक(क्क)र**–पुन. भुइमूग, उंस, भात इ० पिकांचा फन्ना उडविणारें रानटी जनावर. ०**तरवड**–पु. तरवडाची एक जात. ०**तीळ**–पु. काळा तीळ पहा. ०**तुळस**–स्त्री. एक वनस्पति; वैजयंती; ही तुळशीसारखीच असते. पानें मात्र मोठीं असतात. हिला मंजिऱ्या येतात. बीं काळें, किंचित् तांबूस व खसखशीएवढें असून पाण्यांत घातलें असतां फुगतें. हें तुकुमराई (सबजाचें बीं) प्रमाणें असतें. यासहि तुकुमराई म्हणतात. ०**तूर**–स्त्री. एक लहान पिवळ्या फुलांचें झुडुप. ०**तेरडा**–पु.तेरड्याची एक जंगली जात.०**दांडगा**–वि. आडदांड;रानटी; धिप्पाड; राक्षसी काम करणारा. ०**दांडगे**–पुअव. सर्व तऱ्हेचीं शस्त्रें घेऊन शत्रूचा किंवा लुटारू धाडीचा प्रतिकार करण्याकरितां जाणारा शेतकरी किंवा खेड्यांतील लोकांचा समुदाय. ०**निंबू**–न. राननिंबोणीचें फळ. **निंबोणी–निंबण**–स्त्री. एक मोठें काटेरी झाड. ०**निवडुंग**–पुन. जंगली निवडुंग. ०**पासरा**–पु. दुकानदारीची झिंबड. ०**पाळ**–वि. नापीक;भुकिस्त; वरड; माळवजा (भातजमीन). ०**पिंपळ**–पु. पारोसा पिंपळ; एक झाड. ०**बाजरी**–स्त्री. गवतासारखी वनस्पति. ०**भरी**–क्रिवि. रानोमाळ. ' रानभरी झालें साधारण । ' - एभा२३.३१६. ०**भरी–भरू**–वि. १ भयभीत; घाबरलेला; पलायमान; परागंदा (पशु, मनुष्य). ' महा वारण जे उन्मत्त । दैत्यें सोडिले तयावरते । तयास प्रल्हाद सिंह दिसत । मग ते होत रानभरी । ' २ (ल.) चैनीकरितां इतस्ततः भटकण्याच्या हेतूनें ज्यानें आपली बायकापोरें सोडलीं आहेत असा. [रान+भरणें] ०**भरू होणें**–१ रस्ता चुकणें; आडरस्त्यास जाणें. २ गोंधळणें; घाबरणें; घाबरें होणें. ०**भाजी**–स्त्री.१लागवडीशिवाय उगवणारी भाजी.२वनांत होणारी खाद्य वनस्पति. ०**मटकी**–स्त्री. रानांत होणारी मटकी, मठ. ०**मसूर**–स्त्री. एक जंगली झाड; हीं झाडें महाबळेश्वराकडे पुष्कळ होतात; ह्यांचें बीं मसुरासारखें असतें. ०**मांजर**–पुन. जंगली मांजर; मोठा व धाकटा असे याचे दोन भेद आहेत. ०**माणूस**–

न. १ एक प्रकारचा वानर. २ (ल.) रानटी; खेडवळ माणूस. ०मूग-पु. रानात होणाऱ्या मुगाची जात. ०मोगरा-पु. अरुंद पानांची जाई. ०म्हैस-स्त्री. जंगली म्हैस. ०राघताण-णी-नस्त्री. रावताण पहा. ०वट-स्त्री. मोठ्या रस्त्यापासून फुटलेली रानास जावयाची वाट 'पुढच्या आंब्याजवळ वाट उजवी फुटली आहे ती रानवट आहे.' -वि. १ जंगली; लागवड न केलेली व साफ न केलेली (जमीन). २ खेडवळ; गांवढळ; रानटी (मनुष्य). ३ वन्य आपोआप उगवणारा (वृक्ष, वनस्पती). ०पत-न. (राजा.) वन्य वृक्षाचें पान; ज्यांचीं पानें सामान्यतः भोजनाकरितां, पुडयाकरितां उपयोगी पडत नाहींत अशा झाडाचें पान. [रान+पत्र] ०वन-न. (व्यापक) रान; जंगली प्रदेश; रानांत फिरणें, वन्य पदार्थांवर उपजीविका करणें किंवा निर्वाहाकरितां वन्य पदार्थ शोधणें. (क्रि० करणें; पाहणें; फिरणें; हिंडणें). 'रानवन मला व्हावयाचें-किंवा मी करीत असतों.' [रान+वन] रानवा-पु. लागवडीस न आणलेली पडीत जमीन; जंगल; रान. 'गांवाला रानवा असल्यावांचून तृणकाष्ठाची सोय होत नाहीं.' रानवाट-स्त्री. जंगली व रानवट प्रदेशाकडे जाणारी वाट. ०वाळूक-न. (थट्टेनें, ल.) दगड. ०वाळूक चारणें-(ल.) दगड मारणें. ०शकट-पु. एका जातीचें श्वापद. 'रानशकट आणी रीसें।' -दा ३.७.९. ०शेकट-पु. रानशेवगा पहा. ०शेण-शेणी-गवरी-स्त्री. १ रानांत पडलेलें गाई-म्हशींचें वाळलेलें शेण. याच्या उलट वळशेण. २ जेव्हां एखाद्या मनुष्याचें ज्ञान, समज, सामर्थ्य किंवा संपत्ति यासंबंधीं पूर्णपणें निषेध दाखवावयाचा असतो तेव्हां उपमानाप्रमाणें योजलेल्या (शेण, गोवऱ्या, माती, धूळ, दगड, धोंडा, राख इ०) शब्दांपैकीं हा एक शब्द आहे. उदा० त्याला रानशेणीचें पीठ समजतें? =त्याला काय समजतें? ०शेर-पु. एक वनस्पति; हुरा. ०शेवगा-पु. एक झाड. सामान्यतः रानेशर. ०सटा(टा)वी-स्त्री. सटवीचें रूप धारण करणाऱ्या देवीचें किंवा दुर्गेचें नांव. 'उच्छिष्टचांडाळी रानसटवी जखणी।' -ह १३.६८. ०सावज-न. रानांतील जंगली पशु. 'कीं रानीचें रानसावज उन्मत्त।' -नव २२.१३१. ०सिवार-न. शिवारांतील जंगल. 'गांवचें रानसिवार खोताची सत्ता आहे.' -मसाप २.५९. ०सोडवण-स्त्री. रान तोडून साफ केल्याबद्दलची जकात. -अस्पृ ३८. ०सो(व)र-सोरु-पु. रानडुकर. 'रानसोवर बळकट।' -कालिका २२.१९. [रान सुकर-सुअर-वर] ०हळद-वी-स्त्री. एक वनस्पति. ०हुरा-पु. सामान्यतः रानशेर रानावळी-स्त्री. एक लहान फुलझाड. हिचा औषधांत उपयोग करतात. रानी-परज-स्त्री. सुरतपासून नवापूरपर्यंत राहणारे रानटी लोक. रानोमाळ-क्रिवि. १ रानांत आणि माळांत. २ तजावजा; अव्यवस्थित; अस्ताव्यस्त रीतीनें; पांगून. 'तैसे ब्राह्मण रानोमाळ। भयें करूनि पळतात।' ३ (ल.) पसरल्यासारखें; इकडे तिकडे अस्ताव्यस्त फेकल्यासारखें. 'वाऱ्यानें पोथीचीं पत्रें रानोमाळ झालीं.' [रान+माळ] रानोरान-क्रिवि. रानांतून आणि वनांतून; दरीखोऱ्यांतून; सर्व देशभर 'माझी गाय चुकली म्हणून मी रानोरान फिरलों' [रान द्वि.] रान्या-वि. रानावनांतील; खेडवळ; गांवढळ; रानकरी; रानट. [रान]

. रान्ह-न्हें-न. भाकरी भाजण्याचा मातीचा तवा; परळ. रांधण पहा. [रांधणें]

रांप-पु. (बे.) घराची बाजू किंवा पडवी.

रा(रां)प-पु. १ तुरटपणा; विशिष्ट फुलांचा व वनस्पतींचा तुरट आणि आंबट रस. (क्रि० चढणें; येणें; बसणें). २ कोवळी सुपारी किंवा एखादा तुरट पदार्थ ज्यांत शिजविला आहे असें पाणी; फल, पुष्प इ० कांच्या द्रवाच्या अंगीं असलेला काळा इ० रंग. 'सुपारीचा रांप धोतरावर पडला तर धोतर खराब होईल.' रा(रां)पणें-अक्रि. १ हवेवर उघडें ठेविल्यामुळें किंवा लोखंडाशीं संबंध झाल्यामुळें काळें होणें (तुरट किंवा आंबट फळ, भाजी-पाला). काळवटणें. २ छानदार छटा येणें; रंगणें. 'तया अनुरागाचेया चोळे। रापें इंद्रियांचें मैळें।' -भाए ७९६. ३ चांगल्या रीतीनें भिनणें, मिसळला जाणें, मुरणें (मसाल्यानें खार, क्षारांनीं खत इ०). ४ अग्नीच्या उष्ण तेमुळें गुणविशिष्ट आणि स्वादिष्ट होणें (आंबे इ०). ५ आंत खोल भिनणें व छटा येणें (खार, मीठ, क्षार, रंग). ६ सर्व अंग व्यापणें; सर्व शरीरावर परिणाम होणें (ताप, उपदंश इ० आजार, विष किंवा दुसरें रोगकारक द्रव्य, औषध यांचा). ७ असा विकार भोगणें (अंग, शरीर यांनीं). ८ सर्वत्र पसरणें व विश्वासास पात्र होणें (आवई, बातमी). ९ पूर्ण, सतेज, टवटवीत, जिवट दिसणें (पूर्वी कृश व निस्तेज असलेला मनुष्य). १० व्यापणें; व्यापणें व ताब्यांत, कबज्यांत घेणें. 'फौजेनें किंवा परचक्रानें मुलूक रांपला.' 'गवतानें शेत रांपलें.' ११ (ल.) परिचित, चांगला माहितगार होणें. [राप]

रां(रा)पण-स्त्री. (कु. कों.) मासे धरण्याचें मोठें जाळें; (कु.) अनेक जाळीं एकत्र करून मासळी धरण्याचें साधन.

रांपणी-स्त्री. १ चाचपणी; दाबणी. २ चाचपून शोधणें. [रांपणें] रांपणें-सक्रि. १ चाचपणें; पाहण्याकरितां दाबणें व चिवळणें. 'म्यां त्याचें पोट रांपून पाहिलें, पोटांत कवळू आहे.' २ (आटयापाटयांचा खेळ) मुयदंड नामक लांब मध्यरेषेवरून चालणें; अशा रीतीनें खेळणाऱ्यांना ती रेषा ओलांडूं न देणें. ३ -अक्रि. (अंधारांत) चाचपून पाहणें, चांचपडणें.

रापदळी-स्त्री. (महानु.) शरीर हलविणें; अंगविक्षेप. 'रळियां रापदळिया करीतु।' -दाव २१६.

रापणें, रांपा—नपु. (राजा.) सुपारीवरचा पापुद्रा सोलण्याचें एक हत्यार; (कु.) रांपो. सुपारी इ० तुरट किंवा आंबट फळें कापण्याचें हत्यार. [प्रा. रंप=छिलणें]

रांपा—पु. (चांभारी धंदा) चामडें कापण्याचें, दोहों बाजूंस धार असलेलें हत्यार.

रांपी—स्त्री. १ चांभाराचें, कातडें कापण्याचें उलट्या खुरप्याच्या आकृतीचें हत्यार; कापणी. २ लहान रांपा. रांपा पहा. [प्रा. रंप=छिलणें]

रापा—स्त्री. पावसाळा; एकसारखी सतत वृष्टि. (क्रि० घालणें; बसणें; पडणें; लागणें; चालणें; जिरणें; विरणें; मोडणें). **०लागणें**–अक्रि. एकसारखा पाऊस पडणें. **रापेचा पाऊस**–पु. एकसारखी सतत वृष्टि; संततधारपाऊस.

रांफ, रांफेचा पाउस—स्त्रीपु. राप पहा. एक सारखी वृष्टि. (क्रि० घालणें; बसणें; पडणें; लागणें; चालणें; विरणें; जिरणें; मोडणें).

राफजी—पु. बोहरी लोकांस तुच्छतेनें वापरण्यांत येणारा शब्द. –मासिक मनोरंजन पृ. १०६ फेब्रुवारी सन १९३५.

राब—स्त्री. १ काकवीपेक्षां दाट असा उसाच्या रसाचा रांधा. २ दुखणेकऱ्यास पिण्यास द्यावयाचें पेय. पीठ घालून दाट केलेलें आणि कढविलेलें साखर घातलेलें पाणी. ३ (कों.) रोपाकरितां भाजलेली जमीन. ४ अशा रीतीनें तयार केलेल्या जमिनीवर केलेलें रोप. ५ जमीन भाजण्याकरितां लागणारें गवत, पानें, केरकचरा, टहाळ इ०. ६ तेला–तुपाचा गाळ, बेरी. [देप्रा. रब्बा; हिं. राब] (वाप्र.) **०करणें**–(जुन्नरी) जमीन भाजण्यासाठीं पान–पाचोळा वगैरे शेतांत पसरणें. 'त्यानें भातासाठीं राब केला आहे.' **०जाळणें**–(जुन्नरी) शेतजमीनीवर पान–पाचोळा पसरून जाळून जमीन भाजणें. **०बरडळणें**–भाजलेली जमीन नांगरून दांताळ्यानें ढेकळें फोडून सारखी करणें. **राबड**–स्त्री. चिडबिड; रेंदा; चिखल; गाळ; खळमळ; रेबड. [राब] **राबडी**–स्त्री. रबडी पहा. बासुंदीचा एक प्रकार; साखर व मसाला घालून आटवून दाट केलेलें दूध. २ पातळ गूळ; पातळ चिखल [राब] **राबणी**–स्त्री. टहाळ, शेण, गवत, बारीक माती घालून रोपटा तयार करणें व भाजणें; भाजावळ; दाढ. **राबणें**–सक्रि. जमीन नांगरणें, लागवडीस आणणें. 'आम्ही वर्षास दहा बिघे शेत घरीं राबतो.' **राबरी**–स्त्री. घट्ट न झालेला, पातळ गूळ. **राबाचें पाणी**–न. उपयोग केलेलें पाणी.

राब—पु. १ रीत. २ स्वभाव. ३ वारंवार जाणें येणें; एखादें कृत्य पुन्हां पुन्हां करणें; अभ्यास; वापर (क्रि० घालणें; पाडणें). 'आताशीं घरांत मनुष्यें थोडीं म्हणून पुढला दरवाजा बंद करून मागील दरबाजानेंच राब घातला आहे.' ४ आटोकाट मेहनत; श्रम. 'कुकर्माचा करवी। रावु जरी।' –ज्ञा १३.३०. ५ धुमाकूळ. 'हा ठायवरी लोभु। करी स्वैरत्वाचा रावु।' –ज्ञा १४.२३०. ६ कुटुंबांतील माणसांची वर्दळ; विस्तार; पसारा. 'तुमचा राब मोठा. तुम्हाला एवढें घर पुरणार नाहीं.' [रावणें] **०लावणें**–सक्रि. लावणें.

राबड—स्त्री. मेहनत; श्रम; कष्ट. **राबडणें**–अक्रि. मेहनत, श्रम करणें. [रावणें]

रांबणावळ—स्त्री. (कों.) १ ओढाळ जनावरास ताळ्यावर आणून तें कळपाबरोबर चालण्याकरितां गुराख्यास द्यावयाचें वेतन, बक्षीस.

राबणी राबणूक—स्त्री. १ येजा: वापर; जावा येवा; राहणें; जन्म घालविणें. २ संबंधीचा, परिचित होणें. ३ पहारा; चाकरी. 'सर्वेंद्रियाच्या आंगणीं। विवेक करी राबणी।' –ज्ञा १४.२०६. ३ (व्यापक) लागवड; नांगरणी; शेतीचें काम. 'दहा बिघे जमीनीची राबणी करावयास शंभर रुपये तरी खर्चास पाहिजेत.' [रावणें] **रा(रां)बणें**–अक्रि. १ संबंधीचें होणें; परिचित होणें (परक्या कळपाशीं गाय इ०, नुकतांच शाळेंत घातलेला मुलगा, घरांस रानमांजर, ओझ्यास खांदा, पाठ इ०). २ चांगला मळलेला असणें (रस्ता); वारंवार लिहिल्यामुळें शाईनें सारवल्यासारखा होणें (खर्डा).

राबणें—अक्रि. नित्य येणें जाणें असणें; राबता असणें (रस्ता, मैदान, जमीनीचा तुकडा यावरून); वारंवार जाणें येणें असणें (एखाद्याच्या घरीं, एखाद्या जागेंत); राहणें; असणें; जन्म घालविणें (एखाद्या घरांत, जागेंत); विशिष्ट रीतीनें, संबंधीनें जन्म घालविणें; वापरणें; परिचित होणें. **राबता**–पु १ वारंवार जाणें येणें; येणाऱ्या जाणाऱ्यांची गर्दी, दाटी, वर्दळ; वापर; परिपाठी; अभ्यास; संबंध; पौन:पुन्य (एखाद्या कृत्याचें). 'आज माणसांचा राबता दिसत नाहीं.' –मदरु १.५५. २ ऋणानुबंध; स्नेह; दळणवळण. 'आपला व खानाचा स्नेह व राबता बराच आहे.' [अर. रफ्त]

राबणें—क्रि. मेहनत, श्रम करणें. **म्हण** १ राव राबतात देव कांपतात २ राबेल तो चाबेल. **राबता**–पु. महारांकडून हक्कानें घेण्यांत येणारें सरकारी काम किंवा त्या कामाच्या मोबदला त्यांजकडून घेण्यांत येणारा पैसा. –वि. मेहनत करणारा. 'जया प्राणाचे घरीं। अंगें राबते भाऊ चारी।' –ज्ञा १३.२८. **राबता महार**–पु. गांवचें सरकारी काम करणारा महार; पाळीचा महार. 'व राबता महार वगैरे मशारनिल्हे यांजकडे देत जाणें.' –थोमारो २.४७. **राबती**–वि. चालू; लागवडीची (जमीन). 'इनाम पडजमीन बिघे ५ देवविली ती राबती जमीन होती.' –बाडबावा २.८३. **राबतीण**–स्त्री. (व.) मालकाच्या शेतांत

काम करणाऱ्या नोकराची बायको. **राबत्या**–पु. सार्वजनिक काम करणारा महार; पाळीचा महार; वतनीमहार. [राबता]

राबस—वि. १ ठोसर (नागली, कांग, कुळीथ, राळे, सावा इ० धान्यास म्हणतात). २ अरवट चरबट; वाईट (अन्न, जेवण). ३ घाणेरडा; अव्यवस्थित; डुकरासारखा खाणारा किंवा तशी खाण्याची रीत.

राँबा—पु. (सुतारकाम) सामता; टोपण; छिद्र पाडण्याचें हत्यार.

रांबा(ब)ड-डा—वि. (राजा.) भटकणारा; स्वैर वागणारा; उनाड; बारगळ. **रांबा(ब)डकी**–स्त्री. (राजा.) स्वच्छंदी वर्तन; उनाडकी. [रांबाड]

राभस—वि. राबस पहा.

राभस्य—न. १ अविचार; दांडगेपणा. ' म्हणोनि तैसी कर्मा । राभस्यें सांडे सीमा । ' –ज्ञा १७.३९६. २ अविचाराचें भाषण. ' येतुलें हें राभस्व बोलिलेती तुम्ही । ' –ज्ञा १०.३१९. [सं रभस]

राम—पु. १ परशुराम, रामचंद्र, बलराम यांस सामान्य संज्ञा. २ (ल) सामर्थ्य; तथ्य; जीव. ' त्या उपरण्यांत आतां कांहीं राम उरला नाहीं. ' ३ (सांकेतिक) सीता किंवा सीताबाई हें जसें अधेलीस त्याप्रमाणे राम हें रुपयास नांव आहे. ४ वाईट बातमी ऐकली असतां किंवा दुसऱ्यानें बोललेल्या दोषादिकांचा निषेध कर्तव्य असतां हा शब्द उच्चारतात. [सं. रम्=रमणें] (वाप्र.) **०नसणें**–(मारुतीला सीतेनें प्रसन्न होऊन दिलेल्या तिच्या गळ्यांतील रत्नहाराचें एक एक रत्न त्यानें फोडून पाहिलें पण त्यांत रामाची मूर्ती त्यास दिसेना म्हणून तें व्यर्थ समजून तो सर्व हार त्यानें फोडून टाकला ह्या कथेवरून) सत्व, अर्थ नसणें. **०म्हणणें-होणें**–(मरतांना माणसाच्या तोंडांत रामाचें नांव यावें अशी हिंदूची समजूत आहे ह्यावरून) मरणें; मरण्यास सिद्ध होणें; मरणोन्मुख होणें. **रामाचें नांव, रामचर्चा**–एखाद्या गोष्टीचा पूर्ण अभाव होता असें जोरानें सांगावयाचें असतां योजतात. ' अजून तरी त्याला पश्चात्ताप झाला होता म्हणाल, तर रामाचें नांव. ' सामाशब्द– **०कली-ल्ली(भैरव)**–स्त्री. (राग) ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण वादी पंचम. संवादी ऋषभ. गानसमय प्रातःकाल. वरील स्वराशिवाय तीव्र मध्यम व कोमल निषाद ह्या स्वरांचा विशिष्ट प्रयोग रागवाचक असाच दिसतो. ' प्रभात समयीं रामकली । ' –दावि १८६. [रामकेलि] **०कां(का)टी-ठी**–स्त्री. बाभळीची एक जात. हिला पुळाटी किंवा रामबाभळ असेंहि म्हणतात. ही सामान्य बाभळीपेक्षां अधिक उंच, सरळ व गेंददार असते. **०कांठी**–वि. पांढरे रेशमी कांठ असलेलें (वस्त्र). **०कुंड**–न. १ नाशकास गोदावरीवर असलेलें एक कुंड. तीर्थ (स्नान करणें, मृताच्या अस्थी टाकणें इ० करितां). २ (यावरून) कोणत्याहि नदीकाठी असलेलें असें कुंड, तीर्थ. **०कोदंड**–न. रामाचें धनुष्य. ' जसें चातकाला घनाचें चि पाणी । स्वभक्तां तसे राम कोदंड-पाणी । ' [सं.] **०कृष्णपंथ**–पु. आराध्य देवाचीं नावें (राम, कृष्ण, गोविंद, हरि इ०) उच्चारण्याचा पंथ, संप्रदाय. ' ज्ञानदेवा जिणें नामावीण व्यर्थ । रामकृष्ण पंथ क्रमियेला । ' **०गोळा**–पु. (रामनवमीच्या फराळाकरितां केलेला) ताकांत भिजविलेल्या लाहीपिठाचा गोळा. **०चंद्र**–पु. दशावतारांतील सातवा अवतार; दाशरथी राम **०चर्चा**–क्रिवि. पूर्णपणें एखाद्या गोष्टीची नाकबुली किंवा अभाव जोरानें दाखवावयाचा असतां भाषण –संप्रदायांत योजावयाचा शब्द. ' तो तुम्हाला किती सांगो, पण मी त्याला रामचर्चा एक अक्षरहि बोललों नाहीं. ' [सं. राम+चर्चा=उच्चारणें, नांव घेणें] **०जन्म**–नपु १ रामाचा जन्मदिवस. २ रामनवमीचा उत्सव.[सं.] **०जनी**–स्त्री. गाणारी कसबीण, वेश्या. ' गावांत गाणाऱ्या रामजन्या पांचपंचवीस होत्या. ' –विक्षिप्त १.५९. [राम+जानी] **०जयंती**–स्त्री. १ रामजन्माचा वार्षिक उत्सव. २ चैत्र शु० ९. [सं.] **०टेकी**–वि. रामटेक नामक गांवासंबंधीं(विड्याचीं पानें इ०). **०टोला**–पु. १ विटीदांडूच्या खेळांत विटीवर दांडूनें मारलेला पहिला टोला. (क्रि० मारणें).२ (ल.) जोराचा प्रहार (काठीचा, मुठीचा). ३ मोठी व जाड भाकरी. ४ (सामा.) मोठी, प्रचंड वस्तु. [राम=प्रकर्ष, जोर] **०त(ती)ळ**–न. (गुज. कों.) कारळे. **०तुरई**–स्त्री. एक भाजी. **०तुळस**–स्त्री. तुळशीची एक जात. **०थडी**–स्त्री. पितळेचे मोहरे मणी. –गुजा १७. **०दास**–पु. १ एक प्राचीन महाराष्ट्रीय राजकारणी साधु ह्यानीं ठिकठिकाणीं मठ स्थापून धर्मजागृति केली. ह्यांचे दासबोध, मनाचे श्लोक, रामगीता, दासगीता इ० ग्रंथ प्रसिद्ध आहेत. २ (सांकेतिक) एकआणा. **०दासी-शी**–पु. श्रीसमर्थ रामदास यानीं स्थापिलेल्या संप्रदायांतील मनुष्य. **दासी मल्लार**–पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी मध्यम, संवादी षड्ज गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. **०दूत**–पु. मारुती; वानर. [सं.] **०नगरी**–वि. १ रामनगर संबंधी. २ तांबडे पंख असलेला व आकारानें जाड असलेला (राघू). **०नवमी**–स्त्री. चैत्र शुद्ध नवमी; रामाचा जन्म दिवस. **०नामी**–वि. रामाचें नांव असलेली (आंगठी). **०पंचायतन**–न. राम, लक्ष्मण, सीता, भरत, शत्रुघ्न आणि मारुती यांचा समुदाय. **०पत्री**–स्त्री. खोटी, नकली जायपत्री. मायपत्री व ही एकच. **०पाहारा-पाहरा पारा**–पु. सूर्योदयापासून पहिले

तीन तास; पहिला प्रहर; पवित्र, देवाधर्माचा काल. 'रामपहाऱ्यांत खोटें बोलूं नको, खरें सांग.' **०पात्र**–न. पाणी पिण्याचें पितळी भांडें; फुलपात्र. [सं.] **०पुरी लडी**–स्त्री. रेशमाची एक जात. –मुंव्या ९७. **०प्रतिज्ञा**–स्त्री. सत्य व खात्रीचें वचन. [सं.] **०फळी-फळ**–स्त्री. एक फळझाड व त्याचें फळ. हें झाड बरेंच उंच असतें. पानें अशोकाच्या पानांसारखीं लांबट असतात फळ मोठें असून रंग तांबूस असतो. चवीस सीताफळापेक्षां किंचित् गोड. हें वातहारक आहे. [सं. गुज. रामफल] **०बाण**-पु. १ रामानें सोडलेला बाण. हा कधींहि व्यर्थ जात नसे. (यावरून ल.) २ खात्रीचें, ठाम, अचूक वचन, करार, भविष्य इ० 'त्याचा प्रश्न म्हणजे रामबाण, कधीं खोटा व्हावयाचा नाहीं.' –वि. कधीं न चुकणारें, अचुक गुणकारी (औषध इ०) [सं.] **०बाण औषध**–न. हटकून गुण करणारें औषध **०बाभळ**–स्त्री. बाभळीचा एक भेद. रामकांटी पहा. **राम बोलो भाई राम**–पु (गुज.) प्रेतास नेतांना मोठ्यानें म्हणावयाचे शब्द. **०मं(मां)-दार**–पु. एक वृक्ष; मांदाराचा, रुईचा एक भेद. 'डाळिंब सावरी राममांदार।' [सं.] **०रग(गा)डा**-पु. पराकाष्ठेची दाटी, गर्दी (लोकांची, काळजींची, कामांची, उद्योगांची). [राम=पुष्कळ+रगडा] **०रट्टा**–पु. १ मोठा प्रहार; रपाटा (काठीचा, मुठीचा). (क्रि० दाखविणें; देणें). ३ कचका; भार (अवाढव्य उद्योगाचा, कामाचा). ४ घोटाळा; गोंधळ. ५ दाटी; चेप; गर्दी. [राम=अतिशय+रट्टा] **०रस**–पु. मीठ. [प्रा.] **०रक्षा**–स्त्री. १ रामाचें एक सुप्रसिद्ध स्तोत्र. २ हें स्तोत्र म्हणून अभिमंत्रिलेली विभूति, राख. ३ (निंदार्थी) लाहीपीठ, बाळंतलिंबाचीं पानें, मिरच्या इ० कांची रास. [सं.] **०राज्य**–न. १ ज्यांत लोकांचें सर्व शत्रूंपासुन रक्षण केलें जातें व त्यांजवर न्यायानें व चांगल्या रीतीसें राज्य केलें जातें असें राज्य; श्रीरामचंद्रानें केलें तसें उत्कृष्ट, सुखाचें व शांततेचें राज्य. २ रागें भरण्यास कोणी नसल्यामुळें (मुलानीं) केलेलें स्वैर वर्तन. 'घरांत तीन दिवस कोणी वडील मनुष्य नव्हतें. तेव्हां मुलांनीं रामराज्य चालविलें होतें.' [सं.] (वाप्र.) **०राज्य करणें**–१ सुरक्षितपणें व सुखानें राहणें. २ निर्भयपणें वागणें. **०राम**–पु ब्राह्मणाशिवाय इतर लोक दुसऱ्याच्या सत्कारार्थ एका हातानें वंदन करतांना जो शब्द उच्चारतात तो; अशा प्रकारच्या नमस्कारासंबंधीं शब्द. हा पत्रलेखनांतहि योजितात. [राम] **०राम ठोकणें**–एखाद्याचा निरोप घेणें; त्यास सोडून जाणें. 'परीक्षा झाल्यानंतर शाळेला रामराम ठोकला.' **०रामी**–स्त्री. १ परस्परानीं परस्परास रामराम करणें. २ रामराम करतां येण्यापुरती ओळख. ३ सामान्यतः रमारमी. [रामराम] **०रोट**–पु. (ना.) जाड पोळी, रोटी. –वि. घटिंगण; आडदांड. **०लीला**–स्त्री. आश्विन महिन्यांत उत्तरहिंदुस्थानांत कांहीं ठिकाणीं रामाच्या चरित्राचे केलेले नाटकप्रयोग. [सं.] **०वचन**–न. सत्य भाषण, वचन. [सं.] **०वरदा(यि)येनी**–स्त्री. तुळजापूरची भवानी. 'रामवरदायेनी ते कुळस्वामिणी।' –रामदासी २.१. [रामवरदायिनी] **रामाचें राज्य**–न. रामराज्य पहा. **रामानुज**–पु. वैष्णवांमधील एक पंथ, भेद. [सं.] **रामानुजाचार्य**–पु. वैष्णव धर्मपंथांतील एक पंथप्रवर्तक. ह्यानें वेदांतसार, वेदार्थसंग्रह, वेदांतदीप, ब्रह्मसुत्रें व भगवद्गीतेवरील भाष्य हे ग्रंथ रचिले. रामानुजाचार्याच्या पंथांतील लोक दक्षिण हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत. –ज्ञाको (र) ९८. [सं.] **रामायण**–न. १ रामचरित्रवर्णनपर वाल्मीकीनें लिहिलेलें महाकाव्य; रामकथा; रामकथावर्णनपर काव्य. २ (ल.) लांबलचक, कंटाळवाणी गोष्ट; चऱ्हाट. 'आमचें एकदा रामायण संपू द्या. मग तुम्ही दुसरी गोष्ट काढा.' ४ अस्ताव्यस्त पसारा; घालमेल; गोंधळ. 'त्या पोरानें धान्याचें आणि कागदपत्रांचें रामायण केलें.' [स.] **म्ह०** ताकापुरतें रामायण=आपलें कार्य साधण्यापुरतें आर्जव करणें. **रामेश्वर**–पु शिवाच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकीं दक्षिणेंतील एक स्थान. [सं.] **रामा**–स्त्री. १ सुंदर, रमणीय स्त्री. २ (सामा.) स्त्री. 'पीडित दशाननाला त्या श्वेतद्वीपवासिनी रामा।' –मो रामायणें १.१५३. [सं.]

रामगा—पु. (माण.) भुताचें नांव अगर जात.

रामठ-ठा—पु. हिंग. 'जरी कर्पूरचूर्णें मिश्रित केला। तरी रामठा अंगीं दुर्गंधी।' –जै ४०.१३.

रामणें—अक्रि. (प्र.) रांधणें पहा.

रामाठा-ठ्या, रामेठी-ठा—पुस्त्री.पु. रानांतील एक फुलझाड. त्याला पिवळें झुपकेदार फूल येतें. हें महाबळेश्वरच्या डोंगरावर पुष्कळ सांपडतें. यार्चीं पानें चार बोटें लांब व अरुंद असतात. त्याचा चीक डोळ्यास लागल्यास मोठी इजा होते.

रामोसी-शी—पु. १ एक जात व तिच्यापैकी एक व्यक्ति. ह्यांच्या दोन पोटजाती–पुरंद किंवा भंडाते व भोलगे. यांची मुख्य वस्ती पुणें, सातारा या भागांत विशेष आढळते. हे जागलकी, मजुरी, गाडया हाकणें, हमाली शेत कसणें इ० धंदे करतात. २ (ल.) बिलंदर. [सं. अरण्यवासी–रामवंशी, रामंठ]

राय—स्त्री. मत; अभिप्राय. [फा.]

राय—पु. राजा; नृप. राव पहा. 'ऐसें सांगोनि रायासी।' –एरुस्व ६.४७. [सं. राजा; प्रा. राआ–या; हिं. गुज. राय] सामाशब्द– **०आंवळी-आवळा**–स्त्रीपु. राय आंवळ्याचें झाड व त्याचें फळ. ह्यास हरपरेरवडी अमेंहि म्हणतात. **०कुरा-री**–पु. स्त्री. एक कोंकणी झाड. डाक घेऊन जाणारे शिपाई रात्रीच्या वेळी ह्याच्या लांकडाचा दिवटीसारखा उपयोग करतात. **०केळ**–स्त्रीन. केळीची एक जात व तिचें फळ, हें तांबडया जातीच्या

केळयासारखें असतें. [दे.] **०गिडगिडी**–स्त्री. (महानु.) लहान नगारा. ' रायगिडगिडी बोबडिआं । ' –शिशु १०५३. **०घणस**–पु. सर्पाची एक जात. –प्राणिमो ७०. **०घोळ**–स्त्री. एक प्रकारची भाजी. **०धडक**–पु. (महानु) घाय; घाव. ' मग रायधडक निशान लागला । ' –संत राजी. रु १३.५. **०पण**–न. राजेपणा. ' स्वप्नीचेनि जैं अवतरे । रायपणें । ' –ज्ञा १५.३४०. **०पुरी**–वि. रायपूर शहरासंबंधी (साखर, लुगडें, खण इ०) –पु (साकेतिक) भामटया. **०बोर**–स्त्री.न. एक वृक्ष व त्याचें फळ. **०भुलावण**–स्त्री. राजास भुलवणारी किंवा मोह घालणारी स्त्री; सुंदर व मोहक स्त्री. **०भोग**–पु. तांदुळाची एक जात. –वि. राजानें खाण्याजोगा; उत्तम (पदार्थ). [सं. राज+भोग] **०माड**–पु. १ (कों.) ज्यापासुन माडी काढतात तें माडाचें झाड. २ सरकारी हक्काचा माड. **०मुनी**–स्त्री. एक फुलझाड व त्याचें फूल. **०राजेंद्र**–पु. (पोवाडे काव्य) राजाच्या एखाद्या प्रधानाची पदवी. **०विनोदी**–वि. बहुरूपी व माकडचेष्टा करणारा; मस्करया; नकल्या; माधवी. 'दंडीगार्णे टेहलकरी । रायविनोदी । ' –दावि ४७४. **०शेवती**–स्त्री. एक फुलझाड; शेवतीचा एक प्रकार. **०स्थळ**–न. राजधानी. ' पूर्वकालच्या राजधान्या अशाच किल्ल्यावर करीत. नाहींतर मैदानांतलें रायस्थळ शत्रु केव्हां येऊन लुटून नेईल याचा नेम नसे. ' –के ९.२.३७. **राया**–पु. डौलानें बोलतांना फांकडे, फंदी, अफीणबाज इ० कांनीं स्वतःस लावलेली ऐश्वर्याची व वैभवाची पदवी. [सं. राज्=प्रकाशणें; राय] (वाप्र.) **रायाप्पा नाइकाचा फराळ करणे**–थंडा फराळ करणें; फक्त पाणी पिणें.

राय—न. १ सोन्याचा डांख बसवितांना उपयोगांत आणावयाचें मिश्रण. २ (सोनारांत प्रचलित) तांबें. **रायडें सोनें**–न. (सोनारी धंदा) तांबें मिसळलेलें, मिश्र सोनें.

रायघावळ—न. दोन धागे काळे व एक धागा मावडा असें उभार व भाडवणासहि दोन दोरे काळे, एक मावडा. किनार कोणत्याहि प्रकारची असें विणलेलें लुगडें.

रायजमी—स्त्री. १ राजनीति. २ विचार करणें. [फा.]

रायण—न. कडू वृंदावन. राटोण पहा.

रायणी—स्त्री. एक झाड; खिरणी. [सं. राजादनी; प्रा. रायणी]

रायदिंडा—पु. एक झाड, दिंडयाचा एक भेद.

राय(या)त—स्त्री. कृपा; अनुग्रह; मेहर. [अर. रेआयत्]

रायतावा—पु. रयतावा पहा. प्रजा, विशेषतः शेतकरी वर्ग.

रायतें—न. कोशिंबिरीच्या उपयोगी मुळा, गाजर, काकडी इ० चिरून किंवा किसुन त्यांत मोहऱ्या, दहीं इ० घालून केलेलें तोंडीलावणें; (व. ना.) लोणचें. [राई]

रायनी—स्त्री. (व.) लोणचें; रायतें. [राई ?]

रायपी—पु. (कु.) सोवळेकरी. [रांधपी]

रायबारी—वि. (गो.) मंगलकार्यांत राबणारा.

रायरस्ती—क्रिवि. (गो.) राजरोस. [राजा+रस्ता]

रायराय—वि. राइराई एवढे; बारीक, लहान. ' राय राय तुकडे केले जरी । ' –अफला ८. [राई]

रायवणी—न. १ मोहऱ्या, आबे इ० मिळवून केलेलें तोंडीलावणें. मोहरवणी पहा. २ मोहऱ्यांचें पाणी. ' नाकवणी चुनवणी । मीटवणी रायवणी । ' –दा ३.७.६८. [राई+मोहरी पाणी]

रायवळ—न. जंगली लांकूड (इमारती करितां तयार होऊन पडलेलें)–वि. १ साधा किंवा जंगली साया, शिसव, (खैर व फणस यांशिवाय) किंवा कांहींच्या मतें साया व शिसव यांखेरीज सर्व हलक्या लाकडांस लावण्याचें विशेषण. २ सामान्य; वन्य; निकृष्ट; कलमी किंवा इरसाल नसलेला (आंबा, आंवळा, जांभूळ इ०). [राई] **रायवळी**–वि. रायवळ जातीच्या लांकडाचा केलेला.

रायांगण—न. (महानु.) देवळापुढील अंगण. ' अंबीके रायांगणीं उभी ठेली बाळी । ' –धवळे पू ७८. [राज+अंगण]

रायेण—न. कडू वृंदावन. रायणी पहा. **रायेणाचें भातुकें**–न. कडू वृंदावनाचें फळ. ' जैसें रायेणाचें भातुकें । '–विपू ७.७२.

रारा—उद्गा. १ (महानु.) मंत्र. ' करुणेचा रारा करीं ठाळुनि अविद्या विष उतरीं । ' –भाए ७७९. २ यंत्र. ३ निंबाची डहाळी.

रारावणें, रोराण करणें—अक्रि. रडणें; रीरी करणें. [ध्व]

राव—पु. १ नृप; राजा. 'व्यास योगियांचा राव । '–मुआदि ३९.८७. २ नांवापुढील सन्मानाची एक पदवी. जसें:– बळवंतराव, माधवराव. क्वचित नुसता राव शब्दहि येतो. ' काय राव सांगावें, तुम्ही काल नव्हतां. मोठी मौज झाली. ' ३ एक मराठा जात व तिच्यापैकीं एक व्यक्ति. मराठा पहा. ४ समशेर बहादर; तिस्मारखां. ५ दक्षिण हिंदुस्थानांत वेदस्थ ब्राह्मण, मराठे, जैन आणि शेबैंगार राव ही पदवी लागतात. गोणी विणकरांची पेरिके नांवाची जातहि कधीं कधीं राव पदवी लावितें. ६ पेशवाईत विशिष्ट शौर्य गाजविल्याबद्दल एखाद्या व्यक्तीस दिली जाणारी पदवी. [सं. राज, राय] म्ह० राव करीत नाहीं तें गांव करितो. (वाप्र.) **राव खालीं आले**–एखादा मोठा मनुष्य घोडयावरून, मोठया पदावरून खालीं आला असतां त्यास उद्देशून निघणारा उद्गार. **राव घोडयावरून खालीं आले**–राव मेले. **रावाचा रंक होणें**–मोठया, श्रीमान मनुष्यास दारिद्र्य, गरीबी येणें. सामासशब्द –**रावकी**–स्त्री. रावाची स्थिति, गुण; रावपणा. ' याला हणमंतराव म्हणून सारे हांक मारितात, याला रावकी कोणी दिली ? ' **रावजी**–पु. पुरुषास लावावयाचा बहु मानाचा

शब्द. [राव] **रावरंक**–पु. राजा व रंक; श्रीमंत व भिकारी. 'साधूला रावरंक सारखे.' **रावो**–पु. १ राजा. 'देशाधिपतीस दंडिता रावो।' –दा ३.८.९. २ श्रेष्ठ मनुष्य. 'तो चतुरांचा रावो।' –रास २.४७८.

रावखंडा—१ तुटका; तुटलेला (ओंठ) २ ओंठतुटया. ३ (ल.) आ पसरणारा; खिडार पडलेला; उघडा व भकास दिसणारा; विशोभित. (वाडा, घर, खिड, खाडी) 'या पाख्यास कवळें लावलीं तीं चार ओळी कमी आलीं त्यामुळें पाखें रावखंडें दिसतें.' [सं. राजी+खंड] **रावखंडें**–न. तुटका ओंठ.

राव(व्ह)टी—स्त्री. राजे इ० कांनीं राहण्याचें कापडी घर; लहान तंबू, राहुटी पहा. [हिं. राउटी]

रावण—पु. १ रामानें मारलेला लंकेचा राजा. २ (ल.) (निंदेनें) शरीरानें मोठा असा टोणगा, बोका इ० [सं. रु=शब्द करणें] **म्ह**० रावणास भिकेचे डोहळे=नीच व हलकट साधनांचें अवलंबन नाशास, अधोगतीस कारणीभूत होतें याअर्थी. (वाप्र.) **रावण किंवा रावणाची लंका जळणें**–कानाचीं भोकें बोटांनीं बंद केलीं असतां ऐकूं येणाऱ्या आवाजास म्हणतात. **रावण माजणें–मातणें–होणें**–अतिशय ताठेबाज, उद्धट, शिरजोर होणें. सामाशब्द– **०खोत**–वि (राजा.) दांडगा; टणक (मनुष्य). **०फळ**–न. एक वन्य फळ. याचे रामफळाच्या उलट गुणधर्म असल्यामुळें ह्यास हें नांव आहे. **०भात**–पु. मसालेभात; बटाटेभात, वांगीभात यासारखा भात. **०राज्य**–न. १ अंदाधुंदीचा, झोटिंगपातशाहीचा प्रदेश. २ अंदाधुंदी; झोटिंग पातशाही. ३ बेबंदपणा. याच्या उलट रामराज्य. [सं.] **०वेला**–स्त्री. विशिष्ट वेळ, काल. ही लढाई करण्यास, स्वारीवर निघण्यास अशुभ आहे **रावणाचा लेक**–पु. (ल.) १ फुशारखोर, अरेराव मनुष्य. २ (ल.) ताठेबाज, कह्यांत न राहणारा मनुष्य. **–चा वाजंत्री**–पु. डांस. **–ची खाई**–स्त्री. (ल.) सर्व खाणारी, गट्ट करणारी, ग्रस्त करणारी जागा, धंदा, काम इ०; ज्यांत सर्व कांहीं खपतें तें. जसें– कच्याबच्यांचा संसार, अगस्तीचें पोट, अधिक वाढलेलें शहर. 'संसार ही रावणाची खाई आहे. जो पदार्थ आणावा तो गडप होतो.' **रावणारि**–पु. श्रीराम. [सं. रावण+अरि] **रावणी**–पु. इंद्रजीत; रावणपुत्र. [सं.]

रावणी—स्त्री. (कु.) उबारा; अंडीं उबविण्यासाठीं केलेली व्यवस्था; रोवण.

राव(वि)णें—न. लेप. 'उभिलें संध्या–रागाचें रावणें।' –शिशु ५९३. –सक्रि. रंगविणें. 'रांविले कुंकुमरसें।' –शिशु १७. 'जेणें राविली वस्तु धवळ।' –अमृ ७.९६. [रापणें]

रावणावळ–स्त्री. (ना.) रंगणावळ; रंगविण्याची मजूरी.

रावणी—स्त्री. चांभाराची कुंडी

रावण्या—स्त्री. अव. प्रार्थना; विनवण्या. (क्रि० करणें). [राव राव असें म्हणणें !]

रावताण–णी—स्त्री. घोडेस्वारांनीं केलेली लूटमार, नासधूस; रानटी, लुटारू किंवा रानांत हिंडणारे त्या अर्थी अथवा प्रकर्षार्थी ह्या शब्दापूर्वी रान शब्द जोडतात. जसें–रानरावताणी त्याचे खातेरेंत नाहीं; हा रानरावताणीस भीत नाहीं, मानीत नाहीं इ०; अशा रीतीनें रानरावताणी व राणीराउताणी या दोन शब्दांच्या अर्थामध्यें घोंटाळा होतो. राणीराउताणी पहा. [राउत]

रा(रां)वस—पु. एक तांबडया रंगाचा समुद्रांतील मासा.

रावळी—स्त्री. देवदासी; देवळी. –ऐरा २०३. [राऊळ]

रावळूक—स्त्री. (गो.) केस झडणें.

रा(रां)वा—वि. रावखंडा; ओंठतुटका. [रावखंडा]

रा(रां)वा—पु. राघु; पोपट. 'किती रावे असतील तुझ्या धामीं' –र. **म्ह**० जो जो रावा पढे तो तो पिंजऱ्यांत पडे=मूर्ख स्वतंत्र असतात व शहाणे गुलाम बनतात. **०मुख**–वि. पोपटाच्या तोंडासारखा तोंडाचा आकार, टेवण असलेला (घोडा). घोडयाचें एक अशुभ चिन्ह.

रावा—पु. दळलेली हळद.

रावुत, रावूळ—प्र. राऊत, राऊळ पहा.

रावेणी—स्त्री. (ना.) लोणच्याचें पाणी; पाडाचे आंबे उकडून केलेलें रायतें. रायनी पहा. [राई]

रा(रां)वेरी—स्त्री. तांबडया रंगाच्या कपडयाची एक जात.

राशा—वि. १ मध्यम प्रतीचा. राशी पहा. २ नपुंसक; नामर्द. ३ दुर्बळ; मूर्ख. ४ वेडसर. [रास] **राशि–शी**–स्त्री. १ रास; ढीग. (समासांत) पुण्यराशि; पापराशि; तेजोराशी; तपोराशी; गुणराशि. २ सरसकट ढीग; ढिगारा; सळमिसळीचा समवाय. ३ मूळ घटक. 'समाजांतील प्रारंभीची राशी म्हणजे जसें दंपती किंवा कुटुंब...' –आडिवऱ्याची महाकाली (प्रस्तावना) ६. ४ गणितांच्या क्रियेकरितां मांडलेला आंकडा किंवा आंकडे (धन, गुण्य, भाज्य इ०) ५ बेरीज, एकंदरी. ६ (आकण, निकण, मणी यांहून भिन्न) कणसांच्या पहिल्या मळणीपासुन झालेली धान्याची रास. मदन पहा. [सं.] (वाप्र.) **राशी पुंजीस येणें**–राशीस, सांठ्यास पडणें; (खर्चवेच भागून) निवळ नफा म्हणून उत्पन्न होणें; खिशांत पडणें; संग्रहीं पडणें. **राशीवर**–क्रिवि. मळलेल्या धान्याच्या ढिगावर; खळ्यावर; मळणी झाल्यावरोबर. 'अदमण दाणे केले करार ते मी देईन राशीवर।'

राशि–शी, राश—पुस्त्री. १ नक्षत्रचक्राच्या किंवा क्रांति वृत्ताच्या कल्पित बारा भागांपैकीं कोणताहि एक भाग; रास. मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धन, मकर, कुंभ व मीन अशा बारा राशी आहेत; तारांचा पुंज. [सं.]

राशीस बसणें, लागणें–१ अनिष्ट असणें (ग्रह). २ तीव्र वैरामुळें एखाद्याचा नाश करण्याकरितां त्याचा पाठलाग करणें. ३ एखाद्याच्या खणपटीस बसणें, हात धुवून पाठीस लागणें. ३ मन लावून, एकचित्तानें अभ्यास करणें. [राशि] सामाशब्द– **०कूट**–न. दोन माणसांच्या जन्मकाळीं उच्च असलेल्या दोन राशी. किंवा लग्नाच्या वेळीं घटित पाहतांना दिसून येणारी वधूवरांच्या परस्पर राशींची अनुकूलता. [सं.] **०घटित, राशघटित**–न. जन्म पत्रिकेवरून वधूवरांची मैत्री, विरोध याविषयीं ज्ञान; वधूवरांचें घटित. [सं.] **०चक्र**–न. भचक्र; भमंडल. बारा राशी पहा. ज्यांत मुख्य ग्रहांच्या कक्षा सर्वांशीं सांपडतील, असा क्रांतिवृत्ताचा दोहोंकडे आठ आठ अंशापावेतों विस्तारलेला एक कटिबंध कल्पिला आहे तो. –सूर्य १८. [सं.] **राशिचक्रसंबंधी प्रकाश**–पु. कांहींसा अंधुक व त्रिकोणाकार उजेड संध्याकाळीं पश्चिम क्षितिजाकडे व सकाळीं पूर्व क्षितिजाकडे दिसतो तो–ज्योतिःशास्त्राचीं मूलतत्वें. **०नाम, राशनाम**–न. जन्मराशीवरून मुलाचें ठेवलेलें नांव. [सं.] **०भोग**–पु. राशींतून ग्रहाचें गमन. [सं.]

राशी—वि. १ राशा; राशीचा; मध्यम गुणाचा; मध्यम. ' राशी तूप. ' २ मधल्या पायरीचा, धड पुरुष नव्हे, धड स्त्री नव्हे असा; नपुंसक. [राशि किंवा रास]

राष्ट्र—न. १ देश; राज्य; मंडल; प्रांत. २ धार्मिक, सामाजिक व राजकीय आपलेपणा भरलेला लोकसमुदाय; एका दिलाची व एकाच मनोभावनेनें प्रेरित झालेली देशांतील जनता. ३ जमलेला समुदाय; पुष्कळ मंडळी; मेळा; वृंद. ' साकरेच्या भोंवतीं पहा कसें मुंग्यांचें राष्ट्र जमलें जाहें. ' ४ (ना.) प्रस्थ; कारभार; वैभव. [सं.] सामाशब्द– **०गीत**–न. स्वदेश, स्वभाषा, स्वविक्रम, स्वधर्म किंवा संस्कृति यांचें निदर्शक गीत. **०ध्वज**–पु. सर्व राष्ट्रास मान्य अशा वर्ण व चिन्हांकित निशाण. राष्ट्रीय झेंडा, निशाण. **०संघ**–पु. सर्व देशांतील एकजुटीची संस्था; जगांतील राष्ट्रांमध्यें समेटाचें कार्य करणारी संस्था; (इं.) लीग ऑफ नेशन्स्. ' राष्टसंघाच्या बैठकींत हिंदी प्रतिनिधीचें नेतृत्व बिकानेरच्या महाराजाकडे आलें. '–के १७.६.३०. [सं.] **०सभा**–स्त्री. सर्व भरतखंडाचें राजकारण करणारी एक सभा; कांग्रेस ' राजकीय हक्क संपादण्यासाठीं आमच्या लोकांनीं अलीकडे जी राष्ट्रसभा स्थापिली आहे. '–आगर ३.६७. [सं.] **राष्ट्रा(ष्ट्र)ण**–न. १ झुंड; जमाव (दंग्यांतील); अस्ताव्यस्त मेळा. २ मोठा पसारा (अवाढव्य कामाचा, सामानाचा); मोठा राडा (जेवणावळीनंतर अन्नाचा); अडगळीचा विखरडा (कामानंतर जिन्नसांचा, हत्यारांचा). (क्रि० घालणें; पडणें). [सं राष्ट्र] **राष्ट्रि(ष्ट्री)य**–वि. राज्यासंबंधी; राष्ट्रासंबंधी; प्रांतासंबंधी; राष्ट्राच्या हिताचे. [सं. राष्ट्र] **राष्ट्रीय अस्तित्व**–न. स्वतंत्र वृत्तीचें जीवन; स्वतःचें राष्ट्र स्वतः चालविण्याची पात्रता. ' हिंदुस्तानच्या लोकांनीं राष्ट्रीय अस्तित्व कधींच संपादूं नये... ' –टि ३.२. **राष्ट्रीयत्व**–न. स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश व पूर्वज यांच्याविषयीं आदर, अभिमान. ' स्वधर्म, स्वभाषा, स्वदेशाभिमान, पूर्वेतिहासस्मरण हीं राष्ट्रीयपणाचीं लक्षणें होत. ' –टि २.२३७. [सं.] **राष्ट्रीय शाळा**–स्त्री. राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा. **राष्ट्रीय शिक्षण**–न. ज्या शिक्षणानें राष्ट्राची इभ्रत व संपत्ति वाढून त्याची इतरांवर छाप बसेल असें राष्ट्र बनविण्यासारखें शिक्षण. **राष्ट्रीय सभा**–स्त्री. जनतेच्या प्रतिनिधींची राजकारणविषयक सभा; कॉंग्रेस; राष्ट्रसभा पहा. [सं.]

राष्णा–स्ना—पुन. एक वनस्पति व तिचें मूळ. रास्ना पहा.

रास—पुअ. नग, संख्या दाखविणारा शब्द. सर= बैल, म्हशी व गाई यांची संख्या, नफर=उंटांची संख्या, नग= हत्तींची संख्या. या प्रमाणें रास हा घोडयांची संख्या सांगण्याकरितां योजतात. ' घोडे रास दाहा. बैल, गाय इ० सर पांच. उंट नफर वीस. ' [अर. रास=डोकें] **०करदन**–न. एक जिन्नस मोडून दुसरा जिन्नस नवीन केला असतां मोडलें तें नावें व नवें केलें तें जमेस लिहिण्याची जमाखर्ची पद्धत; दुबेरजी. ' तुरा मोत्याचा बाबत रासकरदन '–समारो १.२३९. [अर. रास= डोकें+फा. करदन]

रास—पु. गवळ्यांचा गाण्याचा, नाचण्याचा, खेळण्याचा उत्सव; कृष्णानें गोपींबरोबर केलेली नृत्यक्रीडा. ' ऐसा रास विलास, सारुनि सुखें लावण्णिच्या दीपिका । ' –आनवरस चरित २७. [सं.] (वाप्र.) **०मांडणें**–नृत्य चालविणें. सामाशब्द– **०क्रीडा**–स्त्री. कृष्ण आणि गोपी यानीं केलेलें मंडलाकार नृत्य. [सं.] **०लीला**–स्त्री. रासक्रीडा. [सं.] **रासोत्सव**–पु. कृष्ण व गोपी यांच्या गाण्याचा व नाचण्याचा उत्सव. रास पहा. [सं. रास+उत्सव]

रास—वि. क्रिवि. (शिल्प) सरळ; तिरकस नव्हे असें (वेतलेला कपडा किंवा कपडा वेतणें) याच्या उलट हेरफ. –वि. १ उभें (कापड). ' पुढें रास बाजू ठेवावयाची. ' २ (व.) चिकणी (सुपारी). ' रास सुपारी येथें मिळेल. ' ३ (व.) अनुकूल; योग्य. ' दंडालाच रास आहेत हे लोक. ' [फा. रास्त]

रास—स्त्री. (ज्यो.) राशि पहा. **रासकूट–घटित–नाम**–राशिकूट इ० पहा. **रास**–स्त्री. १ ढीग; राशि. राशि पहा. २ सरसकट ढीग. ' तुम्ही आंबे निवडून घेणार तर सवादोन रुपयांनीं मिळतील व रास घ्याल तर रुपयानें. ' ३ (ब.) खळ्यांतील धान्याचा ढीग; (कु.) कणसें मळून वारवून स्वच्छ केलेला धान्याचा ढीग. ५ (गणित) मुद्दल व व्याज मिळून झालेली रक्कम. [सं. राशि] (वाप्र.) **०भरणें**–न. खळ्यातील जमीनीवर धान्याची

रास करणें. सामाशब्द– **०पुजा**–स्त्री. मळलेल्या धान्याच्या राशीची पूजा. **०माथा**–पु. खळवट; शेतमाल तयार होऊन खळ्यांत धान्याच्या राशी पडण्याचा हंगाम. ह्या शब्दाचा प्रथमाविभक्तींत उपयोग करीत नाहींत. [रास+माथा] **०माथां-माथ्यास**–क्रिवि. शेतांतील धान्य काढून, मळून, त्याची रास केल्यानंतर (सावकार देणें, वारणें, घेणें इ०) 'हा पैका हरभऱ्याच्या रासमाथ्यास फडशा करीन.' **०वट**–वि. १ राशी; राशीचा; मधल्या पायरीचा, गुणाचा; मध्यम; सामान्य. २ हलक्या दराचा, दणगट. ३ (वं.) अडदांड. [रास] **०वटा**–पु. रासोटा पहा. **०वळ**–वि. १ समायिक. २ (कों) साधारण प्रतीचा. **रासिवा**–पु. राशि. 'सुखाचा कीर निखळु । रासिवा मीची ।' –ज्ञा १६.३५६. [रास] **रासी**–वि. मध्यमप्रतीचें राशी पहा. **रासुं(सां)डा**–पु. (व.) धान्याची मळणी पूर्ण झाल्यानंतर गडी–माणसें खळ्यावर स्वयंपाक करून धान्याच्या राशीला नैवेद्य दाखवून जेवतात तो समारंभ. पूर्वी क्वचित राशीला बकऱ्याचा बळी देण्याची चाल असे. **रासोटा**–पु. रास काढून नेल्यानंतर राहणारा खळ्यावरील धान्याचा अवशेष. ह्यावर महाराचा हक्क असतो. [रास+ठाय]

रासणी—स्त्री. सांगडीचा किंवा जोताचा म्होरक्या बैल. [रास]

रासतुरा—पु. एक फुलझाड व त्याचें फूल. [राजतुरा अप.]

रासना—स्त्री. एक औषधी वनस्पति. रास्ना पहा.

रासनाहणें–न्हाणें–न्हाण—न. १ लग्नांत वरपक्षीय स्त्रियांस वधूपक्षीय स्त्रियांकडून वाद्यें वाजवून न्हावयास घालण्याचा समारंभ. २ (ल.) गमत, खेळत, पुष्कळसें ऊन्ह पाणी घेऊन केलेलें स्नान. [सं. रास+स्नान; फा. रास=डोकें+स्नान]

रासनी–णी—स्त्री. बीं पेरल्यावर तें झाकून टाकण्यासाठीं शेतांत फिरवावयाचें एक औत; रेकला. (माण.) भुईमूग पेरल्यानंतर वरची माती साफ करण्याचें गुंठें. **रासन्या**–वि. रासनी हाकणारा.

रासबेरी—स्त्रीन. १ एक झुडुप व त्याचें फळ. २ त्या फळांच्या रसाचें पेय. हें लालसर असतें.

रासभ—पु. गर्दभ; गाढव. **रासभी**–स्त्री. गर्दभी; गाढवी. 'परि तयांत ही रासभी ।' –केका ५४. वि. गाढवासारखें. [सं.]

रासरु(रो)शी, रासरू(रो)स—क्रिवि. (प्र.) राजरुशी इ० पहा.

रासी—वि. (कों.) हलकी (माडी, दारू). राशी पहा.

रास्त–स्ती—वि. १ खरा; न्याय्य; नेकीचा; नीतीचा; सरळ (मनुष्य, भाषण, कृत्य, आचरण). 'हुजूर आलियावर रास्ती न्याय करून...'–मराआ ३१. २ खरें; प्रामाणिक; नक्की; पूर्ण मेजाचें (वजन, माप). –क्रिवि. खऱ्या रीतीनें, न्यायानें, नेकीनें; प्रामाणिकपणानें. [फा. रास्त्] सामाशब्द– **०कौली**–स्त्री. सत्यवक्तेपणा. 'यांत रास्तकौली इंग्रेजांची कोठून राहिली ?' –ऐटि १.५९. [फा.] **०गो**–वि. खरें बोलणारा; सत्यवादी. [फा. रास्त्–गो] **०गोई**–स्त्री. सत्यवादित्व; खरेपणा; सत्य भाषण. 'दुनियेंत रास्तगोई परमेश्वरानें किमिया दिली आहे.' –ऐटि १.५९. [फा. रास्त् गोई] **०मामलगी**–स्त्री. न्याय्य वर्तन. 'त्याप्रमाणें गायकवाड यांचें पत्र आणून ठेविलें असतां महाल गुजारत न केलें हे रास्तमामलगी कीं काय ?' –ख ७. ३५७२. [फा.] **०रवी**–स्त्री. सरलगामित्व; सरळपणा. 'जदीद करार झाला त्याची ही अहवाल, तेव्हां रास्तरवी कायमी कोठें राहिली ?' –ख ७.३५३७. [फा.] **रास्ती**–वि. रास्त; योग्य. **रास्ती माप**–न. खरें, प्रामाणिक माप, मोजण्याची रीति. याच्या उलट बोटधरणी माप, हातधरणी माप.

रास्ता—पु. लुगड्याची एक जात, प्रकार; 'पांढऱ्या किंवा कोणत्याहि रंगाच्या उभ्या काड्या असलेलें लुगडें. [फा. रास्त= सख]

रास्तार—न. (व. घाटी) पसारा; राष्टान पहा.

रास्ना—पु. एक ओषधी वनस्पति. सर्व प्रकारच्या वायूवर यावयाचा रास्नादि काढा प्रसिद्ध आहे. सर्प, विंचू यांच्या दंशावर ह्याचा कांदा ठेंचून बांधतात. [सं. रास्ना; हिं. रासन, रास्ना; बं. रास्ना; गुज. रासना; कर्ना. रसना; ते. रासना पुडका; ता. रासुन]

राह, रहा—स्त्री. १ मार्ग; रस्ता. 'जेन्राल मज्कूर ताब आणितां न सकतां राहेंत आपले हमराही सरन्जाम टाकीत... गढीच्या आसरेस जाऊन पोहोंचला.' –रा १०.१८७. २ वाट; अवधि; मार्गप्रतीक्षा. 'दीड महिना राह साहेबाचे यावयाची पाहिली.' –इमं ६८. ३ सरळ मार्ग; योग्य वागणूक. 'त्यास राहावर आणूं, निदान त्यास तंबी करूं' –रा १.४६. [फा. राह्] **राहदार**–वि. १ मार्गदर्शक. २ नाकेवाला. –रा ६.२७०. [फा. राह्+दार्]

राहकळ—स्त्रीन. १ कावरेंबावरें होऊन गरगरां फिरणें (भ्यालेल्या गुरांच्या कळपानें). २ निकराची झोंबाझोंबी व ओढाताण (जिंकवर उदार होऊन झगडणाऱ्या माणसांची).

राहगुजरी—स्त्री. एक प्रकारचा कर. [फा.]

राहट—स्त्री. (महानु.) झाडी; अरण्य; जाळी. 'उदय अस्त द्वैत वाट । नाहिच राहट दिवाराति ।' –ज्ञानप्रदीप ३६९. रहाटी पहा.

राहट—स्त्री. राहटी. **राहटण**–स्त्री. वर्तणूक. 'न घडे अन्यथा राहटण ।' –बोधवैभव १६८. [फा. राह्] **राहटणें**–उक्रि. आचरणें; वर्तणें. 'शुभाशुभ राहटे प्राणी । तितुकें दृष्टी

देखती।'–मुआदि १६.१३८. **राहटी**–स्त्री. १ वागणूक. रहाटी पहा. 'तैसी भूतमात्रीं राहटी। मवाळ ते।'–ज्ञा १६.१७०. २ क्रम; रीति. ३ व्यापार;व्यवहार.४संसार. 'गृहिणी होवोनि दरिद्रियासी। राहटी करणें जळो तें।'–मुआदि १५.४०. [फा. राह्]

राहटवणी, राहट्या, राहणी, राहदारी, राहदारी जकात, राहसाळी—रहाटवणी, रहाट्या इ० पहा.

राहडी—स्त्री. १ राड; चिखल. २ (विष्ठा इ० दुर्गंधिपदार्थांनीं भरलेली) खांच. 'इंगळ चालती राहडी।'–ज्ञानप्रदीप ७४०.

राहणें—अक्रि. १ नांदणें; वास करणें; असणें; मुक्काम करणें. 'आम्ही सांप्रत काशींत राहतों.' २ एका स्थितींत टिकणें. 'एका बोटावर काठी कशी राहील.' ३ मावणें; समाविष्ट होणें (भांड्यांत पदार्थ). 'या दौतींत अच्छेर शाई राहील.' ४ खळणें;.थांवणें; बंद होणें; शेवट होणें. 'पाऊस राहिला म्हणजे तुझ्या पोटांतील तिडीक राहील.' ५ मागें पडणें; सांड्यां टाकलें जाणें; न संपतां पडून राहणें; तात्पुरतें बंद पडणें.(काम इ०). 'वाड्याचें काम अर्धे झालें अर्धें राहिलें.' 'यंदां त्याचें लग्न होणार होतें पण राहिलें.' ६ उरणें, शिल्लक असणें; हातांत, खिशांत शिल्लक, बाकी म्हणून असणें. ७ मागें घेणें; थांबणें. 'त्वां शिवी दिलीस तर तो तोंडांत मारल्याशिवाय राहणार नाहीं.' ८ शिथिल होणें; असमर्थ होणें (अवयव, इंद्रियें); मोडावणें; खचणें (सामर्थ्य, दम) ९ ठेवला जाणें; पदरच्या माणसाप्रमाणें, चाकराप्रमाणें असणें; कामावर, दिमतीस असणें. 'तूं एका महिन्याचा चाकर. मी कालपासून राहिलों.' १० (आयाचा शेवटीं असणाऱ्या धातुसाधितां बरोबर ह्या क्रियापदाचा प्रयोग असतां) मागें फिरणें, थांबणें. असा अर्थ होतो. 'हा मारायाचा–खायाचा–बसायाचा–जायाचा–राहिला.' ११ (तिरस्कारार्थी) असूं देणें; बाजूस सारणें; दुर्लक्ष करणें. 'होउनि तृप्त नृपातें भीष्म म्हणे काय ती सुद्धा? राहो।'–मोभीष्म १२. १२. [सं. रह्=थांबणें] साधितशब्द– **राहतक**–न. १ राहते पण. २ (ल.) राहण्याची क्रिया. 'यालागिं जोतो पुसे जातक। कोणी राहतक पुसेना।'–भारा बाल ९.४१. **राहराहों**–क्रिवि. पुनःपुनः; वारंवार. 'राहराहों शोध घ्यावा। परांतरांचा।'–दा १५.१.४. [राहून राहून] **राहव(वि)णें**–सक्रि. राहवून, ठेऊन घेणें. 'कैकेयी चालली रायासरसी। राहवितां तिसी न राहे।'–भारा बाल १.८२. **राह(हा–हि)वलेपण**–न. रंगेलपण. 'कां सरलेया गीताचा समारंभु। न वचे राहवलेपणाचा क्षोभु।'–ज्ञा १८.४२४.

राहळ—स्त्री. देशाचा एक भाग. रहाळ पहा.

राहा, राहाट, राहाटवणी, राहाड, राहण, राहाणें, राहादारी, राहासाळी—रहा, रहाट, इ० पहा.

राहाटणें—अक्रि. १ वर्तणें; आचरणें. राहटणें पहा. २ (महानु.) फिरणें. 'परि समग्रें अंधकारीं। राहाटों नये।'–भाए २९७. ३ वर्तणूक; व्यापार. [राहणें] **राहाटवि(व)णें**–सक्रि. १ वापरणें. 'म्हणौनि विचारावया शास्त्र। राहाटवावें जें वक्त्र।'–ज्ञा १७.२३२. २ वागविणें. 'ज्ञाता इंद्रियांचा मेळावा। राहाटवी तेथ पांडवा।'–ज्ञा १८.४९३. ३ व्यापार करविणें, चालविणें. 'देहनिर्वाहापुतें। राहाटवी हातां पायांतें।'–ज्ञा १८.१०२९. **राहाटी**–स्त्री. १ वागणूक. २ रिवाज, परंपरा. ३ घडलेला प्रकार, प्रसंग. 'असो अशी होतां राहाटी। मग उठते झाले चतुर्थजेटी।'–नव १२.१३२.

राहाटमाळ—स्त्री. रहाटगाडगें.

राहाड—स्त्री. धगधगीत निखाऱ्यांची खाई.

राहाडी—स्त्री. राडी; राड. राहडी पहा.

राहाण—न. १ (महानु.) ज्यामध्यें पिशाच संचार होतो असें शरीर. 'तें श्रीरंगाचें राहणें। जग प्रसीध अवतरणें।'–ऋ ६५. २ अंगांत दैवत आणून बोलवणें; दैवताचा, भुताखेतादींचा संचार होण्याकरितां करावयाचा विधि, मांड. 'योगियापुढें राहाण।'–दा ७.९.१९. रहाण पहा.

राहाणी—स्त्री. पेहराव; रीत; रिवाज; आचार विचार; वागणूक; रूढी. 'पाश्चात्त्यांची राहाणी हिंदुस्तानापेक्षां निराळी आहे.'–के १७.५.३०.

राहाणें—न. अंगांत दैवत आणणें. रहाण पहा. **०घालणें**–क्रि. अंगांत दैवत आणून बोलवणें.

राहित्य—न. रहितपणा; शून्यता; अभाव. रहित पहा. बहुधा समासांत योजतात. जसें–द्रव्यराहित्य, जलराहित्य, ज्ञानराहित्य इ०. [सं. रहित]

राही—स्त्री. कृष्णसखी राधा; राधिका; राई पहा. 'राही रखुमाई सत्यभामा माता। पांडुरंग पिता माहियेर।'–तुगा २५८१. [सं. राधिका; प्रा. राहिआ, राही]

राहु–हू–हो—पु. १ एक उपग्रह; नवग्रहांतील आठवा ग्रह. २ ज्याचें शिर विष्णूनें धडापासून वेगळें केलें असा एक दैत्य. त्याचें डोकें तो राहुग्रह व धड केतु ग्रह झाला. यांच्यामुळें सूर्यचंद्रांस ग्रहणें लागतात असें म्हणतात. ३ (ज्यो.) भूमिच्छाया; वरचा पातबिंदु. [सं.] (वाप्र.) **राहूकेतु मागें लागणें, राहूसारखा मागें लागणें–येणें–पाठ घेणें**–खनपटीस बसणें, अतिशय सतावणें; एखाद्याच्या मागें लागून त्याला ग्रासण्यास पहाणें. सामाशब्द– **०ग्रस्त**–वि. राहूनें ग्रस्त केलेला; ग्रहण लागलेला (सूर्य, चंद्र). [सं.] **०ग्रास**–पु. ग्रहणामुळें होणारा सूर्य–चंद्राचा अस्त. [सं.] **०पर्व**–न. ज्या दिवशीं ग्रहण लागतें

तो दिवस, पर्वकाल. [सं.] **०मेळ**-पु. ग्रहण; राहूचा संयोग 'तेथ रविचंद्र राहुमेळु । होतां पाहे पुण्यकाळु ।' -ज्ञा १७.२७२. [प्रा.] **०संपात**-पु. ज्याप्रमाणें भूमध्यवृत्त आणि क्रांतिवृत्त हीं एकमेकांस २३॥ अंशांचा कोन करून छेदितात, त्याप्रमाणें चंद्राची कक्षा व क्रांतिवृत्त हीं एकमेकांस ५ अंशांचा कोन करून छेदितात. तीं ज्या दोन बिंदूंतून छेदितात त्यापैकीं एकाला राहुसंपात म्हणतात. -सृष्टि ११३. [सं.]

राहु(हो)टी—स्त्री. लहान तंबू. रावटी पहा.

राहून राहून—अ. पुनःपुनः; थांबून थांबून; अधूनमधून. 'या नक्षत्राचा पाऊस एकसारखा लागत नाहीं, राहून राहून पडतो.' [राहणें]

राळ—स्त्री. १ शालनिर्यास; एक ज्वालाग्राही डिंकासारखा पदार्थ. ज्यांपासून हा डिंक निघतो तीं झाडें बंगाल, अबूचा पहाड व उत्तरहिंदुस्तान यांत होतात. २ रातकिडा. हा सरलपक्ष कीटक बिळांत राहतो. याचा रंग उदी असतो. ३ (ल.) नासलेली, बिघडलेली, विचका झालेली, भंगलेली, फजीति झालेली; मोडलेली स्थिति. पिठाड, पीठ, धूळ, भुसाडा इ० पहा. ४ हुर्रेवडी; फटफजीती. 'झाडाचा पाला समजून राळ करितात.' -कफा प्र २. ५ चांदीसोन्याचा गट. [सं. राल] (वाप्र.) **०करणें**-१ घाबरवून सोडणें, फट फजिती दैना, दुर्दशा करणें. २ नाश करणें. 'आशा तृष्णा कल्पना काम क्रोध काळ । दुरवितीं शुद्ध बुद्धि केली राळ ।' -तुगा ४०६६. **०पाट**-पु. एखाद्या जिन्नसाला नक्षी काढतांना तो जिन्नस चिकटून रहाण्यासाठीं राळ लावलेला चौकोनी, वाटोळा लाकडी तुकडा.

राळा—पु. एक प्रकारचें हलकें तृणधान्य. याच्या पांढरा, पिवळा व काळा अशा जाती आहेत. ह्याचा भात वगैरे करितात. देशावर गरीब लोक राळयावर निर्वाह करतात. **राळवण**-न. १ राळयाचीं ताटें, पेंढा; कणसें तोडल्यानंतरचें ताट; राळे बडविल्यानंतर राहिलेलें गवत. २-नस्त्री. (ल) शिणलेली, पुष्कळ श्रमलेली स्थिति. **(जिवाचें) राळवण**-न. मरे मरेतों काम, कष्ट करण्याची स्थिति. **राळसाळ**-स्त्री. केरकचरा; उरले सुरले अवशेष, वगळ. -वि. टाकाऊ, रद्द;

राक्षस—पु. १ मानुष किंवा अमानुषरूप देवांचा शत्रु; कुबेराचा सेवक व त्याच्या निधींचा रक्षक; स्मशानांत जाण्याघेण्याची रहाळ असणारा, मृत शरीरांना सजीव करणारा उग्र पिशाच म्हणून निरनिराळ्या रीतींनीं वर्णिलेला देव किंवा पिशाच; असुर: दानव; दैत्य. २ क्रूर, भयंकर, अकराळ विकराळ, अधाशी, झोपाळू मनुष्य. ३ साठ संवत्सरांतील एकुणपन्नासावा संवत्सर. [सं.] सामाशब्द-**०गण**-पु. जन्मकाळच्या नक्षत्रावरून केलेल्या देवगण, मनुष्यगण, व राक्षसगण ह्या तीन वर्गांतील शेवटला वर्ग. [सं.] **०गणी**-वि. राक्षसगण असलेला. **०मुखी-मोहरा-मोरा-मोहरी**-विक्रिवि. दक्षिणाभिमुख; दक्षिणेकडे. गंगमोहरा पहा. [सं.] **०विधि-विवाह**-पु. विवाहाच्या आठ प्रकारांपैकीं एक प्रकार. बलात्कारानें केलेला विवाह; पालकांच्या व कन्येच्या इच्छेविरुद्ध तिचें हरण करणें. अष्टौ विवाह पहा. 'परणूं पाहे राक्षस विधि ।' -एरुस्व १२.६६. [सं.] **०वेळ-वेळा**-स्त्री. सूर्यास्ताच्या व रात्रीच्या मधील काळ; तीनीसांजा. [सं. राक्षस+ वेळ] **राक्षसान्न**-न. तामस अन्न (बाजरी, उडीद, मसूर, राळा, मिरची इ०). [सं.] **राक्षशी(सी)ण**-स्त्री. १ राक्षसाची स्त्री. २ दुष्ट स्त्री. [सं. राक्षसी] **म्ह**० राक्षसणी पीठ कांडितात घरामध्यें-रानामध्यें-तेथें=पराकाष्ठेचा ओसाडपणा दाखविण्याकरितां योजतात. **राक्षसी-शी**-स्त्री. राक्षसाची बायको; राक्षसस्त्री. -वि. १ राक्षसांच्या संबंधी; राक्षसास योग्य. २ प्रचंड; भीम; साहसी; मनस्वी (कृत्यें). ३ आसुरी; तामस; अघोरी (उपाय). ४ कुत्सित; अयोग्य; जबर (अन्न, खाणें) (समासांत) राक्षसी-कृत्य-करणी-खाणें-भाषण-घोडा-बाग-मजल-जोर इ० [सं. राक्षस] सामाशब्द- **०अवतार**-पु. अतिशय क्रूर आणि रानटी मनुष्य. **०उपाय-उपचार**-पु. असुरी, अघोरी उपाय, उपचार. **०झोंप**-स्त्री. अतिशय गाढ व दीर्घ काल झोंप. **०दौलत**-स्त्री. सात्त्विकपणा, टिकाऊपणा नसलेली भरभराट,संपत्ति. **०धान्य**-न. बाजरी (कारण हें धान्य हेमाडपंतानें लंकेहून आणलें अशी समजूत आहे). **०पीक**-न. अतिशय विपुल पीक. **०भाषा**-स्त्री. संकृताच्या अपभ्रंशानें बनलेली व नाटकांत राक्षसांच्या, पिशाचांच्या तोंडीं घातलेली, हेंगाडी भाषा. **०माया-माव**-स्त्री. राक्षसाची माया, कपट. **०मुलूक-ख**-पु. नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेश. ह्याच्या उलट देवमुलूक (नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेश). **०विद्या**-स्त्री. राक्षस आणि पिशाच यांस काढून लावण्याची, त्यांस ताब्यांत ठेवण्याची विद्या. **०वेळ-वेळा**-स्त्री. राक्षस वेळ पहा. **०संपत्ति**-स्त्री. राक्षसी दौलत पहा. **०हाड**-न. टणक व बळकट मनुष्य. **राक्षेस**-पु. राक्षस. 'किती येक राक्षेस ते हाकलीती।' -राक १.४

राज्ञी—स्त्री. राणी, राजपत्नी. [सं.]

रिआया—स्त्री. प्रजा; रयत. रअया पहा. 'रिआया व मुजारियान पर्गणे चाकण.' -रा ६.१५३ [अर.]

रिकब-बी, रिकाबी—स्त्री. घोडयावर बसण्यासाठीं व बसून पाय ठेवण्यासाठीं दोन बाजूंस सोडलेल्या दोन कडयांपैकी प्रत्येक. [अर. रकाबे]

रिकवि(वी)णें—सक्रि. रिचविणें; रिकामें करणें. [स. रिक्त; प्रा. रित्त, रिक्क]

रिकशा, रिक्शा—स्त्री. मनुष्यानें ओढण्याची गाडी. ही जपानांत व मद्रास शहरींहि आढळते. [जपानी रिकशा; जपानी किशा=आगगाडी]

रिकाड—न. (रेकॉर्ड अप.) संग्रह; यादी; नोंद. [इं. रेकॉर्ड]

रिकांडी—स्त्री. (विणकाम) कापडामध्यें आडवें सूत भरण्याकरितां सूत गुंडाळलेली कांडी.

रिकाब-बा—स्त्री. आरोहिणी; रिकिब-बी पहा. [अर.] **०दाल**-पु. रिकबीची वादी; रिकबीचा चामडयाचा पट्टा.-वि. रिकबीच्या जागीं भोंवरा असणारा (घोडा); हा अशुभसूचक मानितात. [अर.] **०भोवरी**-स्त्री. रिकिबीच्या वादीचा दाब बसतो त्या ठिकाणीं घोडयांच्या अंगावर असलेला भोवरा. हा अशुभ होय. -वि. रिकाबदाल (-वि.) पहा. **०सोट**-पु. रिकिबी बांधण्याचा दोर.

रिकाबा-बी, रिकेबी—स्त्री. बशी; जेवणाचें ताट. 'भोजनास रिकाबा रुप्याच्या नव्या करवित्या.'-पेशवेकालीन महाराष्ट्र ३४८. [अर. रिकाबी]

रिकामका—वि. रिकामा; निरुद्योगी; कामधंदा नसलेला. [रिकामा] **०खटाटोप**-पु. निरर्थक दगदग; फायदा न मिळतां विनाकारण करावें लागलेलें काम, श्रम.

रिकामा—वि. १ ज्यांत कांहीं नाहीं असा; पोकळ. ' ही घागर रिकामी आहे. २ (ल.) पोकळ; निराधार; तथ्यांश नसलेला; कोरडा; पुराव्यानें, प्रमाणानें, उदाहरणानें ज्याची सत्यता, यथार्थता सिद्ध करतां येत नाहीं असा (वाद, विधान, हकीकत). उदा० रिकामा डौल; रिकामी स्तुति. ३ ज्या जागेवरील अधिकारी किंवा काम करणारा मनुष्य अद्यापि नेमण्यांत आलेला नाहीं किंवा रजेवर गेलेला आहे अशी (जागा); ' ह्या कचेरींत तीन कारकुनांच्या जागा रिकाम्या आहेत.' ४ निरर्थक; व्यर्थ; निष्फळ; निष्प्रयोजन; खोटा (दगदग, पायपिटी, चौकशी, बोलणें). ' नको सांगु बडिवार रिकामा लक्षुमि नाना परी'-प्रभाकर-लावणी-लक्ष्मीपार्वती संवाद (नवनीत पृ. ४१५.). ५ जरूर ती सामुग्री, हत्यारें इ० साधन ज्याचे जवळ नाहीं असा. ' माझीं हत्यारें सारीं घरीं आहेत, मी रिकामा तुमच्या घरीं येऊन काय करणार ? ' ६ ज्याला नोकरी, उद्योग-धंदा नाहीं असा; बेकार; निरुद्योगी; कामावीण; ' कधीं रिकामा असूं नको । '-अनंतफंदी लावणी (नवनीत. पृ ४३७.) ७ उपयोगांत नसलेली, कामांत न गुंतविलेली (वस्तु, गाडी इ०). ' तुमचा चाकू रिकामा झाला म्हणजे मला अंमळ द्या. ' ८ एकाकी; उद्दिष्ट न साधलेला; प्रयोजनशून्य; फलशून्य. ' मी तुला पुढें घालून घेऊन जाणार, रिकामा परत जाणार नाहीं. ' ९ ज्यास कोणी मालक नाहीं असा (देश, मुलूख इ०). ' आर्यांना दंडकारण्याचा प्रदेश रिकामा सांपडला. ' [सं. रिक्त, रिच=रिकामें करणें] **म्ह० रिकामा न्हावी कुडाला (भिंतीला) तुंबडया लावी.** (वाप्र.) **०बसणें**-उद्योग नसणें; बेकार असणें; निरुद्योगी राहणें; आळशीपणानें वेळ काढणें. ' सहज रिकामे बैसाल घरीं । संसार चाले कैशापरी ।' सामाशब्द- **रिकामचावडी-टेंकडी**-स्त्री. निरुद्योगी लोकांची चकाटया पिटीत बसावयाची जागा-अड्डा; निरुद्योगी लोकांचा समूह-टोळी-कंपू. **०चेष्टा**-स्त्रीअव. निरुद्योगी माणसाचे चाळे, उपव्याप; रिकामपणाच्या खोडया. **०चोट-टवळा-टेकडा**-वि. (अशिष्ट) निरुद्योगी; आळशी. (मनुष्य); उपयोगी न पडतां पडून राहिलेली (वस्तु). **म्ह० १ रिकामचोट आणि गांवास उपद्रव. २ रिकाम टवळा आणि गांवचा होवळा.' रिकामटी, रिकामणूक**-स्त्री. सवड; फुरसत; रिकामा वेळ; रिकामीक. ' पुराणीं बैसतां नाहीं रिकामटी । खेळतो सोंगटी अहोरात्र '। -तुगा ४२३४. **रिकामढंग, रिकामे ढंग**-पुअव. रिकामपणचे चाळे; निष्फळ उपव्याप; निष्प्रयोजन काम. **०पण-पणा**-न. पु. फुरसत; सवड; कामांत न गुंतल्यामुळें मिळणारी सावकाशी; सुट्टी; रजा; विश्रांति. **०वाणा-णी**-वि. व्यर्थ; फुकट; आळसानें घालविलेलें; निष्फळ. **०वेळ**-स्त्री. पुरसतीचा वेळ; सवड. **रिकामा ताठा**-पु. पोकळ गर्व; पोकळ डौल; मोठेपणाचा खोटा आव. **म्ह०** ' नाकीं नाहीं काटा रिकामा ताठा. ' **-रिकामीक**-स्त्री रिकामपण; फुरसत; सवड. **रिकाम्या पोटी**-क्रिवि. अनशेपोटीं; जेवण्यापूर्वी. **रिकाम्यारानी-णी**-क्रिवि. विनाकारण; फळाची आशा किंवा संभव नसतां. ' तुमचें तिकडे कांहीं का होईना ? मला काय त्याची पंचाईत ? रिकाम्या रानीं मी कशाला आपल्याला त्रास करून घेऊं ?' (ज्यांत जनावरें नाहींत अशा रानांत शिकारी जात नाहींत यावरून वरील प्रयोग). **रिकाम्या हातानें**-क्रिवि. आणावयाची वस्तु न आणतां; रिक्त हस्तानें. **रिक्यामी**-वि. (गो.) रिकामा. ' हांव रिक्यामी ना. '

रिकिबी, रिकीब—रिकब पहा. **०दार**-वि. रिकेबदार; रिकाबी धरणारा; रिकिबीस धरून पळणारा (सेवक). **वर रिकेबीस**-क्रिवि. पुनःपुन्हां; वारंवार; वरचेवर (वाईट गोष्टींविषयीं उपयोग.)

रिक्त—वि. १ रिकामा; रिता; पोकळ; मोकळा; कोरडा. २ (ल.) विहीन; (जवळ कांहीं) नसलेला; वियुक्त. [सं. रिच्=रिकामें होणें.] **०अवकाश-स्थळ**-पुन. पोकळी; हवा किंवा दुसरा कोणताहि पदार्थ नसलेली जागा. (इं.) व्हॅक्युम. **०कोष्ठ**-न. अन्नांश अगर मलांश ज्यांत नाहीं असें पोट किंवा कोठा; मोकळें, साफ पोट. [सं.] **०पाणी-हस्त**-वि. रिकाम्या हाताचा; हातांत कांहीं एक देणगी देण्यास न घेतां जाणारा; हात हालवीत

जाणारा. 'रिक्तपाणिर्न पश्येत राजानं देवतां गुरुम् ।' 'रिक्तपाणि दरुशन । सोसेना किं मनांतून ।'–ज्ञानप्रदीप ६१८. [रिक्त+पाणि=हात] ०भाषण–न. खोटें बोलणें; खोट्या उठावण्या; पोकळ आश्वासन; खोटें वचन; वल्गना, बडबड. ०मध्य प्राणी–वि. ज्यांच्या शरीरांत पोकळी असते अशी एक प्राण्याची जात-वर्ग; (इं.) सिलेंटेरा. या पोकळीला शरीरविवर असें नांव आहे. –प्राणिमो १३९. **रिक्ता, रिक्तातिथी**–स्त्री. शुक्लपक्षांतील चतुर्थी, नवमी आणि चतुर्दशी या तिथी.

रिक्थसमभाग—पु. (कायदा) सारखा वारसा. [सं. रिक्थ=वारसाहक्क+समभाग]

रिखाटा—पु. सोट; विनफांदीचें झाड. 'रिखाटयासारखे दोन जीव' –भा ७.

रिंग—स्त्री. १ आंगठी. २ वळें; कडी; कडें; वसवी; मुदन; इ० कोणतीहि वर्तुलाकार वस्तु. [इं.] **रिंगण**–न. रिंग; वर्तुलाकार जागा; सर्कशींतील खेळ करण्याचें वर्तुलाकार स्थान; रंगण. **रिंगोळी**–स्त्री. (चांभारी धंदा) रिंग ठोकण्याचें हत्यार.

रिंगण—न. मुलाचें रांगणें; सरपटणें; घसरणें; सरकणें. [सं. रिंग्=जाणें, हालणें] ०**चेंडु**–पु. पांच किंवा त्याहून जास्त गडयांनीं चेंडूनें खेळावयाचा एक खेळ. –मखेपु ५८.

रिंगणा—पु. (ना.) शाळू.

रिंगणा—पु. (इमारतकाम) घराच्या तात्र्याच्या खालची व खांबांच्या आधारावर असलेली खांबणी, लहान तुळई, कडी.

रिंगणी—स्त्री. एक कांटेरी औषधी रोपटें. ही पित्तकारक, अग्निदीपक, मलभेदक व वातनाशक आहे. –योर १.४२. [दे. प्रा. रिंगणी; हिं. रेंगनी; गु. वेटीभो रिंगणी] **रिंगणमूळ**–न. रिंगणीचें मूळ. हें औषधी आहे.

रिंगणी, रिंगी—स्त्री. १ रिठ्याचें झाड. २ रिठा (फळ). हीं फळें साबणाप्रमाणें कपडे इ० धुण्यास उपयोगी पडतात. **रिंगणें, रिंगी, रिंगणें**,–न. रिंगीचें फळ; रिठा. (कु.) रिंगया.

रिंगणें—न. लहान मुलांची तोंडांत घालून चोखण्याची वस्तु; चोखणी.

रिगणें, रिंगणें–अक्रि. १ रिघणें; शिरणें; प्रवेश करणें. 'चापेआंचेआं सेजारांतु । रीगता झाला ।' –शिशु १७६. २ उद्युक्त होणें; तयार होणें. 'वृक्ष जेणें प्रतिपालिला । तो त्या आधीन जाहला । कां जो छेदावया रिगाला । त्यासही झाला स्वाधीन ।' –एभा ७.३९४. [सं. रिंग्=जाणें, हालणें] **रिगम-मु, रिगु-गू, रींग**–पु. रिघाव; प्रवेश; अवकाश; शिरकाव; (गो.) रिगवो [दे. रिग्ग] **रिगवणी, रिगवणें**–न. १ प्रवेश. २ आरंभ. 'झालिया वसंताचें रिगवणें । वृक्ष सपुष्प सफळ तेणें ।' –एभा १६.७२. **रिगनिग, रिगिनिगी, रिघीनिघी**–स्त्री. ये जा; येणें जाणें; जा ये. 'पै प्राणाची अंतौरी । क्रियाशक्ति जे शरीरीं । तियेचि रिगिनिगी द्वारीं । पांचें ह्हीं ।' –ज्ञा १३.१०२. [रिगणें+निघणें] **रि(री)गा(घा)वा**–पु. १ प्रवेश; रीघ; रिघाव; प्राप्ति. 'मग ब्रह्मसाक्षात्कारीं रीगावा । तुज मी करीन ।' –भाए २१२. २ प्रारंभ; सुरवात. 'तयापरी पांडवा । जया सुखाचा रिगावा ।' –ज्ञा १८.७८१. **रिगुंक, रिगौंक**–क्रिवि. (गो.) प्रवेश होण्याला; शिरण्यास.

रिंगण्या—पु. (व.) ज्यानें बैल लंगडूं लागतो असा एक वातविकार.

रिंगरिंग जाणें-करणें—क्रि. (कुण.) हळु हळु जाणें; अतिसावकास चालणें. [सं. रिंग–हालणें]

रिंगरिंग—स्त्री. (ना.) लहान मुलांची पिरपिर.

रिंगळूं—न. (गु.) वांगें.

रिंगी—स्त्री. (ना.) दोन बैलांची लहान गाडी; रेकला. ह्यांत तीन माणसें बसूं शकतात. याला तटयाचा टप असतो. [सं. अणुरंगा=गाडी]

रिघणें—अक्रि. १ दाटीमध्यें किंवा अडचणीच्या जागेमध्यें बळानें प्रवेश करणें; शिरणें; घुसणें. २ जाणें; निघणें; आंत जाणें. 'प्रभुच्या पाठीसीं तदनुजाधव रिघाला ।' –मोस्त्री ३.५६. ३ सुरण, रताळें इ० कंद जमिनींत मोठे वाढणें पोसणें, धरणें. ४ घडणें; घडून येणें. **रिघणी**–स्त्री. रिघाव; प्रवेश. **रिघिनिघी, रिघनिघ**–स्त्री. रिगनिग; जाये; येजा. **रिघाव-वा**–पु. शिरकाव; प्रवेश; वाट; मार्ग. 'कीं तस्करीं होतां घरांत रिघावा । त्यासहि प्रकाश देई जैसा दिवा ।' –नव १६.१६४. **रिघू, रीघु**–पु. १ रिघाव; प्रवेश. २ समज; ज्ञान. 'गर्वाभिमान्या न होय रीघु ।' –दावि ३४३. **रिघेरिघे**–क्रिवि. हळू हळू; सावकाश.

रिचवणें, रिचावणें—अक्रि. १ ढासळून पडणें; कोसळणें; तुकडे तुकडे होऊन पडणें (रास, ढीग, भित, विहीर इ०). 'हीं भांडीं नीट एकावर एक ठेव नाहीं तर रिचवतील.' २ जोरानें किंवा वेगानें (पाऊस, झाडाचीं पानें किंवा फळें, पोत्यांतील धान्य, जखमेंतून रक्त इ०) गळणें; बाहेर पडणें; वाहाणें; उसळणें. 'देवेंद्र जैं रिचवलाच बलाहकातें ।' –र ६०. ३ अजीर्णांश जोरानें बाहेर येणें (ओकारीच्या रूपानें किंवा मळाच्या रूपानें); ४ जोराचा रेच किंवा वांती होणें. ५ (विनोदानें) घोडयावरून पडणें. [सं. रिच]

रिचविणें, रिचावणें—सक्रि. १ (एखाद्या बारदानांतील जिन्नस ओतून तें) रिकामें करणें; ओतणें; खाली करणें; बाहेर काढून टाकणें. २ आदळणें; रागानें फेकणें; आपटणें; बाजूस फेंकणें; नजरेआड करणें. ३ सांठविणें; ढीग करणें; भरणें; (रिकामें

करणें याच्या उलट अर्थ) धान्य पोत्यांत भरणें, सांठविणें. ४ गिळंकृत करणें; दाबणें; उपटणें. 'कडव्याच्या व लांकडाच्या गाड्या त्यांना फुकटांत रिचविता आल्या.' -खेया. [सं. रिच्=रिकामें करणें] **रिचवणी**-स्त्री. रिकामें करणें; रितें करणें.

रिंच्छोली—स्त्री. पंक्ति; ओळ. -मसाप २.६८.

रिज—स्त्री. रीझ; कृपा; मेहेरनजर. 'दुर्बळ ब्राह्मणावर फार त्याची रिज.' -ऐपो १३८. [दे.]

रिजणें, रिजाऊ—रिझणें, रिझाऊ पहा.

रिजाला—वि. नीच; हलकट; क्षुद्र; हलक्या मनाचा. [अर.]

रिझक—वि. रिझाक पहा.

रिझणें—अक्रि. संतोष पावणें; समाधान होणें; आनंदित होणें; संतुष्ट होणें; रंजन होणें. 'संजयो म्हणे कौरवराया। गुणा रिझों ये रिपूचिया।' -ज्ञा १७.४२७. [सं. ऋध्; प्रा. रिज्झ; हिं. रीझना]

रिझव(वि)णें—सक्रि. संतुष्ट करणें; रंजविणें; आनंदित करणें; समाधान देणें. हे रिझवितील आयणीतें। सज्जानांचिये।' -ज्ञा ६.४९५. [रिझणें] **रिझाऊ**-वि चित्तरंजक; रम्य; मोहक; पसंत पडण्यासारखें; आनंददायक; सुखकर. [रिझणें] **रिझाक, रिझक**-वि. प्रिय; प्रियकर; आवडता; रिझविणारा. (लावण्यांत व पोवाड्यांत ह्या शब्दांचा उपयोग केला जातो).

रिझला—वि. नीच. रिजाला पहा.

रिठा—पु १ रिंगें; साबणासारखें कपडे धुण्याच्या कामीं उपयोगी पडणारें एक फळ. यांचें पाणी विषनाशक आहे. (गो.) रिठे. २ या फळांचें झाड. [सं. अरिष्ट; रिष्ट; प्रा. रिट्ठ] **रिठी**-स्त्री. रिठ्याचें झाड. **रिठें**-न. रिंगें; रिठा (फळ). **रिठेमाळ**-स्त्री. दृष्टमण्यांची माळ. (रिठ्याच्या फळांत जी काळी व कठिण बी असते तिचे बजरबट्टु अथवा दृष्टमणी करतात). 'मग रिठासुर तो मायावी। गुंफिली रिठेमाळ अति बरवी।' -निगा ११.

रिठा—पु एका असुराचें नांव.

रिठोळ—पु. टोळ; सोटभैरव; उनाड किंवा उच्छृंखल मनुष्य. 'रिठोळांच्या संगतींत राहतोस हें बरें नव्हे.'

रि(री)ण—न. देणें; कर्ज; ऋण. समर्थी प्राणसमर्पण करुनि तुझें फेडिलें नृपा रीण।' -मोकर्ण ३.१८. [सं. ऋण; प्रा. रिण] **०कर ०करी**-वि. १ धनको; सावकार; ऋणकरी. 'तुका म्हणे घरीं। बहु वैसले रिणकरी।' -तुगा ५७१. २ कर्जदार; रिणको; कर्ज घेणारा. **०गस्त**-वि. कर्जदार; कर्ज काढणारा; कर्जांत बुडालेला. 'आळसी खादाड रिणगस्त।' -दा १२.९.१. [सं. ऋण+ग्रस्त] **०दार**-वि. कर्जदार; ऋणको. **०फेड**-स्त्री. कर्जफेड: कर्जांतून मुक्तता, सुटका. **०बोड-बोडया**-वि. कर्जांत बुडलेला. 'रिणबोड्या हरी जाणतोसी मुळीं। तुजसी निराळीं होतों कां रे।' -ब ४८६. [ऋण+बुडणें] **रिणको, रिणकोनाम**-वि. कर्ज घेणारा. धनको पहा. **रिणाईतस्वरूपी, रिणायत-स्वरूपी, रिणायीतस्वरूपी, रिणानुबंध, रिणी**-ऋणानुबंध ऋणाईत इ० पहा.

रिता—वि. १ पोकळ; मोकळा. २ रिकामा (सर्व अर्थ-विशेषतः पहिले पांच अर्थ) पहा. ३ (काव्य) वांचून; विरहित; गरज किंवा कमतरता असलेला. 'चतुर मी जालों आपुल्या भोंवता। भावेंविण रिता स्फुंद अंगीं।' -तुगा २०१९. [सं. रिक्त] **०भरला**-वि. होय नाहीं; केलें किंवा न केलें; असा तसा; बराबाईट; बरोबर किंवा चूक. 'जें काम मी सांगितलें त्याचा जाब मला रिताभरला द्यावयाचा होता.' **रिताड**-स्त्री. १ माल, टाकून रित्या झालेल्या गाड्या, बैल, तट्टें इ० २ -न. रहाटगाड्ग्याबरील रिकाम्या लोट्यांची माळेची बाजू. ३ स्त्री. रिकामें असण्याची स्थिति. याच्या उलट भरताड. **रिति-ती**-वि. रिकामी; मोकळी; व्यर्थ. रिकामा पहा. **रितें**-वि. १ रिकामें; पोकळ. २ (गो.) सहज. 'हांव रितें आयलें' =मी सहज आलें होतें' **०सोप**-वि. निरर्थक. **रीतहाती**-स्त्री. (महानु.) हातांत कांकणें नसलेली; विधवा. 'आतां वेल्हाळ वेधवती। जाली रीत हाती।' -भाए ९२. [सं. रिक्त+हस्त]

रिती-तु—स्त्री. चाल; प्रकार. रीत पहा. [सं. रीति]

रिद्धि—स्त्री. १ संपत्ति; समृद्धि; ऐश्वर्य. २ स्वाभाविक सिद्धि; पूर्वतपःसाध्य सिद्धि. [सं. ऋद्धि] **०सिद्धि**-स्त्री. रिद्धि आणि सिद्धि नांवाच्या गणपतीच्या दोन दासी (संपत्ति व परिपूर्णता यांच्या दर्शक). 'रिद्धिसिद्धि दारीं सदा वोळंगति। सकळ संपत्ति सर्वांघरीं।' (**एखाद्याच्याघरीं**) **०पाणी भरणें**-(एखाद्याची) संपत्ति आणि यश भरपूर असणें. रिद्धि आणि सिद्धि या दासी प्रमाणें कामें करतात अशा तऱ्हेचा नशीबवान् असणें.

रिद्धी—स्त्री. (व.) वृद्धि; सोयर; जननाशौच. [सं. वृद्धि]

रिपट-टें—न. (व.) थालिपीठ; लहान पानगा.

रिपरिप—स्त्री. १ पिरपिर; कटकट; एकसारखें मागत राहणें; दुखणाइताची कुरकुर; निकडीची भुणभुण. २ सारखें दोष देत राहणें; धमकीवजा बडबड; टकळी. ३ पावसाची झिमझिम, झुमझुम. (क्रि० लावणें; मांडणें; करणें). [ध्व] -क्रिवि. पिरपिर; किरकिर; झुमझुम; गुरगुर.

रिपाड-र—पुन. छपराचें ओंबण; कारवी; भितीचें कूड. [रीप]

रिपु—पु. शत्रु; वैरी; दुष्मन्; अरि. [सं.] **रिपुंजय**-वि. शत्रूला जिंकणारा; शत्रूवर जय मिळविणारा. [सं. रिपु+जिंकणें]

रिपेअर, रिपेर—स्त्री. डागडुजी; दुरुस्ती. [इं. रिपेअर]

रिपोर्ट, रिपोट, रपोर्ट—पु. इतिवृत्त; अहवाल; बातमी; हकीकत: खालच्या अधिकाऱ्याकडून वरच्या अधिकाऱ्याकडे

जाणारी कैफियत. 'त्यांच्या तक्रारी ऐकून घेऊन त्यांवर रिपोर्ट करण्याकरितां एक कमिशन नेमण्याचा विचार आहे.' –आगर ३.४६९. [इं. रिपोर्ट] **रिपोर्टर**–पु. बातमीदार; निवेदन करणारा; माहिती सांगणारा. [इं.]

रिफाकत—स्त्री. संगत; मैत्री; स्नेह. 'तुम्ही रघुनाथराव यांची रिफाकत सोडून देणें. –ख ७.३५६९. [अर. रफाकत्]

रिफाहत—स्त्री. स्वस्थता. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

रिबडी—स्त्री. (नगरी) आमटीची रबडी; घट्ट आमटी; चिखलासारखा दाट पदार्थ.

रिबाड—न. (राजा. कुण.) चिखल.

रियाज—पु. रोजह; बागा. –आदिलशाही फर्मानें. [अर. रोझा अव.]

रियात—स्त्री. रीत; मार्ग; रीति; रयात पहा. 'रियात करून घ्यावयाची' –वाडबाबा ३.२३७. [फा. रिआयत्]

रि(री)याती—स्त्री. (रयत शब्दाचें अनेकवचन) प्रजा. 'रियाती आहेत याजकरितां निदान बेचाळीस हजारांची जागा घेणें.' –वाडबाबा १.६४.

रियासत, रियाषत—स्त्री. १ राजवट; राज्य; सत्ता. २ राज्यविस्तार. [फा. रियासत्]

रिवरिवणें, रिवरिव—रवरव इ० पहा.

रिवाज—पु. रूढी; चाल; शिरस्ता; वहिवाट; रीत; प्रकार; तऱ्हा; पद्धत. [अर. रिवाज्] **०पडणें**–प्रचारांत येणें; रूढ होणें.

रिश्ते(स्ते)दार—पु (व.) नातेवाईक; आप्त; संबंधी. [हिं.]

रिश्वत—स्त्री. लांच. 'भवानीपंताच्या मार्फत दहा लक्ष पावेतों रिश्वत घेऊन हंगामा होऊं दिला नाहीं.' –परमव ६८. [अर. रिश्वत्]

रिषी—पु. (ताम्रपट) ऋषि. –शक १०१६. चा शिलाहार ताम्रपट.

रिष्क—पु. जाच; जुलूम. [अर.]

रिस—स्त्री. राग; क्रोध; चीड; त्रास. [हिं; सं. रोष]

रिसीक-पु. (कु.) छलक.

रिसाड—वि. १ घाणेरडा; ओंगळ. २ आळशी.

रिसाल—पु. कर्तव्य; काम; पत्र धाडणें; पुस्तक;प्रबंध; लहान टापू. [अर.]

रिसालतपनाह—पु. भविष्यवादित्वाचें आश्रयस्थान. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

रिसाला—पु. १ घोडदळ; घोडेस्वारांची पलटण; स्वारांचें पथक (साधारण १०० जणांचें) २ सरंजाम; सामुग्री. 'त्यांत साल मजकुरी तोफा, बाण, जेजाला यांचा रिसाला बहुत तयार करविला.' –ख ८७५. [अर. रिसाल] **रिसाल(ले)दार**–पु. रिसाल्याचा मुख्य अंमलदार. [अर.] **रिसालदारी**-स्त्री. घोडदळाचें आधिपत्य.

रिसीट—स्त्री. पावती; पोंच. [इं.]

रिसीव—वि. श्रेष्ठ. –मनको.

रिसीव्हर—पु. घेणारा; वादांतील मिळकत किंवा दिवाळें काढलेल्या मनुष्याची मालमत्ता आपल्या ताब्यांत घेऊन तिची व्यवस्था लावण्याकरितां कोर्टानें नेमलेला मनुष्य. [इं.]

रिस्त—स्त्री. रसद पहा.

री—स्त्री. १ गायनांतील स्वरसप्तकांपैकीं दुसरा स्वर. २ मुख्य गायकाचें गायन चाललें असतां त्याचा हस्तक किंवा साथीदार त्याच्या मागोमाग त्याचेच सुर म्हणत जातो ते. (क्रि० नेणें; धरणें; ओडणें). [ध्व.] **०ओढणें**–१ दुसऱ्याच्या सुरांत सुर मिळविणें. २दुसऱ्याच्या म्हणण्यासारखेंच म्हणणें; पुनरुच्चार करणें.

रीग-घ—स्त्री. रिगवणी; रीघ. रीघावा, रिगणें; रिघणें पहा.

रीगवेद—पु. (प्र.) ऋग्वेद पहा.

रीगावी—स्त्री. (महानु.)प्रवेशद्वार. 'पूर्वाभिमुख रीगावी।' –ऋ ११५. [रिगणें]

रीज—स्त्री. रीझ पहा.

रीझ-ज—स्त्री. १ करमणूक; आनंद; रंजन. २ आवड; पसंति; प्रीति; कृपा; खुशी; अगत्य. 'त्या पानशावर रावसाहेबाची रीझ।' –ऐपो २८२. [सं. रंजन; हिं. रीझ] **०बूज**–स्त्री. सुखसमाधान.

रीठ—न. (ना. व.) १ बखळ; पडक्या घराची जागा; पूर्वी वस्ती असलेली परंतु सध्यां नसून ओसाड पडलेली जागा. २ ओसाड व मोडकळीस आलेलें घर, घराचे भग्नावशेष. (वाप्र.) **रिठावर दिवा लागणार नाहीं**–निःसंतान होऊन घर पडून त्याचें रीठ होईल व तेथें कोणीहि घर बांधणार नाहीं.

रीठा—पु. रिठा पहा. **रीठी**–स्त्री. रिठ्याचें झाड.

रीढकास्थी—स्त्री. पाठीच्या कण्याचीं हाडें; मणके. [रीढक+अस्थि]

रीत—स्त्री. रीति; प्रघात; मार्ग; पद्धत; चाल; वहिवाट. [सं. रीति] **म्ह०** (व.) रीत बाटली म्हणून जात थोडीच बाटली. **०पाडणें**–वहिवाट घालणें; नवीन चाल पाडणें; प्रघात सुरू करणें. **०भांत-भात**-स्त्री. रीतरिवाज; चाल; वहिवाट; प्रघात. [रीत+भांत] **०रवेस**-पु. १ चाल; रीत; पद्धत; वागणूक. 'परंतु राजानें माझी रीतरवेस पाहून किल्ल्याची देखरेख मात्र करावी.' –बाळ २.६३. [सं. रीति+फा. रवेश] **०सर**–वि. सशास्त्र; रीतीला अनुसरून; वहिवाटी-रूढीप्रमाणें.

रीति—स्त्री. १ पद्धत; तऱ्हा; वहिवाट; प्रचार. २ संवय; चाल; सराव. ३ रिवाज; शिरस्ता; लोकरीति; रूढी; चालरीत;

एखाद्या ठिकाणची वहिवाट. ४ (साहित्य) लेखनप्रकार. उदा० वैदर्भी, मागधी इ०. 'वैधर्भी तशि मागधी स्फुरु अम्हां येवोत रीति अशा।' –कमं १.२२. [सं. रीति; री–चालणें; हालणें] **म्ह**० सरळ रीतीचा अढळ कृतीचा. **०भूत**–पु. (व्याकरण) भूतकाळचा एक प्रकार. क्रिया सतत चालली होती असें हा काळ दाखवितो. उदा० करीत असे. याचप्रमाणें रीतिवर्तमान व रीतिभविष्यकाळ जाणावे. **०स्थिति**–स्त्री. चालरीत; वागणूक; आचारविचार; वर्तन व परिस्थिति. 'त्याची रीतिस्थिति चांगली आहे.'

रीति—स्त्री. रिता भाग; न्यूनता; कमीपणा. 'ब्रह्मसमन्यें पाहतां पाही। स्थावरजंगमाच्या ठायीं। तिळभरी वाढी रीती नाहीं। आपण पै पाहीं कोंदला।' –एभा ७.४३६. [सं. रिक्तता]

रीप—स्त्री. ओंबण करण्याकरितां लांकडाच्या केलेल्या पट्ट्यांपैकीं प्रत्येक; तक्ते उभे चिरून चारचार बोटें रुंदीच्या (वाशांवर मारून ओंबण करण्याकरितां) केलेल्या पट्ट्या; ओंबण; पांजरण.

रीफ—पु. कठडा. –मसाप २.७६.

रीम—न. कागदाचे वीस दस्ते (चोवीस कागदांचा एक दस्ता याप्रमाणें); ४८० कागद. [पोर्तु. रेमा; इं. रीम]

री री करणें—रेंगाळणें; सावकाश, मंदगतीनें चालणें. 'त्याच्या जवळ एवढें मोठें सैन्य असूनहि वेढ्याचें काम रीरीच चाललें होतें.' –स्वप ४४४.

रील—न. सुत गुंडाळण्याचें चक्र; रीळ; बाबीन. [इं.]

री(रीं)स—पुन. १ अस्वल. 'मी काय आहे वृकव्याघ्र रीस।' –शिवी. २ (ल.) आळशी, घाणेरडा मनुष्य; ओंगळ, मूर्ख माणूस. [सं. ऋक्ष]

रीस—स्त्री. १ अपराध; गुन्हा; चूक. २ असंतोष; गैरमर्जी; राग. ३ त्रास; कंटाळा; तिटकारा. 'कमाईस मोल येथें नका रीस मानूं।' –तुगा ३३५. ४ (व. ना.) किळस; वीट; शिसारी. ५ (गो.) भय; भीति. [सं. रोष]

रीस—स्त्री. विराणी; आगीचा प्रसार होऊं नये म्हणून भोंवतालची जाळलेली जागा; ईर. –बदलापूर २८५. [ईर; सं. वीर्य]

रीसी—स्त्री. मूळव्याध. –वैद्यकबाड ४६. [सं. अर्श]

रीळ—न. दोऱ्याचा गुंडा; दोरा गुंडाळण्याचें साधन. रील पहा.

रुो—(संक्षेप) रुपये.

रुइटी, रुई—स्त्री. १ एक झाड; अर्क वृक्ष. २ निवडून सरकी काढून स्वच्छ केलेला कापूस; पिंजलेला कापूस. 'याशिवाय रुई वगैरेचा व्यापार चालतो.' –विक्षिप्त १.२५. [हिं. रू] **०दार**–वि. कापूस भरलेला. **०फूल**–न. १ रुईचें फूल. २ रुईच्या फुलासारखें वस्त्रावर अगर दागिन्यावर काढलेलें फुलाचें चित्र, आकृति. **०फूलकांठ**–पु. रुईच्या फुलासारख्या आकृती असलेला वस्त्राचा कांठ, किनार. **०फुलकांठी**–वि. रुईफुली कांठाचें. **०फुली**–वि. रुईच्या फुलासारख्या नक्षीचा. **०मांदार**–पु. पांढरीं स्वच्छ फुलें येणारी रुईची एक जात; याला मांदाररुई असेंहि म्हणतात.

रुइ—पु. रोही; नीलगाय. 'पळे जंबुका स्वार मृग थडकले रुई।' –ऐपो ४३४. [सं. रोहित् (मृगविशेष) –रोहिअ–रोही–रुई–भाअ १८३३]

रुई—स्त्री. योग्य रीत; रूढी; प्रकार; मार्ग; रिवाज; शिरस्ता; शिस्त; चाल; वहिवाट. 'वाजवीचे रुईनें अंमल करून रयेत अबाद राखणें.' –वाडसमा ३.१२४. [फा. रूय्] **रुईचा**–वि. रीतसर; योग्य रीतीचा; लोकमान्य. **रुईस येणें**–रीतीस येणें; प्रघात पडणें; रूढीस अनुसरून असणें; जमणें.

रुईखुई—क्रिवि. कसाबसा; कष्टानें; सायासानें. 'आतांच दुखण्यांतून तो रुईखुई उठला आहे.'

रुईरयात, रुरयात—पु. भीडमुरवत. 'तुम्ही हरदूवाद्यास जाणून यांचा त्यांचा करिना भोवरगांव व जमीनदार दोन्ही महालचे मेळवून कोण्हाची रुईरयात (रुरयात) न करितां वाजवी मनास आणून...' –वाडमा २.१९५.

रुकरुक, रुकसत—रुखरुख, रुखसत इ० पहा.

रुकशांग—स्त्री. बांडगूळ; आंब्यावर वाढणारी वनस्पती. [सं. वृक्षांग]

रुकसत, रुक्सत—स्त्री. रजा; रवानगी. 'कितेक सरदार वगैरे यास आपआपले स्थलास रुकसत केले' –पेद १.२. [अर. रुख्सत्]

रुका, रुक्का—पु. १ पै; आण्याचा बारावा भाग. २ जमीन मोजण्याचें एक परिमाण. हें अडीच बिघ्यांपर्यंत (२॥, ५, ८, १०, २०) निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळें आहे. ३ पत्र; रोखा; पत्ता; कोष्टक; यादी. 'शादीचा रुका.' –रा ७.२०४. 'रुक्याप्रमाणें सामान तपासून...' –ऐरापुप्र २.१४०. ४ सोनें; द्रव्य; धन. 'तत्काळ सिद्ध तो करि हरि हरि जैसा सदा रुका सवदे।' –मोशांति ६.५१. ५ अर्धा आणा. –इमं ४५. [अर. रुक्अ; तुल० सं. रुक्म=सोनें] **०अडका-विस्वा**–पु. पैसा अडका; संपत्ति. 'तथापि रुकाविस्वा मिळेना।' –गीता २.२१६५.

रुकार—पु. १ संमति; अनुमति; परवानगी; होकार. (क्रि० देणें). २ संमतिलेखाची नक्कल केल्यावर रुजवात घेतल्याबद्दल रु अक्षर लिहून केलेलें चिन्ह. [रुजवात घेणें यांतील पहिल्या अक्षरावरून] **रुकारणें**–अक्रि. १ संमति देणें, दाखविणें; पसंति दर्शविणें. २ –सक्रि. हो म्हणणें; अनुमति देणें.

रुकावट—स्त्री. प्रतिरोध; अडथळा; विरोध; प्रतिबंध; अडवणूक. [हिं. रोकना] **०से**–क्रिवि. थांबून थांबून.

रुक्न—पुस्त्री. १ खांब; आधार: मदत. २ उमराव. राज्याचा आधारस्तंभ; एक पदवी. 'रुक्नुद्दौला.'- ३ कवितेचा चरण. [फा. रुक्न=स्तंभ]

रुक्म—न. सुवर्ण; सोनें. 'दासी शत दासहि शत आठ महा नाग रुक्मरथ सोळा।'-मोउद्योग ७.२. [सं.] ०**पुंख**-वि. सोन्याचें पुच्छ, पिसारा असलेला (बाण). 'रुक्म पुंख सरले।' -कृमुरा २५.५४. **रुक्मांभ**-वि. सोन्यासारखी कांति असलेलें. 'रूप रुक्मांभ संकाश।' -गुच ३६.३८८.

रुक्मिकेली, रुक्मबाहु, रुक्मरथ—विनापु. रुक्मिणीच्या भावांचीं नांवें. 'तैसे रुक्मिकेली रुक्मबाहू। दोघे भाऊ दोहींभायी।' -एरुस्व ६.६०.

रुक्मिणी—स्त्री. कृष्णाची पट्टराणी. **रुक्मिणीसुत**-पु. मदन.

रुक्वाना—क्रि. अडथळा करविणें. [रोखणें]

रुख—स्त्री. इच्छा; रोख. [हिं.]

रुख, रुंख, रुखा—पु. १ झाड; वृक्ष. 'वाटतें रुखावरी चढोनि।' -दावि १३. २ खोड; फांद्या तोडलेलें झाड; बोडकें झाड; खोडाचा खालचा भाग. ३ रहाटगाडग्याच्या कनेकडांचीं टोकें ज्या दोन आडव्या लांकडावर टेंकलेली असतात त्यापैकीं प्रत्येक. [सं. वृक्ष; फ्रें. जि. रुक] **रुखराए-ये**-पु.अव. १ (महानु.) मोठीं झाडें; थोर वृक्ष. २ अश्वत्थ; पिंपळ. 'तैसें रुखराए पाझिरैले। अंतराळीं।' -शिशु ६१७. [सं. वृक्षराज] **रुखा(खां)डी-डखा, रुखी, रुख्या**-वि. झाडावर चढण्यांत पटाईत; नेहमीं झाडावर चढणारा. [रुखें; सं. वृक्ष] **रुखोडुं**-न. ताडावर किंवा माडावर चढणारा पायाला दोरीचा घालतो तो फासा; पायंडा. [रुख] **रुखाळूं**-न. झाडावर वाढणारें एका जातीचें अळूं. [रुख+अळूं]

रुख—पु. १ तोंड; चेहरा. २ बाजू; दिशा; बिंदु. -सक्रि. रोखणें; अडविणें. [हिं.] ०**घेणें**-(ना.) तोंड देणें.

रुख—पु. बुद्धिबळांतील हत्ती. [इं. रुक]

रुखणें—अक्रि. रागें भरणें; रागावणें. [सं. रुष्]

रुखत—न. (खा.) रुखवत.

रुखय—स्त्री. (कों.) एका जातीचा साप. हा बहुधा झाडावर आढळतो. [सं. वृक्ष.]

रुखरुख—स्त्री. चिंता; टोंचणी; (एकादी वस्तु हरविली असतां किंवा दुष्कृत्याची अगर मूर्खपणाच्या कृत्याची आठवण झाली अ-तां होणारा) पश्चात्ताप; चुटपुट; चटका; हुरहुर; खेद. [ध्व.]

रुखरुखित—वि. ओसाड; रखरखीत. [वृक्षरहित]

रुखवत—न. लग्नांत नवरा मुलगा वधूच्या घराकडे लग्नासाठीं जाण्यापूर्वी वधूपक्षाकडून वराच्या घरीं त्याला व त्याच्या स्नेह्यांना जो उपहार देण्यांत येतो तो; किंवा असा उपहार देण्याचा समारंभ (क्वचित् हा समारंभ वरप्रस्थानानंतर वधूमंडपांतहि करतात). २ अशा प्रकारच्या फराळाची सामुग्री, सामान. [फा. रिषवत्=लांच; रुपवत्=देणगी]

रुखसत, रुख्सत, रुसकत—स्त्री. १ रजा; सुटी. २ परवानगी; निरोप; सोडवणूक. ३ विरोध. -वि. रवाना केलेला; पाठविलेला; सोडलेला; मोकळा; कामावरून काढलेला. [अर. रुख्सत्]

रुखा—वि. १ रुक्ष; नीरस; बेचव; शुष्क; कोरडा; अस्निग्ध (भक्ष्य पदार्थ). २ ओसाड; वृक्षरहित व जलशून्य; रखरखीत; भयाण (प्रदेश). ३ कठोर; निर्दय; मायाविरहित (बोलणें, भाषण). ४ कर्णकटु; घोगरा; कानाला गोड न लागणारा; बेताल (आवाज, स्वर, गाणें इ०) [सं. रुक्ष]

रुखें रुखें—क्रिवि. (व.) कोरडें; बेचव; रुक्ष [रुक्ष]

रुखा—पु. जडयाचें हत्यार. -शर.

रुखो—पु. (गो.) पिपासारखें उंच लांकडाचें भांडें. ताक ठेवण्याकरितां याचा उपयोग करितात.

रुखसार—पु. गाल. -आदिलशाही फर्मानें.

रुगरदा, रुगर्दा—पु. कापूस भरून केलेला तक्या. -वि. कापसानें भरलेली (उशी, गिरदी, इ०) [रू+गर्दा]

रुंगणें—अक्रि. (व.) मंदावणें; रेंगाळणें. 'विहिरीचें काम रुंगतच चाललें आहे.' [रेंगाळणें]

रुंगळणें—अक्रि. बारीक होणें; कृश होणें; वाळणें; उतरणें.

रुंगाळा—पु. कृशता; क्षीणता; काटकुळेपणा; किरकोळपणा; किडकिडीतपणा. -वि. १ कृश; बारीक; किरकोळ; पातळ. २ काटकुळा; सडपातळ; किडकिडीत.

रुगु—पु. (निंदार्थी) ऋग्वेदी. (हा शब्द यजुर्वेदी ब्राह्मण ऋग्वेद्यांस उपहासार्थी लावतात). [ऋग्वेदी]

रुंगें—न. रुपें. -शर.

रुग्ण-न्न—वि. रोगी; रोगग्रस्त; आजारी. [सं. रुज्=दुःख होणें.] ०**दंत**-वि. किडक्या दातांचा; किडके दांत असलेला. ०**परिचर्या**-स्त्री. रोग्याची शुश्रूषा; रोग्याची चाकरी. ०**परिचर्यापथक**-न. रोग्यांची शुश्रूषा करण्याकरितां उभारलेलें पथक; (इं.) अँब्युलन्स कोर. 'काग्रेसचीं रुग्णपरिचर्यापथकें मोटारींतून हिंडूं लागलीं.' -के १४.६.३०. **रुग्णालय**-न. आजाऱ्यांना ज्या ठिकाणीं ठेवून आषधोपचार केले जातात असें घर; (इं.) हॉस्पिटल. [सं. रुग्ण+आलय]

रुच—स्त्री. रुचि; चव; गोडी. -न. (कुण.) मौठ. -वि. रुचकर. [सं. रुचि]

रुचक—न. एक आल्कली. –मराठी ६ वें पुस्तक २ री आवृत्ति १८७५). पृ. १६२. –वि. रुचकर; स्वादिष्ट.

रुचकर—वि. रुचिकर; स्वादिष्ट; मधुर; चवदार. [सं. रुचि]

रुचकी—वि. रुईचा-ची-चें. 'पळसाचीं कीं रुचकीं पानें. –दावि १८०.

रुचणें—अक्रि. १ आवडणें; गोड लागणें; 'ध्यान रुचो प्रभुचेंचि जसें रुचतें शिशुच्या पय अन्न मनातें.'–मोरामायणें १. २९७. २ शोभणें; शोभून दिसणें; योग्य दिसणें; बरोबर वाटणें. 'तुम्ही पिढीचे भट; तुम्ही प्रसंगीं भिक्षा मागितली तरी रुचेल पण आम्हां गृहस्थाला लोक हांसतील.' ३ (चुकीनें उपयोग) रुतणें [सं. रुच्=आवडणें]

रुचि—स्त्री. १ गोडी; चव (पदार्थांत असणारी); स्वाद; रसाळपणा. २ रसनेंद्रियांत असणारी चव घेण्याची शक्ति; तोंडाला असणारी चव. ३ आवड; गोडी; आनंद; सुख. 'यश श्रवण कीर्तनीं रुचि दिली तरी हावरा.' –केका १२. ४ (कों.) मीठ. ५ कांति; प्रभा; तेज. 'वासरमणिकोटिरुचे!' –मोभीष्म १.४५. [सं. रुच्=१ आवडणें. २ शोभणें; प्रकाशणें] ०कर–वि. १ रुचकर; चवदार; तोंडाला गोडी आणणारा; पदार्थाला स्वादिष्ट करणारा; रसाळ; खमंग. २ करमणूक करणारा; रंगविणारा; रंजविणारा; रमणीय. [सं.] **रुची**–रुचि पहा. **रुचीक**–वि. १ रुचकर; स्वादिष्ट; आवडणारें. २ (ल.) रमणीय; रमविणारें. **म्ह**०(गो.) रुचीक सोरो नी पतीक पसारो=चव घेऊन घेऊन सोरो (दारू) संपविली व पत (वानगी) देऊन देऊन दुकान संपविलें. **रुच्य**–वि. १ रुचकर; मिष्ट; चवदार. 'देखें रोगातें जिणावें. औषध तरी देयावें. परी तें अतिरुच्य व्हावें. मधुर जैसें.' –ज्ञा ३.१९. २ सुखदायक; मनोरंजक. **रुचिर**–वि. मोहक; सुंदर. [सं. रुच्–प्रकाशणें]

रुचीकि, रुचिक—पु. रुईचा चीक. 'रुचिक बिबवे घालिती. नाना दुःखें दडपे देती.'–दा ३.७.३५. [रुई+चीक]

रुजई—स्त्री. (व.) कापूस घालून शिवलेलें पांघरूण; दुलई. रजई पहा.

रुजणें—अक्रि. १ कोंब येणें; मोड फुटणें; (एखादें रोपटें) जमिनींतून वर येणें. २ लागणें; उगवणें; फुटणें; जगणें; वाढणें. ३ (उपदेश इ० चा) परिणाम होणें; फलद्रूप होणें; बिंबणें. [सं. रुह्–रुजणें=वाढणें] **रुजत घालणें**–पेरणें; रुजण्याकरितां पुरणें. हिंदुस्थानांतील नारळ दिला तो तिनें पालचे स्मरणार्थ रुजत घातला.'–पाव्ह ४०. **रुजवट**–वि. उगवलेलें; रुजलेलें; मोड आलेलें; कोंब फुटलेलें; पालवलेलें; मूळ धरलेलें (बीं किंवा रोप). **रुजवण**–न. पेरलेलें बीज; फुटलेला अंकुर; उगवलेलें; मूळ धरलेलें बीं किंवा रोप; रुजण्याकरितां पेरलेलें किंवा लावलेलें बीज अगर रोप.

रुंजणें—अक्रि. रुंजी घालणें. 'त्या सुवासा वेधून। भ्रमर तेथें रुंजती.' –ह १.३२. [ध्व]

रुजवात—स्त्री. रुजुवात पहा. **रुजवाती**–वि. ज्याची रुजवात घ्यावयाची आहे असें (कलम, नांवनिशी, रक्कम इ०).

रुजा—स्त्री. १ रोग; पीडा; दुःख. २ ज्या ठिकाणीं रोमरंध्रांचीं तोंडें बंद झाल्यामुळें गळलेले केंस परत येत नाहींत ती जागा. –योर २.४२७. [सं. रुज्]

रुजामा—पु. १ रूं भरलेली बिछाईत; पातळ गादी; जाजम; सतरंजी; जमिनीवर आंथरण्याची बैठक; तक्या, गादी इ० कापूस भरलेली वस्तु. 'रुजामे भरजरी कनकवर्ण.'–नव १५.१९०. २ रूदार आंगरखा. [फा.]

रुंजी—स्त्री. १ गुंजारव; भ्रमराचें गुणगुणणें. 'तों तेथें एक भ्रमर. अकस्मात पातला सुंदर. रुंजी घालीत क्षणमात्र. गोपिकांनीं देखिला.'–ह २१.१५४. २ (एखाद्या वस्तूभोंवती) गुणगुणत घातलेली घिरटी, चक्कर, फेरी. ४ पारव्यांचें किंवा कबुतरांचें (एकमेकांचे मागें लागून) घिरट्या घालणें व घुमणें. (क्रि० घालणें). [ध्व. रुंजणें]

रुजु—वि. सरळ. [सं. ऋजु] ०त्व–न. सरळपणा; सरलत्व. [सं.] **रुजुवणें**–अक्रि. १ फेडणें; पूर्ण करणें. 'कुळदेव देव्यांचें रुजवती रिण.'–दावि ३६५. २ सरळ करणें.

रुजुवात—स्त्री. (निरनिराळे हिशेब, कागद, लिखाण, यादींतील कलमें इ०) समक्ष ताडून पाहणें; कबुली; समक्षता; प्रत्यय; लक्ष्य; बरोबरपणा; सत्यता; खरेपणा; निष्ठा. (क्रि० घेणें; करणें; घालणें इ०). 'गलीमपराभव प्रत्यक्ष जनांत रुजुवातीस आला या आनंदे खुशाली.'–चित्रगुप्त ४५. [अर. रुज्अत; रुजूअ] ०पत्रक–न. तिजोरींतून काढून आणलेली रक्कम जमा केली किंवा नाहीं तें पाहून त्याचा ठेवलेला दाखला. –बडोदें पहिलवान व कुस्ती पृ. २८. ०हर्फखान–पु. खानाचे पूर्वीचे शब्द, म्हणणें. 'मागील रुजवात हर्फखान दूर करावा.'–वाडमा १.२२३.

रुजू—स्त्री. १ निष्ठा. २ संमति; कबुली. ३ रुजवात. (क्रि० घेणें; घालणें; पाहणें). –वि. १ (एखादें काम करण्यास) तयार; तत्पर; राजी; कबूल. 'तुम्ही सांगाल तें करावयास मी रुजू आहे.' २ हजर; गुदरलेला; दाखल; सादर; सरकारजमा; जप्त. 'मी कालच चाकरीवर रुजू झालों.' 'तुम्ही चोर धरले ते सरकारांत नेऊन रुजू करा.' ३ मान्य; पसंत; संमत: रुकार दिलेला. 'अनुपकारी मनुष्यावर उपकार केला असतां व्यर्थ म्हणतां परंतु तो ईश्वरास रुजू होतो.' 'जबरदस्तीमुळें त्यास रुजू होते.' –इमं २६०. ४ सहीशिक्का केलेला; पसंति दर्शविलेला; ५सामील; बाजूचा. ६ बरोबर; दुरुस्त केलेला. मालक सर्व पत्राच्या खालीं व मोतेबाखालीं रुजू या अर्थी रू असें लिही. लिहिण्यांत चुक झाली तर

तो मजकूर न खोडतां पुढें रुजू लिहून नंतर शुद्ध मजकूर लिहीत म्हणजे पूर्वीचा मजकूर रद्द समजत. उदा० बुधवार प्रातःकाळ रुजू भोमवार.' 'पीलगोंडें घेतलें रुजू भागानगर घेतलें.' (म्हणजे पीलगोंडें न घेतां भागानगर घेतलें). [अर. रुजूअ] (वाप्र.) **०घालणें**–ताडून पहाणें. 'पुर्वील बिशादीचें जाबते रुजू घालावे.' **०होणें**–१ पटणें; मान्य होणें; पसंत पडणें. 'फांकू नका रुजू जालियावांचून। सांगाजी कोण धरती धण्या।'–तुगा ३३६. २ भेटणें; नजर देणें; सन्मुख येणें; अंकित म्हणविणें. 'आम्हांस रुजू जाहले नाहींत.'–मराचिथोशा ३. सामाशब्द– **०गुदस्त**–वि. गेल्या सालीं किंवा मागील वर्षी पसंत होऊन दाखल झालेला. **०मु(मो)काबला**–पु. ताडून पाहणें; समक्षता; रुजवात; ताडण्याकस्तिं एकत्र आणणें; तुलना. (क्रि० करणें; होणें).

रुझणें, रुझवण—रुजणें; रुजवण पहा.

रुंझी—स्त्री. रुंजी पहा.

रुटका—पु. बिघ्याहून लहान असें जमीन मोजण्याचें परिमाण. हें मुसलमानांनीं सुरू केलें. **रुटकेबंदी**–स्त्री. रुटका या मापाप्रमाणें ठरविलेला सारा; रुटक्यावर ठरविलेला धारा, जमीनमहसुल.

रुटुखुटु, रुटुगुटु, रुटुघुटु, रुटुघुट—क्रिवि. संदगतीनें, हळु हळु; सावकाश; धीरेधीरें (घोडयाची चाल किंवा कामाची गति.) **०करणें**–बारीक सारीक कामें करणें; पुष्कळ लहान लहान धंदे करणें; नाना उद्योग करून कसें तरी पोट भरणें.

रुटूनबसणें—अक्रि. (व.) रुसून बसणें.

रुट्ट—पु. (बे.) तगादा.

रुठणें—सक्रि. मारणें; बडविणें. 'एवढा माहांकाळु रुठला।'–उषा ११९.

रुंड—न. (अप.) रुंड; शिर; मुंडकें; धडापासून वेगळें केलेलें डोकें. [सं.] **म्ह०** एक घाव आणि दोन रुंडें (तुकडे) **०माळा**–स्त्री. मुंडक्यांची माळ. ही शंकराच्या किंवा काली देवीच्या गळ्यांत असते. 'गळां रुंडमाळांचे हार।'–पाळणेसंग्रह पृ. २४.

रुंढ-ढी—स्त्री. दुर्गादेवीच्या देवळांतील कौल घेतांना उचलून पहाण्याचा दगड; उचला पहा. [रुंड]

रुढणें—अक्रि. १ बातमी पसरणें; अफवा उठणें. 'रामसिंगाचे पोरानें चोरी केली असें सगळ्या गांवभर रुढलें.' २ व्यवहारांत आणणें.'तैसें लटिकें येणें रुढे। जड येणें उजिवडे।'–अमृ २.३५. [रूढ होणें]

रुण—न. ऋण; कर्ज; देणें; रीण, रिण पहा. 'द्रव्य नसेल तरी घ्यावें। रुण कळांतरें।'–दा ३.२.३७. [सं. रुण]

रुणझुण—स्त्री. मंजुळ आवाज; झुमझुम; बारीक मधुर आवाज (विशेषतः घागऱ्या, पैंजण इ०चा); गोड आवाज. [ध्व.] **रुणझुण–णां**–क्रिवि. गोडपणानें; मंजुळपणानें. 'रुणझुणा वाजती नेपुरे। वांकी बोभाटती गजरें।'–दा १.२.२३. **रुणझुणकार**–पु. मधमाशांचा गुंजारव; बाणांचा सूंसूं आवाज. **रुणझुणणें**–अक्रि. १ रुणझुण आवाज करणें; गोड नाद निघणें; मंजुळ वाजणें (पैंजण, नूपुर इ०) २ गुंतणें; घोटाळणें. 'कळलासी तूं कृष्णाचा हेर। पाळती घेतोसी समग्र। तूं शठाचा मित्र शठ साचार। कासया येयें रुणझुणसी।'–ह २१.१२६.

रुणरुणणें—अक्रि. (वेगानें जाणारा गोफणीचा दगड, बंदुकीची गोळी इ०). सूं सूं वाजणें; घुं घुं करणें; गुंगणें. [ध्व.]

रुगा—पु. (कों.) १ झुरणी; सतत होणारें दुःख; हृद्रोग. २ उतरती कळा. [ध्व. अथवा सं. रुगरण]

रुणाईत, रुणार्इतस्वरूपी, रुणानुबंध, रुणी—ऋणाईत इ० शब्द पहा.

रुण्य—स्त्रीपुव. (व.) आळ्या; किडी. (एकवचन रुणी).

रुत—पु. १ ऋतु; हंगाम. २ विटाळशीपणा, रजस्वलावस्था. ३ कोरडी भिक्षा. 'रुत म्हणिजे माध्यान्ह समयावसरी। घरोघरीं फिरोनि ग्रामांतरीं। आणी कोण्ही जरी सुपभरी। तरि घेणें मुष्टि येक।'–स्वादि ५.५.१३. [सं. ऋतु]

रुतण-न—स्त्री. रुपण; भुसभुशीत जागा; मऊ जमीन; (एखादा पदार्थ) रुतून राहील अशी जागा (उदा० चिखलाची जागा, वाळूनें युक्त असें स्थान इ०). **रुतणें**–१ बोचणें; टोंचणें; खुपणें; मऊ पदार्थांत कठीण पदार्थ शिरणें; घुसणें; फोडून आंत शिरणें; चेपून शिरणें. 'भूईवर निजलें म्हणजे अंगांत खडे रुततात.' २ अडकून पडणें; रुपणें; बुडून अडकणें; चिकटून पडणें; पुरला जाणें; पुरलेला असणें. 'ना तरी निदेवाच्या परिवरीं। लोळ्या रुतलिया आहाति सहस्रवरी। परि तेथ बैसोनि उपवासु करी। कां दरिद्रें जिये।'–ज्ञा ९.५९. **रुती**–स्त्री. रुतण; अडकवण. 'ममतेची ओल प्रबळ। ते ठायीं रुती गुंती सबळ।'–एभा १२.५७६.

रुतबा, रुत्बा—पु. दर्जा; पदवी; अधिकार; योग्यता. 'अष्टप्रधानाचे बरोबरीचा रुत्बा'–भाऐपया १०३. [अर. रुत्बा]

रुत्बत—पु. दर्जा; योग्यता; अधिकार. –आदिलशाही फर्मानें. [अर. रुत्बा]

रुतू—पु. १ ऋतु; वर्षाचा विभाग; दोन महिन्यांचा काल. २ विटाळ; रजोदर्शन; न्हाण. ३ माद्यांचा प्रसवण्याचा हंगाम; फुलांचा किंवा फळांचा हंगाम; मोसम. [सं. ऋतु] **०स्नात-दर्शन-मती-वती, रुतुस्नात**–ऋतुस्नात इ० पहा.

रुथेनिअम, रूथेन—पुक्लीन. (रसा.) एक प्लातिन वर्गांतील धातु. हा प्लातिनच्या कच्च्या धातूशीं संयुक्तस्थितींत असलेला आढळतो. यापासून अम्न वगैरेचे संयुक्त क्षार मिळतात. –ज्ञाको (र) ११५. [इं.]

रुंद—वि. विस्तीर्ण; चवडा; आडवा; विस्तृत; रुंदीनें युक्त असा. [सं. वृंद-वुंद-रुंद-भाअ १८३२. देप्रा. रुंद] **रुंदट-ड**–वि. अधिक रुंदीचा; अधिक विस्तृत. 'राजपथासम रुंदट।' –ज्ञाप्र २५०. **-रुंदसो, रुंदाड, रुंदा**-वि. (कु. गो.) रुंद; मोठा; विस्तृत. **रुंदाट-ड**–वि. फार रुंद; अतिशय रुंद, विस्तृत. **रुंदावणी**–स्त्री. रुंद करण्याची, रुंदी वाढविण्याची क्रिया. **रुंदावणें**–अक्रि. रुंद होणें; (शरीर) फुगणें; लट्ठ होणें. **रुंदावा**–पु. रुंदपणा; रुंदी; पन्हा. **रुंदाविणें**–सक्रि. पसरून रुंदी वाढविणें; विस्तृत करणें, रुंद करणें; वस्त्र इ० पसरून विस्तृत करणें. **रुंदाळ**–वि. फार रुंद; अतिशय रुंद. **रुंदी**–स्त्री. चवडाई; आडवी लांबी; पन्हा. **रुंदुला**–न.(चि.) रुंद तोंडाचें सुगड, मडकें. –मसाप २.१८९. **रुंदेला**–वि. रुंद; रुंदट; विस्तृत.

रुंद—पु. (व.) जखमेंतील पू.

रुदन—न. रडणें; शोक. **रुदणें**–अक्रि. रडणें. [सं. रुद्] **रुदंती**–स्त्री. रडारड. 'फौजेंत जिकडे तिकडे रुदंती झाली.' –भाब ५७. **रुदित, रोदित**–न. रडणें; रुदन; शोक; रडारड.

रुदबा—पु. दर्जा; अधिकार. रुतबा पहा.

रुदवणें—सक्रि. (कर.) गुंतविणें. 'सगळीं भांडी रुदवूं नकोस.' –अक्रि. गुंतणें; व्यापणें; कार्यमग्न असणें. 'कपडयांनीं सगळया खुंटया रुदविल्या आहेत.'

रुदवा—पु. दर्जा; पदवी. [अर. रुत्बा]

रुद्ध—वि. १ अडकून पडलेलें अडथळा आलेलें. २ थांबविलें गेलेलें. ३ वेढलेलें; गुंतलेलें. [सं.]

रुद्र—पु. १ शंकराचा एक अवतार; शंकर. २ ब्रह्मदेवाच्या कपाळापासून उत्पन्न झालेला देव; देवताविशेष. हे रुद्र अकरा आहेत. अकरा रुद्र पहा. (यावरून ल.) ३ अकरांचा समुदाय;अकरा ही संख्या. ४ रुद्रताल; शिवस्तोत्र; ह्या तालांत अकरा मात्रा व पांच विभाग असतात. ५ अकरावा रुद्र; मारुती; हनुमान. 'चूडामणिसह देवी प्रभु आणाया निरोप दे रुद्रा।'–मोरामायणें १.१८७. –वि. भयंकर; रडविणारा. [सं. रुद्=रडणें] **०काठी**–वि. तीन धागे काळे व एक पांढरा, नंतर एक काळा व एक पांढरा असें उभार व आडवणहि त्याच प्रकारचें, किनार कोणतीहि असें (लुगडें). **०कोप**–पु. भयंकर प्रसंग; भयंकर संकट. 'क्षुद्र इतर जे शूद्रचे तयांवरि रुद्रकोप या क्षणीं।'–ऐपो ३७०. **०गांठ**–स्त्री. कापड विणतांना त्यांत चौकटीसारखें उठविलेलें चिन्ह. **०गांठी**–वि. रुद्रगांठी असलेलें (लुगडें, वस्त्र इ०) **०ताल**–पु तालाचा एक प्रकार. रुद्र अर्थ ४ पहा. 'मंगलाचरणाचा एक जिवाचा एक ताल आणि भरतवाक्याला रुद्रताल हा टेवलेलाच.'–भा ३८. **०पिशाच**–पु.न. १ काशींत केलेल्या पापाचें क्षालन होईपर्यंत (काशींत मेल्यानंतरहि) पिशाच योनींत राहिलेला जीव. २ (ल.) शीघ्रकोपी, अविचारी, रागीट मनुष्य. **०बलि**–पु. रुद्र देवतांना अर्पण केलेला मांसाचा बली. **०भूमि**–स्त्री. स्मशान; मसणवटी. **०मळी**–स्त्री. (व.) अंधारी; झांपड. 'असा नास चाललेला पाहिला कीं आमच्या डोळयांना रुद्रमळी येते.' **०योनि**–स्त्री. १ काशी येथील विश्वेश्वराच्या देवळावाहेरील खडकांतून गेलेला भुयारासारखा प्रदक्षिणेचा मार्ग. ह्या मार्गात मनुष्य मेल्यास तो रुद्रपिशाच होतो. हा मार्ग उतरता आहे व ब्रह्मयोनीचा मार्ग चढावाचा आहे. यावरून ब्रह्मयोनि आणि रुद्रयोनि हे शब्द ज्या घराचे भाग उंचसखल असतात त्याला लावतात. २ लांब व अरुंद गल्ली; बोळवंडी. ब्रह्मयोनि पहा. **०वात**–स्त्री. चार बोटें लांबीची अकरा सुतांची वात. अशा वातींचा लक्ष लावतात. **०वि(वी)णा**–पु. वीण्याचा एक प्रकार. ह्याचा आकार तंबोऱ्यासारखा असतो. दांडीचें टोक वळवून पाठीकडे नेलेलें असतें. दांडीच्या मागें शेवटाला एक गोल भोपळा बसविलेला असतो. दांडीवर मेणांत चोविस पडदे पक्के बसविलेले असतात. ह्याला चार तारा असुन त्या सा, प, सा, म, ह्या स्वरांत. व आणखी तीन तारा प, सा व तार सा मध्यें लाविताता. वाजविण्याचा सर्व प्रकार बीनाप्रमाणें असतो. **०विंशति**–स्त्री. प्रलयकाळ (माधवग्रंथांत हाच शब्द रुद्रवंश, रुद्रवंशी असा आला आहे.) 'भयानका क्षिति झाली घर–घाली रुद्रविंशति जगिं फांकली।' –ऐपो ३६८. [साठ संवत्सरांतले शेवटचे वीस संवत्सर रुद्र देवतेचे म्हणजे संहार देवतेचे असल्यामुळें ते अनिष्ट मानतात.] **०संख्या**–वि. अकरा. 'कृष्णावालुवंटीं ब्रह्मचारी पूजिले। रुद्रसंख्या नाभिपर्यंत पुरिले।'–सप्र ३.३७. **०सावर्णि**–चवदा मनु पहा. –गीर ७५२. **रुद्राचल**–पु. रुद्र नांवाचा पर्वत. ['रुद्र+अचल] **रुद्राणी**–स्त्री. पार्वती. 'शिव भवानी रुद्राणी। कां पां न पावतीच कोणी।'–एरुस्व ५.७४. **रुद्रावतार**–पु. १ शिवाचा अवतार; शिवाचें उग्रस्वरूप. २ (ल.) तापट किंवा रागीट मनुष्य; तामसी व्यक्ति. [रुद्र+अवतार] **०धा ण करणें**–संतापणें; अतिशय संतप्त होणें; अति क्रोध येणें. **द्राक्ष**–पु. १ एक वृक्षविशेष आणि त्याचें फळ. याचे मोठे मोठे वृक्ष होतात. पानें गंगेरीसारखीं असतात. हीं झाडें कोंकणांत थोडीं व म्हैसुरकडे फार आहेत. या झाडाच्या फळांतील बिया तेच रुद्राक्षमणी. याची माळ करून शिवभक्त गळयांत धारण करितात. रुद्राक्षाला एक ते सहा मुखें असतात. याच्या आणखी जाती गौरीशंख व रुद्राक्षल अशा आहेत. २ शंकराचा डोळा; शिवनेत्र. 'कल्याणाचे बाण निर्वाण मारा। रुद्राक्षींच्या पावकातुल्य धारा।' –मुरामायणें बालकांड ११०. [सं. रुद्र=शंकर+अक्षन्–डोळा]

रुंध, रुंधट—वि. रुंद, रुंदट पहा.

रुधणें, रुंधणें—सक्रि. १ अडवणें; रोधणें; अडथळा आणणें; प्रतिबंध करणें. 'तैं गजबजों लागे कैसा। व्याधें रुंधला मृगु जैसा।'–ज्ञा १३.१८६. २ व्यापणें; बंद करणें; वेढणें; भरून काढणें. 'आणि आथी नाथी तितुकें। रुधलें असे येणेंचि एकें। कल्पांतींचेनि उदकें। व्योम जैसें।'–ज्ञा १५.५३. [सं. रुध्] **रुधणें, रुंधणें, रुंधवणें**–अक्रि. १ अडथळा येणें; अडकून पडणें; थांबणें. २ (रस्ता, वाट, जागा इ०) माणसें, गाडया इ०च्या दाटीमुळें अडणें किंवा त्यांतून जाणें कठिण किंवा अशक्य होणें; भरून जाणें; पूर्ण भरल्यानें बंद होणें. 'स्वरूपें कृष्णाच्या अविरत जिचें मानस रुधे।'–सारुह ७.८१. ३ धंदा–उद्योगांत गुंतलेला असणें; एखाद्या गोष्टीनें व्यापला जाणें; एखाद्या कामांत अडकला जाणें; गुंतणें. [सं. रुध्] **रुधविणें**-सक्रि. (मनुष्य, प्राणी, वस्तु) गुंतविणें; कामाला लावणें; उपयोगाला आणणें; उद्योगांत अडकविणें. [रुधणें]

रुधणें—रुजणें पहा.

रुधा—वि. रोध पावलेला. –मनको.

रुंधावणें, रुंधावा, रुंधी—रुंदावणें, रुंदावा, रुंदी पहा.

रुधिर—न. १ रक्त. २ -पु. मंगळ. हा ग्रह. –वि. तांबडा. [सं.] **०तंतु**-पु. (शारीरशास्त्र) रक्तांतील तंतु, दोर; रक्तामधील एक पांढरें तंतुमय द्रव्य. ह्या द्रव्यामुळें रक्त गोठतें. **०द्रव**-पु. रक्ताचे कण ज्यांत असतात असें द्रव द्रव्य; रक्ताधार जल; रक्तकणधारी रस. **०पेशी**-स्त्री. रक्तगोलक; रक्तांत असणारा तांबडा किंवा पांढरा गोलक. **०लसिका**-स्त्री. रक्त थिजल्यावर त्यांतून वेगळें होणारें पाणी; रक्तजल; लस. **०वाहिनी**-स्त्री. रक्त जीतून वाहतें अशी शरीरांतील नळी; नाडी; धमनी; शीर. **०वाहिनीसमूह**-पु. रक्तवाहिन्यांचा समूह. **रुधिराभिसरण**-न. रक्ताचा शरीरांत सर्वत्र होणार संचार; हृदयांतून सर्व शरीरभर व सर्व शरीराच्या भागांतून परत हृदयांत रक्ताचें जाणेंयेणें. [रुधिर+अभिसरण] **रुधिराभि-सरणव्यूह**-पु. रक्ताभिसरणसंस्था. **रुधिराशन**-पु. राक्षस. [रुधिर+अशन=खाणें] **रुधिरूं**-न (महानु.) रक्त. हातींचें रुधिरूं पीतांतीं तान्हेले। तडस भणौनी। –शिशु १०५६. **रुधिरोद्गारी**-पु. साठ संवत्सरांतील सत्तावन्नावा संवत्सर.

रुंन—वि. (गो.) रुंद.

रुपटका रुपटकी, रुपडी—पुस्त्री. रुपयाबद्दल तुच्छतादर्शक शब्द.

रुपडल्ली—स्त्री. घोडयाच्या खोगिराच्या खालचें वस्त्र; घामोळें. 'रुपडल्ली गोंडे १६ सह.'–ऐरापुप्र ९.५१३.

रुपडें—न. १ रूप; सुंदर रूप; गोजिरवाणी आकृति. (प्र.) रूपडें पहा. २ रूपवान मूल. 'वामन रक्षक रुपडें। जिकडे तिकडे पडे दृष्टि।'–ज्ञानप्रदीप १९.९१. ३ (गो.) कवच. [सं. रूप]

रुपणें—अक्रि. १ रुतणें; दलदलींत किंवा भसभुशीत जागेंत खचणें; खोल जाणें; शिरणें; अडकणें. २ बोंचणें; खुपणें; रुतणें. 'जैशी केशनखें आगें वाढती। आपुलीं आपणाते रुपतीं।'–रावि ६.२१८. ३ खोंचणें; रोवणें; पुरणें. 'आचारभंगाचीं हाडें। रुपती इंद्रियापुढें। मरे जरी तेणेंकडे। किया जाय।'–ज्ञा १४. २४९. **रुपण**-स्त्रीन. रुतण; मऊ जमीन; भुसभुशीत जागा; (जमीन, मांसल भाग, किंवा सामान्य पदार्थ यांचा) रुपलें जाण्यासारखा भाग. **रुपणी**–स्त्री. (कों.) रुपण्याची, पुरण्याची काठी; पुरुष दीड पुरुष उंचीची काठी. 'बिवळया मांडवास खाजणी रुपण्या चांगल्या परवडतात.'

रुपद्—स्त्री. (रसा.) एक धातु. ही अनाम्लिक असून रजतासारखी पांढरी असते. ती हवेंत उघडी राहिल्यास तिचें प्राणिद् बनतें. तिचीं बरींच प्राणिदें व गंधकिदें माहींत आहेत. –ज्ञाको १९ (र) ११६.

रुपया, रुपाया, रुआ—पु. १ सोळा आणे किंमतीचें चांदीचें नाणें. निरनिराळया राज्यांत व निरनिराळया टांकसाळींतील रुपयांना निरनिराळीं नावें होतीं. त्यांचें प्रमाण पुढील प्रमाणें– कंपनीच्या १०० रुपयांबरोबर १०४ चांदवडी, १०४ चिंचवडी, १०६ भडोच, १०९ बडोदी, बाबाशाई, ११२ खंबायती, १०७ अमदाबादी, ३७९ देसलशाई, १०९ कितुर शापुरी, १२३ औरंगाबादी, १२३ इराणी. ज्या परगण्याचें अगर देशाचें नांव रुपयाला असे त्या परगण्यांत अगर देशांत तो चाले. याशिवाय आणखी पुढील प्रकारचे रुपये होते. –शिक्का, तळेगांवी, पन्हाळी, उखळी, कंची, बेलापुरी, अंकुशी, कोरे, ऐन शिक्का, मलकापुरी, अटीकी, वागलकोटी, नीळकंठशाही, तुटकरी, अरकोटी, इटावा, जरीफडा, काशीशिक्का, फुलचरी, दौलताबाद शिक्का, हुकेरी, गंजीकोट, छत्रपरी. २ धन; संपत्ति; पैसा; नाणें. रुपया व त्याचे भाग यांना पुढीलप्रमाणें सांकेतिक नांवे आहेत.–राम=रुपया; सीता=अधेली; लक्ष्मण=पावली; भरत=चवली; रामदास=आणेली. [सं. रूप्यक. रुआ.] **०मोडणें, रुपयाची मान मोडणें**-रुपयाची मोड करणें; रुपयाचें नाणें किंवा खुर्दा करणें.

रुपस—वि. रूपवान्; देखणा. 'वेदभक्तिनें रुपस। सगुण सर्वांगीं डोळस।'–ज्ञाप्र ४४६. [रूप]

रुपा—वि. पांढऱ्या अंगावर काळे किंवा तांबडे ठिपके असलेला (बैल.)

रुपाया—पु. १ रुपया पहा. २ नानक शहाचा अनुयायी. –सिंधी इंग्रजी कोश.

रुपाळुं—वि. रूपवान्; फक्कड; सुंदर; सुरेख. [गु.]

रुपुस्त—स्त्री. गंजिफाच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. तोंडाकडून किंवा पाठीकडून [फा. रू=तोंड+पुस्त=पाठ]

रुपें—न. रजत; अशुद्ध चांदी; ही मौल्यवान् धातु प्राचीन काळापासून नाणीं, दागिने इ० करितां उपयोगांत आणल्या जाणाऱ्या धातूंपैकीं आहे. ही धातु फार तन्य व घनवर्धनीय आहे. –ज्ञाको (र) ११७. २ चंगकांचन खेळांतील एक रंग. ३ जोंधळ्याचा हिरवा पाला. [सं. रूप्य; प्रा. रुप्प] **रुपेरी**–स्त्री. (जर) नुसती चांदीची जरतार –वि. १ रुप्याचें केलेलें. २ रुप्याचा मुलामा दिलेलें. ३ रुप्यासारखें दिसणारें. **–रुपेरीकांटा**–पु. बाभळीचा कांटा. (हा पांढरा असतो यावरून). **रुपेरी डोळे**–पुअव. पांढरे डोळे; कवडीसारखे डोळे. **रुपेरी डोळे करणें**–मरणें. **रुप्याचे डोळे होणें**–अंतकाळ आल्यामुळें डोळे पांढरे होणें; मरणोन्मुख होणें. **रुपेरी निखल(निलख)**–न. १ छीट; चित्रवस्त्र; खडी किंवा चित्रें अगर वेलबुट्टी काढलेलें कापड. २ रौप्यपट. [फा.] **रुपेरी पाऊस**–पु. शोभेच्या दारुकामांतील रुप्यासारख्या फुलांचा (नळा इ० लावला असतां) पडणारा पाऊस. **रुपेरी पेरण**–स्त्री. पांढऱ्या पाठीची पेरण. (पेरण= फनें; नेच्याच्याजातीचें झाड). **रुपेरी बिडी–बेडी**–स्त्री. (ल.) सेवावृत्ति; द्रव्याच्या लालचीनें करून घेतलेलें बंधन ' ही रुपेरी बेडी आपोआप तुटली यांत मला आनंदच आहे.' –संन्याशाचा संसार. **रुपेशाई लोखंड**–न. शिक्केशाई लोखंडापेक्षां कमी प्रतीचें लोखंड. **रुप्याचा सफेत मुलामा**–पु. (ल.) पांढरा रंग; रुप्यासारखा रंग. ' केसांवर जरादेवीनें रुप्याचा सफेत मुलामा चढविल्यामुळें शरीर शिथिल दिसे. ' –विवि ८.१.५.

रुबकार—क्रिवि. १ सन्मुख; जवळ ठेपलेली; निश्चित; समक्ष; पुढें. ' लढाई रुबकार आहे. '–पेद ५.५९. २ तन्मयतेनें; सलक्ष्य. [फा. रु+ब+कार्]

रुबगुंड—पु. (तंजावरी) पाटयावरवंठयाऐवजीं तामीळ प्रांतांत वापरण्यांत येणारा घाण्याच्या तत्त्वावर बनविलेला दगड-उखळांतील उभा वरवंटा [तामीळ. का.] **रुबगुंणें**–सक्रि. (तंजावरी) रुबगुंडांत पदार्थ वांटणें.

रुंबड, रुमड—पु. १ (हेट.) औदुंबर; उंबर. २ (कों.) असोला नारळ. व्यापारी लोकांत रूढ.

रुबया—पु एक महिन्यापर्यंत निघणारा घोड्याचा दांत. –अश्वप १.११८.

रुबरु, रुबुरू, रुबेरूब, रोबरो—क्रिवि. १ समक्ष; समोर; समोरासमोर; प्रत्यक्ष. ' हे गोष्ट रुबरूच जाली तर बहुतच उत्तम आहे. '–पेद २१.११४. २ अपेक्षित; नजीक. ' नित्यानीं लढाई रुबरू आहे. ' –दिमरा १.२०१. [फा. रू–ब–रू]

रुंबल, रुंबाल—पु. (कों. कुण.) रुमाल.

रुबाइयात—स्त्री. चतुष्पदी, चार चरणांची कविता. [फा.] **रुबाई**–स्त्री. १ विवाहगीत. २ चार ओळींची कविता. [बं.]

रुबाब—पु. १ दरारा; ऐट; मिजास; ताठा. २ दमामा; एक तऱ्हेचा ताशा. [अर. रू+आब]

रुबीत—क्रिवि. रुबरू पहा.

रुबूअ—वि. पाव. –आदिलशाही फर्मानें. [अर.]

रुभ्या—स्त्री. भव. (व.) डाळ्या.

रुमझुम—स्त्री. घुंगुरांचा आवाज. [ध्व.] **रुमझुम–झुमां**–क्रिवि. मंजुल आवाजानें; घुंगुरांच्या आवाजानें.

रुमड—पु. (कु.) उंबर. रुंबड पहा.

रुमडा—पु. १ जून शहाळें; कोंवळा परंतु शहाळ्याहून जून असा नारळ. २ –वि. (कु.) असोला (नारळ).

रुमडी—स्त्री. (कु.) नांगराचा दांडा; रुमणी.

रुमणी–णें, रुमडणी–णें, लुमणें—स्त्रीन. नांगर, वखर, डवर, तिफण, कोळपें इ०चा दांडा–मूठ. **रुमणबाक, रुमणी–रुमडणबांक**–पु. शेताचा किंवा बखळीचा रुमणीच्या वळणासारखा बांक किंवा वळण. ' शेतास जागोजाग रुमणबाक आहे म्हणून मोजणी कठीण. ' [रुमणी+बाक] **रुमणमोड्या**–वि. १ रुमणी धरणारा; नांगर हांकणारा; नांगऱ्या. २ गांवढळ; खेडेगांवीं राहणारा; खेडुत. **रुमणबाक**–पु. रुमणबांक पहा.

रुमा—विना. न. १ सांबर देशांतील सरोवर. हा शब्द ऋग्वेदांत आढळतो. रुमा सरोवराजवळील जो प्रदेश तो रुमदेश. –भाअ ८३३. २ –स्त्री. विना. सुग्रीवस्त्री. –हंको.

रुमा(मां)मस्तकी, रुमेमस्तकी–स्त्री. एक औषधी पदार्थ.

रुमाल—पु. १ चौकोनी वस्त्र; फडका; तोंड पुसणें, हात पुसणें इ० करितां उपयोगांत आणावयाचें वस्त्र. २ डोक्याला गुंडाळण्याचें चौकोनी वस्त्र. ३ वेष्टनवस्त्र; कागद, वह्या इ० गुंडाळून बांधून ठेवण्याचें कापड. ४ जमाखर्चाचे कागद इ० फडक्यांत बांधून केलेलें गांठोडें; दप्तर. ५ राजेरजवाडे इ०च्या वर वारण्याचें शेल्यासारखें वस्त्र. ' रुमाल दीपिका विजने वारिती करीं। ' सप्र २१.३१. ६ तहाचें निशाण. लढाईत सेनापतीनें किंवा राजानें रुमाल फिरविला तर तो दुसऱ्या पक्षाच्या राजास किंवा सेनापतीस शरण गेला असें पूर्वी समजत. ७ देशपांड्याला किंवा कुळकर्ण्याला दिलेली इनाम जमीन (हीस असें नांव पडण्याचें कारण या लोकांना रुमाल किंवा दप्तर बाळगावें लागतें) ८ (खा.) उपरणें. (कों.) हुर्माल. [फा. रूमाल, रु=चेहरा+माल] **रुमाली**–स्त्री. १ (व्यायाम) मुद्गल फिरविण्याचा एक प्रकार. २ –पु. चट्टी; (माळवी) लंगोट. ' पहिलवानानें जांगियाचे आंत रुमाली घातलेला असुन...'–पहिलवान व कुस्ती ११. ३ (बेरडी) शरीर आंत जाईल असें भिंतीला किंवा धाब्याला पाडलेलें भोंक. –गुजा १०. ४ कबूतराची एक प्रकार–जात. –वि. चौकोनी. **रुमाली गज**–पु. कापड मोजण्याचा १४ तसूंचा गज. जमीन

मोजण्याचा १६ तसूंचा गज असतो त्यास रेशमी गज म्हणतात. **रुमाली घडी**–स्त्री. चोळखण इ० ची एक प्रकारची त्रिकोनी घडी; शिंपी घडी. **रुमाली पाटी**–स्त्री. दोन, तीन पायल्या धान्य राहील अशी बांबूची पाटी, टोपली. **रुमाली रस्ता**–पु. एकमेकांस काटकोनांत छेदणारे रस्ते. 'रुमाली रस्ते बांधून चार।' –अफला ४९. **रुमाल्या**–वि. नेहमीं डोक्यास रुमाल बांधणारा व कधीहि पागोटें न घालणारा.

रुमोरुम—वि. (व.) पूर्ण. 'रुमोरुम खूष झाला तेवढ्यानें.'

रुय, रुंयटी, रुयफुल, रुयमांदार, रुयी—रुई, रुइटी, इ० पहा.

रुयदाद, रुएदाद—क्रिवि. प्रविष्ट; प्राप्त. 'आं अमांरत्–पन्हाकडील खैरीयत कलमी करून शादमानी रुयदाद होय तें केलें पाहिजे.' –पया ६८३. [अर.]

रुरयात—स्त्री. भाडभीड; पक्षपात; मेदभाव; मुरवत. रुईरयात पहा. 'चौकशी करून कोणाची रुरयात न धरितां...' –वाडसमा २.२२८. [फा.]

रुलोरुला—पु. एक प्रकारचा लगाम. –अश्व १.१८५.

रुवां—न. अव. (कों.) खरजेचे फोड. रूं पहा.

रुशवत, रुश्वत, रुष्वत, रिश्वत—स्त्री. लांच. [फा. रिश्वत] **लांचरुश्वत**–न. लांचलुचपत.

रुषा–शा—पु. (महानु.) क्रोध; संताप. 'तरुमरण रुषा दाखवीले मुरारी।' –गस्तो ९.३९. [सं. रुष्, रुषा]

रुषी—पु. (अप.) ऋषि. [सं. ऋषि] **०संख्या**–वि. (सांकेतिक) सात ही संख्या.

रुष्ट—वि. १ रागावलेला. २ रुसलेला; नाराज; नाखुष. [सं. रुष्=रागावणें] **रुष्टी**–स्त्री. राग; क्रोध; राग आला असतां असणारी स्थिति; रुसवा. 'तुझी तुष्टी आणि रुष्टी। दोन्ही तृणप्राय माझिये दृष्टी।' –मुसभा ११.४५.

रुसकत, रुस्कत—स्त्री. परवानगी; रजा; नोकरी सोडणें. रुखसत पहा.

रुसणें—अक्रि. १ मित्र इ० आपल्या आप्तानें केलेली गोष्ट आपल्या मनास न आल्यानें त्यानें आजेव करून समजी करावी अशा तऱ्हेचा भावनापूर्वक कोप येणें; (स्वतः) रागावणें; (स्वतःस) घुस्सा येणें; नाखूष होणें; राग धरणें; अबोला धरणें. २ (ल.) दूर करणें; नाश करणें; नाहींसें करणें. 'आतां तेचि हातवटी। तुज सांगों गोमटी। जया कर्मातें किरीटी। कर्मचि रुसे।' –ज्ञा १८.१६५. ३झांकणें; दडवणें. 'आभाळें भानु ग्रासे। तै आभाळ व्हेजें प्रकाशे। सुषुप्ति सुषुप्तया रुसें। तै तेंचि कोणा।' –अमृ ७. १६. ४ त्याग करणें; टाकणें. 'या सोपिया योगस्थिती। उकलु देखिला गा बहुतीं। संकल्पाचिया सपत्ती। रुसोनियां।' –ज्ञा ६.३८७. ५ (महानु.) मारणें. 'आड ठाकों महाकाळु। ते हीं रुसैन।' –शिशु ९२२. [सं. रुष्; फ्रें जि. रुश] **०फुगणें**–अक्रि. रागावणें आणि चरफडणें; घुम्यासारखें बसणें. **रुसका**–वि. (कों.) बारीक सारीक गोष्टीवरून रागावणारा किंवा रुसणारा; वारंवार रुसणारा. [रुसणें] **रुसवा**–पु. राग; घुस्सा; रुसण्याची क्रिया; रुसलेपणा. **रुसवाफुगवा**–पु. राग आणि चरफड; हट्ट; रुसणी; तक्रार. 'मुलीकडल्यांनीं मुलाकडल्या झाडून साऱ्या मानकरणींचा रुसवाफुगवा जिथल्यातिथं कसा अगदीं मनाजोगा मिटवून टाकला.' **रुसविणें**–सक्रि. (एखाद्याला न आवडणारी गोष्ट करून त्याला) राग किंवा घुस्सा आणणें; नाखूष करणें; बिघडविणें; खोड्या काढणें. [रुसणें चें प्रयोजक]

रुसीत—क्रिवि. रुजू होऊन. 'जमीनदार व संस्थानिक वगैरे घाटगे आदीकरून रुसीत होऊन मर्यादेनें वर्तत नाहीं.'–वाडशाछ १८७.

रुसु(सू)म—पु. १ देशमुख व देशपांड्याचा जमिनीच्या उत्पन्नांतील भाग. २ हक्क पैका; कर; फी; हक्क म्हणून द्यावयाचें देय; हक्क; शेंकडावळ; दरसाल मिळणारी नक्त नेमणूक. 'रसदेचा ठराव करून घेऊन त्या–ऐवजीं जमीदाराचा ऐवज हक्क रुसुमाबद्दल ...?' –वाडसमा ४.१२. [अर. रस्म्(=चाल, रीत)चें अव] **०इलाखा**–पु. कुळकर्ण्याचा हक्क. 'रुसुम इलाखा नाहींच कीं बा।' –दावि ३८.

रुस्कत—स्त्री. रुखसत पहा.

रुस्त—वि. (गो.) धाडशी.

रुस्तम, रुस्तु(स्तू)म—पु. मोठा पराक्रमी व धाडसी पुरुष. इराणचा भीमसेन; इराणांतील बारा वीरांपैकीं एक (शहानामा काव्यांतील एक वीरपुरुष. याची इस्फांदियारबरोबर दोन दिवस कुस्ती झाली व त्यानें गदेनें त्यास मारिलें.) [फा.] **०राव**–पु. रुस्तमसारख्या पराक्रमी योध्याला द्यावयाची पदवी. मावळांतील कडू आडनांवाच्या देशमुखास ही पदवी होती. –शिदि ४३२. **रुस्त(स्तु)मी**–स्त्री. शौर्य; शक्ति; पराक्रम; धारिष्ट. 'शाबास तुमच्या हिमतीची व दिलेरी रुस्तुमीची।' –पया १४०.

रुह—वि. वाढणारा; उत्पन्न होणारा; उगवणारा. ह्याचा उपयोग उपपदतत्पुरुषसमासांत उत्तरपदीं होतो. उदा० शिरोरुह=केस; सरोरुह=कमळ; कररुह=नख; महीरुह, भूरुह=झाड. 'तटानिकट भूरुह श्रमहर स्वयें वाकले।' –नरहरी गंगारत्नमाला १४४ (नवनीत पृ. ४३२). [सं. रुह्–वाढणें]

रुह, रोही—स्त्री. नीलगाय.

रुहई—स्त्री. एक मोठें झाड.

रुळणें—अक्रि. १ लोळणें; लोंबणें; सैल किंवा मोकळेपणें हालणें. 'ऋद्धिसिद्धी पायधुळीमाजीं रुळती सर्वदा।' –मुआदि

३९.१५. २ (अलंकार, केस इ०) शोभा देत हालणें; झुलणें. 'कस्तुरी मळवट चंदनाची उटी। रुळे माळ कंठीं वैजयंती।' –तुगा २. 'भालीं कुरळींत केश रुळती।' ३ शोभिवंत दिसणें; शोभणें; सुंदर दिसणें. ४ (वस्त्र, दागिना इ०) वापरण्यानें चोळवटणें; मळणें; चुरगळणें. 'कांहो रुळला दिसे चिरा मस्तकीचा श्रीरंगा।' –होला १४. ५ मळणें; झाकणें; लोपणें. 'म्हणोनि ज्ञानें उजळें। कां अज्ञानें रुळे।'–अमृ ४.१७. ६ परिचय होणें; सराव होणें; वहिवाटणें; एकाद्या कामांत किंवा नोकरीवर किंवा कांहीं मंडळींत अभ्यस्त किंवा परिचित होणें; भीड मोडणें; परिपाठ पडणें. ७ एखाद्या विषयांत सफाई प्राप्त होऊन प्रगति होणें, होऊं लागणें. ८ –सक्रि. गुंडाळणें; घडी घालणें; चुरगाळणें. [सं. रुट्]

रुळलेला–वि. वहिवाटलेला; परिचित; वापरानें सोयीचा किंवा सुखकारक झालेला; ज्याच्या आंगवळणी एखादी गोष्ट पडली आहे असा; एखाद्या शास्त्रांत, कामांत अगर कलेंत वहिवाटलेला. **रुळला मळला**–वि. (कपडा, दागिना इ०) वापरानें मळलेला; वापरून घाण झालेला. [रुळलेला आणि मळलेला]

रुळें—न. स्त्रियांचा पायाच्या घोटयावर घालण्याचा एक अलंकार.

रुक्ष—वि. १ शुष्क; कोरडें; ओलावा नसलेलें; स्निग्धतारहित. २ कोरडा; कठीण; बेचव; रसहीन; पाणी किंवा रस नसलेला (खाद्यपदार्थ). ३ पाणी किंवा झाडें नाहींत असा; वृक्षहीन; वालुकामय; ओसाड; रखरखीत (प्रदेश). ४ कठोर; कर्कश; बेसुर; ज्याच्या योगानें अंतःकरण रंजत नाहीं असें; रस, कारुण्य अगर माधुरी नाहीं असें (भाषण, लिखाण, गायन). 'इत्यादि रुक्ष वाणी कृष्णेला जो सभेंत आयकवी।' –मोकर्ण ६.६२. [सं. रूक्ष्=कठोर बोलणें]

रुक्ष—पु. रीस; अस्वल. 'वाल्मीक मुनि आणि रुक्षवानरगण। बिभीषणादि सकळ भक्षूंसी।' –स्वानुदिन ७.४.७७. [सं. ऋक्ष]

रुक्षांग—न. (कों.) दुसऱ्या झाडावर वाढणारें एक झाड. याला फक्त पात्या येतात व तें झाडाच्या ढोलींत किंवा खोबणींत वाढतें. याच्या पात्यांचा रस हगवणीवर घेतात. [सं. वृक्षांग]

रू—पु. १ पिंजलेला व सरकी काढलेला कापूस. २ (खा.) कापूस. [सं. रूत; दे. प्रा. रूअ; हिं. रुई] **०दार**–वि. ज्यांत कापूस भरलेला आहे असें; मऊ. [हिं.] **०भरी रजई**–स्त्री. कापूस भरलेली रजई. –पेशवेकालीन महाराष्ट्र ३३०.

रू—न. १ गंजिफांची पुढची बाजू. २ फौजेची अघाडी; रोंख. ३ भीड; धाक; अब्रू. [फा रूअ] **रुवाकडून मागणें**–गंजिफाच्या डावांत उतारीनंतर जें पान मागणें तें पोटाकडून म्हणजे चवडीच्या खालच्या बाजूनें मागणें.

रूं—न. (कों.) खवडा; डोक्यांतील फोड. –अव. रुवां–वें.

रूं—पु. एक प्रत्यय. हा लघुता दर्शक प्रत्यय पाणिनीय स्टरच् प्रत्ययापासून निघाला आहे. उदा० वाघरूं=व्याघ्रतर; म्हसरूं=महस+तर; वांसरू=वत्सतर–वच्छअर–वासरूं. इ०. –भाअ १८३४.

रूईनें—क्रिवि. शिरस्त्याप्रमाणें. [अर. रूय]

रूख—न. (चंद्रपुरी) पाण्यांतील नाव; पाण्यावरून जाण्याकरितां केलेलें लांकडी साधन; डोंगा. [सं. वृक्ष]

रूख—पु. १ झाड; वृक्ष. 'रूखु मोडिले हें वाणितां।' –दाव ४६०. २ रहाटगाडग्याच्या कणेकडाचीं टोकें ज्या दोन आडव्या लांकडांवर टेकलेलीं असतात तीं प्रत्येक. ३ शाखारहित झाड; झाडाचा सोट. ४ झाडाचा बुंधा. [सं. वृक्ष]

रूख—पु. १ तोंड. 'ते इंग्रजी वकिलास रूख देणारच नाहींत.' –दिमरा १.५४. २ लक्ष्य; रोंख; दिशा; इरादा; रीत. 'रूख कोणीकडे जावयाचा हें समजलें नाहीं.' –रा १०.२६५. [फा. रुख] **०न देणें**–समोर बोलणें न करणें. 'आनि स्वामीकडील घोंडाजी अगर आम्हासी रूख देत नाहीं.' –पेद. १०.७२. **०मिळविणें**–(व.) मिळतें घेणें; सलोखा करणें.

रूखनळणी—स्त्री. कमळाचा वेल. 'जळामध्यें राहे रविप्रिय सदा रूखनळणी।' –दावि २२४. [सं. वृक्ष+नलिनी]

रूच—स्त्री. १ स्वाद; चव; लज्जत; रसाळपणा. २ चव; स्वाद घेण्याची शक्ति; रुचि ओळखण्याची शक्ति; जिभेची गोडी. ३ आवड; गोडी; चव; रुचि; नाद. [सं. रुचि]

रूचक; रूचकास्थि—न. १ ज्या हाडाचे दांत बनतात तें हाड. अस्थि पहा. २ एक उपरत्न. हें पिंवळें, हिरवें, पिंगट अगर शुभ्र वर्णाचें असतें. हें काश्मीरमध्यें सांपडतें.

रूंझी—स्त्री. १ (महानु.) रुंजी; गुंजारव. 'धुमाडि करिताति मधुकरा। रूंझी घालिताति।' –शिशु २८६. २ हर्ष; रंजन. 'ऐसें नानाविध खेळु खेळतु। देऊं राआंसीं रूंझी उपजवीतु।' –दाव ८८. [रुंजी]

रूटका—पु. बिघ्यापेक्षां लहान असलेलें जमीन मोजणीचें परिमाण. [फा.]

रूढ—वि. १ उगवलेला; उत्पन्न झालेला. २ वृद्धिंगत; वाढलेला. ३ प्रचारांत किंवा चालू असलेला; जाहीर; समाजांत चालू असलेला; सर्वप्रसिद्ध, सुप्रसिद्ध. ४ सर्वसामान्य; माहीत असलेला; प्रसिद्ध (मत, संप्रदाय, कल्पना, व्यवहार, चाल इ०). ५ कुप्रसिद्ध; वाढलेलें; प्रसृत झालेलें. [सं. रुह्=वाढणें] **०पण**–न. प्रतिष्ठा; प्रचारांत येणें. 'माधुर्यीं मधुरता। शृंगारीं सुरेखता। रूढपण उचितां। दिसे भलें।' –ज्ञा १.३६. [सं. रुह्] **०शब्द**–पु. जो स्वतःसिद्ध असून संकेतानें किंवा रूढीनें अर्थाचा बोध करून देतो असा शब्द. –नि ४९. **रूढणें**–अक्रि. १ प्रसिद्ध

होणें; रूढ होणें; प्रचारांत येणें; पसरणें. 'तुझ्या कृपाबळेंचि सर्व रूढले यया मही।' –निमा १.३२. २ उत्पन्न होणें; वाढणें; तयार होणें. 'तै अज्ञान एक रूढे। तेणें कोहंविकल्पाचें मांडें।' –ज्ञा १५.३४२. ३ बोलणें. –शर. **रूढव(वि)णें, रूढावणें**–सक्रि. १ वाढविणें. 'जगीं कीर्ति रूढवीं।' –ज्ञा ३.१९०. २ जाहीर करणें; प्रसिद्ध करणें; प्रगट करणें. 'लोकांत रूढविलें पूर्ण। कीं गोवत्स मारिलें शार्दूलें।' ३ प्रघात पाडणें; प्रचारांत आणणें. **रूढि, रूढ**–स्त्री. १ वाढ. २ उत्पत्ति. ३ प्रसार; फैलाव; प्रसिद्धी. ४ चाल; वहिवाट; शिरस्ता; संप्रदाय; प्रघात. ५ कीर्ति; प्रसिद्धी; योग्यता. 'तुका म्हणे कवी। जगामधीं रूढी दावी।' –तुगा ६२१. ६ केवळ लोकसंकेतावरून ठरलेला अर्थ.

रूप—न. १ बाह्य स्वरूप; देखावा. २ आकार; आकृति; दृश्य पदार्थ. ३ चेहेरा; तोंडवळा; मुद्रा; मुखवटा. ४ (न्याय शास्त्र) डोळ्यानीं दिसणारे पदार्थाचे रंग आणि आकार हे धर्म; नेत्र ह्या इंद्रियाचा विषय. ५ नमुना; विशेष मासला; ठराविक ठेवण; विशिष्ट घडण; अवस्था; स्थिति. ६ सौंदर्य; शोभा; तेज; पाणी; भूषण; शोभादायक गुण; बांधेसूदपणा. 'हें काम असें कीं मनुष्यानें जीव देऊन केलें तरी रूप यायचें नाहीं.' ७ मूळ धर्म; स्वभाव; गुणधर्म; मूळ अवस्था. ८ (व्याकरण) नामाचें अगर धातूचें प्रत्यय इ० लावून सिद्ध झालेलें स्वरूप, स्थिति. ९ (व्याकरण) कोणताहि धातु विधि अगर निषेध या अर्थी चालविला असतां त्याचें होणारें रूपांतर. रूपें दोन आहेत–करणरूप व अकरणरूप. १० तादात्म्य; प्रतिबिंब; सोंग; सारखेपणा; वेष. उदा० पितृरूप; पिशाचरूप; वायुरूप; अलंकाररूप. इ० ११ (गणित) एक ह्या संख्येची संज्ञा; बीजगणितांत व्यक्त संख्या. १२ एक परिमाण दुसऱ्या परिमाणांत नेलें असतां होणारा बदल. उदा० अडीच रुपयांचें आण्यांचें रूप चाळीस आणे. १३ (वैद्यक) निदानाचा दुसरा प्रकार. १४ एखाद्या कामाचा श्रेयस्कर किंवा प्रशंसनीय परिणाम; चीज; फलद्रूपता. 'कृतघ्नाची नोकरी करण्याचें रूप होत नाहीं.' –पु. चंगकांचनी गंजिफांतील सातवा रंग. [सं.] (वाप्र.) **०करणें**–सांगणें; निरूपण करणें; वर्णन करणें. 'जरी प्रज्ञेचेनि आथिलेपणें। श्रीगुरुसामर्थ्यां रूप करूं म्हणे।' –ज्ञा १०.१४. **०पालटणें**–१ आकार बदलणें; निराळी आकृति घेणें; वेश बदलणें. 'असो वानररूप पालटोनि। अणुप्रमाण वेष धरोनि।' –रावि १९.१०१. २ तोंडवळा, रंग, वर्ण, वेष, सोंग इ० बदलणें; चेहरा बदलणें. **०होणें**–एखाद्या कामाचा सुपरिणाम होणें; चीज होणें; श्रेय मिळणें; फलदायी होणें. 'जीव देऊन काम करूं ह्या पण त्या कामाचें रूप व्हावयाचें नाहीं.' **रूपास येणें**–आकार येणें, उपत्न्न होणें; नांवारूपास येणें; चांगल्या स्थितीप्रत येणें; चांगले गुण येऊं लागणें. 'कां इक्षुदंड गाळितां साचार। तयासि सायास लागती फार। सेवटीं रूपास येतां साखर। चवी खाणार जाणती।' सामाशब्द– **०कार**–न. मूर्ति; प्रतिमा; प्रतीक. –खिपु. **०बेरूप**–न. चांगलें किंवा वाईट रूप. [सं. रूप+विरूप] **०रंग**–पु. बाह्य देखावा: सामान्य स्वरूप; आकृति आणि रंग. रंगरूप पहा. 'रूपरंग चातुर्यकला पाहुनि झालों खुशी।' **०रत्नपरीक्षा**–स्त्री. नाणीं आणि रत्नें यांची परीक्षा; चौसष्ट कलांपैकीं ही एक कला आहे. **०रेखा–षा**–स्त्री. १ बाह्य देखावा; बाह्य मर्यादा. २ घाट; आंगलट; घटना; बांधा. ३ आराखडा; कच्चा नकाशा. **०लावण्य**–न. आकाराचें किंवा बांध्याचें सौंदर्य; आकार, चेहरा व ठेवण यांचा मोहकपणा; देखणेपणा. बांधेसुदपणा. **०लिपी**–स्त्री. सारणी; सूत्र. –साठे, रासायनिक परिभाषा (इं.) फॉर्म्युला. **०वती**–स्त्री. सुंदर स्त्री; देखणी स्त्री. [सं.] **०वान्**–वि. १ सुंदर; देखणा; चांगल्या बांध्याचा. २ रूप असलेला; आकृति असलेला; आकारयुक्त. [सं.] **०विकार**–पु. एका रूपांतून दुसऱ्या रूपांत जाणें; रूपांतर; अवस्थांतर. उदा० बेडूक मूळचा जलविहारी. परंतु स्थलविहारी होऊन हवेचें श्वासोच्छ्वसन करूं लागला. या रूपांतरास रूपविकार म्हणतात.–प्राणिमो ७६. **रूपांतर**–न. १ अन्य रूप; दुसरें स्वरूप; नवें स्वरूप. २ फरक; बदल. [रूप+अंतर] **रूपाभिमान**–पु. सौंदर्याचा अभिमान; देखणेपणाबद्दलचा गर्व. [रूप+अभिमान] **रूपावलि–ळी**–स्त्री. नामें किंवा क्रियापदें यांचीं प्रत्यय लावल्यानंतर होणारीं रूपें दिलेलें पुस्तक. [रूप+आवलि] **रूपडें**–न. १ (काव्य) सुंदर रूप; गोजिरवाणें रूप; रूप; मूर्ति; मोहक मुख. 'सांवळें रूपडें चोरटें चित्ताचें। उभें पंढरीचें विटेवरी।' –तुगा २६३०. २ मुखवटा; मुखटोप; बुरखा. **रूपस**–न. स्वरूप; सौंदर्य. –वि. (काव्य) चांगल्या आकाराचा; सुंदर; रूपवान्; नीट नेटका; सुरेख; शोभिवंत; देखणा. 'कुष्ठी उपहासे रूपसा।' –मुसभा १५.२७५. **रूपी**–वि. रूप घेतलेला; त्यासारखा; एखाद्याची आकृति धारण केलेला. समासांत पिशाचरूपी, देवरूपी, दैत्यरूपी. **रूपिणी**–स्त्री. रूप घेतलेली. 'प्रणवरूपिणी मूळप्रकृति।'

रूपक—न. एक अर्थालंकार. जेथें उपमान आणि उपमेय यांचा अभेद वर्णिलेला असतो तेथें हा अलंकार समजावा; मुख्य बोलण्याचा विषय अन्योक्तीनें सांगणें. [सं. रूप्=रूप देणें]

रूपक—पु. एक ताल. ह्याच्या मात्रा सात व विभाग तीन असतात. हा कर्णाटक संगीत पद्धतींतील आहे. ह्याचे मात्राप्रकार पांच आहेत. ते असे– ५.६.७.९.११. 'सुताळा रूपका। वरि नाचतां पात्रकळिका।' –भाए ४६०. **रूपकालप्ति**–स्त्री. (संगीत) चीजेचे बोल व तिचा ताल ह्यानें रागाचें प्रकाशन करणें. **रूपकालाप**–पु. (संगीत) रागविस्तार करीत असतां यांत चीजेचीं अक्षरें व ताल नसून स्वरांच्या समुदायांचे वेगळाले भाग पाडून केलेलें रागाचें मंडन किंवा रागविस्तार असतो.

रूपुस्त—क्रिवि. पुढें व मागें; वर व खालीं; तळाकडून व माथ्याकडून; पोटाकडून व पाठीकडून; आरंभीं व शेवटीं; दोन्ही टोकें धरून; जोडीनें. 'कृतयुगाच्या रूपुस्तास म्हणजे मागें व पुढें मिळून दोन्ही बाजूस.' –गीर १८९. [फा. रूअ+पुस्त] **रूपुस्ताचीं कामें**–पुढचीं-मागचीं कामें.

रूपेस्त—वि. (गो.) रूपवान्, सुंदर. [सं. रूप.]

रूप्य—न. रुपें; चांदी. [सं.] **रूपजस्ती**–स्त्री. रुप्याचा मुलामा; जर्मनसिलव्हर.

रूब—न. (गो.) चार पै; फद्या.

रूबकार—पु. हुकूम; आज्ञा. [हिं.] **रूबकारी**–स्त्री. सुनावणी.

रूबगुंड—न. (तंजावरी) १ वैश्वदेवाचें कुंड. २ उखळ. रुबगुंड पहा.

रूबरू, रूबुरू—क्रिवि. रुबरू पहा. 'त्यांस निरोपसमर्यी वियमान राजश्री बाबासाहेब शुक्रवारचे वाडयांत रूबरू पाहून दिल्हा.' –वाडबुबा ११३. [फा.]

रूबल—न. रूस देशांतील एक दीड रुपया किंमतीचें नाणें.

रूम, रूमशाम—न. रोम; तुर्की साम्राज्य; कॉन्स्टॉंटिनोपल.

रूय—स्त्री. १ रुई; पिंजलेला कापूस. २ रुईचें झाड. त्याच्या बोंडांत कापसासारखे तंतू असतात.

रूयदाद—वि. प्राप्त; आलेलें. [फा.]

रूयेशा—पु. घोडेस्वार. [फा.]

रूरयात—स्त्री. मुर्वत; भाडभीड. रुरयात पहा. 'कोणाची रूरयात न धरितां उभयतांचा हरएक मजकूर मनास आणून वाजवी असेल त्याप्रमाणें विदित करणें.' –ख ७.३४९०. [फा. रू+रयात]

रूवी—स्त्री. रुईचें झाड.

रूळ—पु. स्त्रियांचें एक पादभूषण; पैंजण; नूपुरासारखा चांदीचा दागिना. 'रूळ साखळया घालुन हलु हलु चार कदम चालावें.' –सला ४६.

रूळ—पु. १ वाटोळी आंखणी. २ आगगाडीचा लोहमार्ग. ३ छापतांना टाइपास शाई लावण्याचें साधन. ४ रस्त्यावरील खडी दाबण्याचा वाटोळा दगड अगर लोखंडी यंत्र. [इं. रूलर; रोल] **(एखादा प्रश्न भलत्या) रुळांवर नेणें**–गैरमुद्याचें, अप्रस्तुत बोलणें. 'प्रश्न भलत्या रुळांवर नेऊं नकोस. –सुदे २३३. **रूळणें**–क्रि. रुळणें पहा. **रूळी**–स्त्री.अव. नियम; कायदे. 'सरकार रूळी करणार आहे.' –टि १.३२५. [इं. रूल]

रे—उद्गा. अरे; हे (हाक मारतांना उपयोग). 'भूप म्हणे रे सुता...' –मोकर्ण ५.१२.

रे—पु. एका जातीचा मासा.

रेइला—वि. (महानु.) रचिलेला. 'रेइलिया हाडांची मोळी। सुदृढावया बळी। वोढौनि शिरादळीं। निहारिजे।' –ज्ञानप्रबोध ७५२. [सं. रच्; रेइणीचें धातुसाधित]

रेक—स्त्री. चंगळ; विपुलता; रेट; रेलचेल.

रेकटी—स्त्री. रेघोटी; बारीक रेघ. [रेघ]

रे(रें)कणें—अक्रि. १ (म्हैस, रेडा इ०नीं) ओरडणें. २ घोगऱ्या आवाजानें बोलणें, गाणें; मोठया, कर्कश शब्दानें बोलणें; मोठ्यानें हांक मारणें. ३ चरफडणें; पिरपिरणें; असंतुष्टपणानें ओरडणें. (गो.) रेक्यौंचे. [सं. रेष्=अव्यक्त शब्द करणें] **रेंकत**–क्रिवि. हळू; जडपणें; आळसटपणानें; आळसावत; मंद गतीनें; (क्रि० करणें, बोलणें, चालणें). [रेंगत याबद्दल वरील शब्द या वाक्प्रचारांत आलेला दिसतो. याशिवाय इतर ठिकाणीं याअर्थी रेंकणें याचा उपयोग नाहीं] **रेंकत येणें**–(म्हैस अभिलाषानें ओरडत येते त्याप्रमाणें) लालचीनें, आपण होऊन येणें; उत्सुकतेमुळें धावत येणें. 'आम्हांस श्रीमंत होऊंद्या, मग कोण पाहिजे तो रेंकत येईल.' **रें(रे)काट्या**–वि. म्हशीसारख्या आवाजाचा; रेंकत बोलणारा; घोगऱ्या आवाजाचा; कर्कश आवाज असलेला.

रे(रें)कला—पु. १ छकडा; एक्का; एक बैलाची गाडी. २ जमिनींत बीं पेरल्यानंतर वर माती लोटण्याचें आऊत; कुळव. ३ सुरुंग लावून खडक फोडण्याचें एक साधन. ४ एक प्रकारची तोफ; एक बंदुकीसारखें हत्यार. 'किल्ल्यांत फिरंगी रोहिला जंगी। मारितो रंग रेकल्याचा।' –ऐपो १८२. [हिं. रहकला]

रेकार्ड—न. १ दप्तर; कागदपत्रें; फाईल; मागील पत्रव्यवहार अगर प्रकरणें यांचें टांचण; एकेजागीं टांचून ठेवणें. २ आलेख; ध्वनिलेख; यंत्राच्या साह्यानें घेतलेला गाण्याचा आलेख: फोनोग्राफची तबकडी.

रेक्ता—पु. हिंदुस्थानी किंवा फारसी भाषेंतील एक गीताचा प्रकार. [फा. रेख्ताह्]

रेख—स्त्री. (कों.) रेघ; रेषा. [सं. रेषा]

रेख(खा)टणें—सक्रि. १ (कागद, भिंत इ०वर) चित्र, आकृति, शब्द इ० काढणें. २ (कागद, भिंत इ०वर) अव्यवस्थित पणें रेघोट्या काढणें; रेघा काढून विरूप करणें; चितारणें. [रेखणें] **रेख(खा)टणी, रेखणी**–स्त्री. १ आकृत्या किंवा रेषा काढणें; आंखणें. २ वर्णन; विस्तार; आखणी. ३ आखण्याची पट्टी; आंखण्याचें साधन; रूळ.

रेखणें—सक्रि. १ (जमीन, कागद, भिंत इ०वर) रेषा किंवा रेघोट्या काढणें. २ (चित्र, कांहीं आकृती) भिंत, कागद इ०वर रेघांच्या योगानें काढणें. ३ घासुन गुळगुळीत करणें. ४ (देव, साधु इ०च्या प्रतिमा मूर्ती) मनांत ठसवून घेणें; कल्पिणें.

अंग, कपाळ इ०वर (गंध इ०) रेघांच्या रूपानें चिन्हित करणें: कोरणें; नीट करणें; प्रमाणांत लावणें, काढणें. 'चतुर्भुज माळा रुळे येकावळी। कस्तुरी निढळी रेखिलीसे।'-तुगा ८. ६ वस्त्राच्या चुण्या किंवा डोईच्या केसांच्या पट्या चापूनचोपून बसविणें. ७ वर्णन करणें; बिंबविणें; ठसा उमटविणें; चित्रित करणें. 'ऐकोनि जो स्वहृदयांतचि रेखिला हो। प्रत्यक्ष तोचि नयनीं हरि देखिला हो।' [रेखा, रेषा] **रेखला, रेखलिया**-वि. १ नीटनेटका: प्रमाणबद्ध. २ कोरीव; कोरलेला; रेखलेला; सुंदर. ३ योग्य; बरोबर; तंतोतंत. ४ चित्र काढलेला. 'म्हणोनि माझी वैखरी। मौनाचेहि मौन करी। हे पाणियावरी मकरी। रेखिली पां।'-अमृ १०.१७.

रेखणें—क्रिवि. ओरडणें; रेंकणें पहा. 'आडवे होऊनि रेखत गेलें।'-दावि ४८४. [रेंकणें]

रेखा—स्त्री. १ रेघ; रेषा. २ काढलेलें चिन्ह किंवा आकृति ३ मर्यादा; सीमा. 'जेथ साहित्य आणि शांति। हे रेखा दिसे बोलती।'-ज्ञा ४.२१८. ४ रांग; पंक्ति; ओळ. ५ हात, बोटे इ०वर जन्मजात चिन्हें असतात तीं. 'ध्वजवज्रांकुशरेखा। चरणींचीं सामुद्रिकें देखा।'-एरुस्व १.२२. ६ लंका व मेरू यांना जोडणारी दक्षिणोत्तर रेषा; याम्योत्तरवृत्त; ध्रुवांमधून जाणारी रेषा; शून्य रेखांश. ७ काव्यरचना. 'नवल बोलतीये रेखेची वाहणी। देखतां डोळ्याही पुरों लागे धणी।'-ज्ञा ६.१८. ८ यथोक्त कर्म. ९ (नृत्य) नृत्यामध्यें अंगप्रत्यंगांची जनचित्ताला आनंद देणारी मनोहर टेवण. [सं. रेषा] **०कला**-स्त्री. चित्रें काढण्याची कला (इं.) ड्राइंग. **०गणित**-न. भूमिती. **रेखांतर**-न. रेखांश; पहिल्या रेखावृत्तापासूनचें पूर्व-पश्चिम अंतर. [रेखा+अंतर] **रेखापात**-पु. मध्यान्हरेखा पहा. **रेखावृत्त**-न भूगोलावर उत्तर व दक्षिणध्रुव यांना जोडणारें व भूमध्याला छेदून जाणारें वृत्त; माध्यान्हवृत्त; याम्योत्तरवृत्त. **रेखांश**-पु. कोणत्याहि स्थळाचें पहिल्या याम्योत्तरवृत्तापासून पूर्वेकडील किंवा पश्चिमेकडील अंशात्मक अंतर.

रेखाटा—पु. नकाशा; आराखडा; रेषाचित्र.

रेंगडी—स्त्री. एखाद्या अवयवाला येणारा पेटका. (क्रि० वळणें).

रेंगणीया—स्त्री. मिरचीची एक जात. या जातीची मिरची मोटी असते. -कृषि ५६८.

रेंगणें—अक्रि. १ रांगणें; सरपटणें. २ आळसानें, मंदगतीनें अगर अनुत्साहानें कांहीं काम करीत राहणें; चुकवीत चुरवीत काम करणें. [सं. रिंख् रिंग्]

रेंगरेंग—स्त्री. (ना.) किरकीर; पिरपीर. रिंगरिंग पहा.

रेंगळ—स्त्री. रेलचेल; रंगळ; भरपूरपणा; वैपुल्य; समृद्धि.

रेंग(गा)ळणें—अक्रि. १ आळसावणें; आळस भरणें; आळसानें अगर मंद गतीनें काम करीत राहणें. २ मागें पडणें; मागें राहणें. ३ दमणें; अति श्रांत होणें; मोठ्या परिश्रमामुळें थकणें; [रेंगणें] **रेंगाळता**-वि. (राजा. कुण.) अति मंदपणें काम करणारा.

रेंगळा—न. (कु.) चांभाराचें एक हत्यार.

रेंगापोंगा—पु. (व.) निर्बळ लोक; रडका कारखाना: दुर्बळ संघ. 'आमचा रेंगापोंगा आहे तुमच्या भरंवशावर.'

रेंगी—स्त्री. (व.) आच्छादन नसलेली व वजनानें फार हलकी अशी बैलगाडी. रिंगी पहा.

रेघ—स्त्री. १ रेषा; ओळ २ कांहीं आकृतीची मर्यादा. ३ चेहरा; हजामत; दाढी करून कपाळावरील केंस न्हाव्याकडून काढून महिरपीच्या आकाराची आकृति हौशी लोक कपाळावर करवितात ती. (क्रि० धरणें). सरकारी किंवा इतर कामाच्या कागदावर निरनिराळ्या लांबीच्या व प्रकारच्या व निरनिराळे अर्थ असलेल्या रेघा मारतात. त्यांचीं नांवें:- किदरी, किताबती, खडे, दुरकानी, तिरकानी, दफाते, बितैन, बीत, मसुदर किंवा मशोदर, महदर, शरायती, हरफ, हिकायती. इ० (क्रि० ओढणें, काढणें; फाडणें). [सं. रेषा] **०ओढून देणें किंवा काढून देणें**-एखाद्याच्या वर्तनाला शिस्त लावून देणें; त्याला वर्तनाचे नियम घालून देणें. **०धरणें**-दाढी करून कपाळावरील केंस काढून महिरपीप्रमाणें आकार करणें. **०मारणें**-हद्द ठरविणें; ओळ काढणें. **रेघरूपास आणणें-येणें-चढणें**-उत्कर्षाच्या स्थितीस पोंचविणें, पोंचणें; वैभवशाली करणें, होणें; नांवारूपाला आणणें, येणें; ऊर्जितावस्थेला आणणें, येणें. **काढल्या रेघेनें-रेघे-चालणें वागणें-करणें**-ठरवून दिल्याप्रमाणें; सांगितल्याप्रमाणें; नेमल्याप्रमाणें वागणें; आंखून दिलेल्या मार्गानें चालणें. **रेघनरेघ**-क्रिवि. पूर्ण; खडानखडा; बारीकसारीकसुद्धां. **रेघरूप**-न. १ पदार्थाची घटना किंवा आकारमान. २ पदार्थाचें स्वरूप. ३ उत्कर्षाची स्थिति; भरभराट; पूर्णपणा. रेघेरूपास आणणें पहा. **रेघटी, रेघोटी**-स्त्री. (वांकडीतिकडी) रेघ; रेषा; ओळ. **रेघाटणें, रेघाळणें**-सक्रि. रेखाटणें पहा.

रेंघळणें—अक्रि. १ आळसानें किंवा मंदगतीनें (काम, धंदा, माणूस इ०) चालणें चालत राहणें; आळसावत करणें, बोलणें, चालणें, गमणें; कसें तरी ओढीत (काम) करणें. २ मागें पडणें; मागें राहणें; रेंगळणें. रंघळणें पहा. ३ आजारांत खितपत पडणें; कुचमणें. ४ घसरत चालणें; (उतारावरून) घसरणें. ५ नानाप्रकारचीं विघ्नें येऊन (कांहीं काम) अडखळत चालणें; रखडत चालणें. ६ प्रयत्न निष्फळ झाल्यानें एखाद्या कामांत व्यत्यय येणें; रखळणें.

रेघी—वि. रेघांनीं युक्त अशी; पाव, अर्धा, पाऊण यांच्या निदर्शक एक, दोन, तीन उभ्या रेघांनीं युक्त. [रेघ] **०उजळणी-गुणाकार-बेरीज-भागाकार-वजाबाकी**–स्त्रीपुस्त्री. रेघायुक्त संख्यांची उजळणी, गुणाकार इ०.

रेघोटळी—स्त्री. (सोनारी) दागिना किंवा भांडें यांच्यावर नक्षीच्या नाजूक रेघा उमटविण्याचें किंवा ओरखडून काढण्याचें सोनाराचें एक हत्यार. गुजरणी; छटकारा पहा.

रेच, रेचन—पु. १ ढाळ; जुलाब; रेचकामुळें झालेलें शौच; गुदद्वारें जोराचें मलविसर्जन. २ ढाळक; जुलाब होण्याकरितां घ्यावयाचें औषध. ३ सारक औषधांचा प्रयोग. सप्तोपचार पहा. [सं. रिच्=रिकामा करणें]

रेंच—पु. १ मनुष्य जेवण्यास बसला असतां कोणी भरल्या पायांचा मनुष्य तेथें आला किंवा त्या जेवणाराला कोणाची दृष्टि लागली तर त्या जेवणाराची अन्नावर एकदम अरुचि उत्पन्न व्हावी, मळमळूं लागावें किंवा वांती व्हावी असा जो प्रकार होतो तो. (क्रि० भरणें; उतरणें; लागणें). २ एखाद्याच्या पाठींत किंवा दुसऱ्या गात्रांत शैत्यादि कारणांनीं उत्पन्न होणारा ताठपणा. ३ खुमखुम; गर्व; हिंमत; ताठा; तोरा; गुर्मी. ४ (राजा. कुण.) (एखाद्यास) पुष्कळ मारणें; जोराचा मार; ठेंचणें. ५ (कों.) अपचननाशाचा एक तोडगा. हा पुढील प्रमाणें:–एका मडक्यांत कांहीं निखारे त्यावर मीठ, मोहरी, मिऱ्या व बारीक खडे टाकून विकारी माणसाच्या पुढून व मागून तें मडकें वरून खालीं उतरून परातींत उपडें ठेवून परातींत पाणी ओततात. कांहीं वेळानें पाणी मडक्यांत ओढलें जातें. **०उतरणें-मोडणें-करणें**–१ पाठीच्या शिरा मोडून ती हलकी करणें; पाठीचा ताठपणा, करक, उसण इ० जोराचा धक्का मारून किंवा चिमटयानें मांस ओढून ताणून नाहींसा करणें. २ (ल.) गर्व हरण करणें; खोड मोडणें; रग जिरविणें; नक्षा उतरणें; पराभव करणें. 'हा उतरिताचि त्याचा असता तरि मानवेंद्रसुत रेंच।'–मोवन ११.३२.

रेचक—न. ढाळक; जुलाबाचें औषध; सारक औषध. –पु. प्राणायाम करतांना आंत घेतलेला श्वास बाहेर टाकणें; पूरकानें ओढलेला वायु कुंभकांत स्थिर झाल्यानंतर तो सोडणें.–वि. सारक. [सं. रिच्=रिकामा होणें] **रेचणें**–सक्रि. सोडणें; नाकानें, वायु सोडणें. 'वायु जो धारण धरावा। तो जंव फुटेना अव्हासव्हा। तंववचिवरी विरोधावा। मग रेचावा शनैः शनैः।'–एभा २७.१८३. **रेचन**–न. १ रेचक औषध; सारक औषध. २ रेन; जुलाब; जोराचें मलविसर्जन. **रेचित**–वि. १ मोकळें केलेलें; सोडलेलें. २ ढाळ झालेला; कोठा साफ झालेला. **०अंगहार**–पु. (नृत्य) उजवा हात रेचित करून शरीराची उजवी बाजू वांकवून रेचित करणें, ती बाजू ताठ करून पुन्हां डाव्या बाजूस त्याच क्रियांची आवृत्ति करणें. शेवटीं क्रमानें रेचित उरोमंडल व कटिच्छिन्न करणें. **०कटि**–स्त्री. नृत्यामध्यें दोन्ही पाय अंचित करून कंबर खालीं घालविणें. **०भुवई**–स्त्री. नृत्यामध्यें एखादी भुवई गमतीनें वर उचलिली म्हणजे दुसऱ्या भुंवईची होणारी स्थिति. **०मान**–स्त्री. नृत्यामध्यें कंबर निवृत्त करूं लागतांच शरीराला एक प्रकारची गति मिळते. त्यावेळीं मानेसहि गति मिळते. ही गति मिळण्यापूर्वीची स्थिति. **०संयुक्तहस्त**–पु. (नृत्य) हंसपक्ष हात वर करून फिरविणें व मग आपल्या समोर पसरून उताणे करणें.

रेचकना—पु. (ना.) दुबेळक्या लाकडास दोन आडव्या काठ्या बांधून केलेलें कुंपणाचें, वाडग्याचें फाटक; बेडें.

रेचकनिकुट्टक करण—न. (नृत्य) उजवा हात रेचित करून उजवा पाय निकुट्टित करणें; डावा पाय ह्या बाजूपासून त्या बाजूपर्यंत हलवीत राहणें.

रेचका—पु. (कर.) भार; कामाचा बोजा. 'कामाच्या रेचक्याखालीं तिचा पिट्टा पडला.' [रचणें]

रेचा—पु. (व) कापूस वटण्याचें, सरकी काढण्याचें यंत्र.

रेचाखड—स्त्री. लागवड.

रेज—पु. १ धातूचा कण; लहान तुकडा. २ लहान नाणें. ३ एक कोंबडा. ४ मजूर; मोलानें लावलेलीं मुलें. [सं. रजस] **०गण-गाण**–पुन. १ सोन्याचांदीचे कण. २ दागिने, नाणीं, भांडींकुंडीं इ० चे तुकडे, कण इ० ३ कपडा बेतल्यावर उरणारे कापडाचे लहान तुकडे (समुच्चयानें). ४ उरणारे तुकडे; चाराचुरा; चिटोऱ्या. ५ बंदुकीचे छरे. **०गिरी**–स्त्री. १ बंदुकीचा भडिमार; छरे तोफांची किंवा बंदुकीची एक फैर; शिलग; रंजक. २ लढण्याचें कौशल्य; शौर्य. ३ तोफेतून उडविण्यांत येणारे धातूचे तुकडे. –वसईची मोहीम. 'तोफेचे तोंडीं दिली रेजगिरी म्हणे पेटवा लौकर।'–ऐपो ३५३. [सं. रजस् फा. राजगिरी]

रेजकदाणी–स्त्री. दारू ठेवण्याचें पात्र; छरे किंवा बंदुकीच्या गोळ्या ठेवण्याचें पात्र. 'रेजकदाणी शिंगाची.'–वाड बाबा २.४२. [फा. रंजकदाणी]

रेजगी—स्त्री. १ मोड; किरकोळ नाणें; चिल्लर; खुर्दा. २ फोडलेल्या, तासलेल्या लाकडाचे किंवा दगडाचे तुकडे, खंड, धलप्या इ० समुच्चयानें. [फा. रेझगी]

रेंजणी—वि. (गो.) सदोदित दुखणाईत. **रेंजणेवचें**–क्रि. (गो.) सदोदित आजार लागणें.

रेंजणें—सक्रि. (राजा.) आदरबुद्धीनें किंवा पूज्यभावानें लेखणें; आदर बाळगणें; भिणें; धाक बाळगणें. (निषेधार्थी प्रयोग). 'जो बापाला रेंजीत नाहीं तो चुलत्याला काय रेंजणार?'

रेंजर—पु. जंगलखात्याचा फिरता अधिकारी. [इं.]

रेजा—पु. १ कापडाचा तुकडा; उंची कापडाचा लहानसा तुकडा; (सामा.) तुकडा; किरकोळ वस्तु. २ (कों.) लांकडी गज. (जाळींत बसवितात तो). खिडकीचा गज. ३ फाशांवरील पगडा; टिंब. (सक्रेजा–दोन फाशांवरील दान. सहा आणि एक). ४ भुकटी. –सुंव्या ३५. ५ सोन्याच्या किंवा चांदीच्या लांब लगडी पाडण्याकरितां धातूचा रस दोन्ही टोंकांस बंद असलेल्या ज्या पन्हळासारख्या लोखंडी साधनांत ओततात तें साधन; मूस; भट्टी. ६ (विणकाम) पदर इत्यादि नसलेला सनगाचा कांहीं भाग, तुकडा. ७ (व.) कारागिराच्या हाताखालचा सांगकाम्या मजूर. [सं. रजस्; फा. रेजाह्=कापडाचा तुकडा] **०बाकी**–स्त्री. वस्त्राचा अवशिष्ट भाग किंवा बेगमीच्या धान्यापैकीं कांहीं अवशेष.

रेंजी—स्त्री. (गो.) खरूज.

रेजीम—न. कागदाचें रीम; कोऱ्या ४८० पानांचा किंवा २० दस्त्यांचा गठ्ठा. [पोर्तु.]

रेजो–पु. (चि.) १ गज. २ हातचा. ३ (सिंधी) सोन्या–चांदीची वीट, लगड करण्याचा सांचा, मूस रेजा पहा.

रेट, रेंट—न. (अशिष्ट) १ जाडा रोट; जाडीभरडी भाकरी. (क्रि० रगडणें; रदाटणें; झोकणें; खाणें; बडवणें; ठोकणें; करणें). 'मग ती रेट भाजती.' –तोबं ९७. २ (व.) वाळलेल्या भाकरीचा तुकडा. [रेटणें]

रे(रें)ट—स्त्रीपु. १ गर्दी; दाटी; खेचाखेंच. (क्रि० करणें; बसणें; होणें). २ नेट; पदार्थ पुढें सरकविण्यासाठीं त्याला मागून लाविलेला जोर; मागून दिलेला दाब; धक्का. (क्रि० लावणें; देणें). ३ (व.) भार; जोर; वजन. ४ (व.) दांडगा किंवा उद्दाम मनुष्य. 'उभारेट मुसळभट.' [रेटणें]

रेटकपणा—पु. रेटून नेण्याचा गुण; काम जोरानें पुढें करण्याचा किंवा करविण्याचा गुण.

रे(रें)टणी–स्त्री. रेटण्याची क्रिया; नेट देण्याची, पुढें ढकलण्याची क्रिया; ढकलणी. [रेटणें]

रे(रें)टणें—सक्रि. १ पदार्थाला पुढें जाण्यासाठीं गति देणें: ढकलणें; मागून दाब घालणें; खुपसणें. २ (कांहीं अनिष्ट प्रसंग) प्रतिकार करून थांबविणें; संभाळून धरणें; थोपविणें. ३ (कठिण काम) नेटानें पार पाडणें; (धंदा, नोकरी, उद्योग इ०) विघ्नास न जुमानतां चालविणें. ४ कष्टानें चालविणें; संकटाच्या स्थितींत काढणें किंवा कंठणें (दिवसकाळ). ५ (खाद्यपदार्थ) आधाशीपणानें खाऊन टाकणें; गिळणें. **रेटून जाबसाल करणें**–भीडमुरवत न ठेवतां स्पष्टपणें आपलें म्हणणें मांडणें; उघड बोलणें; धीटपणानें आपलें म्हणणें सांगणें. **रेटून**–क्रिवि. १ जोरानें; आवेशानें. २ मोठ्या प्रमाणांत. **रे(रें)टणें**–अक्रि. १ सरकणें; स्थानभ्रष्ट होणें; आपली जागा सोडणें; (फार दाबामुळें खांब, तुळई इ०) कलणें. २ (धान्य, पाणी इ०) विपुल होणें, पिकणें; अमर्याद होणें; अतिशय होणें. उदा० पीक रेटलें, पाऊस, रेटला, अमदानी रेटली.

रेटमकहाणी—स्त्री. भाकडकथा.

रेटमत—न. जबरदस्तीनें लादलेलें मत. 'रेटमत कीं हो दासाचें।' –दावि ४३२. [रेटणें+मत]

रे(रें)टा—पु. धक्का; नेट; जोर. **रे(रें)टाई**–स्त्री. १ रेटण्याची किंवा ढकलण्याची क्रिया; धक्का; ढकलाढकली. (क्रि० करणें.) २ (ल.) जोर; जुलूम; बळजबरी; धटाई; दांडगाई. 'ताकीद केली असतां भारी जमावानें तुम्हांसी रेटाई करून जाणार असतील.' –बाडसमा १.१९६. ३ संकटें, विघ्नें इ० कडे दुर्लक्ष्य करून किंवा त्यांना न जुमानतां काम चालू ठेवण्याची क्रिया. ४ चालढकल. **रेटारेट–रेटी**–स्त्री. १ ढकलाढकल; खेंचाखेंच; ढकलण्याची क्रिया. २ (ल.) चालढकल; हेळसांड; दुर्लक्ष. 'मला बारीक ज्वर येत होता त्याची रेटारेट केली म्हणून बळावला.' [रेटणें] **म्ह०** दिवस गेला रेटारेटी आणि दिवे लावून कापूस वेंटी. **रेटूक, रेंटूक**–न. (तुरुछतेनें) जाड भाकर, पोळी, पापड इ०

रेड—स्त्री. आंबे, फणस, धान्यें इ० चें वैपुल्य; समृद्धि, रेलचेल; चंगळ. (क्रि० होणें; पडणें). 'आज आंब्यांची बाजारांत रेड पडली आहे. कोणी विचारीत नाहीं.' [हिं.]

रेंड—पु. (विटीदांडूचा खेळ) विटीचें एक टोंक हातांत धरून दुसरें जमिनीकडे करून ती खालीं सोडून जमिनीस लागण्यापूर्वी वरच्यावर तिच्यावर टोला मारून ती फेंकणें; कोठें कोठें लेंड अगर चिट्टी म्हणतात. –मखेपु १८.

रेडका—पु. एक प्रकारची गाडी.

रेडणें—अक्रि. शिंपणें; ओतणें. 'पाणी रेडलें.' –मौज २. ६.३०. [गु.]

रेंडमुंड—वि. (व.) आडमुठा; विचार न करणारा; आडदांड. –क्रिवि. (व.) कांहींएक विचार न करतां. 'रेंडमुंड जाऊन पडला आंगावर.'

रेडा—पु. म्हशीच्या जातीचा नर; हल्या; टोणगा; महिष. [स. रिप्=हिंसा करणें]

रेडा, रेडका—पु (विशेषतः रेडका) बटवा नांवाची पिशवी उघडण्याच्या ज्या दोन दोऱ्या असतात त्यांपैकीं प्रत्येक. तडकणीसाठीं गोणी, पोतें इ० वर घातलेला दोरीचा फास.

रेडो—स्त्री. १ पारडी; लहान म्हैस (दूध देऊं लागण्यापूर्वीच्या स्थितींतील). **रेडुक**–न. पारडूं; म्हशीचें वासरूं; रेडकूं

रेडकूं, रेडुक—न. १ पारडूं; म्हशीचें पोर. २ (तुच्छतेनें) म्हैस. [रेडा]

रेंडिअम—स्त्री. पिचब्लेंड नांवाच्या खनिज द्रव्यापासून मिळणारी अतिशय दुर्मिळ अशी धातु. हिचा १८९८ मध्यें शोध लागला. हिच्यामध्यें प्रकाश देण्याची शक्ति आहे. –झाको (र) १२९.

रेडू—पु. (ना.) बसणारांना खालीं पाय सोडून बसतां येईल अशा प्रकारची हलकी, उघडी गाडी; पायटांगी गाडी; रेडका.

रेडेअननस—स्त्री. जंगली अननसाचें झाड. याच्या पात्यांचीं दोरखंडें करतात.

रेडेमान(ण)गा—पु. एक प्रकारचा वेळू, बांबू.

रेड्डी—स्त्री. तेलंगी शेतकऱ्यांची मुख्य जात.

रेण—पु. रेणु पहा.

रेणवी—स्त्री. खाऱ्या पाण्यांतील माशांची एक जात.

रेणा—स्त्री. विना. व्हाईन नदी. 'आमचे रेणानदीकांठचे पाश्चात्त्य आर्यबंधु रूढावळीनंतर अग्निमीळेवर धडाका उठवितात.' –नि ८४८. [इं. व्हाइन]

रेणु—पुस्त्री १ धूळ; केर; रजःकण. २ फुलांतील पराग. ३ पित्तपापडा. [सं.]

रेणुका—स्त्री. विना. जमदग्नीची पत्नी व परशुरामाची आई.

रेणें—न. (राजा.) जें गवत, कडबा इ० खाऊं लागलें नाहीं, केवळ दुधावरच आहे अशा वासराची, रेडकाची विष्ठा. **रेणेणें**–अक्रि. अशी विष्ठा (रेडकूं, वासरूं इ०नीं) विसर्जिणें; वांसरानें रेणें, हगणें.

रेणोल––पोर्तुगीज सैन्यांतील एक प्रकार. –वसईची मोहीम.

रेत—न. पुरुषाचें वीर्य; धातु; शुक्र. पुरुषाच्या शरीरांतील गर्भोत्पादक धातु. 'देवुनि म्हणे मुनि, असो येणें जरि तुज न होय सुत रेतें।' –मोसभा १.७४. २ (शंकराचें रेत) पारा. जालें कोगाच्या शिखिवदन हुतें कनक सांग गा–रेतें।' –मो अनुशासन ३.४५. [सं. रेतस्] **रेतःपात, रेतस्खलन–रेत–**पुन. वीर्य गळणें; वीर्यपात. **रेतस्तंभक**–वि. वीर्यपात बंद करणारें (औषध). **रेतोधान**–न. गर्भाधान. [सं.]

रेताई—स्त्री. चक्राकी आणण्यासाठीं दिलेली मजुरी.

रेती, रेत—स्त्री. १ वाळू; अगदीं बारीक वाळू. २ (सोनारी धंदा) बारीक कणकण रूपानें असलेली सोन्याची पूड. [सं. रेत, रेतजा] **रेतकरंडक, रेतदाणी**–पुस्त्री. शाईनें लिहिलेल्या कागदावर घालावयाची वाळू ज्या भांड्यांत ठेवलेली असते तें भांडें; वाळूदाणी; वाळूची डबी. [हिं.] **रेताड**–वि. रेती पुष्कळ असलेली (जमीन, माती).

रेंद, रेंदग(गू)ड, रेंदड, रेंदा, रेंदाड–स्त्री.नपु.स्त्री.पु. न. १ घर, गुरांचा गोठा इ० तील केरकचरा किंवा गदळ. २ चिखल; घाण. ३ तेल, तूप इ०च्या बारदानांतील गाळ; पाण्यांत जमलेला मातीचा अंश; मातीमुळें गढूळ झालेलें पाणी. ४ व्रण, गळूं इ०तील दाट पू; रक्त. ५ शेणाची रास. ६ पाघळलेला गूळ. ७ राड; खातेरें. **रेंदा–रेंदाड–रेंदगड–रेंदगूड काढणें**–झोडपून काढणें; रक्त निघेपर्यंत मारणें. **रेंदू**–वि. आळशी; मंद; सुस्त; जड. **रेंदूचणी**–न. गढूळ पाणी; गदळ पाणी. [रेंदा+पाणी] **रेंदसरा**–पु. पाणी पाझरून येण्यासाठीं किंवा पडण्यासाठीं ठेविलेलें भांडें. [रेंदा+सरणें] **रेंदाड, रेंदगड, रेंदगूड**–वि. चिखलानें भरलेलें; घाण किंवा घूळमिश्रित (पाणी, तेल, तूप, रक्त इ०). **रेंदावणें**–अक्रि. १ (पाणी इ०) गढूळ होणें; घाण होणें. २ (गळूं इ०मध्यें) पू सांचणें; पुबानें डबडबणें; पू गळण्यासारखें बरबरीत होणें. **रेंदाविणें**–सक्रि. (पाणी इ०) गढूळ करणें; घाण करणें. **रेंद्या**–वि. रबरचीत. 'रेंद्या चिखुल तें वाळलेसें वाटे। –दावि ७६१.

रेंद—न. (राजा. कु.) १ ताडीमाडीचा मक्ता. २ दारूचा गुत्ता. ३ दारू गाळण्याची भट्टी; रेंदसरा. **रेंदकरी**–पु. मक्तेदार; दारू, ताडी विकणारे लोक. **रेंद(दे)सरा**–पु. दारु गाळण्याची भट्टी. **रेंदा**–पु १ दारू गाळण्यासाठीं आंबविलेला, कुजत घातलेला पदार्थ. २ पितळ करण्याकरतां मिसळण्याचा पदार्थ. ३ सोन्यांत घालावयाचें हीण. **रेंदे**–न. अबकारीकर; दारू गाळणी वरील सरकारी कर. 'रेंदे व गादीयादेखील' –वाडबाबा ३.४. **रेंदेकरी**–पु. दारू मक्तेदार. **रेंदेर**–पु. (गो.) भंडारी; माडी, ताडी, इ० काढणारी जात.

रेदा—पु तंबाखूची जुडी.

रेंदीयाचेंदीया—क्रिवि. (महानु.) कसें तरी. 'रेंदीयाचेंदीया दर भरीजेति।'

रेप, रेंप—स्त्री. तापामध्यें अंगांत उठणारी शिणिक; शिणक. **रेपा**–स्त्री. (विशेषत अनेकवचनी प्रयोग) १ थंडीतापामुळें अंगांत उठतात त्या वेदना; शिलका. २ आमांशानें पोटांत निघणाऱ्या कळा, वेदना, मुरडा.

रेंप, रेप—स्त्री. १ मोठा दगड; शिळा; खडक. २ (ल.) अगडबंब माणूस; राक्षसी माणूस, पशु इ०. ३–स्त्रीपु. दाट चिखल; चिखलाचा लादा. **रेपावर रेप**–क्रिवि. चिखलाचे थरावरथर. **रेपावररेंप घालणें बसविणें**–आधाशीपणानें खाद्यपदार्थ पोटांत घालणें; एकावर एक अधाशीपणानें खाणें. **रेंपणें, रेपणें**–अक्रि. कांहीं हालचाल न करतां सुस्तपणानें बसणें; घट्ट चिकटून बसणें, चिखलाच्या गोळ्याप्रमाणें (लठ्ठ मनुष्यानें) फतकल मारून बसणें.

रेफ—पुस्त्री. रफार; र हें अक्षर. अर्ध र दर्शक चिन्ह; अक्षराच्या डोक्यावरचें र चें अर्धवर्तुळाकृति चिन्ह. उदा० अर्क या शब्दांतील क या अक्षरावरील चिन्ह. [सं. रिफ्=कर्कश नाद करणें]

रेब—स्त्री. (कों.) १ मऊ चिखल; राड; खातेरा. २ समुद्राच्या कांठावर येणारा मऊ गाळ. **रेबट**–स्त्री. (गो.) चिखलाची जागा.

रेंबट—स्त्री. रमत गमत किंवा सुस्तपणें काम करणें; दीर्घसूत्रीपणा; चेंगटपणा. [प्रां.] **रेमटकहाणी**–स्त्री. कंटाळवाणी हकीगत; लांबलचक गोष्ट. (क्रि० लावणें; मांडणें; सांगणें; लागणें; चालणें). 'येरांनीं सांगावी रेमटकहाणी । चित्ता रंजवणी करावया ।' –तुगा ३८४६.

रेंबटणें—सक्रि. (पदार्थाला) तेल, तूप इ० चोपडणें; माखणें; बाटेल तसें चोपडणें. **रेंबट्या, रेंबटी**–वि. मंदपणें किंवा सुस्तपणें काम करणारा; चेंगट; दीर्घसूत्री; भटक्या; आळशी.

रेंबटणें, रोंबटणें—सक्रि. (राजा.) १ खुपसणें; शिरकावणें. २ जोरानें दाबणें, चेपणें.

रेबटी—स्त्री. (राजा.) रेबडी पहा.

रेबड—न. १ घाण; रक्त मिश्रित पू. २ –स्त्री. चिखल, शेण, गू, इ०चा ढीग अगर पसारा; रेंदाड; घाण; रबडा; चिखलाची जागा. **रेबडणें**–सक्रि. (भांडें, अंग इ०) बरबटविणें; माखणें; चोपडणें; फासणें. –अक्रि. बरबटलेलें असणें किंवा होणें; (रस्ता, शरीर, नाक, तोंड, भांडें, वस्तु इ०) माखलेलें असणें. **रेबडी–टी**–स्त्री. (राजा.) १ पाघळून पातळ झालेला गूळ. २ बिलबिलीत झालेलें फळ; अविकल्यानें आंबा, फणस इ०चा थिलथिलीत झालेला गीर; कुजून शेण झालेला जिन्नस.

रेबीट—न. दोन लोखंडी पट्ट्या जुळविण्याचा खिळा. [इं.]

रेबीन—स्त्री. (चांभारी धंदा) पट्टी; फीत; गोठ घालण्याच्या उपयोगाची वस्तु. [इं. रिबन]

रेबो—पु (गो.) चिखल; गारा.

रेभ—स्त्री. (प्रां.) (भित, जमीन इ०तील) भेग; फट, चीर.

रेमट, रेमटणें, रेमट्या—रेंबट, रेंबटणें इ० पहा.

रेम्या, रेमेडोक्या, रेम्या डोक्या—वि. १ मंद; अनुत्साही. २ मूर्ख; मद्दड; मठ्ठ; बुद्धिहीन; दीर्घसूत्री. 'हा प्रकार पाहून रेमेडोक्या सार्जेटाचा संताप झाला. '–के २४.६.३०. [रे आणि मे बावळटपणाचे निदर्शक आवाज]

रेया—उद्गा. राया; अहो. 'मारिले मारिले असुर । क्रोधें फरशधर । कोपले रेया ।' –विठा–रेणुकानंदन पदें (प्रभात, व. १ अं. ८)

रेरे, रेरें—स्त्रीन. १ पिरपिर; रड. 'हरिदास तें रेरें करिती । पोटासाठीं ।' –दा १८.१०.२८. २ अति संथपणानें किंवा मंद गतीनें कांहीं काम करण्याचा प्रकार. ३ धैर्य गमावणें; धीर खचणें; अनुत्साह. ४ एखादें काम करतांना चालविलेली कुरकुर; वेळ काढणें. (क्रि० लावणें). [रर] **०करणें**–क्रिवि. हळू हळू: रडतकढत.

रेरे, रेरेरेरे—उद्गा. (आश्चर्य व दुःख यांचा निदर्शक उद्गार) अहाहा; अरेरे; हाय हाय.

रेरे—स्त्री. हांक; जोराची हांक; परत परत बोलावणें. 'मला काय रेरे करतोस, तुला काय आग लागली.'

रेल—स्त्री. १ वैपुल्य; समृद्धि: चंगळ. २ महापूर; लोंढा. (क्रि० येणें). ३ रेती; बारीक वाळू. [हिं. रेल; प्रा. रेल्ल] **०चेल–पेल–टेल**–स्त्री. अति वैपुल्य; बाहुल्य अघळपघळ पुरण्याइतकें एखाद्या पदार्थाचें वैपुल्य.

रेलणें—अक्रि. १ कलणें; झुकणें; (भित इ० चें बांधकाम) खचून तिरकें होणें; एका बाजूला तोलणें; एका बाजूला पडणें; सरकणें. २ एखाद्याला टेकून उभें राहणें; टेकणें; दुसऱ्यावर भार देऊन राहणें; रेटणें. ३ (साखर, मीठ इ०ची रास ओली झाल्यानें) विरघळून पडणें; भित इ० ढासळून पडणें; पडून तुकडे होणें. ४ (कपाळाचा घाम, पू, रक्त, भितीचा रंग) झिरपणें; गळून पडणें; उडून जाणें. [अर. रेलना; सं. लुठ्; प्रा. रुड्]

रेलवे—पु. आगगाडीचा रुळांचा मार्ग. –स्त्री. (ल.) आगगाडी. [इं.] **०स्टेशन**–पु. आगगाडीचें उभें राहण्याचें ठिकाण. [इं.]

रे(रें)व—स्त्री. १ बारीक वाळू; रेती. २ धान्यांत वगैरे असणारी बारीक रेती; साखर, दळलेलें पीठ इ०कांतील कचकच. ३ –न. आकाशांत लांबलचक पांढऱ्या ढगांचे पट्टे कधीं कधीं पसरलेले दिसतात ते समुच्चयानें किंवा तशा पट्ट्यांनीं व्याप्त असें आकाश. (क्रि० निघणें; चढणें; वाढणें; पसरणें; विरणें; निखारणें, विरळणें). ४ गाळ. 'मग दुःखाचेनि बरबटें बोंबलें । पाटीं मरणाचिये रेवे रेवले ।' –ज्ञा ७.८८. **रे(रें)वट, रे(रें)वठील**–वि. वाळूची; रेताड; वाळू असलेली; पुष्कळ खडे आहेत अशी(जमीन). **रे(रें)वठा**–पु. वाळूचा किंवा रेतीचा ढीग; रास. **रेंवडा**–पु. (कों.) १ वाळू; रेती. २ रेताड जागा; खडे असलेली जागा.

रेवचिनी, रेवच्चिनीचा—स्त्री. रेवाचिनी इ० पहा.

रेवड—स्त्री. १ कांबळें, घोंगडें इ०च्या दशा वळून, गुंफून किंवा दुसरें रंगीत सुत, रेशीम इ० भरून गुंफलेला गोफासारखा पट्टा. (क्रि० घालणें; वळणें). २ (कों) लपेट. ३ परवड.

रेवडावप—क्रि. (गो.) (फडका इ०) डोक्याला गुंडाळणें.

रेवडी—स्त्री. १ साखरेच्या किंवा गुळाच्या पाकांत तीळ घालून केलेली वडी. २ (ल.) फजिती; एखाद्याचा उडविलेला बोऱ्या; लाजिरवाणी स्थिति. [हिं.] **०उडणें–होणें**–फजिती होणें. 'धरली बेदरची वाट, रेवडी झाली ।' –ऐपो २३७.

रेवडी वळविणें–हवेलंडी उडविणें; फजिती करणें. **०वाणा-दाण**–स्त्री. पूर्ण फजिती. **रेवडया वळणें**–फजिती होणें.

रे(रें)वण—स्त्री. १ किल्ल्याच्या तटाच्या बाहेर किंवा खंदकाच्या बाजूला संरक्षणासाठीं उतरता मातीचा ढीग घालतात तो. (यावरून ल.) उतरण, घसरगुंडी. २ खंदक, विहीर इ० खांचा भरण्याची माती, दगड इ० भरताड. ३ रुतण; रुपण; दलदलीची जागा; भुसभुशीत जागा. [रेंव] **म्ह०** चढणीस घोडा रेवणीस रेडा. **रेवणी**–स्त्री. १ खंदकाच्या बाहेर घातलेली मातीची वरवंडी; रेवण. २ तटाखालीं खंदकाच्या पुढें जी थोडी जागा असते तीं. किल्ल्याच्या रक्षणार्थ ज्या बाहेर चौक्या असतात त्या येथेंच असतात. 'सावनूरकर नबाब याजकडील पठाण किल्ल्याचे रेवणीवर सतरंज्या हातरून वर बसवून तिरंदाजी करीत.' –हरिवंशाची बखर पृ. ९. ३ किल्ल्याच्या बाहेरील प्रदेश; परिखावलय. 'सभोंता खंदक मग रेवणी।' –अफला ४९.

रेवंणा, रेवण्णा—पु. लिंगाईतांचा देव. 'येक म्हणती रेवंणा कर्ता।' –दा १३.८.१४.

रेवणी—स्त्री. (कों.) माशाची एक जात.

रेवणें—अक्रि. १ (लिंत, खांब, विहीर इ०) खालीं दबणें; खालीं जाणें; आरणें; रेलण. २ चिखलांत अडकून पडणें; रुपणें; रुतणें. 'जेणें या न भवाख्यपंककुहरीं हे रेवती, दे वरा।' –मोकृष्ण ७३.६. ३ (नदी, विहीर, खड्डा इ०) होरणें; भरणें; माती, गाळ इ०नीं भरून येणें. ४ (दुखणें, कैफ, भूत इ०) अंगांत शिरून, भिनून राहणें; मुरणें. 'दुखणें आंगात चांगलें रेवलें आहे; बरेच दिवस औषध घ्यावें लागेल.' ५ एखाद्या ठिकाणीं अगर एखाद्या धंद्यांत पुष्कळ काळ रहाणें किंवा मुरणें; मुरब्बी बनणें. –सक्रि. (विहीर, खांच इ०) भरून काढणें.

रेवंत—पु घोडयावर बसून मृगया करणारी देवता. [सं. रमत्] –भाश्र १८३२.

रेवती—स्त्री. १ सत्ताविसावें नक्षत्र. २ बलरामाची बायको. ३ चमेलीच्या जातीचें एक झाड. ४ अधेली; अर्धा रुपया (बलरामास राम म्हणतात व रुपयाचें सांकेतिक नांव राम असल्यानें बलरामाच्या पत्नीचें नांव हें अधेलीकरितां सांकेतिक नांव झालें). [सं.]

रेवंद, रेवंदी चिनी—स्त्री. रेवाचिनी पहा.

रेवदंडी—वि. रेवदंडा येथील (रुपया).

रेवनी—स्त्री. (व.) रेवणी पहा. [रेवणी]

रेवलिआ—स्त्री. रेंव. [दे.]

रेवलें—वि. रुतण्याजोगें.

रेवस—न. एक झाड. [फा.]

रे(रें)वसळ—वि. रेताळ; रेताड; रेंवट; रेती असलेलें (स्थळ, जागा). [रेंव+शाला]

रेवसाम्ल—न. एक वनस्पतिजन्य अम्ल. (इं.) मॅलिक ॲसिड.

रे(रें)वा—पु. १ बारीक रेती; वाळू; बारीक खडे; धान्यांतील अगर साखरेंतील कचकच. २ गाळ; गाळसाळ. 'पोटांत अन्नाचा रेवा बसला.' ३ ढगांचा जमाव; ढगांची दाटी. ४ जमाव; सांचा; जमलेला किंवा सांचलेला गाळ. 'मोरीमध्यें रेवा बसला–जमला–भरला–दाटला.' ५ धुकें; खार. [रेंव]

रेवा—स्त्री. १ नर्मदा नदी. 'स्मराला सेवाया धरणिवरि रेवातट वसे।' –अकक २ रसमंजरी ३१. २ पृथ्वी. 'रेवा करी जो धवला करांनीं।' [सं.]

रेवा—पु. (संगीत) गायनशास्त्रांतील एक राग. या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, पंचम, कोमल धैवत हे स्वर लागतात. जाति औडुव–औडुव, वादी गांधार, संवादी धैवत, गानसमय सायंकाल.

रेवाचिनी—स्त्री. एक औषधी वनस्पती. चीन, हिमालय, पूर्वबंगाल व सीलोन येथील जंगलांत रेवाचिनीचीं (गांबोजचीं) झाडें आढळतात. झाड ६–७ हात उंच असतें. या झाडांतून पिवळा चीक येतो. त्यांतील पिंवळ्या राळमय द्रव्याला रेवाचिनीचा शिरा म्हणतात. यांत रेचकगुण आहेत. शिवाय याचा रंगाकडेहि उपयोग होतो. रेवाचिनीच्या मुळांचा औषधांत फार उपयोग होतो. [सं. रेचनी] **रेवाचिनीचा शिरा, रेवंदसार**–पु. रेवाचिनींतील राळमय पिंवळें द्रव्य. याचा रेचक, रंग व शिल्प यांमध्यें उपयोग होतो.

रेवाज—पु. रिवाज पहा.

रेवाडी जोडा—पु. मारवाडी साधा जोडा.

रेवांतकू—पु. (महानु.) सूर्याचा घोडा. 'रेवांतकू सांवळेयां आंगा।' –शिशु ५३१.

रेवाळ–ळें—न. १ वाळू; रेती; धान्यांतील कचकच; धान्य पाखडून, चाळून राहिलेली रेंव, गदळ इ० २ मुरूम; वाळूयुक्त जागा. ३ दाट धुकें; विरल ढग. (क्रि० धरणें; जमणें; पडणें; निघणें; विरळणें). **रेवाळ**–वि. रेती, माती, कचकच, वाळू इ० मिश्रललेलें; रेताळ; रेतीची. [रेंव]

रेवीपेवीं, रेवींटेवीं—क्रिवि. कांहीं इकडे सांडलें तिकडे सांडलें, कांहीं गुरानें खालें, कांहीं पोरांनीं उडविलें, कांहीं कुजलें, कांहीं गेलें इ० प्रकारांनीं अव्यवस्थेमुळें नासधूस होऊन (धान्य). [रेंव द्वि. किंवा रेंव+पेंव]

रेंवो—पु. (कु.) तांबडमाती; रेती. [रेंव]

रेश-शा—स्त्री. १ रेघ; रेषा. २ तंतू; आंब्यांतील धसकटें, केसर. ३ तंतुमयता. [सं. रेषा]

रेशीम—न. तुतीच्या किंवा एरंडाच्या पानांवर उपजीविका करणाऱ्या एका जातीच्या किडयापासुन निघणारा वस्त्रें इ० करण्याच्या उपयोगी असा धागा, दोरा, कृमिज तंतू. [फा. रेशम्-अब्रीशम्] ०भरणें-न. १ कापडावर रेशमानें नक्षी काढणें. २ (चांभारी) तजास रेशीम शिवणें. **रेशमाची आरी**-स्त्री. (चांभारी) रेशीम भरण्याचें हत्यार. **रेशमाची गांठ, रेशी (षि)मगांठ**-स्त्री. (पतिपत्नी, जीवात्मा व देह इ०मधील) कधींहि नष्ट न होणारा संबंध; जन्माची गांठ. २ सुखकर बंधन. 'जगन्निवासा कां अंतरलों रेषिम गांठिला।' -ऐपो ४१०. **रेशमाचा किडा**-पु. ज्या किडयांपासुन रेशीम मिळतें तो किडा. यांनां एकंदर चार अवस्थांतून जावें लागतें (१) अंडें. (२) अळी. (३) कोश व (४) पतंग. अळीची पूर्ण वाढ झाली म्हणजे तो किडा स्वतःला आपल्या तोंडांतून धागा काढून गुरफटवून टाकतो. हा धागा म्हणजेच रेशीम. **रेशमी**-वि. रेशमाचें. २ (ल.) रेशमासारखें मऊ; खरखरीत नव्हे असा. ३ रेशमासारखा; सौम्य; गरीब. **रेशमी कांठी, रेशीम काठी**-वि. कांठांस रेशीम घातलेलें; रेशमाचे कांठ असलेलें. **रेशमी गज**-पु. जमीन मापण्याचा गज. ह्यांची लांबी १८ तसु होती. रुमाली गज पहा. ०जोडा-पु. रेशमाचे कांठ असलेली धोतर जोडी. ०नारिंग-न. नारिंगाची एक जात. याची साल फार पातळ असते. ०मुसलमान-पु. मुसलमान योध्यांची एक जात. ह्यांना दंडाला रेशमी गंडा बांधून शत्रूवर सोडिले जात. ०संत्रा-पु. संत्र्याची एक जात. या जातीचे फळ कौला संत्र्यासारखें असतें. फळ अति लहान असुन त्यांत रस कमी व बिया पुष्कळ असतात. याचा तेल काढण्याशिवाय दुसरा उपयोग होत नाहीं. -उद्यम, मार्च १९३६. **रेशीमदोल**-सूत्रतंतु; रेशमाचे तंतु; रेशमी धागे.

रेषा—स्त्री. १ रेघ; रेखा; ओळ. 'ज्याला लांबी आहे परंतु रुंदी व जाडी मुळींच नाहींत त्याला रेषा म्हणावें.' -महमा १. २ तंतु. ३ भाग्यांतील घसकटें किंवा तंतुमय भाग. [सं.] ०उमटणें-उपटणें-भाग्याची रेषा स्पष्ट दिसूं लागणें; दैव उघडणें; अकल्पित रीतीनें भाग्य उदयास येणें. "शाहू महाराजांची कृपा म्हणण्यापेक्षां त्यांच्या दैवाची रेषा उमटून ते राज्यलक्ष्मीचा उपभोग घेऊं लागले म्हटलें तरी चालेल.' -मराठ्यांचे पराक्रम. ०ओढून देणें-काढून देणें-एखाद्याच्या वागणुकीला मर्यादा घालून देणें. ०काढणें-जंगलाच्या हद्दीवर पन्नास फूट जागा जाळणें. -बदलापूर ३२९. ०परिमाण-न. लांबी मोजण्याचें माप. मराठी:-अंगुलें, तसु, गज, दंड, काठी, कोस, योजन. इंग्रजी:-इंच, फूट, यार्ड, पोल, फर्लांग, मैल इ० ०मय-वि. रेषांनीं युक्त; रेषांनीं भरलेलें. ०वृत्त-न. विषुववृत्ताशीं लंब व दोन्ही ध्रुवांतून जाणारें वृत्त; याम्योत्तरवृत्त; माध्यान्हवृत्त. **रेषुं**-सक्रि. लिहिणें; रेखाटणें; चित्र काढणें. 'मग आदरीले चीत्र रेषुं।' -उषा २८.१५. [सं. लिख्]

रेषे—पु. (कों.) चिखल.

रे(रें)स—पु. १ आण्याचा पंचविसावा भाग; रुपयाचा ४०० वा भाग. २ एक पोर्तुगीज, 'तांब्याचें, एकपंचवीसांश आणा किंमतीचें नाणें. [पोर्तु. रीस] ०भर-वि. थोडासा; अत्यल्प; यत्किंचित्. (बहुधा निषेधार्थी प्रयोग होतो.) 'एक रेसभरहि मी इथून हलणार नाहीं.' -स्वप १८९.

रेस—स्त्री. घोडयांची शर्यत; घोडदौडीचा जुगार. [इं.]

रेसिडेंट—पु. संस्थानिकांच्या दरबारीं असणारा इंग्रज सरकारचा प्रतिनिधि. [इं.] **रेसिडेन्सी**-स्त्री. संस्थानांतील इंग्रज वकिलात.

रेहकणें—अक्रि. (व.) रेंकणें; म्हशीचें ओरडणें, हेल काढून कर्कश रडणें. [ध्व.]

रेहकला, रेहेकला—पु. रेकला पहा.

रेहकी, रेंगी—स्त्री. (ना.) बैलगाडी.

रेहटणें—अक्रि. (ना.) रेटणें; तडस लागेपर्यंत खाणें. २ चोप देणें; पछाडून पछाडून मारणें; चोपणें.

रेहटा—पु. (व.) विष्टेचा पोह; शेणाचा गोळा; फोतका.

रेहदेह—पु. (व.) हलगर्जीपणा; निष्काळजीपणा; हेळसांड. 'प्रकृतीची अशी रेहदेह करूं नका.'

रेहपट, रेहेपट, रेह्मपट—स्त्री. (ना.व.) थप्पड; जोराची चापट.

रेहू—स्त्री. एका जातीचा मासा. [हिं.]

रेहूस साहूस—पु. सर्दीमुळें घोडयाला होणारा रोग. यामुळें घोडा जमिनीवर निजला तर उठूं शकत नाहीं.' -अश्वप २.३००.

रेहेकला—पु. सुरुंग उडविण्याचें हत्यार. -पेशवेकालीन महाराष्ट्र ५३४.

रेळ, रेळचेळ, रेळणें—रेल, रेलचेल, रेलणें इ० पहा.

रेळरेट—वि. भरपूर; चिक्कार.

रेळा—पु. (कों) (रंग, साखर, मीठ इ० चा) ओघळ; पाझर. [रेळणें]

रैयत, रैयतावा—स्त्री.पु. रयत, रयतावा इ० पहा.

रैवत—पु. चवदावा मनु.

रैवस—स्त्री. रिवाज; रीत; समारंभ. [फा. रवेश]

रोऊळ—स्त्री. (हेट.) शेवाळी.

रोक—पु. एक माशाची जात. -प्राणिमो ८३.

रोंक—पु. रोंच पहा.

रोकड—स्त्री. १ नाणें: रोख पैसा; रोख रक्कम. २ सोनें, चांदी, रत्नें इ० ऐवज. [सं. राक; हिं.] **०बाजार**–पु. कंपनीचे शेअर बाजारांत विक्रय जाऊन तिचें भांडवल जमतें तें. **०बही**–स्त्री. कीर्दवही. **०कडा–ड**–वि. १ प्रत्यक्ष सोनें नाणें इ० रूप असलेला (ऐवज); रोख (रक्कम.); नगदी. 'कांहीं पैसा रोकडा । कळांतरें काढिला ।' –दा ३.४.१३. २ (ल.) रोख-ठोक; स्पष्ट; ताबडतोब; शंकाबाह्य; प्रत्यक्ष; मूर्तिमंत; साक्षात; धडधडीत (जबाब, शिवी, प्रत्युत्तर इ०). 'साधूच्या लंघनी होतो नीचाचा घात रोकडा ।' –मोअंबरीषाख्यान ७१ (नवनीत पृ. ३६९). ३ ताबडतोबीचा; लगोलगीचा. ४ –क्रिवि. आतां; इतक्यांतच; सध्यां; या घटकेला. 'तो मुक्ता घरीं गेला आहे त्यापेक्षां रोकडा आठ चार दिवस तर येत नाहीं.' **०जबाब**–पु भीड-मुरवत न बाळगतां स्पष्ट शब्दांनीं दिलेलें उत्तर. **रोकडी कारकून**–पु. खजिन्यावरचा कारकून. **रोकडी हुंडी**–स्त्री. दर्शनी हुंडी; दिल्याबरोबर पैसे मिळतील अशी हुंडी. **रोकडोबा**–पु. एक ग्रामदेवता (ताबडतोब नवसाला पावतो म्हणून हें नांव) हा पुण्याजवळ भांबुर्ड्याला आहे. **रोकड्या**–पु सावकाराचा किंवा सराफाचा खजिनदार; प्रवासांत सराफाचे पैसे बाळगणारा.

रोंकणी, रोकर्णे, रोंकर्णे—रोंखणें, रोखणी, पहा.

रोकवणी—न. (कों.) विटाळ झाला असतां एकवार स्नान करून पुन्हां शुद्धयर्थ लोकीवरून घ्यावयाचें पाणी.

रोकाण—न. (गु.) हरकत; अडथळा; रोखण.

रोख—पु. रोष; राग; क्रोध. 'मग बोले क्षण याया रोखातें ।' –मोवन ४.१६१. [सं. रोष]

रोख—वि. १ रोकड; नगदी रुपये, शेन इ० (ऐवज.) २ तयार; प्रत्यक्ष; उधार न ठेवतां प्रत्यक्ष दिलेला. 'पैसा रोख, माल चोख.' ३ (ल.) रोखठोक; तात्कालिक; तयार; चलाखीचें, तरबेज (उत्तर, जबाब इ०). [सं. रोक] **०ठोक**–वि. १ जिन्नस विकत घेतला तेव्हांच देण्याचा-दिलेला; उधारीचा नसलेला; ताबडतोब, तेव्हांच दिलेला. 'रोखठोक पैसा दिला म्हणजे जिन्नस स्वस्त मिळतो.' २ (ल.) निर्भीडपणाचें, खरें; चलाखीचें; ताबडतोबीचें (उत्तर, मुद्दा इ०) –क्रिवि. निर्भीडपणाचें; आंत बाहेर न ठेवतां. 'काय तें रोखठोक बोलावें. मागें कुरकुर कामाची नाहीं.' [रोख+ठोक] **०रक्कम**–स्त्री (जमाखर्च) ज्या रकमेचा ऐवज शिलकेंत प्रत्यक्ष पडतो किंवा होतो ती. **०विक्री**–स्त्री. १ उधार न ठेवतां केलेली विक्री; पैसे घेऊन केलेली विक्री. २ विकून ताबडतोब मिळालेला पैसा; रोखीच्या सौद्याचा पैसा.

रोंख—पु. १ झोंक, वळण: नेम: दिशा: कल; भाव; ध्येय; झांक, 'निघाला झोंगल भागानगरचा धरला रोंख ।' –ऐपो २६०. २ कटाक्ष; रागावून लावलेली टक. ३ (ल.) धोरण; उद्देश; हेतु; बेत; मन. 'वरील पक्षाचा एकंदर रोंख जुन्या मतांविरुद्ध आहे.' –नि ५६१. ४ (कुस्ती) डाव करणाऱ्याचा डाव चालू न देणें ही क्रिया. [फा.] **रोखण, रोंखणी**–स्त्री. १ रंधा; लांकूड तासून सपाट करण्याचें हत्यार. २ रंध्यानें लाकूड तासणें; रंधणें; रोंखणें. [हिं.] **रोखणें**–सक्रि. १ दाखविणें; नेम धरणें, बंदूक, तोफ इ० चा विवक्षित लक्षाकडे रोंख करणें. २ सपाट करणें; समपातळींत आणणें; रोंखणीनें साफ करणें. [रोंख] **रोंखणें**–सक्रि. सारख्या नजरेनें लक्ष लावून पाहाणें; न्याहाळणें; निरीक्षण करणें; हेतु धरून टक लावून पहाणें. 'दृष्टी कार्मुक रोंखिलें मग मदें तेणें हळू लेखिलें ।' –आसी ४०. **रोखून पाहाणें**–१ टक लावून पहाणें; एखाद्या वस्तूकडे एकसारखें पहात राहणें; एखाद्या वस्तूवर सारखी नजर ठेवणें. २ नेम धरणें; निशाण धरणें; नेम लावणें.

रोंखणें—सक्रि. १ अडविणें; थांबविणें; अडवून धरणें; पुढें येऊं न देणें; प्रतिरोध करणें; ग्रासणें. 'मृत्यूनें जननास वार्धकपणें कीं यौवना रोखिलें ।' –वामन, स्फुट श्लोक ६५ (नवनीत पृ. १४१). २ व्यापणें; ताब्यांत घेणें; घेरणें. [हिं.] **रोखून धरणें**–पुढें येऊं न देणें; अडवून धरणें, अडचणीच्या जागीं अडविणें–गांठणें; कोंडून धरणें.

रोखा—पु कर्जखत; कर्ज घेतल्याचा लेख. २ दस्तऐवज; करारनामा; करारपत्र; लेख; कागद; पत्र. 'अछुनी वरि तन्ही रडे तीचा फाडुनि टाका रोखा हो ।' –मध्व ५५. ३ आज्ञापत्र; साऱ्याचा अथवा माल पुरवट्याचा सरकारी हुकूम; करारमाफक तगादा व वरात काढणें तें; मागणीपत्र; ताकीदपत्र; जरूरीचा हुकूम. 'त्यांनीं महाराजांस न भेटतां स्वार व रोखा गेला. ...' –मराचिथोशा १२. [अर. रुक्आ] **रोखेबाजार**–पु. रोखे व भाव यांची देवघेव पद्धतशीर रीतीनें होण्यासाठीं मोठमोठ्या शहरांतून त्यांचे विशिष्ट बाजार निर्माण होतात व ज्यामध्यें ऋणलेखांची खरेदीविक्री चालते अशा बाजारविषयक संस्था. (इं.) स्टॉक एक्स्चेंज. –काळेकृत व्यापारी उलाढाली. **रोखारोखी**–स्त्री. उधारी न ठेवतां मालाची रोख किंमत घेऊन केलेला व्यवहार. 'उधारीपेक्षां रोखारोखींत सुख आहे.' –क्रिवि. १ रोखीनें; उधार न ठेवतां (एखादा व्यवहार करणें). २ ताबडतोब; एकदम; जलदीनें; तेव्हांच (बोलणें, करणें). [रोख द्वि] **रोखी**–स्त्री. १ ताबडतोब पैसे देऊन किंवा घेऊन केलेला व्यवहार; उधार न ठेवतां केलेला व्यवहार. 'आम्ही काय बाजारांत घेणें तें रोखीनें घेतों, उधार करीत नाहीं.' २ नाणें; पैसा; नगदी. (पैशाचा व्यवहार याअर्थी). 'कापड, किराणा ह्याचे उदमापेक्षां रोखीचे उदमास योग्यता अधिक.' (ह्या शब्दाचा रोखीचा, रोखीनें इ० प्रत्ययांत रूपांतच विशेष उपयोग होतो).

रोंखारोखी—स्त्री. समक्षासमक्ष भेट; बोलाचाल. 'त्याची माझी आज रोंखारोखी झाली.' [रोंखणें द्वि.]

रोग—पु. (खा. भिल्ली) १ राग. २ रंग.

रोग—पु. १ मोठें दुखणें; आजार; प्रकृतींतील बिघाड; शरीरप्रकृतींत उत्पन्न होणारी विकृति. २ शरीर प्रकृतींत बिघाड उत्पन्न करणारें कारण. 'त्याचें पोट दाबून पाहिलें, चांगला आंब्या-एवढा रोग हाताला लागला.' ३ (फळांफुलांतील) नासका अगर किडका भाग; रोगोत्पादक किंवा प्रकृतींत बिघाड करणारा भाग. 'अगस्त्याचे फुलांतील मधली काडी तो रोग आहे, तो काढून टाक.' ४ विकृतिकारक पदार्थ; रोगकारक वस्तु, अन्न इ० 'हे धडधडीत किडके तांदूळ दिसतात आणि पैसा खर्चून हा रोग कशाला आणिलास?' ५ दुसऱ्याचें चांगलें पाहून होणारें दुःख किंवा त्रास; ज्यामुळें अंतःकरणास व्यथा होते असा रोग (चिंता, मत्सर इ०). ६ तिरस्करणीय, घाणेरडा, रोगट, कुसकट पशु किंवा मनुष्य. [सं. रुज्=रोग होणें] **०ग्राम**—पु. रोगाचें वसतिस्थान; शरीर. **०निदान**—न. रोगाची परीक्षा; कोणता रोग झाला आहे हें ठरविणें. **०भावना**—स्त्री. रोगांची लक्षणें; उदा० क्षयरोग-भावना; पित्तज्वरभावना; पांडुरोगभावना. २ लक्षणें दिसू लागलीं आहेत असा रोग. ३ रोगपरीक्षा; रोग ठरविणें. ४ पिशाचबाधा. **०मल्ल**—पु. सदां रोगी; रोग व दुखणीं यांनीं जर्जर झालेला मनुष्य; **रोगिष्ट माणूस. ०मसाला**—वि. (ना.) रोगानीं जर्जर झालेला; रोगेल; मरतुकडा (तिरस्कारार्थी उपयोग). **०राई**—स्त्री. १ लहानमोठे रोग; दुखणींपाखणीं. २ वाईट गुण; उपद्रवकारक धर्म; विकृति उत्पन्न करणारे एखाद्या वस्तूचे गुण. 'ताकाला ठिकरी दिली म्हणजे त्याची रोगराई चट जाते.' [रोग+राई. सं. राजि=ओळ] **०लक्षण**—न. १ एखाद्या दुखण्याचीं लक्षणें; रोगाची भावना. २ रोगाचीं पूर्वसूचक लक्षणें; होणाऱ्या रोगाचें सूचक चिन्ह. **रोगवणी**—न. १ रोगाचीं बीजें बरोबर वाहून नेऊन कोठा स्वच्छ करणारें रोग्याच्या पोटांतून बाहेर पडणारें पाणी, मल, ओकारी इ० २ भाजीपाल्यांतील शिजवून किंवा आंबवून काढलेला अहितकर रस, पाणी. ३ रोग आणणारा पाऊस. उदा० आश्लेषा नक्षत्राचा पाऊस; पिकावर रोग आणणारा पाऊस. [रोग+पाणी] **०वारें**—न. रोगराई; क्षुल्लक दुखणें. 'समर्था कदा रोगवारें नकोरे.' **–वेसीस्व** (प्रस्तावना १२). **०वेळ–ळा**—स्त्री. तीस घटकांपैकीं विशिष्ट ३॥ घटका. वेळ शब्द पहा. **रोगट**—वि. १ रोगानें किंवा दुखण्यानें पछाडलेला; आजारी. २ खुरटलेला; मुरडलेला; रोग झालेला (भाजीपाला, फळें इ०) **रोगटणें**—अक्रि. १ रोग होणें; विकृति जडणें; आजारी पडणें. २ (झाड, वेल, फळ, फूल इ०) खुरटणें; मुरडणें; कीड लागणें. [रोगट] **रोगणें**—अक्रि. (कों.) रोगानें झिजणें; क्षीण होणें; रोड होणें. **रोगपणें**—अक्रि. रोगानें पीडणें; रोग होणें. 'नव्हे पचपचीत तनु रोगपली.' –प्रला २१९. **रोंगा**—वि. (राजा.) १ रोडका; कृश अंगाचा; रोगट; आजारी दिसणारा. २ सुकट व आंबट चेहऱ्याचा; रुसलेल्या चेहऱ्याचा. **रोगडया–ळ्या**—वि. आजारी, रोगानें झिजलेला; अशक्त; नाजूक प्रकृतीचा; रोड. **रोंगाळणें**—अक्रि. १ रोगट असणें, होणें; अजारानें अशक्त होणें. २ रेंगाळणें; झिजणें. [रोंगा] **रोगिष्ट–ष्ठ**—वि. रोगी; आजारी; कांहीं तरी रोग जडलेला; सतत आजारी; रोगट शरीराचा. [सं. रोगिष्ट] **रोगी, रोंगिया**—वि. (काव्य) १ ज्याला पंडु, क्षय, दम, कुष्ठ, मेह इ० चिरस्थायी रोग जडला आहे असा; रोगिष्ट; प्रकृतिस्वास्थ्य बिघडलेला; आजारी; दुखणाईत. 'का जिव्हालंपट रोगिया । अन्नें दूषी धनंजया ।' –ज्ञा १८. १३६. २ अहितावह; अपथ्यकर; रोगकारक. **रोगीण**—स्त्री. देवीची भक्तीण. या नेहमीं आजारी असतात. भावीण पहा. **रोगेणें, रोंघणें**—अक्रि. (राजा. कों.) रोगणें पहा. **रोगेल, रोगेला, रोगलेला, रोग्या**—वि. रोगट; नाजूक प्रकृतीचा; रोगिष्ट; सदा रोगी; रोगाडया. **रोगो**—वि. (कु.) आळशी.

रोगण—न. १ तेलिया रंग; तेल, राळ, मेण इ० चें चिकट मिश्रण; व्हार्निश. हें लाकडास लाविल्यानें लांकूड पाण्यानें भिजत नाहीं व तकाकित दिसतें. २ वरील चिकट मिश्रणाचें माखण; तेलिया रंगाचा हात; व्हार्निसचें सारवण. [फा. रौघन्] **रोगणी**—वि. ज्याला रोगण लाविलें आहे असा; रोगणानें माखलेला; तेलिया रंग दिलेला. 'रोगणी भिंती लखलखाट वर तय्यारी.' –प्रला ९२. **रोगणी रोटी**—स्त्री. फत्तीरी रोटीचा प्रकार. –फत्तीरी रोटी पहा. –गृशि २.१७.

रोगन, रोगान—न. चरबी; तेल; तुपासारखा पदार्थ. हा पदार्थ इराणांत चौंहोंकडे मिळतो. ह्याचा उपयोग भाताबरोबर व रोटीबरोबर खाण्याकडे करतात. –सारसंग्रह २.२३२. [फा. रौघन्]

रोगोत—न. (भिल्ली, खा.) रक्त. 'कोहुडतां कोहुडतां रोगोत निग्यो.'

रोंगोपाग—न. (राजा. कोळी) घनपागहून लहान व बारीक मासे पकडण्याचें जाळें. [रोंगा+पाग]

रोंघावणें—अक्रि. (व.) रेंगाळणें; हळू हळू चालणें.

रोचक—न. पादेलोण. –वि. १ रुचिकर; अन्नाला रुचि किंवा चांगला स्वाद आणणारा; चवदार. २ तोंडाला रुचि उत्पन्न करणारा; जिभेला गोडी आणणारा. [सं.] **०ता**—स्त्री. आवड; गोडी. 'अत्यंत जें रुचिर रोचकतेस आलें.' –सारुह ६.७४. **रोचन**—न. १ स्वाद; गोडी; रुचि उत्पन्न करण्याचा गुण. २ रमणीयता; स्वादामुळें उत्पन्न झालेला मोहकपणा, आनंद. ३ गोरोचनाचें संक्षिप्त रूप. [सं.] **रोचना**—स्त्री. १ रुचिकरपणा; चवदारपणा; गोडी. २ रमणीयता; सुखदायित्व. **रोचष्मती**—स्त्री. रुचि; आसक्ति.

रोंखणें—सक्रि. टोंचणें; भोसकणें; खुपसणें. –अक्रि. शिरणें; घुसणें; रुतणें; बोंचणें.

रोचिस्—न. (काव्य) प्रकाश; प्रभा; तेज; उज्ज्वलता; प्रभाव. [सं.]

रो(रौ)ज—न. (गो.) झेंडूचें फूल.

रोज—न. (नाविक) गलबताच्या बांधकामास लागणारें प्रारंभींचें मुख्य लांकूड. हीं रोजें दरेक गलबतास दोन असतात, एक मागें व दुसरें पुढ. पुढील रोज हें मुख्य होय.

रोज—पु. १ दिवस (२४ तास); अहोरात्र. 'तीन रोज मुर्दा राहिला अझुनि कांहीं हेतू नाहीं पुरला।' –ऐपो १६४. २ दिवसाची मजुरी; एका दिवसाचा पगार. 'सदूला बारा आणे रोज मिळतो.' २ सरकार किंवा सावकार इ० कांकडील तगादार आला असतां त्याचा आपल्याकडून खोळंबा होऊन दिवस मोडल्यामुळें त्याला द्यावें लागणारें द्रव्य. -क्रिवि. प्रत्यहीं; प्रतिदिवशीं; **दररोज**; प्रत्येक दिवसाला. 'बकासुर रोज गांवकऱ्यांकडून गाडाभर अन्न घेत असे.' [फा. रोझ्] **म्ह०** रोज मरे त्याला कोण रडे. =तीच तीच गोष्ट वारंवार होऊं लागली म्हणजे तिच्यांतलें स्वारस्य जाऊन तिजकडे दुर्लक्ष्य होतें. सामाशब्द– **०करी**–पु. रोजच्या बोलीनें कामावर ठेवलेला गडी. **०काम**–न. १ दररोजचें काम. २ प्रत्येक दिवसाचें काम ज्यांत टिपून ठेवलेलें असतें ती वही; डायरी. 'त्या दिवशींच्या रोजकामांत उल्लेख...' –ऐरापुप्र २. ११६. **०कीर्द**–स्त्री. १ दिनचर्या; डायरी. २ रोजचा जमा व खर्च; रोजच्या रोज जमाखर्च लिहून शिल्लक काढतात ती कीर्द; रोजचा जमाखर्च ठेवण्याची वही; रोजखर्डा. ३ रोजच्या गरजा; कुटुंबपोषणादि कामांस नित्य लागणारा खर्च; कुटुंबाच्या नित्य गरजा पुरविणें. (क्रि० चालणें.) 'रोजकीर्दी जमा धरुनी सकळ। खताविला काळ वरावरी।' –तुगा१८९४. [फा.] **०कीर्दवही**–स्त्री. रोजच्या हिशोबाची वही. **०खरडा-खर्डा**–पु व्यापाऱ्याचें रोजच्या व्यवहाराचें टांचण; रोजचें कच्चें टांचण; रोख विक्रीचें कच्चें टांचण. [रोज+खर्डा, सिं. खरिडो] **०गार**–पु. १ धंदा; चाकरी; नोकरी; उद्योग; पोट भरण्याचें किंवा निर्वाहाचें साधन; पैसा मिळविण्याचा उद्योग. 'आतां शेतकीच्या रोजगारांत जीव राहिला नाहीं.' २ कोणताहि उद्योग; काम. 'त्याची गोष्ट यापाशीं सांगणें व याची त्यापाशीं सांगण असला रोजगार आम्हाला होत नाहीं.' [फा] **०गारशीर**–वि. धंद्या-उद्योगांत पडलेला; नोकरी असलेला; चाकरमान्या. **०गारी**–वि. १ नोकरी असलेला; उद्योग असलेला; नोकर. २ व्यापारधंदा किंवा अन्य व्यवसाय करून पोट भरणारा. **०गुजारा**–पु. रोजच्या गरजा भागवून दिवस ढकलण. (क्रि० करणें; होणें; चालणें). [फा.] **०गुदस्त-स्तां**–क्रिवि. काल; आदल्यादिवशीं (जमखर्चांतील शब्द) [फा.] **०दार, रोजनदार, रोजं(जिन)दार**–पु. रोजमुऱ्यानें काम करणारा; मजूर. **रोजंदारी, रोज(जि)नदारी**–स्त्री. रोजची मजूरी; रोजच्यारोज केलेल्या कामाबद्दल दिलें जाणारें वेतन. **रोजदुकू**–पु. (राजा. कुण.) रोजमुरा. **०नामा**–पु. (कायदा) एखाद्या फिर्यादीचें किंवा कोर्टाचें रोजच्या कामाचें टांचण, टिपण. **०नामा-निशी-नामचा**–पुस्त्रीपु. १ रोजकीर्द; रोजच्या जमाखर्चाचें टिपण. २ रोजची हकीकत लिहिण्याची वही; डायरी; रोजच्या कामाचें टिपण; दिनचर्या; दैनंदिनी. [फा.] **०मजुरी**–स्त्री. दिवसाचा पगार; दिवसाचें वेतन. **०मजुऱ्या**–वि. रोजानें काम करणारा; दिवसाच्या कामाची त्याच दिवशीं मजुरी घेणारा; दिवसाच्या कामाची मजुरी ठरवून काम करणारा. **०मरा-मारा-मुरा-मुऱ्हा. रोझमरह**–पु. मजुरी; मुशाहिरा; दिवसाचें वेतन; पगार. 'तमाम फौजामिळोनि दिले रोजमुरे त्यांशीं।'–ऐपो २७५. **०मेळ**–पु. १ रोजच्या जमेचा व खर्चाचा मेळ. २ रोजकीर्द; रोजचा रोखीचा व्यवहार नोंदण्याची वही; रोजखर्डा. **०रोज**–क्रिवि. प्रत्यहीं; दररोज. **०वडा**–पु. (कारकून लोकांत रूढ) दिवसाचा हिशेब; एका दिवसाचा जमाखर्च. **०वारी**–स्त्री. रोजच्या कामाच्या हिशेबाचें पुस्तक (माहेवारी, साल्वारी इ० प्रमाणें हा शब्द सारावसुली खात्यांत रूढ आहे). **रोजारोजी**–स्त्री. १ रोजमजुरी; प्रत्येक दिवशीं मिळणारा दिवसाचा पगार; मजुरी. 'रोजारोजी करून पोट भरतों.' २ हातावरचें पोट; रोज मिळवून रोज खर्च करणें. 'मी रोजारोजींत आहें.' –क्रिवि. मिळवावें आणि खावें अशा रीतीनें. 'मी काय उत्पन्नभक्षी नाहीं, माझा निर्वाह रोजारोजी आहे.' [रोज द्वि.] **रोजिदार, रोजिनदार, रोजिनदारी**–रोजनदार, रोजनदारी इ० पहा. **०उठून**–क्रिवि. प्रत्यहीं; रोजच्या रोज; दररोज. 'आम्ही रोजउठून तुम्हांला ताक कोठून पुरवावें?' **रोजचा**–वि. नित्याचा; नेहमीचा. **रोजचे रोज**–क्रिवि. दररोज; प्रत्येक दिवशीं; नित्य. **रोजि(जी)ना**–पु. रोजची मजुरी; मुशारा. –वि.क्रिवि. दररोज; प्रत्येक दिवशीं. 'रोजीना चार हत्तीस पंचवीस रुपये खर्च.' –ख २. ५४०. [फा. रोझीना] **रोजी**–स्त्री. १ कुटुंबाचा एक दिवसाचा खर्च; रोजचा खर्च. २ दिवसाचें वेतन; पगार; मजुरी. ३ (ल.) दुसऱ्यापासून रोजच्या रोज मिळणारी वस्तु; रोजचा भत्ता; रोज मिळणारें अन्न. ४ मोहरमांत फकिरास केलेला धर्म; भिकाऱ्यास दिलेला पैसा. [फा.] **रोजीवाला**–वि. रोजची नेमणूक, मजुरी, भिक्षा मिळविणारा; रोजगारी.

रोजआंवळी-ळो—स्त्रीपु. (गो.) रायआंवळी; रायआंवळ्याचा झाड व त्याचें फळ.

रोजना—स्त्री. रुदन; रडणें; शोक. 'तुम्ही कोठें गेल्यावर मी करीते रोजना।' –होला १६९. [सं. रोदन]

रोजमरी—स्त्री. वासाच्या पानाचें झाड. –बागेची माहिती १०४. [इं.]

रोजह—पु. बाग. रियाज पहा. –आदिलशाही फर्मानें.

रोजा—पु. मुसलमानांतला उपवास; निरशन. रमजान महिन्यांत मुसल्मान लोक हे उपवास करतात. या उपवासांत सुर्योदयापूर्वी व सुर्यास्तानंतर जेवणाची मुभा असते. [फा.] **रोजदार**–पु. (ना.) रमजान महिन्यांत उपवास करणारा मुसल्मान.

रोजी—स्त्री. (गो.) घास; घांस.

रोजी—पु. (वडोदें) तीन वर्षें टिकणाऱ्या झाडाचा कापूस. –कृषि ३८५.

रोझा-जा—पु. १ समाधिमंदिर; दर्गा; थडगें. २ बाग (औरंगाबादेजवळ रोझा नांवाचें जें गांव आहे तेथें मूळची बाग होती). [अर. रौझा]

रोझीनह—क्रिवि. रोजीना; प्रत्यहीं [फा.]

रोझेल—स्त्री. आंबाडीची एक जात. (तांबडी आंबाडी).

रो(रौं)ट, रोटगा, रोडगा—पु. कणकेचा भाकरीसारखा जाड व भाजलेला गोळा; जाड भाकरी; जाड, मोठी भाकर. [हिं.; फा. रोटिलो] **रोटपाट**–पु. (खा.) पोळपाट. **रोटक-का**–पु रोटी; भाकरी. **रोटा**–पु १ भाकरी; जाड व मोठी पोळी. २ आंबलेला युरोपियनांचा पाव. [हिं.] ३ अन्न; पोटापाण्याची चिंता. **रोटिगा**–पु. रोडगा; रोटगा. ' कांदेभरित रोटिगे केले । ' –दावि २८. **रोटो**–स्त्री. पोळी; चपाती; पाव; कणकेची भाकर. [दे. प्रा. रुट्टिया, रोट्टग; हिं. रोटी] **०मागणें**–(महानु.) घांसदाणा मागणें (एक प्रकारचा कर). ' रोटीमागे सातें पातळीं । ' –शिशु १६२. **०पात्र**–न. चपाती किंवा भाकरी खाण्याची थाळी. ' कीं राव घेऊन रोटीपात्रा । भोजन करी श्लाघ्यत्वें । ' –नव २१.१९. **०पीर**–पु. पिराचा प्रसाद. ' रोटीपीर पाठविला । ' –ऐपो १४. **० व्यवहार**–पु. एकमेकांच्या हातचें खाणें; अन्नव्यवहार. **०सुटी**–स्त्री. भरीतरोडगा. ' बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाठीं देव । ' –तुगा ७९१. **रोठ**–पु केशर, साखर, बदाम, दूध इ० घालून केलेली रव्याची जाड पोळी.

रोटी-ठी—स्त्री. फुलें येणारें झुडुप.

रोंटी-डी—वि. (ना.) खेळांत लबाडी करणें किंवा चिडणें.

रोठ—पु. विरोध. –मनको.

रोठा-टा–पु. नारळाच्या झाडास लागणारा किडा. हा नारळाचें झाड खोडांतून खराब करतो. –कृषि ७५७.

रोंठा-टा, रोंठी-टी—पुस्त्री. पिकून तयार झाल्यावर झाडावरून काढलेली सुपारी; मोठी पांढरी सुपारी. ' क्षीर न खाय खळाची प्रभु विदुराच्याचि जेवितोचि कण्या । आवडतिच्या सुपाऱ्या रोठ्या बरड्या, नव्या जुन्या चिकण्या । ' –स्फुट आर्या.

रोंठेलाट, रोंटेलाट—स्त्री. (क.) १ दुसऱ्याला फसवितांना स्वतःच फसणें; दुसऱ्याला खड्ड्यांत पाडतांना आपणच त्यांत पडणें (हा शब्द एका सुपाऱ्यांच्या व्यापाऱ्याच्या मूर्खपणाच्या कृत्यामुळें रूढ झाला. गिऱ्हाइकाला चांगल्या सुपाऱ्यांच्या ऐवजीं वाईट सुपारी देतांना, चांगली घेऊन शिवाय त्यानें वाईट सुपारीहि मोफतच दिली. व अशा तऱ्हेनें तो फसला. यावरून वरील अर्थ रूढ). २ अतिशयपणा; वैपुल्य; उंघळेपणा.

रोठ्या—वि. (व.) मूर्ख, धडधाकड परंतु मंद; ठोंब्या. (मनुष्य).

रोड—पु. मोठा रस्ता. ' मुंबई रोड, टिळक रोड इ० ' [इं.]

रोड, रोडका-गा—वि. कृश; बारीक; क्षीण; वाळलेला; शेलाटा; फाटक्या अंगाचा; रोडावलेला. ' जें स्थूल वा रोड । ' –विपू २.३८. [सं. रुद्=रडणें; रुद्रः–रुड्रः–रोड (=रडका, वाळलेला, आसवें ढाळणारा. –भाअ १८३३; का. रोडि] **०मल्ल**–पु. (विनोदानें) अत्यंत कृश मनुष्य. [रोड+मल्ल] **रोडगेला**–वि. साधारण रोडका; जरासा काटकुळा; बारीकसा. **रोडणें, रोडावणें, रोडेणें, रोडेजणें**–अक्रि. (राजा.) (काव्य) रोड होणें; कृश होणें; वाळण; सुकून जाणें; खराब होणें. ' शरीर अत्यंत रोडलें । तें सूर्यनारायणें रक्षिलें । ' **रोडिकेंपण**–न. (महानु.) कृशता; क्षीणता; बारीकपणा. ' काई पुसों रोडिकेंपण । ' –शिशु १२०. **रोड्या, रोडा**–वि. (निंदेनें) कृश; अशक्त; फाटक्या अंगाचा; बारीक.

रोडकी—स्त्री. कोकिळेच्या जातीचा एक पक्षी.

रोडगा—पु रोटगा; रोट. आठ भाग गव्हाचें पीठ व एक भाग हरभऱ्याचें पीठ घेऊन त्यांत ओवा, हिंग, मीठ, तूप घालून त्याची जाड पोळी निखाऱ्यावर भाजली म्हणजे हा रोडगा होतो –योर १ ७५.

रोंडनारो—वि. (खा. भि.) तोडणारा. ' एक लाकडें रोंडनारो खाडी तेडी लाकडे रोंडतलो... ' –भिल्ली १५.

रोडा—पु. रक्तरोडा (वनस्पति) पहा.

रोडा—पु. भाजलेल्या विटेचा तुकडा; दगडाची कपरी; [हिं.] **रोडी**–स्त्री. १ विटांचे, दगडाचे तुकडे; रस्त्यासाठीं खडी. २ बारीक बारीक दगडांचा ढीग; रास; दगडधोंडे.

रोंडी—स्त्री. (ना) रडी; चिडणें. रडी पहा. ' असत्याची खाईल जे रोंडी । तिजवर पडो आकाशाची धोंडी । '–मध्व १६८.

रोणदिवी—स्त्री. (प्र.) रोवणदिवी पहा.

रोणसो—वि. (गो.) रोडका; कृश.

रोंत-थ, रोंत(थ,णें—रोवंथ, रोवंथणें पहा.

रोती सुरत—स्त्री. रडकी मुद्रा; रडवा, दुःखी चेहरा, तोंड (कधीं हसतमुख नसणाऱ्याबद्दल योजतात). [हिं.]

रोद्द—स्त्री. विना. (महानु.) बंदराचें किंवा देशाचें नांव. 'रोद्देचीं सोने खैरीं।' –दाव २८०.

रोदन—न. रडणें; शोक; रुदन. 'न साहे वियोग करिती रोदना। भ्रमिष्ट भावना देहाचिया।' –तुगा १०९. [सं.]

रोदा—पु. आंतड्याची केलेली तांत; सांब; तार. [फा. रूदा]

रोद्द—पु. (खा.) रोज. 'ती रोद्दिही हाकाली उठीने...' –भिल्ली २७. [रोज; तुल० सं. रौद्र; प्रा. रोद्द=अहोरात्रीचा पहिला मुहूर्त]

रोध—पु. १ विरोध; अडथळा; प्रतिबंध; अटकाव. 'तैसें धृतिरोधें तया। पांचांही केलें।' –ज्ञा १८.१०१५. २ विरोध; शिरकाव न होऊं देणें; भरून गेल्यामुळें बंद होणें. उदा० द्वाररोध, मार्गरोध. [सं.] **रोधणें**–सक्रि. १ (वाट, रस्ता) बंद करणें; अडविणें. 'उठा, एकीकडे बसा. कोणी सोंवळ्यानें जाणार येणार त्याची वाट रोधूं नका.' २ प्रतिबंध, अडथळा आणणें; विरोध करणें; कोंडणें. 'तपोबळें स्वसामर्थ्यें। अर्धपथीं रोधिला।' –मुआदि ११.१३३.

रो(रों)प-पा—नपु. १ लहान झाड; कोंवळें झाड. 'कीं संतोषतरूचें रोप। थांवलें जैसें।' –ज्ञा ६.२५६. २ बीं पेरून रुजल्यानंतर उपटून व्यवस्थित लावावयाचें रोप. २ (ल.) पुढें मोठें होणारें व सध्यां लहान व नुकतेंच जन्मलेलें किंवा उत्पन्न झालेलें आशास्थान. 'चंद्रवंशाचें हें रोप।' –र २२. **रोपटा-डा**-पु. लहान, फोफावणारें परंतु उपटून दुसरीकडे लावतां येण्याजोगें (आंबा, फणस इ० चें) झाड. –शके १२८९ चा नागांव शिलालेख. **रोपटा**-पु. रोप तयार करण्याकरतां भाजून, खणून इ० प्रकारें तयार केलेली जागा. **रोपटें-डें**–न. फुलझाडाचें किंवा भाजीपाल्याचें रोप; लहान झाड. **रोपण**–न. १ लावणी; पेरणी. २ बीजसंभव; आरोपण; आधान. 'गर्भी प्रभुचें पाहुनि रोपण। तेव्हांच केला दुर्घट हा पण।'–ऐपो २०९. २ दूषण लावणें; आरोप करणें; दोष देणें. **रोपणें**-उक्रि. (काव्य) १ (झाड) लावणें; पेरणें; रोवणें. २ खुपसणें; खोंबसणें; घुसविणें; रोवणें. –अक्रि. घुसणें; आंत जाणें; शिरणें; शिरकणें. **रोपदळ**–न. (कों.) नारळ–सुपारीचीं रोपें; लहान झाडें (दुसरीकडे उपटून लावण्या योग्य अशीं). 'आमचे वाडींत रोपदळच बहुत आहे, झिंटें नाहींत.' **रोपलावणी**–स्त्री. (हेट.) काढलेलें रोप शेतांत योग्य खत घालून व चिखल करून लावणें. **रोपा**–पु. १ (सामा.) रोप पहा. २ (कों.) नारळ येण्यापूर्वीचें नारळाचें झाड; माडा. **रोपाचें भात**–न. लावणीचें भात; रोपें लावून आलेलें भात; **रोपी**–स्त्री. (कों.) रोप; सुपारीचें लहान, कोंवळें झाड (सुपाऱ्या येण्यापूर्वीचें).

रोप—पु. बाण. 'दुर्योधननृप मूर्छित केला भेदुनि उरांत रोपानें।' –मोभीष्म ४.१. [सं.]

रोपित—न. दोषारोप; (क्रि० करणें) –वि. लावलेलें; पेरलेलें (बीं); स्थापित. [सं. रोप]

रोपीटोपी—वि. (बालभाषा) चिमुकलें; लहानसें; इवलेसें. [टोपी?]

रोप्य—न. चांदी: रुपें. –वि चांदीचें; रुप्याचें. [सं. रौप्य] **०मुद्रा**–स्त्री. चांदीचें नाणें; रुपया.

रोब, रोआब—पु. धाक; दरारा; सलाबत; रुबाब. 'तेव्हां हे शकल सल्तनतीचे बेइबुदीची पातशाहीचे दाब–रोबीची सर्कारांतून अमलांत आली.' –रा १२.१२ 'हा दाबरोआब सर्वांना दिसों लागला.' –रा ७ खलप; २०.२७. [अर. रुआब्]

रोंबटणें, रोमटणें—सक्रि. (राजा.) खुपसणें; (डोळा, मातीचा गोळा, पोट इ० कांमध्यें बोट, लांकूड, कटयार इ०) भोंसकणें; जोरानें दाबून आंत शिरकाविणें; आंत चेपणें, दाबणें.

रोंबरो—रूवरू पहा.

रोंबाट—न. (कु.) १ शिमग्यांतील खेळकऱ्यांचा जमाव (आरडाओरड करीत जाणारा); घोळका. २ (ल.) गोंधळ; गडबड. रोंभा पहा.

रोंबें, रोंबी—न.स्त्री. (कों.) दूषित रक्त काढण्याची तुंबडी.

रोंभा, रोंभाडा—पु. (ना. व.) १ घोटाळा; पसारा; लिगाड. 'लग्नाचें काम म्हणजे सगळ्या मुलखाचा रोंभाडा.' २ आकोश; ओरडणें. ३ घोंटाळा; वांधा. 'रोंभ्यांत पडलें काम.'

रोम—न. शरीरावरील केस; लव. [सं.] **०कूप**–पु. शरीराच्या कातडीवरील फार बारीक भोंक; रोमाचें छिद्र. [सं.] ज्याचे रोमकूपीं ब्रह्मांडकोटी। तो हरि वैकुंठीं नांदत।' –एभा २४.२६०. **०बीज**–न केंसाचें मूळ. 'तंव बाहेरी विरूढी करपे। रोमबीजांची।' –ज्ञा ६.२३४. **–रंध्र**–न. १ त्वचेंतील सूक्ष्म छिद्र; रोमकूप पहा. 'त्याच्या सर्व रोमरंध्रांतून घाम आला म्हणजे ताप निघेल.' २ (सामा.) रोम; केंस. 'रोमरंध्रि चैतन्य खेळवी राष्ट्राच्या ईश्वरा।' –राष्ट्रीय पद्यमाला. [रोम + रंध्र] **०रक्षा, रोमरक्षा व्यतीपात**–स्त्री.अव. पु. एखाद्या कामाचा निरर्थकपणा दाखविण्याकरितां हे शब्द योजतात. उदा० 'त्याचे कां तूं नादास लागला आहेस, तेथें काय रोमरक्षा आहेत?' रोमरक्षा या शब्दाचा एकवचनी प्रयोग पुढील वाक्यांतील धूळ, राख, माती याप्रमाणें होतो. 'तेथें काय धूळ आहे; त्याला काय राख समजता; तेथें काय माती मिळणार आहे. **०राजी**–स्त्री. केसांची ओळ, रांग. [सं.] **०शांति**–स्त्री. जननेंद्रियावरील केंस वाढणें. [सं.] **०शुचि**–स्त्री. केंस नसणें; केशरहितपणा. 'रोमशुचि जैसी। तळहातासी।' –ज्ञा १७.२३५. **०हर्ष**–पु. अंगावरचा कांटा; रोमांच पहा. **०हर्षण**–

न. १ रोमांच उभे राहणें. 'मग त्याच्या अंगावर रोमहर्षण होणें तर दूरच.' –सामं २.१७४. २ भय, धाक दाखविणें. 'तुम्ही ठासुन राहावें म्हणजे त्यांच्यानें रोमहर्षण होत नाहीं.' –भाब १४. **०हर्षवायु**–पु. ज्यांत रोमांच उभे राहून फार हसूं येतें असा वातविकार. **रोमागणित**–क्रिवि. प्रत्येक केसाबरोबर; केसागणीत. **रोमांच**–पु. अतिशय आनंद, भय, प्रीति, इ० विकारांच्या प्राबल्यानें अंगावर उभा राहणारा कांटा; अंगावरील केंस (लव) ताठ उभे होणें. 'आपाद कंचुकित । रोमांच आले ।' –ज्ञा ९.५२७. **रोमाचळ**–पु. कांटा; रोमांच. 'आंगीं रोमांचळ उठीले ।' –उषा ६२.६. **रोमांचित**–वि. १ आनंदातिशयानें किंवा इतर विकृतीमुळें ज्यावर केंस उभे राहिले आहेत असें (शरीर); ज्याच्या अंगावर कांटा उभा राहिला आहे असा (माणूस); 'रोमांचित धर्म म्हणे, बाई गातिल तुझा प्रभाव सती ।' –मोवन १३.८१. **रोमावली–ळी**–स्त्री. १ केसांची रांग-पंक्ति-ओळ. २ छातीपासून खालीं बेंबीपर्यंत गेलेली पोटाच्या मध्यभागची केसांची रांग. 'सागरीं लहरींची नव्हाळी। तैसी उदरीं त्रिगुण त्रिवळी । कर्मकर्म रोमावळी । बहिर्मुख वाढलिया ।' –ज्ञा १.३६. [सं. रोम + आवलि] **रोमाळ**–वि. केंसाळ; फार केंसाचा. 'एक अलंकार रोमाळ ।' –मुआदि १०.९९.

रोमट—न. (गो.) शिमग्यांतील एक खेळ; रोंबाट पहा.

रोमणदिवा–दिवली–दिवी, रोमणी—रोवणदिवा इ० पहा.

रोमणबाक–मोड्या, रोमणी–णें—रुमणबाक इ० पहा.

रोमंथ, रोमंथन—पुन. रवंथ; पोटांत गेलेला घांस पुन्हां तोंडांत आणून गुरें तो चघळीत बसतात ती क्रिया. [सं.] **रोमंथक**–वि. रवंथ करणारा (प्राणी).

रोमशवेखंड—न. वेखंडाचा एक प्रकार.

रोमें—न. तुंबडी; दूषित रक्त काढण्याचें साधन; रोंबें पहा.

रोम्हणबाक–मोड्या, रोम्हणी–णें—रुमणबाक इ० पहा.

रोंय–यी—स्त्री. एक विशिष्ट आवाज (जोरानें फेंकलेल्या वस्तूचा); घुई; रों. [ध्व.]

रोयण—न. (गो.) वासळ.

रोयली—स्त्री. (कु. हेट. नाविक.) एक प्रकारचा लहान (गलबताचा) नांगर. याला वर उलट वळलेले पांच पाय (आंकडे) असतात; लोयली.

रोराण—न १ घुशींचा एकदम होणारा रों रों असा मोठा आवाज. २ (ल.) गोंगाट; पोरें इ० च्या ओरडण्याचा गलका किंवा गलबला; किलकिलाट. ३ थोड्या कारणावरून झालेलें शिवीगाळ, मारहाण इत्यादि प्रकारचें मोठें भांडण. [ध्व.]

रोरावणें, रोंरेणें–अक्रि. (राजा.) १ गुरगुरणें. २ (घुशीनें) रोंरों असा आवाज करणें. **रोंरों**–अ. १ (घुशीप्रमाणें) रों रों अशा आवाजानें. २ सूं सूं करीत; बाणाच्या गतीमुळें होणाऱ्या आवाजानें. [ध्व.]

रोव—पु. १ मोड आलेलें पेरण्याचें बीं; रहू; रोंप; नुकतेंच रुजून वर आलेलें बीं; कोंब. [सं. रुह्–रोह; दे. प्रा. रोव] **रोवण**–स्त्री.न. (कों. प्रां.) पेरणें.

रोवण—स्त्री. १ जमिनीचा मऊपणा व भुसभुशीतपणा. २ (नदीच्या किंवा ओहोळाच्या कांठाचा) जमीनीचा खच, पडझड. ३ पुष्कळ बिळें, भोकें असलेली स्थिति (जमिनीची अति लागवडीनें किंवा कुळविल्यानें, नांगरल्यानें झालेली); जमिनीचा भुसभुशीतपणा. [रोवणें] **०घेणें**–(कोंबडीनें) अंडीं उबविणें. (गो.) रोवावचें. **०दिवली–दिवा–दिवी**–स्त्रीपु. १ प्रवासांत उपयोगी व पाहिजे तेव्हां जमिनींत रोवतां येणारा एक लांब लोखंडी दांडा असलेला दिवा; ठाणवाई. २ (ल.) आळशी माणूस. **रोवणी**–स्त्री. (गो.) पेरणी. **रो(रों)वणें**–सक्रि. १ (खांब, खुंटी, झाड,) जमिनींत पुरणें; घट्ट बसविणें; स्थिर करणें. 'जेणें भ्रांतीपासूनि हिरतलें । गुरुवाक्यें मन धुतलें । मग आत्मस्वरूपीं घातलें । रोवूनियां ।' –ज्ञा ५.३४. २ पेरणें; लावणें (बीं. इ०). ३ खुपसणें; खोंचणें; टोंचणें; शिरकाविणें. 'रोंवोनि उपडितां दाभणा । छिद्र शोधितां न दिसे कोणा ।' –मुआदि १३.१६. ४ दाबणें; दाबून ठेवणें. 'नक्रावरी पदें दुजें उचलोनि रोवी ।' –र ५७. –अक्रि. शिरणें; घुसणें; रुतणें; आंत जाणें; टोंचणें. [सं. रोपण.]

रोवंतणें—अक्रि. (महानु.) रोवंथणें; रवंथ करणें. 'श्रीकृष्णें नीववीलें पशु सकळ । आनंदें रोवंताती ।' –दाव १४२. [सं. रोमंथ] **रोवंथ**–पुन. रवंथ; खाल्लेलें चघळणें. [सं. रोमंथ] **रोवंथणें**–अक्रि. रवंथ करणें; चघळणें.

रोवळा—पु. एक माप; (कैली) खंडीचा एकषष्ठांश.

रो(रों)वळी—स्त्री. १ तांदूळ, भाजी धुणें इ० उपयोगाची विशिष्ट आकाराची बांबूची परडी; दुरडी. २ पुष्कळ बारीक बारीक भोकें पाडून वरील उपयोगाकरितां केलेली धातूची परडी; चाळणी. [का. ओरोळगि] **रो(रों)वळणें**–सक्रि. (तांदुळ इ०) रोवळींत घालून धुणें. **रो(रों)वळा**–पु. मोटी रोंवळी.

रोंवा—पु. (चांभारी, कों.) चामडयावर नक्षी उठविण्याचें साधन.

रोशन—वि. १ विशद; स्पष्ट; श्रुत. (क्रि० करणें) 'बंदगीस रोशन होय हे अर्दास' –रा १५.७६. २ लखलखित; सुरेख. [फा. रौशन्] **०दान**–पु. झरोका; साणें. **०नाईक**–पु. मशालजी. **०शुद्ध**–वि. माहीत झालेला; ज्ञात. **रोशनाई**–स्त्री.

१ (दिव्यांचा) लखलखाट; चकचकाट. २ असंख्य दिवे लावून सण करणें; दीपोत्सव; दिवाळी. २ (ल.) आनंद; उत्साह; रमणीयता; शोभा (एखाद्या स्थळाची, प्रसंगाची). ३ आरास; शोभिवंत करणें; शृंगारणें. **रोशनी**-स्त्री. उजेड. रोशनाई पहा. ' रात्रीं रोशनीनें नबाब दौलाचे येथें आले. ' –रा ७.१०४. [फा.] **रोषणाई, रोसनाई**–स्त्री. रोशनाई पहा.

रोशें, रोशेल गवत—न. एक प्रकारचें गवत. यांचें तेल काढतात. –वगु ५.४५. [सं. रोहिष] **रोशेल**–न. रोशें गवतापासून काढलेलें औषधी तेल (वातविकारावर उपयोगी). [रोशें+तेल]

रोष—सपु. राग; रुसवा; क्रोध; नाखुशी; संताप. ' रोषें प्रेम दुणवटे । ' –ज्ञा ९.१८. [सं. रोष] **रोषाविष्ट**–वि. क्रुद्ध; संतापलेला. [रोष+आविष्ट]

रोषणें—न. अव. पहारा; रोखणी; नजर ठेवणें. ' भंवती आल्रीयांचीं रोषणें । ' –उषा पृ. ९. [रोखणें]

रोस—पु. (गो.) आमटी. [रस]

रोह—पु. रोव; रहू; कोंब; मोड; अंकुर; मोड आलेलें धान्य. [सं. रुह्] **०करणें**–घरीं टोपलींत बीं पेरणें; धान्याला मोड आणणें. **रोहें**–न. (कों.) अगदीं कोंवळें झाड; रोप.

रोह—पु. हरिण; रोही.

रोहक—न. (व.) खटाई; खरड; पिठा; हट्टी नरम होणें. ' कामानें चांगलें रोहकच निघालें माझें. '

रोहक—पु. भूत; ब्रह्मराक्षस. ' दक्षिणचें सौभाग्य गळसरी कोण्या रोहकाला । ' –ऐपो ४१०. [सं.]

रोह(हं)क—पु. (काव्य) रोंख; मनाचा कल; प्रवृत्ति. ' परवस्तु चोरावया देख । अखंड लागला असे रोहंक । ' [रोंख]

रोहकणें—सक्रि. १ रोंखणें; धरणें; अडविणें; थांबविणें. २ धरून व्यापणें; पछाडणें; वेढणें; [रोंखणें; सं. रोधन; प्रा. रोहण]

रोहका—पु. (व. ना.) रवंथ. ' गाई रोहका करीत बसल्या. '

रोह(हि)टी—स्त्री. उगवतें धान्य; धान्य पेरल्यानंतर प्रथम दिसणारा अंकुरसमुदाय. [रोह]

रोह(हि)डा—पु. १ एक औषधी झाड; रक्त–रोहिडा. २ एक किल्ला; विचित्रगड. [सं. रोहित]

रोहंत, रोहमंत—पुस्त्री. रवंथ; चघळणें. [सं. रोमंथ]

रोहशेल—न. रोशेल पहा.

रोहिण—स्त्रीपु. मुंग्यांचें वारूळ. –खिपु. [सं. रोहण]

रोहिणी—स्त्री. १ सत्तावीस नक्षत्रांपैकीं चवथें नक्षत्र. २ नऊ वर्षांची कुमारिका. ३ वीज. ४ रोही जातीची हरिणी. ५ बलरामाची आई. ६ मृगजळ. ' नातरी भौमा नाम मंगळु । रोहिणीतें म्हणती जळु । ' –ज्ञा ५.११६. ७ (संगीत) एकोणिसाव्या श्रुतीचें नांव. ८ शुद्धरक्त वाहून नेणारी रक्तवाहिनी. हिला चुकीनें धमनी म्हणतात. ९ रोहीण; एक वृक्षविशेष. रक्तरोहिडा; मंजिष्ठा; या झाडाच्या सालींचा रंगाला उपयोग होतो. [सं.] **०जल, रोहिणीचें जळ**–न. मृगजळ. –ज्ञा २.१२१. ' विषय असत्य रोहिणीचें जळ । वाटतें सकळ भ्रांतिरूप । ' –ब १५७. **०पतिवर**–पु. १ चंद्र. २ वसुदेव. **०रोग**–पु. चाळपुळीचा रोग. ' रामकृष्ण परमहंस यांच्या दुखण्याचें पर्यवसान रोहिणीरोगांत झालें. –विवेकानंदजीवनरहस्य.

रोहिला—पु. पठाण; मुसलमानांतील एक भेद. यांच्या वस्तीवरून ' रोहिलखंड ' (बरेली विभाग) हें प्रांतनाम पडलें.

रोही—स्त्री. १ गोड्या पाण्यांतील एक गोजिरवाणा मासा. २ एका जातीचा हरिण; नीलगाय. हा आकारानें बैलाएवढा, रंग काळसर पांढरा असतो. ' जंबुक चितळे रोही मेंकरें कुरवाळुन धरणें । ' –ऐपो ६९. –प्रला २५६. [सं. रोहित; प्रा. रोहिअ] **रोहें**–न. हरिणाची एक जात; रोही अर्थ २ पहा.

रोहो—पु. (गो.) लांकूड पोखरणारा किडा.

रोहो—पु. १ आरंभ; सुरवात; उपक्रम; उत्पत्ति. ' म्हणोनि फळाचा लागु । देखे जिये असलगु । तिये कर्मी चांगु । रोहो मांडी । ' –ज्ञा १८.६५२. २ वाढ; वृद्धि; दृढता. ' आणि वाढे जंव जंव मोहो । तंव तंव विषयीं रोहो । ' –ज्ञा १६.३७०. ३ अंकुर. [सं. रुहू–रोह]

रोहो-हू, रोहोक, रोहोकणें, रोहोटी, रोहोंत, रोहोमंत, रोहोशेल—रोह, रोहशेल इ० पहा.

रोहोपोहो—पु. १ व्यवहार; दळणवळण; येजा; घसण; घरोबा (क्रि० पाडणें; घालणें; करणें; पडणें; असणें). २ परिचय; ओळख. (क्रि० पाडणें; घालणें). [राहणें+पाहणें]

रोळ—पु. क्रम; नियम; वहिवाट; प्रघात; परिपाठ. ' हा अनादिसिद्ध रोळ । ' –विपू ३.५७. [तुल० इं. रूल]

रोळ—पु. रस्त्यावरची खडी दाबण्याचें यंत्र; रूळ. [इं. रोलर]

रोळणें—सक्रि. रेलणें; वळ देणें. ' बसणारानें आपलें शरीर-दोन्ही बाजूस रोळीत जावें म्हणजे चाल लागेल. ' –अश्वप १.१८९. [रेलणें]

रोळणें, रो(रों)ळा-ळी—रोंवळणें, रोवळा-ळी पहा.

रोळा—पु. वृष्टि; समुदाय. ' दिव्य सुमनांचा रोळा । कृष्णा चौपाशीं विखुरला । ' –एभा ३१.३७. [तुल० इं. रोल]

रोळे—पुभव. (दादर) दाते.

रौखे—पु.अव. (महानु.) पैसा. ' सांडोनी ईश्वराची जवळीक रौखे जोडी। ' –ज्ञानप्रबोध ३१९. [रोख]

रौंडा—न. रुंड; धड; कबंध. ' रौंडा करी ताण्डव तुआं नाचविलें। ' –शिशु ४५०. [सं. रुंड]

रौणक—स्त्री. (ना.) रौनक पहा.

रौंद(दा)ळणें, रौंदळा—रवंदळणें, रवंदळा पहा.

रौंदळी—स्त्री. (व.) रोवलेला दिवा; रोवणदिवा. [रोवण–दिवली]

रौद्र—वि. १ राग; क्रोध; कोप. २ नवरसांपैकीं एक रस. उदा० ' गांगेय कोपा चढला कसा रे। ज्या मानिती हाचि कृतांत सारे। इ० ' –भीष्मार्जुनयुद्धांतील वर्णन. –पु. १ रुद्रासंबंधी; शिवाचा; शंकराचा. २ भयंकर; अत्यंत भीतिदायक; उग्र; अकाळ-विकाळ. ३ तामसी; रागीट; रागावणारा. ' एके रौद्रे अतिभित्रें। भयानकें एकें पवित्रें। ' –ज्ञा ११.१२९.

रौद्री—विना.स्त्री. (संगीत) आठव्या श्रुतीचें नांव. **०गिंडी नृत्य**–न. त्रिशूलाच्या आकृतींत उभें राहून नर्तकांनीं केलेलें नृत्य.

रौनक—स्त्री. १ सौंदर्य; शोभा. ' दौलतींत कांहीं वाकी राहिली नव्हती, त्या दौलतीस खावंदाबरोबर रौनक आणिली. ' –रा ५ ८६. २ (ल.) महत्व; उच्च दर्जा. [फा. रौनक] **०अफ्जा**–वि. १ शोभावर्धक. ही एक पदवी आहे. ' हजरत येथें रौनक अफ्जा होणार. ' –रा ७.१०६. २ एक पदवी. [फा.]

रौप्य—न. रुपें; चांदी [सं.] **०मुद्रा**–स्त्री. रुपया; चांदीचें नाणें. **०शृंखला**–स्त्री. (रुप्याची सांखळी) (ल.) सरकारी पगार, नोकरी. ' सुशिक्षितवर्ग सरकारनें रौप्यशृंखलेनें बद्ध केला आहे. ' –टि १.६४

रौरव—पु. एकवीस महानरकांतील एक महानरक. [सं.] –ज्ञा १६.२२६. रवरव पहा.

रौक्ष्य—न. रुक्षत्व; काठिण्य; कोरडेपणा; कठोरपणा; तापटपणा. रुक्ष पहा. [रुक्ष]

र्‍याघ—स्त्री. (रेघ) चेहरा; हजामतींतील एक प्रकार. मोद पहा. –बदलापूर ३७. [रेघ अप.]

र्‍याऱ्या—स्त्रीपु. लहान मुलांचें रडणें; टयां टयां. (क्रि० करणें). २ (ल.) हताश होऊन, भिऊन मुलाप्रमाणें वागणें; रे रे करणें. [ध्व.]

र्‍हद—पु. डोह; नदींतील खोल पाण्याची जागा. ' तेथ ज्ञान हदीं आल्हावलें। तुझें आंग। ' –भाए २६९. [सं. हद]

र्‍हद—पु. (शाप.) एक धातु; (इं.) र्‍होडियम्. ही प्लातिनशीं संयुक्त असते. **र्‍हवणें, र्‍हेणें**–वि. (राजा. कुण.) राहणें. ' आठ दी रिकाम र्‍हवचें. ' –मसाप २.११०, –लोक २.८०.

र्‍हस्व—वि. (ह्रस्व) १ आंखूड; कमी लांबीचा. २ गिट्टा; ठेंगणा; ' एकें कृशें एकें स्थूळें। एकें र्‍हस्वें एकें विशाळें। पृथुतरें सरळें। अप्रांतें एकें। ' –ज्ञा ११.१२४. [सं. ह्रस्व] **०गोल**–पु. (ज्यो.) लघ्वक्षानें दुभागिलेलें दीर्घवर्तुळाचें अर्ध त्या लघ्वक्षाभोवतीं भ्रमविलें असतां जो आकार उत्पन्न होतो तो. –सूर्य ८. **०जंतु**–पु. अतिसूक्ष्म जंतु. (इं.) बॅक्टिरीया **०मूर्ति**–वि. ठेंगणा; गिट्टा; खुजा. **०स्वर**–पु. ज्याच्या उच्चारणास एकमात्रात्मक काल लागतो असा (अ, इ, उ, ऋ, ऌ) स्वर. **र्‍हस्वास्थि**–स्त्री. आंखूड हाड.

र्‍हास—पु. नाश; उतरती कळा. ह्रास पहा. [सं. ह्रास]

र्‍ही—स्त्री. लज्जा; लाज. [सं.]

र्‍होव—पु. (राजा. कुण.) रहू; कोंब फुटलेलें धान्य. रोह पहा.

ल

ल—वर्णमालेंतील अठ्ठाविसावें व्यंजन. वर्णविकास:–पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार लेखांत, दुसरी कुशानवंशी राजांच्या वेळच्या मथुरा येथील लेखांत (इ. स. १–२ रें शतक), तिसरी झालरापाटण येथील राजा दुर्गगणाच्या लेखांत (इ. स. ६८९) व शेवटची इ. स. ११०८ मधल्या ओरिआ लेखांत दृष्टीस पडेल. –ज्ञाको (ल) १९.

ल(इ)ई—वि. (कुण.) बहुत; पुष्कळ; अतिशय; मोठया संख्येचा, परिमाणाचा. लय पहा. –तुगा १४१. ' उत्तरेचा महिमा लई। जाऊनि राहा हिमालयी। ' –मध्व ३५२. **०लूट**–स्त्री. (कुण.) रेलचेल; विपुलता; ढीगचे ढीग; मोप; मस्त. लय पहा. [लई+लूट]

लईण-न—स्त्री. १ रांग; ओळ; रेघ. २ सैन्याची तुकडी. ३ पोलिस वगैरे लोकांच्या घरांची रांग. [इं. लाइन]

लक-कण-कन-कर-विशीं—क्रिवि. १ चक्र–कण; क्षक–कण. २ झटक्यांत; क्षणांत. [लक्ष–रूख]

लकचें—अक्रि. (गो.) तोल जाणें.

लकट(ड)णें—उक्रि १ (प्र.) लगटणें पहा. २ लोटणें; ढकलणें. [सं. लग्]

लकड—स्त्री. (कों.) १ अतिशय उंच वाढलेलें माडाच्या जातीचें झाड. २ (ल.) शरीरानें कृश, सोटासारखा उंच असलेला मनुष्य. [लांकूड] सामाशब्द– **०कोट**–पु. मोठमोठीं लाकडें जमिनींत उभीं पुरून भिंताडासारखें केलेलें आवार; लाकडाची तटबंदी; मेढेकोट. [लाकूड+कोट; हिं. लकडकूट] **०खाना**–पु. १ इमारतीचीं किंवा जळाऊ लाकडें ठेवण्याची घरांतील स्वतंत्र

जागा; लांकूडघर. २ लाकडांची वखार. [लाकूड+खाना; हिं. लकड-खानह्] ०विवी–वि. रोडका; लुकडा; उंच व कृश. [लाकूड+दिवा] ०वाला–पु. इमारतीचीं किंवा जळाऊ लांकडें विकणारा. [हिं.] **लकडा**–पु. १ मोठी काठी. २ वाळलेला, रोड झालेला मनुष्य. 'त्याचा लकडा वळला.' ३ वाळलेला व लाकडासारखा कडकडीत झालेला पदार्थ (कपडा, भाकर, वाळलेलें काड इ०). **लकडी**–स्त्री. १ लाकडाप्रमाणें घट्ट होईतोंपर्यंत कढविलेला उंसाचा रस; लाकडासारखा कडक झालेला गुळाचा पाक; गुळाचा एक प्रकार. २ लाकूड; काठी. जोंधळ्याचा एक प्रकार. [हिं.] (वाप्र) **लकडी वांचून मकडी वठ(ळ)त नाहीं**–माकडचेष्टादि सौम्य उपायांनीं बंद होत नाहींत, त्याला मारच पाहिजे. [लाकूड+माकड] **लकडी कोट**–पु. लकडकोट पहा. **लकडी पूल**–पु. नदी इ०कांवर बांधलेला लाकडांचा पूल. **लकडी पेंढी**–स्त्री. (कों.) होळीकरितां मुलांनीं घरोघर फिरून मागितलेलीं लांकडें, ओंडके व गवत इ० (व्यापकार्थी). **लकडया**–वि. उंच आणि लुकडा. [लकड]

लफडा—पु. १ गळ्याशीं लागणारें, ओढ्यासारखें वाटणारें, निकडीचें काम; निकड; तगादा; नेट; ओझें (देणें, ससार, इ०चें). (क्रि० लावणें; लागणें; बसणें). (वाप्र.) ०लावणें–तगादा, निकड लावणें; स्वस्थ बसुं न देणें; कांहीं सुचूं न देणें.

लफतर–री—नस्त्री. १ चिंधी. २ फाटलेली वस्तु, वस्त्र इ० [सं. लफ्फ; लतर्, लफ्द्=लाथ] **लफत्र्या**–स्त्रीअव. १ चिंधड्या; धुडके (वस्त्राचे) (क्रि० निघणें; होणें; काढणें). २ फाटकीं वस्त्रें; जीर्ण कपडे. [सं. लफ्फ; फा. लतर्]

लफताड—वि. (व.) हुज्जतखोर; कज्जेदलाल. [लचका+तोडणें ?]

लफतुवाय—न. (गो.) प्रेमळपणा; प्रेम.

लफपफ—वि. चकपक; चापचोप; ठाकठीक; नीटनेटका; छानदार. [लफ द्वि.]

लफब—स्त्री. १ वाईट संवय, रीत; दुर्गुण; खोड. 'दुसऱ्यास वेडावूं लागल्यापासून त्याला तोतरें बोलण्याची लफब लागली.' २ घाटणी; पद्धति; शैली; ढब. 'बोलण्याची चालण्याची, लिहिण्याची लफब.' ३ आसक्ति; व्यसन. [अर. लफब्=टोपण नांव]

लफलफ—वि.क्रिवि. चकचकीत; झणझणीत; लक्क (वीज, झिलईचीं भांडीं इ०प्रमाणें); दिपल्याप्रमाणें. (क्रि० करणें; होणें). 'त्यांचीं भांडीं पहा कशीं लफलफ करतात तीं.' [अनुकरण; लक्क द्वि.] ०करणें–(पित्तक्षोभ इ० मुळें डोळ्यांपुढें लफलफ होणें; काजवे येणें. 'कालचे उपासानें आज डोळ्यांपुढें लफलफ करतें.' **लफलफणें**–अक्रि. १ चकचकणें; प्रकाशणें. २ लफलफ करणें. **लफलफाट**–पु. चकचकाट; उज्ज्वलता; अतिशय प्रकाश; तेज; लफलफी. **लफलफी**–स्त्री. चकचकाट; चकचकी; उज्वलता. **लफलफीत**–वि. १ चकचकीत; झगझगीत. २ (ल) स्वच्छ; निर्मल; नामी; लक्क; लफपक; चकपक (मनुष्य,वस्त्र,सामान इ०). ३ (उप.) साफ; उघडा; नागवा; सुनका; सुना. 'दोन डागिने होते ते चोरानें नेले आतां ती लफलफीत झाली.' 'झाडें तोडून मोडून रान लफलफीत करून तेथें किल्ला बांधूं लागला.'

लफ(ख)वा—पु. वातरोग; अर्धांगवायु.

लफसप(फ)फस, लफसचफस—क्रिवि. (व. ना.) घाईघाईनें. [लफ+स(सदृश) द्वि.]

लफा-क्का—पु. कबुतराची एक जात. याची दूम नेहमीं उभारलेली व पसरलेली असते, मानेचा झोंक नेहमीं पाठीकडे असतो. –मराठी ३ रें पु. (आ. ४) पृ. ६८. [अर. लक्का]

लंका—स्त्री. तंबाखूची एक जात. कृष्णा आणि गोदावरी या नद्यांमधील भागांतील तंबाखूस म्हणतात. –कृषि ४१९. [सं.]

लंका—स्त्री. १ रावणाची राजधानी. २ सिंहलद्वीप; सीलोन बेट. ३ राक्षस, वानर, झाडें इ० कांच्या दारूच्या केलेल्या आकृती; दारूचीं झाडें. ४ (विनोदानें, निंदेनें) लहान पोरगी. (व.) केस पिंजारलेली, कुंकू नीट नसलेली गयाळी मुलगी. ५ जारिणी, स्वैरिणी स्त्री. [सं.] **म्ह०** १ (व.) लंकेंत जन्मले तितके राक्षसच=वाईट कुळांत चांगलीं माणसें जन्मणें शक्य नाहीं, याअर्थी. २ लंकेंत, लंकेस सोन्याच्या विटा=लंकेंत पुष्कळ सोनें असलें तरी त्याचा आपणास काय उपयोग ? (मिळकतीप्रमाणें खर्चहि जास्त या अर्थानेंहि वापरतात). (वाप्र.) ०लुटणें–अवाढव्य संपत्ति मिळणें. ०होणें–(गो.) सौंदर्यवान, सालंकृत होणें. सामाशब्द– ०दहनसारंग–पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल निषाद हे स्वर लागतात. धैवत स्वर वर्ज्य. जाति षाडव–षाडव. वादी ऋषभ. संवादी पंचम. गानसमय मध्याह्न. [सं.] ०लूट–स्त्री. अगणित संपत्ति मिळविणें;लंका लुटणें पहा. **लंकेची पार्वती**–स्त्री. (लंकेला जाऊनहि गोसावियीच्या वेषांत असणारी शिवपत्नी, पार्वती) १ जिच्या अंगावर एकहि दागिना नाहीं अशी उंच व रोडकी स्त्री. २ (सामा.) अलंकाररहित सवाष्ण स्त्री. ज्यावर खोगीर, जीन वगैरे कांहीं नाहीं असा रोडका घोडा. **लंकेश्वर**–पु. लंकाधिपति रावण. 'अहो रानींचिया पालेखाइरा । नेवाणें करविजे लंकेश्वरा ।' –ज्ञा ११.२३. [लंका+ईश्वर] **लंकोदय**–पु. तारे, ग्रह, राशी यांचा सीलोनांतील उदयकाल. यास चरसंस्कार करून वाटेल त्या ठिकाणचे त्या त्या खगोलांचे उदयकाल काढतां येतात. कारण या शहरावरून पहिलें याम्योत्तरवृत्त जातें अस

मानतात. हें उज्जयिनीच्या याम्योत्तरवृत्तावर आहे. ' मेषाचा लंकोदय चार घटका अडतीस पळें. '

लकाटणें—अक्रि अतिशय चमकणें; लख्-ख् करणें; लकलकणें; झळकणें. [लकलक] **लकाकणी**-स्त्री. चकाकणी; चमकणी; झळकणी. **लकाकी**-स्त्री. चकचकी; चकाकी; उज्वलता; पराकाष्ठेची रोषणाई, तेज, तजेला. [लकलकी]

लकार-च्या, लकारचिल्हा-चिल्ह्यांतला—वि.(लबाड, लुच्चा इ० शब्दांचा ल नें आरंभ होतो यावरून सांकेतिक) लबाड, लुच्चा; लफगा इ० **लकारी**-स्त्री (सांकेतिक) लबाडी; लुच्चेगिरी. लबाडी शब्दाशी हा जोडून योजतात जसें- लबाडी लकारी.

लकारी, लकीरी—पु. एक जात व तिच्यांतील एक व्यक्ति. हे लोक लाखेच्या बांगड्या, कंगण्या व इतर अलंकार करतात व रोगणें (वारनिसें) देतात. [लाख+करणें]

लंकिन कांठ—पु. (नाशिक) जरीच्या कांठाची जात. -ज्ञानप्रकाश ९ १.१९.३१.

लकिरी—स्त्रीपु. (सामा) लकेरी पहा.

लकीर—स्त्री. रेषा; रेघ; पट्टी; ओळ. [हिं.]

लकीरी, लकेरी—स्त्री. १ तेज; चकाकी; जिल्हई. २ (ल.) माधुर्य; मोहकता; छबदारी; चित्ताकर्षक गुण (गाण्यांत, बोलण्यांत इ०). (क्रि० मारणें). ३ चुणूक; छटा; वास; गंध (रंग, स्वाद, राग इ० मध्यें एखाद्या परक्या गुणाचा). (क्रि० मारणें). ' ओल्या रंगांत कोणत्याहि रंगाची लकेरी पाहिजे असल्यास... ' -मॅरट २३. ४ कांठ; किनारी (किनखावाची, जरीची, रेशमाची इ०). ' या दुपट्याचें सुत चांगलें आहे पण लकेरी चांगली नाहीं. ' [लक् !]

लकीलक्क—वि.क्रि.वि. लकलकीत पहा. ' झाडें तोडून मोडून रान लकीलक्क करून तेथें किल्ला बांधूं लागले. '

लकुच—न. एक फळ; लिकुच. ' लकुच कटुचि अमृतकरा करवीं हीं शर्करेंत घोळविला। ' -मोवन ९.६८.

लक्क-क्ख-ख्ख—न. १ वीज इ० कांचें तेज स्फुरण होणें किंवा तसा भास होणें; लकलक करणें; चक्क; चमक. ' अकस्मात वीज चमकतांच माझ्या डोळ्यापुढें लक्क झालें. ' २ आकस्मिक भीति; आकस्मिक दुःखाचा धसका; धक्का. -वि. १ स्पष्ट; ठसठसीत. २ चकचकीत; झगझगीत इ० लकलकीत पहा. ३ उघडा बंब; अगदी नागवा. ४ कफलक; निर्धूत; उघडा (नग्न गोसावी). ५ छानदार; सुरेख. [ध्व.] (वाप्र.) **लक्क भावडी कडु उजो**-(गो.) नसता खर्च करून ऐट मारणें.

लक्कड, लक्कडकोट, लक्कडखाना—(प्र.) लकड, लकडकोट इ० पहा.

लक्कण, लक्कन, लक्कर, लक्कदिशी—क्रिवि १ लकलकण-कन-वर-दिशी इ० पहा. २ झटकन; चटकन; पटकन; क्षणांत. [ध्व]

लक्कर—न. लकतर पहा.

लक्काळ—वि. (व.) बेशरम; निर्लज्ज. लकताड पहा.

लखणी—स्त्री. पेंग; झोपेमुळें येणारी डुलकी. (क्रि० देणें). २ (कु.) झोंप. **लखणें**-अक्रि. (कु.) पेंगणें; डुलकी येणें. [सं. लख्=हालणें]

लखपचोतरी-त्री—स्त्री. १ (लाख सरुयेबर आणखी पांच) खोटें किंवा भरमसाट अवास्तव बोलणें; बाता; गप्पा. २ (कांहींच्या मतें लाख सारविणें यावरून) पोकळ जिल्हई; दिखाऊपणा; असत्य बोलणें; खोटेपणा (मनुष्याचा, दृश्याचा). -वि. दिखाऊ पण पोकळ; दिसण्यांत चांगला पण खोटा; नकली. [लाख+पंच(पच)+उत्तर] **लखपचोत-च्या**-वि. खोट्या, निराधार गोष्टी सांगण्याची, बाता झोकण्याची खोडी असलेला.

लखपति-ती—पु. लक्षाधीश; लाखों रुपयांचा मालक. [सं. लक्ष+पति; गुज.]

लखमा—पु. (क.) अर्धांगवायु; लकवा पहा.

लखलख—स्त्री. १ चकचकणें; चकाकणें; चकमकणें; लकलक पहा. २ तीव्र क्षुधा; वखवख. (क्रि० सुटणें). [ध्व.] **लखडलखड करणें**-अक्रि. वखवख करणें अधाशासारखें वागणें. [अनुकरणवाचक] **लखलखणें**-अक्रि. १ लकलकणें; चमकणें. २ तीव्र क्षुधा लागणें. [ध्व.] **लखलखाट, लखलखी, लखलखीत**-लकलकाट इ० पहा.

लखलाभ—पु (लाख रुपयांचा लाभ) १ अतिशय मोठा लाभ. ' आपली भेट झाली हाच आम्हास लखलाभ झाला. ' २ दुकानदारापासुन एखादा जिन्नस विकत घेतला असतां, गिऱ्हाइकास तो लाख रुपयांच्या योग्यतेचा होवो अशी इच्छा दर्शविण्याकरितां दुकानदार उद्गार काढतो तो. ' जा, ही शालजोडी तुला लखलाभ असो. ' [सं. लक्ष+लाभ; हिं. लख=लाभ]

लखलो(लू)ट, लखालू(लो)ट—स्त्रीपु बैपुल्य; प्राचुर्य; रेलचेल. -वि.क्रिवि. विपुल; प्रचुर; रेलचेल. [लाख+लुटणें, लोटणें]

लखापडी—स्त्री. (गुज.) पत्रव्यवहार. लिखापढा पहा. ' निरर्थक लखापडी कमी करण्याबद्दल नियम. ' -(बडोदें) खानगी खातें अपवाद ३०. [लिहिणें+पढणें; हिं. लिखापढ]

लखेरा—पु. लाखेचे दागिने करणारा किंवा त्यांस झिलई देणारा. लकारी, लकेरी पहा. [लाख; हिं. लकहिरा]

लखोटा—पु. १ पाकीट. २ बंद केलेलें पत्र. लाखोटा पहा.

लग—पु. १ खांबांवर आडवी टाकलेली तुळई. २ आधार; लगा पहा. ३ -पुस्त्री. अवयव, अंग, खांदी इ० मोडलीं असतां

ती तुटून न पडतां ज्याच्या योगानें लोंबत राहते तो अंश. ४ संयोगभूमि. ५ जोड; दुवा (दोन पक्षांतील, बाजूंतील, व्यक्तींमधील.) [सं. लग्] (वाप्र.) **लगीं असणें**–संबंध असणें; लागू असणें. **लगीचें काम**–न. ज्यांत छपराला लगीचा आधार असतो तो इमारतीचा प्रकार. याच्या उलट पिढ्यांचें किंवा पिढ्यापाटांचें काम.

ल(लं)ग—स्त्री. (कारकुनी शब्द) दुकालमी यादीपैकीं एखादा कालम अपुरा राहिल्यास तो दुसऱ्याच्या बरोबर करण्यासाठीं पहिल्या कालमांत रकमेच्या ठिकाणीं शून्य व पुढें लग शब्द लिहून पूर्णता करतात ती. [लागणें; किंवा फा. लनूग्=लंगडा] **लगपूज**–न. वरीलप्रमाणें रकमेच्या ठिकाणीं लिहिलेलें पूज्य. (क्रि० घालणें; देणें; मांडणें; लिहिणें).

लंग—न. (कु.) लहान माशाचें जाळें.

लंग—वि. अतिशय क्षीण व अशक्त झालेला (दुखण्यानें, उपासानें). [लंगणें किंवा लंघन]

लंगचो—पु. (कुं.) चिमटा.

लगट—पुस्त्री. १ नेटाचा व निश्चयाचा पाठलाग (सामान्यतः एखाद्या विषयाचा, वस्तूचा); (शब्दशः व ल.) शक्तीचा व बुद्धीचा अत्यंत उपयोग करणें; संघटित व नेटाचा प्रयत्न. २ जोराचा हल्ला; चालून जाणें. 'तो एकएकाचि कोप सेसमक योध संघ करि लगट।'–मोकर्ण ३३.२१. २ पाठ न सोडणें; चिकटणें; पिच्छा पुरवणें. ३ –स्त्री. दाट मैत्री; घसण. (क्रि० करणें; लावणें; घालणें; पाडणें.) –वि. चिकटून राहणारा; पाठ न सोडणारा; चिकट. 'रामभाऊंचा मुलगा किनई फार लगट आहे.' [लागणें] (वाप्र.) **०करणें**–(वाईट अर्थी) जवळ जाणें; अंगाशीं अंग लावणें. **लगटणें**–सक्रि. १ चिकटविणें; चिकटण्यास लावणें. २ मिसळणें; भेसळणें. 'श्रीवर्धनचे सुपारींत भोंवरगांवची सुपारी लगटतात.' ३ ढकलणें; दपटणें; लाटणें; रगडणें; रपाटणें. –अक्रि. १ चिकटणें. 'पावसाचे योगानें सगळे कागद एकास एक लगटले.' २ (लैं.) दाट घोंस लागणें (फळें, फुलें यांचे) लटकणें. 'पीक पिकेल घुमरी। पुरुषार्थ चारी लगटोनि।'–एभा ६.३०७. ३ नेटणें; भिडणें. 'लगटला स्वर्गाचिये सीमा।'–मुआदि २७.४९. ४ पोंचणें; लागणें; पावणें; ठेपणें. 'फौज येऊन ठेपल्याशीं लगटली तरी तुमची तयारी कांहींच नाहीं पुढें कसें?' [सं. लग्]

लगट—स्त्री. (वरघाटी) १ मोठी पास. २ बैलाच्या पाठीवर–पाणी आणण्यासाठीं–ठेवावयाची लोखंडी चौकट; लगड; माकण.

लगड—पु. बहिरी ससाणा; कावळ्यासारखा एक मांसभक्षक पक्षी. 'लगडमगड जळखंडे बाटोवाट।'–ऐपो २४२.

लगड—स्त्री. सोनें, चांदी इ० धातूंची कांब, वीट.

लगड—स्त्री. माकण; पशूच्या पाठीवर घागर ठेवण्याकरितां केलेली लाकडी किंवा लोखंडी चवकट; पशूंच्या पाठीवरील घागरी. लगट पहा. 'नदीच्या गांवीं लगडीनें पाणी आणतात.' २ ओझें. –शर.

लगडणें—अक्रि. १ लगट करणें. लगटणें पहा. २ फलपुष्पांनीं गजबजणें. 'सत्संगाचे निजमेळीं। परमार्थ जाय पाल्हाळीं। लगडोनि ये स्वानंदफळीं। सर्वकाळीं सफळित।'–भारावाल १.१६.

लंगडणें—अक्रि. लंगणें; एक पाय अधू असल्यामुळें दुसऱ्या पायावर भार देऊन चालणें; पाय काढीत, वेडेवांकडे चालणें. [सं. लग्–लंग, फा. लंगीदन; हिं. लंगडना] **लंगडणी**–स्त्री. एक पाय अर्धवट किंवा न टेकतां उड्या मारीत चालणें. **लंगडदीन**–वि. लंगड्या मनुष्यास थट्टेनें म्हणतात. **लंगडशाई-शादी**–स्त्री. १ लंगडत चालणें. (क्रि० घालणें). २ लंगडीचा खेळ. एक पाय आंखडून धरून दुसऱ्या पायावर उडत चालणें. (क्रि० घालणें; करणें). –वि. लंगडा. [लंगडा] **म्हण** लंगडशादी पायांत वादी. **लंगडा**–वि. १ एक पाय आखूड किंवा अधू असलेला. २ अधू; पंगू; हतशक्ति; विकल; व्यंगी (पाय, हात इ०नें–मनुष्य, पशु). ३ (ल.) (एखाद्या जरूर असलेल्या मनुष्याच्या किंवा वस्तूच्या अभावामुळें) पंगू; कमजोर; निकामी. (काम, यंत्र, इ०). 'एक बैल नाहीं यामुळें नांगर लंगडा झाला.' **म्हण** लंगड्याच्या लेंगड आन गांवखोरी पण चरेना. **लंगडी**–स्त्री. एक खेळ; एक पाय दुमडून दुसऱ्या एकाच पायानें उड्या मारीत चालणें. **०कोशिंबीर**–स्त्री. एक मुलींचा खेळ. –मखेपु २७१. **०सबब**–स्त्री. तुटपुंजें, अप्रयोजक, अप्रमाण कारण; अपुरें निमित्त; असमर्पक कारण. 'वजनदार पुढाऱ्यांनां कांहीं लंगड्या सबबीवर पकडलें.'–के १७.५.३०.

लगडत(थ)गड—स्त्री. (साहित्य किंवा फुरसत नसल्यामुळें) काम अपुरें करणें; रपाटणें; रगडणें. 'लांकडें पुरतीं नव्हतीं आणि पर्जन्य तर आला आंगावर तेव्हां लगडतगड करून एकदांचें घर बांधलेसें केलें.' २ अनेक मसलती, बेत योजणें; अनेक उपाय, क्लृप्ति काढणें. ३ –क्रिवि. कसें तरी, निष्काळजीपणानें; वरवर. [ध्व.]

लंगणें—अक्रि. (प्र.) लंगडणें; लंगडत चालणें.

लंगणें—अक्रि. दुखणेकरी, रोड होणें; वाळणें. [सं. लंघन]

लगत—स्त्री. १ जोड; संधि; जोडलेपणा; समीपता; भिडून असणें (जमीन, शरीर इ० चें). 'या स्थळास नदीची लगत आहे.' २ सोयरीक; नातें. ३ दाट परिचय; घसण. 'ही गोष्ट त्याजपाशी बोलायाइतकी त्याची आमची लगत नाहीं.'–क्रिवि. १ जवळ; समीप; सन्निध. 'दसरा नवरात्राचे लगत आहे म्हणून

कोण्ही नवरात्रांतच धरतात. ' २ लागोपाठ; लगोलग. ' लगत तीन चिठ्ठ्या पाठविल्या तेव्हां तो निघून आला. ' २ अनुक्रमानें; खंड न पडतां (कालाचा, स्थलाचा). ' एथून लगत तीन शेतें आमचीं आहेत. ' [लाग] सामाशब्द- **०मजकूर**-पु. परिच्छेद, भाग न पाडलेला (लेखी किंवा तोंडी) मजकूर; लागोपाठ मजकूर. तुटक मजकुराच्या उलट. **०लाखोटा**-पु. १ हुंडीपत्राचा इ० मजकूर आंत लिहून त्याच हुंडीपत्रास चिकटवून पाठविलेला कागदाचा लाखोटा; हुंडीला चिकटविलेली आणि हुंडीबरोबर घडी घातलेली सूचना आंत असणारा लाखोटा. २ आंतील मजकूर व वरील पत्ता निरनिराळ्या बंदावर नसून एकाच बंदावर असतात तें पत्र; पत्र'व लाखोटा एकच असा प्रकार. **०हुंडी**-स्त्री. सूचनेचें पत्र सोबत असलेली हुंडी. **लगता**-पु. १ संबंध; जोड; जवळजवळ असणें (देशांचें, पदार्थांचें). २ शेजारीं, भिडून असणारा प्रदेश; सरहद्द-प्रदेश; सीमाप्रांत. ' यंदा करनाटकचें लगत्यास चांगलें पीक आलें.' -वि. लागून, जोडून असलेला. **०जाब**-पु. १ लगतलाखोटा; हुंडीबरोबर घडी करून हुंडीला चिकटविलेलें हुंडीच्या सूचनेचें पत्र. २ हुंडीच्याच लिफाफ्यांत लिहिलेली हुंडीसंबंधी सूचना, जाब. **०लाखोटा**-पु. लगत लाखोटा पहा. **०लोळ**-पु. १ मागें लोंबणारा वस्त्राचा घोळ; मागें फरपटणारें वस्त्र. २ मालिका; माळ; लांबण. (क्रि० लावणें; लागणें). ३ शेतें, मळे, झाडें इ० कांची लांब मालिका; आश्रितांची, पदार्थांची, साधनें-उपकरणीं यांची लांबलचक मालिका, गाडी. **लगताळ**-स्त्रीपु. माला; माळका; हार; एकसारखा क्रम. (क्रि० लावणें; लागणें) **लगताळा-ळ्या**-वि. १ चिकट; पाठ पुरविणारा; तेलंगभट. २ अंगावरील वस्त्राचा घोळ मागें टाकणारा; कपडे फरपटवीत जाणारा. (ल.) गबाळ; भोंगळ. **लगती**-वि. १ विवाहानें संबंध असलेला; सोयरीक असणारा; सोयरा; नातेवाईक. ' तुम्ही पडला श्रीमंतांचे लगती, तेव्हां तुम्हास असें कसें बोलावें ? ' २ स्नेहाचा; प्रीतीचा. [लगत]

लगतग—स्त्री. १ एखाद्यानें ठेवलेली ठेव बळकावणें; लबाडीनें तिचा अपहार करणें. २ एखाद्या धंद्यांतील लबाडी; अप्रामाणिक व्यवहार.

लगतऱ्या—स्त्रीअव. लकतऱ्या पहा. (क्रि० निघणें; काढणें)

लगदन—न. (राजा.) (मांस, कणीक इ० च्या) गोळ्याचा हातानें, तोंडानें तोडलेला तुकडा; लचका. (क्रि० घेणें; तोडणें) [लगदा]

लगदा—पु. १ लादा; भिजवून, चांगला मळून केलेला गोळा (चुना, चिखल, कणीक इ० कांचा). २ एक घास होईल एवढा मांस इ०कांचा गोळा; लचका. ' रिपुहृदयांचे चि तोडिती लगदे । -मोकर्ण २१.२१. ३ घट्ट पदार्थ (चिघळणारा गूळ, पळपळीत भात इ०). ४ (समासांत) पचपचीत व मऊ (भात, पीठ, भाजी इ० शब्दांशीं विशेषणाप्रमाणें योजतात.) ५ पुंजका गोळा; गुंता (केंस, कागद, पानें इ०चा).

लगदा—पु. १ लाखेचें पुरण; लाखेचें मढवण (दागिन्यांना केलेलें). २ बांगडीचा एक प्रकार; लाखेनें मढविलेली बांगडी. ३ (ल.) खोटें सोनें.

लगधग—स्त्री. १ (घाईनें, चलाखीनें) जाणें, येणें, काम करणें; झटपट; लगबग; चपलता. २ गडबड; धांवपळ. [ध्व.]

लगधगी-ग्या-वि. चपळ; चलाख. [लगधग]

लगन—न. (ग्र.) लग्न; विवाह. [सं. लग्न; हिं. लगन]

लगनकळा, लगनघटका, लगनचिठ्ठी, लगनचुडा, लगनटका, लगनटीप, लगनसराई-लग्नकळा इ० पहा.

लगफग—क्रिवि. जोराच्या वाऱ्यानें कपडा इ० कांच्या फड-फड्ण्याप्रमाणें आवाज होऊन; फडफड. [ध्व.]

लगबग—स्त्री. १ घाई व गडबड; त्वरा; उतावळी. ' लगबग उठतां हे राजकन्येस जाली । ' -सारुह ४.७१. २ झटपट; चलाखी. ३ उत्सुकता. -क्रिवि (काव्य) घाईनें; गडबडीनें; त्वरेनें; **लगबगा-गें**-क्रिवि. (काव्य) घाईनें; गडबडीनें. ' लगबगें येईका । ' -नव १३.११३. **लगबगी-ग्या**-वि. सदां घाई असलेला; अतिशय उतावीळ. **लगबगून**-क्रिवि. (क्वचित् काव्यांत व अशिष्ट भाषेंत) घाईनें; गर्दीनें. [लगबगणें क्रियापदापासून]

लगभग—क्रिवि. (चुकीनें) सरासरी. ' लगभग बारा वर्षे झालीं त्या गोष्टीला. ' [लगोलग हिं]

लगम—स्त्रीपु. लगाम पहा.

लगर—स्त्री. (प्रां.) (मोत्यांचा, फुलांचा) सर [?]

लगर—वि. (प्रां.) आडदांड; उर्मट; बेडखोर. [लंगर ?]

लंगर—स्त्री. (व.) लांबण; मालिका. ' मालांच्या डब्यांची लंगर लागली. ' -वि. (व.) दीर्घसूत्री; चेंगट. **लंगरी**-वि. लंगर.

लंगर—पु. १ गलबताचा लोखंडी नांगर. २ लोखंडाची मोठी साखळी. ३ (ल.) साधारण प्रमाणापेक्षां मोठा, अवजड पदार्थ (दागीना; तोडा; सांखळ्या, दोऱ्या इ०). ' सव्वा शेराचा लंगर ज्यानें हातामधीं घातला । ' -ऐपो ७१. ४ चुना, पोहे इ० कुटण्याचें एक यंत्र. ५ मोहरमच्या सणांत फकीरास वाटतात तें अन्न, शिधा. ' अनुहत लंगर बाजे । फकीर दरवाजे दरवाजे । ' ' शहर मजकूरीं पेशजी मोगलाई अमलांत दररोज लंगर पांच सात पल्ले धान्याचा चालत होता. ' -वाडयोमारो २.२७२. ६ मठ. [फा. लङ्गर] (वाप्र.) **०तोडणें**-(माण.) जत्रेंत खंडोबापुढें पुजाऱ्यानें लोखंडी सांखळी तोडणें. सामाशब्द- **०खाना**-पु. १ अवाढव्य, विस्तीर्ण कारखाना. २ (ल.) जेथें दाद लवकर लागणें कठिण अशी संस्था, प्रकरण इ०; अन्नछत्र. ' गुरु गोविंदसिंगाच्या जयंतीच्या वेळीं जो लंगरखाना उघडण्यांत आला होता त्यांत

बाटेल त्या माणसाला भोजन करण्यास मुभा ठेवण्यांत आलेली होती.' –प्रबोध (धुळे) १६.२.३६. **०खानी**–वि. १ अवाढव्य व भव्य (कारखाना, धंदा, लवाजमा इ०). २ अडाणी, आडदांड लोकांची टोळी. **०दोर**–पु. गलबताच्या नांगराचा दोर [दे.] **०हाड्या**–वि. मोठ्या हाडाचा; मोठाड; जाडजूड; धट्टाकट्टा. **लंगरी काम**–न. (लंगरानें केल्याप्रमाणें काम) जंगी व बेडौल मनुष्य; फाजील वाढलेला, लोटया माणूस.

लंगरू—वि. घोडयाची एक चाल. –अश्वप १.१९४. [लंगडी ?]

लगलग—स्त्री. १ घाई; उताविळपणा; त्वरा; धांदल. (क्रि० करणें). २ (ना.) आधाशीपणा. –क्रिवि. जलदीनें; झपाटयानें (काम करणें, जेवणें; इ०) [सं. लग्न; म. लग द्वि.] **लगलगां**–क्रिवि. लगबगीनें.

लगविणें—सक्रि. लगाविणें पहा.

लगहीन—न. (कों.) गवंडी कामाचें हत्यार.

लगा—पु. (विणकाम) सुताचे ५ किंवा १० थोक एकत्र ताणून केलेला ताणा.

लगा—पु. १ धिरा; लग. २ (ल.) संबंध; नातें; धागा दोरा; सूत; संबंधाचें, दळणवळणाचें साधन. (क्रि० लावणें) ३ (संधी, लक्ष, उद्देश या अर्थी) लाग पहा. (क्रि० लावणें) ४ आश्रय; आधार. 'रक्षी द्रौणीतें जो दृढ होतो आयुचा लगा मरणीं।' –मोकर्ण ११.६९. [लग् = संयोग होणें] **०बांधा**–दा–पु. १ संबंध; अंग; बंधन (नात्याचें, मित्रत्वाचें). २ आश्रय; आधार. 'आम्हास एथें कोण्हाचा लगाबांधा असता तर भिक्षा कशास मागितली असती?' ३ दैवयोग; नेमानेम; लागाबांधा पहा. 'लगाबांधा जसा लागला असतो तसें घडतें.' ४ पूर्वजन्मींचा संबंध; ऋणानुबंध. [लागणें+बांधणें]

लंगाड—न. (गो.) टवाळी.

लगाम—स्त्रीपु. १ घोडयाला ताब्यांत ठेवण्याकरितां व वळविण्याकरितां त्याच्या जबडयांत अडकविलेली लोखंडी सांखळी, कडी. मुखयंत्रण. उभा लगाम, करवती लगाम, कडोळी–ळया लगाम किंवा कडयाळें, कडयांचा लगाम, काटया किंवा काटे लगाम, काटेकडी लगाम, कुऱ्हाडया लगाम, साकळी लगाम, सुतळया लगाम असे लगामाचे कांहीं प्रकार आहेत. 'तव भुज या तरलश्रीवडवावरनीं लगाम हा बा! हो।' –मोकर्ण ७.१४. २ वरील सांखळी, कडी अनीनीला किंवा जेराला लावून केलेलें नियंत्रणसाधन; वादी. ३ स्वाधीनसूत्र; मार्गदर्शकत्व; व्यवस्था; दिशा दाखविणें; ताबा. 'या फौजेचा लगाम बक्षीचे स्वाधीन आहे त्यास वश करा म्हणजे झालें.' ४ कुस्तीचा एक डाव. जोडीदाराला खालतीं धरून घोडयाला लगाम देतात त्याप्रमाणें आपलीं दोन बोटें जोडीदाराच्या गालफडांत घालून त्याला चीत करणें. [फा. लिगाम्] (वाप्र.) **०घालणें**–आळा घालणें. **लगामी**–वि. १ स्वाधीन; अधीन. २ व्यवस्थित; शिस्तवार. याच्या उलट बेलगामी. **लगामीं**–क्रिवि. हुकुमाखालीं; ताब्यांत; शासनाखालीं. (क्रि० असणें; चालणें; वागणें; लागणें; ठेवणें; चालवणें; **आणणें; लावणें**) 'हा जन तुमच्याचि असे इतरा कोण्हाचियाहि न लगामीं।' –मोवन ४.६६. –भाव २४.

लगाव—पु. १ नेम; रोख (एखाद्याजागीं तोफ इ०च्या माऱ्याचा). 'नगरच्या किल्ल्यास भिंगारकडून लगाव आहे.' २ संबंध; संधान. या शब्दाचे हिंदींत यापेक्षां जास्त अर्थ होतात. [लागणें; हिं. लगाव]

लगाव(वि)णें—उक्रि. (चाबूक, काठी इ०कांनीं) मारणें; ठोक देणें. [हिं लगाना] (**शिव्या**) **लगावणें**–शिव्या देणें.

लगिन्या बैल—पु. कालवडीशीं लग्न लावून मोकाट सोडलेला गोऱ्हा; सांड; पोळ. [लगीन+बैल]

लगी—स्त्री. १ निशाण; पताका; झेंडा. (विशेषतः स्वारीपुढें चालवीत असतात तो). 'जाधव चवाण घोरपडे घाटगे लग्या भडकती जरी।' –ऐपो २३२. २ खांबांच्या माथ्यावर ठेवलेली तुळई; लग पहा. [सं. लगुड; सं. लग्; हिं. लगी; म. लग]

लगीत—वि. (व.) लागवडींत असलेली; वहीत (**जमीन**)

लगीत—वि. (व.) पुष्कळ.

लगीन—न. (प्र.) लग्न पहा. [अप. लग्न] **लगीन गोष्ट, लगीन घटका, लगीन घर, लगीन चिठी, लगीनचुडा, लगीनटका, लगीनटीप**–लग्नगोष्ट, लग्नघटका इ० पहा. **लगीन न्हावप**–क्रि. (गो.) लग्नाचा सोहळा उपभोगणें. **०सराई–साडा**–स्त्री. लग्नसराई–साडा पहा.

लंगुटा, लंगुटी, लंगुटीयार, लंगूटबंद—लंगोटा इ० पहा.

लगुंडा—पु. लगोंडा पहा.

लंगूल—न. शेपूट. [सं. लांगूल]

लगू, लोग– क्रिवि. (व.) पर्यंत. 'घरालगू ये' [हिं. लग]

लगे—उद्गा. एखाद्यास उत्तेजन देणें, चेतविणें, या कार्यी योजावयाचा शब्द. धन्य! वाहवा! भले! [लागणें] **०ढोल**–स्त्री. चटपट व चलाखी (कामाची). (क्रि० लागणें). –क्रिवि. (कोल्हाटी, भोरपी, गारुडी इ०कांनीं ढोलके वाजवून जलद व पुनः पुनः उच्चारलेला उद्गार) झपाटयानें; चलाखीनें; चटपटीनें व जोरानें (चालू काम, एखादी क्रिया, चळवळ). (क्रि० लावणें; चालणें; करणें) लगेधूम पहा. [हिं. लगीडहूल]

लगे—क्रिवि. लागलीच; लगोलग पहा. [लागणें] **०लगे-करून**–क्रिवि. घाईने व अर्धवट; कसे तरी. 'पाऊस डोईवर आला

तेव्हां लगेतगेकरून एकदांचें घर शेकारून घेतलें. ' •तार–क्रिवि. (व.) एकसारखा; मध्यें खळ न पडतां. ' लगेतार बारा वर्षें नोकरी केली. ' [हिं. लगातार] •धूम–क्रिवि. झपाट्यानें; चटपटीनें; जलदीनें; झटक्यांत; क्षणांत. (क्रि० पळणें; धावणें; जाणें; येणें). हा शब्द भोरपी इ० लोक चमत्कार दाखवितांना योजितात व लगेढोल या अर्थीच पण थोडया फरकानें हा येतो. •लगे–स्त्री. घाई; गर्दी; उतावळी. ' अशी लगेलगे केली तर काम बिघडेल, सावकाश करा. ' –क्रिवि. घाईनें; गडबडीनें; उतावळीनें. ' तुमचें बलावणें आलें तेव्हां लगेलगे जेवलों आणि तसाच आलों.' •हात–क्रिवि. १ त्याच वेगानें; त्याच दमांत; त्याच कामाबरोबर. ' तुम्ही बाजारांत जातांच आहां तसेंच लगेहात पुढें जाऊन त्या गृहस्थास बोलावून आणा. ' २ दुसरी एखादी गोष्ट करीत असतां; त्याचवेळीं; एकसमयावच्छेदेंकरून. ३ (सामा.) लागलीच; पाठीमागून; ताबडतोब. ' एका शब्दावरून निराळया शब्दाचे वाचक असे शब्द लगेहात हावे तितके करतात. ' –नि १८६.

लगेसा—स्त्रीवि. (अशिष्ट) जरूर असेल तितका. [लागेल–लागेलसा+असा]

लंगोट—पु. १ लंगोटा; मोठी लंगोटी, २ तालीम, कुस्ती यांसाठीं वापरावयाची चड्डी. [हिं.] •पेच–पु. (मल्लविद्या) एक विशिष्ट पेंच. •बंद–पु. १ ब्रह्मचर्य पालन करणारा. व्रतस्थ इसम. २ फक्त लंगोटी नेसणारा मनुष्य, सामान्य कामकरी मजूर. **लंगोटा**–पु. मोठी लंगोटी. **लंगोटी**–स्त्री. १ फक्त गुह्येंद्रियें झांकण्यापुरती करगोटयांतून ओंवलेली–खोवलेली वस्त्राची पट्टी. (क्रि० नेसणें). २ चार सहा–बोटें रुंद व हात-दीड हात लांब असा वस्त्राचा तुकडा; अरुंद व फार लांब असलेला तुकडा; पट्टी (जमीन इ० कांचा) [फा. हिं.] **लंगोटीयार–मित्र**–पु. बाळमित्र; लहानपणीचा मित्र. म्हo सर्वांशीं गांठ पडावी पण लंगोटीयाराशीं गांठ पडूं नये.

लगोंडा—पु. १ एका ठिकाणीं चिकटणारा गोळा (केसांचा, दोऱ्यांचा, पानांचा, कागदांचा इ०). २ लगदा; गुंता; चिकटा; चिकटण. जसें– डिकाचा-रक्ताचा-चिकाचा-कणिकेचा-लगोंडा. ३ चिकटलेपणा; चिकटलेली स्थिति. [लागणें+गुंडा]

लगोरी—स्त्री. १ चेंडूनें पाडण्याकरितां एकावर एक रचलेले लाकडाचे किंवा खापराचे सात वर्तुलाकार चपटे तुकडे प्रत्येकी. २ अशा रीतीनें रचलेल्या विटा, रोडे, दगड इ० प्र. **लगोऱ्या**–अव. १ खेळण्यासाठीं एकावर एक रचलेली रास, उतरंड. २ डाव; खेळ; चेंडू फेंकून एकावरएक ठेवलेले सात तुकडे (लगोऱ्या) पाडण्याचा प्रकार. का. लगेचेंडू. ३ लकतऱ्या पहा. [सं. लघु+उपरि ? किंवा लग्न+गोल]

लगोल(ला)ग—क्रिवि. पाठोपाठ; लागलीच मागून; खंड न पडतां; एकसारखें; अविरत. [लागणें; लग द्वि.]

लग्गा—पु. १ संधि. (ना.) २ संधान; वशीला. लाग पहा. [सं. लग्]

लग्न—न. १ सोयरीक; शरीरसंबंध; विवाह. (क्रि० करणें. होणें). २ मुहूर्तावर केलेला विवाहसमारंभ. (क्रि० लावणें; लागणें). ४ ऐक्य; साहचर्य. ' मग लग्नीं जेविं ॐकारु । बिंबींचि विलसे । ' –ज्ञा ८.११६. ५ योग; मुहूर्त; समय. –ज्ञा १६.३०१. ' हनुमान् प्रभुला भेटे ज्या लग्नीं फार चारुतें । ' –मोरामायणें पृ. ६. ६ क्रांतिवृत्तांतील प्रत्येक राशीबरोबर एकामागून एक वर येणारा विषुववृत्ताचा विभाग; विवक्षित कालीं उदयाचलाशीं संलग्न असणारा राशि. ७ राशीचा उदयकाल; राशींत सूर्याचा गमनकाल (अहोरात्रांत एकंदर बारा राशींचीं बारा लग्नें होतात). उदा० मेष वृषभ लग्न, उदय-अस्त लग्न. –वि. १ संयुक्त; संबद्ध; चिकटलेलें. २ (ल.) निरत; आसक्त; तल्लीन. [सं.] (वाप्र.) •नाहणें–विवाहविधींत सांगितलेलीं नहाणीं व दुसरे संस्कार करून घेणें. सामाशब्द– •क–पु. हामीदार; जामीन. •कळा–स्त्री. लग्नसमारंभामध्यें नवरीच्या चेहऱ्यावर दिसणारें किंवा दिसतेसें वाटणारें तेज, टवटवी. •कार्य–न. मंगल कार्य (लग्न, मुंज गर्भाधान इ.) [सं.] •कुंडली–स्त्री जन्मकालीं पूर्वेकडे उदय पावलेल्या राशीचा दर्शक अंक पहिल्या घरांत मांडून तेथून डावीकडे क्रमानें प्रत्येक घरांत तदनुरोधानें राशि व त्या राशींचे ग्रह लिहून तयार केलेलें बारा घरांचें कोष्टक. [सं.] •गंडांत–पु. कर्क-सिंह, वृश्चिक-धनु व मीन-मेष या लग्नांच्या संधीची एक घटका (जसे, कर्काची शेवटची अर्धी व सिंहाची पहिली अर्धी मिळून एक). [सं.] •गीत–न. विवाहगीत; मंगलाष्टक. [सं.] •गोष्टी–न. एव.अव. १ एखाद्याचा विवाह किंवा दुसरा एखादा इष्ट हेतु सिद्धीस जाण्याकरितां त्या मनुष्याची केलेली शिफारस, प्रशंसा. जसें–' नोकरी नसली म्हणून काय झालें, तो मुलीवर पांचशेर सोनें घालील अशी आमची खात्रीच आहे ' ' हा चांगला पतीचा माणूस आहे, याला हजार रुपये कर्जाऊ दिले तरी चिंता नाहीं इ० २ अनुरागाचीं पोकळ किंवा निरर्थक बोलणीं; मदतीचीं आश्वासनें. •घटि(ट)का–स्त्री. १ लग्न किंवा मुंज लावण्याकरितां ज्योतिःशास्त्रांत शुभ म्हणून सांगितलेला मुहूर्त, वेळ. २ मुहूर्त साधण्याकरितां पाण्यांत टाकलेलें वेळ मापण्याचें अर्धगोलाकृति भांडें; घटिपात्र. ३ असा निश्चित केलेला आणि साधलेला काल, मुहूर्त. ४ (ल.) अणीबाणीची वेळ, प्रसंग; कांहीं करून अडचण पार पाडलीच पाहिजे अशी वेळ. ' ब्राह्मण तर जेवावयास बसले, घरांत तूप नाहीं अशी लग्नघटिका ओळंबली आहे म्हणून तुमच्याकडे धांवत तूप मागावयास आलों. ' [सं. लग्नघटिका] •घर–न. १ ज्यामध्यें

लग्नसमारंभ चालला आहे तें घर; जानोशाचें घर. २ (ल.) लग्नांतल्याप्रमाणें माणसांनीं गजबजलेलें, फार गडबड चालली आहे असें घर. ३ लग्नासारखा भरमसाट खर्च चालला आहे, आनंदी-आनंद आहे असें घर. ०चिटी-ठी-ट्ठी-स्त्री. १ लग्नाचा परवाना (सरकारकडून शूद्रादिकांस मिळत असलेला). २ लग्नमुहूर्त ज्यांत आहे असा जोशानें केलेला कागद. ३ लग्न-मुंजीची आमंत्रण-पत्रिका; कुंकोत्री. ०चु(चू)ड्या-पु. लग्नांत नवरीस व तिच्या बाजूच्या वऱ्हाडणींस बांगड्या इ० भरण्याचा विधि. हा घाण्याच्या पूर्वी होतो. ०टका-चका-पु. लग्न लागल्याबद्दल घेण्यांत येणारा सरकारी कर (हा शूद्राकडून घेण्यांत येई). ०टीप-स्त्री. लग्नाच्या मुहूर्ताची यादी. ०तीथ-स्त्री. ज्या तिथीस लग्नाचा मुहूर्त येतो ती तिथि. [सं. लग्नतिथि] ०थर-पुन. लग्नासाठीं घेतलेलें कापड-चोपड. थर पहा. [दे.] ०नक्षत्र-न. लग्नास शुभ असलेलें नक्षत्र. [सं.] ०पत्रिका-स्त्री. वधूवरांच्या पत्रिकांवरून लग्नाचा शुभ मुहूर्त नक्की करून उभय कुलांच्या उल्लेखासह तो ज्यावर लिहून ठेवतात तो कागद. लग्नापूर्वी याची पूजा करतात. [सं.] ०प्याला-पु. (तेली) नवऱ्यामुलानें लग्नासाठीं मुलीकडे जाण्याचा समारंभ; वरघोडा. -बदलापूर २६९. ०भुज-पु. (ज्यो.) मेषादिक लग्नाचा भुज; चारकांड. ०मंडप-पु. लग्नसमारंभाकरितां उभारलेला मांडव. [सं.] ०मास-पु. लग्न करण्यास शुभ म्हणून सांगितलेला महिना; लग्नाचा मोसम. [सं.] ०मुहूर्त-न. १ लग्नास शुभ अशी वेळ, मुहूर्त. याचे दिवा, गोधूल किंवा गोरज आणि रात्रौ असे तीन प्रकार आहेत. २ (लग्न आणि मुहूर्त =मोहतर, कमी दर्जाचें लग्न). लग्नकार्य पहा. [सं.] ०वेळा-स्त्री. लग्नघटिका; लग्न लावण्याची वेळ. 'त्रिवेणीसंगमीं तिसी साधियेली लग्न वेळा।' -मध्व ३९१. ०शिष्टाई-स्त्री. लग्नाची मध्यस्थी; लग्नासंबंधी बोलणें; लग्न जुळविणें. ०शुद्धि-स्त्री. चिंतिल्या कार्याच्या आरंभाकरितां राशींची निर्दोषता, शुभता. [सं.] ०सराई-स्त्री. लग्नाचा हंगाम, मोसम (मार्गशीर्षापासून ज्येष्ठ महिन्यापर्यंत). ०साडा-न. १ लग्नांत वधूपक्षाकडून वराच्या आईस देण्यांत येणारें लुगडें. २ (कांहीं प्रांतांत) वराकडून वधूस देण्यांत येणारें उंची वस्त्र (पैठणी). ०सोह(हा)ळा-पु. लग्नसमारंभांतील मेजवान्या, उत्सव इ०; विवाहोत्सव. 'लग्नसोहळा ते वेळीं। चार दिवस जाहला।' लग्नाऊ-वि. लग्नाच्या प्रसंगास उपयोगी, योग्य (अहेरी वस्त्र इ०). लग्नाचा-वि. लग्नाच्या संबंधाचा (नवरा, बायको). लग्नाक्षता-स्त्रीअव. लग्नांत वरानें व वधूनें परस्परांवर टाकलेले तांदूळ (सामा.) लग्नविधि. लग्नीक-वि. (गो.) बांधलेला. लग्नक पहा. 'कुटुंबाचा मालक आपल्या वहिवाटाचा हिशेब देण्यास लग्नीक आहे.' -गोमांतक रीतीभाति ११. [सं. लग्नक]

लग्या-न. फांसे, जुगार या खेळांतील एक संज्ञा.

लंघणें-अक्रि. १ क्षीण, अशक्त होणें. २ थकणें व वेंगणें (रोग, उपवास, श्रम यांमुळें). -सक्रि. (काव्य) १ ओलांडणें; आक्रमणें. -ज्ञा १५.३५९. 'स्वापद पक्षियांचे पाळे। पळती लंघिती अंतराळें।' -मुआदि ४.१०७. २ (ल.) अतिक्रमणें. [सं. लंघन]

लंघन-न. १ उपवास करणें (विशेषतः पथ्य म्हणून). (क्रि० करणें; धरणें; पडणें). उपोषण व उपास पहा. 'जैसें नेणतां बाळक। लंघनचि कीं।।' -ज्ञा १७.३५०. २ ओलांडणें; आक्रमणें; वरून जाणें. ३ उल्लंघन; अवज्ञा. 'भीमप्रिया प्रियसखी लवहि न साहेल लंघन गदा हें।' -मोवन ९.१३. ४ क्षीण होणें. ५ (संगीत) एखादा स्वर रागालापांत टाळणें अगर त्याला फारच थोडा स्पर्श करून जाणें. [सं.] लंघले-लोपले-पुभव. दुखणेकरी व अशक्त; श्रांत व जर्जर. [लंघणें द्वि.]

लघळ-वि. लघाळ पहा. ०पणा-पु. लाळघोटणी; लोचटपणा. 'या लघळपणाबद्दल थेरड्या, स्त्रीराज्यांतून तुला आतांच्या आतां हांकलून दिलें जाईल.' -बाय २.४

लघाळ-स्त्री. १ मालिका; रांग; ओळ (वस्तूंची) (क्रि० लावणें; लागणें). 'एथून तेथून पांघरुणाची लघाळ लागली.' २ लांबलचक भाषण; भाषणाची शेज, गाडी (विशेषतः ढाळाढाळीचें व निराधार). (क्रि० लावणें; लागणें; होणें). ३ (सामा.) दीर्घसूत्री, नीरस बोलणें. [? सं. लघ्वी=लहान गाडी+आली=ओळ]

लघाळ-वि. १ पुढेंपुढें करणारा; लाघवी; लघळ; लाळघोट्या. २ अतिशय बडबड्या; बोलका. ३ लोचट; चिकट; कोडगा. ०की-स्त्री. १ लघळपणा. २ गप्पा; अतिशय बडबड. ०माशशी-भवानी-बाई-स्त्री. १ लघाळ, बडबडी व गप्पा मारणारी बाई. लोचट स्त्री.

लघिमा-पु. १ हलकेपणा; कमीपणा. २ अष्टमहासिद्धी-पैकीं एक सिद्धि; पराकाष्ठेचा, निसर्गबाह्य, हलकेपणा. -एभा १५.४२. ३ हलुवारपणा. 'ऐसिया लघिमा चालतां।' -ज्ञा १३.२५५. [सं. लघु]

लघिष्ठ-वि. अत्यंत हलका. [सं. लघु परमावधिवाचक रूप]

लघु-वि. १ हलका; (भारानें) जड नव्हे असा. 'गुरुत्वें जेव्हडा चांगु। तेव्हडाचि तारुनि लघु।' -अमृ ९.६९. २ लहान; छोटा. (आकारानें). ३ ह्रस्व (स्वर). याच्या उलट गुरु. ४ (संगीत) एकमात्राकाल. ५ हलका; क्षुल्लक; क्षुद्र (योग्यतेनें). 'बकी सुमति ताटका लघु न हे भली लाजशी।' -केका ५५. [सं.] सामाशब्द- ०कथा-स्त्री. एकवाङ्मयप्रचार; शक्य तितक्या परिणामकारक रीतीनें आणि शक्य तेवढ्या कमी पात्रप्रसंगाच्या साह्यानें सांगितलेली एकच गोष्ट. -प्रतिभासाधन. ०कोष-

न–पु. (भूमिति) काटकोनापेक्षां लहान असलेला कोन; (इं.) ॲक्यूट ॲंगल. ०कोणत्रिकोण–पु. (भूमिति) ज्या त्रिकोणाचे तिन्ही कोन लघुकोन असतात तो कोण. ०ग्रह–पु. (ज्यो.) सात मोठे ग्रह व पृथ्वी हीं खेरीज करून बाकीचे लहान ग्रह; ग्रह-कल्प. उदा० मंगळाच्या पलीकडचे सूर्याभोंवतीं फिरणारे सुमारें २०० लहान ग्रह. [सं.] ०चीर–न. रुमालासारखें वस्त्र. 'शुभ-लघुचीर हातीं घेऊनी । हरीवरूनि वारीत रुक्मिणी । –ह २७.७१. ०तम साधारण भाज्य–पु. (गणित) दिलेल्या संख्यांनीं जीस निःशेष भागतां येईल अशी सर्वांत लहान असलेली भाज्य संख्या. [सं.] ०त्व–न. १ हलकेपणा. २ लहानपण. ३ (ल.) क्षुद्रता; मान्यतेनें हलकेपण; वैभव, ऐश्वर्य, गांभीर्य किंवा अधिकार यांचा अभाव, उणेपणा. ४ अवमानाची, हलकेपणा आल्याची भावना. (क्रि० येणें; वाटणें). 'ते पिढीजाद भिक्षुक, त्यांणीं याचना केली म्हणून त्यांस लघुत्व येतें असें नाहीं. ' ०वृंती–वि. लहान दांत असणारा (घोडा). घोड्याचें एक अशुभ चिन्ह. अशुभचिन्हें पहा. [सं.] ०न्यास–पु. पूजेंतील लहान देवतास्थापन विधि; न्यासाचा एक प्रकार. याच्या उलट महान्यास. न्यास पहा. [सं.] ०भोजन–न. फराळ; अल्पाहार; उपाहार. [सं.] ०मंगल–न. उपनयन व विवाह यांशिवाय बाकीचीं जातकर्मादिक कर्में, संस्कार प्र. [सं.] ०मालिनी–वसंत–पु. एक रसायण; मात्रा. ०मूत्र–न. लघवी दाबून धरणें; मूत्रनिग्रह. –वि. मूत्रावरोधास समर्थ असलेला. [सं.] ०लाघव–न. चापल्य. ' किरातें लघु लाघवें करून । बाणामागें विंधोनि बाण । वदन संपूर्ण भरियेलें । '–मुआदि ३०.१८६. [सं.] ०लेखन–न. ऐकलेलें भाषण ठराविक चिन्हें इ० कांनीं लवकर व थोड्या जागेंत लिहून घेणें. (इं.) शॉर्ट-हॅंड. [सं.] ०लेखनपद्धति–स्त्री. अशा तऱ्हेनें लिहून घेण्याची लिपी, प्रकार. ०लेखक–वि. लघुलेखन करणारा. ०विष्णु–पु. (गो.) लघुरुद्राप्रमाणें एक अभिषेकविधी. ०वृत्त–न. लहान वृत्त; गोलाला मध्याखेरीज इतर ठिकाणीं सरळ पातळीनें कापिलें तर तेयें गोलाच्या पेक्षां लहान त्रिज्येचें जें वर्तुल होतें तें. –सूर्य १०. [सं.] ०शंका–स्त्री. १ लघ्वी; मूत्र करणें. २ मूत्र. [सं.] ०शंकेस जाणें–लघ्वी करण्यास जाणें. ०सुदर्शन चूर्ण–न. एक ज्वरनाशक चूर्ण. यांत गुळवेल, पिंपळी, हिरडेदळ, सुंठ, लवंग, कडेचिराईत इ० औषधी असतात. [सं.] लघ्वक्ष–पु. (ज्यो.) बृहदक्षार्शी लंबरूप असणारा व्यास. –सूर्य २२. [सं.] [लघु+अक्ष] लघ्वाहार–पु. फराळ; अल्पाहार करणें. [सं. लघु+आहार] लघ्वी–स्त्री. १ मूत्र करणें. २ मूत्र (लघुशंका). ३ नाजूक स्त्री, परी. [सं.]

लंच—स्त्री. (क.) (खड्यांच्या खेळांत) डाव; खेळाचा फेरा. ' गोदे तुझ्यावर लंच झाली. '

लचक—स्त्री. १ कचक, उसण; मुरगाळणें. (क्रि० भरणें; निघणें; बसणें). २ उसण भरल्यानें होणारें दुःख; चमक. (क्रि० मारणें). ३ चट; चटक; आवड; छंद. (क्रि० लागणें). [ध्व. लच्. हिं. लचकना] लचकणी–स्त्री. १ लचक भरलेली असणें. २ उडी मारणें; दचकणें इ० लचकणें–अक्रि. १ कचक, लचक भरणें; शिरेवर शीर चढून वेदना होणें; चमक मारणें; मुरगाळणें. २ उडी मारणें; दचकणें; खालीं, बाहेर, दूर, अकस्मात् सरकणें; घसरणें. ' तेवीं लचकलिया दिठी । '–ज्ञा १४.८४. ३ मुरडणें; मुरकणें. ' या शिकून शिकून कशा उगाच लचकति ललना । ' म्हण० १ लोभ लचकला पान्हा सुटला (वात्सल्य उद्भवून पान्हा आला). २ लोभ लचकला, डोळा पिचकला. लचका–पु. १ चट; चटक. (क्रि० लागणें). २ अकस्मात् भरलेली लचक. (क्रि० बसणें).

लचकंदड—न. (व.) काटा कोरण्याचें, कापण्याचें व उपटण्याचें एक शस्त्र (सुई, चिमटा इ०) ज्यांत आहे अशी कडी. [सं. लुच्=कापणें, उपटणें]

लचका—पु. १ हातानें, तोंडानें तोंडलेला तुकडा; घावा (मांस, कणीक इ० कांचा). (क्रि० घेणें; तोडणें; काढणें; मारणें; निघणें; जाणें).

लचकुटा—वि. (प्र.) लतकुटा पहा. कोडगा, निलाजरा.

लचं(चां)ड, लचं(चां)डी—नस्त्री. १ घोटाळ्यांत घालणारें काम; अडचण; संकट. २ घोटाळ्याची स्थिति; कातर; पेचाटी. ' येरें लचांडा देरे गचांड्या. ' (आपणावर बळेनें संकट ओढून घेणारांसंबंधीं म्हणतात). ३ उलाढाल; भानगड; झेंगट; कुलंगडें. ४ तोहमत; तुफान. ५ एखादें गोंधळविणारें साहस, गोष्ट; त्रासदायक योजना, कल्पि. लचं(चां)ड खोर, लचं(चां)डी–वि. १ नाहीं नाहीं तीं लचांडें करण्याचा स्वभाव असलेला; उलाढाली करणारा; घालमेल्या; कचाट्या; उलाढाल्या. २ द्वाड; लुडबुड्या; कळ लावणारा; भांडण चेतविणारा. (सामा.) लुच्चा; भामटा.

लचणें—अक्रि. (अशिष्ट) कचणें, खचणें; [हिं. लचना] लचला लवंगला–वि. १ थकलाभागला; दुखावला, लंगडा-लुला झालेला (पुष्कळ चालण्यामुळें, ओझें वाहण्यामुळें). २ (ल.) उठवणीस, मोडकळीस आलेला; बुडालेला (व्यापारी). [लचकणें+लवंगणें]

लचलच–चां, लचालचा—क्रिवि. चाटण्याच्या शब्दाचें अनुकरण करून. (क्रि० चाटणें; पिणें; खाणें; जेवणें). [ध्व.]

लचा(च्या)ड–ळ—वि. १ बडबड्या; वाचाळ; रिकामा गप्पीदास. २ लांडा कारभारी; चुगलखोर. ३ रिकामटवळा; क्षुद्र भाषण करणारा. ४ लोंचट. ' चालक धूर्तक लच्याळ । '–ज्ञा २.

३.२८. ४ लाचखाऊ. ५ (व.) बेशरम. **लचा(च्या)ड(ळ)की, लचा(च्या)ळी**–स्त्री. १ बडबडणें; रिकाम्या गप्पा मारणें. २ चुगलखोरी; कुचाळी; हलकटपणा; छिछोरी.

लंछन—न. (प्र.) लांछन पहा. 'अवघेयां लंछन आणी।' –गीता २.१५४५.

लच्छासाग—पु. (संगीत) एक राग. बिलावल रागाचा एक प्रकार. या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी धैवत. संवादी गांधार. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर.

लज—स्त्री. (गो.) लाज. [सं. लज्–लज्जा]

लजणें—अक्रि. लाजणें. 'तैसे अनुसरले जे मज प्राणें। तयांचेंन काइसेनिहि न लजे मी।' –ज्ञा ९.३४०. **म्ह०** (गो.) लजेक आनी पेजेक पडाना=आपली गरज भागवावयाची असेल तर लाज धरून होणार नाहीं.

लज(ज्ज)त—स्त्री. १ रुचि; स्वाद; गोडी; खुमारी. २ चट; चटक; वाईट संवय; खोडी. (क्रि० करणें). ३ छटा; वास; गंध; छाया; चुणुक, धुनुक (एखाद्या विशिष्ट किंवा परकीय गुणाची–रंग, राग, भाषा, रीति, रुचि इ०मध्यें). [अर. लज्जत] **०दार**–वि. रुचकर; स्वादिष्ट.

लजितीफजिती—स्त्री. फजिती; बेअब्रू; छीः थूः, [फजिती द्वि.]

लंजूर—वि. (मुंबई) कमजोर.

लज्जा—स्त्री. १ लाज; विनय; सभ्यता, मर्यादा दर्शविणें. २ लाजरेपणा; लाजाळूपणा. ३ भीड; संकोच. [सं.] **म्ह०** (सं.) एक लज्जां परित्यज्य सर्वत्र विजयी भवेत्।' **०कज्जा, लज्जेकज्जेनें**–क्रिवि. लाजेकाजेनें; लाज वाटून. **लज्जा(ज्या)यमान**–वि. लाजलेला; लज्जित; शरमिंधा. 'नगरीचे लोक लज्जायमान। कपाटें लावूनि बैसति।' [सं. लज्जमान] **लज्जालु**–पु. लाजाळू नांवाची वनस्पति. –वि. लज्जायुक्त; लाजाळू. [सं.] **लज्जावती**–स्त्री. लाजाळू नामक वनस्पति. –वि. लाजाळू (स्त्री.). [सं.] **लज्जावान्–शील**–वि. १ विनीत; मर्यादशील; सभ्य. २ लाजाळू. **लज्जित**–वि. लाजलेला; शरमिंधा. [सं.] **लज्जेचा**–वि. १ लज्जावान्–शील पहा. २ लाजिरवाणें; लाज आणणारें (कृत्य).

लज्जा(ज्या)होम—पु. (प्र.) लाजा होम; विवाहांत लाह्यांचा होम करतात तो.

लट–ठ—पु. सोडगा; सोटा. [हिं. लठ]

लट—स्त्री. १ युद्धेंद्रियावरील केंस; डोंट. २ गुंतागुंत (केसांची, लोकरीच्या सुतांची, तंतूंची) [हिं.]

लट—स्त्री. १ (व.) साठ कागदांचा संच. दोन लटांची एक जोडी, चार जोडयांची एक गड्डी होते. –के १९.४.३५. २ (राजा. कुण.) लाट. –मसाप २.१०५. [लाट]

लटक—स्त्री. १ लकब; धाटणी; रीत; तऱ्हा (गाणें, बोलणें, चालणें इ० कांची). 'त्याचे गाण्याची लटक मी साधावयाला जातों पण साधत नाहीं.' २ संवय; रीत. 'हरिभजनाची लाव लटक।' –राला ९१. ३ वाईट सवय, चाल; दुर्गुण; खोड. [हिं.]

लटक—पु. खोडसाळ, दुष्ट मनुष्य.

लटक—न. एक वृत्त, चाल. उदा० बजे सनई घनघोर। नगारनकी लगे झोर। बाजे कर्णा बंभोर। दिसों नाद धूमती।' –अकक २.३३.६९. [हिं.]

लट–कण–कन–कर–किनीं–किशीं—क्रिवि. १ अकस्मात किंवा वेगानें उठणाऱ्या, उडणाऱ्या, उसळणाऱ्या मनुष्याच्या किंवा वस्तूच्या क्रियेचें दर्शक अथवा त्यावेळीं होणाऱ्या शब्दाचें अनुकरण होऊन. [ध्व.]

लटकणें—अक्रि. १ (वरच्या आधारानें) लोंबणें; ओथंबणें. २ हिलगणें; अधांतरीं लोंबणें; लोंबकळणें. [हिं. लटकना] **लटकत चालणें**–नखऱ्यानें ठुमकत चालणें; लचकणें. **लटकन**–पु. (ना. व.) कंदील; टांगता दिवा. [हिं.] **लटकघिणें**–क्रि. टांगणें; लोंबत ठेवणें. लटकावणें पहा. **लटकावणी**–स्त्री. टांगणी; लोंबणी; लटकत ठेवलेली स्थिति. **लटकाव(वि)णें**–क्रि. १ टांगणें; लोंबत ठेवणें. २ ऐटीनें, झोकांत अंगावर घेणें, धारण करणें (पागोटें, शाल, दागिना). ३ पटकावणें; आत्मसात् करणें; लांबविणें (दुसऱ्याचा माल). [हिं. लटकाना]

लटका–की—वि. १ खोटा; खरा नसलेला; वस्तुस्थितीच्या विरुद्ध; असत्य. 'पण करिति मदुक्ती काय लटकी ही।' –मोसभा ५.३३. २ खोटा; लबाड; विश्वासघातकी; अप्रामाणिक; लुच्चा. ३ व्यर्थ; रिकामा; निष्फळ. 'गेलों खरा पर काम झालें नाहीं. लटकी खेप मात्र पडली.' ४ अन्याय्य; वृथा; अयुक्त; असमर्पक. 'मी कांहीं अपराध केला नसतां मला लटक्या शिव्या कां देतां?' ५ अधु; व्यंगयुक्त (अवयव, इंद्रिय इ०). **लटका पर नेटका**–खोटा पण चांगला दिसणारा; दिखाऊ; दर्शनी; चांगला. सामाशब्द– **०ताठा**–पु. रिकामा दिमाख, डौल. **म्ह०** नाकांत नाहीं काटा आणि लटका ताठा. **०फटका–बिटका–लांडा**–वि. खोटा; विश्वासघातकी; अप्रामाणिक; लुच्चा. [लटका द्वि.] **लटका(को)रा**–वि. खोटा; लबाड. [लटका] **लटकेंपण**–न. लबाडी; खोटेपण. **लटिका, लटीक**–वि. (विशेषतः काव्यांत) खोटा. लटका पहा. 'लटिकें हें तुम्हां वाटेल खेळणें। एका कृष्णाविणें अवघेंचि।' –तुगा २३. –मोसभा ५.७३. **लटीकवाद**–पु. (राजा.) खोटें सांगणें, बोलणें; खोटें बोलण्याचा दोष, पाप.

'देतों म्हणून बोललों आतां जर न दिल्हें तर मजकडे लटीकवाद येईल.' **लटिकेपण-णा**–नपु. खोटेपणा. 'ईश्वरवाक्य वृथा गेलें। आजि देवासि आलें लटिकेपण।' –कथा १.४.९५.

लटपट—स्त्री. १ चलाखी; जलद हालचाल. २ (पेंच घालून खेळतांना, मुलांचे खेळ रंगांत आले असतांना चिमण्या इ० पक्षी भांडतांना, वादविवादांत वगैरे दिसून येणारी). धडपड; खळबळ. ३ घाई; उतावीळपणा; धांदल. ४ तळमळ; अस्वस्थता. ५ मोठ्या भयानें होणारा थरकांप; घाबरगुंडी. 'वाघ पाहतांच त्याची लटपट झाली.' ६ हमरीतुमरी; अरेतुरे;बोलाचाली; भांडण. (क्रि० झडणें; होणें; लागणें). 'काल देवळांत त्याची आमची लटपट झाली.' ७ओढाताण; झटापट. 'प्रत्येक पदार्थांत तिन्ही गुणांची लटपट चाललेली असते. –गीर,१५६. (निंदार्थी) लबाडी; फसवेगिरी. –क्रिवि. ढिला बसविलेला खांब, खुंटा, खुंटी, खिळा इ०कांच्या हलण्याच्या रीतीचें किंवा शब्दाचें अनुकरण होऊन. (क्रि० हालणें; करणें). [ध्व.] **लटपटणी**–स्त्री. डगडगणें; डकडकणें; लटलट हालणें. लटपट पहा. [लटपटणें] **लटपटणें**–अक्रि. १ ढिलेपणामुळें डगमगणें; डकडकणें; हालणें (खांब, खुंटी, खिळा). २ फसणें; फिसकटणें; बिघडणें; नासणें; चुलींत किंवा रसातळास जाणें; नष्ट होणें (काम, जागा, अधिकार, मसलत, संपत्ति). 'मामलतीचे छंदास पडला तेणें करून पहिली सावकारी होती ती लटपटली.' ३ (निरुपयोगी, व्यर्थ म्हणून) दूर, बाजूला फेंकला जाणें; नापसंत, रद्द केला जाणें; गाळला जाणें; रद्द पडणें. 'पहिला कारभारी येतांच नवे कारभारी झाले होते ते लटपटले.' ४ निस्तेज, फिकें पडणें; वजन न पडणें. 'त्याचे वक्तृत्वापुढें आमचीं साऱ्यांचीं वक्तृत्वें लटपटलीं.' ५ गोंधळणें; घाबरणें. [लटपट] **लटपट पंची**–उद्गा. (पोपट, डोल) पोपटास म्हणायला शिकवितात तो शब्द. –स्त्री. १ (ल.) घोटाळा; गोंधळ. २ फसविण्याच्या उद्देशानें केलेलें धरसोडीचें, गोंधळविणारें भाषण. 'खऱ्या मार्मिक श्रोत्यांस केवळ लटपट केल्यानें लेशमात्रही द्रव येणार नाहीं.' –नि. ३ लबाडी; फसवेगिरी. ४ बढाई; शेखीच्या गोष्टी (अंगीं तादृश सामर्थ्य नसतां केलेल्या). 'एवढें डौलानें कशाला बोलतां, तुमची लटपटपंची चालायाची नाहीं.' [लटपटणें+पंची+पोपट] **लटपटीत**–वि. १ आवाज करून डगमगणारा; डगडगणारा, खिळखिळा (ढिला बसलेला खांब, खुंटा, खुंटी इ०). २ (ल.) डळमळीत; अस्थिर; अनिश्चित; चंचल (अधिकार, नेमणूक, काम, मसलत, भाषण, वर्तन). [लटपट] **लटपट्या**–वि. १ चपल; चलाख; झटपट्या (मनुष्य). २ धांदरा; गडबड्या. ३ पुढें पुढें नाचणारा; लडबड्या; लुडबुड्या ४ लबाडी करणारा; फसव्या. [लटपट] **लटापटी**–स्त्री. लटपट पहा.

लटं(टां)बर-बळ—न. १ सामान सुमान व खटलें; प्रवासांत बरोबर असणारें ओझें; सामान, गुरेंढोरें, बायकामुलें. २ घोटाळ्यांत घालणारा किंवा लोढणें म्हणून बागवावा लागणारा (चाकरांचा, गुरांचा इ०) समुदाय; (जिनसांची) रास, माल. ३ गुंतागुंतीचें; घोंटाळ्याचें काम, कृत्य (वाद, कज्जा इ०). [ध्व. लट किंवा भरमसाट बनविलेला शब्द]

लटरफटर—न. सटर फटर पहा. [ध्व.]

लटलट-लटां—क्रिवि. कांपण्याच्या, जलद हालण्याच्या रीतीचें दर्शक किंवा शब्दाचें अनुकरण होऊन. [ध्व.] **लटलट करणें**–१ जलद हालणें; कांपणें. २ लटपटणें; डगडगणें. **लठ्ठलटणें**–अक्रि. १ झोके खाणें; डोलणें; वाऱ्यांत स्वच्छंदानें, डुलणें, खेळणें; झोळकंबणें. २ कांपण; थडथडणें; अत्यंत चंचल स्थितींत असणें. ३ डगमगणें; डगडगणें; ढिलेपणामुळें इतस्ततः हालणें. ४ (ल.) लडबडणें; लुडबुडणें; लुबरेपणानें, दुसऱ्यास त्रास होईल अशा रीतीनें पुढें पुढें करणें. ५ पाणीदार व चकचकीत दिसणें (मुख्यत्वें मोतीं). ६ टवटवीत, टुकटुकीत, सुप्रसन्न दिसणें(चेहरा, वर्ण). [लटपट]

लटा—पु. (कु. रेट.) जुनें, फाटलेलें कांबळें; घोंगडीचा जुना तुकडा. [सं. लक्तक्; फा. हिं. लत्ता=चिंधी]

लटारणा—वि. फार मोठा; जंगी; अवजड; प्रचंड.

लटिंगा—पु. (कों.) आखूड व जाड (दोन तीन हात लांब) लांकूड; काठी; सोडगा; दांडकें. [लुट]

लटुपटु, लटु(टू)फटु-टू, लटुब(बु)टु-टू, लटफटट्या, लट(टू)ब(बु)टट्या, लटु(टू)फ(ब)टूचा—वि. लुडपुडु इ० पहा.

लटुऱ्या—वि. (व.) लुडबुड्या. 'जेथें तेथें हा लटुऱ्या आहेच.' [सं. लट्]

लट्ठ—वि. अज्ञानी. 'करि उदार कथा भल्ता लट्ठ।'–वामन वामनचरित्र ४. [सं. लट]

लट्टोर—पु. १ लटिंगा पहा. २ जोंधळ्याची मोठी व टप्पोरी जात; अरगडींतील एक भेद. ३ एक वनस्पति. –वि. भक्कम; जाड; लठ्ठ (मनुष्य, वस्तु). **लट्टोरें पडवळ**–न. आखूड व जाड पडवळाची एक जात.

लट्ठ-ट्टा—पु. (अश्लील) पुरुषाचें जननेंद्रिय.

लट्ठ—स्त्री. जननेंद्रियावरील केंस; लट पहा.

लठ—स्त्री. १ (व.) लाठी; काठी; सोटा. २ कापड मोजण्याचा गज. ३ मूर्ख किंवा अशिक्षित मनुष्य. [हिं.] **०बाजी**–स्त्री. झोडपट्टी; चोपणें; चोप. **लठाईत**–वि. (व.) १ लाठी बाळगणारा. २ धश्चोट. **लठुंगा**–वि. भक्कम; राकट; मजबूत; बळकट; अटस.

लठणें—अक्रि. गडबडा लोळणें; लोळण घेणें. [सं. लुठन] **लठन**–न. लोळण. [सं.]

लठ्ठ—पु. १ सोटा; सोडगा; जाड काठी. २ ओबड-धोबड जळणाचें लाकूड; ओंडकें. –वि. १ विलक्षण मोठा; भक्कम; जाड; धसाडा (मनुष्य, अवयव, दागिना, दोर, दोरी इ०). २ स्थूल; फोपशा. [हिं.] सामाशब्द- **०निरंजन, लठ्ठ(ठ्ठं)भारती**- पु. (मूळ गोसाव्यां संबंधी रूढ.) शरीरानें धष्टपुष्ट, दांडगा मनुष्य (विशेषतः निरक्षर व आडाणी). –वि. १ धष्टपुष्ट. २ बेफिकीर. ३ दांडगा. ४ मूर्ख. **लठ्ठा**-पु. (व.) मोठा सोडगा. **लठ्ठा, लठ्ठू, लठ्ठ्या**–वि. अजस्र; अमर्याद मोठा; भक्कम; जाड; भसाडा (मनुष्य,पशु, वस्त्र, भांडें, जिन्नस). लठ्ठ पहा. **लठ्ठाई**–स्त्री. दांडगाई; जनावराप्रमाणें धुडगूस, लढाई; **लठ्ठामिश्र, लठ्ठाश्रम, लठ्ठूबगाड्या, लठ्ठेश्वर**–पु. लठ्ठनिरंजन पहा. **लठ्ठामिश्राई** स्त्री. १ उमेटपणाचें वर्तन; दांडगाई. २ लठ्ठालठ्ठी. [मिश्र=मैथिली ब्राह्मणाची पदवी] **लठ्ठालठ्ठी**–स्त्री. सोटे, दांडकीं इ० कांनीं परस्परांमध्यें चालणारी मारामारी; (सामा.) भांडण; हमरीतुमरी. 'आम्हां लोकांत एकी तर इतकी, कीं यत्किंचित् लाभ होण्याचा सुमार दिसूं लागला न लागला तों लठ्ठालठ्ठी सुरू व्हावयाची!' –के. **लठ्ठाश्रम-मी**–पु ढोंगी, दांभिक, धटिंगण असा जोगी. लोठाश्रम पहा. 'लठ्ठश्रमाच्या लागून पार्यी। विघ्न आणिलें राज्यांत।' –नव १८.३५. [लठ्ठ+आश्रमी] **लठ्ठेश्वर**–लठ्ठनिरंजन पहा. **लठ्ठ्या**–पु. (बायकी) १ दांडगा, स्वैर, मोकाट माणूस. लठ्ठा पहा. २ एखाद्या स्त्रीनें टेवलेला माणूस; जार.

लठ्ठा—पु. (माळवी) मांजरपाट (कापड).

लड—स्त्री. (प्रां.) पानांचें ओझें; भारा.

लड—स्त्री. १ सर; माळ (मणी, मोतीं, फुलें इ० ची). २ रेशमाची, सोन्याचांदीच्या जरीची इ० गुंडी.

लंड—पु. १ (अश्लील) पुरुषाचें जननेंद्रिय; शिश्न. २ (ल.) खोल मसलतीचा व लुच्चा मनुष्य. ३ दांडगा, उन्मत्त, बेगुमान इसम. ४ खलेल, आतताई मूल. इ०. ५ देवधर्माला न जुमानणारा, पाखंडी, विषयी मनुष्य. –वि. १ स्वच्छंदी; स्वैर. २ ठक; पक्का धूर्त. २ दांडगा; उन्मत्त; उनाड. 'ऐसा मान्यतेचा पुष्ट गंडु। तो अभिमानी परमलंडु।' –ज्ञा १६.२३६. ४ (व.) धीट; धीमा; बेगुमान; बेफिकीर. [फा. लन्द्, लवन्द्] सामाशब्द- **०पण**– न. दांडगाई; उन्मत्तपणा. 'म्हणवितों दास न करितां सेवा। लंडपणें देवा पोटभरी।' –तुगा ८८८. **०भारती**–पु. (निंदार्थी) नागवा असणारा गोसावी इ० **लंडा**–पु. (अश्लील) पुरुषाचें जननेंद्रिय; **लंड. लंडाई**–स्त्री. १ कावेबाजपणाची व लुच्चेगिरीची वर्तणूक. २ दांड, आतताई, झोटाईची वर्तणूक; दंडेली. ३ हट्टीपणा; खलेली. [लंड] **लडामुंडी**–स्त्री. (कु.) भांडण. (लंड, मुंड इ० शिव्या देण्यावरून). **लंडी**–स्त्री. १ (निंदेनें) भित्रा, बायकया, नामर्द मनुष्य. 'भवाच्या भयें काय भीतोस लंडी।' –राम २७. –वि. १ भित्रा. २ लंड; दांडगा (मनुष्य.) 'असें असुनियां दबली लंडी।' –ऐपो २२५. ३ अविचारी; लबाड; लुच्चा. 'लंडी लटिका लाबाड।' –दा २.१.३३. [लंड] **लंडीपण**– न. नामर्दपण; दौर्बल्य. 'ऊठ टाकूनियां तुच्छ लंडीपण परंतपा।' –वामन, गीतासमश्लोकी २.३.

लंड—वि. (प्र.) लांडा पहा. **०पुच्छ**–वि. १ लांडा; शेपूट कापलेला, तोडलेला; बोखाडलेला. २ (एका लबाड, शेपूट तुटक्या उंदराच्या गोष्टीवरून) मुलांच्या टोळीचा नायक; लहान पुढारी. **लंडोबा**–वि. लबाड.

लडका—पु. मुलगा; पुत्र. 'बाराजण लडक्यांनीं।' –ऐपो ५६. [हिं. लडका; तुल. इं. लॅड्] **लडकी**–स्त्री. मुलगी.

लडणें—अक्रि. (व. कुण.) रडणें; शोक, विलाप करणें; आक्रंदणें. [रडणें]

लडथड—स्त्री. १ वादग्रस्त, अनिश्चित गोष्ट. २ वादाची जागा, मुद्दा; विवादास्पदता (हिशेबांत, व्यवहारांत). ३ वरील गोष्टीसाठीं) वाद; तंटा; झटापट. 'त्याचें आमचें बरकड सारें खटलें तुटलें परंतु शंभर रुपयांचे कलमाची लडथड पडली आहे.' लांझा पहा. ४ भानगड; घोटाळा; चबढब. 'त्यानें कामांची लडथड करून टाकली.' –वि. (बायकी) अस्वच्छ; ओंगळ; अर्धवट केलेलें. 'तिचें काम फारच बाई लडथड आहे.' [ध्व. लड+थड. किंवा लढणें द्वि.] **लडथड, लडथडवाणा–णी करणें**–सतावणें; छळणें; त्रास देणें (मुलानें). **लडथडणें**–अक्रि. मध्यें येऊन अडथळा करणें; लुडबुडणें. **लडथड्या**–वि. १ नेहमीं फिर्याद किंवा वाद करण्यास सज्ज; कज्जेदलाल. २ गोंधळ घालणारा; घोंटाळा माजविणारा. ३ (व्यापारधंद्यांत) खटपटया; गडबड्या; उलाढालया; घालमेल्या. ४ गबाळ; अर्धवट काम करणारा.

लडबू(डु)-धू—वि. १ धटिंगण; घट्टाकुट्टा; भक्कम. २ गबदूल. ३ निरुद्योगी; रिकामा. **म्हण** (क.) येबी लडबू जाबी लडबू= रिकाम्या माणसाची येजा; येणें जाणें.

लडब(फ)ड—स्त्री. १ लटलट होणें; ढिलाई; शिथिल झालेली स्थिति; फडफडत इतस्ततः झोलकंबणें; लोंबणें (यंत्र, एखादी रचना, कपडे इ० चें). २ लवलवीतपणा; शैथिल्य; बलहानि (अंगाची). ३ व्यग्रता व क्षुब्धता (जीवाची). ४ घोंटाळा; विस्कलित स्थिति (संसाराची, जिंदगीची, हिशेबाची, मसलतीची). ५ लुडबुड पहा. –क्रिवि. १ ढिलेपणानें; शैथिल्यानें; लटपटां; फडफडत इ०. बडबड (–नाम) पहा. (क्रि० हालणें, चालणें; करणें). २ अव्यवस्थित, गयाळ रीतीनें. (क्रि० चालणें; धावणें; बोलणें; जेवणें; नेसणें; करणें). [ध्व.] **म्हण** झाविडो लडबड्याम्यहं=इकडून तिकडे व तिकडून इकडे विनाकारण लुडबुडणें.

लडबडणी–स्त्री. १ डगमगणें; डगडगणें; लडबडां हालणें. २ लुबरेपणानें, दुसऱ्यास त्रास होईल अशा रीतीनें मध्यें हात घालणें. [लडबडणें] **लडबडणें**–अक्रि. १ डगमगणें; डगडगणें; लटपटणें; ढिलेपणामुळें इतस्ततः हालणें. २ मध्यें शिरणें, हात घालणें; लुडबुडणें पहा. ३ बरबटला, लेपडला जाणें. –सक्रि. लपेटणें; माखणें; लेपटणें. [लडबड] **लडबडलाटण्या-लाटण्या**–वि. १ दांडगा-उद्दाम; खलेल. २ बेपरवाईनें, दांडगेपणानें लुडबुड करणारा. **लडबडीत**–वि. १ माखलेला; भरलेला; चोपडलेला (चिखल, शेण इ० कानीं). २ (प्र.) लटपटीत; डळमळीत; खिळखिळीत. [लडबड] **लडबडया**–वि. भलत्याच रीतीनें, त्रासदायक रीतीनें, मध्यें हात घालणारा. लुडबुड्या पहा.

लडलड—क्रिवि. लाडानें; लाडेलाडें; लडिवाळपणानें; लाडीगोडीनें. (क्रि० बोलणें; करणें). [सं. लड्; म. लाड]

लडलडणें—अक्रि. (क्वचित उपयोग). लटलटणें पहा.

लडा—पु. (प्रां.) मेंढा. **लडी**–स्त्री. मेंढी.

लडाई—स्त्री. लढाई. १ दांडगेपणा–शर. २ कज्ज्या; भांडण; युद्ध; लढाई. 'तुमची व त्याची गाठ पडोन, लडाई होऊन ...' –बाबसमारो २.६१. [लढणें]

लडालडा—क्रिवि. (कों.) लडलड पहा. 'मामाच्या रे वर्षी। नको जाऊं लडालडा। येऊं दे गाडीघोडा।'–सह्याद्रि, फेब्रुवारी १९३६.

लडिवाळ—स्त्री. लाटदेशीय स्त्री. [सं. लाटी]

लडिवाळ-ळी—पुस्त्री. (काव्य) १ लाडुकपणा; लाडीगोडी; लाडीक; लालन. २ (सामा.) लाड; कौतुक; कोड. 'पुरविली आळी। जे जे लडिवाळी।' [लाड] **लडिवाळ-ड, लडिवाळ, लडिवाळा**–वि. १ आवडीचा; प्रिय; लाडका. 'निवारी निजभक्तांचें साकडें। तीं लडिवाडें पै माझीं।'–एभा २८.६७.–र ५. २ लाडीगोडीची; लडिवाळपणाची (भाषा इ०). [लांड] **लडेवाळ**–वि. लाडका; लडिवाळ. 'जो सकल अनर्थांचा दाता। ज्याची लडेवाळ कन्या ममता।'–एभा १३.५१६.

लडी—स्त्री. १ लड; सर (मोत्यांचा, फुलांचा). २ (जरतारी धंदा) एक किंवा सवा तोळा वजनाचें तयार जरतार; लड पहा.

लॅडीस—न. एक पत्त्यांच्या खेळांतील विशिष्ट डाव. याचे प्रकार दोन एक ३२ पानांचें व दुसरें ४८ पानांचें.

लडो—पु. (गो.) मार; ताडन.

लड्ड—वि. मूर्ख; मंदबुद्धीचा; जड. [सं. लट्, लड्; तुल० इं. डल] **लड्डमुडगें**–पु. (बे.) लड्डाचा खेळ. [लड्ड+मुडगा=गोळा]

लड्डु, लड्डुक—पु. लाडू. [सं.]

लढ-ढी—स्त्रीपु. माळ; सर (मोत्यांचा, फुलांचा) लडी पहा.

लढ—स्त्री. १ समुद्रांतून, नदींतून वाहात किनाऱ्यावर आलेला गाळसाळ; रेंदा. २ गुंतागुंत; गुंताडा; गुरफटा. ३ (ल.) भानगड; घोंटाळा. (क्रि० पडणें; काढणें; सोडणें; उलगडणें; उकलणें). [हिं. लट] **लढणें**–अक्रि. दाट येणें; एकमेकाला चिकटणें (फळें, कणसें, माळेंतील मोतीं इ०) लहडणें पहा **लढया**–पु. (कों.) लढ अर्थ १ पहा.

लढ-ढें—न. १ (खा. व.) शेतीचा माल वाहून नेण्याची बिन तट्ट्याची, लांबट, पुढें निरुंद व मागें रुंद होत गेलेली बैलगाडी. २ (खा.) कपाशी वाहण्याची गाडी.

लढण—स्त्री. (व.) संवय; मोड. 'मुलीला जशी लढण लावावी तशी लागते.'

लढणें—अक्रि. १ युद्ध करणें; झुंज करणें; द्वंद करणें. २ झगडणें; भांडणें; तंटा करणें. ३ (ल.) स्पर्धा करणें; चढाओढ करणें; टक्कर मारणें. [हिं. लडना] (वाप्र.) **लढून पडणें**–मोठया औत्सुक्यानें, उत्कंठेनें एखाद्यावर झटून पडणें; तुंदून पडणें. **लढत**–स्त्री. युद्ध; झुंज; झगडा (क्रि० लागणें; चालणें; होणें). लढा अर्थ १ पहा. [लढणें] **लढता**–वि. १ लढाऊ; युद्धकुशल; लढवई पहा. 'शिंदे यांची फौज एवढी लढती, तिची ही गत.' –भाब ७५. २ लढवय्या; लढणारा; योद्धा. **लढवय्या**–पु. लढण्यांत हुशार असलेला मनुष्य; योद्धा; वीर. [हिं.] **लढव(वा)ई**–वि. १ झुंजार; रणधीर; रणशूर. २ लढाईस योग्य (मनुष्य, घोडा, जहाज, रथ, शस्त्र). [हिं.] **लढविणें**–सक्रि. १ झुंजावयास लावणें. २ बरोबरी, स्पर्धा करण्यास लावणें. 'हें पागोटें त्या पागोटयाशीं लढवून पाहिलें परंतु लढत नाहीं.' ३ चालविणें; करणें; योजणें; उपयोग करणें (मसलत, शक्कल, युक्ति, यत्न, तजवीज, साधनें). **लढा**–पु. १ भांडण; वाद; तंटा; वादाचा विषय, भूमि. (क्रि० लागणें; चालणें; असणें; होणें; राहणें व तोडणें; चुकविणें). २ प्रतिबंध; अडथळा; निरोध; हरकत; मिग्रह करणारें, आड येणारें, गति कुंठित करणारें कारण. 'त्या कागदावर घोटणी नाहीं म्हणून रेघ ओढतांना मध्यें लढा लागतो.' ३ (शब्दशः व ल.) गुंता; गुताडा; गुरफटा. **लढाई**–स्त्री. १ भांडण, तंटा करणें. २ सामना; रण, संग्राम. ३ युद्ध; युद्धसंसार. [हिं. लडाई] (वाप्र.) **०जिंकणें**–लढाईत जय मिळविणें; विजयी होणें. **लढाऊ**–वि. लढण्यास योग्य (मनुष्य, पशु, जहाज इ०). [हिं. लडाऊ] **०गलबत-जहाज**–न. लष्करी जहाज.

लढा—पु. दारूगोळा भरलेली गाडी; रणगाडा. **लढ-ढें** पहा. [हिं.]

लत—स्त्री. १ खोड; दुर्गुण; वाईट संवय. (क्रि० लागणें पडणें; जडणें व मोडणें; सुटणें). २ दोषीपणा; सदोषता. (क्रि० लावणें; लागणें). 'हा आपल्या वचनास लत लावणार नाहीं.'

३ फजीति. ४ युक्ति. ५ (व.) वेड; पिसें. 'देवाची लत आहे त्याला.' [सं. लट; हिं. लत] **लता(टा)चणें**–अक्रि. वाईट चालीस लागणें; बिघडणें. [हिं. लत=खोड, संवय]

लत—स्त्री. (प्र.) लत्ता; लाथ. 'ज्ञानरहित सदा लत खाती।' –दावि ७६१. [सं. लत्ता] **०कुटा-ठा-कुटार-कोडगा-गाढव-खोर-खोरा**–वि. निर्लज्ज; निगरगट्ट; वाईट चालीस चिकटणारा; लाथाबुक्क्या-निंदा-शिव्या यांना न जुमानणारा. [लात+कुटणें, कोडगा] **०खोरा**–पु. १ बाहेरच्या चौकटीच्या उंबऱ्याप्रमाणें आंतल्या चौकटीचा खालचा आडवा तुकडा. २ (व. घाटी) जिन्याच्या पायरीस लावलेलें लाकूड. **लताडणी-णें**–(प्र.) लथाडणी-णें पहा.

लतमला—पु. घोड्याच्या गुडघ्यावरील रोग. –अश्वप २.२८८.

लता—स्त्री. १ सरपटणारी किंवा झाड इ० वर चढणारी वनस्पति; वेल. २ फांदी; डहाळी. [सं.] **०गृह-मंडप-नपु.** वेलीचा मांडव; कुंज. [सं.] **०बंध(नृत्त)**–पु. (नृत्य.) नर्तकांनीं निरनिराळ्या तऱ्हेनें जाळें विणल्याप्रमाणें उभें राहून नृत्य करणें. [सं.] **लतिका**–स्त्री. लता; वेल. [सं.]

लताड—न. (कु.) पडकी भिंत.

लतारणी—स्त्री. (नाविक. कों.) बोंब हाकारण्यासाठीं डोलकाठीच्या धाकट्या गाल्यांतून भरून घेतलेली दोरी. ही दोरी मागच्या हरसास अडकवितात व पुढच्या टोंकास लोखंडी कड्यास वेढा देऊन तें टोंक दोरींत मिळवितात व त्या कड्यांत होंबाचा हूक अडकवून लतारणी खेंचून बांधतात.

लती, लतेला—वि. (व. ना.) लहरी. [लत]

लत्त-त्ता—स्त्रीपु. लगतचा देश, प्रदेश; सरहद्द; लगता पहा.

लत्तरबाळ्या—स्त्री.अव. (उप.) चिंध्या; लक्तऱ्या. [फा. लत्र=लक्तर+बाळी]

लत्ता—पु. चिंधी; धडफा. [फा. लत्ता] **लत्ती**–स्त्री. लकेरी; फडफड उडणारी चिंधी; फाडलेली धांदोटी. **लत्त्याबत्त्या**–स्त्रीअव. चिंध्या आणि लक्तऱ्या. [लत्ती द्वि.]

लत्ता—स्त्री. लाथ; पायानें मारणें. [सं.] **०प्रहार**–पु. लाथेचा तडाखा; जोरानें लाथा मारणें. (क्रि० करणें; देणें). [सं.] **लत्तेस शनी येणें-असणें**–शनि जन्मस्थानापासून द्वितीयस्थानीं असणें. –शनैश्चर पहा.

लथ(था)डणें—अक्रि लपेटलें; बरबटलें जाणें. [हिं. लथना]

लथ(था)डणें—उक्रि. १ यथेच्छ लाथांखालीं तुडविणें; मारणें. २ (ल.) नामोहरम करणें; जिंकणें (प्रतिपक्षी-युद्धांत, गप्पांत). ३ तिटकारणें; झिडकारणें; तिरस्कारानें बाजूला सारणें; भर्त्सनेनें व अनादरानें वागविणें. ४ मोडणें; नासणें; भंगून टाकणें; विघात करणें; फिसकटविणें (भरभराटीचा उद्योग, शिजलेली पक्व झालेली योजना). लाथाडणें पहा. [सं. लत्ता; म. लात-थ; हिं. लथाडना]

लथ(था)डणी–स्त्री. लाथा मारणें इ० (शब्दशः व ल.); लथाडणें पहा. **लथडप(स)थड, लथडालथड**–स्त्री. १ नाश; विघात; मोडतोड; लाथाडणें. २ चालढकल; घालघुसर (कामाची). (क्रि० लावणें). **लथडप(सथडप)**–क्रिवि. चालढकलीनें; हलगर्जीपणानें. [लथडणें द्वि.] **लथडवा**–पु. प्रहार. 'मुष्टी लत्ता लडथवे थडका।' –भुवन २.५४.

लथाबळ—वि. १ (व.) गबाळ; गैरशिस्त (वेणी, कुंकू, व लुगडें नीट नसणाऱ्या मुलीस म्हणतात). २ लावडी.

लथ्थड—स्त्री. (व.) १ लहानसा फेरफटका; फेरी; उभ्या-उभ्या भेट. 'तितक्यांतच एक लथ्थड मारून आली.' २ (व.) नुकसान. 'त्याही व्यापारांत लथ्थड लागली.' [हिं. लत्ताड]

लदडफदड—वि. घाणेरडा; बरबटलेला. 'तिचें काम फार लदडफदड आहे.' [लथडणें द्वि.]

लंदफंद—(ना.) फंदफितूर. [फंद द्वि.]

लदाव—पु. १ ज्यावर कमान रचतात तें मातीचें किंवा लाकडाचें काम. २ कमानीखालचा, कमानदार दरवाजाचा, खिडकीचा भराव. ३ लादलेलें ओझें. [हिं. लदाऊ; म. लादणें]

लद्दा—पु. १ चिकटलेलापणा (केंस, कागद इ० कांचा); लगदा. २ चिकटलेला गोळा. ३ (इतर अर्थी) लादा पहा.

लन्हा मुगद—पु. (बे.) भाताचा प्रकार.

लप—स्त्री. बांक; वांकणें. (क्रि० खाणें). [ध्व.]

लपकणें—अक्रि. (व.) थांबणें; थबकणें. [ध्व. लप!]

लपका—पु. ओलसर आणि मऊ पदार्थाचा गोळा; लबका (चिखलाचा, शेणाचा, लोण्याचा, खालीं टाकलेला, मारलेला). 'एकादा इसम खिडकी लिकलिकी करून खालची मौज पहात आहे तोंच एकादा चिखलाचा लपका येई' –नि ३४५. [ध्व. लप!]

लपंगा-ग्या, लपं(पां)गें—(प्र.) लफंगा-ग्या व लफंगें पहा.

लंपट—वि. १ (स्त्रिया, संसार, प्रापंचिक सुखें यांविषयीं) निरत, आरक्त; (विशेषतः) कामुक; स्त्रीव्यसनी. (समासांत) स्त्री-विषय-लंपट. 'निष्काम तो झाला कामासी लंपट। गोपिकांची वाट पाहात बैसे।' –तुगा २४१. [सं.]

लंपट—वि. लापट; लटपटीत; ढिला (स्क्रू, सांधा इ०, त्याचप्रमाणें त्याचें भोंक, घर). लापट पहा.

लप(पा)टणें—न (ढोर, न्हावी) वस्तरा चटपटण्यास लागणारें चामडें.

लपटणें—सक्रि. लपेटणें पहा.

लपटणें—अक्रि. चिकटणें. [सं. लिप्त; हिं. लिपटना.]

लपणें—अक्रि. वांकणें; खचणें: कचणें (तुळई, वांसा, खांब). [लप]

लपणें—अक्रि. दडणें; छपून, गुप्त राहणें. [सं. लुप्]

लपगि—स्त्री. लपण्याची इच्छा. 'लपगि धरुनि एके पर्वतीं तो निघाला।' –कृष्णकौतुक १३. अकक २.२६. **लपंछपं, लपनछपन**–न. लप्पं छप्पं पहा. **लपंडाई-व**–स्त्रीपु. १ लपण्याचा व शोधून काढण्याचा खेळ; हा खेळ वात्स्यायन कालींहि होता. २(ल) तोंड चुकविणें; उघड न बोलणें; गुप्तपणा. ३ (ल.) काळें; कपट; लबाडी, छद्मी, चोरटी कृत्यें. (क्रि० करणें; खेळणें). [लपणें+डाव] **लपण**–स्त्री. १ लपण्याची; दडण्याची जागा; आसरा; आडोसा. 'आपभयें पळतां यासी। लपणी मिळाली भ्रमापासीं।'–एभा १३.१५. २ स्वतःस लपविणें; दडणें. (क्रि० धरणें; घेणें; करणें; साधणें). ३ रहस्य; खुबी. 'या ब्रह्मविद्येच्या लपणीं।' –दा ७.७.५७. [लपणें] **लपणाछि(शि)पणी**–स्त्री. (ना.) लपंडावाचा खेळ. **लपणीचपणी**–स्त्री. लपंडाव खेळ. –तुगा. **लपविणें**–सक्रि. दडविणें; छपविणें: दुसऱ्यास न दिसूं देणें. लपविणें व दडविणें हीं क्रियापदें अर्थानें कांहींशीं भिन्न आहेत. दडविणें पहा. **लपीथपी**–पुस्त्री. लपंडावाचा खेळ. 'नभ तुजमाजीं खेळे। लपीथपी।' –ज्ञा १४.९. [प्रा] **लपूनछपून, लपतछपत**–क्रिवि. १ चोरून; गुप्तपणानें (वर्तन करणें). २ गुप्तपणानें; उघडीक न होईल असें; दडून (असणें; राहणें). [लपणें+छपणें] **लपंछपं**–न. १ लपंडाव. २ शेखीचें बोलणें; अप्रासंगिक, टाळाटाळीचें भाषण; लबाडीचें, मूर्खपणाचें दिलेलें कारण, निमित्त, सबब इ० (क्रि० लावणें; मांडणें; करणें). [लपणें+छपणें]

लपांगा-ग्या—वि. (विरू.) लफंगा-ग्या पहा.

लपाटण-णें—न. (न्हावी) चटपटणें; पलाटणें पहा.

लपाटी—स्त्री. (क.) एक प्रकारचा चारा.

लपेट—पुस्त्री. १ भोवतीं आच्छादन; आवरण; मढण (कपड्याचें, कातडयाचें, चिखलाचें, रंगाचें). २ –स्त्री. घेर; परिघ; वेढा. ३ उष्ण वाऱ्याची झळ; तसेंच थंड वाऱ्याचा बाधक झपाटा, झोड. (हिं. लपाट). ४ हल्ला; धाड (साथीची इ०) (क्रि० येणें). ५ साथ; सावत्रिक आजार. ६ भाषणाची धूर्तपणाची हातोटी (आंतील डावपेंच, वस्तुस्थिति कळूं नये अशी). सारवासारव करण्याची कला. (क्रि० मारणें). 'त्याची अशी कांहीं बोलण्याची लपेट आहे की, वर शंका करावयास अवसरच सांपडत नाहीं.' ७ लटपट; कावा. ८ दाब; धाटणी; पद्धत (लिहिणें, बोलणें इ. ची). ९ पदर; पट्टी. [सं. लिप्; हिं.लपैट]

लपेटणी–स्त्री. गुंडाळणें; वेष्टण; लेप देणें. [लपेटणें] **लपेटणें**–क्रि. १ गुंडाळणें; वेष्टणें; झांकून टाकणें. २ सभोंवतीं वेष्टणें; गुंडाळणें. [लपेटना] **लपेटा**–पु. १ आच्छादन; मढण (कपडयाचें, कातडयाचें, चिखलाचें, रंगाचें). 'अडुळशाचा पाला एका पानांत घालून त्याचा पुडा करून त्याचे भोंवती शेणाचा लपेटा देऊन फुपाटयांत भाजावा.' २ ज्याच्या भोंवतीं सोन्याची किंवा रुप्याची तार गुंडाळलेली आहे अशा कांचेच्या बांगडया. 'अरे कासारा, या मुलीचे हातांत लपेटाच भर.' [लपेट; हिं. लपेटवां] **लपेटी**–स्त्री. (विरु) लपेट अर्थ ६ पहा. लबाडीचा व्यवहार; लटपट. (वाप्र.) **लपेटी खाली-लपेटून नेणें**–लपेटी मारून साधून नेणें; गुप्तता राखून वेळ मारून नेणें; सारवासारव करणें. **लपेटी, लपेटीचा**–वि. १ लटपटीचा; लबाडीचा. २ गूढ; गुप्त (भाषण, काम, मनुष्य). [लपेट] **०लपेटीदार**–वि. लपेटी असलेलें (अक्षर, भाषण).

लपोट(ड)शंख—वि. (प्र.) लबोडशंख पहा.

लप्पड—स्त्री. (ना.) थप्पड; जोराची चपराक. [हिं. ध्व. लप्?]

लफं(फां)गा-ग्या, लफंघा-ग्या—वि. १ लुच्चा; फसव्या. २ नुसत्या वल्गना करण्यांत हुषार. ३ कांहीं तरी सबबी पुढें करणारा; चुकवाचुकवी, टाळाटाळी करणारा. ४ थापा, पोकळ वचनें देण्यांत पटाईत. [अर लफाझ्=बडबडया; हिं.] **लफंगें, लफांगें**–न. १ लचांड; संकट; अडचण; पेंच. २ वाईट, निरर्थक गप्पागोष्टी; कुटाळक्या. ३ एकसारखी, गैरफायदा, उलाढाल, कचाट.

लफडा-डें—पुन. १ सतावणारें, त्रासदायक काम, संकट; अडचण. २ लचांड; झेंगट. ३ निष्फळ व खडतर वाद; रिकामी बाचाबाच, झटपट. (क्रि० लावणें; लागणें). लांझा पहा.

लफणें—अक्रि. (प्र.) लपणें पहा.

लफलफणें—अक्रि. १ थलथल हालणें (जनावराची कांस, पोट इ०). २ गडबडीनें, असंबद्ध बोलणें. 'वाचा लफलफीत जडत्वें गाढी।'–एभा २२.५३०. [ध्व.]

लफा, लफेदार—(प्र.) लफ्फा, लफ्फेदार पहा.

लफाट—पु. (ना.) अंगठा.

लफाट—वि. (व.) १ लबाड. २ लुच्च्या; हाताळ. **लफाटया**–(व.) बाता झोकणारा; बाताडया; लफंगा.

लफाड—न. (व.) मैदान; मोकळें अंगण; रफाड पहा.

लफ्फड—स्त्री. (व.) थप्पड. 'एक लफ्फड मारूं?' [ध्व लफ्]

लफ्फा—पु. १ किनखाब; जरीचें कापड; मोठा जरीचा पदर (शेला, पागोटें इ० कांचा). [हिं. लप्पा] **लफ्फेदार**–वि. किनखापी किंवा जरतारीच्या कांठाचें; मोठ्या पदराचें (शेला, पागोटें इ० वस्त्र). **लफ्याचा**–वि. जरीचा. 'एकादा महाशेख लफ्याचा पदर लावून पुढें आला कीं शकुन उत्तम.' –नि २३०.

लफ्फा—पु. १ गोल इमारती लाकूड; लाकूड चौरस करण्याकरितां वरच्या अंगाचा करवतून काढलेला तक्ता. २ खांबास, तुळईस बळकटी येण्याकरितां जोड दिलेला तुकडा. [सं. लिप्त; प्रा. लिप्प?]

लफ्फा—पु. एक गळ्यांतला दागीना.

लब—न. (उत्तर कों.) कोरफड.

लब—स्त्री. १ निरोपाचें काम; निरोप नेणें. (क्रि० करणें; मारणें). –वाड–थोमारो १.६०. २ (क) ओठ. 'कागद लब लावून सारखा फाडला. निरोपाचें काम हा लबचा अर्थ कदाचित् फा. लब्=ओठ ह्या पासून निघाला असावा. निरोपकाम हा अर्थ सार्वत्रिक आहे. ओठ हा अर्थ क्वचित् आहे व तो कांहीं लाक्षणिक किंवा काल्पनिक प्रयोगांत दिसून येतो. जसें–घेऱ्याची लब (=शेंडीच्या मुळाभोंवतालीं असणारा घेऱ्याचा ओठ) शेंडी आणि घेरा हीं जेथें मिळतात ती जागा. मिशांची लब इ० [फा. लब्=ओठ. तुल० लॅ. इं. लाबियम, लेबिअल] **सामाशब्द**–**लबई**–स्त्री. निरोपाचें काम; लब. [लब] **लबे कामगिरी**–स्त्री. लब; जासुदगिरी. 'दिमत लबेकामगिरी.'–शारो १.१. **लबेशाई**–स्त्री. निरोप पोचविण्याचें काम. **लबेचा, लबेशाईचा**–पु. निरोप्या चाकर–गडी–माणूस–काम इ०

लब—स्त्री. बांक; वक्रता. लप पहा. [लप] (वाप्र.) **०खाणें**–बांकणें; कच खाणें; खचणें. (तुळई, वासा इ०).

लंब—पु, १ ओळंबा. २ (भूमिति) काटकोन करणारी रेषा. ३ (ज्यो.) जी रेषा पातळीला छेदीत असून त्या छेदनबिंदूंतून त्या पातळींत निघणाऱ्या एकेंदर रेषांवर लंब असते, ती रेषा त्या पातळीवर व ती पातळी त्या रेषेवर लंब आहे असें म्हणतात. –सूर्य ७. ४ अक्षपूरण; अक्षकोटि. –वि. १ लांब. २ मोठा; बृहत्. [सं.] **०क**–पु. लंब; ओळंबा; आंदोलक. [सं.] **०कर्ण**–पु. १ (सांकेतिक) गाढव, ससा, हत्ती इ०लांब कानाचा प्राणी. २ (विशेषतः) गाढव. (लक्षणेनें वापरतात) [सं.] **०च्यड–चेड–छोड**–वि. प्रमाणाबाहेर उंच किंवा लांब (मनुष्य, झाड, तुळई, दांडा). **०छडी**–वि. लांब पल्ल्याची (तोफ). **०ज्या**–स्त्री. अक्षकोटिज्या. [सं.] **०मान**–वि. ओळंबणारा; लोंबणारा. [सं.] **०रेषा**–स्त्री १ लंब अर्थ २ व ३ पहा. २ (ज्यो) उभी रेषा. (इं) व्हर्टिकल. अक्ष पहा. –सूर्य १५. [सं.] **०वर्तुल–ळ**–न. लंबवृत्त. [सं.] **०वर्तुलाकार**–वि. लंब वर्तुळाच्या आकाराचें. [सं.] **०वृत्त**–न. १ (ज्यो.) दृग्मंडळ–वलय. (इं.) व्हर्टिकल. २ अंड्यासारखें लांबट **वर्तुळ**. (इं.) इलिप्स. [सं.] **०संस्था**–स्त्री. (गोलाची) यथार्थ स्थिति. [सं.] **लंबा**–विक्रिवि. १ पूर्ण लांबींत असलेला, ठेवलेला; भुईवर पसरलेला; जमीनदोस्त झालेला (मृत्यु, मूर्च्छा, प्रहार, इ० कारणानीं). 'अकस्मात् जेव्हां पटकी आली तेव्हां एका दिवसांत हजार माणूस लंबे झालें.' २ फस्त; फन्ना; खर्च केलेला; उडालेला (पैसा, साठा). ३ खालीं आडवा पडलेला; जमीनदोस्त (कोस. ळल्यामुळें–घर, भित, झाड). [सं. लंब; हिं. लंबा] (वाप्र.) **०करणें**–चोप देणें. **०होणें**–१ पसार होणें. २ मरणें. **सामाशब्द**– **०चवडा**–वि. लांबलचक; पाल्हाळिक. 'त्यांनीं एकंदर हकीकतीचा लंबाचवडा विस्तार करून...' –सूर्यप्र २५७. [हिं.] **लंबाडा–टया–ड्या**–वि. उंच व सडपातळ; सडपातळ व कृश; शेकाटा. **लंबाणभाऊ**–उंच, काटकुळ्या, बेडौल माणसास विनोदानें म्हणतात. **लंबांतर**–न. (ग.) दोन समांतर रेषांपैकीं एकींतील कोणत्याहि बिंदूपासून दुसरीवर टाकिलेला लंब. –महमा ५३. **लंबायमान**–वि. प्रमाणाबाहेर, फार मोठ्या लांबीचा; अतिशय लांब; लांबलचक. [सं. लंबमान] **लंबासन**–न. १ एक आसन; लांब पसरणें. २ (ल.) निजणें; पसरणें. [सं.] **लंबी**–स्त्री. (जमीन मापणी) लांबी. जसें– शेताची रस्त्याची घराची लंबी. [लांबी] (वाप्र.) **०ताणणें–लावणें–लागणें**–आळसानें हातपाय ताणून पसरणें. **लंबीत**–वि. लांब. 'बहूसाल लंबीत होत्या विशेषा.' –राक खं. १ पा ८. **लंबू**–पु. (संकेत.) पुरुषाचें जननेंद्रिय; बंबू. **लंबे**–क्रिवि लंबा. (वाप्र.) **०करणें**–मारणें. 'गिलच्यांनीं गोखडींत दहापांच बैरागी सत्पुरुष होते तेही बसले ठिकाणीं लंबे केले.' –भाब २८. **०चालणें**–(व.) मर्यादातिक्रमण करणें. **लंबोदर**–पु. १ गणपति. –वि. लांब पोटाचा; ढेरपोट्या. [सं. लंब+उदर]

लबक—स्त्री. १ चट; चटक. (वाईट गोष्टीची); दुर्गुण, खोड; लबक पहा. २ पद्धति; धाटी (चित्रें काढण्याची, बोल; ण्याची इ०). [लकब] **लबकणें**–अक्रि. १ चट, चाळक लागणें.

लबकणें—अक्रि. (चेंडू इ० पकडण्याच्या तयारीनें) पुढें वांकणें. [लब]

लबका—पु. (प्र.) लपका (मांस; चिखल, शेण इ०) पदार्थांचा गोळा.

लंबण, लंबणभाऊ—(विरु.) लंबाण पहा.

लबतूक—क्रिवि. (गो.) अगत्यवाद.

लबदा—पु. ओला गोळा; लगदा पहा. **०लोळ**–वि. अगदीं भिजलेला; पार चिंब झालेला.

लंबन—न. १ ओलंबणें; लोंबणें; लोंबलेली स्थिति. २ (ज्यो) भूपृष्ठावरचें स्थल आणि भूमध्य हीं साधणाऱ्या त्रिज्येवर खऱ्या

पदार्थाच्या मध्यार्शी होणारा कोन. दक्सूत्र व गर्भसूत्र यांमधील अंतर. -शिद्धांतशिरोमणि. (इं.) पॅरॅलॅक्स. ३ ग्रहण दृग्गोचर होण्यास देशपरत्वें होणारें वेळांमधील अंतर. [सं.]

लबराण—न. (नाविक) डोलकाठीचा तोल जाऊ नये म्हणून जीं दोरखंडें बांधलेलीं असतात तीं प्रत्येक. यांचा उपयोग केन प्रमाणें होतो. यांनीं आंतील वस्तु बाहेर व बाहेरील आंत घेतां येते.

लबलब—स्त्री. बडबड; जल्पना; जिभेची त्वरित गति. (क्रि० करणें; बोलणें; चालणें). [ध्व. लब्? फा. लब्=ओठ] **लबलबणें**—क्रिवि. (निंदा.) जलद बोलतांना, खातांना होणाऱ्या ओठांच्या शब्दांचें अनुकरण होऊन (क्रि० खाणें; जेवणें; बोलणें; चालणें). 'माझे गोष्टींत तूं बोलूं नको म्हणून शंभर वेळां सांगितलें तथापि मध्यें लबलब बोलतो.' [ध्व.]

लबलबीत—वि. पातळ. लिबलिबीत पहा.

लबाड—न. (ना.) मद्रास कडून येणारें एका जातीचें विड्याचें पान.

लबाड—वि. १ खोटें; असत्य; अप्रामाणिक (मनुष्य, भाषण, लेख, ग्रंथ, आचार इ०). २ सात्त्विक नसलेला; अंगच्या सद्गुणांविरुद्ध वर्तन करणारा. ३ लुच्चा; गुलाम (लडिवाळपणें मुलांस म्हणतात). [हिं. लबाड] सामाशब्द-**०की**-स्त्री. १ खोटेपणा; असत्यवादिता; लबाडी. २ बनावटगिरी; ठकबाजी. **०झबाड**-वि. खोटा व थोतांड्या; खोटा व कपटी. [लबाड द्वि.] **०लचाड-लताड-ळ**-वि. खोटा; हलकट; नीच; विश्वासघातकी; लुच्चा; सोदा इ० [लबाड द्वि] (वाप्र.) **०वांचूननच्छे**-अद्याप पूर्णपणें असत्यवादी जाहे; अजून सुद्धा तो लबाडच आहे. **लबाडी**-स्त्री. १ खोटेपणा; असत्यवादित्व; दुष्टपीपणा; अप्रामाणिकपणा; कपट. २ खोटें, बनावट कृत्य; कपटलेख; ठकबाजी. ४ (कायदा) अन्यायाचा लाभ किंवा नुकसान व्हावें या इराद्यानें केलेलें कृत्य. **म्हण०** थोडी तों गोडी फार तों लबाडी. **लबाडीलचाडी-लाताडी-ळी**-स्त्री. लुच्चेगिरी; सोदेगिरी; लुच्चेगिरीची वर्तणूक. [लबाडी द्वि.]

लबाडनकशी—न. (विणकाम) एक प्रकारचें लुगडें. पोत कोणताहि, किनार रेशमी किंवा सुती, व किनारीमध्यें गोम नसून त्या जागीं पांढरे साधे घर भरून घेतलेलें असें लुगड्याचें वाण.

लबाडी—स्त्री. १ अवजड ओझें किंवा गट्ठा आंवळून बसविण्याकरितां व घट्ट करण्याकरितां योजलेली युक्ति(काठी घालून दोरी पिळणें इ०). २ दगड इ० उचलावयास, उचकटावयास लावलेली तरफ. ३ सैल दोरी पकडतां यावी म्हणून तिला बांधलेला काठीचा तुकडा; लव्हटी. ४ वाशाच्या माथ्यांतून शिरकवलेली आडवी काठी. (क्रि० घालणें)

लंबाण—पु. १ (धान्य, मीठ यांची वाहतूक करणारी) एक जात किंवा त्यांपैकीं एक व्यक्ति; लमाण; वंजारी. २ (न.) त्यांच्या टोळीचे लोक, गुरें व सामान; वाट चालत असलेली किंवा तळ देऊन राहिलेली या लोकांची टोळी. [हिं. लंबाडा] **०भाऊ**-पु. लंबाण जातीच्या मनुष्यास आदरानें म्हणतात. **लंबाणी**-वि. लंबाण जातीची, संबंधी (जनावर, भाषा, चाली).

लबालब—स्त्री. (व.) रेलचेल; वैपुल्य. -क्रिवि. पुरेपूर. 'तेथें लबालब खायला मिळतें म्हणून वरचेवर जातो.' [लबलब]

लंबित—वि. अवलंबणारा; लोंबणारा; लोंबकळणारा. [सं.]

लबूद—वि. १ लुब्ध; आसक्त; परायण. २ नादी.[सं.लुब्ध]

लबेद—वि. गलेलठ्ठ; धट्टाकट्टा; जोरकस. [हिं. लबेदा=सोटा]

लबेदा—पु. १ प्रवासांत बरोबर असलेला बायकामुलें, जनावरें, चाकरनोकर इ० परिवार; खटलें. 'श्री. अण्णे यांनां सामानाचा फारसा लबेदा नको असतो.' -स्वभावचित्रें १२३. २ (ल.) लचांड; अडचण.

लबोड—वि. अडाणी; खोटा; असत्य (मनुष्य, हकीकत). [लबाड] **०शंख-शिंग**-वि. (एका खोट्या शंखाच्या गोष्टीवरून) मोठेपणानें उगाच आश्वासनें व्यावयाचीं पण कृति करावयाची नाहीं अशा स्वभावाच्या माणसास म्हणतात.

लब्ध—वि. १ संपादिलेला; मिळविलेला; मिळालेला. २ (गणित) काढलेला; निघालेला; प्राप्त. (भाजकानें भाज्य भागिलें असतां येणारें फल, अनुमान). ३ शब्द, वाक्य इ०कांपासून व्यंजनेनें इ० निघालेला (अर्थ). 'त्या वाचून मला क्षणभर करमत नाहीं या वाक्यापासून त्याजवर माझा सर्व प्रेमा आहे असा अर्थ लब्ध होतो.' ४ (समासांत पूर्वावयव असलेला) ज्यानें संपादलें, मिळविलें आहे असा. लब्धाधिकार; लब्धोपदेश; लब्धधन; लब्धविद्या इ० [सं.] सामाशब्द- **०प्रतिष्ठ-प्रतिष्ठित**-वि. १ ज्यानें प्रतिष्ठा, किर्ति मिळविली आहे असा. २ (निंदार्थी) अधिक कीर्ति इ० मिळविण्याचा प्रयत्न न करतां पूर्वीच्या भांडवलावरच जगणारा. ३ (निंदार्थी) खोटी प्रतिष्ठा मिरविणारा; स्वतःस मोठा समजणारा. 'सुधारणेच्या सर्व पद्धती व्यर्थ, पोकळ व त्याचा उपक्रम करणारे लब्धप्रतिष्ठ.' -नि ३५९. ४ (कों.) फाजील लुडबुड्या. [सं.] **०प्रतिष्ठा-शिष्टाई**-स्त्री. कोरडी प्रतिष्ठा; प्रौढी; पोकळ गर्व. [सं.] **०शूरत्व**-न. बढाई; फुशारी. [सं.] **०संज्ञ**-वि. पुनः स्मृति किंवा भान प्राप्त झालेला; सावध. [सं.] **०स्मरण-स्मृति**-वि. १ (मूर्च्छनेनंतर इ०) भानावर आलेला; सावध. 'तों होऊन लब्धस्मरण उठिता झाला.' २ (अन्यकारणानें) स्मरण, आठवण ज्याला झाली आहे असा. [सं.] **लब्धि**-स्त्री. १ संपादन; लाभ; प्राप्ति. २ फायदा; नफा. ३ (गणित) भागाकार. [सं.] **लब्ध्या**-वि. लब्धप्रतिष्ठ. [सं.]

लब्भे(ब्भा)चाटू—वि. बनावट; खोटें करणारा; पदरचें रचणारा; बात्या.

लब्माशाई, लब्भु(ब्मु)शाई—स्त्री. १ बनावट गोष्ट; खोटे लेख, कैफियती इ०, लबाडी. २ वायफळ, पोकळ बोल; बाता. (क्रि० करणें; लावणें; मांडणें; चालवणें). -वि. लब्भेचाटू पहा. **लभाशाई**-वि. (दादर) लघळ.

लभणें—अक्रि. मिळणें; प्राप्त होणें; लाभणें पहा. 'बोलकेपणाचेंनि क्षोभें। लागसरूं न लभे। बोला प्रभु।' -ज्ञा १३.३२१. [सं. लभ्]

लभ्य—न. लाभ; फायदा; प्राप्ति. -वि. १ मिळविण्यास शक्य, योग्य; मिळण्यासारखें. २ (लब्ध ऐवजीं चुकीनें योजलेला) संपादिलेला; मिळविलेला. [सं. लभ्] **०मान**-वि. लाभणारा; मिळणारा. [सं. लभ्] **लभ्यांश**-पु. १ लाभ; मिळकत. २ मिळविलेली, संपादिलेली गोष्ट. [सं. लभ्य+अंश]

लमाण, लमाणभाऊ, लमाणी—लंबाण इ० पहा.

लमाणलंगडी-पु. एक मुलांचा खेळ. -मखेपु ११०.

लय—पुस्त्री. १ वाद्य वाजविल्यानंतर मागें कांहीं काळ पावेतों राहणारा त्याचा नाद, ध्वनि. २ (-पु.) (वादनात) ताल देण्याच्या क्रियेमधील विश्रांतीचा काल. त्याचे द्रुत, मध्य व विलंबित असे तीन भेद आहेत. ३ (वादनांत, नृत्यांत, चालण्यांत) समकाल. ४ गायन, वादन व नृत्य यांचें ऐक्य. ५ (एका पदार्थाची दुसऱ्याशीं तद्रूपता झाल्यानें होणारा) नाहींसेपणा; लोप; अनस्तित्व. ६ (खर्चामुळें, वापरामुळें) खलास होणें; क्षय; नाश; निःपात. ७ झोंप. ८ राजयोग समाधीस होणाऱ्या दुसऱ्या विघ्नाचें नांव. ९ -पुन. जगाचा नाश; प्रलय; संहार. उत्पत्ति आणि स्थिति या शब्दांबरोबर वापरतात. 'कयास मज हा लया रुद्र करि दया दृष्टि झांकली।' -ऐपो ३६८. १० -पु. चित्ताची एकाग्रता; एकतानता. (क्रि० लागणें; होणें). 'लय लक्षूनियां झालों म्हणती देव।' -तुगा २८०८. [सं. ली-लय] **लयास जाणें**-अक्रि. १ तद्रूप, ऐक्य होणें. 'जरी स्तब्ध बुद्धीसीं लया। जाइजे कां।' -ज्ञा १६.१८. २ विनाश पावणें; नाहींसें होणें. सामाशब्द- **०क्रिया**-स्त्री. १ संहारकार्य. २ गाण्यांत ताल धरणें. [सं.] **०स्थ**-वि. तटस्थ; समाधींत असलेला. 'लयस्थें एके।' -ज्ञा ११.१२९. [सं.]

लय—विक्रिवि. (कुण.) १ अतिशय; पुष्कळ; पराकाष्ठेचा; मायंदळ. २ (विशेषणाच्या आरंभीं जोडला असतां) अतिशय; फारच. उदा० लय मोठा; लय उंच; लय लांब. [सं. लय. (अवाङ्मनस्यपणा पाहून मनाची आश्चर्यचकित, दिङ्मूढ स्थिति जी होते तिचें प्रतिबिंब म्हणजे लय, विनाश अशा उद्गारवाचक अर्थानें)]

लय, लयलूट-स्त्री. (कुण.) रेलचेल; समृद्धि; अतिशयितता; **लयकाळ येणें**-अक्रि. (व.) संभार, परिवार येणें. **लयस**-वि. (व.) परिपूर्ण; जय्यत. 'सर्व सामान लयस.' **लयादिशीं**-क्रिवि. (कुण.) पुष्कळ दिवसपर्यंत; पुष्कळ दिवसांत. [लय+दिवस]

लर्जा, लर्जी—पुस्त्री. (संगीत) अनाद्रुत काळांत हाताची तयारी असल्याचें दाखविण्यासाठीं स्वरांचा कंपितपणा करून दाखविण्याची क्रिया. -कला १३८. [फा. लर्झा=कंप]

ललकार, ललकारणी—पुस्त्री १ पुकारणें; हांक मारणें; (विशेषतः) दरबारांत राजाचें आगमन सूचित करण्यासाठीं भाट, चोपदार जी आरोळी देतात ती. 'आदब, इ०' २ ओरडणें; मोठ्या आवाजांत सांगणें. ३ उच्च स्वरांत गाणें. 'हा गातो तेंच तो गातो परंतु त्याची कांहीं ललकारणी निराळी आहे.' [ललकारणें] **ललकारणें**-अक्रि. १ मोठ्यानें पुकारणें; हांक मारणें. २ मोठ्यानें आरडणें, म्हणणें (दवंडी पिटतांना, गातांना इ०). ३ (चालण्याची गर्दी करण्यासाठीं) सांगणें; ओरडणें (जनावराला हाकतांना). ४ ओरडणें; गर्जना करणें (दरडावतांना, खडसावतांना). -सक्रि. १ ओरडून हांक मारणें. २ गायन करणें; गाणें. 'फंदी अनंत कटिबंद छंद ललकारी।' -ऐपो २५३. [ध्व. हिं. ललकारना] **ललकारी**-स्त्री. आरोळी; ओरड; पुकारा; गर्जना; मोठ्यानें हाका मारणें; ललकारणी पहा. (क्रि० करणें; मारणें). [ध्व. सं. लल+कृ; प्रा. ललक; हिं. ललकारी]

लल(लि)त—पु. (संगीत) एक राग. ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति षाडव-षाडव. वादी कोमल मध्यम. संवादी षड्ज. गानसमय रात्रीचा चवथा प्रहर.

ललन—न. १ क्रीडा. २ कंपन. [सं.]

ललना—स्त्री. १ स्त्री; महिला. २ स्वैरिणी किंवा विलासिनी स्त्री. [सं. लल्=विलास करणें]

लललल—उदा. निराशेचा किंवा विस्मयाचा उद्गार; चचचच!

ललाट—न. १ कपाळ. 'सच्चिदानंद एक मेळीं। तेचि त्रिवळी ललाटीं।' -एरुस्व १.६१. २ दोन भिवयांमधील प्रदेश. [सं.] **०रेषा-खा**-स्त्री. कपाळावरील लेख; दैव; नशीब. [सं.] **०रेषा उभी राहणें**-दैव अनुकूल, प्रसन्न होणें; नशीब उदयाला येणें.

ललाम—न. १ रत्न. २ भूषण. ३ शोभा. 'अमोल्य ललामाचिया खाणी।' -मुआदि ४.५४. ४ चिन्ह. ५ कपाळावरचें चिन्ह. -वि. सुंदर. [सं.]

ललित—न. १ एक वृत्त. त्याच्या चरणांत ११ अक्षरें आणि र, ज, स, ल, ग हे गण असतात. उदा० देवता मुनी नमिति सर्वदा । तूजवाचुनी कोण सर्व-दा ।' २ स्त्रियांचीं राग-विकारदर्शी लक्षणें; भाव. (आळसानें आळेपिळे देणें, लोळणें इ०). ३ विलास; शृंगार. ४ स्त्रीचें नृत्य. ५ लळीत पहा. –वि. सुंदर; रमणीय; सुरेख. २ स्वैर; विलासी; विषयी (स्त्री). ३ कोमल. [सं.] सामाशब्द– **०अलंकार**–पु. वर्णनीय जो प्रकृत अर्थ त्याचें वर्णन न करितां त्याचा प्रतिबिंबरूप जो अप्रकृत अर्थ त्याचें वर्णन करणें. उदा० 'न गणावा गरुडहि मग लेखावा काय हो! मशक तातें ।' –मोभीष्म १.२५. [सं.] **०कला**–स्त्री. काव्य, गायन, वादन, चित्र, नृत्य इ० सौंदर्य-विषयक कोमल कला. (इं.) फाईन आर्ट. [सं.] **ललिता**–स्त्री. १ स्वैरिणी स्त्री. २ सुंदर स्त्री. ३ सामान्य स्त्री. ललना पहा. ४ देवी; पार्वती. [सं.] **०पंचमी**–स्त्री. १ आश्विन शुद्ध ५ चा दिवस. त्या दिवशीं ललितादेवीची पूजा करतात. २ या दिवशीं केलेली ललितादेवीची पूजा. [सं.]

ललुपतु, लल्लुपत्तु, लुलुपतु, ललोपतो—नस्त्री. अंजारणी गोंजारणी; भोळावणी; लाडीगोडी; खुशामत करणें. [दे. प्रा. लल्लि=खुशामत; किंवा लाला+पुता=पुत्रा] **०करणें**–दादाबाबा करणें; आर्जव करणें. 'आम्ही कांहीं कोठें ललोपतो करीत नाहीं.' –पेद १०.६६. **ललेथापे**–स्त्री. थापटणें व शांत करणें; गोंजारणें; कुरवाळणें. [का. लालि = अंगाई+थाप; किंवा लाड+थोपटणें]

लल्ल—वि. चंचल. –शर.

लल्ला—पु. आमिष; मधाचें बोट; प्रलोभन. (क्रि० लावणें; दाखविणें; देणें).

लल्ला(ल्हा)ट—न. (प्र.) ललाट पहा. **म्ह०–दैव नाहीं लल्लाटीं पाऊस पडला शेताचे कांठीं. ०रेषा-खा**–ललाट रेषा पहा.

लल्हावणें—अक्रि (व.) लालचावणें. 'खायला लल्हावला.' [लल्ला]

ल(लं)ब—स्त्री. १ (दाढी, मिशी, डोकें इ० ठिकाणीं असणाऱ्या राठ केसांवांचून) पाठ, पोट, हात, पाय इ० अवयवांवरील बारीक, मऊ केस; अंगावरील केस. २ प्राण्यांच्या कातडीवरील मऊ केस; लोंकर. ३ खराऱ्यानें निघालेले घोड्याच्या अंगावरचे केस व मळ. [सं. लोम=लव]

लव—पु, १ अणु; सूक्ष्म अंश. २ (फलज्यो.) अंश; भाग. ३ अपूर्णांकाचा अंश (बरचा भाग). ४ तुकडा. 'शरधारी रिपु-गणाचे लव । करिन ऐसें जाणावें ।' –जै २९.१३. ५ छत्तीस निमिषांइतका काळ. 'निमिष निमिषार्ध त्रुटि लव क्षण ।' –एभा २.७१५. ६ क्षण. –वि. थोडा अत्यल्प. 'प्रभुची दे न भीति लवलीला ।' –मोभीष्म ४.४०. [सं.] **०क**–वि. किंचित्. **०लेश**–पु. किंचित् अंश, कण. 'घरांत तुपाचा लवलेश नाहीं.' [सं.]

लव—पुन. एक वृक्ष व त्याचें फळ.

लवकंड—स्त्री. १ लोळकंड; एकमेकांवर उडया मारणें व लोळणें; झोंबाझोंबी (खेळांत, भांडणांत–कुत्रीं, मांजरें, गुरें इ० कांची). (क्रि० येणें). २ (ल.) गर्दी; दाटी; रेटारेटी; ढकली. [लवंडणें]

लवकर—न. अवधी; अवकाश; (आधीची) वेळ; उशीराच्या उलट. 'अझून लवकर आहे एव्हांच कशाला जातां!' –क्रिवि. १ जलदीनें; त्वरेनें; गर्दीनें. २ चटकन; पुष्कळ वेळ जाण्यापूर्वी. ३ आधीं; नेहमींच्या वेळेपूर्वी. 'यंदा लवकर पेरे झाले म्हणून शेतें लवकर पिकलीं.'

लवकळी—स्त्री. (व.) हलकल्होळ. 'इतक्यांत देग्याची चोहोंकडे एकच लवकळी उटली.' [ध्व.]

लवका, लवकिरा—वि. (प्रां.) लवचीक; मृदु; नरम; वांकणारें; नमणारें. 'हें पाठीचें हाड बळकट असून लवकें असावें लागतें' –मराठी ६ वें पु. (आ. २ री.) पृ. २५६. [लवणें]

लं(ल)वका—पु. हातानें, तोंडानें तोडलेला तुकडा; लचका (मांसाचा, कणकेचा इ०) (क्रि० घेणें; तोडणें; काढणें व निघणें; जाणें).

लवखर—वि. (प्रां.) लवका; लवचीक पहा.

लवखाद—स्त्री. (घाईनें, उतावीळ पणानें घेतलेली) उडी; झडप; झांप (कांहीं वस्तु, देणगी यांवर) (क्रि० पडणें). 'उमेद-वारांची लवखाद पडती.'

लवंग—स्त्री. १ एक झाड. २ हिचें फळ. उत्पत्ति मलाका व अंबोयना बेटांत फार. लवंगा म्हणजे लवंगांच्या झाडाच्या न उमललेल्या वाळलेल्या कळया होत. उपयोग मसाल्यांत व सुगंधी पदार्थांत. तेलहि काढतात. ३ एक सोन्याचें इ० लवंगेच्या आकाराचें कर्णभूषण. [सं.] सामाशब्द– **०का(क)चरी-सुपारी**–स्त्री. कोवळी असतां लवंगेच्या आकाराच्या तुकडयासारखी कातरलेली, शिजविलेली सुपारी; कोणत्याहि आकाराचीं लहान खांडें केलेली शिजवून वाळवलेली सुपारी. **०चुरी-चूर**–स्त्रीपु. लवंगकाचरी सुपारी. (संक्षेप) **०पट्टा**–पु. (तंजा.) दालचिनी. **लवंग(गी)पिंपळी**–स्त्री. पिंपळीची अतिशय लहान जात. **०फूल**–न. लुगडयाचा एक प्रकार. लुगडयावरील लवंगेच्या आकाराचें फूल. **लवंगल**–पु. (शाप.) लवंगांच्या तेलांतील मुख्य घटक. पुष्कळ सुगंधी तेलांत हा असतो. (इं.) युजेनोल. **लवंगादि वटी**–स्त्री. एक चूर्ण किंवा त्याची गोळी. **लवंगी**–वि. १ लवंगेची.

२ लवंगेप्रमाणें बारीक, लहान किंवा तिखट. ०कापूर-पु. लवंगेच्या अर्कापासून काढलेला कापूर. याच्या सुईसारख्या कांड्या असतात. ०कुत्रें-न. कुत्र्याची एक लहान जात. ०फटाकडा-पु. लवंगेसारखा बारीक पण कणखर आवाज करणारा फटाकडा. ०मिरची-स्त्री. लवंगेसारखी बारीक पण फार तिखट अशी एका जातीची मिरची. लवंग(गे)ळ-न. लवंगाचें तेल. [लवंग+तेल]

लवंग-क—स्त्री. (गो.) पहार. [स लोहांग] **लवंगी**-स्त्री. १ (कोळी) साधी काठी. -गुजा ६२. २ लोहंगी; लोखंडाचीं वेटाळी जागजागीं लावून मजबूत केलेला प्राणघातक सोटा. 'बिचवा लवंगी गुरगुज सांग सोंटा बरची फेंकिती।' -ऐपो १०९.

लवंगणें—अक्रि. लचकणें; मुरगाळणें; दुखावणें (शरीर, अवयव).

लँघगाट—न. (कु.) १ लचांड. २ (ल.) रखेली.

लवगी—स्त्री. (बे.) दोरी. [हिं. लाव=दोर]

लवं(व)घा—पु. दाह; शोष; अतिशय तृष्णा. 'तैसाचि लवंघा सुटे। मग भुई ना सेजे साटे। पाणियाचें न सुटे। तोंडोनि पात्र।' -ज्ञा १७.१४९.

लवंचक—न. उभारणी; पोकळपणा; निरर्थकत्व. 'आतां द्वंद्वाचें लवंचक। सांडूनि दुणीचें कंचुक।' -अमृ ५.३३.

लवची(चि)क—वि. १ न मोडतां वांकणारा; लवणारा; लवका; लवकिरा. २ स्थितिस्थापक. ३ हट्टी, आग्रही नसलेला; दुसऱ्याचें ऐकणारा (माणूस).

लवटव—पु. वरवरचें प्रेम; लाडीकपणा. 'जावया परपुरुषाशीं। लवोलवो लावी निज पतीसी।' -एभा २१.२७४. [? तुल० फा. लाव=विनोद]

लवटी—स्त्री. ओझें, भारा आवळून बांधण्यासाठीं त्याच्या भोंवतालीं बांधलेल्या दोरींत घातलेली काडी, चीप. ०घेणें-(कों.) गांठ मारतेवेळीं तेल दोऱ्यांमध्यें एक हात काठी घालून ती पिळवटून न हालेशी झाल्यावर करकचून बंद बांधणें. 'सांध्यावर लवटी घे म्हणजे धास्ती नाहीं'

लवटें—वि. १ लवण्याजोगें. २ लवलेलें. -शर. [लवणें]

लवंडणें—सक्रि. १ उलंडणें; कलंडणें; पालथें पाडणें. २ उलंडून सांडणें. -अक्रि. १ उलटणें; सांडणें; एका बाजूस किंवा पालथें पडणें. २ (कों.) घसरून पडणें. ३ (बिछान्यावर इ०) निजणें; आडवें होणें; वामकुक्षी करणें.

लवडसवड-डी—स्त्री. लगबग; तातडी; त्वरा. 'एशी तेथिंची जीना आवडी। म्हणोनि तेंचि देखावया लवडसवडी।' -ज्ञा ११.५९८. -एभा ३.६१७. [लव न सवड?] **लवडसवडीं, लवडसवडीं**-क्रिवि. (काव्य) झपाट्यानें; जलदीनें; चटपटीनें; चलाखीनें. -एरुस्व ५.७९. 'श्रीकृष्णें खांदा घेऊनि कावडी। पाणी वाहत लवडसवडी।'

लवडा—पु. (अश्लील) पुरुषाचें जननेंद्रिय; शिश्न; लिंग. [हिं.] **लवडेलूट**-स्त्री. (अशिष्ट) १ अतिशय रेलचेल; मोठें वैपुल्य. २ (ल.) मातीमोल स्थिति.

लवंडा—पु. १ (व.) मुलगा. 'तो माझा लवंडाच आहे.' २ पोऱ्या; गुलाम. [फा. लवन्द; हिं. लौंडा]

लवंडी—स्त्री. १ बटीक; दासी. २ वेश्या. ३ रखेली. [फा. लवन्द्; हिं. लौंडी] **लवंडी(डि)चा**-वि. (एक शिवी) नीचोत्पन्न; जारज. हा शब्द शिवी देण्यांत, निंदा करण्यांत योजतात. 'कुणिकुन आला लवंडिचा घातक।' -ऐपो १२६.

लवण—न. मीठ; क्षार. -पु. क्षाररस. -वि. खारट; खारें; क्षारयुक्त. [सं.] सामाशब्द- ०जल-न. (काव्य) (खारें पाणी) समुद्र. 'लवणजलविषें करून। सर्व हा पसरला लंबायमान।' [सं.] ०त्रय-न. सेंधेलोण, पावेलोण, बिडलोण हीं तीन लवणें; त्रिलवण. -योर १.१७६. [सं.] ०पंचक-न. संचळ (पावेलोण), सैंधव, बिडलोण, औद्भिद् (जमिनीमध्यें उकरून निघालेल्या खाऱ्या पाण्यापासून सूर्यकिरणांच्या किंवा अग्नीच्या साहाय्यानें झालेलें मीठ) व समुदाच्या पाण्यापासून झालेलें मीठ. -योर १.१७६. [सं.] ०शाक-स्त्र-पुस्त्री. खारावलेलीं फळें, भाज्या; लोणचें. [सं.] ०सागर-पु. खारा समुद्र. 'कां लवणाची कुंजरी। सूदलिया लवणसागरीं।' -ज्ञा १५.३१८. [सं.]

लवण—नस्त्री. १ खोलगट, सखल स्थल (जमिनींतील इ०); बतखल. (सामा.) खोल, आंत गेलेला भाग; खळगा. जसें- पायाची-मानेची-हाताची-लवण. २ वळण; वांकण (रस्त्याचें, नदीचें इ०). ३ (व.) लहानसा ओढा; नाला. ४ उतार; उतरती जागा. ५ लीनता; लवणें. [लवणें] **ह्रु०** लवणतेथें जीवन. ०भंजन-न. (उप.) १ पूज्यतेचें व नम्रतेचें मोठें आडंबर करणें; लवून नमस्कार करून पूज्यतादर्शक शब्दांनीं संबोधणें, बोलणें. (क्रि० करणें). 'पंडित भेटती समत्सर। लवण भंजन अतिनम्र।' -एभा १०.१७३. २ अत्यंत नम्रता; आदर; आजेव. [लवणें + भजणें] **लवणा**-वि. (व.) ओणवा. 'लवणा पड.' **लवणी**-स्त्री. वांकलेल्या शरीराच्या अवयवाच्या खालील लवण; खळगी. २ बांक; वक्रता; कमान (रस्त्याची इ०); लवणांतील आंत गेलेला भाग. [लवणें] **लवणें**-अक्रि. १ वांकणें. **लवलेलें**-वि. वाकलेलें; नमलेलें. 'भारेंलवे प्रतिपदी भू, शेष धरूं शके न लवलीला।' -मोभीष्म ४.४०. २ वांकणें; दबणें; दबकणें. ३ तळपणें (वीज). ४ स्फुरणें (डोळा). ५ कलणें (मन, मनोवृत्ति); वाहणें (मनदेवता-पिंगळी) ह्या अर्थी मन, मनदेवता, मनपिंगळी इ० शब्द कर्तृस्थानीं योजतात. ६ (व.) उडणें; उडी मारणें. 'भितीवरून लवला.' ७ लीन, नम्र होणें.

' गुरुचरणीं त्यजुनि खेद लवतीस । ' –मोवन ४.७१ [सं. लीन; नमन; अप. नवन; हिं. नौना, पं. नौणा] **लवन**–पु. पाणी वाहून जाण्याचा पाट; लवण अर्थ ३,४ पहा.

लवथवणें—अक्रि. १ लवलवीत, स्थूल होणें. २ लोंवणें. ' असुप लवथवितीं कातडी । ' –दा ३.१.१९. ' लवथवती विकाळा ब्रह्मांड माळा । ' –आरती शंकराची. **लवथवित**–वि. थलथलीत; लवलवीत. [लवणें द्वि.]

लवथा—पु. (राजा.) हातानें धरून ओढलेला शरीरांतील मांसाचा गोळा; लचका. (क्रि० घेणें; काढणें; तोडणें).

लवदार—न. (कु.) जुनें, फाटकें वस्त्र; बोंदर.

लवधट—वि. (प्रां.) १ निष्काळजी; बेपरवा; अविचारी. २ दुराग्रही; हट्टी; अडेल.

लवनी—स्त्री. एक प्रकारचें सिताफळ. [सं.]

लवनी—स्त्री. (प्र.) लवणी पहा.

लवफल—न. लव या झाडाचें फळ हें लहान पण फणसासारखें आंबटसर असतें. ' गुलाबजांब व लवफले रा. स्वामीनी... पाा आहेत. ' –पेद १८.११७. [सं. लवलीफल ?]

लवरलवर—क्रिवि. (ना.) थरथर.

लवलव—स्त्री. १ बडबड; चुरचुर लबलब (बोलतांना जिभेच्या लवण्यावरून). ' वृथा बोलाची लवलव । ' –एभा २२.४३. २ हालचाल; वळवळ. ' कीं गर्भींचु नेत्रपार्ती । न सांडी लवलवा । ' –कथा १.२.३३. [लवणें द्वि.] **लवलव-लवां**–क्रिवि. १ जलद बोलण्याचें अनुकरण करून; लबलब, लुबलुब पहा. (क्रि० बोलणें; करणें). २ घाईनें; गर्दीनें; लवकर. **लवलवणें**–अक्रि. १ जलद व चपळाईनें वांकणें व वळणें (अतिशय लवचीकपणामुळें); वळवळणें (साप, किडा इ०नीं). २(ल.) बोलण्याविषयीं उत्सुकतेनें, फुरफुरणें; वळवळणें (जीभ); स्फुरण चढणें. [लवणें] **लवलवाट**–पु. (लवलवचा अतिशय) १ उत्कंठा; उत्सुकता. २ घाई; त्वरा. ' सद्गुरूचें ध्यावया उच्छिष्ट । मजचि मोठा लवलवाट । ' –एभा १२.५४७.

लवलव—स्त्री. १ लुसलुशीतपणा; कोमलता. ' कां भूमीचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव । ' –ज्ञा १३.१८०. २ टवटवी; उत्सुकता. ' तया अवधानांचिया लवलवा । पाहतां व्याख्यान चढलें थांवा । चौगुणें वरी । ' –ज्ञा १३.११५०.

लवलवीत—वि. १ लवका; लवकिरा; लवचीक. २ मऊ व दबणारें (लोणी, मळलेली कणीक, शिजलेला भात, तुडबलेला चिखल इ०); लवथवीत. ' रक्तवर्ण मांसपेशी । तळीं पडली लवलवीत । ' –मुआदि २६.६६. [लवलवणें]

लवलक्षण—न. (राजा.) देखणेपणा; सौंदर्य; चारुता (टवटवी, सुरेखपणा इ० मुळें येणारी). [लव+लक्षण]

लवलाह—पु १ त्वरा; वेग. ' पूर्वे पुण्याचेनि लवलाहें । तुज लाधलें अकस्मात हें । ब्रह्मज्ञान गा । ' –विपु ७.१०२. २ सामर्थ्य. –माज्ञा १८.१०८९. [लव = क्षण] **लवलाह, लवलाही-हे-ह्या**–क्रिवि. (काव्य) झटपट; जलदीनें; झटक्यांत; क्षणांत. ' ऐसें म्हणूनि लवलाही । शेतासी आला ते समयीं । ' ' तरी चंद्रबिंब लवलाह्या । काढूनि देई रांजणीचें । ' - ह ६.९.

लवलाव—पु. चळवळ; लवलव पहा.

लवली—स्त्री. एक झाड. हरपरेवडी पहा. [सं.]

लवा—पु लव्हा पहा.

लवा—पु सत्ता ' तेथें सरकारचा अंमल व लवा ... ' –ख ७.३५६६. [अर. लीवा=निशाण]

लवाज(जि)मा—पु. १ नोकर चाकर; पदरचे लोक; मोठेपणा, डौल दिसण्यासाठीं बाळगावा लागणारा परिवार (माणसें; गाडया, घोडे, नोकर वगैरे). बडया माणसाचा इतमाम. ' बरोबर लवाजिमा मातबर. ' -मराचिथोशा ३६. २ अट; लबाजीम पहा. ' जाहीरदारींत सर्वास दोस्तीचे लवाजिमे जाहीर होतील ' –रा ५.१७६. [अर. लवाझिमा] **लवाजीम**–पु. १ हक्क. २ कर. ' हक-दक वगैरे लवजीम कूल जे असतील ते वसूल करून सरकारांत जमा करणें. ' –वाडबाबा २.४५. [अर. लवाझिम्]

लवाद—पु. १ मध्यस्थ; पंच; दोन पक्षांत तडजोड करणारा. २ मध्यस्थी; तडजोड (कोर्टांत न जातां खाजगी रीतीनें केलेली). [अर. लवाझ=कैवारी] **०कोर्ट**–न आपसांतले तंटे सरकारी न्यायकोर्टांत न नेतां पंचांमार्फत तोडून घेण्यासाठीं स्थापिलेली सरकारमान्य संस्था. **लवादी**-स्त्री. लवादाचें काम; पंचाईत –वि. लवादाच्या, मध्यस्थीच्या संबंधाचा. [लवाद] **लवादी लवादीचा निवाडा-हुकुमनामा**–पु. लवादानें, पंचानें दिलेला हुकुमनामा, निवाडा.

लवाळा—पु. तृणविशेष; लव्हाळा. लव्हा पहा.

लविन्न—न कोयता. [सं.]

लविथपी—स्त्री. लपंडाव. –शर. (प्र.) लपीथपी पहा.

लवे-लागणी—स्त्री. (पडवी व शेजार) संबंध; ऋणानुबंध. (ल.) विश्व किंवा प्रवृत्ति आणि माया. ' भणाल लवे लागणिचा । तरि मध्यें लटिका वायांचा । ' –ऋ ४४.

लवोटवो—पु. आर्जव; लाडिकपणा. लवटव पहा. ' धनवंता पुरुषापाशीं । स्त्री लवोटवो करी कैशी । ' –एभा २३.३३६. **लवोथवा**–पु. १ लवटव. २ आदरातिथ्य. ' वोस घरासि वस्तीसि पहांहो । निर्जीव पाहुणा आला राहो । त्याचा कोण करी लवोथवो । ' –एभा २१.४९८. [लवटव]

लव्ह(व्हां)गी—स्त्री. गदा; लवंगी, लोहांगी पहा.

लव्हलव्ह—क्रिवि (खा.) लवकर. लवलव पहा. 'लव्हलव्ह चालसींन तव्हात गाव जोय.' = लवकर लवकर चालशील तेव्हां तर गांव जवळ येईल. [लव द्वि.] **लव्हा**–वि. (बे.) लौकर पीक देणारें.

लव्हा—पु. एक पक्षी.

लव्हा, लव्हाळा—पु. तृणविशेष; दर्भासारखें गवत. हा चार फूट वाढतो व ओढ्याच्या आणि खाडीच्या तीरांवर प्रायः आढळतो. याचा घरांची छप्परें, चटया इ०कडे उपयोग करतात. [सं. लव-वा] **लव्ही**-स्त्री. बारीक व नाजूक जातीचा लव्हा.

लव्हा—वि. लहान. [सं. लघु; प्रा. लहु]

लव्हा—पु. मोठी तरवार. 'राया जाधव जसन–मुलुख लव्हा केला।' –ऐपो ३३५. १९. **०गर्द**-स्त्री. तरवारींची खणाखणी. 'खना खना लव्हागर्द उडली।'–ऐपो २७९. [लव्हा+गर्द=गर्दी]

लव्हाणा—पु गुजराथी लोकांतील एक जात किंवा तींतील एक व्यक्ति.

लव्हार, लव्हारकाम, लव्हारकी, लव्हा(व्हे)रसाळ—(प्र.) लोहार इ० पहा.

लश(ष)कर, लश्क(ष्क-स्क)र—न. १ सैन्य; फौज. २ सैन्य जेथें राहतें तो भाग; कँप; गोट. –पु. नाखवा; खलाशी; किंवा लष्करांतील नोकर; लास्कर. [फा. लश्कर्] (वाप्र.) **लष्करच्या भाकरी भाजणें**–निष्कारण दुसऱ्याच्या उठाठेवी करणें (पूर्वी सैन्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाई तेव्हां त्या त्या ठिकाणच्या लोकांना शिपायांच्या भाकरी भाजण्यासाठीं लावीत त्यावरून हा वाक्प्रचार निघाला आहे). 'पत्र धाडणारा खरोखरच जानकीबाईच्या कळवळ्याचा होता कीं ... लष्करच्या भाकरी भाजणारा होता?' –रंगराव. **लशकरगिरी, लश्क(ष्क)रगिरी**-स्त्री. १ सैन्यांतील चाकरी; शिपाईगिरी; स्वारीवर जाणें. २ (उपजीविकेकरितां) लष्कराबरोबर जाणें; लष्करांतील वाणी, शिंपी इ० चा धंदा. **०भरती**-स्त्री. सैन्यांत नवीन उमेदवार भरणें; (इं.) रिक्रूटिंग. 'लष्करभरतीची चळवळ निघाली तेव्हां सरकार पक्षपाती प्रोफेसरांनीं त्यांचे अभ्यास बुडविले' –केले १. ३१७. **लश(ष)करी, लश्क(ष्क)री**–वि. सैन्यासंबंधी. **०कायदा**–पु युद्धामुळें किंवा बंडाळीमुळें नेहमींचा असलेला कायदा तहकूब होऊन लष्करी अधिकाऱ्यांचा बसलेला अंमल व त्यांचा कायदा; (इं.) मार्शल लॉ. **०पिवळा गहूं**–पु मोठ्या दाण्याचा पिवळा व चमकदार गहूं. –मुंव्या ४३. **०बैदा**–पु. वाहून नेण्यासारखें लष्करी सामान, बाजारबुणगें.

लशाकोडया—वि. (राजा.) कोड आणि लस असलेला; गलतकुष्ठ झालेला [लस+कोड] **लशी खरूज**–स्त्री. लस वाहणारी, ओली खरूज [लस+खरूज]

लशून—लसुण पहा.

लष्ण, लष्णा—न. (व.ना.) १ भूतबाधा. २ कुरूप व्यक्तीला उद्देशून योजावयाचा एक तुच्छतादर्शक शब्द.

लष्ण-म—न. (व.) १ व्यसन. 'हें लष्ण नवें लागलें.' २ लचांड.

लस—स्त्री. जखम, फोड इ० तून वाहणारें पाणी, द्रवांश; रक्ताच्या पाण्याचा स्राव, द्रवांश. [सं. रस, लसिका]

लसण—न (खा..) लसुण पहा.

लसणा—पु. कुऱ्हाड इ०कांस धार लावण्याचा दगड; **निसणा.**

लसणें—अक्रि. (व.) लचकणें. लसलसणें पहा. 'असा वरच्यावर लसलसतोस कां?' [सं. लस्]

लसणें—अक्रि. विलसणें; शोभणें. 'म्हणोनि परिहास हा सहज आजि केला लसे।' –मो कृष्ण ६०.९ [सं लस्] **लसत**–वि. उत्कृष्ट; शोभायमान; उज्वल. [सं.] **लसती**–स्त्री. विलासी, सुंदर स्त्री. –वि. विलसणारी; सुंदर. [सं.] **लसत्कांचन**–न. तेजदार सोनें. 'एकें लसत्कांचनसम पिंवळे।',–ज्ञा ११.१३५. [सं.] **लसित**–न १ विलास; क्रीडा. २ उल्हास; उत्कंठा.

लसणें—बोचणें; मनास लागणें; डांचणें. 'सुंदर सकल वधूतें कशी न लसतीच होय दमयंती।' –र १. [सलणें]

लसलस–स्त्री. १ अतिशय वळवळ; चळवळ. २ उत्कंठा. **लसलस-लसां**–क्रिवि. १ अतिशय तप्त व क्षुब्ध द्रवपदार्थांच्या, क्षतांत किंवा नासलेल्या फळांत बुजबुजणाऱ्या किड्यांच्या व्यापारांचें दर्शक किंवा शब्दांचें अनुकरण होऊन. २ टवटवीतपणें; टकमकीतपणें. **लसाकफसाक**–क्रिवि. (कु.) अघळफघळ. लसफशीत पहा.

लसलसणें—अक्रि. लसलस करणें. १ रसरसणें; सळसळणें, खळबळ करणें (पाणी इ०). २ क्षत इ० कांत किडे इ० कांनीं वळवळ करीत असणें; बुजबुजाट होणें. ३ भर येणें; भरज्वानी येणें (तारुण्याची धमक, तेज). ४ लुसलुसणें; टवटवणें; तकाकणें; प्रफुल्लित होणें. ५ अति उत्कंठित होणें. ६ वखवखणें. [सं. लस् द्वि.] **लसलसाट**–पु. (लसलसचा अतिशय) बुजबुजाट; वळवळ. (क्षतांत किंवा नासक्या पदार्थांत किडे इ० कांची) [लसलस] **लसफशी(सी)त**–वि. १ ढील; शिथिल; भोंगळ; घट्ट, अटस नसलेलें (पागोटें, वेणी इ०) **लसलशी(सी)त**–वि. १ अतिशय तप्त; फार खवळलेला; उसलणारा, फसफसणारा (द्रव पदार्थ). २ झपाट्यानें बुजबुजणारे (क्षतांतील इ० किडे); बुजबुजाट असलेलें. ३ लुसलुशीत; टवटवीत; टकमकीत. 'तैसें हृदयीं अष्टदळ। अधोमुख ऊर्ध्वनाळ। अति कोमल लसलसित।' –एभा १४.४६५.

लसूण—पुस्त्रीन. १ एक वनस्पति. याचें झाड कांद्याप्रमाणें असतें. लसुण स्वादाकरितां मसाल्यांत, चटणींत वगैरे घालतात. याचे अनेक औषधी उपयोग आहेत. २ या वनस्पतीचा कांदा किंवा कांद्याची पाकळी. [सं. लशुन; प्रा. लशुण, लसण] **लसणा-ण्या**-पु १ एक रत्न; दुध्या कांचमणि. (सं.) लशुन. ह्यास बहिर्वक्र आकार दिला असतां त्याचें बिडालाक्ष किंवा मार्जारनेत्री हें रत्न होतें. ह्याचे रंग धूम्र, पिंवळट, पांढरट वगैरे. २ (कों.) फणसाचा प्रकार. (बारीक गरे असलेला) [लसुण] **लसणी**-स्त्री. १ लसणाची पाकळी, कुडी. २ तिच्या आकाराचा स्त्रियांचा एक अलंकार (जवा, तोडा इ०). ३ वैदूर्यमणि. -वि. १ लसणीच्या पाकळीच्या आकाराचा (मणि इ०) २ लसणासंबंधींचा. [लसुण] **०जवा**-पु. जव्याचा एक प्रकार. याच्या कडया लसणीच्या कुडीच्या सारख्या असतात. २ लसुणजव्याप्रमाणें जोडणी. **०बिब**-न. वेताची एक लहान जात. याला पिंगट फूल येतें. **०सालेंमिश्री**-स्त्री. सालेंमिश्रीची लहान जात. याच्या उलट पंजाबी सालेंमिश्री. **लसूणवी**-स्त्री. लसुणाची पाकळी, कुडी.

लसूण घांस—पु. (कों.) एक प्रकारचा चारा. [इं. ल्यूसर्न घास]

लस्सी—स्त्री. १ दूधपाणी. २ (व.) दूध व पाणी मिळून केलेली थंडाई. [हिं.]

लहंगा—पु. घागरा; परकर (मोठ्या बायकांचा) [हिं; तुल० फा. लुंग्; म. लुंगी]

लहज—पु. क्षण; पळ; निमिष. [अर. लह्झ]

लहडणें—अक्रि. (प्र.) लागणें; लढणें; लगटणें. ' लहडतील ताटांना कणसं । मग शाळूंची जंवा । देऊं देवाजीला दुवा । ' -ठोकळकृत मोटेवरचें गाणें.

लहणी हुंडी—स्त्री. हुंडीचा एक प्रकार. उदा० अ चे पैसे ब जवळ आहेत. क चे पैसे ब जवळ नाहींत. तेव्हां ब वर दिलेली हुंडी त्यानें स्वीकारावी म्हणून क नें अ पासून घेऊन ब कडे पाठविलेली हुंडी. [लहणें + हुंडी] **लहणें**-न. १ ज्याजवळ त्याचे पैसे नसतात अशा व्यापाऱ्यावर जेव्हां एखादा व्यापारी हुंडी देतो तेव्हां तो त्याजकडे हुंडीची रक्कम रोख अथवा ज्याकडे त्याचे पैसे असतील त्या व्यापाऱ्यावर दिलेली तितक्या रकमेची दर्शनी हुंडी पाठवितो. ही रोकड किंवा हुंडी लहणें होय. २ जम; मेळ. (मनुष्याचा, वस्तूचा). -वि. लाभदायक; धाजिणें. [सं. लभन; प्रा. लहण] (वाप्र.) (**ह्याचें मला, ह्याचें माझें) लहणें नाहीं**-त्याच्या आणि माझ्यामध्यें ममता, स्नेह इ० नाहीं.

लहं(हां)बर, लाहंबर—न. १ लटंबर पहा. प्रवासाचा सरंजाम; खटला; सामानसुमान आणि नोकरचाकर. २ (ल.) भिकाऱ्यांचा, मुलांचा, रिकामटेकडया किंवा त्रासदायक लोकांचा समुदाय. ३ अडगळ वाटणारा (कळप, खिल्लारें, गाडया इ० कांचा) सरंजाम; कारखाना; गाडया, गुरेंढोरें इ० चें लचांड. ४ अधाशी, सर्वंरभक मनुष्य किंवा पशु.

लहम—स्त्रीपुन. लहज पहा. [अर. हिं. लंह]

लहर—स्त्री. १ तरंग; लाट (पाण्याची). ' प्रकटति बहुतर लहरी, करि करिवरसा ऱ्हदासि बहु तरल हरी । ' -मोकृष्ण १६. १०. २ शरीरांत उठणारा वेग, पेटका, झटका (मादक, विषारी पदार्थ, विषारी दंश, क्रोध, काम इ० कांपासुन किंवा मरणकाळीं येणारा). 'सोसिल शोकविषाच्या कृष्णा मत्काय हा किती लहरी।' -मोस्त्री ४.९. ३शौचाच्या वेळीं होणारी पोटांतील खळबळ;ओसर; शौचाचा आवेग. ४ झगडा, वेदना इ० च्या वेळीं होणारी क्रिया; धडपड. ५ वाऱ्याची झुळूक; मंद वायु. ६ हुक्की; एकदम् होणारी इच्छा; प्रवृत्ति; कल (मनाचा). ' वामनाची तेव्हां लहर लागली नाहीं.' ७ विशिष्ट जातीच्या सापाच्या गळयाखालच्या रेषा (ह्या जितक्या असतात तितक्या तो साप चावलेल्या मनुष्यास विषाच्या लहरी येतात अशी लोकांत प्रसिद्धि आहे). ८ नागमोडी सारखी रेषा (कापड, वस्त्र इ० वरील विणकामांतील किंवा रंगानें उठविलेली). ९ कापड, पोषाख याची नागमोडी घडी. १० आकस्मिक झडप; ग्रासणें (झोपेनें). ' झोपेची लहर ' ११ छाया; झांक. [सं. लहरी] सामाशब्द- **०दार**-वि. १ छांदिष्ट; लहरी; तबियती इ०. २ नामी; सुंदर; लहर दाखविणारा (पोषाख, गाणें, वाजविणें, भाषण, कविता इ०). [लहर] **०बहर**-स्त्री. १ जोम; ज्वानी; भर; अत्युत्कर्ष. ' नवतीची लहरबहर थोडी. ' ' आंब्याची लहरबहर उन्हाळ्यांत असती ' २ हुक्की. [लहर+बहर] **लहरा**-पु. १ (संगीत) छाया; थाट; सुर (विशेषतः तंतुवाद्यांवरील). ' कोणत्या रागाचा लहरा आणूं बरें ? ' २ तान; लकेर. (वाप्र.) **०मारणें**-छांदिष्टपणानें क्रीडा करणें; मौज मारणें. **लहरी**-स्त्री. १ लाट. २ (काव्य) शरीरांत उठणारा वेग, पेटका. ' काम-क्रोध लहरी ', ' लागला म्हणोनि लहरी । भांजेची ना । ' -ज्ञा २.७१. -तुगा १४०. ३ (व.) चुनडीप्रमाणें नागमोडी रेघा असलेलें स्त्रियांचें नेसण्याच एक वस्त्र. लहर पहा. -वि. छांदिष्ट; चंचल; मनस्वी. [लहर] **०दार**-वि. १ लहरी, नागमोडी (कांठ, वस्त्र इ०); लाटांसारख्या रेषांचा. ' किनखापे लाल लहरीदार.'-समारो, २.७३. २ छांदिष्ट; लहरी; तऱ्हेबाज; विलक्षण. ३ पाण्याच्या लाटप्रमाणें वरखालीं होणारें. [लहर+दार] **०बहरी**-वि. छांदिष्ट; लहरी, लहरबहर पहा. [लहरी द्वि.] **लहऱ्या पिटणें**-(व.) कमालीची उत्सुकता लागणें, दाखविणें. ' जाण्यासाठीं लहऱ्या पिटतो जसा. '

लहा—पु. ध्यास. लाहो पहा.

लहा, लहालहा—स्त्री. १ उसासा; धापा देणें. २ लखलख करणें; झळाळणें; चकाकणें. ३ (ल.) स्पर्धेनें धापा देणें; लाहडा होणें; स्पर्धेनें होणारी तडफड. (क्रि० एखाद्यासीं बांधणें). –क्रिवि. १ (उष्णतेच्या तापामुळें) धापा देणें, उसासे टाकणें यांचें अनुकरण करून. (क्रि० करणें). २ प्रखर सूर्य किरणांमुळें हवेच्या हेलकाव्याचें, मृगजळाचें अनुकरण करून. (क्रि० करणें). ३ शेतांतील लहरीदार पिकाच्या चकाकण्याचें अनुकरण करून. ४ अत्यंत रुक्ष हवेंत पिकें जणुं धापा टाकीत आहेत त्यावेळचें अनुकरण होऊन. (क्रि० करणें). **ल(ला)हाकणें**-अक्रि. (ना.) धापा टाकणें; जोरानें श्वासोच्छ्वास करणें.

लहाई—स्त्री. (कों. कु.) सागुतीचा किंवा माशांचा खंका किंवा फोडी.

लहांगड—स्त्री. दुचाकी गाडी (धान्य, भूस, कडबा इ० नेण्याची).

लहांगी—स्त्री. गदा. लोहांगी पहा.

लहांचट-ड-र—वि. १ नकाराला, निषेधाला न जुमानतां खणपटीस बसणारा; दुराग्रही; हट्टी. २ (मुख्यत्वें लहांचर) लचाळ (चहाडी करण्यांत, लुडबुड्ण्यांत); लब्रा. (व.) बहाचर.

लहाडी—स्त्री. (मराठवाडा) राडी; विस्तवाची खांच.

लहाण—वि. लहान पहा.

लहाणें—अक्रि. १ लाभणें; लहेंगे पहा. 'स्वर्गू न लहाअे एकु कवडी।' –शिशु १३३. २ पात्र असणें. 'काव्यें जालीं मातावळीं। तिए टाकों न लहती जवळी। सेया गाउंवा।' –शिशु ८५. [सं. लभन; प्रा. लहण]

लहान—वि. १ लघु; सान; अल्प (वय, किंमत, सामर्थ्य इ०नीं). २ आखूड; छोटा (आकार, प्रमाण इ० नीं). ३ अल्प; थोडा. [सं. लघु, प्रा. लहु] **म्ह०** (व.) लहानशी बुटली सांजसकाळ उटली=घरीं नवरा बायको दोघेच असल्यामुळें ज्यास फारसा खर्च नसतो अशास म्हणतात. (वाप्र.) **लहान तोंडीं मोठा घास घेणें**–आपला लहान दर्जा न ओळखतां एखादी मोठी गोष्ट करणें; आपल्याकडून होण्याजोगें नसलेलें काम करावयास सिद्ध होणें. सामाशब्द– **०केळी**-स्त्री. एक वनस्पति. देवकेळी पहा. **०खुरी**-वि. १ लहान पायाची (गाय, बैल इ०). २ लहान बांध्याची; ठेंगणीठुसकी. 'लहानखुऱ्या ठेंगण्या देखण्या त्या कां होईना त्या राजी।' –सला ४३. [लहान+खूर] **०गा**-वि. १ धाकटा; अधिक बुटका–आखूड–लहान–तरुण; (तारतम्यानें) कमी (उंची, लांबी, वय इ० कांत). २ छोटा; बुटका; आंखूड; लहान. (तारतम्याशिवाय) [लहान+गा प्रत्यय] **०झारडी**-पु. (कों.) एक मासा. **०थोर-मोठा**–वि. लहान आणि मोठा; प्रत्येक आकाराचा, वयाचा व जातीचा; एकंदर. **०पण-पणा**-नपु. १ लघुता; हलकेपणा. 'लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा।' २ बाळपण. [लहान] **०बापा**-पु. (खा.) बापापेक्षां लहान असणारा चुलता. [तुल० कानडींत चिक्क अप्पा, दोड्ड अप्पा (लहान बाप, मोठा बाप) असे शब्द धाकट्या व मोठ्या चुलत्याला वापरतात.] **०लहू-लोहू-लव**–वि. लहुलहान पहा. **०वी**–स्त्री. १ (वयाचा, आकाराचा) लहानपणा. २ (ल.) हलकेपणा; लघुत्व; थोरवी, मान्यता, गौरव यांचा अभाव. [लहान] **०वीथोरवी**–स्त्री. तुलना करतांना दाखविलें जाणारें दोन माणसांतील (मुख्यत्वें वयाचें) अंतर; दोन वस्तूंमधील तुलनात्मक अंतर; असमता. 'स्त्री-पुरुषाची दोहों वर्षांची लहानवीथोरवी असावी' **०सर**–वि. लहानसा; कांहींसा लहान. 'हें घर लहानसरच आहे पण टुमदार आहे.' [लहान] **०सहान**–वि. बारीकसारीक; लहान, हलका इ० (व्यापक व सामान्य अर्थी). [लहान द्वि. किंवा लहान+सानें] **लहाना**–वि. लघु, लहान पहा. [लहान] **ल(ला)हानाव(ळ)णें**–अक्रि. १ कमी, अधिक लहान, अधिक अशक्त इ० होत जाणें; घटणें. 'पाऊस लहानावला म्हणजे मग जा.' २ क्षीणक्षीण, बारीकबारीक होणें (विझणारा दिवा). ३ लहान प्रमाणांत येणें; संकुचित होणें (जवळचे भाग सुजले असतां, डोळा). [लहान] **लहानाळ**–वि. (राजा.) सामान्य प्रमाणापेक्षां लहान बांध्याचा (मनुष्य, पशु इ०). [लहान] **लहानाळणें**-सक्रि. अधिक लहान–आखूड–अशक्त–मंद–कमती–करणें (शब्दशः व ल.). 'आपण भ्रमें लहानाळला।' –दा ९.३४. [लहान]

लहा(हां)बर—वि. १ वाचाळ; बडबड करणारा. २ लचाड; लुडबुड्या; लांडा कारभारी.

लहाय, लहायलहाय—स्त्री.क्रिवि. लहालहा पहा.

लहाय—पु (कु. कों.) १ मांसाचा तुकडा. २ काठीवर भाजलेलें मांस.

लहासें—न. लहान डाग, वण. लासें पहा. 'उरीं जयाचे मिरवे लहासें।' –सारुह ३.२३. [लास]

लहारी—स्त्री. १ तीन आण्यांचें एक जुनें नाणें; लारी. २ (यावरून) तीन आणे (एकवट).

लही—स्त्री. (व.) लव्हाळें.

लहीन—वि. (प्र.) लीन पहा. [लीन] **०पणा**–पु. (बायकी) लीनता; विनय. 'इतकी श्रीमंती मिळविली पण अजून अंगांत किती लहीनपणा!' –हाकांध २३.

लहु—वि. लघु; लहान; बारीक. –क्रिवि. (गो.) हलकेच; सावकाश. [सं. लघु; प्रा. लहु] **०लहान**–वि. लघ्वाकृति; लहान

बारीक. २ लहान व सुंदर; लहान व देखणा (सजीव प्राणी). [लघु+लहान]

लहु(हुं)डी—स्त्री. एक शस्त्र; लोखंडांचें अग्र बसविलेली काठी; लोहांगी. ' पाश लहुंडी चडक-चक्र । ' -मुआदि ३०. १६४. -कृमुरा २५.१४. [लोह+अंग]

लहेजा-मा—पु. (व.) क्षण; लहज-म पहा. ' लहेमाभर दम खा. '

लळणें—अक्रि. (व.) निश्चेष्ट पडणें. ' बाधा झाली नि तो जागच्या जागीं लळला. ' [लोळणें] **लळतलोंबत**-क्रिवि. १ फरपटत; खरडत. २ लोंबत; लोळतलोंबत. (क्रि० चालणें; जाणें; येणें; धरणें; ठेवणें इ०). [लोळणें+लोंबणें] **लळतें घेणें**-क्रि. हलक्या हातानें, हळू, सहज रीतीनें घेणें. **लळती गोष्ट, लळतें बोलणें**-स्त्रीन. मन वळविणारें किंवा शांतवनपर भाषण.

लळत्या—वि लळित्या पहा.

लललळ-लळां—क्रिवि. लललळीत रीतीनें (हालणारी, बाहेर लोंबणारी जीभ). (क्रि० करणें) [सं. लल्] **लललळणें**-अक्रि. फेसासह-लाळ बाहेर लोंबणें; इकडे तिकडे हालणें; लळलळ करणें (जीभ). **लललळाट**-पु. लळलळ करणें; लललळणें. ' तैसा जिभांचा लललळाटु देखिला । आवालुवें चाटितां । ' -ज्ञा ११.४२८.

लळा—पु. १ प्रीति; ममता (लालनपालन केलेलें, करीत असलेलें मूल, पशु इ०कांवरील). (क्रि० करणें; बाळगणें; पाळणें; लावणें). ' कीं हा जेंवि तसी न माय पुरवी कुक्ष्युद्भवाचा लळा । ' -मोकृष्ण ५७.२९. २ लाड; हट्ट. (मुलांचे, आश्रिताचे) **म्ह**० लावशील लळा तर पडेल गळां. ' तुका म्हणे अहो केशीराजा दयाळा। बरवा हा लळा पाळियेला शेवटीं । ' -तुगा ४५५. लळा याचा मूळचा अर्थ आईबापांची किंवा वरिष्ठाची प्रीति, ममता हा आहे. परंतु लौकिकांत कनिष्ठावर किंवा वरिष्ठावर केलेली प्रीति अशा दोन्ही अर्थी हा शब्द योजतात. [सं. लल्-ड] (वाप्र.) **०चालविणें-पुरविणें**-लाड पुरविणें; मनाप्रमाणें करणें-करूं देणें; कोडकौतुक करणें. **०देणें**-प्रेम लावणें; माया करणें. ' इंद्रिया लळा देउनी । ' -ज्ञा ३.१९४. सामाशब्द- **लळ (ळि-ळे)वाड, लळेवडा, लळवेडा**-वि. लाडका. ' म्हणे रे बापा लळवेडा । ' -ग्रंथराज १.८. ' तीं ललिवाडें पैं माझीं ।' -एभा २८.६७७. ' तो भक्त चक्रचुडु । मियां केला लळेवडु । ' -भाए ८०९. ' तेवी निजभक्त लळेवाड । ' -एभा २ ७८०. **लळेया**-वि. हट्ट घेणारा. ' कां जे लळेयांचे लळे सरती । ' -ज्ञा ९.३.

लळी(ळि)त—न. १ नवरात्र इ० उत्सवाच्या शेवटच्या दिवशीं रात्रीं उत्सवदेवता सिंहासनारूढ झाली असें कल्पून वासुदेव, दंडीगण इ० ईश्वरभक्तांचीं सोंगें आणून त्या सोंगांनीं स्वसंप्रदायानुरूप देवतेस प्रसाद मागून सभासदांस वाटण्याचा विशिष्ट समारंभ. २ (यावरून) उत्सवप्रसंगीं सोंगें आणून नाटकाच्या प्रवेशाप्रमाणें खेळ करणें. ३ अशा प्रसंगाकरितां रचलेलीं व म्हटलेलीं गाणीं, अभंग, पदें इ० कवनांचा ग्रंथ. ४(ल) दुष्परिणाम; दुःखांत; फजीती (राज्य, संसार, व्यवहार इ० ची) -तुगा ४८४. -शर. ४ शेवटचें मंगल म्हणून मानलेल्या एका माळकेचा शेवटचा अभंग. मंगल पहा. [सं. ललित] (वाप्र.) **लळ(ळि)-ताघर येणें**-वाद इ० प्रसंगीं चिरडीस येऊन निकरावर येणें; अतिप्रसंग होऊन रागावणें. **लळित्या**-वि. लळीत करण्यांत निपुण (हरदास इ०).

लळूतम् गळूतम्—न. (व.) अति सख्य [गळणें द्वि.]

लक्ष—पु. १ शतसहस्र; लाख ही संख्या. ' निवडूनि किजे सेना । लक्षवरी । ' -ज्ञा ७.११. २ -न. (ल.) आनंदाची गोष्ट; लाखाच्या योग्यतेची गोष्ट; लखलाभ. लाख पहा. ' ऐसें ऐकुनि म्हणती आम्हाला हेंचि लक्ष ते पितर । ' -मोआदि ४.१४. [सं.] सामाशब्द- **०दीप**-पुभव. (उत्सवांत लावलेले) शंभर हजार दिवे; उत्सवांतील रोशनाई. **०पू(पु)जा**-स्त्री. १ (फुलें, फळें, विशिष्ट झाडांचीं पानें, अक्षता इ० कांची) लक्ष संख्या वाहून (देवाची इ०) पूजा करणें. २ वरील पूजेकरितां (फुलें, फळें, इ० कांची) जमविलेली वस्तूंची संख्या; लाखोली. [सं.] **०भोजन**-न. धर्मकृत्य म्हणून लक्ष ब्राह्मणांस भोजन घालणें. [सं.] **०चौऱ्यायशी योनी**-स्त्रीअव. चौऱ्यायशी लक्ष जन्म. मनुष्ये चार लक्ष, पशु वीस लक्ष, कृमि अकरा लक्ष, खेचर दहा लक्ष, जलचर नऊ लक्ष, स्थावर तीस लक्ष. एकूण ८४ लक्ष. **०लाभ**-पु. लखलाभ पहा. [सं.] **लक्षशः**-क्रिवि. लक्षावधि; लाखोगणती. [सं.] **लक्षाचा मनुष्य-माणूस**-पु. पराकाष्ठेचा उत्कृष्ट, लायक मनुष्य; लाखमाणूस. **लक्षाधीश-पति**-पु. लाखों रुपये जवळ असलेला मनुष्य. ' नवीन लक्षापती सावकारांच्या मालमत्तेची जप्ती करून जुलुम चालविण्यांत येतो. ' -विक्षिप्त १.२०. [सं. लक्ष+अधीश, पति] **म्ह**० १ लक्षाधीश कीं कक्षाधीश. २ लक्षापति कीं भिक्षापति. **लक्षानुलक्ष**-वि. लक्षावधि; असंख्यात. [सं. लक्ष+अनु+लक्ष] **लक्षावधि**-क्रिवि. लक्षशः, लाखोगणती. लाखों. [सं. लक्ष+अवधि] **लक्षेश्वर**-पु. लाख रुपयांचा मालक; श्रीमंत मनुष्य. ईश्वर पहा. [सं. लक्ष+ईश्वर] **लक्षेश्वरी**-स्त्री. मोठ्या संपत्तीची मालकी; लक्षाधीशपणा. **म्ह**० लक्षेश्वरी कीं भिक्षेश्वरी.

लक्ष—न. १ लक्ष्य; नेम (बंदुकीचा इ०); वेधण्याचें उद्दिष्ट. ' पै लक्ष भेदिलियाहीवरी । ' -ज्ञा १८.४२६. २ अनुसंधान; अवधान; चित्त. ' कीं शेतीं बीं विश्वरिजे । परी पिकीं लक्ष । ' -ज्ञा

१६.१००. [सं. लक्ष्] **लक्षक**–वि. लक्षिणारा; पाहणारा. लक्षिणें (–क्रि.) पहा. **लक्षणीय**–वि. १ दर्शनीय. २ मननीय; विचारणीय. [सं.] **लक्षणें**–सक्रि. (प्र.) लक्षिणें पहा. १ समजणें; कल्पना करणें. ' लय लक्षूनियां झालों म्हणती देव । ' –तुगा २८०८. २ काळजी करणें; लेखणें. ' ... त्वत्सुतासि रक्षील । मन्मातुळ जगदीश, प्रेमें मजहूनि अधिक लक्षील । ' –मोअश्व ३. ३१. ३ –अक्रि. कळणें. ' तेही लक्षे तें फुडें । लक्षण सांगों । ' –ज्ञा १३.३४१.

लक्षण—न. १ खूण. २ सूचक चिन्ह; ज्ञापक विशेष; गुणधर्म; ज्याच्या योगानें एखादी गोष्ट निर्देशिली किंवा ओळखली जाते असें कांहीं. ' धूम पाहिला असतां एथें अग्नि आहे असें ज्ञान होतें म्हणून धूम हें लक्षण अग्नि हें लक्ष्य; स्वभावाचे ज्ञापक गुणावगुण, प्रत्येकी. ' पटकन दुसऱ्यास शिवी देतोस हें तुझे अंगीं वाईट लक्षण आहे. ' ३ अभिधा; व्याख्या; तत्त्वाचा परिस्फोट करून किंवा धर्म सांगून केलेलें एखाद्या गोष्टीचें वर्णन. ४ (वैद्यक) निदान; निदानाच्या पांच भागांपैकीं तिसरा (चिन्हें). ५ (यंत्रशास्त्र) गुण, उपाधि–जाति. ' प्रेरणेस मुख्य तीन लक्षणें असतात ' –यंस्थि ४. ६ लवलक्षण; सौंदर्य. ७ अवलोकन; दृष्टि. ८ (अशिष्ट) लक्ष्मण; रामाचा भाऊ. [सं. लक्ष्=१ खूण करणें. २ पहाणें] **म्ह**० नांव मोठें आणि लक्षण खोटें. सामाशब्द– **०गीत**–न. एखाद्या रागास लागणारे स्वर, त्याची जाति, समय, वादी–संवादी स्वर वगैरे माहिती ज्या चीजेंत सताल बांधून दिलेली असून जी चीज त्याच रागांत गावयाची असते ती. [सं.] **०समन्वय**–पु. व्याख्या किंवा वर्णिलेल्या गोष्टीची व्याख्येशीं, वर्णनाशीं योग्य, यथार्थ जुळणी. २ क्रियापदाचा कर्त्याशीं दाखविलेला बरोबर संबंध. [सं. लक्षण+समन्वय] **०हीन**–वि. (सामान्यतः अपेक्षित लक्षणांनीं रहित (वधू); शुभलक्षणें नसलेला (घोडा); विशेष गुण किंवा सुलक्षण नसलेली (व्यक्ति, वस्तु इ०). [सं. लक्षण+हीन]

लक्षणा—स्त्री. शब्दाचें किंवा शब्दसमुदायाचें अर्थलक्षण; भावार्थ; शब्दशः दाखविलेल्या अर्थापलीकडचा गर्भित अर्थ जिच्या योगें बोधित होतो ती वृत्ति; वाच्यार्थाहून निराळा पण तत्संबद्ध अर्थ; लाक्षणिक किंवा अलंकारिक गर्भितार्थ. उदा० ' चोराचे भयानें सारा गांव पळाला ' येथें गांव ह्या शब्दाची लक्षणा गावांतील लोकांचा जो समुदाय त्याजवर होती. अजहल्लक्षणा पहा. [सं.] सामाशब्द– **०संबंध**–पु. (तर्क.) शब्दानें किंवा शब्दसमुदायानें लक्षिलेली गोष्ट आणि मनांत असलेली व गर्भित गोष्ट यांमधील संबंध; वाच्यार्थ आणि भावार्थ यांमधील संबंध. व्यंजनासंबंध. **लक्षणैकचक्षुष्क**–वि. (तर्क.) पदार्थांच्या लक्षणां–गुणधर्मांकडे ज्याचें लक्ष आहे असा. लक्ष्यैकचक्षुष्काच्या उलट. [सं.]

लक्षिणें—सक्रि. १ पाहाणें; अवलोकन करणें. २ (मनांत) उद्देश धरणें; हेतु ठेवणें. ' लक्षुनिया मिथुळापंथ । परम आनंदें चाल्ले । ' ३ (काव्य) बाट पहाणें; मार्गप्रतीक्षा करणें. ' चार घटका तुझा मार्ग लक्षीत बसल्यें आहे. ' ४ लक्षणें, चिन्हें किंवा आनुषंगिक सूचक गोष्टी यांवरून जाणणें, समजणें. ' मुलाची वाढ प्रतिक्षणीं पाहूं लागलें असतां दिसत नाहीं परंतु महिन्यानें किंवा वर्षानें पाहिलें असतां कांहीं थोर दिसतें, तेव्हां प्रतिक्षणीं वाढ आहे असें लक्षावें. ' ५ उमगणें; काढणें; ताडणें (गर्भित मत, अंतर्गत सत्य) [सं. लक्ष्] **लक्षित**–वि. १ लक्षिलेला; **उद्दिष्ट**. २ पाहिलेला; दिसलेला. ३ उमगलेला; लक्षणांवरून, सूचक गोष्टीवरून किंवा स्वरूपावरून जाणलेला.

लक्ष्मी—स्त्री. (अपभ्रष्टरूपें लक्ष(क्षु)मी,लक्षिमी). १ विष्णूची स्त्री; संपत्ति, उत्कर्ष, वैभव, सौंदर्य इ० ची देवता. २ भाग्य; नशीब; सद्दी. ३ धन; संपत्ति. इ० ४ (काव्य) श्री; शोभा; सौंदर्य; दर्शनीयता (सामा. वस्तूंची). ५ (कृषि) शेतीच्या उपयोगाचीं जनावरें (गाई, म्हशी, बैल, रेडे). ' पाटलाजवळ दोन खंडी लक्ष्मी आहे. ' ' रानांत लक्ष्मीला पाणी भेटत नाहीं. ' ६ (खा. व.) स्त्री; बायको. ' तुझ्या शेतांत निंदण्यास किती लक्षिम्या होत्या ? ' [सं.] (वाप्र.) **०अवतरणें**–लक्ष्मीची कृपादृष्टि होणें; समृद्धि येऊन शोभा प्राप्त होणें (कुटुंब, शेत, घरदार, व्यापार इ० स). **लक्ष्मीचा होरा**–पु. भरभराटीचा काल; भाग्योदयकाल. **लक्ष्मीची मोठी बहीण**–अक्काबाई पहा. **०मोरीवाटें येणें**–गडगंज संपत्ति येणें; लयलूट होणें. सामशब्द– **०ताल**–पु. गाण्यांतील एक ताल. [सं.] **०नारायण**–पु लक्ष्मीसह विष्णु; एक देवता. **०नारायणाचा जोडा**–पु. एकमेकाला शोभणारी नवराबायको; आदर्श दांपत्य. **०पति**–पु. १ विष्णु. २ धनवान् मनुष्य. [सं.] **०पुत्र**–पु. श्रीमंत मनुष्य. [सं.] **०पूजन–पूजा**–नस्त्री. १ गृहप्रवेशानें नवऱ्या मुलीला सासरीं आणल्यानंतर दांपत्याकडून केलेली लक्ष्मीची पूजा. २ अश्विन वद्य अमावास्येस धनिक, व्यापारी इ० लोक मोहरा, रुपये इ० द्रव्यावर लक्ष्मीचें आवाहनपूर्वक पूजन करतात तें. **लक्ष्मी(लक्षुम)बाईची दया**–स्त्री. लक्ष्मीची कृपादृष्टि. ह्याच्या उलट अकाबाईची दया. **०राखण**–न. लक्ष्मीनें कुटुंबांत रहावें म्हणून लक्ष्मीकरितां निराळा काढून ठेवलेला रोजच्या जेवणाचा भाग. **०लीळ**–पु. लक्ष्मीचा पति. [लक्ष्मी+लीला] **०वंत**–वि. लक्ष्मीवान्. **०वान्**–वि. १ संपत्तिमान्; श्रीमान. २ उत्कर्ष पावणारा; वर्धमान; आबादीचा. [सं. लक्ष्मी+वत्] **०विलास**–पु. एक रसायण. हें विशेषतः क्षयावर देतात. [सं.] **०विलास तेल**–न. गंधतेल. हें सर्व रोगनाशक आहे. [सं.]

लक्ष्य—न. १ लक्ष ठेवण्याची किंवा नेम धरण्याची वस्तु; वेध्य; निशाण. २ अवधान; सादर चित्त. ३ ज्याच्या योगानें

पदार्थ पहावयाचे असतात आणि दिशा निश्चित करावयाची असते असें लहानसें भोंक (तुरीययंत्राचें इ०). ४ सावज. ५ (तत्त्व.) ब्रह्मात्मस्वरूप. –वि. १ अवलोकण्यास, अवधान देण्यास, निरखण्यास, जाणण्यास शक्य, उद्दिष्ट, जरूर, योग्य. २ समज लेला; सूचित किंवा उद्दिष्ट म्हणून ग्रहण केलेला; लक्षणेनें ज्ञेय. [सं.] सामाशब्द– **०दर्शी**–वि. १ खोल दृष्टीचा; अचूक, योग्य दृष्टीचा. २ चांगला नेम मारणारा; निशाणबाज. ३ आसक्तचित्त [सं.] **०भेद**–पु. लक्ष्याचा भेद; वेध. **०भेदी–वेधी**–वि. लक्ष्याचा भेद, वेध करण्यांत कुशल. [सं.] **लक्ष्यार्थ**–पु. लक्षणेनें प्राप्त झालेला अर्थ; गर्भितार्थ; वाच्यार्थाहून भिन्न अर्थ. ' तत्पदार्थ त्वंपदार्थ दोहींचा जो लक्ष्यार्थ । त्यासि ऐक्य हा फलितार्थ महावाक्याचा । ' [सं. लक्ष्य+अर्थ] **लक्ष्यांश**–पु. १ लक्षावयाची, ध्यानांत घ्यावयाची, विचार करावयाची, जाणावयाची इ० गोष्ट. २ लक्षिलेली, मनांत आणलेली, ग्रहण केलेली, समजलेली गोष्ट. ' शबल जो वाच्यांश बोलिजे । शुद्ध तो लक्ष्यांश म्हणिजे । ' ३ (तत्त्व.) वाच्यांशाचा त्याग झाल्यावर शेष राहिलेला अधिष्ठान ब्रह्मात्मा. –हंको [सं. लक्ष्य+अंश]

लाइलाज—वि. निरुपाय; नाइलाज. ' आता वारंवार तुम्ही विचार लिहूं लागला तेव्हां लाइलाज जाणून लिहिलें आहे. ' –ख १.२८; –ऐटि १.५९. [अर. ला+इलाज्] **लाइलाजी**–स्त्री. निरुपाय; व्यर्थत्व; उपाय चालत नाहीं अशी स्थिति; कुंठितावस्था. ' लाइलाजीस्तव दर पत्रीं सेवेसी विनंती लिहितो. '–दिमरा १.२०.

लाइस—स्त्री. (नाविक कु.) कापडी बोंब लांकडी बोंबावर ठेवल्यानंतर त्यास गुंडाळणारी दोरी. **०करणें**–क्रि. उलटें वल्हवून होडीच्या गतीस अवरोध करणें.

लाई—स्त्री. लाही पहा. [हिं.]

लांक—पुस्त्री. एक धान्य; लाख. [सं. लंका]

लांक, लांख—स्त्री. १ (माणसें, पशू किंवा पदार्थ यांची दोरी इ० नें) जुळणी करणें; सांगड घालणें. (क्रि० घालणें). २ (पदार्थ, माणसें, पशू इ०ची कांहीं कामाच्या सोयीसाठीं घातलेली) सांगड; एकत्रितपणा; जूट. ' तुमच्याजवळ आधेल्या नसल्या तर दोघां दोघां ब्राह्मणांस एक एक रुपया देऊन दोघादोघांची एक एक लांक करून दक्षिणा वाटा. ' ३ दोन जनावरें ज्या सईलसर दोरीनें एकत्र बांधतात ती दोरी; लांकणदोर. ४ (सामा.) सांधा; बंधन. (क्रि० घालणें). ५ (ल.) मेळ; जूट; जोड. [लाख]

लाक—स्त्री. (गो.) खेकड्याच्या पोटांतील मगज.

लाकड—न. लांकूड पहा.

लांकड—स्त्री. १ अति उंच वाढलेला ताड, माड. २ अति उंच मनुष्य. लकड पहा.

ला(लां)कण–न—न. १ लांक पहा. बंधन. ' आणि येणेंही न सरे । लांकण लागे दुसरें । ' –ज्ञा १४.१५२. मोटेच्या तोंडाच्या लोखंडी कडया ज्यांनी बांधल्या असतात त्या चामड्याच्या वाद्या (समुच्चयानें). **०दोर**–पु. दोन बैल इ० एकत्र बांधावयाची दोरी. **ला–लांकणें–लाखणें**–क्रि. १ (दोन पशू किंवा माणसें यांच्या माना एकत्र बांधणें.) २ (जनावर, माणूस) खुंटयाला, खांबाला बांधणें. ३ एक दोरी दुसऱ्या दोरीमध्यें वळून किंवा गांठ मारून किंवा बिरडें, गुळखी यांच्या योगानें सांधणें, जुळविणें. ४ (माणसाला, जनावराला) एखाद्या रक्षकाच्या, पंतोजीच्या हवालीं करणें. ५ (सामा.) जोडणें; जुळविणें; संबद्ध करणें. ६ साखळी घालणें. [लाख; तुल० सं. लंखनी]

लाकणें, लाखणें—अक्रि. (दागिना, बांगडी इ० वर) लाख चढविणें; लाखटणें; लाख भरणें, लावणें. [लाख]

लाकणो—पु. (कु.) वाघ वगैरेची शिकार करण्याकरितां लाविलेला चाप; सापळा. [लाकण]

लाका—पु. (नंदभाषा) नफा. ' तुम्ही या सणंगाला किती लाका घेतला ?

लाकीन—उअ. पण; परंतु; लेकीन. ' लाकीन भोंसले याजकडोन पत्रें आलीं नाहींत. ' –पया ८४. [अर. लाकिन्]

लाकूड, लांकूड—न. १ काष्ठ. २ लांकडाचा तुकडा; दांडका. ' ते यत्नांतर मातले पशुवशा येती अहो ! लांकुडें । ' –मोकृष्ण ६८.३२. ३ (ल.) ताठ, टणक, न लवणारें शरीर, गात्र, शिंग इ० कोणताहि पदार्थ. ' म्हशीला शेतकऱ्यानें खाऊं घातलें नाहीं म्हणून ती लाकूड झाली. ' [सं. लगुड; प्रा. लक्कुड; हिं. लकडी] (लाकूड शब्दाचा समासांत पूर्वपदीं लाकड असा उच्चार होतो). (वाप्र.) **लाकडास माकड लावणें**–विजोड अशा वधूवरांचें लग्न लावणें; एखाद्या लग्नास हपापलेल्या माणसास कसली तरी वायको मिळवून देणें. **(जिभेचें) लाकूड होणें**–जिभेला कोरड पडणें; जीभ वाळणें. **०पडणें**–काष्ठपण येणें; लाकडासारखें जड होणें. ' सर्वेंद्रियां लांकुड पडे । स्मृति भ्रमामाजीं बुडे । मन होय वेडें । कोंडे प्राण । ' –ज्ञा ८.२२७. **०वळणें–होणें**–काठी किंवा काष्ठाप्रमाणें निर्जीव–निःसत्व होणें. **लाकडाचा तट**–पु. लांकडी कोट, भिंत; लढाईत तोफेचे गोळे अंगावर येऊं नयेत म्हणून संरक्षणासाठीं असा तट उभारतात. **लांकडाचा क्षार**–पु. एक क्षार. एखाद्या लांकडाचा काढलेला क्षार. कोरड्या क्षारास प्रतिसार्य क्षार व काढ्याप्रमाणें पातळ असणाऱ्या द्रवरूप क्षारास ' तैजस क्षार ' म्हणतात. –योर १.२५९. **लाकडाचें नखतेल**–न. लाकडापासून काढलेलें तेल; (इं.) नाफ्तेल. वुड नाफ्था. –सेंपू

१.१५३. **लाकडाचे दोर**–पुअव. लाकडामध्यें असलेल्या बारीक बारीक रेषा. **लाकडी**–स्त्री. (खा.) काठी; दंड. 'आन एकेकापे एकेक लाकडी दीन आख्यों.'–भिक्षी २. **लांकडी, लाकडी**–वि. लाकडासंबंधाचें; लाकडाचें केलेलें. [गु.] **०खेळ**–पु. लाकडी बाहुल्या इ० खेळणीं; लाकडाच्या केलेल्या, भातुकली वगैरे खेळाच्या जिनसा(पूर्वी सासऱ्याकडून नव्या सुनेस श्रावणपाटीवर देत). **०घोडी**–स्त्री. पखवाज ठेवण्याकरितां उपयोगांत आणतात ती लाकडी घडवंची. घोडी पहा. **०बोंब**–पु. (कों. नाविक) नाळीच्या बाहेर शीड लावण्यासाठीं बुंधा दाट्यावरील बोंब पाटलीस अडकवून नाळीच्या भुरडयास बांधलेलें सरळ लांकूड. हा डोलकाठीप्रमाणें उभा न करतां पालथा ठेवितात. हा कलमीहून बराच लहान असतो. याच्या बुंध्यास भोंक पाडून त्यांत एक लाकडी खिळी (लहानसा लाकडी खुंटा) घालून त्या खिळीस फेरे घेऊन बांधतात. **०लास**–पु (चांभारी) बुटांत घालावयाचा लाकडी ठोकळा; कलचूत. **लाकूड फांटे**–पुअव. १ घर वगैरे बांधण्यासाठीं उपयोगी लाकडें, गवत विटा इ० साहित्य. २ संसाराच्या उपयोगी काटक्या; शेणी, गवत इ० जळण; सर्पण. **०भारा**–पु. लाकडाचें ओझें–भारा (डोक्यावर वाहण्याचा किंवा जनावरावर लादण्याचा). **०मदारी**–पु. अतिशय रोडका, कृश मनुष्य. मदारी पहा.

ला(लां)केरी—स्त्री. (कों.) एक झाड.

लाकोटा—पु. चिकटा. लाखोटा पहा. ' लईलई लाकोटा । सांड चाळा तो खोटा । ' –मध्व ३३७.

लाख—वि. १ संख्यावाचक विशेषण. एकावर पांच शून्यें देऊन होणारी संख्या; शंभर हजार; लक्ष पहा. ' लाख मरोत पण लाखांचा पोशिंदा न मरो. ' –राजसंन्यास ७३. २ (ल.) अतिशय उत्तम; फार महत्त्वाची; बिननोल (गोष्ट, युक्ति, माणूस). ' त्यानें काल एक लाख गोष्ट सांगितली. ' ' मावशी मुद्दां खरोखर लाख माणूस आहे. ' –निचं ३८. ३ (ल.) पुष्कळ; अनेक. 'अरे जा ! ! तुझ्यासारखे लाख पाहिले आहेत. ' [सं. लक्ष; प्रा. लक्ख; लाख] **म्ह०** १ (कों.) लाखोश्री आणि भिकेश्री एकच (मेल्यावर गरीब व श्रीमंत सारखेच) २ लाख मरावे पण लाखांचा पालनवाला मरूं नये. (वाप्र.) **लाख नसावा पण साख असावी**–संपत्ति नसली तरी पत असावी. **लाखांतली गोष्ट**–अतिशय महत्त्वाची गोष्ट. सामाशब्द– **लाखपंचोऱ्या**–वि. लाख गोष्टी सांगितल्या असतां त्यांतील पांच गोष्टी ज्याच्या खऱ्या असतील असा; गप्पा मारणारा; थापाड्या; गप्पीदास. **लाख-लाखाचा माणूस**–पु. अत्यंत श्रेष्ठ. योग्य, लाखांत एक या योग्यतेचा मनुष्य. **लाख रुपयांचा**–वि. अत्यंत महत्वाचा, अमोल, उत्कृष्ट. **लाख रुपयांची संधि**–स्त्री. अमूल्य संधि; योग्य वेळ. ' इतक्यांत ही लाख रुपयांची संधी...त्यानें वायां जाऊं दिली नाहीं. ' –लक्ष्मी आणि सरस्वती. **लाखांचा पालनवाला**–वि. अनेक माणसांचें, कुटुंबाचें पालनपोषण करणारा; अनेकांच्या उपयोगी पडणारा (राजे, कोट्याधीश, सरदार, उदार लोक यांसंबंधीं योजतात). **लाखाच्या ठिकाणीं**–वि.क्रिवि लाख रुपये दिले तरी न मिळणारी (अडचणीच्या वेळीं दिलेल्या लहान रकमेबद्दल, मदतीबद्दल योजतात). ' तूं मला दहा रुपये आतां दिलेस तर ते लाखांच्या ठिकाणीं आहेत. ' **लाखी**–वि. जीस मोल नाहीं अशी; अमोल (गोष्ट, वस्तु, मसलत). ' ही लाखी मसलत रावमुरारीस कोणी दिली असेल ती असो. ' –नि ५३९. **लाखों**–वि. असंख्य; अनेक; लक्षावधी. **लाखोलाख**–वि. लक्षावधि; असंख्य. [लाख द्वि.] **लाखोपति**–वि. लक्षाधीश; मोठा श्रीमान. **लाखोली, लाखौली**–स्त्री. १ लाख संख्या. २ देवाला फुलें, फळें, धान्य मोजून त्यांची वाहिलेली लक्ष संख्या. (क्रि० वाहणें). –ज्ञा १३.३८७. ' शतजन्मीं नमनांची मी तुज वाहत असेन लाखोली । ' –मोशांति ६.८. ' कणेरीची लाखौली वाऊनी । ' –शिशु ७३९; –दा १७.३.६. ३ (उप.) शिव्यांचा वर्षाव, भडिमार करणें; एखाद्यास खूप शिव्या देणें. [लाख+आवली] **लाखोंशा**–क्रिवि. लक्षावधि; लाखो; असंख्य. [लक्षशः] **लाख्या**–वि. १ उत्कृष्ट; उत्तम, लाख रुपये किंमतीचा; बहुमोल (मनुष्य, पदार्थ, भाषण). ' तो लाख्या बोलणारा आहे. ' २ पहिल्या प्रतीचा; श्रेष्ठ; प्रतिष्ठित (व्यापारी पेढीवाला). ३ लक्षाधीश; धनाढ्य (सावकार).

लाख—स्त्री. १ रंग वगैरेच्या उपयोगी पडणारा बोर, पिंपळ इ० वृक्षांपासून निघणारा एक कृमिज पदार्थ. एक प्रकारच्या किडयापासून होणारा पदार्थ. पत्रावर मोहोर करणें इ० कामीं लाखेचा उपयोग होतो. लाखेपासून रंग व राळ असे दोन पदार्थ होतात. २ एक पक्का रंग. [सं. लाक्षा; प्रा. लव–खा; हिं. गु–लाख; फा–लाक तेलगू लाका] **०काडी**–स्त्री. (सोनारी) कोणत्याहि जिनसाच्या पोकळ भागांत लाख भरण्यासाठीं केलेली लाखेची लांबट सळई, कांडी. **लाखट**–वि. लाखलेले; लाख चिकटविलेलें; लाखेनें माखलेलें; पोटीं लाख भरलेले (सोन्याचे दागिने) **लाखटणी**–स्त्री. लाखेनें माखणें. [लाखटणे] **लाखटणें**–सक्रि. लाख भरणें; लाख माखणें; लाखणें. –अक्रि. दाटणें; बसणें; चोंदणें (घसा–कफ, बेडका सांचून); आवाज बसणें. **लाखट बेगड**–स्त्री. सामान्य हलका दागिना (ज्यांत लाख भरलेली आहे असा). जस्तीपत्र्याचे रंग; मुलामा दिलेले जिन्नस. [लाखट+बेगड] **लाखट-लाखी-दागिना**–पु. लाख भरविलेला सोन्याचांदीचा दागिना. **लाखडी**–स्त्री. (कु.) राखडी; डोकींत घालावयाच

एक अलंकार. **लाखणें**–क्रि. मडकें इ०स लाख किंवा राळ माखणें, लावणें. **लाखदाणा**–पु. चीन देशांतून आलेली उत्तम जातीची लाख. **लाखपाड**–पु. १ आंगठीवर रत्नाचा खडा बसविण्यासाठीं कोंदणांत लाख भरणें. २ (अशी लाख भरलेली) आंगठी किंवा इतर दागिना; लाखेचा घाट. 'तूं आधी लाखपाड कर मग मी वजन करून देईन.' **लाखलोटगें, लाखलोटें, लाखलोटकें, लाखलोटा**–नपु. लाखेनें मढविलेलें, लाखटलेलें गाडगें. **लाखलोटा**–पु. लाख लावण्याचा धंदा. (क्रि० करणें). –वि. लाखेनें मढविलेलें; लाखटलेलें. (क्रि० करणें) **लाखवण**–न. मढविण्याचा पदार्थ, लाख, राळा, डिंक इ० [लाख] **लाखाजोहर**–न. (लाक्षागृह) लाक्षाजोहार पहा. लाखीघराची आग. 'पांडव लाखाजोहारीं जळतां । विवरद्वारें काढिले ।' –दा ४.८.११. –मुआदि १.१४०. जोहर पहा. [लाख+जोहर] **लाखाट, लाखाटणें–लाखाडी**–स्त्री. लाखड, लाखटणें पहा. **लाखाडी**–स्त्री. लाखेची काडी; लाखकाडी पहा. [लाख+काडी] **लाखाळणें**–क्रि. लाखणें पहा. **लाखाळें**–न. १ लाखेचा दागिना. २ लाखलोटें. **लाखी**–वि. १ लाखेसारख्या रंगाचें. 'तडप रुचिर लाखी उंच हा नेसवीला ।' –सारुह. २ लाखट. **लाखीरंग**–पु. रंगाचा प्रकार. –सेंपू १.७९. **लाखीशाई**–स्त्री. लाख शिजवून तिच्या रसांत काजळ घोटून तयार केलेली काळी शाई. ही पाण्यानें धुतली जात नाहीं. पूर्वी पोथ्या लिहिण्यास ही वापरीत. **लाखें**–न. कातडयांवरील तांबडा चट्टा. [लाख] **लाखोटा**–पु. १ कागदाच्या पिशवींत घातलेलें पत्र; लखोटा; मोहोरबंद पत्र. 'जेणें अभयवर दिला त्या गुरु हस्तांत म्याहि लाखोटा ।' –मोकृष्ण ८३.२३. २ आंत पत्र घालून जिचें तोंड (लाख, डिंक इ०नें) बंद केलें आहे अशी पिशवी; पत्र आंत घालण्यासाठीं केलेली कागदाची पिशवी; लिफाफा, पाकीट पहा. 'तयानें लाखोटा उखलुनी असें जें उकलिलें ।' –सारुह ५.८३. ३ (कागद, कॅस, पानें इ० चा) एकत्र झालेला, चिकटलेला गड्डा; पुंजका. ४ एकत्र चिकटून झालेली स्थिति; गुंता; लादा; लगदा. उदा० केसांचा–पांघरुणाचा–चुन्याचा–दगडाचा लाखोटा. 'चिक्कण मातीचा लाखोटा चांगला बसतो.' ५ लाखलोटा; भांडयास लाविलेला लाखेचा लेप. 'वरि बरवा आंत न जो तो काय करील काम लाखोटा ।' –मोउद्योग १२.१३. ०**फुगडी**–स्त्री. एक फुगडीचा प्रकार. फुगडी खेळ ग लाखोटा । धर माझा आगोठा' –भज ३२. **लाखोला**–वि. लाखेचें बनविलेलें-केलेलें; लाखी (बांगडी, गोट वगैरे).

लाख, लांख—स्त्री. एक हलकें धान्य; एक कडधान्य. याचा वेल असून त्याला शेंगा येतात.

लांख—स्त्री. (कों.) सांगड; जोडी. लांक पहा.

लांखण, लांखणें—लांकण, लांकणें पहा.

लाखण-न, लाखणी—नस्त्री. १ फासा; बंधन; लाकण. २ चाबुकाची दोरी बांधण्यासाठीं दांडयास भोंक पाडून अडकविलेली कातडयाची कडी.

लाखणिक—वि. लाक्षणिक. [सं. लक्ष्; प्रा. लक्ख, लाखु]

लाखणें—उक्रि. (क.) लक्ष्य करणें; (एखादी वस्तु) उद्दिष्ट म्हणून योजणें. [लक्ष]

लाखन—न. (शिंपीकाम) जोडणी; उभारणी; कच्चा दोरा भरण्याचें काम. शिलाईचें मुख्य विभाग पांचः–साधन, लाखन, यंत्रण, इस्त्रीकरण, पूर्तिकरण इ० [लांक, लांकण]

लाखरवा—पु. (महानु.) लाल फूल.! 'तेयां पार्जातकांचें लाखरवां । असमसास ।' –शिशु ३०७.

लाखलिप—स्त्री. लिंपणें; गिलावा करणें. (खराब झालेल्या भिंती, जमिनी भोकें बुजवून वगैरे दुरुस्त करणें, सारवणें). [लाखणें+लिपणें द्वि.]

लांख(खा)ळणें—अक्रि. चिकटणें; माग मागें असणें; सारखें दिमतीला असणें (काहीं फायदा होईल या आशेनें). [लांक–ख]

लाखा—पु भेकाड; भिरड; अळू, पोफळ इ० वर एक कृमि रूप रोग पडत असतो तो; ताका; टाका; फळांचा, धान्याचा रोग.

लाखा—पु. (शिंपीकाम) कच्च्या शिवणकामाला घालावा लागणारा दोरा, धांवदोरा. लाखन पहा. 'ताण नाहींसा करून लाखा घालून घेतला पाहिजे.' –काकडे प्रथमाला ९. [लांक, लांकण]

लाखा—पु. खूण; चिन्ह. [सं. लक्ष] ०**कातरणें**–(जुन्नरी) मेंढराच्या कानास खुणेसाठीं टराविक जागींच लहानपणी कातरा घेतात तो (प्रत्येक धनगर आपल्या कळपांतील मेंढरांना एका ठराविक जागींच कातरा घेतो, म्हणजे तीं ओळखण्यास सोपें जात). 'कोकरांच्या कानास लाखा कातर.'

लाखावणें—लाचावणें पहा.

लाखी पुनीव—स्त्री (व.) रक्षाबंधनाचा दिवस; राखीपुनव.

लाखोणी, लाखोंडी—स्त्री. (कु.) राखोंडी; राखुंडी.

लाख्या—पु. गुरांचें नरडें सुजून त्यास होणारा एक रोग. लाखा पहा.

लाग—पु. १ संधि; वेळ; संभव; शक्यता. 'पाऊस पडण्याचा लाग दिसतो.' 'आंबे पिकायचे लागास आले म्हणजे काढावे.' 'झाडी जेव्हां तोडली तेव्हां किल्ल्याजवळ जायास लाग झाला.' २ मनांतील संधान, उमेदीची दिशा; प्रयत्न; नेम; खटाटोप; खटपट (क्रि० करणें). 'चाकरीसाठीं बहुत लाग केले परंतु एकही चालला नाहीं.' 'तुझा अश्व धरूनियां याग । इंसध्वज करी

सांग । परी सोडवावयाचा तुझा लाग । येथें कांहीं न चाले । ' –जै १९.३१. 'राजदूत पावले लागा । '–मुआदि २५.६. **३** ध्येय; विषय; हेतु; उद्देश; मनुष्य ज्याचा पाठलाग करतो ती वस्तु. (क्रि० धरणें; बांधणें). उदा० ' लाग साधला ' =हेतु साधला; कार्य यशस्वी झालें. याच्या उलट लाग फसला, ' एक लाग आला आहि. ' =कांहीं तरी मिळण्याचा संभव आहे किंवा प्रयत्नास जागा आहे. ' तो लागावर चाल्ला. ' ' हा लाग योजून जातो ' इ० **४** एखाद्यावर ओढवलेलें संकट; दुर्दैवाचा प्रसंग; हल्ला; घाला. ' आजपावेतों दोन तीन लाग निभावले, आतां हा लाग कठीण. ' ' जीवावरचा लाग. ' **५** हल्ला; झपाटा; तडाखा. ' सांडी सांडी भीमकीचा संग । अबद्ध बाधिजसी निलाग । आला कोपिष्टांचा लाग । पडेल पांग दुजयाचा । ' –एरुस्व ८.२३. **६** पीक, बहार, झाड, शेत इ० पासून फळें, धान्य इ० रूप प्राप्ति. ' इरसाल झाडास लाग कमी असतो. ' **७** फळें आणि बहर येण्याची वेळ; योग्य काल; हंगाम; फलादि रूप उत्पन्न करण्याची वृक्षादींची स्थिति. ' नारळ, माड लावल्यापासुन दहाव्या वर्षी लागास येतो. ' **८** दांडा; जहाज किनाऱ्यास येऊन लागतें ती जागा; जहाज होडी इ० चा तळ जेथें जमिनीस लागतो ती जागा. **९** चोळीला कांखेंत ठुशीखालीं द्यावयाचा जोड, तुकडा. **१०** पकड; कैची; तिढा; टेकण; आश्रय; आधार; जागा; पाया; धर (जड वस्तु वर ठेवण्याकरितां). ' ह्या खांबाला हा धोंडा लाग म्हणून पुरे. ' **११** पदार्थाचा मादक गुण; तंबाखू इ० पदार्थांचा अंमली गुण. सुपारी खाल्ली असतां ती कांहींना लागते तेव्हांचा मदांश. **१२** जनावराला एखाद्या ठिकाणीं होणारा रोग. ' तोंडलाग, पायलाग. ' **१३** मारा; स्पर्श; पोंच; पल्ला (बंदूक, तोफ इ०चा). 'बंदुकीचा–तोफेचा–तिराचा–गोळीचा–कमानीचा–लाग. ' **१४** शिकार; लूट; प्राप्ति; लग्गा. ' आम्ही तिघेजण संकेताप्रमाणें लाग लागेल तर पहावा म्हणून शहरांत जाण्यास निघालों. ' –विवि ८.११.२०३. **१५** पत्ता; शोध; तपास; पाठलाग. ' लाग प्रसेनतनुचा लावी हरिन्नाहि मग महाभाग । ' –मोकृष्ण ८३.१११. –ऐपो १५९. **१६** विशिष्ट गात्र, इंद्रिय इ०ची विकृति. **१७** स्थिति; अवस्था. 'निद्रितामागें बैसला वाघु । अथवा पुढें आला स्वर्ग भोगु । त्यासि नाहीं रागविरागु। तैसा लागु ज्ञात्याचा । ' –एभा ७.१२४. **१८** संबंध. ' या प्रपंचाचा कठिण लागु । नाशासि मूळ स्त्रीसंगु । ' –एभा ८.६९. **१९** आवड; प्रीति. ' तैसा जाहला प्रसंगु । जे ज्ञानी आम्हांसि लागु । आणि तुजही अनुरागु । आथि येथ । ' –ज्ञा १३.६४४. **२०** अधिकार. ' एथ इंद्रियांचा पांगु। जया फिटला आहे चांगु। तयासीचि आथि लागु। परिसावया। ' –ज्ञा ५.६६. **२१** (कों.) गवताच्या उत्पन्नाकरितां राखून ठेविलेली डोंगराळ जमीन. 'लागाची कुपण धरण्याची वेळ झाली. ' **२२** सामर्थ्य; मगदूर. **२३** सोय. ' कडावरूनि पाहिला लाग । ' –दावि २१८. **२४** रीघ; वाट. **२५** युक्ति. ' हा बाहेर निघोन येइल असा लागेच ना लाग तो । ' –र५७. **२६** मिलाफ. ' तुम्हा उभएता लाग लागों हे ना । सेवितां मी । ' –**क** ८१. **२७** (व.) पशुपक्ष्यादिकांचें मैथुन; कावळा, सर्प इ०ची सुरतक्रीडा. ' कावळयांचा लाग पाहिला. ' **२८** (जरकाम) तारेची दिशा बरोबर लावणारा, रूळ. **२९** (लोहारकाम) मोठा अवजड हातोडा. रेवीट (रिव्हेट) फुलवितांना एका बाजूनें ठोकतात व दुसऱ्या बाजूस याचा जोर लावतात. **३०** (चांभारी) अपुऱ्या सागळीस लागलेला तुकडा. **३१** (संगीत) एका स्वरावर थांबून मग दुसऱ्या स्वरावर उडी घेणें. (–स्त्री.) उडी; उड्डाण (क्रि० मारणें). –क्रिवि. एकामागून एक; लागोपाठ (लागलगट, लागट या अर्थी). [सं. लग्–लग्न; प्रा. लग्ग] (वाप्र.) **०करणें**–हल्ला चढविणें. ' सर्वेचि पिप्लिका करिती लाग। देखोनि माजला कीर्तनरंग । ' –दावि २६९. **०चालविणें**–ठरलेल्या क्रमानें किंवा सरणीनें चालू करणें. (कांहीं काम योजना, बेत). **०दवडणें**–संधि घालविणें; लाभ दवडणें. **०दवडणें**–एखाद्या इष्टीच्या सिद्धीसाठीं आपल्या योजना चालू करणें, मार्ग लावणें. **०लावणें**–१ (प्राप्तीसाठीं) संधान बांधणें; कांहीं वशिला खर्च करणें; हरएक प्रकारें उपाय, युक्ति योजून काम जुळेलसें करणें. **२** माग काढणें; पाठलाग करणें. ' मागोनि लाग लावित नृपबळ येउनि । ' –मोआदि १५.६३. **(एखादें काम) लागाला येणें–लागीं लागणें–लागावर येणें–मिळणें, जुळणें**–एखादें काम सुरळीतपणें सुरू होणें किंवा चालू लागणें, सिद्धीच्या मार्गावर असणें. पंथाला लागणें. ' माझी पंचायत लागीं लागली. ' **लागास येणें**–रंगारूपास, फलरूप होण्याच्या बेतांत येणें. सामाशब्द– **०पाठ**–पु.स्त्री. १ लगबग; त्वरा; घाई. ' करा करा लागपाठ । धरा पंढरीची वाट । ' –तुगा २५६४. **२** लागलेंच अनुसरण; पाठलाग; पाठपुरावा. (क्रि० पुरवणें; पुरणें; लागणें). **०पाळती**–स्त्री. पाठीस लागण्याची क्रिया. ' किमर्थ अर्थी माझियें पृष्ठीं । लागपाळती केली त्वां । ' –नव १३.१३८. **०बग**–पु. संबंध. ' पाईक तो जाणे या इकीचा भाव । लागबग ठाव चोरवाट । ' –तुगा ३७५. **०बंदी**–वि. जीस लाग लावले आहेत अशी, चांगल्या प्रकारची (चोळी). ' नका सोडू तरी गांठ चोळी फाडाल लागबंदीची । ' –होला ९७. **०भाग**–पु. १ संबंध; लागाबांधा. ' निष्ठुरा उत्तरीं न धरावा राग । आहे लागभाग ठायींचाचि । ' –तुगा १२१७. **२** पाठलाग. **०माग**–पु. लागभाग; उपाय. ' पराक्रमाचा लागमाग । क्षात्रकर्म किं कपटांग । ' –ज्ञानप्रदीप २८१. **०लाड्या**–वि. युक्त्या, बेत वगैरे योजून काम साधणारा; संधान बांधण्यांत कुशल. **०षण**–स्त्री. पाठलाग. ' असाध्य साधूति अंजन । करी

लागवण स्त्रियांसी । '–एभा १०.५७७. **०वेग**–क्रिवि. घाईं; त्वरा; लगबग. **०वेग**–स्त्री. अतिशय त्वरा; घाई; गडबड ' आतां लागवेग करा । ज्याचे धरा ठाके ते । ' –तुगा १९३९. –पु. १ प्रतीक्षा; वाट. ' पालटाचा लागवेग। किती म्हणोनि पहावा । ' –दा ९.६.४२. २ संबंध; लागाबांधा. नरदेहाचेनि लागवेगें । एक लागे भक्तिसंगे । ' –दा १.१०.२ **०वेग-गीं-गें**–क्रिवि. त्वरित; ताबडतोब; लगबगीनें. ' शत्रु निर्दाळी लागवेगीं । यश त्रिजगतीं न समाये । ' –भारा १२.३२. ' महत्कृत्य सांडूनि मागें । देवास ये लागवेगें । ' –दा २.७.३४. **लागाची चोळी**–स्त्री. नऊ तुकड्यांची चोळी. याच्या उलट अखंड चोळी. **लागावेगा**–पु. लागवेग; लागाबांधा. ' न कळे कव्हणा लागावेगा । ' –उषा १२४. **लागचा**–वि. (गो.) लगतचा; जवळचा.

लांग—स्त्री. (गु.) एक कडधान्य. लांक-ख पहा.

लांग—स्त्री. (व.) शेताच्या धुऱ्यावर काढलेला नाला. ' वनचराई माफ करण्यांत यावी व लांकूडफाटा व लांगी वगैरे साठीं दगड मोफत मिळावे. ' –के १४.५ ३७. पृ. ५.

लांग—स्त्री. समुद्राचा किनारा; समुद्राचें पाणी जेथपर्यंत पोंचतें तो भाग. ' गलबत फुटून आंतील नारळ लांगेस लागले. '

लागट—पुस्त्री. (सामा.) लगट पहा. –वि. १ लोंचट; झिडकारिलें असतांहि जो लगट करतो असा; निर्लज्ज; लतकोडगा. २ आसक्त; चिकटलेला; लागून असलेला (निंदार्थी). ' माया मला लागट हे न सोडी । ' –सारुह १.२२. ३ प्रेमी; लोभी; लडिवाळपणें बिलगणारें. ' मन लागट चोरटें । भीतरी वांवरें । ' –शिशु ७०८. ४ कीड लागून थोडें खराब झालेलें (धान्य, फळ, लांकूड). ५ जें खाल्लें असतां घसा, जीभ इ० रवरवतात असा (अळूं, सुरण इ०). ६ जी खाल्ली असतां छातींत बांध बसतो अशी लागणारी (सुपारी). ७ एखाद्याच्या मनाला लागेल असें; बोंचक (बोलणें, लिहिणें). ' लागट लिहिणारानें लिहिलें तरी अब्रूनुकसानीचे बाबतींत इंग्रजी हद्दींतील वारंटाची बजावणी आपणावर होऊं शकत नाहीं. ' –विक्षिप्त ३.१२०. ८ उत्सुक ' या बोला श्री अनंतें । लागटां देखिले तयातें । ' –ज्ञा ९.२३१. ९ (ना.) स्पर्शजन्य; सांसर्गिक (रोग). –सन १८५७ पृ. ४१५. **लागटा**–पु. १ सातत्य; अखंडपणा. २ माला; रांग; ओळ. (क्रि० लावणें; लागणें; करणें; होणें). [लागणें]

लांगड—स्त्री. (व.) मोठा खटारा; बंडी. ' लांगडींत कापूस भर व उद्या विकावयास ने. '

लागण—स्त्री. १ (ऊंस वगैरेस दिलेलें) पहिलें पाणी. २ जींत पेरणी केली जाते अशी, वहीत जमीन. लागवडीखालची जमीन. ' लागणजमीन, लागणशेत, लागणवावर. ' ४ लागवड; जमीनीची वहिवाट. ५ पिशाच्चबाधा. ६ बाधा; रोगग्रस्तता; देवी, अमांश, कॉलरा, प्लेग इ० नीं पछाडलेली माणसें, जनावरें इ०; किंवा अशांची संख्या. –न. (कों.) एकदां पीक घेऊन पुन्हां पीक घेण्यासाठीं पहिल्या जाग्यावरून उपटून दुसरीकडे लावतात तें झाड; फांदी; रोप. ' मला मिरचीचीं २५ लागणें ठेव. ' [लागणें] **०दार**–वि. १ मिरासदार; ठिकाणदार; जमीनीचा मालक. २ जमीन प्रथम लागवडीस आणणारा. ३ जमीन करणारा; (मालक, खंडकरी); प्रत्यक्ष जमीनींत राबणारा. ४ (ल.) उपकारबद्ध; ऋणको; मिधा; जो एखाद्याचें कांहीं देणें लागतो असा. ' मी कोणाचा लागणदार नाहीं. '

लागणें—अक्रि. (ह्या क्रियापदाचा संलग्न, संयुक्त किंवा संबद्ध होणें, जुळणें, चिकटणें, जडणें असा मूळचा एकच अर्थ आहे. परंतु अनेक नामांशीं आणि शब्दांशीं उपयोग केल्यामुळें यांस अनेक भिन्न अर्थांच्या छटा आल्या आहेत. त्यांपैकीं सर्वसामान्य व कांहीं विशेष खालीं दिल्या आहेत) १ स्पर्श करणें; शिवणें. ' तूं त्याला लागूं नको. विटाळ होईल. ' ' परि सावध व्हा लागो शुचि व्हाया हृदयलोह या परिसा । ' –मोभीष्म ६.११. २ लावणें; आंत घालणें; खुपसणें (रोप, झाड इ०); लागवड, पेरणी करणें (जमीनीची).' वाफा, अळें, सरी लागली. ' ३ मूळ धरणें; रुजणें; चांगलें जीव धरणें; एक जीव होणें (लावलेलीं रोपें, कलमें) ४ मार बसणें; आघात होणें (शस्त्र इ०चा). ५ (ल.) मनाला बोंचणें; परिणामकारक होणें; अंतःकरणाला भिडणें (रागें भरणें, शब्दांचा मार). –दा १०.८.२७. ६ बंद होणें; मिटणें; गच्च बसणें. (दरवाजा, खिडक्या, झांकण, पापण्या, डोळे). ७ योग्य प्रकारें जुळणें; जोडलें जाणें (शब्दशः व ल.) (तुकडे, विभाग, कविता, शब्द). ८ बरोबर होणें; लागीं बसणें; नीट सामावणें. ९ प्रचारांत असणें; रूढ असणें (तऱ्हा, पद्धति, रीत). १० चिकटणें; जडणें; आंगवळणीं पडणें (दुर्गुण, खोड, रोग). ११ येणें; उत्पन्न होणें; आसक्ति होणें (भूक, तहान, खोकला, कंप इ०). १२ निघणें व चालू होणें; प्रारंभ होऊन सुरू असणें (स्थल आणि काल यांतील पदार्थ आणि प्रसंग, विशिष्ट परिमाण किंवा प्रकार). 'एथून मावळ संपलें आणि देश लागला. ' ' या अध्यायापासून ग्रंथ कठीण लागला.' 'तेव्हांपासून त्याचा त्याचा कलह लागला.' 'हें काय सोपें लागलें आहे ? १३ बरेंवाईट कळणें; विशिष्ट प्रकाराचे किंवा जातीचें म्हणून समजणें, वाटणें. ' आंबे खाऊन पहा, गोड लागले तर घ्या. ' ' त्याला बरी गोष्ट जरी सांगितली तरी वाईट लागते. ' १४ प्राप्त होणें;मिळणें (नोकरी चाकरी, नेमणूक). 'इतकी खटपट करून अखेर त्याला नोकरी लागली. ' १५ नातें किंवा संबंध असणें; नात्याच्या संबंधानें असणें. 'तुझा तो काय मेहुणा लागतो.' १६ आढळणें; भेटणें; रस्त्यांत मार्गांत येणें; पुढें येणें. ' वाटेनें चार नवे लागतात, ' तुम्ही वाचीत जा आणि पुढें वृत्तश्लोक

लागेल तेथें ठेवा.' १७ फळ धरणें; बहर येणें; वृक्ष फलोत्पादनाच्या स्थितीस येणें. 'ह्या प्रांताचे माड लागूं लागले म्हणजे असे लागतात कीं एका एका माडास हजार हजार नारळ लागतात.' १८ करपणें; विघडणें; बुडाशीं जळणें. 'भात बुडाशीं लागला.' १९ कामांतून जाणें; खराब, घाण होणें; डागळणें; कुजण्यास, सडण्यास आरंभ होणें; बुरशीनें व्याप्त होणें. 'लांकूड लागलें.' २० चिकटणें; चिकटून राहाणें. 'उदंड उपाधी तरी थोडी, लागोंच नेदी.' -दा ९.१०.५. २१ बसणें जडणें; बिलगणें (मन). 'चित्त तें लागलें तुझें पायीं।' -दावि ५६. २२ चावणें; दंश करणें; झोंबणें (साप, विंचू, चिकट पदार्थ). २३ हल्ला, आघात होणें. 'त्याला विंचू लागला' 'मला ठेंच लागली-दगड लागला.' २४ पडणें; धाड येणें (मेकाड, मोवा इ०ची); व्यापणें; ग्रासणें (मेकाड इ०नीं झाड). २५ परिणाम करणें; अनिष्ट व उपद्रव होईल असें करणें; (मादक पदार्थ, वाईट हवा, पाणी, उपवास, शिव्याशाप इ०नीं). २६ जनावर, माणूस इ०ची पाठ, पाय इ० गात्रांस (खोगीर, जोडा, लगाम इ०च्या घर्षणानें) इजा होणें; घसटणें; खरचटणें; चोळवटणें; सोलवटणें. 'जोडा लागला.' २७ नेहमींच्या एखाद्या आजारानें पछाडलें जाणें (जनावर). २८ पूर्णपणें व योग्य रीतीनें मिसळलें जाणें (साखर, तिखट, मीठ वगैरे अन्नांत एखादा पदार्थ). २९ घालविण्याची जरूरी पडणें; खर्चिला जाणें; व्यय होणें (पैसा, पदार्थ, वेळ). 'याच्या लग्नास पांचशें रुपये लागले.' ३० पाहिजे असणें; गरज असणें; सुस्थितीस पूर्वतेस जरूर असणें; (सामा. एखादी गोष्ट) (गरज, नड, उपयोगाचा प्रसंग) उत्पन्न होणें. 'क्षत्रियासि लागल्या अनुपत्ती। पूर्वोक्त कराबी वगिग् वृत्ति।' -एभा १७.४६२. ३१ योग्य स्वरांत बसणें; स्वरानुकूल असणें (गळा, आवाज, वाद्य, सूर). ३२ पेटणें; दीप्तियुक्त होणें (दिवा, विस्तव); चेतणें (आग). ३३ प्रत्यक्ष आरंभ होणें; मुख्य विधि, संस्कार याला सुरवात व्हावयाची वेळ येणें (लग्न, मुंज इ० विधीची). ३४ (बोलतांना) अडखळणें (माणूस, जीभ, शब्द). ३५ चालू होणें; क्रिया सुरू होणें; गति मिळणें, (एंजिन, यंत्र इ०). ३६ चालणें; समर्थ, कार्यक्षम असणें (आपल्या विशिष्ट कार्यांत); उपयोगास येणें. 'जंग चढला आहे म्हणून चाकू लागत नाहीं.' ३७ तीक्ष्ण होणें; धारेनें युक्त होणें. 'दोन चाकू लागले आहेत, बाकींचे लागावयाचे आहेत.' ३८ निश्चित किंवा ठरलेलें असणें; न सुटण्यासारखें जोडलेले किंवा पाठीमागें लागलेलें असणें. 'उपजत्या प्राण्यास मरण हें लागलेंच आहे.' 'संसाराचें कृत्य हें रोज लागलेंच आहे' ३९ सुरू होणें; सतत चालू असणें; एकसारखा असणें; एकसारखा राहणें, घडणें (पाऊस, थंडी, उष्णता). 'कालपासून पाऊस सारखा लागला आहे.' ४० मग्न, गुंतलेला असणें. ४१ मनांत योजिलेला किंवा स्वाभाविक परिणाम होणें; यश येणें; उपयोग होणें. ४२ जुगणें; मैथुन चालणें, करणें (पशु, पक्षी यांमध्यें नरानें मादीशीं) (निंद्यार्थी माणसालाहि लावतात). ४३ योग्य स्थितीला येणें; फलदायी होणें (गाय, म्हैस इ० दूध देऊं लागणें, झाड फळाला येणें). ४४ संबद्ध, मालकीचा असणें; कार्यक्षेत्रांतील, कक्षेंतील, अधिकारांतील असणें. ४५ विवक्षित स्थितींत असणें; विवक्षित गुण, जात, धर्म असणें; विशिष्ट परिस्थिती असणें. 'मी कां श्रीमंत लागलों आहें? सर्वांस शालजोड्या द्या म्हणतां तो.' 'हा काय मुसलमान लागला!' ४६ लावणें; अंगीं लागूं करणें (गुन्ह्याचें कृत्य); करावयासाठीं, पार पाडण्यासाठीं एखाद्या व्यक्तीवर लादलेलें असणें; सोपविलेलें असणें (कर्तव्य, काम इ०). 'हें काम मजकडे लागलें.' ४७ सक्तीचें, आवश्यक, जरूर असणें; करणें-भोगण भाग पडणें. 'ह्याचे हातून न झालें तर तुम्हास जावें लागेल.' 'हा पळून गेला तर रुपये तुम्हाला द्यावयास लागतील.' ४८ अडकणें; गुंतणें. 'कोठें तुझा जाउनि हेतु लागे।' -सारुह २.९४. ४९ झपाटणें; पछाडणें; अंगात येणें; बाधा होणें. 'चिंतूला चिंचेवरची हडळ लागली.' ५० (शौच, मूत्रविसर्जन इ०) क्रियेची इच्छा होणें. 'शौचास-मुतावयास लागली. ५१ (क्रियापद ऊं, आवयास इ०प्रत्यय लागून त्यांचे पुढें 'लागणें' हें क्रियापदातील आलें असतां) क्रिया सुरू करणें; आरंभणें; घडणें; लागूं होणें. 'तो तें करूं किंवा करावयास लागला'; 'तो मारूं लागला-देऊं घेऊं-खाऊं-बोलूं बसावयास करावयास लागला.' ५२ क्रियापदांतील 'वें' ह्या प्रत्ययापुढें 'लागणें' क्रियापद आलें तर आवश्यक होणें, अनिवार्य होणें असे अर्थ होतात. 'त्याला जावें लागलें.' ५३ बरोबर, बाजूला असणें; मदत करणें. 'हा घोंडा मला उचलूं लाग'; 'हें काम मला करूं लाग' ५४ नांगर टाकण्याच्या स्थितीत येणें; कडेला येणें; स्थिरावणें; गति खुंटणें (जहाज, होडी). ५५ (ल.) अगतिक होणें; हालचाल बंद पडणें. [सं. लग् लग्न; प्रा. लग्ग; हिं. गु. लागना] **म्ह०** लागें वोट वाढे पोट=नुसतें निमित्त होऊन एखादें वाईट काम होऊन जाणें. **(एखाद्यास-ला) लागला जाणें**- १ ऋणी होणें, असणें; मिधा असणें. 'त्वां मला दोन पैसे दिलेस म्हणून मी कां तुला लागला गेलों?' 'मी काय तुझे चार चवल लागतों?' २ जास्त परिचयाचा, आसक्त असणें. **लागून असणें**- १ (स्नेह, लोभ, इ० मुळें) अगदीं चिकटला असणें; तंत्रानें किंवा मर्जीप्रमाणें वागणें. २ एखाद्या स्त्रीनें एखाद्याशीं व्यभिचारासक्त असणें. ३ मग्न गुंतलेलें असणें. **लागून जाणें**-नवरा सोडून दुसऱ्यापाशीं राहणें(एखादा स्त्रीनें). **कानास-कानीं-लागणें**- गुप्त गोष्टी बोलणें; कुजबुजणें 'किती लागती परस्पर कानीं। मधुर भाषणी।' -रत्न १०. **पाणी लागणें**-१ एखाद्या ठिकाणच्या

हवेचा, चालीरीतींचा मनावर, वागणुकीवर परिणाम होणें. ' विदेशी लागलें पाणी । ' –दा ३.६.२५ २ एखाद्या ठिकाणची हवा बाधणें. ३ (पुसणें) एखाद्याकडे येणें असलेली रक्कम बुडणें; नाहींसें होणें. **पायीं लागणें**–नम्र होणें; नमस्कार, वंदन करणें. ' समर्थपायीं राजराजेंद्र लागती । ' –सप्र ३ ६६. **लागत**–न. (गु.) भाडें; खर्च. ' अगाऊ लागत भरून पावती मिळविली पाहिजे. ' –(बडोदे) खानगी खातें, लागतीचें नियम ४. **लागत-खेवा**–क्रिवि. लागतांच. **लागतगुण**–पु संगतीचा परिणाम–गुंणें; संबंध जडल्यानें येणारा गुण. ' कोणाचा कोणास लागतगुण असतोच. ' **लागता गुण**–पु. (बायकी) माणूस, संपत्ति, उत्कर्ष, वस्तु जोडण्याचा गुण; संपादन करण्याचा, मिळविण्याचा गुण. **लागता जुगता**–वि. मार्गावर आणलेला; योग्य क्रमांत, रांगेत लावलेला; पायावर उभा केलेला. [लागणें+जुगणें] **लागता वळगता**–वि. (गु.) संबंधी; संबद्ध. ' जबाबदार इसमानें आपले ताब्यांतील व लागते वळगते नोकर लोकांस वरचेवर माहिती देत जावी. ' –(बडोदें) आगी पासून बचाव ४. **लागतें**–न. संबंध. ' न बुझावितां मतें । न फिटे आक्षेपाचें लागतें । ' –ज्ञा १३.३२७. **लागन**–क्रि. (खा.) मनाला वाटणें. **लागरा**–वि. १ मादक; अंमली; खाल्ली असतां लागणारी (सुपारी, औषध, इ०). २ खराब झालेला; किडींनें खाल्लेला; किडका (धान्य, फळ, लांकूड इ०). **लागीर**–स्त्री.न. १ पिशाच; भूत. २ पिशाच–भूत–समंधबाधा; पछाडणी. (क्रि० लागणें; काढणें; निघणें). –वि. १ किडकें; सडकें. २ किडण्यासारखें किडण्याजोगें (लांकूड, धान्य). ३ नास–नुकसान–दुखापत पोंचेल असा. ४ लागलेला. ५ बाधा झालेला; पछाडलेला. ६ चिकटलेला; चिकट. ७ मादक; माजगा; अंमली. ८ वाईट परिणाम करणारा; अहितकारी. ९ दुसऱ्याचें प्रेम, लोभ, दया, जडवून–लावून घेणारा; लाडिक. **लागीर होणें**–बाधा होणें; लागणें (भूत, पिशाच्च).

लागलागवड, लागलागण, लागलगावण, लागलगवड, लागलगावड—स्त्री. १ शेतीची मेहनत; मशागत; कृषिकर्म; शेतकाम; नांगरणी, पेरणी, कुळवणी इ० २ वृक्षसंवर्धन; फळझाडें वगैरे लावणें. ३ (विशेषतः शेवटचे तीन शब्द) डागडुजी; दुरुस्ती (घर इ० ची). [लागवड द्वि.]

लागलाच, लागलींच, लागलेंच—क्रिवि. ताबडतोब तत्क्षणीं; तेव्हांच; तात्काळ. ' जेवला आणि लागलाच गेला. ' ' मागतांच लागलेच दिल्हे म्हणजे वरें वाटतें. ' [लागणें]

लागलिगाड—न. अडथळा; लचांड.

लागवड—स्त्री. १ शेतकी संबंधीचीं सर्व कामें (नांगरणें, पेरणें, बेणणें इ० समुच्चयानें). २ शेतीचा खर्च; जमीन लागवडींत आणणें, गोठे-सोपे इ०ची डागडुजी करणें, गांव वसविणें इ० कामासंबंधाचा खर्च. ' हें घर नीट करा. लागवड आम्ही देऊं ' ३ शेतें, बागा इ० मध्यें धान्यें, झाडें इ० लावणें. ४ ज्यांत धान्यें, झाडें इ० लाविलीं आहेत अशीं शेतें, बागा इ०. ' दहा बिघे लागवड होती तिचा धारा दिल्हा. ' ५ कुलाबा) लागण (प्लेग वगैरेची). ६ (सामा.) पेरणी. ' जमीनीची लागवड केली तरच पीक येतें. ' [लागणें+वड प्रत्यय] **लागवडीस आणणें-येणें**–१ (जमीन) लागवडीच्या योग्यतेस करणें; पीक यावयाच्या योग्यतेस येणें (पानमळा, बाग, पोफळ, माड इ०). २ फळाला, उत्कर्षाला येणें किंवा आणणें (बाग, मळा, झाडें इ०).

लागवडी—वि. लागणारें. ' चित्र्याचें लागवडी सामान बरोबर जपून ठेवणें. ' –चिमा २८. ' शिलकी सामानांत लागवडी सामानाचा समावेश होत नाहीं. ' –खाअं ९१.

लागवण—न. १ दुसरा वृक्ष व्हावा म्हणून कोणेक वृक्षाची लाविली जाणारी फांदी; वाढण्यासाठीं किंवा फुटण्यासाठीं लावणें, रोपणें. २ शेतीसाठीं राखलेला जमीनीचा तुकडा. पेरण्यासाठीं, लावण्यासाठीं राखलेला जमीनीचा भाग. –स्त्री. १ लावणी पहा. २ गांवच्या हिशेबाचा एक प्रकार; कोणाकडून किती सारा यावयाचा असतो यासंबंधीं नोंद. [लागणें]

लागवरी—वि. गर्भधारणा झालेली. ' हरिता चपळा नारी । लागवरी न रिघती । ' –तुगा १४६.

लागशी—क्रिवि. (कों.) जवळ.

लागसर-सार—क्रिवि. जवळ; जवळीक. ' म्हणोनी इये सभे । बोलकेपणाचेनि क्षोभें । लागसरूं न लभे । बोला प्रभु । ' –ज्ञा १३.३२१.

लागा—क्रिवि. तात्काळ. ' लागा पावैल तीपुरारी । ' –उषा ७२.१४.

लागाबांधा—पु. संबंध; ऋणानुबंध; नातेंगोतें; लगाबांधा पहा. ' त्याचे हातून याचें एकही काम होत नसतां उगीच हा त्याला हजारों रुपये देतो तस्मात् याचा त्याचा कांहीं लागाबांधा आहे. ' [लागणें+बांधणें; सं. लग्नबंधन]

लांगात्लुंगा—वि. १ क्षुद्र; हलका; कमी; अपूर्ण; अर्धवट भरलेलें (धान्याचें कणीस) २ (ल.) दुर्बळ; अशक्त; अयोग्य; नालायक. ३ अर्धवट; वेडसर. [लुंगा द्वि.].

लागावळ—स्त्री. रांग; ओळ. (सांडलेल्या बंदुकीच्या दारूची, धान्याची इ०). **लागावळ-वळी**–स्त्री. १ संबंध; नातेंगोतें. ' संचित सांडवलें कांहीं होतें तें जवळीं । वित्त गोत पुत माया तुटली हे लागावळी । ' –तुगा ३५०. २ शिवाशीव; विटाळ. [लागणें+ओळ]

लागी—स्त्री. लाग; लागीर; भूतबाधा. ' सचकित म्हणताहे लागि कोठें पहा गे । ' –सारुह २.८६. –दावि १६.

लागीं—शअ. १ करितां; साठीं; प्रत. ' तुजलागीं; तेथ कीजैल प्रबंधु । मुनिजनालागि । ' –भाए ३६. २ जवळ; लगत. ३ ला; स. ' किती शिकवूं तुजलागीं । मनारे प्रीतिधरी हरीपाईं । ' ४ कडे. ' घरालागीं जाईं वेगीं । ' ५ प्रीत्यर्थ; कारणाकरितां. ' निजतनया विवाहालागीं यावें प्रभावें.' ' त्यालागीं पातला रघुवीर. '

लागी—वि. १ जोडलेल; अवलंबून असलेलें; संबद्ध. २ योग्य; लायक. ' हा धोतरजोडा तुमचे लागी आहे, तुम्ही घ्या.' **लागीभागी, लागाभागास**–वि.शअ.क्रिवि. १ जवळ; शेजारीं; समीप; आसपास. (क्रि० येणें; लागणें; असणें). ' फौज लागीभागी आली. ' २ सदृश; जुळणारें. ' त्याचें बोलणें आपल्या लागीभागी आहे. ' ३ आटोक्यांतला; आवांक्यातला; किंमती-जवळपासचा. ' हा सौदा लागीभागी आहे. ' **लागभाग**–पु. १ चिन्ह; सान्निध्याचें दृश्य. ' आज पाऊस पडेल असा लागभाग दिसतो. ' २ युक्ति; विचारीपणा; शहाणपणा. ' वाघापुढें जाण्याचा लागभाग दिसत नाहीं. ' [लाग+भाग; किंवा लाग द्वि.]

लांगी, लाहांगी—पु. (स्थापत्य) नळ; नहर. (इं.) ॲक्विडक्ट.

लागुनी, लागून—क्रिवि. लागी; पहा.

लागू—वि. १ सामील; संबद्ध ' तुम्हीं एकमेकांना लागू आहात. ' २ प्राप्त; आगत; स्पष्ट ३ यशस्वी; परिणामकारक; गुणकारक (वस्तु; प्रयत्न, उपाय, साधन, सिद्धिबल) ४ योग्य; रीतसर. याच्या उलट गैरलागू. (क्रि० करणें; होणें; असणें). [लागणें] **०करणें**–लावणें; चालू करणें. 'पंजाबला लष्करी कायदा लागू केला. **करणें** –परिणामकारी, गुणकारी होणें (औषध). **०गोष्ट**–स्त्री. (कायदा) मुद्याच्या गोष्टीशीं कारण, परिणाम, उद्देश, तयारी, स्थळ, काळ, वगैरेमुळें संबद्ध असलेली गोष्ट. (इं०) रेलेव्हंट फॅक्ट. **०भागू**- वि. (कों.) जुडलेलें, सांधलेलें (नातें, विवाह, धंदा, मैत्री यांमुळें); संबंधी.

लांगूल-ळ—न. १ शेपूट; पुच्छ. ' लांगूल उभारून धावि भला वृषभ । ' ' बळें लांगुळें रूधिल्या सर्व वाटा । ' –राक १. २३. २ (नृत्य) अंगठा, तर्जनी व मधलें बोट ह्यांचीं अग्रें वाकवून एकमेकांस लावणें; करंगळी उभी टेवणें व अनामिका थोडी वाकडी करून टेवणें. [सं. लांगूल] **०चालन**–न. (शेपटी हालविणें-कुत्र्याप्रमाणें). १ लाडीगोडी. २ कांहीं स्वार्थ साधण्यासाठीं समर्थाची खुशामत; लाळघोटेपणा; हांजी हांजी. (क्रि० करणें).

लागो—वि. (गो.) खुशामत्या. [लागू]

लागो(गौ)नी—शअ. लागी. लागून पहा. ' साहवत नाहीं मजलागोनी '–रत्न २.२४. ' जैसी ओरसें धेनु । हुंबरत ये वच्छालागौनि । ' –ऋ २७.

लागोपाठ—क्रिवि. एकामागून एक अशा क्रमानें; मध्यें खंड न पडतां किंवा न पडूं देतां; लागलाच; ताबडतोब. ' त्या बाईला लागोपाठ चार मुली झाल्या. ' –शअ. मागून; पाठोपाठ; मागोमाग. [लागणें+पाठ]

लागोभागो दिवाळी–(लाभ येवो, नुकसान येवो, दिवाळी झालीच पाहिजे) कोठल्याहि परिणामाकडे न पाहतां उद्योग चालविणें याअर्थी. उच्च ध्येय करून काम करावें, फळ न आलें तरी खचूं नये, अशा भावनेनें काम करणें. ' तूं तर करावयाला लाग. लागोभागो दिवाळी पहातच आहे. ' कांहींजण याचा अर्थ– परिणामाविषयीं बेफिकीर राहून आपल्या कार्यक्रमांत (विशेषतः चैनींत) खंड पडूं द्यावयाचा नाहीं, असा करतात. [लागणें, भागणें आणि दिवाळी]

ला(लां)गोर—स्त्री. भूतपिशाच्च वगैरेपासून बाधा किंवा त्रास; पछाडणी. (क्रि० होणें) लागीर पहा. [लागणें] **ला(लां) गोरणें**- क्रि. भुताटकीमुळें त्रास, पीडा होणें; पछाडलें जाणें.

लागोरें—न. (कु.) वाईट चालीची स्त्री. [लागीर]

लाग्या—पु स्त्रीचा जार किंवा यार. –वि. १ लागलाव्या पहा. २ युक्त्या किंवा हिकमती करण्यांत पटाईत; संधानें बांधण्यांत चतुर, पटाईत. [लागणें]

लाघव—न. १ (वजनाचा) हलकेपणा. ' आइकें देह होय सोनियाचें । परि लाघव ये वायूचें । ' –ज्ञा ६.२६८. २ लहानपणा (आकाराचा); संक्षेप. ' लेखांत लाघव यावें म्हणून कितीएक संकेतानें खुणा लिहिल्या आहेत '–मभाको (प्रस्तावना). ३ क्षुद्रता; लघुता; नीचता. ' प्रसाद मग काय ती जरि निवारिना लाघवा । ' –केका ३६. ४ हळुवार पणा; नाजुकपणा; सुरेखपणा; कुशलता (कारागिरीची). ५ मऊपणा; तुळतुळीतपणा. ६ आजेव; पुढें पुढें करणें; लाडीगोडी; खुशामत. ७ माया. ' लाघव कळलें ब्रह्म. यासी याचें । परब्रह्मसाचें अवतरलें । '–तुगा २७. ८ चमत्कार; लीला. 'चित्रीचा हंस निर्जीव। परि तो काय करिता झाला लाघव । ' –शनि १५२. –ज्ञा १४.५. –मोकर्ण ३०.७१. ९ कपट, लबाडी; फसवेगिरी. ' देवासी लाघव। कामा नये रे । ' –दावि ४७९. १० चापल्य; कौशल्य; चातुर्य. ' आमुच्या बाणांचें लाघव । आजि फावले यादव । धांवा पावा चला सर्व । आले गौरव आम्हांसी । ' –एरुस्व ८.५०. ' कां नटलेनि लाघवें । नट जैसा न झकवे । तैसें गुणजात देखावें । न होतियां । '–ज्ञा १४.२९०. ११ मोह; कौतुक. ' तो कल्पादि जन्मा नागवे । कल्पांतीं मरणें नाप्पवे । माजि स्वर्गसंसाराचेनि लाघवें । झकवेना । ' –ज्ञा ८.२५८. (समासांत)

हस्तलाघव=हातचलाखी. शब्दलाघव=भाषणांतील चातुर्य, शब्दांचा अर्थ लावण्यांतील खुबी, शब्दार्थांची फिरवाफिरव.

लाघवट—स्त्री. लघळपणा; फाजील सलगी (कांहीं त्रास दायक, अपमानकारक कृत्यांत).

लाघवी—पु. नट; नाटकी; जादूगार; मात्रिक. 'जसीं लाघवियें वेडीं चाळविलीं।'-ऋ २९. 'कां लाघविया चें विचित्र। विनोदले।'-ज्ञा १८.७९७. -वि. १ लडिवाळपणा करणारा; मन ओढून घेणारा; आर्जवी; प्रेमळ. २ नम्र; सौम्य. ३ हांजी हांजी करणारा; लघळ. ४ चतुर; कुशल 'ऋषि जात होते स्वाश्रमासी। त्यांतें लाघवी हृषीकेशी। तीर्थमिषें समरतासी। पिंडारकासी स्वयें धाडी।'-एभा १.३१८; -तुगा २२५. ५ धूर्त; ठकबाज; कपटी. 'न गुरु तो ठक दांभिक लाघवी।'-वामन, भरतभाव ३७. [लाघव]

लाघ(घा)ळ, लाघ(घा)ळकी, लाघ(घा)ळभावशी ··भवानी-बाई—लघाळ इ० पहा.

लाघावळ—स्त्री. लागावळ. १ ओळ; रांग; मालिका (घरें, झाडें, टेकड्या इ०ची). (क्रि० लावणें; लागणें). २ मार्ग; माग; अनुसरण्याची दिशा. (क्रि० लागणें; जाणें; येणें). ३ पुष्कळ वेळ चाललेल्या रिकाम्या गप्पा; लांबण. [लागणें+ओळ]

लांब, लाच—पुस्त्री. १ आपलें काम करून घेण्यासाठीं किंवा आपल्या कामांत विघ्न आणूं नये म्हणून एखाद्याला द्युत-पणें दिलेलें द्रव्य इ०; भाड. (क्रि० देणें; भरणें). 'परी परमात्मया चक्रवर्ती। उगाणिती जंव हातीं। तंव लांचुं न घेतां धूर्ती। धरिजतीं जिया।'-ज्ञा १८.७४३. 'तुका म्हणे जैसी लांचासाठीं गाही। देती परि नाहीं ठावी वस्तु।'-तुगा. २ कुमार्ग [प्रा. लंचा; का. लंच; गु. लंचा] **म्ह०** लाचलुचपत दक्षणा आणि घेई जे तत्क्षणा. **०कर**-वि. लाचखाऊ. 'ऐसिया पैजा महेशा। पांघुरणें दाही दिशा। लांचकरु म्हणोनि कोळसा। कामु केला'-ज्ञा १३.२५. **०खाऊ-खोर**-वि. भाडखाऊ; काम करून देण्याबद्दल अयोग्य रीतीनें पैसे खाणारा. **०रुष्वत**-लांच. 'हे लांचरुष्वत खाणारे नाहींत.'-विक्षिप्त १.१४१. [लांच+अर. रिश्वत्] **०लुचपत-लूच**-स्त्री. लांच इ०(व्यापकार्थी); अप्रामाणिकपणानें दिलें घेत-लेलें द्रव्य; अयोग्य, गैरवाजवी बक्षीस.

लाचकोडगा—वि. निर्लज्ज; निकाजरा; लतकोडगा पहा.

लांचावणें—अक्रि. १ संवकणें; कोणेक गोष्टीपासुन एकवार लाभ झाल्यामुळें तीच गोष्ट पुनःपुनः करण्याविषयीं संवकणें; लाडावणें; लालचावणें; चटक लागणें (विशेषतः वाईट अर्थी). 'मग संवादु तोही पारुखे। तरी भोगितां भोगणें थोकें। हें कां साहावेल सुखें। लांचावलेया।'-ज्ञा १८.८२. -एभा १.२९२. -तुगा ६. २ पैसे खाण्याची वाईट संवय लागणें.

लांचाव(वि)णें—उक्रि. १ लांच देणें. २ आमिष दाख-वून वश करणें; फितविणें. 'नां तरि मेघमंडळें। काई चातक लाचविलें।'-भाए १५; -मोकृष्ण १८.१८. ३ मोहविणें; लुब्ध करणें. 'प्रकटुनी गुण गोड। रसिकांस लांचवा।'-मोरा [लांच] **लांचुगा**-वि. लांचखाऊ; लांच खाणारा. 'लांचुगी बुद्धी सदा देवांसी। तैशी नाहीं तुम्हां सांधूंसी।'-एभा २ ६४.

लाचार—वि. (कों.) निरुपायी; अगतिक; दीन; शरणागत. 'परंतु एक चिरंजीव शत्रूचे हातीं सांपडलेमुळें निरुपाय जाणोन लाचार होऊन चाकरी करितों'-ख ६.२९२२. [फा. लाचार्] **लाचारगी**-स्त्री. निरुपाय; लाचारी. 'परंतु हुजुरांत सांप्रत खर्चाची तकलीफ बहुत आहे. यास्तव लाचारगी आहे.'-रा १०. २७३. **लाचारी**-स्त्री. लाचारपणा; दीन-हीन दशा; निरुपाय; दैन्य. -रा १२.७९. 'हल्ली लाचारीमुळें वाटखर्च व सवारी व पोशाक वगैरे सरंजाम कर्जे-वाम करून तयार केले.'-पदमव१०१.

लाचारी तोडी—स्त्री. (संगीत) एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाती संपूर्ण-संपूर्ण. वादी धैवत. संवादी गांधार, गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर.

लांच्छन, लांछन—न १ खूण; चिन्ह; डाग (विशेषतः चंद्रावरील). 'मृगलांछन.' 'जो पुरुष चक्रवर्ती होणार त्याचे हातावर कमलाचें लांछन असतें.' २ कलंक; बट्टा; दुर्लौ-किक; बदनामी. 'आतां दोहीं पक्षीं लागलें लांछन। देव भक्त-पण लाजविल।'-तुगा १५६१. ३ नांव; अभिधान. [सं.] **लांछित**-वि. १ चिन्हित; खूण असलेला. २ कलंकित; ज्याला डाग आहे असा. 'लांछित चंद्रमा.' नित्य. [सं.]

लाज—स्त्री. १ लज्जा; मर्यादा; विनय. २ भिडस्तपणा; भीड; संकोच. ३ प्रतिष्ठा; मोठेपणा. (क्रि० ठेवणें; राखणें; संभाळणें). 'इच्छा पुरवील महाराजा। त्यासी लाज नामाची।'-भूपाळी गणपतिची. ४ लांछन; अपमान, अवहेलना. जसें-नांवावर लाज आणणें-लावणें. ५ शरम; अपमान बेअब्रू याची मनाला टोंचणी (अतिरेक दाखविण्यासाठीं अनेकवचनी प्रयोग करतात). 'दुसऱ्याच्या पुरुषार्शी बेशरमपणानं बोलायला लाजा कशा नाहीं वाटत यांना?'-फाटक, नाट्यछटा ५. [सं.लज्जा] **म्ह०** लाज नाहीं मना कोणी कांहीं म्हणा (वाप्र.) **०काढणें**-निर्लज्ज म्हणणें. **०झांकणें-राखणें**-अब्रू संभाळणें;प्रतिष्ठा ठेवणें. 'आमची राखावी ती लाज। परंपरा हेंचि काज।'-एकनाथ. **०लावणें**-लाजविणें. 'त्याला विजय लाज लावि खरी।'-मोकर्ण १७.१. **०वांटून पिणें**-अगदीं निःसंग बनणें. **०होणें**-लज्जा वाटणें; संकोच वाटणें; अपमानाचा प्रसंग येणें. 'पतकरावास

तर मोठी लाज झाली. '-विवि ८.१.८. सामाशब्द- ०काज-स्त्री. (सामा.) लाज; शरम; नम्रपणा. (क्रि० धरणें; बाळगणें; सोडणें; सुटणें; जाणें, उडणें). ०कोंबडा-पु. फार लाजाळू; संकोची; भिडस्त. ' आमचा मुलगा पंक्तीला लाजकोंबडा नाहीं.' ०मर्यादा-स्त्री. मर्यादा; विनय; नम्रपणा; [लाज+मर्यादा] ०लज्जा-स्त्री. लाजमर्यादा; लज्जा; लाज पहा. [लाज+लज्जा] ०लावणा-ण्या-लाव्या-वि. लाज आणणारा; अब्रू घालविणारा ' हा बेटा वंशांत लाजलावणा निघाला । ' -बाळ २.१६१. ०वट-वि. लाजरा; लज्जाशील; भिडस्त; नम्र. ' बायकांची जा. लाजवट असते. ' लाजट-वि. लाजरा; जरा भिडस्त. लाजणें-अक्रि. १ शरम वाटणें; शरमिंदे होणें. २ संकोच वाटणें; भिडस्तपणानें दबकणें. ३ विनयी, मर्यादशील असणें. ४ (लाजाळू नांवाच्या वनस्पतीनें) अंगसंकोच करणें. [लाज, लज्ज] लाजरा-वि. लाजाळू; लाजवट स्वभावाचा; विनयशील. लाजरी-वि.स्त्री. १ लाजाळू (स्त्री). २ स्पर्श केला असतां जिचीं पानें मिटलीं जातात अशी (वनस्पति). लाजव(वि)णें-उक्रि. १ लाज आणणें; लाज लावणें; शरमिंधा करणें. कोणेकाचें वैगुण्य बाहेर काढून तो लाजेल असें करणें. ' काल तुम्हास बोलावयास विसरलों खरा, आतां तें काढून मला लाजवूं नका. ' २ (गुणांत) मागें टाकणें. ' तो असा दाता निघाला कीं ज्यानें कर्ण लाजविला. ' लाजाळू-ळूं-स्त्रीन. थोडया स्पर्शानें पानें मिटणारी वनस्पति; लाजरी. ' लाजाळूं गाडींत ठेवलें तर गाडी चालूं लागताच त्याची पानें मिटतात. ' -मराठी ६. पु. (१८७५) पृ. २२४. लाजाळू-वि. लाजरा. [सं. लज्जालु] लाजिंद्रा-वि. १ लज्जित. ओशाळा, मिंधा, या शब्दांप्रमाणें विशेषतः उपयोग. २ लाजाळू. [लाज] लाजेकाजें-क्रिवि. लाजलज्जेनें.

लाजन-वि. मर्यादशील; लाजरी.

ला-जबाब-निरुत्तर. ' म्हणून यांसी यथामतीनें बोलून ला-जबाब केलें. ' -रा १२.२२. [फा. ला-जबाब्]

लाजम, लाजीम-वि. योग्य. ' हे मशाखत्-किताबतीचा सिलसिला जारी असावा हे लाजम आहे. ' -ख ७.३५६४. [अर. लाझिम्]

लाजमा-पु. कर; हक्क. [अर. लाझिमा]

लाजवर्त-न. नीलमणी. ' लाजवर्तें पोवळीं । ' -मेस्तक ४१. [फा. लाज्वर्द]

लाजहिर्णें-क्रि. लाजणें. -हंको.

लाजा-पु.अव. लाह्या. [सं.] ०होम-पु. १ विवाहविधींत वधूवरांनीं अग्नींत लाह्यांची आहुति देणें. २ अशा प्रकारें आहुति दिलेला होम.

लांजा-पु. भानगड; लांझा पहा. ' या उपरी खुनाचा लांजा सरकारचा तुम्हाकडे नाहीं. ' -समारो ३.८१.

लांजारणें गोंजारणें-उक्रि. प्रेमानें हलका हात तोंडावरून फिरविणें. [गोंजारणें द्वि.]

लाजिम-लाजिमा पहा. ०दार-वि. शरमयुक्त; भयभीत झालेला; दाबला गेलेला; स्वतःवर दुसऱ्याचा लाजीम (हक्क) असलेला. ओशाळा पहा. ०दारी-स्त्री. मिंधेपणा. ओशाळगत पहा.

लाजिमा-म्मा-पु. १ धंदा; व्यवहार (विशेषतः अनिर्णित; अपूर्ण). (क्रि० तोडणें; तुटणें; उलगडणें; राहणें). २ मालकी हक्क; वहिवाट; संबंध. ' या वतनास हक्कलाजिमा इनामत व हल्लीं पूर्वील सनदाप्रमाणें देत जावें. ' -शाछ ५५. ' शेतांत तुझा लाजिमा नाहीं. तूं आपला ऐस. ' ३ जबाबदारी. -इमं ४६. [अर. लाझिम]

लाजिरवाणा-णी-वि.१शरमिंधा; ओशाळा (दुष्कर्माची प्रसिद्धि होणें इ०कारणांमुळें). ' त्याची मर्मांची गोष्ट निघतांच तो लाजिरवाणा दिसूं लागला. ' २ अपमानकारक; काळिमा लावणारी (गोष्ट, कृत्य). ' ज्यानें समविदग्धांत कोणी याचना केली नाहीं. त्याला याचना करणें लाजिरवाणी गोष्ट आहे. ' लाजिरवाणी-र्णे-क्रिवि. लाजिरवाणेपणानें; लज्जास्पद रीतीनें (बोलणें, जाणें इ०कांचें विशेषण); ' मग बोलिली अंबिका । आम्हासि मूळ ना पत्रिका । तरी लाजिरवाणें त्र्यंबका '। कैसें पुसावें ' -कथा ३.८.१४.

लांजी-स्त्री. (गो.) एक मासा.

लाजीम-पु. (क.) हक्क; मालकी. -वि. आवश्यक; कर्तव्यपर; योग्य. [अर. लाझिम]

लांझा, (ला)लांझ्या-पु. १ अनिर्णित, असमाप्त धंदा, व्यवहार; देवघेव (विशेषतः त्रासदायक, भानगडीचा). (क्रि० तोडणें; तुटणें; न राहणें). २ लडथड; लफडें; खरकटें. -बाडथोमारो १.१५९. ३ वांधा; गुंता. ' तुम्ही या कर्मांत नव्हता अशी साक्ष पुरवा म्हणजे तुम्हाकडे कांहीं लांझा राहिला नाहीं. ' ' आतां लांझा आमुचे पदरीं । राहिला नाहीं सर्वथा । ' -भवि ५४.११६. ४ आरोप; संबंध. ' तर तुजकडे खुनाचा लाझ्या नाहीं. ' -वाडशाछ १८. लांझी-लांझा पहा.

लाट-स्त्री. १ पाण्याचा तरंग; लहरी; ' लाटा आपटतां उठे ध्वनि शिरे तो ज्याचिया बंदरीं । ' २ बगाडाचें वरचें आडवें लांकूड. याला आंकडा लावलेला असतो. ३ चुना, पोहे इ० कुटण्याचें, कांडण्याचें साधन. ४ तेलाची घाणी, उंसाचा चरक इ० यंत्रांत जें उभें वाटोळें लाकूड फिरत असतें तें; रूळ. ' लाट फिरविता आली उरावरी । ' -रामदासी२ १०६. ५ उंसाच्या चरकाचें तुळवट, जें बैल किंवा माणूस वर्तुळाकार फिरवितो, तें. ६ देवाच्या मूर्तीपुढें जें सोंवळ्याची मर्यादा राहावी, दाटी होऊं नये इ० कारणासाठीं आडवें लांकूड असतें तें. -एभा २८.३६९. (पाठभेद)

७ घराच्या बांधकामांत कडयांखालीं असतें ती तुळई. ८ जमीन सपाट करावयासाठीं दगड, लोखंड इ० चा दंडगोल फिरवितात तो. ९ लांकडाचा मोठा ठोकळा. १० (हिं.) स्तंभ; खांब. विशेषतः उत्तरहिंदुस्थानांत अशोकादि प्राचीन राजांचे लेख ज्यांवर लिहिले असतात असे दगडी, लोखंडी खांब प्रत्येकी. ११ (जरतारधंदा) कलाबतूच्या साच्यांत ३०-४० तराक लावलेलें लांकडी साधन. १२ रहाट व चाक यांना जोडणारें आडवें लांकूड. -मसाप २.३.७६. १३ (कों.) देवळाच्या पटांगणांत एका खांबावर एक आडवी बहाळ बसवितात ती. हिच्या टोंकांवर माणसें बसुन फिरतात. ही खांद्यावरूनहि मिरवीत नेतात. [सं. यष्टि; प्रा. लट्ठी; हिं. लाठी] **०उठणें**-१ वाद, चळवळ, द्वेष इ० निघणें, प्रचार असणें. २ (नाविक) दर्यांत खळबळ चालणें.

लाट—पु १ भारा; गठ्ठा; गट. २ विक्रीच्या वस्तूंचे विशिष्ट गट करून ते सवलतीनें विकतात ती पद्धत; तसा गट ३ सोडत; लॉटरी. ४ चंगळ; चैन. ' सुंदर बायको आणि पैसा मिळाला. आतां लाट आहे बुवा ! ' (इं) लॉट. -उद्गा. वाहवा; भले; शाबास; जयजयकार.

लाट—पु. बडा मनुष्य; मोठा अधिकारी. (इं.) लॉर्ड याचा अपभ्रंश. ' साधी गोष्ट सुद्धा लाट साहेबांच्या हातून घडत नाही. ' -के १२.७.३०. [इं. लॉर्ड]

लाट-ठ—स्त्री. (कों. कु) खोल विहिरीचें पाणी वर काढण्याचें एक साधन. ओकती पहा.

लाटण—न. पोळी, पापड इ० लाटतांना ती पोळपाट लाटण्याला चिकटूं नये म्हणून खलवर त्यास लावतात ते पीठ. [सं. लुंट्-ठ्; लुठन] **लाटणी**-स्त्री. वाटोळे फिरणें; फिरविणें; लाटणें. **लाटणी-णें**-स्त्रीन. लाटण्याचे उपयोगी गोल लांकूड; लाटण्याचें साधन. **लाटणें**-क्रि.१ वाटोळें गरगर फिरवणें; (लाटणें इ०नें) (विवक्षित आकार येण्यासाठीं). ' वाटाया प्राज्य पुरण पापड पोळया प्रभृत लाटाया । '-मोगदा २.१६. २ (रहाटगाडगें इ० यंत्र-पाणी वर यावयासाठीं) फिरविणें; चालविणें. ३ लोंबरीस खळ देऊन त्याची गुंडाळी करून ती बुरणूस इ० ह्यावयासाठीं जमिनीवर ठेवून हातानें मागेंपुढें फिरविणें. ४ (ल) दपटणें; दामटणें. ' पुढें लाटोनि रहंवर । पार्थासमोर पातले । '-मुआदि ४४ ८८. ५ चेपणें; रगडणें. ' धनुष्यबळें हृदय लाटी । '-वेसीस्व ४.१०१. ६ (कुलाबा) विटा पाडणें -बदलापूर ६६. ७ (कुस्ती) आपल्या एका हातानें जोडीदाराच्या मांडीखालून हात घालून दुसऱ्या मांडीस धरून आपल्या दुसऱ्या हातानें जोडीदाराच्या गळ्याखालून हात घालून त्याच्या बाहुट्यास धरून आपल्या छातीनें जोडीदारास लाटल्यासारखें ढकलून पाडणें. **लाटीव**-वि. लाटलेली (पोळी, बुरणूस इ०) **लाटण्या**-वि. धष्टपुष्ट व दांडगा; आडदांड आणि बेफिकीर; उसळणारा **लाटण्यासारखी**--वि. लाटण्याप्रमाणें मोठ्या आकाराची आणि सुरेख (बाजरी व त्यानें शेत भरल) याच्या उलट बुरंजी.

लाटणें—उक्रि. बळकावणें; उपटणें. [लाट]

लाटफळें—न. (कु.) पोळपाट.

लॉटरी—स्त्री. १ सोडत; नशिबानें मिळणारें बक्षीस व त्याची योजना. २ नशीबाची परीक्षा. [इं.]

लाटा-डा-ढा—पु. १ वांझ म्हैस-गाय. २ वांझ स्त्री; निपुत्रिक स्त्री. ' घरांत दोन लाडे पोसावे लागतात. ' ' लाटयाचा उपयोग तरी काय ह्मावयाचा ! ' -वि. वांझोटी.

लाटा-टी-लाठा—पुस्त्री. १ पापड इ०कांच्या पिठाची लाटावयाच्या सोयीची जी वडी करतात ती. २ लाटणें-णी. ३ लगड, पत्रा. ' लाटा खुरा ही मायाच आकारही सुवर्णाचें ' -यथादी १२.५१३. [लाटणें] **०फिरणें-फिरविणें-**(वेरजांवर, हिशेबांत, कामावर) कमें तरी दडपून नेणें; घालमेल करणें; गडबडगुंडा करून, लबाडीनें रेटणें. **लाट्या**-पु. १ मुसळ; लाट; वरवंटा. २ लाटण्याच्या आकाराचा गोळा (पीठ, माती इ०चा); लांबट गोळा.

लाटा—पु. (राजा.) १ (भातेणाचा, नाचणीच्या काडाचा वगैरे) भारा. २ नाचणीचें भूस. ३ (कुलाबा) भात झोडून घेतल्यावर खालीं राहिलेलें तण गुंडाळून करतात ती लोळी. ४ (सामा.) ढीग; भारा. ' दसऱ्याचे सुवर्णाचे लाटे । लोक म्हणती परी ते काटे । ' -दा १४.१०.६. [लाट]

लाटा-ट्या—वि. १ दडप्या; बेफिकीर. २ धाडसी; धडाडीचा. लाठा पहा. ' तो पराक्रमी लाटा । राज्य करी अलोटा । ' -कथा १.२.६३. ३ लाटणारा; दिसेल तें बळकावणारा. [लाटणें] **०गंगाजी-गोमाजी-कारभारी-पाटील**-वि. आडदांड; बेमुर्वत्या; लुटारू; लुबाडणारा (माणूस).

लाटानुप्रास—पु. (साहित्य) एक शब्दालंकार. त्याच अर्थाच्या पण निराळ्या ध्वनीच्या शब्दांची आवृत्ति यांत होते. उदा० ' जो कल्याणगुणी गुणीच अगुणी भूतें मणी ज्या गणी । ज्याच्या रूपगुणीं सदा गुणगुणी शंभु निघे निर्गुणी । '

लाटापिटी—स्त्री. (ना.)रणगर्जना; झोंबाझोंबी; मारामारी. [लाटणें+पिटणें]

लाटालाट—स्त्री. १ दपटादपट; दडपादडपी. २ लबाडीन घशांत घालणें; लाटणें. [लाटणें द्वि.] **लाटालाटीनें दपटणें**-क्रि. न जुमानतां, बेधडक पुढें नेणें; दामटणें, दपटशा करणें.

लाटी—स्त्री. लाकडाची तुळई; खांब. लाट पहा.

लाटू—पु. (महानु.) पुरुषार्थ. ' लाटू दोघा समाना –गस्तो ४९.

लाटोरी—स्त्री. दोन धडयांची पोळी. [लाटणें+पुरी]

लाठ-ठा, लांठ-ठा—वि. १ आडदांड व मजबूत; दांडगा; सशक्त व अगडबंब. २ माजलेला. ' आधींच तारुण्यें अति लाठा । वरि धनमदें भरला ताठा । ' –एभा २३.२७७. ३ मोठा शूर; समर्थ; बलवान. ' राजा म्हणे कटकटा । व्यर्थ आलासी माझियां पोटा । नव्हेसि वीरवृत्ति लाठा । अति करंटा नपुंसक । ' –एरुस्व ६.४२. –एभा २०.२७०. ४ प्रचंड; अति मोठा. ' हा लाटा जुंझारु म्हणोनि धनमाने अधिकु लोभकरी । ' –पंच ४ ४. ५ तेजस्वी. ' लाठा आईकीजे अग्नी । ' –उषा ९५ ६६. ५ अपरंपार; रेलचेलीचा (पाऊस, पीक, बहर इ०) [लट्ठ] **लाठाई**–स्त्री. १ दांडगाई व आडदांडपणा. २ जुलूम, जबरदस्ती.

लाठिव—पु. लाठपणा. ' आंगवणेचिया लाठिवा । न पाहे क्षेत्रिया सर्वा । ' –गीता १.४०१.

लाठी—स्त्री. सोटा; काठी; दंडुका. रामपूरची लाठी प्रसिद्ध आहे. हिला वर्षभर मोहरीचें तेल पाजून कमाविली असते तलवारीचा घावहि हिला बाधूं शकत नाहीं. –संव्या ६५. [सं. यष्टि; प्रा. लट्ठि; हिं लाठी] **०चालविणें**–काठीनें मारामारी करणें; लाठी मारणें. ' पोलिसांनीं लोकांवर लाठी चालविली. ' –के २१ ६.३०. **०राज्य**–न. लोकांना लाठीनें मारून सरकारनें राज्य चालविणें, दंडुकेशाहीनें राज्य करणें. **०वाला, लाठियाळ**–वि. लाठी वापरणारा; (ल.) लाठी खेळण्यांत पटाईत. ' प्रक्षुब्ध लोकमत हा एक जहाल लाठियाळ. ' –केले १.३०२. **०वाले भरेकरी**–पुअव. क्षेत्रोपाध्यायांचे दलाल. हे यात्रेकरूंपासून अव्वाचे सव्वा पैसे काढतात. –गांगा २८२.

लाठु, लाठेपणा—पु. १ धैर्य. ' तंव म्हणे दानव सीरसाटु । उद्धव देवा न संडी लाठु । ' –भाए २१९. –ज्ञा २.९. २ महत्त्व. –माझा १६.५१. ३ दांडगेपणा. ४ सामर्थ्य. एवढया लाठेपणाचा उपावो । आनु नाहींचि म्हणे देवो । ' –ज्ञा १६.५१.

लाठ्ठा—पु. (व.) दरवाजा.

लाड—पुअव. लालन; मुलांबाळांवर केलेलें प्रेम; त्यांचें कोडकौतुक; प्रेमानें केलेलें लालनपालन; प्रेमाची भाषा, कृति. [सं. लड्; प्रा. लड्डिय; हिं लाड] **म्ह०** लाडानें वेड गुळानें बोबड. (वाप्र.) **०चालविणें-पुरविणें**-हौस पुरविणें; मागितलेली वस्तु देणें. **०देणें**–लाड करणें. ' कां लाड देशी हो ! कान्हयातें बाई. ! ' –आपद ८८. सामाशब्द– **०झगडा-डें**–पुन. मित्रत्वाचें भांडण; प्रेमकलह. **०पुरवा-ध्या**–वि. लाड पुरविणारा; हौस भागविणारा. **लाडक, लाडका**–वि. १ प्रेमाचा; प्रिय; आवडता. २ एखाद्याच्या विशेष प्रेमांतील. ३ लाडिक; प्रेमळ; लडिवाळपणाचीं (मुलांची भाषा, बोलण्याची पद्धत व त्यांची वागण्याची रीत याबद्दल केलेला उपयोग). ४ प्रेमाचे; विलासी; गोडीगुलाबीचे; स्वार्थी; मनोवेधक (शब्द, रीत). ' आत्तां या, पैका मिळाला म्हणजे देऊं अशा लाडक्या गोष्टी कशाला सांगता ? ' ५ अविनयी; धीट; दांडगी (लाडांमुळें). ६ सौम्य; **मन वळविणारें**; अधिकार दाखवून केलेलें नव्हें असें; राजीखुषीचें. **जसें**–लाडका धंदा–व्यवहार–काम–गोष्ट इ० **म्ह०** १ लाडकं पोर देवळीं हगे, गांड पुसायला महादेव मागे. २ लाडकी सई, दाल्ह्यानं घेतली डोई. ' **लाडकणें**–१ लाड करणें; कोड पुरविणें. २ काळजी घेणें; लालनपालन करणें. **लाडकाविणें, लाडावणें**–१ लाड करून बिघडविणें. २ लाड करणें. ' मी लेकरूं त्वां मज लाडंवावें । ' –अकक २. –केप २२. **लाडणें**–अक्रि. लाडावला असणें; लाड, कौतुक होणें. **लाडला, लाडिला, लाडेला**–वि. लाडका; प्रिय; प्रेमी. **लाडसपणा**–पु. लडिवाळपणा. ' असों हें भवमोचना । देवरायाचें लाडसपणा । ' –ऋ २७. **लाडाचा तांब्या**–पु. विवाहानंतर मुलीच्या बापानें जावयास दिलेलें पात्र (विशेषतः मिठाईनें भरलेलें); वरदक्षिणा. **लाडिकपणा**–पु. लडिवाळपणा. **लाडीगुडी-गोडी**–स्त्री. एखाद्याकडून आपलें काम करून घेण्याकरितां त्याच्याशीं गोड बोलणें; लाडिकपणा करणें; कांहीं लालूच दाखवून अनुकूल करून घेणें. (क्रि० दाखविणें). ' लाडीगुडी चालवूं लाडकीशीं । ' –केक ७. **लाडुकपण-पणा**–नपु. लाडीगोडी; लाडकेपणा. **लाडूबाई**–वि. लाडावलेली; लाडांत वाढलेली (स्त्री, मुलगी). ' देवायची होती लाडुबाई आपल्या घरीं, म्हणजे आमच्या घरीं हे पांढरे पाय लागले नसते. ' –सदानंद. पुढिंगी **लाडोबा-लाडेकोडें**–क्रिवि. लडिवाळपणें; लाडीगोडीनें. ' निज प्रीतीनें होऊनि वेडें । त्याशीं खेळे लाडेकोडें. ' **लाडेजणें**–क्रि. लडिवाळपणा करणें. ' तैसें संत माहेर माझें तुम्ही मिनलिया मी लाडेजे । ' –ज्ञा १५.५९७.

लाड—स्त्री. (प्र.) राड पहा.

लाड—पु. १ एक जात व तींतील व्यक्ति. हे लोक विड्याचीं पानें, सुपारी इ० विकण्याचा धंदा करतात. २ एक राष्ट्र व जात. –चौऱ्याशीचा लेख. लाट पहा. [सं. लाट; प्रा. लाड] **०सोनार**–पु. सोनारांतील एक जात.

लाड—वि. (इं.) लॉर्ड. लाट पहा. **०गवरनर**–वि. (व.) मोठा अधिकारी; तिस्मारखां. ' भले तूं हुकूम सांगत ? तूं काय लाड गवरनर आहे कुटचा ? ' [लॉर्ड+गव्हर्नर]

लांडकें—न. (गो) कुत्र्यांची संभोगक्रिया.

लांडगा—पु १ (वाई) एक वनस्पति. –मसाप ३.३. आंबुटी. २ एका वनस्पतीचें बी. ३ एक फळ. ४ (व.) तुरीच्या

शेंगांतील दाण्यांची उसळ. 'आज मी लांडगा खूप खाल्ला.' –वशाप ५१.८.२४५.

लांडगा—पु. (व.) लग्नांत एका विवक्षित प्रसंगीं नवरदेवाजवळ जेवायला बसणारे मुलगे प्रत्येकी.

लांडगा—पु. एक हिंस्र पशु; वृक. **लांडगी**–स्त्री. १ लांडग्याची मादी. २ कोळप्याची पात. **लांडगेतोड**–स्त्री. शत्रूवर एकदम आवेशानें तुटून पडून त्याची कत्तल करणें; एकसारखी, सरहद्दी कापाकापी; अचानक छापा. 'चोहींकडून तोंडें लागून लांडगेतोड झाली.' –भाव १२१. लांडगावे पहा **लांडगाचें**–न. १ लांडग्यांची धाड; त्यांनीं केलेली नासाडी. २ (ल.) लूट; नागवणूक.

लाडन—स्त्री.न. १ गूळ करावयाच्या कढईस उडीद, राजगिरा इ०च्या पिठाचें लुकण लाविताततें. २ गाळेसारखा एक प्रकारचा पानें–फांद्या यांपासून काढलेला चीक. [अर फा. लादन्]

लांडरूं—न. १ (निंदार्थी) लांडोर: मोराची मादी. २ (बायकी) एक शिवी.

लाडा—वि. वांझोटी; वांझ; लाटा पहा.

लांडा—वि. १ ज्याचें शेंपूट कापलें आहे किंवा नाहींसें झालें आहे असा (पशु, पक्षी, सर्प, मत्स्य इ०); कापलेलें, तुटलेलें, आंखूड (शेंपूट). २ थोटा; अग्रहीन; आंखूड (हात, लेखणी, चाकू, इ०). ३ डोकें, टोंक, वरचा किंवा शेवटचा भाग नसलेली (वस्तु सामान्यतः). ४ अपुरा; कमी प्रमाणाचा (लांबी, रुंदी इ०त); भरपूर मापाचा नव्हे असा. 'हा धोतरजोडा तुम्हास लांडा होतो. आणखी चार बोटें रुंद असता तर ठीक दिसता.' ५ (निंदार्थी–सुंता केली असते म्हणून) मुसलमान. –कोरकि १९०. [लंड] **०कारभार**–पु अधिकार नसतां विनाकारण मध्यस्थी आणि ढवळाढवळ करणें; नसती लुडबुड, उठाठेव (निंदार्थी उपयोग). 'आम्ही आपसांत भांडूं, एकमेकांच्या उरावर बसूं, पण शेजारचे कोणी शेकोजी आमच्या घरांत येऊन लांडे कारभार करावयास लागले कीं तें आम्हांला खपावयाचें नाहीं.' –नि. **०कारभारी**–वि. लांडा कारभार करणारा; लुडबुड्या. **०बुच्चा**–वि. योग्य अलंकार नसलेला: ओका; भुंडा (हात, गळा इ०). 'लांडाबुच्चा हात, दादला करी भात' **०भाई**–पु. (निंदार्थी) मुसलमान. लांडा अर्थ ५ पहा. **०भुंडा–भोंडा**–वि. शेंपूट किंवा अग्र तुटलेला, नसलेला. लांडा पहा. **०भोंडा कारभार–री**–लांडाकारभार–री पहा. **०लटका**–वि. खोटा आणि लबाड; उणा; खोटा; कपटी; विश्वास ठेवण्यास अपात्र (वस्तु, व्यवहार, गोष्ट इ०). (प्र.) लटकालांडा.

लाडिस—न.१पत्र्यांचा एक डाव. २ आगगाडीच्या रस्त्याची पाहणी करण्यासाठीं वापरण्यांत येणारें वाहन. [इं. लॉरी]

लांडी करणें - क्रि विस्तवावरून चालत जाणें. [राड]

लांडीलबाडी, लांडीलटकी—स्त्री. चढाओढ, चुगली इ० लहानमोठी लबाडी; फसवणूक; कपट; लबाडीचा व्यवहार. 'परंतु दोघांनीं मिळून लांडीलबाडी केली' –घका १२६. [लांडा+लबाड]

लाडू—पु एक पक्वान्न; धान्याचें पीठ भाजून त्यांत तूप, साखर वगैरे पदार्थ घालून स्वादिष्ट बनविलेला गोळा. याचे अनेक प्रकार आहेत. २ लाडवाच्या आकाराच्या गोळ्या. ३ (उप.) मुष्टिमोदक; धबका; बुक्की. 'आज गंगूला शाळेंत दहा लाडू मिळाले' ४ (ल.) फायदा; लाभ. [सं. लड्डुक; प्रा. लड्डुअ; हिं. लड्डू] **०गडू**–पु १ वरात घरीं जातेवेळीं नवरानवरी देवास नमस्कार करावयास जातात तेथें गडू व लाडू ठेवलेला असतो तो. २ अशा विधीसाठीं आणतात तो गडू, भांडें. **०संत्रा**–पु संत्र्याची एक जात. हें देंठाकडे निमुळतें असून खालीं पसरट असतें. यांची लागवड आसाम–बंगालकडे करतात. –उद्यममासिक पृ. १९६ मार्च १९३६.

लांडूर—स्त्री. लांडोर पहा.

लांडोर—स्त्री. मोराची मादी. (मोराएवढा लांब पिसारा नसून लांडा असतो म्हणून नांव). **म्हण** (निंदार्थी उपयोग) मोर नाचतो म्हणून लांडोरहि नाचते, पण शोभत नाही. (तिला मोरासारखा पिसारा नसल्यामुळें) अंधानुकरण योग्य नाहीं.

लांड्या—पु (व) एक प्रकारचा पक्षी; लावा पक्षी.

लाढण—स्त्री. गूळ करावयाच्या काहिलीस खडदाचें पीठ इ०चें लुकण लाविताततें; लाडन पहा.

लाढा—पु. १ लगदा; लादा (गूळ इ०चा). २ अंगाचा चिकटपणा; दरदरून घाम येण्यानें होणारी अवस्था (तापामुळें, उष्णतेनें, देवी, गोवर वगैरमुळें).

लाण—वि. (व.) लांब; दूर. 'दूर्णे लाणच आणखी मागतो. 'लंका लाण आहे.' **०करणें**–ताणणें; लांबवणें; मजल आणणें. 'जीव घेईतोवर लाण केली.' लाणें पहा.

लाण, लाणी—स्त्री.१ (शेत, पीक याची) कापणी. २(जुन्नरी कातरणी (मेंढ्यावरील लोंकरीची). [सं. लवन]

लाणी—स्त्री. कापण्याचें हत्यार; कोयता. **लाण्या**–पु. (राजा.) विळा; कोयता.

लाणी—स्त्री. १ शेवट; सीमा. 'सकळां जाणणेयां जे लाणी।' –ज्ञा ८.१००. २ स्थान; आश्रय. 'तैसा ईश्वरावांचूनि कांहीं। जियें आणीक लाणी नाहीं।' –ज्ञा २.२४२. [सं. लयन?]

लाणें—न. अवधि; शेवट.

लाणें—न. प्राप्ति; लाभ. 'तेही पाणियांचें लाणें पाहिले। मल्लिकारा लागी।'–शिशु ५६७. [सं. लान; प्रा. लाण; हिं. लेना]

लात-थ—स्त्री. पायाच्या तळव्यानें केलेला प्रहार; लत्ता. 'वधि तया हरि लात-बुक्यातळीं।'–वामन, नृहरिदर्पण ११७. [सं. लत्ता; फा. लत] **०मारणें**–१ लाथेनें हाणणें; तुडविणें. (क्रि० मारणें, देणें) 'लाथ मारील तेथें पाणी काढील.' (सामर्थ्यवान्, कर्तबगार माणसाबद्दल म्हणतात.) २ अनादरानें त्यागणें; कस्पटासमान मानणें (रोजगार, कामधंदा. अन्न इ०). 'प्रपंच हरिणीस लात मारून।'–नव १५.२६. **लातावुक्यांनीं तुडविणें**–लाथा व गुद्दे मारणें; अतिशय मारणें; फार अवहेलना करणें. **बसतां लाथ व उठतां बुक्की**–अहोरात्र एकसारख्या लाथा बुक्क्या मारणें; सारखा छळ करणें. **लात झोपडें**–(लाथ मारली असतां पडणारें झोंपडें) अगदीं काडीमोडीचें घर; टाकाऊ झोपडी (निंदार्थी उपयोग). **लातड, लातडा, लातरा, लातिरा**–वि. लाथाळ; लात मारण्याचा स्वभाव ज्याचा असा (गोमहिष्यादि पशु). [लात] **लात(थ)डणें**–लाथा मारणें; लातळणें. [लात] **लातबुकी**–स्त्री. लाथा आणि बुक्क्या. (सामा.) जोरानें बडवणें; मारणें. [लात+बुकी] **म्ह०** १ लातबुकी भाकरसुखी=पुष्कळ लाथा आणि गुद्दे व भाकरीहि सुकी (कोरडी–तुपाशिवाय); छळ असून शिवाय खाण्याचे हाल. २ लातबुकी आणि सदासुखी=मार असला म्हणजेच नीट असणारा. **लातळणें**–क्रि. १ लाथा मारणें; लाथाडणें (अडेलपणें किंवा स्वभावामुळें, जनावरानें). २ (ल.) तिरस्कारपूर्वक झिडकारणें; नाकारणें. **लाताखाऊ**–वि. नेहमीं लाथा खाणारा; लतखोर पहा. **लाताड-डी**–स्त्रीन. लाथ. (क्रि० मारणें; देणें). **लाताड**–वि. लातड पहा. **लाता(था)ळ, लाता(था)ळें**–न. १ दुगाण्या; लाथांचा सुकाळ (अनेक घोडे, गाढव यांच्या); जोराचा लत्ताप्रहार. 'कोप धरिला ताळें बळभुजपरि कंपिते करि लाताळे।'–मोकृष्ण ५०. २ गोंधळ; लडथडीचें व हमरीतुमरीचें भांडण; कडाक्याचा वादविवाद व गोंधळ; बजबजपुरी. [लात] **लाताळ, लाताळ्या, लाथाड-ळ**–वि. लाथरा; लाथा मारणारा. 'तथापि बहु लाथळी मग अदंड मी हा किती।'–केका ५४. **लाताळणी**–स्त्री. लाथा मारणें. **लाता(था)ळणें**–क्रि. लातळणें; लाथ मारणें. [लात] **लाथरा, लाथेरा**–वि. लातडा पहा.

लातर—स्त्री. (कों.) माशांची एक जात. या माशांना ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्यें पकडतात.

लातिबी—स्त्री. (क.) पाला ठेंचून ठेंचून केलेला चोथा; गोळी. 'लातिबी कर.' 'लातिबी जखमेवर बांध.'

लाती—स्त्री. एक प्रकारची वडी. तांदुळाच्या पिठांत शिजविलेल्या तुरी किंवा वाटाणे घालून त्याची वडी बांधून शिजवितात तो पदार्थ.

लाती—स्त्री. लाटी पहा.

लाद—स्त्री. (कु.) अंगावर उठलेला लहान तांबडा चपटा फोड.

लादणी—स्त्री. (व.) धान्य, किंवा कांहीं वस्तू सांठण्याविण्याकरितां भिंतींत किंवा जमिनींत केलेली खोलीसारखी जागा. २ भारा; वजन; ओझें. ३ वुरजाच्या बाहेरील बाजूस किंवा किल्ल्याच्या भिंतीस, घराच्या पडवीप्रमाणें, युद्धाच्या सोईकरितां तयार केलेली जागा. मात्र या जागेवर पडवीप्रमाणें लांकडांची छावणी नसून विटा, रोडे, वगैरेची कमान असते. 'इतक्यांत एक गोळा लादणी फोडून आंत आला.'–मल्हारराव होळकरचरित्र ५५. ४ तटाला बळकटी येण्याकरितां बांधलेली उतरती भिंत. ५ (घोडे, उंट इ० वर कंठाळा, सलिता, कांहीं ओझें) लादण्याची क्रिया. ६ तळघर. [लादणें] **लादणें**–उक्रि. १ (बैल, गाडी, होडी, इ०वर) सामान, ओझें, माणसें इ० चढविणें; ठेवणें. २ कोणेकाच्या इच्छेविरुद्ध त्याला (कांहीं काम) करावयास लावणें; त्याच्यावर कांहीं जबाबदारी टाकणें; दोष, देयद्रव्य आरोपित करणें. ३ एकावर एक रचणें; वर जड ओझें घालणें. ३ (विटा, चुना, रंग, गिलावा इ० चा थर) भिंत, जोतें इ० बांधतांना वर लावणें, चढविणें. [दे. प्रा. लद्द; गु. लादवुं; हिं. लादना; फ्रें.जि. लदव]

लादनी—स्त्री. १ (व. ना.) तळघर. लादणी पहा. २ लदाव पहा.

लादा—पु. १ धुण्याच्या कपड्यांचा बोजा, ढीग. २ बोजा; ओझें; भारा; लागेल त्यापेक्षां अतिशय जास्त प्रमाणांत असणारा कोणताहि पदार्थ (भात, गूळ, इ०). ३ (क्रि.) गुंता; लगदा; एकमेकांत मिसळलेला जुडगा (केंस, कपडा, कागद इ० चा). ४ अशी गुंतागुंत, एकत्रित झालेली स्थिति. **लादावदींचें काम**–न. (लादलेलें असल्यामुळें) अव्यवस्थित, कसें तरी केलेलें काम.

लादा—पु. १ (कालवलेलें पीठ, मळलेला चिखल, चुना इ० कांचा भिंत इ० कांवर मारण्याजोगा) गोळा; (सामा.) चांगला भिजवून मळलेला गोळा. २ पाण्याचे बांध तयार करण्यासाठीं पळींवानें खणून काढलेल्या मातीचे चौरस गोळे. ३ (पीठ, भात, गूळ, इ० कांचें) पातळ स्वरूप; लिबलिबीत अवस्था. ४ पाणवट चिखल. 'लादा लाटा कातरे। ठाई ठाई'–दा ११.६.३.

लादी—स्त्री. १ घडीव दगड (फरसबंदी, लादनी इ०कांचे उपयोगी); चीप. 'चार हात नळाला दहा हात लाद्या असल्या म्हणजे आच्छादला जाईल.' २ फरशी (शहाबाद, तांडूर इ०कडील). ३ (सामा.) चौकोनी वडी, चिरा; चौकोनी पदार्थ.

लाधण—स्त्री. लाडन पहा.

लाधणें—अक्रि. १ लाभणें; मिळणें; प्राप्त होणें. –एभा २. २४८. –तुगा ४५२. २ लाभणें; मिळालेली वस्तु आपल्या सुखाची

होणें; आपल्या जवळ टिकणें (निषेधार्थी प्रयोग). ' ही वस्तू भ्रखेर याला लाधली नाहींच. ' –सकि. मिळविणें; संपादणें; जोडणें. ' ऐसा पुत्र लाधसी । ' –मुआदि १६.७५. [सं. लभ्–लब्ध; प्रा. लद्ध]

लान—पु. व्यभिचार केल्याचा आरोप ठेवल्यास मागतां येईल असा घटस्फोट. –घका ७५. [सं. ला=तोडणें]

लानगो—पु. (भि.) लांडगा. ' लांनगो लांनगो आलोरे ! '

लानी—स्त्री. लाणी पहा.

लाप—स्त्री. (बे.) मृगारंभीं उगवणारें कुरणांतील गवत.

लापट—वि. लंपट पहा. [सं.]

ला(लां)पट—वि. १ लटपटीत; ढिलें; घट्ट न बसणारें; सांधे खिळखिळे झालेलें (कुलूप, गाडा, पेटी इ०). २ झिजल्यामुळें सईल झालेला (कुलुपाचा कांटा, पेटींचें झांकण, खुंटी, मळसूत्र इ०). ३ निर्लज्ज; कोडगा; लोचट. [? ध्व. लप् !]

लापण—वि. जींत रेती व चिकणमाती यांचें प्रमाण सारखें असतें अशी (जमीन). –कृषि १६.

लापणिका, लापण्णिका, लाफण्णिका, लापनिका–लापटणिका—स्त्री. १ लांबलचक, कंटाळवाणी हकीगत; चऱ्हाट. २ लबाडीची मसलत; कपट; लपंडाव. ' प्रपंच वाटे लटिका । माया वाटे लापणिका । ' –दा १.९.१६. ३ विवेचन; स्पष्टीकरण. लापनिका पहा. ' कथा अन्वय लापणिका । नामघोष करतालिका ' –दा ४.२.४५. ४ कुभांड; थोतांड. –वि. मिथ्या; खोटें. ' सदा सर्वकाळ लटिका । बोले माईक लापणिका । ' –दा ५.३.६०. [सं. लापनिका]

लापणी—स्त्री. भाषण. [सं. लापन]

लापणीक—स्त्री. १ (महानु.) विवेचन; स्पष्टीकरण. २ लबाडीची मसलत; कपट. ' हें तों तुज कळों येतसे अंतरीं । लापणीक बरी साच भाव । ' –तुगा ९४२. लापणिका पहा.

लापन—न. १ लावणें; बंद करणें. २ रोंवणें; स्थापणें; गच्च बसविणें. ३ अर्थबोध होईल अशा प्रकारें जुळणी करणें; अन्वय लावणें; योग्य क्रम ठेवणें (कविता, कूट, हिशेब इ०चा) व्यवस्थित रचना, योजना. बहुधा समासांत उपयोग; जसें–श्लोकलापन, ग्रंथलापन. [सं.] **लापनिका**–स्त्री. १ अन्वय; (कवितेंतील शब्दांचा) संबंध, अर्थ लागेल अशी रचना; (श्लोक, वाक्य, कूट इ०चा) अर्थ लावणें. २ वाक्य, श्लोक इ० चा अर्थ समजून सांगण्याची विशिष्ट घाटणी, शैली, सरणी; स्पष्टीकरण किंवा अनुवाद करण्याची रीत, पद्धत. ' अर्थ तर एकच पण त्या टीकाकाराची लापनिका निराळी, याची निराळी. ' ३ वादविवादाची, लेखनाची, संभाषणाची पद्धत, शैली, रीत; वक्तृत्वाची व निबंधाची पद्धत, रीत. ४ शब्दपांडित्य. तुल० –एभा १०.४१८. पहा. [सं.]

लापशी, लाफशी—स्त्री. १ दूध, ताक, नारळाचा रस इ० कांस शिंगाडे, रताळीं, तांदूळ वगैरेचें पीठ, तवकील वगैरे लावून, कढवून करतात तें पेय; लाबशी; खीर. २ साबुदाणा पाण्यांत धुऊन तुपाच्या फोडणींत मिरच्यांचे तुकडे टाकून फोडणीस टाकल्यावर त्यांत ताक ओतून मीठ घालून करतात तो प्रकार. ३ साबुदाण्याची वगैरे खीर. –गृशि ४७१. [वे. प्रा. लप्पसिया; हिं. लपसी]

लांपळ, लांफळ—वि. लांपट; लटपटीत; ढिलें.

लाफ—पु. दिवा. ' लाफांत तेल घालावयाची त्यांची पाळी आहे ना ? ' –खेडयांतील स्वभावचित्रें. [इं. लँप]

लाफा—स्त्री. फळीला वळकटीसाठीं खिळे इ० नी ठोकलेली पट्टी.

लाफा—स्त्री.अव. १ अतिशयोक्ति; विस्तार; तिखटमीठ लावून, वाढवून, फुगवून सांगणें. २ बढाया; बाता; गप्पा; **बडबड** (क्रि० मारणें; झोंकणें; लावणें). [सं. लप्; **बडबड करणें**] **लाफ्या**–वि. बाताडया; गप्पीदास.

लांफाळ—वि. लुब्ध; अधीन; लंपट. (वाईट अर्थाचें उपयोग)

लांब—वि. १ दीर्घ; आखूड नव्हे असा. २ (स्थल किंवा काल या बाबतींत) दूर; अंतरावरील. ' अजून दिवाळी लांब आहे. ' ३ विस्तारयुक्त; पाल्हाळिक. ' म्हणाल बोलणें कां केलें लांब । ' –दावि ३००. –क्रिवि. दूर; अंतरावर. कधीं कधीं लंबा या अर्थी उपयोग. लंबा पहा. [सं. लंब] **॰लांब गोष्टी सांगणें**–१ पूर्वीची विपदवस्था विसरून उद्दामपणाच्या, शेखीच्या गोष्टी सांगणें. २ गप्पा, बाता मारणें. **॰वसणें**–(बायकी) विटाळशी असणें. सामाशब्द– **॰कान्या**–वि. गाढव. ' माणसांचे कान लहान असतां ते लांबकान्यांप्रमाणें कां वागतात ? –नपुक ९. **॰लांब, लांबचे लांब**–वि. १ फार लांब; दूर असलेलें. २–क्रिवि. दूरच दूर. **लांबट**–वि. (विवक्षिताहून) किंचित अधिक जो लांब तो. ' माझ्या धोतरापेक्षां हें धोतर लांबट आहे. ' २ लांब घाटाचा, आकाराचा. **॰टांग्या**–वि. लांब तंगडयांचा, पायांचा; ढांगळ्या; लंबाडया. **॰रुंद**–वि. प्रशस्त लांबी, रुंदी असलेला. **॰लचक**–वि. १ चांगली लांबी, रुंदी, उंची असलेला. २ प्रशस्त उंचनिंच; (सप्रमाण, पाहिजे तितका) लांब; अवाढव्य. ३ (ल.) दीर्घसूत्री; कंटाळवाणें (भाषण, गोष्ट). **॰लेखा**–पु. भारी लांबण, विस्तार; उगीच पाल्हाळ, वाद,चर्चा इ० (निंदार्थी उपयोग). 'या गोष्टीला होण्यास कांहीं लांबलेखा नको, आतां करून येतों. ' **॰सर**–वि. लांबट; अधिक लांब. **॰हस्त**–वि. (हिं.) विस्तीर्ण. **लांबडा**–पु. साप; ' घरांत रात्रीं लांबडा निघाला होता. ' –वि. लांबोडा; लांबट. **॰करणें**–क्रि. पुष्कळ चोपणें; ठोकणें; लंबा करणें. ' शिवाजीनें अफझुलखानाला लांबडा केला. '

लांबण—स्त्री. १ बरेंच मोठें अंतर; दूरपणा. 'किल्ला दिसतो खरा पण हो काय लांबण थोडी आहे.' २ सावकाशी; दिरंगाई; दूर टाकण्याचा प्रकार. 'त्याच महिन्यांत लग्न करून घ्या. उगीच लांबण लावूं नका.' ३ (तुलनेनें पाहतां) जास्त लांबी, अंतर. 'पायवाटेपेक्षां गाडीवाटेकडून लांबण आहे.' ४ विस्तार; पाल्हाळ (भाषणादि व्यवहाराचा). 'काय तें हंशील सांगा, उगीच लांबण लावूं नका, उशीर होतो.' [सं. लंबन] **लांबणीवर घालणें-टाकणें-लोटणें**-दूर मुदतीवर ढकलणें; उशीरां करण्यासाठीं ठेवणें. **लांबणीवर पडणें**-दूर मुदतीवर जाणें; पुढें ढकललें जाणें. **लांबणें**-अक्रि. १ लांब होणें; वाढणें (स्थळ किंवा काल या बाबतींत). २ (लांबी, विस्तार व अवधि या बाबतींत). वाढणें (वस्तु, व्यवहार, गोष्ट इ०). 'काम एकदोन दिवसांत झालें असतें पण सुभेदार गेले, आतां चार महिने लांबलें.' प्रमाणाबाहेर वाढणें. 'प्रथमतः दहा हजारांत घर बांधावें असा बेत धरून आरंभ केला मग जें लांबलें तें पंचवीस हजारांवर गेलें.' ३ भर घातल्यानें प्रमाण वाढणें; अधिक होणें (ताक, दूध इ०मध्यें पाणी वगैरे घातल्यानें); विस्तार होणें. ४ (बातमी, गुप्तगोष्ट, मसलत इ०) अनेकांस विदित होणें; जाहीर होणें. ५ (भाषण, ग्रंथ इ०) कंटाळा येण्याइतकें अधिक मोठें, पाल्हाळीक होणें. [सं. लंबन] **लांबता**-वि क्रिवि. १ लौकर न करतां हळू हळू केलेला, करून लांबविलेला (क्रि० धरणें) 'दोन गृहस्थ येणार आहेत, कथा जराशी लांबती धरा.' २ लांबलेला; बराच दूर गेलेला; (आकाशांत बराच वर आलेला). 'लांबतिजे सुरिजें। केवि लाजिजे नु!' -शिशु ४७०. **लांबरा**-वि. लांबट 'मोठाले कुच इंदुवक्त्र नयनें कर्णावधी लांबरे।' -वसं २. **लांबविणें**-क्रि. १ लांब करणें (स्थळ, काल या बाबतींत); २ (सामा.) लांबीरुंदी वाढविणें. ३ पुढें टाकणें; खेंचणें; ओढणें. ४ (मालकाकडून) काढून नेणें; पळविणें; लुबाडणें. [लांबणें प्रयोजक] **लांबवालांबव**-स्त्री. १ घाईनें, कसें तरी दूर नेणें, घाडणें (चोरादीच्या भीतीनें द्रव्य, वस्तु इ०). २ लुबाडणी; पळवापळव. **लांबमून**-क्रिवि. (कों.) लांबून. -लोक २.४७. **लांबी**-स्त्री. १ लंबाई; दीर्घता. २ लांब बाजू. ३ अंतर; अवधि; मधली जागा किंवा वेळ; दूरता. ४ एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंतचा विस्तार; त्याचें माप.' ५ (गो.) उशीर; दीर्घकाल. 'रुपये पाठविण्यास लांबी जाहल्याबद्दल राग धरूं नये.' **लांबीवर पडणें**-लांबणीवर पडणें; खिळब असणें. **लांबून**-क्रिवि. दुरून; अंतरावरून. **लांबोडा, लांबुळा, लांबुडा**-वि. वाटोळा, चतुष्कोण इ० जे आकार त्यामध्यें लांबी म्हणून जें प्रमाण तत्प्रधान जो आकार तो; लांबट; दीर्घ वर्तुळाकार; अंडाकृति. 'तोफेच्या गोळ्यासारखा वाटोळा गोळा करूं नको; वरंवट्यासारखा लांबोडा गोळा कर.'

लांबणदिवा—पु. लामणदिवा पहा. 'तेविला लांबणदिवा।' -वसा २८.

लांबणी—स्त्री. (हैदराबाद) मोठी चंची.

लांबणें—न. १ (कों.) विहिरींतील पाणी दोरीनें बाहेर काढण्याचें साधन (बादली, पोहरा इ०). २ लांबणदिव्याची सांखळी ३ (वे) पडदांडी जूं.

लांबर—वि १ मध्यें तोंड घालणारा; लुत्रा; (प्र.) लाहबर. २ (सामा.) लुडबुड्या; चोंबडा. [हिं. लहबर=पोपट]

लाबरी—स्त्री. (वे) टप्पा.

लाबशी—स्त्री. लापशी पहा.

लांबा—पु. शेतांतील भात कापतेसमयीं गळलेले किंवा एऱ्हवीं पडलेले जे भातगोटे त्यांच्यापासून उगवलेलें रोप. 'लांबा उगवे आगरीं। विभवश्रियेचा।' -ज्ञा ६.४४४. २ बिन भाजलेल्या शेतांत भाताचें टाकलेलें बी. (क्रि० टाकणें).

लांबा—पु. डाग; दोष. 'सर्खी लांबा लागला पातकाचा।' -सिमं ८.१८४.

लाबाड—वि. (रामदासी वाङ्मय) लबाड. 'बाष्कळ लाबाड ऐसें। जना कळों आलें।' -दा १९.३.२१; -दा २.३.९. **लाबाडघाणा**-वि. लबाड. 'किती येक लाताड लाबाडघाणे।' -रामदासी २.१७९.

लांबी—स्त्री. लुकण; एक प्रकारचा चिकण जिन्नस. ही चुना किंवा सफेता आणि जवसाचें तेल एकत्र करून तयार करतात. कांचेचीं तावदानें घट्ट बसविण्यासाठीं किंवा गळकीं भांडीं दुरुस्त करण्यासाठीं ही वापरतात.

लांबीझांबी—स्त्री. (प्र.) लांबीझांबी पहा.

लाबूद—वि. स्वल्प. -राज्य ८.८२. -क्रिवि. अवश्यमेव; सर्वथा. [फा.]

लांबोडा—वि. लुब्रा; लांबर पहा. 'बायकांत पुरुष लांबोडा भाजून खातो कोंबडा.'

लांबोरा—वि. लोचट; कंटाळा येईपर्यंत पाठीमागें लागणारा (भीक मागण्यासाठीं, द्रव्य गोळा करणें इ० साठीं).

लाभ—पु. १ फायदा; प्राप्ति. 'तुज लाभ काय यांत...।' -मोविराट १.१८६. २ धान्य वगैरे मोजतांना बरकत यावी म्हणून एक अशा अर्थानें वापरतात, नंतर दोन, तीन असें म्हणून माप टाकतात; बरकत पहा. ३ (कु.) शेंकडयावर दिलेला जास्त माल (नारळ वगैरे). (भेटीचा) **०देणें**-भेटणें; भेट घेणें (आदर दर्शविण्यासाठीं योजतात). **लाभा येणें**-१ लाभणें. २ अनुभवास येणें; समजणें. 'जरी हे कैसेनि हे लाभा। जायेचि ना।' -ज्ञा १५.५४२. सामाशब्द- **०काळ**-पु. फायद्याचा, प्राप्तीचा काळ, वेळ, हंगाम; उत्कर्षकाळ. 'जिवाशीं जडविलेल्या जीवासाठीं

अंतकाळाला लाभकाळ समजावें लागतें. ' –राजसंन्यास ५. उलट शब्द विनाशकाळ; आपत्काळ. **०गुण**–पु. फायदा; प्राप्ति. ' त्याच्या मैत्रकीनें मला कांहीं लाभगुण नाहीं. ' **०दायक**–वि. ज्याच्या संग्रहानें संग्रहकर्त्यास द्रव्यादि लाभ होतो असा (अश्व, नीळ इ० पदार्थ, शुभकर्म, व्यापार इ०); फायदेशीर. **०दृष्टि**–स्त्री. लाभाची, फायद्याची इच्छा. –वि. ज्याला केवळ फायद्याची इच्छा आहे असा; ज्यांत त्यांत लाभाची अपेक्षा ठेवणारा. [सं.] **०लोभ**–पु. १ (लाभाचा लोभ) कोणेक कार्यामध्यें मला कांहीं प्राप्त होईल असा जो लोभ असतो तो; लोभदृष्टि. २ (लाभ द्रि.) लाभ; प्राप्ति; फायदा (व्यापकार्थी व सामान्यपणें उपयोग). ' मी तीन वर्षें व्यापार करतों परंतु लाभलोभ म्हटला तर कांहीं एक नाहीं. ' ३ प्राप्ति किंवा स्नेह; लाभाची अपेक्षा किंवा लोभाची भावना. ' लाभ लोभ धरून कोण्ही कोण्हाचें काम करतो. ' ' लाभालोभावांचून कोण कोण्हाला पुसेल. ' **०वेळ-ळा**–स्त्री. १शुभकाल; लाभदायक वेळ किंवा संधी. ' लाभवेळ पाहून काम केलें असतां अवश्य लाभ होतो. ' २ दिवसाच्या किंवा रात्रीच्या आठ भागांपैकीं एका वेळेचें नांव वेळ पहा. **०हानि**–स्त्री. नफानुकसान; सुखदुःख. ' ज्या लाभहानि जेथें, नेतो बांधोनि काळ दान्याने। ' –मोकर्ण ४७.६१. **लाभणें**–१ मिळणें; प्राप्त होणें. ' आज मला भेट लाभेल. ' संपादन होणें. २ निष्पन्न होणें; उद्भवणें (फायदा, नफा). ३ उपयोगाचें, फायद्याचें असणें; उपयोगी पडणें ४ शुभकारक, लाभदायक होणें–असणें (मुहूर्त, ग्रहबल इ० लग्न, मुंज इ० करितां). **लाभाईत**–वि. लाभदायक. ' घरीं येवोनिया आनंदें बोलतीं। कंन्या आम्हाप्रती लाभाईत। ' –ब ४. **लाभागळी**–वि. लाभदायक. ' बोलती लीला लाभागळी। ' –दावि १३१. **लाभागोभा**–पु. (व्यापकार्थी) नफा; फायदा. [लाभ द्वि.] **लाभाचा**–वि. फायद्याचा; लाभदायक. ' त्या वांचुनि यांमीं जो करणें संग्राम तो न लाभाचा। ' –मोविराट. **लाभालाभ**–पु. १ नफानुकसान; नफातोटा. २ दैव; नशीब. [सं. लाभ+अलाभ] **लाभालोभा**–पु. (कों.) लाभलोभ पहा. **लाभालोभाचा**–पु. स्नेह किंवा लाभ यांमुळें जोडलेला, गुंतलेला. ' चौचे लाभालोभाचे असले म्हणजे निर्वाह होतो. ' **लाभावळी**–स्त्री. अनेक लाभ. ' तो चिन्हें शुभ पाहुनी नृप म्हणे लाभो न लाभावळी। ' –र ३०. [लाभ+आवलि]

लाभरा—वि. लांबर, लबरा पहा.

लामटे—पु.अव. (व.) (प्र.) लांबटे; शेवया. [लांबट]

लामणदिवा, लाम्हणदिवा, लामणें, लाम्हणें—पुन. १ लांबणदिवा; लांबगें. दोरी इ० कांस लांबून ठेवावयाजोगा जो लोखंड, पितळ इ० चा करतात तो दिवा २ (कों.) ज्यास मध्यें सांखळी लाविलेली असते असा पितळी कंदील. [लांबण+दिवा; तुल० सं. लावण्यदीप]

लामा—पु. १ बौद्ध धर्मांची तिबेटांतील शाखा. २ या शाखेचा गुरु. ३ तिबेट किंवा मोंगोलिया यांतील बौद्ध भिक्षु. दलाईलामा=प्रमुख लामा. (तिबेटी)

लाय, लायलाय—क्रिवि.स्त्री. लइालइा पहा.

लायक—वि १ सुयुक्त; प्रासंगिक; साजणारा (शब्द, कृति). २ समर्थ; योग्य; शक्त; पात्र (माणूस). ३ सोईचा; सोईस्कर; उपयुक्त; लायू पडणारा (जिन्नस, जागा). ' जमीन पडीत जमाखेरीज लायक–जिराईत. ' –वाडसनदा ९१. ४ (गंजिफा) उतारी करतेवेळीं उतरावयाजोगा (हुकूम). [अर. लाइक्] **लायकी, लायकपण**–स्त्री. १ औचित्य; योग्यपणा (शब्द, कृति यांचा). २ सामर्थ्य; योग्यता (माणसाची) ३ जुळतेपणा; योग्य मिळणी (वस्तु, स्थळ इ०ची). [फा. लायकी] **लायकीचा दाखला**–पु. योग्यतापत्र; शिफारसपत्र; (इं.) सर्टिफिकेट.

लायणें—क्रि. (कों.) लावणें पहा. –लोक २.८०.

लायनी—स्त्री. अपशब्द, शिवी. 'रयतीस लायनी सिवीगाली न करणें व तश्रीस न देणें. ' –रा १६.२९. [अर. लअन]

लायरी—स्त्री. (मुंबई) भिजास. [लहरी, लाहरी]

लारांज—न. (गो.) साखरलिंबू. [पोर्तु.]

लारी—स्त्री. एक जुनें चांदीचें नाणें. आकार लहान चिमटया सारखा, किंमत साधारणपणें आठ आणे. ' होन एकुनु लारी ६ ' –भाद्विसंवृ ४८.

लाल—वि. प्रिय; प्रियकर; आवडीचा (माणूस). ' या जगांत खेरेखुरे सरस्वतीचे लाल कितीसे सांपडतील ? '–विवि ८.८.१४३. –होला १२०. [सं.] **०बनणें**–(व) श्रीमंत, गब्बर होणें. **लालटा**–पु मुलगा; पुत्र. –वि. (हिं.) बहुमानार्थी महाराज, साहेब या प्रकारचें विशेषण.

लाल—पु. १ एक रत्न; माणीक. २ एक पक्षी. –प्रला १३. –वि. १ तांबडा; रक्त (रंग, कपडा इ०). २ अतिशय तांबडा (तांबडा शब्दार्थी जोडून). ' या पागोटयाचा रंग तांबडा लाल आहे. ' ३ मूर्ख. [फा. लाल्] **०अंगार होणें**–(व.) अतिशय रागावणें. **०कांगोणी**–स्त्री. एक झाड. कांगोणी पहा. **०गंध**–न. (व.) वाङ्निश्चयाचें साक्ष गंध. ' त्याचें लालगंध झालें'=लग्नाची तिथी ठरली ! **०गेरू**–पु. गेरूचा एक प्रकार. **०पिशी**–गव्हाची एक जात. –मुंव्या ४२. **०बावटा**–पु. १ प्रतिकूल परिस्थिति. (क्रि० दाखविणें). २ समाजसत्तावादी मजुरांचें निशाण. **०बोर**–वि. विशिष्ट रंगाचा (घोडा). ' घोडा अस्सल कावुलाचा। लाल–बोर टाकम तुरकी। ' –पला ४.२६. **०बुझकड–भुजःकड**–पु. (हिं.) दीडशहाणा, स्वतःला हुषार समजणारा परंतु खरोखर मूर्ख व अज्ञानी असणारा (इसम). लालबुझकड या

नांवाची अशी एक व्यक्ति होती म्हणतात. **०भडक, ०लाल-भडक**-वि. अतिशय तांबडा; अत्यंत गर्द तांबडा; भडक तांबडया रंगाचा. **०वट**-वि. १ लालसर; तांबडसर. २ अतिशय, भडक तांबडा. [लाल+वत्] **लालट**-वि. लालसर. ' पूर्व दिशाही लालट झाली अरुणोदय होउनी। ' -रत्न ४.२. **लालटपणा**-पु. किंचित् लालपणा. ' नंतर लालटपणा आला. ' -वज्राघात ४९. **लाली**-स्त्री. रक्तिमा; तांबडेपणा. [फा.]

लालच, लालचखोर—पु. लालूच, लालूचखोर पहा. **लालचणें, लालचावणें**-अक्रि. १ लोभाविष्ट होणें. २ संवकणें; आमिष लागणें. **लालचाई**-स्त्री. लालूच, लालची पहा.

लालची—स्त्री. १ लालसा; लोभाविष्टता; इच्छा; लोभ; काम. २ लालूच; लांच. (क्रि० दाखविणें). -वि. लोभी; लालूचखोर [सं. लालसा]

लालझगडा-डें—पु न. प्रीतिकलह. लाडझगडा पहा.

लालचेल—वि. १ लोभी; अभिलाषी. २ जास्त लालचावलेला; लोभाकुल. [लालच]

लालटिन-टैन, लालटेम—पु. (व. हिं.) हातकंदील. ' लालटिन हातांत येऊन जा. ' [इं. लॅन्टर्न]

लालडी—स्त्री हलक्या जातीचा लाल; एक रत्न; माणकाचा तुकडा (नथेंत घालतात.) ' राधा-कृष्णलाल आम्ही लालडी त्या। ' -रासक्रीडा २.

लालणें—क्रि. लालन करणें; संगोपन करणें; लाड करणें; संभाळणें. ' पाहुनि घेउनि सेउनि लालुनि पावनसंस्कृतिबंधनिवृत्ता। ' -निमारामायण ४.३०. [सं. लालन]

लालन—न. १ पुत्र इ० कांस मागितलेला पदार्थ द्यावा, करतील तसें करूं द्यावें, त्याजवर माया करावी, चुंबनालिंगनादि करावें इत्यादिकेंकरून त्याचें मन संतुष्ट करण्याचा जो व्यापार तें; लाड; खुशामत. ' दुर्मत्रेंनृपसंगतीस्तव यती कीं पुत्रही लालनें। ' -वामन, स्फुट श्लोक १५ (नवनीत १३४). २ संगोपन; पाळण. -ज्ञा १०.२. [सं.] **०पालन**-न. १ लालन; लाड; लालनाचें आधिक्यदर्शकरूप २ सांभाळ; संगोपन; पालनपोषण.

लालमो—पु. (कु.) एका माशाचें नांव.

लालस—पु. १ औत्सुक्य; तत्परता. २ कोड; लडिवाळपणा. ' एके जनलीला विलासें। एके पालनशीले लालसें। ' -ज्ञा ११. १३०. -वि. तत्पर; उत्सुक. ' दासी तुझी परम लालस वाट पाहे। ' -सारुह ५.१०३. [सं.] **लालसा**-स्त्री. अतिशय आवड; जबर इच्छा; अभिलाष; आकांक्षा. ' तयाही हा ऐसा। लोभें वेतसां जरी लालसा। ' -ज्ञा १८.३९२. [सं.]

लालाभाईचा चुरमा, लालाभाईचुरमा—पु. १ प्रत्येकाला प्रत्येक गोष्टीची चैन, रेलचेल, मुबलकता; कल्पतरु असणें. २ रंगविलासाची झोड; बेसुमार चैन, मौज. [लालाभाई=एका वैरागयाचें नांव+चुरमा] **म्ह०** लालभाईचा चुरमा आणि शेटजी सडक.

लालामेह—पु. तंतुमय लाळेसारखी लघवी; एक प्रकारचा परमा. [सं.]

लालित—वि. १ लाडका; आवडता. २ ज्याचें लालन केलें आहे तो. [सं. लल्=विलास करणें; लाड करणें]

लालित्य—न. आंतील प्रेमविकारामुळें बायकांच्या ठिकाणीं उत्पन्न होणारी विशेष कृति-आळसानें अंग टाकणें, कोमल दृष्टीनें पाहणें, नाजूक विकाराचे द्योतक असे इतर हावभाव करणें. २ सौंदर्य; शोभा; मोहकता; ललितपणा. ' प्रत्येक धंद्यांत लालित्य उत्पन्न करण्याची त्या त्या धंद्याचीं विशिष्ट तत्त्वें असतात. ' ३ काव्य, प्रबंध, भाषण इ० त अर्थ-पदरचनाकृत सौन्दर्य. उदा० अर्थ-लालित्य; वाक्यलालित्य; रसलालित्य; शब्द अथवा स्वर-लालित्य. [सं.]

लालुचणें—अक्रि. लालसा धरणें; लालूच वाटणें; इच्छा होणें; आकांक्षा धरणें. लालचणें पहा. [लालूच]

लालुप्य—न. आसक्ति. [सं. लोलुप्य]

लालूच—स्त्री. १ लोभ; हांव. २ आमिष; मधाचें बोट. (क्रि० दाखवणें, लावणें) [सं. लालसा; हिं. लालच] **०खोर**-वि. लोभी; लाचची.

लालें—न. ओष्ठबंधन; मुकेपणा [फा. लाल्]

लालहात—वि. (महानु.) रमणीय; सुंदर. '। जंव तारुण्याचा पडिभरु। तंव लालहात दिसे। ' -ज्ञाप्र ७६०. ' तो बाळाकरूं बाळु। लालहातु दिसे। ' -शिशु ३०४. [सं. ललित]

लाव—अ. साहित्य; लवाजमा (जमा. किंवा) लष्कर शब्दाला जोडून येतो. ' लाव-लष्कर फौजेचा थाट। '-होपो १८.

लाव—पु. निशाण. [अर. लीवा]

लाव—पु. एक पक्षी; लांवा. [सं.]

लांव—स्त्री. १ एक राक्षसी; लांस; जखीण; हडळ; हडळी; पिशाच्च. (हलक्या जातींत हिची उपासना आहे.) -ज्ञा ७. १४७. ' कपाटें उघडी नरनायका। लांव पाठीं लागली ' -मुहरिश्चंद्राख्यान (नवनीत पृ. २०८). २ (ल.) ओंगळ, दुष्ट, घातकी स्त्री. ' तशा जावा लांवा उचित करणी ते दुषणदा। ' -मराधा ६९. ३ कजाग, कोपिष्ट स्त्री.

लावक—पु. एक पक्षी; लावा. हा पक्षी फार स्त्रीलंपट असतो. ' बंधूसि बंधु पाहे माराया लावकासि लावकसा। ' -मोभीष्म ३.५०. [सं.]

लावक—न. १ भांडण; तंटा. २ कुरापत; लावालावी. ' कांई लावकैआं केउतें। ' -शिशु ११६. [लावणें]

लावगन—स्त्री. लागवण; लागवड. 'लावणसहित पूगी फल वृक्षभूमि ...' –शके ११८१ चा बप्प चालुक्य ताम्रपट.

लावण, लावणिक—वि. खारट; खारें; क्षारयुक्त. [सं.]

लावणी—स्त्री. १ एक प्रकारची कविता, गाणें, चीज. ही खास महाराष्ट्रीय आहे. हींत शृंगार, वैराग्य वगैरे विषय दृष्टीस पडतात. लावणी बहुधा पहाडी, काफी वगैरे रागांत गाईलेली ऐकूं येते. [लावणें]॰**बाज**-वि.१ लावण्या म्हणणारा. २(ल.)तमासगीर.

लावणी—स्त्री. १ लागवडीचें व पेरणीचें काम; लावण्याचा व्यापार (रोपें, ढाळया इ० जमिनींत). 'गुडघ्यावेरी चिखल जाहला आतां करूं लावणी । संपवूं काम गीत गाऊनी ।' २ जमीन पिकायोग्य करणें; वहीत करणें. ३ गणना; संख्या. 'या निरूपणाचेनि नांवें । अध्यायपद सोळावें । लावणी पाहतां जाणावें । मागिला वरी ।'–ज्ञा १६.६३. ४ स्थापना; मांडणी. 'ऐसी देतां उलठणी । अनुराग रोपाची लावणी ।' –शिशु ६८१. ५ (गो.) रतीब्ब. 'दूधाची लावणी दुसरीकडे लावुंक जाय' (दुधाचा रतीब दुसरीकडे लावला पाहिजे). ६ जडवणूक; शृंगार; आरास. 'अवघी जडिताची लावणी ।' –ऐपो १५. [सं. लापन ?]

(वाप्र.) ॰लावणें–क्रि. १ तुलना करणें. 'कृष्णागरु आणि मलयानिल । लावणी लावितां मोल तुटे ।' –भवि २.२४. २ व्यवहारीं उपयोग करणें. 'वर्तेल्यावीण शिकवी । ब्रह्मज्ञान लावणी लावी' –दा २.१०.३६. सामाशब्द– **॰अळपणी**–स्त्री. (व्यापकार्थी) पेरणीमळणी; अव्वल तें अखेरपर्यंतचें सर्व शेतकाम. **॰उगवणी**–स्त्री. शेतपेरणी, सारा वसुली इ०. **॰कमज्यास्ती टिपण**–न. लागवडीसंबंधाचें कच्चें टिपण. विशिष्ट काळांतील पडीत–वहीत जमीनीचा हिशोब. **॰जुंपणी**–१ नांगरणी, जुंपणी इ०; लागवडीचीं कामें सर्व मिळून किंवा निरनिराळीं. 'आमची लावणीजुंपणी आटपली–उरकली–संपली–अगदीं बुडाली–बरी पिकली.' 'लावणीजुंपणी मला कांहीं येत नाहीं.' २ जडविणें; स्थापणें; जुंपणें; मार्गाला लावणें; सांखळींत बसविणें. **॰टुपणी**–स्त्री. (व्यापकार्थी) सर्व शेतकाम; कृषिकर्म; लागवड. 'परगणे मजकुराची लावणीटुपणी उत्तम प्रकारें करून ...' –वाडबाबा १.८४. [लावणी द्वि.] **॰पत्रक**–न. लागवडीखालीं आणलेल्या (वहीत) जमीनीचा तक्ता; गांवची खातेवारी वही. [लावणी+पत्रक] **॰मांडणी**–स्त्री. (व्यापकार्थी) लागवण; लागवडीला आणणें. [लावणें+मांडणें] **॰संचणी**–लावणीटुपणी पहा. 'आपल्या तालुक्याची लावणीसंचणी करून सुखरूप राहणें.' –वाडबाबा १.१५७. **लावणीचा**–वि. आपल्या आपण झालेलें नव्हे; लावणी करून केलेलें (वृक्षादि). 'लावणीचा ऊंस काय माय प्रकाश वर्णावया' –वसा २६.

लावणें—न. (झाडांची रोपांची) लागवड; स्थापना; लावणी. –सक्रि. १ जोडून ठेवणें; लावून ठेवणें; जुळविणें; बसविणें; चिकटविणें. 'पत्र नाटपेड न व्हावें म्हणून त्यास तिकीट लावावें' २ पाठविणें; धाडणें; मार्गावर सोडणें. 'सगळें खटले घराकडे लावलें, मग मी निघून आलों.' 'वित्तेशाकडे विमान । रामभद्रें लाविलें ।' –मोरा १.२४८. ३ पगारपत्रक, बील वगैरे रुजू करणें; सादर करणें (फेडीसाठीं); पटविणें. ४ बसविणें; वरती स्थापना करणें; वसाहत करणें (गांव प्रदेश इ०ची). ५ (दुकान इ०) घालणें; उघडणें. ६ (जहाज, बोट) नांगरणें. ७ कुळास (जमीन) लागवडीसाठीं देणें. ८ (ल.) हांकलून देणें; बाहेर घालविणें. 'नातरि बैल विकूनि गोठा । पुंसा लावोनि बांधिजे गांठा । इया करणी वीं चेष्टा । कांइ हंसो ।' –ज्ञा १३.२३३. ९ पेटविणें. 'लाखेचें करावें दामोदर । त्यांत घालावे पंडुकुमर । कोणा नेणतां मंदिर । लावावें तुवां ।' –कथा ५.११.९६७. १० तोडणें; कापणें. 'तयाचें जें कर्मसांडण । तें तया पै मी म्हणें । शिसाराचें रागें लावणें । शिसचि जैसें ।' –ज्ञा १८.१७९. ११ नाहींसें करणें. 'तैसें आत्मनाथाचिया आधी । लाऊनि विषयविषाची बाधी ।' –ज्ञा १६.१८८. १२ ओळीनें मांडणें; हारीनें ठेवणें; जुळविणें; व्यवस्थित करणें. 'गंजिफा लावण्यांत येतात.' १३ व्यवस्थित, जागच्याजागीं ठेवणें. 'विमान लाविलें अंतराळी । सर्व शोधोनि वनस्थळी ।' –कथा २.९.२०. १४ आरोपणें; मार्थीं मारणें; अंगीं लावणें (दोष इ०). 'दुसऱ्यास दोष लावण्यास जागा राहणार नाहीं.' –विवि ८.११.२०८. 'देव आपणाला पाप लावील असा लोकसमज होता.' –कोरकि ४४१. १५ लावणी करणें; पेरणें. 'अगोदर रोप तयार करून मागून भात लावावें. १६ करणें, देणें, योजणें, आणणें इ० अर्थीहि वापरतात. उदा० धार लावणें; तजवीज लावणें, लाज लावणें इ०. १७ लागणें पहा.[सं लापन ?]

लावून घेणें–(बायकी) वेढून घेणें (वस्त्र). **लावून पाहणें**–(एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाशीं) ताडून पाहणें; परस्परांची किंमत, योग्यता इ० ठरविणें. **लावून बोलणें**–टोमणें मारणें; दुसऱ्याला झोंबतील अशीं विधानें करणें.

लावण्य—न. १ सौंदर्य; रूप. –ज्ञा १.४. २ शोभा; दिमाख. ३ खारटपणा; क्षारता. [सं.] **॰खाणी**–स्त्री. (सौंदर्याची खाण) बायकांच्या अंगची सुंदरता व मोहकपणा या गुणांना उद्देशून हा शब्द योजतात. (सामा.) सुंदरी. 'लावण्यखाणी । हस्तिनीवरून उतरे ते क्षणीं ।' अत्यंत, अपरंपार सौन्दर्य असणाऱ्या व्यक्तीला म्हणतात.

लावतोड, लांवतोड—स्त्री. १ अत्यंत पराकाष्ठेची घाई, लगबग. 'कामाची–देण्याघेण्याची–जाण्यायेण्याची–लावतोड' २ घाईमुळें चित्ताला वाटणारी अस्वस्थता; जिवाची त्रेधा; मनाला त्रास. 'जिवाची–प्राणाची–अंतःकरणाची लावतोड.' ३ कामामध्यें केलेली किंवा करावी लागणारी धांवपळ; धडपड; उतावळेपणा;

घाई इ०. ४ जोराची, निकराची ओढाताण. ५ अत्यंत जोराचें, कडाक्याचें भांडण. [लावणें+तोडणें; किंवा लांव (राक्षसी)-लांवा(पक्षी) यांचें तोडणें]

लावपिसा—पु. एक क्रूर प्राणी. लांव पहा. ' रानगाई रानम्हैसे । रानशकटे आणि रिमे । रानहाती लावपिसे ।'-दा३.७.९.

लावबाज—वि. लाव्याकडील कामगार; लावा पक्षी धरणारा. ' तेथें आज्ञा कीं, रामचंद्र पायेदामी व महादजी खपाणा लावबाज पाठविले आहेत. ' -पेद ८.२७. [लाव+फा. बाज]

लावरा—पु. लहान कोंबडयासारखा एक जंगली प्राणी; यांचें मांस खातात. -बदलापूर १०४.

लावलद्—वि. निपुत्रिक. ' तो लावलद्, लेकीन हिले हयात असतां सुतवन्ना (दत्तक) पुत्र घेतला. ' -रा २२.१०३. [अर्. लावलद्]

लावलिजाव—वि. (क.) जुजबी; तात्पुरतें. ' लावलिजाव काम करून कसें चालेल ? '

लांवसट—स्त्री. राक्षसी; डाकीण; जखीण; लांव पहा. -वि. ढालगज याअर्थी योजतात. **लांवसटणें, लावसरणें, लांवारणें**-क्रि. लांवसटीपासुन बाधा-त्रास-पीडा होणें (फळ, दूध, इ०स). नारळ, ताडफळ इ० फळासंबंधानें लांवसरणें हेंच क्रियापद बहुधा योजलें जातें.

लावा—पु. (क.) लाहो पहा. एकसारखी तीच गोष्ट करणें; धोशा; तडाखा लावणें. ' त्यानें शिव्यांचा लावा घेतला. ' [लाहो]

लावा, लांवा—पु. एक पक्षी; लाहूर. -सारुह ३.४७. ' गरुड म्हणतां प्रतिभटा वांचेल कसा म्हणोनि ओ लावा । ' -मोविराट १.१११. [सं. लावक]

लावा—पु (काव्य) (शोभा येण्यासाठीं, खुलविण्यासाठीं) पदरचें घातलेले शब्द; तिखटमीठ; साफपुफी; मसाला; झिलाई. [लावणें]

लावा—पु. (कु.) तुकडा (मांसाचा).

लावा—पु. खेळ; लीला. ' लाविसि कां बोल ? हें तुझे लावे। ' -मोउद्योग १०.११०. [लावणें]

लावारिस—वि. ज्याला कोणी वारस नाहीं असा; बिनवारशी. [फा. ला=नाहीं या अर्थी प्रत्यय+वारिस=वारस]

लावालाव, लावालावी—स्त्री. १ तुकडयाला तुकडा, वस्तूला वस्तु जोडणें; वाढविणें. २ नीट, व्यवस्थित करणें; मांडणी. ३ (ल.) खुलण्यासाठीं भर घालणें; तिखटमीठ, मसाला घालणें. लावा पहा. ४ इकडील हकीकत तिकडे, तिकडील इकडे जाऊन सांगणें व अशा रीतीनें दोघांचें आपआपसांत भांडण लावणें; चुगली; चहाडी; कलागत. ' त्याची माता असे म्हातारी । तिनें लावालावी केली उत्तरीं । ' -कथा ४.६.१५५. [लावणें द्वि.]

लाविरा-वि. लावालावी करणारा.

लांव्ह, लांव्हा, लांव्हारणें—लांव,लांवा लावारणें इ०पहा.

लाव्हर—स्त्री. कोंकरूं; कोंकरी (एक वर्षाचे आंतील वयाची); लाहोर.

लाशा—वि. १ लास (डाग) दिल्यासारखें चिन्ह ज्या आम्रादि फलावर असतें तो. २ लासाचे चिन्हानें युक्त असा (मनुष्यादि); डागलेला. [लास] **लांशें**-न. काळा डाग. [लास] **लास**-पु. १ वायुविकृति किंवा अन्य रोग इ० च्या निरसनार्थ त्वचा तापलेल्या लोखंडानें भाजणें; डागणी. (क्रि० देणें, घेणें). ' अज्ञानाचें लांशें । जेथ लागलेंचि न दीसे । ' -भाए ५८९. २ अशी त्वचा भाजून पडलेला डाग किंवा वण. ३ जन्मापासुन माणसाच्या तोंड इ०वर जो तांबडा, काळा, पिवळा इ० रंगाचा डाग असतो तो; तीळ; लांग. ४ आंबा इ० फळ अंशतः सडल्याचा जो डाग सालीवर उत्पन्न होतो तो. -न. अंगावरील केंसाळ तीळ (मागील जन्माची खूण समजतात) [सं. लाछ्, लांछन] **लासणी**-स्त्री. १ तापलेल्या लोखंडानें दिलेली डागणी. (क्रि० करणें). २ (विणकाम) शाई, कोळसा इ० नीं विणावयाच्या वस्त्राच्या ताण्यावर केलेली खूण; लासन. [लास] **लासणें**-सक्रि. १ विस्तवांत घालून लाल केलेल्या लोखंडाचा डाग देणें; भाजणें. २ कोणत्याहि कारणासाठीं (त्वचा किंवा पृष्ठभाग) भाजून, डागून खूण करणें. ३ पाजणीनंतर (ताण्याला) लासें लावणें, खुणा करणें. ४ भाजणें; जाळणें. ' मूर्खा, दीपा पतं । स्वमनिं जन्हि म्हणे ' हे खरें फूल' लासी । ' -मोकृष्ण ५६.३९. -दा ३.७.२५. -दा १०.१०.६१. -अक्रि. १ जळणें. ' कपडा लासेल ! जरा इस्त्री थंड कर. ' २ बिघडणें; डागळणें (फळ इ०). **लांसरूं**-नपु. केंसाळ तीळ; वांग; लांस. **लासें**-न. १ डाग; वण. लास पहा. ' परी गुणत्रय वर्से । त्रिविधपणाचें लासें । श्रद्धे जें उठिलें असें । ते वोळख तूं । ' -ज्ञा १७.७३. २ (विणकाम) लास; लासणी पहा. (क्रि० लावणें).

लास—पु. (नाविक) वल्ह्याचें टोंक जमीन इ०वर टेंकून होडी मागें ढकलणें. (क्रि० धरणें; करणें)

लास—स्त्री. (हिं. गु.) कलेवर. ' तों एका लहान मुलाची लास तेथें झांकून ठेवलेली तिला दिसली. ' -मौज २.६.३०. [फा. हिं. लाश्]

लास—पु. (चांभारी) जोडयांत आकार येण्यासाठीं घालावयाचा लांकडी ठोकळा; पायाचा ठोकळा; कलबूत. ' किती नंबराची लास घेऊं ? '

लांस—स्त्री. १ एक राक्षसी; लांव पहा. २ लांडगी; वृकी; कोल्ही.

लांस—स्त्री. (कों.) एक प्रकारची माती. रंग आणि मेण मिसळून करतात.

लांस घालप—क्रि. (गो.) लिलांव बोलणें.

लासन—न. कापड किती विणलें गेलें हें मोजण्यासाठीं त्यास दोन हातावर खुणा करतात त्या प्रत्येकी. लासणी पहा. ०काठी—स्त्री. सणंग (कापडी वस्त्र) मोजण्याचें व खुणा करण्याचें साधन.

लांसरू—न. लांस; राक्षसी (तुच्छतेनें स्त्रीस योजतात). लास पहा.

लांसरू, लासूर—न. १ नेत्ररोग. नासुर पहा. 'डोळे लाल असुन एकाला लासरूं असल्यामुळें त्यांतून पाणी गळत होतें.' –सूर्योदय ८८. **लासु**–पु. (महानु.) २ चामखीळ; नासरू. एक डोळ्यांचा रोग. 'तुझिये माया शक्तीचा डोळे लासु लागला ब्रह्मादिका' –भाए ५३५.

लासा—वि. (सामा.) लाशा पहा.

लांसी—स्त्री. १ डाकीण; राक्षसी; लास. 'पाठीं लागलीमें लांसी । इच्छा जिते जैसी तैसी ।' –तुगा ११९५. २ मांजरी. –ज्ञा १३.२५१. 'अथवा लांसीचे दांत अति तीख । येरां दिसती परि पिलियां सुख ।' –स्वादि १२.३.५६. –तुगा. ३ कोल्ही. 'तंवतंव डांडाति उठी । रसना लांसि ।' –भाए १९७.

लास्य—न. एक नृत्य; सुकुमार व शृंगाररसपोषक नाच. –ज्ञा १७.८. 'लास्य आणि तांडव । दोन्ही नृत्याचे भाव । लास्यकला माधव । दावीतसे तेधवां ।' –ह ५.५६. [सं.]

लाह—पु. छंद; नाद. लाहो पहा. 'तेणें निदसुरपणाचेनि लाहें । कर्माकर्माचें पसरी पाये । हिताहित कोण पाहे । देहमोहें मोहितु ।' –एभा १०.३१६. [सं. लाभ; प्रा. लाह]

लाहकी—स्त्री. (अव. लाहक्या) १ उकळी; अतिशय उष्णतेमुळें खालवर, घालमेल होणें; लहालहा होणें. (क्रि० मारणें; देणें; टाकणें). २ अंगाचा दाह, तलखी होणें; राग किंवा त्रास होणें. 'अंगाची व शरीराची लाहकी झाली.' ३ लाहो; एकसारखा ध्यास; हट्ट धरणें (लहान मुलानें); जीव काढणें. (क्रि० देणें; टाकणें; वर प्रत्यय लावून). ४ उत्कट इच्छा. ५ (माण.) त्वरा; घाई (कार्यसिद्धीची). 'बसा हो ! काय लाहकी आहे, जाल आतां !' [लहा, लाही] **लाहकणें**-क्रि. (व.) धापा टाकणें; तगमग करणें (उन्हानें).

लाहंगड, लाहंचट, लाहंचड, लाहंचर, लाहन, लाहनखुरी, लाहनगा, लाहंचर लाहांगड, लाहांचट, लाहांचड, लाहांचर, लाहान, लाहानखुरी, लाहालाहा—लहांगड, लहांचट इ० पहा. (लाहा–नें आरंभ होणारें रूप अयोग्य, अमान्य आहे.)

लाहडा—पु. तगमग; अतिशय जोर; भर. ताप, देवी, गोवर, खरूज ह्या शब्दांना जोडून येतो. जसें–तापाचा–देवीचा–गोवराचा–खरजेचा–कांजण्याचा–लाहडा. 'तापानें–देवीनें–खरजेनें–कांजण्यानें–उन्हानें लाहडा.' [लहा]

लाहडा—पु. १ लगदा; राडा; गोळा (गूळ, चिखल इ० चा) २ गुंता; गुंतागुंत; मिसळ.

लाहडा—वि. अत्यंत लाचावलेला; मागें लागलेला; आसक्त; अत्यंत शोकी, नादी; हावरा (चांगल्या आणि वाईट अर्थानें). [लाह]

लाहणा—पु. प्राप्ति; उत्पन्न; लाभ. 'म्हणोनि इये–अध्यायीं । निरूप्य नुरेचि कांहीं । आतां गुरुशिष्या दोहीं । स्नेहो लाहणा ।' –ज्ञा १६.४६. –वि. १ लाभदायक; नफा देणारा. 'गुरु उपदेश नाहीं लाहणा ।' –दावि १५०. २ प्राप्त होणारा; मिळणारा. 'येतुलेनि पंडुसुता । अनुभव लाहाणा आयिता ।' –ज्ञा १३.१०४८. ३ आवडता; स्वाधीन. 'एवं भाविकू देवाचा लाहणा –एभा २५.६२०. [सं. लाभ; प्रा. लाह] **लाहणी**–स्त्री. प्राप्ति; लाभ. 'परि समयीं झाली सुदैव गति लाहणी ।' –राला १०. **लाहणें**–अक्रि. १ प्राप्त होणें; मिळणें (नफा, लाभ म्हणून). –ज्ञा १.७७. 'तुजदेखत मीं जयासि लाहेन ।'–मोकर्ण ३४.२६. २ लाभणें. लाधणें पहा. 'मेलाचि मरोनि लाहे । गेलाचि जावोनि लाहे । कर्मवशें ।' ३ उत्पन्न होणें; फळ मिळणें. 'जैसें पेरिले लाहणें ।' –कृमुरा ४२.५८. 'लाहोनि इच्छेसारिखें फळ ।' –मुआदि ३.७२. ४ धजणें; धैर्य करणें. 'परि अपराधु तो आणीक आहे । जें मी गीताधु कवळुं पाहे । ते अवधारा विनवूं लाहें । म्हणऊनियां ।' –ज्ञा १.६६. ५ शेवट होणें; फळ मिळणें; परिणामीं हातीं येणें. 'नातरी जैसें तोय । साखर घालितां गुळचट होय । लवण मिळवितां पाहे । क्षारत्व लाहे तत्काळ ।' [सं. लभ्; प्रा. लह]

लाहणी—स्त्री. कापणी. [सं. लापन]

लाहणी—स्त्री. (उच्चारदोषामुळें) राहणी पहा.

लाहणी—स्त्री. ठाणवाई (दिव्याची).

लाहयकी—स्त्री. (ना.) लाहकी; त्वरा; घाई.

लाहरी, लाहारी—स्त्री. लारी; जुन्या काळचें चार–पांच आणे किंमतीचें एक चांदीचें नाणें. साडेतीन मोठ्या लाहरींचा व चार लहान लाहरींचा एक रुपाया होतो. 'लाहरी रजतवर्ती' –राव्य २.८.

लाहलाहात, लाहलाहत—वि. लुसलुशीत. 'पुढां उपरति रागें लोहिवी । धर्म मोक्षाची शाखा पालवी । लाहलाहात नित्य नवी । वाढतीचि असे ।' –ज्ञा १५.१९४. [लाह+लाह]

लाहवा—पु. लावा पक्षी. 'लाहवे रावे ।'–दावि २४४. [लाव]

लाहा—स्त्री. अतिशय इच्छा. लाह–हो पहा. –भाए ५१४. **लाहाइजणें**–क्रि. लाभणें; लाहणें. ' दैवयोगें ब्रह्मवाणि । जरी न लाहाइजेचि श्रवणीं । ' –ऋ ३.

लाहा—पु. लास; अंगावरील तीळ. ' तम म्हणजे काळिमा । एया लाहासें । जैसें अवघें आंग गौर वर्ण परि कणु एक अनदृश्य । ' –चक्रधर सिद्धांतसूत्रें ३६. [लास]

लाहा—पु. नादारी. ' मुंबई, कलकत्ता, मद्रास वगैरे मोठ्या शहरांत लाहा घेण्याचा स्वतंत्र कायदा आहे. ' –घका १३४.

लाहांकणें—क्रि. (महानु.) शोक, दुःख करणें. ' जेवीं अपत्य मातेशीं चुके । तें भेवतें पाहे तेवि भेके । हिंपुटी होउनी लाहांके । जियापरी । ' –ज्ञाप्र ९९७.

लाहाणा—वि. १ लाभदायक. लाहगा पहा. २ लाभ करून घेणारा. ' साधकहि येथ लाहाणा । जो या साधना साधूं जाणे । ' –एभा११.१०७. **लाहाणी**–स्त्री. प्राप्ति. लाहणी पहा. **लाहार्णे**–न. १ प्रेम; निष्ठा. ' नवल भावार्थाचा महिमा । मज विश्वात्म्याचा झाले आत्मा । ऐसें लाहार्णे तया आम्हा । मज पुरुषोत्तमा वश केलें । ' –एभा ११.१५५९. २ ऐक्य. ३ प्राप्ति. ' जयां मोक्षाचें लाहार्णे ।' –ज्ञाप्र ८९४. –क्रि. प्राप्त होणें. लाहणें पहा. ' लाहोनि उत्तम शरीर । व्यर्थ विषयासक्ती नर । ' –एभा २०.१९३. **लाहातें**–न. प्राप्ति; लाभ. ' जीवा नाहीं कुडीचें लाहातें । ये भिन्नभिन्न पंचभूतें । ' –तुगा ७१३.

लाहान—वि. लहान पहा. **लाहानाळणें**–क्रि. कमी होणें. लहानाळणें पहा. ' अन्नरसें वाढे शरीर । शरीराप्रमाणें विचार । वृद्धपणी · तदनंतर । दोन्ही लाहानाळतीं । ' –दा १३.९.६; ९.९.३४.

लाहानवति—क्रि. गाळीव माती; वाळू. तयांची लाहानवती । मळिजे वातपीति । ' –भाए ४०१; १९३.

लहापाहा—वि. (व.) तेजदार; तजेलदार. ' पिकें लाहापाहा दिसतात. ' [लखपख]

लाहाबरा—वि. (व.) कोणतेंहि काम हावरेपणानें, गडबडीनें करणारा. ' भारी लाहाबरा आहे तो मनुष्य. ' [हिं.लहबर ?]

लाहासी—स्त्री. लांस; लासी; राक्षसी. ' लाहासि अविद्येचिआं । ' –दाव ४४६.

लाहासें—न. काळिमा. लांस, लासें पहा. ' अज्ञानाचें लाहासें जेथ । लागलेचि न दिसे । ' –भाए ५८९.

लाहिरी—स्त्री. (मुंबई) मिजास. [लहरी]

लाहिरी—स्त्री. चटणी. –वदलापूर १४८.

लाही—स्त्री. १ तांदूळ, मका, जोंधळा इ० भाजून फुलविलेला पदार्थ, दाणा. ' काळानलीं द्रिष्टि चमू घातली लाही । '–मोरा१.३८८. –मध्व ५९५. २ तुरटी, मोरचूद वगैरेपासून वरीलप्रमाणेंच केलेला पदार्थ. ' टांकणखाराचा स्फटिक उष्ण केला म्हणजे त्याची लाही होते. '–पदाव ११५. सामान्यतः अनेकवचनी (लाह्या) उपयोग. ३ हल्ला. ' मोगल व भोसले यांची लाही येऊन मौजे मजकूर दरोबस्त लुटला '–समा १.७.४ अतिशय रागामुळें(अंगाची होणारी) तलखी; आग; काहली; दाह इ० [सं. लाजा; हिं. लाई; सं. लांजिका–लाई आ–लाया–लाह्या–भाअ १८३२] ०**उडणें**–क्रि. १ (गोळथांची–जरीमरीची–शिव्यांची–पायपोसांची लाही) भराभर, सपाटयांत भडिमार,वर्षाव होणें. २ (दाण्याची, आंब्यांची इ०) तडकाफडकी विक्री होणें. ०**फुटणें**–मोठा मारा होऊन नाश होणें. ' अठरा घटका लाही फुटली । ' –ऐपो २२४. ०**भाजणें**–१ (अंगाची) गदमदणें; उवगणें. २ (उन्हाची) कडकडीत ऊन असणें; उन्हाच्या झळा येणें, लागणें. ०**होऊन जाणें**–संतापणें. ०**लाही होणें**–रागानें अंगाची आग होणें. ' हा अत्याचार पाहून सारखी लाही·लाही होत होती. '–स्वप १४५. ०**पीठ**–न. लाह्यांचें पीठ (जोंधळ्याच्या) ०**सांडगे**–पुअव. कोहळे सोलून किसल्यावर त्यांत मीठ-मसाला घालून लांबट आकाराचे गोळे करून वाळवितात व तळून उपयोगांत आणतात. –गृशि ३६९. **लाह्याचा मान**–लग्नसमारंभांत लाजाहोमानंतर वरपक्षाकडून वधूपक्षाकडील लाह्या घालणाराला नारळ पागोटें वगैरेचा केलेला आहेर.

लाहु-हू—पु लाहो पहा. ' पुढें गुण काय विसरावे आणखी भेटु नेत्र घेति लाहु । '–सला ७९.

लाहूर—नपु. लावापक्षी [सं. लावक]

लाहेंलाहें—क्रिवि. त्वरेनें; लगबगीनें. ' लाहेंलाह तांतडी । पुढती पंक्ती बैसावया ' –हवि ३४.८४. [लहालहा]

लाहो—पु. १ छंद; नाद; हव्यास. ' राम राम स्मरा आधीं । लाहो करा गाठ घाला मूहबंदी ' –तुगा ३४४२. २ अत्यंत लोभ; हावरेपणा; अतृप्तता. (क्रि० घेणें). ' भुल्ला भक्तिभावें । लाहो घेतला देहीं । ' –भज ७५. ३ प्राप्ति; फायदा; लाभ. ' प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला । तो भलाभला । '. ' अश्रु-नीर पुसि, दे सुख-लाहो । ' –वामन भरतभाव ६९. ४ टाहो; हट्ट; सारखा आक्रोश. ' शोकांतही घे प्रभुनाम लाहो । ' –वामन, भरतभाव ३०. [सं लाभ; प्रा. लाह]

लाहो—पु. त्वरा; घाई; जलदी. ' ऐसें वरचिलीचि बरवा । सुख जावों लागले फावा । तंव रसस्वादाचिया हांवा । लाहो केला । ' –ज्ञा ७.१९१.

लाहोजाळ—पु लोखंडी शस्त्रें. ' लवलवीत लाहोजाळ ' । –उषा ४८. [सं. लोह+जाल ?]

लाहोटा—पु. १ फार लोभीपणा; हांवरेपणा. २ उत्कट इच्छा; आकांक्षा. (क्रि० घेणें) [लाहो]

लाहोरी—वि. लाहोरचा (साबण, साबू). [लाहोर]

लाहार—स्त्री. एक वर्षाची शेळी. लाव्हर पहा.

लाह्य, लाह्यलाह्य—क्रिवि.स्त्री. लहालहा पहा.

लाह्यकी—स्त्री. (व. ना.) घाई; त्वरा. लाहकी पहा.

लाह्या—स्त्रीअव. मुलींचा एक खेळ. -मखेपु ३००.

लाहूलाणें—क्रि. तळमळणें; लाहालाहा करणें. 'घेऊनि अज्ञानें उसंगिए। आर्ती लाहूलाति जिये।' -ऋ २. [लहा]

लाळ—स्त्री. १ काटयाचें बारीक टोंक; कूस; तूस (धान्याचें). (क्रि० शिरणें; राहणें; काढणें). २ विंचवाच्या नांगीचें टोंक.

लाळ—स्त्री. १ मुखरस; तोंडाला सुटणारें पाणी; खाण्याचा पदार्थ तोंडांत घालून चर्वण करीत असतां तो घशाखालीं उतरण्यासाठीं व पचनास मदत होण्यासाठीं मिश्रणाचा स्वाभाविक पातळ पदार्थ. २ जनावरांना होणारा एक रोग. याचेमुळें त्यांच्या तोंडातून लाळ किंवा पाणी गळतें व कित्येक वेळां त्यांच्या खुरांतून पाणी वाहूं लागून ते सडूं लागतात. (क्रि० येणें; जाणें). [सं. लाला] (वाप्र.) **०उठणें**-तोंडास पाणी सुटणें. 'परी अमृताही उठी लाळ।'-अमृ १०.२०. **०गळणें**-(ल) दृढ स्नेहमैत्री असणें. 'काय त्या दोघांची लाळ गळती.' **०गाळणें**-अतोनात किंवा फाजील स्तुति करणें. 'राजांच्या पदरीं लाळ गाळणारे पुष्कळ असतात.' **०घोटणें**-१ तोंडाला पाणी सुटणें; अभिलाष धरणें. 'देखुनी तुझें रूप वेडावलें भूप। अंतरीं घोटिती लाळा' -मध्व ३४; -ह ३४७. २ लांगूलचालन करणें. 'विश्वामित्रानें मेनकेपुढें लाळ घोटावी?' -नारुह ३.४७. **लाळेनें चणे भिजवून खाणें**-(आपल्याच लाळेनें चणे भिजवून खाणें) मिळावयाचा अगर मिळणार अशी खात्री असलेला योग्य मान वगैरे तो मिळाला नसतांहि पुढें अद्याप मिळेल अशा आशेवर स्वतःचें समाधान मानून घेणें; दुसऱ्यानें न केला तरी स्वतःच स्वतःचा गौरव करून घेणें. **लाळणें**-अक्रि. १ लाळ गाळणें; लाळ पाझरणें. २ लाळ गळण्याच्या विकारानें दुःख होणें. **लाळी, लाळेरें**-स्त्रीन. लहान मुलाच्या तोंडातून गळणारी लाळ घरण्यासाठीं गळ्यांत अडकविलेला कापडाचा अगर रबराचा तुकडा. **लाळें**-न. जनावरास होणारा एक रोग. **लाळ्या**-पु. (कों.) सारखी लाळ गाळणारा मनुष्य.

लाळणें, लाळघणें—क्रि. लाड करणें. 'तूं पिता जालासी। फुन लाळॐनी कहीं न बोलाविसी।' -शिशु १०२; -ज्ञा २.३५० [सं. लल्]

लाळणें—अक्रि. लळलळ करणें (जीभ); बाहेर लोळणें, लोंबणें. 'डोलवी मस्तक जिव्हा लाळी।' -दा १.२.८८. जिव्हा लाळी वेळो वेळां। भयानक।' -दा ३.१०.५.

लाळें—न. घोडयाच्या सरोसरीस किंवा म्होरकीस खालच्या बाजूस एक अवयव असतो. ज्यास जेरबंद किंवा दवासन बांधितात तें.

लाळेमुळे—पुअव एक प्रकारचे मासे. -प्राणिमो ८१.

लाक्षणिक—वि. १ लक्षणेनें जाणावयाचा जो अर्थ तो, लक्षणासंबंधी. २ सांकेतिक; सांज्ञिक. ३ वैशिष्ट्यबोधक; दिग्दर्शक; ज्ञापक. 'ज्याप्रमाणें आल्कोहोलांत हैभा हा समूह लाक्षणिक असतो तसा आल्डिहाइडांत काहैभा हा असतो.' -सेंपू ३. ४ अलंकारिक; औपचारिक. ५ अप्रत्यक्ष; गौण. [सं.] **लाक्षण्य**-वि. लक्षणांनीं, गुणधर्मांच्या योगानें ओळखतां येणारे. [सं.]

लाक्षा—स्त्री. लाख. [सं.] **०जोहर**-न. लाखेच्या घरांचें जळणें; लाक्षागृहदहन: (पांडवांना जाळण्यासाठीं कौरवांनीं केलेलें). 'पांडव निमाले लाक्षा जोहरीं।' लाखाजोहर पहा. **०तेल**-न. लाखेपासुन काढलेलें तेल (औषधोपयोगी)

लाक्षायणी—स्त्री.लक्ष तीर्थांचें स्थान. 'लक्षतीर्थे जेथें मज्जना सर्वदां। लाक्षायणी सदां वास तेथें।' -ब २.५.

लाक्षारस—पु. दहाभाग लोध्र, त्याच्या दहाव्या हिश्शानें सज्जीखार, थोडी बोरीचीं पानें व सोळापट पाणी घालून केलेला काढा. -योग १.१८९. [सं.]

लि॥—(संक्षेप) लिहिलें; लिखित.

लिई(ही)न—क्रिवि. (खा. भिली.) घेऊन. 'हाकाल लकडी लिईन आवजा.' -भिर.

लिंक—स्त्री. सांखळीची एक कडी; एक इंग्रजी रेषापरिमाण; एका सांखळीचा शतांश; ७.९२. इंच. [इं. लिंक=सांखळीचा दुवा]

लिकचोरी—स्त्री. चोरून केलेलें काम; गौप्य. **लिका(की) चोरी**-स्त्री. चोरून काम करण्याची पद्धत. लिकचोरी पहा. [लिकणें+चोरी] **लिकून चोरून**-क्रिवि. लपूनछपून; चोरूनमारून; गुप्तपणें; लबाडीनें; दडून. [लिकणें+चोरणें] **लिक्कीर**-वि. (कों.) लबाड; गुप्तपणें काम करणारा; खोल वृत्तीचा; एखाद्या कामांत आपलें अंग असतांना नाहीं असें दाखविणारा. [लिकणें]

लिकटणें—अक्रि. चिकटणें; चिकटून राहणें.

लिकंडाव—पु. (कों.) लपंडाव. [लिकणें+डाव]

लिकडें, लिकडेंमिकडें—लिखडें, लिखडेंमिखडें इ० पहा.

लिकण—स्त्री. लपून बसण्याची जागा; दडण्याची जागा; दडी; आडोशाची जागा. [लिकणें=लपणें; हिं.] **लिकणें**-अक्रि. लपणें; दडणें; छपणें. [सं. लुप्? हिं. लुकना; प्रा. लुक्क]

लिकलिकणें—अक्रि. लुकलुकणें; मंद प्रकाशानें चमकणें; मध्यें मध्येंच एकदम चमकणें; (बारीक पदार्थ) थांबून थांबून प्रकाशित होणें; (लकलकणें व लिकलिकणें या दोन शब्दांच्या अर्थांत थोडा भेद आहे). [ध्व; किंवा सं. लोक्] **लिकलिकी**-स्त्री. मरणवेळचा किंवा आजारपणांतील डोळ्यांतील निस्तेजपणा; मिचमिचीतपणा; फिकटपणा; मालवत्या दिव्याचा अंधुक उजेड; किंचित् चकाकी; चमक; लुकलुकी. (क्रि० राहणें; होणें; करणें;

दिसणें) (लिकलिकी आणि लकलकी यांच्यांत भिन्नता आहे. पहिल्याचा अर्थ चमक किंवा अंधुक तेज असा आहे व दुसऱ्याचा लख्ख प्रकाश, झगझगीत उजेड, डोळे दिपवून टाकणारा प्रखर प्रकाश असा आहे). -वि विलकिलीत; थोडी उघडलेली. 'माडीवरील मंडळीपैकीं एक अमळ खिडकी लिकलिकी करून खालीं पाही.' -नि ३४५. **लिकलिकीत**-वि. चमकणारा; लुकलुकणारा; चकचकीत. मध्येंच चमकणारा; थांबून थांबून प्रकाशणारा; चंचल प्रकाशयुक्त. अंधुक प्रकाशाचा; जात आलेल्या तेजाचा.

लिकघणें—सक्रि. लपविणें.

लिका—स्त्रीअव. (कु.) लिखा; उवांची अंडी.

लिखडें—न. लहान आकाराचा दागिना; बारिक दागिना. **०मिखडें**-न. किड्कमिड्क; बारीकसारीक दागिना. (-अव.) लिखडीं मिखडीं.

लिखणें—सक्रि. (काव्य. कुण.) लिहिणें. [सं. लिख् ; हिं. लिखना] **लिखन**-न. १ लिहिणें; लेखन. २ लिहिलेला कागद; लिखाण; लिहिलेलें पुस्तक. [सं.] **लिखा**-पु. १ लेख; दस्तऐवज. २ हिशेबाच्या; नोंदीच्या (वह्या). ' यजमानकृत्याच्या लिख्याच्या व नामावळीच्या वह्या त्रिवर्ग सरकृत्यांनीं नेल्या आहेत.' -वाडसमा ३.६४. **म्ह०** एक लिखा हजार बखा. (बखा हें रूप बका 'बक' चे अनेकवचन. आहे. यमक साधण्यासाठीं क चा ख झाला). **लिखाई**-स्त्री. १ लिहिणावळ; लिहिण्याबद्दल द्यावयाचें मोल. २ लेखन; लिहिणें. ३ हस्ताक्षर; अक्षर; लेख. **लिखाण**-न. लेख लिहिणें; लेखन; हस्ताक्षर; पत्र. **लिखापटी**-स्त्री. (खा.) वारंवार पडणारा पत्रव्यवहाराचा त्रास. **लिखापढा-पुसा**-पु. १ कायद्याचे, फिर्यादीचे, सरकारी कामाचे कागद. २ दस्तऐवज; लेख; सनद; **लेखपत्र**. ३ (सामा.) कोणताहि लेख; लिखाण. -वि. सुशिक्षित. [हिं. लिखना+पढना] **लिखापढी**-स्त्री. लेखी व्यवहार; कागदावर लिहिलें जाणें; निश्चित होणें. (क्रि० करणें.) **लिखावट**-स्त्री. लिखाई; लेख लिहिणें; लिपी. **लिखित**-न. पत्र; चिठ्ठी; लेख (हातांनीं लिहिलेला). ' लिखित पाठविलें सकळ नृपां कैसें । ' -र ११३. -वि. १ लिहिलेलें. २ काढलेलें; आंखलेलें, रेखाटलेलें; चित्रित. [सं.] **लिखितार्थ**-पु पत्रीं लिहिलेला मजकूर; एखाद्या पत्राचा, लेखाचा अर्थ-सारांश-उद्देश इ० **लिखें**-न. लिखाण; लेखन. ' बसोन ससांग लिखें करी । ' -दावि २५१. [सं. लिख्=लिहिणें]

लिखा—स्त्रीअव. उवेची अंडी. (-एव.) लीख. [सं. लिक्षा; प्रा. लिक्खा] **लिखी**-स्त्री. लिखा काढण्याची लांबट फणी. **लिखो**-स्त्री. (कु.) उवा.

लिख्या—वि. बारीक; लहान (डोळा). [सं. लिख्या-खसखस]

लिंग—न. १ पुरुषाचें जननेंद्रिय; शिश्न. २ (व्याकरण स्त्रीपुरुषत्वभेद; पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग अशीं तीन लिंगें व्याकरणांत आहेत. ३ शंकराची विशिष्ट प्रतिमा; ईश्वरप्रतिमा; शंकर; शिवलिंग. ' दुर्दम काळासि जसा लंघाया विश्वनायका लिंगा । ' -मोभीष्म ३.३७. ४ आराध्यदैवत. ' तंव वैकुंठपिठीचें लिंग । जो निगमपद्माचा पराग । जिये जयाचेनि हें जग । अंगच्छाया । ' -ज्ञा १७.४६. ५ लिंगाईत लोकांच्या नांवापुढील प्रतिष्ठावाचक शब्द. उदा० सदलिंग; दादलिंग. ६ लिंगाईत लोक गळ्यांत बांधतात तो शिवस्वरूप कवचसहित खडा. ७ खूण; चिन्ह; लक्षण; स्वरूपबोधक चिन्ह. ' आतां शांतीचें जी लिंग । तें व्यक्त मज सांग । ' -ज्ञा १६.१३६. ८ (सांख्य मताप्रमाणें) प्रकृति; सृष्टींतील चिच्छक्ति. ९ (ल.) अडथळा; उपाधि; ज्याच्या योगानें मनुष्य बांधला जातो-त्याची स्वतंत्रता जाते-अशी गोष्ट; अडचण; त्रास. (क्रि० लागणें; अडकणें; असणें). [सं. लिंग्=चालणें, हालणें] **लिंगविभक्ति संभाळून बोलणें**-व्याकरणशुद्ध बोलणें. **०देह-शरीर**-पुन. सूक्ष्म देह; वासनात्मक शरीर. मन बुद्धि, दशेंद्रियें व पंचप्राण इतक्या सतरा तत्त्वांचा हा देह असतो. ' जालिया लिंगशरीराचा भंगु । चुके निरयस्वर्गाचा मार्गु । स्वभावेंचि । ' **०भद्र**-न. कीर्तिमुखादि विशिष्ट आकृति; यंत्र. ' वोडविजेति लिंगभद्रें । नवीं नवीं । ' -ऋ ७८. **०भेद**-पु. १ सूक्ष्मदेहभेद; लिंगदेहाचा भेद. २ पूज्यांचा उच्छेद. ' हें झुंज नव्हे प्रमादु । एथ प्रवर्तलिया दिसतसे बाधु । हा उघडा लिंगभेदु । वोढवला आम्हां । ' -ज्ञा २.३१. ३ वैषम्य; विषमता; फरक; भेद. ' तेथ मी नमस्कारा । लागिं उरों दुसरा । तरी लिंग भेद पाहा । जोडूं जावों । ' -अमृ १ ५१. **०भेद विशिष्ट आकर्षण**-न. भिन्न लिंगांच्या माणसांचें परस्परांकडे आकर्षण. ' आतां पुंस्तकें वाचून लिंगभेदविशिष्ट आकर्षण असें मी म्हणेन. ' -सुदे १०१. (इं.) सेक्स्चुअल अट्रॅक्शन्. **०वंत, लिंगायत**-पु. शिवाचे उपासक. हा एक पंथ आहे. या पंथाचे लोक गळ्यांत लिंग घालतात. **०व्रण**-पु. लिंगक्षत; शिश्नाला पडणारे चट्टे. **०शरीर**-न. लिंगदेह; सूक्ष्मशरीर. याच्या उलट स्थूलशरीर. **लिंगाड**-वि. (निंदेनें) लिंगाची पूजा करणारा; लिंगाईत. **लिंगशा**-वि. (कों.) चेंगटपा; धिमा; थंड; मंदगति; आळसट; काम करण्यांत मंद. **लिंगस्ता(स्था)ई, लिंगिस्ताई**-स्त्री. (कों.). मंदपणा; आळशीपणा; कोणत्याहि कामांतील थंडपणा; धिम्मेपणा. **लिंगडणें**-अक्रि. (अडथळा; अडचण इ०) चिकटणें; बिलगणें; न निघे असें चिकटणें. **लिंगाईत**-लिंगवंत पहा. **लिंगाध्यास**-पु. वासना तादात्म्य. **लिंगायत**-पु. लिंगाईत, लिंगवंत. **लिंग्या**-पु. (निंदेनें) लिंगाईत; लिंगडा. ' पंथ क्रमति नित्य बरोबर लिंग्या घेऊनी । ' -प्रला ३३.

लिगट(ड)णें—सक्रि. चिकटणें; लागणें; स्पर्शणें. 'अश्वभारांमाजीं लिगटले। उन्मत्त नागभार उठावले।' –ह २२.५३. 'मीपण सांडूनि लिगटा।' –दावि ४१६.

लिंगड—स्त्री. (हेट.) निगुडी; निगड; एक वृक्षविशेष.

लिगडेझगडें—न. (कु.) खोट्या भांडणानें स्वार्थ साधणें.

लिगाड—न. १ लचांड; लटांबर; कटकट; अडचण; पंचाईत; बंधन; संकट; कोणतेंहि त्रासदायक काम किंवा परिस्थिति. 'कैसें कराल तें नेणें। लिगाडाच्या गुणें।' –तुगा १२५४. २ चिकटा; चिकटपणा. 'तोही (गुळ) ठेवितां लिगाड धरी।' –एभा १६.१९. **लिगाडी-ड्या**–वि. लचांडखोर; खोडसाळ; उलाढाल्या; कचाट्या; भांडण लावणारा; भयंकर भानगडी करणारा. 'देव लिगाड्या देव लिगाड्या। तुका म्हणे भाड्या देवें ठकी।' –तुगा ३६९९.

लिगाड—न. एक कसरतीचा खेळ. (क्रि० दोंचणें). 'लिगाड इत्यादि कसरतीचीं कामें बायकामुलें करून दाखवीत.' –स्वप ३१.

लिंगी—स्त्री. एक औषधी वनस्पती.

लिंगोरची—स्त्री. लगोरीचा खेळ. (हा शब्द प्रचारांत कमी आहे) (–अव.) लिंगोरच्या.

लिचक, लिच्चक—वि. (ना.) दिरंगाईचा; चिकट; वेळमोड्या. **०घणाणा**–पु. (ना.) कामाचा घातलेला घोळ; कामांची खोटी; काम लांबणीवर टाकणें.

लिचं(चां)ड, लिचांडखोर—लचांड, लचांडखोर इ० पहा.

लिचपिच—क्रिवि. वेताची छडी, बारीक काठी; शिमटी, इत्यादीस जो एकदम बांक येतो त्याचा निदर्शक शब्द. **लिचपिचीत**–वि. १ लवचीक; बारीक; थोड्याशा भारानें सुध्दां लिचपिच लवणारा; घटमूठ नव्हे असा. २ (ल.) अशक्त; क्षीण; दुर्बळ; निस्तेज.

लिचाड—न. (कु.) नेत्रविष्ठा; चिपड.

लिची—स्त्री. एक फळझाड. हीं झाडें बंगाल, लखनौ, अलाहाबाद, सहाराणपूर या प्रदेशांत फार होतात. यांचीं फळें भुरक्या रंगाचीं बारीक काट्यांनीं युक्त व रुचीला आंबट–गोड अशीं असतात.

लिचीडा, लिचो(चों)डा—पु. (ना.) अंगाला घेतलेला चिमटा; चिमकोरा.

लिचोड—पु. (ना व.) पिसू; घाणेरडेपणामुळें मनुष्याच्या व ढोरांच्या अंगावर होणारे कीटक प्रत्येकी.

लिटकणें—अक्रि. चिकटणें; बिलगणें; चिकटून बसणें. [लिकटणें पासून वर्णव्यत्यासानें]

लिटी—स्त्री. (कों.) अगदीं लहान आंब्याची जात; लहान फळ; विटकी.

लिडविडणें—अक्रि. लडबडणें; हलणें; ढिलेपणामुळें झोके खाणें; ढिलावणें. –सक्रि. माखणें; शिडबिडीत होणें; लडबडीत होणें; लेपटलेलें असणें. 'नरकाचें कोठार भरलें। आंत बाहेरी लिडबिडिलें।' –दा ३.१.१८. [लडबडणें] **लिडबिडीत**–वि. १ लडबडीत; शेण, माती इ० नीं माखलेलें, भरलेलें. २ ढिलें; लुटलुटीत; हलतांना कुरकुर आवाज होणारें.

लिडग्या—वि. (राजा.) शरीरानें अशक्त, रोड असें (मूल.)

लितणें—क्रि. (महानु.) माखणें; माखलेलें असणें. 'घेइ आइ। आंतु तऱ्ही लीतैल।' –दृष्टांतपाठ ४४. [लिंपणें]

लिथन—न. दुसऱ्याकडून यावयाचें येणें येईपर्यंत त्याची वस्तु अडकवून ठेवण्याचा हक्क.

लिथाडणें—अक्रि. बरबटणें; भरलेला असणें; माखलेला असणें. 'कामक्रोधें लिथाडला। तो कैसा म्हणावा भला।' –दा १.१.२५.

लिथाडणें—उक्रि. लाथाडणें; पायाखालीं तुडविणें. 'थोरपणासि पाडिलें। वैभवासि लिथाडिलें।' –दा ५.९.३८. [सं. लत्ता]

लिथियम—पु. एक धातुरूप रासायनिक मूलद्रव्य. या धातूचा रंग रुप्यासारखा असून हा धातु पाण्यापेक्षां हलका आहे. हा हवेंत ठेवल्यास गंजतो. लिथियमयुक्त पाण्याचा उपयोग संधिवात झालेल्या मनुष्याला औषध म्हणून देण्याकरितां करतात. –ज्ञाको (ल) ४१.

लिदवळ—वि. (कों.) १ घोड्याची लीद खाणारें (जनावर). २ (ल.) लाचखाऊ; भाडोत्री; हलकट; पैशासाठीं घाणेरडें काम करणारा. [लीद] **लिदाड**–न. घोड्याच्या लिदीची रास; उकिरडा.

लिधा—क्रि. (कातवडी) घेतला. 'तिनी पोटीं जन्म लिधा.' –मसाप २.१. [लेणें=घेणें]

लिनेट, लिनत—पु. एक पक्षी. –प्राणिमो ६२.

लिपडा—वि. निप्राण; अशक्त; कमकुवत; बारीक; रोड.

लिपंडाव—पु लपंडाव पहा.

लिपडें—न. (कर) लुगडें (हा शब्द बागवानांत रूढ आहे).

लिपण—न. (कु.) कांट्यांच्या शिऱ्यांची वई; कुंपण.

लिपण—स्त्री. १ लपण्याची जागा. २ झांकण; आच्छादन; [लिपणें] **लिपणी**–स्त्री. (कों.) लपणें; लपंडाव.

लिंपण—नस्त्री. १ धान्य वगैरे नासुं नये म्हणून कणगी इ० भांड्याला चिखल, शेण इ० चें दिलेलें सारवण–लेप–आच्छादन. (क्रि० घालणें). **लिंपणी**–स्त्री. सारवण; लेप; आच्छादन;

माखण. ३ सारवलेली स्थिति; माखलेली, लेप घेतलेली अवस्था. ४ (ल.) कुभांड; किटाळ; बालंट; दोष; कलंक. (क्रि० लावणें) [सं. लिप्=लिंपणें] **लिंपणें**-न. कोठ्यास शेण थापून बंद करणें; लिंपण अर्थ १ पहा. ' सर्वही धान्यासी लिंपणें घालोनि । ' -रामदासी २.१३६. **लिंपाण**-न. (कु.) चोरांस चढतां येऊं नये म्हणून नारळीच्या झाडाला केलेलें कांटेरी फांद्यांचें वेष्टन.

लिं(लि)पणें—सक्रि. १ लेपानें बुजविणें; थापणें; चोपडणें; भोकें, खळ्या इ० बुजून पडलेली भित, कूड, बील इ० चांगलें होण्यासारखें शेण, चिखल इ०चा लेप देणें. २ चिखल, चुना इ०चे गोळे मारून चूल, ओटा इ० रचणें-तयार करणें-घालणें. ३ भिजणें; लिप्त होणें. ' तो वर्मे करी सकळ । परि कर्मबंधा नाकळे । जैसें न लिंपे जळीं जळें । पद्मपत्र । ' -माज्ञा५.५०. ४ (ल.) दोष लागणें. ' परी त्याचेनि वेव्हारें न लिंपिजे तो । ' -विपू १.१०८.

लिंपणें—अक्रि. लपणें; दडणें; लपून किंवा दडून राहणें, बसणें; दडी मारून राहणें. [लपणें]

लिपि—स्त्री. १ लेखनपद्धति; हस्ताक्षर; अक्षरें. २ लीप; भाषेंतील निरनिराळ्या ध्वनींचें पृथक्करण करून त्यांपासुन वर्णमालायुक्त अक्षरें तयार झालीं त्यास लिपि ही संज्ञा आहे. ५ भाषा; लेखन; लेख. ' इहीं बोधार्चीं रोपें लुंचिलीं । सुखाची लिपी पुसिली । ' -ज्ञा ३.२५४. ३ रंग देणें, भरणें; चित्रें काढणें; आकृति; चिन्ह. ४ लेप; माखण; सारवण; लिंपण. [सं.] **०मात्र**-वि. निरर्थक; तथ्य नसलेलें (पुस्तक लिखाण). **म्ह०** लिपिमात्र पुस्तक योनिमात्र स्त्री. ' **०लेखन**-न. कारकुनी; लिहिण्याचें काम.

लिप्त—वि. १ माखलेलें; सारवलेलें; लेपयुक्त. २ व्यापलेला; पूर्णपणें गुरफटलेला; (संकटांत, अडचणींत) सांपडलेला. ३ दूषित; गुन्ह्यांत सांपडलेला; गुन्ह्याचा आरोप आलेला [सं. लिप्=लिंपणें] **लिप्ताळा**-वि. १ गुन्ह्यांत सांपडलेला; गुन्ह्याचा आरोप आलेला; दूषित; एखाद्या कृत्यांत गोंवला गेलेला, गुरफटलेला. २ ओशाळा; मिंधा; अंकित; अधीन; दुसऱ्यानें केलेल्या उपकारांनीं मिंधा बनलेला; उपकाराच्या ओझ्याखालीं वांकलेला. **लिप्ताळणें**-अक्रि. दूषित होणें; बाधा पावणें; अंगावर येणें, शेकणें; दोषारोप केला जाणें; किटाळ, गुन्हा, आरोप घेला जाणें.

लिप्सा—स्त्री. लोभ; मिळण्याची इच्छा; आकांक्षा. [सं.] **लिप्सु**-वि. मिळण्याची इच्छा करणारा; आकांक्षी; लोभी; शोधणारा; मिळवूं पहाणारा. [सं.]

लिफाप-पा-फा—पु. पत्रवेष्टन; पाकीट; लखोटा; मळपृष्ठ. [अर. लिफाफा]

लिंब—पु. १ कडूनिंब. २ बकाणा निंब. [सं. निम्ब; प्रा. लिम्ब किंवा निंब]

लिंबडथा—पु. कडूनिंब.

लिंबन्हाण—न. नवऱ्या मुलाच्या किंवा नवरीच्या आजीला तांदुळाच्या पिठाच्या लिंबाएवढ्या गोळ्यांनीं व पाण्यानें घालावयाचें स्नान. मुलाला लग्नाआधीं व मुलीला लग्नानंतर वरातीच्या आधीं हें स्नान घालतात. ही चाल हबसाणांत आहे. -मसाप १.११. [लिंबू+न्हाण]

लिंबलिंबीत—वि. १ लबलबीत; पाणथळ; पाणेरलेला; फार मऊ. २ बिलबिलीत; अति पिकून मऊ झालेला; थलथलीत. [ध्व.]

लिंबलोण, लिंबा, लिंबारा, लिंबी, लिंबुनी, लिंबू, लिंबूण, लिंबूर, लिंबोटी, लिंबोणी, लिंबोर, लिंबोळी, लिमचा—हे सर्व शब्द लोकांच्या बोलण्यांत असले तरी निंबलोण, निंबा इ० शब्दांचीं अशुद्ध रूपें होत. म्हणून निंबलोण इ० पहा. **लिंबू तोंडावर फुटणें**-तोंडावर तजेला, टवटवी येणें; तोंड तेजस्वी दिसणें. ' अलीकडे त्याच्या तोंडावर लिंबू फुटलें आहे जसें कांहीं. '

लिंबा—वि. १ दुबळा; अशक्त; कमजोर; लेंबाडथा. २ सैल किंवा कमजोर बांधणीचा.

लिबाज—पु. थाट; ऐश्वर्य. ' मोठ्या लिबाजानें गोरे कँपांत रेसिडेन्ट साहेबांच्या बंगल्यांत । ' -गापो ११८. [अर. लिबास]

लिंबा(भा)रा—पु. १ निंबाऱ्याहून निराळें, एका जातीचें झाड. २ निंबारा हाहि अर्थ आहे.

लिबा(भा)स—पु. १ वेष; पोशाख; पेहेराव; वस्त्रें; (राजदरबार किंवा समाज यांतील दर्जा दाखविणारा) पोशाख. ' नारीचे दिपले डोळे लिबास पाहून । ' -पला ७९. २ लबाजमा; डौल. [अर. लिबास] **लिबासी**-वि. खोटें; कृत्रिम; बनावट; तकलुबी; कपटानें बनविलेलें. ' हे नकल लिबासी आहे ' -रा २०.६२.

लिंमणें—अक्रि. (गो.) हुंगण धुणें; गुदप्रक्षालन करणें.

लिमलेट—न. लिंबू व साखर यांपासुन केलेली मिठाई. [इं० लेमोनेड]

लियाकत—स्त्री. योग्यता; सामर्थ्य. [अर. लायक]

लिलाम, लिलांव—पु. १ हरास; हरराजी; जाहीरपणें सर्वांत जास्त किंमत बोलणारास माल विकणें. २ (क्र.) वरील तऱ्हेनें विकलेला माल. [पोर्तु. निलामु.] **०दार**-पु. लिलांव करणारा; लिलांव पुकारणारा.

लिवका—वि. (कों.) १ लवचीक; लवणारा; वांकणारा; लवका. २ (राजा.) ढिला; सैल; अंगांत बळकटी नसलेला; लिडबिडीत. [लवणें]

लिवचीक—वि. लवचीक; ताणला जाणारा; वाकणारा; लवणारा; लवका.

लिवणं—न. (कुण.) लिहिणें; विद्या. **लिवणें**–सक्रि. (कुण.) लिहिणें. [सं. लिप्. –भाअ १८३४.]

लिवलिवणें—अक्रि. इच्छिणें; इच्छेनें हालणें. वळवळ करणें; चुरचुरणें. ' जीभ फार लिवलिवते आहे. '

लिवलिवीत—वि ताठ नसलेला; लवचीक; मजबूत नसलेला; चिवट; स्थितिस्थापक; मऊ आणि ढिला; मृदु आणि शिथिल.

लिवा—पु. जिल्हे. [फा.] –मुसलमानी मुलखांतील मुशाफरी.

लिव्हणें—सक्रि. (काव्य) लिहिणें. ' लिव्हलिव्होनि कवण सुरत । ' –दावि १८०.

लिसा—स्त्री. बारीक कणांची दमट साखर; पिठी साखर.

लिसाळ—वि. ढिसाळ; थिलथिलीत; फोफशा.

लिसेंस—न. (गो.) परवाना; परवानगी. ' दुकानाचें लिसेंस काढलां मू ? ' [इं० लायसेन्स]

लिहणें—सक्रि. (प्र.) लिहिणें पहा. [सं. लिख्]

लिहाज—पु. छद्मीपणा; लबाडी; फसवेगिरी; ढोंगीपणा. [फा.]

लिहा(इ)जा—अ. म्हणून. –आदिलशाही फरमानें. [फा.]

लिहिणें—सक्रि. १ अक्षरें काढणें; लेखन करणें. २ रचणें; रचना करणें; ग्रंथरचना करणें. ३ चितारणें; चित्रित करणें; आकृति, चित्र काढणें; वेलबुट्टी काढणें. ' पत्रीं लोकत्रयींचे पुरुष लिहिन ते त्वां पहाया बसावें.' –मोकृष्ण ६२.१७.२५३. [सं. लिख् : प्रा. लिह्] ०**पुसणें**-न. लेखन,वाच , हिशोब, इ० विद्या. **लिहिलें पुसलें**-न. १ कायद्याचे किंवा सरकारी कागद; लेख; दस्तऐवज; लेखपत्र सामान्यपणें लेखन. [लिहिणें द्वि.] **म्ह०** (गो.) लिहितां पुसतां, चारी दसरां चलयतां (अटपैल् मनुष्यास उद्देशून योजितात.) ०**वाचणें**-न. लेखन आणि वाचन. **लिहितांवाचतां येणें**–लेखन-वाचन करतां येणें; लिहिण वाचणें जाणणें. साक्षर, सुशिक्षित, होणें. **लिहिणावळ**–स्त्री. लिहिण्याची मजुरी; लिहिण्याकरितां दिलेला पैसा. **लिहिता**–वि. लेखक; ग्रंथकर्ता; लिहिणारा. ' जनार्दनची ग्रंथ लिहिता । सत्य सर्वथा हे वाणी । ' –एरुस्व १८.८२. **लिही**–स्त्री. लेख; लिपी; शब्दोच्चार. ' जेथ शब्दाची लिही पुसे । तेणेंसीं चावळों बैसे । ' –अमृ २.२८. **लिहिलीं**–न.अव. सनदा; लेख. ' अधर्माची अवधी तोडी । दोषांचीं लिहिलीं फाडी । सज्जनाकरवीं गुढी । सुखाची उभवी । ' –ज्ञा ४.५२.

लिळा—स्त्री. खेळ; मौज; करमणुकीच्या गोष्टी करणें [सं लीला] ०**फिरणें**–**बदलणें**–**पालटणें**–अक्रि. (चांगल्यापासून वाईटाकडे किंवा त्याविरुद्ध) वळणें; दिशा–मार्ग बदलणें.

लिक्षा—स्त्री. १ लीख; उवेचें अंडें. २ खसखशीचा दाणा. ६ मोहरीच्या दाण्याच्या एकषोडशांश वजनाइतकें परिमाण.

ली—स्त्री. लेख. लिही पहा. ' तेवीं हे गोष्टी दिमोन आली । कार्यकारण कर्त्याची बोली । आधीं कर्त्याचेचि जेथें ली पुसिली । तेथें कार्यकारण काइसें । ' –स्वादि ८.३.७६. [सं. लिख्]

लीक-ख—स्त्री. १ उवेचें अंडें. २ रेशीमकांठ इ० रेशमाच्या विणकामांत मध्यें रेशीम घट्ट न भरलें गेल्यामुळें मध्यें मध्यें दिसणारा बारीक पांढरा ठिपका. [सं. लिक्षा; फ्रेंचजि. लीख]

लीची—स्त्री. एक प्रकारचें फळ. हीं फळें बिहारमध्यें पुष्कळ होतात. लिची पहा.

लीद—स्त्री. १ हत्ती, घोडा, उंट, गाढव, इ० ची विष्टा; घोड्याच्या लेंड्या. २ एक वेल. [हिं. देप्रा. लद्दी; गु. लीद]

लीन—वि. १ मिसळून गेलेला; एकजीव झालेला; गुप्त; लय पावलेला. ' प्रलयीं सर्व प्रपंच ब्रह्मस्वरूपीं लीन होती. ' २ नम्र; आदरशील; सौम्य वृत्तीचा. ' साधूपाशीं लीन व्हावें. ' [सं. ली= भेटणें; चिकटून असणें] **लीनकरण**-न. (नृत्य) हाताची पताकांजलि करून वक्षःस्थलावर ठेवणें, मान उन्नत करणें, खांदे किंचित् वांकडे करणें.

लीप—स्त्री. लिपि पहा. लेखनपद्धति; अक्षरें किंवा वर्ण लिहिण्याची पद्धति; उच्चारांत येणारे निरनिराळे वर्ण कांहीं एक संकेतानुरोधानें रेषा-चिन्हरूप लिहिण्याची पद्धति. [सं. लिपि]

लीला-ळा—स्त्री. १ क्रीडा; खेळ; कौतुक; मौज; गुण. ' बुझावी हरी तेचि लीळा वदावी । ' –वामन, भामाविलास (नवनीत पृ. ९८). २ सहज घडणारी क्रिया; स्वाभाविक गोष्टकृति. ' जयांचिये लीलेमाजीं नीति। जियाली दिसे। ' –ज्ञा ९. १९२. ३ (लीलावतार याचा संक्षेप) विष्णूचा अवतार. –क्रिवि. (काव्य) सहज; स्वाभाविकपणें; खेळांतल्याप्रमाणें. ' लीला–कमल घेतां हातीं । कृष्णचरण आठवती । ' –एरुस्व ५.६६. [सं. लीला] **लीलाधारी**–पु. अवतार घेणारा. ०**चरित्र**–न. सहज केलेला चमत्कार. ' रविकुळीं अवतरला श्रीधर । कैसे केले लीला–चरित्र । ' –रावि १.१०३. ०**मुद्रा**–स्त्री. खेळकर किंवा आनंदी चेहरा (अर्जदाराच्या केविलवाण्या किंवा आशाळू चेहेऱ्याला उद्देशून कुत्सितपणें उपयोगांत आणण्याखेरीज इतर विशेष उपयोग नाहीं). ०**विग्रह**–पु. लीलेनें धारण केलेलें शरीर; भक्तांच्या इच्छा पुरविण्याकरितां देवानें धारण केलेला देह. ०**विग्रही**–पु लीलेनें देह धारण करणारा; मौजेनें देहधारी झालेला. ' तोचि जाहला जी साकार । लीलाविग्रही श्रीकृष्ण । ' –एरुस्व १.२०. **लीलांजन**–न. नीरांजन. [लीला+अंजन] **लीलाधारण**–न. **लीलावतार**–पु. लीलेनें धारण केलेला अवतार; विष्णूनें केवळ लीला म्हणून घेतलेला अवतार [लीला+अवतार]

लीलावती–स्त्री. खेळकर–विलासी स्त्री; चंचल बाई; कामचेष्टा करणारी स्त्री. २ भास्कराचार्यांचा गणितशास्त्रावरील (त्यांच्या याच नांवाच्या मुलीला उद्देशून लिहिलेला) सुप्रसिद्ध ग्रंथ.

लीली—स्त्री. हिरवें केळें. –कृषि ९०. [गु. लीलुं=हिरवें]

लुकई—पु (सोनारी) गोळा.

लुकड-डा-ड्या—वि. कृश; रोड; बारीक; सडपातळ.

लुकड-ण, लुंकण—न. चिकटवण; डिकवण; एक चिकट पदार्थ; दगड, काष्ठ इ० चा सांधा बसबिण्याकरितां शेंदूर, राळ, चुना, मेण इ० पदार्थ एकत्र करून तयार केलेला रांधा; रोगण; तकाकी आणण्याकरितां लावावयाचा पदार्थ. २ रांध्याचा केलेला लेप, आवरण; पूट. [ते. अलुकु=घराची जमीन किंवा कूड शेणकाल्यानें सारवणें अगर ती क्रिया.]

लुकलुकणें—अक्रि १ चकचकणें; चकाकणें; चमकणें; झळकणें. २ टिकटिकणें; (उजेड) लहान मोठा होत राहणें; एकसारखा नसणें; लिकलिकणें. ३ (चेहरा) तेजस्वी होणें; टवटवीत होणें; तेजःपुंज दिसणें. [सं. लोक्] **लुकलुकी**–स्त्री. १ चकाकी; तेज; चमक; झळक; लकलकी. २ दिव्याचा चंचल प्रकाश; विझत आलेल्या दिव्याचा कमीजास्त होणारा प्रकाश. ३ (ल.) मरणसमयींची जीवाची चंचल स्थिति. ४ (चेहरा, फुलें इ० चा) तजेला; टवटवीतपणा; तरतरी; झळकणारी टवटवी. **लुकलुकीत**–वि. १ प्रकाशणारा; चमकणारा; झळकणारा. २ लुकलुक करणारा; जात आलेला; फडफडणारा; चंचल. (दिव्याचा प्रका.) ३ चकाकणारे, चमकणारे; तेजस्वी; टवटवीत; तकतकीत. (डोळे, चेहरा, झाड, इ०).

लुकसान—नस्त्री. १ नुकसान; हानि; तोटा; नाश. २ दुखापत; जखम. –वि. अशक्त; निर्बल; रद्दी; किरकोळ; निःसत्त्व (प्राणी, पदार्थ). [नुकसान] **लुकसानी**–स्त्री. १ नुकसान; तोटा; नाश; २ हानि (प्राणाची किंवा पदार्थांची) ३ अशक्तता; निर्बलता; निःसत्त्वपणा;

लुका-क्का—वि. १ रोडका; कृश; सडपातळ (माणूस); मरतुकडा. २ धूर्त; कपटी; लुच्चा; नीच; सोदा. ३ कोणत्याहि कामास गेला असतां तें न करितां र र करीत माघारा येणारा; दैवचातुर्यादि हीन (मनुष्य). [अर. लुक्का] **म्ह०** समुद्रास गेला लुका तों सुका.

लुकान—न. कुस्तीचा एक डाव. आपल्या मानेवर जोडीदारानें हात ठेविला असतां त्याच बाजूच्या आपल्या हातानें जोडीदाराची कोपराची लवण आपल्या पंजानें धरून आपला दुसरा हात जोडीदाराच्या मानेवर ठेवून जोडीदाराच्या कोपराच्या लवणींत ठेविलेल्या हातानें त्याचें कोंपर वर झटका देऊन फिरवून जोडीदारास चीत करणें. [हिं. लुका=हलविणें]

लुकुलुकु—क्रिवि. लुकुलुकु पहा.

लुक्कड—वि. अशक्त; किरकोळ; रोड; सडपातळ; कृश. **०पेंच**–पु. कुस्तींतल्या एका पेंचाचें नांव.

लुक्कण—न. लुक्कण पहा. **०पेंच**–पु. कुस्तींतला एक पेंच.

लुक्णा, लुकाना—वि. दडलेला; लपलेला; झांकलेला. [हिं. लुकाना]

लुक्सान—न. (प्र.) नुकसान.

लुख—स्त्री. १ उन्हाचा तडाखा; तिरीप (क्रि० लागणें). २ (गरम पाण्याची) वाफ.

लुखुलुखु—क्रिवि. हालगरा; डळमळीत; ढिला; लटपटीत (खांब, खुंटी, यंत्र, मनुष्य इ० च्या हलु, मंद, निःसत्त्व रीतीचा निदर्शक शब्द); रुखुरुखु; लटपट. (क्रि० हालणें; करणें).

लुगट—न. १ (विशे. मुसईत रूढ) लुगडें. २ (कों.) मेणकापड; कपडा. **लुगटावुं(वों)क**–क्रि. (गो.) कापडावर वारणिसांतून रंग देणें; मेणकापड तयार करणें; कापड मेणानें मढविणें.

लुगडें—न. १ बायकांचें वस्त्र; साधारणतः सोळा हात लांब व दोन हात रुंद कांठपदर असलेलें रंगीत वस्त्र. २ साधारणपणें वस्त्र (पुरुषांचें सुद्धा); धोतर; मानाचा पोशाख; कापड. देशमुख पाटील यांनां पूर्वी वस्त्रें देत त्यांना लुगडीं ही संज्ञा असे. 'ऐसे ठाकले मंडपातळीं । महापंडित भगवीं लुगडी । तो बलदेवास म्हणे वनमाळी । कीं हे पांडव वोळखे ।' –कथा ५ १३.१३. 'लुगडीं दिलीं हेजिबाला ।' –ऐपो १३. [सं. दुकूलम्–दुगूलम्–लुगूडं–लुगडें–भाअ १८३३; गु लुगडुं; सिं. लुगिडो] **म्ह०** सात लुगडीं शेटें उपडी=विपुलतेचा योग्य उपयोग न करणें; विपुलतेचा उपयोग करितां न येणें. **०खण**–पु. लुगडें फाडून केलेला खण.

लुंगणें—अक्रि. १ निर्बल होणें; निःसत्त्व, कमजोर, अशक्त होणें; हालतांचालतां न येण्यासारखी स्थिति होणें. २ त्रस्त होणें; कंटाळणें; दमणें; थकणें. [लंगणें, लंघणें]

लुगदा, लुगदी–धी—पुस्त्री. मऊ व चिकट पदार्थांचा गोळा; वांटलेल्या, मळलेल्या, तिंबलेल्या पदार्थांचा गोळा;(भांग, कणिक, पाला, ओली माती इ० चा) गोळा; लगदा.

लुंगर—स्त्री. उंबराच्या जातीचें एक मोठें झाड.

लुगलुगीत—वि. ओला व मऊ; दमट व मऊ; लिबलिबीत (लोणी, ओली माती, कणिक इ०).

लुंगस—न. १ खरटलेलें व बारीक असें (जोंधळा, बाजरी, गहूं इ० चें) कणीस. २ (कपडा, दोरखंडें यांची) रास; ढीग. ३ कुंचला किंवा इतर केंसांची वस्तु यांचीं टोकें; झिजलेलें टोंक; झिजलेला, घासलेला, दगडाचा किंवा लांकडाचा तुकडा. ४ लुंगी पहा.

लुंगा—पु. १ (राळा, नाचणा, राजगिरा इ०) धान्याचें लहान कणीस. २ शिगरूं; घोड्याचें पोर. ३ लहंगाबद्दल चुकीचा प्रयोग. [दे. लुंगा] **लुंगा, लुंगापुंगा, लुंगासुंगा**–वि. १ बारीक; क्षुद्र, निःसत्व; खुरटलेलें (धान्याचें कणीस, पीक). २ (ल.) अशक्त; किरकोळ; सडपातळ; बारीकसारीक; बुटका; गरीब (मनुष्य, प्राणी). 'शिंद्याचा ज्यान बत्तीस फ्रेंच । ना लुंगा।' –ऐपो ४२३. ३ सामान्य; हलका; कमी योग्यतेचा.

लुगाई—स्त्री. बायको; स्त्री; नारी. 'गुजराथ किहो हिंदुस्थानापासुनि आणली लुगाई।' –सला ७२. [हिं.]

लुगारणें, लुंगाडणें—सक्रि. लुटणें; लुबाडणें; नागविणें; फसवून घेणें. **लुगारणी, लुंगाडणी, लुगारा**–स्त्री. लूट; नागवणूक; फसवणूक; लुबाडणें. **लुगारी–रू, लुंगाड्या**–वि. लुटारू; लुटणारा; नागविणारा; पेंढारी; विशेषतः टिपूकडील कानडी पेंढारी किंवा बाजारखुणगे. हे लोक शत्रूकडील लष्करांत लुटालूट करीत. –ख २०९३.

लुगारी—स्त्री. लोळण; लोळणें. [सं. लुंटन]

लुगी—वि. लहान.

लुंगी—स्त्री. १ चारपांच हात लांबीचें गडद निळ्या किंवा तांबड्या रंगाचें कमरेभोंवतीं गुंडाळण्याचें मुसलमानांचे लहानसें वस्त्र. २ पंचा; धोतर; अरुंद व लांब कापडाची पट्टी; लंगोटी; नेसण्याचें वस्त्र; काचा; पायजमा; पटका. ३ (व.) न्हावी हजामतीचे वेळीं अंगावर केंस पडूं नये म्हणून वापरतो तो कपडा. ४ बाजरीचें नाक; सजगुऱ्याच्या दाण्यावरील बोंड; भूस. 'लुंगी भुस नाहीं कोंडा।' –निगा १०२.

लुंगू-गूं—न. १ बाजरी, राळा इ० धान्याचें बारीक लहानसें कणीस. २ लुंगस पहा.

लुंगूस—स्त्री. (व.) निंबी. 'टोपींतून आंतली लुंगूस दिसूं लागली तरी अद्यापि तो ती टोपी टाकीत नाहीं.'

लुंघणें—अक्रि. थकणें; अशक्त, निर्बल होणें; श्रमणें; दमणें; गळून जाणें; दमून जाणें. [लंघणें]

लुंघणें—अक्रि. लूट केली जाणें; लुटला जाणें; नासधूस होणें (मनुष्य, मालमत्ता इ०ची). **लुंघविणें**–सक्रि. लूट, नासधूस जाळपोळ, नाश करणें; लुटणें; लुबाडणें.

लुघत—स्त्री. जीभ; भाषण; भाषा; शब्द; शब्दकोश.

लुचईपुरी—स्त्री. पुरीचा एक प्रकार. –गृशि २.३६.

लुचक—वि. (गो.) लावालावी करणारा.

लुंचक—पु. (गो) मोठमोठ्या माशांच्या पोटाला चिकटून त्याला ठार मारणारा एक जीव.

लु(लुं)चणें—अक्रि. वासरानें गाईच्या, म्हशीच्या (आपल्या गाईच्या) स्तनांतील दूध पिणें; स्तनपान करणें.

लु(लुं)चणें—सक्रि. १ चिमटयानें केंस उपटणें; केंस काढणें. 'केशश्मश्रू लुंचतां देखा। क्षपणिक तैसे भासती।' –मुआदि ६.५७. २ तोडणें; फाडणें; ओरबाडणें; उपटणें. 'बरें वाईट हा न म्हणेचि कांहीं। पापपुण्य तेंहि लुंचियेलें।' –निगा २६२. [सं. लुछ्]

लुचपत—स्त्री. अन्यायाची प्राप्ति; धन्यास न कळवितां चोरून खाल्लेला पैसा; आडमार्गानें मिळविलेला पैसा; लबाडीनें मिळविलेला पैसा; लांच.

लुचपणें—अक्रि. लंगडणें; उडत उडत चालणें; लंगडत चालणें; थांबणें; थबकत चालणें. **लुचपत-तां**–क्रिवि. लंगडत; थांबत; थबकत; उडतउडत (क्रि० चालणें; जाणें; करणें).

लुचया—स्त्रीअव. चिरोटे; एक पक्वान्न. 'फेण्या खाजी करंजी मृदुतर लुचया शर्करेमाजि घोळी।' –किंसुदाम ३४.

लुचर—स्त्री. (राजा.) (आंबा इ० फळांमध्यें असणारे) तंतूचें जाळें; रेषा.

लुचलुचणें—सक्रि. पंजांत धरून ओढणें; नखानीं ओरबडून घेणें; पंजांत धरून फाडून घेणें.

लुचाडणें—सक्रि. लुबाडणें; दुसऱ्याची वस्तु बळजबरीनें हस्तगत करणें; बुचाडणें; लुटणें; नागविणें. 'दिवाणाचे शिपाई, काजीचे शिपाई वगैरेनीं तीं वांगीं लुच्चाडून घेतलीं.' –तीप्र ८७. **लुचाडणी, लुचाडणूक**–स्त्री. लूट; लुबाडणें; लुटारूपणा; नागवणूक.

लुच्चाबुच्चा, लुच्चाभुंडा, लुच्चामुंडा—वि. उघडा; अलंकारविरहित; नेहमीं असणाऱ्या दागिन्यांविरहित.

लुंचाय, लुच्चेपण—न. (गो.) लुच्चेपणा; लबाडी.

लुंचित—वि. टकल्या; डोक्यावर केंस नसलेला. 'लुंचित नागिवा उघडा।' –दावि १६८. [सं. लुच्; म. लुंचणें]

लुची—वि. रुचिकर अन्न खाणारी (जीभ). [सं. रुचित–लुचिअ–लुची–भाअ १८३४.]

लुचुमुचु—क्रिवि. (गो.) खालींवर; वरखालीं. 'मजो जींव लुचुमुचु जाता.' [ध्व.]

लुचूपुचू—क्रिवि. अस्पष्ट; असेंतसें; भलतें सलतें. 'तेथें कांहीं लुचूपुचू बोलणें नाहीं.' –मोर २३.

लुचौचें—क्रि. (गो.) लुचणें; दूध पिणें; स्तनपान करणें.

लुच्चा—वि. लबाड; सोदा; असभ्य कर्म करणारा; ठक; कुकर्मी; दुराचारी; दुष्ट; दुर्व्यसनी; बदफैली. [हिं; सं. लुब्ध, दूर नेणें; चोरणें; लुब्धक–लुच्चअ–लुच्चा; राजवाडे ग्रंथमाला; फा. लुचा=व्यसनी, बदफैली] **लुच्चाई, लुच्चेगिरी, लुच्चेपणा** (पु.) **लुच्चेशाई**–स्त्री. धूर्तता; ठकबाजी; लबाडी; सोदेगिरी; लुच्चे लोकांचा व्यवहार; लबाडीची वागणूक.

लुंझा—वि. (ना.) ढिला; सैल.

लुटकण-न-र, लुटकणें—लुडकण, लुडकणें पहा.

लुटणें—सक्रि. १ अपहार करणें; लुबाडणें; लूट करणें; नुकसान करणें; नाश करणें; नागविणें; धन हरण करणें; बळजबरीनें किंवा कायद्याच्या जोरावर एखाद्याला किंवा एखाद्याची वस्तु हरण करून नेणें. २ एखाद्याला जिंकणें; त्याचें सर्वस्व हरण करणें. 'भक्ति बळेंचि पहा हो परमेश्वर आजि अर्जुनें लुटिला.' –मोउद्योग. १ [सं. लुंटन, लुट्=चोरणें] **लुटविणें**–सक्रि. १ लुटणेंचें प्रयोजक रूप. २ (लुटण्यास परवानगी देणें.) भरभक्कम (लुटून नेल्याप्रमाणें) देणें; अतिशय देणें. **लुटवैया**–पु. चोर; लुटारू; उधळ्या. [हिं.] **लुटा**–पु. लुटारू. 'कोठें कैचें आले लुटे। वायां झाले टाळकुटे.' (रामदास मूर्खपंचक (नवनीत पृ. १५८). **लुटाऊ**–वि. लुटून आणलेला लुबाडलेला; लुटीचा. **लुटार**–न. १ लुटारू लोकांची टोळी. २ लुटारू लोकांची जातवर्ग; लुटारू लोक. **लुटारा-री-रू**–वि. लुटणारा; लुबाडणारा; दरोडा घालणारा. 'गांवोगांवचे आले लुटारी। तीं धरून घेऊन जाती.'–ऐपो २५९. **लुटालूट**–स्त्री. सर्वत्र चाललेला लुटण्याचा प्रकार. सार्वत्रिक लूट; नाश; जाळपोळ इ०

लुंटणें—अक्रि. लोळणें; लोळण घेणें. लोटांगण घालणें. 'तेयां श्री चक्रधराचा चरणकमळीं लुंटतुसें.' –शिशु ५. [सं. लुट्=लोळणें]

लुटपु(फु)ट—स्त्री. (मुलें, वासरें, खारी, उंदीर इ०ची) घांवपळ; बागडणें; उडया मारणें; धडपड. [ध्व.]

लुटपुट—स्त्री. भरगच्ची; अति विपुलता; भरमसाटपणा. 'दागिन्यांत खुप लुटपुट झाली लवली कदैळी जशी.' –पला ४.३९. [लुट द्वि.]

लुटपुट—वि. थोड; अपुरें; क्षुद्र; बारीकसें; वरवरचें; कमी महत्त्वाचें (काम). –क्रिवि. पळभरांत; झटपट; हां हां म्हणतां. **लुटपुटणें**–अक्रि. खिळखिळी होणें; सैल होणें; कमजोर होणें; फुटणें. 'प्रभाकर गाइ बुट, अपरूप अनुसुट, सारी जुट लुटपुटली.' –प्रला ११२. [लटपटणें]

लुटपुटीचा—वि. लटपटीचा; खोटा; नकली. (लहान मुलांचा खेळ). **लुटुपुटु-फुटु-वुटु-मुटु-फुटया**–वि. (लहान मुलांच्या खेळांत उपयोग.) लटका; कल्पित; खोटा, खरोखरीचा नव्हे असा; मानलेला; फक्त बतावणी केलेला; कल्पिलेला. **लुटुपुटुचा-फुटूचा-वुटूचा-मुटूचा-वुटयांचा**–वि. खोटा; कल्पित; मानलेला.

लुटलुट-टु, लुटुलुटु—क्रिवि. चटपट; चुटुचुटु; झपझप जवळ जवळ परंतु हलक टाकलेल्या पावलांच्या आवाजाचा दर्शक शब्द. [ध्व.]

लुटलुटीत—वि. मध्यम लठ्ठ, पुष्ट, ठेंगणें, वाटोळें असें परंतु जड व सुस्त नव्हे असें (शरीर, शरीरावय अगर मनुष्य). [ध्व.]

लुटुलुटु—क्रिवि. लुटलुट पहा.

लुंठणें—अक्रि. १ लोळणें. 'तरंग सर्वांगीं तोय चुंची। प्रभा सर्वत्र विलसे बिंबी। नाना अवकाश नभीं। लुंठतु जैसा।'–ज्ञा १८.११४८. २ लोटांगण घालणें. 'देखिलिये वस्तु उजू लुंठिती। मीचि म्हणोनि।'–ज्ञा ९.२२२. [सं. लुट्=लोळणें] **लुंठन**–न. लोळण.

लुंठन-ण—न. १ लूट; चोरी; लुबाडणें. २ नासधूस; नुकसान. झाड, वेल इ० ची पानें, फुलें, फळें वगैरे सर्व तोडून टाकणें. [सं. लुंटन]

लुंड, लुंडुक, लुंडो—न. (गो.) डोकें नसलेलें शरीर; धड; कबंध. [सं. रुंड]

लुडकण-न-र—क्रिवि. झटकन्, झपकन्, पडणें; लुडकणें, निजणें, लवंडणें. इ० क्रिया झटकन् होतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण करून. [ध्व.]

लुडकणें, लुडगणें—अक्रि. १ आडवें होणें; हळूच निजणें. २ वरून हळूच पडणें; लवंडून पडणें; कोसळणें. ३ एखाद्याकडे प्रेमानें ओढला जाणें. [ध्व.] **लुडक्या**–वि. अडखळणारा; पडणारा; धडपडणारा; पडण्यासारखा.

लुडगी—स्त्री. १ भांगेचा केलेला एक प्रकार. २ झोकांडी; हेलकावा. (क्रि० खाणें; जाणें).

लुडतें—न. नकसगाराचें एक हत्यार.

लुडथावणें—अक्रि. लोळणें; उलटेंपालटें होणें.

लुडबा—वि. १ (राजा.) बोबडा (माणूस, मूल). २ वर्णोच्चार करण्यास असमर्थ (जीभ, ओठ, कंठ इ०). ३ अस्पष्ट किंवा बोबडें; स्पष्ट वर्णोच्चार न करितां बोललेलें (भाषण, शब्द, अक्षर.). ४ लुडबुड्या; ढवळाढवळ करणारा; नसते उपद्व्याप करणारा. **लुडबेपणा**–पु. बोबडेपणा.

लुडबुड—स्त्री. १ दुसऱ्यानें बोलाविलें नसतां त्याच्या कामांत पडणें; दुसऱ्याला मदत करण्याकरितां त्याच्या कामांत केलेली ढवळाढवळ; चाललेल्या कामांत उगाच केलेली गडबड. २ एखाद्याला मूल इ०नीं केलेली किरकोळ मदत. **लुडबुडणें**–अक्रि. १ दुसऱ्याला त्याच्या कामांत मदत करूं लागणें; गडबड करणें; लुडबुड करणें; ढवळाढवळ करणें; ज्या योगें दुसऱ्याला अडथळा होईल अशी मदत करणें; विनाकारण दुसऱ्याच्या कामांत गढून जाणें. २ इकडून तिकडे आणि तिकडून इकडे असे हेलपाटे घालणें किंवा खाणें. 'द्राविडो लुडबुडाम्यहम्।' **लुडबुडत पडणें**–एखाद्याच्या मार्गांत पडणें; दुसऱ्याला अडथळा उत्पन्न होईल अशा रीतीनें निष्कारण त्याच्या कामांत असणें किंवा मदत

करणें. **लुडबुड्या**–वि. १ दुसऱ्यानें बोलाविलें नसतांना त्याला मदत करून त्रास देणारा; लुडबुड करणारा; लुडबुडणारा; पुढें पुढें करणारा; उपदेश किंवा मदत करण्याच्या ऐटीनें विनाकारण चुकीच्या मार्गानें कामांत पडणारा. २ ढवळाढवळ करणारा; लुडबुड करणारा. 'शौर्यें निर्दय, आर्जवें लुडबुड्या कीं दीन सद्भाषणीं।' –वामन, स्फुटश्लोक १६ (नवनीत पृ. १३५). **म्ह०** 'लांडें लुडबुडें आणि नाचे पुढपुढें.'

लुडमा—वि. १ आंखूड; तोकडा; लांडा (हात, पाय, बोट इ०). २ आंखूड किंवा लांडा हात, पाय इ० कोणताहि अवयव असलेला. ३ लुडबुड्या.

लुंडमुंड—वि. निश्चेष्ट पडलेला; कासावीस.

लुडवा—वि. हस्तपादरहित; थोटा व पांगा. 'प्रसूतिसमयीं आडवा आला। शस्त्रें छेदुनि लुडवा केला।' –अमृत १६. **लुंडा**—वि. लुळा; पंगु; थोटा; पांगळा. 'शास्त्राचा केला लुंडा। तोंडीं पाडियेला धोंडा।' –तुगा ३१८१.

लुडाखुडा—वि. १ थकलेला; अशक्त; म्हातारा. २ जरठ; मोडकळीस आलेला; सरासरी काम चालावयाजोगा; मोडका (नांगर, गाडा इ०) ३ लोळा–गोळा; फाटका तुटका. [लुला+खुडा]

लुडाबुच्चा—वि. भुंडा; बोडका; उघडाबोडका; खांदा, पानें इ० नीं विरहित असा (वृक्ष). **लुंडाभुंडा**–वि. रिकामा; मोकळा; (बांगड्या इ०नीं) विहीन. 'हातांतल्या बांगड्या फुटून ते लुंडेभुंडे दिसले.' –अस्तंभा ६०. [लांडा+भुंडा] **लुंडी**–वि. लुटलेली. 'अशी दुनिया लुंडी।' –विवि ८.८.१५७.

लुडी—स्त्री. (गो.) हुशारी.

लुढावणें—सक्रि. धुडकावणें; उधळून देणें; उलटापालटा करणें. 'मान भिडावून देति लुढावून टोपीवाले नाहीं गणती।' –ऐपो २५३. [सं. लुंठनम्; हिं. लुंढाना]

लुढिया—पु. १ भांग घोटण्याचा दगड; विशिष्ट आकाराचा बरवंटा. 'गंगाकिनारीं ह्या लुढियानें छानलेल्या विश्वेश्वराच्या प्रसादाची लज्जत औरच आहे.' –भाऊ २१. २ भांग घोटणारा माणूस. [हिं.]

लुतकरी—स्त्री. लकतरी; चिंधी; लुगडें, धोतर बंडी इ० फाडून त्याची लोंबत असलेली चिंधी; चिरफळी. [फा.]

लुतफ, लुत्फ—स्त्री. मेहेरबानी; कृपा. 'यापासी येलन... याचे म्हणवल्यानें लुतफ नाहीं.' –पेद ६.१९०. [अर.लुत्फ्]

लुत(थ)फी, लुफ्ती, लुत्फी–वि. कृपेनें दिलेला; दत्त.

लुतरा, लुत्रा—वि. १ लपळ; बडबड्या; गप्पीदास. २ निंदक; चुगलखोर; लुबरा; चहाडखोर; पाठीमागें निंदा करणारा; चोंबडा; खोडसाळ. 'ही काय सांगे लुतरी कुत्री बसवस करती सदां।' –पला ८४. [हिं. फा. लुत्रा] **लुतरापन**–न. खोडसाळपणा.

लुर्ता—स्त्री. १ त्वचेला होणारा रोग; लूत; कोड; कुष्ट. 'तेसा नवही द्वारें स्रवती। आंगीं देहाची लुती जिती।' –ज्ञा १३.७२१. २ (व.) ओकारी; उलटी. ३ जननेंद्रिय; शिश्न. 'दोन्हीं अंड झडो तुझी लुति गळो दुर्गंध हो मंदधी।' –कीर्तन १.८२. **लुतिजणें**–सक्रि. गलत्कुष्ठ व्याधीनें युक्त होणें; त्वचारोग होणें.

लुतूफुतू करप—क्रि. (गो.) कानगोष्टी करणें.

लुंधळणें—अक्रि. (व.) घुटमळणें; एखाद्याच्या मागें फिरणें.

लुपौनी—अ. (महानु.) लपून. 'लुपौनि राहिला माजिवास्थारा। जंघद्वई।' –ऋ ८९. [सं. लुप्]

लुप्त—वि. १ लोपलेला. २ लपलेला; अदृश्य झालेला. ३ रद्द पडलेला. ४ वहिवाटींतून गेलेला. ५ लिहितांना किंवा बोलतांना गळलेला. ६ विसर पडलेला; विस्मरणांत सांपडलेला. [सं.] **०प्राय**–वि. बहुतेक लुप्त झालेला; लुप्त झाल्यासारखा. **लुप्तोपमा**–स्त्री. (साहित्य) उपमा ह्या अलंकाराचीं उपमेय, उपमान, साधारण धर्म, आणि उपमावाचक शब्द अशीं जीं चार स्पष्ट अंगें त्यांपैकीं एक किंवा अधिक अंगें ज्या उपमेंत नसतात तिला लुप्तोपमा म्हणतात. हिच्या उलट पूर्णोपमा. लुप्तोपमा आठ प्रकारची आहे–उपमान, उपमेय, धर्म, धर्मवाचक, धर्मोपमान, धर्मोपमेय, धर्मोपमानवाचक, धर्मोपमेयवाचक. यांपैकीं कोणतेंहि एक लुप्त असतें.

लुबकणें—अक्रि. १ एखाद्या पदार्थासाठीं टपून किंवा वाट पहात बसणें; आशा धरून बसणें. 'उंदरासाठीं मांजर मघांपासून येथें लुबकून बसलें आहे.' २ चिकटणें. [सं. लुभ्]

लुबडो—वि. (गो.) वोवडें बोलणारा.

लुबरा, लुब्रा—वि. १ कारणावांचून मध्यें तोंड घालून बोलणारा; दुसऱ्यानीं विचारिलें नसतां त्यांना उपदेश करावयास जाऊन किंवा आपलें मत सांगूं जाऊन उपद्रव देणारा; लुडबुड्या; ढवळाढवळ करणारा. २ तोंडपुजा; चोंबडा. 'मला जरि म्हणाल वा तरि विशंक लुब्रा म्हणा।' –केका ७२. [ध्व.]

लुबलुब—स्त्री. वटवट; बडबड; कंटाळवाणें भाषण; टुरटुरणें; मुलाचें भराभर बोलणें. [ध्व.] **लुबलुब–बां**–क्रिवि. १ लुबरेपणानें; पुन्हां पुन्हां मध्यें तोंड घालून; मध्यें तोंड घालून (दुसऱ्याचें बोलणें थांबविण्याकरितां रागानें उपयोगांत आणतात). 'चार वेळां तुला बोलूं नको म्हणून सांगितलें तरी माकट्यानें लुबलुबां बोलतोस.' २ शेळी इ० नीं मचमचां खाणें याचें अनुकरण करून (क्रि० खाणें). भराभर परंतु

हातीं पावलें टाकून चालण्याच्या ध्वनीचें अनुकरणकरून (क्रि० चालणें). जोराची दंगल अगर बडबड दाखविणारा शब्द. (क्रि० करणें). **लुबलुबणें**–अक्रि. हलणें; लवलवणें.

लुबाडणें–सक्रि. हरण करणें; लुटणें; नागविणें; लुंगारणें; दुसऱ्याची वस्तु त्याच्या इच्छेविरुद्ध, त्याची परवानगी नसतां उपटणें. **लुबाडणी**–स्त्री. लूट; लुबाडणूक; नागवणूक.

लुंबी—स्त्री. लोंबी; लोंगर; लोंबट; लोंब; घोंस; कणीस.

लुबुधक—स्त्री. पारध. [सं. लुब्धक]

लुब्ध—वि. १ आसक्त; आशा असलेला; आशाळू. २ लोभावलेला; लोभी; लोभाविष्ट. ३ उत्कटतेनें कांहीं पदार्थ इच्छिणारा. ४ मोहित; लोलुप. ' जो अनुसरेल इंद्रियमदा । लुब्ध होऊनियां स्वादा । ' –ज्ञा ३.१०३. [सं. लुभ्=लोभ धरणें.]

लुब्धक—पु. १ पारधी; शिकारी. २ लोभी. ३ रांडबाज वेश्यालंपट. ४ गुदद्वार. ५ (ज्योतिष) बृहल्लुब्धक ह्या तारकापुंजांतील पहिल्या प्रतीचा तारा; मृग नक्षत्राजवळील व्याध हा तारा. **लुब्धणें**–अक्रि. (काव्य) लोभ सुटणें; एखाद्या वस्तूची अनावर इच्छा होणें; एखाद्या वस्तूविषयीं मोहित होणें; भुलणें ' भरज्वानीमधीं मस्त तुझा भर नौतिची बाहारी । पाहून लुब्धलों तुसी आतां किती दिवस चाळविसी नटधारी । ' –होला ८९. [सं. लुभ्]

लुब्रा, लुभरा, लुभ्रा—वि. लुबरा पहा.

लुभणी, लुभणें—स्त्रीन. रुमणी–णें इ० पहा. नांगराचा दांडा.

लुभणें—न. लोढणें (विशेषतः लाक्षणिक अर्थे) पहा.

लुलपणें, लुलणें—अक्रि. (काव्य महानु.) लोभ धरणें; आसक्त होणें; भुलणें; लोभानें आकृष्ट होणें; एखाद्या वस्तूकडे प्रेमानें ओढलें जाणें. ' सदां इंद्रियार्थादिकांतें लुलावें । ' –उपदेश पाळिशी ६. [सं. लोलुप]

लुला—वि. १ जन्मतः किंवा रोगादि कारणांमुळें व्यंग, अशक्त झालेला; पंगु; ताठपणा नसलेला; ढिला; लोंबत असलेला (हात, पाय, मनुष्य, प्राणी इ०). ' हातानें, पायानें किंवा जिभेनें तो लुला आहे. ' २ अशक्त; कमजोर; निर्जीव. ३ म्हातारपणामुळें किंवा अन्य कारणामुळें आपलें कर्तव्य करावयाला असमर्थ. ४ अपूर्ण; सदोष. ५ यथास्थित न चालणारा. ' माझी बायको मेल्यापासून माझा संसार लुला पडला. ' [सं. लोल्=हलणारा] **०पांगळा**–वि. हात किंवा पाय लुला असलेला; अशक्त; कमजोर; निरुपयोगी; व्यंग असलेला. **लुलावणें**–अक्रि. १ (हात, पाय, इ० गात्र) अशक्त होणें; आपआपलें कर्तव्य करावयाला असमर्थ होणें; लुला होणें; पंगु होणें. २ अशक्त किंवा कमजोर होणें. ३ (कों.) दुसऱ्याच्या कारभारांत लुडबुड करून त्याला उपद्रवकारक होणें. [लुला] **लुलित**–वि. १ खिळखिळे झालेलें. २ चिरडलेलें; कुसकरलेलें; कोमेजलेलें. ३ रेंगाळणारा; कंपायमान; लोंबणारा. ४ ढवळलेलें.

लुलाय—पु. रेडा; टोणगा; महिष. ' याया मज यज्ञ लोकां सुख गुप्ता तो लुलाय मांस मरे । ' –मोभीष्म १.४८. [सं.] **०वाहन**–पु. यम.

लुलु—स्त्री. लालूच; लोभ. ' लुलु न धरावी देहातीत व्हावें । ' –दावि ३९.

लुलुपत, लुलुपतू, लुलुपितू, लुल्लुपुत्त्—स्त्री. मनधरणी; हांजी हांजी; आर्जव; एखाद्याला वश करून घेण्यासाठीं त्याला दादाबाबा करणें. ' बराडी-पणानें त्याची लुलुपत । न करी तो विरक्त गुरुवर्य । ' –दावि २१०.

लुलुपु(व)टी, लुलुमिठी—स्त्री आतुरता; उत्कट इच्छा; लालसा; लोभ. ' कृष्णरूपीं पडे मिठी । होत लुलुपटी डोळ्यां । ' –एभा १.२९०.

लुलुवाना—पु. (व.) भिकारी; दरिद्री; दीन; दुबळा. ' लुलुवान्यासारखा फिरतो. '

लुल्ल—वि. गुंग; झिंगलेला; दारूचा कैफ चढलेला.

लुवलुवणें—अक्रि. १ अंगावर उवा, मुंग्या, किडे इ० अतिशय चढणें, चालणें व त्यामुळें खाज सुटून त्रास होणें. २ बोलण्याकरितां जीभ वळवळणें; बोलण्याची जिभेला खाज सुटणें. ' मी आतां अगदीं बोलणार नाहीं असें म्हणतों पण प्रसंग आला म्हणजे जीभ लुवलुवत्ये, राहवत नाहीं. ' [ध्व.]

लुवुंक—क्रिवि. (गो.) कापण्याला; कापणी करावयास. ' शेत लुवुंक गेल्यांत. ' **लुंवणी**–स्त्री. (गो.) शेतकापणी; लाणी. [सं. लु=कापणें]

लुस—वि. लुसलुशीत. ' हें वालुक कोवळें लुस आहे. '

लुसलुशी-सी—स्त्री. (फळें, झाडें, चेहरा इ० वरील) टवटवी; तजेला; ताजेपणा; तेजस्विता; पक्वतेचें तेज; पूर्णतेची झळक. **लुसलुशीत**–वि. मऊ; टवटवीत; अतिशय कोंवळा; स्वच्छ व तजेलदार; कोंवळेपणामुळें टवटवी, मृदुत्व आलेलें (फल, पर्ण, अंकुर, शरीरावयव इ०). **लुसलुशीतपणा**–पु. लुसलुशी पहा. **लुसलुसणें**–अक्रि. टवटवीत असणें; तजेलदार असणें, दिसणें. **लुसकान-नी**—लुकसान, नुकसानी पहा.

लुसलुस—स्त्री. उत्सुकता; उत्कट इच्छा; इच्छेची उसळी; प्रबळ इच्छा. [ध्व] **लुसलुसणें, लुसलुस करणें**–अतिशय उत्कंठित होणें. **लुसलुस, लुसुलुसु**–क्रिवि. उत्कट इच्छेनें; इच्छेच्या उसळीनें; उत्सुकतेनें.

लुसणें—सक्रि. (महानु.) लुटणें; आकर्षणें; ओढून घेणें. ' मज निद्रिस्थातें खाणौरियें । लुसौनि नेति । ' –ऋ ५५.

लुह, लूक—स्त्री. झळ. [हिं.]

लुहंगी, लुहांगी, लुहांगीकाठी—लोहंगी इ० पहा.

लुळणें—अक्रि. (काव्य) लोळणें; लोळण घेणें. 'ऋद्धि-सिद्धि पाय- । धुळीमाजीं लुळती सर्वदा । '

लुळलुळीत—वि. लुसलुशीत; कोमल; मृदु; लवचीक; हुळ-हुळीत; सत्त्वाच्या कमीपणानें मृदु (जीभ, अति पिकलेलें फळ, नुसतें मांस).

लुळा—वि. लुला पहा. ०**खुडा**–वि. म्हातारा आणि अशक्त; जीर्ण आणि निकामी; फुटलेला तुटलेला (मनुष्य; प्राणी, गाडी, पदार्थ). ०**खुळा**–वि. शरीरानें व मनानें पंगु; अशक्त; निर्वीर्य; खुळा (लुला खुडा या अर्थीहि हा शब्द चुकीनें वापरतात).

लुळी, लोळी—स्त्री. १ (कों.) श्रम, झोंप, थकवा इ० मुळें मूल, माणूस, पशू यांना होणारी लोळण्याची इच्छा. (क्रि० येणें). लोळण; उन्हाळ्यामुळें येणारी सुस्ती; लोळण्याची इच्छा; पेंग. २ (महानु.) गुंडाळी, गांठ. 'जाणिवेयांची लुळी झळाळिली। '–शिशु ४३.

लुळें—न. बाजारबुणगें; हलक्या सलक्या लोकांचा समुदाय; वाव्रट, टवाळ, मवाली लोकांचा समुदाय, दाटी; दुकानदार, गिऱ्हाईक, सट्टेवाज लोक इ० ची गर्दी; तमाशा, मारामारी, भांडण इ० चाललें असतां गोळा झालेली दाटी.

लू, लूक-ख—स्त्री. उन्हाचा तडाखा; तीव्र झळ; उष्ण हवा; उष्ण वारा. [हिं. लुक]

लूं—न. लोंकर; बारीक केंस; लव. 'त्याची आयाळ जाड असुन पोटाखालीं केसाळ असें पांढरें लूं असतें. ' [सं. लोम]

लूट—स्त्री १. लुटण्याची क्रिया. २ लुटण्यानें मिळालेलें जें कांहीं तें; लुटून आणिलेलें द्रव्य इ० ३ सढळपणानें केलेला खर्च (गरिबांना घातलेलें जेवण, दिलेलें दान इ०). ४ विपुलता; समृद्धि; लयलूट; भरमसाटपणा. [लुटणें] ०**मारणें**–लूट करणें; लुटणें. ०**फाट-फूट-लबाड**–स्त्री. लूट; लबाडणी; नासधूस. 'शत्रूच्या मुलखांतून लूटफाट करून विजयी होऊन आलेलें सैन्य...'–स्वप. ३६. [लूट द्वि.]

लूड—स्त्री. शेतांत करावयाचा राब. (दाढ.) –बदलापूर २८३.

लूत—स्त्री. १ मनुष्य, कुत्रा इ० प्राण्यांस होत असतो तो एक प्रकारचा त्वचारोग. २ सुरणाच्या झाडासारखें एक औषधोपयोगी झाड. याच्या फुलानां शेवाळें म्हणतात.

लूता—पु. कोळी; कांतीण. 'बहुधा बद्ध करीलचि लूतेचें जिष्णुवारणा सुत। '–मोविराट ४.३६.

लूनिया—पु. मीठ पिकविणारा वाणी. [सं. लवण; हिं.]

लूब—स्त्री. (गो.) प्रबल इच्छा; रुचीची परमावधि.

ले—(सा.) चतुर्थीचा प्रत्यय; ला. उदा० रामाले.

लेइणें, लेणें—सक्रि. धारण करणें; घालणें; धरणें; नेसणें. 'आपुलेनि सुकुमारपणें । हे न ले परागाचें लेणें।' –शिशु ६९०. [हिं.]

लें(ले)क—पु. १ मुलगा; पुत्र. २ पादपूरणार्थक बुवा इ० अर्थी उपयोग. 'आतां तिकडे जाणार तरी कोण लेक. ' –मृ ४४. ३ हीनतादर्शक, तुच्छता, तिरस्कार अगर निंदाव्यंजक शब्द. 'म्हणती अहारे नपुंसका । ऐसें राज्य सोडुनी लेका। भीक मागणें वरियेलें। ' –नव १८.२५. –स्त्री. मुलगी; कन्या. 'म्हणे तुझी होइन मीच लेकी। ' –सारुह २.२५. **म्ह**० लेकी बोले सुने लागे. ०(पु)**पूत-बाळ**–पु.न. मुलगा; मूल; मुलगा किंवा मुलगी. (सामा.) मूलबील; मूलबाळ. ०**वळा**–पु. राखेचा मुलगा; रांडेचा मुलगा; स्वस्त्री वांचून इतर स्त्रीचे ठिकाणीं झालेली संततिः दासीपुत्र. ०**विता**–पु. बाप; पिता. **लेकाचा-लेको**–पु. निंदा किंवा तिरस्कारदर्शक शब्द. 'कसा लेकाचा कार्याला जुंपला आहे. ' –नाकु ३.५५.

लें(ले)करूं—न. मूल; बालक; बाळ. (पुत्र किंवा कन्या या अर्थी.) 'तरी सकृप बाप तूं म्हणसि नायके लेंकरूं। '–केका ९२. **लेकरालेकरीं, लेंकुरालेंकुरीं**–क्रिवि. १ वाडवडिलांपासून (चालत असलेलें वतन, हक्क, इ०); मुलापासून त्याच्या मुलाकडे अशा क्रमानें; वंशपरंपरेनें. २ मुलांत; मुलांशीं; मुलांमध्यें इ० [लेकरूं द्वि.] ०**बाळ, लेकरेंबाळें**–न एव.अव. मुलेंबाळें; लहान मुलें; मुलेंबिलें; कुटुंबांतील लहानमोठीं मुलें (सामान्यत्वेंकरून.) **लेंकुरडा**–वि. लहानसा; पोरकट. 'न्हाण आलें शोभेना अंगाचा बांधा लेकुरडा। ' –प्रला ९९. **लेकुरछंद**–पु. १ मुलांत मिसळण्याचा छंद, हौस, आवड; मुलांचा शोक; लहान मुलांसारखें वागण्याचा स्वभाव. 'अरे तूं एवढा मोठा झालास तरी लेकुरछंद टाकीत नाहींस. ' २ पोरकटपणाचा नाद; बालिश हट्ट. 'भाईबापावांचून मुलाचे लेंकुरछंद दुसरा कोण पुरवील? ' **लेंकुरपण-पणा**–नपु. १ बाल्यावस्था; शैशवावस्था. २ पोरपणा; बालिशता. **लेंकुरवा**–वि. (राजा.) पोरकट; बालिश; लहानसा. **लेकुरवाला-ळा**–वि. १ मुलेंबाळें असलेला. 'लेकुरवाळी बाईल म्हणतें आतां याला झोंका। ' –मध्व. २ ज्याला आडवे कोंब किंवा बारीक फाटे आहेत असें (हळकुंड). **लेंकुरसमजूत**–स्त्री. पोरबुद्धि; लहान मुलाचें ज्ञान. **लेंकुरस्वभाव**–पु. पोरस्वभाव; बालिशपणा; लहान मुलाचा स्वभाव. [लेंकरूं+स्वभाव]

लेकिं(की)न—अ. पण; परंतु; शिवाय. [फा. लेकिन्; अर. लाकिन्]

लेख—पु. देव. 'गुरूपुत्र हा तूं न समान लेखी। जयाचा असे फारसा मान लेखीं। ' –वामन, विराट ७.१२३. **लेखर्षि**–पु. देवर्षि; नारद. –हंको.

लेख—पु. १ जें लिहिलें किंवा लिहिण्यांत आलें तें; अक्षर. 'नाना नुठितां लेख। पुसिलें जैसें।' –अमृ ७.७०. २ दस्तऐवज; लिहिलेला कागद. ३ गणना; हिशेब; मोजदाद. 'यैंवीं घरीं ये लेख।' –अमृ ५.९. ४ प्रतिष्ठा; आकार; तुलना; पर्वा. 'खांडे थोवेकारू असमसासु। एरां लेख नाहीं।' –शिशु १०२२. ५ प्रत्यय; पाणें. 'औचिता करौनि धरा। मग लेखा येईल।' –शिशु ६९६. ६ –न. एक, दोन इ० जे पाडे मुलें शिकतात तेप्रत्येक. [सं. लिख्=लिहिणें] **०निबद्ध**–वि. लेखांत नमूद केलेलें **०पत्र-पढा-पूस**–न पु. देणें घेणें इ० व्यवहार करतांना उभयपक्षांना किंवा एका पक्षाला बंधनकारक ताकीदपत्र, दस्तऐवज, कर्जखत, सनद, इ० लेख केलेला असतो तो. 'साहेब लोकांचे सरकारकामांत जे लेखपूस होतात ते समग्र छापून लोकांस कळण्याकरितां प्रसिद्ध करीत जावे.' –इनाम १२६. **०प्रमाण**–न. लेखी पुरावा; लिखित आधार, प्रमाण; प्रमाण मानलेला दस्तऐवज. **लेखांक**–पु. लेखाचा विभाग; एखाद्या मोठ्या लेखाच्या पाडलेल्या भागांपैकीं प्रत्येक. [लेख+अंक] **लेखादेवी**–स्त्री. कर्जखत. **लेखापुरी**–क्रिवि. लिहिण्यांत;' लेखामध्यें; लिहून ठेऊन (तोंडातोंडी नव्हे असें). **लेखावेगळा**–वि असंख्य; मोजतां न येणारा; अगणित. 'नाना दृष्टीचे उमाळे। उठती लेखावेगळे।' –अमृ ७.१४३ **लेखी**–वि. लिहिलेला.

लेखक, लेखिक–पु. १ लिहिणारा; नकला करणारा; कारकून; लिहिण्यावर उपजीविका करणारा. २ स्वतंत्रपणें चित्र, ग्रंथ इ० रचणारा. ३ (सांकेतिक) कारभारी; कारकून. 'नाना फडणवीस तेथील निखालसता लेखकमुखें...दिमुन आल्यावर.' –रा २०८९. [सं.] **०प्रमाद**–पु लिहिणाराची (ग्रंथकर्त्याची नव्हे) चूक; हस्तदोष; नकलणाराची चूक. **लेखकी**–स्त्री. लेखकाचा धंदा; लेखकाचें काम; कारकुनी. –वि. कारकुनानें लिहिलेला: लेखकानें लिहिलेला.

लेखणी-नी, लेखण—स्त्री. १ शाईनें कागद इ० वर लिहिण्याचें बोरू, कांबटी इ०चें केलेलें साधन; कलम. २ (व.) दगडी पेन्सिल. [सं. लेखनी] **लेखणीस चंग बांधणें**–सुंदर लिहिण्याचा धंदा करणें; उत्तम, वळणदार अक्षर लिहिणें. **लेखण्या करणें**–१ तुकडे करणें. २ (सैन्याच्या) तुकड्या पाडणें. ३ ठार मारणें. **०हांकया**–वि. कसें तरी आणि कांहीं तरी लिहिणारा; वाटेल तें लिहिणारा; विचार न करितां लिहिणारा; मूर्ख संपादक. 'हे सूक्ष्म भेद डोकें एकीकडे तर लेखणी एकीकडे अशी जेथें स्थिति आहे तेथील लेखणीहांक्यांच्या लक्षांत कसे येणार?' –टिले ३.२९७. **लेखणीचा धड-पुरा-बहादर**–पु. अति उत्तम लेखक; लेखनकलेंत निष्णात; कलमबहादर; कुशल लेखक; लिहितांना न चुकणारा, वळणदार लिहिणारा.

लेखणें—सक्रि. १ मानणें; समजणें; गणणें. 'मग संक्षुब्धौर्वानळदर्शन जालें असेंचि लेखाल।' –मोकर्ण २.११. २ पर्वा करणें; चाहणें; आदर करणें. 'न गणावा गरुडहि मग लेखावा काय हो मशकतातें।' –मोभीष्म १.२५. ३ लिहिणें. 'निश्चेष्ट कृष्ण केले मेलेसे लेखिलेचि लेखणेंस।' –मोकर्ण ३५.२२. ४ विचार करणें. 'पैं गा भक्तीचेनि नावें। फूल मज एक द्यावें। तें लेखें तरि म्यां तुरंवावें। परि मुखींचि घालीं।' –ज्ञा ९.३८४. [सं. लिख्]

लेखन-ण—न. १ लिहिणें. २ लिहिण्याची घाटणी; शैली. ३ जें लिहिलें तें. ४ चित्र, नकाशा इ० काढणें किंवा रेखादिकांनीं निर्मिणें. [सं. लेखन] **०कला**–स्त्री. लिहिण्याची कला. **०प्रशस्ति**–स्त्री. श्रीशिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून सरकारी कागदपत्रें लिहिण्याचे ठराविक मायने वगैरे पद्धति बाळाजी आवजी चिटणीस यांनीं तयार केली ती. **०सोमा**–स्त्री. पत्राचा शेवट; मजकुराची अखेरी. यापुढें दुसरा मजकूर येत नाहीं. पेशवाईंत हा एक शिक्का होता. **०स्वातंत्र्य**–न. वर्तमानपत्रांतून लेख लिहिण्यांचें स्वातंत्र्य. (इं.) लिबर्टी ऑफ् प्रेस. **लेखनाडंबर**–न. १ पुष्कळ लिहिणें; लेख-विस्तार. २ लांबलचक पत्र इ० लिहून वाचणारास त्रास देणें किंवा आपल्या लेखनपटुत्वाची ऐट मिरविणें. पत्र इ०चा शेवट करतांना पुढील प्रमाणें हा शब्द योजतात. उदा० कळावें ही विज्ञप्ति, लेखनाडंबर कशास पाहिजे?' **लेखनीय, लेख्य**–वि. १ लिहिण्यास योग्य, लिहिण्याजोगा. २ खिजगणतींतील. 'पार्था नवल हें पाहीं। जेथ स्वर्गसुख लेखनीय नाहीं। तेथ ऋद्धिसिद्धि कायी। प्राकृता होती।' –ज्ञा २.३६५. **लेख्यमूर्ति**–स्त्री. कागदावर किंवा कापडावर काढलेली मूर्ति.

लेखा—पु. १ हिशेब; गणती; मोजणी. 'जाती लवपळ घटिका काळ लेखा करितो।' –दत्तपदें पृ ५५. २ पर्वा; खिजगणती; पाडःकिंमत. 'म्हणउनि कवणाचा हा असे आजि लेखा।' –सारुह ७.१६८. ३ लिखितप्रमाण; दस्तऐवज. 'त्यांचें त्यांस द्याल धन। काळांतरीं ओपिल्या प्राण। तुज देतील लेखा करून। फाडीवाडी हरतर्‍हे।' –मुसभा १४ १२५. [लेख]

लेखित—वि. लिहिलेलें. [सं.]

लेखीं—क्रिवि. १ (व.) मतानें. 'माझ्यालेखीं तो मेला.' २ तऱ्हेनें; परीनें; सारखें. 'कोण लेखीं मोक्षाला मिटावें। तेथें' –दावि १५५.

लेंगडलेंगड—स्त्री. पिरपीर.

लेगुटी—स्त्री. (खा. भिल्ली.) लंगोटी.

लेंगो—पु. (गो.) खेकड्याचा पाय.

लेचणें—अक्रि. खचणें; दबणें; नमणें; दबकणें; बांक येणें.

लेचापे(पे)चा—वि. अशक्त; कमजोर; निर्वीर्य; निर्बल; निःसत्त्व; कच्चा; दुर्बळ. स्थैर्य, शक्ति, सत्त्व इ०चा अभाव असलेला. ' लेच्यापेचांच्या नादीं बायका लागत नसतात. ' -सवतीमत्सर ५४.

लेंची—स्त्री. एक प्रकारचें झाड.

लेंजणें—सक्रि. घातला जाणें; धारण केला जाणें. ' कां हीर कंकण नं लेजति बायकांहीं । ' -आमु ५८. [लेणें]

लेंजीम—स्त्रीन. लांकडाच्या दांडयाच्या दोन टोकांना धातूच्या चकत्या ओंवलेली सांखळी वसवून व्यायामासाठी केलेलें एक वनुष्याकृति साधन. [फा. लेझम्]

लेंझा—वि. (व.) ढिला; मैंगळा; सैल; ताठपणा नसलेला. ' असा लेंझा कारभार काय कामाचा ? ' ' उशी जरा लेंझी भरली गेली. '

लेटणें—अक्रि. पडणें; लोटणें; पसरणें; निजणें; विश्रांति इ० साठीं जमिनीवर आडवें अंग करणें. [सं. लुट् ; हिं. लेटना]

लेटी—स्त्री. (व.) हातम्याचें झाड; अगस्त्याचें झाड.

लेटीस—स्त्री. एक भाजी. हिचे दोन प्रकार. -क्याबेज व कास. [इं.]

लेंड—स्त्रीपु. १ दोन या अर्थाची विटीदांडूच्या खेळांतली संज्ञा. २ विटीचा एक प्रकारचा टोला. विटीचें एक टोंक हातांत धरून व दुसरें जमिनीकडे करून ती खालीं सोडून जमिनीवर पडण्यापूर्वी मधल्यामध्येंच तिच्यावर टोला मारून ती फेकणें. -मखेपु १८. [ते. रोंडु]

लेंड—न. लेंडूक; विष्ठेचा लहान गोळा (मनुष्य, कुत्रा, मांजर इ०च्या). **म्ह०** (गो.) एकाच लेंडाचे तुकडे, एक परमाळूतलो नी एक घाणतलो. **लेंडासुखास येणें**-आपलें आवडतें मूल इ०चे प्रेम करतां करतां अत्यंत तल्लीन होऊन देहभान विसरणें.

लेंडओ(वो)हळ, लेंडि, लेंडिया—स्त्रीपु. लहान ओघळ; लहान ओढा; पन्हा. ' गांवीचे होते लेंडवोहळ । गंगेसि मिळतां गंगाजळ । ' -व्यं ३४. **लेंडकी**-स्त्री. चरकांतून पिळून काढलेला ऊंस; चिपाड. **लेंडक्या, लेंडकवळ्या, लेंडूकवळ्या**-पु एकदां चरकांतून पिळून निघालेलें कांडें पुन्हां चरकांत लावणारा. **लेंडपटाऱ्या**-वि. (व.) बेशरम; निर्लज्ज. ' त्याला एकदां घालवून दिलें होतें तरी तो लेंडपटाऱ्यासारखा त्यांच्या घरीं गेलाच. ' **लेंडपेंड**-पुन. दागदागिने; नटण्याच्या उपयोगाचे जिन्नस. [लेंड द्वि.]

लेंडकटर—पु. (छाप.) शिशाच्या पट्या कापण्याचें यंत्र. [इं.]

लेंडसणें—सक्रि. (ना.) एखाद्याची कणीक तिंवणें; एखाद्याला बेदम मार देणें.

लेंडा—पु. (व.) घोडयाच्या खोगीरास असलेला शेपटी-खालून घेण्याचा पट्टा किंवा दोरी.

लेंडा(ढा)र—न. लटांबर; प्रवासांत बरोबर न्यावयाचीं भरपूर व त्रासदायक मुद्देमालणें, गुरेंढोरें, सामानसुमान इ०

लेंडारगो—पु. (कु.) गिधाड.

लेंडावर्त—पु. घोडयाच्या दाढेखालीं असणारा केंसांचा भोंवरा. हें अशुभ लक्षण मानतात.

लेंडि-डी, लेंडिया—स्त्रीपु लेंडओहळ पहा. नाला; ओहळ; पन्हा. ' लेंडिये आला लोंढा । न मनी वाळुवेचा वरवंडा । ' -ज्ञा १३.६९३.

लेंडी—स्त्री. एक झाड. याच्या दोन जाती:-काळी व पांढरी. या झाडाचीं पानें उंबराच्या पानासारखीं असतात.

लेंडी—स्त्री. १ (शेळी, उंट, बकरा, घोडा, घूस, उंदीर इ०ची) विष्ठेची लहान गोळी. २ मळाचा जमलेला खडा; लेंड. ३ घोडयाचें खोगीर पुढें सरकूं नये म्हणून जो शेपटीच्या खालून घातलेला पट्टा त्याला बांधितात तो. ४ खोगिरास पुढच्या अंगास असणारा घोरवंद. ५ वांशोट्या अगर नर जातीच्या ताडाला शेंगेसारखा एक अवयव येतो तो. ६ एकेरी मखमलीचें फूल. [लेंड] **लेंडया गाळणें-टाकणें-हगणें**-भयानें गर्भगळित होणें; भीतीनें गाळण उडणें; फार घाबरणें; भिणें. **०खत**-न. बकऱ्यामेंढ्यांचें खत. **०ढयाक**-स्त्री. (अशिष्ट) धनधान्याची समृद्धि; चंगळ; भरभराट. **०तळाभि**-पु. (व.) गांवांतून घाण पाणी वाहून बनलेला तलाव. **०पिंपळी**-स्त्री. उंदराच्या लेंडीच्या आकाराची एक शेंग. ही औषधी आहे. **०प्रसाद**-पु. चाबूक किंवा छडी मारतांच हगणारा घोडा; वाईट घोडा. **लेंडयाताड**-पु. फळ न येतां नुसत्या लेंडयाच येतात असा ताड; नर ताड. **लेंडुरी**-स्त्री. लेंडीनाला; फक्त पावसाळ्यांत वाहणारा ओढा. **लेंडूक**-न. मनुष्य, कुत्रा इ०ची केळ्याच्या आकारासारखी पडलेली विष्ठा. **लेंडोर-रा-रें**-न लेंडयांचा समुदाय; लेंडया; ' लेंडोरा आगीं घूमावधि । कां अपाना आगीं दुर्गंधि । ' -ज्ञा १८.६८५.

लेंडी—स्त्री. पांघरण्याचें लोंकरीचें वस्त्र. [मि.]

लेंडीस हॅंबर—स्त्री. (चांभारी) एक प्रकारची हातोडी. [इं० लेडीज हॅमर]

लेंडूकवळ्या—वि. लेंडक्या पहा.

लेंडूर—न. (मुलांचें) लेंढार पहा. **०लागणें**-पुष्कळ मुलं होणें.

लेंड्या—पु (व.) एक शिवी.

लेढ—न. (व.) १ रेत; वीर्य. २ एक शिवी. **०पाडणें**–सक्त मेहनत करून घेणें. 'खूप लेढ पाडलं त्यानं तेव्हां इतके पैसे दिले.'

लेंढार—न. टोळी; समुदाय; कळप. लेंडार पहा. 'हाक देती येक वेळे। सहस्रार्जुन पारधी खेळे। मग लेंढारें निघालें। सकळ सैन्य।' –कालिका २२.२०. [हिं. लेंढा]

लेण—स्त्री. रेघ; ओळ; रेषा. [इं. लाईन.]

लेणदेण—स्त्रीन. देणेंघेणें; देवघेव; देण्याघेण्याचा व्यवहार. [म. लेणें+ देणें; गु.]

लेणारत—न. ब्राह्मणांत बोडणाचे वेळीं करण्यांत येणारें कणकेचें पाटयाच्या आकाराचें सिंहासन व वरवंटयाच्या आकाराचा लोड. –बदलापूर २१९.

लेणें, लेइणें—सक्रि. १ डोळ्यांत (काजळ) घालणें; कपाळावर (कुंकू) लावणें; अंगावर यथास्थानीं (दागिने) घालणें; धारण करणें. 'पौष्य भूपाळ पत्नी। दिव्य कुंडलें लेइली कर्णी।' –मुआदि २.८५. २ (काव्य.) (वस्त्र) नेसणें; परिधान करणें; धारण करणें. 'वस्त्रें सुंदर भूषणें उभयतां लेती नवीं नित्यहो।' –उमाविलास पृ. ६. भूतकाळीं ह्या क्रियापदाचा कर्तरिप्रयोग होतो. उदा० पीतांबर परिधान। लेइली अलंकार भूषण।' –एरुस्व ५.२०. ३ घेणें. **लेणार-रा**-पु. धारण करणारा; घालणारा. 'कृष्ण असे गोरसचोर। महाकपटी अकर्मी जार। हाच काय मणि लेणार। जाहला थोर अवध्यांत।' –ह २९.२८. **लेता**–पु. धारण करणारा; लेणार पहा. **लेणें**–न. १ शरीराला शोभा देणारा कोणताहि पदार्थ–दागिना, कुंकु, काजळ इ० 'मग रायें तयां लेणियांचें वृत्त पुसिलें।' –पंच १.३५. २ चैत्र महिन्यांत गौरीच्या उत्सवांत भितीवर गोपुर इ०चें जें चित्र काढतात तें; मंगळागौरीच्या वेळीं देवीला वाहण्याचे कणिकेचे अलंकार. ३ पांडवकृत्य; डोंगर पोखरून त्यांत सभामंडप, देवादिकांच्या मूर्ती इ० कोरून तयार केलेली गुहा; कोरीव लेणें. उदा. कार्ल्याचें लेणें, वेरूळचें लेणें. [सं. लेपन–लयण–लेणें. किंवा लेपन–लेवन लेणें; रत्न–लयन–लेणें; प्रा. लेण] **लेणेपण**–न. अलंकारदशा-अवस्था. 'मुकुटकुंडलें करकंकणें। न घडितां सोनें सोनेंपण। त्यार्चीं करितां नाना भूषणें। लेणेपणें उणें नव्हेचि हेम।' –एभा २८.२६३.

लेथडणें—सक्रि. शेण, माती, खरकटें इ०नीं (भांडें, अंग इ०) माखणें; लिप्त करणें; चोपडणें; लिडबिडणें. [सं. लिप्] **लेथडणी**–स्त्री. लेप; माखण; चोपडण; लिडबिडाट.

लेप—पु. खाडीमध्यें सांपडणाऱ्या काळ्या पाठीचा व पांढऱ्या पोटाचा एका जातीचा मासा.

लेप—पु. १ सारवण; माखण. २ अंगाला लावण्याची चंदन इ०ची उटी. ३ चुना, चिखल इ०चा भित इ०वर केलेला गिलावा. ४ भित इ०वरील रंगानें किंवा चुना इ०नीं काढलेलें किंवा लिंपलेलें चित्र. 'निर्जीव लेपें हार गिळिला।'–शनि ३६५. 'लेपाचां देउळीं न बैसावें।' –सूत्रपाठ ४०. ५ भात, भाजी इ०चा हात, भांडें इ०ना चिकटून राहिलेला अंश; खरकटें. ६ बाधा; दोष; विटाळ; मळ; बाह्यात्काराची मलिनता. 'जेथ न संचरे पुण्यपाप। जें सूक्ष्म अति निष्कंप। गुणत्रयादि लेप। न लगति जेथ।' –ज्ञा २.२३६. ७ रंग; वरचा रंग; मुलामा. 'तें आनंदचित्रींचे लेप।' –ज्ञा ६.२५६. ८ ओढा; सारवण; ओढा घालण्याचें द्रव्य; दुखणारें किंवा ठणकणारें गात्र इ०वर झाडाचीं पानें इ०चा बांधण्याचा ठेंचा. [सं. लिप् = लिपणें; लावणें] **लेपटणें, लेपणें**–सक्रि. १ लेप देणें; माखणें; ओढा घालणें. २ लिंपणें; लिंपून आकृति तयार करणें. 'तेथें हंसमयूर कोकिळा। नाना प्रकारचे लेपिले।'–शनि १३२. ३ एखाद्या पदार्थाचा दुसऱ्यास लेप लागणें; दोष लागणें; स्पर्श होणें. 'विहित भंगाचा कर्दम। तुज लेपला नाहीं कीं।' –मुसभा ३.४. **लेपन**–न. १ ओढा घालणें; लिंपणें; लेप देणें. २ लेप देण्याचा पदार्थ. **लेपवणी**–न. १ खरकटीं भांडीं, हात इ० धुतलेलें अन्नांशयुक्त पाणी. २ (कु.) गुरांना द्यावयाचें पाणी; पेज वगैरे मिश्रित कदान्न. **लेपवळ**–न. (राजा) खरकटें; जेवण झाल्यानंतर ताटांत राहिलेले अन्नाचे अवशेष; खरकटयाचा पसारा. **लेपाटा**–पु. औषध, चिखल इ०चा वेडावांकडा व जाडा लेप; ओढा. (क्रि० लावणें, देणें). **लेपाळणें**–सक्रि. लेप लावणें; माखणें. **लेपाळा**–पु. भांडीं, हात इ०वर तेल, तूप इ०चा जमलेला थर. (क्रि० बसणें; लागणें; जमणें; दाटणें). –वि. १ लेप देण्यास योग्य; लिंपण्याजोगा; लेप देण्यास जरूर असलेला. **लेप्य**–न. चित्र. 'जैसे सप्तरंग भरोनि जाण। लेप्य काढिलें चितारयानें।'–कथासारामृत ७.४२. –वि. लिंपलेला; लिंपून तयार केलेला. 'लेप्या लेख्या ज्या मूर्ति जाण। त्यांसि करावे ना स्नान। इतरां मूर्तीसि स्नपन। यथाविधान करावें।' –एभा २७.१२२.

ले(लें)प—पुन. आंथरण्यापांघरण्याच्या उपयोगी असें कापूस भरून केलेलें वस्त्र; रजई; दुलई. **ले(लें)पडी**–स्त्री. बसण्याची किंवा आंथरावयाची दुलई; आंथरण्याची लहान गादी. **लेपडीची टोपी**–स्त्री. लेपाची खोळ. (चहादाणीतील चहा थंड होऊं नये म्हणून त्यावर घालण्याची). **ले(लें)पडें**–न. हलक्या जातीचा लेप; बारीकसा व वाईट असा लेप.

लेपसट—वि. (ना.) लेचापेचा; शिळपट; स्त्रैण.

लेपाटी—स्त्री. विशिष्ट प्रकारचें नळकांडें; ठाकर लोकांचें पांखराच्या शिकारीचें एक साधन. –बदलापूर १७६.

लेफ—नपु. एक प्रकारचा मासा. लेप पहा.

लेफडा—पु. (कों.) सारवणाचा पट्टा किंवा रेघ; वांकडा तिकडा पट्टा. 'सुरेख चांगलें कपाळीं गंध लावावें तो लेफडा काय लावला आहेस?' [लेप]

लेबक—पु. (व.) पुत्र; मुलगा.

लेंबटा—वि. (गो.) आशाखोर.

लेब(भ)डा, ले(लें)भळा—वि. १ नेभळा; '(पोशाखांत, वागणुकींत); दुर्बळ; नेभळट. २ अस्ताव्यस्त; अव्यवस्थित; घाणेरडा (मनुष्य, पोशाख.) (लेभडा शब्द फक्त घाणेरडा या अर्थानेंच योजतात).

लेंभड—स्त्री. (कों.) रोडकेपणा; कृशता; क्षीणता; बारीकपणा; अशक्तपणा. **लेंभडणें, लेंभगें**–अक्रि. (कों.) १ क्षीण होणें; रोडावणें; वाळणें. २ (आजार, उपवास अगर श्रम यांनीं) गळून जाणें; दमणें; लंघणें; अशक्त होणें.

लेभागू—वि. उचल्या; एखादी वस्तु घेऊन पळणारा. [हिं. लेना+भागना]

लेभाशा, लेंभाळ्या—वि. (वना.) नेभरट; पुळचट; कुचकामाचा; अशक्त 'लेभाशा माणूस शेतकीच्या काय कामाचा?'

लेभें—न वाद; तंटा; झोंबड; खटलें; लडथड; लडा; खरकटें.

लेलाम, लेलांव—न. लिलांव पहा. **०दार**–पु. लिलांव बोलणारा, पुकारणारा.

लेलिहमुद्रा—स्त्री. चौसष्ट हजार तंत्रमुद्रांपैकीं एक. ही मुद्रा अशी:– उजवा तळहात डाव्या उलट्या हातावर धरावा व बोटें नागाच्या जबडयाच्या उघडमिटीप्रमाणें खालींवर करावीं.

लेलूत—स्त्री. उसने आणणें व परत न करणें. [सिं.]

लेलेमजनू—पु. गरीब, कींव करण्यास योग्य, भितरामाणूस. **लेले मजूर**–पु (व.) अशक्तपणामुळें काम करण्यास असमर्थ मनुष्य. 'आपण पाहिला तर लेलेमजूर, दुसऱ्यावर अवलंबून.' [लैलामज्नून या प्रेमी जोडप्यांचें जें शिमग्यांत सोंग आणतात त्यांत यांचें उच्च प्रेम न दाखवितां कांहीं तरी विकृत स्वरूपांत अत्यंत शेवटपट असा मज्नू दाखविला जातो यावरून रूढ.]

लेवचें, लेवप—क्रि. (गो.) चाटणें. **लेंवटो**–पु (गो.) हात चाटणारा; भांडें चाटणारा.

लेवट—न. (कों.) मैथुनार्थ संयुक्त झालेलें जोडपें.

लेवट—पु. (राजा.) भाजावळीकरतां गोवरी, कवळ, जाडें गवत इ० पसरल्यानंतर त्यावर जें फार बारीक गवत किंवा भातेणाचा चुरा पसरतात तो. [लेवा]

लेवट—नपु जाड व मजबूत असा कापसाचा पदार्थ. [लेप]

लेवठावचें—क्रि. (गो) देतों म्हणून न देणें.

लेवणा-णू—वि. (नंदभाषा.) तीनचतुर्थांश; पाऊण.

लेवणें—न. (कों.) लेवट पहा. भाजावळी करतां कवळावर घालावयाचें बारीक गवत. –सक्रि. भाजावळीकरतां कवळावर गवत, काटक्या इ० पसरणें. **लेवणी**–स्त्री. कवळावर गवत, काटक्या, माती इ० टाकण्याची क्रिया.

लेवदेव, लेवादेवा, लेवादेवी—स्त्रीपु.स्त्री. देवघेव; व्यवहार; व्यापार धंदा; उदीम; घेणें देणें. [लेंगेदेणें; गु.]

लेवविणें—सक्रि. चढविणें; घालणें; धारण करविणें. 'लेववितीं पांचपुडी आंगलीं।' –शिशु ९१. [सं. लेपन]

लेवा—पु. लेप; लेपन; गिलावा; पूट; लिंपण. 'जैसे लेवे दिधेल तमा। काजळाचे।' –ज्ञा १६.३९०. [लेप]

लेवाडा-ड्या—वि. कृश दिसत नसतां तितकी शक्ति नसलेला; मजबूत बांध्याचा नसल्यामुळें अशक्त; कमजोर; ढिला.

लेश—पु. १ अल्प अंश; सूक्ष्म भाग; कण. 'जें जें अत्यंत सुंदर दिसे। तें तें कृष्णाचेनी लेखें।' –एरुस्व १७०. २ शेष; अवशिष्ट भाग. 'करी तेथें भस्म लेशु।' –अभृ ३.२६.

लेश-स—वि. एकादें काम करण्यास तयार; तत्पर; हुषार.

लेश(स)पंड, लेसट—न. त्रासदायक होणारी अनिश्चित गोष्ट; घोंटाळ्यांत पाडणारी गोष्ट; त्रास,अडचण; लचांड; लिगाड. लांझा पहा.

लेषावळी—स्त्री. लेखावळी; मोजदाद; गणती. 'नृपती नाहीं लेषावळी।' –उषा ८.७१. [लेख+आवली]

लेस—वि. तयार; उत्कृष्ट सामान वगैरे भरपूर तयारीनें असलेला; लेशमात्रहि न्यूनता नाहीं अशा तयारीचा. 'छऱ्यांच्या थैल्या लेस करून ठेविल्या आहेत.' –ख ४३०९.

लेस—स्त्री. १ किनार; फीत; जाळीदार फीत; जोडावयाचे कांठ; बुटाचे बंद. २ (चांभारी) गिरणींतील तुटलेला पट्टा शिवण्याकरितां काढलेलें सल. [इं.] **०दार**–वि लेस लाविलेला; जाळीदार फीत जोडलेला. 'अंगांत लेसदार ब्लाऊज असून...' –हाकांध १०७.

लेंस—पु. (गो.) हातरुमाल.

लेसट—न. १ (भांडयाला अगर हाताला) चिकट्न राहिलेला तेल, तूप इ० पदार्थांचा अंश. २ अपूर्णता; उणेपणा; कमीपणा; कमतरता (इ० अर्थी कारभार, व्यवहार, काम, बोलणें इ० शब्दांना जोडून योजतात.) ३ लेशपंड पहा.

लेसन—न. धडा; शिकविण्याचा पाठ. 'याचें बीतभर लेसन तर त्याचें हातभर.' –ब्रावि १७१. [इं.]

लेसन, लैसन—न. परवाना; परवानगी; मंजुरी. [इं. लायसेन्स]

लेसां—क्रिवि. तयारीनें; बऱ्या रीतीनें; जपून. 'मग प्रमेयाचिया गांवा। लेसां जाइजे।' –ज्ञा ७.२२९. [लेस]

लेसाटा—वि. शेलाटा; काटकुळा; ढांगळा; उंच व बारीक.

लेह—पु. चाटण; चाटून खाण्याचा पदार्थ, औषध; अवलेह. 'लेहें पेयें चोखें खाद्यें चतुर्विधें अन्नें वन्हाडीयां ओगरलीं।' –धवळेउ ३८. [सं. लिह्=चाटणें] **लेहन**–न. १ चाटण्याची क्रिया. २ (नृत्य.) जिमेनें ओंठ चाटणें, दुसऱ्याच्या नजरेस न पडण्यासारखी गोष्ट दुसऱ्यानें पाहणें, मुलींचें लाजणें ह्या गोष्टी हा अभिनय दाखवितो. **लेह्य**–वि. चाटण्यासारखें; चाटून खाण्यास योग्य; चाटून खावयाचें (औषध इ०).

लेहडा—वि. (ना.) खादाड; चटावलेला; खादाडमावसा.

लेहणें—सक्रि. (काव्य.) लिहिणें. 'लेहोनि पत्रा खिळिलें प्रतापीं।' –अकक २. गजगौरीव्रत ३३.

लेहाजा—अ. म्हणून; सबब; यासाठीं. [अर. लिहाझा]

लेळूपेळू—वि. (व.) लुला; पांगळा. 'झोपेनें लेळूपेळू झाला.'

लै—वि. (अशिष्ट)लय; पुष्कळ; भरमसाट; अतिशय. लय पहा. **लैलूट**–स्त्री. विपुलता; लयलूट; अति समृद्धि. –वि. क्रिवि. विपुल; अतिशय; पुष्कळ. 'बटाट्यांचें पीक लैलूट करण्यास कोणत्या पदार्थांनीं परिश्रम केलेले असतात!' –माझीपण हीच गत १५.

लैसा—वि. मोठा. 'मी एक पंडित मी एक वैदिक। मी एक ज्ञानी लैसा।' –अमृत १२०. [लयसा]

लो—पु. (काव्य) लय; नाद; छंद; व्यसन. 'पुढें लो लागला खेळाचा।' –दा ३.२.२२. [लय]

लों—स्त्री. १ लव; शरीरावरील बारीक बारीक केंस. २ लोंकर; जनावराच्या अंगावरील केंस. [सं. लव, लोम]

लोइली—स्त्री. विशिष्ट प्रकारचा, गलबताचा लहान नांगर; लोयली पहा.

लोई—स्त्री. (व.) पांघरावयाची धावळी; पांघरूण. [लव. हिं.]

लोक—शअ. (व. ना.) पर्यंत; पावेतों. 'तूं तेथलोक चाल.' स्टेशनलोक जाऊन आलों. अतांलोक=आतांपर्यंत. [लग; हिं. लों, लौं=पर्यंत]

लोक—पु. १ जन; मनुष्य; मानवजात; जनता; समाज. 'तूं मात्र शहाणा, लोक काय वेडे आहेत?' (सामा.) लोकमर्यादा–रीति–लज्जा इ० (बहुधां अनेकवचनी प्रयोग). २ वर्ग; विशिष्ट समाज, संघ; जात; (या अर्थी पूर्वशब्दाशीं समास होऊन उपयोग.) उदा० ब्राह्मणलोक, शूद्रलोक, गवईलोक, शिपाईलोक, देवलोक, पिशाचलोक इ० ३ राष्ट्र; देश; राज्य; प्रांत. 'प्रौढ होतां संपूर्ण लोक आले खरेच उदयाला।' –ऐपो ३०४. –एभा १०. ६०४. ४ राजे, सरदार इ०कांजवळ किल्ला, शहर इ०कांचें रक्षण करण्याकरतां ठेवलेलीं माणसें; सैन्य; संत्री; शिपाईनोकर. ५ भुवन; जग; मानवजात; समूह. 'देहक्रिया आवघी। न करविता होय बरवी। जैसा न चलेतेनि रवी। लोकु चाले।' –ज्ञा ८.१८७. ६ परका माणूस; तिऱ्हाईत इसम; अनोळखी मनुष्य. 'आज आपल्याकडे लोक आले आहेत.' ७ मनुष्य; इसम; माणूस. 'जो दाखवील मजला कृष्णार्जुन तो न लोक सामान्य।'–मोकर्ण २६. १८. ८ जगाचे, विश्वाचे भाग. प्रामुख्यानें तीन लोक आहेत. स्वर्गलोक, मर्त्य किंवा मृत्युलोक, आणि पाताळलोक. पुढील सप्तलोकहि मानण्यांत येतात. भूलोक, भुवर्लोक, स्वर्लोक, महर्लोक, जनलोक, तपोलोक, सत्यलोक. ह्यांशिवाय प्रत्येक देवतेचा एकेक लोक कल्पिलेला आहे. उदा० इंद्रलोक, चंद्रलोक, ब्रह्मलोक, विष्णुलोक इ० 'जैं लोकांचीये व्यवस्था न पडे। जैं या त्रिभुवनाचें कांहीं न मांडे।' –ज्ञा १०.९५. ९ सद्गति; स्वर्गलोक; मरणोत्तर चांगली अवस्था. 'मनुवंशीं जन्मुनियां जालों अनपत्य मीं न लोक मला।'–मोमंत्ररामायण, बालकांड २०. १० प्रदेश; ठिकाण. 'अवघड स्थळीं कठीण लोक। तेथें राहणें नेमक।' –दा १५.२. २४. [सं.] **म्ह०** १ लोकां सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण =लोकांना उपदेश करावयाचा व स्वतः मात्र त्याप्रमाणें वागावयाचें नाहीं. २ लोक आणि ओक. =लोकमत हें अतिशय वाईट, तिरस्करणीय, ओकारीप्रमाणें त्याज्य असें जाहे, या अर्थी **उपयोग. लोकांचीं घरें(किंवा दारें)पुजणें**–सारखें लोकांच्या घरीं जाणें; या घरांतून त्या घरांत असें नेहमीं लोकाकडे जाणें. सामाशब्द– **०कथा**–स्त्री. १ दंतकथा; लोकांत प्रचलित असलेली परंतु ऐतिहासिक आधार नसलेली गोष्ट; कल्पित गोष्ट; परंपरागत गोष्ट. २ एक प्रकारचें वाङ्मय. प्राचीन काळापासून लोकांच्या तोंडीं असलेल्या गोष्टी, कहाण्या; लौकिक सारस्वत. (इं) फोकलोअर. **०गंगा**–स्त्री. समाज; लोकसमुदाय. 'जातगंगेला व लोकगंगेला मिळालें पाहिजे.' –भाऊ १९. **०गान**–न. जानपदगीत; खेडवळ लोकांचें गाणें. **०ग्रह**–पु. लोकमत; लोकांची एखाद्या गोष्टीविषयींची समजूत, कल्पना. **०चर्चा**–स्त्री. जनतेमधील चर्चा; गप्पा; लोकांत चर्चिली किंवा बोलली जाणारी गोष्ट. **०जवाई**–पु. (ना.) जांवई. –शर. **०तंत्र**–न. लोकमत; जनतेचा कल; प्रजेचें म्हणणें, प्रवृत्ति. 'सरकारनें लोकतंत्रानेंच राज्यकारभार हांकावा.' –केसरी २.१२.३०. –वि. लोकानुवर्ती; लोकांना जवाबदार. 'सरकार हें अधिक लोकतंत्र झालें पाहिजे.' –केले १.६४. **०त्रय**–न. तीन लोक; स्वर्ग, मृत्यु व पाताळ. **०धारजिणा**–वि. १ लोकमताला मानून वागणारा (परंतु स्वतःच्या किंवा धन्याच्या हिताबद्दल निष्काळजी); स्वतःच्यापेक्षां, स्वकीयांच्यापेक्षां लोकांच्या हिताला जपणारा. २ लोकांची काळजी करणारा; लोकाभिमुख. **०नाथ**–पु. १ एक औषधी रसायन. २ राजा; देव. 'लोकनाथा, जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना।'

-मारुतिस्तोत्र. **०नायक**-पु. लोकांचा पुढारी. 'लोकनायकाचें कर्तव्य फारच खडतर आहे.' -टि १.४६७. **०नियुक्त**-वि. लोकांनीं नेमलेला, निवडलेला. **०नीति**-स्त्री. लोकरीत; वागण्याची सामान्य पद्धत; समाजास मान्य गोष्ट; प्रघात; चालरीत. **०नुत**-वि. लोकांकडून प्रशंसा केला गेलेला; लोकांनीं स्तविलेला. **०परी**-स्त्री. लोकरीत. 'लोकपरीनें वर्तती जनीं।' -दावि २६६. **०पक्ष**-पु. लोकांची बाजू; प्रजापक्ष. याच्याविरुद्ध राजपक्ष, सरकारपक्ष. 'फेरोजशहांनीं आणीबाणीच्या प्रसंगीं लोकपक्ष संभाळला.' -टि १.४२२. **०पाल-ळ**-पु. १ राजा; प्रजेचा पालन कर्ता; नृप. 'म्हणवितां स्वतां लोकपाळा!' -विक ४०. २ इंद्र, यम इत्यादि लोकाचा स्वामी; अष्टदिक्पाल पहा. 'इहीं लोकपाळ केले। लोकपाळीं विविध, लोक स्रजिले।' -ज्ञा १०.१०२; -एभा १०.६०३. **०प्रवाद**-पु. बातमी; लोकवार्ता; वदंता; किंवदंती; जनप्रवाद (सामान्यतः वाईट अर्थानें). 'लोकप्रवाद कायकाय कंडया पिकवील तें सांगतां येत नाहीं.' -नि ४३४. **०प्रवाह**-पु. सर्वसाधारण चालरीत, वागणूक; लोकरीत. **०प्रशस्त**-वि. लोकसंमत; लोकमान्य; रूढीला धरून. असलेला. **०प्रसिद्ध**-वि. १ सर्वप्रसिद्ध; लोकांमध्यें अतिशय माहित असलेला; लोकांमध्यें प्रचलित. २ सर्वसाधारण; सामान्य. **०प्राणेश**-पु. (लोकांच्या प्राणांचा मालक, धनि.) वायु; हवा. **०बंधु**-पु. १ लोकांचा भाऊ; लोकहितकर्ता. 'लोकबंधू जो होय खरी ऐसा।'-नल. २ सूर्य. **०बाह्य**-वि. १ (लोकांच्या सामान्य वागणुकीहून किंवा समजुतीहून निराळा) विचित्र; विलक्षण; चमत्कारिक. २ लोकांना प्रिय नसणारें; लोकविरुद्ध. **०बोली**-स्त्री. लोकांचें बोलणें; लौकिक बोली. 'गुणा निर्गुणा आणिलें लोकबोलीं।' -दावि २६६. **०भय-भीति**-नस्त्री. जनतेची भीति; लोकप्रवादाची भीति; जनलज्जा. **०भांड**-वि. भांडखोर; बडबड्या. -तुगा. **०भाषा**-स्त्री. १ सामान्य जनतेची भाषा, बोली. २ बोलण्यांतील भाषा; वाक्प्रचार. ३ अडाणी भाषाप्रयोग; असंस्कृत बोली. **०मत**-न. सामान्य जनसमूहाचा अभिप्राय; लोकांचें म्हणणें; त्यांचे विचार. 'ज्या वसाहतींत लोकमतदर्शक कायदेमंडळें आहेत त्यांस या कायद्यानें आपल्या शासनपद्धतींत फेरफार करवून घेण्याचे अधिकार देतांना हा निर्बंध घालून ठेवला.' -वस्व १३६. **०मतानुवर्ती**-वि. लोकांच्या मताप्रमाणें असलेला; लोकतंत्राप्रमाणें चालणारा. [लोक+मत+अनुवर्ती] **०मर्यादा**-स्त्री. १ जनरूढी; पडलेली वहिवाट; प्रचार. २ जनलज्जा. ३ जनाचा मान; लोकांविषयीं आदरभाव. (क्रि० राखणें; ठेवणें; पाळणें; धरणें; बाळगणें). **०माता**-स्त्री. लक्ष्मी; लोकजननी. 'न सेविती हे जरी लोकमाता।' -सारुह २.१८. **०मांदी**-स्त्री. लोकांचा समूह; गर्दी. 'त्वरें चालती धांवती लोक मांया। पुरी वोस ते रात्र जेथें अयोध्या।' -मुरामायणें अयोध्या ४३. **०मान्य**-वि. १ लोकांना मान्य; प्रिय. २ लोकांचा पुढारी नेता. 'लोकमान्य हा शब्द उच्चारतांच मनांतून ही पदवी तुम्ही मान्यच करतां.'-केले १.२७६. बाळ गंगाधर टिळक यांना लावण्यांत आलेली, येणारी पदवी. 'गोखल्यांची इंग्लंडांतील कामगिरी' -(विश्ववृत्त एप्रिल १९०६) या लेखांत प्रथम वि.का.राजवाडे यांनीं वापरली. **०रंजन**-न. १ लोकांची करमणूक. २ लोकांना संतोष, सुख होईल असें आचरण; लोकांना खूष ठेवणें. **०रमण**-वि. लोकांनां संतुष्ट करणारा. 'पूर्णब्रह्म स्वयें श्रीकृष्ण। बळी बळिराम लोकरमण।' -एभा १.२०३. **०राजक-राज्य**-न. लोकमतानुवर्ती शासनसंस्था. (इं.) डेमॉक्रसी. 'लोकराजकाचे दोष त्यांना स्पष्ट दिसत होते.'-महाजनि (मनोरंजन-आगरकर अंक). **०रीति-रीत**-स्त्री. लोकांची वागण्याची पद्धत; जनरीतिरिवाज; सामान्य वागणूक. **०लचांड**-न. लोकांच्या नाखुषीनें होणारा त्रास; येणारी अपत्ति, लोकांच्या अवकृपेचें संकट. **म्ह०** सगळें लचांड पुरवेल पण लोकलचांड पुरवणार नाहीं. **०लज्जा-लाज**-स्त्री. लोकमर्यादा पहा. १ लोकमताला मानणें; लोकांना जुमानणें. २ जनलज्जा; लोकभय; लोकांची वाटणारी शरम. **०लोकपाळ**-पुअव. १ देशाचे किंवा समाजाचे पुढारी लोक; प्रतिष्ठितवर्ग (व्यापकार्थी). २ राजा व त्याचे अधिकारी (लवाजम्यासह). ३ फौज; शिपाई. **०वाद-वार्ता**-स्त्री.पु. जनवार्ता; वदंता; कंडी; लोकप्रवाद पहा. 'लोकवार्तेला गति मिळाली कीं ती किती फोफावेल याचा नियम नाहीं.' -इंप ३७. **०विद्या**-स्त्री. समाजशास्त्र. -मसाप २.२१९. **०व्यवहार**-पु. लोकप्रवाह; सामान्य रीत; जनरीत; सर्वसाधारण वागणूक. **०शाही**-स्त्री. लोकांच्या सत्तेखालीं त्यांच्या संमतीनें चालणारी व त्यांच्याच हिताची अशी राज्यपद्धति. **०शिरस्ता**-पु. सामान्य परिपाठ; सामान्य रीत; लोकांची वागण्याची पद्धत; राहटी; रूढी. **०संख्या**-स्त्री. एका विशिष्ट स्थानीं राहणाऱ्या एकंदर सर्व लोकांची गणती. **०संग्रह**-पु. समाजव्यवस्थेचें रक्षण; लोकसंस्थेचें संरक्षण; अनेक अनुयायी मिळविणें; लोककल्याण; लोकदीक्षा; स्वतःला निराळ्या रीतीनें वागण्यास प्रत्यवाय नसतांहि लोकांनीं आचारभ्रष्ट होऊं नये म्हणून स्वतःच्या इच्छेविरुद्ध कांहीं आचारांचा स्वीकार करून लोकांची जूट राखणें. 'ज्ञानी पुरुषांनीं यथाधिकार धर्मसंस्थापनेसारखीं लोकसंग्रहाचीं कामें करावीं.' -टिसू ५. 'तया लोकसंग्रहालागीं। वर्ततां कर्मसंगीं। तो कर्मबंधु आंगीं। वाजेलना।' -ज्ञा ३ १७५. **०सत्ताक-सत्तात्मक**-वि. लोकांची सत्ता असलेलें; लोकमतानुवर्ती; राजा नसून लोकांकडून राज्यकारभार चालणारी (शासनपद्धति). 'लोकसत्तात्मक राज्यपद्धतींत लोकच राजे असतात.' -गांगा २६. **०संपादणी**-

स्त्री. लोकांचीं मनें अनुकूल करून घेणें; लोकांची खुशामत; लोकांच्या मर्जीकरितां केलेली बतावणी. 'जैसि बहुरूपियांची रावो राणी। स्त्रीपुरुषभावो नाहीं मनीं। परी लोकसंपादणी। तैशीच करिती।' –ज्ञा ३.१७६. ०**समजूत**–स्त्री १ सर्वसाधारण लोकांचें मत; सामान्य समजूत. २ (एखाद्या मनुष्याविषयींचें किंवा पदार्थाविषयींचें) लोकांचें यथायोग्य ज्ञान; समाधान; योग्य जाणीव. ३ केवळ लोकांचें समाधान (आपलें किंवा आपल्या बाजूचें समाधान न मानतां फक्त लोकसमाधान) पहाणें. ०**साहित्य**–न. लोकांच्या जिव्हाग्रीं परंपरेनें वावरत असलेलें कथात्मक वा गीतात्मक वाङ्मय. हें लिखित असेलच असें नाहीं. यांचीं उदाहरणें–कहाण्या, सावित्रीचें गाणें; कावळाचिमणीच्या गोष्टी; ठकसेनाच्या गोष्टी. इ० ०**सिद्ध**–वि. लोकांत रुढ असलेलें; लोकांत चालू असलेलें; प्रचलित; वहिवाटींत असलेलें. ०**स्थिति**–स्त्री. एकंदर जनतेची सामान्य स्थिति; लोकांची परिस्थिति. 'गाडग्या घोडग्यांतून हिंडणाऱ्या गृहस्थापेक्षां गरिबांनाच लोकस्थिति अधिक चांगली समजते.' –टि २.८०. ०**स्फीति**–स्त्री. लोकप्रसिद्धि. 'स्वामींची नजर खायसमृद्धीवर, त्यांच्या पुरस्कर्त्यांची लोकस्फीतीवर व इतरेजनांची केवळ मौजेवर.' –नि ६१९. ०**हितैषी**–वि. जनतेचें हित इच्छिणारा; लोकांचें कल्याण पाहणारा. [लोक+हितैषी; हित+इष्=इच्छिणें] **लोकाग्रणी**–पु. लोकश्रेष्ठ; लोकांचा पुढारी; नेता. [लोक+अग्रणी] **लोकाग्रह**–पु. लोकांची उत्कट इच्छा; जनतेचा आग्रह. **लोकाचळ**–पु. स्वर्गादि लोकरूपी पर्वत; जगरूप पर्वत. 'ए=हवीं जगदाकाराचें सिरें। जें चिरस्थानीयांचे धुरे। ब्रह्मभुवन गा चवरें। लोकाचळाचें।' –ज्ञा ८.१५४. [लोक+अचल] **लोकाचार**–पु. रूढी; लोकांची रीत; प्रघात; वहिवाट; लोकरीत. 'अंतरनिष्ठ तितुके तरले। अंतरभ्रष्ट तितुके बुडाले। बाह्याकारें भरंगळले। लोकाचारें।' –दा १८.१.२४. **लोकांतर**–न. परलोक; (स्वर्ग, नरक इ०) मृत्युलोकाहून निराळा दुसरा लोक. [लोक+अंतर] **लोकांतीं**–क्रिवि. लोकांमध्यें; जाहीर रीतीनें; उघडउघड. 'एकांतीं लोकांतीं करूं गदारोळ। लेश तोही मळ नाहीं येथें।' –तुगा १९९१. **लोकातीत**–वि. अलौकिक; लोकांवेगळें; या लोकीं न सांपडणारें. [लोक+अतीत] **लोकानुकूल्य**–न. लोकांची अनुकूलता; जनमान्यता; लोककृपा; लोकप्रसिद्धि. [लोक+आनुकूल्य] **लोकापवाद**–पु. लोकांनीं केलेली निंदा; जनापवाद; लोकप्रवाद. [लोक+अपवाद] **लोकालोक**–पु. सप्तद्वीपात्मक पृथ्वीला तटबंदीसारखा असलेला पर्वत; सप्तद्वीपा पृथिवी व सप्तसमुद्र यांना वेढणारा व सूर्यमंडळापर्यंतचा अवकाश व्यापून टाकणारा असा एक महान् विस्तृत पर्वत. **लोकालोकीं**–क्रिवि. १ तिन्हाइतांकडून तिन्हाइतांमार्फत. २ विशेष पुरावा नाहीं अशा प्रकारें लोकांच्या तोंडून ऐकिलेलें. 'ही खबर मी लोकालोकीं ऐकिलेली आहें.' **लोकी(कि)क**–पु. १ लौकिक; कीर्ति; यश. 'बहु लोकिक सांडूं नये।' –दा १४.१.६८. २ प्रसिद्धि; चांगल्या किंवा वाईट रीतीनें लोकांस माहीत असणें. –वि. या लोकांतील; 'प्रपंच संपादणें लोकिक।' –दा २.७.९. [सं. लौकिक] **लोकिकीं**–क्रिवि. (काव्य) लोकांत; लोकसमुदायांत. 'पुत्रसंतान नस्तां दुःखी। वांज नांव पडिलें लोकिकीं।' –दा ३.३.३२. **लोकेषणा, लोकेशना**–स्त्री. १ लोकांनीं आपणास बरें म्हणावें अशी इच्छा; कीर्तीची इच्छा. 'वैराग्यें तनु शुष्क करावें सोडुनि लोकेशना।' –देप ६७. २ स्वर्गादि लोकांच्या प्राप्तीची इच्छा. ३ लोकांमध्यें चांगली किंवा वाईट प्रसिद्धि; लोकमान्यता किंवा दुर्लौकिक. 'मुलखांत लोकेशना होती.' –पेद २१ ११२. [सं. लोकेषणा] **लोकोक्ति**–स्त्री. १ म्हण. २ ज्यांचा रूढ अर्थच घ्यावयाचा, शब्दशः अर्थ घ्यावयाचा नाहीं असे शब्द समुच्चयानें; वाक्प्रचार. उदा० डोळ्यांत तेल घालून राहणें; डोक्यांत राख घालणें इ०. ३ (साहित्य) ज्या वाक्याला वाक्प्रचारानें चारुता आली आहे असें वाक्य. 'हरिच्या पुन्हां पुन्हां कां काडया नाकांत घालिशी शशका।' [लोक+उक्ति] **लोकोत्तर**–वि. अलौकिक; असामान्य; असाधारण. [लोक+उत्तर] **लोकोद्धार**–पु. मानव जातीचा उद्धार; कल्याण; मोक्ष; जननमरणापासून मानवाची सोडवणूक; लोकांची उन्नति, प्रगति. [लोक+उद्धार] **लोकोपकार**–पु. केवळ लौकिकाच्या संरक्षणार्थ करण्याचा शिष्टाचार; जी करण्याला शास्त्राज्ञा किंवा आपली इच्छा नसून केवळ लोकमर्जीकरतां आपण करतों ती गोष्ट, कृति. [लोक+उपचार]

लों(लो)कर—स्त्री. १ बकरीं, मेंढरें इ० च्या अंगावरील मऊ केंस. २ शरीरावरील बारीक व मऊ केंस; लव. ३ (कों.) आंब्याच्या बाठयावर असणारा काथ्यासारखा पदार्थ; रेषा. [सं. लोम] **लों(लो)करी**–वि. लोकरीचा बनविलेला.

लोकर—स्त्री. रोकड; नगद. –बदलापूर ३९.

लोकल—वि. स्थानिक; ठराविक मर्यादेच्या आंतील. [इं.] ०**फंड**–पु. स्थानिक कर. [इं.] **लोकलफंडी**–वि. लोकलफंडांतून बांधलेली (सडक). ०**बोर्ड**–न. स्थानिक स्वराज्यसंस्था.

लोकाट—न. एक झाड. हें मूळचें चीन व जपान मधील आहे. याची लागवड उत्तरहिंदुस्थानांत होते. फुलें सुवासिक व फळें आंबटगोड लागतात. –ज्ञाको (ल) ५८.

लोकी—पु. (माळवी) दुध्या भोंपळा. [हिं.]

लोखंड—न एक कठीण धातु; लोह. याचा रंग गर्द करडा किंवा काळा असतो. हा धातु कठीण, चिवट, उष्णतावाही आहे. याचे तापवून ठोकून पत्रे व तार काढतात. या धातूला हवापाण्यानें गंज चढतो. [सं. लोहखंड; फ्रेंजि. लोलो] **लोखंडाचे चणे**

खाणें–खडतर तपश्चर्या करणें; फार कष्ट सोसणें. **लोखंडाचे चणे खावविणें–चारणें**–अत्यंतिक जुलूम करणें; अतिशय त्रास देणें; अत्यंत हालअपेष्टा सोसावयास लावणें. **लोखंडकाम**–न. १ घर, यंत्र इ० मध्यें जे लोखंडाचे भाग लागतात ते समुच्चयानें; लोखंडी सामान. २ लोहारकाम. **लोखंडाची फणी**–स्त्री. वस्तरा. 'तिच्या डोक्यावर लोखंडाची फणी फिरवावी.' –आगर ३.१९७. **लोखंडी**–स्त्री. १ लोखंडाची कढई; काहील. २ एक वेलीसारखें झुडुप. –वि. १ लोखंडाचा बनविलेला. २ (ल.) कठीण; लोखंडासारखा टणक; मजबूत; कणखर. (शरीराचा बांधा, हाडपेर इ०). ३ गांठी असलेलें व कठीण (लांकूड). ४ फार आग करणारा; कमी न होणारा (ताप). ५ जाडाभरडा; कठीण; मजबूत; टिकाऊ. **०कडबा**–पु. अरगडी जातीच्या जोंधळ्याचा कडबा. **०काच**–स्त्री. तांबड्या मुरमाच्या जातीचा दगड; लाल रंगाची कठीण माती. **०केळ**–स्त्री. केळीची एक जात. **०केळें**–न. लोखंडी जातीच्या केळीचें फळ. **०चार**–स्त्री. एक प्रकारचें गवत. **०चुना**–पु. मजबूत आणि टिकाऊ चुना किंवा अशा चुन्यानें केलेलें काम. **०छाप**–पु. छापण्याकरितां शिशाचे केलेले ठसे (याच्या उलट शिळाछाप अगर दगडछाप). **०जर**–पुस्त्री. खोटा जर; लोखंडाचा जर. **०झाड**–न. लोखंडासारखें कठीण लांकूड असलेलें झाड. **०तगर**–स्त्री. तगर नांवाच्या एका फुलझाडाची एक जात. या जातीच्या तगरीला वास नसून फुलें ताठ असतात. **०पाया**–पु. मजबूत व टिकाऊ पाया. **०फळ**–न. लोखंडी झाडाचें फळ. **०मन**–न. निर्दय मन; कठोर मन; निष्ठुर मन. 'महाराजासारखा लोखंडी मनाचा मनुष्य दुसऱ्याहि हाल अपेष्टांनीं द्रवणारा नव्हता. –विक्षिप्त २.१५२. **०मुरूम**–पु. कठीण मुरूम **०रस्ता–सडक**–पुस्त्री. लोहमार्ग; आगगाडीसाठीं रूळ घालून केलेला मार्ग. **०लास**–स्त्री. (चांभारी) चामडें ठोकण्याची ऐरण. **०हळद**–स्त्री. कठीण व तांबड्या रंगावर असलेली हलकी हळद. **लोखाण**–न. (कों.) लोखंड.

लोग—क्रिवि. (खान.) पर्यंत. लोक पहा. [लग]

लोंग-गी, लोंघ—स्त्री. भात, गहूं, राळा, वरी इ० धान्याचें कणीस; लोंब.

लोंग—स्त्री. (कों.) लाख नांवाचें धान्य.

लोंगर—नपु. १ केळीच्या झाडाला येणारा केळ्यांचा घड, घोस; केळवंड. २ (राजा. कुण.) मोठी लोंग; मोठें व लांब कणीस.

लोंघळावि(व)णें—सक्रि. (कों.) चिखल, राख, माती इ० मध्यें (वस्त्र) लोळविणें.

लोंच—स्त्री. (गो.) लांच.

लोंच—पु. उचलून पाय टाकण्याचा प्रकार. 'शिगराच्या पुढील पायांत लोंच असा सिकवावा.' –अश्वप १.१९०.

लोचका—पु. ओढून काढलेला तुकडा. लचका पहा.

लोंचट-ड—वि. १ लवकर न तुटणारा; चिवट; वातड; तुटतां तुटत नाहीं अशी (भाकरी, पोळी इ०). २ लवचिक; वांकणारा. ३ (ल) कितीहि झिडकारिलें किंवा रागें भरलें तरी लगट करणारा किंवा बोलावयास येणारा निर्लज्ज (मनुष्य). (गो.) लोचरो.

लोचण—स्त्री. न्हाव्याचा केस उपटण्याचा चिमटा. [सं. लुच्]

लोचन—पु. डोळा. [सं.] **लोचनावर्त**–पु. घोड्याच्या भुंवईखालीं असणारा भोंवरा.

लोचा—पु. बनावट रेशमाचा गाळ.

लोंचा—पु. (कु.) निकालांत न निघालेला व त्रासदायक होणारा वाद, तंटा, हिशोब इ०. लांझा पहा.

लोंजारणें गोंजारणें—सक्रि. लाड करणें; कुरवाळणें; पाठीवरून हात फिरविणें. [गोंजारणें द्वि.]

लोट—पु. १ पाणी, वारा, इ० चा (आणि यावरून मनुष्यें, प्राणी इ० चा) एकदम आणि जोरानें आलेला मोठा प्रवाह, लोंढा, समुदाय किंवा टोळी; जोराची पुढें येणारी लाट. २ गतिमान् पदार्थाच्या गतीचा किंवा वेगाचा जोर; गतिमान् पदार्थानें दिलेला धक्का किंवा अशा धक्क्याचा जोर. 'लहान चाकाचा लोट भारी, मोठ्या चाकाचा लोट हलका.' ३ हरएक प्रकारचीं कामें, काळज्या, जबाबदाऱ्या इ० चें मनावर पडलेलें दडपण. ४ वक्तृत्वाच्या ओघाचा जोर. ५ (ल.) (आंबे, फणस इ० ची) समृद्धि; विपुलता; लयलूट. ६ लोटांगण; नम्र होणें. 'लोट धेति पोट खरडिती ओंठ भजनिं हालविती.'–राला १९. ७ (व. ना.) लहान ओढा, नाला; प्रवाह. [लोटणें] **०गाडा**–पु. (साताऱ्याकडे) आंत सामान भरून ढकलीत न्यावयाची हातगाडी.

लोटण—पु. एक प्रकारचें कबूतर. [हिं.]

लोटण—पु. जमिनीवर लोटत लोटत जावें अशी शिक्षा झालेला मनुष्य. [लोटणें] **०चाल**–स्त्री. एक प्रकारची घोड्याची चाल. चाल पहा. **०दिवा**–पु. कितीहि हलला, डोलला तरी न पडणारा किंवा न विझणारा असा सांगाड्यांत बसविलेला दिवा.

लोटणा—पु. खराटा; झाडणी; केरसुणी; केर लोटण्याचें साधन.

लोटणें—सक्रि. १ (एखादा पदार्थ) ढकलणें; जोरानें पुढें रेटणें–सारणें; टाकणें. 'प्रेम झोंबे कंठीं । देह धरणीये लोटी ।' –तुगा १८१५. २ जमिनीवरून (दगड, चाक इ०) त्याच्या आंसाभोवतीं फिरवीत ढकलणें किंवा पुढें दडपणें; रगडणें; लाटणें. बंद करणें; जोरानें लादणें (दार). ४ (दिवस, वाढ इ०) घालविणें

अतिक्रान्त करणें; कष्टानें काळ कंठणें; (खाद्य, पेय, औषध, इ०) घशाखालीं घालणें (नाखुषीनें किंवा आधाशीपणानें). ६ (हत्ती, घोडे, सैन्य, इ०चा) शत्रूवर एकदम घाला पडणें; जोरानें चालून जाणें; हल्ला करणें. ' देह समंधावरी लोटला । संकल्पावरी उटावला । '–दा ५.९.४२. ७ दूर करणें; सारणें; दूर टाकणें. ' तेही तयाचा मग हात लोटी । '–सारुह २.३१. –अक्रि. १ ढकलले जाणें. २ जोरानें येणें, घुसणें, वाहणें; एकदम येणें; पुष्कळ प्रमाणांत येणें, जाणें, जमणें. ' देवळामध्यें कथेला आज लाखों मनुष्य लोटलें होतें. ' ' अवचितां सुखसागर लोटला । ' –दावि १९३. ३ (दिवस, वर्ष, काळ) निघून जाणें; पुरे होणें; संपणें; नाहींसें होणें; गत होणें. ' इष्टविरहशोकोत्थित दुःसहमूर्च्छेंत लोटली घटिका । ' –मोकर्ण ६.१. ४ (भित, घर इ०) कोसळणें; ढासळणें. ५ सर्व शक्ति एकवटून जोरानें (शत्रूवर) तुटून पडणें. ' आकाशाहूनि विजू पडत । तेवीं दक्षावरि अकस्मात् । वीरभद्र लोटला ' ६ (अश्रु) जोरानें वाहणें, येणें; (नदी, लोंडा इ०) दुथडीभरून वाहणें; पूर येणें. ' जें पाणी लोटलें तें लागलेंच दोन्ही थडी भरल्या. ' ७ काळेकुट्ट आणि वावटळीचे ढग येणें; जोराचा पाऊस येणें. ' तिकडे जों पाऊस लोटला तो गांवचे गांव वाहविला. ' ८ (धान्य, फळें. पीक इ०) भरपूर येणें; अतिशय पिकणें; लयलूट होणें; समृध्दि होणें. ९ आंथरुणावर लवंडणें; निजणें; पडणें. १० लोटांगण घालणें. ' लोटला पायीं स्तवितचि । ' –दावि ४४. ११ तोडून टाकणें; तोडणें. ' आणि नित्यादिक जें असें । तें येणें फळत्यागें नासे । शिर लोटलिया जैसें । येर आंग । ' –ज्ञा १८.१२८. १२ पालटणें; बदलणें. ' परी मनोधर्मु न लोटे । विकारविलाहि । ' –ज्ञा २.४१. १३ मोजणें; मोजून टाकणें. ' बाप दुःखाचें केणें सुटले । जेव्ह मरणाचे भरे लोटले । ' –ज्ञा ९. ४९६. १४ मरणें; जाणें. ' येवढें शहोरात्र जेथिंचें । तेणें न लोटती जे भाग्याचे । देखती ते स्वर्गीचे । चिरंजीव । ' –ज्ञा ८.१५७. [सं. लुठ्; प्रा. लोट्ठ; हिं.]

लोटपोट—स्त्री १ लोळण. २ बेसुमार मौज; आनंद; हंशा, खिदळणें इ० चाळे किंवा क्रीडा. ३ पूर्ण तृप्ति किंवा समाधान. ४ कसें बसें काम रेटण्याची क्रिया; चालढकल. ५ वैपुल्य; चंगाळी. ६ नृत्य, गीत, वक्तृत्व इ० पाहून किंवा ऐकून होणारी तल्लीनता, एकाग्रता किंवा करमणूक. ७ एखाद्या वस्तूच्या दोन्ही बाजू. **०करणें–होणें**–हंसून हंसून मुरकुंडी वळणें; हंसून पोट दुखूं लागणें. ' हंसून हंसून ती लोटपोट होऊन गेली. ' –पप्रे ४२.

लोटलोट—स्त्री. लोटणें; गडबडणें. ' होत लोटलोट आपटले । ' –दावि १२३.

लोट, लोहट—पु (कों) पोहोरा; विहिरींतून पाणी काढण्याचें तांब्याचें भांडें, [सं. लोहघट]

लोटा—पु. (हेट. कु.) घराचा ओटा. **लोटी**–स्त्री.(राजा. कु.) ओटी; ओसरी. **लोटो**–पु. (राजा. कुण.) ओटा.

लोटा-ट्या—पु.(कों.) १ रहाटगाडग्याच्या माळेस बांधण्याचें मातीचें भांडें. २ विशिष्ट आकाराचें तांबें, पितळ इ० धातूचें भांडें, ताब्या, गडवा, तपेली इ०; मोठी ले.टी. ' कनकाचियां लोटीं सिंपिजेती । वेली सातुसे आंचिसां । '–शिशु ३१२. [सं. लोहघट] **०बाडगी–बासन**–स्त्रीन. १ गरिबाघरचीं स्वयंपाकाचीं भांडीकुंडीं. २ स्वयंपाकाची तयारी. उदा० चुली सारवणें, सर्पण आणणें, भांडींकुंडीं व्यवस्थितपणें ठेवणें इ० पारोसें काम. ' लोटाबाडगी करून मी भाकरी करावयाला बसलें. ' **लोटी**–स्त्री. १ तपेली; लहान तांब्या; लहान लोटा; विशिष्ट आकाराचें तांबें, पितळ इ० धातूचें पाणी ठेवण्याकरतां अगर पिण्याकरतां भांडें. २ तीर्थकुंड. –ऐरापुप्र १०.१ **लोटकें, लोटका**–पु.न. (जुन्नरी) लहान मडकें; लहान भांडें.

लोटा-ट्या—वि. धष्टपुष्ट. लोठा-ठ्या पहा.

लोटांगण—न. १ देवापुढें, साधुपुरुषापुढें किंवा राजा इ०कांपुढें नम्रपणानें लोळणें; साष्टांग नमस्कार. ' घालूं लोटांगण तच्चरणीं । ' –विक ४. २ ईश्वरादि प्रीत्यर्थ आडवें पडून चक्राकार लोटत जाणें; असें लोटत जात असतां होणारा फेरा. (असें लोटत क्षेत्रास गेल्यानें पुण्य लाभतें अशी समजूत आहे.) ३ एखादा पदार्थ उंचावरून ढासळून खालीं गडगडत येत असतां त्याचे आपल्या भोंवतीं होणारे फेरे प्रत्येकी. [लोटणें+अंगण]

लोटालोट-लोटी—स्त्री. १ एकमेकांनीं एकमेकांस लोटणें, ढकलणें; ढकलाढकली. २ (ल.) एकमेकांवर कामाची कोलवाकोलवी ३ काम, उद्योगधंदा कसाबसा करणें; चालढकलीवर नेणें.

लोटाळण-णें—न. (व.) लाटणें; पोळी इ० लाटण्याकरितां लागणारा गोल दांडा.

लोटिंगो—पु. (गो.) झाडांचे हातहात तुकडे करून जंगलांतून शहरांत आणणें. [लोटणें]

लोठा-ठ्या, लोंठा-ठ्या—वि. लठ्ठ; अगडबंब; धष्टपुष्ट; गलेलठ्ठ; मजबूत; धिप्पाड (माणूस, लाकूड, पशु इ०). **लोठाश्रम**–पु. १ कोणीहि अगडबंब, लठ्ठ व मूर्ख माणूस; धटिंगण; उच्छृंखल मनुष्य; लठ्ठ निरंजन. ब्रह्मचर्यादि आश्रमहीन मनुष्य. २ सडेसोट. ज्याच्यामागें बायकोमुलें इ० व्याप नाहीं असा माणूस.

लोड, लोढ—नपु.पु. १ टेकण्यासाठीं केलेला लांब आणि वाटोळा तक्या; पृष्ठोपधानक. ' त्यावरि प्रेमाची गादी सुघड । पाठीशीं धैर्याचें केलें लोड । वरि आनंद चांदवा अखंड । प्रकाशमय लाविला । ' –ह ३३.३. २ तुरपून शिवलें असतां होणारी वळकटी; तुरपून घातलेली शिवण; गोट. ३ सुताराच्या सामत्याची

मूठ. ४ –न. पाभर, कुळव इ० आउतास एक अवयवभूत आडवें लांकूड असतें तें. यांत जुंवाचा दांडा अडकवितात; वखर, कुळव यांचें दिंड.

लोड—वि. (खा.) रोड; अशक्त.

लोडणा—पु. जनावर पळूं नये म्हणून त्याच्या गळयांत बांधण्याचें अवजड लांकूड; अवजड पदार्थ. लोढणें पहा.

लोडणी—स्त्री. दवडणें; घालविण्याची क्रिया. 'सात घटिकां पुढें तयाची लोडणी। इंद्रियें गोठणी सर्वे येती।' –ब ११२.

लोडणें—न. सुतार इ०चें कोरण्याचें, खोदण्याचें किंवा कातण्याचें हत्यार.

लोडमदान्—वि. (व.) लोढण्यासारखा असणारा मनुष्य.

लोडा—वि. (खा. भिल्ली) लोखंडी.

लोडिगा—पु (कों.) लांकडाचा ओंडा.

लोडी—पु (सोनारी) सफाई, पॉलिश करण्याचा दगड.

लोडेलूट—स्त्री. लवडेलूट पहा.

लोढ—पु. लोड; लांबडा व गोल तक्या. लोड पहा.

लोढणें—सक्रि. (कापसांतून) सरकी काढणें; कापूस विंचरणें. **लोंढमन**-न. (खा.) सरकी काढणें. **लोढाई**-स्त्री. कापसांतून सरकी काढणें किंवा त्या कामाची मजुरी.

लो(लों)ढणें, लोड(ढ)णा—न.पु. १ ओढाळ गुराच्या गळयांत अडकविलेलें लांकूड. २ (ल.) प्रतिबंधक गोष्ट. लचांड; जबाबदारी; जोखड; आपणास अप्रिय असें माणूस किंवा काम–जें आपल्या पाठीस लागलेलें असतें तें. 'वृद्धानें बालपत्नीचें लोढणें गळयांत अडकवून घेणें हें नित्य आहे.' –टि ४.१३७. [३ बेढब आणि जड असा दागिना इ०. ४ मालाच्या ओझ्यानें गाडी उलथून पडूं नये म्हणून जें टेकण देतात तें. (व.) लोडन. [सं. रोधनम्]

लोढणें—सक्रि. १ पुष्कळ अभ्यास करणें; परिशीलन करणें; शिकणें. 'तो न पढो कां ब्रह्मसुत्र। न लोढो सर्वे शास्त्र।' –ज्ञा १७.८५. २ ढवळणें. [सं. आलोडन]

लोढा—पु. (काशी) वरवंटा; चटणी इ० वाटून चूर्ण करण्याचा गोल लांबट दगड. [सं. लुठ्]

लोढा—पु. बुळणी; घोट. 'मुखी रक्त लोढे खोटी।' –वेसीस्व १०१.

लोंढा—पु. १ अकस्मात येणारा पाणी इ० द्रव पदार्थाचा लोट, प्रवाह; पूर. 'तयाचि पाहे या तोंडा। येईल जळंवटाचा लोंढा। इया उमळती दाढा। दांतांसहित।' –ज्ञा १३.५६४. २ मोठी आणि जोराची पाण्याची लाट. ३ (ल.) धान्यें, फळें इ० कोणत्याहि पदार्थाची बाजार, शेत इ०मध्यें एकदम झालेली समृद्धि; अति विपुलता; असंख्य वस्तु. ४ गांव, देश इ०वर धाड घालण्यासाठीं परगांवाहून किंवा परदेशाहून आलेली लुटारूंची टोळी; यात्रा इ० प्रसंगानें एखाद्या स्थळीं एकदम गोळा झालेले लोक. **लोंढ्याबरोबर-सरसें वाहात जाणें**–समाजांत रूढ असलेल्या किंवा होत चाललेल्या सरणीनें वागणें; प्रवाहाबरोबर वाहून जाणें.

लोढ्या—वि. लोठा–ठ्या पहा.

लोण—न. एक कापडाची जात. –मुंब्या १२३.

लोण—स्त्री. १ खाऱ्या पाण्याच्या आश्रयानें खाडी इ०च्या कांठीं रुजणारें एक प्रकारचें गवत. २ लवण; मीठ. 'लाविल्या लोण न लगे ज्यासी। लोणलक्षण त्या काय पहासी। तें तंव नाणावें पंक्तीसी। चवी त्यासी पै नाहीं।' –एरुस्व १८.४८. ३ जमिनींतील क्षाराचा अंश. ४ सिंध प्रांतांतील उमरकोट व शहाबंदर येथील एका विशिष्ट झाडाच्या राखेपासून तयार केलेला पापडखार. ५ (ल.) उतारा; ओंवाळणी. [सं. लवण; प्रा. लोण; गु. लुण; सिं. लूणु; पं. लूण] **०उतरणें**–दृष्ट काढणें; मीठमोहऱ्या ओंवाळून काढणें. 'तुम्हां निद्रा मज आज्ञा ते स्वभावें। उतरूनी जिवें जाइन लोण।' –तुगा ४३७. **०करणें**–ओंवाळणें; ओंवाळून टाकणें. 'सकल तीर्थांचिये धुरे। जियें का मातापितरें। तयां सेवेसि कीर शरीरें। लोण कीजे।' –ज्ञा १७.२०७.

लोणड—न. ज्या ठिकाणीं लोण नांवाचीं झाडें पुष्कळ होतात तें ठिकाण. **लोणवी**–स्त्री. (राजा.) लवणाची खोलगट जागा. समुद्राचें पाणी पूर्वी भरत असून नंतर गाळानें भरून आलेली जागा. हींत मीठ पिकतें. **लोणा**–पु. १ एक प्रकारचा तांदूळ. २ जमीन इ०मधील क्षारांश. ३ (ल.) अंगकांति; चेहेऱ्याची टवटवी; जनावरांना यथेच्छ खाणें–पिणें इ० मिळत असल्यानें त्यांच्या अंगावर येतो तो तजेला. (क्रि० येणें; जाणें.) ४ ओलीसारखा जमिनीवर येणारा मिठाचा एक विकार; ओलसरपणा. (जमीन किंवा माती यांमधील क्षारांशामुळें जमीन किंवा भित कधींच खडखडीत वाळत नाहीं अशी स्थिति). (क्रि० चढणें). **लोणांबा, लोणा(णं)बी**–पु स्त्री. आंब्याच्या कैऱ्या उकडून व मिठाच्या पाण्यांत मुरवून केलेलें तोंडीलावणें; उकडांबा; खारविलेल्या कैऱ्या. [सं. लवण+म.=आंबा] **लोणार**–न. मिठागर. **लोणारणें**–अक्रि. भित, जमीन यांना लोणा चढणें.

लोण—न. आटयापाटयांच्या खेळांत सगळया पाटयांतून निघून जाऊन पलीकडची थोडीशी माती परत आणणें; किंवा अशी परत आणलेली माती. (क्रि० आणणें; येणें; देणें). अशी माती आणली म्हणजे डाव जिंकला असें समजण्यांत येतें. [सं. लवण] **०व्यारगळणें**–एखादा नियम उल्लंघिल्या कारणानें निरुपयोगी होणें किंवा फुकट जाणें. 'असा आजपर्यंत कोणी राज्यकर्त्यानें किंवा शास्त्र कारानें कायदा किंवा कानू केलेला आठवत

नाहीं कीं अमुक एक विषयास अमुक अमुकच पृष्ठें लागावीं. ती शास्त्रोक्त मर्यादा उल्लंघिली कीं लोण बारगळलें.' –चिपळूणकर. **मागून आलेलें लोण पुढें पोंचविणें**–(आटयापाटयांच्या खेळांत एखादा गडी सगळया पाटयांतून पार जाऊन परत येण्यास निघाला म्हणजे तो लोण घेऊन येऊं लागला असें म्हणतात. हें लोण तो वाटेंतील गडयास शिवून देतो. यावरून) मागून आलेली चाल पुढें चालविणें. 'जे आपले आचार विचारांच्या कसोटीला लावीत नाहींत ते गाढ विश्वास शृंखलांनीं निगडित झाल्यामुळें मागून आलेलें लोण डोळे मिटून पोंचविणें एवढेंच आपलें कर्तव्य समजतात.' –आगरकर. **लोणपाटया** (स्त्रीअव.); **लोणप(पा)ट**–न. १ आटयापाटया; मृदंगपाटया. २ (फक्त शेवटचा शब्द) खेळांतील सरशी; जय.

लोणचें—न. १ आंबे, लिंबें इ० चिरून त्यांत मीठ, मोहरी, हिंग इ० घालून खारवून केलेलें तोंडीलावणें. २ दोन्ही बाजूकडून खेळणारा गडी. (खा.) लोणसान. [सं. लवण] **लोणच्या**–वि. सालीला जाड व आंबट असा (आंबा.) (जाड सालीच्या आंब्यांचें लोणचें जास्त दिवस टिकतें).

लोणमांस—न. मांसापासून शिजवून तयार केलेला पदार्थ. –गृशि २.९७. **लोणमांसाचा रस्सा**–पु. सागोती बारीक चिरून त्यापासून तयार केलेला रस्सा. –गृशि २.५०.

लोणारी—पु लांकडें जाळून त्यांचे कोळसे करणें किंवा चुनकळया करणें हा धंदा करणाऱ्यांची किंवा लांकूड, कोळसा अगर चुनकळया विकणाऱ्यांची जात किंवा त्या जातीचा इसम.

लोणी—न. दूध, दही घुसळलें असतां त्यांतून जो स्निग्धांश निघतो तो. [सं. नवनीत; प्रा. नोणीअ; पं. नौणी; हिं. नौनी] **०खाऊन ताक देणें**–स्वत:चा स्वार्थ साधून मग परार्थ पाहणें; मुख्य भाग आपण घेऊन निःसत्त्व व किरकोळ स्वरूपाचा भाग उदार होऊन दुसऱ्यास देणें. 'हजार युरोपियन कामगार सर्व लोणी खाऊन ताक मात्र आमच्या वांटयास देतात' –टि २.५१२. **०लावणें**–खुशामत करणें; मनधरणी करणें; मिनत्या करणें. **लोण्याची कढी करणें**–लोणी वाटेल तितकें किंवा विपुलतेनें वाढणें. **लोण्याची सवत न साहणें**–शांत आणि लोण्याप्रमाणें मऊ अशीहि सवत असह्य होणें; विरोध सहन न करणें. **लोण्याच्या पुऱ्या तुपांत तळणें**–अशक्य गोष्टी शक्य होणें; न घडणाऱ्या गोष्टीची चिकित्सा करणें. **लोण्यांत दांत फुटणें**–अत्यंत सौम्य स्वभावाचा मनुष्य असभ्य, रागीट आणि कठोर असा होणें. **लोण्यास दांत फुटणें**–आपण ज्याचें लालन, पालन, पोषण केलें त्यानें आपणाशीं कृतघ्नपणें किंवा अमर्यादपणें वागूं लागणें. **लोण्याचा कण, लोण्याचें बोट**–स्त्रीन. अगदी किंचित् लोणी; कणीएवढें लोणी; बोटाला चिकटलेलें लोणी; इवलेसें लोणी. **लोण्याचें आयसिंग**–न. लोण्यापासून चोटी सुरम्याची तुकडे पाडून केलेली बर्फी. –गृशि १.४४४. **लोणकढा**–वि. ताजा; अगदीं नवा; कोरा करकरीत; नवीन; साजूक. (अगदीं ताज्या कढविलेल्या लोण्याप्रमाणें). [लोणी+कढणें] **लोणकढी, लोणकढीथाप-वार्ता-बातमी-गोष्ट-खबर, लोणकढें वर्तमान**–स्त्रीन. समयानुसार ठेवून दिलेली थाप; खोटी बातमी; गंमतीखातर आणि गंभीर मुद्रेनें सांगितलेली खोटी खबर. 'पण मला आपण आपली तसवीर द्यायची कबूल केली ना ? कां लोणकढी दिलीत? '–फाल्गुनराव. **लोणकढी दौलत**–स्त्री. नवीनच मिळालेली दौलत. **लोणकढें(डें)तूप**–न. शुद्ध लोणी कढवून तयार केलेलें ताजें तूप; साजूक तूप. **लोणकढें दारिद्र्य**–न नुकतेंच आलेलें दारिद्र्य. **लोणकाप्या, लोणीकाप्या**–वि. बोथट; धार नसलेला (चाकू, सुरी इ०). **लोणट**–वि. लोण्याच्या वासाचें किंवा चवीचें. **लोणणें**–सक्रि. (व.) घोटणें; आहाटणें; घाटणें; वरणाची डाळ शिजल्यानंतर ती लोण्यासारखी मऊ करणें. **लोणस**–वि. (कों.) १ सत्वस; कसदार; ज्यामध्यें लोण्याचा अंश पुष्कळ आहे असें (दूध, दहीं). २ जीच्या दुधापासून पुष्कळ लोणी मिळतें अशी (गाय, म्हैस इ०).

लोत—स्त्री. एक औषधी झाड व त्याचें मूळ. याच्या फुलाला शेवाळें म्हणतात.

लोथ-ध—स्त्री. १ मुडदा; प्रेत; शव. २ माजून पुष्ट झालेलें शरीर; धूड; अवजड किंवा स्थूल शरीर; अगडबंब माणूस, पशु. 'दैत्या दानवांचिआं लोथां। दाटला वसुंधरेचा माथां।'–शिशु १४७. ३ फार मोठें फळ (पणस, चिबड, भोपळा इ०). ४ मोट; गाठोडें; पिशवी; कोथळा. 'जैसीं अवघींचि नक्षत्रें वेचावीं। ऐसी चाड उपजेल जै जीवीं। तै गगनाची बांधावी। लोथ जेवीं।' –ज्ञा १०.२५९. ५ ओझें. 'कीं अनुभवाचा माथां। वाउगि सुखाचिया लोथा।' –ऋ ६४. ६ मोठा ठोकळा; मोठा फत्तर. [हिं. लोथाह्] **लोथी पाडणें**–१ समूळ नाश करणें; सैन्याचा धुव्वा उडविणें. २ मृतप्राय होईपर्यंत एखाद्याला खूप कुबलणें. **लोथेला, लोथ्या**–वि. (व.) स्थूल शरीराचा; दोंद सुटलेला; गलेलठ्ठ.

लोद्-ध—पु. (ढोरांचा धंदा) कोंकणांतील एका झाडाची साल. (लाखेचा रंग पक्का व चमकदार होण्यासाठीं लोद टाकतात.) [सं. लोध्र, लोध]

लोदळणें—कि. पीक भरपूर येणें; असें पीक जमीनींत सांडून त्यावर पाऊस पडल्यामुळें दाण्यास मोड येणें.

लोंदा—पु. उत्तम अन्नाचा घास; पिंड; गोळा.

लोंदी—स्त्रीविना. पटाणाच्या एका जातीचें नांव.

लोंदु—वि. नीच. –राज्य २.२६.

लोधा—वि. (बायकी) नको असलेला; मनांतून उतरलेला; तिरस्कृत; ज्याच्यावर राग झालेला आहे असा (मनुष्य).

लोधा—वि. एक प्रकारची नाचणी.

लोध—स्त्रीपु. प्रेत; शव; मुडदा. लोथ पहा. ' एक पुरुष एक कुमर । जळोनि पडिले लोध शरीर । ' –हरिश्चंद्राख्यान २५५ (नवनीत पृ. १९७). **एकाद्याची लोध पाडणें**–एखाद्याला मारून किंवा बुकलून मृतप्राय करणें. **लोधी पाडणें**–(सैन्याचा) पूर्ण नाश करणें. कत्तल करणें; मृतवत् पाडणें; ठार मारणें

लोधडा, लोधा, लोदा–पु. अगडबंब किंवा धिप्पाड माणूस, पशु. **लोधा**–पु. १ प्रेत; मुडदा. २ प्राण्याचें तोडून किंवा ओर बाडून काढलेलें मांस; लचका. (क्रि० घेणें; तोडणें; काढणें).

लोधट—वि. (कों.) चिघळलेला; पातळ; लिबलिबीत (गूळ, कणिक, साखर इ०) **लोंधा**–पु चिकट व मऊ गोळा; पातळ व चिघळलेला पदार्थ, गूळ; पातळ भात, कणिक इ०. –वि. चिघळलेला; पातळ; लिबलिबीत; पाझरलेला.

लोधणें—अक्रि. (काव्य) १ लुब्ध होणें; झोंबणें; चिकटणें; गुंतणें. ' संसारसुखाचेनि पडतमूर्ख । लोधोन पडती । ' –दा ३.१०.३०. २ संचय लागणें; लालचावणें; चटक लागणें. ' मायबाप बंधु बहिणी । नोवरी न दिसतां वाटे काणी । अत्यंत लोधला पापिणी । अविद्येनें भुलविला । ' –दा ३.२.४०. ३ लोटणें; लुब्ध होऊन येणें. ' तद्रूप रामपूजेसी । प्राणीमात्र लोधले । ' –वेसीस्व ७.५०. ४ (ल) घडणें; बनणें; तद्रूप, तदाकार होणें. ' जिव्हा लोधली रसें । कमळ सूर्यपणें विकासे । ' –अमृ ९.३. ५ गाढ निजणें. ' तेथेंचि येक लोधले । ' –गीता २.१३९८. [सं. लुभ्] **लोधलेपणें**–क्रिवि. लोभानें; लुब्ध होऊन. ' नयन हे लोधलेपणें । निमेषोन्मेषांचें सांडणें । '

लोधा—पु. एका शेतकरी जातीचें नांव.

लोध्र—पुन. एक वृक्ष व त्याची साल हे वृक्ष कोंकण, महाबळेश्वर, बंगाल व नेपाळ या प्रदेशांत होतात. पानें बकुळीच्या पानांएवढीं असतात. उपयोग रंगाकडे व ओषधीकडे. यास हुरा असेंहि कोणी म्हणतात. याच्या तांबडा व पांढरा अशा दोन जाती आहेत.

लोन—न. (व खा.) मीठ. **लोना**–पु. (व.) भिंतीला अगर जमिनीला क्षारामुळें आलेला ओलसरपणा. लोणा पहा. **लोनार**–पु. मिठागर. **लोनावळें**–न. ज्यापासुन मीठ मिळतें असें तळें. [लवण+तळें] **लोनीया**–स्त्री. मीठ तयार करणारी जात.

लोना—पु. एक लहान जातीचा मासा.

लोप—पु. १ गळणें; नाहींसें होणें; अभाव; नाश. २ प्रचारांतून जाणें; रद्द होणें, पडणें. ३ बोलतांना किंवा लिहितांना अक्षर, शब्द इ० गळणें, गाळणें; अक्षर, प्रत्यय इ० शब्दांतून गळणें. [सं.] **लोपणें**–अक्रि. १ लुप्त होणें; नाहींसें होणें; दिसेनासा होणें. २ प्रचारांतून जाणें; गळणें. ३ लीन होणें; मिळून जाणें. **लोपविणें**–अक्रि. (काव्य) लपविणें; अदृश्य करणें; दडविणें. ' भगणें सर्व लोपवी । '

लोपाचार—पु. (कु.) कोंबडें वगैरे बळी देणें.

लोपामुद्रा—स्त्री विना. अगस्ति ऋषीची स्त्री.

लोप्तुवाय—स्त्री. (गो.) अगत्य; कळकळ. [लोभ]

लोब—पु (गो.) लोभ; प्रेम; आकर्षण. [सं. लोभ]

लोंब, लोंबट–र–न—स्त्री. भात, गहूं, वरी, राळा, राजगिरा वगैरेचें कणीस; धान्याचा तुरा. [सं. लंब]

लोंबक(का)ळणें, लोमकळणें—अक्रि. १ लोंबणें; लटकणें; ओळंबणें; अधांत्रीं राहणें; लोंबत राहणें; वरच्या आधाराशीं संबद्ध असा पदार्थ खालच्या भागाला आधार नसल्यामुळें अधांतरीच लटकत असणें; झाडाची फांदी, खुंटी तुळई इ० हातांनीं धरून पाय निराधार स्थितींत ठेवणें. ' घोडयावर बसलें असतां रिकिबी नसतील तर पाय लोंबकळतात. ' २ (कांहीं काम, कारभार इ०) शेवटास न जातां अपूर्ण स्थितींत पडणें; अनिश्चित अशा मनःस्थितींत असणें. [लोंबणें] **लोंबकळणी, लोंबक(का)ळा**–स्त्रीपु. लोंबकळत राहण्याची स्थिति; झोला; लोंबण.

लोंबट–ड—स्त्री. (कों.) १ नारळ, पोफळें इ० फळांचा घड, झुपका; समुदाय. २ उपद्रव; त्रास; झंगट; शुक्लकाष्ठ. ३ संकट; अडचण; त्रासदायक गोष्ट.

लोंबण—स्त्री. (राजा.) फळें, फुलें, नेसलेलें लुगडें, धोतर इ०चा लोंबत असलेला घड, घोस किंवा बोजा; लोंबकळत किंवा लटकत असलेला समुदाय. (क्रि० लागणें) [लोंबणें]

लोंबणें—अक्रि. १ वरच्या बाजूस आधार असून खालच्या बाजूस आधार नाहीं अशा स्थितींत (पदार्थ, माणूस इ०) लटकलेला असणें; टांगलेला राहणें. २ (ल.) सुरू केलेलें कार्य पूर्ण न होतां लांबणीवर पडणें, अनिश्चित स्थितींत असणें. ३ एखाद्या कार्याविषयीं साशंक असणें; एखादें काम धरतां येत नाहीं सोडतां येत नाहीं अशा क्लेशकारक परिस्थितींत असणें; कुचमणें; कुचंबणूक होणें; वाट पहात बसणें. [सं. लंब] **लोंबणी**–स्त्री. १ लोंबकळणें; लटकणें; झोका; हेलकावा. २ कुचंबणा; थांबणें; संशयित स्थितींत राहणें. **लोंबत्या**–वि. (व.) एखाद्याचे मागें मागें घोळ धरून फिरणारा; लोंबणारा; एखाद्याच्या अन्नावर पोसला जाणारा.

लोंबर—न. (राजा.) मोठी लोंब; ओंबी; लोंबतें कणीस. ' जो भासे दिवसां कृष्ण.बळ शिरीं खोंवूनिया लोंबरें । ' –केक १३९. [लोंब]

लोबरें—न. गोवारीच्या शेंगांची पीठ पेरून केलेली भाजी.

लोवाड—वि. (खा. भिल्ली.) लबाड.

लोबान, लोवानऊद, लोवानीऊद—लोभान इ० पहा.

लोंबी—स्त्री. लोंबत कणीस; लोंगी; ओंबी; तुरा. ' येंबी येंबी आल्या लोंबी । ' भोंडल्याचें गाणें–मसाप २.१. [लोंबणें]

लोंबीझोंबी—स्त्री. झटापट; जोराचा प्रयत्न; अनेक तऱ्हेची खटपट; आवेश; कांहीं कार्यार्थ रोसलेले कष्ट किंवा केलेली धडपड; लोंबून आणि झोंबून केलेला प्रयत्न. ' साती दैवतें बलजेटी । लोंबीझोंबी पातले । ' –नव ५.८८. [लोंबणें+झोंबणें]

लोभ—पु. १ एखाद्या पदार्थाच्या प्राप्तीची उत्कट इच्छा. २ हातचें जाऊं नये अशी इच्छा. ३ हांव; आधाशीपणा. ' द्रव्याचिया लोभछंदा । करूं नये तो करि धंदा । ' –ज्ञानप्रदीप १३५. ४ चिक्कूपणा. ५ कृपादृष्टि; ममता; मेहेरबानी; प्रीति; प्रेम. ' सद्गुरु गुरुजींचा फार लोभ होता. ' **लोभडचें**–क्रि. (गो.) लोभ, प्रेम करणें. **लोभणें**–अक्रि. (काव्य) लोभ करणें, सुटणें; लुब्ध होणें· एखाद्या वस्तूच्या प्राप्तीची इच्छा होणें. **लोभणें, लोभवणें, लोभावणें**–अक्रि. १ (मनुष्य, पदार्थ इ० बद्दल) प्रेम असणें; प्रीति करणें; प्रेमानें खेंचला–ओढला जाणें; ' भू क्षीबा पतिला कधींहि लोभेना ! ' –मोशांति ३.६८. २ उत्कट आकांक्षा असणें; एखाद्या वस्तूनें आकृष्ट होणें; प्राप्तीची इच्छा होणें. **लोभनीय**–वि. लोभ करण्यासारखा; स्पृहणीय; आकर्षक. **लोभापर**–वि. लोभयुक्त; कृपाळू; ममताळू. 'म्हणोनि त्याज्य जें नोहे । तेथ त्यागानें न सुचावें । त्याज्यालागीं नोहावें । लोभापरी । ' –ज्ञा १८.१३३. [सं. लोभपर] **लोभाविष्ट, लोभाळू, लोभिष्ट, लोभी**–वि. १ हावरा; अधाशी; फार लोभ असलेला; एखादी वस्तु मिळण्याबद्दल किंवा आपणाजवळील न जाऊं देण्याबद्दल फाजील इच्छा करणारा. २ चिक्कू; कृपण; कंजूष; पैसा खर्च न करणारा; कवडीचुंबक.

लोभान, लोभान-नी ऊद—पु. एक सुगंधी द्रव्य; ऊद; एका झाडाचा चीक. [हिं. लोबान] **०दाणी**–स्त्री. धुपाटणें.

लोभी—पु. व्याध तारा. लुब्धक पहा.

लोंभें—न. वाद; तंटा. लेंभें पहा.

लोम—नपु. लव; अंगावरील बारीक केंस. [सं.] **०पाद**–केंसाळ किंवा केंसासारखे पाय असलेला प्राणी. उदा० कोळी, झुरळ, माशी इ०. **०विलोम**–पु. वर्णसंकर. ' नाना प्रसंगें लोमविलोम अविचार । ' –सप्र २१.४८. **लोमश**–वि. १ केंसाळ (जनावर, गात्र). २ लोंकरीचा; केंसांचा बनविलेला–लें (वस्त्र, शाल जोडी, बुरणूस, घोंगडी इ०). **लोमहर्षण**–वि. रोमहर्षण; अंगावर रोमांच उठविणारें; पुलकित करणारें.

लोमकळणें—अक्रि. लोंबकळणें पहा.

लोमूर—न. एक लोखंडाचा प्रकार.–लोखंडीकाम. मॅरट २१.

लोयली—स्त्री. गलबताचा एक प्रकारचा लहान नांगर; लंगर; लोली; लोइली पहा.

लोल—वि. १ हलणारा; अस्थिर; चंचल; झुलणारा; कांपणारा. ' लोल पताकीं डोलत । रथ शोभत अतिशोभा । ' –एरुस्व ५.११. २ (ल.) अति उत्सुक; अधीर; उतावीळ; आतुर. ' असन्मानस तव भुजपौरुष देखावया असे लोल । ' –मोकर्ण १४.४२. ३ लंपट; अधाशी; लोलुप; आसक्त; लुब्ध; एखाद्या विषयाकडे आकृष्ट झालेला. ' त्या शोकगररसाच्या पानीं मुनि शंभुचीच मति लोला । ' –मोवन ४.१३८. ४ क्षणभंगुर; नाश पावणारें; नाहींसें होणारें. ५ क्षुब्ध; अस्वस्थ. ६ लोळागोळा झालेला; पंख उपटल्यासारखा; असहाय. ' रयत बिचारी लोल झाली उपटली पराला । ' –ऐपो ४१२. [सं. लोल] **लोलक**–पु. दागिन्यांतील लोंबता मणि. हा बहुधा खालीं जाड व वर निमुळता आणि लांबट असतो. [सं.] **लोलं(लिं)गत**–वि. आसक्त; लोभी; हावरा. ' सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन । त्यासी कैचें समाधान । लोलंगतासी । ' –दा ३.१०.६२. **लोलं(लिं)गता**–स्त्री. १ आसक्ति; लोभ; एखाद्या वस्तूच्या प्राप्तीची इच्छा–हांव. ' तापसां नाहीं लोलंगता । ' –मुआदि २२.१४३. २ चंचलता. ' लोलंगता नसे ज्ञानें धालेपणें । ' –रामदास, अभंग (नवनीत पृ. १६७.) **लोला**–वि. १ निर्जीव होऊन लोंबत राहिलेला (हात, पाय इ० अवयव, ताड, माड इ०चें पान). २ लुला; अशक्त; निर्जीव; थोटा (माणूस, पशु). ३ (ल.) परतंत्र; असहाय. ४ लंगडा; लुळापांगळा; व्यंग असलेला; अर्धांग झालेला. 'हा लोला झाला, होऊन पडला. ' **लोला–ळा**–पु. १ घंटेचा लोढणा. हा आंतील घंटेच्या बाजूवर आपटून आवाज होतो. २ घडयाळाचा लंबक. ३ घशांत लोंबणारी पडजीभ; उपजिव्हा. ४ लचका. ' श्वानें अर्धवें लोले तोडिती । ' –दा १.१०.५७. **लोलावणें**–अक्रि. आसक्त होणें.

लोलाम-ब, लोलाम(ब)दार—लिलाम; लिलामदार पहा.

लोलितकरण—न. (नृत्य) एकदां डाव्या बाजूला व एकदां उजव्या बाजूला अंचित हस्त करून रेचित करणें व त्या वेळीं हात जिकडे असेल तिकडे डोकें वळविणें. **लोलितशीर्ष**–न. (नृत्य) डोकें चोहोंबाजूस हलविणें. वेड, क्रोध, देहभान नसणें, रोगग्रस्तता, मद्यपानसेवनस्थिति, ग्रहबाधा ह्या गोष्टी दाखविणें झाल्यास हा अभिनय करतात.

लोली—स्त्री. लोयली पहा.

लोलुत्व—न. लंपटत्व; लोभीपणा; आसक्ति. ' आधार घेईन[लोलुत्वाचा । ' –दावि १८४.

लोलुप—वि. अति उत्सुक; अति लोभी; आसक्त; लुब्ध; उत्कंठित. [सं.] **लोलुपत्व, लोलुप्य**-न. लोभ; आसक्ति; लंपटपणा; हांव; लालसा. ' आधींच प्रकृतीचे पाइक । वरी भोगालागीं तंव रंक । मग तेणें लोलुप्यें कौतुक । कैसे भजती । ' -ज्ञा ७.१४१.

लोलो—पु शब्दांच्या उच्चाराचा शुद्धपणा, योग्य ठिकाणीं शब्दावर आघात देणें, विराम इ० कडे लक्ष न देतां केलेलें घोकणें, भाषण, वाचन, वेदपटन इ०; सरासरी ग्रंथ घोकीत किंवा पढत असणें. -उद्गा. गुरांना पाणी पाजतांना गुराखी उच्चारतात तो शब्द. [ध्व.] **०करणें**-(क.) भांडणें. **०घालणें**-१ कसेंतरी वाचणें; सरासरी ग्रंथ पठन करणें, घोकणें इ०. २ भिकाऱ्यानें तगादा करून किंवा लोचटपणानें भीक मागणें; (शिमग्यांत होळकर भीक मागतात तशी) उद्धटपणानें किंवा जोरानें भीक मागणें.

लोलो—पु. छंद; नाद. लो पहा. ' लोलो लागाला लो । आदि शक्तिचा लागला लो । ' -रामदास. [सं. लय]

लोल्हट—न. (व.) उनाड जनावराच्या गळ्यांत बांधलेलें अवजड लांकूड; लोढणें.

लों(लो)व—स्त्री. १ अंगावरील बारीक केंस; लवः लोम ' लोवेंचें बांबळ । पाल्हेलें हे । ' -भाए ३९७. २ मेंढरूं इ०च्या अंगावरील केंस; लोंकर. [सं. लोम] **लोवाळ**-वि. दाट लोकरीचा; केंपाळ. -शर.

लोंचथा—पु. मांस, भिजवलेलें पीठ, चिखल, गूळ इ०चा तोडून काढलेला तुकडा, खंड किंवा लचका; लोथ; लोथा.

लोवसपण—न. (महानु.) अज्ञानपण; कृपणपण; कुटिलपण. ' कीं भीतरीं औदार्यें वसे । तेथ लोवसपण कांइसे । ' -ऋ ९१. [लोभ]

लोवसूं—वि. (महानु) कृपाळू; लोभाळू. ' तो देव हृषिकेशू । जीवाकारणें लोवसूं । ' -ज्ञाप्र ४४७. [लोभ]

लोवांग—स्त्री. (गो) पहार. [लोहांग]

लोष्ट-ष्ठ—पुन. १ मातीचें ढेकूळ. ' ऐसे होती तरु तृण । लोह लोष्ट पाषाण । '-ज्ञा १५.१७३. २ लोखंडाचें कोट; गंज. [सं. लोष्ठ] **लोष्ठाशौच**-न. मलविसर्जनानंतर पाण्याच्या अभावीं मलद्वार ढेकळानें पुसून स्वच्छ करणें. [सं. लोष्ठ+आशौच, शौच]

लोसूण—स्त्री. (कु.) (प्र.) लसूण पहा.

लोह-हो—न. १ लोखंड. २ लोखंडाचें केलेलें शस्त्र, तरवार इ०. ' लोहाचें काळवखें पडिलें । फररां आकाशु गवसिलें । ' -शिशु ५८५. ३ लोहभस्म; लोखंडाच्या गंजापासून अगर किटापासून केलेलें औषध. ४ रक्त. ' राया राणिएंचा जाला । जरि घे लोहाचा कांटाळा । ' -शिशु ४७१. ५ सोनें; सुवर्णरूप धन. -वि. १ तांबडा. २ लोखंडी. [सं.] **०कांत**-नपु. १ लोखंड आकर्षून घेणारा पदार्थविशेष; लोहचुंबक. २ लोखंडाची एक जात. ३ ह्या जातीच्या लोखंडाचें औषधार्थ केलेलें भस्म; तिख्याचें भस्म. **०कार**-पु. लोहार; लोखंडाचे पदार्थ बनविणारा. [सं.] **०किट्ट**-न. १ लोखंडावरचा गंज; जळलेलें लोखंड. २ मंडूर नांवाचें औषधी द्रव्य. [सं.] **०घंगाळ**-न. मोठें लोखंडी घंगाळ; काहील. ' सूर्यनारायण जेवावयास आले, साती दरवाजे उघडले, लोह घंगाळें पाणी तापविलें । ' -आदित्यराणूबाईची कहाणी-कहाण्या भाग १. पृ. ९. **०चुंबक**-पु. लोखंडाच्या वस्तूला आकर्षण करणारा दगड; लोहकांत. -वि. (ल.) हट्ट घेऊन बसणारा; अनेक युक्त्या करणारा किंवा धरणें धरून बसणारा; झटून, चिकटून दुसऱ्यापासून द्रव्य घेतल्याशिवाय न सोडणारा माणूस. [सं.] **०चुंबकाकर्षण**-न. एका लोहचुंबकाचें दक्षिण टोंक दुसऱ्या लोहचुंबकाच्या उत्तर टोंकाजवळ आणिलें असतां त्यांमधील दिसून येणारें परस्पर आकर्षण. **०चुंबकप्रतिसारण**-न. दोन लोहचुंबकांच्या उत्तर किंवा दक्षिण टोकांमधील परस्परांस दूर लोटणें. **०चूर्ण**-न. लोखंडाचा कीस. **०तुला-ळा**-स्त्री. १ लोखंडाची तागडी; लोखंडी तराजू. २ लोखंडी गज, दांडा **०दंड**-पु. १ लोखंडी गदा; पातकी लोकांना मारण्याची यमाची गदा-हत्यार. २ यम, शनि यांच्या शांतीसाठीं ब्राह्मणाला दान द्यावयाचा लोखंडी सोटा; गज; लोखंडी काठी. [सं.] **०दंडक्षेत्र**-न.विना. पंढरपूर. ' शोधीत शोधीत हृषीकेशी । आला लोहदंड क्षेत्रासी । दिंडीरवन म्हणती त्यासी । तेथें द्वारकावासी प्रवेशला । ' -ह ३६.१८०. **०धुरोळा**-पु. लोखंडाचा-लोखंडासारखा धुरळा-धूळ; तांबडी धूळ. ' रणीं उठिला लोहधुरोळा । तेथें चालों न शके वारा । ' -एरुस्व ९.३७. [सं. लोह+धूलि] **०परिघ**-पु. लोखंडी गदा-सोटा; लोखंडी पहार. ' जे वनिता असे जारीण । तीस यमदूत नेती धरून । लोहपरिघ तप्त करून । कामागारीं दाटिती । ' **०पेटि-का**-स्त्री. लोखंडाची पेटी; तिजोरी; (इं.) सेफ. ' सरकारी ब्यांकेसारखी सुरक्षित लोहपेटिकाच नाहीं. ' -आगर ३.६६. **०बंद**-पु. लोखंडाची सांखळी. ' दोहीं बाहीं कुंजरथाट । मद गाळित गजघंट । दातीं लोहबंद तिखट । वीर सुभट वळंघले । ' -एरुस्व ८.१६. **०बंद-ध**-वि. सोनेरी. -शर **०भस्म-मंडूर**-नपु. लोखंडाच्या गंजापासून केलेलें एक रसायन; लोखंडाचें प्राणिद. **०मय**-वि. १ लोखंडाचा वनविलेला; लोखंडी; लोखंड असलेला; लोहनिर्मित. २ (ल.) भयंकर; क्रूर; निर्घृण. [सं.] **०मार्ग**-पु. लोखंडी रस्ता; रेलवे; आगगाडीचा रुळांचा मार्ग. ' सरकारनें लोहमार्ग हिंदुस्थानांत केले ते आपल्या सोयीसाठीं आहेत. ' -टि १.३३. **०लंगर**-पु. लोखंडी बेडथा; सांखळदंड. ' लोहोलंगर पायांत खिळविले । '

–ऐपो २०९. ०शलाका–स्त्री. लोखंडाची सळई. **लोहं(हां)गी, लःहांगी, लोहंगी काठी**–स्त्री. लोखंडाचे खिळे आणि कडया जागोजाग बसवून मारामारीसाठीं केलेला सोटा; पहार. [लोह+अंग] **लोहिर्वा**–स्त्री. तांबूसपणा. 'पुढां उपरति रागें लोहिर्वी । धर्ममोक्षाची शाखा पालवी । लाहलाहात नित्य नवी । वाढतीची असे ।' –ज्ञा १५.१९४. **लोहार**–पु. लोखंडाचे खिळे, कोयते इ० अनेक पदार्थ करणारा कारागीर. [सं. लोहकार] **लोहारकाम**–न. लोखंडाच्या अनेक वस्तू करण्याचें काम; लोहाराचें योग्य कर्म. **लोहारकी**–स्त्री. लोहाराचा धंदा. **लोहारडा**–पु. (निंदेनें किंवा कुत्सितपणें) लोहार. **लोहारसाळ**–स्त्री. १ लोखंडी कामाचा कारखाना; लोहाराची काम करण्याची जागा. 'लोहारसाळेंतून खुरप्याला पाणी पाजून आण.' २ लोहाराची भट्टी. [सं. लोहकार+शाला] **लोहें**–स्त्री. पेटी; तिजोरी. 'जैसी लोभियाचे हातीं । सांपडे अवचितीं धनलोहें ।' –एभा ७.५७०. **लोहो आर्गळा**–स्त्री. लोखंडाचा अडसर. 'कपाटें लोहो आर्गळा पंथ मोठें ।' –राक १.२. [सं. लोह+अर्गळा] **लोहोदक**–न. ज्यांत लोखंडाचा अंश आहे असें पाणी. [लोह+उदक] **लोहोलोखंड**–न. लोखंडाचीं भांडीं, हत्यारें इ० वस्तू. [लोह+लोखंड]

लोह—पु. दगडी पाटी; लिहिण्याचा फळा, तक्ता. –आदिलशाही फर्मानें. [अर. लौह]

लोह—क्रिवि. (खा.) लवकर. 'लोहलोह चाल.' [सं. लघु; का. लघु ?]

लोंहकर, लोंहचट—लोंकर, लोंचट इ० पहा.

लोहट–टी—स्त्री. दगड, तुळचा इ० जड सामान वाहावयाचा भक्कम गाडा.

लोहडणा-णें—पुन. लोढणें पहा.

लोहनाळी मोहनाळी—स्त्री. प्रेमळता; मायाळूपणा; मार्दव; कोमलता; प्रेमाचें किंवा मायेचें वर्तन, भाषण इ० [म लोहो=लोभ, मोह=प्रेम, मवाळी]

लोहबंदीऊद, लोहभानऊद, लोहभानीऊद—लोभान इ० पहा.

लोहांगी, लोहांगकाठी—लोहंगी पहा.

लोहानी—स्त्री. पटाणांतील एक जात.

लोहाभिसारिक—न. जयप्राप्ति इच्छिणाऱ्या राजानें अश्विन शुद्धप्रतिपदेपासून अष्टमीपर्यंत करावयाचें एक कर्म. यांत सर्व राजचिन्हें, शस्त्रें व अस्त्रें मंडपांत ठेवून त्यांची स्थापना केल्यानंतर होम करावयाचा असतो. –एरा २०८. [सं.]

लोहाळ—वि. पुष्कळ लोंकर असलेला; 'मेंढा मारावा लोहाळ । पूजा पावली सकळ ।' –तुगा २८४. [लव]

लोहाळा—पु. एक जातीचें गवत. लव्हा किंवा लव्हाळा पहा.

लोहित—न. १ रक्त. २ लाली; तांबूसपणा –वि. रक्तासारखें; आरक्त; तांबडें; लाल. [सं.] ०त्व–न. तांबूसपण; **तांबडेपणा. लोहि(ही)वा**–वि. तांबडया रंगाचा; तांबडा; लाल; आरक्त. **लोही**–वि. रक्तवर्ण; तांबडा; लाल. 'लोही वारुण–वद्द माथां । जैसा प्रभातेचा संध्याकाळु ।' –उषा ९६.८८.

लोही—स्त्री. पाणी तापविण्याचें लोखंडाचें भांडें; लोखंडाची कढई. 'कनक गंगाळें निघालीं । लोह्या हांडे तपेलीं ।' –वेसीस्व १४.३९.

लोही—स्त्री. १ एक प्रकारचें रेशमी कापड. २ पहाट. [सं. लोहित; हिं.]

लोही—स्त्री. मोहोर; सोन्याचें नाणें; द्रव्याची कढई. 'नातरी निदैवाच्या परिवरीं । लोह्या स्तलिया आहाति सहस्रवरी । परि तेथ बैसोनि उपवासु करी । कां दरिद्रें जिये ।' –ज्ञा ९.५९.

लोहु, लव्ह–वु, लोव, लोव—क्रिवि. हळूहळू. [सं. लघु] **लोहुसाण, लोहुसो**–क्रिवि. (गो.) हळूसा; बारीक बारीक; अस्पष्ट. 'लोहुसो उलैता' =हळुसा बोलतो. [सं लघु] **लोहुलहान**–वि. चिमुकला आणि गोंडस; लहुलहान पहा.

लोहो—पु. लोभ; स्नेह; प्रेम; आकर्षण; लाहो. (देवीचा गोंधळ घालतांना व पुढील म्हणीतच या शब्दाचा उपयोग होतो. इतर ठिकाणीं सहसा येत नाहीं.) [सं. लोभ] **म्ह०** देखला गोहो लागला लोहो. '=लग्न होतांच किंवा नवऱ्याची गांठ पडतांच अल्लड मुलगी त्यावर प्रेम करूं लागली (घराचा व आईबापांचा विसर पडला).

लोहोकर, लोहोचट—लोंकर, लोंचट इ० पहा.

लोहोट–टी—लोहट–टी पहा.

लोहोडणें—न. लोढणें पहा.

लोहोनाळी मोहोनाळी—लोहनाळी मोहनाळी पहा.

लोळ—पु. आगीचा झोत; जोरानें पेटलेला आगीचा कल्लोळ; सवेग असा आगीचा डोंब; अग्नीच्या ज्वालांचा भडका; गर्जत येणारी अग्नीची ज्वाला. २ (मुंग्या, माशा इ० चा) दाट थवा, समुदाय, गोंगाट. ३ (व.) जळमट.

लोळ—पु. लोळण्याची क्रिया; लोळणें. दुःखातिशयानें गडबडां लोळणें (या अर्थी रडण्याचा किंवा रडून लोळ घालणें किंवा घेणें असा शब्द-प्रयोग करतात.) २ (ल.) (ताप, लोकांचा उपद्रव इ० मुळें) एखाद्याची झालेली दुरवस्था किंवा पीडितपणाची स्थिति; थकवा; अतिश्रांत स्थिति; भागोटा. 'पोरानें किंवा तापानें माझ्या जिवाचा लोळ केला.' ३ (लोथ–ध च्या ऐवजीं अरुण्याच्या संभव) लठ्ठ पोटाचें पोर; अगडबंब माणूस, घूस, उंदीर इ० मोटा प्राणी; धूड. 'काय हो घुशीचा लोळ सांपडला पिंजऱ्यांत.' ४ अव्यवस्थितपणें बांधलेला गठ्ठा; अव्यवस्थित पदार्थ, चिरगुटें,

पोथ्या इ०ची रास ढीग. ५ काम, कारभार, कारखाना इ०चा पसारा; व्याप. ६ चाळा; वेडेंवांकडें कृत्य, वागणुक. 'वदवती न कवीसहि लोळ ते।'–वामन, भामाविलास (नवनीत पृ ९९). [लोळणें] **निजून लोळ पडणें-पसरणें**-एखाद्या मोठ्या ओंडयासारखें किंवा धोब्याच्या कपड्यांच्या पसाऱ्याप्रमाणें–गाठोडयाप्रमाणें,पसरणें–पडून असणें. (या अर्थी पांघरुणाचा लोळ कामाचा लोळ इ०). **०आकांत**–पु. मोठमोठ्यानें ओरडणें; प्रचंड व भयंकर गर्जना; आक्रोश. (क्रि० करणें; मांडणें; लावणें; चालविणें; उठणें; होणें). २ जोराचा प्रयत्न; धडपड; अविरत श्रम. ३ आरडाओरड; क्षोभ; एखाद्या गोष्टीविषयींची सार्वत्रिक तक्रार; पटकी, पाऊस, दरवडेखोर, माहागाईची धारण इ०मुळें उत्पन्न झालेली परिस्थिति. 'पेंढ्यांचा–जरीमरीचा–पावसाचा–पाण्याचा–धारणीचा–माहागाईचा–लोळ–आकांत.' [म. लोळणें+आकांत] **०कंड, लोळकण**–स्त्री. १ लोळण; जमिनीवर गडबडां लोळणें (विशेषतः जरूरीचें काम असतां किंवा जबरदस्ताचा प्रतिकार करतांना); एखादा जबरदस्त मनुष्य दुसऱ्याला त्याच्या इच्छेविरुद्ध ओढून नेत असतां त्यानें पडणें, लोळणें, धडपडणें इ० त्याच्या सर्व क्रिया. २ एखाद्याचें मन वळविण्याकरतां त्याच्यापुढें लोळण घेणें; लोटांगण घालणें. (क्रि०घेणें,मारणें). 'रांडांच्या पायीं लोळकंड घेणारा बुट्ठा मूर्ख.' –नारुक ३.४२. ३ कुत्रीं, मांजरें इ०चें बागडतांना एकमेकांवर उड्या मारणें, एकमेकांच्या अंगावर लोळण घेणें. **०घोळ**–पु. १ (कागद, चिरगुटें, खाद्यपदार्थ इ०ची) कालवाकालव; डिवचाडिवच; कुसकरणी; चुरडणें; घोटाळा; मिश्रण. २ हिशेब, जमाखर्च, कारभार इ०ची अव्यवस्था; घोंटाळा; गुंतागुंत; गोंधळ. ३ मनाची अस्वस्थता; गोंधळलेली स्थिति; विसकटलेली स्थिति. (क्रि० करणें; होणें). ४ हट्टी किंवा द्वाड पोर जमिनीवर लोळून व हातपाय आपटून करतें तो गोंधळ; हूड किंवा उच्छृंखल पोरानें घेतलेली लोळण; केलेली धडपड-गडबडणें. [लोळणें+घोळणें] **०पट**–स्त्री. लोळण; आजारामुळें आलेली पडून राहण्यासारखी स्थिति; अंथरुणावर पडून लोळणें; एखाद्या सांथीनें पुष्कळांना दुखणें येऊन लोळत पडण्याची स्थिति; आजारामुळें आलेली दुर्बलता; हीनदीनपणाची स्थिति. [लोळणें+पडणें] **०वडी**–स्त्री. निरनिराळ्या डाळींच्या चुरीच्या पिठाची लांबट वळवटी करून ती उकडल्यानंतर तिची केलेली वडी. [लोळणें+वडी]

लोळकं(कुं)बणें, लोळकं(कुं)बा—लोंबकळणें, लोंब कळा इ० पहा.

लोळगा—पु. वायंगणें (उन्हाळी) भात करणें असल्यास त्यासाठीं केलेल्या रोहापैकीं निरुपयोगी रोह (रोप). –कृषि २३०.

लोळण-णी—स्त्री. १ (हट्टी किंवा द्वाड पोराचें) जमिनीवर गडबडां लोळणें. (क्रि० घेणें; घालणें). २ लोटांगण. ३ जबरदस्तीनें ओढून नेलें जात असतां त्या माणसाचें जमिनीवर लोळणें; अव्यवस्थितपणें हातपाय हापटणें. (क्रि० घेणें) [लोळणें] **०घोळण**–स्त्री. (रागानें किंवा उतावीळपणामुळें) गडबडां लोळणें. (क्रि० घेणें; घालणें). **०फुगडी**–स्त्री. मुलींचा एक खेळ. यांत मुली पायाचे आंगठे दोन्ही हातांत धरून गडबडां लोळत जातात. –मखेपु २२०.

लोळणें, लोळत पडणें—अक्रि. १ जमीन इ०वर वरचें आंग खालीं वखालचें वर होईल अशा तऱ्हेनें गडबडणें. २ आंयरुणावर निजलेल्या मनुष्यानें निजलेल्या ठिकाणापासुन अव्यवस्थितपणें कुशीवर वळून वळून दूर जाणें. ३ नेसलेल्या वस्त्राचे सोगे जमिनीवर फरफटणें. ४ उपयोगी पडण्याच्या स्थितींत असुन (पदार्थ किंवा माणूस) कांहीं उपयोग न केला जात असल्याकारणानें किंवा उद्योगधंदा न मिळाल्या कारणानें रिकामा राहणें; अव्यवस्थितपणें इतस्ततः पडणें. 'अनेक पदवीधर केवळ ब्राह्मण म्हणून लोळत आहेत.' 'हा पहा तुझा चाकू येथें लोळत पडला आहे.' [सं. लोठन; प्रा. लोळण] **०घोळणें**–सक्रि. (मुद्दमा, कज्जा, गोष्ट, वेत इ०चा) सर्व बाजूंनीं किंवा साधकबाधक प्रमाणें विचारांत घेऊन खल किंवा वाटाघाट करणें; जोरानें आपलें विचार मांडणें. **लोळवि(व)णें, लोळाविणें**–सक्रि. १ एखाद्यास लोळावयास लावणें. २ (ल) पाडणें; मारणें; चीत करणें; पराभव करणें. ३ लेंबे करणें; अंगावर चाल करून आलेल्याला आपल्या अंगच्या सामर्थ्यानें ढकलून देऊन किंवा चोप देऊन जमिनीवर आपटणें; लोळावयास लावणें. 'चोरांनीं रात्रीं दोन असामीस लोळविलें.' ४ लडबडविणें; माखणें; बुडविणें. 'ते देवें भक्तिरसें जाणों स्वचरणरजांत लोळविले।' –मोद्रोण १०.४०. [लोळणें चें प्रयोजक] **लोळविणारा गीध**–पु. एक पक्षी. इं. लॅमर गेयर.

लोळसा—पु. वेटाळें; कडें. 'उगा लोळसा घोळ मोठा करीतो।' –राक १.४.

लोळसावि(व)णें—सक्रि. (कों.) माती, वाळू इ०मध्यें वाटेल तसें किंवा दुखापत होईल अशा रीतीनें लोळविणें. [लोळणें]

लोळा—पु. १ घड्याळ, घंटा इ०चा लंबक. २ पडजीभ. ३ पीठ, मांस इ०चा तोडून काढलेला लचका–तुकडा–भाग. लांबट वाटोळा गोळा. (क्रि० घेणें; तोडणें; काढणें). [सं. लोल] **०तोडणें**–१ आईबापांनीं मुलीचें लग्न करून देऊन तिला दुसऱ्याच्या स्वाधीन करणें. २ (कृपणानें) पैसा खर्चणें. ३ (व.) चावा घेणें; लचका तोडणें; एखाद्यावर खेंकसून धांवणें. **लोळी**–स्त्री. १ लहान घंटेचा लहान बारिकसा लोळा; लहान लंबक. २ डूल, झुंबर, इ०चा लोंबणारा मणि; लोलक. ३ शेंबूड इ०चा जाड,

घट्ट आणि लोंबता गोळा. ४ तोंडांतील पडजीभ. ५ बैल, गाय यांच्या गळ्याखालचें लोंबतें व पातळ कातडें. ६ (राजा.) लांबट आणि सारखा भरलेला फणस. ७ गूळ, मेण, पापडाचें भिजविलेलें पीठ इ० पदार्थांची लांबोडी गोळी.

लोळी—स्त्री. १ गाढव इ०स येणारी लोळण्याची लहर; त्यांनीं घेतलेली लोळण-णी. (क्रि० घेणें; घालणें; मारणें; येणें). २ आळसामुळें किंवा गुंगीमुळें अगर पेंग आल्यामुळें झालेली लोळण्याची इच्छा; पडून राहण्याची इच्छा. (क्रि० येणें). [लोळणें]

लोळी—स्त्री. गलबताचा लहान नांगर. लोयली पहा.

लोळी—स्त्री. (लोहारी) कुदळ, खोरें इत्यादींचें नेढें करण्याकरितां लागणारें लोखंड.

लोळुलें—न. मुलांच्या हाताच्या बोटांत घालण्याचा एक दागिना. 'अंगुळें लोळुलें वाघनखें सरी किती करिंच्या मणगटया।' -वसा ९.

लोळो—पु. (गो.) लोळा.

लौकर, लौका, लौका—लवकर, लवका इत्यादि पहा.

लौकिक—पु. १ कीर्ति; प्रसिद्धि; नांव; बोलबाला; एखाद्याच्या संबंधानें लोकांत रूढ असलेलें मत. २ चांगल्या किंवा वाईट रीतीची लोकांमधील वाच्यता; लोकांत एखादी गोष्ट जाहीर होणें. ३ सामाजिक व्यवहार; सार्वजनिक काम. ४ समाजांतील लोकांची व्यवहारांत वागण्याची सरणी; प्रपंच; लोकाचार. 'हा गृहस्थ लौकिकांत हुशार आहे.' -वि. या लोकांतील; ऐहिक; अवैदिक; केवळ लोकप्रसिद्ध. २ सामान्य; नेहमीचें. ३ रूढ; प्रचारांतील. ४ लोकाचाराला अनुसरून असलेलें. [सं.] **लौकिकांत येणें**-मुलगा वयांत येऊन संसार करूं लागणें; कामधंदा इ०ची जबाबदारी वाहूं लागणें; प्रपंचांत पडणें. **लौकिकावर येणें**-वाद इ०मध्यें पराभव झाल्याकारणानें किंवा अंगावर डाव आल्याकारणानें चिरडीस जाऊन अद्वातद्वा बोलूं लागणें; शिव्याशाप देणें; एखाद्याबद्दल अचकटविचकट बोलणें. सामाशब्द- **०ऋण**-न लोकांचें कर्ज. 'पूर्वीच्या ऋषींनीं वरील श्रुतींत अनुक्त असें जें एक नवीन लौकिक ऋण उपस्थित झालेलें आहे...' -टि २.१. **०चतुर**-वि. लोकांशीं वागण्यांत किंवा त्यांना कायूंत आणण्यांत हुषार; लोकव्यवहारांत तरबेज. **०चातुर्य**-न. लोकांशीं वागण्यांतील शहाणपण. **०रीति**-स्त्री. रूढीनें चालत आलेली रीत; सर्वसाधारण पद्धत; सर्व लोकांची चाल; लोकांतील सामान्य चाल. **०ज्ञान**-न. लोकांचें ज्ञान; लोकांसंबंधीं ज्ञान. **लौकिकाग्नि**-पु. स्मार्ताग्नि किंवा श्रौताग्नि नव्हे असा अग्नि; ज्याच्यावर स्वयंपाक इ० करतात तो विस्तव. **लौकिकाचार**-पु शिष्टाचार; शिष्ट संप्रदाय; शिष्ट लोकांची वागण्याची सरणी. [लौकिक+आचार] **लौकिकानुसरण**-न. लोकांना अनुसरणें; लोकांप्रमाणें वागणें; लोकांच्या वहिवाटीप्रमाणें किंवा लोकरीतीप्रमाणें वागणें. [लौकिक + अनुसरण] **लौकिकी**-वि. १ लोकांत रूढ असलेलें; लोकांत प्रचलित असलेलें; लोकप्रसिद्ध; पुष्कळ दिवसांपासुन चालत आलेलें; पूर्वापार चालू असलेलें. २ व्यवहारचतुर; व्यवहारांत हुशार; प्रापंचिक बाबतींत निष्णात.

लौंग—स्त्री. (प्र.) लवंग पहा.

लौचीक—वि. लवचीक पहा.

लौंजी—स्त्री. आंब्याचें लोणचें. [हिं.]

लौट—क्रिवि. परत. [हिं.]

लौंडा—पु. पुरुष; नोकर; दास; नाच्या. लवंडा पहा. [हिं.] **लौंडी**-स्त्री. दासी; गुलाम-स्त्री; लवंडी; पहा. **लौंडीचा**-पु. दासीपुत्र; एक शिवी.

लौंद—वि. १ लोध-थ; गलेलठ्ठ; दांडगा; फोपशा (मनुष्य किंवा प्राणी.) 'टोणपा लौंद घट उद्धट।' -दा २.३.३२. २ मूर्ख; हलकट. 'ऐसे लौंद बेइमानी। कदापि सत्य नाहीं वचनीं।' -दा १८.६.५. [लोध]

लौंधट—वि. स्वेच्छाचारी; उच्छृंखळ; लवधट पहा.

लौल्य—न. १ लोभ; हांव; स्पृहा. 'परि लौल्य वोखटे।' -पंच ५.९. २ चंचलता; लोलपणा. [सं. लोल]

लौह—वि. लोखंडी; लोखंडाचा; लोखंडासंबंधाचा. [सं. लोह]

ल्याख—वि. योग्य; शहाणा (मनुष्य); योग्य; वाजवी (बोलणें, भाषण, कृत्य). युक्त; जोगता (वस्तु; प्रदेश) [लायक]

ल्याणें, ल्याइणें—न. लेणें; अलंकार. -सक्रि. (दागिना, वस्त्र, इ०) अंगावर धारण करणें; लेणें. 'अळंकार ल्याइले अनेक१' -मुआदि ४६.६. [लेणें]

ल्याहणें—सक्रि. (काव्य) मिळविणें; घेणें; स्वीकारणें. 'जरी ल्याहीन पति, तरी जाईन मागुर्ती।' -वसा ६५. [लेणें]

ल्याहाडा—वि. (व.) गोडखाऊ.

ल्येक, ल्योक—पु. (अशिष्ट) मुलगा; लेक पहा.

ल्हातणें—अक्रि. (काव्य) राहणें; संगतीनें असणें; बरोबर राहणें. 'जे तुझी हे बुध्दि ईंद्रियसंगतीच ल्हातसे ते श्रवण-मनने मागुती स्वरूपीं स्थिरावे जैं।' -शिगीता ७२.

ल्हाद—पु. आनंद; हर्ष; आल्हाद. [सं.]

ल्हार—स्त्री. (गो.) लाट. [सं. लहरि]

ल्हाव—पु. लाहो; लोभ; लोभीपणा; हांव. [लाहो]

ल्हांवा-वो—पु. लाहूर; लावा पक्षी; एक लहान पक्षी. -लोक २.८०.

ल्हावो—पु. (राजा.) उन्हाळयांत पिकलेली नाचणी किंवा भात; गिमवा. **ल्हावी**-स्त्री. नाचणीची एक जात; लहुवी; (श्रावणांत निघणारें नाचणीसारखें एक हलकें धान्य). [लघु]

व

व—वर्णमालेंतील एकोणतिसावें व्यंजन. अक्षरविकासः-पांच अवस्था. पहिली गिरनार शिलालेखांत, दुसरी व तिसरी खिपू. १ ल्या शतकाच्या सुमारच्या मथुरेंतील जैन लेखांत; चवथी इ. स. ८३७ मधील जोधपूर लेखांत व शेवटची पुढल्या शतकांतील एका दानपत्रांत आढळते. [ओझा]

व—उअ. आणि. 'आणि' आणि 'व' या दोन उभयान्वयींत फरक असा कीं, एका विधानांत किंवा एक क्रियापद असतांना दोन किंवा अधिक पदें किंवा कर्ते या दोघांनींहि जोडले जातात. उदा० तो आणि (व) मी आलों; दिवस आणि (व) रात्र सारखीच. पण जेव्हां भिन्न गोष्टी दाखविणारीं, किंवा एक वाक्य कारण, आधार इ० व दुसरें परिणाम, शेवट इ० दाखविणारें अशीं वाक्यें जोडतांना 'व' ऐवजीं 'आणि' चाच उपयोग करतात. उदा० 'मी आलों आणि तो गेला;' 'सुर्य उगवला आणि मी उठलों;' 'तो काळा आणि हा गोरा.' भोजशक ४१० तील मंगळवेढयाच्या ताम्रपटांत हा आढळतो. [अर. व तुल० सं. उत-उअ-व, याप्रमाणें संस्कृतसदृश प्राकृतांतून व फारसींत गेला. -भाअ १८२५]

व—अ. अथवा; वा. 'व चोळावें पत्ळ मोडे।'-वैद्यक ७६. [सं. वा]

व—उद्गा. संबोधन १ (ना.) ओ! काय? याअर्थी. २ (खा.) अग! वो पहा. [सं. वै.]

वः—उद्गा. वाहवा! छान! 'कीं त्यानें म्हणावें पण वः' -मोर ९. [फा. वाह्]

व॥—संक्षेप. १ वल्द. २ वस्ति. ३ वद्यपक्ष. ४ वकील.

वइ—स्त्री. कुंपण. वई-ही पहा. [सं. वृत्ति; प्रा. वइ]

वइचणें, वइरण, वइरणें, वई, वईकाठीं, वईल, वईलचूल—वैचणें, वैरण इ० पहा.

वइंचणें—उक्रि. वैंचणें पहा. 'वइंचणें निसणें आणि गाळणें।' -सारुह ३.५२.

वइला—वहिला पहा.

वइस—न. वर्ष; वरिस पहा.

वई—स्त्री. कुंपण. वही पहा. 'वईवरलें कार्लें।' -मसाप २.१. **०निघणें**-कुंपणींतून येणें; कुंपणींत असणें, जाणें. 'जैसा मूषक निघाला वई।'-ह २१.२६. **०निवडुंग**-पु. निवडुंगाची एक जात; साबर-गोल निवडुंग. -वगु ५.५५.

वईस—न. विणलेल्या मालावरील निरुपयोगी म्हणून कापून टाकण्यांत येणाऱ्या दशा;कुरळया; निरुपयोगी कापूस, चिंध्या इ० याचा उपयोग यंत्रें साफ करण्याकडे होतो. [इं. वेस्ट (कॉटन)]

वऊळ, वऊळदोडा, वक, वकटा, वकटें, वकणें, वकती, वकरा—ओऊळ, ओऊळदोडा इ० पहा.

वंक, वंकट—वि. वांकडा; वक्र. 'तैसे भ्रूभंग वंकट। मिरवतांति।' -ऋ ९७. [सं. वंक; वक्र]

वकट—नस्त्री. (विटीदांडूचा खेळ) एक अर्थाची संज्ञा; वकट पायावर विटी ठेवून मारतात. याला 'पांव' असेंहि म्हणतात. 'वकट, पाय गेला फुकट.' [ते. वकटु=एक]

वकट, वकटवणी, वकटवाणा, वकटंवाणी, वकटा, वकटें—(प्र.) ओखट, ओखटवाणी इ० पहा.

वक(कु)त—पु. वेळ; वखत पहा. 'माईला लेकरूं वऊखेना असा वकत पडला।'-ऐपो ३३५. 'न्याहरीचा वकुत होईल'-यशोधन. [अर. वक्त]

वंकनाळ—नस्त्री. मातेनें खाल्लेल्या अन्नाचा रस गर्भास ज्या वाटेनें पोहोंचतो तें नाळ; नाळद्वार. 'रस उपाय वंकनाळें। होत असे।' -दा ३.१.३२. [देप्रा का. वंक=दार+सं. नाल]

वकफीयत—स्त्री. वाकफीयत पहा.

वकर—पुस्त्री. मान; प्रतिष्ठा; अब्रू; पत. 'अन्नास संदेह तुम्ही पाडोन वकर गमावला म्हणोन...कलह आरंभला आहे.' -पेद ६.२०३. [अर. वकार्]

वकरा—पु. घोडयाच्या पायाचा एक रोग. -अश्वप २.२७३.

वकल—न. १ पत्नी. २ कुटुंब; खटलें. 'जोंवरि मिळविशि पैसा तोंवरी कुटुंब सारें तुझें वकल।' -राला १०. ३ (व.) आप्तपरिवार; नातेंगोतें. 'आमच्या वकलांत अशी मुलगी नाहीं.' ४ रांड; वेश्या. 'वकील आणि वकल हे दोन वकार वर्जावेत!' ५ भडवा; कुंटण्या. -व्यनि २५. ६ खातें; क्षेत्र; शाखा; प्रकरण; खटलें. 'स्वयंपाकाचें वकल या खोलींत असूं द्या आणि पालखीचें वकल पुढचे चौकांत.' [अर. वकूल्]

वकलात, वकालत, वकिलत, वकिलात, वकिली—स्त्री. १ वकिलाची वृत्ति, धंदा, पेषा. 'सेवकास वकालतीचे जावसाल लिहावयास प्रयोजन नाहीं.'-रा? २ शिष्टाई. ३ मुखत्यारी; प्रातिनिधित्व. [अर. वकिली, वकालत्] **०नामा**-पु. वकीलपत्र.

वकसणें—अक्रि. (प्रां.) खरचटणें; घासटणें; सालटें जाणें. [वसकणें]

वका, वकारणें, वकारा-री—ओका, ओकारणें इ० पहा.

वकाई-या—स्त्री. बातमी; वृत्तांत. 'पासा वकायाच्या फर्दा रोजच्या पाठविल्या.'-दिमरा १.१२४. [अर. वकिआ-वकाइ] **वकाई-नवीस**-पु. बातमीदार. **वकाय(ये)निगार**-पु. वृत्तांत लेखक; वाकनीस; अखबारनीस. 'सर्व वकायनिगार चहूंकडे खबरा लिहितात.' -रा ६.४१९; 'गुलाम अहमद वकायेनिगार.....

कर्जदारांनीं अटकाऊन ठेविले होते.' –दिमश २.८५. [फा. वकाइअ-निगार्]

वकालद, वकलाद, वकिलद, वकिलाद—स्त्री. (अप) वकलात पहा.

वंकी—स्त्री. (खा.) मोठी बिनतट्ट्याची गाडी (भरतीची).

वकील—पु. १ प्रतिनिधि; मुखत्यार; एखाद्यासाठीं अधिकारानें बोलणारा, वागणारा माणूस. २ न्यायसभेंत एका पक्षाचें म्हणणें पुढें मांडणारा, एक बाजू घेऊन तिच्या तर्फेनें पुरावे मांडणारा अखत्यारी माणूस. ३ एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्राच्या दरबारीं असलेला प्रतिनिधि. ४ कायदेपंडित. ५ मुनीम; एजंट; अडत्या. ६ सल्लागार; मंत्री. ७ देशमुखाचा दुय्यम; मदतनीस. हा वंशपरंपरा असतो. [अर. वकील्] ०इ-मुत्लक–पु. पूर्ण अखत्यार असलेला राजप्रतिनिधि; (इं.) व्हाईसराय. हा किताब सवाई माधवरावाला दिल्लीच्या बादशहाकडून मिळाला होता.–ख४५८५; ४६२३. [अर.] ०मुत्लक–वकील-इ-मुत्लक पहा. 'कर्नेल मजकुरास वकील मुत्लक व आमचे ठिकाणीं जाणून, त्यांचें केल्यास आमचे व कुंपनीचे केलें जाणावें.' –ऐटि २.१४. ०मुत्लकी–स्त्री–स्त्री. वकील-इ-मुत्लकाची पदवी व काम. 'श्रीमंत पंतप्रधान यांचें नांव वकील-मुत्लखी व मीरबगशीगिरी हे दोन्ही पदें देऊन त्यांची नायबत आम्ही तुम्हांस देतों.'–दिमरा १.१०९. **वकीलकी**–स्त्री. वकीली. 'मन कठोर करून भावनात्मकतेला बळी न पडण्याचा अभ्यास वकीलकीमुळें होतो.' –सत्तेचे गुलाम ५९. ०नामा-पत्र–पुन. विशिष्ट कामांत वकील नेमल्याबद्दल दिलेलें अधिकारपत्र. 'गुन्ह्याच्या युक्त्या गुन्हेगारांचीं वकीलपत्रं घेणाऱ्या प्रतिष्ठित गुन्हेगारालाच सुचायच्या.' –सत्तेचे गुलाम ८.

वकूफ-ब—पु. १ हुशारी; अक्कल; शहाणपणा २ सामर्थ्य; हिंमत; ताकद. 'लोकांतला वकूब पाहिला तर कोणाच्या अंगीं हिंमत नाहीं.' –नि ९६७. ३ कर्तृत्वशक्ति; प्रभाव. [अर. वुकूफ्] ०दार–वि. जाणता; सुज्ञ; काबील. 'तुझा मातबर भाऊ वकूबदार असेल.' –रा २०.६४. [फा. वुकूफदार्]

वक्क(ख्ख)पया—स्त्री.अव. (तंजा.) विपरीत, प्रतिकूल टीका. [सं. व्याख्यान; गु. वखाण=स्तुति]

वक्कर—पुस्त्री. १ वकर पहा. २ (व.) चेष्टा; नखरे.

वक्कल—वकल पहा.

वक्त—पुन. १ कालावधि; कालमर्यादा; ठराविक मुदत. २ विशिष्ट वेळ, घडी. ३ घडण्याचा एक प्रसंग, वेळ; संधि. ४ कठीण, खडतर वेळ; आणीबाणी. 'वक्ताची वेळ आली तर तो उपयोगी पडेल.' ५ अनुकूल, योग्य काल. 'नको आडवूं हा नव्हे वक्त कीं।' –होला ३७. [अर. वक्त] ०गुजराण–स्त्री. कालक्षेप. 'परागंदा होऊन परमुलखास जाऊन वक्त-गुजराण करीत असतां.' –रा १५.३१८. ०गैर–पु. अवेळ. ०बेवक्त–क्रिवि. वेळीअवेळीं. ०शीर–क्रिवि. १ वेळ, प्रसंग पाहून, अनुसरून. २ वेळेवर; वेळच्यावेळीं. **वक्ताची वेळ**–स्त्री. कठीण वेळ. वक्त अर्थ ४ पहा.

वक्तव्य—न. १ वचन; उक्ति. २ नियम; अनुशासन. ३ (सामा.) भाषण; बोलणें. –वि. बोलावयास, म्हणावयास योग्य, क्रमप्राप्त, आवश्यक असलेलें. [सं.]

वक्ता—पु. १ बोलणारा; व्याख्याता. 'होवोनियां श्रोता वक्ता। करी आपुली आपण कथा।'. २ भाषणपटु; चांगला, श्रोत्यांवर छाप पाडून बोलणारा. [सं.]

वक्तृत्व—न. १ बोलण्याचें सामर्थ्य, शक्ति. 'तैसें माझें वक्तृत्व साचार। पदरचें नाहीं एक अक्षर'. २ चांगलें परिणाम कारक बोलण्याचें सामर्थ्य; वाक्पाटव. आपल्या मनांतील विचार व भावना दुसऱ्यास उत्तम रीतीनें पटवून देणें व त्याला आपल्या विचारानें भारून टाकण्याची कला. –के १३.१२.३५. ०ता–स्त्री. भाषणाची, व्याख्यानाची शैली. 'उजवली अजि वक्तृत्वता।' –ज्ञा १४.६३. ०पाठ–पु. अलंकारयुक्त भाषण; भुरळ पाडणारें वक्तृत्व. ०शक्ति–स्त्री. वक्तृत्व अर्थ १ पहा. **वक्त्री**–स्त्री. उत्कृष्ट वक्तृत्व करणारी, भाषणपटु स्त्री.

वक्त्र—न. १ तोंड; मुख. 'शोषावया पवित्र वक्त्र। पसरूनी जैसे यज्ञासी।' –मुहरिश्चंद्राख्यान (नवनीत पृ१८५). २ चेहरा. 'अवलोकितां तुझिया वक्त्रा। धनी माझी पुरेना।' [सं.] ०उजळ करणें–काळीमा घालविणें. 'यादवांचें वक्त्र उजळ। केलें तेव्हां मुकुंदें।' –ह १९.१८२.

वक्फ—पु दानधर्म; धर्मादाय; देणगी. [अर.]

वक्फा—पु. थांबणूक; मुक्काम; खोळंबा. 'वीस दिवस कमठाण्यावर वक्फा...' –रा ७.८६. [अर. वक्फ्]

वक्र—वि. १ वांकडें; वांकलेलें; वांकदार. –ज्ञा १३.१०६०. २ नागमोडी चालीचा; वळणावळणाचा. ३ प्रतिगामी; वक्रगति (ग्रह). ४ (ल.) कपटी; अप्रामाणिक स्वभावाचा, वागणुकीचा; कुटिल. –क्रिवि. शत्रुत्वानें; वांकड्या नजरेनें. 'समर्थांचिया सेवका वक्र पाहे।' –राम. ०गति–स्त्री. १ नागमोडी मार्ग; अशा मार्गानें जाणें. २ परागति; मागें जाणें. उदा० एखाद्या ग्रहानें मेषापासून वृषभराशीकडे न जातां मीन राशीकडे जाणें. ०गति-गामी–वि. १ प्रतिगामी. (ग्रह) २ (ल.) वांकड्या चालीचा. ३ भलत्याच वाटेनें जाणारा. ०ता–स्त्री. १ वांकडेपणा. 'तुझी तोडीन रे वक्रता। सात्त्विकता पाहें माझी।' –एरुस्व ११.४. २ (संगीत) मान वांकडी करून गाणें. ०तुंड-मुख–पु. गणपति. 'सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना।' –आरतीं गणपतीची. –वि. १ वांकड्या तोंडाचा. २ तोंड वांकडें (आंवट) केलेला. ३ तोंड

एकीकडे फिरविलेला. 'जे तुझ्याविखीं मूढ । तयां लागीं तूं वक्रतुंड।' –ज्ञा १७.४. [सं. तुंड=तोंड] **०दृष्टि**–स्त्री. १ वांकडी, तिरपी दृष्टी; तिरळेपणा. २ (ल.) अवकृपा; विरुद्ध, दुष्ट भावानें पाहणें. –वि. १ तिरव्या डोळयाचा; चकणा; काणा. २ मत्सरी; हेवादावा करणारा; बरें न पाहणारा. **०पातळी**–स्त्री. जिचा केवढाहि भाग सरळ पातळींत नसतो अशी पातळी. –महमा १. **०पुरशीस**–स्त्री. (विचित्र समास) उलट तपासणी, सवालजबाब. [सं. वक्र+फा. पुरशीस] **०रेषा**–स्त्री. जिचा केवढाहि भाग सरळ नसतो अशी रेषा. –महमा २. **०संस्था**–स्त्री. वांकडी असण्याची स्थिति (पृथ्वीची). **०स्वर**–पु. (संगीत) आरोह अवरोह करतांना ज्या स्वरावरून मागील स्वरावर गायक फिरतो तो स्वर. **वक्रानन**–वि. वक्रतुंड पहा. 'वक्रानना तूं सुखदायका ।' –भूपाळी गणपतिची ४. [वक्र+आनन] **वक्रावलोकन**–न. चोरून हळूच पाहणें; वक्रदृष्टि. [वक्र+अवलोकन] **वक्रिय**–वि. वांकडा. **वक्रिमा**–पुस्त्री. वांकडेपणा. **वक्री**–वि. १ (ज्यो.) विरुद्ध गतीनें (मेषाकडून मीनाकडे) जात आहेसा दिसणारा (ग्रह). याच्या उलट मार्गी. २ वक्रदृष्टीचा; मत्सरी; शत्रुत्वानें वागणारा. **वक्री येणें–जाणें–असणें**–वक्रगति होऊन येणें इ०. **वक्री होणें**–(कोणेकावर) वक्रदृष्टि होणें. **वक्रीक्रमण**–न. (ज्यो.) ग्रहानें उलट जाणें; वक्री होणें. **वक्रीभवन**–न. (पदार्थ) पदार्थाचे किरण एका पारदर्शक पदार्थांतून दुसऱ्यांत जात असतांना आपला सरळ मार्ग सोडून थोडेसे जे वांकडे होतात तो प्रकार. (इं.) रिफ्रॅक्शन. **वक्रोक्ति**–स्त्री. १ वांकडें, लावून बोलणें. 'कृपावंता कोप न धरावा चित्तीं । छळूं वक्रोक्ति स्तुती करूं।' –तुगा १५९०. २ एक शब्दालंकार. बोलणाराचा अर्थ एक असावा व दुसऱ्यानें त्याचा तुसराच अर्थ घ्यावा असा प्रकार. उदा० 'आज माझें फार पोट भरलें असें मी त्यापाशीं बोललों असतां, भरलें असलें तर धुवून टाक अशी तो वक्रोक्ति बोलला.' 'ऐकोनि वक्रोक्ति छंद बंध।' –एभा २५.८७.

वक्र—पु. प्रतिष्ठा. वकर पहा. 'यांत श्रीमंतांचा वक्र काय राहिला ?' –ख १.४०७. [अर. वकार]

वखट, वखटवणी, वखटवाणा-णी, वखटा, वखटें—ओखट, ओखटवणी इ० पहा.

वखट्या तोंडाचा—वि. (माण.) तोंडावर देवीचे वण असलेला. [ओखट+तोंड]

वखडा—पु. (ना.) घिसाडखाई. [वखवख]

वखत, वखुत, वखत—पुन. वेळ. वक्त पहा. **म्ह०** वखत पडे बांका गधेको कहना काका. **वखत–गैरवखत**–क्रिवि. वेळीं अवेळीं. 'अंबारखाना चांगला वख्तगैरवख्त कामा आला.' –भाअ १७३४.४९.

वखद—न. औषध. ओखद पहा. 'वखद उपाय करूनि कांहीं।' –दावि २६२. [औषध अप.] **वखदी**–वि. औषधी; औषधोपयोगी.

वखर–रा—पुन. १ शेतकीचें एक हत्यार. यानें शेतांतील तण, गवत मुळांसकट उपटून काढतात. २ जमीन सपाट करण्याचें औत; कुळव. –शे १०.१९९. चारबैली वखर. –शे ६.७५. [सं. विकृ–विकिर] **वख(खा)रणें**–उक्रि. १ वखरानें तण इ० काढून टाकून साफ करणें. २ नांगरल्यानंतर जमीन सारखी करणें.

वखवख—स्त्री. १ खा खा सुटणें; क्षुधातिशय; तृप्ति न होणारी भूक. २ (ल.) अतृप्य लालसा; अभिलाषातिशय; तृष्णा; लोभ. ३ (भिकारी, मुलें, तगादेदार इ० कडून) छळणूक; त्रास; जाच. ४ पोटांत तुटणें (भूक, पित्त यांमुळें). ५ खंगणें (काळजीनें). ६ तगादा; दपटशा (कामाचा). ७ वरील प्रकारची स्थिति. ८ (व्यापक) उपहास; दुर्लौकिक; छळ. ९ उपहासाची, बद लौकिकाची स्थिति. (क्रि० करणें; होणें). [ध्व. तुल० सं. वष्–वख] **वखवखणें**–अक्रि. वखवखीनें विशिष्ट होणें. **वखवख्या**–वि. १ वखवखलेला; अतिशय भुकेला. २ हांवरा; लोभी. ३ त्रास देणारा; छळणारा; उपहास, बदलौकिक करणारा.

वखा—पु. १ शेर; शिधा; रतीब; भत्ता (रोजचा इ०). (क्रि० घालणें; लावणें). २ नियमितपणें ठराविक शेर घेणें (क्रि० घेणें).

वखा—पु. (ना.) गोट्या खेळण्यासाटीं केलेला खळगा; गल.

वखार—स्त्री. १ विकावयाचा माल सांठवून ठेवण्यासाठीं बांधलेली जागा; गोदाम. २ धान्य सांठविण्यासाठीं केलेलें भितीतील बळद. ३ मोठा सांठा; कोठार [देप्रा. वक्खार; हिं. वखार] **०दार, वखारी**–पु. वखारीचा मालक.

वखारणें—उक्रि. वखरणें पहा.

वग—स्त्री. १ कृपादृष्टि; मेहेरबानी; आश्रय (मोठ्या लोकांचा). २ ओळखदेख; स्नेहभाव; शरीरसंबंध; वळण (अगत्यवाद पडण्याजोगें). ३ वशिला; शिफारस. ४ प्रतिष्ठा; पत. 'जगजीवनाची बहीण खांसा सुंद्राबाई दमाजीच्या भावास (दिली) आहे. तिकडे यास वग मोठी आहे.' –ब्रच २४७. [अर. वक्अ] **०वशिला–वसीलत**–पुस्त्री. वग पहा. 'आमचा वग–वशिला पायांखेरीज नाहीं.'–ख १.१६८. 'परंतु वग–वसीलतीमुळें भिडेनें कागद पत्र करून घेऊन जोरावरीनें वतन खातात' –वाडसनदा १३३.

वंग—न. १ कथील. २ शिसें; जस्त. ३ –पु. बंगाल प्रांत. ४ वांगें. [सं.] **०भस्म**–न. कथिलाचें प्राणिद; एक औषधी रसायन **०भंग**–पु. बंगालची फाळणी. –टि ३.४५.

वंग—पु. कलंक; मळ; घाण. –ज्ञा १०.३१३. 'तुज म्यां अज्ञानपणें वंग । समतेचा लाविला।' –स्वानु ४.१.१६. [देप्रा. वंक=कलंक]

वगड—स्त्री. (व.) असडीक तांदूळ. बगड पहा.

वंगडी, वांगडी—स्त्री. (लोखंडकाम) मध्ये रुंद असलेलें पसरट उतरतें लोखंडी चाक. खोलगटपणा देण्यासाठीं याचा उपयोग करतात. [वक=वांकडा]

वंगण—न. करकर वाजूं नये, झिजूं नये, हलका यावा इ० साठीं गाडा, रहाट इ० कांचे कण, चाक इ० अवयवास लावितात तें तेल; ओंगण. [सं. व्यंजन] **वंगणें**–उक्रि. १ वंगण लावणें. २ (ल.) नरमणें; भिऊन वागूं लागणें. 'शिवा जर इतका वंगला होता' –सुयेंग्र २५८; –वज्राघात ७२. ३ वठणीवर येणें. **वंगविणें**–उक्रि. १ वंगण लावणें. २ मऊ करण्यासाठीं, ताळ्यावर आणण्यासाठीं खूप चोपणें. ३ नामोहरम करणें. ४ पैसे द्यावयास लावणें. [वंगणें प्रयोजक; सिं. वंगणु=गाईचे दूध काढतेवेळीं मागचे पाय बांधणें]

वगणें—अक्रि. भडकणें; अनिवार होणें. 'विषादें वगलें तोंड। मनीं शोक काढी उदंड।'–सिसं ३.१८१. [सं. वग्–वंगन=हालणें]

वगत—पु. वक्त; वखत पहा.

वगतृत्व—न. (अप.) वक्तृत्व पहा. 'येक वगतृत्व श्रवणीं पडे। तेणें झालें समाधान मोडे।'–दा ७.८.१००

वगदी—वि. (अशिष्ट) वखदी. औषधी पहा.

वगर—वि. (तंजा.) अपक्व; तुरट (सुपारी).

वगर—स्त्री. म्हैस. वगार पहा. [ते.] **०मासा**–पु. (बे.) सुसर; मगर.

वगर—शअ. शिवाय. बिगर, बगर पहा.

वगर, वगरणें, वगराळें—ओगर, ओगरणें इ० पहा.

वगळ—स्त्री. १ निवडक अंश काढून घेतल्यावर खालीं राहिलेला भाग, गाळ. २ (ल.) गाळसाळ; टाकाऊ माल. –वि. १ वगळलेला; खालीं राहिलेला. २ (ल.) टाकून देण्यायोग्य; वाईट; टाकाऊ (पदार्थ). [वगळणें] **०सगळ**–स्त्री. गाळसाळ.

वगळ—स्त्री. (कों.) गवतासाठीं मुद्दाम राखून ठेविलेली जमीन. **वगळणी**–स्त्री. गाळणें; सोडणें; बाहेर टाकणें. **वगळणें**–उक्रि. १ बाहेर ठेवणें; सोडणें; टाकणें; अनादर दाखविणें; डावलून जाणें. २ (चुकीनें) वघळणें पहा. [सं. विगलन]

वंगळ—वि. वाईट; ओंगळ पहा. **०वाणा**–वि. ओंगळवाणा. **०संगळ**–वि. वाईटसाईट; घाण; अमंगळ. **वंगाळ**–वि. (कुण.) वंगळ. 'बाप्याचा जनुम हात लई वंगाळ लागतुया' –बाबं २.२

वगाव—पु. (कु.) वखत, वक्त पहा.

वगार—स्त्री. (खा. व.) म्हशीची पारडी; रेडी. **वगारू**–न. रेडकूं. [ते. वगार=म्हैस]

वंगारी—स्त्री. वंगण लावण्याची काडी, सळई. [वंग+अरी]

वगी—स्त्री. (जरतारधंदा) बारीक आणि जास्त जवळ जवळ तारा असलेली जर.

वगीच, वग्गी—शअ. (गो. कुण.) उगीच पहा.

वंगु—वंग पहा.

वगैरे-रा—अ. आणखी, आणि दुसरे; व इतर; इत्यादि; आदि करून. 'सुभेदार फडणीस वगैरे झाडून सारे आमचे घरीं आले होते.' 'ते समयीं चाहुजी गोरे वगैरा कोळी...'–बाडबाबा १.११. [अर. फा. वघैरा]

वग्र—वि. (प्र.) व्यग्र पहा. 'सोकटयाच्या खेळामंदी गुंतला वग्र' –ऐपो ३४०. [सं. व्यग्र]

वघळ—पु. १ ओघळ पहा. २ घळ; दरड. 'किनाऱ्यास मोठमोठ्या वघळी फार आहेत.' –धर्माजी १५०. **वघळणी**–ओघळणें धातुसाधित नाम. **वघळणें**–सक्रि. १ ओघळणें पहा. २ वगळणें; वलांडून जाणें. –अक्रि. १ ओघळणें पहा. २ खरडून जाणें; खरकणें (पाण्याच्या झोताखालील जमीन, माती). ३ अंगावर धांवून जाणें (रागानें अंध होऊन). (देशावर ओघळणेंचें रूप वोघळणें असें होतें. ओघळणें याच्या अर्थाखेरीज देशावरील इतर अर्थ वर दिले आहेत). **०निघळ**–ओघळ निघळ पहा.

वच—न. (काव्य) १ भाषण; बोलणें. २ बोल; शब्द. (वाप्र.) 'मनस्येकं वचस्येकं।' =पोटांत एक आणि ओठांत एक.

वचक—पु. १ दरारा; भीति; धाक. (क्रि० खाणें; बाळगणें; पाळणें; राखणें; ठेवणें; धरणें). २ धसका; दचका; धस्स होणें. (क्रि० घेणें; बसणें). 'पाहतां देवांही वचक पडे।'–ज्ञा ११.३३९. ३ भय; भीति. 'देती दुःखाचे सज्जनास वचक थवे।' –मोमंत्र ३.१०. ४ कल्पना; विचार; अंदेशा. (क्रि०जाणें; होणें). 'म्यां सावली पाहिली मला वचक गेला कीं रामाजीपंत आले असतील.' [हिं. भचक. तुल० सं. भय+चक्] **वचकणें**–अक्रि. १ वचक बसणें; भीति, धास्ती वाटणें. 'म्यां तो किति वर्णावा? बहु वचके श्वेतवाह वीरा ज्या।' –मोभीष्म १०.७४. २ एकदम भयचकित होणें; धक्का बसणें. 'उगाच कां मी वचकों निघालों।' –सारुह ७.३३. **वचका**–पु. १ वचक पहा. २ ओचका पहा. (क्रि० पडणें).

वचक—वि. घोडयाचा एक रंग. –अश्वप १.२८.

वंचक—वि. फसव्या; लबाड; ठक; सोदा. [सं. वंच्] **वंचणूक**–स्त्री. फसवणूक. **वंचणें**–सक्रि. १ फसविणें. –ज्ञा ४.३०. 'विष वाटितां वंचिलें पंक्तीं।'–मुआदि १०.७. –अक्रि. फसणें. –ज्ञा १७.३५६. 'तो वंचलासे जन जो न वाची।'–सारुह १.३२. **वंचतुक**–स्त्री. वंचना; फसवणूक. 'नावाजिलें तुम्ही म्हणा आपणांसी वो। तरी कां वंचतुक सुमनासि वो।'–तुगा १४२. **वंचन**–

ना–नस्त्री. प्रतारणा; फसवणूक; लबाडी. **वंचित**–वि. फसलेला; प्रतारित.

वचकन-कर-दिशीं—वसकन–कर–दिशीं पहा.

वचकने—न. (चांभारी) लहान मुलाचा जोडा.

वचकवचक—क्रिवि. घाईनें खाणें, पिणें, बोलणें, लिहिणें, कापणें, गवत इ० तोडणें वगैरे क्रियांच्या शब्दांचें अनुकरण करून.

वचका—वि. १ वसवस करणारा; खेकसणारा. २ वाचाळ; तोंडाळ. ३ हलका; क्षुद्र; मूर्ख; फुसका. [ध्व. वच !]

वचकाणा—पु. (क.) वचपा.

वचणें—अक्रि. जाणें. 'यालागीं नवचें कौंडिण्यपुरा।'–एरुस्व १४.५. –ज्ञा १.२४०. [सं. व्रज्; प्रा. वच्च]

व(वं)चणें—उक्रि. १ वेंचणें; खर्चणें. २ टाकणें; त्याग करणें. 'कीं मीं कृपिणें प्राङ्मुखें। होऊनि वंचिजे तुज।' –ऋ ५०. ३ टाळणें; चुकविणें. 'प्रकाश तो प्रकाश कीं। यासी न वचे घेई चुकों।' –अमृ ७.२८९. ४ हरविणें; सांडणें. 'त्यानें दोन पानें वंचलीं.' ५ वगळणें. –अक्रि. मुकणें; आंचवणें; अंतरणें. 'हा बंदीस पडला आणि आपल्या सर्वस्वास वंचला.' [सं. वंच्]

वंचणें—अक्रि. वांचणें पहा. –ज्ञा १६.१०६. 'एऱ्हवीं न वंचसि निभ्रांत।' –उषा १८०८.

वचन—न. १ भाषण; बोललेली गोष्ट. २ शब्द; भाष; निश्चयपूर्वक सांगणें. ३ विधान. ४ उक्ति; सूक्त. ५ प्रमाणभूत आधार; प्रामाण्य. 'मुख्य प्रभुचें लक्षण प्रत्यक्ष ज्यास वचन भारती।'–ऐपो ३२०. ६ (कायदा) करार; प्रतिज्ञा. ७ अवतरण; ग्रंथांतील उदाहरण. 'सर्व देवांसि नमस्कारिलें। तें एका भगवंतासि पावलें। येदर्थीं येक वचन बोलिलें। आहे तें ऐका।' –दा ४.६.११. ८ (व्या.) नामाच्या ठिकाणीं एकत्वरूपानें अथवा अनेकत्वरूपानें असलेली अर्थाची उपपत्ति. 'एकवचन;द्विवचन,अनेक –बहुवचन.' [सं.] **म्ह०** वचने किं दरिद्रता=नुसतें बोलण्यांत कमीपणा कशाला? बोलायला काय जातें? **०चिठी–ट्ठी**–स्त्री. कर्ज घेतांना लिहून दिलेला रोखा. (इं.) प्रॉमिसरी नोट. 'एखाद्या चुकार ऋणकोनें हिशोबाची भानगड दाखवून बरीचशी सूट घेऊन वचनचिठी लिहून द्यावी.' –सासं २.१६६. **०भंग**–पु. करार, शपथ मोडणें. **०भाक**–स्त्री. तोंडी करार, व्यवहार. **०विरोध**–पु. वचनाच्या विरुद्ध वागणें. **वचनाचा खरा-धड**–वि. वचनाप्रमाणें वागणारा; वचन पाळणारा. 'खरा लोककल्याणेच्छु व देशाभिमानी पुरुष म्हटला म्हणजे.....तो वचनाचा धड असला पाहिजे.' –नि. **वचनाच्या आज्ञेंत, अर्ध्या वचनांत असणें, वागणें**–अतिशय आज्ञाधारक, विनीत असणें. **वचनीं गोवणें**–एखाद्याला त्याच्याच शब्दांत, वचनांत गुंतविणें; वचनानुसार करावयास भाग पाडणें. 'म्हणती श्रीकृष्ण आमुचें जीवन। सत्यभामेसी वचनीं गोवून। कैसें नेतोसी दयाणेवा।' –ह ३०. १४३. **वचनीं राहणें**–आज्ञेंत वागणें. 'वचनी राहुनि काम मनांतिल पुरवी ऐशी त्यजिली रामा।' –मराठी ६ पु. (१८७५) १७६. **वचनावचनी**–स्त्री. तोंडी करार, व्यवहार; वचनभाक. **वचनीय**–वि. १ बोलण्या–सांगण्यासारखें. २ शब्दांनीं व्यक्त करण्यासारखें; वर्णनीय.

वचनाभी—स्त्री. बचनाग. 'वचनाभी ते आधीं लागोनि गुळचट।' –दावि १२७. [सं. वत्सनाभि]

वचपा-बा—पु. (प्र.) वजपा पहा.

वचवच—स्त्री. बडबड. (क्रि० करणें). **वचवच-वचां**–क्रिवि. १ विसकटून, चिवडून, विसकारून इ० रीतीनें (डुकराप्रमाणें किंवा अडाणी रीतीनें अन्न खाणें). २ निरर्थक व मूर्खपणानें (बोलणें, करणें). [ध्व. वच !] **वचवच्या**–वि. वटवट, वचवच करणारा; बडबड्या.

वचा—स्त्री. वेखंड. [सं.]

व्रंवा—पु. ओंचा पहा.

वंच्य-च्यु—वि. (महानु.) कृपण. 'ऐसाही दीनु वंच्यू। कहीं नव्हेचि तुज।' –ऋ ४७. [सं. वंच्]

वछ, वच्छ—पुन. १ वांसरूं (गाईम्हशीचें). 'धेनु वछाचेनि लागें।'–दावि ४८०. 'गोप वच्छें गिळौनि ठेला।'–दाव १०५. २ बालक; लेकरूं. 'जे आतें वच्छा नंदनी।' –ऋ १. [सं. वत्स; प्रा. वच्छ] **०प**–पु. गोप; गोपाळ. **वछल**–वि. (प्र) वत्सल. 'भक्तवछल जगत्पती।' –वेसीस्व २.३७.

वछाड—न. घोडयाचें स्वारीचें सामान.

वच्छात—पु. दांडीवाल्यांना, दलालांना माल पुरविणारा शेतकरी, कूळ. हे दांडीवाले यांना आगाऊ रकमा देतात व मालांतून त्यांची भरपाई करून घेतात. विछायत अर्थ ४ पहा. [गु. वछियत]

वच्छावंगी—स्त्री. (बे.) तोंडी लावण्याची तांदुळाची फेणी.

वज, वजच, वजवज-जां, वजेनें, वजेवजे—क्रिवि. (अशिष्ट) हळू; सावकाश; धीमेपणें.

वज—स्त्री. (व.) १ काळजी; व्यवस्था; ओज. २ सोय. [सं. ओजस्; का. ओजे; म. ओज] **०नीज**–स्त्री. वज अर्थ १ पहा. **०वजेनें**–क्रिवि. काळजीपूर्वक. **वजणें**–अक्रि. निगा राखली जाणें; काळजी घेतली जाणें. 'शेत चांगलें वजलें.' ओजणें पहा. –रंयो १०४०४. **वजविणें**–ओजविणें पहा.

वज—स्त्री. (कर्ना. कु. कों.) संवय; पद्धत; रीत. [अर. वज्ह] **वजावणें**–संवय होणें.

वज—न. वेखंड; वचा पहा.

वज—अ. (कु.) पादपूरणार्थी अव्यय. 'माझाँ वज काय? ' माझें काय?

वंज—स्त्री. (चंद्रपुरी) स्वारी. 'भावाची वंज बहीण पाहिली।' –मनोरंजन जुलै १९३२.

वजडी-डें—नस्त्री. (मांसाहार) पोटांतील मांसाचा भाग.

वंजण—न. (घागरी इ० ना) घासण्याचोपडण्यार्ची द्रव्यें. (तेल, बिब्बे इ०). [सं. अंजन; म. वंगण] **वंजणें**–उक्रि. तेल, बिब्बे इ०च्या मिश्रणानें (पाण्याची, मातीची घागर) माखणें, घासणें.

वजणें—अक्रि. जाणें; वचणें पहा. –तुगा १०५. 'न वजावें त्याचे घरां।' –ब २४३.

वजन—न. १ पदार्थाच्या ठिकाणचा जडपणा; भार; गुरुत्व. २ याची इयत्ता समजण्यासाठीं (मासा, तोळा, धडा, मण, इ०) जी ठराविक वस्तु वापरतात तें. ३ गुरुत्वाची इयत्ता समजण्यासाठीं करावयाचा तोल; तोलण्याचा व्यापार. ४ ओझें; भार. 'आपलें सर्व वजन दुसऱ्यांवर घालूं नये.' ५ इभ्रत; प्रतिष्ठा; मान. 'मनुष्याच्या आंगच्या सद्गुणांमुळें त्याचें लोकांत वजन वाढतें.' ६ महत्त्व; किंमत. 'हेस्टिंगचा प्रयत्न आपलें पेशव्यांशीं वजन रहावें म्हणून होता.'–विवि ८.६.११४. ७ (शाप.) भार; प्रतिबंधाचें अतिक्रमण करण्यास लाविलेली शक्ति. –यंस्थि ३. ८ वशिला; वर्चस्व; छाप. 'माझ्या कामांत त्यानें अधिकाऱ्याजवळ आपलें वजन खर्ची घातलें' [अर. वझ्न्] **०कशी**–पु. वजनेमापें तपासणारा अधिकारी. –वाडमा १.१२०. [वजन+कस] **०दार–शीर**–वि. १ विशेष जड; जास्त वजन असलेला. २ (ल.) प्रतिष्ठित; तोलदार; छाप पडेल असा (माणूस). 'वजनदार गणोजी तांडेल.' –चित्रगुप्त १२४. [फा. वझ्न्+दार; सं. शील] **०दारी**–स्त्री. १ प्रतिष्ठा; महत्त्व; सत्ता. २ परिणामकारकता; चांगला बांधीवपणा. 'अशा योगानें वाक्य किंवा वाक्यांश याची वजनदारी राहत नाहीं.' –विवि ८.४.९२. **०पूर**–वि. शेर, तोळा इ० विवक्षित वजनानें पुरा; पुऱ्या वजनाचा. **वजनी**–वि. १ तोलण्याचा; मापण्याचा नव्हे असा (शेर, मण, खंड इ० प्रमाण). याच्या उलट मापी. २ वजन करून देण्याघेण्याचा (तूप, गूळ इ० पदार्थ). [फा. वझ्नी] **०माप**–न. वजन करून पाहण्यासाठीं असणारें प्रमाण.

वंजन—न. भाजीमध्यें तिला चव यावी म्हणून मिसळतात ती डाळ इ० [सं. व्यंजन]

वजपा-बा—पु. १ वचपा; एखाद्या गोष्टींत कांहीं अधिक उणें झालें असतां त्याची बरोबरी त्या सारख्याच दुसऱ्या गोष्टींत करण्यासाठीं केलेला कमीअधिकपणा. (क्रि० काढणें; निघणें; घेणें; घालणें). 'असें असल्यामुळें अधिक उष्णता गेल्याचा वजपा निघून जातो.' –मराठी ६ वें पु. (१८७५) पृ. १३५. २ समतोलपणा; भरपाई; कमीअधिक असेल तें ठीक, बरोबर करणें. 'त्यानें मला मारलें खरें ह्याचा वजपा मी काढवीन.' –शअ.क्रिवि. **मोबदल्यांत**; कमीअधिकपणा घालविण्यासाठीं म्हणून. 'इच्या वजपा दुसरी वस्तु द्यावी.' [अर. वझ्ना; म. वजा] **०निघणें**–भरपाई होणें; कमीअधिकपणा (मागें झालेला) नाहींसा होणें.

वजमजुरी—स्त्री. (ना.) शेता-रानांतील काबाडकष्टावर मिळणारा रोजमुरा.

वजर—पु. (कु.) खोल डोह.

वजरबट्ट, वजरावळ, वजरी—(प्र.) वज्रबटू, वज्रावळ, वज्रा पहा.

वजरी-रें—वजडी-डें पहा.

वजवज-जां—क्रिवि. १ वज, वजच पहा. सावकाश. २ (व.) लौकर. हा विरुद्ध अर्थ चुकीनें झाला असावा. 'ऊन्ह फार आहे, वजवज चाल.'

वजविणें, वंजळ—ओजविणें, ओंजळ पहा.

वजा-वजे—स्त्री. तऱ्हा; प्रकार. 'मुंबईस तोतया येत असता तुम्ही दस्तगीर करून नेला याची वजे काय?–ख ७.३५७१.–वि. तुल्य; सदृश्य; सारखा; ह्या प्रकारचा. (समासांत) खरडेवजा; कुळंबीवजा; मातीवजा. [अर. वज्ह्] –क्रिवि. प्रकारें; प्रमाणें. 'चालीवजा.'

वजा—स्त्री. वर्जन; वजाबाकी; उणें करणें. –वि. उणा केलेला; कमती; कमी; काढून टाकलेला, घेतलेला. [अर. वझ्आ] **०करणें**–कमी करणें; काढून टाकणें. 'नोकरीवरून लोक वजा केले.' **०ई**–स्त्री. १ वजा घातलेली, सूट दिलेली रक्कम. २ खालीं आणणें; बढतीच्या उलट. 'रिसाल्यासंबंधानें बहाली, बडतर्फी, तरकी किंवा वजाई करण्याचा पूर्ण हक्क तुम्हांकडे राहील.' –रा ७.१५. ३ न्यून; उणीव. **०बाकी**–स्त्री. १ (गणित) मोठ्या संख्येंतून लहान संख्या कमी करून बाकी काढण्याचा व्यापार. २ वजेंत; वजा करणें. ३ हिशेबाची शिल्लक बाकी. (क्रि० करणें). ४ वजा करून आलेलें उत्तर. [अर. वझ्आ + बाकी] **०बाकी बेरीज**–स्त्री. वजाबाकी आणि बेरीज. एकदम एकाच उदाहरणांत हे दोन्ही गणिताचे प्रकार शिकविणें. **०वाट**–स्त्री. १ देणेंघेणें चुकतें करून, बाकी काढून हिशेबाचा केलेला उलगडा; हिशेबाचा बांधा मिटविणें. २ उधळपट्टी. (व.) वजावाटोळें. ३ एकंदर रकमेंतून विशिष्ट रक्कम वजा घालून काढलेली बाकी. **०शिरस्ताबाद**–पु. शिवाजीच्या काळीं जमाबंदींत दर बिघ्यास ३ पांड जमीन वजा टाकण्याची असलेली पद्धत. **०सूट**–स्त्री. वजनामापांत विशिष्ट प्रमाणांत दिलेली सूट.

वजा—स्त्री. पाठविणें; रवानगी. 'कोणाचे हुजूर कैसे असतात हें कळत नाहीं. याकरितां वरचेवरी गडाखालेंच जाबसाल देऊन वजा करीत जावें. –रा ८.९१. [वजणें किंवा अर. विदाअ]

वजा—पु. (राजा.) १ लोहारकी आणि सुतारकी असे दोन्ही धंदे करणारा माणूस. २ अशा माणसासाठीं सन्मानाची पदवी. –आडिवऱ्याची महाकाली ११.

वजा—स्त्री. स्वरूप; आकार; तऱ्हा. 'अनगरची रचना खेडयांत होत असली तरी रेल्वे स्टेशन झाल्यापासून त्यास शहरी वजा आली होती.' –महाराष्ट्र शारदा, जानेवारी १९३७. [अर. वजह्]

वंजार-री-वंजारा-री—पु. वणजार–री पहा. एक जात व तींतील व्यक्ति. हे लोक बैलांच्या तांडयावरून धान्य वगैरे घालून विकण्यासाठीं देशोदेशीं फिरतात. 'त्या वंजारें वृषभकटक। त्यांनीं पाहून त्याचा शोक।' –नव २४.१७६. [सं. वाणिज्यकार; फा. बिरंजिारी] ०**दांड-डा**–वि. वंजाऱ्याप्रमाणें दणगट, दांडगा. विशेषतः आडदांड वंजाऱ्याला हें विशेषण लावतात.

वजारत—वजिरात पहा. [अर. विझारत्] ०**मआब-महा**–पु. श्रेष्ठ वजीर. एक पदवी. ही आंग्रे सरदारांना असे. –वाडशा २

वजावाजवी-बी, वजावाजब-जीब—वि.क्रिवि. योग्य; न्याय्य; वाजवी. [वाजवी द्वि.]

वजिरात—स्त्री. वजिरी; वजारत. –दिमरा २.१३. [अर. विझारत्] **वजिरी-री**—स्त्री. १ वजिराचा हुद्दा; दिवाणगिरी; प्रधानकी. २ (गंजीफा) वजीरास द्यावी लागते ती तलफ. तलफ पहा. –वि. वजिरासंबंधी (रीत, डौल, भाषण, इ०) **वजीर**–पु. १मुख्य प्रधान; दिवाण; सामंत. २ बुद्धिबळाच्या खेळांतील राजाच्या खालचें मोठें मोहरें; प्रधान. [अर. वझीर]

वजीफा—पु. सरकारी तैनात; जहागिरी. –वि. बिनचाकरीचा. 'गायकवाड यांच्या अमलांत वजीफा इनाम जमीन ७५ विघे' –वाडबाबा १.४५. [अर. वजीफा हिं.] **वजीफदार**–पु. जहागीरदार.

वंजीभारा—पु. (क.) कांबटयांचा भारा. [सं. वंश+भारा; वंजुल=वेत]

वजीरमूठ—स्त्री. वज्रमुष्टि–मूठ पहा. –शर.

वजु-जू-ज्जू—न. (मुसलमानांचें) हात, पाय, तोंड धुणें; क्षालन. (क्रि० करणें). 'मशिदींत प्रार्थना करण्यापूर्वी मुसलमान लोक वजू करतात.' –सह्याद्रि आक्टोबर १९३५. [अर. वजु, वुजू]

वंजुळ—स्त्री. (प्र.) ओंजळ पहा. 'सरस होत ते वंजुळी मापें।' –दावि ८०. [सं. अंजलि]

वंजुळ—पु. वेत; एक लता. 'प्रवाळ वंजुळ नारिकेळ घन।' –नरहरितनय (मार्कंडेयचरित्र). [सं. वंजुल]

वजूद—पु. १ अस्तित्व. २ शरीर. –आदिलशाही फर्मानें [अर. वुजूद]

वज्जर, वज्जेर—क्रिवि. (व.) फार; पुष्कळ.

वज्जीवाज्ज—स्त्री. वजावाट पहा. –मसाप २.२.२९.

वज्र—पुन. १ इंद्राचें आयुध; (सामा.) अमोघ शस्त्र. २ हिरा. 'माणिक मोती प्रवाळ। पाचि वैडूर्य वज्र नीळ।' –दा ८. ६.३४. ३ वीज; विद्युत्. ४ वज्रतुंड पहा. –पु. १ सत्तावीस योगांपैकीं पंधरावा. २ जाज्वल्य, दहशत बसविणारा माणूस (योद्धा, शास्त्री). हा शब्द पहिल्या पदीं येऊन पुष्कळ समास होतात कांहींचे अर्थ पुढें दिले आहेत. ०**आंगठी**–स्त्री. त्रिकोनाकृति कोंदणांत हिरा व तीन कोनांवर तीन रत्नें बसविलेली अशी आंगठी. –वेहु ४९. ०**कपाट**–न. वज्राचें, हिऱ्याचें कवाड, दार. 'मुक्तिचे वज्रकपाट। कामीनि हे।' –भाए ७५६. ०**कवच**–न. वज्राचें, वज्रासारखें अभेद्य चिलखत. 'जैसें वज्रकवच लेइजे। मग शस्त्रांचा वर्षावो साहिजे।' –ज्ञा २.१३२; –एभा १५.७. ०**कीट**–पु. खवल्या मांजर. ०**कीटकी**–स्त्री. (महानु.) एक रोग–जंतु. 'कन्हणा एका अंताचीए सवडी वज्रकीटकी लागली असे।' –दृष्टांतपाठ २. ०**कृत**–वि. घट्ट; घट्ट बसेल असें केलेलें. ०**गर्भ**–स्त्री. एक प्रकारची भिकबाळी. (बं.) गिमडा. –वेहु ४५. ०**गांठ**–स्त्री. पक्की, न सुटणारी गांठ. 'कर्माच्या वज्रगांठी। कळासे तो।' –ज्ञा १८.३९२. ०**घात**–पु. १ वज्राचा प्रहार, तडाखा. २ (ल.) मोठी आपत्ति; नुकसान; संकट. ०**चुडेदान**–चुडेदान पहा. –ह ११.१३७. ०**चूडेमंडित**–वि. १ हिऱ्याच्या कंकणांनीं विभूषित, शोभायमान असलेले (हात); 'वज्रचूडेमंडित हस्त। अवतार मुद्रा दाही झळकत।' –ह २७.८०. २ पत्रांतून सुवासिनी स्त्रियांस लिहावयाचा मायना. अक्षय टिकणारे चुडे हातांत असणारी; (ल.) अखंड सौभाग्यवती. ०**जिव्ह**–वि. खोंचदार, कडक भाषा वापरणारा. ०**जिव्हा**–स्त्री. खोंचदार, कडक भाषण. ०**टीक-टीका**–स्त्री. स्त्रियांचा गळयांतील एक दागिना. ०**तडक**–पु. वीज. –खिपु. ०**तुंड**–पु. वज्राचा एक जातीचा दगड. स्फटिक, चंद्रकांत आणि अभ्रक या पदार्थांच्या कणांच्या अनियमित मिश्रणानें हा झालेला असतो. (इं.) ग्रॅनाईट. ०**देह**–पु. वजाप्रमाणें अभेद्य, बळकट शरीर; रोगरहित, ताकदवान शरीर. ०**देही**–वि. असें शरीर असलेला; फार बलाढय. ०**द्रोह**–पु. दीर्घकालचा व फार तीव्र असा द्वेष. ०**द्रोही**–वि. हाडवैरी. ०**धर**–पु. इंद्र. ०**धार**–वि. तीक्ष्ण धार असलेलें; तिखट (शस्त्र). ०**नाद-निर्घोष**–पु. विजेचा कडकडाट. ०**पंजर**–पु. (वज्राचा पिंजरा) दुर्भेद्य किल्ला, आश्रयस्थान; निर्भय आसरा. 'तरि शरणांगतां वज्रपंजर। तेहिं कां म्हणवावें।' –भाए ६१४. –तुगा ७०६. ०**पथ्य**–न. फार अवघड, कठिण पथ्य. ०**परीक्षा**–स्त्री. १ हिऱ्यांची परीक्षा. २ (ल.) कठिण कसोटी; फार अवघड तपासणी. ०**पाणि**–पु. इंद्र. 'कृपा भाकिता जाहला वज्रपाणी।' ०**पात**–पु. १ वज्रायुधाचा प्रहार. २ वीज कोसळणें;

पडणें. ०पाणी–वि. मोठा पातकी. –एभा २७.४९४. ०प्रयोग–पु. १ फार अवघड प्रयोग, उपाय. २ मांत्रिक जादूगाराचा विशिष्ट मंत्रप्रयोग. ०प्रहार–पु. वज्रपात पहा. ०प्राय–वि. १ वज्रासारखा कठीण (पदार्थ). २ वज्रासारखा अमोघ आघात असणारा (बाण, मुष्टि इ०). ३ अतिशय वजनदार, खंडण करण्यास अवघड (मुद्दा). ४ झोंबणारें; मर्मभेदी; हृदयांत सलेल असें (भाषण, इ०). ०बट्टू–पु. एक झाड. –न. त्याचें फळ. बजरबट्टू पहा. ०बाण–वि. वज्रासारखे घातक बाण असलेला. ०बुद्धि–स्त्री. १ खंबीर मन. २ उत्कृष्ट ग्रहणशक्ति. विशेषणासारखाहि उपयोग. ०मणि–पु. हिरा. ०मय–वि. १ वज्राचा, हिऱ्याचा केलेला. २ अतिशय कठीण. ०महाग–वि. अतिशय महाग. ०महागाई–स्त्री. अतिशयित, भरमसाट महागाई. ०महाग्या–वि. अतिशय महाग विकणारा. ०माला–स्त्री. हिऱ्याची माळ. ०मिठी–स्त्री. फार घट्ट मिठी. 'मग तोंडा कां वज्रमिठी पाडिजे।' –ज्ञा ७.१५२. ०मुष्टि–पु. मल्लांचें एक आयुध. हें मुठीला लावतात. –स्त्रीपु. लोखंडासारखी, कठीण मूठ. २ (बडोदें) एक खेळ. –खाला ८०. ३ लुनीचा कांदा. सुरण पहा. –वि. १ लोखंडासारखी मारक मूठ असलेला. 'मी वज्रमुष्टि...।' –स्वयंवर. २ वज्रमुष्टि हत्यारानें लढणारा, हत्यार वापरणारा. ०मूठ–स्त्री. वज्रमुष्टि पहा. ०मूली–मूळ–स्त्री. एक झुडूप; रानउडीद. ०योग–पु. वज्रासन; हटयोग. 'एक वज्रयोग क्रमें। सर्वाहार संयमें।' –ज्ञा ४.१४७. ०लेप–पु. १ चुन्यामध्यें कात, गूळ इ० सरंजाम घातल्यामुळें दृढता आलेला चुना. २ अशा चुन्याचा दगड इ० वर करतात तो लेप. ३ (ल.) अक्षयता; अविनाशता; चिरंतनपणा (वचन, निश्चय, संस्था इ०चा). याअर्थी विशेषणासारखा उपयोग; पक्कें; काययचें; स्थिर; अभंग. 'महापापां प्रायश्चित्तविधान। वज्रलेप पूर्ण गुरुवाक्यावज्ञा।' –भारावाल ११.२७९. ४ (महानु.) दृढता आणणारा पदार्थ. 'ना तो संशृतीसि ताठ। वज्रलेप।' –ऋ ११. ०लेप होणें–पक्कें, कायम होणें. 'आमच्या आजे सासुबाई एकदां कोणाचें नांव घ्यावयाचें नाहीं असें म्हणाल्या कीं मग तें वज्रलेप झालेंच समजावें!' –पकोघे. ०वाट–स्त्री. (महानु.) वज्राचें वेष्टण. 'काळ लोहें डवरिलें। वज्रवाटीं बांधिलें।' –शिशु. [सं. वज्र+वृत्त; प्रा. वट्ट] ०वाणी–स्त्री. कठोर, झोंबणारें भाषण. –वि. असें भाषण करणारा. ०वीर्य–न. वानराचें वीर्य (शुक्र). हें इतकें उष्ण असतें म्हणतात कीं त्यामुळें दगडहि उलतात. –वि. १ अमोघ, पराक्रमी वीर्याचा (माणूस–ज्याचीं मुलें फार सशक्त आहेत अशाबद्दल. हें विशेषण योजतात). २ उत्साही; पराक्रमी; निश्चयी; सहनशील; ताकदवान इ०. ०शरीर–न. वज्रदेह पहा. ०शरीरी–वि. वज्रदेही. ०शलाका–स्त्री. घरावर वीज पडूं नये म्हणून लावतात ती तार. ०शील–(व.) वरिष्ठ; वरचढ. 'सगळ्या कारकुनांत तो वज्रशील होऊन बसला.' ०संकल्प–पु. न फिरणारा निश्चय; दृढनिश्चय. ०संकल्प–पी–वि. फार दृढनिश्चयी. ०सांखळ–ळी–स्त्री. अभेद्य, अखंडय कोटिक्रम. 'तार्किकांचिया वज्रसांखळा।' –शिशु २५. ०हस्त–वि. वज्राप्रमाणें कठीण हाताचा. ०हस्तें–क्रिवि फार जोरानें. 'तों मुकुंदरायें काय केलें। वेताचे छडीस पडताळिलें। मारिते जाहले वज्रहस्तें।' –संवि २०.११६. ०हृदय–यी–वि. १ कठोर अंतःकरणाचा; अति निर्दय. २ अति निग्रही; निधडया छातीचा. ०क्षार–पु. एक औषधी क्षार. मीठ, सेंधेलोण, पादेलोण, टाकणखार, बागडखार, जवखार, सज्जीखार, या खारांचें विशिष्ट कृतीचें केलेलें औषध. वज्रांगी–स्त्री. चिलखत; कवच. 'वज्रांगी लेइला तैशी प्रलयमेघांची।'–शिशु १००१. –ज्ञा ६.४७५. [वज्र+अंग] वज्राग्नि–पु. १ मूलबंधापासून उत्पन्न होणारी उष्णता; वज्रासनरूप अग्नि –ज्ञा १२.५०. २ विद्युल्लताग्नि; विजेचा अग्नि. 'वज्राग्नीचिया जाळीं। करूनि सप्तधातूंची होळी।' –ज्ञा ११.३७७. [वज्र+अग्नि] वज्राघात–पु. १ वीज पडणें. 'शिरिं वज्राघातचि गमला।' –संग्रामगीतें १२. २ (ल.) भयंकर संकट, आपत्ति. [वज्र+आघात] वज्राधिकार–पु. अनेक पिढया एका कुटुंबांत असलेला अधिकार. [वज्र+अधिकार] वज्रानल–पु. वीज; विजेचा लोळ. [वज्र+अनल] वज्रांबट–वि. अतिशय आंबट. [वज्र+आंबट] वज्राभ्यास–पु. गुणाकाराचा एका प्रकार; वज्रवध. [वज्र+अभ्यास] वज्रावळ, वज्रावळें–स्त्री.न. एका वेलीच्या बियांची, मण्यांची केलेली माळ. मुलाला दृष्ट लागूं नये म्हणून ही त्याच्या गळ्यांत बांधतात. [वज्र+आवली] वज्रासन–न. १ (योग.) एक आसन. मुसलमान नमाज पढावयास बसतात त्याप्रमाणें बसुन हात जोडणें. –संयोग ३२०. –एभा ६.१२७. २ मूळबंध; आधारबंध. –ज्ञा ८.४९. ३ स्थिर, दृढ-आसन (जसें घोडयावर). ४ (ल.) दृढपणें धारण करणें (अधिकार, सत्ता). [वज्र+आसन] वज्रास्त्र–न. इंद्राचें आयुध; वज्र; विद्युतास्त्र. [वज्र+अस्त्र] वज्राहत–वि. वज्राचा प्रहार ज्यावर झाला आहे असा. [वज्र+आहत] वज्रिका–वि. (संगीत) दहाव्या श्रुतीचें नांव. वज्री–स्त्री. पाय घांसण्यास उपयोगी असा कठीण, खरखरीत दगड, वीट, धातूचा पदार्थ इ० –पु. इंद्र. वज्रेश्वरी, वज्राबाई–योगिनी–स्त्री. एक देवता. वज्रोपचार–पु. कडक उपचार, उपाय. [वज्र+उपचार]

वज्ह, वझ्ह—स्त्री. १ रूप; चेहरा. २ पद्धत; चाल. ३ स्थळ; जागा. [अर. वज्ह्]

वझरता, वंझळ, वझें, वझेल–ली—ओझरता, ओंझळ इ० पहा.

वझा—पु. (राजा.) वजा पहा.

वझ्झर—क्रिवि. (व.) लवकर; झरझर. [झर]

वट—पु. वड; वडाचे झाड. –एभा २.५८९. [सं.] **०पौर्णिमा, पूर्णिमा-पुनव**–स्त्री. ज्येष्ठ पौर्णिमेस सुवासिनींनीं वडाची पूजा करण्याचा दिवस. **०व्रत**–न. वटपौर्णिमेस वडाची पूजा करण्याचें व्रत; वडवत (क्रि० धरणें). **०श्राद्ध**–न. यात्रा पुरी करण्यासाठीं गयेस वडाच्या झाडाखालीं करावयाचें श्राद्ध **०सावित्री**–स्त्री. वटपौर्णिमा व्रताची देवता सावित्री. **०सावित्री व्रत**–न. वटपौर्णिमाव्रत.

वट—स्त्री. १ दोरी; दोरा; बट. २ रक्षाबंधन; गंडा. ' कशी–वट कडा दोरा ऋषि तथा दीजे । ' –वसा १०. [सं.]

वट—स्त्री. १ कच्चें रेशीम धुतांना निघून जाणारे दोरे, तंतू, गाळसाळ. २ त्यामुळें येणारी तूट. [का. ओट्टयसु=घटणें. ओट्टु]

वट—वि. एकूण; एकत्र; वट्ट. ' एकंदर भरपाईचा वट आंकडा किती असावा. '–सासं २.३४५. [का. ओट्टु] **०पट्टी**–स्त्री. एकूण आकार, हिशेब. ' साल अखेरीस वटपट्टी करतेवेळीं... ' –मुंव्या ४. **०हुकूम**–पु. १ सर्वत्रांना दिलेला हुकूम; (इं.) सर्क्युलर. –शे ९.४६. २ तावडतोब अंमलांत येणाऱ्या कायद्याचें फर्मान; (इं.) ऑर्डिनन्स; जादा हुकूम. ' कांहीं प्रसंगीं अशा स्थानिक बाबतींतील कायद्याचें कार्य सरकारी वट हुकुमानें करण्यांत येतें ' –पार्ले १०६.

वट—स्त्री. (दादर) ऐट; डौल; मिजास.

वटक—पु. १ डाळीच्या पिठाचा वडा. –सुवन ११ ११९. २ मळाचा खडा. विष्टेचा गोळा, खडा होणें. ३ न पचणाऱ्या अन्नाचा पोटांत होणारा गोळा. ४ अशा तऱ्हेचा होणारा रोग, विकार. ५ लहान मूल दूध प्याल्यानंतर लहान लहान गेळघा ओकतें तो विकार; लहान मुलाची ओकारी. ' वाटी वटक वायेगोळा । ' –दा ३.६.२२. [सं.]

वटकण-न—न. १ (पंढरपुरी) टेंकण; टेकू. वडगण पहा. २ (ल.) दाब; दडपण; अडकवण्याची किल्ली. ३ (ल.) अहंमन्यतेचा ताठरपणा, हट्टीपणा. **म्ह०** पोराचें वटकण पंतोजीच्या हातीं, माकडाचें वटकण दरवेशाच्या हातीं.

वटका—पु. रिकामी बडबड; गुऱ्हाळ; चऱ्हाट. (क्रि० करणें; लावणें; मांडणें; चालवणें). [ध्व. वट ! वट !]

वटंग—न. (बे.) (सोनारी) बिलवर ठोकण्याकरितां असलेली ऐरण; वटांग पहा.

वटगण-न—वडगण पहा.

वटणें—उक्रि. कापसांतील सरक्या निघण्यासाठीं तो लोखंडी किंवा लांकडी दांडघानें लाटणें; लोढणें. [वाटणें] **वटीव**–वि. लाटलेला (कापूस).

वटणें—उक्रि. (प्रां.) रचणें; गंज घालणें (गवत, भारे, दगड इ०ची). [का. वोट्टु] **वटीव**–वि. रचलेलें; ढीग, गंज घातलेलें (गवत, पेंढघा इ०).

वटणें—अक्रि. मनांत येणें; वाटणें पहा. ' गज धाडुं असें न वटे मनिं इंद्रा । ' –वस्वलिंग, गजगौरीव्रत ४६.

वटणें—न. (गो.) उटणें पहा.

वटभरण-णी—नपु. (प्र.) ओंटीभरण पहा.

वट(ट्)ला—पु. (खा.) ओटा.

वटवट—स्त्री. १ अप्रयोजक, कंटाळवाणी बडबड; टकळी. ' तुमची चुकविली वाट । करी वटवट या निमित्यें । ' –तुगा ६९५; –दा २.३.७. २ रिकामी कटकट. [ध्व. वट !] **वटवटणें**–अक्रि. वटवट करणें; टकळी लावणें. ' हा भलतेंच वटवटी सदा । ' **वटवट्या**–वि. वटवट, कटकट करणारा; बडबड्या.

वटवट्या—वि. १ मोठे; गरगरीत; वटारलेले (डोळे). २ बटबटीत डोळ्यांचा; डोळे वटारलेला. [सं. वृत्त; प्रा. वट्ट द्वि.]

वटवणें, वटविणें, वटाव(वि)णें—उक्रि. (पैशाचा) मोबदला घेणें; एका प्रकारचीं नाणीं (रुपया, हुंडी इ०) देऊन मोबदला कमजास्त किंमतीचीं तसल्यांच प्रकारचीं दुसरीं घेणें. बटावणें पहा. [सं. वृत्-वर्तन] **वटाव**–पु. १ नाण्याचा मोबदला. २ असा मोबदला करण्याबद्दलचा आकार. ' इसम पैवस्तीपासोन वजावटाव दंडकप्रमाणें वजा करून उरलें वेतन... ' –वाडशा १२१. बट्टा पहा. (क्रि० येणें; पडणें).

वटवागू(घू)ळ—न. वडवागूळ पहा.

वटा, वंटा—पु. ओटा, ओंटा पहा.

वटांग—स्त्री. लोहाराचें एक हत्यार; एक प्रकारची ऐरण. संधन पहा.

वटारणें—अक्रि. रागानें डोळे वासून पाहाणें; धाक, भीति दाखविण्यासाठीं डोळे मोठे करून टक लाविणें. [सं. वृत्त; प्रा. वट्ट]

वटाव(वि)णें—उक्रि. पार पडणें (संकटादिकांतून); मागें टाकणें; अतिक्रांत होणें. वाटविणें पहा. [वाट]

वटाक्ष—पु. वडा. ' म्हणे माते वटाक्ष झडकरी । माझें पदरीं घाल आतां । ' –भवि २२.१००; –संवि १५.१३६. [सं.]

वटिका—पु. (बुद्धिबळें) प्यादा. ' वाटे त्या चेष्टविलें कोपानें युद्ध–केली वटिकांतें । ' –साधुदास. [सं.]

वटिका, वटी—स्त्री. १ वाफा; मळा (बागेंतील). २ गोळी. ३ वडी; थापटी (साबण, लोणी, शेण, कणीक इ० ची). ४ (महानु.) वडा; सांजोरी. ' ताटी तेचि गगनु । वटिका पूर्ण

चंद्राचें मानु।' –ऋ ८२. ५ (क.) गोलाकृति दगडी चीप (खेळण्यासाठीं). [सं.]

वटी, वंटी, वंटीभरण, वंठ—ओटी, ओटीभरण इ० पहा.

वटी—स्त्री. (ढोर) धान्य पेरतेवेळीं बीं ठेवण्याची पिशवी.

वटी येणें—(व. घाटी) ओटी भरावयाची वेळ येणें; पदर येणें. ऋतु प्राप्त होणें. **वटभरण**–न. फलशोभन. ओटी भरणें. [ओटी]

वट्टी–ट्टी—पु. (व. ना.) घोबी; परीट; वरठी पहा.

वठणें—अक्रि. नरम होणें; मऊ येणें (मर्दनादि व्यापारानें). 'बाईल वठेना बोला। बाळें दाविती वाकुल्या।'–भारा-बाल ९.७४. [सं. वृत्] **वठणीस-वर-येणें**–(रूढ प्रयोग). १ वठणें; मऊ येणें (दमन, मर्दन इ० व्यापारानें); ताळ्यावर येणें. 'घोडा फार दांडगाई करीत होता, जरासा फेरफटका देतांच चांगला वठणीस आला.' २ वश होणें; ताब्यांत येणें. 'तद्दुर्दशा न करितां निस्तेज मज वठेल काय मही।' –मोसभा ३.३५.

वठणें—अक्रि. १ उमटणें; ठळक होणें; उठावदार दिसणें (शिक्का, रंग). २ फलद्रूप होणें; खरा ठरणें (शाप इ०). ३ (व्यापक.) भरभराटीस येणें; फोफावणें; तरारणें (वनस्पति). ४ उग्र, खमंग असणें (स्वाद). ५ दरवळणें (वास). ६ शुष्क होणें; वाळणें (रोगादिकानें मनुष्य, वृक्ष, इ०). ७ (ल.) उतरणें; बनणें. 'तें विवेचन चांगलें वठलें आहे.' 'या ठिकाणीं सर्व व्यवस्था पूर्वीप्रमाणें वठली असली तरी...' –हिंदु ११.२.१९. ३०. [उठणें] **वठ(वि)णें**–(उघड) करून दाखविणें; उठविणें पहा. 'नाटक अमुक अमुक कंपनी बरोबर वठवून दाखविते किंवा नाहीं या गोष्टीकडे शेंकडा ९० लोकांचें दुर्लक्ष असतें.' –नारुकु ३.५१.

वठम—पु. (व.) १ आवड; हौस. 'तिला खायचा मोठा वठम आहे.' २ खटपट; प्रयत्न. 'हा वठम तुझ्यानें कसा होईल?'

वठाण—न. घरांतील खोली किंवा खोल्यांचा एक गाळा; विशिष्ट व्यक्तीला किंवा कार्याला दिलेला घराचा भाग. उदा० माजघर, स्वयंपाकघर इ० [सं. अवस्थान, आस्थान; प्रा. अट्ठाण. तुल. सिं. वथाणु=गोठा]

वठार—पु. (कों). १ गांवची एक पेठ; मोहल्ला. २ वठाण पहा.

वठूर—वि. (व.) राठ; खरखरीत.

वठ्ठ्या, वठ्या, वठ्याबा, वठ्ठोबा—वि. लठ्ठ्या; दांडगेश्वर; गलेलठ्ठ आळशी (माणूस). [सं. वठ्=लठ्ठ होणें] **वठ्ठ्याचें**–न. (निंदार्थी संकेतानें) पोटभर जेवण. 'दिवसांत तीनदां वठ्ठ्याचें पाहिजे आणि काम कांडींचें नको.' **वठ्ठ्या मारणें**–(क.) (पदार्थावर) ताव मारणें. 'आज काय श्रीखंडावर वठ्ठ्या मारला.'

वड—पु. एक झाड; वट. हें झाड फार पवित्र मानिलें जातें व औषधीहि आहे. याच्या स्त्री व पुरुष अशा दोन जाती आहेत. [सं. वट; प्रा. वड] **०पिकणें**–(ल.) अनेकांना नोकरी व उपजीविकेचें साधन निघणें, तयार होणें. **म्ह० वड पिकला आणि कावळ्याला मुखरोख झाला, किंवा वडास आलीं वडफळें कावळ्यास आलें रूं (रोग)=चांगले दिवस आले असतां उपभोगाचें सामर्थ्य जाणें. वडाची लाल पिंपळाला लावणें**–१ खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करणें. २ नसता संबंध जोडणें; भलत्या गोष्टीचा संबंध प्रस्तुताशीं लावणें. ३ वळणें; कपटानें फिरणें, बदलणें. **०काळिका**–स्त्री. वडवागूळ. 'कीं दिनउदयीं शाखेवर। वडकाळिका झोंबती।' –नव १२.१८४. [सं. वट + कालिक] **०जखीण**–स्त्री. वडाच्या झाडावरील स्त्री पिशाच; हडळ; **०जाई**–स्त्री. एक क्षुद्र देवता. –खेया. **०पिंपळ**–(वडापिंपळास फळें धरत नसल्यानें निरुपयोगी यावरून) ब्रह्मचारी; फटिंग (निंदार्थी उपयोग). **०पुनव**–स्त्री. वटपौर्णिमा पहा. ज्येष्ठांतील पौर्णिमा. **०रुख**–पु. वडाचें झाड. 'तया वडरुखाखालिं येतुजातु देखिला।' –पंच २.१. **०व्रत**–न. (प्र) वटव्रत पहा. **०वतें**–न. अव. नूतन विवाहित स्त्रिया वडपुनवेचे दिवशीं वाणें वाटण्याचा जो समारंभ करतात तो. **०वाघू(घू)ळ**–न. एक पक्षी; वागळ, वागूळ पहा. **०सावित्री**–स्त्री. वटसावित्री पहा. **वडांगळें**–न. वडाचें फळ. **वडाची पुनव-पूर्णिमा**–स्त्री. ज्येष्ठी पौर्णिमा; या दिवशीं सुवासिनी वडाची पूजा करतात. **वडावरची जखीण**–स्त्री. १ रागानें, तिरस्कारानें अज्ञान व्यक्तीवद्दल वापरतात. २ वडजखीण पहा.

वड—पु. (सराफी) मोत्यांचें वजन करण्यापूर्वी सारख्या आकाराचीं मोतीं वेगळीं करणें. (क्रि० लावणें).– जनि (परिभाषिक शब्द) १३. **०वार तोल**–पु. अशीं मोतीं एकत्र तोलणें. –जनि १३.

वड—पु. (क.) वढा; ओढा पहा.

वंड—वि. (कों.) खोल. ओंड पहा.

वंडकी-कें—स्त्रीन. ओंडकी-कें पहा.

वडग—न. (गो.) मरायला टेंकलेलें किंवा मेलेलें जनावर.

वडग-गें—न. (ना. चंद्रपुरी) टोपलें.

वडगण—न. १ अटकण (दगड, लाकूड इ० चें दार, चाक इ० ला). २ टेंकण (ताटाखालीं) हलूं नये, मागेंपुढें होऊं नये म्हणून लावतात ती वस्तु.

वडजंबा—स्त्री. (महानु.) एक देवी. 'वडजंबेचा देऊळी। वस्ती जाली।' –ऋ.

वडजा—पु. (एक विशेषनाम) विद्रुप, कुरूप माणूस. कृष्णाचा एक सोवती. 'पेंधा, वडजा वांकुडा।' –दाव ६८. –वि. कुरूप; वक्र; हिडिस. 'वडजे वांकुडे गोवळ। तयांसी म्हणे तमाळनीळ।' –ह ९.१३८.

वडणें—न. ओढणी. 'झगडयांत पुढें भिडणें म्हणुनी धरियेलीच कंचुकि कीं वडणें।' –अकक २ हरिराजकृत राधावर्णन ८. [ओढणें]

वडप—न. १ वर्षाव; वृष्टि. 'वरिखतु रसाचें वडप।' –दाव १३७; –ज्ञा ६.४९०. २ मळभ; अभ्र. 'दिशांवरी पडलें वडप। पश्चिमे प्रगटलें रेखाचाप।' –कुमुरा ६८.४. [दे. प्रा. वडप्प=निरंतर वृष्टि]

वडपड—वि. योग्य; पात्र. 'वडपड जाहाली यमकोंडासी।' –खिपु २.२९.७५. वरपड पहा.

वडलो—स्त्री. (व. पारधी) भाकरी.

वडव—स्त्रीन. ज्यांत मोटेचें चाक बसवितात तें विहिरीवरचें आडवें लांकूड; मोटवण.

वडवडणें—अक्रि. १ ओढवणें पहा. 'हार नवता मधीं सहात कसें आज संकट वडवडलें।' –होला ११२. २ मध्यें मध्यें येणें; अडमडणें.

वडवडित, वडवा—क्रिवि. त्वरित. 'कृपावंता आतां वडवडित पावेसि मजला।' –सारुह ६.११०. 'मला धीर धरवेना वडवा। दृष्टीला दावा तरी।' –पला ४.९.

वडवा—स्त्री. घोडी. 'वडवा झाली व्याघ्र घोर। हें देखोनि भियाले सर्व वीर।' –जै २१.२८. [सं.]

वडवा—स्त्री. पाणधरण; पाणबांध. –हंको. ?

वडवा—पु. (चुकीनें) वडवाग्नि, वणवा पहा.

वडवाग्नि, वडवानल—पु. समुद्रांतील अग्नि. 'आतां धैर्याचा समुद्र शोखला। त्येजाचा वडवानळु विझाला।' –भाए ९४; –ज्ञा १.८९. [सं.]

वडवाळी—स्त्री. १ घांस; ग्रास. 'गांसाची वडवाळी। आरोगूं लागे।' –ज्ञा ६.२३०. २ आहुति.

वडस—पु. डोळ्याचा एक रोग. बुबुळावरील पांढरा कवडा. 'फुलें वडस आणि पडळें।' –दा ३.६.४०. 'कमळाक्षीचे नयनीं वडस।' –दावि १०८. [? तुल० दे. प्रा. वड्डवास=अभ्र]

वडा—पु. डाळीच्या पिठाचें तळून केलेलें एक खाद्य. [सं. वटक; प्रा. वडग; हिं. वडा] **वड्यांची माळ**–स्त्री. वडे तळून त्यांची केलेली माळ. ही शनवारीं मारुतीस घालतात. 'वडयांचीही माळा रुचिरतर वाहीन तुजला।' –सारुह ६.११०. **वड्याचें तेल वांग्यावर काढणें**–एकावरचा राग दुसऱ्यावर काढणें. **वड्येल**–न. (गो.) वड्याचें तेल.

वंडा—पु. (प्र.) ओंडा पहा.

वंडा—स्त्री. वांझ स्त्री, मादी. 'मूळ लग्नाची आमची बायको जन्माची वंडा।' –पला ७७. [सं. वंध्या]

वडांग—स्त्री. कुंपण; वई (विशे. काटेरी झाडांची).

वडागरमीठ—न. समुद्रमीठ (याचे खडे मोठे असतात).

वडाण—न. (प्र.) उडाण पहा. 'तयातें चित्रगीउ वडाण घेऊनि डोंगरा एका पैलाडि गेला।' –पंच २.२.

वडार-री—नपु. १ एक हलकी जात. ही कामाच्या जागीं जमावानें राहते. धंदा दगड फोडणें, विहीर खणणें इ० २ या जातींतील व्यक्ति. [का. ओडु; प्रा. वड्डर]

वडिपडि—वि. उत्कंठित; उत्सुक. 'म्हणती हा खैचा कवणु। काइ बोलैल म्हणउनु। तें ऐकावेया सकळै जनु। वडिपडि जाहाले।' –खिपु २.१६.४२.

वडी—स्त्री. १ लहान चपटा तुकडा (पिठाच्या पदार्थाचा, साबण इ० जिन्नसाचा); थापटी. २ (ल.) अळिता इ० कांत कापूस भिजवून जी पोळी करतात ती. ३ शेत, जमीन इ० जागीं जाळण्याच्या उद्देशानें किंवा लोकर वाळावें म्हणून विरळ पसरतात तें शेण; गोवऱ्या थापणें. ४ (तंजा.) सांडगा. [सं. वटी; वडा अल्पार्थी; देप्रा. वडी]

वडी—वि. (कातोडी) इतकी; एवढी. [एवढी अप.]

वंडी—स्त्री. (अव.) (खा.) घरावरील धाब्याच्या बाजूस असलेल्या भिंती; वरवंडी.

वंडी—स्त्री. (खा.) मोठया बायका पसाडा(परकरा)वरून नेसतात ती साडी. लहान मुलींच्या साडीला फडकी म्हणतात.

वडीचा—वि. (वाई) शेवटचा. 'या औताच्या वडीची जोडी फार तापट आहे.'

वडीम—स्त्री. (क.) गंजी.

वडील—पु. बाप; तीर्थरूप. 'सकळांस आनंद जहाला। म्हणती आमुचा वडील आला।' –दा ३.४.२३. –वि. १ वाड-वडील; बाप, आजा, पणजा इ० पूर्वज. 'जे हे वडिल सकल आपुले। वधावया दिठी सुदले।' –ज्ञा १.२६४. २ वयानें मोठा. 'तयामाजीं तो मदन। हरीचा वडील नंदन।' –कथा १.३.१३९. ३ विद्या, मान, इ०नीं श्रेष्ठ, मोठा. ४ (सामा.) श्रेष्ठ; थोर. –ज्ञा ३.१५८. ५ विस्तृत; लांबलचक; मोठा. 'हा आहे वडील वृत्तांत।' –वसा ७३. ६ फार; अतिशय. 'च्या-ही दीस भरले वडील उछायें।' –घवळे उ ४०. [सं. वृद्ध; प्रा. वड्ढिअ; देप्रा. वड्डिल] **०की**–स्त्री. १ घराण्याचा कारभार पाहण्याचा अधिकार. पेशवाईत देणें–यादीवर मालक पेशवे 'यावे' असा शेरा व वडीलकीचा अधिकार असलेले त्यांचे कारभारी 'देवावें' असा शेरा मारीत. –अधिकारयोग ५२–५३ पहा. २ वडीलपणा. **०घराणें**–न. कुटुंबांतील मोठया माणसांचें (विभक्त झाल्यावर) घराणें; वडील भावाचें घर. **०तक्त**–न. वडील घराणें पहा. 'वडील तक्ताची जागा सबब समाईक जोशी याकडे ठेवली आहे.' –मसाप २.२.५८. **०धारा-रें**–पुन. (वडील आणि लहान) घराण्यात

शिस्त राखण्याचा अधिकार असलेली व्यक्ति; घराण्यांतील वडील माणूस. 'त्यांनीं माझा मुका घेण्यास तोंड पुढें केलेंच तर मी वडीलधारा न ओळखतां एकदम त्यांच्या मिशा उपटी.'–बहक-लेली तरुणी ६. **०परंपरा**–स्त्री. पूर्वजांची, वडील माणसांची मालिका. **०परंपरागत**–वि. पूर्वजांपासुन चालत आलेली; पिढी-जात. **०मान**–पु. वडीलकीचा मान; पिढीजाद हक्क. 'होळीपोळीचा वडीलमान मुकद्दमाकडे आहे.' **वडलाई, वडलाबाई**–स्त्री. आपल्या लहान भावंडांवर अधिकार गाजविणें (निंदार्थी उपयोग). **वडलांचा अडकित्ता**–पु. (ल.) सुपारी फोडण्यास घेतलेले दगड. **वडलांचा आहेर**–पु. जुनी म्हण. **वडलावडली**–वि. वाड-वडलांच्या वेळचें; परंपरागत; प्राचीन. –क्रिवि. वाडवडलापासून; वंशपरंपरा. 'वडलावडली भार असे जन पडती।'–ऐपो २६९. **वडलोपार्जित, वडिलार्जित**–वि. वाडवडलांनीं संपादिलेलें, ठेविलेलें (द्रव्य). [वडील + उपार्जित किंवा अर्जित] **वड-लोबा**–पु. आपल्या लहान भावंडांवर अधिकार गाजवणारा भुलगा; दादा. **वडलोवडली**–क्रिवि. वंशपरंपरागत. वडला-वडली पहा.

वडवा—स्त्री. घोडी; वडवा पहा. 'तीये वडवेसी डसली।' –उषा १७०७.

वडसा—स्त्री. (माण.) इच्छा. (क्रि० धरणें).

वडें—वडें पहा.

वडुर—स्त्रीपु. १ वडार जात. २ तींतील व्यक्ति. [का. ओडु] **०खोरें**–न. खांदणें, माती भरणें, भराव घालणें वगैरे कामास उपयोगी असलेलें हत्यार.

वड्डी—स्त्री. (क.) चार चिंचोक्यांचा एक गट (मुलींच्या खेळांत रूढ). [का. ओडु=डोंग]

वढ, वढक, वढकर, वढगस्त, वढगस्ती, वढण, वढणबाकी, वढणें, वढदोरा, वढव, वढवणें, वढा, वढाताण, वढावढी, वढळकी, वढाळी, वढिस्त—ओढ, ओढक इ० पहा.

वढम—स्त्री. (व.) नाद; आवड. [ओढ]

वढरी—पु. (महानु.) प्रेतयात्रेंत भाग घेणारा; प्रेताबरोबर जाणारा मनुष्य. 'कंसाते नेत माडी सखिजन वढरी गूढरी घालु-निया।'–गस्तो ३२.

वढाय—वि. (व.) उनाड; बदमाष.

वढाळ—न. ओढाळ गुरूं. ओढाळ पहा. 'वढाळें चरतीं शालीवनें।'–मुसभा ३.७९.

वढी—स्त्री. (व.) शेतांत घातलेला लहानसा बांध.

वढील—वडील पहा.–मोउद्योग ८.४.

वढें—न. १ सूड; उंडे. (क्रि० घेणें; उगवणें; काढणें). 'पण मी आतांच ह्याचें वढें काढीन.'–बाळ २.१५४. २ मोबदला; भरपाई. (क्रि० घेणें; काढणें). 'यंदा तो फसला तर ह्याचें वढें पुढल्या वर्षी कां घेईना?' [सं. वृध्?]

वढ्याळ—ओढाळ पहा.

वण—पुन. देवी, गळूं, क्षत इ० बरें झाल्यानंतर त्या जागे-वर राहणारें चिन्ह; डाग; व्रण; घट्टा. –मोरा १.४०२. 'नामचि पुरे न घ्यावे अष्टांगीं नमन करुन आठ वण।'–मो स्फुट आर्या (नवनीत पृ. २५५). [सं. व्रण; प्रा. वण]

वण—स्त्री. (राजा.) वेताळ, म्हसोबा इ० देवतांस जो जना-वरादि बलि देतात ती.

वण—न. (प्र.) वन पहा. 'तेव्हां तो भट एक वण मागें टाकतो तों दुसरें पुढें येतें.'–मसाप १.२.–स्त्री. वनचराई. पाहणी इ०च्या सरकारी कागदपत्रांतून म्हैस शब्दामागें याचा योग होतो (वनचराई आकारावयाची या अर्थानें). 'वण म्हशी चौदापैकीं मयत तीन बाकी जमा अकरा.' [सं. वन] **०मस-म्हैस**–(वण + म्हैस) वनचराईचा आकार. 'हल्लीं वणमस (म्हशीमागें एक रुपाया...) भरूनसुद्धां श्रावणापासून जनावरें घरीं बांधून ठेविलीं आहेत.'–खेया.–बाडमा १.११२. **वणीं देणें**–(कों.) वनांत नेऊन मारणें.–लोक २.३१.

वणंग-गें—न. (गो.) एक लहान जातीचा मासा.

वणज—स्त्री. व्यापारासाठीं प्रवास, फेरी; वाणिज्य. [सं. वाणिज्य] **वणजणें**–अक्रि. व्यापार करणें.–ज्ञा १८.९४८(पाठभेद)

वणजारा-री—पु. एक जात किंवा तींतील व्यक्ति; लमाण; हे लोक परगांवांहून धान्य, गुरें इ० आणून विकतात. 'मार्गी जाता अवधारा। भेटला सार्थक वणजारा।'–कथा १.९.१४९. [सं. वाणिज्यकार; फा. बिरंज=तांदूळ; फा. बिरिंजारी=धान्याचा व्यापारी] **वणजार-रा**–नपु १ वणजारी लोकांचा तळ, समुदाय. २ (समुच्चयार्थी) वणजारी.

वणत—स्त्री. (कारवारी) भिंत. –शर.

वणधा—स्त्री. (मुंबई, कों.) कोठें दुखत असलें म्हणजे सांध्यांत येणारी गांठ; अवधणा पहा.

वणवण-वणवणघाणा-णी—स्त्री. १ दमणूक; व्यर्थ श्रम; कुत्तेघाशी. २ भगभग; गांजणूक. 'श्रीरामाचें व्रतबंधन। सुखी केले अकिंचन। वणवण निमाली पूर्ण।'–भारावाल ७.१५. –क्रिवि. १ पुष्कळ श्रम होत असें निरर्थकपणें (क्रि० करणें). २ उगाच पुष्कळ दमणूक करून. (क्रि० हिंडणें; फिरणें). 'उगेंच वणवण हिंडोन।'–दा १९.६.२४. वनवन पहा. **वणवणणें**–अक्रि. धडपड करणें; कष्ट करणें. 'जें चित्त वणवणी विषयालागीं।' –एभा २५.२४२. **वणवणा**–क्रिवि. वणवणचा अतिशय. 'सारा हिंदुस्थान वणवणा पायींच हिंडून पहावा'–खेया (प्रस्ताविका)

वणवणें-वणवा—ओणवणें, ओणवा पहा. **वणवा घेणें**-क्रि. (बे.) १ खांदा देणें. २ जनावरानें जूं काढल्यावर खालीं पडणें.

वणवा—पु. डोंगर, अरण्य इ०कांत पेटलेला अग्नि; दावानल; रानवा. -ज्ञा १४.१९१. 'यदुवंशाचीं वेळवनें वणवाचि असती।' -भाए ५३. [सं. वन; प्रा. वण. देप्रा. वणव=दावानल] **वणवणें**-अक्रि. वणव्यानें व्याप्त होणें. 'जैसा ग्रीष्म कालीं गिरिवरु। वणवला कां।' -ज्ञा २.७६.

वणवी—स्त्री. रास; गंज. 'जैसे तृणाचे वणवीसी। अग्निस्पर्शे होता नाशी।' -गुच ३६.२३८.

वणसावणें—न. (मुंबई, कों.) स्वप्नांतील बरळणें.

वणिज—स्त्री. १ व्यापार; वाणिज्य. वणज पहा. -ज्ञा ६.११०. २ (सामान्य) व्यवहार. 'ययां कौरवांचिया घरा। शिष्टाई धाडिलासि दातारा। ऐसा वणिजेसाठीं जागेश्वरा। विकिलासि आम्ही।'-ज्ञा ११.५४२. [सं. वणिक्-ज्; वाणिज्य] **वणिक्-ज**-पु. १ व्यापारी. २ वाणी; बनिया. 'मारिति हाका केवळ नागविला वनिं जसा वणिक् सार्थ।' -मोकृष्ण ८६.२६.

वणिज—न. बवादिकांतील ६ वें करण. करण पहा. [सं.]

वणी—पु. (महानु.) घाव घालणारा; मारणारा. 'रणीं जुझारू घायेवाटे। तरि वणियां न बंधिजाति पाटे।'-भाए२४१. [सं. व्रणिन्; प्रा. वणि]

वणी—शअ. (रूढ) वाणी पहा. सारखा; प्रमाणें. 'तो सांगे पळाला भुतावणी।' -दावि ४७१.

वणी—समासांत पाणी या अर्थानें हें रूप येतें. उदा० गुळवणी (गुळाचें पाणी=मराठ्यांतलें कालवण); आंबवणी (उंसाच्या पिकास द्यावयाचें पाणी); चिंबवणी, काढवणी इ० [सं. वन; प्रा. वण=पाणी]

वणोटा—पु. रंगाचा पट. [सं. वर्ण; वण+पट्टा]

वत्—प्रत्यय. जसा; सारखा; प्रमाणें; सदृश. उदा० तद्वत्; एतद्वत्; ब्राह्मण-क्षत्रियवत्.

वत-ती—स्त्री. बाजू. वर्ती, वतीनें या विभक्तींत उपयोग. वर्ती-तीनें पहा.

वत—पु. ऊत पहा.

वंत—पु. (कों.) वांटा; हिस्सा (वडलार्जित मिळकत, व्यापार इ० तील). 'माझा ज्येष्ठपणाचा वंतु। वेगळा करी पा यज्ञदत्तु।' -कथा ५.१५.१०. **०दार**-पु. भागीदार.

वंत—बाळगणारा, धरणारा, धनी या अर्थी नामांना जोडून येणारा प्रत्यय. उदा० द्रव्यवंत; भाग्यवंत; धैर्यवंत इ० [सं. वत, वान्]

वतणी, वतणें—ओतणी, ओतणें पहा.

वतणें—अक्रि. (प्र.) उतणें पहा.

वतन—न. १ वंशपरंपरेची चाकरी, धंदा, अधिकार, नेमणूक, उत्पन्न; उपजीविकेचें साधन. -गांगा १६. २ मालकीची जागा; जन्मभूमि; घर. ३ इनाम; बक्षीस. 'दिधलों गुरु प्रसादप्रभुनें पूर्वोक्तसद्गुणां वतन।' -मोकर्ण २०.२९. ४ वंशपरंपरा हक्क (जमीन, वृत्ति इ० त). [अर. वतन्=जन्मभूमि, घर. तुल० सं. वर्तन=उदरनिर्वाह, वेतन] **०गाडणें**-एखाद्या जागीं मालकी, सत्ता असणें (नेहमीं नास्तिपक्षीं उपयोग). 'तूं नित्य येथें येऊन बसतोस, काय येथें तुझें वतन गाडलें आहे.' **०गाडलें**-न. (गाडलेलें वतन) जुनी किंवा फार दिवस ताब्यांत असलेली मिळकत. 'माझी वंशपरंपरा ह्या जागेवर नांदून वतनगाडलें आहे तें मी सोडणार नाहीं' **०जप्ती**-स्त्री. वतनी जमीन किंवा तीवरील उत्पन्नाची जप्ती. **०दार**-पु. वतन असलेला; वतन धारण करणारा. 'वतनदारांचीं वतनें वतनदारांच्या दुमाला केल्या विरहित पोटतिडीक लागोन मुलूक मामूर होत नाहीं.'-रा१६.४४ (कायदा) वंशपरंपरेनें सरकारी काम करण्याचा हक्क असणारा इसम. 'तीर्थोपाध्याय, मंदिरवाले, दरगेवाले, फिरस्ते, हुन्नरी व मनोरंजनाचा धंदा करणारे, भिकारचोरटे वगैरे वतनदार स्वतःला म्हणवितात. ...सर्व गांवकऱ्यांना मग ते कोणत्याहि धंद्यावर पोट चालवोत वतनदार ही सामान्य संज्ञा आहे. -गांगा १५. [फा.] **०दार-हिजडा**-पु. हिजडा पहा. **०दारी-दारकी**-स्त्री. वतनाचा हक्क, मालकी; वतन असणें **०दारीकरा**-पु. (वतनदार) (कों.) फार जुना शेतकरी. **०पत्र**-न. वतनाची सनद, दस्तऐवज. **०बंधु-भाऊ**-पु. १ वडिलोपार्जित मिळकतींत हक्क असणारा; भागीदार. २ सह-अधिकारी (वंशपरंपरागत); देशमुखबंधु. वतनबहीण असाहि शब्द येतो. **०वाडी**-स्त्री. वतन, वतनी शेत, वाडी इ० (व्यापकपणें); जमीनजुमला; इस्टेट. 'वतनवाडी पाहून मुलगी देणें तर द्यावी.' **वतनी**-वि. १ वडलोपार्जित किंवा विकत घेतलेली (जमीन, मालमत्ता इ०). २ वतनासंबंधी (दस्तऐवज, कागदपत्र, इ०). ३ वतन आहे किंवा जन्म झाला तें (ठिकाण). **वतनी मिळकत**-स्त्री. (कायदा) वंशपरंपरेनें सरकारी काम करण्याच्या मेहनतान्याबद्दल मिळकत किंवा नक्त नेमणूक.

वतन-नी—ओतणें-णी पहा.

वतबळी—स्त्री. (क.) कांकण घट्ट बसावें म्हणून मध्यभागीं खांच पाडून तयार केलेलें पत्र्याचें कांकण. [सं. वृत्त+वलय]

वतरणें, वतारणें—अक्रि. १ संचरणें (पिशाचानें शरीरांत). २ अशा संचारानें संचलनविशिष्ट होणें (माणसानें, जनावरानें); पछाडलें जाणें. [अवतरणें]

वतल-ळ—न. (व. है.) अवेल; वैल. 'वतलावर आधण ठेव.' ओतल पहा. [सं. अव किंवा उत्+तल ?]

वतवत—स्त्री. १ रिकामें भटकणें, फिरणें. 'त्वां दिवसभर वतवत केलीस आतां जेवायाला तांतडलास.' २ वटवट; बडबड; बकबक. ३ बदलणें [ध्व] **वतवत-तां**–क्रिवि. १ वटवट लावून; बडबडून. २ बरळून; भ्रमिष्टपणें. (क्रि० करणें; बोलणें). ३ वचवच पहा. (क्रि० खाणें; जेवणें). ४ रिकामपणें; रमतगमत. (क्रि० फिरणें; करणें). **वतवतणें**–अक्रि. १ वटवट करणें; बडबडणें. 'तें नाहीं तरी किती। वतवतु।' –अमृ ७.८४. २ तणतणणें; क्रोधावेशांत चडफडणें.

वंतसें—नस्त्रीअव. (रूढ) वनसें पहा.

वताणा—पु. (चांभारी) सागळ व आस्तर यांमधील भाग.

वतारणें—अक्रि. वतरणें पहा.

वतारी, वतींव—ओतारी, ओतीव पहा.

वतावत-तां—क्रिवि. वतवत-वतां चा अतिशय.

वताळ—पु. वार; जखम. –मनको.

वताळणें—क्रि. १ (व.) बडबडणें. २ गर्जना करणें. 'गजारूढ वताळे भाट।' –कृमुरा २५.७२.

वतीं, वतीनें—क्रिवि. तर्फे; बाजूनें; बद्दल. 'ने. ना. दिवाण साहेब यांही श्रीमंतांवतीं स्वीकार करावा.' –अहेर बहुमान पोषाक नियम ६. **वतीचा**–वि. बाजूचा; पक्षाचा. आमच्यावतीं व तुमच्यावतीं हे शब्द व्यापारी, पेढीवाले यांच्या हिशेबांतून सावकार-कूळ यातर्फे अशा अर्थानें येतात.

वत्त—न. १ (बे.) नदीला पूर आल्यावर पाण्यास येणारी फूग. ओत पहा. [का. ओतु=पूर]

वत्तर—स्त्री. (व. ना.) १ हंगाम; योग्य संधी. २ विपुलता; समृद्धि.

वत्स—पुन. १ गाईम्हशीचें पोर, बालक; वासरूं.–ज्ञा ७.१२०. 'तुका म्हणे वत्स धेनुवेचे चित्तीं। तैसे मज येती सांभाळीत।' –तुगा २२०१. २ बाळ; मूल. लहानाला प्रेमानें संबोधितात. 'भीष्म म्हणे वत्सा जरि पुससी सर्वांत कोण पूज्य असे।' –मोसभा २.२८. ३ रत्नागिरीजवळील ब्राह्मणांची एक जात व तींतील व्यक्ति. [सं.] **०द्वादशी**–स्त्री. आश्विन वद्य १२. या दिवशीं सवत्स धेनूची पूजा करतात. वसुबारस पहा.

वत्सनाभ—पु. एक प्रकारचें विष; बचनाग. [सं.] **वत्सनाभाम्ल**–न. (शाप.) बचनागांतील अम्ल. (इं.) ॲकोनिटिक ॲसिड.

वत्सर—पु. वर्ष; संवत्सर. [सं.]

वत्सल—वि. प्रेम करणारा; दयाळू; कृपाळू; आवडता; काळजीचा. –ज्ञा १२.२४२. (समासांत) अनाथवत्सल; दीनवत्सल; भक्तवत्सल. [सं.] **वत्सलता**–स्त्री. वात्सल्य; स्नेह; मायाळूपणा.

वथ—स्त्री. (व.) व्यथा (कुंथण्याची). [सं. व्यथा]

वंथ—पु. वांटा; वंत पहा.

वथज्या—क्रिवि. (ना.) तिकडे.

वथणें—अक्रि. मूर्खपणें बडबडणें; नको तें बोलणें.–अक्रि वटवट करणें; बकणें. [वदणें ?] **वथूयाणें**–क्रि (कु.) झोंपेंत बडबडणें.

वथंबणें, वथंबा—ओथंबणें, ओथंबा पहा.

वद्—न. (व.) दंव. **वद्दाड**–न. (व.) १ दंव. २ सर्दी.

वंदक—वि. पूजा, भक्ति करणारा; भक्त. [सं.]

वंदट—न. (क.) वांबळ; अभ्राच्छादित आकाश.

वंदण—न. (प्र.) ओंदण पहा.

वदणूक—स्त्री. १ स्पष्ट, उघड करणें; सांगणें; वर्णन देणें. २ कबुली; कबुलायत; मान्यता. ३ पंचाकडून इमान करवणें. –भाअ १८३२. [वदणें]

वदणें—उक्रि. १ उघड करणें; मनांतलें, लपवून ठेवलेलें बोलूं लागणें; कबूल करणें. २ प्रतिपादणें; जाहीर करणें; मोठ्यानें बोलणें. ३ –अक्रि. (सामा.) बोलणें; सांगणें. 'आतां पाल्हाळ टाकोनि सत्वर। संतचरित्रें वदावीं।' [सं. वद्] **वदंता**–स्त्री. बातमी; बोलवा; जनवार्ता. [सं. वदंती] **वदंती**–स्त्री. १ भाषण; बोलणें. 'हे ब्रह्मीची वदंती। तुज निवेदिली गा भूपती।' –कथा ६.१२. ७४. २ वचन; वाक्य. 'अव्यक्त वादमतीं। अव्यक्त ऐसी वंदती।' –ज्ञा १४.६९. ३ वार्ता; बोलवा. 'मग कल्पादीं पुढती। मींचि सृजीं ऐसी वदंती।' –ज्ञा ९.१०५. ४ उपदेश; उच्चार. 'पै गुरुशिष्यांचिया एकांती। जे अक्षरा एकाची वदंती।' –ज्ञा १०.१२६. ५ वटवट; बडबड. 'गाडींतून उतरल्यापासुन आपलीच एकसारखी वदंती चालू आहे. आम्हीं बोलावं केव्हां?' –भयंकरदिव्य. [सं.] (वाप्र.) **वदतोव्याघातः**–उघड विरोध; स्पष्ट विसंगतता; उघड असणाऱ्या विरुद्धतेचें प्रतिपादन करणाऱ्याविषयीं योजतात. **वदव(वि)णें**–उक्रि. बोलविणें; बोलावयास लावणें; तोंडातून काढणें. (वदणें प्रयोजक)

वंदणें—उक्रि. १ नमस्कार करणें. २ सत्कार करणें; पूजा, भक्ति करणें. ३ आदर बाळगणें; मानणें. 'कोणी वंदा कोणी निंदा। आपला स्वहिताचा धंदा।' [सं. वंदन] **वंदन**–न. वंदणें; नमस्कार. २ आदर दाखविणें; मान्यता; सत्कार. ३ सेवा; पूजा. [सं.] **वंदनभक्ति**–स्त्री. उपासना मार्गांतील नवविधा भक्तीमधील एक अंग. **वंदनशील**–वि. १ फार आदर दाखविणारा. २ सभ्य; प्रशंसापर; गौरवपर. **वंदनीय**–वि. वंदायास योग्य; पूज्य; सेव्य. [सं.] **वंदित**–वि. वंदिलेला; पूजिलेला. [सं.] **वंद्य**–वि. वंदण्यास योग्य; वंदनीय. –ज्ञा १.५४.

वदन—न. १ मुख; तोंड. 'वृथा गेली आंगवण। काय वदन दाखवितां।' –एरुस्व ८.६. (समासांत) चंद्रवदन; पद्मवदन;

म्लानवदन इ० २ (गणित) श्रेणीतील पहिले पद. [सं.] **वदनामृत**-न. भाषण. -ज्ञा १५.५८८. [वदन+अमृत] **वदनेंदु**-न. मुखचंद्र (सुंदर मुखाच्या वर्णनांत उपयोग). ' उदय अस्ताचीण संपूर्ण । वदनेंदु श्रीकृष्णाचा । ' -एरुस्व १.५५. [वदन+इंदु]

वंदन--न. १ चिवडाचिवड; कालवाकालव (जेवणांत अन्नाची) २ अस्ताव्यस्त पसरणें; उधळणें; फेंकणें. (क्रि० करणें).

वदर—स्त्री. भीति; कदर. ' ठेऊन चित्तामध्यें वदर भिऊन या जना । ' -होला १०६. [दर, डर; आदर]

वदर—पु. (व.) थर. [सं. दृ-दर] **वदरणें**-अक्रि. (व. ना.) १ विरणें; फाटणें. २ गळून पडणें; ओघळून जाणें.

वदळ—स्त्री. वरदळ पहा.

वदळ—पु. (कों.) समुद्राच्या लाटामुळें किनाऱ्यावरील वाळूमध्यें होणारा उंचसखलपणा; उंचसखल रेषा, वळया.

वदान्य—वि. १ उदार; दाता. ' धर्मिष्ठ वदान्य सत्यवचन । सन्मुख रणी पावला मरण । ' -जै २१.२९. २ वाक्पटु; वक्ता. [सं.]

वंदारुता—स्त्री. वंदन करावें अशी इच्छा; आदर: भक्ति. ' वांछा सज्जनसंगमीं गुरुकुळीं वंदारुता नम्रता । ' -वामन स्फुट-श्लोक (नवनीत पृ. १३७). [सं.]

वद्य—पु. कृष्णपक्ष; महिन्याचा दुसरा पंधरवडा. -वि. या पक्षासंबंधी (तिथि). उदा० वद्य एकादशी. [सं.] **०पक्ष**-पु. कृष्णपक्ष. याच्या उलट शुद्धपक्ष.

वध—पु. १ मारणें; घात; नाश; संहार. -ज्ञा १.२२८. ' परनिंदेनें परवध, आत्मस्तवनेंहि आत्मवध होतो । ' -मोकर्ण ४२ ६१. (समासांत) पितृ-मातृ-भ्रातृ-मनुष्य-राज-ब्रह्म-गो-**वध**. २ (गणित) गुणाकार; घात. [सं.] **०घटी**-स्त्री. मरणकाल. **०स्तंभ**-पु. देहांतशिक्षा देण्यासाठीं पुरलेला खांब. **वधणें**-सक्रि. ठार मारणें; नाश करणें. -ज्ञा १.२०६. **वधिता**-वि. मारणारा. -ज्ञा २.१३८. **वध्य**-वि. मारण्यास योग्य; शक्य; वधार्ह. -ज्ञा २.१३८. [सं.]

वध(धा)णा—वाधणा पहा.

वधणें—सक्रि. (व.) तुटलेली दोरी वाख वगैरे लावून पुन्हां वळणें; वाढविणें. [सं. वृध्; सिं. वधणु; गु. वधवुं]

वधर—शअ. (व.) वर. ' घराच्या वधर फांदी आली. ' सं. उत्-धृ-धर]

वंधा—पु. (व.) पीळ; गुंफणी. [सं. बंध]

वधारा—स्त्री. (बडोदे) वाढ. ' केलेल्या प्रमाणांत परिस्थित्यनुरूप वधारा करण्याची आवश्यकता वाटल्यास...'-बडोदें, सत्कार नियम ८. [सं. वृध्-वर्धय; प्रा. वद्धार; गु. वधारो] **वधारणें**-क्रि. वाढणें; मोठा होणें.

वधू—स्त्री. १ नवरी; जिचें लग्न ठरलें आहे, चाललें आहे अशी स्त्री. -ज्ञा १४ ३. २ पत्नी. ३ उपवर कन्या; स्त्री; विवाहयोग्य वयापासून यौवनदशा येईपर्यंतची स्त्री. ' भुले सुकवि वाग्वधू तव गुणा अनर्घ्या नगा । ' -केका ९९. ४ (सामा.) स्त्री. ' राजीवाक्ष असा विलोकुनी वधू धांवे जशी बावरी । ' -आशवरी ९. [सं] **०पक्ष**-पु लग्नामध्यें नवरीकडील पक्ष. **०पक्षीय**-वि. वधूपक्षासंबंधी; नवरीमुलीकडील **०प्रवेश**-पु. १ विवाहानंतर नवरीनें नवऱ्याच्या घरीं समारंभानें येणें. २ या वेळचा विधि; घरभरणी. **०माय**-स्त्री. (काव्य.) नवरीची आई (लग्न समारंभांत या नांवानें तिला संबोधितात). [माय=माता] **०वरें**-न.अव. विवाहसमारंभांतील वधू आणि वर उभयतां मिळून; जोडपें; नवरानवरी. **०वस्त्र**-न. लग्नाच्या वेळचें वधूचें पातळ; अष्टपुत्री. **वधूटी**-स्त्री. आड बायको; अर्धवट प्रौढ स्त्री.

वंध्य—वि. १ फळें न धरणारा (वृक्ष); अनुत्पादक; वांझ. २ निष्फळ; व्यर्थ (प्रयत्न, इ०). ' पसरोनि शीघ्र कवळी नमुनि म्हणे न करि वंध्य आशातें । ' -मोकर्ण (नवनीत पृ.३३२). **वंध्या**-स्त्री. जीस मुलें होत नाहींत अशी स्त्री; वांझ. **वंध्यापुत्र-सुत**-पु. (वांझेचा मुलगा). (ल) अशक्य कोटींतील, असंभाव्य गोष्ट. खपुष्प पहा. **वंध्येची सुता**-स्त्री. वरील प्रमाणेंच अशक्य गोष्ट. ' वेगळेपणाची माता । ते लटिकें वंध्येची सुता । ' -दा ६ १०.३५. **वंध्यामैथुन**-न. (वांझेशीं रतिक्रिडा) अनुत्पादक, व्यर्थ, निष्फळ श्रम; निष्फळ व्यापार.

वन—न. पाणी. ' अति-सहवासि-वच मना कतक कलुषिता वना निवळवील । ' -मोविराट ३.१६. [सं.] **०द**-पु. मेघ.

वन—न. १ रान; अरण्य; जंगल. २ ओसाड, निर्जन प्रदेश. ३ (समासांत) पान या अर्थी उपयोग. ' तरी बद्धमूळें अज्ञानें । महदादिकीं शासनें । वेदांचीं थोरवनें घेऊनियां । ' -ज्ञा १५. १४७. ४ (समासांत) वन्य, रानांतला, जंगली या अर्थी. उदा० **वनपुष्प**-वृक्ष, **वनगाय**. -स्त्री. १ चराई. २ गुरचरण; गायरान. ३ (व.) कणसें खुडण्याबद्दलचा मोबदला. [सं.] **०कर**-पु. वनरक्षक; ' तंव ते वनकर समग्र । गाऱ्हाणें सांगों पातलें । ' -ह ३१.८९. **०क्रीडा**-स्त्री. जंगलांतील खेळ; रानांतून भटकणें इ०. **०गाय**-स्त्री. १ गायींची एक जंगली जात. हें जनावर भात खातें. २ कोचिनीलचा किडा. **०चर**-पु. १ पौराणिक नाटकांतील विदूषक. २ माकड. (ल.) इंग्रज; टोपीवाले. ' वनचर हातें पृथ्वी केली निक्षेत्री । ' -ऐपो ४०४. -वि. १ वनांत काळ कंठणारा; वनवासी (वाघ, सिंह इ० प्राणी). २ जंगली; रानवट. **०चराई**-स्त्री. गुरांना सरकारी माळरानावर चारण्याबद्दल द्यावयाची पट्टी; चारणावळ. **०देवता-देवी**-स्त्री. वनाची अधिष्ठात्री देवता. **०पशु**-पु. जंगलांतला, न माणसाळलेला प्राणी.

०प्रस्थ–न. वानप्रस्थाश्रमांतील माणसांना राहण्याचें जंगलांतील ठिकाण; एकांतवास. **०भोजन**–न. अरण्य, उद्यान अशा जागीं जाऊन केलेला जेवणाचा समारंभ. (इं.) पिकनिक्. 'शक्ति पूजोन वनभोजन। लहानथोरीं संपादिलें।' –ह ३२.२२२. **०मक्षिका**–स्त्री. जंगली माशी. **०माला-ळा**–स्त्री. १ वनपुष्पांची माळ. २ देवाच्या गळ्यांतील फुलें, तुळसी इ०ची गुडघ्यापर्यंत लोंबणारी माळ; विष्णूचें कंठभूषण. –एभा ३.५५१. ३ वनांची ओळ, रांग, पंगत. **०माली-ळी**–पु. विष्णु; कृष्ण. 'धरिं ध्यानीं हरि वनमाळी। –देप ७१. **०माशी**–स्त्री. वनमक्षिका पहा. हिमालयांत अशा माशा अमून त्या चावल्या कीं गळवें येतात. –तीप्र ६५. **०राज**–पु. सिंह. 'तुज वनराजा काय ग्रहदशा आली।' –विक ९०. **०वाशा-शी**–वि. १ हालअपेष्टा काढणारा; नेहमीं अभागी. २ (व.) वाईट पायगुणाचा; सत्यानास घडवून आणणारा. ३ (व.) नासाडया; नाश करणारा. **०वास**–न. १ अरण्यांत राहणें; जंगलांतील वस्ती. २ आयुष्याला स्थिरता नसणें; भटकत राहणें. ३ प्रवासांतील हाल, दुःख. ४ वाईट दिवस; संकटकाल. 'आला कसा कपाळा वनवास।' –विक ३६. **०वास आणणें**–१ छळून, त्रास देऊन घराबाहेर काढणें. २ फार सतावणें; गांजणें. 'त्या पोरांनीं मला वनवास आणिला आहे.' **०वासवन-वासवाडी**–स्त्री. (काव्य) सोयीचें आश्रयस्थान म्हणून पत्करलेला अरण्यवास. **०वासी**–वि. १ अरण्यांत राहणारा. –ज्ञा ३.२३५. २ वनवाशा पहा. **०विहार**–पु. वनक्रीडा पहा. 'राव चालिला वनविहारार्थ। विलोकीत वनश्रीतें।' **०विहारी**–वि. वनांत आनंदानें राहणारा, विहार, क्रीडा करणारा. **०शाई-ही**–स्त्री. वनवास. 'कैकयीच्या कलहानें तदुपरी वनशाई।' –राला ९. **०श्री-लक्ष्मी**–स्त्री. फल-पुष्पसंभारानें वनाला आलेली शोभा; अरण्यशोभा. –ज्ञा ३.१००. **०सरणी**–स्त्री. रानांतील मार्ग. 'चित्राश्व म्हणे दयिते गमली वन-सरणि काय कोमळ ती।'–मोवन १३.४१. **०हरिद्रा**–स्त्री. रानहळद. **वनाई**–स्त्री. वनचराई. –केसरी २६.७.३०. **वनानी**–क्रिवि. वनोवनीं; प्रत्येक वनांत. 'अतीरती कुलखप्पी झाले हिंडुं लागले वनानी।' –अफला ७६. [वन द्वि.] **वनाळी**–स्त्री. झाडांची रांग; राई; झाडी. 'छाया तियेस दुसरी तिसरी वनाळी। जे सांवळी युवतितुल्य दिसे निराळी।' –र २३. [वन+आली] **वनेचर, वनौक-स**–वि. वनचर पहा. 'अटविये माजी जैसा। वन्हि रिघतां सहसा। लंघिती कां दिशा। वनौकें तिये।' –ज्ञा १८.१५३१. **वन्य**–वि. १ वनांतील; वनांत राहणारें, वाढणारें. –ज्ञा १८.१०६५. २ जंगली; रानवट. ३ वनवासी. 'सरलें माझें सर्वहि पुण्य। होऊनि वन्य काय फिरूं।' –मराठी ६ वें पु. (१८७५) पृ. १७४. ४ रानटी मनुष्य; असंस्कृत मनुष्य; वृक्ष, प्राणी वगैरेची पूजा करणारा. (इं.) ॲनिमिस्टला प्रतिशब्द. –ज्ञाको. **वन्यता**–स्त्री. रानटी अवस्था. 'वन्यता आणि सुधारणा यांची अजून व्हावी तशी फारकत झालेली नाहीं.' –आगर ३. २०. [सं.]

वन—पु. गोसाव्यांचा एक पंथ व त्यांतील व्यक्ति. [सं.]

वन—पुन. चिन्ह; खूण; वण पहा.

वनई—स्त्री. निरगुडी. –बदलापूर ६९.

वनवंदी—स्त्री. एक वाद्य. 'घडघाळ वनवंदी झडूं लागली।' –पाळणेसंग्रह (शाहूमहाराजांचा पाळणा) ६.

वनवर्णे—अक्रि. करपणें; जळणें. 'तापानळें कवळलें। भूतजात वनवलें।' –ऋ ३३.

वनवन, वनवनवाणा-णी—क्रिवि. वणवण पहा. (क्रि० फिरणें; हिंडणें; बहकणें; भटकणें)

वनवलिया—वि. वणव्यांत सापडलेला. 'कीं मळयागिरीचां माथां। वनवलिया चंदनलता।' –शिशु ७५१.

वनवा—पु. १ दावानल; वणवा पहा. 'रयतेला लागला वनवा जळती अंत्रीं।' –ऐपो ४०४. २ (खा.) त्रास; जिवाची आटापीट.

वनसें, वन्सें—न स्त्री.अव. नवऱ्याची बहीण (नेहमीं अनेकवचनी प्रयोग. (वनसें हें रूप स्त्रीलिंगांत सुद्धां येतें). [सं. भगिनी+सा; पतिस्वसा–वइससा–वइंसा–वयन्स–वन्सं. –भाअ १८३३; वहिनी+असा]

वनस्पति—स्त्री. १ लता, वृक्ष, झुडप इ० २ औषधी झाड. 'हो कांहीं तरी वनस्पतिच असली पाहिजे.' –स्वप १५५. **०शास्त्र**–न. वनस्पतीविषयीं संपूर्ण ज्ञान करून देणारें शास्त्र. (इं.) बॉटनी.

वनस्फुरा—वि. (महानु.) विस्ताररूप. 'समीप वनस्फुरा। ते म्हणों भक्ति क्षेत्रिचा धुरा।' –ऋ ८७.

वनाळ—वि. अंगावर वण असलेला.? 'काळे माणूस गोरे होयेना। वनाळास येतन चालेना।' –दा १४.६०.२. [वण+सं. आलय=आळें]

वनिता—स्त्री. स्त्री; वधू; नारी. –ज्ञा १.१८७. 'जोंवरि तोंवरि वैराग्याच्या गोष्टी। जंव सुंदर वनिता दृष्टी पडली नाहीं।' –तुगा ३२३८. [सं.]

वनेर—पु. मुंगसाच्या जातीचा एक प्राणी. कांडेचोर पहा.

वन्निक—पु. (मुद्रण) प्रेटपायमर पेक्षां थोडा मोठा टाईप. [इं.]

वन्समोर—क्रिवि. (नाट्य) पुन्हां एकदां; आणखी. नाटकांतील एखादें पद चांगलें आवडल्यास तें पुन्हां म्हणण्यास सांगण्यासाठीं हा इंग्रजी शब्दप्रयोग योजतात. 'हर्षे टाळ्या पिटुनि अवघे गर्जती 'वन्समोर।' –अर्वाचीन ३८८. [इं. वन्स मोअर]

वन्हि—पु. अग्नि. –ज्ञा १.२५८. [सं.] **०त्व**–न. आग; तप्तता. –ज्ञा १८.२२०. **०यंत्र**–न. तोफ. 'त्याभोंवतीं केवळ वन्हियंत्रें।' –सारुह ८.५३. –वामन विराट २.११. **वन्हिधूम-न्याय**–पु. (जेथें धूर तेथें अग्नि) सतत साहचर्य दाखविण्यासाठीं योजतात.

वन्हार—पु. (व.) एक नीच जात; महार.

वपणी—स्त्री. ओप देण्याचें हत्यार. ओपणी पहा.

वपणी-णें—ओपणी, ओपणें पहा.

वपन—न. १ बीं पेरणें; पेरणी. २ (सामा.) हजामत; श्मश्रु, डोकें इ०चे केंस काढणें. 'मस्तकवपन आणा पाणी। नाहीं आड ना विहीर वर्गी।' –एरुस्व १२.१४८. ३ (विशेषतः) विधवा स्त्रीचें क्षौर करणें. [सं.]

वपविणें—(प्र.) ओपविणें पहा. **वपींव**–ओपींव पहा

वपा—स्त्री. १ हाडामांसाचा चिकचिकीत रस. २ हाडांतील मज्जा. ३ काळजावरील केळीच्या कोंवळ्या पानासारखा असणारा पापुद्रा. 'दर्भमुष्टिच्या गर्भि धरुनिया निर्भर पशुच्या वपा।' –राला ८७. ४ चरबी. [सं.] **वपिन**–न. (शाप.) चरबीचा मुख्य घटक; (इं.) स्टिअरिन. याच्या मेणबत्त्या करतात.

वपारी—स्त्री. (व.) पाळी; आवृत्ति.

वपु—पुन. देह; शरीर. –ज्ञा १.३. 'जिकडे वपु तिकडे मन युक्त न शोभेल अन्यथा नातें।' –मोभीष्म ४.५. २ त्वचा. 'मृदु आणि कठिण। हे स्पर्शाचे दोन्ही गुण। जे वपूचेनि संगें कारण। संतोषखेदां।' –ज्ञा २.११५. [सं.]

वप्ता—वि. पेरणारा. [सं.]

वफा—स्त्री. नेकी. इमानीपणा; निष्ठा. [अर.] **०कीश-दार**–वि. इमानी; निष्ठावंत. [अर.] **०दारी**–स्त्री. इमानीपणा. 'तुम्ही इमानें इतबारें वफादारीनें चालोन चाकरीची सरबरा ठेवाल तों पावेंतों जहागीर-बे-खल चालेल' –ममंब १६.

वफात—स्त्री. मृत्यु. 'वाटेंत लसलीन वफात पावले.' –ख ७.३५७३. [अर. वफात्]

वंब—स्त्री. (तंजा.) वाचाळता; बडबड. [ता.?]

वंबण, वंबणें, वंबळणें, वंबी—ओंबण, ओंवणें इ० पहा.

वमक—न. वांति; वमन पहा. 'दिवसंदिवस वमक वाढे।' –दावि ३०. [सं.] **वमणें**–अक्रि. ओकणें. –ज्ञा ६.२४१. 'तंव बळिभद्रें दिधली लाथ। येरू अशुद्धातें वमित।' –एरुस्व १०.५१. **वमन**–न. वांती; ओकारी. 'कोण माहों दक्ष करितां संसार। आम्हीं हा विचार वमन केला।' –तुगा १९६७. [सं.]

वय—न. १ उमर; आयुर्मान; आयुष्य; जन्मापासूनचा काल. २ तरुणपणा; ज्वानी. ३ उतार वय; वृद्धावस्था. 'आमचें वय झालें.' [सं. वयस्] **वयांत येणें**–१ तारुण्याच्या भरांत येणें; तरुणपणा प्राप्त होणें. २ विवाहयोग्य होणें; समजूं लागणें. 'ती वयांत आल्यावर तिच्या बापानें तिचें लग्न करून दिलें.' –मराठी ३ रें पु (१८७३) पृ. २०. ३ (कायदा) सज्ञान होणें; व्यवहाराला लायक होणें. **वयसा**–स्त्री. १ वय; आयुष्य. 'सार्थकेविण वेची वयसा। तो येक मूर्ख।' –दा २.१.५४. २ तारुण्य. 'एकीं वयसेचें जाड बांधलें। मग मन्मथाचिये कासे लागले।' –ज्ञा ७.८५. **वयस्क, वयस्कर, वयस्थ**–वि. १ प्रौढ; बरेंच वय उलटलेला; पोक्त. २ तरुणदशा प्राप्त झालेला; वयांत आलेला. 'माझा मुलगा वयस्क होऊन अविवाहित आहे.' ३ वयानें मोठा; वडील (सापेक्षतेनें). ४ (वयस्क) –वयाचा; वय असलेला समासांत उपयोग. उदा० समवयस्क. **वयस्य**–पु. (सारख्या वयाचा) मित्र; सखा. (स्त्रीलिंगी रूप वयस्या). 'चतुर तिजसमाना सर्व तीच्या वयस्या।' –सारुह २.७५ **वयातीत**–वि. वृद्ध; म्हातारा. **वयी**–वि. वय असलेला; वयाचा. समासांत उपयोग. उदा० अल्पवयी. **वयेसा**–वयसा पहा. **वयोगत-वृद्ध**–वि. फार वृद्ध; जखडड. **वयोधर्मानें**–क्रिवि. वयमानानें; वय झाल्यानें; वयाप्रमाणें. **वयोवस्था**–स्त्री. आयुष्यांतील अवस्था. या तीन आहेत: बालत्व; तरुणत्व, वृद्धत्व.

वय—स्त्री. (व.) आजी (बापाची आई).

वय—स्त्री. वई; कुंपण. –लोक २.२४. वै. पहा. **०वाडा**–पु. (कों.) घर, शेत इ०च्या भोंवतीं असणारें कुंपण.

वयफळ—वि. वायफळ पहा.

वयचणें, वयरण-णें, वयरा, वयला, वयलाठी—वैचणें, वैरण इ० पहा.

वयला—वि. वेगळा; वायला पहा.

वया—स्त्री. अव. ओंव्या; गाणीं; 'हडळी वया गाती।' –मसाप १.२. [ओवी]

वयाळा-ळें—पुन. पाण्यांतला एक बिनविषारी साप. [वाळा]

वर—स्त्री. प्रसूतीवेळची वार. वार पहा.

वर—पु. आशीर्वाद; शुभदायक वचन; ऋषि, देव, ब्राह्मण इ० नीं दिलेला प्रसाद, देणगी. 'वर दमनऋषीनें दीधला कीं तयाला।' –र १४. [सं.] **०दान**–१ वर, आशीर्वाद देणें; देणगी; कृपेनें केलेलें दान. २ एखाद्याच्या हातून हटकून घडणारी गोष्ट; नेहेमीची, रूढ गोष्ट. 'चोरीचें त्याला वरदानच आहे.' **०दानी**–वि. वर लाभलेला; भाग्यवान (वंश, कुल, व्यक्ति). **०दी**–वि. वर प्राप्त झालेला (पुरुष, कुल, वंश इ०). **०प्रद**–वि. अभीष्ट देणारा; वरद. **वरद**–पु. गणपति देवता. –वि. १ वरदाता; प्रार्थिलेलें देणारा. 'मग सहजें सत्कारवादु। तो पद्माकर वरदु।' –ज्ञा १.१३. २ प्रासादिक; कल्याणकारक. 'हा हरिविजय वरदग्रंथ।' –ह २२.२६९. ३ कृपाळु; दयाळु. **०चतुर्थी-चौथ**–स्त्री.

भाद्रपद शुद्ध चतुर्थी; गणेशचतुर्थी. 'आम्हीं वरदचतुर्थीचा चंद्र अवचिता। देखिला गोकुळीं।' -ह २५.१३७. **०वाणी**-स्त्री. आशीर्वाद; शुभचिंतन. 'कीर्तनी रंग येतसे चौगुणी। वरदवाणी म्हणोनिया।' **०हस्त**-पु. १ वर देण्यासाठीं (देवता इ० नें) उचललेला हात; दानशील, औदार्यदर्शक हाताची ठेवण. २ शिष्याना विद्या देणारा गुरु, सर्व आश्रित किंवा संबंधी यांना उन्नतीला पोंचविणारा, किंवा ज्याचा आशीर्वाद खरा ठरतो अशाला लाविताति. **०हस्त ठेवणें**-१ पूर्ण कृपा करणें. २ स्वतःसारखें करून सोडणें (निंदार्थी प्रायः उपयोग).

वर—पु १ नवरा मुलगा (लग्नांतील). -ज्ञा ११.३.२ पति; नवरा. 'इंदिरावर'=विष्णु 'पर पुरुषाचे पायीं स्त्रियांनीं सोडून आपला वर।' -होला ६५. [सं.] **०घोडा**-पु. १ वरात; लग्नानंतर समारंभानें वधूवरांची मिरवणूक. २ लग्नाला जातांना नवरा मुलगा पालखी, घोडा, गाडी इ० तून वाजतगाजत जातो ती मिरवणूक. ३ मुंजा मुलाची मिरवणूक. **०दक्षिणा**-स्त्री वधूचा पिता कन्यादानाची सांगता करण्यासाठीं वरास देतो ती दक्षिणा; हुंडा; शुल्क. **०धवा**-पु. नवरदेव; वरधावा पहा. 'वटेश्वर चांगा वरधवा। तुम्ही नेऊनि मध्यें बैसवा।' -चांगदेवगाथा. **०धावा**-पु. १ नवऱ्यामुलास लग्नासाठीं घेऊन येण्यावरितां वाजत गाजत निघालेला मुलीचा भाऊ किंवा त्याचा बदला. २ नवऱ्याला मूळ. ३ (बडोदें) वरपक्षाकडून वराची स्वारी वधूगृहीं येण्यास निघाली अशी खबर देण्याकरितां समारंभानें जाणारा वराचा धाकटा भाऊ किंवा बदला. -ऐरापुविवि ८३. वऱ्हाड-नागपुराकडेहि हा 'वर्धाव' पाठविण्याची चाल आहे. **०निश्चय**-पु. वर निश्चित करणें, ठरविणें. **०पक्ष**-पु. लग्नांत नवऱ्यामुलाकडची बाजू; या बाजूची मंडळी. याच्या उलट वधूपक्ष. **०पक्षीय**-वि. वरपक्षाकडील-कडचे (लोक, वऱ्हाडी, इ०). **०प्रस्थान**-न. आपल्या जानवसेघरांतून लग्नमंडपाकडे जाण्यासाठीं वराचें निघणें; वरघोडा निघणें. **०बाप**-पु. (लग्नांत) नवऱ्यामुलाचा बाप. **०माई-य-यी**-स्त्री. (लग्नांत) नवऱ्यामुलाची आई. 'जात्या वरमाय आळशीण। मग काय पहावी वऱ्हाडीण।' -नव २१.२९. **०मायपण**-न. नवऱ्यामुलाची आई असण्याचा मान. -एभा ? **०मूठ**-स्त्री. १ लग्नांत वधूवरांच्या वस्त्रांना एकत्र मारलेली गांठ सोडवणाऱ्या मेहुणी वगैरे वधूपक्षीय स्त्रीला दिलली देणगी. २ वधूच्या पित्यानें मुलगी वराला देतांना दिलेली देणगी; हुंडा; शुल्क. **०मूळ**-न. वराला बोलावणें. 'वरमूळा चालिल्या अहिवा नारी।' -वसा ४८. **०योजना**-स्त्री. कन्येसाठीं वराची केलेली योजना. **वरावर**-पु. श्रेष्ठवर. 'भीमकें अर्पुनियां अपार। कृष्ण वरावर पूजियेला. -एरुस्व १४.८७. [वर+वर] **वरावर, वरेकज**-स्त्री. लग्न जमविणें, जुळविणें. [वर+आवर, वर+काज] **वरेकऱ्या**-पु. लग्न जुळविणारा, मध्यस्थ इसम. **वरोपचार**-पु. लग्नांत (कांहीं ठिकाणीं नंतरहि) वराचे संस्कार व सोहळे. [वर+उपचार]

वर—वि. १ श्रेष्ठ 'मी वर म्हणे सुधन्वा कीं साक्षात् तात अंगिरा ज्याचा।' -मोसभा ५.९६. २ अत्युत्कृष्ट; अति सुंदर. 'वरतनु दमयंती नंदिनी हे त्रितीय।' -नल ६५. ३ पहिला; अग्र. 'वरसुत दम नामा दांत नामा द्वितीय।' -नल ६५. (समासांत) **देव-द्विज-मनुष्य-तरु-पशु-पक्षी-वर.** [सं.] **०कस**-पु. वर्चस्व; अधिकार; सत्ता; अंमल (क्रि० बसवणें; चालवणें; चढवणें; मिळवणें). -वि. १ श्रेष्ठ प्रतीचें, कसाचें (सोनें). २ (सामा.) सर्वश्रेष्ठ; सर्वोत्कृष्ट. 'वरकसा जिणता जिणवेना।' -दावि ३७९. ३ सर्वोवर सत्ता गाजविणारा; ताब्यांत ठेवणारा; देखरेख करणारा. 'सर्व पशूंचा वरकस वाघ, पक्ष्यांचा वरकस बैरीससाणा, मुलांचा वरकस पंतोजी, उंदरांचा वरकस मांजर. **०कसदार**-वि. अंमल चालविणारा; अमलदार; तपासनीस. वरकस अर्थ ३ पहा. **वरती**-वि. श्रेष्ठ. 'जे गतीहून वरती चढेना अधिक गती।' -एभा ३१.१५६. **वरांगना**-स्त्री श्रेष्ठ स्त्री. [वर+अंगना] **वराचे**-वि. श्रेष्ठ. बहुतांती वराचे यादव।' -उषा ७३.२७. **वरान्न**-न. १ पक्वान्न. 'अन्न वरिष्ठ वरान्न।' -एरुस्व १४.१२५. २ वरण. 'भवब्यावरी वाढिलें जाण। वरी वरान्न स्वादिष्ट।' -एरुस्व १४.१२५. 'सोलीव डाळींचें वरान्न।' -मुवन ११.१२४. [वर+अन्न] **वराप्सरा**-स्त्री. प्रमुख अप्सरा (रंभा, मेनका इ०). 'शक्रप्रेषित वराप्सरा नटल्या।' -मोमंत्र २.४६. [वर+अप्सरा] **वरांवर**-वि. श्रेष्ठांत श्रेष्ठ. 'हेंचि निज ज्ञान साचार। वरांवर वरिष्ठ।' -एभा १०.७०६. [वरात् वर] **वरासन**-न. श्रेष्ठ आसन, स्थान. 'वरासनीं पाषाण। तो न मानावा सामान्य।' -तुगा २२६८. [वर+आसन] **वरिय**-वि. श्रेष्ठ. 'आग्रहाच्या उजरिया। श्रेष्ठ देवता वरिया।' -ज्ञा १७.९८. [सं. वरियस्]

वर—क्रिवि. १ पर्यंत; काल, मर्यादा किंवा प्रमाण यापावेतों. उदा० आजवर; वर्षावर; पायलीवर; खंडीवर. २ उंच; उच्च प्रदेशीं; उपरि. याच्या उलट खालीं. ३ नंतर; मागून. 'औरंगजेब मेल्यावर कोण गादीवर आला?' ४ अधिक; जास्त. 'त्या सभेंत शंभरावर लोक नव्हते.' ५ शिवाय; आणखी. 'आम्हाकडून काम करून घेतलेंच, वर आम्हाला शिव्या पण दिल्या.' ६ मुळें; कारणानें. 'पुरुषोत्तमरावांचें घर आपणांवरच चाललें आहे.' -इप ३२. ७ अनुरोधानें; लक्ष्यविषय करून. 'वाघावर एकटा कसा चालला आहे तो पहा.' 'या विषयावर चार घटका बोलत होता.' ८ परंतु. 'हे सारि ते वर थोडे। आणीकही साधील गाढे।' -ज्ञा १६.३५२. वरता, वरी पहा. [फा. वर; सं. उपरि; प्रा. उवरि तुल०] **०डोकें काढणें**-ऊर्जितावस्थेस येणें. 'ताराबाईनें नातवाला सातारची गादी साधून देऊन वर डोकें काढलेलें

जिजाबाईला मानवलें नाहीं.' –भक्तमयूर केका५. ०तोंड करणें–निर्लज्ज बनणें; लाज न वाटणें. ०पडणें–(–वस्तु, गोष्टी) तत्परतेनें करूं लागणें. 'अलीकडे तो कादंबऱ्यांवर पडला आहे.' ०पाहणें–लज्जा, शंका, भीति न वाटणें; धीटपणा असणें; उजागरीनें वघणें. 'पापाला वर पाहण्याचा धीर होत नाहीं.' –पुण्यप्रभाव १३७. सामाशब्द– ०उपचार–पु अव. १ वरवर सभ्यपणा; शिष्टपणा दाखविणें; खोटी नम्रता; शिष्टाचार. २ रोगनिवारणासाठीं बाहेरून शरिराला केलेले उपचार. ०कडो–वर्चस्व; वरचढपणा. 'राज्यांत मुधोजीची वरकडी झाली कीं आपला तो सुद उगवील अशी कारभाऱ्यांस भीति पडली.' –विवि ८.६.११०. ०करणी–वि. बाह्य; औपचारिक; कृत्रिम; दिखाऊ; वरकांती; पोकळ (भाषण, कृत्य, इ०). ०कर्मी–वि. १ वरकरणी पहा. 'याचें असलें वरकर्मी बोलणें तुम्ही जमेस धरूं नका हो!' २ बाहेरचा; आंत ज्याचा प्रवेश नाहीं असा (रोग, औषध). ३ मूळचा झरा नसलेलें (जल इ०). ४ मूळ नसलेला; उपरी; स्थिरपणा, कायमपणा नसलेला. ५ पोकळ; दिखाऊ; खोटें. ०कर्मी आदर–पु. पोकळ, कृत्रिम आदर, भाव; आदरसत्काराचा खोटा देखावा. ०कांती–कांतीचा–वि. १ दिखाऊ; सुंदर; सुरेख दिसणारा. २ वरकरणी पहा. 'नाहीं शब्द रे बोललास वरकांतिचा।' –प्रला १५६. ०काम–न. प्रत्यक्ष बनावाचें काम न करतां त्याला साधनीभूत असणाऱ्या गोष्टी करणें. उदा० स्वयंपाकाला लागणारें साहित्य पुरविणें, धुणेंपाणी इ०. ०कोट–पु. थंडी, पाऊस इ०साठीं कोटावर घालावयाचा लांब कोट. (इं.) ओव्हरकोट. 'उलट वरकोट आणि हातमोजे हा नेहमींचाच पोषाक होऊन बसला आहे.' –सासं २.२३४. ०खर्च–पु. १ अधिक, योजलेल्यापेक्षां जास्त खर्च. २ इतर किरकोळ खर्च. ०खाल–क्रिवि. खालवर; उंचसखल; विषमरीतीनें. ०घडी–स्त्री. १ वस्त्राची घडी करतांना दर्शनी चांगला भाग यावा म्हणून अमळ बारीक विणून काढलेला पट्टा; वरची चांगली बाजू. २ (शिंपीकाम) बाहेरच्या बाजूला असलेली दुमड. 'वरघडीच्या तळाची द्रावझर करावयाची असल्यास पांच इंच कापड अधिक घ्यावें.' –काटकर्तन ८. ०घडीचा–वि. १ बाह्य; वरचा. २ वरघडी असलेलें (वस्त्र). ३ (ल.) दिखाऊ; भपकेदार. ४ कृत्रिम; खोटें. ०घाट–पु. १ बाहेरचा आकार, घडण; बाह्य स्वरूप. २ घाटावरचा प्रदेश; सह्याद्रीच्या पूर्वेकडील मुलूख. ०घाटी–वि. वरघाटासंबंधी (माणूस, पदार्थ इ०). ०घाटीण–स्त्री. घाटावरची स्त्री. ०घाला–पु. जोराचा हल्ला, घाला. 'पडूरिपूवरता वरघाला।' –दावि ३७९. ०चढ–वि. सरस; श्रेष्ठ; जास्त; वरच्या दर्जाचा. ०चढपणा–पु. सरसपणा; श्रेष्ठपणा. ०चष्मा–इमा–पु. १ वरचढपणा; वर्चस्व. (क्रि० करणें; होणें). 'काकेशियन वर्गाचा दुसऱ्या वर्गावर नेहमीं वरचष्मा असे' –मराठी ६.३०६. २ देखरेख करणारा; तपासनीस; वरचा अधिकारी. ३ वर्चस्व गाजविणारा; अधिकार चालविणारा. ०जोर–वि. श्रेष्ठ. 'सीरजोर वरजोर जोर हा।' –दावि ३१०. ०डगला–पु. (वडोदें) वरकोट पहा. –खानो ३. ०डोळ्या–ळा–वि. १ उलट्या-बाहुल्या असणारा; अदूरदृष्टि; नेत्ररोगी. 'परपुरुषातें नयनीं पाहे। उपजतां वरडोळी होये।' –गुच ३१.८५. २ आढ्यताखोर; रागीट. ३ टक लावून वर पाहणारा; वर दृष्टि असणारा (निंदार्थी उपयोग). ०तगड–न. दागिन्यावरचा तगडाचा अंश. ०दळ–न. भाजीबरोबर चव येण्यासाठीं शिजविलेली डाळ. [वर+दाळ] ०दळ–न. १ घरावर कौलें, गवत इ० घालण्यापूर्वी वांस, पांजरण इ० पसरतात तें. २ वरचें कवच, साल. 'येक वरदळ बरें असतें। कठिण अंतर्त्यागि दिसतें।' –ज्ञानप्रदीप ८३४. ३ वरचा भाग. 'अंग साजिरें नाकहीन। वरदळ चांग चरण क्षीण. –एभा ११.१२८५. ४ मुलामा. 'हावभावाचेनि वरदळें।' –भाए ३४५. –वि. १ वरवरचा; बाहेरचा. 'दाऊनियां वरदळ वेष। मना अंगीं आशापाश।' –निगा २८०. 'वरदळभक्तीं करोनिया नमन।' –नव १८.१६३. २ दांभिक. 'तुका म्हणे आम्हां तुमचेचि फंद। वरदळ छंद कळों येती।' –तुगा ५०७. ३ हलकें; नीरस; किरकोळ. [वर+दल] ०दळ–स्त्रीन. १ उपयोगांत, वहिवाटींत असलेले जिन्नस. 'चोर आले आणि वरदळ नेली.' २ नफा; वर मिळणारा फायदा. 'लाख रुपये मूळ पुंजी. जें वरदळ मिळेल तें खातों.' ०दळखर्च–पु. जास्त खर्च. ०दळ जिंदगी–दौलत–स्त्री. सामान; जंगम माल. वरदळा–ळें–क्रिवि. वरून; बाहेरून. 'सेवन हें शिरसा धरीं। अंतरीं ही वरदळा।' –तुगा ३२२३. 'तेविं मनुष्य वेशाचें रूपडें। वरदळें दिसे चोखडें।' –ज्ञाप्र ७५०. वरदळ सामान–१ जंगम माल. २ किरकोळ माल, सामान. ०दक्षिणा–स्त्री. चोरी इ०कानें गेलेला पैसा, पदार्थ परत मिळविण्यासाठीं व्यर्थ खर्चलेला पैसा. ०दूध–न. अंगावरील दुधाखेरीज इतर दूध (लहान मुलास दिलेलें). वरचें दूध पहा. ०नट–क्रिवि. वरून; वरकांती. 'लई अंतरची खोल मोठी वरनट केवळ सात्विक दिससी।' –होला ८९. ०पंग–क–वि. वरवरचा; बाह्यात्कारी (देखावा). 'अवघा वरपंग सारा। पोटीं विषयाचा थारा।' –तुगा २८३२. ०पंकाचा–पंगीचा–वि.क्रिवि. वरकरणी; वरकांती पहा. 'कीं वरपंगी जेवि जारीण। दावी भ्रतारसेवा करून।' ०पंकी–पंगी–पांगी–क्रिवि. वरवर; बाह्यात्कारी; बाह्यतः 'सामाजिक व धार्मिक रीति इंग्रजी शाळेंतला मनुष्य वरपांगी पाळीत असतो.' –टि ४.३७८. [वर+पंख] ०पंगतीचा–वरपंकी पहा. वरकांती. 'हा स्नेह नाहीं वरपंगतीचा।' –सारुह १.३६. ०पिकापीक–वि. झाडावर पिकलेला (फलादि पदार्थ). याच्या उलट

कोनपिका. 'वरपिका फणस असला तर मला दे. कोनपिका नको.' [वर + पिकणें] ०बुजारत–क्रिवि. वरवर; बाह्यतः [वर + हिं. बुझारत] ०बट्टा–पु. नाणें मोडतांना पडणारा बट्टा. बाहेरबट्टा पहा. ०वंचाई–स्त्री. बाह्य भपक्यावरून झालेली फसवणूक. [वर+वंचणें] ०वंचाईचा–वि. वरकमी पहा. ०वर–वरता–वरतीं–क्रिवि.वि. १ आंत प्रवेश न होतां–करतां; बाहेरूनच (खोदणें, चोळणें इ०). २ थोडें फार, खोल नव्हे, अंतर्यामी नव्हे अशा रीतीनें. ३ वरकांती–वरपांगी; कृत्रिम; खोटें. 'तो मला वरवर प्रेम दाखवितो.' ०ह० वरवर माया करती आणि तोंड झांकून खाती. ०वर करणें–केल्यासारखें दाखविणें; करण्याचें ढोंग करणें. वरवर बोलणें–रडणें–हांसणें–रागें भरणें–कृपा करणें इ० प्रयोग होतात. ०वर उपचार–पुअव. बाह्य, दिखाऊ आदरसत्कार; नुसता, पोकळ शिष्टाचार. ०वळा–पु. वर्चस्व; बलाधिक्य. 'देखोनि वैरियांचा वरवळा। कांपिन्नली भीमकबाळा।'–एरुस्व ८.५१. ०वेष–पु. बाह्य वेष; बुरखा; ढोंग. ०शेर–सर–सांड–स्त्री. भरपूरपणा; महामुरी; तुडुंब होऊन सांडणें.–वि. भरपूर; तुडुंब. ०सार, ०सारपारसार–स्त्री. (व.) संसारोपयोगी सामानसुमान, चीजवस्त. ०सांस–पु. श्वास; ऊर्ध्व. (क्रि०लागणें). [वर+श्वास] वरचा–वि. बाह्य; वरच्या भागाचा. ०चें दूध–न. लहान मुलाला आईच्या दुधाऐवजीं–शिवाय गाईम्हशीचें जें दूध घालतात तें.–टि १.२९७. वरता–तों–तें–शअ.क्रिवि. सर्व अर्थी वर पहा. १ वर. 'त्याने जे समयीं वरतें बसावें ते समयीं त्याची बुद्धि मोटी उदार व्हावी.'–सिंहासनबत्तीशी १. २ आणखी. ३ अधिक. 'त्याहूनि कोटियोजना वरता।'–भारा किष्किंधा ११.७९.४ हून; पेक्षां. 'तरी स्त्री आणि स्त्रैणावरता। दुःसंग सर्वथा असेना।'–एभा २६.३०२. ५ श्रेष्ठ; उच्चतर. ६ (किनाऱ्याच्या बाजूनें) उत्तरेकडचा. ७ किनाऱ्यापासून आंत. वरला–वरचा पहा. वरावरी–क्रिवि. १ वरचेवर; वारंवार.–तुगा.–शर. २ झपाटयानें; निमिषांत. वरिवरी–शअ.क्रिवि. वर पहा. १ वर; उंच. 'तूं काइसयावरी आहासि ऐसें। पाहिलें मियां।'–ज्ञा ११.२७५. २ आणखी. 'ऐसा जात्यंधु अधस्तु। वरि भवरोगी ग्रस्तु।'–ऋ २. ३ वरवर; बाह्यतः 'सत्य धनंजय कर्मे रूपें दिसतो उगाचि वरि नरसा।'–मोभीष्म ११.७२. ४ पर्यंत. 'तैसें आस्थेच्या महापुरीं। रिघतांति कोटिवरि।'–ज्ञा ७.१३. 'देव जवळ अंतरीं। भेटी नाहीं जन्मवरी।'–तुगा. ५ (तृतियेचा प्रत्यय)नें; मुळें. 'तो निर्मत्सरू का म्हणिजे। बोलवरी।'–ज्ञा ४.११३. वरिवरी–क्रिवि. वरवर पहा. 'अवघे देखिले अधमैरत। वरीवरी आचार दावित। जैसी शांति मैंदाची।'–वरीव–वि. श्रेष्ठ; उत्कृष्ट. 'प्रेमळ देखतांचि दिठीं। मीं घें आपुलिये संवसाठीं। नव्हतां वरीव दे सुखकोटी। नये तरी उठाउठी सेवक होय।'–एभा १४.१५८. वरिवा–पु. १ वरचढपणा; श्रेष्ठपणा. 'जियें आपुलियां बरवां। नंदनवनातें मागती वरिवां।'–शिशु २४९. २ शोभा; उत्कृष्टपणा. वरिष्ठ–ष्ठ–वि. विद्या, वय इ०कानीं श्रेष्ठ; सर्वांत मोठा; श्रेष्ठ.–ज्ञा १.३०. 'ईश्वर तो अति वरिष्ठ। येरू भूतभौतिक अति कनिष्ठ।'–भारावाल ११.१६५. ३ अत्यंत मोठें, जड. [सं. वरिष्ठ] वरीयान्–वि. श्रेष्ठ (मनुष्य, प्रश्न इ०;) अत्युत्तम; अत्युत्कृष्ट.–पु. (ज्यो.) १८ वा योग. वरील–वि. वरच्या भागासंबंधी; वरचा. वरुता–तें–शअ. क्रिवि. वर, वरता–तें पहा. 'पाळा मांडिला शरीरावरुता।'–नव ११.१२०. वरून–शअ. १ वरच्या भागापासून. २ साहाय्यानें; साधनानें; कारणानें. 'तुला म्यां शब्दांवरून ओळखलें.' ३ परिणामतः; प्रसंगानें; मुळें. 'तूं सांगितल्यावरून मी गेलों.' ४ पुढून; समोरून; जवळून. 'तो माझे गांवावरून गेला.' ५ पृष्ठभागास धरून. ६ नंतर; मागाहून. (कालसापेक्ष प्रयोग). 'स्नान केल्यावरून भोजनास बसलों.' ७ वर; उपरि. 'झाडांवरून पांखरें बसलीं.' 'घोड्यांवरून सगळीं माणसें बसलीं.' (फक्त अनेकवचनांत प्रयोग). ८ प्रमाणें. 'आपणांवरून दुसऱ्याला। राखीत जावें।'–दा १२.१०.२४. 'आपणांवरून जग ओळखावें' ९ वरील बाजूस; बाह्यप्रदेशीं. 'अंतर्वसन बाह्यवसन कंचुकीवरून प्रावरण।'–ह ३४.१६३. वरौता–ती–वि. वर; वरता पहा.–ज्ञा ४.२०९. 'वरौती एऊनी आनंदभरें।'–दाव १८८. 'सुकुमारपणें भूपति भृंग। धरोनि झेली वरौतें।'–मुआदि १८.३४. वरौना–वरून पहा. 'वरौनि कापूरकेळी। भ्रमरांची झांक ऊठिली।'–शिशु ६०५.

वरई—स्त्री. १ एक प्रकारचें धान्याचें गवत. २ एक धान्य. वरी पहा. [देप्रा. वरइअ]

वरई—स्त्री. एक सुवर्ण नाणें. वराई पहा.

वरकट–ड—वि. इतर; बाकीचे; राहिलेले. 'तरी तपक्लेशा वरकडसनी। दुःख देणार नाहीं बा।'–नव ११.२९. [? प्राकृत–पराकड–वराकड–वरकड.–भाअ १८३५]

वरकल, वरकोल—पुस्त्रीन. सोन्याच्या कसोटीचा दगड (हा पितळी कोंदणांत बसविला असतो); कसवटी; कसोटी. 'परी परिसाचा वरकलीं। नाहीं चोखाकिडाची बोली।'–ज्ञा१७.४०७; 'सोनारी वरकोल घातला।'–रावि १९.११७. [का. ओरेकल्लु; ते. ओरेगल्ल]

वरकस—वि. १ तांदूळ, गहूं, बाजरी, जोंधळा इ०मुख्य धान्यें व तूर, हरभरा, वाटाणा, मूग, मठ हीं कडधान्यें सोडून इतर हलकें, गौण (धान्य). नाचणी, वरी, हरिक वगैरे. २ अशा हलक्या धान्याला योग्य (जमीन); नापीक; माळरानाची. ३ (विशेषतः भातशेताभोवतालची, गवताची (जमीन). वरकसल–स्त्री. वरकस धान्यें, कडधान्यें यांन सामान्य संज्ञा. वरकशी–वि. वरकस धान्याच्या पिकालाच योग्य अशी (जमीन). [वर+सं. कृष्]

वरकारी—स्त्री. (बुरूड) दुरडी, सुप यांस गोठ घालवया-साठीं वापरतात ती जाड कांबीट.

वरख-ग—पुन. (कों. कुण.) आडनांव. [सं. वर्ग]

वरख—पु. १ पान (पुस्तकाचें). २ पान; पातळ पत्रा; वर्ख. (सोनें किंवा इतर धातूचा). 'कथिल चांदिचे सारखे वरख।' –प्रला १९६. ३ कपटा; अर्धा तुकडा (कागदाचा). 'लिहिले असती वरखावरी।' –दावि. ४ अर्धा बंद; चौबंदी घडी घातलेल्या देशी कागदाचा एकअष्टमांश भाग. [अर. वरक] **वरखी**-वि. १ वरख लावलेलें; सोन्यानें मढविलेलें (पान). २ मुलाम्याची; खोटी. 'ब्रह्म सबाह्याभ्यंतर भरलें परि भक्ति नसो वरखी।' –देप ७३.

वरखडणें, वरखाडणें, वरखडा, वरखाडा—ओरखडणें, ओरखडा इ० पहा.

वरखणें—अक्रि. वर्षणें पहा. 'सुरेज्याच्या वारीं वरि सुमनवर्षें वरखिला।' –निमा १, व्यंकटेश स्तोत्र ३०. [सं. वृष्-वर्ष; हिं. बरसना]

वरखता-त्या—पु. बरकत्या-ता पहा. भात कापून काढल्यावर त्याचे भारे बांधण्यास, पेंढ्यास पीळ घालून वावभर लांब करतात तो दोर. –कृषि २३८.

वरखल—पु. वरकल पहा.

वरखशी, वरखशील, वरखस, वरखसल—वरकस इ० पहा.

वरखु—स्त्री. वृष्टि. 'पाणियावरी वरखु। होतां कें असे विशेखु।' –अमृ ६.६०. [सं. वृष्-वर्ष]

वरंग—पु. एक झाड.

वरगण—स्त्री. वांटणी; (प्र.) वर्गणी. 'जयाचिया अक्षौहिणी। तेणें तिया आरणी। वरगण कवणकवणी। महारथीया।' –ज्ञा १.२२. **वरगणी, वरगत**–वर्गणी, वर्गत पहा.

वरगणें—क्रि. (वे.) वांकडें होणें.

वरंगल-ळ—पु. भाताची एक जात. (कु.) वरंगाळ. याच्या तीन पोट जाती:–साधा वरंगल, दुद्या वरंगल व शेप्या वरंगल.

वरंग(घ)ळ—स्त्री. उतार; उतरण; घसरण. [वरून+गळणें, घळणें?] **वरंग(घ)ळणें, वरग(घ)ळणें**–अक्रि. १ खालीं घसरणें; ओघळणें. २ कोसळणें; गडगडणें; ढासळणें. ३ धोधो खालीं पडणें (पाण्याचा लोट, नदी). ४ पुष्कळसें खालीं, बाहेर पडणें; भसूदिशीं बाहेर येणें, वाहणें. 'कणसांतून दाणा–पोत्यांतून साखर, सरांतून मोतीं–नाकांतून नथ–खिशांतून रुपये वरंगळतो –ती–तें–तात.'

वरघट-टी—स्त्री. १ भरभराट; उत्कर्ष. 'धंदा वरघटीला आणणें.' –केसरी २९.९.३०. २ पुनरुज्जीवन. [वर+घटणें]

वरघणें—क्रि. (व.) कापूस वठणें.

वरचस, वरचस्व, वरचस्वता, वरचस्वी—वर्चस, वर्चस्व व त्यांचे सामासिक शब्द पहा.

वरचा—वि. जागीं; ऐवजीं; वांटचा, वारचा पहा.

वरचा-ता—वि. पश्चिमेकडचा; पाश्चात्य. वरती पहा.

वरचेवर, वरच्यावर—क्रिवि. १ (खालीं न येतां, पडतां) वर; अधांतरीं. २ जसें होतें, असावें तशा स्थितींत; अलगत; हातचे हातीं. ३ वारंवार, पुन्हां पुन्हां. ४ झटदिशीं; चलाखीनें. [वर द्वि.]

वरचिलें, वरचील—वि. १ इतर; अन्य; बाकीचें; उरलेलें; अवांतर. 'जन्मासवें श्रम वरचिलही गेले।' –ज्ञा ९.४०४. २ वरील; वर सांगितलेलें. 'आतां येणेंसि कवण भिडे। हें पांडवसैन्य कीर थोडें। वरचिले निपाडें। दिसत असे।' –ज्ञा १.११९. ३ आणखी. ४ किरकोळ; सामान्य. 'संसप्तक ते राक्षस अर्जुन तो रघुपती न वरचील।' –मोकर्ण २.१२. वरकड पहा. [वर]

वरजणें—उक्रि. वर्जणें पहा. १ टाकणें; त्याग करणें. 'आपल्याला तुम्ही रूपासी समजा। कासया वरजा आरसिया।' –तुगा ३३३३. २ प्रतिबंध करणें. 'नमन करुनिया निघतां न सके माता सुतास वरजाया।' –मोरा १.१२.२६.

वरजाळी—स्त्री. भोंवरा खेळण्याची एक पद्धत.

वरजी वांकडा—वि. (वरजी आणि वांकडा असे कृष्णाचे दोन विरूप गोपगडी होते त्यावरून) अत्यंत बेडौल; विद्रूप; कुरूप. वडजा वांकडा, वडजा पहा.

वरट, वरटघाण, वरड, वरडणें, वरडा, वरडा-वरड—ओरट, ओरटघाण इ० पहा.

वरंट—पु. (राजा.) पेटका; वळ; (प्र.) वरवंट.

वरटा—स्त्री. १ हंसी. २ गांधील माशी. [सं.]

वरंटा, वरंटापाटा—पु. वरवंटा, वरवंटापाटा पहा.

वरठा-ठी—पु. (व. कों.) परीट; धोबी. [सं. वरटा=हंसी?] **वरठीण**–स्त्री. धोबीण. 'गाढवीकरितां रडतां वरठिणी।' –दावि १८५.

वरठी—स्त्री. हंसी; वरटा. 'निर्मळ वरठी गे। तयाचे दारीं मी घाली घरटी गे।' –मध्व ३९८. [सं. वरटा]

वरंड—स्त्री. १ डोक्यावर घेण्याकरितां बांधलेला गवताचा भारा. २ धान्याची रास. ३ कापणी केलेल्या ताटांचा भारा. **०गवत**–न. कापून आणलेल्या ताटांचा भारा. असा भारा दरसाल कुळाकडून मिळण्याचा खोतास हक्क असतो. [सं. वरंड]

वरंड-डा-डी, वरांडा—स्त्रीपु. १ कठड्याची, कडेची भित (रस्ता, व्हरांडा याची). २ दोन शेतांमधील बांध; हद्दीची भित; पाळा. ३ ज्याच्या भेंडा पाडतात ती मळलेली माती (तिच्या लांबट डिगाच्या आकारावरून). ४ भितीची मुंढेरी; वरंडा. ५ छप्पराचें आढें; पाटेस. [सं. वरंड] **वरंडा**–पु. (कु. कों.) दगडांची अव्यवस्थित रास.

वरंडा—पु. सज्जा; छप्पर असलेली गॅलरी. [सं. वरंड; गो. वरांद; पोर्तु. वरंदा; इ. व्हरांडा]

वरंडा—पु. (गो.) उच्च कार्यासाठीं देह ठेवणाऱ्या थोर पुरुषाच्या मृत्युस्थानीं असलेलें दगडांच्या ढिगाचें स्मारक. –सह्याद्री १६०.

वरडे(डे)ल—न. तळणाचें शिल्लक राहिलेलें तेल. याचा वास फार उग्र असतो. ओरडेल पहा.

वरढाण—स्त्री. दुर्गंध; कुदर्प. ओरढाण पहा. 'झाली विष्ठेची सारणी। भोंवतीं उठली वरढाणी।' –दा ३.३.२३.

वरढोक-ढोंक—पु. भातखाचरांतील एक मोठा पक्षी.

वरण—पु. क्षत; व्रण पहा.

वरण—स्त्री. (कों.) गवताचा भारा. वरंड पहा.

वरण—न. १ डाळीचें कालवण. याचे–दोन प्रकार: आंबट व गोड. २ शिजविलेली डाळ पातळ करून भातावर वाढतात तें. वरान्न पहा. [सं. वर+अन्न] म्ह० वरण दाटणी आणि बायको आटणी. ०भात–पु. १ नुसतें वरण आणि भात; साधें जेवण. २ (ल.) नवऱ्यापेक्षां बायको वय, उंची, बांधा इ० त मोटी असते तें जोडपें. 'आतां अंमळ मुलगा आहे बसक्या बांध्याचा आणि पोरीची जात पडली उफाड्याची म्हणून वरणभात व्हावयाची भीति!' –गडकरी (वेड्यांचा बाजार).

वरण—न. १ लग्न; विवाह. 'पट्ट महिषीचें वरण। भौमासुराचें निर्दळण।' –एभा ३१.३८३. २ नेमणूक; निवड; पसंती. [सं. वृ–वरण] **वरणी**–स्त्री. १ वधूवस्त्र; अष्टपुत्री. 'ती पिंवळी वरणी नेसली होती.' –झांमू ८१. २ पाळीनें अनेक ब्राह्मणांनीं करावयाचें अनुष्ठान, देवाची आराधना. (क्रि० देणें; घेणें). ३ अशा अनुष्ठानाची पाळी, वेळ (दर एकाची). ४ (दैवज्ञ) बरातीच्या वेळीं लागणारें–पांच नारळ, साडी व खण–इ० सामान. ५ (दैवज्ञ) तेलफळाच्या वेळचं सामान (नारळ, खारका, खजूर, बदाम इ०). –बदलापूर २३६, २४०. ०लावणें–१ सोय लावणें; पाळी देणें. २ प्राप्तीचें साधन मिळवून देणें. **वरणीय**–वि. बरावयाचा; निवडावयाचा; वरण्यास लायक, योग्य. **वरणें**–उक्रि. १ लग्न लावणें; विवाह करणें. 'बाळपणींच सर्वज्ञता। वरी तयातें।' –ज्ञा ६.४५३. २ नेमणें; अधिकृत करणें. ३ पसंत करणें; स्वीकारणें. –ज्ञा ९.३१०. 'कीं टाकावें सत्वर वपु निजरण धर्मे सत्पथा वरुनी।' –मोभीष्म ११.१०९. ४ धारण करणें; घेणें. –माज्ञा १७.५८. ५ अंगिकारणें; घेणें; स्वीकार करणें. 'पांडवभयें पलायन वरिलें असतां रणीं अनीकांहीं।' –मोकर्ण १.२३.

वरणा—पु. पावटा; कडवेवाल. [वरण?]

वरणें—वैरणें पहा.

वरणें—न. (व.) वैरण पहा.

वरतनी—स्त्री. (बे.) रतीब. [सं. वृत्त, वर्तन]

वरतवळा,वरतावळा,वरताळा—पु. १ एका शिक्क्याचें नाणें देऊन दुसऱ्या शिक्क्याचें घेतांना पडणारा वटाव, वरबट्टा; वर्तावळा. २ विवक्षित प्रमाणानें मोजल्यावर येणारा वाढावा. ३ व्यवहार केल्यानंतर हातीं राहणारा नफा किंवा भरावा लागणारा तोटा; शिल्लक; बाकी. ४ पुरें माप दिल्यावर वर आणखी थोडा जिन्नस घालतात तो. [वर, वरता+ल]

वरताणा—पु. (सोनारी) सोनारांचें एक हत्यार; काकणता पहा. यानें दागिन्याला गोल आकार देतात. [सं. वर्तन]

वरताव—पु. हल्ला; चढाई. –शर.

वरती, वरतीकडे—क्रिवि. पश्चिमेस. वरचा–ता पहा. देशावरचा माणूस कोंकणच्या बाजूस वरती म्हणतो. याच्या उलट खालती–कडे.

वरत्रा—स्त्री. दोरी; कातड्याची वादी, पट्टा. [सं.]

वरदळ—स्त्री. १ (रस्ता, जमीन, वस्त्र–पात्र इ० वर) नासधुशीची क्रिया; धुडगूस: तुडवातुडव; जोरानें, निष्काळजीपणें वापर; राबता. २ त्रास देणें; छळणें. 'पोरांनीं वरदळ लावली.' ३ उपसर्ग; अडचण; त्रास. 'आमची कांहीं वरदळ लागावयाची नाहीं.' [सं. वर+दल्] **वरदळणें**–अक्रि. तोंड सोडणें; बाचाबाची करणें; भांडणें, तंडणें. –सक्रि. तुडविणें; नास करणें. **वरदळीस–वर येणें**–हमरीतुमरीवर येणें; फार कडाक्यानें भांडणें.

वरदाव—स्त्री. वरदळ पहा.

वरदावरद-दी—स्त्री. वरावर्दे, वर्दावर्दे पहा.

वरदी—स्त्री. वर्दी पहा. 'शाहू राजाशीं वरदी वळली।' –पाळणेसंग्रह ६.

वरदोळणें—उक्रि.(महानु.) रगडणें; वरदळणे पहा. 'चाणोरे वरदोळि मुष्टिक।' –गरुडो ८०.

वरधणी—पुन. (राजा.) शिजणाऱ्या पदार्थावर ठेवलेलें झांकण. [सं. वर्धनी=विशिष्ट भांडें]

वरंधार—क्रिवि. (कर्ना.) मुसळधार; एकसारखा. (पडणारा पाऊस) [वर+धार]

वरधाविणें—उक्रि. खुष करणें; खुलविणें; आंजारणें गोंजारणें. [सं. वृध्–वर्धी]

वरन—स्त्री. (प्र.) वैरण. (व.) लहानसर ओल्या ज्वारीच्या ताटांचा (जनावरास दिलेला) चारा.

वरप—ओरप पहा. **वरपणें**–उक्रि. १ ओरपणें पहा. २ म्हशीच्या निरणांत हात घालून तिला फळण्यास उद्युक्त करणें. ३ (सारवण, सांडलेला द्रव पदार्थ इ०) हातानें निपटणें. ४ भुरकणें. 'मुखापासीं नेतो गजवर पितो तें वरपितो।'–र (गजेंद्रमोक्ष).

वरपट बकरा—पु. (माण.) खच्ची केलेला बकरा. [वरपणें+बकरा?]

वरपट्टी—स्त्री. (विणकाम) मागावरील कापड गुंडाळावयाच्या लांकडास घालावयाची खीळ. या दोन असतात. फिरवणी पहा.

वरपड-डा, वरिपडा—वि. १प्राप्त. -ज्ञा६.१६८; 'पांडवां वरपड न व्हावें।' -मुवन १२.४७. २ स्वाधीन; वश. -ज्ञा २.३४९. 'वरपडा होसि तूं काळा।' -देप ७१. ३ आसक्त; ताबेदार; वश. 'जैसा योगी होय आत्मज्ञाना। वरपडा पै।' -कथा ४.६.११२. ४ व्याप्त; मग्न. 'दुःखा वरपडा होता जाला।' -दा ३.१.४८.५ विव्हल; दुःखी. 'तै वरपडा होय अरण्यशोकें।' -मुसभा ८.१६३.-कथासा ३२.११४.६ पात्र; योग्य. 'म्हणोनि स्वधर्मु हा सांडसील। तरी पापा वरपडा होसील।' -ज्ञा २.२०१. **वरिपडणें**-अक्रि. १ प्राप्त होणें. 'तेथ शब्दांकुर वरिपडी। श्रोत्रावाढी देव्हडी।' -ज्ञा १५.१००. २ गुंतणें; वरपडा होणें. 'वरिपडलें भवपाशें।' -दावि ८४. ३ गोंधळणें; कांहीं कळेनासें होणें. ४ बुडणें; मग्न होणें. 'सेवटी होए तापा वरिपडे। दुःखाग्निमाजि।' -ऋ ५४. **वरिपडी**-स्त्री. १ मिठी. -एभा ६.५७. २ उडी; झडप; लुब्ध होणें. 'ऐशी डोळ्यां आवडी। म्हणोनि कामिनी वरिपडी।' -एभा १.२९४. ३ गर्दी. 'ब्रह्मादिकांचिया वरिपडी। बखलुनि कवणाचे ताट काढी।' -भाए १३२. ४ (महानु.) पूर्वपद; आश्रयस्थान. 'तया सन्निधानाची बेडी। जया नव्हेचि वरपडी।' -भाए ५०. [? वर+पडणें]

वरपत्र—न. (जप्तीचा) सरकारी हुकूम; वारंट. 'मी तों महाराजाचा देशी जफ्तीदार। धाडिलेति वरपत्रासह।' -दावि ३७७. [वर=श्रेष्ठ+पत्र ?]

वरपा—पु दरोडा; लुटीचा हल्ला. 'ठकु सितरु वरपेकरी। वरपा घालिती।' -दा ३.७.४९. **वरपेकरी**-पु. लुटारू; दरोडेखोर. 'मारेकरी वरपेकरी। दरवडेकरी खाणोरी।' -दा २.३.३१.

वरबडणें, वरबडा, वरबाडणें, वरबाडा—ओरबडणें, ओरबडा इ० पहा.

वरंबा, वरंभा, वरभा—पु १ बांध (वाफा, पाट, धरण इ० ला घालतात तो). (क्रि० घालणें). 'तों पाचेच्या वाफ्यांचे बरंबे नवेच बांधले होते... ते त्यानेंच तुडवून टाकिले.' -बाळ २.३७. २ पाण्याचा पाट. 'वरंबा खोल आहे. त्यांत पाणी अडकलें.' ३ टेंगूळ. ४ वरंडी पहा.

वरम—स्त्री. (व.) १ शेत पेरल्यानंतर शेतांत उठणाऱ्या मातीच्या उंच रांगा. २ पाणी जाण्यासाठीं बागाइतींत केलेल्या मातीच्या वरवंड्या.

वरमणें—अक्रि. १ नाजुक भागाला धक्का लागणें. (ल.) अंतःकरणाला झोंबलेला असणें; खोंचला जाणें; मर्मभेद पावणें. २ वर्म काढल्यामुळें ओशाळणें; शरमणें. 'कृष्णेच्या देव रमे स्मरतां विस्मय रमा मना दे वरमे।' -मोकृष्ण २९.६१. ३ खिन्न होणें. 'सर्व बळासह कीशवरा प्रभुच्या अनुजाहि रणीं वरमाया।' -मोरामायणें १.२८७. [सं. मर्म] ॰ह्न० नाक खाजविलें नकटें वरमतें.

वरमणें—अक्रि. दबलें जाणें; बसणें (गळ्हे, दुसदुस, धडधड इ०). [विराम ?]

वरयिता-यतु—वि. वरणारा (नवरा); भर्ता. 'इया लागीं इये वरयितु हा।' -ज्ञा १३.१०२४. [सं. वरयितृ-ता]

वरयी—स्त्री. वरी, वरई पहा.

वरला(ले कडे-कडून—क्रिवि. पश्चिमेकडे; वरती-कडे. 'वरिलेकडून मंदानिळ। लोटोनि आणी दिव्य परिमळ।' -मुआदि २३.३.

वरलाशीं—न.अव. (सांकेतिक) स्त्रीस्तन. (ए. व.) वरलासें. [वरील]

वरली—स्त्री. (गो.) तांदूळ धुण्याची (बांबूची) रोवळी.

वरलें—न. (कु.) १ राख सांठविण्यासाठीं भिंत घालून केलेली खोलगट जागा. २ जमीन वाहून जाऊं नये म्हणून घातलेला चौरस बांध. ३ दोन गांवांमधील सीमेची खूण.

वरव—स्त्री. १ एखाद्या पदार्थाचें बैपुल्य असल्यामुळें वारंवार तोच खर्चण्याचा, वापरण्याचा प्रकार (तांदुळ, इतर धान्य, भाजी इ० बाबत). 'जे जें धान्य पिकतें त्याची कांहीं दिवस वरव असती.' 'सजगुऱ्याची वरव पुरवठ्याची नव्हे.' २ तांदूळ, पीठ इ० मुख्य पदार्थास भाजी, कालवण इ० च्या साहाय्यामुळें किंवा कांहीं कारणानें येणारी ऊर; शिळक. 'फणसाचे भाजीनें अन्नास वरव येती.' ३ सारखा वापर, सेवन, खर्च. 'लोभें आशींचीचि न मणिराशींची बरी वरव राया।'-मोसभा ६.४४. ४ पुरवठा; सांठा; संग्रह. 'वर्षाची वरव केली नाहीं म्हणून तांदुळाचा तोटा आला.' ५ रेलचेल; समृद्धि. 'वरव घरामधें देकुण पिसा कुटवर देऊं मी धिग।' -पला ८३.६ तृप्ति; पुरवठ्यामुळें समाधानाची स्थिति. [वर किंवा उरणें, उरविणें; तुल० सं. उर्वरित]

वरवंट—पु. १ साडी नेसण्याचा एक प्रकार. परवंटा पहा. २ वरवंटा पहा. **वरवंट्याचें नेसणें**-न. वरवंट अर्थ १ पहा.

वरवंट-टा—वि. सुंदर; शुद्ध. बरवंटा पहा. सुंदर स्त्री. 'ऐसा विचार करूनि गोमटा। जात्या झाल्या त्या वरवंटा।'-नव १४.८१७. [सं. वर+वर्त]

वरवंटा-ट—पु. चटणी, औषधें इ० पदार्थ पाट्यावर वांटण्यासाठीं केलेला उभट वर्तुळाकार घडीव दगड. २ मोटेच्या शिडीवरचें वरील आकाराचें बांधकाम. ३ (वरवंट) पेटका; बळ;

स्नायूंमध्यें वरवंट्याप्रमाणें गोळा उठणें, आल्याप्रमाणें वाटणें. (क्रि० येणें उठणें). ४ जाणाऱ्यायेणाऱ्यानें एकेरु दगड टाकल्यानें झालेला दगडाचा एक लांबट आकाराचा ढीग. [वर+सं. वृत्त; प्रा. वट्ट=वाटोळें ?] ०फिरविणें-(ल) एखाद्या वस्तूचा चुराडा, नाश करणें. ' सर्वांवर सारखा वरवंटा फिरविला जात आहे. ' -टिव्या. ०पाटा-पु. पाटावरवंटा पहा.

वरवंटी—क्रिवि. वरवर; वरकरणी -शर

वरवट्याच्या शेंगा—स्त्रीअव. (व.) चवळीच्या शेंगा.

वरवड—स्त्री. घोंगडी इ० कांस जी रेवड घालतात ती. रेवड पहा.

वरवंड-डा-डी—स्त्रीपु. बांध. वरंड-डा-डी पहा. ' लडिये आला लोंढा । न मनीं वाळुवेचा वरवंडा । ' -ज्ञा १३.६९३. वरवंड हें देशावरचें रूप असुन कोंकणी रूप वरंड आहे.

वरवंडणें—क्रि. कुरवंडी करणें. -शर ?

वरवणी—न. (कृषि) १ पावसाळा संपल्यावर (ऊस इ० स) वरचें पाणी देतात तें. यानें पावसाचें पाणी धुवून टाकतात. २ सटवणीचा पाऊस. [वर+वणी=पाणी]

वरवणें—उक्रि. १ (सोनारी) वर ठेवणें (छील, फासा इ० जिन्नस). २ उंच करणें. ' या कोपभरें कितिमान वरवत असती हें सांग खरें ? । ' -र ६०. [वर]

वरवा—पु. (नाविक) नांगर टाकणें; ओरवा पहा. (क्रि० करणें). ' हिंदुस्थानला जाणाऱ्या एका गलबताने वरवा केला. ' -पाव्ह ८५.

वरवा—पु. १ वाढावा; शिल्लक. ' वरतो वरतो वरवा वरतों । ' -दावि ३५३. २ मुख्य धान्याबरोबर पेरावयाचें उपधान्य; उताडा. ' शेतीं धान्य पेरिती शेती । त्यामाजीं किंचित् वरवा घालिती । ' -कथा ४.७.२२३. [वर]

वरवा—पु. (व.) उकाडा; रतीव. ' आमच्या घरीं रोज शेरभर दुधाचा वरवा आहे. '

वरशिका-शीक—वि. (राजा.) ज्यास वर्षाच्या आंत बीं येत नाहीं असा (माठ). (माठाची एक जात). [सं. वार्षिक]

वरस—न. (प्र.) वर्ष पहा. ' घोस अमें फणसाचे षण्मासाचे कितेक वरसाचे । '-र ८. ०गांठ-स्त्री (गु.) वर्षगांठ पहा.

वरस—पु. वर्षाव; वर्षणें. [सं. वृष्-वर्ष्]

वरसणें, वर्सणें—(प्र.) वर्षणें पहा. ' पुढें चिक्षारीची झाडी काठवाडी मोठ्या घाडी वर्सल्या बाई । ' -ऐपो १८३.४३४.

वरसं(सुं)दा—क्रिवि. (चुकीनें) सरसंदा; एकसारखा बसेल अशा रीतीनें; सरसंदा. ' जरी किनारी कोरदार तंग चोळीवर रंग उदा। उदीं उमटल्या नूतन गरसा झांकी पदर वरसुंदा । '-पला ४.३५.

वरसल—स्त्री. वतन इ०चा उपभोग घेण्याची पाळी. वर्षल पहा.

वरसाडा—पु. तुषार. वसाडा, ओसाडा पहा. [सं. वर्षाव]

वरसुणी—वि. (बे.) वर्षाला विणारी. [वरस+विणें]

वरसून—शअ. (प्र.) वरून पहा. (क्रि० चालणें; जाणें).

वरळा-ळी—रोवळा-ळी पहा.

वरळा-वरळें—पुन. तिसऱ्यानें वारवल्यानंतर राहिलेलें खळ्यावरचें धान्य; हलकें धान्य व भुसा यांचें मिश्रण; वरुळें. यावर महाराचा हक्क असतो. ' निवडिलें वरळाभूस । ' -तुगा २१६६.

वरा—पु. (कों. कु) शेत नांगरतांना सोईचें पडावें म्हणून नांगरण्याच्या दृष्टीनें तेवढ्या वेळेपुरते जे जमीनीचे निराळे भाग करतात त्यांपैकीं प्रत्येक. ओरा पहा.

वरा—स्त्री. जहाजाची मागची, सुकाणूकडील बाजू.

वराई—स्त्री. वरई; एक रोन्याचा होन. यावर वराहाचें चित्र असुन हा कर्नाटकी नाण्यांपैकीं आहे. -शिदि २१०. [वराह]

वराई—स्त्री. वरी पहा.

वराक-का-की—वि. १ गरीब; दरिद्री. २ दीन; बापडा. ' ज्या कारणें हे विलपे वराकी । ' -सारुह ३.९. ३ दुर्दैवी. ' पहा त्या वराका किती । ' -रास १.९३५. ४ नीच; क्षुद्र. ५ दुर्बल. [सं. वराक]

वरागणी—स्त्री. वर्गणी पहा.

वराटक-टिका—पुस्त्री. कवडी. [सं.]

वराटी—स्त्री. (संगीत) एक राग यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण वादी गांधार, संवादी धैवत. गानसमय सायंकाल.

वराड—न. १ वऱ्हाड पहा. -तुगा ३४६६. ' वराड निघालें समारंभें । ' -रामदासी २.१७३. २ बिऱ्हाड; घर. दुजें नाहीं काम गेला कुब्जेच्या वराडा । ' -राला ४६. **वराडिक**-न. लग्न. ' तेथ द्वैपेंसीं मांडिली । वराडिक । ' -ज्ञा ७.१६६. **वराडी**-न. वऱ्हाडी पहा. -ज्ञा ११.३. ' कां भीमकीचा नव्हसी वराडी । ' -सारुह १.३६.

वराड—स्त्री. ओरड पहा.

वरांडा—पु. (कों.) वरंडा-ड पहा.

वरात—स्त्री. १ झोंपाळा, पाळणा इ० टांगण्यासाठीं जाड दोरी, लोखंडी सांखळी, सळई, इ० २ वादी; दोर. [सं. वरत्रा]

वरात—स्त्री. विवाहानंतर वराच्या बिऱ्हाडीं वधुवरांनीं मिरवीत जाणें; हा समारंभ. [सं. व्रात=समुदाय किंवा वरयात्रा; हिं. वरात] म्ह० वरातीमागून (वरातेमाघे) घोडें=एखादी गोष्ट होऊन गेल्यावर तिची सामग्री येणें. संबंध म्हण अशी-वरातेमाघें घोडे; व्याह्यामागें पिढें. ०काढणें-(निंदार्थी) धिंड काढणें;

हांकून लावणें. **०जेवण**-न. वरात मिरवून घरीं आल्यावर जें जेवण होतें तें. **वराती-त्या**-वि. १ वरातीसंबंधी. २ वराती-बरोबर चालणारा. ' लहान मोठे असले वराती । वरचें शिरोधान सुरंग लेती । ' -शशिसेना.

वरात—स्त्री. १ मामलेदार इ०कांकडून यावयाचा जो पैसा त्याविषयीं सरकारांतून करतात जी चिट्टी ती; मागणीपत्र; हुंडी. ' सरकारची वरात व ऐवज पावल्याचें कबज. ' -वाडसमा १. २७०. २ (सामा.) हुंडी; चेक; बिल. [अर. बरात्] **म्ह०** वाऱ्यावर वरात आणि दर्यावर हवाला (किंवा भुसावर चिट्ठी). **०दार**-पु. १ सरकारची वरात घेऊन मामलेदार इ०कांकडे वसुलाकरितां येणारा शिपाई, स्वार इ०. २ (ल.) मामलेदार, खोत इ०कांकडून कुळाकडे येणारा तगादेदार. [फा. बरातदार]

वरांदूळ—न. वऱ्याचे तांदूळ. -कृषि २९२. [वरी+तांदूळ]

वराम—न. नावेचा मागील भाग; वरा पहा.

वराय-यी—स्त्री. सोन्याचें नाणें. वराई पहा.

वरावर्द—स्त्री. १ गणित करणें; हिशेब; त्याची रीत; गणना; गणित २ मागील महिन्याच्या जमाखर्चावरून केलेलें अंदाज पत्रक (कमाविसदाराच्या खात्याबाबतचें इ०). ३ (सामा.) अंदाज. [फा. बरावर्द] **वरावर्दी**-स्त्री. (वरावर्दचें अव.) वरावर्द प्रमाणेंच वापरतात. **वरावर्दीचें सामान**-न. किरकोळ सामान.

वराह—पु. १ डुकर. २ विष्णूचा एक अवतार. -ज्ञा ११.६२.

वराळी—स्त्री. बडीशेप; एक औषधोपयोगी बीज. **वरि-आळी**-स्त्री. (गु.) बडीशेप.

वरि(रु)खणें—न. वृष्टि. ' समुद्रीं जालें वरिखणें । ' -अमृ ९.१९. -अक्रि. वर्षणें; वृष्टि करणें. ' वरिखतु रसाचें वडप । ' -दाव १३७. [सं. वृषू-वर्ष]

वरिवंडणें—अक्रि. सफळ होणें. -मनको. ' वरिवंडलें जयाचिया । अनुज्ञा कां । ' -अमृ २.१७.

वरि(री)स-ष—न. (प्र.) वर्ष; संवत्सर. [सं. वर्ष; प्रा. वरिस] **०खंड्या**-वि. (कों.) वर्षाच्या बोलीनें ठेवलेला (चाकर). [वर्ष+खंडणें]

वरि(रु)सणें-षणें—क्रि. वृष्टि करणें; वर्षणें. ' येणें सात्त्विक रसें । जंव देही मेहा वरिषें । ' -ज्ञा १७.१३२. [सं. वृषू; प्रा. वरिस] **वरिसाव, वरुषाव**-पु. वर्षाव. ' हरिवरि वरिसाव करि सुमनांचे । ' --र ६५. [सं. वर्षा; प्रा. वरिसा] **वरिष**-पु. पाऊस. ' मग वरिषु या अन्नातें । सर्वत्र प्रसवे । ' -ज्ञा ३.१३४.

वरी—स्त्री. एक तृणधान्य; हें उपवासाला खातात. वराई पहा. [दे. प्रा. वरइअ]

वरी—स्त्री. (नाविक) ठांकणीला बांधलेली एक दोरी.

वरु—पु. मनुष्य; वर. ' संपूर्ण सींहुं ना वरु । देवता अंगीचि वीभिचारु । ' -ऋ ७२.

वरुख—न. वर्ष; वरिस पहा. ' पक्षे शुक्र पराभवाब्दवरुखे । ' -भाव्रै १०.३.११५.

वरुण—पु. १ जलाची अधिष्ठात्री देवता; समुद्रदेवता; पश्चिम दिशेचा स्वामी. २ सूर्यमालेंतील एक ग्रह. (इं.) यूरेनस. ३ (शाप.) एक उपधातु. (इं.) युरेनियम्. [सं.] **०दिक्**-स्त्री. पश्चिम दिशा. ' तंव तो वरुणदिग्वधूचे सदन । ' **वरुणालय**-न. समुद्र.

वरुंवा—पु. (माण.) मातीचा लहान बांध. वरंबा पहा.

वरुळें—न. वरळें पहा.

वरू—स्त्री. १ अत्युच्चता; थोर पात्रता. (मर्यादित अर्थानें विशेषतः खाद्यावद्दल वापरतात. २ (सामा.) वरव पहा. [सं. वर]

वरूटा—पु. वरवंटा पहा.

वरें—न. नावेचा मागचा भाग. वरा, वराम पहा.

वरेण—न. वरी धान्याचें काड. [वरी+तण]

वरेत, वरैत—पु. (गो. खि.) वरणारा; भर्ता. नवरदेव. -ज्ञा १८.१०४९. ' आधीं सभागा होति तव वरैतु आदिकरूनि तिएसि अधीनें होति । ' -दुर्भगाप्रमेय [सं. वृ-वर]

वरो—स्त्री. १ अन्नसामग्री; एक दिवसाचा शिधा. ओयरा पहा. ' कुटुंबा वरोचि विनवणी । एर काई सांगो । '-भाए ७२५. २ पोटगी; नित्याचें अन्न. ' बीजचि वरोसि वेंचे । तेथ वाढती कुळवाडी खांचे । ' -ज्ञा १८.२५८. ३ धान्य. ' वाइलपासी तें वरो वोपी । '-अज्ञात च० ५८. -गुच २२.२५.

वरो—वि. पुष्कळ; वरू, वरव पहा. ' संताचिये गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त । ' -तुगा २२९३. [वर]

वरोजा—पु. सुरूच्या झाडाचा चीक. तंतुवाद्यांच्या तारांस लावण्याकडे याचा उपयोग होतो. गंधाबिरुजा पहा. -कृषि ७८४.

वरोटा—पु. मोटेच्या विहिरीपुढली कुंडी; मोटवण. [वर+ओटा]

वरोटा, वरोंटा—पु. वरवंटा पहा.

वरोरू—स्त्री. सुंदर स्त्री; रंभोरु. ' हे रुक्मिणी देववरे वरोरू । ' -सारुह १.४२. [सं. वर+ऊरु]

वरोळा—पु. रोवळा पहा.

वरोळी—स्त्री. १ रोवळी पहा. २ मोजणी कामदारानें घालून दिलेली शेताची हद्द; बांध. -वाडसमा १.४३. ३ (व.) मातीचें लहान टेंकाड.

वरोळें—न. वरळें पहा.

वर्क-र्ख—पु. पान; तगट. वरख पहा. ' दुसरी अखबार चिना-पट्टणाहून सौदागरांनीं लिहिली त्याचा एक वर्क. '--रा ७.२२. [अर. वरक्]

वर्कशी, वर्कस, वर्कसजमीन, वर्कसल, वर्खल—वरकशी, वरकस इ० पहा.

वर्कीण—स्त्री. नौकेचा एक प्रकार.

वर्के—न. (उत्तर कों.) ३० हात लांब व ७॥ हात रुंद (किंवा ५० फूट×१२॥ फूट) जमिनीचा तुकडा.

वर्ख—न. (चि.) वर्ष. -मसाप २.४.१०८.

वर्खर—पु. एक हत्यार; वस्तरा. ' सुरिया वर्खर परजिती । सिंह दांत नखें विदारिती । '-खिपु १.१.१०५.

वर्खाओ—पु. (प्र.) वर्षाव; वृष्टि. ' कीं देवों पुष्पवर्खाओ केला । '-शिशु १०८४. [सं. वृष-वर्ष्]

वर्ग—पु. १ तुकडी; संघ; समुच्चय; गट; जात; एका संज्ञेखालीं येणारे अनेक प्राणी किंवा वस्तु. उदा० ब्राह्मण-दास-मत्स्य-धान्य-वर्ग. २ (शालेय) इयत्ता; अभ्यासक्रमाचा विभाग. ३ (व्या.) वर्णांचा समुदाय, गट उदा० कवर्ग, चवर्ग इ० ४ (गणित) गुण्यांक व गुणकांक एकच कल्पून गुणिले असतां होणारी अंकसंख्या. उदा० आठाचा वर्ग ६४ (८×८). ५ व्रत; दर्जा. ' कैक्यांचे अ-ब-क असे तीन वर्ग असतात. ' ६ ग्रंथांतील जीं लहान लहान प्रकरणें तीं प्रत्येक; ऋग्वेदांतील अध्यायांतील पोटविभाग; विशिष्ट ऋचांचा गट. ' वर्ग ऋचा, श्रुतिस्मृति । '-दा १२.८.१६५. ७ थवा; रास. ' ते देखतखेंओ जळतुसे उभा । वर्गु अविद्येचा । -ऋ २३. [सं.] **०आमद्, वर्गरफ्त**-स्त्री. (कारकुनी) या सदरांतून त्या सदरांत घालणें (हिशेबातील रक्कम इ०). [वर्ग + फा. आमद् (आगत) व रफ्त् (निर्गत)] **०घन**-पु. (गणित) घनाचा वर्ग. **०मूल-ळ**-न. (गणित) ज्याचा वर्ग केला असतां मूळ संख्या येते तें. उदा० ९ चें वर्गमूळ ३. **०वस्तु**-स्त्री. (वडोदें) समस्वरूपाच्या जिनसा ज्या एका वर्गांत मोडतात त्या वर्गांपैकीं प्रत्येक जिन्नस. -जनि, परिभाषा १४. **०समीकरण**-न. (गणित) ज्या समीकरणांत अव्यक्त पदाचा दुसरा घात म्हणजे वर्ग असतो तें; (इं.) क्वाड्रॅटिक इक्वेशन. **वर्गावर्गी**-स्त्री. १ वर्गाप्रमाणें घालणें. वर्गीकरण; निवडानिवड; प्रतवारी. २ बदली; अदलाबदल. **वर्गित**-वि. वर्ग केलेली (संख्या). **वर्गी**-पु. (गो.) वर्गातील, कुटुंबांतील घटक.-गोमांतक रीतिभाति ९. **वर्गीकरण**-न. वर्ग पाडणें; निरनिराळीं सदरें करणें. -सेंपू १.१. **वर्गीय**-वि. १ वर्गाचा; वर्गासंबंधी. २ वर्गीकृत.

वर्ग—पु. बदली. ' माझा वर्ग वारामतीस होणेबद्दल मी अर्ज केला आहे. ' **०करणें**-(कायदा) योग्य कारणास्तव एका मॅजिस्ट्रेटपुढील खटला दुसऱ्या मॅजिस्ट्रेटकडे पाठविणें; बदलणें; स्थानांतर करणें. (इं.) ट्रॅन्सफर. **वर्गावर्गी**-स्त्री. विशिष्ट तत्त्वानुसार लावलेला क्रम, परंपरा, मालिका वगैरे. वाढ (पगार, दर्जा इ०ची) ' तेथले. कारकून वर्गावर्गीनें वाढतात. ' २ बदली करणें; अदलाबदल (कारकून, मामलतदार, अधिकारी इ०ची); नवेंजुनें.

वर्गणी, वर्गत—स्त्री. १ वांटा; हिस्सा; विभाग (प्रत्येकाचा, समुदायांतून एका व्यक्तीचा). ' दोनशें बत्तीस तीन आणे । वर्गताचे आलें नाणें । '-पैमा. २ दर; किंमत; पडणारे पैसे; आकार; पट्टी. ३ पट्टी करून जमा झालेला पैसा; फंड; निधि. [वर्ग] **०दार**-पु. १ हिस्सेदार; भागीदार; वांटा उचलणारा. २ वर्गणी, आकार, किंमत देणारा; ग्राहक; सभासद.

वर्चस्, वर्चस्व, वर्चस्वता—नस्त्री. १ विद्या, अधिकार इ० परत्वें महत्त्व; प्रामुख्य; श्रेष्ठपणा. २ तेज; प्रभा; सामर्थ्य. ३ (निंदार्थी) वरचढपणा. [सं.] **वर्चस्वी**-वि. १ वर्चस्व असणारा. २ वरचढ; अरेराव.

वर्चील—वि. वरकड; वरचिलें पहा. ' ते अर्चिली म्हणुनि वर्चिल सत्तमांनीं । '-आ गणिकोद्धार १२.

वर्ज—वि. (प्र.) वर्ज्य. १ वगळलेला; समाविष्ट न केलेला. २ टाकून दिलेला; फेंटाळलेला. [सं.] **०दिवस-वार**-पु. १ धार्मिक आचार, संस्कार इ०ला निषिद्ध दिवस. २ प्रयाण, नवीन कामाला सुरुवात इ० महत्त्वाच्या गोष्टींना अशुभ दिवस; घातवार. **वर्ज(जि)णें**-उक्रि. १ वगळणें; समावेश न करणें. ' वर्जुनि वृषासि मज निज कटकींच प्रथम ने । '-मोकर्ण ३५.९. २ एकटाच राहूं देणें; लक्ष न देणें. ३ बाहेर टाकणें; टाकून देणें. ' तेवीं मातें जाणे तो संकल्पीं । वर्जुनि घालिजे । '-ज्ञा १०.८०. ४ त्याग करणें; सोडणें. ' प्रीति नाहीं राया वर्जिली ते कांता । परी तिची सत्ता जगावरी । '-तुगा १६७५. ५ परिपाठ सोडणें, बंद करणें. ' येणें जाणें कांहो वर्जिलें । '-लावणी. ६ मना करणें; प्रतिबंध करणें. ' या रात्रीच्या ठाईं । श्रीकृष्णाजवळ काज कांहीं । ऐसें बहुतांहीं । वर्जिलें त्यातें । '-रास १.२३२. ७ निषेध करणें; निर्भर्त्सणें. ' तव राजपत्नी येऊनि जवळी । वर्जी आपुले पतीतें । '-गुच ७.२४. [सं. वर्जन] **वर्जन**-न. वर्जण्याचा व्यापार; वर्जणें (सर्व अर्थी) पहा. [सं.] **वर्जनीय**-वि. वर्जन करण्यास योग्य; त्याज्य. **वर्जावर्जी**-स्त्री. गाळागाळ. ' हा वर्जावर्जी करण्यासंबंधीं कायदा. ' -इंमू २५२. [वर्ज द्वि.] **वर्जित**-वि. वर्जिलेला. वर्जणें पहा. **वर्जिता**-वि. निवारण करणारा. ' कोणी वर्जिता नाहीं सबळ । '-कथासा २.२६. **वर्ज्य**-वि. वर्जावयास योग्य,अवश्य, शक्य. **वर्ज्य स्वर**-पु. (संगीत) 'विवादी स्वर' पहा.

वर्जोर—वि. कडक. 'वर्जोर नतिजा. '-रा १५.३८१. [फा. बर्जोर]

वर्ढाणी—वरढाण पहा.

वर्ण—पु. (प्र.) व्रण पहा.

वर्ण—पु. १ रंग; छटा. -ज्ञा ६.९७. -एभा १.१२४. २ समाजांतील वर्ग; जात (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र) -ज्ञा ४.९०. 'समाजाचे वेगळाले संघ तयार झाले तेच वर्ण.' -गांगा २१. ३ (सामा.) संघ; समूह; पंथ; पक्ष. ४ कंठांतून निघणारा स्वर; ध्वनि. याचे चार प्रकार-स्थायी, आरोही, अवरोही व संचारी. ५ (व्या.) भाषेंतीलस्वर-व्यंजनांच्या मालिकेंतील प्रत्येक अक्षर. 'म्हणोनि वर्णत्रयात्मक। जें हें परब्रह्मनाम एक।' -ज्ञा १७.३५३. ६ कसोटीवरील उठविलेल्या सोन्याचा रंग. यावरून सोन्याची प्रत कळते. ७ (अंकगणित) गुणक; पट दाखविण्यासाठीं अक्षर किंवा अंक यापूर्वी घातलेला अंक किंवा अक्षर. (इं.) कोइफिशंट. [सं.] **०क्रम**-पु. अक्षरांचा क्रम; अकारविल्ह्याचा क्रम. **०चतुष्य**-न. चातुर्वर्ण्य; ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार जाती. चतुष्य पहा. **०चिकित्सा-जलचिकित्सा**-स्त्री. निरनिराळ्या रंगांच्या बाटल्यांत ठेवलेल्या पाण्यावर सूर्यकिरणांचें कार्य झाल्यावर तें पाणी औषधासारखें वापरण्याची पद्धत. (इं.) क्रोमोपथी. **०जन्य अपेरण**-न. (शाप.) रंगापायन; रंगापेरण. (इं.) क्रोमॅटिक ॲबॅरेशन. **०धर्म**-पु. १ ज्या त्या जातीला योग्य असा आचार, व्यवहार. २ मनुष्यांचें एक घटक या नात्यानें समाजांतील स्थान आणि तदनुसार त्यांचीं कर्तव्यें, हक्क व जबाबदारी यांचा विचार ज्यांत येतो तो. -काणे धर्मशास्त्रविचार. **०माला**-स्त्री. मुळाक्षरें; अक्षरमाला; मातृका. **०लेखनशास्त्र**-न. ठराविक वर्णांना किंवा ध्वनींना ठराविक संज्ञा किंवा चिन्हें असावीं व ठराविक संज्ञांचे किंवा अक्षरांचे ध्वनि ठराविकच असावे हें मत प्रतिपादन करणारें शास्त्र. (इं.) फोनेटिक्स. **०विचार**-पु (व्या.) वर्णाचा विचार ज्यांत केला जातो तो व्याकरणाचा भाग. **०विपर्यय-विपर्यास-व्यत्यय-व्यत्यास**-पु. (भाषा.) शब्दांतील वर्णांची अदलाबदल स्थानांतर. उदा० डोचकें-डोकचें; महशूर-महशूर, बाराणसी-बनारस. इ० **०विपर्यास**-पु. १ रंगाची विरुद्धता; विरोध. २ रंग उडत जाणें, वाईट होणें. **०व्यवस्था**-स्त्री चातुर्वर्ण्य. **०शः**-क्रिवि. १ जातवार; वर्गवार; वर्णाप्रमाणें. २ अक्षरशः; अक्षरानुक्रमानें. **०संकर**-पु. १ मिश्रजात, वंश. हा प्रथम चार वर्णांच्या व्यभिचारापासून उत्पन्न होऊन, नंतर व्यभिचारसंततीच्या परस्पर संबंधापासूनहि बनत जातो. २ एकंकार; भ्रष्टाकार; वर्णैक्य; सबंगोलंकार 'वर्ण संकर करूं नये।' -दा १४.१.७६. **०संधि**-पु. शब्दांच्या अंतीं किंवा एकापुढें एक येणाऱ्या दोन अक्षरांचा संयोग. **०हीन**-वि जातिहीन; जातीमध्यें समावेश नसलेला. **वर्णाचें स्थान**-न. मुखाच्या ज्या स्थानापासून वर्णाचें उच्चारण होतें तें स्थान. **वर्णांधता**-स्त्री. दृष्टीच्या व्यंगामुळें रंग न ओळखणें. [वर्ण+अंधता] **वर्णानुप्रास**-पु. (काव्य) तेंच तेंच व्यंजन पुन्हां पुन्हां येणें; अनुप्रास पहा. **वर्णावर्ण**-पु. जात असणें व नसणें; भेदाभेद विरहित जात. यातायाती पहा. [वर्ण+अवर्ण] **वर्णाश्रम**-पु.अव. चार वर्ण व चार आश्रम (ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास). 'मग वर्णाश्रमासि उचित।' -ज्ञा ४.९०. [वर्ण+आश्रम] **०धर्म**-पु. वर्णाश्रमाचे नियम पाळण्याविषयीं आज्ञा करणारा धर्म. **वर्णिक**-वि अयोग्य, भलत्याच रंगाची झांक असलेलें (रत्न) **वर्णोच्चार**-पु. वर्णांचा उच्चार. [वर्ण+उच्चार]

वर्णणूक—स्त्री. वाहवा; वर्णन; शिफारस; गुणगौरव. [वर्णणें] **वर्णणें**-उक्रि. १ वर्णन, गुण-कथन करणें; वाखाणणें. २ गुणधर्म, स्वरूप, खाणाखुणा इ० ची माहिती देणें; हकीकत सांगणें. [सं. वर्णन] **वर्णन-ना**-नस्त्री. १ स्तुति; प्रशंसा; गौरव. 'म्हणौनि सद्गुरु वर्णावेना। हे गे हेचि माझी वर्णना।' -दा १.४.३१. २ गुणधर्म, माहिती, विशेष गोष्टी सांगणें; शब्दचित्र. 'तेव्हां चाणक्याची आणखी वर्णना काय करावी?' -चंद्रगुप्त ३६. [सं.] **वर्णनात्मक**-वि. वर्णनपर; ज्यांत वर्णनाचाच भाग आहे असा (निबंध). [वर्णन+आत्मक] **वर्णनीय**-वि. १ वर्णन, प्रशंसा करण्यायोग्य (पदार्थ); स्तुत्य. 'तूं वर्णनीय परी लोभें। मातें वर्णिसी पां सभे।' -ज्ञा ११.५७०. २ चित्रित, लिखित, निवेदित, करण्यालायक. **वर्णित**-वि. १ वर्णिलेलें; प्रशंसिलेलें. २ चित्रित; निवेदित. [सं.] **वर्णुक**-न. (महानु.) वर्णन पहा. 'उपमा श्लोक वर्णुक।' -दाव ११.

वर्णषष्ठी, वर्णसट-ठ—स्त्री. श्रावण शुद्ध षष्ठी. या दिवशीं स्त्रिया ब्राह्मणांना वरण्यांचें वायन देतात. [वरणा+षष्ठी-सटी]

वर्णा—पु. (राजा.) वाल; वरणा पहा. -कृषि ३३१. (अनेक वचनी प्रयोग) वर्णे.

वर्णी—पु. ब्रह्मचारी. [सं.]

वर्त—पु. १ मार्ग; वाट. 'जिणौनि मनातें। जे वळघले ज्ञानाचिया वर्तें।' -भाए १६४. २ बंधन; नाडा. 'अव्यक्ताचा वर्तु सारी। महंतत्वाची खुलि धरी।' -भाए ६०२. [सं. वृत्-वर्त]

वर्त—स्त्री. (महानु.) उटी; उटणें. 'चालेविण पाउलीं। कर्माचिया वर्तें वरि।' -भाए ६०५. [सं. वर्ति]

वर्त—स्त्री. वार्ता; गोष्ट. 'सर्व बाष्कळचि वर्त वितो गे।' -वामन बाळक्रीडा ३८. [सं. वृत्]

वर्तक—पु. १ बेलिफासारखा एक गांवकामदार. २ ग्रामपंचायतीच्या ठरावांची अंमलबजावणी करणारा अधिकारी. ३ सरकारी वजनें मापें पाहणारा अधिकारी. -मसाप २.२.३३. ४ जमाबंदीचा कारकून. -भाअ १८३२. ५ व्यापारी. [वर्तणें] **वर्तकी**-स्त्री. वर्तकाचा अधिकार, वृत्ति. **वर्तकी तपकीर**-स्त्री.न. (वर्तक

नांवाच्या एका हुषार गृहस्थानें पूर्वी पुण्यास चांगल्या तपकिरीचा धंदा सुरु केला त्यावरून) अत्युत्कृष्ट तपकीर.

वर्तणीया—पु. (बडोदें) जागल्या; रखवालदार. ' चौकी पहाऱ्याकरितां पोलिसचे लोक व गांवनोकरापैकीं वर्तणीये वगैरे लोक हजर ठेवावे.' –वाघसिंहाची शिकार २४; –स्वारीनियम २६; ९५. [गु. वर्तणीयो]

वर्तणु—पु. (महानु.) वर्तन. ' जैसा वर्तणु जैसीं आकृती।' –दाव २२. [सं. वर्तन]

वर्तणूक—स्त्री. १ वर्तन; वागणूक; राहाणी. २ जीवन; आयुष्यक्रम; दिवस कंठणें. ' तो काय दुष्ट राजा हो ! त्याचे हाताखालीं प्रजांची वर्तणूक होणें कठीण दिसतें. ' [वर्तणें] **०जामिनी**–स्त्री. पंचायतीच्या निकालाप्रमाणें वागतील अशी वादांतील पक्षाच्या लेहीमंडळीनें दिलेली हमी, जामिनकी. **वर्तणें**–अक्रि. १ वागणें; आचरण करणें. –ज्ञा ४.९३; ' पुत्र वर्ते पितृआज्ञेनें।' २ राहणें; असणें (आंत, वर, कडे). ' नृप चित्र चित्रसेन व्यूहाच्या सबळ वर्तती पृच्छीं।' –मोकर्ण ७.४६. ३ अंमलांत असणें; चालू, रूढ असणें (चाल, विधि). ४ (काव्यांत) घडणें; होणें–ज्ञा १.१३७. ' एकचि वर्तला आकांत।' ५ उपस्थित होणें; उद्भवणें. ' ज्याला वर्तली चिंता।' –ऐपो ४१. [सं. वृत्] **वर्तन**–न. १ वागणूक; आचरण. ' नव्हे आणि वर्तन। ऐसें पैं तें।' –ज्ञा १३.३५६. २ राहाणें; नांदणें; अस्तित्व. ३ धंदा; व्यवसाय; उपजीविकेचें साधन. ' यज्ञा ऐसें वर्तन। जीविकें केलें।' –ज्ञा १७.३३९. [सं.] **वर्तनीय**–वि. (एखाद्या कामाधंद्याला) लावण्याजोगा; कामांत गुंतविण्याजोगा. **वर्तन्य(वि)णें**–उक्रि. १ वर्तणेंचें प्रयोजक रूप. २ (ज्यो.) गणित करून निश्चित करणें (ग्रहण, संक्राति इ०). ३ (खलांत तपकीर इ०) घोटणें. **वर्तित**–वि. चालविलेलें; वर्तविलेलें; व्यवस्था केलेलें. [सं.] **वर्ती**–वि. राहणारा; असणारा; वर्तणारा. उदा० अग्रवर्ती, मध्यवर्ती, पुरोवर्ती इ०

वर्तबान—पु. (मर्तबानबद्दल चुकीनें) बरणी; रांजण. 'गच्चास अवरेना अशी भुई असेल तेथें गच्चीघरें करून थोरथोर कांचेचे वर्तबान, झोलमाठ मडकीं आणून त्यास मजबूत बसक करून त्यांत तेल तूप सांठवावें.' –मराआ ३२. [अर. मर्तबान्]

वर्तमान—न. १ वस्तुस्थिति. ' ऐसें असतां वर्तमानीं।' –गुच १.७१. २ बातमी; हकीकत. ' व्हर्जिनियाकडील कांहीं वर्तमान कळत नाहीं.' –पान्ह १०२. ३ वृत्तांत; कथा. ' मागां समर्थअवतारवर्तमानें।' –सप्र २.१. ४ वर्तमानपत्र पहा. –वि. १ चालू; विद्यमान; हयात; अस्तित्वांत असलेला. ' कै० रावसाहेब रूपासा वर्तमान असतां सेवकासमक्ष चर्चा केली कीं...'–इमं ३३६. २ अमलांत असलेलें; रूढ. ३ (व्या.) सांप्रतचा; चालू (काळ). ४ असलेला; राहिलेला. **०काळ**–पु. (व्या.) विद्यमानीं चालत असणारा काळ; प्रस्तुत काळ. **०पत्र**–न. बातमीपत्र; वृत्तपत्र. **०भविष्य**–पु. एक काळ. कर्त्याच्या मनांत व्यापार करावयाचा आहे परंतु त्यानें अद्यापि त्या क्रियेस आरंभ केला नाहीं असा बोध होणाऱ्या क्रियापदाचा काळ. –म. भा. व्या १६६. उदा० मीं करणार आहे. **०भूत**–पु. एक काळ. भूतकाळीं आरंभलेली क्रिया वर्तमानकाळापर्यंत चालत आहे असा अर्थ उत्पन्न होणारा काळ. –म. भा. व्या १६४. उदा० मी केलें आहे.

वर्तवळा, वर्ताळा, वर्तावळा, वर्ताळा—पु. वरतवळा, वरतवळा पहा. –वाडसमा १.२६८.

वर्ता—शअ. वरता पहा. ' दुजा चरण उभारितां। तो गेला एकवीस स्वर्गावर्ता।' –कथा २.७.१५.

वर्ति-र्ती—स्त्री. १ दिव्याची वात; बत्ती. २ (वैद्यक) सळई; बत्ती. हिचा उपयोग स्त्रियांच्या गुह्येंद्रियांत औषध घालण्यासाठीं होतो. ३ (गर्भाशय इ० चें) छिद्र रुंदावण्यासाठीं केलेली कापसाची वळी; विस्तारक. [सं. वर्त्ती]

वर्तित(करण)—न. (नृत्य) दोन्ही हातांचीं मनगटें आकुंचित करणें व दोन्ही हातांचीं बोटें व्यावर्तित परावर्तित करून हात मांडयावर ठाकणें.

वर्तुल, वर्तूळ—न. (भूमिति) ज्या आकृतीची मर्यादा एकाच वक्ररेषेनें दाखविली जाते, व जीमध्यें असा एक बिंदु असतो कीं, त्यापासुन त्या वक्ररेषेपर्यंत कितीहि सरळ रेषा काढिल्या तरी त्या समान असाव्यात अशी आकृति. –महमा ५. –वि. वाटोळें; गोल. [सं. वर्तुल] **०गति**–स्त्री. वक्ररेषागति; वक्रगति. वर्तुलाकार गती. (इं.) कर्व्हिलिनिअर मोशन. **०पाद**–पु. व्यासावर लंब असणाऱ्या त्रिज्येनें अर्धवर्तुलाचे जे दोन समान भाग होतात त्यापैकीं प्रत्येक; पाववर्तुळ. ' क्षितिज आणि खस्वस्तिक यांच्या मधचें अंतर वर्तुलपादाइतकें असतें.' –मराठी ६ पु. पृ. ३१४. **०मध्य**–पु. मध्यबिंदु पहा. **०मय**–वि. गोलाकृति; गोलीय. (इं.) स्फेरिकल. **वर्तुला(ळा)कार**–पु. १ पूर्णनाश; फन्ना; उध्वस्तता. ' परचक्रानें गांवचा आणि शेतमळे त्यांचा अगदीं वर्तुळाकार केला.' २ पूर्णपणें खलास, खर्च, क्षय; अगदीं अकिंचनता. –वि. वाटोळें; गोल.

वर्त्म—नपु. १ मार्ग; वाट. ' कीं दावी वर्त्म जैसें परमतृषित जो पांथ त्या सदनाचें।' –मो अंबरीषाख्यान (नवनीत पृ. ३६६) २ डोळ्याची पापणी. [सं.] **वर्त्माधबंध**–पु. पापण्यांचा ताठरपणा.

वर्वेळ—स्त्री. १ त्रास; उपसर्ग. वरदळ पहा. २ वापर. ३ येजा; रावता. **०घालणें**–वाद, भांडण करणें. ' मेलमनच्या

हातचा भात व बिस्कुटें झोडून श्रीशंकराचार्यांशीं वर्दळ घालीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ' –आगर ३.१४३.

वर्दावर्द-वर्दी—वरावर्द पहा.

वर्दावर्द-र्दी—स्त्री. १ हातातोंडाशीं गांठ; जेमतेम उदरनिर्वाह. ' वर्दावर्दीवर संसार चालला. ' २ देवघेव; प्रसार; व्यापार. ' धान्याची वर्दावर्दी होती. ' [वर, वरच्यावर !]

वर्दावळ—स्त्री. (चांभारी, कों.) पायांत वहाणा अडकण्यासाठीं असलेली पायाच्या घोटयावरची रुंदट पट्टी. वर्दावळीचीं दोन्ही शेवटें कातडयामध्यें घालून शिवतात.

वर्दी—स्त्री. १ लष्करी पोषाख. २ सरकारी गणवेष. (इं.) युनिफॉर्म. [हिं.]

वर्दी—स्त्री. १ भेटीस आल्याचा निरोप. ' आनकीबाईची वर्दी त्यांना अगोदर पोहोंचली होती. ' –इंप १३. २ बातमी; खबर. ' पाटलाला कांहीं वर्दी मिळाली नाहीं. ' –के १.७.३०. ३ (बडोदें) हुकूम; आज्ञा. ' कारखान्याकडे समजण्याकरितां वर्दीपुस्तकांत हुकूम काढणें. '–ऐरापुप्र २.५. [हिं.] **०पुस्तक**–न. हुकूम लिहून ठेवण्याचें पुस्तक; (इं.) आर्डरबुक. ' उभय खाशांचे वर्दीपुस्तकांत हुकूम काढून... ' –ऐरापुविवि ३०.

वर्ध्दा(र्धा)पन—न. १ वाढदिवस; जयंति. २ या दिवशीं करावयाचा विधि. [सं.]

वर्धक—वि. १ वाढविणारा. २ उत्कर्ष, भरभराट करविणारा. [सं.] **वर्धणें**–अक्रि. वाढणें. **वर्धन**–न. १ मोठें होणें; वाढणें; वाढ. २ भरभराट; उत्कर्ष; प्रगति. ३ (वैद्यक) अंगाची उष्णता वाढविणें. सप्तोपचार पहा. –वि. (समासांत) वाढविणारा; आधिक्य करणारा. उदा० विषयवर्धन; वीर्यवर्धन; बालवर्धन इ०. [सं.] **वर्धनीय**–वि. वाढण्यास योग्य, लायक; वाढवितां येण्यासारखा. [सं.] **वर्धमान**–वि. १ वाढता; मोठा होणारा. २ भरभराटणारा; उत्कर्ष पावणारा. **०गति**–स्त्री. (शाप.) वाढत्या वेगाची गति. (इं.) ॲक्सेलेरेटेड मोशन. **०पिंपळी**–स्त्री. एक औषधी योजना. पहिल्या दिवशीं एक भाग, दुसऱ्या दिवशीं दोन भाग, अशा प्रकारें पिंपळी खाण्याचें कांही दिवस चढवून तशाच क्रमानें उतरवीत आणणें. श्वास, खोकला, क्षय इ० रोगावर हा उपाय करतात. **०संयुक्त हस्त**–पु. (नृत्य) हंसपक्ष हात पाठीला पाठ लावून ठेवणें. **वर्धमानांतर**–वि. (शाप.) फांकणारा; पसरणारा (किरण). (इं.) डायव्हर्जंट. **वर्धावणें**–क्रि. (कों.) चढविणें; खुलविणें (मुलांस). **वर्धित**–वि. वाढलेला. **वर्धिष्णु**–वि. वाढणारा.

वर्धाव—पु. (व. ना.) लग्न लागण्यापूर्वी नवरदेवाकडून नवरीकडे सूचना करण्याकरितां जाणारा मनुष्य. वरधावा पहा. [वर+धांवणें] **वर्धावा**–वरधावा पहा.

वर्पणें—क्रि. ओरपणें पहा. ' वाणी शिखरणी वर्पेतो क्षीरी । ' –सप्र १७.२०.

वर्बडणें, वर्बाडणें, वर्ब(र्बा)डा—ओरबाडणें, ओरबडा इ० पहा. ' बळें गाल सर्वांग तो वर्बडीतो । ' –राक १.५.

वर्म—न. चिलखत; कवच. [सं. वर्मन्] **वर्म-र्मा**–क्षत्रिय जातीच्या नांवापुढें लावण्यांत येणारा प्रत्यय. उदा० कृष्णवर्मा. **वर्मे चर्मे छेदणें**–(कवच, कातडी यांतून पार खुपसणें) आंतपर्यंत, आरपार भेदणें. (ल. व शब्दशः)

वर्म—न. १ नाजुक, हळवा, दुखरा भाग. २ (ल.) नाजुक जागा; मर्म. ' वर्मी खोंचला रुक्मिया । ' –एरुस्व ६.४४. ३ ज्याचा उल्लेख केल्यास राग येतो अशी गोष्ट; बिंग; जिव्हार. ४ रहस्य; तत्त्व; सार. –ज्ञा ५.९६. ' तो आत्यंतिक क्षेमाचें वर्म । भागवतधर्म उपपादी । ' –एभा २.२७७. ५ मख्खी; खुबी; गुह्य. ' देव सख्यत्वें राहे आपणासीं । हें तों वर्म आपणाचिपासीं । ' –दा ४.८.१२; –अमृ ५.५०. ६ बळी पडण्याचें, वश होण्याचें साधन. ' बायकांचें वर्म म्हणजे दागिने. ' –शारदा ३२. ७ महत्त्वाची गोष्ट. ' सर्व कांहीं धर्म आणि कर्माऽकर्म । चुकलिया वर्म व्यर्थ जाती । ' –रामदास, स्फुट अभंग (नवनीत पृ.१५१) [सं. मर्म] **०कर्म**–न. १ उखाळीपाखाळी. ' हांसोनियां काढिति वर्मकर्मा । ' –भा उमारमासंवाद १. २ छिद्र; व्यंग. (बहुधां अनेकवचनी प्रयोग, उदा० वर्मे कर्मे). **०स्पर्शी**–वि. मनाला झोंबणारें; लागणारें (भाषण) –ज्ञा १३.२७०; ' कां वर्मस्पर्शवचनीं निंदितां । मुक्तासी व्यथा उपजेना । ' –एभा ११.४६७. **वर्मणें**–क्रि. वर्म जाणणें ? –अमृ.५.५०. **वर्मी**–वि. १ मर्मभेदक; बोचक; टोंचणारें (भाषण इ०). २ मर्मे, बिंगें, व्यंग, दोष जाणणारा. ३ गूढ, मर्मे, रहस्य जाणणारा (एखाद्या धंद्याचें, यंत्राचें, कृतीचें); तज्ज्ञ. ४ मर्मज्ञ; मार्मिक; आंतला अर्थ, रहस्य जाणणारा (एखाद्या ग्रंथांतील, वचनांतील). ५ कांहीं गुह्य गोष्टी, बिंगें असणारा; वर्म काढलेलें खपत नाहीं असा. 'वर्मी पुरुषास चौघामध्यें सभाकंप सुटतो. '

वर्म—न. गळूं; दुखणें. [अर. वरम]

वर्मणें—वरमणें पहा. ' सखियेचिआं बोला वर्मैली । तें वैदर्भाची बाळी । ' –शिशु २२७.

वर्य—वि. १ निवडण्यास लायक; योग्य; अवश्य. २ मुख्य; प्रधान; श्रेष्ठ. ' जयजय आचार्या । समस्तसुरवर्या । ' –ज्ञा १४.१. [सं] **०पण**–न. श्रेष्ठपण. ' देऊनि पुंडलिका वर्यपण । ' –दावि ३१६. **वर्या**–वि. स्वयंवर करणारी (कन्या). ' जे तुर्या वर्यवर्या सगुणगुणमया आत्मसा–धुर्य धुर्या । ' –मुरा अयोध्या १०१. [सं.]

वर्याळा—स्त्री. एक औषधी.

वर्याळी—स्त्री. वराळी पहा.

वर्षिली—स्त्री. (बे.) नेम; व्रत. [वर्ष]

वर्ष—न. १ संवत्सर; बारा महिन्यांचा काळ; साल. २ सांवत्सरिक श्राद्ध; वर्षश्राद्ध. 'सारी वर्षे प्रयागीं प्रभु पदनिरतां त्यांसि मेटोनि तारी।' –मो रामायणें २१. [सं.; तुल० फ्रेंजि. बेर्स] ०**गणना**–स्त्री. वर्ष मोजण्याची पद्धत. याच्या सौर व चांद्र अशा दोन गणना आहेत. ०**गांठ**–स्त्री. वाढदिवस. (पूर्वी दरसाल जन्मदिवशीं दोरीला एकेक गांठ देऊन त्या गांठींवरून वय मोजण्याची चाल असे). ०**धात**–स्त्री. वर्षाचें सामर्थ्य; वर्षफल (मानवी व्यवहारावर परिणाम करणारें). (क्रि० जपणें; सांभाळणें). [वर्ष+धातु=वीर्य] ०**प्रतिपदा**–स्त्री. चैत्र शुद्ध १; गुढीपाडवा. ०**फल**–न. ज्योतिषाच्या आधारें नव्या वर्षांत घडणाऱ्या गोष्टींचें केलेलें भविष्य (पाडव्याच्या दिवशीं हें वाचतात); वर्षभविष्य. ०**वीण**–वि. वर्षाला विणारी (गाय, म्हैस). ०**वृद्धि**–स्त्री. एकाच राशींत गुरु राहतो तें वर्ष. ०**सण**–पु. लग्नाला वर्ष पूर्ण होतें त्या प्रसंगीं जांवयास दिलेली मेजवानी, अहेर इ०. **वर्षल**–स्त्री. वतन इ० उपभोगण्याच्या पाळीचें वर्ष; उत्पन्नाचें वर्ष –पु. वर्षाचा वतनदार, पाळीदार **वर्षाचा दिवस-सण**–पु. १ वर्ष श्राद्धाचा दिवस. २ वाढदिवस. ३ सणाचा दिवस. (तो दिवस वर्षातून एकदांच येतो म्हणून). 'वर्षाचा हा सण। करावा गोड सख्या आपण।' –प्रला. **वर्षांदिसाचा दिवस**–पु. वर्षाचा दिवस अर्थ १, २ पहा. **वर्षानकाळ-वर्ष**–क्रिवि. १ प्रतिवर्षी. २ अनेक वर्षे (टिकणें, इ०). 'नवऱ्याला सोडून बायकांनीं वर्षानवर्ष माहेरीं राहणें म्हणजे वनवासच होय.' –सवतीमत्सर ९४. [वर्ष आणि (अन्) वर्ष] **वर्षायु**–वि. (खा.) एक वर्ष टिकणारा. कापसाची एक जात. **वर्षास(श)न**–न वार्षिक नेमणूक; उदरनिर्वाहासाठीं ब्राह्मण इ०कास प्रतिवर्षी नियमानें धन, धान्य इ० देतात तें (याबद्दल चाकरी करावी लागत नाहीं) २ दरवर्षी करावयाची गोष्ट, देण्याचें द्रव्य इ० 'तंव इंद्राचें वर्षासन। प्रतिवर्षी करावें हवन।' –कथा ४.५.९३. **वर्षासनदार**–पु. वर्षासन असणारा माणूस; नेमणूकदार. **वर्षिल**–पु. पालटवाटा. –आडिवऱ्याची महाकाली (प्रस्तावना) ११. वर्षल पहा. **वर्षिलदार**–वि. वर्षाच्या पाळीचा हकदार. **वर्षोगणति**–स्त्री वर्षांत, वर्षांनीं मोजणें. –क्रिवि. वर्षांनीं (मोजणें इ०). **वर्षोवर्ष**–क्रिवि. १ कित्येक वर्षे; वर्ष पर्यंत. २ दरसाल. **वर्सल**–स्त्री. वर्षल पहा.

वर्ष—पु १ वर्षाव; वृष्टि. २ पाऊस पडणें; पर्जन्य. 'सांगें वातवर्ष आतपु धरे। ऐसें अभ्रच्छायाचि जरी सरे।' –ज्ञा ५.११४. [सं.; तुल० जि. बेर्श] ०**ऋतु. वर्षर्तु**–पु. षड्ऋतूंपैकीं एक; श्रावण-भाद्रपद या दोन महिन्यांचा काल; पावसाळा. **वर्षण**–न. वृष्टि; पर्जन्य. [सं.] **वर्षणें**–अक्रि. वृष्टि करणें (मेघानें). –उक्रि. (ल.) वर्षाव करणें; फेंकणें (बाण, फुलें, गारा इ०). 'तेथ बाणवंरी धनुर्धर। वर्षताती निरंतर।' –ज्ञा १.१६६. **वर्षा, वर्षाकाल-ऋतु**–स्त्री.पु पावसाळा; वर्षर्तु. –ज्ञा १५.२८५. **वर्षाव**–पु. १ पाऊस. २ वृष्टि; फेंकणें; भडिमार (फळें, फुलें इ० चा) **वर्षित**–वि. वृष्टि झालेला (ल. व शब्दशः). **वर्षावर्षाव** पहा. 'वाढावयालागीं पुढती। सरसावली द्रौपदी सती। जैसा मेघ वर्षोन मागुती। वर्षाव करीअद्भूत।' –ह ३४.२७.

वर्ष—पु. आर्य पुराणप्रथेप्रमाणें खंडाचा विभाग. हे पुढील नऊ आहेतः–कुरु, हिरण्मय, रम्यक, इलावृत्त, हरि, केतुमाला, भद्राश्व, किन्नर, भारत. [सं.]

वऱ्हा—पु. गुळाचा रांधा निवळण्यासाठीं जमीनींत केलेल्या ज्या खांचेंत तो ओततात ती खांच.

वऱ्हा, वऱ्हाय—पुः (अप.) वराह. 'मच्छ कच्छ वऱ्हा आठविना कोणी।' –दावि १५४. 'वसुंधरा कुवडैली। वऱ्हायाची दाढ कसकरैली।' –शिशु ५४१. [सं. वराह]

वऱ्हाड—न. १ लग्न. 'सप्त वर्षे जातीं तत्वतां। चिंतित होती मातापिता। वऱ्हाड केवीं करावें।' –गुच ३५.१२०. –**जगन्नाथ, शके १६६९ ग्रंथमाला**. २ लग्नाची मिरवणूक. (क्रि० काढणें; चालणें). ३ लग्नास जमलेली मंडळी, समुदाय. (क्रि० निघणें; चालणें; जमणें; उतरणें; मिळणें). 'वर नसता व्यर्थ वऱ्हाड। शीर नसतां कायसें धड।'–रावि १.४४. ४ (ल.) मुंग्या इ०चा क्रमानें चालत असलेला समुदाय; मुंग्यांची रांग. [सं. वर+हाट; किंवा वर+आड] **म्ह**० वऱ्हाडास घोडें गेलें तरी त्यास करड. =दुर्दैवी प्राण्यास सर्वच ठिकाणी हाल ०**गोष्टी**–स्त्री अव. १ लग्नासंबंधीच्या गोष्टी, गप्पा, हकीकती. २ पोकळ प्रेमाच्या, सेवेच्या गोष्टी; बढाया. ०**घर**–न. लग्नघर; वऱ्हाड उतरलेलें घर. ०**टक्का**–पु. लग्नावरचा कर. **वऱ्हाडणी-डिणी**–स्त्री.अव. लग्नासाठीं जमलेल्या स्त्रिया. (एव. वऱ्हाडीण). 'नेटका वऱ्हाडी पुढें चालला। वऱ्हाडणी हांसती सकळा।'–ह २४.१०८. **वऱ्हाडणें**–अक्रि. १ विवाहसंस्कारविशिष्ट होणें; लग्न होणें (नवरानवरीचें). २ विवाहसमारंभांत वऱ्हाडी लोकांनीं निमग्न होणें. ३ (ल.) मेजवानींत, आनंदाच्या गोष्टींत अगदीं तल्लीन होऊन जाणें. **वऱ्हाडीक**–पु बोलावणें; आमंत्रण. 'पैं परिसतु आहासि निकियापरी। तेंचि वक्तृत्वा वऱ्हाडीक करी।' –ज्ञा ९.२३८. **वऱ्हाडीकका**–स्त्री. सोयरीक; लग्नसंबंध. 'तयेनें बोधिला अनिरुद्ध। म्हणे आतां करूं संबंध। वऱ्हाडिकेचा।' –कथा १.६.११४. 'तयासी वऱ्हाडिका जालि।' –पंच ४.६. **वऱ्हाडी**–वि. वऱ्हाडांतील, वऱ्हाडाकडला (पाहुणा, नोकर, वस्त्रपात्र इ०). 'सीतासैंवराच्या काजा। सिद्धलाडु गणराजा। पूर्णमोदक पंचखाजा। तूं वऱ्हाडी

आधीं।' –वेसीस्व १.३. –ह २४ १०८. वऱ्हाड पहा. **वऱ्हाडीण**–स्त्री. लग्नासाठीं आलेली स्त्री. वऱ्हाडणी पहा.

वऱ्हाड—न. १ जनावरानें सकाळच्या प्रहरीं उकिरडा फुंकत फिरणें; इरड करणें. २ (ल.) व्यसनीपणाचा क्रम. [विरड] **वऱ्हाडी**-वि. इरड करणारा (बैल, गाय).

वऱ्हाड—पु. एका प्रांताचें नांव. [सं. वराट; सं. विदर्भ-वरदातट; प्रा. वराड] **वऱ्हाडी**-वि. या प्रांताचा, प्रांतासंबंधी.

वऱ्हाडीण—स्त्री. (व.) धान्य उपणतांना भुसा झाडण्याची केरसुणी.

वऱ्हे—शअ. (खा.) वर. 'परिसाचे कसवटीवऱ्हें। जें जें तें तें साडेपंधरें।' –एभा २.४४१.

वल, वलंडणें. वलंडा—ओल, ओलंडणें इ० पहा.

वल—पु. वेळ. –आदिलशाही फर्मानें. [अर. फा. विला]

वल—स्त्री. (व.) १ खणाची घडी; खणाळें. 'या वलींत ४० खण आहेत.' २ हात टेंकून पाय वर करून मारलेली उडी. (क्रि० टाकणें). [सं. वल्]

वलकट—स्त्री. (जुन्नरी) पांघरण्याची पासोडी. [? तुल० सं. वल्कल=वल्ल]

वलखरणें—अक्रि. (प्रां.) १ विसकटणें; विखुरणें (विशेषतः केंस). २ अस्ताव्यस्त पसरलेलें, पडलेले असणें. [वळखर]

वलगणें—अक्रि. वल्गना करणें; रिकाम्या गोष्टी करणें. 'विचारितां निजनिवाडी। कृष्णावीण अर्धघडी। इकडील तिकडे नव्हे कोडी। वृथा वेडीं वलगती।' –एरुस्व १५.११६. [सं. वल्गना]

वलगें—न (महानु.) लगाम; वागुरा. [सं. वल्गा]

वलंज—पु. एक जातीचा मासा. हा एक फुटापेक्षां मोटा असून याच्या सेकर व शिलन अशा दोन जाती आहेत.

वलण—न. (कों.) चिरगुटें टेवण्यासाठीं असलेली पालखीच्या दांडयाच्या आकाराची वेळूची दांडी.

वलद, वलुद—पु. (चा) मुलगा. माणसाचें नांव लिहून संबंधार्थ बापाचें नांव लिहावयाचें झाल्यास मध्यें घालतात. उदा० गुलाम खान वलद याकूबखान. 'सुरज वल्लद वापू जोशी ज्योतिषी वतनदार जुन्नर.' –वाडसनदा ८५. [अर. वलद्. अव. अवलाद]

वलंदेज—पु. (ऐतिहासिक) हालंड देशांतील लोक; डच. 'या विरहित शामल, फिरंगी, इंग्रज वलंदेज, रामनगरकर, पाळेगार, सौंदे, बिदनूर ...आदिकरून संस्थानिक...' –मराआ ३. [इं. हॉलंड. गु. वलंदा=डच]

वलन—न. १ वळणें; हलणें; चलन. २ (ज्यो.) खगोलाच्या ठिकाणीं दोन बृहद्वर्तुलें करतात तो कोन. यांचे अयनवलन, अक्षजवलन, स्पष्टवलन इ० प्रकार आहेत. [सं.] **०ऊर्ध्व**-पु. (नृत्य) अग्रतलपाद करून जानु आंतील बाजूस घेऊन उरु वळविणें. **०तारा**-पु (नृत्य) डोळ्यांचीं बुबुळें बाजूस वांकडीं वळविणें. **वलित(करण)**-न. (नृत्य) उजवा हात अपविद्ध करणें व उजवा पाय सूची करणें. यांत त्रिक फिरविलेलें असतें.

वलभा—स्त्री. आवड! –मनको. [वल्लभ]

वलभी—स्त्री. घराच्या छपरास आधारभूत असलेला वासा, कडणी, इ० 'वलभीवरी गोळांगुळ। अतिविचित्र शोभती।' –मुमभा २.४२. [सं. वड(ळ)भी]

वलय—न. १ कंकण; कडें; बांगडी. २ वर्तुलाकार. ३ (प्राणि.) पृष्ठवंशाचा मणि–मणका. –प्राणिमो ९७ [सं.] **०बाहु**–पु. (प्राणि.) पृष्ठवलयार्धा(टर्गम)च्या दोन्ही बाजूंवर अधोगामी व कंटकांत शेवट पावणाऱ्या दोन भागांपैकीं प्रत्येक. –झाको (क) १९०. (इं.) एक्युॉन. **०रोग**-पु. घटसर्प. **वलयांकित, वलयित**–वि. भोंवतालीं वर्तुल असलेलें; वेढलेलें; वेष्टिलेलें. उदा० समुद्रवलयांकित पृथ्वी. 'मी वलयांकित चक्रवर्ती।' –एभा २६. १३६. [वलय+अंकित] **वलयांकित संघ**-पु. (प्राणि.) जमीनीवर सरपटणाऱ्या प्राण्यांचा एक विशिष्ट संघ.

वलव—पु. (बे.) तोल.

वलवटा—पु वहिवाट; वळण, 'ही गोष्ट जालियास बदनक्ष होऊन आमलाचा वलवटा मोडतो.' –पेद १०.१४२. [सं. वल्]

वलवटी—स्त्री. वळी; सुरकुती. 'टवटवीत गाल नाहिं पडली कुठें वलवटी।' –प्रला ११५ [सं. वल्+वटी प्रत्यय]

वलवण, वलवणें, वलवा, वलसर, वला, वलाचिंब—ओलवण ओलवणें इ० पहा.

वलवणी, वलावणी—स्त्री. वल्हविणें, वलविणें पहा. **वलव(वि)णें, वलावणें**-उक्रि. १ वल्ह्यानें चालविणें (नांव). २ (ल.) पुढें ढकलणें–नेणें. ३ व्यवस्था पाहणें, चालविणें (कामाची). [वलें]

वलवणी—स्त्री. देवीचा कौल घेणें. –अडिवऱ्याची महाकाली १५०. [ओलें]

वलव(वि)णें—सक्रि. (कों. कुण.) ओझें डोक्यावर घ्यावयास मदत करणें, हात लावणें.

वलाट-टी-ठी—नक्रि. १ किनाऱ्यापासून सह्याद्रीच्या पायथ्यापर्यंत चढती जमीन. याच्या उलट खालाटी. 'संतु या वलाठीनें उत्तरेकडे चालतांचालतां कोरलईकरांच्या मुलखांत आला.' –कोरकि १३४. २ कोंकणांत या जमिनीच्या पूर्वभागाला म्हणतात. व खालाटी असें समुद्रालगतच्या भागाला म्हणतात. ३ (कु.) वरचें गांव. [? वरला+ठाय] **०कर**–वि. वलाटीचा रहिवासी.

वलांडणें, वलांडा, वलाणी-णें, वलादंड, वलादुकळ, वलावण, वलाघणें, वलावा, वलास्त्रा—ओलांडण, ओलांडा इ० पहा.

वलाणी—स्त्री. बांधणी; चढवणी. 'जाली पलाणा वलाणी।' –उषा ७३.१९. अवआ. [सं. वलन]

वलादांड—पु. ओला, कोंवळा दांडा (तोडण्याच्या स्थितींत नसणारा). ओलादंड पहा. 'मिरच्यांचा वलादांड आहे.'

वलाव—पु. ओलावा पहा.

वलावा—पु. १ माणसांचा किंवा गलबतांचा तांडा सुरक्षितपणें इष्ट स्थळीं पोंचावा म्हणून अधिकाऱ्याकडून घेतलेला शिपाई, लवजमा इ०. पाटवळ. पावणी पहा. २ यासाठीं अधिकाऱ्यास द्यावें लागतें तें द्रव्य. ३ वलवणी पहा.

वली—पु. १ साधु; संत; सत्पुरुष. २ मालक; धनी; पालक. [अर.] ०**अहद**–पु. १ वारस. २ युवराज. 'अली गोहरचे पुत्रास वली अहद केलें.' –रा १.३६३.० **नियामत-न्यामत**–वि. आश्रयदाता; श्रीमंत (पदवी). 'वलीन्यामत रावसाहेब पंडित प्रधान.' –रा १०.१६५. [अर. वली–निअमत] ०**हद**–पु. वली-अहद पहा. युवराज. 'त्याचे पुत्रास बाहेर काढून वलीहद केलें.' –रा १.३६२. ०**हद्दी**–स्त्री. यौवराज्य. –रा १.३६३.

वली आग-घ, वली कूस, वली खरूज, वलें, वलेटा-ता, वलेटें-तें, वलेंपालें—ओली आग, ओलीकूस इ० पहा.

वलीत—न. वळवून नेणें (गुरें, इ०) वळती पहा. 'मिरजेचा मोगल इसलामपुरास गुरांचें वलीत करावयास आला होता.' –बाडशाछ ५. [सं. वलित]

वलीबाळंतीण—स्त्री. दहा दिवसांतली बाळंतीण. [ओली+बाळंतीण]

वलीस—वि. इवलासा; थोडासा. 'लघु लघु वलीसी।' –कुमुरा ७६.१३. [सं. अल्पीयस]

वलें-ल्हें—न. १ नाव चालविण्याचें लांकडी साधन; नौकादंड; अवलें पहा. २ लहान अवलें; दांडा. ३ (ल.) पोहणें इ० प्रसंगीं हात, पाय इ० शरीरावयव. [सं. वल्] ०**करी**–पु. वल्हविणारा, नावाडी.

वले—उद्गा. आज्ञार्थी रूप. (व.) आटोपा; त्वरा करा. (याची दुसरीं रूपें येत नाहींत). 'वले, आपणाला आणखी पुष्कळ काम आहे.' वल्हा–ल्हे पहा.

वलें—वि. ओलें पहा. ०**अंग**–न. (लहान मूल, आजारी माणूस, नवीन बाळंतीण इ० चें) नाजुक शरीर. 'बाळंतिणीच दहा दिवस वलें अंग असतें.' ०**कोरडें-वाळलें**–न. १ ओलेंकोरडें लांकूड. २ (ल.) खरीं खोटीं विधानें.

वल्क—नपु. १ झाडाची साल; त्वचा; वल्कल. 'झाली तपोवनांत स्वीक रुनि वल्क तापसी ते तें।' –मोवन १३.३०. २ माशाचें खवळ, खवला. [सं.] ०**पर्ण**–पु. (शाप.) खवला; खपली. ०**पक्ष**–पु. पंखाना खवले असणाऱ्या प्राण्यांचा वर्ग. यांत फुलपाखरें, रेशमाचे किडे इ० येतात. –प्राणिमो ११२. **वल्कल**–न. १ झाडाची अंतर्साल, अंतस्त्वचा. २ यापासून केलेलें वस्त्र. 'राम वल्कल जटादिक रीती। वेष तो उभय बंधु करीती।' –वामन, भरतभाव ४९. [सं.]

वल्गणें, वल्गिजणें—अक्रि. वल्गना करणें; व्यर्थ बडबडणें. 'इयें वायांचि सैन्यें पाहीं। वल्गिजत आहातो।' –ज्ञा ११.४५८. [सं. वल्गना] **वल्गना**–स्त्री. १ बडबड; पोकळ भाषण. २ बढाई; प्रौढी मिरविणें; फुशारकी मारणें. 'शशमंडळांत कोल्हा म्हणतो मी सिंह वल्गना करितो।'–मोकर्ण (नवनीत पृ.३३७). [सं.]

वल्गा—स्त्री. लगाम. 'या टोपा कवचाच्या भीमा वल्गा उगेचि आटोपा।' –मोकृष्ण ८६.२५. [सं.]

वल्मीक—नपु. १ मुंग्यांनीं केलेलें वारूळ. 'शिरला भुजांतरीं शर वल्मीकामाजि नागसायकसा।'. २ वातदोषानें मान, गळा, हातपाय इ० ठिकाणीं उत्पन्न होणारा गांठीचा रोग. [सं.]

वल्ल—पु. वाल. 'जो भगवदुक्ति जिवती धरिल न पावेल बाळ वल्ल भया।' –मोमंभा २.११८. [सं.]

वल्लकी—स्त्री. पावा; मुरली. 'मग वल्लकी काढून। श्रुतिस्वर मेळवून। आरंभिलें शिवकीर्तन।' [सं.]

वल्लफ—पु. (व.) एक पांढरा दगड. सफेतीसाठीं हा उगाळून भिंतीला लावतात.

वल्लभ—पु. १ नवरा; पति. 'करी तिच्या वल्लभ सोहळयाला।' –सारुह २.३४. २ प्रियकर; जार. ३ (सामा.) प्रियजन; आवडता माणूस. –वि. आवडता; प्रिय. 'ब्राह्मणभोजन द्वादशीसी। भगवंतासी वल्लभ।' –एरुस्व ४.२०. [सं.] **वल्लभा**–स्त्री. १ पत्नी. २ उपस्त्री; रखेली. ३ (सामा.) प्रिय, आवडती स्त्री. 'तो वल्लभा मी कांतु। ऐसा पढिये।' –ज्ञा १२.१५६. [सं.]

वल्लरी—स्त्री. वेली; वेल. 'ते वल्लरी होशि महाविखारी।' –सारुह ३.१३०. [सं. वल्ली]

वल्ली, वल्ही—पु. १ साधु; वली पहा. 'वल्ली पीर पैगंबर।' –दावि ४७४. २ विक्षिप्त, विचित्र, स्वच्छंदी माणूस; वेडापीर. 'साक्रेटीस हा अथेन्स शहरांतील एक विलक्षण व्यक्ति किंवा वल्ली होऊं लागला होता.' –साक्रेसं ८. [अर. वली]

वल्ली—स्त्री. १ वेली; वेल. –ज्ञा ६.१२. 'यमुनेच्या तिरि झाडें वृक्षवल्ली।' –तुगा ४६. २ (गणित) श्रेणी; माला. [सं.]

वल्ली—स्त्री. (गो.) खळी.

वल्हंडणें, वल्हंडा, वल्हांडणें, वल्हांडा, वल्हाणी, वल्हाणें—ओलंडणें, ओलंडा इ० पहा.

वल्हविणें, वल्हाटी-ठी, वल्हाविणें, वल्हावा, वल्हें, वल्हेकरी—वलविणें, वलाट-टी इ० पहा.

वल्हा—पु. (प्र.) वल्हें, वलें पहा. **वल्ही**-स्त्री. लहान वल्हा. ही बहुतेक चिंव्याच्या काठीस पात बांधून करतात. ही वल्हविण्यास फार हलकी असते.

वल्हा, वल्हे, वल्हेवल्हे—उद्गा. जलदी, चटदिशीं, चला, आटोपा याअर्थी प्रेरकत्वेंकरून प्रयोग. [? सं लघु; प्रा. लहु-वल्हा वर्णव्यत्यासानें] **०करणें**-भाग पाडणें; आग्रह करणें.

वल्हाणें—अक्रि. (व.) निवणें; थंड होणें.

वल्हो—पु.(महानु.) वळु. 'तथा तोचि आवृत्ति सेवी तरी वल्हो आंतु पडे।'-दृष्टांतपाठ ७७.

ववंडा, ववंडेकरी, ववर्णे, ववरा, ववरी, ववळा, ववा, ववांडा, ववाळणी, ववाळाणें, ववी—ओवंडा, ओवंडेकरी इ० पहा.

ववण—स्त्री. ओवणी; गुंफणी. 'अक्षरीं मोत्यांची ववण साधुनी हो।'-प्रला १०९. [ओवणें]

ववर—न. नवदंपती; ओवर; वधूवर पहा. 'ववर जाऊन विडया तोडतात.'-मसाप ४.४.२५६. [वधूवर]

ववसणें—अक्रि. ओंवसणें पहा. संक्रांतीच्या दिवशीं सुग डाचीं वाणें वांटणें. [सं. उपासन; म. वसा]

वव्हण—न. वाहणी; वाहणें. 'उष्ण ना शीतल ऐसें। मृग-जल वव्हणीं असे।'-गीता २.७१३. [सं. वहनि]

वश—वि. १ आधीन; अनुकूल केलेला; ताब्यांत, कह्यांत आणलेला. (क्रि० करणें). 'वश करी मन्मथ सकळाला। पण तो हर जाळी त्याला।'-सौभद्र. २ मंत्रतंत्रांनीं मोहून, भारून टाकलेला, भुरळ पाडलेला. [सं.] **०क्रिया**-स्त्री. १ मंत्रतंत्रानें भारणें, मोहून टाकणें; वशीकरण. २ ताब्यांत ठेवण्याचा प्रकार; स्वाधीन राखणें. **०वर्ती**-वि. आज्ञेंत वागणारा; वश असलेला. 'तेथहि विवेकू परमार्थी। त्याचा वशवर्ती मी असे।'-एभा २०.१६९. **वशांगत**-वि. स्वाधीन झालेला; शरण आलेला; हुकमाखालीं असलेला. **वशता**-स्त्री. अधीनता. (समासांत) पर वशता. **वशंवद**-वि. आज्ञा, स्वामित्व मानणारा. **वशात्**-शअ. (समासांत पूर्वपदीं दुसरा शब्द असतां उपयोग). वश असल्या-कारणानें; स्वामित्वामुळें; सत्तेनें. (सामा.) योगानें; मुळें. उदा० कालवशात्; दैववशात्; द्रव्यवशात्; एतद्वशात् इ० **वशिता, वशित्व**-स्त्रीन. शिवाच्या अष्टमहासिद्धींपैकीं एक. गूढ संस्कारांनीं ही प्राप्त होते. अष्टमहासिद्धी पहा. 'माझे धर्म जेथ वश होती। ते वशिता बोलिजे सिद्धांती।'-एभा १५.४२. **वशी**-वि. १ इंद्रियें स्वाधीन असलेला; संयमी. २ आधीन असलेला; परतंत्र. **वशीकरण**-न. १ मंत्रादि साधनांनीं वश करण्याची विद्या (जारणमारणाबरोबर हा शब्द येतो). २ कोणी आपल्याला वश व्हावा म्हणून जें मंत्रादि साधन करतात तें. 'ती मुग्धा कैसी गे। वळवील स्वामिमन वशीकरणें?'-मोवन ६.६२. **वशें**-वशात् पहा. 'व्योमवायुवशें। वाढिलेनि गर्भरसें।'-ज्ञा १४.९९. **वश्य**-वि. आधीन; अनुकूल; वश असलेला. -ज्ञा १३.१०१२. 'जो वश्य न होय ब्रह्मादिका। तो हो भक्ता स्वाधीन।'-न. वधूवरें इ०कांच्या राशींचें आनुकूल्य; पत्रिका जमणें. **वश्यकर्ण**-वशीकरण (अप.) पहा. 'आकळ सांडून परतीं। लोक वश्यकर्ण करिती।'-दा १५.१.९.

वंश—पु. १ कुल; कुटुंब; गोत्र; वर्ग; जाति. 'तंव यदु-वंशाची वेळुवनें। वनवावी असती।'-भाए ५३. २ प्रजा; संतति ३ वेळू; बांबू. 'त्वरें धाडिलें रावणें नापिकातें। चढे गोपुरी तो धरी वंश हातें।'-मुरा युद्धकांड ७९. **०कांति**-न. (सराफी) एक प्रकारचें माणिक रत्न. हें दुरून पेटलेल्या आगीप्रमाणें दिसतें. **०चरित्र**-न. वंशावळ; वंशाचा इतिहास; कुलवृत्तांत. **०च्छेद**-पु. १ कुलाचा नाश; निसंतान. २ बांबू फोडणें, तोडणें. **०जालवन**-पुन. वेळूचें बेट. 'यदुवंशवंशजाळी। वाढली श्रीकृष्ण कृपा-जळीं।'-एभा १.२३२. **०परंपरा**-स्त्री. कुळांतील लोकांची मालिका (पूर्वज व वंशज यांची); कुटुंबाच्या मागच्या व पुढच्या पिढया. -क्रिवि. एकापासून दुसऱ्याला असें वंशांतल्या प्रत्येक पिढीला प्राप्त होऊन; पिढयानुपिढया. **०परंपरागत-यात**-वि. पिढयानुपिढया चालत आलेलें; आनुवंशिक. -क्रिवि. वंशपरंपरा पहा. **०पात्र**-न. बांबूची परडी, टोपली इ०; झाल. 'भवऐरणी संपादन। कृष्णासी वंशपात्रदान।'-एरुस्व १६.१५८. **०रोचना-लोचन-क्षीर-क्षीरी**-स्त्रीन. वेळूच्या पोटांतील पिठासारखा औषधी पदार्थ. **०वेल**-स्त्री. वेलीप्रमाणें वाढणारा वंश. 'कां पेशव्यांची ही वंशवेल खुडलिस।'-ऐपो ३१३. **०वाद्य**-न. अलगुज; पांवा; मुरली; वेणु. **०वृद्धि**-स्त्री. कुळाची वृद्धि, वाढ. **०क्षय**-पु. कुलनाश. वंशवृद्धीच्या उलट. **०ज**-वि. १ वंशांत, कुळांत जन्मलेला. २ कुळांत मागाहून होणारा, येणारा. याच्या उलट पूर्वज. ३ कुलीन; चांगल्या कुळांत जन्मलेला. **०धर्म**-पु. कुळधर्म; कुटुंबपद्धति. -ज्ञा १.२.४५. **वंशांकुर**-पु. १ वंशांतील एकुलती व्यक्ति; ज्यावर संबंध वंशाची वाढ अवलंबून आहे असें मूल. 'हा एवढा वंशाकुर उरला (राहिला) आहे.' २ कळकाचा कोंब; धुमारा. [वंश+अंकुर] **वंशानुचरित**-न. १ पिढयानु-पिढया, वंशपरंपरा आलेली चाल, रीत. २ वंशावळ; वंशवृक्ष ३ कुळाचा इतिहास. [वंश+अनुचरित] **वंशावलि, वंशा-वळ-ळी**-स्त्री. कुळाची, वंशाची परंपरा, मालिका; **कुळांत झाले-ल्यांची यादी. २** वंशवृक्ष. [वंश+आवलि=ओळ] **वंशिक**-वि. १ वंशासंबंधी; वंशांतील. २ वंशज. **वंशी**-स्त्री. पांवा; मुरली,

'वंशी नादनटी तिला कटितटीं खोवोनि पोटींपटीं ।' –वामन वनसुधा ४.३१. –वि. १ वंशासंबंधी; वंशिक. २ वेळूची केलेली. **वंशीक**–वि. वंशपरंपरागत (चाल, रोग इ०). **वंशीय**–वि. वंशांतला; वंशज. उदा० राजवंशीय; गुरुवंशीय, मातृ–पितृ–वंशीय. **वंश्य**–वि. १ वंशाचा; वंशिक. २ कुलीन. [सं.]

वशट—नवि. ओशट पहा. 'वशट गोड खाल्ल्यानें पोराचे पोटांत एखादा रोग उत्पन्न होईल.'–बाळ २.१८२.

वशां(शिं)ड—न. बैलाच्या मानेजवळील उंचवटा, आवाळूं; कोळें. [सं. वृषस्कंध]

वशा—पु. शेतकामावर देखरेख करणारा, शेत राखणारा इसम; शेताचा रखवालदार. साणा पहा. [अर. वशी]

वशाड—वि. (गो.) १ ओसाड पहा. 'गांव तर आज पांच वर्षें झालीं अगदीं वशाड पडला आहे!'–सह्याद्रि ८९. २ (कु.) वाईट. **वशाडी**–स्त्री. ओसाडपणा; वसाडी. ओसाडी पहा.

वशाड—स्त्री. (कु.) पाण्याच्या लाटा जेथें आपटतात ती जागा.

वशाडी—स्त्री. (कु.) एक प्रकारची वनस्पति.

वशारणें—न. (विणकाम) ताण्याचीं सुतें (समुच्चयानें खळ लावण्यासाठीं पसरलेलीं). **वशारन**–न. अशा पसरलेल्या सुतास खळ लावण्याची क्रिया.

वशाळकी, वशाळगत, वशाळणें, वशाळा, वशाळी, वशाळीक—ओशाळकी, ओशाळगत इ० पहा.

वशियत—स्त्री. १ मृत्युपत्र. २ आदेश; आज्ञा; हुकूम. [अर. वसीयत्] **०नामा**–पु. मृत्युपत्र.

वशिला—पु. १ फायद्यासाठीं मोठ्या माणसांशीं जोडलेला संबंध, वग; मोठ्याचा पाठिंबा, आधार. २ पुंढे येण्यास मध्यस्थ होणारा मोठा, वजनदार माणूस; मध्यस्थ. 'त्यास वशिला करून ...'–रा ३.५५. ३ शिफारस; ओळख. [अर. वसीला] **०वग**–स्त्री. मध्यस्थी; शिफारस; वशिला. 'हिमायत म्हणावी तर वशिला–वग म्हणावा तर स्वामीखेरीज आमचा, आमची गोष्ट बरी सांगेसारखा कोणी नाहीं.'–रा ३.१२३. **वशिलेदार**–वि. वशिला असणारा.

वशिष्ठ—पु. १ एक प्रसिद्ध ऋषि; वसिष्ठ. २ (ल.) शास्त्रें आणि रूढी यांनीं सांगितलेल्या सर्व गोष्टींकडे बारीक लक्ष देणारा माणूस. [सं.] **०वामदेव**–पु. (ल.) व्यवहारी, तसाच अभ्यासी माणूस.

वशी—स्त्री. खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

वशें, वशेंड—न. वशिंड पहा.

वशेट—नवि. वशट, ओशट पहा.

वशेव—न. (कु.) औषध.

वशेळी—वि. वाशेळा, वासाळ. 'हें गवत वशेळी असल्यानें गुरें खात नाहींत.' [वास]

वशेळी—स्त्री. १ नेमनिष्ठ, व्रताचरण करणारी स्त्री. २ लग्नानंतर पहिलीं पांच वर्षें मंगळागौरी इ० व्रताचा वसा असलेली स्त्री; वसाळी [वसा]

वश्यतनामा—पु. मृत्युपत्र. वशियतनामा पहा. 'खंडेराव रास्ते यांनीं मरतेवेळेस मी जवळ नसतां वश्यत्नामा केला त्यांत मला मुखत्यार लिहून ठेविलें.'–भाअ १८३८. [फा. वसीयत्–नामा]

वश्वी—स्त्री. वमवी पहा.

वषट्कार—पु. १ हवन; यज्ञ. २ अग्नींत आहुति देतांना म्हणावयाचा एक मंत्र, वौषट् शब्दाचा उच्चार. ३ (ल.) जाळपोळ; लुटालूट. (गो.) निर्वंश; सर्वस्वी नाश. [सं.]

वषद—पु. (कों. कुण.) विषाद (अप.)

वष्णेवणें—अक्रि. (कु.) झोपेंत बडबडणें. वसण पहा.

वस—वि. ओस पहा. 'वशा गांवांत चिपडी सवाशीण.'

वस—वि. वश पहा.

व(वँ)स—पु १ (कु.) पूर्वज. २ वंश पहा.

वस—अ. (कु.) पादपूरणार्थी अव्यय. 'माझॉ वस काय? =माझें काय?

वस-कण-कन-कर-दिशीं—क्रिवि. वस् असा अंगावर येण्याचा, ओरडण्याचा, रागावण्याचा आवाज करून, होऊन; खसकन; चिरडखोरपणानें. (क्रि० बोलणें; अंगावर येणें). [ध्व. वस्!] **वसकणें**–अक्रि. चिडून, चवताळून, खसकन अंगावर येणें; रागानें बोलणें. 'तो माझ्या अंगावर वसकला.' **वसकाडे देणें**–(व.) हिडिसफिडिस करणें.

वसका, वसकणें—वचका, वचकणें इ० पहा.

वसंग, वसंगळ-ळी—स्त्री. ओसंग, ओसंगळी इ० पहा.

वसड—स्त्री. (वे.) वळचणींतून पाणी जमिनीवर पडतांना वाऱ्याच्या योगानें उडणारे तुषार; ओसाडा. [सं. उत्+सु]

वसंड—न. वशिंड पहा.

वसण—न. नदी–ओढ्याच्या पुराबरोबर वाहून येणारा काटक्या, केर इ० गाळसाळ.

वसण—न. (अप.) वेसण पहा.

वसणणें, वसणवणें, वसणावणें—अक्रि. झोपेंत किंवा वातांत बरळणें, बडबडणें. [सं. स्वप्न?]

वसणें—अक्रि. १ राहणें; मुक्काम, वस्ती करणें. २ स्थळीं, जागी असणें; स्थित, स्थानापन्न असणें (गांव इ०). 'कवण खंडीं कवण देशीं वसत असतो.' ३ वस्तीनें युक्त होणें (गांव, देश इ०). 'प्लेगानंतर आतां कोठें गांव वसला.' [सं. वस्–वसन] **म्ह०** १ मनीं वसे ते स्वप्नीं दिसे. २ सोनें पाहावें कसुन माणूस पाहावें वसुन. **वसतकरू**–पुस्त्री. उतारू; प्रवासी; वाटसरू.

[वसणें + कृ प्रत्यय] **वसता**–वि. १ वस्तीचा; लोक असलेला. –एभा ३.६७९. 'वाटती दशदिशा उदासा। वसतें गोकुळ वाटे ओसा।'–ह २१.१३. २ राहणारा. 'स्वानंद वैकुंठीं सदा वसता। तुझें ऐश्वर्य स्वभावता।' –एभा २१.१. **वसति-ती**–स्त्री. १ रहिवास; मुक्काम. २ राहण्याची जागा, ठिकाण; निवास. **वसतिगृह**–न. १ निवासस्थान; घर. २ (विद्यार्थी, पांथस्थ इ० करितां) राहण्याजेवण्याची जागा; भोजननिवासगृह; खाणावळ. (इं.) होस्टेल. **वसविणें**–उक्रि. १ स्थापन करणें; रचणें. २ वस्ती करविणें. ३ नेऊन ठेवणें. 'वसिष्ठपुत्र एकशत गुणी। जेणें वसविले कृतांतभुवनीं।' –मुआदि १५.१२२. ४ ठेवणें; देणें. 'त्याचि चारी भुजा शोभती। आयुधें वसविलीं हातीं।' –एरुस्व १.४६. ५ वसति करणें, राहणें, प्रत जाणें. 'तेणें वसविलें स्वर्गालय। आतां कवणा पुसावें।' –जै १२.१०६. **वसिन्नणें**–वसणें पहा. –मुआदि ५.१११; –ह २६.१७७.

वसणें—उक्रि. कांहीं धार्मिक व्रत आचरणें (विशेषतः बायकांनीं). 'मंगळागौरी पांच वर्षे वसावी लागते.' [सं. उप+आस्–उपासना; वसा]

वसंत—पु. १ एक ऋतु; चैत्र आणि वैशाख या दोन मासांचा किंवा मीन आणि मेष या दोन संक्रांतींचा काळ. 'हा वसंत म्हणजे सृष्टिसतीची करमणूक नुसती।'–टिक. २ या ऋतूची अधिष्ठात्री देवता. 'सुखकर वसंत सरसावला, किं कोकिळा करि गायनाला।' ३ (संगीत) एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात; जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी तार षड्ज, संवादी पंचम. गानसमय रात्रीचा तिसरा प्रहर व वसंत ऋतूंत सार्वकालिक. याचे आणखी दोन प्रकार आहेत. एकांत आरोहांत पंचम वर्ज्य ठेवतात व दुसऱ्यांत पंचम वर्ज्य करून कोमल धैवताच्या जागीं तीव्र धैवत घेतात. 'वसंत पावक पद्म सुरंग। नीलांबर राग वाजवित।' –ह १०.११७. ४ आर्यवैद्यकांतील एक औषध; सुवर्ण मालिनीवसंत. [सं.] **०खेळणें**–रंग खेळणें. 'जें सिंहासनीं राजत्व जोडे। तें वसंत खेळतां न मोडे।'–एभा ११.७०१. **०ऋतु**–पु. वसंत अर्थ १ पहा. **०कुमार-कुसुमाकर**–पु. एक औषधी रसायन. अनेक भस्में, फुलें, चंदन इ० पासून हा तयार होतो. सर्व रोगांचा यानें नाश होतो.–योर १.५९६. **०तिलका**–स्त्री. एक वृत्त. याच्या प्रत्येक चरणांत १४ अक्षरें असतात व त, भ, ज, ज, ग, ग असे गण असतात. उदा० 'जो मानसीं विहरतो विहरो परी तो।' **०पंचमी**–स्त्री. माघ शुद्ध ५. **०पूजा**–स्त्री. वसंतऋतूंत वसंतमाधवाप्रीत्यर्थ समारंभपूर्वक जी ब्राह्मणांची पूजा करतात ती; मंत्रजागर. **०माधव**–पु. वसंताची अधिष्ठात्री देवता; विष्णु. **०मुखारी**–पु. (संगीत) एक राग. या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी धैवत संवादी ऋषभ. गानसमय प्रातःकाळ. **वसंताचें बोलणें**–न. नुसतें गोड, मिठास भाषण; भारून टाकणारें, फुसलावीचें वचन. 'त्याचें बोलणें म्हणजे वसंताचें बोलणें, मधुर किती म्हणून सांगूं!' **वसंतारंभपात**–पु. उत्तरायणपात पहा. **वसंती**–वि. वसंता (ऋतु-रागा) संबंधी.

वसद—न. (राजा. कुण.) औषध. (–अव.) वसदां. [सं. औषध अप.]

वसन—न. १ कापड; वस्त्र. २ कपडा; प्रावरण; चिरगूट. 'कै उत्तम प्रावणें। कै वसनें तीं जीर्णे।' –तुगा २७१७. ३ राहण्याचें ठिकाण; जागा; घर. [सं.] **०ग्रंथि**–पु. लग्नांत नवरानवरीच्या वस्त्रांना दिलेली गांठ; वस्त्राची गांठ. **०भूषण-णें**–नअव. कपडे व अलंकार; पोषाख; दागीने. 'वसनेंभूषणें सावरून। चापाकडे चालिला रावण।' –रावि ८.७२.

वसन—शअ. १ मतानें; मतें. २ पासून; कडून. [पासून, पासनें अप. ?]

वसनपुजा—स्त्री. (अप.) वसंतपूजा पहा.

वसनवात—स्त्री. (प्र.) उसनवार. 'गांवगन्ना बाकी सालगुदस्तांची वसनवात सरकारची राहिली असेल ...' –वाडसमा १.१६१.

वसनावणें—(व.) वसणणें पहा.

वसपय—स्त्री. (कु.) सावली; काळोख. [वसवा]

वसमरणें-मारणें—अक्रि.उक्रि. (प्र.) वस्मरणें पहा.

वसर, वसरणें, वसरी—ओसर, ओसरणें इ० पहा.

वसला—पु. १ जमीन मोजणीच्या सोयीसाठीं शेताचे, जागेचे जे तुकडे पाडतात ते प्रत्येक. 'वसले म्हणजे ऐक साचार। जैसा जैसा भूमीप्रकार। तुकडे योजीती पैमायषदार। जेणें मोजणी पुरी होय।' –पैमा ६.१४. २ (सामा.) कोणत्याहि जमीनीचा तुकडा; प्लॉट. ३ (चांगलें वस्त्र इ० चा) घडपा; तुकडा; रखट; चिंधी. (बहुधा अव. प्रयोग). (क्रि० करणें; उडवणें) [अर. वसली= तुकडा]

वसलात-द—स्त्री. आनुवंशिक स्वभाव, गुण; वंशांतील, घराण्यांतील एक विशिष्ट चिन्ह, प्रकृति. [अर. वस्ल्]

वसली-ल्या—वि. वसुल करण्यासाठीं ठेवलेला (शिपाई, इ०). [वसुल]

वसवट—पु. वास्तव्य; वसणूक; वसति. 'पवनाचिया नेटा। सर्वेंद्रियां वसवटा।' –सिसं ३२. [वसणें]

वसवस-वसां—क्रिवि. ओरडण्याच्या, चिडून बोलण्याच्या, तुसडेपणाच्या उत्तराच्या आवाजाचें अनुकरण करून; वसकन. (क्रि० बोलणें; अंगावर येणें). 'पुसो जातां वसवस। वक्का करी।' –दा

१८.५.६. **वसवसणें**–अक्रि. ओरडणें; दरडावून, रागानें बोलणें; अंगावर येणें. –एभा ११.१३७४. 'अवली तयासी देखोनि नयनीं । वसवसोनि पाठी लागे ।' [वसवस]

वसवस, वसवसणें—वखवख, वखवखणें पहा. 'अंग मोडुनी उठिला कैसा । भुकें वसवसत तैसा ।' –कालिका २७.४.

वसवसा—पु. १ दरारा; भीति; धास्ती. 'म्हणजे शेटचे महाजन वसवसा न धरितां पेठीची अबादानी करितील. –वाडबाबा २.८५. २ संशय; भीतियुक्त शंका. (क्रि० धरणें, पाळणें, बाळगणें). 'नमन पुरे संकोचासह अंजलि वसवसाहि सोडावा ।' –मोउद्योग १३.१७४. ३ कल्पना; विचार; तर्क. (क्रि० जाणें). [अर. वस्वास, वस्वसा] **०खाणें**–धास्ती घेणें. 'आम्हीहि वसवसा खाऊन निघोन आलों.' –ख ३५२६. **वसवास**–पु. भीति; शंका. वसवसा पहा. 'या गोष्टीचा वसवास जनराल मारनिले याही चितात धराबासा नाहीं.' –पेद ३.६४. **वसवासी**–वि. संशयी; शंकेखोर.

वसवा—पु. १ सावली; छाया; सावट. 'दिव्याच्या वसव्यांत बसूं नये.' २ प्रकाशाच्या आड येऊन सावली पाडणारी वस्तु. [सं. च्छाया]

वसवी-वें—स्त्रीन. कोयता, मुसळ, फाळ इ०स वसवितात ती मांडळ, कडें इ०.

वसवो, वसा—पु. (कु. गो.) संगत; सहवास. 'तुम्ही कांहींहि म्हणा पण त्याचाच वसवो बाधला.' [सं. वास–सहवास]

वसहत-हात—वसात, वसाहत पहा.

वसा—पु. (व.) सुताचा धागा.

वसा—स्त्री. १ मज्जा; मगज. २ चरबी. 'दुधांत एक प्रकारची वसा असते.' –विवि ८.२.२२. ३ अंतस्त्वचा. [सं.] **०मेह**–पु. लघवीचा एक विकार. मेह पहा.

वसा—पु. एक माप, प्रमाण. (१६ आणे=१ विश्वासी, २४ विश्वासी=१वसा) लांकूड मोजण्याचें कोष्टक. –मुंव्या ११४. [अर. वसली]

व(वं)सा-वोवसा—पु. १ (बायकी) स्वतः लावून घेतलेला नेम, व्रत. (क्रि० घेणें; होणें). २ (क.) बाण (संक्रांतीचें); सुघड. [सं. उप+आस्–उपासना] **वसा(सो)ळी**–स्त्री. वसा पूजणारी, व्रत पाळणारी स्त्री.

वसांग-ळ-ळी—ओसंग, ओसंगळ इ० पहा.

वसाड, वसाडी, वसाडींचा लांडगा—ओसाड, ओसाडी इ० पहा.

वसाडा—पु. तुपार; बुरबुर; शिंतोडा; ओसाडा. (क्रि० येणें; लागणें; उडणें). 'वसाडे थांबल्यावर बाहेर पड.' [सं. उत्सृ–उत्सर; सडा]

वसात-द, वसाहत—स्त्री. १ वस्तीचा देश, ठिकाण. २ देशांत वसति, लोक असल्याची स्थिति. वस्ती पहा. ३ परमुलखांत जाऊन राहिलेली वस्ती; देशशाखा. (इं.) कॉलनी. 'हिंदुस्थान व वसाहती यांची नेहमीं तुलना करण्यांत येते.' –के १४.६.३०. [सं. वस्. तुल० अर. वुसूभत्] **वसाहतीचें स्वराज्य**–न. साम्राज्याच्या शाखांना, वसाहतींना मिळालेली राज्यघटना. (इं.) कलोनियल गव्हर्नमेंट. 'वसाहतीसारखें स्वराज्य हें राष्ट्रीय सभेचें प्राप्तव्य आहे.'

वसान—वि. (व.) ओसाड; उजाड.

वसार—पु. (प्र.) ओसर. १ जाण्याकरितां दिलेली वाट. (क्रि० देणें; घेणें). २ वसारा पहा. [ओसर] **वसारा**–पु. ओसरा; ओहटी; कमी होणें (फुगेलेलें पाणी, ताप इ०). **वसरणें**–ओसरणें पहा.

वसिष्टता—स्त्री. (महानु.) (अप.) विशिष्टता; वैशिष्ट्य. 'बोरें अंब्र दोही फळासि वसिष्टता नाहीं. विद्दु नुपजे ऐसे दोन्ही फळ प्रशंसीलें.' [सं. विशिष्टता]

वसु—पु. पोळ. वसू पहा.

वसु—पुस्त्री. मायणी; कडें. वसू पहा.

वसु—पु. एक विशिष्ट देवता. या आठ आहेत. अष्टवसु पहा. –न. संपत्ति; धन. –वि. अष्ट संख्या; आठ. 'कर वसु पद बेविस ज्या वेद स्तन शोभती शिरें सात ।' 'तिथि तरि वसु जाणा ।' –देप ४६. [सं.]

वसुंधरा, वसुधा, वसुमती—स्त्री. पृथ्वी. –ज्ञा ११.६१; १२.१४५. 'धरा धरिली फणिवरें । वरती छप्पन कोटी विस्तारें । वसुंधरा हे ।' –दा ४.१०.३. [सं.] **म्ह०** वसुधैव कुटुंबकम् ।'

वसुआर—न. (महानु.) निवासस्थान; वसुवार पहा. 'हे तुम्हां वसुआर ना ।' –पैठण चरित्रलीळा १४०.

वसुजणें—अक्रि. सुज उतरणें, ओसरणें. [अव+सुजणें ?]

वसुधारा—स्त्री. १ बद्रीनारायणाजवळचें एक तीर्थ. २ (अथ.) धार्मिक संस्कारांत भितीवर पातळ तुपानें पांच किंवा सात रेषा काढतात त्या. ३ पूर्णाहुतीच्या वेळीं अग्निकुंडांत तुपाची अखंड धार धरतात ती; वसोधारा. 'वसुधारा धृतावदान । तेथें तृप्ती न पावे नारायण । तो गौळियांचें घृत चोरून । भक्षून तृप्त जाहला ।' –ह ७.३६. –वि. समृद्ध; अखंड. [सं.]

वसुला-ली—पुस्त्री. तासणी; वाकस. [वसा=तुकडा]

वसुवार—न. निवासस्थान; मंदिर. 'ना तें वसुवारू । अनंगरायाचें ।' –शिशु ६४५. 'सप्तखणांचीं धवलारें । सदीप दिसतीं वसुवारें ।' –कालिका १९.३८. [वसणें]

वसू—पु. डाग देऊन मोकळा सोडतात तो गोहरा, बैल; पोळ. 'वसु जैसा मोकाटु ।' –ज्ञा १३.६९७. [सं. वृष; प्रा. वस]

ह्न० माजला वसु खायास काळ. **०बारस**–स्त्री. आश्विन वद्य द्वादशी; गोवत्सद्वादशी. या दिवशीं एकाच रंगाची गाय व वांसरूं यांची पूजा करतात. **०वसुत्सर्ग, वसोत्सर्ग**–(अप.) वृषोत्सर्ग पहा. 'राजश्री अमृतराव याजकडून कार्तिकमासी वसोत्सर्ग करावयाचें बाईचें मानस आहे.' –पेद ४.१८. [सं. वसु+उत्सर्ग]

वसू–सूं—स्त्रीपुन. गाडीचें चाक, नांगराचा फाळ, मुसळ इ० काच्या तोंडाशीं बसवितात तें लोखंडी कडें; मायणी.

वसूल—पु. १ उत्पन्न; आवक. २ सरकार, सावकार इ० कांस शेतकरी, कुळें यांजपासून आलेला पैसा; कर; खंड; भाडें. ३ शेतसारा. ४ उगवणूक; येण्यापैकीं जमा झालेला पैसा. ५ हप्त्यांनीं येणारी उगराणी. ६ किंमत; मोल. 'गुलामगिरी व तिचें भावंड हीं पुस्तकें कोणत्या वसुलाची आहेत' –नि ४७२; ८०९. [अर. वुसुल] **०दार**–वि. वसुली करणारा; वसुल्या. **०बाकी**–स्त्री. १ वसूल घेणें, घालणें, बाकी काढणें इ० व्यापार. 'सरकारनें ह्या गांवची वसुलबाकी आम्हास सांगितली'. २ वसूल न झालेली उगवावयाची रक्कम. **०बाकीपत्रक**–न. आलेला व यावयाचा वसुल ज्यांत नोंदला आहे ती नोंदवही, रजिस्टर. **०वासलात**–स्त्री. १ वसुलाचा हिशेब. २ वसुल–वासूल पहा. **०वासूल–वसुलात**–पु. १ (व्यापक अर्थी) वसूल पहा. २ वसुलीचा व्यापार; वसूल बाकी अर्थ १ पहा. [वसूल द्वि.] **वसली**–स्त्री उगराणी. –वि. १ वसुलासंबंधी. २ चांगला वसूल यावयाजोगा (गांव, शेत, इ०). **वसुली–ल्या**–पु. वसूलदार. **वसूली आकार**–पु. कमाल आकारांत कमजास्त करून सालोसाल जो ऐनवसूल करतात तो. **वसूलीगल्ला**–पु. वसुलीचें धान्य; धान्याचा खंड. **०जमा**–स्त्री. प्रत्यक्ष उत्पन्न, जमा. याच्या उलट आकारजमा. **०बेरीज**–स्त्री. देणें वगैरे देऊन राहिलेला वसूल; निवळ वसूल.

वसे—स्त्री. विस्तार. 'किल्ल्याची वसे पाहून खुद्द आले.' –ख ११.६१३२. [अर. वस्आ]

वसें—न. (रूढ) वसूं पहा.

वसैठा—पु. (महानु.) घर; स्थान. 'कीं शृंगाराचा वसैठा। –शिशु ४६. [सं. वसति+स्था]

वसोळी—वसाळी पहा.

वसौट–टा–टें—पुन. १ आश्रय; वस्ती. 'ऐसा क्रोधाचा वसैटा।' –एभा ५.१०१. २ आश्रयस्थान. वसैठा पहा. –ज्ञा १.२२८. 'जें मृत्यूचें वसौटें।' –स्वादि १०.३.४८. [सं. वस्]

वस्त—शअ. (व.) कडून; नें; करवीं. 'माझ्यावस्त हें काम होत नाहीं.' [अर. वासित–मध्यस्थ, माध्यम]

वस्त—स्त्री. वस्ती पहा. 'जेथें वसे थोर वस्त। तेथें न प्रार्थितां येती अनर्थ।' [सं. वस्–वसति] **०बांध**–वि. वस्ती करणारा. –शर. **वस्ता**–वि. वस्तीचा.

वस्त—स्त्री. १ वस्तु; जिन्नस; पदार्थ. 'अपूर्व जे का वस्त। आणून मातापितरांसीं देत।' –ह २७.१२२. २ चांदीसोन्याचा दागिना; (सामा.) अलंकार. (अव.) वस्ता याचाच विशेष प्रयोग. 'माझ्या आंगावर कांहीं वस्ता नाहींत.' –सिंव १४. [सं. वस्तु] **०भांव–वानी**–स्त्री. १ (व्यापक) दागदागिने; अलंकार. २ घरांतील किरकोळ सामान; चीजवस्त. 'बयाबाईंची वस्तवानी वगैरे...' –वाडसमा ३.६४. ३ प्रवासाचें सामान.

वस्तर—न. (व.) वस्त्र (अप.) पहा.

वस्तरा, वस्तारा—पु. वस्त्रा पहा. [फा. उस्तरा]

वस्तरें—न. (गो.) ट्सका. उस्तरें पहा. **वस्तऱ्या, वस्तेरां जाणें**–पातळ पदार्थ पितांना घशांत अडकणें; उलट्न पडणें.

वस्ताद—पु. १ विद्या–कलादिकांमध्यें निष्णात, पटाईत, वाकबगार. २ शिक्षक; गुरूजी; अध्यापक (विशेषतः गायन, व्यायाम, नृत्य या कलांचा.). 'वस्ताद गंगु हैबती तेथील रहिवाशी।' –प्रला १९४. ३ दमनकर्ता; तोडीस तोड असणारा माणूस; शेराला सवाशेर. ४ कावेबाज, धूर्त मनुष्य. [अर. उस्ताद्] **०गिरी**–स्त्री. वस्तादाचें, गुरूचें काम, धंदा. २ चातुर्य; कौशल्य. ३ धूर्तता; कावेबाजी; लबाडी. **वस्तादी**–वि. वस्तादापासून मिळालेली (गायनादि विद्या). –स्त्री. १ प्रावीण्य; मर्मज्ञता. 'पीळ पेच अर्ध अक्षरांत वस्तादीचे।' –प्रला ६२. २ धूर्तता; कावेबाजपणा. [फा. उस्तादी]

वस्ति—स्त्री. १ ओंटीपोट. २ मूत्राशयाच्या चर्माची पिचकारी. [सं.] **०शोधन**–न मूत्रेच. [सं. बस्ती]

वस्ती—स्त्री. १ वास; राहणें. वसति पहा. २ निवास; घर. ३ लोक राहात असलेली; ओसाड नसलेली स्थिति (गांवाची). ४ लोकसंख्या. [सं. वसति] **०करू–कर**–वि. प्रवासी; वाटसरू. 'अहो जीवु एथ उखिता। वस्तीकरू वाटे जातां।' ज्ञा–१३.३४. 'देखोनिया राजमंदिर। सुरावाड न घेती वस्तिकर।' –भवि १४.६४. **०वाडी**–स्त्री. १ लोकवस्ती असणें. २ संतति; प्रजा. **वस्तीस राहणें**–एखाद्या ठिकाणीं मुक्काम करणें, प्रवासांत उतरणें.

वस्तु–स्तू—स्त्री. १ पदार्थ; जिन्नस; चीज. वस्त पहा. २ काम; व्यवहार; गोष्ट. ३ परब्रह्म; ब्रह्म. –ज्ञा ६.७१. 'वस्तु प्रगटची असे। पाहतां कोणासीच न दिसे।' –दा १.५.३. ४ नाटकाचें कथानक, विषय. ५ (संगीत) चीज. (सं. शब्दाचें लिंग नपुं. आहे पण मराठींत हा शब्द नेहमीं स्त्रीलिंगीच वापरतात). [सं. वस्तु] **०कथन**–न. खरी हकीकत; सत्यस्वरूप सांगणें. **०गत्या, वस्तुतः**–क्रिवि. १ वास्तविक; खरें पाहतां; परमार्थतः. २ स्वभावतः; मूळपासून. 'इंग्रजींत घोंटाळा नाहीं असें नाहीं. सर्व भाषांत वस्तुगत्याच असायचा.' –नि १२९. **०चित्रलेखन**–न. चित्रकलेचा एक प्रकार. समोर ठेवलेल्या पदार्थांचें चित्रण. (इं.) मॉडेल

ड्रॉईंग. **०जात**-न. पदार्थमात्र. 'मग पासींच असतां न दिसे । वस्तुजात ।' -ज्ञा २.५६. **०तत्त्व**-न. (तत्त्व.) कल्पना. -साक्रेसं २८१. **०पाठ**-पु वस्तूची सप्रयोग माहिती देणें; अध्यापनाचा एक प्रकार. (सामा.) धडा. 'कायदा मोडायचा वस्तुपाठ हवा.' -के २६.७.३०. **०मात्र**-न. १ आराखडा; सांगाडा (संवाद, निबंध इ० चा). २ वस्तुजात पहा. **०लाभ**-पु. (लग्नांत) चांगली वधू मिळणें. 'बाकीच्या गोष्टींकडे पाहाण्याची जरूरी नाहीं वस्तुलाभ पहा.' **०वाद**-पु. (तत्त्व.) वास्तववाद; (इं.) रिआलिझम. **०शक्ति-स्वभाव**-स्त्रीपु. पदार्थाच्या ठिकाणची नैसर्गिक शक्ति; निसर्ग-प्रकृतिप्रवृत्ति; नैसर्गिक गुणधर्म. **०सत्ता**-स्त्री. खरें, सत्य अस्तित्व; असृष्ट, स्वतंत्र वस्तु (म्हणजे ब्रह्म, परमेश्वर). याला विरोधी व्यावहारिकसत्ता व प्रातिभासिक सत्ता. **०सिद्धि**-स्त्री. (कायदा) झालें तें सशास्त्र हा न्याय. (इं.) फॅक्टम व्हॅलेट. **०स्थिति**-स्त्री. खरा प्रकार; खरी गोष्ट. **०स्थितिकथन**-न. खरी, वास्तविक गोष्ट आहे ती सांगणें. **०स्थितिविचार**-न. खऱ्या गोष्टीचा शोध, विचार **०स्वरूपवाद**-पु. वस्तुवाद पहा. **वस्तूक**-स्त्री. खेळणें; खाऊ (मुलास खेळण्यासाठीं दिलेला). **वस्तूपपाद्य**-न. सिद्धांत [वस्तु+उपपाद्य]

वस्तु-स्तू—शअ. कडून; गुजारतीनें; हस्तें. वस्त पहा. माझे वस्तू होईल-जावेल.' 'यांचे वस्तू आपले सर्बरा होऊन साध्य घडावयाचे नाहीं.' -मराचिप १४. वस्त पहा.

वस्त्र—न. १ कापूस, रेशीम, लोंकर इ० चें कापड. २ कपडा; अंगावर घेण्याची, नेसण्याची वस्तु; प्रावरण; चिरगूट. ३ पोषाख. **वहo** १ लाभ पांचाचा आणि वस्त्र दाहाचें. २ वस्त्राआड जन नागवें. ४ देवास वाहतात ती सूत पुतळी. [सं.] (वाप्र.) **०आड करणें**-लज्जारक्षणासाठीं नेसणें. 'जुनेर आड करून चार लोकांत कसें बरें यायचें बाहेर!' -एकच प्याला. **एका वस्त्रानें निघणें**-(अंग शब्दाच्या पोटांत) एका अंगवस्त्रानें निघणें पहा **वस्त्रें देणें**-दिवाणगिरी इ०चा अधिकार देणें. **काळीं वस्त्रें देणें**-पदच्युत करणें; काढून टाकणें. (शब्दशः व ल). **वस्त्रें होणें**-१ अधिकार प्राप्त होणें. २ (विपरीतल.) अधिकारावरून दूर होणें. **वस्त्रांतर होणें-करणें**-पोषाख बदलणें. **०गाळ-गाळीव**-वि. कपड्यांतून गाळून घेतलेलें. **०गोपन**-न. एक कला; वस्त्रें नेहमीं नवीं राहतील अशा युक्तीनें ठेवणें. **०परिधान**-न पोषाख चढविणें, करणें. **०पात्र**-न. नेहमीच्या व्यवहारांतील भांडीं कुंडीं, कपडे लत्ते इ०; सामानसुमान. **०प्रावरण**-न. (व्यापक) कपडालत्ता; वापरण्याचे कपडे. **०प्रासाद**-पु. तंबू. 'वस्त्रप्रासादीं शुभशयनीं जातांचि भागला पहुडे ।' -मोकर्ण ३९.४. **०लोचन**-न. (प्र.) वस्त्रलुंचन; वस्त्रें लुबाडणें, चोरून नेणें; नागविणें. **०विलास**-वि. नटवा; उंची, सुंदर पोषाख करण्यांत आनंद मानणारा. **०हरण, वस्त्राहरण**-१ वस्त्र बुचाडणें, फेडणें. 'द्रौपदीवस्त्रहरण.' २ वस्त्रें चोरून नेणें, लुबाडणें. **वस्त्रागार**-न तंबू. 'निर्मिऊन पैलाडी वस्त्रागार ।' -दावि ३९१. **वस्त्राचा ताणा**-पु. वाळत घातलेल्या कपड्यांची रांग. (क्रि० लावणें). **-वस्त्रें भूषणें**-न.अद. कपडे; अलंकार; कपडेलत्ते, दागदागिने. 'तिला वस्त्रेंभूषणें घालून संतोषित केलें' -कमं २.

वस्त्रा—पु. १ केंस काढावयाचें एक शस्त्र; वस्तरा. २ (ल.) कडकडीत विद्वान्, पंडित. ३ निस्पृही मनुष्य. ४ तिखट, झोंबणारें भाषण; मर्मभेदी, जहाल शब्द. [फा. उस्तुरा]

वस्नावणें—क्रि. झोपेत बरळणें; वसनावणें पहा. 'किंकाळी फोडुनी पवित्रा विचित्र वस्नावली' -शशिमोहन. [सं. स्वप्न]

वस्मरणें, वस्मारणें—अक्रि. १ तक्रार करणें; कांहीं दुःख, अडचण यांविषयीं बोलणें; आटवण करून उगाळीत बसणें. उस्मरणें पहा. २ (-उक्रि.) सारखें आठवणें, पुढें आणणें. ३ वयणें आणि वदणें पहा. फाजीलपणें, मुर्खपणें बोलणें. ४ फोडणें; तोंडाळणें. ५ झोपेंत बरळणें. [सं. उत्+स्मरण] **वस्मरा, वस्मारा, वस्मा**-उस्मारा पहा.

वस्वसा, वस्वास—पु. १ भीति; काळजी. २ अंदेशा; संशय. 'जहाले कामाचा वस्वसा न धरितां समर्थी महाराजांचा मनोरथ सिद्धीस नेणें.' -चित्रगुप्त ५. ३ पर्वा ४ (मुंबई) चाहूल. वसवसा पहा. [अर. वस्वास्, वस्वसा] **वस्वासी**-वि. वसवासी; संशयी. 'आईसाहेब (ताराबाई) वस्वासी फार.' -पया ३२३.

वस्वी-स्वें—स्त्री.न. लहान लोखंडी कडें; मांडळ. वसवी पहा.

वह—पुन. मान व खांदा यांमधील अंतर. -अश्वप १.६२.

वहट-टी—पु.स्त्री. ओहट टी पहा. **वहटणें**-अक्रि. ओहटणें पहा.

वहड, वहडणें—ओढ, ओढणें पहा.

वहडास—पु. (कातोडी) नवरा. -बदलापूर १२८.

वहणें. वहाणें—उक्रि. (प्र.) वाहणें पहा. [सं. वहन] **वहन**-न. १ वाहून नेण्याचें साधन; गाडी; वाहन पहा. २ वाहून नेणें; एकीकडून दुसरीकडे पोंचविणें, नेणें. ३ (पदार्थ.) उष्णता, वीज इ० वाहणें, जाणें. (इं.) कंडक्शन. [सं.] **वहनीय**-वि. वाहून नेण्यालायक, नेण्यास शक्य, योग्य. [सं.] **वहित**-वि. १ वाहिलेलें; नेलेलें. २ (शेत.) लागवडीस आणलेली, लागवड केलेली (जमीन) -न. लागवड. [सं.]

वहन काढणें—क्रि. (व.) पुष्कळ चोप देणें. 'खूब वहन काढलें त्यांचें!'

वह(हि)मा—पु. १ शंका; संशय; किंतु. (क्रि० धरणें; येणें). 'ह्या कारणास्तव त्यांचा कोणास वहमा येत नाहीं.' -मराठी ३ पु. (१८७३) पृ २०. २ भय; धाक. 'करवीरच्या

राजकारणाचें दृढीकरण जाहलें म्हणजे यजमानास वहमा पडेल कीं यांस भारी आसरा जाहला.' -ख १.१७२. ३ (लोकांची) समजूत; कल्पना (चांगल्या किंवा वाईट अर्थानें). क्रि० असणें; होणें). वहीम पहा. [अर. वहंम्]

वहमाय—स्त्री. (लग्नांत) वधूची आई. वहूमाय पहा [सं. वधू-माय]

वहर—न. वधूवर. वहूवर पहा.

वहळ, वहळणें, वहळी—ओहळ, ओहळणें इ० पहा.

वहाटळ, वहाट्टळ—स्त्री. (व.) वावटळ पहा.

वहाडणें—वाढणें पहा.

वहाण-ळ—स्त्री. १ नदी इ०चा प्रवाह; पाट. २ ओढा; नाला. [वाहणें]

वहाण—स्त्री. पायतण; चप्पल; पादत्राण. 'वर्णिल कोण शहाणा, आपण काठी करीं पर्दीहि वहाणा।' -मोकृष्ण १३.२१. [सं. उपानह; प्रा. वाहणा] **म्ह०** पायींची वहाण पायींच छान= ज्याच्या त्याच्या योग्यतेनें वागवावें. **०धर**-वि. जोडे उचल्या. 'जीवें संतांचें होत वाहण धरू.' -ज्ञा १३.११३२.

वहाणी—स्त्री. (नाविक. कु.) संकटाच्या वेळीं माल समुद्रांत फेंकणें. [सं. वहन]

वहाणी, वहाणें, वहाता, वहाती कूस, वहावट, वहावटळ, वहावण, वहावणी, वहावर्णे, वहावरा, वहाळी—वाहणी, वाहणें इ० पहा.

वहाणें—क्रि. (माडी) काढणें व विकणें. -मसाप ४. ४.२५३.

वहादन—न. (व.) तुफान वारा. 'एकदम वहादन सुटलें त्यामुळें स्वयंपाक सुचेना.'

वहारी—स्त्री. (खा.) सून. [सं. वधू; म. वहू]

वहावट—स्त्री (प्र.) वहिवाट पहा.

वहाविणें—उक्रि. १ वाहवणें पहा. २ लागवड करणें. 'मग अहंकारासि एकलाधी। करूनि जीवितावधी। वहाविलें बुद्धी। चराचर।' -ज्ञा १३.४९.

वहाळ वोहळ—पु. लहानमोठे नाले; ओढे. 'जैसे तंवचि वहाळ वोहळ। जंव न पवती गंगाजळ।' -ज्ञा ९.४५८.

वहिनी—स्त्री. (आदरार्थी संज्ञा) वडील भावजय. 'एक म्हणे भात आणी। एक म्हणे आजि हरिदिनी। एक म्हणती एका हो वहिनी।' -ह ३४.५०. [वे. प्रा. वहुण्णी. सं. वधू; प्रा. वहू; सं. भगिनी?] **वहिनक**-स्त्री. (वंजा.) नवऱ्याची वडील बहीण. [वहिनी+मका] **वहिन्स**-स्त्री. (ना.) नवऱ्याची बहीण; नन्स पहा.

वहिमा—वहमा पहा. **वहिमी**-वि. ज्यावर वहीम आहे असा; संशयास्पद वर्तनाचा. 'वहिमी जाती मध्यवस्तींत टेवणें धोक्याचें असतें.' -गांगा ४.

वहिला-ली-लें—विक्रिवि. (जुन्या काव्यांतून हा शब्द अनेक ठिकाणीं येऊन त्याचे अनेक विविध अर्थ संभवतात). १ सत्वर; लवकर; तातडीनें. 'तरि वहिला धावे जंव आहे। कंठीं प्राणु।' -ऋ ३३. -एभा २२.६२६. 'माझेनि वर्तृत्वें ब्रह्मांड जालें। मी जें करीन तें होईल वहिलें।' -स्वादि १०. १.३६. २ आधीं; अगोदर; प्रथम. 'टाटाओनी बांधा वहिला। एन्हवी जाइलु हा।' -शिशु १३१. 'श्रवण करीं तूं बरें अंतरीं घे समजून वहिली।' -होला १३. ३ एकदां. 'याजी घृत खेळों वहिलें। अवश्य म्हणे कृष्णाप्रज।' -ह ३२.६५. [सं. प्रथम; दे. प्रा. वहिल्ल=शीघ्र; गु वहेलो; म. पहिला]

वहिला-लें—वि.क्रिवि. खरोखर; निश्चयानें. 'त्याचा दास मी जाण वहिलें। करीन कंदन लंकेचें।'

वहिला—वि. १ स्वतंत्र; निराळा. वायला पहा. 'करी माळा घेऊनि रडे बाळा। कृष्ण झाला सांग हो काय वहिला।' -व ५५३. २ सुंदर; चांगला. 'वर्टी पितांबर कास मिरवली। दाखवी वहिली ऐसी मूर्ती।' -तुगा ८२८.

वहिली—स्त्री. बुरख्याची गाडी; मेणा; डोली. **०महाल**-पु. रथशाळा; गाडीखातें. -भाअ १८३४. **वहिलवान**-पु. सारथि. -राज्य ५ ३८. **वहिलेपण**-न. वाहण्याचा वेग. 'तया पाणियाचेनि वहिलेपणें। अझुनी न धरिती बोभाणें।' -ज्ञा ७.८१.

वहिवट, वहिवटणें—वहिवाट, वहिवाटणें पहा.

वहिवाट—स्त्री. १ कारभार; व्यवस्था; (काम, धंदा इ०) चालविण्याचा व्यापार. 'दिवाणगिरीची वहिवाट आम्ही करूं आणि अकातीची वहिवाट ते करतील.' २ कारभारांतील, व्यवस्थेंतील कौशल्य, हातोटी. ३ कारभाराचा अहवाल; कामाची नोंद; वहिवाटपत्र. ४ व्यवहार; धंदा; दळणवळण. ५ उपभोग; वापर; भोगवटा. 'शंभर वर्षे या वृत्तीची वहिवाट मी करीत आलों.' 'शालजोडी नेहमीं वहिवाटींत पाहिजे, नाहींतर कसर लागेल.' ६ चाल; रिवाज. 'तिकडेस जाण्यायेण्याची आमची वहिवाट नाहीं, मग ते कोठून आढळतील?' ७ जाणेंयेणें; परिचय; सहवास. [सं. वह्+वृत्; प्रा. वहवट्ट] **०दार**-पु. १ कारभारी; व्यवस्थापक; (इं.) मॅनेजर. 'केसरी छापखान्याचे वहिवाटदार रा० धोंडोपंत विद्वांस यांजकडून २॥ हजार रुपये घेण्यांत आले.' -के १०.६.३०. २ प्रतिनिधी; मुखत्यार; एजंट; मालकासाठीं जबाबदारीनें काम पाहणारा. ३ (वतनी कायदा) वतनदारांपैकीं प्रत्यक्ष काम पाहणारा वतनदार. ४ (गु.) मामलेदार; वसुलीकामगार. ५ (कायदा) कोर्टानें नेमलेला कारभारी; रिसीव्हर. **०खत**-पु.

(कायदा) चालू वहिवाटीनें, भोगवटयानें प्राप्त होणारा हक्क. (इं.) प्रिस्क्रिप्शन. **वहिवाटणें**–अक्रि. १ सहवास, संबंध, वहिवाट ठेवणें; व्यवहार करणें. 'असा चोरा मोरा किती दिवस वहिवाटणार?' –सूर्यप्र १२९. २ पार पडणें; निभावणें (संकट, नोकरी, वहिवाट इ०त). 'म्हणूनीयां काळजी फार वाटे। कसें मोठें हें विघ्न वहीवाटे।' –कीर्तन १.६०. ३ वहिवाटीखालीं चालणें; ताब्यांत, दिमतींत असणें. 'ती खोली त्या तिघांच्या वहिवाटीस लागली होती.' –विवि ८.२.२८. ४ संवय होणें. 'हा घोडा लष्करांत वहिवाटलेला आहे.' –उक्रि. १ कारभार पहाणें; व्यवस्था करणें, चालविणें. 'सरकारी हुद्देही त्यानें सचोटीनें वहिवाटल्यावरून त्याचा लौकिक वाढत चालला.' –नि २८२. २ वापरणें; उपभोग घेणें; वहिवाट करणें. ३ ठेवणें; कामाला लावणें; सरावाचा करणें. ४ निवारणें; बाजूला सारणें (संकट इ०). ५ उपभोग घेणें (स्त्रीचा.). **वहिवाटी, वही घटी**–वि. वहिवाटींत, रोजच्या उपयोगांत असलेला (दागिना इ०). –स्त्री. वहिवाट. –ज्ञा ११.४.२६.

वही—स्त्री. १ जमाखर्च, नोंद इ०ची चोपडी. 'विसाळा भाळाचां वहिवटीं। भणानि प्रकृति सठी।' –ऋ ९७ २ कांहीं कागद एकत्र टांचून बांधलेली चोपडी; कोरें पुस्तक. ३ पुस्तक; बूक; लघुग्रंथ. ४ दफ्तर. 'पैं जीवाचें कसी उतरली। ते दासी कीं गोसावीण जाली। सिसे वचि तया मविली। वही जयीं।' –ज्ञा १८.९१२. ५ हिशेब; व्यवहार. 'अर्जुना जिये ठायीं। न सरे त्रैताची वही।' –ज्ञा १३.९३८. [दे. प्रा. वहिया; हिं. वही] (सामासांत) खातेवही; पावतीवही; रोजकीद वही इ०.

वही—स्त्री. १ (लग्नांत) वहुल्याभोंवतीं उतरंडी रचण्याकरितां आणतात तो मडक्यांचा समुदाय. बहुलें पहा. २ या समुदायांतील एक मडकें. 'बहुल्याच्या उतरंडींतील एक वही फुटली आहे' **वहीवरून अंबट होणें**–(बहुल्याच्या चार कोंपऱ्यास प्रत्येकीं पांच पांच मडक्यांच्या चार उतरंडी असतात; लग्नानंतर या कोणी दोन वरपक्षाकडे जातात, यावेळीं भांडण होतें त्यावरून) क्षुल्लक कारणासाठीं भांडण. 'लग्न झाल गोड पण वहीवरून झाला अंबट, हें काय?' [सं. वृत्ति]

वही—स्त्री. १ कुंपण. वई, वय, वै. 'त्याचा एकांत व्यर्थ देख। जैसें वहीस बेसले मूषक।' २ अटकाव; प्रतिबंध. (क्रि० घालणें). सं. वृत्ति; प्रा. वइ] **०वाडा**–पु. वयवाडा पहा.

वहीत—वि. लागवडींत असलेली, आणलेली (जमीन, शेत, इ०). –वाडमा १.२३. **०जमीन-शेत**–स्त्री.न. लागवडीची, पीक येणारी जमीन, शेत.

वहीन, व्हैन—न. (बे.) उखळ. [फा. हावन]

वहीम—पु. वहमा पहा. [अर. वह्म्]

वहीरान—वि. वैराण पहा.

वहू—स्त्री. १ वधू; बायको; नवरी. २ सून. [सं. वधू; प्रा. वहू; गु. वहु] **म्ह०** वहू नाहली आणि वाफा शिंपला. **०माय**–स्त्री. (लग्नांत) नवरीची आई; वधूमाता. 'अवधानकळा ते वरमाय। वक्तृत्वशक्ती ते वहूमाय।' –मुआदि ४३. ७५. **०वर**–न. नवरानवरी (विशेषतः लग्नानंतर देवदर्शनास जातांना योजतात); ओहर पहा. 'वहुवर बैसले पंगतीं।' –वसा ५२. **०वरजत्रा-भरणी-भरणें**–स्त्रीन. लग्नानंतर कुलधर्माप्रमाणें जोडप्यानें देवदर्शनास जाणें. **वहुळ्या**–स्त्री.अव. (ठाकूर) लग्नांत रांजण भरणाऱ्या बायका. –बदलापूर १४८.

वहेचणी—स्त्री. वांटणी. –मौज २.६.३०. [गु.]

वह्नि—पु. १ अग्नि; विस्तव. वन्हि पहा. २ जठरानल; कोठ्यांतील आग. यामुळें अन्न पचतें. [सं.]

वह्या, वह्याताड—वि. (व.) वेडा; पागल. [वाह्यात्]

वह्याळ-ळी—स्त्री. खेळ; क्रीडा. 'तिहीं अवस्थाचिया वह्याळी। दावी जें जीवा।' –ज्ञा १८.५४१.

वळ—पु. १ मांडया, काखा, कान इ०च्या संधिप्रदेशीं असणारें लांबट उठावूं. २ हात, पाय इ० अवयवांस वायुविकारानें उत्पन्न होणारी व्यथा; वांब. ३ –पु.स्त्री. काठी इ० मारल्यानें अंगावर उठणारें त्या आकाराचें चिन्ह; वण. [सं. वल्] **०वाणें**–न. वळ; वण; खूण. 'त्या धगधगीत सुदर्शनें। दैत्य हाणिला पंचाननें। परी आंगीं नुठेचि वळवाणें। जालंधरासी।' –कथा ५.५.६९.

वळ—पु. १ दोरी, सूत इ०स असणारा पीळ. २ (बुरूडकाम) टोपलीच्या तोंडाला तीन कामटयांचा देतात तो गोठ. ३ वळवळ; तळमळ; अतिशय उत्कंठा. [सं. वल्; म. वळणें] **वळई**–स्त्री. १ भूस इ० ठेवण्यासाठीं करतात ती वाटोळी, भोंवतालून बंद केलेली जागा. २ भूस इ०ची वाटोळी, भोंवतालून कडब्याच्या पेंढया लावलेली रास. ३ कडबा, गवत, कणसें न खुडलेली ताटें इ०ची रास, गंज, गंजी. 'तृणाचे वळई माजी देखा। कैशी उगी राहे दीपकलिका।' –रावि १५.११८. ४ वळी; वळकटी. [सं. वलय, वलयित; प्रा. वलइय] **वळकटी-कुटी-कोटी**–स्त्री. १ गुंडाळी (कागद, कपडा, इ०ची); गुंडाळलेली वस्तु. २ घडी; दुमड; मोड; सुरकुती. **०कुटी सुरकुटी**–स्त्री. वळकटी अर्थ २ पहा. (अव.प्रयोग) वळकुटया सुरकुटया. **०खर**–वि. पीळ घातलेली; पीळदार (दोरी, सूत इ०). **०वट**–न. १ खिरीसाठीं पिठाचा वळून केलेला बोटवा, शेवया इ०पदार्थ. 'वळवटाची नवलपरी। एक पोकळें अभ्यंतरीं। एकें वर्तुळें साजिरीं। सुमनाकारीं पै एक।' –एरुस्व १४.१११; –मुवन ११.१२४. २ दळणवळण; घरोबा; परस्पर व्यवहार. **०वटी-वंटी**–स्त्री.

गुंडाळी; वळकटी पहा. **०वळ-ळा-ळी**–स्त्रीपु १ साप, किडा इ०च्या अंगास मोडी पडत असें त्यांचें चलनवलन. २ (ल.) एका कुशीवरून दुसऱ्या कुशीस वळावें, लोळावें इ० चळवळ. ३ चुटपुट; अस्वस्थ करणारी उत्कंठा; तळमळ. (क्रि० करणें; येणें). ' माथें पाहे घरिंची राटावळी । करी भोजनाची वळवळी । ' –स्त्रिपु २.३६.१६. ४ चडफड; धुसफुस. ५ कंड; खाज (गळूं, इ०ची). (क्रि० सुटणें; येणें). ६ हालचाल; तंटा; कुरापत. ' फिरंगी वळवळ करतां राहत नाहींत. ' –पया १२२. ७ चपळाई; एकसारखें चलनवलन. ८ (कु) रग. (क्रि० जिरणें; जिरविणें). **०वळ-ळां**–क्रिवि. १ नागमोडीनें; किड्याप्रमाणें वळवळ करून. २ गडगडत; लोटांगणें घालीत; चक्करें खात (जाणें). ३ भरभर; घाईघाईनें; तोंडाला येईल तसें; अचावचा (बोलणें, खाणें, लिहिणें). **०वळणें**–१ नागमोडीप्रमाणें अंगविक्षेप करणें; आळेपिळे देणें. २ वेदनांनीं तडफडणें; तळमळणें; विवळणें. ३ अस्वस्थ असणें (दुःख, उत्कंठा इ० मुळें). अत्युत्सुक होणें. **०वळाट**–पु. अतिशय वळवळ; चुळबुळ; अस्वस्थता. **०वळ्या**–वि. १ गडबडया; धांदऱ्या. २ अस्वस्थ; बेचैन असणारा. **०शेण-शेणी-शिणी**–नस्त्री. गोंवरी (थापलेली). याच्या उलट रानशेण-णी. **वळापिळा**–पु. आळापिळा; अंगविक्षेप (पिशाचसंचारादि कारणामुळ होणारा). [वळणें+पिळणें] **वळावळ**–स्त्री. उत्कंठा; चुळबुळ; अस्वस्थता. **वळावळी**–क्रिवि. तडकाफडकीं; त्वरेनें. –शर.

वळ—स्त्री. १ ओळ; पंक्ति; रांग. २ टांकानें, लेखणीनें काढलेली रेघ; लिहिण्यासाठीं ओढलेली रेघ. ३ (ल.) तऱ्हा; रीत; वहिवाट. ४ (व. शेती) नांगरटीच्या बारा-चौदा तासांचा समूह. बारा-चौदा पराटीच्या तासांनंतर एक तास तुरीचा घालतात, यावेळीं प्रयोग. [सं. आवलि] **०वट**–पु. १ रीत; संवय; परिपाठ; वहिवाट; पद्धत. ' वळवटा पाडून देणें म्हणोन... ' –वाडसमा ३.२४७. २ दळणवळण; घरोबा; परस्पर व्यवहार.

वळ—एक मूल्यार्थी प्रत्यय. उदा०. दळणावळ; धुणावळ; बांधणावळ इ०.

वळई—स्त्री. (कों. कुण.) जमीन करणें.

वळई—स्त्री. (हेट.) माजघर. [दे. प्रा. वलय=घर]

वळकंबणें-कुंबणें, वळकंबा-कुंबा, वळख, वळखण, वळखणें, वळखदेख, वळखपाळख, वळखी, वळखीदेखी, वळखीदेखीचा, वळखीपाळखी—ओळकंबणें ओळकंबा इ० पहा.

वळग-घ—स्त्री. पकड; घट्ट मिठी; आलिंगन; वेंघ. (क्रि० मारणें; घालणें) [सं. अव+लग्; म. ओळगणें] **वळग(घ)णें**, **वळंग(घ)णें**–उक्रि. १ मिठी मारणें; पकडणें; झटून पडणें. २ लोंबकळणें; ओळंबणें. ' कीं वळघौनि झाडा । एरझारा करी माकोडा । ' –ऋ ३०. ३ चढणें; आरूढ होणें. ' पवनवारू वळंघला । आणि गगनामार्जी पैं उडाला । ' –सिसं ४.१२८. –एरुस्व ८.१२. ' हा परम उंच सुवेळ गिरी । अवघे वळघोनिया वरी । ' –रावि २४.१४१. ४ (व्यापक) आश्रय करणें, धरणें; पकडणें (एखादा प्रदेश, प्रांत) ' बुद्धीतें सांडोनि ज्ञान । भेणें वळघलें । ' –ज्ञा ११;६६४. ५ भटकणें; हिंडणें; भ्रमणें; फिरणें. ' मग हिंडणें; वळंगत वासुदेव । ' –भज १९. ६ वळणें; ओढणें. ' पाकळ्या पसरूं लागल्या म्हणजे त्यांचे शेंडे पहिल्यानें अंतर्गोल म्हणजे आंतल्या बाजूनें वळंगलेले असून... '–मराठी ६ वे पु (१८७५) पृ. २४०. –अक्रि. १ पोंचणें; जाणें. ' जयजयकार त्रिलोक करी । नाद वळघला सत्य शिरीं । ' –निमा १ (निर्वोष्ट राघव ४१). २ चिकटून राहणें; लोंबणें. ' अचिंत्या अनंतशक्ति । श्रीहरीतें वळंगती । ' ३ वर चढण; भोगणें (घोडी–गाढवीला घोडा–गाढव यांनीं). [सं. अव+लग् ? प्रा. वलग=चढणें; गु. वळगवुं] **वळगा-घा**–पु. विलक्षण मिठी. ' सागरलहरी किनाऱ्यास घे वळघे आलिंगाया । '–केक १२५. **वळघी**–स्त्री. चाल; हला. ' साहे बोलाची वळघी । ऐसी अविद्या असे जगीं । ' –अमृ ६.२७.

वळचण—स्त्री. १ (कों. राजा.) घराच्या मूळ पायाच्या बाहेरचा पागोळ्यांच्या आंतील प्रदेश. २ घराच्या पाखाचा अग्र प्रदेश. ' जाणोनियां अग्नि लाविला घरीं । तो जाळूनियां सर्वेही भस्म करी । मा नेणतांही ठेविला वळचणीवरी । तोही करी तैसेंचि । ' –एभा ३०.२९९. (क्रि० बांधणें). ३ पागोळी; पावळी. [सं. वलभिस्थान – वढलचाण – वळीचाण – वळचाण – वळचण. –भाअ १८३२] **म्ह०** भुकेलें गुरूं वळचण ओढतें. (वाप्र.) **वळचणीचा वासो**–पु. (ल.) खेंदून असलेला शेजारी (विशेषतः ऋण, उसनेपासनें यासंबंधीं योजतात) **वळचणीची पाल**–स्त्री. आडून कानवसा घेणारी व्यक्ति. **वळचणीचें पाणी आढ्याला(जात नाही–गेलें–चढलें नाहीं)**–(पाणी खालून वर जात नाहीं यावरून) लहानाला मोठें होणें अशक्य.

वळण—न. १ आकारभेदाचे प्रकार (अक्षर, चित्र, शरीर, अवयव इ०चे प्रत्येकी); तऱ्हा; मोड. ' गोंदूनानाच्या अक्षराचें वळण बिवलकरी दिसतें. ' २ वागण्याची रीत, पद्धति, व्यवहार. ३ कल; प्रवृत्ति; झोंक (अंतःकरण, मन इ०चा). ४ शिक्षण; शिस्त; व्यवस्था. ' बाळकास वळणांत ठेवावें. ' ५ देणें, घेणें, जाणें, येणें इ० व्यवहार व त्यामुळें येणारा संबंध; दळणवळण. ' सरकारांत वळण बांधावें, मग फिर्याद करावी. ' ६ वक्रता; सरळपणा नसणें; वांक, (नदी, रस्ता, काठी इ०चा). ७ डोंगराचें वांकण ८ नद्यादिकांचें पाणी विवक्षितजागीं न्यावयासाठीं बांधतात तें धरण; बांध; माती दगड वगैरेचा वळ. ' उदधीचें वळण फुटे । '–उषा

९९.२३. ९ वशिला; वजन. (क्रि० बांधणें). 'चितोपंतांनीं रामशेटजीकडे वळग बांधून नोकरी मिळविली.' १० वेढा; वळसा. 'दुर्मोच्या काळपाशासम याच्या होय वळण वळयाचें।' –मोवन ६.२०. [सं. वलन] **म्ह०** १ वळणाचें पाणी वळणानेच जाईल. २ पाण्याआधीं वळण बांधावें. (वाप्र.) **वळण बांधणें**–(ल.) मैत्री संपादन करणें; संधान बांधणें. **वळणावर जाणें**–अनुसरणें; प्रमाणें चालणें, वागणें. 'हा अगदीं बापाच्या वळणावर गेला.' सामाशब्द– **०डळण–दळण**–न. दळणवळण पहा. **०दार**–वि. १ चांगला आकार, वळण असलेलें; नीटनेटकें. ए सा रखें, व्यवस्थित, शुद्ध (लेखन). घटींव आणि घोटींव यांपासून हें निराळें आहे. **०शुद्ध–सूत्र**–वि. प्रमाणशीर; वळणदार. 'तीं कामाच्या सोईकरिता अथवा वळणसुदपणाकरितां सुधारण्यांत आलीं.'–इंमु ३५२. **वळणी**–स्त्री. वळणें, वळण पहा. **वळणीं, वळणीस आणणें–येणें**–वठणीस आणणें–येणें पहा. 'तव विक्रमाविण पळभरिहि न येतींच खळ बळें वळणी।'–मोनामरसायन. **वळणें**–उक्रि. १ दिशा बदलणें; फिरविणें. २ राखणें; सांभाळणें (गुरें, मेंढया इ०). 'चला वळूं गाई। बैसो जेऊं एके ठायीं।'–तुगा २००. ३ बनविणें; घडविणें (पिद्धन, इतर क्रिया करून). 'संस्कृत इक्षुदंडरस अपार। त्याची प्राकृत हे वळिली साखर।'–ह १९.२२२. ४ अंकित करणें; वश करणें. 'मातल्या कामभद्रजाती। विवेकांकुशें वळावा।' –मुआदि १६.११. ५ वळवून, परतवून नेणें, आणणें. 'जन कथिति धेनु कुरुनीं वळिल्या येऊनि उत्तराशेला।'–मोविराट६.६३. 'वळल्या हातीवरल्या ढाला।'–ऐपो २१. ६ वळता करणें, घेणें. –अक्रि. १ घटलें जाणें; चांगलें तयार होणें (अक्षर). २ वळणदार होणें; योग्य रूप घेणें. (चित्र, प्रतिमा इ०नीं). ३ वांकणें; कलणें; दिशा, रूप, आकार इ० बदलणें.–ज्ञा ११.४८७. 'मडक्याचा कांठ ओला आहे तो वळेल.' 'आकाशीं मेघ करी गर्जना। वळला पर्जन्य सभोंवतां।' ४ शरीरावयव वायूनें आंत ओढला जाणें, त्याला वेदना होणें; पेटका येणें; वांब येणें. ५ अनुकूल, वश होणें; कबूल होणें. 'वळला न ईश्वरासहि तो दुष्ट वळेल काय इतरांला।' –मोउद्योग १०.७१. ६ प्रसन्न होणें. 'म्हणे रोसिका नृपा! वळलों।'–मोअश्व १.३५. ७ फिरणें; विशिष्ट दिशेनें जाणें. [सं. वलन] **वळना देणें**–परत देणें, करणें (पैसा, उसनी वस्तु). **वळती**–स्त्री. १ रानामध्यें गेलेलीं गुरें परत वळवून आणण्याचा व्यापार. २ गुरें वळून आणण्याची पाळी (गुराखी पोरें खेळत असतां ज्यावर डाव येतो त्यानें गुरें वळावीं असा संकेत). 'वांधुरें चारितां गोविंदा। वळत्या न देसी तूं कदा।'–ह ३६.५६; –तुगा १७०. ३ एकदम, एकाएकीं आगमन, फेरी. (क्रि० येणें). 'दूध उघडें टाकूं नको मांजराची जर कोण्हीकडून वळती आली तर खाऊन जाईल.' ४ उलट चाल, जाण्याचा रोख, वळण; फेरी. 'गुरें गांवाकडे येत होतीं आतां वळती रानाकडे चालली.' ५ (जुगार) विशिष्ट दान पडलें असतां घेण्यासाठीं मांडलेलें द्रव्य. ६ छपराचा सुरुवातीचा, तळचा भाग. (क्रि० बांधणें). ७ हल्ला चाल. (क्रि० करणें). 'मौजे मजकुरावरि डफळेची फौज येऊन वळती केली ते समयीं युद्ध जाहलें.'–बाडशाछ १०७. **वळतीस येणें**–वळणीस, वठणीस येणें. 'त्यांनीं धनीण बहु दक्ष असें म्हणावें। घेवोनि धाक हृदयीं वळतीस यावें।'–अर्वाचीन ३८२. **वळते करणें**–वजा करणें. **वळवणी**–स्त्री. एक हत्यार; पकड. **वळविणें**–उक्रि. (वळणें प्रयोजक). १ आकार देणें; घडविणें. २ फिरविणें; कलतें करणें (केस इ०). ३ गिरविणें; घटवणें, वळण देणें (कित्ता, खरडा, हस्तव्यवसाय इ०ला). ४ तयार करणें (पिद्धन, विणून). **वळाण–न**–न. (प्र.) वळण पहा. **वळित, वळीत**–स्त्री. १ सुरकुती. 'लपौनि चोर खांचीं वोहळीं। वळीत-पळितांचें ताडवन घाली।'–भाए ५२१. २ वळती; परत फिरणें. (क्रि० धरणें). 'आतां मोडुनि टेलीं दुगें। कां वळित धरिलें खगें।' –ज्ञा १३.५८१. ३ वळती पहा. ४ मेलेलें माणूस भूत होऊन घरीं परत येणें. **वळींव**–वि. १ वळलेलें; पीळ दिलेलें; विणलेलें. २ घट्ट पिळलेलें, वळलेलें; पीळदार. ३ भक्कम; चागलें मजबूत; घटलेलें (शरीर इ०) **वळीव गवरी**–स्त्री. गोळा बनविलेलें शेण; गोल गवरी; थापा-थापटी नव्हे.

वळण—स्त्री. (व.) वळचण पहा.

वळण—वि. (गो.) अर्धें जळलेलें. **वळणुचें**–क्रि. (गो.) अर्धेमुर्धे जळणें. [सं. ज्वलन–वळणें]

वळंत—स्त्री. (गो.) भित.

वळतर—न. (बडोदें) मोबदला; परतफेड. 'दिलेला इजारा विशेष कारणानीं इजारदाराच्या कसुरीवांचून रद्द होईल तर वळतर देणें.'–खाअं १२०. [गु.; तुल. म. वळता]

वळंदी—स्त्री. (हेट.) माजघरांत वस्त्रें ठेवण्याकरितां बांधलेली काठी. वळय पहा. [देप्रा. वलय=घर]

वळंबणें—अक्रि. ओलंबणें पहा. **वळंबा**–पु. ओलंबा पहा.

वळय—स्त्री. (कु.) माजघर. [देप्रा. वलय=घर]

वळंव—न. ओबडधोबड मोठा धोंडा (शेताचा बांध, पाया इ०स लावतात).

वळवंजी—स्त्री. (राजा.) गोमेची एक जात. हिच्या अंगास चिकट मळ असून तो रात्रीं चकाकतो. –श्रीको.

वळवणी—न. वळवाचा पाऊस. वळवा पहा. 'आला पुर वळवणी वहालें। तळचें जळ तसेंच सरल्या राहिलें।'–प्रला १७२. [वळवा+पाणी] **म्ह०** वळवणी आलें आणि तळवणी घेऊन गेलें.

वळवा–स्त्री.अव. १ (बारा-पाऊस पूर्वेकडे जाऊन पुन्हां पश्चिमेकडे वळतो यावरून) पावसाचीं पूर्वा ते स्वातीपर्यंतचीं नक्षत्रें. २ या नक्षत्रांचा पाऊस. [वळणें] **वळवाचा पाऊस**–पु. १ पूर्वेकडून येणारा पाऊस. २ (ल.) कोणीकडे वळेल, काय करील याचा नेम नसलेला माणूस; लहरी माणूस. **वळीव, वळीव पाऊस**–पुस्त्री. वळवाचा पाऊस.

वळवास—पु. माशाची एक जात. आक्टोबर-नोव्हेंबरांत पकडतात.

वळविंच-ज—स्त्री. १ (कों.) घोण. २ एक प्रकारचा मुंगळा.

वळविणें—उक्रि. (क्र.) विळविणें पहा.

वळशिंगटी—स्त्री. माशाची एक जात.

वळसणें—अक्रि. (प्रां.) वळसा घेणें; भोंवतीं फिरणें.

वळसा–पु. १ वेढा; भोंवती, मागेपुढें फेरा. (क्रि० घेणें; घालणें; पडणें). 'हरि म्हणे गा अविनाशा। जरासंधें घातला वळसा।' –कथा २.२.८९. २ वळण; प्रदक्षिणा. –ज्ञा ७.७२. 'पदार्थास वळसा घालून किरणांस पलीकडे जावयास नाहीं.' ३ बंधन. 'उडाला देहबुद्धीचा वळसा। तुटला फांसा कर्माचा।'–एभा १८. ७७. ५ भोंवरा. –ज्ञा १३.१८६. 'संता ठाया ठाव पूजनाची इच्छा। जीवनींच वळसा सांपडला।' –तुगा ३४४३. ६ संकट; त्रास; अनर्थ. 'निद्राकाळीं ढेकूणपिसा। नाना प्रकारीं वळसा।'–दा १७.६.११. ७ गांठ; अढी. 'अंतरीं पीळपेच वळसा। तोचि वाढवी बहुवसा।'–दा १५.६.१४. ८ सहाणेवर एक वेळ मागेपुढें घासणें (मात्रा). (क्रि० घेणें; घालणें; उगाळणें). ९ गोंधळ; गलबला; 'बाहेर फुटली मात। वळसा होत नगरांत। लोक दुःखें वक्षस्थळ पिटीत। राजकिशोर आटबुनि।' –शिशी १४.१७१. [वळणें] **म्हo** काखेस कळसा आणि गांवास वळसा. **वळसे वेलांटया**–स्त्री.अव. फाटे; फिरवाफिरव. 'आतां या वेळेस वळसे वेलांटया नकोत.' –भा ३७.

वळसरा—पु. पावसाचा तोटा; दुष्काळ. 'टोळखाद व वळसरा होऊन ...'–ख ४२६०.

वळसा—पु. गडबड; धामधूम (जनतेची) 'चंद्ररायदुर्ग येथील तमाम वळसा निघून गेला.'–ख २०७४.

वळसाल—न. (बे.) पेरणी केल्यानंतर शेतांत फिरविण्याचें कुळवापेक्षां हलकें हत्यार. (क्रि० घालणें; करणें).

वळसाव(वि)णें—उक्रि. १ (नवीन मडकें) निरढावणें; रांपवणें; पक्कें करणें. –अक्रि. २ सरावणें; पडकणें. [वळसा ?]

वळही, वळहई—स्त्री. गंज. (प्र.) वळई पहा.

वळाण—न. (व. ना.) शेताची वाफ; शेतांत पाऊस पडल्यानंतर शेत कोरडें होणें; वाफसा. [वाळणें] ०**पडणें**–औत चालण्याइतकी जमीन कोरडी होणें; वाफसा येणें. ०**सार, वळाणी-नी**–शकी. ई. ४८ वि. (व.) पाणी धरून न ठेवणारी व वाहण्यास लवकर योग्य होणारी (जमीन).

वळार—पु. (गो.) बांगडया भरणारा कासार.

वळिबा—पु. १ वळंबा, ओळंबा पहा. २ खळयाच्या मेढीभोवतालचें दोरीचें कडें.

वळिवट—पु.अव. गव्हले; वळवट पहा. 'नखिया माळतिया सळिवें। इत्यादि वळिवट बरवें।'–क ८२. –एभा २५. २७२.

वळी—स्त्री. १ रांग; ओळ; पंक्ति. 'जेथें वळी धरुनि पंचनळी बसे ते।'–र ४६. २ लिहिण्यासाठीं ओढलेली रेघ; ओळ. ३ (ल.) तऱ्हा; पद्धत; वळण; धोरण. ४ सुरकुती; वळकटी (शरीरावरील). ५ (कु.) वाफा. [सं. आवलि]

वळी—स्त्री. १ जनावराच्या पाठीला लागूं नये म्हणून खोगिराखालीं दोन उशा एकत्र शिवतात ती; खोगिराखालची गादी. 'ठेवितां वरि पळेंक वळीतें। आवरोनि धरणी कवळी ते।' –किंगवि २५; –मोउद्योग १३.३१. २ वळकटी; गुंडाळी. ३ रास; गंज. 'वळी पोथ्यांच्या त्या तुम्हि असुर रीती शिकविता।' –वामन नृहरिदर्पण १.३७. ४ सुरकुती; घडी; दुमड. 'भीतरीं वळी न धरे। कोठ्यामाजी संचरे।' –ज्ञा ६.२१७. ५ (विण. काम) तातूला तातू जोडणें; सांधणी पहा. [वळणें] ०**मूठ**–पु. १ वळी आणि मूठ. खोगीर समुच्चयार्थी. (क्रि० कसणें; बांधणें; आवळणें; घालणें; ठेवणें). 'चवकीदारानें वळीमूठ नेली उचलून हक्काची।'–पला ७०. २ गोणी. ३ लग्नांत वधूमातेला देण्यांत येतें तें खणलुगडें.

वळीत—न. धरपकड; घेरणें. 'गुंडांचें वळीत करण्याचें कामहि काहीं भागांत पोलिसांनीं सुरू केलें होतें.'–केसरी २७. १०.३६.

वळू, वळहू—पु. १ प्रजोत्पादन करण्यासाठीं राखलेला घोडा किंवा बैल; न खच्ची केलेला न बधलेला घोडा, बैल. 'वळू, घोडे मधुर ध्वनी ऐकून धावत येतील.'–व्हेनिसचा व्यापारी (शेक्सपिअर नाटयमाला) पृ. १७२. ०**दाखविणें**–फळविणें; घोडी, गाय यांना गर्भधारणा करावणें.

वळे, व्हळे—स्त्री. (बे.) जात्याची टाकी.

वळेसर—पु. (कु. गो.) फुलांचा गजरा, वेणी.

वळोंची-जा—स्त्री. (कों.) एक जातीची गोम, वळविंच.

वळ्या—पु. शंखासारखें एक कवच. हें वळावर घासतात. [वळ]

वळ—न. १ बोटांत घालण्याचें सोन्या-चांदीचें वेढें; लहान कडें; अंगठी; जोडवें. 'पोल्हारें विरुद्या दृशांगुळि वळीं गर्जोनिय पोंचटें।'–अनंत सीस्व ३९. २ (कु.) नारळाचा अर्धा भाग;

वाटी. २ (कु.) शिगर करण्याकरितां माडाच्या पिंडयाचें काढलेलें वातळ भेत. [सं. वलय]

वळ्हई—स्त्री. वळई पहा.

वक्ष, वक्षस्थल—न. १ छाती; ऊर.–ज्ञा ९.४८०. 'करूनिया हाहाकार। वक्षस्थळ बडवी नृपवर।' २ (नृत्य) एक अभिनय हा वक्षस्थलानें दाखविला जातो. सम, निर्भुग्न, अभुग्न, प्रकंपित व उद्वाहित अशी पांच प्रकारची वक्षस्थळाची टेवण असत. [सं.] **वक्षःस्वस्तिकक रण**–न. (नृत्य) पाय स्वस्तिक करणें, हात रेचित करणें व छातीवर टेवणें, छाती आकुंचित करणें. **वक्षोज. वक्षोरुह**–न. स्तन; कुच. 'उठत वक्षोरुह हे उठाणे।' –सारुह २.५६.

वक्ष्यमाण—वि. बोललें जाणारें. [सं.]

वा—उभ. १ पक्षांतरबोधक अव्यय; नाहींतर; अथवा; किंवा. 'त्या तो भी जैसा गज भीतो सिंहासि सिंह शरभा।' –मोभीष्म ५.४०. २ व, आणि. 'हिराजि वा केसव मलह वा माळि.' –मंगळवेढेचा शिलालेख, ग्रंथमाला.

वा—स्त्रीअव. (संक्षेप) उवा. 'वा चामवा गोचिड।' –दा १७.६.२३. 'तुका म्हणे वाचया रागें' –तुगा ३२८४.

वा—उद्गा. आश्चर्यदर्शक उद्गार; वाहवा. 'वा! असं कधीं झालंय.'

वा—स्त्री. (गो.) आई. 'वा भार गेलां' [आवय]

वा—क्रि. (वहा याचा संक्षेप) वहा. 'संतचरणीं अभिमान।' –आपद ३३ ८०. [वाहणें]

वाइच, वांइच, वाईच, वां(ई)स, वाइसा, वाईसा—वि. (अशिष्ट) थोडा; जरा; अल्प; किंचित. –क्रिवि. थोडासा; जरासा; क्षणिक. [सं. अल्पीयस्]

वाइ(ई)चाळ—वि. अश्लील; वाग्रट; वाईट. 'मस्करी करून वाइचाळ शब्द बोलत असे.'–स्त्रीच २.१२२. 'माजिऱ्या सारिखें वाईचाळें' –तुगा ३०८७. [वाचाळ]

वाइ(ई)णें—सक्रि. १ वाहणें; धारण करणें; चढविणें. 'धनुर्ये वाइलीं हातीं।' –ज्ञा ११.६८२. –एरुस्व १०.२४. २ देणें; अर्पण करणें. 'तेणें रीतुरायें वाईलें।' –भाए ४२८.१३३. 'महातपाचा पाउड वाइजेंच।' –शिशु ११३. 'प्रवृत्तीवरी निगड वाउनि' –ज्ञा ८.२४. [सं. वह्]

वाइणें—सक्रि. वाजविणें. 'भयंकर, अति भेदकु महा मोठा शंखु। वाइला भीमसेनें' –गीता १.१०९९. 'नारदतुंबर वाउनी ब्रह्मवीणा।' –दावि ३४१. [सं. वाद्]

वाइ(ई)ला—वि. वेगळा; निराळा; भिन्न. 'कैसेनि वाइले उतरे। हे मुगुट भोजा।' –ऋ ३६. **वाइलपण**–न. (व.) निकामपण. [वायला]

वाई—स्त्री. वायु; वातः वारा. [सं. वायु]

वाई—क्रिवि. वाया; व्यर्थ; निरर्थक. –तुगा. [सं. व्यय]

वाई—स्त्री. (भि.) वेळ. 'धोडीक वाईनें तिया डेडिम दुवां लाग्यो' –भिक्षी २५. [सं. वेला]

वाईट—वि. अनिष्ट; गुणरहित; अयोग्य; अशुभ सामान्यतः चांगला याच्या उलट फार व्यापक अर्थानें वापरतात. [सं. वि+अय्+त] **०करणें**–नाश, अहित करणें. **वाइटावर असणें**–द्वेष करणें; वरें न पाहणें. अहित चिंतणें. सामाशब्द– **०बरा**–वि. सामान्य; मध्यम; थोडा फार वाईट. **०वांकडा**–वि. अयोग्य; निरुपयोगी. निरर्थक; सर्वतः वाईट; सामान्यतः वाईटच **०वाणा**–वि. थोडासा साधारण वाईट. **०विडळ**–वि. १ निरुपयोगी; कुचकामाचा; व्यर्थ. २ कुरूप; विद्रूप; वेडावाकडा. **०साईट**–वि. अपथ्यकर; निरर्थक; निरुपयोगी; सामान्यतः वाईटच.

वाईण–न—न. (कों.) उखळ. [सं. वह्]

वाईनसळ—न. उंसाच्या चरकाचीं मुसळें बसविण्याची खालची लाट; काटवट. [सं. वाहन+शलाका]

वाईल—पु. आवेल; चुलीशेजारचा भाग; वैल. [वायला] **०चूल**–स्त्री. वैल असलेली चूल.

वाईसर—पु. नट घट्ट बसविण्यासाठीं, दोन भाग एकत्र घट्ट जुळण्यासाठीं मध्यें दिलेली चकती. [इं. वॉशर]

वाउ(ऊ)गा—वि. व्यर्थ; निरर्थक; रिकामा; मिथ्या. 'किर्ती जल्पेसी वाउगें।'–शिशु १०७२. –ज्ञा १५.२३८. [सं. वि+अय्]

वाउधाण–न, वावधाण–न—न. वादळ; वावटळ. 'वाउधाणाचिया परी। जो आश्रो केहीवि न धरी।' –ज्ञा १३.६८८. [सं. वायु+उत्थान]

वाउर–ळ—वि. व्यर्थ; वावगें; निरर्थक. 'कायिसया ते असुर। संपत्ति पोषिति वाउर।'–ज्ञा १६.४२२. 'ऐसी तूं महा पुंश्चली। आतां काय स्फुंदसी वाउळी।'–कथा ३.१६.५२.[वाउगा]

वाउरुळ—न. वारूळ. 'म्हणती वाउरुळाचे नळे।' –उषा १७०८. [वारूळ]

वाऊ–ए–ओ—वि.क्रिवि. व्यर्थ; वाऊगें; वाईट. 'धरितासि ममत्वें करून। परंतु वाऊ।' –गीता १३.३७४. 'हें काई वो माये। कैसें वायाचि वाए'–शिशु ६७४; 'तंव देखिलें तें जालें वाओ' –दाव ३८२. –ज्ञा ८.२४८. **वाएकेलें**–वि. व्यर्थ. 'आमुते संबंध सोहळे। पृथ्वी कुंजे वाए केलें।' –ऋ १५.

वाऊळ—न. दोरीस माडाच्या पात्या लावलेलें एक आळत. याचा मासे धरण्यास उपयोग करतात.

वाऊळ—न. (राजा.) कातळीवरील खळ्यांत माती सांडून झालेलें शेत.

वाक्-गू—स्त्री. वाणी; भाषण; आवाज; वाचा; बोलण्याची शक्ति किंवा इंद्रिय. [सं. वाक्] सामाशब्द–**०चतुष्य**–न. वाणीचे चार प्रकार –परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी. **०चातुर्य**–न. बोलण्यांतील कौशल्य; वक्तृत्व. **०चापल्य**–न. १ बोलण्यांतील अस्खलितपणा, चतुरता. २ बडबड; वटवट; भरमसाटपणें बोलणें; अतिशय बोलणें. **०पटु**–वि. बोलण्यांत कुशल, तरबेज; पंडित; वक्ता. **०पंडित**–पु. (उप) ताडकन् उत्तर देणारा मनुष्य; वाचाकुशल; तडकाफडकी उत्तर देणारा. **०पथ**–पु. संभाषण; भाषणाचा ओघ. 'नुसधीच शांतिकथा। आणिजेल कीर वाक्पथा।' –ज्ञा १३.११५५. **०पाटव**–न. बोलण्यांतील चातुर्य, कौशल्य; वक्तृत्व. **०पांडित्य**–न. बोलण्यांतील तत्परता; सद्यः-प्रत्युत्तर देण्याची कला. **०पारुष्य**–न. कठोर भाषण; खरडपट्टी; शिवीगाळी; दुर्भाषण. **०प्रचार**–पु. भाषेतील संप्रदाय; म्हणी; विशिष्ट शब्दसमूहास वारंवार उपयोजिल्यामुळें विशिष्ट अर्थ येण्याचा प्रकार; रूढी. **०प्रतिबंध**–पु. १ भाषणबंदी; बोलण्याचें थांबविणें; गप्प करणें, बसविणें; तोंड बंद करणें; कुंठित करणें. २ स्तब्धता; शांतता; निःशब्दता. **०सरणी**–स्त्री. बोलण्यांतील अस्खलितपणा; वाक्प्रवाह; शैली. **०सिद्धि**–स्त्री. शब्दांतील अमोघता; बोललेला शब्द खरा होण्याची शक्ति. **०सुकृत**–न वचन. 'म्हणुनु वाक्सुकृत दिधलें.' –मंगळवेढें लेख, ग्रंथमाला. **०सृष्टि**–स्त्री. बोलण्यांतील चातुर्य, विविधता, कौशल्य. 'हे वाक्सृष्टि एके वेळे। देखतु माझे बुद्धीचे डोळे।' –ज्ञा १४.२०. **०स्तंभ**–पु. बोलण्यांत अडखळणें; थांबणें; वाग्रोध; गहिंवरामुळें वगैरे बोलतांना कुंठित होण. **वाग्जल्प-ना**–पुस्त्री. वल्गना; बडबड; वटवट; लबलब; टकळी. **०जाल**–न. शब्दपांडित्य; बडबड; वटवट; पोकळ भाषण. 'वाग्निश्चयाचें वाग्जालिक। शब्द शास्त्रें सोडिलीं।' –एरुस्व २.३७; –ज्ञा १३.२०. **०दंड**–पु १ धमकी; खरडपट्टी शब्दताडन. २ वाचेचा संयम; भाषणावर नियंत्रण. **०दत्त**–वि. १ वाङ्निश्चय झालेला; शब्दांनीं दिलेला; विवाहवचन दिलेला. २ तोंडी वचन दिलेला; शब्दांनीं संमत केलेला; वचनांकित. **०दान**–न. १ वाङ्निश्चय; विवाहाचा करार; वरवधूयोजना. २ तोंडी करार; वचन. **०दुष्ट**–वि. १ अभद्र बोलणारा; अपशब्द बोलणारा. २ चुकीचें बोलणारा; चुकीची भाषा वापरणारा. **०देवता**–स्त्री. वाणीची देवता; सरस्वती. **०दोष**–पु. १ वाणीची अशुद्धता; चुकीचे उच्चार. २ अपशब्द; निंदा; अश्लीलता. ३ जिव्हाभ्रंश; चुकून शब्द बाहेर पडणें; वाक्स्खलन. **०ध्वज-ध्वज**–पु. १ वाणीरूप पताका. २ प्रसिद्धी; दवंडी. 'स्वधर्मु वाग्ध्वजीं। बांधी नेणे।' –ज्ञा १३.२०७. **०नियम-ङ्नियम**–पु. १ भाषेसंबंधीं, बोलण्यासंबंधीं नियम, विधि. २ भाषणबंदी; बोलण्यावरील नियंत्रण. ३ मौन; मूकत्व. 'वाङ्नियम सदैव विहित कां गमला।' –मोसभा ३.७. **०निरोध-ङ्निरोध**–पु. १ बोलणें कुंठित करणें; गप्प करणें. २ वाचेवरील संयम; निःशब्दता, शांतता. **०निश्चय-ङ्निश्चय**–पु. लग्नाचा करार; वरवधूयोजना; वरवधू निश्चित करण्याचा विधि. **०बाण**–पु. कठोर शब्द; टोंचणारे, बोंचणारे शब्द; कटु वाचा. 'लागति वाग्बाण काळजाला कीं।' –मोभीष्म १०.८. **०ब्रह्म**–न. वेद. 'एकीं वाग्ब्रह्म अभ्यासें थोकडें केलें।' –ज्ञा १२.११२. **०भव**–वि. वाचिक; वाचेपासून होणारें. 'वाचे वसे तें वाग्भव। तप जाणावें।' –ज्ञा १७.२२३. **०मय**–ङ्मय–न. साहित्य; भाषेंतील ग्रंथसंपत्ति; गद्यपद्यादि ग्रंथसमूह. –वि. १ शब्दांस अनुसरून; मूळ वचनाप्रमाणें; वाणिरूप. 'विवरण जाला वाङ्मय। संपूर्ण पर्याय नवमिचा' –ज्ञानप्रदीप ७७९. २ वाचिक; शब्दमय. 'एवं शारीर जें तप। तयाचें दाविलें स्वरूप। आतां आईक निष्पाप। वाङ्मय तें।' –ज्ञा १७.२१५. **०मयी**–स्त्री. वाणी; वक्तृत्व. 'जी एकमात्र भूषण पुरुषाप्रति तीहि वाङ्मयी देवी।' –गोविंदाग्रज. **०मात्रा**–स्त्री. सेकंद; क्षण. **०माधुर्य**–न. वाणीची मोहकता, मधुरता, गोडी; रसाळपणा. **वाग्मी**–वि. १ बोलण्यांत पटाईत; चतुर; वक्ता. २ बोलघेवडा; बोलका; वटवट करणारा; वावदूक. **०मुख**–न. आरंभीचे शब्द; सुरुवातीचें वाक्य. **०युद्ध**–न. वादविवाद; आवेशयुक्त व जोराची चर्चा; तोंडातोंडी. **०रोध**–पु. १ बोलण्याची मनाई; तोंड बंद पाडणें; गप्प करणें. २ स्तब्धता; मूकता. **०वज्र**–न. शब्दशस्त्र; वाचारूप हत्यार; शाप. **०वल्लरी-वल्ली-विलासिनी**–स्त्री. सरस्वती; वाणीची देवता. **०वाद**–पु वादविवाद; वितंडवाद. 'पाखंडाचे दरकुटे। मोडी वाग्वाद अव्हाटे।' –ज्ञा १२.१४. **०विलास**–पु. १ शब्दकौतुक; शाब्दिक करमणूक; वाणीची क्रीडा; वाणीचा प्रभाव. 'जैसें सरस्वतीपुढें मूढें बहुत। वाग्विलास दावितीं।' २ भाषाविनोद; शाब्दिक करमणूक. **०वीर-शूर**–वि बोलण्यांत धीट, शूर, पटाईत. **०वृत्ति**–स्त्री व्याख्यानविस्तार; स्पष्टीकरण. 'आतां गीतार्थाची मुक्तमुदी। लावी माझिये वाग्वृद्धी।' –ज्ञा १८.२७. **०व्यय**–पु. व्यर्थ बडबड; निरर्थक भाषण, बोलणें; शब्दांची व्यर्थ काथ्याकूट. **०व्यापार**–पु. बोलाचाली; गप्पासप्पा; भाषण; परस्पर बोलणें, चालणें. 'तेथ कें नाम्ह्यापारा। अवकाशु असे।' –ज्ञा १८.१.३०. **०शून्य-सून्य**–वि. वाचाहीन; मुका; बोलतां येत नाहीं असा. 'मज वाक्सुन्यास वदवावें।' –दा १.२.२.

वाक-ख—पु. ताग, अंबाडी, घायाळ वगैरेच्या सालीचा दोर; तंतु.

वाक—पु. एक पक्षी.

वांक, वाक—स्त्री. १ स्त्रियांचें एक बाहुभूषण; दंडांतील दागिना. 'नेपुरें वांकी कट किंकिणी।' –वेसीस्व ५.६. १

पायांतील वाळें; पायांतील दागिना. 'गर्जती चरणीं वाकी अभिनव।' –तुगा २९१. –न. १ होडीची फासळीसारखीं लांकडें; रोजापासून वऱ्यापर्यंत ठोकावयाचीं बमानदार लांकडें. २ रहाटास आढ्यांच्या दोन बाजूंस बसविलेलीं तीं बांकदार लांकडें –पु. १ वक्रता; वांकडेपणा. २ (ल.) कल; झोंक; ओढा; तोल. ३ (ल.) द्वेष; तेढ; मत्सरबुद्धि. ४ (ल) दोष; चुकी. 'ह्यांत शिवबाचा कांहीं वांक नाहीं.' –सूर्यप्र ३. ५ (व.) तथ्य; अर्थ. 'त्यांत कांहीं वाक नाहीं.' **वाकचवेळा-वाकरवाळ्या-वेळा**–स्त्री. वाकी; स्त्रियांच्या दंडावर घालण्याचा दागिना.

वाकई—वि. दुरुस्त; यथायोग्य. 'पैसा मजकूर करार वाकई याणी सांगितला.' –पेद ६.१९; –पया ४६६.

वाकचवडा-डें—वाघचवडा पहा.

वाकटांवचें—क्रि. (गो.) चोरी करणें. **वाकटी**-स्त्री. (गो.) चोरी.

वाकड-डी—स्त्री. पावसाची झड; सर; सतत वृष्टि. 'कां वाकडिया होरें बैसलीं।' –ज्ञा १३.५६५. 'अति वृष्टीची वाकडी लागली।' –दावि १४१.

वाकड—वि. वांकडा; वक्र. 'वेऊनि वाकड करुनि मुख।' –दावि ११५.

वांकडणें—अक्रि. १ वांकणें; वांकडें होणें; आंखडणें; कलणें. २ वांकडें बोलणें. 'संगिकासी बोलतु वाकडोनि।' –दावि ३७१.

वा(वां)कडा—वि. १ वांकलेला; वक्र; कललेला; लवलेला; वळलेला; सरळ नव्हे असा. २ (ल.) विरुद्ध; तेढ असलेला; प्रतिकूल **वाकडकोका-मुसका-वाकिडातिकडा-वाकडा तिडका-वांकडा तेहुडा**–वि. वक्र; वाकलेला; कुबडा; वक्रांग; सरळ नसलेला. **वाकडवाद**-पु. तंटा; बखेडा; याप्रमाणेंच. **वाकडनाक्या – पावड्या – मान्या – मुसका – शिंगी – शिंग्या**-इ०. **वाकडा गुणाकार**-पु. गुणाकाराचा एक प्रकार **०ताईत**-पु. एक गळ्यांतील ताईतासारखा अर्धचंद्राकृति व बागड्या लावलेला मुलांचा अलंकार. **०भांग**-पु. एका बाजूस कमी केंस ठेवून पाडलेला भांग. **०मार्ग**-पु. आडवाट; अप्रत्यक्ष मार्ग. 'वांकड्या मार्गानें कां बोलेल।' –कमं १.२९ **०विचुका**-वि. वेडावांकडा. 'कां वाकडा विचु कां पाडलीं।' –ज्ञा ९.६. **वांकडी दृष्टि-नजर, वांकडा डोळा**–स्त्रीपु. तिरस्कार, द्वेषयुक्त किंवा पापी दृष्टि. **०पगडी**-स्त्री. अवज्ञासूचक वर्तणूक; विरुद्धाचरण. (क्रि० करणें; ठेवणें). **०मान करुन पाहणें**–स्त्री. अवज्ञादर्शक दृष्टि. **०म्हैस**–स्त्री. १ वाकड्या शिंगाची म्हैस. २ (सांकेतिक) चिंच. **वाकडी वाट**–स्त्री. १ विपथ; न रूळलेला रस्ता; रहदारीचा नव्हे असा मार्ग. 'वाकडी वाट कोणीकडे केली।' –होला २७. २ अन्याय्य मार्ग; कुमार्ग. 'स्वइच्छेविरुद्ध वाकड्या वाटेनें जावें लागतें.' –विक्षिप्त २.१३. **०समजूत**–स्त्री. १ कलुषित मन; पूर्वग्रह; दुराग्रह. २ तेढ; द्वेष; गैरसमजूत. **वांकडें**-न. १ वैर; द्वेष. 'बाहेर मिरविशि आंत हरिशीं वांकडें।' –राला –वि. १ प्रतिकूल; निष्ठुर; न आवडणारें. 'प्रभो शरण आलिया वरि न व्हा कधीं वांकडें।' –केका ४०. २ अयोग्य. 'सद्गुरु वाचुनि वांचुनि विफल जिणें यांत वांकडें काय?' –कीर्तन १.३. **०नेरा**–पु.अव. तिफाशी सोंगटयांतील एक दान. ६+५+२. **०दाखविणें**–क्रि. वेडावणें. **०पडणें-येणें**–क्रि. भांडण होणें; वितुष्ट येणें; कलह होणें. **०पांऊल** न. दुर्वर्तन; दुराचरण; व्यभिचार.

वांकडा—पु. १ मुलाचें हातांतील दागिना. २ स्त्रियांच्या पायांतील दागिना.

वाकंडी—स्त्री. (प्र.) वाखंडी; घायपात.

वाकण—न. १ वळण; बांक; वक्रमार्ग (नदी, मार्ग वगैरे मध्यें). 'जेथें रान भयाण फार असती कांटे कडे वांकणें।' –केक ४५. २ खाडी; आखात; उपसागर. ३ सामान्यतः बांक; वक्रता. **वाकणें**–क्रि. १ कलणें; वांकडें होणें; तिरपें होणें. २ पोंक घेणें. ३ (ल.) नम्र होणें; शरण येणें; नमणें. [सं. वंक्=वाकणें]

वाकर्ता—स्त्री. पदराची वगैरे खोळ; झोळी.

वाकदोर—पु. वाकाचे दोर; वाखदोर.

वाकनवीस-निवीस-नीस, वाकेनीस—पु. १ (मूळ फारसी) लेखक; वृत्तांतलेखक; रोजची दैनंदिन माहिती लिहून ठेवणारा; अखबारनवीस. २ (रूढ) मोठ्या घराण्यांतील खासगीकडील हिशेब, कागदपत्र, भोजन वगैरे सर्व कामें करणारा कारभारी. –रा ६.५०९. [अर. वाकिआ+नवीस्]

वाकफ, वाकब, वाकीफ—वि. १ जाणता; हुषार; तज्ज्ञ; माहितगार; अनुभविक. 'माझे चालीस व मुलखास वाकब.' –भाअ १८३८. २ माहीत; ठाऊक. 'त्याची अवस्था काय हें वाकफ.' –रा ५.१६८. [अर. वाकिफ] **०गार**–वि. माहितगार; तरबेज; निष्णात. 'त्यांचे विचार विशिष्ट शास्त्रांतील वाकबगार विद्वानांपेक्षां पुढें गेले होते'–टिले ४.३६३. **०गारी**–स्त्री. माहितगारी; हुशारी. 'तुम्हास वाकबगारी आहे.' –रा १२.६१. **वाकफीयत**–स्त्री. माहिती; ज्ञान; अनुभव. 'पागेचे कामांत महमद अजीम्खां यांचीच वाकफीयत चांगली.' –रा ७.५६.

वांकर—पु. (कु.) बैलानें शिंगानें पाडलेला ओरखाडा, वळ. [वांक]

वाकल्या—स्त्रीअव. वांकुल्या पहा. 'वाकल्या दाविती अर्भका।' –दावि ७.२ ३३.

वाकवट—स्त्री. (प्र.) वाकवट-ट्टी. वाखाचा गुंजडा, गुंडा.

वांकवणें—क्रि. (वांकणें प्रयोजक) १ वांकण्यास लावणें. २ (ल.) मानहानि करणें; नम्र करणें. 'फडणिसास वांकविला आहे हें पाहून विसुभाऊस समाधान झालें.' –अस्तेभा ३५.

वा(वां)कस—न. सुतारांचें लांकूड तासण्याचें हत्यार; तासणी. **वाकसणें**-वाकसानें तासणें.

वाकसणी-नी—स्त्री. (व.) भांडीं घांसावयाची काथ्याची, वाखाची गुंडी. [वाख] **वाकसणें**–क्रि. (व.) दशादशा होणें; वाकासारखा पिंजला जाणें. **वाकसला**-वि. (व.) शिळा; वातड; लवकर न तुटणारा.

वाकस(सा)ळ—स्त्री. एका जातीचें भात.

वाकळ—स्त्रीन. १ गोधडी; अनेक चिंध्या शिवून केलेलें वस्त्र. 'घरीं मोडक्या बाजा। वरी वाकळांच्या शेजा।'–तुगा ६८२. २ जीर्ण वस्त्र; फाटकें वस्त्र, कपडा. 'कीं वाकळ पडे वाटेवरी। तें काठीनें उचलिजे वाटसरी।' –मुरंशु ४११. ३ (ल.) वृद्ध, जरठ, जरुखड स्त्री; गलिच्छ, अजागळ स्त्री [सं. वल्कल] **०गुंडी**-स्त्री. (व.) वाकळ गुंडाळलेला बागुलबुवा किंवा बाई. **०फाडणें**-(व.) (ल.) व्यर्थ बडबड करणें.

वाका—पु. १ हकीकत; वर्तमान; घटना; म्हणणें. 'बोलले-प्रमाणें वाकाहि लिहिला.'–चित्र १३७. 'उभय पक्षांचा वाका ऐकून निर्णय सांगितला.'–वाको६२. २–स्त्री.मृत्य.'२७ जिल्कादी पादशहाची वाका फौत जाली.'–रा ११.५५. [अर. वाकिआ]

वांका—पु. वाजविण्याचें शिंग. **०ईत, वांकेकरी**-पु. शिंग वाजविणारा. 'इटेकरी, पटाईत वांकाईत...यांची संचणी करून हशम मेळविले.'–मराआ ६.

वांकाड-ण—न. वांकण पहा. 'वळणें वांकाणें भोंवरे।' –दा ११.७.३. **वांकाडी**-स्त्री. वांकण पहा.

वाकांडी—स्त्री. १ घायपात; वाकंडी पहा. २ (प्रां.) स्त्रियांचें कमरेभोंवतीं नेसण्याचें वस्त्र. (क्रि० नेसणें)

वांकारणें—क्रि. १ रस्ता सोडून बाजूनें जाणें (टाळण्या करितां); चुकवून जाणें. २ दूर राहणें; संबंध टाळणें; बाजूस सरणें. ३ दूरदूर राहणें; संबंध टाळणें.

वांकाळा—पु. रहाटाच्या प्रत्येक बाजूस दोन वांकें कमी लावून तेथें सुंभाचा दोर बांधतात तो. [वांक]

वाकि(की)फ—वाकफ पहा. 'आपण वाकिफ नव्हतों.' –पेद २०.९४.

वाकी म्हैस—वांकडी म्हैस पहा.

वांकीव—वि. वांकविलेला; वळविलेला; वांकडा केलेला. 'पालखीचा दांडा वांकीव असतो.'

वाकुडणें—वांकडणें पहा. **वाकुडपण-पणा**-नपु. तीड; तेढ; वक्रता. २ द्वेष; विनुष्ट. 'उभयतांचा हजारपांचशें वर्षांचा वांकुडपणा असल्यामुळें'–आगर ३ २२५. **वांकुडा**-(काव्य) वांकडा पहा. –ज्ञा १३.३४३.

वांकुडी—स्त्री. वाकांडी पहा.

वा(वां)कुडी—स्त्री. वाकडी पहा. झड; वृष्टि; मेघाच्छादन. 'जेवीं वांकुडी घाली घन।'–मुविराट ५ १११. 'बाणांची वाकुडी वर्षत। मंडप दिसत अंतराळीं।'–ह २४.२४.

वाकुदणें—अक्रि. मनस्वीपणें नाचणें, उडणें, बागडणें, हुंसणें.

वा(वां)कु(को)ली—स्त्री. (बहुधा अनेकवचनी उपयोग) वांकुल्या; विडंबन; चेष्टा; वेडावणें; तोंड वेडींवांकडीं करणें. 'द्विविद कुमति त्यातें दाखवी वांकुल्यांतें।'–मोकृष्ण ६७ ८. –ज्ञा १७.९४.

वांकें—न. वांक अर्थ ४ पहा. १ रहाटाची अढेकड; चाकाच्या परीघाचा भाग. २ बांकदार लांकडाचें खुंटाळें. ३ हत्यारें, पळथा वगैरे ठेवण्याचें बांकदार लांकडाचें साधन. ४ बावकडाच्या तिन्ही लांकडांपैकीं प्रत्येक.

वाकेनवीस—वाकनीस इ० पहा.

वाकेरी—स्त्री. एक सागरगोटीसारखी औषधी वनस्पती. इच्या गड्डयास भातें म्हणतात.

वांकेस—वाकस पहा.

वांकेसिर—वि. वांकडा, वक्रांग; कुब्ज. 'वाकेसिर पांगुळ थोटे।'–दावि ४७४.

वांकोण—न. वाकण पहा.

वाकोरणें—क्रि. वांकोऱ्यानें तास पाडणें.

वाकोरा—पु ओरखडा; ओचकारा; करकोचा.

वाकोरी—पु. (कुण. कर.) न्हावी; नापित. 'वाकोऱ्याला पोराकडून निरोप पाठविला.' [वाकोरा]

वाकोरें—न. १ दाराच्या फळीचा खालचा वात्या, वाता, वाथा. २ लहान तास पाडण्याचें आऊत; नांगरी.

वाको(कु)रें—न. लहान वाफा; पाणी देण्याच्या सोई-करतां पाण्याच्या दांडाजवळ पाडलेला लहान वाफा.

वाक्य—न. १ एक संपूर्ण विधान करणारा शब्दसमूह; पूर्ण अर्थ होईल इतका शब्दसंघ; लहान परिच्छेद; सिद्धान्त. २ उक्ति; वचन; नियम; सूत्र; विधान. 'सत्यव्रतरतमति पतिस तिचें वाक्य करावें लागे।'–मोरामायणें १.४९९. [सं. वच् = बोलणें] **०खंडन**-न. १ सिद्धान्ताची असिद्धता प्रस्थापन करणें, खोडून काढणें; चुकीचें ठरविणें. २ वाक्यांतील दोषदर्शन; वाक्य चुकीचें ठरविणें. ३ वाक्याचे अवयव पाडणें; विभाग करणें; तुकडे पाडणें.

०दीप–पु. स्पष्ट, सुबोध वाक्यें. **०दोष**–पु. वाक्यांतील न्यूनता, चूक, अशुद्धता इ०. साहित्यशास्त्रकार हे दोष अनेक मानतात. उदा० प्रतापरुद्र ग्रंथांत पुढील वाक्यदोष दाखविले आहेत:–शब्दहीन अथवा शब्दशास्त्रहीन; क्रमभ्रष्ट; विसंधि; पुनरुक्ति; व्याकीर्ण; वाक्यसंकीर्ण; भिन्नलिंग; भिन्नवचन; न्यूनोपम व अधिकोपम; भग्नबंद; विसर्गलुप्त; अस्थानसमास; वाच्यवर्जित; समाप्तपुनरात्त; संबंधवर्जित; पतत्प्रकर्ष; अधिकपद; अष्टार्धार्धविवाह; प्रक्रमभंग; अपूर्ण; वाक्यगर्भित; यतिभ्रष्ट; अशरीर; अरीतिक इ० काव्यप्रकाशांत हे दोष पुढील सांगितले आहेत:–प्रतिकूलवर्ण; उपहतविसर्ग; लुप्तविसर्ग; विसंधि; हतवृत्त; न्यूनपद; अधिकपद; कथितपद; पतत्प्रकर्ष; समाप्तपुनरात्त; अर्थांतरैकवाचकपद; अभवन्मतयोग; अनभिहितवाच्य; अस्थानपद; अस्थानसमास; संकीर्ण; गर्भित; प्रसिद्धिहत; भग्नप्रक्रम; अक्रम; अमतपदार्थ. यांप्रमाणेच शब्ददोष. शब्दालंकार, वाच्यालंकार पहा. **०पद्धति** स्त्री. वाक्यरचनेसंबंधी नियम, वाक्यरचनेची रीति. **०पूजा**–स्त्री. शब्दरूपी पूजा. 'स्वामी निवृत्तिरांजा तो अवधारू वाक्यपूजा ज्ञानदेवो म्हणे।' –ज्ञा १५.५९८. **०पृथक्करण**–न. वाक्यांतील उद्देश–विधेयादि निरनिराळे भाग सांगून त्यांचा परस्परसंबंध दाखविणें. **०प्रयोग**–पु. वाक्याची, शब्दांची किंवा भाषणाची योजना, रचना. **०रचना**–स्त्री. वाक्यांतील शब्दांची मांडणी, ठेवण. **०विन्यास**–पु. वाक्यांतील शब्दांची जुळणी, मांडणी, परस्परसंबंध; त्यासंबंधीं नियम वगैरे. **०विशारद**–वि. वक्ता; पंडित; भाषणांत कुशल, चतुर **०शः**–क्रिवि. प्रत्येक वाक्य घेऊन; प्रत्येक वाक्यास अनुसरून. **वाक्यार्थ**–पु. १ विधान; सिद्धान्त; वाक्याचें उद्दिष्ट; भाव. २ कथा. 'समर्थसेवकें वाक्यार्थ लिहिले।' –सप्र ३.२. **वाक्यालंकार**–पु. वाक्यांतील निरर्थक शब्द; केवळ शोभेकरितां वापरलेले शब्द; वाक्यांतील मोकळी जागा भरण्यासाठीं किंवा खंड पडूं नये म्हणून वापरलेला शब्द. उदा० जेंहत्ते.

वांक्या—स्त्रीअव. वांकी. वांक अलंकार पहा. 'पिंवळया वांक्या रुणझुणती।' –रामाची भूपाळी.

वाख—पु. धागा; तंतु. वाक पहा. **वाखंडी**–वाकंडी पहा.

वाख—पु. वाखळ; खळगा; खड्डा. 'वेंचेना परी कुसी। वाखा न पडे।'–अमृ ७.२६७. **वाखती**–स्त्री. खड्डा; खळगा; खोळ.' भरोनियां घरीं। राहिलों वाखती। तुका म्हणे संतापाडें। करा पुढें वाखती।'–तुगा २६४१. –ज्ञा ९.४८०; १३.८०६.

वाखणणी–णें—वाखाणणी वगैरे पहा.

वाखणें—क्रि. भिणें; वाकणें पहा.

वाखवोर, वाखवगार, वाखवट—वाक दोर इ० पहा.

वाखर—पु. १ वस्तरा. (गो.) वाखोर. 'प्रभुतेजें नुरे वज्रें तेजस्वी पर वाखर।' –मोरोरामायणें ५.–तुगा ३०८२. २ खुरपें. 'राम तो सदसि प्रशस्त महागमे पर वाखर।' –मोरामायणें ५; –मोद्रोण ९.७६. –वि. वाखासारखे पांढरे; शुभ्र(केंस). 'जाहाले केश सकळ वाखरो।' –राला २९.

वाखळ—स्त्री. पोटाची खळगी; भुकेमुळें पोटांत पडलेली खळी.

वाखळणें—अक्रि. वाखा होणें; अतिशय आजारी पडणें; गर्भपात होणें.

वाखळ—स्त्री. वाकळ पहा.

वाखा—पु. १ दुःख; पीडा; उपद्रव; नाश; संकट. 'पद प्रणामी बहु होति वाखे।' –सारुह ५.२५. २ महामारी, पटकी वगैरेची साथ. 'आकांत वाखा प्रळये।'–दा ३.७ ८२. ३ अकाली गर्भपात. ४ संहार; मारामारी; युद्ध. 'बेलोलखानाचा थोर वाखा केला.' –सभासद ४९. [अर. वाकिआ]

वाखाडी—स्त्री. (गो.) तोफा सोडणारें जहाज.

वाखांडी—स्त्री. वाकंडी पहा.

वाखाण–णा—नपु. स्तुती; चर्चा; उहापोह; व्याख्यान; विवरण; स्पष्टीकरण.–ज्ञा १८.१७४५. [सं. व्याख्यान, वि+आ+ख्या; प्रा. वक्खाण; पं. बं. बखाणना; हिं बखानना; सिं. वखाणणु; गु. वखाणवुं] **०णी**–स्त्री. नांवाजणी; स्तुती. **०णें**–क्रि.१ स्तुती करणें; नावाजणें; चाहां करणें. 'चारी वेद ज्याची कीर्ति वाखाणिती।' –तुगा १४. २ वर्णन करणें; स्पष्ट करणें; विवरण करणें. 'सुचिलें तेंहि पुढें प्रशस्ते। वाखाणिजेल प्रसंगें।'–रास ५. ७००.

वाखार–री—स्त्री. दुकान; कोटी; वखार पहा. 'भरील वाखारी श्रवणाच्या।' –एभा ३.८७२. 'तो देखे ज्ञानाची वाखारी।' –ज्ञा ७.१३५. **वाखारी वोखारी**–स्त्री. (महानु.) भांडारांतील नगद शिलक. 'भाडार फोडोनि वाखारी। ने तें नुपसाहे।' –दृष्टांतपाठ ८१.

वाखाळणें—क्रि. वाखलणें पहा. चुकीनें वाखाणणें या अर्थी वापरतात.

वाखील—न. (गो.) अस्वल.

वाखें—न. १ जाळें.–मसाप २.२.५७. २ (गो.) दिवाळें.

वाखो—पु. (कु.) वाखा पहा.

वाखोर—पु. वाखर पहा.

वाखोरणें—क्रि. वाकोरणें पहा. **वाखोरें**–वाकोरें पहा.

वाखोरा—पु. घर; वाखार पहा.

वांखोरी—स्त्री. माळ? –शर.

वाखोरें—न. खिसा; कप्पा. 'न्हाणवी तंव आपण चोळीचें वाखोरें पाहिलें।' –नागदेवस्मृति ३६.

वाखोऱ्या—स्त्रीअव. (व.) वाकुल्या पहा.

वाग—स्त्री. १ रहदारी; चाहूल: वापर; वागणूक २ वाहण्यास, नेण्याआणण्यास सोईस्करपणा, सुलभता. 'आठकीचा वाग'=आठ माणसांचें ओझें. [वागणें]

वांग—पु. १ सोनें, रुपें वगैरेस मोरचूत वगैरेमुळें पडलेला डाग. २ धातूच्या पत्र्यावर दिसणारे हातोड्याचे टोके. ३ तोंडावरील सुरमाच्या पुटकुळ्या. 'वांग तिळ सुरमें लासें।' –दा ३. ६.५०. [सं. व्यंग]

वांग—पु. बधिरता; जडपणा; शैथिल्य (भारामुळें येणारें). (क्रि० येणें.)

वांग—पु. भलारी; शेतकाम करतांना म्हणावयाचें गाणें.

वांग—पु. एक मुलींचा खेळ. –मखेपु ३३६.

वागन्यग्रोधा—पु. एक वनस्पती.

वागजाई—स्त्री. वाघजाई, एक देवता. 'वागजाई देवी म्हणे तूं वाग्वाणी।' –सप्र ५.३१.

वागटी—स्त्री. १ एका माशाचें नांव. २ (मावळ) रानमांजराची एक जात.

वांगड-ड-डी—पुस्त्री. १ (गो. कु.) सोबत; सहचर. २ कुल; बेटाळें. 'भारद्वाज गोत्राच्या मंडळीला जसें ह्या वांगडांत घेतलें...' –हिंदु ११.२.३०. **वांगडें**–क्रिवि. बरोबर; संगती. [सवंगडी]

वागणूक—स्त्री. वर्तन; राहणी; व्यवहार; चालचलणूक; सामान्यत: स्थितिगति. **वागणें**–क्रि. १ राहणें; स्थितिगति; अस्तित्व, चलनवलनादि व्यापार; वर्तन; व्यवहार; संबंध असणें; येजा करणें वगैरे. 'करी तिरंदाजी वागूं नेदी राउताला।' –ऐपो ८६. २ (मनांत कामक्रोधादि विकार) घोळत असणें; वाटणें; चालू असणें. 'या नियमावर विचार करतां असें बुद्धिस वागूं लागलें.' ३ (ग्रंथ, पद्धति, तऱ्हा, मत, चाल) प्रचारांत, चालू, व्यवहारांत असणें. ४ (ना.) प्रकृति नीट राहणें. **वागायला निघणें**–आजारी मनुष्य हिंडूंफिरूं लागणें. **वागायाचा**–वि. नेहमी वापरावयाचा; रोजच्या उपयोगांतला, धडोतीचा. 'हा कागद वागायाचा, हा सनदेचा.' **वागदार**–न. (कु.) ज्यांतून पुष्कळ येजा होते असें दार; वापराचें दार.

वागबारस—स्त्री. वसुबारस; गोवत्सद्वादशी; कार्तिक शुद्ध द्वादशी. कांहीं ठिकाणीं अश्विन वद्य द्वादशी. या दिवशी गोवत्सपूजा करतात.

वागरजाळ—न. (कु.) फडकीं व वागाळीं यांचें जाळें.

वागराटी—स्त्री एक वनस्पती.

वागड-रू—न. जाळें; 'संसार वागरू चुके।' –भाए ४०. 'वागरूं मृग पडिलें' –ज्ञप्र ६६.

वागवटी—स्त्री. उक्ति; भाषण; बोलणें. 'ऐसा प्रेम होतसे कष्टि। आल्या पुसे वागवटी' –नव १५.१४, –नव ३.८५.

वांगवांग—क्रिवि. कसकस; वखवख; किरकिर; अंग, जीव, प्रकृति वगैरे बरोबर न चालणें; कुथुकुथु करणें. (क्रि० करणें).

वाग(व)विणें—सक्रि. १ वागणें प्रयोजक भार संभाळणें; निभावून घेणें; सांभाळणें; खपवून घेणें; जोपासना करणें. २ (ल.) लाबविणें; उडविणें; लबाडीनें घेऊन जाणें. **वागवून घेणें**–संभाळून घेणें; (मूल चाकर वगैरेस) सदयतेनें चालवून घेणें; निभावून घेणें.

वागळ—वागूळ पहा.

वागळ-ळी-ळें. वाघली-ळी—स्त्री. एक प्रकारचा मासा. याची शेपटी करवतीसारखी असते. यांचें खत झाडास घालतात. याचे प्रकार–बोलाड, पलवा, वानवसा, भाटया, आघ्या, शेवते ६०. –कृषि ७५६.

वागा—पुस्त्री. १ करगोटा; कडदोरा. 'जयजय तिमया कोनेरी। तुझा वागा सोनेरी।' –मध्व २७१. २ दोरे; लगाम. 'डोळेयांचिआं वागा ओढोनि।' –शिशु ६०८. 'तेथ गाडिया वागा। राउतें करीति श्रीरंगा।' –शिशु ५३१. ३ (महानु.) वाङ्निश्चय. 'उदारे वागा केला श्री गजमोहनु।' –मातृकी रुक्मिणी स्वयंवर ९५. ४ एक प्रकारचा अंगरखा; पोशाख.

वांगा—वि. (व.) तिरपा; चकणा; तिरवा. [सं. व्यंग] **वांगें पाहणें**–तिरवें पाहणें.

वागाटी—स्त्री. एक वनस्पती.

वागाबुंद—वि. (गो.) उडाणटप्पू.

वागारा—पु. लगाम; दोर. 'सारथी आपुडीत वागारे।' –उषा ७३.२८. 'मोटका देओ वागारां हातु घाली।' –शिशु १०११.

वागां(घा)रा—पु. चाहूल. [वागणें]

वागाळ—न. (कु.) वाघूळ पहा.

वागी—पु (गो.) शिंगा मासा.

वांगी—स्त्री. एक फळभाजीचें झाड; याचे फळास वांगें म्हणतात. वांगा पुराणाची, वांगीं पोहे; वांगी भात हे याचे पदार्थ करतात. [सं. वृंताक; हिं. बैंगण]

वागुजास्त—स्त्री. सोंपवणूक. 'ठाणीं वागुजास्त करावी।' –रा ५.१३२. [फा. वा–मुझास्तन्]

वागुजी—स्त्री. 'गाढी वागुजी गोपाळा राणें राया' –शिशु ५१२.

वागुर-रा—स्त्री. पक्ष्यांस पकडावयाचें जाळें; पाश; बंधन. 'तंव पांगितु जाळातें। चिरितु वागुरेतें।' –भाए ४०.३१८. –ज्ञा ४.२६३. [वाक+दोर]

वागुरी—स्त्री. घोड्याची चाल. –अश्वप १.१८८.

वागु(गो)ऱ्या—स्त्रीअव. चिंध्या; लकतऱ्या; चिरफळ्या. 'नव्या साडीच्या पोरीनें वागुऱ्या करून टाकल्या.'

वागु(ग)ळ—स्त्रीन. १ वटवाघूळ. २ पाकोळी. [स. वल्गुली, वाग्गुद]

वागूळ करणें—(नाशिक) रंवथ करणें (क्रि० करणें). [ऊगाळू]

वांगें—न. वांगीचें फळ. वांगी पहा. **वांगेसट**–स्त्री. चंपाषष्ठी मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी.

वांगेलिसा—पु. (स्त्रि.) प्रेषित. (इं.) इव्हांजेलिस्ट. –ख्रिपु.

वागेश्वरी—स्त्री. सरस्वती. 'जी आपुलिया स्नेहाची वागेश्वरी।' –ज्ञा १०.८.

वागोरा-रे-ऱ्या—वागुरा पहा.

वाघ—पु. १ एक क्रूर मांसाहारी जंगली प्राणी; एक वन्य पशु. २ एक उडया मारणारा कीटक. ३ बुद्धीबळांतील शेळ्या मेंढ्या खेळांतील हत्ती. ४ एक मुलांचा खेळ. –वि. (ल.) जागरूक व भयप्रद. [सं. व्याघ्र; प्रा. वग्घ; पं. हि. बं. बाघ; सिं. बाघु; गु. वाघ] (वाप्र.) **०डांभणें**–गाऱ्याजवळ (वाघ आल्यास त्यावर मारा करील अशी बंदूक बांधून ठेवण. सामाशब्द– **०जाई**–स्त्री. व्याघ्रदेवता; एक क्षुद्र देवता. **०जोर**–पु. (व्यायाम) एक प्रकारचे दंड काढण्याची पद्धति. –व्यायाम मासिक मार्च १९२३. **०ट**–न. लहान वाघ; वाघ शब्दाचें तिरस्कारदर्शक रूप. **०डोळ्या**–वि. मोठ्या, बटबटीत व पाणीदार डोळ्यांचा. **०नख**–न. १ वाघाचीं नखें सोन्यांत मढविलेला लहान मुलांचा एक दागिना. २ वाघाच्या नखांच्या आकाराचें पोलादी हत्यार. ३ वाघाचा पंजा. **०नख सांखळी**–स्त्री. मद्रासकडील महाराष्ट्रीयांत प्रचलित असलेला एक दागिना. **०नखी**–स्त्री. १ एक झाड. २ एक पोलादी हत्यार. **०बकरी**–स्त्री. १ एक खेळ. **०बीळ**–न. वाघाची गुहा. **०मान**–पु. मुख्य मान. 'तुम्ही आपला जो वाघमान करावा तो करून घेतला.' –भाव ६८. **०मार्‍या**–वि. १ वाघास मारणारा. २ (ल.) अतिशय बळकट, शूर, धाडसी. ३ अतिशय लागणारा (हरिक, सुपारी वगैर पदार्थ). **०मुंगी**–स्त्री. भयंकर देश करणारी मुंगी. **०मेंढी-मेंढ्या**–स्त्री. बुद्धिबळांतील एक खेळाचा प्रकार. **०यी**–स्त्री. सुंगट जातीचा मोठा मासा. **०री**–पु. जाळ्यांत पशुपक्षी पकडणारी एक जात व तींतील व्यक्ति; फासेपारधी; यांचे सांकेतीक शब्द–ऱ्हा=गुरू; माती=मृतमांस; माड, बिलाडी=पोलीस; झेमी=घरफोडी; मांढनो=चोरलेलें जवाहीर; हाथवान=चोरीचें कापड; तारखो=रुपया; पिलीऊन=सोनें; धोलीऊन=रुपें; चमई जावन=लग्न; खावरी=वाघानी; दातरड=घरफोडीचें हत्यार; चिरिंगो=किड्यांचा जुडगा; बांदो=साथीदार; भुन्यो; माकडो=युरोपिअन; वस्तू=पैसे इ०. **०रू**–न. वाघास तुच्छतादर्शक शब्द. **०वडाई**–स्त्री. वाघजाई; क्षुद्रदेवता. 'फूजिति वाघवडाइआं।'–शिशु ५२७. **०व बकरी**–एक मुलींचा खेळ. –मखेपु ३५५. **०वें, वाघावें**–न. १ वाघांचा उपद्रव. २ (ल.) उपद्रव; त्रास; पीडा; काहूर. 'आमच्या विरुद्ध काय वाघवं उठलंय तें तूं पहातच आहेस' –झांमु १७७. **वाघाचा डोळा**–पु. (संकेत) रुपया. **वाघाची जाळी**–स्त्री. वाघास लपून बसण्यास योग्य झाडी, वेलांची गुंतागुंत वगैरे. **वाघाची मावशी**–स्त्री. मांजर. **वाघाचें कातडें**–न. १ व्याघ्रचर्म; वाघाचें चामडें. २ (ल.) अधिकार, सत्ता गेल्यावरहि ज्यास लोक भितात असा मनुष्य. **०कातडें पांघरणें**–आव आणणें; पोकळ सत्ता, सामर्थ्य दाखविणें; ढोंग करणें. **वाघाडया**–पु. मंत्रसामर्थ्यानें वाटसरूंच वाघांपासुन संरक्षण करणारा मांत्रिक. **वाघी**–स्त्री. १ वाघ्याची भंडार ठेवावयाची–वाघाच्या कातडयाची पिशवी. २ वाघाच्या तोंडाचा पुढें आकार असलेली जलद चालणारी नौका, होडी. ३ वाघाच्या कातडयासारखी पिवळया रंगाची, वर टिपके असलेली घोडयाची झूल. ४ लाकूड तासण्यासाठीं त्याच्याखालीं ठेवावयाचा सुताराचा एक खांच पाडलेला ठोकळा. ५ दोन टोंकांचा खिळा ६ एक प्रकारचा सोनाराचा चिमटा. –वि. वाघाच्या रंगाचा; वाघासारखा. 'एकें वाघी पिवळी पुंडी।' –दाव २८१. **वाघी कवडी**–स्त्री. टिपके असलेली कवडी. **वाघीण**–स्त्री. स्त्रीजातीचा वाघ; वाघाची मादी. **वाघी तंबाखू**–स्त्री. पानावर टिपके असलेली तंबाखूची जात. **वाघेरें**–वि. वाघानीं भरलेलें. –लोक २.७७.

वाघचबका—पु. एक फुलझाड व फूल; बचनाग.

वाघचवडा-डें—पुन. (वाघाचें मांस लावल्यानें बरा होणारा रोग) तळहातास होणारा रोग.

वाघटी—वागटी पहा.

वाघंटी—स्त्री. एक झुडुप. **वाघंटें**–न. वाघंटीचें फळ; गोविंदफळ; याची भाजी करतात. [सं. व्याघ्राटकी]

वाघड—पु. कापसाची एक जात. याचा कापूस बोंडांतून ओढून काढावा लागतो.

वाघण, वाघीण—स्त्री. आगगाडीचा मालाचा उघडा डबा. [इं. वॅगन]

वाघ(घू)ळ—स्त्रीन. उडतें खोकड; वडवाघूळ. [सं. वल्गुली, वाग्गुद]

वाघळी, वाघाळें—स्त्रीन. एक प्रकारचा मासा. वागळ पहा.

वाघा—स्त्री. लगाम. वागा पहा. 'सरसीया वाघा धरुनि मुठी।' –उषा १४२०.

वाघाट, वाघांटा-टी-टें—नपुस्त्रीन वाघांटीफळ. वाघंटी पहा.

वाघिन्सा—पु. (व.) (अप.) वाडनिश्चय पहा.

वाघुर-रा-री, वाघूर-रा—न. जाळें. वागुर इ० पहा. 'मग व्याघ्रपाश वाघुरा घेऊन कुक्षेसी।' –होला ४५.

वाघुरडें—न. ओढाताण; तगादा; मानहानि. (क्रि० करणें).

वाघूळ—न. पाकोळीच्या जातीचा एक प्राणी; वटवाघूळ.

वाघूळ—स्त्री. रंवथ. वागूळ करणें पहा. [उगालु]

वाघेटी-टें—वाघंटी पहा.

वाघेर—पु. गुजराथेंतील एक लुटारूंची जात. (वाघ शब्दांत) वाघरी पहा. [वाघ]

वाघेला—पु. रजपुतांतील एक जात. [वाघ]

वाघेश्वरी—स्त्री. व्याघ्रदेवता; एक क्षुद्र देवता. 'वाघेश्वरी इत्यादि देवतांच्या बाबतींत...' –खेया.

वाघोडी—स्त्री. एक खेळ. 'वाघोडी आणि आटापाटया।' –भवि २७.२०.

वाघोणी—स्त्री. (गो.) गोम; घोण.

वाघोबा—पु. वाघ पहा.

वाघोरा-रें—पुन. वाघुरडें पहा.

वाघोळें—न. (गो.) वाघूळ पहा.

वाघ्या घा—पु. (अव. वाघे.) खंडोबास वाहिलेला पुरुष; खंडोबाचा भक्त, उपासक. 'वाघे मुरळया भजन करिती।' –देप ९३.३. [का. वग्गे=भक्त]

वाङ्निश्चय, वाङ्मय—वाक् शब्दामध्यें पहा.

वाचक—पु. शब्द; भाषणाचा विभाग, तुकडा, अवयव; वाक्य; शब्दसमूह. –वि. १ दर्शक; दाखविणारा; अर्थाचा. उदा० काल-देश-स्थल-वृक्ष-अग्नि-वाचक. 'अन्य व्यावृत्ति सिद्ध। वाचक नव्हे।' –अमृ ५.१३ २ वाचणारा. 'मुका होय वाचकाचा।' –अमृ ६.६७. ३ महारांचा धर्मगुरु. –अस्पृ ४२. [सं. वच्]

वाचणी—स्त्री. १ वांचन; लिहिलेल्या अक्षरांचें उच्चारण. २ वाचावयाचा धडा; पाठ. **वाचणें**—क्रि. लिहिलेलीं अक्षरें उच्चारणें; पटण करणें. (गो.) वाचप. [सं. वच्=बोलणें]

वाचन—न. पठणक्रिया; वांचण्याचो क्रिया; अभ्यास; पटण.

वांचणें—अक्रि. १ जगणें; जिवंत राहणें; जिवाचा संभाळ; संरक्षण करणें. 'वाचणें तें आतां खोटें संसारीं।' –तुगा ४६. २ निभावणें; बचावणें; पार पडणें; धोक्यांतून निसटणें. ३ आजारांतून पार पडणें; बरें होणें.

वाचनालय—न. ग्रंथालय; ज्या जागेमध्यें वाचण्याकरितां ग्रंथादि ठेवलेले असतात अशी जागा.

वाचनिक—वि. १ उच्चारित; जाहीर; साक्षात्; प्रतिपादित; निर्दिष्ट; स्पष्ट केलेला; घोषित (विधिनिषेध, नियम वगैरे) अनुमानित याच्या उलट. २ मूळ ग्रंथांतील; उल्लिखित; मूळ ग्रंथांतील वचनांत असलेला.

वाचस्पति—पु. बृहस्पति; देवगुरु. –ज्ञा १०.८.

वाचा—स्त्री. १ वाक्; वाणी; वागिंद्रिय. २ भाषण; बोलणें; शब्द; वचन; बोल. 'वदलासि न तूं कधींहि अशी वाचा।' –मोकर्ण ५ ३७. ३ आकाशवाणी; अशरीरिणी वाक्. ४ अवसरणी. [सं. वच्=बोलणें] **वाचा उकठणें-पालटणें-परतणें-फिरणें-मुरडणें**-बोलणें खुंटणें; बोलणें खोटें पडणें; मागें घेण्याची पाळी येणें; गप्प बसावें लागणें. **वाचा नरकांत घालविणें**–खोटें बोलणें; वचन मागें घेणें. **वाचा फुटणें**-बोलण्याची शक्ति येणें. **वाचा बसणें**-बोलण्याची शक्ति नाहींशी होणें; वाणी खुंटणें; बोबडी वळणें. **वाचा विटाळणें**-१ खोटें बोलणें; वचन न पाळणें. २ व्यर्थ भीड घालणें; निरर्थक शब्द वेंचणें, खर्च करणें. **०ट-ल-ळ**-वि. बडबड्या; बोलका; बोलघेवडा; वटवट करणारा. 'वाचाट हा चाट बदोन राहे।'–सारुह ८.१५. (वाप्र.) **०दत्त**-वि. १ वाग्दत्त; वाणीनें दिलेलें; वाङ्निश्चित. २ वचनानें दिलेलें; कबूल केलेलें. **०बरळ**-वि. बडबड्या; बरळणारा. 'गुरूतें वाचाबरळ।' –विपू २.६. **०रंभण**-न. परिस्फुटता; स्पष्टपणें वाचेनें निदर्शन; बोलण्यांत रूढी. 'राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेला वाचारंभण किंवा नामधेय अजून मिळालें नव्हतें।' –टिळकचरित्र १. **०विदळ**-वि. (बो.) वाचाट; वाग्रट; अद्वातद्वा बोलणारा. **वाचांश**-पु. १ (चुकीनें वाच्यांश). शब्द; चकार शब्द; उच्चार (क्रि० काढणें; करणें). २ उल्लेख; बोलणें; चर्चा. (क्रि० काढणें; निघणें). ३ परिस्फोट; लावालावी. (क्रि० करणें). ४ वचन; करार. (क्रि० करणें). **वाचाशक्ति**-स्त्री. १ वक्तृत्व; व्याख्यानसामर्थ्य; बोलण्याचें चातुर्य. २ (रूढ) वाचण्यांतील कौशल्य; स्पष्टपणा; वाचनशक्ति. ३ वाचाळपणा. 'तुम्ही अमळसें तोंड आटपून धरीत जा. भारी वाचाशक्ति करूं नका.' –शास्त्रीको. **०सिद्धि**-स्त्री. बोललेलें खरें होण्याचें सामर्थ्य; अमोघवाणी. **वाचाळ**-वाचाट पहा. 'तुका म्हणे वाचा वाचांळते।'–तुगा ७०. **वाचाळता**-स्त्री. बडबड. 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे।'–राम १६५. **वाचाळ पंचविशी**-स्त्री. बडबड. (क्रि० लावणें). 'तिची वाचाळपंचविशी आतां सारखी चालू झाली।' –गणपतराव. **०पंचांग**-न. चऱ्हाट; बडबड; वटवट. **०घाणा-णी**-वि. बोलका; बडबड्या. –क्रिवि. चावटपणें; वाचाटपणें. **वाचाळी**-स्त्री. बडबड. 'एक म्हणती साडी वाचाळी।'–दा ८.१०.१९; –ज्ञा १८.१७०९. **वाचिक**-न. वृत्त; बातमी; हकीकत; वर्तमान. –वि. वाणीसंबंधी; बोलण्यानें, शब्दानें घडलेलें. **०कर्म**-१ वाणीनें केलेलें काम. (विशेषतः पातक, खोटें, कडू बोलणें वगैरे). **०प्रतिकार**-पु. तोंडानें केलेला विरोध; शाब्दिक विरोध. 'त्यांचा वाचिक प्रतिकारहि आम्हाला करवत नाहीं।'–केले २.५०३.

वाची—वि. वाचक; दर्शक; दाखविणारें. उदा० गुण-काल-देश-धर्म-वाची.

वा(वां)चून, वाचौनि, वांचौनिया—क्रिवि. शिवाय; खेरीज; सोडून; विना: विरहित. 'परिणामीं भवदुःखा । वांचौनि नाहीं ।' –ऋ ३०; –ज्ञा ३.४४.

वाचे—वाचा शब्दाची सप्तमी. वाचेमध्यें; तोंडांत. 'सदा सर्वदा नम्र वाचे वदों दे ।' –राम २४.

वाचेंदयाळ—वि (कु) वाचाळ.

वाचेंवाद्‌ध—स्त्री (कु.) शब्दानें दर्शविलेली क्रिया.

वांछा—स्त्री. इच्छा: मनीषा: हेतु. –ज्ञा १७.१७६. [सं. वञ्छ्=इच्छिणें] **वांछनीय**–वि. इच्छिण्याजोगें **वांछिणें**–क्रि. इच्छा करणें. **वांछित**–वि. इष्ट: इच्छित. –ज्ञा १६.३३८.

वाच्य—न. १ उद्दिष्ट; बोलावयाची, सांगावयाची गोष्ट; व्याख्यानाचा विषय. –ज्ञा १८.१६८२. २ (व्या.) प्रयोग. कर्तृवाच्य; (कर्तरि); कर्मवाच्य; (कर्मणि). –वि. १ बोलण्यास, उल्लेख करण्यास योग्य, शक्य, इष्ट, जरूरीचें –ज्ञा ११.४४. २ कर्तृविषयक; विधेयात्मक; गुणवाचक; शक्यतावाचक वगैरे (शब्द). ३ विशेषणाप्रमाणें विभक्ति रूपें होणारें. ४ दूषणीय; अश्लाघ्य. 'जो आपल्या धर्मातील वाच्यस्थलें दाखवील तो पाखंडी ।' –आगर ३.२८. [सं.] **वाच्यता**–स्त्री. चर्चा; गवगवा; प्रसिद्धि; सांगत फिरणें. (क्रि० करणें). **वाच्यार्थ**–पु. १ शब्दशः अर्थ; स्पष्टार्थ. २ जें बोलावयाचें तें; बोलण्यांतील उद्दिष्ट. **वाच्यांश**–पु भाषण; शब्द; बोललेली किंवा बोलावयाची गोष्ट; वाचांश असाहि प्रयोग करतात. 'वाच्य वाचक वाच्यांश । त्रिपुटीत ज्याची सत्ता अंश ।' –ज्ञानप्र ३२१. **वाच्यालंकार**–पु. भाषणांतील, वाक्यांतील सौंदर्यदर्शक स्थल; सामान्यतः यांस अर्थालंकार म्हणतात–शब्दालंकार याच्या उलट. यांपैकीं कांहीं पुढें दिले आहेत:–उपमा; अनन्वय; उपमेयोपमा; प्रतीप; रूपक; परिणाम; उल्लेख; स्मृतिमान्; भ्रांतिमान्; ससंदेह; अपह्नुति; उत्प्रेक्षा; अतिशयोक्ति; तुल्ययोगिता; दीपक; प्रतिवस्तूपमा; दृष्टांत; निदर्शना; व्यतिरेक; विनोक्ति; समासोक्ति; परिकर; परिकरांकुर; श्लेष; अप्रस्तुतप्रशंसा; प्रस्तुतांकुर; पर्यायोक्त; व्याजनिंदा; व्याजस्तुति; आक्षेप; विरोधाभास; विभावना; विशेषोक्ति; असंभव; असंगति; विषम; विचित्र; अधिक; अल्प, अन्योन्य; विशेष; व्याघात; कारणमाला; एकावली; मालादीपक; यथासंख्य; पर्याय; परिवृत्ति; परिसंख्या; विकल्प; समुच्चय; समाधि; प्रत्यनीक; काव्यार्थापत्ति; काव्यलिंग; अर्थांतरन्यास; विकस्वर; प्रौढोक्ति; संभावना; मिथ्याध्यवसिति; ललित; प्रहर्षण; विषादन; उल्लास; अवज्ञा; अनुज्ञा; लेश; मुद्रा; रत्नावली; तद्‌गुण; पूर्वरूप; अतद्‌गुण; उत्कर्ष; मीलित; सामान्य; उत्तर; चित्र; सूक्ष्म; व्याजोक्ति; विवृतोक्ति; युक्ति; लोकोक्ति; छेकोक्ति; वक्रोक्ति; स्वभावोक्ति; भाविक; अत्युक्ति; निरुक्ति: प्रतिषेध: विधि; हेतु; रसवत्; प्रेयस्; ऊर्जस्वित; समाहित: भावोदय; भावसंधि; भावशबलता. ह० यांचें वर्णन काव्यप्रकाश किंवा प्रतापरुद्र वगैरे साहित्यावरील ग्रंथांत पहावें.

वाज—स्त्री म्यान: खोळ. 'एक वाज मढीव मखमली लाल नवी, समेत कचक लोखंडी वर मुलामा सोनेरी.' –समारो ३.२४९. [सं. वज्=जाणें]

वाज—बोलणें; प्रवाद 'अगा प्रकृती पगैता । एकु आथी पाडमुता । एसा वाजु तो तत्त्वता ।' –माज्ञा १३.१०२९.१४.७९

वाज—पु. १ श्रम २ (गो) आलस: कटाळा –तुगा २२०५. –वि पुष्कळ 'मनामध्यें आले वाज ।' –दावि १८१. [अर. वजअ्=दुःख]

वांज वांजट, वांजनिथि, वांजा—वांझ. वांझट इ०पहा.

वाजगस्त—स्त्री. सवाय पट्टारा. याचे उलट चोरगस्त.–मोल.

वाजगस्त, वाजगुदस्त—वि. परत दिलेलें; परावृत्तादाय –राज्य. [फा. बाजुझाश्त=मुक्त, परत केलेलें]

वाजघट—वि. (व.) उघडउघड. [फा. वाज्=उघडा]

वाजट—न. १ प्रसिद्धि; डंका; गवगवा; बभ्रा; बोभाटा; वाच्यता; परिस्फुटता. –केसरी २२.१२.३६. २ जाहिरी; प्रसिद्धि; प्रसार. (क्रि० करणें). –वि. १ प्रसिद्ध; बोभाटा झालेला. २ जाहीर केलेला. ३ वाचाट; व्यर्थ बडबडया; वाद घालणारा. 'चाट चावट वाजट ।' –दा २.३.३०. 'उच्छृंखळ पापी धीट वाजट ।' –स्वानु ४.४. ४ वाजणारा; नाद करणारा; आवाज करणारा. 'सरत्न वर मेखळा लसित घंटिका बाजटा ।' –निमा चिद्बोधरामायण, सर्ग ३. श्लोक १८. 'त्या पादुका वाजटा ।' –आसीता १०. –क्रिवि. प्रसिद्धपणें; उघडपणें. [वाजणें]

वाजणें—अक्रि. १ शब्द करणें; नादणें; आवाज काढणें. २ चर्चेचा विषय होणें; प्रसिद्ध होणें. ३ लागणें; विषय होणें (थंडी, हींव). 'माथां वाजती घाये ।' –एरुस्व ८.४१. ४ शिवशिवणें; आवाज करूं लागणें (दांत). 'वाजतां दातोरीं । काई आइकिजेना ।' –शिशु ९५१. ५ वाहणें; सुरू होणें (वारा). 'वाजतिया वायूतें जरी होकारी ।' –ज्ञा ९.१२५. 'अहंकुवावो वाजतां थोरू । अवघाचि खवळे भवसागरू ।' –एभा २.९५. ६ आदळणें; चिकटणें; बाधणें; उद्भवणें; 'परी पाखंडता अंगीं वाजे ।' –एभा २०.४८. 'बाळ म्हणोनि धरितां व्याळ । अनर्थ वाजे रोकडा ।' –मुआदि ३१.१००; १६.१०. ७ (राजा.) चिरकणें; पिंजणें (वांसा, कळक वगैरे). ८ (घड्याळ) ठोके पडणें; घटिका, तास भरणें. 'आठ वाजले.' [सं. वद्; प्रा. वज्ज; हिं. बजना; सं. वाशृ–शब्दे. वाश्यते–वास्सए–वासे–वाजे. –भाअ

१८३३] **बारा वाजणें**–घटिका पूर्ण भरणें; नाशाची वेळ येणें; नाश होणें. **०गाजणें**–१ गर्जना, गडगडाट, कडकडाट इ० होणें. २ गाजावाजा, प्रसिद्धि, बोभाटा, बभ्रा होणें. **०गाजत**–क्रिवि. वाद्यांचा आवाज करीत; गजरानें; थाटामाटानें; डामडौलानें (क्रि० जाणें; येणें–मिरवणूक वगैर). **वाजता**-वि. आवाज करणारा; खणखणीत. **वाजता नारळ**-पु. पाणी असलेला, आवाज करणारा नारळ. गोटा नव्हे तो. **वाजता पुडा-वाजतें पूड**–पुन. जिकडून थाप मारावयाची ती मृदंगाची बाजू; डग्याची नव्हे ती. **वाजती घांट**–स्त्री. (ल.) फार बोलकी, वटवट करणारी व्यक्ति. **वाजतें गाळ**–न. एक मुलींचा खेळ. –मखेपु ३४१. **वाजतें फूल**–न एक मुलींचा खेळ. –मखेपु ३४०. **वाजतें वारें, वाजत वारा**–पुन. संकट; आपत्ति; त्रास. 'उभयतांस मी वाजतें वारें।' –अफला १.४. 'तुम्हावरी वाजतवारा येथौनि धरिजैल।' –सुत्रपाठ १०४.

वाजंतर, वाजंतें, वाजंत्रीं, वाजंत्रें, वाजांतर—न. वाद्य; सुर, सनई, संबळ इ० वाद्यसमूह. 'वाजंत्र्यांचा नाद गंभीर। वानरीं केला भुभुक्कार।' –भारा किष्किंधा ९.४७. 'ऐसें नाहीं कोणी वाजंत्र।'–एभा २३.९. 'दमामे नगारे वाजंतरें।'–वेसीस्व ७.११. (कु.) वाजांतर. [सं. वादित्र] **वाजंत्री**-पु. वाजंत्र वाजविणारा. **वाजप**-न. (गो.) वाद्य; वाजंत्री.

वाजपूस, वाजपुशी—स्त्री चौकशी; विचारणा; वास्तपुस्त; शोध; तपास. 'सावकार येथें कोण आहेत म्हणून वाजपूस करावयास लागले.'–ख ८.३९७४. [फा. बाझ्+पुर्स]

वाजपेय—पु एक यज्ञविधि; सप्तसोमसंस्थापैकीं एक सोमसंस्था. [सं.]

वाजब-बी-वी, वा(जि)जीब-बी, वाजावाजवी—वि. न्याय्य; रास्त; योग्य; उचित; आवश्यक; मुनासब; कायदेशीर; उजु. 'तें करणें वाजीब व लाजिम आहे'–रा १०.२८०. [अर. वाजिब्] **वाजबमिति, वाजीब मिती**–स्त्री. ज्या दिवशीं विशिष्ट गोष्ट घडली किंवा घडावयाची ती दस्तऐवजांत नमूद केलेली मिति, तिथि, दिवस. **वाजबुल्-अर्ज**–स्त्री. लेखी आज्ञा. 'वाजबुल् अर्ज पातशहापासुन दस्खत करून मागितली.' –दिमरा १.८६. [अर. वाजिबुल् अर्झ]

वाजव(वि)णें—सक्रि. १ शब्द करणें; आवाज काढणें (वाद्य वाजवून). २ जाहीर करणें; डंका, दौंडी पिटणें. [वाजणें प्रयोजक] **वाजवणा**–पु. वाद्य वाजविणारा.

वाजा—वि. नीट.

वाजा, वाज्याच्या शेंगा—स्त्रीअव. (खा.) गोवारीच्या शेंगा; वावच्या.

वाजागाजा, वाजांवाजा—पु. गाजावाजा; प्रसिद्धि; गवगवा; बोभाटा; दणका. (क्रि० करणें.) [वाजणें+गाजणें] **वाजेवाजे**–पुभव. वाजागाजा; प्रसिद्धि. (क्रि० करणें.)

वाजिअ—वि. जाहीर; प्रसिद्ध. [अर. वाझीह्=उघड, स्पष्ट]

वाजिवणें—वाजणें पहा.

वाजिवाह—न. अश्वशास्त्र; शालिहोत्र. 'रत्नपरीक्षा लक्षण। जाणे आपण वाजिवाह।' –एभा ११.५१७.

वाजी—स्त्री. १ अपवाद; निंदा. 'म्हणून देहा एवढेपणाची वाजी।' –विपू ७.५१. २ बोभाटा; बभ्रा. 'याची करु काय वाजी।' –राला ४४. [वाजणें]

वाजी—स्त्री. कंटाळा; त्रास; दुःख. 'कामाचिये वेळेमाजीं। आणुं नको मज वाजी।' –आपद ८०. [अर. वाजअ्=दुःख] **०येणें**–क्रि. कंटाळणें. 'किती घोळं वाजी आलों। डाग ढळेना' –दावि ५००.

वाजी—पु. घोडा. 'वाजीचें मन जाणता सकलही राजी शिपाई जया।' –र ६. [सं. वज्=जाणें] **म्ह० वाजीवर गोमाशी ताजी**–संपत्काळचे मित्र. 'वाजीवर गोमाशी ताजी। तैसे गुलाम करिती हांजी।' –अमृत ७३. **०करण**–न. १ मंत्रतंत्र औषधादिकांनीं कामवासना वाढविण्याची क्रिया. २ कामेच्छा बाढविणारें औषध, रसायन. **०तळ**–न. घोडयाची टाप, पाऊल. 'वाजी तळांची थडथड.' –वेसीस्व ६.७४.

वाजे, वाजेह्—क्रिवि. स्पष्ट; विशद; उघड. 'बाजे मरातब कृष्णराव यार कलमी केले त्यावरून वाजे होईल.' –रा १०. १६७. [अर. वाझिह्=स्पष्ट, उघड]

वाजे, वाजेकरी-लोक—बाजे, बाजेलोक पहा.

वाजेवप, वाजेवुंक, वाजांचें—अक्रि. (गो.) कंटाळणें; आळसणें. [अर. वाजअ्=दुःख; त्रास]

वांजेल—वि. (गो.) वांझ; निष्फल.

वाजो—क्रिवि. (व.) यथेष्ट; मनास येईल तसें. 'आमच्या मनाप्रमाणें वागत नसशील तर जा वाजो कुकडे बी।' –वशाप ५१.१२.४५१.

वाजौटी-ठी—स्त्री. वांझ; वंध्या; निपुत्रिक. 'निराहार तेचिया वाजौठी।' –भाए १९७.

वाज्य—क्रिवि. मेटाकुटीस; दुःखाप्रत. **वाज** पहा. 'बहुवीस तेणें गुणें वाज्य आलें।' –रारामा १५.२६६. [अर. वाजअ्=दुःख, त्रास]

वांझ—स्त्री. १ वंध्या; निपुत्रिक स्त्री. 'शल्या तैसी नवांझ वेणेची।' –मोकर्ण २७ १४. –ज्ञा १२.१३५. २ निपुत्रिक, संतानाक्षम पुरुष. ३ निष्फल उद्योग; बेफायदा धंदा. –वि. निष्फल; निरर्थक; फोल. 'कोरडेचि बोल फोस वांझ।' –तुगा

१०८३. [सं. वंध्या; प्रा. वंज्झा; पं. वंझा; सिं. वांझ; हिं. बांझ: गु. बांझणी; बं. बांझा; का. बांजि] **०खडा**–पु. गर्भधारणा न व्हावी म्हणून घ्यावयाचें औषध. **०ट–टोळी**–स्त्री. वंध्या; वंध्येस उपहासात्मक शब्द. (गो.) वांझडो–टो. –वि. व्यर्थ. 'तैसें दृश्य कां द्रष्टा या दोन्ही दशा वांझटा।' –अमृ ७.२४४. **०तिथी–तीथ**–स्त्री. ज्या दिवशीं कोणतेंहि कर्म, विधि विहित नसतो असा दिवस. **वांझा**–वि. वांझ पहा. १ ज्या फुलापासुन फल उत्पन्न होत नाहीं असें. २ गरे नसलेला (फणस); दाणे नसलेली (शेंग, कणीस वगैरे). ३ ज्यास फुलें येतात पण फळें येत नाहींत असा (वृक्ष–पोपया, बकुल वगैरे). ४ निष्फल; बेफायदा; निरर्थक (धंदा, श्रम, काम, हंगाम). ५ ज्या दिवशीं व्यवहार झाला नाहीं, जमाखर्च नाहीं असा (दिवस). **वांझीतिथी–तीथ–वांझतिथी** पहा. **वांझी पुनव–पूर्णिमा**–स्त्री. पौषशुद्ध पौर्णिमा. या दिवशीं अनेक मुलें असलेल्या स्त्रीस सुवासिनी म्हणून बोलावितात. **वांझें**–वि. निष्फळ; व्यर्थ. –ज्ञा १८.११९. **वांझेढक–ग**–पुन्नव. बिनपाण्याचे, पाऊस न आणणारे मेघ, ढग. **वांझो**–वि. (गो.) वांझा. **वांझोटा–टी–डा–ळा**–वि. (उप.) वांझ; निपुत्रिक. 'जैसी एकचिवये वांझोटी।' –ज्ञा ६.१२१ **वांझोळें–ळ–ळें–वांझोळ–ळें**–न. वांझ फूल. 'म्हणोनि वांझोळें व लगती देखा।' –ज्ञा १०.३३३. –वि. व्यर्थ; निष्फळ. 'ये दोन्हीहि वांझोलें। दोन्ही जालीं।' –अमृ ८.१७.

वांझ—पु. १ (कों.) सुकत आलेला, बिनपाण्याचा नारळ. २ (गो.) खोबरें नसलेला नारळ.

वांझा–झें—पुन. वांधा; हिशोबासंबंधानें भानगड, गुंता; 'हें वांझें बाना फडणीसच काढून टाकील.' –अस्तंभा १६४.

वांझ–झां वाअंगणें, वांझसा—वांयां, वायंगणें, वायसा इ० पहा.

वाट—स्त्री. १ रस्ता; मार्ग. 'कीं भीष्में धरिली ती वरिलीच तुम्याहि वाट लेकांहीं।' –मोभीष्म १.२८. २ (ल.) वर्तनक्रम; पद्धति; परिपाटी; तऱ्हा; प्रकार; रीत. 'पहिली जी नीट वाट वाहो ती।' –मोआश्रम १.९. ३ (ल.) उपाय. 'मग पोट भराया काढिली वाट।' –दावि ८१. ४ (ल.) परिणाम; गति; निकाल. 'माझ्या फिर्यादीची वाट काय झाली कोण जाणें.' ५ बेंबीच्या खालीं पोटांत वाटीच्या आकाराचा जो उंचवटा येतो तो (ही सरली म्हणजे पोट दुखूं लागतें). [सं. वाट, पथिवस्तु निवाटःस्यात्। –त्रिकडांशेष. वर्त्मन्; प्रा. वट्ट; हिं. वाट] (वाप्र.) **०करणें**–क्रि. १ मार्ग करून देणें. २ (ल.) वर्तनक्रम ठरविणें; मार्ग दाखवून देणें; व्यवस्था, मांडणी वगैरे करणें. ३ नाहींसा करणें; दूर करणें. 'तेव्हेळीं शिशुपाळाचें राऊत। पारकेयांवरी वाट करिपें।' –शिशु ९६४. **०घडणें**–परिणाम होणें; गति होणें; मार्ग निघणें. 'अद्वैतशास्त्र नावडे यासी। पुढें वाट घडेल कैसी।' **०चुकणें**–आकस्मिक भेटणें; अनेक दिवसांनीं घरीं आलेल्यास म्हणतात. 'आज फारा दिवसांनीं वाट चुकला.' –मोर १३. **०धरणें**–१ मार्ग अडविणें, रोखून धरणें. 'एवढ्या रानामध्यें जाण। वाट धरून बैससी कोण।' –रावि. २ मार्गप्रतीक्षा करणें; वाट पहाणें. **०पाडणें**–वाटेंत चोरी करणें; लुटणें; दरोडा घालणें. 'किरातसंगे वाट पाडित।' –रावि १.१०५. **०पाहणें**–मार्गप्रतिक्षा करणें; खोळंबून राहणें; वाटेकडे डोळे लावून बसणें. **०मारणें**–मार्गांत गांठून लुटणें; वाटेंत दरोडा घालणें. **०लागणें**–निकाल लागणें; उरकणें; संपणें; खलास होणें; विल्हेस लागणें; दूर होणें; नष्ट होणें. **०लावणें**–१ निकालांत काढणें; विल्हेवाट करणें. २ खाऊन टाकणें; संपविणें. ३ मोडून तोडून टाकणें; नाश करणें. ४ मार्गातून दूर करणें; हांकलून देणें. **०वावरणें**–१ निरर्थक खेप घालणें; व्यर्थ हेलपाटा घालणें. **०वाहणें**–रहदारी असणें; चालू असणें; वाटसरू, प्रवासी वगैरेनीं गजबजलेला असणें; वापर असणें. 'तुका म्हणे वाहे वाट। वैकुंठींची घडघडाट।' **०वाहती करणें**–वाट मोकळी करणें; घालवून देणें; वाटेस लावणें. 'मग जाणतया जें विरू। तयाची वाट वाहती करू।' –ज्ञा १६.५७. **०सरणें**–आंत्रमार्ग निरुद्ध होणें. 'या धक्क्यानें क्षुधामांद्य होणार बहुधा वाट सरली असेल.' –मौनयौवना. **०सुधारणें**–पळणें; चालतें होणें; पाय काढणें. 'आपली वाट सुधार कसा.' –तोबं १७. **०होणें**–परिणाम, गति होणें; निकाल लागणें. **चार वाटा करणें**–उधळणें; दूर दूर करणें; विखुरणें; पळविणें; घालविणें. **चारहि वाटा मोकळ्या, बारा वाटा मोकळ्या**–पूर्ण स्वातंत्र्य; सर्व जग फिरावयास मोकळें असणें; स्वैरस्थिति; अनिर्बंध गति. **तिवाटांची माती येत नाहीं समजत नाहीं**–पूर्ण अज्ञान; कांहीं न समजणें. **देखली वाट पाहणें–करणें**–गेल्या मार्गानें परत येणें. **मधल्या वाटेस**–दोहोंच्या मध्यें; दोहों मार्गांपैकीं कोणताहि न पतकरतां, कोणाचाहि फायदा न घेतां (क्रि० येणें; जाणें; नेणें; आणणें). **वांकडी वाट करणें**–आडवळणास जाणें; मुद्दाम मार्ग सोडून जाणें; वळसा घेणें. **वाटा घेणें**–क्रि. लुटणें; लुबाडणें. 'तुजकारणें चोर घेती वाटा। तूं भुंजविली वीरा सुभटा।' –कालिका १४.६६. **वाटा लावणें**–वाटेस लावणें पहा. 'लाटून वाटा लाविले। विचारें अविचारासी।' –दा ५.९.४८. 'बळें लाविती लोभ दाटूनि वाटा।' –दावि ३६४. **वाटेग लावणें**–(गो.) रस्ता धरणें. 'हांगा बसुं नाका वाटेग लागा.' **वाटेचा पाय–वाटेचें पाऊल आड वाटेस पडणें**–कुमार्गास लागणें; चुकी होणें. **वाटे जाणें**–खोडी करणें; कुचेष्टा करणें. **वाटे–वाटेस लावणें**–१ मार्गास लावणें; रास्त मार्ग, दाखविणें. २ निरोप देणें; पाठवणी करणें; रवानगी करणें. ३ हांकून

देणें; घालविणें. **वाटेवर आणणें**–ताळ्यावर आणणें; सुधारणें; योग्य मार्गावर आणणें. 'गंगे जा वाटेवरि आण, अभय द्यावया न हा भागे।' –मोउद्योग १३.५६. **वाटेवर पडणें**–सहज प्राप्य असणें; सुलभ असणें; सुसाध्य असणें. 'माझी मुलगी वाटेवर पडली आहे' –भाव १२. **वाटेवर येणें**–शुद्धीवर येणें; योग्य मार्गास लागणें; ताळ्यावर येणें; व्यवस्थित वागूं, बोलूं, करूं लागणें; वर्तनक्रम सुधारणें. **वाटेस जाणें**–खोडी करणें; कुरापत काढणें; त्रास देणें. **वाटेस लागणें**–१ चालू होणें; योग्य मार्गानें जाणें. २ नाहींसें होणें; संपणें. **वाटेस लावणें**–१ योग्य मार्गास लावणें. 'सर्वत्र धर्म रक्षक राजे आहेत लाविती वाटे।' –मोकर्ण २९.४६. २ निरोप देणें; पाठवणी करणें; हांकून लावणें. सामाशब्द– **०करी–काढू–काढ्या**–पु. वाटाड्या; रस्ता दाखविणारा; मार्गदर्शक. **०खर्च–खर्ची**–पुस्त्री. प्रवासांत खर्चावयाकरितां लागणारा पैसा; प्रवासखर्च. 'जरी हा वाटखर्चीस पीठ देतां।' –कचेसुच ५. **०घेणा**–पु. वाटमाऱ्या; लुटारू. 'वाटघेणा वाल्हा कोळी। अजामेळा पडतां जळीं।' –निगा १२७. **०चा चोर–पोर**–पु. कोणीहि अनोळखी मनुष्य; उडाणटप्पु; भटक्या. **०चा वाटसरू**–पु. अनोळखी प्रवासी; कोणताहि संबंध नसलेला मनुष्य; कोणीहि प्रवासी; पांथस्थ; वाटेनें जाणारा–येणारा. **०चाल**–स्त्री. प्रवास. **०चालन**–न. (कातकरी) लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं वधूस वरगृहीं नेतात त्यावेळीं वाटेंत देण्यांत येणारी दारू. –बदलापूर ११९. **०तीट**–स्त्री. आक्रमावयाच्या मार्गांतील अडचणी, संकटें वगैरेस उद्देशून म्हणतात; रस्ते व त्यांतील संभाव्य विघ्नें इ० 'वाटेतिटेनें संभाळून जा.' **०पाडी**–स्त्री दरोडा. –गुजा. [वाट द्वि] **पाडिया–पाडो–डू–ड्या**–पु. वाटमाऱ्या; लुटारू; चोर; दरवडेखोर. 'म्हणे आजि वाटपाडिया। कैशी दया उपजली।' –दे कृष्णजन्म १९. 'वाटपाडयासी कैसी भाया।' –ह २.१९१. **०भेट**–स्त्री. रस्त्यांत पडलेली गांठ; आकस्मिक भेट. **०माणूस**–पु. सामान्य मनुष्य; कोणत्याहि दर्जाची व्यक्ति: रस्त्यावरील मनुष्य. –नवाकाळ १६.८.२७. **०मार**–स्त्री. १ रस्तालूट; रस्त्यावरील हल्ला. २ रस्त्यावर मित्रत्वानें थांबविणें, अडविणें. ३ (बुद्धिबळ) प्यादें दोन घरें जात असतां मध्येंच एक घर आल्यासारखें धरून मारणें. **०मारू–मार्‍या**–पु. ठग; लुटारू; रस्तेलूट करणारा. **०मार्ग**–पु. रस्ता; मार्ग; रीत; पद्धति; सामान्य नियम; साधारण व्यवहार, क्रम इत्यादि वाचक सामान्य शब्दप्रयोग. वाट पहा. **०मार्ग करणें–घालणें–दाखविणें–पाडणें–शिकविणें–सांगणें**–सामान्यतः दिशा दाखविणें, सांगणें; उपदेश करणें; सल्ला देणें. **०मार्गी**–पु. प्रवासी; पांथस्थ. **०वाटमार्गी लागणें**–१ योग्य दिशेनें जाणें; मार्गावर येणें. २ मृत्युपंथास लागणें. **वाटमार्गी लावणें**–१ योग्य दिशा दाखविणें; मार्ग दाखविणें. २ निरोप देणें; पाठवणी करणें; वाटेस लावणें. **०वणी**–न. १ वाटेंतील पाणी; गटारांतील, रस्त्यांत वाहणारें पाणी. 'नाहीं आड ना विहीरवणी। घाला वाटेचें वाटवणी। विनोद मेहुणी मांडिला।' –एरुस्व १२.१४८. २ (सांकेतिक-स्त्रियांमध्यें रूढ) मूत्र. **०वधा**–पु. वाटमाऱ्या. 'किंबहुना ते चुकले। वाटवधेया।' –ज्ञा ७.१७४.१३.५४७. **०वर्धे**–न. वाटमार; वाटमाऱ्याचा धंदा; वाटेंतील अडथळा, विघ्न. 'तया इंद्रादि पदें। करिताति वाटवर्धे।' –ज्ञा १२.६१. **०शेक**–क्रिवि. रस्त्याचे बाजूनें; दुतर्फा; वाटेनें. **०सखा**–पु. प्रवासांतील सोबती. **०सर–सरू–सारू–सुरू**–पु. प्रवासी; पांथस्त; मुशाफरी; रस्त्यानें जाणारा. **वाटाडी–ड्या**–पु. रस्ता दाखविणारा; मार्गदर्शक. **वाटेकरू**–पु. वाटाड्या. 'किंभक्तीचा वाटेकरू। ज्ञानाचा निडारू।' –भाए २५२. **वाटेचा चोर–वाटेचा वाटसरू**–पु. कोणीहि जाणारायेणारा सामान्य मनुष्य. 'वाटेच्या वाटसरूला देखील हें समजेल.' –अस्तंभा ३. **वाटेचें सोवळें**–न. (बायकी) सोंवळें वस्त्र नेसून मार्गक्रमण केल्यास त्या सोंवळ्यास दोष लागतो यावरून त्या वस्त्रास म्हणतात. **वाटेंतील कांटा**–पु. अडथळा; विघ्न. 'फडणविसांनीं आपल्या वाटेंतील वर्गभटाचा कांटा नाहींसा केला.' –अस्तंभा ६८.

वाट—पु. तोलण्याचें वजन (सुमारें पांच शेर वजनाचें).

वाट—पु. वाटिका; आश्रम. 'गोमतीच्या तटीं वाट वल्मिकीचा।' –मोरामायण १.२५७.११७.

वाट—स्त्री. (प्र.) वांट. रेडी; रेडकी; म्हशीचें वासरूं.

वाट-टं—न. (व.) मोठी पसरट वाटी. याचा ताटासारखा उपयोग करतात.

वाटकुळें—वि. (गो.) वाटोळें; गोल. [सं. वृत्त] **०पण**–न. गोलपणा; वाटोळेपणा.

वाटकोळ-खोळ वाटकूळ, वाटखूळ—पु. उशीर; पुष्कळ वेळ; वाढवेळा. [वाढणें+वेळ] –क्रिवि. पुष्कळ वेळपर्यंत; दीर्घकालपर्यंत; उशीर होईतो.

वाट(ड)गा—पु. मोठी पसरट वाटी. [सं. वृत्त] **वाटगें**–न. (खा.) मोठी वाटी. [वाटी]

वाटगें—न. शिदोरी; पाथेय. [वाट]

वाटघाट—स्त्री. १ खल; बारीक चूर्ण करणें; चिरडणें; ठेंचणें; चूर्ण करून मिसळणें (औषधें, पदार्थ वगैरे). २ (ल.) वाटाघाट, बोलाचाली; खलबत; खटपट; तजवीज; घडण; बनाव. ३ (ल.) खल; चर्चा; वादविवाद. [वाटणें+घाटणें]

वांटचा—क्रिवि. ऐवजीं; बद्दल; बदली; जागीं; **जागचा.** [वांटा+चा]

वाटण—न. १ वरवंट्यानें बारीक करण्याची क्रिया. २ अशा रीतीनें बारीक केलेला पदार्थ. [वाटणें]

वाटणा—पु. (प्र.) वाटाणा. एक द्विदल धान्य; एक कडधान्य.

वांटणी—स्त्री. १ विभागणी; हिस्सेरशी. २ पृथक्करण; निरनिराळे भाग पाडण्याची क्रिया. ३ हिस्सा; वांटा; भाग. ४ (पत्ते) पिसल्यानंतर सर्व खेळणारांस विशिष्ट संख्येइतके पत्ते देण्याची क्रिया व पाळी. **०पत्र-क**-न. ज्या लेखांवरून सहमालक अथवा भागीदार आपले हिस्से निराळे करून घेतात तो लेख; विभागणीपत्रक; यादी.

वाटणें-वांटणें—सक्रि. १ निरनिराळे विभाग करून भागीदारांस देणें; विभागणें; हिस्से, तुकडे करणें; भाग पाडणें. २ निरनिराळथा लोकांस योग्य प्रमाणांत देणें. ' दक्षिणा वांटणें. ' ३ पृथक् काढून ठेवणें. ' जें महर्षी वाटलें । विरक्तां भागा फिटलें । ' –ज्ञा ५.१४७. [सं. वंट्=विभागणें] **वांटप**-न. विभागणी; वांटणी; मालमत्तेची हिस्सेरशी. **वांटपपत्र**-न वांटणीपत्र. **वांटपी**-पु. वांटप करणारा. **वांटा**-पु. हिस्सा; भाग; अंश. (गो.) वांटो; वांटे. **वांटा उचलणें**-मध्यें सहभागी होणें; अंशभाक् असणें; हात असणें; भागीदार होणें (पापाचा, यशाचा, पुण्याचा).

वाटणें—सक्रि. १ वरवंट्यानें घांसून बारीक करणें; चूर्ण करणें; चक्काचूर करणें; पिष्ट करणें. २ (ल.) घासाघीस, चर्चा, खल, छाननी करणें; खोदखोदून चौकशी करणें. **वाटनघाटन**-क्रिवि. १ चिरडून भरडून; बारीक चूर्ण करून. २ (ल.) अत्यंत त्रास देऊन; छळ करून; गांजून गांजून. (क्रि०खाणें; पिणें; गिळणें). ' हा वाटनघाटन माझा प्राण खातो, मला प्यायला पाहतो. ' **वाटप**-न. (कु.) वांटून तयार केलेला पदार्थ, मसाला. –क्रि. (गो.) वाटणें; चूर्ण करणें. **वाटपण**-न. (गो.) घासाघीस. **वाटपिठाचा**-वि वाटून केलेल्या पिठाचा (उंडा, वडा इ०). **वाटली डाळ**-स्त्री. चण्यांची डाळ भिजवून वाटून केलेला खाद्यपदार्थ. **वाटली डाळ करणें**-(वाप्र.) १ संपुष्टांत आणणें. २ नामशेष करणें, जवळजवळ नाहींसें करणें. ३ उगाच चबीपुरतें खाणें.

वाटणें—अक्रि. १ भासणें; भावना होणें; समजणें. ' तुज वाटे हे जागृति । मज आली अनुभवा । ' –ज्ञा ७.२०८. २ मनांत येणें; इच्छा होणें; सुचणें. ' संसार सोडावासा वाटतो. '

वाटमुशी—स्त्री मुशी नांवाच्या माशाची एक जात.

वाटरूं—न. म्हशीचें रेडकूं; पारडें.

वाटला—क्रिवि. (अशिष्ट) (कों.) वाटोळा; सभोवतीं; सभोवार; आसपास. [वाटोळा]

वाटली—स्त्री. (गो.) वाटी; पेज पिण्याचें भांडें; वाटगा; तवराळें.

वाटव—पु. वाटीव-मनको.

वाटवं—न. (ना). पोतें.

वाटवणें—क्रि. पुन्हां मार्गस्थ होणें; थोडा वेळ थांबून पुन्हां चालावयास लागणें; मार्ग धरणें; रस्ता सुधारणें. [वाट] **वाटविणें**-उक्रि. १ मार्गांत बाजूस किंवा मार्गे टाकणें; पलीकडे जाणें; बाजूनें पुढें जाणें; वळसा घालून जाणें. ' ही खांदेरी वाटविली म्हणजे शहर दिसूं लागेल ' २ ओलांडणें; उल्लंघून जाणें; मार्गे टाकणें; टळणें (काळ, समय इ०). ' एवढी अंवस वाटविली म्हणजे यांस गुण पडेल. ' वटावणें पहा. [वाट]

वाटवा—पु. १ बटवा; वाटोळी सरकबंदांची पिशवी; सराफांची नाणें ठेवावयाची पिशवी. ' काच वाटव्यामाजी घालून । तोंड बांधून टाकिती । ' –जै १६.११. २ कप्पे, खण असलेली पिशवी; मोठी चंची. ३ (ना.) पोतें. ' वाटव्यांत धान्य भरलें. '

वांटवा—क्रिवि. बदल; ऐवजीं; वांटचा. –शर. [वांटा]

वाटवें—न. (व.) पोतें; गोणता. वाटवं पहा.

वाटाउ—पु. वाटसरू. ' तेथ भीये तरि वाटाउवांजवळि । ग्रामप्रांती । ' –भाए ४९३.

वाटाघाट—स्त्री. १ चर्चा; खल; विचारविनिमय; वादविवाद. २ कसून प्रयत्न; परिश्रमपूर्वक काम; त्रास; मेहनत. ३ श्रांत स्थिति; थकवा. ४ दुर्दशा; कष्टप्रद स्थिति (ऋणकोची सावकारानें, मजूराची मालकानें केलेली). [वाटणें+घाटणें]

वाटाणा—पु. एक द्विदल धान्य; कडधान्य; मटार. [सं. वटधान्य; वटदाण –भाअ १८३३] **वाटाण्याच्या अक्षता लावणें-देणें**-साफ नकार देणें; विनंति अमान्य करणें (वाटाणे कपाळास लावल्यास चिकटत नाहींत यावरून). ' बाबा हातोहात तुम्हाला वाटाण्याच्या अक्षता देतील. ' –भाऊबंदकी १३७.

वाटांदुळा-वूळ—पु. सडीक तांदुळांतील जाड कणी.

वाटारणें—क्रि. वटारणें पहा.

वाटाव-वो—पु. वटाव पहा. उणीव; कमीपणा. ' न पडेगा वाटावो । आणिकांचा । ' –ज्ञा १३.७५२.

वाटावणें-विणें—वटावणें पहा.

वाटावाट—स्त्री. सारांश समजण्याकरितां घोळघोळून केलेली चौकशी; चर्चा; खल; वाटाघाट; वादविवाद. [वाटणें द्वि.]

वांटावांट—स्त्री. अनेकांस वांटण्याची क्रिया. [वांटणें द्वि.]

वाटाळ—क्रिवि. (व.) रस्ता सोडून; आडमार्गानें. [वाट]

वाटिका, वाटी—स्त्री. फुलझाड वगैरेचा बाग; बगिचा: लहानसें उद्यान. (ससासांत) पुष्पवाटिका=फुलबाग; वृक्षवाटिका=उपवन; इक्षुवाटिका=ऊसाचा मळा इ. ' निकट पुरपतीची वाटिका रम्य पाहे। ' –मुरामायण अयोध्या ११.

वाटि(टी)व—स्त्री. (काव्य) १ अश. 'ते तुझिया प्रकाशाची वाटिव' –विउ ३.११. २ पुरुषार्थ; पराक्रम. 'वाटिवावीण हांव। बांधिती झुंजी।' –ज्ञा १.१७२. 'तरी तुझा मोडीन दरारा। वाटिवेचा।' –कथा ५.४.७२. तेवेळीं यांची वीरवाटीव। कोठें गुप्त ठेविली होती सर्व।' –मुआदि ४२.६३. ३ प्रशंसा. 'कीजे भारिव थोर वाटिव तुझी गंधर्व–विद्याघरीं।' –आयज्ञरक्षण ७.४. [वाटणें]

वाटी—स्त्री. १ लहान वाडगा; बशीसारखें खोलगट भांडें. २ नारळाचा अर्धा भाग; एक कवड. ३ गुडघ्यावरील हाड; गुडघी रोग. 'वाटी वटक वायगोळा।' –दा ३ ६.२२. ४ सामान्यतः खोलगट पदार्थ; फुलाचा पेला; पोकळ गोळघाचा अर्धा भाग वगैरे. ५ रत्न बसविण्याकरितां केलेलें कोंदण. [सं. वर्तिका–वट्टिआ–वटी–वाटी–भाअ १८३२]

वाटीगर—पु. एक फुलझाड. वाटोगर पहा. 'जाईजुई राजसेवंती। मंदार वाटीगर मालती।' –मुरंशु ५.१४.

वाटीव—वि. वाटलेलें; चूर्ण केलेलें; पीठ केलेलें.

वाटु—पु. (गो.) एक जातीचा मासा. –मसाप ३.३.

वाटु(ली)व—स्त्री. वाट; प्रतीक्षा. 'कैसी अवस्छा भूतळी। वांटु पातां।' –शिशु १७१. 'वाटुली पाहतां सिणले नयन। बहु होतें मन आर्तभूत।' –तुगा ६१३.

वाट्र(टो)ण—न. (तंजा.) वाटवण पहा.

वांटेकर-री-दार, वाटेलदार, वाटेली—पु. विभागी; भागीदार; हिस्सेदार; पातीदार.

वांटेचा—वि. वांटचा; ऐवजी; बदली. [वांटा]

वाटेनसून—क्रिवि. (गो.) वाटेनें.

वाटेपत्र—न. वाटणीपत्र पहा.

वाटेय—पु. विषय. –हंको.

वाटोगर-रें—पुन. बटमोगरा. 'ते नवे वाटोगरें उमलतांती।' –शिशु ३०१.

वाटोणी-णें—न. वाटवणी पहा.

वाटोली—स्त्री. वाट. 'डोळे माझे शिणले। पाहतां वाटोली।' –नामदेव, स्तोत्रमाला १५३९.

वाटोवा—पु. वटवा. वाटवा पहा.

वाटोळा—वि. १ गोल; वर्तुळाकार; गोलाकार; चेंडूसारखा. २ दीर्घवर्तुलाकार; लांबट व गोल; नळकांडयासारखा. [सं. वर्तुल; प्रा. वट्टुल]

वाटोळा—वि. वाटोळें करणारा; नाश करणारा. 'उदंडचि घरें बुडविलीं वाटोळया।' –ब ४९६. **वाटोळा खूर**–पु. १ अतिशय खर्चिक घोडा असल्यास त्यास म्हणतात. २ (ल.) उचल्या; भामटा; सोदा. **वाटोळा गोटा-गोळा-धोंडा**–पु. (ल.) बोलण्या मध्यें वगैरे कधीं सांपडावयाचा नाहीं असा मनुष्य; धूर्त मनुष्य; सर्वांशीं किंवा सर्व प्रसंगीं सारखा वागणारा, सर्वांशीं गोड असणारा, जमवून घेणारा मनुष्य. **वाटोळें-वाटोळें लांबोळें करणें**–(वाटोळें=शून्य यावरून) नाश करणें; नाहींसें करणें; समूळ नष्ट करणें. 'सुयशाचें करिल कां न वाटोळें।' –मोउद्योग ७.२६. **वाटोळें-वाटोळें लांबोळें होणें**–नाश होणें; नाहींसें होणें; नष्ट होणें. **वाटोळे चणे**–पु अव. (गो.) वाटाणे. **वाटोळ्या गंजिफा**–स्त्री. एक खेळ. –मखेपु १५९.

वा(वां)ठ—स्त्री. म्हशीची रेडी. वांट पहा. **वांठीचा पिता**–पु. (संकेत) मूर्ख, जड बुद्धीचा. **वांठरूं**–न. रेडूक, रेडकू.

वांठ—वि. चकित; तटस्थ; आश्चर्ययुक्त. 'ऐसा महिष घनवट। गंगा तैसी चोखट। जया देखी जगीं सुभट। वांठ जहाली।' –ज्ञा २.२१३.

वांठणें, वांठरणें—अक्रि. (थंडी, वांब इ०मुळें) आंखडणें; वांकडे होणें.

वाठाण—न. वठाण पहा. 'कीं वाठाणीं नलगे दीपु।' –गीता १२.९२.

वाठार—न. वटार पहा. १ गांवाचा, शहराचा भाग; पेठ; पुरा; बोंड. २ गल्ली; बोळ; आळी.

वाठि(ठी)व—पु. वाटिव पहा. 'जेविं वाठिवेचे आदित्य उदैलें।' –शिशु ९४७. 'कीं शृंघाराची वांठीव पान्हेली।' –शिशु ५९७.

वांठीं-ठ्यें—न. गवताचा, पेंढ्याचा मुडा.

वाड—न. (राजा.कु.) वाढें; उंसाचा शेंडा. [सं. वृध्=वाढणें]

वाड—स्त्री. १ मोकळी जागा; रिकामी जागा; रिता ठाव. २ रिकामपण; फुरसत. [वाढणें]

वाड—वि. (काव्य) १ थोर; मोठें; पुष्कळ; प्रचंड. 'परि भीमकाचें भाग्य वाड। पुरत परमार्थाचें कोड।' –एरुस्व १४.८४. 'करा आतां मजसाठीं वाड पोट।' –तुगा १२९५. २ अफाट; विस्तीर्ण; अबाढव्य; अमर्याद. 'कपी वीर तो वाड ज्याला उडाला।' –राक १.८. ३ भव्य; बलिष्ठ; भयंकर; आश्चर्यकारक; विस्मयकारक. 'अभ्रीं वाढुनि वाड धाड पडली तेंणें थरारी धरा।' –आपूतनावध ४१. 'वटबीजीं असें वाड। फोडुनि पाहतां वर दिसे झाड।' –दा १०.९.२. 'कुमारें सर्पास्त्र घातलें वाड।' –ह २८.१६१. [सं. वृध्–वृद्ध–वद्ध–वाढ–वाड] **०पण**–न. विस्तार; मोठेपणा; भव्यपणा; अधिकपणा. 'वाडपणाचा डांगोरा। तो दंभु ऐसा।' –ज्ञा १६.२१७; –ज्ञा १०.१७६.

वाड, वाडणें—वाढ, वाढणें पहा.

वांड—वि. हूड; व्रात्य; खोडकर; उनाड. [सं. वंड–भाअ १८३३; वड्=विभाजने, वेगळा राहणारा. –ग्रंथमाला; प्रा. वंढ=अविवाहित; का. उंडिग]

वाडकर-री—पु. १ वाडीकर; वाडीचा मालक. २ वाडींत राहणारा; सांवतवाडीकडचा मनुष्य. ३ गांवढा.

वाडकुलें—न. (कों.) लहान वाडी; लहानसें आवाड; परसूं.

वाडकोड—न. कौतुक; लडिवाळपणा; आवड. 'उठोनि नृपति वाडकोड।' –दावि ३५६. [कोड द्वि]

वाडखो—क्रिवि. (व. ना.) १ वाढूळचा; केव्हांचा; फार वेळचा. २ इतक्यांतच; एवढ्यांतच; आतांच. [वाढ वेळ]

वाडगा—पु. मोठी वाटी.

वाडगी—वि. (कों.) म्हातारा; वृद्ध; वाढलेला. [वाढणें]

वाडगें—न. आवार, परसूं; घराभोंवतालची मोकळी जागा; घर नसलेली किंवा पडक्या घराभोंवतालची कुडलेली जागा. 'वाडग्यांत गवताची गंज आहे.' –मराठी तिसरें पुस्तक पृ. ७५. २ (व.) जनावरें कोंडण्याकरितां केलेलें आवार. [सं. वाटक]

वाडदिवस, वाडदीस, वाडप, वाडपी-प्या, वाडया वाडलें, वाडवण, वाडवीस, वाडवेळ—(राजापूर प्रांतीय) वाढदिवस-दीस इ० पहा.

वाडभर—क्रिवि. पुष्कळ वेळ.

वाडव—पु. वडवानल पहा. 'दुर्वार वाडवशिखेसि न मानिजेले।' –र ३९.

वाडवडील—पु.अव. पूर्वज; बापजादे; वडील माणसें वगैरे [वडील द्वि.]

वाडवळ—पु. एक जात व तींतील व्यक्ति; बागवान. [वाडी]

वाडवळ—न. शेतकरी लोकांतील एक विधि; डवरा. [वाढ+वेळ]

वाडसणें, वाडणें—सक्रि. (कों.) (वाढलेला भाग) छाटणें; तोडणें; कापणें. 'झाड वाडसून टाक.' 'बेत आंगलें ती वाडी टाकी.' –भिल्ली. [वाढ]

वाडा—पु. १ भव्य व मोठी इमारत; प्रासाद; थोरामोठ्यांचें घर; राजवाडा; सरकारवाडा. 'मग गणेशा करूनि नमन। वाडियांत आला जाण।' –कथा ६.१९.१२६. २ शहरांतील पोट विभाग; आळी; वसती. उदा० गौळवाडा; ब्राह्मणवाडा; कुंभारवाडा; देऊळवाडा. ३ खेडेगांवाचा, मौजाचा भाग; कोंड. ४ आवाड; आवार; कुंपण घातलेली जागा; बंद केलेली जागा. 'वाडांचे कूपी खातीचे जळे।' –कृमुरा ७.४६. ५ गुरें, मेंढ्या, शेळ्या बांधण्याकरितां केलेली जागा (उघडी किंवा छपर घातलेली); बेडें. 'वेती आपुलाला झाडा। गाई बैसविल्या वाडां।' –तुगा १८६. ६ शेळ्यामेंढ्यांचा बसलेला समुदाय. 'शेतें खतण्यासाठीं त्यांत वाडे बसवितात.' [सं. वाट; प्रा. वाड] **वाडोवाडीं**–क्रिवि. (महानु.) दर वाड्यांतून. 'आर्तातें परमेश्वरु वाडोवाडीं गिवसती।' –दृष्टांतपाठ ३७.

वाडाचार—पु. १ (कर) वंशविस्तार. २ आचारविचार. 'बहुत नाहीं वाडाचार।' –दावि १०. [वाढ+आचार]

वाडाळणें—सक्रि. वारवणें; आसडणें; पाखडणें.

वाडि—स्त्री. वाट. 'मज निघावा खिडियेरे वाडि पाहों दे।' –पंच ५.७.

वाडी—स्त्री. १ कुंपण घातलेली लहान बाग; बगीचा; वृक्षसमूह; राई. 'नातरी सांडून कल्पतरूची वाडी।' –भाए ६२२; –ज्ञा ८.१४०. २ बाडगें; आवार; वाडकुलें; मळा. ३ मोठ्या गांवाजवळील लहान वस्ती; झोंपड्यांचा समूह; लहान गांव. 'जेथ पांतां चहूं कडी। अठरा गाउआं बाहिरि वाडी।' –शिशु ३२१. [सं. वाटिका; प्रा. वाडिआ; गु. हिं. वाडी; बं. वाटी] **०धतन**–न. वतनवाडी पहा. **वाडया**–पु. वाडीचा वतनदार; वाडीवाला; घरंदाज; शेतीवाडीचा मालक.

वाडी—(राजा. गो.) पिशाच्चादिकांकरितां थोडें अन्न वाढून ठेवतात तें; काकबली; भिकाऱ्यास द्यावयाची उंडी; गोग्रास. [वाढणें]

वाडु—वाड पहा.

वाढळ—वाढवेळ पहा.

वाडें—न. १ वाढें; उंसाचा शेंडा. २ खजूराचें आखें; अर्धे ओझें.

वांडें—न. माल; विकण्यास आणलेले जिन्नस; मालाचा सांठा. [सं. वाणिज्य] **वांड्याचें वांडें**–सगळा माल; सर्व सांठा.

वाडें—न. वाडी पहा. देऊळवाडें; आईतवाडें.

वाडें—क्रिवि. कौतुकानें; आश्चर्यानें. 'प्रत्यक्ष म्यां कोंडुनियां कवाडें। लावूनि आल्यें निरखाल वाडें।' –आकृष्णचरित्र ४८.३०. [वाड] **वाडेंकोडें**–क्रिवि. १ कौतुकानें; मोठ्या आवडीनें; लाडिकपणानें; प्रेमानें. 'द्यावा प्रसाद हा सर्वांला भक्षूं वाडेंकोडें।' –मोसुदाम ५४ (नवनीत पृ. ३७८). –ज्ञा १५.४४८. २ सहज; लीलेनें; सहजपणें; अनायासें. 'एकेचि शरें वाडेंकोडें। मस्तक उडविलें आकाशीं।' –जै ६८.८९. ३ लबाडीनें; धूर्तपणें. 'जे मायेनें ठकिलें वाडेंकोडें। ते माया सभूळेसीं उडे।' –एभा २.९१. [कोड-कोडें द्वि.]

वांडें—न. रहाटाच्या माळेचा लोटा, मडकें.

वांडें—न. १ (कु.) अचानक लाभ; घबाड. २ रखेली; उपस्त्री.

वाडोवाड—वि. मोठमोठा. वाड पहा. [वाड द्वि]

वाडोळ—पु. वाढवेळ पहा.

वाड्रीक—पु. (गो.) लग्नसमारंभ.

वाढ—स्त्री. १ शरीराची उत्तरोत्तर होत जाणारी वृद्धि; आकार मोठा होणें; जाडें होणें. २ आधिक्य, प्रमाणांत, मापांत,

संरुयेंत अधिक भरणें; वाढावा. ३ व्याज; वाढावा (उसनें धान्य वगैरे परत देतांना जें अधिक देतात तें). ४ –स्त्रीन. मोड येण्याची जागा; डोळा; अंकुर फुटण्याचें स्थान. ५ –न. (वाढें) उंसाचा अग्रभाग, शेंडा. –वि. उंच; थोर; मोठा. 'कवी उपासकांची वाढ कीर्ति। विस्तारली।'–दा १.७.१३. [सं. वृध्–वर्ध्; प्रा. वड्ढ] **वाढआविंज, वाढाविंज**–स्त्री. भातलावणीची अखेर, शेवट. आविंज पहा. **वाढणी**–स्त्री. वाढ; मोठें होणें; उंच होणें; वाढणीस लागणें; वाढूं लागणें. [वाढ] **वाढणें**–अक्रि. १ मोठें होणें; आकार, उंची, संख्या वगैरे अधिक होणें. २ वय, काल इत्यादींनीं प्रगत होणें; पक्व दशेप्रत जाणें. ३ पुढें जाणें; हळा करणें; समोर जाणें; चालून जाणें. 'राउळांपुढें वाढत। राजवाहन पुआळित।'–शिशु ५३०. 'पवार कांहींसे पुढें वाढून गेले.' –भाब ११५. ४ (प्रत्यक्ष उच्चारानें येणारे अशुभ टाळण्याकरितां स्त्रिया वगैरेमध्यें रूढ) कमी होणें; नाहींसें होणें; संपणें; खर्च होणें (कुंकू इ०) ५ वारविलें जाणें (धान्य) ६ अंगांत येणें; संचार होणें (देव, भूत, पिशाचादिकांचा). –आडिवऱ्याची महाकाली १०३. [सं. वृध्–वर्ध्; प्रा. वड्ढ; हिं. बढना; बं. बढिबा; उरि. बढिवा; सिं. गु. वधणुं–वुं] **वाढणें वर्तणें**–अक्रि. सामान्यतः वाढणें व राहणें; आयुष्यक्रम चालविणें. 'तुमच्या अन्नावर वाढलों व वर्तलों तो मी तुमचाच आहें.' [वाढणें+वर्तणें] **वाढता**–वि. १ वाढत जाणारा; पूर्णतेस जाणारा; मोठा होणारा. २ अधिक होत जाणारा; वृद्धि पावणारा. उदा० वाढता धंदा–रोजगार–चाकरी–मुदत–बुद्धि–लक्ष्मी–राज्य–कळा. ३ शुभदायक, मंगलदायक म्हणून वर्तालिा दिलेला. [वाढ] **वाढत्या अंगाचा**–वि. १ जलद वाढणारा, मोठा होणारा; उंच होत जाणारा. २ सैल; डगळ; वाढला तरी अंगास येईल असा (कपडा वगैरे). **वाढता चुडा**–पुं. बांगड्या भरल्यावर शुभदायक म्हणून कासार जी अधिक बांगडी भरतो ती. **वाढती**–स्त्री. १ मुलांच्या उचकीस शुभदायक शब्द (अमंगल टाळण्यास). २ वाढदिवस. 'कीं वाढती करिती उल्हासें। उभविती गुढिया।'–ज्ञा ९.५१२. **वाढदिवस–दीस**–पु. जन्मदिवस; जन्मदिनीं करावयाचा विधि, समारंभ. (प्रारंभीं मुलाच्या प्रत्येक महिन्याच्या जन्मदिवशीं हा विधि करतात व एक वर्षानंतर वार्षिक करतात). **वाढवण**–स्त्री. १ वाढण्याची, अधिक होण्याची क्रिया. २ वृद्धि; वाढ; वढती. ३ संपणें; खलास होणें; खुंटणें (अभाव, नाश वगैरेचा प्रत्यक्ष निर्देश अशुभसूचक मानून त्याअर्थी उलट वृद्धिवाचक शब्द योजतात). ४ केरसुणी; खराटा. [सं. वर्द्धनी] **वाढवणें–विणें**–उक्रि. (वाढणें प्रयोजक) १ मोठें करणें; अधिक करणें; विस्तृत करणें. २ वाढावयास लावणें; पालनपोषण करणें; संभाळणें. ३ फुटणें (बांगडी वगैरे); संपणें; खुंटणें; नाश पावणें (अशुभ निर्देश टाळण्याकरितां कुंकू, बांगड्या वगैरेसंबंधीं). ४ आसडणें; पाखडणें; वारवणें (धान्य). [सं. वर्धापनम्] **वाढवा**–पु. वाढ; वाढलेला भाग; जास्तीपणा. **वाढविणें वर्तविणें**–उक्रि. पालनपोषण करणें; लहानाचा मोठा करणें; संभाळ करणें. **वाढवा-वाढव**–स्त्री. १ विस्तार;. आधिक्य; वृद्धि करणें (औत्सुक्य, पुरस्कार, नेट प्रगति इत्यादि ध्वनित होतात). २ (ल.) चेतवणी; भडकविणें; वाढविणें (कलह, भांडण, तंटा, आग). **वाढवीस**–पु. वाढदिवस; जन्मदिवस; वर्षगांठ. **वाढिनणें–निणें–स्रणें**–क्रि. वाढणें पहा. 'यादव प्रतापतरु, वाढिनला।'–शिशु २. 'त्यावरी वाढिन्नली तृणजाळी।'–सुवन १५७६. **वाढी**–स्त्री. १ वृद्धि; वाढ. २ उसना घेतलेला धान्यादि पदार्थ परत करावयाच्या वेळीं अधिक द्यावयाचा तो; व्याज. ३ पातळ पदार्थ वाढण्याचें तोटीचें भांडें; झारी. [वाढ] **०दिढी**–स्त्री. उसनें धान्यादि दीडपटीनें परत द्यावयाचा करार, रिवाज, रीत. **०मोडी**–स्त्री. चढउतार. –शर. (वाप्र.) **उंसांत जाऊन वाढें आणणें**–समृद्धीच्या स्थळाहून क्षुद्र वस्तु आणणें. **वाढीव**–स्त्री. थोरपणा; बडेजाव. 'वाढिवेच्या गोष्टी बोलती। घाय घालिती अधर्मे।'–रावि १९.११५. **वाढणीस, वाढीस लागणें**–१ उंच, ऊंद, लठ्ठ होऊं लागणें. २ खुंटलेली वाढ पुन्हां सुरू होणें.

वाढई, वाढी—पु. (व.) सुतार. बढई पहा. 'देवदत्त नामें वाढई।'–पंच १.४०. [सं. वर्धकिः] **वाढकाम**–न. सुताराचें काम. धंदा.

वाढकर–री—वाडकर पहा.

वाढखो—वाडखो पहा.

वाढण–णें—न. १ पात्रांवर अन्नादिक ठेवणें; जेवणाऱ्या मंडळीस अन्नादि पदार्थ पुरविणें, देणें; पानावर घालणें; असें वाढलेलें अन्न. २ न्हाणवलीसाठीं जें पान वाढून आप्तादिक आणतात तें; जेवावयास न आलेल्या व्यक्तीस अन्न वाढलेलें पात्र पोंचवितात तें. ३ नोकरचाकर वगैरे लोकांस जें अन्न वाढून देतात तें. [का. बडिसु] **वाढणी**–स्त्री. १ अन्नादि वाढावयाचें भांडें, पात्र; वेळणी. २ वाढण्याची क्रिया; वाढप. 'सर्वांचा समाचार घेतात व वाढणीवर लक्ष ठेवून...' –पुरवणी ऐरापुर २.१७. **वाढणें**–उक्रि. १ (जेवणारास अन्न) वांटणें; देणें; घालणें. २ (दिव्यांत तेल, झाडास पाणी वगैरे) घालणें; पुरविणें. ३ (भिक्षेकऱ्यास भिक्षा) टाकणें; घालणें. ४ सोडणें; टाकणें; लोटणें. 'समय हा मज काळाच्या मुखांत वाढील।'–मोकर्ण २८.४८. **वाढून ठेवणें, वाढून ठेवलेला असणें, होणें**–तयार असणें; वाट पहात असणें (दुःख, संकट, त्रास इ.); दत्त म्हणून उभें असणें. **वाढून येणें**–एकामागोमाग येणें; एकापाठीमागून एक येणें (आजार, क्लेश, दुर्दैव वगैर). **वाढता**–वि. वाढपी. **म्ह०** वाढत्यापेक्षां

चहाडता गोड. **वाढप**–न. १ वाढण्यासाठीं घ्यावयाचे पदार्थ; जेवण्याचे पदार्थ. २ वाढण्याची क्रिया; वाढण. **वाढपी-प्या**–पु. वाढणारा; जेवतांना खाद्यपदार्थ पानावर घालणारा. **वाढलें**–न. वाढण अर्थ २, ३ पहा.

वाढणी—स्त्री. केरसुणी; वाढवण पहा.

वाढवेळ, वाढुवेळ, वाढोळ—पु. उशीर; दीर्घकाल; पुष्कळ वेळ. 'वाढवेळ बहु झाला येईसरुया मला भेटे।' –वेप ३३. 'मीं वाढुवेळ करितों किति कंठशोषा।' –हरिराज मुद्गलार्यांचें भाषांतर २५. **वाढवेळ-ळां**–क्रिवि. दीर्घकालपर्यंत; उशीरां; फारवेळ. 'जळीं राहिला वाढवेळ। तेव्हां विसर्जिली लीळा।' –कथा ४.६.१३२. [सं. वृद्ध+वेला]

वाढळ, वाढाळ, वाढाळू—वि. जलद वाढणारें, वाढलेलें (झाड, रोप, प्राणि); भारीची (जमीन). [सं. वर्द्धालु]

वाढा—पु. वीण; प्रजा; संतति, अवलाद; बिजवट; विस्तार (गुरेढोरें, प्राणी यांचा). **वाघाचा वाढा वाढत नाहीं**–दुष्ट मनुष्याचा उत्कर्ष होत नाहीं.

वाढाघरचा—वि. नांदत्या घरांतील; मुलें, लेंकरें बरींच आहेत अशा घरांतील. 'संपूर्णाला काय करावें वाढाघरची सुन जेवूं घालावी.' –धरित्रीची कहाणी.

वाढाचार—पु. पाल्हाळ; विस्तार. 'उगीच वाढाचार लावीत बसुं नको.'

वाढावा—वाढवा पहा.

वांढाळ—विक्रिवि. (व.) १ वांकडें; समप्रमाण नसलेलें; सरळ रेषेंत न चालणारें. 'चाक वांढाळ चालतें.' २ तेंढ्या स्वभावाचा; वांकडा वागणारा. 'वांढाळ माणूस आहे.'

वाढाविंज—स्त्री. वाढआविंज पहा.

वाढी—पु. १ सुतार. वाढई पहा. २ सुतार नांवाचा पक्षी. [सं. वर्धकिः]

वाढें—न. १ वाढ; उंसाचा शेंडा, अग्र. २ आंचळया; दशा; दोन लुगड्यांमधील न विणलेला भाग.

वाढोळ-ळां—वाढवेळ पहा. 'मग वाढोळा उमजला।' –कथा ६.१५.५२.

वाण—पु. १ वर्ण; रंग. 'साजत मेघा ऐसा वाण।' –कीर्तन १.७५. **म्ह०** ढवळ्या शेजारीं बांधला पोवळा वाण नाहीं पण गुण लागला.' २ नमुना; प्रकार; तऱ्हा. लुगड्याचें वाण. 'कर्मी या नामपाठाचे। वाणें सारी।' –ज्ञा १८.६०३. ३ बाजू. 'तेया फुसाचा येके वार्णी।' –ख्रिपु २.४४.४१. [सं. वर्ण; प्रा. वण्ण] **०चोर**–वि. आपले खरें स्वरूप लपविणारा; वेषधारी; ढोंगी. **०ढाळ**–वि. विटका; रंग, चेहरा, चर्या उतरलेला; निस्तेज; फिका (रत्न, मोती). **०पालटण**–स्त्री. १ वस्त्रपालट. 'श्रीकृष्णासी वाणपालटण। नामरूपाचें वास संपूर्ण।' –एरुस्व १६.१५४. २ रंग, चर्या, छटा बदलणें. (चेहरा. सोनें, मोतीं, हिरे यांचा). **वाण मारणें**–कलाहीन होणें; निस्तेज होणें; फिकें पडणें. **निःसत्त्व** असणें. 'आज घोडा वाण मारल्यासारखा दिसतो.' **०मान्या**–वि. निस्तेज; फिका; उतरलेल्या चेहऱ्याचा; दुर्मुखलेला. **वाणलग, वाणेलग**–वि. अनेक रंगांचें; भिन्नवर्णी; पंचवर्णी. 'वानलगां वस्त्राचे वोसाडे।' –ऋ १.४.२३. 'वरि शिरा जाळ उमटे। वाणेलग।' –भाए २०२. **वाणवती**–स्त्री. वर्ण; छटा. 'ना तरी पण्हरेयां वाणवती।' –शिशु २९. [वर्ण]

वाण—न. वायन; व्रताच्या सांगतेकरितां ब्राह्मणास सुप, खण, तांदूळ वगैरे साहित्य देतात तें. 'कां वाण घाडिजे घरा। वोवसियाचें।' –ज्ञा १७.२८६. [सं. उपायन] **सुन्या घरीं वाण देणें**–निरुपयोगी स्थानीं सामर्थ्य वेचणें; बेफायदा सत्कृत्य करणें; विनासाक्ष मोठें कृत्य करणें, दिमाख दाखविणें. **वाणक**–न. वायन. वाण पहा. 'सर्वस्व समर्पाया धर्मासि ब्राह्मणासि वाणकसें।' –मोविराट ६.७७. **वाणवसा-वंसा**–पु. व्रत; नियम; उपासना. 'अनन्य भावें शरण तुला स्वधर्म अमचा वाणवसा।' –प्रला ११४. [वाण+वोवसा]

वाण—स्त्री. न्यूनता; कमीपणा; उणीव; तूट; टंचाई; कमतरता. 'तयांची न वाण।' –विक ५. [उणा, ऊन=न्यून] **वाणि-णी**–स्त्री. उणीव; वाण पहा. 'तया प्रेमळांसिगा कांहीं। या कथामृताचि वाणि नाहीं।' –रास ३.२८७. 'गालिप्रदानीं न करूनि वाणी।' –वामन गृहरिदर्पण. **वाणेपण**–न. न्यून; कमतरता; उणीव. वाण पहा. 'न करी अवधानाचें वाणेपण।' –ज्ञा १८.५९४. [वाण]

वाण आमंत्रण—सर्वसाधारणपणें निमंत्रण. आमत्रंण पहा.

वाणका—वि. बळकट; धडधाकट; दणगट; धडोतीच्या उपयोगी (वस्त्र). [वाणा]

वाणकी—वि. लहान. 'तगायास तूझी तनू वाणकी रे।' –वामन, विराट ७.१५५. [वाण=न्यून]

वाणगी—स्त्री. १ वानगी; नमुना. 'म्हणती वाणगी भक्षाहो।' मुआदि २९.८७. २ भाजीपाल्यावरील एक कर. 'शेव सबजी व वाणगी देशमुखाचे निमे करार केली असे.' –वाडबाबा १.३. [वाण]

वाणेणें—क्रि. वर्णन करणें; वाखाणणें; स्तुति करणें; प्रशंसिणें. 'ते कवि वाणिजे बोलीं। श्रीकृष्ण मूर्ति।' –शिशु ३६७. 'चित्रकें परी गोचर केल्या। वरी वाणिल्या परीक्षिकीं।' –मुआदि २५.९१. [सं. वर्णन]

वाणणें—क्रि. बाणणें; ठसणें; प्रवेशणें. 'योगियाचें परम भाग्य। आंगीं वाणे तें वैराग्य।' –दा १.१ ३१. (धुळें प्रत). [बाणणें]

वाण धरणें—क्रि. (राजा.) कुणब्यांनीं पाऊसकाळ संपल्यावर पहिल्यांदा जोंधळे टाकून मासे धरून वेताळास परडीचा नैवेद्य करणें. –आडिवऱ्याची महाकाली (प्रस्तावना) ७.

वाणशी—स्त्री. (कु.) माजघर.

वाणसी—स्त्री. वेश्या; पण्यांगना. 'वाणसियेचे उभले। कोण न रिगे।' –ज्ञा १३.७००. [सं. वणिक्+स्त्री]

वाणा—पु. वस्त्रांतील आडवा दोरा, सुत; बाणा. 'दुबंधा क्षीरोदकीं। वाणे परी अनेकी' –अमृ ७.१४७. [सं. वाणि=विणणें, माग] ०**ताणा**–पु. वस्त्राचे आडवे उभे तंतू.

वाणा—पु. कूसाचा एक हात, बाजू. –ख्रिपु २.५०.

वाणिणी धनगरणी—स्त्री. एक मुलींचा खेळ. –मखेपु २४१.

वाणी—स्त्री. १ वाचा; भाषण. 'जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी।' २ जिव्हा; रसना. –ज्ञा ९.८१६. 'जेवीं वाणी न शके चालों।' –अमृ ७.११३. ३ वाक्देवता; सरस्वती. 'मग मुखविवरामध्यें घटकरणाच्या सुरार्थ ते वाणी। शीघ्र पितामह वाक्यें शिरे गुहेमाजि चंचले वाणी।' –मोरामायण १.१३८. ४ भाषा. 'त्या शूर पूर्वजांची तुमच्याहि चालली लया वाणी।'

वाणी—शअ. (कुण.) सारखें; प्रमाणें; सदृश. 'कुरुकटकांत मिसळला तोहि धनंजय (अर्जुन) धनंजया (अग्नि) वाणी' –मोकर्ण ४९.७०. [सं. वत्]

वाणी—स्त्री. जोंधळ्याची एक जात. याचा हुरडा नरम असतो. हिचे प्रकार:–नारळी, चपटी, आंधळी, झिप्री, दुधी, पिवळी हळदी, दगडी इ०

वाणी—पु व्यापारी; वैश्य; दुकानदार. [सं. वणिक्] समासांत वाणी शब्दाचें पूर्वपदीं वाण असें रूप होतें. सामाशब्द– **वाणकूट–गट–गंड**–पु. (तिरस्कारार्थी) वाणी. **वाणजिन्नस**–पु. वाण्याकडील माल; किराणा; वाणसवदा. [वाणी+जिन्नस] **वाणपण**–न. वाणीपणा; व्यापार. **वाणपसारा**–पु. १ वाण्याच्या दुकानांतील माल; वाणजिन्नसांचें प्रदर्शन. २ (ल.) तऱ्हेतऱ्हेची व विस्तृत मांडणी; एखाद्या कार्यांतील अनेक गोष्टींची वस्तूंची मांडामांड, प्रदर्शन, रचना. ३ अव्यवस्थित रचना; अस्ताव्यस्तपणा; गोंधळ. ४ (बायकोचा) प्रसूतिसमयीं घोटाळा, अडचण, कठीण परिस्थिति. (क्रि० पडणें). **वाणसवदा–सौदा**–पु. हिंगजिरें इत्यादि वाण्याच्या दुकानांतील जिन्नस; वाणजिन्नस; किराणा माल. [वाणी+सौदा] **वाणिज्य–ज**–न. व्यापार; उदीम; वैश्यवृत्ति. 'गौरज्य वाणिज्य कृषि।' –दा १४.२.१८. –ज्ञा १८.९१३. **वाणिया**–पु. वाणी. पहा. व्यापारी. **वाणी ०उदमी–बकाल**–पु. (व्यापक) व्यापारी; दुकानदार; क्रयविक्रयादि व्यवहार करणारा. ०**बैलकरी**–पु. बैलावरून वाहतुक करणारे. –ससाप २.२.३०. ०**वेव्हार**–पु. (सांकेतिक) कर्ज. ०**शाई**–वि. वाण्याच्या पद्धतीचें; एका विशिष्ट तऱ्हेचें.

वाणी—पु. एक किडा. 'टोळ, झुरळ, पुंगळ वाणी।' –दावि २४४.

वाणीकिणीचा, वाणीतिणीचा, वाणीदेणीचा—वि. बहुमोल; महागाईचा; दुर्मिळ; नवससायासाचा. 'त्यांनाही वाणीतिणीची एवढीच मुलगी।' –(शेक्सपियर नाट्यमाला) रोमिओजुलिएट.

वाणें—क्रि. वाजणें; वाजवणें. 'वाती सिंगे पांवे।' –तुगा २३०; 'सुछंदे टाळघोळ वातु।' –दाव ८४. 'तेथ गाती वाती।' –शिशु ३४९. [सं. वान=फुंकलेला ?]

वाणें—क्रि. वाहणें; अर्पण करणें. 'महातपाचा पाउड वाइजे।' –शिशु ११३. 'मग-मृगी सुताचे जुझार। वाति कामिनी। –भाए ४३८. 'सवर्गा वाती वांकुलिया।' –ज्ञा ७.१९०. [वाहणें]

वाणें—न. वाहन. 'टंका मयूराचें वाणे।' –उषा १२२.८१.

वाणेउमट—पु. नाना प्रकार. वाण पहा. –हंको.

वाणेरा—पु. कर्ज. वाणीवेव्हार पहा. 'मुद्दल देउनि वाणेरा फेडिला।' –ज्ञागा २१७.

वाणोवाण—पु वाण जिन्नस; माल. –तुगा ४४३२. [वाणी+वाण]

वात—पु. १ वायु; वारा; हवा. २ शरीरांतील तीन धातूंपैकीं एक; त्रिदोषांपैकीं एक. ३ संधिवात; पेटका; वळ वगैरे. (क्रि० येणें). [सं.] ०**चढणें**–वाताचा झटका येणें; वातोन्माद होणें. सामाशब्द– ०**टंटक**–पु. त्रिदोषांपैकीं वातविकाराचा प्रकोप; मुंग्या येणें; हुळहुळणें. ०**कफज्वर**–पु. वात व कफ यांच्या प्रकोपामुळें येणारा ताप. ०**कोश**–पु. (शाप.) माशांची पिशवी; (या पिशवीमुळें माशांस पोहतां येतें). ०**गुल्म**–पु. संधिवात रोग; पोटांतील वायु, पोटशूळ वगैरेसहि हा शब्द लावतात. ०**चक्र**–न. १ झंझावात; वावटळ; भोंवरा. २ वातावरण. ३ पृथ्वीभोंवतीचा अवकाश; अंतरिक्ष; वायुलोक. ०**ज्वर**–पु. त्रिदोषांपैकीं वात कुपित झाला असतां येणारा ताप. ०**नलिका**–स्त्री. (शाप.) अपृष्ठवंश प्राण्यांच्या शरीरांतील वायुवाहक नळ्या. ०**पित्तज्वर**–पु. वात व पित्त कुपित झाल्यामुळें येणारा ताप. ०**पूरक यंत्र**–न. (शाप.) जोरानें वारा भरण्याचें यंत्र. (इं.) फोसेपंप. ०**प्रकृति**–स्त्री. वातुळ, वातप्रधान शरीर. वात धातूंचें आधिक्य असणारें शरीर. ०**बद्ध**–वि. वातुळ; वातप्रधान; फोपशा. ०**रक्त**–न. १तीव्र संधिवाताचा विकार; दूषित वायूच्या योगानें संचित रक्ताचा विकार –योग २.२. २ रक्तपित्त; महाव्याधि. 'बातरक्त कपरक्त।' –गीता १३.२४९७. ०**रोग**–पु. संधिवात; पेटके;

पित वातदोष. ०रोगी–वि. वातरोग झालेला. ०विकार–पु. वातरोग. ०विध्वंस–पु वातविकारावरील रसायन; वायूची मात्रा. ०व्याधि–पुस्त्री. वातविकार. ०शूल–पु. पोटशूल; वायगोळा; पेटका. ०श्वासी–वि. (शाप.) वायूनें श्वासोच्छवास करणारे, श्वसन करणारे, हवा आंत घेऊन बाहेर सोडणारे (प्राणी). **वातार्कर्षक यंत्र**–न. वायु ओढून घेणारें यंत्र. **वाताकृति**–वि. चपळ; वेगवान्. 'अश्व मिरवले वाताकृती।'–नव११.६३. [वात+आकृति] **वातात्मज**–पु. १ मारुती. २ अग्नि. **वातांबुपर्णाशन**–वि. वायु, पाणी व पाला यांवर निर्वाह करणारे. –एभा १४.२५६. [वात+अंबु+पर्ण+अशन] **वातायन**–न. खिडकी; झरोका; गवाक्ष. [सं. वात+आयन] **वातासन**–न. एक योगासन; डाव्या पायाचा चवडा उजव्या मांडीवर चढवून खुब्यावर टेकून उभें राहणें. –संयोग ३३५. **वातावरण**–न. १ पृथ्वीच्या भोंवतालचें वायूचें वेष्टण. २ (ल.) परिस्थिति; सभोवतालची स्थिति. 'पुण्याचें वातावरण हल्लीं बोंच स्वच्छ झालें आहे' –केले २.२.४. [सं. वात+आवरण] **वाताश**–पु. सर्प; शेष. –वि. वायुभक्षण करणारा. 'आंगे काजळ डोंगरू उमथला वाताश सेवी भला।' –गस्तो ८४. **वातूल**–न. वावटळ; वादळ; भोंवरा. **वातिक**–वि. वातजन्य; वातदोषांमुळें उत्पन्न होणारा. **वातूल-ळ**–वि. १ वातकारक; ज्यामुळें वातविकार उत्पन्न होतो असा. २ वातप्रकृतीचा; फोपशा; वातानें फुगलेला. [वात] **वात्या**–पु. वादळ; वावटळ. 'जसा पट टिकों न दे वात्या।' –मोकर्ण ११.५४. [वात] **वातोदर**–न. वातयुक्त उदररोग; गुबारा. **वातोन्मान**–न. वायुभारमापक यंत्र. **वातोर्मि**–स्त्री. वाऱ्याची झुळूक, लाट, लहर.

वात—स्त्री. १ वात्ती; दिव्यांतील कापसाची, सुताची पेंढ; देवापुढे लावावयाच्या निरनिराळ्या फेऱ्यांच्या वळ्या. उदा० बोटवात–१ सूत; बेलवात–३ सुतें; विष्णुवात–५ सुतें; माणिकवात–१सूत; रुद्रवात–११ सुतें; पुरुषोत्तमवात–१५ सुतें; गणेशवात–२१ सुतें; गोकुळवात–८ सुतें; रामवात–१२ सुतें; शिवरात्रवात–१००० सुतें. इतर वाती–फुलवात, काडवात, पंचरत्नवात, अनंतवात, अधिक वात. 'घरोघरीं दीप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती।' –घन:-शामाची भूपाळी. २ कोवळें बारीक पडवळ, शेंग, काकडी वगैरे. ३ (ल.) (नाविक) गुंडाळलेलें शीड. ४ दिव्याचें नाक, निमूळता भाग; समईतील वाती ठेवण्याची जागा. ५ तेलवात या शब्दाचें संक्षिप्त रूप; नंदादीपासाठीं लावून दिलेली जमीन. ६ (ल.) दिवा. 'रश्मि वातीविण न देखती।' –ज्ञा ९.३०१. [सं. वर्त्ति] ०**द्रोरा**–पु. गाभण प्राण्याच्या योनींतून स्रवणारा चिकट द्रव. ०**पोत**–पु. (दिव्याची वात व देवीचा पोत) (ल.) सरळ सडसडीत, किरकोळ, बारीक व लांब वस्तु. 'अवयव आकृति खिली वातपोतसारखी। निवडणार निवडील असे जो रत्नाचा पारखी।' –पला ४.३४. **वातेर, वातेरें, वात्येरें**–न. १ समईतील वाती लावण्याची खोबण. 'दोन वातेऱ्यांत दोन जुळ्या वाती जळत होत्या.' –कोरकि ५४. २ वाती करावयाच्या उपयोगी फडकें. ३ (ल.) फाटकें वस्त्र; लकतऱ्या; चिंध्या. [वात]

वांत—स्त्री. १ वांति; ओक; ओकारी; ओकलेले पदार्थ. २ ओकारी; ओकण्याची क्रिया. 'पाठीं फळा कीजे अशेखा। वांताचे वानो।' –ज्ञा १८.१२५ ५५६.९१९. –वि. ओकलेला. [सं. वम्]

वांत—वि. ज्याच्या अखेरीस व हें अक्षर आहे असा; प्रयोजक धातु. उदा० करव, निजव, बोलव, मारव इ० (कर, नीज, बोल, मार या धातूंपासून). [सं. व+अंत]

वातंग—पु. (कों.) वैल. (चुलीचा) [सं. वात+अंग]

वात(ता)ट-ड—वि. १ चिवट; चिकट; लोचट; लवकर न तुटणारा; खुसखुशीत नव्हे असा; दडदडीत. २ (ल.) हेकट; हट्टी; लागट; लोचट. म्ह० शेळी जाते जिवानिशी, खाणार म्हणतो वातडशी. [वात] **वातट(ड)णें**–क्रि. १ वातड होणें. २ लोचट होणें. **वातडला**–वि. (ना.) कृश; सडसडीत.

वातणें—क्रि. वाजणें. 'सुताल ताल घोळ मोहरा। वातांती।' –दाव ३५४. [सं. वा–वाति]

वातलणें—क्रि. (व.) बातलणें; बाता मारणें.

वातवेल—पु.स्त्री. एक मोठी वेल.

वाता—पु. दारांचें कुसुं; वात्या. **वात्या**–पु. वाता पहा. १ दरवाज्याच्या फळींचें कुसुं; दार फिरवण्यासाठीं दोन्ही टोंकास पुढें काढलेले भाग प्र. २ (कारवारी) वात्या फिरण्याचें भोंक.

वाताडें—न. अचानक लाभ; वाऱ्यानें येऊन पडलेलें. [वात=वायु] ०**पडणें**–क्रि. थोडया किंमतींत पुष्कळ मिळणें; अचानक लाभ होणें. [इं. विंडफालला प्रतिशब्द]

वाताहत-हात—स्त्री. दाणादाण; पांगापांग; फाटाफूट; नाश; धुव्वा; सत्यानाश; उधळपट्टी (संपत्तीची). 'सुधारणाप्रिय लेखकांनीं शास्त्राची वाताहत करून सोडली आहे.' –केले ४.४. –विक्रिवि. विस्कळित; नष्ट; उधळलेले. 'नातरी गंगातरंग वाताहत जेवि दिसती।' –भाए ७१३. 'कांपवूनि टिरी शूरत्वाची मात। केलें वाताहत उचितकाळें।' –तुगा २८०३. –दा ३.५.४९. [सं. वात+आहत]

वाताळ—वि. (व.) वाचाळ; बडबडया; वात्रट. [वार्ता+लु]

वांति—स्त्री. १ ओकारी; उलटी; वमन. २ ओक; ओकलेला पदार्थ. –ज्ञा १८.६२०. [सं. वम्=ओकणें]

वातेर-तेरें, वातेरपट्टी-फळी—नस्त्री. दरवाजाच्या फळीचा वात्या फिरण्यासाठीं वरतीं फळयांत बसविलेला तुकडा. [वात्या] **वात्येरें**–वात्या.

वात्रट-ड—वि. वातट-ड पहा. १ चिवट; लोचट. २ (ल.) निरर्थक; पाचकळ. 'माझें बोलणें वात्रट । याचा मानूं नको वीट ।' –मध्व ६६३.

वात्सल्य—न. मुलांविषयींचें प्रेम, कौतुक, आवड, स्नेह; लाड. (सामा.) ममता; प्रेम. [सं. वत्स]

वात्सी, वाथसी—स्त्री. बस्तीभाग; ओटीपोट; पोटाखालचा भाग. [सं. बस्ती]

वाथंग-ग्या—वाथंग-ग्या पहा.

वाथरणें—क्रि. (चित्पा. राजा.) पसरणें; अंथरणें. [सं. वि+आ+स्तृ]

वाथा—पु. वाता-त्या पहा.

वाथा-थ्या—पु. बस्तिभाग; ओटीपोट. 'वांझेनें दाविलें गन्हवार लक्षण । चिरगुटें घालून वाथयाला ।' –तुगा २८७५. [सं. बस्ती]

वाथ्या—पुस्त्रीअव कांथा या शब्दाऐवजीं त्याच अर्थीं वापरतात. **वाथ्या कुटणें, बडविणें**–निष्फळ वाद करणें; रिकामा वाद घालणें; काथ्या कुटणें. काथ्या पहा.

वाद—पु. १ चर्चा; खल; वादविवाद. 'ऐसा प्रतिपादनामाजीं वादु ।' –ज्ञा १०.२२६. २ भांडण; कलह; तकार. ३ संभाषण; मुलाखत; बोलाचाली; वाटाघाट. ३ वदंता; वार्ता; ऐकीव बातमी; प्रवाद. 'आम्ही सेवानुरूप त्वरितचि फळतों त्या वृथा वाद पांचा ।' –मोअंबरीष २० (नवनीत पृ. ३६२). ४ फिर्याद; दावा; कज्जा. ५ (ल.) गुन्हा; अपराध. 'तुमचा काय वाद केला ।' –ऐपो ३४. ६ संज्ञा; नांव. 'ऐसी कोण्ही एकी दशा । तिये वादु अज्ञान ऐसा ।' –ज्ञा १४.७९. [सं. वद्=बोलणें] **०सांगणें**–क्रि. आव्हान करणें; बरोबरी करणें; स्पर्धा करणें. 'अजगव शार्ङ्गासीही स्ववळें सांगेल वाद कर्णातें ।'–मोकर्ण २४.१८. **०क**–वि. वाद करणारा; वादी; द्वंदी. 'मनहि चंचळ वादुकें ।' –ऋ ५५. 'गेलीं वादकें अचाटें ।' –दा ३.९.५५. **०ग्रस्त**–वि. १ ज्यासंबंधीं फिर्याद चालू आहे असें. २ तंट्यांतील; वादांतील; भानगडीचें. **०चंचु-चू**–वि. वाद करण्यांत चतुर, निष्णात; वादकुशल. 'शेंकडों ग्रंथांचें अध्ययन करून मोठा वादचंचू किंवा महान् ग्रंथकार झाला ।' –नि ४८. **०ट**–वि. वाद करणारा; भांडखोर. 'आत्महत्यारी धीट वादट ' –कृमुरा १५.६४. **०प्रतिवाद**–पु. १ उलटसुलट बाजूंनीं चर्चा; पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून होणारा वादविवाद, खल. २ संभाषण; संवाद; बोलणें; वाटाघाट. **०बळ**–पु. तंट्यास उत्तेजन. 'उपरोधु वादबळु । प्रतिपादळु ।' –ज्ञा १३. २७०. **०विवाद-वेवाद**–पु चर्चा. स्त्री: भवति न भवति; वादप्रतिवाद. 'जनीं वादवेवाद सोडनि द्यावा ।' –राम १०९. **वादानुवाद**–पु. १ चर्चा उलटसुलट प्रश्नोत्तरें; पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून खल. २ (कायदा) फिर्याद आणि प्रतिपक्षाचें उत्तर; मूळ तकार व तीस उत्तर. **वादावादी-दी**–पुस्त्री. वारंवार, मोठी चर्चा; वादविवाद. **वादाळ**–वि. वादग्रस्त पहा. **वाद्या**–वि. १ भांडखोर; भांडकुदळ; तंटेखोर; हुज्जत घालणारा. 'वाद्या अथवा भेद्या ऐसा सेवक काशाला ।' –स्फुट पदें (नवनीत पृ. ४५१). २ (अशिष्ट) वैरी; शत्रु.

वाद—स्त्री. (प्र.) वादी. चामड्याची पट्टी; (वहाण इ०करितां) **वादडणें**–क्रि. वादी, पट्टा इत्यादींनीं मारणें. **वादडा**–पु. थप्पड; धपाटा; चापटी; रट्टा. [वादी] **वादाडणें**–उक्रि. वादडणें; वादीनें, चाबकानें झोडपणें; फटके मारणें. [वादी] **वादाडा देणें**–(माण.) थप्पड मारणें; ठोकणें.

वाद—पु. बधिरता; जाडय (गात्र इत्यादीस आलेलें). [वात]

वाद—स्त्री. (खा.) आठवण; स्मरण. [याद]

वादगार, वादगारी—वि. स्मारक; आठवणीचा; स्मृतिवश. 'जो उपकार आपण करितील तें आपलें नांव राहील वादगारी.' –रा ६.६०२. [फा. यादगार–री]

वादंग—पु. वादविवाद; चर्चा. 'हा रिकामा वादंग नकोच आहे मुळीं ।' –भाबं ५९. [वाद]

वादघाई—स्त्री. (प्र.) वाद्यघाई पहा.

वादट-ड—वि. सदे; दमट; ओलसर हवेनें दूषित.

वादणा—पु. (प्र.) वाधणा, अवधणा पहा.

वादडणें—उक्रि. १ धूर्तपणानें एखादी गोष्ट मिळविणें, संपादन करणें; लाटणें. २ चलाखीनें, थाडसानें एखादी गोष्ट करणें. [सं. अद्]

वादन—न. १ वाजविणें; शब्द काढणें. २ वाद्यादिकांतून सूर काढण्याची क्रिया. 'गाण्याची साथ करणें. गायनाची निर्जीव पदार्थापासून तयार केलेल्या यंत्रानें केलेली नक्कल.' –संगीत शास्त्रकार व कलावंतांचा इतिहास. **वादक**–वि. १ वाद्य वाजविणारा. २ शब्द करणारा; बोलका. 'फेडुनि जन्माची जवनिक । वैखरियेतें करी वादक ।' –भाए ५०४. [सं.] **वादित**–वि. १ वाजवलेलें. २ म्हटलेलें; सांगितलेलें. **वादित्र**–न. १ वाद्य; वाजंत्री. 'वादित्रांची होतसे थोर घाई ।' –सारुह २.४१. [सं.]

वांदर, वांदरखट, वांदर तेल इ०—वानर इ० पहा.

वादलें—न. (जरतार) चपटें केलेलें धातूचें सूत. [बादला]

वादळ—न. १ वावटळ; झंझावात; तुफान; वायुक्षोभ. २ (ल.) संकट. [सं. वातुल; दे. वादल; प्रा. वदल; हिं बादल]

वादळणें—अक्रि. क्रोधानें मोठ्यानें बोलणें; उसळणें; अंगावर घसरणें; शिवीगाळ करणें.

वादा—पु. रोगाची सांथ; गुरांचा भयंकर आजार; मरी; मर. [सं. बाधा]

वादा—पु. १ चाबकाचा फटकारा. २ मोठा चामडयाचा पट्टा; मोठी वादी. [वादी]

वादांग, वादांग्या—वाधंग, वाधंग्या पहा.

वादाडणें—सक्रि. गट्ट करणें; खाणें; फन्ना करणें. वादडणें पहा. 'किती पोळया वादाडल्या.' [सं. अद्=खाणें ?]

वादाळणें, वादळणें—अक्रि. १ दमट हवेनें लोचट होणें; सर्द होणें. २ तुफानांत सांपडणें; झंझावातानें नाश होणें; वादळानें पडणें वगैरे. (झाड वनस्पति इ०)

वादी—स्त्री. चामडयाची पट्टी, दोरी, नाडी; चाबकाच्या शेवटीं लावावयाची चामडयाची पट्टी; तबला, डग्गा आवळण्याची पट्टी. [सं. वार्धी; प्रा. वद्धी] ०कडें-कुडें-कोडें-न. चामडयाचें वेटाळें. वादीचें कोडें; सच्छिद्र वादीचा जुगार. 'नाडेल जो वादीकोडें।' -अमृ ७.११६.

वादी—पु. १ तक्रारी; वाद घालणारा; भांडखोर. २ वादांविषयीं उत्सुक किंवा वादांत कुशल. ३ फिर्यादी; अग्रवादी, कोर्टामध्यें प्रथम कज्जा मांडणारा; दावा मांडणारा. ४ वैरी; शत्रु. ५ मांत्रिक; मंत्रवादी. 'वादी म्हणेल उरविन बाधा घालीन रामरक्षे मी।' -मोविराट ६.६९. ६ विशिष्ट तत्त्व, मत इत्यादींचा पुरस्कार करणारा. उदा० द्वैतवादी; अद्वैतवादी. 'देहात्मवादी जे नर। न जाणती ते परमेश्वर।' -जै ५७.४. ७ बोलका; बोलण्यांत चतुर; वक्ता. ८ (संगीत) रागांतील मुख्य स्वर. [सं. वद्=बोलणें]

वादीक—न. वाद्यांचें काम; वहाणेंचें शिंकें; वहाणेचा वाद्यांनीं केलेला वरचा भाग. [वादी]

वादें—न. वादा पहा.

वादेली—वि. (कु. कों.) १ वाद घालणारा; तक्रारी; भांडखोर. २ एका पक्षाचा, तर्फेचा, बाजूचा.

वादो—पु. (कु.) वादा पहा.

वाद्य—न. वाजविण्याचें, आवाज काढण्याचें एक साधन; ध्वनि उत्पन्न करण्याचें साधन, हत्यार. उदा. चर्मवाद्य, तंतुवाद्य, रणवाद्य इ०. यांचे प्रकार-तत, सुषिर, अवनद्ध आणि घन. [सं.] ०घाई-स्त्री. अनेक वाद्यांच्या आवाजाचा नाद; वाद्यांची झड; अनेक वाद्यांची झुंबड; गर्दी.

वाधंग—पुन. झाल्यागेल्या गोष्टीबद्दल निष्कारण धुसफुस; कुरबुर; चिडखोरपणाची वटवट; कुत्सितपणाची टीका; आढेवेढे; वितंडवाद; दगदग. (क्रि० लावणें; मांडणें; सांगणें; घेणें; चालवणें; करणें). 'हा रिकामा वाधंग तुला सांगितला कोणी.' -खरादे ६८. [सं. वाद] **वाधंग्या**-वि. वाधंग लावणारा; नेहमीं धुसफुस करणारा; हरकती सांगणारा; हुज्जतखोर.

वाधणा—पु. अवधणा पहा.

वांधा, वांधें—पुन. देण्याघेण्यासंबंधीं वादविवाद, तंटा; तक्रार; भानगड. वांझा पहा.

वांधा—पु. मिरचीवरील एक रोग. -कृषि ५७०.

वाधांग-ग्या—वाधंग-ग्या पहा.

वाधावणें—न. १ वरधावा; वरागमनप्रसंगींचीं मंगलवार्ते; आगमनसूचक वाद्यवादन; आगमनाची सूचना. 'वोहरेवीण वाधावणें। तो विटंबु गा।' -ज्ञा १३.८३७. 'उभविलीं गुडितोरणें। नगरीं जाहलीं वाधावणें।' -कथा १.१०.१९०. २ आमंत्रण; मूळ धाडणें. 'येथ प्रवृत्ति वोहटे जिणें। अश्रुतीसीं वाधावणें।' -अमृ ९.२७. 'कळलें पांडवांचें वाधावणें।' -गीता १.११९०.

वाधावा-पु. १ वरधावा; वरागमनाची सूचना. 'वाधावा सांगो रुक्मिणी।' -आद्य मराठी कवयित्री २९.३. २ आगमनवार्ता; शुभवर्तमान; वार्ता. 'तो अष्टभोगाचा कुढावा। की ऋतुरायाचा वाधावा।' -शिशु ६२३. 'पाही आत्मज्ञान सुदिनाचा। वाधावा सांगत या अरुणाचा।' -ज्ञा १८.९०३. ३ आगमनप्रसंगींचें वाद्य; शुभवाद्य. 'वाधावें वाजती।' -वसा २८. [वरधावा]

वाधावी-पु वार्ताहर; बातमी आणणारा. 'तये वेळीं वाधावियातें। रायें हार दिधला उचितें।' -कथा ७.१०.१३९.

वाधी—स्त्री. वादी पहा.

वांधें—न. (को.) १ बांडगुळ. २ वांधा पहा.

वान्—एक संस्कृत प्रत्यय. अंतीं अ किंवा आ असणाऱ्या नामास हा प्रत्यय लागून विशेषणें होतात, व त्यांचा अर्थ तत्तद्वस्तुयुक्त असा होतो. उदा० धनवान्, भाग्यवान् वगैरे. हा पुल्लिंगी प्रत्यय आहे. स्त्रीलिंगी 'वती' असा आहे. [सं. वत्]

वान—पु. वर्ण; रंग; रूप; प्रकार; तऱ्हा. वाण पहा. 'वान ते सांवळी नाव तें श्रीधर।'-तुगा ३३६४. ०सर-वि. तऱ्हेतऱ्हेचे. 'मुदियाचे हीरे। आंगुलिया तेजाचे वानसरे।' -शिशु ४०३.

वान—न. (कों. गो.) उखळ. वाईन, वहान पहा.

वान—न. घटकद्रव्य (मिश्रणांतील औषधांतील). 'कांहीं कषायांच्या वानांच्या यादी घोकून पाठ केल्या.' -व्यनि ७६.

वानकी—स्त्री. (गो.) चिचोळें तारूं.

वानगी—स्त्री. १ नमूना; मासला. २ कोणत्याहि पदार्थाचा थोडासा चवीसाठीं घेतलेला अंश. 'तीं होऊन हळूच आंत शिरती-दे माउली वानगी।' -केक १४०. ३ जकातीच्या नाकेदारानें जकातीशिवाय कोणत्याहि मालाचा नमुन्याकरितां, चव पाहण्याकरितां म्हणून घ्यावयाचा अंश; शेतांत पिकलेल्या पदार्थाचा खंडकऱ्याकडून मालकास मिळावयाचा नमुन्यादाखल अंश. ४ भेट म्हणून आणलेली दूरदेशची अगर दुर्मिळ वस्तु. [वाण]

वानणें—उक्रि. वर्णन करणें; स्तुती करणें; प्रशंसा करणें. वाणणें पहा. 'उदारतेसी काय वानूं।' -एरुस्व १.८२.-ज्ञा ५.१४०.

वानती—स्त्री. (गो.) (सोनारी) उजळा; लेप. [सं.वर्णवती?]

वानप्रस्थ—पु. चार आश्रमांपैकीं तृतीयाश्रम (गृहस्थाश्रमानंतरचा वनांत राहण्याचा काळ.); त्यांत राहणारा ब्राह्मण; वानप्रस्थ, वानप्रहस्त अशीहि रूपें आढळतात. 'वानप्रस्थ यती सुस्नात।' –दाव १९१. 'गृहस्त्याश्रमी वानप्रहस्ती।' –दा १.८.२४. –न. वानप्रस्थाश्रम. [सं.]

वानर—पुन. मर्कट; माकड; काळ्या तोंडाचा, लांब शेपटीचा एक प्राणी. 'सत्वर जाऊनि वनाप्रति। वानर धरूनि आणावें।' –ह ३१.१००. (अप.) वांदर, वान्नर. 'अंगीकारिले वान्नर।' –दावि ४६. [सं.] ०**किवण-खत-खट**–न. (वानरास एखादी जखम झाली असतां त्याचे सर्व जातभाई येतात व त्यास सहानुभूति दाखवितात, पण प्रत्येकजण ती जखम उघडून पाहतो त्यामुळें ती बरी न होतां त्यास फार दुःख होतें. यावरून) उपद्रवकारक, अपायकारक सहानुभूति; दुःख कमी व्हावयाच्या ऐवजीं वाढण्यास कारण होणारे प्रयत्न; मायेचे वरून दिसावयास कमी करण्याकरितां पण प्रत्यक्ष दुःख वाढविण्याकरितां होणारे सहानुभूतिक प्रयत्न. ०**खाद**–स्त्री. वानरांची धाड; (ल.) लुटालूट; नासाडी; उपद्रव. ०**चेष्टा**–स्त्री. १ वानराप्रमाणें केलेल्या खोड्या. २ अविचाराच्या गोष्टी. ०**तेल, वानरी तेल**–न. (पंचतंत्रांतील (५.९) चंद्रराजाच्या कथेवरून–प्रबलाच्या आश्रयानें स्वतःस निर्भय समजून अविचाराची वागणूक करणाऱ्यावर आपत्ति येते यावरून) सर्वनाश; सत्यनाश. (क्रि० काढणें) 'पुढें विनाशकाळें येणार भविष्य आलें तेव्हां वानरीतेलाचा जैसा प्रकार तैसा प्रकार घडला.' –भाब २. ०**तोंड्या**–वि. माकडतोंड्या; विद्रूप; कुरूप. ०**थेर**–पुन. माकडचेष्टा; चाळे; खोड्या. ०**दुःख**–न. वानरकिवण पहा. ०**दृष्टि**–स्त्री. सूक्ष्म व काळजीपूर्वक पाहणें; सूक्ष्म निरीक्षण. –वि. सूक्ष्म दृष्टीचा. ०**भोजन**–न. वानरासारखें प्रथम तोंडांत अन्न भरून घेऊन सावकाश खात, चावत बसणें. ०**यूथ**–पुन. वानरांची झुंड, जमाव, समूह, थवा. 'तंव तेथें वानरयूथ आलें।' –पंच. ०**लकडी**–स्त्री. (वानर शेकण्याकरितां लांकडें जमवितात पण तीं पेटवतां न आल्यामुळें त्यांस शेक लागत नाहीं यावरून) न पेटतां धुमसणारीं लांकडें. ०**विचका**–पु. अनेकांचा सल्ला घेतल्यामुळें कामाचा होणारा बिघाड; कामाची कुचंबणा. ०**विचकल्या-वेंचकुल्या**–स्त्रीअव. वानराप्रमाणें वेडीवांकडीं तोंडें करून केलेल्या चेष्टा; वेडावणें; वांकुल्या दाखविणें. ०**शेक, शेकणी-शेकणीचीं लांकडें**–पुस्त्रीन. (वानर लांकडें जमवितात पण तीं न पेटवतांच त्यांजवळ शेकण्याकरितां बसतात यावरून) न पेटणारीं लांकडें; पेटावयास कठिण असणारीं लांकडें. ०**क्षत**–न. वानरखत पहा. **वानरी**–स्त्री. वानराची मादी; वानरीण. **वानऱ्या**–वि. वानरतोंड्या किंवा वानरासारख्या चेष्टा करणारा. **वानेर-न्नर-न्नेर**–पुन. (अशिष्ट) वानर पहा. **वान्येरूं**–न. (कों.) वानर.

वानवटें—न. भाजकट बीं. 'परी शेती वानवटें। पेरूं नये।' –विउ ७.६४, [सं. वाण=अग्नि ?]

वानवणें—सक्रि. (ना.) चिरणें. 'आपण साक वानवतो व धुवून शिजण्यास टाकतो.'

वानवती—स्त्री. उजळा. 'साडेपंधरया दिधली वानवती।' –ज्ञाप्र ४९५. वानती पहा.

वानवळा—पु. प्रथमच पिकणाऱ्या फळांवर, भाजीपाल्यांवर वगैरे घ्यावयाचा कर. वानगी. वानोळा पहा. –थोमारो २. ३४१. [वान–ना+वळा प्रत्यय]

वानवा—पुस्त्री. १ अनिश्चितपणा; संदिग्धता; शंका; संशयित स्थिति. 'ग्रहगतीचीं मानें नक्की कळलीं आहेत कीं नाहींत याची वानवाच आहे.' –टिले ४.२७०. २ होय किंवा नाहीं; अस्तिपक्षीं कीं, नास्तिपक्षीं याची निश्चिती. 'तो देतो कीं नाहीं याचा संशय ठेवूं नका, कायती वानवा करून घ्या.' [सं. वा न वा]

वानवा—स्त्री. वर्णन; वाखाणणी. [वानणें] **वानवानो**–क्रिवि. वारंवार वर्णन करून. पुन्हां पुन्हां वर्णन करून. 'वानवानों वर्णिती किती।' –दावि ३१५. [वानो द्वि.]

वानवसा-सें—पुन. १ माजघर; मध्यगृह. 'तें वानवसां आंघळें। जैसें ठाकें।' –ज्ञा १७.१०२. २ भोजनशाळा. भानवसा पहा.

वाना—पु. १ वान; वाण पहा. विक्रीचा माल; जिन्नस. २ घटकद्रव्य (औषधांतील); वान पहा.

वानावानाचें—वि. (व.) तऱ्हतऱ्हेचें; वान पहा.

वानिवसें—क्रिवि. अकस्मात्; दैववशात्; यदृच्छया. 'जैसा घरीं आपुला। वानिवसें वन्ही लागला।' –ज्ञा १.२५८.

वानी—स्त्री. वाण–न पहा. मासला; प्रकार. 'नातरी अंधकाराची वानी। जैसा सूर्यो न देखे स्वप्नीं।' –ज्ञा ५.९१; –एभा १३.४०४. **वानेपरी**–वि. नाना प्रकारची; तऱ्हतऱ्हेची. –अमृ ७.२७२. –ज्ञा ११.२८३.

वानी—स्त्री. उणेपणा; कमीपणा. 'तरी कामनेची कां तेथें। वानी कीजे।' –ज्ञा ३.२२.

वानी—स्त्री. कस; शुद्धाशुद्ध परीक्षा. 'तेयां परिमळाची वानी धवधविली।' –शिशु ६१३. –ज्ञा ९.९६; १२.२५; –अमृ १०.२७.

वानीर, वानेर—स्त्री. (महानु.) पाणवेत; एक जंगली झुडूप. 'डोइए वानेराची पेंडी।' –दृष्टांतपाठ ५४.

वानोळा—पु. वानवळा पहा. १ किराणा माल; केणें; विक्रेय जिन्नस. २ देशमुख, देशपांडे यांनीं प्रथम तयार होणाऱ्या फळें,

भाज्या वगैरे पदार्थांवरील वाणगी म्हणून घ्यावयाचा अंश. 'सांगितलें परी न सोडसी । घरोघरच्या वानोळ्या ।'-होला १०२. ३ नमूना; मासला. ४ दूरदेशची, बहुमोल, दुर्मिळ वस्तु (भेट म्हणून दिलेली). [वान]

वाप—पु. पेरा; पेरणी; धान्य रुजत घालणें. [सं. वप्=पेरणें; वाप] -स्त्री. (कों.) नुकतेंच पेरलेलें शेत; ज्यामध्यें पेरलेलें धान्य उगवलें आहे असें शेत. **वापणें**-क्रि. (ना.) उगवणें; फुटणें. **वापारी**-पु. (कु.) धान्य पेरणारा; कुशल पेरा करणारा. [सं. वाप] **वापित**-वि. १ पेरलेलें. २ वपन केलेलें; श्मश्रू केलेलें. [सं.] **वाप्य**-वि. १ पेरावयाचें; पेरण्यास योग्य, शक्य, लायक. २ वपन करण्यास योग्य. [सं. वप्]

वापणें—क्रि. (व.) व्यापणें; मरणें.

वापर—पु. उपयोग; वहिवाट; रावता. (यंत्र, साधन, हत्यार वगैरेचा). (क्रि० करणें.) [सं. व्यापार] **वापरणें**-उक्रि. १ उपयोग करणें; उपयोगांत आणणें; (वस्त्रपात्रादि) पांघरणें. २ वहिवाट असणें; रावता, सराव, अभ्यास असणें (एखाद्या गोष्टीचा).

वापस—क्रिवि. परत; माघारा; उलट; फिरून. 'अम्मल मुंबईकरांनीं कौलकरारांखेरीज कब्जा केला तो वापस करवितों.' -ख ६.३५७३. [फा. वापस्] **०जमा-रकम**-स्त्री. खजिन्यांत पुन्हा भरणा करावयाचा पैसा. **०करणें**-वजा करणें; न द्यावयाची रक्कम पुन्हां खजिन्यांत भरणें.

वापसणें—अक्रि. १ (जमीन) वाफ येऊन पेरण्यास योग्य होणें. २ (वासरें वगैरे) विथरून बेफाम होणें; वारा खाणें. ३ (ल.) मनास लावून घेणें; हळुवार होणें; क्षुल्लक गोष्टीवरून भलतीच कल्पना करून घेणें. [वाफ] **वापसा**-पु. १ जमिनीची पेरण्यायोग्य स्थिति; पाऊस पडल्यानंतर जमीन दमट, उबदार झालेली स्थिति. (क्रि० होणें). २ पावसानंतर जमीनींतून निघणाऱ्या वाफा. [वाफ] **वापसें**-न. (व.) शरद्ऋतु. **वापश्याचें ऊन**-न. (व.) शरदृतूंतील ऊन; विश्वामित्राचें ऊन. (इं.) आक्टोबर हीट.

वापा—पु. वाफा पहा. **वापी**-स्त्री. लहान वाफा. [सं. वप्=पेरणें]

वापिक—पु. कुलधर्म. -मनको.

वापी—स्त्री. विहीर; पुष्करणी; पायऱ्यांची विहीर; बारव. 'वापी कूप अरण्यदेख ।' -एरुस्व ४.१९. -ज्ञा १८.९९. [सं.]

वाफ—स्त्री. १ वापसा; पेरणीची घात; पेरण्यास योग्य भूमि. 'मृगाची-हत्तीची-चित्राची-कृत्तिकेची-रोहिणीची-वाफ. २ (ल. यावरून) शुद्ध भूमि; योग्य संधि. 'तेथ केवळ जाली वाफ । निजबोधाची ।' -ज्ञा १७.२३१. 'मग विधीची वाफ चुकवी।' -ज्ञा १६.३०. **वाफणें**-अक्रि. (कों.) फळणें; (गाय, म्हैस) गर्भधारणा होणें. -उक्रि. धान्य मुठीनें उडवून पेरणें. [सं. वप्] -अक्रि. १ उगवणें; रुजणें. २ कणीस येणें; पक्व होणें. **वाफधाणी-नी, वाफधान्नी**-स्त्री. (व.) पेरणी संपल्यानंतर औतांची पूजा करून जेवण वगैरे करतात तें. **वाफविणें**-सक्रि. रुजविणें; पेरणें; उत्पन्न करणें. -ज्ञा १३.३०. 'पृथ्वी निववूनियां जाण । नर धान्य वाफवी ।' -एभा २३ ८५७.

वाफ—स्त्री. १ पाणी किंवा द्रव पदार्थ यास उष्णता लागल्यामुळें त्याचें जें वायुरूप बनतें तें. २ गरम हवा; उष्ण हवा. उदा० आगीची वाफ. [सं. बाष्प; प्रा. वप्फ; बं. उ. भाप; पं. भाफ] **वाफणें**-अक्रि. वाफेनें शिजणें, उकडणें. [सं. बाष्प] **वाफर-फोर**-न. (गो.) वाफेनें चालणारें जहाज. 'वाफोरची वेळ टळली, सुकती तर झाली. अन् या चिखलांत होड्या कशा तरून राहिल्या आहेत.' -सागराच्या लाटा ६८. [सं. बाष्प; वाफर पोर्तु. वापोर तुल० इं. व्हेपर] **वाफलणी**-स्त्री. वाफ देण्याची, वाफेनें सुकविण्याची क्रिया. **वाफलणें**-उक्रि. १ वाफेनें सुकविणें. २ वाफ देणें. [वाफ] **वाफसांडा**-वि. वाफ गेलेला; निवलेला. [वाफ+सांडणें] **वाफारा**-पु वाफेचा शेक; औषधीयुक्त पाण्याच्या वाफेनें दिलेली उष्णता. (क्रि० देणें; घेणें). 'गजचर्म रोगांत वाफाऱ्यापासुन पुष्कळ गुण येतो.' -बालरोग चिकित्सा २९. [सं. बाष्प] **वाफोळें**-न. तांदुळाच्या पिठाचें उकडून केलेलें खाद्य. -गृशि ३९५. [वाफळणें]

वाफ—न. (कों.) शेतीसाठीं बैल इ० वापरावयास घेतला असतां त्याबद्दल द्यावयाचें धान्य अथवा द्रव्य; भाडें.

वाफडणें—अक्रि. भिणें; दचकणें. 'पान खडफडितां वाफडें। मरणा भेण चौकडे।' -भाए ६७१.

वाफरें—न. कांपरें; शिरशिरी; कांटा (थंडी, पिशाच इ०च्या उपद्रवानें येणारें). थरकांप. (क्रि० भरणें; येणें.) [ध्व.? कापरें]

वाफवा—स्त्री. (अशिष्ट) अफवा पहा.

वाफसा—पु. वापसा पहा. 'वरी अवधानाचा वाफसा।' -ज्ञा ६.४९१.

वाफा—पु. १ अळें; लहान खाचर; वांगी, मिरच्या वगैरे लावण्याकरितां पाणी देण्याच्या सोईचा तयार केलेला जमिनीचा तुकडा; जिन्नपाकरितां केलेलें अळें. २ कढविलेला उंसाचा रस ओतण्यासाठीं तयार केलेला खड्डा; ढेपेचा खड्डा. ३ मोटेच्या पाण्याकरितां बांधलेला हौद; थारोळा. [सं. वप्=पेरणें-वाप]

वाफारा—पु. गुबारा; फुगारा. 'गलांडानें वाफारा धरला.'

वांब—स्त्री. नदी तीरावर वाढणारी एक कडू पानांची वेल.

वांब—पुस्त्री. (भारामुळें येणारी) बधिरता; जडत्व; पेटके; वळ; गोळा. (क्रि० येणें).

वांब—पु. एक बिन कल्ल्याचा, गोड्या पाण्यांत सांपडणारा मासा. –प्राणिमो ७९. [हिं. बाम]

वांब—वि. दोन किंवा अधिक वेताची (गाय, म्हैस). याच्या उलट पहिलार किंवा पहिलटकरीण.

वांबणें—अक्रि (प्र.) ओंबणें पहा.

वांबळ, वांबाळ, वामळ—स्त्री. मळभ; अभ्रें; कुंद, दमट हवा. (क्रि० पडणें; होणें; असणें; जाणें). 'तो वांबाळीचा चिलीम ओढीत बसला.' –खरादे.

वाभरू—न. तुफान; वादळ. [वायु+भिरें]

वाभळ—स्त्री. (कों.) भराभर वाढलेलें पण पोलकट भात. **वाभळणें**–अक्रि. वाभळ होणें; अतिशय जलद वाढल्यामुळें भाताचीं कणसें पोल होणें.

वाभा, वाभाडा, वाभारा—पु. १ मोठी चीर, भेग; घस लागल्यामुळें निघणारा वल्ल्याचा फाळा; धांदोटी; चिरफळी. 'निशाणाचे वाभाडे काढले.' –कोरकि ५. २ (ल.) कडक टीका. (क्रि० काढणें; निघणें). 'तो स्वत: न्यायाधिशाच्या खुर्चीवर बसेल तर त्याचे वाभाडे निघण्याला वेळ लागणार नाहीं.' –सासं २.६.

वांभाळ—स्त्री. वांबाळ पहा.

वांभेरें—न. सापास टोंचून सांधी बिळांतून बाहेर काढ्याचें कांटेरी हत्यार. कांबेरूं पहा.

वाम—वि. १ डावा; उजव्याच्या उलट. –ज्ञा ५.१५३. 'वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी।' –तुगा ३. २ सुंदर. 'परवाम-लोचनेच्या ऐकों न शकेंचि या विलापरवा।' –मोसभा ५.३५. ३ (ल.) कठिण; वाईट. 'ना सारथी म्हणुनि फारच वाम लागे।' –वामन, विराट ५.११६. ४ उलट; विरुद्ध; वाकडा. [सं.] **०कुक्षि**–स्त्री. (शब्दशः) डावी बाजू. (ल) दोनप्रहरीं जेवल्या-नंतर (डाव्याकुशीवर पडून) घ्यावयाची विश्रांति, निद्रा. (क्रि० करणें; घेणें). 'दुपारची वामकुक्षि चुकूं देऊं नये' –नि. **०बाहु**–पु. डावा हात, दंड. **०मार्ग**–पु. (डावा, वांकडा रस्ता) १ सामान्य पद्धतीच्या विरुद्ध उपासनामार्ग; मद्यमांसादि उपचारयुक्त पूजा-पद्धति; अभिचार कर्म. शाक्त वगैरे पंथ. २ आडमार्ग; वाकडा, कपटी मार्ग. **०मार्गी**–पु. अभिचारक–वाममार्गाचें अवलंबन कर-णारा; शाक्त. 'तो मोठा मंत्रशास्त्रज्ञ असुन शक्त्युपासक वाममार्गी होता.'–कमं १. **०सव्य**–वि. डावाउजवा. 'वामसव्य दोहींकडे। देखे कृष्णाचें रूपडें।' –एरुस्व १६.८५. **०हस्तभुजासन**–न. डावा पाय डाव्या खांद्यावर चढवून डाव्या हातानें मान धरणें. –संयोग ३२९. **वामांग**–न. १ डावी बाजू. २ (नवऱ्याचें डावें अंग) पत्नी; बायको. **वामांगी**–स्त्री. १ सुंदर स्त्री. २ पत्नी. 'वांमागीचा लास्य विलासु।' –ज्ञा १७.८. **वामाचार**–पु. शाक्त-पंथापैकीं एक उपासनाप्रकार; याच्या उलट दक्षिणाचार. **वामा-चारी**–पु. वामाचारास अनुसरणारा. **वामावर्त-वर्ती**–वि. डाव्या बाजूस वळलेला (शंख, जिना, भोंवरा, मळसूत्र) **वामा**–स्त्री. सुंदरी; स्त्री. 'चापल्य कौतुकानें वरुते चित्तांत सर्व वामांचे।' –कमं २.२. **वामी**–वि. वाममार्गी. 'वामी आम्हीं मुक्त असेचि होतों।' –कमं १.३५. –स्त्री. घोडी.

वाम—न. कर्ज शब्दास जोडून त्याच अर्थी वापरतात; **कर्ज-वाम**; देणें; ऋण. [अर. वाम] **०दार**–पु. (गो.) कर्जदार; धनको.

वाम—स्त्री. पेटके. वांब पहा.

वामक—वि. वमनकारक; ओकारी आणणारें (औषध). [सं. वम्=ओकणें]

वामणें—अक्रि. दुखावणें; नाखूष करणें. 'तें पाहूनि विराट आदि जन तो चित्तामध्यें वामला।' –वामन विराट. [वाम]

वामन—पु. १ विष्णूचा पांचवा अवतार. २ वामनद्वादशीचे दिवशीं जेवावयास बोलविलेला बटु, मुलगा. –वि. १ (ल.) खुजा; बुटका; ठेंगू (मनुष्य). २ (विष्णूनें वामन अवतारांत बलीस फस-विल्यावरून) लबाड; ठक; फसव्या. [सं.] **०जयंती-द्वादशी**–स्त्री. भाद्रपद शुद्ध द्वादशी; वामनाचा जन्मदिवस व बलिगर्वहरण. **०त्व**–न. ठेंगणेपणा; हीनता. 'आशा उपजली वामनासी। नीच वामनत्व आलें त्यासी।' –एभा ८.३११. **०मूर्ति**–स्त्री. ठेंगणा मनुष्य; खुजा मनुष्य. (विशेषतः एखाद्या लहान पण पराक्रमी पुरुषाबद्दल वापरतात.) –वि. ठेंगणा; खुजा.

वामळ, वामाळ—वांबळ, वांबाळ पहा.

वामोग—पु. (कु. गो.) कौतुक व प्रेम; माया.

वाय—पु. (समासांत) वायु; वारा. [सं. वायु] **०कर-खर-खोर**–वि. (गो.) वातुळ; वायुप्रकोप करणारें. **०गमन**–न. आंत-डयांत वायूमुळें निघणारी कळ; वायगोळा. **०कळा**–स्त्री.अव. संधिवाताच्या वेदना. **०कुंभा**–पु. एक औषधी वनस्पति. –प्रसुति-कृत्यादर्श ६. **०कळणें-चळणें**–अक्रि. १ चळणें; भ्रमिष्ट होणें; बेफाम होणें; वेडें होणें. २ स्वैर, स्वछंदी वर्तणूक करणें; चंगी-भंगी होणें; अनिर्बंध, मोकाट वागणूक करणें. **०गोळा**–पु. आत-डयांत वायु धरल्यामुळें येणारी कळ, होणारा रोग. 'पोटसुळीं निरंतर वायगोळा।' –दा ३.२.२६. **०चळ-कळ**–पु. वातभ्रम; वायु झाल्यामुळें होणारा उन्माद बुद्धिभ्रंश; वेड. –वि. वेडा; भ्रमिष्ट; बडबडया. **०चाळ-ळा**–पु. वेड; भ्रम; बडबड. 'अन्याय तो त्याचा नव्हे वायचाळ।' –तुगा ३०७८. 'जनीं व्यर्थ संसार हा वायचाळा।' –स्तोत्रमाला, रामदास करुणाष्टक ७. –वि. बड-बडया; वेडा. **०जाळ**–न. उन्हाळ्यांत उष्णवातानें हातापायांस भेगा पडणें. **०दमन**–न. (गो.) एक वातरोग; वायूचा गोळा छातींत बसणें.

वाय—क्रिवि. (वायां-वाव) व्यर्थ; निरर्थक; निष्फळ; मिथ्या. 'ते वेळीं तुझा आक्षेप वाय।' –विपू ७.७; ३.४०; –ज्ञा १५.३२७; १७.१९७. [सं. वि+अय्] **०आभाळ**–न. पोकळ अभ्र; बिन पावसाचें मळभ, ढग. **०करणी**–वि. व्यर्थ; निष्फळ; पोकळ. 'कासया होसी घामघूम। वायकरणी वैदा हा।' –अफला १४. **०कळ**–वि. १ शुष्क; पोकळ; निरर्थक; कुचकामाचें (भाषण, कृत्य). २ अनिर्बंध; बेफायदा; स्वैर. **०कांड**–पु. निष्फळ बाण. 'काय पिनाकपाणीचिया भाता। वायकांडीं आंहाती।' –ज्ञा ११.२०७. **०धळ**–वि. वायकळ पहा. **०पट-वट**–वि. व्यर्थ; मिथ्या. 'तैसा आत्मा भूंजे वायवटु। संसारू हा।' –भाए ५९९. **०फट**–वि. १ निष्फळ; निरर्थक; बालिश; पोकळ (बोलणें, बोलणारा). २ स्वैर; स्वच्छंदी; हट्टी; तऱ्हेवाईक; लहरी; हूड; उनाड. (मूल वगैरे). ३ क्षुद्र; फुकट; क्षुल्लक; बेफायदा (काम). **०फली-फूल**–वि. फळें, फुलें न येणारें, वांझ (झाड, रोप). **०फळ**–वि. पोकळ; फोल; अर्थशून्य; रिकामें; वावगें (बोलणें). 'या वायफळ गप्पांत कांहीं अर्थ नाहीं' –टिले ४.१९. [वायु+फल] **०फूल**–न. वांझ मोहोर; फळ न धरणारें फूल. 'अष्टलोकपालांसहित। स्वर्गसुखें वायफुलें समस्त।' –ह २२.६. **०बार**–पु. वांझा, फुसका बार; गोळी न घालतां नुसती दारू भरून उडविलेला बंदुकीचा बार. **वायबारचें काडतूस**–न. बिन गोळीचें, नुसत्या दारूचें काडतूस. **०बुंथी**–स्त्री. बुरखा; भ्रामक आवरण. 'तरी नामाची वायबुंथी। सांडीचि ना।'–अमृ २.३२. **०बुद्धि**–स्त्री. चुकीची, व्यर्थ, भ्रामक समजूत. 'मा येती न येती हे कायसी। वायबुद्धि।' –ज्ञा १५.३२७. **वायवाय**–क्रिवि. व्यर्थ; निष्फळ; वायां. 'ऐकुनि मोकलुनी धाय रुदन करीत वायवाय।' –अमृत, ध्रुवचरित्र ३. **वायां, वांया**–विक्रिवि. व्यर्थ; पोकळ; निष्फळ; मिथ्या; फुकट; निरर्थक. 'वेंचून वायां वय सर्व गेलें।' –सारुह १.१८. –ज्ञा २.१४०. [सं. वि+अय्] **वायाणी-णें**–वि. व्यर्थ; मिथ्या; लटकें. 'तैसे सर्व कर्मी असणें। तें फुडे मानूनि वायाणें।'–ज्ञा ४.९८. **वायांविण**–वि. व्यर्थ; निष्फळ; निष्कारण. 'तोंडे पाप घेती कांइसें। वायांविण।'–शिशु २१६.

वायंगण-णा-णें—नपुन. उन्हाळ्यांतील एक भाताचें पीक. एक प्रकारचें भात. [वायंगें-वांगें]

वायंगीं, वायंगीभात, वायंगें, वायंगें भात—(कों.) वांगें पहा.

वायघोय—न. (कों.) कळपांतील मेलेलें जनावर (गाय, बैल, म्हैस वगैरे).

वांयच—वि. थोडेंसें. वाईंच पहा.

वायंचणें—उक्रि. प्र. वैंचणें पहा.

वायट—वि. (गो.) वाईट; दुःखकारक. **०कार**–वि. दुखणेकरी. **०चरें**–वि. बरेंवाईट.

वायटळ-टूळ-टोळ—वावटळ पहा.

वायंडा—वि. (प्र.) वावंडा पहा. रिकामा; मोकळा; व्यर्थ.

वायण-न—न. उखळ. वाईंन पहा.

वायणें—क्रि. (प्र.) वाहणें. 'मना वाचे काये। जे आपुली आप वाये।' –ज्ञा १३.१२८.

वायदा, वाईदा—पु. करार; मुदतीचा ठराव; वचन; ठराविक वेळ; नेमलेली वेळ. 'सोळा दिवसांचा वाईदा करून गेले आहेत.' –ख ४.१८३१. 'तीन दिसांचा वायदा जो केला।' –ऐपो ३४. २ (व्यापार) ठराविक मुदतीनें व्हावयाचा खरेदी-विक्रीचा व्यवहार. उदा० आश्विन वायदा, एप्रिल वायदा. 'विलायती मालाचे खरेदी-विक्रीचे वायदे शहरांतून बंद करा.' –केसरी २६.७.३०. ३ (व.) शेतसारा; सरकारी महसूल; काळीचा वसूल. [अर. वअदा] **वायदेचिठ्ठी-रोखा**–स्त्रीपु. १ मुदतबंदीचा लेखी करारनामा; मूळचे मुदतीस अंतर पडल्यास पुनः दुसरी मुदत ठरवून जी चिठ्ठी लिहून देतात ती. २ कर्जफेड मागाल त्या वेळीं करण्याचें बिनशर्त वचन दिलेला बिनसाक्षीचा लेख. (इं.) प्रॉमिसरी नोट. ३ (ल.) तात्पुरता इलाज; तावडतोबीचें तात्पुरतें औषध; कायमचा नव्हे, तेवढ्यापुरता उपाय. **वायदेबंदी**–स्त्री. मुदतशीर ठराव. 'याशी वायदेबंदी मार्गेश्वर अखेर ५०० रुपये, पौष अखेर ५०१.'–वाडबाबा २.५. **वायद्याचा व्यापार**–पु. ताबडतोब खरेदीविक्रीचें करारपत्र करून कांहीं ठराविक मुदतीनंतर मालाची देवघेव करणें. –केसरी २८.७.३६.

वायदेव—पु. वायु. 'धन्य धन्य हा वायदेव।' –दा १६.६.१. [सं. वायु+देव]

वायदेश—पु. वाई प्रांत.

वायदेशा—वि. घरदार, ठावठिकाण नसलेला; भटक्या; उपरी; फिरस्ता. [सं. वायु+देश]

वायधूळ—न. वावटळ; वादळ; झंझावात. (क्रि० घेणें, सुटणें; चालणें; वाहणें).

वायन—न. वाण अर्थ १ पहा. [सं. उपायन]

वायन, वायीन, वाय्न, व्हायीन—न. वाईन पहा. दगडी उखळ. [फा. हावन; सं. वाहन ?]

वायना—स्त्री. अवाई.

वायपोय-ळ—स्त्रीन. (राजा.) गुरुंढोर मरणें; नुकसानी होणें; नासाडी. –मसाप २.४.१०५.

वायबेर—स्त्री. भातखाचरांतील चिखलाड्या वेळची तिसरी नांगरट. –कृषि २२५.

वायभरक—वि. (व.) वायु झालेला; कोठें तरी वाहवणारा. 'वायभरकासारखा वाटेल तें बडबडत होता.' [वायु+भरणें]

वायंभाळ—स्त्री. (बे.) वांबळ पहा.

वायरी—स्त्री. (व.) सुन. -वशाप ८.५१.२४५. [बायरी?]

वायल, वैल—पु. चुलीच्या बाजूस जाळ जाऊन वर भांडें ठेवण्याकरितां केलेली रचना. [वायला=वेगळा]

वायला—विक्रिवि. (अशिष्ट) १ वेगळा; अलग; विभक्त; निराळा. २ भिन्न; पृथक्. 'गोसावी त्यामधीं वायले।' -ऐपो १०८. ३ एकीकडे; बाजूला. 'वायले व्हा.'

वायवरणा—पु. एक औषधी वृक्ष; हाडवर्णा; वाटवर्णा. यास पांढरीं फुलें येतात. हा वातहारक आहे. [वायु+वरुण]

वायवस—वि. लटिका; मिथ्या. **वायवसा**-पु. वातभ्रमांत केलेली चेष्टा, चाळा; व्यर्थ गोष्ट. 'म्हणोनि वायांचि वायवसे।' -विपू १.३३.

वायवाट, वायवाटणें—वहिवाट, वहिवाटणें पहा.

वायवी—स्त्री. वायव्य दिशा; उत्तर-पश्चिम यांमधील दिशा. [वायु]

वायव्य—स्त्री. वायवी; उत्तर व पश्चिम यांमधील दिशा. -वि. वायुसंबंधी; वायुदेवताधिष्ठित.

वायशी-शो—वि. (व.) विचित्र; तारतम्य नसणारा; बेअकली; फाजील. [वायस, वायु]

वायस—पु. कावळा; काक; एक काळा पक्षी. -ज्ञा ३.१९८. 'मधुघृत पायस वायस खाय सदा पक्षियां सवें भांडे।' -मोकर्ण (हंसकाकीय). ०**पिंड**-पु. उत्तरक्रियेच्या वेळीं कावळयाकरितां ठेवावयाचा भाताचा पिंड, गोळा; काकबलि. [वायु]

वायसट, वायसी—वि. (व.) मूर्ख. वायशी पहा.

वायसर—पु. स्क्रू किंवा बोलट घट्ट बसावा म्हणून मध्यें घालावयाची चामडयाची किंवा लोखंडाची चकती. [इं. वॉशर]

वांयसा—वि. अल्प; थोडा. वांईच पहा.

वायसें—वि. लटकें. [वायां]

वाया—पु. (सोनारी) अर्धवर्तुळाकार सोन्याची किंवा चांदीची तार. **वायाची अवटी**-स्त्री. सदर तार काढण्याचा ठसा.

वायु—पु. १ वात; हवा; वारा; रूपरहित परंतु स्पर्शज्ञात असें एक द्रव्य. २ वातदेवता; वायुरूप देवता. ३ शरीरांतील प्राण (पांच मिळून किंवा स्वतंत्रपणें). ४ शरीरांतील एक धातु (कफ, वात, पित्त यांपैकीं वात हा). ५ वातधातूच्या विकृतीमुळें किंवा क्षोभामुळें होणारा रोग. उदा० उन्मत्तवायु, त्रिदोषवायु, धनुर्वायु, संधिवायु इ० [सं.] (वाप्र.) **वायूची मोट**-स्त्री. (प्र.) वाऱ्याची मोट; अशक्य गोष्ट. ०**सरणें-मोकळा होणें**-पाद येणें; अपानवायु बाहेर पडणें. ०**सोडणें-मोकळा करणें**-अपानवायूस मार्ग देणें; पादणें. सामाशब्द- ०**कर्षक**-वि. (शाप.) वायु शोषणारा; वायु ओढून घेणारा. (इं.) ॲस्पिरेटर ०**कोश**-पु. (शाप.) वायूची पिशवी. (इं.) पल्मनरी चेंबर; एअर सॅक. ०**ग्रस्त**-वि. १ वाऱ्यानें फुगलेला; फोपशा; वायु भरलेला. २ वातरोगानें पछाडलेला; वातुळ. ३ वाताचे झटके येणारा; फेपरें येणारा; झीट येत असलेला. ०**चक्र**-न. वातावरण. ०**चक्रशास्त्र**-न. वातावरणांतील निरनिराळया व्यापारांचा विचार करणारें शास्त्र; हवेंतील घडामोडी स्पष्ट करणारें शास्त्र. ०**धारक**-पु. वायु धरून ठेवण्याचें पात्र; वायुपात्र. (इं.) गॅस होल्डर. ०**धारणा**-स्त्री. प्राणायाम; वायु धरून, कोंडून ठेवण्याची क्रिया; योगमार्ग. ०**पात्र**-न. वायु धरून ठेवण्याचें भांडें; वायु बाहेर पडणार नाहीं असें भांडें; (इं.) गॅस जार; न्युमॅटिक ट्रफ. ०**पुराण**-न. अठरा पुराणांपैकीं शिवभक्तीवरील एक पुराण. ०**बद्ध**-वि. वातुल (प्रकृति-वातानें लवकर बिघडणारी). ०**बद्धक**-वि. वातकारक; ज्यामुळें गुबारा धरतो असें; वातुळ (पदार्थ). ०**भारमापक**-न. (शाप.) वातावरणाचा दाब मोजण्याचें यंत्र; (इं.) बॅरोमीटर. ०**मापक**-न. (शाप.) वायु मोजण्याचें यंत्र. (इं.) इंडिओमीटर. ०**रूप-रूपी**-वि. वातरूपी; वाऱ्यासारखें. (इं.) गेशस. ०**वहिनी**-स्त्री. (शाप.) हवा नेणारी नळी. (इं.) ब्रॉंकिओल. ०**विश्लेषण**-न. (शाप.) वायूचें पृथक्करण. (इं.) ॲटमॉलेसिस. ०**सख**-पु. वायूचा मित्र; अग्नि. 'तेथें शुक्र बृहस्पति जलद हरिश्चंद्र सर्व वायुसख.' -मोसभा १.२४. ०**सुत**-पु मारुती. 'महाराज तो स्वामि वायूसुताचा।' -राम २२. ०**स्थितिशास्त्र**-न. (शाप.) हवेचा, वातावरणाचा, अभ्यास करणारें शास्त्र. (इं.) मीटिऑरॉलॉजी.

वायें-ए-यें—विक्रिवि. व्यर्थ; वायां पहा.

वायो—पु. वायु पहा.

वार—पु. १ दिवस; अहोरात्र; आठवडयांतील प्रत्येक दिवस. उदा० रवि-सोम-मंगळ-बुध-गुरु-शुक्र-शनि-वार. 'त्या शुद्ध सत्त्व तनुला भेट गुरुबंधु ज्यांत तो वार।' -मोकृष्ण ८१.१. 'चार दिवस बाजार तेथिचा वार करुनि लवकरि।' -राला १६. २ ठराविक दिवस; आठवडयांतील ठराविक दिवस; ब्राह्मणास, विद्यार्थ्यास जेवावयास घालण्याचा ठरीव दिवस. 'गरीब मुलें वारानें उदरनिर्वाह करतात.' -टिले ४.१६५. ३ नियमित दिवस; पाळीचा दिवस (वेश्येस यजमानाकडे जाण्याचा-यावरून वारवधू, वारांगना, वारयोषित्, वारयुवति, वारनारी, वारस्त्री इ० शब्द बनले). 'ज्याचा वार तयासचि हेतु पुसो कीं कसा स्वभरि खचला।' -मोआदि ३१.६९. 'देवीपुढें नाचत वारनारी।' -सारुह ८.६१. ४ आठवडा (तोच वार पुन्हां येण्याला लागणारा काळ यावरून). 'तो गेल्याला आज दोन वार झाले.' ६ (ना.)

आठवड्याच्या दृष्ट्यांनीं फेडावयाचें कर्ज. 'मी बुटीचा वार काढला आहे.' –क्रिवि. वेळां; आवृत्तिवाचक अव्यय; एकवार, अनेकवार; त्रिवार; दोनवार. **वार करणें-असणें**-नियमित वारीं उपवास करणें. **०कर-करी**-पु. १ ठराविक वारीं जेवावयास घेणारा विद्यार्थी, ब्राह्मण, खंडोबाचा भक्त इ० २ ठराविक वारीं वसुल करावयाचा हप्ता उगविण्याकरितां फिरणारा सावकाराचा मनुष्य, कारकून. **वारनारी**-स्त्री. वेश्या. वारमध्यें पहा. **वारमुख्या**-स्त्री. मुख्य वारांगना. 'मधें मधें चालति वारमुख्या।' –सारुह ८.५०. **वारयुवति**-स्त्री. वेश्या. वार पहा. **वारवधू**-स्त्री. वेश्या. वार पहा. **वारस्त्री**-स्त्री. वेश्या. वार पहा.

वार—स्त्री. (कों.) भात भरडल्यानंतर तुसापेक्षां तांदुळांमध्यें जी वाढ दिसुन येईल ती. तांदुळ कांडल्यास तांदुळ व कोंडा निमेनिम होतात. त्यांत जर कोंडयापेक्षां तांदूळ अधिक भरले तर ती वार; वाढ.

वार—पु. १ जखम; दुखापत; तडाखा; मार (शस्त्राचा). २ (ल.) दोष; भार. [फा.]

वार—स्त्री. १ फुरसत; सवड; रिकामपण. 'तुज मज वार येथें कोण म्हणे किर।' –ब ५९३. २ विलंब;उशीर; वेळ. 'वार लावूं नको.'

वार—पु. लांबी मोजण्याचें एक माप; तीन फूट लांबीचें प्रमाण; गज; (इं.) यार्ड.

वार—स्त्री. मूल जन्मतें त्यावेळचें त्यावरील आवरण; वेष्टण; जार. 'पाहे तंव लवथवीत वार।' –कथा ५.१.३९. [सं. वृ]

वार—पु. (चुकीनें) वारसा; हक्क.

वार—पु. १ समुदाय; रास; ढीग; जमाव. 'कीं मथिला स्वांतरस्थ अरिवार।' –मोवन १३.१५.

वार—(अरबी, फारशी शब्दांस लागणारा प्रत्यय) १ सादृश्य, पद्धति, रीति, इत्यादि बोधक प्रत्यय. उदा० तपशीलवार; बयादवार; नावनिशीवार. २ साहचर्य, संबंध, इत्यादिबोधक प्रत्यय. उदा० किफायतवार; तरिकेवार. [सं.]

वारकरी—पु. १ वारी करणारा. २ (ठराविक दिवशीं क्षेत्राच्या ठिकाणीं जाणारा भक्त; नियमित दिवशीं यात्रा करणारा. 'पंढरीचा वारकरी.') [वारी+करी] **०करी धर्म**-पु. वारकरी लोक परस्परांमध्यें जो आचार धर्म पाळतात तो.

वारकोंड—वि. कोंदट; बंदिस्त; मोकळी नसलेली (जागा). [वारा+कोंडणें]

वारंग—पु. (कों.) कोयता, सुरी, तरवार वगैरेचा मुठींत अडकविण्याचा निमुळता भाग. [वार+अंग]

वारगी पारगीचा-नें—पारगी वारगी पहा.

वारंगुळा, वारगोळा-गुळें-गोळें—पुन. बदला; सर्कत; आळीपाळी; आलटापालट; इरजीक; डाळें; एकमेकांचें काम सहकार्यानें करण्याची शेतकऱ्यांची पद्धति. [वारगी+गोळा]

वारचा—विक्रिवि. ऐवजीं; जागीं; वाटचा; पाळीचा. 'माझ्या वारचा तो गेला.' 'त्यांत जे वारचे वतनदार लागले ते आपापल्या आणेवारीप्रमाणें स्वतः किंवा गुमास्त्यामार्फत काम करतात.' –गांगा ७५. [वार, वारी=वेळ, पाळी]

वारंट—न. धरणें; पकडहुकूम; पकडण्याचा हुकूम. 'त्यांच्यावर वॉरंट बजावण्यांत आलें.' –केसरी १७.६.३०. [इं. वॉरंट]

वारट—पु. अंत; शेवट. –मनको.

वारडें—न. शिळें अन्न.

वारण—पु. हत्ती. 'पद्माचा जो तंतु तो वारणाला। वारायाला पै म्हणे सिद्ध झाला।' –वामन स्फुट श्लोक (नवनीत पृ. १३४). [सं. वरण=जाणें]

वारणें—न. १ परतविणें; प्रतिकार; निवारण; मागें फिरविणें; परावृत्ति. २ टाळा; चुकविणें. 'दया प्रकट दाखवी कवण सांग त्या वारणीं।' –केका ६. ३ रक्षण. 'मी आजि साम्राजासुज शक्रसुताचें करीन वारण गा।' –मोभीष्म ४.१०. [सं. वार्=टाळणें]

वारणें—उक्रि. १ परावृत्त होणें, करणें; प्रतिबंध करणें; प्रतिकार करणें; टाळणें; चुकविणें; बाजूस करणें, सारणें (एखादें अनिष्ट वगैरे). 'शरणागत व्यसन तों स्वयें वारणें।' –केका ५६. २ हात वगैरे हालवून घालवून देणें, दूर करणें, हांकून देणें (माशा वगैरे). 'तुम्हां लागोनिलियां गौमासिया। तरि वारां जा कां।' –शिशु २१९. ३ फेडून टाकणें; मुक्त करणें (कर्ज वगैरे). ४ फिरविणें; हलविणें; ढाळणें (चवरी, मोरचेल वगैरे). 'तैं चामरे वारिती निर्विकारी।' –सारुह ५.२९. ५ सांगणें; कथन करणें. 'वैद्य पथ्य वारूनि जाये।' –ज्ञा ३.८. ६ वाटेस लावणें; संभावना करणें. 'भाटातें उचितीं वारितु।' –शिशु ५२१.–अक्रि. १ (सांकेतिक) मरणें. २ संपणें; नाहींसें होणें; दूर होणें; टळणें; निभावणें. 'हळू हळू त्यांचें पुण्य जातें वाड। वारतें हें जाड तिमिरासें।' –तुगा ४०. 'हळीं गडबडही वारली।' –समारो १.९. [सं. वार्=टाळणें]

वारणें—उक्रि. (कों. अशिष्ट) हांक मारणें; पुकारणें.

वारती—स्त्री. १ झोपाळ्याची कडी; पाळण्याची दोरी; कातडयाचा दोर, वादी वगैरे 'जननिया बाळकारे घातलें पाळणा। पंचतत्त्वीं जडियेल्या वारतिया चहुकोणा।' –तुगा २६५. २ शिडी; दोर (चढावयाचा). 'वारत्या लाविजती आकाशीं। यागांचिया।' –ज्ञा १८.४८२. [सं. वरत्रा, वारत्र]

वारद, वारीद—वि. दाखल; प्रविष्ट; प्राप्त. 'खैरियत खत खलिता वारीद होत नाहीं.' –रा ३.९०. 'शिरावर बरसात वारद झाली.' –हौकै १२. [अर वारिद]

वारदानी—पु. (नाविक) पावसाळ्यांतील दक्षिणवारा.

वारधट—पु. (माण.) वारा.

वारधाटीं—क्रिवि. मोकळया हवेंत; उघड्या वाऱ्यावर.

वारधुंद—स्त्री. (व.) खूप जोराची वावटळ; वादळ; झंझावात.

वारनीस—न. रोगण; एक प्रकारचा तेलकट पदार्थ. 'लांकडांस वारनीस द्यावें.'—मॅरट ७७. [इं. व्हार्निश]

वारपार—क्रिवि. वारगीपारगीनें; पाळीपाळीनें. 'सरकारच्या कोठ्या नेमणुकेप्रमाणें सनदेबरहुकूम वारपार चालतात...'—थोमारो २.८७.

वारया वेधणें—क्रि. वायुचक्रांत सांपडल्याप्रमाणें मन भ्रमणें. 'त्यांचा वारया वेधला जीव।'—दा ३.३.४७. धुळेप्रत. 'तेणें जीव वारया वेधला।'—दा ३.२.६३.

वारली—पु. उत्तरकोंकण, ठाणें जिल्हा यांतील एक जात व तींतील व्यक्ति.

वारलें—न. बहुल्याभोंवतीच्या बहींतील मडकें. वही पहा.

वारवंडा—पु. एक औषधी वृक्ष. वायवरणा.

वारवण-णें—न. मेंढ्या चारण्याबद्दलची मजूरी, वेतन. [वारणें]

वारवणें-विणें—सक्रि. उपणणें; वाऱ्यानें धान्यांतील भूस उडवून लावणें. [वारा]

वारवा—पु. एक जातीचा घेवडा.

वारंवार—क्रिवि. पुन्हां पुन्हां; वरचेवर; सतत; नेहमीं; फिरून-फिरून. [सं. वारम् द्वि]

वारविलासिनी—स्त्री. वेश्या; वारवधू; वार पहा.

वारवो—पु. (गो.) जननेंद्रियाच्या वरचा भाग.

वारशी—स्त्री. महार जातींत मोहतुराचे वेळीं पांच रुपये घेऊन वधूच्या पहिल्या नवऱ्याच्या वारसास देतात त्यास म्हणतात. —बदलापूर १७१. [वारस]

वारशीक-षीक—वि. (अप) वार्षिक पहा.

वारस-सी—पुस्त्रीन. एक इमारती लांकडाचें झाड.

वारस, वारीस—पु उत्तराधिकारी; वडिलार्जित धनाचा हकदार, मालक, वाली. 'पाटिलबाबा जमिनीचा वारस होऊं पाहतो.'—जोरा ११७. [अर. वारिस्] **०नामा**—पु. मृत्युपत्र.

वारसट—न. (हेटकरी) भयंकर वादळ. [वारा]

वारसंडणें—उक्रि. वारवणें; वाऱ्यानें भूस उडविणें. [वारा]

वारसंडणें—अक्रि. वाऱ्याच्या, उघड्यावरील हवेच्या योगानें फळीस, लांकडास वगैरे चिरा, भेगा पडणें. [वारा]

वारसा, वार्सा—पु. १ पैतृक हक्क; वडिलार्जित मालमत्तेवरील हक्क; मालकी; स्थावरादि द्रव्यावरील स्वत्त्व. 'मामलत देत असतां जमिनीचा वार्सा करूं लागले.'—जोरा १३०. २ वंशपरंपरागत आलेली मालमत्ता, संपत्ति; पित्रादि नातेवाईकांकडून मिळालेलें धन. [अर. वर्सा] **वारसान**—पुअव. वारस; हकदार. **वारसेदार**—पु. वारस; वारसा आलेला; पैतृक हकदार; मालक—महाराष्ट्र कृषीवल, आगष्ट ३०.

वारसा—पु. दोर, (जूं वगैरे बांधण्याकरितां).

वारसी—स्त्री. वृष्टि; पाऊस. [सं. वर्षा. हिं. बारस]

वारळी—पु. वारली पहा.

वारा—पु. १ वात; चलित वायु; हवा; न दिसणारें परंतु स्पर्शास समजणारें पंचमहाभूतांतील एक तत्त्व. —ज्ञा १५.३७६. २ (ल.) वीरश्री; स्फुरण. 'शिंद्यांना भरला वारा।'—संग्रामगीतें ७३. ३ संचार; अंगांत येणें. 'कंपु नोहे आंगी वारा। जगदंबेचा।'—ऋ ६५. [सं. वा=वाहणें] (वाप्र.) **०घालणें**—पंखा, चवरी वगैरे साधनांनीं हवेस चलन देऊन वारा लागेल असें करणें. **०घेणें-खाणें-पिणें**—१ (वासरें वगैरे) मोकाट सैरावैरा पळूं लागणें; उडया मारूं लागणें. २ (ल.) निर्बंध झुगारून देऊन स्वैर वर्तन करणें; मोकाट सुटणें; अद्वातद्वा बागणें. 'स्वरूप तुमचें पाहून पापिणी जीव आमचा प्याला वारा।'—होला १०२. 'तेणें करून रांगडे बहुत वारा प्याले।'—पेद २१.१७७. **०न घेणें किंवा न पडूं देणें**—अगदीं अलिप्त, दूर राहणें; किंचितहि संबंध न येऊं देणें; संसर्ग टाळणें. **०पडणें**—वारा वहावयाचा बंद होणें. **०पिणें**—१ वारा घेणें पहा. २ दुःखी, उदासीन, उत्साहहीन, खिन्न, उद्विग्न होणें. **०फिरणें**—मत बदलणें; स्थिति पालटणें. **०मोकळा करणें-सोडणें**—अपानवायु सोडणें; पादणें. **०मोकळा होणें, सरणें**—अपानवायु सुटणें; पश्चिमद्वारें वायु बाहेर पडणें; पादणें. 'वारा सरतां मोठी फजीति।'—दा १८.१०.२०. **०वाजणें**—वारा वाहणें; जोराचा गार वारा सुटणें. 'वारा वाजतां करपती ओलीं पिकें।'—दा ९.८.२९. **०वाजेल-वाहील तशी पाठ करावी-ओढावी, द्यावी, वारा पाहून पाठ द्यावी, वाराबाहेल तसें करावें-पाठीवर घ्यावा**—१ वाऱ्याच्या प्रवाहाबरोबर जावें, वारा वाहील त्या दिशेनें जावें, वाऱ्याच्या अनुरोधानें जहाज हांकारावें. २ (ल.) वेळ पडेल तसें, प्रसंग ओळखून वागावें. **०होणें**—वाताहात होणें. 'हळहळ बहु झाली होय संसार वारा।'—सारुह ३.७३. **वाजता वारा लागूं न देणें**—किंचितहि त्रास न सोसणें; स्वतःस अणुमात्र तोशीस लागूं न देणें; अजीबात त्रास टाळणें. **वाऱ्याचा उपद्रव**—पु. १ हवेंतील फरकामुळें होणारी पीडा, बाधा. २ पटकीची साथ. **वाऱ्याचा बुंद**—पु. हवेचा अल्पांश; किंचितहि वायुचें वाहणें; बारीकशी झुळूक (बहुधा नास्तिपक्षी). **वाऱ्याची मोट**—स्त्री. (ज्याप्रमाणें वारा एका गाठोडयांत बांधणें अशक्य त्याप्रमाणें) परस्परांपासुन दूर व भिन्न अशा अनेक वस्तु अथवा व्यक्ति एकत्र आणण्याची व ठेवण्याची क्रिया; अनिर्बंध वस्तूंचें एकत्रीकरण. (हें अशक्यप्राय असतें)

०बांधणें–क्रि. अशक्य गोष्ट करूं जाणें. **वाऱ्याचें घोडें**–न. (वाऱ्यानें चालणारें) जहाज; गलबत; नौका. **वाऱ्याबरोबर-शीं भांडणें**–अतिशय भांडखोरपणा करणें; नसते कलह उकरून काढणें. **वाऱ्याला लाथा मारणें**–निष्फळ काम करणें. **वाऱ्या वर टाकणें**–अजिबाद सोडून देणें; टाकून देणें; पूर्णपणें त्याग करणें; हयगय, दुर्लक्ष करणें. **वाऱ्यावर भारे बांधणें**–मनोराज्य करणें. **वाऱ्यावर वरात भुसावर चिठी-भूसपर ठेंगा**–बेजबाबदारीचें, निष्काळजीचें काम (वरात म्हणजे पैसा देण्याविषयीं चिठ्ठी. ती वाऱ्यावर देणें म्हणजे कांहीं तरी करणें); ताळमेळ नसलेली गोष्ट करणें. **वाऱ्यावर सरणें**–१ कुठें तरी भटकणें; वहावत जाणें; कांहीं तरी भरमसाट बोलत सुटणें. २ अवखळ होणें; आडदांडपणा करणें; स्वैर वागणें. **वाऱ्यावशीं-वाऱ्यास्वोई-वाऱ्याबाग**–क्रिवि. वाऱ्याच्या गतीच्या अनुरोधानें; प्रवाहाबरोबर; प्रवाहाच्या दिशेनें. **वाऱ्यास उभा न करणें-राहूं न देणें-न राहणें**–स्वतःपासून दूर ठेवणें; संबंध न ठेवणें; संसर्ग टाळणें. **वाऱ्यास देणें**–उपणणें; वारवणें; वारसंडणें. सामाशब्द-

वारापाणी–न. १ वारा व पाणी यांच्या सुलभतेमुळें क्षुल्लकत्व दर्शक दुर्लक्षित, उपेक्षित स्थिति; अवहेलना; उपेक्षा; हेटाळणी; तिरस्कार; हेळसांड. 'मी बोलतों याचें उगीच वारापाणी करून टाकूं नको.' 'म्हालें बारापाणी वज्र तव भयेंचि देव कां पावे।' –मोभीष्म १.१०६. २ –नस्त्री. निरवानिरव, वारासार; फेड; भागवाभागवी (कर्ज-वाम वगैरेची). ३ निरास; निवारण; अनिष्ट निरसन. ४ हवापाणी; मोकळी स्वच्छ हवा; एखाद्या ठिकाणचें हवामान; आबहवा. 'चार दिवस वारापाणी खा मग बरा होशील.' [वारा+पाणी] **वारें**–न. १ वारा; विशेषतः वाहणारा, हलणारा वारा. २ साथ; प्रसार; प्रादुर्भाव (रोग वगैरेचा). उदा० पटकीचें वारें; खोकल्याचें वारें. (क्रि० चालणें; वाहणें; वाजणें; सुटणें). 'वारीं रोग्याची वाजतीं।' –दावि ३७७. ३ संचार; अंगांत येणें; पिशाच्चबाधा. (क्रि० येणें; भरणें.) 'अंगीं घेऊनियां वारें दया देती। तयां भक्तांहातीं चाट आहे.।' –तुगा २८४२. 'वारें निराळें बोले। देहामध्यें भरोनि डोले।' –दा ९.८.२२. ४ झांक; छटा; चर्या; सुरत; गुणसमुच्चय. (विशिष्ट गोष्टीकडे कल, आवड, विशिष्ट बौद्धिक सामर्थ्य, कौशल्यदर्शक). 'कारकुनीचें वारें.' ५ लहर; लाट; ऊर्मि; प्रवृत्ति; कल. उदा० प्रीतीचें-ममतेचें-रागाचें-शोकाचें-आनंदाचें-वारें. ६ जोम; उत्साह; सामर्थ्य; आनुवंशीक ओज, तेज, रग वगैरे. उदा० तारुण्याचें-बळाचें-शक्तीचें-वारें. 'हिंदुलोकांत स्वातंत्र्याचें वारें कसें तें माहित नाहीं.' –नि. 'अंगीं भरलें नूतन वारें।' –विक ३. ७ सामान्यतः एखादी चमत्कारिक कल्पना, वेड, खूळ वगैरे 'सुधारणेचें वारें महाराजांच्या डोक्यांत शिरलें' –टिले ४.३३६. ८ स्पर्श; वास. 'एका राज्यव्यवस्थापकानें राज्यास संपत्तीचें वारें लागूं नये म्हणून कडक कायदे केले.' –नि ५४. ९ अंश; भाग. 'त्यातलें बिलकुल वारें ऐन साठीच्या अंमलातहि प्रस्तुत ग्रंथकाराचे ठिकाणीं आढळत नाहीं' –नि. १० आविर्भाव; देखावा; आव; अवसान. 'चोरापुढें त्यानें पहिलवानगिरीचें वारें अंगीं आणण्याचा प्रयत्न केला.' ११ अर्धांगवायु; पक्षवात. 'वारीं अंगावरून जातीं।' –दा ९.८.२९. **०फिरणें**–बदल होणें; पालटणें; वर्तणूक निराळी होणें. 'गोविंदरावास नोकरी लागल्यापासून सखूबाईचें वारें फिरलें.' **०लागणें**–संसर्ग होणें; संगति लागणें; संबंध येणें. 'संपत्तीचें वारें आजपर्यंत कसें तें मुळींच लागलें नाहीं असे देश पृथ्वीवर पुष्कळ आहेत. **'वारें सुटणें**–परिस्थिति, वातावरण उत्पन्न होणें. 'कायदेभंगाचें हिंदुस्थानांत वारें सुटलें.' –के १२.७.३०. **०सूत्र**–न. (गो.) पिशाच्चाचा फेरा. **वारेघशीं**–क्रिवि. उघड्यावर; वाऱ्यावर; हवेवर. 'रसाची घागर तुळशीपाशीं उतरली व वारेघशीं ठेविली.' –खरादे ६९. **वारेमाप**–क्रिवि. १ प्रमाणाबाहेर; भलतीकडेच; बेअंदाज; बेछूट. २ बेताल; असंबद्ध; विसंगत; अद्वातद्वा (बोलणें, भाषण). **वारेलग**–क्रिवि. वाऱ्याच्या प्रवाहांत, झोतांत. 'कां वारेलगें पांखिरूं। गगनीं भरे।' –ज्ञा १३.३१४. **वारेहळक**–वि. वारा लागून वाळलेलें; वाऱ्यावर टाकून वाळलेलें.

वारांगना—स्त्री. वेश्या. वार पहा.

वारांगुळें—न. अव्यवस्था; अस्ताव्यस्तपणा; उडवाउडव; दाणादाण; नासधूस (वाऱ्यानें धान्य वगैरे उडून जावें त्याप्रमाणें). (क्रि० करणें; करून टाकणें.) [वारा+गोळा]

वाराणसी-शी—स्त्री. काशी; बनारस शहर. 'जपतुसें वारानशी तिअेदीनी।' –शिशु १३२. 'मोक्षाचें तीर्थ नलगे वाराणसी।' –तुगा २२७४. [वारणा+असी या दोन नद्यांच्या संगमस्थानावरून] **०कर**–पु. काशीकर पहा.

वारानी—वि. (व.) हवाशीर; वाऱ्याची. [वारा]

वारांव—पु. (गो.) खिडकीचा गज. [इं. बार]

वाराव(वि)णें—१ वारवणें पहा. २ वाऱ्याकर धरून वाळवणें (वस्त्र वगैरे).

वारावार—स्त्री. निरवानिरव; कर्जफेड; कामाची व्यवस्था; भागवाभागवी. [वारणें]

वारासार—स्त्री. १ निरवानिरव; आवराआवर; व्यवस्था; नीट, व्यवस्थित मांडणी, रचना; आटोपाआटप. 'जिकडे तिकडे करूनि टाकसी अशी वारासारी।' –होला ८९. २ वारावार. [कारणें+सारणें]

वाराही—स्त्री. एक वनस्पती. **वाराहीकंद**–पु. वाराही वनस्पतीचा गड्डा, मूळ, कांदा.

वारि, वारिया—शअ. ऐवजीं; बद्दल. 'तुझीया वारिया मज नाचोंनये।' –भाए २४२. [वार पहा.]

वारि—न. उदक; पाणी. [सं.] **०ज**–न. कमल; अब्ज. **०राशी-सी**–पु. समुद्र. 'न हें नभोमंडल वारिराशी।' –अन्योक्ति. **०वाह**–पु. मेघ.

वारिक-कें—न. १ वाहन. 'गरुडाचें करौनि वारिकें। दाटौनि आलासी कवतिकें।' –शिशु ४४७. 'यादव आरूढ गजवारिकां' –धवळेउ ५२. 'पवनाचां वारिकां वळघे।' –ज्ञा ६.२७०. 'गरुडाचें वारिकें कामे पीतांबर।' –तुगा ३. २ शिंगरूं; घोडें; तट्टू. 'दांडियांचां सरकौनि वारिकेआंवरी।' –शिशु ५५२.

वारि(री)क—पु. न्हावी; म्हाली; नापीक. 'तंव त्याचीं नखें फेडावया! वारिकु।' –पंच ५.१. 'तंव हडपिनी वारिकी दुआळिलीं। तिअें पुढिलां बारिआं बुजालीं।' –शिशु ५५८. 'धनाशें वारिक पोरगी आणूनी।' –दावि २९२. [सं. वार, टरा-विक वारीं येणारा]

वारिका—स्त्री. वेग; गति.

वारिशदार, वारिसदार, वारीश—वारस पहा.

वारिजणें—अक्रि. वर्ज्य होणें; बंद होणें; मिटणें; लागणें. 'जेथ काळा वारीजती दारवंठे।' –भाए ६३. [सं. वर्ज]

वारी—स्त्री. १ यात्रा; नियमित फेरी; व्रत; येरझार. 'आषाढी कार्तिकी पंढरीची वारी।' –रामदासी २.२२. –ज्ञा ६.३७७. २ पाळी; खेप; क्रम; वाटा. 'आतां कर्मटां कैं वारी। मोक्षाची हे।' –ज्ञा १८.६८. ३ गती; जाणें. 'सरली द्वैताची वारी।' –ज्ञा १४.५६. ४ देवाच्या नांवानें मागितलेली भिक्षा. 'वारी मागतां पोट भरेना बहु श्रम पावली हो।' –भज ५९. ५ वेळ; प्रसंग; सवड. 'तंव जाणुनि आयुष्यावसार वारी।' –आ मार्कंडेयाख्यान ६.३६. 'गरुडास जातो म्हणून नाहीं पुसाया वारी।' –पला. **वारीस येणें**–वाटयास येणें, क्रमप्राप्त होणें; उरणें; राहणें.

वारी—स्त्री. नाश. 'विचाराची होते वारी। देखत देखतां।' –दा ११.४.९. **वारी सोडचणें**–क्रि. (कों.) ग्रामदेवतेसमोर महारानें तरवार हातांत घेऊन ती आपले पोटावर (स्वतःला इजा न होता) आपलेच हातानें मारून घेणें. याला तोडून घेणें असेंहि म्हणतात. अशा वेळीं देवीपाशीं गाऱ्हाणें व्हावयाचें असतें. या दिवशीं महारास उपवास करावा लागतो. या कृत्याबद्दल महा-रास देणगी देतात. –आडिवऱ्याची महाकाली ३२.

वारी, वारीं—शअ. १ नें; साहाय्यानें; साधनानें; तृतीया-बोधक अव्यय. उदा० केरसुणीवारीं. 'पंख्यावारीं वारा घ्यावा.' 'तें तें भगवत्सेवे वारीं। स्वयें कृष्णार्पण करी।' –एभा ३.५६५; ५.४०२. –ज्ञा १८.२२५; ५०७, ५४६, ५५०. २ सारखा; प्रमाणें; अनुलक्षून; रीतीनें; वजा. 'पाण्यावारी पैका खर्चला पाहिजे' 'तृणावारी मोजणें.' ३ बरोबर; सह; म्हणून; पोटांत; खालीं; मुळें; योगानें. उदा० हसण्यावारी; बोलण्यावारी, विनोदा-वारीं. 'आंबे प्रसादावारी गेले.' 'सर्व बोलणें थट्टेवारी गेलें' 'तुका म्हणे कामावारीं। आळस घरीं करमेना' –तुगा ६७५. ४ ऐवजीं; जागीं; वाटचा. ५ साठीं; करितां. 'मी पोटावारी काम करतों.'

वारी(रि)त—वि. १ हजर; उपस्थित; आलेला; प्रविष्ट झालेला; दाखल. २ हातीं आलेला; मिळालेला. [अर. वारिद]

वारीस-दार—वारसदार पहा.

वारु-रू—पु. घोडा; अश्व. 'भणओनि उपमा न घडें। तेआंवारूवांसी।' –शिशु ९९३. 'कोल्हेरीचे वारू। न खेती धारकीं धरूं।' –अमृ ७.४. –ज्ञा ९.२१६. –वि. उत्तम; सुंदर. 'चारू तो वारू.' [सं.] **वारुडा**–पु. घोडेवाला; अश्वपाळ; खासदार. 'वारुडे नी मेळविला। झडकरौनी।' –शिशु ५११. 'तंव वारू मेळविला। वारुडेनि' –शिशु ९८९.

वारुणा—स्त्री. एक नदी. 'दक्षिणकडे काशिच्या अशी। उत्तरे-कडे वारुणा तशी।' –नरहरी गंगारत्न माला (नवनीत पृ.४३५.)

वारुणी—स्त्री. १ पश्चिमदिशा. २ मद्य; दारू. 'वारुणी माध्वी मधोदक। आवश्यक सेविती।' –एभा १३.१२०. ३ एक अस्त्रविद्या. 'तुज विद्याभार्गवी वारुणी।' –वामन निगमसार १.४५. –वि. वरुणदेवतेसंबंधी; वरुणदेवताधिष्ठित. [सं. वरुण]

वारूळ—न. १ मुंग्यांचें घर; भुवन; सापाचें बिळ. 'वारु-ळास वाल्मीक बोलिजे।' –दा १६.१.१४. 'त्या मणिप्रकाशीत वारुळी।' –नरहरी, गंगारत्नमाला. (नवनीत पृ २४१) २ एक व्रणरोग. [सं. वल्मीक; सं. वामतुर, वामलुर; म. वाळ्+घर]

वारूळ—न. वाळा; एक सुगंधी गवत.

वारें—न. वारा पहा.

वारें—वि. वारीचें; वारी मागून आणलेलें. 'आपली भिक्षा सोडूं नये। वारें अन्न खाऊं नये।' –दा १४.१.५६.

वारेंवस्त्र—न. सूत व रेशीम यांच्या मिश्रणांत जें रेशीम असतें तें.

वारेंरंग—वि. रंगहीन; बेरंग; रंग उडालेलें. 'रंग आणि वारेंरंग।' –दावि ११५.

वारेंरंगणें—अक्रि. रमणें; रममाण होणें; गुंग होणें. 'संसार-दुःखें विसरलें। विषयेरंगीं वारेंरंगले। श्रीरंगरंगीं।' –दा ३.१०. ३५.

वारेवणें—अक्रि. (कु.) वारवणें पहा.

वारेसा—पु. एक इमारती झाड. वारसा पहा.

वारेळूं—न. (राजा.) वाळा; एक प्रकारचें सुगंधी गवत व त्याची मुळी.

वार्ता—स्त्री. १ वृत्त; बातमी; हकीकत. २ वदंता; ऐकीव बातमी. ३ संवाद; संभाषण. (क्रि० करणें). ४ राजनीतीचें तिसरें अंग; अर्थविचार अथवा अर्थानर्थ विचार (आन्वीक्षिकी, त्रयी व दंडनीति हीं बाकीचीं तीन अंगें होत). ५ गोष्ट; संबंध. 'वार्ता हरीची सहसा त्यजावी।'–सारुह ३.२५. ६ अल्पांश; किंचितहि भाग. 'घरूं नका संशय वार्ता।'–रत्नकांता१५. ७ प्रसिद्धि; ख्याति; लौकिक. 'लोकांत ज्यांची वार्ता आहे तेच हे.'–कर्म १. ८ बाता; गप्पा. 'अशा तो सारख्या वार्ता झोंकीत आहे.'–स्वप ९०. [सं. वृत्=होणें] **वार्ता नसणें**–अस्तित्वांत नसणें; अत्यंत अल्प प्रमाणांत असणें. 'सृष्टीची नाहीं वार्ता। तेथें सर्व ही ऐक्यता।'–दा ५.६.४९. 'वार्ता नाही जन्ममृत्याची।'–दा १.९.१३. **०हर**–पु. बातमीदार; दूत; निरोप सांगणारा जासूद.

वार्ता—स्त्री. दोरी; रज्जु. 'मग कोता खेंव देणें। वार्तेवरील घांवणें। सांडी पडे खेळणें। नागिणीचें तें।'–ज्ञा १८.६५. [सं. वर्त्ती; वरत्रा]

वार्तिक—पु. बातमीदार; जासूद; दूत; भाट; बातम्या लिहिणारा. 'आपण वार्तिका समागमें पत्र पाठविलें.'–पेद ३. १०४. 'वार्ता वार्तिक कीर्तिती प्रभुपुढें।'–आसी १३.९. 'देखिलें वर्तमान वार्तिकें लेहावें'–सप्र १२.४०. [वार्ता]

वार्तिक—न. १ सूत्रावरील व्याख्यान; स्पष्टीकरण; टीका. 'तो बौद्धमत संकेतु। वार्तिकाचा।'–ज्ञा १.१२. –एभा ७. २९५. २ (संगीत) चार मात्रा प्रमाण. –पु. टीकाकार; वार्तिककार. 'वक्त्रे वार्तिकू। रसाळें पुराणिकू।'–शिशु ३५०. [सं. वृत्ति]

वार्धक्य—न. म्हातारपण; वृद्धपण; उतारवय. वार्धिक्य, वार्धिक्यदशा अशी अपभ्रष्ट रूपें काव्यांत येतात. [सं.]

वार्धुषिक—पु. व्याजबट्ट्यावर उपजीविका करणारा; सावकार. [सं.] **वार्धुष्य**–न. व्याज; नफा; किफायत; वाढ. मिळकत. [सं.]

वार्याव—वि. भेटीची, प्रवेशाची परवानगी मिळालेला. [फा. वार्याब्] **वार्यावी**–स्त्री. भेटीची परवानगी; राबता. 'तो दिवसरात्र दौलाची प्रकृत अस्वस्थ. कोणाचीवार्याबी नाही.'–रा ७.१११.

वारांशी—पु. समुद्र. 'वारांशी वानर विलंघित होय तो कीं'–र १५. [सं. वारिराशि]

वार्षिक-की—नस्त्री. १ साल्लीना नेमणूक; दर वर्षाचें वेतन. २ दरसालचा उत्सव, व्रत, समारंभ. –वि. १ दरसालचा; प्रतिवर्षीचा; प्रतिवार्षिक. २ पावसाळ्यांत होणारें; पावसासंबंधी पावसाळी. [सं. वर्ष]

वार्षिया—पु. पावसाळा; वर्षाऋतु. –ज्ञा ९.१०२.

वार्षी, वारिषी—स्त्री. १ पर्जन्यकाळ; पावसाळा; वर्षाऋतु; वृष्टि. 'अथवा घनावळी आकाशा। वार्षिये जेवी।'–ज्ञा ९.११९. २ वेश्या. 'वार्षियेचे उभळें। कोण न रिगे।'–माझा (पाठ) १३.७०१. [सं. वृष्]

वाऱ्हाव—पु. वराह; डुकर. 'शेषकूर्म वाऱ्हाव जाले।'–दा २०.८.२१.

वाल—पु. १ तीन गुंजाभार वजन; व्यवहारांत हें दोन किंवा अडीच गुंजाभार धरतात. 'मग वालुवालु ज्ञान भांगारा। एक कर्म कथिलाचा खुरा।'–भाए ६३५. २ कडवा; एक द्विदल धान्य; वरणा; एक कडधान्य. ३ चिल्हारीची बी; फताड्या गुंजेची बी. [सं. वल्ल; प्रा. वल्ल; का. आवरे] **म्ह०** अटतां वाल पिटतां वाल वाल वाल निसंतान.

वाल—पुन. १ (गो.) वेल. २ (गो. कु.) गलबतावर उपयोगांत आणावयाचा काथ्याचा मोठा दोर. –कृषि ७५१. ३ (कर.) धनुष्याकृति आसन. [का. वल्ले=दोर]

वाल—वाला; संबंधदर्शक प्रत्यय. उदा० अग्रवाल; पोरवाल; खंडेलवाल.

वाल—पु. पडदा [इं. व्हाल्व्ह]

वालकफा—पु. घाटावरील एक वृक्ष. याच्या तांबडा, जांभळा व पांढरा अशा तीन जाती आहेत.

वालका, वालॉ-लो—पु. (कु. गो.) पंचा. [सं. वल्कल्]

वालखिल्य—पु. अंगुष्ठमात्रप्रमाण अशा साठ हजार ऋषी पैकीं एक व्यक्ति. हे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र होत. 'मार्गीत वालखिल्यहि तुज येतां भेटले निराहार।'–मोआदि ४.१३०. २ –न. लहान मुलांचा समुदाय. **०स्वामी**–पु. लहान मुलांत वावरणारा वयस्कर मनुष्य.

वालथर—वि. दुर्बल; पुळपुळीत; पोकळ (भाषण, ग्रंथ). फुसके; निर्बल; कमजोर (प्रयत्न, उपाय). [वालु+थर]

वालदाणी-नी—स्त्री. वालुकापात्र; वालु ठेवण्याची डबी; रेतीदाणी; बालुदाणी. [वालु+फा. दान]

वालपापडी—स्त्री. एक शेंगभाजी; एक भाजीचा वेल व त्याच्या शेंगा; (गुज.) मरचला=एक प्रकारचा घेवडा.

वालभ—न. १ प्रेम; आवड; प्रीति. 'परि पुढें वालभाचें भोज। नाचत असे।'–ज्ञा ६.१२३. 'अहिंसेचें परमवालभ।'–स्वादि १.६.१६. २ तादात्म्य. [सं. वल्लभ] **वालभणें**–अक्रि. लोभावणें; प्रेमहत होणें. 'रूपाचिआं भूली। जेआं लक्ष्मी वालभैली।'–शिशु ३६९.

वालय, वाल—स्त्री. एक जातीचें भात.

वालरस—पु. समुद्रांत राहणारा, मासे खाणारा एक प्राणी.

वालशिंगट—न. एक मासा.

वालशीट-शेट—न. मेणबत्तीचा दिवा; मेणबत्तीची ठाणवी. [इं. वॉलशेड]

वालसांबळ—स्त्री. एक शेंगभाजी.

वाला—वि. (ना.) वायला; वेगळा. 'माझा राम झाला मजहुन वाला।' –आपद ६९.

वाला—कर्ता, विक्रेता; मालक; रहिवासी; तज्ज्ञ इत्यादि अर्थबोधक प्रत्यय. हा नामास किंवा क्रियापदास लागतो. उदा० बोलणेवाला; करणेवाला; देणेवाला; घेणेवाला; बंदूकवाला; पैसेवाला; अत्रूवाला; दाणेवाला; दारूवाला; दिल्लीवाला; नाटकवाला. [सं. वत्]

वाला-ल्हा—वि. आवडता; प्रिय. 'विसरु हा तीस कैसा वाचा जाला। जीवाहूनी वाल्हा दिसतसे।'–तुगा २०. [सं. वल्लभ]

वालॉ-लो—पु. मोटेचा दोर; सोल. [का. वळे=दोर]

वाला—वि. थोर; मोठा; उच्च. [फा. वाला=राजा, मुख्य] **०कद्र**–वि. उच्च पदवीचा. –रा १५.१७१. [फा. वाला+कद्र] **०जाह**–वि. सन्माननीय; श्रेष्ठ; उच्च पदवीचा. –रा १५. ३६३. **०जाही**–स्त्री. थोर कीर्ति; प्रसिद्धी. 'जिकडे इन्साफ तिकडे फत्ते, हे वालाजाही झाली व जुहुरांत आलें.' –ख ७. ३५७२. **०मनाकब**–वि. थोर गुणांचा; श्रेष्ठ गुणांचा. [फा. वाला+मनाकिब्] **०शान**–वि. वालाजाह पहा.

वाला—पु. (गो.) पंचा. [सं. वल्कल]

वाली-ल्ही—पु. १ त्राता; रक्षणकर्ता; कैवारी; आश्रय दाता. 'अनाथाचा वाली ईश्वर.' २ मालक; धनी; पति; प्रियकर. 'तूं माझा वाली इश्कांची शिपायावाणी बांधलीस ढाली।' –होला ९४. [अर. वाली=राजा, मालक] **०वारस**–पु. धनी; उत्तराधिकारी; हकदार; मालक (व्यापक अर्थानें).

वाली—वि. वेडा; आश्चर्यचकित; प्रेमवेडा. [अर. वालीह्]

वाली—स्त्री. (खा.) हातोड्याचें चापट टोंक.

वालीद—पु. पिता; बाप. [अर.] **वालीदवारस**–पु. नातेवाईक. त्यांच्या वालीद-वारसांच्या रक्षणाची जबाबदारी घेतली काय?' –दुर्दैवी मोहरे.

वालीप-फ—वि. (वस्त्राच्या) तंतूंचा झिरझिरीतपणा, बारीकपणा, नाजुकपणा. –स्त्री. झिरझिरीत आच्छादन; गवसणी; ओढणी; बुरखा; कौपीन. 'आंगिचेनि गौरपणें रंगली। वालीप जाली पींवळी।' –शिशु २७५. 'आहाच बोलाची वालीफ फेडिजे।' –ज्ञा ६.२५. 'तेयापरी वालिपेची बुंथी।' –उषा ३४.

वालुका—स्त्री. वाळू; रेती. [सं.] **०तैल**–न. (वाळूचें तेल निघूं शकत नाहीं यावरून) खपुष्प, शशशृंग याप्रमाणें अशक्य गोष्ट याअर्थी हा शब्द वापरतात. **०यंत्र**–न. १ वाळूचें घड्याळ; आंत वाळू घातलेलीं दोन कांचपात्रें उलट सुलट बसवून केलेलें घटिकायंत्र. २ (वैद्यक) एक रसायन करावयाचें कांचेचें पात्र. **०लिंग**–न. १ वाळूची शाळुंका व पिंडी. २ वाळूची केलेली खूण. [सं.]

वालुंकी—स्त्री. वालुक; काकडीची एक जात; कर्कटी. –गाथासप्तशती.

वालुसरा—पु. एक पिकांचा रोग. 'मौजे मजकुरावर वालुसरा पडोनि पिकें गेलीं.' –समारो २.२३५.

वालुग—न. (माण.) लक्ष्मीचे किंवा बहिरोबाचे नांवानें पुष्कळ माणसें मिळून ढोल बांधून नाचतात त्यास म्हणतात. (क्रि० घालणें).

वालेंटुलें—वि. वाल्हेटुलें पहा.

वालो, वाल्को—पु. (कु. गो.) पंचा. वाला पहा.

वालोवाल—क्रिवि. निःशेष; समूळ; सर्वे; अजीबाद; वाल पहा. [वाल+वाल] **वालोवाल निसंतान**– पूर्ण नाश; सर्वनाश

वाल्मीक, वाल्हा—पु. रामायणकर्ता ऋषि. 'बाल्हा विश्वामित्र वसिष्ठ नारद। यांचें पूर्व शुद्ध काय आहे।' –तुगा ३२५०. [सं. वाल्मीकि]

वाल्ही—पु. कैवारी; रक्षक. वाली पहा.

वाल्हीटुल्ही, वाल्हेटुले—वि. प्रिय; आवडतें; जिवलग; अपूर्व; नाजूक. 'कौतुकें कवळितां मुठी। जिये चवदा भुवनें थेंकुटी। ते भ्रांति तिये धाकुटी। वाल्हीटुल्ही।' –ज्ञा ३.२४७. [सं. वल्लभ]

वाव—पु. १ वायु; वारा; हवा. 'लागतां श्रीकृष्णाचा सुवावो। अवघा संसारचि होय वावो।' –एभा १.२५१; १२.३०४. २ –पुस्त्री. जागा; अवकाश; रीघ. 'पुढें कनकवेत्रधारी धांवोन। वाव करिती चालावया।' –ह ३३.११९. ३ सवड; अवसर; फुरसत; योग्य वेळ. ४ (ल.) सबब; कारण; निमित्त; आधार; योग्य प्रसंग, स्थान, वेळ. ५ शिरकाव; प्रवेश; रिघाव. ६ –न. तण; कस्तण; निरुपयोगी गवत. [सं. वायु] **वावझड**–स्त्री. वाऱ्यामुळें पावसाचे येणारे तुषार; शिंतोडे. [वाव+झड] **वावझडी**–स्त्री. १ वावझड; पावसाचे वाऱ्यानें आलेले तुषार, शिंतोडे. २ अशा तुषारामुळें येणारी हुडहुडी; गारठा; शिरशिरी. (क्रि० लागणें; भरणें; येणें.) [वाव+झडी]

वा(वां)व—स्त्रीन. दोन्ही हात पूर्ण पसरले असतां होणारें अंतर; लांबी मोजण्याचें एक परिमाण; ५ हात. 'पवनातें बावीं मवावें।' –ज्ञा १०.१७८; १२.६३. 'पसरूनि वृत्तिचीं बावें। दिठी रूपातें दे खेवे।' –अमृ ९.२२. 'न मिळे गुरुक्त धनुर्सी जो गुण तो व्यर्थ लाख बावें हो।' –मोवन १०.९५. [सं. व्याम]

वाव—क्रिवि. व्यर्थ; निष्फळ; मिथ्या; निरुपयोगी. 'देह मुळींच केला वाव।' –दा १९ ५.८. वस्तुवीण दुसरें वावो।' –मुआदि १.३७. [सं. वि+अय्]

वाव—पु. बिनखवल्याचा मासा. –बदलापूर १३२.

वाव—स्त्री. (गो.) विहीर; बाव. [सं. वापी]

वावकळ, वावकळणें—वायकळ, वायचळणें पहा.

वावगा—वि. १ व्यर्थ; रिकामा; पोकळ; निरुपयोगी. 'मनुष्याच्या शरीराचा अवयव वावगा नाहीं.' –नि २५३. २ स्वैर; स्वच्छंदी; विपरीत; अनिर्बंध; गैरशिस्त; गबाळ (मनुष्य, कृत्य, भाषण वगैरे). [वाव]

वावट(ड)णें—अक्रि. विश्रामणें; विश्राम पावणें; विश्रांति घेणें. 'शिणली कमळा जेथ वावटे।' –ज्ञा ११.२१९. 'ऐसा जो पाहे चहूंकडे। तंव जो तो प्राणी तेथें वावडे।' –स्वादि १०.४. १६. २ लीन होणें; ओहटणें; निवृत्त होणें. 'तें सुषुप्तिकाळीं वावटें। जेथें ज्ञान।' –माज्ञा १८.४६५. 'तया नांव वावटे। आपणपयां।' –अमृ ७.१५४. [सं. वि+अय्]

वावट(ट्)ळ—स्त्री. १ वाऱ्याचा भोंवरा. २ वादळ; तुफान; सोसाट्याचा वारा. ३ (ल.) वावगें, चंचल, लहरी, अस्थिर वर्तन, भाषण वगैरे. ४ स्वैर वर्तन करणारी, भटकणारी, पायांवर नक्षत्र पडलेली स्त्री. ५ –न. (ल.) किटाळ; आळ; तोहमत. 'कृष्णरावावर या खटल्याचें सध्या वावटळ आलें आहे.' [सं. वातुल]

वावड—वि. ओढाळ; नाठाळ; उनाड (मूल, अथवा गुरूं). [वाव] ०की–स्त्री. उनाडकी; भटकेगिरी.

वावडंग—स्त्री. (प्र.) वावडिंग पहा.

वावडणें—अक्रि. (कों.) वावरणें; भटकणें; फिरणें (मुलें, गुरें वगैरेनीं). 'पांचविअें धारें वावडतु।' –शिशु ५३४. 'तेही वाचा वावडे।' –अमृ ९.१९. 'सद्गुरुकृपा न जोडे। आणि भलतीकडे वावडे।' –दा ५.१.३७. –उक्रि. फिरविणें; परजणें; (शस्त्र वगैरे). [वाव]

वावडा—वि. वातुल; वायुप्रकोप करणारा. [वाव]

वावडा—वि. १ अपथ्य; बाधक; अपायकारक; वर्ज्य. २ (ल.) प्रतिकूल; विरुद्ध जाणारा. [सं. व्यावृत्ति]

वावडा—पु (नाविक) लोखंडी मोठा नांगर.

वावंडा—वि. रिकामा; मोकळा; व्यर्थ; सुना; कोरडा; फुकट; निष्फळ (दिवस, उद्योग, वेळ). 'नित्य मला थोडा बहुत पैका मिळतो. एक दिवस कांहीं वावंडा जात नाहीं.' [वाव]

वावंडा, वावंडेकरी—ओवंडा, ओवंडेकरी पहा.

वावडिंग—स्त्री. एक झाड. हें पुरुषभर उंच वाढतें. पानें लांबट असतात. –न. या झाडाचें बीं. हें कृमिनाशक असुन जंतावर देतात. [सं. विडंग; हिं. वायविडंग; बं. विडंग; गु. वावडींग; का. वायुविडंग; ते. वायुविडंघमु]

वावडी—स्त्री. १ पतंग; आकाशांत वाऱ्यानें उडवावयाचें कागदाचें एक खेळणें. 'वावडी उडे अंबरी।' –ग्रंथराज १०८. २ धान्य वारवण्याकरितां केलेली तीन पायांची उंच घडवंची. [वायु, वाव] ०करणें–फजिती करणें; पत्रावळ उडविणें; घोटाळा उडवून देणें; लज्जित करणें.

वावडी—स्त्री. लहान विहीर; बावडी. [सं. वापी]

वावडें—न. १ वातरोग; संधिवात; पेटके; गोळे. २ अपथ्यकारक पदार्थ; कुपथ्यापासुन झालेला रोग. ३ (ल.) वर्जनीय, त्याज्य गोष्ट; हानिकारक गोष्ट. 'त्याला खेळाचें वावडें आहे.' [वाव, वायु, व्यावृत्तक]

वांवढळ, वावंढा—वि. वावडें; वावगें. [वाव]

वाव(व्ह)णें-नें—न. (व.) धुराडें; धारें. 'वावनाचा उजियेडु पडे।' –वृद्धासंगमलीळा ११. [वायु–वाव]

वावदळ—न. प्र. वादळ पहा. 'वावदळ पडूनि ठाये। साबळु डाहारला आहे। तैसें तीख तो खाये। जें घायेविण रुपे।' –ज्ञा १७.१४३. **वावदळणें**–अक्रि. सैरावैरा धांवणें. 'घोडा इकडे तिकडे वावदळत चालला.' –लोकमित्र १८९६.

वावदूक—वि. १ बोलका; वाचाळ; बडबड्या; बहुभाषी. [सं.]

वावधण-न, वाउधाण, वावधाण-धान, वावधणी वावधूळ—नस्त्री. वावटळ; वादळ; वाहट्टळ; तुफान; वायधूळ; चक्रवात. 'अग्निआला वाउधाणा। वरपडा जैसा।' –ज्ञा १७.१९३. 'वावधणीतें उपणावें' –ग्रंथराज ८९.

वावनी—पु. घोर. –मनको.

वावन्स—न. खद्रासारखा पण फार मोठा मासा; एक माशाची जात.

वावबाब—पु. एक वृक्ष.

वावभिडंग—स्त्रीन. वावडिंग पहा.

वावर—न. शेत; मळा; कुरण; लागवडीची जमीन; रान. 'ठाकें बाजूस वावरांत पडक्या देवालयीं मारुती.।' –विवि ५८. ८. [सं. व्याप्त–वापर]

वावर—पु. १ राबता; वापर; वर्दळ; हालचाल. २ उद्योग; व्यवहार; कामधंदा; घरकाम. [सं. व्यापार] **वावरणें**–उक्रि. १ वापर करणें; काम करणें; उद्योग, कामधंदा करणें; राबणें; हिंडणें; फिरणें. 'तरी यांहीं आपुलिअे चाडें। वावरों नअे।' –शिशु १८५. २ उपयोगांत येणें, आणणें; काम करणें; लागू होणें; प्रहार करणें; वापरणें. 'देवा नवनिशतीं शरीं। वावरोनि यांच्या जिव्हारीं।' –ज्ञा २.४८. **वावरिजे(जे)णें**–अक्रि. व्यवहार करणें; वापरणें. 'तेथ नादासळु नुठी। मा वावरिजैल ओठीं। हे कें आहे।' –अमृ ५.६३. **वावरभारा**–पु. (माण.) कणसाड

कडबा गोळा करतांना एक भारा महार आपल्या करितां ठेवतो तो. **वावरमोड**–स्त्री. फाल्गुनापासुन ज्येष्ठापर्यंत (मृगापर्यंत) कुळवून वगैरे पावसाळ्यांत जमीन पड ठेवावयाची यास म्हणतात. (क्रि० राखणें). **वावरी**–स्त्री. शेतांतील, वावरांतील काळी माती. घटस्थापनेच्या वेळीं उपयोग. [वावर]

वावराडी—स्त्री. (गो.) मोलकरीण.

वावरी, वावरीचें जाळें—स्त्रीन. (कों.) एक खूप लांब जाळें. बुरीच्या जाळ्याप्रमाणें यास नांगर नसतो व हें खुंटयांस बांधतात.

वावरूळ-ळ—न. वारुळ. 'कोण्हे येके वावरुलि।' –पंच ३.१३. 'पक्षिये करीति अविसाळें। वोळींवें वावरुळें।' –भाए ४९०.

वावरें—क्रिवि. व्यर्थ; फुकट; निष्फळ. 'तान मान हें तुफान वेवधान वावरें।' –दावि १२२.

वावरें—न. एक लहान जाळें.

वावली—स्त्री. १ (गो.) विडी. २ केळीचा दोर.

वावली—स्त्री. विस्तार. –मनको.

वावली—स्त्री. (खा.) विहीर. 'भिल्ल समाजाकरितां... नदीचे पात्रांत हातानें खोदून ज्या वावल्या करतात...' –केसरी ६.१०.३६. [सं. वापी]

वावशी—स्त्री. १ (कों.) डोळ्यांतील शैत्य, थंडी, सारा. (क्रि० धरणें). २ डोळ्यांतील फूल, डाग, ठिपका. (क्रि० येणें). [सं. वाव–वायु] **वावसंडणें**–अक्रि. वारवणें; वाऱ्यानें कोरडें होणें; वाऱ्यावर वाळणें. [वाव]

वावसळणें—अक्रि. बावचळणें; भ्रमिष्ट, वेडें होणें; चळ लागणें; चाळे करणें. [वाव–वायु] **वावसा**–वि. १ भ्रमिष्ट; मूर्ख; वेडगळ. 'तेथें वावशासारखी नजर टाकून ती माजघरांत गेली.' –कोरकि ३००. २ अनिश्चित; चंचल; अस्थिर. ३ अव्यवस्थित; गबाळा; अस्ताव्यस्त; गैरशिस्त (कारभार, वर्तन, भाषण, घरस्थिति). **वावसी**–वि. निष्फळ; फुकट. **वावसें**–न. वेड; भ्रम. (क्रि० भरणें).

वावसाव—पु. कामधंदा; उद्योग; व्यापार; व्यवहार. [सं. व्यवसाय]

वावसें—न. (कों.) तीन कोंपऱ्या सुंभाचें गुंडाळें. 'दोन वांवशी सुंभ असलें म्हणजे एका बाजेची बेगमी होईल' [वांव]

वावहणें—अक्रि. पळणें; पळून जाणें. 'देखोनि ईला हरि वावहाला।' –सारुह १. ७४. [वाहवणें ? वाव=वायु ?]

वावळ—स्त्री. (गो.) पुष्कळ गऱ्या एकत्र पंक्तिनें ओवून केलेलें मासे पकडावयाचें साधन.

वावळ-ळा—पु. एक इमारती लाकडाचा वृक्ष. याचीं पानें नाण्याच्या पानांसारखीं लांबट व दर्पयुक्त असतात.

वावळी—स्त्री. (गो.) केळीचा दोर. वावली पहा.

वावळें—न. (राजा.) पड जमीन; गदताळ जमीन.

वावाची अवटी—स्त्री. (सोनार) वाया करण्याची अवटी, ठसा. वायाची अवटी पहा.

वावाची माशी—स्त्री. १ गबाळ, ओंगळ स्त्री; वेश्या; पोतेरें; जोगम्मा; माभळभटीण. २ सोनकिडा.

वावारणें—उक्रि. (कु.) वावरणें पहा.

वावी—स्त्री. गवाक्ष; खिडकी; झरोका. [वाव]

वावीर—न. १ भातांचें निकस शेत; निकस मांडीव; यांत भात वरकशीप्रमाणें पेरतात व लावणी करीत नाहींत. २ रोह; मोड आलेलें भात (पेरण्याकरितां). ३ तण; निरुपयोगी झाडें-झुडपें. [वाव–वायु]

वावुगा—वि. वावगा पहा. 'दे टाकनि हे छंद वाघुगे फंद।' –अफला ६१.

वावून—न. धारें. वावणें पहा.

वावो—क्रिवि. व्यर्थ. वाव पहा. 'हे अवघेचि वावो।' –भाए ५८.

वावोवावी—क्रिवि. जेथें तेथें; सर्वत्र. 'पवनमेवा वावोवावीं निरंतर।' –सिसं ५ २३३. [वाव द्वि.]

वाव्य—क्रिवि. वायव्य. 'संभुमात्रां वाव्यकोणीं।' –उषा ९८. [सं. वायव्य]

वाव्र, वाव्राडी—पु. (गो.) वावर, वावराडी पहा.

वाव्हटळ-ट्टूळ—स्त्री. वावटळ पहा.

वाव्हण, वाव्हणी, वाव्हणें, वाव्हरा—प्र. वाहण, वाहवणी, वाहवणें, वाहवरा. वाहणें पहा.

वाव्हा—उद्गा. (प्र.) वाहवा पहा. शाबास; भलें; उत्तमोत्तम. –राज्य. 'वाव्हा फार चांगलें शुद्ध म्हटलें।' –बाळ २. १७४. 'वाव्हां वाव्हां वदती घडी घडी।' –दावि ३४५.

वाश—स्त्री. वाट, वास पहा. 'कव्हणाची पाहों वाश। अनाथे आम्हीं।' –ऋ २८.

वांशिक—वि. वंशसंबंधी. १ कुलासंबंधी; घराण्यासंबंधी. २ बांबूचें; कळकाचें; कळकासंबंधी. [वंश=१ कुल २ बांबू]

वाशिंग—न. (विणकाम) नकशीच्या खोबळयास व चकाच्या दोरीच्या ताणास जी मध्यें दोरी असते तीस वाशिंग म्हणतात.

वाशिष्ठ—पु. वसिष्ठ गोत्रांतील मनुष्य.

वांशीक—न. घरावरील वांशांची रचना. घराच्या छपराचा सांगाडा. [सं. वंश; म. वासा]

वाशील—वि. उणें; कमी; वजा. (क्रि० करणें; होणें; पडणें.) [अर. वासील] **०बाकी**-स्त्री. शिलक; शिल्लक काढणें. (क्रि० करणें).

वाशेरा-ळा, वासट—वि. वाईट वास येणारा; बुरसट; दुर्गंधियुक्त; घाणेरा. [वास]

वास—पु १ गंध; परिमळ; पुष्पादिकाचा बरावाईट गंध; दर्प. २ (ल.) झांक; छटा; स्वाद; अंश; सुगावा; खूण; अस्तित्वाचा दर्शक अंश वगैरे. ' तिला क्रोधाचा वास काय आला. ' –नारुकु ३.८४. ३ अवशिष्ट अंश; अल्पांश; लेश; किंचितहि भाग. ' विहिरींत पाण्याचा वास नाहीं. ' ४ हिंग. (रात्रीचे वेळीं सांकेतिक नांव). [सं. वास्=गंध सुटणें] **वास काढणें-घेणें-पाहणें-शोधणें-लावणें**-माग काढणें; सुगावा, पत्ता लावणें. **वास निघणें-लागणें**-पत्ता लागणें; सांपडणें. **वास मारणें**-दुर्गंध येणें;घाण येणें. **वास सुटणें**-चांगला वास येणें; सुगंध येणें, दरवळणें; घमघमाट सुटणें. **वासाचा**-वि. झांक, छटा, रूप, गुण वगैरे असलेला. **वासाचें पोतें**-न. १ (पदार्थाचा अभाव असून केवळ वास राहिला आहे अशी वस्तु यावरून ल.) श्रीमंती जाऊन गरीब झालेला मनुष्य; गरीब मनुष्य. २ (वास असलेली वस्तु यावरून ल.) श्रीमंत, गबर मनुष्य. **वासकट, वासट**-वि.१ दुर्गंधयुक्त; घाणेरा; वाईट वास येणारा. २ वाशेरा-ळा पहा. **वासन**-न. सुवासिक करण्याची क्रिया; गंधयुक्त करण्याची क्रिया; सुगंधित करणें. [सं. वास्] **वास-वारा**-पु. अत्यंत अल्प अंश; केवळ वास. (निषेधात्मक उपयोग) [वास+वारा] **वासळणें**-अक्रि. (फळें वगैरे पक्वदशेस आल्यामुळें) गंध पसरणें; दरवळूं लागणें; (पर्याय) वासाडणें. [वास] **वासाळ**-वि. वाशेरा-ळा पहा. **वासित**-वि. सुगंधित; सुगंधयुक्त; वास लावलेलें. [वास]

वास—पु. वस्ती; वास्तव्य; रहिवास; राहणें; निवास; मुक्काम; घर; बि-हाड; आश्रय; स्थान. ' असें विदित वास ही मज सदा श्रमींचा करा. ' –केका २२. [सं. वस्=राहणें] **वासन**-न. १ निवास; वस्ती; रहिवास. २ ध्यानाची स्थिति; आसन. [सं. वस्=राहणें] **वासी**-वि. वसणारा; राहणारा; वस्ती केलेला. (समासांत) वनवासी; गृहवासी; कैलासवासी; वृक्षवासी. **वासु**-पु. वास्तव्य; वास पहा. [सं. वस्=राहाणें]

वास—स्त्री. १ वाट; मार्ग; प्रतीक्षा. ' आज्ञा कृतांता वास पाहो नए. ' –ऋ ७. ' वास न पाहाती काळदूत. ' –उषा १६५६. ' इहीं आमुची वास पहावी. ' –ज्ञा ३.१६७. २ चर्या; चेहरा; मुद्रा. ' तंव देवें हास्य केलें उद्धवदेवाची पाहिली वास. ' –धवळेपू ४५.४. ' ऐसें तो क्रिस्ताओ बोलतु वास पाहे गुरूची. ' –क्रिपू १.४.३८. ३ क्रम; रीति. –माज्ञा १६. २८७. [सं. वस्]

वास—पुस्त्री. वस्त्र; कपडा. –एभा १२.५३८. [सं. वासस्=वस्त्र] **वासित**-वि. वस्त्र नेसलेलें; आच्छादित. [सं. वासस्]

वांसकटी, वांसटी—स्त्री. लहान वांसा; बारीक वांसा. [सं. वंश; म. वांसा]

वासकसज्जिका—स्त्री. एक प्रकारची नायिका; प्रियसंगमोत्सुक स्त्री; नटलेली; वस्त्रें, शृंगार करून तयार असलेली. ' होतिआं बहुती वासकसज्जिका. ' –शिशु १७२. [सं.]

वासकूट—न. बिन बाह्यांचा आंखूड आंगरखा; जाकीट. ' इंग्रजी वासकूट घालणें आमच्या तरुणांना आवडूं लागलें. ' –नि ९१३. [इं. वेस्ट कोट]

वासणें—उक्रि. उघडणें; पसरणें; मोठें करणें; फाडणें (तोंड, भोंक, छिद्र, फट वगैरे). –अक्रि. १ विद्रुपता व्यंजक, प्रमाणबाह्य उघडणें; पसरणें; विस्तारणें (तोंड, डोळे, भोंक, तंगडया, बोटें वगैरे). ' आम्ही कोणापाशीं तोंड वासूं. ' –तुगा ५७२. २ (ल.) दिवाळें निघणें; नाश होणें; बसणें (धंदा, व्यापार) [सं. वि+अस्=फेंकणें]

वासंत, वासंतिक—वि. वसंतऋतुसंबंधी; वसंतविषयक [सं. वसंत]

वासन—न. १ कापडाचें दिंड ज्या वस्त्रांत बांधतात तें वस्त्र; गाठोडयाचें फडकें; बासन. २ सामान्यतः कोणतेंहि वस्त्र; कपडा; कापड. [सं. वसन] **वासनी**-वि. बासन करण्यास योग्य; गांठोडें बांधण्यासारखा; रुमाल करण्याच्या उपयोगी. ' वासनी खारवा. '

वासनवेल—स्त्री. तान्हीचा वेल; भुईपाडळ; पातालगरुडी. या वेलीच्या टोपल्या करतात. –वगु ५.६७. [वासन+वेल]

वासना—स्त्री. १ मनाचा कल; प्रवृत्ति; स्वभाव; चित्तस्वभाव. ' वासनेसारखें फळ. ' ' कर्म करणाऱ्या पुरुषाची वासना किती शुद्ध आहे हें पाहूनच ठरविली पाहिजे. ' –गीर ४७९. २ इच्छा; वांच्छा; अंतःकरणप्रवृत्ति. ' चित्तीं धरिली वासना । सिद्धि न्यावी नारायणा । ' ' मना वासना दुष्ट कामा नये रे । ' –राम ४. ३ परिचय; पारंगतता; अभ्यास; ज्ञान; प्रावीण्य; संस्कार. उदा० शास्त्रवासना; गणितवासना; न्यायवासना. ' कांहीं शास्त्राची वासना असली म्हणजे बोलणें प्रौढ पडतें. ' ४ मृत्युसमयींची इच्छा; हेतु; आकांक्षा. [सं.] (वाप्र.) **०ओढाळ असणें**-मनाची अनेक ठिकाणीं तीव्र प्रवृत्ति होणें; निरनिराळ्या तीव्र इच्छा उत्पन्न होणें. **०फजीत होणें-अर्धवट** इच्छा पूर्ण होणें; अर्धवट तृप्ति होणें; आकांक्षा विफल होणें. **०फोडणें-मोडणें**-इच्छेचा नाश करणें; आकांक्षा दडपून टाकणें; सर्व प्रवृत्ति निरोधून टाकणें.

वासपर्णे—अक्रि. भिणें. वासिपर्णे पहा.

वासपूस—स्त्री. वास्तपुस्त पहा. चौकशी; विचारपूस. (क्रि० करणें, घेणें).

वासंबा, वासमसडी—पुस्त्री. (कों.) एक भाजीचा वेल.

वासर—पु. १ दिवस. 'होती वासर दीर्घ जे धनपति द्वारीं तयां प्रार्थितां।' –वामन, स्फुटश्लोक (नवनीत पृ. १४१). २ वार. 'वासर असत सौम्य।' –रामदासी २.६०. 'ते मध्य शावैरिचा वासर सौम्य जागा।' –देपद ४६. ०मणि–पु. सूर्य [सं.]

वासरी—स्त्री. (गो.) ओसरी; ओटी; पडवी; माजघर. [सं. वस्]

वासरूं, वांसरूं—न. १ गाईचें पारडुं; जावपें; पोर; वचडें. २ (लाडिकपणें). वत्स; बालक; लहान मूल. 'मन्माताशि म्हणे रे, हो न यशोहानि वासरा। मन मीं।...' –मोउद्योग १३.१६७. 'म्हणे वासरा घात झाला असारे।' –वामन भरतभाव १५. [सं. वत्स; प्रा. वच्छ; पं. बच्छा; सिं. वछ; हिं. बाछा; बछा; वछ; गु. वछ, बाछरडुं; बं. बाछुर; उ. बाछुरी] **वासुरकरीण**–स्त्री. १ पितें वासरूं असलेली गाय किंवा म्हैस. २ जिला पान्हवावयास वासरूं लागतें (आंबोणानें केवळ पान्हवत नाहीं) अशी गाय किंवा म्हैस. [वासरूं] **वासुरटें**–न. (चांभारी) वासराचें चामडें, कातडें. [वासरूं] **वासुरू**–न. वासरूं पहा. **वासुरुवें-वासरें**. 'राखे वासुरुवें।' –दाव ६६.

वासरूं—न. १ (नाविक) शिडाच्या दोरखंडाच्या टोंकास बांधलेला एक लांकडी दांडा. २ (नाविक) दमान बांधलेली दोरी. 'वासरूं जोरानें खेचल्याबरोबर केळीचे बंद (शिडाला बांधलेले) तटातट तुटतात. शीड मोकळें होतें.'

वासला—पु. सुताराचें लांकूड तासण्याचें हत्यार; वाकस.

वासलात-द, वासलत—स्त्री. १ वसूल; जमा; उत्पन्न व त्याचा हिशोब, जमाखर्च. 'तहापासोन वासलातीचा ऐवजही माघारा देविला.' –रा ७. २ हिशोब लिहितांना काढावयाची एक रेघ (या रेघेच्या आरंभीं मोडी वा हें अक्षर असतें). या रेघेप्रमाणें एकोणात, दकारी, बीत हीं दुसऱ्या रेघांचीं नांवें आहेत. रेघ पहा. ३ हकीकत; गोष्ट; खटला; कज्जा; काम. ४ निकाल; शेवट; फैसला. 'वादविवादांचे जे पर्वत माजले आहेत त्यांची वासलाद कशी लावावयाची.' –आगर ३.५६. ५ व्यवस्था; तजवीज. 'त्यांना आपल्या हिश्शाची वाटेल ती वासलात लावतां येईल.' –धका ५७. ६ परिणाम; अखेर. 'त्या निकालाची जी वासलात होईल तीच .. कार्याकार्य निर्णयाची होईल.' –गीर १२४. ०लावणें–१ निकाल लावणें; फना करणें. [अर. वासिलात्] २ लांबलचक हकीकत सांगत बेणें; कंटाळवाणी कथा लावणें.

वांसली—स्त्री. (गो.) लहान वांसा. [वांसा]

वासव—पु. इंद्र. 'धर्म म्हणे सिद्धि भजे यन्मंत्रा जेंवि वासवा रंभा।' –मोसभा १.५३. [सं.] **वासवी शक्ति**–स्त्री. १ इंद्रानें दिलेलें एक अमोघ शस्त्र. २ (हें कर्णास मिळालें असून तें हटकून परिणामकारी व्हावयाचें होतें. यावरून ल.) अमोघ शस्त्र; हटकून परिणामकारक होणारी गोष्ट.

वासा, वांसा—पु. १ दांडी; काठी; सोट; वेळू; बांबू; घराच्या आढ्यापासून वळचणीपर्यंत जोडलेला तीर, सोट, दांडा. 'गृहा पांच वांसे असे एक आढें।' –कचेसुच २. २ (ल.) पृष्ठवंश; पाठीचा कणा. ३ (ल.) नाकाचें हाड. ४ (ल.) मोठी लेखणी. [सं. वंश] म्ह० खाल्ल्या घरचे वांसे मोजणें–कृतघ्नपणा करणें. **वासेबीं**–न. वंशबीज; कळकाचें, वेळूचें बीं; एक उपधान्य. [सं. वंशबीज] **वासोंडी-ळी**–स्त्री. लहान वांसा; निरुपयोगी; निकामी वांसा. [सं. वंश; म. वांसा]

वासिप-पु—पुन. भय; भीति; वचक. 'जो मी काळासि याही तोंडा। वासिपु न धरी।' –ज्ञा ११.३८७. **वासिपणें**–अक्रि. भिणें. 'समुद्र जरी वासिपे।' –विपू ७.४७. 'ज्या मज संहाररुद्र वासिपे। ज्या मज भेणें मृत्यु लपे।' –ज्ञा ११. ३५१. 'तुका करी जागा। नको वासपूं वाउगा।' –तुगा ३८६६. [सं. वत्सप्राय होणें]

वासि(सी)ल, वासि(सी)ल बाकी, वासिलात—वाशील, वाशीलबाकी, वासलात पहा.

वासी—वि. व्यर्थ; निष्फळ.

वासुकी—पु. सर्पांचा राजा.

वासुकें—न हंसपाद.

वासुदेव—पु. १ विशेषनाम; श्रीकृष्ण. २ मोरांच्या पिसांची उंच टोपी घालून भिक्षा मागणारी एक जात.

वासे—न. लांब वांसास लांकडी करवतीसारखे कोयते जोडून केलेलें हत्यार. [वंश]

वासोंडी—स्त्री. (व.) खरडपट्टी.

वास्कूट—न. वासकूट पहा. [इं. वेस्टकोट]

वास्ट—वि. (गो.) वाईट; वांकडें. **वास्टेपण**–न. वांकडेपणा.

वास्त, वास्ता—स्त्री. विचारपूस; चौकशी; अमलबजावणी; काळजी. (क्रि० टाकणें; टाकून देणें; सोडणें). 'तो बादशा प्रकृत होतो म्हणून कर्जाची वास्त सोडली.' 'म्या कोणाचीहि वास्ता ठेविली नाहीं.' [पुस्त शब्दाची द्विरुक्ति होऊन वास्तपुस्त शब्द होतो त्यावरून हा शब्द बनला आहे] **वास्तपुस्त**–स्त्री. विचारपूस; चौकशी. 'सहा महिनेपर्यंत या माणसानें बायकोची वास्तपुस्त केली नाहीं.' –मायेचा बाजार. [सं. पृष्ठ; हिं. पुछापाछा]

वास्तव—वि. १ प्रत्यक्ष; खरोखरीचें; वास्तविक; मूळचें, खरें. 'प्रकार वास्तव दिसतो कैसा हें प्रत्यक्ष पहावें।' –मराठी सहावें पुस्तक पृ. ४३७. २ भरींव; मुख्य; पोकळ, दिखाऊ, टाकाऊ नव्हे असें. [सं. वस्तु–वास्तव] **०क्षितिज**–न. दृश्य गोलार्धापासुन अदृश्य गोलार्धास निराळें करणारें वर्तुळ. –मराठी सहावें पुस्तक, पृ. ३१४.

वास्तवशास्त्र—न. वस्तु आणि शक्ति किंवा तेज यांविषयीं विवरण करणारें शास्त्र. यांत उष्णता, प्रकाश, ध्वनि, वीज इ०चा समावेश होतो. –केसरी ३०.६.३६.

वास्तविक—वि. १ यथार्थ; प्रत्यक्ष; खरोखर; सत्य. २ वस्तुस्थितीस धरून; योग्य; न्याय्य; रास्त; बरोबर. **०सत्ता**–स्त्री. नित्य किंवा सत्य तत्त्व; खरें अस्तित्व. वस्तुसत्ता पहा.

वास्तवान—पु. रहिवासी; वास्तव्य करणारा; राहणारा. 'अकळ कलेनें असतोसी । वस्तींत वसतोसि वास्तवीन।' –ज्ञानप्रदीप ३३७.

वास्तव्य—न. १ वसति; राहणें; निवास. २ वसतिस्थान; राहण्याची जागा; निवास. –वि. वसतीस योग्य, अवश्य, शक्य. [सं. वस्=राहणें]

वास्तह्, वास्ता—पु. मध्यस्थी; कारण. 'तुमचे वास्ता दर्म्यान आहे यांजकरितां तहमूल जाला, नाहीं तरी याचा तदारूक करणें लाजम आहे.' –रा २२.६१. [अर.]

वास्तु—स्त्री.न. घर; वसतिस्थान; राहण्याची जागा. निवासस्थान; गृह. [सं. वस्=राहणें] सामाशब्द– **०देवता-पुरुष**–स्त्री.पु. १ निवासस्थानाची, घराची अधिष्ठात्री देवता; स्थानदेवता; गृहदेवता. २ गृहदेवतेची लहानशी प्रतिमा. **०प्रवेश**–पु. नवीन घरांत रहावयास जाण्याचा विधि, समारंभ. **०विद्या**–स्त्री. शिल्पशास्त्र; घर बांधण्याचें शास्त्र, ज्ञान, कला; गृहरचनाशास्त्र. **०विधान**–न. घर; वास; वास्तव्य. 'केलें वास्तुविधान एणनयनगात्रीं बसाया भलें।' –विप्रल, रसमंजरी ४. **०शांत, शांति**–स्त्री. नवीन घरांत रहावयास जाण्याच्या वेळीं करावयाचा एक विधि; नवीन गृहदेवतेची वगैरे शांति; स्थानदेवतांची पूजा वगैरे. **०शास्त्र**–न. शिल्पशास्त्र; स्थापत्यशास्त्र; घर बांधण्याची कला, विद्या. **०सौंदर्यशास्त्र**–न. सुंदर इमारती वगैरे बांधण्याचें शास्त्र; गृहमंडनशास्त्र.

वास्तु-स्तू—शब्द. नें; कहन; तृतीयाबोधक अव्यय. [अर. वास्तह्]

वास्ते—शब्द. साठीं; करितां. 'कित्येक पोशींश मस्लतीच्या मम्मुना वास्ते अजन राघो विठ्ठल यांस फिरस्ताद केले असत.' –पया ३८७. [अर. वासिता]

वास्तेय—वि. ओटीपोटासंबंधीं; पोटाच्या खालच्या भागासंबंधीं. [सं. बस्ती]

वांस्वेल—न. (गो.) आस्वल. [आस्वल]

वाह—उद्गा. ओहो! शाबास! भले! [फा. वाह्]

वाह—पु. गति. 'अधोरंध्राचेनि वाहे।' –ज्ञा १८.३३८. [सं. वह्]

वाह, वाहक—पु. नेणारा; वाहून नेणारा; हमाल. –वि. वाहणारा; वाहून नेणारा. (समासांत) रथ–मार–शव–**वाहक**. **वाहक(त्व)**–न. उष्णता, विद्युत् इत्यादि वाहून नेण्याचा धर्म. **वाहक शक्ति**–स्त्री. उष्णता, विद्युत् इत्यादि वाहून नेण्याचें सामर्थ्य, गुण.

वाहटळ-टूळ-टोळ-डूळ—स्त्री. वादळ; तुफान; सोसाट्याचा वारा. [सं. वातुल]

वाहडणें—क्रि. (प्र.) वाढणें पहा. 'जालें वाहडणें संकल्प जोडणें।' –दावि १७५.

वाहण, वाहाण—स्त्री. चप्पल; पादत्राण; पादुका. 'ते विंची आशेचिया न लेचि वाहणा।' –ज्ञा १२९. (–अव.) **वाहाणा**. [सं. उपानह्=वाहणा] **०धर**–पु. जोडे उचलणारा. 'जीवें संतांचें होत। वाहणधरु।' –ज्ञा १३.११३२.

वाहण—न. मार्ग; गति; रीत. 'अनुसरले गा माझिये वाहणीं।' –ज्ञा ९.३३८. 'ऐका सुंदर काहणी चतुर हो भक्ताचिया वाहणी।' –आ मृगीचरित्र १. [सं. वह्] **वाह(हा)णी, वाहण, वाहणें**–स्त्रीन. १ प्रवाह; ओढा; ओघळ; लोंढा. 'आपण पडूं पाहे वाहणींत।' –दावि ७७१. 'कां वसंताचिया वाहाणीं।' –ज्ञा १६.१६४. २ पीक वगैरे वाहून नेण्याची क्रिया; नेणें. [सं. वह्]

वाह(हा)णी—स्त्री. १ (ल.) मार्ग; प्रकार; रीत; पद्धत; क्रम. 'एकीं धर्माचिया वाहणी। गाळूं आदरिलें पाणी।' –ज्ञा १३.२३४. 'म्हणोनि इया वाहणी। केली म्यां उपलवणी।' –ज्ञा १३.८५२. [सं. वह्]

वाहणें—उक्रि. १ उचलून नेणें; एका जागेवरून उचलून दुसऱ्याजागीं नेऊन ठेवणें. 'वाहतिये वेळें जड। शिदोरी जैसी।' –ज्ञा १८.१८५. –एभा ३.८७. 'शीतलजल कलश शीघ्र वाहोन।' –मोभीष्म १२.४. २ भार सहन करणें, सोसणें; आधार देणें; आश्रय देणें. 'गेल्या पळोनि गायी पृष्ठावरि पुच्छभार वाहोनी।' –मोविराट ४.८८. ३ मनांत बाळगणें; धरणें. 'परी ते चाड एकी जरी वाहे।' –ज्ञा ४.१९५ 'वाहतसे हृदयाब्जीं अत्युत्सुक मीं' –मोमंभा २.३२. 'मरे येक त्याचा दुजा शोक वाहे।' –राम १७. ४ चालू ठेवणें; पुढें चालविणें (व्यवहार, धंदा वगैरे). ५ अर्पण करणें; पूजेमध्यें देणें; पुढें ठेवणें. 'उडवी किरीट विधिनें जें

निर्मुनि यासी वाहिलें होतें।'–मोकर्ण ४७.७६. 'वाहुनि मस्तक-चरणीं।'–मोअनु ४.५५. ६ (शपथ) घेणें. ७ देऊन टाकणें; स्वत्वनिवृत्ति करणें; टाकून देणें; सोडून देणें; त्याग करणें. ८ काढून देणें; पुढें करणें; स्वत:जवळचें देणें. 'जामीन रहा आणि गाठेचें वाहा.' ९ चढविणें; बसविणें; सज्ज करणें (धनुष्यास गुण वगैरे). 'कैकेयांचीं चापें खंडूनी...अन्य धनुष्यें वाहुनी ते।' –मोकर्ण ९.८. 'जो या धनुष्या वाहील गुण।' –रावि ७.५४. १० (जमीन) कसणें; लागवडीस आणणें; पेरणें; मशागत करणें. 'काय जाहालें न वाहता भुई पेरिजे।' –ज्ञा ११.१६२. ११ धारण करणें; नेसणें; वापरणें. 'वाहे वल्कल जटा।' –मोरामायणें २३. 'हे विपरीताक्षिति असतीसी नवनवा गुणा वाहे।' –मोमंभा १.७३. १२ चालविणें; उपयोग करणें. 'जेती घाणे वाहती।' –पाटण शिलालेख. १३ हल्ला करणें; चाल करणें. 'मग तेणें विक्रमसेनु प्रौढवर्धनावरि सबळु वाहौनु आला।' –पंच १.३२. **चिंता वाहणें**–काळजी वाहणें; अस्वस्थता बाळगणें. **वाहणें**–अक्रि. १ वारा, पाणी हलणें; एका जागेवरून दुसऱ्या जागीं जाणें; सरकणें; पुढें जाणें; गतिमान् असणें (सैन्य, पक्ष्यांची, गाडयांची रांग वगैरे). 'वाहे हिममंद सुगंध पवन.' –मोभीष्म ११.८७. २ (नाक, व्रण, गळतें भांडें यांतून) पाणी, पू वगैरे बाहेर येणें; स्रवणें; पाझरणें; गळणें; ठिबकणें. ३ एका दिशेनें जाणें; लांबवर पसरणें; रांगेनें असणें (रस्ता, किनारा, डोंगराची रांग). 'परमार्गु वाहाती सदैवें। जेआंलागीं।' –ऋ १००. ४ चालू असणें; गतिमान असणें; कार्य करीत राहणें (यंत्र, हत्यार; साधन). ५ तीक्ष्ण असणें; उपयोग होण्याच्या स्थितींत असणें; धार असणें (शस्त्र, हत्यार वगैरे). ६ प्राप्त होणें; चालू असणें. 'रुपयाचें दीड शेर पाणी अशी कठिण वेळा वाहली' –ऐपो २२५. [सं. वह्]

वाहता झरा–री–पुस्त्री. जिवंत झरा; ज्यांतून नेहमीं पाणी वाहात असतें असा झरा, प्रवाह. २ चालू प्रवाह, वर्षाव (देणगी, खर्च वगैरेचा); चांलू पुरवठा; रेलचेल; चंगाळी. **वाहतवणा**–पु. रानांतून चालणारा; प्रवासी. 'आणि जन्मशतांचा वाहतवणा।' –ज्ञा ७.१२९. **वाहत वाटोळें**–न. १ जुजवी किंवा तात्पुरती व्यवस्था, दुरुस्ती, उपाययोजना; मिटवामिटव (वाद, भांडण, रोग यासंबंधी कामचलाऊ योजना). २ आरंभ; सुरुवात; चालू होण्याची क्रिया (काम, धंदा वगैरेची). ३ सत्यानाश; पूर्ण नाश; फन्ना; वाटोळें (धंदा, कार्य, व्यवहार, सल्ला वगैरेचा). **वाहता**–वि. १ मोकळेपणानें वावरणारें, हलणारें, फिरणारें, वागणारें; तीक्ष्ण धारेचें; कुशाग्र (शस्त्र, बुद्धि वगैरे). उदा० वाहती कुऱ्हाड. २ चालू; कार्य करीत असलेलें; चालतें; सुरू (काम, धंदा, व्यवहार, कारखाना वगैरे). **वाहता घाणा**–पु चालू असलेला, उपयोगांत असलेला तेलाचा घाणा. **वाहता झरा, वाहती झरी**–वाहत-झरा पहा. **वाहता रस्ता**–पु. रहदारीचा रस्ता. **वाहती**–स्त्री. १ प्रारंभ; सुरुवात. २ चाल; वहिवाट; शिरस्ता; प्रघात. **वाहतीकूस**–स्त्री. गर्भधारणा करण्यास योग्य अशी स्त्रीची अवस्था; मुलें व्हावयास लागण्याची अवस्था. 'एकदां वाहती-कूस झाली म्हणजे बाटेल तितकीं मुलें होतील.' 'पावसाची वाह-तीकूस झाली.'=पावसाळा सुरू झाला. **वाहतीगंगा**–स्त्री. अनुकूल परिस्थिति; चालू काम; भरभराटलेला धंदा; सुकाळ; चंगळ; संपन्नता. (क्रि०चालणें; होणें.) **वाहत्यागंगेंत हात धुवून घेणें**–अनुकूल काल असेल तों आपलें कार्य साधून घेणें. **वाहती धार**–१ तीक्ष्ण पाजळलेली धार (हत्याराची); याच्याउलट पडती धार. २ वाहत असलेला, चालू असलेला पाण्याचा प्रवाह (नदी, ओढा वगैरेचा); पाणी, रस वगैरेचा पडता प्रवाह, झोत. ३ (ल.) धंद्याची, कामाची चलती, भरभराट, घाई, धुमश्चक्री. उदा० लढाईची–धर्माची–वादाची–वाहती धार. **वाहती वाट**–स्त्री. १ रहदारीचा रस्ता; मोकळा, बंद न केलेला रस्ता; चालू रस्ता. २ मुलें होत असलेला स्त्रीचा गर्भाशय, कूस. ३ (ल.) सुरुवात; आरंभ; ओनामा (धंदा, व्यवहार इत्यादीचा). **वाहतु(तू)क**–स्त्री. रहदारी; येजा; वापर; नेआण. –पु. वाहणारा; लाकडांची नेआण करणारा. –नस्त्री. वाहतुकीची मजुरी. **वाहतुरा**–वि. वाहती; तीक्ष्ण (शस्त्राची धार). **वाहतें**–वि. चालू; तीक्ष्ण; धारचें; उपयोगांत असलेलें (शस्त्र वगैरे). **वाहतें नांव**–न. चालू, व्यावहारिक नांव.

वाहती—स्त्री. एक फुलझाड.

वाहदीय(ये)त—स्त्री. ऐक्य; स्नेह; मैत्री; सलूख. 'दोन्ही दौलतीची अशी वाहदीयेत.' –रा ७.१५२. [अर. वाहिदीयत्]

वाहन—न. गाडी, घोडा इत्यादि प्रवासाचें साधन; यान; (समासांत). गरुडवाहन; नरवाहन; आखुवाहन; अश्ववाहन. [सं. वह्]

वाहन—न. (कों.) उखळ. [फा. हावन; सं. वाहन?]

वाहर—स्त्री. पीडा; बाधा; दु:ख. 'तरि आतांचि ये संहार वाहरे। तुम्ही पांडव असा वाहिरें।' –ज्ञा ११.४५४. 'आतां हे जोहरवाहर दुसरी। चैतन्या संकट।' –ज्ञा ११.६०.

वाहली—स्त्री. (कों.) ओहोळ; वाहाळ. –देशीनामाला. [सं. वह्]

वाहल्कड—पु. पुढें आलेलें टोंक. 'मिहिंतले येथील कंटक चैत्याची स्तूपसाफसुफी नव्यानें केली गेली. याच स्तूपाच्या चारी बाजूस चार वाहल्कड असून त्यांपैकीं पूर्वेच्या वाहल्कडावर गणांची एक रांग कोरलेली आहे.' –केसरी २२.९.३६.

वाहवट—स्त्री. प्रवाह; ओघ; पात्र; मार्ग. 'तैसे इंद्रियांच्या वाहवटीं। धांवतया ज्ञाना जेथ ठी।' –ज्ञा २८.४७६. –वि.

प्रवाहानें वाहून गेलेला; धुऊन गेलेला. [सं. वह्] **वाहवटळ**–स्त्री. १ प्रवाह; ओघ; धार. २ (सामान्यतः वावटळ) तुफान; वादळ; झंझावात. [सं. वह्]

वाहवण—स्त्री. १ प्रवाह; ओघ; लोंढा. २ वहात जाण्याची क्रिया; प्रवाहाबरोबर जाण्याची क्रिया. [सं. वह्]

वाहवणी—न. १ वाहातें पाणी; पाण्याची धार, प्रवाह. २ (याच्या उलट जिरवणी) वाहात जाणारें पाणी; जोरानें वाहणारा प्रवाह; पाणी वाहील इतका पाऊस. [वाहणें+पाणी]

वाहवणें—अक्रि. १ प्रवाहाबरोबर खालीं वाहात जाणें; लोंढ्यांत सांपडणें; वहावटीस लागणें. २ झिरपणें; पाझरणें; थेंबथेंब गळणें, पडणें. ३ (ल.) बोलतांना विषय सोडून बोलणें; बहकणें; भलतीकडे वळणें, घसरणें. ४ (प्रयत्न, कल्पना, योजना) निष्फळ होणें; बेत वगैरे फसणें; वायां जाणें. ५ सैरावैरा जाणें; भलतीकडे जाणें. 'ऐसी पाचवटें जवळिकें। करूनि वाहाविती अभिलाषें।' –ऋ ५५. [सं. वह्]

वाहवरा—वि. वाहणारा; वाहून जाण्यासारखा; अर्धवट पातळ (गूळ, चिखल, गाळ वगैरे); ढिसूळ, ढिसूळ, शिथिल, थलथलीत, लिबलिबीत (शरीर). २ (ल.) स्वैर; विषय सोडून; मुद्दाबेगळें (भाषण); बेशिस्त; अनुसंधानरहित (बोलणें). [सं. वह्]

वाहवा—उद्गा. शाबास! भले! फार उत्तम! (प्रशंसापर उद्गारवाचक अव्यय) –स्त्री. प्रशंसा; वाखाणणी; स्तुति; शाबासकी; तारीफ. [फा. वाहवाह्; तुल. वै. सं. स्वाहावाट्] **वाहवाह**–उद्गा. वाहवा पहा. 'करणी केल्यानें वदों जी वाहवाहा।' –दावि १९६.

वाहविणें—सक्रि. घालवून देणें; मोडणें; घालविणें. 'कां धर्म व्यर्थ तुवां, गांजुनि हा निरपराध वाहविला।' –मोआदि २.३. 'परकरग स्वकलत्र स्पर्शेंचि महायशासि वाहवितें।' –मोवन १२.८७.

वाहळ, वाहाळ—पु. ओढा; नाला; ओहोळ. 'वाहळ वोहळ दरे दरकुटे।' –मुवन ७.१४४. [सं. वह्]

वाहळी—स्त्री. (राजा.) ओघळ; ओढा; नाला; पन्हा; ओहोळ.

वाहळी—स्त्री. तेरड्याची एक जात. [सं. वह्]

वाहा—स्त्री. बाबद. 'बाजेखर्च कागद वाहा व रोशनाई वगैरे खर्च.' –वाडबाबा ३.३२०. [फा.]

वाहाकविद्या—स्त्री. (प्र.) वाहकविद्या; चाबुकस्वाराची कला; वाहनविद्या. 'तळवागेवर वागे निर्वाळिला। वाहाकविद्ये वहिला।' –शिशु १०००. [सं. वाहक+विद्या]

वाहाटळ–टूळ, वाहाडणें, वाहाणी, वाहाणें, वाहात, वाहार, वाहाल, वाहावट, वाहावटळ, वाहावण, वाहावणी, वाहावणें, वाहावरा—वाहटळ, वाहडणें इ० पहा.

वाहाण—स्त्री. (प्र.) वहाण पहा. चर्मपादुका; पादत्राण; जोडा. 'जेयाची वाहाणा। चिंतामणि खेवणा।' –ऋ ५२. [सं. उपानह्] **०धर**–वि. पादुकाधारक. 'थापटे मळिवटें। वाहाणधरूं दीवटें।' –शिशु ३५३.

वाहाण—स्त्री. ओढा; नाला; ओहोळ. [सं. वह्]

वाहातिक—स्त्री. वाहतुक पहा.

वाहारी—स्त्री. (खा.) सुन. 'माही वाहारी गुनाची आहे.' [सं. वधू]

वाहाळ, वाहाळी—(राजा.) (प्र.) वहाळ पहा. 'श्लेष्मेयांची चिखल वाहाळ।' –भाए ३९६. 'वाहाळ मानिजे जगें।' –दा १.४.१४.

वाहाळ—वि. लागवड केलेली; वहित. [सं. वह्]

वाहाळी—स्त्री. शिकार. –शर.

वाहिद, वाहेद—वि. एक; एकटा. –मराठी सहावें पुस्तक पृ. २१६. [अर. वाहिद]

वाहिनी—स्त्री. पृतना; सेना; सैन्य. [सं.] **०पति**–पु. सेनापति. 'तें देखोनि वाहिनीपती।' –रावि २७.९०.

वाहिला—वि. वेगळा; निराळा; पृथक्; वायला पहा. 'तरि झडझडोनि वाहिला निघ।' –ज्ञा ९.५१६. [सं. व्यवहित+ल]

वाहिला—पु. गोंपळा; पोहणाऱ्याची सांगाडी. [सं. वह्]

वाहिलें—प्र. वहिलें पहा.

वाहि(ही)वा—पुस्त्री. शेताची लागवड; वहिवाट; कारभार.

वाही—स्त्री. १ (ना.) नाला; ओढा. २ मार्ग; रीत; ओघ; क्रम. 'घ्यावें त्याचें देणेंचि नाहीं। येचि वाही देखतसों।' –तुगा ३६७. ३ शेताची मशागत; औताची पाळी; लागवड. –वि. १ वाहून नेणारा; उचलून नेणारा; जो वाहतो, नेतो तो. २ वाहणारा. 'दक्षिणवाही.' [सं. वह्]

वाही—वि. खोटें; निष्प्रमाण; असत्य; वेडगळ. 'सदाशिव रुद्री अलाहिदा राहिल्यानें तहलीक किंवा वाही वर्तमान हें खचित समजल्यावर मागाहून विनंति लिहिण्यांत येईल.' –रा ५.१९९. [अर. वाही]

वाहीक—वि. नेणारा; वाहणारा; वाहून, उचलून नेणारा. [सं. वह्]

वाहीत—वि वहीत पहा. लागवड केलेली.

वाहीन—न. (कों.) उखळ. वाहन पहा. [फा. हावन]

वाहीम—वि. खोटें. 'जेथें द्विजावांचुनि देव नाहीं। वांहीम वाटे नवयौवना ही।' –वामन विराट १.३९.

वाहीम—न. नांगर, रहाट वगैरे ओढणारें जनावर; ओढकामाचें, ओझ्याचें जनावर. [सं. वह्]

वाहीयात, वाह्यात—वि. (ना.) व्रात्य; खोडकर; त्रासदायक. [अर. वाहियात्]

वाहील, वाहेल—स्त्री. १ मशागत; लागवड; नांगरट वगैरे शेतकाम. –न. २ पोकळ नारळ; वांझा नारळ. ३ पोहणाऱ्याची सांगड.

वाहुटळ, वाहुटूळ—स्त्री. वावटळ पहा. 'गजहरनरशर ततिस वाहुटळ लाजो।' –मोभीष्म ३.६०.

वाहुटा—पु. (व.) मुलाची हातांतील वाक. [बाहु]

वाहुटी—स्त्री. वहिवाट पहा. [वाहणें]

वाहुदार—पु. जमीन कसणारा. 'वाहुदारांनीं जमीनींचें उत्पन्न वेळें नये.' –के १६.४.३०.

वाहेर—पु. खवळया मासा. –बदलापूर १३२.

वाहो—पु. १ मशागत; लागवड. 'पैं प्रतिवर्षीं क्षेत्र पेरिजे। पिके तरी वाहो नुबगिजे।' –ज्ञा १०.५५. २ प्रवाह; ओघ; धार. 'स्वप्रतीति धारेचा वाहो। करील तैसें।' –ज्ञा १५.२६४. मार्ग; रूढि; प्रघात; गति. 'चालीचाचि वाहो बहुतेक।' –तुगा ९३१. [सं. वह्=वाहणें]

वाहोळ-की-दारी—स्त्री. लागवड; शेतकाम; शेतीची मशागत. (क्रि० करणें; चालवणें; वाहणें). –वि. लागवडीची; वहीत; नांगरटीची; पडित नव्हे ती. [सं. वह्] **वाहोळकर-करी-दार**—पु. शेतकरी; शेतीकरणारा.

वाह्य—वि. उचलून नेण्यास शक्य, योग्य, आवश्यक; नेण्या-आणण्यास सोईचें. [सं. वह्]

वाह्या, वाह्याची अवटी—वाया, वायाची अवटी पहा.

वाह्यात—वाहियात पहा.

वाळ—स्त्री. (कों.) कुंडींत लावावयाची एक वेल.

वाळ—न. पुच्छ; शेंपूट; शेंपटीचें केंस. 'वाजीवाळ धवळ कैसें। तें मज दाखवी डोळसे।' –मुआदि ५.१९. **वाळाग्र**–न. वालाग्र; केंसाचें टोंक. 'चिरलें वाळाग्र तें ही प्रकाशी।' –दा १.५.८. [सं. वाल]

वाळ—स्त्री. १ प्रचारांतून जाण्याची क्रिया; चलनांतून जाणें (माणें). (क्रि० पाडणें; पडणें). २ जातिबहिष्कार; जातिबाह्यता; समाजभ्रष्टता; जातिभ्रष्टता. (क्रि० काढणें; निघणें; पाडणें; घालणें; पडणें). ३ नाश; कुजकेपणा; जीर्णता; सुकेपणा. (क्रि० पडणें; होणें; असणें). ४ लोप; प्रचारांतून जाणें; रद्द होणें. –वि. १ प्रचारबाह्य; नाचलाऊ; अव्यवहारित; बंद पडलेलें (माणें वगैरे). २ जातिबाह्य. ३ (ल.) बेकार; प्रचारांतून गेलेली (चाल, रीत, प्रघात, नियम). [वाळणें=टाकणें] **वाळीस-वाळींत-घालणें-टाकणें**–जातिबाह्य करणें; जातिभ्रष्ट करणें. **वाळींत-वाळीस-पडणें**–जातिबाह्य, भ्रष्ट होणें.

वाळ—स्त्री. १ मासे मारण्याकरितां तयार केलेली जागा. २ (गो.) ओढा. [वहाळ, ओहोळ]

वाळई—स्त्री. (कु.) खडपांत राहणारा चरटया जातीचा मासा.

वाळका, वाळकुंजा-कुडा-कुंडा—वि. १ कोरडा; शुष्क; नीरस; रुक्ष; सुका; सुकट. २ किडकिडीत; बारीक; कृश; रोडका; काटकुळा. [वाळणें]

वाळकी—स्त्री. वाळुकाचा वेल.

वाळखो—पु. (व.) वेळ. –वशाप ५२.१.

वाळगणें—अक्रि. शिजवितांना, भाजतांना लागणें; करपट घाण यावयाजोगें होणें; करपणें; जळणें. [सं. ज्वल्; गु. बळणें=जळणें] **वाळगघाण**–स्त्री. करपट दुधाची घाण.

वाळंज, वाळुंज—स्त्रीपु. एक झाड.

वाळंजी—स्त्री. बिन खवल्याचा मासा. –बदलापूर.

वाळटी—स्त्री. (गो.) वाळवी.

वाळण—स्त्री. (कु.) १ भातांतून पेज काढण्याची क्रिया. २ भातांतून पेज काढण्याचें भांडें. **वाळणी शीत**–न. (कु.) पेज काढलेला भात. **वाळवण**–स्त्री. (कु.) पेज काढण्याकरितां भाताच्या तपेल्याच्या तोंडावर लावावयाची मूठ असलेली फळी.

वाळणें—अक्रि. १ सुकणें; नीरस होणें; रुक्ष होणें; रस, रक्त इत्यादि आटून आर्द्रतारहित होणें. २ कृश होणें; रोडणें; रोडावणें; क्षीण होणें. [सं. ज्वल्] **वाळवण**–न. वाळण्यासाठीं उन्हांत घातलेलें धान्य. २ वाळल्यामुळें कमी होणारा अंश. **वाळत राहणें**–(कर.) उपाशीं राहणें. **वाळवणें-विणें**–सक्रि. १ सुकविणें. २ कृश करणें. [वाळणें प्रयोजक]

वाळणें—सक्रि. खिळा वगैरे उपटून येऊं नये म्हणून वळविणें; बोळविणें. [सं. वल्=वळविणें]

वाळणें—उक्रि. १ वर्ज्य करणें; टाकणें; त्याग करणें. 'वस्तु घेऊनि वाळिजे। जैसें रत्नासि दूषण ठेविजे।' –ज्ञा ११.६४२. 'परमेश्वराचां डोळां। वाळुनि देवताचक्राचा मोळा।' –भाए ५४३. २ वाळींत टाकणें; बहिष्कार घालणें, टाकणें. 'मी रे गोरी चापेकळी। तुझ्या दर्शनें होईन काळी। मग हे वाळी जन मज।' –तुगा १२९. 'कुळें वाळिती जातिभ्रष्टातें।' –मुसभा ३.८७. ३ वजा करणें; परत करणें; निकालांत काढणें. 'तसलमात टाकून वाळणें.' –(बडोदें) खानगीखातें पृ. १५६.

'खर्च पडलेली रक्कम मांडून वाळण्यास उपरी अधिकारी.' –खानखातें १५५. [वळणें] **वाळता करणें-घेणें-देणें**– वळता करणें पहा.

वाळती-टी-वी—वाळवी पहा.

वाळेबा—पु. १ चांचड; एक प्रकारची तांबडया मुंग्यांची जात. २ वाळवी; उधई.

वाळय—पु एक जातीचा मासा. वाळई पहा.

वाळवंट-ठ, वाळवट—न. वाळूचें मैदान; रण. **वाळवट**–वि. वाळुयुक्त; वाळूचें; वाळूमिश्रित. [सं. वालुका] **वाळसर**–वि. वालुकायुक्त; वाळुमिश्रित (जमीन, जागा); रेताड. **वाळसरा**–पु वाळवंट; वाळूची जमीन. 'तेथें जांबुळवुडीं वाळसरा असे।' –पंच ४.१. [वालु] **वाळुव(वं)ट**–न. वाळवंट पहा. 'मग हीवें पीटों देइजें वाळुवंटी । मंदाकिनींचा।' –शिशु ७९०.

वाळवट—न. (व.) घोडयाच्या किंवा जनावरांच्या केसांचें केलेलें चऱ्हाट. [वाळ=पुच्छ; वेंस]

वाळवत—न. (कों.) केळींचें वाळलेलें पान. [वाळणें+पत्र]

वाळवांगी—स्त्री. बेलवांगी पहा.

वाळवी—स्त्री. १ लांकूड खाणारा एक किडा; उधई. २ लांकूड, वस्तु वगैरे वाळवीनें खाल्ल्याप्रमाणें ज्यामुळें दिसावयास लागतें असा रोग कीड, कसर. ३ (ल.) चिंता, काळजी, भीति वगैरे शरीर कृश होण्यास कारणीभूत होणारी गोष्ट. 'चिंता या वाळविला पाळूनि तुम्ही स्वदेह तरु वाळविला।' –मोकृष्ण ४५. ८. 'तिकडच्या जिवाला वाळवी लागली.' –निचं १३९. **वाळवेणें**–अक्रि. (कों.) वाळवी लागणें.

वाळशिंगटी—स्त्री. शिंगटी माशाची एक जात.

वाळा—पु. एक सुगंधि मुळयाचें गवत; या गवताच्या मुळया; खस. [सं. वल्लुर, वाल; हिं. सुगंधवाला; गु. वालो; का. वालवेवरु; ते. वादिवेलु] **वाळागीर**–वि. वाळयाचे. 'वाळागीर पडदे आणवा.' –पला ४.२२.

वाळा—पु. १ पायांतील एक दागिना; पदभूषण. 'ते चाल हे नुचलेत वाळे।' –सारुह २.७२. २ हातांत घालावयाचा एक दागिना; कडें; लहान कडें. 'नांव सोनूबाई हातीं कथलाचा वाळा.' ३ कडें; वलय; वाटोळी कडी; भांड्याच्या भोंवतीं असलेला फुगीर कंगोरा; तांब्या, चंबू वगैरेचा फुगीर भाग. ४ सापाच्या जातीचा एक प्राणि; सापाचें पिलूं; जिवाणूं. ५ खोबऱ्याच्या वाटीची कापलेली वाटोळी कड; खोबऱ्याचे वलयाकार वाटोळे तुकडे. ६ एखाद्या कडयानें वगैरे दिलेला वाटोळा डाग. ७ वळ; वाटोळी गांठ. ८ सामान्यतः वाटोळा उंचवटा, वळ; उदा० उंसाच्या चुलाणावर कढई बसविण्यासाठीं केलेला वाटोळा उंचवटा. (गो.) वाळो. **वाळाकरू**–वि. वाळे घातलेला; लहान. 'तो वाळा करूंबाळु । लाल्हातु दिसे।' –शिशु ३०४. **वाळयाचा तांब्या**–पु. ज्याच्या खालीं वाटोळें स्वतंत्र बूड (बैठक) बसविलेलें असतें असा तांब्या.

वाळांच—पु. एक मुलींचा खेळ. –मखेपु ३३७.

वाळांब—पु. (गो.) तरस.

वाळियेणें—सक्रि. (नाविक) वाऱ्याच्या दिशेनें चालविणें; वाऱ्यांत ठेवणें (गलबत). [वळणें]

वाळी—स्त्री. १ बाळी; नाकांतील किंवा कानांतील एक सोन्याच्या तारेचें भूषण; सुकलें; (कु.) नथ. २ वेलबोंडी नांवाची वेल. [वाळा]

वाळीत—न. जातिबहिष्कार–स्थिति व क्रिया; जातिभ्रष्टता; जातिबहिष्कृति. उपयोग:–एखाद्यावर वाळीत टाकणें; –ला वाळीत घालणें; –वर वाळीत पडणें–येणें; –ची वाळीत निघणें–काढणें.' –वि. बहिष्कृत; जातिभ्रष्ट; जातिबाह्य. [वाळणें] **०पत्र**–न. बहिष्कारपत्र.

वाळु(लू)क—न. १ एक प्रकारची काकडी; चिबूड; सुरती काकडी. २ आवाळूं. [सं. वालुक] **म्ह**० वाळकाची चोरी आणि बुक्क्यांचा मार=लहान अपराधास हलकी शिक्षा.

वाळुं(लूं)ज—स्त्रीपु. एक झाड. वाळुंजीचें झाड.

वाळू—स्त्री. १ पुळण; बारीक रेती. २ कंकर; बारीक खडयांची रेती; जाड रेती. 'जमविला पैका जसा वाळुवा नदीच्या।' –पला ६८. [सं. वालुका; प्रा. वालुआ; गु: वाळू; हिं. वालू] (वाप्र.) **वाळूची भिंत**–स्त्री. न टिकणारी गोष्ट. **वाळूंत-वाळूवर-वाळूमध्यें मुतणें**–निरर्थक गोष्ट करणें; निष्फळ काम.

वाळू—स्त्री. वाळवी पहा.

वाळू—स्त्री (गो.) जेवणी.

वाळेरूं, वाळेस, वाळो—न. (गो.) वाळा (गवत) पहा.

वाळोय—स्त्री. (गो.) वाळवी पहा.

वाक्षण—स्त्री. (गो.) लज्जा.

वि—१ शब्दाच्या पूर्वी लागणारा एक उपसर्ग. हा (अ) वियोग, असंधान (उदा० विगत, विघटन); (आ) पराङ्मुखता, प्रातिकूल्य (उदा० विसदृश, विमनस्क); (इ) जाति, भेद (उदा० विभाग), (ई) वैरुप्य; वैपरीत्य (उदा० विलोम), ह्या अर्थांचा द्योतक आहे. २ केव्हां केव्हां स्पष्टीकरणार्थ अगर निरर्थकहि जोडतात. ३ वैशिष्ट्य; आधिक्य (उदा० विनिपात; विहित). 'विनिर्मिलें झांकण अज्ञतेचें।' –वामन, स्फुटश्लोक ४ (नवनीत पृ. १३३). [सं.]

वि—पुस्त्री. १ पक्षी; खग; गरुड. उदा० विपति. 'इच्छी कुलहित नाग वि भागं न अर्पूनि संधि करवीना।' –मोउद्योग ३.४१. [सं.]

वि॥—(संक्षेप) १ विनंति. २ विशेष. ३ विद्यमानें. ४ विद्यमान.

विइनें—क्रिवि. (खा.) पाहून. 'रामानें तिमा बोरॉहानें टोंचें पोडलें विइने तिथिल...' –भिक्षी २७. [सं. वीक्ष्]

विकट—वि. १ मोठें; प्रचंड. २ भयंकर; भयानक; भयकारक स्वरूपाचा. 'विकट देऊनियां हांक। वेगीं सन्मुख लोटला।' –एरुस्व १२.१३३. २ छिन्न; मोडलेला. 'तोचि सहस्राजुंन साचार। विकटबाहो।' –कथा ३.१७.१९. –दावि २९३. ३ हिडीस स्वरूपाचें; कुरूप. 'पूजिती विकट दोंद। पशु सोंड गजाची।' –तुगा ४१६; –ज्ञा ११.१३९. ४ विरुद्ध: विचित्र; अघटित. 'क्षीराब्धीं काळकूट। हें येकि परीचें विकट।' –अमृ ७.२८६. ५ (गो.) अशुभ; अमंगल (बोलणें, करणें, ऐकणें). ६ कंटाळवाणें. 'सारखें सुख मनुष्यास विकट वाटतें.' –(लोहोकरेकृत) विसांवा पृ. ४४. [सं.] **विकटांत अध्ययन, विकटोपर्यंत अध्ययन-ज्ञान**–न. १ देवपूजेच्या आरंभींचा 'सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गजकर्णकः। लंबोदरश्च विकटो विघ्नराजो गणाधिपः। हा श्लोक सुद्धां 'विकटो' पर्यंतच म्हणजे अर्धवट येणें. २ (ल.) अगदींच थोडें, अपुरें अध्ययन, ज्ञान; ठोंबेपणा. 'धार्मिक व सामाजिक विषयासंबंधानें आमच्या लोकांचें ज्ञान विकटोपर्यंत जाऊन थडकलें होतें.' –आगरकर. **विकटोपशास्त्री**–वि. मट्ठ; दगड; ठोंब्या (विद्यार्थी, माणूस).

विकडी–स्त्री. चातुर्याचें, आलंकारिक भाषण. 'आतां असो हे विकडी।'–ज्ञा १०.६०; –एरुस्व १६.१३०. [सं. विकत्था]

विकण—वि. १ कणरहित. २ (ल.) जवळ धान्य, अन्न नसलेला. 'विकणास कण निधनास धन.' [सं.] **विकणवा**–वि. धान्याचा कणहि जवळ नसलेला (शेतकरी); विकण. 'मग फिटे दु:खाचा ठावो। तंव राहटवी रात्रीदिवो। विकणवातें कां रावो। जया परी।' –ज्ञा १८.५०४.

विकणें—सक्रि. मोल घेऊन देणें; विक्रय करणें; किंमत घेऊन देऊन टाकणें. 'पिता विकी कन्यासुता। हें अपूर्व काय गा ताता।' –कथा १.५.१७१. –अक्रि. १ कांहीं किंमतीस दिला जाणें; विनिमय होणें. २ (ल.) पटणें; मान्य होणें; चांगला व योग्य म्हणून चालणें. 'एथें तुमचें शाहणपण विकणार नाहीं.' [सं. वि+क्री; प्रा. विक्कणय] **म्ह०** पिकेल तसें विकेल. **विकणाऊ**–वि. विकावयास ठेवलेला, मांडलेला, पुढें केलेला; विकाऊ. **विकणी**–स्त्री. विक्रय; विक्री. 'युदु म्हणे तिसां पासौनि विकणी। करितों गुरुथें।' –शिपु २.४५.३३. **विकलेला असणें**–१ एखाद्याच्या आधीन असणें; त्याचा गुलाम असणें. २ (प्रेम किंवा कृपा यानीं) खुषीचा गुलाम बनणें, असणें. **विकत-ता**–क्रिवि. मोलानें; विक्रींत; पैसा देऊन (क्रि० घेणें; मिळणें; देणें.) [विकणें] (वाप्र) **विकत घेणें**–१ खरेदी करणें; मोलानें घेणें. २ (ल.) प्रेमानें किंवा उपकारानें एखाद्यास गुलाम करणें. 'राम म्हणे साधो त्वां वांचविलें, घेतलें विकत मातें।' –मोवन ११.१३०. २ (एखादा अनर्थ) मुद्दाम आपणांवर ओढून आणणें. 'सावध रे कां घेसी मंदा खळनायका विकत मरण।' –मोविराट ४.४४. (वाप्र.) **विकतआळ**–विकत खरूज पहा. **०कज्जा, विकता कज्जा-कलागत-कुरापत**–पुस्त्री. आपल्या हट्टानें, मूर्खपणानें आपणावर ओढून घेतलेलें भांडण, लचांड; नसता उपद्व्याप. **०खरूज-खोकला, विकता खोकला**–पु. स्वतःच्या पैशानीं, कृतीनीं, ओढून घेतलेला त्रास, लचांड. **०घोर-पाप-पीडा-फजिती-मौत-रोग-लचांड-विघ्न-श्राद्ध**–पुनस्त्री. (सामान्य अर्थानें) विकत खोकला; आपणच स्वतःवर ओढवून घेतलेलें संकट, त्रास इ०. 'हें पाहून शेटजी भिऊन जाऊन आपल्या अंगावर घेतलेलें विकत श्राद्ध टाकून देतील असें पुष्कळांस वाटलें.' –टि ४.९०. **विकतश्राद्ध घेऊन सव्यापसव्य करणें**–(मृताची उत्तरक्रिया, श्राद्ध करण्यास वारस नसल्यास कोणी तरी त्या वेळेपुरता वारस होतो यावरून) आपल्या मागें कांहीं तरी उपद्व्याप, लचांड लावून घेऊन त्रास भोगीत बसणें. **०तंटा**–पु विकत कज्जा पहा. **विकता**–१ विकत पहा. २ विकणारा. –पाटण शिलालेख, शके ११२८. ३ विकाऊ. 'कीं संभोगसुखाचिये हाटधारणें। विकते देखौनि सुखाचें केणें।' –शिशु ४७. **विकताईचा**–वि. विकत घेतलेला. 'गुरें विकताईच्या पेंढ्यांवर पाळावीं लागतात.' –बदलापूर २२. **विकतेकरी**–पु. रोजच्या खाण्याचे, खर्चाचे जिन्नस विकत घेणारा मनुष्य; स्वतः शेतीभाती इ० न करणारा, खाद्यादि पदार्थ उत्पन्न न करणारा केवळ विकत घेऊन निर्वाह करणारा मनुष्य. [विकणें] **विकाऊ**–वि. विक्रीस ठेवलेला; विकणाऊ पहा. **विक्या**–वि. विकणारा; विक्रेता. (समासांत) ताक–तूप–दूध–पान–विक्या.

विकथन—न. बदनामी; निंदा; एखाद्याविषयीं वाईट बोलणें. [सं. वि+कथन]

विकंपित—वि. कांपणारा; जलद क्षोभ पावणारा. [सं. वि+कंप्]

विकरण—न. १ विकार; बदल. २ (व्या.) गणाचा प्रत्यय. पहिल्या गणाचें अ हें विकरण आहे. [सं.] **विकरणें**–अक्रि. १ विकार पावणें; क्षोभणें. 'येरी ते दुर्मति जे। बहुधा असे विकरती।' –ज्ञा २.२४३; –ज्ञाप्र ९९. २ बिघडणें; मोडणें. 'ज्याचें हृदयींचे न विकरे ध्यान।' –एभा ३.

८२५. –सक्रि. विकार करणें; विकरविणें. ' प्रथम माया जीवातें विकरे । ' –चसिसुत्रें ३९. [सं. वि+कृ] **विकरवणें–विणें**–क्रि. विकार उत्पन्न करणें. ' परी मनोधर्मु न लोटे । विकरविलाही । ' –ज्ञा २.४१. ' आपण विकरे आनजीवातें विकरवि ।" –चसिसुत्रें ३९.

विकरणें—सक्रि. विखरणें; पसरणें. ' मज पासौनि जाणावें विकरलें असे । ' - माझा ७.५२. ' विकरलेंपणाचें आठांगुळें केलें । ' –शिशु ९०. [सं. वि+कृ]

विकरा-री—पुस्त्री. १ विक्री; विकण्याची क्रिया. (क्रि० करणें; मांडणें). ' शरीर तुला अर्पिलें प्रचित पहा, कर याचा विकरा । ' –होला ९९. ' स्वहस्तें गोणी उसपोनि हातें । मिरच्या विकरी मांडिली तेथें । ' २ विकलेपणा; विकलेली स्थिति. ३ विक्रीचें उत्पन्न. [सं. वि+क्री-क्रय]

विकराल-ळ—वि. भयंकर; भयानक; हिडीस; विकाळ. [सं. वि+कराल]

विकर्तन—पु. सूर्य. [सं.]

विकर्तन—न. (संगीत) आकर्षण करून ताणलेली तार तिच्या पहिल्या जागेवर आणणें.

विकर्षण—न. १ ओढणें. [सं. वि+कर्षण] **विकर्षित**–वि. ओढलेला.

विकल—वि. १ असमर्थ; अधू; हीन; मोडलेला; विकृत; विरूप; क्षीण; व्यंगयुक्त (अवयव, इंद्रिय, मनुष्य). २ विव्हल; शोकयुक्त. ३ अपुरें; असंपूर्ण; साधनाभावीं हीन दशेस पोंचलेलें (काम, व्यवहार). विकळ पहा. [सं.] **०ता**–स्त्री. १ वैकल्य; न्यूनत्व. २ (संगीत) गाण्यांत कमजास्त श्रुति लावणें. [सं.] **विकलांग**–वि. १ विकृत; व्यंग शरीराचा; एखादें इंद्रिय किंवा अवयव अधू, न्यून असलेला २ (ल.) अपुरा; उणीव असलेला; अपूर्ण. [सं. विकल+अंग] **विकलेंद्रिय**–वि. एखाद्या इंद्रियानें उणा; व्यंग इंद्रिय असलेला. [सं. विकल+इंद्रिय]

विकला—स्त्री १ कलेचा (चंद्रबिंबाच्या एकषोडशांचा) साठावा अंश. २ एक वेळाचें परिमाण; अर्धी काष्ठा. ३ वर्तुळाच्या अंशाचा साठाव्या भागाचा साठावा भाग. [सं.]

विकल्प—पु. १ भेद; फरक. २ विरोध; मतभेद. ' दोहींशीं घटिताच विकल्प । शून्यसंकल्प सोयरीके । ' –एरुस्व १.९६. ३ विरुद्ध, प्रतिकूल, भिन्न मत. ४ अंदेशा; कुतर्क; आशंका; वाईट किंवा चुकीचा तर्क, विचार. ' तैसें सांडिले अशेखीं। विकल्पीं जे । ' –ज्ञा १५.२८८. ६ संशयितपणा; संशय; अनिर्णेय; मताचा किंवा हेतूचा दुटप्पीपणा. ' ऐसे दिवस लोटतां फार। अवलीस विकल्प पातला थोर । ' ७ (–अव.) विचार; कल्पना; तर्क. ८ भ्रम. ' उभेच संकल्प विकल्प दोघे । ' –सारुह १.२२. ९ (व्या.) एकापेक्षां अधिक रूपांचा किंवा नियमांचा स्वीकार. [सं.] **०घालणें**–संशय उत्पन्न करणें; विसुष्ट, बिघाड आणणें. ' आमुचें तेथें रत होतें चित्त । त्यांत विकल्प घातला तुंवा । '

विकसणें—अक्रि. उमलणें; उकलणें; खुलणें; फुलणें. [सं. विकसन] **विकसन**–न. उमलण्याचा व्यापार. [सं.] **विकसित**–वि. उमललेलें; प्रफुल्लित. ' विकसित लोचनपंकज ज्याचे जननी म्हणे हें चिपडें । '–मध्व. [सं.] **०दृष्टि**–स्त्री. (नृत्य) वरच्या पापण्या वर व खालच्या खालीं ठेवणें व बाहुल्या स्थिर ठेवणें. गर्व, राग, क्रूरपणा इ०चा दर्शक हा अभिनय आहे. [सं.]

विकळ—वि. विकल पहा. १ दुःखित; गालितगात्र. ' परम विकळ मी तूं या स्मृती ही उडाल्या । ' –वामन, भामाविलास (नवनीत पृ. ९९). २ विसकटलेला; अस्ताव्यस्त. ' विकळ देखोनि दळभार । मागधवीरीं केला मार । ' –एरुस्व १०.४२. ३ अधू; व्यंग. ' बाण खोंचला अति निगुती । विकळ गेला दोहीं हातीं । ' –एरुस्व ११.४४. ४ हीन दशा पावलेला; हतबुद्ध; असहाय्य. ' निज मंडपीं शिशुपाळ । करीत होता गदारोळ । भीमकी घेऊन गेला गोपाळ । ऐकोन विकळ पडियेला । ' –एरुस्व १२.१. ५ विव्हळ; दुःखी. ' लिंग देखिलें भूमीवर । मनीं विकळ जाहला । ' –गुच ६.१८३. ६ निस्तेज; निःसत्व. ' विकळ करि शिखंडीतें गुरुसुत ... । ' –मोभीष्म ८.२१. ७ उलट; विपरीत. ' तंव ग्रह नव्हता सानुकूळ । म्हणोनि तव बुद्धि विकळ । ' –शनि ३७१. ८ उणाख; अपूर्ण. ' जो साम्यचि परी विकळ । तो दृष्टांत नव्हे निर्मळ । ' –विपू ७.३३. ९ अमेळ; संबंधशून्य; विसंगत. ' आतां जाहालिया भ्रमहत । जैसें पिशाचाचें चित्त । मग इंद्रियांचें चेष्टित । विकळु दिसे । ' –ज्ञा ५.५७. १० जड; अस्पष्ट. ' ययाती म्हणे वाचा विकळ । सांगो जातां होतसे । ' –मुआदि २०.१३७. [सं. विकल] **विकळणें**–अक्रि. (कों.) १ बुद्धीची ग्राहकशक्ति जाणें, नष्ट होणें (वार्धक्य, विकार इ०मुळें). ' साधक आळसें विकळे । ' –एभा २०.२०२. २ बारगळणें; भ्रम होणें; वेडयासारखे, मूर्खासारखे चाळे करणें; बडबडणें (विशेषतः म्हाताऱ्यानें, लहान मुलानें). ' तो म्हातारा अलीकडे विकळला, त्याबरोबर तुम्ही वशास बोलतां! ' ३ अतिशय विकल, जेर होणें (उष्णतेनें, श्रमानें). ४ नासणें व फुटणें (दूध, ताक, दहीं). [विकळ] **०ता**–स्त्री. १ शिथिलता; विकलता पहा. ' विकळता उपजत । गात्रांसी । ' –ज्ञा १.१९६. २ व्याकुळता; खेद; दुःख. ' ऐश्वर्यहानीची विकळता । अळुमाळ नाहीं माझिया चित्ता । ' –मुआदि २०.४४. **०मति**–स्त्री. (काव्य) १ बुद्धिभ्रंश; भ्रष्टमति. ' नळाची विकळमति होऊन । तटस्थरूप राहिला । ' –वि. ज्याच्या बुद्धीला विकळता आली आहे असा. **विकळा**–वि. विवर्ण; निस्तेज; फिकट (वर्ण, चेहरा). [वि+कला]

विकळा—क्रि. विकला पहा.

विकळाप—स्त्री. (गो.) हातवारे; विलाप; शारीरिक हालअपेष्टा.

विकळी, विकळूत—स्त्री. चिळस; किळस; शिसारी. (क्रि० येणें).

विकार—पु. १ विकृति; बदल; स्थित्यंतर; पदार्थाचें रूपांतर किंवा बदललेलें रूप. ' दहीं हा दुधाचा विकार. वाफ, गारा हा जलाचा विकार. सुवर्णाचा विकार अलंकार. मृत्तिकेचा विकार घट. ' २ दुखणें; व्याधि; रोग; अस्वास्थ्य. ३ भाव; उत्थित भावना (कामक्रोधादि); क्षुब्ध मनोवृत्ति; जीवाची स्वाभाविक, निश्चल स्थिति जाऊन आलेला कसलाहि क्षोभ. ' काम-क्रोध-लोभ-मोह-विकार, मनोविकार. ' ' तिहीं विरक्तीचि ज्वाला घेतली । तंव विकारांचीं इंधनें पळिपलीं । ' –ज्ञा ४.१२९. ४ विनाश. ' ब्रह्म याचा हेत भवानी सुंदर । अंगुष्ठें विकार आणियेला । ' –ब १२८. ५ विस्तार. –हंको ५ १३८. ६ भेद; निरनिराळा प्रकार. ' आणि विकारांची जे वारी । ते विपरीत ज्ञानाची परी । ' –ज्ञा १५.५२१. ७ परिणाम. –ज्ञा १७.५९ [सं.] **विकारक, विकारी**–वि. (रसा. शाप.) विकार करणारा. १ रासायनिक क्रिया घडवून आणणारा; (इं) ॲक्टिनिक. २ (तर्क.) ज्यांची क्रिया दुसऱ्यावर घडते तें; (इं.) एजंट. –न्यायप २९. **विकारणें**–अक्रि. आकाराला येणें; भिन्नरूप धारण करणें; विकासणें. ' आतां वस्तुजातचि आघवें । मजपासूनि जाणावें । विकारलें असे । ' –ज्ञा ७.५२. **विकारवणें**–सक्रि. विकारवश करणें. ' बहु प्रकारें विकारवावें, चित्त तयाचें तपोवित्त हळु जपुनि घ्यावें । ' –अमृत, शुकचरित्र २१. **विकारी**–पु. साठ संवत्सरांपैकीं तेहतीसावा संवत्सर. –वि. विकारयुक्त; दुखणेकरी; आजारी; (रोगानें किंवा मानसिक क्षोभानें) पीडिलेला. ३ विकार करणारें; बाधक. ४ परिवर्तनशील; बदलणारें; विकार पावणारें. ५ नाशवंत. [विकार] **विकार्य**–वि. रूपांतर किंवा बदल केला जाण्यास योग्य, शक्य, आवश्यक इ० [सं.]

विकाल—पु. अपराह्न; भलतीच वेळ; विलंब. [सं.]

विकास, विकासन—पुन. १ उमलणें; विकसन पहा. २ प्रफुल्लितपणा. ' विकासें रवीतें उपजवी । ' –ज्ञा १८.२७६. ३ विस्तार; वाढ; परिणति. ' जो विकासाहीवरी उरता । ' –ज्ञा१५. ५४९. [सं.] **विकासणें**–अक्रि. १ उमलणें; फुलणें; उकलणें. ' प्रेमें विकासलीं कमळें शुद्ध । ' –एरुस्व ३ ६. २ शोभणें. ' वात्सल्य मोठें तुजला विकासे । ' –सारुह १.३. ३ परिणति होणें; प्रगति होणें. [विकास] **विकासवाद**–पु. १ अनुक्रमानें होणारी वाढ; गुणोत्कर्ष; गुणपरिणामवाद. –गीर १६९. २ प्राणी हीन कोटीपासून उच्च कोटीप्रत जातात असें मत. उत्क्रांतिवाद (डार्विनाचा). (इं.) एव्होल्यूशन. [सं.] **विकासित**–वि. उमललेला; उकललेला; विकसित. [सं.] **विकासी**–वि. प्रफुल्लित करणारें किंवा होणारें. ' सूर्य-चंद्रविकासी कमल. ' [सं.]

विकिर—पु. श्राद्धविधींत ब्रह्मणभोजनानंतर पिंडदानाच्या वेळीं ब्राह्मणांच्या उच्छिष्ट पात्राजवळ प्रासमात्र बलि देतात तो. ' जैसें न करितां विकिरदान । पितृपिंडास होय विघ्न । ' –कथा १. १ ५०. विकीर पहा. [सं. वि+कृ] **विकिरण**–न. १ पसरणें; विखरणें. २ फैलावणें. [सं. वि+कृ] **विकिरणें**–क्रि. १ पसरणें; विखरणें. २ उडविणें; फेंकणें. [सं. विकीरण]

विकीर—पु. १ प्रसरण; पसरणें. २ विकीरपिंड, विकिरान्न पहा. ३ विकिर पहा. [सं. वि+कृ] **०पिंड**–पु. १ धर्मशास्त्रदृष्ट्या प्रत्यक्ष पिंडदान करण्याचा अधिकार ज्यांना पोचत नाहीं अशा असंस्कृत मृत पितरांस उद्देशून श्राद्धीं विकिरलेली भाताची शिथिल मूट. विकिर पहा. २ (निंदार्थी) विकृत, कुरूप मूल. [सं. विकिर+पिंड] **०वत्**–क्रिवि. १ विकिरलेल्या भाताच्या मुठीसारखा, मुठीप्रमाणें. २ (ल.) अनादरानें; उपेक्षापूर्वक. [विकिर+वत्] **विकीरान्न**–न. विकीरपिंड. अर्थ १ पहा. [विकिर+अन्न] **विकीरण**–नं १ पसरणें; विखरणें; पांगापांग. २ (शाप.) विकिरण करणें; पृथक्करण. उदा० प्रकाशविकीरण. [सं.] **विकीर्ण**–वि. पसरलेला; विखुरलेला. [सं. वि+कृ]

विकुंचित(करण)—न. (नृत्य) डावा हात आकुंचित करून बाजूस ठेवणें व उजवा हात नाकाच्या शेंडयासमोर आणून ठेवणें. [सं.]

विकुरणें—सक्रि. पसरणें; विखरणें; सडा घालणें. ' एकेच शरें तो सारथी । केला यमाचा अतिथी । चहूं अश्वांचीं शकलें निश्चिर्ती । करूनि भूमि विखुरली । ' –जै १८.९३. विकरणें, विकिरणें पहा. [सं. वि+कृ]

विकूणन(अधर)—न. (नृत्य) खालचा ओठ वळविणें. हा अभिनय वेदना, मत्सर, अपमान, आळस वगैरे दाखवितांना करतात. [सं.] **विकूणित(नासिका)**–स्त्री. (नृत्य.) नाकपुडया संकुचित करणें हा अभिनय दुःख, मत्सर यांचा द्योतक आहे. [सं.]

विकृत—न. १ वीट; किळस; चिणका. २ विकृति पहा. –वि. १ रूपांतर, बदल झालेला; बदललेला. २ तिटकारा, वीट आलेला. ३ मन उडालेला; विन्मुख झालेला; तोंड फिरविलेला. ४ दुर्दशी; विकाळ. ५ बिघडलेला. [सं.वि+कृ=करणें] **सामाशब्द**–**०जाति**–स्त्री. (संगीत) ज्या स्वरावरून एखाद्या जातीस तिचें नांव दिलेलें असतें व जिच्यांत तोच न्यास स्वर असून बाकीच्या स्वरांबद्दल नियम नसतो ती जाति. यांची संख्या अकरा आहे. षड्जकैशिकी, षड्जोदीच्यवा, षड्जमध्यमा, गांधारोदीच्यवा,

रक्तगांधारी, कैशिकी, मध्यमोदीच्यवा, कर्मारवी, गांधारपंचमी, आंध्री, नंदयति. [सं.] **०स्वर**–पु. (संगीत) शुद्ध स्वरापेक्षां ध्वनीनें कमी किंवा अधिक असा स्वर, विकृतस्वर हल्लीच्या पद्धतीमध्यें पांच मानितात. रागवर्गीकरणास पांचांपेक्षां जास्त विकृतस्वर मानणें सोयीचें नाहीं, हें मत पंधराव्या शतकापासुन आजपर्यंतच्या ग्रंथकारांस मान्य झालें आहे. कलावंत शास्त्रज्ञ नसल्यानें त्यांच्यांत त्याबद्दल एकमत नाहीं. पांच विकृत स्वरांत ऋषभ, गांधार, धैवत, निषाद हे चार कोमल आहेत व मध्यम तीव्र आहे. ३६ इंच लांबीच्या तारेचा ध्वनि व २४० आंदोलनसंख्या षड्जस्वरास गृहीत धरल्यास, पांच विकृत स्वरांचीं आंदोलनसंख्या व तारेची लांबी खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

स्वर	नव्या मताच्या श्रुति	जुन्या मताच्या श्रुति	तारेची लांबी इंच	आंदोलन संख्या
कोमल ऋषभ	३	६	$33\frac{3}{4}$	२५६
कोमल गांधार	७	१०	३०	२८८
तीव्र मध्यम	१२	१५	$25\frac{3}{4}$	$333\frac{1}{3}$
कोमल धैवत	१६	१९	$22\frac{1}{2}$	३८४
कोमल निषाद	२०	१	२०	४३२

विकृति-ती—स्त्री. १ दुखणें; आजार. २ बिघाड; विकार. ३ राग. ४ शंका; संशय. –पया २४६. ५ भाव; वृत्ति; मनाची खळबळ; मानसिक स्थिरतेचा विघात करणारी खवळलेली वृत्ति, मनोविकार. ' नाथिली विकृति निपजे । ' –ज्ञा १३.४७६. ६ कुबुद्धि. ७ त्रास; दुःख. ' आणि संसारदुःख मूळवर्णें । विकृती विर्णे । ' –ज्ञा ४.२२२. ८ तिटकारा; चिळस; किळस. ९ चोविसाव्या संवत्सराचें नांव. १० प्रकृतीपासुन पुढें होणारे पदार्थ; मूलभूत द्रव्याचे विकार. –गीर १५५. ११ द्रव्याचा रूपभेद; रासायनिक रूपांतर; कोणतेंहि पालटलेलें रूप. १२ विपाक. (इं.) फर्मेंटेशन. –वि. अकराळ विकराळ; विकृत. ' हें रूप जरी घोर । विकृती आणि थोर । ' –ज्ञा ११.६३२. [सं.]

विकृती—वि. १ विकत घेतलेला (पदार्थ); घरीं केलेल्याच्या उलट. २ जें विक्रीकरितां आहे तें; विकावयाचें. [सं. विक्रीत]

विकृष्ट—वि. ओढलेला; आकृष्ट. [सं. वि+कृष्] **०नासिका**–स्त्री .(नृत्य) नाकपुडया फुगविणें. तीक्ष्णवास, भय, दुःख, राग, जोरानें श्वास सोडणें ह्या भावांचा द्योतक वरील अभिनय आहे.

विकेंद्रीकरण-भवन—न. (शाप.) मुख्य ठिकाणापासुन फाटाफूट; ऐक्य, एकाग्रता यांचा भंग. (इं.) डिकॉन्सेन्ट्रेशन. [सं. वि+केंन्द्र+कृ किंवा भू]

विकोप—पु. १ संताप; क्षोभ. (क्रि० जाणें). ' आपणपें लोपे वारा । विकोपीं जाय । ' –ज्ञा १५.२५३. २ अनर्थ; वाईट परिणाम (क्रि० होणें). ' गव्हर्नरांच्या धमकावणीचा आम्ही निषेध करतों. या पुढें तेथें (बारडोलीस) कांहीं विकोप झाल्यास त्याची जबाबदारी सरकारवर आहे. ' [सं वि+कुप्=कोपणें] **विकोपा(प्या)स, विखोप्यास–जाणें**–१ अतिशय राग होणें राग भडकणें. २ कुपथ्यानें, विरुद्धोपचारानें जास्त बिघडणें (रोग, गांठ, जखम, क्षत). ३ चिरडीवर जाणें (वाद, तंटा). ४ फाजील, बेसुमार होणें (किंमत, मोल). ५ अतिशय वर चढणें; शिखरास पोंचणें. ६ नष्ट होणें; नाश पावणें (मैत्री, प्रीति). ७ बिघडणें; नासणें (मसलत, बेत, उपाय, गोष्ट). (कोणी हा शब्द विख=विष पासुन व्युत्पन्न झाला असें समजून तदनुरूप अर्थ करतात.)

विक्ती—स्त्री. (राजा. कु.) युक्ति.

विक्रतणें—अक्रि. विकार पावणें. [सं. विकृति]

विक्रम—पु. १ शौर्य; पराक्रम; मर्दुमकी. 'तुज नमो अमितविक्रमा । ' –ज्ञा ११.५३३. २ विक्रमादित्य नामक उज्जनीचा एक शककर्ता राजा. ह्याचा शक इ. स. पूर्वी ५६ सालीं सुरू झाला व तो अद्यापि नर्मदेच्या उत्तरतीरीं चालत आहे ह्या नांवाचे पुष्कळ राजे होऊन गेले आहेत. ३ चवदाव्या संवत्सराचें नांव. [वि+सं. क्रम्=जाणें, चालणें] **०शक-संवत**–पु. विक्रमादित्यानें स्थापिलेला शक. याचा आरंभ काल इ. स. पूर्व ५६. हा शक बंगाल खेरीज करून सर्व उत्तरहिंदुस्थानांत चालू आहे. यांचा वर्षारंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदेला होतो. [सं.]

विक्रमा—स्त्री. गतिप्रकार; विक्रांति. –अश्वप १ १८५. [सं.]

विक्रय, विक्रयण—पुन. विकणें; विक्री; मोल घेऊन देणें. [सं. वि+क्री=विकत घेणें] **विक्रयानुशय**–पु. (कायदा) परत करण्याच्या बोलीनें केलेली खरेदी; जांगड. [सं. विक्रय+अनुशय] **विक्रयी, विक्रेता**–वि. विकणारा. (समासांत) अश्व–घृत–तैल–रस–कार्पास–गो–धान्य–अपत्य – सुवर्ण–प्रतिमा – वेद – विद्या – पशु–शरीर–भार्या–विक्रयी. हे सर्व विक्रेते निषिद्ध आहेत. [सं. क्री] **विक्रा**–स्त्री. विक्री पहा. विकणें. ' पैशाच्या मोहांत अब्रूचा विक्रा करणारी अमंगळ स्त्री मी. ' –बहकलेली तरुणी १. [सं. विक्रय] **विक्रीत**–वि. विकलेला. [सं. क्री] **विकृत–वि. (अशिष्ट)** विकलेला; विकत घेतलेला. (क्रि० देणें=विकणें; घेणें=विकत घेणें). [सं. विक्रीत अप.] **विक्रेता**–वि. विकणारा. [सं.] **विक्रेय**–वि. विकला जाण्यास शक्य, जरूर, योग्य; विकाऊ. [सं.]

विक्रांत—वि. प्रतापशाली; शूर; पराक्रमी. ' चेकितान धृष्टकेतु । काशीश्वरू विक्रांतु । ' –ज्ञा १.९९. [सं.]

विक्राळ—वि. भयंकर; भयावह. अकराळ विकराळ पहा. ' दाढा विक्राळ तिखटा । ' –एरुस्व १२.१०८. [सं. विकराल] **०नामा**–वि. खालच्या व वरच्या जबडयाचे दांत लांब असणारा (घोडा). घोडयाचें एक अशुभ चिन्ह.

विक्रिया—स्त्री. १ बदल; विकार. २ चित्तक्षोभ. ३ अकर्म (थट्टा, इ०). -शिदि ३४०. **विक्रिय**-वि. ज्यावर क्रिया घडते तें. -न्यायप २९.

विक्रीडित—न. लीला; खेळ. 'शार्दूलविक्रीडित' [सं. वि+क्रीड्]

विख—न. विष; जहर. 'बुडालें सोहळ्याचें सुख। हरिखीं विख कालविलें।' -एरुस्व १२.७. -ज्ञा ९.१४२. -अमृ ५.१. [सं. विष; पं. विह, विस; सिं. विहु-खु] **म्ह०** विख घेववतें भीख घेववत नाहीं. **विखणें**-न. विषार; विष. -ख्रिपु. सामाशब्द- **विखमोगरा-री**-पुस्त्री. एक फुलवेल; मोगरीची, जाईची एक जात; रानमोगरा. **विखर**-वि. विषारी. -शर **०वणी**-न. १ विषाचें पाणी. २ (ल.) पावसाळ्यांतील अगदीं पहिली वृष्टि. हिनें पिकांची खराबी होते; तेव्हां हिच्यानंतर लगेच दुसरी चांगली वृष्टि पाहिजे असते. [विख=पाणी] **विखार**-पु. १ विषांश; विषारी गुण, (विषारी पदार्थांचा, सापाचा, औषधीचा). 'रावणासी झोंबला विखार।' २ विषाचा विकार; उपद्रव; विषबाधा. (क्रि० होणें). ३ (काव्य) साप; सर्प. 'परपीडेविषयीं तत्पर। जैसे विंचू आणि विखार।' -दा ५.३.९१; -ज्ञा ९.१४८. ४ विषारी पदार्थ; विषासारखा पदार्थ. 'चंदन आगरु नाना उपचार। गमती विखार हरिवीण।' -ब १६०. [सं. विषार] **विखारणें**-अक्रि. विष चढणें; विषबाधेनें युक्त होणें. [विखार] **विखारा**-पु. तालीमखाना; विषारी औषध. -बदलापूर ३४०. **विखारा-री**-वि. विषारी (प्राणी, वनस्पति, औषध). [विखार] **विखारूं**-न. साप; विखार पहा. 'विखारूं काळिआ जिंतीला।' -दाव ५२. **विखाहार**-पु. साप. -ख्रिपु. विखार पहा. **विखूख**-न. १ विष; विख. २ अतिशय कडू पदार्थ. ह्याअर्थी कडू शब्दासह येतो. 'हें औषध कडू कडू विखूख आहे.' [विख]

विखंड, विखण—न.क्रीन. आऊत; हत्यार (शेतकामाचें, हातकामाचें, विळा, खोरें, कुदळ इ०). -मोमंभा (पृ. ४१. वरील टीप) [सं. वि+खंड] **विखंडणें**-सक्रि. १ फोडणें; नाश करणें; तुकडे करणें; तोडणें. 'ते ते जाण द्वंद्वी। सर्पा ऐसे विखंडीन।' -मुआदि ५.४२; -मोभीष्म ११.५०. २ ताटातूट करणें. 'करूनी बंधु वेडा। जोडा माझा विखंडिला।' -तुगा ४०८७. [सं.]

विखम—वि. विषम (संख्या). [सं. विषम] **विखण**-वि. (गो.) विषम; विजोड; अपूर्ण. [सं. विषम]

विखरणी—स्त्री. इकडे तिकडे पसरणें इ०. [विखरणें] **विखरणें**-उक्रि. १ अव्यवस्थित रीतीनें इकडेतिकडे पसरणें; उधळणें. 'दहींभात विखुरला चहुंकडे। अद्यापि शुभ्र दिसती सूक्ष्म खडे।'. २ निष्काळजीपणानें टाकणें, ठेवणें; इकडे तिकडे लोळवणें (स्त्रीच्या डोक्यावरील केस). ३ चेदामेंदा, तुकडे तुकडे करून फेंकून देणें. 'भीम गदा हाणुनि त्या सद्विरद क्षेम-धूर्तिला विखरी।' -मोकर्ण ८.३०. ४ वृष्टि करणें; शिंपडणें. 'माते, ज्याचें नाम स्वरतांवरि अमृत नित्य विखरीतें।' -मोहनुमद्रामायण १६. -अक्रि. विस्कटणें (केस, इ०) [सं. वि+कृ-विकिर; प्रा. विखर; हिं. विखरना; गुज. विखरवुं; पं. विखरना] **विखरा**-पु. १ विखरलेली स्थिति. २ अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तू; पसारा. ३ उधळपट्टी; खर्च. 'ओटीभरणाचा गजर पुढें आहे। द्रव्याचा विखरा।' -पला ९२. **विखुरणी**-स्त्री. विखरणी पहा. **विखुरणें**-क्रि. विखरणें पहा. १ पसरणें. 'विखुरले विकत्याचे काटे।' -ज्ञा ७.१७०; -अमृ २.७. २ तळमळणें. 'आम्हां नाहीं त्याचा घडला आटव। त्याचा बहुजीव विखुरला।' -तुगा ६०६. ३ फुटणें. 'माझें करुणावचन। न ऐकती तुझे कान। ऐकोनि पाषाण। विखुरतसे।' -गुच १.१३८. **विखु(खू)री**-स्त्री. प्रसार; पसारा. 'चांदाचिया दोंदावरी। होत चांदणियाची विखुरी।' -अमृ १.५६. [विखुरणें]

विखळ—वि. अति दुष्ट; दुराचारी. 'मीच विखळ मीच विखळ। येर सकळ बहु बरें।' -तुगा ३९४७; -सारुह ४.६७. [वि+खल]

विखळणें, विखळाविखळ—उखळणें, उखळाउखळ पहा.

विखळणें—(प्र.) विखुरणें. अस्ताव्यस्त पसरणें; इतस्ततः फेंकणें.

विखास-सें—पुन. श्रम. वेखासें पहा.

विखीं—शअ. विषयीं. -ज्ञा १७.३२०; -एभा १०.२४२. 'कैवि तुला सुत यो विखिं कारण तें मज सांग कसें।' -शिवराम शिवकथामृत अ. १९. [सं. विषये]

विखो—पु. विषय. 'हा प्रकृतीविखो आघवा। तुवां मागां परिसिलासे पांडवा।' -ज्ञा ९.९९. [सं. विषय अप.]

विखोप—(प्र.) विकोप पहा.

विख्यात—वि. प्रख्यात; सुप्रसिद्ध; नामांकित. 'हें गीता-नाम विख्यात। सर्व वाङ्मयाचें मथित।' -ज्ञा १८.१३२३. [सं. ख्या=सांगणें] **विख्याति**-स्त्री. प्रसिद्धि; कीर्ति. 'तो फारच विख्यातीस चढला.' -नि ७०७. [सं.] **विख्यापन**-न. १ विवरण; स्पष्टीकरण. २ जाहीर करणें. [सं.]

विगटणें—अक्रि. भिडणें. 'त्यास विगटले।' -ऐपो २६९.

विगडणें—सक्रि. १ बिघडणें; मोडणें. [सं. वि+घट्]

विगडणें—क्रि. मोकळा करणें, टेवणें; उघडा करून टेवणें. 'विगडुनि ठेविति मद भगडया।' -आ गोरसक्रीडा २. [सं. वि+घटट्]

विगत—वि. १ गेलेला; गत. २ वेगळा केलेला; वियुक्त. ३ (समासांत) ज्याचें गेलेलें आहे असा. जसें–विगतैश्वर्य=ऐश्वर्य गेलेला; विगत-स्त्री-संपत्ति-प्राण-मत्सर-काम; विगतकोध, विगतधवा: गत शब्द पहा. [सं.] ०**विधवा**–स्त्री. (शुद्ध प्रयोग विगतधवा). (काव्य) विधवा स्त्री. ' कोरडें तप । जैसें विगत विधवेचें स्वरूप । यौवन काय जाळावें । ' ०**विषय**–वि. विरक्त; वैराग्यशील. ' जयजय देव सकळ । विगतविषयवत्सल । ' –ज्ञा १८.३. [सं.] ०**विषयवत्सल**–वि. विषयवासना दवडलेल्यांचा कैवार घेणारा. [सं.] ०**श्रीक**–वि. १ भिकेस लागलेला; विपत्तीप्रत पावलेला. २ दुर्दैवी; हतभाग्य; अकृतार्थ. [सं. वि+गत+श्री]

विगत—न. (गुज.) अहवाल; तपशील. [सं. युक्त] ०**वार**–क्रिवि. (गुज. सिं.) साद्यंत; संपूर्ण; तपशीलवार. [गु.]

विगत—स्त्री. (अशिष्ट) युक्ति; विगुत.

विगमन—न. (तर्क.) ज्यांत एक किंवा अनेक विशेष गोष्टींच्या निरीक्षणानें सामान्य नियम स्थापित करण्यांत येतात तें अनुमान; (इं.) इंडक्शन्. –न्यायप १.१२१. [सं.]

विगर्हणा—स्त्री. निंदा; तिरस्कार. [सं. गर्ह् = निंदा करणें]

विगर्हित–वि. निंदिलेला; तिरस्कृत. [सं. गर्ह्]

विगलित—वि. १ पडलेलें; गळलेलें; टाकलेलें; सांडलेलें (फूल, फळ). २ (समासांत उत्तरपदीं) ज्याचें पडलेलें, गळलेलें आहे असा. उदा० दंत–इंद्रिय–केश–गात्र–नख–वीर्य–विगलित. त्याचप्रमाणें समासांत पूर्वपदीं. विगलित-केश–दंत–धैर्य–पर्ण–शक्ति; विगलितांग. ३ शिथिल; ढिला झालेला; खचलेला; थलथलीत व अशक्त झालेला; ताजेपणा, दाढर्य; ताठपणा, दम इ० गेलेला. ४ घट्ट; दृढ. (वि = विरुद्ध असा अर्थ घेऊन) ' विगळित मन माझें तूं करी देवराया । ' –दावि ४८२. [सं.]

विगळ-ळा-ळी, विगोळ—इंगळ, इंगळा इ० पहा. [याप्रमाणें इबद्दल विचा व विबद्दल इचा उच्चार करून झालेले पुष्कळ शब्द अशिष्ट लोकांच्या भाषेंत आहेत. उदा० ईश्वर–विश्वर; इच्छा–विच्छा; इंग्रज–विंग्रज; विचार–इचार; विघ्न–इघ्न इ०.) २ निखारा. ' कीं पद्मरागमानुनि जो पदरीं विगळांशि ओतुनि थे । ' –मोवन ९.४६. (वाप्र.) **विगळ वर्षणें**–१ आग पाखडणें. ' करुणाशील कां हा विगळ वर्षतो ? । ' –यथादी १८.२२७१. २ अग्निवृष्टि होणें. ' जणुं वर्षति विगोळ । उठति मृगजळ कल्लोळ । ' ' –अमृतध्रुव.

विगीत—न. गायन; गाणें [सं.]

विगीत—वि. नीच; हलकट; दुष्ट; अधम; वाईट (मनुष्य, वर्तन, कृत्य). [सं.]

विगीत—न. खूण; मर्म; गौप्य; अभिप्राय (प्र.) इंगित. ' बनराज, आपल ह्ये विगीत खर व्हयना ? ' –बाय ३.२.

विगुण—पु. विरुद्ध किंवा न जुळणारा गुणधर्म, प्रकृति. –वि. १ भिन्न गुणांचा; असदृश. २ विरुद्ध; प्रतिकूलगुणांचा. ३ ज्याचा गुण दूषित, भ्रष्ट, बिघडलेला आहे असा; गुणहीन. [सं. वि+गुण]

विगुत—स्त्री. (राजा. कुण.) युक्ति; इगुत; विगत पहा. [युक्ति अप.]

विगुं(गु)तणें—क्रि. १ गुंतणें; आडकणें. ' उद्धव आवडला पुरुषोत्तमा । त्याचिया प्रेमा विगुंतला । ' –एभा ११. २५६. २ गढणें; मग्न असणें. ' तो विगुंतला असे अंतरीं । महासुखीं । ' –ज्ञा २.३६२. ३ स्पर्श करणें; भिडणें. ' पारंब्या भेदूनियां धरा ।धराधरा विगुंतल्या। ' –एभा १२.१५. ४ अडणें. ' चीत चैतन्यी वीगुतलें जेव्हळि देखियले यदुरायाचे पाय । ' –धवले ६२.

विगै(गे)रे—अ. (गुज.) वगैरे. –मौज २.६.३०. [अर. वघैरा]

विगोवा—वि. (महानु.) मुक्ति देणारा. ' सिहाणेआंदेवां विगोवा । ' –शिशु १५३. [वि+गोवा–गोवणें]

विग्रह—पु. १ युद्ध; लढाई; भांडण. २ परमात्म्याचा अंश; स्थूल देह; शरीर. ' ब्रह्मांड तो विराटदेहो । त्याचा मुख्य भाग विग्रहो । ' –एभा २४.१४६; –रास १.४१४. ३ (व्या.) समासांतर्गत शब्दांचा संबंध व्यक्त करून दाखविण्याची रीति; समासाची किंवा शब्दाची फोड, पृथक्करण. याच्या उलट संधि. [सं. ग्रह्=स्वीकारणें]

विग्रही–वि. (समासांत) १ करणारा; पसरविणारा; मांडणारा; याअर्थी. ' लीलाविग्रहि अवतारी हा । ' –उद्धवचिद्घन, नागनाथचरित्र १५. २ भांडण करणारा, लावणारा. [सं. विग्रह]

विघटणें—सक्रि. बिघडणें पहा. –अक्रि. (महानु.) तुटणें. ' सवधुर वीघडिली । परब्रह्माची । ' –भाए ९०. [सं. वि+घट्]

विघ(घा)टन—न. १ मोडून टाकणें; निर्दलन; फाडून, फोडून, आपट्न तुकडे तुकडे करणें. २ सामान्यतः फट; फूट; भेग; फाटणें. ३ (विघटन) (रसा.) पृथक्करण. [सं. वि+घट्]

विघटनात्मक–वि. (शाप.) मूळ पदार्थाचें पृथक्करण होऊन तो मूळ स्वरूपांत नाहींसा होईल असें. (इं.) डिस्ट्रक्टिव्ह्, कॅटॅबोलिक. **विघ(घा)टित**–वि. १ विभिन्न केलेला; फाडून किंवा फोडून तुकडे तुकडे केलेला; विध्वंसित; विनाशित. २ भग्न; फोडलेला. ३ दूर; पृथक् केलेला.

विघड—पु. १ (श. व ल.) भाग, अवयव यांची फूट; भेद; पृथक्करण. त्यापासून उत्पन्न होणारी भिन्नता; अव्यवस्था; बिघाड. (यंत्रे, अनेकावयवी रचना, संस्था, पक्ष, इ० कांमध्यें). ' परि अबंधा नित्य ब्रह्मभावा । विघड नाहीं । ' –ज्ञा ८.२५७. २ वियोग; वियुक्तता; बेकी. (स्त्री, पुरुष, मित्र

इ०कांची). (क्रि० पाडणें; पडणें). ' विकविला जीव डोंबा घरीं । पाडिला विघड नळदमयंतीमधी । ' –तुगा ४१३८. ३ विकलता; विरूपता. ' कळां वोहट चढु । परि चंद्रि नाहीं विघडु । ' –भाए २९४. [सं. विघट] **विघडणें**–न. (महानु.) बिघाड; भांडण. ' भणती शंभूसी विघडणें । एणेंची केलें । ' –शिशु १३०. **विघडणें**–उक्रि. १ नाश करणें; फोडून तुकडे करणें. २ बिघाड करणें; खराब करणें; नासणें. ' प्रचितीविण औषध घेणें । तरी मग घडचि विघडणें । ' –दा १०.८.६. ३ ताटातूट, वियोग करणें. ' मंजुळ वदनीं बचनागाची कांडी । शेवटीं विघडी जीव प्राण । ' –तुगा ३००१. ४ सोडणें; टाकणें; दूर करणें; विमुख करणें. ' स्त्री कारणें विघडिलीं । सकळहीं जिवलगें । ' –दा ३.२. ५०. –अक्रि. १ नाहींसें होणें; नाश पावणें. ' तेवीं गुरुकृपा उजियेडें । ज्याचें लिंगदेह विघडे । ' –एभा ११.२५२. २ तुटणें; भंगणें. ' जंव जंव भक्तीचें पुट चढे । तंव तंव अविद्या बंध विघडे । ' –एभा १४.३४०; –ज्ञा ९.१७०. ३ ताटातूट होणें; अंतर पडणें; वियोग होणें. ' वत्स विघडलियां धेनु भेटली । जैसी कुरंगिणी पाडसा । ' –ज्ञागा २२१. ४ विलयास जाणें; गळणें; मोडणे (निश्चय, पण, इ०). ' घडिघडि विघडे हा निश्चयो अंतरीचा । ' –राम करुणाष्टक. [सं. विघट] **विघडविणें**–सक्रि. शिथिल करणें. ' नाडीतें सोडवी । गात्रांतें विघडवी । ' –ज्ञा ६. २१९. **विघडाविघड**–स्त्री. १ मोडून तोडून टाकणें; नाश करणें; मोडतोड. ' परि व्हावया तेथें विघडाविघड । ' –दावि २४९. २ बिघडविणें; खराब करणें. ३ बिघडवलेली, खराब केलेली स्थिति. [विघडणें]

विघ(घु)रणें—अक्रि. १ द्रवणें; वितुळणें; विरघळणें; पातळ होणें (तूप, गूळ इ०). ' विघरलें तें तूप होये । थिजलें त्या परीस गोड आहे । ' –एभा ११.१४५८. ' थिजल्या विघुरल्या घृताची । ऐक्यता न मोडे । ' –दा ८.२.३८. २ कमी होणें. ' पुष्टि लागे विघरों । कांति पाहे निसरों । ' –ज्ञा १३.७५६. ३ (ल.) गर्भगलित होणें. ' म्हणे, मागें जाय, द्रुत परिभवें शत्रु विघरे । ' –मो रामायणें युद्धकांड. [सं. विघरण]

विघस—पुन. अतिथि इ०कांचें भुक्तशेष अन्न. ' अतिथि वगैरे जेवून उरेल तें विघस ' –गीर ६७९. [सं.]

विघाटणें, विघाटत, विघाटित—विघटणें इ० पहा.

विघात—पु. १ मोडणें; फोडणें. २ मोडून तोडून टाकलेली, नाश केलेली स्थिति. ३ नाश; बिघाड (कामाचा, मसलतीचा). ४ विघ्न. ५ पृथक्करण. –यंस्थि १४. विघटन पहा. [सं.] **विघातक, विघाती**–वि. नाशकारक. [सं.]

विघोटाई—स्त्री. (बडोदें) जमीनीचें क्षेत्र व कस पाहून त्या मानानें कर उगराणीची एक जुनी पद्धत. ' शेवटली विघोटाई नांवाची एक पद्धत असे. परंतु जुन्या काळीं ती क्वचितच उपयोगांत आणीत. ' –बडोद्याचे राज्यकर्ते पृ. ३५९.

विघ्न—नपु. १ प्रतिबंध; अडचण; अंतराय; अडथळा. २ संकट; आपत्ति. ' सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी । ' –आरती. २ (ल.) भूत. ' प्रहरारात्रीसी विघ्न येईल येथें । ' –रामदासी २.६६. ३ अपमृत्यु व उत्पात याअर्थी योजतात. अपमृत्यु, उत्पात पहा. [सं. वि+हन्=मारणें] **सामाशब्द**–**०कर्ता**–वि. अडचणी, विघ्नें उत्पन्न करणारा. [सं.] **०कार**–वि. (गो.) विघ्नें करणारा; विघ्नकर्ता. **०नाशक-नाशन-राज-हर-हर्ता**–पु. गणपति, गणेशाचें नांव. ही देवता सर्व विघ्नें दूर करणारी आहे. [सं.] **०संतोषी**–वि. दुसऱ्याच्या कामांत विघ्न आलेलें पाहून आनंद मानणारा. [सं] **विघ्नित**–वि. विघ्न, अडथळा केलेला. [सं.] **विघ्नो**–पु. बिघाड, विघ्न पहा. ' मध्येंच विघ्नो आला, नाहींतर मजा झाली असती. '

विच—स्त्री. (को.) तडा; चीर; भेग; फट (जमीन, लाकूड, इ० फास असणारी).

विच-चें—न. (चित्पा.) संध्याकाळ.

विचकट—वि. १ बीभत्स; अश्लील; वेडेवांकडें (भाषण इ०). २ बीभत्स कृत्य करण्याचा स्वभाव असलेला. ' विचकट पोर. ' –नि ९७१. [वि+चकोट] (वाप्र.) **०बोलणें**–अश्लील भाषण करणें; असभ्य बोलणें. **०पणा**–पु. वाह्यातपणा; अनियमितपणा; असभ्यपणा. ' गायनांत विचकटपणा होऊं देतां कामा नये. ' –(बडोदें) कलावंतखातें ५४.

विचकटणें—सक्रि. १ ओढणें व फाडणें; जोरानें, घाईनें, वेडयावांकडया रीतीनें, अव्यवस्थितपणें इकडे तिकडे फेकणें किंवा ढवळणें, चिवडणें; ओरबडून इ० छिन्नभिन्न करणें; विचकुरणें; विदारणें. २ विसकटणें पहा. (विसकटणें या शब्दापेक्षां हा विघातक अर्थानें निराळा व जास्त कडक आहे). ३ उचकटणें पहा. [वि+शकट ?; सं. विच्=वेगळें करणें+कट=जाणें ?; वि+चिकटणें ?; सं. विष्कंदन] **विचकटा विचकट**–स्त्री. घाईचें व जोराचें ओढणें, विदारणें. विचकटणें पहा. [विचकटणें द्वि.] **विचकडणें, विचकडाविचकड**–विचकटणें इ० पहा.

विचका—पु. १ अव्यवस्थित रीतीनें इकडे तिकडे फेंकलेला रचलेला, किंवा कालविलेला ढीग (अन्नाचा, फुलांचा, फळांचा इ०); चिवडाचिवड; पखरलेली, चिवडलेली रास. २ (ल.) विसकळलेली, नासलेली, भंगलेली, बिघडलेली स्थिति (कामाची, मसलतीची). ३ बिघाड; विसकळलेली, नासलेली, उघडी पडलेली स्थिति (अब्रूची, नांवाची इ०). ' बंगाल्यांतील ब्रह्मो धर्माचा विचका बाबू केशवचंद्रांनी आपल्या मुलीचा बालविवाह केला म्हणून झाला. ' –टिले ४.१४७. ४ घोंटाळा; गोंधळ. ५

वाईट गोष्टीचें प्रदर्शन. [सं. विच्] **विचकणी**–स्त्री. १ उघडणें; दोहीकडे करणें; विदारणें इ०. २ ('तोंडविचकणी' चें संक्षिप्त रूप.) तोंड वेडेवांकडें करून वेडावणें. [विचकणें] **विचकणें**–उक्रि. व अक्रि. १ उघडणें; दोहीकडे करणें होणें; मोठ्याने किंवा विरूप व किळसवाण्या रीतीनें पसरणें; वासणें. २ (ल.) उघड करणें, पाडणें, पडणें; जाहीर करणें, होणें. (गुप्त दोष, व्यंगें) ३ (ल.) नासणें; मोडणें; भंगणें; बिघडणें (कट, मसलत, काम). ४ (शब्दशः) पाकळ्या, पानें, ओढून काढणें; फाडणें (फुलें, पुस्तकें यांच्या). ५ विचकटणें पहा. उसकटणें. [सं. विच्=वेगळे करणें. सं. विकोचन; विकचीकृ=विकचणें] विचकणें शब्दापूर्वी नामजोडून अनेक वाक्प्रचार होतात जसें–तोंड विचकणें=१ वांकुल्या, वेडावण्या दाखविणें. २ तोंड उघडणें; बोलणें. दांत, वत्तिशी विचकणें=(उपहासार्थी) दांत, वत्तिशी दाखवणें, काढणें; हासणें. कस विचकणें=कस विसकळणें. **(त्याचें) विचकलें**=(तो) नाश पावला, धुळीस मिळाला. **विचकून पाहणें**–सूक्ष्म दृष्टीनें वारकाईनें पाहणें. **विचकोपा**–पु. ओरवडलेली, विचकुरलेली, विदारलेली, छिन्नभिन्न केलेली स्थिति. विचक पहा. [विचकणें] **०होणें**–विसकटणें.

विचका—पु. १ पांढरें फूल येणारा एक प्रकारचा गांठींचा वेल; वनस्पति. २ (प्र. इचका) शिक्क्याचा एक साधा प्रकार.

विचकु(खु)रणें—सक्रि. ओरखडणें; चिमटा घेणें; वोचकरणें; हातानखांनीं ओढून फाडणें. [विचकुरा] **विचकु(खु)रा, विचकोरा**–पु. १ नखांनीं धरणें, तोडणें, ओढणें; ओरखडणी. (क्रि० घेणें). २ चिमटा. (क्रि० घेणें). ३ नखांनी ओरवडून केलेला व्रण; ओरखडा. [सं. विच्+कृ]

विचखेण—वि विचक्षण. –खिपू.

विचडा—पु. मोठा विंचू. [विंचू]

विचंबणें—न. श्रम; त्रास; कष्ट. 'तैसें स्वर्गसुख लोभें। विचंबणें जें।' –अक्रि. १ श्रम पावणें; कष्टांत पडणें; कुंचबणें. 'जैसा क्षालुनियां लेपु एकु। सवेंचि लाविजे आणिकु। तैसेनि आम्रहाचा पाइकु। विचंबे वायां।' –ज्ञा ६.४९. २ (महानु) विटंबना होणें. 'मग अनेगी जाचकणुका। विचंबिजे हा।' –भाए ५०९. **विचंबविणें**–१ कुचंबत ठेवणें. विचंबवी खोडां घालुनी। हाडांचा यां।' –ज्ञा १८.१०५१. २ विघ्न करणें **विचंबु**–पु. १ संकट. 'साधुसज्जनां विचंबु अडी।' –एभा २३.३९८. २ गरज; चाड. 'मज काय तीर्थी विचंबु।' –एभा २९ ८०१ [वि+चिंब-चिंबणें] **विचंबतु मारणें**–क्रि. संकटग्रस्त करणें. 'आराधितां अनेकी परी। जो तिहीं लोकांते विचंबितु मारी।' –शिशु १६३.

विचमोरा—पु. स्त्रियांचा पायांतील दागिना (विंचू सारखा). 'विरवल्या विंचमोरे।' –स्त्रीगीतमाला ६६. [विंचू+मोहरा]

विचरण—न. आचरण; वर्तन; चलन. 'कांई सिंहाचें विचरण।' –दाव ३७९ [सं. वि+चर्]

विचरणी—स्त्री. १ फणी; कंगवा. २ विंचरण्याची क्रिया; केश साफ करण्याची क्रिया. **विचरणें**–सक्रि. फणीनें केश साफ करणें; केसातील जटा वगैरे मोडून मोकळे करणें; पिंजणें; कापसांतील सरकी काढून साफ करणें. 'मग म्हणतसे माता। सखये तुझा विंचरूंदे माथा।' –कथा १.८ ७४.

विचरणें—अक्रि. १ फिरणें; हिंडणें; भ्रमण करणें; भटकणें. 'विचरे विश्व होऊनि। विश्वाचि माजी।' –ज्ञा २.३६७. २ अनिर्बंध रीतीनें वागणें; चेष्टा करणें. ३ संचार करणें. ४ वावरणें; व्यवहार करणें. 'निजाकारें विचरत। रविप्रकाशें असे वर्तत।' –विपू ३.२७. 'विचरती जैसें साच भावें लोक।' –तुगा २५. [सं. वि+चर्]

विचर्वा—स्त्री. १ (सोनारी) तारेची कडी; तारेची डम्ब्या नामाच्या आकृतीची जोडणीची कडी. २ एक त्वचारोग; इसब. **विचवी खरूज**–स्त्री. विंचू उकळलेल्या तेलांत बरी होणारी खरूज. [विंचु]

विचर्वी-णी—स्त्री. विंचवाची मादी. [सं. वृश्चिक]

विचळणें—अक्रि. बावचळणें; भ्रमिष्ट होणें; वेडें होणें; भ्रमणें. 'न निघे हा नंद विचळला म्हातारा।' –मोकृष्ण ३९. ३१. 'दुराचारी रुक्मा निपट सखिये हा विचळला।' –सारुह ६. ११५ २ मोडणें; सोडणें; सोडून जाणें. 'शास्त्रांचिये सोयरिके। विचळिजे येणेंचि एकें।' –ज्ञा १३.१६. [सं. वि+चल्]

विचक्षण—वि. १ ज्ञाता; जाणता; दूरदृष्टि; शहाणा; बुद्धिमान्. 'साधु हो तुम्ही विचक्षण।' –मुआदि २०.११५. –ज्ञा ४ ८५. 'धूर्त तार्किक विचक्षण।' –दा १.१.३२. २ चिकित्सक; सूक्ष्मपणें व खोलवर चौकशी करणारा. 'भैंदाचें स्वीकारील कवण-विचक्षण कमूल्य निष्कपट।' –मोउद्योग ६.४९. [सं. वि+चक्ष्=पाहणें] **विचक्षणा**–स्त्री. चिकित्सा; बारकाईची चौकशी; परीक्षा; फोड करून तपास. (क्रि० करणें; लावणें; मांडणें). **विचक्षणता**–स्त्री चौकसबुद्धि; दूरदृष्टि. 'शोधांनीं एक विचक्षणता प्राप्त होते.' –टिले ४.४३४.

विचा—पु. (सोनारी राजा.) दुबेळकी बारीक खिळा; नक्षी उठवण्याचें साधन. [विंचु]

विंचांचें घर—न. १ विंचवांचें घर. २ (ल.) त्रासदायक वस्तु.

विचार—पु १ कल्पनाशक्ति, बुद्धि यांचा व्यापार; शोध; अभ्यासपूर्वक चिंतन; खलबत; चर्चा; तारतम्य; विवेक; तर्क; मनन. २ विवेक, चिंतन, मनन करून केलेला निश्चय, निर्णय, निकाल, मत. ३ विधिनिषेध; महत्त्व; क्षिति. 'तुझे तुज नव्हे

शरीर । तेथें इतरांचा काय विचार । '–दा ३.१०.५३. ४ घोटाळा; विवंचना; त्रास; कटकट. ' पृथ्वीप्रलय होतो तैसा विचार जाहला.' –भाव १५. ' मग तुम्हांस विचार भारी पडेल.' –शारो ८१. ५ गोष्ट; हकीकत; खरी स्थिति. ' कळतां तेथिचा विचार । ' –दा ८.८.४३. ' हाराचा सांगावा विचार । तरी वृथा म्हणाल तुम्ही सर्व । ' –शनि १८१. ६ मत; अभिप्राय; बेत. ' परंतु पुत्रें नये हा विचार । कोठेंच नाहीं । ' –दा १.६.१३. ७ युक्ति; उपाय; मनसुबा; मलसत. ' दयानिधि ऋषेश्वरु । सांगता झाला विचारु । ' –गुच ३४.१६. ' चला आमुचे मंदिरा । बोलों पुढील विचारा । ' –कथा १.३.११८. ' घडून येण्यास कोणता विचार. ' –रत्नकांता २१. ८ वर्णन. ' याहीं वेगळे आणीक गुरु । ऐक तयांचा विचारु । ' –दा ५.२.६९. ९ इच्छा मर्जी; मनोदय. ' तहनामा तुमच्या विचारें केला जाईल .'–विवि ३.५ १८७६. [सं. वि+चर्] या शब्दाचे अनेक सामासिक शब्द होतात. उदा० **सारासार विचार**–पु. गुणदोष पाहून केलेला विवेक, बनविलेलें मत. **सद्सद्विचार**–पु. योग्य अयोग्य यांची निवड; चांगलें वाईट ठरविणें. **कार्याकार्य विचार**–पु. साधकबाधक प्रमाणांवरून कर्तव्य किंवा अकर्तव्य तें ठरविणें; करावयास योग्य किंवा अयोग्य यासंबंधी अनुकूल प्रतिकूल प्रमाणांवरून मत बनविणें. याप्रमाणें इष्टानिष्ट-कर्माकर्म –कर्तव्याकर्तव्य –कार्यकारण –गमनागमन –ग्राह्याग्राह्य–धर्माधर्म–पात्रापात्र –पापपुण्य–भक्ष्याभक्ष्य – योग्यायोग्य–वर्ज्यावर्ज्य–वाच्यावाच्य–विधिनिषेध–विहिताविहित–शुभाशुभ–साध्वसाधु–संगासंग–विचार इ०. (वाप्र.) **विचार जागविणें**–(प्र.) विवेक जागविणें पहा. **विचारांत पडणें**–चिंता उत्पन्न होणें; काळजी वाटणें. **विचारक**–वि. विचारी; विचार करणारा; शोधक. **विचारगम्य**–वि. विचार केल्यानंतर समजण्यासारखें; तपास करण्यासारखें; बुद्धीस आकलन करतां येण्यासारखें; चिकित्सा करतां येण्याजोगें. **विचारण**–न. १ शोध; चिकित्सा; विवेक. **विचारणा**–स्त्री. १ शोध; चौकशी; विचार, तर्क; कल्पना. ' विचारणा देवाची । '–दा १६.१०.२८. २ पंचाईत; चिंता; काळजी; गूढ. ३ व्यवस्था; तजवीज. ' लग्नविचारणा न पुसतां मांडिली । ' –सप्र १.३७. ' विधियुक्तादि विचारणा सकळिकीं । '–दावि ७.२.१२. ४ सप्त भूमिकांतील दुसरी भूमिका. –हंको. **विचारणीय**–वि. १ विचार करण्यासारखें; शोध, तपास, चिकित्सा करण्यासारखें. २ विचारण्यासारखें; ज्याबद्दल माहिती मिळवावयाची आहे असें; प्रश्न करण्याजोगें; प्रष्टव्य. **विचारणें**–उक्रि. १ प्रश्न करणें; चौकशी-साठीं पुढें मांडणें; चर्चा करण्यासाठीं प्रस्तावना करणें. २ परामर्श घेणें; विचारपूस करणें; पुसणें; परिस्थिति वगैरेसंबंधीं सहानुभूतिपूर्वक किंवा मदत करण्याच्या दृष्टीनें चौकशी करणें. ' मायेबहीण न विचारी। जाहला पापी परद्वारी । '–दा ३.३.१५. ३ आदर दाखविणें; आज्ञा पालन करणें; काळजीपूर्वक लक्ष्य देणें. ४ महत्त्व देणें; क्षिति बाळगणें; पर्वा करणें; किंमत देणें. ५ विचार करणें; चौकशी, तपास, चर्चा करणें; ' लघुपत्तनकें विचारलें. ' –पंच २.१. ' एथ सरासार विचारणें । करणें काय आचरावें ' –ज्ञा १.२४६. ' पुन हें अवघें विचारितां । ऐसें येत असे माझेया चित्ता । ' –भाए ६४. ६ चालविणें; चालू करणें. ' यांचेनि वीर्ये स्त्रियेच्या पोटीं। संतती विचारूं गोमटी । ' –मुआदि २४.३४. **विचारणें**–अक्रि. चिंतन करणें; मनन करणें; विचार करणें. ' मनीं विचारी लंकानाथ । ' –रावि. ' विचारिल्यावीण बरूं नये तें । ' –सारुह ३.२. **विचारपूस**–स्त्री. १ वास्तपुस्त; चौकशी; शोध. २ परामर्श; कुशलप्रश्न. (क्रि० करणें). [विचारणें+पुसणें] **विचार-वंत-वान-शील, विचारी**–वि. सुज्ञ; विचार करून वागणारा. **०शक्ति**–स्त्री. बरेवाईट वगैरे विवेक करण्याचें सामर्थ्य; मननशक्ति. **०संगति**–स्त्री. विचारमालिकेंतील निरनिराळ्या विचारांचा सुसंगतपणा; परस्परसंबंध; एकसूत्रता; एका कल्पनेवरून तत्सदृश दुसरी कल्पना सुचते तेव्हां त्या दोहोंमधील साहचर्यसंबंध. **०संक्रांति**–स्त्री. विचारांचें परिवहन; एक विचार दूरस्थ व्यक्तींच्या मनांत एकाच वेळीं येणें. (इं.) टेलेपॅथी. नीतिशास्त्रप्रवेश ३९०. **०स्थित**–वि. विचार करण्यांत, चिंतनांत मनन करण्यांत निमग्न, गुंग झालेला. ' ऐसें बोलती श्री गुरुनाथु । तंव शिष्य झाला विचारस्थितु । ' **०क्षम**–वि. विचार करण्याचें सामर्थ्य असलेला; विवेकी. **विचारित**–वि. विचार करून ठरविलेलें; निश्चित; बुद्धीनें स्वीकृत. **विचार्य**–वि. विचार करण्यास योग्य.

विचिकित्सा—स्त्री. १ बारीक चौकशी; तत्त्वनिर्णय. २ शंका; संशय. [सं.]

विचिंतित—वि. चांगलें मनन केलेलें; विशेष विचार केलेलें. [सं.]

विचित्र—न. आश्चर्य. –वि. १ चित्रविचित्र; अनेक रंगांचा; नाना रंगी; रंगीबेरंगी; निरनिराळ्या अनेक रंगांनीं युक्त. २ आश्चर्यकारक; अचंबा वाटण्यासारखा. ' पाहे तटस्थभावें दोघांचें रण विचित्र सेना तें । ' –मोकर्ण ९ १९. ३ तऱ्हतऱ्हेचा; नाना प्रकारचा; अनेकविध. ' विचित्र अंगें वाहिलीं तार्टीं । ' ' रचना विशेषें विचित्रीं । ' –ऋ २०. ४ विलक्षण; तऱ्हेवाईक; लोकविलक्षण. ' कोणी एक वर्नी विचित्र पुतळा जेवावया बैसला । ' ' तो फारच विचित्र मनुष्य आहे. ' [सं.] **०ता**–स्त्री. वैचित्र्य; भिन्नता; तऱ्हेवाईकपणा; सौंदर्य; नानावर्णयुक्तता; रमणीयता; विस्मयकारिता. ' विचित्रता भूतांचिया । '–ज्ञा १८.५३९. **०वाडा**–पु. (व. ना.) वैचित्र्य. **विचित्रित**–वि. विचित्र.

विचित्रगड—पु. किल्ला रोहिडा.

विंचीण—स्त्री. १ विंचवी पहा. २ विंचवी खरूज पहा.

विचुक-का—त्रिकिवि. (प्र) विचूक; असंबद्ध; अडखळणारें. 'ना तरी बालक बोबडा बोलीं। कां वांकुडा विचुका पाउलीं।' –ज्ञा ९.६. 'विचुक बोलती शब्द घडोघडीं हृदयांतरीं भ्रासुनी।' –ऐपो ३०५. **विचूक**–वि. असंबद्ध; भलभलतें; विसंगत. –क्रिवि. असंबद्धपणें. [वि+चूक]

विचुंबा—पु. अचंबा; आश्चर्य; बुचकळा; विस्मय. 'विचुंबा पडला देखोनी दृष्टि।' –मुक्तेआदि ३०.१०८.

विचुरणी-णें—विचरणी-णें पहा.

विंचू—पु. १ एक अष्टपाद विषारी प्राणी. हा नांगीनें दंश करतो. (अप.) विंचु: विंचू; इंचु. २ कृत्तिकानक्षत्र (विंचवाच्या आकारावरून). ३ बाजलें विणतांना गातावरील दोऱ्या पुढें सरकूं नये म्हणून गांठ दिलेले काथ्याचे तुकडे वापरतात ते. [सं. वृश्चिक; प्रा. विच्छुआ, विच्छूअ, विंचुअ; हिं. बिछु; सि. विछुं] **विंचूकांटा**–पु. विंचू अगर इतर दंश करणारा प्राणि. **विंचुपेंव**–न. विंचवांनीं भरलेलें पेंव. 'विंचुपेवीं जळीं, गर्तेंत ढकलितां।' –दावि २७६.

विंचू—स्त्री. हिमालयांत सांपडणारी एक वनस्पति. हीस स्पर्श केला असतां विंचू चावल्याप्रमाणें वेदना होतात.

विचेतन—वि. बेशुद्ध. [सं. वि+चेतना]

विचेष्टित—न. कृत्य; हावभाव; कार्य. [सं.]

विच्चड, विच्छड—पु. समूह. –हालसप्तशती. [दे. सं. वि+चि]

विच्छाय—वि. पांढरें; फटफटित; फिक्कट; फिकें. 'मुखकमल तियेचें स्वच्छ विच्छाय झालें।' –सारुह ३.५७. [सं. वि+च्छाया]

विच्छिन्न—वि. १ तुटलेलें; विभागित; भाग अलग झालेलें. २ छिन्नभिन्न; पूर्ण मोडलेलें; चुराडा झालेलें; नष्ट. ३ (ल.) मोडलेला; उल्लंघन केलेला; अतिक्रमण केलेला (नियम, विधि, वगैरे). 'ज्या मनुष्यांचे कुलधर्म विच्छिन्न झाले त्यांना हें जनार्दना ! नरकवास निश्चयेकरून घडतो.' –गीर ६१०. ४ बंद पडलेला; स्थगित; लुप्त; खंडित; बाधित; प्रतिबंध, हरकत आलेला (वंशपरंपरेचें वतन, हक्क, व्यवहार, धंदा, स्थिति वगैरे). 'तुका म्हणे होय दरिद्र विच्छिन्न।' –तुगा १९७. [सं. वि+च्छिद्] ०**किरण**–पु. पृथक्कृतकिरण. (इं.) स्पेक्ट्रम. ०**किरणदर्शक**–पु. प्रकाशपृथक्करणयंत्र. (इं.) स्पेक्ट्रॉस्कोप. ०**किरणपट**–पु. पृथक् झालेल्या प्रकाशाचा पट्टा. (इं.) स्पेक्ट्रम.

विच्छेद्—पु. १ विभागणी; वियोग; भेद; विभाजनक्रिया अथवा विभाजित स्थिति; निरनिराळे भाग करणें. २ मोडतोड; फोडाफोड; चुराडा; चूर्ण स्थिति. ३ खंड; लोप. 'नॉर्मन जेत्यांनीं केलेल्या स्वारीमुळें या संस्थेच्या परंपरेंत कांहीं कालपर्यंत कांहींसा विच्छेद पडला.' –पार्लमेंट ४. ४ पृथक्करण. (इं.) डिकॉपोझिशन. 'त्याचा लागलाच विच्छेद होऊन वेगळे वायु होतात.' –रसा १२४. [सं. वि+च्छिद्] ०**क**–वि. विच्छेद करणारा.

विज—स्त्री. वीज पहा. 'पायांस लावी विज एक हातें।' हरिराजकृत रामायणाचें भाषांतर ८८.

विंजणा-ना—पु. पंखा. 'चवरी हन विंजणा। तेथ लयो करीन प्राणां।' –ज्ञा १३.४३४. [सं. व्यंजन; प्रा. विंजण; गु. विंजगो] **विंजणवारा**–पु. पंख्याचा वारा. 'मज नल्गे विंजणवारा।' –एरुस्व ५.७१. **विंजणें**–न. पंखा; विंजणा ढाळणें. **विंजणें, विजणें**–क्रि. वारा घालणें. –ज्ञा ९.१०. 'एकी चवरी विंजती सुंदरा।' –निगा ३१. 'विजिला प्राणसांडी।' –ज्ञा १३.७२०. 'कनकदंडे विजिजाल।' –पैठणचरित्र. 'तिआं विजीजती गाभवनीं। कापूरकेळींचां।' –शिशु ३४४. **विंजणें जाणविणें**–पंख्यानें वारा घालणें. 'अनुपद तिस कोणी विंजणें जाणवीती।' –सारुह ३.६९.

विजन—न. एकांत. –ज्ञा १३.१९८. –वि. लोकवस्तीरहित; ओसाड; निर्जन; मनुष्य फिरकत नाहीं असा. [सं. वि+जन=लोक]

विजना—वि. कृश; बारीक; सडपातळ. 'सडक पातळ विजना कंबर पीतांबर नेसली।' –पला ४.३५.

विजबळ—स्त्री. (व. ना.) इजबळ पहा. विसाप.

विजमायली—वि. इजमायली पहा.

विजय—पु. १ जय; यश; जिंकणें; जयोत्सव. २ विष्णूच्या एका द्वारपालाचें नांव. ३ सत्ताविसावा संवत्सर. ४ अर्जुन. 'हांसे विजय मनिं म्हणे कां गोपस्त्रिया मला बुजाल्या हो।' –मोविराट ४.८७. [सं. जि=जिंकणें] ०**ध्वज**–पु. जयाची खूण; जयचिन्ह; जयाची पताका; निशाण. **विजयी**–वि. जेता; यशस्वी; जय पावलेला. [सं.] ०**माळ**–स्त्री. जयकारक माला; यशोदायक चिन्ह; शुभ वस्तु. **विजित**–वि. १ पराभूत; जिंकला गेलेला; पराभव झालेला २ जिंकून घेतलेला; युद्धांत मिळविलेला, द्यूतांत मिळवलेला. [सं. वि+जित] ०**जाणें**–हरणें; पराजय कबूल करणें; कमीपणा पतकरणें. **विजेता, विजैया**–वि. (महानु.) विजयी; यशस्वी; जय मिळवणारा. 'गिरिसम वधुनी कृष्णराजा विजैया' –गस्तो २०.

विजया—स्त्री. १ भांग. २ तृतीया, अष्टमी, व त्रयोदशी या तिथींस नामाभिधान. ३ आश्विन शुद्ध दशमी. या दिवशीं दसरा हा सण असतो. ४ पार्वती; दुर्गा. [सं.] ०**दशमी**–स्त्री. दसरा; आश्विन शुद्धदशमी. या दिवशीं रामानें रावणास मारिलें.

विजयाख्य—वि कर्णमूळ स्थानीं दोन भोंवरे असलेला घोडा –अश्वप २५. [सं.]

विजयाभिनंदन—पु. पुढें होणाऱ्या एका शकर्त्याचें नांव.

विजयावर्त—वि. कर्णमूळाचें ठिकाणीं एक व उरावर एक असे भोंवरे असलेला (घोडा). –अश्वप १.८८ [सं.]

विजरे—पु. प्रांताधिकारी; पोर्तुगीज गव्हर्नर; व्हाइसरॉय. 'गोवेकर विजरे यांचा व स्वामींचा स्नेह झाला आहे.' –शारो १.९२. [पोर्तु. इं. व्हाइसरॉय]

विजवटा—वि. व्रात्य; द्वाड; खोडकर; उच्छृंखल; दुर्वर्तनी; कुलकलंक; दुर्गुणी. 'शिवाजीच्या मरणानंतर त्याच्या विजवट्या लेकानें...' –नि ९६८. 'उगीच विजवटी हे आणिली काल भाची' –सारुह ४.६६. [सं. वीज+वत्! विद्यावत्=दीडशहाणा–भाअ १८३४. विजयवर्तिक–भाअ १८३४]

विजवरा—पु. बिजवरा पहा.

विजवा—स्त्रीअव. (अशिष्ट) बीज यांचें अनेकवचन. 'स्वरुपाचे तुटती तारे कडारे कड विजवा पडतील तुटून।' –पला ४.१७. 'भूकंपा उलुका भालु रीत घन विजवा कडकडती।' –ऐपो ३११. [सं. विद्युत्]

विजळणें—अक्रि. बिलबिलीत होणें; (आंबे, अन्न वगैरे नासून) लिबलिबीत होणें; चोथापाणी होणें (दुधाचें); नासणें. [सं. वि+चल्]

विंजाई—स्त्री. एक क्षुद्र देवतता. 'विंजाई देवी म्हणे मी विंजवनी।' –सप्र ५.२७. [सं. विंध्य+आई]

विजात—स्त्री. भिन्न जात. –वि. १ भिन्न जातीचा; निराळा; वेगळा. 'माणसांसी भुंके। विजातीनें चावे थुंके।' –तुगा ३११३. २ (अपशब्द) द्वाड; व्रात्य; त्रासदायक; अवखळ (मूल) [सं. वि+जाति] **विजाती**–वि. भिन्न जातीचा; निराळा; वेगळा; असाधारण; असामान्य. **विजातीय**–वि. १ भिन्न जातीचा, वर्गाचा, प्रकारचा, कुलाचा; अन्य. २ विलक्षण; अपूर्व; नवीन व आश्चर्यकारक; तऱ्हेवाईक. ३ तऱ्हेतऱ्हेचा; नानारूपी; बहुविध; अनेक प्रकारचा. 'परमेश्वराचे विजातीय चातुर्य, उपकारबुद्धि व अपारशक्ति हे गुण दिसून येतात.' –मराठी सहावें पुस्तक पृ. ७७. [सं.]

विजायली—वि. इजायली पहा.

विजार, विजारत, विजारदार, विजारा—इजार, इजारत, इजारदार, इजारा इ० पहा.

विजावळी—स्त्री. वेगळेपणा; भिन्नता; वेगळीक. 'तैं तरी गा सुवर्मा। विजावळी आत्मया कर्मा।' –ज्ञा १८.२६९.

विजु, विजुका, विजू, विज्जु—स्त्री. वीज; विद्युत्; विद्युल्लता. 'संहारमेघांचां पोटीं। उकलेति कोळ विजुचिआं पुटीं।' –शिशु १०१९. –ज्ञा ११ २०४. 'जैसे विजुचे कल्लोळे।' –जै ४३.१८. 'जैसी मेघांत विज्जुनभा' –ज्ञाप्र ४२४. [सं. विद्युत्]

विजृंभणें—अक्रि. १ जांभई येणें. २ प्रगट होणें; दिसूं लागणें. 'आनंदसमुद्रीं संक्रीडत घडिघडि रोमांच विजृंभती' –आविश्वा. [सं.]

विजोगत—स्त्री. अपघात; आपत्ति; अनर्थ; दुःखकारक घटना. (क्रि० येणें; पडणें.) [सं. वि+युज्] **विजोगाचा विधा**–पु. (व.) विचित्र माणूस; विलक्षण व्यक्ति. 'तुमच्यासारखे विजोगाचे दिवे जगांत नाहीतच.'

विजोड—वि. १ विशोभित; विषम; न शोभणारें; विसंगत. 'असल्या विजोड संबंधानें नांवाजलेल्या कुटुंबांस कलंक लागतो.' –टि ४.१३५. २ न जुळणाऱ्या रंगाचें, भागाचें; न बसणारें, जमणारें. [सं. वि+युज्]

विज्वर—वि. भयंकर; प्राणांतिक, दुर्धर; वाईट; नाशकारक. 'संभाजी महाराज औरंगजेब यांणीं नेऊन विज्वर प्रसंग गुजरला' –मराचिथोशा २.

विंझण–णा–णें, विंझवणा–विंझणवारा—विंजणा, विंजना पहा. (अशिष्ट) इझणा–ना. 'उखा घाली विंझणवारा' –कथा १.६.१९७.

विझणें—अक्रि. १ मालवणें; शांत होणें; थंड होणें (दिवा, अग्नि वगैरे). २ (ल.) थंडावणें; शांत होणें; मिटणें; दबणें (भांडण, राग वगैरे) [सं. उपशमन; सिं. उझणु] **विझण**–न. विझवण्याची, मालवण्याची स्थिति. [विझणें] **०घालणें**–विझविणें. **०पडणें**–विझणें. **विझवणें**–सक्रि. मालवणें; शांत करणें. [विझणें प्रयोजक; सि. उझाइणु; गु. विसामणु]

विझणें—उक्रि. भोंक पडणें; छेदणें; टोंचणें. 'विझती शस्त्रांचे घायटे।' –दा ३.७.४. [सं. विध्; म. विंधणें]

वि(विं)झणें—न. सुताराचें च्छेद पाडण्याचें हत्यार. [सं. विध्]

विंझुणवारा, विंझुणा, विंझुर्णे—विंजणा पहा.

विट—पु. १ जार; उपपति; ठक; लुच्चा मनुष्य; धूर्त; व्यसनी; छंदी. 'भीष्मा मर्दाया अरि, विट जेंवि सतीकुचा मरायास।' –मोभीष्म ११.५४. 'जपति जसे पोडाया व्यसनीं सुजनासि सर्वकाळ विट।' –मोआदि २८.८. २ गांडू; गांडमराळ. २ जांवई. –हंको. ४ (नाटय) राजाचा मित्र; रंगेल मनुष्य. [सं.]

विटक-र, विटका—वि. १ नासलेलें; विटलेलें. 'आंबट तिखट विटक जाणोनि। करी त्याग स्वीकार।' –स्वादि ५.२.३४. २ विटणारा, उडणारा, फिका पडणारा (रंग, कपडा). [विटणें]

विटंक—न. घरटें; खुराडें. 'कपोत हुंकार करी विटंकीं।' –सारुह ५.१४. –वि. ऊंच व घनदाट; निबिड; अवाढव्य. 'ऐसा हा एकु। विश्वाकार विटंकु।' –ज्ञा १५.६२. [सं.]

विटकणी—स्त्री. १ वेडावणी; विचकणी; वाकुली. (क्रि० दाबणें; दाखविणें) २ कुचाळी; टवाळी; थट्टा. [विट]

विटकर, विटकूर—स्त्री. १ वीट; विटेचा तुकडा; रोडा; ढोला. २ विटेची पूड; इटकर-कूर. **विटकरी**-वि. विटेसारखा; विटेच्या पुडीसारखा (रंग).

विटकळणें—अक्रि. सुटें होणें; फांकणें.

विटकुली—स्त्री. (प्र.) विडकुली पहा. लहान विडी.

विटगळला—वि. (व.) विटका; वेडाविद्रा; किळसवाणा.

विटणें—अक्रि. १ निस्तेज होणें; मळकट होणें; तजेला नाहींसा होणें; फिका पडणें (रंग, रंगित वस्तु). 'झऱ्याच्या पाण्यानें तांब्याचीं भांडीं विटतात.' -पदाव १.१४३. २ शिळें होणें; आंबणें; ताजेपणा, तजेला, सौंदर्य, तेज, तकाकी नष्ट होणें. ३ कोमेजणें; मलूल होणें; शिळपणें; म्लान होणें (एखादें झुडुप-अकालीं अथवा फार वृष्टि झाल्यामुळें). ४ (ल) कंटाळणें; तिरस्कार वाटणें; ओकारी येणें; नकोसें होणें. 'जरि तूं करुणाळा गोसावी। भणौनि विटसीना।' -ऋ ५२. 'स्वकन्येच्या ठायीं सदय परि झालाचि विटता।' -मोकृष्ण ६२.३४. [सं. विट्=घाण; विट् ध्वनि करणें, शाप देणें]

विटप-पी—पु. वृक्ष; झाड.

विटंबणें-बिणें—उक्रि. १ उपहास, थट्टा, फजिती करणें; अनमानणें; चेष्टा करणें; लाजविणें. 'विटंबिले भट। दिला पाठी बरी पाट।' -तुगा २३६. २ विघडविणें; कुरूप करणें. 'रूप विटंबील श्रीपती।' -एरुस्व १६.२७. [सं. विडंब्] **विटंब**-पु. विटंबना; फजिती; चेष्टा. 'वोहरेवीण वाधावणें। तो विटंबु गा।' -ज्ञा १३.८३७. **विटंबना-णा**-स्त्री. फजिती; मानहानि; अप्रतिष्ठा. 'काय विटंबना सांगों किती। पाषाण फुटती ऐसें दुःख।' -तुगा २२६०. **विटंबवाणें**-वि. अपमानकारक; मानहानीचें. 'त्या कृष्णासी सोयरिक करणें। तेंचि आम्हां विटंबवाणें।' -एरुस्व २.२७.

विटबंदी, विटेबंदी—वि. विटांनीं बांधलेलें; इटबंदी. [वीट+बंदी]

विटवणी—न. हानिकारक पाऊस; अकालवृष्टि; अतिवृष्टि; (अशा वृष्टीवर विहिरींचें पाणी पिकास द्यावें लागतें).[विटणें+पाणी]

विटवणें—सक्रि. वेडावणें; कंटाळा आणणें. 'मातलें माकड विटवी पंचानना।' -तुगा २४०३. 'हा ठायवरी पांडवा। पदार्थ जातीं आघवा। विटवी तो होआवा। वैराग्य लाठु।' -ज्ञा १५. २५७. [विटणें प्रयोजक]

विटविट—स्त्री. बिघाड; नाश; विस्कटलेली स्थिति, अवस्था. -क्रिवि. किड्यांच्या बुजबुजाटाप्रमाणें; किडे घोंगावूं लागतात तसें. [विट द्वि.]

विटा—पु. एक प्रकारचा भाला; इटा पहा. 'त्यामागें विटे बाण भाले.' -मराचियोशा ६९. **विटेकरी**-पु. विटा नांवाचें शस्त्र धारण करणारा; इटेकरी. 'पुढें धावती विटेकरी।'-ऐपो १४५.

विटावणें--सक्रि. वेडावणें. 'कीं विटावूं लागे फुंजे।' -ज्ञा १३.७६०. 'हरिदासासी विटावी।' -एभा २३.२५८. [विटणें प्रयोजक] **विटावीट**-स्त्री. फटफजिती. 'तेथ विटावीट आघवी। होइजे जे स्वभावीं।' -सिसं ४२.१०१.

विटाळ—पु. १ दोष; अपवित्रता; अशुद्धता; विशिष्ट प्राणिमात्र, वस्तुजात यांमध्यें असणारी अशुचिता. 'तरी आतां दिठीचा विटाळु गेला।' -ज्ञा ११.१९२. 'या स्त्रीजिता नित्य विटाळ पाही।' -सारुह ८.११. २ अशुद्ध, अपवित्र वस्तूच्या संसर्गानें प्राप्त होणारा दोष; अशुचिता; अस्पृश्यसंसर्गजन्यदोष. ३ स्त्रियांचा ऋतुस्राव; रजःस्राव. 'रजस्वलेचा जो विटाळ। त्यामध्यें जन्म यांसि।' -दा ३.१.११. ४ अभाव, अलिप्तता वगैरे दाखविण्यास हा शब्द योजतात. 'आम्हा विषयांचा विटाळु सदा।' -शिशु २०१. 'त्यांस देशभाषेचा विटाळहि सोसत नाहीं.'-नि २. [सं. विष्टा; प्रा. विट्ठा; प्रा. विट्टाल] (वाप्र.) **०करून घेणें**-विधवेनें वपन करून घेणें. **०कालवणें**-विटाळ पसरणें; एकापासुन दुसऱ्यास याप्रमाणें दोष सर्वभर होणें. **०जाणें**-१ वेळीं अवेळीं रजःस्राव होणें. २ रजःस्राव होण्याचें अजिबात बंद होणें. **विटाळणें**-उक्रि. १ अशुद्ध, दूषित, भ्रष्ट, अपवित्र करणें; विटाळ करणें; होणें. 'जैसे पुत्र विटाळले।' -विपू १.८४. २ केवळ स्पर्श होणें, नाममात्र संबंध येणें. 'जेवण न जातां तोंड मात्र विटाळलें.' **०चंडाळ**-पु. नानाप्रकारचा विटाळ; सर्वसामान्य विटाळ. **विटाळशी**-स्त्री. रजःस्वला; ऋतुस्नात स्त्री. **०चंडाळशी**-स्त्री. विटाळशी.

विटाळी—स्त्री. (व.) विटकर; विटेचा भुगा.

विटाळें—न. विटा पाडावयाचा लांकडी सांचा.[सं. इष्टकालय]

विटी—स्त्री. विटूदांडूच्या खेळांत दांडूनें उडवावयाचा लहान लांकडाचा तुकडा. [सं. यष्टि] **विटीदांडू**-पु. विटी आणि दांडू घेऊन खेळावयाचा एक खेळ. 'मराठी राज्य कावीज करणें म्हणजे विटीदांडूचा खेळ.'

विटी—स्त्री. विडा. 'मंदस्मित मुखभर विटी।' -लक्ष्मीनारायण कल्याण, ग्रंथमाला [सं. वृत्=वळणें; वीटिका]

विटोरिया—पु. बुरखुंडा; भुट्टा. 'जैसे दाणे काढी कणसाचे। मग काय प्रयोजन विटोरियाचें।' -अफला २९.

विटोला—पु. (ना.) तात्पुरता घातलेला चुला. [वीट]

विट्ट—पु. १ अतिशय वीट. २ बेरंग; पाणउतारा; तेजोभंग; फटफजिती.

विठलाई—स्त्री. एक क्षुद्रदेवता. 'विठालाईदेवी म्हणे सांगो कायी।' –सप्र ८.५.२४.

विठाई, विठाबाई, विठोबाई—स्त्री. विठोबास प्रेमांतील लाडकें नांव. 'विठाई माउली। ग माय माझी विठाई माउली।'

विठी, विठीदांडू—विटी, विटीदांडू पहा.

विठीव—स्त्री. पौरुष. 'आंगीं कस धरिती पण विठिवेवीण. –गीताचंद्रिका २३.

विठू, विठुमिया—पु. पोपट.

विठू, विठो, विठोबा—पु. विठ्ठल देवाचीं नांवें.

विठूबोका, विठ्या—पु. बोका; माजलेलें मांजर.

विठोबारखमाई—पु. (अव.) १ विठ्ठल व रुक्मिणी. २ (ल.) समवयस्क वधूवर; योग्य जोडपें.

विठ्ठल—पु. पंढरपूरची प्रसिद्ध देवता. [सं. वित्=ज्ञान+ठ=शून्य, +ल=परिपालक. अज्ञानांचा कैवारी; विष्णु–विठ्ठ+ल; का?] **विठ्ठलपंती तांब्या**–पु. विठ्ठलपंत नांवाच्या मनुष्यानें प्रचारांत आणलेल्या घाटाचा तांब्या. **विठ्ठल सवाशीण–सवाष्ण**–स्त्री. जीस विठ्ठल हाच केवळ आधार आहे अशी स्त्री, विधवा; विकेशा विधवा. 'गतभर्तृकेच्या मनांत तसला झोंक पाहिजे असेल तर तिनें अगोदर विठ्ठलसवाष्ण झालें पाहिजे' –आगर ३.११.

विठ्ठलसुंदरांतक—पु. (सांकेतिक) राघोबादादा. (विठ्ठलसुंदर हा निजामाचा दिवाण होता त्यास मारणारा). 'म्हणे म्यां बहुतेक दिधलीं दुःखें। त्या विठ्ठलसुंदरांतकें।' –अफला.

विडकुली—स्त्री. लहान विडा; पट्टी.

विडनिंबू–लिंबू—न. ईडनिंबू–लिंबू पहा.

विडंब—पु. डौल; थाट; तऱ्हा; टेवण. 'जेवीं आरिशाचें प्रतिबिंब। दिसे समरूपें स्वयंभ। तैशी स्वरूपतेची शोभ। सम विडंब दोहींचा।' –एभा २४.३०९. [सं.]

विडंबन–ना—नस्त्री. १.उपहास; फजिती; टवाळी; थट्टा; चेष्टा. एखादी गोष्ट वस्तुतः आहे त्याहून भिन्न स्वरूपांत दर्शवून तिची टवाळी करणें; उपहास करणें; कुचेष्टामिश्रित दोषदिग्दर्शन. यांत कुचेष्टा हा एकच हेतु नसून विडंबित गोष्ट सुधारण्याचाहि हेतु असतो.. २ नक्कल; सोंग; बतावणी. ३ दुसऱ्याचें रूप धारण करणें; दुसऱ्याची आकृति धारण करणें. [सं.विडंब्]

विडंबित–वि. १ फजित; उपहास केलेला, झालेला. २ ज्याची नक्कल, अनुकरण, बतावणी केली आहे तो.

विडवर—न. निकृष्टावस्था; पूर्ण विनाश; फजिती; गाळण; हवेलंडी. –विक्रिवि. अव्यवस्थित; हिडिस; ओंगळवाणा; भ्रष्ट; निकृष्ट. 'राज्य झालें असें बहु विडवर। उपद्रव फार प्रजेसी।' –कथासारामृत २७.७५.२५.४७. [सं. विट]

विडा—पु. १ नागवेलीचीं पानें, सुपारी, कात, चुना, लवंग, वेलदोडे वगैरे घालून केलेली पट्टी; तांबूल. विडयाचे प्रकार:–कातरविडा; कापूरविडा; कुलपीविडा; गोविंदविडा; गोंदविडा; मोडविडा; मोदकविडा इ०. २ विड्याचें साहित्य, पानसुपारी वगैरे. [सं. वीटिका; प्रा. वीठिआ] **०उचलणें**–(पूर्वी एखादें विकट काम करण्याचा प्रसंग आला असतां दरबारांत मध्यें विडा मांडून ज्यास तें काम करावयाची ईर्षा असेल त्यानें तो विडा उचलून घ्यावा अशी पद्धति होती. त्यावरून) प्रतिज्ञा करणें; पण लावणें; कार्याची जबाबदारी घेणें. 'जो धरून आणील अनुशाल्वाला। तेणें विडा उचलावा।' –जै १३.९. **०देणें–१** निरोप देणें; पाठवणी करणें (समारंभ पुरा झाल्यावर विडे वांटावयाची चाल आहे यावरून). 'केशवपति रायाचा। विडा घेऊन आज्ञेचा।' –ज्ञाप्र १०२९. २ कामावरून कमी करणें. **०पाऊड**–पु. विडादक्षिणा; विडा पैसा. 'विडा पाऊड भीतरां। घेऊनि रिघती गाभारा।' –ज्ञा १८.४६.

विडाल–क, विडाळक—पुनपु. बिडाल; बिडालक पहा. मांजर. 'बदके विडाळके पाकोळ्या।' –होला ११४.

विडाळू—न. पोटांतील आंतड्याचा भाग. 'सात अंगुळें स्नेहाळी। औट अंगुळें पित्ताची खोली। विडाळू बोलिजे जवळीं। दोन अंगुळें।' –कथा ५.७.१७५.

विडि, विडी—स्त्री. १ विडा; तांबूल. 'विडि करूनि समर्पि महासती।' –नरहरि, दानव्रत १७. 'राव होता सुखसदनीं। विडिया देतसे मोहिनी।' –कथा २.९.९३. 'धरा शांतता खाउंया विडी।' –होला ८३. २ तंबाखू घालून केलेली पानाची सुरळी; विडीचे प्रकार:–फर्मास, तोकडी, लवंगी, बीचबंद. ३ लग्नसमारंभांत वधूवरांस तोडण्याकरितां देण्यांत येणारी पानाची सुरळी, लवंग, खोबऱ्याची काचळी इ०. ४ वसवी; शेंवी; मांडळ; वलय; कडें; लोखंडाची वाटोळी चापट कडी (ही मुसळ, काठी, दिवटी यांच्या शेवटीं, नांगराचा फाळ बसविण्याकरितां, चाकांच्या तुंब्याभोंवतीं व तुंब्याच्या आंतील भागास, रहाटाचा आंस फिरण्याकरितां, जात्याच्या मायणींत, हत्याराच्या मुठीस वगैरे बसवावी लागते). 'विद्युल्लतेची विडि। वन्हिज्वाळांची घडी।' –ज्ञा ६.१२४. [सं. वीटिका; विटि]

विडुळणें—अक्रि. बिलबिलीत, लिबलिबीत, थलथलीत होणें (एखादें फळ अधिक झाल्यामुळें, उबून, नासुन); नासणें; चोथापाणी होणें (दूध, दहीं वगैरे). **विडुळ**–वि. १ आंबलेलें; नासलेलें; कुबट झालेलें; शिळें; बेचव; पांचट (पाणी, दूध, दहीं, फळें वगैरे). २ निस्तेज; फिका; उतरलेला (चेहरा,मुद्रा). ३ मुलमुलीत; रुक्ष; पाणचट; नीरस (भाषण). ४ किळसवाणा; घाणेरडा; तिरस्करणीय (मनुष्य, कृत्य). [विट] **विडोळ, विढूळ, विढोळ, विढोळणें**–विडुळ, विडुळणें पहा.

विढार—न. विढार पहा. बिऱ्हाड; राहण्याची जागा; निवासस्थान. ' पावे सुरवाडिक विढार । ' –विपू २.४.

विढाळ—वि. तेजःपुंज; देदीप्यमान; चकचकीत. ' कीं मुक्ताफळांचा गोळा विढाळ । ' –रावि ४. [वि+ढाळ]

विण—शअ. वांचून; वीण पहा. ' तें उकललियाविण । ' –विउ १.२.१३७.

विणची वेळ—स्त्री. संध्याकाळची वेळ; सूर्यास्तसमय; तिन्हीसांजा. **विणचां**–क्रिवि. (राजा.) संध्याकाळीं; सुमारें चार घटका दिवसा.

विणणें—उक्रि. १ ग्रथन करणें; गुंफणें; तंतु वगैरे एकमेकांत गुंतवून वस्त्रादि तयार करणें. २ पलंग, माचा, खाट इत्यादि नवार, सुंभ, दोरी वगैरेनीं जाळीसारखें काम करून भरणें; गुंफणें. ३ टोपली, चटई, वेणी वगैरे गुंफणें; तंतु, दोरे, पेड एकत्र ग्रथन करणें. ' कर्पूरकर्दळीचें हिंदोळें । मृणाळसुताचेनि पाटें विणिलें । ' –शिशु ७७४. ४ तुणणें; दोरा भरणें; जाळीकाम करणें. [सं. वे; सिं. उणणुं; गो. विणय] **विणकर**–स्त्री. वीण; पोत; विणण्याची तऱ्हा; सफाई. [विणणें] **विणकर-री-पु.** विणणारा; कोष्टी; साळी. **विणकाम**–न. विणण्याची कला; कृति. **विणणावळ**–स्त्री. विणण्याची मजूरी. **विणतर**–स्त्री. (बडोदें) विणकाम; जाळी; वीण. ' एक विणतरीची टिपाई व खुर्च्या ठेवाव्या. ' –स्वारीनियम ७१. **विणाई**–स्त्री. १ विणकर. २ विणणावळ. **विणपी**–पु. (गो.) विणणारा; विणकर. **विणावणी**–स्त्री. वीण; विणकर; विणण्याचें कार्य. ' मगतिये विणावणीचेनि आधारें । लहाना चौकडिया पटत्व भरे । ' –ज्ञा ९.१०७. ' म्हणौनि अविद्येचिया विणावणी । ब्रह्मी पढति प्रपंच रंगाची वाणी । ' –माए ५८२. **विणीव**–वि. १ विणलेलें. २ वेणी घातलेलें.

विणती—स्त्री. १ देवास फूल, तांदूळ, सुपारी वगैरेचा लाबलेला कौल. (क्रि० लावणें; देणें; ठेवणें). २ देवानें असा कौल लावून दिलेलें उत्तर, कौल. [सं. विनति]

विणवणी—स्त्री. कण्हणें, कुंथणें, वेणा देणें, या क्रिया. **विणवणें**–अक्रि. कण्हणें; कुंथणें; विव्हळणें; वेणा देणें. [वेण]

विणवनी—स्त्री. विनवणी पहा. ' ऐसी आइकौनी विणवनी । ' –शिशु १६६.

विणा—पु. वीणा पहा. तंबोरा.

विणा—शअ. (प्र.) विना पहा. वांचून; खेरीज; शिवाय.

विणावणी—स्त्री. उपाधि; यातायात. ' प्रपंचाचिया विणावणी । ' –विपू १.४३. [विणवणें]

विणी—स्त्री. वेणी पहा.

विणुढणें—अक्रि. रुजणें; अंकुर येणें. ' अध्यासें बीज विणुढलें । ' –गीता १३.१७७. [विणें]

विणूं—शअ. विना; वांचून. ' ऐसेनि काळ गेले बहुतां । तुआं विणूं । ' –शिशु १०४. [सं. विना]

विणें—अक्रि. १ प्रसवणें; जन्म देणें; उत्पन्न करणें. (प्राणि, पशु, पक्षी, किडे यांचे बाबतींत उपयोग. घोडी, गाढवी प्रसवणें म्हणतात; मानवी स्त्रीच्या बाबतींत तिरस्कारानें वापरतात). ' दोघे एके ठायीं केलीं नारायणें । वाढविला तेणें आणि व्याली । ' –तुगा ९३. ' हे गांधारी जरि शतपुत्र मुनीच्या अनुग्रहें व्याली । ' –मोकर्ण ६.२५; –ज्ञा ८.८८. २ (केळ वगैरे) प्रसवणें; कोंका बाहेर येणें. ३ (डोळ्यांतून) पू येणें. ४ उत्पन्न करणें; तयार करणें. ' वितां व्यर्थ काव्यें । अलवण हरीविण कविता । ' –वामन, नृसिंहदर्पण ३७. [सं. वी] **म्ह०** व्याली आणि चाटायास विसरली. १ ज्या आईनें मुलांस नीट वळण लावलें नाहीं तीस म्हणतात. २ अर्धवट काम करणाऱ्यास म्हणतात. **वितीफळती–वितीगाभती**–स्त्री.वि. विणारी व फळणारी; विणारी व गाभण राहणारी; वांझ नव्हे अशी; दूधदुभतें देणारी (गाय, म्हैस वगैरे).

विणें—शअ. विना; वांचून; शिवाय. ' विणें त्यच्या वेही खचित आपुला प्राण अबला । ' –विवि १.२०.१८७६.

विणेकरी—पु. वीणा धरणारा; तंबोरावाला. ' विणेकरी रबाब वाले । ' –दावि ७.२.१३.

वितकळणें—अक्रि. विरळणें; नासणें; चोथापाणी होणें (दूध, दहीं, ताक). [विटणें]

वितंड—वि. १ प्रचंड; विशाळ; मोठें; प्रशस्त. ' तैशी तुझीं मुखें वितंडें । पसरलीं देखे । ' –ज्ञा ११.३७५. ' भव्यरूप वितंड । ' –दा १.२.१०. ' शिवधनुष्या ऐसें वितंड । ' –ह २६.७८. २ मिथ्या; खोटें. ' नियोजिलीं वितंडें । ताळासि येती । ' –ज्ञा १३.२१. ' अवघें मायामय वितंड । स्वप्नवत् क्षणिक हें । ' –ह ६.६५. ३ विचित्र; अघटित; चमत्कारिक. ' यम वर देतसे वितंड कीं तूं सुख पावसी उदंड । ' –कथा ६.१६.१०५. [सं. वि+तड्] –क्रिवि. कुटिल बुद्धीनें; विनाकारण; अट्टाहासानें. ' येणें मांडिलेसे पाखांड । ऐसा निर्भर्त्सितां वितंड । ' –एभा २३.५१९. **०वाद**–पु. अट्टाहासानें खोटा पक्ष स्थापन करण्यासाठीं वादविवाद; मिथ्या वाद; दुराग्रहपूर्वक वाद. (समासांत) **वितंडमत–भाषण–कथा–प्रलाप. वितंडा**–स्त्री. (न्याय) व्यर्थ काथ्याकूट, वादविवाद; अट्टाहासाचा वादविवाद. (प्रतिपक्षस्थापनाहीनो जल्पः वितंडा). [सं.]

वितंडणें—क्रि. (महानु.) वेगवेगळें करणें. ' ताट ताटांतु घाली । परजु परजांतु घाली । ऐसी वितंडौनि सांडी । ' –दृष्टांतपाठ ४०.

वितर्णें—अक्रि. वर्तणें; घडून येणें, गुजरणें. 'मुक्ताबाई म्हणे चांगया नवल वितलें।' –चांगदेवगाथा २२. 'नवल वितलें पहा काई।' –रास २.५५३. 'कृष्णातीरीं वितला प्रसंग हो।' –सप्र १७.९. [सं. वृत्]

वितर्णें—अक्रि. (कों.) वितुळणें; पातळ होणें; विरणें. [वितळणें]

वितर्णें—अक्रि. विटणें. 'बहुत वितला याकाळें।' –निगा ३७.

वितत—वि. पसरलेलें; ताणलेलें; ओढलेलें. [सं वि+तत]

वितंत—क्रिवि. सुसंगत; मिलाफदार; सुस्वर. 'तंत वितंत घन सुस्वर। वाद्यें वाजविती परम मधुर।' –ह १०.१३६. [वि+तंतु]

वितथ—वि. असत्य; खोटें; अप्रमाण; मिथ्या; निराधार. [सं. वि+तथा]

वितरणें—सक्रि. देणें; बहाल करणें. 'येणें प्रसन्न होवूनि अभय तूं वितर।' –भक्तमयूरकेकावली १०४. 'सौख्य सुधा वितरो.' **वितरण**–न. देणगी; बक्षीस; लाभ. 'देओ वितरण जीमुती। पृथ्वी करी अनार्ती।' –ऋ ५२. [सं. वि+तृ–तर्]

वितरेक—पु. व्यतिरेक पहा.

वितर्क—पु. १ विचार; कल्पना; अंदाज; युक्ति; योजना; बेत; तरंग. या शब्दाचा बहुधा अनेकवचनी उपयोग करतात व अशा ठिकाणीं त्यामध्यें अफाटतेची, भ्रमणाची, दूरान्वयाची झांक असते. २ विस्तरशः विचार; सर्व बाजूंचा, शक्याशक्यतेचा विकल्पांचा, परिणामांचा वगैरे विचार. [सं. वि=विशेष+तर्क] **वितर्कण**–न. चर्चा; वाटाघाट; वादविवाद; सर्व बाजूंनीं विचार; साधकबाधक सर्व गोष्टींचा विचार. **वितर्कणें**–अक्रि. १ दूरवर तर्क चालविणें; अफाट कल्पना करणें; विलक्षण गोष्टी मनांत आणणें, योजणें. २ –सक्रि. मोकळेपणानें चर्चा करणें; कसून वादविवाद करणें; साधकबाधक सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करणें. (गो.) **वितर्कुक. वितर्कित**–वि. सर्व बाजूंनीं चर्चा, विचार केलेला. **०दृष्टि**–स्त्री. (नृत्य) खालीं पहाणें, बुबुळ उंच करणें, डोळे वटारून पाहणें (आठवण व विचार दर्शविणारा अभिनय).

वितल—न. सप्तपातालांपैकीं दुसरें पाताल. [सं.]

वितवितणें—अक्रि. (कों.) चरफडणें; धुसफुसणें; आरडाओरड करणें. [उतणें] **वितवितला**–विक्रिवि. १ गैरशिस्तपणें; अजागळपणें; चिवडाचिवड करून (खाणें वगैरे). २ अजागळ; बावळी; गबाळ (मुद्रा, वतैणूक वगैरे).

वितस्ती—स्त्री. वीत; अंगठ्याच्या टोकापासून करंगळीच्या शेवटापर्यंत अधिकतम अंतर. [सं.]

वित(तु)ळणें—अक्रि. १ विघरणें; विरघळणें; द्रवणें; पाझरणें. २ कोमेजणें; फिकें पडणें; निस्तेज होणें. 'गजबजले लोक समस्त। सकळ रंग वितुळला।' ३ (ल.) फाटाफूट होणें; पांगापांग होणें; विस्कळित होणें; अस्ताव्यस्त पसरणें (आभाळ, ढग, सैन्य, राजकारण. पंचाईत, जमाव, अज्ञान वगैरे). 'तुझिये कृपेचेन बळें। वितुळती भ्रांतीचीं पडळें।' –दा १.२.३. ४ विरणें; फिसकटणें; मधल्यामध्येंच मोडणें; नाहींसें होणें; जिरणें (बेत, मसलती, युक्ति, कल्पना). ५ दयेनें, करुणेनें मन आर्द्र होणें; अंतःकरण पाझरणें. [सं. वि+ताल]

वितान—न. १ छत; चांदवा; छत्र; आच्छादन; मंडप. 'अधिष्ठानावर सुंदर छत्राकार वितान होतें' –सूर्य ३६०. २ विस्तार; पसारा. 'विविध याग वितानें।' –ज्ञा १५.१८ ३ आकाश; शून्य. [सं. वि+तन्]

वितापात्र—वि. (गो.) उद्धट; वात्रट.

वितालळ—वि. बेताल; विसंगत; विलंबित. चालतां बैसे विताळाचा येऊनि धका।' –दावि २३.२. **वितालो**–वि. बेताल वाजविणारा; बेताल. 'वितालो तो वितालें वितंडें वेगळा। –दावि २३.३. [वि+ताल]

वितालु—वि. मोठ्या तालूचें. 'एके दीर्घकंठें वितालें। विकटें एकें।' –ज्ञा ११.१३९.

वितिपात—पु. (अशिष्ट) (प्र.) व्यतिपात पहा.

वितुटणी—स्त्री. ताटातूट; वियोग; फाटाफूट. 'तरी विषयेंद्रियमिळणी। करूनि घाये वितुटणी।' –ज्ञा १६.८९. [वि+तुटणें]

वितुष्ट—न. वैमनस्य; वांकडें; बेबनाव; भांडण. [सं. वि+तुष्टि]

वितुळणें—वितळणें पहा.

वितृष्ण—वि. निरिच्छ; ज्याला कोणतीहि इच्छा, गरज नाहीं असा. 'तरी सर्वविषयीं वितृष्ण।' –ज्ञा १७.३१. [सं.]

वित्त—वि. ज्ञात; माहीत असलेलें; समजलेलें. [सं. विद्=जाणणें]

वित्त—न. १ द्रव्य; धन.' जो बाधोनि असे डोळा। वित्ता-शेतें।' –ज्ञा १३.६८३. २ मालमत्ता; संपत्ति; ऐवज; मालकीच्या वस्तू. [सं. विद्=मिळणें] सामाशब्द– **०घोषणा**–स्त्री. द्रव्याचा ध्यास; पैशासंबंधी चिंतन; धनलोभ. **०प**–पु. कुबेर. **०पिसा**–वि. द्रव्याचें वेड लागलेला; पैशाशिवाय कांहीं सुचत नाहीं असा. **०पिसें**–न. द्रव्याचें वेड; धनलोभ. **०विषय**–पु. धनदौलत; मालमत्ता; ऐहिक संपत्ति; ऐवज; पैसा. [सं.] **०शाठ्य**–न. कृपणता; चिक्कूपणा; कवडीचुंबकपणा, कद्रुपणा; कार्पण्य. [सं.] **वित्तेश**–पु. कुबेर. 'रौप्याद्री तुळिला पदें प्रबळिला वित्तेश विध्वंसिला।' –मुरामाण युद्ध १२५. **वित्तेषणा**–स्त्री. द्रव्याविषयीं इच्छा; धनलोभ. [सं.]

वित्ताण—न. वितान पहा. 'वित्ताणें गुढरे असंख्ये मानु।' –धवळेपु ४८. (पाठभेद).

वित्पत्ति, वित्पन्न—व्युत्पत्ति, व्युत्पन्न पहा. 'नांवासाठीं मेघे भार। नलगे फार वित्पत्ति।' –तुगा ४५८२.

वित्रस्त, वित्रास—वि. भयभीत; भ्यालेला; घाबरलेला; विषादयुक्त; सचिंत. 'इतकी खबर ऐकून मग भाऊ झाले वित्रास।' –ऐपो ४४६. [सं. वि+त्रस्त] **वित्रास**–पु. भय; भीति; दरारा.

वित्रिभलग्न—न. (ज्यो.) त्रिभोनलग्न पहा. [सं.]

वित्थर—पु. पांगापांग; विस्कटलेली स्थिति; गोंधळ; अस्ताव्यस्तपणा (कामधंदा, व्यवहार वगैरेचा). –वि. १ ओळंब्यांत नसलेली (भिंत, दगड, वीट). २ मिश्र; भेसळीचा; भलत्याच प्रकारचा, वाणाचा, वर्णाचा (कपडा, नाणें, वस्तु). ३ (ल.) विचित्र; अनियमित; गैरशिस्त; असंबद्ध (वर्तन, भाषण, कृत्य). विसंगत, असंबद्ध (बोलणें, बरळणें). [वि+थर] **वित्थरणें**–अक्रि. अनिर्बंध वागणें; बेताल होणें; मार्ग सोडून जाणें.

वित्थवित्थ—पु. (चित्पा.) कंड्; खाज. –मसाप २.३६७.

वित्थानक, वित्थानीक—वि. (अशिष्ट) व्यत्थानक पहा.

वित्थापाक—पु. (अशिष्ट) विघडणें; नासणें (तयार होत असलेला पदार्थ, घटना); बिघाड; नाश.

वित्थिका—स्त्री. मार्ग. 'अशा प्रकारची नवी वित्थिका त्यांत निर्माण केली.' –नि ४४२. [सं. वीथिका]

वित्—पु. जाणता, ज्ञाता, ज्ञानी पुरुष. –वि. ज्ञानी.

वित्तुगुडणें—उक्रि. (कों.) लचकणें; उसण, करक भरणें; मुरगळणें.

वित्तेंग्द—वि. (अप.) विदग्ध. 'तंव विद्वद मालतियां बोलिजे। हा हो जी राहिजे।' –शिशु ६७२.

वित्दग्ध—धावि. १ करपलेलें; जळलेलें. 'शुष्कें अथवा स्निग्धें। सुपकें का वित्दग्धें।' –ज्ञा १५.९. २ अर्धकच्चें; अर्धवट शिजलेलें (अन्न). ३ अर्धवट करपलेलें व अर्धवट कच्चें (अन्न). ४ उत्तम शिजलेलें; चांगलें भाजलेलें (अन्न वगैरे). 'शुष्कसुपक्व वित्दग्ध। चतुर्विध अन्नें उत्तम खाद्य।' ५ (ल.) कुशल; चतुर; हुशार; निष्णात. [सं. वि+दह्–दग्ध] **वित्दग्धाजीर्ण**–न. अन्न अर्धवट पचल्यामुळें होणारें अजीर्ण. यांत घशाशीं आंबट येतें. चार प्रकारच्या अजीर्णापैकीं एक प्रकार.

वित्दणी—स्त्री. (ओसवाल) सुन. –बदलापूर २८३.

वित्दध्वी—वि. (ना.) आतताई; विक्षिप्त व खोडसाळ. [विदग्ध अप.]

वित्दरा—वि. कुरूप. 'सुत कोणासही नको वित्दरे।' –मोअनु ६.१०. 'शडांगुळें गेंगाणें वित्दरें।' –दा ३.६.४२. [सं. विरूप]

वित्दरूं—न. (कों.) लहान छिद्र, भोंक [सं. विध्]

वित्दर्भ—पु. वऱ्हाड. 'पूर्वी येकपुरीं वित्दर्भविषयीं दोघे द्विजाती भले।' –विरेश्वर, सोमवारचरित्र ५. [सं.]

वित्दवित्दणें—अक्रि. १ मऊ; बिलबिलीत होणें (फळें वगैरे). २ चरफडणें; वितवितणें. **वित्दवित्दा**–वि. बिलबिलीत झालेला; अविकलेला; अधिक झालेला; उतरलेला (आंबा वगैरे फळ).

वित्दळ—वि. १ डाकलग; डाक लावलेलें; हीणकस. 'वित्दळ बहु चोखा। मीनलिया वाला एका।' –ज्ञा १३.१००८. २ ज्यांत दळ, गर, सार नाहीं असें. [सं. वि+दल]

वित्दळणें—सक्रि. (महानु.) नाश करणें; निर्दालन करणें; मारणें. 'वित्दळीतु भवदुःखा नास्तिविद्या प्रकोपा।' –गस्तो ७. 'जयजय देव प्रबल। वित्दळितामंगळकुळ।' –ज्ञा १८.२ [सं. वित्दलनम्]

वित्दळा—पु. माघांत पिकणारा कुळीथ. –कृषि ३२७.

वित्दा—पु. पाठवणूक; निरोप देणें; रामराम करणें; आशीर्वाद; शुभचिंतन. [अर. बिदाअ] **वित्दाई**–स्त्री. निरोप; पाठवणूक; वियोग; पाठवणी; जातेसमयीं दिलेली भेट, देणगी. **वित्दा करणें**–निरोप देणें; पोंचविण्यास जाणें.

वित्दाण-न—न. १ कौशल्य; चातुर्य; कारागिरी; लाघव. 'जिया अहंकाराचेनि वित्दाणें। जगचि धरिजे।' –ज्ञा ७.२१. 'मांडिलें वित्दान। ख्याल सुखाचें संधान।' –तुगा १३३. 'वेगीं वित्दान पाहे माझें' –एरुस्व ९.१४. २ कपट; कारस्थान; युक्ति; व्यूह; कावा. 'छलितयां वित्दाणा–। मार्जी जूं तें मी विचक्षणा।' –ज्ञा १०.२८४. 'आटु वेगु वित्दाणु। आशा शंका प्रतारणु।' –ज्ञा १३.२७१. ३ निग्रह; वेध; लक्ष. 'जैं इंद्रियां वित्दाण लागे।' –ज्ञा ६.३६५. 'मुकलें पूर्वस्थान। स्वरूपाचें वित्दान।' –भज २६. ४ लीला; चमत्कार, चरित्र; करणी; गती 'मायेचें परम वित्दाण।' –रावि ६.६७. 'ऐसें कर्माचें वित्दाण। भोगिल्याविण सुटेना।' –शनि २०३. 'केलें वित्दाण ठाईंच।' –दावि २.९५. [सं. विज्ञान] **वित्दानी**–वि. कुशल; कारागीर. 'मंडपाची रचना हरुषें करी विश्वकर्मा वित्दानी।' –धवळे उ १४. 'ऐसा व्यासें वित्दाणिये। गीता प्रासादु सोडणिये।' –ज्ञा १८.४४. –पु. कारागीर. 'तरी आतां कोकुनामें वित्दानी।' –कथा २.१५.१०१.

वित्दारणें—उक्रि. १ फाडणें; चिरणें. 'तें चौभेरी गिधीं वित्दारिजे।' –ज्ञा २.२००. 'वित्दारिन कुंभस्थळें।' –एरुस्व १०.५५. २ फोडणें; तोडणें; तुकडे करणें. ३ (काव्य.) टार मारणें; वधणें; कत्तल करणें. 'हिरण्यकश्यप वित्दारिला। भक्त प्रल्हाद रक्षिला।' –तुगा २५२७. ४ (ल.) विचिकित्सा करणें; उघडणें; उकलणें; फोड करून सांगण (विषयाची). ५ (ल.) पांगापांग करणें; फाटाफूट करण; फांकाफांक करणें; पळवून, हुसकून लावणें. 'जैसा गज घटा आंतु। सिंह लीला वित्दारितु।'

–ज्ञा १.१६२. [सं. वि+दृ=फोडणें, चिरणें] **विदारक**–वि. फाडणारा; चिरणारा. **विदारण-णा-णी**–नस्त्री. विदारण्याची क्रिया (सर्व अर्थी). **विदीर्ण**–वि. फाडलेलें; भग्न. **विदारणीय, विदार्य**–वि. फाडण्यासारखें. **विदारित**–धावि. फाडलेलें. **विदारुंक**–धाअ. (गो.) फाडावयास. **विदारून सांडणें-स्रोडणें**–पांगापांग करणें; उधळून लावणें; पळवून लावणें. ' कीं जलदजाल प्रभंजन । विदारून सांडी जैसा । ' **विदारण्या**–वि. भांडाभांडी लावणारा; भेद करणारा; चहाड; चुगलखोर; आगलाव्या.

विदारणें—अक्रि. (कु.) स्वैर, स्वच्छंदी होणें; उधळणें; व्यसनी होणें; अनिर्बंध वर्तन करणें. [सं. वि+दृ]

विदारी—पु. १ मणि किंवा मोती यांस वेज, छिद्र पाडणारा. २ क्षत्रिय माता व वैश्य पिता यांची संतति. [सं. विध्]

विदाह—पु. १ ज्वलन; पेटणें; जळण्याची क्रिया. २ भयंकर आग; धगधगित उष्णता; उष्मा. [सं. वि+दह्] **विदाहक, विदाही**–वि. १ जाळणारें. २ (ल.) पाचक; खाणारें; गंज चढविणारें (धातूस); नाशकारक; कुजविणारें.

विदित—धावि. १ ज्ञात; माहीत; ठाऊक; प्रख्यात. ' विदित पायांपाशीं सर्व आहे । ' –तुगा १५१२. २ कळविलेलें; जाहीर केलेलें; सूचित. [सं. विद्=जाणणें]

विदिशा—स्त्री. पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर या चार मुख्य दिशांतील प्रत्येकीं दोहोंपैकीं उपदिशा; आग्नेयी, नैर्ऋत्य, वायव्य व ईशान्य या दिशा. [सं.]

विदुर—वि. ज्ञानी; शाहणा; माहितगार; अनुभवी. [सं. विद्=जाणणें]

विदुर—पु. १ धृतराष्ट्राच्या धाकट्या भावाचें नांव. २ अनौरस मूल; मिश्र संतति; मिश्र संततीची एक जात. ३ (सांकेतिक) माहादजी शिंदे; पुढें दौलतराव शिंदे. ' विदुर पुढें गेलें '–ख ४७५९. ' इनामगांव विदुरांकडून जप्त झालें । ' –अस्तंभा ८१. [सं.] **विदुर चांभार**–पु. मराठा चांभारांपैकीं एक पोटजात.

विदुर—पु. (शाप.) एक अल्कमृत्तिकाधातु. (इं.) बेरिलियम.

विदुषी—स्त्री. विद्वान स्त्री.

विदू—वि. जाणता; जाणणारा; ज्ञानी. ' भावे क्रीडा सर्व विदूंस माजी । ' –मॅगीश राधाविलास ३.

विदूषक—पु. नाटकांतील एक विनोदी पात्र; खुषमस्कऱ्या. [सं.]

विदूसणें—सक्रि. तोडणें; फोडणें; नाहींसें करणें. खराब करणें; बिघडविणें. [सं. वि+दूष्] ' हिऱ्यारत्नाची जोडी विदूसकि । ' –ऐपो १४४.

विदेश—पु. परदेश; अन्यदेश; भिन्नदेश. ' मार्ग चुके विदेशी एकले । ' –तुगा १५३८. ' विदेश पळणीं नागवण । ' –दा ३०.७.८१. [सं. वि+दिश्] **०गमन**–न. परदेशीं जाणें; देशत्याग; देशांतरास जाणें. **०वास**–पु. परदेशांत राहणें, रहिवास. **०स्थ**–वि. परदेशीं राहणारा. **विदेशी-य**–वि. परदेशी; परदेशांतून आलेला; परदेशचा. ' विदेशी कापडाची होळी केली । ' –के १७.५.३०.

विदेह—पु. १ जनक राजा. २ एक देश. ३ एक नगर. –वि. १ देहरहित; अशरीर. ' विदेहासि देहधर्म । आरोपिती । ' –ज्ञा ९.१५६. २ देहातीत; मुक्तदेह; देहाचा विसर पडलेला; देह असून नसल्यासारखा. ' तैसा देहींच जो असे । विदेह दृष्टि । ' –ज्ञा १८. ४३५. [सं. वि+देह] **०मुक्त**–वि. जीवंतपणींच मुक्त झालेला. ' अचेतन ते विदेह मुक्त । ' –दा ७.६.४६. **०मुक्ति**–स्त्री. ब्रह्मलोकांतील अखेरची मुक्त अवस्था. ' ब्रह्मलोकीं जाऊन जेथें अखेर मुक्ति मिळत असल्यामुळें विदेहमुक्ति अशीं दुसरीं नांवें आहेत । ' –गीर २९५. **०स्थिति**–स्त्री. १ देह व आपण निराळे अशी मानण्याची प्रवृत्ति, मनाची अवस्था. २ देहाची स्मृति नष्ट झालेली अवस्था; ज्ञानी पुरुषाची निर्विकल्प स्थिति, समाधि. ' तुकयास उबग न येई चित्तीं । विदेह स्थिति जाहाला । '. **विदेही**–वि. १ देहातीत; देहभान विसरलेला. २ शारीरिक अथवा ऐहिक विषयांची आसक्ति नष्ट झालेला.

विदोर—पु. (विणकाम) ताणा ताठ करण्यासाठीं हातखुंटयास बांधलेली दोरी.

विदोशा, विद्दोशा, विधोशा—वि. विध्वंस करणारा; नाश करणारा; उधळया. [सं. विध्वंस] **विदोस, विधोस**–पु. (अप.) विध्वंस; नाश; वाटोळें.

विद्वावळी—स्त्री. (गो.) खरडपट्टी.

विद्रोग—पु. (गो.) दैन्यावस्था. [विपत्ति+भोग]

विद्राट—स्त्री. (गो.) नासाडी. [विध्वंस]

विद्ध—धावि. १ वेधित; सच्छिद्र; भोंक पाडलेला; टोंचलेला. २ आकर्षित; गुंग केलेला. ' नादे विद्धा मुरारी । ' –गस्तो २५. [सं. विध्=भोंक पाडणें]

विद्यमान—स्त्री.न. साक्षी; समक्षता; हजेरी; गुजारत. –धावि. १ अस्तित्वांत असलेला; हयात असलेला. २ वर्तमान; सांप्रतचा. –शअ. देखत; समक्ष; हजेरींत; मार्फत; कडून. [सं. विद्=असणें]

विद्या—स्त्री. १ ज्ञान; विद्वत्ता. ' विद्या याचा अर्थ ज्ञान असाच विवक्षित आहे । ' –गीर २७३. २ ब्रह्मज्ञान; ब्रह्मात्मैक्यज्ञान. ' यासच विद्या असेंहि म्हणतात । ' –गीर २७२. ३ उपासनामार्ग; ज्ञानप्राप्तीचें साधन. ' विद्या म्हणजे ईश्वरप्राप्तीचा मार्ग आणि तो ज्या प्रकरणांत सांगितला असतो त्याला हि

विद्या हेच नांव अखेर देण्यांत येतें।' –गीर २०४. ४ कला. (चित्र, रंग वगैरे) चौदाविद्या पहा. [सं. विद् = जाणणें] **॰गुरु**–पु. १ शिक्षण देणारा, शास्त्रादि ज्ञान देणारा गुरु. परमार्थज्ञान देणारास मोक्षगुरु म्हणतात. २ अध्यापक; कोणत्याहि विषयांत प्रावीण्य मिळवलेला विद्वान मनुष्य. **॰धन**–न. १ ज्ञानरूप संपत्ति. 'ऐसें एकचि विद्याधन अद्भुत गुण न हा दुजांत वसे।' –विद्याप्रशंसा. २ अविभक्त कुटुंबांतील भागीदारानें स्वतःच्या विद्येपासून मिळविलेलें धन. हें स्वकष्टार्जित म्हणून खासगी समजलें जातें. **॰परिषद**–स्त्री. शिक्षणपरिषद. 'मुसलमानांची अलीगढ येथें विद्यापरिषद भरली होती.' –टि १.२६८. **॰पात्र**–न. विद्येचें स्थान; विद्वान मनुष्य. 'विद्यापात्रें कळापात्रें।' –दा १.८. २३. **॰पीठ**–न. १ विद्यामंदिर; ज्ञानमंदिर; विद्या शिकविणारी संस्था, स्थान. २ विश्वविद्यालय; (इं.) युनिव्हर्सिटी. **॰बंधु**–पु. गुरुबंधु; सहाध्यायी. **॰वान्**–वि. (विरू.) विद्यावंत; विद्वान; विद्येंत प्रवीण, निपुण; शास्त्री. **॰वेतन**–न. शिष्यवृत्ति; विद्याभ्यास आर्थिक मदत. 'दोन होतकरु विद्यार्थ्यांस सरकारी विद्यावेतन देऊन युरोपांत पाठविण्यांत आलें.' –ऐरा ५६. (प्रस्तावना) **विद्यानंद**–पु. ज्ञानापासून होणारा आनंद. **विद्यानुराग**–पु. विद्येची आवड, गोडी; विद्याप्रेम. **विद्यानुरागी**–वि. विद्येची आवड असणारे. 'ॲनराणीचे कारकीर्दीत बहुतेक सर्व विद्यानुरागी लोक राजनितिविषयक ...' –इंमू ४५०. **विद्याभ्यास**–पु. शास्त्राचें अध्ययन; शिक्षण. **विद्यार्थी**–पु. १ शिकणारा; अभ्यास करणारा; विद्यार्जन करणारा. २ (ऐतिहासिक कागदपत्रांत) शागीर्द. ३ शिष्य; चेला; विद्येकरितां गुरूची सेवा करून राहणारा. **विद्यालय**–न. शाळा.

विद्याधर—पु. एक देवयोनि.

विद्युत्—स्त्री. वीज; बिजली; एक नैसर्गिक शक्ति; (इं.) लाइटनिंग, इलेक्ट्रिसिटी. [सं.] **॰कण**–पु. विद्युच्छक्तियुक्त अत्यंत सूक्ष्म परमाणु. (इं.) इलेक्ट्रोन. 'पदार्थविज्ञानशास्त्रज्ञाला विद्युत्कणांची मालिका दिसते.' –विचारविलास २८. **॰गतिशास्त्र**–न. विजेच्या गतीसंबंधीं शास्त्र. (इं.) इलेक्ट्रो डायनामिक्स. **॰घंटा**–स्त्री. विजेनें वाजणारी घंटा. **॰चक्र**–न. वीज वाहण्याचा वाटोळा मार्ग. (इं.) सर्कीट. **॰चुंबक**–पु. विजेच्या प्रवाहामुळें ज्यांत लोहचुंबकाची शक्ति उत्पन्न होते असा लोखंडाचा तुकडा. (इं.) इलेक्ट्रो मॅग्नेट. **॰चुंबकत्व**–न. विजेच्या प्रवाहामुळें लोहचुंबकाची शक्ति उत्पन्न होण्याचा धर्म. (इं.) इलेक्ट्रोमॅग्नेटिझम. **॰जन्य**–वि. विजेपासून उत्पन्न झालेला. **॰जागृति**–स्त्री. विद्युल्लतेचे परिणाम दिसुन येणारी स्थिति. (इं.) इलेक्ट्रिफिकेशन; चार्जॲफ इलेक्ट्रिसिटि. **॰धनु**–न. वीजेचें वलय. (इं.) इलेक्ट्रिक आर्क. **॰दर्शक**–पु. विजेचें अस्तित्व दाखविणारें यंत्र. (इं.) इलेक्ट्रोस्कोप. **॰दीप**–पु. विजेचा दिवा. **॰दृक्शास्त्र**–न. विजेचा आणि दृष्टीचा संबंध अभ्यासिणारें शास्त्र. (इं.) इलेक्ट्रोऑप्टिक्स **॰धातुशोधन**–पु. विजेचा धातूंवर परिणाम अभ्यासिणारें शास्त्र. (इं.) इलेक्ट्रोमेटालर्जी. **॰रोधक**–वि. विजेच्या गतीस अडथळा करणारा; अप्रवाहक. (इं.) नॉनकंडक्टर. **॰परमाणु**–पु. विद्युत्कण. (इं.) इलेक्ट्रॉन. **॰पात**–पु. वीज पडणें; विजेचा धक्का. **॰पृथक्करण**–न. विजेच्या साहाय्यानें पदार्थाचें पृथक्करण. (इं.) इलेक्ट्रोलिसिस **॰प्रकंपन**–न. विजेमुळें होणारीं आंदोलनें. (इं.) इलेक्ट्रिक ऑसिलेशन. **॰प्रवाह**–पु. विजेचा प्रवाह. (इं.) इलेक्ट्रिक करंट. **॰प्रवाहमंडळ**–न. विद्युच्चक्र. (इं.) इलेक्ट्रिक सर्कीट. **॰बल**–न. विजेची शक्ति. (इं.) इलेक्ट्रिक पोटेन्शल. **॰मत्स्य**–पु. विजेची वांब; एक मासा. (इं.) इलेक्ट्रिक ईल. **॰मानसशास्त्र**–न. मनुष्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या ममांतील रहस्य शोधून काढण्याची विद्या. **॰मापक**–पु. वीज मोजण्याचें यंत्र. (इं.) इलेक्ट्रोमीटर. **॰यंत्र**–न. विजेनें चालणारें यंत्र. (इं.) इलेक्ट्रिक मशीन. **॰रोधक**–वि. विजेच्या प्रवाहास प्रतिबंध करणारा. (इं.) नॉन–कंडक्टर; बॅड कंडक्टर. **॰लहरि**–स्त्री. विजेची लाट. विजेनें उत्पन्न होणारें कंपन (इं.) इलेक्ट्रिक वेव्ह. **॰वहन**–न. वीज वाहण्याची, जाण्याची क्रिया. (इं.) कंडक्शन. **॰वांब**–स्त्री. विद्युन्मत्स्य; एक मासा. (इं.) इलेक्ट्रिक ईल. **॰वाहक**–वि. वीज वाहून नेणारा; विजेच्या प्रवाहास अनुकूल. (इं.) कंडक्टर. **॰वाहकत्व**–न. वीज वाहून नेण्याची शक्ति. (इं.) कंडक्टिव्हिटी. **॰विच्छेदन**–न. विजेच्या साहाय्यानें पृथक्करण. (इं.) इलेक्ट्रोलिसिस. **॰संग्राहक–संचालक**–पु. वीज सांठवून ठेवण्याचें पात्र. (इं.) अक्युम्युलेटर **॰स्थापक**–वि. विद्युद्रोधक. **॰स्फुलिंग**–न. विजेची ठिणगी. **॰क्षेत्र**–न. विजेनें व्यापलेली जागा. (इं.) इलेक्ट्रिक फील्ड.

विद्युन्माला—स्त्री. एक समवृत्त. याच्या चरणांत आठ अक्षरें असुन म म ग ग हे गण असतात. [सं.]

विद्युल्लता—स्त्री. चमकणारी वीज; चपला. 'जैसी विद्युल्लता झळके मेघीं।' –तुगा ७३३. [सं.]

विद्योत—पु. प्रभा; तेज; लकाकी. [सं. वि+द्युत्]

विद्रधि—पु. क्षत; चरणारा व्रण; गळूं; उठाणुं; काळपुळी; पूयुक्त फोड. वात–पित्त–कफ–रक्त–क्षत–त्रिदोष–ज विद्रधि. [सं.]

विद्रा, विद्रूप—वि. विरूप; कुरूप. [सं. विरूप]

विद्रावक—वि. वितळणारा. **विद्राव्य**–वि. वितळण्यासारखा; विरण्यासारखा, पाण्यांत विरघळणारा. (इं.) सोल्यूबल. **विद्रुत**–वि. विरघळलेलें; द्रवरूप झालेलें. (इं.) डिझॉल्व्ह्ड.

विद्रुम—न. पोवळें; प्रवाळ. 'जीचा धरी अधर विद्रुम भावना कीं।' –र. [सं.] **०वर्ण**–वि. पोवळ्यासारख्या रंगाचा. 'विद्रुमवर्ण अधर सतेज।'

विद्रोह—पु. शत्रुत्व; वैर. [सं.]

विद्वेषे—वि. (गो.) विजवटा पहा. नाश करणारा.

विद्वान्—वि. ज्ञानी; जाणता; पंडित; पारंगत; व्युत्पन्न. [सं. विद्=जाणणें] समासांत याचें विद्वत् असें रूप होतें. सामाशब्द– **विद्वत्कुल**–न. पंडितांचा समूह. [सं.] **विद्वज्जन**–पु. विद्वान; तत्त्वज्ञानी; ज्ञानी; शहाणा. **विद्वत्ता**–स्त्री. पांडित्य; ज्ञान; शहाणपणा. **विद्वन्मंडल**–न. पंडितसमूह. **विद्वन्मान्य**–वि. पंडितांकडून सन्मानित; पंडितांस पूजित; आदरार्थी पत्रांत लिहितात. **विद्वत्सन्यास**–पु ज्ञानप्राप्तीनंतर केलेला त्याग. **विद्वांस**–वि. विद्वान. 'विद्वांसास अधिक प्रीति।' –दा ७.९.४५. [सं. विद्वान्चे अव]

विद्वेष—पु. द्वेष; तिरस्कार; मत्सर; हेवा. **विद्विष्ट**–वि. द्वेष केलेला; तिरस्कार केलेला. [सं.] **विद्वेषक, विद्वेषी, विद्वेष्टा**–वि. मत्सरी; हेवेखोर; वैरी; शत्रु; अत्यंत विरोधी.

विध—पु. प्रकार; तऱ्हा; जात; घाट; आकार. उदा० द्विविध; त्रिविध; बहुविध; नानाविध. [सं.]

विध—पु. विधी; नियम; रीति. 'नेणें पाळुं विध करुणा भाकी।' –तुगा १५६६. [सं. विधि]

विंध—न. छिद्र; भोंक; वेज. [सं. विध्=छेद पाडणें] **०काम**–न. (कों.) छिद्रें, वेजें पाडण्याचें काम. **विंधणें**–न. छेद पाडण्याचें हत्यार; किंकरें. –क्रि. भोंक पाडणें; छेद, छिद्र, वेज पाडणें; रोंचणें; शस्त्रानें आघात करणें. 'दूर देखोनि विंधिला बाणीं।' –मुआदि ७.६५. **विंधरू-क**–न. (कों.) छिद्र; भोंक.

विंधडणें—क्रि. बिघडणें; नासणें. 'प्रचीतीविण औषध घेणें। तरी मग धडचि विंधडणें।' –दा १०.८.६. [सं. विघटन; वि+घड]

विंधणू—स्त्री. अकालप्रसूतिमुळें प्राण्यांच्या गर्भाशयांत उत्पन्न होणारी शुष्कता, रुक्षता. [सं. विदहनम्]

विंधरणें—क्रि. छिन्नभिन्न होणें; घायाळ होणें. 'विंधरे वृंद जितांचा दुःखभरे।' –विक ३८. [सं. विध्]

विधर्मी—वि. १ अन्य धर्माचा. २ अधर्मानें वागणारा; पाखंडी; धर्मशत्रु. [सं.]

विंधवरा—वि. विजवटा पहा.

विधवा—स्त्री. गतभर्तृका; पति निवर्तलेली स्त्री; नवरा मेलेली स्त्री. [सं. वि+धव=नवरा] **०विवाह**–पु. गतभर्तृकेचें पुन्हां लावलेलें लग्न; पुनर्विवाह. [सं.]

विधवार—स्त्री. नाश; फडशा; उधळपट्टी. (क्रि० लावणें; लागणें; होणें). (गो.) विधवाडचें=नाश करणें. [सं. विविध+वाट]

विधाता—पु. १ निर्माणकर्ता; व्यवस्थापना करणारा; नियमन, स्थापना करणारा; सृष्टिकर्ता. २ ब्रह्मदेव. 'काय विधात्यानें घातलीसे रेखा।' –तुगा १६१५. [सं.]

विधान—न. १ स्थापना; आधान; स्वाधीन करणें; ठेवणें; कर्तव्य. 'तेथें राजा कौंडण्यपती। विधान स्थिति करितसे।' –एरुस्व ५.१४. 'पलंगीं पुतळ्याचें करा ग विधान।' –प्रला १३९. २ सांगणें; कथन; अस्तिनास्ति पक्षीं म्हणणें मांडणें. 'धर्मशिक्षणाची आवश्यकता नाहीं असें बेधडक विधान करणें या सारखें धाडस नाहीं.' –केले १.१४९. ३ आदेशणें; नियम घालणें, स्थापित करणें. ४ आज्ञा; नियम; अनुशासन. 'मनुष्यावाचूनि विधाना। विषय नाहीं।' –ज्ञा १५.१७८.५ (कार्यास, कृत्यास, कामास) लावणें; नेमणूक; योजना. 'जे ते वैदिक विधानीं। योग्य म्हणौनि।' –ज्ञा १८.८१९. ६ विधि; पद्धति; क्रिया. उदा० पूजाविधान; होम विधान; व्रत विधान. 'यज्ञीचें विधान सरे।' –ज्ञा ४.१५०. 'प्रायश्चित्ताची विधानें। सांगेन ऐका स्थिर मनें।' –गुच २८.८०. ७ (व्या.) उपसर्ग, प्रत्यय लावणें. [सं. धा=ठेवणें]

विधायक, विधार्या—वि. १ स्थापना करणारा; नियमन करणारा; योजना, नेमणूक, व्यवस्था करणारा; उभारणी, जोडणी, आखणी करणारा. २ प्रत्यक्ष कृतिरूप; दृश्य परिणामी; कार्यकारी; परिणामकारक. 'त्यांचें कार्य विधायक स्वरूपाचें नसून विध्वंसक स्वरूपाचें होतें.' –वस्व ५. [सं. धा=ठेवणें]

विंधान—न. संधान; नेम; योजना. (क्रि० करणें; बांधणें; धरणें; लावणें). [सं. वेधन]

विंधारी—पु. मोत्यांस वेजें, छिद्रें पाडणारा. [सं. विध्]

विधि-धी—पु. १ नियम; शास्त्राची आज्ञा; वेदविहित क्रिया, कर्म वगैरे. 'विधीतें पाळित। निषेधातें गाळित।' –ज्ञा १२.७७. २ पद्धति; कर्म करण्याची रीत; धार्मिक कृत्याचा प्रयोग. उदा० उद्यापनविधि; उपासनाविधि; दानविधि; स्नानविधि; होमविधि; व्रतविधि; पूजाविधि. 'क्रियाविशेषें बहुतें। न लोपिती विधीतें। निपुण होऊन धर्मातें। अनुष्ठिती।' –ज्ञा २.२४९. ३ सामान्यतः नियम; आज्ञा; विधान; अनुशासन; आदेश; कल्प. 'विधि हाचि मान्य आहे।' –मोआदि ४.१४.४ दैव; प्रारब्ध; नशीब. 'स्थिर न राहे माझी बुद्धि। तरी हा आपुलाचि विधि। सुजाण राया।' –कथा ६.१९.१५९. ५ ब्रह्मदेव; सृष्टिकर्ता. 'तें निर्मितो विधि विभूषण भूमिकेचें।' –वामन स्फुटश्लोक (नवनीत पृ.१४१). 'अतर्क्य महिमा तुझा गुणहि फार बाहे विधी।' –केका १४०. ६ शास्त्रवचन; धर्मग्रंथातील वाक्य, आधार; प्रमाण. ७

तऱ्हा; प्रकार; रीत. 'गऱ्हवारे हा विधी। पोट वाढविलें चिंधी।' –तुगा ६२५. 'लिहिल्या विधे येईन मी त्वरें।' –होला ३४. ८ योजना; क्रिया. 'कवण कार्याचिये विधि। तुम्ही आलेती कृपानिधि।' –एरुस्व ३.४३. [सं. विधू=विधान करणें] ०अंड– न. ब्रह्मांड; विश्व; भूगोल. 'तडतडि विधिअंड त्रास दे...' –वामन-सीता स्वयंवर. [विधि+अंड] ०किंकर–पु. कर्मांचा दास. 'मग विधिकिंकर तो नव्हे।' –यथादी ३.२२९९. ०दृष्ट–वि. वेदविहित; शास्त्रोक्त; साधार; सप्रमाण. ०निषेध–पु. अमुक बरें, अमुक वाईट, अमुक करावें, अमुक करूं नये यासंबंधी नियम; बंधन; नियम; कर्तव्याकर्तव्य. 'एथ सारासार विचारावें। कवणें काय आचरावें। आणि विधिनिषेध आघवे। पारुषता।' –ज्ञा १.२४६. [विधि+निषेध] ०निषेधातीत–वि. १ ब्रह्मज्ञान प्राप्त होऊन मुक्त स्थितीस गेल्यामुळें ज्यास सामान्य धर्मनियम बंधनकारक नसतात असा; सर्व नियमांच्या पलीकडे गेलेला. २ (उप.) स्वैर, अनिर्बंध वागणारा. [विधि+निषेध+अतीत] ०पूर्वक–वि. नियमानुसार; यथासांग; योग्य प्रकारें. [विधि+पूर्वक] ०भंजक–वि. (व्या.) नियम मोडणारा; सामान्य नियमांत न येणारा; अपवादभूत. [विधि+भंजक] ०भंजन–न. नियम मोडणें; अपवाद होणें. ०मंडळ–न. कायदे, नियम करणारी संस्था, सभा. (इं.)लेजिस्लेटिव्ह कौन्सिल. ०मंत्र–पु. विधियुक्त मंत्रसंस्कार; नियमानुसार सर्व धर्मकृत्य. 'मग जाहला विधिमंत्र। चारी दिवस।'–कथा १.७.२०७. ०मुख–न. सच्चिदानंद स्वरूपाचें वर्णन. –हंको. ०युक्त–वि. विधिपूर्वक; शास्त्रोक्त; वेदविहित; शास्त्राज्ञेप्रमाणें. ०लिखित-लिपी–स्त्री. ललाटरेषा; ब्रह्मलिखित. 'आपले सुख खास गमावशील ही विधिलिपी समज.' –कल्याणी, नवयुग. ०वत्–क्रिवि. विधीप्रमाणें; शास्त्रोक्त; यथायोग्य; वेदविहित पद्धतीप्रमाणें. ०वाक्य–न. शास्त्रवचन; वेदवचन; वेदवाक्य. ०वाचक धातुसाधित–न. कर्तव्यबोधक धातुसाधित; नियम घालून देणारें धातुसाधित. उदा० करावें; धरावें इ०. ०विधान–न. शास्त्राज्ञा किंवा नियम यांस अनुसरून सांगणें, बोलणें, योजणें ठरविणें, वर्तन करणें. [विधि+विधान] ०विवर्जित–वि. शास्त्रमर्यादेचें बंधन नसलेला; नियमांपलीकडील. 'मज विधिविवर्जिता व्यवहारु। आचारादिक।' –ज्ञा ९.१५७. ०विवाह–पु. यथाविधि लग्न. 'निर्धारेसीं तुझी जाया। मी जाहलेंसे यदुराया। विधिविवाह तुवां कीजे।'–एरुस्व ४.१४. ०विशेषण–न. (व्या.) क्रियापदाबरोबर योजलेला गुणवाचक शब्द; विशेषणाचा एक प्रकार. ०वृत्ति–स्त्री. (निषेधवृत्तीच्या उलट) प्रत्यक्ष कृति, क्रिया करावयासाठीं आज्ञा करण्याची पद्धति. रोख, तऱ्हा, स्थिति, नियमन. –वि. (निषेधक नव्हे तें) प्रत्यक्ष नियम, कृति, कार्य सांगणारें; अनुज्ञापक. ०संकुचित-संकोचित–वि. नियमबाह्य; अपवादभूत; नियमांत न येणारें. ०संकोच–पु. अपवाद. विध्युक्त–वि. वेदविहित; शास्त्रांत सांगितलेलें; धर्मग्रंथांत सांगितलेलें. 'किती आज्ञमनें शौच्य विध्युक्त चाले।' –दावि १७९.४.– अप विध्योक्त. 'श्रीराम समर्थ विध्योक्त अर्चनें।' –सप्र ११.१३५. [विधि+उक्त]

विंधी—स्त्री. १ (कों.) भोंक; छिद्र; वेज. २ खोबण; कुसुंचें घर. [सं. विध्]

विधु—पु. १ चंद्र. २ (लेखनांत अक्षरसंख्या) एक ही संख्या. [सं.]

विधुर—पु. पत्नी मेलेला पुरुष; गतस्त्रीक मनुष्य; ज्याची बायको मेली आहे असा पुरुष. [सं.] –न. दुःख; कुश्चल; संकट. 'सर्वहि हेतु सुखाचा स्वापत्यांचा तसा न विधुराचा।' –मोआदि ३५.८. विधुराग्नि–पु. बायको मेली तरीहि ठेवलेला स्मार्ताग्नि. [सं.]

विधुर—वि. व्यंग; अपूर्ण; अधुरा; अर्धवट; सदोष.

विधुळणी—स्त्री. धूळधाण; विध्वंस; नाश. विधुळणीस पडणें–मिळणें–होणें–पाडणें–मिळवणें–मिळवून टाकणें–धूळधाण करणें; विध्वंस करणें; नाश करणें; नायनाट करणें. [सं. विधूलन] विधुळणें–उक्रि. धुळीस मिळणें, मिळवणें; उधळणें; नाश करणें, होणें. 'आहाळी ते पूजा विधुळे।' –ज्ञा १७.७. 'तेथ गुळीचा गाडा विधूळणें।' –ऋ १२०. 'ब्रह्मज्ञान विधुळिते।' –विउ ७.७५.

विधूम—वि. धूम्ररहित; निर्धूम; धूर नाहीं असा. [वि+धूम]

विधेय—न. १ विधीनें विहित गोष्ट; आज्ञापित गोष्ट; कर्तव्य. २ (व्या.) उद्देश्याविषयीं वाक्यांत जें सांगितलें असतें तें. [सं.] ०वाचक–वि. (व्या.) कर्मवाचक; उद्देश्यासंबंधी सांगणारें. ०विस्तार–पु. (व्या.) विधेयासंबंधीचा वाक्यांतील अधिक भाग; वाक्यांश.

विधोटा—वि. विजवट, विधवटा पहा.

विंध्य—पु. एक मोठा पर्वत. हिंदुस्थान व दख्खन यांमधील पर्वतांची रांग.

विध्यर्थ—पु. (व्या.) धर्म, शक्यता, योग्यता इ० अर्थांचा जो बोध क्रियापदाच्या रूपापासून होतो तो.

विंधुका, विंधू, विंधूक—पु. (कों.) लहान छिद्र. [विंधणें]

विध्वंस—पु. १ मोडतोड; भंग; चुराडा; स्फोट. २ सामान्यतः नाश. [सं. वि+ध्वंस्] ०क–वि. नाश करणारा. ०णें–उक्रि. नाश करणें; मोडणें, तोडणें, फोडणें इ०. 'भवासहित अज्ञानातें। ब्रह्मज्ञान विध्वंसिलें।' ०न–न. नाश; मोड; तोड; चुराडा. विध्वंसित, विध्वस्त–वि. १ मोडलेला; तोडलेला; नाश केलेला. २ नाश पावलेला.

विन-ना—शअ. वांचून; शिवाय.

विनक—न. छावणी; तळ; राहुटी; तंबू. 'सेनेसमीप निवांत स्थान पाहून । विनक दीधलें आपुलालें ।' –जै ७६.२९.

विनग्न—वि. अगदीं नग्न; पूर्णपणें नागवा; उघडा. [सं. वि+नग्न]

विनट—पु. १ प्रीति; आवड. 'मज कीरूं तुझाचि विनटु ।' –भाए ८३. २ मित्र; खेळगडी; प्रीतींतील मनुष्य. 'संकल्पु ययाचा इष्टु । अहंकारु विनटु ।' –ज्ञा १४.११४. **विनटणें**–अक्रि. रंगून जाणें; मग्न होणें; गर्क होणें; तल्लीन होणें; आसक्त होणें; रमणें; रममाण होणें. 'कलत्र भावें विनटली ।' –एरुस्व ३.४७. [सं. वि+नट्]

विनत—वि. १ वांकलेला; लवरेला; नमलेला; कललेला. २ नम्र; निरभिमानी; गरीब; लीन. [सं. वि+नम्]

विनता—स्त्री. गरुडाची आई. [सं.] **०नंदन-पुत्र**–पु. १ गरुड. 'कीं यशवंत विनतानंदन । दंदशूक ऐकोन तटस्थ ।' –ह १८.१७. २ अरुण.

विनति, विनंती—स्त्री. १ विनंती; प्रार्थना, विनवणी; अर्जी; विज्ञापना; स्तुती. २ नम्रता; विनय; लीनता [सं.] **०व्याज**–न. प्रार्थनेचें मिष, निमित्त. 'म्हणतिलें विनति व्याजें ।' –ज्ञा १४.२५.

विनमोजबा-बी, विनमोहजबा-बी—बिन मोजदा इ० पहा.

विनय—पु. नम्रता; लीनता; सौजन्य; मृदुता; भलाई; गर्वराहित्य. [सं. वि+नी-नय] **०चातुरी**–स्त्री. सभ्यपणाचें प्रदर्शन; नम्रतेचें प्रदर्शन. 'मनीं धरुनि कामिनी मठामधि मुनी विनय चातुरी ।' –ऐपो ३६८. **०शील, विनयी**–वि. नम्र. **०स्थ**–वि. नम्र; लीन; निगर्वी.

विनय—पु. तळ; छावणी. 'तेथें सैन्य करोनिया स्थिर । विनय आपुला दीधला ।' –जै ११.१०३.

विनयोग, विनयोगणें—विनियोग-णें पहा.

विनवण-वणी-वणूक—स्त्री. प्रार्थना; विनंती; अभ्यर्थना; मिनतवारी. 'करूनि विनवणी । माथा ठेवितों चरणीं ।' –तुगा ११६५. **विनवणें, विनविणें**–उक्रि. प्रार्थना करणें; विनंती करणें; आर्जव करणें. [सं. वि+ज्ञप; प्रा. विण्णव; गु. विनवुं]

विनवणें—अक्रि. कण्हणें; कुंथणें; विव्हळणें; इवळणें. विणवणें पहा.

विनष्ट—वि. उच्छिन्न; नाश केलेला; नाहींसा केलेला. [सं.]

विना—शअ. वांचून; शिवाय; खेरीज. 'विना काजेवीण वादकू ।' –विपू १.५५. [सं.] **०कारण**–क्रिवि. निष्कारण; व्यर्थ. **०आधार**–वि. निराश्रित. (समासांत) पोटाविना, विणा-वीण-वांचून=कोरडया मजुरीनें; खाण्यापिण्याशिवाय. वस्त्राविना= कपडयांखेरीज.

विनाणी—पु. सुतार. 'विनाणियाचे विदेसी । बांदावेन्न मंदिरासी ।' –स्त्रिपु १.३.८७.

विनायक—पु. १ गणपति. 'वरी सेंदुरें विनायक ।' –शिशु ७६५. २ गरुड. 'एक उठतां विनायक । असंख्य संहारती दंदशूक ।' –पांप्र ४५. [सं.] **विनायकी चतुर्थी**–स्त्री. प्रत्येक महिन्यांतील शुद्ध चतुर्थी; विनायकी चौथ. या दिवशीं गणपतीचें व्रत करितात.

विनाश—पु. उच्छिन्नता; नायनाट; विध्वंस; सत्यानाश; पूर्णनाश. [सं.] **०काल**–पु प्रतिकूल कालदशा; नाशसमय. **म्हण०** विनाशकाले विपरीत बुद्धिः=नष्टकाल आला असतां भलतीच गोष्ट करण्याची बुद्धि होते. **विनाशित**–वि. नष्ट; उच्छिन्न. **विनाशी**–वि. १ नाश पावणारें; जें नासतें, कुजतें, बिघडतें तें. २ नाश पावणारें; बिघडविणारें. **विनाशोन्मुख**–वि. नष्ट होण्याच्या पंथास लागलेलें.

विनास—वि. नकटा; नाक नसलेला. [सं. वि+नासा]

विनिगम—पु. निश्चय; ठराव; निर्धार. [सं. वि+नि+गम्] **विनिगमक**–न. निश्चयास कारणभूत गोष्ट; प्रमाण; दाखला.

विनिगुहन—न. (वृत्य) ओठ लांब ओढून घेण्याची क्रिया. हा अभिनय फार श्रमद्योतक आहे.

विनिमय—पु. अदलाबदल; देवघेव; फेर मोबदल्याचा व्यवहार. [सं.]

विनियुक्त, विनियोजित—वि. नेमलेला; योजलेला; लावलेला; ठेवलेला (नोकरी, काम, वगैरेस). [सं. वि+नि+युज्] **विनियोग**–पु. नेमणूक; योजना; आरोपण; उपयोग; व्यवस्था (काम, कारण, उपयोग यावर). 'विनियोग तो जाणा तुम्ही याचा ।' –तुगा १५१२. **विनियोगणें**–क्रि. खर्च करणें; व्यवस्था करणें; योजणें. 'म्हणोनि स्वधर्मे जें अर्जे । तें स्वधर्मेचि विनियोजिजे ।' –ज्ञा ३.१२५.

विनिर्मुक्त—वि. मोकळा; स्वतंत्र; बंधमुक्त.

विनीत—वि. १ नम्र; लीन; निगर्वी. २ नियम, शिस्त वगैरे पाळणारा, मानणारा; ताब्यांत, आटोक्यांत राहणारा. ३ मनोविकार ताब्यांत ठेवलेला; निग्रही. ४ शिकविलेला; सरावाचा; शिस्त लावलेला (पशु वगैरे). [सं. वि+नी]

विनेता—वि. मार्गदर्शक; उपदेशक; शिक्षक; पुढारी. [सं. वि+नी]

विनोद—पु. १ खेळ; क्रीडा; करमणूक. २ थट्टा; मस्करी; उपहास; चेष्टा. 'नये विनोद हा कामा मशी संगें' –तुगा ११२. ३ कौतुक; चमत्कार. 'तैसा भला जाहला विनोदु । कथेचा इये ।'

–ज्ञा ४.३. 'तेही कथेचा विनोद। श्रोतीं सादर परिसावा।' –मुविराट २३.११७. [सं. वि+नुद्] **विनोदणें**–क्रि. विनोद करणें. 'कोल्हाळ करित विनोदिनी' –दावि ७.२. **विनोदास्पद**–वि. थट्टेचा, उपहासाचा विषय; हास्यास्पद; चेष्टेचा विषय. [विनोद+आस्पद] **विनोदी**–वि. गमती; थट्टेखोर; चेष्टेखोर; करमणूक करणारा; हंसविणारा.

विन्मुख—वि. १ पाठमोरा; तोंड फिरवलेला. 'तुका म्हणे हरिसी विन्मुख। गांधारीचे उदरीं शतमूर्ख।' –तुकाराम, पदें (नवनीत पृ. ४४८). २ (ल.) प्रतिकूल; अनिष्ट; अप्रसन्न (दैव वगैरे). ३ फजीत; लज्जित; गोंधळलेला. [सं. विमुख]

विन्यस्त—धावि. टेवलेला; स्थापित; निश्चित केलेला. [सं. वि+न्यस्=टाकणें]

विन्यास—पु. १ ठेव; अनामत ठेवलेली रक्कम. २ व्यवस्था; रचना; स्थिति. 'तेंचि मन्हाटेनि विन्यासें' –ज्ञा १५.५९३. ३ विवेचन; प्रतिपादन; निरूपण; विस्तार. 'तैसेनि सांगों सोलिवें। विन्यासें गा।' –ज्ञा १५.६६; –अमृ ७.२३५. [सं. +न्यस्=ठेवणें, टाकणें]

विन्हेणें—न. (प्र.) विंधणें पहा. सुतारांचें किंकरें. (गो.) विन्हें.

विन्हा—शअ. विना पहा. 'चर्म चालेना अहंता विन्हा' –दावि २६.

विपक्वद्रव—पु. (शाप.) ज्याचा विपाक झाला आहे असा द्रव पदार्थ; कुजलेलें; नासलेलें द्रावण. (इं.) फर्मेंटेडलिकर. [सं.]

विपचार—पु. (अपचार किंवा विपत्चार) अनादर; अपमान; जिगजिग; त्रास; कंटाळवाणी स्थिति; बिघाड; नाश. 'बायको शाहणी असली तर संसार, नाहीं तर विपचार' [सं. वि+आचार]

विपंची—स्त्री. वीणा. 'जीच्या स्वरें लाजतसें विपंची।' –सारुह ६.३५.

विपच्य—वि. (शाप.) कुजलेला; नासलेला; विपाक झालेला. (इं.) फर्मेंटेड. –सेंपू २.४३.

विपट—पुलीन. वितुष्ट; वैषम्य; तेढ; वैर; वांकडें. 'कलिनें दादनि पाडिलें विपट।' –मोवन ४.९८. 'तेणें कित्येक संहार झाला। विपट पाडिलें थोरथोरांला।' –दा १३.५.१३. 'गुरु शिष्यामाजीं पडला विपट।' –दावि ७.९.६६. [वि+पटणें]

विपत्-द्—स्त्री. १ संकट; अडचण; आपत्ति. (समासांत) **विपत्-काल-अवस्था-उद्धार-धर्म-गुण-ग्रस्त-निवृत्ति.** [सं.]

विपतर—वि. (अशिष्ट) व्रात्य; खोडकर; दुर्गुणी; वेडपट; कुस्वभावी. [विपरीत]

विपति-ती—पु. गरुड. 'हरी वाटे काळा करिस विपती मृत्यु भुजगा।' –वामन, स्फुटश्लोक (नवनीत पृ. ८९). [सं. वि+पति]

विपत्ति-त्ती—स्त्री. (अप. विपत्त, विपत्य) आपदा; संकट; अडचण; विघ्न; दुर्धर प्रसंग. 'उत्तमा विपत्तीसंग घडे।' –तुगा ९३०. [सं. विपत्ति] **०काल**–पु. संकटकाल; आपत्काल.

विपत्नीक—वि. विधुर. [सं. वि+पत्नी+क]

विपत्य—न. विपत्ति पहा. 'पाताळीचें आधिपत्य। तें तों मानिती विपत्य।' –तुगा २२३७.

विपथ—पु. कुमार्ग; वाईट मार्ग. [सं. वि+पथ] **०गामी**–वि. कुमार्गी; दुर्वर्तनी; स्वैर.

विपदा—स्त्री. (अप. विपदात) विपत्ति; अडचण; संकट. [सं. वि+पद्]

विपनणें—क्रि. शास्त्रदृष्ट्या पाहणें. –शर.

विपन्न—वि. संकटांत पडलेला; विपत्तींत सांपडलेला.

विपराळ—वि. उखर; जलशून्य; रुक्ष.

विपरिणमन—न. बदल; फरक; रूपांतर. [सं. वि+परि+नम्न]

विपरीत—वि. १ उलट; विरुद्ध; उफराटें; विचित्र. 'केळि जशा विपरीत तशा उरु पावलें तीं।' –राधावर्णन अकक २. –ज्ञा १.२१९. 'नये नानाचे मनास जाहलें विपरीत इतरांस।' –ऐपो ३०६. २ प्रतिकूल; अननुकूल; अप्रसन्न. 'आणि विकारांची जे वारी। ते विपरीत ज्ञानाची परी।' –ज्ञा १५.५२१. ३ अन्य; भिन्न प्रकारचा. [सं. वि+परि+इ=जाणें] **०काल**–पु. प्रतिकूलसमय; कष्टदशा. **०भावना**–स्त्री. १ विरुद्ध किंवा भिन्न रूप, आकार, स्थितिवगैरे. २ प्रकृतीमध्यें पडलेला फरक. ३ एखाद्यासंबंधीं बदललेली वृत्ति, कल्पना वगैरे. ४ (तत्त्व.) देहात्म बुद्धि; जीव व ब्रह्म यांमध्यें भेद आहे किंवा देह हाच आत्मा आहे अशा प्रकारची उलटी समजूत. **०भोग**–पु. पुरुषायित संभोग. 'विपरीत भोग करून मनोरथ कळेल तसा पुरवून।'–प्रला ११७. **०राशी**–पु. (शाप.) उलट केलेली संख्या. (इं.) इन्व्हर्स फंक्शन. **०लक्षणा**–स्त्री. व्याजोक्ति; औपरोधिक वर्णन. **०ज्ञान**–न. अन्यथाज्ञान; मिथ्याज्ञान; जग सत्य आहे असें म्हणणें. 'विपरीतज्ञान म्हणिजे देखणें। येकाचें येक।'–दा २०.१.२३. **विपरीतज्ञानाचा कोंभ फुटणें**–चूक होणें; भ्रम होणें. **विपरीतार्थ**–पु. परस्पर विरोधी, उलटसुलट अर्थ. 'तरी तितुके हि सत्य देख। विपरीतार्थ न मानिजे।' **विपर्यय**–पु. १ विपर्यास; विरुद्धता; उलटेपणा; उफराटेपणा. २ विरुद्ध दशा; प्रतिकूलता (यावरून) कष्टदशा; संकट; चूक; गैरसमज; उलटापालट वगैरे. [सं. वि+परि+इ=जाणें] **विपर्यस्त**–वि. विपरीत

केलेलें; विपर्यास केलेलें; उलटलेलें (वाईट अर्थानें). **विपर्यास**-पु. १ विपरीतपणा; विरुद्धता; उफराटेपणा. २ प्रतिकूलता; विपर्यय पहा. ३ बदल; फरक रूपांतर; अवनति. [सं.]

विपल—न. (प्र.) विपळ; पळाचा साठावा अंश; दोनपंचमांश सेकंद. [सं.]

विपलो(ळा)प—पु. शोक; रडारड; आरडाओरड; हलकल्लोळ. [सं. विप्रलाप] **विपला(ळा)पणें**-अक्रि. शोक करणें.

विपसळा, विपसळ, उपसळ—वि. द्वाड; व्रात्य; खोडकर (मूल). [सं. उप+च्छल ?]

विपसळो—पु. (विरू.) उपसळो; उपद्रव; पीडा; त्रास (उंदीर, कुत्री वगैरेचा). [सं. उपसर्ग]

विपस्टा—स्त्री. (गो.) हाल; त्रास; अपेष्टा. [सं. अपेष्टा]

विपक्ष—पु. १ शत्रु; प्रतिस्पर्धी. 'विपक्षाच्या वक्षावरि विवरलक्षास्तव रणीं।'-र. २ प्रतिपक्ष; विरुद्धबाजू; प्रतिवादी. ३ विरुद्धार्थ; उलट बाजूची गोष्ट. ४ (न्याय.) विरुद्ध उदाहरण; ज्यांत प्रतिपादित वस्तूचा अभाव असतो अशी वस्तु. उदा० ह्रदामध्यें अग्नि असणें संभवनीय नाहीं कारण तेथें धूर नसतो. संपक्ष पहा. [सं. वि+पक्ष] -वि. १ विरुद्ध; प्रतिकूल; प्रतिपक्षीय. २ निराधार; अप्रमाण; अप्रतिपादित (तत्त्व.) निराश्रित (व्यक्ति).

विपाइला—वि. विरळा; क्वचित; एखादा; थोडा; अल्प. 'परि ऐसे भक्त विपाइले। बहुवस नाहीं।'-ज्ञा ७.१०२. 'ऐसा नरू विपाइला।'-आमा (महानु.) विपाय पहा.

विपाओ—पु (महानु.) उपाय. 'एऱ्हवी इअेचा विपाओ।'-शिशु ८४६. 'आतां विपाअें वांचिती प्राण। विरहिणींचें।'-शिशु ७५२. [सं. उपाय]

विपाक—पु. १ परिणाम; शेवट; पूर्णत्वाप्रत गेलेली स्थिति; फल. (सामासांत) अन्न-वर्म-ज्वर-दैव-धर्म-अधर्म-धान्य-पाप-पुण्य-फल-बुद्धि-रोग-विपाक. 'विपाक न गणोनि म्यां प्रकट आपुल्या घातकें।'-केका ४२. २ पूर्ण वाढ; परिपक्वता. ३ कुजण्याची क्रिया; पदार्थांचें मयांत रूपांतर होण्याची क्रिया. (इं.) फर्मेंटेशन. [सं. वि+पच्]

विपाय-य—पु. १ अपाय. 'तरी कैसा घडला जी विपावो। सुरतप्रसंगीं।'-कथा ५ ११.१. २ विरळागति; क्वचित्पणा; क्वचित् घडून येणारा योग, मेळ; असंभव. 'परी कैसेनीहि विपावो। असणियाचा।'-अमृ ८.७; -ज्ञा १७.२८. [सं. वि+अप+इ] **विपायिला**-वि. क्वचित; एखादा; विरळा. विपाईला पहा. **विपायें**-क्रिवि. क्वचित्; कदाचित्; दैवयोगेकरून; आपाततः; दैववशात्. 'विपायें कर्मभूमिचीये पेठें। नरदेह लाधलें अवचटें।'-भाए ५१९. 'विपायें उमजलें होय निदें।'-अमृ १.१४.

विपारणें—अक्रि. खोडकर, व्रात्य, उनाड होणें; स्वैर वर्तन करणें. **विपारा**-वि. (अशिष्ट) १ हूड; हट्टी; द्वाड; (मूल). २ कुरूप; विद्रूप; विकल; वेडपट; मूर्ख. 'अंगहीन विपारा'-दा २. ३.३५. 'रंभादिका दिसति त्यांजपुढें विपाऱ्या।'-सारुह ८. १२८. ३ पायाळू; पायाकडून जन्मास येणारें; एक अपशब्द. [सं. विपरीत]

विपाश—वि. बंधमुक्त; फांसांतून सोडलेला. [वि+पाश]

विपाळ—पु. गंधर्व; अंतरिक्षांतील राजा. 'एकनामाच्या विपाळे। गंधर्वराजें गंधर्वमेळें। चित्रांगद वधिला बळें। कुरुक्षेत्रीं संग्रामीं।'-मुआदि २१.५२. [सं. वि=स्वर्ग, अंतरिक्ष+पाळ=पालक]

विपिन—न. अरण्य; रान; जंगल; वन. [सं.]

विपुल-ळ—वि. पुष्कळ; भरपूर [सं.] **विपुलता, विपुळात**-स्त्री. समृद्धि; रेलचेल; भरपूरपणा.

विप्र—पु. १ ब्राह्मण. २ (सांकेतिक) पेंका; द्रव्य. 'विप्र रवाना जाला आहे तो पावलाच असेल.'-ख ३२२५. [सं.]

विप्रकर्ष—पु. अंतर; दूरपणा. [सं.] **विप्रकृष्ट**-वि. दूरचें; अंतरस्थ. [सं.] **०कारण**-न. (न्याय) दूरस्थ कारण. (इं.) रिमोट कॉज.

विप्रकीर्ण(संयुतहस्त)—पु. (नृत्य) स्वस्तिकाकार हात मनगटावरून खालीं सोडणें. [सं.]

विप्रतिपत्ति—स्त्री. १ मतभेद; मतांतर; मतमतांतर; भिन्न मतांतील वादविवाद; मतमतांतराचा गलबला. [सं.] **विप्रतिपन्न**-वि. १ विवादित; ज्याबद्दल मतभेद आहे, वाद आहे असें. २ मतांचें खंडन करणारें; भिन्नमतप्रवर्तक; विशिष्टमताविरुद्ध.

विप्रलंभ—पु. साहित्यशास्त्रांत शृंगाराचा एक प्रकार. यांत नायक-नायिकेचा विरह वर्णन केलेला असतो. 'शोकदायक प्रसंगांतील विप्रलंभानें वाढविलेला करुणरस ...।'-विंध्याचल १५०. [सं.]

विप्रलाप—पु. १ आरडाओरड; भांडणतंटा; कोलाहल. २ वटवट; बडबड; टकळी. [सं.]

विप्रिय—वि. अप्रिय; नावडतें; न रुचणारें. 'वाचुनि विप्रिय म्हणे तांतडी चुकलें अक्षर साचें।'-कीर्तन १.३३.

विप्लावणें—अक्रि. प्रकट करणें. 'अर्थाचेनि अनानें। विप्लावलीं।'-अमृ ८.१३. [सं]

विफल-ळ—वि. निष्फळ; व्यर्थ; निरर्थक; फुकट. [सं. वि+फल] **०ता**-स्त्री. व्यर्थता; निरर्थकता. **विफळणें**-अक्रि. व्यर्थ करणें; निष्फळ करणें. 'परी विफळ ती आचरोनिया। नाटकी जैसे।'-ज्ञा १६.३७३. **विफळात**-स्त्री. विफलता; व्यर्थता. -क्रिवि. व्यर्थ; फुकट; निरर्थक.

विबुध—पु. १ देव; अमर. 'समुद्र मथितां ये वेळा । विबुधांसी बहु श्रम जाला ।' –पांप्र. २ पंडित; ज्ञानीपुरुष; विद्वान मनुष्य. –ज्ञा १०.३१८. [सं.] ०**प्रिया**–स्त्री. एक समवृत्त. अक्षरें चरणांत १८. र, स, ज, ज, भ, र हे गण.

विबोध—पु. जागेपणा; जागृतता. 'निद्रा विच्छेदानें विबोध होतो ।' –गंगाधर, रत्नकल्लोळ [सं.]

विभक्त—वि. १ भाग केलेला; वांटणी झालेला; पृथक् केलेला; वेगळा; निराळा. २ दुष्ट भक्त; अभक्त; भक्ति नसलेला. 'हरि नरहरि रूपें क्रूरदैत्या विभक्ता ।' –वामन, नरसिंहावतार (नवनीत पृ. १२२) ०**भाव**–पु. वेगळेपणा; कुटुंबाची वाटणी झालेली स्थिति; असमाईकपणा.

विभक्ति—स्त्री. विभक्तपणा; तुटकपणा. 'विभक्ती सांडुनि भक्तीचें । मूळ शोधावें ।' –दा ४.१.३४. २ (व्या.) वाक्यांतील इतर शब्दांशी असलेला संबंधबोधक, नामास किंवा सर्वनामास होणारा विकार; प्रस्तुत विकारदर्शक नामाच्या अंत्यभागामध्यें होणारा फरक, लावलेला प्रत्यय. ३ भाग; वांटणी. ४ (अशिष्ट) भावार्थ; रोख; मतलब; तात्पर्य. [सं. वि+भज्] ०**कार्य**–न. विभक्तिप्रत्यय लावतांना नामाच्या अन्त्यस्वरास होणारा विकार. ०**सामान्यरूप**–न. विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वी होणारें नामाचें रूप.

विभग्न—वि. मोडलेलें; चुराडा झालेलें; नाश पावलेलें; फुटून तुटून गेलेलें. [सं.]

विभच्छ—वि. (अप. विभक्त). मोडलेलें, भंग पावलेलें. 'तेथें भूमीचा कोण लेखा । विभच्छ झाली असेल कीं ।' –वेसीस्व ४.३०.

विभजनीय—वि. विभाग, तुकडे करण्यास योग्य; ज्याचे विभाग करावयाचें तें. [सं.]

विभत्स—वि. (प्र.) बीभत्स पहा. [सं. बीभत्स]

विभर्त्सना—स्त्री. निर्भर्त्सना पहा.

विभव—न. १ ऐश्वर्य; भाग्य; संपत्ति; मोठेपणा; थोरपणा. २ दुसऱ्या संवत्सराचें नांव. [सं. वि+भू]

विभाग—पु. १ अवयव; पृथक्भाग; वांटा; हिस्सा; अंश. २ भाग केलेली, वांटलेली स्थिति; विभजन. [सं. वि+भज्] ०**गुणन**–न. मूळ रकमेच्या निरनिराळ्या अवयवांनीं गुणणें. **विभागणी**–स्त्री. वांटणी. हिस्से करणें; भाग पाडणें. **विभागणें**–अक्रि. भाग पाडणें; हिस्से करणें; वाटे करणें; वेगळे करणें; तुकडे करणें, होणें. **विभागदार**–पु. हिस्सेदार; वांटेकरी. **विभागभाक्**–पु. वडिलार्जित मालमत्तेंतील वांटेकरी; ज्याला वंशपरंपरागत मालमत्तेंत हिस्सा मिळण्याचा हक्क असतो तो. **विभागीत**–वि. वांटलेलें; हिस्से केलेलें. **विभागी**–पु. हिस्सेदार; वांटेकरी; भागीदार; तक्षिमदार; पातीदार. 'ग्रामीचा व्यवहार चालावयालागी । भ्रतार विभागी केला तेथें ।' –ब १२. **विभागीण**–स्त्री. वांटेकरीण. 'दासी माझी दैत्यदुहिता । विभागीण मज केली ।' –मुआदि १९.६४. **विभागु**–पु. विभाग पहा. **विभाजक**–पु. भागणारा; भाग पाडणारा. **विभाज्य**–वि. १ भाग पाडावयाची; जिचे हिस्से करावयाचे आहेत अशी; हिस्से पाडतां येण्यासारखी. २ (गणित) ज्या संख्येस दुसऱ्या संख्येनें पूर्ण भाग जातो अशी (संख्या). **विभाज्यत्व**–न. भाग जाण्याची स्थिति, पात्रता, योग्यता. (इं.) डिव्हिजिबिलिटि.

विभाजा—पु. नाश; चेंदा; रगडा; विध्वंस. 'रणीं कांडिला विभाजा । दैत्यदळाचा ।' –कथा ५.६.८७. [सं. वि+भज्]

विभां(भा)डणें—सक्रि. १ पराभव करणें; जिंकणें; जेरीस आणणें. 'अरिराअे विभांडावे । मग राजसुय यागां यावें ।' –शिशु ४६३. –ज्ञा १.२१६. २ फोडणें; छेदणें; नाश करणें; विद्ध करणें. 'पादरेणूंचेनि कुलिशें । पापपर्वत विभांडिती ।'–मुआदि ५.७४. 'तेआं मदनाचां शरीं । विभांडीनिलिया ।' –शिशु २७०. 'म्हणिपे भूतभजना विभाडिली । आणि विभाडिल फुडा ।' –स्त्रिपु १.३१.५५. [सं. वि+भण्ड] **विभांडू**–वि. भांडणारा; शत्रु. 'मागदराअे विभांडू ।' –शिशु ५१८.

विभाव—पु. काव्यहेतूच्या प्रकारांपैकीं एक; काव्यस्फूर्तीचें कारण; उद्दीपक गोष्ट. भाव, अनुभाव, स्थायीभाव पहा. [सं. वि+भू]

विभावन-ना—नस्त्री. १ विचार; संशोधन; तपासणी. २ कल्पना; तर्क; भावना; समज; समजूत. [सं.] **विभावनीय**–वि. १ विचार करण्यासारखें; संशोध्य. २ कल्पना करण्यास, समजण्यास योग्य, शक्य. **विभावित**–धावि. १ विचार केलेलें, शोधून पाहिलेलें. २ कल्पिलेलें; मानलेलें, गृहीत धरलेलें, समजलेलें.

विभावसु—पु अग्नि.

विभाषा—स्त्री. विकल्प; ऐवजी, बदली गोष्ट; दुसरा मार्ग. [सं.]

विभास—पु. (संगीत) एक राग. [सं.]

विभित्स—वि. बीभत्स पहा.

विभिन्न—वि. १ विभाग केलेलें; तोडलेलें; तुकडे केलेलें. २ विस्कटलेला; उघडून टाकलेला; पसरून टाकलेला. ३ मिश्र केलेला; मिसळलेला. [सं. वि+भिद्]

विभीतक—पु. बिभीतक पहा. बिब्बा [सं.]

विभीषणकाल-वेला—पुस्त्री. ज्योतिःशास्त्राप्रमाण एक विशिष्ट काळ; संकटकाल; अशुभवेला

विभु—पु. प्रभु; परमेश्वर. 'प्रभो, विभो अगाध किति तव करणी ।' –वि. सर्वव्यापी; व्यापक; महान्; चिरंतन. 'उष्णता

व पदार्थ या दोन्ही वस्तू नित्य व विभु पडल्यामुळें तदभाव विशिष्टकाल व स्थान मिळणें असंभवनीय आहे.' –न्याप २०६. [सं. वि+भू]

विभू—पु. (अप. व्यूह) १ व्यूह; सैन्यरचना. २ (ल) कारस्थान; कट; बालंट; बेत; कूट; मसलत. 'तसा करुन दिग्विजय शेवटीं अवघड रचिला विभू.' –ऐपो ३११. ३ रचना; कार्यपरंपरा. 'फळ झाडावरून पडतांना पाहिलें तेवढयावरून त्यानें केवढा विभू रचला!' –नि ३५०. [सं. व्यूह]

विभूत-ति-ती—स्त्री. १ भस्म; रक्षा; राख; अंगारा. 'होऊनि जंगम विभूती लावितो. शंख वाजवीती घरोघरीं.' –तुगा २८३१. २ ऐश्वर्य; तेज; शोभा; यश; कीर्ति; भव्यता. 'नाना विभूति छंद बंद. नाना खाणी' –दा १६.४.१९. करित असति जीच्या निर्विकल्पा विभूती.' –सारुह २.८९. ३ अणिमादि अष्टसिद्धि. ४ ईश्वरांश; महापुरुष; ऐश्वर्यवान् पुरुष; पुण्य पुरुष. 'येथ विभूती प्रतिविभूती. प्रस्तुत अर्जुना सांगिजेती.' –ज्ञा १० ४१. [सं.] **ग्रह०** विभूतीचें मूळ रेडयाचे गांडींत–अनेक ऐश्वर्यवान् व्यक्तीहि मूळच्या गरीब स्थितींतील असतात.

विभूषण—न. अलंकार; शोभा; दागिना. [सं.] **विभूषित**–वि. अलंकृत; शोभायमान; सजविलेला.

विभेद—पु. १ वेगळेपणा; भिन्नता; विभागणी; अलग करणें. २ मिश्रण; मिसळ; भेसळ. [सं. वि+भेद]

विभो—पु. विभू पहा. 'नांदत्या घराला विभो लागला. पिळ पाडुन केला भुगा.' –पला ८६.

विभ्रम—पु. १ चूक; दोष; स्खलन. २ भ्रम; भ्रांति; गोंधळ. 'संभोह विभ्रम भासे. गिळित धैर्याचीं आविसें.' –ज्ञा ७.७७. ३ स्त्रियांचा प्रेममूलक हावभाव, चाळा, चेष्टा, विलास. भाव पहा. [सं. वि+भ्रम] **विभ्रांत**–पु. गोंधळ, गडबड, दर्शक अभिनय. –वि. गोंधळलेला; घोंटाळलेला; चुकलेला; गडबडलेला. [सं.]

विभ्रमण—न. प्रकाशकिरणांच्या गतींतील स्खलन, मार्गच्युति. –सूर्य २६. [सं.]

विमंडल—पु. १ ग्रहाची कक्षा. २ ग्रह आपल्या अक्षाभोंवतीं फिरल्यानें होणारें वर्तुल. [सं.]

विमत—वि. नापसंत; अपसंत; उलट; विरुद्ध; प्रतिकूल. [सं. वि+मति] **विमति**–वि. १ बुद्धि चळलेला; भ्रमिष्ट; खुळा; वेडा. २ नापसंति; असंमति; प्रतिकूलता. [सं. वि+मति]

विमनस्क, विमना—वि. १ उद्विग्न; खिन्न; त्रस्त; गोंधळलेला. 'सैन्य सज्ज असतां अर्जुन विमनस्क म्हणजे उद्विग्न झाल्यावर ...' –गीर ९. २ मन उडालेला; विमुख; विरक्त; प्रेम उडालेला. [सं. वि+मनस्+क]

विमर्द—पु. (कों.) फुरसत; उशीर; कालवृत्ति; कालातर; दीर्घकाल; मध्यातर. (क्रि० लागणें.)

विमर्द-न—न. १ घर्षण; घासणें; कुटणें; दळणें २ (ल.) मारणें; ठार मारणें; नाश. [सं. वि+ मृद्]

विमर्श—पु. विचार; तपास; शोध; बुद्धि चालविणें. [सं.]

विमल-ळ—वि १ निर्मल; स्वच्छ; शुद्ध; निर्दोष. 'दोहीं वेगळें सारासार. विमळब्रह्म.' –दा १२.५.१४. २ मंगल; शुभ (काल, प्रसंग). 'प्रहर दोन्ही निशा विमल क्षणी. प्रगटला निज उत्तम लक्षणी.' [सं. वि+मल]

विमलार्जुन—पु. एक दैत्य. 'गळा बांधुनियां उखळासी दावें. उन्मळी त्या भावें विमळार्जुन.' –तुगा २०. [सं.]

विमा—पु. १ एखाद्या वस्तूची, आयुष्याची घराची वगैरे ठराविक कालपर्यंत सुरक्षिततेची, ठराविक रक्कम भरून घ्यावयाची हमी; ठराविक हप्ते भरून ठराविक कालीं अमुक रक्कम मिळेल अशी तजवीज. (क्रि० उतरणें; भरणें; करणें). २ अशा तऱ्हेनें भरावयाची ठराविक रक्कम, हप्ता. ३ सहा. [फा. हिं. बीमा] **विमेकरी-दार**–पु. जो कोणत्याहि गोष्टीचा विमा उतरतो तो.

विमाता—स्त्री. सापत्न माता; सावत्र आई.

विमान—न. आकाशयान; आकाशनौका; अंतराळांतून प्रवास करण्याचें साधन; देवांचा इच्छागमनी रथ. [सं.]

विमार्ग—पु. १ कुमार्ग; आडमार्ग; भलतीच वाट. 'तो विमार्गास लागला असतां वसुभूतीनें त्याला उपदेश करून आपला शिष्य केलें होतें.' –चंद्रगुप्त ४२. २ अनीतीचा मार्ग; स्वैर वर्तणूक. [सं. वि+मार्ग]

विमुक्त—वि. मोकळा; स्वतंत्र; बंधनांतून सुटलेला. [सं. वि+मुच्] **विमुक्ति**–स्त्री. मुक्तता; मोक्ष; स्वतंत्रपणा; मोकळेपणा. **विमोचन, विमोक्षण**–न. सुटका; मोकळीक; मुक्तता; मुक्ति. [सं. वि+मुच्]

विमुख—वि. पराङ्मुख; पाठमोरा. 'सन्मुख विमुख जगेसीं. न घडे तुज.' –ज्ञा ११.५३१. **०काल-ळ**–पु. प्रतिकूल काल; संकटकाल; आपत्काल; याचे उलट सन्मुखकाल.

वियत्—न. आकाश. [सं.] **वियद्गंगा**–स्त्री. आकाशगंगा. **वियच्चर**–वि. आकाशांत संचार करणारा.

वियुक्त, वियोजित—वि. पृथक् केलेला; तोडलेला; वेगळा, अलग केलेला; वियोग पावलेला; विरहित. [सं. वि+युज्] **०पत्र**–वि. (शाप.) निरनिराळ्या पाकळ्या असलेला (हिरवाचाफा, रामफळ) (इं.) डायलिपेटॅलस.

वियुति—स्त्री. (गणित) अंतर; फरक; वजाबाकी; कमीजास्तीपणा.

वियोग—पु. १ पृथग्भाव; वेगळेपणा; विरह; ताटातूट २ (गणित) फरक; अंतर; वजाबाकी. [सं. वि+युज्] **वियोगानल**-पु. विरहाग्नि; वियोगामुळें उत्पन्न होणारा ताप, संताप, त्रास. 'त्या वियोगानळेकरून । अहाळले श्रावणारि रात्रंदिन ।' –रावि. **वियोगी**-वि. वेगळा; पृथक्; अलग. 'योग नाहीं तो वियोगी ।' –दा १७.१.२३. **वियोजक**-वि. १ (गणित) वजा करण्याची संख्या. २ पृथक् करणारा; वेगळें करणारा. **वियोजन**-न. वियोग करण्याची क्रिया; पृथक्त्व; ताटातूट; वियोग; पृथक्करण. **वियोज्य**-वि. (गणित) ज्यांतून वजा करणें ती संख्या.

विर—स्त्री. विरी. शक्ति; समर्थ. वीर पहा. 'पुरे काळ हा नुरे योग्यता विर निघुनी चालली ।' -राला ११०. [सं. वीर्य]

विरईपुरी—स्त्री. मांसयुक्त पुरीचा एक प्रकार. –गृशि २.१९.

विरका—वि. १ विरणारा; चूर होणारा; कांडतांना तुटणारा, मोडणारा (तांदूळ). २ विरघळणारा. [विरणें]

विरक्त—वि. उदासीन; अनासक्त; निरिच्छ; भोगेच्छेपासून पराङ्मुख; वासनारहित. 'विरक्त करितो हरी स्वगुण नाम संकीर्तनें ।' –वामन, नामसुधा १.५० [सं. वि+रज्-रञ्ज्] **विरक्ति**-स्त्री. १ वैराग्य; अनासक्ति; निरिच्छता. 'तरी विरक्तिवाचूनि केहीं । ज्ञानासि तगणेंचि नाहीं ।' –ज्ञा १५.३६. २ उदासीनता; बेफिकीर वृत्ति.

विरखंड—न. (कों.) पोफळीच्या विरीचा तुकडा. २ (याची घडी घालून पोथीला गुंडाळीत असतात यावरून). पोथीस गुंडाळण्याचें साधन, पुष्टिपत्र. [विर+खंड]

विरखुडी—स्त्री. रेघ; रेघोटी; ओरखडा. [सं. वि+रेखा]

विरंग—पु. विरस; बेरंग; विसंवादी गोष्ट. 'पुढील शाकारांचें मान । विरंग होईल म्हणोनि ।' –वेसीस्व ८.५१. 'कांहींच विरंग नाठवे ।' –दावि २७. –वि. १ वाईट रंगाचें; विटकें; रंग उडालेलें. 'येक सुरंग येक विरंग ।' –दा १५.८.१०. २ रंगाशिवाय; मोकळा; रिकामा; लोकरंजनाशिवाय. 'विरंग जाळं नेदी क्षण ।' –दा १८.४.१०. [सं. वि+रंग]

विरंगुळणें—अक्रि. कांहीं काम करतांना रमणें, रेंगाळणें; विसांवा घेणें; गमणें; करमणूक करणें; खेळणें. [सं. वि+रज्-रञ्ज्=करमणूक करणें] **विरंगुळा-गोळा-गुळो**-पु. १ विसांवा; विश्रांति; विश्रांतिस्थान. 'मनाला विरंगुळा आतां काय तो एवढाच आहे !' –पकोघे. २ करमणूक; खेळ; वेळ घालविण्याचें साधन; मन रमविणें. ३ हरकत; अडचण: आळस. 'वरील कोंडण्याचा गुंडाळा । झाडूनि केलिया वेगळा । कण घेतां विरंगुळा । असे काई ।' –ज्ञा १५.४६६.

विरगेमरी—स्त्री. व्हर्जिन मेरी. –क्रिपु.

विरघळणें—अक्रि. १ द्रवणें; वितळणें; विघरणें; पाघळणें; पातळ होणें. २ (ल.) विरणें; जीर्णपणामुळें पातळ, विरविरीत, झिरझिरीत होणें (वस्त्रवगैरे). ३ (ल.) (भय, दुःख, अनुकंपा इ० विकारांनीं) गळणें; ओशाळणें; मऊ पडणें; द्रवणें. 'सैनिकमन विरघळे दयेनें ।' –विक २. (गो.) विरघुंक. [सं. विधरण]

विरचणें—उक्रि. रचणें; जुळणें; व्यवस्थित मांडणें; पद्धतशीर लावणें. रचणें पहा. [सं. वि+रच्] **विरचित**-वि. जुळविलेलें; रचलेलें; केलेलें; ग्रथित. 'श्री मुकुंदराज विरचित । विवेक सिंधु अध्यात्मग्रंथ ।'

विरंची—पु. ब्रह्मदेव. 'हें परमभाग्य आंगीं । विरंचिही नाहीं ।' –ज्ञा ११ ६२२. 'त्याचे चरणींचे रज:कण । शिव विरंची आपण ।' –एरुस्व १४.९३. [सं. विरंचि]

विरज—वि. शुद्ध; निर्मळ; पांढरें. 'शुद्ध सत्त्वाचें विरजांबर । चिद्रत्नांचे अलंकार ।' –एरुस्व १४.८७. [सं. वि+रज्=रंगविणें]

विरज—न' संघ; डाळें; इरजिक पहा. 'पेरावयासि चेतलें बीज । गांवकरी करूनि विरज ।' –भवि ५४.१७६. **विरजे**-पुअव. इरजिकांतील लोक.

विरजण—न. १ दूध घट्ट होण्यासाठीं, दुधाचें दहीं होण्यासाठीं त्यांत घातलेला पदार्थ. २ घट्ट झालेलें, दहीं झालेलें दूध. ३ (कों.) दहीं करण्याचें भांडें. ४ (ल.) (विद्वत्ता, शहाणपणा, सद्गुण, पावित्र्य वगैरेस) कलंक लावणारें दुर्वर्तन; निष्फल करणारी गोष्ट; कोणत्याहि गोष्टीवर पाणी पाडणारी दुसरी तद्विरुद्ध गोष्ट. [सं. वि+रंज्: –भाअ १८३४; विजन –भाअ १८३२] **०घालणें**-एखाद्याचें मन दुसऱ्याविषयीं कलुषित करणें, **बिघडविणें**, मोडता घालणें; आड येणें; निरुत्साह करणें. **०घालणें-पाडणें**-विफल करणें; नासणें; बिघडविणें; फिसकटविणें; अडथळा आणणें. **०पडणें**-विफल होणें; नासणें; बिघडणें. **विरजणी**-स्त्री. विरजणाचें भांडें. **विरजणें**-उक्रि. दुधाचें दहीं करणें. –अक्रि. (भांडणानंतर) शांत होणें; समजूत होणें; तडजोड होऊन भांडणतंटा मिटणें. **विरजणें**-न. विरजणी; दूध विरजण्याचें भांडें.

विरजणें—क्रि. (प्र.) विराजणें; शोभणें. 'गोपीगण विरजला ।' –रास ५.१५२. [सं. वि+राज्]

विरंजन—न. रंग काढून टाकणें; रंग घालविणें; पांढरें करणें; ओपविणें; सफेतीकरण. (इं.) ब्लीचिंग. [सं. वि+रज्-रञ्ज्]

विर(रि)जा-जिया—पु. मित्र; सहाय्यकर्ता; मदतगार. 'मग वडवानळु तैसे याही । विरजा जैसा ।' –ज्ञा १.११७. विरज=डाळें पहा.

विरजाहोम—पु. संन्यास घ्यावयाच्या वेळीं करावयाचा होम. 'विरजाहोम याचि नांवें । देह नव्हे मी हें जाणावें ।' –तुगा ३८६९. [सं.]

विरजीक, विरजे, विरडया, विरड—इरजीक, इरजे इरडया, इरड इ० पहा. 'नलगे घालावें विरजे। हेल बैल देउनि दुजे।' –मध्व ४०२.

विरड—स्त्री. उतवडा; गौण पीक; मोगण; इरड पहा.

विरड—स्त्री. (कु) १ अर्धा दिवस; एक वेळ; पूर्वाण्ह किंवा अपराण्ह. २ कामाचीं लांकडें वगैरे सांठविण्याचा माचा. ३ ओझ्याची खेप. ४ (राजा) वरंड.

विरडणें—अक्रि. पुरळ उठणें; खरूज येणें.

विरड(ढ)णें—अक्रि. उगवण; अंकुर फुटण. 'जियाचिये भूमिकेसि विरढे।' –भाए २३३. 'विरढोन लागती गगनासी।' –दा १५.४.१०. [सं. वि+रुह्=वाढणें]

विरडा-ढा—पु. (रा.) लहान रोप; माडा.

विरडी-ढीं-डे-ढें—स्त्री. बिरडी-डे-ढी-ढें पहा.

विरढें—न. बिरढें; गुळखी; बूच; बांध 'ते प्रलयनळा धुम्राचें गुंडाळें। कीं कालकुटा बिरढें फूटलें।' –शिशु १०२०.

विरणा—वि. विरका पहा. विरणे तांदूळ–विरणारे तांदुळ.

विरंणा-रण्णा—पु. लिंगायतांचा एक देव, साधु. 'येक म्हणती विरंणा कर्ता। येक म्हणती वरवंणा कर्ता।' –दा १३.८.१४.

विरणें—अक्रि. १ विरघळणें; वितुळणें; पातळ होंणें. २ (ल.) विरविरीत होणें; विरल होणें; वीण पातळ होणें (वस्त्र, कापड वगैरेची); जीर्ण होणें. ३ (ल.) द्रवणें; दयार्द्र होणें; पाझरणें (कोमलतेनें, दयेनें, सहृदयतेनें-अंतःकरण, मन वगैरे). ४ चुरणें; मोडणें; कणी होणें (तांदूळ कांडतांना, अगर इतर धान्य भरडतांना). ५ उडून जाणें; पातळ होणें; नाहींसें होणें (अभ्र, ढग वगैरे); जिरणें; लयास जाणें; दबून जाणें (संशय, हेतु, इच्छा); 'विराला हेत सर्वही.' ६ तृप्त होणें; भागणें; शमणें; उडून जाणें (तहान, भूक वगैरे); 'सकलही तहान विरली हो भूक।' ७ पांगापांग होणें; फाकाफाक होण; दाणादाण, पळापळ होणें; नष्ट होणें (शत्रू वगैरे). 'जीव नील वर्णापरी परस्परें शत्रू विराले तसे।' –ऐपो ३९८. ८ मन उडून जाणें; दुःखित होणें; खेद करणें. 'कपि देखुनि सर्व मनीं विरती।' –मा सेतुबंध २९.१३. [सं. विरल]

विरणें—सक्रि. (कों.) दाढीवर, भाजावणीवर गोंवर पसरणें. [सं. विकिर्]

विरत—वि. १ विराम पावलेला; स्तब्ध; थांबलेला; बंद पडलेला. २ विरक्त; निवृत्त; त्याग केलेला. 'विरत विषयभोगी चाड नाहीं सुखाची।' –मुरामायण बालकांड. [सं. वि+रम्]

विरति–स्त्री. १ विराम; विश्रांति; बंदी; थांबण्याची, मोडण्याची, बंद पडण्याची स्थिति. २ विरक्ति; इच्छा, आसक्ति, वासना यांचा क्षय; अनासक्ति.

विरतिक—पु (कु) वृत्तिकर; वृत्त्यंशी; वृत्ति चालविणारा. [सं. वृत्तिकर]

विरथ—वि. रथहीन रथविरहित; रथांतून उतरलेला. 'विरथ केला वंग राजा।' –एरुस्व ९५४. [सं.]

विरधाळें—न. वृद्धि; सुवेर; जननाशौच. [सं. वृद्धि+आलय]

विरपणें—उक्रि. (कों.) तण काढणें; बेणणें; निंदणें; भांगलणें. **विरपणी**–स्त्री. (कों.) बेणणी; निंदणी. **विरपल**–स्त्री. (राजा.) शेताच्या दाढेपर्यंत राहिलेला चोथा, नांगरणीच्या वेळीं काढून टाकतात तो; नांगरटीनें उपटून काढलेलें रान.

विरंबणें—अक्रि. १ ओशाळणें; लाजणें; खालीं पहाणें; थिजणें; विरमणें. २ पचपचीत होण; कचकचीत, बेचव होणें (भात). [म. वरमणें; सं. वर्म]

विरमणें—अक्रि. थांबणें; बंद होणें; थबकणें; विश्रांति घेणें. 'अशेषहि अज्ञान विरमे।' –ज्ञा १५.४२३. 'विरमशी तूं सांग कोणी कडे।' –वेक ८१. [सं. वि+रम्]

विरमणें—अक्रि. वरमणें पहा. लज्जित होणें; शरमणें; द्रवणें. 'तैसें सधीर परी विरमलें। हृदय त्याचें।' –ज्ञा २.३. [सं. वर्म]

विरय—स्त्री. (कु) कोंकणी देवदार वृक्ष.

विरल-ळ—वि. १ दूरदूर; झिरझिरीत; अंतरा अंतराअंतरचा. २ दुर्मिळ; क्वचित् आढळणारा; असामान्य; केव्हांतरी घडणारा. –क्रिवि. क्वचित्; विरळा. [सं. विरल] **विरलणें**–उक्रि. विरल होणें. **विरलधातु**–पु. (शाप) दुर्मिळ धातु. (इं.) रेअर मेटल. **विरलपक्ष**–वि. विशिष्ट जातीचे प्राणि. (इं.) हिमेनोप्टेरा. **विरलागत**–वि. क्वचित् घडणारे; असामान्य; दुर्मिळ; प्रासंगिक. [सं. विरल+आगत]

विरली-ळें—स्त्रीन. इरली-लें पहा.

विरवड—स्त्री. इरड पहा. गौण पीक; मोगण.

विरवणें—सक्रि. (विरणें प्रयोजक पहा). जिरविणें; नाहींसें करणें. 'बहु भाग्य शिखंडीचे मोठयाच्याही मदासि ज विरवी।' –मोभीष्म ११.५१.

विरवदी-धी-ली—स्त्री. स्त्रियांच्या पायांच्या बोटांतील चांदीचा दागिना. 'विरवल्या विंचमोरे.' –स्त्रीगीतमाला ६. (तंजा.) विरविदी. –तंजा शिलालेख.

विरवाळें—न. (राजा.) विरजीक; इरजीक पहा.

विरविरणें—अक्रि. रवरवणें; मिरमिर लागणें. [ध्व.] **विरविरी-वीर**–स्त्री. चुरचुर; मिरमिर; रवरव.

विरविरीत—वि. झिरझिरीत; जीर्ण; विरळ. [विरणें]

विरस—पु बेरंग; मनोभंग. –वि. १ नीरस; बेचव; गोडी नाहीं असें. 'आवडीविणें संभोग। विरसु होअे।' –शिशु १८२. 'अमृत यापुढें विरस।' –मोसमा ५.९४. २ रुक्ष; कोरडा; पचपचीत; कवकवीत. ३ (ल.) निरुत्साही; निष्प्राण. [सं. वि+रस] **विरसणें**–अक्रि. निरुत्साह होणें; थिजणें 'बोलें ऐशामनीं विरसली।' –विक ७८.

विरह—पु. १ वियोग; ताटातूट; दूरीकरण (मित्र, प्रियमनुष्य यांचा). 'विरह तापें फुंवे छंद करित जाती।' –तुगा १३१. २ वियोगजन्य दुःख; ताटातुटीमुळें होणारी पीडा. हुरहुर; बेचैन. ३ वाण; अभाव; रहितता. [सं.] ०**ज्वर**–पु. विरहामुळें येणारा ताप; वाटणारें दुःख. **विरहाग्नि, विरहानल**–न. वियोगजन्य शरीरदाह; विरहामुळें होणारी शरीराची आग. 'अधिका विरहोनळु। उधावतु दिसे।' –शिशु ७७९. **विरहिणी**–स्त्री. पति अथवा वल्लभाचा वियोग झालेली स्त्री. 'विरहिणी कां जैसी। वल्लभातें।' –ज्ञा १३.३७४. **विरही**–पु. १ प्रियेचा वियोग झालेला. २ विहीन; वाण, राहित्य असलेला.

विरहण—न. आळ; आरोप. 'ज्याहीं चोरिलें त्यांसी सोडिलें। विरहण आलें मजवरी।' –ह ९.१८६.

विरहित—वि. विहीन; शिवाय; वेगळा; खेरीज; वांचून; विना. 'निमोली संपदा भयविरहित। सर्वकाळ चित्त समाधान।' –तुगा १९८३. [सं.]

विरळ, विरळणें, विरळागत—विरल, विरलणें, विरलगत ह० पहा.

विरळा—वि. दुर्मिळ; दुर्लभ; दुष्प्राप्य; एखादा; क्वचित् आढळणारा. –क्रिवि. क्वचित्; प्रसंगवशात्. [सं. विरल]

विरा—पु. (कु.) विरी पहा. 'सुपारीच्या फांदीच्या बुडाशी असलेलें जाड आवरण.

विराकत, विराखत—स्त्री. इराकत पहा.

विराग—पु. विरक्ति; वैराग्य; अनासक्ति; निरिच्छपणा; विषयपराङ्मुखता. –ज्ञा ९.४७०. [सं. वि+रंज्-राग] **विरागी**–वि. बैरागी; विरक्त; वैराग्यशील. –ज्ञा १८.१७६.

विराजणें—अक्रि. शोभणें; प्रकाशणें; सुंदर दिसणें. 'ते भीमकीस सिसफूल शिरीं विराजे।'–सारुह ८.१३५. [सं. राज्+प्रकाशणें] **विराजमान, विराजित**–वि. शोभिवंत; शोभायमान; तेजस्वी; भव्य. 'कंठी कौस्तुभमणि विराजित।'–तुगा १.

विराट-ट्—पुन. १ विश्वव्यापी ईश्वर स्वरूप; स्थिरचरव्यापक पुरुष; ब्रह्माण्डदेह. 'सूक्ष्म हिरण्यगर्भ म्हणती। विराट ते स्थूळ।' –दा १०.१०.१४. 'कीं हे विराटाची योगस्थिति।' –दा १.७. ३२. –वि. भव्य; प्रचंड; अवाढव्य. [सं. वि+राट्] ०**देह-देही**–पु. विश्वस्वरूप; ब्रह्माण्ड; सृष्टि. ०**देह-देही-स्वरूप-रूप-शरीर**–वि. १ सृष्टिस्वरूपी; जगद्रूपी; विश्वरूपानें प्रगट. २ भव्य; अवाढव्य शरीराचा. ०**पुरुष**–पु. ब्रह्माण्डव्यापी ब्रह्म; विश्वपुरुष; सर्वव्यापी आत्मा.

विराण, वैराण—वि. ओसाड; उजाड. [वैराण] **विराणी**–स्त्री. दाढ भाजण्यापूर्वी आग पसरूं नये म्हणून तीसभोंवतीची जी जागा भाजतात ती. [वैराण]

विराणा—पु. विरंणा पहा.

विराणें—न एक वाद्य. –मब ३६.

विरादस—स्त्री. (गो.) बडीशेप.

विराम—पु. १ विश्रांति; विसांवा. 'नको वासना हेमधार्मी विरामीं।' –राम ६५. २ थांबणूक; कुंठित होणें; मध्येंच बंद पडणें; स्थिरता. ३ लय; नाश; अंत; शेवट (क्रि० पावणें). 'मग यया्च्या विरामीं। मीचि होसी।' –ज्ञा १८.१३६७. 'पावे जनप्रतापें त्या तद्दिग्विष्णु जैं विरामास।' –मोभीष्म ७. ३. ४ टप्पा; थांबण्याची जागा. [सं. वि+रम्] ०**चिन्ह**–न. थांबण्याची खूण; वाचतांना वाक्य संपल्यावर अगर मध्येंच कमी जास्त थांबावें यासाठीं वापरावयाची खूण.

विराम—वि. शून्य; ज्यांत राम, तेज, पराक्रम नाहीं असें. 'रामेवीण विराम भासत सभा कोणी न दीसे उभा।' –दावि ४९७. [वि+राम]

विरालेंपण—न. शून्यत्व; सर्व नाहींसें झाल्याची अवस्था. [विरणें]

विरावणें—अक्रि. (व.) विरमणें; विरल्यासारखें होणें (दुःखामुळें); थिजणें. [विरणें]

विरावणें—अक्रि. रममाण होणें; विश्रांति घेणें. 'मग राओ उर्वसीयेसि। विरावला तो।' –भाए ७६४. [वि+रम्]

विरावा—पु. मध्यस्थ; अडचण; खोळंबा. 'मध्यस्त विरावा कशास' –शिदि २८१. [वि+रम्]

विरावें—न. शौर्य; वीर्य; तेज. 'जन्म मायेचें मैंदावें। जन्म क्रोधाचें विरावें।' –दा ३.१.७. [सं. वीर्य]

विरि—स्त्री. विरी पहा.

विरिंचि-ची—पु. ब्रह्मा; ब्रह्मदेव; विधाता; सृष्टिकर्ता. विरंची पहा. 'करी स्तुती प्रेमरसें विरिंची।' –वामन चरित्र १.३३. [सं. वि+रच्] ०**अंड**–न. (काव्य) ब्रह्माण्ड; विश्व. 'भये तडाडी विरिंचिअंड।'

विरी—स्त्री. १ पोफळीच्या सांवळीस बुडाशीं असतो तो सुपासारखा भाग. २ विरीचा द्रोण. [सं. उ+वृ=आवरण घालणें]

विरी—स्त्री. वीर्य; तेज; बळ; सामर्थ्य; सत्त्वांश; (चुन्यातील) कस. 'पृथ्वीनें विरी साडिली।' –दा १३.४.१०. 'त्या

ळेसच त्याच्या नीतिमत्तेची विरी गेली आहे असें समजावें.' -नीतिशास्त्रप्रवेश ४४६. [सं. वीर्य]

विरीं—शअ. पर्यंत; वेरीं. 'वेलिअें वाटोगरी । गुंफिजेती सेरोविरीं ।' -शिशु ६३२. [सं. पर्यंत]

विरु—विरू पहा.

विरुगोळा—पु. विरंगुळा पहा.

विरुद्ध—न. अकल्याण; अभद्र; वाईट 'जें वडिला यां चिंतावें। वेरुद्ध मनें ।' -ज्ञा १.२१४. -वि. प्रतिकूल; उलट; विपरीत; वेघन करणारें; अडथळा आणणारें. 'तें ज्ञानीं विरुद्ध काय आहे। हें जाणावें कीं ।' -ज्ञा १६.५६. (समासांत) आचार-उक्त-काल-जन-वेश- धर्म-पथ्य-परिभाषा -मार्ग-रीति- लेख-वेद-शास्त्र-संप्रदाय-विरुद्ध. -धावि. अडथळा झालेलें; अडखळलेलें. [वि+रुध्=अडथळा करणें] **०भलें**-वि. शुभाशुभ.

विरुळ-ळें—वि. विरळ पहा. 'व्रस्त्रांतून शोभति ते विरुळे। -अकक २ किंकर; शुकरंभासंवाद १९. -ज्ञा ८.१७.

विरुळ—वि. विरळा पहा. 'ऐसा तो विरुळा संत' -दा ५.२.३८.

विरुळा—पु पाणसर्प; विरोळा. 'विरुळेआं रोखेंसी सरीसीं ।' -दाव ३८८. 'कालिय विरुळ्या जळिंच्या मानी मनांत भूधरसा ।' -सखारामतनय रुक्मिणीस्वयंवर १७. [सं. व्याल]

विरू-रूं—न. वैर; शत्रुत्व; वांकडें. 'हें काळें पाखिरू। मजसी सदा चिंती विरू ।' -शिशु ८२१. 'काई माझें घेतलें विरूं ।' -भाए ७७. 'जयांलागि मनें विरूं । आम्ही स्वप्नींहि न शकों धरूं ।' -ज्ञा २.३५ -वि. विरुद्ध; उलट; आड. 'मग जाणतया जें विरू। तयाची वाट वाहती करूं ।' -ज्ञा १६.५७. [सं. वैर; वि+ऋ=जाणें]

विरूढण—न. १ मूळ धरणें.. २ (ल.) परिणामकारक होणें; प्रभावी होणें. [सं. वि+रुह्=वाढणें] **वि(रु)रूढणें**-अक्रि. १ वाढणें; मोठें होणें. 'पुत्रांकुर विरूढला चोखें' -मुआदि ३. ३३. २ अंकुर फुटणें; रुजणें. 'तरी न विरूढती लिंचिर्ली। आवडे तैसी ।' -ज्ञा २ ६६. 'विरूढे सरतेपणाचें बीज ।' -स्वादि २. १.९ **विरूढी**-स्त्री. वाढ; अंकुर. 'तंव बाहेरी विरूढी करपे। रोमबीजाची ।' -ज्ञा ६.२३४; २.७९.

विरूप—वि १ कुरूप; विद्रूप; बेडौल. २ भिन्न; वेगळा; निराळा [सं]

विरूपाक्ष- पु शंकर [सं.]

विरूळ वि. विरळ पहा.

विरें—न. विरीचा द्रोण; विरी पहा.

विरे—स्त्री. विरी पहा. वीर्य. 'पुरे काळ हा नुरे योग्यता विरे निघुन चालली। ' -ऐपो ३७५.

विरेक—पु. १ रेच; ढाळ; मलविसर्जन. २ मल; विष्ठा. [सं. वि+रिच्-रेच] **विरेचन**-न. १ मलशुद्धि; हगवण; झाडा; ढाळ; रेच. २ ढाळक; रेचन; मलशुद्धिकारक औषध. [सं.]

विरे(रें)वीर—पु मुख्य वीर; वीरश्रेष्ठ; असंख्य वीर; वीर-समुदाय. 'विरेंवीर राक्षेस सवें बुडाला ।' -राक १.४.३०. 'मग अपार शर सोडिले। विरेवीर त्रासिलें ।' -जै ७९.८४.

विरोचनात्मज—बिना. विरोचनाचा पुत्र; बलि. [सं.]

विरोदी—स्त्री. विरवदी पहा. (व.) इरुदी. 'रुचिरतर विरोद्या शोभती अंगुळीला ।' -सारुह ६.३१.

विरोध—पु. १ विरुद्धभाव; प्रतिकूलता; वैधर्म्य; विरुद्ध मत; अडथळा; प्रतिबंध; वैर; शत्रुत्व; द्वेष. 'विरोधाचें मज न साहे वचन। ' -तुगा २०६३. 'विरोध आम्हां मगधांत। निकट वास करूं नये ।' -एरुस्व ६ ८. २ प्रतिवर्तित्व; भेद; अंतर; विसादृश्य. [सं. वि+रुध्] **विरोधणें**-अक्रि. विरोध करणें. -ज्ञा ९.४७२. **०भक्ति**-स्त्री. देवाशीं वैर करून त्याकडून आपला वध करवून घेऊन मोक्ष मिळविण्याची मार्ग. **विरोधी**-पु. साठ संवत्सरांतील विसावा संवत्सर. -वि. विरोध करणारा; प्रतिकूल; प्रतिपक्षी. **विरोधी भक्त**-पु. विरोधभक्ति करणारा.

विरोबा—पु वीर; एक क्षुद्र देवता. -खेया.

विरोली—स्त्री. विरवदी-ली पहा.

विरोळा-ला—पु. पाणसर्प. विरुळा पहा. 'वाहती ते चपळ विरोळे जाण।' -ह २६ १५८. 'वीरांचे हस्त विरोळे पूर्ण। तळपताती ठायीं ठायीं ।' -रावि २८.६६. [सं. व्याल]

विरोळा—पु. वरोळी; शेताची मर्यादा दाखविण्याकरितां घातलेला मातीचा ओटा.

विर्जुमाळ—वि. (कों.) समायीक. -पहाणी खर्डा सातारी. [अर विराखत्=वडिलार्जित मिळकत]

विर्ति—स्त्री. (अप.) वृत्ति; इनाम. **विर्तिक**-वि. वृत्तिवंत; इनामदार.

विर्मार—वि. (गो.) बीमार; आजारी.

विव्हडणें—अक्रि. दुःखी होणें; विव्हल होणें. -तुगा. **विव्हया**-वि विरही; दुःखी. 'ते तनूचेनि वियोगें । विव्हये नव्हती ।' -ज्ञा ७.१८१. [सं. विरह]

विव्हा—पु. (कों.) ओढा; नाला; प्रवाह; पव्हया. [सं. वि+प्र+वह्]

विलग—पुन. १ वैगुण्य; उणेपणा; व्यंग; विसंगति; वैपरीत्य; अंतर. 'विलग पडों नेदावें । कथेमध्यें ।' -दा १२.९.२९ २ उपद्रव; त्रास. 'कामक्रोधांचे विलग । उठावती अनेक । ' -ज्ञा

१२.६२. –वि. अलग; भिन्न; विसंगत; अयोग्य; असंबद्ध; न जुळणारें; तुटक; अलिप्त. 'हे लोक साऱ्या गांवापासुन कांहीं काळ विलग राहिले होते.' [सं. वि+लग्] **विलगट**–वि. वेगळा; अलिप्त; भ्रष्ट. –स्त्री. फार लगट; विशेष लगट. 'विलगट हट नाहीं चाट मोकाट नाहीं।' –दावि ७.२. 'ते देवत्रयांची खटपट। सूक्ष्मरूपें विलगट।' –दा १२ ८.९. **विलगणें**–अक्रि. दूर होणें; नाहींसा होणें; धुऊन निघणें. 'पदी श्रीरामाच्या दृढतर महादोष विलगे।' –सारुह ६.१६३. **विलगेस लावणें**–दूर करणें; बंदोबस्त करणें; बाजूस काढणें. 'ही किरकीर विलगेस लावा।' –पला ६.१३.

विलंगी—स्त्री. एक प्रकारचें कोळपें. कोळपें पहा.

विलग्न—वि. संलग्न; जुळलेलें; जोडलेलें; चिकटलेलें; मिळवलेलें. [सं. वि+लग्].

विलंघणें—उक्रि. १ उल्लंघन करणें; ओलांडणें; पलीकडे जाणें. २ (ल.) अतिक्रमण करणें; मर्यादेबाहेर जाणें. [सं. वि+लंघ्] **विलंघ**–वि. घोर; भयंकर; महान्. 'ऐशा गर्वोक्तीनें वदुनी पण करित ते विलंघ सती।' –कीर्तन १.१७.

विलंची—वि. कपटी; कुढघा मनाचा.

विलज्ज—वि. निर्लज्ज; अविनयी; उद्धट. [सं वि+लज्जा]

विलट—न. कापसांतील जंतु.

विलपणें—अक्रि. शोक करणें; रडणें; विलाप करणें. 'तरी हे भार्या सगुण वेल्हाळ। वांचो म्हणोनी विलपत।' –मुआदि ३.५२. [सं. विलप्]

विलंब—पु. उशीर; अवकाश; मध्यंतर; दीर्घकाल. 'बहु विलंबाचें सन्निध पातलें।' –तुगा ६०७. [सं. वि+लंब्=लोंबणें] **विलंबिका**–स्त्री. पटकी अथवा महामारीच्या विकारांतील तिसरी व अखेरची अवस्था. पहिल्या दोन अलसिका व विधूचिका. **विलंबित**–वि. १ उशीर लागलेलें; लांबणीवर पडलेलें; लांबविलेलें, पुढें ढकललेलें (काम). २ सावकाश, मंद, (ताल). ०**वृत्ति**–स्त्री. (ताल) मंदताल. –पु. मध्यलयीच्या दुपटीचा ताल. **विलंबी**–पु. साठ संवत्सरांतील बत्तिसावा संवत्सर. –वि. दीर्घसूत्री; दीर्घकाल लागणारें; उशीर करणारें; लांबण लावणारें.

विलय—पु. १ शेवट; नाश; प्रलय; अंतकालीन प्रलय. २ अंतर; विलंब; खंड. 'मिनलेयां वनमाळी। वैदर्भीची अवच्छा निवर्तली। ते सांघितां बोली। कथें विलयो पडेल।' –शिशु ८५६. [सं.] **विलया जाणें**–१ शेवट होणें; नाश होणें. २ व्यर्थ जाणें. 'काय जाहलें न वाहतां भुई पेरिजे। तरी तो वेलु विलया जाइजे।' –ज्ञा ११.१६२.

विलसणें—अक्रि. १ शोभणें; विराजणें; चमकणें; प्रकाशणें; चकाकणें; झळकणें. –ज्ञा १८.८७७. २ वागणें, वर्तणें; असणें. 'तो कवणीं स्थिती असे। कैसेनि रूपी विलसे।' –ज्ञा २.२८९. [सं. वि+लस्] **विलसित**–वि. विराजित; शोभायमान; प्रकाशमान; तेजस्वी; सुंदर. –न. विलास; चेष्टा.

विलक्षण—वि. १ लोकोत्तर; चमत्कारिक; अलौकिक; असामान्य; विचित्र; नाविन्यपूर्ण. २ भिन्न; निराळा; वेगळ्याच प्रकारचा, गुणाचा. 'ज्ञाता देहीं विलक्षण।' –दा १९.४.२७. ३ विपरीत. 'वचनभंग करितां विलक्षण' –दा ६.७.१०. [सं. वि+लक्ष्=पाहणें]

विला—स्त्री. प्रसंग; वेळ; काळ; संधि; हंगाम. [फा. विला] **दर इन विला**–या प्रसंगी; या ठिकाणीं.

विलाचे जाळें—न. समुद्रांत टाकावयाचें मासे पकडण्याचें मोठें जाळें; बुरीचें जाळें पहा.

विलाज—पु. इलाज पहा.

विलात—स्त्री. विलायत पहा.

विलाप—पु. शोक; दुःख; आरडाओरड; रडारड; आकांत. [सं. वि+लप्] **विलापणें**–अक्रि. मोठ्यानें शोक करणें; आकांत करणें; रडणें; आक्रंदणें. **विलापी**–वि. रडणारा; शोक करणारा.

विलायची—स्त्री. (ना.) वेलची पहा.

विलायत—स्त्री. १ मूळ देश; स्वदेश. २ उत्पत्तिस्थान; मूळचा प्रदेश (प्राणि, वनस्पति वगैरेचा). ३ (रूढ) परदेश; परकीय देश; विशेषतः इंग्लंड, यूरोप. ४ प्रांत; परगणा; प्रदेश; जनपद. 'तेरदळच्या विलायतीस शिवाजी तसवीस देतो.' –शिचप्र ५. 'विलायती खराब पडली होती.' –वाडसनदा १७४. [अर. विलायत्] **विलायती**–वि. १ परदेशी; इंग्लंडचा; यूरोपीय. 'हिंदुस्थाननें विलायती माल घेणें पातक होईल' –टि ३. २४. २ धूर्त; बिलंदर; कावेबाज; हुषार. ३ परदेशी; चमत्कारिक; लक्ष्यवेधक; असामान्य (याअर्थी कोणत्याहि विचित्र, सुंदर, अजब, कौशल्यपूर्ण वस्तूस लावतात). ४ (ल.) उनाड, उंडगा, खोडकर (मुलें). ०**ऊंस**–पु. एक जातीचा ऊंस. ०**कोंबडा**–पु. टर्की; गिनी फाउल. ०**गवत-घास**–न. गिनी गवत; लसूणघास. ०**चणा**–पु. वाटाणा. ०**चिंच**–स्त्री. बारीक पानांचें बारीक शेंगा येणारें एक झाड. ०**थुवर**–पु. एक जातीचा थोर; शेर. ०**धोतरा**–पु. धोत-याची एक जात. ०**निवडुंग**–पुन. फडे निवडुंग; बिनकाटयाचा निवडुंग. ०**बाभळ**–स्त्री. एक विशिष्ट वृक्ष. ०**मूग**–पु. भुइमूग. ०**मुळा**–पु. मुळयाची एक जात. –कृषि ६१८. ०**मेंदी-धी**–स्त्री. एक वासाची, मेंदीची जात. ०**वांगी**–स्त्री. टोमाटोचें झाड; बेलवांगी. ०**वांगें**–न. टोमाटो; बेलवांगें. ०**शेर**–पु. एक जातीचा शेर, हुरा. ०**सन**–पु. ओरिसा, ओढया व बंगालचा कांहीं भाग यांत चालणारा एक शक. इ. स. ५९२ मध्यें सुरू झाला. सौरवर्ष व चांद्रमास.

विलास—पु. १ क्रीडा; खेळ; करमणूक; कालविनोदन; करमणूक (विशेषतः स्त्रिया, नर्तकी, गाणारणी वरोबर). २ चैन; मजा; रंगेलपणा; स्वैर भोग. ३ स्त्रियांचा प्रेमदर्शक हावभाव; कामचेष्टा; नखरा (भ्रूसंकेत, लाजणें, मुरडणें वगैरे). [सं. वि+लस्] **विलासिनी**–स्त्री. विलास करणारी स्त्री. –ज्ञा ९.३२३. ' विलोकुनि विलासिनी जन पुनःपुन्हा कामुक।' –केका १०१. **विलासी**–वि. १ खेळकर; क्रीडासक्त; आनंदी. २ चैनी; कामुक; विषयलोलुप; भोगी; गुलहौशी.

विलाहाळ, विलाळ—पु. विल्हाळ पहा. ' त्या जेवणाचे विलाहाळ। अल्प अल्प सेवीतसे।' –वेसीस्व ८.७४. ' मग त्या आच्मनाचे विलाळ।' –वेसीस्व ८.७४.

विलुप्त(दृष्टि)—स्त्री. (नृत्य) पापण्यांची सारखी उघडझांप करणें व बाहुल्या न दिसूं देणें. हा अभिनय मूर्खपणा, उन्माद, दुःख, पीडा यांचा द्योतक आहे.

विले—विल्हे पहा. ' ऐसें एकामागें एक केलें। विलेनें नेमस्त लाविले।' –दा १६.१०.१५.

विलेप, विलेपन—पु.न. १ सुगंधी पदार्थ अंगास लावणें, उटणें, माखणें; उटी लावणें. २ उटणें; उटी; सुगंधीद्रव्य (अंगास लावावयाचें); चंदन वगैरे. ३ अंगास लावणें, चोपडणें, माखणें (सामान्यतः) [सं वि+लिप्] **विलेपित**–वि. माखलेलें; चर्चित.

विलोकणें—उक्रि. पाहणें; अवलोकणें; चिंतणें; जाणणें. [सं. वि+लोक्] **विलोकन**–न. पाहणें; दृष्टि टाकणें; निरीक्षण; टेहळणी. **विलोकनीय**–वि. पाहण्यासारखें; दर्शनीय; चिंतनीय. **विलोकित**–वि. पाहिलेलें; निरीक्षण केलेलें; चिंतलेलें; टेहळलेलें. **•दर्शन**–न. (नृत्य) पाठीमागील वस्तु पाहणें. **•पुट**–न. (नृत्य) पापण्यांची उघडझांप.

विलोभन—न. फसवणूक. –नि ५३७. [सं. वि+लुभ्]

विलोम—वि. १ विपरीत; उलटा; माघारा; विरुद्ध दिशेचा. २ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या उतरत्या क्रमाच्या उलट पुरुष व स्त्री असतांना होणारा संबंध; हलक्या वर्णाचा पुरुष व वरच्या वर्णाची स्त्री यांचा संबंध व त्यासंबंधापासुन जन्मलेला; संकरज. [सं. वि+लोम=केस. अंगावरील केसांची वाढ वरून खालीं असते यावरून] **•क्रिया**–स्त्री. (गणित) दिलेल्या प्रमाणांतील संख्या उलट करण्याची क्रिया. **•त्रैराशिक**–न. व्यस्त त्रैराशिक. **•विधि**–पु. (गणित) दिलेल्या प्रमाणांतील संख्या उलट करण्याची क्रिया.

विलोल—वि. चंचल.

विल्कल—वि. मूर्ख; अजागळ; व्यंग. ' कितीयेक ती माणसें विल्कलेसीं।' –दावि २८४. [सं. विकल]

विल्लत—वि. इल्लत पहा.

विल्हन—न. (महानु.) पातळ, झिरझिरीत वस्त्र. ' सोनें सेंदूर विल्हना तदुपरी क्षीरोदकी जो फूटा।' –प्रसादमालिका ५.

विल्हय, विल्हणा, विल्हाणें—स्त्रीपुन. वंश; कुल; गोत्र. [अर. विल्हा]

विल्हा, विल्हे—पुस्त्री. १ वर्ग; भाग; खातें (मूळाक्षरांचें). २ (सामान्यतः) प्रकार; दर्जा; विभाग. ३ (किल्ला, भाग यात्र) जोडलेला, समाविष्ट केलेला भाग; अंकित प्रदेश; प्रांत. [अर. विल्हा] **विल्हे करणें–लावणें**–१ निकालास लावणें; निकालांत काढणें. २ लिहिणें; व्यवस्थित मांडणें. ' दुसाला दसरीं विल्हे लावला.' –बाडबाबा २.८५. **विल्हेस लागणें**–व्यवस्था लागणें; बंदोबस्त होणें. ' तुका म्हणे तरी लागलों विल्हेसी।' –तुगा १८४५. **विल्हेस लावणें**–वर्गवारीनें, प्रतवारीनें, प्रकारानुरूप लावणें; व्यवस्था लावणें; जम बसविणें. **विल्हेस लावणें–देणें–करणें**–हवालीं, स्वाधीन, ताब्यांत देणें, करणें; सुपूर्त करणें. **विल्हेवाट, विल्हय**–स्त्री. १ उधळपट्टी; वासलात; फडशा; निकाल; धूळधाण. ' एकीची विल्हेवाट लावून दुसरी बरोबर सवै सोहळे.' –टि ४.१३५. २ व्यवस्था; रचना; मांडणी; योग्य योजना. **विल्हेवार**–क्रिवि. वर्गवारीनें; जातवारीनें, खातेवारीनें, शिस्तवार; क्रमानें. **विल्हेवारी**–स्त्री. १ वर्गवारी; खातेवारी; वर्गीकरण; निवड. २ वर्णानुक्रमरचना. ' प्रकृत कोशाची रचना, त्यांतील गुणदोष, यांतील सारी नांवें यांचे विल्हेवारीनें दिले आहेत.' –नि १४४.

विल्हाळ, विल्हळ—वि. १ दीनवाणें; करुण; दुःखपूर्ण (कथन, कहाणी, रडगाणें, कुरकुर). ' जिवाचे विल्हाळ '=जिवाचे हाल. २ अभद्र बोलणारा; अपशकुनी; अशुभ बोलणारा. [सं. विल्हल्] **विल्हाळक**–स्त्री. काकव्वत; पिरपिर; कुरकुर; रडगाणें. –वि. व्यर्थ; निष्कारण. ' तुका म्हणे असे हातीचे कंकण। तपासी दर्पण विल्हाळक।' –तुगा २७८१. **विल्हाळगौर**–स्त्री. नेहमीं कुरकुरणारी, पिरपिर लावणारी स्त्री; दुर्मुखलेली, अभद्र, अशुभ बोलणारी, चिंतणारी स्त्री. **विल्हाळणें, विल्हळणें**–अक्रि. १ रडगाणें गाणें; किरकिर करणें; शोक करणें. २ (ल.) बाचतांना, बोलतांना रडका आवाज, सूर काढणें; हेल काढणें. ३ नेहमीं मनांत अशुभ विचार आणणें; अभद्र बोलणें, चिंतणें. **विल्हाळया, विल्हळया**–वि. १ रडतोंडया; किरकिऱ्या; पिरपिऱ्या; रडया; रडगाणें गाणारा; तकरारी सांगणारा. २ अशुभ, अभद्र बोलणारा.

विल्होर—पु. (व) बिलवर.

विवंचणें—उक्रि. १ विचार करणें; चिंता करणें; मनांत घोळणें; चिंतन करणें. ' सुनमुखींचें वचन कानीं। ऐकोनी सासु विवंची मनीं।' २ विवेचन करणें; फोड करणें; स्पष्ट करणें. ' हा अभिप्रावो संपूर्ण। विवंचूं गा।' –ज्ञा १५.४७७. ३ भेद करणें;

निवड करणे. 'तैसें दुःखितांचें शिणणें। हिरतां सकणवपणें उत्तमाधम नेणें। विवंचूं गा।' –ज्ञा १६.१५५. ४ मानणें; कल्पना करणें. 'जें सर्वत्र सदा सम। तेथ विभाग अधमोत्तम । मतिवशें संभ्रम। विवंचिती।' –ज्ञा ४.७०. [सं. वि+वंच्] **विवंचना**–स्त्री. १ विचार; चिंता; घोर; काळजी; घोटाळा. (क्रि० पडणें). 'काय म्यां तेथींचें रांधिलें चाखोनि। तें हें करी मनीं विवंचना।' –तुगा २०३. २ सूक्ष्म विचार; विवेचन; विचारणा; सारासार विचार. 'लिंगत्रयांची विवंचना । विचारितां जीए सर्वस्वी ना।' –ऋ ४१. 'जेथें नाहीं विवंचना। तेथें कांहींच चालेना।' –दा १३.६.२९. ३ भेद; निवड. 'तैसी वासनांतराची विवंचना। मग आपैसी पारुखे अर्जुना।' –ज्ञा ५.१५५.

विवज—न. फोड; स्पष्टीकरण. 'सावज रूपाचें विवज जाणवेना।' –दावि ४१९. [सं. वि+वच्]

विवटणें—अक्रि. स्पष्ट करणें. –मनको.

विवटें—न. (कुलाबा) एक जातीचा मासा.

विवदणें—अक्रि. १ वादविवाद करणें; चर्चा करणें; खल करणें; तकरार करणें; भांडणें. २ (महानु.) वाखाणणें; स्तुती करणें. 'लीळा निरंतर परमेश्वरू विवदना।' –गरतो ८३. [सं. वि+विद्] **विवदमान**–वि. भांडखोर; चर्चा करणारा; वाद करणारा. **विवद्धी**–वि. (ना.) खोडकर; भांडखोर; व्रात्य.

विवर—न. १ छिद्र; गुहा; बीळ; भोंक; पोकळी; भुयार 'सीतेच्या वाक्यांनीं जगतीला होय तत्क्षणी विवर।' –मोरामायण १.१६५. २ अवकाश; जागा. 'देवो देव भक्तालागीं। जिये विवरू देखे आंगीं।' –ज्ञा १८.१५९२. 'तें धर्मसुवर्णकाराचें यंत्र। कीं मोक्षसिद्धीचें विवरू।' –ऋ २२. ३ स्पष्टीकरण; विवरण. 'नाना योग नाना विवर।' –दा १४.३.४६. 'तया विवरा अनुसंधान। देइजे निकें।' –सिसं ३७.२३. ४ (गणित) अंतर. 'भूमीपासुन सूर्य व ग्रह यांपावेतों रेषा कल्पिल्या तर त्या रेषांतील कोणास सूर्योतरकोण किंवा विवर म्हणावें.' –सूर्य २३. ५ (ल.) दोष; छिद्र. 'छाद्मीं नुरवीतिळहि खळदृष्टिसि गुरुराज कारुणिकविवर।' –मोणादि २.२४. [सं. वि+वृ]

विवरण—न. स्पष्टीकरण; सविस्तर निरूपण; फोड; उलगडा; व्याख्या. 'शास्त्रीं हेंचि विवरण।' –गुच १५.१४. [सं. वि+वृ] **विवरणें**–उक्रि. १ स्पष्ट करणें; फोड करणें; व्याख्या करणें; भाष्य, टीका करणें. 'तेवीं अष्टादसु विवरी। सार्थत गीता।' –ज्ञा १८.४३. २ विचार करणें. 'हृदयीं विवरी गाधिकुमार।' –मुआदि ४०.८०.

विवरु-रू—पु. विस्तार; प्रकार; तपशील. 'ते पात्राराओ पात्रांगुरु। दावी हस्तकांचा विवरू।' –भाए ४५४. 'नाना भक्त मालिआं दत्त पैकांचा विवरु.' –चौऱ्याशींचा लेख [सं. वि+वृ]

विवर्जन, विवर्जित—वर्जन, वर्जित पहा.

विवर्ण—वि. रंग गेलेला; विटलेला; शुभ्र केलेला. [सं. वि+वर्ण]

विवर्ण—विवरण पहा. 'महावाक्यांचें विवर्ण। वेगळें असे।' –दा १५.५.३०.

विवर्त—पु. १ भोंवरा. २ भास; भ्रम; भ्रांति; माया. 'माया ब्रह्मीचा विवर्त।' –विपू ३.२४. 'बोलतां परिणाम विवर्तु।' –भाए ५८३. 'मूळ तात्त्विक रूप सुटून दुसरें नांवरूप प्राप्त होतें तेव्हां त्यास विर्तत म्हणावें.' –गीर २३९. [सं. वि+वृ] **०रूप**–वि. भासमात्र; मायावी. 'तेथें माया मिथ्या भान। विवर्तरूप भासे।' –दा ८.२.२. **०वाद**–पु. मायावाद. 'प्रकृति ही स्वतंत्र दुसरी वस्तु नसून एकजिन्नसी एका निर्गुण ब्रह्मावरच मनुष्याचीं इंद्रियें अज्ञानानें सगुण देखाव्याचा अध्यारोप करीत असतात या मतास विवर्तवाद म्हणतात.' –गीर २३८. **विवर्तन**–न. १ भ्रमण. २ (नृत्य) डोळा एका बाजूस फेकणें, शृंगारद्योतक अभिनय. **०उरू**–स्त्री. (नृत्य) टांच आंत घेऊन जंघाक्षिप्त मांडयांची होणारी स्थिति. **विवर्तितकरण**–न. (नृत्य) हात पुढें करणें, त्रिक विवर्तन फेकणें व डावा हात रेचित करणें. **०पार्श्व**–पु. (नृत्य) एकाच पायाच्या चवडयावर उभें राहून कटि विवृत्त केली असतां वरचा सर्व भाग फिरविण्याची क्रिया. **०पुट**–न. (नृत्य) खालच्या व वरच्या पापण्या जवळ आणून फिरविणें.

विवश—वि. पराधीन; परतंत्र. [सं. वि+वश्]

विवशी, विवशी, विवसी—स्त्री. १ विघ्नदेवता; राक्षसी; भूत; डाकीण; हडळ. 'कीं लोटलेया विवसी। देखे निधान जेवि।' –ऋ १९. 'जैसी मंत्रज्ञातें विवसी। भुलवी कां।' –ज्ञा २.३१२. २ अपशकुनी, विघ्न आणणारी, दुर्दैवी स्त्री. ३ दुर्दैवाचा फेरा; कष्टदशा. 'स्वयंभू दीप विझतांच विवशी व्यापली दरबारांत।' –ऐपो ३०८. 'तरी ही राज्यास आली विवशी।' –नव १४.११५. ४ चिडस; शिसारी कंटाळा; खंत. 'तयां घायांची घेओनि विवशी। पळाला चैद्य तो।' –शिशु १०७३. 'जयांचीं जीवें घेती विवसी। तेचि जडोनि ठाके जीवेंसीं।' –ज्ञा ३.२३७. 'ते व्हेळीं घेओनि विवसी। मी जालां तापसी।' –शिशु १३२. **०लागणें**–लावसटणें; सडणें; लांवसरणें; लागोरणें. **०लावणें**–नाश करणें; त्रास देणें. 'आतां यादवां लावैन विवशी। तरी शैल्यु होअें।' –शिशु ८८९.

विवसन, विवस्त्र—वि. वस्त्ररहित, नग्न; अंगावर कपडा नसलेला. [सं.]

विवसा—पु. उद्योग; धंदा; काम; व्यवहार. [सं. व्यवसाय]

विवसा—स्त्री. (काव्य) इच्छा; कल; प्रवृत्ति; आकांक्षा. [सं. वि+इष्=इच्छा]

विवस्कंध—पु. सप्तस्कंधांतील पांचवा, नक्षत्र मंडळापासून शनिमंडळापर्यंतचा स्कंध; सप्तस्कंध पहा.

विवस्था—स्त्री. व्यवस्था पहा. [व्यवस्था अप.]

विवस्वत, विवस्वान्—पु. सूर्य. [सं.]

विवळ—वि. १ स्पष्ट; सुगम; सोपे. ' तरी बोलिले तेचि सांगावें । विवळ करूनि । ' –ज्ञा ५.१६४. २ सविस्तर. ' पुष्प तांबोल विवळी । पूजा अनुक्रमें चालविल्या । ' –वेसीस्व ४.४०.

विवळणें—उक्रि. १ उदयास येणें; उगवणें; प्रकाशणें. ' एकां वैराग्य रवि विवळे । ' –ज्ञा ४.१२८. २ स्पष्ट होणें; समजणें. ' म्हणोनि नेणणें जया विवळे । ' –परमा ६.४. ' नातरी भरलेनी कावळे । दृष्टीं आपधेची दिसे पिवळे । तें फिडलियां विवळे । जैसे तैसे । ' –ज्ञाप्र ५४२. ३ उत्पन्न करणें; प्रसवणें, ' सूर्य सूर्यासी विवळे । कां फळ आवणयां फळे । ' –अमृ ४.२१.

विवळणें—अक्रि. तळमळणें; कण्हणें; कुंथणें. ' हानी झाली विवळे । ' –दा ३.७.३९. [सं. विव्हल] **विवळणी**–स्त्री. दुःख; शोक; तळमळ. **विवळखोर**–वि. नेहमीं दुःख करणारा; तळमळणारा.

विवळी—स्त्री. एक पालेभाजी. ' चवळी विवळी कवळया शेंगा । ' –अमृतसुदाम ३४.

विवक्षा—स्त्री. १ बोलण्यांतील हेतु, उद्देश; पुढें मांडावयाचा मुद्दा, मत; मनांतील धोरण, अनुसंधान; बोलण्याची इच्छा. २ इच्छा; हेतु; गरज; जरूरी. ३ व्याख्यान. वर्णन. ' तुझी करूं जातां विवक्षा । आदि कोणा न सांपडे । ' –ह २२.१. [सं. वच्=बोलणें] **विवक्षावशात्**–क्रिवि. वक्त्याच्या उद्देशानुसार, हेतूनुरूप; मताप्रमाणें. **विवक्षित**–न. विवक्षा पहा. –वि. १ वक्त्यानें उद्देशिलेलें; इच्छिलेलें; निर्दिष्ट; वक्त्याच्या मनांत असलेलें. २ विशिष्ट; महत्त्वाचा; प्रसिद्ध; प्रमुख; इतरांहून श्रेष्ठ (व्यक्ति, पुरुष).

विवाद—पु. १ चर्चा; खल; खंडनमंडन. २ वाद; पूर्वपक्ष उत्तरपक्ष; उत्तर–प्रत्युत्तर. ३ कज्जा; खटला; फिर्याद; कायदेशीर भांडण. ४ भांडण; अपील; फेरतपासणी. ' अंमलदारांच्या फैसल्यावर विवाद जिकडे चालूं शकेल... '–खानगीखातें नियम १३१. [सं. वि+वद्=बोलणें] **०ग्रस्त**–वादग्रस्त पहा. **विवादणें**–अक्रि. (काव्य) वाद करणें; भांडणें; तंडणें. **विवादी**–वि. १ भांडखोर; तकरारी; वाद करणारा; फिर्यादी. २ अपीलंट; फेरतपासणी मागणारा. –खानगी खातें १३३. **०स्वर**–पु. रागांतील नियमित स्वरांहून निराळा जो एखादा स्वर गायक कुशलतेनें रागरक्ति वाढविण्याकरितां रागास लावतात तो.

विवार—पु. १ विस्तार; प्रसरण; विकास; खुलावट. २ स्वर व उष्मवर्ण यांचा उच्चार होईइतका वागिंद्रियाचा विस्तार, विकास. बाह्यप्रयत्न पहा. [सं. वि+वृ]

विवास—पु. हद्दपारी; गृहत्याग; देशत्याग. ' निवास येथिल विवास केवळ छळणुक माझी पुरती. ' –टिक १३०. [सं. वि+वस्]

विवाह—पु. लग्न; स्त्रीपुरुषांमध्यें दांपत्यसंबंध उत्पन्न करणारा विधि, संस्कार, पद्धति. याचे आठ प्रकार मनुस्मृतींत सांगितले आहेत–ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस, पैशाच. [सं. वि+वह्; सिं. विहाउ; हिं. ब्याह] **विवाहणें**–उक्रि. १ लग्न करणें; पत्नीचें पाणिग्रहण करणें. २ लग्न लावणें; लग्नांत देणें (मुलीस). **विवाहमेळ**–पु. विवाहप्रसंग; विवाह समारंभ; विवाहसंस्कार. ' म्हणसी मी सोयरा अति काळा । कां बोलाविसी विवाहमेळा । ' –एरुस्व ४.१२. **विवाह होम**–पु. विवाहाच्या प्रसंगीं गृह्याग्निसिद्ध करून करावयाचा होम. **विवाहित**–वि. लग्न झालेला. **विवाही**–पु. व्याही; आपल्या मुलाचा किंवा मुलीचा सासरा. **विवाहोपचार**–पु. लग्नप्रसंगीं करावयाचे विधी, संस्कार, होम वगैरे विशिष्ट गोष्टी. **विवाह्य**–वि. लग्न व्हावयास योग्य, लायक, शक्य, जरूर; ज्यांचें लग्न व्हावयाचें आहे असा.

विविक्त—न. एकांतस्थान; पृथक्स्थान. –वि. १ विशिष्ट; कृतलक्षण; निर्दिष्ट; स्पष्ट व पृथक् विचार केलेला. २ पृथक्; अलग; एकांत; आडवळणाची, बाजूची (जागा). [सं.] **०पणें**–क्रिवि. एकीकडे; अलग; निराळें. ' आणि विविक्तपणें बसून कारभार करणें. ' –राजे संभाजीचरित्रै ६.

विविदिषा—स्त्री. जाणण्याची इच्छा. [सं. विद्=जाणणें] **०संन्यास**–पु. ईश्वरज्ञान होण्याच्या इच्छेनें घेतलेला संन्यास. ' ऐसा जो त्यागविलास । या नांव विविदिशा संन्यास । ' –एभा १८.१८३.

विविध—वि. नाना प्रकारचें; अनेक तऱ्हेचें. –ज्ञा १.९४. [सं.] **०गुणाकार**–पु. (गणित) अनेक परिमाणांचा गुणाकार. **०त्रैराशिक**–न. (गणित) बहुराशिक. **०भागाकार**–पु. (गणित) अनेक परिमाणांचा भागाकार. **०मिळवणी**–स्त्री. (गणित) अनेकपरिमाणांची बेरीज. **०वजाबाकी**–स्त्री. (गणित) अनेकपरिमाणांची वजाबाकी.

विविक्षा—विवक्षा पहा. तपास; विचक्षणा.

विविक्षित—विवक्षित पहा.

विवृत—धावि. विवरण केलेलें; स्पष्ट केलेलें; उलगडा, फोड केलेलें. [सं. वि+वृ]

विवृति—स्त्री. विवरण; स्पष्टीकरण; फोड; उलगडा.

विवृत्त—पु. वर्णोच्चार होण्याकरितां वायूसंबंधीं प्रयत्न, क्रिया. प्रयत्न पहा. [सं.] **०कटि**–स्त्री. (नृत्य) एका पायाच्या चवडयावर उभें राहून दुसरा पाय अंतराळीं ठेवून अर्धी गिरकी मारणें.

विवेक—पु १ विचार; तारतम्यबुद्धि; समज; तर्क; बुद्धि. ' मज विवेकु सांगावा । मन्हाटा जी । ' –ज्ञा ३.१७. ' जैसा मूर्तिमंत विवेक । तैसा जाण राजा भीमक । ' –एरुस्व १.१२. २ सदसद्विवेक; संयम; समंजसपणा; चित्तवृत्तिनिरोध. ' मला अन्नाचा तिटकारा आला आहे पण विवेकानें खातों. ' ३ (वेदांत) नित्यानित्य, सत्यासत्य, यांमधील भेद जाणण्याचें ज्ञान; साधनचतुष्टयांतील पहिलें साधन. ' आहे दिठी डोळयां विवेकु । अपाडु जैसा । ' –ज्ञा १८.२७३. ४ वाटाघाट, चर्चा वगैरेमुळें होणारा समेट, तह. ' विवेक व्हावया प्रकार दिसत नाहीं. ' –खरे १५३९. [सं. विच्=विवेक करणें] **०जागविणें**–तारतम्यबुद्धि जागृत करणें; विचार करणें. ' ते अनुभवी जाणती सम्यक । ज्यांनीं विवेक जागविला । ' **०नंत**–विचारी; इष्टानिष्टाची निवड करण्यास समर्थ. ' देखा विवेकवंतु सुविमलु । ' –ज्ञा १.१४. **०वादी**–पु. बुद्धिवादी; तर्ककर्कश; विचारास पटेल तेंच मानणारा. (इं.) रॅशनॅलिस्ट. ' तो प्रथम विवेकवादी (रॅशनॅलिस्ट) होता ' –सुदे १६७. **०सभा**–स्त्री. पंडितांनीं चर्चा करावयाची जागा. रायगडांत शिवाजीच्या वाडयांत होती. –शिदि ४१६. **०हंस**–पु. विवेकी पुरुषरूपी हंस. –एभा १.२३. **०हीन**–वि. अविचारी; विचार न करणारा; तारतम्यबुद्धि नसलेला. **विवेकाढ्य, विवेकी**–वि. विचारी; न्यायी; तारतम्य जाणणारा; बुद्धिवान; समंजस; शाहणा. ' प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी । ' –दा १२.१ २.

विवेचक—वि. विवेचन करणारा; विचारी; तारतम्य पाहणारा. **०बुद्धि**–स्त्री. सारासारविचार. ' विद्यार्थ्यांना कॉलेज सोडायला लावतांना विवेचन बुद्धि जरूर उपयोगांत आणली पाहिजे. ' –केले १.३४९.

विवेचन–ना—न स्त्री. १ निवडानिवड; तारतम्य; अवयवशः पृथक्करण करून केलेला विचार; सर्व बांजूंचा विचार; योग्यायोग्य विचार. २ स्पष्टीकरण; फोड; उलगडा. [सं. विच्=विचार करणें] **विवेचनीय**–वि. स्पष्ट करण्यास, निवड करण्यास, विचार करण्यास योग्य; तारतम्य पाहण्यालायक; योग्यायोग्य पाहण्यासारखा. **विवेचित**–वि. तारतम्य जाणलें आहे असा; योग्यायोग्य पाहिलेला.

विव्वोक—पु. विवेक. ' तारुण्यादि मदानें जो अनादर तयासि विव्वोक । ' –गंगाधर, रसकल्लोळ १३६.

विव्हल-लित, विव्हळ-ळित—वि. (प्र.) व्याकूळ; दुःखी; त्रस्त. [सं. ह्वल्] ' टाकिती विव्हाळा धरणी अंग । ' –तुगा १०९. **विव्हळा**–स्त्री. यातना; दुःख; पीडा. ' तो रोगिया जेवि विव्हळा । सवता होय । ' –ज्ञा १७.१०१. **विव्हळगौर**–स्त्री. नेहमीं रडकथा गाणारी, कुरकुरणारी, रडवी स्त्री.

विव्हाव—विवाह पहा. ' संभ्रमें मांडिला विव्हाव । ' –दा ३.२.३५.

विशंक—वि.क्रिवि. निर्भय; शंकारहित; निःशंक; निःसंशय. ' जिंकी कपटी जी श्री श्रीदश्रीशीं विशंक तोलावी । ' –मोसभा ४.११.

विशकल—वि. मोडून तुकडे झालेला; भंगलेला; फुटलेला; तुटलेला. [वि+शकल] **०न**–न. तुकडे करणें; भाग पाडणें; फोडणें; तोडणें.

विंशति—वि. वीस. [सं.]

विशद—वि. १ स्पष्ट; प्रांजल; निर्मल; स्वच्छ; प्रगट; दिसण्याजोगें. ' मुळीं नसतां विशद । ' –दा १७.२.१५; –ज्ञा ९.२१०. २ उघडें; ऐसपैस; मोकळें; विस्तृत. [सं. वि+शद्] **विशदर्थें**–क्रिवि. स्पष्टपणें; स्वच्छपणें. ' आपणांस मामल्यापासुन मुक्त करावें म्हणून विशदर्थें लिहिलें. ' –शारो १.६१.

विशंभणें—विसंबणें पहा. ' दोघेहि क्षण येक न विशंभती । ' –दा ३.३.३५.

विशय—पु. विषयाविषयीं संशय. –धर्मशास्त्रविचार, काणे.

विशरण—न. सडकेपणा; कुजणें; विध्वंस; विघात; विच्छेद; चकनाचूर. [सं. वि+शृ]

विशाखा—स्त्री. सोळावा नक्षत्रपुंज. [सं.]

विशाण—विषाण पहा.

विशाप—वि. उःशापित; शापापासुन निवृत्त; शापमुक्त.

विशांपति—न. राजा; प्रंजेचा नायक. [सं.]

विशारत—स्त्री. (अप) इशारत पहा. –तुगा ३७७८.

विशारद—वि. प्रवीण; निपुण; विद्वान; पटाईत. [सं.]

विशाल-ळ—वि. लांबरुंद; मोठा; भव्य; अवाढव्य; विस्तृत; अफाट. ' वरी बिंब तें लाल आल विशाळ । ' –मराठी पहिलें पुस्तक. –ज्ञा १.१९. **०कोन**–पु. काटकोनापेक्षां मोठा कोन. **०स्कंध**–वि. रुंद खांद्याचा. **विशाळणें**–अक्रि. मोठें होणें. ' आपण विवेकें विशाळला । ' –दा ९.९.३२.

विशालू, ईशालू—वि. (महानु.) विषयालु; विषयी. –दृष्टांतपाठ ५९.

विशिख—पु. १ यवन. –ख ५४७९. २ इंग्रज. –पया १७५. ३ बाण. –वि. शिखानष्ट; शेंडी नसलेला. [सं. वि+शिखा=शेंडी]

विशिष्ट—वि. १ कांहीं तरी ठळक गुण असणारा; कांहीं असामान्य गुणामुळें उठून दिसणारा; विशेष लक्षणयुक्त. २ युक्त; संबद्ध; अंगीं असणारा; अंतस्थ किंवा अधिष्ठित असलेला. उदा० घटविशिष्ट भूतल, जलविशिष्ट पात्र, अंतःकरण विशिष्ट चैतन्य, हस्तपादादिअवयवविशिष्ट देव, शिखाविशिष्ट हिंदु इ०. ३ असामान्य,

असाधारण; श्रेष्ठ; निराळा. ' गुरुपद सर्वांत श्रेष्ठ। त्याहून नाहीं कोणी वरिष्ठ। कल्पवृक्ष म्हणावा विशिष्ट। तरी कल्पिले पुरवी तो।' –ह १.४८. ' विशिष्टां व्रतांचे फोक।' –ज्ञा १५.१९१. [सं. वि+शिष्=भेद करणें] ०उष्णता–स्त्री. (शाप.) पदार्थाचें एक अंश तपमान वाढविण्यास लागणारी उष्णता. (इं.) स्पेसिफिक हीट. ०गुरुत्व–न. (शाप.) पदार्थाचें पाण्याशीं तुलनात्मक भारमान. (इं.) स्पेसिफिक ग्रॅव्हिटी. ०ज्ञान–न. एखाद्या पदार्थाचें त्यांतील कांहीं विशेष गुणधर्मामुळें किंवा विशेष प्रसंगामुळें होणारें विशेष ज्ञान. याच्या उलट विषयज्ञान म्हणजे एखाद्या पदार्थाविषयीं सामान्यज्ञान. **विशिष्टाद्वैत**–न. रामानुजाचार्यांचें मत. चिदचिद्विशिष्ट ईश्वर एकच होय व ईश्वरशरीरांतील या सूक्ष्मचिदचिदापासून पुढें स्थूल चित् व अचित् किंवा अनेक जीव व जगत् निर्माण होतात हें मत.

विशी—स्त्री. १ वीस वर्षांचें वयोमान. ' विशी विद्या तिशीं धन.' २ वीस वस्तूंचा समुदाय, गट. [वीस] **विशी बाविशी किंवा विशी एकुणविशी**–किंचित् चढउतार; थोडा फरक.

विशीं—शअ. (अप.) विषयीं पहा. ' जें ज्ञानविशीं उणें।' –दा ५.७.२०. ' तधिपासुनि कोण्हे विशिंचें सुख न देखेचि।' –पंच २.४. ' प्रपंचविशीं सादर।' –दा २.१०.२७. ' कांहीं चिंता कोणा नाहीं कोणे विशीं।' –तुगा १०२.

विशीर्ण—वि. जीर्ण; कुजलेला; मोडकातोडका; पडका; चुराडा झालेला; चकनाचूर झालेला; अवयव वेगळे झालेला. [सं. वि+शृ]

विशुद्ध—धावि. शुद्ध; स्वच्छ; निर्मळ केलेल; धुतलेलें. ' जयजयदेवविशुद्ध।' –ज्ञा १८.७. **विशोधित**–वि. अत्यंत शुद्ध; पवित्र; स्वच्छ; निर्मळ. [सं.] ०चक्र–न. (योग) कंठाच्या ठिकाणीं असणारें षट्चक्रांपैकीं एक कमळ. ' कंठी जाणिजे विशुद्धचक्र। तें षोडशदळ अतिशुभ्र। तेथें प्रतिपत्रीं षोडशस्वर। अकारादिक्।' –विउ १.५२. **विशुद्धि**–स्त्री. १ स्वच्छता. २ शुचिभूतपणा; पवित्रता. ३ बिनचूकपणा; निर्दोषता; अचूकपणा; बरोबरपणा.

विशूचिका—स्त्री. विषूचिका पहा. पटकींतील एक विकार

विशृंखल—वि. बंधमुक्त; अनिर्बंध; स्वैर; मोकाट. [सं. वि+शृंखला] ०पणा–न. उद्दामपणा; दांडगेपणा; उच्छृंखलपणा. ' यासी उपमाचि नसे दुसरी त्याच्या विशृंखळपणातें।' –मोसभा ४.५०.

विशेख—वि. (अप.) विशेष पहा. ' जया नाहीं सामान्य विशेख।' –रंयो १.८१७.

विशेष—पु. १ असामान्य गुण, धर्म, लक्षण, चिन्ह; वैशिष्ट्य; वैलक्षण्य; एकदेशीयता; असाधारणपणा; निराळेपणा; श्रेष्ठता. २ विशिष्ट गोष्ट, व्यक्ति; विशिष्ट गुणधर्मानें युक्त पदार्थ. ३ अपवाद. ४ (गणित) अंतर; फरक; विवक्षित प्रमाणापेक्षां अधिक. ' तया आणि खपुष्पा। विशेषु काई।' –अमृ ७.५३. –वि. असामान्य; असाधारण; सुप्रसिद्ध; एकाकी; बराच मोंठा; अधिक; वरचढ. –क्रिवि. (विशेषेंकरून) मुद्दाम; मुद्दामहून; प्रामुख्यानें; फारकरून; बहुतकरून; आधिक्येंकरून. [सं. वि+शिष्] **विशेषगुण**–पु. पंचमहाभूतांचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पांच गुण. **विशेषण**–न. (व्या.) १ गुण अथवा संख्या दाखविणारा शब्द; नामाबद्दल अधिक माहिती देणारा शब्द. २ कर्त्याविषयीं विशिष्ट विधान करणारा शब्द; विधेय. [सं. वि+शिष्] **विशेषणें**–अक्रि. विशेष वर्णन करणें. ' अर्जुना तोचि योगी। विशेषिजे जो जगीं।' –ज्ञा ३.७५. ' हें काई विशेषावें।' –दाव २७८. **विशेषतः**–क्रिवि. मुख्यत्वेंकरून; प्रायः; मुद्दाम; बळेंहून. **विशेषनाम**–न. (व्या.) वस्तूंचें अथवा स्थानांचें नांव; ज्या नामानें विशेष वस्तूचा, प्राण्याचा अथवा समूहाचा बोध होतो तें नाम. **विशेषलिंग**–न. विशेषविभूति; महत्त्वाच्या, प्रमुख विभूति. ' तेवीं माझिया विशेषलिंगां। नाहीं मिती।' –ज्ञा १०.३०१. **विशेषज्ञान**–न. ब्रह्मज्ञान; जीवाचें, चैतन्याचें ज्ञान. **विशेषात्कार**–पु. असामान्यत्व; असाधारणता; चमत्कृति; वैशिष्ट्य; निराळेपणा. –क्रिवि. (विशेषात्कारेंकरून, विशेषेंकरून) मुख्यत्वेंकरून; मुद्दामहून; विशेषत्वानें, वैशिष्ट्यानें; प्रायशः; बहुतकरून; फारकरून. **विशेषित**–वि. प्रसिद्ध; विशेषगुणधर्मानें ज्ञात; निर्दिष्ट. **विशेषें–करून**–क्रिवि. बहुतकरून; फारकरून; मुख्यत्वेंकरून; ' हें विशेषेंहि न घडेल. याचि लागीं।' –ज्ञा ६.४१७.

विशेष—पु. धूप; एका वृक्षाचा रस, चीक.

विशेषक—न. ज्या तीन श्लोकांमिळून एक कल्पना व्यक्त होते अशा तीन श्लोकांचा समूह.

विशेषोक्ति—स्त्री. अर्थालंकार. कारणसमुच्चय असून कार्योत्पत्ति होत नाहीं त्या ठिकाणीं हा अलंकार असतो.

विशेष्य—न. (व्या.) १ विशेषण ज्याचा गुण दाखवितें तें; नाम; द्रव्यवाचक शब्द. २ कर्ता; उद्देश्य.

विशेष्यनिघ्न—वि. विशेषण; विशेष्याच्या, नामाच्या लिंगवचनानुरोधानें असणारें.

विशो–षो—पु. विषय. ' केला लोकां यया। दिठीचा विषो।' –ज्ञा १८.१७३५.

विशोक— वि. शोक, दुःख, मानसिक त्रास यापासून अलिप्त. [सं. वि+शोक]

विशोधित—वि. शुद्ध केलेलें. [सं. वि+शुध्]

विंशोपक—पु. विसावा अंश. (ज्यो.) पंचांगाच्या आरंभीं निरनिराळ्या गोष्टींचे, फलाचे त्या वर्षांतील विंशत्यात्मक पद्धतीनें दिलेलें भाग, विसावे हिस्से दाखविणारें कोष्टक. [सं. विंशति

विशोभित—वि. शोभाहीन; सौंदर्यहीन; बेडौल; बेढब.

विश्रंभ—पु. विश्वास; मैत्री; दृढस्नेह. [सं.]

विश्रंभालाप—पु विश्वासानें सांगितलेल्या गोष्टी; स्नेहानें, मित्रत्वानें सांगितलेल्या कथा.

विश्रांत—वि. १ श्रम, काम यांपासुन मुक्त; स्वस्थ. २ दमलेला; भागलेला; थकलेला. [सं. वि+श्रम्=दमणें]

विश्रांति—स्त्री. (रूढ विश्रांत) १ विसावा; आराम; सुटी; फुरसत; स्थिरता. २ करमणूक; आराम (श्रमानंतर); मनोविनोदन. ३ करमणुकीचें साधन; क्रीडादि मनोविनोदनाचीं साधनें. ४ (विनोदानें) कामापासुन, श्रमापासुन सुटका; कार्यराहित्य; कार्यशून्यता. 'एक च दौत आहे ती तुम्ही घेऊन गेला म्हणजे इकडे विश्रांति झाली म्हणून समजा.' ५ पर्यवसान; परिणामींची स्थिति; शेवटची स्थिति; अंतिम स्थिति; मोक्ष. 'चौकशी करतां त्या दोघांवर मात्र चोरपणाची विश्रांति झाली.' 'मनें मन घालूनि मागें। विश्रांति जालिया आंगें.' -ज्ञा १४.५०. 'ज्ञानासि सुजन्म जोडें। आपली विश्रांतिही वरी वाढे।' -ज्ञा १६.५९. **विश्रांति असणें**-आधार, आश्रय असणें; भरंवसा असणें; अवलंबून असणें. 'माझ्या आशांची विश्रांति तुम्हावर आहे.'

विश्राम—पु. १ विश्रांति; आराम; विसावा. 'समाधीसी तेथें विश्राम। मनोरम हरिपदीं।' -एरुस्व १.८६. २ विश्रांतिस्थान. 'ब्रह्मविद्येचा विश्रामु।' -ज्ञा १७.३३. **विश्रामणें**-अक्रि. विसावा घेणें. 'त्यांच्या ठायीं तुझें मन। विश्रामत नाहीं कीं।' -मुसभा ३.१४२. ०**धाम**-न. विश्रांतिस्थान; लयस्थान. 'जें जगदादि विश्रामधाम। तयातें एक नाम।' -ज्ञा १७.३२८. ०**शालिका**-स्त्री. विश्रांतिस्थान. 'जे महदादि विश्रामशालिका हे।' -ज्ञा १४.६७. ०**शाळा**-स्त्री. धर्मशाळा. 'कीं निम्होळ संसारवाटेची विश्रामु शाळा।' -शिशु ३३.

विश्रृंखल-ळ—वि. विशृंखल पहा.

विश्रुत—वि. प्रसिद्ध; प्रख्यात; विख्यात; नांवाजलेला. **विश्रुति**-स्त्री. कीर्ति; प्रसिद्धि.

विश्लेष—पु. १ वियोग; विरह; ताटातूट (प्रेमीजन, पतिपत्नी यांची). २ (सामान्यतः) वेगळें करणें; ताटातूट; वियोग; पृथक् करणें; अलग करणें. ३ (गणित) वजाबाकी. ०**जाति**-स्त्री. उणें संख्यांची बेरीज. **विश्लेषण**-न. (शाप.) पृथक्करण; विघटन. (इं.) डिसोसिएशन.

विश्व—न. जग; सृष्टि. 'तैसें व्यासमति कवळलें। मिरवे विश्व।' -ज्ञा १.३९. -वि. सर्व; सगळें; अचाट; अगणित. [सं.] ०**कर-विश्वंकर**-पु. सृष्टिकर्ता. ०**कर्मा**-पु. १ ब्रह्मदेवाचा पुत्र व देवांचा शिल्पकार, सुतार, कारागीर. २ हुषार कारागीर; शिल्पी. ०**कारण**-न. (काव्य) सृष्टिनिर्माणकर्ता; ब्रह्मदेव. ०**कुटुंबवादी**-पु. सर्व जग हें एक कुटुंब असुन सर्व लोक त्या कुटुंबांतील भागीदार आहेत असें मत असणारा. 'त्याचीं मतें नास्तिक्याकडे झुकत होतीं व तो जहाल विश्वकुटुंबवादी बनत चालला होता हें सुशीलेला ठाऊक नव्हतें.' -सुदे २०६. ०**कुटुंबी**-पु १ सर्वसृष्टि हें ज्याचें कुटुंब आहे तो परमेश्वर. २ (ल.) उदार आश्रयदाता; जनकल्याणकर्ता; मोठ्या कुटुंबाचा धनी. ०**कोश**-पु सर्व विषयांचें ज्ञान देणारा मोठा ग्रंथ. ०**जनीन-जनीय**-वि. सर्वजगास योग्य, सोईस्कर, हितकर, लाभदायक, संबद्ध. ०**जित्**-पु. एका यज्ञाचें नांव; जग जिंकणारा. 'ज्या विश्वजित् यज्ञांत यजमानानें आपलें सर्वस्व दान करावें असें सांगितलें आहे ...' -टि ४.५१. ०**जीवन**-न. (काव्य) सृष्टीचा प्राण; परमेश्वर. ०**दुनी**-स्त्री. सर्वजग; सर्वसृष्टि; सर्व मानवजाति अलमदुनीया याप्रमाणें. 'देवा विश्वदुनीच्या भाग्यानें शेत पिको.' [विश्व+फा. दुनिया] ०**धाया**-पु. सृष्टीचा आधार; परमेश्वर. ०**नेत्र**-पु. सृष्टीचा, जगाचा डोळा; परमेश्वर. ०**पाल-विश्वंभर**-पु. जगाचें पोषणकर्ता; जगाचें पालन करणारा; परमेश्वर ०**प्रयत्न**-पु. अचाट प्रयत्न; शक्य ते सर्व प्रयत्न. ०**प्रामाण्य**-न. सर्व जगाला प्रमाण असें; सर्व जगास योग्य वाटणारें तें. 'जे विश्वप्रामाण्याची मुद्री। आणि तुझ्या हातें असे सुबुद्धी।' -ज्ञा १६.४६८. ०**बाहु**-पु. ज्याचे हात सर्वत्र आहेत असा; परमेश्वर. -ज्ञा १३.८७४. ०**बीज**-न. सर्वसृष्टीचें मूळ; आद्यकारण; परमेश्वर. ०**ब्राह्मण**-पु. सुवर्णकार; देवशिल्प करणारी जात. ०**भेषज**-न सार्वत्रिक औषध; सुंठ. 'मध आणि विश्वभेषज हे पदार्थ दाखंत मिसळून द्यावेत'-अश्वप २.१३४. ०**मंगल**-न. सर्व सृष्टीचें कल्याण, सुख, सुदैव, शुभ. -वि. सर्वजगाचें कल्याण करणारा; शुभदायक. ०**मतिचालक**-पु. सर्व जगाच्या मनांत प्रेरणा करणारा; सर्वांच्या बुद्धीस चालना देणारा. ०**मूर्धा**-पु. ज्याचें डोकें सर्वत्र आहे असा; परमेश्वर. -ज्ञा १३.८७८. ०**मोहिनी**-स्त्री. सर्व जगास भुरळ पाडणारी, भुलविणारी, मोहून टाकणारी. -ज्ञा १.२१. ०**रचना**-स्त्री. सृष्टीची व्यवस्था; घटना. -ज्ञा २.९५. ०**रूप**-वि. १ सर्व सृष्टीमधील वस्तूंचीं रूपें धारण करणारा; सर्व सृष्टीमधील वस्तूंच्या रूपांत असणारा; ब्रह्माचें उपपद. २ व्यापक; महत्त्वाचा. 'म्हणतां जाय पाप। प्रश्न असे विश्वरूप।' -गुच २६.९७. ०**विद्यालय**-न. विद्यापीठ; अनेक विद्यांचें अध्ययन-अध्यापनादि कार्य करणारी संस्था. (इं.) युनिव्हर्सिटी. ०**व्यापक-व्यापी**-वि. सर्वव्यापी; सर्वत्र भरून राहिलेलें, सर्व वस्तुमात्राशीं संबद्ध. ०**व्याप्ति**-स्त्री. सर्व सृष्टीमध्यें भरून राहणें. ०**संस्था**-स्त्री. (ज्यो.) सूर्य, चंद्र, ग्रह, तारे व इतर आकाशस्थ ज्योती ज्या आकाशाच्या प्रदेशांत कार्य करितात तो प्रदेश. (इं.) युनिव्हर्स. ०**साक्षी**-वि. सर्व सृष्टीस पाहणारा. ०**सृट्**-पु. सृष्टिकर्ता; जग

निर्माण करणारा; ब्रह्मा. **विश्वतः**-क्रिवि. सर्व ठिकाणीं; सर्वत्र. **विश्वतश्चक्षु**-पु. ज्याचे सर्वत्र डोळे आहेत असा, ज्याला सर्व दिसतें असा; परमेश्वर. -ज्ञा १३.८७. **विश्वतोभय**-पु. सर्व बाजूंनीं भय उत्पन्न करणारा; परमेश्वर. -एभा २.१०१. **विश्वतोमुख**-पु. सर्व बाजूंनीं ज्यास मुखें आहेत असा; परमेश्वर. -ज्ञा ११.२३३. **विश्वतोमुखीं**-क्रिवि. सर्वांचें तोडीं; सर्वतोमुखीं; ज्याच्या त्याच्या तोंडीं; सर्वांच्या बोलण्यांत. **विश्वाचा जिव्हाळा**-पु. १ सृष्टीचाप्राण, जीव. २ (संकेतानें) शिव. **विश्वात्मक**-वि सृष्टिस्वरूपी. -ज्ञा १५.५९५. **विश्वात्मा**-पु. सृष्टीचा प्राण; जगदात्मा; सर्वव्यापी तत्त्व; ब्रह्म. **विश्वांघ्रि**-पु. ज्याचे सर्वत्र पाय आहेत असा. -ज्ञा १३.८७४. **विश्वानुसार**-वि. सृष्टींतील पदार्थाप्रमाणें. -ज्ञा १६.१७३. **विश्वाभिराम**-वि. जगाचा आवडता; जगत्प्रिय; परमेश्वर. **विश्वाभिमान**-पु देह हा मी व सर्व सृष्टि माझा भोग्य विषय होय असा अभिमान. **विश्वेश**-पु. सृष्टीचा स्वामी, मालक; परमेश्वर. -ज्ञा १५.४०. **विश्वेशराव**-पु. सर्व सृष्टीचा प्रभु; मालक; परमेश्वर. -ज्ञा १८. १८०१. **विश्वेश्वर**-पु. १ सर्व सृष्टीचा प्रभु; परमेश्वर. २ काशीक्षेत्रांतील मुख्य देवता. **विश्वोदयपंथ**-पु. माया. **विश्वोद्धार**-पु. सर्व सृष्टीचें रक्षण, तारण, उद्धरण. २ सृष्टितारक, रक्षक परमेश्वर.

विश्वसनीय—वि. खात्रीलायक; विश्वास ठेवण्यासारखा; विश्वासु; प्रामाणिक; पतदार. [सं. वि+श्वस्] **विश्वसित**-धावि. ज्यावर विश्वास, भरंवसा ठेवलेला आहे असा. **विश्वस्त**-वि. १ विश्वासुन राहिलेला; ज्यानें भरंवसा ठेवलेला आहे असा. २ ज्यावर विश्वास ठेवला आहे तो; विश्वासु; खात्रीचा. ३ एखाद्या व्यक्तीची अथवा संस्थेची मालमत्ता सुरक्षितपणें ताब्यांत ठेवणारा. [इं. ट्रस्टी]

विश्वा-स्वा—पु. विसावा अंश; निश्चित प्रमाणाचा विसावा भाग; रुका किंवा रति यांचा विसावा भाग. [सं. विंशति] **आठराविश्वे दारिद्र्य**-पूर्ण दारिद्र्य म्हणजे वीस विश्वे पैकीं अठराविश्वे म्हणजे जवळ जवळ पूर्ण दारिद्र्य. **०घाट**-पु. घाटांतील विश्वा नाण्यांतील जकात. बाजारावरील कर.

विश्वामित्र—पु. १ एक प्रसिद्ध ऋषि; श्रीरामाचा गुरु. २ (संकेतानें) अत्यंत त्रासदायक, पीडाकारक मनुष्य. [सं.] **०सृष्टि**-स्त्री. विश्वामित्रानें उत्पन्न केलेल्या वस्तू. ब्रह्मदेवाशीं स्पर्धा करून विश्वामित्रानें प्रतिसृष्टि निर्माण केली अशी कथा आहे त्यापैकीं मनुष्याच्या डोक्यासारखा नारळ, गाईऐवजीं म्हैस, घोडयाऐवजीं गाढव हीं उदाहरणें देतात. **विश्वामित्री**-स्त्री. म्हैस (विश्वामित्र सृष्टींतील म्हणून संकेतानें). 'विश्वामित्री पोटीं तयाचा अवतार। नांव महाखर चांडाळाचें।' -तुगा २८४५.

विश्वावसु—पु. एकुणचाळिसावा संवत्सर.

विश्वास—पु. १ भरंवसा; खात्री; निश्चय; इमानदारी. २ श्रद्धा; मनाचा अनुकूल ग्रह. [सं. वि+श्वस्=श्वास घेणें] **०घात**-पु. १ विश्वास दाखवून फसवणूक; बेभरंवसा; बेइमानी; दगलबाजी; खोटेपणा. २ (कायदा) विश्वासानें ताब्यांत दिलेल्या मालाचा लबाडीनें गैरशिस्त उपयोग करणें. **०घातक-घातकी**-वि. बेमान; लबाड; खोटा; कृतघ्न. **०जामीन**-पु. खात्रीसाठीं जबाबदार; विश्वासप्रतिभू. **०निधि**-पु. अत्यंत भरंवशाचा माणूस. **०प्रतिभू**-पु. विश्वासपणाबद्दल हमी घेणारा; एखादा मनुष्य खात्रीलायक आहे म्हणून हवाला देणारा. **विश्वासणें**-अक्रि. १ भरंवसा धरणें; विश्वास ठेवणें. २ अवलंबून राहणें; भरंवशावर राहणें; हवाली करणें; स्वाधीन करणें. 'जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला।'-दा. ३ (काव्य) खरें सत्य मानणें. **विश्वासला**-पु. ज्यानें विश्वास ठेविला आहे असा. 'विश्वासला आतुडवीजे चोरा।' -ज्ञा १६.२६०. **विश्वासिक, विश्वासुक, विश्वासू-क**-वि. प्रामाणिक; विश्वास ठेवण्यालायक; भरंवशाचा. 'मित्रा माझिये मती। विश्वासिक तूं एक।' -मुआदि ३५.४८. **विश्वासी**-वि. १ खात्रीचा; भरंवशाचा. २ भरंवसा ठेवणारा.

विश्वेदेव—पुअव. स्वर्गीतील एक दहा देवतांचा समूह; यांस श्राद्धप्रसंगीं अवाहन करतात. 'अश्विनौदेव विश्वेदेव विभवें। त्रायुही हे जी।' -ज्ञा ११.३३२. [सं.]

विष—न. १ एक भयंकर मारक द्रव्य; जहर; वीख. याचे नऊ प्रकार मानतात ते-कालकूट, हलाहल; सौराष्ट्रिक, ब्रह्मपुत्र, प्रदीपन, काकोल (शृंगक), वत्सनाभ (बचनाग), शौक्तिकेय, (सक्तुक), दारद (हरिद्र). तसेंच याचे स्थावर व जंगम असे भेद आहेत. २ (ल.) अत्यंत कडू पदार्थ; घातक, मारक, बाधक अहितकारक पदार्थ. ३ (ल.) ज्यापासून अपाय, घात होण्याचा संभव आहे असें द्रव्य, संपत्ति वगैरे पदार्थ. [सं. विष्=पसरणें] **विष मानणें**-अत्यंत तिरस्कार, तिटकारा करणें. **विषाची परीक्षा पाहणें**-एखादा भयंकर प्रयोग, साहस, धाडस करणें. सामाशब्द- **०कंठ**-पु. शिव; शंकर. [सं. विष+कंठ] **०घटी**-स्त्रीअव. (ज्यो.) नक्षत्रांच्या अशुभ मानलेल्या चार घटिका. **०घ्न**-वि. विषमारक; विषनाशक; विषहारक; विष उतरणारें. **०द**-वि. विष देणारा. **०दग्ध-दिग्ध**-वि. विषयुक्त; विष लावलेलें 'राजा सुधन्वा आमच्या हृदयांत विषदग्ध बाणाप्रमाणें सलत आहे.' -सुधन्वा नाटक ६. **०दृष्टि**-स्त्री. घातक, मारक, नाशक नजर; ज्यावर पडेल त्याचा नाश करणारी नजर. -वि. घातक नजर असलेला. **०नाशक**-वि. विष उतरणारें; विषाचा परिणाम कमी करणारें. **०पदार्थ**-पु. विषारी, घातक, मादक पदार्थ; विष.

०प्रयोग–पु. विषाचा उपयोग; विष देऊन, चारून, घालून मारण्याची क्रिया; विषाची योजना. **०वल्ली**–स्त्री. १ विषारी वेल. २ (ल.) दुष्ट, द्वेषी मनुष्य. **०वैद्य**–पु. विषबाधेवर उपचार करणारा (वैद्य, मांत्रिक). **०व्रतति**–स्त्री. विषवल्ली. **०हर-हारक-अपहारक**–वि. विषाचा परिणाम नाहींसा करणारा; विष उतरणारा. **विषाचा मोहरा**–पु. जहरी मोहरा. (इं.) बेझोर.

विषइ(ई)क—वि. विषयी; विषयासक्त. 'वाटेल विषइका अघोर वाईट।' –दावि २०७.

विषई—श्रम. विषयी पहा.

विषकट—वि. (काव्य) अवाढव्य; विशाल; विस्तीर्ण; राक्षसी; प्रमाणाबाहेर मोठें. 'म्हणे विषकट हृदयायेक हेत। पूर्ण माझा करीका।' [सं. विष्=पसरणें]

विषण्ण—वि. खिन्न; दुःखी; म्लान; निरुत्साही. [सं. वि+सद्] **०दृष्टि**–स्त्री. (नृत्य) बुबुळें इकडे तिकडे हालवून मध्येंच स्तब्ध करणें व अधोगत पाहणें.

विषदु—वि. विशद पहा.

विषम—न. संकट; अडचण. 'सांभाळा जी माझीं विषमें अनंता। जवळी असतां अव्हेरू कां।' –तुगा १५८८. 'एरव्हीं देहांतीं थोर विषम। या मार्गाचें आहे संभ्रम।' –ज्ञा ८.२४३. –पु. १ एक प्रकारचा ज्वर. –ज्ञा. २ भेदभाव. 'तो अर्धिचि नाहीं आघवा। आतां विषय काई।' –ज्ञा ५.९५. –वि. १ सम नव्हे तें; सारखें नव्हे असें; दोहोंनीं भाग न जाणारी (संख्या); कमीजास्त; लहान मोठें; व्यस्त. २ असमान; एका पातळींत नव्हे असें; उंचसखल; वांकडातिकडा; भिन्न; सरळ नव्हे तो. 'परि ते भजती उजरी नव्हे। विषम पडे।' –ज्ञा ९.३४५. ३ अशुभ; विरुद्ध; प्रतिकूल; उलटा; उफराटा. 'तैसा विषमांहि जीवां–। लागीं उजुकारु बखा।' –ज्ञा १८.८४३. ४ कठिण; अवघड; त्रासदायक; मनाविरुद्ध; दुष्कर. 'अगा आपुला हा स्वधर्मु। आचरणीं जरी विषमु।' –ज्ञा १८.९२३. ५ बिनतोड; अतुलनीय; अपूर्व; जोड नाहीं असें. [सं. वि+सम] **०अपूर्णांक**–पु. छेदापेक्षां अंश अधिक असलेला अपूर्णांक. **०कर्णतुल्य चतुर्भुज**–पु. समभुज परंतु कर्ण सारखे नसलेला चौकोन. (इं.) रॉंबस. **०कर्णायत**–पु. समोरासमोरचे भुजसारखे असून कर्ण सारखे नसलेला चौकोन. (इं.) रॉंबॉइड. **०काल**–पु. अशुभ, प्रतिकूल, अमंगल वेळ, प्रसंग. **०केंद्र**–वि. १ दीर्घवर्तुळाकृति. २ केंद्रापासून च्युत झालेलें, बाजूला सरकलेलें, केंद्र सोडून फिरणारें. (इं.) एक्सेंट्रिक. **०ग्रह**–पु (संगीत) गाल व ताल यांचा आरंभ व सम यांचा मेळ न बसणें. **०चतुर्भुज-चतुरस्र**–पु. ज्या बाजू सारख्या व समांतर नाहींत असा चौकोन. (इं.) ट्रॅपिझिअम. **०छाया**–स्त्री. सूर्य संपातांत असतां शंकूची दुपारीं पडणारी कमी जास्त छाया. **०ज्वर**–पु. १ ज्याची येण्याची व उतरण्याची वेळ निश्चित नाहीं असा ताप; मुदतीचा ताप. २ अनियमितपण येणारा ताप. **०त्रिभुज**–पु तिन्ही बाजूंची लांबी भिन्न असलेला त्रिकोण. **०पाचन**–न. अपथ्यकर पदार्थ पचविणारें किंवा त्याचा दोष नाहींसा करणारें औषध किंवा पदार्थ; विषमज्वरावरील औषध. **०भाव**–पु. १ कलुषितमन; वैषम्य; दुष्ट ग्रह; अंदेशा. २ भिन्नभाव; दुजाभाव; आपपरभाव; कमीअधिक लेखणें. ३ अमित्रत्व; शत्रुत्व; वैर. ४ कमी लेखणें; कमी प्रतीचा मानणें; हीन मानणें. ५ असमानता; विषमता; भेद. **०भुजत्रिकोण**–पु. विषमत्रिभुज; ज्या त्रिकोणाच्या तिन्ही बाजू असमान असतात त्रिकोण. तो. **०भोजन**–न. १ अवेळीं जेवणें; कमीअधिक खाणें; प्रमाणशीर न खाणें. २ अनियमित, अप्रमाण, जेवण. **०वात**–पु. त्रिदोष; कुपित वात. 'तैसें देहांतींचेनि विषमवातें।' –ज्ञा ८.२१३. **०वासना**–स्त्री. पापेच्छा; विषयी, कामुक, लोभी, इच्छा, आशा. **०वृक्षन्याय**–पु. स्वतः लावलेलें झाड विषारी निघालें व त्यास विषारी फळें आलीं तरी तोडवत नाहीं, तसा एकदां आपला म्हटल्यावर तो वाईट निघाला तरी त्यास दूर लोटणें बरें नव्हे. **०वेळ**–स्त्री. संकटकाल; आपत्काल; कठिण प्रसंग. **०साहस**–न. धाडस; साहसकर्म; अचाट काम; धाष्टर्य. **०स्थ**–वि. १ अडचणींत, संकटांत, दुःस्थितींत, हालांत सांपडलेला, पडलेला. २ वांकडा, तिरपा, उभा राहिलेला. **०क्षुरी**–वि. एक प्राण्यांचा वर्ग; या वर्गांत गेंडा येतो. कारण त्याच्या पायाला तीन गेळें, खुर असतात. **०ज्ञान**–न. भेदज्ञान; समस्थिति ढळल्याचें ज्ञान. 'महाप्रळय सेजे। खेळोनि आले निदिजे। विषय ज्ञानें उमजे। कल्पोदयीं।' –ज्ञा १४.११२. **विषमाशन**–न. रोजच्या संवयींत नसलेलें अन्न; नेहमीं खाण्यांत नसलेलें अन्न (त्यामुळें पचावयास कठिण अन्न). **विषमालंकार**–पु. एक अर्थालंकार. इष्ट वस्तु मिळविण्याकरितां प्रयत्न करीत असतां ती प्राप्त न होतां अनिष्ट वस्तु प्राप्त झाली असतां हा अलंकार होतो. **विषमाशन**–उ. अवेळीं किंवा अप्रमाणशीर जेवण; अकालीं किंवा प्रमाणाबाहेर जेवणें.

विषय—पु. १ इंद्रियें किंवा मन यांस गोचर वस्तुः ज्ञानाच्या कोणत्याहि साधनानें माहीत होणारी गोष्ट. (याअर्थी सामासांत) विषयभोग, विषयत्याग, विषयासक्ति, विषयाभिरुचि, विषयसेवा–सेवन–प्रीति–तिरस्कार–संबंध–कथन–निंदा –ज्ञान –सुख–दुःख. २ एखाद्या क्रियेचा कर्ता अथवा कार्य; एखादा विकार अथवा भावनेशीं संबद्ध गोष्ट; (कर्ता, करण, शक्ति, अथवा कार्याचा) प्रदेश, टप्पा, आटोका, स्थान वगैरे. उदा० कामाचा विषय स्त्री; मोहाचा विषय पुत्र; लोभाचा विषय वित्त; रोगाचा विषय शरीर; तसेंच क्रोध, हर्ष, दंड इत्यादींचा विषय. (याअर्थी सामासांत)

विवाद–व्याख्या–गायन–लेखन–गमन–विचार–धर्म–ज्ञाति–हास्य–काम–संकल्प–विधि–निषेध–विषय. 'निजस्मृतिस जाहलीं विषय तीं तव श्रीपदें' –केका ८. ३ कार्य; कर्तव्य; कार्यक्षेत्र; अधिकार; व्यवसाय; योग्य धंदा, काम. उदा० बोलणें हा वागिंद्रियाचा विषय; मामलत करणें हा भिक्षुकाचा विषय नव्हे; रफू करणें हा दाभणाचा विषय नव्हे. ४ उद्देश; हेतु; ध्येय; मनांतील गोष्ट. 'तुम्ही जो हा उद्योग करीत आहां याचा विषय कोण?' ५ मुद्दा; प्रकरण; बाब; संबंध. 'शब्द साधनरूप विषय ज्यांत असतो त्याला व्याकरण म्हणावें.' ६ द्रव्य; ऐवज; माल. 'त्यास साऱ्या वर्षांत शंभर रुपयांचा विषय पोंचतो.' ७ महत्व; पर्वा; दरकार. 'स्वामीचा आशीर्वाद असतां इतरांचा विषय मानीत नाहीं.' –रा ३.३२४. ८ कामेच्छा. 'जैसें थोर विषय सुभगे अंगीं । अंगसानें ।' –ज्ञा १६.२५३. 'रुचे विषय ज्या मिळे अमृत ते न मद्या पिती ।' –केका ४३. [सं.] ०द्वार–न. इंद्रिय. 'बहु ही दुस्तर विषयद्वारें ।' –तुगा १८७४. ०नियामक समिति–स्त्री. सभेपुढें मांडावयाचे विषय ठरविणारी, निश्चित करणारी, निवडणारी मंडळी. ०पंचक–न. पांच इंद्रियांचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पांच विषय. 'शब्दस्परुपरूपरसगंध । ऐसें हें विषय पंचक ।' –दा १७.८.१४. ०बद्ध–वि. इंद्रिय विषय लोलुप; कामी; भोगी; आसक्त. (याचअर्थी सामासांत) विषय–तत्पर–लंपट–लीन–लुब्ध–वश–दास–आसक्त–आधीन–आविष्ट–अंध. ०भोगोडा–पु. विषयाचा उपभोग. 'विषयभोगोडा करावया ।' –दावि ४१. ०वासना–स्त्री. भोगेच्छा; इंद्रियसुखेच्छा; ऐहिक वस्तूंच्या उपभोगाची इच्छा. 'विषयवासना नावडो' ०विरक्त–वि. ऐहिक भोगांस विटलेला; भोगांचा त्याग केलेला. ०व्यापार–पु व्यवहार; धंदा; ऐहिक व्यवसाय; सुखसाधनांचें संपादन. 'विषयव्यापारीं सदा सादर । आपपर नावडे त्या ।' ०सुख–न. इंद्रियजन्यसुख; रतिसुख; सृष्टींतील निरनिराळ्या भोगांपासून निरनिराळ्या इंद्रियांस मिळणारा आनंद. **विषयाचरण**–न. इंद्रियभोग; विषयोपभोग. 'पतंगा दीपीं आलिंगन । तेथ त्यासी अचुक मरण । तेवीं विषयाचरण । आत्मघाता ।' –ज्ञा ३.२०१. **विषयानंद**–पु. भोगसुख; निरनिराळ्या पदार्थांच्या उपभोगापासून मिळणारें सुख. **विषयोपभोग**–पु. भोग्य वस्तूंचें सेवन; इंद्रियांस सुख देणाऱ्या वस्तूंचें सेवन. **विषयी**–वि. १ विषयासक्त; भोगसुखास लालचावलेला; कामी; गोडघाश्या. 'जरी विषयीं विषयो सांडिजेल ।' –ज्ञा ५.१२५. २ इंद्रियांस अगोचर वस्तूंचें अस्तित्व न मानणारा. ३ ज्या गोष्टींचें एखादी वस्तु कार्य अथवा कर्ता असतो ती (गोष्ट). **विषयीकरण**–न. इंद्रियांकडून स्वविषयाचें ग्रहण; इंद्रियाकडून त्या विषयाचें ज्ञान होणें. **विषयीं**–शअ. संबंधीं; संबंधानें; बद्दल; धरून; अनुसरून; अनुलक्षून. पूर्वी षष्ठ्यंत नामापुढें लावीत हल्लीं सामान्यरूप करून जोडतात. उदा० घराचेविषयीं, युद्धाचेविषयीं=घराविषयीं, युद्धाविषयीं. [विषय·सप्तमी] **विषी, विषीं**–शअ. विषयीं पहा. 'अगा आत्मजेच्या विषी । जिवु जैसा निरभिलाषी ।' –ज्ञा १२.१३२. **विषो**–पु. विषय पहा. 'अमाइक तंव नव्हसी । कवणा ही विषो ।' –अमृ २.३६.

विषाण—न. १ शिंग. २ सुळा; सुळका; शूलदंत. [सं.]

विषाद—पु. १ खेद; दुःख; निरुत्साह; निराशा. 'जो घ्राणसंगें विषादु । तोषु वेता ।' –ज्ञा २.११७. २ विरक्ति; कंटाळा; तिटकारा. 'माझा तुला काय विषाद आला ।' –सारुह १.१०. 'विषाद धरिला म्हणो ।' –केका ४२. [सं. वि+षद्] **विषादणें**–अक्रि. खेद मानणें; दुःखी होणें. 'हें मनांत येऊन अमात्य फारच विषाला.' –चंद्रगुप्त १२७. **विषादी**–स्त्री. खेद उत्पन्न होईल अशी स्थिति, परिणाम. 'चौघांनीं भरी करून घातली गोष्ट विषादीला ।' –ऐपो ४१०. –वि. १ खिन्न; निराश; म्लान. २ लवकर निराश होणारा; निरुत्साही; लवकर कंटाळणारा, विटणारा.

विषानैनी—वि. सापासारख्या लाल डोळ्याचा (घोडा). घोड्याचें एक अशुभ लक्षण.

विषार—पु. १ विषबाधा; विषापासून पीडा, उपद्रव. २ विषारीपणा; विषयुक्तता. ३ साप. [विष] **विषारणें**–अक्रि. विषबाधा होणें; विषप्रयोग होणें; विषापासून पीडा, उपद्रव होणें. **विषारी**–स्त्री. एक कांटेरी वनस्पती. ही शेतांत उगवते व औषधी आहे. –वि. विषयुक्त. ०माशी–स्त्री. एक माशी. ही चावली असतां फोड येऊन दाह, मूर्च्छा, ज्वर हीं लक्षणें होतात. –योर २.६६. **विषालु–ळू**–वि. विषारी; विषयुक्त.

विषु—न. मेष व तूळ राशींचा आरंभीचा बिंदु. यांत सूर्यानें प्रवेश केला असतां संपात होतो. ०पद्–न. शरत्संपात –मराठी सहावें पुस्तक पृ. २९८. ०चक्र–मंडल, विषुव, विषुवत, विषुव, द्वलय, वद्वृत्त–वन्मंडल, विषुववृत्त–न. (ज्यो.) १ नाडीमंडळ; नाडीवलय, वृत्त. ज्या महावृत्ताची पातळी भूगोलाच्या अक्षाशीं लंबरूप असते तें. २ भूमध्यवृत्त; दोन्हीध्रुवापासून सारख्या अंतरावरून भूमध्यावरून जाणारें वृत्त; भूमध्यरेषा. **विषुव–घत्**–न. सर्व पृथ्वीत दिवस व रात्र यांचें कालमान सारखें असतें तो काल; विषुवकाल; संपात. **विषुवच्छाया, विषुवती**–स्त्री. सूर्य विषुववृत्तावर असतां माध्यान्हीं पडणारी शंकुच्छाया. **विषुवांश**–पु. खस्थ पदार्थांचें याम्योत्तरवृत्त विषुववृत्ताला ज्या बिंदूंत छेदतें त्या विषुवापासून म्हणजे संपातापासून अंतर.

विषूचिका—स्त्री. पटकी किंवा महामारींतील पहिली अवस्था; हगओक. 'दुर्गा सोडी विषूचिका । हगि ओकी सुटली ।' –एरुस्व १४.६५.

विष्क—पु. इष्क पहा. 'अशामधीं कांहीं विष्क करावा।' –पला ४.३२.

विष्कंभ—पु. (ज्यो.) सत्तावीस योगांतील प्रथम योग. **०अंगहार**–पु. (नृत्य) एक हस्तपादांचा अंगविक्षेप. **०करण**–न. (नृत्य) उजवा हात अपविद्ध करणें, उजवा पाय सूची करून जमिनीवर आपटणें व डावा हात वक्षःस्थलावर ठेवणें. **विष्कंभापसृत अंगहार**–पु. (नृत्य) कुंचित व भुजंगत्रासित करून उजवा हात रेचित करणें. **विष्कंभक**–पु. (नाट्य) दोन अंकांच्या मध्यें पुढील कथाभागाची सूचना देणारा प्रवेश. [सं. वि+स्कंभ्=अडथळा करणें]

विष्कळित—वि. विस्कळित पहा.

विष्टप—पु. देव. [सं.]

विष्टंभ—पु. अडथळा; प्रतिबंध; अटकाव; विघ्न; नड; अंतराय; अडचण [सं. वि+स्तभ्]

विष्टर—पु. मधुपर्कसमयीं अतिथि वगैरेस आसनासाठीं द्यावयाचीं दर्भाची विशिष्ट आकाराची मुष्टि; दर्भासन. 'सिद्ध जाहला मधुपर्क देखा। विष्टर दिधला जगन्नायका।' –एरुस्व २४.१३७.

विष्ठा-ष्टा—स्त्री. मल; गू; मलोत्सर्ग. 'शाक्तीची शूकरी माय। विष्ठा खाय बिदींची।' –तुगा ४१५ [सं.]

विष्टि—स्त्री. १ वेठ; मजूरी दिल्याशिवाय घेतलेलें काम. २ वाहतूक. 'चतुरंग दलाशिवाय फौजेचीं आणखी चार महत्वाचीं खातीं होतीं. तीं विष्टि, नौका, हेर आणि वैशिक अशीं सांगितलीं आहेत' –हिंइ ९. ३ (ज्यो.) सातवें करण. [सं.]

विष्णु—पु. १ त्रिमूर्तींपैकीं एक देवता; विश्वाचा पालनकर्ता. २ (संगीत) एका तालाचें नांव. यांत मात्रा सतरा व विभाग पांच आहेत. [सं.] **०क्रान्तकरण**–न. (नृत्य) उजवा पाय चालण्याच्या बेतांत पुढें करून कुंचित करणें व रेचित करणें. **०क्रांत-क्रान्ता**–पुस्त्री. एक औषधी वनस्पती, हिचीं फलें काळसर तांबूस रंगाची असतात. 'श्यामाक दूर्वाला विष्णुक्रांता।' –एभा २७.१७५. **०दैवतनक्षत्र**–न. धनिष्ठानक्षत्र. 'पुढें कोणे एके काळीं। विष्णुदैवतनक्षत्रमेळीं।' –जै २६.५. **०नाभ**–पु. ब्रह्मदेव. **०पद**–न. गयेस असलेली विष्णूच्या पावलाची प्रतिमा. २ आकाश. 'शरवृष्टि करिति भरिति क्षणमात्रें विष्णुचें पद भ्राते।' –मोकर्ण १८.६. **०पदी**–स्त्री. गंगा. **०पुराण**–न. अठरा पुराणांपैकीं एक महापुराण. **०पुरी**–स्त्री. (संगीत) बंगालमधील विष्णुपुर या गांवावरून पडलेलें एका गायनपद्धतीचें नांव. **०बलि**–पु. १ सोळा संस्कारांपैकीं एक संस्कार. गर्भधारणेस प्रतिबंधक अशा प्रेताच्या प्रेतत्वनिवृत्तीसाठी हा करावयाचा असतो. २ संन्याशाच्या मृत्यूनंतर तेराव्या दिवशीं करावयाचा विधि. **०भक्त**–पु. १ विष्णूचा उपासक. २ वैष्णवपंथांतील व्यक्ति. **०रथ**–पु. गरुड; विष्णूचें वाहन. 'शोभे विष्णुरथावरी निवसला सोनेसळा नेसला।' –र गजेंद्रमोक्ष ४९. **०लोक**–पु. वैकुंठ; स्वर्गांतील विष्णूचें स्थान. **०वर्धन**–पु. एक ब्राह्मणांचें गोत्र, वर्गाचें नांव. (प्र.) विष्णुवृद्ध. **०वात**–स्त्री. १ चार बोटें रुंदीची पांचपदरी कापसाची सुताची वात. २ चौदापदरी वात. **०वाहन**–पु. गरुड. 'जर्जर जाहला विष्णुवाहन बदकांचे देंग्यांनीं।' –ऐपो ४०३. **०शयन**–न. चातुर्मास (आषाढी एकादशीपासून कार्तिकी एकादशीपर्यंत देव निद्रिस्त असतात यावरून). **०शृंखला योग**–पु. वामनद्वादशीच्या पूर्व दिवशीं एकादशीविद्ध द्वादशी असून श्रवणनक्षत्र असेल तर हा योग मानतात. **विष्णूचा तीन पदें**–दोन भुंवयांमधील प्रदेश. –योर १.२६.

विष्वक्सेन—पु. विष्णु; श्रीकृष्ण; ज्याला पाहून दैत्यांच्या सेना दशदिशा पळत सुटतात तो. –एभा १९.९८; –ज्ञा १०. २४१.

विसकट—पु. दाणादाण; अस्ताव्यस्त स्थिति; विस्कळित अवस्था. 'जैवि महावात करी अभ्रांचा न लावितां पळ विसकट।' –मोभीष्म १०.११४. **विसकटणें**–उक्रि. १ अस्ताव्यस्त करणें; ओढाताण करणें; रचना बिघडविणें; उसकटून टाकणें; सारासारी, हलवाहलवी करणें; उधळून टाकणें. 'धर्माला वेधाया धावें तो विप्रकटक विसकटून।' –मोद्रोण १०४. २ (ल.) गोंधळ, घोटाळा, अव्यवस्था करणें. [सं. वि+शकलन] **विसकटाविसकट**–स्त्री. ओढाताण; धसकाफसकी; अव्यवस्था; खेचाखेच; गोंधळ; घोटाळा; पसारा; अस्ताव्यस्तपणा. **विसकर्णें**–विसकटणें पहा.

विसकर्णें—अक्रि. दूध द्यावयाचें बंद होणें, आटणें; उडणें (दुभतें जनावर). **विसका**–वि. आटलेलें; भाकड; उडालेलें (दुभतें जनावर).

विसकरणें—उक्रि. विसकटणें; उधळणें; अस्ताव्यस्त करणें; पसरणें. [सं. विष्किर्. –भाअ १८३४.]

विसकळ—स्त्री. १ (शब्दः) पसरलेली, विलग स्थिति. २ (ल.) अव्यवस्थित, घालमेलीची, घोटाळ्याची, गोंधळाची स्थिति (धंदा, कारखाना, काम वगैरेची). –वि. १ (झाडें, घरें, वस्तू यांची) मोकळी; दूरदूरची; पातळ; बिनदाटीची (स्थिति). २ ऐसपैस; मोकळीचाकळी; लांबरुंद; उघडी; बंदिस्त नव्हे अशी (जागा, भांडें). ३ स्पष्ट; घळमळीत; मोकळेंचाकळें; बिनघोटाळ्याचें; काठिण्यरहित (भाषण, लेखन). **विसकळणें**–उक्रि. अस्ताव्यस्त, गैरशिस्त, घोटाळ्याचें, पांगापांग होऊन पडणें; गोंधळ माजणें; अव्यवस्थित होणें. **विसकळित**–भावि. १ अस्ताव्यस्त होऊन, पांगून पडलेलें. २ अव्यवस्थित, घोटाळ्याचें, गुंतागुंत झालेलें.

विस(सु)कुसणें—उक्रि. विस्कटणें; विसकळित होणें; गोंधळणें; घोटाळणें; बिघडणें. 'एवं द्वैतासी उमसों। नेदी ऐक्यासी विसकुसों।'–अमृ २.६९. 'तेचि बुद्धि जालिया विसुकुसे। कैसेनि आतां।'–ज्ञा ८.६७. **विसकुस-सें**–स्त्रीन. बिघाड; गोंधळ; अस्ताव्यस्तपणा; कासाविसी. **विसकूस**–वि. गोंधळलेली; विस्कटलेली.

विसंगत—वि. असंबद्ध; विजोड; बेताल; भरमसाट. [सं. वि+संगति]

विसंच—पु. बिघाड; घोटाळा; नाश. 'विसंच बहु जाला तरी लाज।'–दावि २६४. [सं. वि+सञ्च्] –वि. बिघडलेलें; नष्ट; नाहींसें. 'जेणें दृश्य केलें विसंच। तयास कैचा होय प्रपंच।'–दा ८.९.३२. **विसंचणें**–अक्रि. १ बिघडणें; नासणें; विकार पावणें. 'आकार लोपें न विसंचे। नित्यता गा।'–ज्ञा ८.१८०. २ त्रासणें; पीडा पावणें. 'क्रोधादि जलचरीं विसंचलों।'–विपू १.९०.

विसण—न. ऊन पाण्याची उष्णता कमी करण्यासाठीं त्यांत घालावयाचें थंड पाणी. [सं. वि+शमन; अनुष्ण; प्रा. अणुसिण–विसण–पाइअ]

विसणणें—अक्रि. आवेशयुक्त होणें; सरसावणें; चिडणें; उसळणें. 'आवेशें भुजा त्राहाटिती। विसणेले हांका देती।'–ज्ञा १.१३३. [सं. आवेशन]

विसंधित—वि. १ सांधा, जोड उखळलेलें; निखळलेलें. २ (ल.) असंबद्ध; विसंगत (भाषण वगैरे). [सं. वि+संधू]

वि(वी)सनखी—स्त्री. स्त्री. **विसनखीचा उपद्रव-पीडा-बाधा-दुःख**–स्त्री पु.न. संसर्गजन्यरोग; उपदंश; गरमी.

विसनख्या—पु. वीसनखें असलेला, कुत्रा वगैरे.

विसप-ब—पु. इसब; एक प्रकारचा त्वग्रोग. [सं. विसर्पिका]

विसपगोल—पु. इसपगोल पहा.

विसंब—पु. १ विश्रांति; विसावा. २ विस्मरण; त्याग.

विसंबणें, विसंभणें, विसमणें—अक्रि. १ विश्रांति, विसावा घेणें; भार टाकणें; थांबणें; विश्वास टाकणें. 'पुढतीं निरविसी संतां। नव्हे विसंबतां धीर तुज।'–तुगा ७१०. २ विसरणें; सोडणें; टाकणें; दूर ठेवणें. 'तूं मायावेषु तरि मज अज्ञाना। कां विसंबलासी।'–ऋ ३७. 'भगौनि न विसंबों ब्रह्मपदा।'–शिशु २०१. 'निधि निक्षेप जेंवि कृपणें। न विसंबिजे मानसी।'–मुआदि २५.१२८. [सं. वि+भ्रंस्; वि+भ्रम्]

विसर—पु. १ विस्मरण; विस्मृति; आठवण नाहींशी होणें. 'विसर हा बरा काय।'–मोआश्रम २.१०२. २ विसराळूपणा; स्मरणशक्तीतील दोष, व्यंग. ३ स्मृतिभ्रंश; भ्रम; भूल; भुरळ; धारणाशक्तीचा ऱ्हास. (क्रि० पडणें; होणें.) [सं. वि+स्मृ–विस्मरण; प्रा. विस्सरण] **विसर पाडणें-घालणें**–विसरावयास लावणें. 'जो मातृस्नेहाचा चित्तीं स्नेहें निजें विसर घाली।'–मोभीष्म ४.३९. **विसरीं पाडणें**–विसरविणें; विसरावयास लावणें. **विसरणें**–अक्रि. १ विस्मृति होणें; विसर पडणें; आठवण न राहणें. 'पशु चरों विसरेती'–दाव १८३. २ हयगय करणें; हेळसांड करणें. 'कीं देहभावो विसरैली।'–दाव १७२. **विसरत बोलणें**–असंबद्ध, विसंगत बोलणें; विचूक बोलणें. 'डुलत चालणें। विसरत बोलणें। नेणों काकुहास्य करणें। श्रीहरी नाथासीं।'. **विसरभोळा-ळ्या**-वि. विसराळू; विसरण्याचा स्वभाव असलेला; निष्काळजी; बेफिकीर. **विसरभोळ्या**–क्रिवि. विस्मरणामुळें; विसराळूपणानें; चुकून; हयगयीनें; अज्ञानामुळें. **विसर शील**–वि. विसराळू. –मोऐषिक १.१९. **विसरसांड**–स्त्री. दुर्लक्ष्य; हेळसांड; हयगय; क्षमा (अपराधाची). **विसराळू-ळ**-वि. १ विसरभोळा; लवकर विसरणारा; विसरण्याचा स्वभाव असलेला. २ निष्काळजी; हयगयखोर; बेफिकीर. **विसरी**–स्त्री. विस्मृति; विस्मरण; विसर. 'ते भोगूनि त्याची विसरी पडे जिवा।'–सिसं ७.१६. 'पाडून विसरी अवचित कोणीकडून येतो। ठरवून दृष्टीहि वर्त्से सोडून वेतो।'–होला ३६ **विसरून**–क्रिवि. विस्मरणानें; चुकून. 'परी कहीं न करिशी संभाषण। विसरौनियां।'–शिशु ८८.

विसर्ग—पु. मृदु महाप्राण; ह्कार; हा: या चिन्हानें दर्शवितात हा स्वरांच्यापुढें किंवा क, ख, प, फ, श, ष, स, हे वर्ण आले असतां पूर्व व्यंजनांतील अन्तस्थ अ स्वरापुढें येतो. तसाच अवसानीं येतो. प्रत्ययांच्या अंतीं असणाऱ्या स व र या व्यंजनाबद्दलहि याचा प्रयोग होतो. २ त्याग; विसर्जन; सोडणें; टाकणें. ३ पाद; पर्दन. 'विसर्गु पायूचें कर्म। कवण अपेक्षी याचे धर्म।'–गीता १३.४४०. [सं. वि+सृज्]

विसर्जणें—उक्रि. १ त्यागणें; सोडणें; टाकणें; सोडून देणें. २ मुक्त करणें; निरोप देणें; समाप्त करणें; बोळवण, पाठवणी करणें. 'सभा विसर्जोन रघुनाथ। प्रवेशते झाले सदनांस।' 'निरंतरातें आह्वानिती। विसर्जिती गा।'–ज्ञा ९.१६३. [सं. वि+सृज्] **विसर्जन**–न. १ त्याग; सोडणें; मुक्त करणें; टाकणें; उत्सर्ग. 'किरणविसर्जन.' २ पाठवणी; बोळवण; निरोप देणें; बरखास्ती. उदा० देवताविसर्जन. सभाविसर्जन. ०**क्रिया**–स्त्री. शरीरांतून बाहेर टाकण्याची क्रिया. (इं.) रेडिएशन. **विसर्जित**–वि. १ त्यक्त; मुक्त केलेला; सोडलेला; टाकलेला. २ बरखास्त केलेला; बोळवण, पाठवणी केलेला; निरोप दिलेला.

विसर्प—पु. इसब; घांवरें; एक त्वग्रोग. 'खोकलें खरूज अत्यंत। विसर्पे एकां'–गीता १३.२४९७. [सं.] **विसर्पिका**–स्त्री. विसर्प.

विसवटा—पु. विसांवा; विश्रांति.

विसा [स] **वणें** ...आर्क्रि. १ विसावा घेणें; विश्रांति घेणें. 'आइके जेथ वाचा विसवे। ते साधुकथा।' –ज्ञा ९.१८७. २ क्षणभर थांबणें; स्थिरावणें. ३ (एकाच स्थितींत किंवा फार वेळ स्थिर राहिल्यामुळें अवयव, गात्र) स्तंभित होणें; ताटकळणें; वळत नाहींसें होणें; संवेद, सराव नाहींसा होणें. ४ आळसावणें; ढिलावणें; मंदावणें; शिथिल होणें (मनुष्याचें शरीर, उत्साह, गात्र·वगैरे). ५ पडणें; खचणें; मोडणें (भिंत, तीर, खांब, तुळई वगैरे). –न. विश्रांतिस्थान. 'जें आदिप्रकृतीच विसवण।' –ज्ञा ६.१२. 'संसारतापतप्तां जीवां। विसंवणें जें।' –ऋ ५१.

विसंवता–पु. विसांवा घेणारा. 'चंद्रसूर्याचा चौबारामांदी दाटं। विसंवतेयांची।' –शिशु ९६. [सं. वि+श्रम्]

विसंवणें—अक्रि. थंड करणें; शांत करणें; विझवणें. 'अंगाराचा ग्राम करुनि। निर्वाणस्वरूपीं विसवुनी।' –विपू ७ ३. [सं. वि+शम्]

विसवा—पु. विश्वा पहा. विसावा भाग.

विसवाट—न. घराभोंवतीचें आवार; कुपण.

विसंवाद—पु. १ विरोध; विसंगति; अमेळ. 'म्हणोनिगा इये मातुचा। विसंवादु।'–ज्ञा ४.३८. २ भेद; वेगळेपणा; फरक. 'एथ एकमेकांचिये खुणे। विसंवादु तंवचि जिणें।'–ज्ञा १८. २९५. [सं.]

विसवाविसवीं—क्रिवि. आळीपाळीनें विसावा घेऊन; पाळीपाळीनें; वारगीपारगीनें.

विसविशीत—वि. मिसमिशीत; मऊ; घट्ट किंवा दडदडीत नव्हे असें; पिळदार नव्हे तें; पातळ विणीचें.

विसळणें, विसुळणें—उक्रि. धुणें; खळबळणें; पाणी घालून खळखळून टाकणें. [सं. विक्षालन] **विसळवणी, विसुळवणी**–न. विसळण्याचें पाणी.

विसा—स्त्री वीस; खंडी; वीस संख्येचें माप, समुदाय. [सं. विंशति]

विसाड—न. १ (प्र.) इसाड पहा. नांगराचा दांडा. २ कलम.

विसाण—न. विसण पहा. **विसाणणें**–उक्रि विसण घालणें.

विसाप-ब—पु. १ (प्र.) विसप-ब; इसब; एक त्वग्रोग. २ एक पाली सारखा लहान प्राणी; याच्या स्पर्शानें अंगावर विषारी कांटा उठतो. [सं. विसर्पिका]

विसार-रा—पु. बयाणा; आगाऊ घेतलेला पैसा; सचकार; इसारा. 'होतें गोविलें विसारें। माप जालें एकसरें।' –तुगा १९६०.

विसारणें—सक्रि. दूर लोटणें; दूर करणें; विसरविणें. 'आपुला मधुर स्वरीं। हे सदां कोकिळांतें विसरी।' –शिशु ८०३. 'ओभावीवो मधुकरू। विसारीं वो चकोरू।' –शिशु ८३९. [सं. वि+सृ; वि+स्मृ]

विसालता पन्हा—पु. स्नेह. 'लेकिन विसालता पन्हाचा जवाब मोहिबास येइतलग...' –पेद १.५. [फा.]

विसावण—न. विसण, विसाण पहा. [सं. वि+शमन; वि+शो=पातळ करणें –भाअ १८३४]

विसा(वि)वणें—अक्रि. विसवणें पहा. 'ते देखतां तिहीं लोकां। विसावली श्रीकृष्णचरणीं।' –शिशु १०८३.

विसा(सां)वा—पु. १ विश्रांति; आराम; कार्यनिवृत्ति. २ श्रमपरिहार; स्वास्थ्य; करमणूक. ३ श्रमपरिहारासाठीं, करमणुकीचें साधन. ४ विश्रांतिस्थान; आश्रय. 'विसांवा मोडला। साधुजनांचा।' –भाए १००. [सं. विश्राम; प्रा. वीसव; सिं. वेसांहि]

विसाळ-ळा—पु. १ ईर्षा; स्पर्धा; द्वेष. 'विसाळाचेनि नेटें। विष घ्यावस वाटे।' –दा २.६.१३. २ एकप्रकारची बाधा; पिशाचबाधा.

विसिने—क्रिवि. (भि.) वेंचून; गोळा करून. 'ते विसिने पारी चालतो वेग्यो' –भिक्षी १९.

विसि(सी)फ—पु. गुरें बसण्याच्या जागेंत आढळणारा किडा; विसाप. 'विसीफ भोवर गोचिड जाणा।' –दा ३.७.७. [सं. विसप]

विसीं—शअ. (अप.) विषयीं पहा.

विसुरणें—अक्रि. विसरणें पहा. 'मी माझेंपणु विसुरैले।' –दाव २५९.

विसुरा—पु. १ विचार; अभिप्राय; तात्पर्य. 'परिणामाचा हि विसुरा। सांगितला।' –ज्ञा १७.१५२. २ चमत्कार; विस्मय; आश्चर्य. 'अनंगा केउता हाथिएरु। फुन सदा विसुरा करी थोरू।' –शिशु २६५; –अमृ ७.२९४. ३ समुदाय. 'जे ते विश्वाळंकाराचे विसुरे।' –ज्ञा ६.२८. ४ चित्र. ५ भ्रांति; भ्रम. [सं. वि+स्मृ; विस्मय]

विसुळणें, विसुळवणी—विसळणें, विसळवणी पहा.

विसूचिका—स्त्री. विषूचिका पहा.

विसूत्र—वि. सरळ सुतांत नसलेलें; वांकडेतिकडें; अनियमित; अपवादभूत; असामान्य; स्वैर. [सं. वि+सूत्र=दोरा]

विसृंखळ—वि. (प्र.) विशृंखल; अनिबंध; पाशरहित. 'हो भीम पळ विसृंखळ खळखळखळ रक्तपूर दे बाहूं।'–मोसभा ६.११. [सं. वि+शृंखला]

विसृत—धावि. (प्र.) विस्तृत; पसरलेलें; विस्तारलेलें; लांबरुंद. [सं. वि+सृ]

विसोरा—पु. विसरा पहा. 'अनलें घेतल्या मंदिरा । माजि ठेवा विसोरा ।' –गीता २.१४४.

विसोळ—न. (गो.) बागायताभोंवतालची नंबरांतील जमीन. [सं. वि+शाली]

विसोळा—पु. घरटें. [सं. वि+शाला]

विसोरें—न. विसोरा-विसुरा पहा. 'विसोरें घरें सारें' –दावि ३९६.

विस्कटणें, विस्कटाविस्कट, विस्कळ, विस्कळणें, विस्कळित—विसकटणें इ० पहा.

विस्तर—पु. १ विस्तार; प्रसार; पसारा; फैलाव २ लांवण; पाल्हाळ. 'कथवे बहु युक्त विस्तरें न मला' –मोभीष्म ३ ३८. [सं. वि+स्तृ] **विस्तरणें**–अक्रि. १ पसरणें. २ लांवण लावणें; पाल्हाळ करणें.

विस्तव—पु. अग्नि; आग; जाळ; वन्हि. [सं वैश्वानर; इष्टावह; वैश्वदेव ?; विष्णु–विष्टु–विस्तु: –भाअ १८३३.] **मधून विस्तव न जाणें**–वितुष्ट असणें; वैर असणें. **विस्तवणें**–सक्रि. जाळणें (शब्दशः व लक्षणेनें).

विस्तार—पु. १ प्रसार; पसारा; फैलाव. २ (ल.) पाल्हाळ; लांबण; विकास; वाढ; विवेचन; प्रपंच (विषय, मुद्दा, बीज, गर्भ, रोप, प्राणि, काम, धंदा वगैरेचा). 'कल्याण नामा ग्रंथ विस्तारी' –सप्र १०.१६. ३ रुंदी. ४ झाडाच्या फांद्या, पालवी वगैरेचा व्याप. ५ प्रजा; संतति; संतान. [सं. वि+स्तृ] **विस्तारणें**–उक्रि. पसरणें; वाढ होणें; वाढवणें. **विस्तारित, विस्तीर्ण**–पसरलेलें; वाढलेलें; अफाट; अवाढव्य.

विस्तारणें—सक्रि. (कु.) निरनिराळें करणें. उदा० सागुती वगैरे. [सं. वि+स्तृ]

विस्तारी—स्त्री. पत्रावळ. [सं. वि+स्तृ]

विस्तावा—पु. इस्तावा पहा.

विस्तु, विस्तो, विस्तूव, विस्तोव, विस्तेव—पु. (प्र.) विस्तव पहा. 'विस्तु देखिल नाहीं घरीं।'–दावि १४८.

विस्तृत—धावि. विस्तार पावलेलें, केलेलें; अफाट; विस्तीर्ण; लांबरुंद; ऐसपैस; पसरलेलें; अथळपथळ.

विस्तृति—स्त्री. विस्तार पहा. वृद्धि; प्रसार; वाढ.

विस्फुलिंग—पु. अग्नीची ठिणगी. 'म्हणोनि आइके अर्जुना। जैसा विस्फुलिंग लागे इंधना।' –ज्ञा ३.३२९. [सं.]

विस्फोट—पु. फोड; गळूं; उठाणु; वेड; करट; केसतूड. [सं.]

विस्फोटक तूल—पु. ज्वालाग्राही कापूस; स्फोटक कापूस; भडकगारा कापूस; नत्रिकाम्लांत भिजविलेला कापूस. (इं.) गन-कॉटन. [सं.]

विस्मय, विस्मो—पु. आश्चर्य; चमत्कार; अचंबा; नवल. (क्रि० होणें; वाटणें). 'तंव तो पारधी विस्मो करी।'–पंच २.१. –ज्ञा १.१७७. [सं. वि+स्मि] **०जनक**–वि. आश्चर्यकारक. **विस्मयावह**–वि. आश्चर्यकारक. **विस्मापक**–वि. आश्चर्यकारक; चमत्कृतिजनक; चकित करून सोडणारें; थक्क करणारें. **विस्मापन**–न. आश्चर्यकारक गोष्ट; चमत्कृति. **विस्मावणें**–अक्रि आश्चर्य पावणें; चकित होणें. 'विस्मावला नाम धिग म्हणत।' –दावि २. **विस्मित**–धावि. आश्चर्यचकित. 'विस्मित होऊनि इंद्र ठेला।' –तुगा ८१. –ज्ञा १.५५९.

विस्मर—पु. १ विस्मरण; विसर; दुर्लक्ष. २ भूल; भ्रांति. [सं. वि+स्मृ] **विस्मरण**–न. विस्मर; विसर. **विस्मृत**–धावि. विसरलेलें; आठवण नसलेलें; लक्षांतून गेलेलें. **विस्मृति**–स्त्री. १ विसर; विस्मरण; विसराळूपणा; धारणाशक्तीचा अभाव, नाश. २ भूल; भ्रम; भ्रांति. **विस्मृतिखालीं पडणें**–संवयीची होणें.

विस्रगंध—पु. कच्चया मांसाचा वास; कुजकट घाण. [सं. विस्र+गंध]

विस्वर—पु. बेसूर आवाज; कर्कश आवाज; बदसुर; अपसुर. [सं.]

विस्वा—विश्वा पहा.

विस्वा—पु. (अप.) विसावा पहा. 'विस्वा न मिळे घडीभरी।' –गीता २.२१५८.

विस्वाद—वि. अरुचिकर; ज्यास स्वाद नाहीं असें; बेचव.

विस्वास, विस्वासघात, विस्वासणें—विश्वास इ० पहा.

विहग, विहंग, विहंगम—पु. पक्षी; पांखरूं; आकाशांत संचरणारा. 'झडपुनि तंव कर्मे भाग नेला विहंगीं।' –मुरामायण बाल. [सं. विह=आकाश+ग=जाणारा] **विहंगममार्ग**–पु. (योग) त्वरित समाधि साधण्याचा मार्ग; राजयोगाच्या उलट पिपीलिका मार्ग. 'पिप्लीका मार्गे हळु हळु घडे। विहंगमें फळासि गांठी पडे।' –दा २०.२.१०. 'लंगलें लयेतें अलक्षी। विहंगममाग।' –दा १४.४.३४. २ (ल.) कोणतेंहि कार्य लवकर साधण्याची पद्धति, रीत, मार्ग.

विहनन—न. हत्या. [सं. वि+हन्]

विहरण, विहार—नपु. १ क्रीडा; खेळ; करमणूक; गंमत; मजा; मौज. २ आनंदानें फिरणें, चालणें, भटकणें; सुखसंचार. 'जया ब्रह्मांडीं विहरण।' –विपू ४.६. ३ बौद्धांचा मठ; रहाण्याची जागा. ४ राहण्याचें ठिकाण, स्थान. 'कि महाबोधें विहार। केले जैसे।' –ज्ञा ५ १३८. **विहरण**–न. आळ; अपयश; निमित्त. 'गणेश गेला लाडू घेऊन। मजवरि आलें विहरण।' –ह ८.३०. 'म्हणे पुसावयासि गेलों सांकडें। तों विहरण मजकडे आलें कीं।'

–भवि ८.१४१. [सं. वि+हृ–हर्] **विह(हा)रणें**–अक्रि. विहार करणें; क्रीडा करणें. **विहारी**–वि. १ विहार करणारा; क्रीडा करणारा. २ रंगेल; चैनी; इष्कबाज; छंदी.

विहावो—पु. लग्न; विवाह. –क्षिप्रु.

विहा(ह्या)ळी—स्त्री. विहार; क्रीडा; शिकार. 'विचरे कामविहाळी। विषमपणेंचि निहाळी।' –आपद ५१.२. 'कव्हणी एकि वेळीं। एदु निगाला विह्याळी।' –भाए २५६.

विहिणें—सक्रि. विधान करणें; सांगणें; उपदेशिणें. 'तुम्हां वर्षविशेषवशें। आम्हीं हा स्वधर्मुचि विहिला असे।' –ज्ञा ३.८८. [सं. वि+धा] **विहित**–धावि. १ शास्त्रानें सांगितलेला, घालून दिलेला, निर्दिष्ट केलेला, उपदेशिलेला. 'येर योगिये कर्मा धारें। विहितेंचि निजाचारें।' –ज्ञा ३.४४. 'विहित तयासी यांची सेवा।' –तुगा ३३१४. २ योग्य; उचित; रास्त. 'वाडूनियम सदैव विहित कां गमला।' –मोसभा ३.७. ३ ठेवलेला; दिलेला; स्वाधीन केलेला. **विहितत्व**–न. कर्तव्यता; नियतत्व; कार्यप्रवणता. 'एऱ्हवीं विहितत्वें मांडीं। परी घालिता आसुरवाडी। तेथ पोळला ऐसा सांडी। आदरिलेंही।' –ज्ञा १८.१८९.

विहि(ह)रा, विहीरा—पु. १ मोठी विहीर; कुवा; बाव; बारव. 'सुते जों जों हातें करुन विहिरा हा उपसिजे।' –सारुह ७.१४२. [सं. विवर –भाअ १८३२] 'जैसा न मोडलिया विहीरा।' –ज्ञा १५.२६९. २ झरा; पाझर. 'डुरे विहीरे पाझर।' –दा १६.४.७.

विहीण—स्त्री. आपल्या मुलाची किंवा मुलीची सासू; व्याह्याची स्त्री.

विहीत—स्त्री. (कों.) (प्र.) वीत पहा.

विहीन—वि. रहित; विरहित; उणीव किंवा अभाव असलेलें; शिवाय, खेरीज, वांचून असलेला; शून्य. (समासांत) जलविहीनकूप, प्राणविहीन–देह; धनविहीन; अन्नविहीन, ज्ञानविहीन; एत द्विहीन, तद्विहीन. –ज्ञा २.३२४. [सं. वि+हा]

विहीर—स्त्री. आड; कूप; कुवा; बाव. **०हुंडा**–पु. बागाईत किंवा पाटस्थळ जमिनीवरील सारा, कर. 'नंतर धूर्त विशाळमती। सांगे विहीरहुंडा ठरोती।' पैमा. **०वणी**–न. विहीरींतलें पाणी. 'नाहीं आड ना विहीरवणी।' –एरुस्व १२.१४८.

विहू—पु. विभू पहा. १ व्यूह; सैन्यरचना. (क्रि० रचणें). २ कारस्थान; कट; बालंट. **विहू रचणें**–१ उपाय योजणें; तजवीज करणें. २ युक्ति लढविणें; क्लृप्ति काढणें. **विहू उभा करणें**–कट करणें; कारस्थान रचणें; मसलत उभी करणें.

विहृवल-लित, विहृळगीर—विव्हळ इ० पहा.

विळ—पु. १ ब्रह्मदेवाचा दिवस. 'जै चौकडिया सहस्र जाये। तैं ठायेठायो विळुचि होये।' –ज्ञा ८.१५६. २ काळ; वेळ. 'तुजपाशीं आम्ही बसतो सारा विळ।' –होला ८५. [सं. वेला]

विळौनि–क्रिवि. एका वेळेंत. 'वरुं अमरांमाजी अमरपती। विळौनि ते चवदा निमति।' –एभा ८.२५३. (पाठभेद).

विळचा–क्रिवि. एका वेळीं. 'आम्ही दोघे विळचा तये वृक्षि मिळो।' –पंच ३.१०.

विळखा-का—पु. वेढा; वळसा; वेटोळें; मिठी; पकड; फेरा; लपेटा. [का. ओळगु; सं. विश्लिक्षा–विळिसा–विळखा. –भाअ १८३४]

विळचण—न. (कों.) विसण; विसावण.

विळत—स्त्री. (कों.) १ कुदळयाचे शेवटीं लावावयाचें लोखंडी अग्र. २ (व.) वखरास वगैरे चिकटलेली माती काढावयाचें हत्यार; तुत्या.

विळपणें—क्रि. शोधणें; धुंडणें. 'विळपतां सांपडे जवळींच।' –दावि १८.

विळवणें—अक्रि. विवळणें पहा. [विव्हळ]

विळवणें—उक्रि. १ (राजा.) वळवणें; (ओझें वगैरे) वर उचलून देणें; डोक्यावर चढविणें. २ (ल.) टपका ठेवणें, लादणें; दोषारोप करणें.

विळविणें—उक्रि. वेळणें; वेळविणें; हलविणें.

विळविळणें—अक्रि. (साप, किडा वगैरे प्राणी अंगावरून) वळवळत जाणें; मऊ, गुलगुलीत स्पर्श करीत जाणें. [सं. वलन]

विळविळीत—वि. गिलगिळीत; मऊ; थिलथिलीत.

विळसण—न. (व) विसण; विसावण.

विळा—पु. कोयता; कापण्याचें हत्यार; विशेषतः पिकें कापण्याची तीक्ष्ण धार असलेली कोयती. [का. ईळिग] **विळाभोंपळा**–वांकडें; वैमनस्य.

विळासु—पु. विलास पहा. 'बोलिकेआं देवांचा विळासु।' –शिशु १५६.

विळी—स्त्री. भाजी चिरण्याचें साधन. 'काळखड्गा ऐसी विळी। किंवा असिलतेसारखी पळी।' –मुरंशु ३७७. [का. इळिगे]

विक्षा—स्त्री. पाहणें; टेहळणी. 'विक्षा विक्षा भक्तिमार्गेंचि विक्षा।' –दावि ४६९. [सं. वीक्ष्]

विक्षिप्त—वि. १ टाकून, फेकून दिलेला. २ पसरलेला; विसकटलेला. ३ भ्रमिष्ट; खुळा; चळलेला; बावरलेला (मंत्रतंत्र, भूतबाधा वगैरेमुळें). ४ (ल.) तऱ्हेवाईक; विचित्र; लहरी. 'तो गृदस्थ थोडा विक्षिप्तच होता असें मला वाटतें' –पकोघे. [सं. वि+क्षिप्] **०करण**–न. (नृत्य) हात व पाय पुढच्या किंवा मागच्या बाजूस जसे एकदां टाकले असतील तसेच पुन्हां

टाकणें. ०आक्षिप्तक करण-न. (नृत्य) हातपाय हवेतसे दूर फेकून पुन्हां जवळ आणावयाचे ही क्रिया.

विक्षेप—पु. १ (शब्दशः) वर, बाजूला, इकडेतिकडे टाकण्याची क्रिया. २ चित्ताची व्यग्रता; लक्ष्य न लागणें; विचारांचा, मनाचा गोंधळ, गडबड, घोटाळा; मनाची चंचलता. 'तेणें बहुतीं जन्मीं मागिलीं। विक्षेपांची पाणिवळें झाडिलीं।' –ज्ञा ६.४७१. ३ विषाद; आश्चर्य; अचंबा. –पया २०६. 'कीर्तनामाजीं येताचि विघ्न। विक्षेप पावलें सकळांचें मन।' ४ बुद्धिभ्रंश; भ्रम; भ्रांति (जादूटोणा, मंत्रतंत्र, भूतबाधा वगैरेमुळें). ५ विपरीतज्ञान; भ्रम उत्पन्न होण्याचें एक कारण (दुसरें कारण आवरण). 'तो विक्षेप जडभ्रांति।' –यथादी १.२३७. 'परी दोन्हींमध्यें विक्षेप। शून्यत्वाचा।' –दा ८.५.६१. ६ (ज्यो.) शर; ग्रहाचें याम्योत्तर अंतर. ७ अडथळा; विघ्न. [सं. वि+क्षिप्] ०केंद्र-न. (ज्यो.) शरकेंद्र. ध्रुव-पु. (ज्यो.) ग्रहाच्या कक्षेचा परमकल. ०वृत्त-न. ग्रहाची कक्षा.

विक्षोप—विक्षेप पहा. 'विक्षोप आणिला राज्याला।'–ऐपो १३१.

विज्ञ—वि. विद्वान; जाणता; ज्ञानी पुरुष; विशेषज्ञ. 'तदुचित करवीती विज्ञ दैवज्ञ दानें।' –सारुह २.५.

विज्ञप्त, विज्ञप्ति—स्त्री. विनंति; विज्ञापना पहा. **विज्ञप्त**–वि. विज्ञापित; विनंति केलेलें; सांगितलेलें. 'यांस पूर्वी विज्ञप्त केलेल्या गोष्टींची आठवण करून द्यावी'. –विवि ७.१४१.१८७६. [सं. वि+ज्ञा]

विज्ञात—धावि. विशेष माहितीचा; ओळखीचा; माहीत असलेला; ठाऊक असलेला; कळलेला; समजलेला.

विज्ञाता—वि. जाणता; जाणणारा.

विज्ञान—न. १ विशेषज्ञान; शास्त्रीयज्ञान; तत्त्वज्ञान. २ ब्रह्मज्ञान; ईश्वरविषयक सत्यस्वरूपाचें ज्ञान; अपरोक्षज्ञान. 'एकाच मूलभूत अव्यक्त द्रव्यापासून भिन्नभिन्न अनेक व्यक्त पदार्थ प्रत्येकीं कसकसे निर्माण झाले हें ज्यानें समजतें तें विज्ञान होय.' –गीर १६६. 'मुक्तीचा ठेवा हारतला। विज्ञानाचा मठु फुटला।'–भाए ८८. ३ सामान्यज्ञान; माहिती; परिचय; ओळख. ४ अनुभवज्ञान; जाणीव. ५ प्रपंच; जग. 'जें ऐसेंही परि विरुळें। इये विज्ञानाचिये खोळे। हालविलेंही गळे। तें परब्रह्मो।' –ज्ञा ८.१७ [सं.] ०परंपरा-स्त्री. ज्ञानपरंपरा पहा. ०मय कोश-पु. आत्मा अथवा चैतन्याच्या आवरणाच्या पांच कोशांपैकीं चौथा कोश; जड वस्तूमध्यें जीवाची, चैतन्याची जाणीव. पंचकोशपहा. ०शास्त्र-न. ज्ञानाचें व स्वरूप व उत्पत्ति यांचें शास्त्र. (इं.) एपिस्टेमॉलॉजी. ०संतति-स्त्री. ज्ञान विषयांची किंवा कल्पनांची परंपरा, श्रेणी. बौद्धमताप्रमाणें आत्मा पंचस्कंधात्मक असतो व विज्ञान हा पांचवा स्कंध होय. बौद्धांच्या एका पंथाच्या मतें विज्ञान म्हणजेच पूर्ण आत्मा होय. ०स्थिति-स्त्री. सिद्धावस्था; सिद्धदशा; ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान झाल्याची अवस्था. 'ज्ञान प्राप्ति होतां सोहंपण। नाहंपणें विज्ञान स्थिति।' –स्वादि ११.४.८७. **विज्ञानात्मा**–पु. वस्तुमात्राचें ज्ञान, आधिभौतिक ज्ञान म्हणजेच विज्ञान अथवा आत्मज्ञान ऐहिकापलीकडे आत्मा असा निराळा पदार्थ नाहीं हें मत. बौद्ध अथवा नास्तिकांचें असें मत आहे.

विज्ञापक—वि. ज्ञान देणारा; उपदेशक; शिक्षक. [सं. वि+ज्ञा] **विज्ञापणें**–उक्रि. १ ज्ञान देणें, सांगणें; कळविणें; ठाऊक, माहीत करणें. २ विनंति करणें. **विज्ञापन**–न. ज्ञानदान; शिक्षण; उपदेश; शिकवण. **विज्ञापना**–स्त्री. १ नम्रपणें श्रेष्ठ, थोर गृहस्थास केलेली विनंति, प्रार्थना, अर्जे; सांगणें; माहिती देणें; ठाऊक करणें. २ वरप्रमाणें केलेली विनंति, दिलेली माहिती; सांगितलेली गोष्ट; खुलासा; तकरारअर्जी. 'भवतारका जी सुजाणा। एक विज्ञापना पायांपाशीं।' –तुगा ७३१. ३ सामान्यतः ज्ञान देणें; शिकवण; उपदेश; दिग्दर्शन. ४ वडील मनुष्यास पत्र लिहितांना विनंतीवजा वापरावयाचा शब्द, मायना. **विज्ञापनीय**–वि. सांगण्यासारखें; विनंति करण्यासारखें; माहिती देण्यासारखें. **विज्ञापित**–धावि. १ आदरपूर्वक सांगितलेलें, कळविलेलें, सुचविलेलें, दिग्दर्शन केलेलें. २ ज्यास विज्ञापना केली आहे तो. **विज्ञाप्ति**–स्त्री. (प्र.) विज्ञप्ति. विज्ञापना पहा. **विज्ञाप्य**–वि. विज्ञापनीय पहा. **विज्ञेय**–वि. जाणण्यास योग्य; ज्यासंबंधीं ज्ञान करून घ्यावयाचें तें.

वी—क्रिवि, प्रसवणे या क्रियापदाचें रूप. 'खरा जनक तूं जना इतर कोण हो देव वी।' –केका ४.२६.९३. 'नवी रीति प्रेमा विटवुनि दयासागर नवी।' –मोरामायणें १.४०६. [विणें]

वी—पु.स्त्री. १ गमन. २ पक्षी. –हंको. [सं. वीक]

वीकर—वि. चंचल. 'होत करकर चित्त वीकर।' –दावि ८१. [सं. विकृत]

वीख—न. विष; विख पहा. [विष] **म्ह० वीख घेववतें पण भीक घेववत नाहीं** (भिक्षा मागण्यापेक्षां मरण सोपें वाटतें). **विखार-री**–विषार-री पहा.

वीखीं—विषयीं; विखीं पहा. 'विरे मस्ति वीखीं उद्धवें।' –दावि ३५५. **वीखो**–पु. विषय. **वीखया**–विषयी. 'कन्हणी एकु वीखया असे' –दृष्टांतपाठ ३७. [सं. विषय]

वीचि—पु. लाट; तरंग; जललहरी. 'देहाभिमाचा वारा। आतां बाजो ठेला वीरा। तैं ऐक्य वीचि सागरां। जीवेशा हे।' –ज्ञा १४.३०५. [सं.] **वीचितरंग न्याय**–पु. पाण्यांत एक लाट उत्पन्न होते. तिला मागची लाट पुढें ढकलते, हिला तिच्या

मागची, असें होत होत क्रमाक्रमानें सर्व लाटा किनाऱ्यावर आपटून फुटत असतात. त्याप्रमाणें एका पिढीचीं माणसें मरण पावतात. त्याच्या मागून त्यांच्या जागीं दुसऱ्या पिढीचीं माणसें येतात, पुढें तींहि मरतात. ही जगाची रहाटी.

वीज—स्त्री. १ घर्षणानें उत्पन्न होणारी एक निसर्गशक्ति; विद्युत्; सौदामिनी; बिजली. 'जैसी वीजुची दाटी।' –उषा ७३. २ मेघगर्जना; विजेचा कडकडाट. 'वीज कडकडली.' 'कडकडून वीज पडली.' ३ वज्र; कुलिश; वीज पडणें. [सं. विद्युत्; प्रा. विज्ज; पं विज्ज; सिं. विजु; गु. वीज] **विजेचें चमकणें**–विजेचें लखलख करणें. (ल.) क्षणिकपणा. 'पाण्यावरचा बुडबुडा पहा. **विजेसारखा**–वि. चंचल; क्षणिक. **वीज विहिरा**–पु. वीज पडून तयार झालेली विहीर, डबकें. हा केव्हांहि कोरडा पडत नाहीं अशी समजूत आहे. [वीज+विहिरा] **वीजुलता**–स्त्री. विद्युल्लता. 'कल्पांताचीया वीजुलता।' –उषा ९८.

वीजण-णें—न. विंझण्यानें-पंख्यानें वारा घालणें. [सं. व्यजन] **वीजणें**-क्रि. वारा घालणें; पंखा वारणें. 'मग पद्मिनीचा पाणि–वाळां। वीजितीं हळुहळुं।' –शिशु ७८८. –एभा १५.१७४. **वीजन, वीजण-णा**–पुन पंखा. 'न घालि वो वारें वीजनें। कमळदळाचें।' –शिशु ८३४. 'च्यामरें वीजणे विळासनी।' –वेसीस्व १.८४. [सं. व्यजन]

वीजन—न. (मद्दानु.) बैठक; आसन. 'भिक्षुकांचीं वीजनें। तेणें डोळे धाती।' –ऋ १५ [हिं. बिछाना]

वीट—पु. १ कंटाळा; ओकारी; तिरस्कार; शिसारी. 'मनीं वीट मानु नये। शिकवणीचा।' –ज्ञा २.२.१०. –मोभीष्म ४.५०. २ मेकाड; मोवा; एक रोग. ३ अनादर; अपमान; वाईट प्रकारें वागविणें. बिघाड, विचका झालेली स्थिती (मसलती, कामें, पदार्थ इ० ची). ४ खेद. 'कां दरिद्रलिये बुद्धी वीट। तोही नाहीं।' –ज्ञा १४.३२८. [विटणें] **वीटणें**–विटणें पहा. 'परंतु बहु मंद मी म्हणुनि सत्सृती वीटती।' –केका ५९.

वीट—स्त्री. ईट; इमारतीच्या बांधकामासाठीं मातीचा भाजलेला किंवा कच्चा चतुष्कोनी एक पदार्थ; ईट पहा. 'चयनांतील हेमाच्या बदल्याने त्यासि भार घनवीट। जाणीं म्हणती तेव्हां पासुनचि इष्टकेसि जन वीट।' –मोअश्व. [सं. इष्टका; प्रा. इट्टा; हिं. ईंट] ०**बंदी**–स्त्री. विटांनीं बांधणें; विटांचें बांधकाम. –वि. विटांनीं केलेलें (बांधकाम).

वीट—पु. १ विट पहा. २ वाईट चालीचा माणूस. 'समूह जेथें बसती विटांचें।' –सारुह ६.५५. [सं. विट]

वींटा—स्त्री. विटी (खेळांतील दांडू बरोबरची). 'वींटा हस्तीं ओपिली' –मुआदि ३०.१११; –मोआदि २४.९.

वीटा—पु. एक प्रकारचा भाला. इटा पहा. 'नवुसे रंगीत भाले। वींटेपटेवाले।' –होला १६६.

वीटि-टी, वीटिका—स्त्री. १ विडा. (संस्कृताचा डौल आणून थेटें बहुधा योजतात). 'सकल सोयरि आणिती वीटिका।' [सं.] 'मुखीं धेतसें कापुरें युक्त वीटी' –लक्ष्मीनारायण कल्याण नाटक शके १६०४.

वीड—पुन. १ मनगटाचें माप (बांगडी वगैरेसाठीं). 'तुझ्या हाताचा वीड मजपाशीं आणवा.' २ माप; नमुना. ३ जात; प्रकार. वींड पहा.

वींड—स्त्री. ईंड; एक प्रकारचें लिंबू (झाड व फळ); ईंड-लिंबू.

वींडी—स्त्री. १ विडा. 'मीं नेदीं फोडी। तरि गोसावी नेसति वींडी।' –भाए १३८. २ धूम्रपानाची विडी, बिडी. [सं. वीटिका, विटी]

वीण—स्त्री. १ निपज; जन्म; वेत; खोप; जनन. 'वाकुत्रयाचिये खाणीं। लागली शब्दरत्नांची वीणि।' –ऋ २५. २ विण्याचा काल; निपज होण्याचा ऋतु, काल, हंगाम [विणें]

वीण—स्त्री. १ सणंग; थान; विणलेली वस्तु. २ विणायाची घाटणी, प्रकार, बनावट, विणकाम. [विणणें]

वीण—शअ. शिवाय; खेरीज. 'परि श्रवणें वीणु सुख पाविजे।' –दाव १०; –ज्ञा १३.२२. विना पहा. [सं. विना]

वीणा—स्त्री. एक प्रकारचें भोपळ्याचें तंतुवाद्य; तंबोरा. याचे पुष्कळ प्रकार आहेत. 'हा गे नाद वीणे। तुज न साहे उच्च गाणें।' –शिशु ६९४. "सुरमुनिस रुचों देती निजवीणेचाहि न राजन्य।' –मोभीष्म ११.७६. [सं.] ०**काव्य**–न. (वीण्याच्या नादावरोबर गावयाची कविता) रसात्मक, भावपूर्ण काव्य; भावगीत. (इं.) लीरिक. [सं.] ०**पाणी**–स्त्री. सरस्वती. [सं.]

वीत—वि. गेलेला; नाहींसा झालेला. [सं.] सामाशब्द–०**कल्मष**–वि. ज्याचें पाप व दोष नाहींसे झाले आहेत असा. **वीतकाम-क्रोध-लोभ-मोह**–ज्याचा काम, क्रोध, मोह इ० नाहींशी झाली आहेत असा. [सं.] ०**राग-वीतरागी**–(अशिष्ट) विरागी. ज्याच्या इच्छा, आकांक्षा नाश पावल्या आहेत किंवा ज्यानें विकार ताब्यांत ठेविल आहेत असा. २ विरक्त; वैराग्यशील. –ज्ञा ४.६१; –भाए १८४. –पु. विरक्तता; वैराग्य. ०**रागता**–स्त्री. वैराग्य. 'वीतरागतेसारिखा। जोडुनि ठेविला सखा। तो आघवीयाचि भूमिका। सवें चाले।' –ज्ञा १८. १०४३. ०**शोक**–वि. शोकरहित. [सं.]

वीत—न. १ वेत पहा. २ प्रसूति; जनन; वीण पहा.

वीत—स्त्री. करंगुळी व आंगठा हीं ताणलीं म्हणजे त्या मधील अंतर (आंगठा आणि तर्जनी यांमधील अंतर ती टीच). बारा अंगुळांचें माप. वितस्ति पहा. [सं. वितस्ति] (**आपल्या पुरती, आपल्या भोंवती**) **०काढणें**–(संकटाच्या वेळीं) आपल्या पुरतीच फक्त सावधगिरी व काळजी बाळगणें; दुसऱ्या-संबंधीं बेपर्वाई दाखविणें (निंदार्थी). **०काढणें**-(पेरण्या-साठीं जमीन भाजतानां) गवत इ० उपटून आग पसरूं नये म्हणून भाजण्याच्या व न भाजण्याच्या जमीनीमध्यें अंतर सोडणें किंवा फट पाडणें. **वीतभरपोट**–पोटाचा आकार फार मोठा नसतो; त्याला फार लागत नाहीं या अर्थानें वापरतात. ' या वीतभर पोटासाठीं सर्व उठाठेवी. ' –विवि ८.२.२१.

वीत—न. द्रव्य. ' भ्रमें नाडळें वीत तें गुप्त जालें ' –राम १२८. [सं वित्त]

वीतका पुंजी—मुलींचा एक खेळ. –मखेपु ३४२.

वीतणें—क्रि. वर्तणें; घडणें. ' तें कवतिक वीतलें आइका । शरीरौनीं निगाली ज्योतिकळिका । ' –शिशु १०८३. [सं वृत्-वर्त]

वीतरेक—व्यतिरेक (अप.) पहा. ' अन्वये आणि वीत-रेक । हा शब्दभेद कोणी एक । ' –दा ९.२.२१; ६.६.४९.

वीतुटि—स्त्री. वियोग. ' देवेसीं जालेयां वीतुटि । आपणेया नाणावी जीविताची कुटी । ' –भाए १४४. [वि+तुटणें]

वीथ—स्त्री. वितस्ति; वीत पहा.

वीद—स्त्री. (व.) उकिरडा. [सं. वीथि–बीद, बिदी पहा.]

वीद—स्त्री. (गो.) दुर्बुद्धि.

वींदान—विंदान पहा. ' अया–घडीता तोची वींदानी । ' –उषा ७४. ' तीये वींदाने लागती डोळा ' –उषा ९७.

वीध—पु. १ लग्नानंतर पहिल्या वर्षी करावयाचे मानपान, सणवार इ०; एकमेकांकडे मिठाई, फराळाचे जिन्नस इ० पाठविणें. २ असें पाठविलेले जिन्नस, केलेला मानपान. ३ (सामा.) विधि. ४ मंत्र; प्रयोग; उतारा; विधान. ' वीध केलिया प्रेतें । सावध होती । ' –दा ९.८.२०. –स्त्री. (अशिष्ट) उत्सव; समारंभ; कोणताहि संस्कार; विशेष प्रसंग. [सं. विधि]

वीधवाट—स्त्री. विल्हेवाट. [विधि+वाट]

वीधान—न. (प्र.) विधान; विघ्नसंहारक संस्कार, उपाय. ' स्वामियाशीं वीधान काय कीजे । ' –देवनाथ, श्रावणाख्यान ४.

वीधोळणें—क्रि. उधळणें; नाहींसें होणें. ' तेणें वीधोळले मेघ । ' –उषा १५४. [उधळणें]

वीप—स्त्री. (महानु.) लाज. ' कां चालितां गति विलासीं । इआं वीप लाविली राजहंसी । ' –शिशु ८०४.

वीप्सा—स्त्री. २ सर्वत्र व्याप्ति; अवयवांच्या, घटकांच्या बरोबर संबंध गोष्टीचा समावेश. २ द्विरुक्ति (आज्ञा, भाषण शब्द इ० ची) [सं.]

वीभाडणें—क्रि. पराभव करणें. ' वीभाडीलें भुमासुरातें । ' –उषा ७३. [सं. वि+भंड्]

वीभिचारु—पु. संचार; अवतार. ' संपूर्णसींहुं नावरु । देवता अंगीचि वीभिचारु. ' –ऋ ७२. [सं. व्यभिचार]

वीर—स्त्री. १ ईर. शक्ति; जोम; रग; (ल.) पर्वा; भीड-भाड. ' मराठे मनुष्य पळूं लागल्यावर कोणाची वीर कोणास नाहींशी होते ' –भाव ८४. २ तेज; गुण; प्रभाव. ३ श्रेष्ठता; उत्कृष्टपणा. (बुद्धिबळें) अधिकाराचें क्षेत्र, टापू. ३ (बुद्धिबळें) राजास बचावण्यासाठीं एखादें मोहरें मध्यें घालणें. (क्रि० सोड-विणें) [सं. वीर्य] **विरेंत घालणें**–मध्यें घालणें, मध्यें टाकणें. बुद्धिबळाच्या डावांत राजास शह देणारें मोहरें व राजा यामध्यें मोहरें टाकणें. ईर पहा.

वीर—पु. योद्धा; लढवय्या; शूर पुरुष; उत्साही मनुष्य (लढाईंत, दुसऱ्याची आपत्ति दूर करण्यांत किंवा दान करण्यांत). ' आणीकही द्रौपदीकुमर । हे सकळही महारथी वीर । मिती नेणिजे परी अपार । मीनले असती । ' –ज्ञा १.१०२. २ नवरसांपैकीं एक:–उत्साह, शौर्य, पराक्रम दाखविणारा भाव. ३ ज्याचा कोणी पूर्वज लढाईंत मेला असून, जो फाल्गुन वद्य प्रतिपदेचे दिवशीं, योद्धयाच्या समारंभानें देवदर्शनासाठीं जातो असा. ४ वरील मृत मनुष्याचा देवांमध्यें बसविलेला टांक. ' वीर बैसविला देव्हारां । ' –दावि ६३. ५ मोठया मनुष्याची मरणोत्तर दशा. –बदलापूर ४९२. ६ विशेषनाम, हुद्दा किंवा वर्णनपर नांव यांस जोडून येतो; त्यावेळीं पुढारी, प्रमुख, श्रेष्ठ असा अर्थ होतो. उदा० रघुवीर; कुरुवीर; यदुवीर; दैत्यवीर; कपिवीर; भक्तवीर; वदान्यवीर इ० ' तैसा तुका वैष्णववीर । अवीट आवडी त्याची थोर । मोजुनि त्याहि कृष्णवीर । स्वहस्तें चौगुणें घेती वर. ' ७ एक पदवी. कोण-तेही धाडस, उत्साह, औदार्य, परोपकार, जनकल्याण इ० गुणा-विषयीं प्रसिद्ध असलेल्या पुरुषास लावतात. उदा० वीर नरीमन, वीर वामनराव.–वि. १ शूर; पराक्रमी. २ वैराग्यशील. [सं.] सामाशब्द– **०कंकण**–न. वीर पुरुषाचा मान म्हणून, पराक्रमाचें द्योतक असें मनगटांत घातलेलें कडें. ' वीर कंकण घालितां नाकीं । परी तें शोभा पावेना कीं । ' –दा ७.९.१५. **०कन्या**–स्त्री. (वीर पुरुषाची मुलगी) युद्धप्रिय, धाडशी, खंबीर मनाची स्त्री. वीर-भार्या, वीरपत्नी, वीर भगिनी हे समधर्मी शब्द होत. [सं.] **०कल्लु**–पु. (गो.) वीराचा दगड; वीरगळ. [का. कल्लु=दगड] **०गड**–पु. घोसाळा किल्ला. –शिदि १५१. **०गंठी**–(महानु.) वीरगुंठी पहा. ' विरली रुळती वीरगंठी । '–दाव २४४. **०गर्जना**–

स्त्री. वीराच्या आरोळ्या (आव्हान, उत्तेजन देणाऱ्या). [सं.] **०गांठ**–स्त्री. विशिष्टप्रकारची केसांची गांठ; वीरगुंटी पहा. 'बार्सीगे हीरेयाची जोती मीरवती वीती वीरगांठी।' –धवळेपू ६९. **०गुंटी**–स्त्री. विशिष्ट प्रकारानें केंस बांधणें; वीराला शोभण्यासारखी डोक्यावरील केंसाची गांठ. 'अविरळ कुरळांची मस्तकीं वीरगुंटी।' –सारुह ८.११८. 'सरसावुनी वीरगुंटी।' –मुसभा ७. १७; –ह १९.३७. **०घंटा**–स्त्री. दौंडी पिटण्याचें साधन अशी घंटा; एकच वाद्य. 'डौंडीची ढवंस ढोला। वीरघंटा तांबकिया।' –शिशु १०२६. **०घोषणा**–स्त्री. वीरगर्जना; योद्धयांना युद्धास निमंत्रण. [सं.] **०जननी**–स्त्री. जिचीं मुलें शूर, पराक्रमी आहेत अशी स्त्री; वीरमाता. [सं.] **०जयंतिका-जयंति**–स्त्री. युद्धप्रसंगीं किंवा युद्धांत विजय मिळाल्यावर योद्धयांनीं केलेला नाच; युद्धनृत्य. [सं.] **०ठाण**–न. वीरासन. [सं. वीरस्थान] **०दृष्टि**–स्त्री. (नृत्य) डोळे लाल करणें, बुबुळें उंच नेणें; डोळ्याचा मध्यभाग विकासित करणें (वीररसाचा अभिनय). **०पट्ट**–पु. वीराचें ललाटपदक; शिरताज. **०पत्नी**–स्त्री. वीराची भार्या, बायको; वीरकन्या पहा. [सं.] **०पाण**–न. युद्धापूर्वी किंवा युद्ध चालत असतांना, जोर येण्यासाठीं वीरांनीं नवचैतन्यवर्धक पेय पिणें. [सं.] **०पोर**–वि. १ बोंबल्या; अरेराव; रगडमाळ; धटिंगण माणूस. २ (प्रशंसार्थी) उत्साही, धाडसी माणूस. **०प्रसू**–स्त्री. शूर अशा पुत्रांना प्रसवणारी स्त्री; वीरमाता. [सं.] **०भगिनी**–स्त्री. वीराची बहीण. [सं.] **०भद्र**–पु. १ दक्षयज्ञाचा विध्वंस करण्यासाठीं शंकरानीं जटेपासून निर्माण केलेला वीर पुरुष; अकरा रुद्रांपैकीं एक. २ (ल) उग्र स्वरूपाचा व विनाशक प्रवृत्तीचा मनुष्य. ३ शिवगणांचा एक वर्ग. ४ लिंगायत लोकांमधील एक विशेष दीक्षा. ५ रागीट, हट्टी व सुधारणार नाहीं अशा मुलास म्हणतात. [सं.] **०भाग**–पु. वीराचा भाग; शूर पुरुषाची वस्तू. 'मी तंव तुझेचि अर्धांग। केवीं शिशुपाळ शिवेल माझे आंग। तूं शिरावरी असतां श्रीरंग। मी वीरभाग यदुवीरा।' –एरुस्व ४.१६. **०भार्या**–स्त्री. वीरपत्नी; वीराची बायको; वीरकन्या पहा. [सं.] **०भाषण**–न. वीराची भाषा; वीराचें वचन. [सं.] **०माता**–स्त्री. शूरांची आई; वीरजननी पहा. [सं.] **०मुष्टि**–पु. मद्रासइलाख्यांतील एक भिकाऱ्यांची जात. हे लोक शारीरिक करामतीचे खेळ करून पैसे मिळवितात. हे लिंगायत धर्माचे आहेत. **०रस**–पु. वीराला युक्त अशी भावना, विकार; नवरसांपैकीं एक, याचे चार विभाग पडतातः–विद्या, युद्ध, दया व दान. वीररसाचें उदा० गर्वोक्ति फाल्गुन बघे जगदेकराया। आहे मशीं कवण तो झगडा कराया। म्यां कालखंज वधिले अतुलप्रतापी। पौलोमही असुर गोसुर विप्रतापी।'–वामन, भीष्मप्रतिज्ञा. [सं.] **०राणा**–वि. वीरश्रेष्ठ. 'पाठीं धरा वाहक वीरराणा। चाले करें वोढुनि चापबाणा।'–मुरामायण अयोद्धया. **०वाद**–पु. वीराचें प्रतिपक्षीयास युद्धासाठीं केलेलें आव्हान; युद्धास निमंत्रण. [सं.] **०विलास**–पु. वीराची क्रीडा. –वि. वीरांना ज्यांपासून विलास (आनंद) होतो असा (अर्जुन). 'हारपलें दावूनि जैसा। मागु सरे वीरविलासा। ज्ञानचि कळस वळघे तैसा। कर्मप्रसादा।' –ज्ञा १५. ५८६. **०वृत्ति**–स्त्री. वीराची प्रकृति–शौर्य, पराक्रम. 'तयाचि तुलगासवें। वीरवृत्तीचेनि थावें।' –ज्ञा १.१२७. **०वैष्णव**–पु. १ वैष्णवांचें आचार कडकडीत पाळणारा एक वर्ग. याच्याप्रमाणें वीरशैव असा एक वर्ग आहे. २ वैष्णववीर; कट्टर, थोर वैष्णव. 'तैसा तुका वैष्णववीर। अवीट आवडी त्याची थोर।' [सं.] **०शय्या**–स्त्री. रणभूमि. [सं.] **०शैव**–पु. लिंगायतांचा एक वर्ग. **०श्री**–स्त्री. १ अंगांत संचरणारें शौर्याचें वारें; स्फुरण; वीराचें यश; अब्रू. २ शौर्य. 'कीं अतिथीविण भोजन। कीं वीरश्रीविण रण।' [सं.] **०सभा**–स्त्री. योद्धयांची सभा. [सं.] **०सू**–स्त्री. वीरमाता; वीरजननी पहा. [सं.] **०हंता**–वि. वीरांचा पराभव करणारा किंवा त्यांस ठार करणारा. **०क्षेत्र**–न. बडोदें. 'वीरक्षेत्रीं महाराज प्रथुत्तम खंडेराव राजे बहादूर।' –गापो ११. **०क्षेत्री**–पु. क्षत्रीयवीर. 'वरी विराजे वीर–क्षेत्री। हरिश्चंद्र नृपनाथ।' –मुहरिश्चंद्राख्यान नवनीत पृ. १८३. **वीरासंसन**–न. युद्धांतील वीरांनां प्रिय अशी जागा; प्राणावर बेतण्याचा जेथें प्रसंग येतो अशी धोक्याची जागा. [सं.] **वीरासन**–न. १ डावा गुढघा मोडून व उजवा उभा करून, किंवा दोन्ही गुढगे जमीनीस टेंकून बसणें; आसनाचा एक प्रकार. योद्धयाची बसण्याची रीत (युद्धांत बाण सोडतांना, दरबारांत किंवा समेंत बसणें झाल्यास). (क्रि० घालणें, धरणें). २ वीराची बसावयाची जागा, आसन इ० ३ रणभूमि. [वीर+आसन] **वीरेंवीर**–क्रिवि. एकूणएक वीर. 'वीरेंवीर बुडाला। अवघा हळकल्लोळ जाला। महारुद्र खवळला। ज्ञाते लोक जाणती।' –दावि ४९६. [वीर+वीर]

वीरंग—पु. बेरंग. 'लोभे जाहला वीरंग।'–रामदासी अभंग (नवनीत पृ. १४९). 'अभिनव नटलीला रंग वीरंग माजे।' –दावि ३७. [वि+रंग]

वीरडें—न. (महानु.) पालवी; (प्र.) विरडा–डें. 'तुझे या अनुरोगाचें वीरडें। जयाचिये हृदये भूमिके नवडे।' –भाए २३३.

वीरस—पु. स्नेहाचा पान्हा. ओरस पहा.

वीरु—न. (प्र.) वैर पहा. 'आणि मग तुज वीरु करील।' –पंच ३.१०. 'कांई वीरू घेतलें। तें तू जाणैसी।' –शिशु १०५.

वीर्य—न. १ शुक्र; रेत. २ पराक्रम; प्रभाव; सामर्थ्य; जोम; श्रेष्ठता. ३ पदार्थमात्राचेअंगीं जो तत्कार्यार्थ संपादक शक्तीविशेष असतो तें. 'देशी वनस्पति गोळा करून त्यांचे गुणधर्म व त्यांतील

वीर्यें आणि उपयुक्त पदार्थ यांची माहिती करून घेण्याच्या मार्गें लागला.' –सेंपू २.१०. ४ कस; रग; बल; निश्चय; चिकाटी; धैर्य (जडाजड वस्तूंमधील). (समासांत) मंदवीर्य, हतवीर्य, नष्टवीर्य, उष्णवीर्य, तीव्रवीर्य; इ० ५ शौर्य; वीरता. [सं. वीर्=पराक्रमी होणें] **०वान्**–वि. १ ज्याच्या शरीरांत शुक्र किंवा रेत आहे असा. २ (ल.) बलवान्; जोमदार; गुणवान; श्रेष्ठ. ३ संपादनशक्ति किंवा चिकाटी असलेला; समर्थ. ४ शूर; पराक्रमी; धैर्यशील. [सं.] **०विलास**–पु. पराक्रमाचें कृत्य. –वि. पराक्रम हाच ज्याचा खेळ आहे, ह्यातचा मळ आहे असा. 'एंव मागील जैसे तैसें। तेणें देखिले वीर्यविलासें।' –ज्ञा ११.६६३. **०हीन**–वि. बलहीन; शौर्यरहित; शक्तिहीन; निर्बल. **०शाली**–वि. वीर्यवान पहा. **वीर्यावीर**–वि. शूरत्वानें शूर. 'तुका म्हणे वीर्यावीर। संतधीर समुद्र।' –तुगा १८१४.

वीलु—स्त्री. वेळ. 'येक पदमात्र योजितां। वीलु न पुरे।' –गीता २.३४५४. [सं. वेला]

वीवर—न. विवर पहा. १ पाताळ. 'शंख फुंकिला यादववीरें। नाद माजला सात वीवरें।'–वामन, विराट ७.३२. २ गुहा; भुयार. 'कपाटे कडे वीवरे आणि टाकी।' –दावि ३४९. [विवर]

वीवा—उज्ञा. (गो.) नमस्कार करतांना व 'चिरंजीव' या अर्थी म्हणावयाचा शब्द. [इं. पोर्तु. व्हीव्हा!]

वीष—न. विष पहा **वीषार-री**–पु. सर्प. 'ऋष्णु वेढीला विषारी।' –उषा ५०. –वि. विषार-री पहा. [विषारी]

वीषइ-यी—वि. विषयी पहा. 'अती वीषई सर्वदा दैन्य वाणा।' –राम ६४.

वीस—वि. २० संख्या. [सं. विंश(ति); प्रा. वीस; पं. बीह; सिं. वीह; फ्रें.जि. बीश-स] **म्ह०** वीसां नाहींतर तिसां नाहीं तर जशाचा तसा=विसाव्या वर्षी शहाणपण नाहीं आलें तर तिसाव्या वर्षी येईल पण तिसाव्या वर्षीहि न आलें तर मात्र तो (मनुष्य) आहे तसाच जन्मभर राहणार. **विशी एकूणविशी-वीस होते ते एकूण वीस होणें** म्हणजे कमी प्रमाण असणें. 'आतां आपली प्रकृती कशी आहे? कांहीं विशी एकूणविशी वाटते का?' –रंगराव **०नखी-नखीचा**–वि. १ (ना.) वीस पाय असलेला (एक क्षुद्र विषारी प्राणी). २ स्त्रीवद्दल सांकेतिक शब्द. –संगीत घोटाळा ११. ३ वीस बोटें असलेला (कुत्रा इ० प्राणी). ४ गरमी रोग. **वीस नखीची-नखांची बाधा**–स्त्री. १ (बायकी) गर्भारपण; पोटिशी राहणें. 'कसला रोग अन् कसलें काय? –वीस नखांची बाधा झालेली.' –झांमू. २ गरमी. ३ व्यभिचाराचें व्यसन. **वीसोवा**–पु. विसावा हिस्सा. पाटण शिलालेख शके ११२८. [सं. विंशोपक]

वीसदेओ—पु. (महानु) विस्तव. 'कां गा ओंबीया बाजा ना कां जी जिः वीसदेओ नाहि.' –लीळाचरित्र. [सं. विश्वदेव]

वीसादय—पु. (महानु.) विस्तव. बीसदेओ पहा. 'वीसादयास सेणी लावीत.' –पूजावसर.

वीसाहाणी—स्त्री. (महानु.) विसावणी; विसावा? 'फुण वीसाहाणीचें राऊतु परितिलें। तें साहातीचि ना।' –शिशु ९६३. [सं. वि+श्रम्]

वीळ—पु. वेळ पासून झालेला अशिष्ट अपभ्रंश; दिवसाचा वेळ, सबंध दिवस, सकाळ किंवा दुपार, समय काल या अर्थी वापरतात. 'पिंगा अवघा वीळ वो। स्वरूपी माझ्या मीळ वो।' –मध्व ३७८. –राला ८४. 'वीळभर (दिवसभर) काम केलें.' –स्त्री. भरती (समुद्राची); वेला. (क्रि० लागणें; येणें; होणें). [सं. वेला; म. वेळ]

वीक्षण—न. १ अवलोकन; पाहणें. २ पाहण्याचें साधन (नेत्र इ०). [सं.] **वीक्षणें**–क्रि. पाहणें; बघणें; दर्शन घेणें; अवलोकणें. [सं. वीक्ष्] **वीक्षित**–वि. अवलोकित; पाहिलेलें. [सं.]

वु, वू—हीं अक्षरें मूळ मराठी शब्दाच्या सुरवातीस आढळत नाहींत. कांहीं टिकाणीं हीं अक्षरें बोलण्यांत व लिहिण्यांतहि आढळतात. परंतु तसा उच्चार व तसें लिहिणें हें व्याकरणशुद्ध नाहीं. ते उ, ऊ यांचें चमत्कारिक व कटु उच्चार होत. उदा० 'तुटे जळे वुडे वुडे।' –दा ६.६.२२. वुन (ऊन्ह) –मोआदि ३५.८१. वून (ऊन). मोविराट २.६८. वु–वू नें सुरवात होणारे शब्द उ–ऊ मध्यें पहा.

वुइल—न. मृत्युपत्र. [इं.]

वुगदा—पु. (व.) भुगा; चुरा.

वुंड—पु. लाडू; पिंड. **उंड-डा** पहा. 'तिधींचें करीं तीन वुंड, पुत्र जन्मती हो।' –भज ८२. [प्रा. उंडी; का. उंडे] **वुंडी**–स्त्री. बलिदान; उंडी पहा.

वुंब—स्त्री. (बे.) ओळ.

वृक—पु. लांडगा. 'ते व्याघ्र वृक आठवे। तैसिये करी।' –माझा १६.४०८. [सं.] **०युध्द्**–न. गनिमी लढाई; लपून हल्ला करणें. –शिदि १७९-८०. **वृकोदर**–पु. भीम. 'तो पूर्वदिशे वृकोदरु।' –शिशु ७३१. –वि. (लांडग्यांचें पोट किंवा लांडगा पोटांत असलेला); फार खादाड, आधाशी.

वृक्क—पु. मूत्रपिंड; गुर्दे. इं. किडनी. [सं.]

वृख—पु. वृक्ष. 'कीं वृखिआमध्यें कल्पतरु।' –ज्ञिपू १.१. १२४. **रुख** पहा. [सं. वृक्ष]

वृजिन—न. १ दुःख; क्लेश. 'निस्तरणें पडे वृजिन।' –रास १.३३१. २ पाप; दुराचरण. 'असंख्य गोवधांचें वृजिन।' –रंयोवा ४.३३०. [सं.]

वृंत—न. देंठ; पुष्प किंवा फल ज्याशीं संबद्ध होऊन राहिलें असतें असा वृक्षादिकांचा अवयव. [सं.]

वृतबंध—पु. (प्र.) व्रतबंध. 'आधीं गौळनी भोगिजे। पाठी वृतबंध कीजे। हें कीं वैराग्य देवाचें।' –शिशु ७००.

वृंताक—नपु वांगें (फळ व झाड). 'वृंताक माष मसुर लवण।' –गुच ३२.३४. [सं.]

वृत्त—न. १ भाकित. 'घघरोरीं बोलवी वृत्तें।' –विपू ७.४७. २ आचरण; वर्तन; पद्धत; वहिवाट; शिरस्ता. 'शील त्याचें अत्युच्चरम्य वृत्त।' –टिक ६९. ३ उद्योग, धंदा; निर्वाहाचें साधन म्हणून व्यवसाय; वृत्ति पहा. ४ बातमी; वार्ता; हकीकत; माहिती. 'सांग तें वृत्त तुझ्या जननीला।' –आकृचरित्र १८. ५ छंद; कवितेच्या प्रत्येक चरणांत किती अक्षरें असावींत याचें मापन. ६ वर्तुल; मंडळ; गोलाला कोठेंहि सरळ पातळींनें कापिलें असतां होणारा वर्तुळाकार. ७ गोल पदार्थ; गोळा. –वि. वर्तुलाकार; वाटोळें; मंडलाकार. [सं.] **०खंड**–न. (गणित) वर्तुळाचा अर्धा भाग; वृत्तांश; (इं.) सेक्टर. **०चिति**–वर्तुळस्तंभ; नळ, पंचपात्र यासारखा आकार. (इं.) सिलिंडर. **०पत्र**–न. १ वर्तमानपत्र; जाहीर बातमी, खबर किंवा तत्संबंधी कांहीं ज्ञानप्रदर्शन, टीका, जाहिराती इ० ज्यांत असतात तें पत्र. **०पाली**–स्त्री. परीघ (वर्तुळाचा). [सं.] **०मध्य**–पु. वर्तुळाचा मध्यबिंदु; केंद्र. [सं.] **वृत्तांश**–पु. (भूमिति) वृत्तखंड पहा. [सं.] **वृत्तांत**–पु. वृत्त; बातमी; वार्ता; माहिती; हकीकत. [सं.] **वृत्ति**–स्त्री. १ आचरण; वृत्त; शिरस्ता; वहिवाट. २ रीत; ओळ; पद्धत; वर्तनक्रम; निर्वाहक्रम. 'हरिनीं श्ववृत्ति वरिली।' –मोविराट १.१००. ३ धंदा; पेशा; निर्वाहाचा उद्योग; चरितार्थाचें साधन. –ज्ञा १८.८२०. 'सांचविले वृत्ति करुनि पक्वाची उंदुंबरीं बदरी।' –मोकृष्ण ८७.६६. 'सुज्ञ प्रभु तूं यातें इंडाया, वृत्ति द्यावया स्वामी।' –मोसभा ३.७४. 'गुरुचे शेतीं न चढे वारी। प्राणत्यजीन निर्धारी। गुरुचें वृत्तिनिमित्त।' –गुच १६.५४. ४ आवृत्ति; नेहमीं उपयोग, वापर (विशिष्ट अर्थानें एखादा शब्द किंवा वाक्प्रचार याचा). ५ मनाची स्थिति, भावना (राग, करुणा, भीति, काळजी इ० ची); मनोव्यापार. 'रडत रडत मूर्छेमाजि वृत्ती बुडाल्या।' –वामन, भामाविलास (नवनीत पृ. ९९). –ज्ञा ९.२५२. –एभा ७.२८४. (समासांत) उदास–औदार्य–खिन्न–तामस–प्रसन्न–म्लान–शांत–शोक–संतोष–सौम्य–हर्ष–हास्य–वृत्ति. ६ (साहित्य) काव्य–नाटयप्रबंध रचनेचे चार प्रकार–कौशिकी, भारती, सात्वकी व आरभटी प्रत्येकीं. ७ टीका; विवरण; स्पष्टीकरण. टीका पहा. ८ वर्तुळ किंवा वर्तुळाचा परीघ; वृत्त पहा. ९ स्फूर्ति; स्फुरण. –मनको. १० वाचकता, व्यंजकता, लक्षणा इ० अर्थबोधाचे प्रकार प्रत्येकीं. ११ शेत; इनाम जमीन; वतन; सालीना मिळणारी रक्कम. वृत्ति राजाला काढून घेतां येत नाहीं किंवा बक्षीसहि देतां येत नाहीं. –भाद्विसंवृ. 'अनादि जे प्रकृती। सांख्य जियेतें गाती। क्षेत्र हे वृत्ती। तियेची जाणा।' –ज्ञा १३.३५. 'नव्हे मठपति। नाहीं चाहुरांची वृत्ति।' –तुगा १८१६. 'होता वृत्ति राखीत।' –गुच १९.४. १२ स्वभाव; धर्म. [सं.] **०क**–पु. वतनदार. 'अगा मानस हें एक। माझ्या स्वरूपीं वृत्तिक।' –ज्ञा १२.९७. **०च्छेद–च्छेदन**–पु.न. वंशपरंपरागत असलेल्या निर्वाहसाधनाचा नाश; वतनजप्ती; वंशपरंपरागत हक्क काढून घेणें. [सं.] **०पत्र**–न. ज्यावर किंवा ज्यामुळें वृत्ति नेमून दिली जाते तें पत्र; आज्ञा–वतनपत्र. **०पंथ**–पु. वृत्तीचा, व्यापाराचा मार्ग. 'ते भेदली वृत्तिपंथें। वायुशक्ति गा एथें। कर्मकारण चौथें। ऐसें जाण।'–ज्ञा १८.३४३. **०शास्त्र**–न. व्यापार, धंदा इ० चा विचार–चर्चा करणारें शास्त्र; अर्थशास्त्र. (इं.) एकॉनॉमिक्स. –मसाप २.३.१०३. **०शून्य**–वृत्तिरहित. 'शून्य सांडोनि निरवकाश। तेंचि कृष्णहृदय साबकाश। संती केला रहिवास। वृत्तिशून्य होउनी।'–एरुस्व १.३८. **०स्थिति**–स्त्री. समस्थिति; दोन्हीं बाजूस वजन व तोल सारखें राहतील अशी स्थिति. (इं.) ईक्विलिब्रियम. 'पक्ष्यांची आकृतीहि त्यांच्या वृत्तिस्थितीस फार सुंदर रीतीनें जमते.'–मराठी ६ वें पुस्तक (१८७५). ५. **०मंत–मान–वंत**–वि. १ उपजीविकासाधन जी जोशीपणा इ० नियत वृत्ति ती ज्यास आहे तो; वतनदार. २ स्थिर; स्थायिक. **वृत्तीचा विच्छका**–पु. १ एखाद्याच्या निर्वाहाच्या साधनाचा नाश, वृत्ति बुडणें. २ वृत्ति गेलेली स्थिति. **वृत्यंश**–पु. संपत्ति, हक्क किंवा निर्वाह साधन यांतील भागी. [सं.] **वृत्यंशी, वृत्यांशी**–वि. वृत्तींतील वांटेकरी, भागीदार. [सं. वृत्यंशी]

वृत्ती—स्त्री. वृत्त; वार्ता. 'वृत्ती कोण्ही नेणती।' –मुआदि २९.१३२. **वृत्तीक**–१ वार्ता आणविणारे. 'जे वृत्तीक आले हृदईं। अनुरागाची।' –ऋ ६६. २ वृत्तिक पहा.

वृत्त्यनुप्रास—पु. अनुप्रास अलंकाराचा एक पोटभाग. एकच अक्षर फिरून फिरून येणें. याच्या उलट छेकानुप्रास. बरींच अक्षरें पुन्हां पुन्हां येणें.

वृत्रघ्न, वृत्रारि—पु. वृत्रासुराला मारणारा (इंद्र). [सं.] **०शत्रु**–पु. इंद्रजित. [सं.]

वृथा—त्रिवि. व्यर्थ; विनाकारण; निष्फळ. [सं.] **०दान**–न. निष्फळ, बिन कि.फायतशीर देणगी (खुशामतयां, वेड्या, मळ इ० स दिलेलें बक्षीस, खेळांत घालविलेला पैसा). [सं.] **०पुष्प**–पु. (व्यर्थ खाऊन माजलेला) १ आळशी; निरुद्योगी

निरुपयोगी. ' सार सेविजे श्रेष्ठीं । असार घेइजे वृथावृष्टी । ' –दा ६.९.१०. २ फुकटखाऊ; भोजनभाऊ; खाऊपासरी. [सं.]

वृंद—न. १ सभा; समाज; मंडळी; जमाव; मनुष्यादिकांचा समुदाय. ' देवा संतवृंद नमस्कारिजे । कां घडे तरी पूजिजे । ' –ज्ञा २.३३. २ मोठी रास; ढीग. ३ नांवाजलेला, प्रसिद्ध मनुष्य; प्रस्थ (आडा विद्वान्–सावकार इ०). [सं.] ०**गायन-वादन**–न. ज्या गायनांत–वादनांत गाणाऱ्या–वाजविणाऱ्या व्यक्ती एकापेक्षां जास्त असतात तें. ०**नर्तन**–न. सामुदायिक नाच. ०**संगीत**–न. सामुदायिक गायन. ह्या गायनपद्धतीमध्यें स्त्रीपुरुषांची मिसळ असते. ' वृन्दसंगीताचा परिपाठ फार प्राचीन आहे. ' –ज्ञाको (व) २२६. **वृंदी**–स्त्री. समुदाय, वृंद ' घडलें जें आसुरिया दोषवृंदी । ' –ज्ञा १६.२८०.

वृंदारक—पु. देव; अमर. ' पुष्पसभार उदंड । वृंदारक वर्षिती । ' ' जयजयकारा प्रवर्तले ते वृंदारक संभारानें. –होला २८. –वि. १ सर्वोत्तम; श्रेष्ठ; सर्वो कृष्ट. २ आदरणीय; सन्मान्य; सुप्रसिद्ध. ३ नेता; पुढारी; प्रमुख [सं.]

वृंदावन—न १ ज्यांत तुळशीचें झाड लावतात असें दगड-मातीचें लहान चौकोनी विशिष्ट बांधकाम; तुळशीची कुंडी. २ गोकुळाशेजारील एक पौराणिक बन. येथें पूर्वी श्रीकृष्णाची क्रीडा करण्याची जागा असून हल्लीं हें यात्रेचें स्थान आहे. ' कशी जाऊं मी वृंदावना । वाटे आडवा येतो कान्हा । ' ३ एक प्रकारचें झाड. कइ–गोड वृंदावन असे याचे प्रकार आहेत. –तुगा २९०७. कइ वृंदावन पहा. ' द्राक्षापेक्षां वृंदावन सुंदर दिसतें. ' –नामना ३. [सं.]

वृद्ध—वि. १ वयातीत; म्हातारा; जरठ. ' वृद्ध तपस्वी पितृ पद सेवन सर्वस्व पुंडरीक मुनी । ' –भक्तमयूरकेका १२. २ पूर्ण वाढ झालेला; योग्य विकास पावलेला. ३ मोठा (गुणादिकांनीं); (शहाणपण, ज्ञान इ० त) प्रगति झालेला. (समासांत) विद्या-वृद्ध; वयोवृद्ध; तपोवृद्ध; ज्ञानवृद्ध. ४ श्रेष्ठ. ' तरी अवघाचि गुणीं वृद्ध । जे महर्षीमाजि प्रबुद्ध । काश्यपादि प्रसिद्ध । सप्तऋषी । ' –ज्ञा १०.९२. ५ वृद्धि पावलेला; जमून, सांठून वाढलेला; पुंजीभूत. [सं.] ०**कपि**–पु १ जरख, फार म्हातारा. २ (ल.) चांगला अनुभवी; मुरलेला. ' पंचवीस वर्षे काम केलेले वृद्धकपी कौन्सिलर सांगतात. ' –टि २.१४६. ३ (विशेषतः अनादरानें) वृद्ध गृहस्थ. ' तुझ्या ओळखीच्या गृहस्थाकडे गेलों आणखी ते एखादे जर कां वृद्धकपी असले तर आपल्या हिंडण्या फिंडण्याला विनाकारण अडथळा यायचा. ' –पिंगला. [सं.] ०**काक**–पु. (म्हातारा कावळा) टणक, निरोगी वृद्ध गृहस्थास योजतात. काटक म्हातारा. ०**गंगाधर चूर्ण**–न. एक प्रकारचें औषधी चूर्ण (संग्रहणी, अतिसार यांवर देतात) –योर १.४४८. ०**पतंग**–पु. मावळणारा सूर्य ' तया गीती तेणें उणिव क्षण ये वृद्ध पतंगा । ' –वामन, विराट ८.१२. [सं पत(तं)ग=सूर्य] ०**परंपरा**–स्त्री. १ मागच्या वृद्धवृद्ध माणसांकडून चालत आलेली वहिवाट, चाल. २ (ल.) प्रमाणभूत, पूज्य आचार, वर्तन. ०**प्रमदा न्याय**–जरठ-तरुणी दांपत्य न्याय, (प्रमदा=अतिशय मदनावेग असलेली स्त्री तिच्यापुढें वृद्ध पुरुष न टिकून त्याची फजिती होते यावरून). ' हे अवहेलना करणारे मात्र कल्पनेचे जड ठरून वृद्धप्रमदा न्यायानें उपहास्य होतात. ' –नि ७९. ०**संघ**–पु. वयोवृद्ध मंड-ळीची सभा; वडील माणसांचा संघ [सं.] **वृद्धाचार**–पु. वृद्ध-परंपरेनें चालत आलेली, पूर्वापार वहिवाट, रिवाज; पूर्वजांची, वडील माणसांची अतएव आदरणीय रीत. ' परमामृते भरूनि वाटी । देवकी लावी सुनेच्या वोटीं । पुसे वृद्धाचार गोष्टी । सुने घालीसी पोटीं निजमाये । ' –एरुस्व १८.३८. –एभा १३.१५४. **वृद्धा-चारीचे देव**–पुअव. जुने देव; कुलदेवता. ' वृद्धाचारीचे पूजिले देव । ' –दावि ३३. [वृद्ध+आचार] **वृद्धापकाळ**–पु. म्हातारपण; म्हातारपणचा काळ; वार्धक्य. ' कठिण काळीं वृद्धापकाळीं । सर्व-काळीं अंतकाळी । नामस्मरण असावें. ' –दा ४.३.१४. वृद्धाप्य पहा. **वृद्धाप्य**–न. म्हातारपण. ' मजही वृद्धाप्य आलें । लेंकीं वेगळें घातलें । ' –दा ३.५.३३. –ज्ञा ७.८६. [वृद्ध+आप्-आप्य ?] **वृध्दावस्था**–स्त्री. म्हातारपण. [वृद्ध+अवस्था] **वृध्दि**–स्त्री. १ वाढ; विस्तार; प्रमाणाधिक्य; वाढलेली अवस्था (आकार, वय, संपत्ति, दर्जा इ० ची). ' रिगे मन्वंतर मनूपुढें । वंशावरी वंशांचे मांडे । जैसी इक्षुवृद्धी कांडेनकांडें । जिंके जेवीं । ' –ज्ञा १५.१२८. २ व्याज; वाढ; (उसना दिलेला पैसा, धान्य इ० ची) वाढी. ३ सोयेर; घरांत कोणी प्रसूत झालें असतां येणारें अशुचित्व. ४ चंद्र व सूर्य यांच्या कलांची वाढ; चढती दशा. ५ सूर्योदयापूर्वी सुरू होऊन दुसऱ्या सूर्योदयानंतर संपणारा चांद्रदिवस किंवा तिथि. नक्षत्र, योग यांचें आधिक्य. ६ अंडवृद्धि. ७ (व्या.) अ, इ (ई), उ (ऊ), ऋ यांच्या बद्दल अनुक्रमें आ, ऐ, औ व आर हे वर्ण येणें. ८ –पु. ज्योतिषशास्त्रांतील सत्तावीस योगांपैकीं अकरावा योग. ०**जीविका**–स्त्री. व्याजावर किंवा सावकारीच्या धंद्यावर उपजीविका; सावकारी. ०**प्रमाण**–न. (गणित, भूमिति श्रेढी) वाढीचें प्रमाण. [सं.] ०**श्राद्ध**–न. नांदीश्राद्ध. ०**सूतक**–न. सोयेर. सूतक पहा. **वृद्धिंगत**–वि. वाढीस लागलेलें; प्रगति होत असलेलें; वाढणारें; वृद्धि पावत चाललेलें. **वृद्ध्याजीव**–पु. सावकारी करणारा; पैसे व्याजानें लावून, वाढीदिढी करून उपजी-विका करणारा माणूस.

वृद्धि—स्त्री. चामडें. –माझा १८.२७. [सं. वर्धी]

वृय—वि. १ संतुष्ट. ' दाऊनि गुरुराजा वृय कीजे । ' –दावि ४५७. २ श्रुत. ' वृय दंडक त्याचा ऐसा असे । ' –दावि ४५८.

वृश्चिक—पु. १ विंचू. 'व्याघ्र वृश्चिक आडवे। तैसिये करीं।' –ज्ञा १६.४०८. २ आठवी रास या राशींत विशाखा पाद, अनुराध व ज्येष्ठा या नक्षत्रांचा समावेश होतो. [सं.] ०करण–न. (नृत्य) दोन्ही हात वर नेऊन डोक्याच्यावर वांकडे करून ठेवणें, उजवा पाय पाठीकडे उंच नेणें, व पाठ खूप वांकविणें. ०निकुट्टित करण–न. (नृत्य) उजवा पाय पाठीकडे डोक्यावर उंच नेऊन दोन्ही हात जमिनीवर टेकविणें व त्यांचीं बोटें जमिनीवर आपटणें. ०रेचित करण–न. (नृत्य) उजवा पाय वृश्चिक करून हाताचें स्वस्तिक करणें, व हात एकमेकांपासून दूर करून रेचित करणें. **वृश्चिकापसृत(अंगहार)**–पु. (नृत्य) वृश्चिकचरण करून उजवा हात ललाटय करणें; नंतर तोच हात नाकासमोर आकुंचित करुन उद्वेष्टित करणें. नंतर नितंब फिरवून करिहस्त आणि कटिच्छिन्न हीं करणें.

वृष—पु. १ बैल. वृषभ पहा. 'वृषगजीं वेढिला। केला रावो।' –ज्ञा १४.३६२. २ पंधरावा संवत्सर. ३ कर्णराज; कुंतीपुत्र कर्ण. 'तो वृष भूमिप्रस्तस्यंदनचक्रासि उद्धरायातें।' –मोकर्ण (नवनीत पृ. ३४३). वृषसेनाचा पुत्र. कर्णाचा नातू यालाहि म्हणतात. ४ पुरुषाच्या चार जातींपैकीं एक. [सं.] ०स्कंध–पु. बैलाचें वशिंड. **वृषिन्**–वि. (शाप.) बैलाचें. (इं.) टॉरीन. –केंपू २. **वृषोत्सर्ग**–पु. मृताप्रीत्यर्थ वसु सोडणें; इष्टकामनासिद्धयर्थ विशेषतः उत्तरक्रियेंत गोऱ्हा आणि कालवड सोडणें. [वृष+उत्सर्ग]

वृषण—पु. अंडकोश; अंड. 'गंगाधर तात्या यांचे वृषण घागरीयेवढे जाले घोडियावर बसतां नये असें जालें.' –भाब ८१.

वृषदुमा—पु. बैलासारखा एक प्राणी; बैलाची एक जात. 'रेडे बोकड येडके वृषदुमे सौगंधिकें मांजरें।' –सारुह ३.४७. [सं. वृष+फा. दूय्यम]

वृषभ—पु. १ बैल; नंदी. 'तद्दा वृषभासि दाणा। तृण मागों नये जाणा।'–तुगा ५४५५. २ बारा राशींतील दुसरी रास. हींत कृत्तिका त्रिपाद व रोहिणी यो व मृगशीरार्ध नक्षत्रांचा समावेश होतो. ३ (समासांत उत्तरपदीं) श्रेष्ठ व्यक्ति. [सं.] ०क्रीडितकरण–न. (नृत्य) आधीं टाळी देऊन दोन्ही हात रेचित करणें व मग ते वांकवून वक्षःस्थळासमोर नेणें. ०ध्वज–पु. शंकर. [वृषभ+ध्वज=पताका]

वृषल—पु. १ शूद्र; कुणबी. २ चंद्रगुप्त राजा. ३ बहिष्कृत झालेला, अधार्मिक दुराचारी माणूस. [सं.] **वृषल स्त्री**–स्त्री. १ शूद्र स्त्री. 'दासी वेश्या भुजगणेसीं। वृषल स्त्री रजस्वलेसी।' –गुच २९.२२५. 'मा ह्याचर कुभांड रचून मला वृषली ठरविलें.' –चंद्रगुप्त ५८ २ व्यभिचारिणी. ३ लग्नापूर्वी रजोदर्शन होत असलेली ऋतुमती स्त्री. **वृषलीपति**–पु. ज्यानें उपभोगार्थ शूद्र स्त्री बाळगिली आहे असा ब्राह्मण.

वृषा—पु. लगामाचा एक प्रकार. –अश्वप १.१८५.

वृषाकपि—पु. १ एक वैदिक देवता. २ शिव. 'तीं स्वायुधें शमीवरि ठेवविता राघवा वृषाकपिला। स्मरुनि कपि उडे विजयश्री ज्यासि भजे जसी वृषा कपिला।' –मोविराट ६.५८. ३ विष्णु इ० देव. 'अस्त्रबळीं शस्त्रबळीं संधानीं लाघवी वृषाकपिसा।' –मोभीष्म १२.४७. [सं.]

वृष्टि—स्त्री. १ पाऊस; पावसाचा वर्षाव. २ (ल.) (बाण, फुलें, दगड, अस्त्रें इ०चा) वर्षाव; सारखा प्रहार; पुष्कळ पतन. ३ (शिव्या, शाप, उपमा, मुद्दे वचनें इ०चा) भडिमार. (क्रि० एकसारखे देणें; सोडणें; टाकणें). [सं. वृष्=शिंपणें]

वृक्ष—पु. झाड; झुडुप; रोपटें. (सामा.) वनस्पति. [सं.] ०राज–पु. (झाडांचा राजा) झाडांतील प्रमुख वृक्ष (वड, पिंपळ, आपटा, शमी, चोबचिनी इ०). ०वाटिका–वाटी–स्त्री. १ राई; बन. २ बाग; उद्यान; उपवन; (विशेषतः विलासक्रीडा करण्यासाठीं). ०संवर्धन–न. झाडांची जोपासना करणें; झाडें लावून काळजीपूर्वक वाढविणें. **वृक्षायुर्योग वेद**–पु. वृक्षांचें आयुष्य वाढविण्यासंबंधी शास्त्र. [सं. वृक्ष+आयु+योग+वेद] **वृक्षासादक, वृक्षोपवेशक**–पु. झाडावर वसणारा एक पक्षिवर्ग. असे पांच वर्ग आहेत. चटक पक्षी. –मराठी ६ वें पुस्तक (१८७५) पृ. २१९. –प्राणिमो ६३. [वृक्ष+आसादक, उपवेशक]